# भगवद्गीता

## परिवर्तनाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान

**साहेबराव शामराव जवंजाळ**



**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# भगवद्गीता:
# परिवर्तनाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# भगवद्गीता

## परिवर्तनाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान

The Philosophy of Change Management


लेखक

साहेबराव शामराव जवंजाळ

# भगवद्गीता: परिवर्तनाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान


## लेखक... साहेबराव शामराव जवंजाळ

पत्ता- साकार अपार्टमेंट, १४५ अंबाझिरी हिलटॉप, नागपूर ४४००३३M: 7400173637M: ७४००१७३६३७,
फोन नं . ०७१२ २२२६०३४
मोबाईल ९३२५५०५०३७
Email: sahebraoj.sj@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : २५ डिसेंबर २०२० (गीताजयंती)**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# साहेबराव शामराव जवंजाळ



जन्म : २६ ऑक्टोबर १९४५

;

काटोल जि. नागपूर

हल्ली मुक्काम व पत्ता -

साकार अपार्टमेंट, १४५

अंबाझिरी हिलटॉप नागपूर

४४००३३

शिक्षण :

बी. एस. सी. (मोहता कॉलेज

व हिस्लॉप कॉलेज नागपूर)

बी. एस. सी. टेक(लक्ष्मीनारायण इंस्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी नागपूर)

व्यवसाय :

निवृत्त उपनिर्देशक, खादी ग्रामोद्योग कमिशन (भारत सरकार)

महात्मा गांधी व आचार्य विनोबा भावे यांची कर्मभूमि असलेल्या वर्धा येथील खादी ग्रामोद्योग कमिशन अंतर्गत ग्रामोद्योग अनुसंधान संस्था (महात्मा गांधींनी स्थापन केलेली ) येथे २५ वर्षे वास्तव्य.

साहित्य :

१. नागपूर पत्रिका (नागपूर टाईम्स ग्रुप) नागपूर या वर्तमानपत्रातुन १९८० ते १९९१ या काळात समाजव्यवस्था(८ लेख), मानवविकास व अध्यात्म (६लेख), कृषी व उद्योगाचे व्यवस्थापन(६ लेख), संत्रा प्रक्रिया उद्योग(६ लेख), कृषी(३लेख), कृषीउद्योग(६लेख)
या विषयावरील एकुण ३५ लेख प्रसिद्ध झाले.

२. जागृति (ग्रामिण औद्योगिकीकरण यावरील खादी ग्रामोद्योगाची मासिक पत्रिका) यातुन लेख प्रसिद्ध.

३. अखिल भारतिय गायत्री परिवार नागपूर येथे "विज्ञान व अध्यात्म" या अंतर्गत भगवदगीता विषयावर भाषण

४. भगवदगीतेची विशेष आवड. संपुर्ण भगवदगीता मुखपाठ केली.
"भगवदगीतेतील मुख्य विषयावर दृष्टिक्षेप " ही लेखमाला विविध आध्यात्मिक ग्रुपवर (WA) पोस्ट होते.

फोन नं . ०७१२ २२२६०३४

मोबाईल ९३२५५०५०३७

***********

*नागपूर पत्रिका (नागपूर टाईम्स ग्रुप नागपूर ) वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेले लेख :(१९८० ते १९९१)

*समाजव्यवस्था

१. तर भारत विकसित राष्ट्र होईल.

२. मानवशक्ती आणि शाश्वत समाजव्यवस्था

३. समृद्धि व रोजगार

४. भारताची गरिबी आणि आहार

५. समृद्ध राष्ट्रासाठी ग्रामसमृद्धि आवश्यक

६. ग्रामिण विकास आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह

७. ग्रामिण क्षेत्र आणि व्यावसायिक अभ्यासक्रम

८. प्रत्येक खेडे शहर झालेच पाहिजे

*मानवविकास व अध्यात्म

१. मानवी विकासाचा आधार

२. स्वअस्तित्व जाणले तरच विकास

३. स्वतःचे ज्ञान हेच अध्यात्म

४. सत्याची अनुभुति हाच विकास

५. हातुन मोठी कामे केंव्हा होतात

६. अहंकाराची नव्हे निर्णयसामर्थ्याची गरज

*कृषी व उद्योगाचे व्यवस्थापन

१. समतोल विकासासाठी विकेंद्रिकरण

२. यशस्वी विकेंद्रिकरणासाठी एक्स्चेंज पद्धति

३. ग्रामिण उद्योगाचे व्यवसाय संघटन

४. कृषी उद्योगाची संघटनात्मक रचना

५. सहकार चळवळीचा मार्ग

६. विदर्भातील सहकारी चळवळ-कांही उपाय

*संत्रा प्रक्रिया उद्योग

१. संत्रा प्रक्रिया उद्योगाचे जाळे

२. संत्रा उद्योग संयंत्रणा

३. संत्रा उत्पादक ते ग्राहक संयंत्रणा

४. आदर्श संत्रा उद्योग

५. संत्रा प्रक्रिया उद्योगात प्रथम पाऊल

६. संत्र्याची औद्योगिक उत्पादने

*कृषी

१. शेतीचे प्रश्न आणि सोडवणुक

२. पिकलं नसेल तर लुट नाहीतर लयलुट

३. ग्रामोद्योग विकास साधला तरच शेती जगेल

*कृषीउद्योग

१. विदर्भात प्रक्रिया उद्योग शक्य

२. भारताचा अनमोल नैसर्गिक ठेवा-कडुनिंब

३. सरकी प्रक्रिया उद्योग

४. सुगंधी द्रव्य उद्योग

५. विकेंद्रित फळे व भाज्या प्रक्रिया उद्योग

६. साबण उद्योग

# आभार

"भगवद् गीतेतील मुख्य विषयावर दृष्टिक्षेप" या लेखमालिकेवरील वाचकांच्या कांही प्रतिक्रिया:

१. मी आपल्या तर्कशुद्ध मांडणीचा फॅन बनलो आहे!
अशा प्रकारे गीतेकडे मला कुणी नेले नव्हते !काका खर सांगतो की तुमची पोस्ट वाचल्याशिवाय दिवस सुरु झाल्यासारखा वाटत नाही!...
अशीच शतके ठोकीत रहा नी आम्हाला गीता नव्यारीतीने समजावून सांगत रहा !
पुन्हा एकदा अभिनंदन!
-डॉ. लक्ष्मिकांत कोर्टिकर (M. D. Ayurved) अहमदनगर
(बीजशुद्धी याविषयावर १२००/- मूल्याचे व्दिखंडात्मक पुस्तक प्रकाशित केले !भारताला विश्ववंद्य बनायचे असेल तर येणारी पिढी बळकट, बुद्धिमान, प्रखर देशाभिमानी बनवायला हवी )
(अथाथो ब्रह्मजिज्ञासा ग्रुप)
*******

२.

मी management इतके वर्ष शिकवते आहे पण खरा अर्थ आज कळाला...

खूप छान आणि सोपे करून सांगता तुम्ही दादा...

आम्हाला तुमच्यामुळे गीता कळत आहे. वाचायची गोडी लागली. त्यासाठी खूप धन्यवाद .

-प्रा. सौ. मेघना ढेरे, पुणे

(अथाथो ब्रह्मजिज्ञासा ग्रुप)

*****

३. भगवद्. गीतेचा सुंदरखाशा भावार्थ व सोबत वर्तमानकाळाशी संलग्न असे विवेचन.. कित्ती आठवड्यापासुन सुरु आहे.. कळण्यास सोपे असे.. पाचशे भागापर्यंत येऊन ठेपलय हे विवेचन.. रोज लिहत असले तरीही प्रतिक्रिया रोज पाठविता येत नाही.. काल गीताजंयती झाली.. तिच्या पावन पर्वावर आम्हांस गीता सुगमसोपे करुन सांगण्याऱ्या साहेबराव दादानाः नमन वंदन प्रणाम.

- माधुरीताई ब्रह्मे देशपांडे. आध्यात्मिक लेखिका नागपुर

(अथाथो ब्रह्मजिज्ञासा ग्रुप)

******

४. कमाल आहे साहेबराव तुमची!
गीतेचे एवढ्या प्रकाराने विश्लेषण खचितच कुणी केलं असेल!प्रत्यक्ष योगेश्वर श्रीकृष्णने तरी एवढा विचार केला असेल की नाही याची शंकाच आहे!

-श्री रामदास पटेल सिव्हिल इंजिनियर जीवन प्राधिकरण नाशिक(जे. कृष्णमुर्ति ग्रुप)

*******

५. The way you are relating ancient knowledge with the latest research on various subject and it's authoritative authors from the best sellers books from West, it's emphasise and curious all the readers to dig more from Gita and it's full of timeless knowledge.

Your every depiction is inspiring to dig more and more not only from Gita but it's also giving insight on its latest reserach as well as introduces with the latest books and it's authors.

Thanks and Gratitude for such deep insight.

(One more pinch I would like to add is that he has motivated us to read this great epic...

At least for me he is the source of the motivation to understand geeta. )

-Uday Kulkarni Bharoch Gujrat

(जे. कृष्णमुर्ति ग्रुप)

६.

श्रीमान साहेबरावजी जवंजाळ यांचे लीखाण म्हणजे भगवद् गीतेचे अंतरंगातील वीविध वाटा

बाह्यांगवाद्यांना दाखवून अंतरंगात आणनारा वाटाड्या.

Sudam P. Deshmukh

(जे. कृष्णमुर्ति ग्रुप)

७.

*As usual, the write up is loaded with key insights and reflections based on your versatile studies & experience!

*सर, आपले "दृष्टिक्षेप" मला Work-Life Management मध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी उद्युक्त करत आहेत...

Uday D Vaishampayan

(अथाथो ब्रह्मजिज्ञासा ग्रुप)

सर्व आदरणिय वाचकांचे शतशः आभार व्यक्त करतो. याशिवाय डॉ. प्रा. संगिताताई अरुण खुरद नागपूर, श्री पंडितराव आळशी नागपूर, श्री नरेंद्र केदार नागपूर, प्रा. जयंत लक्ष्मण दलाल नागपूर, श्री. प्रफुल्ल काळे खामगाव (पुणे) तसेच श्री. सुनील सामंत यांचे आभार व्यक्त करतो.

सर्वात शेवटी पण सर्वात महत्त्वाचे, माझी पत्नी सौ.पद्मा व माझ्या मुली डॉ. वैशाली पेठे, डॉ. अनुराधा अलोणे, डॉ. अनुपमा जुनघरे यांचे मला सतत प्रोत्साहन मिळत असते. म्हणून माझ्या कुटुंबियांचेही मी आभार मानतो.

साहेबराव शामराव जवंजाळ

***********

## प्रकाशकांचे मनोगत

ई साहित्य च्या या साइटवर हजारो पुस्तकं आहेत. सर्वच चांगली आहेत पण आपण सर्वच वाचू शकणार नाही हे खरेच. पण इथली तीन पुस्तकं अशी आहेत जी तुम्हाला मराठीत इतर कुठेही मिळणार नाहीत. श्री. अशोक कोठारे अनुवादित १६००० पानी महाभारत. श्री विजय पांढरे यांनी नव्या मराठीत आणलेली १०००० ओव्यांची ज्ञानेश्वरी आणि श्री साहेबराव जवंजाळ यांनी लिहीलेले श्रीमद्भगवद्गीतेवरील ३००० पानी भाष्य. भगवद्गीता: परिवर्तनाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान.

गीता सर्वांनाच वंदनीय आहे. काही लोक अजिबात न वाचता तिला वंदनीय म्हणतात. काही वाचायचा प्रयत्न करतात व सोडून देतात. काही तिचा अर्थ न समजता ती वाचतात, तिचे पठण करतात. काही तिचा अध्यात्मिक अर्थ समजून घेऊन वाचतात. श्रीमद्शंकराचार्यांनी त्यातला ज्ञानयोग जाणला व जाणकारांत पसरवला. संत ज्ञानेश्वरांनी त्यातला भक्तीयोग अंगी बाणवला आणि सामान्यजनांत प्रसार केला. लोकमान्य टिळकांनी त्यातल्या कर्मयोगाचे तत्कालीन महत्त्व जाणले आणि गीतारहस्याद्वारे तो लोकांप्रती पोहोचवला. स्वामी विवेकानंदांनी तिचे वैश्विक महत्त्व जाणून ती आंतरराष्ट्रीय स्तरावर नेली. हे सर्व गेल्या शतकांतील त्या त्या काळांशी सुसंगत होते. श्री. साहेबराव जवंजाळ यांनी आजच्या

तरुणांना ही गीता किती मार्गदर्शक आहे याचे सार्थ दर्शन त्यांच्या पुस्तकातून घडवले आहे. एका अर्थी त्यांनी आपल्याआधीच्या या चार महानुभावांचे कार्य पुढे नेले आहे. भगवद्गीता सार्वकालीन आहे, वैश्विक आहे आणि चिरतरूण आहे. ते बदलाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान आहे. Today's youth has to face the challenge of CHANGE and Bhagavadgeeta is the right Philosophy for MANAGING the CHANGE in right direction.

या संदर्भात साहेबरावांनी जगभरातील अनेक महान तत्त्ववेत्त्यांचे व विचारवंताचे विचार संदर्भासाठी नेमके मांडले आहेत. भगवद्गीतेचे अनेक पैलू व त्यांची आजच्या व येणाऱ्या काळाशी सुसंगती त्यांनी मांडली आहे. हे पुस्तक अध्यात्माहूण अधिक व्यवस्थापनशाश्त्राचे आहे.

हे पुस्तक प्रत्येक तरुणाने वाचावे असा आमचा आग्रह राहील. नुसते वाचू नये तर ते आत्मसात होईतो वाचावे. अभ्यासावे. बस. तुमचे, आमचे व समाजाचे सर्व प्रश्न सोडवण्याची कुवत असलेली ही तीन पुस्तके आहेत असे समजा.

वाचा.

वाचवा.

सुनीळ सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

## लेखकाचे मनोगत

भगवदगीतेची धार्मिक ग्रंथ अशी मर्यादित ओळख असली तरी सर्व धर्माचे मुळ या अर्थाने "सर्व धर्माचा राजा" ही ओळख सर्वप्रथम स्वामी विवेकानंदांनी जगाला करुन दिली. आणि जगातील तत्वज्ञांचे, विद्वानांचे लक्ष भगवदगीतेने वेधुन घेतले. भगवदगीता जगातील कोणत्याच व्यक्तिची किंवा धर्माची खाजगी संपत्ति नाही. ती ईश्वराने अखिल विश्वातील मानवाला उपलब्ध करुन दिलेली संपत्ति आहे. म्हणुन त्याचे नांवच "ईश्वराचे गाणे" (भगवद- गीता) असे आहे.

जगातील प्रश्न सोडविण्यासाठी जगात ज्ञानविज्ञान उपलब्ध झाले. तरी जगात नवनवीन प्रश्न उपस्थित होत असतात. याच विश्वात मनुष्याचे स्वतःचे जीवन मात्र सिमित काळासाठी आलेले असते. यामुळे स्वतःच्या जीवनातील प्रश्न त्याला स्वतःलाच सोडवावे लागतात.

जगातील तत्वज्ञ, प्रबोधनकार मानवी जीवन सक्षम व्हावे यासाठी संदेश देत असतात. तर धर्मधुरीन समाजात चांगलेपणा वृद्धिगत व्हावा यासाठी संदेश देत असतात. जगात चांगलेपणा वृद्धिगत व्हावा, शोषणमुक्त समाजव्यवस्था निर्माण व्हावी, तसेच मनुष्यजीवनातील चांगलेपणा दुर्बलता ठरु नये यासाठी ज्ञानाचा

आश्रय करणे, ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी ईश्वराचा आश्रय करणे ही भगवदगीतेची भूमिका आहे. अर्थात ईश्वराची ओळख ज्ञानविज्ञान या संदर्भात भगवदगीता करुन देत आहे. याप्रमाणे भगवदगीता मनुष्याला ज्ञानविज्ञान, धर्म, ईश्वर यांच्याकडे पाहण्याची निश्चित दृष्टि देते.

आपापले धर्म, संस्कार, विद्या(ज्ञान) यानुसार सर्व लोक आपापल्या स्वभावप्रकृतिनुसारच जगत असतात, कार्यरत असतात. भगवदगीतेतील समाजव्यवस्थेचे वर्गिकरण मनुष्याला कार्यरत होण्यासाठी आहे. अर्थात मनुष्य कार्यरत होणे ही भगवदगीतेची Priority आहे. वर्तमानात शिक्षणव्यवस्थेद्वारा विद्या(ज्ञान)मिळाली तरी व्यवसाय (रोजगार) हा वर्तमानातील महत्वाचा प्रश्न असतो. यासाठी ज्ञान व कर्म यांचा समन्वय साधणे आवश्यक असते.

जगात सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे हा भगवदगीतेचा संदेश आहे. याच ज्ञानाचा उपयोग मनुष्यजीवनात कसा करायचा?याची दृष्टि भगवदगीता देते. जीवनात कर्म(Action) घडत असते. ज्ञानामुळे (जीवनमार्गातील) संशयमुक्ति होते. कार्याचा एकनिश्चय होतो. व निष्ठेने(भक्ति) कार्यरत होतो. व सर्व कर्माचे अखेर ज्ञानातच विलिनिकरण होते. असे भगवदगीतेचे स्पष्ट भाष्य आहे. याप्रमाणे जीवनयात्रेत विकासासाठी ज्ञान, कर्म व निष्ठा(भक्ति) यांची निश्चित भूमिका भगवदगीतेने स्पष्ट केली आहे.

भगवदगीतेवर अनेक महापुरुषांनी भाष्य केले आहे. वर्तमानातील आवश्यकतेनुसार हे अविरत होत राहणार, कारण भगवदगीता ज्ञानविज्ञानाचा विषय आहे.

भगवदगीतेवर भाष्य करणे हा (साहित्याचा)ज्ञानाचा विषय असला तरी भाष्यकार किंवा वाचक, श्रोता यांच्यासाठी हा "ज्ञानयज्ञ" असतो, कारण भगवदगीता भक्तिचाही विषय आहे. हा उल्लेख भगवदगीतेत शेवटी आवर्जुन झालेला आहे.

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादम् आवयोः।

ज्ञानयज्ञेन तेन अहम् इष्टः स्याम् इति मे मतिः।।

(१८-७०)

श्रद्धावान अनसूयश्च शृणुयात् अपि यो नरः।

सोअपि मुक्तः शुभान् लोकान् प्राप्नुयात् पुण्यकर्मणाम्।।(१८-७१)

- साहेबराव शा. जवंजाळ **B. Sc ;B. Sc TECH,** नागपूर

**स्मृतिला समर्पण :**

**वडील - स्व. श्री शामराव यादवराव जवंजाळ**

**आई - स्व. सौ. अनसूयाबाई जवंजाळ**

**माझे आईवडील यांच्या पावन स्मृतिस समर्पित**





# भगवदगीता (संपुर्ण )

अनुक्रमाणिका


| अध्याय | विषय | पेज नंबर — |
|---|---|---|
| १. | अर्जुनविषादयोग | ~ २६ |
| २. | सांख्ययोग | ~ १८३ |
| ३. | कर्मयोग | ~ ६६९ |
| ४. | ज्ञानकर्मसंन्यायोग | ~ ९६५ |
| ५. | कर्मसंन्यासयोग | ~११८५ |
| ६. | अभ्यासयोग | ~१३०१ |
| ७. | ज्ञानविज्ञानयोग | ~१४४७ |
| ८. | अक्षरब्रह्मयोग | ~१५७३ |
| ९. | अनन्ययोग | ~१६७४ |
| १०. | विभूतियोग | ~१८१५ |
| ११. | विश्वरुपदर्शनयोग | ~१९३९ |
| १२. | सगुणभक्तियोग | ~२०७८ |
| १३. | क्षेत्रक्षेत्रज्ञयोग | ~२१६२ |
| १४. | गुणत्रयविभागयोग | ~२२५० |
| १५. | पुरुषोत्तमयोग | ~२३२२ |
| १६. | दैवीअसुर संपद्विभागयोग | ~२४२७ |
| १७. | श्रद्धात्रयविभागयोग | ~२५६१ |
| १८. | मोक्षसंन्यासयोग | ~२६४२ |

भगवतगीता-प्रास्तविक

ज्ञान व कर्म यांचा संबंध काय आहे?(Knowledge to Action). ज्ञान व कर्म यांचा भक्तिशी काय संबंध आहे? या रहस्याचा भगवतगीता उलगडा करते.

युद्धक्षेत्रावर अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो. आपली भूमिका योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी धर्म सांगतो.

समाजात असे Excuses भाष्य बोलणे व ऐकणे मनुष्याला नवखे नसते. अशा भाष्याला भगवतगीता प्रज्ञावाद संबोधते. व ज्यामुळे मार्गातील संशय दुर होतो, ते ज्ञानाचे कार्य असते. या ज्ञानाला प्रकाश संबोधले आहे.

Acceptance of Ignorance याचसाठी सॉक्रेटिस प्रसिद्ध आहे, ज्याच्या शहाणपणामुळेच ज्ञानविज्ञानाची बीजे युरोपात पेरल्या गेली.

ज्ञानविज्ञानाचा कार्यात वापर होतो. ज्ञानामुळे विश्वासाने मनुष्य कार्य करतो. याच ज्ञानविज्ञानाचा मुळ स्रोत ईश्वर आहे. म्हणुन कर्माद्वारे भक्ति साधल्यामुळे विकासाच्या मुख्य मार्गावर असतो.

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

जगाचा इतिहास कर्तृत्वाचा इतिहास असतो. ज्ञान व कर्म या दोहोंचा मेळ बसवुन कर्तृत्व क्षमता साध्य होते. तर कर्तृत्वाला भक्तिची जोड दिली तर तो मार्ग नीतिचा होतो, विजयाचा होतो, समृद्धिचा होतो. या मार्गात उर्जा असते. हाच भगवतगीतेचा संदेश आहे.

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।
तत्र श्री विजयो भूतिः धृवा नीतिः मतिर्मम।।(१८-७८)

******************

# भगवतगीता १. अर्जुनविषादयोग

*"धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे" या महत्वाच्या शब्दांनी भगवतगीता सुरु होते. हे शब्द नीति व व्यवहार दर्शवितात. व्यवहारात पांडवांना न्याय मिळाला नाही म्हणुन न्यायनिवाड्यासाठी धर्मयुद्ध हा शेवटचा पर्याय ठरतो.

*अर्जुन भीष्माचार्य, द्रोणाचार्य यांना पाहुन भावविवश होतो व सर्व स्वजन मरण्यासाठी येथे जमले आहेत या विचाराने गर्भगळित होतो. आपली व्यथा श्रीकृष्णाजवळ व्यक्त करतो. त्याचे विचारचक्र सुरु होते.
-कांहितरी वाईट घडणार आहे!म्हणुन...
-कशासाठी येथे आपण आहोत याचा आढावा घेतो.
स्वतःला सुखासाठी राज्य नको, विजयाचीही इच्छा नाही.

*धर्मात स्वार्थ व परमार्थ या शब्दांचा वापर होतो. दुर्योधन व अर्जुन यांचे Attitude या दोन शब्दांचे दर्शन देते. दुर्योधन आचार्यांना दोन्ही सेनेचा परिचय करुन देतो, तेंव्हा हे सर्व शुर योद्धा माझ्यासाठी प्राण देण्यास तयार आहेत (मदर्थे त्यक्त

जिविताः) असा उल्लेख करतो. तर अर्जुन परमार्थ साधण्यासाठी म्हणतो,

एषां अर्थे कांक्षितं नो राज्यं भोगः सुखानि च।
त इमे अवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च।

ज्यांच्यासाठी राज्य मिळवायचे, ते सर्व येथे प्राण व धन दोन्हींचा त्याग करुन येथेच जमले आहेत. व त्यांनाच मारुन त्रिलोकाचे राज्य मिळाले तर ते अयोग्य होईल.

*धर्म परमार्थ सांगतो, व आपण उलट चालत आहोत. यामुळे पापाचरण होईल. लोभाने, स्वार्थाने यांना(कौरवांना) हे पातक(कुलक्षय)दिसत नाही, पण आपण शहाणे आहोत, म्हणुन पापाचरणापासुन निवृत्त होणे आपले कर्तव्य आहे.
-कुलक्षयामुळे कुलधर्म नष्ट होईल, स्वैरता वाढेल. समाजात संकर होईल . पिंडदान Rituals नष्ट होतील. धर्म Ritualsने ओळखल्या जातो. व हा धर्म नष्ट होण्यास वर्णसंकर कारण होईल व शाश्वत जातिधर्म, कुलधर्म नाहिसे होईल.
-धर्म नष्ट करण्यास कारणीभूत होणारे नरकात जातात हे आम्ही ऐकत आलेलो आहोत.

* युद्धामुळे शोक होणार हे अर्जुन जाणतो. व शोककारक युद्ध करणे अयोग्य आहे, म्हणुन त्याला शोकापासुन निवृत्ति हवी होती. म्हणुन युद्ध करणे कसे चुकीचे आहे, हे दर्शवुन देतो. व शेवटी आपली भूमिका धार्मिक, आदर्श आहे असा निष्कर्ष काढतो. व म्हणतो,

अनवधानाने आम्ही लोभापायी स्वजनांची हत्या करण्यास निघालो होतो. म्हणुन मी निहत्य अवस्थेत शस्त्रधारी कौरवांकडुन मारल्या गेलो तेच माझ्यासाठी श्रेयस्कर आहे. असे बोलुन शोकग्रस्त अवस्थेत शस्त्रहिन होतो.

*चांगला व्यक्तिही सुखाची अपेक्षा करीत नसला तरी दुःख त्याला विचलित करते. तो दुःखापासुन सुटका पाहतो. भिक नको पण कुत्रा आवर अशी त्याची अवस्था होते. व या अवस्थेत आपल्या सोयीने सुटका करण्याचा प्रयत्न करतो, व आपली भूमिका योग्य कशी आहे हे सिद्ध करण्यात सुख शोधत असतो.

*अर्जुन धर्माची भाषा बोलतो व आपल्या सोयीने धर्माचे Interpretation करतो.

*मनुष्य ज्या धर्मात जन्माला आलेला आहे, त्याच्या धर्मविषयक संकल्पना कशा असतात (Belief system) हे येथे स्पष्ट होते.

-परमार्थ!

-कर्मकांड Rituals!

-जाती, वर्ण!

-स्वर्ग नरकवास हे अंतिम साध्य!

*********

**अध्याय(१)-मुख्य विषयावर दृष्टिक्षेप**

(१. १):"धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः"

(व्यवहार-अध्यात्म-धर्म क्षेत्र)

१. ९ :

"अन्ये च बहवः शुरा मदर्थे त्यक्तजीविताः"

(व्यक्तिपुजा vs. आत्मोन्नति)

१. १९:"स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्"

(नैराश्य vs आत्मविश्वास)

(१-२०) /१:

"अथ व्यवस्थितान् दृष्ट्वा धार्तराष्ट्रान् कपिध्वजः"

(War is won in mind)

१. २०/२:"प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः"

(१. २३):

"धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेः युद्धे प्रियचिकीर्षवः"

vs "स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम् माधव"

(मुढ दुर्योधनाचे खुशमस्करे Vs स्वजनहत्येचे पाप)

(१-२४) :

"एवम् उक्तो हृषिकेशो गुडाकेशेन भारत"

(भगवदगीतेचा संदेश)

(१-२९)/१ :

" सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति"

(मानवी दुर्बलता vs सक्षमता)

(१-२९)/२ :

"वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते"

(भय व त्याचा अंत-दुःखान्त)

(१-३०)/१ :

"गांडीवं स्त्रसते हस्तात् त्वक् चैव परिदह्यते"

(Psychodrama)

(१-३०)/२:

"न च शक्नोमि अवस्थातुं भ्रमतीव च मे मनः"

(Mental Weakness vs Strength)

१. ३१/१ :

"निमित्तानि च पश्यामि विपरितानी केशव!"

(१-३१)/२:

"न च श्रेयो अनुपश्यामि हत्वा स्वजनम् आहवे"

(जीवनयात्रेतील Frustration)

(१-३२)/१:"न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च"

(गरजा - आत्मविकास vs कर्म)

१. ३२/२ :

"किं नो राज्येन् गोविंदम् किं भोगेः जीवितेन वा!"

(Purpose of Life)

(१. ३३)/१:

"एषां अर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च"

(प्राप्तिसुख vs आदर्श vs मानसिक सामर्थ्य)

(१-३३)/२ :

"त इमे अवस्थिता युद्धे प्राणान् त्यक्त्वा धनंजय"

(जीवनाचा अर्थ)

(१-३५):

"अपि त्रैलोक्यराजस्य हेतोः किं नु महीकृते"

(विषयांतर vs. कार्याचा दृढनिश्चय)

(१. ३६) :

"पापमेवम् आश्रयेत् अस्मान् हत्वा एतान् आततायिनः"

(चांगल्या मनुष्याचे वर्तमानातील अज्ञान)

(१ -३७)/१:

"तस्मात् न अर्हा वयम् हन्तुं धार्तराष्ट्रान् स्वबांधवान् " (Guilty conscious vs. Rightous)

१-३७/२ :

"स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम् माधव"

( Priority management)

१. ३८/१:"यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहत चेतसः?

१. ३८/२ :

"यद्यप्यन्ते न पश्यन्ति ...

कुलक्षयं कृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् "

(The External world vs. Inner world )

१. ३९/१:

"कथं न ज्ञेयं अस्माभिः पापाद् अस्मान् निवर्तितुम् ?"

(१-३९)/२:

"कुलक्षयं कृतं दोषं प्रपश्यद् भिः जनार्दन"

(Check your thinking behavior)

(१-४०) :

"धर्मे नष्टे कुलं कृत्स्नं अधर्मः अभिभवत्युत"

Religion vs. Spiritual Wisdom (Beyond good & evil)

(१-४३)/१ :

"दोषैःएतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकै"

(भगवदगीतेची धर्माविषयी भूमिका)

(१-४३)/२:

"उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः?

(Change of Mindset)

१. ४४/१ :

"उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन"

(Effect of belief system & Thought process)

१. ४४/२:"नरके नियतं वासो भवती इति अनुशुश्रुम"

१. ४४/३(विषय २९५):"नरके नियतं वासो भवती इति अनुशुश्रुम"

PartII. ( मनोरंजन vs आत्मविश्वास)

१. ४५ /१:

"अहो बत् महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् "

(Diverted Language)

१. ४५/२:"यत् राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनं उद्यता"

(चांगलेपणाच्या शक्तिचे अज्ञान)

१-४६/१:"धार्तराष्ट्रा रणे हन्युः तन्मे क्षेमतरं भवेत्"

(१-४६)/२ :

"धार्तराष्ट्रा रणे हन्युः तन्मे क्षेमतरं भवेत्"

vs.

"हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्"

(जगणे आणि मरणे याविषयी भ्रम )

(१-४७)/१:

"एवम् उक्त्वा अर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् "

(Effect of Internal world on External world)

१. ४७/२ :

"विसृज्य सशरं चापं शोकसंविग्न मानसः"

(विकासमार्गाचा त्याग)

(१-१)

*************************

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः।

मामकाः पांडवाःचैव किम् कुर्वत् संजय।।

*************************

(१. १) :"धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः"

(व्यवहार-अध्यात्म-धर्म क्षेत्र)

मनुष्यजीवनात कार्य घडते, म्हणुन आपण सर्व या कुरुक्षेत्रावरच जगत आहोत. समाजातील व्यवहारक्षेत्र व (स्वविकास या संदर्भात )अध्यात्मक्षेत्र यांचा समन्वय धर्मक्षेत्र साधत असते.

व्यवहाराचा भाग म्हणुनच धर्मयुद्ध ठरले असते. अर्जुन दुःखी झाल्यामुळे स्वतःचे नियतकार्य धर्मविरोधी ठरवितो. या घटनेत व्यावहारिक निर्णय झाला असतो. अर्थात व्यवहारक्षेत्राचा विषय

संपलेला असतो व आता धर्मक्षेत्राचा विषय येतो. अर्जुनासाठी हा स्वधर्माचरणाचा (स्वतःचे दायित्व) विषय येतो.

समाजात निरोगी व्यवहारासाठी धर्म असतो. धर्माचा संबंध व्यवहाराशी येतो तेंव्हा धर्माला " नीति" हा संदर्भ मिळतो. तर धर्माचा अध्यात्माशी(स्वविकास) संबंध येतो तेंव्हा "स्वधर्म" हा संदर्भ मिळतो.

पाणी म्हटले कि पाण्याचा धर्म काय?हा बोध होतो. अर्थात हा बोध गुणधर्म/उपयुक्तता या संदर्भात असतो. तसेच मनुष्याचे स्वभावनियत कार्य याला भगवतगीतेने स्वधर्म संबोधले आहे. मधमाशीचे कार्य स्वविकास, समुहविकास, निसर्गसंचलन याला पोषक असते. तसेच मनुष्याचे कार्य स्वविकास, समुहविकास, सृष्टिसंचलन याला पोषक व्हावे यासाठी मनुष्याच्या स्वभावनियत(सहजकार्य) कार्याला स्वधर्म संबोधले आहे.

मनुष्य जेंव्हा दुसऱ्याविषयी(इतरांचे दायित्व) भाष्य करतो तेंव्हा तो व्यवहारक्षेत्राचा विषय ठरतो. तर स्वतःच्या विकासाविषयी भाष्य करतो, तेंव्हा त्याचा संबंध अध्यात्मक्षेत्राशी असतो.

व्यवहार(क्षेत्र) व अध्यात्म(क्षेत्र) यांचा समन्वय धर्म साधत असतो म्हणुन येथे धर्मक्षेत्र संबोधले आहे.

जगातील कुरुक्षेत्र या संदर्भात कर्माच्या दोन निष्ठा भगवतगीता स्पष्ट करते. १. स्वधर्माचरण(ज्ञानयोगेन सांख्यानां) २. बुद्धियोग(कर्मयोगेन योगीनाम् )

१. स्वधर्माचरण:

अर्जुन निष्क्रियतेला धर्म संबोधतो. येथे धर्माला "नीति" हा संदर्भ असतो. ही व्यवहारातील "धर्मगति" ठरवितो. पण व्यवहारातील धर्मगति अर्जुनाचे दायित्व(असते). याच संदर्भात भगवतगीता स्वधर्माचरणाचे महत्व सांगते. या स्वधर्माचरणाचे पालन न करणे म्हणजे अपकिर्तिचे कारण ठरते. याप्रमाणे स्वधर्माचरण Tiebreaker ठरते.

२. कर्मयोग:

मनुष्य जेंव्हा इतरांना धर्माचे challange देऊन अयोग्य-चुक ठरवितात, तेंव्हा तो व्यावहारिक क्षेत्राचा विषय असतो. पण जेंव्हा स्वतःलाच स्वतःचे स्वधर्म या संदर्भात Challange मिळते, तेंव्हा

तो आध्यात्मिक क्षेत्राचा विषय बनतो. म्हणुन भगवतगीतेने येथे कर्मयोगासाठी बुद्धियोगनिष्ठा स्पष्ट केली आहे. येथे निर्णयअधिकाराचे महत्व भगवतगीतेने स्पष्ट केले आहे. चंचलत्व बुद्धियोगामुळे नष्ट होते. कार्याचा एकनिश्चय होतो. "अमृतत्वाय कल्पते" या मार्गावर समत्वयोगाने (सिद्धि-असिद्धि यात समत्व) कार्य घडते.

व्यावहारिक बोध:

*भगवतगीता कर्माला जीवनविकासात प्राथमिकता देते.
*धर्म या संदर्भात समाज संभ्रमात असतो, तेंव्हा १. इतरांनाच blame करुन Challange करीत असतात. हा व्यावहारिक क्षेत्राचा विषय असतो.
२. स्वतः (चुक होईल या भयाने)निष्क्रियतेला धर्म संबोधतो. तेंव्हा हा आध्यात्मिक क्षेत्राचा विषय ठरतो. व हेच ज्ञान भगवतगीतेने स्पष्ट केले आहे. म्हणुन भगवतगीता संदेश देते, सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।

*याप्रमाणे भगवतगीतेने व्यवहारक्षेत्र, धर्मक्षेत्र, अध्यात्मक्षेत्र यांत पारदर्शिकता आणली आहे.

"A successful life is an authentic life. Happiness and creativity rest on a foundation of transparency to yourself and others. Knowing your own heart and speaking clearly to others keep you on the path. "

Gay Hendricks

*o****oo

(१-९)

*************************

अन्ये च बहवः शुरा मदर्थे त्यक्तजीविताः।

नाना शस्त्रप्रहरणाः सर्वे युद्ध विशारदाः ॥

*************************

१. ९ :

"अन्ये च बहवः शुरा मदर्थे त्यक्तजीविताः"

(व्यक्तिपुजा vs. आत्मोन्नति)

समाजात व्यक्ति चांगला कि वाईट!श्रेष्ठ कि कनिष्ट असे भाष्य असते व या भाषेचे दर्शन भगवतगीतेतुनही होते. युद्धापुर्वी दुर्योधन व अर्जुन दोघांच्याही मानसिकतेचे दर्शन होते. एक(दुर्योधन) स्वतःच्या श्रेष्ठत्वाला महत्व देतो, तर दुसरा(अर्जुन) स्वतःच्या चांगलेपणाला महत्व देतो, पण निष्क्रिय होतो.

दुर्योधन म्हणतो, अनेक शूरवीर माझ्यासाठी प्राणाची पर्वा न करता युद्धासाठी येथे आले आहेत.

अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्त जीविताः।(१-९)

दुर्योधनाचे भाष्य असुर संपत्तिला शोभेल असे असते.
ईश्वरोअहं अहं भोगी सिद्धो अहं बलवान सुखी।(१६-१४)

अर्जुन म्हणतो दुष्ट दुर्योधनाचे खुषमस्करे न्याहाळण्याची इच्छा आहे. शत्रुपक्षातील गुरु पितामह यांचेसमोर रथ येतो तेंव्हा दुःखी होतो.

समाजात चांगला व वाईट या संदर्भात व्यक्ति वाईट नाही म्हणुन चांगला असा मनुष्य समज करुन घेतो. वाईट नाही हेच त्याचे चांगल्याचे प्रमाण असते. दुःखी झाल्यावर अर्जुन म्हणतो, आपल्या स्वार्थासाठी पुजनिय गुरु पितामह यांचा वध करणे समर्थनिय नाही. वाईट आहे असे judgement करतो. म्हणुन निष्क्रियता पसंत करतो.

समाजात व्यक्तिपुजेचे स्तोम (Celebrity worship syndrome)वाढणे ही निरोगी बाब नसते. भगवतगीतेत स्वतःच्या आत्मोन्नतिचे महत्व आहे, व्यक्तिपुजेला स्थान नाही, ईश्वराची ओळखही व्यक्ति म्हणुन नाही. हाच आधार आत्मोन्नति अर्थात विकासाच्या Standard मार्गाचा आहे.

अवजानन्ति माम् मूढा मानुषीं तनुं आश्रितः।
परम् भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥(९-११)
******
(१-१९)
*************************
स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो अभ्यनुनादयन् ॥
*************************
१. १९
:"स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्"
(नैराश्य vs आत्मविश्वास)

जीवनात कार्य घडत असते. कार्याद्वारे विकास या प्रक्रियेत १. कार्यपुर्व मानसिकता २. कार्य करतांनाची मानसिकता व ३. कार्योत्तर मानसिकता या तिन्ही Stagesवर भगवतगीता प्रकाश टाकते. कार्यपुर्व अवस्थेत आत्मविश्वास असेल तर विश्वासाने कार्यरत होतो. कार्याचा एकनिश्चय असतो.
कोणतेही कार्य करण्यामागे हेतु असतो. पांडवांना न्याय मिळण्यासाठी धर्मयुद्ध ठरले असते. हे युद्ध प्रत्यक्ष सुरु होण्यापुर्वी

कौरवपक्षाची मानसिकता व अर्जुनाची मानसिकता यावर भगवतगीता भाष्य करते.

प्रत्यक्ष युद्ध सुरु होण्यापुर्वी शंख, नगारे यांच्या ध्वनीनेच कौरवपक्षाची हृदये विदिर्ण होतात.

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्।(१-१९)

याचवेळी अर्जुन सेना न्याहाळतांना दुःखाने पिडित होतो. युद्ध न करण्याची भूमिका घेतो. येथे जिंकणे वा हरणे हा प्रश्न त्याच्यासाठी महत्वाचा नसतो. तर योग्य-अयोग्य हा प्रश्न महत्वाचा ठरतो. हा विषयच आदर्शाचा बनवितो. तो अप्रत्यक्षपणे म्हणतो, युद्धात हारणे हेच माझ्यासाठी श्रेयस्कर आहे!दुःखी झाल्यामुळे सुख या संदर्भात स्वतःला(योग्य दर्शवुन) empower करतो. दुर्बलतेला सक्षमता, अयोग्यला योग्य व अज्ञानाला ज्ञान दर्शवितो.

मनुष्यजीवन सुखासाठी यात्रा करते पण दुःखाशी गाठ पडते. याच सुखदुःखाचा संबंध कार्याशी असतो, याच सुखदुःखाचा मानसिक सक्षमता-दुर्बलता याचेशी संबंध असतो. अर्थात कार्याचा मानसिक सक्षमतेशी संबंध असतो. याच संदर्भात Technical भाषेत सत, रज व तम या तीन modeमधील सुखाचे स्पष्टिकरण करते.

कार्य संदर्भात इच्छा(काय हवे State of want) व सहजकार्य (State of art) असे शास्त्रिय विधान आहे. भगवतगीता जीवनविकास या संदर्भात कार्याद्वारे मानसिक "Empowerment" या विषयाचे महत्व स्पष्ट करते.

सुखाचा संबंध मनःशांतिशी असतो हे आपण जाणतो. जीवनयात्रेत विश्वासाने कार्यरत राहण्यासाठी याच सुखाचा संबंध Empowerment या संदर्भात आत्मविश्वास, निर्भयता, साहस(धृति), दुःखान्त(योग) याचेशी भगवतगीतेने स्पष्ट केला आहे. अर्थात जीवनविकास या संदर्भात Empowerment चे रहस्य भगवतगीता ज्ञात करुन देते.

आत्मविश्वास:

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व।(११-३३)

निर्भयता:

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

दुःखान्त:

योगः कर्मसु कौशलम्।(२-५०)

कार्यरत असणे हा प्रकृतीचा भाग आहे. क्षेत्र-क्षेत्रज्ञ या ज्ञानाद्वारा प्रकृति व ईश्वर यांचा संबंध भगवतगीता स्पष्ट करते. याच ज्ञानामुळे विकासमार्ग अमृतंगमय जाणतो, याचाच अर्थ जीवनमार्गात

ईश्वराचा आश्रय मानसिकताबदल होण्यासाठी (नकारात्मक ते सकारात्मक) स्पष्ट झाला आहे. या ज्ञानामुळे कार्यपुर्व आत्मविश्वास धारण करणे, कार्यरत असतांना निष्ठेने कार्य करणे (समर्पण-निष्काम), कार्याद्वारे योग(दुःखान्त) साध्य करणे, अर्थात जीवनविकास EMPOWERMENT असते . हे रहस्य जाणतो.

"The first duty of man is to conquer fear; he must get rid of it, he cannot act till then. "

-Thomas Carlyle

क्षुद्रं हृदयदौर्बल्यम् त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप।(२-३)

*********

(१-२०)

************************

अथ व्यवस्थितान् दृष्ट्वा धार्तराष्ट्रन् कपिध्वजः।

प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः।।

************************

(१-२०) :

"अथ व्यवस्थितान् दृष्ट्वा धार्तराष्ट्रान् कपिध्वजः"

(War is won in mind)

कोणतेही कार्य करीत असतांना ते कार्य निष्ठेने (Excellence) व्हावे यासाठी कार्याचा एकनिश्चय असावा. व कार्य सुरु करण्यापुर्वी उत्साही मानसिकता असावी. मग युद्धासारखे (कठीण प्रसंग असतांना) कार्य असेल तर याच मानसिकतेची नितांत गरज असते. (हाच संदेश भगवतगीता पुढे देत आहे.

"तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व"/११-३३

War is won in the mind first . )

महाभारत युद्धात अर्जुनाच्या रथावर हनुमानाचा ध्वज लावलेला असतो. प्रत्यक्ष बाणाचा वर्षाव करण्यासाठी अर्जुन धनुष्य हातात घेतो. एक दृष्टि कौरवपक्षावर टाकतो व हनुमंत विराजमान असलेल्या ध्वजावर टाकतो.

हनुमंत विजयाचे चिन्ह असते. (रामायण) युद्धाच्या विजयात हनुमंताची मुख्य व महत्वाची भूमिका असते. अचाट शक्ति

लाभलेला हनुमंत ज्या बाजुने आहे, ती बाजु युद्ध जिंकणारच म्हणुन घाबरण्याचे कारण नसते.

प्रत्यक्ष युद्ध सुरु होण्यापुर्वी शंखनाद झाल्यावर कौरवांचे हृदय विदिर्ण होते. तर त्याचवेळी अर्जुनामध्ये (अपेक्षित विजयाचा) उत्साह संचारतो.

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलाः अभ्यनुनादयन् ॥(१-१९)
अथ व्यवस्थितान् दृष्ट्वा धार्तराष्ट्रान् कपिध्वजः।
प्रवृत्ते शस्त्रसम्पाते धनुरुद्यम्य पांडवः॥(१-२०)

बोध :
कठीण प्रसंगी मरगळ येण्याचा (हृदय विदिर्णता) संभव असतो. ही मरगळ दुर करण्याची शक्ति हनुमंत देत असतो. अशी भारतीयांची श्रद्धा आहे. म्हणुन भारतात प्रत्येक गावात हनुमंताचे मंदिर असते.

युद्ध सुरु होण्यापुर्वी अर्जुनामध्ये आवश्यक असलेला अपार उत्साह संचारलाच असतो, पण दुसऱ्याच क्षणी दुःखी होतो,

मानसिकता दुबळी होते. याच कारणाने भगवतगीता ज्ञानाचे द्वार उघडते. शेवटी हाच (उत्साह, आत्मविश्वास या संदर्भात) संदेश भगवतगीता देत आहे.

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।
तत्र श्री: विजयो भूतिः धृवा नीतिः मतिः मम ॥(१८-७८)

*******

(१-२०):
"प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः"

भगवतगीतेतील प्रसंग युद्धाचा आहे.

प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः।
अर्जुनाने प्रत्यक्ष युद्ध करण्यासाठी शस्त्र धारण केले आहे. युद्ध प्रत्यक्षात सुरु करण्याचा अगदी शेवटचा क्षण असतो व याचवेळी दुःखी होतो. मनुष्य सुखासाठी, त्याला जे योग्य वाटते त्याचा निर्णय करतो किंवा निर्णय आपोआप होतो. अर्जुनाची दुःखी

अवस्था झाल्यामुळे त्याचा युद्ध टाळण्याचा निर्णय (आपोआप)सहज होतो. व आपण योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो.

जेंव्हा मनुष्य निश्चित Destination च्या दिशेने प्रवास करतो, तेंव्हा निश्चिंत असतो, प्रवासाचा आनंद अनुभवतो. पण येथे तर अर्जुनाला Destination च चुकले अशी जाणिव होते व त्याचे समर्थनार्थ ज्ञान वापरतो.

मनुष्यावर निर्णय घेण्याची जबाबदारी आली व निर्णयक्षमता नसेल तर जो सहज निर्णय होतो, त्याचे समर्थन करतो. याच संदर्भात भगवतगीता सावधान करते. प्रत्येक मनुष्य स्वभावप्रकृतिनुसार जगतो व कार्यरत असतो, पण कार्यातील इच्छा-द्वेष द्वंद्व विकासमार्गातील अडथळा असतो. म्हणुन विकासमार्गावर असतांना या द्वंद्वाच्या जाळ्यात अडकु नये.
"तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ"

सुखी जीवनाचे ज्ञान होण्यासाठी भगवतगीता जीवनविकासाचे रहस्य सांगते, ज्यात बाह्यविकास व आंतर्विकास यांचा संबंध स्पष्ट होतो. सुखी जीवनासाठी मनुष्य (व्यावहारिक, भौतिक)

बाह्यविकासाचे महत्व जाणतो. दुःखी झाला असता, दुःखावर मात करण्याचे ज्ञान नसेल तर द्वंद्वाच्या जाळयात सापडतो. ही मनोवश अवस्था ठरते. अर्जुन द्वंद्वाच्या जाळयात सापडतो, यामुळे मनोदुर्बलता येते.

मनोदुर्बलतेसाठी कारण असणारी मनोवश अवस्था Lower consciousness दर्शविते तर Higher consciousness आत्मवश अवस्था दर्शविते. आत्मवश अवस्थेत दुःखाने विचलित होत नाही. याच अवस्थेचे ज्ञान होण्यासाठी ईश्वरज्ञान व त्याचा मानसिक Faculties व Functiong शी असलेला संबंध ज्ञानविज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते. यामुळे विकासमार्ग (अमृतत्वाय कल्पते) निश्चितपणे कळतो. या मार्गावर आत्मवश अवस्था असते.

मानसिक सक्षम होण्यासाठी आत्मवश अवस्थेचे महत्व स्पष्ट होते. आत्मवश अवस्थेत निर्द्वंद्व असतो. निर्द्वंद्व संदर्भात कार्याचा निश्चय दृढ असतो अर्थात कार्यमार्ग दृढ असतो. स्वधर्म(as tiebreaker), दृढनिश्चय (निर्णयअधिकार जाणुन कार्याचा दृढनिश्चय करणे). व आंतर्गत विकास संदर्भात (योगः कर्मसु कौशलम् ) निष्काम कर्म, समर्पित कार्य हे संदर्भ स्पष्ट होतात.

अर्थात निष्काम कर्म External progress व Internal progress यांतील Common tool ठरते. यामुळे higher self क्रियाशील होतो. "Lower self resists higher self to operate!" हेच मनोदुर्बलतेचे कारण ठरते. )

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

अर्जुनाला त्वरीत निर्णय करायचा होता. निर्णय- अधिकाराची जाण व त्याचे महत्व कळते. त्याला (मोहामुळे झालेला)बुद्धिभ्रम व बुद्धियोग यांतील भेद व त्याचे महत्व कळते. बुद्धियोगाचा आश्रय करुन स्मृतिभ्रममुक्त होतो. ( आसक्तिमुळे, दुःखामुळे झालेली ) मनोदुर्बलतता व सक्षमता(योग, दुःखान्त) यांतील भेद जाणुन विकासमार्गावर येतो. याप्रमाणे बाह्यविकास व आंतर्विकास यांतील संबंध त्याला स्पष्ट होतो. विश्वसंचलनात स्वतःची भूमिका निमित्त असली तरी या त्याच्या भूमिकेचे स्वतःच्या जीवनविकासातील (आंतर्विकास)महत्व कळते.

"निमित्तमात्रं भव सव्यसाचिन" (११-३३)

*********

(१-२३)

************************

योत्स्यमानान् अवेक्षेअहं य यतेअत्र समागताः।

धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेः युद्धे प्रियचिकीर्षवः॥

************************

(१. २३):

"धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेः युद्धे प्रियचिकीर्षवः"

vs "स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम् माधव"

(मुढ दुर्योधनाचे खुशमस्करे Vs स्वजनहत्येचे पाप)

कोणतेही कार्य घडण्याच्या प्रक्रियेत तीन भाग गृहीत धरले तर कार्यनिश्चिति व प्रत्यक्ष कार्य घडण्याची स्थिति या दोहोमधील स्थिति भगवतगीतेचा विषय आहे. पांडवावरील अन्यायाच्या विरोधात धर्मयुद्ध ठरले असते. ही कार्यनिश्चिति कार्यप्रक्रियेतील प्रथम भाग ठरतो, दुसरा भाग प्रत्यक्ष कार्य सुरु करण्यापुर्वीची मानसिकता असते. हाच भाग कार्यनिश्चिति(उक्ति) व प्रत्यक्ष कृति यांतील दुवा साधत असते.

व्यवहारात निश्चित हेतुनेच कार्य केल्या जाते. हाच हेतु लक्षात घेवुन अर्जुन युद्धक्षेत्रावर उत्साहीत होवुन श्रीकृष्णाला दोन्ही पक्षांच्या मधे रथ उभा करण्याची विनंति करतो. दुर्बुद्ध दुर्योधनाच्या खुषमस्कऱ्यांना न्याहाळण्याची इच्छा आहे असे भाष्य करतो.

योत्स्यमानान् अवेक्षेअहं य यतेअत्र समागताः।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेः युद्धे प्रियचिकीर्षवः।।(१-२३)

प्रत्यक्षात रथ मधे उभा केल्यावर त्याचा उत्साह मावळतो. त्याची भाषा बदलते.

तस्मात् न अर्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान् स्वबांधवान्।
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम् माधव।।(१-३६)

त्याला स्वजनांच्या मृत्युचे दुःख भयावह वाटते व यामुळे युद्ध करणे या घटनेला पाप ठरवितो. येथे कौरवपक्ष वाईट, अन्याय करणारे म्हणुन युद्ध आवश्यक कि त्या पक्षातील लोक स्वकीय, महनिय, पुजनिय अर्थात चांगले म्हणुन युद्ध करणे चुक या दोन विषयाचे द्वंद्व तयार होते. पण या दोन्ही विषयावर भगवतगीतेत

चर्चा होत नाही तर अर्जुनाचे व्यक्तिगत कर्तव्य या विषयावर चर्चा होते, व हाच अर्जुनाचा प्रश्न असतो.

समाजात भाष्यातुन Motivation, De-motivation होत असते. जसे रामायणात कैकयीच्या मनात द्वेषाची पेरणी केली जाते, तसे अर्जुनाला युद्धासाठी motivate करण्यासाठी येथे त्याच्या मनात द्वेषाची पेरणी केली नाही. तर येथे अशांत मनाला शांत करण्यासाठी शांतिची पेरणी होते. अर्थात हे battle अशांत मन vs शांत मन असे असते. याच अनुषंगाने कार्यनिश्चिति झालेला व्यवहारमार्ग हा (आत्मोन्नतिच्या) विकासमार्गात (अमृतत्वाय कल्पते) Transform होतो. नियतकार्य स्वधर्मात transform होते. चंचलत्व मिटुन निर्णय दृढ(Determination) होतो. "योगः कर्मसु कौशलम् " हे कौशल्य साध्य होवुन कार्याद्वारे ईश्वरभक्ति घडते.

*******

(१-२४)

*************************

एवम् उक्तो हृषिकेशो गुडाकेशेन भारत।

सेनयोः उभयोः मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम्।।

*************************

(१-२४):

"एवम् उक्तो हृषिकेशो गुडाकेशेन भारत"

(भगवदगीतेचा संदेश)

संदर्भ :

भगवदगीतेत अर्जुनाला "भारत" या संबोधनातुन विशेष संदेश आलेले आहेत.

एवम् उक्तो हृषिकेशो गुडाकेशेन भारत।(१-२४)

याद्वारे सर्वात प्रथम अर्जुनाला श्रीकृष्णाचा Response आहे. व शेवटी सुखी जीवनासाठी ईश्वराला शरण रहा असा संदेश आहे.

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।(१८-६२)

अर्जुनाने शत्रुपक्षाला न्याहाळण्यासाठी रथ दोन्ही सैन्याच्या मधे उभे करण्याची विनंति केली. याप्रमाणेच श्रीकृष्णाने रथ उभा करुन म्हटले, भिष्माचार्य, द्रोणाचार्य या प्रमुख योध्यासह जमलेले महारथी पहा. महाभारतातील हा महत्वाचा प्रसंग ठरतो. यांत अर्जुनाची शोकाकुल स्थिति होते.

समाजात मनुष्य कार्यरत असतो. ईश्वरश्रद्ध ईश्वराची भक्ति करतात. भगवदगीतेत कार्यरत असतांनाच ईश्वरभक्तिचा संदेश आलेला आहे.

समाजात धर्माचरण करणे पुण्यकार्य व अधर्माचरण पापकृत्य अशी मानसिकता असते. याच मानसिकतेच्या आधारावर अर्जुनाला दुःख झाल्यामुळे तो नियतकार्याला पापकर्म ठरवितो व निष्क्रियतेला धर्म ठरवितो.

धर्म-अधर्म या संदर्भात सत्कृत्य-दुष्कृत्य असा द्वन्द्व असतो. या द्वन्द्वाला वश झाल्यामुळेच अर्जुन निष्क्रिय होतो. भगवदगीतेतील शास्त्र बंधन-मोक्ष या संदर्भात द्वन्द्ववश vs द्वन्द्वमुक्ति याचे महत्व सांगते.

१. धर्माचरण या संदर्भात स्वधर्माचरण सांगितले आहे. यात स्वधर्म जीवनमुल्य असते. हे जीवनमुल्य द्वन्द्वमुक्ति Tiebreaker/Self approval अशी भूमिका बजावते.

२. बुद्धियोग, (अव्यक्त) ईश्वराचा आश्रय यामुळे जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. या मार्गावर कार्याचा एकनिश्चय

असतो. निष्काम कर्म अर्थात फल ईश्वराला समर्पित होते. हा मार्ग आत्मोन्नतिचा (गुणातीत होणे) बनतो. याला शाश्वत(अमृत)धर्म असे संबोधन आहे.

शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्य एकान्तिकस्य च।(१४-२७)

सार :

१. अज्ञानामुळे मनुष्य अशांत असतो. जीवनमार्गातील कार्यात विश्वास नसतो. पण स्वतःच्या भूमिकेचे समर्थन करतो. हाच भगवदगीतेचा आरंभ आहे. सुखी जीवनासाठी भगवदगीता ज्ञान सांगत आहे.

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।

तत्प्रसादात् परां शान्तिम् स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।।(१८-६२)

२. धर्म मनुष्याचा भ्रम करु शकतात पण ईश्वराचे ज्ञान जाणुन त्याला शरण जाणे व जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" जाणुन विश्वासाने मार्ग चालणे हा संदेश आहे.

सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।(१८-६६)

योगसंन्यस्त कर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम् ।(४-४१)

********

(१-२९)

************************सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते।।
************************

(१-२९) :
" सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति"
(मानवी दुर्बलता vs सक्षमता)

सिंह वनराज म्हणुन ओळखल्या जातो. "शेर-गीदड" यातील शेर मनुष्याला आवडत असतो. कोणताही एक गुण प्रमाण घेतला तर त्यात सिंह सर्वश्रेष्ठ ठरत नाही.

*In the jungle which animal is the biggest ..... I heard you say, ..... elephant.

*In the jungle which animal is the tallest.... I heard you say .... Giraffe.

*In the jungle which animal is the wisest..... I heard you say...... Tortoise

*In the jungle which animal is the fastest ..... I heard you say ..... Cheetahs.

*Uhmm. Among all these wonderful qualities mentioned.... Where is the Lion in the picture.

*Yet you say the Lion is the king of the jungle even without any of these qualities.

*But I discovered something fascinating about the Lion.

*_The Lion is Courageous_

*_The Lion is very bold_

*_The Lion is always ready to face any mountain, any challenges, any barrier that crosses his part, no matter how big they are. _

*_The Lion walks with confidence. _

*_The Lion dares anything and it's never afraid_

*_The Lion believes he is unstoppable. _

*_The Lion is a risk taker_

*_The Lion believes any animal is food for him_

*_The Lion believes any opportunity is worth giving a trial and never allows it slip from his hands.

_

*_The Lion has charisma. _

*_What is it that we get to learn from here ...

_*• You don't need to be the fastest. _*

_*• You don't need to be the wisest_*

_*• You don't need to be the smartest_*

_*• You dont need to be the most brilliant. _*

_*• You don't need to be generally accepted to become your dreams and be great in life. _*

• All you need is courage_*

_*• All you need is boldness_*

_*• All you need is the will to try_*

_*• All you need is the faith to believe it is possible_*

_*• All you need is to believe in yourself that you can do it. _

मानसिक शक्ति या संदर्भात एका विशिष्ट गुणाची ओळख मानसशास्त्रज्ञ करुन देतात. मानवसमाजात या गुणाला आत्मविश्वास/स्वतःवर विश्वास म्हणुन ओळखत असतो.

आत्मविश्वास याचे विरोधी भय, संशय असते, मानसिक दुर्बलता असते. प्रत्यक्ष युद्ध सुरु होणार त्याचवेळी अर्जुनाला याच मानसिक दुर्बलतेने ग्रासले असते. त्याच्यामध्ये उभे राहण्याचेही त्राण नसते. आपण जे करीत आहो किंवा करणार आहो ते चुकीचे आहे हा संदेश त्याला मिळत असतो. अर्थात मार्गात संशय असतो. तो आपल्या स्थितिचे वर्णन करतो, "कांहीतरी विपरित घडण्याचा हा संदेश आहे. "

सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति।... (१-२९)

न च शक्नोमि अवस्थातुं भ्रमतीव च मे मनः।(१-३०)

निमित्तानि च पश्यामि विपरितानि केशव।(१-३१)

मानवी जीवनात चांगलेपणा असतो. हाच आत्मोन्नतिचा आधार असतो. चांगलेपणा विश्वासात Transform होणे आवश्यक असते. ज्यामुळे विश्वासाने मार्गक्रमण करतो. अन्यथा तो भय, संशय या वाटेने दुर्बलतेत Transform होतो. मार्गात अडथळा करतो. हेच सत्य भगवतगीता प्रकाशात आणते.

अर्जुन "जीवनाचे ज्ञान" या संदर्भात विश्वासाने आपल्या नियतकार्याला पाप ठरवितो. प्रत्यक्षात आपले नियतकार्य योग्य कसे? हा संशय त्याला आला असतो. पण हे वास्तव hide करतो. युद्ध न करणे हाच आपला धर्म आहे हे विश्वासाने बोलतो. या स्थितिला अहंकार कारण असते हे भगवतगीता दर्शविते. दुःख टाळण्यासाठी अर्जुनाला सुचलेला हा उपाय असतो.

समाजात मनुष्य आपलेच ज्ञान श्रेष्ठ समजुन नकारात्मक भाष्य विश्वासाने बोलत (प्रज्ञावाद, कठीण आहे!वाईट/विपरित घडणार!) असतो. हा अहंकार असतो, आत्मविश्वास नसतो.

भगवतगीता"अहंकार vs आत्मविश्वास" यातील भेद "अज्ञान vs. ज्ञान" या संदर्भात दर्शविते. अहंकार Attachment दर्शविते. व ज्ञान या संदर्भात Attachment vs. Non attachment याचे शास्त्र सांगते.

*ज्ञान:ज्ञानसञ्छिन्नसंशयम् ।(४-४१)

*अहंकार vs Nonattachment(ज्ञान)

अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

न आदत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभूः।

अज्ञानेन् आवृतं ज्ञानं तेन् मुह्यन्ति जन्तवः।।(५-१५)

*मानसिक शक्ति (Mindfulness/समुद्रशांति)

योगसंन्यस्त कर्माणं ... (४-४१)

तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योगसंज्ञितम् ।(६-२३)

अर्थात हे शास्त्र मानसिक दुर्बलतेवर (भय, विचलित होणे) विजय मिळविण्याचे शास्त्र ठरते.

सार :

जग सुंदर आहे पण या सुंदर जगात सर्वात सुंदर वस्तु मनुष्याचे स्वतःचे जीवन असते. अज्ञानामुळे मनुष्य अज्ञानाला ज्ञान समजतो. अहंकाराला आत्मविश्वास समजतो. मानसिक दुर्बलतेला धर्म समजतो. यालाच माया (Delusion, Illusory energy) म्हटलेले आहे. व या मायेवर विजय मिळविण्यासाठी Divine quality, तसेच ईश्वराची निश्चित ओळख ज्ञानविज्ञान या संदर्भात भगवतगीता करुन देत आहे.

दैवी हि एषां गुणमयी मम माया दुरत्यया।
मामेव ये प्रपद्यन्ते मायाम् एतान् तरन्ति ते।।(७-१४)

अर्थात जीवनाची सामान्य पातळी(Survival) व विकास पातळी(आत्मोन्नति) यातील भेद स्पष्ट होतो.

*****

(१-२९) :

"वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते"

(भय व त्याचा अंत-दुःखान्त)

जीवनातील दुःख आणि दुःखावर मात करण्याची मानसिक प्रक्रिया(Psychological process) जाणुन घेतली तर भगवतगीतेतील अर्जुनाची भयाची भूमिका, Judgement (पाप) भूमिका, निष्क्रियतेची भूमिका व त्याचे कारण लक्षात येते. व याच दुःखाचा अंत करण्यासाठी भगवतगीतेच्या ज्ञानाचे महत्व कळते.

१*काळजी आणि त्याचा अंत करण्याची प्रक्रिया

(Fearing the unknown)

भविष्य कसे उलगडेल हे आपल्याला कधीच ठाऊक नसते. तरीही भीती आपल्याला सध्याच्या परिस्थितीवर आणि पूर्णतः असत्य असलेल्या भविष्यातील निकालांवर विश्वास ठेवण्यास प्रवृत्त करते. हे चिंतेचे मूळ आहे.

*(Judgement thinking vs. Acceptance).

कल्पनाशक्ती सहसा एक शक्तिशाली सर्जनशील शक्ती असते, परंतु जेव्हा भीतीसह कल्पनाशक्ती लागू केली जाते तेव्हा ती चिंताजनक बनते.

वर्तमानातील परिस्थितीचे योग्य आकलन करण्यासाठी पुरेशी माहिती न घेता आपला अहंकार आपली हीच कल्पनाशक्ती अपहृत करतो आणि भय-आधारित अनुमानांवर उडी घेतो. अहंकाराला अज्ञाताची भीती वाटते, म्हणून ते निश्चिततेची भावना वाटण्यासाठी निष्कर्षांवर उडी घेते.

निश्चितता(Certainity) आपल्या अहंकाराची गरज असते म्हणुन आपण गृहिते(Assumptions) करतो. आणि जेव्हा आपण गृहिते करतो तेव्हा आपण चुका करतो. अर्थात judgement thinking याचे कारण असते. जास्त विचार करुन चुकीच्या निष्कर्षावर जाण्याऐवजी आपल्या विचाराला विश्रांती देण्यास शिका आणि “मला माहित नाही” असे म्हणा. अर्थात वास्तवाचा स्विकार करा. (Acceptance)

*वर्तमानातील जागरुकता :

The Universe works in mysterious ways. Embracing the mystery of life gives us a calm within the storm of uncertainty.

आपण मनुष्य आहात, एका समुहाचे व जगाचे सदस्य आहात. निर्माता आपल्याद्वारे कार्य करू शकतो. तो आपल्याला असे काहीतरी देतो जे आपणास आपल्या संकटातून काढून टाकते आणि याद्वारे आपण इतरांसाठी आणि स्वत: साठीही एक मोठे शहाणपण आणि बुद्धीमत्ता प्रदर्शित करु शकता. हीच जागरूकता मिळवा आणि आपल्याद्वारे महान गोष्टी केल्या जाऊ शकतात. आपला हेतू अनुभवता येतो आणि त्याचे योगदान दिले जाऊ शकते.

Fulfilling your purpose represents your work in the world and the purpose for your coming here. You are freed from the past and are called into the present to something greater where you are needed, where you are destined to be and where your contribution is required. This is fulfillment. "

----- ----

२. श्रीकृष्णाला अर्जुनाच्या माध्यमातुन विशिष्ट कार्य करुन घ्यावयाचे होते. हेच विश्वरुपदर्शनयोगात दर्शविले आहे.

एखाद्या आपदामुळे मनुष्य घाबरतो, भयभीत होतो. जगातील महायुद्ध ही आपदाच असते. महाभारतातील महायुद्धात अर्जुन भयभीत होतो.

सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥(१-२९)

श्रीकृष्ण या महायुद्धाचा हेतु स्पष्ट करतात.
यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।(४-७)

अर्थात एका महान परिवर्तनाचा हा संदेश असतो.

जन्मकर्म च मे दिव्य एवं यो वेत्ति तत्वतः।(४-९)

मनुष्यजीवनात जन्ममृत्यु अपरिहार्य असे जीवनाचे वास्तव आहे. तर सुखदुःख अनित्य आहे. ईश्वराचे जगासाठी असलेले Design समजुन घेणे व स्वतःला, जगाला या दुःखी अवस्थेतुन मुक्त करण्यासाठी आपल्या विधायक भूमिकेद्वारे योगदान देणे हा मनुष्याचा पुरुषार्थ असतो.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)
तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तत् प्रसादात् परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।।(१८-६२)

सार :

"एक शेतकरी व कुंभार उंटावर एका बाजुला भाजी व दुसऱ्या बाजुला मडके लादुन बाजारासाठी निघतात. रस्त्यात उंट मान वळवुन भाजी खातो. शेतकरी पुढे असल्यामुळे त्याला दिसत नाही. कुंभाराला वाटते आपले नुकसान नाही म्हणुन चुप असतो. पण भाजीचा भार हलका होतो व मडके खाली पडुन फुटतात. "

विश्वाचे संतुलन असेच असते. संतुलन बिघडले कि सर्वांचेच नुकसान होते. यालाच धर्मग्लानि, शोषण असे समाज संबोधत असतो. म्हणुनच "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च " अशी ईश्वराची ओळख भगवतगीता देते.

*******

(१-३०)

************************

गांडीवं स्त्रंसते हस्तात् त्यक्चैव परिदह्यते।

न च शक्नोमि अवस्थातुं भ्रमतीव च मे मनः।।

************************

(१-३०) :

"गांडीवं स्त्रसते हस्तात् त्वक् चैव परिदह्यते"

(Psychodrama)

भगवतगीताज्ञानाची सुरुवात अर्जुनाच्या Psychodrama त आहे. महाभारत असो कि रामायण यातील Psychodrama जाणुन घेणे महत्वाचे ठरते.

श्रीरामाच्या राज्याभिषेकाची जय्यत तयारी अयोध्येत सुरु असते. इकडे देवलोक मात्र अस्वस्थ होतात. ठरल्याप्रमाणे (ईश्वराच्या Design नुसार) श्रीरामाला वनवास होता. सर्वदेव सरस्वतीला राज्याभिषेक थांबविण्यासाठी विनवणी करतात. तुम्ही मत्सरी आहात, व कमलवनासाठी मी हेमंतऋतुची रात्र व्हावी ही तुमची इच्छा आहे काय

असे सरस्वती देवलोकांना फटकार लावते. पण खरे कारण (असुरवध) सांगुन पुनः विनवणी करतात. यातील महत्व जाणुन आपण बदनाम होणार नाही याची दक्षता घेवुन, (विद्वान कवी आपली तारीफच करेल हे जाणुन )हर्षित होवुन सरस्वती मनथरेची नियुक्ति करते.

१. मनथरा दासी असल्यामुळे राणीला सल्ला देण्याचा अधिकार नव्हता. कैकयीचे लक्ष वेधण्यासाठी नेमके आनंदाच्या समयी फाटके वस्त्र परिधान करुन दुःखी मनाने (राणीच्या) रस्त्यात बसते.

कैकेयी कारण विचारते. ती उत्तरते, भविष्यातील राणीचे दुःख मी पहात आहे . व आपले दुःख व्यक्तिगत नसुन मी राणीची हितचिंतक आहे असे कैकेयीला दर्शविते.

२. महाराजाचे कारस्थान हा शब्द ऐकुन कैकेयी मनथरेला फटकारते. तीची जागा दाखवते. मनथरा दासी असली तरी आपली हितचिंतक आहे, हे जाणुन तुला हा विचार कसा आला याचे कारण विचारते. मनथरा क्षमा मागत असते पण कैकेयीच्या आग्रहास्तव सुरु करते,

३. राज्याभिषेकाच्या वेळी भरताला मामाकडे पाठविणे हा कौसल्येचा डाव आहे. सावत्र या संदर्भातील शेकडो कहाण्या सांगते. कैकेयी भयभित होते. हीचे हृदय बंद पडायला नको म्हणुन कहाण्या थांबवते. व सांत्वन करते.

४. मी ज्योतिष्याला विचारले यावर उपाय केला तर कैकेयीच राजमाता होईल असा विश्वास देते. पण उपाय ऐकणार काय? हा प्रश्न करते. तेंव्हा कैकेयी विश्वास देते. तु विहिरीत उडी मारायला लावली तरी मारेल कारण तुझ्याशिवाय माझे हीतचिंतक कुणीही नाही.

५. "अब आया उट पहाडके निचे" याची खात्री झाल्यावर कसायाने बळी जाणाऱ्या बकऱ्याकडे पहावे तसा कटाक्ष कैकेयीवर टाकते. यानंतर येथे दोन वराची आठवण देते.

रामायणात कैकेयीने काय करावे हा निर्णय करण्यासाठी कैकेयीला मानसिक दुर्बल, भयग्रस्त करण्यात येते. तर भगवतगीतेत अर्जुनाचे नियतकार्य ठरले असते. अर्जुन युद्धक्षेत्रावर स्वजनांना पाहुन मानसिक दुर्बल होतो. त्याचेतील नीट उभे राहण्याचे त्राण नष्ट होते. या अवस्थेत तो निष्क्रियतेची निवड करतो.

गांडीवं स्रसते हस्तात् त्वक् चैव परिदह्यते।

न च शक्नोमि अवस्थातुं भ्रमतीव च मे मनः।।(१-३०)

कैकेयीचा Psychodrama रामायणाचे कारण ठरते. तर अर्जुनाचा Psychodrama भगवतगीताज्ञानाचे कारण ठरते.

भयग्रस्त अवस्था, मानसिक दुबळी अवस्था नकारात्मक विचारसरणीची कारण ठरते. हीच मनोवश अवस्था असते. या अवस्थेत मनुष्य जगत तर असतो, पण त्याची जीवनयात्रा पाण्यावरील नाव तुफानी वाऱ्याने वहात रहावी अशी असते. तो जीवनविकासार्थ कार्याचा एकनिश्चय करण्यास सक्षम नसतो.

इंद्रियाणां हि चरतां यत् मनो अनुविधीयते।

तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि।।(१८-६७)

"A man without a goal is like a ship without a rudder. "

-Thomas Carlyle

तस्माद् यस्य महाबाहो निगृहितानि सर्वशः।

इंद्रियाणि इंद्रियार्थेभ्यः तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।(२-६८)

अर्थात आत्मवश(स्वतःवर Command/स्वतःचा बंधु) अवस्थेचे महत्व येथे स्पष्ट होते.

सार :

केवळ कैकेयीला निर्दयी ठरविणे म्हणजेच रामायणातील Psychodrama दुर्लक्षित केलेला असतो. तसेच अर्जुन स्वजनांना पाहुन दुःखी झाला म्हणुन शत्रु कुणीही असो, माफ करु नका असे म्हणणारे समाजात सापडतील. व यासाठी गीतेचा दाखला देतील. हा समाजातील फार मोठा गैरसमज आहे. मनुष्य मानसिक दुबळा झाला, भयग्रस्त झाला तर तो योग्य सकारात्मक विचार करण्यास सक्षम नसतो. यासाठी भगवतगीतेतील हा Psychodrama समजुन घेणे आवश्यक आहे.

*******

(१-३०):

"न च शक्नोमि अवस्थातुं भ्रमतीव च मे मनः"

(Mental Weakness vs Strength)

"Mental health is often missing from public health debates even though it's critical to wellbeing. "
Diane Abbott

जशी शारिरीक आरोग्याची मनुष्याला ओळख असते, तशी मनाच्या आरोग्याची ओळख नसते. मनाचे आरोग्य हा विषयच दुर्लक्षित होतो. मनुष्य सुखासाठी कार्य करतो पण याच सुखाचे मानसिक आरोग्याशी नाते आहे हे जाणत नाही. मनोव्यापार या संदर्भात सुखदुःख, ताणतणाव, शांति-अशांति आपण जाणत असतो. व्यवहारातील कार्याचा धर्माशी संबंध असतो हे धर्म जाणणारे जाणतात, पण याच धर्मामुळे अर्जुनाच्या मनात गोंधळ उत्पन्न होतो. म्हणुन भगवतगीता
(१)ज्ञानविज्ञानाचा उपयोग करीत आहे व
(२) मानसिक सक्षमीकरण (स्थितप्रज्ञ, योगः कर्मसु कौशलम्) याचे ज्ञान सांगत आहे.

व्यवहारात कार्याचा सुखदुःखाशी संबंध असतो. सुखासाठी इच्छापुर्ति व इच्छापुर्तिसाठी कार्य (State of want - State of art) अशी ही प्रक्रिया असते. या मार्गातच अर्जुन दुःखी होतो. दुःखामुळे विचलित होतो. अर्थात अशांति असते. सरळ दुःख

टाळण्यासाठी कार्य टाळणे योग्य समजतो. या प्रक्रियेत अर्जुनाचा शोक हेच वास्तव असते. दुःखी झाल्यावर त्याची अवस्था भ्रमिष्टासारखी होते.

सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते।
गांडीवं स्त्रंसते हस्तात् त्यक्चैव परिदह्यते।
न च शक्नोमि अवस्थातुं भ्रमतीव च मे मनः।।(१-३०)

* अर्जुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान वापरतो, अर्थात व्यवहारकार्याचा धर्माशी संबंध जोडतो. धर्म मनुष्याची भूमिका योग्य-अयोग्य ठरविते, पण येथे धर्म या संदर्भातच अर्जुनाचा गोंधळ उडतो. पांडवांना न्याय मिळावा म्हणुन अखेरचा उपाय म्हणुन धर्मयुद्ध ठरते, पण अर्जुन याच धर्मयुद्धाला अधर्मयुद्ध ठरवितो. याचाच अर्थ योग्य-अयोग्य या संदर्भात धर्म येथे काम करीत नाही. म्हणुन भगवतगीतेने ज्ञानाचा उपयोग केला आहे. व ज्ञान या संदर्भातच अध्यात्माचा उपयोग केला आहे. व हा संपुर्ण विषय मानसिक सक्षमतेचा होतो अर्थात मनोविकासाचा होतो. योग या शब्दाची व्याख्या दुःखान्त आहे हे येथे उल्लेखनिय आहे.
तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम्। (६-२३)

*ज्ञान अज्ञान:

समाजात स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी, निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी Excuses चालतात. अर्जुन याच excuses साठी जे ज्ञान वापरतो, या ज्ञानाला भगवतगीता प्रज्ञावाद संबोधते. ज्ञान मार्गातील अडथळे दुर करते (ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम् ) व मार्ग निश्चित करते (योगसंन्यस्तकर्माणं).

ज्ञान याच संदर्भात श्रेष्ठांचा "अमृतत्वाय कल्पते" हा मार्ग ठरतो. मार्ग ठरवितांना चांगले-वाईट, शाश्वत-अशाश्वत या संदर्भात सत्-असत् चा विचार होतो.
उभयोः अपि दृष्टो अंतः तु अनयोः तत्वदर्शिभिः ।(२-१६)

या मार्गावर चालतांना विचलित होत नाही.
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

हा प्रवास आत्मोन्नतिचा(मनोविकास) असतो. याच संदर्भात मनोवश vs आत्मवश या भूमिकेचे स्पष्टिकरण आलेले आहे. या

मार्गावर कार्याचा एकनिश्चय असतो. धर्म-अधर्म या संदर्भात स्वतःचा स्वधर्म (करावयाचे नियतकार्य)महत्वाचा असतो. किंवा द्वंद्वमुक्तिसाठी बुद्धियोगाचा वापर करतो व स्वतःचा निर्णयअधिकार वापरुन कार्याचा एकनिश्चय करतो. हा मार्ग मनुष्याला निर्भय करतो.

(स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् )

"Nothing can stop the man with the right mental attitude from achieving his goal; nothing on earth can help the man with the wrong mental attitude. "

-- Thomas Jefferson

*******

(१-३१)

*************************

निमित्तानि च पश्यामि विपरितानी केशव।

न च श्रेयोअनुपश्यामि हत्वा स्वजनं आहवे॥

*************************

१. ३०/१:

"निमित्तानि च पश्यामि विपरितानी केशव!"

(प्रथम प्रतिक्रिया)

समाजात भाष्य चालत असते. भाष्य Communication चे माध्यम असते. या भाष्यात पारदर्शकता असावी, सत्य असावे, परस्पर सहकार्याचे भाष्य असावे, आनंद देणारे असावे, उद्वेगमुक्त असावे ही मनुष्याची इच्छा असते.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहीतं च यत् ।(१७-१५)

मनुष्य सुख अनुभवण्यासाठी जीवनमार्ग चालत असतो. जीवनाच्या याच प्रक्रियेत अर्जुन दुःख अनुभवतो. प्रत्यक्ष कार्याची वेळ आली असता अर्जुन दुःखाच्या वेदना अनुभवतो. त्याचे गात्र शिथिल होते. भ्रमित होतो. या स्थितित तो प्रतिक्रिया देतो. त्याची प्रथम प्रतिक्रिया असते,

निमित्तानि च पश्यामि विपरितानी केशव!(१-३०)
येथे अर्जुनाचे सुखदुःख योग्य काय?-अयोग्य काय? याचे मार्गदर्शन करीत आहे . याचे दर्शन आहे.

पुढे योग्य-अयोग्यचा आढावा घेतो. प्रथम तो "कार्याची गरज" (Want) या संदर्भात आढावा घेतो. भोगैश्वर्याचे सुख (ज्यासाठी कार्य स्विकारले आहे)नको आहे. व याच सुखासाठी कार्य करायचे असेल तर तो "लोभ" होईल. व या लोभापायी स्वजनाची हत्या!म्हणजे पापच!

आता तिसऱ्या टप्प्यावर येतो. त्याचे नियत कार्य पाप आहे हेच त्याला सिद्ध करायचे असते. यांत त्याचे मानसिक समाधान असते. पापपुण्य धर्मज्ञानाचा भाग असतो. म्हणुन धर्म या संदर्भात भाष्य करतो.

अर्जुनाच्या या स्थितीत तीन Factors निदर्शनात येतात,

१. सुख (गरज) २. कार्य ३. ज्ञान(विचार)

(याच Factorच्या आधारावर पुढे विकासमार्गात भक्ति-कर्म-ज्ञान याचा समावेश आहे. )

श्रीकृष्ण संपुर्ण भाष्य ऐकुन घेतात व या भाष्यावर सर्वप्रथम " ज्ञान" या संदर्भात प्रतिक्रिया देतात. अर्जुनाचे भाष्य

(समाधानासाठी) प्रज्ञावाद असते. ते ज्ञान (पुढे विकासमार्गाचे ज्ञान हाच विषय बनतो) ठरत नाही. मनुष्याच्या प्रज्ञावादी भाष्याचा त्याच्या मानसिक समाधानाचा संबंध असतो हे येथे स्पष्ठ होते.

नंतर दुसरी प्रतिक्रिया "सुख" या संदर्भात असते. याच संदर्भात अशाश्वत व शाश्वत हा विषय येतो. व शाश्वताचे ज्ञान जाणणारा मार्गात दुःखाने विचलित होत नाही हे स्पष्ट करतात. याच मार्गासाठी सत(योग्य, शाश्वत) व असत (अयोग्य-अशाश्वत) असा निश्चय होत असतो.

न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः।

उभयो अपि दृष्टो अंतः तु अनयोः तत्वदर्शिभिः॥(२-१६)

भोगैश्वर्यप्राप्तिसाठी कार्य हा सरळ व्यवहार असतो. संस्कारित व्यक्ति कार्याचे महत्व जाणतो व स्वतःला कार्यरत करतो. (सामान्यजनांना योगक्षेमासाठी कार्यसंधि उपलब्ध करुन देणे हे समाजव्यवस्थेचे दायित्व ठरते. ) अर्जुन संस्कारित, शिक्षित असतो, स्वतःचे नियतकार्य जाणतो. तरीपण मार्गात अडथळा अनुभवतो. याचे कारण जीवनविकासमार्गाचे अज्ञान असते.

मनुष्याला सुखासाठी भोगैश्वर्य (Material wants) कळते. पण दुःखान्त स्थिति (ज्यामुळे निर्भयता, धैर्य अनुभवतो) अर्थात योग याची ओळख नसते. या (शाश्वत) सुखाची ओळख असेल तरच

मार्ग दृढ असतो, विचलित होत नाही. याच अनुषंगाने जीवनाचे प्रकृतिज्ञान, ईश्वर याचे संपुर्ण ज्ञान विज्ञानासह स्पष्ट होते.

दुःख अशाश्वताशी attachment असते. तर दुःखान्त शाश्वताशी attachment अर्थात अशाश्वताशी Nonattachment असते. म्हणुन म्हटले,

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

जीवनमार्गात सुख अनुभवणे या सत्यावर मनुष्यजीवनच उभे असते. दुःखान्त स्थिति(योग) या शक्तिची साधना होण्यासाठीच कार्याद्वारे ईश्वरभक्ति हा विकासमार्गाचा Concept आहे. म्हणुन निष्काम कार्य ही कार्यकौशल्याची प्रक्रिया (आध्यात्मिक व्यवस्थापन) आहे.

याप्रमाणे जीवनविकासमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन हाच भगवतगीतेचा विषय ठरतो.

****************

(१-३१)/२:

"न च श्रेयो अनुपश्यामि हत्वा स्वजनम् आहवे"

(जीवनयात्रेतील Frustration)

*जीवनातील Frustration:

मनुष्याच्या प्रगतिच्या संकल्पना भौतिक असतात. ही Survival स्थिति असते. सिकंदर खाली हात गेला!या संदेशाद्वारे सुखासाठी भौतिक प्रगति पुरेसी नाही, शांति हवी असते असा सुर निघत असतो. याचाच अर्थ मनुष्य सुखासाठी जगत असला तरी "जीवनांतील Frustration" हा मुद्दा नेहमीच मनुष्यजीवनाला आव्हान देत राहणार असा संदेश मिळत असतो.

जीवनात सदा प्रसन्न असावे ही मनुष्याची स्वाभाविक इच्छा असते. Frustration, अशांति, भय हे सर्व मानसिक poverty/illness ठरते. सुखाचा नाश होतो. विचलित होतो.

"It’s a lack of clarity that creates chaos and frustration. Those emotions are poison to any living goal. "

-Steve Maraboli

अर्जुनाला युद्धक्षेत्रावर आपल्या नियतकार्यात संशय येतो. दुःखी होतो. उत्साहाची जागा Frustration घेते. आपण चुकीच्या मार्गावर आहोत असे त्याचे विचार बनतात.

निमित्तानि च पश्यामि विपरितानि केशव।
न च श्रेयो अनुपश्यामि हत्वा स्वजनम् आहवे।।(१-३१)

"विनाशकाले विपरित बुद्धि" याप्रमाणे अर्जुनाला त्याचे नियतकार्यच योग्य वाटत नाही, विपरित वाटते! याचे कारण शोधण्यासाठी तो आपल्या Frustration चा आढावा घेतो.

या कार्यात स्वजनांची हत्या आहे. स्वजनाची हत्या करण्यामागे आपला हेतु काय?
मला कांहीच नको!मग हा लोभ ठरतो!लोभासाठी स्वजनाची हत्या घडणार आहे. व हे तर पाप आहे.
या आढाव्यानुसार युद्ध करणे हेच Frustration चे कारण आहे असा निष्कर्ष काढतो.

अर्जुन Frustrationचा आढावा घेतांना जीवनाच्या Survival Stage वर येतो. जीवन आहे तर जगावे लागणारच आहे हीच Survival भूमिका आहे. आपल्या Survival साठी स्वजनांची सरळ हत्या करणे पाप आहे असा निष्कर्ष काढतो. पांडवावर

अन्याय झाला असता जो धर्मयुद्धाचा तोडगा निघतो, त्याला गैर ठरवितो. ज्या बिंदुपासुन धर्मयुद्धाची यात्रा सुरु होते, त्याच बिंदुवर तो येवुन ठेपतो.

*समाजव्यवस्था व मनुष्यजीवन:

समाजाच्या संचालनासाठी व्यवस्था असते. धर्मयुद्ध याच व्यवस्थेचा भाग असतो. समाजातील स्वैरतेवर मात करण्यासाठी समुहव्यवस्थापन व्हावे म्हणुन धर्म आलेत. हे धर्म समाजातील शोषण व मनुष्याच्या जीवनयात्रेतील संशय/द्वंद्व याचे निदान करण्यास उपयुक्त ठरतात. अर्जुन Frustrationचा आढावा घेतांना धर्माला अधर्म व अधर्माला धर्म ठरवितो हे अज्ञानाचे निदान असते. शोषण बाह्यविघ्न व अशांति आंतरिक विघ्न ठरते.

मनुष्याच्या जीवनयात्रेतील जगण्याच्या महत्वाच्या दोनच स्थिति असतात.

१. Survival

२. धर्म/आदर्श/ श्रेष्ठ

"The meaning of life is not simply to exist, to survive, but to move ahead, to go up, to achieve, to conquer. "

Arnold Schwarzenegger

Survival स्थितिमध्ये व्यवहार असतो. या स्थितीत सकाम कार्य असते. इच्छापुर्ति, ध्येयपुर्तिसाठी कार्य केल्या जाते. जीवनात काय साध्य केले?याचा आढावा भौतिक संदर्भात असतो.

जगण्याची" श्रेष्ठ" स्थिति भगवतगीता सांगत आहे. या स्थितीत मानसिक शक्तिची साधना असते. मार्गावरुन विचलित होत नाही. ही साधना होण्यासाठीच कार्याद्वारे ईश्वरभक्ति आहे. या स्थितीत निष्काम असतो, कार्याचा निश्चय असतो. यांत मानसिक शक्ति साठी "योग" व योगासाठी(साधना) कर्मयोग असे भगवतगीतेतील प्रयोजन आहे.

*वर्तमानातील समाजव्यवस्था, मनुष्याचे स्वतःचे जीवन व गुणात्मक शिक्षण:

वर्तमानात समुहव्यवस्थापनात आधुनिक समाजव्यवस्थेचे व्यवस्थापनाचा उपयोग होतो. जीवनात प्रगति व्हावी म्हणुन मनुष्य शिक्षण, प्रशिक्षण घेतो.

मनुष्याची " सुखी जीवनाची संकल्पना " या संदर्भात अशांति आढळते तेंव्हा भगवतगीतेतील" योगः कर्मसु कौशलम्"; योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्च्छिन्न संशयम्" हेच (संशयमुक्तिचे व) शक्तिसाधनेचे संदेश उपयुक्त ठरणार आहेत.

Survival स्थितीमध्ये कार्याची सकाम मानसिकता असते. तर याच कार्याला "अमृतत्वाय कल्पते" या मार्गात वापरण्यासाठी अर्थात निष्काम कार्यासाठी मुल्यांचा (स्वधर्म, वचन- दृढनिश्चय) वापर करावा लागतो. याच ज्ञानाला गुणात्मक शिक्षण म्हणता येईल.

"The direction in which education starts a man will determine his future in life. "

-Plato

*********

(१-३२)

**************

न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च।

किं नो राज्येन गोविंदं किं भोगैः जीवितन वा।।

************************

(१-३२)/१:

"न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च"

(गरजा - आत्मविकास vs कर्म)

"युगे अठ्ठाविस विटेवरी उभा "-

'मला कांहिही नको' असे ठासुन सांगणाऱ्या(पितासेवेत मग्न असलेल्या) पुंडलिकाने साक्षात श्रीकृष्णाला आदेश दिला, या विटेवर चांगला अठ्ठाविस युगापर्यंत उभा रहा, ज्यांना गरज आहे, त्यांना देत रहा. "मला कांहिही नको" असे भाष्य करणाऱ्या अर्जुनाला मात्र अज्ञानी ठरविले.

न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च।(१-३१)

अर्जुनाच्या "मला कांहिही नको" या विधानावर आक्षेप नव्हता तर स्वतःच्या निष्क्रियतेला धर्माचा, आदर्शाचा बुरखा अर्जुनाने चढविला होता. याद्वारे स्वतःच्या (अज्ञानी) भुमिकेला ज्ञानी दर्शवितो, यावर आक्षेप घेतला.

मनुष्याला जीवन जगतांना सुख प्रिय असते व दुःख अप्रिय असते. याच अनुषंगाने त्याच्या सुखाच्या संकल्पना बनतात. याच संकल्पनेमुळे अभाव आला असता दुःखी होतो. दुःख, अडचणी यावर उपाय करणे हा ज्ञानविज्ञानाचा प्रश्न असतो. विकासासाठी ती संधि असते. पण जगातील वास्तवाचा स्विकार न करता प्रश्नावर आदर्शाचे बुरखे चढविणे ही समाजातील संवय शोकांतिका असते. याच संवयीचे दर्शन अर्जुनाने दिले . आनंदाने युद्ध करण्यासाठी युद्धमैदानावर आलेला अर्जुन दुःखी होतो. अज्ञानामुळे (दुःख टाळण्यासाठी) निष्क्रियतेचे समर्थन "धर्म" या संदर्भात करतो.

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः।(१-३७)

अर्जुन म्हणतो, (कौरवपक्षातील )या लोकांना लोभामुळे अधर्म दिसत नाही!पण आपण धर्म जाणतो, आपल्यासाठी आपले कर्तव्य महत्वाचे आहे, व हे कर्तव्य सांगते, युद्ध करणे पाप आहे.

हा अर्जुनाच्या Thought processचा परिणाम होता. ( Thinking मानसिक क्रिया असते, तर Thought हा Conditiond विचार/Belief system असते. )

"Life Is A Reflection of our Thoughts" व जशी विचाराची पेरणी होते तसे उगवते. म्हणुन जीवन विचाराच्या पेरणीचा परिणाम ठरते. या संदर्भात वर्तमानात मनुष्य कसा विचार करतो, हे महत्वाचे ठरते. विकासमार्गाचे ज्ञान नसल्यामुळे अर्जुन वर्तमानात अशांत होतो. "मला कांहिही नको" ही त्याची भूमिका असते. याचसाठी केलेले समर्थनभाष्य अशांतीवर केलेला उपाय असतो.

जीवनाचे Purpose, Meaning मनुष्य शोधत असतो. ज्या (भौतिक)सुखाच्या अभावामुळे दुःख होते, ते अशाश्वत सुख (बदलणारे) ठरते तर आत्मविकासाचे सुख शाश्वत असते. याच आत्मविकासासाठी मनुष्यजीवन लाभले आहे याची जाण मनुष्याला नसते. आत्मविश्वास, निर्भयता, साहस, शांति, स्थिरता(बुद्धिची अविचल स्थिति), चांगलेपणा (सत) इ. (दैवी)गुणाचा नित्यविकास हा आत्मविकास असतो. व्यवहारात

गरजापुर्तिसाठी कार्य हे साधन असते. याच कार्याद्वारे आत्मविकास हा भगवतगीतेचा विषय आहे.

Small is beatiful चा लेखक ई. एफ . शुमेकर म्हणतो, मला काय हवे? या प्रश्नाची पारदर्शकता येण्यासाठी गुणात्मक शिक्षणाची गरज प्रतिपादन केली. तर भगवतगीता विकासमार्गाचे ज्ञान सांगते व त्या अनुषंगाने कार्याचे महत्व सांगते.

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किञ्चन।(३-२२)
"मला या त्रिलोकातही कांहिही मिळवायचे नाही, तरी मी कार्य करीत आहे, कारण मी कर्म केले नाही तर लोक माझे अनुसरण करुन आळशी होतील. "अशी स्वतःची भूमिका श्रीकृष्ण स्पष्ट करतात. मनुष्यजन्म घेतल्यामुळे कर्म करणे ही जबाबदारी स्विकारली. भगवतगीता मनुष्यजीवनातील कर्माचे महत्व (गहना कर्मणो गतिः) स्पष्ट करते.
तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर।(३-१९)

व्यावहारिक बोध: संस्कार/मुल्यशिक्षण या संदर्भात कार्यसंस्कार ही Priority असते. यात स्वतःचा स्वधर्म (Tiebreaker, Self approval), स्वतःचा निर्णय अधिकार, कार्याचा दृढनिश्चय

होण्यासाठी जीवनमुल्ये (स्वावलंबन, बुद्धियोग, स्वधर्म) महत्वाचे असतात.

मुल्यांचा संदेश

स्वावलंबन : निर्णयअधिकारी (Beggars are not choosers)

वचन : Secret of honor-Honor your own words.

बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले

स्वधर्म :

१. समुहात ठरलेल्या निर्णयाची जबाबदारी स्विकारणे. (To surrender the right of governing self in the hands of team/assemly)

२. Tiebreaker, Self approval

बुद्धियोग:

(बुद् ध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।२-३९)

१वर्तमानातील शांति (चंचलतामुक्त)

२. कार्याचा दृढनिश्चय

३. जीवनयात्रा विकासाच्या राजमार्गावर Transform (अमृतत्वाय कल्पते) करणे

४. कार्याद्वारे योग (योगः कर्मसु कौशलम्)

*********

(१. ३२)/२ :

"किं नो राज्येन् गोविंदम् किं भोगेः जीवितेन वा!"

(Purpose of Life)

मला कांहीही नको असे म्हटले तरी जीवनाचे दायित्व संपत नाही. शरीराच्या (भौतिक) प्रवासाला मर्यादा आहे, पण आत्म्याचा प्रवास अखंड असतो. ईश्वराशी मिलन झाल्यावरच हा प्रवास थांबतो.

अनेकजन्मसंसिद्धः ततो याति परां गतिम् ।(६-४५)

प्रवास शरीराचा असो कि आत्म्याचा, प्रवास जीवनाचाच असतो. या प्रवासात सुखदुःख असते. अर्जुनाला याच प्रवासात दुःख झाले व दुःख टाळण्यासाठी युद्ध न करणे हे option आहे असे समजुन युद्ध न करणे याचीच निवड करतो. तेंव्हा कार्य कशासाठी?याचा आढावा घेतो व म्हणतो, मला कोणत्याच सुखाची गरज नाही.

न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च।

किं नो राज्येन् गोविंदम् किं भोगेः जीवितेन वा॥(१-३१)

जीवनाचा हा प्रवास स्वतःच्या सुखासाठी, आप्तांच्या सुखासाठी, मानवतेच्या कल्याणहेतुने परमार्थासाठी असे मनुष्य जाणतो. व यासाठी कार्यरत असतो. याच संदर्भात स्वार्थि, लोभी, त्यागी (म्हणुन चांगला) अशा शब्दांचा प्रयोग होतो. याच संदर्भात अर्जुन म्हणतो, मला स्वतःला सुखासाठी राज्य नको, ज्यांच्यासाठी करायचे ते सुद्धा प्राण व धनाची पर्वा न करता युद्धासाठी आलेले आहेत. मग कार्याचे प्रयोजनच काय?(हा तर लोभ आहे!) हे अर्जुनाचे कोडे सुटत नाही व सरळ याला पापकर्म संबोधतो!

सामान्य मनुष्य व्यवहारात कार्याविषयी असाच विचार करतो. कार्याचे भौतिक प्राप्तिशिवाय महत्व जाणत नाही. यामुळे जीवनाचे निश्चित Purpose(महत्व) जाणत नाही. हाच उलगडा भगवतगीतेने केलेला आहे.

कार्याद्वारे भौतिक प्राप्ति या संदर्भात स्वार्थ-परमार्थ अशी विभागणी होते. मनुष्यावर स्वार्थी (Selfish), त्यागी (उदार, चांगला, आदर्श) असे लेबल चिकटवण्यात येते. स्वार्थि-परमार्थि या आधारावर जीवनविकासाचा निश्चित बोध होत नाही व स्वतःच्या दायित्वाची पुर्तता व्हावी यासाठी तत्ववेत्त्यांनी Self- Interest हा

शब्द पुढे आणला. सॅम्युयल स्माईलने "SELF HELP" हा शब्द coin केला. भगवतगीतेत "आत्मोद्धार" हा विषय आला.

"उद्धरेत् आत्मना आत्मानम् "

याच संदर्भात " अध्यात्म" हा विषय मनुष्याची गरज आहे हे भगवतगीतेने स्पष्ट केले आहे.

शरीराचा प्रवास व आत्म्याचा प्रवास यांत शरीरसुखासाठी (इंद्रियसुख) कार्याचे महत्व मनुष्य जाणतो. अर्थात अर्जुनाला झालेले दुःख आत्मसुख संबंधित आहे हे अर्जुन जाणत नव्हता. हेच रहस्य भगवतगीता उलगडते.

कार्यकारण कर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।

पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते।।(१३-२०)

येथे विषय येतो, "मानसिक दौर्बल्य vs मानसिक शक्ति" (विचलित होणे vs विचलित न होणे).

मानसशास्त्र (Consciousness व सुखदुःखाचे ज्ञान) या विषयावर फ्राईडसह अनेक शास्त्रज्ञांनी, तत्ववेत्यांनी प्रकाश टाकला. भगवतगीतेने सुखदुःखाचे शास्त्रच सांगितले. विचलित न होणे ही अवस्था दुःखान्त (योग), स्थितप्रज्ञ याद्वारा स्पष्ट केली आहे. अर्थात शरीराचा प्रवास व आत्म्याचा प्रवास यांत

common कार्य आहे व कार्याद्वारे (दुःखान्त)सुख याला "योगः कर्मसु कौशलम् " म्हटले.

सार: आपण कार्यरत असतो. या प्रवासात प्राप्तिसुखासाठी कार्य हे आपण जाणतो. सकाम कार्य निष्काम कार्यात transform केले तर कार्याद्वारे सुखाची साधना(योग) होते. हा भगवतगीतेचा संदेश आहे.

*******

(१. ३३)

*************************

एषां अर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च।

त इमे अवस्थिता युद्धेः प्राणाः त्यक्त्वा धनानि च।।

*************************

(१. ३३):

"एषां अर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च"

(प्राप्तिसुख vs आदर्श vs मानसिक सामर्थ्य)

आपण जे कार्य करतो याचे Purpose काय?याचे साधे उत्तर सुखासाठी असते. सुखाच्या विरुद्ध दुःख असते. येथे अर्जुनाला

दुःख होते व तो कशासाठी युद्ध करायचे याचा आढावा घेतो. व्यवहारात अभाव म्हणजे गरीबी, दुःख मनुष्य जाणतो. प्राप्ति या संदर्भात अभावाने दुःख होते. म्हणुन प्राप्ति या संदर्भातच हा आढावा असतो.

*प्राप्ति vs. आदर्श

एषां अर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च।
त इमे अवस्थिता युद्धे प्राणाः त्यक्त्वा धनानि च॥(१-३३)

मला कांही नको व ज्यांच्या हीतासाठी, कल्याणासाठी करायचे, ते पण प्राण, धन याची पर्वा न करता युद्धासाठी उभे ठाकले आहेत. कोणत्याही प्राप्तिसाठी (त्रिलोकांचे राज्य असले तरी) यांना मारण्याची इच्छा नाही. या कृत्यामागे लोभ आढळतो. अज्ञानामुळे हे कृत्य घडते. पण जे ज्ञानी(आपण) आहेत त्यांनी अशा कृत्यापासुन परावृत्त होणे श्रेयस्कर आहे.

आदर्श कि मानसिक दुर्बलता!

अर्जुन आपल्या भाष्यातुन स्वतःला आदर्श दर्शवितो . प्राप्ति (भोगैश्वर्य) या संदर्भात हे आदर्श भाष्य असते. चांगले-वाईट या आधारावर हे समर्थनभाष्य असते. चांगले-वाईट याच आधारावर स्वसमर्थन, परटिका, उपदेशभाष्य समाजात चालत असते.

सुख या संदर्भात मानसिक सामर्थ्य(विचलित न होणे, निर्भय, साहस) हा महत्वाचा मुद्दा भगवतगीता highlight करीत आहे. सामर्थ्याच्या विरुद्ध दुर्बलता असते. अर्जुनाच्या भूमिकेला मानसिक दुर्बलता (हृदयदौर्बल्य) संबोधण्यात येते. येथे मानसिक दुर्बलता (मार्गात विचलित होणे) सामर्थ्य दिसावी हा प्रयत्न असतो. "आदर्श" या संदर्भातील हे अज्ञान असते.

*आदर्श vs. मानसिक सामर्थ्य

प्राप्तिसुखाच्या अभावाने सामान्य मनुष्य दुःखी होतो. "आदर्श" या संदर्भात भ्रम होतो. हेलन केलर अपंग होती पण मानसिक दुबळी नव्हती. तीने आपल्या कर्तृत्वाने मानसिक सामर्थ्याचे दर्शन जगाला दिले. याच सामर्थ्याला भगवतगीता प्रकाशात आणते.

ईश्वराचे एकत्वाचे ज्ञान नसल्यामुळे मनुष्य भोगैश्वर्य आसक्त(सकाम) असतो. जीवन भोगैश्वर्यासाठी आहे हेच केवळ त्याचे ज्ञान असते.

असत्यं अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनीश्वरम् ।
अपरस्पर संभूतं किम् अन्यत् काम हैतुकम्।।(१६-८)

केवळ याच ज्ञानामुळे (सुखासाठी प्राप्ति) चांगला मनुष्यही मार्गात विचलित होतो. यामुळे आदर्शाविषयी गैरसमज होतो. भगवतगीता आदर्श (चांगलेपणा, सत) व मानसिक सामर्थ्य यांचा संबंध ज्ञानविज्ञानाद्वारे स्पष्ट करते.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

व्यावहारिक बोध:

प्रत्येक मनुष्याची विश्वकल्याणात उपयोगिता असते. पण ज्ञानाचे नांवाखाली आपली निष्क्रियता आदर्श दिसावी व आदर्शाचे नांवाखाली आपली दुर्बलता सामर्थ्य दिसावी या प्रयत्नात कर्तव्य स्वार्थ दिसावे(अर्जुन) किंवा स्वार्थ परोपकार दिसावा असे भाष्य बोलल्या जाते. हाच आदर्शाचा भ्रम असतो. असे भाष्य स्वतःला

तसेच/किंवा समाजाला भ्रमात टाकत असते व भिक नको कुत्रा आवर अशी स्थिति निर्माण होते.

समाजातील भ्रम दुर करण्यासाठी कार्ल मार्क्सने धर्माला अफुची गोळी संबोधले. पण धर्माला अधर्म आणि अधर्माला धर्म (आदर्श) संबोधणे हाच समाजातील भ्रम असतो . समाजातील याच अज्ञानाला भगवतगीता प्रकाशात आणते. व मनुष्याला विश्वासाने जीवनयात्रा करण्याचे ज्ञान सांगते. सुखी जीवनाचे रहस्य कळते.

"There is always a solution to every challenging situation. "

Lailah Gifty Akita

*****

(१-३३) :

"त इमे अवस्थिता युद्धे प्राणान् त्यक्त्वा धनंजय"

(जीवनाचा अर्थ)

*निरर्थक जीवन vs. सार्थ जीवन;(प्रेक्षक vs नायक)

"Life is without meaning. You bring the meaning to it. The meaning of life is whatever you ascribe it to be. Being alive is the meaning. "
-Joseph Campbell

आपण जसे जीवन जगतो, जीवनाला Response देतो, अनुभवतो तसा जीवनाला अर्थ देत असतो व अर्थ कळत असतो. जीवन आहे म्हणुन जगावेच लागते. ही जीवनयात्रा जगत असतांना योगक्षेम चालविण्यासाठी अर्थार्जन करतो. या अर्थाजनाला कुणी साधन करतात तर कुणी जीवनाचे ध्येयच समजतात.

असाच अर्जुनाला प्रश्न पडतो. जगत असतांना महाभारतात ठरलेले "धर्मयुद्ध" त्याला त्याचे नियतकार्य देते. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर येतो, तेंव्हा त्याला त्याचे नियतकार्य शोकप्रद वाटते.
१. जीवनात स्वजनांचा वध करुन राज्य मिळवायचे?

कशासाठी?

मला कांही नको!ज्या स्वजनांच्या सुखासाठी अर्थार्जन करायचे, ते सर्व धन, प्राण यांची पर्वा न करता युद्धासाठी येथे आलेले आहेत.

एषां अर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च।
त इमे अवस्थिता युद्धे प्राणान् त्यक्त्वा धनंजय॥(१-३३)

केवळ अर्थार्जनासाठीच नव्हे तर त्रिलोकांच्या राज्यासाठीही या स्वजनांना मारण्याची माझी इच्छा नाही.

२. हे जीवन धर्मासाठी मिळालेले आहे. आपण जे कार्य करायला निघालो, ते अधर्म कार्य आहे. म्हणुन "धर्मकर्तव्य" या हेतुने मी निष्क्रिय राहुन शस्त्रधारी शत्रुपक्षाकडुन मारले जाणे माझ्यासाठी श्रेयस्कर आहे.

३. याप्रमाणे अर्जुन आपल्या जीवनाच्या "Purpose & Meaning" चा आढावा घेतो. मनुष्य याप्रमाणेच आपल्या सुखदुःखानुसार जीवन जगतो व जसा जगतो तसा अर्थ लावित असतो. अर्जुन चांगला(दैवीगुणसंपत्ति असलेला), शुर, विद्वानही

असतो. पण जीवनाचा अर्थ मात्र स्वतःच्या जगण्यानुसारच जाणत असतो.

ज्यांना जीवनाचा खरा अर्थ कळला त्याला भगवदगीतेने "आर्य" संबोधले आहे, म्हणुन अनार्य संबोधन ज्यांना जीवनाचा अर्थ कळला नाही त्यांच्यासाठी केलेले आहे.

अनार्यजुष्ठम् अस्वर्ग्यम् अकीर्तिकरम् अर्जुन।(२-२)

ज्यांना जीवनाचा खरा अर्थ कळला ते खऱ्या अर्थाने नायकाची (Hero of his own life) भूमिका जगत असतात. अन्यथा सामान्याची (प्रेक्षक) भूमिका जगत असतात. याच भेदाचे(नायक व प्रेक्षक) संदर्भात "भारतिय अध्यात्मज्ञानाचा उपयोग करुन नायक भूमिका जगा" हा संदेश स्वामी विवेकानंद युवा पीढिला देत आहे.

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वंद्वमोहेन भारत।
सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परंतप ।।(७-२७)
येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।

ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)

"If we hope to live not just from moment to moment, but in true consciousness of our existence, then our greatest need and most difficult achievement is to find meaning in our lives. "

-Bruno Bettelheim,

**********

(१-३५)

**************************

एतान् न हन्तुम् इच्छामि घ्नतोअपि मधुसूदन।
अपि त्रैलोक्यराजस्य हेतोः किं नु महीकृते।।

**************************

(१-३५):

"अपि त्रैलोक्यराजस्य हेतोः किं नु महीकृते"

(विषयांतर vs. कार्याचा दृढनिश्चय)

ठरल्याप्रमाणे अर्जुन युद्धक्षेत्रावर येतो व दुःखी होतो. आपली कांहीतरी चुक होत आहे असे त्याला वाटते. आपल्या नियतकार्याचा आढावा घेतो. "जे कार्य हाती घेतले आहे त्याने काय साध्य होणार?आपली गरज काय?स्वजनांना मारुन त्रैलोक्याचे राज्य मिळाले तरी मला नको आहे मग या पृथ्वीवरील राज्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. "

एतान् न हन्तुम् इच्छामि घ्नतोअपि मधुसूदन।
अपि त्रैलोक्यराजस्य हेतोः किं नु महीकृते॥(१-३५)

वरकरणी हे शहाणपणाचेच भाष्य वाटते. पण येथे प्रश्न स्वजनांना मारणे किंवा राज्य मिळविणे हा नसतो. हा प्रश्न ठरल्याप्रमाणे कार्याचा(Committed work), स्वतःच्या कर्तव्याचा(स्वधर्माचा, जबाबदारीचा) असतो.

जीवनमार्गात कार्याचा मार्ग पक्का असेल तर मनुष्य विचलित होत नाही. मार्ग पक्का नसेल तर पळवाट शोधतो. कठीण प्रसंगी मुख्य विषय सोडुन दुसऱ्याच मुद्यावर घसरणे व त्यालाच चर्चेचा विषय बनविणे हा प्रज्ञावाद ठरतो. ती पळवाट असते.

"Most people do not really want freedom, because freedom involves responsibility, and most people are frightened of responsibility. "

-Sigmund Freud

सार :

प्रत्यक्ष कृति करतांना मनुष्य स्वतःला योग्य समजुनच कार्यरत असतो. योग्य नसला तरी योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान(ज्ञानी भाष्य)वापरतो. समाजात असेच भाष्य वापरुन अनावश्यक चर्चा होत असते. मुख्य विषय बाजुला पडुन अनावश्यक विषयावर चर्चा होत असते.

"It has been my observation that most people get ahead during the time that others waste. "

Henry Ford

एकीकडे अनावश्यक भाष्य चालु असते. दुसरीकडे लोक प्रत्यक्ष कार्यरत राहुन विकास साधतात, कुणी ईप्सित साध्य करतात.

याचाच अर्थ अनावश्यक भाष्यात गुंतलेले भ्रमात सापडतात. समाजातील याच संवयीचा फायदा धुर्त लोक आपले ईप्सित साध्य करण्यासाठी करीत असतात.

समाजात चांगलेपणा, जनकल्याण या विषयावरही चर्चा होतात. पण प्रत्यक्ष कार्याशिवाय या चर्चाही अर्थहीन ठरतात. अर्जुनाने मुख्य विषय (नियतकार्य, स्वधर्म)बाजुला सारुन धर्म या विषयावर चर्चेला वळविले. श्रीकृष्णाने या दोन्ही विषयावर प्रकाश टाकला. व कर्माचे महत्व Highlight केले. " गहना कर्मणो गतिः"

Action is a great restorer and builder of confidence. Inaction is not only the result, but the cause, of fear. Perhaps the action you take will be successful; perhaps different action or adjustments will have to follow. But any action is better than no action at all.
Norman Vincent Peale

********

(१. ३६)

***************************

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्यात् जनार्दन।

पापमेवम् आश्रयेत् अस्मान् हत्वा एतान् आततायिनः।।

**************************

(१. ३६) :

"पापमेवम् आश्रयेत् अस्मान् हत्वा एतान् आततायिनः"

(चांगल्या मनुष्याचे वर्तमानातील अज्ञान)

भारतभूमिवर संतमहात्मे यांनी नवदृष्टि दिली. स्वामी विवेकानंदांनी म्हटले महामानव एकच संदेश देतात तो संदेश नवपिढिला दृष्टि देईल. पण नवपिढिला व्यक्तिपूजेत, पोथीत अडकवले तर मुख्य संदेश नजरेआड होईल. हा धोका जाणून मुख्य संदेशाचा उपयोग Highlight करणे, वर्तमानात आजच्या संदर्भात त्याला नविन आयाम देणे आवश्यक असते. भगवतगीतेत श्रीकृष्णाच्या याच कार्याचे दर्शन होते.

१. फक्त एकच संदेश:

समाजात चांगलेपणा याविषयीच गैरसमज असतो. व याचे निश्चित ज्ञान नसल्यामुळे दुर्बलतेचा आश्रय होतो. हा भगवतगीतेचा संदेश आहे.

फक्त एक संदेश वाल्याचा महर्षि वाल्मिकी बनवितो. तुझ्या कर्माचा तु एकटा जबाबदार आहे!हा तो संदेश होता. "आपल्या जीवनाचे आपण स्वतः शिल्पकार" हा संदेश आपण ऐकत असतो. पण प्रत्यक्षात मनुष्य यशाचे श्रेय स्वतःकडे घेतो व अपयशाचे खापर मात्र इतरांच्या, परिस्थितिच्या माथी फोडतो.

अज्ञान-ज्ञान, दुर्बलता-शक्ति(सामर्थ्य), योग्य-अयोग्य(धर्म-अधर्म)याचे निश्चित ज्ञान नसल्यामुळे दुर्बलतेला सद् गुण समजणे व हेच सिद्ध करण्यासाठी स्वतःला ज्ञानी समजणे, ज्ञान सांगणे हेच अज्ञान असते. श्रीकृष्णाने हेच सत्य अर्जुनाला दर्शवुन दिले.

पापमेव आश्रयेत् अस्मान् हत्वा एतान् आततायिनः।

तस्मात् न अर्हा वयम् हन्तुम् धार्तराष्ट्रान स्वबांधवान् ।।(१-३६)

अर्जुन चांगला मनुष्य असतो. त्याच्या चांगलेपणामुळेच आपल्या नियतकार्याचा परिणाम दुःखच आहे, हे जाणुन कार्य टाळण्याचा प्रयत्न करतो. आपले नियतकार्य पापकर्म आहे, असे भाष्य करुन युद्ध न करण्याचा निर्णय करतो.

२. चांगल्या व्यक्तिला आत्मविश्वास हवा. निर्भयता येण्यासाठी कर्मयोग हा भगवतगीतेचा संदेश आहे. याच कर्मयोगाचे शास्त्र भगवतगीता सांगते.

भगवतगीतेने यज्ञाला, देवाला नविन आयाम दिला. जीवनात कर्म, ज्ञानविज्ञान याचे महत्व सांगितले. यज्ञाचे logic निष्काम कार्यासाठी, अकर्मासाठी वापरले. ईश्वर जीवनविकासासाठी ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे याचे तत्व स्पष्ट केले. "स्वधर्म" स्वतःच्या मार्गाला स्वतःचेapproval असते. अर्थात स्वातंत्र्याचे जीवनमुल्य असते.

यज्ञ

यज्ञाय आचरतः कर्मं समग्रं प्रविलीयते।(४-२३)

सर्वाणि इन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।

आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।।(४-२७)

ज्ञान

ज्ञानसञ्छिन्नसंशयम्।

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(९-३३)

अर्थात ज्ञानाने संशय छेदुन कार्याचा एकनिश्चय करणे व समत्वयोगाने कार्यरत होणे(निष्काम कर्म). सर्वकर्माचे अखेर ज्ञानातच विलिनिकरण असते.

*******

(१ -३७)

************************

तस्मात् न अर्हा वयम् हन्तुं धार्तराष्ट्रान् स्वबांधवान्।

स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव।।

************************

(१ -३७):

"तस्मात् न अर्हा वयम् हन्तुं धार्तराष्ट्रान् स्वबांधवान् "

(Guilty conscious Vs. Rightous)

युद्धक्षेत्रावर अर्जुन दुःखी होतो. त्याबरोबरच युद्धात आपल्या हातुन स्वजनांची हत्त्या होणार या विचाराने नकळत अर्जुनामध्ये अपराधिकभावना(Guilt) घर करते. अर्जुन चांगला(दैवीगुण), शुर, विद्याविभुषित असला तरी त्याला अपराधिक भावनेने घेरले असते. युद्ध करणे दुःखदायी आहे म्हणुन अयोग्य ठरवितो.

तस्मात् न अर्हा वयम् हन्तुं धार्तराष्ट्रान् स्वबांधवान् ।

स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव।।(१-३७)

स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी मात्र नियतकार्याला पाप ठरवितो. यासाठी धर्मज्ञानाचा आश्रय करतो. प्रत्यक्षात येथे Rightous vs. Guilt असा Psychological प्रश्न तयार होतो.

Psychological facts about
"Righteous vs. guilt"

*Righteous is free from sin or guilt.

* Guilt is responsibility for wrongdoing.

*All the seven deadly sins(काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर) are man's true nature. Of course, you have to control them, but if you're made to feel guilty for being human, then you're going to be trapped in a never-ending sin-and-repent cycle that you can't escape from.

*Many people absorbed a sense of guilt and/or shame from a very early age; their 'mind-set' is towards feeling worthless or in need of punishment.

*We all feel the urge to condemn ourselves out of guilt, to blame others for our misfortunes and to fantasize about total disaster.

अर्जुनाच्या समर्थनभाष्याला प्रज्ञावाद संबोधण्यात येते. हीच घटना भगवतगीता ज्ञानाचे द्वार उघडते.

What is Right & Rightous act?

योग्य -अयोग्य हा धर्माचा विषय असतो व यांत द्वन्द्व असते. भगवतगीतेत निर्द्वन्द्वाचे ज्ञान आहे . जगात गरिबी-श्रीमंति, सुख-दुःख, अंधार-प्रकाश, चांगले-वाईट, शित-उष्ण, दुर्बल-सक्षम असे द्वंद्व आढळतात. व्यवहारात न्याय-अन्याय, लाभ-नुकसान, यश-अपयश असे द्वंद्व आढळतेच. या द्वन्द्वाला वश असले तर कार्याचा निश्चय होत नाही. द्वंद्व मार्गातील अडथळा ठरतो. म्हणुन कार्य हे द्वंद्वमुक्तिचे साधन आहे, हे भगवतगीतेत स्पष्ट झाले आहे.

The reality you see outside of you is composed of two sides, polarities, dualities. These two sides always appear to be opposites of each other, These

dualities look like two completely different realities, yet metaphysically they arise from the same Oneness.

एकत्व, समत्व, दृढत्व द्वंद्वमुक्ति दर्शविते. म्हणुन भगवतगीतेत निष्काम कर्माचे प्रयोजन आहे. व ईश्वर एकत्व अर्थात द्वंद्वमुक्ति दर्शविते. हेच Logic द्वन्द्व vs निर्द्वंद्व भगवतगीतेत वापरले आहे.

समदुःखसुखंधीरं सः अमृतत्वाय कल्पते।(२-१५)
शुनि च एव श्वपाके च पंडितः समदर्शिनः।(५-१८)
व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।(२-४१)

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)
निर्द्वंदो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान।(२-४५)

इच्छाद्वेष समुत्थेन द्वंदमोहेन भारत... (७-२७)..
.. ते द्वंदमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।(७-२८)

सत्-असत् या द्वंद्वातुन मुक्तिः सत्

शाश्वत(अमृत)-अशाश्वत या द्वंद्वातुन मुक्ति: अमृत
अंधार-प्रकाश या द्वंद्वातुन मुक्ति : प्रकाश
सुख-दुःख या द्वंद्वातुन मुक्ति : दुःखान्त(योग)
दुर्बल-सक्षम या द्वंद्वातुन मुक्ति : सक्षम
विभक्त-एकत्व या द्वंद्वावर मुक्तिसाठी : प्रेम
भय-निर्भय या द्वंद्वावर मुक्तिसाठी निर्भयता
ज्ञान-अज्ञान या द्वंद्वावर मुक्तिसाठी ज्ञान

सत, अमृत(शाश्वत), प्रकाश, योग-सक्षम(उर्जा), प्रेम हे ईश्वराचे Divine गुण आहेत. म्हणुन जीवनात ईश्वराचा आश्रय व शक्ति(दुःखान्त- योग)साधनेसाठी कार्याद्वारे ईश्वरभक्ति यांतील रहस्य स्पष्ठ होते.

यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम्।
स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः॥(१८-४६)

*******

१-३७ :

"स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम् माधव"

( Priority management)

"Our life is the sum total of all the decisions we make every day, and those decisions are determined by our priorities. "

-Myles Munroe(Ex president of the International Leadership Training Institute)

महाभारतात कौरवांच्या अन्यायाविरुद्ध जेंव्हा धर्मयुद्ध हाच पर्याय उरला तेंव्हा श्रीकृष्णाची सक्रिय भूमिका सुरु झाली. पण ही भूमिका केवळ मार्गदर्शकाची होती. श्रीकृष्णाने स्वतः युद्ध केले नाही.

युद्धक्षेत्रावर अर्जुनाला दुःख झाले तेंव्हा त्याच्यासमोर द्वन्द्व उभे ठाकले! ठरल्याप्रमाणे युद्ध करणे योग्य कि जेष्ठांना, स्वजनांना न मारणे योग्य?यातुन एक निवड करायची असते. स्वजनांना न मारणे योग्य ही त्याची Priority ठरते. आपली भूमिका योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञानाचा दाखला देतो.

तस्मात् न अर्हा वयम् हन्तुं धार्तराष्ट्रान् स्वबांधवान् ।

स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम् माधव।(१-३७)

मनुष्याला जे करणे योग्य वाटते हीच त्याची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे Priority असते. याप्रमाणेच कार्य घडत असतात. या Priority चे ज्ञान असेल तर विश्वासाने कार्यरत असतो. ज्ञान

नसेल तरी कांहीतरी निर्णय होतच असतो. याप्रमाणेच कार्य घडत असतात. मनुष्य स्वतःला समाधान मिळावे यासाठी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी समर्थन करीत असतो.

“If it’s a priority you’ll find a way. If it isn’t, you’ll find an excuse. ”

Jim Rohn

समर्थनासाठी(Excuse) काय योग्य(चांगले) व काय अयोग्य यावर भाष्य होते. पण मनुष्याला निर्णय घ्यायचा असतो. निर्णय घेतांना State of mind या संदर्भात दोन अवस्था असतात ज्याचा निर्णयावर परिणाम आढळतो.

१. मनोवश अवस्था

या अवस्थेत द्वन्द्ववश असतो. या अवस्थेत सुखासाठी(दुःख टाळण्यासाठी) युद्ध न करणे हा अर्जुनाचा निर्णय होतो. याच संदर्भात भगवदगीता सावधान करते.

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

२. आत्मवश अवस्था

या अवस्थेत मनुष्य स्वतः स्वतःचा बंधु (SELFHELP) ठरतो. या अवस्थेला भगवदगीता Priority देत आहे. हेच साध्य करण्यासाठी जीवनविकासमार्गात कार्यकौशल्याचे ज्ञान व जीवनमुल्यांचे महत्व सांगत आहे. हेच ज्ञान Priority management चे ठरते.

१. स्वधर्म - Tiebreaker, Self approval
२. बुद्धियोग- या निष्ठेद्वारा कर्मयोगाचे आचरण होत असते. यात कार्याचा एकनिश्चय असतो व समत्वयोगाने कार्यरत असतो.

“Time management is an oxymoron. Time is beyond our control, and the clock keeps ticking regardless of how we lead our lives. Priority Management is the answer to maximizing the time we have. ”
– John C. Maxwell

********

( १. ३८)

*************************

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहत चेतसाः।

कुलक्षयं कृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥

*************************

१. ३८:"यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहत चेतसः?

जगात ज्ञानविज्ञान आले तरीपण समाजात गरिबी, शोषण, अधर्म कां असतो?

समाजात हाच एक महत्वाचा प्रश्न असतो, तो प्राचिन काळातही होता, वर्तमानातही आहे. व याच प्रश्नाची जगाला उकल करता यावी म्हणुन साक्षात ईश्वराने श्रीकृष्णरुपात अवतार धारण करुन भगवतगीता जगासमोर आणली.

अर्थात भगवतगीता याच प्रश्नाचे उत्तर देत आहे.

आपणा सर्वांना जीवन मिळालेले आहे. जशी मनुष्याची त्याच्या जीवनाविषयी धारणा असते तशी त्याची जीवनयात्रा चालत असते. याच धारणेनुसार समाजात लोक आढळतात.

चिंताम् अपरिमेयां च प्रलयांताम् उपाश्रिताः।
कामउपभोगपरमां एतावत् इति निश्चिताः॥(१६-११)

हे जीवन केवळ भोगैश्वर्यसुख उपभोगण्यासाठी मिळाले आहे. अशी धारणा असलेले लोक समाजात असतात.

(कामउपभोगपरमां एतावत् इति निश्चिताः) याच धारणेप्रमाणे त्यांची श्रेष्ठत्वाची संकल्पना असते. यामुळे अन्यायाने अर्थसंचयन करण्यास त्यांना संकोच वाटत नाही. तसेच समाजात गरिबी, दुःखाने पिडित असल्यामुळे चिंता व दुःखाचा आश्रय करुन जीवन कंठित असलेले लोक असतात. (चिंताम् अपरिमेयां च प्रलयांताम् उपाश्रिताः)

याशिवाय समाजात महत्वाचा गट असतो, जे चांगले असतात, विद्वान असतात. समाजाला योग्य दिशा देण्यात या गटाची भूमिका महत्वाची ठरते. अर्जुन याच गटातील असतो. युद्धक्षेत्रावर दुःख टाळण्यासाठी आपले नियतकार्य टाळतो. व आपली भूमिका

योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो. अर्जुन म्हणतो, लोभामुळे या लोकांना(कौरवांना) अधर्म दिसत नाही!पण आपण शहाणे आहोत ना!

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहत चेतसाः।(१-३८)

कथं न ज्ञेयं अस्माभिः पापाद् अस्मान् निवर्तितुम् ।(१-३८)

समाजात स्वतःला चांगले, श्रेष्ठ, ज्ञानी समजणारे लोक हीच चुक करीत असतात . (वास्तव hide करण्यासाठी ) आपल्या अज्ञानाला ज्ञान दर्शविण्यासाठी बुद्धि वापरतात. भगवतगीता या भाष्याला प्रज्ञावाद संबोधते. व जीवनात ज्ञानाचे महत्व सांगते.

अर्थात "ज्ञान" या संदर्भात दोष त्यांचा नसतो, जे जीवनच भोगैश्वर्यासाठी आहे ही धारणा करुन जगतात किंवा शोषणामुळे पिडित असतात!

पण अज्ञानाला ज्ञान दर्शवुन समाजात भ्रम निर्माण करणे (Illusion of knowledge)ही कथित श्रेष्ठांची (चांगल्यांची, विद्वानांची) चुक ठरते.

अर्जुन वास्तव स्विकारतो. स्वतःचे अज्ञान कबुल करतो. स्वतःच्या मार्गाचे ज्ञान हा विषय चर्चीला जातो, जो स्वतःसाठी

Standard मार्ग ठरतो. (नियतकार्य स्वधर्म करणे व निर्णय अधिकार जाणुन कार्याचा निश्चय दृढ करणे). हा मार्ग अमृतंगमय असतो व या मार्गावर (दुःखाने)विचलित होत नाही.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं सोअमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

या मार्गावर कार्याद्वारा ईश्वरभक्ति साध्य होते. बुद्धि स्थिर असते. म्हणुन कोणत्याही भाष्याने मोहित होत नाही.

यदा ते मोहकलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति।
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च॥(२-५२)

*******

( १. ३८) :

"यद्यप्यन्ते न पश्यन्ति ...
कुलक्षयं कृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् "

(The External world vs. Inner world )

"Your soul's mission is to serve in the grandest way it can. Divine plans lie imprinted in your inner world, and there are important lessons for you to learn and share on this journey to your most magnificent self. "

Debbie Ford

मनुष्याच्या आंत(Inner world) Strength असते, तसेच Weakness असते. याच Strength व Weakness चे निश्चित ज्ञान भगवतगीता देत आहे.

अर्जुनाने आपल्या नियतकार्याला पाप ठरविले असते. येथे Strength ला Weakness दर्शवितो. व आपल्या निष्क्रियतेला धर्म ठरवितो, अर्थात येथे Weakness ला Strength दर्शवितो. याचाच अर्थ त्याला Strength व Weakness चे निश्चित ज्ञान नसते.

अर्जुनाचे भाषण:

यद्यप्यन्ते न पश्यन्ति लोभोपहत चेतसः।

कुलक्षयं कृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ।।

कथं न ज्ञेयं अस्माभिः पापात् अस्मान निवर्तितुम् ।

कुलक्षयं कृतं दोषं प्रपश्यद् भिः जनार्दन।।(१-३८)

लोभामुळे या बुद्धिभ्रष्ट लोकांना (कौरव पक्ष) कुलक्षयाचा दोष व विश्वासघाताचे (मित्रविरोध) पातक दिसत नाही. पण ज्यांनी(आपण) हे पातक जाणले, त्यांनी या पातकापासुन निवृत्त कां होवु नये?

मनुष्य निष्क्रिय असला तरी स्वतःच्या समाधानासाठी, स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी चांगले भाषण करतो. त्याला

Supporting ज्ञान वापरतो. योग्य-अयोग्य हाच त्याचा विषय बनतो. याबरोबरच इतरांनी काय करावे व करु नये यावर भाष्य करतो. हे या जगातील वास्तव आहे.

"Everyone seems to have a clear idea of how other people should lead their lives, but none about his or her own.

Why?

We are told from childhood onward that everything we want to do is impossible. We grow up with this idea, and as the years accumulate, so too do the layers of prejudice, fear and guilt.

*There comes a time when our personal calling is so deeply buried in our soul as to be invisible. But it's still there. "

-Paulo Coelho(Writer of Alchemist-The book describes people's inability to choose their own Personal Legends. )

जसे फुग्यातील हवा फुग्याला वर घेवुन जाते, फुगा काळा कि निळा यामुळे फरक पडत नसतो. तसेच जगातील श्रेष्ठ लोक स्वतःचे आंतील Strength व Weakness निश्चितपणे जाणत

असतात. Weakness वर मात करतात व Strength विकसित करतात. याप्रमाणे Inner world विकसित करतात.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

मनोवश अवस्थेत मनुष्य चंचल असतो, विचलित होतो. म्हणुन आत्मवश अवस्थेचे महत्व भगवतगीता सांगत आहे. येथे Lower consciousness (मन) vs Higher consciousness (Soul) हा भेद स्पष्ट होतो.

"Cherish your visions and your dreams as they are the children of your soul, the blueprints of your ultimate achievements. "

-Napoleon Hill

भगवतगीतेतील ज्ञानाचा, अध्यात्माचा, आत्मोन्नतिचा हेतु Internal world मधील Weakness व Strength यांतील भेद जाणणे, Weakness वर मात करणे व Strength विकसित करणे अर्थात "Strengthening of Internal world " याप्रमाणे स्पष्ट होतो.

********

(१-३९)

************************

कथं न ज्ञेयं अस्माभिः पापाद् अस्मान् निवर्तितुम्।

कुलक्षयं कृतं दोषं प्रपश्यत्भिः जनार्दन।।

** **********************

१. ३९/१ : "कथं न ज्ञेयं अस्माभिः पापाद् अस्मान् निवर्तितुम् ?"

कथं न ज्ञेयं अस्माभिः पापाद् अस्मान् निवर्तितुम्।

कुलक्षयं कृतं दोषं प्रपश्यत्भिः जनार्दन।।(१-३९)

भगवतगीतेचे रहस्य अर्जुनाच्या (प्रारंभातील) भूमिकेतच दडलेले आहे. ठरल्याप्रमाणे प्रत्यक्ष युद्ध करण्यास कुरुक्षेत्रावर (Warfield) आलेला अर्जुन युद्ध न करण्याची आपली भूमिका श्रीकृष्णाजवळ स्पष्ट करतो, आम्हाला पापपुण्याचे ज्ञान आहे. लोभामुळे पापपुण्याचे ज्ञान कळत नाही. पण ज्यांना ज्ञान आहे

त्यांनी या पापापासुन निवृत्त होणे व आपला धर्म पाळणे, हेच श्रेयस्कर आहे.

"गुलामाला गुलामीची जाणिव करुन द्या म्हणजे तो बंड करुन उठेल" असे एका महानुभावाचे संदेशपर वाक्य आहे. भगवतगीता "स्वातंत्र्याचे अज्ञान" दर्शवुन देते.

पापाचरण करणारे युद्ध न करणे. हेच माझे स्वातंत्र्य आहे ही अर्जुनाची भूमिका असते. अर्जुनाच्या भाष्यावर प्रतिक्रिया देतांना श्रीकृष्ण म्हणतात, अशा कठिण प्रसंगी दुर्बलता तुझ्यासारख्या श्रेष्ठ पुरुषास अशोभनिय आहे. अशी समज दिल्यावर अर्जुन 'युद्ध करणे योग्य कि अयोग्य हा भ्रम निर्माण झाला आहे व ज्या विजयामुळे निष्कारण शोक निर्माण होईल असे कां करायचे? हा प्रश्न उपस्थित करतो. अर्थात येथे तो आपले अज्ञान कबुल करतो.

ज्या मनुष्याला निर्णय योग्य कि अयोग्य हे कळत नाही, तो सोपा उपाय म्हणुन निर्णयच टाळतो. व त्याचे ज्ञानी समजुन समर्थन करतो. ही स्वैरता ठरते. याचाच अर्थ ज्याला निर्णयक्षमता नाही, त्याला अधिकाराची गरज वाटत नाही. अधिकाराचा संबंध

स्वातंत्र्याशी असतो. व याचे अज्ञान हेच मनुष्यजन्माचे अज्ञान असते.

*मोझेसने यहुदींना स्वातंत्र्य मिळवुन दिले पण स्वैरता आढळली तेंव्हा Ten Commandments दिले. अज्ञानामुळे मनुष्य स्वैरतेलाच स्वातंत्र्य समजतो.

*पिंजऱ्यातील पोपटाला उड्डानाचे स्वातंत्र्य दिले तरी तो पिंजऱ्यात परत येतो व मालकाला म्हणतो हेच माझे स्वातंत्र्य आहे, तु व्यवस्था कर हा माझा अधिकार आहे. येथे पोपटाची उड्डान करण्याची नैसर्गिक शक्ति (Born free)क्षीण होते. Born to win but conditioned to loose.

*पिंजऱ्यात वाढलेल्या एल्सा या सिंहिणीला मालक वनात सोडतो. वनात राहण्याची नैसर्गिक संघर्षशक्ति (Bornfree) तिच्यात नसते. ती मालकाकडे परत येते. अनेक प्रयासानंतर ती संघर्षास सक्षम होते व परत फिरत नाही.

कर्म करणे मनुष्याचे Born free आहे. (कर्मानुबंधिनि मनुष्यलोके). याचसाठी निर्णयअधिकाराची जाणिव भगवतगीता करुन देते. (कर्मण्येवाधिकारस्ते). या Bornfreeचे मनुष्याला अज्ञान असेल तर परावलंबि होतो. व यालाच स्वातंत्र्य समजतो.

* अधिकार, स्वातंत्र्य यांचे जीवनात महत्व कळावे म्हणुन स्वावलंबी होणे याचे महत्व जाणणे आवश्यक असते. परावलंबन हे मानसिक पंगुत्व आहे, हे अपघातात पाय गमावलेला मायकेल ॲन्डरसन जाणतो, म्हणुनच विमानाचा पायलट होतो.

निर्णयअधिकाराचा वापर करण्यासाठी कार्यातील योग्य अयोग्य जाणले तरच कार्याचा दृढनिश्चय होतो. हीच निर्णयक्षमता असते. हेच ज्ञान कर्मयोगाचे ज्ञान आहे. याचसाठी बंधन-मोक्ष याचे ज्ञान आहे.

बुद्धियुक्तो जहातिह उभेसुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

भगवतगीतेतील हेच ज्ञान (आध्यात्मिक) क्रांतिचा संदेश देते. अर्थात जीवनातील स्वातंत्र्याचे ज्ञान जाणुन स्वतःमध्ये परिवर्तन घडवुन आणते.

जगातील क्रांतिचा इतिहास स्वातंत्र्याचा आहे. ज्ञानविज्ञानामुळेच युरोपात फ्रेंचक्रांति घडुन आली.

ज्ञानविज्ञानाच्या उपलब्धिमुळे युरोपमध्ये १५व्या शतकाला Age of Reasoning/Enlightenment Age म्हटले. २०वे शतक जगात स्वातंत्र्याच्या क्रांतिने गाजले. देश स्वतंत्र झाले, तरी "आजादी" ची दस्तक थांबली नाही हे समाज अनुभवत आहे. जोवर या भूतलावर मानवजीवन आहे, तोवर "स्वातंत्र्य"हा विषय

जीवंत राहणार. याच संदर्भात जगातील प्रत्येक मानवाला भगवतगीतेची भूमिका जाणुन घेणे आवश्यक आहे. कारण मनुष्यजीवनातील स्वातंत्र्याचे ज्ञान केवळ भगवतगीतेनेच स्पष्ठ केले आहे. ज्यांत कुणाचाही द्वेष न करता स्वतःचे स्वातंत्र्य अबाधित आहे.

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।

स्वातंत्र्याचे अज्ञान असेल तर मनुष्य जे करतो (किंवा करीत नाही व त्याला योग्य सिद्ध करण्यासाठी भाष्य बोलतो)त्याला स्वातंत्र्यच समजतो. हा अहंकार असतो.

अहंकार विमुढात्मा कर्ताहम् इति मन्यते।

हेच अज्ञान दुर करण्यासाठी भगवतगीतेतील स्वातंत्र्याचे ज्ञान ( बंधन-मोक्ष) मनुष्यात (आध्यात्मिक) क्रांति घडवुन आणते.

*******

:(१-३९)/२

"कुलक्षयं कृतं दोषं प्रपश्यद् भिः जनार्दन"

(Check your thinking behavior)

मनुष्याचा Problem काय आहे?

तो म्हणतो, मला Problem नाही. ज्या जगात आलो ते जगच Problem आहे!जग पुर्वीसारखे(चांगले) राहीले नाही, ते सुधारण्यापलीकडे आहे!

"Every generation imagines itself to be more intelligent than the one that went before it, and wiser than the one that comes after it. "

George Orwell

अर्जुन म्हणतो, मला दिसत आहे कि हे युद्ध आमच्या लोभापायी होत आहे. कुलधर्म हा धर्माचा पाया आहे व तोच नष्ट होणार आहे. यामुळे जगण्यातील शहाणपण कोणते?हेच ठरवायचे आहे.

"जगण्यातील शहाणपण" या संदर्भात विचारसरणी बदलवा, Be Positive असे भाष्य आपण ऐकत असतो. पण याचा निश्चित बोध भगवतगीता करुन देत आहे.

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहत चेतसः।(१-३७)

कथं न ज्ञेयं अस्माभिः पापाद् अस्मान् निवर्तितुम् ।

कुलक्षयं कृतं दोषं प्रपश्यद् भिः जनार्दन।।(१-३८)

अर्जुन म्हणतो, मला कांहीच नको, शहाण्यांनी या (स्पष्ट दिसणाऱ्या) पापापासुन निवृत्त कां होवु नये?अर्थात स्वतःला योग्य सिद्ध ठरविण्यासाठी ज्ञान वापरतो. हे जगण्याचे शहाणपण नसुन

या भाष्याला प्रज्ञावादी विचारसरणी संबोधले आहे. याच विचारसरणीत बदल करणे अर्थात वास्तव स्विकारणे हा भगवतगीतेचा प्राथमिक धडा आहे. हा धडा समजल्याशिवाय पुढे जाणार कसा?

अर्जुन वास्तव स्विकारतो व ("जगण्याचे शहाणपण") ऐकण्यास तयार होतो.

जग वाईट आहे असे समजुन कबीर वाईटपणा शोधायला निघतात, शोध लागतो.

बुरा जो देखन मैं चला, बुरा न मिलिया कोय,
जो दिल खोजा आपना, मुझसे बुरा न कोय।

जग सुंदर आहे कारण ती ईश्वराची निर्मिति आहे. व हे जाणले तर या सुंदर जगात सर्वात सुंदर वस्तु मनुष्याचे स्वतःचे जीवन असते. अर्थात जग वाईट समजले तर सर्वात वाईट स्वतःच ठरतो, स्वतःच स्वतःचा शत्रु ठरतो. व जग चांगले जाणले तर स्वतः स्वतःचा बंधु ठरतो.

"You, yourself, are the eternal energy which appears as this Universe. You didn’t come into this world; you came out of it. Like a wave from the ocean. "

Alan Watts

म्हणुन भगवतगीता "आत्मैव हि आत्मनो बंधुः"अर्थात स्वतः स्वतःचा बंधु व्हा हा संदेश देते. याचसाठी मनोवश अवस्था (शत्रु) vs. आत्मवश अवस्था(बंधु) यातील भेद स्पष्ट करते.

********

(१-४०)

************************

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः।

धर्मे नष्टे कुलं कृत्स्नं अधर्मः अभिभवत्युत॥

************************

(१-४०) :

"धर्मे नष्टे कुलं कृत्स्नं अधर्मः अभिभवत्युत"

Religion vs. Spiritual Wisdom (Beyond good & evil)

मी वाईट नाही म्हणुन चांगला आहो असा प्रज्ञावाद (बौद्धिक) समाजात चालत असतो.

" Nobody thinks that they're evil or bad, they think that they're doing the right thing". -Andrew McCarthy

अर्जुन म्हणतो, मला कांही नको, मी लोभी नाही व हे युद्ध करणे म्हणजे धर्मनाश आहे म्हणजे अधर्म आहे.

धर्मे नष्टे कुलं कृत्स्नं अधर्मः अभिभवत्युत।(१-४०)

"Good & evil refers to ancient conception i. e. objectve forces in world. Beyond good&evil is one

of the phrases quoted by Friedrich Nietzsche. He refered Good&bad to psychological question of the strength & satisfaction of our desires. "

-Beyond Good and Evil: (Prelude to a Philosophy of the Future is a book by philosopher Friedrich Nietzsche )

निट्शे Herd व Master morality यावर भाष्य करतो.

भगवतगीता या दोन Moralities द्वन्द्वमोह या संदर्भात स्पष्ट करते.

व याला(द्वन्द्वमोह) वश होवु नका याचा संदेश देते.

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।

तयोः न वशम् आगच्छे तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

Herd मानसिकता:

इच्छाद्वेष समुत्थेन द्वंद्वमोहेन भारत।

सर्वभुतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप।।(७-२७)

The master मानसिकता:

एषा तु अंतगतं पापं जनाणां पुण्य कर्मणाम् ।

ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)

Religion concerns right or wrong. Spirituality concerns द्वंदमोहनिर्मुक्ता i. e. ( concerns deeper

happiness)to experience beyond good and evil. and enjoy rightous action(योगः कर्मसु कौशलम्).

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृत दुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

This is spiritual wisdom (as defined by Bhagwatgeeta)

तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)

*******

(१-४३)

************************

दोषैरेतेः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः।

उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः।।

************************

(१-४३) :

"दोषैःएतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः"

(भगवदगीतेची धर्माविषयी भूमिका)

* धर्म व संस्कार

धर्म समाजाला सक्षम, सुसंस्कृत करण्यासाठी असतो. मनुष्य समाजातील घटक असतो. समाजात चांगल्या मनुष्याला संभ्रम तयार झाला तर चांगला मनुष्यही दुबळा ठरतो. म्हणुन धर्मस्थापना या संदर्भात चांगल्या मनुष्याला सक्षम होण्याचे ज्ञान भगवदगीता सांगते.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

संस्काराचा अभाव म्हणजे दुर्गुणी(पशुवत् )असा समाजात समज असतो. याचाच अर्थ जो दुर्गुणी नाही तो संस्कारीत असा समज असतो. याच आधारावर मी दुर्गुणी नाही म्हणुन संस्कारीत आहो असा अर्थ मनुष्य काढतो.

अर्जुन चांगला मनुष्य असतो. दुःख झाल्यामुळे स्वतःच्या चांगलेपणावर शंका येते. स्वतःला लोभी ठरवितो.

दोषैःएतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः।

उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः।(१-४३)

अर्जुन निष्क्रियतेला धर्म दर्शवितो. युद्धकार्यामुळे कुलक्षय होईल. कुलधर्म नष्ट होतील. वर्णसंकर होईल. यामुळे अधर्म पसरेल. विश्वात कुलधर्म, जातीधर्म हेच शाश्वत धर्म आहे. या शाश्वत धर्माला नष्ट करणारा पापी ठरतो. म्हणुन धर्म वाचविण्यासाठी युद्ध न करणे श्रेयस्कर आहे.

जीवनाचे आव्हान स्विकारण्यास असमर्थ ठरणे हीच बाब संस्काराचा अभाव दर्शविते. अर्थात संस्काराचा अभाव असल्यामुळेच मनुष्य दुबळा ठरतो, हतबल होतो, नैराश्य येते. तरी आपण चांगले आहो हा गैरसमज करुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करणे, या प्रवृत्तिमुळे समाजात दुर्बलतेचे दर्शन होते.

*समाज vs. स्वतःची भूमिका

(Extrovert vs Introvert)

जीवनात प्रश्न निर्माण झाला तर दोष समाजाचा कि स्वतःचा! हा प्रश्न उपस्थित होतो. पांडवाला न्याय मिळावा या हेतुने धर्मयुद्ध

ठरते. अर्थात सामाजिक दोष दुर करण्यासाठी धर्मयुद्ध ठरले असते. व अर्जुनाला नियतकार्य मिळते. येथे प्रश्न अर्जुनाच्या स्वतःच्या स्वधर्माचा असतो.

समाजात स्वतःचे प्रश्न सोडविण्यास मनुष्य सक्षम नसेल तर मनुष्य आपली असमर्थता लपविण्यासाठी/ स्वतःला समर्थ दर्शविण्यासाठी समाजावर/परिस्थितिवर दोष ढकलतो.

या पार्श्वभुमिवर समाजातील चांगलेपणाबद्दल असलेला गैरसमज दुर करणे आवश्यक असते. भगवदगीता यासाठी स्वतःच्या मार्गाचा निश्चित संस्कार कोणता हे स्पष्ट करते.

व्यवहारातील जीवनमार्ग आत्मोन्नतिचा होण्यासाठी "Transformation" हा भगवदगीतेचा विषय आहे. या मार्गावर विचलित होत नाही.

१. स्वधर्माचरण म्हणजे समर्पण. कार्याद्वारे ईश्वरभक्ति.

"समुहाचे प्रश्न व स्वतःचा स्वधर्म" या संदर्भात समुहाचे प्रश्न सोडविण्यासाठी Commonwealth हा शब्द इंग्लंडमध्ये (Political community) प्रचलित झाला.

To surrender the right of governing self in the hands of person /assembly of persons, thereby vesting the power for common good.

"समुहाचे प्रश्न व स्वतःचा स्वधर्म" यानुसार समुहातील नियतकार्य स्वतःचा स्वधर्म ठरतो. भगवदगीतेनुसार स्वधर्म मार्गातील Tiebreaker (द्वन्द्वमुक्ति) ठरतो, मार्गावर स्वतःची मंजुरी (स्वातंत्र्य) ठरते.

"मत्कर्म परमो भव "(१२-१०)

२. कार्याचा एकनिश्चय व निष्काम कार्य(फलसमर्पण)

"कर्तुं मद् योगम् आश्रितः" (१२-११)

३. (शाश्वत-पुरुषोत्तम)ईश्वराशी जोडणे. -बुद्धियोग

ये तु धर्मं अमृतं इदं यथा उक्तं पर्युपासते।

श्रद्धधाना मत्परमा भक्ताः ते अतीव मे प्रियाः॥(१२-२०)

सार:

अर्जुनाने वर्णसंकर हा शब्द वापरुन वर्णाश्रमाला शाश्वत धर्म ठरविले. पण हा युक्तिवाद अर्जुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी वापरतो व धर्म म्हणजे काय? हा प्रश्न उपस्थित होतो. भगवदगीता मनुष्यजीवनात धर्माचा निश्चित हेतु सांगते. , ज्याचा आधार बंधन-मोक्ष आहे. शाश्वत ईश्वर या विश्वाचा आधार आहे.

याच शाश्वत ईश्वराशी जोडणे हा शाश्वत धर्माचा निश्चित हेतु आहे.
हा हेतु साध्य होत नसेल तर संदेश आहे,

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।

अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥(१८-६६) धर्मामुळे निर्माण झालेले द्वन्द्व दुर करण्यासाठी ईश्वराला शरण जाणे. अर्थात ईश्वराशी जोडणे ही Priority असते, ज्यामुळे जीवनयात्रा "अमृतत्वाय कल्पते" या मार्गावर असते.

अर्थात "आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च " हे धर्माचे मुळ तत्व भगवदगीता स्पष्ट करते.

********

(१-४३) :

"उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः?

(Change of Mindset)

सर्वसामान्यांचा प्रश्न :

जगात अनेक लोक जगत असतात. लोक चांगले जगण्यासाठी, पैसे मिळविण्यासाठी शिक्षण घेतात. अध्यात्म, ईश्वर हा तर जेष्ठांचा विषय असतो. धर्म या संदर्भात जातीधर्म असतो. जाती व्यवसायदर्शक असतात. पण वर्तमानात शिक्षणामुळे व्यवसाय बदलत आहे. मग शिक्षण या संदर्भात भगवतगीतेचा निश्चित उपयोग काय?हा सर्वसामान्यांचा प्रश्न असतो.

मानसिकता भेद :

जगात सिंह जगतो, तसेच कोल्हाही जगतो. पण दोघांच्या मानसिकतेत फरक असतो.

"एक सिंहीण कोल्ह्याच्या पिलाचे आपल्या पिलाबरोबर पोषण करते. मोठे झाल्यावर सर्व मुले बाहेर बागडत असतात तेंव्हा हत्ती दिसतो. त्याला पाहुन सिंह(मुले) आनंदित होतात. पण कोल्हा घाबरतो. पळ काढतो व सिंहिणीला म्हणतो, हत्ती आला, मुलांना वाचवा!तेंव्हा सिंहीण म्हणते, तुला विद्या सारखी मिळाली पण तु

ज्या कुळात जन्मला तेथे हत्ती मारत नाही. अर्थात मानसिकता या संदर्भात कुळाचा उल्लेख होतो.

यत् कुले त्वम् उत्पन्नं गजः तत्र न हन्यते।

म्हणुन तु आता जा, आपल्या स्वभावानुसार जग. "

जगात महान कार्ये करणारे धैर्यवान, निर्भय असतात.

जसे मार्ग चालत असलेल्यालाच अडथळा जाणवतो, तसेच कार्यरत असलेल्याच अडथळा, भय जाणवते. कार्यरत होण्यासाठीच शिक्षणाचा उपयोग होतो. तसेच ज्ञानामुळेच अडथळ्यावर मात होते. या संदर्भात भगवतगीतेचा संदेश आहे,

"योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम् "

अर्जुन मार्गावर असतो. या मार्गात अडथळा जाणवतो. आपले नियतकार्य दुःखदायी आहे म्हणुन हे कार्यच पापकर्म आहे हे सिद्ध करण्यासाठी धर्माचा आश्रय घेतो. धर्म या संदर्भात जातीधर्माचा उल्लेख करतो. कुलक्षय झाल्यामुळे जातीधर्म नष्ट होतील !

उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः।(१-४३)

उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन।

नरके नियतं वासो भवती इति अनुशुश्रुम।।(१-४४)

आपली निष्क्रियता आदर्श दिसावी यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करणे, इतरांच्या चुका काढुन टिका करणे, इतरांनी काय करावे व

करु नये, मी वाईट नाही म्हणुन चांगला आहो ! याविषयी सर्रास भाष्य होत असते. यामुळे स्वतःच्या वास्तवाला व स्वतःचे कर्तृत्व, धैर्य या गुणांना hide केल्या जाते. मानसिकता कोल्ह्याची, पण सिंह दर्शविण्याचा हा प्रयत्न असतो. मनुष्याच्या याच चुकीच्या संवयीला भगवतगीतेने प्रकाशात आणले आहे. अशा भाष्याला प्रज्ञावाद संबोधले आहे, ज्याला मनुष्य "ज्ञान" दर्शविण्याचा प्रयत्न करतो.

कोल्ह्याची मानसिकता बदलुन सिंहाची मानसिकता धारण करण्याचे ज्ञान भगवतगीता देते.

*कर्मण्येवाधिकारः ते।

कर्म करण्याचा अधिकार (निर्णय अधिकार)

* योगः कर्मसु कौशलम् ।

कर्माद्वारे योग साध्य करणे हे कार्यकौशल्य

*तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम्।

योग म्हणजे दुःखान्तशक्ति

*समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।

निष्काम कर्माचे रहस्य, अमृतंगमय, मार्गात विचलित न होणे.

*स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।

ही (निर्भयता)शक्तिसाधनाच.

सार :

दुःखामुळे मनुष्य विचलित होतो. अशांत होतो. दुर्बलतेमुळे समाजात मत्सर द्वेष असतो. भयामुळे मनुष्य निष्क्रिय होतो. हे सर्व मानसिक Weakness असतात. शारिरीक आजारावर मनुष्य उपचार घेतो. पण मानसिक Weakness ची ओळख मनुष्याला होत नाही. किंबुहना ही ओळख करुन घेवु इच्छित नाही. ही मनुष्याची संवय त्याच्या विकासातील अडथळा ठरते. हेच भगवतगीता प्रकाशात आणते. याच अनुषंगाने (सक्षमता) विकासाचे ज्ञान या संदर्भात ईश्वराचे ज्ञान आलेले आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

*****

(१-४४)

************************

उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन।

नरके नियतं वासो भवती इति अनुशुश्रुम।।

************************

१. ४४/१ :

"उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन"

(Effect of belief system & Thought process)

Changing mindset, Change your thoughts हे वाक्य Motivation च्या संदर्भात आपण ऐकत असतो. तर भगवतगीतेत "बदल" हाच विषय आलेला आहे. हाच बदल जाणुन घेणे भगवतगीता ज्ञानाचे Purpose आहे.

Changing Mindset : Facts of Belief & Thought

*The difference between a thought and a belief is that you may have thousands of thoughts going through your mind but none of them have any power except those that are beliefs. A belief is a thought that you make real, or accept as truth.

*Many people absorbed a sense of guilt and/or shame from a very early age; their 'mind-set' is towards feeling worthless or in need of punishment.

*Just saying of Change your thoughts/mindset, it won't make it happen,

nor will 'positive thinking'.

We have to work at it every day and prove to ourselves that we are worthwhile.

*We have to change the beliefs of a lifetime .

*Belief System, Blind faith & Thought process :

Every human being has a belief system that they utilize, and it is through this mechanism that we individually, "make sense" of the world around us.

Blind faith is “belief without true understanding, perception, or discrimination. ”

प्रत्येक मनुष्याची Belief System त्याची स्वतःची असते. हे सत्य असले तरी जेंव्हा आपले विचार मनुष्य दुसऱ्यावर थोपवित असतो, तेंव्हा Reasoning/Questioning ची संधी देण्याऐवजी "त्याच्या भलाईसाठी, हीतासाठी" अशी कारणे देत असतात.

अशी विचारसरणी Blind faith ठरत असते. युरोपात विज्ञानक्रांति आली तेंव्हा त्या काळालाच "Age of reasoning "(प्रश्न विचारण्याची संधि) असे संबोधण्यात आले.

Thought process: The process of using your mind to consider something carefully.

प्रत्येक मनुष्याचा जीवनाचा अनुभव, त्याचे ज्ञान त्याची Life Belief System बनवीत असते.

-पैसा: जीवनात पैसाच सर्वकांही आहे. किंवा पैसा काय वर नेणार आहोत?

- जग : जग चांगले आहे किंवा वाईट आहे!

-जीवन : मुल्यवान आहे कि भार आहे (Asset or Liability) !

याप्रमाणे मनुष्याची Belief System सकारात्मक किंवा नकारात्मक, Fear based or Faith based(Value based ) बनवीत असते.

*Fear based ( belief) system vs. Value based (belief) system:

मनुष्य लहानपणापासुन ज्या संस्कारप्रणालीत घडत असतो, ती प्रणाली एकतर fear based असते किंवा value based असते. बालपणात Reasoning/Questioning नसते तर मोठे झाल्यावर Reasoning/Questioning होत असते. ही Thought

process ची प्रक्रिया असते. मनुष्याची Thought process system सक्षम नसेल तर Negativity येण्याची शक्यता असते.

"जग वाईट आहे"

"मी दुर्दैवी आहे "

अशी नकारात्मक विचारसरणी आत्मविश्वासाचा अभाव(low Selfworth)दर्शवित असते.

*Change

Mindset किंवा Thought process ची प्रणालि मनुष्याला जीवनविकासमार्गावर guide करण्यास असमर्थ ठरते तेंव्हा बदल आवश्यक असतो.

Thought process system vs. Conditioned belief system

कार्य योग्य कि अयोग्य? हे ठरविण्यास अर्जुनाची Thought process system सक्षम नसते.

आपले नियतकार्य योग्य कि अयोग्य?हा प्रश्न अर्जुनासमोर उभा ठाकला. या कार्याचा परिणाम दुःखद असल्यामुळे त्याने "अयोग्य" वरच शिक्कामोर्तब केले व हेच सिद्ध करण्यासाठी धर्म या संदर्भातील आपल्या Conditioned Belief System चा वापर करतो. कुलधर्माचा नाश होणे हेच पापाचे कारण बनेल!

उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन।

नरके नियतं वासो भवती इति अनुशुश्रुम ॥(१-४३)

अर्जुन Default (Conditioned)Belief System चा उपयोग स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी करतो. याला प्रज्ञावाद संबोधले. ही Belief system विकासास पोषक ठरत नाही. भगवतगीतेने Thought Process System चे महत्व सांगीतले व त्या प्रणालिला सक्षम करण्यास ज्ञान सांगितले.

Thought Process System

वास्तवाचा स्विकार

Acceptance of Challanging situation.

Step 1.

*Acceptance of Ignorance.

अज्ञान जाणले तरच ज्ञानाचे महत्व कळते.

Step 2.

* Right of questioning.

श्रीकृष्ण अर्जुनाला प्रश्न विचारण्याची संधि देतात. व या प्रश्नानुसारच उत्तराद्वारे ज्ञान सांगितल्या जाते. श्रीकृष्ण अर्जुनाला त्याचा निर्णयअधिकार वापरण्याची संधि देतात.

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)

* Use of Value based (Belief ) system

सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।

अहं त्वाम् सर्वपापेभ्यः मोक्षयिष्यामि मा शुचः।।(१८-६६)

ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. सृष्टि, जगताचे मुळ ईश्वर हेच शाश्वत तत्व आहे. याच ईश्वराच्या अंशाने प्राणतत्व अस्तित्वात असते. अस्तित्व या संदर्भात अशाश्वत व शाश्वत तत्वाचे ज्ञान भगवतगीता सांगते. ज्याद्वारे मनुष्याचा Standard जीवनविकासमार्ग बनतो. हा मार्ग Value based असतो. अर्थात Value based system चा वापर Standard मार्गासाठी (अमृतत्वाय कल्पते) करण्यात येतो.

*****

१. ४४/२:

"नरके नियतं वासो भवती इति अनुशुश्रुम"

I. (ज्ञान vs. प्रज्ञावाद)

समाजात व्यवहार असतो. योग्य-अयोग्य, चांगले-वाईट यावर भाष्य चालते. स्वतःला " योग्य" समजुनच मनुष्याची जीवनयात्रा सुरु असते. या पार्श्वभूमिवर मनुष्याची जीवनयात्रा "सुखाची कि दुःखाची "हाच महत्वाचा प्रश्न असतो. दुःखी जीवनयात्रेमुळेच Stress, Depression सारख्या Mental illness चा मनुष्य

victim होतो, म्हणुन" सुखाची जीवनयात्रा " हा विषय मनुष्यासाठी महत्वाचा असतो. याचसाठी ज्ञानविज्ञान असते.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।(४-३८)

जगात ज्ञानविज्ञान श्रेष्ठ आहे व श्रेष्ठच राहणार हा भगवतगीतेचा संदेश आहे. विश्वात विकास होतो व प्रश्नही निर्माण होतात. प्रश्न सोडविण्यासाठीच ज्ञानविज्ञान असते.

अर्जुनाला नियतकार्य दुःखप्रद जाणवते. ते कार्यच त्याला टाळायचे असते. वरुन आपणच शहाणे आहोत हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान शोधतो.

नरके नियतं वासो भवती इति अनुशुश्रुम।(१-४४)

अहो बत् महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।(१-४५)

आपण नकळत पापच करायला निघालो होतो!पण आता शहाणपणा करायलाच हवा, म्हणुन युद्ध करणार नाही ही भूमिका घेतो. स्वाभाविक आहे!मनुष्य सुखासाठी जगतो. चुकीचा असला तरी त्याची स्तुती केली तर तो सुखावतो.

श्रीकृष्ण त्याच्या शहाणपणाची स्तुती तर करीत नाही, उलट " अज्ञानी" भूमिका दर्शवुन देतात. अर्जुन वास्तव स्विकारतो, तेंव्हा सर्वप्रथम प्रश्न define होतो. अर्जुनाच्या प्रश्नाची Priority धर्म नसुन दुःख आहे याची पारदर्शकता येते.

मनुष्य अशांत असतो, होतो, तेंव्हा त्याला समर्थनाची गरज भासते. पण जो शांत असतो, विश्वासाने कार्यरत असतो, त्याला (सुखासाठी) समर्थनाची गरज भासत नाही, तो सुख अनुभवतो. अर्थात ज्याची सुखाची जीवनयात्रा आहे, त्याला समर्थनाची गरज नसते.

भगवतगीता याच मुद्याला highlight करते. एकीकडे "सुखाची जीवनयात्रा" ही मनुष्याची Priority असली तरी नकळत तो "दुःखाची जीवनयात्रा" करीत असतो. यामुळेच अशांत असतो व इतरांची नसली तरी स्वतःच्या समर्थनाची गरज भासत असते. यामुळेच Stress, भय, Tension इ. Mental illness चा शिकार होतो.

भगवतगीतेने समर्थन भाष्याला प्रज्ञावाद म्हटलेले आहे व "प्रज्ञावाद vs ज्ञानविज्ञान" या विषयापासुन चर्चेला प्रारंभ होतो. व मनुष्यजीवनातील "सुखाची जीवनयात्रा" या महत्वाच्या विषयावर प्रकाश टाकते.

*******************

१-४४/३:"नरके नियतं वासो भवति इति अनुशुश्रुम"

PartII. ( मनोरंजन vs आत्मविश्वास)

आपण सर्व व्यवहार mode मध्ये जगत असतो म्हणुन संसार म्हटले आहे. व्यवहारात तणाव असतो व अध्यात्म, ईश्वरभक्ति यामुळे सुखशांति मिळते हे आपण मानतो, जाणतो. याच संदर्भात "ईश्वर सत्य संसार मिथ्या" असेही ऐकतो. याच भाष्यावरील "अरे संसार"ही प्रतिक्रियाही सर्वश्रुत आहे.

समाजात असे परस्परविरोधी भाष्य चालत असते. काय खरे?काय खोटे?याचाच समाचार भगवतगीता घेते. व्यवहारात कर्म असते. नियतकर्म टाळण्यासाठी अर्जुन आदर्शवाद बोलतो.

नरके नियतं वासो भवति इति अनुशुश्रुम।(१-४४)

याच मुद्यावर भगवतगीता सुरु होते. दुर्बलतेला श्रेष्ठ(Greatness) दर्शविणे, निष्क्रियतेला आदर्शवादी दर्शविणे, अज्ञानाला ज्ञान संबोधणे!या एकाच मुद्याचा भगवतगीता समाचार घेते. कारण हा मनुष्याच्या स्वतःच्या अधिकारातील प्रश्न असतो.

कर्म:

न हि कश्चित् क्षणम् अपि जातु तिष्ठति अकर्मकृत् ।(३-५)

अर्थात कर्म नित्य घडत असते. कर्माचे निश्चित व्यावहारिक ज्ञान नसेल तर कार्यनिश्चय एक नसतो.

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।(३-६)

अर्थात कर्म टाळले तरी मनाने इच्छाचिंतन असते. यामुळे दुर्बलता अनुभवतो व स्वतःला सक्षम दर्शविण्याचा प्रयत्न करतो. भाष्य बोलतो.

भाष्य:

कुणी स्वसमर्थनार्थ भाष्य बोलतो, कुणी इतरांच्या चुका काढतो. कुणी स्वतःचे हीत साध्य करण्यासाठी भाष्य बोलतो. कुणाच्या भाष्याने कमजोर होतो, कुणाचे भाष्य साहस वाढवते. हे सर्व समाजात अनुभवायला येते.

हेलेन केलर या विदुषिला "बिचारी अपंग होती" असे भाष्य वापरले तर ते मनोरंजनाचा विषय होईल पण "अनाथाची नाथ" ही तिची ओळख तिची शक्ति /Asset दर्शविते.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।(१७-१५) )

जगतांना मनुष्य सहज भाष्य बोलत असतो. जेंव्हा हे भाष्य जीवनविकासाला उपयुक्त ठरते तेंव्हा ते कर्मच (वाङमय तप) ठरते. अन्यथा ते केवळ स्वमनोरंजन असते.

ज्ञान:

जीवनात सुखदुःख आहे. दुःखमुक्तिसाठी आदर्शवाद बोलुन अर्जुन मनोरंजन करतो. ज्ञान संशयमुक्ति करते. अर्जुन वास्तव स्विकारतो तेंव्हा त्याला ज्ञानाची गरज भासते, ज्यामुळे तो आपला मार्ग योग्य आहे हे जाणुन विश्वासाने कार्यरत होईल.

सुख या संदर्भात मनोरंजन vs शक्ति (आत्मविश्वास) हा भेद जाणुन कर्माद्वारे शक्ति (दुःखान्त, योग) याचे ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते.

व्यावहारिक बोध:

स्विडन प्रदुषणमुक्त देश आहे. पण भविष्यात प्रदुषणमुक्त राहण्यासाठी "ग्रेटा" या मुलीने पुढाकार घेतला. जागृति केली. याउलट भारतात दरवर्षी १० लाख लोक (वायु व जल) प्रदुषणामुळे मृत्युमुखी पडतात. १ लाख आत्महत्या करतात(यांत शेतकरी २० हजार, विद्यार्थि १०हजार). मृत्युचे हे थैमान असतांना निश्चित कशाची व कुणाची गरज आहे याचा शोध घेतला तर "ग्रेटा"चे महत्व कळते.

(संदर्भ सकाळ/सप्तरंग दि. २१/४/२०१९)

भारतात "ग्रेटनेस" यावर प्रबोधन होते, भाष्य होते. पण प्रत्यक्षात "ग्रेटा"ची गरज भासत आहे. याच पार्श्वभुमिवर अर्जुनामधील Transformation समाजाला मार्गदर्शक ठरावे.

*************

~ (१-४५)

*************************

अहो बत् महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।

यत् राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनं उद्यता॥

*************************

१. ४५/१ :

"अहो बत् महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् "

(Diverted Language)

समाजात, मानवी जीवनात प्रश्न असतात. या संदर्भात भाष्य चालते. भाष्य जर मुळ प्रश्नच hide करीत असेल तर प्रश्न सुटणार कसे?भगवतगीतेने समाजातील या मुळ समस्येलाच प्रकाशात आणले व प्रश्न सोडविण्यासाठी /समस्या निवारण्यासाठी योग्य चर्चा घडुन यावी यासाठी दिशा दिली.

वर्तमानात ज्ञानविज्ञान उपलब्ध झाले. ही काळाची फार मोठी उपलब्धि आहे. पण आधुनिक व्यवस्थेत निर्माण होणारे प्रश्न निवारण्यासाठी हे ज्ञानविज्ञान समर्थ व्हावे यासाठी भगवतगीतेने आचरलेली Scientific दृष्टि जाणुन घेणे आवश्यक आहे.

अर्जुनाला दुःख टाळण्यासाठी युद्ध टाळायचे असते. पण अशांत मनाला शांत करण्यासाठी "मी योग्य आहे" हे सिद्ध करायचे असते. तो दुःखी झाल्यावर जे प्रथम Statement करतो, ("कांहितरी विपरित होत आहे असे वाटते, स्वजनांना मारणे उचित वाटत नाही") त्या Statement ला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्माचा दाखला देतो. या भाष्याचे फलित असते,

अहो बत् महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।(१-४५)

याप्रमाणे निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी स्वतःला धर्मात्मा सिद्ध करतो.

श्रीकृष्णाने या भाष्यावर (कोणते पाप व कोणते पुण्य) वादविवाद केला नाही तर या भाष्याच्या मुळाशी असलेले त्याच्या भूमिकेतील वास्तव दर्शवुन दिले.

"आणिबाणीच्या प्रसंगी मोह निर्माण होणे व त्यामुळे आलेली निष्क्रियतेची भूमिका व हृदयदौर्बल्य श्रेष्ठांना अशोभनिय आहे. याचा त्याग करुन युद्धास तयार हो"

तेंव्हा अर्जुन आपल्या संभ्रमाचे कारण सांगतो. यामुळे धर्मदृष्ट्या माझ्यासाठी काय योग्य आहे याचा निश्चय करु शकत नाही. व काय योग्य आहे याची विचारणा करतो, ऐकण्याची तयारी दर्शवितो.

-जर युद्ध करणे योग्य असले तर कितीही प्राप्ति झाली, (जास्तित जास्त देवाचे राज्य!)तरी माझा शोक मात्र कसा मिटेल हे अनाकलनिय आहे. म्हणुन मी युद्ध करणार नाही.

येथे वास्तव समोर येते. प्रश्नाची पारदर्शकता येते. प्रश्न विस्ताराने Define होतो. "युद्ध करणे योग्य कसे?योग्य असेल तर शोक नष्ट कसा होईल?"याच प्रश्नाचे उत्तर विस्ताराने येते.

१. पापपुण्य या संदर्भात:

कार्याद्वारे विकास होतो. नियतकार्य निष्ठेने करण्यासाठी स्वधर्माचरण आवश्यक. स्वधर्माचरणामुळे कार्य समर्पण वृत्तिने होते. अर्थात भक्तिसाठी कार्य घडते. स्वधर्माचरण टाळले तर पाप म्हटले.

अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।

ततः स्वधर्मं किर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि॥(२-३३)

२. शोकमुक्ति या संदर्भात:

शोकमुक्त होण्यासाठी योग;योग म्हणजे दुःखान्त; कार्याद्वारे योग, हे कर्मयोग ज्ञान .

तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम् ।(८-२३)

यावर ज्ञानविज्ञानासह विस्ताराने चर्चा होते. काय योग्य व काय अयोग्य याचा खुलासा होतो. हे जाणुन निर्णय तुला घ्यायचा असे श्रीकृष्ण सांगतात.

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)

निर्णय अधिकारामुळे मनुष्य स्वातंत्र्य अनुभवतो. जसे पक्षाला पंखाचे महत्व तसे मनुष्याला निर्णय अधिकाराचे असते. "निर्णयअधिकार" या Awareness मुळे वास्तव स्विकारतो. दृढनिश्चयाचे (Determination)महत्व कळते. म्हणुन निर्णयअधिकार मनुष्याचा Bornfree अधिकार आहे हे भगवतगीतेने "कर्मण्येवाधिकारस्ते" यातुन स्पष्ट केले आहे. कर्मयोगाचा निर्णयअधिकार पाया आहे. निर्णय अधिकार जाणला तर कार्याचा दृढनिश्चय (Determination) व त्याचे महत्व कळते.

व्यवसाय आत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।(२-४१)

सार:

१. समाजात जगतांना वास्तव hide करणारे भाष्य चालते. तेंव्हा असे भाष्य मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी वापरलेली कला असते. यामुळे जेंव्हा अशा भाष्यावर वादविवाद चालतो, तेंव्हा मुळ प्रश्न/वास्तव बाजुला पडतो. म्हणुन

अ)निरर्थक (विषय सोडुन Irrelevent)/भ्रमित करणारे भाष्य आणि

ब). वास्तव स्विकारुन प्रश्नाला पारदर्शकता आणणे, प्रश्न सोडविण्यासाठी Scientific चर्चा अर्थात ज्ञानाची दृष्टि असणे

यांतील भेद जाणणे, त्याचे महत्व जाणणे ही दृष्टि भगवतगीता देत आहे.

२. योग्य काय, अयोग्य काय? यासाठी मार्गदर्शन असते पण निर्णय स्वतःला घ्यायचा असतो. मानवी जीवनात व विशेषतः वर्तमानातील स्वातंत्र्याच्या काळात निर्णय अधिकाराचे महत्व जाणले तर संवाद सुलभ होतो. काय हवे याचे awareness येते.

******

१. ४५/२:"यत् राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनं उद्यता"

(चांगलेपणाच्या शक्तिचे अज्ञान)

"योग्य काय"याचे निश्चित ज्ञान असलेला मनुष्य विश्वासाने जीवनमार्ग चालतो. योग्य काय?या संदर्भात अर्जुनाला संशय उत्पन्न होतो व निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी धर्मज्ञानाचा वापर करतो. यामुळे भगवतगीतेत धर्म हा विषय चर्चेत आला.

चांगले-वाईट, पाप-पुण्य या संदर्भातील धर्म अर्जुन जाणत होता. दुःख टाळण्यासाठी त्याला युद्ध टाळायचे होते. म्हणुन चांगले-वाईट, पाप-पुण्य या आधारावर स्वतःला लोभी ठरवुन त्याच्या नियतकार्याला(Committed work) पापाचरण(Judgement) ठरवितो.

अर्जुनाला ज्या धर्माचे ज्ञान होते त्याच अनुषंगाने धर्माचरण या संदर्भात स्वधर्माचरण करणे या ज्ञानाचा उल्लेख होतो.

स्वधर्माचरण करुन जिंकलास तर राज्य भोगशिल व मृत्यु आला तर स्वर्गास प्राप्त होशील असे श्रीकृष्ण भाष्य करतात. मार्गातील योग्य-अयोग्य हा Tie सोडविण्यासाठी स्वधर्म मुल्याचे महत्व स्पष्ट होते.

यानंतर भगवतगीतेला अभिप्रेत असलेला (शाश्वत) धर्म(बंधन-मोक्ष) ज्ञान सांगण्यात येते. हेच सत्य बुद्धिची सत, रज, तम अवस्था यातुन स्पष्ट झाले आहे.

सत -बंधं मोक्षं च या वेत्ती बुद्धिः सा पार्थ सात्विकी।

रज-यया धर्मं अधर्मं च कार्य च अकार्यं एव च।

अयथावत प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसि।।

तम-अधर्मं धर्मं इति या मन्यते तमसा आवृता।

(१८-३०, ३१, ३२)

योग्य-अयोग्यचे ज्ञान स्पष्ट न झाल्यामुळे निष्क्रियतेला अर्जुन धर्माचरण ठरवितो. प्रत्यक्षात अर्जुनाच्या या भूमिकेला त्याचे सुखदुःख कारण असते. व चांगले-वाईट या आधारावर समर्थन करतो.

सुखदुःखानुसार मार्ग चालणे व चांगले-वाईट या आधारावर समर्थन किंवा टिका करणे, ही जीवनाची सामान्य स्थिती असते. या स्थितीत चांगला(दैवीगुण) अर्जुन स्वतःला लोभी ठरवितो व चांगलेपणाच्या शक्तिविषयी अनभिज्ञ असतो.

भगवतगीता प्रकृतीचे सत-रज-तम तीन गुण व गुणातीत ईश्वर हे ज्ञान विज्ञानासह स्पष्ट करते. याच ईश्वराचा अंशाने जीवितत्तत्व धारण केले असते. या आधारावर १. चांगलेपणाचा (सत् )संबंध ईश्वरज्ञानाशी जोडते. २. बंधन-मोक्ष याचे ज्ञान सांगुन जीवनाचा शाश्वत विकासाचा मार्ग भगवतगीता सांगते.

ही धर्माचरणाची कर्मासाठी बुद्धियोग निष्ठा असते.

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिःयोगे तु इमां शृणु।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।।(२-३९)

या ज्ञानामुळे कार्यातील योग्य-अयोग्य, चांगले-वाईट या संशयापासुन मुक्त होतो(कर्मबंधं प्रहास्यसि). व कार्याचा एकनिश्चय होतो. व कार्याद्वारे योग (दुःखान्त, निर्भयता) साध्य होतो.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

व्यावहारिक बोध:

*मनुष्याला स्वतःच्या ठायी असलेल्या चांगलेपणाची ओळख व्हावी . त्याला साकार करण्यासाठीच भगवतगीता निर्भय, निःसंशय, दृढ होण्याचे ज्ञान देते. अन्यथा या व्यावहारिक जगात स्वतःला दुबळा जाणण्याची, अपराधिक भावनेने ग्रस्त होण्याची शक्यता असते. म्हणुन भगवतगीता मनुष्याला त्याची ओळख देते,

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

*अर्जुनाच्या ठायी असलेल्या चांगलेपणामुळे तो दुःखी झाला व हृदय विदीर्ण झाले. ही स्थितीच अर्जुनाचे असामान्यत्व दर्शविते.

"Everyone is Unique"

अर्जुनाच्या ठायी असलेला चांगलेपणा पुर्वजन्माचे संचित होते. म्हणुन ईश्वराची सोबत मिळाली. व ईश्वराशी जोडण्याचे ज्ञान मिळाले.

पुर्वाभ्यासेन तेनैव ऱ्हियते हि अवशो अपि सः।

जिज्ञासु अपि योगस्य शब्द ब्रह्मअतिवर्तते।।(६-४४)

********०*

(१-४६)

************************

यदि माम् अप्रतीकारम् अशस्त्रं शस्त्रपाणयः।

धार्तराष्ट्रा रणे हन्युः तन्मे क्षेमतरं भवेत्।।

************************

विषय ६५५ :

"यदि माम् अप्रतीकारम् अशस्त्रं शस्त्रपाणयः"

(Fixed mindset vs. Growth mindset)

अर्जुनाची भूमिका :

धर्मासाठी मला मृत्यु मान्य आहे. मी निःशस्त्र राहुन शस्त्रधारी कौरवांनी मला मारणे हेच माझ्यासाठी श्रेयस्कर आहे.

यदि माम् अप्रतीकारम् अशस्त्रं शस्त्रपाणयः।
धार्तराष्ट्रा रणे हन्यु तन्मे क्षेमतरं भवेत्॥(१-४६)

मानसशास्त्रज्ञांनी Mindset Theory या संदर्भात Fixed mindset vs. Growth mindset यांतील भेद स्पष्ट केला आहे.

[Mindsets are people’s lay beliefs about the nature of human attributes, such as intelligence or personality.

Fixed mindset (or entity theory ) is the belief that human attributes, such as intelligence or personality, are fixed and cannot be changed.

According to Mindset Theory, people with a fixed mindset, as compared to a growth mindset, are more interested in proving and validating themselves than in actual improvement and, hence, more vulnerable to get discouraged by mistakes and setbacks.

Growth mindset is the belief that human attributes, such as intelligence or personality, are malleable and can be changed substantially. ]

Mindset Theory नुसार अर्जुनाची विषादभूमिका Fixed mindset ची असते. या भूमिकेत वास्तव स्विकार न करता Judgement thinking, Validation of self ही भूमिका आढळते. भगवदगीतेने "आत्मोन्नति" या संदर्भात Growth Mindset( आत्मा उन्नति) चेच द्वार उघडे केले आहे. या ज्ञानामुळे थांबलेला रथ सुरु होतो.

बोध :

"You try something, it doesn't work, and may be people even criticize you. In a fixed mindset, you say, 'I tried this, it's over. ' In a growth mindset, you look for what you've learned. "

Carol S. Dweck

*********

:"धार्तराष्ट्रा रणे हन्युः तन्मे क्षेमतरं भवेत्":

संपुर्ण विश्व जणु स्वतःला योग्य समजुनच कार्यरत झालेले भासत असते. मनुष्य "योग्य"समजुनच कार्यरत असतो, योग्य नसला तरी

"योग्य"सिद्ध करण्यासाठी भाष्य बोलत असतो. भाष्य बोलतांना मनुष्याची ही सहजप्रवृत्ति असते.

पांडवांना आयुष्यात अडचणी आल्यात. या अडचणीतुन कोणताही मार्ग काढण्यास कौरव तयार नव्हते. अखेर व्यवहाराचा भाग म्हणुनच "धर्मयुद्ध" ठरते. या धर्मयुद्ध रुपाने अडचणीवर मात करण्यास उपाय मिळाला असतो. प्रत्यक्ष कार्य करण्याची वेळ आली असता, हा उपायच चुकीचा आहे असे अर्जुन श्रीकृष्णाच्या निदर्शनास आणुन देतो व या युद्धात स्वतःला (निःशस्त्र राहुन) मृत्यु येणे स्वतःसाठी योग्य समजतो. (प्रत्यक्षात हतबलताच दर्शवीत असतो, पण आदर्शाचा साज चढवितो)

**यदि माम् अप्रतीकारम् अशस्त्रं शस्त्रपाणयः।**
**धार्तराष्ट्रा रणे हन्युः तन्मे क्षेमतरं भवेत्।।(१-४६)**

योगक्षेमासाठी सर्व जगच कार्यरत असते. योगक्षेमासाठी कार्य हीच जीवनाची सामान्य स्थिति व कार्याची सकाम गति असते. जीवनाची श्रेष्ठता या संदर्भात चांगलेपणा, आदर्श, श्रीमंति इ. व्यावहारिक शब्दांची मनुष्याला ओळख असते.

"गरीब खावे भुङगडा तो भुखा मरो खावे, अमिर खावे तो शौकसु"

अर्थात श्रेष्ठतेचा इच्छापुर्तिशी, श्रीमंतीशी संबंध जोडतो, तेंव्हा श्रीमंतांना योगक्षेमासाठी कार्याची गरज नसते असा सामान्य लोकांचा समज होतो. सामान्य लोकांच्या याच मानसिकतेमुळे आपण लोकहितासाठी कार्यरत आहो हे लोकांच्या गळी उतरविणे सोपे असते. तर दुसरीकडे कुणी निष्क्रियतेला उच्चगति(श्रेष्ठत्व)दर्शवित असतात. इच्छापुर्ति याच संदर्भात "स्वार्थि, लोभी vs. त्यागी, आदर्श" असा अर्थ लावुन निष्क्रियतेचे समर्थन केले जाते. याच मानसिकतेची अखेर अर्जुनाच्या विषादयोगातुन दर्शविली आहे.

याचाच अर्थ प्रत्यक्षात कार्याच्या उच्चगतिचे अर्जुनाला अज्ञान असते, व याचमुळे अर्जुन निष्क्रियतेला उच्चगति दर्शवित असतो. समाजात याच दृष्टिमुळे योगक्षेमासाठी होणाऱ्या कार्याला कष्ट समजण्यात येते!

इच्छापुर्ति याच संदर्भात (स्वार्थि vs परमार्थि) जीवनाच्या उच्च अवस्थेचे ज्ञान मनुष्य ऐकत असतो. व याच संदर्भात अर्जुनाचे समर्थन असते. म्हणुन हे ज्ञान अपुरे ठरते. म्हणुन जीवनाची उच्च अवस्था, कार्याची उच्चगति जाणणे हेच मनुष्याचे दायित्व ठरते. ही गति जाणली तरच मनुष्याला जीवनात कार्याचे महत्व कळते.

भगवतगीतेने कार्याची उच्चगति "गहना कर्मणो गतिः" हाच विषय highlight केला आहे.

सहजं कर्म कौंतेय सदोषम् अपि न त्यज्येत्।

सर्वारम्भा हि दोषेण धूमेन अग्नि इव आवृताः॥(१८-४८)

जसा अग्नि धुराने व्यापलेला असतो, तसे कार्यातही दोष असला तरी सहजकार्याद्वारेच मनुष्य विकास साधत असतो. पण हे सहजकार्यच सदोष आहे म्हणुन त्या कार्याचाच त्याग करणे, ही पाळी अर्जुनावर येते.

*जीवनाची उच्च अवस्था:

स्वधर्मम् अपि चावेक्ष्य न विकंम्पितुम् अर्हसि।(२-३१)

योगक्षेमासाठी कार्य ही कार्याची सामान्य अवस्था आहे व कार्याची सकाम गति आहे. तर धर्मकार्यासाठी सहजकार्याचा वापर करणे ही जीवनाची उच्च अवस्था असते.

*कार्याची उच्चगति:

योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय।(२-४८)

जीवनातील कार्याची उच्चगति जाणुन कार्याद्वारे Exercise (योग) साध्य करणे, यासाठी कार्याद्वारे ईश्वरभक्तिचे शास्त्र भगवतगीता स्पष्ट करते. याचसाठी कार्यसंस्कार आवश्यक असतात. येथे (सकाम) नियतकार्य स्वधर्मात(निष्काम, निर्द्वंद्व) Transform होते. निर्णयअधिकाराची जाण असते. कार्याचा दृढनिश्चय असतो. याप्रमाणे कार्याची उच्चगति जाणण्यासाठी कार्यातील सकाम गति vs निष्काम (योग)गति यातील भेद भगवतगीता स्पष्ट करते.

व्यावहारिक बोध:मनुष्यजीवनातील दुर्बलता, हतबलता भयावह रुप धारण करते. जीवन निरस वाटते. समाजात आत्महत्या होण्यास मानसिक दुर्बलता हेच कारण ठरते. हेच जीवनातील अज्ञान ठरत असते. जीवन आनंदाने जगणे हीच ईश्वराची इच्छा असते.

"You are never to allow a shadow of doubt to enter your mind that the Creator intended you to win in life's battle. "

Orison Swett Marden

म्हणुन जीवनाची उच्च अवस्था जाणुन कार्यसंस्कारीत होणे यासाठीच मुल्यशिक्षण (Quality education) आवश्यक ठरते.

*********

(१-४६) :

"धार्तराष्ट्रा रणे हन्युः तन्मे क्षेमतरं भवेत्"

vs.

"हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्"

(जगणे आणि मरणे याविषयी भ्रम )

समाजातील स्वैरता, दुर्बलता दुर करणे यासाठी जगात धर्म, संप्रदाय आलेत. संघटन मजबुत करण्यासाठी या धर्माचा उपयोग होतो. मात्र या धर्माचा उपयोग करुन समाजातील शोषण, दुर्बलता पोसल्या जाणे, निरपराध्याची हिंसा इ. धर्माविषयी भ्रम असतो. यामुळे पुण्यात्म्याला पापी व पाप्याला पुण्यात्मा सिद्ध करण्याचे प्रताप होत असतात. म्हणुन जगात धर्म या संदर्भात क्रान्त्या घडुन आलेल्या आहेत असे इतिहास सांगतो.

धर्माचा हेतु परदुःख दुर करणे, निःस्वार्थि, त्यागी असणे, व याच संदर्भात "धर्मासाठी प्राण देईल " असे अभिमानाने बोलल्या जाते. याच आधारावर अर्जुन म्हणतो,

यदि माम् अप्रतीकारम् अशस्त्रं शस्त्रपाणयः।

धार्तराष्ट्रा रणे हन्युः तन्मे क्षेमतरं भवेत्।।(१-४६)

चांगलेपणा या संदर्भात मनुष्याचा भ्रम होत असतो. व निष्क्रियता स्विकारतो. अर्जुन दुःखी झाल्यामुळे आपले नियतकार्य टाळणे पसंद करतो व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्माचा आश्रय करतो. प्राणत्यागाचाच संदर्भ असेल तर धर्म जग (स्वधर्माचरण कर) अर्थात निष्क्रियतेला धर्म म्हणु नको. हा भगवदगीतेचा संदेश आहे.

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।(२-३७)

१. भगवदगीता धर्माचा निश्चित हेतु सांगते. समाजाला शोषणमुक्त करणे, सृष्टिसंचलनास समाजाचे, मानवाचे सहकार्य लाभणे यासाठी धर्मस्थापना असते. अर्थात समाजातील भय, दुर्बलता, शोषण याविरुद्ध लढा देण्यासाठी धर्मस्थापना असते व याचसाठी ईश्वराचा आश्रय म्हटलेले आहे.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिःभवति भारत।

अभ्युत्थानं अधर्मस्य तद् आत्मानं सृजाम्यहम् ।(४-७)

२. भगवदगीतेत ईश्वराचे ज्ञान ज्ञानविज्ञान या संदर्भात स्पष्ट केले आहे. (प्रकृति-पुरुष-पुरुषोत्तम) याच ज्ञानाला अध्यात्मज्ञान असे ओळखल्या जाते. मनुष्याच्या जीवितत्वात (प्राण) ईश्वराचाच अंश असतो. म्हणुन Consciousness या संदर्भात क्षेत्र-क्षेत्रज्ञ ज्ञान स्पष्ट केले आहे.

३. जीवनविकासाच्या महामार्गाला (मोक्ष या संदर्भात) "अमृतत्वाय कल्पते" असे संबोधन आहे. अध्यात्मक्षेत्रात याला आत्मोन्नति असे ओळखल्या जाते. या मार्गावर ईश्वरभक्ति घडण्यासाठी व्यवहारमार्गातील सकाम कार्य निष्काम कर्मात Transform होते. या स्थितित आत्मवश असणे, कार्याचा एकनिश्चय असणे, निष्ठेने कार्यरत असणे अर्थात भय, दुर्बलता(विचलित होणे), शोषण याविरुद्ध लढा देण्यासाठी धर्माचे प्रयोजन स्पष्ट केले.

अर्जुन अहंकारामुळे निष्क्रियतेलाही धर्म संबोधतो, अर्थात नकारात्मक, विषादी होतो. याच अहंकाराचे Replacement ईश्वरज्ञानाने होते.

सार:

डार्विनचे "Survival of the fittest" हे वाक्य प्रसिद्ध आहे. Fittest या संदर्भात स्वावलंबि असणे, योगक्षेमासाठी कार्यक्षम असलेला असे अभिप्रेत असते. तर Fittest या संदर्भातच " बळी

तो कानपिळी", "जिसकी लाठी उसकी भैस" असे वाक्य प्रचलित झालेले आढळते. अर्थात Fittest या संदर्भात व्यवहारात भ्रम होतो. याचाच अर्थ भ्रम केवळ धर्मात नसुन व्यवहारातही होत असतो. भ्रम म्हणजेच अज्ञान. भ्रम या संदर्भातच सापाला दोरी समजणे व दोरीला साप समजणे असे संबोधन होत असते. भगवदगीता याच भ्रमातुन जगाला बाहेर काढते. भगवदगीता "Fittest" या संदर्भात दैवी-असुर संपत्तिगुण असा भेद स्पष्ट करते.

***********

(१-४७)

*********************

एवम् उक्त्वा अर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् ।

विसृज्य सशरं चापं शोकसंविग्न मानसः।।

*********************

(१-४७):

"एवम् उक्त्वा अर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् "

(Effect of Internal world on External world)

"We're not teaching our students the importance of relationships with other people: how you work with them, what the relational pathology consists of, how you examine your own conscience, how you examine the inner world, how you examine your dreams. "

Irvin D. Yalom

समाज मनुष्यांचा समुह असतो. समाजाचे संचलन होत असतांना विश्वसंचलनास सहकार्य होणे हे धर्माचे कार्य असते. तसेच

व्यक्तिगत जीवनात हाच धर्म Internal world व External World यांचा मध्य साधत असतो.

धर्मयुद्धातील नियतकार्य व त्याचा परिणाम हे External World असते. तर नियतकार्य Execute करतांना अर्जुनाची मनःस्थिति कशी असते हा Internal world चा विषय असतो. अर्जुनाची निष्क्रियता व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी नियतकार्याला पापकर्म ठरविणे हा Internal world चा External परिणाम असतो.

एवम् उक्त्वा अर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत्।
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्न मानसः।।(१-४७)

Internal world या संदर्भात अर्जुनाला दुःख झाले असते. या दुःखाने विचलित होतो. या हृदयदौर्बल्याच्या, निष्क्रियतेच्या स्थितिला अशा कठिण प्रसंगी अनुक्रमे क्षुद्र, क्लैब्य संबोधले. ही स्थिति स्वर्गापासुन वंचित करेल असे स्पष्ट केले. म्हणुन External world (व्यवहार) संदर्भात श्रेष्ठांना अशोभनिय, कीर्तिपासुन वंचित अशी स्थिति आहे म्हणुन म्हटले,

क्षुद्रं हृदयदौर्बल्य त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप।(२-३)

येथे भगवतगीता ज्ञान सुरु होते. अर्थात हे ज्ञान Strengthening of Internal world यासंबंधीच असते.

१. मार्गात विचलित होत नाही.
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२. १५)

२. निर्भयता प्राप्त होते.
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

३. दुःखान्त म्हणजे योग म्हणजे विचलित न होणे म्हणजे शक्ति.
यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते।
तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम्।(६-२३)

४. योग्य-अयोग्य कर्म हा मुद्दा गौण असतो. शक्तिची साधना हेच कार्यकौशल्य.
बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते"

तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥(२-५०)

भगवदगीतेत External world व Internal World याचा मध्य युद्ध या संज्ञेने साधलेला आहे. External world(व्यवहार) मधील युद्धाचे कार्य साधन असते, तेच कार्य Internal world मधील शक्ति(योग) साधनेसाठी साधन बनते. हा भेद सकाम कर्म vs निष्काम कर्म असा असतो.

*********

१. ४७:

"विसृज्य सशरं चापं शोकसंविग्न मानसः"

(विकासमार्गाचा त्याग)

* अर्जुनविषादयोग(प्रथम अध्याय) भगवतगीतेतील संपुर्ण ज्ञानाचा आधार आहे. व्यवहारातील बाह्ययुद्ध व आंतरिक युद्ध(Internal battle) यांचा समन्वय भगवतगीतेत साधलेला

आहे. अर्जुनाला युद्ध कर असे संबोधले तेंव्हा तो संदेश आंतरिक युद्धाचा बनतो.

"रात्रंदिनी आम्हा युद्धाचा प्रसंग "
तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च ।(८-७)

* बाह्ययुद्ध हा व्यवहाराचा भाग असला तरी आंतरिक युद्ध नित्य लढावेच लागते. आत्मोद्धाराचा हा लढा असतो. हा लढा कमजोर करणाऱ्या ( काम, मोह ) शत्रुविरुद्ध असतो.

जहि शत्रुं महाबाहो कामरुपम् दुरासदम् ।(३-४३)

* अर्जुन दुःखी झाल्यावर वास्तव न स्विकारता या Problem ला bypass करतो. मनुष्य दुःखी झाला असता ते प्रश्नाचे वास्तव स्विकारीत नाही, यामुळे ज्या स्थितित त्याचे विकास Status आहे, त्याच स्थितित राहतो. अर्थात विकासमार्गावरुन Withdraw होतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. पण हा अहंकाराचा आश्रय ठरतो. श्रीकृष्णाला शरण जातो तेंव्हा वास्तवाचा स्विकार करतो. व ज्ञानाचे द्वार उघडे होते.

यत् श्रेयः स्यात् निश्चितम् ब्रूहि तन्मे।
शिष्यस्तेअहं शाधि मा त्वाम् प्रपन्नम् ।(२-७)

*दुःखी झाला असता अर्जुनाने युद्ध करणार नाही ही भूमिका घेतल्यामुळे शस्त्र खाली ठेवतो.

एवम् उक्त्वा अर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् ।
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्न मानसः।।(१-४७)

आंतरिक युद्धाचा जीवनात प्रवास अखंड असतो. या युद्धातील शस्त्र विसरता येत नाही. या आंतरिक युद्धातील एक शस्त्र निर्णयअधिकार (प्रयत्नअधिकार, कर्म अधिकार) असते. मायकेल ॲन्डरसनला अपघातात पाय गमवावे लागले. तुला नेहमी कुणाची तरी मदत घ्यावी लागेल असा सहानुभुतिपर सल्ला डॉक्टर देतो. ॲन्डरसन म्हणतो, "पायाने पंगु असलो तरी मानसिक पंगु झालो नाही. मला ईश्वरानी प्रयत्नअधिकार दिले आहेत. " असे खडे बोल ऐकवतो, तो पुढे विमानाचा पायलट होतो. ॲन्डरसन मानसिक पंगुत्वावर विजय मिळवितो.

सार :

"Never allow yourself to dwell upon your weaknesses, deficiencies, or failures. Holding firmly the ideal and struggling vigorously to attain it will help you to realize it. "

-Orison Swett Marden

"मानसिक दुर्बलता " मनुष्यजीवनाला आव्हान असते. भगवतगीतेतील आंतरिक लढाई याच मानसिक दुर्बलतेविरुद्ध आहे. (Fear vs Courage). याच लढाईसाठी संस्काराची गरज असते. संस्कारीत नित्य (आत्मोद्धार) विकासमार्गावर असतो. तर असंस्कारीत स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी समर्थन करीत जगत असतो. (नाचता येईना अंगण वाकडे!)

नास्ति बुद्धिः युक्तस्य नच अयुक्तस्य भावना।

न चअभावयतः शांतिं अशांतस्य कुतः सुखं॥(२-६६)

*******

# भगवदगीता

# अध्याय २ :सांख्ययोग

## अध्याय २ :सांख्ययोग

मनुष्याला ज्ञानाची गरज कां आहे?याची पार्श्वभुमि प्रथम अध्यायात आलेली आहे. नकारात्मक असला तरी मनुष्य "मी योग्य" समजुनच जगत असतो, याचे दर्शन प्रथम अध्यायात होते.

युद्धासाठी शस्त्रवर्षाव होण्याची वेळ असतांना प्रत्यक्ष युद्ध करणे हा विषय होता, पण माझ्यासाठी युद्ध करणे पाप आहे असे Judgement करुन मुख्य विषयालाच बगल दिली. येथे श्रीकृष्णाची सोबत होती. श्रीकृष्ण नसते तर कौरवविजय निश्चित होता. चांगल्या(दैवी) मनुष्याची निष्क्रियताच असुर प्रवृत्तिला संधी देत असते. अर्जुनाला चांगलेपणामुळेच नकळत ही निष्क्रियता योग्य वाटायला लागली. अर्थात हेच अज्ञान ठरते.

श्रीकृष्णांनी सर्व ऐकुन घेतले. अर्जुन स्तब्ध झाल्यावरच भाष्य केले. हा विषय वादाचा(युद्ध करणे पाप कि पुण्य!)नव्हता. त्यामुळे हा विषय कशा प्रकारे Deal केला, हे रहस्य सांख्ययोगात आहे. पांच मुद्दे यांत आलेले आहे.

१. मुख्य प्रश्नाची पारदर्शकता

२. जीवन रहस्य

३. स्वधर्माचरण

४. बुद्धियोग-कर्मयोग

५. स्थितप्रज्ञ-जीवनाची उच्च अवस्था

## २. १ मुख्य प्रश्नाची पारदर्शकता

*हातपाय गाळुन शोकग्रस्त अवस्थेत बसलेल्या अर्जुनाला पाहुन श्रीकृष्णाने मुख्य विषयाकडे त्याचे लक्ष वेधले.

तुझ्यासारख्या शुर व श्रेष्ठ व्यक्तिला अशा आणिबाणिप्रसंगी दुर्बलता शोभत नाही. ही भूमिका ना स्वर्गास(परलोकी) पात्र आहे ना किर्तिस(इहलोकी). मोहनिर्मित दुर्बलतेचा त्याग करुन तयार हो.

*आता अर्जुनाचे लक्ष मुख्य विषयाकडे वळले. आपल्या शंका व्यक्त करतो,

-जे हारांनी पुजनिय आहेत, त्यांचीच बाणाने हत्या करायची?

-राज्य मिळविण्याची इच्छापुर्ति झाली तरी ते सिंहासन रक्ताने माखलेले असेल. जे राज्यभोग शोकप्रद आहे, त्यापेक्षा भिक्षुक बनुन उदरनिर्वाह करणे मला श्रेयस्कर वाटते.

-या दोन पक्षात धर्मदृष्ट्या कोणाची बाजु जिंकण्यास योग्य आहे, हे कळेनासे झालेले आहे. तरीपण ज्यांना मारुन विजय मिळविणे योग्य नाही तेच आमच्यासमोर उभे ठाकले आहेत.

-अशा प्रश्नांनी माझी बुद्धि भ्रमित झाली आहे. धर्मदृष्ट्या काय योग्य ही निवड करण्यास मी असमर्थ झालो आहे. असे बोलुन शिष्य समजुन मार्गदर्शन करण्याची विनंति करतो.

-मनुष्य प्राप्तिसाठीच कर्म करतो. या युद्धात देवलोकांचे जरी राज्य मिळाले, ते राज्य माझा शोक नष्ट कसा करेल?हे माझ्या समजण्यापलीकडे आहे. म्हणुन मी युद्ध करणार नाही.

*येथे अर्जुनासाठी युद्ध करणे योग्य कि अयोग्य या मुख्य विषयावर लक्ष केंद्रित झाले. पण याच प्रश्नात उपप्रश्न आला तो शोकमुक्तिचा. कोणताही मनुष्य सुखासाठी कर्म करतो, दुःखासाठी नव्हे, म्हणुन त्याचा प्रश्न योग्य होता.

-अर्जुनाने आधी याच प्रश्नावर पडदा टाकला होता. आता हा पडदा बाजुला झाला. अर्जुनाने आपले अज्ञान कबुल केले व ऐकण्यास तयार झाला ही श्रीकृष्णासाठी आनंदाची बाब होती. अर्जुनाचा शोक अज्ञानामुळे आहे, हे श्रीकृष्ण जाणत होते. म्हणुन अर्जुन शोकग्रस्त असतांनाही श्रीकृष्ण हर्षित (प्रहसन्निव भारत) झाले .

पंडित कोण?

-विद्वान पंडित अशाश्वताचा शोक करीत नाहीत. जे शोक करण्यालायक नाही, त्याचा तु शोक करीत आहेस, स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी तु जे ज्ञान बोलत आहे तो प्रज्ञावाद(बुद्धिवाद) आहे.

* मनुष्य जे योग्य आहे त्या कार्याचा निश्चय करु शकत नाही, तेंव्हा जी निवड होते, त्याचे समर्थन योग्य सिद्ध करण्यासाठी करीत असतो, हाच प्रज्ञावाद असतो. ज्ञान तर प्रकाश असते. "ज्ञान" या संदर्भात अंधाराला प्रकाश सिद्ध करण्यासाठी वापरलेले ज्ञान व अंधार मिटविण्यासाठी वापरलेले ज्ञान, यांतील भेद स्पष्ट होतो.

२. २ जीवन रहस्य

किम् आश्चर्यम् ? हा प्रश्न यक्षाने धर्मराजाला केला. तेंव्हा उत्तर असते, दररोज मृत्यु पाहुनही आपण जगण्याचा अमरपट्टा घेउनच जगत आहो या आविर्भावात मनुष्य जीवनात इतका गुंतलेला असतो कि कसा(दुःखी अवस्थेत कि दुःखमुक्त )जगतो याचेही त्याला भान नसते.

जन्म, जीवन व मृत्यु यांत मृत्यु अपरिहार्य घटना असते, पण जीवन दुःखमय(नकारात्मक)जगणे कि दुःखमुक्त (सकारात्मक) जगणे ही मनुष्याची निवड असते.

देहसंचलन शाश्वत जिवित तत्वामुळे मुळे होते. जन्म म्हणजे त्या शाश्वत तत्वाची नवशरीरधारणा असते. जीवनाचे रहस्य जाणुन घेण्यासाठी या शाश्वत तत्वाकडे आश्चर्याने पाहतात, बोलतात, ऐकतात. पण समाधान होत नाही. शरीराला मृत्यु असतो म्हणुन

शरीर अशाश्वत तर शाश्वत जिवित तत्व अमृत असते. शाश्वत सत् व अशाश्वत(बदलणारे) असत् जाणुन श्रेष्ठ, जाणकार जीवनयात्रेतील निर्णय करतात. दुःखाने विचलित होत नाही. अर्थात ते जीवनाच्या Values जाणतात, Purpose जाणतात.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं सः अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

पांडवांनी अनेक दुःखद अन्याय सहन केले. अन्यायाचा, दुःखाचा अतिरेक झाला तेंव्हा शेवटी धर्मयुद्ध ठरले. समाज सुखाने रहावा यासाठी संरक्षणाचा भाग म्हणुन युद्धकार्याचे प्रयोजन असते. संघटित दहशतवाद निर्माण करुन विश्वासघाताने निरपराधांची हत्या करणे व देशहितासाठी युद्धकार्य यांत भेद आहे. पण या दहशतवादालाही धर्माचा व पुण्यकार्याचा रंग चढतांना आढळतो. तर याउलट धर्मयुद्धातील नियतकार्याला अर्जुन पापकार्य ठरवितो. ही Contravercy समाजात अनुभवत असतो. याच संदर्भात अर्जुनाच्या( गैर)समजुतीचे निराकरण केले.

ज्याचा (मृत्यु) शोक करु नये, त्याचा शोक करीत आहे व धर्मयुद्धातील नियतकार्याचा(स्वधर्मत्याग) त्याग करणे ही निश्चितपणे शोकांतिका आहे . जबाबदारी टाळुन चिंता , शोक करीत बसणे हीच खरी शोकांतिका असते.

२. ३ स्वधर्माचरण:

कार्लायल म्हणतो, आवडत्या कार्याला व्यवसायकार्याची संधी मिळणे भाग्य असते. अर्जुनाच्या आवडत्या (स्वभावनियत)कार्याला धर्मयुद्ध संधी लाभली होती, म्हणुन हे स्वर्गद्वार म्हटले. हे कार्य टाळले तर पळपुट्या म्हणुन अपकिर्ति होईल. जी तुझी (शुर, श्रेष्ठ)ओळख आहे त्याला तढे जातील. शत्रुंना निंदानालस्ति करण्याची संधीच मिळेल. म्हणुन स्वर्गप्राप्ति किंवा किर्ति याविषयी तुझा गैरसमज दुर होण्यासाठी तुझ्यासमोर option आहे,

१. कार्य टाळले तर स्वर्गप्राप्ति किंवा किर्ति या दोहोपासुन वंचित होशील.

२. कार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करुन युद्ध केले . जिंकलास तर राज्य भोगशील. व मृत्यु आला तर स्वर्गप्राप्ति होईल.

३. दुःखाने विचलित होणे, यामुळे आलेली दुर्बलता ही क्षुद्रता जाणुन, परिणामातील लाभ-हानी द्वारा निर्माण होणारे सुखदुःख सम जाणुन स्वधर्माचरण करणे . यामुळेच पापनिवृत्ति होईल.

सुखदुःखे समे कृत्वा लाभ अलाभौ जयाजयौ।

ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापं अवाप्स्यसि।।(२-३८)

-------

## २. ४ बुद्धियोग/कर्मयोग

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिःयुक्ते तु इमां शृणु।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि॥(२-३९)
या ज्ञानामुळे कर्माच्या Right/Wrong या बंधनातुन मुक्त होतो व कार्यनिश्चय दृढ होतो.

*अर्जुनाची Default belief system ज्या धर्माची असते, त्याप्रमाणे त्याला स्वधर्माचरण सांगितले. यांत स्वधर्माचे स्वतःचे शिक्कामोर्तब करणे हे कर्तव्य असते. यामुळे स्वतःचा मार्ग निश्चित होतो. स्वधर्माचरण व बुद्धियोग यांतील मधली अवस्था जाणुन घेणे आवश्यक आहे. विश्वासाने निश्चित मार्ग ठरणे हाच दोहोंचा हेतु आहे. स्वधर्माचरण सांगतांना स्वर्गाची भाषा वापरली तर बुद्धियोग या विभागात स्वर्गाचे भाष्य कसा संशय निर्माण करतो हे स्पष्ट केले आहे.

*प्रेम, आदर किंवा आज्ञापालन ही संस्कृति या आदर्श नांवाखाली आपले मत इतरांनी शिरोधार्य मानावे अशी मनुष्याची इच्छा असते. यामुळे मनुष्याच्या स्वतंत्र मार्गाची पारदर्शकता नष्ट होते. मनुष्य स्वातंत्र्य इच्छित असतो. गरज नसतांना दुसऱ्यावर मत लादण्याचा प्रयत्न करणे, मत लादणाऱ्याचा अहंकार दर्शवितो. या मताचा स्विकार करणे वा न करणे हा मनुष्याचा अधिकार असतो.

म्हणुन मनुष्याचे स्वातंत्र्य, अधिकार, जीवनमुल्ये यांत पारदर्शकता असणे जीवनमार्गात आवश्यक असते. पारदर्शकतेचा अभावच भ्रमाचे कारण ठरते.

*श्रीरामाच्या वनप्रयाणाच्या निश्चयाला कुणी पितृआज्ञा highlight करतात. प्रत्यक्षात "प्राण जाई पर बचन न जाई" याद्वारे वचन हे मुल्य highlight झाले आहे. वचन पाळणे दशरथ महाराजांची जबाबदारी होती, यानुसार श्रीरामाला वनवास आदेश देणे ही महाराजांची जबाबदारी ठरली. याच जबाबदारीचे ओझे हलके करण्यासाठी श्रीरामाने महाराजांना आज्ञा करण्याची विनंति केली. पण शोकवश महाराजांनी उत्तर दिले नाही. मूकसंमति जाणुन वनप्रयाणावर श्रीरामांनी स्वधर्माचे शिक्कामोर्तब केले.

श्रीरामाचे आज्ञापालन असले तरी स्वधर्माचे शिक्कामोर्तब स्वातंत्र्य दर्शविते.

*बुद्धियोग विभागात कार्याचा दृढनिश्चय हा पाया आहे. म्हणुन निर्णयअधिकार महत्वाचा आहे.

बुद्धितुन संशयमुक्ति झाली नाही तर कार्याचा दृढनिश्चय होत नाही. संपुर्ण संशयमुक्तिसाठी बुद्धिची स्थिर अवस्था बाह्य ज्ञानापासुन मुक्त असते. याचसाठी ईश्वरज्ञानाचे महत्व असते. (बाह्यज्ञान vs ईश्वरज्ञान).

*अर्जुन स्वर्गप्राप्तिचा धर्म जाणतो. (अमुक केले तर स्वर्ग व तमूक केले तर नरक)स्वर्गप्राप्ति मरणोत्तर भोगैश्वर्य इच्छा असल्यामुळे कार्यनिश्चय होत नाही. धर्मशास्त्र त्रिगुणात्मक प्रकृति ज्ञान असते. तर ईश्वरज्ञानासमोर कोणत्याही बाह्य पुस्तकी ज्ञानाची किंमत सर्व जलमय झाले असता विहिरीसमान असते. संशयमुक्तिसाठी बुद्धियोग आहे.

*चंचलत्वामुळे निश्चय होत नाही. परिणामभयामुळे निश्चय होत नाही. संशयामुळे आलेले भय दुर्बलता दर्शविते. भयावर मात करण्यासाठी हा धर्म आहे. म्हणुन कार्य execute करतांना निष्काम कर्म अर्थात सिद्धि-असिद्धि यात समत्व साधुन समत्वयोग साध्य करणे ही प्रक्रिया दिलेली आहे.

स्वल्पम् अपि धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

*बुद्धियुक्त अवस्थेत Right-Wrong हे दुय्यम ठरते. Priority योग साध्य करणे असते. परिणाम भयापासुन मुक्त असतो . योग साध्य होत असतांना बाह्य ज्ञानामुळे भ्रमित झालेली बुद्धि स्थिर होते. ऐकलेल्या किंवा ऐकावयाच्या ज्ञानाचा कंटाळा येतो.

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।

तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

*मनुष्याच्या अंतरंगात दिव्य अशा प्रेरणा स्फुरतात. बुद्धियोगामुळे या प्रेरणेवर विश्वास असतो. या प्रेरणा प्रत्यक्ष साकार करण्यास हे शास्त्र उपयोगी ठरते.

------

२. ५ स्थितप्रज्ञ

मनुष्याला जे जीवन लाभलेले आहे, त्याची ओळख करुन घेतली नाही, जीवनाचे Purpose जाणले नाही, तर मनुष्य अज्ञानी अवस्थेत जगत असतो, स्वतःच्या जीवनाची जबाबदारी कळत नाही व आपल्या दुःखासाठी, अतृप्तीसाठी जगावर, परिस्थितिवर दोष ढकलुन आपले मनोरंजन करुन घेतो. जणु तो एखाद्या अदृश्य कैदेत अडकला असतो व जीवन ईश्वराने दिलेली महान संधी आहे याचे त्याला विस्मरण होते. म्हणुन भगवतगीतेच्या तत्वज्ञानाचा पायाच "बंधन-मोक्ष "असा आहे. कर्माद्वारे याच मुक्तिची साधना (योगः कर्मसु) हे प्रथमच अर्जुन ऐकतो.

आतापावेतो अर्जुनाला कर्माद्वारे भोगैश्वर्य प्राप्ति, स्वर्गप्राप्ति याची जाण असते. पण कर्माद्वारे बुद्धिची स्थिरता साध्य करणे, व यासाठी समाधि हा शब्द ऐकतो.

ही जीवनाची उच्च अवस्था असते. या अवस्थेत मनुष्य कसा वागतो?हे जाणुन घेण्यासाठी प्रथमच प्रश्न करतो.

स्थितप्रज्ञस्य का भाषा?

"एका शेतकऱ्याचा घोडा जंगलात हरवतो. लोक म्हणतात, वाईट झाले. कांही दिवसानंतर तोच घोडा इतर पांच घोड्यांना घेवुन येतो, लोक म्हणतात, चांगले झाले. नविन घोड्यांना शिकवितांना शेतकऱ्याचा तरुण मुलगा लंगडा होतो. लोक म्हणतात, वाईट झाले. पुढे त्या राज्यावर युद्ध लादल्या जाते. युद्धासाठी सर्व तरुणांना भरती करण्यात येते. लंगडा तरुण आपोआप वगळल्या जातो. लोक शेतकऱ्याला भाग्यवान म्हणतात. "

*वरील घटनेत प्रत्येक वेळी लोक Judgemental मत देतात. पण शेतकरी या मतामुळे infect न होता वर्तमानाचा स्विकार करुन निश्चिंत, प्रसन्न मनाने जीवन जगत असतो.

न अभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।(२-५७)

*समुद्रात जशा नद्या येवुन मिळतात, समुद्र स्थिर असतो. तसेच स्थिर मनुष्याच्या जीवनांत घटना घडत असतात. कोणत्याही इच्छा, कामना मनुष्याची प्रसन्नता नष्ट करीत नाही.

*सुखाची स्थिति म्हणजे प्रसन्नता आपण जाणतो, प्रसन्नता म्हणजे दुःखवियोग म्हणजे स्थिरत्व . ही स्थिती लाभण्यासाठी कार्यसंस्कार/बुद्धिवरील संस्कार हा भगवतगीतेचा विषय आहे. (या प्रक्रियेत अनुक्रमे इच्छा-कार्य-दृढत्व(संयम)-स्थिरत्व(योग)-ज्ञान जीवनसंचालनासाठी यज्ञ भावाने Chanelize करण्यात येते . याचे Details पुढे येईलच)

*विषयचिंतनात मग्न असलेला व्यक्ति इच्छा-द्वेष या द्वंदाने infect होतो. अशांत असतो. ही प्रक्रिया अनुक्रमे विषयचिंतन-आसक्ति-काम(greed)-क्रोध(अतृप्तिमुळे अशांती)-संमोह (infection)-विभ्रम-स्मृतिभंश-बुद्धिनाश-ऱ्हास अशी घडते. म्हणुन अशांत व्यक्तिला सुख कोठुन मिळणार?

अशांतस्य कुतः सुखम् ।(२-६६)

* संस्कारित व्यक्तिसाठी जीवनमुल्यांद्वारे धारण झालेला संयम महत्वाचा असतो, तो जागृत असतो, पण अंसंस्कारित व्यक्ति यासाठी झोपलेला असतो, त्याचेसाठी विषय चिंतन, इच्छा आकांक्षा हीच जागृति असते. जी संस्कारीत व्यक्तिसाठी रात्र ठरते.

*संस्कारित व असंस्कारित ही अवस्था अनुक्रमे आत्मवश व मनोवश या अवस्थेने दर्शविली आहे. पाण्यावर नाव वाऱ्याने वहावी तसे मनोवश व्यक्तिचे जीवनसंचलन असते. तर संस्कारित किनारा जाणतो, जीवनाचे महत्व जाणतो, तो नाव वल्हवित असतो. अंतकाळापर्यंत स्थिरत्व साध्य करीत असतो.

इंद्रियाणां हि चरतां यद् मनोअनुविधियते।

तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावाम् इव अम्भसि।।(२-६७)

*****

अध्याय २: मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

(२-१) :

"विषीदन्तम् इदं वाक्यं उवाच मधुसूदनः"

(बोले तैसा चाले)

(२. २)/१:

"कुतः त्वां कश्मलम् इदम् विषमे सम् उपस्थितम् "

(Part I. Guilty Consciousness)

२. २/२:

"कुतः त्वां कश्मलम् इदम् विषमे सम् उपस्थितम् "

(Part II. Challanging situation)

२. २/३:

"अनार्यजुष्ठम् अस्वर्ग्यम् अकिर्तिकरम् अर्जुन"

२. ३/१ : "क्लैब्यं मा स्म गमः पार्थ "

Part I. Mental Poverty

(२. ३)/२:

"क्लैब्यं मा स्म गमः पार्थ न एतद् त्वयि उपपद्यते"

Part II.

(Stupidity vs. Wisdom)

२-३/३:

"क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परन्तप"

(२-४) :

"इषुभिः प्रतियोत्स्यामि पुजार्हाव अरिसूदन"

(२-५)/१ :

"श्रेयो भोक्तुं भैक्ष्यम् अपि इह लोके"

(Your life your choice)

(२-५)/२:

"हत्वार्थ कामांस्तु गुरुन् इहैव
भुञ्जीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् "

( Delusion vs. Awareness of Self determination)

२. ६ :"न च एतद् विद्मः कतरत् नो गरियो
यद् वा जयेम् यदि वा नो जयेयुः।"

२-७/१:"कार्पण्यदोषोपहत स्वभावः
पृच्छामि त्वाम् धर्मसम्मुढचेताः"

(२-७)/२:

"पृच्छामि त्वां धर्मसम्मूढ चेताः
यत् श्रेयः स्यात् निश्चितम् ब्रूहि तन्मे"

(My Path?)

(२. ७)/३: "धर्मसम्मूढचेताः "

(धर्म संदर्भातील भ्रम)

२-७/४ :

"यत् श्रेयः स्यात् निश्चितम् ब्रूहि तन्मे

शिष्यः ते अहं शाधि मा त्वां प्रपन्नम् "

(Defing problem)

२-८:

"न हि प्रपश्यामि मम् अपनुद्यात्

यत् शोकं उच्छोषणम् इंद्रियाणाम् ।"

(२-९):

"न योत्स्य इति गोविंदम् उक्त्वा तूष्णीं बभूव ह"

(My Priority!)

२. १०/१: " प्रहसन्निव भारत "

२. १०/२:

"तम उवाच हृषिकेशः प्रहसन्निव भारत"

(The right time for dialogue)

(२-१०)/३:

"सेनयोः उभयोः मध्ये विषिदन्तम् इदं वचः"

(The learning for Selfhelp)

२. ११/१ :"अशोच्यान् अन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे"

२. ११/२ : " प्रज्ञावादांश्च भाषसे "

(२-१२) :

" न त्वेवाहं जातु नासं न त्वम् न इमे जनाधिपः"

(मनुष्याचे अस्तित्व)

(२-१४)/१:

"मात्रास्पर्शास्तु कौंतेय शितोष्णसुखदुःखदाः।

(Fixed mindset vs. Growth mindset)

२. १४/२:

"आगमा अपायिनो अनित्याः तान् तितिक्षस्व भारत"

(Reality & Change)

२-१५/१: "यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ"

२. १५/२:"समदुःखसुखंधीरं सः अमृतत्वाय कल्पते"

२. १५/३: "सः अमृतत्वाय कल्पते"

२. १६/१:

"न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः"

(२-१६)/२ :

"उभयोःअपि दृष्टो अन्तः तु अनयोः तत्वदर्शिभिः"

(जीवनमार्गात सत-असत निवड अर्थात सुखी जीवनाचा मार्ग)

(२-१७):

"अविनाशि तु तद् विद्धि येन सर्वम् इदं ततम् "

(Search for Permanent अर्थात शाश्वताशी जीवनाचे नाते)

२. १८ :"अन्तवन्त इमे देहा नित्यस्य उक्ताः शरीरिणः"

(२-२२) :

"वासांसि जीर्णानि यथा विहाय"

(Spiritual Revolution)

(२-२६):

"अथ चैनं नित्य जातम् नित्यं वा मन्यसे मृतम् "

(सत्याचा स्विकार)

२-२७/१:

"तस्मात् अपरिहार्ये अर्थे न त्वं शोचितुम् अर्हसि"

२. २७/२:" न त्वम् शोचितुम् अर्हसि"

(Stop worring, Start living)

(२-२७)/३ :

"तस्माद् अपरिहार्येअर्थे न त्वम् शोचितुम् अर्हसि"

(जीवनाचे जन्ममृत्युचक्र vs अध्यात्मज्ञान)

(२-३०):

"देही नित्यम् अवध्यः अयं देहे सर्वस्य भारत"

(शाश्वत-अशाश्वताचे ज्ञान)

२. ३१/१ :

"स्वधर्मम् अपि चावेक्ष न विकम्पितुम् अर्हसि"

(२. ३१)/२:

"धर्म्यात् हि युद्धात् श्रेयः अन्यत् क्षत्रियस्य न विद्यते"

(स्वभावनियत-सहजकार्य-स्वधर्म)

२. ३१/३:

"धर्म्यात् हि युद्धात् श्रेयो अन्यत् क्षत्रियस्य न विद्यते"

(प्रज्ञावाद Excuses vs. स्वधर्म Self approval)

(२-३२)/१:

"यदृच्छया च उपपन्नं स्वर्गद्वारम् अपावृतम् "

(जीवनविकासाचे द्वार )

२-३२/२ :

"सुखिनः क्षत्रियः पार्थ लभन्ते युद्धम् इदृशम् "

(२-३३)/१:

"अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि?"

(बाह्य व आंतरिक संग्राम)

२-३३/२:"ततः स्वधर्मं किर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि"

(२-३३)/३ :

"ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि"

(Low aim vs. High aim)

२. ३४/१:

"अकिर्तिं च अपि भूतानि कथयिष्यन्ति ते अव्ययाम् "

(निष्क्रियता)

२. ३४:

"संभावितस्य च अकीर्तिः मरणात् अतिरिच्यते"

(Tie and Tiebreaker)

(२-३५)/१:

"भयात् रणात् उपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः"

(Breaking barrier of fear)

(२-३५)/२:

"येषां च त्वम् बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् "

(जीवनमुल्ये Lifevalues)

(२. ३६)/१ :

"अवाच्य वादांश्च बहून् वदिष्यन्ति तव अहिताः"

(जगातील टिका करण्याची संवय vs सक्षमता)

२. ३६/२:

"निंदन्ति तव सामर्थ्यं ततः दुःखतरं नु किम् ?"

(Determination vs. Devotion)

(२-३७)/१:

"हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्"

२. ३७/२ :

"तस्मात् उत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः"

२-३८/१:

"सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ"

(Duality vs Excellence/Devotion/Loyalty)

२. ३८/२:

"ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापम् अवाप्स्यसि"

(Non violence)

२. ३९/१:

"एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिः योगे तु इमां शृणु"

(MasterKey )

२. ३९/२: "कर्मबंधं प्रहास्यसि"

(२. ३९)/३:

"बुद् द्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि"

(Self discipline/Disciplined mind)

(२-४०)/१:

"न इह अभिक्रम नाशोअस्ति प्रत्यवायो न विद्यते"

(Strength grows when we dare)

२. ४०/२:

"स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् "

२. ४०/३ : "त्रायते महतो भयात् "

२. ४१/१ :" व्यवसायात्मिका बुद्धिः "

२-४१/२:

"व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन"

(निश्चयाचे बळ)

२-४१/३:

"बहुशाखा हि अनंताश्च बुद्धयो अव्यवसायिनाम्"

(Transformation)

(२. ४१)/४ :

" बुद्धयोअव्यवसायिनाम् "

(कार्याचा एकनिश्चय नसणे)

२. ४२/१:

"यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्ति अविपश्चितः"

(Bookish knowledge vs. Best version of SELF)

(२-४२)/२ :

"वेदवादरताः पार्थ न अन्यत् अस्तीति वादिनः"

(पुस्तकी ज्ञान व वर्तमान)

(२. ४३)/३:

"कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां"

(Ritual vs. Philosophy of life)

(२. ४३)/४ :

"क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यं गतिंप्रति"

(The goal of life)

२-४४/१:

"भोगैश्वर्य प्रसक्तानां तया अपहृत् चेतसाम् "

(Logic of Internal battle)

(२-४४)/२:

"व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते"

(Importance of Determination)

२-४५:"निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्"

(Principle of Rightousness)

(२. ४६):"यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके"

( ज्ञान या संदर्भात उक्ति vs कृति)

२. ४७/१:

"कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन"

(Know your Rights)

२. ४७/२: " कर्मण्येवाधिकारस्ते"

(२-४७)/३ :

"कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन"

(स्वतःचे अधिकारक्षेत्र)

(२-४७)/४ :

"कर्मण्येव अधिकारः ते"

(Power of Choice)

२-४७/५:

"मा कर्मफलहेतुः भूः मा ते संगो अस्तु अकर्मणि"

(अपेक्षा vs अधिकार)

२. ४८/१: "योगस्थः कुरु कर्माणि "

( " Elevating yourself to higher level of consciousness. ")

२. ४८/२ :

"योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय"

(निवड, निर्णय व अधिकार Choice Architecture)

(२-४८)/३ :

"सिद्धिअसिध्योः समो भूत्वा समत्वंयोग उच्यते"

(सुखी जीवन व सुखाची साधना)

२. ४९/१:"दुरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय"

२. ४९/२: "बुद्धौ शरणं अन्विच्छ "

(I. SELF AWARENESS)

२-४९/३ :

"बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणाः फलहेतवः"

(II. बौद्धिक पंगुत्व vs. बौद्धिक सक्षम)

(२-४९)/४ :

"बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणाः फलहेतवः"

(III. Right mental attitude)

२. ५०/१ :"बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते"

(२-५०)/२:"बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते"

(Right work or right path?)

२. ५०/३: "तस्मात् योगाय युज्यस्व "

(Transformation)

२. ५०/४: "योगः कर्मसु कौशलम् "

Mindfulness (मानसिक व्यायाम)

*२-५१

"कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः"

(Art of Transformation)

२. ५२/१ : "यदा ते मोहकलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति"

(Task of Overriding automatic Behavior)

२. ५२/२: "तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च"

( उक्ति आणि कृति)

(२-५३)/१:"श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला"

(२-५३)/२:

"समाधौ अचला बुद्धिः तदा योगम् अवाप्स्यसि"

(स्थितप्रज्ञ)

२-५४/१:"स्थितप्रज्ञस्य का भाषा?"

२. ५४/२ :"स्थितधीः किं प्रभाषेत् किम् आसीत व्रजेत् किम् ?"

(२. ५६)/१ :

" दुःखेषु अनुद्विग्न मनः सुखेषु विगतस्पृहः"

(स्थितप्रज्ञ-शाश्वत सुखाचे रहस्य)

२. ५६/२:

"वीतरागभयक्रोधः स्थितधीः मुनिः उच्यते"

(Weak vs. Strong State of mind)

(२-५८):

:"इंद्रियाणि इंद्रियार्थेभ्यः तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता"

(Principle of freedom)

(२-५९):

"रसवर्ज्यं रसोअपि अस्य परं दृष्ट्वा निवर्तते"

(Higher taste ceases lower)

(२. ६०):

"इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः"

२. ६१: "युक्त आसीत मत्परः"

(Priority of Life)

(२. ६२)/१:

"ध्यायतो विषयान् पुंसः संगः तेषु उपजायते"

(बुद्धिनाश vs बुद्धियुक्त)

२. ६२/२:

"संगात् सञ्जायते कामः कामात् क्रोधः अभिजायते"

(The barrier & its breaker)

(२-६३) :

"स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति"

(विनाशकाले विपरीत बुद्धि )

(२-६४)/१ :

"रागद्वेषविमुक्तैः तु विषयान् इंद्रियैः चरन्"

(व्यवहारात असतांना शांति अनुभवणे अर्थात सुखी जीवनाचा मार्ग)

२. ६४/२ : "आत्मवश्यैः विधेयात्मा "

(Regulating Principle of Freedom

(२-६४)/३:

"आत्मवश्यै विधेयात्मा प्रसादम् अधिगच्छति"

२. ६५/१:"प्रसादे सर्वदुःखानां हानिः अस्य उपजायते"

(सुखी जीवनरहस्य)

(२-६५)/२:"प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते"

(वर्तमानातील प्रसन्नता)

२. ६५/३ : " प्रसन्नचेतसो ह्याशु "

(चित्ताची प्रसन्नता Happy-minded)

२. ६६/१ : नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना?

(स्वतःच्या मार्गाचा संस्कार)

(२-६६)/२:"अशांतस्य कुतः सुखम् "

(Happy life)

२-६७/१ :" इंद्रियाणां हि चरतां यत्मनो अनुविधियते"

२. ६७/२:

"तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावाम् इव अम्भसि"

२. ६८ :" तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता"

२. ६९/१ :

"या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी"

२. ६९/२:

"यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः"

(स्वार्थ-परमार्थ, जगतहिताय-उच्च विचाराचा प्रवाह)

२. ७०/१ :"आपुर्यमाणम् अचल प्रतिष्ठम्

समुद्रम् आपः प्रविश्यन्ति यद्वत् "

(२-७०)/२:

"तद्वत् कामा यं प्रविश्यन्ति सर्वे

स शांतिम् आप्नोति न कामकामी"

(Our priority:Peace or Desire?)

२. ७१:"निर्ममो निरहंकारः स शांतिम् अधिगच्छति"

(Peace, the gate of happiness)

(२-१)

*******************

तं तथा कृपया आविष्टम् अश्रुपूर्णा कुलेक्षणम्।

विषीदन्तम् इदं वाक्यं उवाच मधुसूदनः।।

*******************

(२-१):

"विषीदन्तम् इदं वाक्यं उवाच मधुसूदनः"

(बोले तैसा चाले)

भगवदगीतेत व्यवहार आणि अध्यात्म(किंवा स्वधर्म) या संदर्भात दोन भागात स्पष्ठ सिमारेखा आलेली आहे. ही रेखा विचार(भाष्य) आणि कृति या संदर्भातील तांत्रिक विभागणि दर्शविते. प्रथम भाग व्यवहार वा विचाराचा आहे. हा भाग अर्जुन कुरुक्षेत्रावर(कार्यक्षेत्र) येईपर्यंत आलेला आहे. येथे त्याला नियतकार्य(स्वधर्म)मिळते. तर दुसरा भाग कृतिचा आहे. हा भाग अर्जुनाचा विषाद येथुन सुरु होतो. हाच भगवदगीता ज्ञानाचा महत्वाचा भाग आहे.

तं तथा कृपया आविष्टम् अश्रुपूर्णा कुलेक्षणम्।

विषीदन्तम् इदं वाक्यं उवाच मधुसूदनः।।(२-१)

व्यवहार आणि अध्यात्म यातील तांत्रिक विभागणि अनुक्रमे भाष्य व कृति या संदर्भात लक्षात घेतली तर जीवन विकासाचे रहस्य

कळते. कार्याचे महत्व कळते. आपण जे भाष्य बोलतो त्याचा व्यावहारिक उपयोग कळतो. "बोले तैसा चाले " या संदर्भात व्यवहारात कृतिच्या भागाला Personal Loyalty म्हणुन जग ओळखते. हाच भाग विकासभाग ठरतो. मनुष्याची खरी परिक्षा यांच विकास भागात होते. या भागात मनुष्याला स्वतःचा मार्ग स्वतःलाच चालायचा असतो. स्वतःलाच अडथळ्यावर मात करायची असते. हे अडथळे पार करणे जमले नाही तर वास्तव hide होते व मनुष्य ज्ञान, धर्म, आदर्श याचा दाखला देवुन समर्थन करतो. निरर्थक भाष्य बोलतो. धर्मभाष्य बोलणे व धर्म जगणे यांतील भेद भगवदगीता स्पष्ट करते.

मनुष्य "योग्य" समजुनच जगत असतो. जगत असतांना स्वतःचे समर्थन करणे, इतरांनी काय करावे व करु नये, या विचारसरणीचा(Habit of thinking) शिकार होतो तेंव्हा कितिही ज्ञान घेतले तरी हीच विचारसरणी घट्ट होत जाते. या भूमिकेला मनुष्य ज्ञानी भूमिका समजतो पण वास्तवात हा व्यवहार असतो.

१. काय हवे?/निर्णय/नियतकार्य

व्यवहारात फायदा-नुकसान, ज्ञान, धर्म(चांगले-वाईट) या सर्वांचा विचार होतो. चर्चा होतात, नियोजन होते व कार्य ठरते. मनुष्यही

ध्येय ठरवितो व कार्य ठरते. व्यवहारात "काय हवे" ही पारदर्शकता असेल तर मनुष्याला स्वतःची भूमिका मिळते. नियतकार्य मिळते. निर्णय ठरतो.

समुहात निर्णय होतो. याद्वारे मनुष्याला नियतकार्य मिळते. महाभारतात धर्मयुद्ध ठरते व अर्जुनाला नियतकार्य मिळते.

२. कृति :Determination(स्वधर्म, बुद्धियोग-एकनिश्चय)

मनुष्याच्या अधिकारात कार्य आहे. व जगतांना कार्यच घडत असते. या कार्यातील द्वंद्व मार्गात अडथळा बनतो. या अडथळयाला वश झाल्यामुळे अज्ञान असते. ही मनोवश भूमिका असते. स्वतःवरील command सूटते. आत्मवश भूमिकेत मार्ग दृढ होतो. हीच भूमिका धारण करण्यासाठी जीवनात ईश्वर ज्ञानाचा आश्रय महत्वाची भूमिका बजावते. जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. ज्ञानामुळे संशय मिटतो व कार्यनिश्चय होतो. या मार्गावर निष्काम कार्य घडते.

३. सार :

प्रत्यक्ष कार्याद्वारे भौतिक तसेच आध्यात्मिक विकास होतो. आध्यात्मिक विकास या संदर्भात योग अर्थात दुःखान्त शक्ति, निर्भयता याला भगवदगीतेत प्राधान्य दिलेले आहे.

*भाष्य व कृति यांत जीवनविकासासाठी कृति Priority असते.

* चांगलेपणा सक्षम होण्यासाठी भगवदगीता ज्ञान आहे.

*भय मनोदुर्बलता दर्शविते. निर्भयता सामर्थ्य दर्शविते.

* जीवनात दुःख आहे, दुःखामुळे मनोदुर्बलता येते. म्हणुन "योगः कर्मसु कौशलम् " हा भगवदगीतेचा संदेश आहे.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्माद् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्॥(२-५०)

प्रत्येक मनुष्याला स्वतःचा मार्ग चालायचा असतो व याचेच मनुष्याला अज्ञान असते. अहंकारामुळे हे अज्ञान कायम राहते.

"Everyone thinks of changing world but no one thinks of changing himself. "

Leo Tolstoy------

हेच अज्ञान दुर करण्यासाठी ईश्वराचे ज्ञान भगवदगीतेत "ज्ञान" या संदर्भात आलेले आहे. (ज्ञानसंच्छिन्न संशयम् ). या ज्ञानामुळे स्वतःचा प्रवास ईश्वरधामाकडे आहे, याचा बोध होतो व ईश्वरज्ञानाचा आश्रय स्वतःची भूमिका correct करण्यासाठी (संशयमुक्ति) आहे याची प्रचिति येते.

**********

(२. २)

*******************

कुतःत्वां कश्मलम् इदम् विषमे समउपस्थितम् ।

अनार्यजुष्ठम् अस्वर्ग्यम् अकिर्तिकरम् अर्जुन ॥

*******************

(२. २)/१:

" कुतःत्वां कश्मलम् इदम् विषमे सम् उपस्थितम् "

( Guilty Consciousness)

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।

हा रामायणकार महर्षि वाल्मिकिचा प्रथम श्लोक आहे . हाच रामायणाचा (तात्विक) आधार आहे, यात महर्षिंचे हृदय द्रवले व व्याधाने क्रौंच पक्षाच्या आनंदात विरजण घालणाऱ्या व नराचा वध करणाऱ्या व्याधाला शाप दिला.

"हृदय द्रवणे (परपिडा पाहुन)"ही रामायणाची सुरुवात आहे तर "हृदयदौर्बल्य(दैवी-चांगल्या मनुष्याचे दुःख)" भगवतगीतेची सुरुवात आहे. भगवतगीतेत भगवान उवाच प्रथम श्लोक महत्वाचा आहे. यांत अर्जुनाच्या "हृदयदौर्बल्यावर" भाष्य आहे.

कुतः त्वां कश्मलम् इदम् विषमे सम् उपस्थितम् ।

अनार्यजुष्ठम् अस्वर्ग्यम् अकीर्तिकरम् अर्जुन॥(२-२)

अशा कठिण प्रसंगी (मोहरुपी) अंधार कसा निर्माण झाला?श्रेष्ठ व्यक्तिला अशोभनिय आहे.

मनुष्यस्वभावातील स्वार्थ-परमार्थ, नम्र-दर्प या आधारावर चांगले -वाईटही लेबल लावण्यात येते. "आजकाल" चांगलेपणा चालत नाही असे लेबलही लावण्यात येते. यामुळे भलेभले गोंधळतात. अर्जुनही गोंधळला. व मनुष्यस्वभावातील याच गोंधळावर उपाय भगवतगीतेने सुचवला.

दैवीगुण संपत्तिमध्ये प्रथमगुण "अभय" आहे, तर शेवटचा गुण नम्रता आहे. चांगलेपणा असला तरी स्वतःतील न्युनगंड, मानसिक गुलामि, मानसिक अपंगत्व यावर विजय मिळविण्यासाठी भगवतगीता निश्चित असे मार्गदर्शन करते.

अभयंसत्त्वसंशुद्धिः ...

...... न अतिमानिता भवन्ति संपदम् दैवीम् ।(१६-३)

All the seven deadly sins (To be greedy. To be hateful. To have lust... ) are part of human nature. Of course, you have to control them, but if you're made to feel guilty for being human, then you're going to be trapped in a never-ending sin-and-repent cycle that you can't escape from.

Marilyn Manson

मनुष्यातील चांगलेपणा, नम्रता जीवनविकासातील साधन आहे. जीवनविकासातील साधन व साध्य यातील भेद जाणला नाही तर गोंधळ होतो. मनुष्यात न्युनगंड असणे, आत्मविश्वास नसणे, भय असणे, परावलंबि असणे, Determination चा अभाव असणे. अर्थात स्वतःला कृति करण्यासाठी आत्मविश्वास नसणे पण इतरांना मात्र त्याच कार्यासाठी दुराग्रह करणे. याचा परिणाम स्वतःला ज्ञानी समजुन सतत इतरांवर टिका करणे, इतरांनी काय करावे यावर भाष्य करणे. पण स्वतः मात्र आपल्या निष्क्रियतेचे समर्थन करणे. हा व्यक्तिमत्वातील Error असतो. व याच Error ला भगवतगीतेने प्रकाशात आणले आहे.

"Everyone thinks of changing the world, but no one thinks of changing himself. "

Leo Tolstoy

जगाने कसे वागावे?कसे चालावे? याचा आयुष्यभर मनुष्य आढावा घेतो. व अमुक व्यक्ति, जग कसे वाईट आहे यावर भाष्य करतो. पण जे अधिकारात आहे, "स्वतः बदलणे" यावर दुर्लक्ष होते. म्हणुन गालिब म्हणतो,

"धुल थी चेहरेपर हम आईना साफ करते रहे।
उम्रभर गालिब यही गलति दोहराते रहे।"

सार :

हृदयदौर्बल्य Stress तसेच Guiltyness चे ही कारण ठरते.
भगवतगीता जीवनविकासाचा Standard मार्ग, जीवनाचे निश्चित ध्येय यावर भाष्य करते.

Standard Path:

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

साध्य:

न इह अभिक्रम नाशोअस्ति प्रत्यवायो न विद्यते।
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥(२-४०)

*********

(२. २)/२ :

"कुतः त्वां कश्मलम् इदम् विषमे सम् उपस्थितम् "

(Challanging situation)

"It is Universal need to teach people how to take effective action in challenging situations. "

मनुष्यजीवनांत Challanging situation येतात. याचेच नांव मनुष्यजीवन आहे. यावेळी मनुष्याची क्रिया-प्रतिक्रिया (Action-Reaction) कशी असते, हीच मनुष्याच्या व्यक्तिमत्वाची, State

of progress ची परिक्षा असते. जणु याच परिक्षेत अर्जुनाला उतरविले असते.

*Situation : Negative vs. Challanging

युद्धाच्या प्रत्यक्ष शस्त्रप्रहारप्रसंगीच अर्जुन दुःखी होतो व प्रतिक्रिया देतो. दुःखी होणे घटनेतील प्रतिक्रियाच (Reaction) असते. अर्थात जीवनातील दुःख Situation ची प्रतिक्रिया असते. म्हणुनच ही Situation च Challanging ठरत असते.

अर्जुनाची युद्ध न करण्याची निवड व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान सांगणे ही त्याची याच Situation ला प्रतिक्रिया असते. अर्थात प्राप्त Situation ला Negative situation बनवितो.

समाजात घटना घडतात व प्रतिक्रिया येत असतात. तसेच मनुष्यजीवनांत अशा Situation येतात. यावरील प्रतिक्रिया ही स्वाभाविक संवय असते. पण निश्चित क्रिया करण्याची खरी गरज असते . अर्जुनाच्या जीवनातील ही घटना Challanging situation असते, पण प्रतिक्रिया त्याच्या जीवनातील Negative Situation दर्शविते, अर्थात अर्जुन Challanging situation ला Negative Situation करतो. येथेच Life of reaction व Life of Action यातील भेद भगवतगीता स्पष्ट करते.

A life of reaction is a life of slavery, intellectually and spiritually. One must fight for a life of action, not reaction

- RITA MAC BROWN

* Challanging Situation ची ओळख (वास्तव)

Bhagwatgeeta is translation of the earlier Spiritual, Social psychology and related fields into meaningful insights and tools that individuals can use in their everyday lives to transform negative situations and create positive change.

जसा रोग झाला तर औषध घेतो, तसेच जीवनातील Situation- Negative situation, यातील प्रतिक्रिया व क्रिया यातील भेद, मानसिक दुर्बलता व सक्षमता यातील भेद जाणणे आवश्यक असते. भगवतगीता हाच भेद दर्शवित आहे.

अर्जुनाची मानसिक दुर्बलता ही घटनेतील प्रतिक्रिया असते.
श्रीकृष्ण दुर्बलतेचा त्याग करुन क्रिया करण्याविषयी सांगतात.

कुतः त्वां कश्मलम् इदम् विषमे सम् उपस्थितम् ।(२-२)
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप।(२-३)

Challanging situation आली कि मनुष्य विचलित होतो. अर्जुन याचेच कारण सांगतो. या Situation च्या प्रतिक्रियेतील सत्य (वास्तव) सांगतो. व येथे प्रश्नाची पारदर्शकता येते.
दुःखमुक्ति कशी होईल?
*विकासमार्गाचे ज्ञान :

There might number of circumstances, emotions, values drives the life. But it is response either fear or faith cause the drive. Fear arrest the devepopement and keeps life stagnant. Faith motivate life to get ahead.

भगवतगीतेने विकासमार्गातील ज्ञान, कर्म व भक्ति यांची निश्चित भूमिका स्पष्ट केली आहे. संशय भय निर्माण करते. ज्ञान संशय मिटवुन विश्वास मिळवुन देते. कर्माद्वारे (Action) विकास होतो. भक्ति(Devotion) प्रत्यक्ष विकास साध्य करते.

******

(२. २)/३

"अनार्यजुष्टम् अस्वर्ग्यम् अकिर्तिकरम् अर्जुन"

मनुष्य आपल्या भावनांना कसे respond करतो, यासंबंधी भगवतगीतेचा हा विषय बनतो. मनुष्य व पशु यांत महत्वाचा भेद बुद्धिचा असतो हे आपण जाणतो. मानसशास्त्रिय भाषेत हा भेद

Self Consciousness System चा असतो. या System चा उपयोग करण्याची कला भगवतगीतेचा विषय आहे.

{याच संदर्भात मानसशास्त्रिय विषय पुढिलप्रमाणे येतो.

"How to understand the emotions and how to adaptively relate to and process them. "

That feelings are primitive, animalistic response sets that orient the individual toward action.

Shame orients you to submit,

anger to punish other,

fear to run away.

In contrast to such simple impulses, human society often requires very complex, long term responses.

However, unlike animal, humans have a whole additional dimension of consciousness, called the self-consciousness system.

Emotions:

1. Emotions are a central part of core consciousness.

First, there are your sensory perceptual experiences (i. e. , seeing trees, hearing music).

Second, there are drives (i. e. , good things you intuitively want to approach and bad things you intuitively want to avoid).

Third, there are emotions, which are “response sets” that prepare and energize action in response to perceptions and drives.

2. Emotions provide information about one’s core goals and needs.

3. There are two broad systems of emotions, negative and positive.

Negative emotions signal threat to needs and goals and energize avoidance.

Positive emotions signal opportunity to meet needs and goals and energize approach.

4. Emotions prepare an individual for action.

5. There are differences in emotional temperaments.

----What we need going forward is :

we must learn to adaptively regulate the more problematic action oriented aspects of feelings, and

effectively merge them with our long term goals and valued states of being. }

बुद्धि भ्रम पावली असता भावनांचे Processing ज्या पद्धतीने होते, ती Maladaptive Processing असते. यामुळे नकारात्मक भावना धारण होते. मनुष्य भाष्यातुन आपल्या भावना व्यक्त करतो. दुःखी झाल्यावर अर्जुनाने आपल्या भावना व्यक्त केल्यात. श्रीकृष्ण यावर Respond करतात, अशा कठिण प्रसंगी तुझी दुबळी भूमिका तुझ्यासारख्या श्रेष्ठ श्रेणीतील व्यक्तिसाठी अशोभनिय आहे!

अनार्यजुष्ठम् अस्वर्ग्यम् अकिर्तिकरम् अर्जुन।(२-२)

क्लैब्यं मास्म गमः पार्थ न एतद् त्वयि उपपद्यते।(२-३)

अर्जुन सर्वप्रथम वास्तव स्विकार करतो. व सकारात्मक संवाद सुरु होतो. भगवतगीता ज्ञानामुळे अर्जुनाची नकारात्मक भावना सकारात्मकमध्ये बदलते. व युद्धास तयार होतो. मानसशास्त्रिय भाषेत ही प्रक्रिया"Adaptive Processing of Emotions" म्हणुन ओळखल्या जाते.

"नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा"

****००******

(२-३)

********************

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ न एतद् त्वयि उपपद्यते।

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप॥

*********************

२. ३ /१: "क्लैब्यं मा स्म गमः पार्थ "

Part I. Mental Poverty

Mental health is often missing from public health debates even though it's critical to wellbeing.

Diane Abbott

भगवतगीता मनोविज्ञान क्षेत्रातील महान संशोधन आहे. म्हणुनच भगवतगीता ज्या कारणामुळे सांगण्यात आली, त्याचे कारण प्रथम जाणुन घेणे आवश्यक आहे. हेच श्रीकृष्णांनी अगदी सुरुवातीला वदलेल्या या संदेशात आहे.

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ न एतद् त्वयि उपपद्यते।

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप ॥(२-३)

The very greatest things - great thoughts, discoveries, inventions - have usually been nurtured

in hardship, often pondered over in sorrow, and at length established with difficulty.

Samuel Smiles

मनुष्याला सुखशांती हवी असते. पण या सुखशांतीचा शत्रु कोण? याचा शोध न घेता सरळ Philosophy वापरतो . व पुढिल प्रवास करतो.

Those who lack the courage will always find a philosophy to justify it.

Albert Camus

अर्जुन समर्थनासाठी Philosophy वापरतो.

समाजात असे भाष्य आपण ऐकत असतो . "मानसिक दुर्बलता" हा शत्रु तसाच कायम राहुन Conditioned होत असतो.

"Born to win but conditioned to loose"

मानवजन्मच मनुष्याला लाभलेले मौल्यवान रत्न आहे. केवळ जीवन आहे म्हणुन जगायचे, हे पशुलाही कळते. म्हणुन "क्लैब्यं मा स्म गमः पार्थ" याद्वारे भगवतगीता मनुष्याला जागे करीत आहे. मानवजन्माला पुर्णत्व साकार करण्याचे व अनुभवण्याचे शास्त्र सांगते.

अर्जुन वास्तव स्विकारतो. व संवाद सुरु होतो.

मनुष्य वास्तव स्विकार करीत नाही व अज्ञानी भूमिकेला ज्ञानी दर्शविण्याचा प्रयत्न करतो. हीच नकळत चुक करतो. मनुष्याच्या याच भूमिकेमुळे वास्तवातील प्रश्नाचे निदान होत नाही. यामुळे निरोगी संवाद होत नाही. म्हणुन भगवतगीता येथे प्रज्ञावादी भूमिका vs. ज्ञानी भूमिका (Rightous) यातील भेद दर्शविते.

"Discouragement, fear, doubt, lack of self-confidence, are the germs which have killed the prosperity and happiness of tens of thousands of people. "

Orison Swett Morden

*************

२. ३/२:

"क्लैब्यं मा स्म गमः पार्थ न एतद् त्वयि उपपद्यते"

Part II.

. Stupidity vs. Wisdom

*प्राचिन vs आधुनिक:

ज्ञान:(भारतिय )प्राचिन ग्रंथातील ज्ञान व आधुनिक ज्ञानविज्ञान यांत प्राचिन व आधुनिक असा भेद केल्या जातो. जगाने आधुनिक ज्ञानविज्ञानाचे महत्व निर्विवाद मान्य केलेले आहे. पण "ज्ञान" प्राचिन वा आधुनिक होत नाही. ज्ञान हे ज्ञानच असते,

त्यांत दररोज भर पडत असते. वर्तमानातील प्रश्न सोडविण्यासाठी ज्ञानच उपयोगी पडते. हे वास्तव स्विकारले तर प्राचिन ग्रंथातील ज्ञानाचे महत्व "ज्ञान" या संदर्भात वर्तमानात उपयोगासाठी जगासमोर आले पाहिजे.

सुखदुःख-

मनुष्यजीवनातील दुःख, अशांति, अडचणी ही प्राचिन व आधुनिक होत नाही. महाभारतात अर्जुन युद्धक्षेत्रावर दुःखी होतो. अशांत होतो व युद्ध करणे अधर्म आहे असे Judgement देतो. स्वतःचे वास्तव न स्विकारता स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी उपलब्ध ज्ञानाचा वापर करतो. नकारात्मक असुनही स्वतःला योग्य सिद्ध करण्याची समाजातील हीच "अज्ञानाची संवय" असते. या संवयीला मार्क ट्वेन सरळ Stupidity म्हणतो.

"Never argue with stupid people, they will drag you down to their level and then beat you with experience. "

-Mark Twain

श्रीकृष्णांनी याच Stupidity ला "क्लैब्य" संबोधले.

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ न एतद् त्वयि उपपद्यते।

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप॥(२-३)

*चुकीची संवय(अज्ञानी) vs. ज्ञानी

मनुष्य प्रकृतिनुसार(/स्वभावनियत संवयीनुसार)जगतो. मार्गात अडचण आली असता चुकीच्या संवयीमुळे नकळत अज्ञानाच्या(द्वंद्व) जाळयात सापडतो व स्वतःच स्वतःचा मार्ग अडवीत असतो.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।(३-३३)

तयोःन वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

भगवतगीता याच चुकीच्या संवयीवर मात करण्यासाठी ज्ञानाचे महत्व सांगते. यांत प्रथम टप्पा असतो, वास्तवाचा स्विकार करणे. यामुळे निश्चित विषय मिळतो, प्रश्नाचे निदान होते.

येथे अर्जुनाचा विषय असतो,

"नियतकार्याद्वारे दुःखमुक्ति?"

कार्य व्यवहारातील साधन असते. हा व्यावहारिक मार्ग सकाम असतो. यामुळेच अर्जुनाचा कार्याचा निश्चय डळमळतो. म्हणुन प्रत्यक्ष कार्य करतांना कार्य निष्ठेने व्हावे, (योग)शक्तिची साधना व्हावी यासाठी याच व्यावहारिक मार्गाचे "अमृतत्वाय कल्पते" या राजमार्गात Transformation आवश्यक असते. या मार्गावर नियतकार्य स्वधर्मात, निर्णय दृढनिश्चयात (Determination) परिवर्तित होते. ईश्वरभक्ति म्हणजे कार्यसमर्पण/फलत्याग याप्रमाणे अर्थबोध होतो. व शक्तिची साधना होते. म्हणुन म्हटले,

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

"A true teacher would never tell you what to do. But he would give you the knowledge with which you could decide what would be best for you to do. "

Christopher Pike(Writer of Sati)

*******

(२-३)/३:"क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परन्तप"

III. Wisdom

भगवतगीतेचा विषय उपस्थित होण्याचे कारण "श्रीकृष्णांनी अर्जुनाला सर्वप्रथम केलेले (दोन verses मधुन) संबोधन " यातुन स्पष्ट होते.

कुतस्त्वा कश्मलम् इदं विषमे सम उपस्थितम् ।(२-२)

.....

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परन्तप।(२-३)

चांगला, शुर, विद्वान असलेल्या अर्जुनाला श्रीकृष्णांनी श्रेष्ठ श्रेणीत गणले. आपले नियतकार्य करण्यासाठी तयारीत असतांनाच त्याला चहुकडे दुःखाचा पहाड (स्वतःलाही दुःख व इतरांनाही दुःख)जाणवतो. जाणुनबुजुन खड्ड्याकडे कां जावे?अशी त्याची मनःस्थिति होते. व तो जो उपाय करतो, आपली योग्यता सिद्ध करण्यासाठी धर्माचा दाखला देतो.

चांगलेपणा जेंव्हा दुर्बलता ठरते व निष्क्रियतेचे समर्थन होते, तेंव्हा समर्थनार्थ केलेले भाष्य नकारात्मक भावनेचे प्रतिबिंब असते. याचाच अर्थ आपल्या चांगल्या भावनांनाही सकारात्मक आकार देण्यास(Processing of emotion) अर्जुन असमर्थ ठरतो. याला मानसशास्त्रिय भाषेत Maladaptive processing of emotion म्हटले जाते.

*Negative emotions signal threat to needs and goals and energize avoidance.

Positive emotions signal opportunity to meet needs and goals and energize approach.

let’s consider what happens if someone is trying to block negative emotions all the time. More and more mental energy will go into jamming more and more emotions back stage. That is, the core feeling self will feel wounded and judged by the self-consciousness system, which creates a bad intrapsychic cycle, a cycle where an individual turns against selves, which can easily lead to depression.

This brings into view how the maladaptive processing of emotions might result clinically significant problems.

(Gregg Henriques, Ph. D. , is a professor of psychology at James Madison University. )

भगवतगीता या अवस्थेला (मनोवश ) "वर्तेत आत्मैव शत्रुवत" संबोधते. व आत्मवश होणे हा उपाय सुचविते. मानसशास्त्रिय भाषेत Higher Self/Consciousness क्रियाशिल करण्याची ही प्रक्रिया असते.

*Adaptive processing of emotion is aimed to transform negative emotion into positive emotion.

याचाच अर्थ जेंव्हा धर्मही काम करीत नाही (परलोकी स्वर्ग नाही, इहलोकी किर्ति नाही!) तेंव्हा मानसशास्त्राचा उपयोग (Self consciousness system)केला आहे व याचसाठी अध्यात्मज्ञानाचा वापर केलेला आहे. अर्जुनाचा चांगलेपणा दैवीगुणाचाच भाग असतो पण येथे बुद्धि भ्रम पावते. म्हणुन बुद्धियोग धारण होण्यासाठी ईश्वरज्ञानाचा उल्लेख आलेला आहे. व हे ज्ञान विज्ञानासह स्पष्ट केले आहे.

Self consciousness system मधील मन, बुद्धि, चित्त, अहंकार या functioning faculties असतात. अहंकाराचा आश्रय अशाश्वताचा आश्रय तर ईश्वराचा आश्रय शाश्वताचा आश्रय असतो. मनुष्य देवतांचा भक्त असला तरी त्याची ईश्वरश्रद्धा निर्विवाद स्पष्ट होते. व्यवहारात नित्य ईश्वराचा आश्रय व्हावा

यासाठी अव्यय ईश्वराची ओळख प्रकृतिचा अध्यक्ष,
ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत म्हणुन हृदयातील अंधार दुर करणारे ज्ञान, अधिदैव अशा विविध रुपातुन विविध उपयोगासाठी स्पष्ट केली आहे. या ज्ञानामुळे जीवनविकासाचा मुख्य Goal निश्चित होतो. अर्थात विकासमार्ग ठरवितो व कार्याद्वारे योग(दुःखान्त-निर्भयता) म्हणजेच ईश्वराप्रत मार्गक्रमण हे Logic(येन माम उपयान्ति ते) स्पष्ट होते. अर्थात भगवतगीतेतील भक्तिचे प्रयोजनच मानसिक दुर्बलता दुर करण्यासाठी आहे. वर्तमानात निरोगी, सकारात्मक मानसिकता असावी यासाठी नित्य ईश्वराचा आश्रय याची उपयुक्तता स्पष्ट होते.

मनुष्याचे हृदयस्थानी ईश्वर आहे.

(सर्वस्य च अहं हृददि संनिविष्टो।१५-१५)

म्हणुन स्वतःवर विश्वास येण्यासाठी म्हटले,

सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।(१८-६६)

(Now Arjuna can “approach” being tough because that is adaptive, rather than shaming himself into avoiding looking like a wimp. )

(२-४)

********************

कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन।

इषुभिः प्रतियोत्स्यामि पुजार्हाव अरिसूदन।।

********************

(२-४) :"इषुभिः प्रतियोत्स्यामि पुजार्हाव अरिसूदन"

अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो व युद्ध करणार नाही ही भूमिका घेतो. या घटनेत दोन Stages येतात.

१. समर्थन Judgement thinking:

अर्जुन दुःखामुळे गलितगात्र होतो. व त्याला हे शोकदायी युद्ध करायचे नसते. तो केवळ समर्थन करीत नाही तर या घटनेला (राज्यप्राप्तिसाठी स्वजनांना मारणे म्हणजे लोभीपणा ठरवुन)धर्माचा साज चढवितो. ही त्वरीत प्रतिक्रिया असते.

या प्रतिक्रियेला श्रीकृष्णाचा सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही, उलट ही भूमिका अयोग्य आहे असे त्याला सांगण्यात येते. तेंव्हा तो या घटनेतील सत्यता कबुल करतो. ही दुसरी Stage असते. याच आधारावर प्रश्नाची विचारणा होते.

२. प्रश्न

इषुभिः प्रतियोत्स्यामि पुजार्हाव अरिसूदन।(२-४)

गुरुन् अहत्वा हि महानुभावान्

श्रेयो भोक्तुं भैक्ष्यम् अपि इह लोके।(२-५)

ज्या विभूतिंची हाराने पुजा करावी ते पितामह भिष्म, गुरु द्रोणाचार्य यांना बाणाने मारणे अशी विपरित परिस्थिति निर्माण झाली आहे. या जेंष्ठांना मारुन त्यांच्या रक्ताने माखलेले राज्य भोगण्यापेक्षा भिक्षा मागुन उदरनिर्वाह करणे श्रेयस्कर वाटते. यामुळे धर्म कोणता, अधर्म कोणता, कोणाची बाजु धर्माची हे कळेनासे झाले असले तरी ज्यांना मारुन विजयाची इच्छा नाही तेच समोर उभे ठाकले आहेत. याच आधारावर निश्चित प्रश्न करतो.

या युद्धामुळे दुःख होईल, अपराधिक भावना होईल. युद्ध करणे धर्मकार्य असेल तर या कार्याने पृथ्वीवरीलच काय तर देवाचे राज्य मिळाले तरी हे राज्य मला झालेला शोक मिटविण्यास कसे सक्षम होईल?अर्थात येथे दुःखमुक्तिसाठी प्रश्न करतो.

पहिल्या stageमध्ये Intention चुकीचे नसते, पण Judgement thinking वापरुन निष्क्रियतेलाच धर्म ठरवितो. तर दुसऱ्या stage मध्ये बुद्धि वापरतो व वस्तुस्थिति स्पष्ठ करतो. या Stageमध्येही Intention चांगले असते. पण निश्चित मार्ग कळत नाही.

मनुष्याला सुखशांति अनुभवायची असते. म्हणुन दुःख, कष्ट यांच्या भयाने कार्य टाळतो पण त्याला आदर्शही ठरवितो. पण जबाबदारी कळते तेंव्हा निश्चित मार्ग कळायला हवा.

कार्य केवळ (भोगऐश्वर्य)प्राप्तिसाठी केल्या जाते हे सामान्याचे ज्ञान असते, पण कार्याद्वारे दुःखमुक्तिचे ज्ञान केवळ भगवतगीता सांगत आहे. या शक्तिला योग म्हटले आहे. याच शक्तिमुळे निर्भयता, साहस, विचलित न होणे अर्थात स्थिरता लाभते.

"PRESENT"

१. Courage, Power of Stability:

कार्याद्वारे भक्ति याचा अर्थ कार्याद्वारे दुःखमुक्ति, योग यासाठी निष्काम कर्म.

२. स्वधर्माचरण(Goodwork, Rightous):

नियतकार्य(Committed)स्वधर्म करुन स्वतःचा मार्ग बनविणे. स्वधर्माचरण म्हणजे (ईश्वर)समर्पित कार्य.

३. Determination:

निर्णयअधिकार जाणुन स्वतःचे अस्तित्व जाणणे व स्वतःचा मार्ग बनविण्यासाठी कार्याचा दृढनिश्चय करणे. द्वंद्वमुक्ति म्हणजे दृढनिश्चय. द्वंद्वमुक्तिसाठी बुद्धियोग आश्रय.

सार:

"वर्तमानातील Awareness" हा भगवतगीतेचा विषय आहे. याचसाठी नित्य ईश्वराचा आश्रय याचे रहस्य सांगते. याच अनुषंगाने कार्याद्वारे स्वतःचा मार्ग कसा बनतो व कार्याद्वारे योग साधण्यासाठी नित्य ईश्वराचा आश्रय याचे रहस्य भगवतगीता सांगते. ज्या भयामुळे कार्य टाळतो, त्याच भयावर विजय मिळविण्यासाठी योग असतो.

"त्रायते महतो भयात् "

*********

(२-५)

*******************

गुरु न अहत्वा हि महानुभावान्

श्रेयो भोक्तुं भैक्ष्यम् अपि इह लोके।

हत्वार्थ कामान् तु गुरुन् इहैव

भुञ्जीय भोगान् रुधिर प्रधिग्धान्।।

*******************

(२-५) :

"श्रेयो भोक्तुं भैक्ष्यम् अपि इह लोके"

(Your life your choice)

जीवनात जोवर सुख अनुभवतो तोवर जीवन हवेहवेसे वाटते. या विश्वातच स्वर्ग अनुभवतो. पण हेच जीवन जेंव्हा कठिण वाटते, तेंव्हा ज्याला सुख समजतो, ते काट्यासमान बोचत असते. अर्जुनाला युद्ध करण्यात दुःख जाणवते व राज्याचे सुख काट्यासमान वाटत असते. तो जीवनाची Philosophy बोलत असतो.

मनुष्याची निवड :

अर्जुन घटनेतील वास्तव स्विकार करतांना आपल्या निवडीविषयी भाष्य करतो, तो म्हणतो, ज्या राज्याची आम्ही

इच्छा करीत आहो, ते राज्य गुरु, पितामह यांच्या रक्ताने माखलेले असेल व असे राज्य सुख कधीच देणार नाही. यापेक्षा उदरनिर्वाहासाठी भिक्षा मागुन जगणे मी पसंत करेल.

गुरु न अहत्वा हि महानुभावान्

श्रेयो भोक्तुं भैक्ष्यम् अपि इह लोके।

हत्वार्थ कामान् तु गुरुन् इहैव

भुञ्जीय भोगान् रुधिर प्रधिग्धान्।।(२-५)

"You and your choices are the only things you have control over in this life. Complaining or lamenting over external circumstances and events is the greatest waste of energy on the planet. "

I don’t blame or complain about things like the economy, the government, taxes, employees, gas prices, or any of the external things that I don’t have control over.

' The only thing I have control over is my response to these things. '

Jack Canfield

जगातील Motivators, Inspirators मनुष्याच्या अंतर्गत शक्तिला फुंकर देत असतात. अधिकाराला प्रकाशात आणतात. भगवतगीतेची हीच भूमिका आहे.

जेंव्हा मनुष्य जे आपल्या अधिकारक्षेत्रातच नाही त्यावर भाष्य करतो, तेंव्हा स्वतःचे अधिकारक्षेत्र दुर्लक्षित होते. या अधिकाराचेच ज्ञान भगवतगीता देत आहे.

"चांगलेपणाचे संस्कार" या संदर्भात जे त्याज्य, निंदनिय ते सोडावे व वंदनिय ते आचरावे ही उक्ति आहे. चांगलेपणा या संदर्भातच अर्जुन स्वतःला लोभी म्हणतो. व निष्क्रियतेचे समर्थन करतो. समर्थनासाठी अर्जुन धर्माचाच वापर करतो. धर्मात धर्म-अधर्म या संदर्भात योग्य-अयोग्य हा आधार असतो. प्रत्यक्षात दुर्बलता, भयामुळे मनुष्य निष्क्रियतेचे समर्थन करतो. याच दुर्बलतेला दुर करण्यासाठी अध्यात्माची उपयुक्तता भगवतगीता स्पष्ट करते. यासाठी जीवनमार्गात ज्ञान -अज्ञान हा आधार घेतलेला आहे.

आपल्या अधिकारात स्वतःवर नियंत्रण करणे, निर्णय घेण्याचा अधिकार, कार्य करण्याचा अधिकार, शक्तिची साधना करण्याचा अधिकार अर्थात कर्मयोगाचा अधिकार आहे.

याचाच अर्थ जीवनमार्गातील अध्यात्माचा आधार ज्ञान-अज्ञान असतो. ज्ञानामुळे जीवनमार्ग पक्का, निश्चित असतो. अर्थात

स्वतःच्या अधिकारक्षेत्राचे ज्ञान असते. व नित्य विकासमार्गावर असतो.

उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादरेत्।

आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः॥(६-५)

दुःख, जीवनाची अनित्यता जीवनाचा अविभाज्य भागच आहे. व यावर मात करण्यासाठीच ज्ञान आहे. अज्ञानामुळे मात्र मनुष्याला जीवन कठिण वाटते, यामुळेPhilosophy मात्र बोलत असतो. व नकारात्मक संदेश देत असतो. जे अधिकारक्षेत्रात नाही त्यावर भाष्य करतो व स्वतःचे अधिकारक्षेत्र विसरतो. येथे स्वतःच स्वतःशी शत्रुवत आचरण करतो. जीवनाच्या याच कटु पार्श्वभुमिवर भगवतगीता मनुष्याला जागे करते, स्वतःच्या जीवनाचा आदर करा, त्याचेशी बंधुवत व्यवहार करा.

*******

(२-५) :

"हत्वार्थ कामांस्तु गुरुन् इहैव

भुञ्जीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् "

( Delusion vs. Awareness of Self determination)

युद्धाचा प्रसंग अर्जुनाला त्याच्यासाठी अप्रिय वाटतो. ही अप्रिय घटना टाळावी यासाठी तो धर्मावर भाष्य करतो. व याचा आधार घेवुन युद्ध न करणे ही निवड करतो. पण दुर्बलता सोडुन

ठरल्याप्रमाणे युद्ध कर असे श्रीकृष्ण संबोधीत करतात. तेंव्हा आपल्याला कोणत्या गोष्टीचा त्रास होत आहे हे स्पष्ट करतो.

जीवनचक्रात सुखदुःख असते. कधी चांगले तर कधी वाईट प्रसंग येतात. जे अप्रिय आहे ते व्हायला नको अशी इच्छा असल्यामुळे त्या घटनेचा त्रास होतो. मी स्वतःसाठी अप्रिय/अयोग्य कसे निवडणार?मग इच्छा नसुनही जे अप्रिय घडत असते त्याचा दोष बाह्य परिस्थितिवर मनुष्य लादत असतो. यांत व्यक्ति, देव, दैव होवु शकते. अर्थात स्वतःच्या परिस्थितिला बाह्य परिस्थिति जबाबदार आहे असा समज होतो. या विचारात स्वतःची जबाबदारी व अधिकार विसरतो.

अर्जुन म्हणतो, केवळ राज्याच्या इच्छेने गुरु, पितामह अशा महानुभावांची हत्या करणे म्हणजे त्यांच्या रक्ताने माखलेले राज्य भोगणे ठरेल. यापेक्षा योगक्षेम चालविण्यासाठी भिक्षुक बनणे श्रेयस्कर वाटते.

गुरुन् हत्वा हि महानुभावान्

श्रेयो भोक्तुं भैक्ष्यम् अपि इह लोके।

हत्वार्थ कामांस्तु गुरुन् इहैव

भुञ्जीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् ॥(२-५)

या पार्श्वभुमिवर धर्म या संदर्भात कोणाचा विजय श्रेयस्कर हे कळत नाही. पण ज्यांना मारुन विजय मिळवायचा नाही तेच

आमच्यासमोर उभे ठाकले आहेत. असे बोलुन तो आपली बुद्धि भ्रमात सापडली आहे अशी कबुली देतो.

वरील घटनेत बुद्धिला भ्रमातुन मुक्त करणे व स्वतःचा अधिकार जाणणे, त्याचा वापर करणे हे " Awareness" आवश्यक असते. यांत निर्णयाचा अधिकार महत्वाचा असतो. मनुष्याचा निर्णयअधिकार पक्षाच्या पंखाप्रमाणे असतो.

"एक गरुडपिलु कोंबड्यांच्या कळपात वाढते. कोंबड्यांना त्याची गरुड म्हणुन ओळख नसते. स्वभावप्रकृतिनुसार गरुडपिलाला उडावेसे वाटते. पण जेष्ठ कोंबडी समज देते, ते आपले काम नव्हे. कालांतराने उड्डानच विसरतो. "

"Born to win but conditioned to loose"

आपल्या जीवनातील घटनाक्रमांमध्ये आपल्याला निर्णय घेण्याची संधी मिळते, त्यावेळी आपण कुठला निर्णय घेतो यावर जीवनाचा पुढील घटनाक्रम अवलंबुन असतो. या पार्श्वभुमिवर भगवदगीता निष्काम कर्माचे शास्त्र सांगते.

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।(२-४८)

तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्।(२-५०)

यदा ते मोह कलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति।

तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्यश्रुतस्य च।।(२-५२)

अर्थात या शास्त्राअंतर्गत महत्वाचे मुद्दे:

१. कार्याचा निश्चय :

अ) स्वधर्म :समुहाच्या निर्णयाचा स्वतः केलेला स्विकार.

ब) स्वतःचा अधिकार:निर्णय घेण्याचा स्वतःचा अधिकार जाणणे.

२. बुद्धियोग(भ्रममुक्ति) :

अ)दृढनिश्चय:बुद्धिला भ्रमातुन(चंचलता) मुक्त करणे व कार्याचा एकनिश्चय करणे. यासाठी बुद्धियोग.

ब) योगः कर्मसु कौशलम् : समत्वयोगाने कार्यरत.

"Every human has four endowments - self awareness, conscience, independent will and creative imagination. These give us the ultimate human freedom... The power to choose, to respond, to change. "

-Stephen Covey

संदेश :

मनुष्यजीवनात स्वतःचे प्राणतत्व (जीवात्मा) व ईश्वर याचे निश्चित नाते आहे. या ज्ञानाशिवाय ज्ञानविज्ञानही अपुर्ण आहे.

सर्वभूतेषु येनैकं भावम् अव्ययम् ईक्षते।

अविभक्तं विभक्तेषु तद् ज्ञानं विद्धि सात्त्विकम्।।(१८-२०)

जगाला हाच संदेश देण्यासाठी ईश्वराने मनुष्यरुपात अवतार धारण केला. हाच अवतार श्रीकृष्ण या नांवाने जग ओळखते.

भगवदगीतेत श्रीकृष्ण स्वतःची हीच ओळख देत आहे.

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुं आश्रितम्।
परं भावं अजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।।(९-११)

सर्वस्य च अहं हृदी संनिविष्टो
मत्तः स्मृति ज्ञानं अपोहनंच ।
वेदैश्च सर्वे अहमेव वेद्यो
वेदान्तकृत् वेदविदेव च अहं।।(१५-१५)

********

(२-६)

*******************

न च एतद् विद्मः कतरत् नो गरियो

यद् वा जयेम् यदि वा नो जयेयुः।

यानेव हत्वा न जिजीविषामः

तेअवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः।।

*******************

२. ६ :"न च एतद् विद्मः कतरत् नो गरियो

यद् वा जयेम् यदि वा नो जयेयुः।"

वर्तमानात ज्ञानविज्ञानाच्या काळात निरोगी संस्कृतिसाठी संवाद होणे आवश्यक असते. यांत Reasoning, प्रश्न विचारण्याचा अधिकार असतो. युरोपने १५ वे शतक Age of Reasoning/Enlightenment age संबोधले.

भगवतगीतेतील ज्ञानाचे द्वार उघडण्यापुर्वी अर्जुनाच्या भूमिकेत दोन Stages आहेत. प्रथम Stageमध्ये अर्जुन संवादाचे द्वार बंद करतो. अर्जुन विद्याविभुषित होता, तरी तो स्वतःच्या जीवनाचे प्रश्न सोडविण्यास स्वतःला असमर्थ जाणतो. सर्वसामान्य

मनुष्याप्रमाणे निष्क्रियतेचे समर्थन करतो. अशांत मनाला शांत करण्याचा हा उपाय असतो.

प्रत्यक्षात विश्वास, सुखाची अनुभुति व भाष्याने समाधान घेणे यांत भेद असतो.

जिंदगी वही जीते है, जो

छोटी छोटी चिजोमे खुशियां ढुंढ लेते है।

कागजके फुलोमे खुशबु ढुंढ लेते हे।

परिवारमे फरिश्ते ढुंढ लेते है।

मनुष्य पुर्ण विश्वासाने कार्यरत असतो, तेंव्हा सुख अनुभवतो. पण विश्वास नसणे, कार्य करण्याची इच्छा नसणे, या स्थितित अशांत असतो, कष्टाने कार्य करतो किंवा निष्क्रिय होतो. अशांत मनाला समाधान देण्यासाठी भाष्य बोलतो. कुणी निष्क्रिय असुनही स्वतःला ज्ञानी ठरविण्यासाठी समर्थन करतो. , कुणी श्रेष्ठ ठरविण्यासाठी तुलना करतो. कुणी इतरांना चुक ठरविण्यासाठी Judgement thinking चा वापर करुन भाष्य बोलतो. अशा भाष्याला भगवतगीता प्रज्ञावाद संबोधते.

द्वितिय भूमिकेत पदार्पण: प्रश्नाची पारदर्शकता-

Why I should do it?

वर्तमानातील सुख हेच कारण अर्जुनाच्या प्राथमिक भूमिकेचे असते. श्रीकृष्ण या भूमिकेतील उणीव दर्शवुन देतात, तेंव्हाच अर्जुन मन मोकळे करतो व वास्तव स्विकारतो.

"Emotions never lie"

न च एतद् विद्मः कतरत् नो गरियो

यद् वा जयेम् यदि वा नो जयेयुः।(२-६)

"समाजहीतासाठी कुणाचे जिंकणे श्रेयस्कर हे कळत नाही व केवळ जिंकण्यासाठी यांना मारणे उचित नाही. कारण मी युद्ध केले तरी याची फलश्रुति शोक असेल. अशा स्थितित मी काय करावे?"

शेक्सपियरचा हॅम्लेट "To be or not to be" यासाठी प्रसिद्ध आहे. मनुष्यजीवनाची हतबलता सिकंदरानेही अनुभवली. चांगला मनुष्य आपल्यामुळे इतरांना दुःख होणार नाही अशी भूमिका घेतो. याच भूमिकेमुळे अर्जुन हतबलता अनुभवतो. जगत् जेता असो, विद्वान असो वा चांगला असो, जगातील भलेभले हतबलता अनुभवतात. हे वास्तव जग अनुभवत असते. या पार्श्वभुमीवर भगवतगीतेने जगाला सांगितलेले विकासमार्गाचे निश्चित ज्ञान जाणुन घेणे महत्वाचे ठरते.

अर्जुनाचा प्रश्न असतो, त्याचे नियतकार्य योग्य कि अयोग्य?योग्य असेल तर शोकमुक्ति कशी होईल?

सकाम अवस्थेत अर्जुनाचे कार्य शोकप्रद ठरते. कारण ते प्राप्तिशी( Want ) जोडले असते. तर निष्काम कार्य ईश्वराशी जोडल्या जाते. कार्याद्वारे ईश्वरभक्ति (योग, शोकमुक्ति, निर्भय)या विकासमार्गाचे ज्ञान होते. ईश्वरज्ञान हे बाह्यज्ञान नसुन त्याच्या जीवंत तत्वाशी संबंधित भाग आहे हे ज्ञानविज्ञानासह (Knowledge of Consciousness, Knowledge of Permanent vs Transient) कळते.

जसा अर्जुनाचा निश्चित प्रश्न असतो, त्याला त्याच अनुषंगाने जीवनविकासाचे ज्ञान सांगितल्या जाते व शेवटी काय स्विकारावे हा निर्णय अधिकार त्याचा असतो. हे भगवतेने आवर्जुन दर्शवुन दिले आहे.

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।१८-६३)

जेंव्हा Conflict असते, तेंव्हा Both are Right ही अवस्था असते. याच अनुषंगाने जगात समर्थन असते. सहकार्यासाठी संवाद हवा असतो. वर्तमानातील ज्ञानविज्ञानाच्या युगात भगवतगीतेतील संवादाचे हे रहस्य जाणुन घेणे आवश्यक आहे.

*********

(२-७)

**********************

कार्पण्यदोषोपहत स्वभावः

पृच्छामि त्वाम् धर्मसम्मुढचेताः।

यत् श्रेयः स्यात् निश्चितम् ब्रूहि तन्मे

शिष्यस्ते अहं शाधि मां त्वाम् प्रपन्नम् ।।

**********************

(२-७)/१:"कार्पण्यदोषोपहत स्वभावः

पृच्छामि त्वाम् धर्मसम्मुढचेताः"

Part I . Acceptance of confusion

मी चांगला आहे कि लोभी आहे?असा प्रश्न अर्जुनाला पडतो व स्वतःच्याच भावना वाचण्यात तो असमर्थ होतो. या स्थितिला "कार्पण्यदोष"(दुःखामुळे विचलित झालेली स्थिति) म्हटले आहे. या स्थितित युद्ध करणे योग्य कि अयोग्य याचा निश्चय करु शकत नाही. कार्य करणे त्याला Guilty वाटते. मनुष्य या स्थितित सापडला तर कार्य केले तरी कष्टाने, बळजोरीने करतो, जणु जाणुनबुजुन खड्डयाकडे जात आहे असे त्याला वाटते. याचाच परिणाम तो युद्ध न करणे श्रेयस्कर समजतो. पण "मी योग्य"आहे असे समर्थन आवर्जुन करतो. यासाठी ज्ञान वापरतो.

भगवतगीतेने मनोविज्ञान क्षेत्रातील हा अत्यंत महत्वाचा धागा जगासमोर आणला आहे. अर्जुनविद्याविभुषित, शुर, चांगला(दैवीगुणसंपन्न) होता. कार्याच्या एकाग्रचित्त होण्यात त्याची ख्याति (पोपटाचा डोळा लक्ष्य) होती. तरी प्रकृतिने तो Trap झाला होता. (ज्याला लोक पाय ओढणे म्हणतात. व भगवतगीता प्रकृतितील या Realityची ओळख करुन देते-"तौ हि अस्य परिपन्थिनौ"३-३४)

समाजात निष्क्रियतेचे समर्थन "मी योग्य" समजुन करणारे बहु भेटतील. Audience बनुन भाष्य बोलणे सोपे असते. यामुळे (निष्क्रियता असली तरी)स्वसमर्थन व परटिका असे भाष्य चालत असते.

भाष्याचा विषय काय?

भाष्य सकारात्मक असो वा नकारात्मक !ते influence करीत असते. रामायणात मनथरेच्या भाष्याचा विषय होता-कैकेयीने राजमाता व्हावे!याच अनुषंगाने मानसिक influence होणारी प्रक्रिया मनथरा वापरते. कैकेयी संवादात सहभागी होते.

भाष्य Communicationचे माध्यम असते. म्हणुन संवादात भाष्याचा विषय काय?हाच स्वतःसाठी महत्वाचा विषय असतो. अर्जुनाच्या भाष्याचा विषय होता-मी युद्ध करणार नाही. येथे

संवादच थांबला होता. श्रीकृष्ण संवादाचा मार्ग मोकळा करतात व संवाद सुरु होतो.

-अर्जुनाला वाटते युद्ध करणे चुक आहे!या मुद्यावर संवाद सुरु होतो व आता अर्जुनाला ऐकायचे असते, युद्ध करणे श्रेयस्कर कसे?हा विषय बनतो.

ज्यांना कार्य करायचे आहे, ते विश्वासाने कार्य होण्यासाठी, माझ्यासाठी योग्य काय?हा प्रश्न स्वतःला करणारेच उत्तर शोधतात. प्रश्नाची पारदर्शकता असेल तर उत्तर मिळते.

"And then what makes the work interesting is if you choose the right questions. "

Bruce Nauman

"कार्पण्यदोषोपहत स्वभावः

पृच्छामि त्वाम् धर्मसम्मुढचेताः।

यत् श्रेयः स्यात् निश्चितम् ब्रूहि तन्मे

शिष्यस्ते अहं शाधि मां त्वाम् प्रपन्नम् ।।(२-७)

भगवतगीता याच प्रश्नाचे उत्तर अर्जुनाला देत आहे.

(Knowledge of Determination)

हर्बर्ट स्पेन्सर म्हणतो,

"The great aim of education is not knowledge but action. "

जगात कर्तृत्वाने विकास होतो. इतिहास घडतो. इतिहास घडविणारे जगाच्या पटलावर Hero ठरतात. म्हणुन स्वतःला कार्यरत करणे श्रेयस्कर कि स्वतःला ज्ञानी समजुन(निष्क्रियतेचे समर्थन असले तरी) "मी योग्य" सिद्ध करण्यासाठी ज्ञान भाष्य करणे श्रेयस्कर!अर्थात प्रत्यक्ष जीवन जगुन जीवनाचा अनुभव घेणे किंवा Audience बनुन जीवनाचा अमुल्य वेळ नष्ट करणे, यांत श्रेयस्कर काय? ही स्वतःची निवड असते.

*****

(२-७)/२:

"पृच्छामि त्वां धर्मसम्मूढ चेताः

यत् श्रेयः स्यात् निश्चितम् ब्रूहि तन्मे"

Part II My Path?

"If a man knows not to which port he sails, no wind is favorable. "

Seneca

जग व्यवहार जगत असते. व्यवहारात आपले हीत, हेतु साध्य व्हावा या इच्छेने समाजात भाष्य चालते. स्वहीत साध्य करणे याला स्वार्थ व परहीत साध्य करणे हा परमार्थ अशी धर्म या

संदर्भात ओळख असते. व्यवहारातील नीति या संदर्भात जगातील धर्माची ओळख असते, तर स्वर्गप्राप्ति, मोक्षप्राप्ति या संदर्भात स्वतःच्या धर्माला मनुष्य जाणत असतो.

समाजात व्यवहार असतो. व्यवहाराला योग्य दिशा देण्यासाठी जगात धर्म आलेत. व्यवहारात पांडवांवर अन्याय झाला व न्यायासाठी शेवटचा पर्याय म्हणुन धर्मयुद्ध ठरले. पण व्यवहारमार्गातच अर्जुन अडकला. अर्जुनाला युद्ध(नियतकार्य)करणे दुःखद वाटते, स्वहीताचे वाटत नाही. स्वार्थ-परमार्थ या आधारावर स्वतःला लोभी ठरवितो व नियतकार्याला धर्मविरोधी ठरवितो.

येथे व्यावहारिक दोष झाकण्यासाठी अर्जुन धर्माचा उपयोग करतो. अधर्माला धर्म व धर्माला अधर्म ठरवितो. अलीकडे व्यावहारिक दोष झाकण्यासाठी धर्माचा उपयोग करणे याला कार्ल मार्क्सने अफुची गोळी संबोधले होते. पण याच दोषाला भगवतगीतेने (धर्माचे महत्व कमी न करता)सर्वप्रथम प्रकाशात आणले.

अर्जुन वास्तव स्विकारतो, धर्माचरणास योग्य काय हे कळेनासे झाले आहे. याची कबुली देतो. "धर्म" संदर्भातील गोंधळ दुर करण्यासाठी "योग्य"काय?हे ऐकण्यास तयार होतो. स्वतःसाठी श्रेयस्कर काय हे जाणुन घेण्याची इच्छा करतो पण शोक नष्ट होणे (ज्यामुळे युद्ध टाळतो) ही त्याची Priority असते हे स्पष्ट होते.

पृच्छामि त्वां धर्मसम्मूढ चेताः
 यत् श्रेयः स्यात् निश्चितम् ब्रूहि तन्मे।(२-७)
न ही प्रपश्यामि मम अपनुद्याद्
यत् शोकं उच्छोषणम् इंद्रियाणाम् ।(२-८)

"धर्म" या विषयावर जगातील धर्म(जगतहिताय) व स्वतःच्या विकासासाठी स्वतःचा धर्म(आत्मनो मोक्षार्थ) हे परस्परपुरक असले तरी यांतील सीमारेषा जाणुन घेणे महत्वाचे आहे ही पारदर्शकता भगवतगीता स्पष्ठ करते.

१. यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्ति अविपश्चितः।(२-४२)

मरणोत्तर स्वर्ग-नरक सांगणारा धर्म स्वर्गप्राप्तिसाठी विशेष कर्म सांगते. पण यांत सकाम मानसिकता असल्यामुळे कार्याचा एकनिश्चय होण्यास अडथळा येतो.

क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्य गतिं प्रति।(२-४३)

व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।(२-४४)

ईश्वरज्ञान व पुस्तकी ज्ञान याची तुलना जलमय (सागर) व विहीर अशी करुन कार्याचा एकनिश्चय होण्यासाठी बुद्धियोग आश्रय व त्याचे महत्व स्पष्ट केले.

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके।(२-४६)

२. नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।(८-२७)

मोक्ष व पुनर्जन्म या संदर्भात शुक्लपक्ष व कृष्णपक्ष या दोन गति आहेत अशी सृति ऐकतो. (भीष्माने शुक्लपक्षच मृत्युसाठी निवडला) पण योगी या सृतिला मोह पावत नाही.

तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)

३. सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।

(१८-६६)

जगातील धर्म या संदर्भात पुस्तकी धर्म, सृतिधर्म असा वरप्रमाणे उल्लेख करुन स्वतःचे धर्माचरण या संदर्भात सर्व धर्मापेक्षा (ईश्वर) ज्ञान श्रेष्ठ (अमृतत्वाय कल्पते)हा संदेश भगवतगीता देते.

मानवजन्मात दुःख आहे, कारण या दुःखालयातच जन्माला आलेला आहे. निश्चितच दुःखावर मात करणे ही मनुष्याची मानसिक Priority असते. याचसाठी म्हटले,

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

ज्ञान या संदर्भात मनुष्याचे जीवित तत्व व अव्यक्त ईश्वर हे ज्ञान विज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते. याच आधारावर "अमृतत्वाय कल्पते" या शाश्वत विकासमार्गाचा उल्लेख होतो. (२-१५). जीवनाचे मुळ तत्व व अंतिम धाम याला जोडणारा हा मार्ग असतो. या मार्गात कार्य साधन असते. अव्यक्त ईश्वरभक्ति या संदर्भात म्हटले,

क्लेशोअधिकतरं तेषां अव्यक्तआसक्त चेतसाम् ।(१२-५)
ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः।(१२-६)
या मार्गावर कार्याचा एकनिश्चय असतो. निष्काम कर्म घडते, योगसाधना(दुःखान्त) घडते. मोह पावत नाही, व्यथित होत नाही.

*****

(२. ७)/३: "धर्मसम्मूढचेताः "

(धर्म संदर्भातील भ्रमातुन मुक्ति)

"धर्म " हा शब्द Religion, नीति या अर्थाने समाज जाणत असतो. जोवर विश्व आहे, तोवर धर्म शब्द रहाणारच आहे, कारण विविध अर्थाने धर्माचा उल्लेख होतो. जसे गुणधर्म वस्तुचा धर्म हा संदेश देतो. धर्म या संदर्भातील भगवतगीतेची निश्चित भूमिका कोणती?हा येथे जाणण्याचा विषय आहे.

भगवतगीतेत "धर्मक्षेत्र" हा प्रथम शब्द आहे व "नीतिर्मम " हा अंतिम शब्द आहे. अर्थात धर्म व नीति या संदर्भातच ज्यांचा पक्ष नीतिचा आहे त्याचा विजय या अर्थाने "धर्म" शब्द आलेला आहे. पांडवांना न्याय मिळावा या हेतुने अखेरचा पर्याय "धर्मयुद्ध" ठरते. म्हणुन "धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे" हा शब्द सर्वोच्च न्यायमंदिराची भूमिका पार पाडण्यासाठी ठरते.

जगातील बहुतांश धर्म "स्वर्गप्राप्तिसाठी पुण्यकर्म " हा संदेश देतात. याच धर्माचा दाखला देवुन पाप्याला मारणे म्हणजे

स्वर्गप्राप्तिच!अशा संदेशाने Brainwash करुन दहशतवादाचा कारखानाही जगात चालत असतो. "पापपुण्य" या संदर्भात आपले मत पुण्यकर्मासाठी आहे असा प्रचार करणे व पापाचे भय दर्शवुन आपले मत लादणे असे प्रकार धर्माच्या नांवाखाली होत असतात. याच कारणामुळे धर्माविषयी चुकीचे संदेश समाजात जात असतात. व स्वतःचाही संभ्रम होत असतो. अर्जुन याच (पापपुण्य) धर्माचा दाखला देवुन स्वतःच्या निष्क्रियतेला धर्म संबोधतो. या पार्श्वभुमिवर स्वतःचा बुद्धिभ्रम दुर करणे मनुष्याचे दायित्व ठरते. अर्जुन आपल्या अज्ञानाची कबुली देतो.

कार्पण्यदोषोपहत् स्वभावः

पृच्छामि त्वाम् धर्मसम्मूढचेताः।

यत् श्रेयं स्यात् निश्चितम् ब्रुहि तन्मे

शिष्यस्तेअहं शाधि मा त्वाम् प्रपन्नम् ॥(२-७)

केवळ आणि केवळ भगवतगीता याच धर्मभ्रमातुन मानवजातीला मुक्त करते. व निश्चित विकासाची दिशा दर्शविते. "मोक्षप्राप्ति" हा संदेश वर्तमानातील बंधन-स्वातंत्र्य (मुक्ति) या संदर्भात "संशयमुक्तिसाठी ज्ञान" हा संदेश देते.

१. अर्जुन ज्या (स्वर्ग-नरक प्राप्ति)धर्माचा दाखला देतो, समाजात याच धर्माची ओळख असते. समाजमान्य धर्म (पापपुण्य) मान्य केला तर यांत स्वतः काय करायचे?ही भूमिका महत्वाची असते.
"ये जिंदगिके मेले दुनियामे कम न होंगे !

येथे धर्म या संदर्भात स्वधर्म महत्वाचा असतो. स्वधर्म टाळला तर पापच!अपकिर्ति!

अथ चेत् त्वं इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।
ततः स्वधर्मं किर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि।।(२-३३)

२. यानंतर भगवतगीतेतील महत्वाचा विषय बंधन-मोक्ष सुरु होतो.
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)

भगवतगीता समाजमान्य(स्वर्ग-नरक मान्य) धर्मातील त्रुटीवर भाष्य करते. जे बुद्धिभ्रमाचे कारण ठरते. व कार्याचा निश्चय होण्यास अडथळा ठरते.

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां।
क्रियाविशेष बहुलां भोगैश्वर्यं गतिंप्रति।।

भोगैश्वर्यप्रसक्तानां तया अपहृत् चेतसाम् ।
व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।।(२-४४)
संशयमुक्तिसाठी मोक्षकांक्षि अर्थात स्वातंत्र्याचा (शाश्वत विकास) मार्ग भगवतगीता सांगत आहे.
त्रैगुण्यविषयावेदा निःत्रैगुण्यो भवार्जुन।
निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।।(२-४५)
हाच आधार निष्काम कर्माचा आहे. स्वतःच्या स्वातंत्र्याचा आहे. निर्भय होण्याच्या साधनेचा आहे.
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-
व प्रस्थापित धर्मातील मान्यता (त्यामुळे होणारे पापाचे भय)व मोक्षज्ञान या दोहोंना अनुसरुन म्हटले,
सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।(१८-
६६)
सार : जे जीवन लाभले आहे त्याची महानता जाणणे, यासाठी स्वतःचा बंधु होणे. बुद्धिभ्रम विनाशाचे कारण ठरते, मनुष्यजीवनातील बुद्धिभ्रम हेच भयावह अज्ञान ठरते. (बुद्धिनाशात् प्रणश्यति) . याचसाठी भगवतगीता ज्ञानाचे प्रयोजन आहे.

यदा ते मोहकलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति।

तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च।।(२-५२)

We are each gifted in a unique and important way. It is our privilege and our adventure to discover our own special light.

~Evelyn Dunbar

*******

२-७/४ :

"यत् श्रेयः स्यात् निश्चितम् ब्रूहि तन्मे

शिष्यः ते अहं शाधि मा त्वां प्रपन्नम् "

(Defing problem)

मनुष्याजवळ ज्ञान आहे पण त्याचा उपयोग प्रश्न सोडविण्यासाठी कसा करायचा ? याचे अज्ञान असेल तर मात्र हिऱ्याच्या खाणीत हिरा लपलेला असतो अशी स्थिति बनते. तराशणारे मात्र त्या दगडाला हिरा बनवितात. येथे ज्ञान असणे व त्याचा उपयोग करणे यातील फरक स्पष्ट होतो.

अर्जुनाजवळ युद्धाचे ज्ञान असते पण या ज्ञानाचा उपयोग करण्याची वेळ आली असता, तेंव्हा मात्र गोंधळतो. याला त्याचे संस्कार कारण असते.

जगात चांगले लोक असतात. त्यांचेजवळ ज्ञानही असते. पण प्रत्यक्ष जगत असतांना निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी याच ज्ञानाचा, चांगलेपणाचा उपयोग करतात तेंव्हा ?

शिक्षित बेरोजगार होतो. चांगला निष्क्रिय होतो!

ज्ञान सर्वश्रेष्ठ असते. या ज्ञानाला निष्क्रियतेचे कारण ठरविणे हे समाजातील अज्ञान ठरते. समाजातील या संवयीला संस्कारच कारण असते. म्हणुन आपले विचार, संस्कार यांत पारदर्शकता हवी असते. आपण जे करतो ते कां करतो हे निश्चितपणे माहीत असावे लागते. अर्थात वास्तव स्विकारावे लागते.

धर्म-अधर्म Tie

स्वतःला दुःख होईल या भयाने अर्जुन युद्ध करणे टाळतो. पण या युद्धकार्याला पाप ठरवितो. व दुःखामुळे नव्हे तर पापकर्मामुळे मी युद्ध टाळले असे सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. पण प्रत्यक्षात हे युद्धकार्य दुःखदायी आहे म्हणुन टाळले असते. पण श्रीकृष्ण म्हणतात युद्ध कर. याचा अर्थ जे कार्य अर्जुनाने अधर्मकार्य ठरविले असते तेच कार्य धर्मकार्य आहे असे श्रीकृष्णाला म्हणायचे असते. म्हणुन युद्धकार्य धर्मकार्य कसे? हा प्रश्न येतो.

कार्पण्यदोषोपहत स्वभावः

पृच्छामि त्वाम् धर्मसम्मूढचेताः।

यत् श्रेयः स्यात् निश्चितम् ब्रूहि तन्मे

शिष्यः ते अहं शाधि मा त्वां प्रपन्नम् ।।(२-७)

अर्जुनाचा नेमका प्रश्न :

अर्जुनाचे नियतकार्य धर्मकार्य असले तरी होणारा शोक कसा नष्ट होईल?कारण हे युद्ध आपण जिंकलो तरी शोकदायी आहे. युद्ध जिंकुन पृथ्वीवरीलच काय पण देवाचे राज्य जरी मिळाले तरी शोक कसा नष्ट होणार? हे कळत नाही. अर्थात दुःखमुक्ति हाच अर्जुनाचा नेमका प्रश्न असतो.

कारण कोणतेही कार्य कांहीतरी मिळविण्यासाठीच करण्यात येते. हे मनुष्याचे ज्ञान असते. येथे अर्जुनाची गरज दुःखमुक्ति असते.

न हि प्रपश्यामि मम् अपनुद्यात्

यत् शोकं उच्छोषणम् इंद्रियाणाम् ।

अवाप्य भूमौ असपत्नमृद्धं

राज्यं सुराणाम् अपि च अधिपत्यं।।(२-८)

सार :

"A problem well stated is a problem half solved. "

~ John Dewey

१. जगात प्रश्न असतात. पण त्या प्रश्नाला नीट Define केले तर त्याचे बहुतांश उत्तर प्रश्नातच सामावलेले असते. म्हणुन नेमका प्रश्न कोणता हे Define होणे आवश्यक असते.

२. मनुष्य सुखासाठीच भोगैश्वर्य इच्छा धरतो, कार्य करतो. याच आधारावर अर्जुनाचा प्रश्न Define होतो.

३. दुःखामुळे मनुष्य विचलित होतो व मनोदुर्बलता येते. याच मनोदुर्बलतेवर विजय मिळविणे हा भगवतगीतेचा विषय आहे. याचसाठी

(अ) ईश्वरज्ञानाचा उपयोग स्पष्ट केला आहे.

अनित्य असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

(ब) समत्वयोगाने कार्य करणे यासाठी फलत्याग हे शास्त्र आहे . यासाठी संस्कार या संदर्भात "युक्त " संबोधले आहे.

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

********

(२-८)

**************************

न हि प्रपश्यामि मम् अपनुद्यात्

यत् शोकं उच्छोषणम् इंद्रियाणाम् ।

अवाप्य भूमौ असपत्नमृद्धं

राज्यं सुराणाम् अपि च अधिपत्यं।।

**************************

(२-८):

"न हि प्रपश्यामि मम् अपनुद्यात्

यत् शोकं उच्छोषणम् इंद्रियाणाम् ।"

अर्जुन वास्तव (युद्ध करणे योग्य कि अयोग्य हा संशय) स्विकारतो. पण त्याच्या सुखदुःखाशी निगडित असलेला सर्वात महत्वाचा व्यक्तिगत प्रश्न करतो,

"माझ्या हातुन जेष्ठ, श्रेष्ठांचा, स्वजनांचा मृत्यु होणार !या नुसत्या विचाराने मला असा भयावह शोक झाला आहे कि, त्याने माझ्या संपुर्ण इंद्रियांना निर्जिव करुन टाकले आहे. असा हा शोक पृथ्वीवरीलच काय तर देवांचे राज्य जरी मिळाले तरी कसा नष्ट होणार?हेच मला कळेनासे झाले आहे. "अशी व्यथा बोलुन दाखवतो.

न हि प्रपश्यामि मम् अपनुद्यात्
यत् शोकं उच्छोषणम् इंद्रियाणाम् ।
अवाप्य भूमौ असपत्नमृद्धं
राज्यं सुराणाम् अपि च अधिपत्यं॥(२-८)

सर्वसामान्य मनुष्य याच दिशेने "कार्य" या संदर्भात विचार करीत असतो. अनेक तत्वज्ञांनी मनुष्याच्या गरजांचा, इच्छांचा संबंध कार्याशी जाणुन विविध गरजांचे शोध घेतले. अब्राहम मास्लोने Self actualization ही मनुष्याची गरज दर्शविली. किर्ति या संबंधानेही चांगले म्हणावे, लोकांनी स्तुति करावी ही गरज जाणुन कार्यासंबंधी सकाम भूमिका लोक जाणतात. पुण्यकार्य केल्याने स्वर्ग मिळेल अशी भूमिका "गरज" या संदर्भात धर्म दर्शवितात.

कार्य कशासाठी?हा व्यावहारिक प्रश्न असतो. याच व्यवहारामुळे धर्मयुद्ध ठरले होते. पण हेच धर्मयुद्ध अर्जुनासाठी विषाची परिक्षा ठरले. युद्ध केले नाही तर स्वर्ग, किर्ति मिळणार नाही असे श्रीकृष्ण सांगतात. पण युद्ध केले तर मात्र भयावह शोक मिळणार आहे हा अर्जुनाचा व्यक्तिगत प्रश्न असतो.

एकीकडे मनुष्याला प्रसन्नता हवी व याच प्रसन्नतेचा शोध घेत जगत असतांना मनुष्य सुखदुःख अनुभवत असतो. दुसरीकडे ज्यामुळे प्रसन्नता मिळेल असे कार्य करीत असतो, ज्यामुळे कार्य करतांना सुखच मिळेल, दुःख मिळणार नाही हे जाणुन कार्यरत

असतो. कार्य टाळले तरी निष्क्रियतेचे समर्थन प्रसन्नतेसाठीच(दुःखमुक्ति) करीत असतो. याप्रमाणे कार्य व प्रसन्नता यांचा संबंध जाणुन कार्यरत असतो, जगत असतो.

कोणतेही कार्य कोणत्यातरी हेतुने केले जाते, कांहीतरी प्राप्तिसाठी केल्या जाते हा कार्यासंबंधी स्वाभाविक विचार असतो. म्हणुन ज्या कार्यामुळे दुःखच मिळेल असे कार्य करणे म्हणजे ज्या फांदीवर बसला आहे तीच फांदी कापणे होईल अर्थात हा शुद्ध मुर्खपणा ठरेल. याच वैचारिक पार्श्वभुमिवर अर्जुन श्रीकृष्णाला हा महत्वाचा प्रश्न करतो.

मनुष्यजीवनात प्रसन्नता, सुख याचे महत्व निर्विवाद आहे, दुःख कुणालाही नको असते. याच सुखदुःखाचा संबंध मानसिक आरोग्याशी असतो. हेच मानसिक आरोग्य न साधल्यामुळे जीवनात मानसिक तणाव, विकार ( Stress, Tension, Depression) निर्माण होतो. याच विकाराच्या अतिव उद्रेकामुळे मनुष्य आत्महत्त्या विचाराप्रत पोहोचतो, बुद्धिभ्रम होणे हा मानसिक विकाराचाच उद्रेक असतो. बुद्धिभ्रम भयावह असतो.

"अज्ञानता से भय पैदा होता है, भय से अंधविश्वास पैदा होता है, अंधविश्वास से अंधभक्ति पैदा होती है, अंधभक्ति से व्यक्ति का विवेक शून्य हो जाता है और जिसका विवेक शून्य हो जाता है वह इंसान मानसिक गुलाम होता है।"

-गौतम बुद्ध

ध्यायतो विषयान् पुंसः ...

संमोहात् स्मृति विभ्रमः।स्मृतिभंशात् बुद्धिनाशो।बुद्धिनाशात् प्रणश्यति।(२-६३)

याप्रमाणे भगवतगीता बुद्धिभ्रम होण्याची कारणे सांगते व बुद्धियोगाचे महत्व highlight करते.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

अर्थात मनुष्याची जीवनयात्रा जीवनाच्या शाश्वत विकासमार्गावर होते. या मार्गावर विचलित होत नाही.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

कार्याचा संबंध Physical health शी आहे म्हणुन कांही तत्वज्ञांनी कार्याचा संबंध श्रमाशी जोडला. भगवतगीता स्पष्टपणे कार्याचा संबंध मानसिक आरोग्याशी दर्शविते. निर्भयता, साहस, आत्मविश्वास मानसिक शक्ति दर्शविते.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

याच मानसिक शक्तिची साधना होण्यासाठी कार्यकौशल्याची भूमिका "योगः कर्मसु कौशलम् " याद्वारे स्पष्ट करते. निष्काम कर्म याच कौशल्याचा भाग आहे.

******

(२-९)

********************

एवम् उक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप।

न योत्स्य इति गोविंदम् उक्त्वातूष्णीं बभूव ह।

********************

(२-९):

"न योत्स्य इति गोविंदम् उक्त्वा तूष्णीं बभूव ह"

(My Priority!)

मनुष्य Physical level वर जगत असतो. त्याला सुख हवे यासाठी व्यवहारात यश हवे. पण परिणाम दुःख असेल तर दुःख टाळण्यासाठी कार्य टाळतो. कार्य टाळणे ही त्याची Priority असते.

"Integrity means always doing what is right and good, regardless of the immediate consequences. It means being righteous from the very depth of our soul, not only in our actions but, more importantly, in our thoughts and in our hearts. "

-Joseph B. Wirthlin

युद्धातील शंखनाद युद्ध प्रत्यक्षात सुरु करण्याची परवानगीच असते. युद्धासाठी शस्त्रसज्ज झालेला अर्जुन दुःखी होतो. युद्ध करणे हा निर्णय आपल्या हीताचा नाही, दुःखाचा आहे म्हणुन टाळतो. परिणामभयामुळे Priority बदलते. याच भयावर मात करण्यासाठी भगवतगीतेने Physical world मधील व्यावहारिक कार्य व मनुष्याचा व्यक्तिगत आध्यात्मिक विकास याचा समन्वय साधलेला आहे.

श्रीकृष्णाने त्याचे वास्तव दर्शविल्यावर तो स्वतःचे वास्तव कबुल करतो. युद्ध करणे कर्तव्य (धर्म)म्हणुन योग्य कि अयोग्य याचा निश्चय करु शकत नाही कारण युद्ध केले तरी दुःख होणारच!युद्धामुळे कोणतीही प्राप्ति झाली तरी दुःख कसे मिटेल हे कळत नाही. यामुळे अर्जुनाची Priority युद्ध टाळणे असते.

न योत्स्य इति गोविंदम् उक्त्वा तूष्णीं बभूव ह।(२-९)

या प्रसंगात Internal battle(योग्य-अयोग्य द्वंद्व) ची ओळख होते. भगवतगीतेने प्रत्यक्षातील युद्ध - व्यावहारिक कार्य (Physical world)व योग्य-अयोग्यचे मानसिक द्वंद्व (Internal battle) याचा समन्वय साधलेला आहे.

जो निर्णय स्वतःच्या हीताचा आहे याची खात्री झाल्यावरच अर्जुनाला निर्णय घ्यायचा होता. अन्यथा त्याचा निर्णय ठरला होता, "मी युद्ध करणार नाही". याच अनुषंगाने अंतर्गत मनोविज्ञान

जगताचे ज्ञान भगवतगीता देते व याच संदर्भात अध्यात्म ज्ञान, आध्यात्मिक विकासज्ञान सांगण्यात येते.

Priority:

नियत(युद्ध)कार्य अर्जुनाला आनंदाचे Feel देत नाही, दुःख देते. या घटनेची वेळ महत्वाची आहे. कारण या वेळी अर्जुनाची Priority काय?हा प्रश्न महत्वाचा असतो. अर्थात वर्तमानात Priority काय आहे व काय असावी ?हेच मार्गदर्शन भगवतगीता करते. युद्धकार्य टळत असेल तर दुसरा पर्याय अर्जुनाला हवा असतो. याच अनुषंगाने तो प्रश्न उपस्थित करतो.

स्थिरबुद्धि श्रेष्ठ तर घोरकार्य कशाला?(२-१)

कर्मसंन्यास योग्य तर कर्मयोग कशाला?(५-१)

लोक कर्मही करतात व सगुण ईश्वराची भक्तिही करतात. श्रीकृष्ण येथे कर्माची Priority सांगत आहे. या पार्श्वभुमिवर अर्जुन प्रश्न करतो, सगुण ईश्वराची भक्ति करणारा भक्त व निर्गुण(अव्यक्त) ईश्वराची भक्ति करणारा यात योगयुक्त (श्रेष्ठ) कोण?

अव्यक्त ईश्वराची भक्ति देहवानाला कठिण आहे. म्हणुन Priority कर्माद्वारे अव्यक्ताची भक्ति हवी.

क्लेशोअधिकतर तेषां अव्यक्तआसक्त चेतसाम् ।(१२-५)

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परः।

अनन्येन् एव योगेन माम् ध्यायन्त उपासते।(१२-६)

व्यावहारिक बोध:

"The main “flaw” of spiritual and personal development methods in the past has been their tendency to lose the practical side of things. They offer good directions and ideas, but without a real “show me how” approach it has made it difficult to follow.

The intellectual level allows you to think about it, but the physical level allows you to actually feel, experience and be it. This is power that you can use - power that can affect the real physical world in massive ways! "

********

(२-१०)

********************

तम् उवाच हृषिकेशः " प्रहसन्निव भारत"।

सेनयोः उभयोः मध्ये विषीदन्तम् इदम् वचः ।।

********************

(२-१०) : " प्रहसन्निव भारत "

तम् उवाच हृषिकेशः " प्रहसन्निव भारत"।

अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देतांना श्रीकृष्णाचा व्यक्त झालेला आनंदी भाव.

"Personal growth is a movement forward, a habit to act and get results. "

मनुष्यजीवनांत शरीर(यंत्र) व जीवित तत्व (प्राण) हे आपण जाणतो. या दोहोंचा संबंध जाणुन जीवनविकासाचे शास्त्र जाणणे हे भगवतगीतेचे रहस्यज्ञान आहे. याच ज्ञानामुळे दुःख सुखा(दुःखान्त)मध्ये, दुर्बलता शक्तिमध्ये, नकारात्मकता सकारात्मकतेत Transform होते. जीवनयात्रेचा मार्ग सक्षम होतो, नित्य विकासाचा होतो. याच ज्ञानामुळे जीवनविकासाच्या

ज्ञानाला पुर्णत्व प्राप्त होते. कारण यापलिकडे जाणण्यालायक कोणतेच ज्ञान नाही.

ज्ञानं ते अहं सविज्ञानम् इदं वक्षामि अशेषतः

यद् ज्ञात्वा न इह भूयो अन्यत् ज्ञातव्यम् अवशिष्यते।।(७-२)

जे रहस्यज्ञान सांगण्यासाठी श्रीकृष्ण मनुष्यजन्मात अवतार घेतात, ते ज्ञान केंव्हाही उपलब्ध करु शकले असते. परंतु मनुष्याला ज्या ज्ञानाची गरजच नाही, ते ऐकणार कोण?हेच ज्ञान सांगण्यासाठी अनुकुल स्थिति हवी होती व महाभारत Drama उभा होतो. याच महाभारतातील ही अनुकुल स्थिति कोणती ठरली?

समाजात ज्ञान विज्ञान असते, धर्म असतात, देवदेवतांचे श्रद्धाळु असतात, पण चांगला, धार्मिक मनुष्यही अशा चक्रव्युहात सापडतो कि, त्याची जगण्याची उर्जाच क्षीण होते. शेक्सपियरचा हॅम्लेट असाच अडकतो व "To be or not to be" (जगावे कि मरावे) अशी स्थिति होते. मनुष्यजीवनांत अशी स्थिति आली असता तो सोपे Option निवडतो. किंबुहना (जसे अर्जुन) निष्क्रियतेचे Option निवडतो. व निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी उपलब्ध ज्ञानाचा वापर करतो.

येथे ज्ञानाचा वापर अज्ञान, मुर्खता लपविण्यासाठी अर्थात त्याला संरक्षण देण्यासाठी करतो. प्रत्यक्षात ज्ञान मात्र अज्ञान किंवा मुर्खता नष्ट करण्यासाठी असते. याप्रमाणे मनुष्य स्वतःलाच

फसवित असतो. अहंकारामुळे मनुष्य या स्थितितुन बाहेर पडत नाही, व नैराश्येच्या गटारात (जीवनाच्या कनिष्ट पातळीवर)जीवनयापन करतो. अहंकारामुळे अर्जुनाचे ज्ञानाचे द्वार बंद असते. हेच द्वार श्रीकृष्णाने उघडले.

"Mental weakness commonly is seen in many terms. Poor intellect;Bad self-discipline, Low self-awareness, etc. "

"The ego is the opposite of self-esteem. Most commonly agreed definition of ego is it is your self-defense mechanism and more importantly, your false concept. "

अर्जुनाला श्रीकृष्णाची सोबत होती. अर्जुन आपल्या अज्ञानी अवस्थेला ज्ञानी समजत होता व येथेच श्रीकृष्णाने समज दिली. (अज्ञानाला ज्ञान समजु नको!दुर्बलतेला शक्ति समजु नको)

अर्जुन ऐकण्यास तयार झाला पण conditional ! युद्ध करणे धर्मासाठी योग्य असेल तर युद्ध केल्यावर माझा शोक कसा नष्ट होईल?हे अनाकलनिय आहे!

अर्जुनाच्या या प्रश्नावर व त्याच्या उपप्रश्नावर श्रीकृष्णाजवळच उत्तर असते व हेच ज्ञान सांगण्यासाठी त्यांचे अवतारकार्य असते. म्हणुन शोकमग्न अर्जुनाला ज्ञान सांगण्यासाठी त्यांच्या कार्याला

आता संधी उपलब्ध झाली असते. ही श्रीकृष्णासाठी आनंदाची वेळ असते.

तम् उवाच हृषिकेशः " प्रहसन्निव भारत"।

सेनयोः उभयोः मध्ये विषीदन्तम् इदम् वचः ॥(२-१०)

********

२. १०:

"तम उवाच हृषिकेशः प्रहसन्निव भारत"

(The right time for dialogue)

भगवतगीतेवर अनेक संत, महापुरुषांनी भाष्य केले आहे. अनेक विद्वानांनीही लिहीले आहे. ही प्रक्रिया अव्याहत होत राहणार. कारण वर्तमानात बदल होत असतात व भगवतगीता वर्तमानाचे ज्ञान देत आहे.

वर्तमानात मनुष्याला निर्णय घ्यावे लागतात. कधी त्वरीत निर्णय करावा लागतो. अशाच अटीतटीच्या प्रसंगी (जेंव्हा प्रत्यक्ष युद्धाची वेळ आहे) अर्जुन गोंधळतो व ठरल्याप्रमाणे युद्ध न करणे ही निवड करतो.

या घटनेत अर्जुन दुःखी होतो म्हणुन दुःख टाळण्यासाठी युद्ध न करणे योग्य समजतो. या भूमिकेला योग्य ठरविण्यासाठी धर्मज्ञान वापरतो. हीच घटना श्रीकृष्णासाठी भगवतगीताज्ञान सांगण्याची

योग्य वेळ होती. प्रसन्न मुद्रेने श्रीकृष्ण हे रहस्यमय अद्भुत ज्ञान सांगण्यासाठी संवाद सुरु करतात.

तम उवाच हृषिकेशः प्रहसन्निव भारत।
सेनयोः उभयोः मध्ये विषीदन्तमिदं वचः।।(२-१०)

या घटनेतील दोन चुका अर्जुनाला दर्शवुन देतात.
१. जीवनमार्गातील ज्ञान जीवनमार्ग निश्चित करण्यासाठी असते. ज्ञानामुळे संशय मिटतो. पण येथे अर्जुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. धर्म योग्य-अयोग्य याचा निर्णय करतो म्हणुन अर्जुन धर्मज्ञानाचा वापर करतो, जसे वकील कायद्याचा आधार घेतो. म्हणुन अर्जुनाची भूमिका ज्ञानाची नसुन प्रज्ञावादी आहे, असे भाष्य श्रीकृष्ण करतात.

२. मार्गावर असतांना अर्जुन दुःखी होतो, विचलित होतो. त्याला मनोदुर्बलता येते. प्रत्यक्षात श्रेष्ठ मनुष्य जीवनमार्गात दुःखाने विचलित होत नाही. त्यावर निश्चित उपाय करतो व विकासमार्ग निश्चित करतो.
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

याच ज्ञानाच्या अभावामुळे अर्जुन दुःखी झाला. हे चुकलेले व्यवस्थापन म्हणजे सुखदुःखाच्या व्यवस्थापनाचा विषय असतो. याचाच अर्थ जीवनात सुखदुःखाचे व्यवस्थापन ही एक वैचारिक System असते. दुसरी योग्य-अयोग्य ठरविणारी System असते, ज्यामुळे निर्णय होत असतो. दोन्ही System मिळुन(Composite system) जीवनमार्गाचे व्यवस्थापन ठरत असते. याच System चे ज्ञान भगवतगीता देत आहे. ज्यांत जीवनाचे रहस्य, जीवनाचे अंतिम ध्येय सर्व स्पष्ट होतात.

जीवनमार्गाचे व्यवस्थापन :

अ)जीवनमार्ग योग्य-अयोग्य ठरविणारी System धर्म असेल तर स्वतःचा कार्यनिश्चय करण्यासाठी स्वधर्म जीवनमुल्य असते.

ब)System कोणतीही असली तरी कार्याद्वारे योग (दुःखान्तशक्ति) साध्य करण्यासाठी कार्याचा एकनिश्चय असावा लागतो. व निश्चय होण्यासाठीच ज्ञान असते. (ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम् ). याच संदर्भात ईश्वरज्ञान, बुद्धियोग महत्व सांगितले आहे.

ददामि बुद्धियोगं तं येन् माम् उपयान्ति ते।(१०-१०)

******

(२-१०) :

"सेनयोः उभयोः मध्ये विषिदन्तम् इदं वचः"

(The learning for Selfhelp)

संपुर्ण विश्वात लोक स्वभावनियत जगत असतात. ज्ञानार्जन करतात व कार्यरत असतात. कार्यरत राहुन अनुभवातुन शिकणारे, सातत्याने ज्ञानार्जन करणारे प्रगति करतात.

जीवनात कार्यरत असतांना मनुष्याला अडचणी जाणवतात. या अडचणी ज्यांना हरवतात त्यांच्या प्रगतिचा रथ थांबतो. पण जे अडचणीतील वास्तव मान्य करतात, स्विकारतात, ते ज्ञानार्जन करतात व थांबलेला प्रगतिचा रथ सुरु होतो.

कुरुक्षेत्रावर अर्जुनाचा प्रगतिचा रथ थांबतो. स्वतःचे अज्ञान न स्विकारता निष्क्रियतेला आदर्श दर्शवितो. आपले अज्ञान न स्विकारता स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी समर्थन करणे, बाह्य परिस्थितीवर दोष ढकलणे ही समाजात सामान्य संवयच असते. याच संवयीमुळे ज्ञानार्जन होत नाही व प्रगति खुंटते.

गरज नसतांना किंवा मनुष्याच्या interest चा विषय नसेल तर मनुष्य ऐकण्याच्या मनःस्थितित नसतो. मला राज्य नको म्हणुन मी युद्ध करणार नाही ही अर्जुनाची भूमिका असते. मनुष्य याप्रमाणे

आपल्या प्रगतिचे द्वार (अहंकारामुळे) स्वतःच बंद करुन घेतो. हेच द्वार उघडण्यासाठी ईश्वराने श्रीकृष्णरुपाने मनुष्यजन्म घेतला.

Listening :

दुःखी अर्जुनाला श्रीकृष्ण म्हणतात, तुझ्यासारख्या श्रेष्ठाला ही भूमिका अशोभनिय आहे. ज्या स्वर्गनरकाची भाषा तु वापरत आहे त्या स्वर्गापासुन वंचित तर होशीलच. पण अपकीर्ति होईल. तेंव्हा तो आपले वास्तव कबुल करतो व ऐकण्यास तयार होतो. येथेच श्रीकृष्णाला ज्ञान सांगण्याची संधि मिळते. तेंव्हा प्रसन्न मनाने श्रीकृष्ण भाष्य करतात.

तम उवाच हृषिकेशः प्रहसन्निव भारत।

सेनयोः उभयोः मध्ये विषीदन्तम् इदं वचः॥(२-१०)

ज्ञान :

भगवदगीतेत स्वतःच्या मार्गाचे ज्ञान सांगितले. यांत प्रमुख तीन मुद्दे आहेत.

१. स्वभावनियत कार्य व त्याचा स्वधर्म

२. निर्णयअधिकार व कार्याचा दृढनिश्चय

३. निष्काम कर्म व याद्वारे ईश्वरभक्ति (शाश्वताशी attach व अशाश्वताशी detach)

१. स्वभावनियतकार्य :

अर्जुनाचे नियतकार्य त्याच्या स्वभावनियतकार्याचा/सहजकार्याचा भाग असतो. युद्धकार्यात अर्जुन पारंगत असतो.

युद्धकौशल्याविषयी त्याला कुठलीच शंका नव्हती. याउलट ते त्याच्या आवडीचे कार्य असते.

वर्तमानात मनुष्य ज्ञानार्जन(शिक्षण) करतो. पण व्यवसाय संदर्भात जे कार्य करायचे ते स्वतःचे सहजकार्य होणे ही मनुष्याची स्वतःची जबाबदारी असते, जेणेकरुन आपले व्यावसायिक कार्य आवडीचे कार्य होईल.

आवडीचे कार्य व्यवसायकार्य होणे, धर्मकार्य होणे ही ईश्वराने दिलेली संधिच असते.

यदृच्छया च उपपन्नं स्वर्गद्वारम् अपावृतम् ।

सुखिनः क्षत्रियः पार्थ लभन्ते युद्धम् इदृशम् ।(२. ३२)

२. कार्याचा एकनिश्चय

अ)नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करणे. स्वधर्म Tiebreaker ठरतो, मार्गावर स्वतःची मंजुरी ठरते.

ब)स्वतःचा निर्णयअधिकार जाणणे व कार्याचा एकनिश्चय करणे. Determination

३. निष्काम कर्म/ईश्वरभक्ति/बुद्धियोग

बुद्ध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-

भगवदगीतेत जीवनविकासाचे "बंधन vs. मोक्ष " शास्त्र

"अशाश्वत vs. शाश्वत" या logic वर आधारीत आहे. (आत्मा, ईश्वर शाश्वत व शरीर अशाश्वत). जीवनविकासात कार्य संदर्भात सकाम vs निष्काम कार्य, Attachment vs. detachment हे logic वापरलेले आहे.

शाश्वताला(ईश्वराला) कार्यसमर्पण/फलसमर्पण हा मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. हा आत्मोन्नतिचा (प्रगतिचा) मार्ग ठरतो.

याच संदर्भात ईश्वरज्ञानाला ज्ञान संबोधले आहे, नित्य ईश्वराचा आश्रय म्हणजे ज्ञानाचा आश्रय म्हटले आहे. अज्ञानामुळे मोह होतो. व स्वतःचे ज्ञान झाकलेले असते.

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।

ज्ञानेन् तु तद् अज्ञानं येषां नाशितम् आत्मनः।

तेषां आदित्यवत् ज्ञानं प्रकाशयति तत् परं।(५-१६)

********

(२-११)

*********************

अशोच्यान् अन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे।

गतासून अगतासूंश्च न अनुशोचन्ति पण्डिताः।

*********************

(२. ११)/१ :"अशोच्यान् अन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे"

"परिवर्तन" या संदर्भात भगवतगीतेचा हा संदेश महत्वाचा आहे. व्यक्ति म्हणुन आपली स्वतःची विचार करण्याची पद्धत असते. ही पद्धत, संवयीमुळे conditioned असते व याच पद्धतीने विचार करुन आपण जगत असतो. जेंव्हा स्वतःच्या विचारपद्धतीने(Default) उत्तर मिळत नाही, अशांती असते, तेंव्हा मनुष्य निष्क्रियतेचे समर्थन ज्ञानी (I am right)समजुन करतो. या स्थितित(अज्ञानाचा स्विकार करुन) परिवर्तनाची गरज असते. हाच भगवतगीतेचा महत्वाचा विषय आहे.

मनुष्याला ध्येय आहे, त्याचे स्वप्न आहे पण साकार करण्यासाठी वर्तमानात आत्मविश्वास जागृत करणे आवश्यक असते. विचारपरिवर्तन या संदर्भात(नकारात्मक vs सकारात्मक) अनेक तत्वज्ञांनी आपले विचार मांडलेत. ओरिसन स्वेट मा ॅर्डेन ने "Miracle of right thoughts " या पुस्तकाद्वारे विचारपरिवर्तनाचे महत्व स्पष्ट केले. याच संदर्भात जीवनात

उत्साह निर्माण करण्यासाठी, आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी अर्थात यशस्वी जीवनासाठी विचार करण्याची योग्य पद्धत अवलंबिणे, त्याची संवय करणे हा संदेश स्पष्ट केला.

व्यवहारधर्मानुसार धर्मयुद्ध ठरते. प्रत्यक्ष कुरुक्षेत्रावर आपल्या (conditioned असलेल्या) विचारानुसार अर्जुन दुःखी होतो. अर्जुनाची Belief system केवळ प्राप्तिसाठी कर्म अशी असते. या अवस्थेत त्याला विपरित वाटते व त्याचे विचार सुरु होतात. या विचारानुसारच हे युद्ध करणे त्याच्यासाठी पाप आहे असे Judgement करतो.

अर्जुनाचे नियतकार्य त्याचा स्वधर्म असतो, याला तो अधर्म ठरवितो. व निष्क्रियतेला धर्म ठरवितो. असा स्वतःला योग्य ठरविण्यासाठी हा प्रज्ञावाद असतो. धर्माला अधर्म व अधर्माला धर्म समजणे ही बुद्धिची तम(मोह) अवस्था असते. जगण्याची मनोवश अवस्था असते.

अधर्मं धर्मं इति या मन्यते तमसा आवृता।(१८-३२)

या प्रसंगी निर्माण झालेला मोह व त्यामुळे आलेले दौर्बल्य अशोभनिय आहे असे श्रीकृष्ण दर्शवुन देतात. तो नियत-कार्यातील संशय (वास्तव) कबुल करतो. व योग्य काय? हे ऐकण्यास तयार होतो. अर्थात प्रश्न defined होतो, श्रीकृष्ण हर्षित होवुन प्रथम verse बोलतात,

अशोच्यान् अन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे।(२-११)

अर्जुनाचा प्रज्ञावाद व्यवहारधर्माचाच भाग ठरतो. आपल्या अशांत मनाला शांत करण्यासाठी भाष्य बोलतो. समाजात तुलना इ. भाष्य मनाला समाधान देण्यासाठीच होत असते. अर्जुन या भाष्याला ज्ञान संबोधतो. असेच निरर्थक भाष्य समाजात भ्रम निर्माण करतात. अज्ञानाला ज्ञान दर्शविल्या जाते. म्हणुन " ज्ञान" हा भगवतगीतेचा विषय बनला.

व्यवहारधर्मात "काय हवे?"या विषयाची स्पष्टता असते. प्राप्तिसुखासाठी कार्य हा व्यवहारधर्म संपुर्ण जग जाणते.

जीवनविकासाचे ज्ञान या संदर्भात व्यवहारधर्मात प्रश्न सोडविण्यासाठी व्यवहारधर्म व कार्य निष्ठेने execute होण्यासाठी वर्तमानातील विकासधर्म असे भाग जाणले तर भगवतगीता विकासधर्माचे ज्ञान (आत्मोन्नतिसाठी स्वतःचे संस्कार) सांगते.

विकासधर्म (वर्तमानातील जगण्याचे संस्कार )या संदर्भात भगवतगीता बुद्धियुक्त, योगयुक्त, "माम् अनुस्मर युध्य च" याचा उल्लेख करते. जीवनज्ञान विज्ञानासह सांगते. जीवित तत्वातील ईश्वरतत्व व ईश्वर याचे नाते स्पष्ट होते. व विकासधर्मासाठी स्वतःचा मार्ग अमृतंगमय होतो. या मार्गावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति घडते. अर्थात निष्काम कार्य घडते. व्यवहारधर्मातील नियतकार्य

स्वधर्मात बदलतो. व्यवहारधर्मातील निर्णयअधिकार जाणतो. हा निर्णय कार्यासाठी दृढनिश्चय होतो. याप्रमाणे मार्ग दृढ होतो.

भगवतगीता वर्तमानात शांतिचे महत्व प्रतिपादन करते, ज्यामुळे बुद्धि स्थिर असते(स्मृतिभ्रम होत नाही). शांतीचा अर्थ निष्क्रिय राहणे नसुन सक्रिय राहुन नैष्कर्मसिद्धि अनुभवणे याचे रहस्य व शास्त्र जाणणे भगवतगीतेची Strength आहे. हेच विचारपरिवर्तनाचे रहस्य आहे.

विकासधर्मातील ज्ञानाअभावी अर्जुनाची (चांगला असुनही) सकाम मानसिकता बनते. यातील "काम" barrier या अर्थाने स्पष्ट केला आहे. (जही शत्रु महाबाहो कामरुपम् दुरासदम् ). ही मनोवश अवस्था असते. या ज्ञानामुळेच (Wisdom of ignorance)आत्मवश (जितात्मनः, स्वतःला जिंकणे) अवस्थेचे महत्व व ज्ञान कळते. ज्यामुळे आत्मविश्वास अनुभवतो व वृद्धिगत होतो.

"It is not the mountain we conquer, but ourselves. "

--Sir Edmund Hillary

******

(२-११)/२: " प्रज्ञावादांश्च भाषसे "

"The greatest error of a man is to think that he is weak by nature, evil by nature. Every man is divine

and strong in his real nature. What are weak and evil are his habits, his desires and thoughts, but not himself. "

Ramana Maharshi

मनुष्य याच संवयीत बदल करु शकतो. मनुष्याला जसे ज्ञान असते, तशी त्याची विचारप्रक्रिया(Habit of thinking) बनते. चुकिची विचारप्रक्रिया असली तरी मनुष्य अहंकारामुळे "मी योग्य" ही भूमिका घेतो.

"A long habit of not thinking a thing wrong gives it a superficial appearance of being right. "

Thomas Paine

कोणतेही कार्य प्राप्तिसाठी केल्या जाते, हे सरळ अर्जुनाचे ज्ञान असते. या आधारावर तो स्वतःला लोभी, ठरवितो व म्हणुन अपराधी ठरवितो. याच आधारावर युद्ध करणे वाईट ठरवितो. वाईटाच्या विरुद्ध चांगले, या आधारावर निष्क्रिय राहणे चांगले ठरवितो. या भूमिकेचे समर्थन करतो. अशी अर्जुनाची विचारप्रक्रिया असते. या विचारप्रक्रियेतुन प्रज्ञावाद जन्म घेतो.

मनुष्य कामाचे भाष्य बोलतो कि बोलायचे काम करतो!याचे निरिक्षण केले असता लक्षात येते कि, प्रज्ञावादी केवळ बोलायचे काम करतो!

अशोच्यान् अन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे।(२-११)

विज्ञाननिष्ठ विचारांचे महत्व सांगुन तत्वज्ञानाची सांगड माणसाच्या दैनंदिन व्यवहाराशी घालुन देणारा सत्यशोधन जगतातील प्रथम विचारवंत म्हणुन सॉक्रेटिसची जगाला ओळख आहे.

श्रीकृष्णाने विज्ञान व अध्यात्म यांची सांगड मनुष्याच्या दैनंदिन व्यवहाराशी ज्ञानाच्या माध्यमातुन घालुन दिली. याच संदर्भात ज्ञान व प्रज्ञावाद यांतील भेद दर्शवुन दिला.

समाजात विज्ञान श्रेष्ठ कि अध्यात्म असा अनावश्यक वाद होत असतो. हे दोन्ही ज्ञानाचे विषय आहे व एक दुसऱ्याला पुरक आहे. किंबुहना एक दुसऱ्याशिवाय अपुर्ण आहे. हे सत्य भगवतगीता स्पष्ट करते.

मनुष्य स्वतःच स्वतःला मोठे करतो किंवा लहान करतो, सक्षम करतो किंवा दुबळे करतो. याचे रहस्य जाणुन निष्कारण वाद निर्माण करणारी प्रज्ञावादी संवय बदलविणे हा भगवतगीतेचा मोलाचा संदेश आहे.

******

(२-१२)

********************

न त्वेवाहं जातु नासं न त्वम् न इमे जनाधिपः।

न चैव न भविष्यामः सर्वे वयम् अतः परम् ।।

********************

(२-१२) :

" न त्वेवाहं जातु नासं न त्वम् न इमे जनाधिपः"

(मनुष्याचे अस्तित्व)

महायुद्धामध्ये मृत्युचे तांडवच जणु असते. विश्वात आपदा येते तेंव्हा असेच तांडव असते. याच मृत्युचे तांडव अर्जुनाला युद्धक्षेत्रावर जाणवते व तो दुःखी होतो. दुःख टाळण्यासाठी निष्क्रिय होतो व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान सांगतो. याच पार्श्वभूमिवर भगवतगीता ज्ञान जगासमोर आले.

जगात प्रश्न आहेत म्हणुन ज्ञानाचे महत्व आहे व ज्ञान सर्वश्रेष्ठ ठरते.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।(४-३८)

अर्जुन अज्ञान कबुल करतो व निश्चित प्रश्न करतो. नियतकार्य योग्य असले तरी दुःख नष्ट कसे होईल?

न त्वेवाहं जातु नासं न त्वम् न इमे जनाधिपः।
न चैव न भविष्यामः सर्वे वयम् अतः परम् ॥(२-१२)

मनुष्याचे अस्तित्व नित्य असते. हा अध्यात्मज्ञानाचा विषय अाहे. (अध्यात्मज्ञान नित्यत्वं)पण हेच नित्य अस्तित्व जाणत नसल्यामुळे व देहाचेच अस्तित्व जाणत असल्यामुळे अर्जुन दुःखी होतो. जगात दुःख आहे म्हणुन अध्यात्मज्ञान महत्वाचे आहे हा भगवतगीतेचा विषय आहे. याच अध्यात्माचे ज्ञानविज्ञान (आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च)भगवतगीता स्पष्ट करते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

मनुष्य (योग्य नसला तरी) स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान सांगतो. हा अहंकार असतो, अहंकारामुळेच अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. एकीकडे स्वतःचा आदर करा, स्वतःचा बंधु व्हा हा भगवतगीतेचा संदेश आहे.

उद्धरेतआत्मनाआत्मानं न आत्मानम् अवसादयेत् ।
आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः ॥(६-५)
बंधुः आत्मा आत्मनः तस्य येन आत्मैव आत्मना जितः।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत् ॥(६-६)

जेंव्हा मनावर नियंत्रण असते अर्थात आत्मवश असतो, तेंव्हा स्वतःचा बंधु असतो. तर मनोवश असतो तेंव्हा स्वतःशी शत्रुवत आचरण असते. या पार्श्वभुमिवर अहंकार व आत्मविश्वास यांत

मनुष्याची गल्लत होते. जीवनमार्गात ईश्वराचा आश्रय हा ज्ञानाचा आश्रय असतो. ज्ञानामुळे संशय छेदल्या जातो व आत्मविश्वास येतो. मार्ग पक्का असतो. म्हणुन शेवटी ज्ञानाचा आश्रय कि अहंकाराचा आश्रय असे Option मनुष्यासमोर असते.

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।

मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वां नियोक्ष्यति।।(१८-५९)

म्हणुन अहंकाराचा आश्रय कि ज्ञानाचा( ईश्वराचा )आश्रय तु ठरव. हा अधिकार अर्जुनाला दिला आहे.

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)

सार :

स्वतःचा बंधु व्हा हा भगवतगीतेचा संदेश आहे. पण यासाठी भगवतगीतेतील अध्यात्मज्ञान जाणणे महत्वाचे आहे. याच ज्ञानाच्या अभावामुळे मनुष्याला स्वाभाविकतः अहंकाराचा आश्रय असतो. व अहंकार व आत्मविश्वास यांत गल्लत करीत असतो. अहंकारामुळेच नकारात्मक विचार ( सोच ) असतो. आत्मविश्वास असणारा विकासमार्गावर असतो. सकारात्मक असतो.

*******

(२-१४)

*********************

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शितोष्णसुखदुःखदाः।

आगमा अपायिनो अनित्यः तांस्तितिक्षस्व भारत।।

*********************

(२-१४)/१:

"मात्रास्पर्शास्तु कौंतेय शितोष्णसुखदुःखदाः।

(Fixed mindset vs. Growth mindset)

कॅरोल ड्वेक या तत्वज्ञ प्राध्यापिकेने "The new psychology of success" यातुन Fixed mindset व Growth Mindset ही संकल्पना मांडली. मनुष्यरुपात (जीव) आत्म्याला जीवनप्रवासाची, विकासाची संधी मिळाली आहे. हेच रहस्य भगवतगीता उलगडते.

न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः।

उभयोः अपि दृष्टो अंतः तु अनयोः तत्व दर्शिभिः।।(२-१६)

ज्यात (शरीर)बदल होतो, ते अशाश्वत व जे बदलत नाही ते शाश्वत (आत्मा). अनित्य व नित्य यांतील भेद जाणुन नित्यावर Focus करणे हा भगवतगीतेतील ज्ञानाचा आधार आहे.

सुखदुःखात अडकुन विकास थांबवणे कि नित्यविकास मार्गावर असणे (Unstoppable)? या संदर्भात Fixed Mindset व Growth Mindset ही ओळख होते.

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शितोष्णसुखदुःखदाः।

आगमा अपायिनो अनित्यः तांस्तितिक्षस्व भारत॥(२-१४)

अर्जुन दुःखाने विचलित होतो. दुःख टाळण्यासाठी युद्ध न करणे व आपण योग्य आहो हे सिद्ध करण्यासाठी तो जाणत असलेले धर्मज्ञान वापरतो ही अर्जुनाची भूमिका असते व येथेच विकासमार्ग थांबतो. "Fixed mindset" चा हा प्रभाव असतो. येथेच नित्य-अनित्य या संदर्भात जीवनाचे सत्य सांगितले. मार्गातील सुखदुःखाची (अनित्य) भूमिका सांगितली. नित्य मार्गाचे ज्ञान सांगितले. येथे "Growth mindset" चे ज्ञान होते.

(Carol Dweck writes:

Your view of yourself can determine everything. If you believe that your qualities are unchangeable — the fixed mindset — you will want to prove yourself correct over and over rather than learning from your mistakes.

"People who have fixed mind-set believe that their talent and abilities are in-born and they can’t do anything to change it. People who have growth mind-set believe that they can grow their talent and abilities by learning and training their mind. "

Why it is important to have a growth mind-set and how you can shift your mind from being fixed to being open and ready?

Changing our beliefs can have a powerful impact. The exceptional people seem to have is a special talent for converting life’s setbacks into future successes. The growth mindset creates a powerful passion for learning. “Why waste time proving over and over how great you are, ” instead “when you could be getting better?”

The way you think and by using this new mind-set, you will be unstoppable. )

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

मनुष्यजीवन अनित्य असले तरी नित्य शाश्वत तत्व जाणले तर "अमृतत्वाय कल्पते" या शाश्वत मार्गाचा (Unstoppable ) बोध होतो. या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही.

"Growth mindset is all about effort. It’s the hallmark of a fixed mindset to expect things to be easy. Success demands working hard, learning from failure and refining your performance as you walk that road. "

*****

(२-१४)/२:

"आगमा अपायिनो अनित्याः तान् तितिक्षस्व भारत"

(Reality & Change)

"तितिक्षस्व" हा शब्द "सहन कर" या अर्थाने येथे आलेला आहे. "सहन कर" याचा अर्थ प्रश्नाकडे पाठ फिरविणे हा नसुन वास्तवाचा स्विकार करणे व उपाय करणे या अर्थाने भगवतगीतेत आलेला आहे.

जीवनातील वास्तव(Reality)स्विकार न करणे ही एक समस्याच असते. अर्जुनासमोर युद्धक्षेत्रावर प्रश्न उभा झाला. जे नियतकार्य करायला निघालो आहे ते तर स्वतःसाठी दुःखाचे कारण होईल. हे जाणुन युद्ध करणेच पाप आहे असे Judgemental thinking

करुन अर्जुन त्या प्रश्नाची हवाच काढुन टाकतो. अर्थात प्रश्नाकडे पाठ फिरवितो.

Judgemental thinking:

जगात प्रश्न असतात, समस्या असते. कोणतीही समस्या असो, त्या समस्येची Reality जाणली, प्रश्न define झाला तर ती समस्या सोडविली जाऊ शकते. पण समस्या सोडविणेच बंद केले तर ती समस्या रहात नाही. अर्थात Reality चा अस्विकार होतो. वास्तव न स्विकारता Judgemental thinkingचा वापर सहसा समाजात होत असतो. व हुशार-मंद, चांगला-वाईट, श्रेष्ठ-कनिष्ट, स्वार्थि-त्यागी, श्रीमंत-गरीब असे लेबल चिकटविल्या जातात. समाजातील ही भाषाच Judgemental thinking असते. याला "प्रज्ञावादांश्च भाष्यसे" असे भगवतगीतेत म्हटले आहे.

वास्तव:

भगवतगीता स्वतःच्या जीवनातील वास्तव स्विकारणे व त्यावर उपाय करणे यावर भाष्य करते. नियतकार्य स्वतःसाठी योग्य कसे?ते संभाव्य शोक कसा मिटविणार?हाच अर्जुनासमोर प्रश्न उभा होतो. याच प्रश्नाची कबुली देतो व त्याच्या उत्तरासाठी भगवतगीता संवाद सुरु होतो.

बदल:

"बदल" जगातील असो कि जीवनातील ते वास्तव असते. बदल या संदर्भातच उन्हाळा-हिवाळा असतो, तसे सुखदुःख असते. या बदलाचे वास्तव स्विकारणे हाच प्रथम पाठ भगवतगीने दिला.

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शितोष्णसुखदुःखदाः।

आगमा अपायिनो अनित्याः तान् तितिक्षस्व भारत॥(२-१४)

येथे दुःख सहन कर याचा अर्थ उपाय करु नको हा अर्थ नव्हे तर वास्तव स्विकारुन उपाय करणे हे ज्ञान सांगितले. जीवनाच्या उच्च मार्गावर असलेला विचलित होत नाही. अर्थात जीवनाचा उच्च मार्ग अंगिकारणे हाच उपाय सांगितला.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

अर्थात येथे स्वतःमध्ये बदल करणे हा संदेश आहे. जीवनविकास या संदर्भातील हेच सत्य मनुष्याने स्विकारणे अपरिहार्य असते.

"Everyone thinks of changing the world, but no one thinks of changing himself. "

Leo Tolstoy

*******

(२-१५)

*********************

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं सः अमृतत्वाय कल्पते॥

*********************

(२-१५)/१: "यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ"

*( प्रज्ञावादी भाष्य vs जीवनाची लढाई)

सुखदुःख व कार्य याचा संबंध भगवतगीता दर्शविते. प्रकृति कार्य घडविते. जीवित तत्व सुखदुःख अनुभव करीत असतो.

कार्यकारण कर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।

पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते॥(१३-२१)

सुखाची प्रत्यक्ष अनुभुति व भाष्याने समाधान मानणे यांतील भेद भगवतगीता दर्शवुन देते. व याच अनुषंगाने विकासमार्गाचे ज्ञान सांगते.

समाजात दुःख टाळण्यासाठी व समाधानासाठी तुलना करुन स्वतःला श्रेष्ठ ठरविणे, Judgement thinking वापरुन टिका करणे, स्वतःच्या निष्क्रियतेचे समर्थन करणे असे भाष्य चालत असते.

सुखासाठी मनुष्य जगतो, पण जीवनांत दुःख, अडचणी येतात. ही जीवनाची Reality आहे. यामुळे मानसिक दुःख झाले तर मनुष्य समाधानासाठी भाष्याचा आधार घेतो. ही सुखाची अनुभुति नसते. यामुळे वास्तव hide होते. या भाष्यातुन नकारात्मकता व्यक्त होत असते. नकळत वातावरण प्रदुषित होते. हे भाष्यप्रदुषण असते. असे भाष्य "मनथरा भाष्य"(विचलित करणारे) म्हणुन रामायणात दर्शविले आहे.

सुखाचा संबंध Want शी. व Wantचा संबंध कार्याशी असतो. योगक्षेम चालविण्यासाठी पैसा व पैशासाठी कार्य हे व्यावसायिक कार्याचे मुलभुत तत्व आहे. पैसा या संदर्भात श्रीमंति मोठेपण समजतो. मोठेपण या संदर्भातच आदर्श, चांगलेपणा जाणत असतो. अर्जुन चांगलेपणामुळेच दुःखी होतो. दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो. यांत तो स्वतःला आदर्श दर्शवितो. हा

प्रज्ञावादाचा बुरखा असतो. यामुळे वास्तव स्विकारित नाही. बुरखा ( Reality) वास्तव झाकत असते.

प्रत्यक्ष मोठेपण(वाघ) व मोठेपणाचा बुरखा(कोल्हा) याची ओळख देणारी एक दंतकथा सर्वश्रुत आहे. कोल्ह्याने वाघाचा बुरखा घातला तर तो वाघ होत नाही. प्रत्यक्ष वाघ कसा असतो हे भगवतगीता दर्शविते. कार्य व मोठेपण याचा संबंध दर्शविते.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं सः अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

प्रत्यक्ष मोठेपण म्हणजे दुःख, अडचणीमुळे मानसिक हार नसणे. म्हणुन जीवनाला लढाई म्हटले आहे. अर्थात दुःख, अडचणीमुळे मानसिक हार न होणे, विकास या संदर्भात अपेक्षित असते. जगातील श्रेष्ठ लोक, (Innovators, Creators)दुःखाने विचलित होत नाही. दुःख, अडचणी त्यांचेसाठी विकाससंधी( Stepping Stone) ठरते.

सुख या संदर्भात अर्जुन Want पुर्तिसाठी कार्य जाणत असतो. पण कार्याद्वारे ईश्वरभक्ति (सुख अनुभुति, कार्याद्वारे दुःखान्तासाठी योग) जाणत नाही.

सुख म्हणजे मानसिक हार न होणे, विचलित न होणे, यासाठी चांगलेपण(दैवी)ईश्वराशी जोडले. व कार्याद्वारे भक्ति, योग(दुःखान्त) हा संदेश दिला.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव।(१६-५)

या मार्गावर जीवनमुल्यांना महत्व देतो. कार्यात, कार्याच्या Excellence मध्ये, दृढनिश्चयात, निर्भयतेत सुख अनुभवतो. अर्थात आत्मविश्वास अनुभवतो. शाश्वत सुख व शांतिचा अनुभव आत्मानंद असतो.

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्यच ।(१६-७)

********

(२-१५)/२:"समदुःखसुखंधीरं सः अमृतत्वाय कल्पते"
"श्रेष्ठत्व" या संदर्भात भगवतगीतेचा हा सर्वात महत्वाचा संदेश आहे. भगवतगीता ज्ञानाचा हाच मुळ पाया आहे.
जीवनाचे "श्रेष्ठत्व" काय?याविषयी जगातील अनेक तत्ववेत्त्यांनी भाष्य केले आहे,

“Many people are alive but don’t touch the miracle of being alive. ”

– Thích Nhất Hạnh

"Worthless people live only to eat and drink; people of worth eat and drink only to live. "

- Socrates

जीवनात "मोठे व्हायचे" असे युवा पिढीचे स्वप्न असते. या सृष्टित मनुष्यजीवन महान देण आहे. या जीवनाची महानता जाणुन त्याला महान करणे यांत कांहिही गैर नाही. पण प्रत्यक्षात जी महान कार्ये असतात, ती पार पाडण्यासाठी धैर्य, निर्भयता, आत्मविश्वास या शक्ति महत्वाच्या असतात. याच शक्तिचे महत्व जाणुन स्वामी विवेकानंदांनी युवा पिढीला अध्यात्मज्ञानाचे महत्व व पर्यायाने भगवतगीतेचे महत्व विषद केले. भगवतगीतेनुसार "अभय" हा प्रथम दैवीगुण आहे.

मनुष्याला जगतांना मार्गात दुःख(परिणामभय) जाणवले तर ते दुःख टाळण्यासाठी जे आचरण करतो, त्याला "योग्य" दर्शविण्यासाठी "ज्ञानी भाष्य" वापरत असतो. हा प्रयत्न दुर्बलतेला शक्ति दर्शविण्याचा असतो. निष्क्रियतेला "आदर्श", अज्ञानाला "ज्ञान" सिद्ध करण्याचा हा प्रयत्न असतो. याप्रमाणे समाजात मनुष्य आपली "मजबुरी" व्यक्त करीत असतो. याचा परिणाम समाजात नकारात्मकता पसरत असते, भ्रम पसरत असतो. पण याचे भान मात्र "कथित श्रेष्ठांना" रहात नाही. हीच भूमिका अर्जुनाने घेतली होती. याच पार्श्वभुमिवर सामान्य व श्रेष्ठ यांतील भेद भगवतगीता स्पष्ठ करते.

व्यवहारातील जीवनाचे "श्रेष्ठत्व/मोठेपण" हा शब्द भगवतगीतेने "पुरुषं पुरुषर्षभ" याद्वारे स्पष्ठ केला आहे. याच संदर्भात संदेश आहे,

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं सः अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

*निष्काम कर्म, यासाठी कार्याद्वारे ईश्वरभक्ति, यासाठी शाश्वत विकासाचा मार्ग (अमृतंगमय) स्पष्ट केला आहे. हाच मार्ग "अमृतत्वाय कल्पते" या शब्दप्रयोगाने येथे स्पष्ट होतो.

* या मार्गात दुःखाने विचलित न होणे(यं हि न व्यथयन्तेते) ही स्थिति दर्शविण्यासाठी "समदुःखसुखंधीरं" हा शब्दप्रयोग आहे.

*कर्माद्वारे (दुःखान्त, योग)शक्तिसाधना:

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

जसे खेळामध्ये Exercise होते, तसेच "योगः कर्मसु कौशलम् " ही Exercise आहे. साधना आहे.

"जीतना या हारना जरुरी नही।खेलना जरुरी है"

सिद्धि असिद्धोः समो भूत्वा समत्वं योग उच्यते।(२-४८)

*****

(२-१५) /३: "स अमृतत्वाय कल्पते"

जीवनाचा प्रवास मृत्युकडे आहे कि, मृत्युचा अमृताकडे प्रवास आहे ?हा जीवनातील मुख्य प्रश्न आहे. या प्रश्नाचा संदर्भ व उत्तर शोधले तरच जीवनाचे रहस्य कळेल. अज्ञानामुळे हा प्रवास मनुष्य मृत्युकडे जाणतो, तर शहाण्याचा प्रवास अमृताकडे असतो. (मृत्योर्मा अमृतंगमय)याच सत्यावर भगवतगीता प्रकाश टाकते.

समदुःखसुखंधीरं धीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

दुःखामुळे जीवनाचे आव्हान पेलवत नाही तेंव्हा निराश होऊन स्वतःचे जीवन संपविणारे अर्थात आत्महत्यासारखी टोकाची भूमिका घेणारेही जगात आढळतात.

व्यवहारात मनुष्य स्वभावप्रकृतिनुसार नैसर्गिक जीवन जगत असतो. या प्रवासात दुःख असले तरी दुःख टाळत जगत असतो. दुःख आले असता भावनांवर नियंत्रण करण्याचे ज्ञान (Emotional Intellegence) नसेल तर जी भूमिका घेतो त्याचे समर्थन करीत जगत असतो. अर्जुन कुरुक्षेत्रावर दुःख टाळण्यासाठी अशीच भूमिका घेतो. निष्क्रियतेचे समर्थन करतांना पाप करण्यापेक्षा मृत्यु बरा अशी भूमिका घेतो.

जीवनातील नैराश्य Frustration, Depression मानसिक रोगाचेच लक्षण असते. मानसिक Wellnessचे ज्ञान नसते. मृत्यु तर जीवनाचा अपरिहार्य भाग आहे, पण नैराश्याने निष्क्रिय राहुन मृत्यु ओढवुन घेणे व स्वधर्म जाणुन कार्य करतांना मृत्यु येणे यांत फरक आहे. या ज्ञानावर भगवतगीता सर्वप्रथम प्रकाश टाकते.

अर्जुनाची Belief system स्वर्गधाम, किर्ति या ध्येयाची होती. त्याच्याच B. S. नुसार नियतकार्य टाळुन निष्क्रिय झाला तर अपकिर्ति होते व स्वर्गापासुन वंचित होतो म्हणुन स्वधर्माचरण श्रेष्ठ ठरते ही Reality श्रीकृष्ण दर्शवुन देतात.

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।(२-३७)

हे ज्ञान स्वधर्मज्ञान या संदर्भात निष्क्रियता व सक्रियता यातील भेद दर्शविते.

यानंतर भगवतगीतेच्या मुख्य ज्ञानाचे द्वार उघडते.

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे तु इमां शृणु।(२-३९)

दुःखावर मात करण्यासाठी बुद्धियोग अर्थात Transformation ज्ञान आहे.

Transformation of

-Fear into Courage (त्रायते महतो भयात्)

-Negativity into Positivity

-Inaction into Creativity

-Suffering into Happiness

-Difficulty into Oportunity

हेच ज्ञान मनोवैज्ञानिक भाषेत Breaking misery cycle ठरते. याच संदर्भात Intellegence quotient, Emotional quotient, Adverse quotient ज्ञानाचे महत्व आहेत.

मनुष्याला बुद्धि आहे. भावना असतात, दुःखही असते. याद्वारेच मानवी दुःख निस्तरण्यासाठी जगात ज्ञान निर्माण झाले, होत आहेत. समाजात मानवी हितासाठी अमुक व्हावे, तमुक व्हावे असे भाष्य आपण सतत ऐकत असतो. पण कोण करेल हा प्रश्न अनुत्तरीत असतो.

Everything is Transformation. (E =mC2)

जगात दुःख आहे, अडचणी आहेत. ज्ञानामुळेच या अडचणी विकासातील Stepping Stone ठरतात.

भावनांचे ज्ञानात रुपांतर होते, ज्ञानाचे कार्यात Application होते व अखेर सर्व कार्याचे ज्ञानात विलिनीकरण होते.

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

(१)भावना, ज्ञानविज्ञान कार्यात बदलविणे अर्थात Transformation into Action or Action friendly(कार्यासाठी व्यावहारिक जे motivation ठरते) knowledge हे व्यावहारिक गुणात्मक ज्ञान ठरते. तर

(२)Transformation of Action into ज्ञान(ईश्वरभक्ति, निष्काम कर्म, योग इ. ) यासाठी बुद्धियोग ज्ञान म्हटले आहे. हाच Part "अमृतत्वाय कल्पते" असतो. अर्थात जीवनविकासाचा Highway असतो. मनोविज्ञानाच्या भाषेत Activation of higher consciousness हेच असते.

याच ज्ञानाने अर्जुनात Transformation घडुन आले. ईश्वराची हृदयातील अंधार नष्ट करण्यासाठी ही विशेष कृपा ठरते.

तेषामेव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजम् तमः।

नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ।।(१०-११)

**********

(२-१६)

********************

न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः।

उभयोः अपि दृष्टो अन्तः तु अनयोः तत्वदर्शिभिः।।

********************

२. १६):

"न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः"

(असतो मा सतगमय:जीवनमुल्य vs गरज)

इच्छापुर्तिसाठी कार्य(State of want-State of Art) हा व्यवहार असतो. या कार्याला (जीवन)मुल्यांची जोड मिळते, तेंव्हा मनुष्याचे Charecter बनते. अर्थात मुल्य जीवनाच्या उच्च पातळीवर नेत असते.

आर्थिक संदर्भात आर्थिक गरज व स्वावलंबन यांत स्वावलंबन(परावलंबि नसणे, Beggars are not choosers) जीवनमुल्य ठरते.

"गरज" या संदर्भात अर्जुन "मला कांही नको"हे भाष्य वापरतो. येथे अर्जुनाच्या चांगलेपणालाच आव्हान मिळाले असते. मनुष्यजीवनात जीवनमुल्यांनाच आव्हान मिळत असते. जणु ही परिक्षाच ठरते. "चांगलेपणा"जीवनातील उच्च गति आहे असे मनुष्य जाणतो. "चांगलेपणा" या संदर्भात अर्जुनाची ही परिक्षाच असते. याच पार्श्वभुमिवर "गरज vs मुल्य" हा विषय उपस्थित होतो.

मुल्याच्या परिक्षेत मनुष्य खरा उतरला तर विश्वासाने जीवनमार्ग चालतो;खंबिर, तेजोमय होतो. अन्यथा योग्य-अयोग्य या द्वंद्वाच्या जाळयात सापडतो व याच द्वंद्वाच्या जाळयात सापडल्यामुळे बुद्धिभ्रम होतो. स्वसमर्थनार्थ भाष्य बोलतो.

जगात चांगलेपणा असतो पण आपला स्वार्थ सिद्ध करणारे व्यवहारही असतात. यामुळे समाजात स्वसमर्थनार्थ, स्वार्थसिद्धिहेतु भाष्य बोलल्या जाते. व याला ज्ञान दर्शविल्या जाते. रामायणात अशाच भाष्याने कैकेयीची मानसिकता बदलविण्यास मनथरा यशस्वि होते.

रामायणात रघुवंशाची "वचन"या मुल्यासंदर्भात ख्याति असते. याच वचनमुल्याला आव्हान मिळते. हेच आव्हान दशरथ महाराजांना जड जाते, याउलट श्रीराम धर्मगति जाणुन (धरमधुरिन धरमगति जानु) आनंदाने वनवास स्विकारतात. ही धर्मगति श्रेष्ठ कार्याची संधि आहे(जहां सब भांति मोर बड काजु) असे धर्मगतिचे माहात्म्य मातेला सांगतात.

चांगलेपणामुळेच अर्जुन दुःखी होतो. "सत" म्हणजे चांगले व सत म्हणजे योग्य, हे जाणुन"चांगले" या संदर्भात "मला कांही नको" असे संबोधुन स्वतःची भूमिका सत आहे हे सिद्ध करतांना (दुर्बल)अज्ञानी भूमिकेला "ज्ञानी" दर्शवितों. अर्थात "चांगलेपणा"या संदर्भात मुल्यांचा बोध झाला नसल्यामुळे समर्थनार्थ भाष्य बोलतो.

याच पार्श्वभुमिवर भगवतगीता सतमार्गाचे ज्ञान सांगते.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)
न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः।
उभयोः अपि दृष्टो अन्तः तु अनयोः तत्वदर्शिभिः॥(२-१६)

जीवनमार्गातील सत म्हणजे चांगले, सत म्हणजे शाश्वत या संदर्भात विकासाचा शाश्वतमार्ग "असतो मा सतगमय" (अर्थात अमृतत्वाय कल्पते) ठरतो.

"The aim of education is the knowledge, not of facts, but of values. "

William S. Burroughs

********

(२-१६)/२ :

"उभयोःअपि दृष्टो अन्तः तु अनयोः तत्वदर्शिभिः"

(जीवनमार्गात सत-असत निवड अर्थात सुखी जीवनाचा मार्ग)

सुखी जीवन(Mental health व ज्ञानाचे feeding) :

निरोगी प्रकृतिसाठी आहाराचे ज्ञान असते. पण निरोगी मानसिकतेसाठी योग्य ज्ञानाचे feeding यावर दुर्लक्ष झाले तर Mental illness येवु शकतो, Negativity याचेच लक्षण असते. हेच ज्ञान भगवतगीता सांगते.

"The greatest aim of education should be action" असे एका तत्ववेत्याने म्हटले. सुखासाठी, यशस्वी होण्यासाठी ज्ञानाचे feeding होते. या ज्ञानाचा उपयोग कार्यासाठी होतो. या प्रवासात दुःख आले, संशय जाणवला तर सुखदुःखाचे व्यवस्थापन करावे लागते. याचसाठी ज्ञानाची गरज असते. अन्यथा चिंता करतो. , कार्य टाळतो पण जे करतो किंवा करीत नाही त्याचे समर्थन योग्य-अयोग्य या संदर्भात करतो. जसा अर्जुन कार्य टाळुन समर्थन करतो. याच प्रवृत्तिची संवय झाली तर तो स्वभाव बनतो व त्याच्या Automation (Behavior)चाच भाग बनतो. म्हणुन हा प्रश्न Mental Wellness चा बनतो.

१. शरीरयंत्र: (Automation & Purpose)

कोणत्याही यंत्राचे निश्चित Purpose असते, त्या यंत्रात feeding करुन मनुष्य यंत्राचा उपयोग करुन घेतो. शरीरयंत्राचेही automation असते. यांत जसे feeding होते, त्याप्रमाणेच कार्यरत होते.

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।(३-२७)
ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

* धर्म-अध्यात्म(योग्य-अयोग्य vs ज्ञान-अज्ञान)

प्रकृति automationनुसार कार्यरत असते. या Automationमध्ये कार्यातील द्वंद्ववश स्थिति जीवनविकासाचा barrier ठरते. प्रकृतिच्या याच barrier वर मात करण्यासाठी ईश्वरज्ञान आहे. हे ज्ञान सर्व विश्वाला जोडणारे आहे. ही बुद्धियोग निष्ठा असते.
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)

धर्मात योग्य-अयोग्य(सुकृत-दुष्कृत) हा भेद असतो म्हणुन द्वन्द्व असते. धर्माचे ज्ञान बाह्य असले तरी स्वधर्म स्वतःचा द्वंद्व(tie) सोडविण्यासाठी आहे. ज्यामुळे स्वतःचा मार्ग दृढ होतो. याचद्वारा धर्म व अध्यात्म यांतील भेद स्पष्ठ झाला आहे. अर्थात अध्यात्मात ज्ञान-अज्ञान हा भेद असतो.
बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।(२-५०)

२. सुखी जीवनमार्ग

सुखदुःख या संदर्भात योग्य-अयोग्य हा व्यावहारिक मुद्दा असतो. याचाच संदर्भ अर्जुनाने स्वर्ग-नरक यासाठी दिलेला असतो. तर

ज्ञान-अज्ञान हा संदर्भ बंधन-मोक्षचा आधार असतो व हाच भगवतगीने संदेश दिलेला आहे. भगवतगीतेतील सत-असत मार्गाचा हाच आधार आहे.

*सत्-असत् मार्ग

सत-असत हा सुखी जीवन-दुःखी जीवन याचा आधार ठरतो.

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत्

असत इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह॥(१७-२८)

यज्ञ(कार्य), दान, तप(काया, वाचा, मन- वागणुक) निष्ठेने आचरण करणे सुखी जीवनाचा अर्थात सत मार्ग ठरतो.

सत म्हणजे चांगले, वर्तमानातील विकास स्थिति, शाश्वताचे ज्ञान असते.

सत् भावे साधुभावे च सत इति एतद् प्रयुज्यते।(१७-२६)

यज्ञे तपसि दाने च स्थितिः सत् इति च उच्यते।(१७-२७)

सत(शाश्वत) -असत(अशाश्वत) निवड

न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः।

उभयोःअपि दृष्टो अन्तः तु अनयोः तत्वदर्शिभिः॥(२-१६)

******

(२-१७)

**************************

अविनाशि तु तद् विद्धि येन सर्वम् इदं ततम् ।

विनाशम् अव्ययस्यास्य न कश्चित कर्तुं अर्हसि॥

*********************

(२-१७):

"अविनाशि तु तद् विद्धि येन सर्वम् इदं ततम् "

(Search for Permanent अर्थात शाश्वताशी जीवनाचे नाते)

"The search for something permanent is one of the deepest of the instincts leading men to philosophy. "

-Bertrand Russell,

भगवतगीतेत जीवनातील शाश्वत-अशाश्वताचा विषय मुख्यत्वे दुःखावर मात करण्यासाठी जीवनयात्रेत आत्मविश्वास अनुभवणे यासाठी विस्ताराने चर्चिला आहे. अर्थात जीवनातील Barrier जाणुन त्यावर मात करणे, आत्मविश्वास अनुभवणे, साहस,

निर्भयता अनुभवणे, यासाठी "दुःखान्तशक्ति(योग) वृद्धिगत होण्यासाठी योग"हा विषय आलेला आहे.

अविनाशि तु तद् विद्धि येन सर्वम् इदं ततम् ।
विनाशम् अव्ययस्यास्य न कश्चित कर्तुं अर्हसि।।(२-१७)

या सृष्टित(विश्वात) ज्याचे मुळच (उगम)शाश्वत आहे, ज्यामुळे सृष्टिचे सृजन होते, ते परमात्मा तत्व शाश्वत आहे. याच परमात्मा तत्वाचा अंश शरिरात आत्मा रुपाने शाश्वत ठरतो.

अन्तवन्त इमे देहा नित्यस्य उक्ताः शरीरिणः।(२-१८)

शाश्वत म्हणजेच अविनाशी. त्याला मृत्यु नाही. शरीर बदलते असते.

अजो नित्यः शाश्वतो अयं पुराणः।(२-२०)

*जर आत्मा मृत्यु पावतो, असे जर (अर्जुन) समजत असेल तरी जन्म आहे तर मृत्यु अपरिहार्य आहे. हे जीवनाचे सत्य जाणुन शोकग्रस्त होणे उचीत नाही. दोन अव्यक्ताच्या मध्ये अव्यक्तानेच शरीर धारण केले ही व्यक्त स्थिति आहे. अर्थात जीवनातील शाश्वत तत्व याविषयी आश्चर्याने पाहत असतो, भाष्य होते.

श्रृत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्।(२-२९)

अर्थात श्रवण होते पण निश्चित बोध होत नाही. अशा शाश्वत तत्वाचे ज्ञानाचा निश्चित बोध भगवतगीता विस्ताराने करीत आहे. ईश्वर, आत्मा -परमात्मा, दैव-अधिदैव, क्षेत्रज्ञ(Knower, Consciousness) याच ज्ञानाचा भाग आहे.

* अहंकाराचा आश्रय vs. ईश्वरशरणता

सामान्यतः मनुष्याची जीवनयात्रा योग्य समजुनच चालु असते. याच कारणाने अर्जुन स्वतःला योग्य ठरविण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो. स्वतःला ज्ञानी समजुन व स्वतःला कर्ता जाणुन " मी युद्ध करणार नाही" ही भूमिका घेतो. येथे अहंकाराचा आश्रय असतो.

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।(१८-६१)

यामुळे "अहंकाराचा आश्रय vs. ईश्वरशरणता"हा विषय येतो. यातील अशाश्वत(प्रकृति)-शाश्वत(ईश्वर) तत्व जाणुन, कर्ता जाणुन ईश्वराला शरण जाणे. हाच "अशाश्वत vs शाश्वत" असा विषय बनतो.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।

भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६२)

आपल्या जीवनयात्रेतुन याच शाश्वताचा आश्रय करुन(बुद्धियोग, "अमृतत्वाय कल्पते"हा मार्ग) शांति अनुभवणे. शाश्वताचा हाच शोध आहे.

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।

तत् प्रसादात् परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।।

(१८-६२)

व्यावहारिक बोध:

"Permanence, perseverance and persistence in spite of all obstacles, discouragements, and impossibilities: It is this, that in all things distinguishes the strong soul from the weak. "

-Thomas Carlyle

जीवनातील अडचणी, दुःख हा जीवनाचाच भाग आहे. हेच Barrier मनुष्याला विकासाची संधि देत असते. यासाठीच शाश्वत-अशाश्वताचे (Detachment) ज्ञान आहे. याद्वाराच मनुष्याला( "Negativity into Positivity", "Weakness into Strength ")

असे Transformation शक्य होते. मनुष्याला ही संधीच भगवतगीतेने उपलब्ध करुन दिली आहे.

*********

(२-१८)

********************

अन्तवन्त इमे देहा नित्यस्य उक्ताः शरीरिणः।

अनाशिनो अप्रमेयस्य तस्माद् युध्यस्व भारत।।

*******************

(२-१८) :"अन्तवन्त इमे देहा नित्यस्य उक्ताः शरीरिणः"

जीवन (नित्य) आत्म्याचा प्रवास आहे. हा प्रवास जन्मापासुन मृत्युपर्यंत सुरु असतो. याच प्रवासासाठी (अनित्य) शरीर साधन मिळाले आहे, ज्याचे साध्य ईश्वर(नित्य तत्व) आहे (तद् धाम परमं मम). याच प्रवासाचे व मार्गाचे Awareness उपरोक्त संदेशातुन मिळते.

अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतांना पापकर्म म्हणुन अंतिम Destination स्वर्ग-नरक याचा उल्लेख करतो. वास्तव स्विकारतो, तेंव्हा विनाकारण(व्यक्तिगत गरज नसतांना) दुःख निर्माण करणारे कार्य योग्य कसे?हे कळत नाही, अर्थात दुःखमुक्ति गरज दर्शवितो.

भगवतगीता या दोन्ही मुद्यावर भाष्य करते.

Destination :

जीवनमार्गाचे निश्चित ज्ञान हा भगवतगीतेचा विषय आहे. याला ज्ञानविज्ञानाचा आधार आहे. अंतिम Destination कळले नाही तर मार्ग कळत नाही. जीवननाव वाऱ्याने वाहते अशी अवस्था होते. म्हणुन जीवनात अस्थिर असतो.

"नदी जब निकलती है,
 कोई नक्शा पास नहीं होता की
 "सागर"कहां है।
बिना नक्शे के सागर तक पहुंच जाती है।"

अन्तवन्त इमे देहा नित्यस्य उक्ताः शरीरिणः।
अनाशिनो अप्रमेयस्य तस्मात् युध्यस्व भारत।।(२-१८)

अनेक धर्मात अंतिम Destination स्वर्ग म्हटले आहे. अंतिम destination स्वर्ग म्हटले तर पापपुण्य या अनुषंगाने योग्य-अयोग्य हा मार्गात कार्यासंबंधी संशय असतो. व कार्याचा निश्चय दृढ होत नाही.

जीवन भोगैश्वर्यासाठी जाणले तर चांगले कर्म स्वर्ग व वाईट कर्म नरकप्राप्ति अशी चांगल्या व्यक्तिची दृष्टि असते. अर्जुन हाच (धर्माचा) आधार समर्थनासाठी घेतो. या दृष्टितील उणिव भगवतगीता दर्शविते.

भोगैश्वर्यप्रसक्तानां तया अपहृत् चेतसाम् ।

व्यवसाय आत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते॥(२-

अर्थात चांगल्या मनुष्याच्या कार्याचा निश्चय होण्यास अडथळा होतो. म्हणुन कार्याचा निश्चय होण्यासाठी बुद्धियोगाचे प्रयोजन आहे. व याचसाठी अंतिम साध्य Destination ईश्वर म्हटलेले आहे, ज्याचा अंश हृदयी स्थित आहे.

(तद् धाम परमं मम )

बुद्धियोगामुळे आत्मवश असतो. अर्थात जीवनाची नाव वल्हवतो. म्हणजेच Destination(Goal) निश्चित जाणतो. याप्रमाणे "अमृतंगमय" हा जीवनाचा राजमार्ग जाणतो. व या मार्गावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य करतो. या प्रक्रियेत" योगः कर्मसु कौशलम् " अर्थात कार्याद्वारे योग(निर्भयता, धैर्य, दुःखान्तशक्ति) साध्य करण्याची कला आत्मसात करतो. (कार्यकौशल्य).

जीवनाचे अंतिम धाम(Destination, Goal)जाणले तर जीवनप्रवास जाणतो. प्रवास कळला तर मार्ग कळतो. मार्ग कळला तर कार्याचा निश्चय (स्वतःचा मार्ग)याचे महत्व कळते. याच प्रक्रियेसाठी ज्ञान, कर्म, भक्ति याचा उपयोग भगवतगीतेने केला आहे.

ज्ञान : संशयमुक्ति अर्थात दृढनिश्चय होतो. विश्वासासाठी ज्ञान.

(ज्ञानसंच्छिन्न संशयम् )

कर्म : कर्म घडत असते ही प्रकृति आहे. योगक्षेमासाठी, भोगैश्वर्यासाठी कार्य करतो. हा स्वतःचा मार्ग होण्यासाठी स्वधर्म.

- स्वधर्म :Tiebreaker(द्वंद्वमुक्ति)

भक्ति : स्वधर्माद्वारे नैश्कर्मसिद्धि

-कर्माद्वारे योग (योगसंन्यस्त कर्माणं)

अर्थात धैर्य, निर्भयता, अविचल असणे(शांति) साध्य होते.

या ज्ञानामुळे जीवनांत ईश्वराचा आश्रय याचे महत्व कळते.

*******

(२-२२)

*******************

वासांसि जीर्णानि यथा विहाय

नवानि गृह्णाति नरः अपराणि ।

तथा शरीराणि विहाय जिर्णानि।

अन्यानि संयाति नवानि देही॥

*******************

(२-२२) :
"वासांसि जीर्णानि यथा विहाय"
(Spiritual Revolution)

बदल हा सृष्टिचा नियम आहे. जीर्ण, त्याज्य जावुन नवीन धारणा होते. अधर्माची स्थिति जावुन धर्मस्थापना होते.
वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरः अपराणि ।(२-२२)

शरीराची स्थिति जशी बदलत असते. पण या बदलाव होणाऱ्या सृष्टित शाश्वत तत्व ईश्वर असते. बदलाव होणारी अशाश्वत स्थिति

व सृष्टिचा, जीवनाचा आधार असणारे शाश्वत तत्व याचे ज्ञान भगवतगीता देते. याच ज्ञानाच्या आधारे मनुष्य स्वतःमध्ये आध्यात्मिक क्रान्ति घडवुन आणतो. समाजातील या क्रान्तिचे वर्तमानातील लक्ष कोणते हे जाणणे आवश्यक असते.

जुन्या पिढीने नवीन पिढीला उपदेश करावे या परंपरेला जाॅर्ज ऑर्वेलने विरोध दर्शविला होता. नवीन पिढी जुन्या पिढीच्या खांद्यावर वाढलेली असते. त्यांनी लांबचे पाहीले असते, जे जुन्या पिढीने (नवीन)पाहीले नसते हा संदेश माओ त्सेगुंचा होता. या संदेशाची दखल न घेतल्यामुळे "Born to win but conditioned to loose " असा समाज घडत असतो.

निट्झिने Herd/Slave moralty व Master morality असे नीतिशास्त्रातील भेद स्पष्ट केले. Herd मध्ये Obey असते तर Master मध्ये Decesion authority असते. याच आधारावर आधुनिक क्रान्तिकारकांनी प्रश्न केला,

"It may be your desire to be our master, But why it may be of ours to be your slaves!"

अर्थात निर्णय अधिकार, निर्णयक्षमता हाच आधार मनुष्याच्या स्वतःच्या (आत्म)विकासाचा असतो. या प्रक्रियेत मनुष्य कसा जगतो, याचे प्रात्यक्षिक भगवतगीतेत आलेले आहे. या तत्वानुसार जबाबदारी स्विकारणे, वास्तव स्विकारणे किंवा अज्ञान स्विकारणे हे विकासातील प्रथम पाऊल असते.

महर्षि वाल्मिकीचा पुर्वाश्रमीचा वाल्या डाकु याला त्याची जबाबदारी दर्शविण्यात येते, ज्याचा तो स्विकार करतो.

युद्धाचे परिणाम दुःखदायी आहे व युद्ध करुन कुलक्षय करणे पाप आहे याची जबाबदारी स्वतःवर येईल म्हणुन युद्ध करणे अर्जुन टाळतो. निश्चितच जबाबदारी निर्णय घेणाऱ्यावर(कार्य करणारा) असते. हा विषय जबाबदारीचा असतो.

अर्जुनाची निष्क्रियतेची भूमिका बेजबाबदारीची आहे, अशी समज देण्यात येते. तेंव्हा कार्याचे परिणाम पाप आहे!दुःख आहे हा संशय व्यक्त करतो व हा प्रश्न धर्म कि अधर्म असा बनतो. अर्थात ज्ञान-अज्ञानाचा हा प्रश्न असतो.

मनुष्याला जसे धर्माचे ज्ञान असते, तसे चांगले-वाईट पर्यायाने योग्य-अयोग्य याचे ज्ञान असते. चांगलेपणा, धर्म याचे ज्ञान जगण्यासाठी असते. अर्जुनाला जसे धर्माचे ज्ञान असते त्याचा उपयोग निष्क्रियतेचे समर्थनासाठी करतो.

बालपणापासुन मनुष्य धर्म, संस्कार ऐकत असतो. हे ऐकीव ज्ञान त्याचा निर्णय योग्य कि अयोग्य ठरवीत असतो. मनुष्यजीवनात याप्रमाणे निर्णय होत असतात, पण निर्णय घेणे शक्य झाले नाही तर निष्क्रियतेचे समर्थन करतो. येथेच अर्जुन स्वतःला आदर्श ठरविण्यासाठी धर्माचा उपयोग करतो.

अर्जुनाच्या धर्मज्ञानानुसार त्याला "स्वधर्माचरण" ज्ञान सांगण्यात येते. स्वधर्माचरण टाळले तर धर्म, किर्ति, स्वर्ग यापासुन वंचित होशील हे स्पष्ट केले.

अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।
ततः स्वधर्मं किर्तीं च हीत्वा पापम् अवाप्स्यसि॥(२-३३)

येथे अर्जुनाला धर्मापलीकडचे ज्ञान सांगण्यात येते. हे ज्ञान जीवनातील ऐकीव Elementry ज्ञान व प्रत्यक्ष जगण्याचे अनुभवण्याचे Rightous ज्ञान यांतील भेद स्पष्ट करते, ज्यामुळे

योग्य-अयोग्य या द्वन्द्वापासुन मुक्त होतो. हीच आध्यात्मिक क्रान्ति असते.

सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।(१८-६६)

*निर्णय अधिकार:

कर्मण्येव अधिकारःते मा फलेषु कदाचन।

* दृढनिश्चय

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।

* दुःखान्त शक्ति साधना

योगः कर्मसु कौशलम् ।

******

(२-२६)

*******************

अथ चैनं नित्य जातम् नित्यं वा मन्यसे मृतम् ।

तथापि त्वं महाबाहो नैनं शोचितुम् अर्हसि।।

*******************

(२-२६) :

"अथ चैनं नित्य जातम् नित्यं वा मन्यसे मृतम् "

(सत्याचा स्विकार)

मनुष्य आपल्या स्वभावप्रकृतिनुसार, जाणिवेनुसार, त्याला उपलब्ध असणाऱ्या ज्ञानानुसार (Understanding) जगत असतो. अर्जुन शुर, विद्याविभुषित, चांगला (दैवीगुणसंपत्तियुक्त) मनुष्य असतो. आपल्या ज्ञानानुसार, जाणिवेनुसार जगत असला तरी, त्याचे जगण्याचे Intention प्रामाणिक असले तरी अर्जुनाला अडथळा जाणवतो.

जे कार्य करण्यासाठी उत्साहाने युद्धक्षेत्रावर येतो, तेच कार्य त्याला दुःखदायी वाटते. आपण कांहीतरी चुक करीत आहो ही त्याला

जाणीव होते. ठरल्याप्रमाणे युद्ध करावे कि न करावे असा Tie उत्पन्न होतो. हे घोरकार्य टळावे ही त्याची Priority बनते. यानुसार या ( युद्ध)कार्याचे परिणाम अधर्माचे कारण बनेल असे ज्ञान सांगतो व निष्क्रिय राहणे श्रेयस्कर आहे असे बोलुन Tie सोडवितो.

मनुष्याचे Intention चांगले असले तरी जेंव्हा अडथळा दुर करण्याचे(Tie सोडविणे) ज्ञान नसते व Tie सोडविण्यास सक्षम नसतो, तेंव्हा मनुष्य जे करतो त्याचेच (स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी) समर्थन करतो. या प्रक्रियेत अज्ञानाचा स्विकार करीत नाही. मनुष्यजीवनात अज्ञान कायम राहण्याचे हे एक प्रमुख कारण ठरते.

श्रीकृष्णाने अर्जुनाच्या शौर्याचा, ज्ञानाचा अवमान केला नाही. श्रेष्ठांना न शोभणारी भूमिका असे संबोधुन अज्ञान (ज्ञानाची अपुर्णता) दर्शवुन दिले. अर्जुन अज्ञान कबुल करतो व योग्य काय? हे ऐकण्यास तयार होतो ज्यामुळे त्याची दुःखमुक्ति होईल.

अर्जुनाच्या या भूमिकेला प्रज्ञावादी संबोधले. अर्जुनाला "चांगले" दैवीगुणसंपत्तिसाठी जन्माला आलेला असे संबोधुन चांगलेपणा असला, ज्ञानी असला तरी त्यातील अपुर्णता दर्शवुन दिली. "जीवनाची ज्ञानी भूमिका"या संदर्भात ज्ञान सांगितले.

भगवदगीतेतील संवादात अर्जुनाला असलेल्या उपलब्ध ज्ञानाचा(Understanding) संदर्भ घेवुन महत्वाचे दोन मुद्दे आलेले आहेत.

अ) ज्याने शरीर धारण केलेले आहे तो आत्मा शाश्वत आहे, त्याला मृत्यु नाही. त्याचा कुणीही नाश करु शकत नाही, शरीर बदलत असते.

तुझ्या (ज्ञान) जाणीवेनुसार तुझे ज्ञान म्हणत असेल कि, आत्मा(प्राणतत्व) जन्मतो व मृत्यु पावतो तर जन्ममृत्यु जीवनाचे जीवनचक्र आहे, जो जन्मला त्याचा मृत्यु अपरिहार्य असतो. म्हणुन मृत्युचा शोक उचित नाही.

अथ चैनं नित्य जातम् नित्यं वा मन्यसे मृतम् ।

तथापि त्वं महाबाहो नैनं शोचितुम् अर्हसि॥(२-२६)

ब) आपल्या निष्क्रिय भूमिकेचे समर्थन करतांना स्वर्ग, कीर्ति या संदर्भात भाष्य करतो. (आपण लोभी, पापी ठरु!) पण या संदर्भातील त्याचे Understanding चुकीचे ठरेल हे श्रीकृष्ण दर्शवुन देतांना म्हणतात, स्वधर्माचे आचरण केले नाही तर अपकीर्ति होईल.

अथ चेत् त्वं इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।
ततः स्वधर्मम् कीर्तिं च हीत्वा पापम् अवाप्स्यसि।(२-३३)

यामुळे स्वधर्माचरण करतांना मृत्यु जरी आला तरी स्वर्ग मिळेल व जिंकलास तर राज्य भोगशील.

समाजात लोकांनी वाईट म्हणु नये किंवा आपल्या कार्यात अपयश येवु नये या विचाराने निष्क्रिय राहणारे व स्वतःला ज्ञानी, चांगले सिद्ध करणारे लोक असतात. पण चांगलेपणाविषयीच मनुष्याचा गैरसमज असतो हे भगवदगीता दर्शवुन देते.

भगवदगीता ज्ञान सांगत आहे पण अर्जुनाचे चांगलेपणाविषयी Understanding, त्याच्या स्वर्ग व कीर्ति याविषयीच्या संकल्पना कशा भ्रामक आहेत हे दर्शवुन देते. अर्थात चांगलेपणाला पुर्णत्व येण्यासाठी भगवदगीता ज्ञान आलेले आहे. याच संदर्भात चांगलेपणा व्यर्थ जाईल काय? अशी शंका अर्जुन उपस्थित करतो!व त्यावरही शंकानिरसन केलेली आहे.
न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति।(६-४०)

*भगवदगीतेतील संवादाची उच्च पातळी :

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहीतं च यत् ।(१७-१५)
अर्जुनाचा उद्वेग न करता जे सत्य आहे त्याचा स्विकार करणे, योग्य विचार कसा करावा याचा बोध भगवदगीता करुन देत आहे. याप्रमाणे संवादाची उच्च पातळी भगवदगीतेने गाठली आहे. व जीवनाची ज्ञानी भूमिका या संदर्भात निश्चित ज्ञान सांगितले आहे.

*जीवनाची ज्ञानी भूमिका :
मनुष्य इच्छापुर्तिसाठी कार्यरत असतो, होतो पण हे होत असतांना अपयश नको, अपकीर्ति नको, दुःख नको अशा दुहेरी विचारात मनुष्य असतो. यामुळे कार्याचा एकनिश्चय होत नाही. सकाम कार्याचा हा परिणाम असतो. म्हणुन भगवदगीता निष्काम कार्याचे शास्त्र सांगत आहे. यासाठी बुद्धियोग, ईश्वरभक्ति(समर्पण, फलत्याग) आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।(९-३३)
अभ्यासेअपि असमर्थोअसि मत्कर्म परमो भव।(१२-१०)
अथ एतद् अशक्तोअसि कर्तुं मत् योगं आश्रितः।(१२-११)

बोध:

समाजातील श्रेष्ठत्व, ज्ञानी, चांगलेपणा, कीर्ति, स्वातंत्र्य-पारतंत्र्य, स्वर्ग-नरक, पापपुण्य याविषयी असलेले मनुष्याचे गैरसमज भगवदगीता दुर करीत आहे. याच संदर्भात भगवदगीता संदेश देत आहे, स्वतःला भ्रमातुन (Delusion) मुक्त करा, वास्तवाचा स्विकार करा व नित्य विकासमार्गावर रहा. याचसाठी हे अमुल्य जीवन लाभलेले आहे. या जीवनाचा बंधु बना, त्याचे शत्रु बनु नका.

आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मना।(६-५)

"The world is starving for a new spiritual truth - a truth that works in sustaining life, not a truth that brings an end to life. "

Neale Donald Walsch

********

(२-२७)

*******************

जातस्य हि धृवो मृत्युः धृवं जन्म मृतस्य च।
तस्मात् अपरिहार्येअर्थे न त्वं शोचितुम् अर्हसि।।

*******************

(२-२७)/१:

"तस्मात् अपरिहार्ये अर्थे न त्वं शोचितुम् अर्हसि"

जन्म-मृत्यु या चक्रातील मृत्यु ही अपरिहार्य बाब असल्यामुळे त्याविषयी दुःखी होण्याचे कारण नाही. ही भगवतगीतेची भूमिका कोणत्या संदर्भात आहे हे येथे जाणुन घेणे आवश्यक आहे.

जातस्य हि धृवो मृत्युः धृवं जन्म मृतस्य च।
तस्मात् अपरिहार्येअर्थे न त्वं शोचितुम् अर्हसि।।(२-२७)

अर्जुन दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो व जीवनाचे वास्तव न स्विकारता युद्ध करणे पाप आहे अशी Judgemental भूमिका घेतो. हा जीवनातील दुःखाला अर्जुनाचा Response

असतो. वास्तव hide करुन दुःख टाळण्यासाठी अशीच संवय conditioned होत असते व ती दुःखाला respond करण्याची मानसिकता बनते.

जीवनात इच्छा असतात, दुःख असते, प्रश्न असतात. म्हणुन जीवन कार्यरत असते. जीवन सुखी व्हावे यासाठी ज्ञानविज्ञान आले. अर्थात प्रश्न सोडविण्यासाठी कार्य करतो. पण जीवनातील वास्तवाला Respond न करता निष्क्रियतेचे समर्थन करणे ही नकारात्मक मानसिकता ठरते.

जगातील प्रश्न ज्ञानविज्ञानानेच सुटले आहेत. जीवनातील प्रश्न ज्ञानानेच सुटतात, पण वास्तव न स्विकारता अज्ञानाला ज्ञान दर्शविले तर ज्ञानाचे दरवाजेच बंद होतात. हा ज्ञानाचा अवमान असतो. अर्जुनाचे "ज्ञानी भाष्य" श्रीकृष्ण ऐकुन घेतात. श्रेष्ठांना, ज्ञानी जनांना ही भूमिका अशोभनिय आहे अशी अर्जुनाला समज देतात. तेंव्हा अर्जुन वास्तव कबुल करतो. आपला संशय(युद्ध करणे योग्य कि अयोग्य?) सांगतो. पण युद्ध करणे योग्य असले तरी शोक कसा नष्ट होईल हे अनाकलनिय आहे. माझ्या दुःखाचे युद्ध हेच कारण ठरेल म्हणुन युद्ध करणार नाही ही स्वतःची भूमिका स्पष्ट करतो. अर्थात जीवनातील दुःखाला Respond

करण्याची अर्जुनाची मानसिकता यातुन स्पष्ट होते व ही मानसिकता कशी असावी याचे ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते.

मनुष्यजीवन अव्यक्तातुन व्यक्त झालेला एक व्यक्त Form आहे. ज्याला आपण शरीर म्हणुन ओळखतो. या शरीराची यात्रा जीवन असते. व्यक्त शरीरात ज्ञान-सुखदुःख, इच्छा-कार्य, मोह-अज्ञान याद्वारे अव्यक्त बद्ध असतो. अव्यक्ताच्या प्रवासाचे अंतिम Destination ईश्वर असते. म्हणुन व्यक्ताचा(शरीराचा) प्रवास "मृत्योर्मा अमृतंगमय" असा होतो, तो श्रेष्ठांचा मार्ग ठरतो. या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही. अर्थात दुःखाशी सामना करण्याची मानसिकता असते. या मानसिकतेमुळे अडचणी विकाससंधि ठरतात.

प्रकृतिच्या बद्ध अवस्थेमुळे मनुष्य दुःखाने विचलित होतो. द्वंद्वाच्या जाळयात अडकतो. म्हणुन दुःखाशी सामना करण्यासाठी व्यक्त-अव्यक्ताचा प्रवास जाणुन अंतिम Destination ईश्वर, हाच ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत जाणुन ज्ञानाचा आश्रय करण्यासाठी ईश्वराला शरण असणे, हे जीवनाचे वास्तव ज्ञान भगवतगीता सांगते.

अनित्य असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

व्यावहारिक बोध:

"Death does not concern us, because as long as we exist, death is not here. And when it does come, we no longer exist. "

-Epicurus

जेंव्हा मृत्यु येतो तेंव्हा आपण येथे नसतोच. परंतु जीवनातील दुःखाला आपण कसे respond करतो, हा खरा महत्वाचा प्रश्न असतो. दुःखाशी सामना करण्याची मानसिकता नसल्यामुळेच Stress असतो, दुर्बलता असते. दुर्बल मानसिकता मात्र भयावह असते. याच संदर्भात मनुष्य जीवनातील दुःखाला, अडचणींना कसा Respond करतो, यावरुनच मनुष्याच्या जीवनाची सामान्य मानसिकता व उच्च मानसिकता (श्रेष्ठत्व) यातील भेद भगवतगीता स्पष्ठ करते. ही भगवतगीतेची जगाला महान देण आहे.

*********

(२. २७)/२:" न त्वम् शोचितुम् अर्हसि"

(Stop worring, Start living)

समाजात चांगले- वाईट या आधारावर काय योग्य, काय अयोग्य यावर भाष्य होते. याच आधारावर कुणी काय करावे किंवा काय करु नये असे उपदेशसदृश भाष्य समाजात चालत असते. हा व्यावहारिक विषय असतो. याच व्यावहारिक जगात मनुष्य जगत असतो.

प्रत्येक मनुष्य स्वभावप्रकृतिनुसार जगत असतो. यांत श्र्रेयस असो वा प्रेयस?काय करावे वा करु नये याचा विचार करुनच तो कार्यरत(जगत) असतो. किंवा निष्क्रिय होतो अर्थात "करणे" योग्य आहे हे जाणुन टाळले तरी मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञानभाष्य बोलतो. हीच भूमिका भगवतगीतेतील अर्जुनाच्या भूमिकेचा विषय आहे.
*भगवतगीतेतील Do & Do'nt factor अनुक्रमे Start व Stop संदेश देतो.

"Do" हा सकारात्मक उपदेश व "Do'nt" हा नकारात्मक उपदेश असे गृहीत धरले तर जे कार्य टाळण्यासाठी अर्जुन ज्ञानभाष्य

बोलतो, तेच "कार्य कर" ही श्रीकृष्णाची भूमिका असते. कोणतेही कार्य व्यावहारिक प्राप्तिसाठी करतो या आधारावर मला कोणतीही व्यावहारिक प्राप्ति नको ही अर्जुनाची भूमिका असते. म्हणुन "अमुकच कार्य कर वा करु नको" असा व्यावहारिक उपदेश भगवतगीतेचा विषय नाही. तर" Do'nt" या संदर्भात दुबळेपण शोभत नाही, दुःखी होवु नको, चिंता करु नको हेच संदेश आलेले आहे. याचे कारण सविज्ञान भगवतगीता स्पष्ट करते.

चिंता बुद्धिनाश करते. हा जीवनाच्या विकासमार्गातील Breakdown असतो. याच बुद्धिनाशाची तांत्रिक प्रक्रिया कशी घडते हे स्पष्ट केले आहे. मनुष्यजीवनात भय, चिंता, क्रोध इ. विकाराचे कारण भिन्न असले तरी हे विकार मानसशास्त्रियदृष्ट्या सारखेच असतात. याच मानसशास्त्रिय संदर्भात "काय योग्य व काय अयोग्य?" या विषयावर भगवतगीता प्रकाश टाकते.

"Worry is like a rocking chair - it gives you something to do but won't get you anywhere. "
संशयामुळे भय व भयामुळे चिंता असते. चिंता नैसर्गिक भावना असली तरी बुद्धिभ्रमाचे कारण ठरते. म्हणुन स्थिर बुद्धिचे महत्व स्पष्ट करुन भगवतगीता उपाय सांगते. (तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता).

कार्याद्वारे योग(दुःखान्त, निर्भय). याचसाठी नियतकार्य "स्वधर्म" करणे, निर्णय(कार्याचा निश्चय)दृढ करणे व म्हणुन "कार्य कर " हा संदेश दिला.

बुद्धिभ्रम झाल्यामुळे अर्जुन निष्क्रियतेला योग्य सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. श्रीकृष्णांनी समज दिल्यावर बुद्धिभ्रम कबुल करतो. (कार्पण्यदोषोपहतस्वभावः) व ज्ञान जाणल्यावर "स्मृतिर्लब्ध्वा" या प्राप्तिची कबुली देतो. याचाच अर्थ बुद्धिनाशामुळे जीवनमार्गात Breadown होतो. हाच बुद्धिनाश होवु नये म्हणुन ईश्वराचा आश्रय करुन योगयुक्त होणे हा संदेश दिला. "युक्त आसीत मत्परः" . अर्थात हा विषय(Breakdown ला कारण होणारा) बुद्धिभ्रम vs बुद्धियोग या विषयाला focus करते. (Start living)

मनुष्याच्या जीविततत्वातील शाश्वत ईश्वर व जगताचा अध्यक्ष परम् ईश्वर याची ज्ञानविज्ञानासह ओळख दिली. याच आधारावर मनुष्याचा Standard विकासमार्ग ठरतो(अमृतत्वाय कल्पते). या मार्गावर १. स्वधर्माचरणाद्वारे कार्य ईश्वराला समर्पित होते. २. बुद्धियोगामुळे कार्याचा दृढनिश्चय होतो. कार्याद्वारे समत्वयोग साध्य करतो(हेच निष्काम कार्याचे तत्व/ शास्त्र)

तस्मात् अपरिहार्ये अर्थे न त्वं शोचितुम् अर्हसि।(२-२७)
तस्मात् सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुम् अर्हसि।(२-३०)

***** ******** *********

(२-२७)/३ :
"तस्माद् अपरिहार्येअर्थे न त्वम् शोचितुम् अर्हसि"
(जीवनाचे जन्ममृत्युचक्र vs अध्यात्मज्ञान)

"We are all living together on a single planet, which is threatened by our own actions. And if you don't have some kind of global cooperation, nationalism is just not on the right level to tackle the problems, whether it's climate change or whether it's technological disruption. "
-Yuval Noah Harari

अर्जुनाच्या स्वभावनियतकार्याशी युद्धाचा जवळचा संबंध असतो. महायुद्धात मृत्युचे तांडव असते. अर्जुनाला युद्धापुर्वीच युद्धक्षेत्रावर स्वजनांची हत्त्या, मृत्युचे तांडव नजरेसमोर येतात व तो शोकमग्नच काय पण शक्तिहीन होतो. नीट उभे राहण्याचीही शक्ति त्याच्यात नसते. त्याची बुद्धि भ्रमात सापडते.

न च शक्नोमि अवस्थातुं भ्रमतीव च मे मनः।(१-३०)

अर्जुन आपला प्रश्न करतो. हा प्रश्नच दुःखासंबंधी असतो. त्याच्या शोकमग्न भूमिकेमुळे श्रीकृष्ण सर्वप्रथम जन्ममृत्युचे सत्य स्पष्ट करतात. जे अशाश्वतच आहे त्याविषयी जाणकार शोक करीत नाही.

गतासून अगतासूंश्च न अनुशोचन्ति पंडिताः।(२-११)

जन्म आहे तर मृत्यु आहेच व मृत्यु आहे तर जन्मही आहे. हे जन्ममृत्युचे चक्र आहे.

जातस्य हि धृवो मृत्युः धृवं जन्म मृतस्य च।

तस्माद् अपरिहार्ये अर्थे न त्वं शोचितुम् अर्हसि।।(२-२७)

जन्ममृत्युचे चक्र व स्वर्गनरक प्राप्ति हा धर्माचा एक भाग असतो. धर्माच्या या भागात Rituals असतात. भगवतगीतेची भूमिका धर्म या संदर्भात Rituals vs. Philosophy अशी असते. याच आधारावर स्वधर्माचरण करुन युद्ध जिंकले तर राज्य भोगशील व

मृत्यु आला तर स्वर्ग मिळेल. अशी धारणा धर्म या संदर्भात असते.

जीवनविकासाचे तत्वज्ञान:

"The world is starving for a new spiritual truth - a truth that works in sustaining life, not a truth that brings an end to life. "

Neale Donald Walsch

भगवतगीतेचा दुसरा व महत्वाचा भाग शाश्वत आत्मा- परमात्मा आहे. अर्थात हा भाग अध्यात्माचा असतो. यांत Philosophy आहे. यामुळे भगवतगीतेचा मुख्य विषयच जीवन जगण्याची Philosophy हा अ ाहे. या तत्वज्ञानाचा आधार (बंधन -मोक्ष) अर्थात बंधन -स्वातंत्र्य अर्थात Herd -Master असा आहे.

स्वामी विवेकानंदांनी युवापिढीचे अध्यात्म हा विषय सर्वप्रथम जगासमोर मांडला. Creative leadership साठी आध्यात्मिक क्रान्ति सांगितली.

Every generation needs a new Revolution. It is now Spiritual Revolution .

*युवापिढीचे अध्यात्म

(Purpose :Creative leadership)

चांगलेपणा विकासाचे साधन आहे:

जो चांगला(दैवी) आहे, त्याला आत्मविश्वास हवा. त्याचा कार्याचा एकनिश्चय( Determination) हवा. जगाला चांगल्या कार्याची गरज असते. म्हणुन चांगल्या मनुष्याला मनोदुर्बलता अशोभनिय असते. दुःखामुळे अर्जुनाला मनोदुर्बलता येते.

"Cowards die many times before their deaths; the valiant never taste of death but once. "

William Shakespeare

चांगल्या मनुष्याच्या याच मनोदुर्बलतेला भगवतगीता आव्हान देते. व अध्यात्म सांगते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

चांगलेपणा या संदर्भात मनुष्य प्राथमिक ज्ञान ऐकतो व लोकांनी चांगले म्हणावे अशी इच्छा करतो. चांगलेपणाची पुढील पायरी धर्माची असते. याच धर्माचा आधार अर्जुन स्वतःला योग्य ठरविण्यासाठी म्हणुन आपली निष्क्रियता लपविण्यासाठी करतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी Excuses, प्रज्ञावाद ही सामान्य मनुष्याची संवय असते. व याच आधारावर अर्जुनाला म्हटले, श्रेष्ठांना हे अशोभनिय आहे.

अनार्यजुष्टम् अस्वर्ग्यं अकिर्तीकर अर्जुन।(२-२)

जीवनात उच्च(मोठे) होणे यासाठी युवापिढीचे स्वप्न असते. तर मोठे होण्याची Philosophy भगवतगीता सांगत आहे.

*Level of Consciousness

शाश्वत आत्मा-परमात्मा हा भाग Higher consciousness चा (Senses consciousness vs. spiritual consciousness) विषय आहे.

*Level of Path

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

सामान्य पातळीवर (Senses) सकाम स्थिति असते तर Higher consciousness (अमृतत्वाय कल्पते या मार्गावर) च्या पातळीवर कार्याची निष्काम स्थिति असते. या स्थितीत साधना असते.. साधन कर्म असते व साध्य अमृतंगमय/ईश्वरधाम म्हणुन ईश्वरभक्ति साधना असते. "योगः कर्मसु कौशलम् " साधनेचे कौशल्य असते. अर्थात हीच शक्तिची साधना असते.

सार : विकास म्हटला कि भौतिक विकास(संख्यात्मक) व यासाठी आधुनिक ज्ञानविज्ञान शिक्षण आवश्यक आहे हाच संदेश युवापिढीला मिळतो. जीवनविकासात श्रीमती-गरिबी या

संकल्पनेला प्राथमिक स्थान असते. पण जीवनविकासासाठी संस्कार(गुणात्मक) ही Priority असते याचे अज्ञान असते.

जीवनविकासाच्या संस्कारासंदर्भातच अर्जुन दुःखी होतो, तेंव्हा म्हणतो, मला राज्य नको म्हणुन कर्मही नको. विकासासाठी प्रश्न राज्य हवे कि नको हा नसतो, तर जीवनविकासाच्या संस्काराचा असतो हेच प्रकर्षाने भगवद् गीता जगाच्या निदर्शनास आणुन देते. याच संस्कारासाठी अध्यात्माचा उपयोग केलेला आहे.

याप्रमाणे अध्यात्मज्ञान वर्तमानात सुखी जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या संस्कारातील विषय आहे, हा संदेश भगवद्गीता देते.

********

(२-३०)

*************************

देही नित्यम् अवध्यः अयं देहे सर्वस्य भारत।

तस्मात् सर्वाणि भूतानि न त्वम् शोचितुम् अर्हसि।

*************************

(२-३०):

"देही नित्यम् अवध्यः अयं देहे सर्वस्य भारत"

(शाश्वत-अशाश्वताचे ज्ञान)

संदर्भ :भगवदगीतेत श्रीकृष्ण अर्जुनाला भारत असे संबोधुन विशेष संदेश देत आहे. अगदी प्रारंभी श्रीकृष्णाने सांख्ययोगातुन जे संदेश दिले ते ज्ञान-अज्ञान अर्थात शाश्वत-अशाश्वत ज्ञानासंबंधी आहेत.

१. तम उवाच हृषिकेशः प्रहसन्निव भारत(२-१०)

हा संदेश संवाद (Dialogue sense) संदर्भात आहे. मी योग्य हे सिद्ध करण्यासाठी अर्जुन धर्मज्ञान बोलतो. त्याला ज्ञान ऐकण्याची गरज नसते. गरज नसतांना ज्ञान कोण ऐकणार?श्रीकृष्ण जेंव्हा

अर्जुनाच्या या भूमिकेतील उणिव दर्शवुन देतात, तेंव्हा अर्जुन वास्तव कबुल करतो व स्वतःसाठी श्रेयस्कर काय? हे ऐकण्याची तयारी दर्शवितो.

जे ज्ञान सांगण्यासाठी साक्षात ईश्वराने श्रीकृष्णरुपात जन्म घेतला ते ज्ञान सांगण्याची वेळ आता आलेली असते. यामुळे श्रीकृष्ण हर्षित होतात. व येथे संवाद सुरु होतो.

मनुष्य या विश्वात जे डोळ्याने पाहतो, अनुभवतो तेच त्याचे विश्व असते. विश्वात जे दिसते, घडते तेच सत्य जाणुन मनुष्य जगत असतो. जीवनात सुखासाठी जगत असतांना दुःखी होतो, विचलित होतो. अर्जुन असाच दुःखी झाला असता जीवनाचे आव्हान न स्विकारता स्वतःला योग्य सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. येथे त्याचा विकासरथ थांबतो.

जीवनाचे हेच आव्हान स्विकारण्यासाठी विश्वातील, स्वतःतील शाश्वताचे ज्ञान जाणणे आवश्यक ठरते. याच शाश्वत-अशाश्वत, नित्य-अनित्य ज्ञानाचे संदर्भात यांत संदेश आहेत.

२. मात्रास्पर्शास्तु कौंतेय शितोष्णसुखदुःखदाः।

आगमाअपायिनोअनित्याः तान् तितिक्षस्व भारत।(२-१४)

हा संदेश सुखदुःखाच्या नित्य-अनित्य स्थितिसंदर्भात आहे. जसा उन्हाळा हिवाळा ऋतु बदलतो, तसाच बदल सुखदुःख संदर्भात असतो. श्रेष्ठ मनुष्याची जीवनयात्रा "अमृतत्वाय कल्पते" या राजमार्गावर असते. या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही.

"अमृतत्वाय कल्पते"(२-१५) हा मार्ग जाणण्यासाठी देहाची अनित्यता(अशाश्वत) व नित्य (शाश्वत)आत्मा या संदर्भात पुढील संदेश येत आहेत.

३. अनाशिनो अप्रमेयस्य तस्माद् युध्यस्व भारत।(२-१८)
४. अव्यक्त आदीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत।(२-२८)
५. देही नित्यम् अवध्यः अयं देहे सर्वस्य भारत।(२-३०)

सृष्टिचे जे मुळ तत्व आहे ते परमात्मा तत्व शाश्वत आहे. याच शाश्वत तत्वाचा अंश आत्मा आहे. शरीर अनित्य म्हणुन त्याला मृत्यु आहे. शरीरातील आत्मा नित्य म्हणुन त्याचा प्रवास

"अमृतत्वाय कल्पते" असा असतो. जीवन म्हणजे दोन अव्यक्तातील व्यक्त स्थिति असते.

आसुरी संपत्ति असलेला मनुष्य शाश्वताचे ज्ञान जाणत नाही. याच आधारावर भगवदगीतेतील बंधन-मोक्ष ज्ञान आहे. दैवीसंपत्ति असलेल्याला (चांगला) शाश्वताचे ज्ञान जाणणे आवश्यक ठरते. कारण चांगल्या मनुष्याला निष्क्रियता, दुर्बलता अशोभनिय आहे.

दैवीसंपद्विमोक्षाय निबंधाय आसुरी मता।
मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।।(१६-५)

सार :

शाश्वत-अशाश्वताचे ज्ञान अध्यात्मज्ञान म्हणुन ओळखल्या जाते. Consciousness(Lower-Higher) ज्ञानाचा हाच आधार आहे. याचाच अर्थ जीवनाचे आव्हान स्विकारण्यासाठी स्वतःला सक्षम करणे, समर्थ करणे हा अध्यात्मज्ञानाचा हेतु स्पष्ट होतो.

********

(२-३१)

*******************

स्वधर्मम् अपि चावेक्ष न विकम्पितुम् अर्हसि।

धर्म्याध्दि युद्धात् श्रेयो अन्यत् क्षत्रियस्य न विद्यते।।

*******************

(२-३१)/१ :

"स्वधर्मम् अपि चावेक्ष न विकम्पितुम् अर्हसि"

"What a man can be, he must be. This need we call self-actualization. "

Abraham Maslow

अब्राहम मास्लोव (१९०८-१९७०) हा तत्वज्ञ म्हणतो, मानसशास्त्राने फक्त मानसिक आजारावर Focus केले. परंतु मनुष्याला त्याच्या अंतरंगात असलेल्या शक्तिची ओळख करुन समर्थ करण्यासाठी या शास्त्राने दखल घेतली नाही. त्याने SELF ACTUALIZATION ही मनुष्याची गरज दर्शविली.

"The science of psychology has been far more successful on the negative than on the positive side... It has revealed to us much about man's shortcomings, his illnesses, his sins, but little about his potentialities, his virtues, his achievable aspirations, or his psychological health. "

Abraham Maslow

यापुर्वी सॅम्युअल स्माईल या तत्वज्ञाने सर्वप्रथम "SELF HELP" या पुस्तकाद्वारे(१८५९)मनुष्यातील शक्तिची ( Potential) दखल घेतली होती. ओरिसन मार्डेन या तत्वज्ञाने या पुस्तकाची खरी ओळख जगाला करुन दिली.

या पार्श्वभुमीवर या पाश्चात्य तत्वज्ञांच्या आधी भगवतगीतेने मनुष्यातील Potential ची दखल घेतली आहे, हे सत्य जगासमोर येणे आवश्यक आहे.

सर्वसामान्यांना धर्माची ओळख Rituals, ईश्वरभक्ति या माध्यमातुन होते. तर व्यावहारिक नियम या संदर्भात अनेक धर्माचा जगात उदय झाला. व्यक्तिविकास, समुहविकास, जगतकल्याण या संदर्भात धर्माची भूमिका व्यवस्थापनिय नियम या अर्थाने आढळते.

कुटुंब, Professional संस्था, देश असे विविध समुह असतात. समुहविकासासाठी, (Common -)प्रश्न सोडविण्यासाठी नियमावली, संस्कृति असते. याद्वारा व्यक्तिचे नियतकार्य ठरते. अर्जुनाला युद्धाचे "नियतकार्य" मिळते. प्रत्यक्ष कृतीची वेळ आली असता(कुरुक्षेत्रावर) स्वार्थ-परमार्थ, धर्म-अधर्म असा गोंधळ उडतो.

स्वार्थ-परमार्थ या संदर्भात लोक परमार्थाविषयी अधिक भाष्य (इतरांनी काय करावे)करतात, पण स्वतः काय करावे या प्रश्नाची वास्तविकता दुर्लक्षित होत असते. यामुळे चांगला, विद्वान मनुष्यही निष्क्रियतेकडे झुकतो. याच पार्श्वभूमीवर भगवतगीता जगात आली.

स्वार्थ- परमार्थ या संदर्भातच Selfishness, Self Interest, Self Help, Self Actualization या शब्दांची ओळख महत्वाची ठरते. याच संदर्भात अर्जुन स्वतःला Selfish (लोभी) संबोधतो. याला अधर्म दर्शवतो.

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहत चेतसः।(१-३७)

हा धर्म-अधर्माचा गोंधळ(Tie) दुर करण्यासाठी भगवतगीतेने "स्वधर्म" या शब्दाचे प्रयोजन केले.

स्वधर्मम् अपि चावेक्ष न विकम्पितुम् अर्हसि।(२-३१)

येथे स्वधर्माची भूमिका Tiebreakerची असते, हे स्वतःच्या नियतकार्यावर Self approval असते. यांत कार्य ईश्वराला समर्पण अर्थात कार्याद्वारे ईश्वरभक्ति अपेक्षित असते.

"Self-approval and self-acceptance in the now are the main keys to positive changes in every area of our lives. "

Louise Hay

अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन धर्म संबोधुन करतो. व हेच खरे अज्ञान ठरते. व स्वधर्माद्वारे निष्क्रियता व सक्रियता यातील Tie सुटतो.

"A ship in port is safe, but that's not what ships are built for. "

Grace Hopper

*****

(२. ३१)/२ :

"धर्म्यात् हि युद्धात् श्रेयः अन्यत् क्षत्रियस्य न विद्यते"

Part I.

(स्वभावनियत-सहजकार्य-स्वधर्म)

जीवनाचे "ज्ञान" या संदर्भात मनुष्य जसे जीवनाला ओळखतो तशी कृति करतो, भाष्य बोलतो. तर "कर्म" या संदर्भात जशी

स्वभावप्रकृति असते तशीच कृति घडते. याचाच परिणाम मनुष्याच्या आवडीच्या कार्यात असतो, त्याच्या भाष्यात असतो. याच सत्याचे जगात दर्शन होते. जसा स्वतःला ओळखतो तसा जगतो. याच पार्श्वभुमिवर सॉक्रेटिसने "Know Thyself " हा संदेश दिला.

"एक सिंहिण आपल्या पिलांबरोबर कोल्हाच्या पिलाचे पालनपोषण करते. पिले मोठी झाल्यावर अरण्यात बागडत असता त्यांना हत्ती दिसतो. कोल्हा पळा पळा ओरडुन स्वतः पळतो व सिंहिणीला म्हणतो. मुलांनी माझे ऐकले नाही, त्यांना हत्ती मारुन टाकेल. यावर सिंहिण म्हणते, तुला विद्याही सारखीच दिली. पण तु ज्या कुळात जन्मला तेथे हत्ती मारत नाही.

'यत्र कुले त्वं उत्पन्नं गजः तत्र न हन्यते'

यामुळे जे कार्य माझ्या मुलांचा आनंद आहे, ते तुझे भय आहे. तु आता जा आणि स्वतःच्या स्वभावाप्रमाणे जग. "

*अर्थात मनुष्याला जे जमते, जे करायला आवडते तसाच तो जगत असतो, कार्यरत असतो. व याच प्रकृति, ज्ञान, धर्म संदर्भात "स्वधर्म" जीवनमुल्य ठरते. व आवडीचे कार्य धर्मासाठी मिळालेले आहे ही तर संधि आहे, देवाची कृपा(स्वर्गद्वार) आहे.

स्वधर्मम् अपि चावेक्ष्य न विकम्पितुम् अर्हसि।

धर्म्यात् हि युद्धात् श्रेयः अन्यत् क्षत्रियस्य न विद्यते।।(२-३१)

सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धम् इदृशम् ।(२-३२)

Blessed is he who has found his work; let him ask no other blessedness.

Thomas Carlyle

सहजकार्य आवडीचे कार्य बनते. आवडीचे कार्य व्यवसायासाठी मिळणे हेच blessing असते. अर्जुनाचे स्वभावनियत कार्य या संदर्भात "क्षत्रिय" ही ओळख आहे. व समाजातील ओळख (Identity) या संदर्भात स्वधर्म हे जीवनमुल्य ठरते.

शौर्यं तेजो धृतिः दाक्ष्यं युद्धे च अपि पलायनम् ।
दानम् ईश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ।।(१८-४२)

समुहातील Leadership या संदर्भात आवश्यक गुण (Courage, Commitment loyalty) यांत असतात. याशिवाय यांतील "ईश्वरभाव" हा शब्द जगतकल्याण, समुहकल्याण हा संदेश देतो. तर स्वतःची श्रेष्ठता या संदर्भात असलेला " ईश्वरो अहं" हा शब्द असुरसंपत्तिगुण दर्शविते.

ईश्वरोअहं अहं भोगी सिद्धोअहं बलवान सुखी।(१६-१४)

बोध:

जगातील यशस्वि व्यवस्थापन, संघटक यातुन व्यवस्थापन व त्यासाठी आवश्यक Leadership (योजक) याचा हार्वर्ड विद्यापीठात सातत्याने अभ्यास होतो .

जीवनात सुखी व्हावे, श्रेष्ठ व्हावे अशी स्वाभाविक इच्छा असते. व याच आकांक्षा बाळगुन शिक्षणही घेत असतो. पण कोणत्या विशिष्ट कार्यासाठी विशिष्ट गुणाची आवश्यकता असते हे जाणणे आवश्यक असते. वाघाचे कातडे पांघरुन Timid कोल्हा वाघ बनत नाही.

. "Do not be too timid and squeamish about your actions. All life is an experiment. "

—Ralph Waldo Emerson

याच पार्श्वभूमिवर गुणात्मक शिक्षणाची गरज स्पष्ट होते.

State of Art, Determination, Commitment, Courage, Goodness in action, Life values: Self reliance, Swadharma etc.

ही गरज ई. एफ शुमाखर या तत्वज्ञाने Small is Beautiful यातुन स्पष्ट केली. ज्यामुळे वास्तव (What I want?)स्विकार करतो. व्यक्तिमत्व विकासाचा गुणात्मक ज्ञान अविभाज्य अंग

ठरतो. यामुळे विश्वासाने कृति करतो. तर कृतिमध्ये विश्वास नसेल, आवड नसेल तर कष्ट होते, निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान वापरतो.

मनुष्य मी योग्य समजुनच जगत असतो, कार्यरत असतो. किंवा मी योग्य हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. अर्जुनविषादयोगात याच सत्याचे दर्शन आहे. तेंव्हा "ज्ञान" कृतिसाठी कि निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी?याच प्रश्नाने भगवतगीतेची सुरुवात आहे.

*********

२. ३१/३:

"धर्म्यात् हि युद्धात् श्रेयो अन्यत् क्षत्रियस्य न विद्यते"

Part II.

(प्रज्ञावाद Excuses vs. स्वधर्म Self approval)

मनुष्याला स्वातंत्र्य आवडते अर्थात स्वतःच्या मतानुसार जगणे आवडते. याचसाठी संस्कारीत होणे आवश्यक असते. 'स्वतःच्या नियतकार्यावर/निर्णयावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करणे' हा याच संस्काराचा भाग आहे. यामुळे जबाबदारी स्विकारतो. संस्कारीत

नसेल तर आवश्यक (नियत) कार्य टाळले तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर(प्रज्ञावाद) करतो, Excuses बोलतो.

अर्जुनाला आपल्या नियतकार्यात दुःख वाटले म्हणुन कार्य टाळतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी प्रज्ञावाद बोलतो. याच पार्श्वभूमिवर 'असंस्कारीत vs. संस्कारीत' या संदर्भात स्वधर्माचे महत्व भगवतगीतेत सांगीतले.

स्वधर्मम् अपि चावेक्ष्य न विकम्पितुम् अर्हसि।

धर्म्यात् हि युद्धात् श्रेयो अन्यत् क्षत्रियस्य न विद्यते।।(२-३१)

स्वधर्म व धर्म येथे भिन्न अर्थाने आहे.

स्वधर्म १. Self approval २. Tiebreaker ३. State of Art (स्वभावनियत कार्य) अशा विविध अर्थाने स्पष्ट केले आहे. जगातील प्रत्येक मनुष्याला Self approval या संदर्भात स्वधर्माची गरज असते.

'धर्म' या संदर्भात क्षत्रियाने युद्धकार्य करणे हा त्याचा धर्म असे अभिप्रेत आहे. येथे धर्म हा शब्द State of Art(सहजकार्य, स्वभावनियतकार्य) या संदर्भात आहे. प्राचीन काळात राजे महाराजे क्षत्रिय या वर्गातील होते व राजे स्वतः युद्धात भाग

घ्यायचे. त्यांचे कार्य समुहाचे रक्षण, समुह कल्याण होते. या संदर्भात त्यांचे गुणवर्णन आहे.

शौर्यं तेजो धृतिः दाक्ष्य युद्धे च अपि अपलायनम्।
दानम् ईश्वरभावश्च क्षात्रकर्म स्वभावजम् ।।(१८-४३)

अर्थात वर्तमानात व्यवस्थापनात वापरल्या जाणारा Team leader, Leadership हा शब्द, त्याचे आवश्यक गुण याचा बोध होतो.

येथे क्षत्रियाचे समुहरक्षणासाठी युद्ध करणे आवडीचे कार्य होते. आवडीचे कार्य professional व्यवसायासाठी, धर्मासाठी मिळणे ही महान संधी असते. थाॅमस कार्लायिल म्हणतो, ईश्वराकडुन अजुन काय मागायचे आहे?भगवतगीता म्हणते, ही संधी म्हणजे स्वर्गाचे द्वारच उघडे झाले आहे.
यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारम् पावृतम् ।(२-३२)
येथे स्वभावनियत कार्य स्वधर्माशी जोडले, यामुळे स्वभावनियतकार्यच स्वधर्म झाला. व स्वधर्म या संदर्भात सहजकार्य, स्वभावनियतकार्य असे संबोधन आहे.

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतंकार्य कुर्वन्न आप्नोति किल्बिषम् ।।(१८-४७)
सहजं कर्म कौंतेय सदोषम् अपि न त्यज्येत्।
सर्वारम्भा हि दोषेण धुमेन् अग्नि इव आवृताः।।(१८-४८)

अर्थात मनुष्य जे चांगले करु शकतो, त्याचे आवडीचे कार्य आहे, त्याला STATE OF ART या संदर्भात स्वधर्म करणे वर्तमानात दायित्व ठरते. शिक्षणतज्ञ याला गुणात्मक ज्ञान संबोधतात.

"Desire is the key to motivation, but it's determination and commitment to an unrelenting pursuit of your goal - a commitment to excellence - that will enable you to attain the success you seek. "
Mario Andretti

*********

(२-३२)

**************************

यदृच्छया च उपपन्नं स्वर्गद्वारम् अपावृतम् ।

सुखिनः क्षत्रियः पार्थ लभन्ते युद्धम् इदृशम्।।

***********************

(२-३२)/१:

"यदृच्छया च उपपन्नं स्वर्गद्वारम् अपावृतम् "

(जीवनविकासाचे द्वार )

सकारात्मक दृष्टि, चांगलेपणा असेल तर जगातील चांगलेपणा दिसतो, याच दृष्टिमुळे दगडातुन हिरा शोधतो. अडचणीमध्ये विकाससंधी(Stepping Stone) दिसते. चांगलेपणा असल्यामुळेच अर्जुन दुःखी होतो. या घटनेत अडचण जाणवते. पण घटनेतील वास्तव न स्विकारता आपला युद्ध करण्याचा निर्णय बदलवितो.

व्यवहारात मनुष्य निर्णय घेतो. संपुर्ण विचार होवुनच धर्मयुद्धाचा निर्णय झाला असतो. पण हा निर्णय जगतहीताविरोधी आहे, धर्मविरोधी आहे, असा साक्षात्कार अर्जुनाला प्रत्यक्ष युद्ध सुरु होण्यापुर्वी होतो!या क्षणी येथे प्रश्न जगतहितासाठी, धर्मासाठी युद्ध करणे योग्य कि अयोग्य हा नसतोच. तर प्रस्तुत प्रश्न केवळ अर्जुनाच्या मानसिकतेसंदर्भात असतो. अर्जुनाचे समर्थनभाष्य केवळ त्याच्या अशांतीवर केलेला उपाय असतो. अर्जुन व्यक्तिगत प्रश्नाला सामाजिक, धार्मिक प्रश्न करतो.

"धुल थी चेहरेपर हम आईना साफ करते रहे, उम्रभर गालिब यही गलती दोहराते रहे"

समाजात व्यक्तिगत प्रश्नाला सामाजिक प्रश्न करणे राजकिय क्षेत्रात आढळते तर निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी व्यक्तिगत प्रश्नाला सामाजिक प्रश्न करणे मनुष्याची संवय (अज्ञानामुळे )असते. यामुळे हा प्रश्न व्यक्तिगत आहे ही जाणीव वास्तव स्विकारल्यावरच होते. अर्जुन वास्तव स्विकारतो व या (नियत)कार्याने होणारे दुःख कसे मिटेल?हा त्याचा मुख्य प्रश्न पटलावर येतो.

अडचणीत विकासाची संधि असते, ही सकारात्मक दृष्टि असते. येथे अर्जुनाला जाणवलेल्या अडचणीत विकासाची विकासाची

संधि होती. जीवनाच्या Higher level मध्ये प्रवेश होण्यासाठी ईश्वराने दिलेली ही संधि होती. याच Higher levelचे ज्ञान भगवतगीता सांगते. अज्ञानाला ज्ञानाने छेदण्यासाठी चांगलेपणा व ईश्वर यांचे नाते स्पष्ट होते. व "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) हा विकासाचा महामार्ग कळतो.

व्यावहारिक बोध:

जीवनात जगण्याचे Intention चांगले असले तरी मनुष्याला जीवनात अडचणी जाणवतात. मनुष्याच्या विकासासाठी हे (बंद) द्वार असते. ते स्वतःच उघडावे लागते. हे द्वार उघडण्याची किल्ली भगवतगीता देत आहे.

यदृच्छया च उपपन्नं स्वर्गद्वारम् अपावृतम् ।(२-३२)

"The golden opportunity you are seeking is in yourself. It is not in your environment; it is not in luck or chance, or the help of others; it is in yourself alone. "

Orison Swett Marden

**********

(२-३२)/२ :"सुखिनः क्षत्रियः पार्थ लभन्ते युद्धम् इदृशम् "

महाभारतातील युद्धाच्या प्रसंगातुन जीवनाच्या लढाईचे तत्वज्ञान भगवतगीतारुपाने जगासमोर आले. चर्चिल म्हणतो, युद्धाचा इतिहास हा मानवजीवनाच्या लढाईचाच इतिहास असतो. "जीवन लढाई आहे" हे आपणही ऐकलेले असते. पण या लढाईची पार्श्वभुमी काय?अर्थात कशासाठी लढायचे?यातुन काय साध्य करायचे?सुखासाठी आलेले जीवन दुःखात कां ढकलायचे? असे प्रश्न उपस्थित होतात.

मनुष्य सुखासाठी जगतो. वर्तमानातील प्रश्न सुटला कि सुख ही सुखाविषयी(सुखी जीवनाची) संकल्पना असते. पण एक प्रश्न सुटला कि दुसरा तयारच असतो. जीवनभर प्रश्नाची शृंखला संपत नाही. म्हणजे दुःख संपत नाही. याचसाठी भगवतगीता संदेश देते,

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

याच अनुषंगाने प्रश्न सोडविण्यासाठी वर्तमानातील स्थिति कशी असावी?(Approach to Problem) यासाठी भगवतगीता संदेश देते,

"माम् अनुस्मर युध्य च"(८-७)

महाभारताच्या या लढाईत अर्जुनाची निवड, युद्धाचा प्रसंग याद्वारे जीवनाच्या लढाईचे संपुर्ण तत्वज्ञान स्पष्ट झाले आहे. अर्जुनासाठी युद्धाचा प्रसंग हा त्याच्या व्यवसायधर्म या संदर्भात होता. 'State of Art'नुसार त्याला नियतकार्य मिळाले होते. थाॅमस

कार्लायल म्हणतो, सुखी जीवनासाठी आवडीनुसार (प्रकृतिप्रमाणे)व्यवसाय मिळणे भाग्य असते. भगवतगीतेत श्रीकृष्ण अर्जुनाला हेच सत्य सांगतात, "तुला युद्धरुपाने स्वर्गद्वार उघडे झाले आहे. "

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारम् अपावृतं।
सुखिनः क्षत्रियः पार्थ लभन्ते युद्धम् इदृशम् ।।(२-३२)
सुखासाठी प्राप्ति व प्राप्तिसाठी(State of Want) कार्य(State of Art) हा व्यवहार आपण जाणत असतो. व्यवहाराचाच भाग म्हणुन धर्मयुद्ध ठरले असते. पण प्रत्यक्ष कुरुक्षेत्रावर अर्जुन दुःखी होतो, व युद्धाचे नियतकार्य टाळतो.

मनुष्य सुखासाठी जगतो, दुःखाला टाळतो. येथेही अर्जुन दुःखाला टाळतो. युद्धाचे संभाव्य परिणाम त्याला दुःखी करतात. समाधानासाठी(मी योग्य सिद्ध करण्यासाठी)ज्ञान वापरतो. ही अवस्था "सकाम" अर्थात Governed by senses mind(Loeer Self) असते.
जीवनात नैराश्य येणे, कर्म टाळणे(निष्क्रिय असणे)पण मी योग्य सिद्ध करण्यासाठी प्रज्ञावादी भाष्य(समाधानासाठी) करणे. यातुन नकारात्मक व्यक्तिमत्व जन्म घेत असते. सकारात्मक

व्यक्तिमत्वासाठी मनोविज्ञान क्षेत्र जीवनाची लढाई "Lower Self vs Higher Self"असेही दर्शवितात. भगवतगीता कर्मातील "सकाम vs निष्काम" स्थितिचे शास्त्र सांगते.

बुद्धियोगामुळे(मनोवैज्ञानिकाच्या भाषेत) Higher Self, Creative Self क्रियाशील होतो. व कार्यमार्ग दृढ होतो. (Free from barriers). कार्याद्वारे योग साध्य करतो. हेच निष्काम कर्माचे Logic आहे(कार्य समर्पण/फलत्याग).

ईश्वराचा आश्रय बुद्धियोग असतो. ईश्वर Energy आहे, तेज आहे. जगातील संपुर्ण तेजोमय विभूति ईश्वराची Energy दर्शविते.
यत् यत् विभूति मत्सत्वं श्रीमतं उर्जितम् एव वा।
तत् तत् एव गच्छ त्वं मम तेजोअंश संभवम् ।।(१०-४१)
याप्रमाणे जीवनाच्या लढाईचे मुळ तत्वज्ञान(माम् अनुस्मर युध्य च)भगवतगीतेने ज्ञानविज्ञानासह स्पष्ट केले आहे. जे नकारात्मक व्यक्तिमत्व सकारात्मक व्यक्तिमत्वात Transformation करण्यासाठी उपयुक्त ठरते.
************००

(२-३३)

*************************

अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।

ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि।।

*************************

(२-३३)/१:

"अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि?"

(बाह्य व आंतरिक संग्राम)

जीवनात दोन प्रकारचे Chaos(गोंधळ) मनुष्य अनुभवत असतो. एक बाह्य-व्यावहारिक असतो, ज्यासाठी आपण इतरांना, परिस्थितिला दोषी धरतो. दुसरा आंतरिक असतो, ज्यासाठी आपणच केवळ जबाबदार असतो. बाह्य व आंतरिक हे दोन्ही प्रश्न सोडविण्यासाठी "संग्राम" महाभारतात आलेला आहे.

व्यवहारात अधिकार डावलल्या जातात, शोषण होते व गोंधळ उडतो. म्हणुन समुहातील व्यावहारिक गोंधळ मिटविण्यासाठी System असते, धर्म याच Systemचा भाग असतो. पांडवांचा अधिकार डावलल्यामुळे व्यावहारिक गोंधळ मिटविण्यासाठी

धर्मयुद्ध ठरते. (न्याय मिळत नाही म्हणुन रस्त्यावर भांडत नाही तर धर्मयुद्ध ठरते हेच SYSTEM चे सौंदर्य आहे). अर्जुन युद्धक्षेत्रावर येतो व येथे त्याचा आंतरिक गोंधळ जन्म घेतो.

जसे व्यावहारिक गोंधळ मिटविण्यासाठी SYSTEM चा उपयोग होतो, तद्वतच आंतरिक गोंधळ मिटविण्यासाठी SYSTEM असते, ज्याला भगवतगीता highlight करीत आहे. गोंधळ मिटविण्यासाठी SYSTEM असते, पण जेंव्हा बाह्य गोंधळ व आंतरिक गोंधळ यातील भेद कळत नाही तेंव्हा सर्वप्रथम ही सीमारेषा जाणणे आवश्यक असते.

"When an inner situation is not made conscious, it appears outside as fate. "
-Carl Jung

अर्जुन स्वतःला आदर्श (अज्ञान झाकण्यासाठी makeup) ठरविण्यासाठी जे भाष्य बोलतो, ते भाष्य बाह्य गोंधळ व आंतरिक गोंधळ यातील सीमारेषाच पुसुन टाकते, व हा केवळ बाह्य गोंधळाचा विषय आहे असे त्याचे मत बनते. नियोजीत संग्राम हा

बाह्यगोंधळ मिटविण्यासाठीच ठरलेला आहे व तो अयोग्य आहे, धर्मविरोधी आहे असे मत व्यक्त करतो.

अर्जुन वास्तव स्विकारतो, तेंव्हा हा केवळ आपला आंतरिक गोंधळ आहे, या सत्याचा स्विकार करतो. ज्या संग्रामाचे SYSTEM ने प्रयोजन केले आहे, त्यामुळे आपल्याला आंतरिक दुःख होईल याची कबुली देतो.

भगवतगीतेतील मुख्य दोन टप्पे:

बाह्य संग्राम व आंतरिक संग्राम यातील सीमारेषा जाणणे हा भगवतगीतेतील प्रथम टप्पा ठरतो. दुसरा टप्पा "आंतरिक संग्राम" आहे जो भगवतगीतेचा मुख्य विषय आहे. आंतरिक गोंधळ मिटविण्यासाठी SYSTEM वापरली तर शांत चित्ताने युद्ध लढतो. अन्यथा चिंता, क्रोध, भय आदि आंतरिक विकार हावी होतात, व अशांती असते.

*आंतरिक संग्राम:

अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।

ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि॥(२-३३)

१. स्वधर्म:

मनुष्य जीवनमुल्यांचा वापर करुन स्वतःचा स्वधर्म ठरवितो. स्वतःचा स्वधर्म हे स्वातंत्र्य या संदर्भात Self approval असते, मार्गात द्वंद्वातील Tie सोडविण्यासाठी Tiebreaker असते.

अ. स्वधर्माचरण करतांना कार्य ईश्वराला समर्पित करतो, यामुळे निष्ठेने कार्य घडते. यामुळे धर्म या संदर्भात स्वतःचा स्वधर्म हे आंतरिक गोंधळ मिटविण्याचे साधन आहे. त्या अधिकारापासुन वंचित राहशील.

ब. समाजात श्रेष्ठ(महाधनुर्धारी) अशी ओळख आहे, त्याला तडा जाईल. अपकिर्ति होईल. यामुळे लोकांनी स्तुति करावी ("चांगले म्हणावे") अशी इच्छा असली तरी या विपरित निंदा वाट्याला येईल.

क. ज्या पापाच्या भयाने स्वतःच्या भूमिकेचे समर्थन करण्यासाठी धर्मज्ञान वापरले आहे, ते ज्ञानच धर्मविरोधी ठरवेल.

२. आंतरिक संग्रामाचा महामार्ग भगवतगीतेत "अमृतत्वाय कल्पते" (२-१५), "माम अनुस्मर युध्य च"(८-७) याद्वारे स्पष्ट केला आहे.

बुद्धियोगामुळे "अमृतत्वाय कल्पते-अमृतंगमय" हा महामार्ग ठरतो.

ददामि बुद्धियोगं तं येन माम उपयान्ति ते।(१०-१०)

या मार्गावर कार्याचा एकनिश्चय असतो अर्थात विचलित होत नाही. स्वातंत्र्य या संदर्भात कार्य करण्यासाठी "निर्णयाचा अधिकार " ही जागृति भगवतगीता (कर्मण्येवाधिकिरस्ते) करुन देते. कार्याद्वारे योग या शक्तिसाधनेसाठी "योगः कर्मसु कौशलम्" असे कर्मयोगाला/कार्यकौशल्याला भगवतगीता highlight करते. व " Importance" या संदर्भात जेष्ठता दर्शविते.

दुरेण हि अवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय।

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।।(२-४९)

व्यावहारिक बोध:

भगवतगीतेतील युद्धप्रसंग मनुष्यजीवनातील बाह्यगोंधळ व आंतरिक गोंधळ यांतील सीमारेषा स्पष्ट व्हावी यासाठी बाह्यसंग्राम व आंतर्संग्राम याद्वारे दर्शन देत आहे .

*********

(२-३३)/२ :"ततः स्वधर्मं किर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि" (धर्म vs स्वधर्म)

भगवतगीतेचे ज्ञान मुलतः कृतीचे ज्ञान (शास्त्र) आहे. या ज्ञानाला Action culture म्हटले तर या ज्ञानाचा अभाव असला तरी मनुष्य कार्यरत असतोच. (उदा. भिकारी भीक मागतो. )

Action culture साठी ज्ञान-ज्ञानविज्ञानाचा वापर होतो. कार्य करतो. कार्याद्वारे सुख अनुभवतो. पण ज्ञान या संदर्भात निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान वापरणे व कार्यरत होण्यासाठी ज्ञान वापरणे या दोहोत फरक आहे. ज्ञान नसेल तर निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान वापरतो.

कृतीचे ज्ञान या संदर्भात कार्याचा निश्चय महत्वाचा असतो. कार्याचा निश्चय(Determination) या प्रक्रियेत योग्य-अयोग्य जाणणे व प्रत्यक्ष कार्यासाठी निर्णय घेणे हे मुख्य दोन भाग असतात.

प्रत्यक्षात अर्जुनाचे नियतकार्य धर्मयुद्ध म्हणुनच ठरले होते. कार्य execute करतांना निश्चय ढळला असतो. व कार्य योग्य कि अयोग्य या मुद्यावर लक्ष केंद्रित करतो. याचाच अर्थ "योग्य काय" हे कळले तरी कार्य execute करण्यासाठी निश्चयशक्ति महत्वाची असते. या शक्तिचा अभाव असेल तर जे प्रत्यक्षात करीत असतो, ते योग्य कसे? हे सिद्ध करण्यावर मनुष्य लक्ष केंद्रित करतो. अर्थात मनुष्य "योग्य काय?"याच मुद्यावर back होतो. याच वास्तवाचे अर्जुनाच्या भूमिकेतुन दर्शन होते.

धर्म vs स्वधर्म

कृतीसाठी ज्ञान/निश्चयशक्ति या संदर्भात कार्याचा व्यावहारिक पैलु इच्छापुर्तिसाठी कर्म असा असतो. तर कार्याद्वारे भक्ति करुन सुख, शांति, योग (दुःखान्त, निर्भयता) अनुभवणे हा आध्यात्मिक पैलु असतो. धर्म या दोहोंना जोडत असतो. धर्म कर्तव्याची (स्वतःला व इतरांना)जाणिव देते.

येथे अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतांना याच धर्माचे ज्ञान सांगतो. मनुष्य स्वतःसाठी धर्म म्हणजे पुण्यकार्य समजतो. युद्ध केले तर पाप होईल!यावर भगवतगीता वास्तवावर भाष्य करते,

अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।
ततः स्वधर्मं किर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि।।(२-३३)
यांत धर्म, संग्राम, स्वधर्म, किर्ति, पाप हे शब्द आले.

*पुण्यासाठी धर्म हे सामान्य मनुष्य जाणतो, म्हणुन युद्ध करण्याचा धर्म पाळला नाही तर पाप (स्वर्गापासुन वंचीत) होईल असे "कर्तव्य" या संदर्भात भाष्य आहे.

*मनुष्यजीवनात कर्तव्य या संदर्भात दोन प्रकारचे challange असते. एक इतरांचे स्वतःला व दुसरे स्वतःचे स्वतःला. जेंव्हा कर्तव्य या संदर्भात इतर (समाज)धर्माच्या नांवाखाली challange करतो, तेंव्हाच समाजात क्रांतिची बीजे पेरल्या गेली हा इतिहास आहे. वर्तमानात कर्तव्य या संदर्भात इतरांचे challange केवळ व्यावहारिक असते.

येथे अर्जुनाला इतरांनी Challange केलेले नव्हते, तर त्याचे स्वतःचेच स्वतःला challange असते. अर्जुनाला हे Challange आले तेंव्हा तो वास्तव hide करुन निष्क्रियतेचे समर्थन

करण्यासाठी धर्माचा दाखला देतो. येथे धर्माचा उपयोग अज्ञानाला ज्ञान दर्शविण्यासाठी होतो.

वर्तमानातही अयोग्यला योग्य व योग्यला अयोग्य ठरविण्यासाठी अशा धर्मसदृश भाष्याचा उपयोग होतो. स्वतःचे वास्तव न स्विकारता इतरांना challange करीत असतो. मनुष्य जे स्वतः करु शकतो, ते विसरुन इतरांनी काय करावे यावर focus करीत असतो. याचाच परिणाम समाजात संभ्रमाची स्थिति निर्माण होते. या स्थितीत स्वतःला संभ्रमाच्या स्थितीतुन बाहेर काढणे ही स्वतःची Priority असते.
यदा ते मोहकलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति।
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥(२-५२)

*स्वतःचे स्वतःला challange स्विकारण्यासाठी भगवतगीता मनुष्याच्या अधिकाराची, Resourcesची ओळख करुन देते. समाजात काय योग्य यावर भरपुर लिखाण असले, भाष्य असले तरी ते प्रत्यक्ष अंमलात येण्यासाठी व्यक्तिगत निश्चयशक्ति आवश्यक असते. भगवतगीता याच निश्चयशक्तिच्या ज्ञानावर focus करते. याद्वारे भगवतगीता स्वातंत्र्याला (कार्य ठरविण्याचा

अधिकार) highlight करते. याच संदर्भात स्वधर्म, कर्मण्येवाधिकार (निर्णयअधिकार), मोक्ष हे शब्द आलेले आहे.

*धर्माची भूमिका योग्य-अयोग्य ठरविण्यासाठी असते तर स्वधर्म स्वतःच्या निर्णयाची भूमिका(Determination) करते. अर्थात धर्म योग्य-अयोग्य यावर भाष्य करते, तर स्वधर्म निश्चयशक्ति दर्शविते. म्हणुन भगवतगीतेने धर्म या शब्दाला स्वधर्म या शब्दाने Replace केले.

स्वतःच्या मार्गासाठी "स्वधर्म" शब्द स्वातंत्र्य (स्वतःचा ठरविण्याचा अधिकार) या संदर्भात जीवनमुल्य ठरतो.
वर्तमानासाठी भगवतगीतेची ही बहुमुल्य देण आहे.
कारण
मनुष्यजीवनात स्वतःचे स्वतःला Challange प्रत्येक व्यक्ति अनुभवत असतो. यापासुन सुटका नसते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

स्वधर्माचरण ईश्वरभक्तिसाठी कार्यसमर्पण या अर्थाने अभिप्रेत असते. येथे धर्म या संदर्भात कार्याद्वारे ईश्वरभक्ति याला राजधर्म, शाश्वत धर्म म्हटले.

राजविद्या राजगुह्यं पवित्रम् इदम् उत्तमम् ।
प्रत्यक्ष अवगमं धर्म्यं सुसुखं कर्तुं अव्ययम् ।।(९-२)

शाश्वतस्य धर्मस्य सुखस्य एकान्तिस्य च।(१४-२७)

*याप्रमाणे स्वतःचे challange स्विकारण्यासाठी भगवतगीता स्वतःसाठी स्वधर्म शब्द वापरते. हाच शब्द कार्याचा व्यावहारिक पैलु व आध्यात्मिक पैलु याचे Bridging करते. सहजकार्य असलेले स्वतःचे कार्यक्षेत्र दर्शविते. ही मनुष्याची (स्वतःला व समाजाला)ओळख असते. म्हणुन स्वधर्म या संदर्भात म्हटले,

१. स्वधर्म-कार्यक्षेत्र या संदर्भात ओळख:

तुझी समाजात जी ओळख आहे, त्यानुसार आचरण केले नाही तर अपकिर्ति होईल.

२. स्वधर्म - Tiebreaker

स्वधर्म द्वंद्वमुक्तिसाठी Tiebreaker ची भूमिका करते. स्वतःचा मार्ग दृढ होतो. विश्वासाने मार्ग चालतो.

३. स्वधर्म - Self approval

नियतकार्यावर स्वतःची मंजुरी

*********०

(२-३३)/३ :

"ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि"

(Low aim vs. High aim)

मनुष्याच्या जीवनविषयक (विकास, सुख) संकल्पना त्याचे ध्येय (Aim) ठरवीत असते. योगक्षेमासाठी कार्य करणे हे Survival aim असते. धर्माच्या संकल्पना कीर्ति, चांगलेपणा, पुण्यकार्य म्हणुन स्वर्गप्राप्ति अशा असतात. श्रेष्ठ होण्याच्या संकल्पना कीर्ति, धर्म, लोकांनी चांगले म्हणावे अशा स्वरुपाच्या असतात.

धर्म या संदर्भात योग्य-अयोग्य हा द्वन्द्व असतो. द्वन्द्वामुळे धर्माची Advocacy दोन्ही बाजुने होते. ज्या कार्याला अर्जुन पाप

ठरवितो, त्याच कार्याच्या अभावाला अर्थात निष्क्रियतेला श्रीकृष्ण पाप ठरवितात. म्हणुनच चांगले म्हणावे अर्थात कीर्ति या संदर्भात भ्रम होतो.

अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।

ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि।।(२-३३)

अर्थात समाजातील तुझी ओळख तुला कीर्ति देते. पण याच Professional Identity ला धक्का लागेल. अर्थात कीर्तिपासुन वंचित राहशील. तसेच ज्या कार्याची जगतकल्याणासाठी गरज आहे, ते धर्मकार्य टाळणे पापच ठरेल.

योगक्षेमासाठी कार्यरत असला तरी त्यांत कार्य(कर्म) हे साधन महत्वाचे ठरते. श्रेष्ठ होण्यासाठी कार्यरत असला तरी त्यांत "स्वधर्म"(जीवनमुल्य) हे साधन महत्वाचे ठरते. कर्म, स्वधर्म हेच साधन उच्च जीवनाची साधना यांत असते. उच्च जीवनाची साधना या संदर्भात "अमृतत्वाय कल्पते" असे संबोधन आहे. या संदर्भात मोक्ष, जगतकल्याण व यासाठी महान कार्य अर्थात " आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च" ही उच्च जीवनाची साधना असते. यांत High Aim असते. अर्थात श्रेष्ठ होण्यासाठी कार्यरत असला तर High aim (मोक्ष, जगतकल्याणाचे महान कार्य) महत्वाचे आहे.

सार : चांगलेपणा या संदर्भात मनुष्याच्या संकल्पना भ्रामक ठरण्याचे मुख्य कारण त्याच्या श्रेष्ठ होण्याच्या संकल्पनात असते. या संकल्पना Low aim vs. High aim अशा असतात. श्रेष्ठांचा मार्गच भगवतगीता सांगत आहे.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

अर्थात Low aim सकाम ठरते तर High aim निष्काम असते. पहाडावर चढणाऱ्याला मार्गातील अडथळे थांबवत नाही. पण ज्याला चढायचेच नसते, त्याला तेच लहान अडथळे पहाडासमान वाटतात.

"A soul without a high aim is like a ship without a rudder. "

Eileen Caddy

******

(२. ३४)

*******************

अकिर्ति चअपि भूतानि कथयिष्यन्ति ते अव्ययाम् ।

संभावितस्य च अकीर्ति मरणात् अतिरिच्यते।।

*******************

२. ३४/१:

"अकिर्तिं च अपि भूतानि कथयिष्यन्ति ते अव्ययाम् "

(निष्क्रियता)

"Either you run the day or the day runs you. "

Jim Rohnn

मनुष्य निष्क्रियतेचे समर्थन करु शकतो पण जगाचा इतिहास कर्तृत्वच लिहीत असते हे विसरता येत नाही.

मनुष्य स्तुतीने सुखावतो व निंदेने दुःखी होतो. जगाने चांगले म्हणावे या इच्छेने व निंदा करु नये या भयाने निष्क्रिय होणे, ही निष्क्रियता जीवनविकासाला पोषक ठरत नाही. नेमके एखाद्या

मनुष्यात काय चांगले आहे ( विकासाला पोषक) यापेक्षा काय चुक आहे यावर लोकांचे भाष्य असते. अर्जुन ज्या अपकिर्तिच्या भयाने निष्क्रिय होतो ती निष्क्रियतेची स्थितिच अपकिर्तिची ठरते.

भगवतगीता या अवास्तव भयावर भाष्य करते. मनुष्याला त्याचे कर्तृत्व, शुरता, त्याच्यातील चांगलेपणा ओळख देत असते. अर्जुनाला याच संदर्भात(चांगला, शुर) जे ओळखतात, ते पळपुट्या म्हणतील, तुझी किंमत कमी करतील. व जे तुझे विरोधी आहेत, ते तोंडसुख घेतील. जे सामर्थ्य आव्हान ठरले त्याच सामर्थ्याची निंदा करतील. म्हणुन चांगल्या मनुष्यासाठी अपकिर्तिच्या भयाने निष्क्रिय होणे हा चांगलेपणाचाच अपमान ठरतो. हे वास्तव भगवतगीता दर्शवीत आहे.

अकिर्ति च अपि भूतानि कथयिष्यन्ति ते अव्ययाम् ।
संभावितस्य च अकीर्ति मरणात् अतिरिच्यते।।(२-३४)

अर्जुनाला दुःख होते व दुःखाच्या भयाने नियतकर्म टाळतो हे वास्तव असते. व दुःखमुक्ति हाच त्याचा प्रश्न असतो.

निष्क्रियतेला कारण ठरणारी द्वंद्वमुक्ति यावरच भगवतगीतेचे भाष्य आहे.

१. संत कबीरांनी आपल्या स्वभावनियतकर्माला (विणकाम) अध्यात्माशी जोडले, संत गोरा कुंभारांनी आपल्या स्वभावनियत कार्याला अध्यात्माशी जोडले व दोहे, अभंग जगासमोर आले. महाभारतील व्यावहारिक युद्धाला अध्यात्माशी जोडले व भगवतगीता जगासमोर आली. व्यावहारिक युद्ध हे External battle आहे तर अर्जुनातील द्वंद्व हे Internal battle आहे. External battle मध्ये शत्रुपक्ष कौरव असतो तर Internal battle मध्ये शत्रु (द्वंद्वनिर्माता)"काम" म्हटले आहे. म्हणुन निष्काम कर्माचे शास्त्र भगवतगीता सांगत आहे.

२. स्वधर्म

धर्म या संदर्भात युद्ध करणे धर्म कि अधर्म हा द्वंद्व अर्जुनाला भेडसावतो. द्वंद्वमुक्तिसाठी स्वधर्म हा Tiebreaker असतो. येथे स्वधर्म जीवनमुल्य ठरते, म्हणुन नियतकार्याला स्वधर्मात Transform करणे हा एक पर्याय असतो.

३. बुद्धियुक्त (कार्याच्या योग्य अयोग्य यापासुन मुक्ति)

मनुष्याची मानसिक दुर्बलता हीच खरी गरिबी असते. मानसिक Strong होण्यासाठी (दुःखान्त) भगवतगीता कर्मयोग कला सांगत आहे. योग-दुःखान्त (निर्भयता, साहस) साध्य होण्यासाठी बुद्धियुक्त असणे (Activation of Higher consciousness) ज्यात निष्काम कर्म आहे. या मार्गात कार्याचा एकनिश्चय असतो.

बुद्धियुक्तो जहातिह उभेसुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्।।(२-५०)

सार : मनुष्यच (चुकीच्या मानसिकतेमुळे)चांगलेपणाला दुबळे करीत असतो. भगवतगीतेतील अध्यात्मक्षेत्र हे Internal battleचे आहे. येथे स्वतःचा स्वतःशीच संबंध असतो, समाज किंवा समाजातील कोणत्याही व्यक्तिचा हा प्रश्न नसतो. म्हणुन समाजाला दोषी धरण्यात कांहीही अर्थ नसतो.

*****

२. ३४/२:

"संभावितस्य च अकीर्तिः मरणात् अतिरिच्यते"

(Tie and Tiebreaker)

सामान्यतः मनुष्याच्या सुखाच्या संकल्पना भौतिक स्वरुपाच्या (/Senses सुख) असतात. त्याच अनुषंगाने त्याच्या किर्तीच्या संकल्पना बनतात. जसे गरीब हा शब्द आर्थिक पातळी दर्शवितो. श्रीमंत-गरीब, चांगले-वाईट, यशस्वि-अपयशी, शुर-दुबळा, साहसी-पळपुट्या या Polarity संदर्भात श्रीमंत, यशस्वि, चांगले, शुर, साहसी हे शब्द मनुष्याला सुख देतात.

मनुष्य जे करतो, ते तो कां करतो? मानसशास्त्रज्ञांचे उत्तर असते-
Belief-Desire frame

(1. Why people do what they do? what frame being used?

It is “belief-desire” frame. That is, people in everyday situations use both beliefs and desires to explain why people do what they do.

2. The people of this world have long had a tendency to judge most everything in terms of

light vs. darkness,

good vs. evil,

us vs. them

Our lives are filled with these and many other dualities. These dualities can easily lead to a polarization of beliefs and lifestyles. )

"Belief-Desire” frame या संदर्भात लाभ-हानि, कीर्ति-अपकीर्ति इ. Polarity असते. यामुळे द्वन्द्व असतो. यामुळे Tie असतो. येथे Tiebreaker ची गरज असते.

१. अर्जुन आपल्या निष्क्रियतेचे समर्थन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी करतो. आपण लोभाने पापकर्म करीत आहो असे भाष्य करतो. अर्जुनाला प्रत्यक्षात दुःख झाले असते. व त्याचे भाष्य Senses सुखाचा परिणाम असतो. "कीर्तिची इच्छा"(लोकांनी स्तुति करावी, चांगले म्हणावे, वाईट म्हणु नये ) ही संकल्पना Senses सुखाचीच ठरते. याच संदर्भात अर्जुन युद्ध करण्याचे तोटे व युद्ध न करण्याचे फायदे सांगतो. तर श्रीकृष्ण नियतकार्य न करण्याचे तोटे व कार्य करण्याचे फायदे सांगतात.

नियतकार्यावर स्वधर्माचरणाचे शिक्कामोर्तब झाले कि, ते स्वतःचे कार्य (Self approval) बनते. स्वधर्माचरण न आचरणे म्हणजे

धर्माचे आचरण न करणे, अर्थात ते पापच ठरेल. तसेच निंदा होईल, अपकीर्ति होईल.

ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि।।(२-३४)

अकीर्तिं च अपि भूतानि कथयिष्यन्ति ते अव्ययाम्।
संभावितस्य च अकीर्ति मरणात् अतिरिच्यते।।(२-३५)

अपकिर्ती स्वतःला चांगल्या समजणाऱ्या व समाजात ओळख असलेल्या मनुष्यासाठी मरणाहुनही वेदनाजनक असते.

२. बुद्धियोग :

भगवतगीतेने द्वन्द्वमुक्तिचा मार्ग सांगितला. ही बुद्धियोग निष्ठा असते. अर्थात कर्मयोग याच निष्ठेत येतो.

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिःयोगे तु इमां शृणु।
बुद् ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।।(२-३९)

. (जगतचालक )ईश्वरज्ञान जाणुन त्याच्या भक्तिने बुद्धियोग प्राप्त होतो.

अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।(१०-८)

...

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते॥(१०-१०)

बुद्धियोगामुळे व्यावहारिक जीवनमार्ग(सकाम /द्वन्द्व) अमृतंगमय (निष्काम, निर्द्वन्द्व) या मार्गात Transform होते. या मार्गावर कार्याचा एकनिश्चय असतो. हाच मार्ग शक्तिसाधनेचा (योग-दुःखान्त) असतो.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्माद् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥(२-५०)

*******

(२-३५)

*************************

भयात् रणात् उपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः।

येषां च त्वम् बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ।।

*************************

(२-३५)/१:"भयात् रणात् उपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः"

(Breaking barrier of fear)

पंचतंत्रातील गोष्ट:

"एक सिंहिण आपल्या पिलांबरोबर कोल्ह्याच्या पिलाचे संगोपन करते. पिले मोठी झाल्यावर वनात बागडत असता हत्ती दिसतो. सिंहिणीची मुले शिकार मिळाली म्हणुन हर्षित होतात, तर कोल्हा पळ काढतो. सिंहिणीला म्हणतो, मुलांनी माझे ऐकले नाही, हत्ती त्यांना मारुन टाकेल!तेंव्हा सिंहिण हसते व म्हणते, मी तुझे माझ्या मुलांसमानच पालन केले, समान विद्या दिली. पण हत्तीची शिकार करणे तुझ्या DNA त नाही. तु आता येथुन स्वतंत्र आहे, आपल्या स्वभावानुसार जग. अन्यथा माझी मुले तुझीच शिकार करेल!

यत् कुले त्वम् उत्पन्नं गजः तत्र न हन्यते।

१. सिंहाचा(कार्य) धर्म कोल्ह्यासाठी भयावह असतो. "परधर्मो भयावहः" याचे प्रात्यक्षिक वरील घटनेत स्पष्ट होते. कर्तृत्व याच संदर्भात स्वतःच्या स्वधर्माचे (स्वभावनियत कार्य) महत्व भगवतगीता स्पष्ट करते.

२. मनुष्यजीवनांत कर्तृत्व या संदर्भात भय मानसिक दुर्बलता ठरते. याच भयामुळे Timidness असतो. भयाचे विरुद्ध आत्मविश्वास असतो. याच आत्मविश्वासामुळे (स्वतःच्या शक्तिवर विश्वास) सिंह वनराज ठरतो. जीवनविकासात भय अडथळा ठरते. याच भयावर विजय मिळविण्याचे शास्त्र भगवतगीता" धर्म " या नांवाखाली सांगत आहे.

कर्तृत्वानेच अर्जुनाची महारथी अशी समाजात ओळख असते. त्याला स्वतःलाही आपल्या कर्तृत्वावर विश्वास असतो. पण कार्य execute करण्याची प्रत्यक्ष वेळ आली असता कर्तव्यापासुन परावृत्त होतो. अर्जुनाला स्वकियांना मारणे क्लेशदायी वाटते. एकीकडे ही शोकग्रस्त अवस्था असते, तर दुसरीकडे त्याचे कर्तव्य(युद्ध करण्याची जबाबदारी)असते. अशा अवस्थेत तो भयभित होतो.

कारण कांहिही असो, समाजासाठी मात्र निष्क्रियतेची भूमिका अपकिर्तिकारक ठरणार हे सत्य श्रीकृष्ण दर्शवुन देतात. व याच "दर्शनी"भयाचा उल्लेख "स्वधर्माचरण"या "सांख्य" भागात श्रीकृष्ण करतात. हा उल्लेख किर्ति संदर्भात असतो.

भयात् रणात् उपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः।
येषां च त्वम् बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ।।(२-३५)

नियतकार्य स्वधर्म जाणुन केले तर अपकिर्ति होणार नाही. जिंकलास तर राज्य भोगशील व मृत्यु आला तर स्वर्ग मिळेल.

याप्रमाणे कर्म करण्यासाठी स्वधर्माचरणाची ही एक निष्ठा असते. दुसरी निष्ठा कर्मयोगाची असते(कर्मयोगेन योगीनाम् ) . यांत स्पष्टपणे भयावर विजय मिळविण्याचे शास्त्र आहे.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

याच शास्त्रात निर्णयअधिकार हा मनुष्याचा Bornfree अधिकार दर्शविला आहे. कार्याचा दृढनिश्चय(निश्चयाचे बळ,

Determination) हा या शास्त्राचा पाया आहे. मनुष्य दुःख, भय, संशय यामुळे कार्याच्या योग्य-अयोग्य या द्वंद्वात सापडतो. यामुळेच अर्जुन चांगले-वाईट कार्य याविषयी समर्थनभाष्य करतो. प्रकृतिमध्ये कार्य(State of art) हा Resource असतो, तर द्वंद्व Barrier (परिपन्थिनौ) ठरतो. याच द्वंद्वापासुन मुक्तिसाठी बुद्धियोगनिष्ठा असते.

बुद्धियुक्तो जहातिह उभेसुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

"Choice is the basis of every part of your existence, but so is fear. The difference is, choice creates movement, where fear limits movement. "
Réné Gaudette

********

२. ३५/२ :
"येषां च त्वम् बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् "
(जीवनमुल्ये Lifevalues)

मनुष्यजीवन कर्माने बद्ध आहे. (कर्मानुबंधिनी मनुष्यलोके). भगवतगीतेत व्यवहार व त्यातील मुल्यांचे महत्व highlight केले आहे.

मनुष्याचा एखादे कार्य करण्याचा निर्णय होतो, त्यासंबंधाने वचन बोलतो. प्रत्यक्ष implementation ची वेळ आली असता ती वेळ चुकते तेंव्हा तो excuses बोलतो. हीच घटना भगवतगीतेत घेतलेली आहे.

रामायणात दशरथ महाराजांनी कैकेयीला वचन दिले. याच वचनाचा कैकेयीने उपयोग केला. महाराजांना मात्र वचन पाळणे त्यांचे जीवावर बेतले. रामायणातील ही घटना महत्वाची आहे. कारण "प्राण जाई पर वचन न जाई" याद्वारे वचनमुल्य रघुवंशाची ओळख असते. वचनमुल्याला येथे highlight केले आहे.

महाभारतात अर्जुनाचे नियतकार्य ठरले असते. हे कार्य committed असते. यामुळे हेच कार्य अर्जुनाचा "स्वधर्म" ठरतो. जसे वचन या मुल्यामुळे इतर विश्वास ठेवतात. अर्जुनाची "क्षत्रिय"/महाधनुर्धारी ही ओळख असते. स्वधर्म committed कार्य अर्थात अप्रत्यक्षपणे कार्याप्रति वचन असते. यामुळे लोकांचा विश्वास असतो. (अर्जुन है तो नामुमकिन नही).

वचनपालन न केल्यामुळे किंवा स्वधर्माचरण न आचरल्यामुळे विश्वासाला तडे जातात. यामुळे अपकिर्ति होते.

येषां च त्वम् बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ।(२-३५)

सकाम कर्मामुळे भय, संशय असतो. (यामुळेच अर्जुन दुःखी होतो. )मुल्याला महत्व दिल्यामुळे निष्काम कर्म (निष्ठेने आचरण) आचरण करतो. म्हणुन स्वधर्म येथे व्यवहारातील मुल्य ठरते.

बुद्धांनी Philosophy सांगितली. जे लोकांना समजणार नाही, त्या विषयात गुंतविले नाही. तसेच भगवतगीतेत व्यवहाराला व त्यातील जीवनमुल्यांना महत्व दिले आहे.

१. आत्मा-परमात्मा हा विषय Technical आहे. Consciousness या संदर्भात हा विषय घेतला आहे. यामुळे मनोवश vs. आत्मवश या स्थितितील भेद स्पष्ट होतो.

२. ईश्वरभक्ति या संदर्भात आर्त, अर्थार्थि, जिज्ञासा व ज्ञानी हे चार स्तर स्पष्ट केले. ईश्वरश्रद्ध मनुष्याला यातील ज्ञानी होण्याची Philosophy सांगितली.

३. समाजात चांगलेपणा हा महत्वाचा विषय असतो. Excuses बोलतांना मनुष्य चांगलेपणा संबंधातील आदर्शाचे सहाय्य घेत असतो. यामुळे चांगलेपणा या संदर्भातच अज्ञान असते.

चांगलेपणाचा संबंध "सत" व दैवी गुणाशी असतो. याच संदर्भात सत, रज, तम हे प्रकृतिगुण व दैवी व असुरी संपत्तिगुण भगवतगीता स्पष्ट करते.

चांगलेपणा कमजोर झाला तर जगात असुरी गुण हावी होतो. म्हणुन चांगलेपणा कमजोर होवु नये, सक्षम व्हावा यासाठी भगवतगीतेने Exlusive पाउल उचललेले आहे.

निर्द्वन्द्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।(२-४५)

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव।(१६-५)

"Discouragement, fear, doubt, lack of self-confidence, are the germs which have killed the prosperity and happiness of tens of thousands of people. "

Orison Swett Marden

*******

(२. ३६)

*************************

अवाच्यवादांश्च बहुन वदिष्यन्ति तव अहिताः।

निंदन्तिः तव सामर्थ्यं ततः दुःखतरं नु किम् ॥

*************************

(२. ३६) :

"अवाच्य वादांश्च बहून् वदिष्यन्ति तव अहिताः"

(जगातील टिका करण्याची संवय vs सक्षमता)

दुसऱ्यातील दोष काढुन टिका करणे जगातील सर्वात सोपी संवय असते. टिकाकार शत्रु जर आहे तर ते(शत्रु) तिखटमीठ लावुनच बोलणार!

अवाच्य वादांश्च बहून् वदिष्यन्ति तव अहिताः।

निन्दंति तव सामर्थ्यं ततः दुःखतर नु किम् ॥(२-३६)

मनुष्य किर्तीची(आपली स्तुती व्हावी ही इच्छा) इच्छा करतो. जरी अर्जुन चांगलेपणा, धर्म याचे नांवाखाली निष्क्रिय होणे श्रेयस्कर समजतो. पण जगाच्या संवयीनुसार या युद्धात निष्क्रिय

झाले तर तुझ्या वाट्याला अपकिर्ती येणार याविषयी श्रीकृष्ण येथे अर्जुनाला सावध करीत आहे.

मनुष्य यशस्वि झाला तर आपली पाठ थोपटुन घेतो, अयशस्वि झाला तर जगावर दोष ढकलतो. व जग चांगले कि वाईट हा प्रश्न उपस्थित होतो.

जग चांगले कि वाईट हा प्रश्नच गौण असतो. स्वतः संस्कारीत आहे काय? हाच खरा प्रश्न असतो. संस्कारीत असेल तर जग चांगलेच वाटते व असंस्कारीत असेल तर जग वाईट दिसते.
वासुदेवः सर्वम् इति स महात्मा सुदुर्लभः।(७-१९)
अर्थात येथे खरा प्रश्न असतो, भगवतगीतेला येथे(जग चांगले हे Perception) अभिप्रेत असलेला संस्कार कोणता?

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं॥(२-६६)

अर्थात स्वतःला सक्षम करणे यासाठी संस्कार असतात. या संदर्भात जीवनमुल्ये (स्वावलंबि असणे, वचन पालन संवय,

स्वधर्म) महत्वाची ठरतात. यामुळे समाज विश्वास ठेवतो. असंस्कारीत परावलंबि, वचनपालन न करणारा, स्वधर्म टाळणारा असतो. यामुळे त्याची समाजात जी ओळख असते, त्याला तडा जातो. अर्थात अपकिर्तीचे कारण संस्कारहीनताच असते.
यामुळेच अशांति असते.

सार :

स्वतः जगण्यास सक्षम व्हा हाच संदेश भगवतगीता देत आहे. ईश्वराचा अंशच त्याच्या हृदयात आहे. व हा ईश्वर जीवनाची लढाई लढण्यास सक्षम करतो. याच लढाईसाठी आवश्यक संस्काराला "युक्त" संबोधले आहे.
तस्माद् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(६-७)

"We are all one Energy Stream, but what makes the separations or distinguishes the differences is perspective. You are a unique and individual perspective. "
Abraham-Hicks

*******

२. ३६:

"निंदन्ति तव सामर्थ्यं ततः दुःखतरं नु किम् ?"

(Determination vs. Devotion)

"Determination makes you willing to do and determines what you are willing to do. Thus, determination is the impetus for persistence and perseverance for taking action. "

Dorothy Wehunt,

*योग्य असणे ही गरज :

सामर्थ्याचा जयजयकार होतो, दुर्बलतेचा नव्हे. किर्ति किंवा लोकांनी स्तुति करावी ही मनुष्याची गरज असते तेंव्हा लोकांनी वाईट म्हणु नये, निंदा करु नये ही सुद्धा मनुष्याची अप्रत्यक्ष गरज बनते.

स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी अर्जुनाच्या Thinking Process मध्ये असा विचार डोकावतो कि, हे युद्ध लोभापायी

ठरले आहे म्हणुन कुलक्षयाचे पापावर संपुर्णपणे दुर्लक्ष झाले आहे.

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहत चेतसः।
कुलक्षयंकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥(१-३८)

स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी अर्जुनाचा हा प्रयास असतो. म्हणुन स्वतः योग्य असणे ही मनुष्याची खरी गरज बनते.

श्रेष्ठ मार्गावर चालतांना विचलित होत नाही, ते "अमृतत्वाय कल्पते" या Standard मार्गावर असतात.
(समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते)याच अनुषंगाने "कर्म" या संदर्भात महत्वाच्या दोन निष्ठा सांगितल्या.

कर्मात Determintion (कर्माचा निश्चय) व Devotion (निष्ठा) हे दोन महत्वाचे पैलु असतात. योग्य-अयोग्य या संदर्भात Determination असते, तर साधना, विकास या संदर्भात Devotion ही Priority असते.

१. धर्म-अधर्म या संदर्भात स्वर्ग-नरक, पाप-पुण्य ही अर्जुनाची Belief system असते. या Belief system नुसार "योग्य" होण्यासाठी स्वधर्माचरण हा पहिला मार्ग दिला.

समाजात योग्य-अयोग्य या अनुषंगाने किर्ति-अपकिर्ति, चांगले-वाईट यावर लोक चर्चा करीत असतात. जेंव्हा चांगलेपणाला न्याय मिळत नाही असे निदर्शनास येते, तेंव्हा समाजव्यवस्था, काळ(कलियुग) यावर blame होतो. रामायणात या अवस्थेला ईश्वरगति म्हटले.

और करै अपराधु कोउ और पाव फल भोगु।
अति बिचित्र भगवंत गति को जग जानै जोगु।।(अयोध्याकांड ७७)

अर्जुन चांगला असुनही आपण वाईट ठरु नये ही त्याची विचारसरणी व्यर्थ ठरते. जे दुर्बल आहेत, निष्क्रिय आहेत त्यांचे जीवन केवळ Survival साठी असते. त्यांची विचारसरणी Survival साठीच असते. अर्जुनाची मात्र समाजात "विशिष्ट ओळख" असते. या ओळखीला तडे जाणार, तुझे समर्थक तुला भ्याड ठरवतील तर निंदक, शत्रुंना अपकिर्तिची संधीच मिळेल.
अवाच्यवादांश्च बहुन वदिष्यन्ति तव अहिताः।
निंदन्तिः तव सामर्थ्यं ततः दुःखतरं नु किम् ।।(२-३६)

म्हणुन Determination साठी योग्य-अयोग्य या संदर्भात स्वधर्म या जीवनमुल्याचे महत्व जाणणे आवश्यक असते.

२. कर्माचा दुसरा पैलु Devotion असते, अर्थात निष्ठेने कार्य करणे. यांत योग्य-अयोग्य या भ्रमातुन मुक्त असणे आवश्यक असते. एखादे चांगले कर्म (स्तुती किंवा लाभाची पर्वा न करता) केले तर योग्य-अयोग्य या भ्रमापासुन मुक्त होतो. अर्थात निर्द्वन्द्व असतो.

अर्जुन चांगला असतो तरी द्वन्द्ववश होतो, म्हणुन निर्द्वन्द्व होण्यासाठी बुद्धियोगनिष्ठा सांगितली. कर्मासाठी स्वधर्माचरण सांख्यनिष्ठा असते, तर कर्मयोगासाठी बुद्धियोगनिष्ठा म्हटले आहे.

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिःयोगे तु इमां शृणु।
बुद्ध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।।(२-३९)

या मार्गात स्वर्ग-नरक ही संकल्पना/Belief system उपयुक्त ठरत नाही, कारण या मार्गात स्वर्ग-नरक ही संकल्पना सकाम ठरत असते. यामुळे कार्याचा एकनिश्चय होत नाही. कर्मयोगात निष्काम कर्म असते, कार्याचा एकनिश्चय असणे हा कर्मयोगाचा पाया

आहे. याच अनुषंगाने मार्गाचे प्रयोजन भगवतगीता सांगते.
अर्जुनाला प्रस्थापीत Belief system पासुन मुक्त करण्यासाठी या मार्गाचे प्रयोजन स्पष्ट होते.

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन।
निर्द्वन्द्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।।(२-४५)

* चांगलेपणा आहे तर "नित्यसत्वस्थो"(Mode of Sat, Spiritual existence) असावे.

*कार्याद्वारे भक्ति या संदर्भात निष्काम कर्म(फल ईश्वराला समर्पण) अभिप्रेत आहे.

*योग्य-अयोग्य चा Tie बुद्धियोगामुळे सुटतो. जीवनयात्रा Standard मार्गावर(अमृतत्वाय कल्पते) असते.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

कार्याद्वारे भक्ति यात कार्याचा एकनिश्चय असतो म्हणुन निर्द्वन्द्व हा शब्द Determination व Devotion या दोन्ही संदर्भात येतो.

"True strength lies in submission which permits one to dedicate his life, through devotion, to something beyond himself. "

Henry Miller

********

(२-३७)

*************************

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।

तस्माद् उत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः।।

*************************

(२-३७)/१:

"हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्"

“Many people are alive but don’t touch the miracle of being alive. ”

– Thích Nhất Hạnh

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।

तस्माद् उत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः।।(२-३७)

नियतकार्य केले तर (परिणाम संदर्भात) दोन्हीकडुन तुझाच लाभ आहे. युद्धात जिंकलास तर राज्य भोगशील व मृत्यु आला तर स्वर्गगति मिळेल. पण कार्य न केले तर दोन्हीकडुन तुझेच नुकसान आहे. राज्य तर मिळणारच नाही पण या लोकी अपकिर्ति मात्र

होईल व परलोकी स्वर्गापासुन वंचीत राहशील. ज्याचे दुःख स्वाभिमानी, श्रेष्ठ पुरुषासाठी मृत्युपेक्षाही भयावह असेल.

ततः स्वधर्मं कीर्तिं च हीत्वा पापम् अवाप्स्यसि।(२-३३)

भगवतगीता येथे अर्जुनाच्या (Belief systemची मानसिकता ) मानसिकतेनुसार, त्याच्या शंकेचे केवळ निराकरण करते. पण भगवतगीतेचा मुळ हेतु स्वर्ग-नरक असलेला धर्म highlight करणे हा नाही. कर्माचे महत्व highlight करण्यासाठी "कर्म" या संदर्भातील स्वधर्मनिष्ठा व बुद्धियोगनिष्ठा(कर्मयोग) यांतील स्वधर्माचरण या भागातील हा उल्लेख आहे.

निष्क्रियतेचे समर्थन करुन स्वतःला आदर्श दर्शविण्याचा प्रयत्न करणे ही समाजातील शोकांतिका असते. अर्जुन कर्माचा संबंध प्राप्तिशी जोडतो व मला कांही नको ही भूमिका घेवुन युद्ध करणे पाप आहे हे सिद्ध करुन नियतकार्य टाळतो. ही सकाम मानसिक स्थिती असते. समाजातील व्यवहारधर्मात चांगले-वाईट, योग्य-अयोग्य या आधारावर भाष्य होते, निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी हाच आधार घेतल्या जातो.

दुष्कृत्य करणारे/भ्रष्टाचारी कुणाची परवानगी घेवुन कर्म करीत नाही. याउलट जे चांगले आहेत ते लोक कर्म आवश्यक आहे हे जाणुनही कर्मात संशय, भय असल्यामुळे कर्म टाळत असतील तर निष्क्रियतेचे समर्थन करण्याशिवाय पर्याय त्यांना आढळत नाही.

चांगल्या मनुष्याला मानसिक दुर्बलता अशोभनिय आहे. ही अर्जुनाला समज मिळते. याचाच अर्थ भगवतगीता योग्य जीवनमार्ग ठरविण्यासाठी मानसिक दुर्बलता व सक्षमता हा आधार घेत आहे. मानसिक दुर्बलतेमुळे निष्क्रियतेचे समर्थन सहज होते. अर्जुन पापभयामुळे युद्ध करणे यालाच पाप ठरवितो.

अर्जुन वास्तव स्विकारतो. युद्ध करणे योग्य कसे?या युद्धामुळे माझ्या दुःखावर मात कशी होईल?अर्जुनाच्या याच प्रश्नात उत्तर व भगवतगीतेचा मुळ हेतु याचे रहस्य आहे. मानसिक दुर्बलतेवर विजय मिळविण्यासाठी योग(दुःखान्त) व यासाठी कार्यकौशल्य अर्थात "योगः कर्मसु कौशलम्"साध्य करणे . या मार्गात कार्याचा एकनिश्चय असतो. चंचलतेमुळे निश्चय होत नाही. बुद्धियुक्त मात्र योग्य-अयोग्य या द्वंद्वापासुन मुक्त असतो.

बुद्धियुक्तो जहातीह उभेसुकृत दुष्कृते।

तस्माद् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

व्यावहारिक बोध:

"To live like a lion for a day is far better than to live for a hundred years like a jackal. "हे वाक्य Boldness, Courage, निर्भयता या शक्ति संदर्भात जगप्रसिद्ध आहे. भगवतगीता याच शक्तिच्या रहस्याला highlight करीत आहे. जीवनाची higher level या संदर्भात हे रहस्य जाणुन घेणे आवश्यक आहे. तेंव्हाच"अमृतत्वाय कल्पते" या मार्गाचे महत्व कळेल.

क्लैब्यं मास्म गमः पार्थ न एतद् त्वयि उपपद्यते।(२-३)

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

***००००००

(२-३७)/२

:"तस्मात् उत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः"

जीवन लढाई आहे, तर हे जग लढाईचे मैदान(कुरुक्षेत्र) आहे. लढाईसाठी नेहमी सतर्क(मानसिक तयारी)असावे लागते. या लढाईचे स्वरुप आव्हान (Challange ) असते. हे Challange दोन प्रकारचे असते. जेंव्हा इतर Challange करतात, तेंव्हा तो व्यवहाराचा विषय असतो. व स्वतःचे स्वतःलाच Challange असते, तेंव्हा तो गुणात्मक ज्ञानाचा(जीवनज्ञान) विषय ठरतो.

कौरवपक्षाचे पांडवांना Challange होते, म्हणुन धर्मयुद्ध ठरले. हा व्यवहाराचा विषय होता. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर आल्यावर अर्जुनाला स्वतःचेच Challange मिळते. हाच भगवतगीतेचा(गुणात्मक ज्ञान/जीवनज्ञान) विषय बनतो.

१. युद्धामुळे शोक येईल हे जाणवल्यामुळे अर्जुन युद्ध टाळतो व निक्रियतेचे समर्थन करतो व यासाठी वापरलेले ज्ञान हाच धर्म आहे असे भाष्य करतो.

२. वास्तव स्विकारतो, तेंव्हा Committed नियतकार्य करणे योग्य वा अयोग्य हे Challange त्याला असते. मनुष्य प्राप्तिसाठी

कर्म करतो, हे जाणुन अर्जुन म्हणतो, आपण जे कार्य करणार आहो, त्या कार्याने देवाचे जरी राज्य मिळाले तरी शोक कसा जाईल हे कळत नाही. याच भाष्यात प्रश्न असतो व उत्तरही असते. याच अनुषंगाने जीवन लढाई आहे, युद्ध कर, कर्म कर, योगी हो. असे शब्द वारंवार आले आहेत.

तस्मात् उत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ।(२-३७)

मनुष्याला सुख हवे, यासाठी कार्यरत असतो पण याच प्रक्रियेत दुःख येते, प्रश्न येतात. जीवनज्ञान नसेल तर या प्रश्नामुळे चिंता येते, भय वाटते. अर्थात" लढण्यापुर्वीच लढाई हरलेला असतो". या मानसिकतेला समाज नकारात्मक, निराश व्यक्तिमत्व म्हणुन ओळखतो. यांत आत्मविश्वासाचा अभाव असतो. म्हणुन नित्य आत्मविश्वास असणे(चिंता, भयमुक्त असणे) यासाठी नित्य "योगी हो "या शब्दाचे प्रयोजन आहे.

तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)
कार्याद्वारे योगी होणे हा कर्मयोग सांगितला. यासाठी कार्यकौशल्य, स्वतःचा मार्ग याचे रहस्य सांगीतले, ज्यात कार्याचा

निश्चय असतो व यासाठी(चंचलत्वमुक्ति) बुद्धियोग(ईश्वराचा आश्रय)सांगितला.

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(८-७)

अर्थात जीवनात नित्य आत्मविश्वास असणे, कार्यसंस्कारीत असणे, यामुळे प्रश्न आले तरी ते कार्यसंधी ठरतात व वरच्या पायरीवर प्रवास करण्याची संधी मिळते.

"You can have anything you want in life, you must be willing to conquer the challenge. "

Lailah Gifty Akita

*********

(२-३८)

*************************

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ।

ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापं अवाप्स्यसि।।

*************************

(२-३८):"सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ"

(Duality vs Excellence/Devotion/Loyalty)

"The quality of a person's life is in direct proportion to their commitment to excellence, regardless of their chosen field of endeavor. "

-Vince Lombardi

व्यवहारात मनुष्याला लाभ(Profit)झाला, यश (Success) मिळाले तर आनंद मिळतो, सुख लाभते. तर नुकसान झाले,

अपयश आले तर दुःखी होतो. व्यक्तिगत व्यवहारात याच (लाभ-हानि, यश-अपयश) आधारावर मनुष्य योग्य-अयोग्य या द्वंद्वाच्या(इच्छा-द्वेष) जाळयात सापडतो. समाजात याच(द्वंद्वाच्या) आधारावर लोक (मनुष्याच्या क्षमतेचे मुल्यमापन ) भाष्य करतात. अर्थात मनुष्याच्या कार्याची दृढता(दृढनिश्चय) नष्ट होण्याचे कारण हा द्वंद्वच असतो, व निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी याच द्वंद्वाचा (चांगले-वाईट) आधार घेतो.

अर्जुन ज्या निष्ठेने नियतकार्य (Commitment) स्विकारतो व युद्धक्षेत्रावर हजर होतो, त्याच निष्ठेने (Purpose Loyalty) कार्य करणे त्याचे दायित्व ठरते. पण तो द्वंद्वाच्या जाळयात सापडतो. याच द्वंद्वाला आश्रय देवुन जगणे मनुष्यजीवनाची सामान्य अवस्था असते.

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप।।(७-२७)

तर याच द्वंद्वावर मात करण्यासाठी भगवतगीता चांगलेपणा, ईश्वरभक्ति याचा उपयोग सांगते.

एषा तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः॥(७-२८)

येथे कार्याची निष्ठा(Purpose loyalty) महत्वाची असते. जे कार्य करतो ते निष्ठेने करणे(Excellence) ही Priority असते. याचसाठी चांगलेपणाचे महत्व (Divine दैवी) भगवतगीता highlight करते, ईश्वराचा आश्रय ज्ञानाचा आश्रय असतो. यामुळे कार्याचा दृढनिश्चय होतो. कार्यातुन योग (मानसिक शक्ति, दुःखान्त, निर्भयता) साध्य करणे याला भगवतगीता Priority देते. यासाठी बुद्धियोगाचे महत्व highlight करते.
बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।(२-४९)

व्यावहारिक बोध:

What is your Priority?

एखाद्या संघटनेचे मुल्यमापन करतांना त्याचा योजक(Orgonizer, Leader) हाच कारणीभूत आहे अशी लोकांची धारणा असते. म्हणुन व्यक्तिगत यश-अपयश, लाभ-हानि याला मनुष्य Priority देतो, व द्वंद्वाच्या जाळयात सापडतो. भगवतगीता Purpose loyalty(निष्ठा)/Excellence याला

महत्व देते. व यासाठी स्वधर्म (Tiebreaker/Commitment) महत्व highlight करते.

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापं अवाप्स्यसि॥(२-३८)

"Desire is the key to motivation, but it's determination and commitment to an unrelenting pursuit of your goal - a commitment to excellence - that will enable you to attain the success you seek. "

Mario Andretti

*******

२. ३८:/२

"ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापम् अवाप्स्यसि"

(Non violence)

भगवतगीता अहिंसा दैवी गुणसंपत्ति म्हणत आहे, !दुसरीकडे अर्जुनाच्या नियतकार्यात थेट हिंसा आहे. या Tieचे निराकरण करण्यासाठी ही सर्वश्रुत असणारी

कथा बोधप्रद आहे.

"एक संन्यासी एका झाडाखाली झोपलेला असतो. त्यावर बसलेल्या कावळ्याची घाण त्याच्या शरीरावर पडते. संन्यासी क्रोध व्यक्त करतो आणि कावळा भस्म होतो. संन्याशाला त्याच्या अनाकलनीय शक्तिची जाणीव होते. अभिमानाने गावात जातो. एका घरी भीक्षा मागतो . बऱ्याच वेळानंतर गृहिणी भिक्षा आणते. उशीर झाल्यामुळे संन्यासी ताणलेल्या डोळ्याने तिच्याकडे पहातो! गृहिणी म्हणते, ' मी भस्म होणारा कावळा नाही. मी आजारी पतीच्या शुश्रुषेत व्यस्त होती. ' संन्यासी क्षमा मागतो आणि ज्ञानाची अपेक्षा करते. गृहिणी त्याला एका खाटीकाकडे ज्ञान मिळविण्यासाठी पाठवते. खाटिक कामात व्यस्त असतो, तो म्हणतो, तुला अमुक बाईने पाठविले आहे, त्याला बसण्यास सांगतो . एकापेक्षा एक वरचढ असणारे ज्ञानी पाहुन संन्यासी खजिल होतो. त्याला आपले अज्ञान कळते. "

आपापले नियतकार्य भक्तिभावाने (ईश्वराला समर्पित) करणे . अर्थात स्वधर्माचरण करणे, यामुळे परिणामाच्या भयापासुन मुक्त असतो. सुख-दुःख, लाभ-हानि, जय-पराजय या द्वंद्वापासुन मुक्त असतो. ज्ञानसाधनेचा हा मार्ग आहे. हाच अर्जुनाला संदेश मिळतो.

नियतकार्य टाळणे म्हणजे स्वधर्माचरण टाळणे, अपकिर्तिचे, पापाचे कारण बनते.

अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि।।(२-३३)

सुखदुःखे समे कृत्वा लाभ-अलाभौ जय-अजयौ।
ततः युद्धाय युज्यस्व नैवं पापम् अवाप्स्यसि।।(२-३८)

स्वधर्माचरण म्हणजे आपापले नियतकार्य निष्ठेने (Excellence) करणे. जी मुळ प्रवृत्ति सृष्टिचा उगम आहे (ईश्वर), आपापल्या कर्माने त्याची भक्ति करणे. त्याच मुळ प्रवृत्तिकडे जीवनविकासाचा प्रवास असतो. (अमृतत्वाय कल्पते)हा विकासाचा Standard मार्ग असतो. ही शक्तिची साधना ठरते.

यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम्।
स्वकर्मणा तमभि अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।।(१८-४)

******

(२-३९)

***********************

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिः योगे तु इमां शृणु।

बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि॥

*************************

(२-३९)/१:

"एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिः योगे तु इमां शृणु"

(MasterKey )

वर्तमानक्षणात जगण्याची क्षमता मानसिक आरोग्याचा मुख्य घटक आहे. म्हणुन मानसिक आरोग्यासाठी आपल्या मनाला वर्तमानक्षणात जगण्यासाठी प्रशिक्षित करणे हा संस्कार महत्वाचाअसतो. याच संदर्भात कार्यकौशल्य साध्य करण्याच्या सांख्य व कर्मयोग या दोन निष्ठा आहेत. हे कौशल्य साध्य केले तर वर्तमानात आत्मविश्वास असतो, शांती अनुभवतो. हेच कार्यकौशल्याचे, बुद्धियोगाचे रहस्य आहे.

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

न चअभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं॥(२-६६)

१. (स्वभाव)नियतकार्य स्वधर्माचरण म्हणुन (ईश्वराला)समर्पण वृत्तिने करणे.

२. बुद्धियोग:

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिः योगे तु इमां शृणु।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।।(२-३९)

अर्थात बुद्धियोगाचा आश्रय करणे. यामुळे(योग्य-अयोग्य द्वंद्व मिटुन) कार्याचा एकनिश्चय होतो.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

अर्थात ईश्वराची "सृष्टिचा अध्यक्ष " ही ओळख जाणुन भजणे, यामुळे बुद्धियोग ही कृपा असते. या ज्ञानाने जीवनविकासयात्रा (मृत्योर्मां-) अमृतंगमय मार्गावर असते. या मार्गावर निष्काम कर्म अर्थात समत्वयोगाने कर्म करतो. यासाठी कार्याचा एकनिश्चय असतो. यासाठी स्वतःचा निर्णयअधिकार जाणतो. हे कर्मयोगाचे कौशल्य असते. योग(दुःखान्त-मानसिक शक्ति) साध्य होतो. हेच निष्काम कर्माचे रहस्य आहे.

योगः कर्मसु कौशलम् ।

*व्यावहारिक बोध:

"Always say 'yes' to the present moment... Surrender to what is. Say 'yes' to life - and see how life starts suddenly to start working for you rather than against you. "

Eckhart Tolle---'

व्यवहारात प्रश्न असतात. पण यामुळे अशांत होणे याचे कारणच अज्ञान(संस्कारअभाव) असते. आपण उदास असतो तेंव्हा आपण भूतकाळातील जीवन जगत असतो, आपण चिंताग्रस्त असतो तेंव्हा आपण भविष्यात जगत असतो. आपण शांत असतो तरच आपण वर्तमानात असतो" .

युद्ध प्रत्यक्षात सुरु करण्याची वेळ व याचवेळी अर्जुनाने अशांतीची परिसिमा गाठली होती. या अशांतीवर उपाय म्हणुन निष्क्रियता निवडतो व मनाला समाधान देण्यासाठी या निष्क्रियतेला धर्म दर्शवितो. याच घटनेमुळे शांतीचा पाठ सांगण्यात आला.

वर्तमानात शांतिसाठी "युक्त" संस्कार असेल तर वास्तव स्विकारुन त्यावर उपायासाठी सार्थक भाष्य करतो. (जसे श्रीकृष्ण अर्जुन संवाद). भाष्याला विषय मिळतो. असे ( प्रश्न सोडविण्यासाठी ) सार्थ भाष्य व वास्तव hide करुन मन समाधानासाठी (निरर्थक, नकारात्मक)भाष्य करणे यातील हाच भेद असतो.

भगवतगीतेतील हेच(वर्तमानातील शांतिसाठी बुद्धियुक्त-कार्यकौशल्य संस्कार) बुद्धियोग रहस्य भगवतगीतेतील गुह्य खजानाची चावी ठरते. हीच ईश्वराची विशेष कृपा असते.
तेषां एव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजं तमः।
नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपिते भास्वता।।(१०-११)

******

(२-३९)/२ : "कर्मबंधं प्रहास्यसि"

"कर्मबंधं प्रहास्यसि" हा संदेश कर्माच्या बंधनातुन सुटका असा सरळ शाब्दिक अर्थबोध देतो. पण भगवतगीता निष्क्रियतेचे समर्थन करीत नाही.

अर्जुन दुःखी झाल्यावर निष्क्रिय राहण्याचा Stand घेतो. व याची सारवासारव करण्यासाठी याच Standचे समर्थन करतो. व हाच धर्म आहे असे सिद्ध करतो.

समर्थन-टिका हा केवळ भाष्याचा विषय असतो. समर्थनाने साहस वाढते, टिकेने धैर्य खचते. यालाच ज्ञान समजुन टिकाशुर लोक स्वतःचे, स्वपक्षाचे समर्थन करतात, पण इतरांवर टिका करतात. यावर श्रीकृष्ण म्हणतात,

अवाच्य वादांश्च बहुन् वदिष्यन्ति तव अहिताः।
निन्दंन्तः तव सामर्थ्यं ततो दुःखतर नु किम् ।।(२-३६)

टिकाशुर लोक दोन्ही बाजुने(कर्म केले तरी, न केले तरी)टिका करतात. म्हणुन सक्रिय होणे वा निष्क्रिय राहणे ही Choice स्वतःला करायची असते.

विश्वाचे संचलन/प्रवर्तन कर्माद्वारे होत असते. प्रत्येक घडामोडीवर ईश्वराचे नियंत्रण आहे असे जाणुन भक्त ईश्वराचेच कर्म ईश्वरासाठी करतो. कर्म करतांना कर्मातील Purpose shifting होते. योग्य कि अयोग्य हा प्रश्न संपुष्टात येवुन भक्तिसाठी, योगासाठी, (मानसिक शक्तिसाठी) कर्म असे (मानसिक) Shifting होते. याच Transformationला बुद्धियोगी म्हटले. यामुळे विचलित होत नाही (कार्याचा निश्चय)मार्ग दृढ होतो. अर्थात येथे Purpose shifting(सकाम ते निष्काम) होते, कर्माचे purpose आता "योगः कर्मसु कौशलम् " असते.

बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

******

(२. ३९):

"बुद् द्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि"
(Self discipline/Disciplined mind)

जीवनविकासासाठी संस्कार, Self Discipline या अर्थाने भगवतगीतेत "युक्त" हा शब्द वापरलेला आहे. बुद्धियुक्त म्हणजे Disciplined mind . व याच संदर्भात युक्त म्हणजे निष्काम कर्म व अयुक्त म्हणजे सकाम कर्म हा अर्थबोध होतो.
युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते।।(५- १२)

“Lack of discipline leads to frustration and self-loathing.
Marie Chapian

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

अर्जुन परिणाम भयामुळे द्वंद्ववश होतो. द्वंद्ववश होणे ही स्थिति "अयुक्त" ठरते. धर्म या संदर्भात स्वतःचा स्वधर्म हा Tiebreaker

असतो. ही कर्माची एक निष्ठा(लोकेस्मिन द्विविधा निष्ठा) सांगितल्यानंतर कर्मयोग ही कर्माची दुसरी निष्ठा यावर भाष्य आहे. व याच संदर्भात बुद्धियोग या शब्दाचे प्रयोजन विकासासाठी संस्कारीत बुद्धि या अर्थाने आहे. याच संदर्भात युक्त-अयुक्त हा विषय येतो.

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिः योगे तु इमां शृणु।
बुद्ध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।।(२-३९)

"कर्मबंधं प्रहास्यसि"

कर्म करूनच नैष्कर्मसिद्धि, कर्म करुनच अकर्ता, कर्माच्या द्वंद्वातुन(योग्य-अयोग्य, चांगले-वाईट) मुक्त असणे अर्थात द्वंद्ववश नसणे. याप्रमाणे "कर्मबंधं प्रहास्यसि " याचा बोध अभिप्रेत असतो.

कर्म काम्य आहेत म्हणुन संन्यासी कर्माचा संन्यास स्विकारतात. पण समाजात श्रेष्ठ अशी ओळख असणाऱ्यांनी कर्माचा त्याग करुन सामान्यांचा बुद्धिभेद करु नये असा संदेश भगवतगीता देते. प्रत्येक क्षणात कर्म घडतच असते. कर्म केल्याशिवाय नैष्कर्मसिद्धि लाभत नाही.

न कर्मणाम् अनारंभान् नैष्कर्म्यं पुरुषोअश्नुते।(३-४)
न हि कश्चितक्षणम् अपि जातु तिष्ठति अकर्मकृत् ।(३-५)

कर्म टाळले तरी इच्छा असतात व मनाची प्रसन्नता हरतात. म्हणुन संस्कारीत होवुन (युक्त) आदर्शासाठी कर्म करणे हा श्रेष्ठांचा संस्कार असतो.

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः।(१८-२)
विषया विनिवर्तते निराहारस्य देहिनः।(२-५९)
इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः।(२-६०)
तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर।(३-१९)

“Discipline must come through liberty... We do not consider an individual disciplined only when he has been rendered as artificially silent as a mute and as immovable as a paralytic. He is an individual annihilated, not disciplined.

Maria Montessori

शब्दच्छल करुन अर्थाचे अनर्थ होतात . समाजात बुद्धिभेद होतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी मनुष्य स्वतःच्या सोयीने जगण्याचे, उपलब्ध ज्ञानाचे अर्थ शोधत असतो. अर्जुनाने स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी आपल्या सोयीने धर्मातील

ज्ञानाला अर्थ दिला. म्हणुन वर्तमानात नेहमी विकासमार्गावर असण्यासाठी "योग-युक्त" असणे हा संदेश भगवतगीता देते.

तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)

भगवतगीतेने अयुक्त-युक्त शब्दाचे प्रयोजन बंधन-स्वातंत्र्य (मोक्ष) या संदर्भातच केलेले आहे. विकासमार्गावर असलेला योग-युक्त, Disciplined mind असलेला बुद्धियुक्त या शब्दांचे प्रयोजन आहे. याच पार्श्वभुमिवर विकासाचा Universal Standard मार्गच भगवतगीता सांगत आहे, हा बोध होतो.

Long-term, we must begin to build our internal strengths. It isn't just skills like computer technology. It's the old-fashioned basics of self-reliance, self-motivation, self-reinforcement, self-discipline, self-command.

Steven Pressfield

*********

(२-४०)

*************************

न इह अभिक्रम नाशोअस्ति प्रत्यवायो न विद्यते।

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।।

*************************

(२-४०)/१:

"न इह अभिक्रम नाशोअस्ति प्रत्यवायो न विद्यते"

(Strength grows when we dare)

"Work is one of the best educators of practical character. "

-Samuel Smiles

कर्मयोगात कर्म करण्यासाठी निर्णयअधिकार असतो. या मार्गात कर्म करण्यात नुकसान नाही तर लाभच आहे. जसे खेळ खेळतो व व्यायामाचे फळ आपोआप प्राप्त होते, तसे कर्मयोगात निर्भयता, साहस या शक्तिचे फळ लाभते.

न इह अभिक्रम नाशोअस्ति प्रत्यवायो न विद्यते।

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।।(२-४०)

सुखासाठी भौतिक प्राप्ति याची Strength मनुष्य जाणत असतो. याच संदर्भात श्रेष्ठ/मोठेपणाचे माप सामान्यजन वापरतात. वाघाचे कातडे पांघरले तरी कोल्ह्याला वाघाचे साहस लाभत नाही. मोठेपणा/श्रेष्ठ याचा निश्चित बोध भगवतगीता देत आहे,
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

बुद्धियोगामुळे जीवनयात्रा "अमृतत्वाय कल्पते" या मार्गावर असते . या मार्गात विचलित होत नाही.

जीवनमार्गात दुःखाने विचलित न होणे ही दुःखान्तशक्ति असते. "योग" या शब्दाची व्याख्याच "दुःखान्त शक्ति "(दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम्") आहे. चांगल्या मनुष्याला याच शक्तिची ओळख असणे आवश्यक असते(मा शुचः संपदम् दैवीम् ... ). कारण चांगल्या कार्यासाठी याच शक्तिची(साहस) गरज असते. या शक्तिचा अभाव असल्यामुळेच मनुष्य मार्गात विचलित होतो व निष्क्रियतेचे गोडवे गातो. अर्जुनाला याच शक्तिची ओळख नसते व तो निष्क्रियतेला धर्म संबोधतो.

दुःख झाले म्हणुन कार्य टाळतो ही वस्तुस्थिति असते. या घटनेतील वास्तव येणेप्रमाणे बनते.

*कार्य योग्य कि अयोग्य हा संशय येतो.

*विचलित न होणे या शक्तिची ओळख नसते.

या दोन्हीवर उपाय कर्मयोग असतो.

बुध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)
अर्थात कर्मातील योग्य-अयोग्य या द्वंद्वावर मात होते व कार्याचा दृढनिश्चय होतो. व शक्तिची साधना होते.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।(२-४०)

******

(२. ४०)/२:

"स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् "

(निर्भयतेचा संदेश)

"जिंदगिको खोजने निकले, दुरतक आ गये पर जिंदगि तो मिली नही, तजुर्बे बहोत मिले।"

श्रीकृष्णाने अर्जुनाला"तजुर्बा"सांगितला नाही, तर जीवनाचे वास्तव सांगितले व विकासमार्गावर राहण्यासाठी inspire केले. (जीवात्मा विकासासाठीच मनुष्यरुपात आलेला आहे. )म्हणुन भगवतगीता ठामपणे सांगते, जीवनाचे ज्ञान जाणुन घ्यायचे आहे तर(भगवतगीतेतील ज्ञानविज्ञान) या पलीकडे ज्ञान नाही .
यद् ज्ञात्वा न भूयो अन्यत् ज्ञातव्यम् अवशिष्यते।(७-२)

जसे पोहायची इच्छा आहे, पण भयामुळे काठावरच राहणे पसंत करतो. प्रेक्षक बनुन comment करतो. सृष्टिच्या या भवसागरात मात्र प्रत्यक्ष पोहायचे आहे. प्रत्यक्ष अनुभव घ्यायचा असतो. पण भयाचा आश्रय करुन excuses देत जगत असतो. जीवनांत जे "तजुर्बे "ऐकलेत, त्याचा या excuses साठी उपयोग करतो. अशा excuses भाष्याला भगवतगीता प्रज्ञावाद संबोधते.

भगवतगीता जगण्यातील हाच भेद स्पष्ट करते. अर्जुन वास्तव कबुल करतो, तेंव्हा हा भेद प्रज्ञावाद vs वास्तव(Reality) असा

होतो. प्रत्यक्षात संवाद सुरु होतो, तेंव्हा हा भेद "प्रज्ञावाद vs संवाद" असा होतो.

जेंव्हा समुहात(समाजात)संवाद होत नाही, याचे कारण प्रज्ञावादी संवय असते. कोणत्या बाजुने भाष्य करायचे हे आधीच ठरले असते. व मुख्य विषय(वास्तव), प्रश्न अलगदरित्या बाजुला पडतो. (Hiding reality)

कर्मयोगात कार्याचा दृढनिश्चय पाया आहे. "कर्मण्येवाधिकारस्ते" याद्वारा भगवतगीतेने मनुष्याचा निर्णयअधिकार दर्शवुन दिला आहे. परिणामाच्या अनिश्चिततेमुळे (यश-अपयश) भय असते. यामुळे चंचलता असते. म्हणुन दृढनिश्चयासाठी बुद्धियोग व निष्काम कर्म(मा फलेषु कदाचन) यासाठी समत्वयोगाने कार्य करणे याचे शास्त्र सांगितले. येथे बुद्धियोग vs फलहेतवः (सकाम) यातील भेद दर्शविला आहे.

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।(२-४९)

सकाम (फलहेतवः)मानसिकतेमुळेच भय असते. निश्चय होत नाही व कर्म टाळत असतो. म्हणुन निष्क्रियता येवु नये यासाठी सावधान केले,

मा कर्मफलहेतुर्भुः मा ते संगो अस्तु अकर्मणि।(२-४७)

जीवन आपण प्रत्यक्ष जगत असतो, याचा अनुभव करायचा असतो.

*संवाद आणि प्रज्ञावाद यांतील भेद जाणुन वास्तव स्विकारणे व विषयाला धरुन भाष्य करणे महत्वाचे ठरते.

*जीवनातील निर्णयअधिकाराचे, निर्णयक्षमतेचे महत्व जाणणे कर्मयोगासाठी आवश्यक असते. (याचसाठी बुद्धियोग आहे). हाच धर्म भयापासुन मुक्त करतो.

न इह अभिक्रम नाशोअस्ति प्रत्यवायो न विद्यते।

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥(२-४०)

******

(२-४०)/३: "त्रायते महतो भयात् "

कर्म कशासाठी?

हाच प्रश्न भगवतगीतेत अर्जुन वारंवार करतो. भौतिक इच्छापुर्तिसाठी कर्म हे Logic मनुष्य जाणतो. संपत्ति असेल तर कर्माची काय गरज?असा विचार (अज्ञानामुळे) समाजातही व्यक्त होत असतो. संपत्ति अभावामुळे चिंता, कर्मफलातील भयामुळे आळस, कर्म टाळणे, नैराश्य व यामुळे नकारात्मक विचार समाजात आढळते.

मानसिक स्वास्थ जीवनातील सर्वात महत्वाची संपत्ति असते. याचा कर्माशी असलेला संबंध भगवतगीता दर्शविते. जीवनात आत्मविश्वास असणे, निर्भयता, साहस, सकारात्मक विचार, मनःशांती मानसिक शक्ति दर्शविते. तर भय, चिंता, आत्मविश्वास अभाव, क्रोध, अशांती, नकारात्मक विचार मानसिक दुर्बलता दर्शविते. याचे ज्ञान नसेल तर मानसिक दुर्बलता Conscious मध्ये Conditioned होते व हा नकारात्मक विचाराचा Automatic flow बनतो. याचाच परिणाम Stress, Depression या रोगामध्ये होतो. जीवनांत प्रश्नाचे आव्हान स्विकारण्याचे साहस नसते. म्हणुन अर्जुनाला म्हटले,

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप।(२-३)

दुर्बलता असेल तर कर्म टाळण्यासाठी ज्ञान वापरतो . म्हणुन ज्ञानाचे महत्व व उपयोग भगवतगीतेत स्पष्ट केला आहे.

ज्ञानसंच्छिन्नसंशयम् (४-४१)

सर्वकर्मअखिलंपार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

याच पार्श्वभुमिवर कर्म मानसिक (power)Charging करते, याचे ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते.

यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम् ।

स्वकर्मणा तमभिः अर्च्यं सिद्धिं विन्दति मानवाः ।।(१८-४६)

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

तं विद्यात् दुःखसंयोगं वियोगं योग संज्ञितम् ।(६-२३)

याप्रमाणे कार्याद्वारे ईश्वरभक्ति म्हणजे शक्तिची (नैश्कर्मसिद्धि प्राप्ति, योग, ज्ञान) साधना ठरते.

कार्याला स्वधर्मात व निर्णयाला दृढनिश्चयात Transform करुन योगस्थ वृत्तिने कार्य करणे हे कार्यकौशल्य ठरते.

योगः कर्मसु कौशलम् ।(२-५०)

याच संदर्भात Mindset transformation साठी ज्ञान हा भगवतगीतेचा संदेश आहे. बुद्धिची अयुक्त व युक्त अवस्था, सकाम व निष्काम कार्य यांतील भेद दर्शविला.

युक्ताः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्ताः कामकारेण फले सक्तो निबध्यते॥(५-१२)

********

(२-४१)

*************************

व्यवसायात्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।
बहुशाखा हि अनन्ताश्च बुद्धयोः अव्यवसायिनाम् ।।

*************************

(२-४१)/१:" व्यवसायात्मिका बुद्धिः "

भगवतगीतेत कर्माच्या सांख्य (ज्ञानयोग) व कर्मयोग अशा दोन निष्ठा सांगितल्या. कर्मयोगात कार्याचा मार्ग दृढ होण्यासाठी कार्याचा निश्चय महत्वाचा असतो. याला व्यवसाय आत्मिका बुद्धि (Determination) म्हटले. व हा एकनिश्चय असतो.

व्यवसायात्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।
बहुशाखा हि अनन्ताश्च बुद्धयोः अव्यवसायिनाम् ।।(२-४१)

व्यवहारात कार्य ठरते. यातील सकाम अवस्था निष्काम अवस्थेत Transform करणे कार्याच्या performance साठी आवश्यक

असते. म्हणुन हा मार्ग दृढ करावा लागतो. नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करुन स्वतःचा मार्ग दृढ होतो.

भोगैश्वर्यप्रसक्तानां तया अपहृत चेतसाम् ।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधियते॥(२-४४)

कार्यात चांगले -वाईट, लाभ-हानी या आधारावर योग्य मार्ग ठरतो. सकाम अवस्थेत योग्य-अयोग्य असे द्वंद्व असते. प्रत्यक्ष execution साठी (लाभ व्हावा, चांगले म्हणावे ही किर्ति इच्छा) द्वंद्वापेक्षा निर्द्वंद्व म्हणुन दृढमार्ग महत्वाचा असतो. चांगले म्हणजे सत् व याचा समन्वय ईश्वराशी साधुन बुद्धियोगी होणे हा द्वंद्वातुन मुक्त होण्याचा मार्ग आहे.

बुद् ध्या युक्तो यया पार्थ कर्मबन्धं प्रहास्यसि।(२-३९)

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

अर्थात कर्मातील (योग्य-अयोग्य) द्वंद्व महत्वाचा नसुन कर्मातुन योग साध्य होण्यासाठी योगस्थ मानसिकता (बुद्धियुक्त) Priority

असते. म्हणुन कार्य perform करतांना कर्मातील सकाम अवस्था कनिष्ट व बुद्धियोग श्रेष्ठ म्हटले.

दुरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय।
बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।।(२-४९)

कार्याचा दृढमार्ग असेल तरच निष्ठेने कार्य होईल. याप्रमाणे दृढमार्ग कर्मयोगाचा प्राण ठरतो. तसेच हाच जीवनाचा मुलभूत पायाही ठरतो.

"The difference between the impossible and the possible lies in a man's determination. "

व्यावहारिक भाष्य व स्वतःचा मार्ग:

जगात चांगलेपणा नांदावा म्हणुन जग बदलावे यावर भाष्य होते. पण पायाच कच्चा असेल तर असे भाष्य परिणामकारी ठरत नाही. या अवस्थेला डॉ चीमांनी Lack of purpose loyalty संबोधले. (डॉ चीमा Cottage Industries and Agriculture in Japan -1948 या पुस्तकाचे लेखक आहेत. )

समाजात चांगले- वाईट, फायद्याचे-नुकसानीचे यासंबंधी Judgement thinking वापरुन भाष्य होते. हा व्यवहार असतो. या व्यवहारात द्वंद्व राहणारच. पण जगणाऱ्याला कार्य perform करण्यासाठी मार्ग दृढ(निर्द्वंद्व) करावा लागतो. बुद्धियोगामुळे कोणत्याही भाष्याने बुद्धि विचलित होत नाही. म्हणुन व्यवहारातील ऐकिव भाष्य व स्वतःचा दृढ(योगस्थ)मार्ग यातील भेद जाणुन वर्तमानात जागृत असण्याचा संदेश भगवतगीता देतें.

यदा ते मोहकलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति।
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च।।(२-५२)

वर्तमानातील याच जागृतिमुळे(व्यावहारिक ऐकीव भाष्य vs स्वतःचा दृढ मार्ग) व्यावहारिक भाष्यही गांभिर्याने बोलल्या जाईल व ऐकल्या जाईल. समुहात(समाजात) निरोगी संवादासाठी ही जागृति आवश्यक आहे. भगवतगीतेतील निरोगी संवादाचा हाच आधार आहे. प्रथम अर्जुन कुणाचेही ऐकण्याच्या मनःस्थितित नसतो, तोच श्रीकृष्णाला भाषण ऐकवितो. निरोगी संवादातील हा (स्वमतांधता) व्यत्यय असतो. श्रीकृष्णाने त्याच्या भूमिकेतील अज्ञान व मानसिक दौबल्य दर्शवुन दिले तेंव्हा

अज्ञान(युद्ध करणे योग्य कि अयोग्य) कबुल करतो व त्याची ऐकण्याची मानसिकता (Listner)बनते. आणि.. संवाद सुरु होतो,
******
(२-४१)/२:
"व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन"
(निश्चयाचे बळ)

"You will never do anything in this world without courage. ", Aristotle

We develope courage by performing courageous acts. Today, it's one of the more neglected areas of positive psychology.

Neuroscientists recently determined just how courage works in the brain, finding that a region called the subgenual anterior cingulate cortex (sgACC) is the driving force behind courageous acts
--

a conclusion which could one day prove useful in treating anxiety disorders.

So how can we train our minds to act more courageously in everyday life?

तत्वज्ञ, मानसशास्त्री यांनी जीवनात धैर्य, निर्भयता याचे महत्व जाणले आहे. स्वामी विवेकानंदांनी याच शक्तिचे महत्व जाणुन अध्यात्माचा उपयोग याच शक्तिच्या वृद्धिसाठी करावा असे आवाहन केले. "योग" या शब्दाची निश्चित व्याख्या शक्ति या संदर्भात भगवतगीतेने केलेली आहे. व ही शक्ति निश्चितपणे साध्य करावी हा संदेश दिला.

तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम् ।
स निश्चयेन् योक्तव्यो योगोनिर्विण्ण चेतसा।।(६-२३)

भगवतगीता भयमुक्तिसाठी कर्मयोगशास्त्र सांगते.
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।

या मार्गात कार्याचा एकनिश्चय असावा लागतो. मनाच्या चंचलतेमुळे निश्चय होत नाही.

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।
बहुशाखा हि अनंताश्च बुद्धयो अव्यवसायिनाम॥(२-४१)

भगवतगीता भयाची स्थिति मनाचे चंचलत्व, द्वन्द्व, सकाम कार्य याद्वारा दर्शविते. व कार्याचा एकनिश्चय, निर्द्वन्द्व अवस्था, निष्काम कर्म यांचे महत्व कर्मयोगासाठी स्पष्ट करते.

योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनञ्जय।
सिद्धि असिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते॥(२-४८)

******

(२. ४१)/३

"बहुशाखा हि अनंताश्च बुद्धयो अव्यवसायिनाम्"

(Transformation)

वर्तमान जीवन असते म्हणुन वर्तमानात सुखशांती अनुभवण्यासाठी तत्वज्ञांनी शोध घेतले. अर्जुन वर्तमानात सुखशांती अनुभवण्यासाठीच नियतकार्य(युद्ध) टाळतो.

अर्जुनाचा युद्ध करण्याचा निश्चय ठरला असतो. तो उत्साहाने युद्धक्षेत्रावर हजर होतो. पांडवपक्षात अद्वितिय उत्साह संचारला असतो. युद्ध सुरु होण्यापुर्वी त्यांच्या शंखनादानेच कौरवांची हृदये विदिर्ण होतात.

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्।(१-१९)

या उत्साहानेच याच क्षणी त्याला कौरवसेना न्याहाळण्याची इच्छा होते!तो गर्भगळित होतो. त्याची भाषा बदलते.

सुखशांती संदर्भात जीवनात कार्याची भूमिका महत्वाची असते. ज्याचा कार्यनिश्चय दृढ असतो, तो निष्ठेने कार्यरत होतो. पण कार्याचा निश्चय झाला तरी तो कच्चा कसा व कां होतो?कच्चा झाला तर तो कसा वागतो?याचे प्रात्यक्षिकच अर्जुनविषादयोगातुन स्पष्ट झाले आहे.

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।

बहुशाखा हिअनंताश्च बुद्धयो अव्यवसायिनाम्।।(२-४१)

जीवनात कार्याचे महत्वच न जाणणाऱ्यांचा मार्ग निश्चित नसतो. (इच्छा असल्यामुळे) मन चंचल असते. जणु वाऱ्याने नाव वहावी तशी(दिशाहीन) जीवनयात्रा चालत असते. म्हणुन जीवनात स्वतःचा मार्ग विश्वासाने चालण्यासाठी व जीवनात सुखशांती अनुभवण्यासाठी कार्याचे महत्व भगवतगीतेने highlight केले आहे.

"A man without a goal is like a ship without a rudder. "

. Thomas Carlyle

व्यवहारात कार्य ठरणे व कार्यावर प्रत्यक्षात अंमल होणे असे स्पष्ट दोन भाग महाभारतात आलेले आहे. यांतील प्रत्यक्षात अंमल करण्याची प्रक्रिया हाच भगवतगीतेचा भाग आहे.

जगात व्यवहार असतो. या व्यवहाराचा भाग म्हणुनच प्रश्नावर, विशिष्ट विषयावर चर्चा होते. कार्यनिश्चय (निर्णय) होतो. "मुल्य" या संदर्भात "वचन" भाष्य बोलल्या जाते. कारण या व्यवहारावर

अंमल करणे हा महत्वाचा भाग असतो. रामायणात कैकेयीने दशरथ महाराजांना "वचन" अंमल करण्यासाठी आवाहन केले.

समाजात भाष्य खुप कांही बोलल्या जाते पण या भाष्यावर अंमल होणे हीच परिक्षा असते. या संदर्भात "बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले"हे वचन प्रसिद्ध आहे.

कठिणप्रसंगी दुःखी झालेल्या अर्जुनाला श्रीकृष्ण समज देतात, तेंव्हा तो युद्ध न करणे आपल्याला श्रेयस्कर कां वाटते याचे वास्तव सांगतो. जो अर्जुन युद्ध करणे पापाचरण आहे असा आदर्शवादी युक्तिवाद करतो, तोच आता स्वतःची दुःखमुक्ति कशी होईल ही गरज व्यक्त करतो. स्वतःचे वास्तव(गरज) लपवुन आदर्शाची भाषा बोलुन परस्परांना challange करणारे भाष्य समाजात चालत असते.

टॉलस्टाॅय म्हणतो, स्वतःला ज्ञानी समजुन जग बदलावे ही इच्छा करणारे व तसे भाष्य वापरणारे स्वतः मात्र बदलत नाही हीच खरी समाजातील शोकांतिका आहे. भगवतगीता याच सत्याला प्रकाशात आणते. "स्वतः बदला म्हणजे जग बदलेल"

Transformation:

व्यवहारात कार्याची सकाम अवस्था असते. प्रत्यक्ष अंमल करण्यासाठी निष्काम अवस्थेची प्रक्रिया भगवतगीता स्पष्ट करते. याच transformationसाठी बुद्धियोगाचे महत्व आहे. "अमृतंगमय" हा मार्ग जाणतो. या मार्गावर कार्याचा दृढनिश्चय असतो,

अर्जुनाच्या मनाची चंचलता त्याच्या बुद्धिभ्रमात आढळते. यामुळेच अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. कार्याचा निश्चय होत नाही. बुद्धियोगामुळे बुद्धिभ्रमावर मात होते . या मार्गात नियतकार्य स्वधर्मात (Tiebreaker) transform होते. स्वतःचा निर्णयअधिकार जाणतो. व कार्याचा एकनिश्चय करतो. या मार्गावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति (स्वधर्म ईश्वरसमर्पण, समत्वयोगाने कार्य होण्यासाठी फलत्याग) घडते. अर्थात योगसिद्धिसाठी (योग-दुःखान्त, निर्भय) Exercise ठरते.

वर्तमानात ईश्वराचा आश्रय करुन योगयुक्त असणे यामुळे कार्याचा दृढनिश्चय होतो व निष्ठेने कार्य करतो. अर्थात कार्यावर प्रत्यक्ष

अंमल होण्यासाठी व्यावहारिक(सकाम) कार्य निष्काम कार्यात बदलविणे ही प्रक्रिया साध्य होते.

***********

(२. ४१)/४ :
" बुद्धयोअव्यवसायिनाम् "
(कार्याचा एकनिश्चय नसणे)

जीवनात विकासाचे साधन कर्म आहे. कर्म या संदर्भातच भगवदगीतेने "गहना कर्मणो गतिः" याद्वारे कर्माची महति गायलेली आहे. कार्याचा एकनिश्चय असणे हा कर्मयोगाचा पाया आहे. ज्यांचा निश्चय होत नाही त्यांच्या बुद्धिवर "बुद्धयोअव्यवसायिनाम् " असा शिक्का बसतो.

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।
बहुशाखा हि अनंताश्च बुद्धयो अव्यवसायिनाम्।।(२-४१)

कार्यनिश्चय:

वर्तमानात मनुष्याला समाधान हवे असते. (क्षणोक्षणी) कर्म घडत असते. कार्याचा परिणाम अप्रिय असला तर मनुष्य विचलित होतो. म्हणुन समाधान अनुभवण्यासाठी "समदुःखसुखंधीरं" हा शब्दप्रयोग आहे. मनोवश अवस्थेत चंचलत्व असते. कार्यनिश्चय होण्यासाठी आत्मवश अवस्था कारण ठरते. अर्थात ईश्वराचा आश्रय, बुद्धियोग, आत्मवश अवस्था यामुळे कार्यनिश्चय होतो. याप्रमाणे भगवदगीता जीवनयात्रेत ईश्वराचा आश्रय व ईश्वराच्या भक्तिचे निश्चित प्रयोजन सांगत आहे.

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके।
तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः।।(२-४६)
कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।(२-४७)

अर्थात वेद(ज्ञानविज्ञान) व ईश्वरज्ञान यांतील भेद सर्वत्र जलमय झाले असता विहिरीची जी किंमत तीच
ईश्वरज्ञानासमोर वेदाची असते. व्यवहारात कार्याचा निश्चय होण्यासाठी निर्णय मनुष्याच्या अधिकारात असतो. कार्याचा निश्चय होणे व समाधान अनुभवणे यासाठी:
"बुद्धियोगं उपआश्रित्य मद् चित्तः सततं भव"(१८-५७)
हा संदेश आलेला आहे.

साहस व निष्ठा :

भगवदगीता "योग" या विषयावर भाष्य करते.

तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम् ।(६-२३)

योग म्हणजे दुःखान्त अशी व्याख्या केलेली आहे. निर्भयता, धृति(साहस) दैवीगुणसंपत्ति असते. संशय, भय यामुळे (कार्याचा) निश्चय होत नाही. साहस(धैर्य) म्हणजे भयाला जिंकणे.

निष्काम कर्म म्हणजे परिणाम (कर्मफल) या संदर्भात यश-अपयश यांत समत्वयोगाने कार्यरत असणे. अर्थात निष्ठेने कार्यरत असतांना "योग"(दुःखान्तशक्ति) साध्य होते.

“God has placed a deeper Spirit within you. It is the source of your integrity and your wisdom and your ability to see the truth and to respond to the truth. It is the source of your courage. It is the source of your strength. ”

— Nature and Natural Disasters

**********

(२-४२)

*************************

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्ति अविपश्चितः।

वेदवारताः पार्थ न अन्यत् अस्तीति वादिनः।।

*************************

(२. ४२):"यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्ति अविपश्चितः"

(Bookish knowledge vs. Best version of SELF)

"विकास" या संदर्भात मनुष्याच्या स्वतःच्या संकल्पना (यश, मोठेपणा, चांगलेपणा)असतात. समाजातील ऐकीव ज्ञानाने त्या Conditioned झालेल्या असतात. प्रत्येक व्यक्तिमध्ये त्याला महान बनविण्यासाठी शक्ति ईश्वराने दिलेली असते. त्याला या शक्तिची ओळख करुन (स्वतःची ओळख) स्वतःला विकसित करायचे असते. पण याच रहस्याचे अज्ञान असते. या अज्ञानामुळेच "वाघ" (यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ)बनायला निघाला व कोल्हा बनुन जगत राहिला. अशी अवस्था होते. याच अज्ञानाची ओळख भगवतगीता करुन देते. व ते दुर करण्यासाठी ज्ञान सांगते.

We spend too much time trying to be “good” when good is often merely average. To be great we must be different. And that doesn’t come from trying to follow society’s vision of what is best, because society doesn’t always know what it needs. More often

"Being the best means just being the best version of you. "

Eric Barker, (Writer of Barking up the wrong tree)

*यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्ति अविपश्चितः।(२-४२)

मनुष्याच्या ठायी असलेला चांगलेपणा Divine स्त्रोत असतो. या चांगलेपणामुळेच अर्जुन दुःखी होतो. यामुळे बुद्धिभ्रम होतो. योग्य-अयोग्य या द्वंद्वाच्या जाळ्यात सापडतो. युद्ध करणे योग्य कि अयोग्य हा Tie अर्जुन सोडवु शकत नाही. दुःख टाळण्यासाठी सरळ युद्ध करणे अयोग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ऐकीव(बाह्य, पुस्तकी) ज्ञानाचा वापर करतो. प्रत्यक्षात हे ऐकीव ज्ञान त्याचा Tie सोडवु शकत नाही. पण स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी

ऐकीव ज्ञानाचा आधार घेतो. मनुष्याच्या जगण्यातील हीच स्थिति भगवतगीता ज्ञानाचा आधार ठरते.

*स्वतःच्या जीवनाचे(Self Version) ज्ञान व बाह्य (पुस्तकी)ज्ञान यांतील भेद भगवतगीता स्पष्ठ करतांना सांगते,

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके।
तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः।।(२-४६)

स्वतःचे ठायी असलेला चांगलेपणा Divine स्त्रोत असतो. अर्थात हा चांगलेपणा ईश्वरज्ञानाचा स्त्रोत जो जाणतो, बुद्धियोगी होतो, त्या ज्ञानासमोर बाह्य(ऐकीव) ज्ञानाची किंमत सर्वत्र जलमय झाले असता विहिरीची जी किंमत असते, त्याप्रमाणे असते.

*नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।।(८-२७)

शुक्लपक्ष व कृष्णपक्ष या दोन गति अनुक्रमे मोक्ष व पुनर्जन्म या संदर्भात श्रीकृष्ण सांगतात. पण योगी या ऐकीव ज्ञानाने मोह पावत

नाही. अर्थात मला शुक्लपक्षातच "जायचे" आहे हा आग्रह धरत नाही. तर नित्य योगयुक्त असणे याला महत्व देतो.

*बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृत दुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥(२-५०)

धर्म योग्य-अयोग्य सांगते पण जो नियतकार्याला स्वधर्म जाणुन स्वधर्माचरण करतो, त्याचा कार्याचा निश्चय दृढ असतो. (स्वधर्मम् अपि चावेक्ष न विकम्पितुम् अर्हसि)
याप्रमाणे स्वधर्म Tiebreaker ठरतो व दृढनिश्चय होतो. हाच दृढनिश्चय highlight करण्यासाठी बुद्धियोग सांगितला. जेथे योग्य-अयोग्य या द्वंद्वापासुन मुक्त असतो. याप्रमाणे भगवतगीता निर्भय होण्याचे रहस्य सांगते. यामुळे योगासाठी कार्य (Exercise through work) ही Priority बनते.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

* According to Herbert Spencer,

"The great aim of education is not knowledge but action. "

According to Bhagwatgeeta,

"The great aim of action is योगः कर्मसु कौशलम् "

 ********

(२-४२):

"वेदवादरताः पार्थ न अन्यत् अस्तीति वादिनः"

(पुस्तकी ज्ञान व वर्तमान)

मनुष्य वर्तमानाचे आव्हान स्विकारण्यास सक्षम व्हावा या हेतुने व मानवजातीच्या कल्याणासाठीच जगातील ज्ञानविज्ञानाचे शोध लागले. भारतात ज्ञानविज्ञानाचा पायाच रचला गेला. या ज्ञानात दररोज भर पडत असते, कारण मनुष्यासाठी वर्तमान महत्वाचा असतो. भगवतगीता याच सत्यावर प्रकाश टाकत आहे.

अर्जुन आपल्या निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी पुस्तकी ज्ञानाचा उपयोग करतो. हीच संवय समाजात असते. स्वतःला योग्य सिद्ध

करण्यासाठी याचाच उपयोग करीत असतो. या संवयीला भगवतगीता "प्रज्ञावाद" संबोधते.

श्रीकृष्णाचे अवतारकार्य क्रान्तिकारक आहे. यज्ञ, देवता हे मुळ ज्ञान असले तरी त्याला नवीन संदर्भ दिले. इंद्रपुजा बंद करुन गोवर्धनावर वृक्षारोपणाचा संदेश (पाउस पडण्यासाठी ) दिला.

भगवतगीतेत अर्जुन ज्या पुस्तकी ज्ञानाचा उपयोग करतो त्यांत स्वर्गादि संकल्पना असतात. या ज्ञानामुळे कार्याचा एकनिश्चय नसतो. अर्थात वर्तमानात योगयुक्त नसतो. म्हणुनच भगवतगीता बंधन -मोक्ष याचे शास्त्र सांगते.

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्ति अविपश्चितः।
वेदवादरताः पार्थ न अन्यत् अस्तीति वादिनः।।(२-४२)
कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां।...
.. व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।।(२-४४)

१. वर्तमानातील आव्हान स्विकारण्यासाठी यज्ञ या संज्ञेचा उपयोग श्रीकृष्णाने व्यवस्थापनशास्त्रात केला.

सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा पुरा उवाच प्रजापतिः।(३-१०)

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा।(४-३७)

"अग्नि - हवन" या संदर्भात अनुक्रमे दृढता(संयम, योगस्थ) व समर्पण (भस्मिकरण) हा बोध आहे.

इंद्रियाग्नि- शब्दआदिन् विषय (४-२६)

संयमाग्नि - श्रोत्र आदिन् इंद्रिय (४-२६)

ज्ञानाग्नि - सर्वकर्माणि (४-३७)

२. समाजात चांगलेपणा याविषयी गैरसमज असतो. स्वतःला चांगला/योग्य ठरविण्यासाठी अर्जुन "मी लोभी नाही म्हणुन चांगला" ही भूमिका घेतो. चांगलेपणा मनुष्याला सक्षम करीत असते, त्याला आत्मविश्वास असतो हे भगवतगीता स्पष्ट करते.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

३. ईश्वरश्रद्धेचा उपयोग ज्ञानासाठी अर्थात योगयुक्त/ज्ञानी होण्यासाठी केला. ईश्वरश्रद्धा असुन चांगले कार्य करणारे आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु, ज्ञानी असे चार प्रकारचे भक्त असतात . ज्ञानी होणे हे ध्येय असते. यासाठी वर्तमानात योगयुक्त (स्थिर, शांत, सकारात्मक, दृढनिश्चयी) असणे महत्वाचे असते.

नैते सृती पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन्।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।।(८-२७)
अर्थात योगी वर्तमानात पुस्तकी ज्ञानाने मोह पावत नाही, विचलित होत नाही. चांगलेपणा ही दैवीगुणसंपत्ति असते . म्हणुन नित्य योगयुक्त असण्याचा संदेश दिला.

सार :भारतिय ज्ञानविज्ञानाचा खजिना पवित्र म्हणुन आपण भारतिय जपत असतो. पण वर्तमानाचे आव्हान स्विकारण्याचे ज्ञानविज्ञान त्यांत दडलेले आहे. हे ज्ञान जगासमोर येणे आवश्यक आहे. (स्वामी विवेकानंदांनी भगवतगीतेला जगासमोर आणले. अमेरिकेने त्याचे स्वागत केले) . संशोधक वैश्विक असतात. ज्ञानाचा आदर करीत असतात. त्या ज्ञानाचा उपयोग करुन कुणी संशोधक वर्तमानातील आव्हान स्विकारण्यासाठी उपयुक्त ज्ञान जगासमोर आणेल.

*******

(२-४३)

*************************

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्म फलप्रदां।

क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यं गतिंप्रति।।

*************************

(२. ४३):

"कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां"

(Ritual vs. Philosophy of life)

संपुर्ण सृष्टि सुनियोजित यंत्रणेनुसार संचलित असते. हे प्रकृतिचे Automation असते. जगात कर्म घडते व त्याच्या प्रतिक्रिया प्रकृतिचे Automation असते.

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।(४-३२)

भगवतगीता क्रिया(कर्म) करणे या ज्ञानाला focus करते. जगात कर्मानेच विकास होतो. मनुष्य क्रिया करतो. त्याला जे (सुख, दुःख) लाभते, ही प्रतिक्रिया (फल) असते. हे प्रकृतिचे

Automation असते. (वर्तमान भुतकाळाची प्रतिक्रिया आहे. भविष्य वर्तमानाची प्रतिक्रिया ठरणार. ) . चिंता करणे, Stress हा Automatic परिणाम आहे . क्रिया नसुन प्रतिक्रिया असते. अर्जुनाला दुःख झाले. ही प्रकृति होती. पण युद्ध टाळल्याने हे दुःख टाळता येते म्हणुन युद्ध टाळतो. व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी स्वर्ग-नरक भाष्य वापरतो. ही संपुर्ण प्रक्रिया प्रतिक्रिया असते.

मनुष्याला जे कार्य करणे जमते तेच तो करीत असतो. कार्य करणे ही प्रकृतिची Strength असते. तर अडथळा होणे Weakness असतो.

सदृशं चेष्टते स्वस्या प्रकृतेः ज्ञानवान अपि।(३-३३)

...

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

अर्थात सकाम स्थितिमुळे द्वंद्व असतो व यामुळे अडथळा होतो. अर्जुन स्वर्ग-नरक या भाष्याचा उल्लेख करतो. पण यामुळे सकाम स्थिति असते व कार्याचा एकनिश्चय होण्यास अडथळा होतो.

व्यवसाय आत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।

बहुशाखा हि अनंताश्च बुद्धयोः अव्यवसाययानाम् ।।(२-४१)

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां।

क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यं गतिंप्रति।।(२-४३)

भोगैश्वर्य प्रसक्तानां तया अपहृत् चेतसाम् ।

व्यवसाय आत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।।(२-४४

अर्थात जीवनविकासमार्गाची Philosophy याला भगवतगीता Priority देते. बुद्धांनी जीवनविकासाच्या Philosophy ला महत्व दिले, Rituals ला नाही. जन्ममृत्युचे Cycle breaking साठी निर्वाण शब्द वापरला. तर भगवतगीता मोक्ष हा शब्द वापरते. जीवनविकासमार्गाची Philosophy बंधन-मोक्ष या पायावर आधारलेली आहे.

जीवनविकासमार्गावर कार्याचा एकनिश्चय होणे ही कर्मयोगाची गरज असते. हे भगवतगीता स्पष्ट करते. कर्म घडण्यासाठी कार्याचा एकनिश्चय व निश्चयासाठी निष्काम स्थिति(चंचलतामुक्त) ही प्रत्यक्षात कर्म घडण्याची किल्ली असते.

चंचलत्वमुक्ति यासाठी मनोवश vs. आत्मवश स्थिति यातील भेद जाणणे. कर्मयोगासाठी बुद्धियोगाचा आश्रय महत्वाचा ठरतो. ईश्वरभक्तिने बुद्धियोग लाभतो.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

******

२-४३ :

"क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यं गतिंप्रति"

(The goal of life)

'Survival of the fittest' ! जीवनाविषयी हाच संदेश डार्विनने दिला होता. जीवन आहे म्हणुन जगायचे आहे. या जगण्यासाठी कर्म करुन विकास करायचा, भोगैश्वर्यासाठी (या लोकी वा मरणोत्तर) विशेष कर्म करायचे. ही Survival स्थिति असते. याच Survival जगण्यात योग्य काय अयोग्य काय?या संदर्भात स्वयंप्रेरणेने चांगले-वाईट जाणण्यासाठी इहलोकी पाप-पुण्य व याचा परिणाम परलोकी स्वर्ग-नरक अशा भाष्याचा उपयोग होतो.

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्म फलप्रदां।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यं गतिंप्रति।।(२-४३)

अर्जुन याच ज्ञानाचा उपयोग निष्क्रियतेसाठी करतो. इहलोकी निष्क्रिय झाले तरी नरक मिळणार नाही. अर्थात स्वर्ग मिळाला नाही तरी चालेल पण नरक मिळायला नको.

नरके नियतं वासो भवती इति अनुशुश्रुम्।(१-४४)

भगवतगीता जीवनाचे ध्येयच बदलविते.

"बंधन vs. मोक्ष" (स्वातंत्र्य) हे जीवनाचे तत्वज्ञान सांगते व यासाठी "Survival vs. ईश्वरधाम(बुद्धियोग)" हा बदल असतो. यामुळे जीवनविकासाचा मार्ग "अमृतंगमय" जाणतो. ईश्वरधाम Higher consciousness शी संबंधीत असते. ज्या ईश्वराचा अंश प्राणतत्वात आहे तेच ईश्वरधाम मनुष्याचे अंतिम Destination आहे. जोवर या धामाला पोहोचत नाही तोवर जन्ममृत्युचे फेरे सुरु असतात. याच आत्मज्ञानाला अध्यात्म संबोधले आहे. या ज्ञानाचा उपयोग वर्तमानात करण्यासाठी जीवनाचा शाश्वत विकासाचा मार्ग "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) असा होतो. या मार्गावर बुद्धियोगाचा आश्रय असतो. याच ज्ञानाचा उपयोग करुन बुद्धियुक्त/ योगयुक्त होतो.

मोक्षप्राप्ति या संदर्भात शुक्लपक्ष (मोक्ष), व कृष्णपक्ष (बंधन, पुनर्जन्म) अशा दोनगति सांगितल्या आहेत. ज्ञान स्वर्गप्राप्तिचे असो वा मोक्षप्राप्तिचे, (मार्गदर्शक) सृति या संदर्भातच या ज्ञानाचा उल्लेख भगवतगीता करीत आहे. कुणी महात्मा म्हणतो, मी लोकांना चंद्र दाखवतो पण लोक चंद्र न पाहता माझ्या बोटाकडेच पाहतात. (बोटाची दिशा कशी असेल म्हणजे चंद्र दिसेल? यावर भाष्य). म्हणुन भगवतगीता म्हणतत आहे,
शुक्लकृष्णे गती हि एते जगतः शाश्वते मते।(८-२६)

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।।(८-२७)

सार:

योग्य-अयोग्य संकल्पना असलेल्या ज्ञानाचा उपयोग मनुष्य स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी करतो. अर्थात हे Judgement thinking असते. मनथरेने असेच ज्ञान (स्वतःला शहाणे समजुन दुसऱ्याला चुक ठरविणे) कैकयीला वाटले. या पार्श्वभुमिवर मनुष्याला काय हवे (What I want?)हा प्रश्न महत्वाचा असतो. अर्जुनाने वास्तव स्विकारले तेंव्हा प्रश्न केला. काय हवे! यात पारदर्शकता आली. जे त्याचे नियतकार्य आहे ते दुःखमुक्ति कशी करेल हा त्याचा प्रश्न असतो. अर्थात " प्रज्ञावाद (शहाणपणाचे भाषण) vs. काय हवे?ही पारदर्शकता भगवतगीतेने सर्वप्रथम आणली. "Judgement thinking vs. प्रेम" (जसे आहे तसे स्विकारणे) याचा हाच आधार असतो.

"We should not pretend to understand the world only by the intellect. The judgement of the intellect is only part of the truth. "

Carl Jung

*******

(२-४४)

*************************

भोगैश्वर्य प्रसक्तानां तया अपहृत चेतसाम्।

व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।।

*************************

(२-४४) :

"भोगैश्वर्य प्रसक्तानां तया अपहृत् चेतसाम् "

(Logic of Internal battle)

*तया अपहृत् चेतसाम् (आंतील आवाजाचा विसर)

Born to win but conditioned to loose

एखादा चोर सुरुवातीला चोरी करतो तेंव्हा त्याचा आंतील आवाज सांगतो, हे चुक आहे तरी पण चोरी करतो. यानंतर चोरीची Practice संवय होते. व आंतील आवाज बंद होतो. एक गरुडाचे पिलु कोंबड्यांच्या कळपात वाढते. पिलु मोठे झाल्यावर त्याचा आंतील आवाज त्याला उडण्यासाठी प्रेरीत

करते. वयोवृद्ध कोंबडी सांगते, उड्डान आपले काम नोहे.
कालांतराने आंतील आवाजच बंद होतो.

"Born to win but conditioned to loose"

मनुष्याची शरीरयात्रा चालण्यासाठी त्याला कर्म करावे लागते. इच्छापुर्तिसाठी कर्म करणे हा व्यवहार असतो. या प्रक्रियेत सकाम कार्यरत असतो, तेंव्हा भोगैश्वर्यात आसक्ति(Attachment) असते. या आसक्तिमुळे कार्याचा एकनिश्चय होण्यास अडथळा होतो. सकाम स्थितित Lower consciousness (Senses mind) क्रियाशील असते. हीच संवय जडली असता आंतील आवाजाचा (Higher consciousness) विसरच पडतो.

भोगैश्वर्य प्रसक्तानां तया अपहृत् चेतसाम् ।
व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते॥(२-४४)

"When an inner situation is not made conscious, it appears outside as fate. "

Carl Jung

जीवनमुल्यांचा वापर, अध्यात्माचा वापर आंतील आवाज (चेतना जागृति) क्रियाशील करते. व येथेच जीवनाची लढाई(Internal battle) जाणु शकतो.

Lower consciousness vs. Higher consc.

सकाम vs निष्काम कर्म

जीवनमार्गातील अडथळे, संशय लढाच निर्माण करीत असतात. हा लढा जाणुन घेतला नाही तर मनुष्य निष्क्रियही होतो. म्हणुन भगवतगीता जीवनाचा लढा स्पष्ट करीत आहे.

नियतकार्य या संदर्भात युद्ध करणे दुःखदायी आहे म्हणुन युद्ध करणे योग्य नाही ही अर्जुनाची मनस्थिति सांगते. यामुळे युद्ध करणे कि न करणे हे दोन Option असतात. व या स्थितित निष्क्रिय होतो.

अर्जुन जेंव्हा युद्ध करणे धर्म कि अधर्म?हा निश्चय होत नाही ही कबुली देतो. अर्थात "लढा" स्विकार करतो. सकाम स्थितित नियतकार्य अधर्म वाटते. भगवतगीता निष्काम कर्माची प्रक्रिया(Detachment) सांगते.

निर्द्वन्द्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्।(२-४५)

याच लढ्यासाठी अध्यात्मज्ञानाचा वापर आहे.
तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(८-७)

सार :

"There are powers inside of you which, if you could discover and use, would make of you everything you ever dreamed or imagined you could become. "
-Orison Swett Marden
******

(२-४४):
"व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते"
(Importance of Determination)

मनुष्याला जीवनात सुख हवे पण अशांति(Tension, Worries, Fear), दुःख येते. जेंव्हा दुःखी होतो तेंव्हा मनुष्य कसे आचरण करतो, कसे भाष्य करतो व कसे असावे? याचा उलगडा करतांना

मनुष्याला जीवनात काय साध्य करायचे आहे, याचे रहस्य भगवतगीता सांगते.

जेंव्हा दुःखी अवस्थेवर उपाय न करता मनुष्य स्वतःचे वास्तवच hide करतो व स्वतःला योग्य ठरविण्यासाठी ज्ञानी भाष्य बोलतो, हा एकप्रकारे जीवनविकासातील Barrier असतो. यामुळे मनुष्य अशांत जीवन जगतो, त्याचा वर्तमान विकासमार्गावर नसतो, अर्थात स्वतःचाच शत्रु बनतो. हीच Mental poverty ठरते.

"Mental poverty can spread like an uncontrollable forest fire if you do not stop the mindset in its tracks. This negative mindset can be passed along to your progeny if you do not fight to control it. "

याच संदर्भात जीवनविकासातील Barrier breaker (स्वतःचा बंधु होणे) हेच भगवतगीतेचे ज्ञान आहे.

सकारात्मक दृष्टि:
सुखासाठी प्राप्ति व प्राप्तिसाठी कार्य ही सामान्यतः व्यवहारातील जाण असते. प्राप्ति या संदर्भातच किर्ति, स्वर्गप्राप्ति याचा उल्लेख

होतो. प्राप्तिसुखाचा अभाव दुःखाचे, अशांतिचे कारण बनते. तसेच परिणामभयाने द्वंद्व असतो व द्वंद्वामुळे कार्याचा निश्चय होत नाही. याप्रमाणे प्राप्तिसुख या संदर्भात एक बाजु सुखाची तर दुसरी अभावाची बाजु दुःखाची बनते. याच पार्श्वभुमिवर कार्याचा निश्चय होण्यासाठी "स्वधर्म" या जीवनमुल्याचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते. "निष्क्रियता व कार्य" यातील कार्य घडण्यासाठी स्वधर्म निवड ही सकारात्मक दृष्टि असते. यामुळे DETERMINATION असते. व निष्क्रियतेचे समर्थन ही नकारात्मक दृष्टि ठरते.

याप्रमाणे सुखशांति या संदर्भात प्राप्तिसुखासाठी कार्य व कार्याचे DETERMINATION होण्यासाठी "स्वधर्म" याचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते. यामध्ये निर्द्वंद्व अवस्था महत्वाची असते. व याच अवस्थेला highlight करण्यासाठी कार्यकौशल्याचा दुसरा भाग भगवतगीतेत सुरु होतो, जो कर्मयोग म्हणुन प्रसिद्ध आहे.

सुखाची साधना:

कर्मयोगात DETERMINATION कार्याचा एकनिश्चय महत्वाचा असतो. चंचलतेमुळे निश्चय होत नाही. यासाठी "बुद्धियोग" निष्ठा महत्वाची ठरते. अर्थात बुद्धियोगामुळे "अमृतत्वाय कल्पते"(Road connecting Present destiny and Destination) या मार्गावर असतो. या मार्गावर सुखाची साधना (योगः कर्मसु कौशलम्") महत्वाची असते, याद्वारा Mental poverty चा नाश होतो.

बुद् ध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)
अर्थात कार्यातील द्वंद्वमुक्ति या संदर्भात "कर्मबंधं प्रहास्यसि" या शब्दाचे प्रयोजन आहे. अनेक धर्मशास्त्र अमुक विशेष कार्य केले तर स्वर्गप्राप्ति होते असा सत्कार्य या संदर्भात उल्लेख करतात. पण ही कार्याची सकाम स्थिति असते. कार्याची सकाम स्थिति द्वंद्व निर्माण करते व सत्कार्य जरी असेल तरी कार्याचा निश्चय होण्यास अडथळा करते.

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यं गतिंप्रति।।
भोगैश्वर्यप्रसक्तानां तया अपहृत् चेतसाम्।
व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।।(२-४४)

व्यावहारिक बोध:

व्यवहारात " प्राप्तिसाठी कार्य" यातील कार्य हे साधन असते. याच कार्याद्वारे मानसिक शक्ति प्रदान करणारी सुखाची साधना हा भगवतगीतेचा विषय आहे. जगात अनेक धर्म आहेत, तत्वज्ञान आहे. मनुष्य जीवनात सुखशांति प्राप्त व्हावी म्हणुन ज्ञानाचा शोध घेत असतो. सुखशांति या संदर्भात मानसिक दुर्बलता vs मानसिक शक्ति - " योग" (दुःखान्त, निर्भय), स्थितप्रज्ञ हा विषय भगवतगीतेने स्पष्ट केला आहे. या मार्गात कार्याचे DETERMINATION होण्यासाठी बुद्धियोग, "अमृतत्वाय कल्पते" या मार्गाची ओळख भगवतगीता देते. या ज्ञानाला विद्या या संदर्भात राजविद्या म्हटले. धर्म या संदर्भात धर्मश्रेष्ठ (शाश्वतस्य धर्मस्य)म्हटले आहे.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।(२-४०)

"The power for creating a better future is contained in the present moment: You create a good future by creating a good present. "

Eckhart Tolle

******

(२-४५)

*************************

त्रैगुण्यविषयावेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन।

निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्।

*************************

(२-४५):"निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्"

(Principle of Rightousness)

"The human mind naturally finds pleasure in the principles of righteousness, just as the eyes take pleasure in color and the ears in sound. "

-Wang Yangming

चांगलेपणाचा जगात आदरच होतो. लोकांनी चांगले व्हावे यासाठी उपदेशही असतात. विशेषतः धर्माची ओळख चांगलेपणा (दया धरमका मुल है) या संदर्भात होते. लोक चांगलेपणालाच सात्विक समजत असतात. समाजमान्य असलेल्या या चांगलेपणामुळेच अर्जुन दुःखी होतो व मला कांहीही नको ही

भूमिका घेतो. आदर्श या संदर्भात त्यागाला आपल्या सोयीने अर्थ लावतो. समाजात चांगलेपणा जेंव्हा दुर्बलता ठरते, तेंव्हा अधर्माला space मिळतो. म्हणुन चांगलेपण या संदर्भातील दुबळेपण भयावह असते. यामुळेच नकारात्मक विचार असतात. म्हणुन मनुष्यजीवनातील चांगलेपणाचे ज्ञान होण्यासाठीच भगवतगीता जगासमोर आली. चांगलेपणासाठी " नित्यसत्वस्थो" या शब्दाचे प्रयोजन केले. व दुर्बलतेवर मात करण्यासाठी योग( Exercise) कर्मयोगाचे प्रयोजन स्पष्ट केले. (त्रायते महतो भयात्).

त्रैगुण्यविषयावेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन।
निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्।(२-४५)

जगातील उपलब्ध ज्ञान त्रीगुणाने लिप्त असते. तर ईश्वरज्ञान गुणातीत असते. जगत असतांना निर्द्वन्द्व, नित्यसत्वस्थो, निर्योगक्षेम, आत्मवान (शाश्वत ईश्वराला जोडलेले conscious, True Self, Higher consciousness) असणे या शब्दांचे प्रयोजन केले आहे. यासाठी बुद्धियोग प्रयोजन आहे.

समाजात सुख-दुःख, चांगले-वाईट, श्रीमंत-गरिब, ज्ञान-अज्ञान, प्रकाश-अंधार, इच्छा-द्वेष अशी Polarity असते. निर्द्वन्द्व अवस्था साध्य करणे कर्मयोगासाठी आवश्यक असते.

कार्यातील द्वंद्व अवस्थाच(इच्छा-द्वेष) मार्गात Barrier निर्माण करते. या मार्गात कार्याची निर्द्वन्द्व अवस्था म्हणजे कार्याचा दृढनिश्चय असणे, स्वधर्म(Tiebreaker) या जीवनमुल्याचा वापर करणे . कार्य करतांना फलत्याग याला त्याग म्हटले आहे. व याच त्यागाला निर्योगक्षेम म्हटले आहे.

कार्यम् इत्येव यत् कर्म नियतं क्रियते अर्जुन।

संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्विको मतः॥(१८-९)

श्रेष्ठ-कनिष्ट या संदर्भात श्रेष्ठत्वाचा मार्ग (यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ) सांगितला आहे. या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही. अर्थात सुख-दुःख या संदर्भात शाश्वत सुख (योग, दुःखान्त, निर्भयता, आत्मविश्वास) जाणत असतो. व याच सुखाची साधना कार्याद्वारे (Exercise) होत असते.

******

( २-४६)

*************************

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके।

तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः।।( २-४६)

*************************

(२. ४६):

"यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके"

( ज्ञान या संदर्भात उक्ति vs कृति)

*उक्ति आणि कृति या संदर्भात जगातील व्यावहारिक सत्य:

अ)निष्क्रिय vs सक्रिय

जगात भयाचा आश्रय करुन नकारात्मक भाष्य करणारे, कष्टि मनाने जगणारे, आळशी(यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदं एव च) हा एक प्रकार आढळतो. तर दुसरा विकासमार्गावर उत्साहित असलेला. या प्रकारात विश्वासाने कार्यरतअसतो, शांत, प्रसन्न, सकारात्मक, निर्भय असतो.

ब)दुष्कृत vs सुकृत

दुष्कृत्य करणारे कुणाच्या परवानगीची वाट बघत नाही. चांगल्या लोकांनाच समाजात अडचणी जाणवतात व प्रसंगी निष्क्रियता आदर्श दिसेल असे समर्थन करतात. या प्रक्रियेत स्वतःला ज्ञानी समजुन भाष्य करतात. असे ज्ञानी इतरांनी काय करावे, जगात कुणी काय करावे यावर तोंडसुख घेतात. जणु इतरांना सतत challange करीत असतात. म्हणुनच अशा (बेजबाबदार )भाष्याचा समाजावर फारसा परिणाम नसतो.

"तु तुझ्या कृत्याचा एकटाच जबाबदार आहे, " वाल्याचा वाल्मिकी होण्यास हा एकच संदेश परिणामकारी ठरला.

*ज्ञान:

"He who knows himself is enlightened. "

Lao Tzu

हिऱ्याचा दगड असतो तसे मनुष्यजीवन आहे. याला पैलु पाडुन स्वप्रकाशित होणे हेच जीवनविकासाचे अंतिम सत्य आहे. स्वतःच्या जीवनविकासाची जबाबदारी मात्र स्वतःला घ्यावी लागते. याच जबाबदारीचे महत्व जीवनविकास या संदर्भात भगवतगीता सांगते. यांत भयमुक्तिचे ज्ञान आहे. शक्तिचे ज्ञान आहे.

"Human capabilities are finite and all knowledge is governed by the limits of this capability. We should get out of this limitation. When we reach beyond knowledge by crossing the boundaries of human capabilities, we will realise our ‘Self’ at a higher level. : You were put on this earth to achieve your greatest self, to live out your purpose, and to do it courageously. "

Steve Maraboli,

मनुष्याला चांगल्या कार्याची प्रेरणा मिळते पण Courage अभावी तो टाळत असतो. मनुष्याच्या चांगल्या गुणांत(दैवी संपदेत) निर्भयता हा प्रथम गुण भगवतगीता दर्शवित आहे.

अभयं सत्वसंशुद्धिः.. (भगवतगीता १६-१)

निर्भयता, साहस शक्ति असते. या शक्तिमुळे विचलित होत नाही. ती आपोआप मिळत नाही. या अदभुत शक्तिची ओळख भगवतगीता करुन देते.

तं विद्यात दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम् ।(६-२३)

हीच शक्ति संपादित करण्यासाठी कर्मयोगाचे प्रयोजन आहे.

स्वल्पम् अपि धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)
व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।(२-४१)

या मार्गात कार्याचा दृढनिश्चय असतो. शक्तिअभावी चंचल होतो, म्हणुन बुद्धियोगाचा आश्रय करुन दृढनिश्चय करणे हा कर्मयोगाचा पाया आहे. तर कार्याद्वारे योग अर्थात शक्तिसंचिती करणे, हे कौशल्य साध्य करणे म्हणजेच कर्मयोग.
(योगः कर्मसु कौशलम् )

*ज्ञान व ईश्वरश्रद्धा:

ज्ञान या संदर्भात ईश्वरश्रद्धा Strength आहे, Weakness नाही, मनुष्यजीवनातील दुबळेपण दुर होण्यासाठीच ईश्वरश्रद्धा ही पारंपरिक gift आपल्याला मिळालेली आहे. असे जन्मही दुर्लभ असतात.

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यद् इदृशम् ।।(६-४२)

ज्ञान या संदर्भात ईश्वरज्ञान सर्व ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे.

कोणतेही पुस्तकी ज्ञान(धर्माचे कां असेना) व ईश्वरज्ञान यांतील भेद विहिर व समुद्र असा असतो,

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके।

तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः।।( २-४६)

All purposes served by a little well can at once be served by a great reservior of water.

ईश्वरश्रद्धा असणाऱ्यांनी बुद्धियोगाचे महत्व जाणणे, हा संदेश येथे भगवतगीता देते. बुद्धियोगामुळे जीवनविकासाचा मार्ग "अमृतत्वाय कल्पते" हा होतो. या मार्गावर विचलित होत नाही. नित्य विकासमार्गावर असतो.

***oooo

(२. ४७)

*************************

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।

मा कर्मफल हेतुर्भूः मा ते संगो अस्तु अकर्मणि॥

*************************

(२. ४७)/१:

"कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन"

(Know your Rights)

"नागरिक " या संदर्भातील मुलभूत अधिकार राज्यघटना स्पष्ट करते. तसाच जीवन जगण्याचा मुलभूत अधिकार (Right to live) भगवतगीता स्पष्ट करते. स्वातंत्र्य मानवाची मुलभूत प्रेरणा आहे हे घोषवाक्य आपण ऐकत असतो. याच संदर्भात भगवतगीता "बंधन vs मोक्ष "ज्ञान स्पष्ट करते. स्वातंत्र्याच्या या प्रक्रियेत निर्णयअधिकार महत्वाचा असतो. कर्म करण्याचा अधिकार निर्णय असतो. याच अधिकाराची जागृति "कर्मण्येव अधिकारः ते" याद्वारा भगवतगीता करुन देते. व शेवटी "यथा

इच्छसि तथा कुरु" याद्वारा संबोधन करुन अधिकार अबाधित ठेवते.

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।(२-४७)

काय व्हायला पाहिजे? हा "फल" या संदर्भातील विषय असतो तर त्यासाठी काय करायला पाहिजे ? हा "अधिकार" या संदर्भातील विषय असतो. दुसऱ्याने काय करावे हे भाष्य दुसऱ्याच्या अधिकाराविषयी असते, तर स्वतः काय करावे हा विषय स्वतःच्या अधिकाराविषयी असतो. भगवतगीता स्वतःचा अधिकार highlight करते.

अर्जुनाला स्वतःला निर्णय घेण्याची वेळ आली असता तो गोंधळतो. दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो. अर्जुनाला "युद्ध करणे योग्य कि अयोग्य" हे जाणुन घेण्याचा अधिकार होता. पण सरळ युद्ध करणे चुक आहे(Judgement!) हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. वास्तव न स्विकारल्यामुळे स्वतःचा अधिकारच विसरतो. ज्ञानविज्ञानयुगात हाच अधिकार (Right of reasoning) मनुष्याला मिळाला असतो. व याच अधिकाराची जाणिव भगवतगीता करुन देते. ज्ञानविज्ञानाने याच

अधिकाराची जाणिव झाल्यामुळे युरोपात १५वे शतक Age of Reasoning म्हणुन ओळखल्या गेले.

*वर्तमानातील Mindset व भगवतगीतेचे महत्व:

जसे पक्षाला पंखाचे महत्व तसे मनुष्याला निर्णय अधिकाराचे महत्व असते. एक गरुडपिलु कोंबड्यांच्या कळपात वाढते. वाढ झाल्यावर त्याला उड्डान करावेसे वाटते. पण कोंबड्या त्याला सांगतात, उड्डान आपले काम नव्हे. हा विचार conditioned होतो. गरुड उड्डान विसरतो. "Born to win but conditioned to loose"

निट्झि या तत्वज्ञाने स्वतंत्र व गुलामी Mindset या संदर्भात Master morality व Herd morality यातील भेद दर्शविला. निर्णय अधिकार Master morality ला पोषक असते. व याच Mindset मधील निर्णयप्रक्रियेत दुःखाने विचलित न होणे याचा उल्लेख भगवतगीता करते.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

"What light is to the eyes - what air is to the lungs - what love is to the heart, liberty is to the soul of man. "

Robert Green Ingersoll

*********

(२-४७)/२: " कर्मण्येवाधिकारस्ते"

"कर्मण्येव अधिकारः ते " भगवतगीतेतील सर्वाधिक प्रचलित संदेश आहे. हा संदेश व्यक्तिगत अधिकाराची जाणिव करुन देते. अधिकाराचा संबंध स्वातंत्र्याशी असतो.

"Beggars are not choosers" अर्थात स्वातंत्र्याचे मुळ "स्वावलंबन" या जीवनमुल्यात (SELFHELP) असते. निवड अधिकार, निर्णय अधिकार, कर्माचा अधिकार मनुष्याचे Unique स्वत्व साकार करीत असते. मनुष्यातील स्वैरता, मानसिक गुलामी याचे कारण स्वातंत्र्याचे अज्ञान असते. म्हणुन स्वातंत्र्याचे ज्ञान या संदर्भात अधिकाराचे ज्ञान मुलभूत ज्ञान ठरते.

भगवतगीतेतील अधिकाराची तांत्रिक बाजु जाणुन घेणे महत्वाचे ठरते.

१. Natural rights vs Legal right

Natural rights are rights which are "natural" in the sense of "not artificial, not man-made", as in rights deriving from human nature or from the edicts of a God. They are universal; that is, they apply to all people, and do not derive from the laws of any specific society.

Legal rights: in contrast, are based on a society's customs, laws, statutes or actions by legislatures.

"Natural rights vs Legal right "या संदर्भात मुक्ति (मोक्ष) हा Natural right आहे तर स्वर्ग-नरक या भाष्याचा आधार Legal right असतो. भगवतगीता मुक्तिची भाषा बोलते, अर्थात मनुष्याच्या Natural right विषयी भाष्य करते.

युद्ध न करणे ही अर्जुनाची नैसर्गिक (दुःख टाळण्यासाठी) निवड होती. मनुष्याला अधिकाराची जाण नसली तर अशीच स्वैर निवड आपोआप होते. याच अधिकाराची जाणिव होण्यासाठी सुखी असणे वा दुःखी असणे ही मनुष्याचीच निवड असते, असे तत्वज्ञ सांगतात. अर्थात सुखी होणे, स्वातंत्र्य यांचा Natural vs Legal Right* या संदर्भात नैसर्गिक अधिकार असतो.

२. Liberty vs Claim Right:

A claim right is a right which entails that another person has a duty to the right-holder.

A liberty right or privilege, in contrast, is simply a freedom or permission for the right-holder to do something, and there are no obligations on other parties to do or not do anything.

भगवतगीतेत श्रीकृष्णाने अर्जुनाला त्याच्या अधिकाराची जाणीव करुन दिली.

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।

मा कर्मफल हेतुर्भूः मा ते संगो अस्तु अकर्मणि।

Liberty Right vs Claim Right* या संदर्भात "कर्मण्येव अधिकारः ते "हा Liberty right असतो. तर "मा फलेषु कदाचन " हे Claim Right या संदर्भात आहे.

३. Group vs Individual Right:

"The general concept of rights is that they are possessed by individuals in the sense that they are permissions and entitlements to do things which other persons, or which governments or authorities, can not infringe. "

"Individual rights are rights held by individual people regardless of their group membership or lack thereof. "

"Group vs Individual Right" या संदर्भात समुह अधिकार नियमांच्या आधारावर (Legal right) असतात. भगवतगीता व्यक्तिगत अधिकारावर भाष्य करते. समुह अधिकाराचा आदर करुन स्वतःच्या नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करणे ही व्यक्तिगत मंजुरी असते. हा Positive Right ठरतो.

"मा कर्मफल हेतुर्भूः मा ते संगो अस्तु अकर्मणि। (i. e. Inaction )हा Negative right ठरतो.

४. Positive right vs Negative Right:

*Positive rights are permissions to do things, or entitlements to be done unto.
*Negative rights are permissions not to do things, or entitlements to be left alone.

*स्वातंत्र्याचे ज्ञान सांगितल्यानंतर श्रीकृष्णांनी अर्जुनाच्या निवडअधिकाराला आवाहन केले.
"विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु"(१८-६३)

व्यक्तिगत अधिकाराचे ज्ञान झाले तर मनुष्य स्वतःची बुद्धि वापरतो. मनुष्याची Belief system त्याची Conditioned मानसिकता असते. यामुळे आपण आपल्या Belief system लाच आव्हान देत आहो असा संशय येतो. म्हणुन ज्या श्रीकृष्णाने

अधिकार जागृत केला, त्याच श्रीकृष्णाने (ईश्वरभूमिकेत)विश्वास दिला .

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वाम् सर्वपापेभ्यः मोक्षयिष्यामि मा शुचः ।।(१८-६६)
****

(२-४७) :
"कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन"
(स्वतःचे अधिकारक्षेत्र)

स्वतःचा निर्णय अधिकार, निर्णयक्षमता, स्वतःचे कर्तृत्व अर्थात स्वतःचे अधिकारक्षेत्र जीवनात महत्वाचे असते. पण काय घडणार ?याचा विचार करुन निष्क्रिय होणे हा मनुष्याच्या अज्ञानाचा विषय होतो.

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतुर्भुः मा ते संगो अस्तु अकर्मणि।।(२-४७)

जगातील या सर्वश्रुत verse मधुन भगवदगीतेत अधिकार शब्द आलेला आहे. मनुष्य कुणाला मदत करु शकतो, दान करु शकतो, सत्कार्य करु शकतो, स्वतःच्या अधिकारातील कार्य करु शकतो. याद्वारेच विकास होतो, कर्तृत्व बनत असते. पण (दुर्दैवाने) स्वतःचे अधिकारक्षेत्र कळले नाही तर!इतर कसे आहेत?ते असे कां वागतात?ते अज्ञान, मुढ आहेत पण आपण तर शहाणे आहोत ना!आपण काय करावे हे जर आपल्याला कळत आहे तर घोरयुद्धापासुन परावृत्त होणे आपल्यासाठी श्रेयस्कर आहे!याप्रमाणे अर्जुन आपल्या निष्क्रियतेचे समर्थन करतो.

समाजात इतरांनी काय करावे?यावरच focus असतो. पण स्वतः काय करावे यावर focus नसेल तर कोणती परिस्थिति उदभवते हे अर्जुनाच्या भुमिकेवरुन भगवदगीता दर्शवित आहे. अर्जुन अज्ञानाला ज्ञान, धर्माला अधर्म दर्शवितो. याच पार्श्वभुमिवर "ज्ञान" सांगण्यात आले. स्वतःसाठी काय श्रेयस्कर ? हा अर्जुनाचा प्रश्न असतो. व शेवटी अर्जुनाचा अधिकार अबाधित ठेवुनच ज्ञानाचा समारोप होतो.
इति ते ज्ञानं आख्यातं गुह्यात् गुह्यतरं मया।
विमृश्य ऐतद् अशेषेण यथा इच्छसि तत्कुरु।।(१८-६३)

निट्शी म्हणतो, जगात Master व Herd(Slave) अशी दोन प्रकारची नीति (Morality) असते. भगवदगीता श्रेष्ठ व सामान्य असे दोन प्रकार सांगत आहे. सामान्य श्रेष्ठांचे अनुसरण करतो तर श्रेष्ठ स्वतःची बुद्धि वापरतो. याला बुद्धियोग म्हटलेले आहे. अर्थात त्याची बुद्धि कोणत्याही सृतिने विचलित होत नाही. म्हणुन श्रेष्ठ हो असा संदेश आहे.

नैते सृति पार्थ जानन योगी मुह्यति कश्चन।
तस्माद् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन॥(८-२७)

यद् यद् आचरति श्रेष्ठः तत् तत् एव इतरो जनः।
स यत् प्रमाणं कुरुते लोकातदनुवर्तते॥(३-२१)

स्वतः काय करायचे हे निश्चितपणे श्रेष्ठ जाणतो. परिणामाने त्याची बुद्धि विचलित होत नाही.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

सार :

*अधिकार:

सिमित काळासाठी उपलब्ध झालेले जीवन सार्थक व्हावे, यासाठी भगवदगीतेतील मनुष्यजीवनातील "अधिकार" शब्दाचे महत्व जाणणे प्रथम आवश्यक आहे.

"In the long run, we shape our lives, and we shape ourselves. The process never ends until we die. And the choices we make are ultimately our own responsibility. "
Eleanor Roosevelt

*श्रेष्ठ:

सामान्य-श्रेष्ठ असा भेद जाणुन श्रेष्ठ जीवन जगण्याचे महत्व जाणणे आवश्यक असते. मनुष्य सामान्य जीवनच जगत असतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी अज्ञानाला ज्ञान दर्शविणे याचा अर्थ स्वतः काय करायचे हे निश्चितपणे कळत नाही. याच पार्श्वभुमिवर भगवदगीतेचे ज्ञान उपलब्ध झाले. या ज्ञानाला ज्ञानविज्ञानाचा आधार आहे. याचाच अर्थ हे ज्ञान श्रेष्ठ जीवन जगण्यासाठी आहे कारण मनुष्य सामान्य जीवनतर जगतच असतो.

************

(२-४७)विषय ७७९ :
"कर्मण्येव अधिकारः ते"
(Power of Choice)

"The great thing about life-the most magnificent thing about being these sentient human beings-is that we have been given the power of choice. "
-Bryant McGill,

जीवनयात्रेत कर्म घडत असते. व्यवहारात कर्म घडणे याचा आधार इच्छा-कर्म (State of Want vs State of Art) असा असतो. कर्म या संदर्भात "कार्यकौशल्य" संस्कार जीवनविकासात आवश्यक असतो. (हाच भगवदगीतेचा मुख्य विषय आहे) अन्यथा इच्छा हावी होवुन(मनोवश) मनुष्याला अशांत करते, ढोंगी करते, बुद्धिभ्रम होवुन अखेर बुद्धिनाश होतो.

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते।।(३-६)

ध्यायतो विषयान् पुंसः संगः तेषु उपजायते।(२. ६२)
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।(२-६३)

याच पार्श्वभुमिवर कर्मकौशल्याचा संदेश भगवदगीता देत आहे, ज्यामुळे कर्म जीवनाच्या सर्वांगीण विकासाचे साधन ठरते.

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतुः भूः मा ते संगो अस्तु अकर्मणि।।(२-४७)

स्वतःचा निर्णय अधिकार(Power of Choice) हा कर्मकौशल्याचा प्राण आहे.

"Regardless of what you lose or the challenges you face, you will never lose your power to make decisions"

Dr. Jacinta Mpalyenkana,

निष्काम कर्म या संदर्भात भगवदगीता परिणामाच्या भयापासुन मुक्त करते.

योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय।
सिद्धिअसिध्योः समो भूत्वा समत्वंयोग उच्यते।।(२-४८)
समत्वयोगाने कार्य करणे या प्रक्रियेत शक्तिची (योग-दुःखान्त) साधना होते.
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)
****************
(२-४७)/५:
"मा कर्मफलहेतुः भूः मा ते संगो अस्तु अकर्मणि"
(अपेक्षा vs अधिकार)

Man is fully responsible for his nature and his choices.
Jean-Paul Sartre

वर्तमानात सुखी राहणे वा दुःखी, निराश राहणे ही मनुष्याचीच निवड असते. सुखी होण्याचा त्याला अधिकार आहे व याचसाठी विकासमार्ग जाणणे आवश्यक आहे.

विकासमार्गातील कार्याची अपेक्षा vs. अधिकार ही भूमिका कर्तव्याशी संबंधित असते.

समाजात कर्तव्य ठरत असते व कर्तव्यालाच आव्हान मिळत असते. समुहात एखाद्या प्रश्नावर, विषयावर चर्चा होते, (सामुहिक) निर्णय होतो व याच निर्णयानुसार व्यक्तिला कर्तव्य प्रदान होते. याच प्रक्रियेत अर्जुनाचे नियतकार्य ठरते. पण कर्तव्य या संदर्भातच अर्जुनाला संशय उत्पन्न होतो. दुःखी झाल्यामुळे युद्ध न करणे ही निवड करतो. आपल्या मानसिकतेनुसार स्वतःच्या कर्तव्याविषयी भाष्य करतो.

कर्तव्य vs. अपेक्षा

युद्धकार्याने काय मिळेल?यावर भाष्य करतो व मी योग्य आहे, जबाबदार आहे!हे सिद्ध करण्यासाठी युद्ध करणे धर्माविरुद्ध आहे व धर्मपालन माझे कर्तव्य आहे ही भूमिका घेतो. कार्याने काय मिळेल?धर्म !अशी भाषा अर्जुन वापरतो, त्याच भाषेचा श्रीकृष्ण वापर करतात.

कर्तव्याचा धर्माशी संबंध येतो, तेंव्हा कर्तव्य vs अपेक्षा यात निर्माण होणारा Tie (द्वंद्व)सोडविण्यासाठी "स्वधर्म" या शब्दाला highlight केले आहे.

*स्वधर्माचरण करण्यासाठी तुझ्या स्वभावनियत सहजकार्याला संधी मिळाली आहे . याद्वारे तुला स्वर्गद्वारच उघडे झाले आहे.

*धर्मासाठी स्वधर्माचरण केले नाही तर स्वर्गापासुन वंचित होशील. तुला जे लोक शुर म्हणुन ओळखतात, त्यांचा अपेक्षाभंग होईल. शत्रुंना तुझी टर उडविण्याची संधि मिळेल. ही अपकिर्ति संभाविताला मृत्युपेक्षाही भयावह असते.

*स्वधर्माचरण करुन जिंकलास तर राज्य भोगशील, व मृत्यु आला तर स्वर्गप्राप्ति होईल.

याप्रमाणे धर्म या संदर्भात कार्याचे महत्व स्पष्ट होते. यानंतर जीवनाशी संबंधित असलेला अधिकार vs अपेक्षा हा मुलभूत भाग येतो.

अपेक्षा vs. अधिकार

In the roles of life where you fulfill responsibilities, you have personal rights.

याच संदर्भात जीवन व विकासाचा अधिकार स्पष्ट होतो. विकासमार्गावर कार्य करण्याचा(निर्णय) अधिकार असतो. मनुष्य

कर्मफलाची अपेक्षा करुन संशयी होतो व निष्क्रिय होतो व स्वतःच्याच विकास अधिकाराचा त्याग करतो. हाच अधिकार वापरण्यासाठी निष्काम कर्माचे शास्त्र भगवतगीता स्पष्ट करते.

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।

मा कर्मफलहेतुः भूः मा ते संगो अस्तु अकर्मणि।(२-४७)

Priority

इच्छा-अपेक्षेमुळे कार्यफलात आसक्त असतो. व योग्य-अयोग्य या द्वंद्वात सापडतो. कार्यातील योग्य-अयोग्य या द्वंद्वापेक्षा कार्याद्वारे योग (दुःखान्त, शाश्वत सुख) महत्वाचा (Priority)असतो. समत्वयोगाने कार्य घडण्यासाठी कार्याचा एकनिश्चय हवा असतो. याचसाठी बुद्धियोगाचे महत्व (बुद्धिभ्रम vs बुद्धियोग) आहे. अर्थात हा विकासमार्ग "अमृतत्वाय कल्पते" ठरतो. हे Transformation बुद्धियोग ठरते. म्हणुन येथे बुद्धियोगाला Priority आहे. (बुद्धियोग ईश्वराची सर्वश्रेष्ठ कृपा असते. ज्यामुळे हृदयातील अंधाराचा नाश होतो. )

दुरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय।

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।।(२-४९)

**००००० 

(२-४८)

*************************

योगस्थः कुरु कर्माणि" संगं त्यक्त्वा धनञ्जय।

सिद्धि असिद्धियोः समो भूत्वा समत्वं योग उच्यते।।

*************************

(२-४८)/१ : "योगस्थः कुरु कर्माणि "

( " Elevating yourself to higher level of consciousness. ")

"योगस्थः कुरु कर्माणि" संगं त्यक्त्वा धनञ्जय।(२-४८)

निष्काम कर्म या संदर्भात कार्य जबाबदारीने करणे, निष्ठेने करणे, परिणामभयाला समत्वयोगाने Replace करणे. अर्थात कार्याद्वारे ईश्वरभक्ति करुन शक्तिची (निर्भयता, दुःखमुक्ति-योग ) ही साधना आहे. यासंदर्भात पुढिल शब्द आले आहेत.

१. बुद्धियोग :ईश्वराशी connect होणे म्हणजे Activation of Higher consciousness .

२. कार्याचा दृढनिश्चय : यात निर्णय अधिकार, व दृढनिश्चय असतो.

३. योगस्थ वृत्तिने कार्य

४. बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः (२-४९निष्काम कर्म रहस्य)

४. बुद्धियुक्त : योग्य-अयोग्य या द्वंदापासुन मुक्त. Priority असते- योगः कर्मसु कौशलम् .

५. उपलब्धि : "त्रायते महतो भयात् "अर्थात निर्भय होणे .

मनोवैज्ञानिक विश्लेषण :

सकाम कार्यात Lower consciousness क्रियाशिल असते. Lower consciousness( मन -Senses mind, Ego mind )मुळेच दुःख(attached pain) असते. म्हणुन व्यवहारातील कार्य "योगस्थः कुरु कर्माणि" या अवस्थेसाठी " Transformation "हाच यांतील विषय आहे.

मनुष्य ईश्वरभक्ति करतो. पण व्यवहारात मानसिकतेची परिक्षा होत असते. म्हणुन व्यवहारात मानसिक आरोग्य "Mental Wellness" यासंदर्भात "ईश्वरश्रद्धा " याचा उपयोग Higher consciousness साठी येथे केला आहे. किंवा चांगलेपणा याला

ईश्वरज्ञानाशी (अव्यक्त) जोडले हा बुद्धियोग. अर्थात कार्याचा दृढनिश्चय हे साधन आहे. म्हणुन "योगस्थ" संदर्भात निर्णयअधिकार, निर्णयक्षमता याला महत्व आहे. कार्याचे नियोजन, Goal ठरविणे-Execution ची Deadline, Commitment-वचन याचे महत्व जाणुन कार्याचा दृढनिश्चय होत असतो. व कार्याद्वारे भक्ति घडते.

"Our greatest human adventure is the evolution of consciousness. We are in this life to enlarge the soul, liberate the spirit, and light up the brain. "
Tom Robbins

********

२. ४८/२ :
"योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय"
(निवड, निर्णय व अधिकार Choice Architecture)

एका व्यक्तिकडे पुर्वजांची रुद्रवीणा असते. त्याला ती अडगळ वाटते व तो कचरापेटीत फेकुन देतो. एक साधु रस्त्याने चालला

असतो. तो हे दृश्य पाहतो. रुद्रवीणा घेतो व मधुर संगीत त्यातुन निर्माण करतो. लोक जमतात व आनंद घेतात. वीणा फेकणारा व्यक्ति वीणा माझी आहे म्हणुन परत मागतो. साधु म्हणतो, तुला वीणाचे महत्व कळले, तसेच जीवन आहे, याचे महत्व कळले नाही तर ते व्यर्थ, भार वाटते.

समाजातील व्यावहारिक प्रक्रिया निरोगी बनविण्यासाठी मानसशास्त्राचा उपयोग व्हावा हा नोबेलविजेता प्रा. रिचर्ड थॅलरचा शोध महत्वाचा आहे. अर्थशास्त्राला मानसशास्त्राची जोड देणे आवश्यक आहे, हे त्यांनी "Improving Decesions about Health, Wealth &Happiness या पुस्तकातुन व्यक्त केले.

निर्णयावर निवडीचे परिणाम :

निवड व निर्णय हे दोन वेगळे शब्द आहेत. जेंव्हा अनेक पर्याय उपलब्ध असतात, तेंव्हा योग्य निवड करण्याची जबाबदारी येते. ही जबाबदारी योग्य रितीने पार पडावी(Decesion making) यासाठी Choice Architecture या शब्दाची योजना प्रा. थॅलर यांनी केली.

इतरांनी काय करावे, यावर बरेच उपदेश असतात. आपण हाच आलाप ऐकत असतो, बोलत असतो. व ही जीवनरुपि वीणा वाजविण्याचे ज्ञान दुर्लक्षित होते. या पार्श्वभुमिवर भगवतगीतेतील (स्वतःचाच) Choice architecture (Self Decesion making -मानसशास्त्र , अधिकार याचे महत्व )जाणुन घेणे आवश्यक आहे.

अर्जुन युद्धक्षेत्रावर दुःखी होतो. युद्ध करण्यामुळे दुःख होईल हा विचार येतो व आता त्याला युद्ध करणे वा न करणे यात निवड करायची असते. त्यानुसार तो युद्ध न करणे ही निवड करतो. येथे अर्जुनाची आंतरिक मनःस्थिति त्याच्या निवडीस कारण असते. मानसशास्त्राच्या भाषेत हा Locus of control असतो, जो मनुष्याच्या Belief system ला व पर्यायाने निवड नियंत्रित करते.

भगवतगीतेनुसार आत्मवश अवस्थेत जीवननावेवर नियंत्रण असते तर मनोवश अवस्थेत जीवननाव पाण्यावर वहात असते व वाऱ्याने नियंत्रित होते.

इंद्रियाणां हि चरतां यद् मनः अनुविधियते।

तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि॥(२-६७)

या पार्श्वभुमिवर आत्मवश अवस्था या संदर्भात "योगस्थ" शब्दाचे महत्व आहे. व याचबरोबर अधिकाराची जागृति भगवतगीतेने केलेली आहे..

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।(२-४७)
योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय।
सिद्धि असिद्धः समो भूत्वा समत्वं योग उच्यते॥(२-४८)

मनुष्याला कर्म करण्याचा निर्णय अधिकार आहे. जगात लोक आपला अधिकार वापरुन कर्म करीत असतात. जे प्रत्यक्षात घडत असते हा कर्माचा परिणाम असतो. परिणाम चांगला व्हावा ही मनुष्याची इच्छा असते. यामुळे परिणामाच्या भयानेच मनुष्य कर्म टाळतो. येथे मानसशास्त्र व अधिकार या दोहोची जागृति आहे.

योगस्थ हा शब्द Higher consciousness यासंबंधी आहे. निवड व अधिकार या संदर्भात प्रा. थॅलरचा Choice Architecture व "योगस्थ" या दोन शब्दाचा परस्परसंबंध

आढळतो. कर्माद्वारे योग साध्य करणे म्हणजे फल हा ईश्वराचा अधिकार आहे हे जाणुन फल ईश्वराला समर्पित करणे अर्थात लाभ व हानि या दोन्हीमध्ये समत्व साध्य करणे . याद्वारे (समत्व) योगसाधना(दुःखान्त) करणे. याला समत्वयोग म्हटलेले आहे. (आपल्या अधिकारात जे आहे ते करीत राहणे बाकी ईश्वरावर सोपवुन देणे, काय घडवायचे तो बघुन घेईल!)

"अगर भरोसा है खुदापर, खुदा वही लिखेगा जो नसिबमे है। अगर भरोसा है खुदपर तो खुदा वही लिखेगा जो तुम चाहते हो।"

*****

(२-४८)

*************************

योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय।

सिद्धिअसिध्योः समो भूत्वा समत्वंयोग उच्यते।

*************************

(२-४८):

"सिद्धिअसिध्योः समो भूत्वा समत्वंयोग उच्यते"

(सुखी जीवन व सुखाची साधना)

"We are made wise not by the recollection of our past, but by the responsibility for our future. "

George Bernard Shaw

महर्षि वाल्मिकीच्या पुर्वाश्रमीच्या वाल्याला स्वतःची चुक कळली, जबाबदारी जाणली. व पुढील वाटचाल सुरु केली. यातुनच महर्षि वाल्मिकिचा उदय झाला.

जीवनात इच्छापुर्तीसाठी कर्म करणे ही "Survival mode" मधील सामान्य स्थिति असते. अर्थात मनुष्याच्या कार्याचा संबंध

त्याच्या सुखाशी असते. सुखाचा संबंध त्याच्या इच्छापुर्तीशी असते. अर्जुनाला दुःख झाल्यामुळे तो म्हणतो, राज्यसुखाची माझी इच्छा नाही मग या घोरकर्माचे प्रयोजनच काय?

मनुष्य समुहात जगत असतांना स्वतःची जबाबदारी न स्विकारता स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा, धर्माचा दाखला देतो. मनुष्यजीवनाचे हेच वास्तव अर्जुनविषादयोगात स्पष्ट होते व येथुनच भगवदगीता ज्ञानाची सुरुवात होते. कारण मनुष्याच्या "याच"संवयीमुळे त्याच्या विकासाला खीळ बसते.

"जबाबदार " या संदर्भात स्वतःचा विकासमार्ग जाणणे व त्यासाठी संस्कार हाच भगवदगीतेचा विषय आहे. मनुष्य समुहात असला तरी तो स्वतःचाच मार्ग चालत असतो. हा मार्ग चालतांना स्वधर्माचरण करतो. याचा अर्थ तो आपल्या (नियत)कार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करतो, तेंव्हा स्वतःचा मार्ग मार्ग बनतो.

याच मार्गाचे ज्ञान स्पष्ट करतांना परिणाम या संदर्भात अर्जुनाला म्हटले, यश मिळाले तर राज्य भोगशील, अपयश आले तर पुण्यकर्माचे फळ मिळेल अर्थात चांगली गति मिळेल. याप्रमाणे

कर्मसंस्कार यासाठी सांख्य व योग या दोन निष्ठेचे ज्ञान स्पष्ट करतांना दुसरा बुद्धियोगाचा भाग परिणाममुक्तिचा असतो.
बुध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)

मनुष्याला जे जीवन मिळाले आहे त्यात( सुखदुःख, यश अपयश इ. ) द्वन्द्व (Polarity) अनुभवत असतो. "चांगलेपणा" या संदर्भातही अर्जुन द्वन्द्वाच्या जाळ्यात अडकतो. आपण लोभी आहोत असे शिक्कामोर्तब करतो. हा द्वन्द्व विकासाला खिळ बसवितो म्हणुन भगवदगीता या द्वन्द्वापासुन सावध राहण्याचा संदेश देते.
तयोःन वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)
श्रेयान् स्वधर्मो विगुण ... (३-३५)

भगवदगीतेने बंधन-मोक्ष हे शास्त्र highlight केले आहे. याच संदर्भात जीवनमार्गात निर्द्वन्द्व असणे म्हणजे Tiebreaker या अर्थाने स्वधर्म मुल्याचे महत्व आहे.

"निर्द्वन्द्व " याच संदर्भात मार्गात समत्व, दृढत्व असे शब्दप्रयोग आहेत. बुद्धियोग निष्ठेत (यश-अपयश यांत समत्व साध्य करुन)

समत्वयोगाने कार्यरत असणे अर्थात "योगः कर्मसु कौशलम्" असे कार्यकौशल्याचे ज्ञान स्पष्ट केले आहे.

बुद्धियोग:

बुद्धियोग म्हणजे बुद्धिचे स्थिरत्व (सुख) व जीवनमार्ग येथे "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. या मार्गात कार्याचा एकनिश्चय असतो. कर्म करण्याचा अधिकार म्हणजे निर्णयअधिकार असतो. निष्काम कर्म म्हणजे ईश्वराला फलसमर्पण/समत्वयोगाने कार्यरत असणे. बंधन-मुक्ति या संदर्भात हा मुक्तिचा म्हणजे पुर्ण स्वातंत्र्याचा मार्ग असतो. या मार्गात बुद्धियोग ही Priority असते.

सिद्धिअसिध्योः समो भूत्वा समत्वंयोग उच्यते।(२-४८)
दुरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगात् धनञ्जय।(२-४९)

********

(२-४९)

*************************

दुरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय।

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।।

*************************

(२. ४९)/१:"दुरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय"

जीवनाचे रहस्य: जन्म आहे तर मृत्यु आहेच, मग या जीवनाचे प्रयोजन काय?हा प्रश्न कधीतरी जीवनात डोकावतो. जीवनात घटना घडत असतात. मनुष्य आपल्या ज्ञानानुसार जगत असतो. हे ज्ञान त्याची Belief system असते. कार्यरत असतो व समर्थनासाठी भाष्य बोलत असतो.

जीवनातील कोणत्याही प्रश्नाचे उत्तर मनुष्य व्यवहारात शोधत असतो. महाभारतात याच व्यवहाराद्वारे धर्मयुद्ध ठरते. प्रत्यक्ष युद्धाचे वेळी मात्र अर्जुन "मला कांही नको " म्हणुन दुःखी मनाने स्वतःचे समर्थन करतो. परिणामभयाने निष्क्रियता निवडतो. पण स्वतःच्या भूमिकेला ज्ञानी दर्शवितो.

हे जीवनच विकासमार्गावर असते. पण अहंकाराचा आश्रय असल्यामुळे समर्थन संवय असते. (आत्मविश्वास व अहंकार यांतील भेद जाणत नाही). समर्थन संवयीमुळे स्वतःचे वास्तवच hide करतो. हीच संवय जडल्यामुळे मुख्य प्रश्न sidetrack होतो. आणि जीवनाचे कोडे कधीच उलगडत नाही. यामुळे अशांत असतो, सकाम (इच्छाचिंतन) मानसिकता असते. अशांतीवर उपाय म्हणुन भाष्य बोलतो. असे भाष्य नकारात्मक असते किंवा (मिथ्या )निरर्थक असते. स्वतःच्या विकासमार्गावर स्वतःच अडथळा करतो.

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

अर्जुन अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. भगवतगीता या भूमिकेतील चुक दर्शवुन देते. स्वतःच्या वास्तवाचा स्विकार न करता judgement thinking वापरुन स्वतःला ज्ञानी ठरविण्याचा प्रयत्न असतो. हाच अहंकार असतो. मनुष्य आहे तेथेच थबकतो. जीवनाचा विकासमार्ग जाणत नाही व जीवनाचा विकासमार्ग हाच भगवतगीतेचा विषय बनतो.

व्यवहारात उपयोगात येणारे कर्म विकासाचे साधन आहे. याच कर्माद्वारे स्वतःला सक्षम करणे हा विषय येथे येतो. व याच अनुषंगाने जीवनाचे रहस्य उलगडते. जगातील ज्ञानाचा स्त्रोत ईश्वर आहे व त्याचाच अंश जीवित तत्वात असतो. म्हणुन बुद्धियोग ज्ञान आहे. यामुळे जीवनाचे रहस्य उलगडते.

या ज्ञानामुळे जीवनविकासाचा मार्ग "मृत्योर्मा अमृतंगमय" (marching towards God) होतो. या मार्गावर कार्याद्वारा ईश्वरभक्ति घडते. स्वतःच्या मार्गाचे Awareness कार्यसंस्काराने येते. या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही. अडचणी विकासासाठी कार्यसंधी जाणतो.

दुरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय।
बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।।(२-४९)

कर्मापेक्षा बुद्धियोग श्रेष्ठ आहे. असे असले तरी बुद्धियोगामुळे जीवन विकासमार्गावर असते. याचसाठी कार्यकौशल्य धारणेचे महत्व आहे ज्यामुळे निष्काम कर्म घडते. नियतकार्य स्वधर्म करणे यांत कार्य (ईश्वराला) समर्पण होते. स्वतःचा निर्णय वापरुन कार्याचा दृढनिश्चय करतो व योगस्थ वृत्तीने(निष्काम कर्म) कार्य

करतो. यात फलसमर्पण असते. याप्रमाणे भगवतगीतेतील बुद्धियोगाचे महत्व जाणले तर जीवनाचे रहस्यच उलगडते.

बुद्धियोगं उपआश्रित्य मत् चित्तः सततं भव।(१८-५७)
मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि।
अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि।।(१८-५८)

अर्थात अहंकाराची करामत अनाकलनिय असते. त्याचे replacement करण्यासाठी बुद्धियोग महान साधन आहे. (यासाठी ईश्वराचा आश्रय महत्वाचा असतो. )यामुळे विकासमार्गावर असतो.

व्यावहारिक बोध: घटना घडत असतात, लोक भाष्य बोलत असतात. विकासमार्गातील आत्मविश्वास अनुभुति असते, तर नकारात्मक भाष्य अहंकारामुळे असते. जगात कर्तृत्वाला मर्यादा नाही, मनुष्याच्या जीवनाला मात्र मर्यादा आहे. पण ज्ञान अमर्याद आहे. या ज्ञानाचा स्त्रोत ईश्वर आहे. ज्ञान या संदर्भात ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी बुद्धियोगाचा आश्रय भगवतगीतेने suggest केला आहे. म्हणुन विकासमार्गात अहंकाराचा आश्रय कि

बुद्धियोगाचा(ईश्वराचा आश्रय)? हेच option शेवटी श्रीकृष्ण दर्शवितात.

**********

(२. ४९)/२ : "बुद्धौ शरणं अन्विच्छ "
(I. SELF AWARENESS)

दुरेण हि अवरं कर्म बुद्धियोगात् धनञ्जय।
बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः॥(२-४९)

योग्य-अयोग्यचा निर्णय व "योगासाठी कार्य " यांत योगासाठी (भक्तिसाठी)कार्य महत्वाचे आहे. हीच निष्ठा होण्यासाठी बुद्धियोग आश्रय आहे.

The key to growth is the introduction of higher dimensions of consciousness into our awareness.

Lao Tzu

"Concept of consciousness" as the ability of an individual to determine his or her own actions, in order to determine which thoughts and actions are right, and which actions are wrong.

Whereas,

" Concept of self-awareness" perceives human beings to be thinkers, and the controller of one's thoughts, rather than being controlled by the thoughts.

मनुष्य निष्क्रिय कां होतो? याचे कारण भगवतगीता येथे स्पष्ट करते.

कार्याचा दृढनिश्चय होण्यासाठी बुद्धियोगाचे महत्व आहे. चंचलत्व सकाम अवस्थेमुळे असते. यामुळे चंचलता निष्क्रियतेला कारण ठरते. चंचलत्वामुळे कार्याचा निश्चय होत नाही, किंवा सकाम कार्यरत असतो, ज्यांत कष्ट वाटत असते. अर्थात सकाम अवस्थेत कार्य कष्ट असते व निष्काम अवस्थेत Pleasure असते.

"When work is a pleasure, life is a joy! When work is a duty, life is slavery. "

Maxim Gorky

व्यवहारात कार्य घडण्यासाठी कार्याच्या Right or Wrong पेक्षा निर्णय घेण्याचा आग्रह होतो. Right or Wrong या चंचलत्वावर विजय मिळविण्यासाठी बुद्धियुक्त अवस्था आहे. यात योगासाठी कर्म(निष्काम कर्म)ही Priority असते. यामुळे बुद्धियोग मनुष्याला सक्रिय करते.

मनुष्याला बुद्धिची महान देण प्राप्त आहे. बुद्धिचा मोहामुळे होणारा भ्रम ही भगवतगीतेची सुरुवात आहे. तर हा भ्रम होण्याची कारणेही स्पष्ट केलेली आहे. याच संदर्भात बुद्धिभ्रम व बुद्धियोग यांतील भेद जाणला तर समाजात चालणाऱ्या भाष्यातील बौद्धिक कसरत जाणता येते व यामुळे अशा भाष्यामुळे भ्रम होत नाही. तसेच भ्रम करणारे निरर्थक भाष्य व निरोगी संवाद यातील भेद स्पष्ट होतो. हेच "SELF AWARENESS" या संदर्भात अपेक्षित असते.

व्यवहारात आपली बाजु वरचढ करुन सांगणारे भाष्य बोलतांना लोक आढळतात. एखाद्या राजकिय नेत्याने चुकीचे भाष्य केले तरी ते कसे योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी त्याचे follower नेते भाष्याची कसरत करीत असतात. याउलट एखादा विद्वान व्यक्तीही "मी सत्य सांगत आहो लोक ऐकतच नाही" अशी तक्रार व्यक्त करतांना आढळतो. निष्क्रियतेचे समर्थन कितिही सुंदर भाष्यात केले तरी ते भाष्य निरर्थक ठरते, हे भगवतगीता सुरुवातीलाच दर्शवित आहे.

"It is by acts and not by ideas that people live. "
Anatole France

निष्क्रियपेक्षा सक्रियता श्रेष्ठ, सकाम कार्यापेक्षा निष्काम कार्य श्रेष्ठ, याप्रमाणे कार्यापेक्षा बुद्धियोग श्रेष्ठ . या अर्थाने सक्रिय होण्यासाठी "बुद्धौ शरणं अन्विच्छ" हा संदेश आहे.

बुद्धियुक्तो जहातिह उभेसुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

अर्थात बुद्धियुक्त अवस्थेत योग्य-अयोग्य हा विचार मनुष्याला (स्मृति)भ्रमित करीत नाही. तर योगासाठी (भक्तिसाठी) कार्य ही निष्ठा असते.

********

२-४९/३:"बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः"
(II. बौद्धिक पंगुत्व vs. बौद्धिक सक्षम)

निष्काम कर्म हा संदेश "आदर्श" (स्वार्थि vs. त्याग) या संदर्भात लोक ऐकत असतात. व यामुळे "फलहेतवः" या शब्दाचा स्वार्थि असा message जातो. पण प्रत्यक्षात मानवी जन्मातील "बौद्धिक पंगुत्व vs बौद्धिक सक्षमता " हा संदेश भगवतगीता येथे देत आहे.

मानवी जन्मातील दुर्बलतेचे भगवतगीता निदान करते. व सक्षम होण्याचा मार्ग सांगते. मनुष्य विकास करण्यासाठी जन्माला आला पण असहाय(पंगु-दुबळा) म्हणुन जगत असतो, याचे कारण चुकीच्या धारणेमुळे, संस्कारामुळे दुर्बलता Conditioned झालेली असते. व "Born to win but conditioned to loose" अशी जीवनाची स्थिति बनते. याच संदर्भात अनेक उदाहरणे आपण ऐकत असतो:

*लहानपणी हत्तीच्या पायात साखळी टाकली कि मोठेपणी दोरखंडही पुरेसे ठरते.

*कोंबड्यांच्या कळपात वाढलेले गरुडाचे पिलु मोठेपणीही जमीनीवरच राहते.

*पिंजऱ्यात वाढलेल्या पक्षाचे पंख आपोआपच कमकुवत होतात.

*एका मुलाला चुकीच्या संगोपनामुळे बौद्धिक पंगुत्व येते. तेंव्हा मांटेसरी आपला वैद्यकिय व्यवसाय सोडुन स्वतः Preschool education सुरु करते. Life honesty, Purpose loyalty याचे हे एक महान उदाहरण आहे.

"चांगले "या संदर्भात चांगले म्हणावे, स्तुती करावी यामुळे मनुष्य सकाम कार्यरत असतो. चांगलेपणामुळेच अर्जुन दुःखी होतो. व निष्क्रियतेला आदर्श संबोधतो. त्याचा जीवनाचा विकासमार्ग येथे थांबला असतो. पण चुकीच्या धारणेमुळे मानसिक दुबळा होतो. याच अवस्थेत बुद्धिभ्रम असतो. ही बौद्धिक दुर्बलता ठरते. म्हणुन बुद्धियोगाचे प्रयोजन आहे. "फलहेतवः" अर्थात सकाम कर्म संशय निर्माण करते. तर बुद्धियोग कर्मातील योग्य-अयोग्य हा द्वंद्व मिटवते. म्हणुन या अवस्थेत विकासमार्ग थांबत नाही. सक्षम होण्यासाठी "योगः कर्मसु कौशलम् " हे शास्त्र जाणत असतो.

म्हणुन विकासमार्गात बुद्धिचे महत्व ही Priority दर्शविली आहे.
(Not फलहेतवः but बुद्धियोग)

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।(२-४९)
बुद्धियुक्तो जहातीह उभेसुकृतदुष्कृते।(२-५०)

"Nothing can stop the man with the right mental attitude from achieving his goal; nothing on earth can help the man with the wrong mental attitude. "
-- Thomas Jefferson
 *********
(२-४९)/४:
"बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणाः फलहेतवः"
(III. Right mental attitude)

"Nothing can stop the man with the right mental attitude from achieving his goal; nothing on earth can help the man with the wrong mental attitude. "

-Thomas Jefferson

*Wrong mental attitude vs. Right Mental attitude :

Right mental attitude हा भगवदगीतेचा विषय आहे.
जीवनात सुखी व्हावे ही मनुष्याची स्वाभाविक इच्छा असते. याच सुखाच्या इच्छेने जगत असतांना दुःखाशी, अडचणीशी सामना होतो. हा सामना करणे म्हणजेच Internal battle असते. याच battle ची ओळख भगवदगीता करुन देते. हा सामना करण्यास असमर्थ ठरला तरी मनुष्य स्वतःला योग्य समजुनच जगत असतो व Wrong mental attitue चा शिकार होतो.
अर्जुनविषादयोगाद्वारे Wrong mental attitude चे दर्शन होते.
निदान होते.

"Nobody thinks that they're evil or bad, they think that they're doing the right thing. So many people in the world would rather stay in a situation that's painful but familiar because they're comfortable with it. Not a lot of people have the strength or heart

to realize when something's not good for them and to turn around and be alone. "

*The psychology
Victim of Dualistic paradigm behaviors:

The people of this world have long had a tendency to judge most everything in terms of
light vs. darkness,
good vs. evil,
us vs. them
Our lives are filled with these and many other dualities. These dualities can easily lead to a polarization of beliefs and lifestyles.

When we don't live with clear intentions, many people can be pulled down a destructive path by circumstances, become victim of dualistic paradigm behaviors.

*उपाय :

Psychological approach:

By developing clear purpose and intentions and following these to the best of our ability, we can shift from dualistic old paradigm behaviors to develop healthier, more harmonious ways of living with each other.

भगवदगीता :

Mental attitude याच संदर्भात द्वन्द्वाला वश होउ नको असा संदेश भगवदगीता देते.

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

द्वन्द्व vs. निर्द्वन्द्व होणे याचसाठी " सकाम कर्म vs निष्काम कर्म" असे Transformation आहे. व्यवहारात (सकाम) कर्म घडतात. सकाम कर्मामुळे द्वन्दाला वश असतो. हा द्वन्द्व कर्मफलातील यश-

अपयश असा असतो तसेच कर्मातील योग्य-अयोग्य असा असतो. म्हणुन बुद्धियोगाची Priority असते. कर्माद्वारे समत्वयोग हे कर्मकौशल्य बुद्धियोगामुळे साध्य होते.

कर्मफल vs बुद्धियोग :

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)
बुद्धियोगामुळे जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो.
दुरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगात् धनञ्जय।
बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणाः फलहेतवः॥(२-४९)

योग्य-अयोग्य कार्य vs. योग

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्॥(२-५०)

सार :

जीवनातील ऐश्वर्य vs समाधान/शान्ति यावर लोक भाष्य करतात व समाधान ही Priority आहे हे मान्य करतात. पण व्यवहार व मानसशास्त्र यांचा शास्त्रिय संबंध जाणत नाही. यावरच भगवदगीता प्रकाश टाकते. कारण Mental wellness हा विषय जरी दुर्लक्षित केला तरी अशान्ति मात्र ( Sress, Tension, Worries) कळत असते.

जीवनयात्रा पुढेपुढे सरकत असते. हेच जीवन असते. जीवनयात्रेत मनुष्य व्यावहारिक दृष्टिकोनातुन Wrong vs. Right असे भाष्य करतो, जगतो. पण मानसशास्त्रिय दृष्टिकोनातुन(Wrong mental attitude vs Right mental attitude) जीवनाकडे पहात नाही. निष्क्रियतेचे समर्थन करणारा अर्जुन ना केवळ व्यावहारिक दृष्टिकोनातुन चुकीचा ठरतो, तर मानसशास्त्रिय दृष्टिकोनातुन सुद्धा चुकीचा ठरतो. भगवदगीतेने व्यवहार व मानस याचा समन्वय साधलेला आहे. Mental Weakness या संदर्भात भगवदगीता"क्षुद्रं हृदयदौर्बल्य" असा उल्लेख करते तर Mental Wellness या संदर्भात योग, स्थितप्रज्ञ याचा उल्लेख करते.

*******

(२-५०)

*************************

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।

तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥

*************************

(२-५०)/१ :

" बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते"

(I. Courage)

समाजात चांगलेपणा या संदर्भात चांगले vs वाईट (सत्कृत्य-दुष्कृत्य) या आधारावर योग्य -अयोग्य ठरविल्या जाते. अर्जुन आपल्या नियतकार्याला दुष्कृत्य ठरवितो. यामुळे त्याच्या मानसिकतेत (दुष्कृत्याचे) भयाला आश्रय मिळतो. याच द्वंद्वावर मात करण्यासाठी भगवतगीता भय vs निर्भय (Fear vs Courage) याचे शास्त्र सांगते.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

"You will never do anything in this world without courage. It is the greatest quality of the mind next to honor. "

Aristotle

" Everyone is afraid of something or someone. The difference is how you deal with your fear. Never confuse goofiness with real acts of courage. Lowering your standards to go along with the crowd should never pass for courage. For God has not given us a spirit of fear, but of power and of love and of a sound mind. "

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

मानसिक दुर्बलतेवर विजय मिळविण्यासाठी अर्थात मानसिक सबल (धैर्यवान) होण्यासाठी कर्मयोगाचे महत्व आहे.

*************

(२-५०)/२:

"बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते"

(Right work or right path?)

अर्जुनाचे व्यावहारिक नियतकार्य "योग्य" होते, त्याला भ्रम होतो व आपण अयोग्य मार्गावर आहे हे सिद्ध करण्यासाठी धर्माचा दाखला देतो. जेंव्हा मनुष्य योग्य असुनही स्वतःला अयोग्य ठरवितो हाच भ्रम ठरतो. "योग्य आहे पण योग्य मार्गावर नाही ". भगवतगीता याच योग्य मार्गाचे ज्ञान देते.

The obstacle is the path. ”– ZEN PROVERB

मार्ग चालतांना जसा अडथळा असतो, जीवनातील दुःख असाच अडथळा निर्माण करीत असते. अर्जुन म्हणतो मला कांहीही नको!मनुष्याच्या श्रीमंतीशी किंवा गरीबीशी ईश्वराचा कांहीही संबंध नाही. तर मनुष्य योग्य मार्गावर असणे हाच खरा प्रश्न आहे, याच मार्गाचा ईश्वराशी संबंध येतो.

अर्जुन दुःखामुळे स्वतःला अयोग्य ठरवितो. नियतकार्य योग्य असले तरी दुःखमुक्ति कशी होणार?हा त्याचा प्रश्न असतो. भगवतगीतेचा योग्यमार्ग दुःखमुक्तिसाठीच आहे. योग म्हणजे दुःखान्तशक्तिची साधना आहे.
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्यभजस्व माम् ।(९-३३)

*अडथळा vs विकास:

व्यवहारात मनुष्य कार्यरत असतो. कार्यरत असतांना सकाम मानसिकता व निष्काम मानसिकता यांतील भेद भगवतगीता स्पष्ट करते. कार्य योग्य असले तरी अयोग्य मार्गावर असण्याचे कारण सकाम कार्य असते. सकाम मानसिकतेमुळे यश-अपयश, योग्य-अयोग्य या द्वंद्वात सापडतो व हा मार्गातील अडथळा ठरतो. द्वंद्ववश(बंधन) होतो. द्वंद्वमुक्तिसाठी कार्य साधन आहे. कार्याचा एकनिश्चय, स्वधर्म द्वंद्वमुक्ति दर्शविते. "अमृतत्वाय कल्पते" हा मार्ग व या मार्गावर ईश्वरभक्ति घडते.
इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत।
येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः॥(७-२८)

*विकासमार्गात आत्मवश अवस्थेचे महत्व:

"अमृतत्वाय कल्पते" हा योग्य मार्गाचा संदेश आहे. या मार्गावर विचलित होत नाही. कार्याचा एकनिश्चय असतो. ही चंचलमुक्त आत्मवश अवस्था असते. आत्मवश व मनोवश अवस्था हा संदर्भ मार्गाचे महत्व स्पष्ट करते. नाव वल्हवणे म्हणजे मार्ग ठरलेला असतो, तर मार्गच नसेल तर नाव वाऱ्याने वाहते ही मनोवश अवस्था ठरते.

इंद्रियाणां हि चरतां यद् मनो अनुविधीयते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि।।(२-६७)

*नित्य विकासमार्गावर:

कार्य योग्य असुनही अयोग्य मार्गावर असलेला भ्रमात सापडतो. म्हणुन जीवनविकासात "योग्य कार्य" यापेक्षा "योग्य मार्ग" याला Priority असते. यासाठी बुद्धियोग महत्वाचा आहे.
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

कार्यरत असतांना निष्काम मानसिकता असेल तर नित्य विकासमार्गावर असतो. याच पार्श्वभुमिवर बुद्धियोग महत्वाचा आहे.

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।(२-४९)

अर्थात हा मार्ग निष्काम कर्माचा बनतो.

अर्थात

*योग्य कार्य vs योग्य मार्ग

नित्य विकासमार्गावर असावे यासाठी बुद्धियोगाचे महत्व आहे व विकासमार्गात Priority योग साध्य करणे असते. यामुळे कार्यातील योग्य-अयोग्य हा भेद दुय्यम ठरतो.

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।

तस्माद् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

कार्य योग्य कि अयोग्य हे सिद्ध करण्यासाठी प्रज्ञावाद चालतो. योग्य मार्गावर असलेला कार्याद्वारे योग(दुःखान्त) साध्य करतो .

अर्थात या मार्गावर(योग) साधना घडत असते. म्हणुन कार्याद्वारे योगसाधना घडावी या हेतुने मार्गाला महत्व आहे.

व्यावहारिक बोध:नित्य विकासमार्गावर असणे यासाठी बुद्धियुक्त निष्ठेचे महत्व आहे. यालाच Act in God/Krishna consciousness संबोधले आहे.

***********

(२-५०)/३: "तस्मात् योगाय युज्यस्व "

(Transformation)

"The greatest trap in our life is not success, popularity or power, but self-rejection. "

-Henri Nouwen

मनुष्याच्या विकाससंदर्भात अनेक संकल्पना असतात. मनुष्यपरत्वे स्वतःच्या संकल्पनेनुसार त्याची जीवनयात्रा चालु असते. तो एकतर Creator (नायक) बनतो, ज्याची भूमिका जगाच्या विकासात सकारात्मक सहकार्य करीत असते किंवा

प्रेक्षक बनतो, ज्याची भूमिका केवळ Survival ची असते. आपण "असतो" तोवर जगातील घटनांवर भाष्य करतो (कसे घडले!कां घडले!कोण चांगले, कोण वाईट! इ. )पण, आपण "नसलो"तरी जगाची रहाटी चालु असतेच. याच पार्श्वभुमिवर मनुष्याला स्वतःची भूमिका जाणुन घेण्यास भगवतगीता मार्गदर्शन करते.

आपण "असतो " तोवर जीवनरुपाने मनुष्याला संधी मिळाली असते. ही संधी गमावली तर आपल्या जीवनाचे Status केवळ Survival असते. Survival साठी सर्व जगच जगत असते, पशुही जगत असतो. भगवतगीता याच मुद्यावर "तस्मात् योगाय युज्यस्व" हा संदेश देते. Art of Transformation सांगते.

वर्तमान ज्ञानविज्ञानाचा आहे. ज्ञानविज्ञानाने जगाला विकासाची नविन दिशा दिली. जीवनविकास संदर्भात भारतातील स्वातंत्र्यपुर्व काळ व स्वातंत्र्योत्तर काळ याचे उदाहरण बोलके आहे.

स्वातंत्र्यपुर्व काळात देशाच्या गरिबीसाठी अथवा कोणत्याही दोषासाठी पारतंत्र्य हेच कारण जाणुन टिकेचे लक्ष इंग्रज होते. स्वातंत्र्योत्तर काळात "स्व"चे समर्थन व "पर"वर टिका ही

मानसिकता बदलली नाही. "पर "या संदर्भात टिकेचे फक्त Target बदलले. येथे आपल्या जीवन जगण्याच्या भूमिकेचे Status काय?हा प्रश्न उपस्थित होतो.

Survival जीवन जगत असता आनंदी जीवन जगतो तेंव्हा प्रश्न नसतो. पण दुःख आले, प्रश्न निर्माण झाला तर त्याचे खरे रुप व्यक्त होते. पाण्यात गाळ असला तरी वरुन स्वच्छ दिसते. खडा टाकला तर गाळ वर येतो. या अवस्थेत मनुष्य चांगला असला तरी त्याची भूमिका कशी असते ?तो कोणत्या Trap मध्ये सापडतो?हे दर्शन भगवतगीतेत अर्जुनविषादयोगातुन घडते.

अर्जुन स्वतःचे समर्थन करतो. वास्तवाचा स्विकार करीत नाही व प्रज्ञावादी Trap मध्ये सापडतो. हे Defense mechanism ठरते. तसेच समर्थन मनुष्य करतो. जगावर दोष ढकलतो. नैराश्य असते. नकारात्मक भाष्य करतो. हा प्रज्ञावादी Trap असतो. नकळत मनुष्याचे हे Self rejection ठरते.

भगवतगीता याच Trap ची ओळख करुन देते. यामधुन मुक्त होण्याचे ज्ञान सांगते, ज्यामुळे मनुष्य आपल्या जीवनाची भूमिका सक्रिय करण्यास सक्षम होतो.

Transforming "Survival" status into "बुद्धियुक्त"

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृत दुष्कृते।
"तस्मात् योगाय युज्यस्व" योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

Survival status मध्ये कार्य सकाम असते. यामुळे द्वंद्व असते.
"बुद्धियुक्त" Status मध्ये कार्य ईश्वरभक्तिसाठी/योगासाठी घडते.
या प्रक्रियेत बुद्धियोग आश्रय, कार्याचा एकनिश्चय असतो.

"The spiritual life does not remove us from the world but leads us deeper into it".

-Henri Nouwen

(Dutch priest, professor, writer of 39 books and theologian)

******

(२-५०)/४ : "योगः कर्मसु कौशलम् "

Mindfulness (मानसिक व्यायाम)

वर्तमानात सुखी असणे Mental Wellness दर्शवित असते.
सुखी म्हणजे चिंतामुक्त, भयमुक्त, सकारात्मकता.

जीवनात सुखदुःख Lifedrives ठरतात, म्हणुन इच्छा व त्यासाठी कार्य(State of Want-State of Art) जीवनाची सामान्य Life Drive Channel असते. जीवनात भोगैश्वर्य या संदर्भात इच्छा असतात व कार्य करतो, हा व्यवहार असतो. या व्यवहारानुसार वर्तमानात कार्य ठरत असतात, कार्य होत असते.

प्राप्तिसाठी कार्य याच Life Drive Channel चे ज्ञान असल्यामुळे मनुष्य चिंता, भय, क्रोध या Stress Trap मध्ये सापडतो. मनुष्याला वर्तमानात शांति हवी असते. कारण वर्तमानच जीवन असते.

ईश्वरभक्ति, चांगले कार्य याद्वारा शांति अनुभवतो. तरी अर्जुन(चांगला असुनही)Stress Trap मध्ये सापडतो. Stress मुक्ति(समाधान)साठी आपल्या भूमिकेला धर्मकार्य संबोधतो. याच अवस्थेत मनुष्य जगत असतो, म्हणुन भय, चिंता हेच त्याचे Life Drive बनतात. व मनुष्य नकारात्मक विचार व्यक्त करीत असतो. भौतिक इच्छाप्राप्ति भविष्यातील सुख असते. पण जीवन वर्तमान असते. म्हणुन भगवतगीता Short term सुख व Long term सुख यांतील भेद सांगते.

येथेच भगवतगीतेचे जगातील सर्वात मोठे योगदान आहे. जीवनाची" योगः कर्मसु कौशलम् " अर्थात कार्याद्वारे Mindfulness ची Exercise. शाश्वत सुखाची साधना. यासाठी जीवनाच्या ज्ञान ज्ञानविज्ञानासह मनोवैज्ञानिक ज्ञान भगवतगीता सांगते. जे ज्ञान जाणले कि, जाणण्यालायक कांहिही शिल्लक उरत नाही.

ज्ञानं ते अहं सविज्ञानम् इदं वक्षामि अशेषतः।

यद् ज्ञात्वा न इह भूयो अन्यत् ज्ञातव्यम् अवशिष्यते।।(७-२)

*ध्येय:

स्थितप्रज्ञ याद्वारे सुखाचे अंतिम साध्य वर्णन केले.

आपुर्यमाणम् अचल प्रतिष्ठम्।समुद्रम् आपः प्रविश्यन्ति यद्वत् ।

तद्वत् कामायं प्रविष्यन्ति सर्वे।स शांतिम् आप्नोति न कामकामी।।(२-७०)

समुद्रात नद्या येवुन मिळतात, समुद्र शांत असतो. जीवनाची सामान्य Life drive channel नदीसमान असते. म्हणुन कार्याद्वारे योग ही Higher Life drive channel ठरते. याच Channelचे ज्ञान भगवतगीता देते, ज्यामुळे वर्तमानात शांती अनुभवतो. ही शाश्वत सुखाची Exercise ठरते.

*वर्तमान:

जीवित तत्वातील ईश्वर Conscious व त्याचा मुल स्रोत किंवा अंतिम धाम ईश्वर याद्वारा महामार्गाचे(मृत्योर्मा अमृतोगमय) ज्ञान देते. व हा मार्ग Higher Life Drive Channel ठरतो. या मार्गावर येण्यासाठी बुद्धियोग आहे.

"ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।"(१०-१०)

म्हणुन वर्तमानात शांती अनुभवण्यासाठी भगवतगीता संदेश देते,
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)

*कर्म साधन:
या मार्गावर कार्याद्वारा योग ही exercise होते. याप्रमाणे
योग-कार्य-इच्छा श्रेष्ठकनिष्ठचे ज्ञान देते.
दुरेण हि अवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय।
बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।।(२-४९)

या मार्गावर असलेले (शाश्वत सुखाच्या)Exercise ला महत्व देतात. व योग्य अयोग्य या संशयापासुन मुक्त असतात.
बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।

तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

*कार्यकौशल्य- Values

Higher Life Drive Channel कळली तरच स्वधर्म व कार्य समर्पण, दृढनिश्चय व निष्काम कार्य याचे
रहस्य कळते.

*"जब जागो तब सबेरा" ही जागृति अर्जुनामध्ये होते. अशाच जागृतिला युरोपिय मनोवैज्ञानिकांनी Enlightenment संबोधले आहे.

"Whole life is a search for beauty. But, when the beauty is found inside, the search ends and a beautiful journey begins. "

*****

२-५१

**************************

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः।

जन्मबन्धविनिर्मुक्ताः पदं गच्छन्ति अनामयम्।।

**************************२-५१

"कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः"

(Art of Transformation)

सामान्यतः मनुष्य (कर्मकौशल्याच्या अज्ञानामुळे) विचार करतो, व्यवहारात कर्म कोणत्या तरी हेतुने केल्या जाते, हेतुच नसेल तर कर्माचे प्रयोजनच कशासाठी?यामुळे निष्काम कर्म(फलाची इच्छा न करता कर्म करणे!) हा त्याच्यासाठी अतर्क्य विषय ठरतो. हा अतर्क्य विषयच भगवदगीतेचा मुख्य विषय आहे. याच विषयाच्या अनुषंगाने निष्काम कर्म, कर्मसंन्यास या संदर्भातील ज्ञान भगवदगीतेने स्पष्ट केले आहे.

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः।

जन्मबन्धविनिर्मुक्ताः पदं गच्छन्ति अनामयम्।।(२-५१)

ज्ञानी, बुद्धिमान या संदर्भात बुद्धियुक्त, मनीषि हे शब्द या संदेशात आलेले आहे. "बुद्धियुक्त" हा शब्द संशयमुक्ति, द्वन्द्वमुक्ति, दर्शविते. यांत १. कार्याचा एकनिश्चय असतो. (चंचलतामुक्त). २. यश-अपयश यांत समत्वयोगाने कार्य करतो(- One engaged in devotional service) .

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

जन्ममृत्युच्या फेऱ्यात सापडलेला (जीव) दुःखाशी सामना करीत असतो.

(जन्ममृत्युजराव्याधि दुःखदोषअनुदर्शनम्।१३-८)
याचसाठी ईश्वराचा आश्रय(ईश्वराशी जोडणे) हा महत्वाचा विषय आलेला आहे. जेथे दुःखमुक्ति असते, जन्मबंधन नसते अशा निर्दोष, शाश्वत ईश्वराचे स्थानाशी जोडलेला मार्ग "अमृतत्वाय कल्पते" (२-१५) असा निर्देश केलेला आहे, ज्या मार्गात दुःखावर मात होते.
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

याचाच अर्थ व्यावहारिक सकाम कर्म(कर्मजं) जीवनविकासातील निष्काम कर्मात Transform होण्यासाठी "बुद्धियुक्त" या शब्दाचे प्रयोजन आहे.

बुद्धियोगं उपआश्रित्य मद् चित्ताः सततं भव।(१८-५७)

***********

(२-५२)

*************************

यदा ते मोहकलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति।

तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्यच।।

*************************

(२-५२)/१ :

"यदा ते मोहकलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति"

(Task of Overriding automatic Behavior)

जसे मनुष्य आरशात आपले रुप पाहतो, तसेच भगवतगीता विकासमार्गाचा आरसा दाखविते. मनुष्याची जीवनाची

Movement नित्य सुरु असते. ही Movement विकासाची असेल तर व्यक्तिमत्व सकारात्मक असते.

मनुष्य चांगले-वाईट या आधारावर योग्य-अयोग्य ठरवितो. अर्जुन चांगला असला तरी दुःखी होतो व दुःख टाळण्यासाठी युद्ध टाळतो, व त्या भूमिकेचे समर्थन करतो. ही Automatic reaction असते. Automatic behavior चा हा परिणाम असतो.

जीवनात दुःखी असणे, नकारात्मक असणे, आळशी असणे, भय असणे हे Automatic Behavior असते.

काय असावे?

प्रसन्न, निर्भय, आत्मविश्वास, सकारात्मक व्यक्तिमत्व, (जीवनमार्गात दृढता) Automatic behavior होणे यासाठी ज्ञान हवे. हेच ज्ञान भगवतगीता देते.

अर्जुनाला मोहामुळे Mental infection होते. या Infection पासुन बुद्धिला मुक्त करणे हा Task असतो.

We are all hypnotized. How to override such automatic behavior is real task before us.

-Steven Handel

Professor, Harvard University and Rutgers University

हर्बर्ट स्पेन्सर म्हणतो, "The great aim of education is not knowledge butध्ction. "

भगवतगीता म्हणते, मनुष्य नित्य विकासमार्गावर असावा.

विकासमार्गावर असलेला मनुष्य सुख शांति अनुभवतो, Rightous अनुभवतो. आत्मविश्वास असतो. संस्कारित व्यक्तिची ही Automatic movement असते.

ज्ञानामुळे barrier जाणतो. विकासमार्गावर येतो. या प्रक्रियेत:

* वास्तव स्विकारणे.

* विकासमार्ग जाणणे.

*Barrier जाणणे.

* विकासमार्गावर चालणे.

या विकासमार्गाला विज्ञानाचा आधार आहे. जीवन शरीरयात्रा आहे हे मनुष्य जाणतो. प्रत्यक्षात जीवन शरिराचा प्रवास असला तरी वैज्ञानिकदृष्ट्या तो आत्म्याचा प्रवास असतो. आत्मा प्रकृतिगुणाने बद्ध असल्यामुळे जीवात्मा असतो. हा जीवात्मा शरीर धारण करतो. आत्मोन्नति, आत्मवश अवस्था नित्य विकास ठरतो. आत्मवश अवस्थेत विकासमार्गावर असतो. विकासमार्गावर असलेला दुःखामुळे विचलित होत नाही .

यदा ते मोहकलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति।
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्यच॥(२-५२)

*****००००

(२-५२)/२ :

"तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च"

( उक्ति आणि कृति)

समाजात उक्ति(भाष्य) आणि कृति या संदर्भात प्रश्न उपस्थित होतात.

-आश्वासन(/वचन)दिले पण कृति नसणे!

-योजना आहे पण Implementation नसणे!

-अमुक व्हावे, तमुक व्हावे या संदर्भात बाह्यज्ञान उपलब्ध होते, भाष्य होतात पण कोण करेल?

याच प्रश्नाचे उत्तर भगवतगीता देते.

जगात ज्ञानविज्ञान आले. धर्मज्ञान आले. या सर्वांचा उपयोग मनुष्य जीवनविकासासाठी करतो. याचसाठी ज्ञान, विज्ञान, धर्मज्ञान यांचा संगम भगवतगीतेने साधलेला आहे. या संदर्भात भगवतगीता जगातील एकमेव ग्रंथ ठरतो.

ज्ञानामुळे आत्मविश्वास असतो. विज्ञान Informatory knowledge असते, तर धर्म योग्य-अयोग्य (प्रवृत्ति- निवृत्ति) याचे Awareness देते.

व्यवहारात कार्य ठरविण्यासाठी बाह्य ज्ञान, विज्ञान, धर्म या सर्वांचा उपयोग होतो व कार्य ठरते. कार्य ठरल्यानंतर ते साकार करण्यासाठी व प्रत्यक्ष साकार करतांना जीवनमार्गाची स्थिती कशी असावी हे ज्ञान भगवतगीता सांगते.

भगवतगीता प्रकृतिचे विज्ञान(सत, रज, तम गुण) सांगते व गुणातीत ईश्वराचे ज्ञान सांगते. या आधारावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति होण्यासाठी जीवनविकासाचा राजमार्ग (अमृतंगमय) सांगते. या मार्गावर असलेल्या मनुष्याची मानसिक स्थिती कशी असते याचे ज्ञान सांगते. याच आधारावर अर्जुनाची प्रत्यक्ष युद्ध करण्यासाठी(युद्धपुर्व) मानसिक स्थिति कशी असते व कशी असावी यातील भेद स्पष्ट होतो.

अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो. या घटनेत दोन भाग येतात.

१. अर्जुन दुःखी होतो व दुःखमुक्तिसाठी निष्क्रिय राहणे पसंत करतो.

२. बाह्यज्ञानाचा उपयोग" मी योग्य आहे" हे सिद्ध करण्यासाठी करतो.

या प्रसंगात मनुष्याच्या निष्क्रिय होण्यामागे त्याचे दुःख आहे कि बाह्य ज्ञानाचे Infection आहे?असा प्रश्न उद्भवतो व भगवतगीता या दोन्ही Factorचा समावेश करुन दुःखमुक्तिसाठी विकास मार्ग सांगते, ज्या अवस्थेत कोणतेच बाह्यज्ञान विचलित(Infect)करणार नाही. हा मार्ग कार्याद्वारे योग असतो. व याच अनुषंगाने बाह्यज्ञान, योगयुक्त स्थिति, ईश्वरज्ञान यांतील भेद स्पष्ट केला.

* यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके।
तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः।।(२-४६)

अर्थात जसे सर्वत्र जलमय झाले असता विहिरीची जी किंमत असते, तसेच ईश्वरज्ञान जाणले असता सर्व बाह्यज्ञानाची किंमत असते. ज्ञानाचा (ज्ञान, विज्ञान, धर्म) यांचा कर्मासाठी उपयोग होतो व सर्वकर्माचे अखेर (ईश्वर)ज्ञानातच विलिनीकरण होते.

सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

"The great aim of education is not knowledge but action. "

Herbert Spencer

* नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन् ।(८-२७)

शुक्लपक्ष व कृष्णपक्ष या दोन गतिचा मोक्ष व पुनर्जन्म या संदर्भात उल्लेख होतो. पण या सृतिने योगी मोहित (विचलित) होत नाही. म्हणुन सदा सर्वकाळ योगयुक्त असावे.

तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)

*याप्रमाणे (जीवनविकासाचे ज्ञान जाणुन )मोहाने भ्रमित झालेली बुद्धि घनदाट अरण्यातुन बाहेर पडते व स्थीर होते, यामुळे मार्ग दृढ असतो(योगः कर्मसु). तेंव्हा पुर्वी ऐकलेल्या व ऐकावयाच्या कोणत्याच भाष्याचा मार्गावर परिणाम होत नाही. अर्थात मार्गाचा निश्चय (कार्याद्वारे भक्ति)दृढ असतो.

यदा ते मोहकलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति।
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ।।(२-५२)

"When you're righteous, you don't have to tell people that you're righteous. "

Shaquille O'Neal

*******

(२-५३)

*************************

श्रृतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला।

समाधौ अचला बुद्धिः तदा योगम् अवाप्स्यसि।।

*************************

(२-५३) :"श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला"

(Learned talk vs Determination)

अर्जुन (जीवनविकासाचे )ज्ञान ऐकण्यास तयार होतो. श्रीकृष्ण हर्षित होवुन ज्ञान सांगतात.

अशोच्यान् अन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे।(२-११)
या verse ने आरम्भ करतात, व शेवटी

श्रृतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला।
समाधौ अचला बुद्धिः तदा योगम् अवाप्स्यसि।।(२-५३)

या verse ने विराम देतात. यानंतर अर्जुन याच संदर्भातील प्रश्न उपस्थित करतो. व श्रीकृष्ण त्याचे निराकरण करतांना ज्ञानविज्ञानासह जीवनविकासाचे संपुर्ण ज्ञान उपलब्ध होते.

वरील दोन verses मधील भाग( २-११ ते २-५३) हा भगवतगीतेचा संपुर्ण सार आहे. या दृष्टिने आरम्भिचा verse अज्ञानाची स्थिति व शेवटचा verse ज्ञानाची स्थिति दर्शविते.

निष्क्रिय झालेला अर्जुन स्वतःला योग्य दर्शविण्यासाठी ज्ञान वापरतो, याला प्रज्ञावाद (Learned talk) संबोधले. याचा हेतु अशांत मनाला शांत करणे असतो.

तर शेवटी बुद्धिची स्थीर अवस्था, कोणत्याही ऐकीव ज्ञानाने (श्रृति) विचलित न होणारी समाधिस्थ अवस्था संबोधले, जेंव्हा योग साध्य होतो. बुद्धिची समाधिस्थ अवस्था व Determination याचे नाते कर्मयोग स्पष्ट करते. कार्याद्वारे योग साध्य करणे हा कर्मयोग असतो. यांत कार्याचा एकनिश्चय (Determination) असतो.

व्यवसाय आत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।

बहुशाखा हि अनंताश्च बुद्धयोः अव्यवसायिनाम् ॥(२-४१)

अर्थात चंचल बुद्धिमुळे कार्याचा एकनिश्चय (Determination) नसतो. म्हणुन कर्मयोग या संदर्भात कर्मातील द्वंद्वमुक्ति साध्य करण्यासाठी बुद्धियोग /बुद्धियुक्त या शब्दांचे प्रावधान आहे.

बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)

जगात सर्वलोक प्रकृतिनुसार कार्यरत असतात.
सदृशं चेष्टते स्वस्या प्रकृतेः ज्ञानवान अपि।(३-३३)
जीवनातील (बुद्धिची)समाधिस्थ अवस्था/Determination चे ज्ञान नसेल तर द्वंद्वाच्या जाळयात सापडतात. निष्क्रियतेचे समर्थन करतात.

व्यवहारात भाष्य Communicationचे माध्यम असते. जीवनात Determination चे महत्व जाणले नाही तर ऐकीव भाष्याचे influence होते. याचमुळे समर्थनासाठी उपयोग करतो. Determinationचे महत्व जाणले तर ज्ञानाचे महत्व व उपयोग

कळतो. म्हणुन व्यवहारात हा विषय (प्रज्ञावाद) vs (कार्याचा निश्चय) अर्थात

Learned Knowledge vs. Determinaton ठरतो.

भाष्याप्रमाणे Determination होण्यासाठी "वचन" मुल्य असते. जीवनांत Determination चे महत्व कळले तर "वचन" मुल्याचे महत्व कळते. जीवनांत कार्याचे, निर्णय अधिकाराचे महत्व कळते. तसेच Determintion चे महत्व जाणले तर ऐकीव भाष्याच्या influence पासुन मुक्त असतो.

"Determination gives you the resolve to keep going in spite of the roadblocks that lay before you. "

Denis Waitley

******

(२-५३)

"समाधौ अचला बुद्धिः तदा योगम् अवाप्स्यसि"

(स्थितप्रज्ञ)

१. अज्ञान व दुर्बलता

भगवतगीता मनुष्याला जीवनांतील दुर्बलता मिटविण्याचे ज्ञान देते. कारण आपली दुर्बलता शक्ति दिसावी हा मनुष्याचा स्वाभाविक प्रयास असतो. यामुळे आपले अज्ञान झांकण्यासाठी जे भाष्य करतो त्याला ज्ञानाचा बुरखा चढवितो. याचाच अर्थ प्रत्यक्षात अंधार असतो, अंधार आहे हे सत्य स्विकारले नाही तर उजेडाची गरज कशी कळणार? हेच सत्य अर्जुनविषादयोगातुन स्पष्ठ होते व मनुष्याला झोपेतुन जागे करते. अर्थात ही जागृति (Wisdom of darkness ) असते.

२. संशय व ज्ञान

अर्जुन अशा विचित्र परिस्थितीत सापडतो, कि नियतकार्य केले तर केवळ शोक . हा tie सोडविण्यासाठी न करणे हा पर्याय वापरतो. पण न करणे हा पर्याय मरणप्राय अपकिर्तिचा आहे, हे श्रीकृष्ण दर्शवुन देतात. भयाने त्याला ग्रासले असते. कार्य केले काय किंवा न केले काय, दोन्ही घटनेत तो स्वतःला guilty ठरविणार होता. कर्म केले तरी चुक व न केले तरी चुक!

या स्थितीत

*अर्जुनाला साहसाची गरज असते.

*भयमुक्त होण्याची गरज असते.

*योग्य काय या ज्ञानाची गरज असते.

३. धैर्य (Courage)

Courage धैर्य हा Mental power असतो. Physical exercise ने भौतिक शक्ति वाढते, तसेच Mental power साठी Mental exercise असते. हे रहस्य "योगः कर्मसु कौशलम् " याद्वारे भगवतगीता स्पष्ट करीत आहे.

["There is no escape from your responsibilities, and the attempt to escape them will cost you dearly. It may even cost you your life. That is why if you are honest, you will realize your need for courage. Dishonesty is weakness. Courage is strength. ”

Courage is one of the 24 character strengths identified by positive psychology founders Chris Peterson and Martin Seligman. Biswas-Diener found that courage is made up of two processes. The first part is the willingness to take action, and the second is the ability to control fear.

Developing courage is a matter of learning how to manage fear so it doesn’t prevent you from action, and of finding ways to motivate yourself to act. "]

४. चांगलेपणा, विश्वास व धैर्य शक्ति(दैवी)

*चांगलेपणामुळे स्वतःवर विश्वास यावा यासाठी चांगलेपणा ईश्वराशी जोडण्याचे(एकत्व) साधन असते.

*कार्य योग्य कि अयोग्य हा संशय अर्जुनाला येतो. हे Rightous कार्याचे अज्ञान असते. याच अज्ञानाचा अर्जुन स्विकार करतो. अज्ञान मिटविण्यासाठी ज्ञान असते. कार्यातील संशय मिटुन

कार्यनिश्चय पक्का होण्यासाठी बुद्धियोगाचा आश्रय करणे, याचसाठी ईश्वरज्ञान पुरुष(पुरुषोत्तम) व प्रकृति(गुण) याचे ज्ञानविज्ञानातुन भगवतगीतेत स्पष्ट केले आहे.

*येथे श्रीकृष्ण बुद्धियोगाचे ज्ञान देतात. ज्यांत कर्म योग्य कि अयोग्य हा प्रश्न गौण ठरतो. (२-३९)
*भयमुक्त होतो व शक्ति संचित होते. ज्यामुळे विचलित होत नाही. (२-४०).

बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि॥(२-३९)

स्वल्पम् अपि धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।(२-४१)
अर्थात चंचलत्व नष्ट होऊन कार्यनिश्चय दृढ होतो.

*या ज्ञानामुळे मनुष्याचा जीवनविकासाचा मुख्य track "मृत्योर्मां अमृतंगमय " बनतो(अमृतत्वाय कल्पते). कार्याद्वारे योग साध्य

करण्यासाठी योगस्थ वृत्तिने कार्यरत होतो. याप्रमाणे कार्याची गति बदलते. कार्याच्या गतिचे transformation होते. हा कर्मयोग असतो.

योगः कर्मसु कौशलम् ।

५. स्थितप्रज्ञ (विचलित न होणे, शांति, Divine consciousness)

या ज्ञानामुळे "ज्ञान" या संदर्भातील Priority काय असावी?(ऐकलेली)Flowery language vs Divine consciousness हे स्पष्ट होते. व कर्मयोगाचे महत्व स्पष्ट होते.

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला।

समाधौ अचला बुद्धिः तदा योगम् अवाप्स्यसि।।(२-५३)

****

(२-५४)*

*************************

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव।

स्थितधीः किम् प्रभाषेत् किम् आसीत व्रजेत किम् ?

**************************

(२-५४):"स्थितप्रज्ञस्य का भाषा?"

जीवनात काय साध्य करायचे आहे, याचा बोध झाला तर मनुष्य नियोजन करतो. याप्रमाणे मार्ग ठरवितो. अर्थात मार्गाचा निश्चित हेतु(साध्य) असतो.

इच्छा(State of want) व कार्य(State of art) यानुसार मनुष्य व्यवहारमार्ग चालतो हे आपण जाणतो. व्यवहारात कार्य ठरते. अशाच व्यवहारात धर्मयुद्ध ठरते. अर्जुनाचे नियतकार्य ठरते. पण प्रत्यक्ष कार्य execute करण्यापुर्वीच अर्जुन दुःखी होतो. मार्गावरुन विचलित होतो. निष्क्रियतेचे "धर्म" संदर्भात समर्थन करतो. या समर्थनालाच ज्ञान म्हणतो.

मनुष्य ज्या स्थितीत आहे, त्या स्थितीत समर्थन करण्याची संवय असते. ही संवय त्याच्या मनःशांतिसाठी असते. अर्जुन अशांत स्थितीत असतो व शांतीसाठी समर्थनार्थ (प्रज्ञावाद) भाष्य बोलतो. अज्ञानाला ज्ञान संबोधतो. जीवनाचा विकासरथ थबकतो. जीवनात काय साध्य करायचे आहे याचा आढावा घेतो. भौतिक ऐश्वर्य संदर्भात "कांही नको" हे स्पष्ठ करतो. जीवनात पुण्यकर्माने स्वर्गप्राप्ति व पापकर्माने नरकप्राप्ति असते या आधारावर मला नरक नको म्हणुन (लोभामुळे) युद्धकार्य करणार नाही ही भूमिका घेतो.

याचाच अर्थ अर्जुन जीवनात व्यवहार जाणतो. पण अंतिम साध्य जाणत नाही. हेच अंतिम साध्य "स्थितप्रज्ञ" या विभागात स्पष्ट केले आहे, ज्यामुळे वर्तमानात योग्य मार्गावर कार्यरत होईल. याच संदर्भात अर्जुन प्रश्न करतो,

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव।
स्थितधीः किम् प्रभाषेत् किम् आसीत व्रजेत किम् ?(२-५४)

*मनोवश vs आत्मवश (मानसिक नियंत्रण)

"स्थितप्रज्ञ"या विभागात मनोवश व आत्मवश या स्थितीचे निश्चित वर्णन केले आहे. (इच्छा)विषयचिंतनामुळे कार्याची सकाम अवस्था असते. या स्थितीत मार्ग दृढ नसतो. विचलित (अशांत) असतो. वाऱ्याने नाव वहावी तशी जीवनयात्रा चालु असते. तर आत्मवश (मनावर नियंत्रण) अवस्थेत नाव निश्चित दिशेने वल्हवीत असतो. अर्थात निश्चित दिशेने मार्गक्रमण होते. कार्याचा एकनिश्चय असतो. यासाठीच भगवतगीता स्वधर्म(Tiebreaker) व दृढनिश्चयासाठी निर्णयअधिकार याची जागृति करते.

*ध्येय:

कार्याद्वारे योग साध्य करुन समुद्रशांति मिळविणे (आपुर्यमाणम् अचलप्रतिष्ठम् ) हे ध्येय असते. यासाठी निष्काम कर्म शास्त्र भगवतगीता सांगते. अर्थात फल ईश्वराला समर्पण हेच निष्काम कर्मरहस्य आहे. जीवनाचे अंतिमधाम ईश्वरधाम आहे हे जाणुन "अमृतंगमय" हा मार्ग ठरतो. अर्थात व्यवहारमार्ग(सकाम) अमृतंगमय(निष्काम) मार्गात Transform होतो. शांतिचा source ईश्वरधाम आहे हे जाणतो.

शांतिनिर्वाणपरमां मत्संस्थाम् अधिगच्छति।(६-१५)

"If in our daily life we can smile, if we can be peaceful and happy, not only we, but everyone will profit from it. This is the most basic kind of peace work. "

Nhat Hanh

, ******००

(२-५४) :"स्थितधीः किं प्रभाषेत् किम् आसीत व्रजेत् किम् ?"

अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी भाष्य बोलतो. त्या भाष्याला प्रज्ञावाद म्हटले.

अशोच्यान् अन्वशोचस्त्वं प्रज्ञावादाश्च भाषसे।(२-११)

या verse पासुन श्रीकृष्णाने प्रत्यक्ष जीवनविकासाचे ज्ञान सांगण्यास आरम्भ केला. या भाष्याच्या संदर्भात अर्जुन प्रश्न करतो, जो श्रेष्ठ असतो, स्थितप्रज्ञ ठरतो तो कसे भाष्य करतो?

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिः तस्य केशव।

स्थितधीः किं प्रभाषेत् किम् आसीत व्रजेत् किम्।।(२-५४)

श्रेष्ठ दुःखाने विचलित होत नाही हा संदर्भ येथे विस्ताराने येतो. नित्य विषयचिंतनात(इच्छापुर्ति) असलेला मनोवश ठरतो, म्हणुन (भौतिक )दुःखाने विचलित होतो. नाव वाऱ्याने वहात रहावी तसे त्याचे जीवन चालते. तर ईश्वरचिंतन करुन आत्मवश असलेला (जीवन)नाव वल्हवतो.

जगातील थोर व्यक्तिंच्या जीवनात दुःख, अडचणी आलेल्या असतात, पण त्या अडचणी विकासातील Stepping Stone ठरतात. म्हणुन कार्यरत असतो. इतिहास घडतो. तो कार्यातच शांती अनुभवतो.

रामायणात श्रीरामाच्या राज्याभिषेकाची तयारी सुरु असते, तेंव्हा देवलोक हादरते. श्रीरामाला वनवास घडावा यासाठी सरस्वतीला विनंति करण्यात येते. सामान्य लोक भौतिक सुखासाठी देवतांना भजतात, पण येथे उलट होते. अर्थात थोरांना दुःखरुपाने इतिहास घडविण्याची संधीच मिळाली असते. वनवास declare झाल्यानंतर श्रीराम मातेला हेच सत्य (महान कार्याची संधी)सांगतात,

"जहां सब भांति मोर बड काजु "

सामान्य विषयचिंतनामुळे(सकाम) दुःखी होतो. दुःख टाळण्यासाठी, मनाला समाधान देण्यासाठी प्रज्ञावादी (Colored) भाष्य बोलतो. त्याला जीवनात अपुर्णता जाणवत असते. यामुळे अशांत असतो. हीच अशांती प्रज्ञावादाद्वारे व्यक्त होत असते. तर श्रेष्ठ(स्थितप्रज्ञ) पुर्णत्व अनुभवत असतो. कोणतेही दुःख त्याला विचलीत करीत नाही. (जसे नद्यामुळे समुद्राची स्थिरता बाधित होत नाही)

आपुर्यमाणम् अचल प्रतिष्ठम् ... (२-७०)

अर्जुनाच्या रुपाने सामान्यांचे Survivalसाठी जगणे, या अनुषंगाने केलेले भाष्य व श्रेष्ठांचे जगणे व त्यांचे भाष्य यांतील भेद भगवतगीतेने स्पष्ट केला आहे. अर्जुन भाष्य बोलतो, ते केवळ सामान्याचे वास्तव असते.

समाजात निष्क्रियतेचे, चुकीला योग्य ठरविण्यासाठी सर्रास भाष्य बोलल्या जाते. सहसा याचे स्वरुप नकारात्मक असते. या भाष्याचा सामान्यावर Influence (मोह) होतो. म्हणुनच आपले हीत साधण्यासाठी Influence होईल असा color देवुन भाष्य बोलल्या जाते. मनथरेने याच भाष्याचा कैकेयीला Influence

करण्यासाठी उपयोग केला. श्रेष्ठ अशा भाष्याने विचलित (मोह) होत नाही.

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।(८-२७)

भाष्य संवादाचे माध्यम असते. समाजात कार्य घडत असते, ते वास्तव असते. भाष्य मात्र नेहमी वास्तव दर्शवीत नाही. अर्जुन भाष्य बोलतो, ते फक्त मनुष्याच्या सामान्य स्थितीचे(मनसमाधान) वास्तव असते. श्रीकृष्णाने त्याच्या भूमिकेतील वास्तव दर्शविले. या भाष्याला प्रज्ञावाद संबोधले, त्याला जीवनातील वास्तव स्विकारण्यास भाग पाडले(युद्ध करणे योग्य कि अयोग्य?योग्य असेल तर शोक नष्ट कसा होईल?). प्रश्नाची पारदर्शकता आली तेंव्हाच ज्ञानाचे द्वार उघडे झाले. संवाद सुरु झाला.

We cannot change anything until we accept it.
Condemnation does not liberate, it oppresses.

Carl Jung

*****००

(२. ५६)

*************************

दुःखेषु अनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः।
वीतरागभयक्रोधः स्थितधीः मुनिः उच्यते।।

*************************

(२. ५६):
" दुःखेषु अनुद्विग्न मनः सुखेषु विगतस्पृहः"
(स्थितप्रज्ञ-शाश्वत सुखाचे रहस्य)

विश्वाच्या प्रगतिची गति(मानवकल्याण) व जीवनविकासाची गति याचा समन्वय भगवतगीतेने साधलेला आहे. हे भगवतगीतेचे महान योगदान आहे.

"Until the Scientific Revolution most human cultures did not believe in progress. They thought the golden age was in the past, and that the world was stagnant, if not deteriorating. "

-A brief History of Humankind . (Yuval Noav Harari )

वैज्ञानिक क्रांती होईपर्यंत बहुतेक मानवी संस्कृतींचा प्रगतीवर विश्वास नव्हता. पूर्वीचा काळ सुवर्णकाळ होता व आता जग Stagnant झालेले आहे हाच त्यांचा विश्वास होता.

गरीबी, रोग यावर विज्ञानाने उपाय शोधले. वर्तमानात जी वाईट स्थिति असते त्याला मनुष्यानेच आव्हान दिलेले आहे म्हणुन जग प्रगतिपथावर असते. जसे जग प्रगतिपथावर असते, तसेच जीवनही प्रगतिपथावर असते. हाच संदेश भगवतगीता देत आहे. "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च " याचे हेच रहस्य आहे.

युद्धभुमिवर दुःखी झाल्यावर अर्जुन त्याच्या सुखाच्या संकल्पना जशा असतात त्याप्रमाणे तो "मला कांही नको" ही भूमिका घेतो. अर्थात जीवनविकास येथे Stagnant होतो.

अर्जुनाच्या कार्याद्वारे जगतहीताचे कार्य घडणार होते, हे विश्वरुपातुन दर्शविले. याचाच अर्थ अर्जुनाच्या जीवनविकासातुन (आत्मोन्नति) विश्वकल्याण होणार होते. पण अर्जुनाला

जीवनविकासाचे ज्ञान नव्हते. हे जीवनविकासाचे ज्ञान व त्यातील सुखाची साधना भगवतगीता स्पष्ट करीत आहे. याद्वारे शाश्वत सुखाची व्याख्या स्पष्ट केली आहे. ज्याला स्थितप्रज्ञ संबोधले आहे.

जीवनविकासमार्ग:

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

अर्थात विकासमार्गात विचलित न होणे .

साधना:

योगः कर्मसु कौशलम् ।(२-५०)

(हा संदेश निष्काम कर्म म्हणुन प्रसिद्ध आहे)

सुखाची व्याख्या :

दुःखेषु अनुद्विग्न मनाः सुखेषु विगतस्पृहः।

वीतरागभयक्रोधः स्थितधीः मुनिः उच्यते।।(२-५६)

अर्थात दुःखाने विचलित होत नाही, निर्भय, काम-क्रोध-लोभ मुक्त असतो. असा स्थिरत्व लाभलेला. या स्थितिलाच समुद्राची उपमा दिलेली आहे. जी शान्तिची व्याख्या बनते.

आपुर्यमाणम् अचलप्रतिष्ठम्

समुद्रम् आपः प्रविश्यन्ति यद्वत् ।...

.. स शान्तिम् आप्नोति न कामकामी(२-७०)

"Progress lies not in enhancing what is, but in advancing toward what will be. "

-Khalil Gibran

********

२. ५६:

"वीतरागभयक्रोधः स्थितधीः मुनिः उच्यते"

(Weak vs. Strong State of mind)

व्यवहारात Weak mind साठी" मनाचा दुबळेपणा " हा शब्द वापरल्या जातो. भगवतगीतेत याला हृदयदौर्बल्य म्हटले.

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप।(२-३)

Fear is mental poverty that if left untreated can hinder us from achieving our full potential. Mental poverty can spread like an uncontrollable forest fire if you do not stop the mindset in its tracks.

Strong mind या संदर्भात "स्थितप्रज्ञ" या शब्दाचे प्रयोजन भगवतगीतेत केलेले आहे.

दुःखेषु अनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः।
वीतरागभयक्रोधः स्थितधीः मुनिः उच्यते।।(२-५६)
दुःखाने विचलित न होणे, सुखाचा हव्यास नसणे, आसक्ति, क्रोध व भय यापासुन मुक्त असणे, या स्थितिला स्थितप्रज्ञ म्हटले आहे.

"योगसंन्यस्तकर्माणं" अर्थात कार्याद्वारा योग(दुःखान्त) साधना या शब्दाचे प्रयोजन आहे. Strong mind साठी योग साधना होते. हा भक्तिचा विषय आहे.

व्यवहारात कार्याद्वारा विकास होतो. संतांनी आपल्या स्वभावनियतकार्याला अध्यात्माशी जोडले व भक्तिचा संदेश

दिला. भगवतगीतेत व्यावहारिक युद्धकार्याला अध्यात्माशी जोडले व ज्ञान, कर्म व भक्तिचा संयोग असलेला जीवनविकासाचा संदेश दिला.

१. भक्ति:

व्यावहारिक युद्धकार्य External battle असते, तर Internal battle हा विषय Psychology शी संबंधीत असतो. Weak mind (मनोवश) ला Strong mind (स्थितप्रज्ञ) मध्ये विकसित करणे. कार्याद्वारा योग हा विषय भक्तिशी जोडलेला आहे.

२. ज्ञान:

"ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम् "(४-४१)

विश्वास

(Fear vs. Faith :Fear is a State of mind it arrest the devepopement and keeps life stagnant. Faith motivate life to get ahead. )

विकासमार्गातील " संशय vs विश्वास" या संदर्भात ज्ञानाची भूमिका महत्वाची असते. अर्जुनाला नियतकार्यात संशय येतो.

युद्ध न करणे ही निवड करतो. निष्क्रियतेला ज्ञान संबोधतो. प्रत्यक्षात ज्ञानाने विश्वास येतो व कार्याचा एकनिश्चय होतो. याचाच अर्थ "ज्ञानी" या संदर्भात अर्जुन ज्ञानाचा चुकीचा उपयोग करतो. यामुळे अज्ञानी ठरतो.

'Your faith in "what will be" will not only empower you to let go "what was", but it will also encourage you to accept "what is" existing now! Have faith in God; His plans are to prosper you, not to harm you!'

Israelmore Ayivor

(Writer of Become a better You)

जीवनमार्गात विकासासाठी ज्ञानाचा उपयोग व्हावा याचसाठी अध्यात्म, ईश्वर (ज्या ज्ञानाचा Consciousness शी संबंध असतो)या ज्ञानाचा उपयोग भगवतगीतेत केलेला आहे. यामुळे व्यावहारिक जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" या मार्गात Transform होतो. या मार्गात आत्मवश अवस्था (Strong state of mind) असते. धर्म-अधर्म या संदर्भात स्वतःचा स्वधर्म असतो.

याप्रमाणे ज्ञान या संदर्भात जीवनविकासाचा Standard मार्ग ठरतो.

३. कर्म:

"योगः कर्मसु कौशलम् "

अ)"योगः कर्मसु कौशलम् " या विकासमार्गात कार्याचा एकनिश्चय असावा . निर्णयअधिकार येथे महत्वाचा असतो.

ब)स्वधर्म:

स्वधर्म स्वभावनियतकार्य, Tiebreaker, Self approval असते. व्यावहारिक कार्याला स्वधर्मात Transform करणे. "अमृतत्वाय कल्पते" या मार्गावर निष्काम कर्म/ भक्ति घडते.

समुहातील स्वधर्माची व्याख्या:

To surender the right of governing Self in the hands of a person or assembly of persons in order to execute the Common issues.

महाभारतात common issue धर्मयुद्ध होता. अर्जुनाला त्याच्या स्वभावनियतकार्यानुसार नियतकार्य सोपविले होते. याच कार्याला स्वधर्म करणे हे अर्जुनाचे दायित्व होते.

सार:

१. Weak, Negative mindset याची ओळख भगवतगीता देत आहे व यासाठी "भक्ति" या संदर्भात मानसशास्त्राचा विषय(मनोवश व आत्मवश अवस्था) आलेला आहे.

२. जीवनविकासाचा विषय या संदर्भात determination (कर्म). अर्थात व्यवहारातील कार्यकौशल्याचा विषय आलेला आहे.

३. ज्ञानविज्ञानाचा विकासासाठी उपयोग(ज्ञान) अर्थात ज्ञानविज्ञानाचा विषय आलेला आहे.

******

(२-५८)

*************************

तस्मात् यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः।

इंद्रियाणि इंद्रियार्थेभ्यः तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।

*************************

(२-५८):

"इंद्रियाणि इंद्रियार्थेभ्यः तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता"

(Principle of freedom)

"Without self knowledge, without understanding the working and functions of his machine, man cannot be free, he cannot govern himself and he will always remain a slave. "

George Gurdjieff

कर्माद्वारे जीवनविकास हा भगवतगीतेचा मुख्य संदेश आहे. जीवनविकासात शरीरयंत्रात इंद्रियविषय(Senses), इंद्रिय, मन, बुद्धि, आत्मा, परमात्मा असा जेष्ठतेचा Sequence आहे. म्हणुन

स्वतःचा निश्चित व दृढ मार्ग याचे महत्व "बुद्धियुक्त "या संदर्भात स्पष्ट केले आहे.

इंद्रियाणि पराणि आहुः इंद्रियेभ्यः परं मनः।
मनसः तु परा बुद्धिः योः बुद्धेः परता तु सः।।
एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्य आत्मानम् आत्मना।(३-४३)

कर्मेंद्रियाद्वारे कर्म घडत असते. विकास या प्रक्रियेत शांति, मनाची प्रसन्नता, बुद्धिची स्थिरता, स्वतःचा निश्चित मार्ग असतो. या विकासप्रक्रियेत " स्थितप्रज्ञ " होण्यासाठी विकासमार्गात "तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता" संदर्भात महत्वाचे एकच verse दोनदा आलेले आहे. या दोन verses मधील भाग प्रसन्न मन, बुद्धिची स्थिरता, बुद्धिवर संस्कार, निश्चित मार्ग या संदर्भात आहे.

*Starting verse:
यदा संहरते चायं कुर्मोअंगानीव सर्वशः।
इंद्रियाणि इंद्रियार्थेभ्यः तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।(२-५८)

जसे कासव इंद्रियाला नियंत्रित करतो, (इंद्रिय)विषय इंद्रियाला नियंत्रित करीत नाही. अर्थात स्वतःवर नियंत्रण असते.

(इच्छा - मन-बुद्धि - स्वतःचा मार्ग)

अ)मनोवश अवस्था व त्याचे परिणाम

संन्यास धारण करुन कर्म टाळले(विषयचिंतनामुळे) तरी मनुष्याची नैसर्गिक इच्छा मनाची प्रसन्नता नष्ट करते.

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः।(२-५९)

इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः।(२-६०)

विषयचिंतनामुळे आसक्ति व यामुळे बुद्धिभ्रम होतो.

ध्यायतो विषयान् पुंसः संगः तेषु उपजायते।(२-६२)

स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।(२-६३)

ब)मनोवश अवस्था vs आत्मवश अवस्था

मनावर नियंत्रण, आत्मवश(स्वतःचे स्वतःवर नियंत्रण) यामुळे प्रसन्नता लाभते. म्हणुन बुद्धिवर संस्कार या संदर्भात "बुद्धियुक्त" होणे महत्वाचे आहे. या अवस्थेत नाव निश्चित दिशेने वल्हवीत

असतो, तसा स्वतःचा विकासमार्ग असतो. तर मनोवश अवस्थेत नाव वाऱ्याने वहावी तशी जीवनयात्रा चालु असते. म्हणुन संस्कार या संदर्भात स्वतःचा निश्चित मार्ग चालणे महत्वाचे आहे. यालाच व्यवहारात Regulating principle of freedom म्हणुन ओळख असते.

तस्मात् यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः।
इंद्रियाणि इंद्रियार्थेभ्यः तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥(२-६८)

*****

(२-५९)

*************************

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः।

रसवर्जं रसोअपि अस्य परं दृष्ट्वा निवर्तते॥

*************************

(२-५९):

"रसवर्ज्यं रसोअपि अस्य परं दृष्ट्वा निवर्तते"

(Higher taste ceases lower)

"चंद्रगुप्त हा गुराख्याचा मुलगा. त्याच्या पायात काटा जातो व रक्त वाहते. वाटेतील ते काटेरी झाड तोडत असतो. हा काटा विषारी आहे म्हणुन आधी काटा काढ असे चाणाक्य त्याला सांगतात तेंव्हा तो प्रथम काटेरी झाडालाच जाळुन टाकतो. चाणाक्याच्या नजरेने अपेक्षित भविष्यातील "राजा" येथेच हेरला. "

उच्च विचारसरणी किंवा Higher taste या संदर्भात चांगल्या कार्यात गुंतवले कि मनुष्य स्वतःचे दुःख विसरतो. भगवतगीता

याच संदर्भात श्रेष्ठत्वाचा Sequence स्पष्ट करते. ज्यामुळे Higher taste चा बोध होतो.

इंद्रियविषय-इंद्रिय-मन-आत्मा-परमात्मा शरीरयंत्रातील हाश्रेष्ठत्वाचा sequence.

इंद्रियाणि पराणि आहुः इंद्रियेभ्यः परं मनः।
मनसः तु परा बुद्धिः योः बुद्धेः परतः तु सः॥(३-४२)

अर्थात

इच्छा-कार्य-संयम(दृढत्व, एकनिश्चय, योगी)- ईश्वर(ज्ञान) हा अनुक्रमे श्रेष्ठत्वाचा sequence असतो.

१. इच्छेपेक्षा कार्याचे श्रेष्ठत्व

कार्य टाळुन इच्छा चिंतन मिथ्याचार, म्हणुन कर्मयोग श्रेष्ठ.

इंद्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते।(३-६)
कर्मेंद्रियैः कर्मयोगं असक्तः स विशिष्यते।(३-७)

२. कार्यापेक्षा बुद्धियोग श्रेष्ठ अर्थात बुद्धियोग जाणला तर सकाम कर्म कनिष्ट ठरते.

दुरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय।
बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः॥(२-४९)

३. योग्यांमध्ये ईश्वरगतित असलेला श्रेष्ठ.
योगीनाम् अपि सर्वेषां मद् गतेन अंतरात्मना।
श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः॥(६-४७)

याप्रमाणे जीवनाची उच्च गति जाणता येते. भौतिक संदर्भात आहार वर्ज्य केला तरी आवड नष्ट होत नाही. पण जीवनाची उच्चगति (Higher taste)अनुभवली असता ती (Lower taste)नष्ट होते.
विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः।
रसवर्जं रसोअपि अस्य परं दृष्ट्वा निवर्तते॥(२-५९)

"The key to growth is the introduction of higher dimensions of consciousness into our awareness. "
-Lao Tzu
*********

(२-६०)

*************************

यततो हि अपि कौंतेय पुरुषश्च विपश्चितः।

इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः॥

*************************

(२. ६०):"इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः"

भगवतगीतेतील "स्थितप्रज्ञ" या विभागात "बुद्धि विचलित न होणे" या स्थितीत निर्भयता, शांति, अनासक्ति (वीतरागभयक्रोधः) अभिप्रेत आहे. जीवनात इच्छा असणे, कार्य घडणे ही प्रकृति आहे. जीवनविकासात कार्य साधन आहे तर बुद्धि विचलित न होणे(तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता) हे साध्य आहे.

चांगला(सत), विद्वान असुनही कार्यरत होतांनाच अर्जुनाची बुद्धि हरण होते. हा मानसिक Weakness ठरतो. हे भगवतगीता दर्शवुन देते. तणाव, अशांति (Stress, Tension) हा मानसिक Weakness ठरतो. समाजात शांतीसाठी धर्म, अध्यात्म, संन्यास यांचा उल्लेख होतो. एखाद्याने कार्याचा त्याग केला तरी (विषय) इच्छेवर (मनोवश) विजय मिळविणे कठिण असते व विद्वान समजणाऱ्यांचीही बुद्धि हरण होते.

यततो हि अपि कौंतेय पुरुषश्च विपश्चितः।

इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः।।(२-६०)

जीवनातील हा (मानसिक) Weakness भगवतगीता कारणासह दर्शवुन देते. या पार्श्वभुमिवर जीवनविकासाला पाण्यावरील नावेची संज्ञा दिली आहे. वारा favourable असतो, तेंव्हा नाव वहात असते, पण तुफान आले कि नाव डगमगते. येथे नाव परावलंबित असते. म्हणुन कार्यसंस्कार या संदर्भात नाव निश्चित दिशेने वल्हविणे असे अभिप्रेत असते.

मनोवश अवस्थेत असणारे या "तुफानावरच" भाष्य करीत असतात व नाव वल्हविणे विसरतात. हेच बुद्धिचे हरण असते (तेन मुह्यन्ति जन्तवः). तर आत्मवश अवस्थेत असणारे नाव वल्हवितात.

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।

तस्यां जाग्रति भूतानि या निशा पश्यतो मुनेः।।(२-६१)

जीवनात कार्य घडत असते. सुखी जीवनासाठी या कार्याचे महत्व जाणणे, कार्याची गति(गहना कर्मणो गतिः) जाणणे याला भगवतगीता Priority देते. कार्यसंदर्भात State of Art(सहजकार्य/स्वभावनियतकार्य/आवडीचे कार्य) हा एक भाग असतो. तर दुसरा महत्वाचा भाग प्रत्यक्ष जीवनविकासाशी

संबंधित असतो. ("कार्याद्वारे योग")हाच भाग भगवतगीता highlight करते.

*नियतकार्य स्वधर्मात transform करणे. येथे स्वधर्म Tiebreaker, स्वमंजुरी ही भूमिका बजावते.

*जीवनात निर्णयक्षमता महत्वाची असते. येथे निर्णयअधिकार जाणतो. भगवतगीता येथे निष्काम कर्मासाठी दृढनिश्चयाचे महत्व highlight करते. दृढतेसाठी बुद्धियोगनिष्ठा(चंचलत्वावर विजय) highlight करते. व याच संदर्भात "अमृतत्वाय कल्पते" हा जीवनविकासाचा महामार्ग स्पष्ट होतो.

समदुःखसेखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

"Stress and worry, they solve nothing. What they do is block creativity. You are not even able to think about the solutions. Every problem has a solution. "

Susan L. Taylor

*******

(२-६१)

*************************

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः।

वशे ही इंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥

*************************

(२. ६१) : "युक्त आसीत मत्परः"

(Priority of Life)

भगवतगीतेने बुद्धिवरील संस्कार या संदर्भात "युक्त" व "अयुक्त" हे दोन शब्द वापरले आहेत. विकासमार्गावर असण्यासाठी "युक्त" ही Priority असावी याचे ज्ञान स्पष्ट केले.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।

अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते॥(५-१२)

अर्जुनासमोर युद्ध(नियतकार्याचे पालन जाणुन)करणे वा भीष्म, द्रोण इ. स्वजनांना न मारणे असे दोन Option असतात. तेंव्हा "न मारणे" ही त्याची Priority ठरते. Senses सुखामुळे अर्जुन दुःखी होतो. यामुळे अर्थातच senses सुख ही अर्जुनाची Priority असते.

जीवन जगत असतांना मनुष्य अनेकविध समुहाशी (कुटुंब, संस्था, देश, जगत्) संबंधित असतो, म्हणुन विविध Platformवर असतो. त्याची जी Priority असते, तसा प्रत्यक्षात जगत असतो.

जीवनात senses सुख हीच Priority असल्यामुळे मनुष्य फक्त Survival साठी जगत असतो. याचमुळे मार्गात संशय असतो, निष्क्रिय होतो किंवा आळशी होतो. व "मी योग्य आहे" याचे नित्य समर्थन करीत असतो. यासाठी ज्ञान वापरत असला तरी ही अयुक्त स्थिति असते. म्हणुन विकासमार्गासाठी Lower Self vs Higher Self, Lower conscious vs higher conscious, विषयसुख vs आत्मसुख, अहंकाराचा आश्रय vs ईश्वराचा आश्रय! असे विविध विषय येतात.

भगवतगीता Priority या संदर्भात" Senses सुख" कि "युक्त" याद्वारे विकासमार्गात पारदर्शकता आणते.

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः।
वशे ही इंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥(२-६१)

नित्य युक्त असणे म्हणजे जीवनाचा शाश्वत विकासमार्ग (अमृतंगमय) जाणणे. व विकासमार्गावर असणे. याच संदर्भात बुद्धियोग, योगयुक्त, बुद्धियुक्त शब्द आलेले आहेत. या मार्गावर कार्याचा एकनिश्चय(दृढ) असतो. स्वतःच्या नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करतो. अर्थात निश्चित दिशेने विकास होतो. कार्याद्वारे समत्वयोग (निष्काम कर्म) साध्य होतो. अर्थात कार्याद्वारेच प्रत्यक्ष विकास होतो. बुद्धिची समाधिस्थ अवस्था(अविचल स्थिति) प्राप्त होते.

"Senses सुख "Priority असलेला भोगैश्वर्य आसक्त असतो. (सृति) भाष्याने मोह पावतो(infection!). तर "युक्त" Priority असलेला या( सृति) भाष्यामुळे मोह पावत नाही. Senses सुखाची Priority नैसर्गिक आहे. म्हणुन जीवनाचा विकासमार्ग जाणुन सुखी जीवनासाठी "युक्त"ही Priority असावी . हा भगवतगीतेचा संदेश आहे.

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन॥(८-२७)

नित्य "युक्त" असण्यासाठीच ईश्वराचा आश्रय(शाश्वत) असतो. तर senses सुख priority असल्यामुळे अहंकार(Lower Self) क्रियाशील असतो. व यामुळे निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी colored भाष्य(बुद्धिवादी) वापरतो. याचमुळे नकारात्मकता असते. म्हणुन शेवटी ईश्वराचा आश्रय(शाश्वत) कि अहंकाराचा(अशाश्वत) आश्रय असे Option आलेले आहे.
यत् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।(१८-५९)

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।(१८-६२)

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।।(१८-६३)

अर्थात मनुष्य जसा जगतो, ती त्याची Priority असते.

अर्जुनाला मार्गात संशय आला असता द्वंद्व निर्माण होते. (दुःख टाळण्यासाठी) तो जी निवड करतो ती त्याची Priority असते. प्रथम या द्वंद्वाला hide करतो. स्वतःची धार्मिक भूमिका आहे असे दर्शवितो. नंतर घटनेतील वास्तव कबुल करतो. तेंव्हा हा Tie(द्वंद्व) स्पष्ट होतो.

वर्तमानातील चालु क्षण महत्वाचा असतो. परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेवुन अर्जुनाला तात्काळ निवड करायची होती, हे येथे महत्वाचे आहे. मार्गातील Tie सोडविण्यासाठी वर्तमानात Priority कोणती असावी?हेच त्याला ठरवायचे होते. हा त्याचा अधिकार असतो.

सार: जीवनमार्गात मनुष्यासमोर Option असले तरी जी निवड करतो, ती त्याचीच Priority असते. याच Priority चे ज्ञान भगवतगीतेने कोणतेही बाह्य विचार न लादता स्पष्ट केले आहे. यासाठीच भगवतगीतेने ज्ञान(विज्ञानासह) स्पष्ट केले आहे.

"युक्त आसीत मत्परः"

********

(२-६२)
*************************
ध्यायतो विषयान् पुंसः संगः तेषु उपजायते।
संगात संजायते कामः कामात् क्रोध अभिजायते।।
*************************

(२-६२)/१:
"ध्यायतो विषयान् पुंसः संगः तेषु उपजायते"
(बुद्धिनाश vs बुद्धियुक्त)

१. जीवनाचा अर्थ काय? याचा हेतु काय या प्रश्नाचे उत्तर जगातील तत्वज्ञांनी विविध प्रकारे व्यक्त केले.

Life is not a problem to be solved, but a reality to be experienced.
-Soren Kierkegaard
We may know our true purpose in life, because we may choose our purpose in life. -Bryant McGill,

In our era, the road to holiness necessarily passes through the world of action.

-Robert Green Ingersoll

जीवनात इच्छा असतात, अडचणी येतात, प्रश्न असतात. व या पुर्तिसाठी मनुष्य कार्यरत असतो. (State of want- State of Art). जीवनविकास या संदर्भात कार्यरत राहण्यासाठी संस्कारीत असणे व संस्कार या संदर्भात "बुद्धियुक्त" शब्दाचे भगवतगीता प्रयोजन करते. "बुद्धियुक्त"अभावी "अशांतस्य कुतः सुखम्" असे कारणही स्पष्ट करते.

मनुष्याला जीवनातील अशांति, Stress, Tension, Mental illness कळतो. व याचमुळे सुखी होण्याचा शोध सतत सुरु असतो.

२. भगवतगीता जीवनविकासात कर्माचे महत्व(Subject to condition) सांगते. व ही Condition निष्काम कर्म असते. निष्काम कर्मासाठीच "बुद्धियुक्त" या शब्दाचे प्रयोजन आहे.

दुरेण हि अवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय।

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणाः फलहेतवः॥(२-४९)

याच आधारावर जीवनविकासाचा शाश्वत(Standard) मार्गाचे प्रयोजन सांगितले आहे. "अमृतत्वाय कल्पते" (२-१५) याद्वारा हा मार्ग स्पष्ट झाला आहे. व याचसाठी बुद्धियोगाचे महत्व आहे. व बुद्धियोगासाठीच "ईश्वर"श्रद्धा, स्मरण, भक्ति याचे महत्व आहे.
तेषां सततयुक्तानां भजता प्रितीपुर्वकम् ।
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते॥(१०-१०)

अडचणी, दुःख यामुळे विचलित होतो. उपाय (अज्ञानावर ज्ञान ) न शोधता द्वंद्ववश होतो. अर्थात बंधनाच्या जाळयात अडकतो.
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ॥(३-३४)

३. बुद्धिमध्ये Virus गेला कि (संमोहामुळे)भ्रम होतो. हेच बुद्धिनाशाचे कारण बनते. विषयचिंतनामुळे आसक्ति उत्पन्न होते.
आसक्ति--काम--क्रोध--संमोह-- स्मृतिविभ्रम -बुद्धिनाश-पतन
याप्रमाणे आसक्तिचा परिणाम पतनाकडे (विकासाच्या विरुद्ध) ठरतो.

ध्यायतो विषयान् पुंसः संगः तेषु उपजायते।
संगात संजायते कामः कामात् क्रोध अभिजायते।।(२-६२)
क्रोधात भवति संमोहः संमोहात् स्मृतिविभ्रमः।
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।(२-६३)

३. याच (वरील)पार्श्वभुमिवर बुद्धिनाश vs. बुद्धियुक्त हा जीवनविकासातील महत्वाचा विषय भगवतगीतेने स्पष्ट केला आहे व याद्वारे विकासात "बुद्धियुक्त" चे महत्व ज्ञात होते.
*विकासात कर्म महत्वाचे.
*योग्य -अयोग्य कार्य या मुद्याने विचलित न होणे यासाठी बुद्धियुक्तचे महत्व.
*अर्थात कार्याद्वारे योग(दुःखान्त) हेच विकासातील कार्यकौशल्य ठरते.
बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्।।(२-५०)

*******

(२. ६२)/२:

"संगात् सञ्जायते कामः कामात् क्रोधः अभिजायते"

(The barrier & its breaker)

व्यवहारात "काम" हा शब्द कार्य(Work) संदर्भात अभिप्रेत असतो. तर भगवतगीतेत अर्जुनाला म्हटले कामरुपी शत्रुला ठार कर.

जहिं शत्रु महाबाहो कामरुपम् दुरासदम् ।(३-४३)
हा संदेश युद्धप्रसंगी असतो. जीवनाचा शत्रु ठरणारा हा "काम" कोणता?भगवतगीतेला अभिप्रेत असलेला "काम" या शब्दाचा निश्चित अर्थ समजुन घेणे, जाणुन घेणे महत्वाचे ठरते.

भगवतगीतेतील निष्काम कर्म याचा आधारच "सकाम कर्म-निष्काम कर्म " यातील भेद आहे. याच संदर्भात "काम"ला शत्रु संबोधले. व निष्काम कर्मातुन (समत्व)योग साध्य करणे, हे कौशल्य जाण(योगः कर्मसु कौशलम्) असा संदेश येतो.

एकीकडे" काम" ला शत्रु संबोधले तर दुसरीकडे ईश्वरप्रेरक इच्छा(Divine) या अर्थानेही उल्लेख आहे.
धर्मअविरुद्धः भूतेषु कामोअस्मि भरतर्षभ।(७-११)

अर्थात रंजल्या गांजल्यांच्या दुःखाने व्यथित होणे हे "धर्मअविरोधी काम" या संदर्भात आहे. चांगले मनुष्य परपिडेने व्यथित होतात . महान कार्याची ती प्रेरक शक्तिच असते.
("कामये दुःतप्तानाम् प्राणिनाम् आर्तिनाशनम् ")

चांगल्या मनुष्याला (अर्जुनाला)स्वकियांच्या दुःखाने निर्माण झालेला "काम" हाच अर्जुनाच्या "काम" चा संदर्भ असतो. व याच "काम" वर विजय मिळविण्यासाठी लढा असतो.
तस्मात् सर्वेषु कालेषु माम अनुस्मर युध्य च।(८-७)

भगवतगीतेत याच "काम" ची उत्पत्ति, परिणाम, वसतीस्थान याचे सविस्तर वर्णन आलेले आहे. इच्छेतुन "काम" निर्माण होतो.
ध्यायतो विषयान् पुंसः संगःतेषु उपजायते।
संगात् सञ्जायते कामः कामात् क्रोधः अभिजायते।।
क्रोधात् भवति संमोहः संमोहात् स्मृतिविभ्रमः।
स्मृतिभंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।।(२-६३)

अर्थात विषयचिंतनातुन काम, काममधुन क्रोध(Anger), क्रोधामुळे संमोह(Delusion), संमोहामुळे विभ्रम -बुद्धिनाश,

बुद्धिनाशामुळेच पतन अर्थात मुख्य विकासमार्गावरुन घसरणे.
याप्रमाणे इच्छेला मर्यादा नसते, याच इच्छेतुन निर्माण होणारा "काम" विकासातील Barrier, शत्रु ठरतो.

आवृतं ज्ञानम् एतेन ज्ञानीनो नित्यवैरिणाम्।
कामरुपेण कौंतेय दुष्पुरेण अनलेन च।।(३-३९)

"The ignorant mind, with its infinite afflictions, passions, and evils, is rooted in the three poisons. Greed, anger, and delusion. "
-Bodhidharma

मानसिकता(State of mind) या संदर्भात मनोवश अवस्था प्रसन्नता नष्ट करणारी, विकासमार्गावर नसणारी अवस्था ठरते.
याप्रमाणे भगवतगीता मनोवश अवस्थेतील Weakness, Barrier जाणुन आत्मवश अवस्थेचे महत्व स्पष्ट करते.

रागद्वेषविमुक्तैस्तु विषयान् इंद्रियैः चरन्।
आत्मवश्यैः विधेयात्मा प्रसादम् अधिगच्छति।।(२-६४)

*********

**************************

क्रोधात् भवति संमोहः संमोहात् स्मृतिविभ्रमः।

स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।

**************************

विषय ७२८ :

"संमोहात् स्मृति विभ्रमः "

(मोह vs. आत्मवश )

भगवदगीताज्ञान अर्जुनात Transformation घडवुन आणते. या संदर्भात अर्जुन म्हणतो,

नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा त्वत् प्रसादात् मया अच्युत।

स्थितोअस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव।।(१८-७३)

अर्थात हे Transformation पुढीलप्रमाणे घडुन येते. यातच भगवदगीतेचे रहस्य उलगडते.

मोह vs. नष्टो मोहः

स्मृतिभ्रंश vs. स्मृतिःलब्ध्वा

चंचलता(विचलित होणे) vs. स्थितोअस्मि

संशय vs. गतसंदेहः

*मनोवश vs. आत्मवश अवस्था

समाजात "चंचलता vs. मनावर नियंत्रण " या संदर्भात "मनोवश अवस्था vs. आत्मवश अवस्था" अशी जाण असते.

१. जीवनात कार्यानेच विकास होतो. आत्मवश अवस्थेत कार्याचा एकनिश्चय असतो. जीवनयात्रेत स्वतःवर Command असते. अर्थात निश्चित दिशेने जीवननाव वल्हवीत असतो. तर मोह/मनोवश अवस्थेत जीवननाव वाऱ्याने वहात असते.

कार्यसंस्कार नसेल तर कार्याचा निश्चय नसतो. पण इच्छा असतात. या इच्छा "काम" मध्ये, काम क्रोधामध्ये, क्रोध सम्मोहामध्ये परिवर्तित होतो. सम्मोहामुळे विभ्रम व विभ्रमामुळे बुद्धिनाश होतो.

ध्यायतो विषयान् पुंसः संगस्तेषु उपजायते।....

सम्मोहात् स्मृति विभ्रमः

स्मृतिभंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।(२-६३)

२. "ज्ञान" या संदर्भात जगावर मनुष्य कोणतेही, कितीही भाष्य करु शकतो. पण स्वतःवर कार्याची जबाबदारी येते, संशयमुक्तिसाठी निर्णय घेण्याची जबाबदारी येते तेंव्हा अर्जुन निश्चय करु शकत नाही व कार्य टाळण्यासाठी भाष्य करतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान वापरतो.

समाजातील " प्रत्यक्ष कृति Vs. भाष्य" याचे येथे दर्शन होते. भाष्यामागे त्याचा विषय(Agenda), Intention, मानसिक स्थिति महत्वाची असते. अर्जुनाच्या भाष्यामागे त्याचा मोह असतो, त्याची मनोवश अवस्था असते, निष्क्रियता असते. त्याचे भाष्य यामुळे अर्थहीन ठरते, तो केवळ प्रज्ञावाद असतो. अर्जुन निष्क्रियतेचे कारण सांगतो.

मनुष्य सुखासाठीच कार्यरत असतो. दुःखमुक्ति ही त्याची गरजच असते. व्यवहारात सुखासाठी इच्छा, गरजापुर्तिसाठी कार्य अशी भूमिका असते. पण याच आधारावर त्याचे नियतकार्य(Committed work) त्याला दुःखदायी वाटते म्हणुन निष्क्रियता पत्करतो. व काय श्रेयस्कर आहे ज्यामुळे दुःखमुक्ति होईल? हा प्रश्न करतो.

३. कार्यसंस्कार यासाठी आत्मवश(जितात्मनः) असणे ज्यामुळे कार्याचा एकनिश्चय असतो. व समत्वयोगाने कार्य घडण्यासाठी निष्काम कर्म शास्त्र भगवदगीता सांगते.

सार:

प्रत्येक मनुष्याला ईश्वराने स्वतंत्र बुद्धि प्रदान केलेली आहे. याच बुद्धिचा वापर करुन मनुष्याने जगाला बदलविले आहे. बुद्धिभ्रम नाशाचे (ऱ्हास, अवनति) कारण ठरते. म्हणुन भगवदगीता संदेश देत आहे,

यदा ते मोहकलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति।
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च।।(२. ५२)

"The ignorant mind, with its infinite afflictions, passions, and evils, is rooted in the three poisons. Greed, anger, and delusion. "

-Bodhidharma

********

(२-६३) :

"स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति"

(विनाशकाले विपरीत बुद्धि )

*अर्जुनाचे State of mind :

'भ्रमतीव च मे मनः' vs. 'स्मृतिर्लब्ध्वा'

युद्धक्षेत्रावर प्रत्यक्ष युद्ध सुरु होण्यापुर्वी अर्जुनाचा Psychodrama सुरु होतो. अर्जुन दुःखी झाला असता त्याच्या State of mind चे वर्णन तोच करतो,

न च शक्नोमि अवस्थातुं भ्रमतीव च मे मनः।(१-२९)

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव।(१-३०)

मनाची प्रसन्नता नष्ट झाली कि बुद्धि विचलित होते. या स्थितित बुद्धि विपरीत दिशेने विचार करते. यानुसारच अर्जुन युद्ध न करण्याची निवड करतो.

या पार्श्वभुमिवर भगवदगीता सुरु होते. श्रीकृष्ण प्रथम अर्जुनाला समज देतात, "मी तुझ्यामध्ये श्रेष्ठ पुरुष पाहतो (दैवीगुणसंपत्तियुक्त) व श्रेष्ठांना अशा कठिण प्रसंगी विचलित होणे अशोभनिय आहे. म्हणुन हृदयदौर्बल्याचा त्याग करुन युद्धास तयार हो. "

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ न एतद् त्वयि उपपद्यते।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परन्तप॥(२-३)

बुद्धिची स्थिरता या संदर्भात १. कार्याचा निश्चय(कार्यकौशल्य )
२. मनाची प्रसन्नता (सुख, शांती)
३. समत्वयोग (दुःखान्तशक्ति, साहस, निर्भयता) ४. मनुष्याचे श्रेष्ठत्व हे प्रमुख विषय येतात. हे साध्य करण्यासाठी बुद्धियुक्त असणे(Trained mind) हा संदेश आहे.

"Cultivation of mind should be the ultimate aim of human existence. ”

प्रसादे सर्वदुःखानां हानिः अस्य उपजायते।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते॥
नास्ति बुद्धिः अयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शान्तिः अशांतस्य कुतः सुखम् ॥(२-६६)

याच संदर्भात बुद्धि कर्मापेक्षा श्रेष्ठ तर या घोर कर्माचे प्रयोजन कशासाठी? हा अर्जुनाचा प्रश्न असतो. व याच अनुषंगाने कार्यकौशल्य संस्कार हा भगवदगीतेचा मुख्य विषय येतो.

१. कार्यकौशल्य :

जीवनयात्रेतील व्यवहारात इच्छा असते, प्रश्न येतात यासाठी कार्यरत असतो. कार्यकौशल्याचे संस्कार असेल तर कार्यनिश्चय असतो. निष्काम कर्म करतो.

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।(२-५०)

२. कार्यकौशल्याचे संस्कार नसेल तर विषयचिंतन होत असते .
कर्मेंद्रियाणि संयम्य यः आस्ते मनसा स्मरन् ।(३-६)

विषयाची आवड, त्याचे चिंतन यातुन निर्माण झालेली अतृप्ति यामुळे मनाची प्रसन्नता नष्ट होते.
इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः।(२-६०)

अतृप्ति, क्रोध बुद्धिनाशाचे कारण ठरते.

ध्यायतो विषयान् पुंसः संगः तेषु उपजायते।...

... स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।(२-६३)

३. योग :

जीवनविकास या संदर्भात आत्मोन्नति, कार्यकौशल्य या संदर्भात समत्वयोगाद्वारे योग(दुःखान्त शक्ति) साधना असते.

तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्।।(२-५०)

४. श्रेष्ठत्व :

यत् यत् आचरति श्रेष्ठः तत् तत् एव इतरो जनः।(३-२१)

श्रेष्ठ स्वतःची बुद्धि वापरतात, सामान्य श्रेष्ठांचे अनुसरण करतात. श्रेष्ठ कोणत्याही ऐकीव गोष्टीने विचलित होत नाही.

यदा ते मोहकलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति।

तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च।।(२-५२)

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।(८-२७)

म्हणुन श्रेष्ठत्व या संदर्भात बुद्धियुक्त असणे महत्वाचे असते. श्रेष्ठ कठीण प्रसंगी विचलित होत नाही.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

याप्रमाणे बुद्धियुक्त, ईश्वराचे ज्ञान, अध्यात्मज्ञान ऐकल्यावर मोहमुक्ति या संदर्भात अर्जुन म्हणतो,

मदअनुग्रहाय परमं गुह्यम् अध्यात्म संज्ञितम्।

यत् त्वया उक्तं वचः तेन मोहोअयं विगतो मम।(११-१)

तथापि ईश्वराची या विश्वातील व आपल्या जीवनाशी असलेली भूमिका या संदर्भातील संपुर्ण ज्ञान ऐकल्यावर म्हणतो,

नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा त्वत् प्रसादात् मया अच्युत।(१८-७३)

"Mental toughness is spartanism (courageous in the face of adversity) with qualities of sacrifice, self-denial, dedication. It is fearlessness, and it is love".

-Vince Lombardi

********

(२-६४)

*************************

रागद्वेषविमुक्तैस्तु विषयान् इंद्रियैश्चरन्।

आत्मवश्यैः विधेयात्मा प्रसादम् अधिगच्छति।।

*************************

(२-६४) :

"रागद्वेषविमुक्तैः तु विषयान् इंद्रियैः चरन्"

(व्यवहारात असतांना शांति अनुभवणे अर्थात सुखी जीवनाचा मार्ग)

सुखी जीवनाचा मार्ग या संदर्भात भगवदगीता भाष्य करीत आहे.

मनुष्य व्यवहारात असतांना (सर्व प्रकारचा व्यवहार करीत असता ) द्वन्द्वमुक्ति असणे, मनावर नियंत्रण असणे . या स्थितिचा "आत्मवश्यै विधेयात्मा " असा निर्देश केला आहे.

रागद्वेषविमुक्तैः तु विषयान् इंद्रियैः चरन्"

आत्मवश्यै विधेयात्मा प्रसादम् अधिगच्छति॥(२-६४)

"आत्मवश्यै विधेयात्मा" या संदर्भात (Regulating principles of freedom) भगवदगीतेत निष्काम कर्माचे प्रयोजन आलेले आहे.

दुसरीकडे फळाची इच्छाच केली नाही तर मनुष्य कार्यच कशाला करेल?असा प्रश्न "निष्काम कर्म"या संदर्भात कांही लोक उपस्थित करतात.

"Human Decesion Behavior" या विषयाचा Psychology, Cognitive science, Artificial intellegence, Decesion Science अशा विविध संशोधन विभागात अभ्यास होतो. मनुष्याच्या विचाराची दिशा जशी असेल त्याप्रमाणे त्याचे निर्णय होत असतात, औद्योगिक जाहिरातदार, राजकिय भाष्य या विचाराच्या दिशेलाच influence करतात. हे समाज अनुभवत असतो.

As one of the most popular models of agent decision making, the belief-desire-intention (BDI) model has

been widely used to construct reasoning systems for complex tasks in dynamic environments.

Desire comes from a place of “Yes, it would be nice to have that. ”

There is uncertainty in desire .

Intention is stronger than desire.

You’re more likely to accomplish something if you intend to do it rather than just desire to do it. But it can still be influenced by desire.

Decision is the most powerful of them all.

"I like this town. I am going to live here. ”

There was no uncertainty there. It was a decision, plain and simple. It came from a place of deep inner knowing that is aligned with Universal Flow and the larger framework of one's life.

भगवदगीतेनुसार द्वन्द्व(Duality) हा Desire चा परिणाम असतो, व निर्णयावर परिणाम करतो. अर्जुनाची निष्क्रियता व Reasoning हा Desire चाच परिणाम असतो. कार्याचा निश्चय होण्यासाठी निर्द्वन्द्व (Non duality) असणे आवश्यक असते. निर्द्वन्द्व या संदर्भात कार्य execute करतांना समत्वयोग हाच भगवदगीतेचा विषय आहे.

*चंचलता vs. कार्याचा एकनिश्चय

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।

बहुशाखा हि अनंताश्च बुद्धयोः अव्यवसायीनाम् ।।(२-४१)

*निर्द्वन्द्व :

निर्द्वंदो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान।(२-४५)

सिद्धिअसिध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते।।(२-४८)

**********

(२-६४)/२: "आत्मवश्यैः विधेयात्मा "

(Regulating Principle of Freedom)

फ्राईडने मनाच्या तीन अवस्था (Conscious, Subconscious, Unconscious) दर्शविल्या. Mental wellness साठी हा मनोविज्ञानाचा आधार बनला.

भगवतगीतेत सुखी जीवनासाठी आत्मवश व मनोवश अवस्था यांतील भेद दर्शविला. इंद्रियापलिकडे मन, मनापलिकडे बुद्धि व बुद्धिपलिकडे आत्मा असा शरीरयंत्रातील श्रेष्ठत्वाचा Sequence आहे.

इंद्रियाणि पराणि आहुः इंद्रियेभ्यः परं मनः।

मनसः तु परा बुद्धिः यो बुद्धेः परताः तु सः।।(३-४२)

बुद्धिवर मनाचे अधिराज्य असेल तर मनोवश अवस्था असते. या अवस्थेचे Replacement आत्मवश अवस्था असते. या अवस्थेत समाधान अनुभवतो. समाधान म्हणजे दुःखाचा नाश. प्रसन्नचित्त झाले कि बुद्धि स्थिर होते.

आत्मवश्यैः विधेयात्मा प्रसादम् अधिगच्छति।(२-६४)

प्रसादे सर्वदुःखानां हानिः अस्य उपजायते।

प्रसन्नचेतसो हि आशु बुद्धिः पर्यवतिष्ठते।।(२-६५)

आत्मवश अवस्था सुखी जीवन, बुद्धिची स्थिरता दर्शविते. म्हणुन संस्कार महत्वाचे असतात.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च आयुक्तस्य भावना।

न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

याप्रमाणे सुखी जीवनासाठी संस्कारीत होणे . संस्कारीत असलेला जीवननाव वल्हवतो व किनारा गाठतो. याचाच अर्थ जीवननाव वाऱ्याने वाहणे म्हणजे संस्कारीत नसणे अर्थात मनोवश (मनो अनुविधियते)असणे. यामुळे बुद्धिचे हरण होते.

इंद्रियाणां हि चरतां यत् मनो अनुविधीयते।

तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इह अम्भसि।।(२-६७)

याप्रमाणे भगवतगीता सुखी जीवनासाठी संस्कार याचे logic स्पष्ठ करते. संस्काराचा मुख्य हेतु आत्मवश होणे हे रहस्य सांगते व आत्मवश अवस्था " Regulating principle of freedom" म्हणुन ओळखल्या जाते.

****०**

(२-६४)/३:

"आत्मवश्यै विधेयात्मा प्रसादम् अधिगच्छति"

(दुःखमुक्ति साठी संस्कार)

भगवतगीतेने कोणता महत्वाचा संदेश दिला?या प्रश्नाचे उत्तर अर्जुनाच्या प्रश्नातच शोधायचे आहे.

जीवनात दुःख आले असता दुःखाला avoid करण्यासाठी अर्जुन निष्क्रिय होतो व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी स्वतःला ज्ञानी समजणे व यासाठी धर्म, चांगलेपणा, ज्ञान यांचा दाखला देणे. हा प्रज्ञावाद असतो. अर्जुन ज्ञान व अज्ञान याची उलटापालट करतो.

यामुळे " निष्क्रियतेचे समर्थन vs. कार्याचा निश्चय" असा विषय बनतो. याच विषयात ज्ञान, कर्म व भक्ति हे तीन विषय येतात.

१. ज्ञान:

जो ज्ञानी आहे, चांगला आहे, त्याला आत्मविश्वास असतो. ज्ञान संशयमुक्तिसाठी असते. चांगला म्हणजे चित्तशुद्धि, स्वतःवर विश्वास. धर्म या संदर्भात "स्वतःचा स्वधर्म" कार्याचा निश्चय करते. ज्ञानाद्वारे दृढनिश्चयी होणे.

"ज्ञानसञ्छिन्न संशयम्"

२. कर्म

जीवनात सुखदुःख असते. सुखासाठी, दुःखमुक्तिसाठी कार्यरत असतो. व्यवहारात इच्छापुर्तिसाठी कार्य असते. याच

Consciousness मध्ये कार्यरत असणे ही सकाम मानसिकता असते. येथे Lower consciousness vs. Higher consciousness अर्थात मनोवश vs. आत्मवश हा विषय येतो. प्राणतत्वात ज्याचा वास असतो, तो ईश्वर सर्व जगताचे, सृष्टिचे मुळ आहे. त्याचा संबंध (अ)आत्मवश अवस्थेशी(Higher consciousness) व (ब) जीवनविकासाचा शाश्वत(Standard) मार्ग(अमृतत्वाय कल्पते २-१५) याचेशी असतो. या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही. कार्य/कार्यफल ईश्वराला समर्पित होते. हीच कार्याद्वारे ईश्वराची भक्ति असते. याचाच अर्थ सकाम कार्य निष्काम कार्यात Transform करणे हा बुद्धियोग असतो. याप्रमाणे हा विषय कार्यकौशल्य/कार्यसंस्कार /कर्म या संदर्भात असतो.

रागद्वेष विमुक्तैस्तु विषयान् इंद्रियैः चरन् ।
आत्मवश्यै विधेयात्मा प्रसादम् अधिगच्छति।।(२-६४)
प्रसादे सर्वदुःखानां हानिः अस्य उपजायते।।
प्रसन्नचेतसो हि आशु बुद्धिः पर्यवतिष्ठते।।(२-६५)

आत्मवश अवस्थेत प्रसन्नचित्त(आत्मशुद्धि) असतो. अर्थात दुःखाचा नाश होतो. बुद्धि स्थिर असते. यालाच संस्कार म्हटले

आहे. कार्याद्वारे सुखाची(दुःखान्त) साधना हेच कार्यकौशल्य असते.

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

३. भक्ति:

जीवनात भय, साहसाचा अभाव, Stress मानसिक दुर्बलता ठरत असते. कार्याद्वारे ईश्वरभक्ति अर्थात मानसिक सक्षम (योग-दुःखान्त)होण्याची साधना हा भगवतगीतेचा विषय आहे.

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप।(२-३)
तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योगसंज्ञितम्।(६-२३)
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।(२-५०)
सार : भगवतगीतेने ज्ञान, कर्म व भक्ति यांचे जीवनातील महत्व सांगितले आहे.

*******

(२-६५)

*************************

प्रसादे सर्वदुःखानां हानिः अस्य उपजायते।

प्रसन्न चेतसो हि आशु बुद्धिः पर्यवतिष्ठते।।

*************************

(२. ६५)/१:

"प्रसादे सर्वदुःखानां हानिः अस्य उपजायते"

(सुखी जीवनरहस्य)

भगवतगीता मनुष्यजीवनाच्या महानतेचा परिचय देत आहे. व स्वतःतील महानता(Creativeness) जगात साकार करण्यासाठी, अनुभव करण्यासाठी कौशल्यशास्त्र सांगते. स्वतःतील अंतरात्मा (True Self)जागृत करण्याचे ज्ञान सांगते.

जीवनविकासात शिक्षण व संस्कार या दोहोंची भूमिका असते. ज्ञानाचा कार्यात उपयोग व्हावा(Creativity) म्हणुन शिक्षणतज्ञांनी Cognitive Theory चा (Information

processing of mind) पुरस्कार केला. याच theory चा उपयोग Creative mind जागृत करण्यासाठी होतो.

"Cognition is thinking process. It is one of higher function that our brain performs. (Cognitive psychology)"

संस्कार या शब्दाचा विविध प्रकारे बोध होतो. भगवतगीतेत "बुद्धियुक्त" हा शब्दप्रयोग संस्कार संदर्भातच आहे. वर्तमानात बुद्धिला स्थिर, प्रसन्न ठेवण्याची संवय असणे, ज्यामुळे बुद्धिचा सकारात्मक विकासासाठी पुर्णपणे वापर होतो.

प्रसादे सर्वदुःखानां हानिः अस्य उपजायते।
प्रसन्न चेतसो हि आशु बुद्धिः पर्यवतिष्ठते॥(२-६५)

अर्जुन दुःखी होतो. बुद्धि भ्रम पावते. अर्जुन स्वतः दुःखी झाला हे वास्तव स्विकारतो व Judgement (युद्ध करणे अधर्म!) करतो. हे Judgement त्याच्या दुःखी भावनेला response असतो. (भावनेला observe करीत नाही. अर्थात वास्तव स्विकारीत नाही. )यामुळे नकारात्मक विचार जन्म घेतो.

"We perceive through our senses a person, a situation or an event, and in an instant, we project our mental models - our fears, background and experiences - onto that perception. This often results in cognitive errors, which means we judge and respond incorrectly. "

Elizabeth Thornton

Self Consciousness System मधील

*बाह्यमन (Self I, Lower self, Senses mind, Conscious mind, Judgemental mind) व

*अंतर्मन (अंतरात्मा, Self II, Higher Self, Subconscious mind, Creative mind, Observer mind) अशी जरी ओळख झाली तर या दोहोंच्या मध्ये बुद्धि (Intellegence) असते.

*बुद्धिभ्रम मनोवश अवस्थेमुळे होतो. बाह्यमन(SelfI) अंतरात्म्याला (Self II) वश करते, ही मनोवश अवस्था असते. व अंतरात्मा बाह्य मनावर नियंत्रण करते ती आत्मवश अवस्था असते. यामध्ये कोण कोणाला वापरुन घेते(Lowerने Higher self ला कि Higherने Lower selfला!)याचा बोध होतो. यातच आत्मवश, संयमी, मनावर नियंत्रण, Mastering Self याचे महत्व कळते. भगवतगीता याचसाठी "बुद्धियुक्त" संस्कार सांगते. सउदाहरण (नाव वाऱ्याने वाहणे कि Command घेवुन निश्चित दिशेने वल्हवणे)स्पष्ट करते.

आत्मवश्यै विधेयात्मा प्रसादम् अधिगच्छति।(२-६४)
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते।(२-६५)
(आत्मवश-प्रसन्नतामुळे स्थिर बुद्धि)

नास्ति बुद्धः युक्तस्य-अशांतस्य कुतः सुखं।(२-६६)
(अशांतीचे कारण-बुद्धियुक्त नसणे-संस्कारहीन)

तदस्य हरति प्रज्ञा वायुर्नावाम् इव अम्भसि।(२-६७)
(मनोवश अवस्थेत नाव वाऱ्याने वाहणे)

निगृहीतानि सर्वशः -तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।(२-६८)
(म्हणुन मनावर नियंत्रण)

व्यावहारिक बोध:
अर्जुन वास्तव स्विकार करतो. व ठरल्याप्रमाणे नियतकार्य स्वधर्माचरण (समर्पण भावाने) म्हणुन करणे किंवा बुद्धियोग धारण करुन कार्याचा दृढनिश्चय करणे कार्याद्वारे योग(दुःखान्त) याचे रहस्य जाणतो. वर्तमानात मोह नष्ट होतो. स्मृतिभ्रम मिटतो.

******

(२-६५)/२:
"प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते"
(वर्तमानातील प्रसन्नता)

वर्तमानात प्रसन्नचित्ताने जगणे या एकाच मुद्यावर मनुष्य जीवन जगत असतो व याच मुद्यावर भगवतगीता ज्ञान आधारलेले आहे. वर्तमानातील प्रसन्नता व विकासासाठी Motivation हे विषय

वर्तमानात युवापिढीला आकर्षित करतात. व या दोहोंचा समन्वय भगवतगीतेने साधला आहे.

The Self is not something ready-made, but something in continuous formation through choice of action.

John Dewey

वर्तमानातील प्रसन्नता याच संदर्भात अर्जुनाला कार्य करतांनाच प्रश्न निर्माण झाला होता. अर्जुनाची प्रसन्नता नष्ट झाली होती म्हणुन या घटनेला कारण असणारे "युद्ध" टाळणे ही निवड करतो. या समर्थनार्थ निष्क्रियतेला धर्म ठरवितो. प्रज्ञावादी(समर्थन) भाष्य स्वतःचे (प्रसन्नतेसाठी) मनोरंजन असते. समाजात अशाच (प्रज्ञावादी-स्वतःला प्रसन्न ठेवण्यासाठी वापरलेले भाष्य)) भाष्याची रेलचेल असते. म्हणुन "ज्ञान" म्हणजे काय?हा विषय पटलावर येतो.

मनुष्य जीवनात सुखासाठीच कार्यरत असतो. धर्म, चांगलेपणा, ईश्वरभक्ति याच जीवनविकासाचा भाग असतो. अर्जुन निष्क्रियतेला धर्म ठरवितो. त्याला ज्ञात असलेले धर्म, चांगलेपणा,

ईश्वरभक्ति हे सर्व ज्ञान येथे अपुर्ण ठरते. भगवतगीता हीच अपुर्णता दर्शवुन देते व पुर्णत्वासाठी ज्ञान सांगते. जीवनविकासात या सर्व ज्ञानाचा उपयोग (Purpose )वर्तमानात "बुद्धियुक्त" असणे यासाठी स्पष्ट करते.

भगवतगीता प्रसन्नता व बुद्धियुक्त यांचे नाते स्पष्ट करते. याद्वारे वर्तमानातील प्रसन्नता व आत्मविश्वास यांचे नाते स्पष्ट होते. समुद्राला मिळेपर्यंत नदीचा प्रवाह अखंड असतो, तसा जीवनप्रवाह असतो. जीवनयात्रा याच प्रवाहाचा भाग असतो. या यात्रेत कार्य घडते. व आत्मविश्वासाने कार्यरत असणे म्हणजेच आनंदाने जगणे हे विकासातील रहस्य कळते. चित्ताची प्रसन्नता असते तेंव्हा बुद्धि स्थिर(अविचल) असते. जो युक्त(संस्कारीत) नाही त्याला शांति कशी मिळणार?अशांति असेल तर सुख कोठुन?

प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते। (२-६५)
नास्ति बुद्धिः युक्तस्य न चअयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांति अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

**oooo**

(२. ६५)/३ :

" प्रसन्नचेतसो ह्याशु "

(चित्ताची प्रसन्नता Happy-minded)

"Happiness is not something you postpone for the future; it is something you design for the present. " Jim Rohn"'------

ज्या भवसागरात मनुष्य जन्माला आला, त्यांत मनुष्याने आनंदाने जगावे हीच ईश्वराने भगवतगीतेच्या माध्यमातुन इच्छा व्यक्त केली आहे. व जीवनविकासाचे शास्त्र सांगितले.

"जगा आणि जगु द्या " म्हणजे परस्पर सहकार्य साधुन स्वतः सुखी व्हा व जगालाही सुखी करा, हे साध्य होण्यासाठी जगात धर्म आलेत. म्हणुन चांगलेपणा म्हणजे पुण्यकार्य करणारा हेच धर्माला अभिप्रेत आहे असे चांगला मनुष्य जाणत असतो. अर्जुन अशाच चांगल्या लोकांपैकी एक महारथी असतो. पांडवावर होणारा अन्याय न्यायप्रविष्ट होतो, तेंव्हा धर्मयुद्ध हा एकच पर्याय असतो.

युद्धक्षेत्रावर उत्साहाने आलेला अर्जुन श्रीकृष्णाला शस्त्र पाडाव सुरु होण्याच्या वेळीच रथ मधोमध उभे करण्यास सांगतो व त्याच क्षणी आप्तेष्ठ युद्धात मृत्यु पावतील या भयाने शोकग्रस्त होतो. युद्ध करणे धर्मविरोधी आहे, असे भाष्य करतो.

सुखदुःख पशुलाही कळते व तो आपल्या Survival साठी धडपडत असतो. Survival हेच मात्र मनुष्याचे ध्येय असेल तर चांगला मनुष्य अशाच Senses सुखदुःखाच्या तावडीत सापडतो. सुख अनुभवण्यासाठी दुःखाला हुलकावणी देत जगण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

"सुखी जीवन " या संदर्भात अनेक तत्वज्ञान समाजात उपलब्ध झालेत. तरी प्रत्यक्ष जीवन जगतांना जीवन सोपे(Easygoing)नाही हा अनुभव येतो. अर्जुनाला जेंव्हा आप्तेष्ठांशीच लढण्याची वेळ येते, तेंव्हा त्याचे सर्व अवसान व ज्ञान गळुन पडते.

याच पार्श्वभुमीवर "सुखी जीवन"या संदर्भात भगवतगीताज्ञान जगात उपलब्ध झाले. आनंदाने जगणे व याचे जीवनमार्गाशी कसे नाते आहे, हे सलग पुढिल तीन श्लोकातुन भगवतगीता स्पष्ट करते.

प्रसादे सर्वदुःखानां हानिः अस्य उपजायते।
प्रसन्नचेतसो हि आशु बुद्धिः परि अवतिष्ठते।।(२-६५)
नास्ति बुद्धिर्युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शान्तिः अशान्तस्य कुतः सुखम् ।।(२-६६)
इंद्रियाणां हि चरतां यत् मनः अनुविधीयते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि।।(२-६७)

चित्ताची प्रसन्नता झाली असता बुद्धिची स्थिरता होते. जीवनविकासमार्गात (बुद्धियुक्त स्थिती साध्य होण्यासाठी) बुद्धि संस्कारित नसेल तर मनोवश अवस्था असते. अर्थात नाव वाऱ्याने वहावी तसे जीवन प्रवाहात वहात असते. आत्मवश अवस्थेत (Higher consciousness)बुद्धियुक्त असतो व जीवननाव निश्चित दिशेने वल्हवित असतो. याप्रमाणे जीवनविकासात "चित्ताची प्रसन्नता " याचे महत्व स्पष्ट होते.

*"जगाचे व्यवस्थापन " ईश्वराचे माध्यमातुन कसे होत आहे, हे ज्ञान भगवतगीता स्पष्ठ करते. याच ईश्वराचा अंश मनुष्याचे हृदयी असतो. याच जीवित तत्वामुळे जीवनयात्रा चालत असते. हा

ईश्वरच अंतिम धाम आहे. या सत्याला अनुसरुन जीवनविकासाचे शास्त्र भगवतगीतेने स्पष्ट केले आहे. हे ज्ञान जाणणारा जीवनाचे ध्येय जाणतो. या ध्येयाचे दिशेने त्याची जीवनयात्रा व्हावी यासाठी बुद्धियोग प्राप्ति ईश्वराची कृपा असते. याच कृपेने सर्वदुःखाचा नाश होतो व चित्ताची प्रसन्नता लाभते.

"ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

"You are not here merely to make a living. You are here in order to enable the world to live more amply, with greater vision, with a finer spirit of hope and achievement. You are here to enrich the world, and you impoverish yourself if you forget the errand. " Woodrow Wilson

* "जगाचे व्यवस्थापन" या संदर्भात दहशतवाद जगातील शांतीला लागलेली कीड असते, तर दुष्ट प्रवृत्ति समाजाला लागलेली कीड असते. या प्रवृत्ति शस्त्राचे बळावर समाजात भय निर्माण करतात. समाजातील मनुष्याचे भय त्यांची Strength

असते. भयच मनुष्यातील चांगलेपणाला निष्क्रिय करीत असते. भगवतगीता याच भयावर मात करण्याचे (निर्भय) शास्त्र सांगते. ("स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् " ३-४०).

"Inaction breeds doubt and fear. Action breeds confidence and courage. "
-- Dale Carnegie

म्हणुन चांगल्या मनुष्याला दुर्बलता अशोभनिय आहे, असे अर्जुनाला संबोधण्यात आले आहे. येथुनच भगवतगीता सुरु होते. भगवतगीतेत दैवीगुण संदर्भात "अभयं" हा प्रथम गुण दर्शविला आहे.

*निर्भयता आणि ईश्वर याचा समन्वय केवळ भगवतगीतेने साध्य केला आहे. याच ईश्वराची आपल्या स्वभावनियत कार्याद्वारे भक्ति करणारा ज्ञानी ठरतो. वर्तमान ज्ञानविज्ञानाचा आहे. याच ज्ञानविज्ञानाचा योग्य उपयोग होण्यासाठी भगवतगीतेतील ज्ञानी भूमिका जाणुन घेणे आवश्यक आहे.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभुतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

"ज्ञानी"जीवनाची सर्वश्रेष्ठ भूमिका असते.

उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मा एव मे मतम् ।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम् ॥(७-१८)

या पार्श्वभुमिवर जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी, सुखी जीवन जगण्यासाठी वर्तमानात भगवतगीतेचे महत्व जाणुन घेणे आवश्यक आहे.

********

(२-६६)

*************************

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

न च अभावयतःशांतिःअशांतस्य कुतः सुखं।।

*************************

(२-६६)/१:

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना?

(स्वतःच्या मार्गाचा संस्कार)

"जीवनविकासासाठी संस्कार" हा (वरील) महत्वाचा संदेश आहे. ज्यामुळे स्वतःचा मार्ग ठरविता येतो. येथे अशांतीचे कारण संस्काराचा अभाव हे स्पष्ट म्हटलेले आहे.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

न च अभावयतःशांतिःअशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

अर्थात सुखासाठी शांति, शांतिसाठी संस्कारित मार्ग.

*"To the person who does not know where he wants to go there is no favorable wind. "

- Seneca

इंद्रियाणां हि चरतां यत्मनो अनुविधीयते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुःनावाम् इव अम्भसि।।(२-६७)

जीवननाव वाऱ्याने वाहणे ही मनोवशअवस्था व आत्मवश अवस्थेत नाव वल्हवतो. अर्थात लक्ष पक्के असते.

"A man without a goal is like a ship without a rudder. "

-Thomas Carlyle

* बुद्धियुक्त :

व्यवहारात संस्कार या संदर्भात चांगलेपणाला(Moral values) महत्व असते. हाच चांगलेपणा अर्जुनाच्या ठायी होता. व याचमुळे तो दुःखी होतो. व त्याची मानसिक अवस्था दुबळी होते. ही मनोवश अवस्था असते.

"One who makes himself a worm cannot complain afterwards if people step on him".

Immanuel Kant

चांगलेपणा म्हणजे दुर्बलता नव्हे. जगात चांगल्या कार्याला मर्यादा नसते. "परमार्थ" किंवा धर्म म्हणुन व्यवहारात लोक इतरांकडुन चांगलेपणाचीच, कृतीचीच अपेक्षा करतात. व आदर्शाच्या संदर्भात निष्क्रियतेला चुक ठरवितात. हेच व्यावहारिक सत्य श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात.

म्हणुन "चांगले " या संदर्भात आत्मवश अवस्था महत्वाची असते. अन्यथा चांगलेपणाविषयी भ्रम होतो. व "आजकाल चांगलेपणा चालत नाही!" असे वाक् प्रचार करुन लोक चांगलेपणालाच व्यवहारात बदनाम करतात!याप्रमाणे चांगलेपणाच संभ्रमात असते. ज्या समाजात चांगलेपणा बदनाम होतो, मग तो समाज कुणीकडे वळणार?त्या समाजाचे भवितव्य काय असेल?म्हणुन चांगलेपणाचा निश्चित उपयोग भगवतगीता सांगते व संभ्रमातुन बाहेर काढते.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव।।(१६-५)

मनुष्य चांगल्या कार्याला ईश्वराचे कार्य जाणत असतो. म्हणुन हेच चांगले कार्य निष्काम कार्यात Transform केले तर कार्याद्वारे योग (ईश्वरभक्ति ) साधतो. याद्वारे निर्भय होतो. (त्रायते महतो भयात्). याचसाठी "बुद्धियुक्त" शब्दाचे प्रयोजन आहे.

बुद्धियुक्त अवस्थेत निष्काम कर्म असते.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिं आप्नोति नैष्ठिकिम् ।(५-१२)

याप्रमाणे निष्काम कर्माचे संस्कारात महत्व आहे. यासाठी कार्याचा दृढनिश्चय हवा. अर्थात निर्णय अधिकाराचे Awareness व निर्णयक्षमतेचे महत्व येथे स्पष्ठ होते. यामुळे जबाबदारी स्विकारतो.

*मनुष्य आपल्या जीवनाला जसे ओळखतो (कठिण, चांगले, सोपे)तसे त्याचे जीवन घडते. सुखी जीवनासाठी स्वतःला संस्कारित करणे हाच भगवतगीतेचा संदेश आहे.

गुणात्मक शिक्षण/मुल्य शिक्षण या संदर्भात Awareness of Self Path अर्थात "स्वतःचा मार्ग" हाच संदेश महत्वाचा आहे. या संदर्भातील कांही मुल्ये:

*स्वावलंबनामुळे निर्णयअधिकार मिळतो.

Beggars are not choosers.

*वचन/Commitment मार्ग दृढ करते.

*स्वधर्म नियतकार्यावर शिक्कामोर्तब करते. हा Tiebreaker ठरतो. स्वतःचा मार्ग या संदर्भात समुहातील नियतकार्य स्वधर्मात transform करणे.

"If you don't design your own life plan, chances are you'll fall into someone else's plan. And guess what they have planned for you? Not much. "

Jim Rohn

*****

(२-६६)/२:"अशांतस्य कुतः सुखम् "

(Happy life)

मनुष्य व्यवहारात(संसार) आपापल्या स्वभावसदृश प्रकृतिनुसार, ज्ञानानुसार जगत असतो. या जगण्यातुन सुखी व्हावे ही इच्छा असते. चांगला, विद्वान, कर्तृत्ववान असुनही दुःख आले असता अर्जुन निष्क्रिय होतो, निष्क्रियतेचे समर्थन करुन नकारात्मक होतो. अशाच मानसिकतेने मनुष्य जगत राहिला तर दुबळी मानसिकता बनते, अशांति असते.

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं॥(२-६६)

मनुष्य विद्वान असो, धार्मिक असो, वा ईश्वरश्रद्ध असो, निष्क्रियतेला ज्ञान संबोधणे म्हणजे अज्ञानाला ज्ञान दर्शविणे ठरते. हा भगवतगीतेचा संदेश आहे.

प्रत्येक मनुष्य स्वतःचा मार्ग चालतो. ज्या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही, दुःखावर मात होते, निष्काम कर्म घडते, मानसिक शक्तिचा(कार्याद्वारे Exercise) विकास होतो, त्या मार्गाचे ज्ञान भगवतगीता सांगत आहे. यासाठी व्यवहारसिद्धिसाठी वापरले जाणारे सहजकार्य व निर्णयअधिकार हे साधन केले आहे.

मार्ग:

ततःपदं तत्परिमार्गितव्यं
 यस्मिन गतः न निवर्तन्ते भूयः।
तमेव च आद्यं पुरुषं प्रपद्ये
 यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणि॥(१५-४)

Why?(दुःख, अडथळा व मात करणे):
*अनित्यं असुखं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)
"अमृतत्वाय कल्पते" हा मार्ग
*समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)
*तयो न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-
द्वंद्वामुळे (कार्यनिश्चय)दृढता नसते. मनुष्य व्यवहारात योग्य-अयोग्य यातुन योग्यची निवड करतो. अर्जुन जो धर्म जाणतो यात स्वर्ग-नरक ही संकल्पना सत्कार्य व दुष्कृत्य या संदर्भात असते. अर्थात हा धर्मही द्वंद्व निर्माण करतो (कार्याचा एकनिश्चय होत नाही). पुस्तकी धर्मामुळे वादाला कारण मिळते. मार्गात द्वंद्व (योग्य-अयोग्य) निर्माण झाला असता अर्जुन याच धर्माचा दाखला स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी देतो.

या संदर्भात भगवतगीता पुस्तकी धर्म व मनुष्याच्या शाश्वत जीवित तत्वाशी संबंधीत धर्म यांतील भेद स्पष्ट करते. व निर्द्वंद्व होण्यासाठी शाश्वत धर्म सांगते. याच धर्माचा मनुष्याच्या मनोविज्ञानाशी (मानसिक स्वास्थ, शक्ति) असलेला संबंध भगवतगीता क्षेत्र-क्षेत्रज्ञ योग याद्वारे स्पष्ट होतो.

पुस्तकी धर्म:

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्ति अविपश्चितः।(२-४२)

पुस्तकी धर्म व शाश्वत धर्म भेद:

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके।

तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः।।(२-४६)

शाश्वत धर्म:

निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान।(२-४५)

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

क्षेत्रक्षेत्रज्ञ योः एवं अंतरं ज्ञानचक्षुषः।(१३-३४)

व्यवहारातील साधन व Transformation:

*नियतकार्याला स्वधर्म करणे.

*निर्णयअधिकार वापरुन कार्याचा एकनिश्चय करणे.

*बुद्धियोग Transformation चे साधन.

व्यवहारमार्गातील कार्यात सकाम मानसिकता असते. सकाम अवस्था अशांतिचे कारण ठरते म्हणुन बुद्धियुक्त होणे म्हणजे व्यवहारकार्य/मार्ग "अमृतत्वाय कल्पते" या मार्गात Transform करणे.

ददामि बुद्धियोगं तं येन माम उपयान्ति ते।(१०-१०)

मार्ग चालणे:(परिणामभयापासुन मुक्त, विश्वास, निष्ठा)

*अनन्यभक्ति (ईश्वरसमर्पण)

तेषां नित्य अभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।(९-२२)

*मत्कर्मपरमो भव ।(१२-१०)

*कर्तुं मत् योगम् आश्रितः।(१२-११)

बोध:

इंद्रियाणां हि चरतां यत् मनो अनुविधीयते।

तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि॥(२-६७)

अर्थात

"A man without a goal is like a ship without a rudder. "

-Thomas Carlyle

****

(२-६७)

*************************

इंद्रियाणां हि चरतां यत्मनो अनुविधियते ।

तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि।।

*************************

(२. ६७)/१ :

" इंद्रियाणां हि चरतां यत्मनो अनुविधियते"

एका वाक्यात जीवनाचे रहस्य highlight करण्याचा तत्वज्ञांचा प्रयास असतो. जीवनाविषयी बरेच वाक् प्रचार चलनात असतात. यातुनच " सकारात्मक" या संदर्भात "War is won in the mind first" हे वाक्य प्रचलित झाले. हिटलरने याच वाक् प्रचाराचा वापर केला. एखाद्या सैनिकाने निराशा दर्शविली तर त्याच्यावर गोळी झाडायचा!

भगवतगीतेत "यशो लभस्व" हा संदेश अनेक संदेशापैकी एक आहे. एका वाक्यात मुख्य संदेश शोधला तर मनुष्याला मिळालेले जीवन आत्मविकासाची संधी आहे असे दृष्टिक्षेपात येते. मनुष्याचे जीवन व या जीवनाने घेतलेले अनुभव, स्पंदने Unique असतात.

आत्मविकासाचा प्रवास अखंड(अमृतंगमय) असतो. त्याला विकासासाठी जीवनरुपाने "जीवन" हीच संधी मिळाली असते.

मनुष्य आपल्या सुखाच्या, विकासाच्या संकल्पनेप्रमाणे जगत असतो . जसे आनंदासाठी जगतो, Survival साठी जगतो. या प्रवासातच अर्जुन दुःखी होतो म्हणुन समाधानासाठी युद्ध टाळतो व समर्थनासाठी ज्ञान वापरतो. हे ज्ञान त्याच्या Belief systemनुसार असते. येथे त्याचा विकासरथ थांबतो. पण त्याला याचेच अज्ञान असते.

इंद्रियाणां हि चरतां यत्मनो अनुविधियते ।
तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि॥(२-६७)

येथे मन अनियंत्रित होते. अर्थात मन जीवनाला नियंत्रित करते. जसे वाऱ्याने नाव वहावी तशी जीवनाची स्थिति बनते. चंचल मन बुद्धिला अस्थिर करते. बुद्धिची स्थिरता हा महत्वाचा विषय आला. व याच अनुषंगाने जीवनाचा नियंत्रक कोण ? हा विषय बनतो.

विकास संदर्भात शरीरयंत्रात मन-बुद्धि-आत्मा -परम आत्मा असा श्रेष्ठत्वाचा sequence येतो. व हे ज्ञान स्पष्ट करतांना प्रकृति व ईश्वर हे ज्ञान आले. जसे जीवित तत्वामुळे जीवन क्रियाशील असते, ईश्वर प्रकृतिला क्रियाशील ठेवतो. जीवित तत्व व ईश्वर याचे नाते स्पष्ट होते. बुद्धिला स्थिरत्व प्रदान करण्यासाठी "आत्मवश" असणे हे प्रयोजन आहे. या अवस्थेत मनुष्य स्वतःचा बंधु ठरतो, विकासमार्गावर असतो.

बंधुः आत्मा आत्मनः तस्य येन आत्मैव आत्मना जितः।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत् ॥(६-६)

या अवस्थेत जीवनाचे महत्व कळते. जीवन, जीवनातील अडचणी संधी आहेत याची प्रचिति येते. म्हणुन भगवतगीता "मनावर नियंत्रण" या समाजप्रचलित शब्दाला highlight करते. व कार्याद्वारे समत्वयोग साध्य करण्याचे शास्त्र सांगते.

यावर अर्जुन म्हणतो, मनाला काबुत ठेवणे कठिण वाटते. समत्वयोग साध्य झाला नाही तर आमचे जीवन व्यर्थ जाणार काय?श्रीकृष्ण उत्तरतात, चांगले कर्म फुकट जात नाही. या

जन्ममृत्युच्या फेऱ्यात पुर्वजन्माच्या संचितामुळे मनुष्य (पुर्णत्व साध्य करण्यासाठी) आत्मविकासाच्या मार्गावर येतो.

अनेकजन्मसंसिद्धः ततो याति परां गतिं।(६-४५)

Survivalसाठी जगणे व आत्मविकास याचा मध्य साधण्यासाठी भगवतगीतेने कर्म साधन केले आहे. कर्मकौशल्य मनावर नियंत्रण दर्शविते.

*आनंदासाठी जगणे या संदर्भात अर्जुन आनंदासाठीच (दुःख टाळण्यासाठी) युद्धात निष्क्रिय राहणे पसंत करतो. निष्क्रियतेचे समर्थन करतो. येथे अज्ञानाला ज्ञानी दर्शवितो. म्हणुन भगवतगीता म्हणते, श्रेष्ठ मनुष्याने निष्क्रियतेचे समर्थन करुन सामान्याचा बुद्धिभेद करु नये. स्वतः कार्यरत राहुन कर्माचा आदर्श ठेवावा.

* मनाच्या चंचलतेमुळे कार्याचा दृढनिश्चय होत नाही. दृढनिश्चय कर्मयोगाचा पाया आहे. व यासाठी बुद्धियोग सांगितला. निष्काम कर्माद्वारे समत्वयोग साध्य करतो. म्हणुन "कर्म" संदर्भात निर्णयसंस्कार व निर्णयप्रक्रिया महत्वाची ठरते. ज्याचे निश्चित goal असते, तो विकासनाव निश्चित दिशेने वल्हवित असतो.

*"स्वधर्म"

मन नियंत्रित नसल्यामुळे बुद्धि मोह पावते व अधर्माला धर्म म्हणतो, व धर्माला अधर्म ठरवितो.

अधर्मं धर्मं इति या मन्यते तमसा आवृता।(१८-३२)

समाजात निष्क्रियतेचे समर्थन करणे, अज्ञानाला ज्ञान दर्शविणे यामुळे भ्रम निर्माण होतो. म्हणुन धर्म संदर्भात" स्वधर्म" शब्द कर्तव्य जाणणारा व करणारा या अर्थाने आलेला आहे.

याप्रमाणे जीवन आत्मविकासासाठी संधी आहे हे जाणण्यासाठी, जीवनाचा आदर करण्यासाठी "मनावर नियंत्रण" या संदेशाचे महत्व भगवतगीता highlight करते.

*******

(२. ६७)/२:

"तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावाम् इव अम्भसि"

जीवन काय आहे?त्याचा अर्थ काय, हेतु काय?कशासाठी ईश्वराने येथे आणले?येथे तर सर्वत्र संघर्ष दिसतो, तुफानी हवा दिसते!यावर अनेक तत्वज्ञ भाष्य करीत आले आहे. भाष्य होत

राहणार. भगवतगीता मात्र निवडक उदाहरणे देवुन जीवनाची संपुर्ण ओळख करुन देत आहे.

भगवतगीतेने जीवनमार्गातील Trap ची ओळख करुन दिली व सतर्क केले. याच संदर्भातील हे दुसरे उदाहरण. जीवन समुद्रातील नावेप्रमाणे असते. जेंव्हा सर्व शांत असते, जीवनात आनंद वाटतो, पण तुफानी हवा सुरु होते, तेंव्हा नाव दिशाहीन होते. (या अवस्थेत नाव डुबण्यापासुन वाचविणे हा एकच उद्देश बनतो. ) पण जो जीवनाचा निश्चित हेतु(Goal) जाणतो, तो निश्चित दिशेने नाव वल्हवित असतो.

ज्याला हे नावसदृश जीवन कळले, तो प्रगती मार्गावरच असतो. अन्यथा नाव दिशाहीन वहात राहते. तो Trap ला वश राहुन जगत असतो.

इंद्रियाणां हि चरतां यत्मनो अनुविधीयते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावाम् इव अम्भसि।।(२-६७)

येथे तिसरे उदाहरण "सुख" या संदर्भात आहे.

जगात बरेच जीव जगत असतात. पण जे या जीवनाची ओळख करुन घेतात, ते आनंदी असतात. सुख त्यांना कळले असते. अर्थात विकासाची दिशा व स्थिति कळली असते. कोणत्याही इच्छाआकांक्षा त्यांचे सुख हिरावुन घेत नाही.

आपुर्यमाणम् अचल प्रतिष्ठम् ।
समुद्रम् आपः प्रविश्यन्ति यद्वत् ।(२-७०)

समुद्राला नद्या येवुन मिळतात पण समुद्र शांत असतो. तशी बुद्धिची स्थीर अवस्था त्यांनी साध्य केली असते.

सुखी जीवन, आनंदी जीवन सर्वांना आवडते. याचसाठी स्वतःच्या जीवनाची ओळख हवी. अन्यथा मनुष्य विद्वान असला तरी मनाची अप्रसन्नता बुद्धिचे हरण करते व Trap तयार होतो.

यततो हि अपि कौंतेय पुरुषश्च विपश्चितः।
इंद्रियाणि प्रमाथीनी हरन्ति प्रसभं मनः॥(२-६०)
तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः।
वशे हि यस्य इंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥(२-६१)

***********

(२-६८)

*************************

तस्मात् यस्य महाबाहो निगृतानि सर्वशः।

इंद्रियाणि इंद्रियार्थेभ्यः तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।

*************************

(२-६८) :" तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता"

श्रीकृष्ण मनुष्यजीवनात बुद्धिची महत्ता सांगतात, तेंव्हा अर्जुन प्रश्न करतो, मग कष्टमय कर्माचे प्रयोजन कां?

ज्यायसि चेत् कर्मणाः ते मता बुद्धिः जनार्दन।

तत्किम् कर्मणि घोरे माम् नियोजयसि केशव।।(३-१)

भगवतगीता कर्मप्रधान आहे हे निर्विवाद आहे. मनुष्य जगत असतो, कर्म घडत असतात. ही सहज क्रिया आहे. ही सहजक्रिया विकासासाठी उपयोगात आणण्यासाठी Regularization ची प्रक्रिया सांगितली आहे. या प्रक्रियेत बुद्धिचे महान योगदान असते.

या जीवसृष्टित मनुष्याचे श्रेष्ठत्व त्याचे बुद्धिमुळेच असते. जगातील विकासाचे अवलोकन केले तर बुद्धिचाच करिश्मा आढळतो. मनुष्याचे प्रश्न सोडविण्याची गरज निर्माण झाली, कल्पना सुचत गेल्या. नवनविन शोध लागले. कल्पना साकार करण्यासाठी कर्म घडले. या प्रक्रियेत विकासपुरुषांनी स्वतःच्या बुद्धिचा वापर केला. विश्वासाने कार्यरत झाले. आजचे विश्वकुटुंब साकार झाले. एडिसनच्या दिव्याने जगालाच प्रकाशित केले. फक्त युरोपात प्रकाश करा असे म्हटले नाही. ज्ञानविज्ञान जागतिक उपयोगाचे असते. याच ज्ञानविज्ञानाची महत्ता भगवतगीता सांगते. ज्ञानविज्ञानाचा स्रोत बुद्धि असते. म्हणुन बुद्धिची महानता भगवतगीता स्पष्ट करते.

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।
मनुष्य व्यवहारपातळीवर जगतो. सकाम असल्यामुळे बुद्धिभ्रम होतो.

"स्थितप्रज्ञ" या संदर्भात बुद्धिभ्रंश, विकासमार्गातील बुद्धिची स्थिति, शाश्वत शांतीची अवस्था स्पष्ठ झाली आहे.

स्मृतिभंश व विकासमार्ग:

स्मृतिभंशात् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।

विकासात स्मृतिभंश हाच अडथळा असतो. जे स्वतःची बुद्धि वापरीत नाही त्यांची बुद्धि गहाण असते, असे उपरोधाने म्हटल्या जाते.

तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि।(२-६७)

वाऱ्याने नाव वहावी तशी जगण्याची अवस्था असते तेंव्हा बुद्धिचे हरण होते. तर (जीवन)नाव निश्चित दिशेने वल्हवणे हा विकासमार्ग ठरतो. जीवनाची नाव विकासमार्गावर असावी यासाठी निष्काम कर्माचे शास्त्र सांगितले.

तस्मात् यस्य महाबाहो निगृतानि सर्वशः।

इंद्रियाणि इंद्रियार्थेभ्यः तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।(२-६८)

मनुष्याला जीवनमार्गात स्मृतिभंशाचा Victim न होता विकासासाठी त्याला त्याच्या बुद्धिचा वापर करता यावा, यासाठी भगवतगीतेतील विकासमार्गाचे ज्ञान आहे हे स्पष्ट होते.

"नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा "

***********

(२-६९)

*************************

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।

यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः।।

*************************

(२. ६९)म :"या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी"

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।

यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः।।(२-६९)

वर्तमानात सुखी हवे, आनंदी हवे या शब्दांचा प्रयोग होतो. यासाठी येथे "संयमी "या शब्दाचा प्रयोग केला आहे.

भगवतगीतेत विकासमार्गाचे संपुर्ण ज्ञान विस्ताराने सांगितले असले तरी नित्य विकासमार्गावर असावे यासाठी ईश्वरज्ञानाने

जीवनाचा विकासमार्ग प्रकाशित करावा, म्हणुन जीवनमार्गाच्या दोन बाजु दर्शविल्या. ज्यांत कार्य साधन असते.

व्यवहारात इच्छापुर्तिसाठी कार्य (State of want- S. O. Art)मनुष्य जाणतो. तर कार्याद्वारे ईश्वरभक्ति/योग हा दुसरा भाग जीवनाचा विकासमार्ग पुर्ण करतो. यात कार्य विकासातील साधन असते.

आरुरुक्षो मुनेः योगं कर्म कारणम् उच्यते।
योगारुढस्य तस्यएव शमः कारणम् उच्यते।।(६-३)

" चिंतन" या संदर्भात कार्याचा एक भाग इच्छापुर्ति(विषयचिंतन) व दुसरा भाग ईश्वरभक्ति(ईश्वरचिंतन )असा येतो, यासाठी संयमी(चंचलतामुक्त) हा शब्दप्रयोग आहे. अर्थात "विषयचिंतन vs ईश्वरचिंतन" असा हा विषय बनतो.

जसे दिवस नसला तर रात्र असतेच. कार्य उत्साहाने करणारे, विकासमार्गावर असणारे, सकारात्मक असणारे
" संयमी " ;

व कार्य टाळणारे, दुःखी असणारे, नकारात्मक असे दोन प्रकार ठरविले तर मनुष्याचे चिंतन (Thinking) त्याचा दिवस ठरवितो.
विकासपुरुषाचा दिवस(संयमी) सामान्यासाठी रात्र असते.
सामान्याचा दिवस(भोगैश्वर्य आसक्ति, विषयचिंतन)
विकासपुरुषासाठी रात्र असते.

याप्रमाणे ईश्वराचा नित्य आश्रय /ईश्वरचिंतनाने बुद्धियोगी होणे /योगयुक्त/संयमी /आत्मवश हे शब्दप्रयोग नित्य विकासमार्गावर असण्यासाठी, विकासपुरुषासाठी आहे.

तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)

****

२. ६९/२:
"यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः"
(स्वार्थ-परमार्थ, जगतहिताय-उच्च विचाराचा प्रवाह)

*विचारप्रवाह :

If one thinks of oneself as free, one is free, and if one thinks of oneself as bound, one is bound. Here this saying is true, "Thinking makes it so".
-Ashtawakra

मनुष्य कोणत्या विचारात मग्न असतो, यावरुन सामान्य व श्रेष्ठ यांतील भेद भगवतगीता स्पष्ट करते.
नकारात्मक विचार vs. सकारात्मक विचार,
स्वार्थि विचार vs. परमार्थि विचार,
वाईट विचार vs चांगले विचार,
चंचल(विचलित)विचार vs विवेकी/ संयमी(स्थिर)विचार,
बंधन विचार vs स्वतंत्र विचार
या विचारांचा प्रवाह दिवस vs रात्र याद्वारे भगवतगीता स्पष्ट करीत आहे. एकाचा (विचारप्रवाह)दिवस दुसऱ्याची रात्र असते.

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः।।(२-६९)
"एका झाडावर हंस आणि कावळा बसलेला असतो. झाडाखाली एक वाटसरु झोपलेला असतो. कावळा हाडाचा तुकडा खाली

टाकुन उडुन जातो. वाटसरु जागा होतो. हंसानेच तुकडा टाकला समजुन हंसालाच काठी मारतो. दोन पक्षांच्या विचार प्रवाहात विरोधाभास असतो. "

जेंव्हा लोक स्वतःचा स्वार्थ साधण्याच्या विचारात मग्न असतात, तेंव्हा इतर परमार्थाच्या कार्यात मग्न असतात. यामुळेच न्युटनसारख्या शास्त्रज्ञाने शोध लावलेत. जगतहिताची कार्ये झालीत.

* चांगलेपणाला दुर्बलता ठरविणे हेच अज्ञान.

"One who makes himself a worm cannot complain afterwards if people step on him".

Immanuel Kant

अर्जुनासारखा चांगला मनुष्यही जो परमार्थाचाच विचार करतो व दुःखी होतो. स्वार्थ-परमार्थ या विषयाचे अर्जुनाचे ज्ञान अपुर्णच असते, यामुळे दुःखी होतो. अज्ञानाला ज्ञान संबोधतो. स्वार्थ-परमार्थ या विषयातील उणीव (अज्ञान)भगवतगीता दर्शवुन देते. अज्ञानाचा स्विकार केला तर संशयमुक्तिसाठी ज्ञानाचा आश्रय करणे आवश्यक असते. हेच ज्ञान भगवतगीता सांगत आहे.

परमार्थवादी (श्रेष्ठ ) असला तरी येथे आत्मवश (संयमी) अवस्था व मनोवश अवस्था यातील भेद स्पष्ट केला आहे. आत्मवश श्रेष्ठ, ज्ञानी (संयमी) ठरतो, मनोवश अज्ञानी, कनिष्ट (चंचल)ठरतो. आत्मवश स्थिर(Strong) असतो तर मनोवश मानसिक दुर्बल ठरतो. अर्थात परमार्थवादी विचार असले तरी मानसिक दुर्बलता vs. सक्षमता (विचलित न होणे) हा भेद जाणणे आवश्यक असते. याचाच परिणाम बुद्धिच्या स्थिरत्वात असतो. यामुळेच अर्जुन प्रश्न करतो, बुद्धि श्रेष्ठ तर कर्म कशाला?व ज्ञानाने कर्मसंन्यास(अकर्ता) साध्य करणे हा आत्मोन्नति मार्ग आहे तर योगाचे प्रयोजन काय?

"He who is not everyday conquering some fear has not learned the secret of life. "

Shannon L. Alder

समाजात चांगले-वाईट, स्वार्थ-परमार्थ, श्रेष्ठ-कनिष्ट या विरोधाभासी Polarity वर भाष्य होते. Judgement thinking चा वापर करुन लेबलिंग(चांगले-वाईट, स्वार्थी, साहसी-दुबळा, श्रेष्ठ-कनिष्ट) होते. पण साहस, निर्भयता या महत्वाच्या (मानसिक)गुणावर दुर्लक्ष होते. विचलित न होणे स्थिर बुद्धिसाठी अपेक्षित आहे. व या शक्तिशिवाय संन्यास कठिण आहे. म्हणुन जीवनविकासात याच शक्तिची साधना या महत्वाच्या विषयावर

दुर्लक्ष होत असते . व याच शक्तिच्या अभावी आणि विकासमार्गाच्या अज्ञानामुळे अर्जुन अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. याच अज्ञानाला भगवतगीता highlight करीत आहे.

संन्यासस्तु महाबाहो दुःखम् आप्तुम् अयोगतः।
योगयुक्तो मुनिः ब्रह्म न चिरेण् अधिगच्छति॥(५-६)

विकासमार्गाचे ज्ञान:

अज्ञान ज्ञानानेच मिटते जसे अंधार प्रकाशाने मिटतो. चांगला व्यक्ति(दैवी) ज्ञानाशी जोडल्या जातो म्हणुन ईश्वराशी जोडल्या जातो. ज्ञान आणि ईश्वर यांच्या संबंधाचे रहस्य भगवतगीता स्पष्ट करते. या विकासमार्गात (आत्मोन्नति) कार्याची जोड हवी. ज्यामुळे Goal ठरतो. कार्याचा एक निश्चय असतो. मनुष्याची जीवनयात्रा ईश्वराच्या राज्याकडे (तद् धाम परमं मम) जाणाऱ्या मार्गावर (अमृतत्वाय कल्पते) चालते. व कार्याद्वारे योग(विचलित न होणे या शक्तिची)साधना होते. कर्माद्वारे ईश्वरभक्तिचे फलित अखेर ज्ञानातच असते.

सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

********

(२-७०)

*************************

आपुर्यमाणम् अचल प्रतिष्ठम्

समुद्रम् आपः प्रविश्यन्ति यद्वत् ।

तद्वत् कामाय प्रविश्यन्ति सर्वे

स शांतिम् आप्नोति न कामकामी॥

*************************

२. ७०/१ :"आपुर्यमाणम् अचल प्रतिष्ठम्

समुद्रम् आपः प्रविश्यन्ति यद्वत् "

'विकास' हा मानव जीवनात महत्वाचा विषय आहे. जन्मापासुन मृत्युपर्यंत या शब्दाचे नाते जुळलेले असते. जसा समाजाचा विकास असतो, तद्वतच व्यक्तिविकास असतो. या विकासाचा Roadmap कोणता?असा प्रश्न झाला तर जगात त्याचे एकच उत्तर आहे, व तेच उत्तर "भगवतगीता" देत आहे.. या Roadmapचे मुख्य लक्ष्य ठरते, समुद्रासमान शांति, ज्याला कामरुपि नद्या येवुन मिळतात पण समुद्र विचलित होत नाही.

आपुर्यमाणम् अचल प्रतिष्ठम्
समुद्रम् आपः प्रविश्यन्ति यद्वत् ।
तद्वत् कामाय प्रविश्यन्ति सर्वे
स शांतिम् आप्नोति न कामकामी।।(२-७०)

व्यवहारात "विकास" या संदर्भात विविध संकल्पना असतात व सुख त्याचे मुळ लक्ष्य असते. हे जीवन नित्य विकासमार्गावर असले पाहिजे, याचे रहस्य

"उद्धरेत् आत्मना आत्मानम् .. "याद्वारे भगवतगीता देत आहे. ही आत्मवश अवस्था असते. यात स्वतः स्वतःचा मित्र असतो. या मार्गावर असलेला (जीवन)नाव लक्ष्याच्या दिशेने वल्हवित असतो. (विकासमार्गावर नसलेल्याची नाव वाऱ्याने वहात असते). या मार्गावर असलेला दुःखाने विचलित होत नाही.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं सःअमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

व्यवहारात विकास या संदर्भात भोगैश्वर्य(श्रीमंती, किर्ती) प्राप्तिची ओळख असते. यासाठी कार्य करतो. याच अनुषंगाने दुःख जाणवल्यामुळे अर्जुन म्हणतो, मला कांहिही नको. निष्क्रियतेचे

समर्थन करतो व यासाठी ज्ञान वापरतो. नीतिमुल्ये वेशीवर टांगुन राज्यप्राप्ति मला नको आहे. ही त्याची भूमिका असते. प्रत्यक्षात आपली हतबलता लपविण्यासाठी ज्ञानाने color करतो.

वर्तमानात ज्ञानविज्ञान आले तरी प्रत्यक्षात व्यवहारात जगत असतांना मनुष्य अशाच द्वंद्वाच्या जाळ्यात सापडतो . कुणी दुःखी राहुन रेंगत असतात(नकारात्मक भाष्य बोलतात) तर कुणी आपली हतबलता उपलब्ध ज्ञानविज्ञानाने color करतात. या अपुर्णतेचे कारण विकासाचे अज्ञान असते. म्हणुनच छातीठोकपणे भगवतगीता सांगत आहे,

ज्ञानं तेअहं सविज्ञानम् इदं वक्षामि अशेषतः।
यद् ज्ञात्वा न इह भूयो अन्यत् ज्ञातव्यम् अवशिष्यते॥(७-२)

विकासाच्या शाश्वत Roadmap ला याच ज्ञानविज्ञानाचा आधार आहे. वर्तमानातील व्यवहारमार्ग व शाश्वत विकासमार्ग याचा समन्वय साधुन Standard मार्ग साधलेला आहे. हा स्वतःचा मार्ग असतो. यामुळे स्वतः जबाबदारी स्विकारतो. यामुळे वास्तव स्विकारतो, Self awareness असते.

व्यवहारात मनुष्याचा मार्ग( Interest-want व कार्य- State of art )व्यक्तिपरत्वे वेगळा असला तरी Standard मार्ग पारदर्शकता आणते. व हाच मार्ग जाणुन घेणे भगवतगीतेचा संदेश आहे. म्हणुन" कार्याद्वारे भक्ति" या संदर्भात या मार्गावरील मुल्यांची ओळख भगवतगीता करुन देते,

*कार्य संदर्भात "स्वधर्म" (कार्यसमर्पण)

*निर्णय संदर्भात दृढनिश्चय (समत्वयोगासाठी कार्य, फलत्याग)

*दृढत्वासाठी बुद्धियोग व बुद्धियोगासाठी ईश्वराचा आश्रय

तेषां सतत युक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।
ददामि बुद्धियोगं तं येनमाम् उपयान्ति ते।(१०-१०)

*ईश्वर अंतिम लक्ष्य(तद् धाम परमं मम) जाणुन शाश्वत विकासमार्ग (मृत्योर्मा अमृतंगमय) जाणणे. या मार्गावर कार्याद्वारे भक्ति.

“In this world you’re either growing or you’re dying so get in motion and grow. ”

~ Lou Holtz

******

(२-७०)/२:"तद्वत् कामा यं प्रविश्यन्ति सर्वे
 स शांतिम् आप्नोति न कामकामी"
(Our priority:Peace or Desire?)

भगवतगीतेत शांति अनुभवणे, योग(दुःखान्त, निर्भयता) अर्थात कार्याद्वारे साधना करणे व यासाठी ईश्वरभक्तिसाठी कार्य असा स्पष्ट उल्लेख आलेला आहे. मनुष्याला सुख हवे व यासाठी इच्छा नैसर्गिक असते. पण इच्छा हीच Priority बनली तर "कामकामी" होतो, यामुळे अशांत असतो.
विकासप्रक्रियेत इच्छापुर्तिसाठी कार्य करतो. कार्याद्वारे विकास साधतो. हा विकास भौतिक तसेच मानसिक (योग, निर्भय, साहस, शांति) असतो. अर्थात कार्याद्वारे भौतिक विकास हे निमित्त असते, तर याच कार्याद्वारे (मानसिक शक्तिची) साधना करतो. विश्वासाने मार्ग चालतो व शांति अनुभवतो.

१. इच्छा २. कार्य ३. विकास साधना ४ विश्वासाने मार्ग चालणे ५. शांति, निर्भयता, साहस अनुभवणे अर्थात विचलित न होणे. या अनुषंगाने विकासप्रक्रिया भगवतगीता स्पष्ट करते.

*विकासप्रक्रिया

श्रोत्र आदिणि इंद्रियाणि अन्ये संयमाग्निषु जुह्वति।

शब्द आदिणि विषयान् अन्ये इंद्रियाग्निषु जुह्वति।। (४. २६)

..

आत्मसंयम योगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।।(४-२७)

जीवनविकासाच्या या प्रक्रियेचे अज्ञान असेल व इच्छा Priority बनली तर इच्छा मनुष्याला "कामकामी" बनविते. यामुळे अशांति असते. तर विश्वासाने मार्ग चालणे, शांति अनुभवणे ही Priority असेल तर विकासमार्गावर असतो. समुद्राला नद्या येवुन मिळतात पण समुद्र अशांत होत नाही तसेच विकासमार्गावर असलेल्याला इच्छा अशांत करीत नाही.

आपुर्यमाणम् अचल प्रतिष्ठम्

समुद्रम् आपः प्रविश्यन्ति यद्वत् ।

तद्वत् कामा यं प्रविश्यन्ति सर्वे

स शांतिम् आप्नोति न कामकामी।।(२-७०)

*Transformation

समाजात कोण योग्य? हा विषय घेतला तर (सर्वच) योग्य समजुनच मनुष्य भाष्य करतो. व्यवहारात योग्य-अयोग्य हा Issue असतो. पण मनुष्य मार्ग चालतो तो "योग्य" समजुनच! यांत

१. विश्वासाने मार्ग चालतो, निष्ठेने कार्यरत असतो, शांति अनुभवतो . किंवा

२. "योग्य" चे अज्ञान असेल तर जे करतो किंवा निष्क्रिय झाला तरी स्वतःला "योग्य" सिद्ध करण्यासाठी भाष्य करतो. अर्थात येथे द्वंद्ववश असतो. याच अनुषंगाने व्यवहारातील "योग्य-अयोग्य " व स्वतःच्या मार्गातील "योग्य" यांतील भेद व Transformation चे ज्ञान भगवतगीता सांगते.

व्यवहारातील योग्य-अयोग्य हा द्वंद्व असतो, सकाम असतो. तर स्वतःच्या मार्गासाठी निर्द्वंद्व असावे लागते, अर्थात कार्याचा दृढनिश्चय असतो. म्हणुन विकासप्रक्रियेत द्वंद्व ते निर्द्वंद्व, सकाम ते निष्काम असे Transformation असते.

१. व्यवहारातील नियतकार्य स्वधर्मात Transform करणे.

२. बुद्धियोगाद्वारे "अमृतत्वाय कल्पते" या विकासमार्गावर असणे. व "योगः कर्मसु कौशलम् " साध्य करण्यासाठी दृढनिश्चयी(कार्याचा एकनिश्चय) असणे.

३. सकाम आसक्त असतो. तर अनासक्त होण्यासाठी निष्काम कार्य (कार्यसमर्पण, फलत्याग) प्रयोजन आहे.

कर्मेंद्रियै कर्मयोगं असक्तः स विशिष्यते।(३-७)

तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर।(३-१९)

याप्रमाणे सुखासाठी इच्छा ही नैसर्गिक Priority असते. जीवनविकासाची प्रक्रिया जाणुन बुद्धिवरील योग्य संस्कारामुळे ही Priority बदलते. जीवनांत सुख शांति अनुभवणे, विश्वासाने मार्ग चालणे, विचलित न होणे ही सुखी जीवनाची Priority आहे.

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

न च अभावयतः शांतिं अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

******

२. ७१

*******************

विहाय कामान् यः सर्वान् पुमांश्चरति निःस्पृहः।

निर्ममो निरहंकारः स शांतिम् अधिगच्छति।।

*******************

२. ७१:

"निर्ममो निरहंकारः स शांतिम् अधिगच्छति"

(Peace, the gate of happiness)

भगवतगीतेत सुखी जीवनाचे रहस्य शांति म्हटले आहे. याच शांतिसाठी संस्कारीत होण्याचे महत्व, त्याचे रहस्य स्पष्ट केले.

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना ।

न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखम् ।(२-६६)

*दोन मार्ग

अ) निष्काम कर्माद्वारे शांति

ब) ध्यानयोगाद्वारे शांति

हे दोन मार्ग असले तरी फलत्याग श्रेष्ठ ठरविला आहे.

ध्यानात् कर्मफल त्यागः त्यागात् शांतिं अनंतरम् ।(१२-१२)

अ) निष्काम कर्म

*Freedom from desire leads to inner peace. Lao Tzu
आपूर्यमाणम् अचलप्रतिष्ठम् ...
स शांतिम् आप्नोति न कामकामी ।(२-७०)
अर्थात अशांति म्हणजे चंचलता व त्याचे कारण "कामकामी"(Desires leading to.. )

*Inner peace is beyond victory or defeat. (Bhagavad Gita 5-12)
युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिं आप्नोति नैष्ठिकीम् ।

बुद्धियुक्त संस्कार:
Weak vs. Strong/मनोवश vs. आत्मवश/द्वन्द्व vs निर्द्वन्द्व/सकाम vs निष्काम

विचलित होणे ही दुर्बलता(मनोवश), तर Strong (अविचल) होण्यासाठी आत्मवश असणे यासाठीच बुद्धियुक्त प्रक्रिया अर्थात द्वन्द्वमुक्त होण्यासाठी (Determination या संदर्भात योग्य-अयोग्य हा द्वन्द्व असो किंवा फलसंदर्भात लाभ-हानि हा द्वन्द्व असो!) बुद्धियुक्त असणे.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्माद् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)
यांत कार्याचा एकनिश्चय (Determination) असतो. सिद्धि-असिद्धि यांत समत्वयोग साध्य करुन (निष्काम) कर्म करणे. (It is combination of Determination and detachment)

संस्कारीत असलेल्याची स्वतःवर Command असते. जसे पाण्यावरील नाव वाऱ्याने वहावी तशी संस्कारीत नसलेल्याची(नावेवर) स्वतःवर Command नसते.
इंद्रियाणां हि चरतां यत्मनोअनुविधीयते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि।।(२-६७)

ब) ध्यानयोग

युञ्जन्नेव सदा आत्मानं योगी नियतमानसः।
शांतिं निर्वाणपरमां मत्संस्थाम् अधिगच्छति।।(६-१५)
ईश्वराचे ठायी असलेल्या शांतिची अनुभुति.

ध्यानयोगपरोनित्यं वैराग्यम् समुपाश्रितः।(१८-५२)
अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।
विमुच्य निर्ममः शांतो ब्रह्मभूयाय कल्पते।।(१८-५३)
आपापले स्वभावनियतकर्म ईश्वराला समर्पित केल्याने नैष्कर्मसिद्ध होतो. व ध्यानाद्वारे शांति अनुभवतो.

क) शांतिचे रहस्य:विचलित न होणे:ब्राह्मी स्थिति:Logic of Detachment
विहाय कामान् यः सर्वान् पुमांश्चरति निःस्पृहः।
निर्ममो निरहंकारः स शांतिम् अधिगच्छति।।(२-७१)
एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति।(२-७२)

निर्मम म्हणजे (स्वामीत्वाचे, अशाश्वताचे)Detachment .
"Receive without pride, let go without attachment. "

-Marcus Aurelius (Roman emperor and a Stoic philosopher)

सार:

*शांतिविणा सुख नाही. (अशांतस्य कुतः सुखं)

*अशांती म्हणजे चंचलता, विचलित होणे.

* चंचलतेचे कारण "कामकामी"(Desires)

*इच्छा तर असतेच !मग उपाय?

संस्कार : निष्काम कर्म संस्कार/बुद्धियुक्त

*संस्कारामुळे जीवनमुल्याचे महत्व जाणतो. कार्याचा एकनिश्चय असतो. यामुळे निष्ठेने ( निष्काम) कर्म करतो.

* संस्कार नसलेलाही जगतो पण जणु नाव वाऱ्याने वहावी तशी जीवनयात्रा असते.

*अर्थात निष्काम कर्म/बुद्धियुक्त या संस्काराचे महत्व भगवतगीता highlight करीत आहे.

******

भगवदगीता

# अध्याय ३ : कर्मयोग

*********************

अध्याय ३. कर्मयोग

कर्माद्वारे बुद्धिची स्थिरता(कर्मकौशल्य)हे ज्ञान ऐकल्यावर अर्जुन विचारात पडतो, कर्मापेक्षा बुद्धि श्रेष्ठ तर या घोर कर्माचे प्रयोजन कशासाठी? (हे घोर कर्म टाळता येईल असे कांही ज्ञान असेल तर बरे होईल या आशेने प्रश्न करतो. )

कर्मयोगात दोन महत्वाच्या मुद्यावर चर्चा होते.

१. कर्म:कर्माचे जीवनांत महत्व

२. प्रकृति: कर्म घडणे व त्यातील अडथळा दोन्हीमध्ये प्रकृतिची भूमिका

३. १ कर्म

* ज्ञाननिष्ठा असणारे स्वधर्माचरणासाठी कर्म करतात व कर्मनिष्ठा असलेले कर्मयोगासाठी दृढनिश्चयी असतात. या दोन निष्ठा आधी आलेल्या आहेत.

* कर्माविणा विकास नाही. नैश्कर्मसिद्धिसाठी कर्मच आवश्यक आहे, हेच रहस्य आहे.

*प्रत्येक क्षणात प्रकृति कर्म घडवित असते.

*जीवनांत प्रश्न सोडविण्यासाठी कर्म आवश्यक पण कर्म टाळुन इच्छाचिंतन करणे किंवा अतृप्तिमुळे चिंता करणे हे अज्ञान असते. हा मिथ्याचार ठरतो.

"मिथ्याचारः सः उच्यते"

*कर्मसंस्कारित(स्वधर्म, दृढनिश्चय) होवुन कर्माद्वारे विकास साधणे, कर्माद्वारे योगसाधनेमुळे(Devotion)अनासक्त होणे श्रेयस्कर.

*कर्माशिवाय शरिरयात्राही चालत नाही म्हणुन निष्क्रिय राहण्यापेक्षा नियतकार्य करणे श्रेयस्कर ठरते.

*कर्मातील यज्ञकौशल्य जाणले तर कर्म कष्ट वाटत नाही. बंधन ठरत नाही, मुक्तिसाठी यज्ञकौशल्य जाणणे आवश्यक आहे.

*प्राचिन काळी प्रजेच्या सुखासाठी देवतांना प्रसन्न करण्यासाठी यज्ञ प्रयोजन होते. प्रजा व देवता यांचे परस्पर सहकार्यासाठी यज्ञ साधन होते. यज्ञ कर्माद्वारेच होतो. वर्तमानात कर्मातील हे यज्ञकौशल्य जाणुन घेणे आवश्यक आहे. (अ. ४)

*"यज्ञ" सृष्टिसंचलनात Symbolic Cycle दर्शविते. हे Cycle अनुक्रमे यज्ञ-पर्जन्य-अन्न-प्रजापोषण-कर्म असे चालु असते. या

Cycleमध्ये अव्यक्त उर्जा(अक्षरब्रह्म)नित्य प्रतिष्ठित असते.
[अक्षर(Energy)-ब्रह्म-कर्म. ]
ईश्वराचे हे सृष्टिचक्र चालविण्यास मनुष्याचे कर्म सहकिर्य करीत असते. जो सहकार्य करीत नाही, त्याचे जीवन भार ठरते.

*जो आत्मठायी तृप्त असतो अर्थात परावलंबित नसतो, अनासक्त असतो, तो मानवकल्याणासाठी कर्म करतोच. सामान्य श्रेष्ठांचे अनुसरण करतात. जे कर्मकौशल्य जाणत नाही अशा सामान्यांना कर्माचे महत्व कळावे यासाठी श्रेष्ठांनी कर्म करावे. निष्क्रिय राहुन बुद्धिभेद करु नये.

३. २ प्रकृति : प्रकृतितील Strength व Weakness

प्रकृतिसंदर्भातील ही चर्चा स्वतःचे स्वतःला आव्हान(Internal battle) यावर आहे. याअनुषंगाने स्वधर्म vs काम(जीवनमुल्य vs काम, Strength vs Weakness) याचे महत्व स्पष्ट केले आहे.

Know Internal Battle.

*बाह्य जग(दुसरे व्यक्ति) जेंव्हा मनुष्याला आदर्शाचा, नियमांचा हवाला देवुन Challange करतात, तो व्यवहार असतो. येथे काय हवे?याची पारदर्शकता असते. पण स्वतःचेच स्वतःला आव्हान मिळते, तेंव्हा हा Tie सोडविण्यासाठी Tiebreaker हवा असतो. स्वतःचे जीवनमुल्य येथे Tiebreakerची भूमिका बजावते. हे आव्हान (लढा Internal battle)कळले नाही तर प्रकृतिच्या Automation प्रमाणेच आचरण होते.

*अर्जुनाला इतर कुणिही Challange केले नसते. त्याच्याच नियतकार्याला(Commited work) त्याची मनःस्थिति आव्हान करते. संशय निर्माण झाला. पण Internal battleचे ज्ञान नसल्यामुळे प्रकृतिचे Automationच युद्ध न करणे ही निवड करते व (सकाम स्थिति निर्माण झाल्यामुळे )स्वतःला कर्ता जाणुन निष्क्रियतेचे समर्थन करतो व "योग्य" सिद्ध करण्यासाठी आदर्श ज्ञान बोलतो. हे प्रकृतिचे Automationच
असते. (प्रकृतिवश)

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।
अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते॥(३-२७)

*प्रकृतिचे Automation प्रमाणे मनुष्य क्रियाशील होतो. कर्म (State of art)व गुण(Details अ. १४) याद्वारा हे Automation असते. अर्थात प्रकृति कर्ता ठरते. याच Automation मध्ये Strength व, Weakness असतो. हा प्रकृतिचा खेळ तत्वविद् जाणत असतात. म्हणून विचलित होत नाही.

*प्रकृतिच्या Automationचे अज्ञानच Stress, चिंता, भय याचे कारण ठरते. "स्वतःचे स्वतःला आव्हान"असलेले Internal battle कळत नाही. कधी आत्महत्येला सुद्धा हेच अज्ञान कारण ठरते.

*जे योग्य आहे, त्याची मनुष्य संवय करतो. संवय कालांतराने स्वभाव बनते. हा प्रकृतिचा भाग असतो.

सदृशं चेष्ठते स्वस्या प्रकृते ज्ञानवान अपि।
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किम् करिष्यति।।(३-३३)

*सहजकार्य प्रकृतितील Strength असते.

*इच्छाद्वेष हा द्वंद मार्गातील अडथळा ठरतो. हा प्रकृतितील Weakness ठरतो.

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ॥(३-३४)

*द्वंद Tie सोडविण्यासाठी स्वधर्म Tiebreakerची भूमिका बजावते, म्हणुन "स्वधर्म" स्वतःचा Tie सोडविण्यासाठी जीवनमुल्य ठरते.

*मनुष्य (इच्छा नसतांनाही)नकळत चुक कां करतो?अर्जुन हा प्रश्न करतो.

अथ केन प्रयुक्तोअयं पापं चरति पुरुषः?(३-३६)

स-काम स्थितिमुळे द्वंदवश होतो. ही मनोवश अवस्था असते. शरीरयंत्रात अनुक्रमे इंद्रियविषय-मन-बुद्धि-आत्मा असा जेष्ठक्रम ठरतो.

इंद्रियाणि पराणि आहुः इंद्रियेभ्यः परं मनः।
मनसः तु परा बुद्धिः योः बुद्धेः परतः तु सः।।(३-४२)

याद्वारा आत्मवश अवस्थेची श्रेष्ठता व मनोवश अवस्थेची कनिष्टता जाणतो.

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्य आत्मानम् आत्मना।
जहि शत्रुं महाबाहो कामरुपम् दुरासदम् ।।(३-४३)

अर्जुनाला आलेले भय(नरकवास), संशय याच "काम"मुळे निर्माण झाले असते. याप्रमाणे "काम " स्वतःलाच आव्हान देत असतो. म्हणुन शत्रु ठरतो. हा लढा काम vs स्वधर्म असा ठरतो.

**********

अध्याय ३- मुख्य विषयावर दृष्टिक्षेप:

३. १/१ :"ज्यायसि चेत् कर्मणः ते मता बुद्धिः जनार्दन?"

३. १/२:

"तत् किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव?"

(भगवतगीतेचे प्रयोजन?)

३. २/१:

"व्यामिश्रेण इव वाक्येन् बुद्धिः मोह यसीव मे"

(Philosophy of Karma, The work)

३. २/२:

"तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोअहम् आप्नुयाम् "

(बुद्धिvs कार्य, ज्ञान vsकर्म)

(३-३)/१ :

"लोकेस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मया अनघ"

(कर्म आणि निर्णय/निश्चय)

(३. ३)/२ :

" ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् "

(गहना कर्मणो गतिः/Role of Work in Lifedrive system))

३. ४/१:

"न कर्मणाम् अनारंभान् नैष्कर्मं पुरुषो अश्नुते"

(३-४)/२ :

" न च संन्यसनात् एव सिद्धिं समधिगच्छति"

(यशस्वि जीवनासाठी कर्म आवश्यक)

३. ५/१:"न हि कश्चित् क्षणम् अपि जातु तिष्ठति अकर्मकृत् "

३. ५/२:

"कार्यते हि अवशः कर्म सर्वः प्रकृतिजैः गुणे"

(कार्यप्रवाह)

(३. ६)/१ :

"कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् "

(Hypocracy/Ignorance)

(३. ६)/२:

"इंद्रियार्थान विमूढात्मा मिथ्याचारः सः उच्यते"

(निरर्थक भाष्य करणे vs विकासमार्गावर असणे)

३. ६/३: "मिथ्याचारः स उच्यते"

३-७/१ :

"यः तु इंद्रियाणि मनसा नियम्य आरभते अर्जुन"

(कार्यसंस्कार)

३-७/२:

"कर्मेंद्रियैः कर्मयोगं असक्तः स विशिष्यते"

३. ८/१:

"नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो हि अकर्मणः"

३. ८/२ :

"शरीरयात्रा अपि च ते न प्रसिद्धयेत् अकर्मणः"

३. ९/१:

"यज्ञार्थात कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधन:"

(३. ९)/२:

"तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर"

( कर्मकौशल्य)

३. १०:

"सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा पुरा उवाच प्रजापतिः"

(Translation of ancient treasure-

वर्तमानाचे प्रश्न सोडविण्यासाठी श्रीकृष्णाचे अनुसंधान)

३-११:

"देवान् भावयतानेन ते देवा भावयन्तु वः।

परस्परं भावयन्तः श्रेयः परम् अवाप्स्यथ"

(वर्तमानातील Replacement:आध्यात्मिक क्रान्ति)

३-१५:

"तस्मात् सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् "

(नित्य ईश्वराचा आश्रय+विकासात कर्माचे महत्व)

(३-१६)/१:

"एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्तयतीह यः?"

(इंद्रियराम vs. आत्माराम)

३. १६/२:

"एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्तयतीह यः"

(ईश्वरभक्तिचे रहस्य )

३. १६:"अघायु इंद्रियरामो मोघं पार्थ स जीवति"

३-१७ :

" आत्मन्येव च संतुष्टः तस्य कार्यं न विद्यते"

(सुखदुःख -कर्म-ज्ञान समन्वय)

३-१८:

" नैव तस्य कृतेन अर्थो न अकृतेन् इह कश्चन"

(Asset vs. burden)

३. १९/१:"तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर"

३-१९/२:

" असक्तो हि आचरन् कर्म परम् आप्नोति पूरुषः"

(निष्काम कार्याद्वारे आत्मोन्नति)

(३-२०)/१ :

"कर्मणैव हि संसिद्धिम् आस्थिता जनकादयः"

(Inner management of great people)

(३-२०)/२:

"लोकसंग्रहम् एवअपि सम्पश्यन् कर्तुम् अर्हसि"

(जगाला कर्माचा संदेश हवा!)

३. २१/१: "यद् यद् आचरति श्रेष्ठः "

(३-२१)/२:

"यद् यद् आचरति श्रेष्ठः तत् तत् एव इतरो जनः"

(श्रेष्ठांचा मार्ग)

(३-२१)/३:"स यत् प्रमाणं कुरुते लोकः तदनुवर्तते"

(३-२२)/१:

"न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किञ्चन"

(Audience vs. Hero)

(३-२२)/२:

"न अनवाप्तम् अवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि"

(३-२३)१ :

" यदि हि अहं न वर्तेयं जातु कर्मणि अतंद्रितः"

(श्रेष्ठांचे कर्तव्य-Master vs Herd morality)

(३-२३)/२:"मम वर्त्म अनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः"

(३-२४)१:

"उत्सीदेयुः इमे लोका न कुर्यां कर्म चेत् अहम् ?"

(कर्माचे मनुष्यजीवनातील महत्व)

(३-२४)/२:

" संकरस्य च कर्ता स्याम् उपहन्याम् इमाः प्रजा"

(समाजातील श्रेष्ठ लोक व त्यांची भूमिका)

३. २५/१ :

"सक्ताः कर्मणि अविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत"

(Herd morality vs. Master morality)

(३. २५)/२ :

"सक्ताः कर्मणि अविद्वान्सः यथा कुर्वन्ति भारत "

(कर्माला पर्याय नाही)

३. २५/३:"कुर्यात् विद्वान तथा असक्तःचिकीर्षुः लोकसंग्रहम् "

३. २६/१ : "न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् "

३. २६/२ :

"जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान युक्तः समाचरन्"

(सामान्याकडुन श्रेष्ठत्वाकडे, नराचा नारायण)

(३. -२७)/१:"प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः"

( Lifejourney &Mode of Wisdom )

३. २७/२:"अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते"

३. २७/३ : "अहंकार विमुढात्मा "

३. २७/४:

"अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते"

३. २८:

"तत्वविंत्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः"

(Wisdom of action )

(३-३०)/१:

"मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्य अध्यात्मचेतसा"

( जीवनातील कर्म, ज्ञान व भक्ति यांची भूमिका )

(३-३०)/२ :

"निराशीः निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः"

(अशाश्वताकडुन शाश्वताकडे)

(३-३१) :

"ये मे मतम् इदं नित्यं अनुतिष्ठन्ति मानवाः"

(भगवदगीतेचा संदेश-कार्यकौशल्य)

३. ३३/१ : "सदृशं चेष्टते स्वस्याः"

(३-३३)/२:"सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि"

(३-३३)/३:

"प्रकृति यान्ति भूतानि निग्रहः किम् करिष्यति"

(Replacement of habit/Good habit)

(३-३४)/१ :

"इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ"

(जीवनातील Weakness व Strength :बंधन मुक्ति)

३. ३४/२: "तयोः न वशम् आगच्छेत् "

(Be aware of Trap)

३. ३४/३ : "तौ हि अस्य परिपन्थिनौ"

(३-३४)/४ :

"तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ"

(जीवनातील अडथळा)

३. ३५/१ :" श्रेयान् स्वधर्मो विगुणः "

(३-३५)/२:"स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः"

(स्वतःचा मार्ग vs इतरांचा मार्ग)

३. ३६:"अथ केन प्रयुक्तोअयं पापं चरति पुरुषः"

(३-३८):

"धूमेन् आव्रियते वन्हिः यथा आदर्शो मलेन् च...

. ... तथा तेन् इदम् आवृतं"

(ज्ञानावर आवरण/ Barrier)

(३-३९):

"आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा"

(Ignorance and Wisdom)

(३-४१) :

"तस्मात् त्वम् इंद्रियाणि आदौ नियम्य भरतर्षभ"

(संस्कार)

३. ४२/१: "मनसः तु परा बुद्धिः "

(३-४२)/२ :

"इंद्रियाणि पराणि आहुः इंद्रियेभ्यः परं मनः।

मनसः तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतः तु सः ॥"

(Regulating the senses-कर्मकौशल्य)

३. ४३/१ :

"एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यआत्मानम् आत्मना"

(मन शत्रु कि मित्र?)

३. ४३/२:"जहि शत्रुं महाबाहो कामरुपं दुरासदम् "

*****

*****

(३-१)

**********************

ज्यायसि चेत् कर्मणः ते मता बुद्धिः जनार्दन।

तत् किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव।।

**********************

(३. १)/१ :"ज्यायसि चेत् कर्मणः ते मता बुद्धिः जनार्दन?"

अर्जुन कर्माद्वारे योग, बुद्धिची स्थिर अवस्था हे ज्ञान ऐकतो. अर्थात बुद्धिच्या स्थिर अवस्थेसाठी ज्ञान असा विषय बनतो. अर्जुन याचा असा अर्थ काढतो कि, बुद्धिसाठी ज्ञानच श्रेष्ठ आहे तर कर्म कशाला?

अर्जुनाला अप्रत्यक्षपणे कर्म टाळण्यासाठी ज्ञान ऐकायचे असते कारण त्याच्या भाषेत हे घोर कर्म टाळणे ही त्याची गरज बनते. म्हणुन कर्म टाळण्यासाठी ज्ञान vs कर्म करण्यासाठी ज्ञान?असा हा विषय बनतो.

ज्यायसि चेत् कर्मणः ते मता बुद्धिः जनार्दन।

तत् किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव।।(३-१)

जगात कर्म घडत असते. कर्तृत्वानेच इतिहास घडतो. मनुष्य शिक्षण घेतो. हे ज्ञान Professionसाठीच घेत असतो. अर्थात कर्मासाठी ज्ञान घेतो. हे व्यावहारिक सत्य अर्थात जीवनात कर्माचे महत्व आपण जाणत असतो.

भाष्य संवादाचे माध्यम असते. अर्जुनाचे भाष्य कर्म टाळण्यासाठी ज्ञान या स्वरुपाचे असते. या भाष्यामुळे संवादाला खीळ बसते. ज्ञानासाठी संवाद सुरु होतो.

समाजात योग्य-अयोग्य या संदर्भात समर्थन-टिका या स्वरुपाचे भाष्य चालत असते. याचा आधार द्वंद्व (योग्य-अयोग्य, स्व-पर) असतो. "स्व"संदर्भात अयोग्य असले तरी समर्थन व "पर" संदर्भात योग्य असले तरी चुका शोधणे व त्यावर भाष्य करणे असे व्यवहारात आढळुन येते. पण कार्यरत असणारे "हाथी चला बाजार, कुत्ते भौंक रहे" या न्यायाने जगत असतात.

अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर देतांना विश्वातील व मनुष्यजीवनातील कर्माचे महत्व श्रीकृष्ण स्पष्ट करतात. महात्मा, विद्वान, श्रेष्ठ जनांनी

सामान्याला निष्क्रिय करुन बुद्धिभेद करु नये तर सामान्य कार्यरत होतील असा आदर्श ठेवावा असे स्पष्ट केले. प्रत्यक्ष कर्माद्वारे विकास होतो. श्रेष्ठ स्वतः मार्गावर असतांना विचलित होत नाही. हे स्पष्ट केले.

या मार्गात द्वंद्वामुळे अडथळा होतो. म्हणुन दृढत्वासाठी स्वधर्म, द्वंद्वमुक्त होण्यासाठी आत्मवश, बुद्धियोग याचा उल्लेख आलेला आहे. कर्म संदर्भात सहजकार्य, स्वभावनियत कार्य, (आवडीचे कार्य), कार्याचा निश्चय, निर्णयअधिकार असा उल्लेख आहे. कर्म टाळुन इंद्रियसुखाचे चिंतन करणे मिथ्याचार ठरतो. उत्साहाने कार्यरत होण्यासाठीच भगवतगीता ज्ञान आहे. हा उत्साह निर्माण करणारी उर्जा ईश्वराच्या अंशरुपाने मनुष्याच्या हृदयी स्थित आहे. व याच ईश्वराप्रत जीवनविकासमार्ग असतो. ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. कर्म करण्यासाठी ज्ञान(विज्ञान)असले तरी सर्व कर्माचे अखेर ज्ञानातच विलिनीकरण होते.
सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

म्हणुन ईश्वरज्ञानाने युक्त मनुष्य कार्याद्वारे भक्ति साध्य करतो. अर्थात कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य करणारा "योग्य"ठरतो.

अपिचेत्सु दुराचारो भजति माम् अनन्यभाक् ।
साधुः एव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः ।।(९-३०)

भगवतगीतेतील हे भाष्य जीवनातील (अनन्यभावाने) ईश्वरभक्तिचे महत्व highlight करते . म्हणुन दैवीगुण संपन्न अर्थात चांगल्या व्यक्तिने ईश्वरज्ञान आश्रय करावा, बुद्धियोगी व्हावे. यामुळे कार्याच्या योग्य-अयोग्य या द्वंद्वापासुन स्वतःला मुक्त करतो. कार्याचा दृढनिश्चय होवुन योग (दुःखान्त, निर्भय, अविचल)साध्य होतो.

बुद्धियुक्तो जहातिह उभेसुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)
 ***********

३. १/२:
"तत् किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव?"
(भगवतगीतेचे प्रयोजन?)

भगवंताने अर्जुनाला अध्यात्मज्ञान दिले. व पुन्हा युद्ध करायला सांगितले. मग नक्की काय सांगायचे होते?

संपुर्ण विश्वाला हाच खरा प्रश्न पडतो. व भगवतगीतेचे निश्चित प्रयोजन काय? हे जाणण्याची इच्छा होते.

समाजात "मी योग्य " समजुनच मनुष्य जगत असतो. पण जेंव्हा कार्यात संशय असतो, निश्चय करु शकत नाही, तेंव्हा कार्यच टाळतो. व निष्क्रियतेचे समर्थन करतो. चांगल्या माणसाला आजकाल जगणे कठिण झाले आहे!चांगले चालत नाही!अशा प्रकारचे भाष्य समाजात चालते तेंव्हा चांगलेपणा बदनाम होत असतो. कारण जगातुन चांगलेपणा कधीही नष्ट होत नाही. व हीच ईश्वर असण्याची साक्ष असते हा भगवतगीतेचा संदेश आहे.

अर्जुन चांगला असतो, पण निष्क्रियतेचे समर्थन करतो. "धर्मज्ञान "(Religion) या संदर्भात क्षत्रियाचा धर्म म्हटला तर दुर्योधन इ. कौरव योग्य मार्गावर होते, मग अर्जुनच अज्ञान ठरला काय?"Religion " या संदर्भातील धर्मज्ञानाचा वापर करुन योग्य-अयोग्य ठरविण्यात येते. याच धर्मज्ञानाचा उपयोग करुन समर्थन-

टिका करण्यात येते. अर्जुन याच धर्मज्ञानाचा वापर करुन निष्क्रियतेचे समर्थन करतो. अज्ञानाला ज्ञान दर्शवितो.

मनुष्य कार्यरत असतो. व्यवहारात जगत असतांना अडचणीत सापडतो, जसे अर्जुन सापडला. मनुष्य स्वतःचे अज्ञान कबुल न करता आपल्या दोषाचे खापर जगावर, दुसऱ्यावर, परिस्थितिवर फोडत असतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो. या प्रक्रियेत अज्ञानालाही ज्ञान दर्शविण्याचा प्रयत्न करतो. यालाच प्रज्ञावाद संबोधले आहे. म्हणुन" ज्ञान" हा विषय भगवतगीतेत आला. अर्थात ज्ञानाचे प्रयोजन संशयमुक्तिसाठी कि प्रज्ञावादासाठी? हा प्रश्न उपस्थित होतो.

समाजातील धर्माचे functioning :

१. बाह्यविघ्नमुक्ति(शोषणमुक्ति) यासाठी समाजव्यवस्था व शाश्वत समाजव्यवस्था धारणेसाठी धर्मज्ञान ज्याला आपण Religion म्हणुन ओळखतो.

२. आंतर्विघ्नमुक्ति (संशयमुक्ति) साठी ज्ञान जे भगवतगीता सांगत आहे. यातच अध्यात्मज्ञानाचा समावेश आहे.

Religion या धर्मज्ञानाचा वापर करुन निष्क्रियतेचे समर्थन भाष्याला भगवतगीता प्रज्ञावाद संबोधते. अर्जुन वास्तव स्विकारतो. तेंव्हा अर्जुनाचा मुख्य प्रश्न समोर येतो. "दुःखमुक्ति"?दुःखमुक्तिसाठीच अर्जुन नियतकार्य टाळण्याचा प्रयत्न करतो. यावर भगवतगीतेचे उत्तर असते,

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

अर्थात शाश्वत विकासाचा मार्ग जाणुन भक्ति (योगासाठी कार्य) करणे. यात बुद्धिची स्थितप्रज्ञ अवस्था(विचलित न होणे) साध्य करणे हे ध्येय असते. तेंव्हा अर्जुन प्रश्न करतो, बुद्धि /ज्ञान श्रेष्ठ तर घोर कर्म कशाला?

ज्यायसी चेत् कर्मणः ते मता बुद्धिः जनार्दन।

तत् किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव।।(३-१)

याच प्रश्नाचे उत्तर भगवतगीता देते. ईश्वराची विश्वाचा अध्यक्ष तसेच अव्यय, निर्गुण ओळख देते. या ईश्वराची साधना करुन

योग(दुःखान्त) ही (विचलित न होणे)शक्ति साध्य होते. पण देहवानाला अव्यक्तासक्त कठिण प्रयासाने प्राप्त होते.

क्लेशो अधिकतर तेषां अव्यक्तासक्त चेतसाम् ।

अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवत् भिः अवाप्यते॥(१२-५)

याच पार्श्वभूमिवर कार्याद्वारे योग (योगः कर्मसु कौशलम् ) हे शास्त्र भगवतगीता सांगते. अर्थात व्यवहारातील कार्य इच्छापुर्तिचे साधन आहे. तर हेच कार्य शाश्वत मार्गावरील विकासाचे(योग) साधन आहे.

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परः।

अनन्येन् एव योगेन् मां ध्यायन्त उपासते॥(१२-६)

सारः

याचाच अर्थ Religion या संदर्भातील धर्मज्ञान हा भगवतगीतेचा विषय नाही. तत्ववेत्त्यांनी Religion vs Spirituality हा भेद स्पष्ट केला आहे. हा भेद जाणला तर भगवततगीतेचा विषय सूर्यप्रकाशासारखा स्पष्ट होतो,

1. Religion Separates from Other Religions – Spirituality Unites Them

2. Religion Shows You Fear – Spirituality Shows You How to Be Brave

3 Religion Makes You Dependent – Spirituality Makes You Independent

4 Religion Makes You Follow Other Journey – Spirituality Lets You Create Your Own.

5. Religion Tells You The Truth – Spirituality Lets You Discover It.

6 Religion Makes You Bow – Spirituality Sets You Free.

7 Religion Applies Punishment – Spirituality Applies Karma

***********

(३-२)

*********************

व्यामिश्रेणइव वाक्येन बुद्धिः मोहयसीव मे।

तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोअहम् आप्नुयाम्।।

*********************

३. २/१ :

"व्यामिश्रेण इव वाक्येन् बुद्धिः मोह यसीव मे"

(Philosophy of Karma, The work)

आपल्या नियतकार्याचा परिणाम दुःखद आहे हे पाहुन कार्य कशासाठी? याचा आढावा अर्जुन घेतो. मनुष्याला मनशांति हवी, सुखसमाधान हवे ही Priority असावी, केवळ पैशाच्या मागे धावुन तणावात जीवन जगणे व आपली शांति गमावणे हे श्रेयस्कर ठरत नाही. असे खाजगीत संभाषण चालत असते. मला राज्याचे सुख नको मग कार्य कशाला? हा अर्जुनाचा प्रश्न असतो.

'मनाची दुर्बलता सोडुन ठरल्याप्रमाणे नियतकार्यास तयार हो' हा अर्जुनाला श्रीकृष्णाचा सल्ला असतो. अर्थात नियतकार्य टाळणे

चुक ठरविले तर मनशांती नसेल तर सुख कोठुन मिळणार असे शांतिचे ज्ञान सांगितले.

न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखम् ।(२-६६)

कार्य केवळ ऐश्वर्य प्राप्तिसाठी असते असेच समाजात ज्ञान असते. व शांतिसाठीच अर्जुनाने कर्म टाळण्याची निवड केलेली असते. कर्म vs. शांति, बुद्धिची स्थिरता हे ऐकुन आधीच गोंधळलेला अर्जुन पुनः गोंधळतो.

व्यामिश्रेण इव वाक्येन् बुद्धिः मोह यसीव मे।

तदेकं वद निश्चित्य श्रेयः अहम् आप्नुयाम् ॥(३-२)

अर्जुन म्हणतो, कर्मापेक्षा बुद्धि/ज्ञान श्रेष्ठ आहे,

दुरेण हि अवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय।(२-४९)

तर घोर कर्माचे प्रयोजन कशाला?

जीवनविकासात कर्माचे प्रयोजन (Philosophy of work) याला highlight करण्यात येते.

प्रत्येक क्षणात क्रिया असते अर्थात कर्म घडत असते. कर्म टाळणे पण मनाने इच्छाचिंतन करणे( यामुळे चिंता करणे) हा मिथ्याचार ठरतो, अर्थात ही मनोवश अवस्था असते. यामुळे अशांत असतो.

म्हणुन आत्मवश होवुन(इंद्रियाचे नियमन)( नियत)कार्य करणे आवश्यक ठरते.

कर्मेंद्रियै कर्मयोगं असक्तः स विशिष्यते।(३-७)

ज्या ज्ञानाने कर्म करुनही मनुष्य अकर्ता जाणतो, कर्म अकर्म होतात, मनुष्य शांति अनुभवतो. ते ज्ञान (Philosophy of work) भगवतगीता स्पष्ट करते. कर्म या संदर्भात स्वभावनियत कार्य(सहजकार्य), यज्ञ तर कर्मफल या संदर्भात निष्काम कर्म, योग हे ज्ञान स्पष्ट केले.

"गहना कर्मणा गतिः"

*******

(३. २)/२:

"तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोअहम् आप्नुयाम् "

(बुद्धिvs कार्य, ज्ञान vsकर्म)

सुखासाठी प्राप्ति व प्राप्तिसाठी कार्य याप्रमाणे "कार्य" या संदर्भात काय हवे? हाच व्यावहारिक प्रश्न अर्जुन जाणतो. व समाजहीतासाठी निष्क्रिय राहणे हेच माझ्यासाठी श्रेयस्कर आहे

ही अर्जुनाची भूमिका असते. येथे "बौद्धिक सक्षमता " या शक्तिविषयी अर्जुन अनभिज्ञ असतो.

मनोवैज्ञानिक बौद्धिक सक्षमता या संदर्भात Intellegent quotient, Emotional quotient, Adverse quotient याचा उपयोग करतात. तर भगवतगीता बौद्धिक सक्षमता या संदर्भात बुद्धियोग, बुद्धियुक्त या शब्दाचा उपयोग करीत आहे.

जगात सामान्य लोकांतुनच महापुरुष, महान लोक निर्माण होतात. या महानतेचे रहस्य काय? हेच रहस्य भगवतगीता उलगडत आहे. मायकेल अॅन्डरसन अपघातात दोन्ही पाय गमावतो. डॉक्टर म्हणतात कुणाच्यातरी मदतीशिवाय तुला जगता येणार नाही, यावर अॅन्डरसन तीव्र प्रतिक्रिया करतो:मी पायाने पंगु झालो आहे, बुद्धिने नाही. मी मानसिक पंगु नाही. मला ईश्वराने प्रयत्नाचे अधिकार दिले आहेत! हा पुढे पायलट होतो. यावरुन स्वतःच्या निर्णयअधिकाराचे(प्रयत्नअधिकाय) ज्ञान नसणे हे मानसिक पंगुत्वच ठरते हे स्पष्ट होते.
आपल्या नियतकार्याचे परिणाम दुःखदायी दिसत असतांना या कार्याचे प्रयोजन श्रेयस्कर कसे? हाच अर्जुनाचा प्रश्न असतो. त्याला बौद्धिक सक्षमता यातुनच दुःखमुक्तिचे ज्ञान कळते.

बौद्धिक सक्षमतेमुळेच आत्मविश्वास, साहस, निर्भयता, स्थिरता(विचलित न होणे) ही शक्ति असते. ही बौद्धिक सक्षमताच जीवनविकासात नित्य विकसित होत असते. तेंव्हा बौद्धिक सक्षमतेचे ज्ञान व महत्व ऐकल्यावर अर्जुन म्हणतो बौद्धिक सक्षमता श्रेष्ठ आहे तर कार्य कशाला?अर्जुन असा प्रश्न करतो. यावेळी त्याला निर्णय करण्यासाठी निश्चित ज्ञान हवे असते. म्हणुन बुद्धितील हा गोंधळ(बुद्धि कि कार्य?) दुर करण्याची विनंति करतो.

व्यामिश्रेणइव वाक्येन बुद्धिः मोहयसीव मे।
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोअहम् आप्नुयाम् ।।(३-२)

१. श्रेष्ठांचा मार्ग:

श्रेष्ठ विकासमार्गावरुन विचलित होत नाही.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

भगवतगीता बौद्धिक सक्षमता याच संदर्भात बुद्धियोग सांगते . याद्वारे मानसिक दुर्बलता/ पंगुत्व दुर करण्यासाठी " योगः कर्मसु कौशलम् " या कार्यकौशल्याचे प्रयोजन सांगते . व याचसाठी "कर्मण्येवाधिकारस्ते"(प्रयत्न अधिकार) याची जागृति करते.

२. निष्काम कर्म:

कार्य घडणे हा प्रकृतिचा धर्म आहे. म्हणुन कार्यसंस्काराचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते, ज्यामुळे आत्मविश्वासाने विकासमार्गावर असतो, कार्यसंस्कार नसलेला इच्छाचिंतनमात्र करीत असतो. अतृप्ति "काम" मध्ये परिवर्तित होते. यामुळे (परिणाम) भय, चिंता असते. म्हणुन कार्यसंस्कारात अनासक्त असणे, निष्काम कार्य याचे महत्व स्पष्ट होते.

तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।(३-१९)

मागणारा (परावलंबि) vs देणारा(स्वावलंबि)

सामान्य लोक ईश्वरश्रद्धा असली तरी फलसिद्धि ईश्वराला मागतात, तर ज्ञानी ईश्वराचेच कार्य ईश्वरभक्तिसाठी करीत असतो.

मत्कर्मकृत् मत्परमो मत्भक्तः संगवर्जितः।(११-५५)

"The decisions you make are a choice of values that reflect your life in every way. "

Alice Waters

******

(३-३)

*********************

लोकेस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मया अनघ।

ज्ञानयोगेन् सांख्यानां कर्मयोगेन् योगीनाम् ।।

*********************

(३-३) :

"लोकेस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मया अनघ"

(कर्म आणि निर्णय/निश्चय)

* जीवनमार्ग :

अर्जुनाच्या स्वभावनियतकार्याप्रमाणेच अर्जुनाला युद्धाचे कार्य नियतकार्य म्हणुन लाभले असते. पण आणिबाणीच्या प्रसंगीच युद्धकर्म टाळुन दुसरा कोणताही मार्ग असेल तर तो अर्जुनाला हवा असतो. स्थितप्रज्ञ, शांति, बुद्धियोग हे शब्द ऐकुन तो गोंधळतो. आधीच गोंधळात सापडलेल्या अर्जुनाला निश्चित ज्ञान हवे असते. याच पार्श्वभुमिवर तो प्रश्न करतो. जीवनविकासात कर्मापेक्षा बुद्धि(/ ज्ञान) श्रेष्ठ तर घोर कर्माचे प्रयोजन कशासाठी?

याच संदर्भात

१जीवनविकासात कर्माची Priority भगवतगीता स्पष्ट करते. (अ. ३)

२. जीवनमार्गात ज्ञान व कर्माचे नाते स्पष्ट करते. (अ. ४)

३. याच आधारावर जीवनमार्ग व ईश्वर यांचे नाते स्पष्ट होते. (अ. ९ )

हे नाते बुद्धियोगाद्वारे स्पष्ट होते.

ददामि बुद्धियोगं तं येन् माम् उपयान्ति ते।(१०-१०)

* कर्म व ईश्वर:

लोकेस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मया अनघ।

ज्ञानयोगेन् सांख्यानां कर्मयोगेन् योगीनाम् ।।(३-३)

विश्वातील कार्याच्या दोन निष्ठा असतात.

१. चांगले-वाईट कार्य, धर्म-अधर्म या संदर्भात स्वधर्म अर्थात स्वतःचे(चांगले/योग्य) कार्य .

२. निर्णय अधिकार वापरुन कार्याचा निश्चय करणे (Determination) व निष्ठेने कार्य(निष्काम कर्म-Detachment) करणे.

१. स्वधर्माचरण ईश्वरसमर्पण कार्य असते, तर २. कर्मयोगात समत्वयोगाने कार्यरत या संदर्भात फल ईश्वराला समर्पित असे अभिप्रेत असते.

ईश्वराचे भक्त या संदर्भात आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु व ज्ञानी असे चार प्रकारचे भक्त असतात. ज्ञान, कर्म व भक्ति यांचा समन्वय ज्ञानी भक्त साध्य करीत असतो.

बहुनां जन्मनाम् अन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते।
वासुदेवः सर्वम् इति स महात्मा सुदुर्लभः॥(७-१९)

* ज्ञान व ईश्वर :

ज्ञान असलेल्याचा जीवनमार्ग पक्का असतो. तर ज्ञान नसणारा Confuse असतो. तरी स्वतःला योग्य ठरविण्यासाठी प्रज्ञावादी भाष्य बोलतो. जीवनविकास/सुखी जीवनाचा मार्ग या संदर्भात

कार्यातील चांगले कार्य-वाईट कार्य, योग्य-अयोग्य या द्वन्द्वापेक्षा ज्ञान श्रेष्ठ असते. याच ज्ञानाचा संबंध ईश्वराशी आहे. तसेच Universal consioussnessशी (ब्रह्म) आहे. हे रहस्यच भगवतगीतेचे महत्वाचे योगदान आहे. याच संदर्भात धर्मापेक्षा ईश्वर श्रेष्ठ म्हटले आहे.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।(२-५०)
अर्थात द्वन्दापेक्षा ज्ञान श्रेष्ठ.
सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।(१८-६६)
अर्थात धर्मापेक्षा ईश्वर श्रेष्ठ.

म्हणुन संदेश आहे,
योगसंन्यस्त कर्माणं ज्ञानसञ्च्छिन्न संशयम् ।

सार :

कर्तृत्वाने जगाचा इतिहास लिहिल्या जातो. आपल्या निष्क्रियतेला आदर्शाचा साज चढवुन स्वतःला ज्ञानी दर्शविणे ही

मनुष्याची संवय असते. याच संवयीला भगवतगीतेने बेनकाब केले आहे.

"Inaction breeds doubt and fear. Action breeds confidence and courage.

Fear is present when we forget that we are a part of God's divine design. Learning to experience authentic love means abandoning ego's insistence that you have much to fear and that you are in an unfriendly world.

You can make the decision to be free from fear and doubt and return to the brilliant light of love that is always with you.

Wayne Dyer

******

(३. ३):

" ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् "

(गहना कर्मणो गतिः/Role of Work in Lifedrive system))

Are we aware of what circumstances drives our life?

व्यवहारात मनुष्य जगत असतो. यानुसारच युद्धकार्य ठरले असते. न्यायदान या संदर्भात त्याला धर्मयुद्ध संबोधण्यात येते. प्रत्यक्ष शस्त्रवर्षाव होण्यापुर्वी अर्जुन शस्त्र म्यान करतो व युद्ध करणे पाप आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान सांगतो. वर्तमानातील मनुष्याची विचारसरणीच त्याची जीवनयात्रा पुढे चालवीत असते. ही विचारसरणी त्याच्या संस्कारातुन बनत असते. या विचारसरणीची कार्य करतांनाची भूमिका व दोष अर्जुनाच्या याच भूमिकेद्वारे दर्शवुन देते.

जसे साधारणपणे मनुष्य व्यवहारात जगत असतो तसाच हा व्यवहार होता. पण या व्यवहाराला अर्जुन धर्माचे वळण देतो, ज्ञानाचे वळण देतो. म्हणुन अर्जुनाच्या विचारसरणीतील दोष दुर करण्याच्या हेतुने धर्माची भूमिका व ज्ञान दोन्ही भगवतगीता स्पष्ट करते. अर्थात वर्तमानातील कार्य करतांनाची विचारसरणी / State of mind हाच भगवतगीतेचा विषय बनतो.

मनुष्याला व्यवहारातील कार्याची ओळख फक्त प्राप्तिसाठी/इच्छापुर्तिसाठी कार्य अशीच असते. ही मर्यादीत ओळख विचारसरणीत दोष निर्माण करते. यामुळे सकाम मानसिकता असते. अर्थात कार्याची/कर्माची मर्यादीत ओळख असल्यामुळे निष्क्रियतेचेही समर्थन धर्म, आदर्श यांचे नांवाखाली

करण्यात येते. याच पार्श्वभुमिवर कर्माची जीवनविकासातील "गहना कर्मणो गतिः" ही विशेष भूमिका व ओळख भगवतगीता करुन देते.

लोकेस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मया अनघ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ।।(३-३)

*स्वधर्मकला(ज्ञानयोगेन सांख्यानां)

मनुष्याला जे कार्य प्रत्यक्षात जमते(सहजकार्य)तेच नियतकार्यासाठी वापरतो. या कार्याला स्वधर्मात transform केले तर कर्म समर्पित निष्ठेने केले जाते.

मनुष्य समुहात जगतो. समुहात असुनही स्वतःला स्वधर्म देण्याची कला साध्य करणे:

समुहात प्रश्न सोडविण्यासाठी विषय ठरतो. मनुष्याला नियतकार्य मिळते. स्वधर्माची जाण असेल तर या विषयाला व त्या संदर्भातील भाष्याला गांभिर्य प्राप्त होते. अन्यथा मनुष्याचा egoself (स्वार्थ) त्या विषयालाच चुकीचे ठरवितो. जसे अर्जुनाने युद्धकार्यालाच (मुळ विषय)चुकीचे ठरविले.

स्वधर्म समुहातील common causeसाठी स्विकारलेल्या नियतकार्याला स्वमंजुरी असते . समर्पण म्हणजे surrender of

governing self for common cause of team. खेळाडु Team(समुह)चे नियम पाळतो. व कार्य teamला समर्पित होवुन करतो. खेळाडु बदलतात पण team कायम असते बदलते ते असत् व बदलत नाही ते सत(शाश्वत) या तत्वावर कर्म शाश्वताला समर्पित होते. निःसंशयपणे समर्पित कार्य घडण्यासाठी अशाश्वत व शाश्वत यांतील भेद भगवतगीता स्पष्ठ करते.

*बुद्धियोग कला(कर्मयोगेन योगिनाम् )

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिःयोगे तु इमां शृणु।

बुद्ध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।।(२-३९)

कार्याच्या परिणामातील अपयशाचा, दुःखाचा संशय कार्यनिश्चय होण्यास अडथळा करतो. म्हणुन कार्यनिश्चय दृढ होण्यासाठी बुद्धियोग म्हणजे ईश्वर ज्ञानाने संशय मिटविणे व योगस्थ वृत्तीने (निष्काम) कार्य योगासाठी करणे.

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्च्छिन्न संशयम् ।(४-४१)

*****

(३. ४)

**********************

न कर्मणाम् अनारंभान् नैष्कर्मं पुरुषो अश्नुते।

न च सन्यसनात् एव सिद्धिं सम् अधिगच्छति।।

*************************

(३. ४):

"न कर्मणाम् अनारंभान् नैष्कर्मं पुरुषो अश्नुते"

मनुष्याचा जीवनप्रवास सुख अनुभवणे या हेतुने सुरु असतो. पण हे जीवन सुखाबरोबर नको असलेले दुःखही अनुभवते. सुखदुःखाच्या या प्रवासात कार्य घडत असते. जगाचा इतिहास कर्तृत्वाने घडलेला असतो. कर्तृत्वानेच मनुष्याची ओळख बनत असते. कर्तृत्वामुळेच समाजात श्रीमंति-गरिबी, श्रेष्ठ-कनिष्ठ असे भेद निर्माण होतात. यामुळेच श्रीमंति म्हणजे सुखी असा समाजात समज असतो. अर्थात सुख आणि कार्य यांचा संबंध आपण व्यवहारात जाणत असतो. भगवतगीतेने याच(कर्म आणि सुख) संबंधाचे शास्त्र बनविले आहे.

व्यवहारात प्रश्न असतात, अडचणी असतात. या अडचणीचे निवारण करण्यासाठी विज्ञान उपलब्ध झाले. ज्ञानविज्ञानामुळे कठिण प्रश्न सोपे झाले. ज्ञान उपलब्ध असले तरी प्रश्न

सोडविण्यासाठी प्रत्यक्ष कर्माची गरज असते. ज्ञान आणि कर्म याद्वारा कार्यकौशल्य बनते.

समाजात मनुष्य जगत असतो व व्यवहारातील प्रश्नाशी deal करण्याचे कौशल्य नसेल तर अशांत असतो. या अशांतीवर उपाय म्हणुन नकारात्मक भाष्य बोलत असतो. ही अज्ञानाची देण असते. प्रश्न सोडविण्याचे कौशल्य नसेल तर मनुष्याच्या इच्छेचे चिंतेत रुपांतर होते. इच्छांना मर्यादा नसते, कौशल्याअभावी इच्छेचेच "काम" मध्ये रुपांतर होते. यामुळेच अशांती असते. मनसमाधानासाठी मात्र मनुष्य भाष्य बोलत असतो. हा मिथ्याचार ठरतो.

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान् विमुढात्मा मिथ्याचारः स उच्यते।।(३-६)

दुःखामुळे अर्जुनाला अशांती येते. दुःख टाळण्यासाठी कर्म टाळतो व निष्क्रियतेला "ज्ञान" दर्शवितो. अर्थात मनसमाधानासाठी हे "ज्ञान" बोलल्या जाते. पण ते दुःखाशी deal करण्याचे ज्ञान नसते. याच पार्श्वभुमिवर जीवनाचे ज्ञान व त्यांत कर्माची भूमिका हा विषय चर्चेला येतो.

समाजात ईश्वरभक्ति मनुष्य जाणतो. याच ईश्वरश्रद्धेचा उपयोग भगवतगीतेने ज्ञानासाठी केलेला आहे. (श्रद्धावान लभते ज्ञानं) व कार्याद्वारे ईश्वरभक्ति घडण्यासाठी जीवनाचा शाश्वत विकासमार्ग(अमृतंगमय) सांगितला. ही ईश्वरभक्ति ईश्वराला कार्यसमर्पण/फलसमर्पण (फलत्याग) अर्थात निष्काम कर्मासाठी असते. यामुळे नैष्कर्मसिद्धि/योग(दुःखान्त स्थिति) लाभ होतो, अर्थात शांति, निर्भयता अनुभवतो. बुद्धिची स्थितप्रज्ञ अवस्था (विचलित न होणे, समुद्रशांति) लाभते.

यावर अर्जुन प्रश्न करतो, बुद्धिची स्थिरता साध्य करायची तर कष्टमय कर्म कशाला करायचे?

- संपत्ति, इस्टेट ७ पिढ्यांना पुरेल इतकी आहे तर कर्म करण्याची येणाऱ्या पिढीला गरज नाही अशा आशयाचे भाष्य समाजात ऐकायला मिळते. (मनुष्य आपल्या संपत्तिचा अभिमानाने उल्लेख करीत असतो. )अशाच आशयाचा अर्जुनाचा प्रश्न असतो. म्हणुन उत्तर येते,

न कर्मणाम् अनारंभान् नैष्कर्म्यं पुरुषो अश्नुते।(३-४)

अर्थात कर्मच टाळले तर नैष्कर्मसिद्धि, फलत्यागाची शांति कशी अनुभवणार?

याच पार्श्वभुमिवर जीवनाचा शाश्वत मार्ग असतो. ज्यामुळे वर्तमानात सुखशांति अनुभवतो. याच आधारावर वर्तमानात जगण्याचे संस्कार निश्चित होते.

*नैष्कर्मसिद्धि, फलत्याग याचे साधन (निष्काम)कर्म आहे.

*कर्माचे साधन व्यवहारधर्म असतो. व्यवहारातील प्रश्न, अडचणी कार्यसंधीच देत असतात.

(अर्जुनाला अडचण जाणवली, ही त्याच्यासाठी शाश्वत विकासमार्गातील- आत्मोन्नतिची संधी असते)

म्हणुन वर्तमानात शांति अनुभवण्यासाठी कार्यकौशल्य संस्कार आवश्यक असतो. ज्यामुळे इंद्रियांचे नियमन (Regulating senses) होते. व आत्मवश असतो.

यः तु इंद्रियाणि मनसा नियम्य आरभते अर्जुन।
कर्मेंद्रियेः कर्मयोगं असक्तः स विशिष्यते।।(३-७)

******

(३-४) :

" न च संन्यसनात् एव सिद्धिं समधिगच्छति"

(यशस्वि जीवनासाठी कर्म आवश्यक)

जीवनविकास कार्याद्वारे होत असतो. कार्यरत असणारे व्यस्त(busy) असतात. व्यस्त असणारे कुणी प्रसन्न, शांत असतात तर कुणी अशांत असतात.

-अर्जुन अशांतिवर मात करण्यासाठी निष्क्रियता पसंद करतो. कांहीच मिळवायचे नाही तर घोर कर्म कशाला करायचे?"ना रहे बांस ना बजे बांसुरी". या तत्वानुसार कार्यच टाळतो. पण मनाची अशांति मिटत नाही.

-जे प्रसन्न असतात त्यांना कार्यसंस्कार असतात. युक्त असतात. हाच भगवदगीतेचा विषय आहे.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते।।(५-१२)

१. कार्यसंस्कारात स्वभावनियत (सहज) कार्य, स्वधर्म, निर्णयअधिकार, कार्याचा एकनिश्चय, निष्काम कार्य, अकर्म, सिद्धि-असिद्धि यांत समत्वयोग साधुन कार्य करणे यांचा समावेश होतो.

न कर्मणाम् अनारंभान् नैष्कर्म्यं पुरुषो अश्नुते।(३-४)

२. जगात कार्यरत राहुन सिद्धि (यश) प्राप्त करणारे योग्य विचार करतात. अर्थात शहाणे ठरतात. तर अर्जुन चुकीचे विचार करुनही स्वतःला योग्य (शहाणा) सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञानाचा आश्रय करतो. प्रत्यक्षात येथे अहंकाराचा आश्रय असतो. अहंकाराचा त्याग केल्याशिवाय सिद्धि प्राप्त होत नाही. (यासाठी ईश्वराचा आश्रय हे प्रयोजन आहे. )

न च संन्यसनात् एव सिद्धिं समधिगच्छति॥(३-४)

सार :

मनुष्याला सुख हवे अर्थात यासाठी जीवनात यश हवे, शांति हवी. या संदर्भात योग्य विचार करणारा सुखी असतो. अयोग्य विचार करणारा अशांत असतो. म्हणुन सुखी जीवनासाठी योग्य विचार करणे(ज्ञान) हा भगवदगीतेचा विषय आहे. याच संदर्भात म्हटले आहे, निष्क्रिय राहुन ना यश मिळते ना शांति!तर अनासक्त राहुन (आत्मवश) कार्यरत असणे हा योग्य विचार (ज्ञान) ठरतो.

तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर।(३-१९)

***********

(३. ५)

************************

न हि कश्चित् क्षणम्अपि जातु तिष्ठति अकर्मकृत् ।

कार्यते हि अवशः कर्म सर्वः प्रकृतिःजैर्गुणे।।

************************

(३. ५)/१ :"न हि कश्चित् क्षणम् अपि जातु तिष्ठति अकर्मकृत् "

*जीवनात प्रत्येक क्षणात कार्य(शरीर, वाचा, मन activity)घडते.
न हि कश्चित् क्षणम् अपि जातु तिष्ठति अकर्मकृत् ।(३-५)
*मनुष्य जे करतो, ते योग्य समजुनच!व निष्क्रिय झाला तरी मी योग्य समजुनच समर्थन करतो.
*जे जीवन मिळाले आहे, ते एकदाच मिळाले असते.

जीवनातील या तीन सत्याचे आधारावर कर्म, ज्ञान व भक्ति(विकास) चा समन्वय साधणारे ज्ञान भगवतगीतेत आलेले आहे. विकासमार्गावर असणारा विश्वासाने मार्गक्रमण करतो व सुखशांति अनुभवतो.

"कर्म" या संदर्भात अर्जुनाला संशय येतो. व यामुळे हा विषय येथे केंद्रबिंदु ठरला आहे. कर्म संदर्भातच मला काय मिळेल ज्यामुळे मी सुखी होईल, तसेच दुःख मिळणार नाही ही नैसर्गिक भावना असते, अर्थात मनुष्य स्वतःला काय मिळेल या हेतुने सकाम कार्य करतो. कर्मातील लाभ-हानि यामुळे कर्मात इच्छा-द्वेष असते. चांगले कर्म या संदर्भात धर्मात स्वर्गलाभ व नरकभय या अनुषंगाने "योग्य" ची निवड होते. अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतांना हीच भाषा वापरतो.

प्रथम लाभ-हानि या संदर्भात उत्तर मिळते. धर्म संदर्भात "स्वधर्माचरण"करणे हे तुझ्या स्वभावनियत कार्याला मिळालेली स्वर्गसंधी आहे. युद्ध जिंकलास तर राज्य भोग घेशील व मृत्यु आला तर स्वर्ग मिळेल.

अर्जुनासमोर उभा झालेला प्रश्न लाभ-हानीचा नसतो. तो म्हणतो, माझे नियतकार्य(युद्ध) योग्य कसे?व योग्य असले तरी दुःखप्राप्ति होईल. त्यापासुन मुक्ति कशी मिळेल!हा प्रश्न "आसमांसे गिरा खजुरमे लटका" असा असतो. यामुळे लाभ-हानिच्या या उत्तरामुळे त्याचे समाधान होत नाही. येथे भगवतगीता मुख्य मुद्यावर येते.

जीवनात Stress निर्माण होण्याचे कारण वर्तमानात अशांतीने जगणे असते(Path guided by fear). हा विषय मानसशास्त्राचा असतो. मानसिक समाधानासाठीच अर्जुन युद्ध टाळतो व आपली भूमिका धार्मिक आहे असे समर्थन करतो. मानसिक अशांतिमुळे बुद्धि भ्रम पावते. म्हणुन स्थिर बुद्धि धारण(भ्रममुक्त) होण्यासाठी बुद्धियोग ज्ञान सांगितले.

बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)

*बुद्धियोग

सत, रज, तम गुणयुक्त प्रकृति व पुरुष (व ईश्वर) याचे ज्ञानविज्ञान सांगते. (शाश्वत)ईश्वराचे ज्ञान जाणणारा शाश्वत विकासाचा मार्ग(अमृतंगमय) जाणतो. यालाच बुद्धियोग म्हटले आहे.
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

*निर्द्वंद्व

अर्जुन वर्तमानात विचलित झालेला असतो, त्याला अशांति असते. म्हणुन मानसिक शांति व विश्वास हवा असतो. तेंव्हा

त्याला शांतिसाठी "योग(दुःखान्त)"ज्ञान, व विश्वासासाठी योग्य-अयोग्य मुक्त कर्मज्ञान(निर्द्वंद्व) सांगितले जाते.

निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान।(२-४५)

निर्द्वंद्वाशिवाय येथे "आत्मवान(आत्मवश)", "सत्वस्थो (सत)", "निर्योगक्षेम (निष्काम)" शब्दांचा उल्लेख आहे.

*आत्मवान

आधुनिक मानसशास्त्र Consciousness चा उपयोग करते. या आधारावर Lower consciousness (मन-senses mind) व Higher consciousness (उच्च चेतना) यांतील भेद स्पष्ट होतो. भगवतगीता मनोवश(यत् मनोअनुविधियते) व आत्मवश अवस्था याचे ज्ञान अवगत करते. ज्यामुळे उच्च चेतना जागृत असते(Activation of higher consciousness)व Thinking Pattern बदलते.

*सत

योग्य-अयोग्यचा भेद जाणुन "योग्य"(Rightous) आचरण्याचे धैर्य या संदर्भात भगवतगीता बुद्धि व धृति यांतील सत, रज, तम mode चे ज्ञान अवगत करते. व सत mode मध्ये जगण्याचे महत्व स्पष्ट करते.

सत mode:बंधन-मोक्ष या आधारावर "योग्य"चे निश्चित ज्ञान जाणणे ही सात्विक बुद्धि व "योग्य" चे आचरण करण्याचे धैर्य असणे ही सात्विक धृति असते.

तम mode :अधर्माला धर्म व धर्माला अधर्म अशी विपरित मानसिकता तामसी बुद्धिमुळे असते. भय, विषादी, आळशी, शोकग्रस्त मानसिकता तामसी धृति असते. यामुळेच नकारात्मकता असते.

*निर्योगक्षेम(निष्काम)

निर्द्वंद्व अवस्था योग्य-अयोग्य संदर्भात मार्ग निश्चित करण्यासाठी व परिणाम भयापासुन मुक्तिसाठी (लाभ-हानि) निष्काम अवस्था अर्थात योगस्थ अवस्था धारण होण्यासाठी उपयुक्त असते. म्हणुन येथे निर्णय अधिकार, कार्याचा दृढनिश्चय, समत्वयोगाने कार्य execute करणे या कार्यकौशल्याचे महत्व highlight होते.

"योगः कर्मसु कौशलम् "

*व्यावहारिक बोध:

मनुष्याची मानसिकता जशी असते, तसा तो "योग्य" ठरवित असतो. जेंव्हा आपले मत योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान बोलतो, तेंव्हा या भाष्याच्या मुळाशी असलेला "विषय" त्याचेसाठी महत्वाचा असतो. अर्जुन समर्थन करतो तेंव्हा त्याचा विषय "युद्ध न करणे" हा असतो. पण वास्तव स्विकारतो, तेंव्हा विषयच बदलतो. तेंव्हा विषय बनतो, "कार्यातुन शोकमुक्ति ". भाष्याला भाष्याचा "विषय" (Interest) कारण असतो.

याचाच अर्थ वास्तव स्विकारणे वा न स्विकारणे हा सुद्धा मानसिकतेचा विषय असतो. समाजात प्रश्न असुनही संवाद न होण्याचे कारण वास्तव न स्विकारणे हेच असते. वास्तव स्विकारले तरच संवाद होवु शकतो. योग्य-अयोग्य यावर भाष्य होवु शकते, पण कर्म संदर्भात निर्णय मात्र स्वतःला घ्यावा लागतो. कर्मयोगात (कर्मण्येवाधिकारस्ते) निर्णय अधिकार महत्वाचा असतो . श्रीकृष्ण शेवटी म्हणतात,

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)

याप्रमाणे निर्णयअधिकार व निकोप संवादशास्त्र याद्वारे भगवतगीता मनुष्यजीवनातील स्वातंत्र्याच्या मुलभूत तत्वाचा परिचय देते.

********

३. ५:(२)

"कार्यते हि अवशः कर्म सर्वः प्रकृतिजैः गुणे"

(कार्यप्रवाह)

कार्यरत असणे प्रकृतिचा धर्म आहे. हे कार्य शरीर (काया), भाष्य(वाचा) व मन(विचार, Thinking) याद्वारा होत असते. कोणताही क्षण कार्याविणा नसतो. जसे पाणी जमिनीवर पडते व वाट मिळेल तिकडे वहात असते. पण नदीचा प्रवाह समुद्रालाच निश्चितपणे मिळत असतो. वहाणाऱ्या प्रवाहाचेच नियोजन करुन उर्जा बनते. धरणे बनतात. तसेच कार्याचे नियोजन वा संस्कार असतो, ज्यामुळे विकास होतो. अर्थात कार्य टाळले तरी (प्रकृतिला वश असल्यामुळे) कार्य घडणारच, तर कार्यसंस्कारामुळे जीवनविकास साध्य होतो, सुख (नैष्कर्मसिद्धि,

योग) लाभते. यासाठी कार्यकौशल्य हाच भगवतगीतेचा विषय आहे.

न हि कश्चित् क्षणम् अपि जातु तिष्ठति अकर्मकृत् ।
कार्यते हि अवशः कर्म सर्वः प्रकृतिजैः गुणे॥(३-५)

समाजात बेरोजगारी, चांगल्या कार्याची वाणवा, विशिष्ट कार्याची गरज, मानसिक तणाव(Stress) यावर चर्चा होते. समाजात "धर्म" या संदर्भात चांगलेपणाला तोंडी प्रोत्साहन असते तर प्रत्यक्ष व्यवहारात "Survival " या संदर्भात भाष्याची, विचाराची चलन असते.

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते॥(३-६)
यामुळे चांगला असला तरी निष्क्रियतेचे समर्थन होत असते. यासाठी "ज्ञान" बोलल्या जाते. जणु ज्ञानाचा महापुर वहात आहे असा भास होतो. व समाजात ज्ञानी असुनही प्रश्न कां सुटत नाही याचे आश्चर्य वाटते.

ज्ञान असेल तर Nothing is impossible हा विश्वास मिळतो. याचमुळे ज्ञानाला भगवतगीतेने जगात सर्वश्रेष्ठ म्हटलेले आहे. जीवनमार्गात ज्ञानामुळे संशय मिटतो, कार्यनिश्चय होतो. कार्याद्वारेच विकास होतो. अर्थात कार्यसंस्कारामुळे ज्ञानाला उचीत न्याय मिळतो. युरोपात विज्ञानक्रांती झाली व १५वे शतक Enlightenment Age म्हणुन ओळखल्या गेले. जगभर युरोपीयन व्यवसायासाठी प्रवासाला निघाले. यानंतर यंत्रक्रांति (उद्योग)झाली.

भगवतगीतेत ईश्वर, अध्यात्म यांचा संबंध ज्ञानविज्ञानाशी जोडलेला आहे. जीवनमार्गात दुःख येते. दुःख टाळण्यासाठी मनुष्य कार्यच टाळतो. तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो. Judgement thinking चा वापर करतो. भगवतगीता दुःखाशी deal करण्यासाठी ईश्वरभक्ति सांगत आहे.
(योग म्हणजे दुःखान्त)
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

१. विश्वाचा अध्यक्ष अशी ईश्वराची ओळख करुन त्याच्या भक्तित रमणे यामुळे बुद्धियोग प्राप्त होतो, ज्यामुळे जीवनविकासाचा

Standard मार्ग(अमृतत्वाय कल्पते) कळतो. या मार्गावर ईश्वरभक्ति घडते.
ददामि बुद्धियोगं तं येन् माम् उपयान्ति ते।(१०-१०)

या मार्गावर निष्काम कर्म घडते, विचलित न होता निष्ठा असते. कार्याचा एकनिश्चय असतो. यांत स्वधर्म (Tiebreaker, Self approval) व स्वतःचा निर्णय अधिकार यांचे महत्व कळते. कार्याद्वारा भक्ति म्हणजेच योग(दुःखान्त) साधना असते.

२. या ज्ञानामुळे Consciousness (Functioning of mind) या संदर्भात Lower व Higher Consciousness, Lower व Higher Self यातील भेद कळतो. Lower consciousness मुळे मनोवश व Higher consciousness मुळे आत्मवश अवस्था असते. विचलित होण्याला मनोवश अवस्था कारण असते. याचमुळे आत्मवश अवस्थेचे महत्व कळते. या अवस्थेत स्वतः स्वतःचा बंधु असतो.

सार:

“Plan your work and work your plan. ” Napoleon Hill

समाजात मनुष्याच्या निष्क्रियतेचे समर्थन होणे कदापि उचीत ठरत नाही. जीवनाचा प्रवाह हा कार्याचाच प्रवाह अाहे असे जाणुन या प्रवाहाला निश्चित दिशा देणे आवश्यक ठरते. जसे पाण्याच्या प्रवाहाला निश्चित दिशा मिळते व अखेर समुद्रालाच हा प्रवाह मिळतो तसे सर्व कार्यप्रवाहाचे ज्ञानात विलिनिकरण होते. म्हणुन ज्ञानी व समुद्रशांति यातील साधर्म्य जाणणे महत्वाचे ठरते, ज्यामुळे ईश्वरज्ञानाचे, "अमृतत्वाय कल्पते" या Standard मार्गाचे महत्व कळते.

सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

*****

(३-६)

**********************

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्।

इंद्रियार्थान् विमुढात्मा " मिथ्याचारः स उच्यते"।।

**********************

(३. ६)१ :

"कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् "

(Hypocracy/Ignorance)

* ज्ञान-कर्म-भक्ति

ज्ञान जगात सर्वश्रेष्ठ आहे, तर मनुष्यजीवनात कर्म विकासाचे साधन आहे. या अनुषंगाने जीवनविकासात कर्म व ज्ञान यांचा परस्पर संबंध भगवतगीतेने स्पष्ट केला आहे.

जीवनविकासातील "ज्ञान" या संदर्भातच ईश्वराची ओळख दिलेली आहे. हाच आधार "भक्ति "या संदर्भात आहे.

१. Consciousness चे ज्ञान (मनोवश vs आत्मवश),

२. जीवनविकासाचा Standard मार्ग (अमृतत्वाय कल्पते २-१५)

३. कार्याद्वारे ईश्वरभक्ति (कार्यसमर्पण, फलसमर्पण) .

याप्रमाणे जीवनविकासात ज्ञान, कर्म व भक्ति यांची भूमिका स्पष्ट होते.

* अडथळा/अज्ञान:

मनुष्य चांगला आहे कि वाईट!असे भाष्य समाजात चालते. ज्ञानी या संदर्भात मनुष्यजीवनात चांगले-वाईट, पाप-पुण्य याचा आधारच ज्ञान-अज्ञान असते हा भगवतगीतेचा संदेश आहे. मार्गातील द्वंद्व अज्ञान असते. "चांगले" या संदर्भात अमुक केले तर तमुकाला काय वाटेल असे द्वंद्व उभे होत असतात. मार्गात कार्यनिश्चय होत नाही, यामुळे या द्वंद्वाचा परिणाम निष्क्रियतेत होतो.

यततो हि अपि कौंतेय पुरुषश्च विपश्चितः।

इंद्रियाणि प्रमाथिनि हरन्ति प्रसभं मनः॥(२-६०)

मनुष्य विद्वान असला ( मनोवश- आत्मवश भेद जाणत असला) तरी मनोवश होतो. अर्जुन विद्वान असतो, चांगला असतो पण निष्क्रियतेचे समर्थन करतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. येथे कार्य व ज्ञान यांचा चुकीचा संबंध जोडल्या जातो. याला अज्ञान (Ignorance)कारण असते. निष्क्रियता असते पण मनाने(इच्छा, विषय) चिंतन करतो, याला ढोंगी(Hypocrat) संबोधले.

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते।।(३-६)

"The day you take complete responsibility for yourself, the day you stop making any excuses, that's the day you start to the top. "
O. J. Simpson

स्वतःची स्वतःवर command अर्थात मनावर नियंत्रण (आत्मवश) या संदर्भात भगवतगीतेत कर्मयोगाचे महत्व स्पष्ट केले आहे.

यः तु इंद्रियाणि मनसा नियम्य आरभते अर्जुन।
कर्मेंद्रियै कर्मयोगं असक्तः स विशिष्यते॥(३-७)

* कार्यकौशल्य :

जो मार्ग चालतो त्यालाच अडथळयाची जाणिव होते. जो कार्यरत असतो, त्यालाच चुक किंवा अज्ञानाची जाणिव होते. अडथळयाच्या भयाने कांहीच करीत नाही अर्थात निष्क्रिय असतो तो अज्ञान ठरतो. म्हणुन कार्यकौशल्य या संदर्भात ज्ञानाने संशय छेदणे व योगासाठी कार्यरत असणे यात ज्ञानाचा उपयोग स्पष्ट होतो.
योगः कर्मसु कौशलम् (२-५०)

योगसंन्यस्त कर्माणं ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम् ।(४-४१)

कार्यरत होण्यासाठी ज्ञानाचा उपयोग करणे . अखेर सर्व कर्माचे ज्ञानातच विलिनिकरण होते. या संपुर्ण प्रक्रियेला भगवतगीता कार्यकौशल्य संबोधते.
सर्वं कर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

जीवनविकासातील ज्ञान या संदर्भातच ईश्वराची ओळख दिलेली आहे. अर्थात जीवनमार्गात ईश्वराचा आश्रय हा ज्ञानाचा आश्रय असतो. या ज्ञानामुळे कार्याचा एकनिश्चय होतो. जीवनविकासात कार्याद्वारे ईश्वरभक्ति ही प्रक्रिया "तमसो मा ज्योतिर्गमय" अर्थात अज्ञानाकडुन ज्ञानाकडे अशी होते. हा सुखी जीवनाचा मार्ग ठरतो.

यः अंतः सुखः अंतः आरामः तथा अंतःज्योतिः एव यः।(५-२४)

******

(३. ६)/२:

"इंद्रियार्थान विमूढात्मा मिथ्याचारः सः उच्यते"

(निरर्थक भाष्य करणे vs विकासमार्गावर असणे)

अध्यात्म, ईश्वर या विषयाचा व्यवहाराशी कांही संबंध नाही, कारण जे प्रत्यक्षात घडत आहे ते व्यावहारिक जग सत्य आहे, practical आहे. अशी कांही लोकांची समजुत असते. तर "ब्रह्म

सत्य जगत मिथ्या"या वचनावर "अरे संसार संसार" या संतबहिणाबाईच्या कवितेने उत्तर दिले. "आधी हाताले चटके मग मिळते भाकर". याच संदर्भात निश्चित भाष्य भगवतगीता करीत आहे.

अर्जुनाला व्यवहारमार्गातच अडचण जाणवली. (पांडवावर झालेल्या अन्यायावर धर्मयुद्ध हा उपाय ठरला. याचाच भाग अर्जुनाचे नियतकार्य होते)याच मार्गावरील अडचणीचे निराकरण करुन अडथळा दुर करणे यासाठी अध्यात्म, ईश्वर हा विषय भगवतगीतेत आला.

जे जीवनाच्या विकासमार्गावर असतात, त्यांचा मार्ग पक्का असतो, अडचणीने विचलित होत नाही. जीवनयात्रेतील विकासाचा हा Standard मार्ग आहे. याच मार्गावर असलेले महान कार्य करतात.

इंद्रियार्थान विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते।(३-६)
व्यवहारात मनुष्याने मला कांही नको असे म्हणुन निष्क्रिय झाला तरी शरीरयात्रा, योगक्षेम चालवावाच लागतो. मनुष्याला इच्छा असते, प्रश्न असतात यासाठी कार्यरत होणे गरज असते. म्हणुन

निष्क्रियतेचे समर्थन करणे मिथ्याचार ठरतो. कार्यज्ञान नसणे किंवा कार्य टाळणे यामुळे केवळ इच्छाचिंतन करतो व "नाचता येईना अंगण वाकडे" असे प्रज्ञावादी(बौद्धिक)भाष्य बोलत असतो.

समाजात कुणी आपले हीत साधण्यासाठी भाष्य बोलतात, कुणी निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी भाष्य करतात. अशा भाष्याचा बोलबाला असतो व गोंधळाची स्थिति निर्माण होते. म्हणुन वास्तव स्विकारणे आवश्यक असते. अर्जुनाने वास्तव स्विकारले तेंव्हा प्रश्न व चर्चेचा विषय clear झाला. भोगैश्वर्य नको आहे म्हणुन कार्य करणार नाही ही अर्जुनाची भूमिका असते. पण कार्य आवश्यक आहे हे ऐकल्यावर मला दुःख नको आहे म्हणुन कार्य करणार नाही ही भूमिका घेतो.
न योत्स्य इति गोविंदम् उक्त्वा तूष्णि बभुव ह ।(२-९)

याच पार्श्वभूमिवर दुःखमुक्तिसाठी ईश्वरज्ञान हा विषय येतो.
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)
जीवनविकासमार्गात नित्य ईश्वराचा आश्रय व ईश्वराची भक्ति होण्यासाठी विकासाचा Standard मार्ग "अमृतत्वाय कल्पते" बनतो. या मार्गावर यात्रा होत असता कार्याचा निश्चय असतो, अडचणीमुळे व्यथित होत नाही, कार्याद्वारे भक्ति घडते. या

मार्गावर व्यवहारमार्गातील नियतकार्य स्वधर्म जाणतो, व्यवहारमार्गात स्वतःचा निर्णयअधिकार जाणतो व विकासमार्गावर कार्याचा दृढनिश्चय करतो. समत्वयोगाने कार्य करणे हे "योगः कर्मसु कौशलम्" साध्य करतो. हाच दुःखमुक्तिचा मार्ग असतो.

व्यावहारिक बोध: जे विकासमार्गावर नसतात ते केवळ Survival साठी जगत असतात, याचमुळे द्वंद्वाच्या जाळयात सापडुन मोह पावतात. म्हणुन स्वतःचा जीवनविकासमार्ग पक्का असणे ही मनुष्याची Priority असली पाहिजे. चंचलतेमुळे कार्यनिश्चय होण्यास अडथळा येतो. म्हणुन दृढनिश्चय होणे व निष्काम कर्म घडणे यासाठी बुद्धियोगनिष्ठा भगवतगीता सांगत आहे.
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।(७-२८)

******

(३. ६)/३ : "मिथ्याचारः स उच्यते"

भगवतगीता जीवनविकासाचे व्यवस्थापनशास्त्र सांगते. याच संदर्भात विकासमार्गावर असतांना मनःशांती manage करणे या संदर्भात भगवतगीता म्हणते,

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्।
इंद्रियार्थान् विमुढात्मा " मिथ्याचारः स उच्यते"॥(३-६)

"Unfulfilled expectations always cause problems. Blaming others for the pain we feel each time someone fails to live up to our expectations is no different than burning our tongue on coffee that's too hot to swallow, and then calling our cup an idiot! "
- Guy Finley

जगात घटना घडत असतात. निसर्गाच्या व्यवस्थापनातील शक्तिचे शोध याच घटनांमधुन झालेले आहेत, होत आहेत. यामुळे ज्ञानविज्ञान आले. जगामध्ये ज्ञानविज्ञानाची दृष्टि आली. ज्ञानविज्ञानातील दृष्टिचा अवलंब झाल्यामुळे अशक्य गोष्टी शक्य व्हायला लागल्या. मनुष्य स्वप्न साकार करु शकला. यामुळे

वर्तमानात जगामध्ये शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले. शिक्षणातील विद्येचा उपयोग व्यवहारातील कार्यात व्हायला लागला.

जागतिक घडामोडीतील हे परिवर्तन जग/मनुष्य अनुभवित आहे. हे खरे असले तरी पारंपरिक Belief System व अद्यावत ज्ञानविज्ञान यांतील संघर्षही जग अनुभवत असते, तसेच मनुष्य अनुभव करीत असतो. याच संदर्भात व्यक्तिगत पातळीवर मनुष्याला विकासमार्गावर चालता यावे, यासाठी ज्ञानाची दृष्टि असावी. हा भगवतगीतेचा संदेश आहे.

याच संदर्भात भगवतगीता विकासमार्गाचे व्यवस्थापन ज्ञान सांगते. कार्यसंस्कारित असलेला स्वतःच्या व्यावहारिक नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करतो व स्वतःच्या मार्गाची जबाबदारी स्विकारतो. निर्णयसंस्कारीत असतो, स्वतःच्या कार्याचा दृढनिश्चय करतो. योगस्थ वृत्तीने कार्य, (निर्णय) execute करतो. व अनासक्ति(मनःशांती) अनुभवतो.

यः तु इंद्रियाणि मनसा नियम्य आरभते अर्जुन।
कर्मेंद्रियैः कर्मयोगं असक्तः स विशिष्यते।।(३-७)

याप्रमाणे व्यक्तिगत पातळीवर मनुष्याला विकासमार्गावर चालता यावे यासाठी ज्ञानाची दृष्टि असावी. हा भगवतगीतेचा संदेश आहे व यासाठीच "बुद्धियोगाचे" महत्व स्पष्ट केले आहे. अन्यथा(याच ज्ञानाच्या अज्ञानामुळे) मनुष्याने कार्य टाळले तरी मनात इच्छा, अपेक्षांचे चिंतन असते व यामुळे (अतृप्तिमुळे) चिंता, भय, ईर्षा, क्रोध इ. विकाराने ग्रस्त असतो. व (अज्ञानी स्थिति असुनही) स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी Judgement thinkingचा वापर करुन नकारात्मक भाष्य बोलत असतो. यामुळे स्वतः तर भ्रमात असतोच पण इतरांचाही भ्रम करीत असतो. म्हणुन या स्थितिला "विमुढात्मा"/" मिथ्याचारी" अशा कठोर शब्दाने भगवतगीता संबोधित आहे.

*******

(३-७)

**********************

यः तु इंद्रियाणि मनसा नियम्य आरभते अर्जुन।

कर्मेंद्रियैः कर्मयोगं असक्तः स विशिष्यते ।।

************************

३-७ :

"यः तु इंद्रियाणि मनसा नियम्य आरभते अर्जुन"

(कार्यसंस्कार)

जीवन हे जीवनयात्राच असते. यात्रेत मार्गाचे ज्ञान आवश्यक असते. कर्म, ज्ञान व भक्ति या मार्गाचाच भाग असतो.

ज्ञान -मार्गदर्शक, प्रकाश

कर्म -विकाससाधन, Determintion

भक्ति-समर्पण Devotion, Excellence

कर्म :

कर्माद्वारेच विकास होतो व श्रेष्ठांनी (गरज नसली तरी) कर्माचाच आदर्श लोकांमध्ये ठेवावा हा संदेश भगवतगीता देते व कर्माचे जीवनातील महत्व स्पष्ट करते.

मनुष्यजीवनात प्रत्येक क्षणात कार्य घडत राहते. पण याचे ज्ञान नसते. प्रत्यक्षात मनुष्य कर्मानेच विकास साध्य करीत असतो. यासाठी जे त्याला जमते अर्थात स्वभावनियत कार्य करीत असतो.

भगवतगीतेतील "प्रकाश" या संदर्भात ज्ञानाचे महत्व, Devotion निष्ठा या संदर्भात भक्तिचे महत्व जाणुन कार्यसंस्कारीत होणे, आत्मवश असणे "इंद्रियाचे नियमन " ठरते. इंद्रियावर अर्थात स्वतःवर Command ठरते. ज्याची स्वतःवर command नाही, तो स्वैर ठरतो, अर्थात अज्ञानामुळे कर्म टाळले तरी मनाने चिंतन करीत असतो तेंव्हा ढोंगी ठरतो.

"मिथ्याचारः स उच्यते"(३-६)

यः तु इंद्रियाणि मनसा नियम्य आरभते अर्जुन।

कर्मन्द्रियैः कर्मयोगं असक्तः स विशिष्यते।।(३-७)

"The will to win, the desire to succeed, the urge to reach your full potential... these are the keys that will unlock the door to personal excellence. "

Confucius

ज्ञान:

विश्वात ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे. ज्ञान अंधार मिटविणारा प्रकाश आहे. ज्ञानाने मार्गदर्शन होते. संशयमुक्त होवुन कार्याचा एकनिश्चय (Determination) होतो. अर्थात कार्यासाठी ज्ञानाचा वापर होतो!पण अर्जुन निष्क्रियतेला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो व याचीच दखल भगवतगीतेने घेतली आहे.

अहंकाराचा आश्रय असल्यामुळे स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी अर्जुन ज्ञानाचा वापर करतो. सर्व सृष्टिचे मुळ असलेल्या ईश्वराची "ज्ञान" या संदर्भात ओळख झाली तर ईश्वरज्ञानाने अहंकाराचा आश्रय Replace होतो. सर्व कर्माचे याच ज्ञानात विलिनीकरण होते.

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन् भारत।(१८-६२)

भक्ति:

कार्याचा निश्चय (Determination) हा कार्याचा एक पैलु तर दुसरा Devotion (निष्ठा) असतो. जे कार्य करतो ते निष्ठेने करणे (Excellence) . व याचसाठी कार्याला ईश्वराशी जोडले अर्थात ज्ञान व भक्तिशी जोडले.

व्यवहारात कार्य सकाम असते, तर "अमृतंगमय" या मार्गावर (भगवतगीतेच्या भाषेत 'अमृतत्वाय कल्पते') कार्याद्वारे ईश्वरभक्ति घडते. हे निष्काम कार्य असते. Devotion या संदर्भात ही क्रिया कार्य ईश्वराला समर्पण अथवा कर्मफलत्याग असतो. हेच (व्यवहारमार्ग ते 'अमृतत्वाय कल्पते ' ) Transformation असते. Consciousness चे (Lower to Higher) असते.

ज्ञान या संदर्भात ईश्वराची ओळख झाली तर ईश्वरश्रद्ध व्यक्तीचा सकाम (व्यवहारमार्ग) निष्काम कार्यात याप्रमाणे Transform होतो.

"The great aim of education is not mere knowledge but action. "

Herbert Spencer

*******

(३-७):

"कर्मेंद्रियैः कर्मयोगं असक्तः स विशिष्यते"

मनुष्यजीवनात कार्याची विकासात महत्वाची भूमिका असते. कर्तृत्वानेच इतिहास घडत असतो. अर्जुनाला आपल्या कार्यक्षमतेविषयी आत्मविश्वास होता. मनुष्य सुखासाठी कार्य करतो, पण येथे(युद्धकार्य) तर दुःखप्राप्ति आहे या भयाने अर्जुन व्यथित होतो व निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान वापरतो. याच पार्श्वभूमिवर "जीवनात कार्याची भूमिका " हा महत्वाचा विषय भगवतगीतेने highlight केला आहे.

प्रकृति व पुरुष(पुरुषोत्तम ईश्वर) याद्वारा सृष्टिचे सृजन, संचलन असते. भगवतगीता "कर्म" या संदर्भात प्रकृति, कर्मेंद्रिय, कार्य यांची भूमिका स्पष्ट करते. तर "ज्ञान" या संदर्भात ईश्वर, बुद्धिची स्थिरता(विचलित न होणे) यांची भूमिका स्पष्ट करते. हे ज्ञान ऐकल्यावर अर्जुन म्हणतो, बुद्धि श्रेष्ठ तर कर्म कशाला? याच प्रश्नाचे उत्तरात कर्माचे जीवनात महत्व highlight केले आहे.

स्वभावनियत कार्य(State of art) या संदर्भात स्वधर्म व निर्णय(क्षमता) या संदर्भात कर्मयोग या कार्याच्या दोन निष्ठा (विभाग)भगवतगीता स्पष्ट करते. अर्थात स्वभावनियत कार्य व निर्णय हे कार्याचेच दोन अंग ठरतात.

जीवनविकासात कार्य साधन असते. पण अज्ञानामुळे कार्याचे, कार्यक्षमतेचे महत्व जाणत नाही. कुणाला कार्य कष्ट वाटते.

प्राप्तिसाठी कार्य असते म्हणुन संपत्ति आहे तर कार्य करण्याची काय गरज?अशी मानसिकता बनते. यामुळे कार्य न करता आपली इच्छापुर्ति व्हावी, प्रश्न सुटावेत हि इच्छा करतो व हेच अज्ञान मिथ्याचाराला (Hypocracy) जन्म देते. यामुळे कार्यात नावड निर्माण होते. आपली विफलता निष्क्रियतेचे समर्थन करुन करतो. याच विफलतेमुळे समाजात नकारात्मक भाष्य असते. अर्थात अज्ञानाला "ज्ञान " दर्शविण्याचा हा प्रयत्न असतो.

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन।
इंद्रियार्थान् विमुढात्मा मिथ्याचारः स उच्यते।।(३-६)

प्रकृति प्रत्येक क्षणाला कार्य घडविते. कार्याचा सन्मान करणे, कार्यात आनंद घेणे, स्वतःला कार्यसंस्कारित करणे याचा भगवतगीता पुरस्कार करते.

यः तु इंद्रियाणि मनसा नियम्य आरभते अर्जुन।
कर्मेंद्रियैः कर्मयोगं असक्तः स विशिष्यते ।।(३-७)

कार्याद्वारे योगक्षेम चालतो. कार्याद्वारेच चांगले कर्म घडते. अर्थात कार्य प्राप्तिसाठी होते, कार्याचा हेतु असतो. अब्राहम मास्लोने कर्माचा सर्वात श्रेष्ठ हेतु "Self actualization" म्हटले. तर

भगवतगीता कार्याद्वारे योग(दुःखान्त, समत्वयोग, निर्भयता) श्रेष्ठ हेतु स्पष्ट करते.

व्यावहारिक बोध: आधुनिक ज्ञानविज्ञानामुळे संघटित व्यवसायाची(कार्पोरेट) व्यवस्था समाजव्यवस्थेचा अंग बनली आहे. यामुळे व्यावसायिक रोजगार उपलब्धि समाजव्यवस्थेचे दायित्व बनले आहे. याच पार्श्वभुमिवर बेरोजगारी, शोषण हा समाजव्यवस्थेतील error दर्शवितो. हा error निर्माण होणे समाजदोष ठरतो. हा error दुर न केल्यामुळेच समाजात बुद्धिभेद होत असतो. व विद्वानांनी याची दखल घेणे आवश्यक ठरते.

न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम।
जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान युक्तः समाचरन् ।।(३- २६)

"People who decide they came to earth to work, who make work their personal philosophy, are kept very busy. "

-Constantine Karamanlis

********

(३-८)

*************************

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो हि अकर्मणः।।

शरीरयात्रा अपि च तेन प्रसिद्धेत् अकर्मणः।।

************************

*

(३. ८)/१:

"नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो हि अकर्मणः"

जीवनात आनंद अनुभवणे असो, आत्मविश्वास किंवा निर्भयता(साहस) किंवा चांगलेपणा अनुभवणे असो, हे सर्व स्वतःच्या मार्गातच अनुभवावे लागते. याचसाठी मनुष्याला स्वतःचा मार्ग ज्ञात हवा. या मार्गात कशा अडचणी येतात व या प्रसंगी मनुष्य कोणती भूमिका घेतो याचे प्रात्यक्षिक अर्जुनाच्या भूमिकेत आहे.

अर्जुनाला त्याचे नियतकार्य प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर execute करायची वेळ आली असता त्याला आपले नियतकार्य योग्य कि अयोग्य हा संशय येतो. या कार्याचा परिणाम दुःखदायी आहे

म्हणुन संशय कबुल न करता सरळ युद्ध करणे पाप आहे असे Judgement करतो. या भाष्यातुन निष्क्रियतेला चांगलेपणा दर्शविण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

समाजात जेंव्हा "चांगल्या" लोकांना/चांगल्या कार्यासाठी अडचणी जाणवतात, तेंव्हा आपल्या निष्क्रियतेला आदर्श दर्शविण्याचा प्रयत्न होतो. भगवतगीतेने मनुष्यजीवनातील हेच वास्तव highlight केले. मनुष्य स्वतःचे वास्तव/अज्ञान स्विकारित नाही तर ते hide करण्यासाठी स्वतःला आदर्श दर्शविण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

जगात ज्ञान उपलब्ध झाले तरी या ज्ञानाचा उपयोग निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी करणे ही स्वतःच स्वतःची केलेली दिशाभुल असते. जसे अर्जुन समर्थनासाठी धर्माचा दाखला देतो . यावर श्रीकृष्ण म्हणतात तुझी भूमिका धर्माची नसुन निष्क्रियतेची आहे. तसेच बेजबाबदारपणाची आहे. प्रत्यक्ष कार्यात स्वधर्माचा वापर(नियतकार्यावर शिक्कामोर्तब) हे धर्माचे application असते. याच संदर्भात भगवतगीता जीवनात कर्माचे महत्व सांगते.

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो हि अकर्मणः।।
शरीरयात्रा अपि च तेन प्रसिद्धेत् अकर्मणः।।(३-८)

कर्म टाळुन चिंता करणे, इच्छाचिंतन करणे यामुळे बुद्धिभ्रम होतो. म्हणुन स्वतःला कार्यसंस्कारीत करुन आनंदाने, आत्मविश्वासाने कार्यरत असणे हा शहाणपणा ठरतो.

ध्यायतो विषयान् पुंसः संगःतेषु उपजायते।(२-६२)

स्मृतिभंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति॥(२-६३)

दुःखामुळे मनुष्य विचलित होतो, या अवस्थेत बुद्धिभ्रम होतो. याच बुद्धिभ्रमावर उपाय करण्यासाठी मनोवश अवस्था vs आत्मवश अवस्था यातील भेद स्पष्ट केला आहे. जन्मापासुन मृत्युपर्यंत मनुष्याचा जीवनप्रवास ज्या मार्गावर होतो, त्या मार्गावरील मनुष्याची मानसिकता व सुखी, स्थिरबुद्धिची, विकासाची मानसिकता यातील भेद कळतो. व या मानसिकतेसाठी ज्या मार्गावर प्रवास व्हायला हवा (अमृतंगमय) त्या मार्गाची ओळख होते. या मार्गावर अडचणी विकासातील संधि असते याचा अनुभव होतो. कार्यातुन निर्भयतेची शक्ति अनुभवतो.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

व्यावहारिक बोध: जो आपल्या मार्गात सुख अनुभवतो त्याला बाह्यसमर्थनाची गरज नसते. याचाच अर्थ भगवतगीता निःसंशय सुखी जीवनाचा मार्ग बनविण्याचे व चालण्याचे शास्त्र सांगते.

*******

(३. ८)/२ :

"शरीरयात्रा अपि च ते न प्रसिद्धयेत् अकर्मणः"

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो हि अकर्मणः।

शरीरयात्रा अपि च ते न प्रसिद्धयेत् अकर्मणः।(३-८)

श्रेष्ठ व्यक्ति शरीरयात्रा जाणतो. जीवनाचा शाश्वत मार्ग (अमृतंगमय) जाणतो. विश्वासाने मार्ग चालतो. स्वयंस्फुर्तिने स्वतःला कार्यरत करतो. श्रेष्ठांच्या याच भूमिकेचे Standard भगवतगीतेत आधार घेतला आहे. याच आधारावर अर्जुनाच्या भूमिकेतील अज्ञान दर्शविले. दैवीगुणसंपन्न(चांगला) अर्जुन श्रेष्ठ होण्यासाठीच जन्माला आलेला आहे हे अप्रत्यक्षपणे श्रीकृष्ण दर्शवुन देतात.

भगवतगीतेत दैवी व असुरी असे दोन भाग आले. दैवी (चांगले) मध्ये सामान्य व श्रेष्ठ असे दोन भाग आले. चांगल्या मनुष्याचे हृदय परपीडेने हेलावते. पण या दुःखनिवारण्यासाठी प्रत्यक्ष कार्य हवे असते. व यासाठीच श्रेष्ठांचा मार्ग जाणणे आवश्यक असते. हाच मार्ग अर्जुनाला ज्ञात केला. चांगल्या मनुष्याला स्वार्थसिद्धिसाठी भ्रष्टाचार, परपीडा देवुन स्वार्थ साधणे आवडत नाही. पण त्याला हा मार्ग कठिण वाटतो. (प्रसंगी निष्क्रिय होतो.) अर्थात सामान्य राहणेच पसंद करतो.

जीवनाचे श्रेष्ठत्व जाणणे व श्रेष्ठ होणे यासाठीच भगवतगीतेचे ज्ञान आहे. कारण सामान्य जीवन (Default) असतेच. व मार्ग कळला नाही तर मनुष्य अज्ञानालाही ज्ञानच समजतो, जी अर्जुनाची स्थिति झाली. व ज्ञान सांगितले.

येथे श्रेष्ठ म्हणजे असुरभाव नाही, जे दर्शविते:

ईश्वरोअहं अहं भोगी सिद्धोअहं बलवान सुखी।(१६-१४)

तर श्रेष्ठ शरीरयात्रा जाणतो, आत्म्याच्या विकासप्रवासासाठी (आत्मोन्नति) शरीर साधन मिळाले आहे. अर्थात जीवनाचे रहस्य जाणतो. दुःखाने, अडचणीने व्यथित होत नाही. अमृतंगमय या शाश्वत विकासमार्गावर असतो. विश्वासाने मार्गक्रमण करतो.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

अर्थात श्रेष्ठांसाठी मार्गातील अडचणी (विकासमार्गावरील) कार्यसंधि ठरतात. हीच विकासासाठी संधि जाणुन घेण्याचे रहस्य भगवतगीता सांगते.

*******

(३-९)

*************************

यज्ञार्थात कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधन:।

तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर॥

*************************

(३. ९):

"यज्ञार्थात कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधन:"

जीवन आहे तर कार्य घडत राहणार. कार्याशिवाय शरीरयात्राही (योगक्षेम) चालत नाही. कुणी कष्टत कार्यरत असतो, कुणी प्रसन्नचित्ताने(उत्साहाने) कार्यरत असतो. अर्थात जीवनात कार्याचा सुखदुःखाशी जवळचा संबंध असतो.

मनुष्य कष्टत कार्यरत असतो, कार्यात संशय असतो, परिणामात कष्ट अनुभवतो, या (दुःखमय )स्थितीतील कार्याला "कर्मबंधन" या शब्दाचे प्रयोजन भगवतगीतेने केले आहे. व सुखी जीवनासाठी कार्यकौशल्याचे व्यवस्थापन होण्यासाठी "यज्ञ" प्रयोजन आहे.

यज्ञार्थात कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधनः।(३-९)

*सृष्टिचक्राचे प्रवर्तन याचा प्रवर्तक या संदर्भात ईश्वर, ब्रह्म याचे प्रयोजन स्पष्ट होते, तर प्रवर्तन कार्य संदर्भात "यज्ञ" शब्दाचे प्रयोजन आहे.

तस्मात् सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ।(३-१५)
एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्तयतीह यः।
अघायु इंद्रियरामो मोघं पार्थ स जीवति।।(३-१६)

हाच संदर्भ व्यक्तिगत कल्याण असो वा जगतकल्याण असो या संदर्भात यज्ञकार्य संबोधले आहे.

मधमाशी मधनिर्मिती करते. परागीकरण होते, फुलाचे फळात रुपांतर होते अर्थात एकच कार्य विविध हेतु( स्वतःसाठी कार्य, समुहासाठी कार्य तसेच सृष्टिचक्रप्रवर्तनासाठी कार्य ) साध्य करते. तेंव्हा असे कार्य "यज्ञ" संबोधल्या जाते.

व्यवहारातील कार्यगति या संदर्भात मनुष्य स्वतःच्या विकासासाठी कार्य करतो, समुहकल्याणासाठी करतो, किंवा ईश्वरभक्तिसाठी करतो. याप्रमाणे भाष्य ऐकत असतो. अर्जुनाला दुःख होते तेंव्हा "मला कांही नको, ज्यांच्यासाठी(समुह) करायचे ते पण प्राणाची पर्वा न करता, धन त्यागुन येथेच आलेत. मग करायचे कशाला?शेवटी जे करायला निघालो त्याने पापच लाभेल. म्हणुन मुढ बुद्धिने असे हे पापकार्य करायचे कि शहाणे बनुन पापकर्म टाळायचे हे आपल्याला ठरविण्याची वेळ आहे. " असा वाद उपस्थित करुन मी युद्ध करणार नाही ही भूमिका अर्जुन घेतो.

प्रस्तुत वाद प्रज्ञावाद असतो. एकाच कार्यात स्वतःचा विकास, समुहविकास, सृष्टिचक्रप्रवर्तन असे विविध प्रयोजन असल्यामुळे प्रज्ञावादाला वाव मिळतो. समाजात असा वाद चालतो. विशेषतः राजकिय क्षेत्रासाठी असा वाद पर्वणि असते.

जीवनविकास या संदर्भात कार्याची गति जाणुन उच्च पातळीवर (Excellence) कार्य करणे व याद्वारा सुख अनुभवणे हा भगवतगीतेतील शास्त्राचा संदेश आहे. याच संदर्भात "कार्याद्वारे ईश्वरभक्ति" हा संदर्भ येतो.

"कार्याद्वारे ईश्वरभक्ति" या संदर्भातच "माम अनुस्मर युध्य च" अर्थात जीवनाची लढाई हा संदर्भ येतो. जीवन सुखासाठी जगतो. या मार्गात दुःख आहे, अडचणी आहेत, प्रश्न आहेत. ज्याचे प्रश्न त्यालाच सोडवायचे आहेत. म्हणुन आत्मविश्वास हवा असतो. अर्थात ही लढाई लढलास तर मी तुझ्याबरोबर आहे. मला स्मरुन "विजयी" मानसिकतेने ही लढाई लढ. (या लढाईत मोह बुद्धिभ्रम करुन तुला मागे खेचत आहे!)

"तस्मात् त्वम उत्तिष्ठ यशो लभस्व" जीवनाची उच्च मानसिकता साध्य होण्यासाठी याप्रमाणे भगवतगीतेने व्यवहारातील लढाई व जीवनातील लढाई याचा समन्वय साधलेला आहे. तसेच कार्याची उच्चगति साध्य होण्यासाठी "यज्ञ" शब्दाचे प्रयोजन कार्यकौशल्याचे व्यवस्थापन या संदर्भात साधलेले आहे. कार्य ईश्वराला समर्पित(हवन) करणे. यामुळे कर्मबंधनातुन मुक्त असतो.

तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर।(३-९)

*******

(३. ९)/२:

"तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर"

( कर्मकौशल्य)

वर्तमानात मनुष्य शिक्षण घेतो. हे ज्ञान संख्यात्मक असते. याच ज्ञानाचा उपयोग कार्यात होतो. अर्जुनाला व दुर्योधनाला सारखीच विद्या मिळाली. अर्जुन व दुर्योधन दोघेही युद्धक्षेत्रावर येतात. यानंतर भगवतगीतेची भूमिका सुरु होते. ज्याला

१. गुणात्मक ज्ञान या संदर्भात बुद्धियुक्त संबोधले आहे.

दुरेण हि अवरं कर्म बुद्धियोगात् धनञ्जय।

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः॥(२-४९)

२. कर्म या संदर्भात कार्यकौशल्य संबोधले आहे.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।

तस्माद् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥(२-५०)

गुणात्मक ज्ञानासाठी कर्म आवश्यक आहे. अर्थात गुणात्मक ज्ञान व त्या अनुषंगाने कर्मकौशल्य हाच भगवतगीतेचा विषय आहे. येथे कौशल्य हा शब्द Skill नसुन Art of Work असा अभिप्रेत आहे. याच कौशल्य संदर्भात "यज्ञ" प्रयोजन आहे.

*कर्मकौशल्यासाठी यज्ञ:

उद्योग, शिक्षणकार्य असे अर्थ, ज्ञान, तप, योग इ. विषयक विविध विधायक कार्ये जगात सुरु असतात. ही विधायक कार्ये यज्ञरुपाने केली जातात.

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।(४-

यज्ञात हवन(समर्पण) असते. (निश्चयाचा)अग्नि असतो. कार्यनिश्चय करुन निष्ठेने (निष्काम, त्याग) कार्य करतो. अग्नित हवन भस्म होते. यज्ञतत्वाची ही प्रक्रिया कर्म करण्यासाठी वापरण्याचे महत्व भगवतगीता स्पष्ट करीत आहे.

मनुष्याला इच्छा(State of want) असतात म्हणुन कार्य (State of art) करतो. हा व्यवहार असतो. या प्रक्रियेत यज्ञरुपाने कार्य केल्याने बंधनमुक्त असतो. अर्थात परिणामभयात अडकत नाही. कष्टाच्या बंधनात अडकत नाही. केवळ इच्छेमुळे आसक्ति निर्माण होते. यामुळे बंधन असते. अर्थात Stress असतो.

यज्ञार्थात् कर्मणोअन्यत्र लोकोअयं कर्मबन्धनः।
तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर॥(३-९)

"Nothing in this world can take the place of persistence.

Talent will not: nothing is more common than unsuccessful men with talent.

Genius will not; unrewarded genius is almost a proverb.

Education will not: the world is full of educated derelicts.

Persistence and determination alone are omnipotent.
"

-Calvin Coolidge

********

(३-१०)

**********************

सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा पुरा उवाच प्रजापतिः।

अनेन् प्रसविष्यध्वम् एष वः अस्तु इष्ट कामधुक्।।

**********************

३. १०:

"सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा पुरा उवाच प्रजापतिः"

(Translation of ancient treasure-

वर्तमानाचे प्रश्न सोडविण्यासाठी श्रीकृष्णाचे अनुसंधान)

"The universe is constantly moving in the direction of higher evolutionary impulses, creativity, abstraction, and meaning. It is need of time to translate our ancient treasure into meaningful insights and tools that individuals can use in their everyday lives to transform negative situations and create positive change. "

वर्तमानाचे आव्हान स्विकारणे मनुष्याचे दायित्व असते. "विकास" या संदर्भात हे विश्व कल्याणाच्या (जगतहिताय) मार्गावर असते. या मार्गात "धर्मग्लानि " याचा संदर्भ समाजातील शोषण (बाह्यविघ्न) व चांगल्या मनुष्याला संभ्रम(आंतर्विघ्न) असा असतो.

नियतकार्य या नात्याने युद्ध करणे योग्य कि अयोग्य?असा प्रश्न अर्जुनासमोर उभा होतो. या प्रश्नाचे उत्तर न मिळाल्यामुळे कमीत कमी नुकसान होईल अशी निवड होण्यासाठी युद्ध न करणे पसंत करतो. अर्थात युद्ध केले तर चुक होईल, दुःख होईल या भयाने निष्क्रियता पसंत करतो .

वर्तमानात योग्य निर्णय होणे हे अर्जुनाला आव्हान असते व हेच आव्हान स्विकारण्यास अर्जुन असमर्थ ठरतो. पण स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्माचा वापर करतो.

येथेच भगवतगीता ज्ञान सुरु होते.

प्रथम Universal truth सांगण्यात येते. व याच आधारावर श्रीकृष्णाने अर्जुनाच्या भूमिकेतील सत्य उघड केले.

Universal truth:

श्रीकृष्ण जीवनविकासाचा (श्रेष्ठांचा) Standard मार्ग सांगतात. व यासाठी पुरावाही दिला.

लोकेस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मया अनघ।(३-३)

* दुर्बलता श्रेष्ठांना अशोभनिय असते म्हणुन योगासाठी (दुःखान्त) कार्य हा Standard मार्ग आहे. या मार्गावर विचलित होत नाही.

* १. धर्म-अधर्म हा Tie सोडविण्यासाठी स्वतःचा स्वधर्म हा Tiebreaker असतो.

२. या मार्गावर कार्याचा एकनिश्चय असतो. स्वतःला कर्म करण्यासाठी निर्णय अधिकार असतो.

*कर्म करुनच नैष्कर्मसिद्धि, योग साध्य होतो. येथे अर्जुनाला विचलित न होणे यासाठी स्थिरबुद्धिचे महत्व कळते .

हे ज्ञान ऐकल्यावर (ज्ञान) बुद्धि श्रेष्ठ तर गरज नसतांनाही कर्माचे प्रयोजन कशासाठी? हा प्रश्न करतो. या प्रश्नाचे उत्तरात विकासात कर्माचे महत्व हा विषय focus होतो. याच अनुषंगाने विविध प्रश्न(ईश्वर, संन्यास, योग, त्याग इ. ) उपस्थित होतात.

कर्म टाळुन नुसते इच्छाचिंतन करणे(यामुळेच चिंता करणे, क्रोध करणे, द्वेष करणे इ. दोष उत्पन्न होतात) अज्ञान / ढोंग ठरते. कर्म करुनच विकास होतो. नैष्कर्मसिद्धि/योग साध्य होण्यासाठी कार्यकौशल्य साध्य करण्यासाठी श्रीकृष्णाने प्राचीन संदर्भ दिले व त्याला वर्तमानाचे प्रश्न सोडविण्यासाठी नवीन संदर्भ दिले.

*यज्ञ या संज्ञेचा वापर समर्पित कार्यासाठी केला.

१. अज्ञानामुळे मनुष्य सकाम कर्म करतो व (आसक्ति व द्वेष)द्वंद्वाच्या जाळयात(बंधनात) सापडतो. म्हणुन निष्काम कर्मासाठी यज्ञभावाने कर्म करणे.

यज्ञार्थात् कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबन्धनः।

तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर।।(३-९)

प्राचीन संदर्भात यज्ञाद्वारा देवताभक्ति, सृष्टिचक्रप्रवर्तनात यज्ञाची भूमिका स्पष्ट केली आहे.

सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा पुरा उवाच प्रजापतिः।(३-१०)

एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्तयतीय यः।

अघायु इंद्रियरामः मोघं पार्थ स जीवति।।(३-१६)

२. श्रेष्ठ, अनासक्त असला तरी लोकांमध्ये कर्माचे महत्व हा संदेश जाण्यासाठी कर्म करणे आवश्यक असते. लोकांना चुकीच्या मार्गावर नेणारा किंवा आळशी करणारा श्रेष्ठ ठरत नाही.

उत्सीदेयुः इमे लोका न कुर्यां कर्म चेत् अहम्।

संकरस्य कर्ता स्याम् उपहन्याम् इमाः प्रजा।।(३-२४)

३. ईश्वर(ज्ञानाचा) वापर करुन कर्मसंन्यास (नैष्कर्मसिद्धि) यासाठी पारंपरिक ज्ञानकर्मसंन्यासयोग याचा संदर्भ दिला.

एवं परंपरा प्राप्तं इमं राजर्षयो विदुः।

स कालेन् इहमहता योगो नष्टः परंतप॥(४-२)

अहंकारामुळे मनुष्य स्वतःला कर्ता जाणतो व अज्ञान स्विकारत नाही . बंधनात अडकलेला(Attachment) असतो.

द्वंद्वमुक्तिसाठी, संशयमुक्तिसाठी ईश्वरज्ञान, बुद्धियोग याचे महत्व सांगितले.

योगसंन्यस्त कर्माणं ज्ञानसञ्छिन्न संशयम् ॥(४-४१)

सार:कर्मानेच विकास होतो. ज्ञानाने कार्यकौशल्य साध्य होते. श्रीकृष्णांनी यज्ञ, देवता हे प्राचीन संदर्भ दिले तरी त्याचा वापर कार्यकौशल्य साध्य करण्यासाठी केला. प्राचीन तत्वांना नवीन संदर्भ दिला. याप्रमाणे अर्जुनाला वर्तमानाचे आव्हान स्विकारण्यास समर्थ केले.

वर्तमानाचे आव्हान स्विकारण्यास सक्षम व्हावे याच हेतुने "जुन्याची जोपासना व नव्याची उपासना करा" याच मुद्यावर भगवतगीता प्रकाश टाकते. वर्तमानातील शिक्षणपद्धतिचा हाच हेतु अपेक्षित असतो.

********

(३-११)

**********************

देवान् भावयतानेन ते देवा भावयन्तु वः।

परस्परं भावयन्तः श्रेयः परम् अवाप्स्यथ"

**********************

३-११ :

"देवान् भावयतानेन ते देवा भावयन्तु वः।

परस्परं भावयन्तः श्रेयः परम् अवाप्स्यथ"

(वर्तमानातील Replacement:आध्यात्मिक क्रान्ति)

धर्म म्हटला कि देव, कर्मकांड(Rituals), पापपुण्य, स्वर्ग-नरक या संकल्पना नजरेसमोर असतात. या संकल्पना conditioned होत असतात. याच संकल्पनेचा उपयोग करुन वर्तमानातील प्रश्न सोडविण्याचा अर्जुन प्रयत्न करतो . प्रश्न सुटत नाही पण निष्क्रिय मात्र होतो. अशा स्थितित समाजात मरगळलेपणा येतो.

समाज वर्तमानात जगत असतो. वर्तमानात चांगलेपणाविषयी गैरसमज असणे, मात्र या स्थितित आसुरी शक्तिचा समाजावर

प्रभाव असतो, शोषण ही अधर्म स्थिति असते. हेच समाजाच्या मरगळीचे कारण बनते. या मरगळलेल्या समाजाला गति देण्यासाठी "धर्मस्थापना" हा शब्द भगवदगीता वापरत आहे. धर्माचा व्यापक अर्थ सांगत आहे.

पाऊस पडण्यासाठी अस्तित्वात असलेली इंद्रपुजा बंद करुन वृक्षारोपण सांगणारा श्रीकृष्ण भगवदगीता सांगत आहे. कालबाह्य Rituals मधुन बाहेर पडण्यासाठी ज्ञानयुक्त Philosophy चा उपयोग येथे केलेला आहे.

भगवदगीता स्पष्ट शब्दात सांगते, पुर्वी देव (निसर्गाच्या शक्तिरुपी देवता) व मनुष्य यांच्या परस्पर सहकार्यातुन सृष्टिचक्र चालावे म्हणुन "यज्ञ" ही संकल्पना प्रजापतिने दिली.

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरा उवाच प्रजापति।<br>
अनेन प्रसविश्यध्वम् एष वः अस्तु इष्टकामधुक्।(३-१०)<br>
देवान् भावयतानेन ते देवा भावयन्तु वः।<br>
परस्परं भावयन्तः श्रेयः परम् अवाप्स्यथ।(३-११)

मनुष्य जे कर्म करतो, त्या कर्माद्वारे समुहाचा विकास, निसर्गाचे संतुलन अर्थात सृष्टिचक्रप्रवर्तन, तसेच स्वतःचा व्यावहारिक(लौकिक, भौतिक, योगक्षेम, भोगैश्वर्य) व आध्यात्मिक (आत्मोन्नति) विकास साध्य होतो अशा कर्माचे व शास्त्राचे प्रयोजन "धर्म" या संकल्पनेत अभिप्रेत आहे. याचसाठी यज्ञ ही संकल्पना प्रजापतिने दिली.

याच यज्ञ संकल्पनेचे "ज्ञान" या संदर्भात व्यवस्थापनिय logic(अग्नि-हवन, Purpose-समर्पण) स्पष्ट करुन निष्काम कर्म या शास्त्रासाठी, स्वधर्म या मुल्यासाठी उपयोग सांगितला.

श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञ ज्ञानयज्ञः परंतप।
सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते॥(४-३३)

*वर्तमानासाठी भगवदगीतेचा संदेश:

अज्ञानाला ज्ञान समजणे अर्थात बुद्धिभ्रम होणे याचेच दर्शन भगवदगीतेत आहे. बुद्धिभ्रम करणाऱ्या कालबाह्य Rituals मधुन बाहेर पडण्यासाठी बुद्धिचा, ज्ञानाचा वापर करणे यासाठी समाजातील अंधश्रद्धा निर्मुलन हे मिशन ओळखल्या जाते. तर

बुद्धिला भ्रममुक्त करुन ज्ञानाचा वापर करणे व त्याचे शास्त्र भगवदगीता स्पष्ट करीत आहे. याप्रमाणे भगवदगीता अज्ञानाचे ज्ञानाने Replacement करते. ज्ञानाला सन्मान देत आहे.

अर्थात भगवदगीता केवळ कालबाह्य संकल्पनेवर टिका करीत नाही तर Replacement देत आहे.

"The present system cannot be changed unless it is replaced properly. "

अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञानार्थ दर्शनम् ।
एतद् ज्ञानं इति प्रोक्तं अज्ञानं यदतो अन्यथा।(१३-११)

********

(३-१५)

**********************

कर्म ब्रह्मोद्भवं विद्धी ब्रह्माक्षर समुद्भवम्।

तस्मात् सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ।।

**********************

(३-१५):

"तस्मात् सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् "

(नित्य ईश्वराचा आश्रय+विकासात कर्माचे महत्व)

धर्म मनुष्याला नित्य ईश्वराशी जोडतो, मनुष्याची जीवनयात्रा विकासमार्गावर (आत्मोन्नति) ठेवतो, त्याला सकारात्मक करतो . अशी समाजात धारणा असल्यामुळे धर्म म्हटला कि धर्माला मान्य आचरण केले तर ईश्वरमान्य आचरण ठरते म्हणुन पुण्यकर्म ( स्वर्ग) तर धर्मविरोधी आचरण म्हणजे पाप ठरते अर्थात या धर्माचा ईश्वराशी संबंध असतो अशी धर्माविषयी समजुत असते.

मनुष्य प्रत्यक्षात जगत असतांना त्याची Priority त्याचे सुखदुःख असते. कीर्तिची इच्छा (लोकांनी चांगले म्हणावे, वाईट म्हणु नये)

सुखदुःखाशी निगडीत असते. पण धर्माशी याला जोडत असतो. अर्जुन दुःखी होतो व दुःखदायी घोर कर्म टळावे ही त्याची Priority बनते. म्हणुन या कर्माचा संबंध तो अपकीर्ति(लोभी व लोभामुळे स्वजनहत्या करणारा!), पाप अर्थात (अ)धर्माशी जोडतो. याचाच अर्थ Excuses(अज्ञान)ला धर्माशी जोडतो. निष्क्रियतेला ईश्वराशी जोडतो. अर्जुनाची ही भूमिका कीर्ति व स्वर्गविरोधी आहे असे श्रीकृष्ण स्पष्ट करतात.

मनुष्यजीवनाचा विकासरथ नित्य विकासमार्गावर असावा हे "आत्मोन्नति" या संदर्भात अभिप्रेत असते. पण हा विकासरथ नकळत (अज्ञानामुळे)थांबतो. स्वतःचे अज्ञान ज्ञान दिसावे, निष्क्रियता आदर्श दिसावी असा मनुष्याचा प्रयास स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी असतो. याच अज्ञानाला भगवदगीता प्रकाशात आणते.

मनुष्याचा नित्य संबंध शाश्वताशी अर्थात ईश्वराशी आहे कारण याच शाश्वताच्या अंशाने प्राणतत्व(जीवात्मा) धारण केलेले असते. भगवदगीतेने जीवनात नित्य ईश्वराचा आश्रय होण्यासाठी "यज्ञ" ही संकल्पना स्पष्ट केली. कर्माचा संबंध "यज्ञ" या संज्ञेद्वारा ईश्वराशी जोडलेला असतो. म्हणुन यज्ञभावाने कर्म आचरण केले तर निष्काम कर्म घडते, ईश्वरभक्ति घडते.

यज्ञार्थात् कर्मणोअन्यत्र लोकोअयं कर्मबंधनः।(३-९)

मनुष्यप्राणी अन्नामुळे जगत असतात. पर्जन्यामुळे अन्न उत्पादीत होते. (सृष्टितील) यज्ञामुळे पर्जन्य होतो. यज्ञ कर्माद्वारे होते व कर्म ब्रह्मामुळे होते. याप्रमाणे यज्ञ सृष्टिचक्र प्रवर्तित करीत असते.

कर्म ब्रह्मोद्भवं विद्धी ब्रह्माक्षर समुद्भवम्।
तस्मात् सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ।।(३-१५)

अर्थात या यज्ञाचा नित्य ईश्वराशी संबंध असतो. यज्ञातील कर्म ईश्वराला समर्पित (ब्रह्माग्नौ, ज्ञानाग्नि)होत असते. ( निष्काम कर्म ). म्हणुन यज्ञभावाने कर्म करणे यांत नित्य ईश्वरस्मरण होते. कर्माचे ज्ञानात विलिनीकरण होते.

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानअवस्थित चेतसः।
यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।।(४-२३)

सार :

निष्क्रियतेला धर्माशी, ईश्वराशी जोडणे हे भ्रमाचे कारण ठरु शकते. भगवदगीता कर्माला Priority देत आहे. म्हणुन "यज्ञ" या पुरातन संज्ञेचा भगवदगीतेने वर्तमानात जीवनविकासाच्या( "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय " ) व्यवस्थापनात उपयोग केलेला आहे.

सृष्टिसंचलन या संदर्भात

१. या सृष्टित विविध यज्ञ होत असतात व सृष्टिसंचलन होत असते. सर्व यज्ञ कर्माद्वारेच घडत असतात.

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धी तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।(४-३२)

२. भगवदगीता ईश्वराची ओळख सृष्टिचा अध्यक्ष अशी देत आहे. तसेच जीवनात नित्य ईश्वराचा आश्रय म्हणजे ज्ञानाचा आश्रय ही भगवदगीतेची भूमिका आहे. (ज्ञानसञ्चिन्नसंशयम् ) ज्यामुळे कार्याचा एकनिश्चय होतो, विश्वासाने मार्ग चालतो.
(योगसंन्यस्तकर्माणं)

याप्रमाणे भगवदगीता समाजातील गैरसमजुती अर्थात अज्ञान दुर करण्याची भूमिका बजावीत आहे.

********

(३-१६)

*************************

एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्ततीय यः।

अघायुः इंद्रियरामः मोघं पार्थ स जीवति।।

*************************

(३-१६)/१:"एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्तयतीह यः?"

(इंद्रियराम vs. आत्माराम)

"The goal of life is to make your heartbeat match the beat of the universe, to match your nature with Nature. "

Joseph Campbel

कर्माद्वारे जीवनविकास होतो. याच कर्माद्वारे सृष्टिचक्र प्रवर्तित होत असते. या चक्रातील कर्माची भूमिका "यज्ञाची" असते. या चक्राला सहकार्य करणारा जीवनाचे विकासचक्र जाणतो. या विकासचक्रातील यज्ञाची भूमिका जाणतो.

संस्कारीत व्यक्ति(ज्ञानी) उत्साहाने कार्यरत असतो, तर अज्ञानी(असंस्कारीत) व्यक्तिला कर्म कष्ट वाटते. कर्म टाळुन निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो. याला भगवतगीतेत "प्रज्ञावादाश्च भाष्यसे" म्हटले आहे. संस्कारीत होण्यासाठीच कर्माची यज्ञ भूमिका भगवतगीता स्पष्ट करते.

*इंद्रियराम vs आत्माराम

मनुष्यजीवनात दर क्षणी कर्म घडत असते. या कर्माचा व सुखदुःखाचा संबंध असतो. कर्म व सुख यांत कर्माचे महत्व न जाणता केवळ सुखदुःख ही Priority असते, तेंव्हा कर्माची सकाम (मानसिक) स्थिति असते व कर्म कष्ट वाटते. अज्ञानी व ज्ञानी या संदर्भात ही भूमिका इंद्रियराम vs. आत्माराम अशी असते.

जो सृष्टिचक्र चालविण्यास "यज्ञ" कार्याने सहकार्य करतो, तो विकासमार्गावर असतो, व सहकार्य करीत नाही त्याचे जीवन व्यर्थ अशी स्पष्ट भूमिका भगवतगीतेने घेतलेली आहे.
एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्ततीय यः।

अघायुः इंद्रियरामः मोघं पार्थ स जीवति॥(३-१६)

इंद्रियराम आसक्त असतो व आत्माराम अनासक्त असतो.
आत्मनि एव च संतुष्टः तस्य कार्यं न विद्यते।(३-१७)
तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्मसमाचर।(३-१९)

अर्थात अनासक्त व्यक्ति दुःखामुळे विचलित होत नाही. याच अनासक्तिसाठी कर्माची "यज्ञ" भूमिका भगवतगीता स्पष्ट करते.

यज्ञार्थात कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधनः।
तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर॥(३-९)

१. प्राचीन काळी:
पुर्वी (सृष्टिसंचालनातील)देवतांना प्रसन्न करुन लोकांनी परस्पर सहकार्य घडवुन आणण्यासाठी प्रजापतिंनी "यज्ञ" साधन दिले.

सहयज्ञः प्रजा सृष्ट्वा पुरा उवाच प्रजापतिः।
अनेन प्रसविष्यध्वम् एष वः अस्तु इष्टकामधुक् ॥(३-१०)

२. वर्तमानात ज्ञानाग्नित कर्माचे भस्मिकरण:

यज्ञात अग्नि व हवन असते. ज्ञानाने प्रदिप्त झालेल्या अग्नित कर्माची आहुति या अर्थाने कर्माची यज्ञ भूमिका स्पष्ट होते.

सर्वाणि इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते॥(४-२७)

या ज्ञानामुळे व्यावहारिक कर्म यज्ञ या भूमिकेत Transform होते.

भगवतगीता यज्ञ(त्याग, निष्काम कर्म), दान(परमार्थ), तप(काया, वाचा, मन या संदर्भात Personality, Charecter ) या त्रिकर्माची जीवनविकासातील भूमिका स्पष्ट करते . यातील यज्ञ ही संज्ञा व्यावहारिक कर्मासाठी प्रायोजित आहे.

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यं एव तत्।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥(१८-५)

"Just as a candle cannot burn without fire, men cannot live without a spiritual life. "

Buddha

**********

३. १६/२:

"एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्तयतीह यः"

(ईश्वरभक्तिचे रहस्य )

सृष्टिचे संचलन म्हणजे सृष्टिचक्रप्रवर्तन असते. सृष्टिचक्रप्रवर्तनाचे प्राचिन, योग्य उदाहरण भगवतगीतेने दिले. मनुष्य यज्ञरुपी कर्म करतो, यज्ञाने पाउस पडतो, पावसामुळे अन्न उत्पादन होते. अन्नाने मनुष्यप्राण्यांचे पोषण होते. याप्रमाणे सृष्टिचक्रप्रवर्तन असते.

अन्नात् भवन्ति भूतानि पर्जन्यात् अन्न संभवः।

यज्ञात् भवति पर्जन्यो यज्ञः कर्म समुद्भवम् ।।(३-१४)

*सृष्टिचक्रप्रवर्तनासाठी यज्ञ या संदर्भात श्रीकृष्णाची आध्यात्मिक क्रान्ति:

प्राचीन काळी यज्ञाने देवतांना खुश करुन देवता व मनुष्यांनी परस्पर सहकार्य करुन घ्यावे. या हेतुने "यज्ञ" प्रयोजन होते.

सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा पुरा उवाच प्रजापतिः।(३-१०)

परस्परं भावयन्तः श्रेयः परम् अवाप्स्यथ।(३-११)

१. पाउस पडण्यासाठी इंद्रदेवतेला खुश करण्यासाठी यज्ञ व्हायचे. श्रीकृष्णाने ही पुजा बंद करुन पाउस पडण्यासाठी गोवर्धन पर्वतावर वृक्षारोपण करुन संवर्धन करावे हा संदेश प्रत्यक्ष पुढाकार घेवुन दिला. व इंद्रपुजा बंद पाडली.

२. "यज्ञ" यांतील अग्नि व हवन तत्व जीवनविकास व्यवस्थापनातील निष्काम कर्मासाठी वापरले.

यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।(४-२३)

३. सृष्टिचक्रप्रवर्तन या संदर्भात ईश्वराचे कर्म ईश्वराला समर्पण याद्वारे ईश्वरभक्तिचे समर्पणतत्व स्पष्ट केले.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।

निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

अर्थात ईश्वरभक्ति या संदर्भात निष्काम कर्म (Determination & Detachment), मानवकल्याणार्थ (सर्वभूतहीतेरतः) कर्म याचे logic स्पष्ट होते.

४. जीवनांत सुखी व्हावे या हेतुने मनुष्याची जीवनयात्रा चालत असते. आपल्याजवळ पिढीजात संपत्ति आहे असे जाणुन आपल्याला कर्म करण्याची गरज नाही असा समज करुन घेतला तर तो गैरसमज ठरतो. भगवतगीता म्हणत आहे, त्याचा जन्मच व्यर्थ आहे जो सृष्टिचक्रप्रवर्तनात (कर्माचे) योगदान देत नाही.

एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्तयतीह यः।
अघायुः इंद्रियरामः मोघं पार्थ स जीवति।।(३-१६)

"Worthless people live only to eat and drink; people of worth eat and drink only to live. "
-Socrates

अर्थात विश्वकल्याणाचे संवर्धन(विश्वसंचलनाचे कार्य) व्हावे हे मनुष्याला स्वार्थापोटी भलेही न वाटो, पण ईश्वराचे ते कार्य जाणुन ज्ञानी कार्यरत असतो.

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिः विशिष्यते।
प्रियो हि ज्ञानिनो अत्यर्थं अहं स च मम प्रियः।।(७-१७)

******

(३. १६)/३:"अघायु इंद्रियरामो मोघं पार्थ स जीवति"

मनुष्यजीवन आहे तर योगक्षेमासाठीही(Livelihood) कर्म आवश्यक असतात. जीवन केवळ योगक्षेमासाठी जगले तरी दुःखाशी सामना होणारच. म्हणुन योगक्षेमापलीकडे जीवनाचा शोध सुरु असतो. अर्जुन म्हणतो मला कांही नको, तर हे कार्य धर्मविरोधी आहे. हीच योगक्षेमापलीकडे जीवनाकडे पाहण्याची अर्जुनाची दृष्टि असते.

जीवनात दुःख आले असता त्याचा सामना करण्याचे ज्ञान नसेल तर मनुष्य निष्क्रियतेला असे आदर्श अर्थ देत असतो. मनुष्यजीवनातील हेच सत्य जाणुन योगक्षेम असो वा उच्च

जीवनाची साधना असो, भगवतगीतेने जीवनविकासात " कर्म" हेच साधन केले आहे.

ज्या कर्माने दुःख येईल(स्वजनमृत्यु), त्याच कर्माने दुःखमुक्ति (प्राप्ति संदर्भात अधिकाधीक देवाचे राज्य असा उल्लेख होतो) कशी होईल?हाच अर्जुनाचा प्रश्न असतो.

"To live is to suffer, to survive is to find some meaning in the suffering. "

Friedrich Nietzsche

मनुष्य जीवनात दुःखामुळेच विचलित होत असतो. भय, संशय मनुष्याला मार्गावरुन विचलित करते. मनाची चंचलता मनुष्याला अशांत करीत असते. म्हणुन शांतीसाठी स्थितप्रज्ञ अवस्था, गुणातीत, योग(दुःखान्त) या स्थितीचे, शक्तिचे महत्व जाणुन जीवनाचे साध्य ठरविणे व त्या अनुषंगाने कर्माचा हेतु (योगः कर्मसु कौशलम्) भगवतगीता स्पष्ट करते. हाच हेतु स्पष्ट करतांना कर्म हेच योगक्षेम व उच्च जीवनसाधना याचे माध्यम आहे हे स्पष्ट करते. व हेच रहस्य जाणण्यासाठी अर्जुनाचे दुःख निमित्त ठरले आहे.

*दुःख बंधन जाणले तर दुःखमुक्तिसाठी मोक्ष, व मोक्षासाठी ईश्वरज्ञानाचे महत्व प्रकृतिविज्ञानासह (सत, रज, तमगुण) भगवतगीता स्पष्ट करते.

*चांगलेपणाचा संबंध "सत" या उच्चगुणाशी आहे. "सत"मुळे आत्मविश्वास असतो. "सत"मुळे Higher consciousness क्रियाशील होत असते. "सत" या संदर्भातच मनुष्याला भ्रम होतो व दुर्बलतेला, निष्क्रियतेला आदर्श, ज्ञान दर्शविण्याचा प्रयत्न करतो. अर्थात अज्ञानाला ज्ञान संबोधतो. म्हणुन जीवनात ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी बुद्धियोगाचे महत्व(बुद्धिभ्रम vs. बुद्धियोग) भगवतगीता स्पष्ट करते.

*काय मिळेल? कर्माची केवळ हीच गति मनुष्याला ज्ञात असते. व याच दृष्टिमुळे अर्जुन दुःखी होतो. म्हणुन कर्माची उच्चगति या संदर्भात भगवतगीता भाष्य करते. "काय मिळेल" ही सकाम भूमिका निष्काम कार्यात बदलविणे (Transformation) याचे शास्त्र सांगते. याच संदर्भात "यज्ञकर्म" हा उल्लेख आलेला आहे.

यज्ञार्थात कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधनः।

तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर॥(३-९)

सृष्टिचक्र अविरत कार्यरत असते. सृष्टिचक्राला सहकार्य करणारे कार्य "यज्ञकर्म" संबोधले आहे. "यज्ञकर्म-पर्जन्य-अन्न-मनुष्यप्राणी-कर्म " याप्रमाणे सृष्टिचक्र कार्यरत असते. मनुष्याचे यज्ञकर्म या चक्राला सहकार्य करीत असते.

एवं प्रवर्तितं चक्र न अनुवर्तती इह यः।

अघायु इंद्रियरामो मोघं पार्थ स जीवति॥(३-१६)

केवळ इंद्रियतृप्तिसाठी जगणे याला व्यर्थ जीवन म्हटले आहे तर उच्च जीवनासाठी जगणे हेच जगण्यातील शहाणपण असते.
म्हणुन जीवनाचे साध्य जाणणे (निर्भयता, योग-दुःखान्त, विचलित न होणे-शांति)व हीच साधना कर्माद्वारे होणे यासाठी कार्यसंस्कार आवश्यक ठरतात. यामुळे

*स्वतःचा निर्णयअधिकार जाणतो,

*स्वतःचे स्वभावनियत कार्य (State of art)जाणतो.

*स्वतःचा मार्ग दृढ करण्यासाठी स्वधर्म मुल्य जाणतो,
दृढनिश्चयाचे महत्व जाणतो.

"If civilization is to survive, we must cultivate the science of human relationships - the ability of all peoples, of all kinds, to live together, in the same world at peace. "

Franklin D. Roosevelt

*********

(३-१७)

*********************

यः तु आत्मरतिः एव स्यात् आत्मतृप्तस्य मानवः।

आत्मन्येव च संतुष्टः तस्य कार्यं न विद्यते।।

*********************

३-१७(विषय ७५७) :

" आत्मन्येव च संतुष्टः तस्य कार्यं न विद्यते"

(सुखदुःख -कर्म-ज्ञान समन्वय)

प्रश्न :

मनुष्यजीवनात कर्म घडत असते. व्यवहारात इच्छापुर्तिसाठी कार्य (State of want-State of Art) हे कर्माचे सामान्य तत्व(general knowledge) असते. मनुष्य योगक्षेमासाठी कर्म करतो तसेच प्रश्न सोडविण्यासाठी कर्म करतो.

पैसा, संपत्ति असेल तर मनुष्य सुखी असतो मग कर्माचे प्रयोजन कशासाठी? असा कुणी प्रश्न करतो. पांडवावर अन्याय झाला. हा प्रश्न सोडविण्यासाठी धर्मयुद्ध ठरते. पण प्रश्नाची, दुःखाची शृंखला संपलेली नसते. अर्जुन दुःखी होतो, तेंव्हा मला कांही नको म्हणुन

कर्माचे प्रयोजन दिसत नाही ही भूमिका घेतो. दुःखमुक्ति हा त्याचा प्रश्न बनतो.

भगवदगीतेत याप्रमाणे अर्जुनाचा निश्चित प्रश्न येतो. Committed नियतकार्य execute करणे आवश्यक आहे, मग दुःखमुक्ति कशी होईल?ही अवस्था "आ बैल मुझे मार " (गरज नसतांना कार्य करणे व दुःखाला आमंत्रण देणे) यासमान अर्जुनाला वाटते. याच प्रश्नाचे उत्तरासाठी प्रश्नोत्तर- चर्चा होते. युद्ध करायचे किंवा नाही याचा निर्णय अर्जुनाला घ्यायचा असतो.

*श्रेष्ठांचा आदर्श:

१. संपुर्ण रामायणाचा आधार "प्राण जाई पर बचन न जाई" हा आहे. भगवदगीता व्यवहारात स्वधर्म (नियतकार्य) महत्व सांगते. व्यवहारात वचनाप्रमाणे न चालणाऱ्या व्यक्ति विश्वासपात्र ठरत नाही. अपकीर्तिचे हे कारण ठरते हे भगवदगीतेत स्पष्ट केले आहे. अकीर्तिं चापि भूतानि कथियष्यन्ति ते अव्ययाम् ।(२-३४)

२. जो आत्मतृप्त आहे, परावलंबि नाही त्याला कर्माचे प्रयोजन नसते. असे सुखी/श्रेष्ठ पुरुष आदर्शासाठी कर्म करतात.

आत्मन्येव च संतुष्टः तस्य कार्यं न विद्यते॥(३-१७)
नैव तस्य कृतेन अर्थो न अकृतेन इह कश्चन।
न च अस्य सर्वभूतेषु कश्चित अर्थ व्यपाश्रयः॥(३-१८)

सामान्य लोकांना गरजापुर्ति, प्रश्न सोडविण्यासाठी कर्म आवश्यक असते. कर्म टाळुन केवळ इच्छाचिंतन करणे हा मिथ्याचार ठरतो. म्हणुन श्रेष्ठ, ज्ञानीजन यांनी सामान्य लोकांचा बुद्धिभेद करु नये. याचा अर्थ त्यांना आळशी करु नये म्हणुन स्वतः कर्म करुन आदर्श ठेवावा.

भगवदगीता Exclusive :
ईश्वर, निष्काम कर्म (ईश्वरभक्ति):

कर्माचे प्रयोजन १. गरज (State of want ) व २. आत्मतृप्ति (Happiness) याप्रमाणे भगवदगीता स्पष्ट करते. जीवनात दुःख आहे व दुःखमुक्तिसाठी कर्माद्वारे ईश्वरभक्ति ही भगवदगीतेची भूमिका आहे. गरजेपुर्तिसाठी कर्म हे निमित्त असते. तर यांत कर्म

साधन मिळते. या कर्माद्वारे ईश्वरभक्ति हा भगवदगीतेचा संदेश आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

विश्वसंचलनात कर्म घडत असते.
एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।(४-३२)

विश्वसंचलन व कर्माद्वारे ईश्वरभक्ति या संदर्भात भगवदगीता स्पष्ट करते,
*निष्काम कर्म:
न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः।
न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते।।(५-१४)
*नियति:
मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव।।(११-५५)

अर्थात कर्म, कर्मफल हा प्रकृतिचा भाग असतो. ईश्वर अकर्ता असतो पण मनुष्याला कार्याची संधि देतो. हीच नियति (Destiny)असते. याचेच दर्शन अर्जुनाला दिले असते.

सार :

ज्ञानसञ्च्छिन्न संशयम् :

वर्तमानात जीवनविकासासाठी शिक्षणाचे अर्थात ज्ञानाचे महत्व आहे, हे समाज मान्य करीत असला तरी भगवदगीतेनुसार मनुष्यजीवनातील कर्म, कर्तृत्व हा जीवनविकासात प्रधान विषय ठरतो. कर्म हा विषय स्पष्ट करतांना ज्ञानाचे महत्व कमी केले नसुन ज्ञानाला जगात सर्वश्रेष्ठ ठरविले आहे. ज्ञानामुळेच कार्यातील संशय मिटतो. व एकनिश्चय होतो.

योगसंन्यस्तकर्माणं :

व्यवहारात कार्याच्या एक(दृढ) निश्चयाचे महत्व स्पष्ट होते. निर्णय घेण्यासाठीच चर्चा होत असते. जसे धर्मयुद्ध ठरते. ठरलेला निर्णय execute करण्यासाठी कार्याचा निश्चय असणे, निष्काम कर्म याचे महत्व भगवदगीता सांगते. दुःखमुक्तिसाठी " योगः कर्मसु कौशलम् " हे रहस्य सांगते.

**********

(३-१८)

**********************

नैव तस्य कृतेन अर्थो न अकृतेन् इह कश्चन।

न च अस्य सर्वभूतेषु कश्चित् अर्थ व्यपाश्रयः।।

**********************

(३-१८):

" नैव तस्य कृतेन अर्थो न अकृतेन् इह कश्चन"

(Asset vs. burden)

कर्म व सुख याचा संबंध व त्या संदर्भातील Philosophy चार टप्प्यातुन "कर्मयोग" या अध्यायातुन स्पष्ट केली आहे. यातीलच एक महत्वाचा टप्पा Asset vs. burden? हा आहे.

१. कार्य व इच्छा संबंध

सुखासाठी इच्छा, इच्छापुर्तिसाठी कार्य केल्या जाते. याच आधारावर अर्जुन आपल्या नियतकार्यासंदर्भात म्हणतो, माझी सुखासाठी कोणतीच आकांक्षा नाही. यामुळे या कार्याचे प्रयोजन माझ्यासाठी व्यर्थ आहे. याच विचारसरणीमुळे वडिलोपार्जित

संपत्ति असेल तर कार्य करण्याची गरज नाही असे भाष्य केल्या जाते.

कार्य व इच्छा या संबंधाने "कार्यसंस्कार" या संदर्भात भगवतगीता भाष्य करते,
कार्य न करता मनाने विषय(इच्छा) चिंतन करणे हा मिथ्याचार ठरतो. तर कार्यसंस्कारीत असणारे मनावर नियंत्रण साध्य करुन कार्य करीत असतात. अर्थात कार्यसंस्कार(कार्यकौशल्य) या संदर्भात अनासक्ति, निष्काम कर्म याला महत्व आहे.
योगः कर्मसु कौशलम् ।(२-५०)

२. यज्ञ(समर्पण)
कार्यसंस्कारातील अनासक्तिसाठी यज्ञाची Philosophy "कार्याचे आध्यात्मिक व्यवस्थापन" या संदर्भात भगवतगीता सांगत आहे. विश्वात यज्ञरुपाने विविध कर्म घडत असतात. सृष्टिचक्रप्रवर्तनात या यज्ञाचे योगदान असते. म्हणुन निष्काम भाव धारण होण्यासाठी म्हटले,
यज्ञार्थात कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधनः।
तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर॥(३-९)

यज्ञाचा सृष्टिचक्रप्रवर्तनाशी संबंध आहे. अर्थात Destiny/ Goal ईश्वर असते. ईश्वराला समर्पण म्हणजे (ईश्वर)ज्ञानाने प्रदिप्त झालेल्या आत्मसंयमयोगाग्नित कर्माचे समर्पण .
(आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते)

३. सुख-अनासक्ति

(१)मनावर नियंत्रण ठेवुन कार्य करणे व(२)निष्काम कर्मासाठी यज्ञ तत्वाचा वापर करणे. या दोन टप्प्यानंतर तिसरा टप्पा सुखाचा, अनासक्तिचा असतो. जो आत्मतृप्त असतो, आत्मसमाधानी असतो, विचलित होत नाही अर्थात सुखासाठी कशावरही, कुणावरही अवलंबुन नसतो, त्याला कार्य करण्याचे कोणतेच प्रयोजन नसते. सुखी जीवनाची साधना या संदर्भात येथे शाश्वत सुख, परावलंबन त्यागणे अर्थात स्वावलंबन highlight केले आहे.

यःतु आत्मरतिःएव स्यात् आत्मतृप्तश्च मानवः।
आत्मनि एव च संतुष्टः तस्य कार्यं न विद्यते॥(३-१७)
नैव तस्य कृतेन अर्थो न अकृतेन् इह कश्चन।

न च अस्य सर्वभूतेषु कश्चित् अर्थ व्यपाश्रयः॥(३-१८)

श्रेष्ठ लोक याच तिसऱ्या टप्प्यात असतात. विश्वासाठी ते Asset असतात, Burden नसतात.

४. आदर्शासाठी कर्म

सामान्य लोक समाजातील श्रेष्ठांचे अनुसरण करतात म्हणुन भगवतगीता श्रेष्ठ लोकांचा चवथा टप्पा सांगते. कारण सामान्यांचा योगक्षेम चालविण्यासाठी त्यांना रोजगार/व्यवसाय या संदर्भात कर्माचीच गरज असते. म्हणुन श्रेष्ठांना गरज नसली तरी लोकहीतासाठी कर्माचा आदर्श ठेवावा. सामान्य लोकांचा बुद्धिभेद करुन त्यांना निष्क्रिय, आळशी करु नये.

न बुद्धिभेदं जनयेद् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।(३-२६)

सार:

कर्तृत्वच जगाचा इतिहास लिहीत असते. "संस्कार" या संदर्भात कार्यकौशल्य साध्य केल्याने सुखी जीवनाचा मार्ग सापडतो. निष्क्रियता म्हणजे चांगलेपणा नव्हे. म्हणुन भगवतगीता( चांगल्या

)मनुष्याला श्रेष्ठ होण्याचा मार्ग सांगते, नव्हे आग्रह धरते. कारण समाजातील बेरोजगारी, निष्क्रियता, शोषण हा समाजव्यवस्थेतील दोष असतो. या दोषावर पांघरुण घालणे हा सामान्यांचा बुद्धिभेद ठरतो. अशा वेळी स्वतःला गरज नसतांनाही श्रेष्ठांनी कार्यरत असण्याचा संदेश भगवतगीतेने दिलेला आहे.

उत्सीदेयुः इमे लोका न कुर्याम् कर्म चेत् अहं।
संकरस्य च कर्ता स्याम् उपहन्याम् इमाः प्रजाः॥(३-२४)
मनुष्याला मिळालेले जीवन अमुल्य आहे, ते केवळ स्वतःसाठीच नव्हे तर विश्वासाठी Asset व्हावे, हा भगवतगीतेचा संदेश आहे.

"The greatest development is achieved during the first years of life, and therefore it is then that the greatest care should be taken. If this is done, then the child does not become a burden; he will reveal himself as the greatest marvel of nature. "

-Maria Montessori

******

(३-१९)

**********************

तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर।

असक्तो हि आचरन् कर्म परम् आप्नोति पूरुषः।।

**********************

(३. १९):"तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर"

जगात धर्म आले तसेच ज्ञानविज्ञानही उपलब्ध झाले. या दोहोंचा हेतु मानवी जीवन सुखी करण्यासाठीच असला तरी केंद्रबिंदु मात्र मनुष्यच ठरतो. ज्ञानविज्ञानाचा संदर्भ घेतला तर विज्ञानाच्या प्रगतिने जगामध्ये क्रांतिकारक बदल झालेत. युरोपात १५ व्या शतकाला Age of Reasoning अशी ओळख मिळाली. केवळ वैज्ञानिक प्रगतिच नव्हे तर मनुष्याला प्रश्न करण्याचा अधिकार मिळाला व स्वातंत्र्याचे बीजारोपण झाले. मनुष्याला कर्म करण्याचा अधिकार आहे व विश्वासाने मार्गक्रमण करण्यासाठी ज्ञान जाणुन घेण्याचाही अधिकार आहे, हीच जागृति भगवतगीता करीत आहे.

*भाष्य, ज्ञान व कर्म

अर्जुनाला स्वतःच्या नियतकार्यात दुःख जाणवल्यामुळे संशय येतो, पण वास्तव न स्विकारता निष्क्रियतेचे समर्थन करतो व आपल्या भूमिकेला ज्ञानी समजतो. हे भाष्य व्यवहारातील कार्यसंबंधाने असल्यामुळे या भाष्याला प्रज्ञावाद संबोधल्या जाते व ही भूमिका अज्ञानाला ज्ञान ठरविणे अशी असते. याच अनुषंगाने ज्ञान व कर्म यांचा संबंध भगवतगीतेने स्पष्ट केलेला आहे.

*ज्ञान व कर्म

कार्याद्वारे भौतिक विकास होतो व याच कार्याद्वारे शाश्वत विकास(आत्मोन्नति)होतो. हेच रहस्य भगवतगीता ज्ञानविज्ञानाद्वारा उलगडते. याच संदर्भात व्यवहारातील भाष्य/ज्ञान कार्याला पोषक असावे. ज्ञानामुळे संशय छेदल्या जातो व कार्याचा निश्चय होतो. अर्जुन कार्यातील संशयाचे वास्तव स्विकारतो व हा संशय छेदण्यासाठी त्याला ज्ञान हवे असते, ज्यामुळे विश्वासाने जीवनमार्ग चालु शकेल.

*कर्म-कार्यकौशल्य

जीवन आहे म्हणुनच मनुष्य जगत असतो, सुखासाठी धडपडत असतो. पण या धडपडीत दुःखही अनुभवत असतो. याच दुःखाशी कसा सामना करायचा याचे ज्ञान नसेल तर जगण्यात Stress असतो, नैराश्य येते. व नकारात्मक/प्रज्ञावादी भाष्य करतो. जीवन आहे तर दुःख आहे, मृत्यु आहे. पण मृत्यु म्हणजे दुःखाचा अंत असा मनुष्याचा गैरसमजही होतो. हेच अज्ञान आहे. दुःखाचा अंत म्हणजे योग(दुःखान्त) हे ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते. याचसाठी जीवनात कार्यसंस्कारित होणे, कार्यकौशल्य साधुन निष्काम कर्म करणे. हे ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते.

*जीवनमुल्ये:

जीवनमुल्ये(Values) व कार्य (State of art) याद्वारा कार्यकौशल्य साध्य होते. "भाष्य" संदर्भात " बोले तैसा चाले" याद्वारा वचनमुल्य Highlight होते. याच मुल्याला रामायण highlight करते. वचन बोलणे(Decesion) व त्याचे पालन (Determination) याद्वारा मनुष्य स्वतः विश्वासाने मार्ग चालतो. इतरांचाही विश्वास असतो. म्हणुन नियतकार्याला स्वधर्मपालन जाणुन कार्य करणे. असे "धर्म" या संदर्भात अर्जुनाला संबोधन होते. याप्रमाणे स्वधर्म जीवनमुल्य ठरते.

*ज्ञान, ईश्वर व मार्ग:

ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. ज्ञान कार्याला पोषक व्हावे यासाठी जीवनात ईश्वराचा आश्रय ज्ञानाचा आश्रय ठरतो. याचसाठी बुद्धियोगी होणे, यामुळे अमृतंगमय (शाश्वत) मार्गावर असतो. या मार्गावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य होते. अर्थात (ईश्वर)ज्ञानामुळे संशय मिटतो. कार्याचा निश्चय होतो व कार्याद्वारे भक्ति घडते(निष्काम कर्म). याप्रमाणे ईश्वराचा आश्रय जीवनाच्या शाश्वत विकासमार्गात ज्ञान-कर्म-भक्ति या Cycleची पुर्तता करते.

*शाश्वत विकासमार्गाचे महत्व:

१. मनुष्याला मिळालेले जीवन अद्भूत आहे. या जीवनाचे रहस्य जाणुन विश्वासाने, आनंदाने, निर्भयतेने जगणे यासाठी भगवतगीता ज्ञान आहे. अर्थात मनुष्य जगण्यास सक्षम व्हावा म्हणुन भगवतगीतेने "मार्ग" या संदर्भात व्यावहारिक पारदर्शकता व जीवनविकासाचा शाश्वत मार्ग यामध्ये पारदर्शकता आणलेली आहे.

*दोन्हीमध्ये कार्य Common असते. ज्या कार्याने व्यवहारसिद्ध होतो, तेच कार्य शाश्वत विकासमार्गात योग(Exercise)साधन होते.

*समाजात जगतांना व्यवहार असला तरी सर्वांसाठी शाश्वत विकासमार्ग Common असतो.

२. व्यवहारात कार्य संबंधाने भाष्य बोलल्या जाते. मनुष्य जी कृति करतो, ती योग्य समजुनच करतो. कर्म टाळले तरी स्वतःला योग्य ठरविण्यासाठी भाष्य बोलत असतो. याप्रमाणे संपुर्ण जग कार्यरत असते व मनुष्य भाष्य करीत असतो.

मनुष्याला इच्छा असतात व कार्य विकासाचे साधन असते. इच्छेला मर्यादा नसल्यामुळे अशांति असते. अशांतिमुळेच मनुष्य नकारात्मक भाष्य बोलत असतो. यातुन मनसमाधानासाठी, व्यवहारसिद्धिसाठी भाष्य बोलतो. यामुळे भाष्य टिकात्मक, उपदेशात्मक होते.

जेंव्हा स्वतःला काय हवे?याचे वास्तव न स्विकारता आपल्या निष्क्रियतेला योग्य ठरविण्यासाठी भाष्य बोलतो, ते भाष्य स्वतःच्या मनसमाधानासाठी, दुर्बलतेला शक्ति दर्शविण्यासाठी असते. असे भाष्य जेंव्हा स्वतःचे हीत साधण्यासाठी वापरतो, तेंव्हा इतरांच्या आदर्शाला, मुल्यांना आवाहन करीत असतो.

अर्थात स्वतःचे वास्तव न स्विकारता प्रज्ञावादी भाष्य बोलल्या जाते.

अशा प्रकारचे भाष्य समाजात चालत असते, तेंव्हा चांगला मनुष्यही भ्रमात सापडतो. शाश्वत विकासमार्गावर असलेला मात्र या भाष्याने मोह पावत नाही. कारण या मार्गात अनासक्तिचे प्रयोजन आहे.

तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर।
असक्तो हि आचरन् कर्म परम् आप्नोति पूरुषः॥(३-१९)
 *****

३-१९:
" असक्तो हि आचरन् कर्म परम् आप्नोति पूरुषः"
(निष्काम कार्याद्वारे आत्मोन्नति)

देव सर्व जाणणारा, कर्ता आहे आणि श्रीकृष्ण जर देव होते तर त्यांनी पांडवांना जुगार खेळण्यास कां थांबविले नाही!किंवा

मानवसंहार होणारे युद्ध कां थांबविले नाही?असा वाद समाजात होतो.

मनुष्याला सर्व Readymade मिळाले असते तर त्याच्या बुद्धिला चालनाच मिळाली नसती. त्याचे Role त्याला कळलेच नसते. युद्धात अर्जुनाबरोबर श्रीकृष्ण होते, पण लढायचे अर्जुनाला होते. अर्जुनाला जीवनयात्रेतील मार्ग दिसत नाही. श्रीकृष्ण मार्ग दाखवतात, पण चालायचे अर्जुनालाच असते.

पांडवांना न्याय मिळावा यासाठी धर्मयुद्ध ठरले असते. अर्जुनाचे नियतकार्य याच धर्मयुद्धाचा भाग असतो. अर्जुन आपल्या अज्ञानाला Challange न करता धर्मयुद्धालाच Challange करतो. स्वतःचे अज्ञान न स्विकारता इतर मुद्यावर लक्ष Divert करणे अशी समाजात संवय असते. याच संवयीला भगवतगीतेने प्रकाशात आणले आहे. या संवयीमुळे प्रश्नाचे निदान होत नाही. विषयाची निश्चितिय होत नाही. कारण मुख्य विषयाला Divert करणे हाच हेतु असतो.

मनुष्य "मी योग्य" समजुनच जगत असतो. यासाठी तो आपल्या Belief system चा उपयोग करतो. जसे धर्मराजाने जुगाराचे

निमंत्रण स्विकारले. तसेच मनुष्य योग्य नसला तरी स्वतःला योग्य ठरविण्यासाठी स्वतःच्या Belief system चा उपयोग करतो. जसे अर्जुन आपले नियतकार्य पाप आहे हे सिद्ध करण्यासाठी भाष्य करतो.

मनुष्याने योग्यच व्हावे हे भगवतगीतेला अपेक्षित आहे. व योग्य काय आहे हे सांगत आहे. मनुष्याची "अज्ञानी vs ज्ञानी" ही भुमिका स्पष्ट होण्यासाठीच कर्म, ज्ञान, धर्म, ईश्वर यांची निश्चित भूमिका स्पष्ट करीत आहे.

*कर्म :
जगात सर्व लोक कार्यरत असतात व कार्यानेच विकास होतो अर्थात कार्य जीवनविकासात मुख्य साधन आहे हा भगवतगीतेचा संदेश आहे. कुणाजवळ सर्व श्रीमंति असते, आत्मतृप्त(सुखी) असतात. तरी आदर्शासाठी कार्यरत असतात. जसे राजा जनक. सामान्यांना निष्क्रिय करणे हा बुद्धिभेद असतो.

तस्माद् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर।
असक्तो हि आचरन् कर्म परम् आप्नोति पूरुषः।।(३-१९)
कर्मणि एव हि संसिद्धिं आस्थिता जनकादयः।(३-२०)

न बुद्धिभेदं जनयेद् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।(३-२६)

*ज्ञान

(Attachment vs. Detachment) :

विज्ञानाने निर्विवाद जगात क्रान्ति घडवुन आणली. ज्ञानविज्ञानामुळेच प्रश्नाचे निदान होते, उपाय मिळतो. भगवतगीतेने ज्ञानाला सर्वश्रेष्ठ संबोधले आहे.

मनुष्याचे जीवन सिमित काळासाठी असते. या जीवनात Survival mode मध्ये जगत असला तरी कर्म विकासाचे महत्वाचे साधन असते. Survival mode मध्ये सकाम कार्याची मानसिकता असते. याच मानसिकतेत बदलाव घडुन येण्यासाठी Attachment vs. Detachment हे कर्माचे शास्त्र आहे.

ज्ञान, मनुष्याचे Consciousness, विश्वसंचलन या सर्वांचा संबंध ईश्वर या संज्ञेद्वारा भगवतगीतेने साधलेला आहे. ज्यामुळे या विश्वातील मनुष्याची भूमिका स्पष्ट होते. व "अशाश्वताकडुन शाश्वताकडे" या आत्मोन्नति मार्गाचा हेतु स्पष्ट होतो. याचसाठी Attachment vs. Detachment हे कर्माचे शास्त्र स्पष्ट होते. हेच शास्त्र बंधन-मोक्ष या शास्त्राचा आधार आहे.

(बंधन -मोक्ष)

धर्मात पाप-पुण्य, स्वर्ग-नरक हे भाष्य असते. म्हणुन धर्मापेक्षा ईश्वराच्या भूमिकेला श्रेष्ठ ठरविले आहे. ज्यामुळे बंधन-स्वातंत्र्य(मोक्ष) हे शास्त्र महत्वाचे ठरते.

(Belief system vs Self confidence)

सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।।(१८-६६)

सार :

"To work without attachment is to work without the expectation of reward or fear of any punishment in this world or the next. Work so done is a means to the end, and God is the end. "

-Ramakrishna

**********

(३. २०)

*********************

कर्मणैव हि संसिद्धिम् आस्थिता जनकादयः।

लोकसंग्रहम् एव अपि संपश्यन् कर्तुम् अर्हसि ॥

**********************

(३-२०) :

"कर्मणैव हि संसिद्धिम् आस्थिता जनकादयः"

(Inner management of great people)

"श्रेष्ठ लोक" याविषयी समाजात बरेच गैरसमज असतात. तरी लोक स्वतःला श्रेष्ठ ठरविण्यासाठी तुलना, समर्थन (Judgement thinking) याचा वापर करतात. समाजात (लोकांसाठी) श्रेष्ठ असणे, ज्यांचे अनुसरण सामान्य लोक करतात व श्रेष्ठत्व अनुभवणे या दोन गोष्टी भिन्न आहेत. एक Extrvert तर दुसरी Introvert ठरते. या दोन्हीचा समन्वय भगवतगीतेने साधला आहे.

श्रेष्ठ होण्याची इच्छा म्हणजे श्रीमंती, उच्च पदाची इच्छा (भोगैश्वर्य) असते. ही भौतिक असते. या इच्छेला मर्यादा नसते. ही अयुक्त (सकाम मानसिकता) स्थिति असते.

इदम् अद्य मया लब्धम् इमं प्राप्से मनोरथम् ।(१६-१३)

श्रेष्ठत्व अनुभवणे ही उच्च जीवनाची साधना असते. हाच भगवतगीतेचा विषय आहे.

श्रेष्ठ, कर्तृत्ववान मनुष्याची योजक क्षमता, कार्याचा एकनिश्चय, निष्ठा Excellence, निष्काम कार्य अशी ठळक वैशिष्टे असतात. तो कार्यरत नसला तरीही कार्यरत असतो.

सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी।

नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ।।(५-१३)

संस्कार या संदर्भात हेच Inner management असते.

तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचरन् ।

असक्तो हि आचरन् कर्म परम् आप्नोति पुरुषः।।(३-१९)

कर्मणैव हि संसिद्धिम् आस्थिता जनकादयः।

लोकसंग्रहम् एव अपि संपश्यन् कर्तुम् अर्हसि।।(३-२०)

भगवतगीता श्रेष्ठ लोकांच्या याच Inner management चे(श्रेष्ठांचा विकासमार्ग) ज्ञान स्पष्ट करीत आहे.

व्यवहारात इच्छापुर्तीसाठी कार्य असते. यातील कार्य विकासमार्गात साधन असते. या मार्गात कार्याचा एकनिश्चय असतो, विचलित होत नाही (द्वन्द्वमोहनिर्मुक्त). तर सकाम मानसिकतेत विचलित होतो.

या व्यवस्थापनात यज्ञ, दान, तप (कायीक, वाचिक, मानसिक) असे तीन कर्मे असतात.

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यं एव तत् ।
यज्ञः दानं तपैश्चैव पावनानि मनीषिणाम् ।।(१८-५)

या विश्वात यज्ञरुपाने कर्म घडत असतात. सृष्टिचक्रप्रवर्तन या संदर्भात यज्ञ या शब्दाने सृष्टितील कर्माला संबोधले आहे.

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।(४-३२)

यज्ञ निष्काम कर्म या संदर्भात कार्याची व्यवस्थापन कला ठरते.

यज्ञार्थात् कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधनः।

तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर॥(३-९)

सार:

या विश्वात भार बनु नका हा भगवतगीतेचा संदेश आहे.

एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्तयतीह यः।

अघायु इंद्रियरामः मोघं पार्थ स जीवति॥(३-१६)

स्वावलंबि होण्यासाठी (शरीरयात्रा, योगक्षेम) कर्म करावेच लागते. याच कर्माद्वारे सृष्टिचक्रप्रवर्तन होत असते. हेच रहस्य जाणण्याचा विषय आहे.

ऐश्वर्यप्राप्तिसाठी कर्म मनुष्य जाणतो. (सकाम मानसिकतेमुळे विचलित होतो. ) विचलित न होण्याची शक्ति म्हणजे योग व योगासाठी कार्य जाणणे हा आध्यात्मिक व्यवस्थापनाचा विषय बनतो. याचमुळे मानसिक शक्ति, धैर्य, निर्भयता लाभते.

"कष्ट सह कर ही सबसे मजबूत लोग निर्मित होते हैं; सबसे महान चरित्रों पर घाव के निशान होते हैं।"

- खलील जिब्रान

******

(३-२०):

"लोकसंग्रहम् एवअपि सम्पश्यन् कर्तुम् अर्हसि"

(जगाला कर्माचा संदेश हवा!)

१. स्वतःच्या जीवनातील सामान्य-श्रेष्ठ श्रेणी:

मनुष्य आपापल्या स्वभावानुसार जगत असतो. त्याची जीवनयात्रा सामान्य पातळीवरच चालु असते. या पातळीवर सकाम कार्यरत असल्यामुळे द्वन्द्ववशही होतो.

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वन्द्वमोहेन भारत।

सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप॥(७-२७)

सामान्य पातळीवर असल्यामुळेच जगात इतरांनी बदलावे अशी मनुष्य इच्छा करतो. जगावर टिका करतो.

"Everyone thinks of changing the world, but no one thinks of changing himself. "

Leo Tolstoy------

भगवतगीता मनुष्याला येथेच सावध करते. विचलीत होणे, द्वन्द्ववश होणे ही सामान्य अवस्था असते. तर जीवनाचे श्रेष्ठत्व हे मानवी जीवनाचे ध्येय असते. हे श्रेष्ठत्व म्हणजे स्वतःमध्ये बदल घडवुन आणतो. याच श्रेष्ठत्वाचे द्वार भगवतगीता उघडुन देते. याचा आधार ज्ञान-अज्ञान असतो.

"Before changing the whole world, you need to change your own world. "

Myra Yadav

२. जीवनविकासातील ज्ञान-अज्ञान श्रेणी:

सामान्य-श्रेष्ठ, श्रीमंत-गरीब अशा श्रेणी समाजात आढळतात. निट्त्शी या तत्वज्ञाने संस्कार या संदर्भात Herd morality व Master morality असा भेद केला. ज्ञान सर्वश्रेष्ठ असल्यामुळे ज्ञानी-अज्ञानी या दोन सर्वात महत्वाच्या श्रेणी ठरतात.

*सामान्य व श्रेष्ठ यांत चांगलेपणा Common असतो. चांगलेपणा या संदर्भात भगवतगीतेत दैवी-आसुरी अशा दोन श्रेणीला ज्ञान-अज्ञान या संदर्भात प्रकाशात आणले आहे.

*सामान्य व श्रेष्ठ या संदर्भात दुसरा मुद्दा कार्यरत असणे common आहे. जीवनप्रवासात कर्म साधन आहे. श्रेष्ठ निष्काम

कार्यरत असतो, तर सामान्य "चांगले" या संदर्भात चांगले म्हणावे ही इच्छा करतात यामुळे परावलंबि ठरतात. सामान्य सकाम मानसिकतेमुळे ज्ञानी-अज्ञानी या संदर्भात अज्ञान स्तरावर फेकल्या जातो. तर श्रेष्ठ एकनिश्चयाने, विश्वासाने मार्गक्रमण करतो.

३. श्रेष्ठांचा मार्ग :

सामान्याचे मानसशास्त्र या संदर्भात श्रेष्ठ-कनिष्ट हा मानसशास्त्रिय विषयही होवु शकतो. पण श्रेष्ठांचा Standard मार्ग या संदर्भात ज्ञानी-अज्ञानी याच श्रेणीचे महत्व असते. जगात कितीही श्रेणी (श्रीमंत-गरीब, शिक्षीत-अशिक्षीत, चांगला-वाईट इ. )असल्या तरी ज्ञानी-अज्ञानी ही श्रेणी (विभागणि) सर्वात महत्वाची ठरते. "तमसो मा ज्योतिर्गमय"अर्थात अमृतत्वाय कल्पते" हा Standard मार्ग असतो. या मार्गावर विचलित होत नाही. निष्काम कार्यरत असतो. कार्याचा एकनिश्चय असतो.

याच Standard चे आधारावर अज्ञानाची ओळख करुन ज्ञानाने संशय छेदणे आवश्यक असते. अर्जुनाला अज्ञानाची ओळख होते व त्याचा स्विकार करतो. भगवतगीता संदेश देते,

"योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम् "

४. आदर्श :

सामान्य श्रेष्ठांचे अनुसरण करतो, म्हणुन श्रेष्ठांनी गरज नसली तरी कार्यरत असणे आदर्शासाठी आवश्यक असते. अर्जुन जसे

समाधानासाठी निष्क्रियतेचे तत्वज्ञान बनवितो, तसेच सामान्य आपल्या समाधानासाठी तत्वज्ञान बनवीत असतो. यामुळे चुकीचे संदेश समाजात जातात. निष्क्रियतेचे समर्थन करणे समाजाला आळशी करणे असते. कारण सामान्याला विकासासाठी कार्याचीच गरज असते.

लोकसंग्रहम् एवअपि सम्पश्यन् कर्तुम् अर्हसि।(३-२०)
यद् यद् आचरति श्रेष्ठः तत् तत् एव इतरो जनः।(३-२१)

सार :

हे जीवन सिमित काळासाठी लाभलेले असले तरी यांत मोठी संधि दडलेली असते. या संधिची ओळख होणे महत्वाचे आहे. सामान्य जीवन तर सर्व लोकच जगत असतात. श्रेष्ठ जीवनाचा अनुभव मात्र फक्त स्वतःच घेवु शकतो. हाच भगवतगीतेचा संदेश आहे.

येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)

*******

(३-२१)

**************************

यद् यद् आचरति श्रेष्ठः तद् तद् एव इतरो जनः।
स यद् प्रमाणं कुरुते लोका तदनुवर्तते॥

**************************

(३. २१)/१ : "यद् यद् आचरति श्रेष्ठः "

समाजात Master व Herd अशा दोन प्रकारच्या Morality आढळतात व तदनुसारच मानसिकता बनते असे भाष्य निट्त्झी या तत्वज्ञाने केले होते. भगवतगीतेत "श्रेष्ठ " संदर्भात निश्चित ज्ञान व त्याची मानसिकता स्पष्ठ केली आहे.

यद् यद् आचरति श्रेष्ठः तद् तद् एव इतरो जनः।
स यद् प्रमाणं कुरुते लोका तदनुवर्तते॥(३-२१)

सामान्य जीवन जगण्याचा मुलभूत सिद्धांत Survival वर आधारित असतो. यातुनच त्याच्या सुखाच्या, मोठेपणाच्या संकल्पना ठरत असतात. जीवनात यशस्वी व्हावे, सुखी व्हावे,

मोठे व्हावे इ. मनुष्याच्या स्वाभाविक इच्छा असतात. तर मोठे म्हणावे, चांगले म्हणावे अशाही सुखाच्या संकल्पना बनत असतात.

प्रत्यक्षात तो जे श्रेष्ठत्व मान्य करतो, त्याच्या आचरणाचे अनुसरण करीत असतो. यामुळेच समाजात Judgement thinking याचा वापर करुन चांगले वाईट, लहान मोठे, पाप पुण्य, श्रीमंत गरीब या आधारावर तुलनात्मक भाष्य चालत असते. याप्रमाणे समाजातील श्रेष्ठत्वाच्या संकल्पना मनुष्यच ठरवित असतो.

मनुष्याला जीवनाचे जसे ज्ञान होत असते, तसा आपल्या क्षमतेनुसार प्रयत्नशीलही असतो. मनुष्याच्या जीवनाच्या, श्रेष्ठत्वाच्या संकल्पना कोणत्याही व कशाही असल्या तरी त्याची प्रत्यक्ष कुरुक्षेत्रावरच (Field of work) परिक्षा ठरत असते. येथे त्याची मानसिकता बोलत असते.

अर्जुन विद्यासंपन्न, युद्धपारंगत, दैवीगुणसंपन्न असला तरीही कुरुक्षेत्रावर त्याची स्थिति सामान्यासारखी शोकाकुल (श्रेष्ठांना अशोभनिय)बनते. व येथेच श्रीकृष्ण सामान्य व श्रेष्ठ यांतील भेद स्पष्ट करतात.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)
श्रेष्ठ विकासमार्गात दुःखाने विचलित होत नाही.

जीवनाच्या श्रेष्ठत्वाचे दालन मनुष्यासाठी उघडे असले तरी त्या दालनात स्वतः प्रवेश करावा लागतो. कारण येथे कोणतेच बाह्यज्ञान काम करीत नाही, तर मनुष्याच्या अंतरंगात असलेली उच्च चेतना(जी कांही गीताभक्त Krishna Consciousness म्हणुन ओळखतात) क्रियाशील होत असते. दुसऱ्या शब्दात मनोविज्ञानातील उच्च ज्ञान कसे व कां वापरायचे? याचे सविस्तर ज्ञान देणारे एकमेव शास्त्र म्हणुन भगवतगीतेची जगात ओळख आहे. भगवतगीतेचा तत्वज्ञ भक्त इमर्सन * म्हणतो,

"Be yourself; no base imitator of another, but your best self. There is something which you can do better than another. Listen to the inward voice and bravely obey that. Do the things at which you are great, not what you were never made for.
-Ralph Waldo Emerson "

भगवतगीतेत सामान्य व श्रेष्ठ यांतील भेद विविध प्रकारे श्रीकृष्ण स्पष्ट करुन सांगतात. सामान्य लोकांत वाघ व बकरी याद्वारा हा भेद प्रसिद्ध असतो. अर्जुनाला श्रीकृष्ण पुरुषव्याघ्र संबोधुन श्रेष्ठत्वाच्या दालनात प्रवेश करण्यासाठी Motivate करतात.

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम् ।
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकिर्तितः ।।(१८-४)

त्याग या संदर्भात "पुरुषव्याघ्र" हे विशेषण वापरले. वाघ प्रसंगी भुकेला राहणे पसंत करतो पण गवत खात नाही. कर्म(शिकार) करुन अन्न मिळवितो. तसेच फलत्याग कौशल्य साधुन कर्माद्वारेच श्रेष्ठत्वाच्या दालनात प्रवेश करायचा असतो.

जगातील सर्वलोक आपापल्या Belief system नुसार, ज्ञानानुसार जगत असतात. श्रेष्ठ जीवन जगण्याच्या प्रयत्नात असणारेही जीवनात त्यांच्या(यशस्वी विषयीच्या) संकल्पनेनुसार यशही मिळवितात. जसे राज्यसुख अर्जुनाच्या दृष्टिक्षेपातच होते. पण हे यश मनुष्याला सुखी करेलच याची शाश्वती नसते. सिकंदराने हेच सत्य मान्य केले. याचे कारण मनुष्याच्या

श्रेष्ठत्वाच्या संकल्पना त्यांच्या स्वतःच्या Perception नुसार असतात.

म्हणुनच भगवतगीतेतील श्रेष्ठत्वाचे ज्ञान "Timeless Leadership "म्हणुनही ओळखल्या जाते.

"Discover the traits that makes you great and develop those to become all you can be. "
Demond Jackson,
(Writer:Finding happiness in the Workplace)

*Ralph Waldo Emerson (1803-1873) said this about the Bhagavad Gita: "I owed a magnificent day to the Bhagavad-Gita... His answer was "He was fortified by the Bhagavad Gita which taught that if one were morally right, one need not hesitate to fight injustice.
********

(३-२१)/२:

"यद् यद् आचरति श्रेष्ठः तत् तत् एव इतरो जनः"

(श्रेष्ठांचा मार्ग)

युधिष्ठिराला यक्ष प्रश्न करतो. "कः मार्ग?"तेंव्हा युधिष्ठिराचे उत्तर असते, जो मार्ग श्रेष्ठ आचरण करतात. त्याच मार्गाचे अनुसरण सामान्य लोक करीत असतात.

श्रेष्ठांचा हा मार्ग कोणता?

भगवतगीता यावरच भाष्य करते.

यद् यद् आचरति श्रेष्ठः तत् तत् एव इतरो जनः।

स यत् प्रमाणं कुरुते लोकाः तत् अनुवर्तते॥(३-२१)

अर्जुन नियतकार्य टाळण्यासाठी धर्मज्ञान बोलतो. तेंव्हा सामान्याला शोभेल असे अर्जुनाचे (प्रज्ञावादी) वर्तन आहे असे श्रीकृष्ण ठणकावुन सांगतात व तु "दैवीसंपत्ति"ने युक्त असा जन्माला आलेला आहे. तुला अशोभनिय आहे. क्षुद्र हृदयदौर्बल्याचात्याग कर.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

या पार्श्वभूमिवर श्रेष्ठ आचरण करतात, तोच मार्ग अर्जुनाला सांगण्यात येतो. व हाच भगवतगीतेचा संदेश आहे. कारण मनुष्य सामान्याचे जीवन जगतच असतो.

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थ धनुर्धरः।
तत्र श्री विजयो भूतिः धृवा नीतिः मतिः मम।।(१८-७८)

सामान्याचे जगणे:

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप।।(७-२७)

श्रेष्ठांचा मार्ग:

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

येषा तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।

ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)

व्यावहारिक बोध:

मनुष्य सामान्याचे जीवन तर जगतच असतो. ज्यांना सामान्य जीवन जगायचे आहे, त्यांच्या जगण्यावर भगवतगीता आक्षेप घेत नाही. परंतु जो श्रेष्ठ, ज्ञानी ही ओळख घेवुन जन्माला आलेला आहे, जगत आहे, त्याच्या जगण्यावर मात्र आक्षेप घेतला आहे.

जगात अशक्य कांहीही नाही. पण यासाठी "योजक" दृष्टि हवी. अर्थात योजकांसाठी (Leadership) कांहीही अशक्य नाही. व याचसाठी श्रेष्ठत्वाचा मार्ग जाणणे आवश्यक आहे.

अमंत्रं अक्षरं नास्ति, नास्ति मुलम् औषधम्।

अयोग्य पुरुषं नास्ति योजकः तत्र दुर्लभः।।

"A soul without a high aim is like a ship without a rudder. "

-Eileen Caddy

********

(३-२१)३:"स यत् प्रमाणं कुरुते लोकः तदनुवर्तते"

जीवनयात्रा vs. विकासमार्ग

जन्मापासुन मृत्युपावेतो चालु असते तीच जीवनयात्रा असते. याच जीवनयात्रेत ठरल्याप्रमाणे नियतकार्य करण्यास अर्जुनाला अडचण जाणवते. कार्य टाळायचे हेच त्याने ठरविले असते. आपली भूमिका योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी धर्माचे ज्ञान सांगतो.

जीवनयात्रेत अडचण जाणवली, दुःख आले तर! जेंव्हा मनुष्याला (आवश्यक) कार्य करायचेच नसते तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो तेंव्हा त्या प्रश्नाला न हाताळता सरळ समर्थन भाष्य करतो, यामुळे वास्तव स्विकारीत नाही. तो द्वंद्वमोहाच्या जाळयात सापडतो. यामुळे बुद्धिभ्रम होतो. याचाच अर्थ तो जीवनाचा विकासमार्ग जाणत नाही. अर्जुनाला याच विकासमार्गाचे अज्ञान असते. भगवतगीता याच "विकासमार्गाचे "ज्ञान सांगते. याचसाठी "बुद्धियोग" प्रयोजन असते. "अमृतत्वाय कल्पते" हा विकासमार्ग जाणतो.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

श्रेष्ठ मनुष्य नित्य विकासमार्गावर असतो. या मार्गावर विचलित न होता विश्वासाने कार्यरत असतो. तो स्वतःच्या बुद्धिचा वापर करतो. त्याचे जगणे प्रमाण असते व सामान्य लोक याच मार्गाचे अनुकरण करतात.

यद् यद् आचरति श्रेष्ठः तत् तत् एव इतरो जनः।
स यत् प्रमाणं कुरुते लोकः तदनुवर्तते॥(३-२१)

याप्रमाणे भगवतगीता सामान्य व श्रेष्ठ मनुष्य यांतील भेद दर्शविते. जीवनयात्रा तर चालणारच आहे, पण श्रेष्ठ होण्यासाठी विकासमार्गाचे ज्ञान हा जीवनाचा आदर असतो हे भगवतगीता स्पष्ठ करते.

उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत् ।
आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मना॥(६-५)

*******

(३-२२)

*************************

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन।

न अनवाप्तम् अवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि।।

*************************

(३-२२):

"न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किञ्चन"

(Audience vs. Hero)

सहसा धर्म, अध्यात्म या विषयासंबंधी ग्रंथात (समाजात सुखशांति प्रस्थापीत होण्यासाठी)जगाने काय करावे?या विषयावरच उपदेश असतो. पण भगवतगीतेतील ज्ञान व्यक्तिगत विकासासंबंधी आहे.

Audience vs. Hero

Everyone is Hero of his/her own story.

"Heroic Imagination Project*( California) teaches people how to take effective action in challenging situations. HIP, translate the extensive research findings of social psychology and related fields into meaningful insights and tools that individuals can use in their everyday lives to transform negative situations and create positive change. "

देश, समाज याबाबत भाष्य ऐकले तर सामान्यतः लोक तुलना करतात व Audience ची भूमिका घेतात. "लोक ऐकतच नाही! अशी टिप्पणि करतात. अर्थात समाजविकास या संदर्भात कितीही ज्ञान ऐकले तरी स्वतःला exclude करतात. पण स्वतःच्या फायद्याचे असेल, स्वतःचे सुखदुःख प्रभावित होत असेल तर मात्र भाष्य बदलते.

विकास या संदर्भातच भगवतगीतेतील संपुर्ण ज्ञानाचा हेतु अर्जुनाच्या सुखदुःखाशी निगडित आहे. दुःख टाळण्यासाठीच अर्जुनाने नियतकार्य न करण्याची निवड केलेली होती. योगक्षेमासाठी, भोगैश्वर्यासाठी कार्य ही स्थिति Survival या

संदर्भात असते. हाच संदर्भ घेवुन सुखासाठी राज्याची इच्छा नाही, मग कर्माचे प्रयोजन कशाला? हा प्रश्न अर्जुन उपस्थित करतो.

१. सामान्य श्रेष्ठांचे अनुसरण करतात. श्रेष्ठांजवळ(/श्रीमंत असलेले) मिळविण्यासाठी कांहीही नसले तरी आदर्शासाठी कर्म करणे आवश्यक आहे. अन्यथा लोक आळशी होतील. व याचे श्रेय(!) श्रेष्ठांकडे जाईल.

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किञ्चन।
न अनवाप्तम् अवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि॥(३-२२)

२. सुख या संदर्भात प्रसन्नता, शांति, दुःखान्त (विचलित न होणे, योग) अशी व्याख्या भगवतगीतेत केलेली आहे.
तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम् ।(६-२३)

अ)ज्या मार्गावर(दुःखाने) विचलित होत नाही, तो विकासाचा शाश्वत(Standard) मार्ग भगवतगीता सांगत आहे.
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

ब)समत्वयोगाने कार्य करणे/कार्याद्वारे योग हेच कार्यकौशल्य ठरते.
योगः कर्मसु कौशलम् ।(२-५०)

*****

*(The Heroic Imagination Project (HIP) is a nonprofit organization, headquartered in San Francisco, California, it was founded by Dr. Philip Zimbardo, Professor Emeritus of Psychology at Stanford University. )

****

(३-२२):
"न अनवाप्तम् अवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि"

कर्तृत्व आणि श्रेष्ठत्व यांचा घनिष्ठ संबंध आहे हा महत्वाचा संदेश भगवतगीता देत आहे. सामान्य लोक श्रेष्ठांचे अनुसरण करतात. अनुसरण या संदर्भात अंधानुकरणही (Without reasoning) होत असते. समाजातील श्रद्धा, निष्ठा "Without reasoning"

असतात, तेंव्हा अंधश्रद्धा संबोधल्या जाते. अंधानुकरण म्हणजे स्वतःच्या बुद्धिचा वापर न करणे.

अर्जुन निष्क्रियतेला धर्म(आदर्श) ठरवितो. याच मुद्यावर भगवतगीता सुरु होते.

१. आदर्श या संदर्भात समाजात निष्क्रियता पसरविणे म्हणजे समाजाला आळशी बनविणे असते.

२. अज्ञानाला ज्ञान संबोधणे हा भ्रमअसतो. वास्तव स्विकारल्यावर प्रश्नाची पारदर्शकता येते. निदान होते. Reasoning व Without reasoning यातील भेद येथे स्पष्ट होतो.

"कर्तृत्व" या संदर्भातच लोकांमध्ये विविधता आढळते. कर्तृत्वानेच श्रेष्ठत्व लाभत असते. पण श्रीमंतीमुळे श्रेष्ठत्व लाभते असा कांही लोकांचा समज असतो.

"गरीब खावे भुङगडा तो भुखा मरो खावे।अमीर खावे तो शोकसु"अशी एक राजस्थानी म्हण आहे. श्रीमंत झाला तर कर्म करण्याची गरज नाही असा कांही लोकांचा समज असतो.

कर्म या संदर्भात विविध निष्ठा असते,

" मंदीर बांधकामात व्यस्त असलेले तीन कारागिर वेगवेगळी मते मांडतात. एक म्हणतो, पोटासाठी कष्ट करतो!दुसरा म्हणतो माझ्यामुळे मंदीरनिर्मिती होत आहे!तिसरा मुर्ति तराशत असतो, तो म्हणतो दगडात ईश्वर आहे, मी फक्त अनावश्यक दगड वेगळे करीत आहो. "

कर्म या संदर्भात (१)योगक्षेमासाठी कार्य (२)वैभवप्राप्ति, भोगैश्वर्यासाठी कार्य (३) समुहकल्याणासाठी कार्य(४) जगतहीत, मानवकल्याणासाठी कार्य अशा विविध निष्ठा असतात. यानुसार व्यक्ति आपल्या सहजकार्याचा वापर करतो.

प्रत्येक क्षणात कर्म घडते. कार्याद्वारे विकास होतो. या विकासात स्वतःचा योगक्षेम, समुहकल्याण, जगत-मानवकल्याण यांचा समावेश असतो. म्हणुन नियतकार्याद्वारे ईश्वरभक्ति (Exercise, योगः कर्मसु) हा संदेश भगवतगीता देत आहे.

व्यवहारात कार्य ठरते. अर्जुनाला नियतकार्य मिळते. पण दुःखी झाल्यावर निष्क्रियतेचे समर्थन करतो. निष्क्रियतेला धर्म, (आदर्श) बनविणे समाजात भ्रम निर्माण करणे ठरते. याच संदर्भात श्रीकृष्ण

म्हणतात, मला जीवनात मिळाले नाही वा मिळवायचे आहे असे कांहीच नाही. तरी मी कार्य करीत आहे.

न अनवाप्तम् अवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि।(३-२२)
यदि हि अहं न वर्तेयं जातु कर्मणि अतंद्रितः।
मम वर्त्म अनुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः।।(३-२३)

सामान्य श्रेष्ठांचे अनुसरण करतो. मी आळस सोडुन कार्य केले नाही तर लोकांचा बुद्धिभेद होईल. लोक आळशी होतील. म्हणुन आत्मज्ञानी, अनासक्त ज्ञानी असला तरी समाजात निष्क्रियता पसरणार नाही ही दक्षता श्रेष्ठांनी घेणे आवश्यक आहे.

व्यावहारिक बोध:

१. जीवनविकासात कार्यच महत्वाचे साधन आहे. हाच भगवतगीतेचा संदेश आहे. या संदर्भात योगक्षेम चालवण्यासाठी समाजात प्रत्येकाला कार्य उपलब्ध व्हावे हे समाजव्यवस्थेचे दायित्व असते. समाजशास्त्री समाजव्यवस्थेची दृष्टि देत असतात.

२. हार्वर्डमध्ये यशस्वि व्यवस्थापनाचा अभ्यास होतो. कर्तृत्वानेच इतिहास घडतो. इतिहासातील कर्तृत्वाचा सकारात्मक दृष्टिने अभ्यास होणे आवश्यक असते.

३. कर्म कष्ट नसुन सर्वांगीण विकासाचे साधन आहे ही भावना व्यक्तिमध्ये रुजणे आवश्यक असते. या संदर्भात सहजकार्य(आवडीचे कार्य, स्वभावनियतकार्य), स्वधर्म (स्वतःच्या मार्गातील Tiebreaker, स्वतःचे approval), स्वतःचा निर्णयअधिकार, निर्णयक्षमता याचे महत्व रुजविणे महत्वाचे ठरते. हाच भगवतगीतेचा संदेश आहे.

"Labour may be a burden and a chastisement, but it is also an honour and a glory. Without it, nothing can be accomplished. "

Samuel Smiles(Writer of SELFHELP)

*******

(३-२३)

************************

यदि हि अहं न वर्तेयं जातु कर्मणि अतंद्रितः।

मम वर्त्म अनुवर्तन्ते मनुष्यः पार्थ सर्वशः।।

************************

(३-२३) :

" यदि हि अहं न वर्तेयं जातु कर्मणि अतंद्रितः"

(श्रेष्ठांचे कर्तव्य-Master vs Herd morality)

*श्रेष्ठांचा मार्ग व सामान्यांचा मार्ग :

श्रेष्ठांचा मार्ग(Master) :

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

सामान्यांचा मार्ग (Herd):

यद् यद् आचरति श्रेष्ठः तत् तत् एव इतरो जनः।
स यत् प्रमाणं कुरुते लोकः तदनुवर्तते॥(३-२१)

अर्थात जगात१. स्वतः निर्णय घेणारे व २. अनुसरण करणारे असे दोन प्रकारचे लोक जगात असतात. संस्कार(Morality) या संदर्भात श्रेष्ठ व सामान्य अशी विभागणि केली तर Master morality मध्ये निर्णय घेणारे असतात, जबाबदारी स्विकारतात. तर अनुसरण करणारे Herd morality मध्ये येतात, ते प्रज्ञावादी असतात. याच दोन Morality चा परिणाम त्यांच्या मानसिकतेत आढळतो.

*भगवतगीतेची पार्श्वभूमि:
अर्जुन दुःखी झाला असता आपले कार्य पापकर्म ठरविण्यासाठी धर्माचा वापर करतो. अर्थात वास्तव/जबाबदारी न स्विकारता निष्क्रियतेचे समर्थन करणे हीच Herd मानसिकता असते. म्हणुन दुःखी अर्जुनाला म्हटले,

अनार्यजुष्टम् अस्वर्ग्यम् अकिर्तिकरम् अर्जुन।(२-२)
अर्थात ही श्रेष्ठांना अशोभनिय भूमिका आहे.

महर्षि वाल्मिकीचा पुर्वाश्रमिचा वाल्या डाकु असतो. पापकर्माचा जबाबदार तु एकटा आहेस हे वास्तव वाल्याला कळते व स्वतःमध्ये बदल घडवुन आणतो. अर्जुन स्वतःचे वास्तव स्विकारतो. युद्ध दुःखदायी आहे म्हणुन निष्क्रिय झालो ही कबुली देतो. याच कबुलीत त्याचा प्रश्न येतो, दुःखमुक्ति कशी होईल?

*श्रेष्ठांचे कर्तव्य:

मनुष्याला या जीवसृष्टित सर्वश्रेष्ठ जीवन लाभलेले असते. या जीवनाचे सार्थक करण्याची संधि त्याला लाभली असते. पण या जगात सर्व लोक (Herd) Survival mode मध्ये जगत असतात. त्यांना योगक्षेम चालविण्यासाठी, गरजापुर्तिसाठी कार्याची गरज असते. म्हणुनच गरज नाही तर कार्य कशाला! हा अर्जुनाला प्रश्न पडतो. म्हणुन जीवनात कार्याचे महत्व highlight करणे ही भगवतगीतेची Priority बनते.

सामान्यांनी आपला योगक्षेम चालविण्यासाठी कार्य करावे याची दक्षता श्रेष्ठांनी घेणे आवश्यक आहे. पैसा असेल तर कर्म कशाला? हा सामान्यांचा प्रश्न असतो. श्रेष्ठांचा नाही. श्रीकृष्ण

म्हणतात, मला त्रैलोक्यातही मिळविण्यालायक कांहीही नाही तरी मी कार्य करतोच. कारण श्रेष्ठांनी कार्य केले नाही तर त्यांचे अनुसरण सामान्य करतात. यामुळे ते सामान्यांना नकळतपणे आळशी बनविणारे ठरतात.

यदि हि अहं न वर्तेयं जातु कर्मणि अतंद्रितः।
मम वर्त्म अनुवर्तन्ते मनुष्यः पार्थ सर्वशः।।(३-२३)

*सार:

अध्यात्म जीवनात Transformation चे माध्यम :

व्यवहारात न्याय मिळाला नाही म्हणुन महाभारतात अखेर धर्मयुद्ध ठरते. सामान्यांचा मार्ग व श्रेष्ठांचा मार्ग यात कार्य (Common) साधन असते. नियतकार्याला स्वधर्म करुन कार्याद्वारे सिद्धि/योग/शक्तिसाधना हा श्रेष्ठांचा मार्ग असतो. याचाच अर्थ जीवनात निर्णयअधिकाराचे, दृढनिश्चयाचे महत्व कळले तर निष्काम कार्याचे महत्व कळते अर्थात अध्यात्माचे महत्व कळते.

सिमित काळासाठी या भूतलावर अवतरलेला मनुष्य या जीवसृष्टित श्रेष्ठ आहे. या सर्वश्रेष्ठ जीवाचा आदर करा, त्याचा बंधु व्हा, त्याचेशी शत्रुवत आचरण करु नका हा भगवतगीतेचा संदेश

आहे. यामुळेच सामान्य(Herd) मानसिकता ते श्रेष्ठ(Master) मानसिकता अशा Transformation च्या शास्त्राचे महत्व कळते.

******

(३-२३)"मम वर्त्म अनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः"

'लोक सर्वार्थाने माझाच मार्ग अनुसरतात' हेच verse (वाक्य) भगवतगीतेत दोनदा आलेले आहे.

१. श्रीकृष्णाची" मनुष्य" ही ओळख व

२. "ईश्वर "ही ओळख

१. (श्रेष्ठ)मनुष्य "ओळख:

कः मार्ग? हा प्रश्न यक्ष धर्मराजाला करतो. धर्मराज उत्तरतो, जो मार्ग श्रेष्ठ मनुष्य आचरण करतो. याचेच अनुसरण सर्वसामान्य लोक करतात.

श्रेष्ठ जो मार्ग आचरण करतात, त्याचेच अनुसरण सामान्य लोक करतात. म्हणुन सामान्यांनी कसे आचरण करावे यासाठी श्रेष्ठांनी स्वतः आदर्श ठेवावा. यासाठी श्रीकृष्ण स्वतःचे उदाहरण देतात.

यदि ही अहं न वर्तेयं जातु अकर्मणि अतंद्रितः।

मम वर्त्म अनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः॥(३-२३)

अर्थात मी निष्क्रिय झालो तर लोक माझा मार्ग अनुसरुन आळशी होतील. सामान्यांना योगक्षेमासाठी कार्याचीच गरज असते. म्हणुन श्रेष्ठांनी (कर्माची गरज नसली तरी) आदर्शासाठी कर्म करावे. सामान्यांना निष्क्रिय करुन बुद्धिभेद करु नये.

अर्थात निष्क्रियतेचे समर्थन करणे श्रेष्ठांसाठी अयोग्य आहे. अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी धर्मज्ञान वापरतो. याच पार्श्वभुमिवर भगवतगीतेने जीवनविकासात कर्माला प्राधान्य दिले व मनुष्याची सामान्य व श्रेष्ठ अवस्था यातील भेद स्पष्ट केला. अर्जुनाची (दुःखी) भूमिका श्रेष्ठांना अशोभनिय आहे असे दर्शवुन दिले व श्रेष्ठ भूमिकेचे ज्ञान सांगितले.

२. "ईश्वर"ओळख

ये यथा मां प्रपद्यन्ते तान् तथैव भजाम्यहम्।

मम वर्त्म अनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥(४-१०)

मनुष्य ईश्वराला जसा ओळखतो(ज्या भावाने ओळखतो) तसा भजतो. या लोकी ईश्वराला देवतारुपात कर्माच्या फलसिद्धिसाठी भजत असतात.

काङ्क्षतः कर्मणां सिद्धि यजन्त इह देवता।(४-१२)

अर्जुनाला ईश्वराची मुळ ओळख करुन दिली .

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुम् आश्रितम् ।

परं भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।।(९-११)

धर्मस्थापनेसाठी याच ईश्वराने (तत्कालिन) वर्तमानात मनुष्यरुपात अवतार घेतला आहे, ही श्रीकृष्णाने स्वतःची ओळख दिली.

मनुष्य, जगत व ईश्वर यांचे नाते स्पष्ट केले.

जन्म कर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ति तत्वतः।

त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सो अर्जुन।।(४-९)

सृष्टिच्या शाश्वत संचलनात(सृष्टिचक्र, जगतहिताय) ईश्वराची ही "कर्ता" भूमिका असते. हे कर्तेपण प्रकृतिच्या माध्यमातुन घडवुन आणतो. म्हणुन ईश्वर स्वतः कर्ता असुनही अकर्ता असतो.

तस्य कर्तारम् अपि मां विद्धि अकर्तारम् अव्ययम् ।(४-१३)

हा ईश्वरभाव (ईश्वराचे दिव्य जन्मकर्म) जाणुन श्रेष्ठ मनुष्य माझेच कार्य करतो व स्वतःला अकर्ता जाणतो.

न आदत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः।
अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यंति जन्तवः॥(५-१५)

अर्जुन मोहामुळे अस्थिर होतो. त्याची बुद्धि काय योग्य? याचा निश्चय करु शकत नाही. (परिणामतः दुःख टाळण्यासाठी युद्ध करणे अयोग्य ठरवितो. ) अर्थात बुद्धि भ्रम पावते. शेवटी अर्जुन म्हणतो, "नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा"

* याप्रमाणे श्रेष्ठ अवस्थेत मनुष्य स्वतःचे जीवन जाणतो. स्वतःच्या बुद्धिचा वापर करतो. स्वतःच्या मार्गाची जबाबदारी स्विकारतो. मार्गावर असतांना (दुःखाने) विचलित होत नाही. विश्वासाने मार्ग चालत असतो. त्याचा स्वतःवर विश्वास असतो.

आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम् ।(७-१८)
अर्थात ज्ञानी ईश्वराच्या उत्तम गतित असतो.

*व्यावहारिक बोध :

जगाचा इतिहास कर्तृत्वाने घडलेला असतो. कार्य करणे ही प्रकृति आहे. जीवंतपणातच ईश्वराचे रहस्य आहे. प्रकृति व ईश्वर याद्वारा सृष्टि संचलित असते. स्वतःच्या जीवनाचे संचलन स्वतःचे क्षेत्र आहे. या संचलनात दुःखी (चिंता, निराश, भयग्रस्त) होणे, निष्क्रियतेचे समर्थन करणे, नकारात्मक असणे, अज्ञानाला ज्ञान दर्शविणे हे चांगल्या मनुष्यासाठी अज्ञान ठरते. या अज्ञानामुळे बुद्धिभ्रम होतो. चांगलेपणाची जगाला गरज असते. पण अज्ञानामुळे त्याने स्वतःलाच निष्प्रभ केले असते. ही प्रकृतिचीच खेळी असते. म्हणुन चांगल्या मनुष्याचे अज्ञान, भ्रम दुर करण्यासाठी जीवनाचे श्रेष्ठत्व जाणणे हा भगवतगीतेचा विषय बनला.

*********

(३-२४)

************************

उत्सीदेयुः इमे लोका न कुर्यां कर्म चेत् अहम् ।

संकरस्य च कर्ता स्याम् उपहन्याम् इमाः प्रजा।।

************************

(३-२४) :

"उत्सीदेयुः इमे लोका न कुर्यां कर्म चेत् अहम् ?"

(कर्माचे मनुष्यजीवनातील महत्व)

*श्रीमंती-गरीबी व कर्म

श्रीमंति आणि गरिबी हा समाजातील भेद लोक जाणत असतात. या दोघांकडे पाहण्याची लोकांची दृष्टिही भिन्न असते.

"गरीब खावे भुंगडा तो भुका मरो खावे, अमिर खावे तो शौकसु" अर्थात फुटाणे जर गरीब खात असला तर भुकेपोटी खात आहे व श्रीमंत खात असला तर शौकाने खात आहे अशी राजस्थानी म्हण आहे. याप्रमाणेच कुणी श्रीमंत असला तर त्याला कर्म करण्याची गरज नाही व गरीब असला तर कष्ट करावे लागतात अशीही समाजात सामान्यांची मानसिकता(Psychology) असते. यामुळे "कर्म" या संदर्भात निश्चित बोध नसतो. केवळ कांहीतरी

मिळविण्यासाठीच मनुष्य कर्म करतो अशी समाजातील कर्माविषयी जाण असते. यानुसारच अर्जुन म्हणतो, मला कांहिही मिळवायचे नाही. म्हणुन या (घोर) कर्माचे माझ्यासाठी कांहीही प्रयोजन नाही!

याच पार्श्वभुमिवर भगवदगीता ज्ञानाचे द्वार उघडते व "जीवनात कर्माचे महत्व" हा विषय चर्चेला येतो. भगवदगीतेचा विषय सकाम कर्म vs. निष्काम कर्म असा Transformation चा असला तरी "कर्म" ही या विषयात Priority आहे.

कर्माचा मुख्य हेतु कांही मिळविण्यासाठी असला तरी अनासक्ति(Detachment) साठी निष्काम कर्म, योगासाठी(दुःखान्तशक्ति) समत्वयोगाने कर्म, ईश्वरभक्तिसाठी अर्थात "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च" या हेतुने १. सृष्टिसंचलनासाठी सहकार्य या अर्थाने(यज्ञ) कर्म २. मानवकल्याणासाठी सतकर्म अशा विविध अर्थाने कर्माचे मनुष्यजीवनातील महत्व भगवदगीता स्पष्ट करीत आहे.

*श्रेष्ठ-सामान्य व कर्म

मानवकल्याणासाठी कर्म या संदर्भात श्रेष्ठांची भूमिका महत्वाची असते.

१. स्वधर्माचरण :

श्रीरामाला "स्वधर्म" या संदर्भात वनाचे राज्य मिळते. ही कटु घटना(यद् तद् अग्रे विषम् इव) असली तरी श्रीरामाला त्यांत मानवकल्याणासाठी महान संधि (परिणामे अमृतोपमम्) आढळते.

धरमधुरीन धरमगति जानी।... जहां सब भांति मोर बड काजू।

अयोध्याकांड(५२-३)

अर्थात या कटुसत्यात धर्मस्थापनेचे ब्रिद लपलेले असते. श्रेष्ठांच्या या धर्मकार्यात सत्कार्य हे स्वधर्माचरणच असते. सामान्य लोक सत्कार्य म्हणजे पुण्यकार्य, चांगले दैव या संदर्भात जाणत असतात. श्रेष्ठ धर्मकार्य/सत्कार्य याला ईश्वरकार्य (ईश्वरगति) जाणत असतात.

औरु करै अपराधु कोउ और पाव फल भोगु।

अति बिचित्र भगवंत गति को जग जानै जोगु ।

अयोध्याकांड(७७)

याच पार्श्वभुमिवर भगवदगीतेत अर्जुनासमोर कटुप्रसंग असला तरी ती धर्मगति, ईश्वरगति जाणुन कर्म कर असा संदेश आहे.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव॥(११-५५)

२. आदर्शासाठी कर्म :

सामान्य लोक श्रेष्ठांचे अनुसरण करतात. हे श्रेष्ठ त्यांच्या दृष्टिनुसार श्रीमंत, ज्ञानी, महापुरुष यांतील कुणीही होवु शकतात. यामुळे (कथीत) श्रेष्ठांनी ( गरज नसली तरी) कर्म केले नाही तर सामान्यांचा बुद्धिभेद होतो. व यामुळे हे कथीत श्रेष्ठ समाजाला निष्क्रिय, आळशी बनविणारे ठरतात.

उत्सीदेयुः इमे लोका न कुर्यां कर्म चेत् अहम् ।
संकरस्य च कर्ता स्याम् उपहन्याम् इमाः प्रजाः॥(३-२४)

या पार्श्वभुमिवर श्रेष्ठ(ज्ञानी/अनासक्त) कर्माचे महत्व जाणतो. (त्याला कर्माची गरज नसली तरी) आदर्शासाठी /मानवकल्याणासाठी सतत कार्यरत असतो.

************

(३-२४) :

" संकरस्य च कर्ता स्याम् उपहन्याम् इमाः प्रजा"

(समाजातील श्रेष्ठ लोक व त्यांची भूमिका)

मनुष्याला जीवन मिळाले आहे. त्याच्या मान्यतेनुसार (Believe system), संस्कारानुसार तो जगत असतो. याच मान्यतेनुसार अर्जुनाला मार्ग चालत असता संशय येतो व अज्ञानाला ज्ञान संबोधतो. ज्ञान जगात सर्वश्रेष्ठ आहे व याच ज्ञानाविषयी अर्जुनाचा गैरसमज होतो. या स्थितित "ज्ञानी " भूमिकेचे अज्ञान असते. जीवनाची उच्च अवस्था म्हणजे ज्ञानी अवस्था धारण होण्यासाठी भगवतगीतेचे ज्ञान आहे.

श्रेष्ठांची भूमिका:

समाजाला पुढे नेणाऱ्या श्रेष्ठ (Creative leadership) लोकांची जगाला गरज असते. सामान्य लोक(प्रजा) त्यांच्या मान्यतेनुसार जे श्रेष्ठ असतात त्यांचे अनुसरण करीत असतात व त्यावरुनच त्यांच्या जगण्याची, विकासाची मान्यता तयार होते. साक्षात ईश्वरही मनुष्यरुपात समाजात आला तरी त्याला श्रेष्ठांचीच भूमिका बजावावी लागते. लोकांच्या मान्यतेनुसार श्रेष्ठ व प्रत्यक्षातील श्रेष्ठ यांचा समन्वय येथे साधला जातो. श्रीकृष्ण म्हणतात, मी जर कार्य केले नाही तर लोक माझे अनुसरण करतील व कर्माचे महत्व त्यांना कळणार नाही. यामुळे लोकांना आळशी बनविणारा ठरेल. यामुळे माझी भूमिका समाजाला पुढे नेणारी नव्हे तर मागे ढकलणारी होईल.

उत्सीदेयुः इमे लोका न कुर्यां कर्म चेत् अहम् ।
संकरस्य च कर्ता स्याम् उपहन्याम् इमाः प्रजा॥(३-२४)

अध्यात्माची भूमिका:

विश्वाचा अध्यक्ष, व या अध्यक्षाला अभिप्रेत असलेले कार्य धर्मसंस्थापनार्थाय, सर्वभूतहीतेरतः अर्थात जगतहीताय याद्वारे ईश्वराची भूमिका दर्शविली आहे. प्राणतत्वात याच ईश्वराचा अंश

असल्यामुळे याच ईश्वराचा आश्रय करुन ईश्वरभक्तिसाठी कार्य हा अध्यात्मज्ञानाचा विषय आहे. श्रीकृष्ण हेच अध्यात्म अर्जुनाला त्याचे अज्ञान दुर होण्यासाठी व पर्यायाने श्रेष्ठ होण्यासाठी सांगत आहे.

असक्तो हि आचरन कर्म परम् आप्नोति पुरुषः।(३-१९)

भगवतगीतेची भूमिका :

चांगल्या मनुष्याला मार्गात अडचणी जाणवल्या तर वास्तव स्विकार करणे आवश्यक असते. यामुळे खरा प्रश्न कोणता?याची पारदर्शकता येते. जसे दुःख होणे हा अर्जुनाचा प्रश्न असतो व भगवतगीता दुःखान्तशक्तिची (योग) साधना होण्यासाठी सकाम कार्य ते निष्काम कार्य असे Transformation सांगते.

श्रेष्ठ जीवन जगण्यासाठीच मनुष्यजीवन लाभलेले असते. पण अज्ञानामुळे मनुष्य ईश्वराला(ज्ञान या संदर्भात)जाणत नाही. यामुळे स्वतःलाही जाणत नाही. परिणामी सामान्य पातळीवरच जगत असतो.

अज्ञानेन् आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

हीच चुक अर्जुन करणार असतो. यामुळे लोकांच्या मान्यतेनुसार श्रेष्ठ असणाऱ्याला अर्जुनाने घेतलेली भूमिका अशोभनिय (निष्क्रियतेला ज्ञानी दर्शविणे) असते. ही चुक दुरुस्त करुन श्रेष्ठ पातळीवर जगण्याची अर्जुनाला संधी मिळालेली असते. कारण श्रेष्ठ लोकांची जगाला गरज असते, जे समाजाला पुढे नेत असतात.

सार :

समाजात चांगल्या मनुष्यालाच अडचणी जाणवतात. कारण अशा घटना मनुष्याला श्रेष्ठ पातळीवर जगण्याची संधी देत असते. या संधिचे महत्व जाणले नाही तर जीवनाचे श्रेष्ठत्व या संदर्भातच मनुष्य आयुष्यभर भ्रमातच असतो. प्रत्यक्षात सामान्य(सकाम) जीवनच जगत असतो.

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वंद्वमोहेन भारत।
सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परंतप ।।(७-२७)

"The hero is the one who kindles a great light in the world, who sets up blazing torches in the dark streets of life for men to see by. The saint is the man

who walks through the dark paths of the world, himself a light. "

~Felix Adler

स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे, समाजाची वाटचाल समुद्रातील भरती-ओहोटीप्रमाणे असते. समाजाच्या वाटचालीत कधी अशी वेळ येते, जणु सर्व शक्ति संपलेली आहे, समाज हतबल ठरतो. पण अशाच वेळी कुठेतरी त्याचे उत्तर शोधण्याचे कार्य चालु असते. हे उत्तर गवसते, तेंव्हा तो महापुरुष समुद्राच्या लाटेवर स्वार होवुन प्रकाश दाखवित असतो.

"You have to find what sparks a light in you so that you in your own way can illuminate the world. " ― Oprah Winfrey

******

(३-२५)

*************************

सक्ताः कर्मणि अविद्वांसः यथा कुर्वन्ति भारत।

कुर्याद् विद्वान तथा असक्तः चिकीर्षुःलोकसंग्रहम् ।।

*************************

३. २५/१ :

"सक्ताः कर्मणि अविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत"

(Herd morality vs. Master morality)

जगप्रसिद्ध हास्यकलाकार चार्ली चाप्लिन म्हणतो, मी जेंव्हा गरीब होतो, तेंव्हा वाटायचे, पैशाविणाच गरीब दुःख भोगतो म्हणुन श्रीमंतांना कांही दुःखच नसेल!परंतु जेंव्हा मी श्रीमंत झालो, तेंव्हा कळले, दुःख श्रीमंतांनाही असते पण श्रीमंत कार्यरत असतात, दुःखाशी सामना करण्याचे त्यांना ज्ञान असते व त्यांची क्षमता असते.

जगातील सामान्य व श्रेष्ठ यांतील भेदाचे सत्य भगवतगीता स्पष्ट करते.

सक्ताः कर्मणि अविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत।
कुर्याद् विद्वान् तथा असक्ताः चिकीर्षु लोकसंग्रहम् ॥(३-२५)

१. सामान्याच्या सुखाच्या संकल्पना भौतिक असतात. म्हणुन "सक्ताः " या शब्दाचे प्रयोजन आहे. किर्ति व पुण्यकर्म यांच्या संकल्पनाही अर्जुनाला संशयी बनविते. तो द्वंद्वाच्या जाळ्यात सापडतो. नियतकार्य केले स्वजन, जेष्ठ यांना मारण्याचे दुःख होईल . या द्वंद्ववश अवस्थेमुळे अर्जुन निष्क्रिय राहण्याची निवड करतो. व याच भूमिकेचे समर्थन करतो.

क्या खोया?क्या पाया!
सामान्य लोक सकाम प्रवृत्तिमुळे कार्य केले तर काय मिळेल, व निष्क्रिय राहिले तर काय गमवावे लागेल असा विचार करुन कार्य करणे किंवा न करणे याची निवड करतात. याच मनोवृत्तिचा आधार घेवुन भगवतगीता कार्यरत होण्याचा संदेश देते.

कार्यानेच विकास होतो. यासाठी "स्वधर्म" या मुल्याचा वापर सांगितला. कार्य टाळले तर तो स्वधर्माचाच त्याग होईल, अर्थात जबाबदारी टाळणे ठरेल. यामुळे अपकिर्ति होईल . म्हणुन स्वधर्माचरण जाणुन कार्य करणे श्रेयस्कर आहे. जिंकला तर राज्य भोगशील व युद्धात मृत्यु आला तर स्वर्ग मिळेल . अर्थात निष्क्रियतेपेक्षा कार्य करणे श्रेयस्कर आहे.

अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।

ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि।।(२-३३)

हतो वा प्राप्स्यसि स्वर्ग्यं जित्वा वा भोक्ष्यसे महिम् ।(२-३७)

२. दुसरा पर्याय श्रेष्ठ, विद्वान लोकांचा असतो. ते आदर्शासाठी कार्यरत असतात. कार्याचा एकनिश्चय असतो. मार्गात (दुःखाने) व्यथित होत नाही. दुर्बलता, अडथळा याविरुद्ध कार्याद्वारेच हा लढा असतो. यांत शक्तिची (दुःखान्त/योग) साधना असते.

योगः कर्मसु कौशलम् ।

माम् अनुस्मर युध्य च ।

कार्याचा एकनिश्चय होणे, निष्काम कर्म यासाठी बुद्धियोग निष्ठा असते, अर्थात मार्गात ईश्वराचा आश्रय असणे. मार्गाचे अंतिम

धाम ईश्वर म्हणुन मार्ग "अमृतंगमय" असतो. कार्याचा एकनिश्चय, निष्काम कार्यरत अर्थात फल ईश्वराला समर्पित होते.

याचाच अर्थ सामान्य लोक सकाम प्रवृत्तिमुळे द्वंद्ववश होतात, म्हणुन द्वंद्वमुक्त होण्यासाठी स्वधर्माचरण स्वतःच्या मार्गासाठी Self approval असते. द्वंद्वमुक्तिसाठी Tiebreaker ठरते.

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिःयोगे तु इमां शृणु।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि॥(२-३९)

अर्थात दुसरा पर्याय श्रेष्ठांच्या आदर्श/Standard मार्गाचा असतो. कर्माच्या योग्य-अयोग्य या द्वंद्वातुन मुक्त (कर्मबंधं प्रहास्यसि)असतो. हा higher मार्ग ठरतो. ईश्वरभक्तिसाठी कार्यरत, आदर्शासाठी कार्यरत असतो.

Herd morality (सक्ताः)vs. Master morality (असक्ताः) याद्वारे स्पष्ट होते.

******

(३. २५)/२ :
"सक्ताः कर्मणि अविद्वान्सः यथा कुर्वन्ति भारत "
(कर्माला पर्याय नाही)

श्रेष्ठत्व कुणाला आवडणार नाही!युवापिढीत बरेच युवा "मला जीवनांत मोठे व्हायचे आहे "असे स्वप्न पाहतात. यांत कांहीही वावगे नाही पण हा मोठेपणा काय आहे? याचे निश्चित ज्ञान मात्र केवळ भगवतगीताच देत आहे.

कर्तृत्वानेच अर्थात कर्म करुनच मनुष्य मोठा होतो. समृद्ध व्यक्तिच्या श्रीमंतिविषयी लोक म्हणतात, कांही न करता त्याच्या सात पिढ्यांना पुरेल एवढी श्रीमंति आहे. अर्थात श्रेष्ठ(मोठा माणुस) व कर्म यांच्या नात्याविषयी समाजात असलेला हा गैरसमज असतो. हा गैरसमजच समाजातील अज्ञान ठरते.

मनुष्याला इच्छा असतात (State of want). म्हणुनच मनुष्यजन्म कर्माने बद्ध (कर्मानुबंधिनी मनुष्यलोके) आहे. अर्थात कर्म जीवनविकासात अविभाज्य भूमिका बजावीत असते. इच्छा कधी अमर्यादही असतात व काम, क्रोध, लोभ या विकारांना जन्म

देतात. म्हणुन भगवतगीता कार्यकौशल्याचे शास्त्र(योगः कर्मसु कौशलम्) सांगते.

श्रेष्ठ व्यक्ति कार्यरत असतो. स्वावलंबि(निरपेक्ष) असतो.
परावलंबि असणारा, दुःखामुळे विचलित होणारा श्रेष्ठ ठरत नाही.
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

जो इच्छाहीन आहे अर्थात आत्मतृप्त आहे, त्याला कांहीही मिळविण्याची गरज वाटत नाही. म्हणुन "प्राप्तिसाठी कर्म" हा त्याचा विषय नसतो.
आत्मनि एव च संतुष्टः तस्य कार्यं न विद्यते।(३-१७)

अर्थात अशा श्रेष्ठ व्यक्तिच्या कार्याचा विषय "आदर्शासाठी कर्म" हा असतो. समाजात समाजहीतासाठी कार्य करणारे (अनासक्त) आढळतात. अर्थातच "चांगले कार्य" या संदर्भात मानवकल्याणासाठी समाजाला गरज असतेच.

अर्जुनाला "चांगले कार्य" या संदर्भातच संशय येतो. व आपले नियतकार्य वाईट आहे, जगतकल्याणविरोधी आहे असे सिद्ध

करण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो. ही भूमिका चांगलेपणालाच अपमानीत करीत असते. व कर्माचे महत्व कमी करीत असते. म्हणुन भगवतगीतेने श्रेष्ठत्व, आदर्श व चांगलेपणा याचा समन्वय साधलेला आहे. लोक कर्माशिवाय विकास साध्य करु शकत नाही, या कारणास्तव हा लोकांचा बुद्धिभेद ठरतो.

न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम्।
जोशयेत् सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरन्।।(३-२६)

अर्जुनाला संबोधुन श्रीकृष्ण म्हणतात, तु दैवीगुणसंपत्तिसाठी जन्माला आलेला आहे. श्रेष्ठाला शोभेल असेच तुझे वर्तन हवे. म्हणुन जसे सामान्य लोक प्राप्तिसाठी कर्म करतात तसेच श्रेष्ठांनी आदर्शासाठी कर्म करावे. अर्थात निष्क्रियतेला प्रोत्साहीत करु नये.

सक्ताः कर्मणि अविद्वान्सः यथा कुर्वन्ति भारत।
कुर्यात् विद्वान् तथा असक्तः चिकिर्षुलोकसंग्रहम् ।।(३-२५)

सार:

प्राचिन काळी आपला योगक्षेम चालविण्यासाठी पारंपरिक कार्याचीच निवड लोक करीत होते. वर्तमानात शिक्षण आले. शिक्षणाने व्यवसाय या क्षेत्रात क्रान्ति केली पण बेरोजगारी (Unemployment) या शब्दाला वर्तमानातील शिक्षणानेच जन्म दिला. कारण शिक्षणाचा उपयोग नोकरी मिळणे अपेक्षित असते. समाजविकासात रोजगारासाठी औद्योगिकिकरण आले. यामुळे बरेच पारंपरिक व्यवसाय आर्थिकदृष्ट्या दुबळे (Economic viability) ठरलेत. यामुळे समाजासमोर शिक्षण क्षेत्रासाठी नवीन आव्हान उभे झाले.

याच पार्श्वभूमिवर शिक्षणाचा निश्चित हेतु जाणुन घेण्यासाठी भगवतगीतेतील कार्यकौशल्याचे (गुणात्मक) ज्ञान महत्वाचे ठरते.

********

(३-२५)/३:"कुर्यात् विद्वान तथा असक्तः चिकीर्षुः लोकसंग्रहम् "

भगवतगीतेत जीवनाची ज्ञानी(विद्वान, श्रेष्ठ)अवस्था व अज्ञानी(सामान्य) अवस्था यांतील स्पष्ठ भेद आलेला आहे.

जीवनात सुख आहे तसेच दुःखही आहे. म्हणजेच जीवनात अडचणी(Barrier) असतात. याच अडचणीवर मात करण्याचे ज्ञान नसेल(Barrier breaker) तर मनुष्य Shortcut वापरतो. अर्जुनाने( चांगला, विद्वान असुनही) हाच shortcut वापरल्यामुळे निष्क्रिय होतो व ज्ञानी भूमिकेत निष्क्रियतेचे समर्थन करतो. (जसा एखादा स्वार्थी व्यक्ति आपला स्वार्थ परमार्थ दर्शविण्यासाठी प्रयत्न करतो, पण येथे अर्जुन स्वतःला लोभी म्हणतो व स्वतःला चांगला दर्शविण्याचा प्रयत्न असतो यासाठी धार्मिक ठरवायचे असते!) स्वतःच्या अज्ञानाला ज्ञान दर्शविण्याचा हा अथक प्रयत्न असतो.

भगवतगीता येथे Barrier breakerची भूमिका करते. जो विश्वासाने, निष्ठेने मार्ग चालतो, त्याला Barrier breaker चे ज्ञान असल्यामुळे दुःखाने व्यथित होत नाही, अशी ज्ञानी अवस्था होण्यासाठी अर्जुनाच्या भूमिकेतील अज्ञान दर्शवुन दिले.

समाजात मनुष्याची ज्ञानी अवस्था, श्रेष्ठ अवस्था या संदर्भात अनेक थोर लोकांच्या, विद्वान लोकांच्या, सिद्ध पुरुषांच्या भूमिकेकडे दिशानिर्देश करता येईल. परंतु समाजात ज्यांचा सरळ सामान्यांवर अनुकरणार्थ प्रभाव (impact) असतो, असे लोक

जणु त्या समुहाचे प्रतिनिधीत्व(Leadership) करीत असतात. म्हणुन समाजात चुकीचे निष्क्रियतेचे संदेश जावु नयेत, यासाठी श्रेष्ठ, थोर, विद्वान, ज्ञानी अशा लोकांनी स्वतः अनासक्त राहुन कार्यरत असावे हा संदेश येथे आला आहे.

सक्ताः कर्मणि अविद्वांसः यथा कुर्वन्ति भारत।
कुर्याद् विद्वान तथा असक्तः चिकीर्षुः लोकसंग्रहम् ॥
न बुद्धिभेदं जनयेद् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।(३-२५, २६)

अर्थात सामान्य लोक प्राप्तिसाठी कर्म करतात. अज्ञानामुळे आसक्त असतात. विद्वानांनी, श्रेष्ठांनी अनासक्त राहुन कर्माचा आदर्श लोकांमध्ये ठेवावा हे अपेक्षित आहे.

अर्जुन स्वतःला ज्ञानी समजतो . या प्रयत्नात अज्ञानाला ज्ञान दर्शविण्याचा प्रयत्न करतो. अशा "ज्ञानामुळे" समाजात चुकीचे संदेश जातात.

स्वतःच्या अज्ञानाचे Awareness नसते पण स्वतःला ज्ञानी समजुन दुसऱ्याला उपदेश करणाऱ्या (socalled, स्वघोषित

श्रेष्ठ)विद्वान व्यक्तिंची समाजात वानवा नसते. स्वतःला ज्ञानी समजुनच भाष्य करतात. इतिहासातुन ज्ञान न घेता त्यांतील थोर व्यक्तिंच्या चुका काढुन भाष्य करतात. जणु आपला जन्म जगातील चुका काढण्यासाठीच झाला आहे, अशा भूमिकेत वावरत असतात.

याच संदर्भात विद्वानांनी, संभावितांनी कसे आचरण करावे हे भगवतगीता स्पष्ठ करते. म्हणुन येथे श्रीकृष्णाची भूमिका जाणुन घेणे महत्वाचे ठरते.

*अर्जुनाचे अज्ञान दर्शवुन देतांना त्याला न दुखवता भाष्य करतात,

"तुझ्यासारख्या श्रेष्ठ व्यक्तिला(ज्याची समाजात श्रेष्ठ म्हणुन ओळख आहे) अशा प्रसंगी दुर्बलता शोभत नाही.

*अर्जुन वास्तव, अज्ञान स्विकारतो. श्रीकृष्ण जीवनाची योग्य व अयोग्य भूमिका स्पष्ट करतात. हे सांगितल्यानंतर म्हणतात,

"निर्णय तुला घ्यायचा आहे"

(विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु)

******

(३-२६)

*************************

न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।

जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरन्।।

*************************

(३. २६)१:

"न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् "

न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।

जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरन्।।(३-२६)

याद्वारे भगवतगीता संपुर्ण समाजाला कळकळीचा संदेश देत आहे, याचे महत्व लक्षात घेतले पाहिजे.

जगाचा इतिहास कर्तृत्वाचा असतो. हेलेन केलर अपंग असुनही कार्यानेच तीला महान केले. शिवाजी महाराजांनी १५व्या वर्षी पन्हाळा जिंकला हा सर्व इतिहास श्रध्देने वाचतो. पण समाज

शिक्षणपद्धतीला जबाबदार धरुन लॉर्ड मेकालेवर दोष ढकलतो. या स्थितीत भगवतगीतेचे असाधारण महत्व जाणुन घेतले पाहिजे. अज्ञान, बुद्धिभेद काय आहे याची निश्चित ओळख झाली पाहिजे.

अज्ञान:

भगवतगीतेत अध्यात्म आहे. पण ते ज्ञानविज्ञानाचाच भाग आहे, हे ज्ञानविज्ञानयोगात स्पष्ट होते. हे ज्ञान निष्क्रिय किंवा दुबळे करण्यासाठी नाही, तर निष्क्रिय, दुबळा झालेला अर्जुन स्वतःला (धर्म)ज्ञानी संबोधतो, त्याला अज्ञानाचे अज्ञान असते. यालाच भगवतगीता अज्ञान संबोधते. याच संदर्भात सॉक्रेटिस म्हणतो, "To know, is to know that you know nothing. That is the meaning of true knowledge. "

अज्ञानाचे अज्ञान मृगजळासारखे असते. अर्जुन वास्तव स्विकारतो व अज्ञान कबुल करतो, तेंव्हाच ज्ञानाचे द्वार उघडते.

बुद्धिभेद:

ईश्वराने प्रत्येक मानवात कोणतातरी चांगला गुण दिला असतो. या गुणाची ओळख झाली तर त्याची कार्यक्षमता वाढविण्यास मदत

होते. पण कार्यक्षमतेचे अज्ञान असेल तर त्या गुणाची जाणिवही होणार नाही.

बुद्धित चुकीचे विचार पेरणे याला बुद्धिभेद संबोधले आहे. "एक गरुडाचे पिलु कोंबड्यांच्या कळपात वाढते. थोडे मोठे झाल्यावर त्याला उडावेसे वाटते. पण हे आपले काम नोहे असा उपदेश करुन कोंबडे त्याच्या उड्डानाला मज्जाव करतात. हाच विचार त्याच्या बुद्धित Conditioned होतो. कालांतराने तो( Bornfree)उड्डान विसरतो. Born to win but conditioned to loose"

* जीवनविकासाच्या मार्गासाठी भगवतगीता मनुष्याच्या जीवित शक्तिची(Conscious) ओळख करुन देते. व या अनुषंगाने ईश्वराची ओळख करुन देते(Universal Conscious -क्षेत्रज्ञ). गतिः भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ।(९-१८)

यामुळे जीवनविकासाचा शाश्वत/Universal मार्ग (अमृतंगमय)कळतो. याप्रमाणे भगवतगीता जीवनविकासमार्गाचे ज्ञान सांगते. यांत निष्काम कर्म, कार्याचा दृढनिश्चय याचे महत्व आहे. पण कार्याचे महत्व न जाणणारा म्हणजे आंधळयाला

ताजमहाल दाखविण्यासारखे आहे. कर्माशिवाय शरीरयात्राही चालत नाही.
शरीरयात्रा अपि च तेन् प्रसिद्धयेत् अकर्मणः(३-८)

*कार्यक्षमतेचे, कर्तृत्वाचे ज्ञान नसलेला परावलंबि होतो. जीवनात कर्माचे, निर्णय अधिकाराचे महत्व कळण्यासाठी स्वावलंबि होणे या जीवनमुल्याचे महत्व कळले पाहिजे. "Beggars are not choosers". जीवनात स्वातंत्र्याचे ज्ञान नाही त्याला भगवतगीतेतील स्वातंत्र्याचे रहस्य( बंधन-मोक्ष या ज्ञानाचे रहस्य) कसे कळणार?

*जगाने काय करावे, असे भाष्य मनुष्य सहज करतो व स्वतः काय करावे?याचे भान दुर्लक्षित होते. जीवनाचे अमुल्य क्षण व Energy चा नाश होतो.

"So many people get involved with carrying grudges and having these moral battles with people, where they cast themselves as the righteous and the other guy is the dirtbag. They waste tons of energy on it,

create all kinds of darkness around themselves and the other person. It gets you nothing. "

Stephen J. Cannell

* जगातील हे वास्तव जाणुन भगवतगीतेतील संदेशाचे महत्व असाधारण आहे, हे लक्षात येते.

तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर।
असक्तो ही आचरन कर्म परमाप्नोति पूरुषः।।(३-१९)

********

(३. २६)/२ :

"जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान युक्तः समाचरन्"

(सामान्याकडुन श्रेष्ठत्वाकडे, नराचा नारायण)

मनुष्य मी योग्य समजुनच कार्यरत असतो. चांगले-वाईट असे ठरवुन स्वतःचे समर्थन व परटिका करीत असतो. चांगले-वाईट या संदर्भातच पाप-पुण्य हे भाष्य असते. अर्जुन स्वतःचे समर्थन करतांना आपल्या नियतकार्याला पापकर्म ठरवितो.

संत कबीर म्हणतात,

"बुरा जो देखन मैं चला, बुरा न मिलिया कोय, जो दिल खोजा आपना, मुझसे बुरा न कोय।"

चांगले-वाईट या संदर्भात अर्जुन चांगला असतो, पण सामान्याची भाषा बोलतो. भगवतगीता सामान्य व श्रेष्ठ यांतील निश्चित भेद स्पष्ट करते. ज्ञान-अज्ञान या संदर्भात सामान्य श्रेष्ठांचे अनुसरण करतात. विद्वानांनी सामान्यांचा बुद्धिभेद करु नये म्हणुन श्रेष्ठांनी स्वतः जबाबदारीने आचरण केले पाहिजे. हा (कथित) श्रेष्ठांसाठी प्रथम संदेश आहे.

न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।
जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान युक्तः समाचरन्।।(३-२६)

अर्थात समाजात कर्माचे जीवनविकासात महत्व समजण्यासाठी कार्याचाच संदेश जाणे आवश्यक असते. म्हणुन विद्वानांनी स्वतः कार्यसंस्कारीत असावे. व कर्माचाच आदर्श ठेवावा, निष्क्रियतेला(नियतकार्य टाळणे) धर्म ठरविणे हा बुद्धिभेद ठरतो. याचाच अर्थ अर्जुन चांगला, विद्वान असुनही अज्ञान ठरतो. याच अज्ञानाची ओळख भगवतगीता करुन देते.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।(३-३३)
समाजातील लोक चांगले किंवा वाईट नसतात, तर तो त्यांचा स्वभाव ( Behavior/Charecter) असतो. समाजात (अनुसरण करणारे) सामान्य व (जबाबदारीने जगणारे) श्रेष्ठ असतात. सामान्य श्रेष्ठांचे अनुसरण करतात. ज्ञान-अज्ञान हाच आधार सामान्य-श्रेष्ठ यासाठी ठरतो.

"There is nothing either good or bad but thinking makes it so. "
William Shakespeare

अर्जुन दैवीगुणसंपत्तिसाठी जन्माला आलेला असतो. पण " श्रेष्ठ" या संदर्भात अज्ञान ठरतो. सॉक्रेटिस म्हणतो, "मला कांहीच माहीत नाही हेच माझे ज्ञान आहे. " जग बदलावे ही इच्छा केली तरी स्वतःचे अज्ञान जाणुन ज्ञानी होणे हे अधिकारात आहे, हेच सॉक्रेटिसचे ज्ञान असते.

भगवतगीता म्हणुनच "श्रेष्ठांचा मार्ग " याचे निश्चित ज्ञान सांगते.

१. दुःखाने विचलित न होणे व निश्चित दिशेने (अमृतत्वाय कल्पते) मार्गक्रमण करणे.

यं हि व्यथयन्तेते ...

... अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

२. Determination

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।

अर्थात निष्काम कर्म शास्त्र आचरण करणे. येथे कार्याचा एकनिश्चय असतो. व निष्ठेने कार्यरत असतो.

३. अहंकाराचा आश्रय vs ईश्वराचा आश्रय हा अज्ञानाचा आश्रय vs ज्ञानाचा आश्रय असतो. हे भगवतगीतेचे Exclusive ज्ञान आहे.

अज्ञानेन् आवृतं ज्ञानं।

अहंकार विमुढात्मा कर्ताहम् इति मन्यते।

ज्ञानसञ्च्छिन्न संशयम् ।

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन् भारत ।

सार:

"When the divine vision is attained, all appear equal; and there remains no distinction of good and bad, or of high and low. "

Ramakrishna

समाजातील भाष्याचा सूर चांगले-वाईट या आधारावर असतो. इतरांना वाईट व स्वतःला चांगले समजुन जगले तर चांगल्या मनुष्याचाही भ्रम होतो हे भगवतगीता दर्शवुन देते. जगात चांगले-वाईट नसुन ज्ञान-अज्ञान आहे या तत्वाचा स्विकार केला तर चांगल्या मनुष्याला श्रेष्ठ होण्यासाठी स्वतःच्या अज्ञानाचा स्विकार करणे आवश्यक असते.

******

(३-२७)

*******************

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।

अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।।

*******************

(३. -२७)/१:

"प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः"

( Lifejourney &Mode of Wisdom )

Lifejourney:

A life where the choices we make are decided by what it is that we most value.

मनुष्याच्या जीवनयात्रेत स्वतःचा मार्ग महत्वाचा असतो. Detachment संदर्भात निष्काम कर्म, कार्याचा दृढनिश्चय, स्वतः जबाबदारी स्विकारणे, विश्वासाने व निष्ठेने कार्य करणे यांचा समन्वय स्वतःचा मार्ग साधत असतो. हा भगवतगीतेचा संदेश आहे.

स्वतःचा मार्ग:

(3D: Decesion, Discipline & Determination)

" Our life journey is made up of many factors. However, the decisions we make, the discipline we have for acting on those decisions, and the determination we have for adhering to those decisions will make a huge impact on our life. "

१. गुण :

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।(३-२७)

प्रकृति गुणानुसार कार्यरत(active) असते. "स्वतःचा मार्ग" याच संदर्भात या गुणाची (mode of life-journey) ओळख भगवतगीता देत आहे,

सत- Mode of Wisdom, goodness

रज-Mode of passion (प्रवृत्ति)

तम-Mode of ignorance

रज व तम गुण यांना defeat करुन सत गुण प्रभावी होतो. याप्रमाणे "गुण" या संदर्भात सत गुणाचा प्रभाव स्वतःच्या मार्गासाठी Priority ठरते.

२. नियम vs. मुल्ये

भगवतगीता जीवनविकासासाठी स्वतःचा पक्का मार्ग ही मनुष्याची Priority असावी हा संदेश देते व त्यासाठी साधन व जीवनमुल्यांची(We most value) ओळख देते.

स्वतःच्या मार्गासाठी (अ). स्वभावनियत कार्य (सहजकार्य) (ब). निर्णयअधिकार हे साधन आहे.

जगात नीति, नियम, धर्म आपण ऐकत असतो. याचाच आधार घेवुन चांगले वाईट, योग्य-अयोग्य यावर भाष्य चालत असते. स्वतःच्या निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी, जगावर टिका करण्यासाठी याचाच उपयोग होत असतो. समाजात नीति या

संदर्भात धर्माचे Interpretation आपल्या सोयीने केले जाते, तेंव्हा लोक कसे वागतात, कसे भाष्य करतात?याचे दर्शन अर्जुनविषादयोगातील अर्जुनाची भूमिका देते. अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतांना धर्माचा दाखला देतो.

(अ)धर्माचरणातील हा Tie भगवतगीता धर्म(नियम) vs. स्वधर्म(मुल्य) याद्वारे सोडविते. (समर्थनासाठी नियम vs. मार्ग पक्का करण्यासाठी मुल्ये).

अर्जुनाच्या नियतकार्यात स्वभावनियतकार्याचा उपयोग होतो. हे कार्य स्वधर्मात transform होते, तेंव्हा स्वधर्म जीवनमुल्य ठरते. येथे धर्म vs. स्वधर्म याद्वारे हा tie सुटतो. स्वधर्म Tiebreaker ठरते. येथे स्वतःच्या निश्चित मार्गाचे महत्व स्पष्ट होते.

ब)चंचल बुद्धि vs. बुद्धियोग

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।
बहुशाखा हि अनंताश्च बुद्धयोः अव्यवसायिनाम् ॥(२-४१)

चंचलत्वामुळे कार्याचा एकनिश्चय होत नाही. चंचलत्वावर मात करण्यासाठी बुद्धियोग निष्ठा व त्याचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते. या संदर्भात बुद्धियोग जीवनमुल्य ठरते, ज्यामुळे "अमृतत्वाय कल्पते" हा विकासमार्ग बनतो. व्यावहारिक नियतकार्याचे दृढनिश्चयात Transformation होते.

********

(३. २७)/२:"अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते"

जीवनमार्गात अज्ञानाचा आश्रय vs. ज्ञानाचा आश्रय ही भगवतगीतेची भूमिका आहे. याच संदर्भात अहंकाराचा आश्रय असतांना "विमुढात्मा "(अज्ञान) संबोधले आहे.
अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

विकासाला सहाय्यक असलेले ईश्वरज्ञान व बाधक ठरणारा अहंकाराचा आश्रय यातील निश्चित बोध भगवतगीता करते.

अर्थात जीवनमार्गात अज्ञानाचा आश्रय कि ज्ञानाचा आश्रय?या संदर्भात ईश्वराचा आश्रय हा ज्ञानाचा आश्रय असतो ही भूमिका भगवतगीता स्पष्ट करते.

अहंकाराचा निश्चित बोध होण्यासाठी अहंकार vs आत्मसन्मान, अहंकार vs आत्मविश्वास हा भेद जाणणे आवश्यक असते.

Know your SELF:Ego & Self respect:

"Often humanbeing is confused while interpreting Self respect and Ego. The former push the life ahead, the later plays obstacle. Wisdom is to know the difference between ego and Self-respect, and to become more aware towards these.

The very basic difference is – ego is negative and counter productive while self respect is positive and sign of confidence. To have confidence is to have faith in your own abilities and believe in yourself, but the Ego is our false-self; it is a cover up for our

insecurities. The best way of managing ego is to break the unhealthy attachment with the self. "

Bhagwatgeeta revealed the secret of "Breaking the unhealthy attachment" that will be hurting the self respect.
अहंकाराचा आश्रय अर्जुनाच्या विकासमार्गात अडथळा निर्माण करते. Attachment of pain यामुळेच असते. Detachment साठी (शाश्वत)ईश्वराचा आश्रय याचे शास्त्र भगवतगीता स्पष्ट करते.

अहंकार vs. ईश्वर
अहंकाराचा आश्रय असल्यामुळे मनुष्य स्वतःला कर्ता समजतो. प्रत्यक्षात प्रकृतिमुळे(गुण) कर्म घडत असते.

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।
अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।।(३-२७)

संपुर्ण प्रकृति ईश्वराच्या उर्जेमुळे संचलित असते. या संदर्भात ईश्वराला विश्वाचा अध्यक्ष संबोधले आहे.

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।
हेतुना अनेन कौंतेय जगत् विपरिवर्तते।।(९-१०)

प्रत्येक व्यक्ति विश्वाचा घटक आहे. जगाचे व मनुष्याचे नाते याच ईश्वरामुळे स्पष्ट होते. मनुष्यातील चांगलेपण याची साक्ष असते.

आत्मविश्वास असलेला विश्वासाने विकासमार्ग चालतो, तर अहंकाराचा आश्रय विकास थांबवतो. संशयामुळे चंचलता असते. तर संशयमुक्तिसाठी ज्ञान असते. ईश्वराचा आश्रय "ज्ञान" या संदर्भात मार्गातील संशयमुक्तिसाठी अर्थात कार्याचा दृढनिश्चय होण्यासाठी आहे. (ज्ञानसञ्च्छिन्न संशयम् )

व्यावहारिक बोध:

एखादा व्यक्ति अहंकारी आहे असे बोलल्या जाते तेंव्हा अहंकार या शब्दाचा संदेश दर्प, घमेंड असा असतो. पण भगवतगीतेत दुःखी झालेल्या व त्यामुळे निष्क्रिय झालेल्या अर्जुनाला

"अहंकाराचा आश्रय कि ईश्वराचा आश्रय?"असे Option दिलेले आहे.

"Ego closes our mind and obstructs our vision so that we cannot see anything other than the ideas of our own. "

अहंकारामुळेच मनुष्य "स्वमतांध" होतो. वास्तव स्विकारीत नाही. याचमुळे समाजात निरर्थक, नकारात्मक भाष्य चालत असते. ज्ञानविज्ञान उपलब्ध असुनही त्याचा निश्चित उपयोग करण्यास सक्षम नसतो.

"Knowing the difference between self-respect and ego, if personal action is not decided accordingly, then acquired knowledge gets converted to ignorance, stagnates, becoming merely for exhibition. "

याच पार्श्वभुमिवर ज्ञान या संदर्भातच ईश्वराचा आश्रय मनुष्याचे "Perception"बदलविण्यास सहाय्यक ठरते. ज्यामुळे विश्वासाने विकासमार्गावर जीवनयात्रा चालत असते. भगवतगीता या

ज्ञानाला गुह्यज्ञान संबोधते व ईश्वराचे अस्तित्व मानायचे किंवा न मानायचे! या निरर्थक वादावर पडदा टाकते.

"The bond that links your true family is not one of blood, but of respect and joy in each other's life. "
Richard Bach

**********

(३. २७)/३ : "अहंकार विमुढात्मा "

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।
"अहंकार विमुढात्मा" कर्ताहम् इति मन्यते॥(३-२७)

प्रकृति कार्यरत असते, ही प्रकृति ईश्वराच्या उर्जेमुळेच कार्यरत असते. "कर्ता" हे श्रेय मनुष्य घेत असतो. पण कर्तेपणाच्या या संवयीमुळेच दुःखी होतो. संशयामुळे द्वंद्ववश होतो. अर्थात मोह पावत असतो. याप्रमाणे दुःखाचे कारण अज्ञान ठरते.
अज्ञानेन् आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः॥(५-१५)

यामुळे "अहंकार विमुढात्मा (Stupdity) " असा कठोर शब्दप्रयोग भगवतगीता करीत आहे.

"The ego is only an illusion, but a very influential one. Letting the ego-illusion become your identity can prevent you from knowing your true self. Ego, the false idea of believing that you are what you have or what you do, is a backwards way of assessing and living life. "

Wayne Dyer

What is Ego

Ego is one of the Mind functionig faculty viz:Conscious mind(मन), Intelligence (बुद्धि), Memory or Subconscious mind (चित्त), Ego ("I maker"अहंकार)

Definition of Ego

Ego=1/Knowledge

" More the knowledge lesser the ego, lesser the knowledge more the ego. "

Albert Einstein

". Most commonly agreed definition of ego is, it is your self-defense mechanism and more importantly, your false concept. "

*The ego is the opposite of self-esteem. Often humanbeing is confused while interpreting Self respect and Ego. The former push the life ahead, the later puts obstacle. "

"Self Awareness" या संदर्भात मनुष्याला निर्भयता, धैर्य, आत्मविश्वास, शांती(Stable mind )आवश्यक असते. भगवतगीता याच संदर्भात Ego vs Self esteem हे ज्ञान स्पष्ठ करते. अहंकारामुळेच दुःखी होतो. अहंकारामुळे यशाचे श्रेय स्वतःकडे व अपयशाची जबाबदारी न स्विकारता इतरावर दोष ढकलतो. बेजबाबदार होतो. स्वतःच्या अज्ञानी अवस्थेला ज्ञानी दर्शवितो.

"There is a vitality, a life force, an energy, a quickening, that is translated through you into

action, and because there is only one of you in all time, this expression is unique. "

Martha Graham

मनुष्याचे जीवन ईश्वराच्या उर्जेनेच क्रियाशील असते व Ultimate Aim (Goal)ईश्वर (तद् धाम परमं मम) आहे. ज्ञानविज्ञानाचा उपयोग जीवनयात्रेतील कार्यासाठी होतो व कार्याचे ज्ञानात विलिनिकरण (सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते)होते. Matter(जड) व Energy चे नाते भगवतगीता याप्रमाणे स्पष्ठ करते. यालाच जीवनविकासासाठी अध्यात्मज्ञान (Know Thyself/शाश्वताचे ज्ञान) म्हटले. (अध्यात्मज्ञान नित्यत्वं).

ईश्वरश्रद्धा असणारे प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे याच सार्वभौम ईश्वराला भजत असतात.

एकत्वेन पृथक्त्वेन् बहुधा विश्वतोमुखम् ।(९-१५)

म्हणुन वर्तमानात व्यवहारात जगत असतांना ईश्वराचा आश्रय अहंकाराला replace करते. अप्रत्यक्षपणे हे Consciosness चे Shifting ठरते. ( " Elevating yourself to higher level of consciousness. ")

याप्रमाणे भगवतगीतेतील जीवनविकासाच्या ज्ञानाला शाश्वत मनोवैज्ञानिक ज्ञानाचा आधार आहे.

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।.. (१८-५९)

स्वभावजेन् कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा।.. (६०)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।... (६१)

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तद् प्रसादात् परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।।(६२)
*****

३. २७/४:
"अहंकार विमुढात्मा कर्ताहम् इति मन्यते"
(Ego vs Self realization)

I believe that the biggest problem that humanity faces is an ego sensitivity to finding out whether one

is right or wrong and identifying what one's strengths and weaknesses are.

Ray Dalio

The ego is the opposite of self-esteem.

The very basic difference is – ego is negative and counter productive while self respect is positive and sign of confidence. Ego closes our mind and obstructs our vision so that we cannot see anything other than the ideas of our own.

Wisdom is to know the difference between ego and self-respect, and to become more aware towards these. Ego is our false-self; it is a cover up for our insecurities.

Self-realization means that we are established in the Self as the Self due to the total dissolution of the ego.

The best way of managing ego is to break the unhealthy attachment with the self.

There is an external reality and an internal reality. External reality is a world of external objects. Internal reality is a world of thoughts and feelings. We experience the world more from an internal reality.

Observe thoughts and feelings that make us happy or sad. If something makes us sad, renounce it.

Renouncing involves not being attached to your thoughts and feelings as they emerge. You give them a reality when you merge with them. We get stuck to the wrong 'I' in us. This wrong self is the ego. Ego exists in ignorance. The shadow becomes real if you get attached to your shadow. Detachment is the key. Detachment is being aware of the sanity of life. Attachment is insanity.

*** ***

(३-२८)

**********************

तत्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः।

गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते।।

**********************

३. २८:

"तत्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः"

(Wisdom of action )

गुणकर्मविभाग:

मनुष्यजीवनात कर्म घडत असते. प्रकृतिचे तीन गुण(सत- Mode of wisdom, रज- Mode of passion, तम- Mode of ignorance) व त्याचा कर्मावर परिणाम अनुक्रमे निष्काम कर्म, सकाम कर्म व प्रमाद याप्रमाणे होत असतो, यालाच "गुणकर्मविभागयोः" म्हटले.

तत्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः।

गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते।।(३-२८)

SELF : Herd or Master!

"The human race is a herd. Here we are, unique, eternal aspects of consciousness with an infinity of

potential, and we have allowed ourselves to become an unthinking, unquestioning blob of conformity and uniformity. A herd. Once we concede to the herd mentality, we can be controlled and directed by a tiny few. And we are. "

David Icke

(Writer of"And the Truth Shall Set You Free")

या विश्वात आपण आलेलो असतो. आपली जीवनयात्रा चालु असते. या विश्वाशी आपले नाते काय? व या विश्वात आपले अस्तित्व काय? यासंबंधी विचार केला तर या विश्वात जीवनाचे खेळ नित्यच चालु राहणार. "आपण" याच खेळाचा पण मर्यादित (अनित्य) भाग आहोत असा प्रथमदर्शनी विचार येतो.

भगवतगीता याच "आपण" ची ओळख करुन देते. "आपण" या संदर्भात शरीरयंत्रातील (क्षेत्र) गुणाचा आपसातील खेळ सुरु असतो (गुणा गुणेषु वर्तन्ते), पण गुणातीत (शाश्वत) या संदर्भात आपण अलिप्त(Detached) असतो.

अहंकार विमुढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

अहंकारामुळे "कर्ता" या संदर्भात स्वतःला अशाश्वत (मर्यादीत) जाणत असतो. म्हणुन दुःखी, विचलीत( pain- attached )

होतो. म्हणुन स्वतःची अलिप्तता, शाश्वत अस्तित्व जाणण्यासाठी भगवतगीतेच्या "गुणत्रय" विभागात प्रकृतिचे तीन गुण व गुणातीत अशी ओळख व शाश्वत- अशाश्वताचे विज्ञान सांगितले आहे.

व्यवहारात कर्म घडण्यास मुख्य दोन factors,

१. State of Art व

२. State of want कारण असतात.

व्यवहारातील हे कर्म त्याच Consciousness मध्ये perform केले तर ते सकाम कार्य ठरते.

"No problem can be solved from the same level of consciousness that created it. "

Albert Einstein

भगवतगीता दुःखाच्या, अशाश्वताच्या Detachment साठी निष्काम कर्माचे शास्त्र सांगते. व याचसाठी कर्माचे महत्व स्पष्ट करते. निष्काम कर्म Higher consciousness मध्ये घडते. म्हणुन भगवतगीता जीवनाच्या विकासमार्गात "नित्यसत्वस्थो"(Mode of wisdom/goodness) असे प्रयोजन करते.

निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।(२-४५)

Obedience is detachment from the self. This is the most radical detachment of all. But what is the "Self"?

The "Self" is the principle of reason and responsibility in us. It is the root of freedom, it is what makes us men.

-Bede Griffiths(Swami Dayananda )

Leading thinker in the development of the dialogue between Christianity and Hinduism.

*******

(३-३०)

**************************

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्य अध्यात्मचेतसा।

निराशीः निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः।।

**************************

(३-३०)

:

"मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्य अध्यात्मचेतसा"

( जीवनातील कर्म, ज्ञान व भक्ति यांची भूमिका )

कर्माशिवाय शरीरयात्राही चालत नाही. म्हणुन जोवर या भूतलावर मनुष्य आहे, कर्म घडणार.

शरिरयात्रा अपि च तेन प्रसिद्ध् येत् अकर्मणः।(३-८)

जगात ज्ञानविज्ञान असले तरी नवनवीन प्रश्न निर्माण होतातच व समाजाला, मनुष्यजीवनाला आव्हान देत असतात. यामुळे विज्ञान

कितीही अस्तित्वात असले तरी त्याच्या अपुर्णतेची जाणीव होते. यामुळे अविरत शोध सुरुच असतात.

ज्ञान म्हणजे ज्या शक्ती मुळे कळते, समजते, उमजते त्या शक्तीला ज्ञान म्हणतात. (पर्यायवाचक शब्द awareness, knowingness, perception, attention, mind. ) जीवनात ज्ञानाची भूमिका याच संदर्भात कर्माचे जीवनविकासात महत्व आहे.

काळ कोणताही असला तरी मनुष्यजीवन सिमित काळासाठी असते. विज्ञान अपुरे असले तरी ज्ञान अपुरे नाही हे भगवतगीतेतुन स्पष्ट होते. ज्ञान या संदर्भातच अध्यात्म, ईश्वर हा विषय भगवतगीतेत आलेला आहे. व काळ कोण आहे?त्याचा संदेश काय आहे हे भगवतगीता विश्वरुपदर्शनातुन स्पष्ट करते. म्हणुन जीवनाचा विकासमार्ग, ध्येय या संदर्भात त्याचे(अध्यात्म, ईश्वर) महत्व भगवतगीता स्पष्ट करते. व याच संदर्भात सर्व कर्माचे ज्ञानात विलिनीकरण होते असे स्पष्ट होते.

सर्व कर्म अखिलं पार्थ ज्ञाने परि समाप्यते।(४-३३)

२. कर्माची जीवनातील भूमिका काय?

कर्माचे ज्ञान जाणणारे कर्मात आनंद अनुभवतात. तर याचे अज्ञान असल्यामुळे कुणाला कर्म कष्ट वाटतात. यामुळे कर्म टाळण्याकडे त्याचा कल असतो. नकारात्मक, excuses भाष्य बोलतो व यालाच आदर्श दर्शविण्याचा प्रयत्न करतो. तर कुणी ज्ञानी समजुन उंटावरुन शेळया हाकतो.

सामान्य श्रेष्ठांचे अनुसरण करतात. एखादा यशस्वि उद्योगपति स्वतःला शक्यतोवर free ठेवून आपले उद्योगसाम्राज्य चालवित असतो. योजक, नियोजनकौशल्य साध्य करतो. परंतु पैसा असेल तर घरी बसुन काम करुन घेता येते असा अर्थ काढुन पैशालाच सर्वश्रेष्ठ ठरविले तर कार्यक्षमतेचा तो अनादर ठरतो. कर्माचे अज्ञान ठरते. हा भ्रम ठरतो.

श्रेष्ठ, ज्ञानी जनांनी कर्माचाच सामान्यांना संदेश द्यावा, बुद्धिभेद करु नये. हा भगवतगीतेचा संदेश आहे.

न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।(३-२६)

म्हणुन मनुष्यजीवनांत कर्म व ज्ञान यांची निश्चित भूमिका काय आहे. हे स्पष्टिकरण भगवतगीता करते. ज्ञानविज्ञानात कितिही ज्ञान निर्माण झाले तरी मनुष्याचे कर्म अखेर ज्ञानातच विलिन होते. या विलिनीकरणासाठी ज्ञानविज्ञानाची भूमिका, कार्यकौशल्य कला स्पष्ट होते. ही कलाच मानसिक exerciseचे साधन ठरते.

योगः कर्मसु कौशलम्।

-----

३. गहना कर्मणो गतिः

*यज्ञकला:

सृष्टित प्रजा व देवता यांचेत परस्पर सहकार्य साधण्यासाठी पुर्वी यज्ञाचे प्रयोजन केले होते.

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरा उवाच प्रजापतिः।(३-१०)

सृष्टिचक्रप्रवर्तनात यज्ञ, कर्म, ब्रह्म यांची भूमिका सांगीतली व या यज्ञकलेद्वारे कर्म मानसिक exercise चे साधन स्पष्ठ केले.

श्रोत्र आदीनी इंद्रियाणि अन्ये संयमाग्नेषु जुह्वति।

शब्द आदीन् विषयान् अन्ये इंद्रियाग्निषु जुह्वति॥(४-२६)

सर्वाणि इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।
आत्मसंयम योगाग्नौ जुह्वति ज्ञानददीपिते॥(४-२७)

इच्छा कार्याद्वारे इंद्रियाग्नीत भस्म, इंद्रियकार्य संयमाग्नित भस्म याप्रमाणे सर्वकर्म ज्ञानाने प्रदिप्त झालेल्या योगाग्नित भस्म होतात. भस्मिकरण यज्ञकलेतील रहस्य आहे. कार्याचे goal लक्ष्य ठरवुन निष्ठेने लक्ष्य साध्य होते, तेंव्हा goal मधील Fire स्पष्ठ होते. ज्ञानाग्नि याच अर्थाने fire ठरतो.

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात कुरुते तथा॥(४-३७)

४. श्रेष्ठत्व :

सुख या संदर्भात भोगैश्वर्यप्राप्ति, किर्ती, ज्ञानी, चांगले, शुर, पुढारी असे वेगवेगळे मत असते. तरी श्रेष्ठ संदर्भात सिंहाचा उल्लेख होतो. ज्याची वनराज अशी ओळख आहे.
"मृगाणां च मृगेन्द्रो अहं ।"

"I am not afraid of an army of lions led by a sheep; I am afraid of an army of sheep led by a lion. "

-Alexander the Great

आता सिंह म्हणजे काय?

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

विचलित न होणे याचसाठी "योगः कर्मसु कौशलम् " हा संदेश आहे.

"People with a strong will power will always have the bigger picture in mind. They will be able to forgo small pleasures in order to help attain bigger goals. "

-Brian Adams,

५. भक्ति :

भगवतगीतेत अकर्ता, अकर्म, निष्काम या शब्दांचा उल्लेख असला तरी जीवनात कर्माचे महत्व कळल्याशिवाय अकर्ता, अकर्म, निष्काम या शब्दाचे महत्व कळत नाही. "न हि ज्ञानेन

सदृशं" याद्वारे ज्ञानाला सर्वश्रेष्ठ ठरविले तरी कर्माचे महत्व कळल्याशिवाय ज्ञानाचे महत्व कळत नाही.
म्हणुन कर्माद्वारे ईश्वरभक्ति या संदर्भात भगवतगीता संदेश देत आहे,

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्य अध्यात्मचेतसा।
निराशीः निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः।।(३-३०)

******

(३-३०)

:

"निराशीः निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः"

(अशाश्वताकडुन शाश्वताकडे)

मनुष्यजीवन अशाश्वत आहे हे आपण जाणतो. या जीवनाचा प्रवास मात्र शाश्वताकडे आहे. जीवनविकासाच्या मार्गाचा हाच आधार आहे. हेच आपल्याला जाणुन घ्यायचे आहे. अशाश्वताशी Attachment मुळे मनुष्य दुःखी होतो, विचलित होतो. म्हणुन जीवनात अशाश्वत(अनित्य) vs. शाश्वत (नित्य) हा भेद जाणुन

शाश्वताचा मार्गात आश्रय व्हावा व अशाश्वतावर विजय मिळवावा हेच ज्ञान भगवतगीता सांगत आहे.

प्रकृति(सत, रज, तम गुणयुक्त) व पुरुष(आत्मा) अर्थात जड व चेतन याद्वाराच विश्वाची उत्पत्ति आहे. प्रकृतिगुण (सत, रज व तम) कर्म घडण्यास कारण असतात. जीवनविकासात कर्म हे प्रमुख साधन असते. याच कर्माला साधन करुन Attachment vs. detachment शास्त्र भगवतगीता स्पष्ट करते. अशाश्वताकडुन शाश्वताकडे या मार्गात Detachment चे शास्त्र आहे. हा केवळ स्वतःचा मार्ग असतो हे येथे महत्वाचे आहे. याचसाठी अध्यात्मज्ञान आहे.

*मनुष्य स्वभावनियत जगत असतो, कार्यरत असतो. मग त्याचा दोष कोणता?

Attachment!

अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।

व्यवहारात सकाम कर्म असते, अर्थात Attachment असते. यामुळेच अर्जुन (परिणामभयाने) दुःखी होतो. त्याला आपल्या कर्मातच चुक जाणवते. ही चुक टाळण्यासाठी सरळ निष्क्रियता पत्करतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. या प्रक्रियेत वास्तव स्विकारीत नाही, ज्यामुळे प्रश्नावरच पडदा पडतो.

जेंव्हा समाजात लोक जलपा(मी योग्य) mode मध्ये किंवा वितंड(तु चुक) mode मध्ये भाष्य करतो तेंव्हा संवादाला Space मिळत नाही. या संवयीमुळे अज्ञानालाही ज्ञान दर्शविण्याचा प्रयत्न होतो. याचे कारण अहंकार असतो व यामुळे Attachment असते.

अर्जुन वास्तव स्विकारतो व संवाद सुरु होतो.

*Detachment चे शास्त्र (निष्काम कर्म)

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्य अध्यात्म चेतसा।

(अर्थात कार्याद्वारे ईश्वरभक्ति)

निराशीः निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः।।

निराशी - निष्काम कर्म

निर्मम-अहंकाररहित, स्वामित्व नसणे.

विगतज्वर-आळस, उद्वेग सोडुन

युध्यस्व -

मनुष्य जन्म घेतो, जीवन जगतो व गन्तव्य स्थानाला जातो (जावेच लागते). या सिमित जीवनाचा अर्थ काय?याचा हेतु काय?याचा विचार करायचे कारणच नसते कारण मनुष्य प्रत्यक्ष जगत असतो. जेंव्हा या यात्रेत दुःख येते, अडथळा जाणवतो, तेंव्हा मात्र गोंधळतो. या गोंधळाचे उत्तर तो बाहेरच(व्यवहारात/External)

शोधत असतो. अर्जुनानेही उत्तर शोधले असते!समोरचा पक्ष अज्ञान असेल व अज्ञानामुळे, लोभामुळे त्यांना युद्धामुळे घडणारे पाप दिसत नसेल पण आपण ज्ञानी आहोत ना!आपणाला तर पाप स्पष्ट दिसत आहे. शहाण्याचे कर्तव्य म्हणुन आपणच निवृत्त होणे श्रेयस्कर नाही कां?

अर्जुनाच्या गोंधळाचे (Chaos) हे उत्तर नसते. कारण हा गोंधळ आंतरिक (Internal) असतो. भगवतगीतेत External battle(व्यवहार) व Internal battle (अध्यात्म) याचा समन्वय साधलेला आहे. External battle निमित्त असते. Internal battle गरज असते.

"The battlefield is a scene of constant chaos. The winner will be the one who controls that chaos, both his own and the enemies. "

-Napoleon Bonaparte

********

(३-३१)

**************************

ये मे मतम् इदं नित्यं अनुतिष्ठन्ति मानवाः।
श्रद्धावन्तो अनसूयन्तो मुच्यन्ते तेअपि कर्मभिः।।

**************************

(३-३१):

"ये मे मतम् इदं नित्यं अनुतिष्ठन्ति मानवाः"

(भगवदगीतेचा संदेश-कार्यकौशल्य)

मानवी जीवनात कर्म अविभाज्य भाग आहे.

"कर्मानुबंधिनि मनुष्यलोके". योगक्षेमासाठी, भौतिक प्रगतिसाठी कर्म करणे हा व्यवहार आहे व ती स्वाभाविक प्रवृत्ति आहे.

भौतिक विकासात कर्म साधन असते. मनुष्याला गरजापुर्तिसाठी, व्यवहारात प्रश्न सोडविण्यासाठी कर्म करावे लागते. हेच कर्म करतांना अर्जुनाला अडथळा जाणवतो. जे कार्य करावयाचे आहे त्याचा परिणाम शोकदायी आहे म्हणुन ठरल्याप्रमाणे कर्म न करणे हेच स्वतःसाठी श्रेयस्कर समजतो. व आपण योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान वापरतो.

व्यवहारात सकाम कार्य असते. या स्थितित परिणामाचे भय विचलित करते. व कार्यनिश्चय ढळतो. तरी मनुष्य स्वतःला योग्य

सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. ही स्वाभाविक संवय असते. अर्जुन अज्ञानी भूमिकेला ज्ञानी भूमिका दर्शवितो व येथुनच भगवदगीता ज्ञानाला सुरुवात होते. कर्म सहज घडत असते. कर्माद्वारेच विकास होतो. या विकासाचे ज्ञान व विकासासाठी "कार्यकौशल्य" हाच भगवदगीतेचा विषय आहे.

समाज कार्यकौशल्याला Skilled work, State of Art असे जाणतो. तर "जीवनविकासातील कार्याचे कौशल्य " यासाठी भगवदगीतेने कार्यकौशल्य शब्द वापरला आहे.

"योगःकर्मसु कौशलम्"

"कार्यकौशल्य" याच संदर्भात अकर्म, स्वधर्म, निर्णयअधिकार व कार्याचा एकनिश्चय, समत्वयोग या कौशल्याचा उल्लेख आहे.

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्य अध्यात्म चेतसा।

निराशीः निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः।।(३-३०)

१. "कर्मण्येव अधिकारःते" हा भगवदगीतेचा निर्णयअधिकिराविषयी संदेश आहे. जीवनविकास ज्ञानात योगक्षेमासाठी कार्य करणे, स्वावलंबि असणे यामुळे निर्णयअधिकार मिळतो.

"Beggars are not choosers"

२. स्वतःचा स्वधर्म कार्यातील संशयमुक्ति(Tiebreaker) व स्वातंत्र्य(Self approval) अशी दुहेरी भूमिका बजावते.

*समुहातील निर्णयाचा स्विकार करणे व नियतकार्याला स्वधर्म जाणणे.

*स्वतःच्या स्वभावनियतकार्याला स्वधर्म जाणणे.

३. निष्काम कर्म, कर्मसंन्यास(अकर्म)

कर्म घडणे ही प्रकृति असते. प्रकृति व पुरुष(ईश्वर) याद्वारे सृष्टिची निर्मिति आहे. मनुष्याचे प्राणतत्व याच ईश्वराशी संबंधित आहे. (आत्मा-परमात्मा, Mind-Universal mind). हाच आधार जीवनविकासमार्गाचा आहे. यानुसार मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा ठरतो. या मार्गात कर्म ईश्वराला समर्पण होते तेंव्हा "कर्मसंन्यास " हा उल्लेख आहे. तर कार्याचा एकनिश्चय करुन फलत्याग करणे व समत्वयोगाने कार्यरत असणे याला "कर्मयोग" संबोधले आहे.

हाच Attachment (सकाम कर्म) vs. Detachment (निष्काम कर्म) याचा आधार आहे. अर्जुनाचे नियतकर्म/स्वभावनियतकर्म या अर्थाने "युध्यस्व विगतज्वरः" या शब्दाचे प्रयोजन असले तरी प्रत्येक मानवासाठी हे Internal battle असते.

ये मे मतम् इदं नित्यं अनुतिष्ठन्ति मानवाः।

श्रद्धावन्तो अनसूयन्तो मुच्यन्ते तेअपि कर्मभिः।।(३-३१)

**********

(३-३३)

 **************************

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।

प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति।।

 **************************

(३. ३३)/१ : "सदृशं चेष्टते स्वस्याः"

"सदृशं चेष्टते स्वस्या" या संदेशातुन प्रकृतिचे वास्तव दर्शवुन दोष कोणता?हे भगवतगीतेने दर्शविले आहे. याद्वारे जीवनविकासात प्रकृतितील Strength व Weakness याचा बोध होतो. ज्यामुळे मनुष्याला जगण्यातील अडथळा जाणुन बदल करणे शक्य होते.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।

प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति (३-३३)

ज्ञानीसह सर्वच लोक आपापल्या प्रकृतिनुसार जगत असतात. याच प्रकृतिमुळे स्वभावनियत कार्यरत असतात. हे प्रकृतितील Distinction असते.

सहजकर्म जीवनविकासाचे साधन असते. ही Strength असते. अडथळा आला असता मनुष्याला त्याची ओळख नसते व तो प्रकृतिवश जगत असतो.

प्रकृतितील हा अडथळा कोणता? निश्चित दोष(Weakness) कोणता आहे?हा दोष निर्माण झाला असता कसे भाष्य करतो?हे जाणुन घ्यायचे असते, ज्याविषयी मनुष्याला सावधानता बाळगायची आहे!

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयो नः वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

अर्जुन प्रत्यक्षात अशाच द्वंद्वाच्या जाळयात अडकतो व हा अडथळा न जाणता (समर्थनासाठी)प्रज्ञावादी भाष्य करतो. भगवतगीता याच मुद्यावर मनुष्याचे लक्ष वेधते.
श्रीकृष्ण अर्जुनाचे भाष्य ऐकुन घेतात. पण ते निरर्थक आहे, हे दर्शवुन देतात. (किर्ति, स्वर्ग मिळविण्याचे हे ज्ञान नव्हे तर अज्ञान आहे!). वास्तव वेगळे असते. हेच वास्तव अर्जुन कबुल करतो.
What I want?

युद्ध करणे माझ्यासाठी चुक आहे असे मला वाटते . कारण जर योग्य असेल तर युद्धाच्या परिणामाने मला होणारा शोक कसा नष्ट होणार ?

जीवनयात्रेत मनुष्याला अडथळा जाणवला तर दुःखी होतो. समाधानासाठी प्रज्ञावादी (बौद्धिक) भाष्य करतो. या भाष्याचे Purpose "मी योग्य" सिद्ध करण्यासाठी असते . असे भाष्य भाष्यकाराच्या दृष्टिने योग्य असले तरी इतरांच्या दृष्टिने Purposeless असते. यामुळे अशा भाष्यात संवाद होत नाही. म्हणुन प्रथम भाष्याचे Purpose जाणणे व ठरविणे आवश्यक असते.

भगवतगीतेतील हाच मुद्दा त्यांतील ज्ञानाचा उगम आहे. हा मुख्य बिंदु लक्षात घेतला तरच भगवतगीतेचे महत्व कळते. निरर्थक भाष्य(Purposeless) व सार्थक भाष्य(Purposeful -ज्ञान ) यांतील भेद जाणतो.

समाजबोलीत "सदृशं चेष्टते स्वस्या" याच संदर्भात "स्वभावाला औषध नाही "असे बोलल्या जाते पण भाष्यातील सार्थकता व निरर्थकता यांतील भेद जाणता येणे व त्यापासुन सावध असणे मनुष्याला शक्य असते. हाच अडथळा मनुष्याला दृढतेने पार

करायचा असतो. याच अडथळयाला "पाय ओढणे" या संदर्भातही बोलले जाते. तर भाष्याचे संदर्भात वचन मुल्य, "बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले"ही Strength असते.

*भाष्य Communication चे साधन असते, म्हणुन समाजात निरोगी संवाद आवश्यक असतो. तरी निरर्थक भाष्य, नकारात्मक भाष्य, चिथावणी देणारे भाष्य, स्वार्थसाधु भाष्य असे विविध प्रकारचे भाष्य समाजात चालत असतात. मोहाच्या माध्यमातुन मनुष्य अशा (Toxic) भाष्याच्या जाळयात अडकत असतो. असेच भाष्य समुहात, समाजात Conflict (Lack of healthy communication) तयार करतात.

जशी दृष्टि तशी सृष्टि.
"It is Persuer that pollutes the Perception and create Toxicity. "

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप॥(७-२७)

सर्व जग प्रकृतिनुसार जगत असते, तसे आपणही जगत असतो. जगतांना स्वतःला द्वंद्वाच्या जाळयात अडकवुन न घेणे (व Toxicity पासुन मुक्त असणे), याविषयी सावध व्हायचे आहे. याचेच सविस्तर ज्ञान भगवतगीता विविध प्रकारे (स्वधर्म asTiebreaker, कार्याद्वारे ईश्वरभक्ति) देते.

येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)
**********०**

(३-३३)/२:"सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि"

प्रत्येक मनुष्याच्या जीवनाचे महत्व असते, पण याचे ज्ञान व जाणीव स्वतःलाच हवी, हेच रहस्य भगवतगीता सांगत आहे. महाभारत युद्धात अर्जुनाची भूमिका विशेष महत्वाची होती व यासाठी जणु ईश्वरानेच त्याची नियुक्ति केली असते हा पुरावाच भगवतगीतेतुन मिळतो.

प्रकृति व प्रकृतिवश:

"Repetition of the same thought or physical action develops into a habit which, repeated frequently enough, becomes an automatic reflex. "
Norman Vincent Peale

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।(३-३३)
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

मनुष्य चांगला असला, विद्वान असला तरी आपल्या (स्वभाव)प्रकृतिनुसारजगत असतो, कार्यरत असतो. पण या प्रवासात मनुष्याची इच्छा नसतांनाही नकळत तो निराश होतो, दुःखी होतो व द्वंद्वाच्या जाळ्यात अडकतो. हा जीवनमार्गातील अडथळा (Error)ठरतो.

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।
अहंकारविमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते॥(३-२७)

द्वंद्ववश हा error आला असता कोण चुक कोण बरोबर याचा उलगडा होत नाही, म्हणुन अर्जुन स्वतःलाच चुक ठरवुन

युद्धकार्यापासुन बाजुला होतो पण स्वतःची भूमिका योग्य आहे, धर्माची आहे असे ठामपणे (अहंकारामुळे) बोलतो. अर्थात येथे प्रत्यक्षात "योग्य" कळत नाही हे वास्तव असते, तरीपण स्वतःला योग्य ठरविण्यासाठी समर्थनभाष्य(प्रज्ञावाद) बोलतो. यामुळेच Error कळत नाही, व स्वतःच्या जीवनाचे महत्व कळत नाही. ही मनोवश अवस्था असते व नकळत स्वतःशीच शत्रुत्व करतो. याच पार्श्वभुमिवर मनुष्याला स्वतःच्या जीवनाचे महत्व कळण्यासाठी भगवतगीता मनोवश (प्रकृतिवश) अवस्था व आत्मवश(जितात्मनः) अवस्था यांतील भेद स्पष्ट करते.

प्रत्येक मनुष्य प्रकृतिनुसार जगतो, याचा अर्थ तो वर्तमानात सत, रज किंवा तम या कोणत्यातरी एका Mode मध्ये असतो. सत ज्ञान, रज प्रवृत्ति-कर्म, तम अज्ञान असते. तम भय, विषाद, आळस दर्शविते.

सत म्हणजे चांगले, चांगले कार्य या अर्थाने मनुष्य जाणतो. याच चांगलेपणामुळे अर्जुन दुःखी होतो व गोंधळतो. योग्य काय?हा संशय मिटत नाही व चुक होईल, पाप लागेल या भयाने (Committed)नियतकार्य टाळतो. अर्थात तम mode मध्ये

जगतो व सात्विक(सत mode) समजुन समर्थन करतो/दर्शवितो. म्हणुन तम mode vs. सत mode हा प्रश्न असतो.

सत mode: Wisdom & Happiness mode (Courage & Confidence)

रज mode: Action mode(State of want-State of art, action)

तम mode:Doubt & fear mode,

१. ज्ञानसञ्छिन्न संशयम् ।

Confidence mode vs. doubt mode

(संशयात्मा विनश्यति)

संशयामुळे कार्याचा निश्चय होत नाही. आत्मविश्वास नसतो. कार्यनिश्चय होण्यासाठी ज्ञानाचे महत्व (बुद्धियोग) भगवतगीता सांगते. आत्मविश्वास येण्यासाठी मार्गातील अज्ञान दुर करणे ही Priority ठरते.

२. योगसंन्यस्त कर्माणं।

Fear mode vs. Courage mode

Being in a state of fear is generally not very pleasant. This is because we are designed to exist in a state of love.

vs.

"You were put on this earth to achieve your greatest self, to live out your purpose, and to do it courageously. "

Steve Maraboli

मनुष्य भयामुळे कृति टाळतो, प्रत्यक्ष कृतिसाठी Courage mode आवश्यक असते. समत्वयोगाने कार्य करणे यामुळे महत भयावरही मात होते. (त्रायते महतो भयात्)

******

(३-३३)३:

"प्रकृति यान्ति भूतानि निग्रहः किम् करिष्यति"

(Replacement of habit/Good habit)

"A long habit of not thinking a thing wrong gives it a superficial appearance of being right. "

Thomas Paine

भगवतगीतेत अर्जुन स्वतःच्या निष्क्रियतेला धर्माचा दाखला देतो अर्थात Superficial apperance देतो. अशा प्रकारची भूमिका जेंव्हा Repeat होते, तेंव्हा संवय बनते. अशाच संवयीमुळे मनुष्य द्वंद्ववश अर्थात सकाम भूमिका जगत असतो. हीच भूमिका विकासमार्गात सहकार्य न करता अडथळा करीत असते. स्वतःच स्वतःचा अडथळा बनतो, अर्थात शत्रुवत बनतो.

"Repetition of the same thought or physical action develops into a habit which, repeated frequently enough, becomes an automatic reflex. "

Norman Vincent Peale

सदृशं चेष्टते स्वस्या प्रकृतेः ज्ञानवान अपि।
प्रकृति यान्ति भूतानि निग्रहः किम् करिष्यति।।
इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

संवय बदलविणे याचसाठी बदलाव/Transformation हा विषय येतो.

"The only proper way to eliminate bad habits is to replace them with good ones. "

-Jerome Hines

चांगली संवय-"योगयुक्तो भवार्जुन"

"चांगली संवय" या संदर्भात ईश्वरभक्ति, चांगलेपणा आपण जाणत असतो. याच ईश्वरश्रद्धेचा, चांगलेपणाचा आधार घेतला तर "चांगली संवय "या संदर्भात भगवतगीता योगयुक्त होणे, व विकासाचा राजमार्ग सांगते. या मार्गावर विचलित होत नाही म्हणुन सकारात्मक असतो. अर्थात आत्मविश्वासाने विकासमार्गावर असतो. अर्थात "चांगली संवय "म्हणजे स्वतःचा बंधु होणे, आत्मवश असणे .

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम।(९-३३)

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

तस्माद् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)

******

(३-३४)

***************************

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

***************************

(३-३४)/१ :

"इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ"

(जीवनातील Weakness व Strength :बंधन मुक्ति)

जीवन :

"जीवन प्रत्यक्षात सोपे आहे पण आपला प्रयत्न त्याला कठीण करण्याचाच असतो" हे कन्फ्युशियसचे वाक्य आहे. मनुष्य व्यवहारात चर्चा करतो. काय योग्य ?काय अयोग्य? यावर भाष्य होते. पण मनुष्य जे प्रत्यक्षात करीत असतो ते स्वतःसाठी योग्य आहे हे समजुनच करीत असतो. योग्य असेल तर समाधान असते

म्हणुन त्याला मी योग्य आहे, हे जगाला पटवुन देण्याची गरज पडत नाही.

पण समाधान नसेल तर(अशांती) मी योग्य आहे, हे सिद्ध करण्यासाठी तुलना, judgement thinking याचा वापर करतात. जे कार्याचे महत्व जाणत नाहीत, ते अशाच भाष्याची संवय करुन घेतात व आपला अमुल्य वेळ नष्ट करतात. अशाच चुकीच्या संवयीमुळे जीवन Complicatedहोते. व स्वतःच स्वतःचा अडथळा बनतो.

स्वाभाविक संवय व प्रश्न:

"मला कोणत्याच प्राप्तिची इच्छा नसतांना जे कार्य मला शोकदायी वाटत आहे, ते कार्य मी कां करावे?" हा अर्जुनाचा प्रत्यक्षात प्रश्न असतो, पण हे सरळ भाष्य न बोलता तो मला पापकर्म करायचे नाही अशी आदर्शवादी भाषा करतो. समाजात सत्याला बगल देवुन आदर्शवादी भाष्य वापरले जाते, तेंव्हा असे भाष्यच वादाचा विषय बनतो.

अडचणीचा असा प्रसंग मनुष्य जाणुन स्वतःवर ओढवुन घेत नाही. तरी आयुष्यात असे प्रसंग उभे ठाकतात. व आपल्याला

सोयीस्कर होईल अशी निवड करुन यात्रा सुरु ठेवतात. व मी योग्य आहे हा आधार बनवुन जगातील योग्य-अयोग्य या चर्चेत स्वतःला गुंतवुन घेतात. स्वतःचे समाधान करुन घेतात.

भगवदगीता हीच क्लिष्टता दुर करते. प्रश्नाची पारदर्शकता येते. व संवाद सुरु होतो.

दुःखमुक्ति:

भगवदगीता सोप्या भाषेत जीवनाचे रहस्य सांगते. दुःख बंधन अनुभवतो, तर सुख मुक्ति असते. म्हणुन दुःखातुन मुक्तिसाठी मनुष्याचा प्रयत्न असतो. अर्थात दुःखमुक्तिचा हा जीवनप्रवास बंधनमुक्तिचा असतो.

संघर्ष परिवर्तनाची सुचक :

सुखप्राप्तिसाठी मनुष्य जगत असतो. पण याच प्रवासात दुःख अनुभवतो. विचलित होतो. अशा स्थितित अडचणीचा सामना करणे हा संघर्ष जीवनात अनुभवतो. हा संघर्ष परिवर्तनाचे सुचक असते. जीवनप्रवासात याच संघर्षाला जीवनाचा लढा म्हणुन ओळख आहे. भगवदगीता संदेश देत आहे,

"माम अनुस्मर युध्य च "

जीवनप्रवास :

मनुष्य बंधनात जन्माला आला व त्याचा प्रवासच बंधनमुक्तिचा ठरतो. अशाश्वताकडुन शाश्वताकडे हा संदर्भ यासाठी घेतलेला आहे.

-दुःखाचे attachment बंधन असते.

-अशाश्वताशी attachment बंधन व मुक्तिसाठी शाश्वताशी attachment.

-शाश्वत यासंदर्भात ईश्वराच्या devine qualities (दैवी ) चा उपयोग जीवनमार्गात होतो.

-मनुष्य कुटुंब, व्यावसायिक संस्था, समाज, देश अशा विविध Platformवर(स्व, समुह, सर्व) असतो. कुटुंबातही पत्नि मुले, आईवडिल असतात व कुटुंबातही द्विधा अवस्था कधी अनुभवतो. द्विधा अवस्थेत सापडणे हेच बंधन आहे. म्हणुन कर्म हे विकासाचे साधन दर्शवुन कार्याची दृढता याबद्दल भाष्य आहे.

१. प्रकृति व बंधन(Weakness)

प्रत्येक व्यक्ति स्वभावप्रकृतिनुसार जगतो.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।(३-३३)

Tie बंधन

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

द्विधा अवस्था द्वन्द्वमोह निर्माण करते. याला वश होउन मनुष्य आपल्या सोईची निवड करतो, पण स्वतःला योग्य दर्शवण्यासाठी आदर्शवादी भाष्य करतो.

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वंद्वमोहेन भारत।

सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परंतप ।(७-२७)

३. मुक्ति(स्वातंत्र्य)

Tiebreaker

Tie मनुष्याला स्वतःला सोडवायचा असतो.

अ) स्वधर्म:द्विधा मनःस्थिति सोडविण्यासाठी " स्वतःचा स्वधर्म" हे जीवनमुल्य (Tiebreaker) असते.

Committed कार्याला स्वधर्माचे शिक्कामोर्तब करणे.

ब)ईश्वर आश्रय(बुद्धियोग)

धर्म जर Tie सोडविण्यास असमर्थ ठरला तर अध्यात्माचा वापर होतो. ईश्वर आश्रय होणारा बुद्धियोग आहे, याद्वारे जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. या मार्गावर कार्याचा निश्चय दृढ होतो. Right-Wrong या द्वंद्वातुनही मुक्त होतो.

सार :

" Nobody thinks that they're evil or bad, they think that they're doing the right thing. Everyone seems to have a clear idea of how other people should lead their lives, but none about his or her own. "

माझ्यासाठी काय योग्य आहे हे मनुष्य जाणुन घेण्याचा प्रयत्न करीत नाही. मनुष्याच्या सुखदुःखाचे इतरांना घेणेदेणे नसले, तरी हा स्वतःसाठी जिव्हाळयाचा विषय असतो. जिव्हाळयाच्याच मित्राची अर्जुनाला सोबत असते. हा मित्र प्रत्येकासोबत आहे. त्याची ओळख नसते. हा Permanent मित्र असतो. याच मित्राची ओळख भगवदगीता करुन देत आहे.

बंधुरात्मा आत्मनः तस्य येन आत्मैव आत्मना जितः।अनात्मनः तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत् ॥(६-६)

प्रकृति व पुरुष (ईश्वर) याद्वारे सृष्टिची निर्मिति आहे. याप्रमाणे भगवदगीतेत ईश्वर या संकल्पनेला ज्ञानविज्ञानाचा आधार आहे. मनुष्याचे प्राणतत्व याच ईश्वराशी संबंधीत आहे. हेच रहस्य केवळ मनुष्यजन्मच जाणु शकतो.

**********

(३. ३४)२: "तयोः न वशम् आगच्छेत् "

(Be aware of Trap)

"A trap is only a trap if you don't know about it. If you know about it, it's a challenge. "

China Miéville,

भगवतगीता प्रकृतिची Strength व Weakness दोन्हीचे ज्ञान अवगत करुन मनुष्याला सावध करते. स्वभावनियत कार्य (करणे)

Strength असते, तर कार्यातील इच्छा-द्वेष यामुळे निर्माण होणारा द्वंद्व Trap ठरतो.

जसे शिकारी आमिष दर्शवुन शिकार जाळ्यात ओढतो, तसेच प्रकृति मनुष्याला मोहाद्वारे द्वंद्व जाळ्यात सहज वश करते(अडकवते).

इच्छाद्वेष समुत्थेन द्वंद्वमोहेन भारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप।।(७-२७)

मनुष्याला या Trapचे ज्ञान नसते. हाच Trap मनुष्याला दुर्बल करतो. त्याचा (मार्गातील) दृढनिश्चय कच्चा करतो. अनवधानाने याच Trapमध्ये जीवन व्यतीत करतो.

जसे अंधाराशिवाय प्रकाशाचे महत्व कळत नाही, दुःखाशिवाय सुखाचे महत्व कळत नाही, तसेच जीवनातील Trapची ओळख भगवतगीतेतील

Wisdom of Ignorance ठरते.

व्यवहारात व्यावहारिक नियम असतात, नीतिनियम- धर्मनियम असतात . या सर्वांचा उपयोग करुनच कार्यमार्ग (कार्याचा निश्चय) ठरतो. अर्जुनाला याचद्वारे नियतकार्य मिळते. प्रत्यक्ष कृति करण्याची वेळ आली असता हा कार्यमार्ग कच्चा होतो. येथेच भगवतगीता सुरु होते.

अर्जुन (मोहाद्वारे)द्वंद्वाच्या Trap मध्ये सापडतो. व याच Trap ची ओळख भगवतगीता करुन देते.

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

व्यवहारात या Trapची ओळख स्वतःचा पक्का मार्ग याचा संस्कार असेल तरच होते. या Trapपासुन मुक्तिसाठी या Trap ला बंधन म्हटलेले आहे. व या मुक्तिसाठी (मोक्ष-स्वातंत्र्य) कार्याद्वारे ईश्वरभक्ति हा संदेश भगवतगीता देते.

येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)

कार्यमार्ग पक्का(दृढनिश्चय) असेल तर कार्य निष्ठेने होईल. या प्रक्रियेत ईश्वरभक्तिची भूमिका कार्य निष्ठेने घडविते. मार्ग पक्का करण्यासाठी स्वतःचा स्वधर्म(Self approval) मार्गात Tiebreakerची भूमिका करते व मार्ग पक्का होतो. तसेच कर्मयोगात बुद्धियोग(Grace of God) कार्याचा निश्चय दृढ करते.

************०

(३. ३४)३: "तौ हि अस्य परिपन्थिनौ"

जीवनविकास व Barrier याचा आधार द्वंद्व व निर्द्वंद्व याचे तांत्रिक विवेचन (Technical facts) भगवतगीतेने केलेले आहे. सृष्टिसंचलनात प्रकृति-पुरुष अनुक्रमे द्वंद्व, निर्द्वंद्व या आधारावर प्रकृति द्वंद्व व ईश्वर (निर्द्वंद्व)एकत्व हा तांत्रिक आधार आहे.

प्रकृतिमध्ये सुख-दुःख, प्रेम-द्वेष, अंधार-प्रकाश, चांगले-वाईट, योग्य-अयोग्य असे द्वंद्व आपण अनुभवत असतो.

The Law of Polarity (One of Universal Laws) tells us that "Everything is dual, everything has poles; everything has its pair of opposites; opposites are identical in nature, but different in degree".

व्यवहारात द्वंद्वदृष्टि व निर्द्वंद्व दृष्टि याचा बोध पुढिल गोष्टिवरुन स्पष्ट होते.

"एका शेतकऱ्याचा घोडा जंगलात हरवतो. लोक 'वाईट झाले 'म्हणुन सांत्वन करतात.
दरम्यान तो घोडा अजुन तीन घोडे घेवुन परततो. लोक 'चांगले झाले'म्हणतात.
शेतकऱ्याचा मुलगा नवीन घोड्यांना शिकवितांना पडतो व लंगडा होतो. लोक 'वाईट झाले' म्हणुन सांत्वन करतात.
त्या राज्यावर युद्धाचे सावट येते व सर्व युवकांना युद्धात सामिल केल्या जाते. हा मुलगा लंगडा असल्यामुळे सुटतो. लोक शेतकऱ्याला सुदैवी व स्वतःला दुर्दैवी ठरवतात. "
लोक घटनांचे वास्तव स्विकार न करता त्यामध्ये सुखदुःख, भाग्य शोधतात. ही द्वंद्व दृष्टि असते. शेतकऱ्यासाठी त्याच्या जीवनात

घडणारे वास्तव Destiny (Design of God) असते. ही निर्द्वंद्व दृष्टि असते.

This Principle of Duality may appear to be very real in your life but it operates only in the physical and mental realms, not in the spiritual realm where All is One.

याच तत्वाचा आधार घेवुन दृष्टिबदल, विचारबदल, दुर्बलता सक्षमतेत बदलविणे याचा भगवतगीतेत बोध होतो.

शरीरयंत्रात काया, वाचा व मन अनुक्रमे कार्य, ज्ञान व प्रसन्नता( सुखदुःख )यांचेशी संबंधित असते. जीवनविकासात कर्म प्रमुख साधन आहे तर ज्ञान जगात सर्वश्रेष्ठ आहे. ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्रोत आहे. प्रकृतित द्वंद्व व ईश्वर एकत्व दर्शविते. म्हणुन जीवनविकासमार्ग द्वंद्व ते निर्द्वंद्व या आधारावर ठरतो. विकासमार्गात प्रकृति कार्यरत असते तर या प्रकृतितील द्वंद्वाला वश होणे अडथळा ठरते. हेच सत्य भगवतगीता दर्शविते.

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।

तयो न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।

द्वंद्वाला वश असतांना मनःस्थिति, कर्म व ज्ञान

मन -अस्थिरता, दुःखाने विचलित होतो. चंचलत्व
कर्म -संशय असतो, कार्यमार्ग दृढ नसतो. निष्क्रिय होतो.
ज्ञान-संशय, समर्थनासाठी प्रज्ञावादी, (Judgement thinking, Compare thinking)

निर्द्वंद्व अवस्था:

मन- स्थिर बुद्धी(विचलित न होणे), प्रसन्न, शांति
कर्म - दृढनिश्चय
ज्ञान - विश्वास देते. एकत्व, समत्व, दृढत्व

याच आधारावर ज्ञानाद्वारे संशयमुक्ति, कर्माचा दृढमार्ग, कर्माद्वारे भक्ति याचे भगवतगीतेतील विवेचन स्पष्ट होते.

******

(३-३४)/४ :

"तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ"

(जीवनातील अडथळा)

भगवदगीता अर्जुनाला श्रेष्ठ मनुष्याने वर्तमानात कसे जगावे याचे ज्ञान सांगते. जगात ज्ञान आहे, धर्म आहे तरी प्रत्यक्षात मनुष्य आपल्या स्वभावप्रकृतिनुसार जगत असतो. आपल्या मानसिकतेनुसार, ज्ञानानुसार, Belief system नुसार विचार करतो व कार्यरत असतो.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।

प्रकृति यान्ति भूतानि निग्रहः किम् करिष्यति।(३-३३)

मनुष्यजीवनात सुखदुःख आहेत. सुख हवे असते, दुःख नको असते. या दुःखाने मनोधैर्य खचु न देता याच अडथळ्याला विकासाची पायरी (Higher step)करणे हे ज्ञान भगवदगीता सांगत आहे. अर्जुन विद्याविभुषित, शुर, चांगला (दैवीगुणसंपन्न) असतो, तरी प्रत्यक्ष कार्याच्या वेळी त्याचे मनोबल खचते. मनुष्यजीवनातील हाच अडथळा असतो. याच अडथळ्याचे विवरण भगवदगीता देत आहे.

मनोदुर्बलता :

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ न एतद् त्वयि उपपद्यते।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परन्तप।।(२-३)

*जीवनमार्गातील अडथळा व मार्ग

१. ज्याप्रमाणे वाऱ्याने नाव वहात रहावी व याचमुळे दिशाहीन होते. ही मनोवश अवस्था असते.

इंद्रियाणां हि चरतां यत्मनो अनुविधियते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावाम् इव अम्भसि।।(२-६७)

२. मार्गातील द्वन्द्व (योग्य-अयोग्य, परिणामातील यश-अपयश यामुळे इच्छा-द्वेष)अर्थात इच्छा-द्वेष स्वाभाविक असते. या द्वन्द्वाला वश होणे अडथळा ठरतो.

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

३. जीवनमार्ग:

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

श्रेष्ठ मनुष्याचा मार्ग "अमृतत्वाय कल्पते" याप्रमाणे निर्देशित केला आहे. अर्थात ईश्वरधाम हे जीवनमार्गाचे अंतिम ध्येय (Destination ) ठरते. अर्थातच जीवनमार्गात ईश्वराचा आश्रय असतो. यामुळे विश्वासाने मार्ग चालतो.
अज्ञश्च अश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति।
संशय म्हणजे अज्ञान, अडथळा व ज्ञान म्हणजे विश्वास.

"योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंच्छिन्नसंशयम् ।(४-४१)

अर्थात ज्ञानाने संशयाचा नाश होतो व कार्याचा एकनिश्चय होतो. जीवनविकासाच्या या मार्गात(कर्मयोग) कार्याचा एकनिश्चय असतो.
व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।

बहुशाखा हि अनंताश्च बुद्धयो अव्यवसायिनाम्॥(२-४१)

एकनिश्चय Determination :

नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करणे हा द्वन्द्वाचा Tiebreaker असतो. तसेच मनुष्याजवळ विकासासाठी निर्णयअधिकार (कर्म करण्याचा अधिकार) हे शस्त्र असते. चंचल व्यक्तिचे Determination होत नाही. चंचलता म्हणजेच मनोवश व मार्गाची द्वन्द्ववश अवस्था असणे. कार्याच्या सकाम कर्माचा हा परिणाम असतो. म्हणुन बुद्धियोग प्रयोजन आहे. बुद्धियोगामुळे द्वन्द्वावर मात करतो. या अवस्थेत निष्काम कर्म (समत्वयोगाने कर्म करणे) करतो. यालाच वर्तमानातील कार्यकौशल्य म्हटले आहे.

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणाः फलहेतवः।(२-४९)
बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥(२-५०)

***********

(३-३५)

*********************

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात स्वनुष्ठितात् ।

स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।।

*********************

(३. ३५) /१:" श्रेयान् स्वधर्मो विगुणः "

जगात ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत सतत सुरु आहे. मनुष्याला आपली कार्यक्षमता वृद्धिगत करण्यासाठी याचा लाभ निर्विवाद होतो. परंतु या विकासप्रक्रियेत पुनः नविन प्रश्न निर्माण होतच असतात. विकासाच्या या प्रक्रियेत जग तर कळले (याच भूमिकेत मनुष्य बोलत असतो !)पण जीवनच कळले नाही, अशी अवस्था झाली म्हणुन 'सिकंदर रिकाम्या हाताने गेला हे जगाला कळु द्या' अशी सिकंदराने इच्छा व्यक्त केली.

"धुल थी चेहरेपर, हम आईना साफ करते रहे, उम्रभर यही भुल करते रहे।"

याच संदर्भात जीवनाचे ज्ञान कळण्यासाठी संपुर्ण विश्वात "भगवतगीता" हेच प्रथम व अंतिम ज्ञान आहे. या दृष्टितुन भगवतगीतेची ओळख जगाला होणे आवश्यक आहे.

भगवतगीतेतील "स्वधर्म" हा शब्द प्रथमदर्शनी 'Religion' या अर्थाने भासतो. भगवतगीतेत स्वभावनियत कार्य, द्वंद्वमुक्तिचा Tiebreaker अर्थात स्वतःची स्वतःच्या मार्गावर मंजुरी अर्थात ईश्वरभक्तिसाठी जीवनमुल्य, अशा विविध अर्थाने आलेला आहे.

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात स्वनुष्ठितात् ।

हे verse दोनदा आलेले आहे.

जीवनमुल्य संदर्भात-

स्वधर्मे निधनं श्रेय परधर्मो भयावहः।।(३-३५)

स्वभावनियतकार्य संदर्भात-

स्वभावनियतं कर्म कुर्वन् न आप्नोति किल्बिषम् ।।(१८-४७)

"Be yourself; no base imitator of another, but your best self. There is something which you can do better than another. Listen to the inward voice and bravely obey that. Do the things at which you are great, not what you were never made for. "
Ralph Waldo Emerson,

स्वभावनियत कार्य या संदर्भात भगवतगीता म्हणत आहे,
सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।(३-३३)

संपुर्ण जगात स्वभावनियत कार्याद्वारेच मनुष्य कार्यरत असतो. विद्वानही आपल्याच प्रकृतिनुसार जगत असतात.
"स्वभावनियतकार्य" ही प्रकृतिची Strength आहे, तर द्वंद्व(इच्छा-द्वेष) Weakness आहे.

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

अर्जुन आपल्या समर्थन भाष्यामध्ये धर्माचा दाखला देतो. या संदर्भात स्वभावनियतकार्य स्वधर्म ठरते, व अर्जुनाला धर्मकार्य

करण्याची ही महान संधी आहे, हे स्वर्गद्वार आहे . असे श्रीकृष्ण सांगतात. थाॅमस कार्लायल म्हणतो, आवडीचे कार्य व्यावसायिक (Professional) कार्य म्हणुन लाभले तर मनुष्याला ईश्वराकडे कांहिही मागण्याची गरज उरत नाही.

नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करुन ईश्वरसमर्पित कार्य करणे, या प्रक्रियेत Elevation of Consciousness होते, मार्ग द्वंद्वमुक्त(दृढ) होतो. स्वतःची मार्गावर मंजुरी(स्वातंत्र्य) असते. नैष्कर्मसिद्धि लाभते.

न कर्मणाम् अनारंभान् नैष्कर्मं पुरुषो अश्नुते।
न च संन्यसनात् एव सिंद्धिं सम् अधिगच्छति।।(३-४)

निष्क्रिय व्यक्तिला नैष्कर्मसिद्धिचा (Freedom from reaction)आनंद कसा कळणार?

याप्रमाणे कार्याद्वारे जीवनविकास हाच भगवतगीतेचा विषय आहे.

"Your work is going to fill a large part of your life, and the only way to be truly satisfied is to do what you believe is great work. And the only way to do great work is to love what you do. ”

Steve Jobs

***********

(३-३५)/२:"स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः"

(स्वतःचा मार्ग vs इतरांचा मार्ग)

"Be yourself", "Everyone is unique" या संदर्भात तत्ववेत्त्यांनी समाजाला प्रबुद्ध केले. भगवतगीता याच संदर्भात निश्चित भाष्य करीत आहे.

"धर्म" हा शब्द Religion या अर्थाने समाजात ओळखल्या जातो. धर्माची निश्चित ओळख भगवतगीता देत आहे.

समाजात व्यवहार असतो. या व्यवहारात व्यावहारिक धर्म(Ethics, नियम) असतो. व्यावहारिक धर्म समाजात परस्पर विश्वास निर्माण करतो. व्यवहारात पारदर्शकता असते.

व्यावहारिक धर्मानुसारच पांडवावर अन्याय झाला म्हणुन धर्मयुद्ध निश्चित होते. या व्यावहारिक धर्माशिवाय स्वतःच्या मार्गाचा धर्म (Values) असतो, ज्यामुळे स्वतःचा मार्ग निश्चित ( दृढ) होतो व विकासमार्गावर असतो. याच मार्गाचे ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते.

अर्जुन प्रत्यक्ष युद्धापुर्वी दुःखी होतो व लोभामुळे युद्ध करणे अधर्म ठरवितो. हा त्याचा प्रज्ञावाद असतो. या प्रज्ञावादाचा आधार व्यावहारिक धर्म असतो. याच मुद्यावर व्यावहारिक धर्म व स्वतःच्या मार्गाचा धर्म यात भगवतगीतेने पारदर्शकता आणलेली आहे.

१. व्यावहारिक धर्मानुसार अर्जुनाला "स्वधर्म "संधी मिळाली हे स्वतःच्या विकासासाठी स्वर्गद्वार आहे.
यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारम् अपावृतम् ।(२-३२)

२. व्यवहारधर्म पाळला नाही तर (स्वविकासासाठी) स्वधर्म व (समाजातील) किर्ति या दोहोपासुन वंचित राहशील व (समाजात अविश्वास ठरणारे) पापाचरणच ठरेल.
अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि॥(२-३३)

याप्रमाणे व्यवहारधर्म समाजात परस्पर विश्वास दर्शवितो तर स्वतःचा धर्म(स्वधर्म) स्वतःचा मार्ग निश्चित (दृढ) करतो. संशयातुन मुक्त होतो. स्वतःच्या मार्गावर (स्वतःवर) विश्वास येतो.

स्वतःच्या मार्गाचा धर्म :

१. स्वधर्म

स्वधर्मम् अपि चावेक्ष्य न विकपितुम् अर्हसि।(२-३१)

प्रत्येकाचे स्वभावनियत कार्य, नियतकार्य या अर्थाने मनुष्याला स्वतःचा स्वधर्म मिळतो. प्रत्येक मनुष्य त्याला (स्वभावनियत) जे जमते तेच कार्य तो करीत असतो. हेच स्वभावनियत कार्य स्वतःच्या विकासाचा मार्ग बनविते. स्वतःचा मार्ग व इतरांचा मार्ग या अर्थाने स्वधर्म व परधर्म या शब्दांचे प्रयोजन आहे.

श्रेयान स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।।(३-३५)

जो मार्ग श्रेष्ठ आचरण करतात त्याचे अनुसरण सामान्य करतात. हेच उत्तर "कः मार्ग?" या यक्षाच्या प्रश्नाला युधिष्ठिर देतो. सामान्य बाह्यदर्शनी मार्गाचे अनुसरण करतात. ईश्वर "अध्यक्ष" भूमिकेत कार्यरत असतो पण बाह्यदर्शनी कांहीच करीत नाही. मनुष्यरुपात कार्य केले नाही तर सामान्याचा बुद्धिभेद होईल असे श्रीकृष्ण स्पष्ट करतात. येथे स्वतःच्या मार्गाचा धर्म या संदर्भात कार्याचे महत्व, स्वधर्माचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते.

२. बुद्धियोग

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिःयोगे तु इमां शृणु।(२-३९)

अ. निर्भय होणे, दुःखान्त (योग) हे या धर्माचे वैशिष्ट आहे. कर्म करण्याचा(निर्णय) अधिकार या धर्माचा पाया आहे.

ब. या मार्गात कार्याचा एकनिश्चय आवश्यक असतो. चंचलतेमुळे एकनिश्चय होत नाही. व्यावहारिक धर्मात स्वर्ग-नरक ही संकल्पना पापपुण्य या संदर्भात असते. या संदर्भात विशेष कर्म असले तरी सकाम मानसिकता असल्यामुळे कार्यनिश्चय होण्यास अडथळा होतो. म्हणुन हा धर्म निर्द्वंद्व होण्यासाठी निष्काम कर्माचे प्रयोजन आहे.

क. निष्काम कर्म:परिणामाच्या भयाने निष्क्रिय न होणे, समत्वयोगाने कार्यरत असणे.

ड. विकासात"योग(दुःखान्त शक्ति) " महत्वाचा आहे.
दुरेण हि अवरं कर्म बुद्धियोगात् धनञ्जय।(२-४९)

स्वतःच्या विकासमार्गात बुद्धियोग Priority असते. यामुळे कार्याच्या योग्य-अयोग्य या द्वंद्वापासुन मुक्त होतो.

"योगः कर्मसु कौशलम् " (२-५०)

******

(३-३६)

*********************

अथ केन प्रयुक्तोअयं पापं चरति पुरुषः।

अनिच्छन् अपि वार्ष्णेय बलात् इव नियोजितः।।

**********************

(३. ३६):"अथ केन प्रयुक्तोअयं पापं चरति पुरुषः"

भगवतगीता केवळ चांगले-वाईट (दैवी-असुर) यावरच भाष्य करीत नाही तर जीवनाचा विकास या संदर्भातील ज्ञान व अज्ञान यावर भाष्य करते. धर्म, अध्यात्म याच ज्ञानाचा पुरक भाग आहे. म्हणुन भगवतगीतेकडे आपण कोणत्या नजरेतुन पहात आहोत- धर्म, अध्यात्म कि स्वविकास(SELFHELP)?हे स्वतःचे Perception महत्वाचे ठरते.

Any book is a self-help guide if you can take something from it.

Kevin Smith

आपले जीवन सुखी व्हावे ही प्रत्येक मनुष्याची इच्छा असते. इच्छा असल्यामुळे कार्यरत असतो. कार्याद्वारे विकास साधतो. याच प्रवासात अर्जुन दुःखी होतो. राज्य मिळाले नाही तरी चालेल पण दुःख नको ही त्याची भूमिका असते. अर्थात भिक नको कुत्रा आवर अशी त्याची स्थिति होते. पण मनुष्य समाधान शोधतच असतो. त्याला समाधान मिळते. युद्ध करणे पाप आहे, धर्माविरुद्ध आहे याचा दाखला देतो.

याच भूमिकेतील वास्तव (युद्ध करणे योग्य कि अयोग्य?) स्विकारल्यानंतर अर्जुनाला चुक कळते व भगवतगीतेतील SELFHELP ज्ञान सुरु होते.

अर्जुन चांगला मनुष्य असतो. चांगल्या Intentionनेच त्याचा जीवनप्रवास चालु असतो. याच प्रवासात (इच्छा नसतांनाही) चुक घडते!व याच संदर्भात तो प्रश्न करतो. इच्छा नसतांनाही मनुष्य कां चुकतो?

अथ केन प्रयुक्तोअयं पापं चरति पुरुषः।
अनिच्छन् अपि वार्ष्णेय बलात् इव नियोजितः।।(३-३६)

गरजापुर्तिसाठी मनुष्य कार्य करतो. वर्तमानात सुखी होण्यासाठी कार्यसंस्कारीत होणे ही गरज ठरते. मनुष्याच्या गरजा सिमित असतात पण इच्छा अमर्याद असतात. (कार्यसंस्कारित न होता )इच्छा चिंतनामुळे इच्छेचे "काम" मध्ये(संगात् सञ्जायते कामः), "काम"चे क्रोधामध्ये रुपांतर होते. क्रोधामुळे संमोह होतो व संमोहामुळे बुद्धिनाश(भ्रम) होतो.

क्रोधात् भवति संमोहः संमोहात् स्मृति विभ्रमः।

स्मृतिभंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।।(२-६३)

याच संदर्भात जीवनविकासमार्ग जाणणे, अडथळा कोणता?व त्यावर उपाय करणे आवश्यक असते. स्वभावप्रकृतिनुसार विद्वानही कार्यरत असतो. पण (संस्काराअभावी) कार्यातील इच्छा-द्वेष या द्वंद्वाचे जाळे मनुष्याच्या विकासमार्गाला trap करते. अर्थात मार्गात अडथळा निर्माण करतो. मनुष्याचे (lower)मन बुद्धिवर हावी होते. ही मनोवश अवस्था असते.

धर्म या संदर्भात काय योग्य हा प्रश्न अर्जुनासमोर उभा ठाकतो. व समाधान न मिळाल्यामुळे द्वंद्ववश होतो. याच संदर्भात "स्वधर्म" हा Tiebreaker असतो. Selfhelp या संदर्भात स्वधर्म जीवनमुल्य ठरते.

धर्म या संदर्भात Destination स्वर्ग असा उल्लेख होतो. हे destination जेंव्हा भ्रम निर्माण करते, तेंव्हा जीवनाचे ज्ञानविज्ञान या संदर्भात जीवनप्रवासातील Last Destination ईश्वरधाम(ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत) याचे ज्ञान विज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते. येथेच अध्यात्म सुरु होते.

ज्ञानं ते अहं सविज्ञानम् इदं वक्ष्यामि अशेषतः।(७-२)

हेच ज्ञान जाणुन जीवनविकासाचा राजमार्ग(अमृतत्वाय कल्पते) कळतो. जीवनाची नित्य विकास स्थिति (आत्मोन्नति) जाणतो. या मार्गावर विचलित होत नाही. मनोवश अवस्था आत्मवश होते. सकाम कर्म निष्काम कार्यात Transform होते. येथे निर्णयअधिकार जाणतो . कार्याचा एकनिश्चय असतो. निष्ठेने कार्य घडते.

व्यवहारबोध:

समाजात स्वार्थ-परमार्थ यावर चर्चा होते. स्वतः स्वार्थ साधावा व इतरांनी परमार्थ करावा पण आपल्या स्वार्थाला परमार्थ सिद्ध

करणे यामुळे समाजात प्रचंड भ्रम असतो. वास्तव न स्विकारता अज्ञानाला ज्ञान संबोधण्यात येते. चांगल्या Intention ने जगत असलेला व्यक्तिही स्वतःला दुर्बल अनुभवत असतो. समाजातील, मनुष्यजीवनातील हाच भ्रम भगवतगीता दुर करते.

जगात क्रांति होते, व बदलाव होतात. व्यक्तिगत अर्जुनाच्या जीवनात क्रांति घडुन आली. थांबलेला विकासरथ विकासमार्गावर सुरु झाला. ही आध्यात्मिक क्रांति ठरली.

******

(३-३८)

**********************

धूमेन् आव्रियते वन्हिः यथा आदर्शो मलेन् च. ।

यथा उल्बेन् आवृतो गर्भः तथा तेन् इदम् आवृतं।।

**********************

(३-३८)

"धूमेन् आव्रियते वन्हिः यथा आदर्शो मलेन् च...

. ... तथा तेन् इदम् आवृतं"

(ज्ञानावर आवरण/ Barrier)

"Infuse your life with action. Don't wait for it to happen. Make it happen. Make your own future. Make your own hope. Make your own love. And whatever your beliefs, honor your creator, not by passively waiting for grace to come down from upon high, but by doing what you can to make grace happen... yourself, right now, right down here on Earth. "

Bradley Whitford

मनुष्याजवळ वेळ असतो. स्वतःची कार्यक्षमता असते. स्वतःचे ज्ञान असते, निर्णयअधिकार असतो. वर्तमानात याचा उपयोग न करता तो इच्छा नसतांनाही चुकीचे कां जगतो?या अर्जुनाच्या प्रश्नात स्वतःतील अडथळा करणारा शत्रु कोण याचे रहस्य कळते. जीवनाचा नित्य विकासमार्ग आत्मोन्नतिचा मार्ग असतो. कर्मानेच आत्मोन्नति कशी साध्य करायची हे कर्मयोगाचे रहस्य आहे. हा विकासमार्ग जाणुन मनुष्य नित्य विकासमार्गावर असतो याचा अर्थ Consciousness च्या उच्च पातळीवर(चेतना जागृति) असतो.

मनुष्याला इच्छा असतात . कार्यसंस्कारामुळे विकासमार्गावर असतो. कार्यसंस्काराचा अभाव असेल अतृप्ति असेल तर मन इच्छेत भटकत असते. अर्थात Lower consciousness मध्ये मन चंचल असते. येथे काम क्रोध क्रियाशील होतात व अज्ञानाचे आवरण (स्वतःच्या ज्ञानावर) होते.

धूमेन् आव्रियते वन्हिः यथा आदर्शो मलेन् च।(३-३८)
आवृतं ज्ञानम् एतेन ज्ञानिनो नित्यवैरिणां।
कामरुपेण कौंतेय दुष्पूरेण् अनलेन् च।।(३-३९)

अग्नि धुराने वेढलेला असतो, आरशावरील धुळ असते तसे ज्ञान "काम" ने वेढले असते व हेच अज्ञानाचे कारण ठरते.

"जीवनविकासातील अडथळा " भगवतगीतेने दर्शविला आहे, ज्यामुळे द्वंद्ववश ठरतो. काम (इच्छेची अतृप्ति, परिणामभय याचमुळे )हा मनुष्यातील शत्रु आहे जो द्वंद्ववश करतो. निष्क्रिय करतो, आत्मविश्वासाचा अभाव असतो. ज्ञानावर आवरण अर्थात जीवनातील अज्ञानाचे कारण ठरते. म्हणुन मनोवश vs. आत्मवश अवस्थेचे महत्व जाणुन नित्य विकासमार्गावर असणे व याप्रमाणे कामरुपी शत्रुला ठार करणे. हा संदेश येथे येतो.

जहि शत्रुं महाबाहो कामरुपम् दुरासदम् ।।(३-४३)

"धुल थी चेहरेपर हम आईना साफ करते रहे।उम्रभर यही गलती दोहराते रहे।"

*******

(३-३९)

*************************

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा।

कामरुपेण कौंतेय दुष्पूरेण अनलेन च॥

***********************

(३-३९):

"आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा"

(Ignorance and Wisdom)

"Wisdom is not a product of schooling but of the lifelong attempt to acquire it. "

-Albert Einstein

मनुष्य व्यवहार जगतो अर्थात इच्छापुर्तिसाठी कार्यरत असतो, यासाठीच शिक्षण घेतो. इच्छा अमर्याद असतात, यामुळे जीवनात(विकासमार्गात) कार्यकौशल्य साधले नाही तर ज्ञान असुनही ते अपुर्ण कसे ठरते?ही "अपुर्णताच " भगवतगीता highlight करते.

इच्छा नसतांनाही मनुष्य चुकीचे कां जगतो? हा अर्जुनाचा प्रश्न असतो. याचे उत्तर आहे-अज्ञान!

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा।

कामरुपेण कौंतेय दुष्पूरेण अनलेन च॥(३-३९)

जगातील हेलेन केलर व तत्सम उदाहरण पाहिले कि आढळते, एखादा शरीराने पंगु असुनही जीवनात यशस्वी होतो, समर्थ ठरतो, तर एखादा शरीराने समर्थ असुनही (मानसिक) पंगु ठरतो. हीच "अपुर्णता" ठरते, अज्ञान ठरते. याच अज्ञानामुळे दुःख, अडचणी मनुष्याला बंधनात टाकते, त्याला (विचाराने)नकारात्मक करते. या अज्ञानावर विजय मिळविला तर दुःख, अडचणी विकासमार्गातील संधी ठरतात.

जगात सर्वात सोपा व्यवसाय शहाणपणाचा असतो. परटिका, स्वसमर्थन ही संवय (विकासमार्गावर) चालणाऱ्याची नसते, तर चालणाऱ्याचे(स्वतःचे /इतरांचे) पाय ओढण्याची असते. यांत स्वतः चालण्याचा, कर्तृत्वाचा आनंद अनुभवत नाही, तर भाष्य बोलुन मनोरंजन करीत असतो. याच "शहाणपणाचे" दर्शन अर्जुनाच्या प्रज्ञावादात आढळते. व स्वतःच्याच विकासमार्गात स्वतःच अडथळा ठरतो(वर्तेतआत्मैव शत्रुवत्). म्हणुन भगवतगीता स्वतःचा बंधु व्हा (आत्मवश) हा संदेश देते.

भगवतगीता दैवी व असुरी अशा दोन विभागात जगातील लोकांचे वर्गिकरण करते. असुरी अज्ञानामुळे असते, तर दैवी असुनही

अज्ञानी असणे व या अज्ञानाचेही अज्ञान असणे ही अपुर्णता "दैवीगुण संपत्तिसाठी जगणाऱ्या" अर्जुनात आढळते.

कार्यकौशल्य:

जीवनाचा विकासमार्ग चालणे व या विकासमार्गावरील मानसिक शक्तिची (योग)साधना होण्यासाठी कार्यकौशल्य ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते. मनुष्याच्या जीवित तत्वाचे अंतिम धाम ईश्वर आहे. हाच ईश्वर सृष्टिची मुळ प्रवृत्ति आहे व याचाच अंश जीवित तत्वात शाश्वतरुपाने स्थित आहे.

शरीरं यद् अवाप्नोति यत् च अपि उत्क्रामति ईश्वरः।

गृहीत्वा एतानि संयाति वायुः गंधान् इव आशयात् ।।(१५-८)

अर्थात जेंव्हा मनुष्य देह सोडतो, तेंव्हा वायु जसा फुलाचा गंध वाहुन नेतो, तसे शाश्वत तत्व प्रकृतिगुणाला वाहुन नेते. हाच आधार "अमृतत्वाय कल्पते" या विकासमार्गाचा आहे. कार्य व्यावहारिक विकासातील साधन असले तरी विकासमार्गात याच कार्याद्वारे ईश्वराची भक्ति घडते. हीच भक्ति घडण्याचे कौशल्य(स्वधर्म, कर्मयोगातील दृढनिश्चय, "योगः कर्मसु कौशलम्" ) भगवतगीता स्पष्ट करते.

******

(३-४१)

*************************

तस्माद् त्वम् इंद्रियाणि आदौ नियम्य भरतर्षभ।

पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ।

*************************

(३-४१)

"तस्मात् त्वम् इंद्रियाणि आदौ नियम्य भरतर्षभ"
(संस्कार)

जीवनात कर्म घडते. सुखासाठी इच्छा व इच्छापुर्तिसाठी कर्म (State of want-State of art) हे व्यवहारातील कर्म घडण्याचे सामान्य logic आहे. यांत इच्छापुर्ति ही priority असते म्हणुन (बुद्धिची) सकाम मानसिकता असते. जीवनाची ही सामान्य पातळी असते. इच्छापुर्ति ही priority असल्यामुळे विषयचिंतन, फलासक्ति असते. यामुळे "काम" उत्पन्न होतो व बुद्धिनाशाचे कारण ठरतो.

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषु उपजायते।... (२-६२)
स्मृतिभंशाद् बुद्धिनाशो बद्धिनाशात् प्रणश्यति॥(२-६३)

सुखी म्हणजे बुद्धिची स्थिर अवस्था असते. म्हणुन संस्काराचे महत्व आहे. मनुष्यजीवनांत सुख हवे असते. दुःख आले असता बुद्धि विचलित होते. सुखी अवस्था म्हणजे बुद्धिची स्थितप्रज्ञ अवस्था भगवदगीतेने स्पष्ट केली आहे. हीच अवस्था साध्य करण्यासाठी बुद्धियोग, निष्काम कर्म, कार्याद्वारे समत्वयोग, कार्याद्वारे (ईश्वराची )अनन्यभक्ति असे प्रयोजन आहे.

यज्ञ या तत्वाने कर्म घडण्याची प्रक्रिया:
तस्माद् त्वम् इंद्रियाणि आदौ नियम्य भरतर्षभ
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ।(३-४१)
इंद्रियाणि पराणि आहुः इंद्रियेभ्यः परं मनः।
मनसःतु परा बुद्धिः यो बुद्धेः परतः तु सः॥(३-४२)
शरीरयंत्रात इंद्रियापेक्षा श्रेष्ठ मन, मनापेक्षा श्रेष्ठ बुद्धि व बुद्धिपेक्षा श्रेष्ठ आत्मा याप्रमाणे जेष्ठत्व असते. यानुसार जीवनविकासात कर्म घडण्याच्या प्रक्रियेचा प्रवास इच्छा-कर्म-कार्याचा एकनिश्चय-बुद्धिची स्थिरता-बुद्धियोग याप्रमाणे असतो.

श्रोत्रआदीनि इंद्रियाणि अन्ये संयमाग्निषु जुह्वति।
शब्द आदीन् विषयान् अन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति।(४-२६)
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदिपिते।(४-२७)

विषय(इच्छा) इंद्रियाच्या अग्नित(कर्मात) भस्म होतात. कर्म संयमाच्या अग्नित(निश्चय, ध्येय) भस्म होते. (ईश्वर)ज्ञानाने संयमाग्नि प्रदिप्त होतो.

कर्म घडण्याच्या प्रक्रियेतील या प्रवासाची सामान्य अवस्था व उच्च अवस्था याप्रमाणे विभागणि होते.

१. सामान्य अवस्था (इच्छापुर्तिसाठी कर्म) व २. उच्च अवस्था (युक्त या शब्दाने निर्देश आहे). याच उच्च अवस्थेत कर्मसंस्कार(कार्याचा निश्चय, जीवनमुल्यांचा वापर) व कर्माद्वारे योग साध्य करणे असते. दोन्ही अवस्थेत कर्म साधन असते. पण Priority वेगळी असते.

Priority in life :

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।(२-४९)

सामान्य पातळीवर इच्छापुर्ति ही Priority असते. यामुळे सकाम मानसिकता असते, तर उच्च पातळीवर बुद्धिची स्थिर अवस्था (युक्त) ही Priority असते. याचे वर्णन भगवदगीता स्पष्ट करते,

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।

तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्।।(२-५०)

कार्यातील द्वन्द्वमुक्ति म्हणजेच कार्याचा एकनिश्चय असतो. कर्मफलातील द्वन्द्वमुक्ति म्हणजे समत्वयोग साध्य करणे.

तस्मात् सर्वेषु कालेषु

Higher consciousness या संदर्भात उच्च पातळीचे महत्व आहे. म्हणुन कर्म घडण्याच्या प्रक्रियेतील दोन्ही पातळीची ओळख(Level of consciousness)होणे आवश्यक ठरते. प्रश्न, अडथळे सामान्य पातळीवर निर्माण होतात.

"No problem can be solved from the same level of consciousness that created it. "

-Albert Einstein

********

( ३-४२)

**********************

इंद्रियाणि पराणि आहुः इंद्रियेभ्यः परं मनः।

मनसः तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतः तु सः ॥

**********************

(३-४२)१: "मनसः तु परा बुद्धिः "

"मनसः तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतः तु सः " ( ३-४२)

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्य आत्मानम् आत्मना।(३-४३)

मनापलिकडे बुद्धि व बुद्धिपलिकडे आत्मा जाणुन मन Lower consciousness व आत्मा Higher Consciousness दर्शविले आहे. यावरुन मन, बुद्धि, चित्त, आत्मा, ईश्वर हे सर्व मनोविज्ञानाचा भाग आहे हे भगवतगीता स्पष्ट करते.

जसे मन दिसत नाही तसेच ईश्वरही दिसत नाही. पण (कार्याद्वारे अनन्यभक्तिद्वारा)ज्ञानाने जाणता येते. ही जाणीव क्षेत्र-क्षेत्रज्ञ

ज्ञानाद्वारे होते. शरीराला जाणणारा क्षेत्रज्ञ स्वतः (Own mind) असतो, तर सर्व क्षेत्राला जाणणारा ईश्वर (Universal Mind) असते.

भक्त्या तु अनन्यया शक्य अहं एवं विधो अर्जुन।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्वेन प्रवेष्टुं च परंतप॥(११-५४)

"Our Soul is the connection between our physical body and our Spirit, and provides communication between the two. It is our consciousness, and forever remains connected to the Creator, God. Our Spirit is our individual spark of the Divine, and it fills us with the higher guiding intelligence of the Universe. "

*मनुष्याचे सुखदुःख मनोविज्ञानाचाच भाग असतो. हेच मनोविज्ञान जाणण्यासाठी भगवतगीतेचे ज्ञान आहे.
सर्वस्य च अहं हृदि संनिविष्टो।

मत्तः स्मृतिज्ञानं अपोहनं च।(१५-१५)

"Character cannot be developed in ease and quiet. Only through experience of trial and suffering can the soul be strengthened, ambition inspired, and success achieved. "
-Helen Keller

कार्यकारण कर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते।।(१३-२१)

मनुष्याला जीवनात सुखदुःख येतात. सुख सर्वांनाच हवे असते व दुःख नको असते, तरी दुःख जीवनात डोकावते. दुःखामुळे दुबळा होतो. Tense होतो. दुःखाचे मनोविज्ञान जाणत नाही. ईश्वराचे Design जाणत नाही. हेच (Designed plan) दर्शन विश्वरुपात दिले.

(Designed plan of God यावर दंतकथा:

"एक मनुष्य मुर्तितील देवाला म्हणतो, तु कांहीच बोलत नाही तरीसुद्धा लोक तुला भजतात. व समाधानी होतात. याचे रहस्य मला जाणायचे आहे. एक दिवस मी तुझ्या जागी मुर्ति बनुन उभा होतो. देव म्हणतो, ठीक आहे पण एक अट आहे, कांहीच बोलु नको. ठरल्यानुसार तो मुर्ति बनुन उभा होतो.

त्या दिवशी मंदिरात एक शेटजी, नंतर एक गरिब मनुष्य व नंतर जहाजाचा कप्तान, येतो . शेटजीची पैशाची पर्स मंदिरात पडते. गरीब मनुष्य आपली गरीबी दुर करण्यासाठी देवाला विनवतो, तेंव्हा त्याला पर्स दिसते. व प्रसाद म्हणुन पर्स उचलुन चालता होतो. नंतर शेटजी पोलीस घेवुन मंदिरात येतो व कप्तानानेच पर्स लांबवली असेल म्हणुन कप्तानाला चोर ठरवितो. मुर्तितील मनुष्याला राहवत नाही, तो सत्य जाणतो. व तेच तो शेटजीला सांगतो.

देव म्हणतो, तु तोंड उघडुन माझे Design बिघडविले. कप्तान जे जहाज घेवुन जाणार आहे, त्याला अपघात होणार आहे. आता त्याला नाहक प्राण गमवावे लागणार. ")

जगात ईश्वराच्या संकल्पना आपापल्या धर्मानुसार व्यक्त केल्या आहेत. भगवतगीतेतील ज्ञानाचा आधार मनोविज्ञान आहे. हे ज्ञान

जाणले तर दुःख मनुष्याला हरविणार नाही, तर दुःख जीवनविकासातील Stepping Stone ठरेल हाच भगवतगीतेचा संदेश आहे.

अनित्य असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।(९-३३)

*****

३-४२ :

"इंद्रियाणि पराणि आहुः इंद्रियेभ्यः परं मनः।
मनसः तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतः तु सः ॥"
(Regulating the senses-कर्मकौशल्य)

मनुष्यजीवनाला शरीर नांवाचे यंत्र मिळाले आहे. या यंत्राचा योग्य उपयोग होण्यासाठी भगवदगीता यांतील System स्पष्ट करुन सांगत आहे.

अर्जुनाचा प्रश्न असतो, मनुष्य(इच्छा नसतांनाही, बळजोरीने नियोजन केल्याप्रमाणे) पापाचरण कां करतो?याचे उत्तर असते, या System मधील सर्वात कनिष्ट इंद्रियनिर्मित "काम" ज्ञानावर

आच्छादन करतो, जसे धुर अग्निला, धुळ आरशाला आच्छादित करते.

मनोवश अवस्थेत "काम" क्रियाशिल असतो व बुद्धिचे हरण करतो. बुद्धिनाश म्हणजे सर्वनाश असतो.
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।(२-६३)

तस्मात् त्वम् इंद्रियाणि आदौ नियम्य भरतर्षभ।
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम्।।(३-४१)

या पार्श्वभुमिवर बुद्धिची स्थिरता, आत्मवश अवस्था (स्वतःवर command, मनाला वश करणे) भगवदगीतेची Priority आहे. याच संदर्भात शरीरातील Functioning system चे वर्णन, प्रत्येकाचे श्रेष्ठत्व-कनिष्टत्व या संदर्भात आलेले आहे.

इंद्रियाणि पराणि आहुः इंद्रियेभ्यः परं मनः।
मनसः तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतः तु सः ।।(३-४२)

जड(स्थुल)शरीरापेक्षा (Senses)इंद्रिय श्रेष्ठ, इंद्रियापेक्षा मन श्रेष्ठ, मनापेक्षा बुद्धि श्रेष्ठ(अर्थात इंद्रिय मनाला जाणत नाही पण मन इंद्रियाला जाणते, मन बुद्धिला जाणत नाही पण बुद्धि मनाला जाणते), बुद्धिपेक्षा आत्मा श्रेष्ठ म्हणुन आत्मवश (आत्मवश अर्थात स्वतःला स्वतःच्या शाश्वत स्वरुपाशी जोडणे)असणे महत्वाचे ठरते.

कर्मकौशल्य :

शरीर, मन, बुद्धि (अनित्य)प्रकृतिचे अंश आहे. मनुष्य अनित्य/जडाशी स्वतःला जोडतो.

"संगात् सञ्जायते कामः।" (२-६२)

विषयाची आवड (इच्छा) आसक्ति निर्माण करते. आसक्तिमुळे काम उत्पन्न होतो, जो बुद्धिनाशाचे कारण ठरतो. म्हणुन काम शत्रु ठरतो.

"Several Self help or Enlightenment books cite the Seven Deadly Sins. They are: pride, greed, lust, envy, wrath, sloth, and gluttony. "

. -Dave Mustaine

कर्म जीवनविकासात साधन असते. कार्याच्या सकाम मानसिकतेमुळे अर्जुनाला अडथळा जाणवतो व यामुळे कार्य टाळतो. म्हणुन कर्मकौशल्य हा विषय भगवदगीतेत आलेला आहे. मनुष्याला सुख हवे म्हणुन भगवदगीता कार्यकौशल्याची (योगः कर्मसु कौशलम्) आवश्यकता व प्रक्रिया सांगत आहे. या पार्श्वभुमिवर कार्याच्या कर्मकौशल्य या संदर्भात निष्काम मानसिकतेसाठी ईश्वराशी जोडणे हा उपाय असतो.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।(९-३३)

***********

(३-४३)

********************

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्य आत्मानम् आत्मना।

जहि शत्रुं महाबाहो कामरुपं दुरासदम्।।(३-४३)

*********************

३. ४३ :

"एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यआत्मानम् आत्मना"

(मन शत्रु कि मित्र?)

जसे रथाचे घोड्यांना लगाम नसेल तर घोडे बेलगाम झाले असे बोलल्या जाते. तसेच मन आहे. ते वश असेल तर मित्र आहे, वश नसेल तर बेलगाम(चंचल) असते व शत्रु ठरते.

इंद्रियविषयचिंतनामुळे "काम" निर्माण होतो व बुद्धिनाशाचे कारण ठरते.

ध्यायतो विषयान् पुंसः संगःतेषुपजायते।

संगात् संजायते कामः ...

.... बुद्धिनाशात् विनश्यति।(२-६३)

यामुळे म्हटले,

तस्माद् त्वम् इंद्रियाणि आदौ नियम्य भरतर्षभ।
पाप्मानं प्रजहि एनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥(३-४१)

शरीरशास्त्राप्रमाणे मनोविज्ञानात इंद्रियविषय-कर्मेंद्रिये- मन-बुद्धि-आत्मा(-परमात्मा) अशी जेष्ठता आहे.

इंद्रियाणि पराणि आहुः इंद्रियेभ्यः परं मनः।
मनसः तु परा बुद्धिः परतः तु सः॥(३-४२)
एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यआत्मानम् आत्मना।
जहि शत्रु महाबाहो कामरुपम् दुरासदम् ॥(३-४३)

या ज्ञानानुसार मनावर नियंत्रण म्हणजे आत्मवश स्थिति असते, बुद्धिची स्थिरता असते (तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता). मनावर नियंत्रण नसल्यामुळे मनुष्य स्वतःशी शत्रुवत वागतो, मन शत्रुवत आचरण करते. अर्थात काम शत्रु ठरतो. याच शत्रुवर विजय मिळविण्यासाठी बुद्धिची स्थिरता, आत्मवश अवस्था महत्वाची असते.

आत्मवश अवस्थेसाठीच संस्कार या अर्थाने "युक्त" या शब्दाचे प्रयोजन भगवद् गीतेत केले आहे. युक्त म्हणजे निष्काम कार्य करणारा, अयुक्त सकाम कार्य करणारा म्हणुन अशांत असतो. या स्थितीत मनोवश असतो. जशी नाव वाऱ्याने वाहते तशी जीवन जगण्याची अवस्था असते. जिकडे वारा वाहतो तसे जीवनाला जगवत असतो.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न ज अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखम् ।।(२-६६)

इंद्रियाणां हि चरतां यत्मनो अनुविधियते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावाम् इव अम्भसि।।(२-६७)
तस्माद् ...
इंद्रियाणि इंद्रियार्थेभ्यः तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।(२-६८)

"A soul without a high aim is like a ship without a rudder. "

Eileen Caddy

जीवनाच्या उच्च पातळीचा आधारच आत्मवश अवस्था आहे.

*जीवनाची उच्च पातळी:

"It's better to be a lion for a day than a sheep all your life. "
Elizabeth Kenny

मनुष्य सामान्य पातळीवर जगतो ही जीवनाची Survival mode असते. तर उच्च पातळी जगण्याची Spiritual mode असते. याचेच ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते.

बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)
या मार्गात बंधन-मोक्ष हा आधार असतो. कर्माच्या बंधनातुन सुटका याचा अर्थ योग्य-योग्य/चांगले-वाईट या द्वन्द्वापासुन मुक्त असणे अर्थात निर्द्वन्द्व असणे.

Nonduality (अद्वैत/निर्द्वन्द्व)

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥(२-५०)

कार्यकौशल्याचे महत्व:

"When you have balance in your life, work becomes an entirely different experience. There is a passion that moves you to a whole new level of fulfillment and gratitude, and that's when you can do your best... for yourself and for others.

Cara Delevingne

*******

(३. ४३):"जहि शत्रुं महाबाहो कामरुपं दुरासदम् "

भगवतगीतेत "काम"हा शब्द बुद्धिला विचलित करणारा शत्रु या अर्थाने आलेला आहे. यावरुन जीवनाला लढाई कां म्हटले?काय साध्य करायचे आहे? याची स्पष्टता कळते.

बुद्धि स्थिर असणे, विचलित न होणे यासाठी "योग" (दुःखान्त) म्हटले आहे. म्हणुन बुद्धियोगाचा आश्रय स्पष्ट होतो. जीवन विकासमार्गावर (आत्मोन्नति) असते. म्हणुन विकासमार्गावर असतांना श्रेष्ठ मनुष्य (दुःखाने, अपयशाने) विचलित होत नाही. याच संदर्भात बुद्धियोगाचे महत्व स्पष्ट केले.

दुरेण हि अवरं कर्म बुद्धियोगात् धनञ्जय।
बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणाः फलहेतवः॥(२-४९)
अर्थात फलहेतुने कार्य करणे(सकाम कार्य) यापेक्षा (निष्काम) कार्य श्रेष्ठ, कार्यापेक्षा बुद्धियोग श्रेष्ठ आहे. म्हणुन बुद्धि श्रेष्ठ जाण कारण फलहेतुमुळे (अतृप्तिमुळे, अपयशामुळे) काम हा शत्रु सक्रिय होतो.

अर्जुन याच संदर्भात प्रश्न करतो, बुद्धि श्रेष्ठ तर कर्म कशाला?(३-१)
मनुष्याला लाभलेली प्रकृति कार्यरतच(काया, वाचा, मन) असते. मनुष्य व्यवहारात (सकाम) कार्यरत असतो. कार्यसंस्कार नसेल तर विचलित होतो. अर्थात दुःखाशी (अडचणी, प्रश्न)deal करण्याचे ज्ञान नसते तेंव्हा चिंता, भय, क्रोध इ. विकाराने अशांत(Tension) असतो. यामुळे बुद्धि विचलित होते. म्हणुन

कार्यसंस्कार असणे आवश्यक आहे, ज्यात कार्याचा दृढनिश्चय असतो, निष्काम कार्यरत असतो अर्थात परिणाम भय नसते व अपयशाने खचत नाही.

यः तु इंद्रियाणि मनसा नियम्य आरभते अर्जुन ।
कर्मेंद्रियैः कर्मयोगं असक्तः स विशिष्यते।।(३-७)

मानसिक functiong या संदर्भात इंद्रियापेक्षा मन श्रेष्ठ, मनापेक्षा बुद्धि श्रेष्ठ, बुद्धिपेक्षा (परम्)आत्मा श्रेष्ठ याद्वारे बुद्धिची श्रेष्ठता जाणुन तीला कोण Disturb करतो?व कोण (स्थिर राहण्यासाठी )सहाय्यक ठरतो ?अर्थात बुद्धिचा शत्रु कोण व मित्र कोण?हे जाण.

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्य आत्मानम् आत्मना।
जहि शत्रुं महाबाहो कामरुपं दुरासदम्।।(३-४३)
*******************

# भगवदगीता

## अध्याय ४

## ज्ञानकर्मसंन्यासयोग

********************

भगवदगीता : अध्याय ४

ज्ञानकर्मसंन्यासयोग

यज्ञकौशल्याची धारणा झाली तर कर्म कष्ट जाणवत नाही, बंधन जाणवत नाही, म्हणुन मुक्तिसाठी या कौशल्याचे महत्व कर्मयोग अध्यायात श्रीकृष्ण सांगतात. सृष्टिसंचलनात यज्ञतत्व ज्ञानकर्मयोगात विस्ताराने सांगतात. यज्ञकौशल्याचा वापर करुन ज्ञानाद्वारे कर्मसंन्यास (अकर्म स्थिति) हा या अध्यायातील विषय आहे. यांत व्यवस्थापन कौशल्याचा संदेश मिळतो.

हा योग परंपरागत माझ्याकडुन सुर्याकडे, सुर्याकडुन मनुकडे व मनुकडुन इक्ष्वाकुकडे आला . केवळ राजर्षि हा योग जाणत होते, कालांतराने नष्ट झाला. तेंव्हा कुतुहलाने अर्जुन विचारतो, आपला जन्म वर्तमानातील आहे. मी या भाष्यावर कसा विश्वास करु?

यावर भाष्य करतांनाच स्वतःतील ईश्वराची भूमिका स्पष्ट करतात. या ज्ञानासह पुढिल मुद्यावर विस्ताराने भाष्य करतात.

४. १ पारंपरिक ज्ञान:

जगाचे व्यवस्थापनात ईश्वराची भूमिका (६-१५)

४. २ गहना कर्मणो गतिः(अकर्म व अकर्ता ज्ञान) (१६-२३)

४. ३ यज्ञ:सृष्टितील यज्ञकार्य व यज्ञकौशल्य (२४-३३)

४. ४ ज्ञान: न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते (३४-४२)

४. १ पारंपरिक ज्ञान:

जगाचे व्यवस्थापनात ईश्वराची भूमिका:

या भूतलावर आपले अनेक जन्म झाले आहेत. तूं जाणत नाही, मी जाणतो. या भूतलावरील सर्वलोकात ओळखल्या जाणारा मीच ईश्वर आहे. समाजात जेंव्हा अधर्म हावी होतो, समाजात शोषण होते, यामुळे सृष्टिसंचलनाला हे आव्हान ठरते. चांगले, सज्जन संभ्रमात सापडतात, जणु सर्व शक्ति लोप पावली अशी अंधारमय स्थिति होते, तेंव्हा प्रकाशाची गरज भासते. याच प्रकाशाची मशाल (सुर्यकोटिसमप्रभाः)घेवुन मी जन्म घेत आलो आहे.

जो मला माझ्या या रहस्यमय जन्मासह, दिव्य कर्मासह तत्वतः जाणतो. तो माझ्याप्रत पोहोचणाऱ्या मार्गावर असतो. (अमृतंगमय). तो माझे कार्य माझ्यासाठी करुन अंतकाळी माझ्याच भावात विलिन होतो. जो जसा मला ओळखतो, तसा भजतो व माझा मार्ग अनुसरतो.

सामान्य लोक कर्मसिद्धिसाठी, इच्छापुर्तिसाठी देवतांना भजतात. त्यांची प्रकृति त्यांच्या इच्छापुर्तिसाठी conditioned होते. याच प्रकृतिनुसार कर्म करीत असतात. ही प्रकृति गुणकर्मानुसार चार विभागात विभागलेली आहे. *(१)

ईश्वर या सृष्टिचा अध्यक्ष या नात्याने(अ. ९) कर्ता असुनही अकर्ता ठरतो. ही ईश्वराची भूमिका जाणुन नियतकर्म केल्याने कर्माचे परिणाम बंधनात अडकवित नाही. कर्माचे अकर्मात, कर्ता अकर्तात transform होण्याचे परंपरागत शास्त्र आहे.

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पुर्वैः अपि मुमुक्षुभि:।

कुरु कर्मेव तस्मात् त्वम् पुर्वैः पुर्वतरं कृतं॥(४-१५)

## ४. २ गहना कर्मणो गतिः *तिसरा विकल्प

सामान्यतः कर्मसंदर्भात करणे किंवा न करणे, चांगले किंवा वाईट या दोनच मुद्यावर विचार होतो. करणे योग्य वाटले नाही तर" न करणे" याचे समर्थन करतो. कोणताही प्रश्न उपस्थित झाला तरी समर्थन किंवा टिका असेच भाष्य समाजात चालते. या मानसिकतेमुळेच प्रश्न सुटत नाही.

श्रीकृष्णाने प्राचिन ज्ञानाचा आदर केला. समर्थन किंवा टिका केली नाही. प्राचिन ज्ञानाचे logic वर्तमानातील प्रश्न सोडविण्यासाठी, त्याला नविन आकार देवुन वापरले. याच विकल्पाला विकर्म म्हटले.

एका शेतकऱ्याने फळलागवडीसाठी शेती विकत घेतली. तेथे सापांचा सुळसुळाट पाहुन फळलागवड करणे किंवा शेती विकणे असे दोनच विकल्प होते. पण त्याला तिसरा विकल्प सुचला, विषापासुन औषधनिर्मिति. तेथे Snake Institute उभी झाली.

मनुष्याने विकल्पावर विचार केला तर अनेक विकल्प सुचतात. यातच मनुष्याची रहस्यमय प्रतिभा दडलेली असते.

कर्मणो हि अपि बोधव्यं बोधव्यं च विकर्मणः।
अकर्मणश्च बोधव्यं गहना कर्मणो गतिः॥(४-१७)

युद्ध करणे वा न करणे अशा दोन विकल्पावर अर्जुन विचार करतो. विकर्म अर्थात तिसरा विकल्प श्रीकृष्ण सुचवतात, कर्म वेगळ्या पद्धतिने करणे. कर्म करुनही अकर्ता*(२)जाणणे. यामुळे कर्माचे अकर्मात transformation होते. कर्मबंधनातुन सुटतो.

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञान अवस्थितचेतसः।
यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते॥(४-२३)

ज्ञानाचा आश्रय करुन यज्ञकौशल्य साध्य करणे यामुळे परिणामापासुन मुक्त असतो व सर्व कर्म (अकर्मात) विलिन होतात.

भाग (ब) यज्ञकौशल्य व ज्ञान

*एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।(४-३२)

या ब्रह्ममय सृष्टित यज्ञरुपाने कर्म घडत असतात. द्रव्यसंदर्भात द्रव्ययज्ञ, जीवनविकासासाठी
शरीर-वाचा-मन स्वस्थ व पोषक असावेत यासाठी तपोयज्ञ, स्वतःचे जीवनज्ञान जाणुन विकासमार्गावर असण्यासाठी स्वाध्यायज्ञानयज्ञ यांत कठोरतेने नियम पाळुन यज्ञकौशल्य साध्य करतात.

*यज्ञातील अग्नित हवन करणे हे भस्मिकरण असते. हवन त्याग दर्शविते. शरीरयंत्रात इच्छा-कार्य-संयम(दृढत्व)-योग-ज्ञान अशा चढत्या विभाजणीत यज्ञकौशल्याची प्रक्रिया दर्शविली आहे.

श्रोत्र आदीनि इंद्रियाणि अन्ये संयमाग्निषु जुह्वति।
शब्द आदीन् विषयान् अन्य इंद्रियाग्निषु जुह्वति।।(४-२६)
सर्वाणि इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि च अपरे।

आत्मसंयम् योगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।।(४-२७)

कार्यात इच्छेचे भस्मिकरण, आत्मसंयम योगाग्नित कार्यकष्टाचे भस्मिकरण, ज्ञानाने अग्नि प्रदिप्त होतो. कोणत्याही यज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ ठरतो. कारण सर्व कर्म अखेर ज्ञानात विलिन होतात.

सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

*यानुसार ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्रोत ठरतो. या ज्ञानाने सर्वात मी व माझ्यात सर्व पाहतो. विविध प्रश्नोत्तराने हे ज्ञान अधिकारी व्यक्तिकडुन जाणुन घेता येते. येथे हेच ज्ञान श्रीकृष्ण माहिती करुन देतात. जसे काष्ट(लाकडे) अग्निने भस्म होतात, तसे सर्वकार्य ज्ञानाग्नित भस्म होतात. कार्यातील कोणताही पापाचा संशय मिटतो.

*न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।(४-३८)
ज्ञान जगी सर्वश्रेष्ठ आहे।ज्ञानाने कार्यातील संशय मिटतो. या ज्ञानाने योग साध्य होवुन कर्मसंन्यास अनुभवतो. म्हणुन हृदयातील संशयरुपी अंधार ज्ञानाने मिटवुन योगासाठी सिद्ध हो.

भाष्य विवेचन

भगवतगीता व्यवहारात कितपत उपयोगी आहे, हाच विषय वर्तमानात जाणुन घेण्याचा आहे.

*अर्जुन युद्धमैदानावर भजनकिर्तन ऐकण्यासाठी आला नव्हता. युद्ध करणे हा त्याच्या व्यवहारकार्याचाच भाग होता. या सत्याचा स्विकार केला तरच व्यवहारज्ञानाला पुर्णत्व देण्याचे ज्ञानच भगवतगीता ज्ञान आहे, या सत्याचा बोध होतो.

(*१)*जगाचे संचलन सुरळित चालण्यासाठी प्रकृतिचे संचलन

१. जगाचे कल्याण साधण्यासाठी ज्ञानविज्ञान कार्य.

२. समुहकल्याणासाठी क्षात्रकार्य (समुह प्रशासन, संरक्षण)

३. द्रव्यवृद्धि, समृद्धिसाठी उत्पादन व व्यवसायकार्य ४. वरील तिन्ही क्षेत्राला पुरक ठरणारे सेवाकार्य

या चार विभागात होते. हा जगाचे संचलन होण्यासाठी व्यवस्थापनाचा भाग ठरतो. याच आधारावर कार्यविभागणी जगातच आढळते.

याच आधारावर चार प्रकारच्या समाजव्यवस्था समाजात आढळतात, असे अर्थतज्ञ डॉ. जे. सी. कुमारप्पाने प्रतिपादन केले

१. Economy of Permanance शाश्वत व्यवस्था

२. Economy of gregation समुहप्रधान व्यवस्था

३. Economy of Enterprise व्यवसायप्रधान व्यवस्था

४. Economy of Parasites असंस्कृत/रानटी/शोषणाधिष्ठित व्यवस्था

(Ref. Economy of Permanance)

याच व्यवस्थेचे प्रतिबिंब समाजमनावर बिंबलेले असते. म्हणुन समाजव्यवस्थेला योग्य आकार देण्यासाठी यांतील तांत्रिक ज्ञान जाणुन घेणे आवश्यक आहे.

*जीवनविकासासाठी कर्माचा स्वधर्म करण्यास समर्थ व्हावा, यासाठी कार्यविभागणिनुसार भारतात प्राचिन समाजव्यवस्था जातीवर आधारित बनली. जात कार्याची State of art(Specialized expertise)चे निदर्शक होते. कार्यविभागणिनुसार विशेष आवश्यक गुणांची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. (Detailअ. १८). म्हणुनच क्षात्राला युद्धसंधि ही स्वधर्मसंधि म्हटले.

*वर्तमानात Professional कार्यासाठी निवड करतांना आवडीचे कार्य, आवडीचा विषय आधार बनवितात. पारंपरिक व्यवसायात जर चांगले भविष्य आढळले, तर युवापिढी त्याच व्यवसायाला निवडतात. -डॉक्टर, कारखानदारी इ. यामुळे व्यवसाय निवडीसाठी जात factor कालबाह्य ठरला असला तरी व्यवसायनिवडीसाठी तसेच सर्वांगीण उन्नतिसाठी भगवतगीतेतील ज्ञान गुणात्मक ज्ञान(Quality education) ठरते. शाळा, महाविद्यालयीन शिक्षण केवळ संख्यात्मक ज्ञान(Quantity education)ठरते. म्हणुन प्राचिन व्यवस्थेतील तांत्रिक ज्ञान जाणुन घेणे आवश्यक आहे. ]

(*२)

*सामान्यतः मनुष्य कार्य प्राप्तिसाठी जाणत असतो. जीवनविकासाच्या मनुष्याच्या संकल्पना प्राप्तिपर्यंत सिमित असल्यामुळे, सर्व भोगैश्वर्य लाभले तर कार्याची गरज काय?असा साधारण समज असतो. (असाच समज जगात असल्यामुळे एक पिढि कमावते, दुसरी उडवते व तिसरी रस्त्यावर येते हे विदारक चित्र कांही तत्वज्ञ दर्शवतात)

*अर्जुन असेच भाष्य बोलतो, "मला कांही नको"ज्या कार्याने शोक होणार ते करायचेच कशाला?एकीकडे धर्मपालन व दुसरीकडे शोक अशा द्वंदात सापडतो व "करणे"व "न करणे" यातुन दुसरा पर्याय स्विकारतो. अशांती आली तर मनोवश अवस्था बनते. या अवस्थेत बुद्धि स्थिर नसते. त्याच्या दृष्टीत दोनच पर्याय आढळतात(करणे वा न करणे). तिसरा विकल्प सुचत नाही. भगवतगीता हाच विकल्प सांगत आहे. कर्माद्वारे अकर्म, अकर्ता अनुभुति!कर्मसंन्यास! भल्याभल्यांनाही या रहस्याचे कुतुहल वाटते.

किम् कर्म किम् अकर्मेति कवयः अपि अत्र मोहिताः।

*निष्काम कर्म, यज्ञकौशल्य, स्वधर्म हे सर्व विकल्प कार्यकौशल्य संदर्भात आहेत. मनोवश अवस्थेतुन आत्मवश अवस्थेत येण्यासाठी हे विकल्प आहेत. आत्मवश अवस्थेत उच्च चेतना (Higher Self) जागृत असते.

*कर्मयोग कशासाठी? याचे उत्तर

१. त्रायते महतो भयात् (निर्भय होणे)

२. योग -दुःखापासुन वियोग करणारी शक्ति

शक्तिसाधनेचा हा विषय प्रत्यक्ष अनुभुतिचा आहे व प्रत्यक्ष कृतितुनच अनुभुति होते. भाष्य कोणत्याही दिशेने वळविल्या जावु शकते. अर्जुन आपल्या भाष्याला ज्ञान दर्शविण्याचा प्रयत्न करतो. म्हणुन जीवनात ज्ञानाची भूमिका हाच विषय भगवतगीतेचा आहे.

*निर्णयक्षमता नसणे(यामुळे दृढता नसणे), कार्यजबाबदारी टाळणे, स्वतःच्या मार्गाचे ज्ञान नसणे हे सर्व व्यवहारज्ञानातील अज्ञानच दर्शविते. याचमुळे आपले हीत साधावे ही इच्छा असते व याच दिशेने त्याचे भाष्य वळत असते. केवळ भाष्य बोलण्यासाठी ज्ञान घेणे व प्रत्यक्ष कृतिसाठी ज्ञान यांतील भेद भगवतगीतेने स्पष्ठ केला आहे.

*ज्ञानविज्ञानाचा आज महापुर वहात असतांनाही मनुष्यजीवनातील प्रश्न असो वा समाजातील प्रश्न असोत, ते Resolve करण्यासाठी ज्ञान सापडत नाही!वर्तमानातील प्रश्न सोडविण्यासाठी श्रीकृष्णाने पुरातन ज्ञानाला वर्तमानात Translate केले.

*ज्ञान या संदर्भात मी योग्य समजुनच मनुष्याची जीवनयात्रा सुरु असते. अज्ञानी असला तरी(नकारात्मक) मी योग्य हे सिद्ध करण्यासाठी भाष्य बोलतो, येथे अहंकार बोलत असतो. म्हणुन अहंकाराचा आश्रय कि ईश्वराचा आश्रय? हा विकल्प शेवटी अर्जुनाला दिला. ईश्वर ही संकल्पना ज्ञानासाठी आहे, हे येथे सिद्ध होते. अर्थात हा श्रद्धेचा भाग असतो, म्हणुन सर्वात शेवटी श्रद्धेचे महत्व सांगितले आहे.

*सामान्यतः कर्मसिद्धिसाठी देवतांनाच ईश्वर जाणुन लोक भजत असतात, पण मला जाणत नाही!हा भेद श्रीकृष्ण दर्शवितात. पण ईश्वरश्रद्धा असणे ही Strength असते. व याच श्रद्धेचा उपयोग जीवनाची वरची पातळी गाठणे म्हणजे ज्ञानी होणे (आर्त-अर्थार्थि-जिज्ञासु-ज्ञानी) यासाठी होण्यासाठीच व्यवहारज्ञानातील कार्यकौशल्याचे विकल्प भगवतगीता सांगते.

********

अध्याय ४-मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

(४-२) :

"एवं परंपरा प्राप्तम् इमं राजर्षयो विदुः "

(स्वतःसाठी रहस्यज्ञान)

४. ७/१ :

"यदा यदा हि धर्मस्य ग्लानिःभवति भारत"

४. ७/२:

"अभ्युत्थानं अधर्मस्य तद् आत्मानं सृजाम्यहम् "

(ईश्वराच्या अवतारकार्याचे रहस्य व वर्तमानातील ज्ञान)

४-८/१ :

"परित्राणाय साधुनाम् विनाशाय च दुष्कृताम् "

(वर्तमानातील संदेश :Empowering goodness)

४. ८/२: "संभवामि युगे युगे "

(४-८)/३:

"धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे"

(अर्थात आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च)

(४-९):"जन्मकर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ति तत्वतः"

(The philosophy of Change)

(४-१०) /१:

" वीतरागभयक्रोधा मन्मया माम् उपआश्रिताः"

(ईश्वराचाआश्रय:आध्यात्मिक व्यवस्थापनाचा आधार)

४-१०/२ :

"बहवो ज्ञानतपसा पूता मद् भावम् आगताः"

(Power of Creator)

४. ११/१:

"ये यथा मां प्रपद्यन्ते तान् तथैव भजामि अहं"

(Transformation)

४. ११/२:

"मम वर्त्म अनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः"

४. १२:

"काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः"

(४-१३) :

"तस्य कर्तारम् अपिमां विद्धि अकर्तारम् अव्ययम् "

(कर्ता, अकर्ता यांचे Logic)

४. १४/१:

"न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा"

( 'Doer sounds Nondoer')

(४-१४)/२ :

"इति मां योअभिजानाति कर्मभिः न स बध्यते"

(जीवनाची श्रेष्ठ गति(भूमिका)/ज्ञानी)

(४. १६)/१:"किम् कर्म किम् अकर्मेति कवयः अपि अत्र मोहिताः"

(Life driven modes&Mental gears)

(४-१६)/२ :

"तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यत् ज्ञात्वा मोक्ष्यसेअशुभात्"

[सुखी जीवनासाठी कर्माचे रहस्य (गहना कर्मणो गतिः)जाणणे]

४. १७/१:

"अकर्मणश्च बोधव्यं गहना कर्मणो गतिः"

४. १७/२ : "गहना कर्मणो गतिः"

(४-१८)/१:

"कर्मणि अकर्म यः पश्येत् अकर्मणि च कर्म यः"

(भगवतगीतेला अभिप्रेत संस्कार-Discipline)

(४-१८)/२ :

"स बुद्धिमान मनुष्येषु युक्तः कृत्स्नकर्मकृत्"

(बुद्धिमान vs. अबुद्धयः)

४. १९ :

"ज्ञानाग्नि दग्ध कर्माणं तम आहुः पंडितं बुधा"

(४. २०)/१:

"त्यक्त्वा कर्मफलासंग नित्यतृप्तो निराश्रयः"

(कार्यकौशल्य :Art of Akarma)

(४. २०)/२ :

"कर्मणि अभिप्रवृत्तः अपि नैव किञ्चित् करोति सः"

(Logic of Akarma -The inaction)

(४-२१) :

"निराशीः यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः।

शारीरं केवलं कर्म कुर्वन्न आप्नोति किल्बिषम् ।"

(कर्मकौशल्याचे Universal Standard)

४. २२:

"यदृच्छा लाभ संतुष्टः द्वन्द्वातीतो विमत्सरः"

(Self approval )

(४-२३)/१ :

"गतसंगस्य मुक्तस्य ज्ञान अवस्थित चेतसः"

कर्मकौशल्य(व्यवहार+आत्मोन्नति)

(४-२३)/२ :

"यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलियते"

(कार्याचे आध्यात्मिक व्यवस्थापन)

(४-२५):

"ब्रह्माग्नौ अपरे यज्ञं यज्ञेनेव उपजुह्वति"

(यज्ञ संकल्पनेचा जीवनविकासाच्या व्यवस्थापनात उपयोग)

४. २६:

"शब्द आदीन् विषयान् अन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति"

(State of want vs. State of Art)

४. २७:

"आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते"

(४-२८) :

"स्वाध्याय ज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रतः"

(Self learning, Self cultivation)

(४-३२)/१:

"एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे"

(विश्वसंचलनात मनुष्याचे योगदान)

(४-३२)/२ :

"कर्मजान् विद्धि तान् सर्वान एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे"

(कर्माद्वारे मुक्तिचे तत्वज्ञान)

(४. ३३)/१:

श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञात् ज्ञानयज्ञः परंतप।

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।।

(कर्म vs. ज्ञान)

४. ३३/२:

"श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञात् ज्ञानयज्ञः परंतप"

(ज्ञानाची श्रेष्ठता व कर्माचे महत्व)

४. ३३/३ :

"सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते"

४. ३६/१:"अपि चेत् असि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।

सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि।।"

(Improving Self)

४. ३६/२:

"सर्वज्ञान प्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि"

(४-३६)/३ :

"अपिचेत् असि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तम्।

सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं सन्तरिष्यसि।।"

(ज्ञानरुपी नौका)

(४-३७)/१ :

"यथा एधांसि समिद्धो अग्नि भस्मसात् कुरुते अर्जुन"

(ज्ञानाग्नि-विकासात्मक अग्नि)

(४-३७)/२:"ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा"

(व्यवहार, आदर्श व ज्ञान)

४. ३८/१:"न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते"

४. ३८/२:" न हि ज्ञानेन सदृशं "

४. ३९/१:" श्रद्धावान लभते ज्ञानं"

४. ३९/२ :

"ज्ञानं लब्ध्वा परां शांतिं अचिरेण अधिगच्छति"

I. (जीवनात ज्ञानाची भूमिका)

(४-३९)/३:

"ज्ञानं लब्ध्वा परां शांतिम् अचिरेण अधिगच्छति"

II. (Secret of Confidence, Peace)

४. ४०/१ :"अज्ञश्च अश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति"

(Wisdom of Darkness)

४. ४०/२: " संशयात्मा विनश्यति"

(४-४०)/३:"नायं लोकोअस्ति न परो न सुखं संशयात्मनः"

(भयाची मानसिकता vs विश्वासाची मानसिकता)

४. ४१/१:

"योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंच्छिन्नसंशयम् "

(४. ४१)/२:

"योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्च्छिन्न संशयम्"

(जीवनविकासातील ज्ञान, कर्म व भक्ति यांची भूमिका)

(४-४१)/३:

"आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनञ्जय"

(जीवनविकास-सुख-State of mind)

४. ४२/१ :

"तस्मात् अज्ञान संभुतं हृत्स्नं ज्ञानअसिन आत्मनः"

४. ४२/२:

"छित्वैनं संशयं योगं आत्तिष्ठ उत्तिष्ठ भारत"

***********

(४-२)

************************

एवं परंपरा प्राप्तम् इमं राजर्षयो विदुः।

स कालेन इह महता योगो नष्टः परंतप॥

************************

(४-२):

"एवं परंपरा प्राप्तम् इमं राजर्षयो विदुः "

(स्वतःसाठी रहस्यज्ञान)

भगवदगीतेतील ज्ञानकर्मसंन्यासयोग प्राचिन काळी फक्त राजर्षि जाणत होते. व कालांतराने तो नष्ट झाला.

एवं परंपरा प्राप्तम् इमं राजर्षयो विदुः।

स कालेन इह महता योगो नष्टः परंतप॥(४-२)

अर्जुनाला विशेष ठिकाणी "भारत "असे संबोधन आलेले आहे. भगवदगीता यातुन कोणता विशेष संदेश देत आहे?याचा शोध घेतला तर राजर्षि जाणत होते ते रहस्य कळते. या विशेष रहस्यमय योगात दोनदा भारत हे संबोधन आलेले आहे.

१. यदा यदा हि धर्मस्य ग्लानिःभवति भारत।(४-७)

२. छित्वैनं संशयं योगं आत्तिष्ठ उत्तिष्ठ भारत।(४-४२)

अर्थात हे संबोधन १. समाजातील धर्म (संस्कृति) व २. स्वतःला जीवनमार्गाचे संस्कार या संदर्भात आहे. समाजात संस्कृतिचा अभाव असेल तर स्वतःला संस्कार असणे ही Priority ठरते.

समाजात/समुहात निश्चित संस्कृति(धर्म) असेल तर परस्पर सहकार्य असते. पण निश्चित संस्कृति नसेल तर मनुष्य गोंधळतो. या स्थितीत परस्परावर दोष ढकलत असतात. (यामुळे हा केवळ व्यवहार ठरतो. याच कारणाने महाभारतात धर्मयुद्ध ठरले होते. )

मनुष्य स्वतः चांगला असला तरी त्याला स्वतःला योग्य असल्याचा Confidence नसतो. अर्जुन "योग्य" असुनही स्वतःला लोभी ठरवितो व युद्धातुन माघार घेतो. याच पार्श्वभुमिवर भगवदगीता संदेश देत आहे, समुहात संस्कृति असेल वा नसेल पण चांगल्या व्यक्तिने स्वतःला संस्कारीत करणे Priority ठरते. यामुळेच त्याला स्वतःवर विश्वास असतो.

मानवी जीवनात सुखशांतिसाठी व्यवस्था, संतुलन, संयम अर्थात संस्कार आवश्यक आहेत . संस्काराच्या अभावामुळे मनुष्याच्या विविध शक्ति क्षीण होत असतात. व शक्तिहीनता हाच शाप ठरतो.

याच पार्श्वभुमिवर स्वतःचा संस्कार या संदर्भात भगवदगीतेत व्यावहारिक मार्गाचे(सकाम कार्य) आत्मोन्नति मार्गात(निष्काम कार्य) Transformation व्हावे यासाठी शास्त्र सांगितले आहे. ज्ञानाद्वारे संशय मिटवुन कार्याचा निश्चय करणे व कार्याद्वारे समत्वयोग साध्य करणे हा संदेश आलेला आहे. योग हा शब्द शक्ति (दुःखान्त) या संदर्भात आहे.

स्वतःला संस्कारीत करण्यासाठी ज्ञान याला येथे Priority आहे. ज्यामुळे कर्मसंन्यास अर्थात कर्म अकर्म जाणतो. हेच ज्ञान जीवनविकासातील गुणात्मक ज्ञान ठरते.

सार :

समाजात व्यवहार असतो. समाजातील मनुष्य आपापल्या Survival साठी जगत असतात. समाजाच्या संस्कृतित उणिव निर्माण झाली तर समाजातील लोक (स्वसमर्थन करुन) परस्परावर दोष ढकलत असतात. Survival of the fittest या न्यायाने

लोक जगत असतात. अशा स्थितित स्वतः चांगले(दैवीगुण) असले तरी मनुष्याला स्वतःवर विश्वास नसतो . अशा स्थितित जगाने बदलले पाहीजे ही इच्छा केली तर मनुष्य स्वतःचाच अधिकार विसरतो. याच अधिकाराची जाणिव भगवदगीता करुन देते व संदेश देते, "स्वतःला बदलवा, जग बदलेल. "

जो अर्जुन(निष्क्रिय झाला तरी) मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी समर्थनभाष्य करतो, तोच ज्ञान ऐकल्यानंतर "मी योग्य आहे" हा अनुभव घेतो. आत्मविश्वास अनुभवतो.

********

(४-७)

************************

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिःभवति भारत।

अभ्युत्थानं अधर्मस्य तद् आत्मानं सृजाम्यहम् ।।

************************

(४. ७)/१ :

"यदा यदा हि धर्मस्य ग्लानिःभवति भारत"

जगातील क्रांतीच्या इतिहासाचे अवलोकन केले तर "शोषणाविरुद्ध लढा" असे त्याचे स्वरुप आढळते. कार्ल मार्क्सप्रणित क्रांतीचे स्वरुप "समाजव्यवस्थेतील शोषणाविरुद्ध लढा" दर्शवितो. पण मार्क्सने शोषणासाठी धर्मालाच आरोपी केले.

प्रत्यक्षात धर्म या संदर्भातच अधर्म शोषण(बाह्यविघ्न) दर्शविते तसेच जीवनमार्गातील संशय(अशांति-आंतर्विघ्न) अर्थात अज्ञान दर्शविते. धर्म या संदर्भातच लोकांना अन्यायाविरुद्ध लढण्यास सक्षम करण्यासाठी खालसा पंथाची स्थापना झाली. धर्म या

संदर्भात अधर्म म्हणजे शोषण व धर्मस्थापना म्हणजे शोषणाविरुद्ध पुकारलेली क्रांती असते.

युरोपात ज्ञानविज्ञानाचे युग म्हणुन १५वे शतक Enlightenment Age(Age of reasoning) ठरले. याच आधारावर फ्रेंच क्रांती झाली. ज्ञानविज्ञानाने परिवर्तन घडुन आले. अपेक्षित परिवर्तन होण्यासाठीच ज्ञानविज्ञानाची भूमिका भगवतगीता स्पष्ट करते. यामुळे धर्म या संदर्भातील प्राचीन Logic ला नविन संदर्भ मिळाला. धर्माला ज्ञानविज्ञानाची बैठक मिळाली. धर्माला मर्यादा आहे, पण ज्ञानविज्ञानाला मर्यादा नसली तरी ज्ञानविज्ञानाचे पुर्णत्व ईश्वरज्ञानाने सिद्ध होते. भगवतगीता धर्मातील मर्यादा दर्शविते, ज्ञानविज्ञानाचे महत्व दर्शविते व मनुष्यजीवनात ईश्वरज्ञान ज्ञानविज्ञानाचाच भाग आहे, ज्यामुळे ज्ञानविज्ञानाला पुर्णत्व येते. हे विस्ताराने स्पष्ठ केले.

महाभारतयुद्ध शोषणाविरुद्ध पुकारलेले धर्मयुद्ध असते. यासाठी चांगलेपणाला सक्षम, बलवान, निर्भय होण्याचे ज्ञान अर्जुनाच्या माध्यमातुन भगवतगीतेद्वारा दिले. याचाच अर्थ मनुष्यजीवनातील चांगलेपणा सक्षम, बलवान, निर्भय होण्याचे साधन आहे, हे रहस्य भगवतगीता स्पष्ट करते. हाच मुळ हेतु आहे.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिःभवति भारत।
अभ्युत्थानं अधर्मस्य तद् आत्मानं सृजाम्यहम् ।।(४-७)

श्रीकृष्णाची भूमिका याच क्रांतीसाठी आहे. जगाला हे रहस्यज्ञान सांगण्यासाठी ईश्वराने मनुष्यरुपात अवतार घेतला. व भगवतगीता जगासमोर आली. यातुन जीवनाचे व ईश्वराचे नाते ज्ञानविज्ञानासह स्पष्ट केले. जगातील ज्ञानविज्ञानाला पुर्णत्व आले. जगात ज्ञानविज्ञानात दररोज भर पडत असते. ज्ञानविज्ञानाचा कार्यात उपयोग होतो. पण शेवटी सर्व कर्माचे ज्ञानात विलिनीकरण होते. याचाच अर्थ ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत ठरतो.

वर्तमानातील प्रश्न : ज्ञानविज्ञान आहे तर समाजातील प्रश्न कां सुटत नाही?
यावर मात्र प्रज्ञावादी, नकारात्मक भाष्य होत असते. कुणी धर्मावर दोष ढकलतो, कुणी राजकिय पक्षाला जबाबदार धरतो, कुणी शोषितांच्या नशिबावर, अज्ञानावर दोष ढकलतात. या भाष्याला ज्ञानविज्ञानाची बैठक नसते, संवाद नसतो, ही वर्तमानातील शोकांतिका ठरते. वास्तव स्विकारणे, संवादाचा आधार असतो, (ज्यामुळे प्रश्नाला पारदर्शकता येते) तर वास्तव hide करणे,

प्रज्ञावादी भाष्याचे कारण असते. हे सत्य भगवतगीता प्रकाशात आणते व संवाद सुरु होतो.

प्रज्ञावादी भाष्य vs ज्ञान

युद्धाची प्रत्यक्ष वेळ आली असता अर्जुन दुःखाने गर्भगळित होतो. चांगलेपणाचे हे एक रुप असते. अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी स्वतःला ज्ञानी दर्शविण्याचा प्रयत्न करतो. दुबळ्या, दुःखी अवस्थेतील त्याचे भाष्य प्रज्ञावाद असतो. यामुळे अज्ञानाला ज्ञान दर्शविण्याचा हा प्रयत्न असतो. समाजातील अशा स्वरुपाचे भाष्यच विकासमार्गातील Roadblocks असतात. यामुळे ज्ञानविज्ञान असुनही समाजातील प्रश्न सुटत नाही.

ज्ञान विकासमार्गात प्रकाश टाकत असते.

अर्जुनाची श्रीकृष्णावर श्रद्धा होती. अर्जुनाचा संशय मिटला. चांगल्या मनुष्याने सकारात्मक, सक्षम व्हावे हेच भगवतगीतेला अपेक्षित आहे. अहंकारामुळे मनुष्य नकारात्मक भाष्य "मी योग्य" दर्शविण्यासाठी करीत असतो. जगात ज्ञानविज्ञान आहे, ईश्वर नाही

असेही भाष्य होत असते. म्हणुन श्रीकृष्ण म्हणतात, श्रद्धा असेल तरच हे रहस्यमय ज्ञानविज्ञान सांगणे योग्य आहे.

इदं ते ना तपस्काय नाभक्ताय कदाचन।

न च अशुषुश्रवे वाच्यं न च मां योःअभ्यसूयति।।(१८-६७)

जीवनात दुःख, अडचणी असतात. सक्षम होण्यासाठीच ज्ञानाची गरज असते. अशांती दुर करण्यासाठी वास्तव न स्विकारता प्रज्ञावादी भाष्य बोलणे, ही चुकीची संवय ठरते. यांत अज्ञानाला ज्ञान ठरविण्याचा प्रयत्न होतो. अज्ञानाचा अंधार मिटविण्यासाठी ज्ञान असते. म्हणुन भगवतगीता "ज्ञानाला" सर्वश्रेष्ठ ठरविते.

"न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।"

संशयामुळे कार्याचा निश्चय दृढ होत नाही. विकासमार्ग दृढ करण्यासाठी, संशय मिटविण्यासाठीच ज्ञानाचा उपयोग करणे आणि निर्भय, सक्षम होण्यासाठी योग असे भगवतगीता भाष्य करते. ही स्वतःमधील आध्यात्मिक क्रांती ठरते.

" योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंच्छिन्नसंशयम्"(४-४१)

***********

४. ७/२:

"अभ्युत्थानं अधर्मस्य तद् आत्मानं सृजाम्यहम् "

(ईश्वराच्या अवतारकार्याचे रहस्य व वर्तमानातील ज्ञान)

जेंव्हा जेंव्हा धर्माला ग्लानी येते, तेंव्हा अधर्माचा उदय होतो.

सज्जनांना जगणे कठीण होते!तेंव्हा स्वतः ईश्वर अवतार घेतो.

"श्रीकृष्ण" या अवतारकार्यातील रहस्य

भगवतगीता स्पष्ट करते.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।

अभ्युत्थानं अधर्मस्य तद् आत्मानं सृजाम्यहम्।।(४-७)

वर्तमानातील धर्म-अधर्म ज्ञान:

येथे अधर्म म्हणजे बाह्यविघ्न (समाजातील शोषण) व आंतर्विघ्न( चांगल्या मनुष्याला संभ्रम) या अर्थाने असतो . भ्रष्टाचार्यांना प्रतिष्ठा मिळणे व सज्जन वेड्यात निघणे, प्रामाणिकपणे कष्ट करणाऱ्यावर आत्महत्त्या करायची वेळ येणे. सज्जनांची अडचण, भय ही दुर्जनांसाठी संधि असते. ही स्थिति अधर्माची जाणली तर चांगलेपणा प्रभावी होणे आवश्यक असते.

वर्तमानातील गरज:

सज्जनांसाठी त्याची स्वतःची अडचण, दुःख ही विकासमार्गातील संधिच (Stepping stone) असते. याचसाठी शाश्वत विकासमार्गाचे (अमृतत्वाय कल्पते, योगः कर्मसु कौशलम् ) प्रयोजन आहे. हेच ज्ञान भगवतगीता देत आहे.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

चांगलेपणामुळेच अर्जुनाला दुःख झाले. व मार्गात अडथळा निर्माण झाला. चांगलेपणाचा पुढील Chapter निर्भयता, साहस असते. कार्यातुन शक्तिची साधना हा कर्मयोग असतो. यामुळे विचलित होत नाही. (दैवीगुणाच्या एका टोकाला नम्रता व दुसऱ्या टोकाला अभय आहे व अभयच प्रथमगुण आहे. )

“Without courage we cannot practice any other virtue with consistency. We can’t be kind, true, merciful, generous, or honest. ” –DR. MAYA ANGELOU

धर्म, चांगले संस्कार या संदर्भात "चांगलेपणा" (नम्रता) यावरच उपदेश चालत असतात. जगाने बदलावे, चांगले व्हावे ही इच्छा करीत लोक जगत असतात. पण जे अधिकारात आहे याचा विसर

पडतो. "चांगले, विद्वान असले तरी स्वतःमध्ये बदल घडवुन आणणे" व याचसाठी भगवतगीता "अध्यात्म" रहस्य सांगते. ईश्वराची ओळख करुन देते.

ईश्वराची ओळख/ ज्ञान:

जन्मकर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ति तत्वतः।
त्यक्त्वा देह पुनर्जन्म न एति मामेति सो अर्जुन।।(४-९)
वरुन अवतार अवतरेल याची वाट न पाहता मनुष्याने ज्ञानाचा वापर करुन स्वतः ईश्वराचेच कार्य जाणुन करणे हे रहस्य भगवतगीता स्पष्ट करते व याद्वारे ईश्वर स्वतःचे अधिकार delegate करीत आहे. (निमित्तमात्रंभव )व याद्वारे चांगल्या मनुष्याला संभ्रमातुन मुक्त करीत आहे.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।।(११-५५)

"God always gives His best to those who leave the choice with him. "

Jim Elliot

सार : "भगवतगीतेची महत्ता" या संदर्भात मनुष्याचा जो समज आहे, त्यापेक्षा तीची महत्ता महान आहे, अनंत आहे, समजण्यापलिकडे आहे. कारण हेच रहस्यज्ञान सांगण्यासाठी साक्षात ईश्वराने अवतार घेतला. हे रहस्याचे रहस्य (गुह्यात् गुह्यतरं) जाणले तर मनुष्याचा आपल्या स्वतःच्या जीवनाविषयी जो समज आहे त्यापेक्षा त्याची महानता अधिक आहे. याची जाणीव होते अर्थात स्वतःवर प्रगाढ विश्वास असतो. यालाच आपण आत्मविश्वास म्हणुन ओळखत असतो.

"Trust yourself. You know more than you think you do. " -

- Dr. Benjamin Spock

***********

(४-८)

*************************

परित्राणाय साधुनाम् विनाशाय च दुष्कृताम् ।

धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।।

*************************

(४-८) :

"परित्राणाय साधुनाम् विनाशाय च दुष्कृताम् "

(वर्तमानातील संदेश :Empowering goodness)

भगवतगीतेतील"संभवामि युगे युगे" याचा "सज्जनांचे रक्षण व दुर्जनांचा विनाश करण्यासाठी ईश्वराचे अवतारकार्य" असा सरळ अर्थ आपण जाणतो.

परित्राणाय साधुनाम् विनाशाय च दुष्कृताम् ।

धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।।(४-८)

या संदेशातील गर्भित अर्थ न जाणता अशा संदेशाला लोक शाब्दिक प्रज्ञावाद (Advocacy) करुन वादाचा विषय बनवतात.

अहिंसा दैवीगुणसम्पत्ति सांगणाऱ्या भगवतगीतेवर हिंसेला प्रोत्साहन देणारे साहित्य अशीही टिका करतात.

शाब्दिक प्रज्ञावाद vs ज्ञान

वर्तमान ज्ञानविज्ञानाचा आहे. ज्ञानविज्ञानाने अशक्य "शक्य" झाले आहे. कृति आणि उक्ति या संदर्भातील ज्ञानी व अज्ञानी भूमिका यातील भेद भगवतगीता स्पष्ट करते. अर्थात बोलल्याप्रमाणे (Committed/नियत) प्रत्यक्षात कृतिचे दर्शन होत नाही तेंव्हा समाज विश्वास गमावतो. व याच मुद्याला भगवतगीतेने focus केले अाहे. व भगवतगीता ज्ञान जगासमोर आले.

धर्मयुद्ध अर्जुनाचे Committed कार्य होते. पण हेच कार्य टाळण्यासाठी त्याला निषिद्धकार्य ठरवितो. हे सिद्ध करण्यासाठी वाद करतो, तोच प्रज्ञावाद असतो.

मनुष्य चांगला जरी असला तरी सामान्य अवस्थेत त्याची Herd मानसिकता असते. प्रत्यक्ष लढाईत श्रीकृष्णाची भूमिका योध्याची नसुन सारथ्याची असते. अर्थात अर्जुनाला स्वतःच लढायचे असते. स्वतः जीवनाची लढाई न लढता कुणीतरी दुसऱ्यानेच

आपल्यासाठी लढावे ही Herd मानसिकता असते. याच मानसिकतेत भगवतगीतेला बदल अपेक्षित आहे. कोणत्याही मार्गाने असो पण या जगात दिग्मुढ (handicapped )होणे ही Herd मानसिकताच दर्शविते. व या मानसिकतेतुन स्वतःलाच बाहेर यायचे असते. यासाठी भगवतगीता एकच Option देते, Master of your own life.

बंधुरात्मा आत्मनः तस्य येन् आत्मैव आत्मना जितः।
अनात्मनः तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत् ॥(६-६)

Question: Why are we Masters of our Fate, the captains of our souls?

Because we have the power to control our thoughts, our attitudes.

That is why many people live in the withering negative world.

That is why many people live in the Positive Faith world.

Alfred A. Montapert

चांगलेपणा दैवी gift/blessings असते. मनुष्याला स्वतःतील चांगल्या गुणाची ओळख होणे व त्याला शक्ति बनविणे यासाठीच स्वतःवर विश्वास, आत्मवश अर्थात योगयुक्त होणे हा संदेश भगवतगीता देते. या स्थितित मनुष्य ईश्वराचा भक्त बनुन ईश्वराचेच कार्य (On behalf of God) करीत असतो हा संदेश भगवतगीता देत आहे.

"उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मा एव मे मतम् ।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम् ॥(७-१८)

"मत्कर्मकृत मत्परमो मद् भक्ताः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥"(११-५५)

या भक्ताच्या भूमिकेला Spiritual leadership असे संबोधता येईल. या अर्थाने जणु ईश्वराचा प्रतिनिधीच असतो. वर्तमानातील समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी अशाच प्रतिनिधींची(Leadership/योजक) समाजाला नित्य गरज असते.

"The work an unknown good man has done is like a vein of water flowing hidden underground, secretly making the ground green. "

Thomas Carlyle

********

(४. ८) : "संभवामि युगे युगे "

"संभवामि युगे युगे " याचा "सज्जनांचे रक्षण व दुर्जनांचा विनाश करण्यासाठी ईश्वराचे अवतारकार्य" असा सरळ अर्थ आपण जाणतो.

परित्राणाय साधुनाम् विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे॥(४-८)

या संदेशातील गर्भित अर्थ न जाणता अशा संदेशाला लोक शाब्दिक प्रज्ञावाद (Advocacy) करुन वादाचा विषय (एका राष्ट्रात हा वाद "हिंसा" या विषयावर गाजला होता) बनवतात. समाज आधीच वादाने ग्रासलेला असतो. या वादाच्या

चिखलातुन मनुष्याला कमळाप्रमाणे आपले जीवन फुलवायचे असते. हे जीवनाचे सत्य जाणले तर "संभवामि युगे युगे" या संदेशाचे महत्व आपोआप कळेल.

 समाजात सज्जन लोक असुनही, धर्मज्ञान असुनही, स्थिति अधर्मसदृश कां होते? समाजात भ्रम निर्माण झाला तर सज्जन लोक कुणीतरी अवतार येईल याची वाट पहात राहत असतात. समाजात टिकात्मक भाष्याची (नकारात्मक) रेलचेल होत असते. बोलल्याप्रमाणे (Committed/नियत) प्रत्यक्षात कृतिचे दर्शन होत नाही. समाज विश्वास गमावतो. व याच मुद्याला भगवतगीतेने focus केले अाहे. व भगवतगीता ज्ञान जगासमोर आले.

मनुष्य चांगला जरी असला तरी सामान्य अवस्थेत त्याची Herd मानसिकता असते. यांत बदल भगवतगीतेला अपेक्षित आहे. कोणत्याही मार्गाने असो पण या जगात दिग्मुढ (handicapped )होणे ही Herd मानसिकताच दर्शविते. व या मानसिकतेतुन स्वतःलाच बाहेर यायचे असते. यासाठी भगवतगीता एकच Option देते,

Master of your own life.

Question: Why are we Masters of our Fate, the captains of our souls?

Because we have the power to control our thoughts, our attitudes.

That is why many people live in the withering negative world.

That is why many people live in the Positive Faith world.

◌̆Alfred A. Montapert

चांगलेपणा दैवी gift/blessings असते. मनुष्याला स्वतःतील चांगल्या गुणाची ओळख होणे व त्याला शक्ति बनविणे यासाठीच स्वतःवर विश्वास, आत्मवश अर्थात योगयुक्त होणे हा संदेश भगवतगीता देते.

काळ बदलला आहे. ज्ञानविज्ञानाने अशक्य "शक्य" झाले आहे. पण कृति आणि उक्ति या संदर्भातील ज्ञानी व अज्ञानी भूमिका यातील भेद मात्र जगात फक्त भगवतगीताच स्पष्ट करते.

"उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मा एव मे मतम् ।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम् ।।(७-१८)

"मत्कर्मकृत मत्परमो मद् भक्ताः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव।।"(११-५५)

या स्थितित मनुष्य जणु ईश्वराचे प्रतिनिधित्व (On behalf of God)करतो हा संदेश भगवतगीता देत आहे. वर्तमानातील समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी अशाच प्रतिनिधींची समाजाला नित्य गरज असते.

***********

(४-८):
"धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे"
(अर्थात आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च)

विश्वातील नियंत्रण या संदर्भात ईश्वराची भूमिका अध्यक्षाची असते. ईश्वराचे नियंत्रण धर्माच्या माध्यमातुन होते. जेंव्हा अधर्माचा उदय होतो. अर्थात चांगलेपणा दुबळा ठरतो, तेंव्हा चांगलेपणाचे रक्षण करण्यासाठी ईश्वराची भूमिका सक्रिय असते.

परित्राणाय साधुनाम् विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।।(४-८)

महाभारतासंदर्भात बोलायचे तर चांगलेपणा (अर्जुन) दुबळा झाला. याच चांगलेपणाला सक्षम करण्यासाठी भगवतगीता आली. अर्जुनाच्या माध्यमातुन ईश्वर आपले कार्य पार पाडतो.
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्।(११-३३)

वर्तमान व (भगवतगीता )ज्ञान

"ज्ञान "या संदर्भात ईश्वराची भूमिका, विश्वाचे संचलन व्यवस्थापन भगवतगीतेत स्पष्ट झाले आहे. ईश्वर सर्व विश्वाचे मुळ, ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत जाणुन मनुष्य आपला जीवनविकासमार्ग

(अमृतत्वाय कल्पते) ठरवु शकतो. अनन्यभक्ति साध्य करु शकतो.

भक्त्या तु अनन्यया शक्य अहं एवं विधोअर्जुन।

ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप॥(११-५४)

समाजात धनशक्ति, राजकिय शक्ति(राज्य) याचा Influence असतो. याच राज्यासाठी धर्मयुद्ध ठरले असते. वर्तमानातही पैसा, राजकिय शक्ति यांचा influence असतो. ज्या राज्यासाठी युद्ध ठरले, ते राज्यच मला नको ही अर्जुन भूमिका घेतो. अर्जुन आपल्या सुखदुःखाच्या सोयीने धर्म-अधर्म ठरवितो. येथे प्रश्न राज्याचा नसतो, तर चांगलेपणाच्या दुर्बलतेचा असतो. अर्जुनाला संदेश मिळतो.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

चांगले व वाईट अनुक्रमे दैवी व असुरी गुणसंपत्ति अशी विभागणि भगवतगीतेत केलेली आहे.

असुरीगुणसंपत्तिचा जगतहीताशी कांहीही संबंध नसतो. उलट प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे जगतकल्याणविरोधी भाव असतो.

असत्यं अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनीश्वरम् ।

अपस्परसंभूतं किम् अन्यत् काम हैतुकम् ।।(१६-८)

एतां दृष्टिम् अवष्टभ्य नष्टात्मानो अल्पबुद्धयः।

प्रभवन्ति उग्रकर्माणः क्षयाय जगतो अहिताः।।(१६-९)

याचाच अर्थ आसुरी प्रवृत्ति अध्यात्मविरहीत असते . भगवतगीता "आत्मनो मोक्षार्थ " या संदर्भात "उद्धरेत् आत्मना आत्मानम् ", मोक्षकाङ्क्षि असे भाष्य करते. जीवनमार्ग या संदर्भात "अमृतत्वाय कल्पते" व जीवनविकास या संदर्भात" योगः कर्मसु कौशलम्" असे भाष्य करते .

"जगतहिताय" या संदर्भात धर्मस्थापना, सर्वभूतहीतेरतः या शब्दांचा उल्लेख आलेला आहे. जीवनविकास व जगतहीत या संदर्भात ज्ञानविज्ञानासह अध्यात्माचा उपयोग केलेला आहे. धर्मस्थापना म्हणजेच शोषणविरहीत समाजव्यवस्था ज्याची ओळख "आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च" अर्थात आध्यात्मिक/शाश्वत समाजव्यवस्था येथे अभिप्रेत आहे.

वर्तमानात ज्ञानविज्ञान आले तरी समाजात शोषण आढळते व चांगलेपणा दुबळा ठरत आहे असे प्रत्यक्षात चांगले लोक बोलुन दाखवतात. याचाच अर्थ अध्यात्माशिवाय ज्ञानविज्ञान अधुरे आहे. म्हणुन शोषणविरहीत समाजव्यवस्थेच्या निर्मितीसाठी अध्यात्माचा उपयोग आवश्यक ठरते. व जीवनविकास या

संदर्भात "आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च " हा भाव महत्वाचा ठरतो. याच संदर्भात भगवतगीतेचा संदेश आहे,

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

सार:

ईश्वरच सृष्टि चालवतो, त्याच्या इच्छेशिवाय पानही हलत नाही. हे जर मान्य केले तर जगात वाईट कृत्य कां होतात?शोषण कां ?असे प्रश्न वर्तमानात होत असतात.

"एक राजा साधुला आपल्या राज्यामधील आपले कर्तृत्व दर्शवितो. भ्रमण करीत असता गरीब दरिद्री लोकांची झोपडपट्टी आढळते. याचे कारण साधु विचारतो. हे त्यांचे नशीब आहे असे राजाकडुन उत्तर मिळते. "

वर्तमानात "ज्ञानविज्ञान " या संदर्भातअशाच प्रकारचे उत्तर (लोकसंख्या जास्त आहे!भ्रष्टाचार आहे!राजकारण घाणेरडे आहे! जगातील बलाढ्य राष्ट्र नियंत्रण ठेवतात!लोक कामचुकार आहेत इ. ) विद्वानही बोलुन दाखवतात, तेंव्हा असे भाष्य ज्ञानविज्ञानाच्या भूमिकेलाच आव्हान देत असते हे लक्षात घेतले पाहीजे. हेच आव्हान भगवतगीता स्विकारते. अर्थात अध्यात्माशिवाय ज्ञानविज्ञान अधुरे ठरते.

********

(४-९)

************************

जन्मकर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ति तत्वतः।

त्क्त्वा देह पुनर्जन्म नैति मामेति सोअर्जुन।

************************

*

(४-९):"जन्मकर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ति तत्वतः"

(The philosophy of Change)

भगवतगीता विकासासाठी "Change/बदलाव " highlight करीत आहे, या संदेशावर विचार केंद्रीत केला तर" बदलाव "संदर्भात ईश्वराची भूमिका, ईश्वराचे जन्म (अवतार) व कार्य याचे वर्णन "यदा यदा हि धर्मस्य" या संदेशातुन स्पष्ट केले. जेंव्हा धर्माला ग्लानी आली अर्थात अधर्म वाढला तेंव्हा अवतारकार्य घडले. समाजात बदलाव आणला. "बदलाव" या संदर्भातील मार्गदर्शनासाठी श्रीकृष्ण अवतार झाला व भगवतगीता जगासमोर आली.

धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।(४-८)
जन्मकर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ति तत्वतः।(४-९)

संघर्ष:

विज्ञानाची प्रगति, राजकिय उलथापालथी, लोकसंख्येतील वाढ इत्यादि कारणामुळे सृष्टित व समाजात बदल होत असतात. हे बदल वर्तमानातील प्रस्थापित व्यवस्थेला, मानवी परस्पर संबंधांना अर्थात मानवी मुल्यांना आव्हान देत असतात. अर्थात हा संघर्ष पारंपरिक मानसिकता व वर्तमानात आवश्यक असलेली मानसिकता यातुन प्रकट होतो.

क्रांति:

समाजशास्त्रे असो, तत्वज्ञान असो कि ज्ञानविज्ञान यातील संशोधन नवविचाराचा उदय करीत असते. जेंव्हा हे संशोधन प्रस्थापित धर्म किंवा मुलतत्ववादी विचाराशी लढा देण्याचे कारण ठरते तेंव्हा हा लढाच क्रांति ठरत असतो. भगवतगीतेतील लढा ही आध्यात्मिक क्रांतिच आहे. ही क्रांति बाह्य बदलाव व आंतर्गत(मानसिक) बदलाव यांचा समन्वय साधत असते.

ज्या ईश्वराचा मनुष्याच्या मनोविज्ञानाशी (मानसिकता) संबंध आहे त्या ईश्वराची ओळख "ज्ञान" या अर्थाने भगवतगीता करुन देते. जगातील बाह्य कार्यात ईश्वराची भूमिका विश्वरुपातुन प्रकट होते. अर्जुनाचा आंतर्गत संघर्ष (Internal battle) व बाह्य लढा(External battle) यांचा समन्वयच भगवतगीतेने "लढाई"रुपाने साधलेला आहे.

अर्जुनाचा मानसिक संघर्ष:

अर्जुन नियतकार्य दुःखदायी आहे म्हणुन टाळतो. व त्याला धर्माची भूमिका(धर्मगति) दर्शवितो. ठरल्याप्रमाणे नियतकार्य केले तर अधर्म वाढेल ही त्याची भूमिका असते.

"Faced with the choice between changing one's mind and proving that there is no need to do so, almost everyone gets busy on the proof. "

-John Kenneth Galbraith

अर्जुन Comfort zone मध्ये असतो. अर्जुनाला जीवनविकासातील " बदलाव" याचे अज्ञान असते. येथेच Higher level चे ज्ञान मिळते.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

“Life begins at the end of your comfort zone. ”

~ Neale Donald Walsch

या मार्गावर निर्भय होवुन विश्वासाने कार्य करतो. यासाठी ईश्वरभक्तिसाठी निष्काम कर्म प्रयोजन स्पष्ट होते. ज्या भयामुळे Comfort zone मध्ये असतो, त्याच भयाचे Courage(Courage to change) मध्ये रुपांतर होते. अर्थात निर्भय होतो. या मार्गावर योग(दुःखान्त, विचलित न होणे) शक्तिची साधना होते व भयावर विजय मिळतो.

"What we achieve inwardly will change outer reality. "

Plutarch

***********

(४-१०)

************************

वीतरागभयक्रोधा मन्मया माम् उपाश्रिताः।

बहवो ज्ञानतपसा पूता मद् भावम् आगताः।।

************************

(४-१०) :

" वीतरागभयक्रोधा मन्मया माम् उपआश्रिताः"

(ईश्वराचा आश्रय:आध्यात्मिक व्यवस्थापनाचा आधार)

मनुष्यजीवन, विश्व व ईश्वर याचे नाते भगवतगीता स्पष्ट करते.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेअर्जुन तिष्ठति।

भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

विश्वाचे संचलन याला सृष्टिचक्रप्रवर्तन संबोधले आहे.

व्यवस्थापन या संदर्भात यज्ञरुपी कर्म या चक्रप्रवर्तनास सहकार्य करीत असते.

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।

कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।(४-३२)

या संचलनात ईश्वराची ओळख अध्यक्ष अशी असते. जितका मोठा कारभार तशी यंत्रणा उपलब्ध असते. यात अध्यक्ष अकर्ता असतो.

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।(९-१०)

तस्य कर्तारम् अपि मां विद्धी अकर्तारम् अव्ययम् ।(४-१३)

अध्यक्ष केंव्हा व कां हस्तक्षेप करतो हाच जाणण्याचा विषय आहे. याच ईश्वराचा आश्रय जीवनमार्गात करणे हा आध्यात्मिक व्यवस्थापनाचा विषय बनतो.

जन्म कर्म च मे दिव्यम् एवं यो वेत्ति तत्वतः।(४-९)

...

वीतरागभयक्रोधा मन्मया माम् उपाश्रिताः।

बहवो ज्ञानतपसा पूता मद् भावम् आगताः।।(४-१०)

अर्थात (विविधप्रकारे)ईश्वराचे ज्ञान जाणुन जीवनात ईश्वराचा आश्रय करतो, या ज्ञानाने मार्गात Detachment (अनासक्ति/वीतराग) असते. भयमुक्त, क्रोधमुक्त असतो. ईश्वराला भजतो व याच (ईश्वराच्या)भावात विलनीकरण होते.

सिमित काळासाठी मनुष्य जीवन असले तरी त्याचे अनंत शक्तिशी नाते आहे. पण मनुष्य हे नातेच (अज्ञानामुळे, अहंकारामुळे)विसरतो. व हे जीवन केवळ भोगऐश्वर्यासाठी आहे हे समजुन दुःखी होतो. मनुष्याची जीवनयात्रा कर्माद्वारे व्यवस्थापनच असते. (State of want- State of Art)या व्यवस्थापनात सकाम कार्य असते. याच व्यवस्थापनात ईश्वराचा आश्रय झाला

तर ते आध्यात्मिक व्यवस्थापन होते. कार्य निष्काम होते. याच आध्यात्मिक व्यवस्थापनाचे ज्ञान भगवतगीता देत आहे.

*ईश्वराची कृपा : अज्ञानमुक्ति, दुःखमुक्ति, बुद्धियोग, स्थिरबुद्धि, शान्ति

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

प्रसादे सर्वदुःखानां हानिः अस्य उपजायते।
प्रसन्नचेतसो हि आशु बुद्धिः पर्यवतिष्ठते।।(२-६५)

शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थाम् अधिगच्छति।(६-१५)

*Higher consciousness :

मनुष्याला व्यक्तिगत सुखदुःख आहे. व याचाच संबंध त्याच्या Consciousness शी आहे.
कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृति उच्यते।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते।।(१३-२०)

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥ (२-१५)

*अकर्ता : Detachment

तस्य कर्तारम् अपि मां विद्धि अकर्तारम् अव्ययम् ।(४-१३)

न आदत्ते कस्य चित् पापं न चैव सुकृतं विभुः।

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।।(५-१५)

*सकारात्मक विचार:

तस्मात त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व।(११-३३)

*ईश्वराचे कार्य, भक्ति

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्ताः संगवर्जितः।(११-५५)

*चांगलेपणाला प्रोत्साहन, रक्षण, मार्गदर्शक

परित्राणाय साधुनाम् विनाशाय च दुष्कृताम्।

धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे॥(४-८)

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

सार :

ईश्वराचे अवतारकार्य, त्याचा उद्देश भगवतगीतेत स्पष्ट झाला आहे. पण याचबरोबर या अवतारकार्याचे ज्ञान जाणुन मनुष्याला त्याच ईश्वराशी नाते जोडायचे आहे, जे नाते मुळातच आहे पण चांगल्या मनुष्यालाही अज्ञानामुळे/अहंकारामुळे या नात्याचा विसर पडतो. जीवनात दुःख जाणवते. जीवन व्यर्थ वाटते. असेच Frustration अर्जुनाला आले होते. या Frustration वर विजय मिळविण्यासाठीच भगवतगीता जगासमोर आली.

"Your visions will become clear only when you can look into your own heart. Who looks outside, dreams; who looks inside, awakes. "

Carl Jung

*********

४-१० :

"बहवो ज्ञानतपसा पूता मद् भावम् आगताः"

(Power of Creator)

ये यथा मां प्रपद्यन्ते तान् तथैव भजाम्यहम्।

मम वर्त्म अनुवर्तन्ते मनुषः पार्थ सर्वशः।।

We were born into this world and formed in the likeness and similitude of The Creator.

अर्थात ईश्वराची जशी ओळख असते, तसे मनुष्य ईश्वराला भजतो. सर्वार्थाने ईश्वराचेच अनुसरण करतो.

यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम् ।(१८-४६)

ईश्वर सृष्टिचा कर्ता या नात्यानेच ईश्वर व मनुष्याचे नाते भगवतगीता स्पष्ट करते. या विश्वात ज्या शक्तिचे दर्शन होते, त्या सर्व शक्ति ईश्वराच्या अंशापासुन निर्माण झालेल्या असतात.

विष्टभिः अहं इदं कृत्स्नं एक अंशेन स्थितो जगत् ।(१०-४२)

ईश्वराशी नाते म्हणजे या अपरिमीत शक्तिशी नाते असते. तर ईश्वराची भक्ति म्हणजे या शक्तिची साधनाच असते. याच ईश्वराचे दिव्य जन्म, कर्म तत्वतःजाणणारा ईश्वराच्या दिव्य भावात मिळुन जातो.

जन्मकर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ति तत्वतः।..

वीतरागभयक्रोधा मन्मया माम् उपाश्रिताः।

बहवो ज्ञानतपसा पूता मद् भावम् आगताः॥(४-१०)

अर्जुनाला अर्थात मानवाला याच ईश्वराच्या भक्तिचा हेतु व शास्त्र भगवतगीता सांगत आहे. याचे कारण प्रथम जाणुन घेणे आवश्यक आहे.

तं तथा कृपयाविष्टम् अश्रुपूर्णा कुलेक्षणम् ।

विषीदन्तमिदं वाक्यम् उवाच मधुसुदनः॥(२-१)

"Mental poverty can spread like an uncontrollable forest fire if you do not stop the mindset in its tracks. This negative mindset can be passed along to your progeny if you do not fight to control it. "

जसा एखाद्या विषाणुला, मनुष्याने नियंत्रित केले नाही तर वनातील आगीप्रमाणे पसरत असतो. तद्वतच दुबळी मानसिकता व नकारात्मक विचार पसरत असतात. याला नियंत्रित केले नाही तर त्याच्या पुढील पिढीत संक्रमित होवु शकतात.

सार :

मनुष्यजन्म सर्वश्रेष्ठ आहे हे खरे असले तरी तो दुःखालयातच जन्माला आलेला आहे. जगतअसतांना मार्गात दुःख, अडथळा आला कि ते टाळण्यासाठी निष्क्रिय झाला तर स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो तेंव्हा "नाचता येईना अंगण वाकडे " अशी स्थिति होते. हीच प्रवृत्ति मनुष्याला नकारात्मक करीत असते व नकारात्मकतेचा विषाणु जगात पसरवीत असते. या प्रवृत्तिवर मात करण्यासाठीच ज्ञानाचा आश्रय भगवतगीता सांगते.

जगात ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे. ज्ञानानेच सर्व अडथळ्यावर मात केली आहे. व मनुष्याला विकासमार्ग दर्शविला आहे. जीवनमार्गात ज्ञानाचा आश्रय होण्यासाठीच ईश्वराचा आश्रय भगवतगीतेने सांगितलेला आहे. याची सर्व विद्वानांनी नोंद घेतली पाहीजे. अर्थात नकारात्मक प्रवृत्तिच्या विषाणुवर मात करण्यासाठी ईश्वराचा आश्रय सांगितला व ज्ञान या संदर्भात ईश्वराची ओळख दिली.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम् -योगसंन्यस्त कर्माणं

*********

(४-११)

*************************

ये यथा मां प्रपद्यन्ते तान् तथैव भजाम्यहम् ।

मम वर्त्म अनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥

*************************

४. ११/१ :

"ये यथा मां प्रपद्यन्ते तान् तथैव भजामि अहं"

(Transformation)

श्रेष्ठत्वाची परिक्षा :

मनुष्याच्या श्रेष्ठत्वाची परिक्षा अडचणीतच होत असते. पांडवांना न्याय मिळावा यासाठी धर्मयुद्ध ठरते. अर्जुन उत्साहाने युद्धक्षेत्रावर येतो. पण दुःखी झाल्यावर हे युद्ध धर्मयुद्ध नसुन अधर्मयुद्ध आहे असे भाष्य करतो. जणु येथे धर्माचीच परिक्षा होते. अर्जुनाला याच परिक्षेचे अज्ञान असते व सरळ दुःख टाळण्यासाठी त्याला जो उपाय सुचतो तसे आचरण करतो, भाष्य करतो.

*सकाम कार्य / द्वंद्ववश/Lower consciousness

व्यवहारात सरळ इच्छापुर्ति या हेतुनेच कार्य करतो. याच Consciousness मध्ये कर्म केले तर सकाम कार्य असते. दुःखी झाल्यामुळे अर्जुनाला योग्य-अयोग्य यात संशय येतो व तो द्वन्द्वाच्या जाळ्यात सापडतो. हा Lower consciousness चा परिणाम असतो.

व्यवहारात काय योग्य, काय अयोग्य?काय चांगले, काय वाईट?कोण योग्य कोण अयोग्य? या सर्वांचाच विचार होतो. सकाम स्थितित द्वंद्व असते. प्रत्यक्ष कार्य करण्यासाठी निर्णय एक असावा लागतो. अर्थात द्वंद्वातुन बाहेर पडावे लागते.

*निष्काम कार्य /Higher consciousness/निर्द्वंद्व

दुःखावर मात करण्यासाठी भगवतगीता ईश्वरभक्ति व यासाठी Higher मार्गाचे (अमृतत्वाय कल्पते) ज्ञान सांगते. या मार्गावर दुःखान्तशक्ति(योग) साधना होते.

मनुष्य जसा ईश्वराला ओळखतो, तसा भक्तिचा मार्ग अनुसरतो.
ये यथा मां प्रपद्यन्ते तान् तथैव भजामि अहं।

मम वर्त्म अनुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः॥(४-११)

सामान्यपणे ईश्वरश्रद्ध लोक कर्मसिद्धिसाठी देवतांची भक्ति करतात.
काङ्क्षतः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः।(४-१२)

Transformation:

ईश्वराचे दिव्य जन्म कर्म जाणणारे "अमृतत्वाय कल्पते" या (मुक्तीच्या) मार्गावर असतात.
बहवो ज्ञानतपसा पूता मद् भावम् आगताः।(४-१०)

या मार्गावर यज्ञभावाने कर्म, निष्काम कर्म भक्तिसाठी करीत असतो. कर्म करुनही अकर्ता भाव याला "युक्त" संबोधले आहे. ईश्वरज्ञानाने कर्म दग्ध होतात.
ज्ञानाग्नि दग्धकर्माणं तम आहुः पंडितं बुधाः।(४-१९)

ज्ञानाने कर्म अकर्म होणे याला ज्ञानकर्मसंन्यासयोग संबोधले आहे. (ज्ञानाचा कर्मात उपयोग व कर्माचे ज्ञानात विलिनिकरण)

अर्थात व्यवहारातील (सकाम कार्य) मार्ग "अमृतत्वाय कल्पते" या मार्गात Transform करणे आवश्यक असते.

"True strength lies in submission which permits one to dedicate his life, through devotion, to something beyond himself. "

Henry Miller

सार:

ज्ञान या संदर्भात ईश्वराची ओळख भगवतगीता देत आहे. ज्ञानच जगात सर्वश्रेष्ठ आहे. कर्म जीवनविकासाचे साधन आहे. ज्ञानाचा कर्मात उपयोग व कर्माचे ज्ञानात विलिनिकरण ही कला साध्य करण्याचे ज्ञान भगवतगीता सांगत आहे.

******

(४. ११/२):

"मम वर्त्म अनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः"

'लोक सर्वार्थाने माझाच मार्ग अनुसरतात' हेच verse (वाक्य) भगवतगीतेत दोनदा आलेले आहे.

१. श्रीकृष्णाची" मनुष्य" ही ओळख व

२. "ईश्वर "ही ओळख

१. (श्रेष्ठ)मनुष्य "ओळख:

कः मार्ग? हा प्रश्न यक्ष धर्मराजाला करतो. धर्मराज उत्तरतो, जो मार्ग श्रेष्ठ मनुष्य आचरण करतो. याचेच अनुसरण सर्वसामान्य लोक करतात.

श्रेष्ठ जो मार्ग आचरण करतात, त्याचेच अनुसरण सामान्य लोक करतात. म्हणुन सामान्यांनी कसे आचरण करावे यासाठी श्रेष्ठांनी स्वतः आदर्श ठेवावा. यासाठी श्रीकृष्ण स्वतःचे उदाहरण देतात.

यदि ही अहं न वर्तेयं जातु अकर्मणि अतंद्रितः।

मम वर्त्म अनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः।।(३-२३)

अर्थात मी निष्क्रिय झालो तर लोक माझा मार्ग अनुसरुन आळशी होतील. सामान्यांना योगक्षेमासाठी कार्याचीच गरज असते. म्हणुन

श्रेष्ठांनी (कर्माची गरज नसली तरी) आदर्शासाठी कर्म करावे. सामान्यांना निष्क्रिय करुन बुद्धिभेद करु नये.

अर्थात निष्क्रियतेचे समर्थन करणे श्रेष्ठांसाठी अयोग्य आहे. अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी धर्मज्ञान वापरतो. याच पार्श्वभुमिवर भगवतगीतेने जीवनविकासात कर्माला प्राधान्य दिले व मनुष्याची सामान्य व श्रेष्ठ अवस्था यातील भेद स्पष्ट केला. अर्जुनाची (दुःखी) भूमिका श्रेष्ठांना अशोभनिय आहे असे दर्शवुन दिले व श्रेष्ठ भूमिकेचे ज्ञान सांगितले.

२. "ईश्वर"ओळख

ये यथा मां प्रपद्यन्ते तान् तथैव भजाम्यहम् ।

मम वर्त्म अनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥(४. ११)

मनुष्य ईश्वराला जसा ओळखतो(ज्या भावाने ओळखतो) तसा भजतो. या लोकी ईश्वराला देवतारुपात कर्माच्या फलसिद्धिसाठी भजत असतात.

काङ्क्षतः कर्मणां सिद्धि यजन्त इह देवता।(४-१२)

अर्जुनाला ईश्वराची मुळ ओळख करुन दिली .

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुम् आश्रितम् ।

परं भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।।(९-११)

धर्मस्थापनेसाठी याच ईश्वराने (तत्कालिन) वर्तमानात मनुष्यरुपात अवतार घेतला आहे, ही श्रीकृष्णाने स्वतःची ओळख दिली. मनुष्य, जगत व ईश्वर यांचे नाते स्पष्ट केले.

जन्म कर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ति तत्वतः।

त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सो अर्जुन।।(४-९)

सृष्टिच्या शाश्वत संचलनात(सृष्टिचक्र, जगतहिताय) ईश्वराची ही "कर्ता" भूमिका असते. हे कर्तेपण प्रकृतिच्या माध्यमातुन घडवुन आणतो. म्हणुन ईश्वर स्वतः कर्ता असुनही अकर्ता असतो.

तस्य कर्तारम् अपि मां विद्धि अकर्तारम् अव्ययम् ।(४-१३)

हा ईश्वरभाव (ईश्वराचे दिव्य जन्मकर्म) जाणुन श्रेष्ठ मनुष्य माझेच कार्य करतो व स्वतःला अकर्ता जाणतो.

न आदत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः।

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यंति जन्तवः।।(५-१५)

अर्जुन मोहामुळे अस्थिर होतो. त्याची बुद्धि काय योग्य? याचा निश्चय करु शकत नाही. (परिणामतः दुःख टाळण्यासाठी युद्ध करणे अयोग्य ठरवितो. ) अर्थात बुद्धि भ्रम पावते. शेवटी अर्जुन म्हणतो, "नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा"

* याप्रमाणे श्रेष्ठ अवस्थेत मनुष्य स्वतःचे जीवन जाणतो. स्वतःच्या बुद्धिचा वापर करतो. स्वतःच्या मार्गाची जबाबदारी स्विकारतो. मार्गावर असतांना (दुःखाने) विचलित होत नाही. विश्वासाने मार्ग चालत असतो. त्याचा स्वतःवर विश्वास असतो.

आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम् ।(७-१८)

अर्थात ज्ञानी ईश्वराच्या उत्तम गतित असतो.

*व्यावहारिक बोध :

जगाचा इतिहास कर्तृत्वाने घडलेला असतो. कार्य करणे ही प्रकृति आहे. जीवंतपणातच ईश्वराचे रहस्य आहे. प्रकृति व ईश्वर याद्वारा सृष्टि संचलित असते. स्वतःच्या जीवनाचे संचलन स्वतःचे क्षेत्र आहे. या संचलनात दुःखी (चिंता, निराश, भयग्रस्त) होणे, निष्क्रियतेचे समर्थन करणे, नकारात्मक असणे, अज्ञानाला ज्ञान दर्शविणे हे चांगल्या मनुष्यासाठी अज्ञान ठरते. या अज्ञानामुळे बुद्धिभ्रम होतो. चांगलेपणाची जगाला गरज असते. पण अज्ञानामुळे त्याने स्वतःलाच निष्प्रभ केले असते. ही प्रकृतिचीच खेळी असते. म्हणुन चांगल्या मनुष्याचे अज्ञान, भ्रम दुर करण्यासाठी जीवनाचे श्रेष्ठत्व जाणणे हा भगवतगीतेचा विषय बनला.

***********

(४-१२)

************************

कांङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः।

क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिः भवति कर्मजा।।

************************

(४. १२):

"काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः"

कांङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः।

क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिः भवति कर्मजा।।(४-१२)

ईश्वरभक्ति या संदर्भात लोक कर्मसिद्धिसाठी देवतांना भजतात.

मनुष्य जीवनात प्रत्यक्ष व्यवहारात कार्यरत असतो. स्वभावप्रकृतिनुसार कार्य घडत असते. हाच त्याचा प्रत्यक्षातील जीवनमार्ग असतो. याच मार्गात अर्जुन (परिणामभय दिसल्यामुळे)

दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेला "ज्ञान" संबोधतो. येथे परिणाम/कर्मफल यावर लक्ष केंद्रित होते.

जीवनांत प्रश्न असतात. अमुक प्रश्न सुटला तर जीवनात सुख मिळेल या मानसिकतेने मनुष्य जगतो. पण पुनः दुसरा प्रश्न तयार होतोच व जीवन प्रश्न सोडविण्यात busy होते.

"अन्यायाचा" प्रश्न सोडविण्यासाठी महाभारत युद्ध ठरले होते. हा प्रश्न सुटला तरी दुःखाचा प्रश्न तयार होईल, या भयानेच अर्जुन दुःखी होतो, भ्रमित होतो. अर्थात प्रश्न सुटण्यापुर्वीच दुसरा प्रश्न तयार होतो. जीवनात प्रश्नाची शृंखला संपत नाही! म्हणुन "सुखी जीवनाचा मार्ग" या संदर्भात वर्तमानातील मानसिकता यावर भगवतगीता लक्ष केंद्रित करते. याच संदर्भात फलाकांक्षि मानसिकता व बुद्धियोगी मानसिकता यांतील भेद स्पष्ट करते.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न चअभावयतः शांतिःअशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

संस्कारीत बुद्धि या संदर्भात "बुद्धियुक्त" प्रावधान आहे. व्यवहारात जगतांनाच अर्जुन फलाकांक्षि मानसिकतेमुळे दुःखी

होतो. म्हणुन जीवनमार्गातील सकाम (फलाकांक्षि) vs निष्काम (मोक्षाकांक्षि) या मानसिकतेतील भेद भगवतगीता स्पष्ट करते. हा भेद नाव तुफानी वाऱ्याच्या स्वाधिन करणे व निश्चित दिशेने नाव वल्हविणे या उदाहरणाद्वारे स्पष्ट केला आहे.

तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि।(२-६७)

याच आधारावर स्वर्गइच्छा फलाकांक्षि मानसिकता म्हटले आहे व "बंधन-मोक्ष " या संदर्भात मोक्षाकांक्षि मार्गाचे महत्व स्पष्ट करते. फलाकांक्षि सोच बंधन असते तर मोक्षाकांक्षि सोच स्वतंत्र करते. हेच Transformation होण्यासाठी बुद्धियोग प्रावधान आहे.

भगवतगीता मुळ, शाश्वत (अव्यय)ईश्वराची ओळख ज्ञानविज्ञानासह स्पष्ट करते. सर्व सृष्टिचा अध्यक्ष, गतिर्भता, प्रभु, साक्षी अशी ईश्वराची ओळख आहे. याच ईश्वराच्या भक्तिने बुद्धियोग प्रदान होतो. अर्थात मनुष्याची जीवनयात्रा शाश्वत विकासमार्गावर(अमृतंगमय) असते. अर्थात निश्चित दिशेने नाव वल्हवितो.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

मनुष्याची देवताभक्ति ईश्वरश्रद्धा सिद्ध करते. (यजन्ते सात्विका देवान्). अव्यय ईश्वराचे चिंतन कसे करायचे? हा अर्जुनाचा प्रश्न

असतो. तेंव्हा सर्वच देवता ईश्वराच्या विभूति आहे हे भगवतगीता स्पष्ट करते.

*आदित्यानाम् अहं विष्णुः(१०-२१)

*रुद्राणाम् शंकरश्च अस्मि(१०-२३)

*अवतारपुरुष:

रामः शस्त्रभृताम् अहं (१०-३१)

वृष्णीनां वासुदेवः अस्मि(१०-३७)

*(लक्ष्मी, सरस्वती)किर्तिः श्रीः वाक् च नारीणां(१०-३४)

*(गायत्री मंत्र) गायत्री छंदसाम् अहं(१०-३५)

याप्रमाणे देवताभक्ति या संदर्भात भगवतगीतेने कोणताही वाद निर्माण केला नाही तर यांतील Strength चा (ईश्वरश्रद्धा/सत श्रद्धा, बुद्धियोगासाठी विभूतिचिंतन) जीवनविकासात उपयोग स्पष्ट केला.

"सदा वसंतम् हृदयारविंदे"

*******

(४-१३)

************************

चातुर्वण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।

तस्य कर्तारम् अपि मां विद्धि अकर्तारम् अव्ययम्।

************************

(४-१३)

" तस्य कर्तारम् अपि मां विद्धि अकर्तारम् अव्ययम् "

(कर्ता, अकर्ता यांचे Logic)

कर्ता या शब्दाला Self, व्यक्तिमत्व या अर्थाने भगवतगीतेने Define केले आहे.

मुक्तसंगो अनहंवादी धृति उत्साहसमन्वितः।

सिद्धिअसिद्धोः निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते॥(१८-२६)

अर्थात विकास या संदर्भात अहंकार नसलेला पण साहसी, उत्साही, निष्काम कार्यरत असलेला असतो.

जबाबदारी स्विकारणारा आपला अधिकार जाणतो, मार्गात अडथळयामुळे विचलित होत नाही, विकाससंधी जाणतो. श्रीरामाला वनवास मिळाला असता त्यांत संधी दिसली. (जहां मोर बड काजू)

अर्जुन धर्माचा हवाला देवुन जबाबदारी टाळतो. समाजात मनुष्य असेच दैवयोग, धर्म इतकेच काय ईश्वराचा हवाला देवुन जबाबदारी टाळत असतो. कर्ता-अकर्ता यांत त्याचा गोंधळ होतो.

"एक राजा साधुला आपली कर्तबगारी दर्शविण्यासाठी राज्यात भ्रमण करवितो. मंदिरे, धर्मशाळा दाखवतो. साधुला वाटेत दारिद्र्याने कुपोषित वस्ती दिसते. साधु कारण विचारतो. राजा म्हणतो, हे त्यांचे पुर्वजन्मीचे पाप आहे. "

"कर्ता" या संदर्भात यशाचे श्रेय स्वतःकडे व अपयशाचे खापर इतरावर फोडणे ही संवय समाज अनुभवत असतो. तसेच स्वतःला कर्ता जाणुनच अर्जुन आपल्या निष्क्रियतेला धर्म संबोधतो. अहंकारामुळे हा गोंधळ होतो.

अहंकारविमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।

मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वाम् नियोक्ष्यति।।(१८-५९)

हा गोंधळ दुर करण्यासाठी अध्यात्मज्ञान भगवतगीता सांगत आहे. स्वतःचे अस्तित्व हाच विषय अहंकाराचा होतो तेंव्हा "स्व " अशाश्वत असते. हा विषय अध्यात्माचा होतो तेंव्हा "स्व"चे शाश्वताशी नाते स्पष्ट होते. येथे ईश्वराची ओळख आहे, त्या ईश्वराचे मनुष्याशी नाते स्पष्ट होते. व जीवनविकासात याच ईश्वराचा आश्रय करुन कर्ता-अकर्ता यांतील भेद स्पष्ट होतो.

कर्ता (Attachment) व अकर्ता (Nondetachment)

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्।(९-१०)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।

भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

संपुर्ण प्रकृति त्रिगुणानुसारच कार्यरत असते. या प्रकृतिचे movemenet ईश्वराच्या उर्जेमुळे होते. जसे यंत्र उर्जेवर चालतात. या ज्ञानामुळे कर्म व त्याचे परिणाम(फल) हे मनुष्याला संशयाने विचलित करीत नाही. म्हणुन म्हटले,

तस्य कर्तारम् अपि मां विद्धि अकर्तारम् अव्ययम्।(४-१३)

न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा।

इति मां यो अभिजानाति कर्मभिः न स बध्यते।।(४-१४)

बदल:

या सृष्टित(प्रकृति) जे प्रत्यक्षात घडत असते त्या सत्याचा स्विकार करुन आव्हान स्विकारायचे असते. पण या प्रकृतिला वश होवुनच सर्व लोक जगत असतात.

सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप।(७-२७)

म्हणुन ज्ञान या संदर्भात ईश्वराची ओळख (त्याचे दिव्य जन्म व कार्य ) जाणणे आवश्यक असते.

दैवी हि एषा गुणमयी मम माया दुरत्यया।

मामेव ये प्रपद्यन्ते मायाम् एतान् तरन्ति ते।।(७-१४)

"You never change things by fighting the existing reality. To change something, build a new model that makes the existing model obsolete. "

-R. Buckminster Fuller

सार :

कर्ता-अकर्ता हे ज्ञान Detachment - Nondetachment (शाश्वत-अशाश्वत)असे आहे.

मनुष्यजन्म या सृष्टित सर्वश्रेष्ठ आहे. दुःख(अडचणी) रुपाने या जीवनाला सतत आव्हान मिळत असते. मनुष्याच्या श्रेष्ठत्वाच्या संकल्पना भौतिक (भोगैश्वर्य) असतात. यामुळे कर्ता-अकर्ता यांत गोंधळ होतो. यामुळे हताश अवस्थेतही(वास्तव न स्विकारता) मनुष्य स्वतःला ज्ञानी दर्शविण्याचा प्रयत्न करतो. यामुळे विचाराचा नकारात्मक Virus पसरत असतो. हीच चुक अर्जुन करतो. म्हणुन जीवनाचे श्रेष्ठत्व जाणुन घेणे आवश्यक ठरते. यामुळे दुःख (अडचणी) विकासमार्गातील संधी आहे ही जाणिव होईल.

******

(४-१४)

********************

न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा।

इति मां योअभिजानाति कर्मभिः न स बध्यते।।

********************

४. १४(विषय ४६०):

"न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा"

( 'Doer sounds Nondoer')

मनुष्य भगवतगीतेला कोणत्या नजरेने पाहतो, तसे भगवतगीतेचे दर्शन होते. जगतहिताय अशा योग्य नजरेने पाहिले तर Interpretation योग्य होते. चुकीचे Interpretation झाले तर P U T "पुट" तर B U T" बुट" कां नाही? असे प्रश्न उपस्थित होतात. याचमुळे भगवतगीता हिंसेला प्रोत्साहन देते असे अर्थ काढणारेही असतात. प्रत्यक्षात भगवतगीता अहिंसा गुणाला दैवीगुण संबोधित आहे. मार्क ट्वेन म्हणतो,

"Never argue with stupid people, they will drag you down to their level and then beat you with experience. "

तर भगवतगीता म्हणते,

इदं ते ना तपस्काय ना भक्ताय कदाचन्|
न च अशुश्रुसवे वाच्यं न च मां अभ्यसूयति||(१८-६७)

अर्थात श्रीकृष्णाची भक्ति भगवतगीतेला जाणण्याची "नजर " देते. व भगवतगीता जीवनाकडे पाहण्याची "नजर" देते.

वर्तमान ज्ञानविज्ञानाचा आहे. याच ज्ञानविज्ञानाच्या नजरेतुन भगवतगीतेला पाहिले तर ज्ञान म्हणजे काय?हे स्पष्ट होते.

युरोपात वैज्ञानिक क्रांति आली. १५/१६ वे शतक Enlightenment Age/ Age of reasoning असे ओळखल्या गेले. संपुर्ण जगात वसाहतवादाची घोडदौड सुरु झाली. कांही राष्ट्रावर Ruling झाले. एकाच ठिकाणावरुन सर्व सुत्र हलत होते.

मोठमोठ्या कार्पोरेट कंपन्या, त्यांचे कारखाने चालु असतात, तेंव्हा अध्यक्ष अप्रत्यक्षपणे एकाच ठिकाणावरुन सुत्रे हलवितो. संघटन कार्यरत असते. पण संघटक "अकर्ता" भासतो. कर्तृत्ववान मनुष्याच्या या "अकर्ता" भावालाच भगवतगीता नैष्कर्मसिद्धि संबोधते.

न कर्मणाम् अनारम्भान् नैष्कर्म्यं पुरुषो अश्नुते।
न च संन्यसनात् एव सिद्धिं सम् अधिगच्छति॥(३-४)

अर्थात कार्य करुनच कार्य करण्याचा अनुभव येतो. आत्मविश्वास वाढतो. कार्यक्षमता वाढते. अकर्ता भाव जाणतो अर्थात कार्य करीतच मोठा संघटक होतो. अशाच व्यवस्थापनात (देश, संस्था, उद्योग, व्यक्तिगत विकास) कार्यक्षमता महत्वाची ठरते. कर्म या संदर्भात मनुष्याचे कर्तृत्व जगात इतिहास घडवीत असते. म्हणुन कार्यक्षमता मनुष्यजीवनात महत्वाचा विषय असतो. या कार्यक्षमतेचे शत्रु कोण?हे भगवतगीता सांगते व कार्यक्षमतेचे रहस्य स्पष्ट करते.

ईश्वर या मुळप्रवृत्तितुन सृष्टिचे सृजन होते. व्यवस्थापन, योजक(Leadership)विश्वाचे संचलनकार्यात ईश्वराची भूमिका

अध्यक्षाची असते. याच संदर्भात ईश्वराच्या विविध भावाची ओळख भगवतगीतेतुन दिली आहे. ज्या भावातुन ईश्वराला भजतो, त्या भावाची धारणा होते.

वीतरागभयक्रोधा मन्मया माम् उपआश्रिताः।
बहवो ज्ञानतपसा पूता मद् भावम् आगताः॥(४-१०)

येथे ईश्वर कर्ता असतो पण अकर्ता जाणवतो. कर्म किंवा त्याचे फलात आसक्त नसतो. याप्रमाणे ईश्वराला जाणले तर अकर्ता भाव जाणतो. व मुक्ति, शांति अनुभवतो. गृहस्थ असुनही संन्यास अनुभवतो.

न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा।
इति मां योअभिजानाति कर्मभिः न स बध्यते॥(४-१४)

बोध : जगात सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे हा भगवतगीतेचा संदेश आहे. ज्ञानविज्ञान असुनही समाजातील, जीवनातील प्रश्न अनुत्तरीत कां असतात?यावर भगवतगीता प्रकाश टाकते. कार्यक्षमतेला पोषक

अशा सकारात्मक दृष्टितुनच ज्ञानविज्ञान, व ईश्वरभक्तिला भगवतगीता highlight करते.

"No man has the right to be an amateur in the matter of physical training. It is a shame for a man to grow old without seeing the beauty and strength of which his body is capable. "

Socrates

शरीराने Handicapped असले तरी जगात ज्यांनी आपले स्थान निर्माण केले अशा हेलेन केलरचे उदाहरण इतरांना म्हणुनच प्रेरणादायी ठरते.

***********

(४-१४) :

"इति मां योअभिजानाति कर्मभिः न स बध्यते"

(जीवनाची श्रेष्ठ गति(भूमिका)/ज्ञानी)

भगवदगीता जीवनविकासात कर्माचे महत्व सांगते. कर्माचे महत्व जाणले तरच अकर्माचे महत्व(Detachment) कळते. या विश्वात मोठमोठ्या संस्था संचलित असतात. कोणत्याही समुहाचे संचलन (कुटुंब, संस्था, देश इ. )हा व्यवस्थापनकौशल्याचा विषय असतो. सर्व समुह ज्या विश्वात संचलित असतात, त्या विश्वाचा ईश्वर अध्यक्ष असतो. या अध्यक्षाची भूमिका कर्ता असुनही अकर्ता अशी असते. याप्रमाणे ईश्वराची ओळख जाणली तर कर्म-अकर्म कळते.

न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा।
इति मां योअभिजानाति कर्मभिः न स बध्यते।।(४-१४)

कर्माविषयी समाजात सामान्याचे जे ज्ञान असते, ते गरजापुर्ति/इच्छापुर्तिसाठी कार्य अशी असते. यामुळे पैसा असेल तर कर्माची काय गरज? अशीही मानसिकता बनते. "श्रेष्ठता"(मोठेपणा) या संदर्भात पैसा असेल तर इतरांकडुन(Staff) कार्य करुन घेता येते म्हणुन पैसा महत्वाचा!अशा प्रकारच्या धारणा बनतात. यामुळे कर्मगतिचे(गहना कर्मणो गतिः) निश्चित ज्ञान नसते. अर्जुनही म्हणतो, मला राज्य नको मग कर्माची काय गरज?या पार्श्वभुमिवर भगवतगीतेतील ज्ञान ईश्वराचे विश्वातील समुहाचे

व्यवस्थापन व या अनुषंगाने स्वतःच्या मार्गाचे व्यवस्थापन या संदर्भात स्पष्ट होते.

*स्वधर्म

समुहव्यवस्थापन चांगले असेल तर परस्पर सहकार्य असते. समुहाचा विकास होतो. व्यक्तिला नियतकार्य मिळते व या कार्याच्या माध्यमातुन स्वतःचा सर्वांगीण विकास साध्य करतो. याप्रमाणेच समुहकार्यातुन अर्जुनाला नियतकार्य मिळते. स्वतःच्या मार्गाचे व्यवस्थापन या संदर्भात "स्वधर्म" स्वतःचे कर्तव्य ठरते. जीवनमुल्य या अर्थाने स्वधर्म Tiebreaker व Selfapproval असते.

* बुद्धियोग

स्वतःच्या मार्गाचे व्यवस्थापन या संदर्भात बुद्धियोग बुद्धितील Blockage दुर करते. ईश्वर शाश्वत आहे. ज्याचा अंश प्राणतत्वात वास करीत आहे. आत्मोन्नति या संदर्भात जीवनयात्रा "अमृतत्वाय कल्पते" या दिशेने संचलित असते. याच ईश्वराची भक्ति म्हणजे फलत्याग/योगः कर्मसु कौशलम् ". अर्थात बुद्धियोगामुळे ईश्वराचा आश्रय असतो. कर्मबंधनातुन(पाप-पुण्य, योग्य-अयोग्य) मुक्त असतो.

बुद्ध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)

सार:

जशी जीवनयात्रा कळत-नकळत नित्य सुरु असते, तसेच जीवनयात्रेत कळत-नकळत कर्म घडत असते. जगात कर्तृत्वच इतिहास घडविते. जीवनात याच कर्माचे विकासातील महत्व भगवदगीता स्पष्ट करते.

विश्वात ज्ञानविज्ञान आहे. विकासात या ज्ञानविज्ञानाचे महत्वाचे योगदान असते. अर्जुन आपल्या निष्क्रिय भूमिकेला योग्य सिद्ध करण्यासाठी त्याला ज्ञात असलेल्या उपलब्ध ज्ञानाचा वापर करतो. याच पार्श्वभुमिवर जीवनयात्रेतील जीवनविकास या संदर्भातील श्रेष्ठ व "ज्ञानी" याची निश्चित व्याख्या भगवदगीता स्पष्ट करते. या ज्ञानानुसार कर्ता असतो पण अकर्ता जाणतो, (जगतहीताय- सर्वभूतहीतेरतः)कार्यरत असतो पण अकर्म जाणतो.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मैव मे मतम् ।

आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम्।।(७. १८)

********

(४-१६)

************************

किम् कर्म किम् अकर्मेति कवयः अपि अत्र मोहिताः।

तत्ते कर्म प्रवक्षामि यत् ज्ञात्वा मोक्ष्यसे अशुभात् ।।

************************

(४. १६):"किम् कर्म किम् अकर्मेति कवयः अपि अत्र मोहिताः"

(Life driven modes&Mental gears)

मनुष्य वर्तमानात जगत असला तरी भूतकाळात जाऊन दुःखी होतो व भविष्यकाळात जाऊन भयग्रस्त, चिंताग्रस्त होतो, यामुळे वर्तमानात जगतच नाही, वर्तमानातील वास्तवावर attention नसते. मनोवैज्ञानिकांनी Mental illnessचे हे महत्वाचे कारण ठरविले आहे. व याचसाठी Mindfulness ही मानसिक प्रक्रिया highlight केली आहे.

“Mindfulness is a way of befriending ourselves and our experience. ”

– Jon Kabat-Zinn

Mindfulness is a state of active, open attention on the present.

When you're mindful, you carefully observe your thoughts and feelings without judging them good or bad.

Mental gears:
Doing (कर्म)mode & Being mode (Nondoing-अकर्म) .
Mindfulness is the ability to shift gears when we need to so that we are not permanently stuck in the same gear of the Doing Mode.

"Doing Mode"
It is the capacity of the intellect and critical reasoning and includes our conventional skills of analysis, problem solving, and thinking about things.

Being Mode.

It is the capacity of mindfulness. It works through the power of awareness itself. You begin to experience the world directly.

Our culture elevates the Doing Mode and often we feel as if we are human-doings rather than human-beings. In our culture, many of us have been trained out of the Being Mode and because of this, we have lost touch with our natural ability to manage stress and find satisfaction with things as they are.

Hence we can think of mindfulness training as a way to learn how to become more aware of your mode of mind ("mental gear") at any moment, and the skills to disengage from unhelpful modes of mind and to engage more helpful modes.

भगवतगीता याच Doing व Being(Nondoing) mode संदर्भात "कर्म" व "अकर्म" याचा उल्लेख करीत आहे.

युद्धक्षेत्रावर दुःखी झाला असता कार्याचा हेतु स्पष्ट करुन अर्जुन म्हणतो, मला कांही नको. म्हणुन युद्ध न करण्याची निवड करतो.

मनुष्याने निष्क्रियतेची निवड केली तरी तो स्वतःला "योग्य" सिद्ध करण्यासाठी Judgemental thinking चा वापर करतो. हीच Doing mode ठरते. (याउलट Being mode ही Nonjudgemental असते. )अर्थात अर्जुन Being mode विषयी अनभिज्ञ असतो. याच कारणामुळे वास्तव जसे आहे तसे स्विकारीत नाही. हे वर्तमानापासुन पलायन असते. Being mode हा Awareness, ज्ञानाचा भाग आहे, Judgemental नाही.

दुःखी झाला असता अर्जुनाचा Mental gear बदलला नाही, यामुळे त्याचा विकासरथ थांबला. भगवतगीता Mental gear बदलविण्याचे ज्ञान सांगते .

किम् कर्म किम् अकर्मेति कवयः अपि अत्र मोहिताः।
तत्ते कर्म प्रवक्षामि यत् ज्ञात्वा मोक्ष्यसे अशुभात् ।।(४-१६)

अर्जुनाने वास्तव स्विकारले तेंव्हा दुःख कसे नष्ट होणार हा प्रश्न उपस्थित झाला. याच प्रश्नाचे उत्तरात जीवनविकासमार्गात कार्याद्वारे साधना व समुद्रशांती यांचे ज्ञान स्पष्ट केले.

आपुर्यमाणम् अचलप्रतिष्ठम् समुद्रम् आपः प्रविश्यन्ति यद्वत् ।

हेच शास्त्र Mindfulness ज्ञान स्पष्ट करते.

We all have the capacity to engage with the “doing” mode that is the lively surface of the ocean just as we all have the capacity to merge with the “being” mode that is the still, quiet, and calm depths of the sea. Begin to recognize what moments and events in life benefit from interacting with life from your “doing” (कर्म)mode versus your “being”(Nondoing-अकर्म) mode.

***********

(४-१६) :

"तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यत् ज्ञात्वा मोक्ष्यसेअशुभात्"

[सुखी जीवनासाठी कर्माचे रहस्य (गहना कर्मणो गतिः)जाणणे]

सुखी जीवनासाठी संस्कार हा गुणात्मक शिक्षणाचा महत्वाचा भाग असतो. कर्माद्वारे Physical exercise होते, हे समाज जाणत असतो, तर मानसिक Exercise होते याचे रहस्य भगवदगीता सांगत आहे. शांति, समाधान, साहस-निर्भयता(शक्ति), सकारात्मकता ही शक्ति आहे व याच शक्तिसाधनेसाठी ईश्वरभक्ति हे सुद्धा समाज जाणत असतो. भगवदगीता कर्माद्वारे मानसिक Exercise(योग) होण्यासाठी ईश्वरभक्तिचा संदेश देते. अर्थात जे कर्म व्यावहारिक विकास करते, तेच कर्म मानसिक विकास करते हे रहस्य भगवदगीता सांगते.

किं कर्म किम् अकर्मेति कवयः अपि अत्र मोहिताः।
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यत् ज्ञात्वा मोक्ष्यसेअशुभात्॥(४-१६)

कर्माने विकास होतो. कर्माने अर्थप्राप्ति होते, प्रश्न सोडविल्या जातात. पण पैसा नको असेल तर कर्म कशाला?हा प्रश्न उपस्थित होतो. हाच प्रश्न अर्जुनाने उपस्थित केला. कारण त्याला कर्म दुःखप्रद, कष्टप्रद वाटायला लागले. ज्या मनुष्याला कर्म कष्टप्रद वाटते तो नियतकर्म टाळत असतो. कर्माच्या गतिचे हे अज्ञान

असते, कारण सुख म्हणजे केवळ भौतिक प्राप्ति हेच तो जाणत असतो. याचमुळे विचलित होतो.

याच पार्श्वभुमिवर सुख म्हणजे केवळ भौतिक प्राप्ति नसुन शांति, विचलित न होणे, साहस, निर्भयताही असते व ही मानसिक Exercise (योग) असते. याचसाठी कर्माद्वारे ईश्वरभक्ति हे मानसिक Exercise चे साधन हा भगवदगीतेचा महत्वाचा संदेश आहे. यालाच कार्यकौशल्य, अकर्म (कौशल्य ) संबोधले आहे. या संदर्भात विविध संदेश आलेले आहेत.

* नैष्कर्मसिद्धिसाठी ईश्वरभक्ति
 अकर्म -नैष्कर्मसिद्धि

यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम् ।
स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।।(१८-४६)

*सुखी जीवनाचा मार्ग :"विचलित न होणे. "

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

*सुखी जीवनाचा मार्ग "सत मार्ग"

सत मार्ग -कार्याद्वारे ईश्वरभक्ति

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत् ।

असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह॥(१७-२८)

*सुखी जीवनासाठी "युक्त"

युक्त -निष्काम कार्य

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।

अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते॥(५-१२)

नास्ति बुद्धिः अयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

न च अभावयतः शांतिं शांतस्य कुतः सुखम् ॥(२-६६)

*सुखी जीवनासाठी( द्वन्द्वमुक्तिचे )कर्मकौशल्य :

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥(२-५०)

सार :

जीवनयात्रेत मनुष्य सुखदुःख अनुभवतो. जीवनयात्रेतील हालचालीतुन कर्म घडत असते. सुख म्हणजे भौतिक प्राप्ति व भौतिक प्राप्तिसाठी कर्म असे कर्माचे महत्व कांही जाणतात. हा व्यवहार असतो व या व्यवहाराचे साधन कर्म असते. तर जीवनयात्रेत सुख अनुभवणे व यासाठी याच व्यवहारातील कर्माद्वारे मानसिक Exercise होणे याचे कौशल्य साध्य करण्याचे ज्ञान अर्थात जीवनयात्रेत सुखी जीवनाची साधना होण्याचे कौशल्य साध्य करण्याचे ज्ञान भगवदगीता देत आहे.

***********

(४-१७)

************************

कर्मणो हि अपि बोधव्यं बोधव्यं च विकर्मणः।

अकर्मणश्च बोधव्यं गहना कर्मणो गतिः॥

************************

(४. १७/१:

"अकर्मणश्च बोधव्यं गहना कर्मणो गतिः"

(कर्म vs ज्ञान)

जगात कार्य घडते, निर्णय होतो, घटना घडतात. कर्तृत्वानेच इतिहास घडतो. मनुष्यजीवनात म्हणुनच कर्माचे स्थान महत्वाचे आहे. याच सत्याची जाणिव भगवतगीता करुन देते.

जीवनांत ज्ञान श्रेष्ठ कि कर्म!या संदर्भात नावाड्या व विद्वान पंडित यांची गोष्ट सर्वश्रुत आहे. कर्माशिवाय पढीत ज्ञान व्यर्थ आहे याची प्रचिति पंडितांना येते. अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान वापरतो व अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. या एकाच मुद्यावर

भगवतगीता जीवनातील कर्म व ज्ञान यांचे निश्चित स्थान दर्शवुन देते.

वर्तमानात ज्ञानविज्ञान आले. समाजात मनुष्य "मी योग्य" समजुनच कार्यरत असतो, भाष्य बोलतो. जीवनात अडचणी येतात, प्रश्न येतात, दुःख असते. पण प्रश्न न सोडवता निष्क्रियतेचे समर्थन करुन त्याला ज्ञान दर्शविण्याचा प्रयत्न करणे नकारात्मकता असते. यांत वास्तव स्विकारीत नाही व स्वतःला ज्ञानी समजुन उपदेश करणे, टिका करणे ही एक संवय ठरते. यामुळे समाजात एकीकडे जगणारा "मी योग्य" समजुन कार्यरत असतो तर दुसरीकडे त्याला चुक ठरविणारेही असतात. व हेच सत्य अर्जुनाच्या निष्क्रियतेच्या समर्थनासंदर्भात श्रीकृष्ण त्याच्या नजरेस आणुन देतात.

जीवनात ज्ञानाचा आश्रय असेल तर विश्वासाने मार्गक्रमण करतो. याच संदर्भात भगवतगीता ज्ञानविज्ञान सांगुन ज्ञानी कोण? स्पष्ट करुन ज्ञानाचा कार्यात उपयोग सांगते.

खेळ खेळत असतांना Exercise होते. खेळण्याचा आनंद मिळतो व आरोग्य लाभते. तसेच जीवनात कर्माची गति जाणली तर कर्म

अकर्म जाणतो व Exercise चा लाभ होतो. कार्यातुन विकास, वैभव, किर्ति, शांती, कल्याणविश्वास, साहस, निर्भयता इ. प्राप्ति Exerciseचे फलित असते. म्हणुन कर्म व ज्ञान यांचे नाते दर्शविले आहे. मार्गातील संशयमुक्तिसाठी ज्ञान व योगासाठी(Exercise ) कर्म.

योगसंन्यस्त कर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम् ।(४-४१)

ज्ञानाचा(ज्ञानविज्ञान) कर्मात उपयोग होतो, कर्म घडते व ज्ञानामुळे कर्म अकर्म होते.

अकर्मणश्च बोधव्यं गहना कर्मणो गतिः।(४-१७)

ज्ञानाग्नि दग्धकर्माणं तम् आहुः पंडितं बुधाः।(४-१९)

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

अर्थात अखेर सर्व कर्माचे ज्ञानातच विलिनीकरण होते. याच संदर्भात ज्ञान श्रेष्ठ म्हटले आहे.

ज्ञानामुळे स्थितप्रज्ञ अवस्था, शांति लाभते. याच अनुषंगाने ज्ञान श्रेष्ठ तर कर्म कशाला?असा अर्जुन प्रश्न करतो, व भगवतगीता कर्माचे जीवनात महत्व स्पष्ट करते. व ज्ञानाचा उपयोग स्पष्ट करते.

जीवन-मृत्यु याच संदर्भात अशाश्वत-शाश्वत, प्रकृति-ईश्वर प्रकृति(सत, रज, तम गुण) व ईश्वर(गुणातीत )असे ज्ञानविज्ञान भगवतगीता स्पष्ट करते. प्रकृति कर्माचे कारण तर ईश्वर ज्ञान(विज्ञानाचा) स्त्रोत आहे. जीवन आहे तोवर प्रकृति कार्यरत असते. तर जगत असतांना ईश्वराचा आश्रय ज्ञानाचा आश्रय ठरतो.

कर्म या संदर्भात यज्ञातील समर्पण भाव(कार्यसमर्पण - हवन), स्वधर्म(Tiebreaker, Self approval), कार्याचा दृढनिश्चय(निर्णयअधिकार या स्वातंत्र्याची जाण), ज्ञानाचा उपयोग करुन कर्माला अकर्म जाणणे यासाठी ईश्वर (ज्ञान)आश्रय, बुद्धियोग, निष्काम कर्म(ईश्वरभक्ति, फलसमर्पण) याचे शास्त्र भगवतगीता स्पष्ट करते.

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञान अवस्थितचेतसः।

यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते॥(४-२३)

********

(४. १७)/२ : "गहना कर्मणो गतिः"

भगवतगीता मनुष्यजीवनांत कर्माचे महत्व सांगते. कर्मानेच सृष्टिचक्र चालते. कर्मानेच विकास होतो. समाजात जगतांना

कर्माला कष्ट समजुन टाळणे अज्ञान असते. याच मुद्यावर भगवतगीतेचे जगात पदार्पण झाले.

व्यवहारात कर्माचे सरळ तत्व इच्छापुर्तिसाठी कार्य (State of Want-State of Art) असे असते.

जसा पाण्याचा प्रवाह असतो, नदी वहात असते, तसे प्रकृतित प्रत्येक क्षणांत कर्म घडत असते. नदी अखेर समुद्राला मिळते, तसे सर्वकर्म ज्ञानात विलिन होतात. या तत्वावर कर्माचा ज्ञानाशी संबंध दर्शविला आहे.

सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

याच आधारावर जीवनांत ज्ञानाचे महत्व सांगितले.

जीवनविकासात " कर्माची गति" या संदर्भात चार अवस्था असतात.

कर्मणो हि अपि बोधव्यं बोधव्यं च विकर्मणाः।

अकर्मणश्च बोधव्यं गहना कर्मणो गतिः।।(४-१७)

१. कर्म टाळुन इच्छापुर्ति गरज

२. इच्छापुर्तिसाठी (सकाम) कर्म

३. समुहकल्याणासाठी (निःस्वार्थ-निष्काम)कर्म. जीवनमुल्यांचा वापर, स्वधर्माचरण

४. जगत(मानव)कल्याणासाठी कर्म. कर्माद्वारे ईश्वरभक्ति. ईश्वरभक्तिद्वारा योग(दुःखान्त) ज्ञानी अवस्था(स्थितप्रज्ञ) साध्य करणे.

याच संदर्भात अज्ञानी व ज्ञानी अवस्था भगवतगीता सांगते.

अज्ञानी :

कर्मेंद्रियाणि संयंम्य यः आस्ते मनसा स्मरण।

इंद्रियार्थान् विमुढात्मा मिथ्याचारः स उच्यते।।(३-६)

ज्ञानी:

यः तु इंद्रियाणि मनसा नियम्य आरभते अर्जुन।

कर्मेंद्रियै कर्मयोगं असक्तः स विशिष्यते।।(३-७)

मनुष्य चांगला, विद्वान जरी असला तरी" कर्माची गति" या संदर्भात अज्ञानी व ज्ञानी अवस्थेत मनुष्य कसा वागतो, कसे भाष्य करतो, हे अनुक्रमे अर्जुनविषाद व स्थितप्रज्ञ अवस्था यातुन दर्शविले आहे. म्हणुन प्रश्न असतो, चांगला, विद्वान असुनही मनुष्य अज्ञानाला कां प्राप्त होतो?

"सकाम " अवस्थेत कार्यातील परिणामाच्या भयाने संशयी होतो, संशयाने दुबळा होतो. कधी अशा चक्रव्युहात सापडतो कि, कार्य केले तरी चुक व न केले तरी चुक!हा चक्रव्युह भेदण्याचे ज्ञान नसेल तर मनुष्य जे करतो किंवा करीत नाही, त्याचे समर्थन ज्ञानी समजुन करतो. अर्थात येथे अज्ञानी अवस्थेला ज्ञानी दर्शवितो. जगण्यातील दुर्बलता भयावह असते. कितिही व कसेही समर्थन केले तरी तो पुरुषार्थ नसतो. भगवतगीता याला सरळ "क्लैब्य" संबोधते व पुरुषार्थ काय आहे याचे ज्ञान सांगते.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं सो अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

समाजात भाष्य चालते. यातुन टिका चालतात. काय चुक आहे हे कळते, मग काय बरोबर आहे हेही कळते. पण जे योग्य आहे ते आचरण करण्याचे साहस (धृति)नसते. याच साहसाच्या वृद्धीचे ज्ञान(धर्म) भगवतगीता देते.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

समाजात परकिय व स्वकिय (हे अधिष्ठानानुसार बदलते) या आधारावर" स्व" चे समर्थन व "पर" वर टिका असे भाष्य चालते. या टिकेतुनच नकारात्मक उर्जा नकळत वाढत असते. यातुन

विध्वंसक प्रवृत्ति वाढते. "पर" वर टिका म्हणजे "स्व" वर प्रेम नव्हे. भगवतगीता प्रेम म्हणजे काय याचे स्पष्टिकरण करते.

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।(१२-१३)

याप्रमाणे कर्म, ज्ञान व प्रेम या सर्वांचे संमिलन ईश्वर ज्ञानाद्वारे घडवुन आणण्याची किमया भगवतगीतेने साध्य केली आहे. (याच तत्वाला कर्म ज्ञान भक्ति म्हणुन ओळखतात) व हेच शास्त्र भगवतगीतेद्वारा जगासमोर आले आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(४-३३)

दुःख Attached pain असते. म्हणुन Detachment हवे असते, याबरोबरच प्रेमभाव साध्य होणे यासाठी भगवतगीता संदेश देते,

मत्कर्मकृत मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव।। (११-५५)

***********

(४-१८)

************************

कर्मणि अकर्म यः पश्येत् अकर्मणि च कर्म यः।

स बुद्धिमान् मनुष्येसु युक्तः कृत्स्नकर्मकृत्॥

************************

(४-१८):

"कर्मणि अकर्म यः पश्येत् अकर्मणि च कर्म यः"

(भगवतगीतेला अभिप्रेत संस्कार-Discipline)

मनुष्य व्यायाम करतो, तेंव्हा व्यायाम कर्म असुनही मनुष्य कर्म समजत नाही. ते अकर्म. मनुष्य त्याचे सहजकार्य, स्वभावनियतकार्य व्यवसायासाठी वापरतो. सहजकार्य अकर्म व्हावे यासाठी जगण्याचे संस्कार (Disciplined) भगवतगीता "युक्त(बुद्धियुक्त)" या शब्दातुन व्यक्त करीत आहे.

कर्मणि अकर्म यः पश्येत् अकर्मणि च कर्म यः।

स बुद्धिमान् मनुष्येसु युक्तः कृत्स्नकर्मकृत्॥(४-१८)

समाजात चांगली वागणुक, चांगले कर्म यालाही संस्कारच संबोधण्यात येते. इच्छापुर्तिसाठी कार्य हा व्यवहार असतो. चांगले म्हणावे-व्हावे, श्रीमंत म्हणावे- व्हावे, श्रेष्ठ म्हणावे- व्हावे अशाही विविध इच्छा असतात. या सर्व इच्छा व्यावहारिक ठरतात. यामध्ये द्वन्द्व असतो. या संदर्भातील ज्ञान व्यावहारिक ज्ञान ठरते.

* द्वन्द्व-द्वन्द्वमुक्ति (बंधन-मोक्ष)

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वन्द्वमोहेन भारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप॥(७-२७)

कार्याद्वारे ईश्वरभक्तिमुळे द्वन्द्वमुक्ति असते.

येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।
ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः॥(७-२८)

* स्वधर्म :

द्वन्द्व या संदर्भातच स्वधर्माचे महत्व सांगितले. कर्म केले तर पाप हा अर्जुनाचा समज असतो. तर कर्म टाळले तर पाप हे श्रीकृष्ण धर्म या संदर्भात समजावुन देतात.

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

Tiebreaker निर्द्वन्द्व
अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।
ततः स्वधर्मं किर्तिं च हीत्वा पापम् अवाप्स्यसि।।(२-३३)

अर्थात भगवतगीतेप्रमाणे द्वन्द्वमुक्तिसाठी संस्कार अभिप्रेत आहे.

* बुद्धियुक्त :
बुद्धियुक्त या संदर्भात कार्याचा एकनिश्चय, निष्काम कार्य निर्द्वन्द्व स्थिति दर्शवते.

सुखी जीवनासाठी संस्कार
नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

न च अभावयतः शांन्तिः अशांतस्य कुतः सुखं॥(२-६६)

निष्काम कर्म

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिं आप्नोति नैष्ठिकीम्।

अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते॥(५-१२)

निर्द्वन्द्व

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।

तस्माद् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥(२-५०)

*********

(४-१८) :

"स बुद्धिमान मनुष्येषु युक्तः कृत्स्नकर्मकृत्"

(बुद्धिमान vs. अबुद्धयः)

भगवदगीतेत ज्ञानी, संस्कारीत, श्रेष्ठ, चांगलेपणा highlight झालेले आहेत.

१. ज्ञान या संदर्भात ज्ञानी vs. अज्ञानी, विद्वान vs. मुढ, विपश्चित vs. अविपश्चित, बुद्धिमान vs. अबुद्धयः असे शब्दप्रयोग आहेत. याशिवाय पंडीत, बुधा असे शब्दप्रयोग ज्ञानी या संदर्भात आले आहेत.

२. संस्कार (Training the mind) या संदर्भात युक्त vs. अयुक्त असा शब्दप्रयोग आहे.

३. श्रेष्ठ vs इतर(सामान्य) या संदर्भात श्रेष्ठत्वाचा बोध होण्यासाठी "पुरुषं पुरुषर्षभ", अनार्य, कृपण असे शब्दप्रयोग आलेले आहेत.

४. चांगलेपणा vs. वाईटपणा या संदर्भात दैवी vs. असुरी गुणसंपत्तिद्वारा चांगलेपणाला highlight केले आहे.

*बुद्धिमान vs. अबुद्धयः

जीवनविकासाचे ज्ञान असलेला बुद्धिमान मनुष्य "युक्त" अर्थात संस्कारीत असतो. निष्काम कर्माचे, स्वधर्माचरणाचे शास्त्र

आचरण करतो. स्वतः या शास्त्रानुसार कार्यरत असतांना कर्मात अकर्म व अकर्मात कर्म जाणतो. यामुळे स्वतः अकर्ता जाणतो.

कर्मणि अकर्म यः पश्येत् अकर्मणि च कर्म यः।
स बुद्धिमान मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ।(४-१८)

ईश्वराची ओळख जड-चेतन(व्यक्त-अव्यक्त), क्षर-अक्षर(शाश्वत-अशाश्वत) या संदर्भात ज्ञानविज्ञानासह प्रकृति(सत्-रज-तम गुण)-पुरुष(आत्मा)-पुरुषोत्तम(परमात्मा) अशी दिलेली आहे. अर्थात "ज्ञान" या संदर्भात ईश्वराला form नसतो. या formless शाश्वत तत्वापासुनच सृष्टिचे प्रवर्तन आहे. या ईश्वराला न जाणणारा अज्ञान ठरतो व यासाठी मुढ, अबुद्धयः असे शब्दप्रयोग आहेत.

अवजानन्ति माम् मूढा मानुषीं तनुम् आश्रितम्।
परम् भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।(९-११)

अर्थात

अव्यक्तं व्यक्तिम् आपन्नम् मन्यते माम् अबुद्धयः।

परं भावम् अजानन्तो ममअव्ययम् अनुत्तमम् ॥(७-२४)

या ज्ञानामुळे "युक्त"(आत्मवश, निष्काम कर्म करणारा) संस्काराचे महत्व कळते.

"The requirements for our evolution have changed. Survival is no longer sufficient. Our evolution now requires us to develop spiritually - to become emotionally aware and make responsible choices. It requires us to align ourselves with the values of the soul - harmony, cooperation, sharing, and reverence for life. "

Gary Zukav

********

(४-१९)

*************************

यस्य सर्वे समारम्भाः कामसंकल्प वर्जिताः।

ज्ञानाग्नि दग्ध कर्माणं तम आहुः पंडितं बुधाः।।

*************************

(४. १९) :"ज्ञानाग्नि दग्ध कर्माणं तम आहुः पंडितं बुधा"

जीवनविकासात ज्ञानाची भूमिका हा भगवतगीतेचा विषय आहे, कारण "ज्ञान"या विषयावरच चर्चेला आरम्भ होतो. अर्जुनाला दुःख होते म्हणुन त्याला आपले नियतकार्य(युद्ध) टाळणे श्रेयस्कर वाटते. म्हणुन या कार्यातील Weakness(वाईटपणा-पाप) शोधतो कारण त्याला आपली निष्क्रियता कशी योग्य आहे हे सिद्ध करायचे असते.

शाळा, कॉलेजेस मधुन ज्ञानार्जन कार्यासाठीच होत असते हे सत्य आपण जाणतो, अर्थात कार्यासाठी ज्ञान असते. ही वस्तुस्थिति असतांना निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञानभाष्य समाजात चालत असते. या ज्ञानभाष्याचा आधार बहुधा चांगले-वाईट ही Polarity असते. मी वाईट नाही म्हणुन चांगला आहे असे समर्थन करण्यासाठी जगात वाईट काय आहे यावर भाष्य होते. यामुळे निष्क्रियतेचे समर्थन करण्याची संवय जडली तर सहसा

नकारात्मक भाष्यच बोलल्या जाते. जणु अंधाराला प्रकाश आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान बोलल्या जाते. अर्जुन हीच भूमिका घेतो.

अंधार स्विकारला तर तो प्रकाशानेच दुर होईल . याला तत्वज्ञांनी Wisdom of darkness म्हटले. म्हणुन भगवतगीता ज्ञानाला प्रकाश संबोधत आहे. याच मुद्यावर भगवतगीतेचे भाष्य सुरु होते.

निराशावादी, नकारात्मक भाष्याची संवय निरोगी नसते. वर्तमानात भ्रष्टाचारावर focus असतो. अमुक क्षेत्रात भ्रष्टाचार आहे म्हणुन मी त्या क्षेत्रात जात नाही असे भाष्य सर्रास बोलल्या जाते. जगात अनेक कार्यक्षेत्र उपलब्ध असतात. ज्या क्षेत्रात जो expert आहे ते त्याचे कार्यक्षेत्र असते. प्रत्येकाचे कार्यक्षेत्र त्याचेसाठी सहजकार्य असते, तसेच ते त्याचे स्वधर्मक्षेत्र असते. युद्धकार्य अर्जुनासाठी सहजकार्य होते, तसेच स्वधर्मक्षेत्र होते. या संदर्भात भगवतगीता भाष्य करते,

स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।

योगक्षेम चालविण्यासाठी, भौतिक विकासासाठी कर्म आवश्यक असते. कर्मात कष्ट होते पण ज्ञानाने कर्म सोपे होते व कर्म सहज करीत असतो. कर्मात आनंद अनुभवतो. भौतिक विकास कर्मानेच होतो, तर सुख, निर्भयता, स्थिरत्व, शांति, योग(दुःखान्त) हा आध्यात्मिक विकासही कर्मानेच होतो. कर्म या संदर्भातील

ज्ञानाचा हा दुसरा पैलु असतो. कर्म करुनही अकर्म जाणणे, कर्ता असुनही अकर्ता जाणणे याचे रहस्यज्ञान भगवतगीतेचे निष्काम कर्मशास्त्र आहे.

यस्य सर्वे समारम्भाः कामसंकल्प वर्जिताः।

ज्ञानाग्नि दग्ध कर्माणं तम आहुः पंडितं बुधाः।।(४-१९)

अर्थात जीवनविकासात भौतिक विकासासाठी कर्म व कर्मासाठी ज्ञान हा ज्ञानाचा एक पैलु आहे, तर कर्माद्वारे सुख, शांति, स्थिरता यासाठी ज्ञान(कर्माद्वारे भक्ति) हा दुसरा पैलु असतो. यांत ईश्वराचा आश्रय जो ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे, हा ज्ञानाचा आश्रय असतो. हा पैलु जाणणे भगवतगीतेचा महत्वाचा भाग आहे. महाभारतात अर्जुनाच्या कर्मासंबंधी हे दोन पैलु स्पष्ट झाले आहेत.

व्यवहार पातळीवर पांडवांचे शोषण होते, अन्याय होतो म्हणुन धर्मयुद्ध ठरते. हा व्यावहारिक पैलु असतो. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर दुःखी झाल्यामुळे युद्ध टाळण्यासाठी, निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान वापरतो. अज्ञानाला ज्ञान दर्शवितो म्हणुन ज्ञानाचा दुसरा पैलु येथे सुरु होतो, ज्यामुळे जीवनविकासातील ज्ञानाला (तमसो मा ज्योतिर्गमय)पुर्णत्व येते. हे दोन्ही पैलु जाणणारा पंडित ठरतो.

*******

(४-२०)

************************

त्यक्त्वा कर्मफलासंग नित्यतृप्तो निराश्रयः।

कर्मणि अभिप्रवृत्तःअपि नैव किञ्चित् करोति सः।।

************************

(४. २०) :

"त्यक्त्वा कर्मफलासंग नित्यतृप्तो निराश्रयः"

(कार्यकौशल्य :Art of Akarma)

या विश्वात मनुष्याचे कर्माशी घनिष्ट नाते आहे. "कर्मानुबंधिनि मनुष्यलोके". क्षणोक्षणी कार्यच नकळत घडत असते. जीवनातील सुखदुःखाचा या कर्माशी संबंध असतो. भगवदगीता दुःखी, निष्क्रिय झालेल्या अर्जुनाला सुखी जीवनासाठी कार्यकौशल्याचे ज्ञान देत आहे.

कर्तृत्वानेच मनुष्य विकास साधत असतो. हे कार्य करतांना कुणी राबत असतो, कष्टत असतो. तर कुणी "अकर्म" अनुभवत असतो, तृप्त असतो. अर्थात साधना घडत असते, कर्माचे कष्ट नसते. हाच कार्यकौशल्याचा भेद असतो. म्हणुन जीवनात कार्यकौशल्याचे ज्ञान हा विषय महत्वाचा असतो.

कार्यकौशल्याचे ज्ञान नसेल तर मनुष्य कर्माचे महत्व जाणत नाही, फलाचे मात्र महत्व जाणतो. कारण जीवन म्हटले कि प्रश्न असतातच!यामुळे जीवनातील साधे प्रश्नही सुटत नाही. मनुष्य निष्क्रिय होतो तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी समर्थन करतो. या पार्श्वभुमिवर जीवनात कर्माचे महत्व जाणणे, कार्यकौशल्य साध्य करणे हा ज्ञानाचाच भाग ठरतो.

मनुष्य शिक्षण घेतो, व्यवसाय स्विकारतो. ही व्यवस्था समाजव्यवस्थेचा भाग असते. कार्यकौशल्य या संदर्भात

१. State of Art अर्थात कार्याचे skill साध्य करणे हा एक भाग असतो. शिक्षणाद्वारे हे कार्यकौशल्य साध्य करतो. हे कार्यकौशल्य मनुष्याचे सहजकार्य असते.

२. कर्माचा जीवनमार्गात प्रत्यक्ष उपयोग करणे. हा दुसरा भागच भगवदगीतेचा मुख्य विषय आहे. "योगः कर्मसु कौशलम्".

युद्ध करणे अर्जुनाचे नियतकार्य होते. पण सकाम कर्मच जाणत असल्यामुळे त्याला कष्ट वाटते व कर्मच टाळतो. व या निष्क्रियतेला धर्म, ज्ञान संबोधतो.

नित्य ईश्वराचा आश्रय व्हावा, साधना व्हावी यासाठी कुणी कर्म काम्य आहेत म्हणुन कर्माचाच त्याग करुन संन्यास घेतात. पण

भगवदगीता कार्यकौशल्य साधण्यासाठी ईश्वराचा आश्रय व भक्ति सांगत आहे. याच (कार्यकौशल्य) संदर्भात कर्म अकर्म होणे, निष्काम कर्म, ईश्वरभक्तिसाठी कर्मसमर्पण, अमृतत्वाय कल्पते हा विकासमार्ग, बुद्धियुक्त हे विषय आलेले आहेत.

त्यक्त्वा कर्मफलासंग नित्यतृप्तो निराश्रयः।
कर्मण्यभिः प्रवृत्तोअपि नैव किञ्चित् करोति सः।।(४-२०)

जीवनमार्गात (राग-द्वेष) हे द्वन्द्व असते. हे द्वन्द्व १. कर्म संदर्भात योग्य-अयोग्य (सत्कृत्य-दुष्कृत्य, चांगले-वाईट)व २. कर्मातील फल(यश-अपयश, मान-अपमान, पाप-पुण्य)
या स्वरुपाचे असते.

१. चांगला मनुष्य दैवीगुणसंपत्तियुक्त असतो म्हणुन बुद्धियोगी हो म्हणजे कर्माच्या सुकृत-दुष्कृत या द्वन्द्वापासुन मुक्त होशील, तसेच२. कर्मफल या संदर्भात समत्वयोगाने कार्य करणे/फलत्याग हा संदेश आहे.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

************

(४. २०) :

"कर्मणि अभिप्रवृत्तः अपि नैव किञ्चित् करोति सः"

(Logic of Akarma -The inaction)

नियतकार्यातील संभाव्य दुःख टाळण्यासाठी अर्जुन निष्क्रिय होतो. आपली भूमिका आदर्श आहे असे भाष्य बोलतो. आपल्या अज्ञानी भूमिकेला ज्ञानी समजतो. यामुळे मनुष्यजीवनात ज्ञानाची भूमिका हा विषय भगवतगीतेत आलेला आहे.

येथे निष्क्रिय झालेल्या अर्जुनाला कर्म करण्याचा संदेश देण्यात येतो. हृदयात निर्माण झालेल्या अज्ञानाला ज्ञानाने मिटविणे. या ज्ञानामुळे कार्यातील संशय मिटतो व कार्याचा एकनिश्चय होतो. (ज्ञानसञ्च्छिन्न संशयम् ). कार्य समत्वयोगाने (निष्ठेने) करतो. (योगसंन्यस्तकर्माणं) याद्वारे कार्याचे अकर्मात रुपांतर होते. पर्यायाने ज्ञानात विलिनिकरण होते.
सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

याप्रमाणे कार्याचा निश्चय होण्यासाठी ज्ञान व कर्माचे अकर्मात रुपांतर होण्यासाठी ज्ञान अशी दुहेरी ज्ञानाची भूमिका असते. हे Exclusive ज्ञान असलेला योग ज्ञानकर्मसंन्यासयोग म्हणुन ओळखल्या जातो. हा योग परंपरेने राजर्षि जाणत होते. कालपरत्वे तो लुप्त झाला. श्रीकृष्णाने याच ज्ञानयोगाला पुनःजिवित केले.

या योगात(अध्यायात) ज्ञानाची महति आहे. जगी सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे. कार्यानेच विकास होतो. ज्ञानाने कार्यक्षमता वाढते . कार्य या संदर्भात कार्यासाठी ज्ञान ही एक भूमिका असते तर कर्माचे अकर्मात रुपांतर( व सुखशांतीची अनुभुति) ही ज्ञानाची दुहेरी भूमिका आहे.

त्यक्त्वा कर्मफलासंग नित्यतृप्तो निराश्रयः।
कर्मणि अभिप्रवृत्तः अपि नैव किञ्चित् करोति सः।।(४-२०)

जगतकल्याणाचे ज्ञानविज्ञानयुक्त कार्य, समुहकल्याणाचे शौर्यप्रधान कार्य, अर्थसमृद्धि (उत्पादन, व्यवसाय) विषयक कार्य, सेवाकार्य असे चार प्रकारचे कार्यच जगात असतात व प्रकृतिगुणानुसार मनुष्य कार्यरत होत असतो.

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।(३-२७)

याच (तांत्रिक) आधारावर मनुष्याची कार्याची आवड असते व जगातील प्रत्येक मनुष्य कार्यरत होत असतो. याच तांत्रिक आधारावर भारतिय समाजात वर्णाश्रम व त्यातही व्यवसायनिर्देशक जाती अस्तित्वात आल्या होत्या. वर्तमानात मात्र शिक्षणामुळे व्यावसायिक कार्य बदलत असतात. ही शैक्षणिक क्रान्ति जगातच अस्तित्वात आली.

मनुष्याने स्वतःला कार्यरत करावे, कार्यक्षमता वाढावी यासाठी ज्ञान उपलब्ध झाले. तर सुखी जीवनासाठी "गहना कर्मणो गतिः" हा भगवतगीतेचा संदेश महत्वाचा आहे. ही भगवतगीतेची Exclusive strength आहे. [निष्क्रिय व्यक्तिला अकर्माचे ज्ञान(प्रथम कर्मात व नंतर कर्माचे अकर्मात Transformation) ]. अकर्माच्या ज्ञानामुळे परिणामभयापासुन (कर्मफल)मुक्त असतो.

न आदत्ते कस्य चित्पापं न चैव सुकृतं विभुः।

अज्ञानेन् आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः॥(५-१५)

********

(४-२१)

************************

निराशीः यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः।

शारीरं केवलं कर्म कुर्वन्न आप्नोति किल्बिषम् ॥

************************

(४-२१) :

"निराशीः यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः।

शारीरं केवलं कर्म कुर्वन्न आप्नोति किल्बिषम् ।"

(कर्मकौशल्याचे Universal Standard)

व्यवहारात सकाम कार्य (State of want-State of art)असते. याच सकाम मानसिकतेमुळे अर्जुन आपल्या गरजा/इच्छा याचा आढावा घेतो व मला कांहीच नको तर कर्माचे प्रयोजन कशासाठी?अर्थात परिणामाचे दुःखामुळे/भयामुळे कर्म टाळतो. समाजात कर्मकौशल्याच्या अज्ञानामुळे कर्माविषयी अशीच मानसिकता असते. एका पिढीला पुरेल इतकी वडिलोपार्जित संपत्ति असेल तर कर्म कशाला करायचे?याच पार्श्वभुमिवर भगवदगीता कर्मकौशल्याचे संस्कार यावर भाष्य करीत आहे.

निराशीः यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः।

शारीरं केवलं कर्म कुर्वन्न आप्नोति किल्बिषम् ।।(४-२१)

अर्थात सुखी जीवन जगण्यासाठी कार्यकौशल्याचे संस्कार हा भगवदगीतेचा विषय आहे. आत्मवश असणे, निष्काम असणे, शरीराने/शरीरासाठी कार्यरत असणे. व्यवहारात कर्माचा तपशिल स्थलकालपात्रानुसार बदलत असतो. पण "कार्यकौशल्य " या संदर्भात मात्र Universal Standard भगवदगीता सांगत आहे.

१. स्वधर्माचरण

स्वधर्मम् अपि चावेक्ष्य न विकम्पितुम् अर्हसि।(२-३१)

कर्म केले तर दुःख होईल, पाप लागेल म्हणुन धर्मासाठी कर्म टाळणे योग्य ज्यामुळे दुःखही टळेल ही अर्जुनाची भूमिका असते. जीवनात कर्म घडत असतात. कर्म केले तर दुःख, पाप व कर्म टाळले तर पापमुक्ति, दुःखमुक्ति ही अर्जुनाची भूमिका असते. तर भगवदगीतेनुसार कर्म टाळले तर अपकीर्तिचे दुःख, पाप व ठरल्याप्रमाणे "कर्म केले तर (युद्ध जिंकलास तर)राज्यप्राप्तिचे सुख किंवा (वीरमरण प्राप्त झाले तर)स्वर्गप्राप्ति अर्थात अपकीर्तिच्या दुःखापासुन मुक्ति, अधर्माच्या पापापासुन मुक्ति" ही भूमिका होण्यासाठी नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करणे.

## २. बुद्धियोग

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।(२-४९)

कर्माच्या सकाम मानसिकतेत चंचलत्व असते. यामुळे कार्याचा एकनिश्चय होण्यास बाधा येते. म्हणुन आत्मवश (मनावर नियंत्रण)होण्यासाठी व निष्काम मानसिकतेसाठी बुद्धियोगाचे प्रयोजन भगवदगीता सांगत आहे. यामुळे जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" (मोक्ष) असा होतो. कार्याचा एकनिश्चय असतो. योग्य-अयोग्य या द्वन्द्वापासुन तसेच परिणाम संदर्भात सिद्धि-असिद्धि या द्वन्द्वापासुन मुक्त होतो. समत्वयोगाने कार्यरत होतो.

***********

(४-२२)

**************************

यदृच्छा लाभ संतुष्टः द्वन्द्वातीतो विमत्सरः।

समः सिद्धौ असिद्धौ च कृत्वापि न निबध्यते॥

************************

४. २२:

"यदृच्छा लाभ संतुष्टः द्वन्द्वातीतो विमत्सरः"

(Self approval )

"A man cannot be comfortable without his own approval. "

-Mark Twain

मनुष्य या विश्वात विविध (विविध समुह) Platform वर असतो. अमुक केले किंवा न केले तर तमुकाला काय वाटेल ? अशा द्वंद्वाच्या (Duality)जाळयात अडकतो (हाच फलाचा हेतु किंवा सकाम स्थिति असते) व यामुळे त्याचेसमोर Choice चे Options उभे होतात. व त्याला जे शक्य होईल त्याची निवड करीत असतो. शेवटी ही स्वतःची मर्जी (यदृच्छा) असते.

भगवतगीतेत अर्जुन याच द्वंद्वाच्या जाळ्यात सापडतो. युद्ध नियतकार्य असले तरी शोकदायी आहे हे जाणतो. यामुळे नियतकार्य करावे कि शोकदायी युद्ध टाळावे असे Options निर्माण होतात. अर्जुन युद्ध न करणे ही निवड करतो. स्वतःची भूमिका योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी समर्थन करतो, ज्ञान वापरतो.

अशाच द्वंद्वाचा मनुष्याला सतत सामना करावा लागतो, व जी निवड करतो, त्याचे समर्थन करतो. म्हणुन जीवनविकास या संदर्भात Determination हा महत्वाचा संस्कार असतो.

"Determination is the wake-up call to the human will. "

Anthony Robbins

जीवनविकासात आत्मोन्नति (उद्धरेत् आत्मना आत्मानम् )हा संदर्भ येतो तेंव्हा मनुष्याने विकासमार्गावर असावे ही गरज स्पष्ट होते. हा अध्यात्माचा भाग असला तरी मनुष्य व्यवहारात द्वंद्वाच्या जाळ्यात अडकतो व म्हणुन विकासमार्गाची गरज स्पष्ट होते. द्वंद्व आहे म्हणुन Determination (एकनिश्चय)चे महत्व असते.

Determination चे Status

यदृच्छा लाभ संतुष्टः द्वन्द्वातीतो विमत्सरः।

समः सिद्धौ असिद्धौ च कृत्वापि न निबध्यते॥(४-२२)

यांत स्वतःची निवड स्वतःच्या मर्जीने असते (यदृच्छा, Self approval). Determination मधील Choice या संदर्भात कधी ही निवड आवडीची असते, तर कधी Tiebreaker(द्वंद्वमुक्ति) असतो. याच Determination वर भगवतगीतेने focus केले आहे. याच संदर्भात स्वधर्म, कर्मयोगातील कार्यनिश्चय यांचे महत्व Highlight केले आहे. निष्काम कर्म या संदर्भात यश-अपयश यात समत्व साधत असते. अर्थात अपयशाने खचत नाही.

"A truly strong person does not need the approval of others any more than a lion needs the approval of sheep. "

Vernon Howard

*********

(४-२३)

************************

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानअवस्थित चेतसः।

यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते॥

************************

(४-२३):

"गतसंगस्य मुक्तस्य ज्ञान अवस्थित चेतसः"

कर्मकौशल्य(व्यवहार+आत्मोन्नति)

जीवनविकास या संदर्भात कर्म साधन आहे हा भगवदगीतेचा विषय आहे. जीवनाच्या सर्वांगिण विकासासाठी कर्मकौशल्य ज्ञान व शास्त्र भगवदगीता स्पष्ट करीत आहे.

मनुष्याला इच्छा असतात. म्हणुन इच्छापुर्तिसाठी, गरजापुर्तिसाठी कर्म करतो. याच ज्ञानाच्या आधारावर अर्जुन म्हणतो, मला कांही नको!शिवाय पारलौकिक विकास या संदर्भात हे कर्म धर्मविरोधी ठरते.

व्यावहारिक व पारलौकिक या संदर्भात कीर्ति व्यावहारिक ठरते तर स्वर्ग पारलौकिक ठरतो. व्यावहारिक व पारलौकिक याचा

समन्वय धर्माने साधलेला असतो. याच ज्ञानानुसार अर्जुन म्हणतो, माझ्यासाठी माझे नियतकार्य निरर्थक व निषिद्ध आहे. याच ज्ञानाचा आधार घेवुन श्रीकृष्ण म्हणतात, कीर्ति व स्वर्ग या दोन्हीपासुन वंचित करणारी तुझी भूमिका आहे.
व्यवहारानुसार अर्जुनाचे नियतकार्य ठरते. भगवदगीता कर्म या संदर्भातील पारलौकिक भाग "आत्मोन्नति"/ ज्ञान या संदर्भात स्पष्ट करीत आहे.

१. आत्मोन्नति या संदर्भात जीवनातील "अशाश्वत vs शाश्वत" ज्ञान स्पष्ट होते. जीवनमार्गातील "सकाम कर्म vs निष्काम कर्म" याचा हाच आधार आहे.

२. व्यवहार व आत्मोन्नति यांचा समन्वय सुखदुःखाने साधलेला आहे. व्यवहारात सुखासाठी कर्म करतो, तर दुःखान्त शक्तिसाठी कर्म हा आत्मोन्नतिचा भाग आहे. दुःखान्त म्हणजे योगसाधनेसाठी कर्माद्वारे समत्वयोग साधणे याचे शास्त्र स्पष्ट केले आहे.

३. व्यवहारात यश मिळविण्यासाठी जसे कार्यकौशल्य वापरतो, तसेच अनासक्त (मुक्त) राहुन ( ईश्वर) ज्ञानात स्थित असणे व

यज्ञभावाने (कर्मसमर्पण) कर्म करणे, कार्याद्वारे योग साध्य करणे हे कौशल्य साध्य करणे. "योगः कर्मसु कौशल्यम्"

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञान अवस्थित चेतसः।
यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।।(४-२३)

हेच कार्यकौशल्य(व्यवहार व आत्मोन्नति) साध्य करण्यासाठी ज्ञानाचा उपयोग केला आहे. (गुण -गुणातीत, ज्ञानविज्ञान-ज्ञान) म्हणुन ईश्वरज्ञान या संदर्भात "ज्ञानअवस्थितचेतसा" हा शब्दप्रयोग आहे.

सार :
अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत्।
असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह।।(१७- २८)
अर्थात (व्यावहारिक व पारलौकिक) कार्यकौशल्य या संदर्भात :
१. नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करणे. यज्ञभावाने (समर्पित) कर्म करणे.
२. कार्याचा एकनिश्चय करणे व समत्वयोगाने कार्यरत असणे.

३. बुद्धियुक्त असणे ज्यामुळे मार्गात स्थिर असतो, आत्मविश्वास(संशयमुक्त) असतो, योग्य-अयोग्य कार्य यांत निर्द्वन्द्व अवस्था साध्य होते. मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो.

********

(४-२३) :

"यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलियते"

(कार्याचे आध्यात्मिक व्यवस्थापन)

वर्तमानातील आव्हान:

संपुर्ण विश्वात ज्ञानविज्ञानाचे स्वागत होत असते. भारतिय संस्कृतित व्यावहारिक संस्काराला धर्म, ईश्वर यांचा संदर्भ दिलेला आहे. वर्तमानात युद्धक्षेत्रावर शस्त्रपाडाव होण्याचा प्रसंग असतांना अर्जुन त्याचवेळी निःशस्त्र होतो. निष्क्रियतेला धर्म ठरवितो. मनुष्याला वर्तमानात अडचण जाणवली तरी (उपाय सापडला नाही तर) Shortcut शोधुन "मी योग्य" सिद्ध करण्यासाठी Compare thinking, Judgement thinking चा वापर करतो व त्यात समाधान मानतो. या समर्थनाला धर्म, आदर्श यांचा संदर्भ

देत असतो. दुसरीकडे अंधश्रद्धा निर्मुलन वादी उपयुक्त मुल्यांनाही चुक ठरवित असतो. याप्रमाणे श्रद्धा, अंधश्रद्धा, मनुष्याची स्वमतांधता संवय यामुळे संस्कृतिचा आधार असलेल्या Scripture चे Scientific महत्वही नजरेआड होत असते. या पार्श्वभुमिवर मौल्यवान Scripture चे Scientific महत्व जगासमोर येणे आवश्यक असते. हाच संदेश भगवतगीता देत आहे.

भगवतगीतेने सर्वप्रथम ज्ञान म्हणजे काय? याच मुद्याला प्रकाशात आणले आहे. ज्ञानाला अज्ञान व अज्ञानाला ज्ञान ठरविणे या संवयीमुळे समाज भ्रमात सापडत असतो. याच भ्रमातुन भगवतगीता मुक्त करते. प्रश्नाचे निदान न करता सरळ Judgement thinking चा मनुष्य वापर करतो. यामुळे ज्ञानविज्ञान असुनही त्याचा उपयोग होत नाही. या संवयीचे कारण अहंकार असतो. ज्ञानानेच अज्ञानाचे Replacement होते. अहंकाराचे Replacement होण्यासाठी ईश्वरज्ञानाचा आश्रय असे प्रयोजन आहे.

अर्जुनाचा वर्तमानकाळ युद्धाचा प्रसंग असतो. याच काळाचे दर्शन विश्वरुपात घडविले. भगवतगीता ज्ञानाद्वारेच वर्तमानात मनुष्याला स्वतःची Destiny (कार्याचे प्रयोजन) जाणायचे आहे हा संदेश मिळतो.

वर्तमानातील कर्तव्य:

सृष्टिचक्रप्रवर्तनातील सहकार्य करणाऱ्या कार्यासाठी यज्ञ या शब्दाचे प्रयोजन आहे.

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।

कर्मजान् विद्धि तान् सर्वान एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे॥(४-३२)

मनुष्याच्या जीवनयात्रेत ज्या क्रिया घडतात त्या क्रिया Effective, Fruitful होण्यासाठी यज्ञ, दान, (काया, वाचा, मन) तप या त्रिविध कार्याचे प्रयोजन आवश्यक म्हटलेले आहे. अर्थात यज्ञ याच त्रिविध कार्याचा भाग असतो.

मनुष्याला इच्छा असतात. इच्छापुर्तिसाठी कार्य करतो, कार्याचे नियोजन करतो. इच्छापुर्तिबरोबरच समाधानही अनुभवत असतो. मानसिक शक्ति वृद्धिगत होते. याच प्रक्रियेसाठी(इच्छा-कर्म-दृढनिश्चय/ध्येय/आत्मसंयम - ज्ञान) "यज्ञ" शब्दाचे प्रयोजन आहे. अर्थात इच्छा कर्मेंद्रियाने, कर्मेंद्रियाचे कर्म संयमाग्निने भस्मिकरण होते. संयम /ध्येय ज्ञानाग्निने प्रदिप्त होतो.

श्रोत्र आदीनि इंद्रियाग्नि अन्ये संयमाग्निषु जुह्वति।

शब्द आदीन् विषयान् अन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति॥(४-२६)

आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।।(४-२७)

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

याप्रमाणे जीवनविकासातील व्यवस्थापनात यज्ञ तत्वाचा उपयोग होतो. हेच आध्यात्मिक व्यवस्थापन ठरते. आध्यात्मिक व्यवस्थापनाचा आधार बंधन-मुक्ति असते. यांत अग्नि, हवन यांचा संदर्भ ध्येय ठरविणे, Determination, निष्काम कर्म यासाठी उपयोगात येतो.

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानअवस्थित चेतसः।

यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।।(४-२३)

सार : Transformation

"The perennial wisdom of the Bhagavad Gita can teach us how to transform our character, conduct and consciousness to meet the challenges of everyday life. "

-C Leonard Perlmutter

***********

(४-२५)

*************************

दैवमेव अपरे यज्ञं योगीनः पर्युपासते।

ब्रह्माग्नौ अपरे यज्ञं यज्ञेनेव उपजुह्वति।।

*************************

(४-२५) :

"ब्रह्माग्नौ अपरे यज्ञं यज्ञेनेव उपजुह्वति"

(यज्ञ संकल्पनेचा जीवनविकासाच्या व्यवस्थापनात उपयोग)

विश्वाचे आरंभी प्रजा व देवता यांच्या परस्पर सहकार्यासाठी यज्ञ ही संकल्पना आली. या यज्ञ संकल्पनेत हवन हे समर्पण व अग्नि भस्मिकरण करते. (उदा. ज्या क्रिया घडतात त्यांत ध्येय -संकल्प असते. या प्रक्रियेत ध्येयाग्नित कर्माचे कष्ट भस्म होते) कर्मामुळे यज्ञ होत असतो व कर्म ब्रह्मामुळे होत असते. सृष्टिचक्रप्रवर्तन याच यज्ञ संकल्पनेद्वारा चालत असते.

सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा पुरा उवाच प्रजापति।(३-१०)

...

तस्मात् सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम्।(३-१५)

कर्मामुळे यज्ञ होतो, कर्म ब्रह्मामुळे होते. म्हणुन सर्वव्यापी ब्रह्म यज्ञात नित्य प्रतिष्ठीत असते.

ब्रह्मार्पण. ब्रह्म हविः ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।(४-२४)

दैवमेव अपरे यज्ञं योगीनः पर्युपासते।
ब्रह्माग्नौ अपरे यज्ञं यज्ञेनेव उपजुह्वति।।(४-२५)

कुणी योगी देवतापुजनासाठी यज्ञ करतात.

अशाश्वताशी Detachment यासाठी निष्काम कर्म हे भगवदगीतेचे मोक्ष या संदर्भात logic आहे. निष्काम कर्मासाठीच यज्ञ ही संकल्पना आहे. ब्रह्म शाश्वत या संकल्पनेतुन शाश्वताला समर्पण, हवनही ब्रह्म, अग्निही ब्रह्म, फलही ब्रह्म याप्रमाणे यज्ञ या संकल्पनेतुन सर्व ब्रह्ममय, वासुदेवमय आहे हे जाणत असतात. (समाजात राममय प्रचलित आहे. ) सर्व कर्माचे याच ज्ञानात विलिनीकरण होते.

याप्रमाणे "यज्ञ" या संकल्पनेचा जीवनविकासातील कर्मप्रक्रियेतील व्यवस्थापनात उपयोग होतो.

यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलियते।(४-२३)

....

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

अर्थात जीवनविकासमार्गात ज्ञानाचा कर्मात उपयोग व कर्माचे ज्ञानात विलिनिकरण या प्रक्रियेत यज्ञ या संकल्पनेचे व्यवस्थापन या संदर्भात महत्व स्पष्ट होते.

*भगवदगीता-स्वाध्याय ज्ञानयज्ञ

द्रव्ययज्ञाः तपोयज्ञा योगयज्ञाः तथा अपरे।

स्वाध्याय ज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः।।(४-२८)

विश्वात द्रव्ययज्ञ(अर्थविकाससंबंधी), तपोयज्ञ (यामुळे प्रतिकुल परिस्थितीत विचलित न होता आव्हान स्विकारतो), योगयज्ञ(समत्वयोग, दुःखान्त शक्तिसाधना इ. संबंधी), स्वाध्याय ज्ञानयज्ञ(जीवनविकाससंबंधी) असे विविध यज्ञ दृढत्वाने आचरले जातात. भगवदगीता ज्ञान स्वाध्याय ज्ञानयज्ञ म्हणुन ओळखल्या जाते.

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादम् आवयोः।

ज्ञानयज्ञेन तेन अहं इष्टः स्याम् इति मे मतिः।(१८-७०)

************

(४-२६)

************************

श्रोत्रआदीनि इंद्रियाणि अन्ये संयमाग्निषु जुह्वति।

शब्द आदीन् विषयान् अन्ये इन्द्रियाग्निषु जुह्वति।

************************

(४. २६):

"शब्द आदीन् विषयान् अन्ये इन्द्रियाग्निषु जुह्वति"

(State of want vs. State of Art)

जगात लोक सुखाची इच्छा करतात व (कळत-नकळत) कार्यरत असतात. कुणी कार्यात आनंद घेतो, कुणी कष्ट जाणुन टाळतो.

*State of Art:व्यवहारात प्राप्तिसाठी कार्य -

सुखासाठी कार्यरत असणे ही सहजक्रिया निसर्गात असते. व्यवहारात कार्य घडण्यास इच्छा(State of want) व सहजकार्य(State of Art) हे दोन factors कारण ठरतात.

State of Art या संदर्भात अर्जुन महाधनुर्धारी होता. या कार्याचा उपयोग त्याला स्वतःच्या विकासमार्गात (आत्मोन्नति) करण्याची संधी मिळते. पण याच कार्यकौशल्य (व्यवस्थापन)ज्ञानाचे अज्ञान असते व तो निष्क्रियता पसंत करतो. याला ज्ञान संबोधतो. तेंव्हा मनुष्यजीवनात विकासासाठी कार्याचे व्यवस्थापन हा विषय भगवतगीता स्पष्ट करते.

आपले नियतकार्य वाईट आहे म्हणुन अर्जुन avoid करतो. निष्क्रियतेचे समर्थन करतो. व्यक्तिगत कर्म या संदर्भात चांगले-वाईट, स्वार्थ-परमार्थ, पाप-पुण्य यावर भाष्य होते. हे द्वंद्व समर्थनाचा आधार बनवितो, अर्थात येथे अर्जुन द्वंद्ववश होतो. चांगले कार्य या संदर्भात द्वंद्व अडथळा, म्हणुन द्वंद्वमुक्तिचे महत्व(Tiebreaker, Firm) भगवतगीता स्पष्ठ करते.

"विकासमार्गातील कार्याचे व्यवस्थापन" या संदर्भात कार्यरत असता शांती अनुभवणे याच मुद्यावर भाष्य सुरु होते. (कार्यरत असतांना अर्जुन अशांत होतो व कार्यच टाळतो. ) वर्तमानात शांतिचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते.

यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।(४-२३)

यज्ञाचे logic यासाठी वापरले आहे.

इच्छा कार्याने (इंद्रियाग्नि) भस्म करणे, कार्य(कष्ट) दृढनिष्ठेत( संयमाग्नि) भस्म करणे. आत्मसंयमयोगाग्नि (ईश्वर) ज्ञानामुळे प्रदिप्त होतो.

शब्द आदीन् विषयान् अन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति।(४-२६)

सर्वाणि इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।

आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते॥(४-२७)

***********

(४-२७)

*************************

सर्वाणि इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।

आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।।

*************************

(४. २७) :"आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते"

कर्माद्वारे (अव्यय)ईश्वराची भक्ति, निष्काम कर्म हा भगवतगीतेचा व्यावहारिक संदेश आपण जाणत असतो. हीच प्रक्रिया जाणण्यासाठी कर्म व ईश्वर यांचा संबंध स्पष्ट होतो.

कर्माची प्रक्रिया "यज्ञ" या तत्वाने स्पष्ट केली आहे. या संदर्भात ईश्वर अधियज्ञ(कर्म घडविणारा) ठरतो.

इच्छा(इंद्रियविषय)कर्मात(इंद्रियाग्नि) भस्म होतात.

कर्म(इंद्रियकर्म)आत्मसंयमात(संयमाग्नि) भस्म होतात. याप्रमाणे सर्वच कर्मे(इंद्रियकर्म, प्राणकर्म) आत्मसंयमयोगाग्नित भस्म होतात. आत्मसंयमयोगाग्नि ईश्वरज्ञानाने प्रदिप्त होतो.

सर्वाणि इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।

आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।।(४-२७)

या प्रक्रियेत आत्मसंयम हा महत्वाचा शब्द आहे. हा शब्द आत्मवश, धीर(समदुःखसुखंधीरं), योगस्थ, योगयुक्त, बुद्धियोग अशा विविध अर्थाने कर्म व ईश्वरज्ञान यांचा समन्वय साधणारा दुवा असतो.

कर्म संदर्भातील "आत्मसंयम" महत्व:

चंचलत्वामुळे कार्याचा दृढनिश्चय होत नाही. अशांति असते. बुद्धिभ्रम होतो. ही मनोवश अवस्था असते, म्हणुन नाव वाऱ्याने वहावी तशी जीवनयात्रा घडते. म्हणुन Consciousness(Lower-Higher) संदर्भात "मनोअनुविधीयते vs आत्मवश्यै विधेयात्मा " यांतील भेद दर्शविला आहे. आत्मवश अवस्थेत निश्चित दिशेने नाव वल्हवतो.

ईश्वरज्ञानाची भूमिका:

बुद्धियोग ईश्वराची उत्तमकृपा(Grace of God) असते. ही कृपा दैव म्हणुन जाणतो. तर" दैव" हा शब्द भाग्य, Destiny या विविध अर्थानेही(मनुष्याच्या दृष्टिनुसार)Interprete होत असतो. या संदर्भात ईश्वर अधिदैव ठरतो.

कुणी ऐश्वर्यसुख मागतो, कुणी जिज्ञासु असतो. म्हणुन आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु, ज्ञानी असे चार प्रकार (ईश्वर) भक्ताचे ठरतात.

अर्जुनाची कांहीच मागणी नसते. यावेळी तो जिज्ञासु असतो. त्याला जीवन जाणुन घ्यायचे असते, ज्यामुळे वर्तमानात योग्य निर्णय करण्यास समर्थ होईल.

समाजात इच्छेमुळे कर्म घडते याची जाण असते पण

जिज्ञासु (Search करणारा)या अग्निमुळेच जगात (जगतहितासाठी)शोध लागलेत. यामुळेच निष्काम भक्ति घडते. म्हणुन कर्म घडण्याच्या प्रक्रियेत "इच्छा vs जिज्ञासु " यातील भेद जाणणे आवश्यक ठरते. ईश्वरप्राप्तिची वा जाणण्याची इच्छा असो, मोक्षाकांक्षि असो, या संदर्भात जिज्ञासु शब्द महत्वाचा आहे, ज्यामुळे बुद्धियोग मिळतो, जीवनज्ञान जाणतो. आत्मसंयमयोगाग्नि प्रदिप्त होण्याची ही प्रक्रियाच असते.

जिज्ञासु अपि योगस्य शब्दब्रह्म अतिवर्तते।(६-४४)

------ ----

कर्म घडण्याच्या प्रक्रियेत "यत्न-कालम्-दैवम्" या सुत्रात "काळ" या संदर्भात कुणी संताने म्हटले आहे,

"अच्छा वक्त आता है, पर "वक्त" पर ही आता है।जरुरी इंतजारकी है, धीरजकी है, संयमकी है।

***********

(४-२८)

************************

द्रव्ययज्ञः तपोयज्ञः योगयज्ञः तथापरे।

स्वाध्याय ज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रतः।

************************

(४-२८) :

"स्वाध्याय ज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रतः"

(Self learning, Self cultivation)

स्वाध्याय म्हणजे स्वतःच्या जीवनाचे ज्ञान जाणणे व या ज्ञानाचा दृढतेने जीवनात अंगिकार करणे. या अर्थाने स्वाध्याय हा शब्द ज्ञान, दैवीगुण, वाणीचे संस्कार(तप) या संदर्भात भगवदगीतेत आलेला आहे.

ज्ञान:

द्रव्ययज्ञः तपोयज्ञः योगयज्ञः तथापरे।

स्वाध्याय ज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रतः।(४-२८)

दैवीगुण : स्वाध्याय तपः आर्जवम् ।(१६-१)

वाङ्मय तप : स्वाध्याय अभ्यसनं चैव (१७-१५)

Self learning & practice(Self cultivation)

सॉक्रेटिस म्हणतो, मला कांहीच माहीत नाही हेच माझे ज्ञान आहे.

True knowledge exists in knowing that you know nothing.

Socrates

१. "ज्ञान "या संदर्भात अर्जुन कसे व कां भाष्य करतो हा अर्जुनविषादयोग आहे. समाजात "ज्ञान" या संदर्भात मनुष्य बाह्यजगावर(कुणी काय करावे, करु नये) भाष्य करतो. पण स्वतःच्या अंतर्जगातील प्रश्न येतो(स्वतः काय करावे) तेंव्हा निष्क्रिय झाला तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो.

२"स्वतःची जबाबदारी" या संदर्भात महर्षि वाल्मिकीच्या पुर्वाश्रमीतील वाल्याला आपल्या जबाबदारीचेच ज्ञान होते. त्याचे

Transformation होते. ही प्रक्रिया Self education, Self cultivation असते. याचप्रमाणे स्वतःची जबाबदारी या संदर्भात अर्जुनाच्या भूमिकेत बेजबादारी आढळते.

जीवनात व्यवहार असतो. या व्यवहारात कार्य करतो. (State of want-State of Art). या व्यवहारानुसारच धर्मयुद्ध ठरले असते. यानुसार अर्जुनाचे नियतकार्य ठरते. धर्मयुद्धानुसार अर्जुनाला लाभलेले व त्याने स्विकारलेले नियतकार्य execute करण्यासाठी कुरुक्षेत्रावर येतो. शंखनादाने उत्साहीत होतो, व शस्त्र उचलतो. या क्षणी शत्रुपक्ष न्याहाळण्यासाठी त्याच्या इच्छेनुसार श्रीकृष्ण रथ मधोमध उभा करतात. अर्जुन गोंधळतो, त्याचा निश्चय ढळतो. निष्क्रिय राहणे योग्य समजतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी "ज्ञान" वापरतो.

प्रत्यक्षात येथे व्यवहाराचा प्रश्न संपला असतो. या व्यवहारानुसार कार्य execute करायचे असते. पण अर्जुन या व्यवहाराला चुक ठरवितो. हे धर्मयुद्ध नसुन अधर्मयुद्ध आहे अशी वाच्यता करतो. येथे धर्म, ज्ञान या संदर्भात त्याचे जीवनात आचरण करण्यासाठी स्वतःची पद्धति वापरतो. व यानुसारच धर्मयुद्धाला अधर्मयुद्ध ठरवितो.

धर्म या संदर्भात इतरांप्रति, विश्वाप्रति कसे वागावे याचेच ज्ञान मनुष्य बालपणापासुन ऐकत आलेला असतो. या धर्मज्ञानानुसारच

अर्जुन भ्रमात सापडतो. याच पार्श्वभुमिवर मनुष्याला "स्वाध्याय" ज्ञानाची(Self awareness, Self learning, Self cultivation) गरज भासते.

याच संदर्भात सॅम्युयल स्माईलने SELFHELP या पुस्तकाद्वारे संदेश दिला. भगवदगीता हेच ज्ञान देत आहे. "स्वतःचा बंधु व्हा, स्वतःशी शत्रुवत् आचरण करु नका".

उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत्।
आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः॥(६-५)

"The spirit of self-help is the root of all genuine growth in the individual. "

-Samuel Smiles

********

(४-३२)

************************

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।

कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।

************************

(४-३२) :

"एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे"

(विश्वसंचलनात मनुष्याचे योगदान)

या विश्वात जे घडत असते, त्यांत मनुष्याच्या कार्याचे योगदान असते, सृष्टीच्या संचलनकार्याचे योगदान असते.

१. मनुष्याच्या कार्याचे योगदान:

*मनुष्याचा कर्म करण्यावर अधिकार आहे, अर्थात कर्म ठरविण्यावर(निर्णय) अधिकार आहे. याच अधिकाराचा अर्जुन वापर करतो, पण मी नियतकार्य करणार नाही ही भूमिका घेतो.

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।(१८-५९)

*याच आधारावर अर्जुनाला म्हटले तुला कार्य ठरविण्याचा अधिकार आहे. निष्क्रिय राहण्याचा निर्णय केला तरी प्रकृतिवश कार्य घडणारच आहे. म्हणुन परिणामाच्या भयामुळे निष्क्रिय होणे असे ठरविले तरी मनुष्य स्वभावजन्य कार्याने बद्ध असतो. ही प्रकृति असते. याच प्रकृतिवश अवस्थेत मनुष्य कार्यरत असतो.

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा।
कर्तुं न इच्छसि यत् मोहात् करिष्यसि अवशोअपि तत् ।।(१८-६०)

२. सृष्टिचे संचलनकार्याचे योगदान

*या विश्वात जे घडते त्यांत ईश्वराच्या विश्वसंचलनकार्याची भूमिका असते.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

ईश्वराचे विश्वसंचलनात सृष्टिचक्रप्रवर्तन असते. हे चक्र चालविण्यास मनुष्याचे (यज्ञ) कर्म सहकार्य करते.

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।(४-३२)

हे चक्र चालविण्यास जो सहकार्य करीत नाही, त्याचे जीवन व्यर्थ आहे.

एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्ततीह यः।
अघायुः इन्द्रियरामः मोघं पार्थ स जीवति॥(३-१६)

चांगल्या मनुष्याने सृष्टिच्या संचलनकार्यास सहकार्य करुन ईश्वराची भक्ति व कृपा साध्य करावी. हा संदेश भगवतगीता देत आहे.
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

याच आधारावर अर्जुनाला म्हटले, परिणामाचे भय बाळगुन निष्क्रिय राहण्याचा अर्थात नियतकर्म न करण्याचा आग्रह धरु नको.
कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूः मा ते संगोअस्तु अकर्मणि॥(२-४७)

कारण तु चांगला आहेस. व चांगल्या मनुष्याने मनोदुर्बलतेचा त्याग करावा.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

सार:

"God will not permit any troubles to come upon us, unless He has a specific plan by which great blessing can come out of the difficulty. "

Peter Marshall

******

(४-३२) :

"कर्मजान् विद्धि तान् सर्वान एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे"

(कर्माद्वारे मुक्तिचे तत्वज्ञान)

जीवनात सुखी व्हावे, दुःख नसावे असे कुणालाही वाटत असते. ऐश्वर्य मिळाले, मोठेपण मिळाले, कुणी स्तुती केली म्हणजे

जीवनात सुख मिळाले, अशी सुखी जीवनाची व्याख्या मनुष्य जाणत असतो. पण हेच जीवन जगतांना अडचणीचा सामना करावा लागतो, दुःखाचा सामना करावा लागतो. दुःख टाळण्यासाठी व मनसमाधानासाठी मनुष्य समर्थनभाष्य बोलतो, तुलना करतो, Excuses बोलतो. ही जीवनाची Survival mode असते. व "Survival of the fittest " हे जीवनाचे तत्वज्ञान बनते. यांत स्पष्टपणे व्यावहारिक मानसिकता बनते.

भगवतगीता जीवनाचे वेगळे तत्वज्ञान सांगते. ते बंधन-मुक्तिचे तत्वज्ञान आहे. दुःखाचे कारण बंधन असते व कर्म काम्य आहे म्हणुन कर्म बंधनात टाकतात असे जाणुन कांही जाणकार कर्माचाच त्याग करतात व संन्यास घेतात. तर भगवतगीता कर्माद्वारेच मुक्तिचे तत्त्वज्ञान सांगते. यासाठी यज्ञ(समर्पण प्रक्रिया), निष्काम कर्म या शास्त्राचे प्रयोजन आहे.

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।(४-३२)

सृष्टिचे चक्रप्रवर्तन अव्याहत सुरु असते. या विश्वात विविध कर्मयज्ञ सुरु असतात. हे सर्व यज्ञ कर्मानेच साध्य होतात.

अध्यात्म :

*कर्माचे Transformation (सकाम ते निष्काम) होण्यासाठी अध्यात्मज्ञानाचा उपयोग केलेला आहे. हे Transformation ज्ञान(Academic) ते कर्म ते ज्ञान (शाश्वत, Wisdom) याप्रमाणे असते. याद्वारे ज्ञान व कर्म यांचा संबंध स्पष्ट होतो.

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

* दुःखावर मात करण्यासाठी अध्यात्माचा उपयोग केला आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

ज्याला आपण मन म्हणुन ओळखतो, ते Outer self असते. व अंतरात्मा म्हणुन ओळखतो, ते Inner deep Self असते. मन पंचेंद्रियाशी संबंधित असते. तर अंतरात्मा शाश्वताशी (Universal) संबंधित असते. मन बुद्धिचा ताबा घेते ती स्थिति मनोवश असते व अंतरात्म्याच्या ताब्यात मन असते ती स्थिति आत्मवश (जितात्मनः) असते. आत्मवश स्थितित स्वतःच स्वतःचा बंधु असतो. म्हणुन संस्कार या संदर्भात बुद्धियुक्त या शब्दाचे प्रयोजन आहे.

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।

तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

*कर्म/कार्य व्यवहारात साधन असते. यामुळे नियतकार्य ठरते. Transformation प्रक्रियेत(सकाम ते निष्काम) हेच कार्य विकासातील साधन असते. कार्याद्वारा योग (दुःखान्त शक्ति) साध्य करणे हे कार्यकौशल्य असते. कार्यकौशल्यामध्ये (Art of work) स्वधर्म (नियतकार्य), कार्याचा एकनिश्चय(Determination, निर्णय), समत्वयोगाने (सिद्धि-असिद्धि) कार्यरत असणे यालाच "योगः कर्मसु कौशलम् " संबोधले आहे.

सार:

भगवतगीता मुक्तिचे अर्थात स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान आहे, ज्या स्वातंत्र्याचीच वर्तमानात मनुष्याला गरज निर्माण होते. हे स्वातंत्र्य कर्मानेच साध्य करायचे आहे. याचे शास्त्र भगवतगीता सांगत आहे. याच संदर्भात वर्तमानातील स्वतःचा निर्णयअधिकार, तत्संबंधी Determination (एकनिश्चय), स्वधर्म या मुल्याद्वारे मार्गावर स्वमंजुरी व्यवहारात समजुन घेणे आवश्यक आहे. (हाच संदेश अर्जुनाला दिला)

**********

(४-३३)

************************

श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञ ज्ञानयज्ञः परंतप।

सर्व कर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते॥

************************

(४. ३३)/१:

श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञात् ज्ञानयज्ञः परंतप।

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते॥

(कर्म vs. ज्ञान)

ज्ञान "योग्य" काय हे सांगते. ज्ञानामुळे प्रश्नाचे निदान होते. उपाय मिळतो. विज्ञानात दररोज भर पडत असते. या ज्ञानाचा कर्मात उपयोग होतो व ज्ञानाचा खजिना भरत असतो. कर्तृत्वाने विकास होतो, इतिहास घडतो. कर्म व ज्ञान हे याप्रमाणे परस्परपुरक असतात. हे सर्व जग जाणत असते.

जीवनविकासात कर्म महत्वाचे साधन आहे. या सत्याचे अज्ञान असेल तर कर्म कष्ट वाटते व कर्म टाळण्यासाठी "ज्ञान" बोलल्या

जाते. समाजात "ज्ञान" या संदर्भातच लोक भाष्य बोलत असतात. कर्म ऐश्वर्यासाठी केल्या जाते, मग ऐश्वर्य असेल तर कर्म करण्याची काय गरज?असे (दिव्य!) ज्ञान कर्म टाळण्यासाठी बोलल्या जाते. अर्जुनाला (दुःखदायी )नियतकार्य योग्य कसे?हे कळत नाही. निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान बोलतो. जीवनमार्गात कर्माचे महत्व कमी करुन ज्ञान श्रेष्ठ ही भूमिका अर्जुन घेतो. यामुळे जीवनमार्गात कर्म व ज्ञान यांची भूमिका भगवतगीतेच्या पटलावर येते.

श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञात् ज्ञानयज्ञः परंतप।
सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।।(४-३३)

अर्थात ऐश्वर्यासाठी कर्म करणे यापेक्षा ज्ञानाचे कार्य श्रेष्ठ आहे कारण अखेर सर्व कर्माचे ज्ञानात विलिनीकरण होते. हा भगवतगीतेचा कर्म व ज्ञान यांचा संबंध दर्शविणारा संदेश आहे.

*Wisdom/ Quality education
शिक्षणातुन ज्ञान संपादन होते. पण कर्तृत्वाने विकास होतो. ज्ञानाचा कर्मात उपयोग करणे हे गुणात्मक ज्ञान आहे. कर्माद्वारे विकास होतो. व्यवहारात कार्य साधन असते. कार्याद्वारे इच्छापुर्ति

हा व्यवहार असतो, संसार असतो. याच कार्याद्वारे शक्तिची साधना ही जीवनाची श्रेष्ठ level ठरते.

मनुष्यजीवनात सुखी होणे या संदर्भात अशांत असेल तर सुख कोठुन?(अशांतस्य कुतः सुखं) हे रहस्य भगवतगीता सांगते याचाच अर्थ सुखाचा शांतिशी संबंध असतो. अशांती ही मानसिक दुर्बलता असते. विचलित होणे ही अशांति असते. म्हणुन जीवनविकास या संदर्भात कार्याद्वारे शक्तिची (विचलित न होणे, दुःखान्त, योग, निर्भय) साधना हा संदेश भगवतगीता देते व याचसाठी कार्याद्वारे ईश्वरभक्तिचे प्रयोजन आहे. जीवनमार्ग विश्वासाने चालणे, स्वतःला "योग्य" अनुभवणे या संदर्भात " कार्याद्वारे शक्तिसाधना" (योगः कर्मसु कौशलम् ) हा संदेश महत्वाचा ठरतो. याच मार्गाला "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) असे भगवतगीतेत संबोधन आहे.

जीवनविकासाच्या या उच्च मार्गावर विचलित होत नाही. अर्थात कार्याचा दृढनिश्चय असतो. येथे अमृत/ईश्वर हे अंतिमधाम असते. सृष्टिची मुळ प्रवृत्ति, ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत हेच अंतिम ज्ञान असते. म्हणुन "उच्च मार्गाचे ज्ञान" या संदर्भात "तमसो मा ज्योतिर्गमय"

हा मार्ग बनतो. या मार्गात शक्तिची साधना होते. व या साधनेचे अखेर ज्ञानात परिवर्तन होते. याच ज्ञानाला जाणतो, अनुभवतो.

न हि ज्ञानेन् सदृशं पवित्रम् इह विद्यते।
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेन् आत्मनि विन्दति॥(४-३८)

************

(४. ३३)/२ :

विषय ४७७:
"श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञात् ज्ञानयज्ञः परंतप"
(ज्ञानाची श्रेष्ठता व कर्माचे महत्व)

समाजातील शिक्षणपद्धति व त्याचा व्यवसाय-रोजगाराशी संबंध हा विषय वर्तमानात चर्चेला येत असतो. शिक्षण घेवुन नोकरी मिळाली नाही तर बेरोजगार अशी नोंद होते. कुणी स्वतःचा व्यवसाय उभा करुन शिक्षणाला न्याय देत असतो. या पार्श्वभुमिवर

भगवतगीतेतील कर्म व ज्ञान यांचा परस्पर संबंध व भूमिका जाणुन घेणे महत्वाचे ठरते.

पुर्वि मनुष्य व देवता यांचे परस्पर सहकार्य साध्य होण्यासाठी "यज्ञ" प्रयोजन होते. सृष्टिचक्रसंचलनात कर्म या संदर्भात "यज्ञ" कर्माची आवश्यकता स्पष्ट केली आहे.

सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा...

परस्परं भावयन्तः श्रेयः परम् अवाप्स्यथ॥(३-११)

हा संदर्भ घेवुन भगवतगीतेत निष्काम कर्माचे व्यवस्थापनात यज्ञ या संकल्पनेचा उपयोग केला आहे.

यज्ञार्थात् कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधनः।(३-९)

इच्छेचे कर्माच्या अग्नित हवन होते. कर्माचे एकनिश्चयात (दृढत्व-Determintion) हवन होते. ज्ञानाने प्रदिप्त झालेल्या आत्मसंयमयोगाग्नित निश्चयाचे अर्थात कर्माचे हवन होते.

शब्द आदीन् विषयान् अन्ये इंद्रियाग्निषु जुह्वति।(४-२६)

.. आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।(४-२७)

सृष्टित जे विविध (कर्मरुपी) यज्ञ होत असतात, ते कर्मानेच साध्य होतात. द्रव्यप्राप्ति व वृद्धिसाठीसाठी केलेले कर्म द्रव्ययज्ञ व ज्ञानप्राप्ति व वृद्धिसाठी केलेले कर्म ज्ञानयज्ञ म्हटले आहे. कर्मानेच विकास साध्य होतो. ज्ञान सर्वश्रेष्ठ असले तरी सर्व कर्माचे अखेर ज्ञानातच विलिनीकरण होते.

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।(४-३२)
श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञ ज्ञानयज्ञः परंतप।
सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।।(४-३३)

जीवनमार्ग चालण्यासाठी कार्यसंस्कार आवश्यक असतात.
जीवनात कर्मानेच विकास साध्य होतो, जीवनयात्रा चालत असते. ज्याला चालायचेच नाही त्याला मार्गाची गरज वाटत नाही. त्याचप्रमाणे ज्यांना विकासमहत्व कळते त्यांना कर्माचे महत्व कळते.
शरीरयात्रा अपि च ते न प्रसिद्धेत् अकर्मणः।(३-८)

सार:

जगात शिक्षण आले, जीवनात शिक्षण घेतले, ज्ञान मिळविले, पण विकास कर्मानेच होत असतो. अर्थात ज्ञानाचा कर्मासाठी उपयोग करणे म्हणजेच विकासासाठी उपयोग ठरतो. जीवनविकासासाठी कर्मकौशल्य साध्य करणे हा भगवतगीतेचा संदेश आहे.

"योगः कर्मसु कौशलम् "

*****

४. ३३/३

"सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते"

जीवनविकासात ज्ञान, कर्म व भक्तिचा समन्वय साधणारा हा संदेश आहे. भगवतगीतेत मनुष्यजीवनात विकासासाठी कर्म सर्वात महत्वाचे साधन आहे. तर या विश्वात ज्ञान सर्वश्रेष्ठ म्हटले आहे. कर्मासाठी ज्ञानाचा वापर होतो. सर्व कर्माचे अखेर (ईश्वर)ज्ञानात विलिनिकरण होते.

कर्म टाळण्यासाठी ज्ञानाचा वापर अर्जुन करतो. या मुद्यावरच भगवतगीता सुरु होते, व कर्म आणि ज्ञान यांचा संबंध स्पष्ट करते. ज्ञान संशयरुपी अंधार मिटविणारा प्रकाश आहे. ज्ञानाचा वापर

कर्मात होतो. निश्चय दृढ होतो. विश्वासाने कार्य करतो. भक्तिमुळे कर्माचे ज्ञानात विलिनिकरण होते.

"यज्ञ" ही संज्ञा ज्ञान, कर्म व भक्तिचा समन्वय साधण्यासाठी कर्मासाठी Symbolic माध्यम ठरते.

कर्म:

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।

कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे॥(४-३२)

या सृष्टित विविध कर्म घडतात. कर्मानेच सृष्टिचक्र (Nature Cycle) प्रवर्तित असते. या प्रवर्तनचक्राला मनुष्याचे कर्म सहकार्य करते. कर्म टाळुन जो सहकार्य करीत नाही, तो केवळ इंद्रियतृप्तिसाठी जगत असतो.

एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्तयत् इह यः।

अघायुः इंद्रियरामः मोघं पार्थ स जीवति॥(३-१६)

ज्ञान:

श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञ ज्ञानयज्ञः परंतप।

सर्व कर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते॥(४-३३)

द्रव्यसंबंधी कार्यापेक्षा ज्ञानसंबंधी कार्य श्रेयस्कर ठरते.

ज्ञानाचा(ज्ञानविज्ञान) उपयोग कर्मासाठी होतो. अखेर (भक्तिद्वारा) सर्वकर्माचे (ईश्वर)ज्ञानात विलिनिकरण होते. या अर्थाने ईश्वरज्ञान ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत ठरते.

भक्ति:

यथा एधांसि समिद्धो अग्निः भस्मसात् कुरुते अर्जुन।

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा।।(४-३७)

जसे सर्व लाकुड अग्नित भस्म होते, तसेच (ईश्वर)ज्ञानाने प्रदिप्त झालेल्या अग्नित (भक्तिमुळे-हवन) सर्वकर्म भस्म होतात. ज्ञान व भक्तिद्वारा कर्मसंन्यास(अकर्ता-अकर्म) याप्रमाणे कर्मासाठी "यज्ञ" Symbolic माध्यम ठरते. जीवनमार्गाच्या आध्यात्मिक व्यवस्थापनात याचा महत्वाचा उपयोग भगवतगीतेत दर्शविला आहे.

सर्वाणि इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।

आत्मसंयम योगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।।(४-२७)

***********

(४-३६)

**********************

अपिचेत् असि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः।

सर्वज्ञान प्लवेनैव वृजिनं सन्तरिष्यसि ॥

************************

४. ३६/१:

"अपि चेत् असि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।

सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि॥"

(Improving Self)

"There is only one corner of the universe you can be certain of improving, and that's your own self. "

Aldous Huxley

मनुष्याचा सर्वात मोठा अडथळा मनुष्य स्वतःच असतो.

हनुमानाजवळ उड्डान शक्ति होती. पण याच शक्तिची त्याला ओळख नव्हती. सुर्याच्या दणक्यामुळे शक्तिचा विसर पडला होता. जाम्बुवन्ताने योग्य वेळी याच शक्तिची ओळख करुन दिली. ज्या शक्तिचे लंकायुद्धात मोठे योगदान ठरले.

मनुष्य आपली नैसर्गिक शक्तिही विसरतो, तेंव्हा आपली ओळखच गमावतो. यामुळे कोंबडेही गरुडाला कोंबडाच समजतात व गरुड आपली ओळख विसरतो. गरुडपिलु कोंबड्याच्या कळपात वाढते. मोठे झाल्यावर त्याला उडावेसे वाटते. पण कोंबडे त्याला "आपले काम नोहे " म्हणुन खाली ओढतात.

"Born to win but conditioned to loose"

स्वतःला श्रेष्ठ दर्शविण्याच्या प्रयत्नात मनुष्य तुलना इ. संवयीमुळे स्वतःची ओळखच विसरतो. स्वतःला तुच्छ लेखतो. अर्जुनाला युद्ध केल्यामुळे आपण पापी ठरु असे भय वाटते. व येथे स्वतःच स्वतःचा अडथळा ठरतो. अर्जुनाची ही मनोवश अवस्था असते. भगवतगीता या अवस्थेला स्वतःच स्वतःचा शत्रु ठरवीत आहे व स्वतःचा बंधु होण्यासाठी आत्मवश अवस्था(जितात्मनः) याचे महत्व सांगते. हाच भगवतगीता ज्ञानाचा पाया आहे.

प्रत्येकजण Unique आहे. स्वतःच स्वतःचा अडथळा बनु नये, याचसाठी ईश्वराचे ज्ञान व त्याचा आश्रय याचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते. यामुळे "अमृतत्वाय कल्पते" हा विकासमार्ग जाणतो.

अपि चेत् असि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि।।(४-३६)

बोध-

"Every field of activity of world needs orgonizers, creaters, leaders. One of the keys for being orgonizer is recognizing that everybody has gifts and talents. A good leader will learn how to harness those gifts toward the same goal. "

ज्या अडथळयामुळे मनुष्य चांगला, विद्वान असुनही स्वतःची शक्ति विसरतो. त्या अडथळयावर विजय मिळविण्यासाठी भगवतगीता "ज्ञान" या संदर्भात ईश्वरज्ञान, ईश्वरभक्ति यांचे महत्व सांगते . व मनुष्याला जीवनाचा शाश्वत विकासाचा (सुखी

जीवनाचा, आत्मनो मोक्षार्थ) मार्ग सापडतो, या मार्गाचे विश्वात (जगतहिताय) योगदान असते.

******

(४. ३६)/२

:"सर्वज्ञान प्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि"

जीवनविकास संदर्भात ज्ञानविज्ञानाचा कर्मात वापर कर्माचे महत्व दर्शविते व कर्माचे ज्ञानात विलिनिकरण ज्ञानाचे श्रेष्ठत्व दर्शविते. याप्रमाणे ज्ञानाचे कर्मात व कर्माचे ज्ञानात Transformation असते. जीवनविकासात याच Transformationचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते.

सृष्टिचक्रप्रवर्तन या संदर्भात यज्ञ ही संज्ञा समर्पित कर्मासाठी वापरली आहे. विश्वात विविध यज्ञ होत असतात व ते सर्व कर्माद्वारे घडत असतात.

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।(४-३२)

तर लगेच ज्ञानाचे श्रेष्ठत्व दर्शविले आहे.

श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञ ज्ञानयज्ञः परंतप।
सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते॥(४-३३)

जगात विज्ञान आले. या ज्ञानविज्ञानाचा विकासात उपयोग झाला, व होत आहे. हा विकास कर्मानेच घडत असतो. याच कर्माचे ज्ञानात विलिनिकरण होते. येथे ईश्वर ज्ञान- विज्ञानाचा स्त्रोत आहे हे दर्शन आहे.

जीवनात ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी ईश्वराचा आश्रय महत्वाचा ठरतो. याच आश्रयामुळे जीवननाव तरुन जाते. अर्थात हेच परिवर्तन असते. या परिवर्तनामुळे वाल्याचाही वाल्मिकि झाला.

अपिचेत् असि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः।
सर्वज्ञान प्लवेनैव वृजिनं सन्तरिष्यसि ॥(४-३६)

याप्रमाणे ज्ञानविज्ञान आणि ईश्वर याचे नाते जाणुन हा ज्ञानाचा आश्रय "परिवर्तन" घडवुन आणते. हे परिवर्तन "Transformation " स्वरुपाचे असते. हे परिवर्तन दृष्टिबदल म्हणुनही ओळखल्या जाते.

Transformation:

What is vs What should be?

*सकाम कार्य ते निष्काम कार्य

*निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान vs ज्ञानाने संशय मिटवुन (योगासाठी कार्य घडण्यासाठी)कार्याचा दृढनिश्चय करणे .

*फलसिद्धिसाठी कर्म ते योगासाठी(Exercise)कर्म

*मनोवश मानसिकता ते आत्मवश मानसिकता

*अयुक्त vs युक्त

* मोहामुळे निष्क्रियता येते, Tie निर्माण होतो. म्हणुन मोह vs जीवन मुल्य. मुल्य Tiebreakerची भूमिका करते. स्वतःचा कार्यनिश्चय दृढ होतो.

*तम(Mode of ignorance) vs. सत(Mode of goodness/Wisdom)

शेवटी

*अहंकार आश्रय vs ईश्वर आश्रय

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे?(१८-५९)

.....

स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन् कर्मणा।(१८-६०)

.....

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।

भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

अर्थात प्रकृतिने बद्ध असल्यामुळे कर्म घडत असतात. ईश्वराच्या उर्जेमुळे प्रकृति क्रियाशील असते. अहंकाराचा आश्रय अशाश्वताचा आश्रय असतो व ईश्वराचा आश्रय शाश्वताचा आश्रय असतो.

***********

(४-३६)/३:

"अपिचेत् असि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तम्।

सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं सन्तरिष्यसि।।"

(ज्ञानरुपी नौका)

समाजात प्रत्येक मनुष्य "मी योग्य" समजुनच जगत असतो, किंवा योग्य सिद्ध करण्यासाठी समर्थन करतो. या पार्श्वभुमिवर चांगल्या मनुष्याला अपराधिक भावना आल्यामुळे त्याची काय स्थिति होते हे अर्जुनविषादयोगात स्पष्ट होते. एकीकडे अर्जुनाला दुःख होते व कार्य टाळणे ही त्याची गरज बनते, तर दुसरीकडे स्वतःच्या भूमिकेला योग्य सिद्ध करण्यासाठी स्वतःला ज्ञानी ठरवितो.

या घटनेत अप्रत्यक्षपणे अज्ञान व ज्ञान हे दोन्ही मुद्दे निर्माण होतात. १. कार्यात संशय निर्माण झाल्यामुळे निर्णय घेण्यास सक्षम नसणे हे अज्ञान. २. मनुष्य जो निर्णय करतो तो योग्य समजुनच करतो किंवा (योग्य नसला तरी) योग्य सिद्ध करण्यासाठी "ज्ञान"वापरतो. येथे "ज्ञान" हा विषय येतो.

भगवदगीता ज्ञानाला जगातील सर्वश्रेष्ठ स्थान देते. ज्ञानामुळे संशय मिटतो. द्वन्द्वमुक्ति होते. विकास होतो.

वीतरागभयक्रोधा मन्मया माम् उपाश्रिताः।

बहवो ज्ञानतपसा पूता मद् भावम् आगताः।।(४-१०)

आसक्ति, अपराधिक भावना यामुळे भय, क्रोध हे विकार असतात. साहसाचा अभाव याचमुळे असतो. जीवनमार्गात ईश्वराचा आश्रय याचे महत्व "ज्ञान " या संदर्भातच भगवदगीता येथे स्पष्ट करते.

Courageous act :

There is a close connection between fear and confidence. Fear and confidence in relation to courage can determine the success of a courageous act or goal.

जीवनमार्गात भय विरुद्ध साहस असते. हे साहस दोन प्रकारचे असते. भौतिक(Physical courage) व नैतिक(Moral courage).

Physical courage is bravery in the face of physical pain, hardship, even death or threat of death,

while moral courage is the ability to act rightly in the face of popular opposition, shame, scandal, discouragement, or personal loss.

अर्जुनाला "नैतिक"या संदर्भातच संशय निर्माण होतो. म्हणुन नैतिक साहसाची(Rightous act) गरज असते. याचसाठी भगवदगीतेचा संदेश आहे,

अपिचेत् असि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तम्।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं सन्तरिष्यसि।।(४-३६)

अर्थात ज्ञानरुपी नौकेद्वारा (दुःखमय)पापरुपी समुद्रातुन तरुन जातो. याप्रमाणे चांगलेपणा सक्षम होण्यासाठी [जीवनमार्गात ईश्वराचा आश्रय(अमृतत्वाय कल्पते) व (समर्पण)भक्ति] १. अज्ञानाचे निवारण व २. विकास-साधना होण्यासाठी ज्ञान या दोन्ही संदर्भात (नौकेसमान) महत्वाची भूमिका बजावते.

*************

(४-३७)

*************************

यथा एधांसि समिद्धो अग्निः भस्मसात् कुरुते अर्जुन।

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा।।

*************************

(४-३७)विषय ५९५ :

"यथा एधांसि समिद्धो अग्नि भस्मसात् कुरुते अर्जुन"

(ज्ञानाग्नि-विकासात्मक अग्नि)

ज्ञानाग्नि:

जीवनविकासात ज्ञान, कर्म व भक्ति यांची निश्चित भूमिका भगवतगीता स्पष्ट करते. हा समन्वय "यज्ञ" याद्वारे साधलेला आहे. सृष्टिचक्र प्रवर्तनात यज्ञ महत्वाची भूमिका बजावते.

यज्ञार्थात् कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधनः।

तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसंगः समाचर।।(३-९)

सृष्टिचक्रप्रवर्तन:

अन्नात् भवन्ति भूतानि पर्जन्यात् अन्न संभवः।

यज्ञात् भवति पर्जन्यो यज्ञः कर्म समुद्भवम् ।।(३-१४)

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।(४-३२)

जीवनविकास:
इंद्रियाग्निमध्ये विषय(इच्छा)भस्म होतात. आत्मसंयमाग्नि (दृढनिश्चय) मध्ये इंद्रियकर्म भस्म होतात. ज्ञानाने आत्मसंयमयोगाग्नि प्रदिप्त होतो.
सर्वाणि इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपीते।।(४-२७)

जसे अग्नि सर्व लाकडांना भस्म करतो. तसेच ज्ञानाग्नि कर्मातील कष्टाचे, संशयाचे, सर्व कर्माचे भस्मिकरण करते.

यथा एधांसि समिद्धो अग्नि भस्मसात् कुरुते अर्जुन।
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा।।(४-३७)

सार :

"Just as a candle cannot burn without fire, men cannot live without a spiritual life. "

-Buddha

भगवतगीतेत अग्नि या शब्दाचा प्रयोग ज्ञान, यज्ञातील अग्नि याद्वारे विकासात्मक अर्थाने आलेला आहे. समाजात चिंताग्नि, क्रोधाग्नि या विध्वंसक अग्निची ओळख असतेच. विध्वंसक अर्थाने "काम(Limitless desire)" या शब्दाचा प्रयोग केलेला आहे. ज्यामुळे बुद्धिनाश होतो, अर्थात ज्ञानावर आवरण असते.

आवृतं ज्ञानम् एतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा।
कामरुपेण कौन्तेय दुष्पूरेण अनलेन च॥(३-३९)

जीवनातील विध्वंसक अग्निला सकारात्मक/विकासात्मक ज्ञानाग्निने Replace करावे हा भगवतगीतेचा संदेश आहे.

*******

(४-३७):"ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा"

(व्यवहार, आदर्श व ज्ञान)

समाजात व्यवहार असतो. व्यवहारालाच आदर्शाचा मुलामा देऊन स्वतःच्या व्यवहारसिद्धिसाठी आपले मत लादणे शोषणाचे कारण ठरते. हे कार्ल मार्क्सने दर्शवुन दिले. व्यावहारिक शोषणामुळेच महाभारतात धर्मयुद्ध ठरते. पण प्रत्यक्ष युद्धाचे वेळी अर्जुन दुःखी होतो, गोंधळतो व युद्ध न करणे योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी आदर्शाचा मुलामा देतो.

ज्ञान:

अर्जुन चांगला मनुष्य असुनही त्याला पापाचा संशय येतो. त्याची Priority दुःख टाळण्याची असली तरी युद्ध करण्याला पाप ठरवितो. अर्जुन अज्ञानाला ज्ञान ठरवीत आहे, हे वास्तव श्रीकृष्ण दर्शवुन देतात . आदर्शामुळे निर्माण झालेला गोंधळ दुर करण्यासाठी "ज्ञान" असते. यामुळे "ज्ञान" (What is wisdom?Purpose of Knowledge)हा विषय पटलावर येतो.

कर्म:

समाजात चांगलेपणा या संदर्भात प्रबोधन होते. पण Mental poverty, Negative mindset, भय मनुष्यजीवनातील

अडथळा असते. यावर उपाय करणे मनुष्याची Priority असली पाहिजे, याचसाठी कर्म हे महत्वाचे साधन आहे हाच संदेश भगवतगीता देत आहे.

*What circumstances drives our life?

"There might number of circumstances, emotions, values drives the life. But it is response either fear or faith cause the drive. Fear arrest the devepopement and keeps life stagnant. Faith motivate life to get ahead.

Fear & Mental poverty:

Fear is a state of mind. Fear is an uncomfortable emotion that causes a person to feel threatened or believe that something or somebody will afflict them or cause them some sort of pain. It is mental poverty that if left untreated can hinder us from achieving our full potential.

Mental poverty & Negative mindset:

Mental poverty can spread like an uncontrollable forest fire if you do not stop the mindset in its tracks. This negative mindset can be passed along to your progeny if you do not fight to control it. "
नकारात्मक मानसिकता अज्ञानाचे कारण ठरते. तर सकारात्मक मानसिकतेसाठी ज्ञान असते. याच पार्श्वभुमिवर "वर्तमानात ज्ञानाचा आश्रय"हा भगवतगीतेचा विषय आहे.

ज्ञानाग्नि:

जीवनाचे ज्ञान, जीवनमार्गाचे ज्ञान हा प्रत्येक मनुष्यासाठी जिव्हाळयाचा प्रश्न असतो. जीवनाची सामान्य Level नैसर्गिक (प्रकृति)असते. मनुष्य आपल्या स्वभावनियत प्रकृतिनुसार जगत असतो. याच मार्गात सुखदुःख अनुभवत असतो. यालाच मनुष्य व्यावहारिक जगणे जाणतो. अर्जुन (व्यावहारिक)कर्म करण्याच्या मार्गावर असतांनाच या Mental poverty ची ओळख होते, अज्ञानाची ओळख होते.
(क्लैब्यं मास्म गमः पार्थ... २-३)

ज्ञानामुळे विश्वास असतो. तर भयाचे कारण अज्ञान असते. अर्थात जीवनात ज्ञानाचा आश्रय विश्वास देतो. "ज्ञान" याच

संदर्भात ईश्वराचा आश्रय ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी भगवतगीता अध्यात्मज्ञान सांगते, ज्यामुळे "अमृतत्वाय कल्पते" हा विकासमार्ग(२-१५) जाणतो. व्यवहारमार्गातील सकाम कार्य निष्काम कार्यात Transform होते.

अपिचेत् असि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तम्।
सर्वज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यति।।(४-३६)

या मार्गावर योग्य-अयोग्य(पाप-पुण्य) या द्वंद्वापासुन मुक्त असतो. अर्थात विचलित होत नाही. कर्म ईश्वरभक्तिसाठी या भावनेने केल्या जाते. जीवनमार्गात कर्मातील द्वंद्वमुक्तिसाठी ज्ञान या संदर्भात ईश्वराचा आश्रय ज्ञानाग्नि ठरतो. जसा अग्निमुळे काष्ट भस्म होतात, तसेच जीवनमार्गातील कर्म(योग्य वा अयोग्य) ज्ञानामुळे भस्म होते.

यथा एधांसि समिद्धो अग्निः भस्मसात् कुरुते अर्जुन।
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा।।(४-३७)

***********

(४-३८)

*************************

न ही ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।

तत्स्वयं योगसंसिद्धः कालेन् आत्मनि विन्दति।।

"*************************

-

(४. ३८)/१:
"न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते"

ज्ञानविज्ञानाचा काळ (१५वे शतक) युरोपातAge of Reasoning/Enlightenment Age म्हणुन ओळखल्या जाते. व्यवस्थापन क्षेत्रात Success stories चा हार्वर्ड मध्ये अभ्यास होतो. अर्थात जगातील चांगलेपणाचा, ज्ञानाचा आदर होतो!स्विकार होतो.

"Let all the noble thoughts come to us from the Universe"

जीवन संघर्ष आहे, हे घोषवाक्य आपण ऐकत असतो. हा संघर्ष म्हणजे जीवनातील प्रश्न सोडविण्याची (सकारात्मक) मानसिकता

असते. जीवनात प्रश्न आहे, दुःख आहे, अडचणी येतात. म्हणुनच मनुष्य (प्रश्न सोडविण्यासाठी) कार्यरत असतो. पण उपाय न करता केवळ निष्क्रियतेचे समर्थन करणे व आपण योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी उपलब्ध ज्ञानाचा वापर करणे ही विद्वत्ता नसुन नकारात्मक मानसिकतेचे प्रदर्शन असते. अज्ञान असते!याच मानसिकतेने जगत राहिले तर सतत टिका करण्याची संवय जडते. यामुळे जगातील चांगलेपणाचे दर्शन होत नाही. भगवतगीतेने (ज्ञान-अज्ञान यासंदर्भातील) याच मुळ मुद्याला highlight केले आहे. व जीवनात ज्ञान व अज्ञान या विषयावर प्रकाश टाकला आहे. याचमुळे "जीवनातील अज्ञान" या संदर्भात अज्ञान, मुढ, विमुढात्मा असे शब्दप्रयोग आलेले आहेत.

न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।(३-२६)
अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुं आश्रितः।(९-११)
अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

वर्तमान ज्ञानविज्ञानाचा आहे. जीवनात ज्ञान म्हणजे प्रकाश असतो व अज्ञान अंधार असते. ही भूमिका समजली तर धर्मही कळेल. धर्म कळला तरच अधर्म कळेल. यावरुन भगवतगीता धर्मापेक्षा ज्ञानाला महत्व देत आहे, हे स्पष्ट होते. म्हणुन म्हटले,

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।(४-३८)

सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।(१८-६६)

******

(४. ३८)/२:" न हि ज्ञानेन सदृशं "

जगातील सर्व शास्त्रच नव्हे तर सर्व धर्मशास्त्र यांतील ज्ञानाच्या उत्पत्तिचे मुळ ज्ञानातच आहे. व हे मुळ ज्ञान ईश्वर आहे. याच मुळ ज्ञानाचा(ईश्वर) अंश मनुष्याच्या जिवीत तत्वात (हृदयी) वास करते. हेच ज्ञानतत्व सर्व सृष्टिशी जोडले असते.

सर्वभूतेषु एनैकं भावम् अव्ययम् इक्षते।

अविभक्तं विभक्तेषु तद् ज्ञानं विद्धि सात्विकम् ।।(१८-२०)

जीवनांत, समाजात प्रश्न असतात. हेच प्रश्न सोडविण्यासाठी ज्ञान असते. या संदर्भात ज्ञानाची भूमिका प्रकाशाची असते. जी अज्ञानरुपी अंधाराला छेद देते.

दुसऱ्या महायुद्धाचा वणवा जगभर पसरला. हा वणवा शमविण्यासाठी युद्धपातळीवर संशोधन झाले. विध्वंसक अणुबाॅम्ब यांतुनच जन्माला आलेत. १९३९ मध्ये सुरु झालेले युद्ध १९४५ च्या उत्तरार्धात संपुष्टात आले. यांतील विध्वंसाने विज्ञान आणि मानवता या विषयाला जन्म दिला. जसा "धर्म आणि मानवता", "ईश्वर व विज्ञान" हा विषय अजुनही चर्चिल्या

जातो. विज्ञान असो वा धर्म जगात मानवतेचा संदेश देण्यासाठीच ( सर्वभूतहितेरतः) भगवतगीतेचा उदय झाला.

असुरशक्तिमुळे जेंव्हा मानवता धोक्यात येते, त्याला भगवतगीता अधर्माचा उदय म्हणते.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।

अशा स्थितित चांगले असो वा विद्वान यांनाही स्वतःच्या जीवनात संशय उत्पन्न होतो. असाच संशय अर्जुनाच्या हृदयी उत्पन्न झाला. युद्धपातळीवरच हा प्रश्न सोडवितांना भगवतगीता जगासमोर आली. व त्यांत मनुष्यजीवनांतील "ज्ञान "या संदर्भातील भूमिका" कशी असते" व "कशी असावी" याचे ज्ञान(What is and What should be) स्पष्ट होते. जगातील तत्वज्ञ Knowledge vs Wisdom या विषयावर याचमुळे प्रकाश टाकत असतात. व यांत Wisdom जिंकत असते.

"The experience gathered from books, though often valuable, is but the nature of learning; whereas the experience gained from actual life is one of the nature of wisdom. "

Samuel Smiles

ज्ञान संशयमुक्त करते, विश्वास देते. वर्तमानात मनुष्य शिक्षित होतो. पण या ज्ञानाचा उपयोग जीवनविकासात होणे महत्वाचे असते.

अर्जुनाला धर्मज्ञान होते, पण ते ज्ञान त्याचा प्रश्न(युद्ध करणे योग्य कि अयोग्य?) सोडवु शकत नाही. याउलट आपल्या निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी या ज्ञानाचा उपयोग करतो. भगवतगीतेचे सर्वात महत्वाचे योगदान याच संदर्भात आहे. मनुष्याला अज्ञानी व ज्ञानी भूमिकेतील भेद दर्शविते.

जगात वाद कोणतेही असोत, मनुष्याला त्याच्या जीवनातील अज्ञानरुपी अंधार छेदणे, केवळ त्याचेच दायित्व असते. मनुष्यजीवन ईश्वराचे Gift आहे. त्याच ईश्वराचा आश्रय करणे म्हणजे ज्ञानाचा आश्रय करणे असते, हे सत्य भगवतगीताच केवळ स्पष्ट करते.

"न ही ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।"(४-३८)

***********

(४-३९)

************************

श्रद्धावान लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः।

ज्ञानं लब्ध्वा परां शांतिं अचिरेण अधिगच्छति।।

************************

(४. ३९)/१:" श्रद्धावान लभते ज्ञानं"

Ego=1/Knowledge

" More the knowledge lesser the ego, lesser the knowledge more the ego. "

Albert Einstein

अल्बर्ट आईंस्टाईनने मनुष्यजीवनातील ज्ञान व अहंकार याचे समिकरण मांडले. भगवतगीतेने जीवनमार्गात ज्ञान व ईश्वर यांचा संबंध स्पष्ट केला. ज्ञानाचा आश्रय करण्यासाठी ईश्वराचा आश्रय आहे, अहंकारामुळे अज्ञानाचा आश्रय असतो हे सुत्र स्पष्ट केले. "अहंकार "शब्द अशाश्वत प्रकृतिसाठी, तर "ज्ञान" शब्द शाश्वत

ईश्वरासाठी वापरला. या आधारावरच जीवनमार्ग "मृत्योर्मा अमृतंगमय" बनतो.

अर्जुन दुःखी, अशांत होतो. निष्क्रियतेचे समर्थन करतो. अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. अशांतीचे कारण अज्ञान असते. यातुन मनुष्याच्या दुर्बलतेची ओळख होते. अज्ञानाची ओळख होते. अज्ञान असणे हा दोष नाही पण अज्ञानाला ज्ञान दर्शविणे हा दोष ठरतो. मनुष्य जे करतो वा करीत नाही, ही भूमिका योग्य समजुनच घेतो. निष्क्रियतेचेही समर्थन योग्य समजुनच करतो. हा दोष अहंकारामुळे असतो व हेच श्रीकृष्ण दर्शवुन देतात.
अहंकार विमुढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

*ज्ञान
मनुष्यजीवनात दुःख, अशांती येते, अडचणी येतात. आधुनिक विज्ञानाच्या इतिहासाचे अवलोकन केले तर जेंव्हा जेंव्हा अडचणी जाणवल्या, अडचणीचे कारण शोधल्या गेले. आर्केमिडिजने Gravity शोध लावला व सोन्यातील भेसळ कळली.
ज्ञानविज्ञानाच्या क्रांतिमुळे युरोपात १५वे शतक "Enlightenment Age" संबोधल्या गेले.

शिक्षणातुन ज्ञान प्राप्त होते. या ज्ञानाचा उपयोग व्यावसायिक कार्यात होतो. हे व्यावहारिक सत्य आपण जाणतो. वर्तमानात शिक्षण सर्वांना उपलब्ध आहे. यातुन ज्ञानविज्ञान प्राप्त होते. स्वतःला कार्यरत करणे यासाठी विकासाचा मार्ग जाणणे व कार्याचा मार्ग ठरविणे याचे महत्व आहे. या कार्याच्या संदर्भातच ज्ञानाचे महत्व भगवतगीतेने स्पष्ट केले आहे. मार्गातील संशयमुक्तिसाठी ज्ञानाचा उपयोग होतो. अहंकारामुळे वास्तव स्विकारीत नाही. म्हणुन ज्ञानाचा आश्रय करण्यासाठी ईश्वराचा आश्रय असतो.

श्रद्धावान लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः।
ज्ञानं लब्ध्वा परां शांतिं अचिरेण अधिगच्छति॥(४-३९)

"श्रद्धा" या संदर्भातच समाजात "श्रद्धा" ज्ञानविरोधी आहे असा समज असतो, पण भगवतगीता "श्रद्धावान लभते ज्ञानं" सांगते असा हा विरोधाभास जाणुन घेणे महत्वाचे आहे. तरच भगवतगीतेनुसार "ज्ञान म्हणजे प्रकाश आहे " हे कळेल . जगातील या सत्यातुनच जीवनमार्गातील अडथळा दुर करण्यासाठी "अहंकार" व "ईश्वर" यांची निश्चित भूमिका जाणणे आवश्यक ठरते.

भगवतगीतेने "ज्ञान" सर्वश्रेष्ठच म्हटलेले आहे. जीवनविकासात कार्य साधन असते. ज्ञानविज्ञानाचा कार्यात उपयोग होतो, तर सर्व कार्याचे ज्ञानात विलिनिकरण होते. या सुत्राद्वारे सर्व ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत ईश्वर आहे हे सत्य ज्ञानविज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते. यामुळे "ज्ञान" या संदर्भात जीवनविकासाचा मार्ग "तमसो मा ज्योतिर्गमय" होतो. (अंधारातुन प्रकाशाकडे)

*चांगलेपण (सत)

अर्जुन चांगला (दैवीगुणी) मनुष्य असतो. याच चांगलेपणामुळे दुःखी होतो. आपल्या निष्क्रियतेचे समर्थन करतांना स्वतःला लोभी ठरवितो व आपल्या कार्याला पाप ठरवितो. पाप-पुण्य याविषयीचे भेद चांगलेपण, ईश्वरश्रद्ध, धार्मिक संदर्भात असते. किर्ति-अपकिर्ति याविषयीचा भेद चांगलेपण संदर्भात असतो. श्रीकृष्ण अर्जुनाचे अज्ञान दर्शवुन देतांना त्याची भूमिका स्वर्ग व किर्ति या दोहोसंदर्भात विरोधाभासी आहे हे स्पष्ट करतात. भगवतगीतेने "चांगलेपण" या संदर्भात प्रकृतितील "सत"गुण, सत मार्ग स्पष्ट केला, ज्यामुळे "कर्म" संदर्भात जीवनमार्ग "असतो मा सतगमय" होतो.

*अहंकार

समाजात "अहंकार" शब्द गर्व, दर्प या अर्थाने ओळखल्या जातो. भगवतगीता अहंकाराचा आश्रय अशाश्वताचा आश्रय(अज्ञान असले तरी वास्तव न स्विकारता "मी योग्य" असे समर्थन) या अर्थाने स्पष्ट करते. अज्ञानाला ज्ञान दर्शविणे याचे कारण अहंकाराचा आश्रय असतो. अहंकाराचे Replacement होण्यासाठी ईश्वरज्ञान (शाश्वत) असते.

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।...

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।(१८. ५९-६२)

**********०

(४. ३९)/२ :

"ज्ञानं लब्ध्वा परां शांतिं अचिरेण अधिगच्छति"

(जीवनात ज्ञानाची भूमिका)

भगवतगीतेनुसार जीवनमार्गात ज्ञानाची भूमिका प्रकाशाची असते. ज्ञानामुळे काय योग्य आहे हे स्पष्ट होते व कार्यनिश्चय एक होतो, मार्गात दृढता असते, निष्ठेने कार्य करतो. विश्वासाने मार्ग चालतो,

शांति अनुभवतो. याप्रमाणे जीवनमार्गात ज्ञानाचा संबंध कसा आहे हे स्पष्ट झाले आहे. याच संदर्भात ज्ञान व ईश्वर यांचा संबंध स्पष्ट केला आहे. यानुसार ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत ठरतो. म्हणुन ईश्वराचा आश्रय ज्ञानाचा आश्रय ठरतो. ईश्वरावर श्रद्धा ज्ञानावर श्रद्धा(vice a versa) असते, हा वर्तमानात आवश्यक असलेला महत्वाचा पैलु भगवतगीतेने ज्ञानविज्ञानासह स्पष्ट करुन दर्शविला आहे.

ज्ञानं लब्ध्वा परां शांतिं अचिरेण अधिगच्छति।(४-३९)

मनुष्य सुखासाठी जगतो, हे स्वाभाविक आहे. अर्जुन दुःखामुळे नियतकार्य टाळतो. काय योग्य(युद्ध-नियतकार्य करणे योग्य कि अयोग्य)हे कळत नाही. हे वास्तव असते. त्याला त्वरीत निवड करायची असते, म्हणुन दुःख टाळणे श्रेयस्कर जाणुन युद्ध न करणे ही निवड करतो. आपली भूमिका योग्य आहे हे दर्शविण्यासाठी त्याला युद्ध करणे अयोग्य आहे हे सिद्ध करायचे असते. अर्थात येथे ज्ञानाची भूमिका निष्क्रियतेला योग्य ठरविण्यासाठी असते.

अज्ञश्च अश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति।(४-४०)

अर्जुन संशयामुळे अशांत असतो, अशांत मनाला शांत करण्यासाठी समर्थन भाष्य बोलतो, यासाठी ज्ञानाचा वापर करतो. प्रत्यक्षात मार्गातील संशय अज्ञान असते. ज्ञानाने शांति मिळते, मार्ग विश्वासाने चालतो.

याप्रमाणे "काय अयोग्य आहे "हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरणे व "काय योग्य आहे "यावर विश्वास येण्यासाठी ज्ञान वापरणे यातील भेद भगवतगीता स्पष्ट करते. याच संदर्भात भगवतगीता पुढे स्पष्ट करते,

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुः त्यागं विचक्षणाः।।(१८-२)

कुणी विद्वान कार्य काम्य आहेत म्हणुन संन्यास पत्करतात तर कुणी अनुभवी जाणकार निष्काम कर्माचे शास्त्र जीवनविकासात वापरतात. जीवनविकासात कार्याची भूमिका हाच भगवतगीतेचा महत्वाचा विषय आहे. याच अनुषंगाने ज्ञानाचे महत्व स्पष्ट होते. निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी कार्याला दोषी ठरविणे या संदर्भात म्हणुनच म्हटले, अग्नितील धुर हा अग्निचा दोष ठरत नाही.

सहजं कर्म कौंतेय सदोषम् अपि न त्यजेत्।
सर्वारम्भाहि दोषेण धुमेन अग्नि इव आवृताः।(१८-४८)

समाजात काय अयोग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी विद्वत्तेचे धमासान सुरु असते. अंधार आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञानाची गरज नसते, तर अंधार मिटविण्यासाठी प्रकाशाची गरज असते. हीच ज्ञानाची जीवनात भूमिका आहे.

अर्थात अज्ञानाचा अंधार समाजातील असो वा जीवनातील असो, तो ज्ञानानेच दुर होतो.

"Better to light a candle than to curse the darkness. "

***०००

(४-३९)/३:

"ज्ञानं लब्ध्वा परां शांतिम् अचिरेण अधिगच्छति"

(Secret of Confidence, Peace)

स्वतःच्या जीवनाचे ज्ञान व उपलब्ध ज्ञानविज्ञान या दोन भिन्न बाबी असल्या तरी परस्परपुरक आहेत, हा भगवतगीतेचा महत्वाचा संदेश आहे.

न हि ज्ञानेन् सदृशं पवित्रम् इह विद्यते।(४-३८)

ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे. पण जीवनात" ज्ञानी असणे" याच संदर्भात मनुष्य भ्रमात असतो. अर्जुन दुःख टाळण्यासाठी युद्ध करणे व निष्क्रियता यात निष्क्रियता निवडतो. या भूमिकेचे "ज्ञानी" समजुन समर्थन करतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी बाह्यज्ञानाचा उपयोग करतो. याचाच अर्थ मनुष्य आपली दुर्बलता सामर्थ्य दिसावी यासाठी "ज्ञानी"समजुन भाष्य करतो, यामुळेच "ज्ञानी असणे" याचा भ्रम मनुष्याला होतो.

ज्ञानामुळे आत्मविश्वास असतो, शांति मिळते अर्थात संशयमुक्त असतो, द्वंद्वमुक्त असतो. भयमुक्त असतो.

श्रद्धावान् लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः।
ज्ञानं लब्ध्वा परां शांतिम् अचिरेण अधिगच्छति।।(४-३९)

जीवनाचे ज्ञान या संदर्भात ईश्वरज्ञानाचा उल्लेख "ज्ञान"व "श्रद्धा" या संदर्भात आलेला आहे. याच आधारावर "अमृतत्वाय कल्पते" हा जीवनविकासाचा महामार्ग बनतो. या मार्गावर विचलित होत नाही. द्वंद्वमुक्त असतो. कार्याचा एकनिश्चय असतो. निश्चित दिशेने विकासाचे मार्गक्रमण असते. निष्काम कर्म अर्थात "योगः कर्मसु कौशलम् " साध्य होते.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

याचाच अर्थ ज्ञानामुळे नकारात्मक Attitude सकारात्मक Attitude मध्ये बदलते. दुर्बलता सामर्थ्यामध्ये, अडचणी संधीमध्ये बदलते. This is true purpose of "ज्ञान" as highlighted by Bhagwatgeeta.

***********

(४-४०)

************************

अज्ञश्च अश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति।

नायं लोकोअस्ति न परो न सुखं संशयात्मनः।।

************************

(४. ४०)/१ :

"अज्ञश्च अश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति"

(Wisdom of Darkness)

जगात नवपिढी सुखाने जगण्याचे ज्ञान मिळावे म्हणुन शिक्षण घेत असते. अर्जुनानेही शिक्षण घेतले. पण प्रत्यक्ष जगतांना मार्गात अडथळा जाणवतो, व त्याचे ज्ञान या अडथळयाला clear करु शकत नाही. आपले अज्ञान न स्विकारता जी (निष्क्रियतेची)भूमिका घेतो, त्याचे समर्थन करीत जगण्याचा प्रयत्न करतो.

समाजात निष्क्रिय असले तरी त्याचे समर्थन करणे, (स्वतःची चुक न जाणता)इतरांच्या चुका काढणे व टिका करणे. या भाष्याचेच दर्शन होते. या अवस्थेचे कारण भगवतगीताच स्पष्ट करते.

मामुपेत्य पुनर्जन्मदुःखालयम् अशाश्वतम् !(८-१५)

अशांत मनाने "कठिण-कठिण" करीत जीवन जगत राहणे व त्याच अवस्थेत मृत्यु होणे, असेच जन्ममृत्युचे फेरे सुरु असतात. "हे दुःखालयच आहे, "अशी सरळ भाषा भगवतगीता वापरते. या दुःखालयाला सुखालय जाणण्यासाठी, करण्यासाठीच ज्ञान आहे. म्हणुन अर्जुनाला सावध करते,

अज्ञश्च अश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति।
नायं लोकोअस्ति न परो न सुखं संशयात्मनः॥(४-४०)

आपले अज्ञान, चुक कबुल न करणे ;अज्ञानाला ज्ञान संबोधणे व ज्ञानी समजुन दुसऱ्याच्या, जगाच्या चुका काढणे व (स्वतःला ज्ञानी समजत असला तरी!) अशांत मनाने जीवन जगत राहणे. या अवस्थेमुळे ना जगतांना शांति ना मृत्युनंतर? या एकाच पण अति महत्वाच्या मुद्यावर भगवतगीता जगासमोर आली.

मनुष्य सुखासाठीच कार्य करतो. पण याच मार्गात दुःखाच्या Trapमध्ये सापडतो, तेंव्हा दुःख टाळण्यासाठी alternative शोधतो. अर्जुनाने निष्क्रियता हेच alternative option स्विकारले. मनसमाधानासाठी (समर्थन)भाष्य बोलतो. ही नैसर्गिक अवस्था असते. अर्थात येथे त्याला सुखाचेच ज्ञान(अशाश्वत सुख -विषयइंद्रियसंयोग व शाश्वत सुख-आत्मबुद्धिःप्रसादजम् ) नसते, यामुळे निष्क्रियता स्विकारतो.

"कर्म" मनुष्याला विकासासाठी मिळालेले Bornfree साधन आहे. ज्ञानाने याच कर्माला कर्मकौशल्य बनवितो. याच कर्माला भगवतगीता प्राधान्य देत आहे. कर्माचे ज्ञान, कौशल्य जाणले तर ज्ञानाचे महत्व कळते, कारण "ज्ञान" सर्वश्रेष्ठ आहे. ज्ञानच अंधार दुर करते. व विश्वास देते.
येथे जीवनातील अज्ञानाला "ज्ञान"संबोधणे हेच अज्ञान ठरते. हेच Delusion (False belief) ठरते. म्हणुन या सर्वश्रेष्ठ ज्ञानाचा आश्रय करण्यासाठी ईश्वरश्रद्धा उपयोगी ठरते. कारण ईश्वरच ज्ञानविज्ञानाचा मुळ स्त्रोत आहे.

याप्रमाणे वास्तवाचा स्विकार करुन आपले अज्ञान कबुल करणे Wisdom of Darkness ठरते. जीवनमार्गातील हा अंधार जाणणे व अंधार दुर करण्यासाठी ज्ञानाचे व श्रद्धेचे महत्व जाणले तर जणु कर्म आणि ज्ञान जीवनविकासरथाची दोन चाके आहेत याची खात्री होते.

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंच्छिन्नसंशयम् ।(४-४१)

************

(४. ४०)/२ : " संशयात्मा विनश्यति"

सकारात्मक विचारात विश्वास असतो व नकारात्मक विचारात संशय असतो, हे सत्य आपण जाणतो. म्हणुन व्यवहारात *Be Positive, *Change your thoughts, *War is won in mind असे Slogans ऐकत असतो. याच संदर्भात Law of attraction(Part of Universal law-Law of Vibration) कार्यरत असतो. (Negative energies attract negative energies and positive energies attract positive energies. )अर्थात विचार विचाराला आकर्षित करतो.

नकारात्मक नकारात्मक विचाराला व सकारात्मक सकारात्मक विचाराला.

नकारात्मक विचाराचा उगम कसा होतो व यावर उपाय भगवतगीता सांगते.

जगाच्या इतिहासात दुसऱ्या महायुद्धाने जगाला हादरा दिला. हिटलरने "War is won in mind" याचा उपयोग केला. निराशा पसरु नये म्हणुन वापरलेले गोबेल्स तंत्र प्रसिद्ध आहे. व जगत कल्याणासाठी केवळ विज्ञान अपुरे आहे. हे जगाने अनुभवले. म्हणुन सकारात्मक होण्यासाठी भगवतगीतेतील मानसशास्त्र जाणुन घेणे जगाची वर्तमानात गरज ठरते.

दुष्कृत्य करणारे कुणाची परवानगी घेत नाही पण त्याचबरोबर चांगल्या कार्यासाठीच अडथळा येतो. हे जग अनुभवत असते, ऐकत असते. चांगलेपणा व वाईटपणा हा भेद भगवतगीतेत स्पष्ट होतो.

चांगले म्हणजे "सत". ईश्वरावर श्रद्धा सत श्रद्धा असते. व यासाठी "सत ज्ञान "काय आहे, हे भगवतगीता सांगते.

सर्वभूतेषु एनैकं भावम् अव्ययम् इक्षते।
अविभक्तं विभक्तेषु तद् विद्धि सात्विकम् ।।(१८-२०)

एकत्वाचा भाव प्रेम, चांगलेपणा, कल्याणभाव असतो. या ज्ञानाने हृदयस्थानी ईश्वर आहे हे जाणतो. म्हणुन चांगल्या प्रेरणा, प्रेम, कल्याणाचे विचार आंतुन येतात. याच संदर्भात चांगल्या मनुष्याला(अर्जुनाला) हृदयदौर्बल्य अशोभनिय आहे असे श्रीकृष्ण सांगतात. कारण याच मानसिकतेतुन नकारात्मक विचार कसा जन्म घेतो हे अर्जुनाच्या भूमिकेतुन कळते. यांत मोहामुळे Senses मन active होते व अहंकाराद्वारे प्रज्ञावादी(मी योग्य हे सिद्ध करण्यासाठी वापरलेले ज्ञान) भाष्य करतो. हे नकारात्मक भाष्य असते. प्रत्यक्षात चिंता, भय याच दुर्बलतेतुन जन्म घेते.

मानसिक दुर्बलतेतुन उगम पावलेले नकारात्मक विचार समाज अनुभवत असतो. म्हणुन मार्क ट्वेन म्हणतो,

"Never argue with stupid. He will drag you to his level and beat with experience. "

कर्मामध्ये विश्वास नसेल तर मनुष्य द्वंद्वाच्या(इच्छाद्वेष) तावडीत सापडतो, जसा अर्जुन सापडला. तरी मनुष्य आपले अज्ञान कबुल न करता "योग्य, ज्ञानी"जाणुन समर्थन करीत असतो व येथेच

नकारात्मक विचार जन्म घेतो. असे भाष्य प्रज्ञावाद असतो. हे भगवतगीतेत स्पष्ठ केले. म्हणुन

"ज्ञानसंच्छिन्नसंशयम् " हा संदेश दिला. ज्यामुळे कार्याचा मार्ग दृढ होतो व कार्याद्वारे योग(दुःखान्त)साध्य करतो.

"योगसंन्यस्त कर्माणं"

म्हणुन दुर्बलता, भय, नकारात्मकता यावर मात करण्यासाठी भगवतगीता निर्भय होण्याचे शास्त्र सांगते यावर श्रद्धा असावी.

"स्वल्पम् अपिअस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।"(२-४०)

अज्ञश्च अश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति।(४-४०)

तस्मात् अज्ञानं संभूतं हृत्स्थं ज्ञानअसिन आत्मनः।

छित्त्वैनं संशयम् योगं आतिष्ठ उत्तिष्ठ भारत।।(४-४२)

*******

(४-४०)/३:

"नायं लोकोअस्ति न परो न सुखं संशयात्मनः"

(भयाची मानसिकता vs विश्वासाची मानसिकता)

"Choice is the basis of every part of your existence, but so is fear. The difference is, choice creates movement, where fear limits movement. "

Réné Gaudette

संशय मनुष्यजीवनाच्या विकासातील अडथळा असतो. अज्ञानामुळे संशय असतो. संशयामुळे भय असते. ज्ञानामुळे विश्वास असतो. भय ही मानसिकता असते. म्हणुन जीवनप्रवासात "अज्ञान vs ज्ञान" या संदर्भात "भयाची मानसिकता vs (आत्म)विश्वासाची मानसिकता" याची निवड करणे हा खरा प्रश्न असतो.

अज्ञश्च अश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति।
नायं लोकोअस्ति न परो न सुखं संशयात्मनः।।(४-४०)

वास्तव स्विकारले तर प्रश्नाची पारदर्शकता येते. अर्जुनाचा प्रश्न त्याच्यासाठी स्वार्थ, लोभाचा आहे कि त्यागाचा?सत्कृत्य कि दुष्कृत्य ?अर्थात अधर्माचा आहे कि धर्माचा?असा संशय(Tie) निर्माण करणारा असतो. हाच Tie सोडविण्यासाठी भगवतगीता अध्यात्माचा उल्लेख करते अर्थात ईश्वराचे ज्ञान विज्ञानासह

सांगते. वर्तमानात संशयमुक्त होण्यासाठी ज्ञान व (कार्याचा दृढनिश्चय करुन) "योगः कर्मसु कौशलम्" हा संदेश आहे.

तस्मात् अज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानअसिन आत्मनः।
छित्वैनं संशयं योगं आत्तिष्ठ उत्तिष्ठ भारत॥(४-४२)

व्यावहारिक बोध:
ईश्वर, धर्म, ज्ञान आणि भगवतगीता

आर्थिक शोषण गुलामीचे कारण ठरते म्हणुन जगात स्वातंत्र्यक्रान्त्या झाल्यात. वर्तमान ज्ञानविज्ञानाचा असुनही असे लक्षात येते कि, आर्थिक शोषणाचे फक्त Target बदलतात, पण " शोषण" हा विषय तसाच जीवंत असतो. हा विषय (शाश्वत ) समाजव्यवस्थेचा असतो.
डॉ. सर्वपल्लि राधाकृष्णन म्हणतात, विज्ञानाच्या आधाराशिवाय धर्मशास्त्रे, समाजशास्त्रे पांगळी ठरतील, तर समाजशास्त्राच्या सामाजिक बांधिलकीशिवाय विज्ञान आंधळे ठरेल.
जगामध्ये ईश्वराचे अस्तित्व न मानणारे लोक असतात.

जगातील कांही लोक( Atheist) ईश्वर ही संकल्पना एकीकडे अंधश्रद्धा म्हणुन ठरवीत असतात तर दुसरीकडे ज्ञानविज्ञानाचा वापर होण्यासाठी ईश्वरज्ञानाचे महत्व भगवतगीता सांगते. ईश्वरश्रद्धेला महत्व देते. ईश्वर मानणाऱ्यांमध्ये भयामुळे ईश्वर मानणारे असतात. भगवतगीता भयमुक्त होण्यासाठी (संशयमुक्तिसाठी) ईश्वरज्ञानाचे महत्व सांगते.

God exist whether or not men may choose to believe in Him. The reason why many people do not believe in God is not so much that it is intellectually impossible to believe in God, but because belief in God forces that thoughtful person to face the fact that he is accountable to such a God.

~ Robert A. Laidlaw

ज्ञान, कर्तृत्व याचे महत्व न जाणता (भयामुळे)अंधश्रद्धेला लोक बळी पडतात. म्हणुन अंधश्रद्धा निर्मुलन Mission जगात कार्यरत आहे. अंधश्रद्धा अज्ञानाचा भाग असतो. याच अज्ञानामुळे ज्ञान, कर्तृत्व याचे महत्व क्षीण होते.

अर्जुनाच्या कर्तृत्व मार्गातच संशय उत्पन्न होतो. अर्थात अज्ञानाचा अडथळा निर्माण होतो. पण वास्तव(अज्ञानाचा

स्विकार ) न स्विकारता निष्क्रियतेचे समर्थन करतो. मनुष्य स्वतःला योग्य समजुनच जगत असतो. म्हणुन समर्थन करतो व अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. समाजात ज्ञानविज्ञान असले तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी अज्ञानाला ज्ञान दर्शविणे ही समाजातील शोकांतिका ठरते. याला मार्क ट्वेन सरळ Stupidity म्हणतो. तो म्हणतो,

"Never argue with stupid people, they will drag you down to their level and then beat you with experience. "

Mark Twain

समाजातील याच अज्ञानावर भगवतगीता प्रकाश टाकते. नकारात्मक मानसिकता असलेले काय चुक आहे यावर भाष्य करतात. काय चुक आहे हे सांगणे सोपे असते. पण काय योग्य आहे यासाठी ज्ञान हवे असते.

याच पार्श्वभूमिवर सुखी जीवन या संदर्भात मनुष्याची जगण्याची मानसिकता सकारात्मक, (आत्म)विश्वासाची असावी, भयाची नसावी याच मुद्याला भगवतगीता highlight करते.

***********

(४-४१)

************************

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंच्छिन्नसंशम्|

आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय||

************************

(४. ४१)/१ :

"योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंच्छिन्नसंशयम् "

Work is worship असे वाक्य व्यवहारात ऐकायला मिळते. कार्याद्वारे भक्ति कां करायची?त्याची प्रक्रिया काय?हे ज्ञानच भगवतगीतेचा विषय आहे.

सुखासाठी, योगक्षेमासाठी, भोगैश्वर्यप्राप्तिसाठी मनुष्य कर्म करतो, हे आपण जाणतो. सुखाचे concept नुसार प्राप्ति (Want, needs)ठरवितो. इच्छित प्राप्ति झाली तर त्याचा अभिमान वाटतो, सुख अनुभवतो. पण याच मार्गात इच्छित प्राप्ति झाली नाही तर दुःखी होतो. यामुळे अपेक्षित फलाची इच्छा असते. या मार्गात परिणाम अपेक्षित जाणवले नाही किंवा दुःख जाणवले तर?

हीच स्थिती अर्जुनाची होते व निष्क्रिय भूमिकेला ज्ञानी भूमिका ठरवितो. सर्वसाधारणपणे समाजात अशी भूमिका नकारात्मक ठरते. मनुष्य जे करतो, ते योग्य समजुनच करतो, पण निष्क्रिय झाला तरी" योग्य" सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो.

जगातील कोणताही मानव असो, त्याची जीवन जगण्याची प्रक्रिया जणु Automatic movements असते. जीवन चांगले आहे कि वाईट!कठिण आहे कि सोपे!जीवनाला अर्थ असो कि नसो!त्याला हे जीवन जगावे लागते. मग ती जबाबदारी असो, आनंद असो, कि लढा असो!ते मनुष्यच ठरवित असतो. आनंदाने जगण्याची त्याची इच्छा असते म्हणुन ज्ञान घेतो. "सुखी जीवन यासाठी ज्ञान" या ज्ञानाचा जणु जगात महापुर आलेला असतो. इतके प्रचंड ज्ञान असतांना जीवन आनंदमय व सोपे व्हायला हवे होते. तरी मनुष्याच्या या ज्ञानाला त्याचे जीवनच नकळत आव्हान देत असते.

कर्म टाळले तरी इच्छा असते. या स्थितिला आदर्श ठरविण्याचा प्रयत्न केवळ स्वतःच्या इच्छापुर्तिसाठी असते. म्हणुन ही स्थिति दांभिक होण्याचा संभव असतो.

कर्मेंद्रियाणि संयम्य यः आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान् विमुढात्मा मिथ्याचारः सः उच्यते।।(३-६)

म्हणुन वास्तवाचा स्विकार (What I want) हे विकासमार्गावरील प्रथम पाउल ठरते. नियतकार्य योग्य कि अयोग्य?याचे अज्ञान अर्जुन कबुल करतो. पण दुःखमुक्ति हवी हे आवर्जुन सांगतो. याच प्रश्नाद्वारे "जीवनविकासाचे ज्ञान" हा भगवतगीतेचा विषय ठरतो.

वर्तमानकाळात ज्ञानविज्ञान आले. याचा Professional कार्यासाठी उपयोग होतो. पारंपरिक व्यवसायाला नित्य नविन आकार मिळतो. वर्तमानाची गरज ओळखुन श्रीकृष्णाने कर्माला महत्व दिले. पाउस पडण्यासाठी इंद्रपुजा गोवर्धनावर वृक्षारोपण याद्वारे Replace केली. भगवतगीतेत पारंपरिक यज्ञकार्याच्या logicचा विकासमार्गाचे व्यवस्थापन यासाठी उपयोग केला.

यज्ञ कर्मानेच होत असते(यज्ञः कर्म समुद्भवम् ). तर यज्ञातील हवनतत्व कर्मसमर्पण, निष्काम कर्म यासाठी वापरले. व कर्मसंन्यास तत्व सांगितले.
यज्ञार्थात् कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधनः।(३-९)

निसर्गशक्तिच्या देवता व सर्व शक्तिचा स्त्रोत ईश्वर याची ओळख ज्ञानविज्ञानासह करुन दिली. मनुष्याच्या हृदयी हाच स्त्रोत Conscious(क्षेत्रज्ञ) रुपाने असतो. म्हणुन Mental Wellness साठी कार्याद्वारे योग(दुःखान्त) हे भक्तिचे साधन व प्रक्रिया सांगितली.

सर्व ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत ईश्वर आहे. प्रकृतितील ज्ञानविज्ञानाचा वापर कर्मात होतो. व यज्ञतत्वानुसार सर्वकार्य अखेर ज्ञानात विलिन होते. यानुसार मनुष्याचे अंतिम धाम ईश्वर जाणुन "अमृतंगमय" या शाश्वत विकासमार्गाची ओळख होते. याच (ईश्वर)ज्ञानाने कार्यातील संशय छेदतो. व मार्ग दृढ होतो.

"योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंच्छिन्नसंशम्।
आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय।।(४-४१)

या संदेशात योग (दुःखान्त, Stable), कर्म, कर्मसंन्यास (अकर्ता), ज्ञान, मार्गातील संशय छेदणे. अर्थात कार्यातील संशय (ईश्वर)ज्ञानाने छेदणे व निश्चय दृढ करणे, कर्म ईश्वराला समर्पण करुन (भक्ति) कर्मसंन्यास(अकर्ता), कर्माद्वारे योग (दुःखान्त), याप्रमाणे आत्मवश राहुन (कर्मबंधनमुक्त) संशयमुक्त होणे व

अर्थात "कार्याद्वारे भक्ति" चा हेतु, उद्देश या संदेशात येतो. यांत कर्म, ज्ञान व भक्ति तिन्हीचा समावेश आहे.

याप्रमाणे प्राचिन पारंपरिक यज्ञ logic ला नविन आकार दिला व कर्म-ज्ञान-भक्ति या तिन्हीचा शाश्वत विकासमार्गात उपयोग केला. हा स्वतःचा (कार्याद्वारे भक्तिचा)मार्ग असतो. या मार्गावर स्वधर्माद्वारे शिक्कामोर्तब करतो. कार्याचा निश्चय होण्यासाठी Mental stability आवश्यक असते. यासाठी बुद्धियोग सांगितला, ज्यामुळे मनुष्याची जीवनयात्रा शाश्वत विकासमार्गावर असते.
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

जगात ज्ञानविज्ञान दररोज येत राहणार. तरी समाजातील प्रश्न (गरिबी, दहशत, शोषण) सतत या ज्ञानाला आव्हान देत असते. मनुष्याच्या अधिकारात त्याचे कार्य आहे. मनुष्याचे प्रश्न जेंव्हा या ज्ञानाला आव्हान देते, (जसे अर्जुनाला आव्हान दिले), तेंव्हा भगवतगीता मनुष्याला संदेश देते,

तस्मात् अज्ञान संभुतं हृत्स्नं ज्ञानअसिन आत्मनः।
छित्वैनं संशयं योगं आत्तिष्ठ उत्तिष्ठ भारत॥(४-४२)

*******

(४. ४१)/२:

"योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्च्छिन्न संशयम्"

(जीवनविकासातील ज्ञान, कर्म व भक्ति यांची भूमिका)

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्च्छिन्न संशयम्।(४-४१)

याच संदेशाद्वारे जीवनविकासातील अध्यात्मज्ञानाची भूमिका व त्या अनुषंगाने ज्ञान, कर्म व भक्ति या तिन्ही साधनांचे Purpose व परस्परपुरकता स्पष्ट करणारा महत्वाचा संदेश भगवतगीता देत आहे. ज्ञानाद्वारे संशय मिटतो. कार्याचा एकनिश्चय होतो. कार्याद्वारे (कर्मयोग) योग साध्य होतो. ज्ञानामुळे कर्म अकर्म (संन्यास) होते.

ज्ञान, कर्म व भक्ति या संदर्भात व्यवहारातील परिचय:

ज्ञान:

अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी जे भाष्य बोलतो त्याला ज्ञान दर्शवितो. व यासाठी धर्माचा उल्लेख करतो. धर्म समाजाला

सक्षम करण्यासाठी अस्तित्वात आले असतात. दुबळेपणाला सामर्थ्य दर्शविण्यासाठी धर्माचा उपयोग करणे म्हणजे अज्ञानाला ज्ञान दर्शविणे असते. याच संदर्भात ज्ञान धर्मापेक्षा श्रेष्ठ ठरते.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।
तत् स्वयं योगसंसिद्धः कालेन आत्मनि विन्दति।।(४-३८)

अर्थात योगसंसिद्ध झालेला ज्ञानानेच शक्ति अनुभवतो. व अकर्ता जाणतो.

१. ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम्:

अर्जुन योग्य-अयोग्य हा संशय कबुल करतो व यासाठी त्याला ज्ञान हवे असते. योगसाधना या कर्मयोगात कार्याचा एकनिश्चय हवा. ज्ञानाने संशय मिटतो. "ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम् "याद्वारे संशयमुक्तिसाठी ज्ञान स्पष्ट होते.

२. योगसंन्यस्तकर्माणं:

भक्ति या संदर्भात साधना(योग, संन्यास) व साध्य(साहस, निर्भयता, दुःखान्त-योग, आत्मविश्वास )

यांची ओळख भगवतगीता देत आहे.

योगसाधनेमुळे विचलित न होणे(दुःखान्त)

शक्ति प्राप्त होते. व कर्म अकर्म होणे म्हणजे कर्मसंन्यास ज्ञानाने अनुभवतो. याच संदर्भात "योगसंन्यस्त कर्माणं" हा शब्दप्रयोग आहे.

आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय।(४-४१)

***********

(४-४१) :

"आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनञ्जय"

(जीवनविकास-सुख-State of mind)

गरजापुर्ति, इच्छापुर्तिसाठी कर्म करणे हा व्यवहार अाहे. मनुष्याला सुख हवे म्हणुन हा व्यवहार चालतो. अर्थात कार्यरत असणे हा व्यवहार असतो. या व्यवहारात कुणी कष्टत असतो, कुणी समाधानी असतो. यामुळे समाजात कर्म vs. समाधान यावर

चर्चा होते व समाधान ही Priority असावी हा सुर निघतो. धर्म, अध्यात्म हे शांतिसाठी आहेत ही समाजात भावना बनते. कांही विद्वत् जन कर्माचा हा व्यवहार सकाम आहे म्हणुन संन्यास घेतात.
काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः।(१८-२)

नियतकार्य प्रत्यक्ष करण्याची वेळ येते तेंव्हा अर्जुन दुःखी होतो. या स्थितित समाधान शोधतो व कार्य न करणे ही भूमिका घेतो. याला धर्माची भूमिका दर्शवितो.

भगवदगीता व्यवहार, व्यवहारातील कर्म, ज्ञान, धर्म, अध्यात्म, समाधान(सुख) या सर्वांचा आढावा घेते. व कर्म, ज्ञान, भक्ति(धर्म, अध्यात्म, ईश्वर) या सर्वांची जीवनातील निश्चित भूमिका व त्याचे महत्व स्पष्ट करते.

"संशयात्मा विनश्यति " :
अर्जुनाला आपल्या कार्यात संशय येतो. एकीकडे ठरल्याप्रमाणे कार्य करणे आवश्यक तर दुसरीकडे कार्यच दुःखाचे कारण ठरणार! अशा द्विधा मनःस्थितित सापडतो व अशांत होतो. ही अज्ञानी स्थिति ठरते.
अज्ञश्च अश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति।

नायं लोकोअस्ति न परो न सुखं संशयात्मनः।।(४-४०)

अर्थात या अज्ञानी, संशयी, अशांत स्थितित श्रद्धाहीन असतो. मनुष्याला या स्थितितुन बाहेर काढण्यासाठी ईश्वरावर श्रद्धा हा विषय येतो. यांत ईश्वराची ओळख मात्र "ज्ञान" या संदर्भात करुन दिलेली आहे. अर्थात ईश्वराचा आश्रय म्हणजे ज्ञानाचा आश्रय ठरतो. हा शाश्वताचा आश्रय असतो व अशांतीचे कारण ठरणाऱ्या संशयावर मात होते. यामुळे कार्यमार्ग पक्का होतो अर्थात कार्याचा एकनिश्चय होतो.

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम् ।(४-४१)

जीवनात कार्य घडत असतात. कार्याचा मार्ग पक्का असणे व समत्वयोगाने कार्यरत असणे ही आत्मवश अवस्था असते. जीवनात हे कार्यकौशल्य साधल्यामुळे कर्माचा परिणाम(योग्य-अयोग्य, पाप-पुण्य) बद्ध करीत नाही. आत्मवश अवस्था State of mind असते. याप्रमाणे विकास, सुख या संदर्भात State of mind या विषयात भगवदगीतेने पारदर्शकता आणली आहे.

आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनञ्जय।(४-४१)

***********

(४-४२)

************************

तस्मात् अज्ञानसंभुतं हृत्स्नं ज्ञानअसिन आत्मनः।

छित्वैन् संशयं योगं आत्तिष्ठ उत्तिष्ठ भारत।।

************************

(४. ४२)/१ :"तस्मात् अज्ञान संभुतं हृत्स्नं ज्ञानअसिन आत्मनः"

*हृदयदौर्बल्य, प्रसन्नता, हृदयातील ईश्वर:

युद्धक्षेत्रावर मनसमाधानासाठी अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतांना स्वतःची धार्मिक भूमिका दर्शवितो. श्रीकृष्ण अज्ञान दर्शवुन देतांना म्हणतात,

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप।

अर्जुनाच्या दुःखी अवस्थेचा हृदयदौर्बल्याशी संबंध असतो. आरम्भि शंखनादाने कौरवांची हृदये विदिर्ण झाली असा शब्दप्रयोग आहे. रामायणात कैकयीला मनथरा संवतीद्वेष या विषयावर कहान्या सांगते. मनथरेच्या अपेक्षेप्रमाणे कैकयी भयभित झालेली पाहुन आता कैकयीची हृदयगति बंद पडु शकते

अशी शंका येते व कहानी कार्यक्रम बंद करते. भय, सुखदुःख याचा संबंध हृदयाशी आलेला आहे. "हृष्यामि" हा शब्दप्रयोग आनंदासाठी केलेला आहे.

सर्वस्य च अहं हृदि संनिविष्टो।(१५-१५)
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते।(१३-२१)
अर्थात हृदयस्थानी असलेला ईश्वर(आत्मा) सुखदुःख भोगतो. म्हणुन प्रसन्नता, भय याचा हृदयावर परिणाम असतो.

*निर्भयता, योग व ज्ञान:
भगवतगीता निर्भयता हा प्रथम दैवीगुण दर्शविते. कर्मयोगाने निर्भयता लाभते. येथे योग हा शब्दप्रयोग दुःखान्त या अर्थाने आहे.
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

योग या शब्दाचा मुळ अर्थ ईश्वराशी जोडणे आहे. म्हणुन ईश्वराशी जोडणे म्हणजे निर्भय होणे, मार्गावर विश्वास येणे यासाठी ईश्वर शब्द ज्ञान या अर्थाने आलेला आहे. हृदयातील अंधार

हृदयातीलच ईश्वरज्ञान ज्ञानदिपाने मिटवते. हा बुद्धियोग जीवनाचा (शाश्वत) विकासमार्ग जाणतो.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

याप्रमाणे हृदयातील ईश्वर ज्ञान जाणणे व बुद्धियोगी होणे, अर्थात हृदयातील अज्ञान (ईश्वर)ज्ञान या शस्त्राने छेदणे. ज्ञानामुळे संशय मिटतो. कार्याचा दृढनिश्चय होतो. व (लाभ-हानि द्वंद्वमुक्त) समत्वयोगाने कार्य करतो. अर्थात कार्यात आनंद, विश्वास अनुभवतो.

तस्मात् अज्ञानसंभुतं हृत्स्नं ज्ञानअसिन आत्मनः।
छित्वैन् संशयं योगं आत्तिष्ठ उत्तिष्ठ भारत॥(४-४२)

* कार्यातील आनंद

याप्रमाणे कार्याद्वारे विकासमार्गावर असलेला कार्यातच "योग्य"हा विश्वास अनुभवतो. (शाश्वत) विकासमार्गावरील कार्यातच प्रसन्नता अनुभवतो. शांति अनुभवतो. त्याला "मी योग्य आहे" असे (मनसमाधानासाठी) समर्थन करण्याची गरज भासत नाही.

"When you're righteous, you don't have to tell people that you're righteous. "

Shaquille O'Neal

ज्याला मार्गावर विश्वास नसतो, तो अशांत असतो व "आपण योग्य आहे" हे सिद्ध करण्यासाठी भाष्यात ज्ञान वापरतो. मनसमाधानासाठी हे प्रज्ञावादी भाष्य असते. याच भाष्याचे दर्शन अर्जुन देतो. ही आत्मठायी आलेली अशांती असते.

म्हणुन कार्याद्वारे शांति अनुभवणे व शांतिच (समुद्रशांति) साध्य करणे यासाठी(आत्मतृप्तिसाठी) शाश्वत विकासमार्ग सांगितला. हा भगवतगीतेचा विषय बनला.

यः तु आत्मरतिः एव स्यात् आत्मतृप्तस्य मानवः(३-१७)
अर्थात आत्मठायी संतुष्ट असलेला, अनासक्त असला तरी, अर्थात कार्याची गरज नसली तरी श्रेष्ठांनी (सामान्यांचा बुद्धिभेद होवु नये यासाठी)आदर्शासाठी कर्म करावे . याचसाठी साक्षात ईश्वराने मनुष्यरुप धारण केले आहे व श्रीकृष्ण भूमिकेत कार्यरत आहो अशी स्वतःची ओळख देतात.

याप्रमाणे कार्यात सुखशांति अनुभवणे यासाठी कार्यकौशल्य संस्कार साध्य करणे. हेच कौशल्य साधण्यासाठी स्वतःचा शाश्वत विकासमार्ग जाणणे, हे ज्ञान भगवतगीता ज्ञात करते.

*व्यावहारिक बोध:

निर्भयता-भय, सुख-दुःख, शांति-अशांति, ज्ञान-अज्ञान यांचा हृदयाशी सरळ संबंध असतो. अशांति, Tension, Stress, नकारात्मकता इ. मानसिक error अज्ञानामुळे असते. म्हणुन Mental Wellness या हेतुने भगवतगीतेतील ज्ञानाला जाणले तर मनुष्याच्या (Perception) दृष्टित सकारात्मक बदल होतो. प्रत्यक्ष दृष्टिबदल व याद्वारे Transformation होणे हाच भगवतगीतेचा हेतु आहे.

**********

(४. ४२)/२:"छित्वैनं संशयं योगं आत्तिष्ठ उत्तिष्ठ भारत"

संपुर्ण विश्वाचा(ब्रह्मांड) व ईश्वराचा संबंध असलेले ज्ञान, याच ज्ञानाचा आश्रय करुन कर्म करणे व मुळ ज्ञानात विलिन होणे, हे अतिप्राचिन ज्ञान आहे. याच ज्ञानाचा मुळपुरुष ईश्वर अर्जुनाला

त्याचा संशय मिटविण्यासाठी हेच मुळ ज्ञान त्याच्या हेतुसह सांगत आहे.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिः भवति भारत।(४-७)
...
छित्वैनं संशयं योगं आत्तिष्ठ उत्तिष्ठ भारत।(४-४२)

या ज्ञानाचा उलगडा करण्यासाठी येथे धर्मग्लानि हे कारण असते. धर्माची भूमिका मानवी विकासासाठी समाजातील शक्ति असते, दुर्बलता नव्हे. जेंव्हा धर्माची भूमिका दुबळी ठरते, त्याला भगवतगीता धर्मग्लानि संबोधत आहे. यामुळेच अर्जुनासारख्या चांगल्या(दैवी प्रकृति) व्यक्तिला आपल्या भूमिकेत भ्रम तयार होतो. योग्य कार्याला अयोग्य (पापकार्य) ठरवितो.

"एक राजा साधुला आपल्या राज्यातील विकासदर्शन घडवितो. या फेरफटक्यात पिडित, दुबळया लोकांची वस्ती आढळते, तेंव्हा साधु याचे कारण विचारतो. राजा म्हणतो, हे त्यांचे पुर्वजन्माचे पाप आहे, आपल्या दैवानुसार भोग भोगत आहेत. "
येथे राजा समाजातील Weakness वर धर्माचा बुरखा टाकतो. व्यावहारिक दोषाचे खापर धर्माच्या माथी मारुन मनुष्य धर्मालाच

बदनाम करीत असतो. समाजातील शोषणाला त्याग दर्शविणे हे शोषणावर आदर्शाचा बुरखा टाकणे असते. तसेच आपल्या Weakness वर, अज्ञानावर (Hide करण्यासाठी) धर्माचा बुरखा अर्जुन वापरतो.

व्यावहारिक ethics प्रमाणे युद्ध करणे अर्जुनाचे कर्तव्य होते. पण दुःख झाल्यामुळे युद्ध करणे त्याला टाळायचे असते. आपण योग्य आहो हे सिद्ध करण्यासाठी तो धर्माचा आश्रय करतो. यामुळे धर्म व व्यवहार यांत Tie निर्माण होतो. हा Tie तो सोडवु शकत नाही. याची तो कबुली देतो. हाच Tie(संशय) सोडविण्यासाठी ज्ञानाची गरज असते.

"छित्वैनं संशयं योगं आत्तिष्ठ उत्तिष्ठ भारत"
अर्थात ज्ञानाने संशय छेदुन कार्याचा निश्चय कर, Be Ready. (उत्तिष्ठ). कार्याद्वारे योग(दुःखान्त शक्ति, निर्भय) साध्य कर.
"Talent alone won't make you a success. Neither will being in the right place at the right time, unless you are ready. The most important question is: 'Are your ready?'

(Johnny Carson)

"ज्ञान " या संदर्भात भगवतगीता अध्यात्म व विज्ञान यांचा संबंध स्पष्ट करते. "ईश्वर"ज्ञानविज्ञानाचा मुळ स्त्रोत ठरतो, याच ईश्वराचा अंश मनुष्याच्या जीवीत तत्वात स्थित आहे. अर्थात ज्ञान या संदर्भात "ईश्वर" अध्यात्म व विज्ञान याला जोडणारा दुवा आहे. जेंव्हा धर्मग्लानि अवस्था असते, चांगल्या (दैवी प्रकृति)मनुष्याला ज्ञानाची गरज पडते. धर्म व व्यवहार यांतील Tie याच ज्ञानाने सुटतो. म्हणुन भगवतगीतेने ज्ञानाला धर्मापेक्षा श्रेष्ठ ठरविले आहे. सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।(१८-६६)

व्यावहारिक बोध:

वर्तमानात विज्ञानाने प्रचंड झेप घेतली आहे. दुसऱ्या महायुद्धातील संहार पाहुन संपुर्ण विश्व हादरले व अध्यात्माशिवाय विज्ञान अपुर्ण आहे याची विश्वाला प्रथमच जाणीव झाली. वर्तमानातील विकासात ज्ञानविज्ञानाची भूमिका निर्विवाद महत्वाची आहे. पण ज्ञानविज्ञान उपलब्ध असुनही समाजात प्रश्न निर्माण होतात. शक्तिची स्पर्धा नित्य सुरु राहते. या स्पर्धेत "मनुष्य" विकासाच्या केंद्रस्थानी असला पाहिजे याच संदर्भात "आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च" हा अध्यात्माचा संदेश भगवतगीता देत आहे.

मत्कर्मकृत मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

अर्थात निरोगी विकास साधण्यासाठी (जगा व जगु द्या) भगवतगीतेची ओळख जगाला होणे काळाची गरज आहे. ही ओळख होण्यासाठी मनुष्याने स्वतःतील चांगलेपणाला निर्भयतेची जोड देणे आवश्यक आहे. हाच भगवतगीता संदेश देत आहे.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।

"The first duty of man is to conquer fear; he must get rid of it, he cannot act till then. "

Thomas Carlyle-'"---

*******

# भगवदगीता

## अध्याय ५.

## कर्मसंन्यासयोग

अध्याय ५. कर्मसंन्यासयोग

संन्यासं कर्मणां कृष्ण पुनःयोगं च शंससि।
यत् श्रेयं यत् योः एकम् तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ।।(५-१)

इच्छापुर्तिसाठी, प्राप्तिसाठी कार्य करणे हे व्यावहारिक सत्य असते. इच्छा अमर्याद असतात, याचमुळे परिणामभय मनुष्याला भ्रमित करते. कर्म टाळले तरी इच्छा असतेच यामुळे अशांती असते. जशा इच्छा कार्यप्रवण करतात, तसेच परिणामभय अशांतीचे कारण ठरते. म्हणुन कार्याचा निश्चय होण्यासाठी स्वधर्म (मुल्य), बुद्धियोग तर Devotion साठी यज्ञकौशल्य व त्याद्वारा ब्रह्मार्पण या प्रक्रियेद्वारा कर्माचा संन्यास(अकर्म) साध्य करुन योग साध्य करणे हे सर्व ज्ञान ऐकल्यावर कर्माचा संन्यास व पुनः कार्याद्वारे योग याविषयी अर्जुन प्रश्न करतो, माझ्यासाठी काय श्रेयस्कर संन्यास कि योग?

*या प्रश्नाचे स्पष्टिकरण अध्याय ५-कर्मसंन्यास व ६-(अभ्यास)योग मधुन केले आहे.

*या दोन्ही अध्यायात शाश्वत सुखाचे ज्ञान स्पष्ट केले. सुखासाठी संन्यास व योग या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. दोन्हींचे purpose शांति, सुख, स्थिरत्व आहे. पण या दोहोमध्ये योग श्रेष्ठ आहे. योगाशिवाय संन्यास कष्टाने साध्य होतो. योग दुःखान्तशक्ति

आहे, ज्यामुळे विचलित होत नाही. निर्भय होतो. हि शक्तिची साधनाच ठरते.

*या निसर्गात पक्षी घरटे बांधतात तर मधमाशांच्या घरट्यामधुन मधनिर्मिति होते. सूर्य प्रकाश देतो. त्यांच्या कार्याला कोणतेही lable नसते. तसेच आपले इंद्रिय-डोळे पाहतात, कान ऐकतात इ. आपापल्या ठायी कार्यरत असतात. या इंद्रियांना आपण सुखासाठी Chanelize करतो.

*आपण व्यवहारात सकाम अवस्थेत कार्यरत असतो, यामुळे परिणामात आसक्ति(फलासक्ति) असते, म्हणुन भय, अशांति निर्माण होते. निष्काम कार्यरत होण्यासाठीच कार्यकौशल्य संस्कार आवश्यक आहे, हे मागील अध्यायात स्पष्ठ झाले. यामुळे सहज कार्यरत होतो. व कार्य execute करतांना ब्रह्मार्पण(ईश्वरसमर्पण) हे कौशल्य आत्मशुद्धिसाठी साधणे यामुळे अकर्ता भाव अनुभव करतो.

*हे शरीर नवद्वार असलेले एक राज्य आहे. कर्मसंन्यास साधल्याने या राज्याचा राजा (आत्मा) सुखाने (अकर्ता) वास करतो. तो कोणतेही (पापपुण्याचे)Lable आपल्या कार्याला लावत नाही. मुक्त असतो.

न आदत्ते कस्यचित् पापं न चैव सुकृतं विभु।
अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।।(५-१५)

(ईश्वर, ब्रह्म, आत्मा यासंबंधी)अज्ञानामुळे मनुष्य मोह पावतो व अशांत होतो. हाच अज्ञानाचा अंधार ज्ञान दुर करते, जसे सूर्य प्रकाश करते. ही ज्ञानाची अनुभूति असते. म्हणुन मनुष्यजन्माचे अंतिम साध्य हे ज्ञान आवश्यक आहे, ज्याचा सरळ जिवित तत्वाशी संबंध आहे.

*या ज्ञानाने अशांतीस कारण असलेला दोष मिटतो. स्वतःचे ठायी सकारात्मक भाव अनुभवण्यासाठी (शाश्वत सुख)ईश्वराचे(ब्रह्म) भाव व गुण जाणतो. यांत अनुक्रमे एकत्व, समत्वदृष्टि, ब्रह्मभूत-ब्रह्मठायी स्थित होणे, स्थिर बुद्धि, बाह्य attachment पासुन मुक्त, शाश्वत सुख, Senses सुख बदलते म्हणुन अशाश्वत असते, हे जाणतो व यामुळे कामक्रोधाचा, दुःखाचा आवेग त्याला विचलित करीत नाही. तोच सुखी असतो.

*म्हणुन योगी जीवनाचे साध्य सुख, शांति, ज्ञान(प्रकाश) जाणतो व ब्रह्मभूत होतो. या स्थितित द्वंदमुक्त असतो. प्रेमभाव असतो(सर्वभूतहितेरतः)यामुळे कल्याणभाव जागृत होतो. कारण ईश्वराची ओळख "सर्वलोकमहेश्वरम् "अशी होते.

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम्।

सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिम् रुच्छति।।(५-२९)

*कामक्रोधाचा आवेग किंवा दुःखाचा आवेग सहन करण्याची शक्ति धारण होणे ही दुःखान्त शक्ति म्हणजे योग असतो.
(Details अध्याय ६ मध्ये येईल)

*************

अध्याय ५-मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

(५-१)/१:

"संन्यासं कर्मणां कृष्ण पुनः योगं च शंससि"

(५-१)/२:

"यत् श्रेयः एतयोः एकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् "

(Leadership lesson)

५-२ : "तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते"

(५-३) :

"निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बंधात् प्रमुच्यते"

(Free from bondage:सुखी जीवनाची साधना)

(५-४)/१ :

"सांख्ययोगौ पृथग् बालाः प्रवदन्ति न पंडिताः"

(व्यवहारात संस्काराचे महत्व)

(५-४)/२ :

"सांख्ययोगौ पृथग् बालाः प्रवदन्ति न पण्डिताः"

(Different path for same destination)

(५. ६):

"संन्यासस्तु महाबाहो दुःखम् आप्तुम् अयोगतः"

(Determination-The power source अर्थात कर्मयोग शक्तिचा स्त्रोत )

५-१० :

"लिप्यते न स पापेन पद्मपत्रम् इव अम्भसा"

(Wicked vs. Rightous)

(५-११):

"योगिनः कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वा आत्मशुद्धये"

(Importance of State of Mind)

५. १२/१ :

"युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोतिनैष्ठिकीम् "

(५-१२)/२:"अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते"

(Ignorance:Cause of stress)

(५-१३)/१:

"सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी"

(Wisdom of Detachment)

(५-१३)/२:"नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् "

(संघटन कौशल्य)

(५-१४)/१:

"न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः"

(स्वामीत्वाचे ज्ञान)

(५-१४)/२:

" न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते"

(जबाबदारी/दायित्व)

५. १५/१:

"न आदत्ते कस्य चित्पापं न चैव सुकृतं विभुः"

(Law of creation /विकास)

५. १५/२:"अज्ञानेन् आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः"

(Ignorance vs. Wisdom)

५. १५/३ : " अज्ञानेन आवृतं ज्ञानं "

५-१६/१:"ज्ञानेन तु तद् अज्ञानं येषां नाशितम् आत्मनः

५-१६/२:

"तेषां आदित्यवत् ज्ञानं प्रकाशयति तत् परम् "

५-१८/१:

"शुनि चैव श्वपाके च पंडितः समदर्शिनः"

(ज्ञान-अज्ञान vs चांगले-वाईट)

५. १८/२ : पंडितः समदर्शिनः

(Logic of Nonduality, Oneness)

५. २२/१:

"ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनव एव ते"

(५. २२)/२ :

"आद्यन्तवन्तः कौंतेय न तेषु रमते बुधाः"

(Happy person)

(५-२३):"

शक्नोति इह एव यः सोढुं प्राक् शरीर विमोक्षणात्।

कामक्रोध उद् भवं वेगं स युक्तः स सुखी नरः।"

(Happy Person)

५. २५ :

"छिन्नद्वैधा यत् आत्मनः सर्वभूतहिते रताः "

(Art of crossing Duality)

*******

(५-१)

***********************

संन्यासं कर्मणां कृष्ण पुनः योगं च शंससि।

यत् श्रेयः यत् योः एकं तन्मे ब्रुहि सुनिश्चितम् ।।

***********************

(५-१):

"संन्यासं कर्मणां कृष्ण पुनः योगं च शंससि"

"संन्यास" यावर भगवतगीता विस्ताराने भाष्य करते. कांही जाणकार कर्म काम्य आहेत म्हणुन कर्माचा संन्यास पसंद करतात. पण भगवतगीता कर्माद्वारे संन्यास या शास्त्राचा पुरस्कार करते. याच संदर्भात (ईश्वर)ज्ञानाचा वापर करुन कर्माद्वारे संन्यास ही प्रक्रिया यज्ञतत्वाद्वारे (हवन, समर्पण) ज्ञानकर्मसंन्यासयोगात स्पष्ट होते. कर्माद्वारे नैष्कर्मसिद्धि, अकर्ता, संन्यास ही प्रक्रिया स्पष्ट होते. संन्यास या शब्दाचे शांति या संदर्भात महत्व आहे.

भगवतगीता स्वतःच्या मार्गाचे व विकासाचे ज्ञान सांगते. या मार्गात दुःखामुळे (अथवा अपेक्षित सुख वा यशाचा अभाव) संशय येतो. हा संशय द्वंद्व निर्माण करतो. द्वंद्वाच्या जाळयात सापडल्यामुळे मोह अवस्था (तम mode) बनते. मनुष्याला अशांति येते. अर्जुनाचे युद्ध टाळणे हा शांतिसाठीच प्रयास असतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो, तेंव्हा अर्जुन स्वतःला ज्ञानी समजतो. पण ज्ञानाची भूमिका जीवनात श्रेष्ठ असते. या संदर्भात ज्ञानाला सर्वश्रेष्ठ संबोधले आहे. म्हणुन ज्ञानाने संशय छेदणे व कार्याचा एकनिश्चय करणे व योगासाठी कार्य करुन संन्यस्त होणे या प्रक्रियेचे प्रयोजन सांगितले. तेंव्हा अर्जुन प्रश्न करतो,

संन्यासं कर्मणां कृष्ण पुनः योगं च शंससि।
यत् श्रेयः यत् योः एकं तन्मे ब्रुहि सुनिश्चितम् ।।(५-१)

संन्यास कि योग यांत निश्चित श्रेयस्कर काय?

जीवनांत शांति असणे याचा अर्थ दुःखाने, अडचणीने विचलित न होणे, कोणत्याही सृतिने वा लोकमताने योगी विचलित होत नाही.

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।(८-२७)

पाणी वरुन स्वच्छ दिसले तरी गाळ असेल तर खडा टाकल्यावर वर येतो. अर्जुन उत्साहाने युद्धक्षेत्रावर येतो, पण दुसऱ्याच क्षणी विचलित होतो. मनाची शांति ढळते. अर्थात ही अज्ञान अवस्था ठरते. अज्ञानामुळे मोह होतो, विचलित होतो.

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

याच पार्श्वभुमिवर कर्मसंन्यास व कर्मयोग एकच असले तरी कर्मयोग श्रेष्ठ ठरते. योग म्हणजे दुःखान्त, विचलित न होणे, निर्भय होणे याप्रमाणे "योग" या शब्दाची विस्तृत व्याख्याच भगवतगीता देत आहे.

वेत्ति यत्र न चैवायं स्थितः चलति तत्त्वतः।(६-२१)

यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणाअपि विचाल्यते।(६-२२)

तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम् ।(६-२३)

अर्थात "शांति" या संदर्भात कर्मयोगाचे महत्व आहे. याच अर्थाने "योगसंन्यस्तकर्माणं " म्हटले आहे. कर्मयोगासाठी कार्याचा

एकनिश्चय आवश्यक असतो. या संदर्भात ज्ञानाचे महत्व आहे.
"ज्ञानसञ्चिन्न संशयम्"

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्चिन्न संशयम्।
आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय।।(४-४१)

*******

(५-१):
"यत् श्रेयः एतयोः एकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् "
(Leadership lesson)

कर्म अकर्म होण्यासाठी भक्ति या संदर्भात कर्मसंन्यास तत्व एकदा सांगितले व पुनः समत्वयोगाने(Devotion) कर्म कर असे श्रीकृष्ण सांगतात. भक्तिने काय साध्य करायचे आहे, संन्यास कि योग?जे माझ्यासाठी श्रेयस्कर असेल ते फक्त एक निश्चित सांगा. हा अर्जुनाचा प्रश्न असतो.
संन्यासं कर्मणां कृष्ण पुनःयोगं च शंससि।
यत् श्रेयः एतयोः एकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ।।(५-१)

मनुष्यजीवनात विकासासाठी ज्ञानाला महत्व आहे. प्रत्यक्षात विकास कर्माने होत असतो व यामुळे जीवनविकासात ज्ञान व कर्म दोन्हीची महत्वाची भूमिका आहे हे मनुष्य जाणतो. भगवद् गीता जीवनविकासात भक्ति(Devotion, Sacrifice) हा तिसरा factor जोडते व ज्ञान, कर्म व भक्ति यांचा समन्वय साधुन जीवनविकासाचे शास्त्र भगवद् गीतारुपाने निर्माण होते.

तथापि भक्ति या संदर्भात ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग असे विविध मार्ग आहेत असे लोक जाणत असतात. याच आधारावर अर्जुनही प्रश्न करतो. बुद्धिची स्थिरता भक्ति किंवा ज्ञानमार्गाने साध्य होत असेल तर या घोर कर्माची गरजच काय?

समाजाचा विकास, युवा पिढीचा विकास कर्मानेच होत असतो. या युद्धात कर्म या संदर्भातच अर्जुनाला संशय निर्माण होतो. व घोर, दुःखदायी कर्म कां करावे? हा त्याचा मुळातील प्रश्न असतो. याच संदर्भात कर्माचे महत्व स्पष्ट केले आहे.

कर्माचे महत्व ऐकल्यावर कर्मसंन्यास व योग हे दोन्ही भक्ति या संदर्भात ऐकतो . श्रीकृष्ण म्हणतात त्याप्रमाणे युद्ध(कर्म) करणे योग्य आहे . हे ठीक आहे, पण कां करायचे?याचे निश्चित एक उत्तर हवे असते.

संन्यास व योग दोन्ही सारखे असले तरी योग श्रेष्ठ आहे.

अर्जुन चांगला व्यक्ति असतो. त्याला दैवीगुणसंपत्तियुक्त संबोधले आहे. चांगल्या व्यक्तिलाच आपल्या नियतकार्याबद्दल संशय आलेला असतो व जशी संन्याशाची भूमिका असते(मला कांही नको!असे रक्ताने माखलेले राज्य भोगण्यापेक्षा भिक्षा मागुन जीवन जगणे मला पसंद आहे!) तशी भूमिका घेतो. ज्याने आधीच संन्याशाची भूमिका घेतली त्याला "योग" जाणुन घेणे आवश्यक वाटते. संन्यास म्हणजे कांहीही संकल्प नसलेला, तृप्त, स्वतःवर नियंत्रण असलेला. तर योग म्हणजे दुःखान्त शक्ति, विचलित न होणे, निष्काम कर्म करुन समत्वयोग साध्य करतो.

यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते।
तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम्।(६-२३)

कठिणकाळी या चांगलेपणाचीच परिक्षा होत असते. कथित चांगल्या व्यक्तिच समाजात संभ्रमात सापडतात. नकारात्मक होतात. चांगला व्यक्तिही निष्क्रियतेला आदर्श दर्शवितो. यामुळे समाज संभ्रमात सापडतो. (समाजाचे पुढारपण स्विकारलेले लोक vs कथित चांगले लोक !) हे वैचारिक प्रदुषण (Virus) असते.

हेच समाजाचे वैचारिक प्रदुषण दुर करण्यासाठी भगवद्-गीता मार्गदर्शन करीत आहे.

"There are no good and bad peoples; there are only leaderships that behave responsibly or insanely. "

-Yossi Sarid

अर्थात

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।

तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥(२-५०)

**********

(५-२)

***********************

संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयस करौ उभौ।

तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते।।

***********************

(५-२) : "तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते"

वर्तमानात स्वातंत्र्य संदर्भात लोकशाही, गणराज, स्वराज या शब्दाशी नाते जुळलेले असते. "स्वराज" हा शब्द स्वतःवर command (स्वनियंत्रित), स्वयंसंस्कारित (without or minimum governance) या अर्थाने जाणला तर स्वयंसंस्कारित असणे ही वर्तमानातील गरज ठरते. जगाला बदलविणारे स्वतः संस्कारीत असतात, विश्वासाने मार्ग चालतात. तर जे स्वयंसंस्कारीत नसतात ते इतरांनी बदलावे म्हणुन भाष्य करीत असतात. जगात घटना घडतात व लोक भाष्य करीतअसतात.

धर्मस्थापना(नवसभ्यता) यासाठी महाभारत युद्धाचे प्रयोजन होते. यांत अर्जुनाची भूमिका निर्णायक असते. अर्जुन निष्क्रियतेचे

समर्थन करतो. अज्ञानाला ज्ञान संबोधतो. याच मुद्यावर संवाद सुरु झाला व भगवतगीता ज्ञान जगासमोर आले.

भगवतगीतेत जीवनविकासाचे सविस्तर ज्ञान आले असले तरी अर्जुनाच्या प्रश्नातुन मुख्य शब्द highlight झाले आहेत.

१. अज्ञानाला ज्ञान दर्शविणे याला कारणीभूत Illusion (wrong perception) व Delusion(false belief) अर्थात माया असते.

Illusion:अशाश्वताशी attachment हे attachment of pain चे कारण असते.

Delusion : पापपुण्य या संदर्भातील false belief. (अपुरे ज्ञान) येथे वास्तव स्विकारणे सर्वप्रथम शहाणपण असते. यामुळे प्रश्नाची पारदर्शकता येते.

२. सुखी जीवनमार्ग यासाठी कर्माद्वारे विकास व विकास या संदर्भात (वर्तमानात) पायाभुत व अंतिम लक्ष बुद्धिची स्थिरता, शांति याचे सविस्तर वर्णन आले. या प्रक्रियेत कर्माचे महत्व(अ. ३), ज्ञानाद्वारे कर्मसंन्यास याद्वारे ज्ञानाचे महत्व(अ. ४) स्पष्ट झाले.

ज्ञानसंच्छिन्नसंशयम् योगसंन्यस्तकर्माणं।

येथे योग शब्द आला, तेंव्हा अर्जुन प्रश्न करतो कर्माद्वारे संन्यास/योग यात श्रेयस्कर काय?यावर उत्तर असते,

तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते।(५-२)

३. कर्मयोगातुन निर्णयक्षमता, निर्भयता highlight झाले आहे.

अ. शांति या संदर्भात संन्यास (नैष्कर्मसिद्धि)आहे, पण निर्भयता, दुःखान्त(योग) ही शक्ति कर्मयोगाने प्राप्त होते.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

निर्भयता हा प्रथम दैवीगुण आहे.

ब. कर्मयोगाचा पाया (कार्याचा) दृढनिश्चय आहे. म्हणुन निर्णयक्षमता महत्वाची ठरते.

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।(२-४१)

अर्जुन निर्णय करण्यास(युद्ध करणे योग्य कि अयोग्य) असमर्थ ठरतो, म्हणुन निर्णयच टाळतो व स्वतःला योग्य ठरविण्यासाठी ज्ञान वापरतो. ही निर्णयक्षमतेतील (Determination) दुर्बलता दर्शविते.

क. भगवतगीता निर्णय अधिकाराचे, दृढनिश्चयाचे, कार्याद्वारे समत्वयोग ज्ञान सांगते.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।(२-४७)

योगः कर्मसु कौशलम् ।(२-५०)

*******

(५-३)

*******************

ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति।

निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बंधात् प्रमुच्यते।।

*******************

(५-३) :

"निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बंधात् प्रमुच्यते"

(Free from bondage:सुखी जीवनाची साधना)

जगात शक्तिचे(उर्जा) दर्शन होत असते. शक्ति या संदर्भात समुहशक्ति किंवा व्यक्तिगत शक्ति असे दोन पर्याय जगात आढळतात. समुहात परस्पर सहकार्य साधुन समुहशक्ति बनत असते. हेच सहकार्य साधण्यासाठी समुहसंस्कार असतात. जगत असतांना व्यक्तिगत शक्तिची नेहमी गरज पडते. शक्ति या संदर्भात योग(दुःखान्त) या शक्तिची साधना भगवद् गीतेचा विषय आहे. भगवद् गीता यासाठीच व्यक्तिगत संस्कारावर भाष्य करते.

समुहसंस्कार व व्यक्तिगत संस्कार या दोहोंचा समन्वय धर्माने साध्य केलेला असतो. हा (समुह)धर्म सृष्टिसंचलनास सहकार्य करीत असतो तेंव्हा धर्माचे उद्दिष्ट "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च" असे बनते.

समुहधर्म या संदर्भातच अर्जुनाचा गोंधळ होतो. त्याची व्यक्तिगत शक्ति क्षीण होते. मनोदुर्बलता येते. तेंव्हा "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च " या धर्माचा संदर्भ येतो. याचा हेतु व्यक्तिगत शक्ति (योग)साध्य करणे असते.

धर्मात योग्य-अयोग्य(धर्म-अधर्म) असे द्वन्द्व असते. व्यक्तिगत पातळीवर इच्छा-द्वेष असे द्वन्द्व असते. धर्मामुळे गोंधळ होणे म्हणजेच द्वन्द्ववश होणे. हे भगवद् गीता स्पष्ट करते. व द्वन्द्वापलीकडचे अर्थात निर्द्वन्द्वाचे ज्ञान सांगते. यालाच बंधन-मोक्ष ज्ञान संबोधले आहे. निर्द्वन्द्व म्हणजे संन्यास(विचलित न होणे, न द्वेष्टी न कांक्षति). तसेच निर्द्वन्द्व म्हणजे योग(शक्ति). याच ज्ञानामुळे संन्यास कि योग यातील श्रेयस्कर एक सांगा असे अर्जुन विचारतो. तेंव्हा हे स्पष्टिकरण येते.

ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति।
निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बंधात् प्रमुच्यते।।(५-३)

जीवनमार्गात निर्द्वन्द्व असणे हाच भगवद् गीतेतील संस्काराचा हेतु आहे.

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

निर्द्वन्द्व होण्यासाठीच कार्याचा एकनिश्चय (Determination), स्वधर्म (स्वभावनियतकार्य as Tiebreaker) याचा उल्लेख आलेला आहे. सकाम या स्थितित द्वन्द्व असतो, तर निष्काम स्थितित निर्द्वन्द्व असतो. ही स्थिति साध्य करण्यासाठी बुद्धियुक्त स्थितिचे महत्व स्पष्ट केले.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृत् दुष्कृते।
तस्माद् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

जीवनविकास या संदर्भात हाच मार्ग शक्तिसाधनेचा बनतो. प्रत्यक्ष कार्य execute होण्यासाठी व्यवहारमार्ग (सकाम) निष्काम मार्गात(अमृतत्वाय कल्पते) Transform होतो. याला कार्यकौशल्य संबोधले आहे.

सार :

"Nearly all men can stand adversity, but if you want to test a man's character, give him power. "

-Abraham Lincoln

अर्जुनाला साक्षात ईश्वराची सोबत मिळाली पण या शक्तिचा उपयोग करण्यासाठी अर्जुनाच्या चांगलेपणाची (Charecter) जणु परिक्षाच घेण्यात आली. नियतकार्य हा त्याचा स्वधर्म असुनही ( दुर्बलतेमुळे) स्वतःला लोभी ठरवितो!व मला कांही नको असे भाष्य करुन निष्क्रिय होतो.

वर्तमानात "मानसिक दुर्बलता vs मानसिक सक्षमता "हा विषय समाजात महत्वाचा ठरतो. भगवद् गीतेने धर्म या संदर्भात हा विषय स्पष्ट केला असला तरी मानसिक सक्षमता(योग) याला Priority आहे .

"सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज "

**********

(५-४)

**************************

सांख्ययोगौ पृथग् बालाः प्रवदन्ति न पंडिताः।

एकम् अपि आस्थितः सम्यक् उभयोः विन्दते फलम् ॥

*********************

(५-४) :

"सांख्ययोगौ पृथग् बालाः प्रवदन्ति न पंडिताः"

(व्यवहारात संस्काराचे महत्व)

समाजात व्यवहार असतो म्हणुन व्यवहारधर्म असतो. याच व्यवहारधर्मानुसार महाभारतात धर्मयुद्ध ठरले असते. भगवतगीतेत पदार्पण करण्यापुर्वी समाजातील हाच व्यवहारधर्म जाणुन घेणे आवश्यक आहे.

*व्यवहारधर्म व त्यातील जीवनमुल्ये:

नियोजित युद्ध करणे अर्जुनाचे कर्तव्य असते. हा त्याचा व्यवहारधर्म असतो. पण धर्म या संदर्भात अर्जुन आपल्या नियतकार्याला अधर्म ठरवितो.

समाजात व्यवहारधर्म असतो. याच व्यवहारधर्माचे दर्शन रामायणात घडते. व्यवहारधर्मात "वचन" श्रेष्ठ जीवनमुल्य आहे. कैकेयीला दिलेले वचन पाळण्याची वेळ आली तेंव्हा दशरथ महाराजासमोर दुःखद प्रसंग उभा झाला. त्या दुःखातच शेवटी महाराजांना प्राण गमवावा लागला. तर श्रीरामाने धर्मगति जाणुन पित्याच्या वचनपुर्तिसाठी वनवास पत्करला. श्रीरामासाठी ही ईश्वरगति (Design of God) असते. ईश्वरगतिचा संदेश महान कार्याचा ("जहां सब भांति मोर बड काजू")असतो. श्रीराम मातेला हे रहस्य सांगतात.

व्यवहारधर्मानुसारच स्वभावनियत कार्य मनुष्याला ओळख देत असते. स्वभावनियतकार्य त्याचा धर्म असतो. व Committed कार्य(वचन) त्याचा स्वधर्म ठरतो. अर्जुनाला धर्म या संदर्भात याच स्वधर्माचरणाचे महत्व सांगण्यात येते.

स्वधर्मम् अपि चावेक्ष न विकम्पितुम् अर्हसि।

धर्म्यात् हि युद्धात् श्रेयः अन्यत् क्षत्रियस्य न विद्यते।।(२-३१)
डॉक्टरने ऑपरेशनच्या वेळीच पाठ फिरविली तर ?हाच संदर्भ स्वधर्माचरणाचे धर्म या संदर्भात महत्व आहे. अर्जुनाला म्हटले हा धर्म आचरण केला नाही तर किर्ति, स्वर्ग यापासुन वंचित होशील उलट अपकिर्ति होईल व पापच ठरेल.

व्यवहारधर्म या संदर्भातच अर्जुनाला महान कार्याची संधि होती. या कार्यातच ईश्वराचे Design(ईश्वरगति) होते, ज्याचे दर्शन विश्वरुपात घडते.

*भगवतगीतेतील ईश्वरगतिचे ज्ञान व कर्माचे शास्त्र :

होय. भगवतगीतेत ईश्वरगतिचे दर्शन अर्जुनाला घडविले. हेच दर्शन ज्ञानाने जाणायचे आहे. याचसाठी भगवतगीता ज्ञान आहे. यात अध्यात्मज्ञानाचे महत्व स्पष्ट केले आहे.

भगवतगीतेने सर्वप्रथम व्यवहारधर्मातील चुक अर्जुनाला दर्शवुन दिली. व्यवहारधर्मात कार्य महत्वाचे साधन असते. याच कार्याचे जीवनातील महत्व highlight केले आहे. कर्माच्या दोन निष्ठा सांगितल्या.

ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ।(३-३)

सांख्य म्हणजेच संख्याशास्त्र (Analytical). याचा आधार ज्ञानविज्ञानाचा (जड प्रकृति व चेतन पुरुष-आत्मा) आहे. याच ज्ञानाचा उपयोग करुन स्वधर्माचरणाद्वारे कर्मसंन्यास होणे(समर्पित कार्य) हे सांख्यशास्त्र आहे. याच ज्ञानाद्वारे संशय छेदुन ( कार्याचा एकनिश्चय कर) योगासाठी कार्य कर असे संबोधन होते,

छित्वैनं संशयं योगं आत्तिष्ठ उत्तिष्ठ भारत।(४-४२)

ज्ञानाद्वारे कर्मसंन्यास हे ज्ञान ऐकले पण वरील संबोधनामुळे अर्जुन भ्रमात सापडतो. व संन्यास किंवा योग यांत जे श्रेयस्कर आहे, ते निश्चित सांगा अशी विनंति करतो.

सांख्य व योग दोन्ही मार्ग भिन्न वाटत असले तरी गन्तव्य एकच आहे. हे सत्य विद्वान पंडित जाणत असतात. केवळ अल्पबुद्धिमुळे त्यांचे फल वेगळे वाटते .

सांख्ययोगौ पृथग् बालाः प्रवदन्ति न पंडिताः"

एकम् अपि आस्थितः सम्यक् उभयोः विन्दते फलम् ।।(५-४)

आता दोन निष्ठेत श्रेयस्कर हवे असेल तर तो "योग"मार्ग आहे. यामुळेच कार्याचा एकनिश्चय असतो. मनावर नियंत्रण असते. विचलित होत नाही. योगाशिवाय संन्यास दुर्लभ असतो.

संन्यासस्तु महाबाहो दुःखम् आप्तुम् अयोगतः।(५-६)

योगयुक्तो विशुध्दात्मा विजितात्मा जितेंद्रियः।(५-७)

*सार :

१. व्यवहारधर्मात स्वधर्म, वचन जीवनमुल्य ठरते. स्वभावनियतकार्य -नियतकार्य स्वधर्मात transform करतो. तर भगवतगीतेप्रमाणे स्वधर्माचरणाद्वारे समर्पित कार्य करणे याद्वारा कर्मसंन्यास होतो. या मार्गाला "अमृतत्वाय कल्पते" संबोधले आहे.

२. विचलित न होणे या शक्तिसाठी योग हे प्रयोजन आहे. ही साधना कर्मयोगाने साध्य होते. या मार्गात कार्याचा एकनिश्चय करुन समत्वयोगाने कार्यरत असणे हे कार्यकौशल्य असते. अर्थात व्यवहारधर्मात निर्णयक्षमता आवश्यक असते. यासाठी निर्णय अधिकाराचे महत्व आहे व यासाठी स्वावलंबन हे जीवनमुल्य ठरते.

"Nothing in this world can take the place of persistence.

Talent will not: nothing is more common than unsuccessful men with talent.

Genius will not; unrewarded genius is almost a proverb.

Education will not: the world is full of educated derelicts. Persistence and determination alone are omnipotent. "

Calvin Coolidge

******

५-४/२ :

"सांख्ययोगौ पृथग् बालाः प्रवदन्ति न पंण्डिताः"

(Different path for same destination)

बालबुद्धिमुळे जीवनविकासातील सांख्य व योग हे दोन्ही मार्ग भिन्न वाटत असले तरी त्याचे ध्येय(Purpose) एकच आहे. विद्वान हे सत्य जाणत असतो.

सांख्ययोगौ पृथग् बालाः प्रवदन्ति न पंण्डिताः।
एकम् अपि आस्थितः सम्यग् उभयोः विन्दते फलम्।(५-४)

भगवदगीतेतच या दोन शास्त्रातील/मार्गातील भेद स्पष्ट केलेला आहे.

लोकेअस्मिन द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मया अनघ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगानाम्।।(३-३)

अर्थात १. सांख्यामध्ये "ज्ञान"निष्ठा असते. ज्ञान या संदर्भात जीवनाचे शाश्वत ज्ञान (आत्मज्ञान) व अशाश्वत (प्रकृति) जाणुन स्वधर्माचरण (कर्मसमर्पण, ब्रह्मार्पण) करतो. याचसाठी "मत्कर्मपरमो भव"(१२-१०) असा शब्दप्रयोग आहे. अर्थात ज्ञानाला(शाश्वताला) Priority असते.

२. कर्मयोगात "कर्म"निष्ठा असते.

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिः योगे तु इमां शृणु।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)

कर्मयोगात कर्माला Priority असली तरी बुद्धियोगामुळे कर्मबंधन मुक्ति होते. म्हणुन कर्मनिष्ठा या संदर्भात बुद्धियोगाला Priority आहे. यामुळे कार्याचा एकनिश्चय (Determination) होतो. बुद्धियोग या संदर्भातच बुद्धियुक्त, योगयुक्त असे शब्दप्रयोग आलेले आहेत. अर्थात आत्मवश (जितेंद्रिय) अवस्थेचे स्पष्टिकरण येथे आलेले आहे.

योगयुक्तो विशुध्दात्मा विजितात्मा जितेंद्रियः।
सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नअपि न लिप्यते।(५-७)

कर्मयोगात १. Determination २. समत्वयोग हे महत्वाचे मुद्दे ठरतात.

जीवनमुल्यामुळे(वचन, स्वधर्म इ. ) कार्याचा एकनिश्चय (Determination) होतो. परिणामाचे भय असेल तर(चंचलता, आसक्ति) कार्याचा निश्चय होत नाही. म्हणुन Detachment यासंदर्भात निष्काम कर्माचे शास्त्र आहे. अर्थात फल ईश्वराला समर्पण असे भाष्य आहे.

(अथएतद् अपिअशक्तोअसि )कर्तुम् मत् योगम् आश्रिताः।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुः त्यागं विचक्षणाः।(१२-११)

सार :

"Pursue some path, however narrow and crooked, in which you can walk with love and reverence".

Henry David Thoreau

जीवनविकासाचा मार्ग "अमृतत्वाय कल्पते" अर्थात अशाश्वताकडुन शाश्वताकडे असा आहे. अर्थात सर्व मार्गाचे Purpose ईश्वराशी मिलन हेच आहे. याचाच सार भगवदगीताच देत आहे.

ध्यानेन आत्मनि पश्यन्ति केचित् आत्मानम् आत्मना।
अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन् चापरे।(१३-२४)

कुणी ध्यानाद्वारे स्वतःच्या ठायी शाश्वताला अनुभवत असतो. तर कुणी ज्ञानार्जनाद्वारा(शाश्वत-अशाश्वत) किंवा कर्माच्या प्रक्रियेद्वारा (योगः कर्मसु कौशलम्- Determination, फलत्याग) शाश्वताला अनुभवत असतो.

********

(५. ६)

***********************

संन्यासस्तु महाबाहो दुःखम् आप्तुम् अयोगतः।

"योगयुक्तो"मुनिःब्रह्म न चिरेण अधिगच्छति।।

***********************

(५. ६):

"संन्यासस्तु महाबाहो दुःखम् आप्तुम् अयोगतः"

(Determination-The power source अर्थात कर्मयोग शक्तिचा स्त्रोत )

मनुष्याला सुख हवे असते, यासाठी विकास हवा असतो पण दुःख नको असते. विकासमार्गात/जीवनयात्रेत दुःख आढळले व अर्जुन दुःख टाळण्यासाठी जी भूमिका घेतो, तीच भूमिका भगवतगीता ज्ञानाचा Source बनते. व विकासमार्गाचे ज्ञान सांगते.
याच(User friendly) अनुषंगाने अनेक प्रश्न, उपप्रश्न अर्जुन विचारतो.

* कर्म या संदर्भात प्रश्न करतो.

बुद्धिची स्थिरता साध्य करायची तर कर्म कशाला?
स्थिरतेसाठी कर्मसंन्यास(अकर्ता) सांगितला तर "योग" प्रयोजन कां?संन्यास कि योग यात श्रेयस्कर काय?

समाजातील भाष्यात Judgement thinking चा वापर होतो तेंव्हा चांगले-वाईट, पाप-पुण्य यावर भाष्य होते. ईश्वरभक्तिने सुखशांति मिळते, फलसिद्धिची कृपा होते, परमार्थ अर्थात चांगलेपणा, प्रेम कळते. तसेच फलप्राप्तिसाठी कर्म केल्या जाते हेही कळते. पण नियत- कार्याद्वाराच ईश्वरभक्तिने शक्तिची(निर्भयता, दुःखान्त, साहस, विचलित न होणे) साधना करणे याचे अज्ञान असते. या शक्तिविना देहधारी मनुष्याला संन्यास कठिण आहे.

संन्यासस्तु महाबाहो दुःखम् आप्तुम् अयोगतः।
"योगयुक्तो"मुनिःब्रह्म न चिरेण अधिगच्छति।।(५-६)

"You will never do anything in this world without courage. It is the greatest quality of the mind next to honor. "

Aristotle

*"योगयुक्त/ईश्वरभक्ति" या संदर्भात प्रश्न करतो.
योगयुक्त होण्यास कोणत्या(सगुण कि निर्गुण) ईश्वराची भक्ति श्रेष्ठ?(१२-१)
ईश्वरभक्ति करतो पण निष्काम कर्म शास्त्र आचरत नाही, तेंव्हा कोणती निष्ठा(सत-रज-तम) समजावी?(१७-१)

* कर्मयोग या शक्तिसाधनेचा स्त्रोत असल्यामुळे कर्मयोग श्रेष्ठ ठरविला आहे.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

कर्मयोगात Determination अर्थात कार्याचा एकनिश्चय पाया असतो. मनुष्याचा कर्मफलात अधिकार नसला तरी कर्म करण्याचा अधिकार आहे. (अर्थात हाच निर्णय अधिकार असतो, प्रयत्नअधिकार असतो. ) मनुष्याला स्वतःच्या अधिकाराची जाण असणे आवश्यक असते. पण अज्ञानामुळे मनुष्य जे (कर्मफल)अधिकारात नाही त्याचा विचार करतो व दुःखी होतो. या विचारामुळे जे त्याचे Resource (अधिकार संपत्ति) आहे याचाच विसर पडतो. अर्थात ज्ञानावर अज्ञानाचा पडदा येतो. हेच

अज्ञान दुःखाचे कारण बनते. भगवतगीता याच संपत्तिचे, शक्तिचे ज्ञान देते.

अज्ञानेन् आवृतं ज्ञानं तेन् मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

"Believe in yourself! Have faith in your abilities! Without a humble but reasonable confidence in your own powers you cannot be successful or happy. "

Norman Vincent Peale

******

( ५-१०)

*************************

ब्रह्मणि आधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः।

लिप्यते न स पापेन पद्मपत्रम् इव अम्भसा।।

*************************

५-१० :

"लिप्यते न स पापेन पद्मपत्रम् इव अम्भसा"

(Wicked vs. Rightous)

संपुर्ण जगात "नीतिमत्ता" यावर भाष्य होते. कोणत्याही धर्मात नीतिमत्ता समाविष्ट आहे हे अभिप्रेत असते. भगवदगीतेत नीतिमत्तेचा दैवीगुणसंपत्ति या संदर्भात समावेश आहे. याशिवाय सतगुण या संदर्भात Rightous चा बोध होण्यासाठी उल्लेख आलेला आहे.

चांगला मनुष्य जीवनात नीतिमत्तेचा उपयोग करतो. म्हणुन चांगलेपणा या संदर्भात नीतिमत्ता, धर्म यांचा उल्लेख होतो. अर्जुन चांगला मनुष्य होता. पण जेंव्हा दुःखी होतो, तेंव्हा नीतिमत्ता या

संदर्भात guilty feel करतो. आपण लोभी आहोत असे भाष्य करतो. व निष्क्रियतेला धर्म दर्शवितो.

प्रत्यक्षात ही घटना जबाबदारीपासुन पळवाट काढणे अशी असते. पण अर्जुन या भूमिकेला धर्माचा मुलामा चढवितो. श्रीकृष्णाने या भूमिकेला सरळ Wicked(क्लैब्य) संबोधले आहे. यामुळे हा प्रश्न आता Wicked vs. Rightous असा बनतो.

प्रत्येक चांगला मनुष्य योग्य समजुनच कार्यरत असतो. अथवा स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी समर्थन करतो. पण चांगलेपणातही भेद Wickedness vs. courage (Lion) हा असतोच.

"The wicked flee when no one is pursuing, but the righteous are bold as a lion. "

याच पार्श्वभुमिवर भगवदगीतेचे ज्ञान महत्वाचे ठरते. अर्जुन आपले वास्तव कबुल करतो. व धर्माच्या दृष्टिने काय योग्य (Rightousness) हे जाणुन घेण्यास तयार होतो. अर्थात स्वतःची भूमिका योग्य(Rightous) करण्यास त्याची तयारी असते.

शिष्यस्तेअहं शाधि मा त्वां प्रपन्नम् ।

"Rightous मार्ग " यावरच भगवदगीतेचे भाष्य आहे. नीतिमत्ता या संदर्भात अर्जुनाला सत्कृत्य-दुष्कृत्य असा Tie निर्माण होतो. भगवदगीता या Tie पासुन मुक्त करते.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्माद् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्।(२-५०)

येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।(७. २८)

द्वन्द्वमोहमुक्त होणे ही जीवनविकासमार्गातील भगवदगीतेची Priority आहे. यासाठी ईश्वराची ( अव्यय, शाश्वत) ओळख जाणुन अनन्यभक्ति करणे, यामुळे guilty conscience वर विजय मिळवितो.

अपि चेत्सु दुराचारो भजति माम् अन्यभाक्।
साधु एव स मन्तव्यः सम्यग् व्यवसिता हि सः।(९-३०)

जीवनातील Wickedness, guilty conscience यावर विजय मिळविणे म्हणजे स्वतः Rightous असणे. याचसाठी म्हटले,

ब्रह्मणि आधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः।

लिप्यते न स पापेन पद्मपत्रम् इव अम्भसा।।(५-१०)

सार:

१. भगवदगीतेचा विषय दुर्बलता (Wickedness) vs. Courage /Rightousness असा आहे.

“Without courage we cannot practice any other virtue with consistency. We can’t be kind, true, merciful, generous, or honest. ” –DR. MAYA ANGELOU

२. जीवनाचा (व्यवहार)मार्ग या संदर्भात भगवदगीता स्वतःचा मार्ग पक्का होण्यासाठी स्वधर्म हे जीवनमुल्य (Tiebreaker), कार्याचा दृढनिश्चय म्हणुन स्वतःचा निर्णय अधिकार जाणणे याला महत्व देत आहे. Rightous या संदर्भात सकाम मार्ग निष्काम मार्गात transform होण्यासाठी बुद्धियोगाचे प्रयोजन आहे. कार्यसमर्पण, फलत्याग असा उल्लेख ईश्वरभक्ति या संदर्भात आलेला आहे.

लिप्यते न स पापेन पद्मपत्रम् इव अम्भसा।

अर्थात जसे कमळपत्र पाण्यापासुन अलिप्त असते. तसेच ईश्वरभक्त (कोणत्याही ) guilty conscience पासुन मुक्त असतो.

********

(५-११)

*************************

कायेन मनसा बुद्ध्या केवलैः इंद्रियै अपि।
योगिनः कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वा आत्मशुद्धये।।

***********************

(५-११):
"योगिनः कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वा आत्मशुद्धये"
(Importance of State of Mind)

जे कार्य आपण व्यवहारात वापरतो, ते सुखप्राप्तिसाठी आहे हे आपण जाणतो, फार तर पुण्यकार्य-पापकार्य असे वर्गिकरण जाणतो. पण हेच कार्य मानसिकता विकसित करण्यासाठी शक्तिची(योग) साधना करण्यास साधन आहे हे रहस्य जाणत नाही. व याच रहस्याचा उलगडा भगवतगीता करीत आहे. याच साधनेला आत्मशुद्धि, आत्मोन्नति संबोधले आहे. प्रचंड आत्मविश्वास, विचलित न होणे, सकारात्मकता आत्मशक्तिची ओळख देते. (भय, चिंता, नकारात्मकता मानसिक दुर्बलता असते. )

योगिनः कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वा आत्मशुद्धये।(५-११)

जशी मानसिकता असते तसे विचार /भाष्य असते. नकारात्मक व सकारात्मक भाष्य अनुक्रमे दुर्बल व सक्षम मानसिकता दर्शविते. अर्जुनाचे भाष्य त्याच्या मानसिकतेची ओळख देते. कार्याद्वारे (भौतिक, स्वर्ग)प्राप्ति हा व्यवहारधर्म मनुष्य जाणतो. सुखदुःख प्राप्तिसुखाचा आधार असतो. याच आधारावर अर्जुन म्हणतो, मला भौतिक प्राप्ति नको, हे कर्म नरकप्राप्ति देणारे आहे म्हणुन युद्ध करणे अयोग्य ठरवितो.

अर्जुन (योग्य-अयोग्य ) द्वंद्वाच्या जाळयात सापडतो. भगवतगीता विकासमार्गातील हाच मुख्य अडथळा सांगते. (तौ हि अस्य परिपन्थिनौ).

आपण सर्व प्रकृतित जन्माला येतो. मानसिक दुर्बलता प्रकृतिचा Weakness आहे. याच दुर्बलतेवर मात करण्यासाठी (मानसिक) शक्तिसाधना अर्थात आत्मोन्नति, आत्मशुद्धि, योग(दुःखान्त) अशा शब्दाचे प्रयोजन भगवतगीतेने केले आहे. व्यवहारात Polarty द्वंद्व असतो. तर ईश्वर एकत्व दर्शविते. म्हणुन द्वंद्व-निर्द्वंद्व या संदर्भात प्रकृति-ईश्वर ही ओळख भगवतगीता करुन देते.

कार्याद्वारे शक्तिसाधना होण्यासाठी कार्याचा एकनिश्चय महत्वाचा असतो. यासाठी निर्द्वंद्व होणे . याचसाठी बुद्धियोग, ईश्वरआश्रय सांगितला आहे, ज्यामुळे मार्ग अडथळामुक्त होतो. ("अमृतत्वाय कल्पते"). स्वधर्माद्वारे कार्यसमर्पण, योगासाठी फलत्याग हे शास्त्र स्पष्ट होते.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोतिम् नैष्ठिकीम् ।(५-१२)

व्यावहारिक बोध:

१. जे आपण जाणत नाही त्याच रहस्याचा भगवतगीता उलगडा करीत आहे. व्यवहारात प्राप्तिसाठी कर्म आपण जाणतो पण याच कार्याद्वारे मानसिक शक्तिची साधना हे रहस्य जाणत नाही. याचद्वारे मनुष्यजीवनात मानसिक शक्तिचे महत्व भगवतगीता सांगते.

२. आपण कां जाणत नाही?

माया! अज्ञानाला ज्ञान दर्शविणे (दोरीला साप), यामुळे अज्ञानाचेही अज्ञान असते. (अर्जुन धर्मकार्याला अधर्म ठरवितो व

निष्क्रियतेला धर्म ठरवितो. ). म्हणुन वास्तव स्विकारणे येथे महत्वाचे ठरते. Wisdom of Ignorance.

दैवी हि एषां गुणमयी मम माया दुरत्यया।
मामेव ये प्रपद्यन्ते मायाम् एतान् तरन्ति ते।।(७-१४)

३. याच पार्श्वभुमिवर "मानसिकता-विचार-भाष्य- कार्य- मानसिकता " हे Cycle ठरते. (जशी मानसिकता तसे विचार, विचार तसे भाष्य, मानसिकता तसे कार्य )व यात मानसिकता विकास Priority ठरते.

*******

(५-१२)

**********************

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते।।

**********************

(५. १२)/१ :
"युक्तःकर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम्"

शिक्षणात मुल्यशिक्षणाचे उद्दिष्ट या संदर्भात भगवतगीतेतील युक्त व अयुक्त यांतील भेद दर्शविणारा हा संदेश महत्वाचा ठरतो.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते।।(५-१२)

"अयुक्त" हा शब्द सकाम कर्म(मनोवश अवस्था- Governed by senses) व" युक्त" निष्काम कर्म(आत्मवश अवस्था-Governed by Soul)या अर्थाने आलेला आहे. अयुक्त अवस्थेत नाव

वाऱ्याने वहावी तशी जीवन जगण्याची स्थिति असते. युक्त अवस्थेत जीवननाव लक्ष्याच्या दिशेने वल्हवीत असतो.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च आयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

सुखी जीवनासाठी बुद्धिवर ज्या संस्काराची गरज आहे, त्याला युक्त म्हटले. ही आत्मवश अवस्था असते. या अवस्थेत मनुष्य विकासमार्गावर असतो, जबाबदारी स्विकारतो. याचसाठी जीवनमुल्यांची गरज असते.

अर्जुनाला नियतकार्य मिळते. कार्य करण्याची प्रत्यक्ष वेळ आली असता तो दुःखाच्या भयाने युद्ध टाळतो. (मोहामुळे) नकळत मनोवश अवस्थेत Trap होतो. या अवस्थेत निष्क्रिय झाला तरी मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी "ज्ञान" वापरतो. हा प्रज्ञावाद असतो. स्वतःला विश्वास नसल्यामुळे स्वतःच कार्य टाळतो. अर्थात जबाबदारी झटकण्यासाठी केलेले हे भाष्य असते. ही अयुक्त स्थिति बनते.

जीवनांत दुःख, अडचणी येतात व नकळत मनुष्य मनोवश अवस्थेत सापडतो. जबाबदारी न जाणता प्रज्ञावादी होतो. ही दुबळी/नकारात्मक अवस्था असते. सकारात्मक स्थितीत अडचणी Stepping Stone असतात. अर्जुनाला हीच संधी(Stepping towards higher stage of life) मिळाली असते. म्हणुन येथे दोन Options असतात. आहे त्या स्थितीत(प्रकृतिवश) जगणे किंवा सकारात्मक होणे . अर्थात यासाठी "युक्त" होणे. हेच दोन्ही Options भगवतगीता दर्शविते. याच अनुषंगाने विकासमार्ग, जीवनमुल्ये याचे ज्ञान स्पष्ठ केले आहे.

कार्याच्या निष्ठा:
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगीनाम् ।(३-३)

१. स्वतःला कार्यरत करणे ही जीवनविकासात Prime गरज असली तरी केवळ कार्यरत करणे विकासासाठी पुरेसे नसुन याला "स्वधर्म"(Tibreaker, Selfapproval) या जीवनमुल्याची जोड आवश्यक असते. यामुळे स्वतःवर विश्वास(I am Right)असतो. व निष्काम कार्य(समर्पण) करतो. अर्थात निष्ठेने कार्यरत असतो.

२. दुसरे "स्वतःचा अधिकार " या संबंधाने कार्याचा निर्णय हा Bornfree अधिकार आहे. स्वावलंबन या मुल्यामुळे निर्णय अधिकार मिळतो. (Beggars are not choosers). येथे कार्याचा दृढनिश्चय आवश्यक असतो, ज्यामुळे कार्य निष्ठेने घडते. यासाठी Self commitment(वचन)मुल्य उपयुक्त असते.

चंचलतेमुळे द्वंद्व असतो, कार्याचा निश्चय होत नाही. म्हणुन द्वंद्वमुक्त होण्यासाठी बुद्धियोग आहे. निष्काम कर्म/फलत्याग/फल ईश्वरसमर्पण या संदर्भात कार्यातुन समत्वयोग साधणे हे कौशल्य असते.

सिद् ध्य असिद् ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते।(२-४८)

********oooo

(५-१२)/२:

"अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते"

(Ignorance:Cause of stress)

भगवतगीतेत "संस्कारीत" व "असंस्कारीत" हे शब्द युक्त व अयुक्त या शब्दाने संबोधित केले आहे. व हेच शब्द ज्ञानी-अज्ञानी, निष्काम व सकाम या संदर्भात जाणुन घेण्यास उपयुक्त ठरतात.

समाजात ज्ञानी-अज्ञानी, संस्कारीत-असंस्कारीत, चांगले-वाईट हे शब्द आपण मनुष्याच्या Behavior या संदर्भात ऐकत असतो. चांगले म्हणावे, दिसावे ही इच्छा असते. अर्थात या इच्छेमुळे "सकाम" अर्थात अयुक्त ठरतो.

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

समाजात स्वैरता म्हणजे असंस्कारीत असा बोध होतो. मनुष्याला सुख हवे, शांति हवी, सुखासाठी इच्छा असते हे स्वाभाविक आहे. संस्कारीत नसेल तर याच इच्छा "काम" मध्ये व "काम" बुद्धिनाशात परिवर्तीत होतो.

ध्यायतो विषयान् पुंसः संगः तेषु उपजायते।
संगात् संजायते कामः ...
स्मृतिभंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।।(२-६३)

याचाच अर्थ "संस्कारीत, ज्ञानी, निष्काम, युक्त, चांगले(सत) होणे" Vs "असंस्कारीत, अज्ञानी, सकाम, अयुक्त, असत असणे

"हाच भगवतगीतेचा विषय ठरतो. यामुळे त्वरीत शांति-अशांतिचे कारण जाणता येते.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते॥(५-१२)

अर्जुन दुःखामुळे अशांत होतो, विचलित होतो. व दुःखमुक्तिसाठी युद्ध न करणे ही निवड करतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. हा प्रयास शांतिसाठी (अशांतिवर उपाय)असतो. अर्थात असे भाष्य स्वहीतासाठीच (स्वतःच्या शांतिसाठी)समाजात केल्या जाते. पण अर्जुन आपण लोभी ठरु नये म्हणुन ही भूमिका घेतो. अर्थात येथे अर्जुन चांगला असला तरी "स्वहीत" या संदर्भातच भ्रम होतो. हाच बुद्धिनाश असतो. (बुद्धिनाशात् प्रणश्यति). स्वहीतासाठी जगणे हा अपराध नसतो, पण "स्वहीत "या संदर्भात असलेला भ्रम बुद्धिनाशाचे कारण ठरते.

येथे स्वतःच स्वतःचा शत्रु ठरतो. हा स्वतःच्या जीवनाचाच अपमान असतो. वाईट ठरु नये, चांगले दिसावे या प्रयासात ही मानसिक आत्महत्याच ठरत असते. (Fear, Lack of courage)

भय, (Stress)अशांति, मानसिक दुर्बलता अर्थात Mental poverty याचमुळे असते. अर्जुनाची भाषा याच Mental poverty चे दर्शन देते.

यदी माम अप्रतीकारम् अशस्त्रं शस्त्रपाणयः।

धार्तराष्ट्रा रणे हन्युः तन्मे क्षेमतरं भवेत्।।(१-४५)

याच पार्श्वभुमिवर भगवतगीता मनुष्याला जागे करते. मनुष्यजीवनाचे मोल जाणा. त्याचा अपमान करु नका . व याचसाठी "युक्त" या संदर्भात आत्मवश व मनोवश यातील भेद स्पष्ट केला आहे.

इंद्रियाणां हि चरतां यद् मनो अनुविधीयते।

तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि।।(२-६७)

अर्थात वाऱ्याने नाव वहावी व नाव वल्हवणे हा भेद मनोवश व आत्मवश अवस्था दर्शविते. याच संदर्भात तत्वज्ञ बोलतात,

*Arise! Awake! and stop not until the goal is reached. (Swami Vivekananda )

*A man without a goal is like a ship without a rudder. (Thomas Carlyle)

*A soul without a high aim is like a ship without a rudder. (Eileen Caddy)

आत्मवश अवस्थेत स्वतःचा निश्चित मार्ग असतो. कार्याचा एकनिश्चय असतो. निश्चित मार्गासाठी :

-नियतकार्य स्वधर्मात Transform होते.

-निर्णय अधिकार जाणुन कार्याचा दृढनिश्चय करतो.

-स्वाभाविकपणे प्रकृति आपले कार्य करीतच असते. प्रकृति आणि ईश्वर (क्षर-अक्षर, क्षेत्र-क्षेत्रज्ञ) यामुळे प्रकृति संचलित असते. सृष्टिचा हा कारखाना चालत असतो. पण या कारखान्याचा अध्यक्ष ईश्वर आहे . अर्थात ईश्वराच्या भूमिकेचे अज्ञान असते.

परम् भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।(९-११)

ईश्वराच्या याच ज्ञानामुळे व भक्तिमुळे बुद्धियोगी असतो व विकासाचा शाश्वत Standard मार्ग(अमृतत्वाय कल्पते) जाणतो. संस्कार, युक्त, ज्ञानी, निष्काम हे सर्व शब्द याच Stadard मार्गाकडे निर्देश करतात.

"The tragedy of life is not that it ends so soon, but that we wait so long to begin it. "

~W. M. Lewis.

*******

(५-१३)

***********************

सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी।

नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥

***********************

(५-१३)/१:

"सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी"

(Wisdom of Detachment)

"जग सुंदर आहे, पण या सुंदर जगात सर्वात सुंदर वस्तु स्वतःचे जीवन आहे. एका व्यक्तिकडे पुर्वजांची रुद्रवीणा असते. त्याला ती अडगळ वाटते व तो कचरापेटीत फेकुन देतो. एक साधु रस्त्याने चालला असतो. तो हे दृश्य पाहतो. रुद्रवीणा घेतो व मधुर संगीत त्यातुन निर्माण करतो. लोक जमतात व आनंद घेतात. वीणा फेकणारा व्यक्ति वीणा माझी आहे म्हणुन परत मागतो. साधु म्हणतो, तुला वीणेचे महत्व कळले, तसेच जीवन आहे, याचे महत्व कळले नाही तर ते व्यर्थ, भार वाटते. "

टॉलस्टाॅय म्हणतो, "जग बदलावे ही मनुष्य इच्छा करतो पण स्वतः बदलत नाही!" जगात काय व्हायला हवे? इतरांनी काय करावे, यावर बरेच उपदेश असतात. आपण हाच आलाप ऐकत असतो. पण ही स्वतःची जीवनरुपि वीणा वाजविण्याचे ज्ञान महत्वाचे वाटत नाही. आणि यासाठीच भगवतगीतेने मानसशास्त्राची दखल(Internal World) घेतली आहे. चांगलेपणा मनुष्यात असतो, त्याला चांगली प्रेरणाही मिळते, पण courage धृति या दैवी गुणाशिवाय ती प्रेरणा, ते संगीत साकारच होत नाही.

*स्वतःतील शक्ति (Strength) व शक्तिचे अज्ञान

"All men's souls are immortal, but the souls of the righteous are immortal and divine. "

Socratese

चांगलेपणा स्वतःची अंतःप्रेरणा शक्ति जागृत करण्याचे महान साधन आहे. चांगलेपणामुळेच अर्जुन दुःखी होतो. व योग्य-अयोग्य(धर्म-अधर्म) या संदर्भात गोंधळ उडतो. योग्यला अयोग्य व अयोग्यला योग्य ठरवितो. यामुळे स्वतःमध्ये शक्ति अनुभवत

नाही. आत्मविश्वास नष्ट होतो. (मनोदुर्बलता येते) यामुळे स्वतःतील Strength व Weakness याची ओळख होत नाही.

स्वतःतील Strength व Weakness या संदर्भात रेमंड डॅलियो(जगातील ५८वा श्रीमंत)म्हणतो,

I believe that the biggest problem that humanity faces is an ego sensitivity to finding out whether one is right or wrong and identifying what one's strengths and weaknesses are.

-Ray Dalio( Billionaire investor, hedge fund manager, and philanthropist)

* False-Self vs True -Self,

Ego is our false-self; it is a cover up for our insecurities. Self-realization means that we are established in the Self as the Self due to the total dissolution of the ego.

Wisdom is to know the difference between ego and self-respect, and to become more aware towards these. The ego is the opposite of self-esteem.

The very basic difference is –

ego is negative and counter productive while self respect is positive and sign of confidence. Ego closes our mind and obstructs our vision so that we cannot see anything other than the ideas of our own.

*Attachment vs Detachment

The best way of managing ego is to break the unhealthy attachment with the self.

There is an external reality and an internal reality. External reality is a world of external objects. Internal reality is a world of thoughts and feelings. We experience the world more from an internal reality.

Observe thoughts and feelings that make us happy or sad. If something makes us sad, renounce it.

Renouncing involves not being attached to your thoughts and feelings as they emerge. You give them a reality when you merge with them. We get stuck to the wrong 'I' in us. This wrong self is the ego.

अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

Ego exists in ignorance. The shadow becomes real if you get attached to your shadow. Detachment is the key. Detachment is being aware of the sanity of life. Attachment is insanity.

सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी।
नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ।।(५-१३)

**********

(५-१३)/२:
"नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् "
(संघटन कौशल्य)

विश्वाचे संचलन सुरु असते. व याच विश्वात आपल्या जीवनाचे संचलनही सुरु असते. यातील व्यवस्थापन कौशल्य हा भगवतगीतेचा विषय आहे. ईश्वराची या विश्वात अध्यक्षाची भूमिका असते. तर शरीरयंत्रात जीवनाचे संचलनाशी नाते असते.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

विश्वाचे संचलन या संदर्भात या विश्वात विविध संघटन असते. संघटन उद्योगातील असो, देश, कुटुंब, एखादा event असो यांत व्यवस्थापन (संघटनकौशल्य )असते. अर्थात गुरुत्वाकर्षण कळले म्हणुन सफरचंद खाली पडत नाही. ती सहज नैसर्गिक क्रिया आहे. या विश्वात संचलनाची प्रक्रिया सुव्यवस्थित असावी, सुसंचालन असावे म्हणुन ज्ञानविज्ञान, त्यातील व्यवस्थापनशास्त्राची ओळख

झाली. यामुळे Strength व Weakness कळतो. हे जाणुन Weakness ला Strength मध्ये बदलविणे हा भगवतगीतेचा विषय आहे. याच संदर्भात व्यक्तिगत पातळीवर सुखी जीवनाचे व्यवस्थापन व समुह व्यवस्थापनात (संघटन) मनुष्याची भूमिका या दोहोचा समन्वय साधणारी "योजक"(Orgonizer) भूमिका हा भगवतगीतेचा विषय बनतो. याच भूमिकेसाठी संस्कार असतो. व शिक्षण याच संस्काराचा एक भाग असतो.

"Good management is the art of making problems so interesting and their solutions so constructive that everyone wants to get to work and deal with them. "
Paul Hawken

शिक्षणामुळे मेंदुचा विकास होतो, तर मनाची शक्ति, शरिराचे आरोग्य दुर्लक्षित झाले तर दुबळी बुद्धिमान पिढीच तयार होईल हा इशारा शिक्षण या संदर्भात स्वामी विवेकानंदांनी दिला होता. व मनगट(काया), मन("मनाची शक्ति" ), मेंदु(बुद्धि) याचा समन्वय साधुन संतुलित विकास यावर "सुखी जीवनाचे व्यवस्थापन" या संदर्भात भगवतगीता प्रकाश टाकते.

कायेन मनसा बुद्ध्या केवलैः इंद्रियैः अपि।
योगिनः कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वा आत्मशुध्दये।।(५-११)

सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी।
नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ।।(५-१३)

अर्थात नवद्वार असलेल्या नगरीत वास करीत असलेला अकर्ता असतो.

विश्लेषण:
जीवनयात्रेत मनुष्याला सुख हवे, पण नको असलेले दुःख येते. हेच दुःख टाळण्यासाठी अर्जुनाची "पाप ठरणारे युद्ध मी करणार नाही" अशी भूमिका असते.

"No problem can be solved from the same level of consciousness that created it. "
Albert Einstein

प्रवासात जशी नदी आडवी येते, नदी पार केली तर पुढील प्रवास सुरु होतो. अशीच जीवनविकासाच्या प्रवासात जीवनातील Barrier ची भूमिका असते. चांगला मनुष्य (दैवीगुण) असलेल्या अर्जुनाला ही विकासाची संधी असते. याद्वारे (चांगला मनुष्य असला तरी )अडचणीची ओळख, विकासाची ओळख भगवतगीता करुन देते.

१. वर्तमान:

"This is the key to time management - to see the value of every moment. "

-Menachem Mendel Schneerson

वर्तमानात "ध्यान"(लक्ष) कोठे आहे? असा प्रश्न होत असतो. अर्जुनाचे लक्ष विचलित होते. व अशांत झाल्यामुळे स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. म्हणुन "ज्ञान", "ध्यान" हा विषय भगवतगीतेत आला.

२. दुःखमुक्तिःयोग(दुःखान्त)

आगमा अपायिनो अनित्यः तान् तितिक्षस्व भारत।(२-१४)
अशाश्वताला आसक्त म्हणुन दुःख असते, दुःखमुक्तिसाठी अनासक्तिचे ज्ञान या संदर्भात शाश्वताला आसक्त (attach) राहुन आत्मशुद्धिसाठी अकर्ता रहस्य ज्ञान भगवतगीता सांगते व याद्वारा कर्माला साधनेची श्रेणी प्रदान करते. याचसाठी "योगः कर्मसु कौशलम् " हा संदेश आहे.

"Don't lower your expectations to meet your performance. Raise your level of performance to meet your expectations. Expect the best of yourself, and then do what is necessary to make it a reality. "
Ralph Marston

*******

(५-१४)

***********************

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः।

न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते।।

***********************

(५-१४):

"न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः"

(स्वामीत्वाचे ज्ञान)

"It's important to understand your ownership pattern because it is an expression of the values that guide your life. The question of what you want to own is actually the question of how you want to live your life. "

- Marie Kondo

*Asset कि Burden?

"आपल्या उदास मुलाकडे पाहुन वडील त्याच्या उदासीचे कारण विचारतात. मुलगा म्हणतो मला "बी" ग्रेड मिळाली. वडील म्हणतात, ही परिक्षेची ग्रेड आहे, जीवनाची नाही. तु अभ्यास केला जो तुझ्या अधिकारात होता. फल तुझ्या अधिकारात नव्हते. जीवनाची ग्रेड Asset(A) or Burden(B) अधिकारात असते. म्हणुन जे अधिकारात आहे त्याचा विचार महत्वाचा आहे, जे अधिकारात नाही त्याचा विचार करुन दुःखी होवु नको. "

*अधिकाराचे ज्ञान

भगवतगीता मनुष्याच्या याच अधिकाराविषयी जागृत करते.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन् ।(२-४७)

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शितोष्णसुखदुःखदाः।

आगमाअपायिनो अनित्यः तान् तितिक्षस्व भारत।।(२-१४)

अधिकाराच्या अज्ञानामुळे स्वतःला कर्ता जाणुन मनुष्य कर्मफल आपल्या झोळीत जमा करतो व दुःखाचा पहाड जमा झाल्यामुळे जीवन भार वाटते.

न आदत्ते कस्य चित्पापं न चैव सुकृतं विभुः।

अज्ञानेन् आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।।(५-१५)

*स्वामीत्व/जीवनाचे ज्ञानविज्ञान

जसे मनुष्यांच्या विश्वात यंत्र आले, तसेच प्रकृतिच्या विश्वात मानवशरीर विशेष यंत्र आहे. हे यंत्र ईश्वराच्या उर्जेवर चालत आहे जीवंत असणे ही त्याची साक्ष आहे. प्रकृतिचे कार्य व ईश्वराची भूमिका जाणणे हेच ज्ञानविज्ञान आहे. हे ज्ञानविज्ञान जाणणे जीवनयात्रा सुखाची होण्यासाठी महत्वाचे असते. कारण ही जीवनयात्राच जीवन असते.

मया अध्यक्षेण प्रकृति सूयते सचराचरम् ।

ईश्वर प्रकृतिचा अध्यक्ष आहे. संपुर्ण सृष्टित प्रकृति आपले कार्य यंत्रवत् करीत आहे.

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः।
न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते।।(५-१४)

जसा ईश्वर प्रकृतिचा स्वामी आहे, तसाच आत्मा देहरुपी नगराचा स्वामी आहे. तो कर्मफल निर्माण करीत नाही. हे प्राकृतिक गुणांचेच कार्य आहे.

*श्रेष्ठ -कनिष्ट, मालक-सेवक

शरीरयंत्राच्या विभागात मन विषयकेंद्र (Centre of senses) आहे. मनापलीकडे बुद्धि, बुद्धिपलिकडे आत्म्याचे स्थान अशी श्रेष्ठता(sequence of superiority )असते.

मनसः तु पराबुद्धिः यो बुद्धेः परतः तु सः।(३-४२)

विकासमार्गावर असतांना (आत्मविकासरुपी पहाडावर चढतांना) मन बुद्धिचे पाय ओढते. (मनातील नकारात्मक विचार इच्छाद्वेष द्वंद्व तयार करते व मोहाद्वारे विचलित करते). बुद्धिचे वर आत्मा असतो. आत्मा ईश्वराचा अंश असतो म्हणून बुद्धि ईश्वराला वर घेण्यासाठी नित्य हात मागत असते .

तस्मात सर्वेषु कालेषु माम अनुस्मर युद्ध च।(८-७)

*******

(५-१४):

" न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते"

(जबाबदारी/दायित्व)

समाजात चांगल्याचे, यशाचे श्रेय मनुष्य स्वतःकडे घेतो व अपयशाची जबाबदारी दुसऱ्यावर, जगावर ढकलतो. केवळ व्यवहारातच नव्हे तर धार्मिक क्षेत्रातही हेच अनुभवायला येते. जे मनुष्याच्या कार्यक्षेत्रातील आहे त्यासाठी ईश्वराला जबाबदार धरतो. याचमुळे मनुष्य कर्ता कि ईश्वर कर्ता?हा विषय समाजात चर्चिल्या जातो. भगवतगीता याच विषयावर Scientific (ज्ञानविज्ञानसंहितं) भाष्य करते . "मी कर्ता " असे जाणुनच मी युद्ध करणार नाही असे भाष्य करुन अर्जुन स्वतःची जबाबदारी टाळतो.

मनुष्याला त्याच्या जीवनाचे दायित्व काय?हेच रामायणातही दर्शविले आहे. वाल्याला त्याच्या जबाबदारीची जाणीव करुन दिली. "तुझ्या पापासाठी तु एकटाच जबाबदार आहे". याच वास्तवाचा वाल्याने स्विकार केला व रामायणकार महर्षि वाल्मिकि घडला.

रामायणात ही जबाबदारी "वचन" या मुल्याला highlight करुन दर्शविली आहे. स्वतःचे Commitment स्वतःच पाळले तर स्वतःवर नियंत्रण सिद्ध होते. यामुळे आत्मविश्वास असतो. तर इतरांना Commitment दिले व त्याचे पालन केले तर इतरांचा विश्वास बसतो.

दशरथ महाराजांनी कैकेयीला वचन दिले होते. त्या वचनाचे पालन करणे महाराजांना आवश्यक होते. स्वधर्मपालनासाठी श्रीरामांनी महाराजांना सहकार्य केले. वनवासासाठी मुकसम्मति जाणुन स्वतः आज्ञापालन केले.
धरम धुरीन धरम गति जानी।कहेउ मातु सन अति मृदु बानी।
पिता दीन्ह मोहे कानन राजू।जहॅ सब भाॅंति मोर बड काजू।।(अयोध्याकाण्ड ५२-३)

अर्थात स्वतःचा स्वधर्म जाणणे मनुष्याचे कर्तव्य ठरते. वचनपालन हे स्वतःचे दायित्व असते. Determination या संदर्भात याचे जीवनविकासात महत्व आहे. पण समाजात वचन मागे पडुन आज्ञापालन हाच धर्म असे highlight होत असते. आज्ञापालन हा दुसऱ्याचा respect आहे, तर वचनपालन स्वतःचा respect आहे. स्वतःचा स्वधर्म असतो.

नियतकार्यातील "कर्मफल" या संदर्भात अर्जुनाला दुःख जाणवते. म्हणुन "स्वधर्म" या मुल्याचे महत्व स्वतःची मंजुरी, Tiebreaker या संदर्भात स्पष्ट करण्यात येते.

प्रकृति व पुरुष-पुरुषोत्तम या ज्ञानविज्ञानाद्वारे कर्म घडणे, कर्मफल हे प्रकृतिचे क्षेत्र आहे हे भगवतगीता स्पष्ट करते.

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः।

न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते॥(५-१४)

मग ईश्वराचे क्षेत्र कोणते?

तस्य कर्तारम् अपि मां विद्धि अकर्तारम् अव्ययम् ।(४-१३)

न आदत्ते कस्य चित्पापं न चैव सुकृतं विभुः।

अज्ञानेन् आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः॥(५-१५)

अर्थात पापपुण्य/योग्य अयोग्य(Rightous) हा प्रकृतिच्या कार्याचा भाग आहे. ईश्वर याचा कर्ता नाही. म्हणुन "युक्त" विचलित होत नाही, अयुक्त विचलित होतो, अशांत होतो. सुखी जीवनासाठी संस्कार या संदर्भात भगवतगीता "युक्त" शब्दाचा प्रयोग करते.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखम् ।।(२-६६)
युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ।।(५-१२)
अर्थात येथे निष्काम कर्माचे महत्व व पर्यायाने Determination चे महत्व स्पष्ट होते.

सार :

"God has a purpose for your pain, a reason for your struggles and a reward for your faithfulness. Don’t give up. ”

Eric Thomas

भगवतगीतेत निष्काम कर्म, ईश्वरज्ञान (अध्यात्म) सांगितले आहे. याचा अर्थ जबाबदारी टाळणे नसुन बेजबाबदार अर्जुनाला त्याची जबाबदारी दर्शविली आहे. अज्ञानामुळे मनुष्य बेजबाबदार होतो. म्हणुन जबाबदारीने मनुष्य विकासमार्गावर असावा हा भगवतगीतेचा संदेश आहे.

******

(५-१५)

***********************

न आदत्ते कस्य चित्पापं न चैव सुकृतं विभुः।

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।।

***********************

(५. १५)/१:

"न आदत्ते कस्य चित्पापं न चैव सुकृतं विभुः"

(Law of creation /विकास)

न आदत्ते कस्य चित्पापं न चैव सुकृतं विभुः।

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।।(५-१५)

प्रकृतिनियमानुसार या सृष्टिचे संचलन होते. तसेच मनुष्यजीवन याच नियमानुसार चालत असते. याच संदर्भात मनुष्यजीवनातील अशाश्वत व शाश्वत तत्व प्रकृति(Nature) आणि ईश्वर (शाश्वत) यांची भूमिका भगवतगीतेने स्पष्ट केली आहे. याच ज्ञानाच्या

अभावामुळे मोह (अज्ञान) असते. जीवनात दुःखाशी सामना करण्यास सक्षम नसतो.

याच अनुषंगाने Law of creation जाणुन घेणे महत्वाचे ठरते.

" Nature is neutral. It does not take sides neither does it care what happens to you. What happens to you is simply a matter of law-the law of cause and effects. "

One of the most of amazing things about life is that there are many spiritual systems and sciences that address the issue of how we create things on this Earth, and they are often in conflict with each other. To reconcile these different perspectives. , we should understand the functioning of Three Levels of Creation…

Law of creation :

1. The Physical Level is the level of Doing and Having; of creating through the things we do with the things we have.

2. The Spiritual Level is the level of Being, of creating through the essence of our Being, both consciously and unconsciously, all of time.

3. The Empowerment Level is the level of Becoming, of learning and growing, and realizing our potential to create. It is complementary to both the Physical and Spiritual Levels of Creation, and between them in many ways. At this level, the focus is on increasing our power, enhancing our ability to create, and becoming who we are when we are at our best. It is about realizing our potential.

कार्य घडण्यास भौतिक पातळीवर(Physical level) इच्छा(State of want) व कर्म (State of Art) या दोन विभागाचा (Factors) उल्लेख होतो. याच संदर्भात State of Mind(सक्षमीकरण, विकास, शांति) हा तिसरा Factor

भगवतगीता सांगत आहे. Law of creation या संदर्भात ही Empowerment level of creation ठरते.

अर्जुन म्हणतो, जर मला कांहीच नको, तर कार्याची गरज काय?ही विकासातील Physical level असते. पुढे याच संदर्भात अर्जुन म्हणतो, या कार्याने नरकवास मिळेल. आम्ही स्वजनांची हत्या करणारे लोभी ठरु!अर्थात अपकिर्ति होईल. स्वर्गप्राप्ति, किर्तिप्राप्ति जीवनविकासातील Spiritual level ठरविली तर येथे conflict असतो. श्रीकृष्ण हा conflict दर्शवुन देतात. निष्क्रियता स्वर्ग व किर्ति या दोहोपासुन वंचित करेल. अर्थात येथे जीवनविकासाच्या संकल्पना " मिळणे" या संदर्भात असतात.

अर्जुन वास्तव न स्विकारता मनसमाधानासाठी(समर्थन) ज्ञान वापरतो. अर्थात इच्छापुर्तिसाठी कार्य हे अर्जुनाचे ज्ञान Physical level व Spiritual level या दोन्ही पातळीवर अपुरे ठरते.

The body is a servant of the mind. What we feed the mind on is what the body responds or react to. Thoughts lead to action, repetitive action (habit)

forms characters that eventually make our lives (destiny).

मनुष्य शिक्षण घेतो, ज्ञानी होतो. संस्कारीत होतो(habit formation), ईश्वरभक्ति करतो. या सर्वांचा उपयोग विकासातील Empowerment पातळीवर जाणला तर नित्य विकासमार्गावर असणे हे जीवनाचे वर्तमानातील "लक्ष" ठरते. याच भागाचे भगवतगीतेने सविस्तर स्पष्टिकरण केले आहे.

* Senses सुख( विचलित करणारे अशाश्वत) vs. शाश्वत सुख (योग-दुःखान्त-विचलित न होणे)

*बुद्धिभ्रम vs. बुद्धियोग

*मनोवश vs. आत्मवश

*सकाम कर्म vs. निष्काम कर्म

*द्वंद्व vs. (कार्याचा) दृढनिश्चय

*निष्क्रिय, आळस, अशांति(तम) vs नित्य विकास (सत-मनशांति)

* State of mind या संदर्भात मार्गात विचलित न होणे यासाठी अमृतंगमय मार्ग ज्ञान, State of mind ची अवस्था या संदर्भात योगयुक्त अवस्थेचे महत्व स्पष्ट होते.

जीवनातील भय, चिंता, दुर्बलता नकारात्मक emotions असतात. जीवनविकासातील अडथळा ठरतात. तर निर्भयता, साहस, आत्मविश्वास सकारात्मक emotions ठरतात. नित्य विकासाला(आत्मोन्नति) सहाय्यक ठरतात.

"A mind dominated by positive emotions, becomes a favorable abode for the state of mind known as faith. "

Napoleon Hill

*****०

(५. १५)/२:

"अज्ञानेन् आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः"

(Ignorance vs. Wisdom)

भगवतगीतेचा विषय "अज्ञान"( चुकीचे विचार करुन निराश राहणे) या एकाच मुद्यावर सुरु होतो. एखादे यंत्र उर्जेवर चालते. जशी यंत्राची कार्यपद्धति असेल तसे ते काम करते. मनुष्याचे जीवन यंत्र व उर्जा या संदर्भात प्रकृति व पुरुष या तत्वावर चालत असते. पुरुष हे उर्जेचे शाश्वत तत्व ईश्वराशी(पुरुषोत्तम) जोडलेले असते.

अवजानन्ति मां मुढा मानुषीं तनुं आश्रितम्।(९-११)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।

भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया॥(१८-६१)

ईश्वर हे शाश्वत तत्व ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत असतो, यामुळे "ज्ञान" म्हणुन ओळखल्या जाते. याच ज्ञानाचे awareness नसल्यामुळे मोह होतो. म्हणुन "अज्ञान vs. ज्ञान " या विषयाला भगवतगीतेत चालना मिळाली.

अज्ञानेन् आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

अर्जुन मोहामुळे(attachment) दुःखी होतो. जे कार्य सुखासाठी घेतले तेच आता दुःखदायी वाटते व या कारणाने युद्ध न करणे तो योग्य समजतो. योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. याचमुळे अज्ञानाला ज्ञान दर्शविले जाते. हीच चुकीची विचारसरणी, अज्ञानी स्थिति ठरते. या स्थितीचा सरळ संबंध वास्तवाशी असतो.

वास्तव :युद्ध करणे वा न करणे यांत श्रेयस्कर काय?युद्ध करणे श्रेयस्कर असले तरी देवाचे राज्य मिळाले तरी दुःख नष्ट कसे होईल?हाच खरा प्रश्न आहे! अर्थात दुःखमुक्ति ही अर्जुनाची Priority असते.

न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।
जोशयेत् सर्वकर्माणि विद्वान युक्तः समाचरन्॥(३-२६)

सुखाचा संबंध कर्माशी, कर्माचा ज्ञानाशी याप्रमाणे सुख-कर्म-ज्ञान यांचा संबंध भगवतगीता स्पष्ठ करते.

अर्जुन व्यावसायिक कर्म व त्याची गरजापुर्ति जाणतो. पण त्याची उच्चगति जाणत नाही. (दुःखमुक्तिसाठी )कार्यातील याच उच्चगतिचे ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते.

व्यवहारात सुखासाठी गरजा, व गरजापुर्तिसाठी कार्य आपण जाणत असतो. इंद्रियविषयसुख व आत्मबुद्धिसुख असे सुखाचे मुख्यतः दोन प्रकार जाणले (तिसरा प्रकार आळस, प्रमाद) तर गरजापुर्तिसाठी कार्य इंद्रियविषयसुख संदर्भात असते. याच आधारावर युद्ध न करणे याची निवड करतो. तो कार्यातील गरजापुर्ति गति जाणतो. (राजस सुख)

विषयेन्द्रियसंयोगात् यत् तद् अग्रे अमृतोपमम्।(१८-३८)

गहना कर्मणो गतिः

कार्यसंस्कार या संदर्भात सहजकार्य-व्यावसायिक कार्य-स्वधर्म कार्य/योगस्थ गति याप्रमाणे कार्याची उच्च गति निश्चित होत असते. निष्काम कर्म/ईश्वरभक्तिसाठी कर्म/ योगासाठी कर्म ही कार्यातील उच्च गति असते, ज्यामुळे सतसुख- निर्भयता, योग(दुःखमुक्ति) साध्य होते.

तत्सुखं सात्विकं प्रोक्तं आत्मबुद्धिः प्रसादजम् ।।(१८-३७)

व्यावहारिक बोध: पोथीज्ञान-कर्म-ज्ञानी(Wisdom)

कोणाचा जन्म व्यर्थ गेला?या संदर्भात नावाड्या आणि पोथीपढीत विद्वान यांची गोष्ट सर्वश्रुत आहे. पोथीज्ञान (Informatory knowledge) श्रेष्ठ कि कर्म श्रेष्ठ? याचा निवाडा होतो, तेंव्हा ज्या नावाड्याला अज्ञानी संबोधत असतात, तो तरतो!पोथीपढीत ज्ञान व्यर्थ ठरते!

कर्म जीवनविकासाचे साधन आहे. यांत सहजकार्य(State of art), निर्णयअधिकार यांचा समावेश असतो. "ज्ञानी" या संदर्भात कर्माची उच्चगति जाणणे व कार्याद्वारे सुख-दुःखमुक्ति साध्य करणे यासाठी कार्याची निर्द्वंद्व (दृढ) अवस्था साध्य करण्यासाठी ज्ञान (ज्ञानसंच्छिन्नसंशयम्) म्हटले आहे. यामुळे स्वधर्म, दृढनिश्चय याद्वारे मार्ग निश्चयाने, विश्वासाने चालत असतो. कार्यातील उच्चगति अनुभवतो.

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)
यत् ज्ञात्वा न पुनर्मोहं एवं यास्यसि पांडव।(४-३५)

"Wisdom is knowledge which has become a part of one's being. "
Orison Swett Marden

******

(५. १५ )/३ : " अज्ञानेन आवृतं ज्ञानं "

"Every great dream begins with a dreamer. Always remember, you have within you the strength, the patience, and the passion to reach for the stars to change the world. "
Harriet Tubman

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जंतवः।।(५-१५)

जसा सूर्य ढगाने झाकल्या जातो. पण सूर्य असतोच. अज्ञानामुळे जीवनज्ञान झाकल्या जाते. या अज्ञानाची जाणीव भगवतगीता

मनुष्याला करुन देते. हीच ओळख भगवतगीतेत अर्जुनविषादयोगातुन होते. अज्ञानी अवस्थेला ज्ञानी दर्शविण्याचा अर्जुनाचा प्रयत्न असतो. व येथेच भगवतगीतेचा प्रवास सुरु होतो.
(Logic:"Breakdown to Breakthrough")

स्वतःवर विश्वास(आत्मविश्वास) व स्वतःचे अज्ञान(मोह) दोन्ही येथे स्पष्ट होते. यामुळेच समाजात दोन प्रकारचे लोक आढळतात. आत्मविश्वास असलेले कर्तृत्वाचे महत्व जाणुन कार्यरत असतात व दुसरे स्वतःला ज्ञानी समजुन भाष्यात व्यस्त असतात.

ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे हे निर्विवाद सत्य आहे पण जीवनात कर्माचे महत्व जाणले तरच ज्ञानाचे महत्व कळते हे भगवतगीतेचे भाष्य आहे.
(Logic:"Conversion of knowledge into action and action into knowledge")

मनुष्याचे जीवित तत्वात शाश्वत ईश्वराचा अंश आहे. कार्यकारण हा प्रकृतिचा भाग असतो . प्रकृतिचे संचलन शाश्वत ईश्वरामुळे होते. जीवनातील अशाश्वत व शाश्वत तत्वाचे आधारावर भगवतगीतेचे विकासज्ञान आहे.

जीवनाची सामान्य अवस्था vs श्रेष्ठ अवस्था

प्रकृति vs ईश्वर

अशाश्वत vs शाश्वत

मोह vs आत्मविश्वास

अज्ञान vs. ज्ञान

असत् vs. सत्

मनोवश अवस्था vs. आत्मवश

सकाम कार्य vs. निष्काम कार्य

Lower consciousness vs. Higher Consc.

जीवनयात्रेत जीवन वेगवेगळी वळण घेत असते, व हे आव्हान स्विकारण्यास त्याला सक्षम व्हावे लागते. म्हणुन ही वळणे जाणणे व स्वतःला सक्षम करणे आवश्यक असते. उदा. मुले सर्वप्रथम शिक्षणासाठी बाहेरगांवी जातात, व जी काळजी आईवडील घेत होते त्याला स्वतःला काळजी घ्यावी लागते. याप्रमाणेच जीवन विविध वळणे घेते.

-व्यावसायिक(Professional)कार्य स्विकारतो. स्वावलंबित होतो.

- लग्न होते, गृहस्थाश्रमात प्रवेश करतो

-निवृत्तिकाळात प्रवेश होतो.

या संदर्भात भगवतगीता Professional व्यवसायातील मार्गदर्शिका ठरते, पण याद्वारेच जीवनाचे संपुर्ण रहस्य व ज्ञान स्पष्ट करते.

व्यवहारात व्यावसायिक मार्ग सकाम असतो(State of Want-State of Art) . पण याच Conscious नुसार कार्य केले तर परिणाम(भयाने) दुःखी करतात, ती मनोवश अवस्था असते. जसे हिवाळा उन्हाळा बदलते स्वरुप असते, तसेच दुःख अशाश्वत असते म्हणुन शाश्वताचा आश्रय असणारे व्यथित होत नाही.
समदुःखसुखं धीरं स अमृतत्वायकल्पते।(२-१५)

*******

(५-१६)

************************

ज्ञानेन तु यत् अज्ञानं येषां नाशितम् आत्मनः।

तेषां आदित्यवत् ज्ञानं प्रकाशयति तत् परम्।।

************************

(५-१६)/१:

"ज्ञानेन तु तद् अज्ञानं येषां नाशितम् आत्मनः"

(अज्ञान vs ज्ञानाची दृष्टि)

'जीवन' मनुष्याला विकासासाठी लाभलेली संधी असते. स्वतःच्या विकासाच्या, सुखाच्या संकल्पनेनुसार जीवनयात्रा चालत असते. याच संकल्पना जर त्याला द्वंद्वाच्या जाळयात अडकवीत असेल तर अज्ञान स्थितीत मनुष्य जगतो. यामुळेच नकारात्मक भाष्य बोलत असतो. म्हणुन जगण्याची "अज्ञानी स्थिति vs ज्ञानी दृष्टि " हा भगवतगीतेचा विषय आहे.

जीवनात ज्ञानाची दृष्टि प्राप्त होण्यासाठी अज्ञानाचा (वास्तव) स्विकार होणे प्रथम पाउल असते. दुःख टाळण्यासाठी अर्जुन युद्ध

न करणे कसे योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान सांगतो. अर्थात अज्ञानाला ज्ञान दर्शविण्याचा हा प्रयत्न असतो. वास्तव (नियतकार्यातील संशय) कबुल करतो. व "योग्य काय?" हे ऐकण्यास तयार होतो.

*ज्ञानाची दृष्टि:

१. द्वंद्व vs निर्द्वंद्व

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप।।(७-२७)

इच्छा-द्वेष, चांगले-वाईट, पाप-पुण्य, योग्य-अयोग्य, सुख-दुःख Polarity असते. जीवनमार्गातील ही Polarity द्वंद्व दर्शविते, तर निर्द्वंद्व highlight करण्यासाठी भगवतगीता सुख-दुःख संदर्भातही "समदुःखसुखंधीरं " हे भाष्य करते. व चांगले-वाईट, पाप-पुण्य या संदर्भातील अर्जुनाचा संभ्रम(अज्ञान) दर्शवुन देते.

जीवनातील "ज्ञान" या संदर्भात प्रकाश vs अंधार या Polarity चा उपयोग केलेला आहे. यानुसार ज्ञान प्रकाश ठरतो, अज्ञान अंधार ठरते.

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)
ज्ञानेन तु तद् अज्ञानं येषां नाशितम् आत्मनः।(५-१६)

अज्ञानामुळे जीवनात मोह असतो. जीवनातील अज्ञान दुर करण्यासाठी ईश्वराचा आश्रय व त्याचे महत्व विज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते.

जगातील चांगलेपणा, Creativity ईश्वराच्या दिव्य विभूति असतात. जीवनात ईश्वरज्ञानाचा आश्रय दृष्टिबदल करतो. सकारात्मक असतो. त्याला जगातील चांगलेपणा दिसतो. अडचणीत विकाससंधी शोधतो. अर्थात यामुळे जीवनात ज्ञानाची दृष्टि असते. याच दृष्टिमुळे विकासदृष्टि लाभते.

येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)

२. मनोवश vs आत्मवश

भगवतगीतेतील युद्धाचा प्रसंग मनुष्याच्या अंतरंगातील (Internal) battle व बाह्य व्यवहारातील(External) battle याला Corelate करते. बाह्य व्यवहाराचा आंतर्गत जगतातील व्यवहारावर परिणाम असतो. म्हणुन आंतर्गत जगतातील battle कळणे हा बोध येथे आहे. बुद्धिला भ्रमित करणारी मनोवश अवस्था vs आत्मवश अवस्था हा बोध होतो.

व्यवहारात कार्य न करता इच्छाचिंतन करणे चिंता, "काम" निर्माण करते. यामुळे बुद्धिभ्रम होतो. ही मनोवश अवस्था ठरते. ज्ञानी अवस्थेसाठी आत्मवश अवस्थेत Transformation आवश्यक असते. आत्मवश अवस्था धारण होण्यासाठी "बुद्धियुक्त" अवस्थेचे(free from duality, निर्द्वंद्व) महत्व सांगितले.

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।(२-५०)

* विकासदृष्टि:
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

जीवनविकासात कार्यकौशल्य साध्य होण्यासाठी "यज्ञ" कौशल्य सांगितले आहे.

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञान अवस्थित चेतसः।
यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते॥(४-२३)

या प्रक्रियेत

इच्छा(इंद्रियविषय)-कार्य(कर्मेंद्रिये)-स्वधर्म, दृढनिश्चय (आत्मसंयम)- (ईश्वर)ज्ञान असा Sequence असतो.
इच्छा(इंद्रियविषय) इंद्रियाग्निमध्ये भस्म होते. कार्य आत्मसंयमात भस्म होते.

सर्वाणि इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।
आत्मसंयम योगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते॥(४-२७)

याप्रमाणे जीवनात ईश्वराचा आश्रय ज्ञानी दृष्टिची धारणा करते.

*****

(५-१६)/२:

"तेषां आदित्यवत् ज्ञानं प्रकाशयति तत् परम् "

मनुष्याच्या हृदयी ईश्वराचा अंश (जीवित तत्वात)आहे, हे भगवतगीता सांगते. हे सत्य अनुभवणे(क्रियाशील असणे) म्हणजे जीवनातील अंधाराचा नाश होणे जसा सूर्य दिवसाला क्रियाशील असतो. अर्थात जीवन प्रकाशित होते.

ज्ञानेन तु यत् अज्ञानं येषां नाशितम् आत्मनः।
तेषां आदित्यवत् ज्ञानं प्रकाशयति तत् परम्।।(५-१६)

जीवनातील अंधार आणि प्रकाश यांचे नाते अज्ञान व ज्ञानाशी जोडलेले आहे.

शिक्षणातुन ज्ञानप्राप्ति होते. जीवनविकासात प्राप्तिसुख जाणतो. व यासाठी कार्य जाणतो. (State of want- State of art) . या ज्ञानानुसार (भौतिक प्राप्तिसाठी कार्य)विकासमार्गावर असतो. पण याच ज्ञानानुसार अर्जुन अडकतो. व अज्ञानाला ज्ञान दर्शवितो.

केवळ "प्राप्तिसाठी कार्य " ही दृष्टि असल्यामुळेच "एक पिढी कमविते, दुसरी मजा करते, तिसरी रस्त्यावर येते व पुनः संघर्ष सुरु होतो. " असा जगात समज बनतो.

"काय हवे" याची पारदर्शकता असेल तर संवाद होतो. अर्जुन म्हणतो, मला कांही नको. तो अशा अवस्थेत सापडतो, कि कार्य केले तर दुःख व न केले तर अपकिर्ति!या स्थितीत समाधानासाठी भाष्य बोलतो . अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. या भाष्यात केवळ फसवणुक असते, दुसऱ्याची किंवा स्वतःची!

कार्य मनुष्याला प्रकृतिने दिलेले साधन आहे.

"कर्मानुबंधिनी मनुष्यलोके. "

प्रत्येक क्षणी कार्य घडणार. येथे प्रश्न उपस्थित होतो, ज्ञान म्हणजे काय?भगवतगीता याचेच उत्तर देते.

ज्ञान म्हणजे प्रकाश. संशय म्हणजे अंधार. यासाठी जीवनाचा विकासमार्ग सांगितला, ज्या मार्गावर दुःखामुळे विचलित होत नाही. मार्ग दृढ असतो. हा विकासमार्ग असतो, "अमृतंगमय"(जीवित तत्वातील ईश्वरअंशाचे ईश्वराशी संमिलन). या मार्गावर नित्य विकास होतो, अर्थात कार्याद्वारे भक्ति घडते. कार्य निष्ठेने करतो.

याप्रमाणे ज्ञान म्हणजे प्रकाश व भक्ति म्हणजे नित्य विकास असे संदर्भ जीवनविकासमार्गावर असतात. म्हणुन येथे विकासासाठी कर्म या संदर्भात कर्म निष्काम बनते. जीवनविकासात कार्यसंस्कारीत असलेला स्वतःचा मार्ग (स्वधर्म, दृढनिश्चय) जाणतो.

"He who knows himself is enlightened. "

Lao Tzu

भगवतगीतेने कर्म, ज्ञान व भक्ति याचे विकासमार्गातील महत्व व मुळ Logic स्पष्ट केले.

कर्म :कर्म प्रकृति घडविते.

"न हि कश्चित् क्षणम् अपि जातु तिष्ठति अकर्मकृत् "

कार्याचे दोन भाग जाणणे(एक प्राप्तिचा दुसरा भक्तिचा)

१. (योगक्षेम, भोगैश्वर्य) प्राप्तिसाठी कार्य(सकाम)

२. कार्याद्वारे भक्ति(योग-निष्काम)

हे ज्ञान जाणुन स्वतःचा मार्ग (सांख्यात स्वधर्म, कर्मयोगात दृढनिश्चय) जाणणे व संस्कारीत असणे.

ज्ञान : प्रकाश

ज्ञानामुळे कार्यमार्ग दृढ होतो "ज्ञानसंच्छिन्नसंशयम्" व कार्याद्वारे भक्ति घडते. " योगसंन्यस्तकर्माणं"

ज्ञानविज्ञानाचा कर्मात उपयोग होतो. अखेर सर्व कर्माचे ज्ञानात विलिनीकरण होते.

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञानेपरिसमाप्यते।

अर्थात ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. याचाच अंश हृदयी असतो. म्हणुन Higher consciousness क्रियाशील होणे यासाठी बुद्धियोग/ईश्वर आश्रय हा शब्दप्रयोग आहे.

भक्ति : विकास

जीवनाचा विकासमार्ग(अमृतंगमय)जाणुन नित्य विकास करणे. यामुळे दुःखामुळे विचलित होत नाही. मार्ग दृढ असतो. मनःशांती अनुभवतो.

"अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् "

*******

(५-१८)

**********************

विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि।

शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः।।

**********************

(५-१८)/१:"शुनि चैव श्वपाके च पंडितः समदर्शिनः"

(ज्ञान-अज्ञान vs चांगले-वाईट)

"There is nothing either good or bad but thinking makes it so. "

William Shakespeare

भगवतगीतेत एकत्वाची दृष्टि असलेल्याच पंडित संबोधले आहे.

विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि।

शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः।।(५-१८)

ज्ञानविज्ञान या संदर्भात चांगले-वाईट हे मापदंड नसते, तर ज्ञान-अज्ञान असते. मनुष्याने अज्ञान स्विकारले तरच तो ज्ञान घेतो.

चांगले-वाईट, चुक-बरोबर, धर्म-अधर्म हे व्यावहारिक मापदंड असतात. याच आधारावर धर्मयुद्ध ठरले होते. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर अर्जुन दुःखी होतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानभाष्य बोलतो. अज्ञानाला ज्ञान दर्शवितो.

जीवनात मनुष्याला सुख हवे असते. दुःखी झाला असता मनसमाधानासाठी जेंव्हा समर्थन करतो, येथेच तो अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. अर्जुन वास्तव स्विकारतो अर्थात अज्ञान स्विकारतो व ज्ञान(What is right?)ऐकण्यास तयार होतो.

"Life is neither good or evil, but only a place for good and evil. "

Marcus Aurelius

मनुष्यजीवनात विकासाच्या ज्ञानाचे रहस्य "Raising Consciousness (आत्मोन्नति)" असते. दुःखी झाला असता मनोवश झाल्यामुळे मन(Lower consciousness) बुद्धिला

clouding करते. भ्रम होतो. म्हणुन अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. नकारात्मक होतो. म्हणुन बुद्धिला Cloudfree भ्रममुक्त करणे हा खरा प्रश्न असतो.

व्यावहारिक(भौतिक) सुखासाठी मनुष्य कार्य करतो. Lower consciousness मध्ये प्रश्न, अडचणी व्यथित करतात. Higher consciousness मध्ये अडचणी विकाससंधि ठरतात.

"The significant problems we face cannot be solved at the same level of thinking we were at when we created them. "
~ Albert Einstein

Lower Consciousness मध्ये State of mind मनोवश अवस्था असते. तर आत्मवश अवस्थेत Higher consciousness क्रियाशील होतो. मनोवश अवस्थेत कार्याची सकाम अवस्था असते. म्हणुन निष्कामकार्याचा हेतु "Raising consciousness" स्पष्ट होतो. व याचसाठी जीवनविकासाचा Standard मार्ग "अमृतत्वाय कल्पते" म्हटले आहे. याच मार्गासाठी ईश्वरज्ञान(तद् धाम परमं मम) व जीवनाच्या

विकासमार्गातील त्याचे महत्व सांगितले. ईश्वरज्ञान ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत असतो.

याच आधारावर मार्गातील अज्ञान ज्ञानाने छेदणे व योगासाठी कार्य हा संदेश भगवतगीता देते.

योगसंन्यस्त कर्माणं ज्ञानसंच्छिन्न संशयम् ।(४-४१)

विश्वातील ज्ञानाचे महत्व निर्विवाद आहे, तर जीवनात विकासासाठी Consciousness ज्ञान महत्वाचे आहे. अर्थात बाह्य श्रेष्ठत्वासाठी प्रथम आंतर्श्रेष्ठत्व जाणणे आवश्यक आहे. हाच संदेश भगवतगीता देते,

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

"The key to growth is the introduction of higher dimensions of consciousness into our awareness. "
Lao Tzu

*******

५. १८/२: पंडितः समदर्शिनः

(Logic of Nonduality, Oneness)

"When the divine vision is attained, all appear equal; and there remains no distinction of good and bad, or of high and low. "

Ramakrishna

बहुनां जन्मनाम् अन्ते ज्ञानवान् माम् प्रपद्यन्ते।
वासुदेवः सर्वम् इति स महात्मा सुदुर्लभः।।(७-१९)

The people of this world have long had a tendency to judge most everything in terms of

light vs. darkness,

good vs. evil,

fear vs. faith

us vs. them

Our lives are filled with these and many other dualities. These dualities can easily lead to a polarization of beliefs and lifestyles. It is “belief-desire” frame. That is, people in everyday situations use both beliefs and desires to explain why people do what they do.

प्रकृति व ईश्वर यांत मुख्य विषय द्वन्द्व व एकत्व/समत्व हाच आहे. याच संदर्भात भगवतगीतेने ईश्वराची ओळख दिलेली आहे. याच ईश्वराची भक्ति करण्याचे शास्त्र भगवतगीता सांगत आहे. या शास्त्राचा आधार द्वन्द्व vs निर्द्वन्द्व हा आहे.

*Perception:निर्द्वन्द्व या संदर्भात एकत्व, समत्व दृष्टि असते.

*ज्ञान (Faith/Fear) : संशयामुळे द्वन्द्व असतो. भय असते. ज्ञानामुळे विश्वास असतो. निर्द्वन्द्व स्थिति निर्भयता असते.

ज्ञानसञ्छिन्न संशयम् (४-४१)

*Determination -कार्याचा एकनिश्चय

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।(२-४१)

*भक्ति-निष्कामकर्म या संदर्भात सिद्धि-असिद्धि साम्य/समत्व

सिद्धिअसिद्ध्योः समो भूत्वा समत्वंयोग उच्यते।(२-४८)

*Standard मार्ग:अमृतंगमय या Standard मार्गावर निर्द्वन्द्व असतो.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

अर्थात

प्रकृति:व्यवहारामध्ये सकाम कर्म असल्यामुळे द्वन्द्व असतो.

ईश्वर :एकत्व, समत्व दृष्टि

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि।

शुनि चैव श्वपाके च पंडितः समदर्शिनः।।(५-१८)

इहएव तैर्जितः सर्गो एषां साम्ये स्थितं मनः।(५-१९)

सार : संशय, भय यामुळे दुर्बलता असते. "संशयात्मा विनश्यति". भयामुळे विकास थांबतो. संशय, भय म्हणजेच द्वन्द्व स्थिति. ज्ञानामुळे संशय मिटतो. विश्वास येतो. कार्याचा एकनिश्चय होतो. निर्द्वन्द्व होतो. भक्तिमुळे (परिणाम)भय मिटते.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

निर्द्वन्द्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।(२-४५)

******

(५-२२)

***********************

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनव एव ते।

आद्यन्तवन्तः कौंतेय न तेषु रमते बुधः।।

***********************

(५. २२):"ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनव एव ते"

मनुष्यजीवनाला सुख आवडते परंतु (जरा, मरण, व्याधि, अडचणी इ. )दुःखाशी सामना करावाच लागतो. या एकाच प्रश्नाने जगातील विद्वतजनांना विचारात टाकले व सुखी जीवनाचे तत्वज्ञान जगासमोर आले. वर्तमानात प्रत्येक मनुष्याला हा प्रश्न आव्हान देत असतो. महाभारतात अर्जुनाला आव्हान मिळाले व भगवतगीता जगासमोर आली.

जीवनातील सुखदुःख-

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनव एव ते।

आद्यन्तवन्तः कौंतेय न तेषु रमते बुधः।।(५-२२)

मनुष्य जीवन जगत असतो. सुखदुःख अनुभवत असतो. सुख उत्साहीत करते व दुःख दुबळे करते. Senses mind जे सुख भोगते, ज्या सुखाला ओळखते, त्याच सुखाचा अभाव दुःखी करते. याच सुखाचे वर्णन :

"विषयइंद्रियसंयोगात यत् तद् अग्रेअमृतोपमम्।

परिणामे विषम् इव"(१८-३८) असे करते. व हे सुख अशाश्वत(जाणारे येणारे)संबोधुन शाश्वत सुख सांगितले,

यद् तद् अग्रे विषम् इव परिणामे अमृतोपमम् ।

तत् सुखं सात्विकं प्रोक्तं आत्मबुद्धिः प्रसादजम् ।।(१८-३७)

याप्रमाणे अशाश्वत सुख व शाश्वत सुख यांतील भेद स्पष्ट होण्यासाठी अर्जुनाची "कर्म" या संदर्भातील भूमिका निमित्त ठरली. अशाश्वत सुखातुन शाश्वत सुखाकडे पोहोचण्यासाठी(१) "कर्म" साधन केले (२)ईश्वरज्ञान जाणुन जीवनाचा शाश्वत मार्ग सांगितला.

जीवात्मा शरीर धारण करतो अर्थात आत्म्याच्या प्रवासाला शरीर साधन मिळते. म्हणुन जीवन आत्मोन्नतिचा प्रवास आहे. हा प्रवास ईश्वराप्रत असतो . ईश्वरच आत्म्याचे मुळ व अंत आहे,

सृष्टिची मुळ प्रवृत्ति आहे, ज्ञानविज्ञानाचा मुळ स्त्रोत आहे. ज्ञानामुळे विश्वास असतो. विश्वासामुळे कार्याचा एकनिश्चय असतो. याच ईश्वराची भक्ति म्हणजे आत्मोन्नति (ईश्वराप्रत प्रवास) असते. याच भक्तिसाठी कार्य साधन केले आहे. याप्रमाणे ज्ञान-कर्म-भक्ति यांचा समन्वय आत्मोन्नतिसाठी स्पष्ट केला. "युक्त "या संदर्भात ईश्वरज्ञानाचा वापर येथे स्पष्ट होतो.

*युक्त (संस्कारीत):

युक्त होण्यासाठी बुद्धियोग आश्रय म्हटलेले आहे. या मार्गात दुःखमुक्तिसाठी ईश्वरभक्ति अर्थात निष्काम कर्म अर्थात कार्याद्वारे योग (दुःखान्त) स्पष्ट होतो.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिं आप्नोति नैष्ठिकिम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते॥(५-१२)

हेच ज्ञान जाणण्यासाठी अर्जुनाचे नियतकार्य(" कर्म" ) निमित्त ठरले. ईश्वर व प्रकृति याद्वारा सृष्टिचे सृजन होते. प्रकृति कर्म करते. कर्तृत्वानेच जगाचा इतिहास घडतो. जगात ज्ञानविज्ञान आले. कर्तृत्वाला नवदिशा मिळाली. म्हणुन जग विज्ञानाच्या ज्ञानामुळे विस्मित झाले.

कर्म घडण्याच्या प्रक्रियेत (१)कर्म ठरणे, ठरविणे (२)प्रत्यक्ष कर्म सुरु करणे (३) प्रत्यक्ष कर्म घडणे, असे तीन विभाग जाणले तर अर्जुन मधल्या अवस्थेत असतो. प्रत्यक्ष कर्म सुरु करण्यापुर्वी दुःखी होतो. दुःखामुळे Mindset "सकाम" होते. म्हणुन आत्मोन्नतिसाठी "ज्ञान-कर्म-भक्ति "या तत्वाचा येथे वापर स्पष्ट केला. व "कार्यसंस्कार " हा विषय पुढे आला.

व्यवहारबोध:

"युक्त" या संदर्भात संस्कारीत असलेला विश्वासाने जीवनमार्ग चालतो. स्वतःची बुद्धि वापरतो. मार्गात दुःखी झाला, अडथळा जाणवत असला तर (अज्ञानामुळे) त्याची भूमिका कशी असते हे अर्जुनाच्या भूमिकेतुन स्पष्ट होते. निष्क्रियतेचे समर्थन करणे, नकारात्मक भूमिका असुनही या भूमिकेला "ज्ञानी" दर्शविणे, नाव वाऱ्याने वहावी तशी जीवनमार्गाची भूमिका बनते. ही भूमिका मनोवश ठरते. म्हणुन आत्मवश भूमिकेसाठी "कार्यसंस्कार" महत्वाचे आहेत, ज्यामुळे जीवननाव निश्चित दिशेने वल्हवीत असतो.

*समुहातील Committed नियतकार्य "स्वधर्म"जाणुन स्वतःचा मार्ग चालणे. कार्य निष्ठेने होण्यासाठी कार्य ईश्वराला समर्पित करतो.
*स्वतःचा निर्णयअधिकार जाणुन कार्याचा दृढनिश्चय करणे व योगासाठी(दुःखान्त) कार्यरत असणे.

*******

(५. २२)/२ :
"आद्यन्तवन्तः कौंतेय न तेषु रमते बुधाः"
(Happy person)

"A happy person is not a person in a certain set of circumstances but rather a person with a certain set of attitudes. "
Hugh Downs

जगातील तत्वज्ञानाचा(Philosophy) आधार मुख्यत्वेकरुन सुखदुःख आहे. सुखासाठी मनुष्य जगत असला तरी नकळत दुःख

येत असते. याच दुःखामुळे विचलित होतो. कामक्रोध या विकारांचा आवेग येतो. युद्धक्षेत्रावर दुःख टाळणे सहज शक्य आहे असे अर्जुनाला वाटते. तो म्हणुन युद्ध टाळण्याची भाषा बोलतो. कारण सुखासाठी प्राप्ति व प्राप्तिसाठीच कार्य घेतले असते. यावरुनच तो युद्धकार्याला निषिद्धकार्य सिद्ध करतो. पण..

.. पण सुखाचे रहस्य विचलित न होणे ही शक्ति आहे याचे सामान्य मनुष्याला ज्ञान नसते. निर्भयता, साहस याच शक्तिमुळे असते. याच शक्तिची ओळख योग(दुःखान्त) या संदर्भात भगवतगीता देत आहे. सुखी जीवनाचे हेच रहस्य आहे.

शक्नोति इह एव यः सोढुं प्राक् शरीर विमोक्षणात्।
कामक्रोध उद् भवं वेगं स युक्तः स सुखी नरः।।(५-२३)

ही शक्ति साध्य करण्यासाठीच कार्याद्वारे ईश्वरभक्तिचा संदेश भगवतगीता देत आहे. अर्थात कार्य निष्ठेने(योगासाठी) करणे, यासाठी कार्याचा एकनिश्चय असणे आवश्यक असते. या संदर्भात स्वधर्म, कार्यनिश्चय( Determination ) Tiebreaker ठरतात. Tie ला (द्वन्द्व) वश झाल्यामुळे बंधन असते. या आधारावर मुक्तिसाठी निर्द्वन्द्व असतो. हा बंधनमुक्तिचा आधार आहे. याचसाठी जीवनमार्गात जीवनमुल्य Priority असते. मनुष्य

तात्पुरत्या दुःखाने (परिणामभयाने) विचलित होत नाही. सुखाची (शक्तिची) साधना ही Priority असते
ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते।(५-२२)

. अर्थात जीवनमुल्ये, कार्याचा एकनिश्चय शक्तिसाधनेसाठी Priority असते.
आद्यन्तवन्तः कौंतेय न तेषु रमते बुधाः॥(५-२२)

सार:A happy person is happy not because everything is right in his life. He is happy because his attitude towards everything in his life is right.

*******

(५-२३)

**********************

शक्नोति इह एव यः सोढुं प्राक् शरीर विमोक्षणात्।

कामक्रोध उद् भवं वेगं स युक्तः स सुखी नरः॥

**********************

(५-२३):"

शक्नोति इह एव यः सोढुं प्राक् शरीर विमोक्षणात्।

कामक्रोध उद् भवं वेगं स युक्तः स सुखी नरः।"

(Happy Person)

मनुष्य जीवनमार्ग चालतो. या मार्गात सुख अनुभवणे मनुष्याची Priority असते. सुख या संदर्भात भगवतगीतेत सुखी मनुष्य(५-२३), सुखाचा मार्ग (२-१५), सुखाचे रहस्य दुःखान्त -योग (६-२३) या सरळ व्याख्याच केलेल्या आहेत.

मनुष्य खेळ खेळतो व व्यायाम आपोआपच होतो. शक्तिचा लाभ होतो. याचप्रमाणे व्यवहारात (सुखी होण्यासाठी) कार्य करतो व मानसिक व्यायाम घडतो. कार्यातील हेच कौशल्य भगवतगीता

सांगत आहे. निर्भयता, साहस, विचलित न होणे ही शक्ति कार्याद्वारे "योग" साधनेमुळे शक्य होते. विचलित न होणे म्हणजे Stable अर्थात कामक्रोध आवेग विचलित करीत नाही. तोच सुखी मनुष्य.

शक्नोति इह एव यः सोढुं प्राक् शरीर विमोक्षणात्।
कामक्रोध उद् भवं वेगं स युक्तः स सुखी नरः।।(५-२३)

प्रकृति सगुण असते व ईश्वर गुणातीत असतो. भगवतगीता प्रकृतितील Strength व Weakness याचा परिचय देते. व ज्ञान या संदर्भात ईश्वराचे महत्व सांगते.

प्रकृति व पुरुष:

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृति उच्यते।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते।।(१३-२०)

ईश्वर:

उत्तमः पुरुषः तु अन्यः परमात्मा इति उदाहृतः।
यो लोकत्रयम् आविश्य बिभर्ति अव्यय ईश्वरः।।(१५-१७)

भक्ति/शक्तिची साधना

पुरुषः स परा पार्थ भक्त्या लभ्य तु अनन्यया।
यस्य अन्तःस्थानी भूतानि येन सर्वम् इदं ततम्।।(८-२२)

भगवतगीतेने सुखाचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रकृतितील Strength (कर्म) याचा उपयोग केला . प्रकृतिचा Weakness मनुष्याला अशांत करतो, विचलित करतो. प्रकृतिगुणामुळे कामक्रोधाचा आवेग असतो. कामक्रोध याचा आवेग संशय, चिंता, Tension, भय निर्माण करते. हा आवेग सकाम मानसिकतेमुळे (आसक्ति) असतो. याचाच अर्थ कामक्रोधाचा आवेग मनुष्याला अशांत करतो, विचलित करतो. या Weakness वर मात करण्यासाठी भगवतगीता ज्ञान जगासमोर आले.

*प्रकृतितील Strength :
सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवानअपि।(३-३३)
कर्म:कार्य करणे, निर्णयअधिकार, स्वभावनियत सहजकार्य, स्वधर्म, दृढनिश्चय यामुळे विकासमार्ग बनतो.

*प्रकृतितील Weakness:

तयोःन वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

इच्छा नैसर्गिक आहे. यामुळे कार्य करतो. पण या मार्गात संशय, दुःखी होणे, विचलित होणे, अशांति, यामुळे द्वंद्वच्या जाळयात अडकतो व विकासमार्गावरुन घसरतो.

*ज्ञान या संदर्भात ईश्वराचे महत्व:

ज्ञानविज्ञानामुळे अशक्य शक्य होते. ज्ञानाचा उपयोग जीवनमार्गातील अज्ञान मिटविण्यासाठी आहे. पण मनुष्याला जीवनमार्गाचेच अज्ञान असेल तर निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी, स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा उपयोग करतो. यामुळे नकारात्मक मानसिकता असते. हीच चुक अर्जुन करतो. मनुष्य (अज्ञानामुळे) समजतो, मी ज्ञानी आहे! पण हा प्रज्ञावाद असतो. जीवनाचे सत्य (वास्तव) न स्विकारल्यामुळे मनुष्य प्रज्ञावादाचा आधार घेतो.

भगवतगीता जीवनमार्गातील "ज्ञान" या संदर्भातील हेच Misunderstanding प्रकाशात आणते.

ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. बुद्धियोग/ईश्वराचा आश्रय मार्गातील संशय मिटवतो. व कार्याचा एकनिश्चय होतो.
"ज्ञानसञ्च्छिन्न संशयम्"

व्यवहारमार्ग सकाम असतो. यात आसक्ति असते. तर ईश्वरज्ञानामुळे "अमृतंगमय" अर्थात "अमृतत्वाय कल्पते" या राजमार्गात व्यवहारमार्गाचे Transformation होते. या मार्गात अनासक्त असतो. निष्काम कार्य घडते. या मार्गात शक्तिची साधना(योगः कर्मसु कौशलम्, नैष्कर्मसिद्धि) घडते.

Each time we face our fear, we gain strength, courage, and confidence in the doing. Act on your courage and you'll become bold and fearless, ... Do the right thing because it is right.
- Theodore Roosevelt

*******

(५-२५)

************************

लभन्ते ब्रह्मनिर्वाणं ऋषयाःक्षीणकल्मषः।

छिन्नद्वैधा यत् आत्मनः सर्वभूतहिते रताः ॥

************************

(५-२५)

: "छिन्नद्वैधा यत् आत्मनः सर्वभूतहिते रताः "

(Art of crossing Duality)

छिन्नद्वैधा-Breaking duality

यत् आत्मनः -आत्मवश, Higher conscious

सर्वभूतहितेरतः -जगत कल्याण, प्रेम, ईश्वरभक्ति

याप्रमाणे मनुष्याला कार्य करतांना कोणती अवस्था साध्य करायची आहे?याचा संदेश मिळतो.

जीवनात कार्य घडतच असते. हे कार्य करतांना जीवनविकासाची आपली भूमिका कोणती?हे मात्र आपण ठरवीत असतो. यांत चुकीची भूमिका कोणती व योग्य भूमिका कोणती याचेच मार्गदर्शन भगवतगीता करते.

प्रकृतित द्वंद्व(Polarity अंधार-प्रकाश इ. ) असते. व्यवहारातील कार्यात द्वंद्व(यश-अपयश इ. किर्ति-अपकिर्ति)असतेच. याच (द्वंद्व)अवस्थेत कार्य करणे, कार्याची सकाम अवस्था ठरते. अपयशाचे भय वाटते. ("द्वैत्यात् भयम् भवति" Where you see two, there will be fear. )याचाच परिणाम द्वंद्व अवस्थेतील कार्य कष्ट वाटते, किंवा भय नष्ट होत नाही. भय असणे म्हणजे अशांत असणे (अशांतस्य कुतः सुखं).

God is beyond duality(एकत्व). याच तत्वाचा उपयोग व्यवहारकार्य (द्वंद्व)विकासकार्यात(निर्द्वंद्व) transform करण्यासाठी उपयोग होतो. कार्य प्रत्यक्षात करतांना द्वंद्वाला cross करणे अर्थात निर्द्वंद्व अवस्था साध्य करुन कर्म करणे, याचे व्यवस्थापन भगवतगीता सांगते.
(निर्द्वंदो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान)

व्यवहारात मनुष्य(चांगला, विद्वान असुनही)कार्य कां टाळतो?बेजबाबदार कसा होतो व त्याची भूमिका कशी असते?याचेच उदाहरण अर्जुनाची विषादी व याच संदर्भातील प्रज्ञावादी (Socalled wisdom!) भूमिका आहे. येथे (निष्क्रियता व)दुर्बलतेचे दर्शन होते. म्हणुन श्रीकृष्णाने सुरुवातीलाच " क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा" ही अर्जुनाला समज दिली.

येथेच "काय आहे? vs काय साध्य करायचे आहे?याचे awareness हवे.

दुर्बलता vs सक्षमता

दुःख vs योग(दुःखसंयोगंवियोगं)

अशांती vs शांती

द्वंद्व vs निर्द्वंद्व

सकाम कार्य vsनिष्काम कार्य

भय vs अभय,

Timidity vs Courage

या संदर्भात विकासाचे ज्ञान मिळते. व ईश्वराचा आश्रय व कार्याद्वारे भक्ति याचे महत्व कळते.

विश्वात आपण अनेक घटना पाहतो. एखादा अपघात होतो, तेंव्हा अमुक असे केले असते तर अपघात टळला असता!असे भाष्य आपण ऐकतो. पण हे भाष्य निरर्थक ठरते. भूतकाळ परत येत नाही, वर्तमान आपला असतो.

वर्तमानात आपला अधिकार कार्य(मार्ग) ठरविण्याचा आहे. कार्यरत असतांना योगस्थ (निर्द्वंद्व)भूमिका असावी, याचे महत्व जाणले तर निर्णय घेतांना(मार्ग ठरवितांना) आपली भूमिका कशी असावी याचे Awareness येते. याच Awarenessचे व Executionचे ज्ञान भगवतगीता विस्ताराने सांगते.

वरील संदेश मनुष्याला काय साध्य करायचे याचे awareness देते.

लभन्ते ब्रह्मनिर्वाणं त्र्षयाःक्षीणकल्मषः।

छिन्नद्वैधा यत् आत्मनः सर्वभूतहिते रताः ।।(५-२५)

According to Stephen Covey, "Spiritual intelligence is the central and most fundamental of all the intelligences, because it becomes the source of guidance for the others. "

*********

# भगवदगीता

## अध्याय ६. अभ्यासयोग

## अध्याय ६ अभ्यासयोग

६. १. विकासासाठी योग्य मानसिकता

६. २. योगाभ्यास

६. ३. अर्जुनाचा प्रश्न

### ६. १ योग्य मानसिकता

"Nothing can stop the man with the right mental attitude from achieving his goal; nothing on earth can help the man with the wrong mental attitude. "
-- Thomas Jefferson

योग्य मानसिकताच जीवनविकास साध्य करते. योग्य मानसिकता या संदर्भात निर्भयता, चिंतामुक्त, संशयमुक्त असणे, सकारात्मक, प्रेम(करुणा) इ. दैवीगुणांचा समावेश असतो, यामुळे कार्याचा कार्याचा दृढनिश्चय होतो. कर्मयोगाचा दृढनिश्चय पाया असतो. व्यवहारात

योग्य मानसिकताधारणेसाठी Self developement, योग (अभ्यासवर्ग ) यांचा उपयोग होतो.

संन्यास कि योग या संदर्भात निराकरण करतांना जीवनविकासात योगाचे विशेष महत्व सांगितले. विकासात कर्म कारण तर योगारुढ होण्यासाठी शांती, फल (परिणाम)त्याग कारण असते. याप्रमाणे जीवनाच्या विकासमार्गावर असतो तो स्वतःचा मित्र असतो. विकासात फलत्याग या संदर्भात लाभ-हानि, यश-अपयश, मान-अपमान या द्वंदावर योगस्थ वृत्तिने मात करणे व समत्वयोग साध्य करणे, या विकासप्रक्रियेत द्वंदमुक्ति साध्य करीत असतो. शीत-उष्ण, सुखदुःख यांत द्वंदमुक्ति साधुन शांती अनुभवतो व ईश्वराच्या एकत्वाकडे प्रवेश करतो व समत्वदृष्टि, समबुद्धि(सोने-दगड, मित्र-शत्रु) साध्य करतो. अद्वेष्टा, सर्वभूतहितेरतः अशी बुद्धि धारण होते.

व्यवहारात चांगले काय, वाईट काय यावर चर्चा होते, चांगल्याला वाईट ठरविणे व वाईटाला चांगले ठरविणे, असेही भाष्य चालत असते. यामुळे भ्रम निर्माण होतो. म्हणुन जीवनविकासासाठी योग्य मानसिकतेची धारणा महत्वाची असते.

One who makes himself a worm cannot complain afterwards if people step on him.

Immanuel Kant

या संदर्भात अभ्यासयोगाचा (Cultivation of mind) संदेश महत्वाचा ठरतो.

"Honor Yourself"

बंधुरात्मा आत्मनः तस्य येन आत्मैव आत्मना जितः।
अनात्मनः तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत॥(६-६)

६. २ अभ्यास

"A life of reaction is a life of slavery. One must fight for a life of action, not reaction "

मी सामान्य आहे असे समजुन मनुष्य जसा आहे, त्याच स्थितित जगत असतो. स्वभाव, संवयीनुसार जगणे सोपे वाटते. पण प्रश्न असतो, Action जगतो कि Reaction जगतो?दुःखी असणे,

नकारात्मक असणे या Reactions असतात. अर्जुनाची युद्ध न करणे ही Reaction होती.

जगात काय व्हायला हवे हे कळले तरी त्यासाठी कार्य हवे. जगात काय चुक आहे हे शोधणे सोपे असते. Reaction जगणारा काय चुक आहे, हेच शोधत असतो, व जेंव्हा स्वतःवर कृति करण्याची वेळ येते, तेंव्हा चुक होण्याचा संशय वाटतो, यामुळे निष्क्रिय झाला किंवा जी निवड केली तर त्याचे आदर्शकृति म्हणुन समर्थन करतो. कारण वर्तमानात एकाग्रता साधलेली नसते, मन सतत इकडेतिकडे धावत असते. स्वतःमध्ये काय बदल करायचा हे कळत नाही, व कळले तरी बदल कठिण वाटतो. याप्रमाणे मी सामान्य आहे असे समजुन मनुष्य स्वतःला बेजबाबदार घोषित करतो. म्हणुन भगवतगीता संदेश देते, स्वतःचा बंधु व्हा.

अब्राहम मास्लोव म्हणतो, "The ability to be in the present moment is a major component of mental wellness. " सुखी जीवन या संदर्भात एक तज्ञ डा. सुसान म्हणते, "Training your mind to be in the present moment is the key to making healthier choices. ”

"Improving your ability to focus your mind, to concentrate, could be the difference between a mediocre life and a successful and satisfying life. "

वर्तमान जगण्यासाठी एकाग्रता महत्वाची असते. एकाग्रतेमुळे करावयाच्या कार्याचा निश्चय होतो, जे कार्य करतो ते निष्ठेने करतो. एकाग्रता, योग ही शक्ति असते. याच संदर्भात चंचलत्व ही दुर्बलता ठरते.

कर्मयोगात सिद्धिअसिद्धि यांत समत्वयोग साधणे हे कौशल्य असते, याद्वारा समत्वदृष्टि प्राप्त होते. योगाभ्यासात (सकाम मनावर लगाम बसुन)चित्ताची एकाग्रता साधण्यासाठी
अभ्यास(Practice) आहे.
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचित अपि चिंतयेत् ।(६-२५)

शाश्वत सुखासाठी योग, ब्रह्मभूत होणे
योग म्हणजे दुःखान्त
यं लब्ध्वा च अपरं लाभं मन्यते न अधिक अंततः।(६-२२)
(अर्थात कितिही प्रचंड दुःख आले तरी विचलीत न होणे)

याप्रमाणे शाश्वत सुख-समत्वदृष्टि-एकत्व अर्थात कल्याणभाव(सर्वभूतहितेरतः) याची धारणा होणे .

आत्मा औपम्येन सर्वत्र समं पश्यति यो अर्जुन।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः।। (६-३२)

याप्रमाणे Honor Yourself /बंधुरात्मा हे logic वर्तमान जबाबदारीने (Action)जगण्यासाठी आहे.

६. ३ अर्जुनाचा प्रश्न :

जीवन Automatic यंत्रवत् (स्वभावसदृश) चालत असते. मन Senses सुखदुःखाचे केंद्र असते. वाऱ्यासारखे पळत असते. यांत purposely बदलाव करणे म्हणजे वारा पकडण्यासारखे अशक्य वाटते. अर्जुन शंका व्यक्त करतो, याचे निराकरण करतांना अत्मवश होणे कठिण आहे पण उपायाने शक्य आहे. यासाठी अभ्यास एक मार्ग आहे, तर वैराग्य म्हणजे कर्माद्वारे संन्यास (Transformation of lifepath in spiritual journey) हा

दुसरा मार्गआहे. अर्जुनाला याच मार्गाची तत्काळ गरज होती. ज्यांत त्याला शंका वाटली. ती शंका विचारतो,

श्रद्धेने आपण सांगितलेला मार्ग आचरण्याचा प्रयत्न केला पण जमले नाही तर, आता जे मला व्यावहारिक सुखासाठी श्रेयस्कर (युद्ध न करणे)वाटते, ते व ज्यासाठी (योग)वेगळा मार्ग आचरला ते (योग)सुख या दोन्हीपासुन वंचित व्हावे लागेल!अशा स्थितित ढगफुटीप्रमाणे सर्वच वाया जाणार?(माझे गेले, तुझे गेले, हाती धुपाटणे आले!). आपण मार्ग सांगितला तर आपणाशिवाय कुणिही ही शंका दुर करु शकत नाही.

याच शंकेचे निराकरण करतांना पुढिल विषय(ज्ञानविज्ञानसह-अध्याय ७) सविस्तर चर्चिले जातात.

चांगल्या मनुष्याचा जीवनप्रवास पुर्णत्व साधण्यास असमर्थ ठरला तर पुढिल जन्मात तो continue होईल.

अर्जुन श्रीमंत, पवित्र घराण्यात जन्मला होता. भौतिक सुखासाठी व्यवहारमार्ग आचरत असतांना गोंधळला. हा गोंधळ मिटविण्यासाठी या मार्गाला आध्यात्मिक मार्गात Transform

करण्याचा उपाय श्रीकृष्ण सांगतात. बुद्धांचा जन्म पवित्र, श्रीमंत घराण्यात झाला होता. भौतिकसुखदुःखाच्या प्रश्नाने त्यांना अशांत केले, सत्याच्या शोधात निघाले. यातुनच बुद्ध धर्माची स्थापना झाली.

याप्रमाणे कुणी पवित्र, श्रीमंत घराण्यात जन्माला येतो, तर कुणी दुर्लभ अशा योगी कुळांत जन्माला येतो. तेथे पुर्वसंस्कारामुळे योगासाठी जिज्ञासु असतो. पुर्वसंस्कारामुळेच व अनुकुल कुळातील जन्मामुळे मनुष्य अध्यात्म विषयाकडे आकर्षित होतो.

जीवनांत सुख, साफल्य शोधत मनुष्याची जीवनयात्रा पार पडत असते. व जन्मजन्माचा प्रवास सुरुच राहतो. चांगल्या मनुष्याचा प्रवास याच यात्रेचा भाग असतो. म्हणुन या जीवनात पुर्णत्व साधण्यासाठी काय महत्वाचे आहे, हे जाणणे आवश्यक असते. भक्ति करणारा तपस्वि असो, ज्ञानी असो, वा कर्मनिष्ठ असो, यांत योगी होणे श्रेष्ठ असते तर ईश्वरगति जाणुन श्रद्धेने भजणारा योगी सर्वश्रेष्ठ ठरतो.

*********

अध्याय ६-मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

(६-२) :

"न हि असंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन"

(स्वतःचा धर्म)

(६. ३):

"आरुरुक्षोः मुनेःयोगं कर्म कारणम् उच्यते"

(विकासमार्ग व मानसिक शक्ति यांचा समन्वय)

६. ५/१: "उद्धरेत् आत्मना आत्मानम् "

(६. ५)/२:

"उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत्"

(विकासमार्गावर असणे vs. स्वतःचा अडथळा बनणे)

(६. ५)/३:

"आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः"

(Self-help attitude)

६. ५/४ : "आत्मैव हि आत्मनो बंधुः "

(६. ५)/५ :

"उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत् "

(जीवनविकासातील आत्मोन्नति)

६-६/१ :"बंधुः आत्मा आत्मनः तस्य येन आत्मैव आत्मना जितः"

६. ६/२:

"अनात्मनः तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत् "

६-७/१:

"जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः"

६. ७/२:

"शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः"

(जीवनविकासाचा Mindset)

(६-१४) :

"मनः संयम्य मत् चित्तो युक्त आसीत मत्परः"

(State of mind)

६. १५ :

"युञ्जनैव सदा आत्मानम् योगी नियतमानसः"

(निष्काम कर्माची दशा)

(६-२०):

"यत्र उपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया"

(Change of level of consciousness)

(६-२१):

"वेत्ति यत्र न चैवाय स्थितः चलति तत्त्वतः"

(Alignment with reality)

(६. २२ )/१ :

"यं लब्ध्वा च अपरं लाभं मन्यते न अधिकं ततः"

(सुखाची निश्चित व्याख्या)

६. २२/२:

"यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते"

६. २३/१ :" तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम्"

६. २३/२:"स निश्चयेन योक्तव्यो योगो निर्विण्ण चेतसा"

(Exercise through life)

६-३३:

"एतस्य अहं न पश्यामि चंचलत्वात् स्थितिम् स्थिराम् !"

६. ३५/१:

"असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् "

(Who controls whom?)

६. ३५/२ :

"अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते"

(बदल)

६-३६/१:

" असंयत आत्मना योगो दुष्प्राप इति मे मति "

(Importance of Discipline, Lifevalues)

(६-३६)/२:

"वश्य आत्मना तु यततां शक्यो अवाप्तुम् उपायतः"

(दुबळे करणारी मनोवश अवस्था vs. जीवनविकासात सक्षम करणारी आत्मवश अवस्था)

(६-३७)/१:

"अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति?"

(विकासाचा अखंड प्रवास व अडथळा)

(६-३७)/२:

" अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति?"

(जीवनाचे ध्येय?)

६-४०:" न हि कल्याणकृत् कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति।"

(६-४२):

"एतद् हि दुर्लभतरं लोके जन्म इदृशम् "

(Opportunity of progress)

६. ४४:

"पुर्वाभ्यासेन तेनैव ऱ्हियते हि अवशो अपि सः"

(६-४५):

"अनेकजन्मसंसिद्धः ततो याति परां गतिम्"

(विकासाचे सातत्य)

(६-४६)/१ :

" तस्मात् योगी भवार्जुन"

(६-४६)/२ :

"कर्मिभ्यश्च अधिको योगी तस्माद् योगी भवार्जुन "

( life : Journey cum battle)

(६-४७):

"श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः"

(बुद्धियोग :द्वन्द्व vs निर्द्वन्द्व)

******

(६-२)

*************************

यं संन्यासं इति प्राहुः योगं तं विद्धि पांडव।

न हि असंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन।।

*************************

(६-२) :

"न हि असंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन"

(स्वतःचा धर्म)

सॉक्रेटिसला मृत्युदंड देण्यात येतो, तेंव्हा शिष्य सॉक्रेटिसला एका शब्दात ज्ञान देण्याची विनंती करतात. तेंव्हा सॉक्रेटिस "KNOW THYSELF" हा संदेश देतो. या संदेशाची जगभरात नोंद घेण्यात आली.

मोझेस शोषणातुन लोकांची मुक्तता करतो. पण समाजात स्वैरता थैमान घालते. तेंव्हा "Ten Commandments" हा ईश्वराचा आदेश येतो. याप्रमाणेच जगातील स्वैरतेवर मात होण्यासाठीच जगात धर्म(जगात/समाजात वागण्याचे नियम) आलेत. या धर्माचे

आचरण म्हणजे स्वतःसाठी पुण्यकार्य, स्वर्गप्राप्ति, ईश्वरभक्ति असे याचे स्वरुप असते.

आपल्या आचरणाने इतरांना त्रास होवु नये, इतरांना सहकार्य व्हावे, समुहाच्या संचलनात सहकार्य व्हावे असा या धर्माचा आधार असतो, त्याप्रमाणे श्रद्धा असते. अर्थात परस्पर सहकार्यासाठी जगात धर्म आलेत. हे सहकार्य मधमाशांच्या संघटनेसारखे कार्यरत असते. परस्पर सहकार्य शक्ति असते. याच धर्माच्या(दया धरमका मुल है) logic(ज्ञान) नुसार अर्जुन भ्रमात सापडतो. दुःखामुळे दुबळा होतो. आपल्या लोभापायी स्वजनांना मारणे हा अधर्म आहे असे भाष्य करतो. अर्जुनाचे हे भाष्य ज्ञान या संदर्भात असते.

ज्ञान vs. कर्म

भगवदगीतेने ज्ञानाला सर्वश्रेष्ठ ठरविले आहे. ज्ञानामुळेच (जीवनमार्गातील) कार्यातील संशय छेदल्या जातो व कार्याचा एकनिश्चय होतो. पण अर्जुन येथे द्वन्द्वाच्या जाळयात सापडतो. या जाळयातुन मुक्तिसाठी धर्मभाष्य करतो.

समाजात स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी असे भाष्य स्वतःला "ज्ञानी" समजुनच केल्या जाते. अशा वेळी अर्जुनाला भ्रममुक्त करण्यासाठी जे ज्ञान सांगण्यात येते ते ज्ञान स्वतःला संस्कारीत करण्यासाठी असलेला स्वतःचा धर्म (स्वधर्म) ठरतो.

प्रत्यक्ष कार्यामुळेच सृष्टिचे संचलन चक्र प्रवर्तित असते. म्हणुन जीवनविकासात कर्माला प्राधान्य आहे. व कर्मप्रधान असलेला धर्म आत्मोन्नतिसाठी भगवदगीता सांगत आहे. कर्म या संदर्भातच जसे "ज्ञान vs. कर्म" असा प्रश्न येतो(३-१) तसेच संन्यास vs. योग असा अर्जुनाचा प्रश्न येतो. व निष्काम कर्माचे निश्चित तत्व व महत्व कळते.

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः।
स संन्यासी च योगी च निरग्निः च अक्रियः।।(६-१)
यं संन्यासं इति प्राहुः योगं तं विद्धि पांडव।
न हि असंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन।।(६-२)

संन्यास व योग दोन्ही मार्ग सारखे महत्वाचे असले तरी परस्परावलंबि आहेत. दुःखान्तशक्ति (विचलित न होणे) अशी व्याख्या भगवदगीतेने केलेली आहे. या शक्तिशिवाय संन्यास कठिण असतो.

संन्यासस्तु महाबाहो दुःखम् आप्तुम् अयोगतः।(५-६)

*स्वतःच्या धर्माचे वैशिष्ट:

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

१. प्रत्यक्ष अवगमं धर्म्यं सुसुखं कर्तुम् अव्ययम् ।(९-२)

या जगात दुःख आहे . हे दुःख मनुष्याला दुबळे करते. तर शहाण्यासाठी हे दुःख विकासाची संधि ठरते. व याचसाठी स्वतःच्या जगण्यात नित्य ईश्वराचा आश्रय महत्वाचा असतो. यामुळे मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. या मार्गावर विचलित होत नाही.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

२. भय, संशय यामुळे दुबळेपणा असतो. म्हणुन भयमुक्तिसाठी योग, संशयमुक्तिसाठी ज्ञान या धर्माचा निश्चित हेतु आहे.

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम् ।(४-४१)

३. या धर्मात "आत्मवश" अवस्था महत्वाची असते. या अवस्थेत कार्याचा एकनिश्चय असतो, ध्येय निश्चित असते. याप्रमाणे स्वतःला संस्कारीत करणे यासाठी "युक्त" शब्दाचे प्रयोजन आहे. याचा अर्थ व्यवहारात भ्रममुक्त राहुन विश्वासाने कार्यरत असणे. या अवस्थेत स्वतः स्वतःचा बंधु ठरतो. अन्यथा शत्रु!

बंधुःआत्मा आत्मनःतस्य येन आत्मैव आत्मना जितः।(६-६)

४. या मार्गात कर्म साधन असते. यांत स्वतःचे स्वभावनियत कार्य(सहजकार्य), स्वतःचा निर्णयअधिकार महत्वाचे साधन असते. अर्थात आत्मवश अवस्था व निष्काम कर्म परस्परावलंबि असतात. या अवस्थेत जीवननाव निश्चित दिशेने वल्हवित असतो. अन्यथा नाव तुफानी वाऱ्याने वहात रहावी अशी जीवनाची स्थिति होते.

इंद्रियाणां हि चरतां यत्मनो अनुविधियते।

तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावाम् इव अम्भसि।(२-६७)

"The spirit of self-help is the root of all genuine growth in the individual. "

-Samuel Smiles

**********

( ६-३)

*************************

आरुरुक्षोः मुनेःयोगं कर्म कारणम् उच्यते।

योगारुढस्य तस्यैव शमः कारणम् उच्यते।।

*************************

(६. ३):"आरुरुक्षोः मुनेःयोगं कर्म कारणम् उच्यते"

(विकासमार्ग व मानसिक शक्ति यांचा समन्वय)

“Our greatest battles are those with our own mind. ”

अर्जुनाला युद्धक्षेत्रावर मानसिक दौर्बल्य येते. म्हणुन जीवनविकास या संदर्भात मानसिक सक्षमता अर्थात "योग" हा विषय भगवतगीतेत आलेला आहे.

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप।(२-३)

मनुष्य आपल्या Perception प्रमाणे जीवन जगत असतो. मनुष्यजीवन या इहलोकी भोगैश्वर्याच्या सुखासाठी मिळाले आहे

अशी कांही लोकांची जीवनदृष्टि असते. यामुळे जीवनभर अशांति, चिंता याला आश्रय देत असतात.

चिंताम् अपरिमेयां च प्रलयान्ताम् उपाश्रिताः।
कामउपभोगपरमा एतावद् इति निश्चिताः॥(१६-११)

तर भोगैश्वर्याचीच जीवनदृष्टि असणारे कांही लोक जीवनात सुखशांति मिळावी व मरणोत्तर स्वर्ग लाभावा म्हणुन विशेष कार्याला, पुण्यकार्याला महत्व देतात. याचदृष्टिमुळे स्वर्गनरक ही भाषा वापरतात.

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्य परां गतिम् ॥(२-४३)

अर्जुन हिच स्वर्गनरक भाषा वापरतो. या जीवनदृष्टिमुळेच कार्यनिश्चय दृढ नसतो. व अर्जुन मानसिक दौर्बल्याचा victim होतो.

व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।(२-४४)

जीवनात सुखशांती अनुभवण्यासाठी विकासमार्गात बुद्धि विचलीत न होण्याचा मार्ग (अर्थात मानसिक सक्षम होण्याचा मार्ग)भगवतगीता सुचवते.

आरुरुक्षोः मुनेःयोगं कर्म कारणम् उच्यते।
योगारुढस्य तस्यैव शमः कारणम् उच्यते॥(६-३)

मानसिक शक्तिचा विकास होण्यासाठी योग अभ्यास आहे. योग म्हणजे दुःखान्त ही व्याख्या भगवतगीता करते. याच शक्तिचा विकास होण्यासाठी कार्याद्वारे योग, निष्काम कार्य हे कार्यकौशल्य म्हटले आहे. यांत मार्ग अर्थात कार्याचा निश्चय दृढ असतो. यासाठी बुद्धियोग निष्ठा सुचवली आहे. (मानसिक दुर्बलतेमुळे बुद्धिभ्रम होतो व निश्चय होत नाही. )

"मानसिक शक्ति " संदर्भात मनुष्यजीवन आत्मोन्नतिचा विकासमार्गच आहे . हेच विकासमार्गाचे रहस्य भगवतगीता सांगत आहे. व्यावहारिक मार्ग(नियतकार्य, स्वतःचा निर्णय) आत्मोन्नतिसाठी "अमृतत्वाय कल्पते" या मार्गात Transform होते. नियतकार्य स्वधर्मात, निर्णय
दृढनिश्चयात(Determination) परिवर्तित होते.

"It's not enough to be busy, so are the ants. The question is, what are we busy about?"

- Henry David Thoreau

******

(६-५)

********************

उद्धरेतआत्मनाआत्मानं न आत्मानम् अवसादयेत् ।

आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः ।

********************

(६. ५)/१ : "उद्धरेत् आत्मना आत्मानम् "

स्वतःच स्वतःचा विकास करा, हा संदेश "उद्धरेत् आत्मना आत्मानम् " यातुन मिळतो.

"तुम्हीच तुमच्या जीवनाचे/भाग्याचे शिल्पकार " असे घोषवाक्य समाजात ऐकत असतो. प्रत्यक्षात जीवनाच्या, जीवनातील सुखाच्या जशा संकल्पना असतात, तसा मनुष्य जगत असतो.

जे विकास इच्छीत असतात, त्यांच्या श्रेष्ठ व्हावे, चांगले व्हावे याविषयी सुखाच्या संकल्पना असतात. भौतिक जगातील हे श्रेष्ठत्व दोन प्रकारचे असते, समाजपुरस्कृत (किर्ति) व ईश्वरपुरस्कृत(ज्ञानी). हाच भेद भगवतगीता सांगते.

"श्रेष्ठ" या संदर्भात अर्जुनाची Belief system समाजपुरस्कृत असते. यांत सुखाच्या संकल्पना (Pleasure) इच्छाप्रेरीत असतात. या इच्छापुर्तीसाठी कार्य करतो, तर याच संकल्पनेमुळे (अभाव, ) दुःखही येते. परिणामभयाने निष्क्रियही होतो.

अर्जुनाला दुःख झाले, तेंव्हा तो समाधान शोधतो. अर्जुन मानसिकदृष्ट्या खचलेला असतो, व युद्ध न करणे हा पर्याय स्विकारतो. "ना रहे बांस ना बजे बांसुरी" असा हा निष्क्रियतेचा पर्याय असतो. पण आपली भूमिका धर्माची आहे असे दर्शवितो.

आपले अज्ञान वा निष्क्रियता झांकण्यासाठी चांगला मनुष्यही सहज स्वसमर्थनार्थ नकारात्मक भाष्य बोलतो. पण या तात्पुरत्या समाधानातुन मनुष्याचे मानसिक दौर्बल्य व्यक्त होत असते. व विकास थांबत असतो.

मानसिक सक्षमता हा भगवतगीतेचा मुख्य पैलु आहे. यात सुखदुःखाची महत्वाची भूमिका असते. सुखाच्या संकल्पना या संदर्भात Pleasure सुख हे रज सुख असते. व शाश्वतसुख सत असते. "आत्मबुद्धिः प्रसादजम् "असे सतसुख असते. मानसिक

सक्षमतेसाठी हा भेद जाणणे आवश्यक आहे. अन्यथा चांगलेपणाच मानसिक दौर्बल्याचे कारण ठरते. व समाजात चांगलेपणा बदनाम होतो.

सत या संदर्भात चांगलेपणा दैवी गुण असतो, म्हणुन सतसुख दुःखान्त स्थिति असते व यासाठी योग हा संदेश आहे.

व्यवहारात इच्छापुर्तीसाठी कार्य असते, तर याच कार्याद्वारे शाश्वत सुखाची साधना या संदर्भातच भगवतगीता निष्काम कार्य, "योगः कर्मसु कौशलम्" हा संदेश देते.

निष्काम कर्म या संदर्भात ईश्वराला फलसमर्पण हे भाष्य ईश्वरभक्ति या संदर्भात आहे. अर्थात येथे विकासासाठी "श्रेष्ठ" ची संकल्पना ईश्वरपुरस्कृत असते. याप्रमाणे "विकास" या संदर्भात "श्रेष्ठ"ची संकल्पना बदलत असते.

चांगलेपणा असुनही मानसिक दुर्बलता, नकारात्मक भाष्याला ज्ञान समजणे हे अज्ञानच ठरते. यामुळेच मनुष्याचा जीवनविकास थांबत असतो.

जीवनविकास नित्य होत असतो. यासाठी जीवनविकासात विकास, श्रेष्ठता, सुखदुःख, ज्ञान, मानसिक सक्षमता याचे ज्ञान भगवतगीता स्पष्ठ करते. व यासाठी संदेश देते,

उद्धरेत आत्मना आत्मानं न आत्मानम् अवसादयेत् ।
आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः ।(६-५)
*******

(६. ५)/२:
"उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत्"

(विकासमार्गावर असणे vs. स्वतःचा अडथळा बनणे)

मनुष्याचे जीवन जीवनयात्रा आहे व हे जीवन विकासासाठी मिळाले आहे याचे ज्ञान असणारे नित्य विकासमार्गावर असतात, सकारात्मक असतात. तर या ज्ञानाअभावीच मनुष्य नकळत स्वतःच स्वतःचा अडथळा बनत असतो. या कटुसत्यावर भगवतगीता लक्ष वेधत आहे.

स्वतःच स्वतःचा अडथळा बनणे ही एकप्रकारे मूढता असते. अज्ञानामुळे हे नकळत घडत असते, म्हणुन या अज्ञानाला सरळ "विमूढ"(Stupidity) हाच शब्द भगवतगीतेने वापरला आहे.

अहंकार विममूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

अवजानन्ति मां मूढा मानुषिं तनुं आश्रितम् ।(९-११)

विमूढा न अनुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः।(१५-१०)

ज्ञान-अज्ञान:

अर्जुन मार्गावर असतांना दुःखी होतो. युद्धकार्य आवश्यक आहे याची जाणीव असुनही ते कार्य करणे त्याला दुःखदायी वाटते. या मुद्यावर पडदा टाकुन तो "धर्म" या विषयावर भाष्य करतो. व आपल्या नियतकार्याला अधर्म ठरवितो.

अर्जुन चर्चेचा विषय धर्माचरणाचा करतो. पण वास्तव वेगळे असते. अर्जुनाचा मुळ प्रश्न "दुःख"व त्यामुळे आलेली मानसिक दुर्बलता असते. श्रीकृष्णाने सर्वप्रथम याच मानसिक दुर्बलतेवर लक्ष वेधले. तेंव्हा अर्जुन वास्तव कबुल करतो, व प्रश्न करतो: युद्ध करणे धर्माचरण असेल तरी दुःख होणारच आहे. या दुःखापासुन मुक्ति कशी होईल?हेच कळत नाही. याचाच अर्थ दुःखमुक्ति हाच त्याचा मुळ प्रश्न असतो.

"An expert knows all the answers - if you ask the right questions. "

Claude Levi- Strauss

मुळ प्रश्न सोडुन चुकीच्या प्रश्नावर लक्ष वेधणे व त्यावर तार्किक चर्चा करणे या संवयीमुळे समाजात निरर्थक भाष्य होत असते. (ही Stupdityच असते). योग्य प्रश्नच निरोगी व उपयुक्त संवाद घडवुन आणते. " ज्ञान" या संदर्भात भगवतगीता हा प्रथम धडा देते.

पलायनवाद व कर्म

"Escapism, we are led to believe, is evidence of a deficiency in character, a certain failure of temperament, and like so many -isms, it is to be strenuously avoided.

'How do you expect to get ahead?, ' people ask.

But the question altogether misses the point. The escapist doesn't want to get ahead. He simply wants to get away. "

J. Maarten Troost

मानसिक शक्तिविषयी(दुःखान्त) अर्जुन अनभिज्ञ असतो. "प्राप्तिसाठी कार्य" या संदर्भात प्राप्तिचे सुख व अभावाचे दुःख अर्जुनाला ज्ञात असते. म्हणुन Escapism स्विकारतो. अर्थात कार्याद्वारे मानसिक शक्तिचा विकास (दुःखान्त-योग) याविषयी अनभिज्ञ असतो.

विकास मानसिक शक्तिचा(योग) असो वा प्राप्तिसुखाचा दोन्हीमध्ये "कार्य" Common असते, म्हणुन भगवतगीता कर्म, कार्यसंस्कार याचे विकासमार्गातील महत्व सांगते व "गहना कर्मणो गतिः" याद्वारे कर्माची महिमा सांगते.

याप्रमाणे भगवतगीता जीवनात ज्ञानाचे महत्व, कर्माची महिमा ज्ञात करुन या दोहोंचा समन्वय घडवुन आणण्यासाठी "ईश्वरभक्ति ही साधना'" याप्रमाणे (ज्ञान-कर्म-भक्ति) समन्वयाचे शास्त्र स्पष्ट करते. व हे शास्त्र मनुष्याची जीवनयात्रा विकासमार्गावर होण्यासाठी मार्गदर्शक ठरते.

उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत्।
आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मना।।(६-५)

*******

(६. ५)/३ :

"उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत् "

(जीवनविकासातील आत्मोन्नति)

मनुष्याला जीवन मिळाले आहे. या जीवनावर शतशः प्रेम करावे अर्थात जीवनाचा आदर करावा हा संदेश भगवतगीता देते. पण अहंकारामुळे आदर न करता स्वतःचाच द्वेष करीत असतो. म्हणुन स्वतःचा आदर करणे अर्थात स्वतःचा बंधु होणे अर्थात विकासमार्गावर असणे (आत्मोन्नति) याची निश्चित व्याख्या भगवतगीता देत आहे:

उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत् ।
आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः।।(६-५)

व्यक्ति(Individual), समाज व विश्व या तिन्ही संस्थांच्या संदर्भात जीवनविकास, समाजव्यवस्था, विश्वचक्रप्रवर्तन (विश्वसंचलन) हे

महत्वाचे पैलु असतात. या तिन्हींचा समन्वय "धर्म" या शब्दाने साधता येतो हे भगवतगीता स्पष्ट करते.

समाजव्यवस्था या संदर्भात शोषण धर्मग्लानि ठरते. यामुळे चांगल्या(दैवी गुणसंपत्ति) व्यक्तिला संभ्रम (संशय) होतो, जसा महाभारत युद्धात अर्जुनाला संभ्रम झाला. हा संभ्रम मनुष्याचे आंतर्विघ्न असते, व शोषण बाह्यविघ्न असते. भगवतगीतेने धर्मस्थापना यावर उपाय म्हटलेले आहे.

व्यक्तिविकास या संदर्भात धर्माची भूमिका आत्मोन्नतिची असते. ही भूमिका विश्वचक्रप्रवर्तनाला सहकार्य करते म्हणुन आत्मोन्नतिला "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च" असे संबोधले आहे.

शिक्षण व कर्तृत्व याद्वारे व्यक्तिचे व्यवसायही बदलतात. पण आत्मोन्नति हा विषय कायम असतो. शिक्षण व कर्तृत्व याद्वारे व्यवसाय बदलत असले तरी यांतील "कर्म" हा विषय आत्मोन्नतिचे साधन असते. याच विषयाला भगवतगीतेने प्रकाशात आणले आहे, जे जीवनविकास या संदर्भातील गुणात्मक ज्ञान/ मुख्य संस्कार ठरते.

समाजात धर्म, आदर्श या नांवाखाली आत्मोन्नति(स्वतःचा विकास) हा विषय दुर्लक्षित होतो तेंव्हा भगवतगीता याला मानसशास्त्राचा विषय बनविते.

अर्जुन संभ्रमामुळे स्वतःला लोभी ठरवितो व Self help, Mental wellness हा मुद्दा दुर्लक्षित होतो. Selfishness, Self interest, Self help यातील भेद मानसशास्त्रज्ञ, तत्वज्ञ यांनी स्पष्ट केले आहे. भगवतगीता Mental weakness(हृदयदौर्बल्य) व Mental strength (स्थितप्रज्ञ) यातील भेद स्पष्ट करते. व याच संदर्भात "आत्मोन्नति" या विषयाला प्रकाशात आणते.

आत्मोन्नति, कर्तृत्व(कर्म), धर्म यांचा समन्वय भगवतगीतेने साधलेला आहे. धर्म जर आत्मोन्नति neglect करीत असेल तर भगवतगीता सावधान करीत आहे,

सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।<br>
अहं त्वाम् सर्वपापेभ्यः मोक्षयिष्यामि मा शुचः।।(१८-६६)

तसेच आत्मोन्नति या संदर्भात धर्म या विषयात जर कर्तृत्व neglect होत असेल व निष्क्रियतेला धर्म संबोधित असेल तर

भगवतगीता या स्थितिला अज्ञान ठरवीत आहे. व कर्माद्वारे आत्मोन्नतिचा संदेश देत आहे.

(चांगल्या/दैवीगुण) मनुष्याचा धर्म, ज्ञान, कर्म, आत्मोन्नति या संदर्भात होत असलेला गोंधळ भगवतगीता याप्रमाणे दुर करते . या गोंधळास कारणीभूत असलेला अहंकार दुर होण्यासाठी ईश्वराचा आश्रय कर हा संदेश देत आहे. कारण हा खेळ प्रकृति vs ईश्वर हा असतो. हा अहंकार मनुष्याला स्वार्थी करतो, दुःखी करतो, व अज्ञानाला ज्ञान दर्शवतो अर्थात नकारात्मक करतो, कुपमंडुक करतो. आणि ज्ञानासारखे जगात दुसरे श्रेष्ठ कांहीही नाही.

न हि ज्ञानेन् सदृशं पवित्रम् इह विद्यते।

"Ego, the part of you that defines itself as a personality, separates itself from the outside world and considers itself a separate entity from the rest of nature and the cosmos. "

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।
मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वाम् नियोक्ष्यति।।..

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतिनि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

सार :

मनुष्याला जीवन जसे मिळाले आहे, त्याचा स्विकार करावाच लागतो. मनुष्याची जीवनयात्रा त्याच्या स्वभावप्रकृतिनुसार, ज्ञानानुसार, Belief system नुसार चालु असते. धर्म, संस्कार, ज्ञान, अहंकार जीवनविकास या संदर्भात जे ऐकत असतो, त्याप्रमाणे मनुष्याची Belief system बनते. याच Belief system नुसार जेंव्हा अज्ञानाला ज्ञान ठरवितो, तेंव्हा प्रश्न निर्माण होतो. कारण मनुष्य (योग्य नसतांनाही) स्वतःला योग्य ठरविण्यासाठी ज्ञान भाष्य बोलत असतो. याच घटनेवर भगवतगीता प्रकाश टाकते. जीवनविकास या संदर्भात आत्मोन्नति ही धर्माची व्याख्या (शाश्वत, अमृत)भगवतगीता करीत आहे.
ब्रह्मणो हि प्रतिष्ठा अहं अमृतस्य अव्ययस्य च।
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्य ऐकान्तिकस्य च।।(१४-२७)

याप्रमाणे "आत्मोन्नति" या जीवनाच्या मुळ सत्याला भगवतगीता प्रकाशात आणते. जे सत्य कधीही बदलु शकत नाही, या शाश्वत

सत्याचाच जीवनाशी दृढ संबंध असतो. भगवतगीतेने याचाच समन्वय व्यवहारातील कर्माशी साधलेला आहे. या संबंधाची व समन्वयाची ओळख भगवतगीता देत आहे. व (आत्मोन्नति या संदर्भातील )विकासातील अडथळ्यापासुन वेळोवेळी सावध करीत आहे.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।..

...... रागद्वेषौ व्यवस्थितौ।

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

********************

(६. ५)/४:

"आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः"

(Self-help attitude)

Attitude:

Ability is what you're capable of doing. Motivation determines what you do.

Attitude determines how well you do it.

Lou Holtz

The way you think about a problem determines your attitude, or approach, as well. The attitude of looking for the good in every situation, of looking for the advantage or benefit in any problem or difficulty, is the way that the most successful people think most of the time. This type we label as Positive attitude /Self-help Attitude.

You can use three words to change your attitude and your approach to any difficulty you face.

Problem vs.

1. Situation 2. Challenge 3. Opportunity

घटना(Situation ):

युद्धक्षेत्रावर अर्जुन दुःखी होतो. त्याचे Attitude बदलते. त्याला युद्ध करणे दुःखदायी वाटते. मला कांही नको असे भाष्य करुन युद्ध करणे कसे चुक आहे याच घटनेवर तो Focus करतो. प्रत्यक्षात अर्जुनाचे दुःखी होणे हीच अर्जुनासाठी "घटना" (Situation) असते.

Whereas "problem" is a negative word that triggers feelings of fear and anxiety, "situation" is neutral. Instead of saying, "We have a problem, " you can say, "We have a situation. "

आव्हान ( Challange):
तो वास्तव स्विकारतो, तेंव्हा मुख्य दोन प्रश्न समोर येतात.
१. धर्माचरणासाठी युद्ध करणे योग्य कसे?
२. दुःखमुक्तिसाठी युद्ध करणे योग्य कसे?

संधी (Opportunity):

अर्जुनाला व्यावहारिक विकास कळत होता. व याच व्यवहारमार्गात दुःखी होतो. व हीच( दुःखी होण्याची ) घटना अर्जुनासाठी विकासाची संधी असते. येथे Purpose of life कळते. आत्मोन्नति(सक्षमीकरण) व त्याची प्रक्रिया हाच विषय सुरु होतो.

अर्जुनाचे नकारात्मक Attitude बनते . ही मनोवश अवस्था असते. याच Attitude ला Self-help attitude मध्ये बदलविणे ही आत्मवश अवस्था असते. या दोन अवस्था अनुक्रमे मनुष्य स्वतःचाच शत्रु व स्वतःचाच मित्र/बंधु अशी असते. व याद्वारे मानवीजीवनाचे एक महान सत्य समोर येते,

"मनुष्य स्वतःच स्वतःचा बंधु आहे व तोच स्वतःचा शत्रु आहे!"

आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः।(६-५)

व याचसाठी(स्वतःचा बंधु) Self-help attitude आवश्यक आहे, ज्यामुळे विकासमार्गावर राहील.

उध्दरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत् ।(६-५)

येथे विकासमार्गाचे ज्ञान स्पष्ट होते.

Self-help attitude संदर्भात

१. स्वतःचे स्वधर्माचरण मार्गातील कार्याचा Tie सोडवतो.

२. मनुष्याला कार्यनिश्चय करण्यासाठी निर्णयअधिकार असतो. मनाची चंचलता हाच विकासमार्गात अडथळा करतो. म्हणुन बुद्धियोग ज्ञान (ईश्वराचा आश्रय) दिले. यामुळे कार्याचा दृढनिश्चय होतो. येथे समत्वयोगाची साधना होते. म्हणुन निर्भय असतो.
(त्रायते महतो भयात् )

याद्वारे अर्जुनाच्या दोन्ही (१. धर्माचरणासाठी युद्ध करणे योग्य कसे?२. दुःखमुक्तिसाठी युद्ध करणे योग्य कसे?)प्रश्नाचे उत्तर मिळते.

दोन्हीमध्ये कार्याद्वारे ईश्वराची भक्ति साधते. (स्वधर्माचरण-कार्यसमर्पण, कार्यनिश्चय -फलसमर्पण) अर्थात कार्याद्वारे शक्तिची(विचलित न होणे, दुःखान्त, योग) साधना (Exercise) होते. म्हणुन व्यवहारातील कार्य प्रत्यक्षात कृतीत आणण्यासाठी "अमृतत्वाय कल्पते" हा महामार्ग असतो.

*************

(६. ५)/५ : "आत्मैव हि आत्मनो बंधुः "

स्वतःच स्वतःचा मित्र व्हा, शत्रु बनु नका! हा भगवतगीतेचा संदेश आहे.

उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत् ।
आत्मैव हि आत्मैव बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः।।(६-५ )

Everyone thinks of changing the world, but no one thinks of changing himself.

Leo Tolstoy------

जगात (समाजात, समुहात)काय चुक आहे, काय बरोबर आहे, यावर सातत्याने भाष्य चालत असते. पण त्याच भवसागरात आपण जगत असतो. स्वतःला जगण्याचा संस्कार असेल तर या भवसागरात आपण आपली शरीररुपी नाव वल्हवित असतो. संस्कार नसेल तर नाव (वाऱ्याच्या प्रवाहात) वहात असते.

इंद्रियाणां हा चरतां यत् मनोनु विधियते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि।।(२-६७)

जगावर कांहिही भाष्य केले तरी जगाचा प्रवाह आहे तसा चालुच असतो. स्वतःचे जीवन मात्र मर्यादित काळासाठी या भवसागरात प्रवास करीत असते. चांगला, विद्वान मनुष्यदेखील प्रकृतिच्या Automationनुसार स्वभावनियत जगत असतो.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।(३-३३

सुखासाठी मनुष्य जगतो. विरुद्ध प्रवाह आला असता गोंधळतो. जणु नाव वादळात सापडते. हा गोंधळ कसा असतो याचे दर्शन अर्जुनविषादयोग आहे. अर्जुनाचे नियतकार्य(युद्ध करणे) जणु विरुद्ध प्रवाहात नाव वल्हवण्यासारखे असते. शरीररुपी नावेवरील ताबा सुटतो. प्रवाह Favorable आहे कि विरुद्ध आहे हा प्रश्न नसतो. (Favorable प्रवाहात सुख व विरुद्ध प्रवाहात अशांती असते). तर नाव योग्य दिशेने वल्हवणे हा प्रश्न असतो. म्हणुन स्वतःच्या शरीररुपी नावेवर ताबा घेणे हे प्रथम कर्तव्य असते.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतीः अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

ज्याची स्वतःवर Command असते, तो विश्वासाने आपला मार्ग चालतो. आपले नियतकार्य स्वधर्माचरण जाणतो, स्वतःचा निर्णय

अधिकार जाणतो. कार्यनिश्चय दृढ असतो. स्वतःचे जीवनमुल्य(वचन, स्वावलंबन, स्वधर्म इ. )जाणतो.

भगवतगीतेत विविध पद्धतीने हेच ज्ञान स्पष्ट झाले आहे.

*भगवतगीता सतमार्ग व असतमार्ग यातील भेद स्पष्ठ करते.

*मनोवैज्ञानिक Unconscious mind, Higher Self क्रियाशील करणे याचे ज्ञान सांगते. भगवतगीता ईश्वरज्ञान व त्याचे Mind मधील connection याचे ज्ञान विज्ञानासह सांगुन बुद्धियुक्त होणे, बुद्धियोग ज्ञान सांगते. मानसिक Strong होणे म्हणजे योगयुक्त होणे याचे ज्ञान सांगते.

* मनुष्य मार्गात गोंधळला तर निष्क्रिय (Freeze)होतो व त्याचे समर्थन करतो. यासाठी ज्ञान वापरतो . ही प्रक्रिया नकारात्मक विचाराला जन्म देते. म्हणुन "ज्ञान" प्रकाश आहे, अंधाराला प्रकाश ठरविण्यासाठी नाही, या सत्याची जाणिव करुन देते. ज्ञानाचा आदर करण्यासाठी ईश्वर आश्रय सांगते.

"ज्ञानसंच्छिन्न संशयम् "

* ******

(६-६ )

*************************

बंधुः आत्मा आत्मनः तस्य येन आत्मैव आत्मना जितः।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत् ।।

*************************

(६-६) :"बंधुः आत्मा आत्मनः तस्य येन आत्मैव आत्मना जितः"

भगवतगीतेत मनोवश(Governed by senses mind/lower consciousness) व आत्मवश (Governed by higher consciousness अवस्थेतील भेद दर्शविला आहे. आत्मवश अवस्थेत स्वतः स्वतःचा बंधु असतो अन्यथा स्वतःच स्वतःचा शत्रु (अडथळा) बनतो.

बंधुः आत्मा आत्मनः तस्य येन आत्मैव आत्मना जितः।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत् ।।(६-६)

जीवनप्रवास जीवात्म्याच्या माध्यमातुन आत्म्याचा प्रवास असतो. हा जीवात्मा शरीराच्या माध्यमातुन प्रवास करतो. हा अखंड प्रवास असतो. कार्याद्वारे हा प्रवास होत असतो. हा प्रवास

आत्मोन्नतिस सहकार्य करणारा असावा, याचेच शास्त्र भगवतगीता सांगत आहे. या मार्गात स्वतःचा मार्ग पक्का असणे, निष्ठेने कार्य करुन विकास करणे, प्रसन्नता, निर्भयता (अविचल)अनुभवणे, सकारात्मकता (कल्याण विश्वास) अनुभवणे अपेक्षित असते. म्हणुन या प्रवासात कार्यसंस्कारीत असणे आवश्यक असते. या प्रवासात अडथळा आला कि समाधानासाठी भाष्य बोलतो. हे भाष्य प्रवासाला Break लावते. (या भाष्याला प्रज्ञावाद म्हटले, ज्यामुळे संवादालाच break लागतो. ) ही वस्तुस्थिति भगवतगीता दर्शविते. प्रवासाला break कां लागला, याचे वास्तव अर्जुन कबुल करतो व संवाद सुरु होतो.

समाजात भाष्य चालत असते. भाष्यCommunication चे माध्यम असते. हे भाष्य नकारात्मक आहे कि सकारात्मक?Barrier(अडथळा) आहे कि Motivational? हे महत्वाचे असते. अर्जुनाचे भाष्य अडथळा असते. दुःख टाळण्यासाठी, मनाला समाधान देण्यासाठी तो भाष्य बोलतो. तर श्रीकृष्णाचे भाष्य Motivational (तुझ्यासारख्या श्रेष्ठ व्यक्तिला अशोभनिय!)असते. यातुनच संवाद सुरु होतो.

प्रज्ञावादी(समर्थन) भाष्यात सहसा Compare thinking, Judgement thinking चा वापर होतो. चांगले आहे, वाईट आहे, तुलना करीत जगणे अशी समर्थन भाष्याची संवय असते. असेच भाष्य बोलण्याची व ऐकण्याची संवय झाली तर (स्वसमर्थन-परटिका) भाष्यातील नकारात्मकता (अडथळा)व सकारात्मकता कळत नाही. व कैकेयीला जशी मनथरा जिंकते, तसा भाष्याचा influence होत असतो. हा senses mind चा परिणाम असतो. (मार्क ट्वेन म्हणतो, Never argue with the stupid. He wii drag you to his level and beat with experience)

समाजात जशा जाहिराती असतात, मनुष्य आपले हीत साधण्यासाठी (नकळत) कलात्मक भाष्य बोलतो. यात भाष्यकाराचा हेतु आपले स्वमत लादणे हाच असतो. (म्हणुन भाष्यात स्वतःसाठी "वचन"मुल्य महत्वाचे ठरते. )भगवतगीता भाष्याविषयी सावध करते, (Higher consciousness, योगयुक्त याचे महत्व स्पष्ट करते)

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन् ।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन॥(८-२७)

जीवनांत दुःख, अडचणी येतात. चांगल्या मनुष्यासाठी ते विकासातील Stepping stone असते. समाजात चांगलेपणाविषयी जेंव्हा संभ्रम निर्माण होतो, तेंव्हा चांगलेपणा कठिण आहे!चालत नाही! अशाही स्वरुपाचे निरुत्साही भाष्य चालत असते. याचे कारण जीवनमुल्यांचे अज्ञान असते. अर्जुनाला हेच अज्ञान होते व तो असेच निरुत्साही भाष्य बोलतो.

जीवनमुल्ये विकासात Motivational असतात, चांगलेपणा अडथळा नसतो, त्याला जीवनमुल्यांची जोड हवी असते.

उदा. वचन मुल्य motivatonal असते. यामुळे कार्याचा निश्चय दृढ होतो.

भगवतगीता आवर्जुन चांगल्या मनुष्याचा हा संभ्रम दुर करते, म्हणुन अर्जुनाला म्हटले,

माशुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव।(१६-५)

चांगलेपणा व भाष्य यांचा समन्वय साधणारे भाष्य वाङमय तप असते.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहीतं च यत् ।

भगवतगीता दिव्य संवादातुन जीवनमार्गातील मुल्यांचे ज्ञान देते. अर्जुनाला आलेले दुःख Senses mind (Lower

consciousness) मुळे असते. म्हणुन Higher consciousness (आत्मवश) ची ओळख दिली. यांत स्वतःचा विकासासाठी बंधु असतो.

स्वधर्म मुल्य स्वतःचा मार्ग दृढ करते. कार्य निष्ठेने(समर्पण) करतो. बुद्धियोगामुळे Higher consciousness क्रियाशील होते. चंचलता मिटते. कार्याचा निश्चय दृढ होतो. कार्याद्वारे योग साध्य करणे यासाठी निष्काम कर्म, ईश्वराला फलसमर्पण याचा उल्लेख आहे. यांत कार्यनिष्ठेचे ज्ञान, शाश्वत सुखाचे ज्ञान स्पष्ट होते.

**********

(६. ६)/२:

"अनात्मनः तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत् "

(Why Enmity with SELF?)

मनुष्याला स्वतःचे अस्तित्व प्रिय असते. (म्हणुनच मास्लोने Self actualization ही need म्हटले आहे). भगवतगीतेत स्वतःचा सन्मान म्हणजे आत्मवश (जितात्मनः) असे स्पष्ट केले आहे. व मनोवश अवस्थेत स्वतःशीच शत्रुवत वर्तन करतो. अर्थात एकीकडे आपले अस्तित्व प्रिय असते पण प्रत्यक्षात स्वतःशी शत्रुवत वर्तन करतो. अशी उलट प्रक्रिया घडण्याचे कारण स्पष्ट

करुन स्वतःच्या जीवनाचा निश्चितपणे सन्मान करण्याचे ज्ञान भगवतगीता सांगते.

बंधुः आत्मा आत्मनः तस्य येन आत्मैव आत्मना जितः।
अनात्मनः तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत्॥(६-६)

मनुष्य जे करतो, योग्य समजुनच करतो. अर्जुन दुःखी झाला म्हणुन निष्क्रियतेचे समर्थन योग्य समजुनच करतो. योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. अर्थात येथे निष्क्रिय झाला तरी स्वतःला ज्ञानी समजुनच भाष्य करतो. या भाष्याला प्रज्ञावादी भाष्य संबोधले आहे. अहंकाराचा आश्रय असल्यामुळे अशा प्रज्ञावादी भाष्याचा आश्रय (स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी) करतो.

अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर देतांना "प्रज्ञावादी भाष्य vs ज्ञान" या विषयापासुन श्रीकृष्ण सुरुवात करतात व त्याची समाप्ति "अहंकाराचा आश्रय vs ईश्वराचा आश्रय" या Optionवर

करतात. या ज्ञानानेच आत्मविश्वास vs अहंकार हा भेद स्पष्ट होतो.

"ज्ञान "जगात सर्वश्रेष्ठ आहे हाच भगवतगीतेचा संदेश आहे. जगातील अंधार असो वा जीवनातील अंधार असो, ज्ञानानेच दुर होतो. म्हणुन ज्ञानाला प्रकाश संबोधले आहे. जगातील संपुर्ण ज्ञानाचा(ज्ञानविज्ञान) स्त्रोत ईश्वर आहे. म्हणुन ईश्वराचा आश्रय ज्ञानाचा आश्रय ठरतो. हे भगवतगीतेने ज्ञानविज्ञानासह स्पष्ट केले आहे. अर्थात ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी ईश्वराचा आश्रय असतो. आत्मवश होण्यासाठी याच ईश्वराचा आश्रय उपयुक्त होतो. म्हणुन जीवनात ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी आत्मवश असणे हा सिद्धांत बनतो. (अहंकारामुळे मनोवश अवस्था कायम राहते!म्हणुन अहंकाराचा आश्रय vs ईश्वराचा आश्रय असे Option आले आहे. )

व्यावहारिक बोध:

विज्ञानाने जगाला बदलविले हे निर्विवाद सत्य आहे. म्हणुन ज्ञानाचा, शिक्षणाचा सन्मान होत आहे. पण शिक्षणाचा उपयोग केवळ Informatory ज्ञानासाठी?कि, Creative/Innovative ज्ञानासाठी? हा प्रश्न समाजात उपस्थित होतो.

तसेच(२) समाजात एखाद्या प्रश्नाला किंवा व्यक्तिला राजकिय पटलावर ओढले तर राजकिय भाष्य कोणत्या दिशेने जाते? हा

अनुभव सर्वच जाणत असतात. असे भाष्य केवळ प्रज्ञावाद(Advocacy) असतो. ज्ञान नसते. यामुळे मुळ प्रश्न बाजुला पडुन अनुत्तरीत राहतो. ही समाजातील शोकांतिका बनते. या दोन्ही प्रश्नाची कारणमिमांसा भगवतगीता स्पष्ट करते. व स्वतःचा सन्मान करा. जीवनात आत्मविश्वास आवश्यक असतो. यासाठी ज्ञानाचा आश्रय करा. ज्ञानानेच अंधार दुर होईल. असा मोलाचा संदेश देते.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इतिपांडव।।(११-५५)
अर्थात
"आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च"
* ******

(६-७)

*************************

जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः।

शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः।।

*************************

(६-७):

"जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः"

"Peace is not the absence of conflict but the presence of creative alternatives for responding to conflict - alternatives to passive or aggressive responses, alternatives to violence. "

Dorothy Thompson

मनुष्यजीवनातील Conflict हाच भगवतगीतेचा विषय आहे. व्यावहारिक बाह्ययुद्ध(External conflict) यासाठी निमित्त ठरले आहे. मनुष्य व्यावहारिक घटनांनाच Priority देत असतो. पण

Internal युद्ध जिंकण्यासाठी ते निमित्त आहे, याचे अज्ञान असते. अर्जुनाचे हेच अज्ञान प्रकाशात आणले. व Internal Conflict विविध verses मधुन स्पष्ट केले.

*मनोअनुविधीयते(२-६७) vs
आत्मवश्यै विधेयात्मा (२-६४)

*अहंकारम् आश्रित्य (१८-५९) vs
बुद्धियोगम् उपाश्रित्य मच्चित्तः सततं भव(१८-५७)

तर जगातील तत्वज्ञांनी विविध प्रकारे या युद्धाला स्पष्ट केले आहे.
*Lower Self(Self I) vs Higher Self (Self II)
*Senses mind vs Creative mind
*Judgemental mind vs Observer mind
*जीवात्मा vs परमात्मा

याच आधारावर Lower Self शांत करुन Higher (Creative) Self क्रियाशील करण्याचा (Barrier Breaker) सिद्धांत तत्वज्ञ

मांडतात. तर भगवतगीता हाच सिद्धान्त वेगळ्या पद्धतीने(शांतीसाठी ध्यान) मांडते.

युञ्जन्नेवं सदा आत्मानं योगीनियतमानसः।
शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थाम् अधिगच्छति॥(६-१५)

Judgemental विचार करुन Senses mind नकारात्मक Story बनविते. भगवतगीतेने यालाच प्रज्ञावाद संबोधले आहे. यामुळेच मनुष्याला चिंता असते. बुद्धि भ्रमित होते.

मनसः तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतः तु सः।(३-४२)
(Lower Self)मन बुद्धिला भ्रमित करते. म्हणुन मनापेक्षा बुद्धि श्रेष्ठ व बुद्धिपेक्षा अंतरात्मा श्रेष्ठ जाणुन मनावर नियंत्रण करणे याचे महत्व स्पष्ट होते. बुद्धिला सकारात्मक क्रियाशील करण्यासाठी बुद्धियोग, ईश्वराचा आश्रय अर्थात ज्ञानाचा आश्रय याचे महत्व स्पष्ट होते.

जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः।
शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः॥(६-७)

"मनके हारे हार है।मनके जित जित है।"

अर्थात दुःखाने विचलित न होणे ही जीत व विचलित होणे हार ठरते. याचसाठी स्वतः स्वतःचा बंधु असणे कि शत्रु! याचे रहस्य सांगितले.

बंधुः आत्मा आत्मनः तस्य येन आत्मैव आत्मना जितः।
अनात्मनः तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत् ।।(६-६)

**********

(६. ७)/२:"शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः"
(जीवनविकासाचा Mindset)

मनुष्याची आवड सुखी जीवन असते, पण दुःखही वास्तव असते. दुःख जीवनातील Weakness बनते कि Strength हाच खरा प्रश्न असतो. मनुष्याला स्तुती आवडते पण मनुष्य चांगला असला तरी निंदाही वाट्याला येते. या संदर्भात "निंदकाचे घर असावे शेजारी" कानावर पडते. निंदा, अपमान, अडचणी जेंव्हा मनुष्याला दुःखी करते, तेंव्हाच Weakness ठरतात, पण याच अडचणी जेंव्हा विकासातील Stepping stone बनतात तेंव्हा Strength बनते.

"Try to look at your weakness and convert it into your strength. That's success. "
-Zig Ziglar

जगात ज्यांनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले त्यांनाही अडचणी, निंदा यांना सामोरे जावे लागले. पण याच अडचणीमुळे त्यांनी स्वतःला दुःखी केले नाही तर त्यांच्या विकासासाठी Strength ठरल्यात. हेलेन केलरचे अपंगत्व तिच्यासाठी Weakness ठरले नाही तर Strength ठरले.

अर्जुनाला दुःख झाले हे वास्तव होते. (Emotions never lie). याच दुःखाने त्याच्या बुद्धित भ्रम निर्माण केला. व या स्थितित हे दुःख Weakness ठरु पहात होते. हीच घटना भगवतगीतेचे रहस्यज्ञान जगासमोर येण्याची संधी ठरली. (Dealing with distress/emotions)या ज्ञानानुसार अर्जुनासाठी ही घटना विकासाची(आत्मोन्नति) संधी होती. मनोवश अवस्थेमुळे दुःखी होतो. त्याला आत्मवश होणे आवश्यक असते. यामुळे Mindset( State of mind )बदलतो. बुद्धि स्थिर असते. निश्चय ढळत नाही. अर्थात Change of Mindset (Negative to Positive) हेच भगवतगीतेतील ज्ञानाचे रहस्य आहे.

भगवतगीता प्रकृतिची Strength व Weakness दोन्ही दर्शविते. मनुष्य स्वभावप्रकृतिनुसार कार्यरत असतो. यातील कार्य(State of art) Strength असते. पण दुःखामुळे, अडचणीमुळे जेंव्हा बुद्धिभ्रम होतो, तेंव्हा द्वंद्वाच्या जाळ्यात(Barrier trap) सापडतो (गीता ३-३४) . याच द्वंद्वाला व्यवहारात Complex, Confusion असे आपण ओळखत असतो. अर्जुन याच जाळ्यात सापडतो व निष्क्रियतेला धर्म/ज्ञान संबोधतो.

“Inferiority complex is a gold plated highway to the throne of depression. "

-Ikechukwu Izuakor

या स्थितीत अर्जुनाच्या जीवनविकासाची गति थांबली असते. जीवनाला गति असते, या सत्याचे Internal दर्शन "आत्मोन्नति"आहे. याचसाठी जीवनज्ञान सांगितले व आत्मवश होण्याचे(जितात्मनः) महत्व सांगितले. अर्थात Weakness ठरलेले दुःख आता(नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा) विकासासाठी(आत्मोन्नति) Strength ठरते.

जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः।

शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः।।(६-७)

******

(६-१४)

*************************

प्रशान्तात्मा विगतभीः ब्रह्मचारिव्रते स्थितः।

मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः॥

*************************

(६-१४):

"मनः संयम्य मत् चित्तो युक्त आसीत मत्परः"

(State of mind)

“Focused mind power is one of the strongest forces on earth. ”

-Mark Victor Hansen

*State of mind या संदर्भात " मनोवश अवस्था vs. आत्मवश अवस्था " यांतील भेदाकडे भगवदगीतेने लक्ष वेधले आहे.

शांति, भय, चंचलता, राग-द्वेष (आवड-नावड, यश-अपयश) हे द्वन्द्व मनोवश अवस्था (मनावर नियंत्रण नसणे, बुद्धि विचलित

होणे) दर्शविते. यामुळे जीवनयात्रा नाव वाऱ्याने वहात रहावी अशी चालत असते.

इंद्रियाणां हि चरतां यत्मनो अनुविधियते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावाम् इव अम्भसि।।(२. ६७)

मनाची दुर्बलता मनोवश अवस्थेमुळे असते. या स्थितित द्वन्द्वमोह असतो.
इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वन्द्वमोहेन भारत।(७-२७)

म्हणजे जीवनविकास या संदर्भातील खरा (मानसिक) प्रश्न मनोवश अवस्थेचा असतो. या स्थितित स्वतःवर Command नसते. स्वतःशी शत्रुवत आचरण करतो. अर्थात स्वतःचा आदर नसतो.
अनात्मनःतु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत।(६-६)

मनोवश अवस्थेवर विजय मिळविण्यासाठी कार्याचा एकनिश्चय, योगाभ्यास, ईश्वरभक्ति(ब्रह्मभूत होणे), बुद्धिवर याप्रमाणे संस्कार असणे "युक्त" या शब्दाने निर्देश केलेला आहे.

प्रशान्तात्मा विगतभीः ब्रह्मचारिव्रते स्थितः।
मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः॥(६-१४)

याप्रमाणे स्थिर बुद्धि, आत्मवश होणे ही State of mind या संदर्भात Priority आहे.

* कर्मापेक्षा बुद्धि श्रेष्ठ तर कर्माचे प्रयोजन कशासाठी? हा अर्जुनाचा प्रश्न असतो.

जीवनयात्रेत कर्म हा अविभाज्य भाग असतो. कार्याचा एकनिश्चय, समत्वयोगाने कार्य करणे, कर्म समर्पणवृत्तिने करणे (यज्ञ), याप्रमाणे कर्माद्वारे (योग, दुःखान्तशक्ति) साधना होत असते. हाच भगवदगीतेचा मुख्य विषय ठरला आहे.

“The mind is a powerful force. It can enslave us or empower us. It can plunge us into the depths of misery or take us to the heights of ecstasy. Learn to use the power wisely. ”

- David Cuschieri

********

(६-१५)

*************************

युञ्जनैवं सदा आत्मानम् योगी नियतमानसः।
शांतिं निर्वाणपरमां मत्संस्थाम् अधिगच्छति।।

*************************

६. १५ :

"युञ्जनैव सदा आत्मानम् योगी नियतमानसः"
(निष्काम कर्माची दशा)

कर्म ईश्वरभक्तिसाठी होणे यातुन नैष्कर्मसिद्धि (अकर्ता) साध्य होते. कर्माचे ज्ञानात विलिनिकरण होते. अर्थात कर्म अकर्म होते. हा ज्ञानकर्मसंन्यासयोग म्हटले आहे. अर्जुनाला याच योगाचे (अध्याय ४) स्पष्टिकरण दिले व शेवटी संदेश दिला:

संशयात्मा विनश्यति।(४-४०)
ज्ञानसञ्च्छिन्न संशयम् ।(४-४१)
योगसंन्यस्त कर्माणं।(४-४१)

संशय विनाशाला कारण होतो म्हणुन ज्ञानाने संशय छेदुन कार्याचा एकनिश्चय करणे व कार्याद्वारे समत्वयोग साध्य करणे. यावर योग याविषयी निश्चित जाणुन घेण्याची इच्छा अर्जुनाने व्यक्त केली. "योग" या विषयावरच ६वा अध्याय अभ्यासयोग आहे.

कर्म करतांना आत्मवश असणे हा मनाचा निश्चित संस्कार आहे.
आरुरुक्षो मुनेः योगं कर्म कारणम् उच्यते।
योगारुढस्य तस्यैव शमः कारणम् उच्यते॥(६-३)
सर्वसंकल्पसंन्यासी योगारुढः तदा उच्यते।(६-४)

सर्वसंकल्पसंन्यासी याद्वारे निष्काम कर्माची दशा दर्शविली आहे. या अवस्थेत स्वतःचा बंधु असतो, तर मनोवश अवस्थेत स्वतःशी शत्रुवत् आचरण करतो. अभ्यासाने "आत्मवश" अवस्था(मनावर नियंत्रण!मनाचे Right attitude) साध्य केल्या जाते. याचे (Meditation) Details ६ व्या अध्यायात स्पष्ट केले आहे. अर्थात कार्य करतांना समर्पण भावाने कार्य करणे, समत्वयोगाने कार्य करणे, या संदेशाचे महत्व जाणुन घेणे अर्जुनाला आवश्यक होते. याप्रमाणे "योगासाठी निष्काम कर्म " हा मनाचा संस्कार (RMA- Right mental attitude) ठरतो. अर्थात शांतिचा संस्कार ठरतो.

युञ्जनैवं सदा आत्मानम् योगी नियतमानसः।
शांतिं निर्वाणपरमां मत्संस्थाम् अधिगच्छति॥(६-१५)

“When you become the master of your mind, you are master of everything. ”

-Swami Satchidananda

सार : Importance of RMA

निष्काम कर्माची Theory अर्जुनाला सांगितली. पण अर्जुनाची Belief system या Theory च्या विरुद्ध होती.

Belief(System programmed in SubConscious Mind) Vs. words(Uttered by Conscious mind. ) असे हे Battle ठरते.

Simply talking or knowing something is not enough, it only reaches your conscious mind, and then when it comes to subconscious mind, your subconscious mind doesn't understand the language your conscious mind speaks. If the information you

receive is conflicting with your belief system, your subconscious mind will filter out the information automatically even though the information is a fact.

For instance, you talk to yourself that "I must be confident!", but it doesn't work because you have the limiting beliefs that hold your back to believing in yourself.

"You don't believe in yourself is because your mindset is setting you to believe you're not worthy to get something. "

The longer the subconscious mind believes in something, the harder for you to alter your beliefs.

This is the reason why many people don't feel the power of words.

********

(६-२० )

*************************

यत्र उपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया।

यत्र चैव आत्मना आत्मानम् पश्यत् न आत्मनि तुष्यति।।

*************************

(६-२०):

"यत्र उपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया"

(Change of level of consciousness)

"The key to growth is the introduction of higher dimensions of consciousness into our awareness. "

Lao Tzu

"मनोधैर्य" मनुष्यजीवनातील महत्वाची संपत्ति आहे. एखाद्याचे(किंवा समुहाचे )मनोधैर्य खचविणे किंवा उंंचावणे यासाठी भाष्याचा उस्ोग समाजात होत असतो. रामायण व महाभारतात हे प्रयोग लक्षवेधी ठरते.

रामायणात कैकयीचे Brainwash करण्यासाठी (मनथरा) प्रथम तीचे मनोधैर्य खचविण्यात आले. (तु दासी होशील व भरताला कैद!). महाभारतात "अश्वत्थामा मेला" हा संदेश द्रोणाचार्यापर्यंत पोहोचविला ज्यामुळे द्रोणाचार्यांचे मनोधैर्य खचले.

रामायणात श्रीरामावर दुःख कोसळले. हातपाय गाळुन न बसता सुग्रीवाशी मैत्री करुन युद्धासाठी साधनाची जुळवाजुळव केली. तर महाभारतात (भगवतगीता) युद्धक्षेत्रावर दुःख दिसल्यामुळे अर्जुन हातपाय गाळुन बसतो.

जीवनातील दुःख, अडचणी, अशांती याचेच नांव जीवन आहे. पण(उपाय न करता) या दुःखामुळे Paralyse होणे, हातपाय गाळुन बसणे ही जीवनातील हार असते. व विचलित न होता अडचणीवर मात करणे जीत असते. जीवनाच्या याच हारजीतचे रहस्य भगवतगीता सांगत आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

१. Change of level of consciousness

मन, बुद्धि, चित्त, अहंकार Functioning faculties of consciousness (Mental activities)आहे. हातपाय गाळुन बसणे ही तम अवस्था(State of ignorance)ठरते, मनोवश अवस्था ठरते. आत्मवश अवस्था Change of consciousness ठरते. याच संदर्भात भगवतगीता दुःखाने विचलित न होणे vs. स्थिरत्व या संदर्भात

मनोवश अवस्था vs. आत्मवश अवस्था;

अहंकाराचा आश्रय vs. ईश्वराचा आश्रय;

बुद्धिभ्रम vs. बुद्धियोग;

चंचलत्व vs स्थिरत्व

भेद स्पष्ट करते. व याच संदर्भात जीवनविकासात योगसाधना, कार्याद्वारे योग याचे महत्व स्पष्ट करते.

*Detachment

यत्र उपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया।(६-२०)

*Stability

वेत्ति यत्र न चैवाय स्थितः चलति तत्वतः।(६-२१)

*Power, Success(free from failure)

यस्मिन् स्थितः न दुःखेन गुरुणाअपि विचाल्यम्। ।(६-२२)

## २. "अमृतत्वाय कल्पते"

(Standard Lifepath)

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।

व्यवहारात कर्म सकामच असतात. कार्याद्वारे योग यासाठी कार्याद्वारे ईश्वरभक्ति व हे निष्काम कर्म असते. व्यावहारिक (सकाम) मार्ग निष्काम अवस्थेत करण्यासाठी "अमृतत्वाय कल्पते" असे संबोधन भगवतगीतेत केले आहे. या मार्गावर विचलित होत नाही.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

******

(६-२१)

*************************

सुखं आत्यन्तिकं यत्तद् बुद्धिग्राह्यम् अतींद्रियम्।

वेत्ति यत्र न चैवाय स्थितः चलति तत्त्वतः।।

*************************

(६-२१) :

"वेत्ति यत्र न चैवाय स्थितः चलति तत्त्वतः"

(Alignment with reality)

सुखशांति हा मनुष्यजीवनातील जिव्हाळयाचा विषय असतो. ही सुखशांति तर सर्वांनाच हवी असते, ती कुठे मिळते?

हीच सुखशांति मनुष्याच्या आंत वास करीत अाहे. तीच मनुष्याच्या जीवनाला दिशाही देत असते. अर्जुनाची सुखशांति युद्धक्षेत्रावर ढळली. दुःख टाळण्यासाठी निष्क्रिय होतो. वरुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान सांगतो. या प्रक्रियेत अर्जुन समाधान शोधत असतो.

मनुष्याची जीवनयात्रा अशीच समाधान शोधत चालत असते. मनुष्याचा जीवनमार्ग त्याच्या सुखदुःखाच्या संकल्पनेनुसार किंवा विकासाच्या संकल्पनेनुसार ठरत असतो. जीवनयात्रेची वर्तमानातील स्थितिच मनुष्याच्या विकासाची स्थिति ठरवीत असते. भगवतगीता मनुष्याच्या सुखदुःखाच्या संकल्पना व विकासाच्या संकल्पना याचा समन्वय साध्य करते. जीवनयात्रेतील ही स्थिति Alignment with reality ठरते.

Alignment with reality:(वास्तव स्विकारुन विकासमार्ग ठरविणे)

दुःखाला, अडचणीला dealन करता shortcut वापरुन चालणे ही मनुष्याची सामान्य संवय असते. आपल्या सुखदुःखाच्या संकल्पनेनुसारच अर्जुन समाधान शोधतो. यांत स्वतःला योग्य ठरविण्यासाठी स्वतःच्या Belief systemचा वापर करतो.

उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन।
नरके नियतं वासो भवति इति अनुशुश्रुम् ।।
अहो बत् महत् पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।(१-४५)

ही स्थिति जीवनात त्याला सुखशांति देवु शकत नाही असे सरळ भाष्य भगवतगीतेने केले नाही, तर जीवनविकासाचा मार्ग भगवतगीता सांगते. या मार्गाला ज्ञानविज्ञानाचा आधार असतो. या प्रक्रियेत Belief system vs. ज्ञान हा भेद स्पष्ट झालेला आहे. याद्वारा सुखशांतिसाठी युक्त संस्कार व जीवनविकासात (शाश्वत) सुखाची साधना याचे रहस्य भगवतगीता सांगते.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखम्। (२. ६६)
अयुक्त(संस्कारहीन)असेल तर अशांति !मग सुख कोठुन?

तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्। (२. ५०)
निष्काम कर्माद्वारे सुखाची साधना.

सुखं आत्यन्तिकं यत्तद् बुद्धिग्राह्यम् अतींद्रियम्।
वेत्ति यत्र न चैवाय स्थितः चलति तत्त्वतः।।(६-२१)
यस्मिन् स्थितः न दुःखेन गुरुणापि विचाल्यते।६-२२)

या स्थितीत कितीही मोठे दुःख आले तरी विचलित होत नाही. सुखशांति अनुभवत असतो. याच स्थितिला सुखाची साधना या संदर्भात योग संबोधले आहे.

संदेश:

मनुष्याला मार्गात अडथळा जाणवला तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी आपल्या Belief system चा उपयोग करतो. स्वतःचे समर्थन करुन, तुलना करुन परटिका करुन मनुष्याला तात्पुरते समाधान लाभत असले तरी (शाश्वत) सुखशांतिच्या मार्गापासुन मनुष्याला वंचित करते. भगवतगीता जीवनमार्गातील हाच Error दर्शवुन देते व सुखशांतिच्या मार्गाचे ज्ञान सांगते.

"What you sow, so reap" या नियमानुसार चांगले कर्म चांगला मनुष्य घडविते, वाईट कर्म वाईट मनुष्य घडविते. आपल्या नियतकार्यात अर्जुनाला चांगले-वाईट हा संभ्रम होतो. हा संभ्रम दुर करण्यासाठी जो विकासमार्ग सांगण्यात येतो, त्या मार्गावरील कर्माला "योगः कर्मसु कौशलम् " असे संबोधले आहे. या मार्गात कार्याचा एकनिश्चय असतो. मनुष्य विचलित होत नाही. हा मार्ग केवळ विकासाचा नव्हे तर सुखाच्या साधनेचा ठरतो.

जगप्रसिद्ध योद्धा सिकंदराने खाली हाताने या जगाची Exit केली !हा संदेश त्याने स्वतःच दिला. विकासाचे ज्ञान सिकंदराला होते, पण त्याला सुखाचे ज्ञान नव्हते यामुळे त्याच्या जीवनयात्रेत सुख व विकास याचा समन्वय साधल्या गेला नाही, हे सत्य भगवतगीतेतील ज्ञानाच्या आधारावरच स्पष्ट होते.

"Happiness is not something you postpone for the future; it is something you design for the present. " Jim Rohn------

*******

(६. २२ )

*************************

यं लब्ध्वा च अपरं लाभं मन्यते न अधिकं ततः।

यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते॥

*************************

(६. २२ ):

"यं लब्ध्वा च अपरं लाभं मन्यते न अधिकं ततः"

(सुखाची निश्चित व्याख्या)

सामान्य अवस्थेत इच्छा असतात. इच्छापुर्ति झाली तर सुख अनुभवतो. याच सुखप्राप्तिसाठी कार्यरत असतो. स्वावलंबि असणे, निर्णयअधिकार वापरणे, इच्छापुर्तिसाठी कार्यरत असणे. हे Normal life असते. मनुष्याचे Normal जीवन डार्वीनने म्हटल्याप्रमाणे "Survival of the fittest" या न्यायाने सुरु असते. म्हणुनच स्पर्धा आढळते. या स्पर्धेमुळे समाजव्यवस्थेत श्रीमंति-गरीबी आढळते. शक्तिप्रदर्शन आढळते. शोषण आढळते.

प्रकृति तम, रज व सत अशा तीन गुणांनी बद्ध आहे. दोन गुणांना मागे टाकुनच एक गुण नेहमी प्रभावीत असतो. मनुष्यजीवनाला अज्ञानी, सामान्य(Normal) व ज्ञानी अशा तीन स्थितीत विभागले तर सामान्य मनुष्याचे जीवन Normal सुरु असते. या Normal जीवनयात्रेत दुःख येते व दुःखमुक्तिसाठी मनुष्य धडपडत असतो. सिद्धार्थ गौतमांना दुःख झाले तेंव्हा झोप उडाली व सुखाच्या शोधार्थ गृहत्याग केला. या शोधातुनच बौद्ध धर्म जगासमोर आला. अर्जुनाला दुःख झाले तेंव्हा तो Shortcut वापरतो. त्याने दुःखदायी कर्म टाळणेच योग्य जाणले. अर्जुनाची ही अज्ञान अवस्था ठरली.

मनुष्यजीवन सिमित काळासाठी असले तरी मनुष्यजीवन या दुःखालयात आलेले आहे म्हणुन दुःखमुक्तिसाठी प्रयास करणे हा पुरुषार्थ असतो. याच पुरुषार्थाचे ज्ञान भगवतगीता आहे.
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

हे ज्ञान "अज्ञान vs ज्ञान"असे असते व याच संदर्भात "दुर्बलता vs. (दुःखान्त) शक्ति", "सामान्य vs. श्रेष्ठ" असा हा लढा असतो. श्रेष्ठ या संदर्भात श्रीमंती, भोगैश्वर्य प्राप्ति/संचय, किर्ती(Fame)

मनुष्याला कळत असते. पण "श्रेष्ठ"चे निश्चित ज्ञान "दुर्बलता vs. (दुःखान्त) शक्ति" या लढ्यात असते.

यं लब्ध्वा च अपरं लाभं मन्यते न अधिकं ततः।

यस्मिन् स्थितः न दुःखेन गुरुणाअपि विचाल्यते॥(६-२२)

दुःखामुळे विचलित होणे ही दुर्बलता ठरते तर विचलीत न होणे ही शक्ति ठरते. चांगलेपणा सक्षम व्हावा हा या लढ्याचा हेतु असतो. जगात दैवी व आसुरी असे दोन प्रकारची गुणसम्पत्ति असलेले लोक असतात. अर्जुन दैवी विभागातील असतो. म्हणुन अर्जुनाला म्हटले, तु दैवीगुणसंपत्तिसाठी जन्माला आलेला आहे. तुला दुर्बलता शोभत नाही.

मा शुचः सम्पदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

याचाच अर्थ सामान्य मनुष्याला श्रेष्ठत्व, चांगलेपणा याचे निश्चित ज्ञान नसते. या अज्ञानामुळेच अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो. हेच ज्ञान भगवतगीता स्पष्ट करीत आहे.

सार:

मनुष्यजीवन श्रेष्ठत्वाकडे वाटचाल करीत असते. ही वाटचाल आत्मोन्नतिची असते. श्रेष्ठत्व या संदर्भातच जगात श्रीमंती, राजकारण याद्वारे शक्तिप्रदर्शन आढळत असते. वर्तमानात राजकारण हा लोकशाहीचा अविभाज्य अंग बनले आहे पण कांही लोक चांगलेपणा या संदर्भात राजकारणाला दुषण देत असतात. (अर्जुन युद्धाला दुषण देतो) याचे कारणच मनुष्यजीवनाची श्रेष्ठत्वाकडे वाटचाल असली तरी श्रेष्ठत्व व चांगलेपणा याचे निश्चित ज्ञान नसते. भगवतगीता श्रेष्ठत्व, चांगलेपणा याच संदर्भात जीवनाच्या वाटचालीचे निश्चित ज्ञान देत आहे.

********

(६. २२):

"यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते"

जीवनात दुःखामुळे मनुष्य विचलित होतो व हीच दुर्बलता ठरते. याच दुर्बलतेवर विजय मिळविण्यासाठी "योग" आहे व याची भगवतगीता स्पष्ट व्याख्या करते,

यं लब्ध्वा च अपरं लाभं मन्यते न अधिकं ततः।

यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते।।
तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम् ।।(६-२२/२३)

अर्थात योग मानसिक शक्तिची Exercise ठरते. याच शक्तिमुळे निर्भयता, धैर्य, शांति असते. तर चिंता भय, विचलित होणे मानसिक दुर्बलता दर्शविते.

मनुष्याला जीवनात सुखी होण्यासाठी भौतिक सुख, किर्ति (चांगले म्हणावे) इ. व्यावहारिक सुखाची ओळख असते. म्हणुन व्यवहारात "सकाम" कार्यरत असतो. अर्जुन परिणामभयाने दुःखी होतो, कार्य टाळतो व निष्क्रियतेला धर्म संबोधतो. अशांत मनाला समाधान देण्यासाठी हे मनोरंजन असते. पण यामुळे अज्ञानाला ज्ञान दर्शवित असतो. हे ज्ञान नसुन Illusion of Knowledge असते. समाजात नकारात्मक भाष्याचे हेच कारण असते.

येथे मनुष्य जीवनाचा भौतिक प्रवास(External) जाणत असतो पण Internal प्रवास जाणत नाही. अर्थात जीवनाचे ज्ञानविज्ञान जाणत नाही. सुखदुःखाची अनुभुति, मानसिक शक्ति यांचा सं ंबंध Internal world अर्थात मानसिकतेशी असतो. म्हणुन भगवतगीतेत कार्याद्वारे मानसिक शक्तिचा विकास(योगः कर्मसु कौशलम्) हा विषय आला. "कार्य" व्यवहारातील विकासाचे

साधन असते. याच कार्याला दोन्ही(भौतिक व मानसिक) विकासाचे साधन केले.

भगवतगीतेत अर्जुनाच्या विचलित होण्याचा प्रसंग प्रत्यक्ष कार्य सुरु करण्यापुर्वी आहे. याच क्षणी प्रत्यक्ष कार्यासाठी Transformation (सकाम कार्य ते निष्काम कार्य) आवश्यक असते. याच Transformation साठी ईश्वरज्ञानाचा (व भक्ति) वापर होतो. अर्थात ईश्वराचा आश्रय करुन कार्याचा मार्ग दृढ करणे( नियतकार्याला स्वतःचा स्वधर्म व स्वतःच्या निर्णयाला दृढनिश्चय करणे) व कार्याद्वारे ईश्वरभक्ति (स्वधर्मात कार्यसमर्पण, निर्णय-निश्चय संदर्भात फलत्याग) साध्य करणे. याचसाठी ईश्वराची ओळख दिली व मनुष्याच्या ईश्वरश्रद्धेचा उपयोग स्पष्ट केला.

जीवनाचे रहस्य काय?Meaning काय?Purpose काय? या संदर्भात तत्ववेत्ते भाष्य करतात. भगवतगीता जीवनाचे ज्ञानविज्ञान सांगते. याच अनुषंगाने "ईश्वर"ज्ञान व प्रकृतिज्ञान(विज्ञान) स्पष्ट केले. याच आधारावर" मृत्योर्मा अमृतंगमय"(अशाश्वताकडुन शाश्वताकडे) या शाश्वत जीवनमार्गाची ओळख होते. जीवनात नित्य ईश्वराचा आश्रय या अनुषंगाने मानसिकता संदर्भात "योगयुक्त" व भक्ति संदर्भात अनन्ययोग याचे महत्व स्पष्ट केले.

व्यावहारिक बोधः

व्यवहारात मनुष्य कार्यरत असतो. सकाम मानसिकतेमुळे परिणामभय असते, अशांती असते, विचलित होतो व (कार्याचा)निश्चय होत नाही. नकारात्मक भाष्य बोलतो. अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. हेच अशांतीचे, दुर्बलतेचे लक्षण असते. म्हणुन जीवनविकास व तत्संबंधी कार्यसंस्कार आवश्यक असतो.

१. भौतिक विकास मनुष्य जाणतो. शिक्षण घेतो पण प्रत्यक्ष विकासात कार्य साधन असते. म्हणुन स्वतःला कार्यरत करणे हेच शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट असावे. (Transformation of knowledge into Action) या सत्याकडे हर्बर्ट स्पेन्सर, ई. एफ. शुमेकर या तत्ववेत्यांनी समाजाचे लक्ष वेधले.

२. प्रत्यक्ष कार्य execute करण्यासाठी व्यवहारकार्याचे (सकाम कार्य) निष्काम कार्यात Transformation करणे (नियतकार्य स्वधर्मात, निर्णय दृढनिश्चयात) करणे. याच Transformation साठी ईश्वराचा (शाश्वत) आश्रय असतो, जो अहंकाराला(अशाश्वत) replace करतो.

बुद्धियोगामुळे (कार्याचा) निश्चय पक्का होतो व कार्याद्वारे भक्ति करणे अर्थात कार्याद्वारे योग(Exercise) अपेक्षित असते. (योगः कर्मसु कौशलम् )

** ******

(६-२३)

**************************

तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम्।"
स निश्चयेन योक्तव्यो योगो निर्विण्ण चेतस।।

**************************

(६-२३)

:" तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम्"

भगवतगीतेत "योग" या शब्दाची स्पष्ट व्याख्या आहे.

तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम्।
स निश्चयेन योक्तव्यो योगः अनिर्विण्ण चेतसा।।(६-२३)

योग म्हणजे दुःखान्त. कार्याद्वारे ईश्वरभक्तिचे purpose "योग "साध्य करणे ठरतो. व्यवहारात भक्तिमुळे मनःशांति हा शब्द रुढ आहे. प्रत्यक्षात शांति म्हणजे दुःखाने विचलित न होणे. (जसे

पाणि वरुन स्वच्छ दिसते, पण खडा टाकला तर गाळ वर येतो. )
या अवस्थेत निर्भयता असते.

यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरूणापि विचाल्यते।(६-२२)

नैसर्गिक अवस्थेत(Reality of Present) मनुष्य भयग्रस्त, चिंताग्रस्त असेल तर नकारात्मक असतो व जीवनाच्या आनंदापासुन वंचित होतो. जीवनविकास म्हणजे नित्य सक्षम होण्याची प्रक्रिया आहे. यावरुन भगवतगीतेचे ज्ञान निर्भय, सक्षम होण्यासाठी आहे, दुबळे होण्यासाठी नाही, हे स्पष्ट होते.
भगवतगीतेने जगातील कुणाच्याच व्यावहारिक ज्ञानात ढवळाढवळ केली नाही. व्यवहार जगातील सर्वच लोक जगत असतात, जगत राहणार. याचसाठी ज्ञान(शिक्षण) घेतात. कार्य करतात. (व्यवहार म्हणजे State of want-State of Art). या व्यवहारात Belief system फक्त वेगळी (श्रद्धा याच System चा एक भाग असतो)असते.
कुणी हा मनुष्यजन्म 'ऐश्वर्याचा उपभोग घेण्यासाठी आहे'
(कामउपभोगपरमा एतावत इति निश्चिताः।१६-११)
व या आधारावर आज अमुक मिळविले, अमुकाला हरविले, मीच श्रेष्ठ अशी विचारसरणी बनते.

(ईश्वरो अहं अह भोगी सिद्धो अहं बलवान सुखी।१६-१४)

तर दुसरा चांगलेपणाला महत्व देतो. अर्जुन या Category मध्ये येतो. याला दैवी म्हटले. Belief system चांगली असली तरी दुःखी होतो. चांगलेपणा असल्यामुळेच व्यावहारिक स्तरावर संभ्रम होतो. (अर्जुन काय मिळेल याचा आढावा घेतो!). येथेच भगवतगीता कार्याचे दोन स्तर सांगते.

१. व्यावहारिक स्तर(सकाम) व २. आध्यात्मिक स्तर(निष्काम)

मनुष्यजीवन आहे तर कार्य घडणारच. पण ज्याची Belief system "कामउपभोगपरमां"(Materialistic) असते, तो अभावामुळे चिंता करतो, अपयशामुळे खचतो. तर Belief system चांगली असली तरी किर्ति(अपकिर्तिचे भय, लोकांनी चांगले म्हणावे), स्वर्गइच्छा असेल तर मनुष्य "सकाम" स्तरावर जगतो व कार्याचा निश्चय होण्यास अडथळा येतो. म्हणुन संभ्रम असतो. निष्क्रिय झाला असता समाधानासाठी ज्ञानी समजुन Justification (प्रज्ञावाद) देतो.

भोगैश्वर्य प्रसक्तानां तया अपहृत् चेतसाम् ।

व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते॥(२-४४)

मार्गातील कार्याचा Tie सोडविण्यासाठी कार्याच्या आध्यात्मिक स्तराचे (Higher consciousness)ज्ञान दिले.

निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।(२-४५)

या स्तरावर (अव्यय, शाश्वत)ईश्वराची ओळख होते. बुद्धियोगाचा आश्रय करतो. मार्ग पक्का होतो. कार्य ईश्वराला समर्पित होते. यासाठी "योगः कर्मसु कौशलम् "ही प्रक्रिया वापरतो.

याप्रमाणे मनुष्यजीवनाचे "कार्य घडणे" या संदर्भात तीन स्तर येतात.

१. भोगऐश्वर्यासाठी जीवन आहे, ही Belief system.

२. चांगलेपणा, ईश्वरावर श्रद्धा अशी B. S. असते, पण व्यवहार स्तरावरच जगत असल्यामुळे भ्रम (द्वंद्वमोह) होतो. व निष्क्रिय झाला तरी समाधानासाठी समर्थन-टिका, Judgement thinking trap मध्ये सापडतो(Absence of experience of joy). यामुळे अज्ञान ठरतो.

३. ज्ञानी: जीवनाचा आध्यात्मिक स्तर जाणतो. "अमृतंगमय" हा जीवनाचा शाश्वत विकासाचा मार्ग जाणतो. व्यावहारिक कार्याला आध्यात्मिक स्तरावर Transform करतो. व यामुळे मार्ग दृढ होतो. कार्य निष्ठेने होते. आनंद, शांति, निर्भयता (शाश्वत सुख) अनुभवतो.

याप्रमाणे पहिल्या व दुसऱ्या स्तरावर असलेल्यांना सुखासाठी बाह्य ज्ञानाची (Justification) ची गरज भासते. तर तिसऱ्या स्तरावर प्रत्यक्ष सुख(Joy) अनुभवतो.

*********

६. २३:"स निश्चयेन योक्तव्यो योगो निर्विण्ण चेतसा"

(Exercise through life)

मनुष्य कां चुकतो?, दुर्बलता, भय, Stress कां असते?या सर्वांचे निदान अर्जुनाच्या विषाद भूमिकेत सापडते.

मनुष्याला व्यावहारिक(भौतिक)सुखाचीच ओळख असते. याच सुखाची संवय करतो. चांगले, सुखी जीवन जगण्यासाठी मनुष्य शिक्षण घेतो, कार्यसंस्कारित होतो. तरी अडकतो!Deviate होतो. अर्जुन दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेला धर्म संबोधतो. याच भूमिकेमुळे मनुष्य अज्ञानाला ज्ञान समजत असतो. मनुष्याचा हाच भ्रम भगवतगीता दुर करते.

बुद्धिची स्थिरता यासाठी योग(विचलित न होणे, दुःखान्त) या Exercise ची भगवतगीता ओळख करुन देते.

ईश्वरभक्तिमुळे शांति(शाश्वत सुख) मिळते अशी श्रद्धा असते. भगवतगीता कार्याद्वारे exercise साध्य होण्यासाठी कार्याद्वारे भक्ति याचे शास्त्र स्पष्ट करते व या अनुषंगाने जीवनमार्गातील विविध भेद स्पष्ट होतात.

अज्ञान vs. ज्ञान

द्वंद्व vs. निर्द्वंद्व (एकनिश्चय)

दुर्बलता vs. शक्ति(विचलित न होणे)

Fear vs. courage

भौतिक सुख vs योग (दुःखान्त)

फलसिद्धिसाठी कार्य vs Exercise

सकाम कार्य vs. निष्काम कार्य

व्यवहारकार्यात व्यावहारिक(भौतिक)सुख जाणतो. याच कार्याद्वारे Exercise होण्यासाठी बुद्धियोग, ईश्वराचा आश्रय

असतो, ज्यामुळे विकासयात्रा "अमृतत्वाय कल्पते" या महामार्गावर चालत असते. या मार्गावर नियतकार्य स्वधर्मात transform होते. कार्याचा एकनिश्चय असतो.

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंच्छिन्नसंशयम् ।(४-४१)

या मार्गावर विचलित होत नाही. म्हणुन कार्यसंस्कारातील ही बुद्धियुक्त अवस्था असते. व निश्चयाने Strong होण्यासाठी कार्याद्वारे exercise( साधना) करतो.

तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम् ।

स निश्चयेन योक्तव्यो योगो निर्विण्ण चेतसा।।(६-२३)

"Determination gives you the resolve to keep going in spite of the roadblocks that lay before you. "

Denis Waitley

******

(६-३३)

*************************

योअयं योग त्वया प्रोक्तः साम्येन् मधुसुदन।

एतस्य अहं न पश्यामि चंचलत्वात् स्थितिम् स्थिराम् ।।

*************************

(६-३३)

:

"एतस्य अहं न पश्यामि चंचलत्वात् स्थितिम् स्थिराम् !"

भगवतगीतेचे मुख्य लक्ष चंचल मनावर विजय मिळविणे (स्वतःला जिंकणे, जितात्मनः) यावर आहे. हा हेतु साध्य होण्यासाठी मनोवश vs आत्मवश, अयुक्त vs युक्त, सकाम कर्म vs निष्काम कर्म या शास्त्राचे प्रयोजन आहे. याचसाठी स्वधर्म, कार्याचा एकनिश्चय याचे महत्व आहे. याच संदर्भात मानसशास्त्री Lower consciousness vs. Higher consciousness, Lower Self vs. Higher Self याचा उल्लेख करतात. भगवतगीतेतील समत्वाचे, स्थिरत्वाचे शास्त्र ऐकल्यानंतर अर्जुन पुन्हा साशंक होतो व प्रश्न करतो,

योअयं योग त्वया प्रोक्तः साम्येन् मधुसुदन।
एतस्य अहं न पश्यामि चंचलत्वात् स्थितिम् स्थिराम् ॥(६-३३)

स्वाभाविक स्थितित मन चंचल असल्यामुळे त्यावर विजय मिळविणे कठिण आहे. याचसाठी शास्त्र असते. अभ्यासाने (Practice) व वैराग्याने(सोडणे) शक्य आहे हे उत्तर असते.
आत्मवश अवस्थेत येण्यासाठी भगवतगीता कार्याद्वारे योग याचे(Transformation) शास्त्र सांगते. यामुळे "अमृतत्वाय कल्पते(२-१५)" या शाश्वत मार्गावरील जीवनयात्रेचे महत्व कळते. कर्मयोग महत्व कळते.
कार्याद्वारे ईश्वरभक्तिद्वारा आत्मवश अवस्था साध्य झाली असता समत्वदृष्टि येते. द्वंद्वमुक्ति होते. ही बुद्धियुक्त अवस्था असते.

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृत् दुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥(२-५०)

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि।
शुनि चैव श्वपाके च पंडितः समदर्शिनः। (५-१८)

बोध:

१. जीवनाची उच्च अवस्था, व्यवहारातील जीवनांत मोठे होणे, जीवनविकास या सर्वांचा पायाच मनोवश अवस्था vs आत्मवश(जितात्मनः) अवस्थेत आहे. आत्मवश अवस्था साध्य केल्याशिवाय विकास अशक्य असते.

असंयत् आत्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः।
वश्य आत्मना तु यततां शक्यो अवाप्तुम् उपायतः॥(६-३६)

२. समुहात आदेश, उपदेश भार वाटतात (sounds pressure)तर "स्वधर्म " हा स्वातंत्र्याचा संस्कार(Own approval) आहे.

३. चंचलत्वामुळे कार्याचा एकनिश्चयही होत नाही. म्हणुन दृढनिश्चयाचे महत्व येथे कळते.

४. Stress, Tension, चिंता, विचलित होणे मानसिक दुर्बलतेचे लक्षण असते. भगवतगीता योग (दुःखान्त) याचे ज्ञान देते. मानसिक सक्षम होण्याचे रहस्य कळते.

*******

(६-३५)

*************************

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।

अभ्यासेन् तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते॥

*************************

६. ३५:

"असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् "

(Who controls whom?)

When you understand that you can control what happens to you and to your life, you have taken one of the biggest steps to self-determination and domination of your life and the path you choose to set for yourself.

"How would your life be different if…You stopped allowing other people to dilute or poison your day with their words or opinions?

Let today be the day…

You stand strong in the truth of your beauty and journey through your day without attachment to the validation of others. "

-Steve Maraboli

कोण कोणावर नियंत्रण ठेवत आहे? जगाचा खेळ याच आधारावर सुरू राहतो. जेंव्हा चांगल्यावर वाईटाचे नियंत्रण असते, ती धर्मग्लानीची अवस्था असते. ज्ञानावर अज्ञानाचे नियंत्रण असते ते Delusion असते. जेव्हा वाईटावर चांगल्या गोष्टीचे नियंत्रण असते तेव्हा ते पवित्र असते आणि म्हणूनच "जीवनमुल्य, धर्म, ईश्वर" यांचे ज्ञान आहे, जे मनुष्यास आश्वासन देतात. विश्वास देतात.

धर्म:

धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।(भगवतगीता ४-८)

ईश्वर :

जन्म कर्म च मे दिव्यं यो अयं वेत्ति तत्वतः।

त्यक्वा देह पुनर्जन्म न एति माम् एति सो अर्जुन।।(४-९)

नियंत्रणाच्या संदर्भात, जगाचे सत्य जसे आहे तसेच जीवनाचे सत्य देखील आहे. आपण जीवनावर नियंत्रण ठेवत आहात की जीवन आपल्यावर नियंत्रण करीत आहे? अहंकार आत्म्यावर नियंत्रण ठेवत आहे किंवा आत्मा अहंकारावर नियंत्रण ठेवत आहे? मन बुद्धीवर नियंत्रण ठेवत आहे कि बुद्धिचे मनावर नियंत्रण आहे?एक मनोवश स्थिति असते दुसरी आत्मवश .

असे नियंत्रणाचे सत्यच (कोण कोणास नियंत्रित करते?) भगवद्गीता ज्ञानाचा आधार आहे. जेव्हा अज्ञान ज्ञानावर नियंत्रण ठेवते, तेव्हा ते भ्रम असते. खरं तर ज्ञान(प्रकाश) अंधाराचे निर्मूलन करते. जसे अंधारावर नियंत्रण करणारा प्रकाश असतो, अज्ञानावर नियंत्रण करणारे ज्ञान असते.

१. जीवनावरील नियंत्रण का सुटते?

यततो हि अपि कौंतेय पुरुषश्च विपश्चितः।
इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः।।(२-६०)
जहि शत्रु महाबाहो कामरुपम् दुरासदम् ।(३-४३)

द्वंद्ववश असणे, सकाम स्थिति हेच नियंत्रण सुटण्याचे कारण ठरते.

२. Control Factors( Opportunity) कोणते आहेत?ज्यामुळे जीवनावर Command असते.

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन् तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते।।(६-३५)

निश्चितच हे नियंत्रणाचे ज्ञान कठिण असले तरी चांगल्याची (योग्य) साधना व वाईटाचा(अयोग्य, अज्ञानाचा) त्याग करुन नियंत्रण साध्य करता येते.

*Your sense of self worth(life values)
मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव।(१६-५)

*Your right to have and determine choices
कर्मण्येव अधिकारः ते.. ।(२-४७)

*Your right to have access to opportunities
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धम् इदृशम् ।(२-३२)

*Your right to have the power to control your own life(Command)

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

*Your ability to go outsid!e yourself to influence change in the socio-economic environment in which you live.

तस्मात् उत्तिष्ठ यशो लभस्व।..
.. निमित्तमात्रं भव स व्यसाचिन।।(११-३३)

*******

६. ३५ :

"अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते"
(बदल)

Motivation या संदर्भात " Changing mindset", "Change your thoughts " असे आपण ऐकत असतो. हा बदल कां आवश्यक आहे, व कसा होतो हाच भगवतगीतेचा विषय आहे.

१. Belief system

मनुष्य बालपणापासुनच जी संस्कार प्रणाली आत्मसात करतो ती प्रणालि fear based किंवा value based असते. ही संस्कार प्रणालि त्याची (Belief system) विश्वास प्रणाली बनवते. हा Conditioned thought असतो. विचार प्रणालि Thought process असते.

*Conditioned thought (विश्वास प्रणालि)/ Thought process(विचार प्रणालि)

आपल्या विश्वास प्रणालीद्वारेच मनुष्य सभोवतालच्या जगाचा अर्थ काढत असतो . याचाच अर्थ ही विचार ( विश्वास) प्रणालि (Thought process) सकारात्मक किंवा नकारात्मक असते.
उदा. बरेच लोक अगदी लहान वयातच अपराधीपणाची भावना आणि / किंवा लज्जाची भावना आत्मसात करतात; कारण त्यांची 'विश्वास प्रणालि' स्वतःला निरुपयोगी वाटण्याची किंवा शिक्षेचे भय असण्याची बनते.

२. Belief system vs. ज्ञान

बालपणात Reasoning/Questioning नसते. वाढत्या वयाबरोबर Reasoning ची इच्छा असते. हा Thought process चा भाग असतो.

प्रत्येक मनुष्याची विश्वास प्रणाली त्याची स्वतःची विचारसरणी असते. हे सत्य असूनही लोक आपले विचार इतरांवर लादतात. तर्क / प्रश्नाला संधी देण्याऐवजी त्यांच्या हीताचा दाखला देतात. ही विचारसरणी अंध विश्वास असू शकते.

Blind faith is belief without true understanding, perception, or discrimination.

भगवतगीता मनुष्याची Belief System आणि ज्ञान यांतील भेद स्पष्ट करीत आहे. ज्ञान Reasoning ची संधि देत असते.

अर्जुनाला त्याच्या मार्गात संशय येतो. त्याची विचारप्रणालि युद्ध करणे योग्य कि अयोग्य?या प्रश्नाचे उत्तर देण्यात अयशस्वी ठरते. म्हणूनच निष्क्रियतेची निवड होते. "मी बरोबर आहे" हे सिद्ध करण्यासाठी तो आपल्या विचार-विश्वास प्रणालीनुसार ज्ञानाचा

संदर्भ घेतो. ही अर्जुनाची विश्वास प्रणाली (Conditioned thought) आहे, जी त्याला पुढे जाण्यापासून प्रतिबंधित करते.

जेव्हा एखाद्या व्यक्तीची विश्वासप्रणालि/विचारप्रणालि त्याला विकासमार्गावर मार्गदर्शन करण्यास असमर्थ ठरते तेव्हा बदलाव (Thought) आवश्यक असते. अन्यथा नकारात्मक विचारप्रणालि तयार होते.

"जग वाईट आहे!"

"मी दुर्दैवी आहे!"

ही विचारसरणी Low self worth (स्वतःचा कमकुवतपणा) दर्शवते.

मग हा बदल काय आहे? भगवतगीता याचेच उत्तर देत आहे.

३. ज्ञान /Changing mindset

आपले "विचार बदलवा" असे केवळ म्हणणे, हे (विचारबदल) घडवून आणणार नाही, किंवा 'सकारात्मक विचार' करणार नाही.

तर आपल्याला दररोज त्यावर काम करावे लागते(अभ्यास) तरच स्वत: ला सिद्ध करु शकतो.

*अज्ञानाची स्वीकृती.

* आव्हानाची स्वीकृती.

* प्रश्न विचारण्याचा अधिकार

* अभ्यास

अर्जुन अंध अनुयायी नाहीत म्हणूनच तो अज्ञानाचा स्वीकार करतो. युद्ध करणे योग्य आहे कि अयोग्य यातील संशय अर्जुन कबुल करतो, तसेच युद्ध करणे योग्य असेल तर दुःख कसे नष्ट होणार? अर्थात अर्जुन प्रांजळपणे आपले अज्ञान कबुल करतो पण दुःखावर मात कशी होईल हा प्रश्नही करतो.

अर्जुनाची Belief system स्वर्ग-नरक आधारित असते. ही प्रणालि त्याला मार्गदर्शन करण्यास सक्षम ठरत नाही. याच प्रणालिचा आधार घेतला तरी स्वधर्माचरण आवश्यक असते. स्वधर्म टाळणे म्हणजे स्वर्ग व किर्ति यापासुन वंचित होणे ठरते.

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिः योगे तु इमां शृणु।
बुद्ध्याः युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।।(२-३९)

भगवतगीता बुद्धियोगनिष्ठेचे शास्त्र सांगते. यांत निर्द्वन्द्व तत्वाचे/साम्ययोगाचे ज्ञान स्पष्ट होते. या प्रवासात अभ्यास (Practice कर्मयोग साधना, Determination), वैराग्य (Detachment निष्काम कर्म, फलत्याग) आवश्यक असते.

अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते।(६-३५)

सार:

अर्जुनाने अज्ञानाची कबुली दिली. ज्ञानाचे महत्त्व ज्ञान-अज्ञान( संशय ) यांतील भेद, प्रकाशाचे महत्व अंधकार आणि प्रकाश यांतील भेद जाणुनच स्पष्ट होते. भगवतगीता ज्ञानाला प्रकाश(ज्योति) व अज्ञानाला अंधार(तम) संबोधत आहे. ज्ञान या संदर्भातच "तमसो मा ज्योतिर्गमय" हा जीवनविकास मार्ग स्पष्ट होतो.

ज्ञान सांगितल्यानंतर श्रीकृष्ण अर्जुनाला तर्क करण्याची/ प्रश्न विचारण्याची पूर्ण संधी देतात आणि शेवटी Option ठेवतात,

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।।(१८-६३)

ईश्वर ज्ञानाचा उगम आहे. सृष्टिचा अध्यक्ष आहे. चैतन्यरुपाने मनुष्याचा सजीव घटक आहे, त्याचे शेवटचे निवासस्थान आहे. या नव्या विचारसरणीने श्रीकृष्णाने अर्जुनाला ज्ञान या अर्थाने ईश्वराचा आश्रय करण्यास सांगितले.

सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वाम् सर्वपापेभ्यः मोक्षयिष्यामि मा शुचः।।(१८-६६)

We have to change the beliefs of lifetime, only then it will become part of us.

******

(६-३६)

*************************

असंयत् आत्मना योगो दुष्प्राप्य इति मे मतिः।

वश्य आत्मना तु यततां शक्यो अवाप्तुम् उपायतः।।

*************************

६-३६:

" असंयत आत्मना योगो दुष्प्राप इति मे मति "

(Importance of Discipline, Lifevalues)

"To enjoy good health, to bring true happiness to one's family, to bring peace to all, one must first discipline and control one's own mind. If a man can control his mind he can find the way to Enlightenment, and all wisdom and virtue will naturally come to him. "

-Buddha

शिस्त, संस्कार, मनावर नियंत्रण :

जीवनातील शिस्त, जीवनमुल्यांचा आदर करुन संस्कारीत असणे, मनावर नियंत्रण हे परस्परसंबंधित विषय आहे. निश्चित विषयावर भाष्य करणे, वचनपालन वाणी या संदर्भात संस्कार ठरतो . सत्य पण उद्वेग होणार नाही, हितावह भाष्य करणे हा विषय वाङमय तपद्वारे स्पष्ट केला आहे. तसेच मनावर नियंत्रण अर्थात आत्मविनिग्रह, मौन, मनःशांति मनाच्या या संस्काराला मानसिक तप याद्वारे स्पष्ट केले आहे.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।(१७-१५)

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनम् आत्मविनिग्रहः।(१७-१६)

शिस्तिच्या संस्कारामुळेच कार्याचा दृढनिश्चय असतो. जीवनमुल्यांचा(स्वावलंबि, वचन, स्वधर्म इ. ) आदर करतो. शिस्त, संस्कार या संदर्भात भगवदगीतेत बुद्धियुक्त, आत्मवश या शब्दांचा उल्लेख आलेला आहे.

स्वधर्मम् अपि चावेक्ष्य न विकम्पुतुम् अर्हसि।(२-३१)

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

न च अभावयतः शान्तिः अशांतस्य कुतः सुखम् ।(२-६६)

असंयत् आत्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः।
वश्य आत्मना तु यतता शक्योअवाप्तुम् उपायतः।(६-३६)

व्यवहारात गरजापुर्तिसाठी कर्म साधन असते. व्यवहारात कर्माची सकाम स्थिति असल्यामुळे अशांति असते. याच कर्माला साधन करुन कर्मातुन समत्वयोग साध्य करणे (योगसाधना) ही जीवनातील शक्तिची साधना अर्थात आत्मोन्नति आहे. यासाठी मनाला शिस्त हवी(मनावर नियंत्रण) ज्यामुळे कार्याचा एकनिश्चय असतो. याला कर्मकौशल्य (योगः कर्मसु कौशलम्)म्हटले आहे.

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।
बहुशाखा हि अनंताश्च बुद्धयो अव्यवसायिनाम्।(२-४१)

अर्थात चंचलत्वामुळे कार्याचा एकनिश्चय होत नाही. (योग, दुःखान्तशक्ति)शक्तिची साधना होण्यासाठी मनावर नियंत्रणाची आवश्यकता स्पष्ट केली आहे.

भगवदगीतेत जीवनात कर्माचे महत्व highlight केले आहे. आपले घोरकर्म सुटण्यासाठी जीवनविकासाचा अन्य मार्ग मिळेल या आशेने अर्जुन ज्ञान ऐकत असतो. कर्मातुन सुटका नसते, तर कर्मबंधनातुन सुटका हा संदेश येतो.

यज्ञार्थात् कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधनः।(३-९)
यज्ञतत्वात फलत्याग, (कर्म)समर्पण आहे.

बुद्ध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)
बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।(२-५०)

अर्थात कर्माचा चांगले-वाईट असा कार्मिक trap असतो. यामुळे द्वन्द्व असते. या trap मधुन मुक्त होण्यासाठी संस्कार या संदर्भातच "बुद्धियुक्त " असे प्रयोजन आहे.

********

(६-३६):

"वश्य आत्मना तु यततां शक्यो अवाप्तुम् उपायतः"

(दुबळे करणारी मनोवश अवस्था vs. जीवनविकासात सक्षम करणारी आत्मवश अवस्था)

"रात्रंदिनी आम्हा युद्धाचा प्रसंग" जीवन युद्ध आहे असे म्हटल्या जाते. जीवनाच्या याच युद्धाची निश्चित परिभाषा भगवतगीतेतुन स्पष्ट होते. भगवतगीतेत युद्धाचा प्रसंग आहे. या प्रसंगात सर्वात महत्वाचा प्रसंग अर्जुनाचा नकार असतो, ज्यामुळे भगवतगीता ज्ञान जगासमोर आले. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर युद्ध करण्यासाठी अर्जुन नकार देतो. पण शेवटी(ज्ञान कळल्यानंतर) युद्ध करण्यास तयार होतोच व ठरल्याप्रमाणे युद्ध घडते. याच प्रसंगातुन जीवनविकास या संदर्भात "जीवनाचे युद्ध" जाणुन घ्यायचे आहे. याच युद्धाची ओळख नसते म्हणुन दुर्बलता, भय, गरिबी कायम राहते.

अर्जुन युद्धक्षेत्रावर दुःखी होतो. आपले नियतकार्य शोकदायी आहे हे जाणुन युद्ध न करणे योग्य समजतो. १. अर्जुन सर्वप्रथम "धर्म" या संदर्भातील ज्ञानाचा (कुलधर्म, जातीधर्म)उपयोग समर्थानासाठी करतो.

दोषैः एतेः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः।
उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः॥(१-४२)

याप्रमाणे आपली भूमिका धर्माची आहे असे भाष्य करतो. या प्रसंगातील वास्तव मात्र श्रीकृष्ण दर्शवुन देतात. ज्या भूमिकेला अर्जुन धर्म समजतो, पण ही भूमिका धर्माची नाही अर्थात ना किर्तिची आहे ना स्वर्गाची!याचाच अर्थ धर्माला आपल्या सोयीने प्रदर्शित करतो. खरा प्रश्न ऐनवेळी निर्माण झालेली मनोदुर्बलता असते. याच दुर्बलतेमुळे धर्माला अधर्म व अधर्माला धर्म संबोधतो. (याला भगवतगीता तम ज्ञान संबोधते)

२. अर्जुनाचे शल्य:

अ)जे पुजनिय आहेत, ज्यांचे उपदेश, आदेश शिरोधार्य स्विकारायचे असतात, असे जेष्ठ गुरु, पितामह यांच्यावर बाणाने प्रहार करायचे!अशा युद्धात जिंकले तरी मिळालेले राज्य रक्ताने माखलेले असेल!

ब)दुतर्फा असलेले आम्ही व कौरव यांत धर्माची बाजु कुणाची हे कळेनासे झाले आहे तरीपण केवळ विजयासाठी यांना मारणे उचित वाटत नाही.

क)माझ्यासाठी धर्माच्या दृष्टिने युद्ध करणे योग्य ठरले तरी या युद्धामुळे जी प्राप्ति होईल (पृथ्वीचेच काय पण देवाचे राज्य!) ती माझा शोक नष्ट कसा करेल?

हे सर्व अनाकलनिय आहे. म्हणुन युद्ध करणार नाही ही अर्जुन भूमिका घेतो.

मनुष्य दुःखी झाला, अशांत झाला कि शांतीचा शोध घेतो. शांतिसाठीच भाष्य बोलतो. या भाष्यातुन धर्म या संदर्भात जे ऐकतो, त्याला आपल्या सोयीने प्रदर्शित करतो. जीवनात निर्माण होणारी मनोदुर्बलता, चिंता, भय, अशांति इ. नैसर्गिक मानसिक दुःखच असते. हीच मनोवश अवस्था असते. या अवस्थेत मनुष्य आपल्या सोयीने धर्मालाही interprete करुन समर्थन करतो.

जीवनविकास मानसिक शक्तिची साधना असते. याच शक्तिला योग(दुःखान्त) म्हटले आहे. जगातील युद्धे शक्तिचीच युद्ध असतात. शक्तिचेच प्रदर्शन यात होत असते. तसेच जीवनाचे युद्धही शक्तिचे युद्ध आहे. ही शक्ति मानसिक असते. व हे युद्ध मानसिक दुर्बलता vs मानसिक शक्ति (आत्मविश्वास, साहस)असे असते. अर्थात मानसिक दुबळे करणारी मनोवश अवस्था vs मानसिक सक्षम करणारी आत्मवश अवस्था असते.

अर्जुनाला हे आंतरिक युद्ध कठिण वाटते. म्हणुन याचसाठी उपाय आहे.

असंयत् आत्मना योगो दुष्प्राप्य इति मे मतिः।
वश्य आत्मना तु यततां शक्यो अवाप्तुम् उपायतः॥(६-३६)

याचसाठी शाश्वत धर्माचा (अमृतत्वाय कल्पते) वापर केलेला आहे. दुर्बलता vs सक्षमता अशी लढाई असते. हा विकासमार्ग ठरतो. या मार्गावर विचलित होत नाही अर्थात एकनिश्चय असतो. हा निश्चय होण्यासाठीच स्वधर्म, निर्णय अधिकाराचे महत्व जाणुन कार्याचा एकनिश्चय हे मार्गाचे ज्ञान स्पष्ट केले. व निष्काम कर्म, समत्वयोग, ईश्वरभक्ति (फलसमर्पण) याद्वारे शक्तिची साधना स्पष्ट केलेली आहे.

"The battlefield is a scene of constant chaos. The winner will be the one who controls that chaos, both his own and the enemies. "

Napoleon Bonaparte

******

(६-३७)

*************************

अयतिः श्रद्धया उपेतो योगः चलित मानसः।

अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति॥

*************************

(६-३७):

"अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति?"

(विकासाचा अखंड प्रवास व अडथळा)

मनुष्य जीवनाचा भौतिक प्रवास जाणतो. कर्माद्वारे प्राप्ति कळते. म्हणुन या प्रवासात कर्म विकासाचे साधन असते. (कर्मानुबंधिनी मनुष्यलोके). कर्माद्वारे परमार्थ कळतो. या प्रवासात कर्म सकाम असल्यामुळे आपल्या नियतकार्याचा परिणाम दुःख आहे हे अर्जुनाला जाणवते. जे कर्म करायला निघालो, ते कर्म तर स्वजनांना दुःखी करणारे आहे. म्हणुन या कर्माला दुष्कृत्य ठरवितो. हे दुष्कृत्य करण्याचे प्रयोजन त्याला राज्याचा लोभ वाटते. म्हणुन निहत्य राहुन स्वतःला कौरवाकडुन मृत्यु येणे श्रेयस्कर समजतो. येथे त्याचा (जीवनविकास) रथ थांबतो.

मनुष्यजीवनरुपाने (जीव)आत्मा आपल्या मुलतत्वाशी मिलन करण्याच्या प्रवासाला निघालेला आहे. अर्थात या प्रवासात आत्मोन्नति अपेक्षित असते. हा प्रवास अखंड (नित्य) असतो. याच प्रवासाचे अर्जुनाला अज्ञान असते. हेच ज्ञान भगवतगीता सांगत आहे, ज्यामुळे जीवनविकासरथ थांबलेला आहे हे कळते व ज्ञान ऐकल्यावर रथ सुरु होतो. या प्रवासाचे अंतिम स्थान (Goal, Last destination) ईश्वर असते. यामुळे मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा ओळखल्या जातो. या प्रवासात ज्ञान या संदर्भात ईश्वराचा आश्रय असतो.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

या मार्गाला मानसशास्त्रात Higher Self activation म्हणुन ओळखतात. आध्यात्मिक भाषेत Spiritual journey असेही ओळखतात. या मार्गात आत्मवश असणे, योगसंसिद्ध होणे अपेक्षित असते. या मार्गात दुःखामुळे व्यथित(विचलित) होत नाही. अडचणी विकाससंधि बनतात. सामान्य मार्ग व श्रेष्ठ (उच्च) मार्ग यांत अनुक्रमे द्वन्द्ववश असणे व निर्द्वन्द्व असणे हा भेद आहे. म्हणुन भगवतगीता विकासमार्गातील अडथळा यावर भाष्य करतांना द्वन्द्वाचा उल्लेख करते,

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयोःन वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

याच पार्श्वभुमिवर अर्जुनाला समत्वयोग साध्य करणे (योगसंसिद्ध) कठिण वाटते. म्हणुन हा जन्म (व त्यातील चांगलेपणा) व्यर्थ जाईल काय?हा प्रश्न करतो.

अयतिः श्रद्धया उपेतो योगः चलित मानसः।
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति।।(६-३७)

उत्तर असते,
चांगलेपणा /चांगले कर्म व्यर्थ जात नाही. चांगलेपणा, योगसंसिद्ध होण्यासाठी प्रयत्नशील असणे, यासाठी अध्यात्माकडे ओढ हे सर्व जन्मोजन्मीच्या चांगलेपणाच्या संचिताचे फलित असते.
प्रयत्नात् यतमानः तु योगीसंशुद्ध किल्बिषः।
अनेकजन्मसंसिद्धः ततो याति परां गतिम् ।।(६-४५)

अर्थात जीवनप्रवास विकासाला सहाय्यक आहे कि अडथळा करीत आहे याची भगवतगीता ज्ञान/जाणीव करुन देते. जीवनप्रवास विकासाला सहाय्यक असते, तेंव्हा सकारात्मक असतो, तर नकारात्मकता अडथळा ठरते.

अर्जुनाचा चांगलेपणा सकारात्मक होतो. (स्थितोअस्मि गतसंदेहः)म्हणुनच व्यवहारात सकारात्मक विचारसरणीचे महत्व असते. अडचण आली असता बरेच लोक रस्ता न दिसल्यामुळे हार मानुन प्रयत्न सोडुन देतात. प्रयत्नच संकटातुन बाहेर काढतात. "थांबु नका, चालत राहील्याने रस्ता मिळेल, किंवा रस्ता बनेल. "
"BE POSITIVE"

********

(६-३७):विषय ७२१ :
" अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति?"
(जीवनाचे ध्येय?)

भगवदगीतेत जीवनविकास या संदर्भात "युद्ध(लढाई)"हा शब्द आलेला आहे. अर्जुनाचे नियतकार्य या संदर्भात "युद्ध" हा बाह्यअर्थ आहे. या लढाईत परिणाम या संदर्भात यश-अपयश असते. अर्जुन याच अर्थाने आपल्या नियतकार्याला जाणत असतो. पण याच कर्माला अंतर्गत लढाईचे साधन जाणत नाही. जो भगवदगीतेचा मुख्य विषय आहे.

जीवनाची अंतर्गत लढाई या संदर्भात योगसंसिद्ध होणे हा शब्द आलेला आहे. योग(दुःखान्त शक्ति, विचलित न होणे), संसिद्ध (Proven, matured प्रथितयश) याप्रमाणे योगसंसिद्ध होणे जीवनविकासातील ध्येय ठरते.

लढाई म्हटले कि शक्ति हा विषय येतो. साहस, निर्भयता, आत्मविश्वास, सकारात्मकता बुद्धिची स्थिरता दर्शवित असते. अर्थात योगसंसिद्धि या संदर्भात शक्तिचाच संदेश मिळतो. यामुळे बुद्धिची स्थिर अवस्था (स्थितप्रज्ञ, विचलित न होणे) साध्य होत असते. बुद्धिभ्रम विनाशाला (ऱ्हासाला) कारण ठरतो, म्हणुन बुद्धियोग ही जीवनात Priority असावी.
दुरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगात् धनञ्जय।(२-४९)

यावर अर्जुन प्रश्न करतो, बुद्धि श्रेष्ठ तर कर्म कशाला?तेंव्हा कर्म जीवनविकासाचे साधन आहे हा संदेश भगवदगीता देते. ज्ञानाद्वारे कर्म अकर्म जाणणे म्हणजे कर्मसंन्यास होणे या शास्त्रात योगसंसिद्ध हा शब्द आलेला आहे. शाश्वताचे ज्ञान अनुभवणे या संदर्भात हा शब्द आलेला आहे.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेन आत्मनि विन्दति॥(४-३८)

जसा लढाई हा शब्द दुहेरी(बाह्य व अंतर्गत) संदर्भात आलेला आहे, तसेच ज्ञान हा शब्दही दुहेरी (बाह्य-ज्ञानविज्ञान, अंतर्गत-शाश्वत ईश्वरज्ञान) संदर्भात आलेला आहे.

कर्मसंन्यास ज्ञान ऐकल्यानंतर संन्यास कि योग यांत श्रेयस्कर काय? हा अर्जुनाचा प्रश्न असतो. तेंव्हा कर्मयोग श्रेयस्कर म्हटले आहे. (कर्मयोगो विशिष्यते).

व्यवहारात "गरजापुर्तिसाठी कार्य" या अर्थाने कर्म असते. धर्म या संदर्भात मनुष्य चांगलेपणा जाणत असतो. याच जाणिवेनुसार (मला राज्याची गरज नाही!)अर्जुन युद्ध टाळणे हा धर्म समजतो.

जीवनातील "चांगलेपणा vs. योगसंसिद्ध होणे" यांत योगसंसिद्ध होणे हे ध्येय असते, चांगले कार्य साधन असते.

अयति श्रद्धया उपेतो योगात् चलित् मानसः।
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति।(६-३७)
जीवनात योगसंसिद्ध प्राप्ति झाली नाही तर या जीवनातील चांगलेपणा, सत्कार्य व्यर्थ जात नाही हे श्रीकृष्णाचे उत्तर असते.

न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति।(६-४०)

********

(६-४०)

*************************

पार्थ नैव इह नामुत्र विनाशः तस्य विद्यते।

न हि कल्याणकृत् कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति।।

*************************

(६-४०):" न हि कल्याणकृत् कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति।"

महामानवांनी, तत्ववेत्त्यांनी जीवनाचा शोध घेतला व जगाला मार्गदर्शन केले. मनुष्य जन्माला आला व जाणारच!जरा, व्याधि ही पिडाही असते!मग या दुःखालयात जगण्याचे प्रयोजन ते काय? या प्रश्नाने सिद्धार्थाची झोप उडवली.

जीवनच मनुष्याला आव्हान देत असते. असेच आव्हान अर्जुनाला मिळाले. पण या आव्हानाची त्याला ओळख होत नाही. भोगैश्वर्य मिळवुन काय करायचे?सर्व येथेच राहणार!सिकंदर खाली हात गेला!हे भाष्य मनुष्य ऐकत असतो. हीच भाषा अर्जुनही बोलतो.

युद्ध केल्यामुळे दुःखच होईल म्हणुन या नियतकार्याने "काय मिळवायचे?" याचा आढावा घेतो व "मला कांही नको" म्हणुन युद्ध करणे टाळणे योग्य समजतो.

आपली भूमिका योग्य आहे याचे समर्थन करतो. या प्रक्रियेत निष्क्रियतेला धर्म/आदर्श संबोधतो. आपली दुर्बलता सक्षम दिसावी यासाठी हा प्रयास असतो. पण या प्रयासात अज्ञानाला ज्ञान संबोधतो. धर्माला अधर्म व अधर्माला(अयोग्य) धर्म(योग्य) दर्शवितो. (भगवतगीता या स्थितिला बुद्धिची तम अवस्था संबोधते. ) या प्रयासात जीवनाचा Weakness व Strength याची ओळख नसते.

Acceptance:

जीवनातील वास्तव न स्विकारल्यामुळे आव्हानाची ओळख होत नाही. यामुळे जीवनातील Weakness व Strength कळत नाही. या स्थितीत स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी केलेले भाष्य Monologue असते, Dialogue (संवाद) नसतो. हा अर्जुनाचा Comfort zone असतो.

“Life loses its meaning when we get stuck up in comfort zone. ”

अर्जुन वास्तव स्विकारतो. अज्ञान कबुल करतो, तेंव्हा निश्चित प्रश्नावर भगवतगीता सुरु होते. संवादाला निश्चित विषय मिळतो.

"अज्ञानाला ज्ञान म्हणु नको" ही अर्जुनाला समज देण्यात येते व ज्ञान जगी सर्वश्रेष्ठ आहे हा संदेश भगवतगीता देते.

भगवतगीतेची भूमिका:
जीवनात सुख हवे पण दुःख आले कि गोंधळतो. याच दुःखाचे आव्हान स्विकारण्यासाठी संदेश आहे,
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

"ईश्वर " ही संकल्पना ज्ञानविज्ञानविरोधी आहे, व्यवहारात निरुपयोगी आहे, असा कांहींचा समज असतो. ईश्वराचा ज्ञानविज्ञानाशी असलेला निश्चित संबंध भगवतगीता स्पष्ट करते. मनुष्य व ईश्वर यांचे नाते या आधारावरच भगवतगीता जगण्याचा

Standard मार्ग सांगते. ज्या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

मनुष्य व्यवहारात जगतो. हा व्यवहारमार्ग इच्छा/गरज (State of want) व सहजकार्य (State of art) या आधारावर असतो. हाच व्यवहार प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी वर म्हटल्याप्रमाणे "अमृतत्वाय कल्पते" या मार्गात Transform करावा लागतो. अर्थात या मार्गावर "आत्मवश"अवस्था असते. या मार्गावर "कार्याद्वारे ईश्वरभक्ति " या संदर्भात कार्याद्वारे योग(दुःखान्त शक्ति) ही Exercise होते. भगवतगीतेतील निष्कामकार्य शास्त्र याप्रमाणे स्पष्ट केले आहे. याच संदर्भात जीवनमार्गातील ज्ञान-कर्म-भक्ति-ज्ञान हे cycle स्पष्ट केले आहे.

*ज्ञानसंच्छिन्न संशयम्।(संशयमुक्ति)

*व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।(कार्यनिश्चय)

*योगसंन्यस्त कर्माणं। (भक्ति)

*सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(कार्याचे ज्ञानात विलिनिकरण)

संशय, भय ही दुर्बलता (Weakness)असते. यामुळे बुद्धिचा निश्चय होत नाही. म्हणुन जीवनात ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी बुद्धियोग प्रावधान आहे. ज्यामुळे "अमृतत्वाय कल्पते" या मार्गावर जीवनयात्रा विश्वासाने चालत असते. विश्वास, निर्भयता, साहस शक्ति Strength असते. जीवनातील Weakness वर विजय मिळविण्यासाठीच याप्रमाणे भगवतगीता जीवनाचा विकासमार्ग, जीवनाची लढाई याद्वारा सांगत आहे. यासाठीच चांगलेपणा, ईश्वर यांची भूमिका स्पष्ट करते. व जीवनात चांगलेपणा, ईश्वरश्रद्धा याचे प्रयोजन दुर्बलता नसुन दुर्बलतेवर विजय मिळविण्यासाठी आहे हे भगवतगीता दर्शवुन देते.

*विकासमार्ग:विकासमार्गावर असलेला आत्मवश असतो. स्वतःचा बंधु असतो, अन्यथा स्वतःशी शत्रुवत् आचरण करतो. अनात्मनःतु शत्रुत्वे वर्तेत् आत्मैव शत्रुवत् ।(६-६)

*लढाई:" माम् अनुस्मर युध्य च" ही लढाई Weakness vs Strength, Distress vs happiness, Ignorance vs Wisdom, मानसिकता संदर्भात बुद्धिभ्रम vs बुद्धियोग ;कार्य संदर्भात सकाम vs निष्काम अशी असते,

*सत (चांगलेपण):

चांगलेपणामुळेच अर्जुन दुःखी होतो, सामान्य मनुष्याच्या स्वाभाविक संवयीनुसार तो स्वतःला योग्य ठरविण्यासाठी अज्ञानाला ज्ञान, दुर्बलतेला सक्षम दर्शवितो. म्हणुन चांगलेपणा दुर्बलता नसुन सक्षम होण्याचे साधन आहे. हे भगवतगीतेतुन स्पष्ट होते. याच पार्श्वभुमिवर अर्जुन प्रश्न करतो. जर जीवनाची ही लढाई (मनचंचलतेमुळे)जमली नाही तर माझा चांगलेपणा व्यर्थ जाईल काय?या प्रश्नावर उत्तर येते,

पार्थ नैव इह नामुत्र विनाशः तस्य विद्यते।
न हि कल्याणकृत् कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति।।(६-४०)

चांगलेपणाचा विनाश नाही.

जिज्ञासुः अपि योगस्य शब्दब्रह्म अतिवर्तते।(६-४४)

वर्तमानजन्मातील चांगलेपणा, ईश्वरश्रद्धा ही पुर्वजन्मातील देण आहे यामुळेच जीवन जाणुन पुर्णत्वाकडे वाटचाल करण्याची ओढ असते.

अनेकजन्मसंसिद्धः ततो याति परां गतिं।(६-४५)

याप्रमाणे भगवतगीता जीवनाचा आदर करण्याचा संदेश देते. मनुष्याच्या ठायी असलेला चांगलेपणा दुर्बलता नसुन शक्ति आहे याची ओळख देते. जीवनाचा हेतु (Meaning & Purpose of Life)स्पष्ट करते.

"Life is without meaning. You bring the meaning to it. The meaning of life is whatever you ascribe it to be. Being alive is the meaning. "

Joseph Campbell

* ******

(६-४२)

*************************

अथवा योगिनाम् एव कुले भवति धीमताम्।

एतद् हि दुर्लभतरं लोके जन्म इदृशम् ।

*************************

(६-४२):

"एतद् हि दुर्लभतरं लोके जन्म इदृशम् "

(Opportunity of progress)

मनुष्यजीवनांत सुखदुःख असतात. जीवनांत अडचणी सर्वांनाच येतात पण अडचणीवर मात करुन (विकासमार्गावर) प्रवास सुरु ठेवणारा शहाणा ठरतो. अर्जुनाचा प्रवास मात्र थांबतो(अर्जुनविषादयोग). अर्जुन केवळ भौतिक विकास जाणत असतो, यामुळेच दुःखाने विचलित होतो. दुर्बलतेला सक्षमता दर्शवितो. अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. याच पार्श्वभुमिवर मनुष्यजीवनातील नित्य विकासप्रवास (आत्मोन्नति) व "थांबणे" यातील भेद चर्चेला येतो.

आत्मोन्नति या संदर्भात कार्याद्वारे समत्वयोग अर्जुनाला कठीण वाटतो, तेंव्हा प्रश्न करतो, (विकासमार्गावर येणे साध्य झाले नाही तर )जीवनातील चांगलेपणा व्यर्थ जाईल काय?याच प्रश्नाचे उत्तरात नित्य (विकास) प्रवासाचा उलगडा होतो. नित्य विकासासाठी(आत्मोन्नति) प्रेरीत करीत असलेला जन्म या लोकी भाग्यवान ठरतो. आत्मोन्नतिसाठी Favorable असणाऱ्या घराण्यात जन्म घेणे भाग्याचे ठरते. असे भाग्य मागील जन्माचे फलित असते.

एतद् हि दुर्लभतरं लोके जन्म इदृशम् ।(६-४२)

विकासप्रेरणा:
तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।(६-४३)

नित्यप्रवास-आत्मोन्नति:
अनेक जन्मसंसिद्धः ततो याति परां गतिम् ।(६-४५)

व्यावहारिक बोध:

भगवतगीतेने येथे पुनर्जन्म ही संकल्पना highlight केली नाही तर याच जीवनात विकासाची निश्चित दिशा मिळावी यासाठी दुःख, अडचणीचे आव्हान स्विकारणे, भय, चिंता इ. Negative emotions वर विजय मिळविणे याचे महत्व highlight केले आहे. ज्यामुळे वर्तमान विकासाची संधी ठरेल. याच ज्ञानामुळे अध्यात्म या विषयाचे जीवनविकासातील महत्व स्पष्ट होते.

* ******

(६-४४)

*************************

पुर्वाभ्यासेन तेनैव ऱ्हियते हि अवशोअपि सः।

जिज्ञासुः अपि योगस्य शब्दब्रह्म अतिवर्तते।।

*************************

(६. ४४):

"पुर्वाभ्यासेन तेनैव ऱ्हियते हि अवशो अपि सः"

"सुखाची प्राप्ति, दुःखाची निवृत्ति ही मनुष्याची प्रवृत्ति(एवं मनुष्यः प्रवृत्तिः)" असे मनुष्याच्या प्रवृत्तिबद्दल म्हटले आहे. भगवतगीता जीवनातील दुःखाशी सामना करण्याची कला सांगते. जीवनविकासाचे पुर्णत्व अनुभवण्यासाठी समत्वयोग सांगते. याच संदर्भात अर्जुन प्रश्न करतो, जर समत्वयोग साधला नाही तर हे जीवन व्यर्थ जाईल काय?यावर उत्तर देतांना पुनर्जन्माचा उल्लेख भगवतगीतेत आहे. पुर्वजन्मातील चांगल्या कर्माच्या संचितामुळेच वर्तमानातील जीवनाचा प्रवास विकासाच्या

पुर्णत्वाकडे होतो. यामुळेच मनुष्य मानवकल्याणाच्या चांगल्या कार्याकडे आकर्षित होतो.

न हि कल्याणकृत कश्चित् दुर्गतिं तात् गच्छति।(६-४०)
...
पुर्वाभ्यासेन तेनैव ऱ्हियते हि अवशोअपि सः।(६-४४)

पुर्वजन्म आठवत नसल्यामुळे पुनर्जन्म ही संकल्पना केवळ मानण्याचा प्रकार ठरते. मृत्यु मनुष्याला नको असतो याचाच अर्थ जीवन आवडत असते. पण जेंव्हा दुःख येते तेंव्हा ते नकोसे होते. मग मात्र मनुष्याला जीवन कठिण वाटते. अर्जुन म्हणतो, अशा (दुःखी) जीवनापेक्षा मृत्यु बरा!याचाच अर्थ जीवनातील दुःख अर्जुनाला मृत्युपेक्षाही भयावह जाणवते. याच दुःखाशी सामना करण्याचे महत्व व ज्ञान भगवतगीता सांगते. व याच अनुषंगाने जीवनविकासाचा महामार्ग सांगण्यात आला. या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही . अडचणी विकाससंधि ठरतात. येथे सकारात्मक असतो.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

संदेश: जसा अर्जुन दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेला आदर्श दर्शविण्याचा प्रयत्न करतो, तसेच समाजात मनुष्य दुःख टाळण्यासाठी Shortcut वापरत असतो. विकासमार्गातील ही नकारात्मक मानसिकता ठरते. या मानसिकतेमुळे स्वतः तर भ्रमात असतो, पण समाजातही भ्रम निर्माण करतो. हीच मनुष्याची अज्ञान अवस्था ठरते. म्हणुन दुःखाशी सामना करणे मनुष्याची Priority( आद्य कर्तव्य) असली पाहिजे. केवळ याच कारणासाठी अर्जुनाला जागृत केले. व याच अनुषंगाने "अमृतत्वाय कल्पते" अर्थात विकासाचा महामार्ग, ईश्वरज्ञान याचे ज्ञान विज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते.

******

(६-४५)

*************************

प्रयत्नात् यतमानः तु योगी संशुद्धकिल्बीषः।

अनेकजन्मसंसिद्धः ततो याति परां गतिम्।।

*************************

(६-४५):"अनेकजन्मसंसिद्धः ततो याति परां गतिम्"

(विकासाचे सातत्य)

मनुष्यजीवन अनेक जन्मानंतर लाभले आहे व या जन्माचा सन्मान केला पाहिजे हे (आध्यात्मिक )तत्वज्ञ सांगत असतात. मनुष्यजीवनातच जीवनाचे रहस्य व विकासाचे ज्ञान कळते.

जीवनाची Survival भूमिका मनुष्य जाणत असतो. यात सुखासाठी जगत असतो. जीवनात प्रश्नांचे आव्हान असते. प्रश्नावर उपाय करणे आवश्यक असते. जीवनातील दुःख, प्रश्न याला deal करण्याचे ज्ञान असेल तर विकासमार्गावर असतो. अन्यथा दुःख टाळण्यासाठी प्रश्नाला bypass करुन जगण्याचा

प्रयत्न करतो. या प्रक्रियेत वर्तमानातील अशांतिवर उपाय म्हणुन स्वतःला योग्य ठरविण्यासाठी ज्ञान वापरतो. अर्जुन दुःख टाळण्यासाठी अशीच भूमिका घेतो. या प्रयत्नात अडथळयाला विकास, अनादरला आदर, अज्ञानाला ज्ञान ठरवितो.

भगवतगीता याच स्थितिला अज्ञान संबोधित आहे.
या स्थितिचे कारण अहंकार असतो. याच पार्श्वभुमीवर " अहंकार vs ज्ञान" या विषयावर भगवतगीता प्रकाश टाकते.
अहंकार विमुढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

भगवतगीतेचा हाच Opening विषय आहे. मनुष्य जर स्वतःच्या अज्ञानी भूमिकेला ज्ञानी ठरवीत असेल, तर तो ज्या फांदीवर बसला आहे त्याच फांदीला कापत असतो व ही मुढ अवस्था ठरते.

मनुष्य स्वतःच्या जीवनाचा आदर करतो आहे कि अनादर?
ज्ञानी आहे कि अज्ञानी?
विकासमार्गावर आहे कि अडथळा बनला आहे?

भगवतगीता हेच विविध भेद(विकास कि अडथळा?ज्ञानी कि अज्ञानी?) स्पष्ट करीत आहे.

स्वार्थि, लोभी म्हणजे स्वतःचेच हीत जाणणे व त्यासाठी आपल्या चुकांनाही योग्य ठरविणे हे आपण जाणत असतो. तर स्वतःच्याच सुखाचा विचार करुन जीवनात दुःख आले तर दुःखाला bypass करुन जगण्याचा प्रयत्न करणे हा बेजबाबदारपणा ठरतो. हेच भगवतगीता दर्शवुन देते. अर्जुन स्वतःला लोभी ठरवितो. पण या प्रयत्नात जीवनांच्या मुल्यांचा अनादर होतो. येथे अर्जुन लोभी नव्हता पण जीवनाचे मुल्य जाणत नव्हता. म्हणुन अज्ञानी ठरतो. याच पार्श्वभुमिवर म्हटले,
अनार्यजुष्टम् अस्वर्ग्यम् अकिर्तिकरं अर्जुन।(२-२)

समाजात (स्वतःला योग्य ठरविण्यासाठी )असेच भाष्य स्वतःला "ज्ञानी" समजुन बोलल्या जाते. तसेच आपला स्वार्थ सिद्ध करण्यासाठी अशाच भाष्याचा उपयोग होतो. असे भाष्य ज्ञान ठरत नसुन मनुष्याच्या Survival भूमिकेतील भाष्य असते. म्हणुन वास्तवाचा स्विकार करणे हे या अज्ञानातुन बाहेर पडण्याचे प्रथम पाऊल ठरते.

अर्जुन वास्तव स्विकारतो. ज्या कार्यात दुःखच दिसत आहे ते योग्य कसे? हा त्याचा प्रश्न असतो. याच प्रश्नाचे उत्तरात जीवनाचे रहस्य कळते.

*ज्ञानी/श्रेष्ठ जीवनाच्या विकासमार्गावर असतात. हा मार्ग "अमृतत्वाय कल्पते"(अमृतंगमय) असतो. मनुष्याचे शाश्वत पुरुष तत्व व पुरुषोत्तम (ईश्वर)याला जोडणारा "अमृतंगमय" हा शाश्वत राजमार्ग असतो.

*जीवनविकासात Survival vs. आत्मोन्नति हा भेद कळतो. या मार्गावर "आत्मवश "असतो. या मार्गावर विचलित होत नाही. कार्याचा एक(दृढ) निश्चय असतो. आत्मवश अवस्थेत स्वतःचा बंधु ठरतो. तर मनोवश अवस्थेत स्वतःचा शत्रु ठरतो. स्वतःचाच स्वतः अडथळा बनतो. "आत्मोन्नति" म्हणजेच मनुष्यजीवनात विकासाचे सातत्य असणे .

अर्जुन याच पार्श्वभुमीवर प्रश्न करतो, आत्मोन्नति संदर्भात विकासमार्गावर येणे जमले नाही तर ढगफुटीप्रमाणे जीवन व्यर्थ समजावे काय?

हे जीवन म्हणजे शाश्वत तत्वाला शरीर हे साधन विकासासाठी लाभले आहे. चांगले कार्य व्यर्थ जात नाही. शाश्वत तत्वाचा हा प्रवास अखंड असतो. अनेक जन्माच्या शुद्धिनंतर जे या विश्वात कार्यरत आहेत ते महापुरुष, महामानव म्हणुन आपण ओळखत असतो.

प्रयत्नात् यतमानः तु योगी संशुद्धकिल्बीषः।
अनेकजन्मसंसिद्धः ततो याति परां गतिम्॥(६-४५)

सुखदुःख या संदर्भात दुःखालयाला सुखालय करण्यासाठीच शाश्वत विकासमार्गाचे प्रयोजन आहे.
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

व्यावहारिक बोध:

Survival मार्गात कर्म घडतच असते. व्यवहारात कर्म घडतच राहणार. हेच कर्म विकासाचे साधन आहे. कर्माची सकाम मानसिकता Vs निष्काम मानसिकता यातील भेद व महत्व जाणण्यासाठी शाश्वत विकासमार्ग भगवतगीता सांगत आहे.

स्वतःच्या जीवनातील वास्तव स्विकारले तरच जगातील ज्ञानाचा उपयोग करता येतो. ज्या अज्ञानामुळे मनुष्य अडथळयाला विकास म्हणतो, अहंकाराला स्वाभिमान-आत्मसन्मान म्हणतो, अज्ञानी भूमिकेला ज्ञानी म्हणतो, त्याच अज्ञानावर भगवतगीता प्रकाश टाकते. याचाच अर्थ मनुष्यजीवनात ज्ञानाची भूमिका हाच भगवतगीतेचा विषय आहे. ज्ञान या संदर्भातच विश्वातील व मानवजीवनातील" ईश्वर" ही संकल्पना भगवतगीता प्रकृतिच्या विज्ञानासह स्पष्ट करते. व यामुळेच मनुष्याला शाश्वत विकासमार्गाचा (अमृतत्वाय कल्पते) बोध होतो.

याप्रमाणे भगवतगीता मनुष्याच्या गुणात्मक विकासात कर्म व ज्ञान यांची भूमिका स्पष्ट करते.

*********

(६-४६)

************************

तपस्विभ्: अधिको योगी ज्ञानिभ्यःअपि मतोअधिकः।

कर्मिभ्यश्च अधिको योगी तस्मात् योगी भवार्जुन।।

************************

(६-४६) :

" तस्मात् योगी भवार्जुन"

कर्माद्वारे प्राप्ति, इच्छापुर्ति हा व्यवहार मनुष्य जाणत असतो. तर कर्माद्वारे संन्यास(अकर्ता, अकर्म-Free from attachment of pain) हे ज्ञान भगवतगीता सांगते. यासाठी "योगसंन्यस्तकर्माणं" या शब्दाचे प्रयोजन केले. कर्माद्वारे योग, कर्माद्वारे संन्यास हे दोन्ही शब्द ऐकुन अर्जुन गोंधळतो व निश्चित श्रेयस्कर काय? हे विचारतो.

१. कर्म:

कर्माद्वारेच विकास होतो.

आरुरुक्षो मुनेःयोगं कर्म कारणम् उच्यते।(६-३)

२. योग:

योग ही दुःखान्त शक्ति आहे. यामुळे विचलित होत नाही. योगाभ्यासाने मनावर नियंत्रण येते. तर कर्मयोगात कार्याचा एकनिश्चय करुन समत्वयोगाने कार्य करतो.

३. निश्चयाचे बळ:

मनावर नियंत्रण असल्यामुळे कार्याचा एकनिश्चय होतो. शांत असतो. अशांती म्हणजेच चंचलत्व. चंचलत्वामुळे निश्चय होत नाही.

अ)जीवनमुल्ये:

स्वावलंबन, वचन, स्वधर्म इ. जीवनमुल्यांमुळे कार्याचा निश्चय होतो. रामायणात वचन पाळणे दशरथ महाराजांना अवघड गेले. तर स्वधर्म जाणुन श्रीरामाचा त्वरीत निर्णय झाला.

धरम धुरीन धरम गति जानी।कहेउ मातु सन अति मृदु बानी।
पितां दीन्ह मोहि कानन राजू।जहँ सब भांति मोर बड काजू।

ब)बुद्धियोग:

बुद्धियोगनिष्ठेमुळे कार्याचा निश्चय होतो. द्वन्द्वमुक्त असतो, निष्काम कर्म करतो. कार्याद्वारे योग हे कार्यकौशल्य साध्य होते.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

४. शांति:

युञ्जनैवं सदा आत्मानं योगी नियतमानसः।

शांति निर्वाणपरमां मत्संस्थाम् अधिगच्छति।।(६-१५)

तपस्वि असो, विद्वान असो, कर्तृत्ववान असो, योगी होणे अधिक श्रेयस्कर आहे. जीवनविकासात यासाठीच प्रयत्नशील असावे. यामुळे आत्मशुद्धि होते, शांती मिळते.

प्रयत्नात् यतमानः तु योगीसंशुद्ध किल्बिषः।.. (६-४५)

तपस्विभ्ः अधिको योगी ज्ञानिभ्यःअपि मतोअधिकः।

कर्मिभ्यश्च अधिको योगी तस्मात् योगी भवार्जुन।।(६-४६)

*******

(६-४६):

"कर्मिभ्यश्च अधिको योगी तस्माद् योगी भवार्जुन "

( life : Journey cum battle)

*Journey of life

*Journey cum battle:(Journey transformed into battle. )

*Battle

प्रत्यक्ष युद्धकार्य अर्जुनाचे नियतकार्य असते. याद्वारे जीवनाच्या युद्धाला (Internal battle)भगवतगीता highlight करते. कर्म या battle चे साधन असते. जीवनप्रवास आणि battle यांचा समन्वय भगवतगीतेने साधलेला आहे. हे battle "बंधन vs मोक्ष " असे असते.

**Journey of life :

ही सृष्टि द्वन्द्वाने (अंधार-प्रकाश)भरलेली आहे.

जीवनप्रवास या संदर्भात मनुष्यजीवनात योग्य-अयोग्य, चांगले-वाईट, धर्म-अधर्म, यश-अपयश, सुख-दुःख हे द्वन्द्व जीवनमार्गाचा आधार ठरतात. याच द्वन्द्वाचा आधार आपला मार्ग चुकीचा आहे हे सिद्ध करण्यासाठी अर्जुनाने घेतला. अर्जुन दुःखामुळे निष्क्रिय होतो व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान सांगतो.

जीवनमार्गातील ज्ञानाची भूमिका निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी कि मार्ग पक्का करण्यासाठी असावी? अर्थात कार्यनिश्चय

करण्यासाठी ज्ञान?हा प्रश्न येथे उपस्थित होतो म्हणुन जीवनमार्गातील ज्ञानाचे महत्व कळण्यासाठी भगवतगीता कर्माचे महत्व स्पष्ट करते. "ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम्" ज्ञानाने संशय मिटुन कार्याचा एकनिश्चय होतो. कर्मयोगासाठी (योगसंन्यस्तकर्माणं) कार्याचा एकनिश्चय असतो.

**Journey cum battle:

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(८-७)
जीवनप्रवासात "माम् अनुस्मर "हा संदर्भ ईश्वरभक्ति असा होतो.

ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।(७-२८)
Battle या संदर्भात हे battle द्वन्द्व vs. निर्द्वन्द्व असे असते. अर्थात जीवनप्रवासात चांगले वाईट कर्म या संदर्भात निर्द्वन्द्व असतो.
(Journey transformed into battle. )
बुद्धियुक्तो जहातीह उभेसुकृतदुष्कृते।
तस्माद् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

*प्रवासात Destination चे महत्व असते. याच हेतुने कर्मापेक्षा योगी श्रेष्ठ म्हटले आहे. अर्थात या logic मुळे "योगः कर्मसु कौशलम् " अर्थात कार्यकौशल्य Define होते.

कर्मिभ्यश्च अधिको योगी तस्माद् योगी भवार्जुन।(६-४६)

**Battle :

"योगः कर्मसु कौशलम् "अर्थात हे battle विविध प्रकारे भगवतगीता स्पष्ट करते.

१. दुर्बलता vs सक्षमता

अनार्यजुष्ठम् अस्वर्ग्यम् अकिर्तीकरम् अर्जुन।(२-२)

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ न एतद् त्वयि उपपद्यते।(२-३)

तुझी भूमिका श्रेष्ठांना अशोभनिय, स्वर्ग व किर्ती यापासुन वंचित करणारी आहे. मनोदुर्बलता तुला शोभत नाही.

२. मनोवश vs आत्मवश

इंद्रियाणां हि चरतां यत् मनोअनुविधीयते।

तदस्य हरति प्रज्ञा वायुः नावाम् इव अम्भसि।।(२-६७)

वाऱ्याने नाव वहावी तशी जीवनयात्रा असणे ही मनोवश स्थिति ठरते.

३. तम vs सत

निर्द्वन्द्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।(२-४५)

तु निर्द्वन्द्व, सात्त्विक, निष्काम, आत्मवश हो. हा श्रेष्ठांचा मार्ग.

४. चंचल vs. कार्याचा एकनिश्चय

व्यवसाय आत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।

बहुशाखा हि अनंताश्च बुद्धयोः अव्यवसायिनाम् ।।(२-४१)

या मार्गात कार्याचा एकनिश्चय असतो.

५. सकाम vs निष्काम कर्म असते.

जहि शत्रुं महाबाहो कामरुपम् दुरासदम् ।(३-४३)

६. सामान्य vs श्रेष्ठ

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

मनुष्य सामान्यच असतो. श्रेष्ठ प्रवासात व्यथित होत नाही. म्हणुन हे battle सामान्य vs श्रेष्ठ असे असते.

******

(६-४७)

*************************

योगीनाम् अपि सर्वेषां मद् गतेन् अन्तरात्मना।

श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः।।

*************************

(६-४७):

"श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः"

(बुद्धियोग :द्वन्द्व vs निर्द्वन्द्व)

मनुष्य व्यवहारात कर्म करीत असतो. हे कर्म करतांनाही ईश्वराची भूमिका भगवतगीता स्पष्ट करते व ईश्वराची निश्चित ओळख देवुन त्याच्या नित्य भक्तिचे शास्त्र सांगते. या नित्य भक्तिसाठी बुद्धियुक्त (Right mental attitude) शब्दाचे प्रयोजन आहे.

Right Mental Attitude

Nothing can stop the man with the right mental attitude from achieving his goal; nothing on earth can help the man with the wrong mental attitude.

Bhagwatgeeta is about transformation for Right Mental Attitude.

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिं अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

बुद्धियुक्त असणे हा संस्कार आहे.
दुरेण हि अवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय।
बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।।(२-४९)

* नित्य आत्मवश असणे
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)
*निर्द्वन्द्व असणे(द्वन्द्व vs निर्द्वन्द्व battle)
तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(८-७)

*निर्द्वन्द्व अर्थात कार्याचा एकनिश्चय असणे.
बुद्धियुक्तो जहातिह उभेसुकृतदुष्कृते।(२-५०)
*निष्काम कर्म
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।(२-५०)

*सुखी जीवन

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।(५-१२)

( द्वन्द्व vs. निर्द्वन्द्व

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।

तयोःन वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

When we don't live with clear intentions, many people can be pulled down a destructive path by circumstances, become victim of dualistic paradigm behaviors.

Ignorance:

Nobody thinks that they're evil or bad, they think that they're doing the right thing. So many people in the world would rather stay in a situation that's painful but familiar because they're comfortable with it. Not a lot of people have the strength or heart

to realize when something's not good for them and to turn around and be alone.

By developing clear purpose and intentions and following these to the best of our ability, we can shift from dualistic old paradigm behaviors to develop healthier, more harmonious ways of living with each other. )

******

भगवदगीता

# अध्याय ७ ज्ञानविज्ञानयोग

## अध्याय ७ ज्ञानविज्ञानयोग

भगवतगीता ज्ञानविज्ञानाचा विषय आहे, वादाचा विषय नाही, हे ज्ञानविज्ञानातुन स्पष्ठ होते. अर्जुनाच्या प्रश्नांचे सविस्तर निराकरण श्रीकृष्ण करीत आहे, यातुन महत्वाच्या विषयाचा उल्लेख झाला तर त्या विषयाचे सविस्तर स्पष्टिकरण करीत आहे. ६व्या अध्यायात जीवनातील शाश्वत तत्वाचा प्रवास हे रहस्य सांगितले व ईश्वरगतित असलेला योगी श्रेष्ठ म्हटले. याच संदर्भात ज्ञानविज्ञानसह स्पष्टिकरण या अध्यायात आलेले आहे.

E=mC2(Square) असे उर्जा व जड याचे रहस्य आईंस्टाईनने उलगडले. तर जीवनविकासासाठी उर्जारुपांत ईश्वर या संज्ञेने भगवतगीता हेच रहस्य उलगडते.

श्रद्धावान मनुष्य ईश्वराला देवतारुपात (मानुषिम् तनुम् आश्रिताः)भजत असतो. भजणाऱ्या भक्तांतील भेद यांत स्पष्ठ करतात. श्रीकृष्ण म्हणतात, लोक सिद्ध होण्यासाठी ईश्वराला भजतात. अशा हजारो भजणाऱ्यात एखादा सिद्ध होतो. अशा हजारो सिद्धांतुन एखादाच तत्वतः ईश्वराला जाणतो.

या अध्यायात मुख्य दोन विभाग येतात.

७. १. सृष्टिचे वास्तव Existence

७. २. जीवनविकास प्रक्रियेत ईश्वराचा आश्रय

७. १ Existence

*Physical existance

*Consciousness domain

*Spiritual domain

*State of spiritual existance

*Psychological domain

पंचमहाभुते(Physical) व मन, बुद्धि, अहंकार (Consciousness) ही अष्टप्रकृति म्हणुन ओळखल्या जाते. या प्रकृतिपलिकडे श्रेष्ठ ईश्वराची अव्यक्त उर्जा आहे, ज्याद्वारा सृष्टिचे धारण होते. (Spiritual). याप्रमाणे सृष्टितील जड व चेतन वस्तुंचा मुळ स्रोत आहे. याच शाश्वत तत्वांमध्ये सर्व जग मण्याप्रमाणे ओवलेले आहे.

*State of Spiritual existance सत्वभाव

पाण्यातील रस, सुर्यचंद्राची प्रभा, ॐ, शब्द, पृथ्वीचा सुगंध, अग्नितील तेज, जीवन व सनातन बीज, तप, बुद्धिवानाची बुद्धि, तेजस्विचे तेज तसेच जगतकल्याणाला पोषक भाव(काम या शब्दातील सकारात्मक व नकारात्मक बोध) व बलवानाचे बल याच उर्जातत्वांचे श्रेष्ठ भाव (सत्वभाव) आहेत.

*Psychological domain मनोवैज्ञानिक क्षेत्र व ईश्वर

प्रकृति सत्, रज व तम अशा त्रिगुणात्मक भावाने बनलेली आहे. या भावांचा मानसिकतेवर परिणाम असतो. हा परिणामच माया म्हणुन ओळखल्या जातो. मायेने बद्ध असल्यामुळे ईश्वराचे शाश्वत तत्व जाणत नाही. दुर्जन मला कोणत्याच रुपांत जाणत नाहीत व या मायेतच अडकुन अखेरपर्यंत बद्ध असतात. पण ईश्वराचे सत्य, शाश्वत तत्व जाणणारे, त्याचा जीवनांत आश्रय करुन या मायेवर विजय मिळवितात.

दैवी हि एषा गुणमयी मम माया दुरत्यया।
मामेव ये प्रपद्यन्ते मायां एतान् तरन्ति ते।।(७-१४)

----

७. २ जीवनविकास प्रक्रियेत ईश्वराचा आश्रय

प्रत्यक्ष व्यवहारातील कार्य व ईश्वराचा आश्रय या दोहोंचा समन्वय भगवतगीतेने साधला आहे. या संदर्भात खालीलप्रमाणे विवेचन आहे.

*ईश्वरभक्त व ज्ञानी (Wisdom)

*देवताभक्त व ईश्वर

*व्यवहारकार्यात द्वंदमुक्तिचे तत्व(Nonduality)

*अंतकाळापर्यंत नित्य ईश्वराचा आश्रय

*ईश्वरभक्त व ज्ञानी (Wisdom)

Wisdom can be defined as the capacity of an individual to integrate idealism and realism with value adding actions.

चांगले व निषिद्ध यामधुन चांगले कार्य करणारे चार प्रकारचे भक्त असतात.

१. आर्त: (दुःखमुक्तिसाठी)

२. अर्थार्थि: (भोगैश्वर्य इच्छुक)

३. जिज्ञासु: (ज्ञानाचे इच्छुक)
४. ज्ञानी: (ईश्वराची ओळख जाणुन प्रत्यक्ष ज्ञानाचा अनुभव करणारे)

यामध्ये ज्ञानी श्रेष्ठ असतो, तो ईश्वराच्या उच्चतम गतित असतो. हे जग वासुदेवमय आहे हे जाणणारा हा ज्ञानवान असतो. अनेक जन्मानंतर असे दुर्लभ जीवन लाभणारा हा महात्मा असतो.

*देवताभक्त व ईश्वर

मनुष्याला व्यवहारात सिद्धि(फल, यश) प्रिय असते. याचा सरळ सुखाशी संबंध जोडतो. म्हणुन श्रद्धेने देवता भजत असतात. त्याला घडणारे लाभ अप्रत्यक्ष ईश्वराचीच निर्मिति असते.

येथे ईश्वराची शाश्वत, अव्यय, कर्ता, भर्ता अशी ओळख नसते. म्हणुन मर्यादा येते. देवांचे भक्त देवांनाच मिळतात, तर ईश्वराचे भक्त ईश्वरधामाचाच प्रवास करतात.

अन्तवत्तु फलं तेषां तद् भवति अल्पमेधसाम् ।
देवान् देवयजो यान्ति मद् भक्ता माम् अपि।।(७-२३)

यांत ईश्वरश्रद्धा ही Strength असते. याच Strengthचा उपयोग ईश्वरज्ञान जाणुन व्यवहारकार्यातील द्वंद व निर्द्वंद भेद जाणणे व योग्य मार्गावर प्रवास करणे आवश्यक असते.

*मार्गातील द्वंद व निर्द्वंद भेद (Nonduality)

इच्छाद्वेष समुत्थेन द्वंदमोहेन भारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परतप॥(७-२७)
एषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वंदमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः॥(७-२८)

अर्थात सकाम स्थितीमुळे इच्छाद्वेष द्वंदाला मोहवश होवुन सामान्य लोकांची जीवनयात्रा चालु असते. पण जे ईश्वराचे ज्ञान जाणुन चांगले कार्य करतात, ते पापमुक्त असतात व ईश्वराची भक्ति करुन द्वंदमोहमुक्ति साधत असतात.

चांगले कार्य करणारा अर्जुन द्वंदवश होतो. याच मार्गात द्वंदमोहमुक्ति साधण्यासाठी ईश्वरज्ञान जाणुन भक्तिचे महत्व येथे सांगितले. याच ज्ञानाचा आश्रय अंतकाळापर्यंत असतो.

*अंतकाळापर्यंत नित्य ईश्वराचा आश्रय

ईश्वराचा नित्य आश्रय झाल्याने जीवनाची जरामरण अवस्था (दुःखमुक्त)सहज पार पडते. जीवनप्रवासात ते ब्रह्म, अध्यात्म, कर्म याविषयी संपुर्ण ज्ञान व महत्व जाणत असतात.

या सृष्टितील जड(क्षर) व चेतन (शाश्वत)तत्व, अधिभूत व अधिदैव तत्वाद्वारा ईश्वराची भूमिका जाणतो,
तसेच कार्यकारण भाव अधियज्ञ तत्वाद्वारा अंतकाळी जाणतो.
(पुढे अक्षरब्रह्मयोग अध्यायात ब्रह्म, अध्यात्म, कर्म व अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ या शब्दांचे स्पष्टिकरण अर्जुन मागतो . )

********************

अध्याय ७-मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

७. २/१ : "ज्ञानं ते अहं सविज्ञानं इदं वक्षामि ते अशेषतः"

(७. २)/२:

"यद् ज्ञात्वा न भूयो अन्यत् ज्ञातव्यम् अवशिष्यते"

(The end of knowledge to be known)

(७-३) :

"यतताम् अपि सिद्धानां कश्चित मां वेत्ति तत्त्वतः"

(ईश्वराची ज्ञानविज्ञान या संदर्भात ओळख व अध्यात्म)

७. ४:

"अहंकार इति इयं मे भिन्ना प्रकृतिः अष्टधा"

(७-६) :

"अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयः तथा"

(ईश्वराचा नित्य आश्रय:अनन्यभक्त)

(७-७)/१:

"मत्त परतरं न अन्यत् किञ्चित् अस्ति धनञ्जय"

(ज्ञानी)

(७-७)/२ :

"मयि सर्वम् इदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव"

(जीवनयात्रेत ईश्वराचा आश्रय)

७-७/३ :

" मयि सर्वम् इदं प्रोतं सुत्रे मणिगणा इव"

(विश्वाचे संचलन)

७. १४/१ :

"दैवी हि एषां गुणमयि मम माया दुरत्यया"

७. १४/२:

"मामेव ये प्रपद्यन्ते मायाम् एतां तरन्ति ते"

७. १६/१: "चतुर्विधा भजन्ते माम् "

(७. १६)/२:

"आर्तो जिज्ञासु अर्थार्थि ज्ञानी च भरतर्षभ"

७. १७/१ :

"तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिः विशिष्यते"

(जगातील ज्ञानविज्ञान व मानवकल्याण)

७. १७/२:

"प्रियो हि ज्ञानिनो अत्यर्थं अहं स च मम प्रियः"

७. १८/१ : "ज्ञानी तु आत्मैव मे मतम् "

७. १८/२ :

"उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मैव मे मतम् "

( ईश्वर : ज्ञानाचा स्त्रोत )

(७. १८)/३:

"आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम्"

(उर्जा आणि गति )

(७-१९)/१:

"बहुनां जन्मनाम् अन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते"

७. १९/२: "वासुदेवः सर्वमिति"

(७-१९)/३ विषय ६८२ :

" वासुदेवः सर्वम् इति स महात्मा सुदुर्लभः"

("महात्मा " The great people of the word)

७. २३:

" देवान् देवयजः यान्ति मद् भक्ता यान्ति माम् अपि"

(७-२४) :

"परम् भावम् अजानन्तो मम अव्ययम् अनुत्तमम्"

(जीवनातील ज्ञानअज्ञान)

(७-२७)/१:

"इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वंद्वमोहेन भारत"

(७-२७)/२ :

"सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परंतप "

[सामान्य जीवन (प्रकृति) vs श्रेष्ठ जीवन (संस्कृति)]

(७. २८)/१:"येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्"

७. २८/२ :

"ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः"

(७-२९)/१:

"जरामरणमोक्षाय माम् आश्रित्य यतन्ति ये"

(जो सुखमे सुमिरन करे तो दुख काहे होय)

(७-२९)/२:

"ते ब्रह्म तद् विदुः कृत्स्नं अध्यात्मं कर्म अखिलं"

(Life journey &Role of Work)

(७. ३०):

"सअधिभूतअधिदैवं मां सअधियज्ञं च ये विदुः"

**

(७-२)

********************

ज्ञानं ते अहं सविज्ञानं इदं वक्षामि ते अशेषतः।

यद् ज्ञात्वा न इह भुयो अन्यत् ज्ञातव्यम् अवशिष्यते॥

********************

(७. २): "ज्ञानं ते अहं सविज्ञानं इदं वक्षामि ते अशेषतः"

ज्ञानं ते अहं सविज्ञानं इदं वक्षामि ते अशेषतः।
यद् ज्ञात्वा न इह भुयो अन्यत् ज्ञातव्यम् अवशिष्यते॥(७-२)
भगवतगीतेतील ज्ञानाला ज्ञानविज्ञानाचा आधार आहे, हे श्रीकृष्णाने वरील संदेशातुन स्पष्ट केले.

"The man of science has learned to believe in justification, not by faith, but by verification. "
Thomas Henry Huxley,

एका राजाने साधुला आपल्या राज्यातील विकासाचे दर्शन घडविले. देवळे, धर्मशाळा दाखविल्या. मार्गात गरीब, कृश, उपाशी लोकांची वस्ती आढळली. साधुने याचे कारण विचारले. हे त्यांचे पुर्वजन्माचे नशिब आहे, असे राजा उत्तरतो. विकासाचे श्रेय स्वतःकडे व गरिबीचे खापर इतरांवर कुणावर तरी फोडतो. या प्रज्ञावादी संवयीतुन मनुष्य देवालाही सोडत नाही.

वर्तमानात समाजात अशाच आदर्शावर चर्चा होतात. समाजातील अडचणीसाठी शासन जबाबदार म्हणुन राजकिय पक्षावर दोष ढकलतात. अर्थात कोणत्याही प्रश्नाला राजकिय बनवतात.

प्रज्ञावादी संवयीत कुणाला, कुणाच्या भाष्याला समर्थन करायचे व कुणाला, कुणाच्या भाष्याला विरोध करायचा हे आधीच ठरले असते.

या पार्श्वभुमीवर प्रज्ञावादी संवय व ज्ञानविज्ञान यांतील भेदच भगवतगीतेने सर्वप्रथम नजरेस आणुन दिला. प्रज्ञावादी संवयीमुळे संवाद होत नाही. अर्जुनाने वर्तमानातील वास्तव स्विकारले, तेंव्हाच संवाद सुरु झाला.

यज्ञाद्वारे देवता भक्ति व याद्वारा परस्पर सहकार्य साधणे, या पुरातन Logicचे आधारावर कर्माद्वारे ईश्वरभक्ति अर्थात निष्काम कर्माचे प्रयोजन केले. दृढतेने व निष्ठेने कर्म घडण्यासाठी निष्काम कर्म व यासाठी कर्मात यज्ञभाव याचे स्पष्टिकरण आहे.

सत, रज, तम या त्रिगुणाने प्रकृति बद्ध असते. हे प्रकृतिचे विज्ञान आहे. याचे अव्यक्त स्वरुप व या प्रकृतिच्या अव्यक्तापलिकडे असलेले सनातन सत्य (अव्यक्तःअव्यक्तात् सनातन् ) पुरुषोत्तम (ईश्वर, गुणातीत) असे प्रकृति-पुरुष ज्ञान आहे. याप्रमाणे जीवनाचा Goal ईश्वर आहे, या आधारावर विकासाचा महामार्ग (अमृतंगमय) ठरतो. या मार्गावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति असते. यांतील ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत ठरतो. (सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते)

वर्तमान निर्विवाद ज्ञानविज्ञानाचा आहे. आपण समुहात जे भाष्य करतो, त्यालाही ज्ञानविज्ञानाचा आधार असेल तरच संवाद होतो. काय आहे? व काय हवे? यातुन चर्चेचा विषय ठरतो. प्रश्नाची पारदर्शकता असते. प्रश्नाचे निदान झाले तर उपाय मिळतो. यासाठी संवादाचे ज्ञानविज्ञान जाणणे आवश्यक असते.

Transformation of irrelevent talk into Dialogue.

प्रश्नाला ज्ञानविज्ञानाची बैठक मिळण्यासाठी श्रीकृष्णाने सर्वप्रथम प्रज्ञावादी संवय व संवादासाठी ज्ञानविज्ञानाचा आधार यांतील भेद दर्शविला. व याच संवादासाठी वर्तमानातील वास्तवाचा स्विकार याचे महत्व दर्शविले.

"We cannot change anything until we accept it. Condemnation does not liberate, it oppresses"
Carl Jung

(७. २):
"यद् ज्ञात्वा न भूयो अन्यत् ज्ञातव्यम् अवशिष्यते"
(The end of knowledge to be known)

विज्ञानात दररोज भर पडत असते. ज्ञानविज्ञानाच्या कक्षाची व्याप्ति वाढते. समाजसंचलनात याच ज्ञानविज्ञानाचा उपयोग होतो. समाजव्यवस्थेचा मनुष्य घटक असतो. मनुष्य याच ज्ञानविज्ञानाचा (त्याच्या Perception नुसार) विकासात(जीवनाचे संचलनात) प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे उपयोग करतो.

कोणताही मनुष्य त्याला जीवनाविषयी जसे ज्ञान असेल तसाच जगत असतो. अर्जुन विद्वान, कर्तृत्ववान, शुर होता पण जीवनाविषयी त्याला जे ज्ञान असते त्याचा उपयोग तो युद्धक्षेत्रावर करतो. हा उपयोग चुकीच्या पद्धतीने होतो. निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी, स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. स्वतःच्या विकासात हा Barrier असतो. यामुळेच जीवनसंचलनातील ज्ञान हा विषय पटलावर येतो व भगवतगीता विज्ञानासह हे ज्ञान स्पष्ट करते. याच संदर्भात जीवन संचलनातील अंतिम ज्ञान या ज्ञानाला म्हटले आहे. हेच ज्ञान अध्यात्मज्ञान म्हणुन ओळखल्या जाते.

ज्ञानं ते अहं सविज्ञानं इदं वक्षामि ते अशेषतः।
यद् ज्ञात्वा न भूयो अन्यत् ज्ञातव्यम् अवशिष्यते।।(७-२)

एखादा कारखाना चालावा तसे विश्वाचे संचलन सुरु असते. या विश्वात घटना घडतात व निसर्गनियमानुसार Automatic संचलनकार्य सुरु असते. या विश्वसंस्थेचा मनुष्य एक घटक असतो. या संचलनात प्रकृति(निसर्ग) व ईश्वर(पुरुषोत्तम) हे दोन महत्वाचे घटक असतात. संचलनात ईश्वराची भूमिका अध्यक्षाची असते, तर प्रकृतिची भूमिका व्यवस्थापकाची असते.

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्।
हेतुना अनेन् कौंतेय जगत् विपरिवर्तते।।(९-१०)

व्यवस्थापक बदलत असतो, तर अध्यक्ष मालक असतो, कायम असतो. याच ईश्वराचा अंश मनुष्याच्या हृदयस्थानी असते . याच आधारावर"अमृतत्वायकल्पते" (अमृतंगमय) हा मनुष्याच्या विकासाचा राजमार्ग बनतो. या मार्गावर ईश्वराला (अध्यक्षाला) कार्य समर्पित होते. हीच ईश्वरभक्ति असते.

भगवतगीता याच ईश्वराचे ज्ञान विज्ञानासह स्पष्ट करते. अष्टप्रकृति व त्याची "अव्यक्त" परा प्रकृति यापासुन जीवभूतांची धारणा होते. ईश्वर याच अव्यक्ताहुन श्रेष्ठ अव्यक्त ठरते.

अपरा इयं इतः तु अन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्।
जीवभूतां महाबाहो यया इदं धारयते जगत् ।। (७-५)
परः तस्मात् तु भावो अन्यो अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः।(८-२०)

सृष्टिसंचलनातील सर्व विधायक, उर्जावान समृद्ध शक्ति याच ईश्वराच्या विभूति आहेत. अर्थात सृष्टिसंचलनात ईश्वररुपाने विधायक Energy कार्यरत असते. याला सकारात्मक Energy म्हणुन समाज ओळखत असतो.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।(११-५५)

ईश्वरावर श्रद्धा असणारे चार levelवर भक्त असतात. (आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु, ज्ञानी). यातील ज्ञानी(अव्यक्त) ईश्वराचे ज्ञान जाणतो व व्यवहारात कार्यरत असला तरी ईश्वराचेच (विधायक)कार्य करीत असतो. यामुळे मार्गात विचलित होत नाही.

Default व्यवहारमार्ग व राजमार्ग यात कार्य(State of art) Common असते. व्यवहारमार्गात कार्याची सकाम मानसिकता असते, तर राजमार्गावर निष्काम मानसिकता असते. राजमार्गाच्या अज्ञानामुळेच मनुष्य जीवनमार्गात विचलित होतो. विचलित असला तरी स्वतःला योग्य ठरविण्यासाठी आपले सिमित ज्ञान वापरतो. पण या प्रक्रियेत मानसिक शक्तिचा (साहसाचा ) अभाव जाणवतो. म्हणुन अर्जुनाला म्हटले,

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप।(२-३)

म्हणुन जीवनसंचलनातील अखेरचे ज्ञान(यानंतर जाणण्यालायक कांहीही नाही)ज्याला संबोधले त्याचा आदर करणे अपरिहार्य ठरते. भगवतगीता याच ज्ञानाची ओळख देते.

*******

(७-३)

*******************

मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद् यतति सिद्धये।

यतताम् अपि सिद्धानां कश्चित मां वेत्ति तत्त्वतः।

*******************

(७-३) :

"यतताम् अपि सिद्धानां कश्चित मां वेत्ति तत्त्वतः"

(ईश्वराची ज्ञानविज्ञान या संदर्भात ओळख व अध्यात्म)

जगात ज्ञानविज्ञान आले . विज्ञानाने जगाला बदलविले. या सृष्टितील Cause &Effect(कारण व परिणाम) विज्ञानाच्या कसोटीवर स्पष्ट होतात, अशी विज्ञाननिष्ठांची धारणा असते. या ज्ञानविज्ञान क्रान्तिमुळे "विज्ञान vs. धर्म, ईश्वर " असा वाद समाजात निर्माण झाला. यामुळे सृष्टिनिर्मितिसाठी ईश्वराचा कांहीएक संबंध नाही असा मानणारा वर्ग समाजात असला तरी ईश्वराला मानणाऱ्या व त्याच्यावर श्रद्धा असणांऱ्यांची संख्या अधिक आहे. हाच वाद भगवदगीतेने ज्ञानविज्ञानयोगाद्वारे

सोडविला आहे. अर्थात ज्ञानविज्ञान या संदर्भातच ईश्वराची ओळख दिली.

मय्यासक्त मनाः पार्थ योगम् युञ्जन् मद् आश्रयः।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तत् शृणु।।(७-१)

ईश्वरावर श्रद्धा असणाऱ्या हजारो लोकांपैकी एखादाच सिद्ध होण्यासाठी (ईश्वरप्राप्तिसाठी) ईश्वराला भजतो. अशा सिद्ध होण्यासाठी भजणाऱ्या योग्यांमध्ये एखादाच ईश्वराला तत्त्वतः अर्थात ज्ञानविज्ञान या संदर्भात जाणतो,

ज्ञानम् तेअहं सविज्ञानम् इदं वक्ष्यामि अशेषतः।(७-२)
मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद् यतति सिद्धये।
यतताम् अपि सिद्धानां कश्चित मां वेत्ति तत्त्वतः।(७-३)

ईश्वरावर श्रद्धा असणाऱ्या भक्ताचे आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु व ज्ञानी असे चार प्रकार यामुळेच असतात. ज्ञानी भक्त ज्ञानविज्ञान या संदर्भात ईश्वराची ओळख जाणतो.

जड(अष्टप्रकृति) प्रकृतिला अपरा प्रकृति म्हटले आहे व चेतन प्रकृतिला परा प्रकृति संबोधले आहे, ज्यामुळे विश्वनिर्मिति होते.

अपरा इयं इतः तु अन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्।
जीवभूतां महाबाहो ययाइदं धार्यते जगत्।(७-५)

परा प्रकृति अव्यक्त, अक्षरब्रह्म आहे, ज्याद्वारा सृष्टिनिर्मिति व लय होतो. ज्याचा लय होत नाही असे अविनाशी तत्व सर्वश्रेष्ठ असते, जी ईश्वराची परम गति आहे. याच तत्वाला सर्व विश्वाचे मुळ म्हटलेले आहे.

परः तस्मत् तु भावो अन्यो अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः।
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति।(८-२०)
अव्यक्तोअक्षर इति उक्तः तम आहुः परमां गतिम्।
यं प्राप्य न निवर्तन्ते तद् धाम परमं मम।(८-२१)

सर्व विश्वाचे मुळ असलेल्या शाश्वत ईश्वराची ओळख ज्ञानविज्ञान या संदर्भात सृष्टिसंचलनातील परमगति अशी आहे. याच ईश्वराला

(जीवात्मा-आत्मा, अध्यात्म या संदर्भात) परमात्मा, (प्रकृति-पुरुष या संदर्भात)पुरुषोत्तम म्हटले आहे.

यस्मात् क्षरम् अतीतो अहं अक्षराद् अपि च उत्तमः।
अतोअस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः।(१५-१८)

याच ज्ञानाच्या आधारावर बंधन-मोक्ष हे logic जीवनाचे Purpose व Meaning या संदर्भात आलेले आहे. ईश्वराची भक्ति म्हणजे "आत्मोन्नति " हा विकासप्रवास (अमृतत्वाय कल्पते), निष्काम कर्म, अनन्यभक्ति असे विविध संदर्भ आलेले आहेत. हे सर्व ज्ञान भगवदगीतेत स्पष्ट होण्याचे कारणच अर्जुनाच्या युद्धपुर्व भूमिकेत आहे.

मनुष्य स्वतःला योग्य समजुनच जगत असतो. जे अर्जुनाचे नियतकार्य होते ते अंमलात आणतांना त्याला दुःख जाणवते. सुखासाठी मनुष्य जगत असतो. पण स्पष्टपणे मार्गात दुःखरुपी खड्डा दिसत असतांना पुढे जाणार कसा?

आपल्या कार्याला अर्जुन धर्मविरोधी ठरवितो. मार्गात अर्थात नियतकार्यात संशय असतो. मार्गात अर्थात कार्याच्या निश्चयात संशय अडथळा असतो. हा अडथळा दुर करण्यासाठीच ज्ञान

आहे. ही जीवनविकास या संदर्भात ज्ञानाची महति भगवदगीता सांगत आहे. "ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम् " व याच ज्ञान या संदर्भात जीवनमार्गात ईश्वराचा आश्रय येतो.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।(९-३३)

Replacement:

दुःखाचे कारण अशाश्वताचे Attachment असते. शाश्वताचे Attachment हे Replacement असते. याचसाठी ज्ञानविज्ञान या संदर्भात ईश्वराची ओळख व भक्तिचे महत्व स्पष्ट होते. अर्थात बंधन-मोक्ष या संदर्भात मार्गातील द्वन्द्व (अडथळा) चे Replacement द्वन्द्वमुक्ति ( निर्द्वन्द्व) असे होते.

द्वन्द्ववश:

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत।(७-२७)

निर्द्वन्द्व :

येषा तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।

ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)

*********

(७-४)

**********************

भूमि आपः अनलः वायुः खं मनः बुद्धिः एव च।

अहंकार इति इयं मे भिन्ना प्रकृतिः अष्टधा।।

**********************

(७. ४):"अहंकार इति इयं मे भिन्ना प्रकृतिः अष्टधा"

या जीवसृष्टित सृष्टिसंचलनात सर्व जीवांचे योगदान असते. मनुष्य सर्व जीवांत श्रेष्ठ आहे. त्याने आपली भूमिका जाणावी, शक्ति जाणावी व भूमिका सक्षम करावी, याच हेतुने भगवतगीता अशाश्वत व शाश्वत यातील भेद जाणुन नित्य शाश्वताचा आश्रय करण्याची कला सांगत आहे. ही कला "जागरण" स्वरुपाची आहे. (Know Thyself) "जागरण" म्हणजे स्वतःतील शक्ति जाणणे. जगात शक्तिची स्पर्धा असते. जगाची पर्वा न करता जगणे(क्षयाय जगतो अहितः) हा असुर भाव व "जगतहिताय" हा दैवी भाव असतो. या स्पर्धेत चांगलेपणा (दैवीभाव) शक्ति व्हावी, दुर्बलता बनु नये, याच हेतुने भगवतगीता "जागरण" करते.

मा शुचः संपदम् दैवीं अभिजातो असि पांडव।(१६-५)

अशाश्वत- शाश्वत, प्रकृति-ईश्वर या संदर्भात अहंकार-ईश्वर यांची जीवनविकासातील भूमिका भगवतगीता स्पष्ट करते.

अहंकार इति इयं मे भिन्ना प्रकृतिः अष्टधा। (७-४)

अपरा इयं इतः तु अन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।(७-५)

अहंकार( पंचमहाभूत, मन, बुद्धि, अहंकार या अष्टप्रकृतितील) प्रकृतिचा एक भाग आहे. "Self" या संदर्भात अहंकार अशाश्वताचे प्रतिनिधित्व करते. अहंकार Mind functioning मधील (मन, बुद्धि, चित्त, अहंकार) एक factor असतो. यामुळे अहंकाराचा नित्य आश्रय असतो!म्हणुनच शेवटी अहंकाराचा आश्रय कि ईश्वराचा आश्रय?असे Option अर्जुनासमोर दर्शविले आहे.

प्रत्येक मनुष्याला आपले अस्तित्व प्रिय असते. हे त्याचे SELF असते. मनुष्य व्यवहारात कार्यरत असतो. केवळ अशाश्वताचेच ज्ञान असल्यामुळे कार्य प्राप्तिसाठी केल्या जाते व "मला कांहीच नको"ही अर्जुनाची भूमिका असते. यामुळे अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो व आपण योग्य आहो हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो.

अहंकार विमुढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

समाजातील नकारात्मक भाष्य याच चाकोरीत (स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी) चालत असते. अर्थात नकारात्मक भाष्य अहंकाराचाच अविष्कार असतो. याच अहंकारामुळे स्वतःची शक्ति जाणत नाही. अर्थात अहंकार अज्ञानाला जोपासत असतो, स्वतःच्या जीवनाचे महत्व जाणत नाही व शक्ति विकसित करण्यासाठी अडथळा ठरतो.

"अशाश्वताकडुन शाश्वताकडे" हा जीवनविकासाचा प्रवास असतो. व्यवहारातील कार्य या प्रवासातील साधन असते. प्रत्यक्षात कार्य करतांना ईश्वरभक्तिसाठी कार्य करणे, यातच नित्य ईश्वराचा आश्रय याचे रहस्य आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।

"दुखमे सुमिरण सब करे, सुखमे करे न कोय।
जो सुखमे सुमिरण करे तो दुख काहे होय।"

*****************

(७-६)

*************************

एतद् योनीनि भूतानि सर्वानि इति उपधारय।

अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयः तथा।।

*************************

(७-६) :

"अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयः तथा"

(ईश्वराचा नित्य आश्रय:अनन्यभक्त)

ज्ञानविज्ञानाच्या आधारे ज्या ईश्वराची ओळख होते, त्याचा संबंध मनुष्याशी असतो. हाच ईश्वर अध्यक्ष या भूमिकेतुन सृष्टिचा आधार आहे. सृष्टिची निर्मिति व प्रलय याचे कारण आहे.

अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयः तथा।

मत्त परतरं न अन्यत् किंचित अस्ति धनंजय।

मयि सर्वम् इदं प्रोतं सुत्रे मणिगणा इव।।(७-७)

मनुष्य जसा ईश्वराला ओळखतो तसा त्याला भजत असतो. रामायणात श्रीराम हनुमंताला म्हणतात,

सो अनन्य जाकें असि मति न टरइ हनुमंत।

मै सेवक सचराचर रुप स्वामि भगवंत॥(३-किष्किन्धा)

"हे चराचर(जड-चेतन) विश्व ईश्वराचे (माझ्या स्वामिचे)रुप आहे व मी त्याचा सेवक(भक्त) आहे" या श्रद्धेवरुन ज्याची बुद्धि ढळत नाही तो अनन्यभक्त होय.

सामान्य मनुष्याची जीवनयात्रा :

जीवनाच्या "सकाम "mode मध्ये असल्यामुळे अर्जुन दुःखी होतो व निष्क्रियतेला धर्म करतो. जे अधर्म नाही तो धर्म !अशी भूमिका घेतो.

" मी वाईट करीत नाही किंवा चुकीचे कार्य करणे मला आवडत नाही, सत्य आचरणाने राजकारण होत नाही किंवा श्रीमंत होता येत नाही म्हणुन मी सरळसाधे जीवन जगतो. "ही भूमिका घेवुन स्वतःला आदर्श ठरविण्याचा मनुष्याचा प्रयत्न होतो. चांगलेपणा, आदर्श याविषयी समाजातील हा सर्वात मोठा भ्रम असतो.

अर्जुनाचे स्वभावनियतकार्यच Warrier चे असते. भगवतगीता म्हणते, जसे धुरावाचुन अग्नि नाही, तसे दोषच काढायचे असेल तर प्रत्येक कार्यात दोष दिसेल.

सर्वारम्भाहि दोषेण धूमेन् अग्निः इव आवृताः।(१८-४८)

प्रत्येक कार्यात दोष शोधण्याच्या मानसिकतेमुळे मनुष्य स्वतःच द्वन्द्ववश होतो व बंधनात सापडतो. मनुष्याला स्वतः मात्र या बंधनातुन मुक्त व्हायचे असते. म्हणुन अध्यात्मज्ञानाचा उपयोग आलेला आहे. ज्यामुळे जीवनात नित्य ईश्वराचा आश्रय असतो. यालाच अनन्यभक्ति म्हटले आहे.

अपिचेत्सु दुराचारो भजति माम् अन्यभाक्।
साधुःएव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः॥(९-३०)

अनन्यभक्ति :

अनन्यभक्ति म्हणजे नित्य ईश्वराचा आश्रय असणे. भगवतगीतेत अनन्यभक्तिलाच राजविद्या, राजगुह्यज्ञान म्हटले. कर्मयोग, भक्तियोग व ज्ञानयोग यांचा समन्वयच अनन्ययोगात साधल्या जातो. जीवनात नित्य ईश्वराचा आश्रय असणे याचाच अर्थ जीवनयात्रेतील Activity त अध्यात्मज्ञानाचा उपयोग करणे. यज्ञ(नियतकार्याद्वारे सृष्टिचक्रप्रवर्तनास सहकार्य), दान, तप(काया, वाचा, मन यांचे आचरण) या त्रिविध कार्यात अध्यात्माचा उपयोग करणे म्हणजेच जीवनाच्या सात्त्विक mode मध्ये कर्म घडणे, जी कर्मे व्यवहारात घडत असतात. म्हणुनच भगवतगीतेने ईश्वराचा संदेश पोहोचविला आहे,

तस्माद् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च ।(८-७)

याचा अर्थ याच कुरुक्षेत्रावर रात्रंदिवस युद्ध कर असे अर्जुनाला म्हटले नाही किंवा या प्रसंगी निःशस्त्र होवुन ध्यानाला बैस असेही म्हटले नाही. अर्जुनाला त्याच्या प्रश्नाचे निश्चित उत्तर हवे होते, ज्यामुळे युद्ध करायचे किंवा नाही याचा निर्णय त्याला घ्यायचा असतो.

सार :

जीवनयात्रेतील अडथळयाची ओळख करुन तो अडथळा दुर करण्यासाठी अध्यात्मज्ञानाचा उपयोग भगवतगीतेने केलेला आहे.

“The spiritual journey is individual, highly personal. It can't be organized or regulated. It isn't true that everyone should follow one path. Listen to your own truth. "

Ram Dass

*********

(७-७)

********************

मत्त परतरं न अन्यत् किञ्चित् अस्ति धनञ्जय।

मयि सर्वम् इदं प्रोतं सुत्रे मणिगणा इव।

********************

(७-७)/१:

"मत्त परतरं न अन्यत् किञ्चित् अस्ति धनञ्जय"

(ज्ञानी)

भगवदगीतेत "ज्ञान" या संदर्भात ज्ञानविज्ञान, अध्यात्म, शास्त्र, धर्म हे शब्द आलेले आहेत.

१. ज्या विश्वात मनुष्यजन्म आलेला आहे, त्याचे ज्ञानविज्ञान जाणण्यासाठी ज्ञानविज्ञानयोग स्पष्ट केला आहे. याद्वारे अध्यात्माची ओळख दिलेली आहे.

ज्ञानं तेअहं सविज्ञानं इदं वक्ष्यामि अशेषतः।(७-२)

ते ब्रह्म तद् विदुः कृत्स्नं अध्यात्म कर्म च अखिलं।(७-२९)

२. पुरुषोत्तमयोगाद्वारे निष्काम कर्माचा आधार (Detachment) व शास्त्र स्पष्ट केले आहे.

असंगशस्त्रेण दृढेन छित्वा।(१५-३)

इति गुह्यतमं शास्त्रं इदं उक्तं मया अनघ।(१५-२०)

३. गुणातीत होणे, आत्मोन्नतिचा अर्थात जीवनविकासाचा आधार आहे. हे गुणत्रयविभागयोगात स्पष्ट केले. शाश्वत धर्माच्या शास्त्राचा आधार आहे.

शाश्वतस्य धर्मस्य सुखस्य एकान्तिकस्य च।(१४-२७)

याच धर्माला अनन्यभक्तियोगात(समर्पण) स्पष्ट केले आहे. पुढे याचे स्पष्टिकरण सगुणभक्तियोगात स्पष्ट झाले आहे.

अनन्येन् एव योगेन् मां ध्यायन्त उपासते।(१२-६)

ये तु धर्मम् अमृतं इदं यथा उक्तं पर्युपासते।(१२-२०)

४. भगवदगीतेतील धर्माची Priority ईश्वरभक्ति आहे, व कार्याद्वारे भक्ति साध्य करणे याचे शास्त्र ही priority ठरते.

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।(१८-६६)

याचाच अर्थ ज्या धर्माला ज्ञानविज्ञानाचा आधार आहे त्यालाच भगवदगीतेने धर्म संबोधिले आहे. याच अनुषंगाने अध्यात्मज्ञान (आत्मज्ञान, ईश्वराचे ज्ञान) स्पष्ट केले आहे.

सर्व विश्वाचे मुळ ईश्वर आहे.
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयः तथा।(७-६)
मत्त परतरं न अन्यत् किञ्चित् अस्ति धनञ्जय।
मयि सर्वम् इदं प्रोतं सुत्रे मणिगणा इव।(७-७)

दैवीगुण संपत्तिगुण धारण असलेले प्रकृतिच्या गुणांना जीवनविकासाद्वारे पार करतात. असा भक्त ज्ञानी भक्त ठरतो.
त्रिभिः गुणमयि भावैः एभिः सर्वम् इदम् जगत् ।
मोहितं न अभिजानन्ति मामेभ्यः परम् अव्ययम् ।(७-१३)
मामेव ए प्रपद्यन्ते मायाम् एतान् तरन्ति ते।(७-१४)

सार :
ज्याला समाज अंधश्रद्धा(ज्याला बुद्धि गहाण टाकणे, बुद्धिला पक्षाघात होणे असेही म्हणतात) म्हणुन ओळखतो, त्या अंधश्रद्धेला भगवदगीतेत कुठेही स्थान नाही. यातील शास्त्र,

अध्यात्म याला ज्ञानविज्ञानाचा आधार आहे. मानवी दुर्बलता, भय, अंधश्रद्धा विकासातील अडथळे असतात.

Human spirit is the ability to face the uncertainty of the future with curiosity and optimism. It is the belief that problems can be solved, differences resolved. It is a type of confidence. And it is fragile. It can be blackened by fear and superstition.

Bernard Beckett

********

(७-७)/२ :

"मयि सर्वम् इदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव"

(जीवनयात्रेत ईश्वराचा आश्रय)

प्रकृति व ईश्वर याचे ज्ञान विज्ञानासह भगवदगीतेच्या ज्ञानविज्ञानयोगात आलेले आहे.

१. ईश्वराचे या विश्वातील अस्तित्व :

मयि सर्वम् इदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव।(७-७)
रसोअहंअप्सु कौन्तेय प्रभाअस्मि शशिसूर्ययोः।
प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु।।(७-८)

हे विश्व मोत्याच्या हाराप्रमाणे एका धाग्यात ओवलेले आहे. जगातील चांगलेपणा, पुरुषार्थ, पाण्यातील रस, ॐकार प्रणव, Space मधील शब्द ईश्वराचे अस्तित्व दर्शविते.

२. प्रकृति व माया

मनुष्याचे जगणे प्रकृति गुणांच्या(सत, रज व तम) effect नुसार असते. यानुसार कार्यरत असतो. माया याच गुणांचा effect असतो, ज्यामुळे मोह होतो व मनुष्याला त्याच्या मुळ ज्ञानाचा विसर पडतो. ही वस्तुस्थिति असली तरी ईश्वराच्या आश्रयाने तरुन जातो. अर्थात जीवनाचा भवसागर पार होतो.

मामेव ये प्रपद्यन्ते मायाम् एतान् तरन्ति ते।(७-१४)

३. ईश्वराचा आश्रय :

जरामरणमोक्षाय माम् आश्रित्य यतन्ति ये।

ते ब्रह्म तद् विदुः कृत्स्नं अध्यात्मं कर्म च अखिलं॥(७-२९)

वृद्धावस्था, मृत्यु जीवनाच्या अपरिहार्य अवस्था आहे. या दुःखापासुन मुक्ति मिळावी यासाठी जीवनात ईश्वराचा आश्रय करणारे जीवनविकासात कर्म, अध्यात्म, ब्रह्म जाणतात.

४. ईश्वरगति :

आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम्।(७-१८)

ईश्वराची भक्ति करणारे आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु व ज्ञानी असे चार प्रकारचे सत्कार्य करणारे भक्त असतात. यांत ज्ञानी होणे हा ईश्वराच्या आश्रयाचा हेतु असतो. मनुष्यजीवनात दुःख असते म्हणुन आव्हान असते. म्हणुन म्हटले,

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

यामुळे जीवनमार्ग " अमृतत्वाय कल्पते"(२-१५) असा होतो.

या मार्गावर स्वधर्माचरणात कार्य (ईश्वराला) समर्पित होते. अथवा कार्याचा एकनिश्चय (Determination) असतो. फल ईश्वराला समर्पित (फलत्याग) करतो.

५. महात्मा :

बहूनां जन्मनामअन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते।

वासुदेवः सर्वम् इति स महात्मा सुदुर्लभः॥(७-१९)

अर्थात हे विश्व वासुदेवमय आहे असे जाणुन ईश्वराला भजतो.
(अनेक जन्मानंतर लाभलेली ही स्थिति असते)

********

७-७/३(विषय ७६०) :

" मयि सर्वम् इदं प्रोतं सुत्रे मणिगणा इव"

(विश्वाचे संचलन)

१. ईश्वर, सृष्टिसंचलन व यज्ञ(निष्काम कर्म)

* एकाच ईश्वररुपि धाग्यात मणि ओवल्याप्रमाणे हे विश्व ओवलेले आहे.

मत्त परतरं न अन्यत् किञ्चित् अस्ति धनञ्जय।

मयि सर्वम् इदं प्रोतं सुत्रे मणिगणा इव।।(७-७)

*विश्वाच्या संचलनात अध्यक्ष ही ईश्वराची भूमिका असते.

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।

हेतुना अनेन कौंतेय जगत् विपरिवर्तते।।(९. १०)

*अन्नामुळे विश्वाचे (प्राणिमात्राचे) पोषण होते. पर्जन्यामुळे अन्न पिकते.

विश्वातील यज्ञामुळे पर्जन्य होते. सृष्टिचक्रसंचलन यज्ञामुळे (Transformation) होत असते. यज्ञ कर्माद्वारे होते.

अन्नात् भवन्ति भूतानि पर्जन्यात् अन्न संभवः।

यज्ञात् भवन्ति पर्जन्यो यज्ञः कर्म समुद् भवः ।(३-१४)

* कर्माच्या "यज्ञ" या संज्ञेद्वारा मनुष्य सृष्टिचक्रप्रवर्तनास सहकार्य करतो. जो सहकार्य करीत नाही त्याचे जीवन व्यर्थ ठरते.

एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्तयतीह यः।

अघायु इंद्रियरामो मोघं पार्थ स जीवति।।(३-१६)

* Transformation (बदल)

यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलियते।(४-२३)

या विश्वात कर्मरुपाने अनेक यज्ञ(Transformation प्रक्रिया) घडतात.
एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।(४-३२)

*सर्व कर्मांचे ज्ञानात विलिनिकरण होते.
श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञात् ज्ञानयज्ञः परंतप।
सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।।(४. ३३)
*यज्ञासाठी कर्म करणे म्हणजे ईश्वराला समर्पित कर्म करणे.
तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर।
असक्तो हि आचरन् कर्म परम् आप्नोति पूरुषः।(३-१९)
२. मनुष्य, ईश्वर व चांगलेपणा(दैवी)
सर्वांच्या प्राणतत्वात ईश्वर आहे. जसे उर्जेने यंत्र चालतात तसे हीच ईश्वर उर्जा मानवी यंत्र चालवित असते.
ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया ।।(१८-६१)

मनुष्याच्या चांगलेपणाचा संबंध दैवीगुणसंपत्तिशी असतो.

दैवी संपद् विमोक्षाय निबन्धाय आसुरी मता।(१६-५)

समाजाची अधर्म अवस्था(शोषण) धर्मग्लानिची अवस्था ठरते. धर्माची पुनःस्थापना करुन शोषणमुक्त व्यवस्था निर्माण करणे यासाठी ईश्वराची उर्जा मनुष्याचे ठायी सक्रिय होते.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिःभवति भारत।(४-७)

ईश्वराचे कार्य जाणुन ईश्वरभक्तिसाठी कार्य करणे. (Growth mindset)

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।

निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव।।(११-५५)

३. वर्तमानात विकासमार्गावर असणे.

(Fixed mindset vs. Growth mindset)

In a chaotic world of rapid, revolutionary change, learning to adapt, manage and lead the change process is essential to survival.

It is mindset that makes wonder.

Fixed mindset—a belief that one cannot change one’s abilities or personal characteristics such as intelligence.

A slave mentality is when a person :Is one of feeling inferior or of feeling lost without hope, a feeling that we do not have the power to significantly alter our own circumstances.

Change of mindset is learning to navigate change, It is shift from a fixed mindset toward a growth mindset.

A growth mindset—a belief that one can improve aspects of oneself with time and effort.

अर्जुनाला दुःख होते व दुःखमुक्तिसाठी "निष्क्रियता" (ना रहे बांस ना बजे बांसुरी) हा उपाय करतो. ही अवस्था "Fixed mindset " ची असते. यामध्ये विकास थांबतो. भगवदगीता विकासमार्गाचे ज्ञान (आत्मोन्नति) सांगते. जीवनविकासाच्या या राजमार्गावर (अमृतंगमय) विचलित होत नाही. हा Growth mindset असतो.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

**********

(७-१४)

*******************

दैवी हि एषां गुणमयी मम माया दुरत्यया।

मामेव ये प्रपद्यन्ते मायाम् एतान् तरन्ति ते।।

*******************

(७-१४):

"दैवी हि एषां गुणमयि मम माया दुरत्यया"

विश्वनिर्मितीतील प्रकृति व पुरुष या संदर्भात त्रिगुणात्मक प्रकृति व गुणातीत ईश्वर अशी ओळख भगवतगीता जीवनविकास या संदर्भात करुन देते.

"दैवी हि एषां गुणमयि" अर्थात प्रकृति ईश्वराची त्रिगुणी(सत, रज व तम) माया असते. व ही"त्रिगुणी माया" मनुष्याला कधी सुखावते तर कधी दुखावते. अर्थात ही त्रिगुणी माया ईश्वराची आहे हे जाणले तर मनुष्य ईश्वराला शरण जातो व वास्तव स्विकारतो.

श्रीकृष्ण अर्जुनाचा रथ शत्रुपक्षात असलेले पितामह व गुरु यांचेसमोर उभा करतात. अर्जुनाच्या दुःखात ईश्वराचीच माया असते. अर्जुन वास्तव स्विकारतो व याच ईश्वराला (श्रीकृष्णाला) शरण जातो . श्रीकृष्ण ईश्वराची ओळख करुन देतात.

दैवी हि एषां गुणमयी मम माया दुरत्यया।(७-१४)

"दुरत्यया" याचा अर्थ मनुष्य स्वतःला कधी सुखी कधी दुःखी, कधी ज्ञानी कधी अज्ञानी, कधी बलवान कधी दुबळा समजतो. अर्थात सुखात तल्लीन होतो तसात दुःखातही तल्लीन होतो. टिका करण्यात तल्लीन होतो तसा स्तुती करण्यातही तल्लीन होतो. यालाच भगवतगीता राजस कर्ता संबोधत आहे.

हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः।(१८-२७)

स्वामी विवेकानंदांनी शतकानुशतके गुलामीत राहीलेल्या भारतीयांच्या मानसिकतेचा अभ्यास केला. व मानसिक दुर्बलता हटवा याचसाठी अध्यात्माचा उपयोग करा हा संदेश दिला. कुणी महापुरुष म्हणतो, मी लोकांना चंद्र दाखवतो पण लोक बोट पाहण्यातच तल्लीन आहेत. याच

प्रस्थापित मानसिकतेमुळे (Conditioned mindset) भारतिय संदेश ग्रहण करणार नाही तर स्वामी विवेकानंद किती महान होते

अशी स्तुतीपाठ करण्यातच तल्लीन होतील असे भाकित केले होते.

मनुष्य व्यवहारात जगत असतो. यात सुखदुःख असते. सुख हवे असले तरी दुःख वाट व पाठ सोडीत नाही. व मनुष्याला हतबल झाल्यासारखे वाटते. ईश्वराची माया पार करण्यास कठिण आहे.

मामेव ये प्रपद्यन्ते मायाम् एतान् तरन्ति ते॥(७-१४)
अर्थात ईश्वराला शरण गेले तर मार्ग सापडतो. भवसागरात तरुन जातो. ईश्वरशरणता म्हणजे जीवनविकासाचा मार्ग "अमृतंगमय" करणे, या मार्गावर मार्गातील संशय ईश्वरज्ञानाने दुर करणे, ज्यामुळे एकनिश्चय होतो. कार्य/ फल ईश्वराला समर्पण करतो. अर्थात व्यावहारिक (सकाम) मार्ग निष्काम कार्यासाठी "अमृतत्वाय कल्पते" या Standard मार्गात Transform करणे.

तात्पर्य :हे विश्व व त्यांत आपले सिमित काळासाठी असलेले जीवन Complicated वाटत असले तरी जीवनमार्गातील Tie सोडविण्यासाठी ईश्वरज्ञानाचा उपयोग होतो. यासाठी (भवसागर )तरुन जाणे या शब्दाचा प्रयोग केलेला आहे. ईश्वरशरणता अहंकाराचे Replacement असते.

मत् चित्तः सर्वदुर्गाणि मद् प्रसादात् तरिष्यसि।
अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि।।(१८-५८)

******

७. १४/२ :

"मामेव ये प्रपद्यन्ते मायाम् एतां तरन्ति ते"

माया Delusion

माया म्हणजे Delusion, False belief. मनुष्य या Delusion trap मध्ये फसलेला असतो, तेंव्हा हेच अज्ञानाचे कारण ठरते. पतंगा दिव्याला आकर्षित होतो व स्वतःचा घात करुन घेतो. असे फसवे आकर्षण माया असते.

यथा प्रदिप्तं ज्वलनं पतंगा।

विशन्ति नाशाय समृद्धवेगाः।(११-२९)

जीवनात द्वंद्वमोहामुळे मायेचे जाळे विणत असतो. जीवनमार्गात योग्य- अयोग्य, चांगले-वाईट, सुख-दुःख, स्वहित-परहित, श्रेष्ठ-कनिष्ट अशा अनेक द्वंद्वांचा सामना असतो.

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वन्दमोहेन भारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्तिं परंतप।।(७-२७)

विकासाचे Logic

दैवी हि एषां गुणमयि मम माया दुरत्यया।
मामेव ये प्रपद्यन्ते मायाम् एतां तरन्ति ते।।(७-१४)

ईश्वरज्ञान हे जीवनाचे अंतिम Goal जाणले तर "बुद्धियुक्त" ही अवस्था द्वंद्वमोहाचा Barrier breaker असतो. अर्थात जाळ्यातुन मुक्त होतो.

ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।(७-२८)

भगवतगीतेत "युक्त " हा शब्द जीवनविकासासाठी संस्कारीत असणे या अर्थाने योजीलेला आहे.

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

विकास मार्ग

विकासाचा मार्ग चालणाऱ्यालाच कार्याचे महत्व कळते, अडथळ्याची ओळख होते. धर्माचा चक्रव्युह कळतो. माया कळते. ही माया पार करण्यास कठिण असली तरी ईश्वराकडे जाणाऱ्या मार्गावर जीवनयात्रा करणारे यातुन पार होतात. हाच मार्ग "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) असतो.

मद् चित्तः सर्वदुर्गाणि मद् प्रसादात् तरिष्यसि।(१८-५८)

कर्म

Work gives you meaning and purpose and life is empty without it.

Stephen Hawking

या विश्वातील व्यवहाराचा योग्य-अयोग्य हाच आधार असतो. चांगल्या मनुष्यासाठी योग्य-अयोग्यचा आधार चांगले-वाईट असते. अर्जुन चांगला मनुष्य आहे. आनंदाने युद्धाचे कार्य स्विकारतो व युद्धक्षेत्रावर येतो. युद्धासाठीच शस्त्र हाती घेतो. पण दुसऱ्याच क्षणी दुःखी होतो. आता युद्धासाठी त्याची Priority त्याचे सुखदुःख बनते. युद्ध केले तर दुःखच होणार म्हणुन युद्ध न करणे योग्य समजतो.

Delusion vs. Ignorance:

भाष्य हे communicationचे साधन असते. कधी हे भाष्य आपल्या हिताचे असावे असे ऐकणारा अपेक्षा करतो, तर बोलणारा त्याच्या सोयीने(स्वसमाधानासाठी, स्वहितासाठी) बोलत असतो. स्वतःची भूमिका धर्माची भूमिका आहे व हेच सिद्ध करण्यासाठी अर्जुन धर्म सांगतो. अयोग्यला योग्य ठरविणे हे अज्ञान अर्थात तम mode मधील ज्ञान ठरते.

अधर्मं धर्मं इति या मन्यसे तमसा आवृताः।(१८-३२)

व्यवहारात अज्ञानाला ज्ञान ठरविणे, (False belief मुळे) खोटारडेपणा सत्य वाटणे हि माया ठरते. याच मनोविज्ञानाचा वापर जाहिरात, राजकिय क्षेत्रात होतो.

Political language is designed to make lies sound truthful and murder respectable, and to give an appearance of solidity to pure wind. -George Orwell,

स्वतःच्या अज्ञानाचा स्विकार झाला तर ज्ञानाचे द्वार उघडे होते. तर माया म्हणजे निश्चितपणे अज्ञान असते. (मायया अपहृत् ज्ञानां ) हाच अज्ञान व माया यातील भेद आहे.

Wisdom of Ignorance :

अर्जुन येथे धर्माच्या चक्रव्युहात सापडतो. व निश्चित काय करावे हे कळत नाही, हे वास्तव कबुल करतो. याच चक्रव्युहातुन बाहेर पडण्यासाठी १. स्वधर्म २. "बुद्धियुक्त" हे भगवतगीतेचे प्रयोजन आहे.

१. स्वधर्म

व्यवहारात योग्य-अयोग्यच्या आधारावर कार्याचा निश्चय होतो. या नियतकार्यावर स्वधर्म या जीवनमुल्याचे शिक्कामोर्तब होते. स्वतःच्या जीवनमुल्यांचा सन्मान स्वतःच करावा लागतो. यामुळे स्वतःची Priority जीवनमुल्य बनते.

२. बुद्धियुक्त

बुद्धियुक्तो जहातिह उभेसुकृत दुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।

यात Determination / कार्याचा एकनिश्चय असावा लागतो. स्वतःच्या निर्णयअधिकाराचा यासाठी वापर होतो.

*******

(७-१६)

********************

चतुर्विधा भजन्ते माम् जनाः सुकृतिनो अर्जुन।

आर्तो जिज्ञासु अर्थार्थि ज्ञानी च भरतर्षभ ॥

********************

(७. १६): "चतुर्विधा भजन्ते माम् "

*शिक्षणाचा उपयोग भौतिक प्रगति असाच अर्थ विशेषतः भारतिय समाजात आहे. अध्यात्म म्हटले कि तो जेष्ठांचा विषय मानल्या जातो.

*मानवी जीवन रहस्यमय आहे. याच रहस्याचा उलगडा भगवतगीता करते. जगाची रहाटी अखंड चालु राहणार पण आपण नसणार?

भगवतगीता सांगते, मृत्यु शरीराला आहे, जे जिवित तत्व शरीरयंत्राला संचालित ठेवते, त्या तत्वाला मृत्यु नाही. याच जिवित तत्वाची ओळख, त्याचे विश्वाशी असलेले नाते, याची संपुर्ण ओळख भगवतगीता करुन देते. यालाच अध्यात्मज्ञान(स्वभाव अध्यात्म उच्यते) म्हटले आहे.

*जीवनविकासाच्या प्रवासात आध्यात्मिक प्रगतीमुळे बुद्धिची स्थितप्रज्ञ अवस्था प्राप्त होते. अर्जुनाचा प्रश्न व्यावहारिक असतो. व त्याचे लक्ष व्यावहारिक कार्य टाळण्याकडे असते. त्याला कार्यापासुन सुटका हवी होती. म्हणुन प्रश्न करतो, बुद्धिची स्थितप्रज्ञ अवस्था श्रेष्ठ तर घोर कर्माचे प्रयोजन कां?
याच प्रश्नाचे उत्तरात मनुष्यजीवनांत कार्याचे महत्व सांगितल्या जाते.

*याचाच अर्थ, अर्जुनाला व्यावहारिक कार्यातच संशय येतो, व हा संशय मिटविण्यासाठी ज्ञान असते. जे ज्ञान भगवतगीता सांगते. (ज्ञानसंच्छिन्न संशयम्) . याप्रमाणे ज्ञान हाच भगवतगीतेचा विषय बनतो. अर्थात हे गुणात्मक ज्ञान ठरते. व अध्यात्मज्ञान गुणात्मक ज्ञानाचाच भागआहे, हे स्पष्ठ करते.

*गुणात्मक ज्ञानाची व्याख्या करतांना "Small is beautiful" चा लेखक इ. एफ. शुमेकर म्हणतो, पुस्तकी शिक्षण संख्यात्मक ज्ञान देते. या ज्ञानाचा उपयोग विकासासाठी होतो, तेंव्हा ते गुणात्मक ज्ञान ठरते.

*गुणात्मक ज्ञान या अर्थाने भगवतगीतेची ओळख झाली तर शिक्षणक्षेत्र व युवापिढी भगवतगीतेचे महत्व जाणु शकते.

*मनुष्य आपल्या दृष्टितुन जगाकडे पाहतो व स्वतःच्या जीवनाकडे पाहतो. तो ज्या पातळीवर विचार करतो, अनुभव घेतो, त्या चार पातळी मनोवैज्ञानिकांनी अभ्यासलेल्या आहेत.

People can think on four levels —

Four levels of human experience, :

Delta (δ) :feelings

Gamma (γ):beliefs

Beta (β) :facts

Alpha (α) :ideas

Here is a description of the levels and methods to process experience.

1. Description

2. Reasoning Method

3. Moral Accountability

4. Behavioral Adaptability

5. Perception of Reality

Level-Delta (δ) :feelings

1. Emotion without reason

2 : None

3: None

4 : None

5:Passive sensory experience

Gamma (γ):beliefs

1:Values dictated by others

2:Reasons only within framework of beliefs

3:Limited to belief system

4:Only as part of belief-group

5:Reality is filtered by beliefs

Beta (β) :facts

1:Basic reality testing

2:Relies on factual descriptions

3:Based on superficial information sources

4:Crude stimulus-response processing

5:Progresses by successive approximation

Alpha (α) :ideas

1:Creates new realities

2:Understands that facts grow from ideas, constructs new ideas

3:Accepts individual responsibility

4:Flexible, fully adaptable

5:Proactively builds physical and mental environment

it is easy to understand the four levels of human experience. If we don't understand this idea, we might become stuck in the lower levels and never even realize the higher levels exist. In a perfect world, people would process experience using all four methods. But many people limit themselves to the lower levels, and therefore cannot join the full human adventure.

The people who ascend to the level of ideas are the same people who will cure diseases, who will colonize Mars, who will lead us into the next chapter of the human adventure. The rest can only be followers.

*भगवतगीतेने ईश्वरश्रद्धा माध्यम घेवुन या चार अवस्था सांगितल्या व अज्ञानी व ज्ञानी भूमिकेतील भेद स्पष्ट केला जेणेकरुन मनुष्याला जीवनाचे विकासज्ञान जाणुन ध्येय ठरविता येईल.

चतुर्विधा भजन्ते माम् जनाः सुकृतिनो अर्जुन।
आर्तो जिज्ञासु अर्थार्थि ज्ञानी च भरतर्षभ ॥(७-१६)

भगवतगीतेनुसार ईश्वरावर श्रद्धा असणारे चार प्रकारचे लोक असतात. आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु व ज्ञानी. हेच प्रकार जीवनविकासाची पातळी ठरते. ज्ञानी सर्वोच्च पातळी ठरते. ही पातळी गाठण्यासाठी जीवनाची ज्ञानी व अज्ञानी भूमिका भगवतगीतेने स्पष्ट केली आहे. याच आधारावर अर्जुनाला अज्ञान ठरविले.

अहंकाराचा आश्रय असल्यामुळे अज्ञान अवस्था कायम राहते. म्हणुन शेवटी अहंकाराचा आश्रय कि बुद्धियोगाचा आश्रय असे option दर्शविले.

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः।

बुद्धियोगं उप आश्रित्य मच्चित्तः सततं भव।(१८-५७)

ज्ञानी पातळीवर असणारे कठीणसमयी विचलित होत नाही:

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं सः अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

*****

(७. १६)/२:"आर्तो जिज्ञासु अर्थार्थि ज्ञानी च भरतर्षभ"

चांगला मनुष्य ईश्वरभक्त असतो, तेंव्हा या भक्ताचेही चार प्रकार असतात. रडणारा(आर्त), मागणारा(अर्थार्थि), (ईश्वर-ज्ञान) जाणुन घेणारा(जिज्ञासु), प्रत्यक्षात उच्च गतित जगणारा (ज्ञानी).
चतुर्विधा भजन्ते माम् जनाः सुकृतिनो अर्जुन।
आर्तो जिज्ञासु अर्थार्थि ज्ञानी च भरतर्षभ।।(७-१६)

अर्थार्थि :

काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः।(४-१२)

जिज्ञासु :

जिज्ञासुः अपि योगस्य शब्दब्रह्म अतिवर्तते।(६-४४)

ज्ञानी :

उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मैव मे मतम् ।

आस्थितः स ही युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिं।।(७-१८)

भगवतगीता "ज्ञान" या संदर्भातच ईश्वराचे ज्ञान विज्ञानासह सांगत आहे. याच ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी जीवनाची उच्च अवस्था (पुरुषं पुरुषर्षभ) व त्याचे महत्व स्पष्ट केले आहे.

सृष्टिच्या अनंत काळात मनुष्याचा जीवनप्रवास सिमीत काळासाठी असतो. सुखाच्या अपेक्षेने जगत असतो पण दुःखी कां होतो?असा प्रश्न उपस्थित होतो. याच पार्श्वभूमिवर भगवतगीता स्पष्ट करते,

अनित्य असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

अर्थात दुःखावर मात करण्यासाठीच ईश्वर आश्रय "ज्ञान"या संदर्भात सांगितला आहे.

अर्जुन दुःख टाळण्यासाठी युद्ध करणे टाळतो. यात वास्तव स्विकारीत नाही व आपली भूमिका योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान सांगतो. युद्ध करणे अर्जुनाचे नियतकार्य होते. युद्ध करणे पाप आहे, धर्मविरोधी आहे ही अर्जुनाची भूमिका असते. तर नियतकार्य धर्मासाठी न करणे हेच पापाचरण ठरेल ही भगवतगीतेची भूमिका असते. अर्थात या दोन भूमिका परस्परविरोधी ठरतात.

मनुष्याला दुःखावर विजय मिळविता आला नाही तर (वास्तव न स्विकारल्यामुळे)तो नकारात्मक होतो, (अहंकारामुळे) अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. ज्ञानविज्ञान असुनही प्रश्नाचे निदानच झाले नाही तर प्रश्न अनुत्तरीत असतात. ज्ञानविज्ञानाचा उपयोग करण्यासाठी अज्ञानाचा स्विकार करणे आवश्यक असते.

व्यावहारिक बोध:

मनुष्य ज्ञानी समजुनच, स्वतःला योग्य समजुनच जगत असतो, तरी समाजात एक दुसऱ्याला अयोग्य ठरवुन टिका असतेच. जगाच्या कल्याणासाठी लोकांनी बदलावे अशी अपेक्षा असते पण स्वतः बदलत नाही . समाजातील ही शोकांतिका टॉलस्टाॅयने बोलुन दाखविली.

भगवतगीता मनुष्यजीवनाच्या महानतेचे रहस्य सांगत आहे, ज्याच्या अज्ञानामुळे मनुष्य दुःखी असतो, नकारात्मक असतो. धर्म, ईश्वर या संकल्पना समाजात अंधश्रद्धा पसरवतात असा बुद्धिवाद चालत असतो. पण ज्ञानविज्ञान असुनही समाजातील प्रश्न अनुत्तरीत कां राहतात?मनुष्य सुखाच्या इच्छेने जगतो, पण दुःखी कां होतो? याच सत्यावर भगवतगीतेने प्रकाश टाकला आहे.

********

(७-१७)

********************.

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिः विशिष्यते।

प्रियो हि ज्ञानिनो अत्यर्थं अहं स च मम प्रियः।।

********************

७. १७ :

"तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिः विशिष्यते"

(जगातील ज्ञानविज्ञान व मानवकल्याण)

भगवतगीतेत ज्ञानाला सर्वश्रेष्ठ म्हटले आहे. जगात ज्ञानविज्ञान उत्तरोत्तर वाढत आहे व नवनवीन प्रश्नही जगात उपस्थित होत असतात. शेवटी ज्ञान असुनही उत्तर कां मिळत नाही, प्रश्न कां सुटत नाही ?हाच प्रश्न उपस्थित होतो.

या प्रश्नाचे उत्तर भगवतगीतेशिवाय कुणीही दिलेले आढळत नाही.

*युरोपातील ज्ञानविज्ञानक्रांति:

ज्ञानविज्ञानाने जगाला बदलविले. विज्ञानयुगाच्या आरंभाला युरोपात Enlightenment Age (Age of Reasoning ) संबोधल्या गेले. मानवजीवनातील प्रश्न सोडविण्यासाठी ज्ञानविज्ञान महत्वाचे साधन ठरले.

The Age of Enlightenment was an intellectual and philosophical movement that dominated the world of ideas in Europe during the 18th century. The Enlightenment emerged out of a European intellectual and scholarly movement known as Renaissance humanism.

Sir Francis Bacon was the first person attributed to the phrase "Knowledge is Power'. ( 1597). The real test of ‘knowledge’is not whether it is true, but whether it empowers us. The real test is utility.

Most people have a hard time digesting modern science because its mathematical language is difficult for our minds to grasp, and its findings

often contradict common sense. Presidents and generals may not understand nuclear physics, but they have a good grasp of what nuclear bombs can do.

Until the Scientific Revolution most human cultures did not believe in progress. They thought the golden age was in the past, and that the world was stagnant, if not deteriorating.

Throughout history, societies have suffered from two kinds of poverty:

Social poverty, which withholds from some people the opportunities available to others; and

Biological poverty, which puts the very lives of individuals at risk due to lack of food and shelter.

Poverty, sickness, wars, famines, old age and death itself were not the inevitable fate of humankind. Our best minds are not wasting their time trying to give

meaning to death. Instead, they are busy investigating the physiological, hormonal and genetic systems responsible for disease and old age.

* भगवतगीतेची ज्ञानविज्ञान या संदर्भातील भूमिका:

१. भगवतगीतेनुसार ज्ञान अंधाराचा नाश करणाऱ्या प्रकाशाची भूमिका बजावते. याच संदर्भात ज्ञान म्हणजे काय?मनुष्यजीवनात या ज्ञानाची भूमिका कशी असते?या विषयातील प्रश्नाची उत्तरे भगवतगीता देत आहे.

* अर्जुनाला नियतकार्यात दुःख जाणवले. अर्थात परिणामभय जाणवले. सहसा मनुष्य शंका निर्माण करतो, म्हणुन कार्याचा निश्चय डळमळतो. तरी मनुष्य स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो.

मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर करणे हा मनुष्यस्वभाव आहे. याच स्वभावानुसार अर्जुन ज्या ज्ञानाचा वापर करतो त्या ज्ञानाला प्रज्ञावाद संबोधले.

* वास्तवाचा स्विकार केला तर प्रश्नाची पारदर्शकता येते. निश्चित प्रश्न असेल, चर्चेचा निश्चित विषय असेल तर उपयुक्त चर्चा होते. अन्यथा चर्चा दिशाहीन असते. हा भगवतगीतेने दिलेला " ज्ञान" या संदर्भातील पहिला नियम आहे.

२. प्रस्थापित संकल्पना चुक ठरविल्याने अंधाराचा नाश होत नाही. वीज पडणे देवतेचा प्रकोप आहे ही संकल्पना बेंझामिन फ्रॅन्कलिनने वीजेतील Electrical energy शोधुन संपुष्टात आणली. श्रीकृष्णाने पाऊस पडण्यासाठी (गोवर्धन)पर्वताचे महत्व, वृक्षारोपण महत्व सांगितले व इंद्रदेवतेला disarm केले. प्रस्थापित संकल्पनेला अज्ञान ठरविले तर केवळ टिका करुन अंधाराचा नाश होत नाही. अज्ञानाचा स्विकार केला तरच ज्ञानाचे द्वार उघडते.

३. जगात धर्म असते, ईश्वर ही संकल्पना असते. भगवतगीता या संदर्भात आपली निश्चित भूमिका "ज्ञान" या अनुषंगाने स्पष्ट करते.

*मरणोत्तर गति चांगली मिळावी हे प्रस्थापित धर्माची संकल्पना असते. भगवतगीता वर्तमान जीवन चांगले जगावे याचे शास्त्र सांगते.

*शोषण करणारी व्यवस्था(बाह्यविघ्न) असेल तर चांगल्या व्यक्तिला जगतांना संशय उत्पन्न होतो. ते आंतर्विघ्न असते. व ही अधर्म स्थिति ठरते. चांगल्या व्यक्तिला संशयमुक्त होण्यासाठी ज्ञानाची गरज असते. याचसाठी बुद्धियोग आश्रय सांगितला आहे. ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. सर्व कर्माचे ज्ञानात रुपांतर होते. म्हणुन भगवतगीतेतील ईश्वर संकल्पनाच ज्ञानाशी निगडित आहे. याच ईश्वराच्या भक्ति मार्गावर (आत्मोन्नति, अमृतत्वाय कल्पते) असलेला भक्त ज्ञानी ठरतो.

चतुर्विधा भजन्तोमाम् जनाः सुकृतिनो अर्जुन।(७-१६)
चांगले कर्म करणारे, ईश्वरश्रद्ध व्यक्तिंची आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु, ज्ञानी अशा चार प्रकारात विभागणी होते.

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिः विशिष्यते।
प्रियो ही ज्ञानीनो अत्यर्थं अहं स च मम प्रियः।।(७-१७)

याप्रमाणे श्रेष्ठ व्यक्ति(ज्ञानी ७-१७), श्रेष्ठ व्यक्तिचा मार्ग (पुरुषं पुरुषर्षभ २-१५) याचे निश्चित ज्ञान भगवतगीतेने स्पष्ट केले आहे.

********

(७. १७):
"प्रियो हि ज्ञानिनो अत्यर्थं अहं स च मम प्रियः"

ईश्वराचे अस्तित्व आहे काय?असले तर जीवनात उपयोग काय?असे प्रश्न समाजात ऐकायला मिळतात. ईश्वरासंबंधी असलेल्या चर्चेला अंधश्रद्धा संबोधुन विज्ञानाचे श्रेष्ठत्व सांगण्यात येते. तर भगवतगीतेत ज्ञानविज्ञान या दृष्टितुनच मनुष्याचे ईश्वराशी असलेले नाते स्पष्ट केले आहे. ज्यांना हे नाते जाणुन घेण्याची इच्छा नाही त्यांना भगवतगीतेत सांगितलेले ज्ञान सांगणे व्यर्थ आहे असेही भगवतगीतेने स्पष्ट केले आहे. यामुळे निष्कारण वादाला भगवतगीतेत स्थान नाही.

भगवतगीतेची सुरुवातच अज्ञानाला ज्ञान संबोधणे, दुर्बलतेला आदर्श संबोधणे येथुन सुरु होते. रोगाला रोग म्हणुन न जाणता सौंदर्य ठरविले तर!रोग दुरुस्त कसा होणार?अज्ञान स्विकारले नाही तर ज्ञानाची गरजच कशी स्पष्ट होणार?

अर्जुनाचे Intention चांगले होते. त्याने इतरांनी सुधारावे ही भाषा वापरली नाही. तर स्वतःच्या चांगलेपणामुळेच तो दुःखी होतो. दुःख टाळण्यासाठी मात्र वास्तव न स्विकारता जी भूमिका घेतो, त्याला आदर्श दर्शवितो. श्रीकृष्णाने यावर प्रतिक्रिया दिल्यावरच तो वास्तवाचा(अज्ञानाचा) स्विकार करतो.

जीवनातील दुःख, भय याचे कारणच मनुष्यजीवन दुःखालयात प्रवास करीत असते, ही स्वाभाविक अवस्था असते. पण हेच दुःख टाळण्यासाठी अर्जुनाने केलेला उपाय(निष्क्रियतेचे समर्थन):"अज्ञानाला ज्ञान समजणे व दर्शविणे "या स्वरुपाचा असतो. अर्थात नकारात्मक भूमिका असते. वास्तव स्विकारुन जीवनाचे आव्हान स्विकारण्यासाठी ज्ञानाचा उपयोग भगवतगीता सांगते. व ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी ईश्वराचा आश्रय करणे याचे शास्त्र भगवतगीता सांगते.

क्या खोया, क्या पाया?

जीवनात काय मिळविले व काय गमावले? यावर एक सुफि संत म्हणतो, "जो खोया वह मेरी नादानी थी, पर जो पाया वह रबकी

मेहरबानी है।बडा खुबसुरत रिश्ता है मेरा रबसे!मै जादा मांगता नही और वह कम देता नही।"

ईश्वरभक्त ईश्वर जाणुनच देवतांची भक्ति करतात. तर हृदयात असलेल्या(जीवित तत्वातील) ईश्वराची ओळख झाली तर मनुष्य जीवनयात्रेचा निश्चित हेतु जाणतो. निश्चित मार्गावर (अमृतत्वाय कल्पते) जीवन संचालीत होते. याच संदर्भात आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु, ज्ञानी असे भक्तांचे चार प्रकार भगवतगीतेने स्पष्ट केले आहे. यांत ज्ञानी भक्ताशी ईश्वराचे नाते स्पष्ट होते.

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिः विशिष्यते।
प्रियो हि ज्ञानिनो अत्यर्थं अहं स च मम प्रियः।।(७-१७)

"God always gives His best to those who leave the choice with him. "

-Jim Elliot

समोअहं सर्वभूतेषु न मे द्वेष्यो अस्ति न प्रियः।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु च अपि अहम्।।(९-२१)

अर्थात ईश्वराची अनन्यभावाने(समर्पण) कार्याद्वारे

भक्ति साध्य करणारा ईश्वराशी जोडलेला असतो.

*स्वतःचा आदर करतो, बंधु असतो. अर्थात आत्मवश असतो.

*ईश्वराच्या सृष्टितील विभूतिचिंतनाने(श्रीमतं उर्जितम्) सकारात्मक असतो. बुद्धियोगी होतो. विकासाचा (अमृतंगमय) शाश्वत मार्ग जाणतो, ज्या मार्गावर (अडचणीमुळे) विचलित होत नाही.

*हा मार्ग दृढ असतो. नियतकार्य स्वधर्म करतो. निर्णयअधिकार जाणतो व कार्याचा दृढनिश्चय करतो. योगस्थ बुद्धिने निष्ठेने कार्यरत असतो.

*जीवनातील अडचणी त्याचे दुःख बनत नाही तर विकासाच्या संधी बनतात.

*मोहामुळे बुद्धिभ्रम होतो. अर्थात यामुळे द्वंद्वाच्या जाळयात अडकतो ही प्रकृतिवश अवस्था असते. यामुळे अहंकाराचा आश्रय प्रकृतिवश अवस्था ठरते, तर ईश्वराचा आश्रय ज्ञानाचा आश्रय असतो. याच संदर्भात भगवतगीता कार्याद्वारे योग(Exercise) साध्य करण्यासाठी व संशय मिटविण्यासाठी शास्त्र सांगते.

योगसंन्यस्त कर्माणम् ज्ञानसञ्च्छिन्न संशयम्

***********

(७-१८)

***********************

उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मैव मे मतम् ।

आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम् ।।

*********************

(७-१८) : "ज्ञानी तु आत्मैव मे मतम् "

भगवतगीतेत ज्ञानी कोण? हाच प्रश्न अर्जुनाच्या भाष्यातुन उपस्थित झाला.

जगात कितीही ज्ञानविज्ञान आले तरी जगातील लोक ज्ञानी (I am right) समजुनच जगत असतात. ती त्यांची Conditioned घडण असते.

सदृशं चेष्टते स्वस्या प्रकृतेः ज्ञानवान अपि।(३-३३)

यालाच "प्रकृति "म्हणुन आपण ओळखतो. ही घडण चुकीची (Born to win but conditioned to loose) असु शकते किंवा चांगलीही असु शकते. जगात अनेकविध (कर्तृत्ववान-निष्क्रिय, चांगले-वाईट) लोक असतात. मनुष्य इतरांना Labeling करु शकतो. पण स्वतःला जाणणे व Empowering करणे आपल्या अधिकारात असते. अर्जुन हेच वास्तव विसरतो. अर्थात याचे अज्ञान असते. अर्जुनाची घडण चांगली(योग्य) असली तरी अडथळा येतो, तेंव्हा ज्ञानी समजुन निष्क्रियतेचे समर्थन करतो.

समाजात "ज्ञानी" समजुनच भाष्य बोलल्या जाते. मार्गाच्या अज्ञानामुळे निष्क्रिय झाला तरी ज्ञानी समजुनच चांगले-वाईट, योग्य-अयोग्य अशा Judgement thinking चा वापर करुन मनुष्य भाष्य बोलतो. अर्जुन असाच ज्ञानी भाष्य बोलतो, तेंव्हा "ज्ञानी कोण?", त्याचा मार्ग कसा असतो? याचे ज्ञान भगवतगीता सांगते.

येथे वर्तमानातील वास्तव स्विकारणे हे प्रथम पाऊल असते. महर्षि वाल्मिकिच्या पुर्वाश्रमांतील "वाल्या"ने वास्तव स्विकारले, तेंव्हा मार्ग मिळाला. प्रत्येक मनुष्यच सुखासाठी जगतो. अर्जुनाला

मार्गात दुःख जाणवले म्हणुन वास्तवाला बायपास करुन भाष्य बोलतो. अर्जुनाने वास्तव स्विकारले व ज्ञान(काय योग्य) ऐकण्यास तयार झाला. त्याला दुःखमुक्तिसाठी ज्ञान हवे होते.

"ज्ञानी" या संदर्भात समर्थन करुन अर्जुन स्वतःला comfortable करण्याचा प्रयत्न करतो. या प्रक्रियेत जीवनातील दुर्बलता जाणत नाही. याच दुर्बलतेची जाणिव भगवतगीता करुन देते. व सक्षमतेसाठी (Empowering, दुःखान्त) कार्याद्वारे योग सांगते. येथे मनुष्याला स्वतःचा मार्ग Design करण्यासाठी " स्वधर्म" मुल्य, निर्णय अधिकार याचे ज्ञान आवश्यक असते. मार्गाचा अंतिम Goal ईश्वर असतो. कार्याचा दृढनिश्चय करुन कार्याद्वारे ईश्वरभक्ति याचे रहस्य कळते. ज्ञानी होण्याची हीच प्रक्रिया आहे.

उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मैव मे मतम् ।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम् ।।(७-१८)

ज्ञानी ईश्वराच्या उत्तम गतिमध्ये असतो. सर्व जग वासुदेवमय जाणतो. "ज्ञानी"ची याप्रमाणे परिभाषा सांगुन मनुष्याला जीवनाचा Goal दर्शविला आहे. ज्यामुळे तो स्वतःचा मार्ग Design करण्यास व त्या मार्गावर चालण्यास समर्थ होईल. कारण एरवी

मनुष्य "ज्ञानी"(मी योग्य या संदर्भात) म्हणुनच जगतो. व भाष्य बोलतो.

"True knowledge exists in knowing that you know nothing. "

Socrates

सॉक्रेटिस म्हणतो, मी अज्ञानी आहे हेच माझे ज्ञान आहे. जोवर मनुष्य ज्ञानी अवस्थेत पोहोचत नाही तोवर तो ज्ञानी ठरत नाही. तो चांगला असु शकतो, श्रेष्ठ असु शकतो. अर्जुन चांगला (दैवी) होता पण निष्क्रियतेचे समर्थन "ज्ञानी" समजुन करतो, तेंव्हा श्रेष्ठ पुरुषाचा मार्ग सांगितला. ज्या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

****oooo

७. १८:

"उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मैव मे मतम् "

( ईश्वर : ज्ञानाचा स्त्रोत )

जीवन जगणाऱ्याला सुखदुःख कळत असते. जीवनातील आव्हान स्विकारणाऱ्यालाच कार्याचे महत्व कळते. कार्य करणाऱ्याला निर्णयाची गरज पडते. निर्णय घेणाऱ्याला निश्चयासाठी ज्ञानाची गरज पडते. ज्ञानामुळे संशय मिटतो. कार्याचा एकनिश्चय होतो. Determination असेल तर Devotion असते.

मनुष्याला जीवनात कार्याचे महत्व कळले नाही तर जीवनात निष्क्रिय, आळशी होतो. मात्र इच्छा (विषयचिंतन) मनात असते. यामुळे दांभिक ठरतो.
इंद्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते।(३-६)

ज्ञानी कोण?
जीवनविकासात ज्ञानाचे महत्व कळले नाही तर संशयामुळे निश्चय होत नाही. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी मात्र ज्ञान वापरतो. ज्ञान या संदर्भातील हा भ्रम असतो.

ज्ञानी जीवनमार्गात ज्ञानाचा वापर करतो. ज्ञानी स्थिर, सकारात्मक, कार्यरत असतो. त्याचा मार्ग निश्चित असतो व विचलित होत नाही. "ज्ञानी कोण?"याच प्रश्नाचे उत्तर भगवतगीतेत मिळते.

ईश्वर :शक्तिचा स्त्रोत

"God is bigger than people think. "

-Jimmy Dean

भगवतगीतेतुन ईश्वराची ओळख विविध प्रकारे होते. या विश्वात आपल्या बुद्धिप्रमाणे ज्या शक्तिला आपण ओळखत असतो, त्यापेक्षा अनाकलनिय शक्ति ईश्वराची आहे.

*शांतिचा स्त्रोत:

शान्ति निर्वाणपरमां मत्संस्थाम् अधिगच्छति।(६-१५)

*शक्तिचा स्त्रोत :

तत्र श्रीः विजयो भूतिः धृवा नीतिः मतिः मम।(१८-७८)

* आत्मविश्वासाचा स्त्रोत :

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व।(११-३३)

*ज्ञानाचा स्त्रोत

विश्वातील सर्वात महत्वाचा ज्ञानाचा स्त्रोत ईश्वर असतो. हा महत्वाचा संदेश भगवतगीता देत आहे. ईश्वराला जसे ओळखतो त्याप्रमाणे मनुष्य भजत असतो. (चांगले) कार्य करणारे असे चार

प्रकारचे भक्त असतात. आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु व ज्ञानी अर्थात याच ईश्वरभक्तिच्या चार पातळी ठरतात. ज्ञानी ही उच्च पातळी असते.

ज्ञानी :चांगलेपणाचा स्त्रोत, ईश्वराची सर्वोत्तम गति

उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मैव मे मतम् ।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम्।।(७-१८)

ईश्वराची उत्तम गति हा विश्वाचा आधार असतो. हाच आधार संपुर्ण विश्वाला गति देत असतो.

बहुनां जन्मनामन्ते ज्ञानवान मां प्रपद्यते।
वासुदेवः सर्वम् इति स महात्मा सुदुर्लभः।।(७-१९)

सार :

मनुष्यातील चांगली प्रवृत्ति ईश्वराशी जोडत असते, तर हिंसक प्रवृत्तिला मर्यादा असते कारण त्याने ईश्वराची शाश्वत शक्ति ओळखली नसते. म्हणुन दैवी vs असुरी अशा दोन प्रवृत्तिची ओळख भगवतगीतेने दिली आहे.

असुरी (Darkness):

प्रभवन्ति उग्रकर्माणः क्षयाय जगतो अहिताः।(१७-९)

दैवी(प्रकाश) :

"So wonderful is God's power. He can see beyond any darkness and reach beyond any limitation. "

Gift Gugu Mona,

(Writer of My mothers classroom, Power-Filled Quotes for a Powerful Woman. )

याप्रमाणे ईश्वराची ओळख ज्ञानाची, चांगलेपणाची, शक्तिची ओळख असते. याच ईश्वराचा नित्य आश्रय मनुष्याला करावयाचा आहे.

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिः विशिष्यते।

प्रियो हि ज्ञानीनो अत्यर्थं अहं स च मम प्रियः।।(७-१७)

*******

(७. १८):

"आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम्"

(उर्जा आणि गति )

"God always gives His best to those who leave the choice with him. "

Jim Elliot

वर्तमान व State of mind :

भगवतगीतेत अर्जुनाच्या वर्तमानातील वागणुकीलाच आव्हान दिलेले आहे. "धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे" या प्रथम Verse पासुन भगवतगीता सुरु होते. कुरुक्षेत्रावर(Platform of specific work) जे कार्य करायचे आहे, ते व्हायलाच पाहीजे. कुरुक्षेत्राचा तो धर्म असतो. मनुष्याने वर्तमानात कुरुक्षेत्राचा धर्म पाळला नाही तर निष्क्रियतेचे समर्थन करतो. वेळेत अपेक्षित कार्य घडले नाही म्हणुन पश्चाताप(असे कार्य करायला हवे होते!मला असे वाटले म्हणुन!) करतो. अर्थात वर्तमानात जागृत नसतो. याचसाठी वर्तमानात "योगयुक्त" हो, हा संदेश भगवतगीता देत आहे.
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)
"The ability to be in the present moment is a major component of mental wellness. "
Abraham Maslow

वीणेची तार सैल असेल तर अपेक्षित कार्य करीत नाही म्हणुन तार कसल्या जाते. वर्तमानातील कार्यासाठी आवश्यक State of

mind या संदर्भात भगवतगीता युक्त व अयुक्त या शब्दाचे प्रयोजन करते. यात State of mind अनुक्रमे आत्मवश व मनोवश असे असते. या स्थितीला अनुक्रमे 'नाव निश्चित दिशेने वल्हवणे' व 'नाव वाऱ्याने वाहणे' (वायुर्नावाम् इव अम्भसि २-६७)ही उपमा देवुन स्पष्ट करते.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते॥(५-१२)

अर्थात जीवनमार्गातील, वर्तमानातील अयुक्त स्थिति कार्याची सकाम अवस्था असते व' युक्त' निष्काम अवस्था असते.

उर्जा आणि गति:

भगवतगीता (चांगले-सुकृत) कार्य करणाऱ्या ईश्वरभक्ताचे चार विभागात वर्गिकरण करते. यांतील ज्ञानी भक्त "युक्त" असतो. ईश्वराच्या उत्तम गतिमध्ये असतो.

उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मा एव मे मतम्।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम्॥(७-१८)

ईश्वर ही मुळ उर्जा आहे. संपुर्ण सृष्टि याच उर्जेचे गतिमान स्वरुप आहे. मनुष्यजीवन याच उर्जेचा एक भाग(अंश) आहे. याच उर्जेचे गतिमान स्वरुप आपले जीवन असते. उर्जा नित्य अस्तित्व आहे व गतिमान स्वरुप जीवन आहे.

याचाच अर्थ जीवन या प्रचंड उर्जेचा एक भाग आहे, तर ज्ञानी भक्त याच शाश्वत उर्जेच्या गतिमध्ये असतो हे रहस्य भगवतगीता स्पष्ट करीत आहे.

बहुनां जन्मनाम अन्ते ज्ञानवान मां प्रपद्यते।

वासुदेवः सर्वम् इति स महात्मा सुदुर्लभः॥(७-१९)

************

(७-१९)

*******************

बहुनां जन्मनाम् अन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते।

वासुदेवः सर्वम् इति स महात्मा दुर्लभः।।

*******************

(७-१९)/१:"बहुनां जन्मनाम् अन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते"

(जगातील महामानव)

भगवतगीतेत ज्ञानाला सर्वश्रेष्ठ स्थान आहे. ज्ञानामुळेच अशक्य गोष्टी शक्य होतात. याच ज्ञानाचे जीवनातील महत्व व त्याची भूमिका भगवतगीता सांगत आहे.

व्यवहारात प्रश्नावर मनुष्य उत्तर शोधतो. पांडवावरील अन्याय हा व्यावहारिक प्रश्न असतो. अनेक प्रयासानंतर "धर्मयुद्ध" हे उत्तर मिळाले असते. उत्साहाने अर्जुन युद्धक्षेत्रावर येतो व गर्भगळित होतो. अर्जुनाला युद्ध करणे योग्य कसे हे कळले नसल्यामुळे युद्ध

न करणे ही त्याची स्वतःची निवड असते. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. हा अर्जुनाचा व्यक्तिगत प्रश्न असतो.

एकीकडे जीवनाचे ज्ञान या संदर्भात अर्जुनाला भ्रम असतो. पण दुसरीकडे समुहातील/विश्वातील "अन्यायावर उपाय" हा मुळ विषयच दुर्लक्षित होतो. विश्वाच्या प्रश्नाशी अर्जुनाच्या प्रश्नाचा संबंध काय?मनुष्याला सुखासाठी जगायचे असते. ज्या कार्यात अर्जुनाला स्पष्ट दुःख दिसत होते ते कार्य त्याने कां करावे?हाच त्याचा प्रश्न असतो.

*ज्ञानवान, आत्मवान, श्रद्धावान:
(Wisdom, Self, Faith)

अर्जुन चांगला मनुष्य असतो व त्याचा व्यक्तिगत प्रश्न विश्वातील प्रश्नाशीच संबंधीत आहे याचे त्याला अज्ञान असते. मनुष्याच्या हृदयात ईश्वराचा अंश असतो याचाच अर्थ मनुष्य या विश्वाचाच एक भाग असतो. "ज्ञानवान " हे सत्य जाणत असतो.

या जगात जगतहीतासाठी, मानवकल्याणासाठी कार्यरत असणारे लोक भुतकाळात झालेत, वर्तमानात कार्यरत आहेत व

भविष्यातही राहणार. हे महानुभाव कोण होते?व कोण आहेत? हे भगवतगीता "ज्ञानवान" याद्वारा स्पष्ट करते.

बहुनां जन्मनाम् अन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते।
वासुदेवः सर्वम् इति स महात्मा दुर्लभः।।(७-१९)

हे जग वासुदेवमय आहे असा जाणणारा महात्मा दुर्लभ असतो. त्याचा जन्मच अनेक जन्माचे फलित असते. याच जीवनाचे ज्ञान अर्जुनाला सांगण्यात येते. येथे त्याच्या कार्याचा विश्वकल्याणासाठी संबंध असतो. भगवतगीता विश्वरुपदर्शनयोगाद्वारे हा संबंध स्पष्ट करते.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव।।(११-५५)

याच पार्श्वभुमिवर "आत्मवान हो "असा अर्जुनाला निर्देश आहे. व याचसाठी जीवनविकासाचा Standard मार्ग सांगितला, ज्याला "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) असे भगवतगीता संबोधते. अर्थात या मार्गावर आत्मवान ठरतो.

निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।(२-४५)

या मार्गावर

-निर्द्वंद्व म्हणजे कार्याचा दृढनिश्चय असणे.

-'नित्यसत्वस्थो ' या संदर्भात "सत "श्रद्धा हा संदेश मिळतो.

-निर्योगक्षेम हा निष्काम कार्याचा संदेश देतो.

*श्रद्धावान vs अश्रद्धधान, संशय vs विश्वास
(Faith)

श्रद्धेचे सत, रज, तम हे तीन प्रकार असतात. प्रत्येक मनुष्याची (यांतील एक)श्रद्धा असली तरी "श्रद्धावान" शब्द सत श्रद्धा यासाठी योजिलेला आहे. ईश्वरावरील श्रद्धा "सत" असते. ज्ञान या संदर्भातील सतश्रद्धा हा भगवतगीतेचा विषय आहे. यालाच "ज्ञानवान "म्हटले आहे.

"श्रद्धावान लभते ज्ञानं "(४-३९) याद्वारे श्रद्धा व ज्ञान याचा समन्वय भगवतगीतेतील Strength आहे हा संदेश मिळतो. श्रद्धा नसलेला अज्ञानामुळे संशयी असतो.

अज्ञश्च अश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति।(४-४०)

विश्वास या संदर्भात ज्ञानाला महत्व आहे. तसेच विश्वास या संदर्भातच श्रद्धेला लोक ओळखत असतात. एखाद्या कथित(भोंदु) महाराजाचे शिष्य बनुन विश्वास मिळविणे ही अंधश्रद्धा म्हणुन समाजात ओळखल्या जाते. तर Reasoning चा वापर करुन विश्वास मिळविणे हा बुद्धिप्रामाण्यवाद म्हणुन ओळखल्या जाते.

बुद्धिप्रामाण्यवाद(Reasoning) /ज्ञान या संदर्भातच भगवतगीतेचा अर्जुनविषादयोग बोलका ठरतो. मनुष्याला निर्णयक्षमता नसेल तर स्वतःच्या निर्णयावर विश्वास नसतो. व निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान वापरतो.

या पार्श्वभुमीवर निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञानाचा वापर करणे Vs. ( विश्वासाने मार्ग चालण्यासाठी)कार्याचा दृढनिश्चय करण्यासाठी ज्ञानाचा वापर करणे हा भेद भगवतगीता स्पष्ट करते.

योगसंन्यस्त कर्माणं ज्ञानसञ्च्छिन्न संशयम् ।(४-४१)

*****

(७-१९)/२ : "वासुदेवः सर्वमिति"

जसे एखाद्या कारखान्याचे, संस्थेचे, देशाचे व्यवस्थापन असते तसेच या विश्वातही व्यवस्थापन शास्त्र कार्यरत असते. याचे दर्शन भगवतगीता देते. अर्जुनाला दुःख होणे व तो आपल्या अज्ञानी भूमिकेला ज्ञानी संबोधतो. हा ईश्वराचे नियोजनाचाच भाग असतो. म्हणुनच भगवतगीता जगासमोर आली.
विज्ञातुम इच्छामि भवन्तम आद्य? या अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर देतांना ईश्वराच्या नियोजनाचे दर्शन विश्वरुपातुन दिले.

जीवन जगतांना सुख, यश मनुष्याला हवे असते. मनष्यजीवन पुढेपुढे वाटचाल करीत असते. पण ही वाटचाल करतांना दुःख, अपयश याचेशी मनुष्याचा सामना असतो. अज्ञानामुळे दुःख, अपयश मनुष्याला हरवितात व तो प्रकृतिच्या द्वंद्वरुपी जाळयात अलगद अडकतो. जीवनविकासाचा रथ थांबतो. मलाच दुःख कां आले ?असा प्रश्न मनुष्याला पडतो व हताश होतो, तेंव्हा जीवनरथ थांबतो. पण ज्ञानी ईश्वराचे नियोजन जाणतो.

ईश्वरावर श्रद्धा असणारे लोक ईश्वराला कर्मसिद्धि मागतात पण त्याचे नियोजन जाणत नाहीत. भगवतगीतेत ईश्वरावर श्रद्धा

असणाऱ्यांच्या चार Stages (आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु, ज्ञानी)सांगितल्या आहेत. ज्ञानी जाणतो, हे जग वासुदेवमय आहे.

बहुनां जन्मनाम् अन्ते ज्ञानवान मां प्रपद्यते।
वासुदेवः सर्वम् इति स महात्मा सुदुर्लभः॥(७-१९)

मनुष्य जगत असतो, पण जीवनरथ विकासमार्गावर आहे कि रुतलेला आहे याची जाण नसते. रुतलेला असला तरी मनष्य स्वतःला योग्य दर्शविण्यासाठी ज्ञानी सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. जीवनात ज्ञानाची भूमिका या संदर्भातच अर्जुनाचा गैरसमज होतो. जीवनात ज्ञानाचे महत्व व ज्ञानाची दृष्टि भगवतगीता सांगते.

भौतिक प्रगती मनुष्यासाठी जीवनातील Reality असते, म्हणुन याचेच अभावाने मनुष्य दुःखी होतो, दुबळा होतो. व या दुबळेपणाला शक्ति दर्शविण्याचा प्रयत्न करतो.

मानसिक शक्तिचा विकास या संदर्भात सकारात्मकता, चांगलेपणा, धैर्य, सातत्य, स्थिरता(दुःखाने विचलित न होणे) या गुणांची ओळख दैवीगुण या संदर्भात भगवतगीता देते.

भौतिक प्रगतीसाठी कार्य निमित्त असते, तर याच कार्याद्वारे मानसिक शक्ति विकसित होत असते. म्हणुन भगवतगीता कार्याद्वारे " योग" (दुःखान्त)याचे शास्त्र सांगते.

फ्राईड किंवा कोणताही मनोवैज्ञानिक मनाच्या विविध अवस्था सांगतो. व या आधारावर Mental Wellness साठी उपाय सांगतो. ज्या उर्जेमुळे मनुष्यजीवन संचलित असते, भगवतगीता हृदयातील विराजमान त्याच ईश्वराचे ज्ञान सांगते,

प्रत्येक मनुष्य विश्वाच्या व्यवस्थापन यंत्रणेतील एक घटक असतो. संदर्भ मनोविज्ञानाचा असो, ज्ञानविज्ञानाच्या असो, जीवनाला विकासमार्गावर संचलित ठेवण्यासाठी जीवनांत ईश्वराचा आश्रय याचाच अर्थ "वासुदेवः सर्वम् इति" हे भगवतगीतेने सांगितलेले रहस्य जाणुन घेणे आवश्यक ठरते.

*******

(७-१९)/३ :

" वासुदेवः सर्वम् इति स महात्मा सुदुर्लभः"

("महात्मा " The great people of the word)

ईश्वराला "परमात्मा" म्हणुन ओळखल्या जाते. तर महात्मा हे संबोधन (देहधारी )एखाद्या महापुरुषाला दिले जाते. "महात्मा" या संदर्भात भगवदगीता म्हणत आहे,

(१) ज्ञानी भक्त

बहुनां जन्मनाम् अन्ते ज्ञानवान मां प्रपद्यते।

वासुदेवः सर्वम् इति स महात्मा सुदुर्लभः॥(७-१९)

(२) चांगला मनुष्य

महात्मानः तु मां पार्थ दैवीं प्रकृतिम् आश्रिताः।

भजन्ति अनन्यमनसो ज्ञात्वा भूतआदिम् अव्ययम्(९-१३)

१. सत्कृत्य करणाऱ्या व ईश्वरश्रद्धा असणाऱ्या मनुष्याचे (भक्त) ईश्वराची भक्ति या संदर्भात आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु व ज्ञानी असे चार प्रकार असतात. ज्ञानी (अव्यक्त)ईश्वराचे ज्ञान(सर्व प्राणिमात्रांचे उगमस्थान- ज्ञात्वा भूतआदिम् अव्ययम्) जाणतो. सर्व विश्व वासुदेवमय आहे अर्थात एकाच ईश्वरतत्वाने व्यापलेले आहे. हे ज्ञान जाणुन "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च(निर्वैरः सर्वभूतेषु, सर्वभूतहीतेरतः) जगण्याच्या या श्रेष्ठ mode मध्ये जगत असतो. असा ज्ञानी जणु ईश्वराचा प्रतिनिधीच असतो, जो मनुष्यरुपात ईश्वराचेच(ईश्वराला अभिप्रेत असलेले) कार्य करतो.

उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मैव मे मतम् ।

आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम्॥(७-१८)

(२) समाजातील सामान्य लोकांत मनुष्याच्या संदर्भात चांगले-वाईट असे संबोधन असते. याच संबोधनासंदर्भात भगवदगीतेत "दैवी-असुरगुणसंपत्ति" असा तांत्रिक भेद स्पष्ट केला आहे. अर्थात जो चांगला आहे त्याने ईश्वराचे (सृष्टिचा अध्यक्ष, परम आत्मा) ज्ञान जाणुन अनन्यभक्ति साध्य करावी अर्थात ईश्वराची नित्यभक्ति होण्यासाठी (व्यवहारातील) कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य करावी . याचाच अर्थ भगवदगीतेत म्हटल्याप्रमाणे कार्यकौशल्य (योगः कर्मसु कौशलम् ) साध्य करावे.

"Those who have accomplished great things in the world have been, as a rule, bold, aggressive, and self-confident. They dared to step out from the crowd and act in an original way. They were not afraid to be generals. "

-Orison Swett Marden

********

( ७. २३)

*********************

अंतवत्तु फलं तेषां तद् भवति अल्पमेधसाम् ।

देवान् देवयजः यान्ति मद् भक्ता यान्ति माम् अपि ।

*********************

७. २३:

" देवान् देवयजः यान्ति मद् भक्ता यान्ति माम् अपि"

"To be conscious of knowing God is to know about God and self. "

Meister Eckhart

देव आणि ईश्वर यांतील भेद स्पष्ट करुन ईश्वराची निश्चित ओळख भगवतगीता देत आहे. मनुष्याचे(जीवात्मा) ईश्वराशी असलेले नाते न जाणल्यामुळे अज्ञान असते. हेच नाते जाणुन ईश्वराची भक्ति या संदर्भात विश्वाचा (सृष्टिचा) अध्यक्ष ही ईश्वराची ओळख भगवतगीता देत आहे.

देवान् देवयजः यान्ति मद् भक्ता यान्ति माम् अपि।(७-२३)
अव्यक्तं व्यक्तिम् आपन्नं मन्यते माम् अबुद्धयः।
परं भावं अजानन्तो मम् अव्ययम् अनुत्तमम् ॥(७-२४)

चांगला अर्थात दैवीगुणसंपन्न असलेला अर्जुन युद्धक्षेत्रावर दुःखी झाल्यावर म्हणतो, मला सुखासाठी राज्य नको, पण या कर्मामुळे होणारे पाप मी करणार नाही. व्यवहारात चांगल्या कार्याचा संबंध पाप-पुण्याशी व पर्यायाने स्वर्ग वा नरकप्राप्तिशी जोडल्या जातो. पण हे सकाम कार्य ठरते. म्हणुन निष्काम कार्याचे logic भगवतगीता देत आहे.

एखाद्या व्यापारी संस्थेतील, कारखान्यातील कर्मचारी कशासाठी कर्म करतो (पैशासाठी!कुटुंबासाठी!भक्तिसाठी!)हा त्याचा व्यक्तिगत प्रश्न असतो. पण कारखाना संस्थेचा अध्यक्ष म्हणतो, माझा कारखाना चांगला चालावा यासाठी कर्मचारी कर्म करीत असतात, त्या मोबदल्यात मी कर्मचाऱ्यांना वेतन देतो. या विश्वसंस्थेचा अध्यक्ष ईश्वर असतो. अर्थात कशासाठी कर्म करतो हा मनुष्याचा व्यक्तिगत(व्यावहारिक) प्रश्न असतो. पण या विश्वाचे चांगले संचलन व्हावे ही ईश्वराची इच्छा असते. याप्रित्यर्थ होणारे कार्य ईश्वराचेच कार्य असते.

ईश्वराचे सर्वांशीच नाते असते. यामुळे ईश्वर कुणाचा द्वेषही करीत नाही किंवा त्याला कुणी प्रिय नाही. पण जो ईश्वराशी नाते जोडतो, तो आपले नियतकार्य ईश्वराचेच कार्य जाणुन ईश्वराची भक्ति करतो.

समोअहं सर्वभूतेषु न मे द्वेष्यो अस्ति न प्रियः।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु च अपि अहं॥(९-२९)

विश्वसंचलनात दोष निर्माण झाला असता सज्जनांना त्रास व दुर्जनांना राज्य अशी स्थिति अधर्माची असते. अर्थात चांगलेपणा दुबळा ठरतो. या अवस्थेत समाजात शोषण व सज्जनांना भ्रम असतो. म्हणुन धर्मस्थापनेसाठी चांगलेपणा सक्षम असणे आवश्यक असते. याचसाठी चांगल्या मनुष्याच्या नियतकार्याला, चांगल्या कार्याला द्वंद्वमुक्त करणे, अर्थात कार्याचा दृढनिश्चय करणे व निष्ठेने कार्य घडण्यासाठी निष्काम कार्य करणे हेच ज्ञान भगवतगीता सांगत आहे.

भगवतगीतेने जी ईश्वराची ओळख दिली(तद् धाम परमं मम्) त्याचा उपयोग जीवनविकासाचा Standard (अमृतत्वाय कल्पते) मार्ग बनविण्यासाठी होतो. या मार्गावर कार्याद्वारे ईश्वराची भक्ति

घडते. अर्थात ईश्वराचे कार्य जाणुन निष्काम कर्म करतो. स्वतःचे नियतकार्य साधन असते.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्ताः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

"Remember your connection with the cosmos. Remember your connection with the infinity and that remembrance will give you the freedom. "
Amit Ray

*******

(७-२४)

********************

अव्यक्तं व्यक्तिम् आपन्नम् मन्यते माम् अबुद्धयः।

परम् भावम् अजानन्तो मम अव्ययम् अनुत्तमम्॥

********************

(७-२४) :

"परम् भावम् अजानन्तो मम अव्ययम् अनुत्तमम्"

(जीवनातील ज्ञानअज्ञान)

ईश्वर ही संकल्पना मनुष्याला दुबळी करते, परावलंबि करते असा जगातील कांही लोकांचा समज असतो. भगवदगीतेत मात्र याउलट स्थिति आढळते. जीवनयात्रेत मनोदुर्बलता आलेल्या अर्जुनाला सक्षम होण्यासाठी ज्ञान सांगतांना "ज्ञान" या संदर्भातच ईश्वराचा आश्रय याचे महत्व सांगण्यात येते. संशय असुनही मनुष्य स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो, पण ज्ञान संशयमुक्तिसाठी असते. (ज्ञानसञ्छिन्नसंशयम्)

सामान्य लोक देवतांची भक्ति करतात. ईश्वरश्रद्ध असतात. ईश्वरश्रद्ध असणे ही strength असली तरी ज्या सार्वभौम ईश्वराचा अंश हृदयी आहे(Consciousness) त्या सार्वभौमत्वाचे ज्ञान नसणे अर्थात अव्यक्त, शाश्वत ईश्वराचे ज्ञान नसणे हे जीवनाचे ज्ञान या संदर्भात अज्ञान ठरते.

अव्यक्तं व्यक्तिम् आपन्नम् मन्यते माम् अबुद्धयः।
परम् भावम् अजानन्तो मम अव्ययम् अनुत्तमम्॥(७-२४)

मनुष्यजीवनात ईश्वर, धर्म, दैव यांची निश्चित भूमिका भगवदगीता स्पष्ट करते.

*ईश्वराची भक्ति या संदर्भात भगवदगीतेत दोन प्रश्न महत्वाचे आहेत.

१. अव्यक्त(Formless) ईश्वराची भक्ति किंवा सगुण(Form) ईश्वराची भक्ति यांत कोणती भक्ति श्रेष्ठ समजावी?(१२-१)

२. श्रद्धेने ईश्वराची भक्ति करणारा जर निष्काम कर्म आचरण करीत नाही तर त्याची श्रद्धा कोणती?(१७-१)

-१. अव्यक्त, अव्यय ईश्वराला आसक्त देहवानासाठी कठीण असते. (क्लेशोअधिकतर तेषां अव्यक्तआसक्त चेतसाम्). पण कर्माद्वारे अनन्यभक्तिने ही भक्ति साध्य होते.

-२. निष्काम कर्माचे logicच Detachment (from pain, अशाश्वत) साठी आहे. शाश्वत ईश्वराचे ज्ञान जाणले तर सृष्टिसंचलनातील "ॐ तत् सत्" या ब्रिदवाक्याचे महत्व कळते. ॐ एकाक्षर ब्रह्म ईश्वराचे अस्तित्व दर्शविते. "तत" म्हणजे निष्काम कर्म व "सत" म्हणजे चांगलेपणा(सद् भाव, सत्कार्य) व यज्ञ, दान, तप या कार्याची वर्तमानातील स्थिति याप्रमाणे जीवनविकासाचा "सतमार्ग" स्पष्ट केलेला आहे.

मनुष्यजीवन म्हटले कि शरीर अशाश्वत आहे व ईश्वर शाश्वत आहे, त्याचाच अंश जीवात्मा बनलेला आहे म्हणुन जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा राजमार्ग ठरतो. धर्म या संदर्भात "अमृतत्वाय कल्पते" हाच शाश्वत धर्म ठरतो.

ब्रह्मणो हि प्रतिष्ठा अहम् अमृतस्य अव्ययस्य च।
शाश्वतस्य धर्मस्य सुखस्य ऐकान्तिकस्य च॥(१४-

*धर्म म्हटले कि योग्य-अयोग्य हा द्वन्द्व असतो.

१. जीवनाच्या राजमार्गावर स्वतःचा स्वधर्म हा Tiebreaker (निर्द्वन्द्व) असतो.

२. बुद्धियुक्त स्थितित निर्द्वन्द्व असतो अर्थात कार्याचा एकनिश्चय असतो. ईश्वर व धर्म या संदर्भात चांगल्या मनुष्याला Priority ईश्वराचा आश्रय असते ज्यामुळे बुद्धियुक्त असतो.

* दैव हा शब्द मनुष्यजीवनात नशीब, नियति या अर्थाने संदेश देत असते. याच संदर्भात अधिदैव(घडविणारा) ईश्वर असतो. (पुरुषश्च अधिदैवतम्)

"ॐ तत् सत्"

************

(७-२७)

*******************

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वंद्वमोहेन भारत।

सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप॥

*******************

(७-२७):"इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वंद्वमोहेन भारत"

या सृष्टित प्रकृतिचे Automation असते. प्रकृतिच्या Automation प्रमाणेच मनुष्याची जीवनयात्रा असते.
मनुष्य जीवनाच्या विकासमार्गावर उत्साहाने कार्यरत असतो. पण Obstacle आले असता (अज्ञानामुळे) प्रकृतिवश होतो अर्थात Automationप्रमाणे जगत असतो. याचमुळे दुःखी होतो, चिंता करतो, Tension असते, स्वमतांध होतो.

अर्जुन मार्गावर असतो पण Obstacle येते. तो दुःखी होतो. व निष्क्रिय होतो. हे Obstacle, Obstacle नसुन धर्म आहे असा अर्जुनाचा समज होतो. विकासमार्गातील अडथळयालाच धर्म

आहे असा वाद करणे स्वमतांधता ठरते. ही स्वमतांधताही प्रकृतिच्या Automation चा भाग असतो. अशीच मानसिकता बनली तर विकासमार्ग सोडुन डबक्यात जगणे पसंत करतो. व हेच अज्ञानाचे कारण ठरते.

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वंद्वमोहेन भारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप।।(७-२७)

भगवतगीता याच Automationचे रहस्य, Obstacleची ओळख देते.

Automation

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।(३-३३)

Obstacle

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयोःन वशम् आगच्छेत् तौ ही अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

पुढे याच Obstacle वर मात करण्यासाठी(Barrier breaker) Values (Tiebreaker)सांगते.

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् ।(३-३५)

धर्मात चांगलेपणाला महत्व असते. सामान्य मनुष्य याच चांगलेपणाला महत्व देतो.

(१)याच चांगलेपणामुळे(रामायण) दशरथ महाराजांनी कैकयीला वर दिलेत. पण प्रत्यक्ष कृतीची वेळ आली असता" Goodness vs Values(वचन)" हा लढा उभा होतो.

(२) महाभारतात याच चांगलेपणामुळे अर्जुनाला दुःख होते. व निष्क्रियता पसंत करतो, पण याला धर्म समजतो, तेंव्हा "Goodness vs. Values(स्वधर्म)" हा लढा उभा होतो.

अर्थात जीवनात चांगलेपणाचे Purpose द्वंद्वमोहमुक्त होणे असते. याचसाठी (As Barrier breaker) Values चे महत्व, अध्यात्माचे(प्रकृति-पुरुष ज्ञानविज्ञान) महत्व, कार्याद्वारे ईश्वरभक्तिचे(पुरुषोत्तम) महत्व भगवतगीता स्पष्ट करते.

येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः(७-२८)

************

(७-२७) :

"सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परंतप "

[सामान्य जीवन (प्रकृति) vs श्रेष्ठ जीवन (संस्कृति)]

१. जीवन जगण्याची सामान्य अवस्था :

Everyone thinks of changing the world, but no one thinks of changing himself.

-Leo Tolstoy

मनुष्य "योग्य" समजुनच जगत असतो. जगत असतांना स्वतःचे समर्थन करणे, इतरांनी काय करावे व करु नये, या विचारसरणीचा(Habit of thinking) शिकार होतो. व्यवहारात "काय हवे" ही पारदर्शकता असेल तर मनुष्याला स्वतःची भूमिका मिळते. नियतकार्य मिळते. अर्जुनाला व्यावहारिक प्रक्रियेतच नियतकार्य मिळाले. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर आला असता दुःखाचे भयाने कार्य टाळतो व हीच(प्रज्ञावादी )विचारसरणी जीवनात पुनःपुनः डोके वर काढते. तेंव्हा कितीही ज्ञान घेतले तरी हीच

विचारसरणी घट्ट (Conditioned thought) होत जाते. या भूमिकेला मनुष्य ज्ञानी भूमिका समजतो पण वास्तवात हा अहंकार असतो.

प्रत्येक मनुष्याला स्वतःचा मार्ग चालायचा असतो व याचेच अर्जुनाला अज्ञान असते. अहंकारामुळे हे अज्ञान कायम राहते. हेच अज्ञान दुर करण्यासाठी ईश्वराचे ज्ञान भगवतगीतेत "ज्ञान" या संदर्भात आलेले आहे. (ज्ञानसंच्छिन्न संशयम् ). या ज्ञानामुळे स्वतःचा प्रवास ईश्वरधामाकडे आहे, याचा बोध होतो व ईश्वरज्ञानाचा आश्रय स्वतःची भूमिका correct करण्यासाठी आहे याची प्रचिति येते.

२. द्वन्द्व (मनोवश) -निर्द्वन्द्व(आत्मवश)

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वंद्वमोहेन भारत।
सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परंतप ॥(७-२७)

मनुष्याच्या अधिकारात कार्य आहे. व जगतांना कार्यच घडत असते. या कार्यातील द्वंद्व मार्गात अडथळा बनतो. या

अडथळयाला वश झाल्यामुळे अज्ञान असते. ही मनोवश भूमिका असते. स्वतःवरील command सूटते.

"Born to win but conditioned to loose"

मनुष्य या जगात आला, तो जगत असतोच. नाव समुद्रात वाऱ्याने वाहते तसे कुणाचे जीवन सुरु असते. ही मनोवश, द्वंद्ववश अवस्था असते. नाव तुफानात सापडावी तसे दुःखामुळे मनुष्याची स्थिति होते. याच दुःखाशी deal करण्यासाठी ईश्वरज्ञान, स्वतःचे ज्ञान (आत्मज्ञान, अध्यात्मज्ञान) ज्ञानविज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते.

नावेवर ज्याची command असते, तो नाव वल्हवतो. अर्थात स्वतःचा मार्ग चालत असतो. याच मार्गाचे ज्ञान भगवतगीता देते. आत्मवश भूमिकेत मार्ग दृढ होतो. हीच भूमिका धारण करण्यासाठी जीवनात ईश्वर ज्ञानाचा आश्रय महत्वाची भूमिका बजावते.

*चांगले-वाईट

चांगले व वाईट या संदर्भात दैवी व आसुरी प्रवृत्तिचा भगवतगीता उल्लेख करते. पण हा भगवतगीतेचा मुख्य विषय नाही. जेंव्हा

चांगला मनुष्यही दुःखाने व्यथित होतो, तेंव्हा तो बंधनात अडकतो. त्याला मार्ग सापडत नाही व अज्ञानामुळे निष्क्रियतेचे समर्थन करतो. चांगलेपणा दैवी संपत्ति असते. त्याचा चांगलेपणाबद्दल गैरसमज होतो . हा गैरसमज भगवतगीता दुर करते व त्याचा मार्ग clear करण्याचे ज्ञान देते.

ज्ञान कार्यातील संशय मिटविण्यासाठी आहे हे ज्ञानाचे रहस्य भगवतगीता सांगते. ज्ञान आणि ईश्वर याचे नाते स्पष्ट करते. फलसिद्धिसाठी देवतापुजन कळते. पण ईश्वरज्ञान कार्यातील संशय मिटवते. मार्ग दृढ होतो व कार्याद्वारे ईश्वरभक्ति होऊन योग, ज्ञान प्राप्ति होते हेच रहस्य भगवतगीता सांगते. मार्ग दृढ करण्यासाठी स्वधर्म जीवनमुल्य ठरते. ईश्वरभक्तिने बुद्धियोग प्राप्त होतो व निर्णय दृढ होण्यासाठी सहकार्य होते.

नकारात्मक विचार विकासाला खिळ घालते, ते कधी मनाचा व पर्यायाने बुद्धिचा ताबा घेतात, कळतही नाही. व यामुळे स्वतःच्या चांगल्या गुणांचा, सामर्थ्याचा विसर पडतो. तर सकारात्मक (चांगले, कल्याणकारी )विचार ईश्वरी कृपा असते. यामुळे आत्मविश्वास असतो. हीच कृपा प्राप्त होणे बुद्धियोग आहे.

तेषां सततयुक्तानां भजतां प्रितिपुर्वकम्।
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते॥(१०-१०)

तेषां एव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजं तमः।
नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदिपेन भास्वता॥(१०-११)

३. मनुष्याचे अधिकारक्षेत्र:

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतुर्भुः मा ते संगो अस्तु अकर्मणि॥(२-४७)

अर्थात कर्माचा अधिकार, निर्णयअधिकार हे मनुष्याचे अधिकारक्षेत्र आहे. यासाठी स्वावलंबन हे जीवनमुल्य असते.
"Beggars are not choosers"

ईश्वराचे अधिकारक्षेत्र:

मया अध्यक्षेण प्रकृति सुयते सचराचरम् ।

हेतुना अनेन कौंतेय जगद् विपरिवर्तते॥(९-९)

ईश्वरः सर्वभूतानांहृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया॥(१८-६१)

मनुष्य आपल्या अधिकारक्षेत्रात कर्म करतो. परिणाम ईश्वराचे अधिकारक्षेत्र आहे. परिणामाचे भय विचलित करीत नाही. याची जाण असणारे कर्माद्वारे विकासमार्गावर असतात . अंतःकाळी ईश्वराच्या दिव्य धामात विलिन होतात.

जन्मकर्म च मे दिव्यं एवं योः वेत्ति तत्वतः।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सो अर्जुन॥(४-९)

४. जीवनाची श्रेष्ठ अवस्था प्राप्तिचा मार्ग :

भगवतगीता कर्म, कार्याचा एकनिश्चय (Determination) याला महत्व देते. ज्याचा निश्चय दृढ असतो, तो निष्ठेने कार्य करतो. विकासमार्गावर असतो. दृढ नसलेला सकाम मानसिकतेचा असतो, भूतकाळातील दुःखाचे ओझे वहात जगत असतो. अर्थात

वर्तमान जगत नाही. ही मानसिक दुर्बलता असते. जीवनातील याच अज्ञानाला भगवतगीता प्रकाशात आणते.

शेक्सपियर म्हणतो, "धाडसी व निर्भय मनुष्यच यशाचे शिखर गाठु शकतो. भित्र्या माणसाची फारशी प्रगति होत नाही. "

जे योग्य कार्य आहे, ते साकार करण्यासाठी धाडसाची गरज असते. व कार्यातुन सामर्थ्य वाढते. हे रहस्य कर्मयोगातुन भगवतगीतेत दर्शविले आहे.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

या धर्मात कार्याचा एकनिश्चय असतो. भय, संशय यामुळे मन चंचल असते व निश्चय दृढ होत नाही.

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।
बहुशाखा हि अंनन्ताश्च बुद्धयोः अव्यवसायिनाम् ।।(२-४१)

कार्याद्वारे द्रव्यप्राप्ति आपण जाणतो पण कार्याद्वारे धाडस, निर्भयतेचे सामर्थ्य जाणत नाही. कार्याद्वारे योगाचे हेच रहस्य आहे.

*****

(७-२८)

. *******************

येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।

ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।

*******************

(७. २८):"येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्"

मनुष्यजीवन जीवनविकासाची जीवनयात्रा असते. याच यात्रेतील विकासातुन Strong (विचलित न होणे, निर्भय) होणे, हा भगवतगीतेचा संदेश आहे. याचसाठी चांगलेपणा (सत)साधन आहे. चांगला मनुष्य कार्याद्वारे ईश्वरभक्ति करुन द्वंद्वमोहमुक्ति (Strong)साध्य करतो.

येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।

ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)

सामान्यतः मनुष्य जे करतो ते योग्य समजुन करतो व निष्क्रिय झाला तरी "योग्य" दर्शवित असतो. स्वतःचे अस्तित्व, श्रेष्ठत्व

दर्शविण्यासाठी तुलना करणे, समर्थन करणे हे प्रकृतिचे Automation असते(प्रकृतिवश). अर्जुन चांगला मनुष्य असतो. पण चांगलेपणामुळे युद्धक्षेत्रावर दुःखी होतो. द्वंद्ववश होतो. निष्क्रियतेचे समर्थन करतो, याला चांगलेपणा दर्शवितो.

येथेच भगवतगीता सामान्य व श्रेष्ठ पुरुष यातील भेद दर्शविते. सामान्य श्रेष्ठांचे अनुसरण करतो तर श्रेष्ठ आत्मविश्वासाने विकासमार्गावर असतो, प्रसंगी दुःखाने व्यथीत होत नाही.
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

सामान्य असणे ही प्रकृति आहे, तर श्रेष्ठ होण्यासाठी कार्याचा मार्ग(स्वधर्म, निर्णयअधिकार-दृढनिश्चय) जाणणे व कार्याद्वारे भक्ति साध्य करुन Strong (योगयुक्त)होणे हाच "अमृतत्वाय कल्पते" हा राजमार्ग आहे.

व्यावहारिक बोध:चांगले व्हावे यासाठी समाजात बोधप्रद प्रवचने मनुष्य ऐकत असतो. पण कार्याद्वारे Strong (योग) होणे या संदर्भात हे अधुरे ज्ञान असते तेंव्हा लोकांनी चांगले म्हणावे (अर्थात किर्तिची इच्छा) ही इच्छा करतो. यासाठी

तुलना(Comparision, Judgement thinking), समर्थन याचा आधार घेतो. याचमुळे दुसऱ्यावर टिकाही करतो. या भाष्याला प्रज्ञावाद संबोधुन भगवतगीता याच अपुर्ण ज्ञानाला पुर्णत्व देते. ज्यामुळे विश्वासाने(Confident) जीवनयात्रा करण्यास मनुष्य समर्थ होईल.

******

(७-२८)/२ :"ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः"

आपले जीवन सुरु आहे. यांत अनुभव घेतो, ज्ञान घेतो, भक्ति करतो. ही प्रक्रिया सुरु असते. असेच अर्जुनाचे जीवन सुरु असते. महत्वाच्या वेळी दुःखी होतो. मार्गात अडथळा जाणवतो. निष्क्रियतेचे समर्थन करतो. आपल्या अशांत मनाला शांत करतो. आपल्याजवळ जी ज्ञानाची पुंजी असते, त्याचा समर्थनासाठी वापर करतो.

भगवतगीता वर्तमानातील मानसिक स्थिति (State of mind) व जीवनात कोणती मानसिक स्थिति achieve करायची आहे, (ज्याला स्थितप्रज्ञ Higher state of mind म्हटले) जे जीवनाचे " लक्ष्य" ठरते, यांतील भेद स्पष्ट करते. व ही स्थिति achieve करण्यासाठी वर्तमानात मानसिकता कशी असावी? ज्याचा मनुष्याच्या कार्याशी, ज्ञानाशी, सुखदुःखाशी संबंध आहे अर्थात जीवनविकासाची या संदर्भात प्रक्रिया कशी आहे ?याचे ज्ञान सांगते. अर्थात जीवनाचे रहस्य ज्ञानविज्ञानासह सांगते.

भगवतगीतेत मुख्य विषय "कर्म" संबंधी आहे. निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी अर्जुन ज्ञान वापरतो. प्रत्यक्षात ज्ञान मार्गातील अडथळा दुर करण्यासाठी असते, निष्क्रियतेचे समर्थन करणारे ज्ञान मनुष्याचा प्रज्ञावाद असतो. सामान्य State of mind मध्ये दुःखी होतो. दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो. याच मुद्याला भगवतगीतेने उचलले.
वर्तमानात आलेली अशांती, दुःखाने विचलित झालेली मानसिकता/बुद्धि ही सामान्य अवस्था( Normal state of mind )असते. या अवस्थेत दुःख, अडचणी जाणवतात. तर उच्च स्थितित(HSM-Higher state of mind) जगात चांगलेपणाच दिसतो. अडचणी कार्यसंधी जाणतो, दुःख स्वतःला विकासाची

संधि जाणतो. म्हणुन HSM (Higher state of mind/स्थितप्रज्ञ) ध्येय जाणले तर वर्तमानात कसे जगायचे हे स्वतःला ठरविता येते. म्हणुन निर्णय अधिकाराची जाण भगवतगीता देते.

बुद्धिची Higher अवस्था प्राप्त करायची आहे तर कर्म कशाला?हा अर्जुनाचा प्रश्न असतो. कर्मच विकासाचे साधन आहे. कोणता विकास हवा हे मनुष्यच ठरवतो. कर्मानेच योगक्षेम चालतो. सामान्य mind कर्म प्राप्तिसाठीच जाणतो. म्हणुन अर्जुन म्हणतो, मला कांही नको, म्हणुन निष्क्रियतेचे समर्थन" श्रेष्ठ"(चांगलेपणा/पुण्य) या संदर्भात करतो.

व्यवहारात चांगले कर्म" पुण्य" या संदर्भात मनुष्य जाणतो. याच चांगलेपणाचा उद्देश जीवन "सत"mode मध्ये जगणे असते. (ज्याला आपण सात्विक म्हणतो). अर्जुन चांगला असतो, तरी मोहामुळे द्वंद्वाच्या जाळ्यात सापडतो. म्हणुन भगवतगीतेने चांगलेपणाला ज्ञानाची जोड दिली आहे. सामान्य (Normal state of mind) अवस्थेत मनुष्य मोहामुळे द्वंद्ववश होतो. ईश्वरभक्तिसाठी कार्य ही प्रक्रिया द्वंद्वमोहमुक्तिसाठी सांगितली आहे.

एषा तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)

याचाच अर्थ जीवनातील चांगलेपणा जीवनांत उच्च मानसिकता प्राप्त करण्यासाठी महत्वाचे साधन आहे. साध्य मात्र HSM(Higher state of mind)

स्थितप्रज्ञ आहे. वर्तमानात उच्च मानसिकता धारण करण्यासाठी बुद्धियोग/योगयुक्त या शब्दाचे प्रयोजन आहे व यासाठी ईश्वराचा आश्रय असा संदर्भ जोडलेला आहे. जीवनाचा अंतिम goal ईश्वरधाम याचे ज्ञान जाणले तर जीवनाचा विकासमार्ग अमृतंगमय होतो. या मार्गात विचलित होत नाही. जीवननाव निश्चित ध्येयाचे दिशेने वल्हवीत असतो. बुद्धिवरील या संस्काराला बुद्धियुक्त म्हटले आहे.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिं अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

याप्रमाणे जीवनमार्गात "कर्म" विकासाचे साधन represent करते. "ज्ञान" मार्गात प्रकाश represent करते (ज्यामुळे विश्वासाने मार्ग चालतो). "भक्ति " विकासनिष्ठा represent करते. बुद्धिची "स्थितप्रज्ञ" अवस्था विकासाचे लक्ष्य represent करते. ईश्वरज्ञान जीवनाचा चालक व अंतिम धाम represent करते.

"स्वतःची मानसिकता" याच संदर्भात (नकारात्मक vs सकारात्मक हा) मानसिकता बदल विषय समाजात चर्चिल्या जातो. पण बदल होण्यासाठी निश्चित Awareness भगवतगीतेतुन येतो. (Normal state of mind vs Higher state of mind)

* दुःखाने विचलित होतो कि दुःख Stepping stone जाणतो?

*अडचणीमुळे हताश होतो कि अडचणी कार्यसंधि जाणतो?

*स्वतःजवळील ज्ञान निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी वापरतो कि जीवनमार्गात विकास करण्यासाठी (दृढनिश्चय) वापरतो?

*आपले जीवन लादलेले आहे कि स्वतःचा निर्णय आहे!

*जगात वाईटच दिसते कि जग चांगलेपणाचा Resource आहे?

*जग अडचण वाटते कि विकाससंधी!

*जीवन दुर्दैवी वाटते कि जगायची दुर्लभ संधि!

*वर्तमानात अशांत आहे कि शांत!

* म्हणुन शेवटी जीवन कठिण आहे कि सोपे?

(*ज्ञानाने अंधार मिटतो, कठिण मार्ग सोपा होतो . भगवतगीता ज्ञान आहे व ज्ञान कठिण सोपे करण्यासाठी आहे. )

**********

(७-२९)

***********************

जरामरणमोक्षाय माम् आश्रित्य यतन्ति ये।

ते ब्रह्म तद् विदुः कृत्स्नं अध्यात्म कर्म च अखिलं।।

********************

(७-२९):"जरामरणमोक्षाय माम् आश्रित्य यतन्ति ये"

(जो सुखमे सुमिरन करे तो दुख काहे होय)

आपल्याला मनुष्यजीवन मिळाले. या जीवनयात्रेतील जरा(म्हातारपण), मृत्यु हे Milestones अनिवार्य असले तरी अप्रेयस असते. म्हणुन जीवनातील जरामरणाच्या दुःखापासुन मुक्तिसाठी ईश्वराचा आश्रय करणे याचाच अर्थ नित्य जीवनविकासाच्या मार्गावर असणे.

जो सुखमे सुमिरन करे तो दुख काहे होय।

दुःखमुक्तिसाठी मनुष्य Shortcut वापरतो व ज्ञानी समजुन प्रज्ञावादी होतो. हेच त्याचे अज्ञान(ज्ञानी समजण्याची चुक करणे) ठरते. या स्थितीत तो विकासमार्गावर नसतो. अर्जुनाचा

प्रज्ञावाद(बौद्धिक समर्थन) निष्क्रियतेची Reaction असते. मनुष्य विकासमार्गावर नसतो, तेंव्हा दुःखमुक्तिसाठी, शांतीसाठी याच प्रज्ञावादाचा ज्ञानी समजुन वापर करतो. म्हणुन भगवतगीता ज्ञान "प्रज्ञावादी संवय vs. विकासमार्ग" या मुद्यावर सुरु होते.

मनुष्य व्यवहारात सकाम कार्यरत असतो, म्हणुन द्वंद्वमोहाच्या जाळ्यात सापडतो. तर जीवनाचा विकासमार्ग जाणणारे सकाम मार्गाला निष्काम मार्गात Transform करतात. या मार्गात द्वंद्वमोहमुक्तीसाठी ईश्वराला भजतात. अर्थात या विकासमार्गावर असणारा द्वंद्वमोहमुक्त असतो.

ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।(७-२८)
जरामरणमोक्षाय माम् आश्रित्य यतन्ति ये।
ते ब्रह्म तद् विदुः कृत्स्नं अध्यात्म कर्म च अखिलं।।(७-२९)

व्यवहारात कर्म साधन असते. Transformationच्या (सकाम ते निष्काम) प्रक्रियेत शाश्वत ब्रह्म(जीवनातील शाश्वत तत्व), अध्यात्म(ब्रह्म-परब्रह्म) याचा वापर होतो व विकासमार्ग(अमृतत्वाय कल्पते) ठरतो.

*******

(७-२९):

"ते ब्रह्म तद् विदुः कृत्स्नं अध्यात्मं कर्म अखिलं"

(Life journey &Role of Work)

जीवनप्रवासाचे ज्ञान हाच भगवतगीतेचा विषय आहे. जीवन आहे तर प्रवास होतोच . याच प्रवासात सुखी होतो, विकास साधतो. याच प्रवासात म्हातारपण येते. मृत्यु येतो, दुःख होते, अडचणी येतात. म्हणुन या प्रवासात अडचणीवर, दुःखावर मात करता यावी व प्रवास सुखाने व्हावा यासाठी भगवतगीता संदेश देते:

जरामरणमोक्षाय माम आश्रित्य यतन्ति ये।
ते ब्रह्म तद् विदुः कृत्स्नं अध्यात्मं कर्म अखिलम् ।।(७-२९)

अध्यात्म (स्वतःचा मुळ भाव) जाणल्यामुळे "अमृतत्वाय कल्पते" हा शाश्वत प्रवासाचा मार्ग जाणतो. या प्रवासात जीवित तत्वातील( श्रेष्ठ )शाश्वत तत्व ब्रह्म, यामुळे Higher consciousness व Lower Consciousness मधील भेद जाणतो . हा प्रवास कर्मानेच होतो म्हणुन कर्म हे विकासाचे साधन जाणतो. याच प्रवासात अर्जुन कर्म टाळण्यासाठी ज्ञान वापरतो. तेंव्हा प्रश्न येतो:

१. ज्ञान कशासाठी? कर्म टाळण्यासाठी कि कर्म करण्यासाठी ( कार्याचा निश्चय होण्यासाठी)?

मनुष्य शिक्षण घेतो, ते कर्म करण्यासाठीच, व कर्माद्वारे विकास साधण्यासाठी. भगवतगीता संदेश देते,

"योगसंन्यस्तकर्माणंज्ञानसंच्छिन्नसंशयम्" (४-४१)

(संशयमुक्तिसाठी ज्ञान वापरुन कार्याचा निश्चय करणे व कर्माद्वारे योग साध्य करणे, अंततः ज्ञानाद्वारे कर्मसंन्यास-अकर्ता)

"The great aim of education is action not knowledge. "

२. कर्म सुखासाठीच केले जातात. परंतु अर्जुनाला कष्ट जाणवते, दुःखदायी वाटतात. म्हणुन अध्यात्म, Lower consciousness(Senses mind) vs Higher Consciousness, ब्रह्म, परब्रह्म(ईश्वर) हा विषय आला. सुखासाठी योग(दुःखान्त) हा विषय आला. स्वविकास (योगक्षेम) असो, समुहविकास असो, जगतहिताय विकास असो, या सर्वांचा समन्वय स्वधर्माने साधल्या जातो. हा भगवतगीतेचा महत्वाचा सिद्धांत आहे. हा स्वधर्म स्वतःच्या मार्गासाठी Tiebreaker असतो. याच आधारावर "अमृतत्वाय कल्पते" (२-१५) हा शाश्वत विकासाचा (आत्मोन्नति, स्वतः स्वतःचा बंधु) मार्ग

जाणतो. याच मार्गाची "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च " अशी ओळख असते.

उदा. मधमाशी एकाच कार्यात-स्वधर्मात (स्वविकास-योगक्षेम, समुहकल्याण, निसर्गहीत-बीजाचे फुलात रुपांतर)सर्वांगीण विकास साधत असते. हेच कार्य आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च असे संबोधल्या जाते. "Economy of Permanance " शाश्वत किंवा शांतीची समाजव्यवस्था(शोषणमुक्त) याला हाच आधार आहे.

* Economy of Permanace ही विश्वातील चार व्यवस्थेतील सर्वोत्तम व्यवस्था असते

१. Economy of Parasite/Predation (परोपजीवी)

२. Economy of Enterprise (मुक्त, भांडवलशाही )

३. Economy of Gregation (समुहप्रधान)

४. Economy of Permanance (समुहाला, निसर्गाला सहकार्य करणारी शोषणमुक्त)

**********

(७-३०)

*********************

सअधिभूतअधिदैवं मां सअधियज्ञं च ये विदुः।

प्रयाणकाले अपि च मां ते विदुःयुक्त चेतसः।।

*********************

(७. ३०):

"सअधिभूतअधिदैवं मां सअधियज्ञं च ये विदुः"

जीवनात ईश्वराचे नित्यस्मरण करणे या संदर्भात अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ या शब्दांचा उल्लेख भगवतगीतेत कर्माद्वारे जीवनविकास या संदर्भात आलेला आहे.

सअधिभूतअधिदैवं मां सअधियज्ञं च ये विदुः।

प्रयाणकाले अपि च मां ते विदुःयुक्त चेतसः।।(७-३०)

१. प्राप्तिसाठी कर्म यांत स्वहितासाठी, परमार्थासाठी, किर्तिसाठी, स्वर्गप्राप्तिसाठी कर्म यांचा समावेश होतो. याच ज्ञानानुसार अर्जुन म्हणतो, मला कांही नको(न कांक्षे विजयं), परमार्थासाठी करायचे (एषां अर्थे )तर ते येथेच युद्धासाठी ठाकले आहेत. या कार्यात

लोभ आहे (लोभोपहतचेतसा), नरकप्राप्ति आहे म्हणुन अधर्म आहे हे सर्व प्राप्तिसंदर्भात भाष्य करतो व युद्ध न करणे श्रेयस्कर जाणतो.

प्राप्तिसाठी कर्म हा व्यवहार असतो. सामान्य मनुष्य याच सिमित ज्ञानामुळे कर्माला कष्ट जाणतो. मोह पावतो अर्थात द्वंद्वमोहाचा आश्रय विकासातील अडथळा ठरतो. यामुळे
प्रज्ञावादाचा(Judgemental thinking)चा आश्रय करतो.
इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत।(७-२७)
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

२. कर्माचा दुसरा भाग जीवनविकासकौशल्याचा असतो. याच ज्ञानाचा उपयोग Motivation साठी होतो. हाच जीवनातील उर्जेचा भाग (निर्भयता, साहस)आहे. याच विकासमार्गातील कौशल्याचे ज्ञान भगवतगीता देते. यांत (अ)कार्यकौशल्य :स्वधर्माचरण, कार्याचा एकनिश्चय व समत्वयोग (योगः कर्मसु कौशलम्)
(ब) ईश्वराचे नित्य स्मरण असणे या संदर्भातील अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ ज्ञान:

*अधिभूत:(क्षरोभावः, Changing nature) प्रकृतिचे सृजन व लय

*अधिदैव:(पुरुषश्च अधिदैवतम्)सर्व देवतांचा अधिपति, शाश्वत तत्व, Creater of Destiny

*अधियज्ञ:(अहमेव अत्र देहे देहभृतांवर) मनुष्याच्या प्राणतत्वातील शाश्वत तत्व(Supersoul), विश्वकर्माचा अंश(अधियज्ञ)अर्थात सृष्टिचे संचलन कर्मानेच चालत असते. या संदर्भात यज्ञ घडतात. (एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।)

याप्रमाणे जीवनविकासमार्ग ठरवितो ज्यांत नित्य ईश्वरस्मरण असते..

समदुःखसुखंधीरं सअमृतत्वाय कल्पते।(२-१५)

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(८-७)

********************

# भगवदगीता

## अध्याय ८ अक्षरब्रह्मयोग

# अध्याय ८ अक्षरब्रह्मयोग

जीवनप्रवासात बालपण बागडण्यात सहज निघते, युवावस्था उर्जायुक्त तर जरामरण पार करणे कठिण असते. मधली मुख्य स्थिति गृहस्थावस्था असते.

गृहस्थावस्था कठिण नसते, पण आव्हानात्मक असते. आव्हान स्विकारणे हाच पुरुषार्थ असतो. याच संदर्भात अर्जुनाचे अज्ञान दर्शवुन दिले. हेच आव्हान स्विकारण्यासाठी सक्षम व्हावे म्हणुन शिक्षण, संस्कार यांचे प्रयोजन युवावस्थेत महत्वाचे असते.

जीवनविकास या संदर्भात जीवनाचे आव्हान स्विकारण्यासाठी, दुःखाच्या अवस्था पार पाडण्यासाठी ब्रह्म, अध्यात्म, कर्म याचे विशेष महत्व सांगितले, तर या प्रवासात सृष्टिजगत्, ईश्वर, मनुष्य यांचे नाते जाणण्यासाठी अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ या शब्दाने ईश्वरभूमिका स्पष्ठ केली. या शब्दांचे निश्चित अर्थ जाणुन घेण्याची इच्छा अर्जुन व्यक्त करतो. याच प्रश्नाचे निराकरण करतांना "जीवनाची लढाई "या मुख्य भागाचा उल्लेख होतो. जीवनप्रवास यशस्वी होण्यासाठी नित्य ईश्वराचा आश्रय याचे महत्व स्पष्ट होते.

८. १ जीवनयुद्ध

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।

८. २ नित्ययुक्त /योगयुक्त

तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।

८. १ जीवनयुद्ध

ब्रह्म:मनुष्याचे व जगाचे मुळ श्रेष्ठ शाश्वत स्वरुप

अध्यात्म :स्वतःचे मुळ स्वरुप जाणणे. जीवनयात्रा विकासमार्गावर सुसंचलित होण्यासाठी मनुष्याच्या आंतरजगतासंदर्भातील ज्ञान.

कर्म :भावभावनेतुन निर्माण होणारी क्रिया

अधिभूत व अधिदैव :सृष्टिनिर्मितीत क्षर (नाशवंत, Changing) प्राणिमात्रांचा निर्माता पुरुषाला अधिदैव म्हटले आहे. अधिदैव शाश्वत तर अधिभूत क्षर भाव(Changing) आहे.

अधियज्ञ:जीवात्मा(Soul) देहधारण झाल्यावर क्रियाशिल होतो. ईश्वराचा क्रियाशिल भाव यज्ञाचा अधिपति म्हणुन ओळखल्या

जातो. म्हणुन सर्व देहधारण करणाऱ्यात ईश्वराची अधियज्ञ ओळख Supersoul ठरते.

मनुष्याचे ईश्वराशी असलेले नाते जाणण्यासाठी व नित्य स्मरण होण्यासाठी योग्य शब्दांची ही ओळख आहे. आयुष्यभर जे ज्ञान conditioned झाले, तेच अंतकाळी आठवणार.

जीवनयात्रा ही नित्य जीवनाची लढाई जाणुन लढा यशस्वी पार पाडण्यासाठी ईश्वराचे स्मरण व त्याचे महत्व स्पष्ठ होते . या प्रवासात मन, बुद्धि ईश्वरसमर्पित असल्यामुळे ईश्वरमिलनाकडे हा प्रवास निश्चितपणे असतो.

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।
मयि अर्पित मनोबुद्धिः मामेव एष्यसि असंशयः।।(८-७)

८. २ योगयुक्त

नेहमी दुःखाचे स्मरण करीत जगणार कि दुःखाचे Replacement ईश्वरस्मरणाने (योगयुक्त State of mind धारणा) करणार हा या

अध्यायातील विषय आहे. म्हणुन सातत्य, मुख्य संस्काराचे स्मरण (accumulative samskara, thought) याला जीवनप्रवासात महत्व आहे. या संदर्भात पुढील विषयाची भूमिका स्पष्ठ केली.

*अभ्यासयोगी

*अनन्ययोग

*अव्यक्तात श्रेष्ठ अव्यक्त-ईश्वरधाम

*योगयुक्त

ईश्वर सनातन शाश्वत, सर्व जाणणारा व सर्वांचा धारक, अणुपेक्षा सुक्ष्म, अचिंत्य, अंधार नष्ट करणारा प्रकाश आहे. याच ईश्वराच्या साधनेत असलेले योगाभ्यासी, साधक परम् पद प्राप्त करतात. हे साधक अंतकाळी कशाप्रकारे संमिलन साधतात याचे सविस्तर वर्णन केले. तर अर्जुनाला कर्माद्वारे अनन्यभक्तिचा सुलभ मार्ग सांगतात.

अनन्यचेताः सततं यो माम् स्मरति नित्यशः।

तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।।(८-१४)

ब्रम्ह अव्यक्त आहे, तर परब्रह्म अव्यक्तात श्रेष्ठ आहे. ब्रह्माचा दिवस व रात्र याद्वारे सृष्टिची उत्पत्ति व लय ठरतो. म्हणुन ब्रह्म(लोक) व परब्रह्म (ईश्वरधाम)यांतील भेद स्पष्ठ केला.

परः तस्मात् तु भावो अन्यो अव्यक्ताद् अव्यक्त सनातन।(८-२०)
अव्यक्तो अक्षर इति उक्ताः तम् आहुः परमां गतिम् ।
यं प्राप्य न निवर्तन्ते तद् धाम परमं मम ॥(८-२१)
सर्व सृष्टिचा मुळपुरुष म्हणुन ईश्वराची ओळख आहे.
(कर्माद्वारे)अनन्यभक्तिने या श्रेष्ठ धामास पोहोचणे सुलभ असते.
*शुक्लपक्ष व कृष्णपक्ष अशा जन्ममृत्युच्या कालगति आहेत. शुक्लपक्षात मुक्ति व कृष्णपक्षात पुनः जन्म!पण ही सृति जाणुन योगी मोह पावत नाही. (मला शुक्लपक्षात जायचे आहे असा भिष्माचार्याचा पण होता). म्हणुन सदासर्वकाळ योगयुक्त असणे श्रेष्ठ ठरते.
नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन ।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन॥(८-२७)
(म्हणुन अनन्ययोग राजयोग ठरला आहे. अध्याय ९ याच संदर्भात येतो)

********* ******** *********

अध्याय ८-मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

(८-१):

"किम् तद् ब्रह्म किं अध्यात्म किं कर्म पुरुषोत्तम?"

(अध्यात्मज्ञान)

८. ३/१ : "स्वभाव अध्यात्म उच्यते"

(Know Thyself)

(८. ३)/२ :"अक्षरं ब्रह्म परं स्वभाव अध्यात्म उच्यते"

(८-६) :

" यं यं वाअपि स्मरन् भावम् त्यजति अंते कलेवरम् "

(The journey of life)

८-७/१:

"तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च"

(वर्तमानातील सुखी जीवनाचे रहस्य)

८. ७/२: "माम् अनुस्मर युध्य च "

८-७/३) :

" माम अनुस्मर युध्य च "

(Life is crusade)

८-९ :"कविंपुराणम् अनुशासितारम् अणोःअणीयांसम् अनुस्मरेद् यः"

(८-१४)/१:"अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः"

(High level of awareness)

(८-१४)/२ :

" तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः"

(Purpose & meaning of life)

८. १५/१:

"माम् उपेत्य पुनर्जन्म दुःखालयम् अशाश्वतम् "

(८-१५)/२ :

".. दुःखालयम् अशाश्वतम् न आप्नुवन्ति महात्मनः संसिद्धिं परमां गताः"

८. १६: "मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते"

(८-२०)/१:

"परः तस्मात् तु भावः अन्यः अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः"

(Absolute)

८. २०/२: "अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः"

८. २१/१ :

"अव्यक्तो अक्षर इति उक्तः तम् आहुः परमांगतिम् "

(Philosophy of Religion & God)

८. २१/२ :"यं प्राप्य न निवर्तंते तद् धाम परमं मम"

८. २१/३: "तत् धाम परमं मम "

(Address of Life)

(८-२२)/१ :

" पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्य तु अनन्यया"

(ईश्वराची ज्ञान या संदर्भात ओळख)

(८-२२)/२:

"यस्य अंतःस्थानी भूतानि येन सर्वम् इदम् ततम् "

(Destination)

८. २७/१ : "नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन् "

(What is knowledge to life?)

८. २७/२:"तस्मात् सर्वेषु कालेषु 'योगयुक्तो' भवार्जुन"

८. २७/३: "योगयुक्तो भवार्जुन "

(८-१)

**************************

किम् तद् ब्रह्म किं अध्यात्म किं कर्म पुरुषोत्तम।

अधिभूतं च किं प्रोक्तं अधिदैवं किं उच्यते।।

**************************

(८-१) :

"किम् तद् ब्रह्म किं अध्यात्म किं कर्म पुरुषोत्तम?"

(अध्यात्मज्ञान)

भगवदगीतेत "ज्ञान " या संदर्भात अध्यात्मज्ञानाचा विषय जीवनविकासाच्या मार्गासाठी स्पष्ट केला आहे. या ज्ञानाला नित्यज्ञान म्हटले.

अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञानार्थ दर्शनम्।

एतद् ज्ञानम् इति प्रोक्तम् अज्ञानं यदतो अन्यथा।(१३-११)

"सुखी जीवनाचा (विकास)मार्ग " या संदर्भात जीवनातील वृद्धावस्था, मृत्यु या दुःखापासुन मुक्त होण्यासाठी मार्गाचे वर्णन ज्ञानविज्ञानयोगात स्पष्ट केले,

जरामरणमोक्षाय माम् आश्रित्य यतन्ति ये।

ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नं अध्यात्म कर्म च अखिलं।(७-२९)

जे नित्य ईश्वराचा आश्रय जीवनयात्रेत करतात ते जीवनमार्गातील ब्रह्म, अध्यात्म, कर्म याचे महत्व जाणतात. यावरच ब्रह्म, अध्यात्म, कर्म याचा निश्चित अर्थ जाणुन घेण्यासाठी अर्जुन प्रश्न करतो .

किम् तद् ब्रह्म किं अध्यात्म किं कर्म पुरुषोत्तम?(८-१)

याचेच उत्तर येते,

अक्षरं ब्रह्म परं स्वभाव अध्यात्म उच्यते।

भूतभावउद्भवकरो विसर्गः कर्म संज्ञितः।(८-३)

स्वतःचा मुळ भाव/शाश्वत भाव/ स्वतः(Self )संबंधी ज्ञान/Know Thyself/Self realization/आत्मा-परमात्मा संबंधी ज्ञान याप्रमाणे अध्यात्मज्ञानाचा बोध होतो.

अध्यात्मज्ञान व त्याचा उपयोग याचे सार पुरुषोत्तमयोगात स्पष्ट झाले आहे.

ईश्वराचे धाम म्हणजे जीवनमार्गाचे Destination या अर्थाने स्पष्ट केले आहे. याच ईश्वराचा अंश प्रकृतिस्थानी आकर्षित असल्यामुळे जीवात्मा होतो. सर्वांचे हृदयस्थानी हाच (ईश्वराचा अंश) स्थीत असतो. जीवनयात्रेत आत्मवश होणे, निष्काम कर्मासाठी अध्यात्मज्ञानाचा उपयोग आहे.

निःमानमोहा जितसंगदोषा

अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।

द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैः

गच्छन्ति अमूढाः पदम् अव्ययं तत् ॥(१५-५)

स्पष्टिकरण :

व्यवहारात योग्य-अयोग्य या आधारावर मनुष्याचा निर्णय होतो. जो निर्णय होतो, त्याचे समर्थन करतो. प्रत्येक क्षणात कार्य घडते, या कार्याचा निर्णय होतो.

मार्गातील योग्य-अयोग्य Tie सुटण्यासाठीच धर्माचा वापर होतो. पांडवांना न्याय मिळावा या हेतुनेच धर्मकार्य ठरते. या युद्धाला धर्माचा शिक्का लागतो. अर्जुन याप्रमाणे युद्धक्षेत्रावर कार्यरत होत असतांना दुःखी होतो. नियतकर्म अर्जुनाला पापकर्म वाटते. धर्म-अधर्म याचा निश्चय होत नाही. निष्क्रियतेवर धर्माचा शिक्का लावतो.

१. धर्म या संदर्भात मनुष्याचा कार्याचा निर्णय "स्वधर्म" या अर्थाने होतो. यानुसार अर्जुनाचे नियतकार्य स्वधर्म ठरते.
स्वभावनियतकार्याला धर्मकार्याची संधि मिळते.

२. कार्याचा धर्म -अधर्म हा Tie सोडविण्यासाठी बुद्धियोग ज्ञान सांगितले .

बुध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)

यांत निष्काम कर्माचे शास्त्र आहे. ईश्वराची ओळख (अव्यक्त) गुणातीत जाणुन मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. यामुळे कर्माच्या योग्य-अयोग्य या द्वन्द्वातुन मुक्त होतो. अर्थात कार्याचा एकनिश्चय होतो. समत्वयोगाने कार्यरत होतो. अर्थात येथे परिणामाच्या(फल) द्वन्द्वापासुन (यश-अपयश, सुख-दुःख) मुक्त असतो.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

"We do not get to choose how we start out in life. We do not get to choose the day we are born or the family we are born into, what we are named at birth, what country we are born in, and we do not get to choose our ancestry. All these things are predetermined by a higher power. By the time you are old enough to start making decisions for yourself, a lot of things in your life are already in place. It’s important, therefore, that you focus on the future, the only thing that you can change. "

-Idowu Koyenikan

********

(८-३)

*************************

अक्षरं ब्रह्म परं स्वभाव अध्यात्म उच्यते।

भूतभाव उद्भव करो विसर्गः कर्म संज्ञितः।।

*************************

(८-३) : "स्वभाव अध्यात्म उच्यते"

(Know Thyself)

मनोविज्ञान शास्त्र मनाचा अभ्यास असतो, तर अध्यात्म आत्मासंबंधी अभ्यास असतो. या दोहोला एकत्र करुन Spiritual Psychology, Transpersonal Psychology या विषयावर अलिकडे भाष्य होत आहे.

"Awareness of Freedom "या पुस्तकाचे लेखक Dr. Itai Ivtzan(Uni of East London) यापैकी एक आहे.

"Transpersonal Psychology is concerned with the study of humanity's highest potential, and with the recognition, understanding, and realization of

unitive, spiritual, and transcendent states of consciousness. "

याच संदर्भात वर्तमानात भगवतगीतेचे "कार्याद्वारे योग(Exercise)" ज्ञान समजुन घेणे आवश्यक आहे.

जीवनविकासात ब्रह्म, अध्यात्म, कर्म म्हणजे काय हा प्रश्न करतो. याचे उत्तर असे :
अक्षरं ब्रह्म परं स्वभाव अध्यात्म उच्यते।
भूतभाव उद्भव करो विसर्गः कर्म संज्ञितः॥(८-३)

व्यवहारात "अंतरात्मा"हा शब्द ऐकायला येतो. याच संदर्भात मनुष्य व ईश्वर यांचे नाते आत्मा-परमात्मा याद्वारे व्यक्त होते. अशीच ईश्वराची ओळख: प्रकृति व पुरुष या संदर्भात "पुरुषोत्तम", ईश्वराचे धाम या संदर्भात ब्रह्म-परब्रह्म, दैव या संदर्भात अधिदैव, अव्यक्तापलिकडे अव्यक्त अशी दिली .

परः तस्मात् तु भावो अन्यो अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः॥(८-२८)

याप्रमाणे ईश्वराची ओळख जाणुन विकासमार्गाची जाण येते व मनुष्य स्वतःला जाणुन विकासमार्गावर यावा या अनुषंगाने अध्यात्मज्ञान आले.

अभ्यासयोगेन ततो माम् इच्छा आप्तुं धनजय ।(१२-९)

हे शक्य होत नसल्यास(अभ्यासे अपि असमर्थो असि) कर्माद्वारे साधना (Exercise) याला अनन्यभक्ति म्हटले.

अर्जुनाचा प्रश्न कर्मसंदर्भात होता. अर्जुनाच्या जीवनांत मनोदुर्बलता आली व यावर मात करण्यासाठी कर्माद्वारे योग(Exercise) ज्ञान सांगितले.

कर्माद्वारे विकास मनुष्य जाणतो. भोगैश्वर्य, किर्ति, पुण्य-स्वर्ग इ. सुखप्राप्ति या संदर्भात Belief system असते. याचाच संदर्भ दुःख आले असता अर्जुन देतो. भोगैश्वर्य नको, जनकल्याणासाठी हे कार्य निरुपयोगी आहे. पापपुण्य या संदर्भात मात्र पापकर्म ठरते. हे सिद्ध करण्यासाठी धर्म-अधर्म विश्लेषण करतो.

निष्क्रियतेचे समर्थन कसेही होवु शकते. याला आपण Excuses म्हणुन ओळखतो.

वरील अवस्थेत द्वंद्व असते व तोच आधार समर्थनासाठी असतो. मोहामुळे द्वंद्व निर्मित होतो. बुद्धिला भ्रमित करते. म्हणुन बुद्धिला free करणे, यासाठी अध्यात्मज्ञान आहे. (म्हणुन शेवटी शब्द आलेत, "नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा")

अध्यात्म भागात एकत्व असते. कार्याचा निश्चय होण्यासाठी दृढत्व, समत्व, समत्वयोग शब्दांचा उल्लेख आला. याच अनुषंगाने,
"निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान"(२-४५)
अर्थात कार्याचा दृढमार्ग करणे. व योगासाठी कर्म करणे अर्थात समत्वयोग साधणे ("समत्वंयोग उच्यते") .

याप्रमाणे कर्म संदर्भात Excuses or Exercise हा मुद्दा स्पष्ट होतो.

कर्मातील अपयश, हानी, चिंतेचा, संशयाचा विषय बनतो. यामुळे नैराश्य येते. म्हणुन शत्रुपक्षाला नामोहरम करण्यासाठी, नैतिक धैर्य खच्ची करणे हा युद्धकौशल्याचाच भाग बनतो(नरः वः कुञ्जर वः). तर मित्रपक्षाचे साहस, आत्मविश्वास वाढविणे आवश्यक

असते. हे आपण व्यवहारात अनुभवतो. तसेच जीवनाच्या लढाईत नैराश्य मनुष्याला हरवते व जिंकण्यास आत्मविश्वास आवश्यक असतो.

श्रीकृष्णाने "यशो लभस्व" हा विश्वास दिला. म्हणुन अध्यात्म मनोदुर्बलता दुर करते, या विश्वासाने त्याची वर्तमानात ओळख करुन घेणे आवश्यक ठरते.

****

(८-३)

:"अक्षरं ब्रह्म परं स्वभाव अध्यात्म उच्यते"

"We are lucky because we have existed; we are unlucky because our existence is temporary; but we are still lucky because we have the ability to make the impermanent one permanent!"

-Mehmet Murat ildan

मी कोण?

माझे अस्तित्व काय?

हाच अध्यात्माचा विषय आहे.

अर्जुन युद्धक्षेत्रावर दुःखाने विचलित होतो, तेंव्हा त्याला स्वतःच्या शाश्वत तत्वाचे(अस्तित्वाचे) ज्ञान नसते. या प्रसंगी (जीवनांत) विचलित होणे, नकारात्मक होणे व हेच योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी अर्थात आपल्या भूमिकेला आदर्श ठरविण्यासाठी Philosophy सांगणे!हा भ्रम असतो, ज्ञान नसते.

मनुष्य भलेही स्वतःला ज्ञानी समजुन "अशी" Philosophy बोलत असला तरी तो "ज्ञानी" ठरत नाही. स्वतःच्या अशांत मनाला शांत करण्यासाठी केलेला हा उपाय असतो. याच मुद्यावर भगवतगीतेतील ज्ञानाचे दालन उघडते व "ज्ञान" या विषयावर प्रकाश टाकते. कारण जसा अंधार प्रकाशानेच मिटतो, तद्वतच "ज्ञान" प्रकाश असते. ज्ञानासमान जगात कोणतीही गोष्ट श्रेष्ठ नाही. व "ज्ञान" या शब्दाचे महत्व कमी करणे हेच मुळात अज्ञान ठरते.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।(४-३८)

मनुष्यजीवन जाणुन घेण्यासाठी सृष्टितील शाश्वत व अशाश्वत तत्व, सृष्टिचे सृजन, संचलन हाच विषय भगवतगीता ज्ञानविज्ञानासह

स्पष्ट करते. जो मनुष्य जीवनात शाश्वताचा (ईश्वर)आश्रय करुन अशाश्वतावर विजय मिळवितो, तो(शाश्वत) ब्रह्म, अध्यात्म (शाश्वत-अशाश्वत ज्ञान), कर्म जाणतो.

जरामरणमोक्षाय माम आश्रित्य यतन्ति ये।
ते ब्रह्म तद् विदुः कृत्स्नं अध्यात्म कर्म च अखिलं।।(७-२९)

अध्यात्म शाश्वत-अशाश्वत यातील भेद स्पष्ट करते. याचाच अर्थ अध्यात्माशिवाय जीवनातील ज्ञान अपुर्ण ठरते.

अक्षरं ब्रह्म परं स्वभाव अध्यात्म उच्यते।(८-३)

जसे मनोविज्ञान ज्ञानाचा आधार Consciousness आहे. भगवतगीता क्षेत्र क्षेत्रज्ञ(योग) याद्वारा शाश्वत-अशाश्वत व त्या अनुषंगाने ब्रह्म या विषयावर प्रकाश टाकते.

ज्ञेयं यत् तद् प्रवक्षामि यद् ज्ञात्वा अमृतं अश्नुते।
अनादि मत्परं ब्रह्म न सत् तत् न असत् उच्च्यते।।(१३-१२)

अविभक्तं च भूतेषु विभक्तं इव च स्थितम् ।(१३-१६)

ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम् ।(१३-१७)

कर्म:

स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।(१८-४६)

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथा आप्नोति निबोध मे।(१८-५०)

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङक्षति।
समः सर्वेषु भूतेषु मद् भक्ति लभते पराम् ॥(१८-५४)

**************

(८-६)

*************************

यं यं वाअपि स्मरन् भावम् त्यजति अंते कलेवरम्।

तं तं एवैति कौन्तेय सदा तद् भाव भावितः॥

*************************

(८-६) :

" यं यं वाअपि स्मरन् भावम् त्यजति अंते कलेवरम् "

(The journey of life)

ज्या प्रवासाला निघाले आहे त्याचे अंतिम स्थान (Destination) आले कि प्रवास फलित होतो. तसेच ईश्वराचे धाम हे मनुष्याचे Destination आहे.

अव्यक्तो अक्षर इति उक्तःतम् आहुः परमां गतिं।

यं प्राप्य न निवर्तन्ते तद् धाम परमं मम॥(८-२१)

मनुष्याची इच्छा सुखासाठी असली तरी जीवनयात्रा मात्र दुःखालयात चालत असते, यामुळे विचलित होतो. म्हणुन नित्य ईश्वराचा आश्रय करणे हा संदेश भगवतगीता देते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

ज्ञान याच संदर्भात याच ईश्वराचा प्रवासातील नित्य आश्रय केल्यामुळे प्रवास निश्चित दिशेने होतो. प्रवास कष्टहीन होतो.
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम् ।(१३-१७)
अक्षरं ब्रह्म परं स्वभाव अध्यात्म उच्यते।(८-३)

या सृष्टित सर्वप्राणीमात्र नाश होणारे या अर्थाने अधिभूत जाण . प्रकृति-पुरुष विश्वनिर्मितिचे अनादि तत्व आहे. यातील पुरुष अधिदैवत(ईश्वर, Master of destiny, Designer) जाण. विश्वाचा अध्यक्ष या नात्याने कर्म करणाऱ्या देहधाऱ्यांमध्ये श्रेष्ठ असा "अधियज्ञ" ईश्वरभाव जाण. याप्रमाणे ईश्वराचे स्थान(अशाश्वत-शाश्वत), अस्तित्व, त्याचे कर्म या संबंधाने ईश्वराचे भाव जाणतो.

"If one thinks of oneself as free, one is free, and if one thinks of oneself as bound, one is bound. Here this saying is true, "Thinking makes it so".

-Ashtawakra

मनुष्य नित्य ज्या भावाचे, विचाराचे चिंतन करतो, त्याच भावाला तो प्राप्त होतो. अर्थातच या जीवनाचे Destination जसे जाणतो, त्याप्रमाणेच विचार, जीवनाची Philosophy बनते. म्हणुन भगवतगीतेने नित्य ईश्वराचे स्मरण या संदर्भात जीवनाला लढाई संबोधले आहे.

यं यं वाअपि स्मरन् भावम् त्यजति अंते कलेवरम् ।
तं तं एवैति कौन्तेय सदा तद् भाव भावितः।।(८-६)
तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(८-७)

"The world as we have created it is a process of our thinking. It cannot be changed without changing our thinking. "

-Albert Einstein

सार :

न्याय मिळाला नाही म्हणुन धर्मयुद्ध ठरले असते. अर्जुनाच्या स्वभावनियतकार्याला संधी मिळते. त्याचे नियतकार्य ठरते. पण

अर्जुन "योग्य vs. अयोग्य" या द्वन्द्वपाशात सापडतो. हा द्वन्द्वपाश सोडविणे अर्जुनाचे दायित्व असते, पण हा पाश न सोडविता नियतकार्याला अर्जुन निषिद्धकार्य ठरवितो. व्यवहारातील द्वन्द्वपाश सोडविण्यासाठी स्वधर्म Tiebreaker ठरतो. हा व्यावहारिक लढाईचा भाग असतो.

तर आंतरिक लढाई (Internal battle) संशय vs विश्वास अशी असते. हीच लढाई Consciousness (lower vs higher) ची असते, मानसिक दुर्बलता vs सक्षमता अशी असते. ईश्वर आश्रय(चिंतन) विश्वास देते (ज्ञानसञ्छिन्नसंशयम्) ज्यामुळे स्वधर्म स्वतःच्या मंजुरीचे शिक्कामोर्तब ठरते.

~~**************

(८. ७)

*************************

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च ।

मयी अर्पित मनोबुद्धिः मामेवैष्यसि असंशयः।।

*************************

(८-७)/१:"तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च"

(वर्तमानातील सुखी जीवनाचे रहस्य)

"The ability to be in the present moment is a major component of mental wellness. "

-

Abraham Maslow

जीवनात सुखी असणे व सुखी असण्याचा आभास निर्माण करणे यांतील भेद भगवतगीता दर्शविते. जीवनाचे वास्तव न स्विकारता स्वतःच्या दुर्बलतेला शक्ति, अज्ञानाला ज्ञान, निष्क्रियतेला आदर्श दर्शविण्याचा प्रयत्न करणे हाच सुखी असण्याचा आभास असतो.

या प्रवृत्तिमुळे मनुष्य अज्ञानाला ज्ञान ठरवित असतो (Wrong thinking).

अर्जुन दुःखी होतो. म्हणुन सुखी होण्यासाठी वास्तव hide केल्या जाते. जेंव्हा हेच वास्तव स्विकारतो तेंव्हा योग्य काय? यासाठी ज्ञान ऐकण्यास तयार होतो, पण स्वतःची दुःखमुक्ति ही त्याची Priority असते. याचाच अर्थ वर्तमानात सुखी असणे ही मनुष्याची गरज बनते.

जीवनात काय मिळवायचे आहे याचा अर्जुन आढावा घेतो व कांहीच मिळवायचे नाही तर कर्म कशाला? हा त्याला पडलेला प्रश्न असतो. व कर्म टाळुन पापापासुन सुटका मिळत असेल तर निष्क्रियता धर्माचरणास योग्य आहे ही त्याची भूमिका असते. स्वतःला दुःखमुक्त करण्यासाठी अर्जुनाचे हे Thinking असते. या विचाराचा आधार जीवनप्रवास स्वर्गाप्रत आहे हा असतो. या जीवनप्रवासात दुःखी झाल्यामुळे वर्तमानात सुखी असण्याचा आभास निर्माण करतो.

जन्म-मृत्यु हा शरीराचा प्रवास असतो, तर मृत्यु-अमृत हा जीवाचा (आत्मा) प्रवास असतो. म्हणुन जन्म-अमृत (मृत्योर्मा अमृतंगमय

-शाश्वत) हा जीवनाचा प्रवास ठरतो. याच मार्गावर दुःखाने विचलित होत नाही. या प्रवासात प्रकृति व ईश्वराचे नाते ज्ञानविज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते. याच अनुषंगाने जीवप्रवासात ईश्वरज्ञान, ईश्वरधाम या शब्दांचा उल्लेख आलेला आहे. या प्रवासात ईश्वरआश्रयामुळे बुद्धियोगी असतो. अर्थात बुद्धिभ्रम होत नाही, प्रकृतिनिर्मित द्वंद्वाच्या जाळ्यात सापडत नाही. जणु या प्रवासातील जीवनाची लढाई प्रकृति vs ईश्वर, अशाश्वत vs शाश्वत (असतो मा सतगमय)अशी असते.

जीवनाच्या या लढाईत मनुष्याची भूमिका योध्याची असते. ज्ञान या संदर्भात "तमसो मा ज्योतिर्गमय" या प्रवासातील हा लढा अज्ञान vs ज्ञान असा असतो.

याप्रमाणे सुखी जीवनाच्या प्रवासातील हा लढा द्वंद्व vs दृढता, निष्क्रियता vs स्वधर्म, सकाम vs निष्काम, Lower Consciousness vs Higher Consciousness, अशांति vs शांति, दुःख vs सुख, दुर्बलता vs सक्षमता, भय vs निर्भयता अशी असते. कार्याद्वारे योग ही निर्भयतेची, ज्ञानाची, शांतिची साधना असते. या साधनेतुनच बुद्धिची स्थितप्रज्ञ(विचलित न होणे) अवस्था साध्य होत असते.

“If you are depressed, you are living in the past, if you are anxious, you are living in the future. If you are at peace you are living in the present”

— Lao Tzu

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।
मयी अर्पित मनोबुद्धिः मामेवैष्यसि असंशयः॥(८-७)

****

(८-७)/२ : "माम् अनुस्मर युध्य च "

II. Freedom vs Obstacle

"Freedom means you are unobstructed in living your life as you choose. Anything less is a form of slavery. "

Wayne Dyer

भगवतगीता "गीता" या नांवानेच जगात ओळखल्या जाते.

लहान मुलाच्या रडण्याची भाषा आईला कळत असते. ही आईची भूमिका मुल मोठे झाल्यावर भगवतगीता करते. या विश्वासाने व श्रद्धेने आचार्य विनोबांनी गीतेला आई संबोधले.

"गीताई माऊली माझी, पडता रडता उचलुनी घेई, "

मनुष्याच्या जीवनप्रवासात दुःख आले कि जीवन भार वाटते, चैतन्यहीन वाटते. त्याच्या अंतरंगातील दुःख त्यालाच कळत असते. लहान मुलाच्या रडण्याची भाषा आईला कळते, तसेच भगवतगीतेत अर्जुनाच्या रडण्याची भाषा श्रीकृष्णाला कळते.

मनुष्याला दुःखी करण्यास त्याच्या अंतरंगातील शत्रुवर मात करण्यासाठी त्यालाच लढा द्यावा लागतो. हाच लढा देण्यासाठी अंतरंगातील शत्रु कोण?व त्याच्याशी कसे लढायचे, हेच मार्गदर्शन मनुष्याच्या अंतरंगातील ईश्वर (Higher conscious द्वारा )करीत असतो. याच रहस्याचा उलगडा भगवतगीता करते. हा ईश्वर जीवन जगतांना सदा सोबत असतो, हे रहस्य जाणण्यासाठीच मनुष्यजीवन मिळाले असते. हे रहस्य जाणले तर जीवनोत्तर धाम(Goal, Destination) शाश्वत ईश्वरच आहे, हे रहस्य कळते.

मायेमुळे हे रहस्यज्ञान कळत नाही व मोह पावतो. अंतरंगातील शत्रु क्रियाशील होतात.

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

अज्ञानामुळेच मनुष्याला आत्मविश्वास नसतो. दुःखी जीवन जगत असतो. जे त्याला नित्य हरवित असते, ते अंतरंगातील शत्रु जाणत नाही. यामुळे तो जीवनाचा लढा जाणत नाही. म्हणुन भगवतगीता संदेश देते,

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च ।(८-७)

ईश्वर श्रीकृष्णाच्या रुपात अर्जुनाच्या रथाचा सारथी बनला असतो. लढाई त्याला लढायची नसते, अर्जुनाला लढायची असते. सारथी अर्जुन सांगेल तिकडे रथ नेणार. अर्जुन मधोमध रथ उभा करण्यास सांगतो. स्वजनांना पाहुन दुःखी होतो. युद्ध करणार नाही म्हणुन खाली बसतो. जणु त्याला आता सारथ्याची गरजच नसते.
ज्याच्या कार्यासाठी श्रीकृष्ण सारथी बनतात, त्यालाच आता गरज उरली नाही.

जो ईश्वर मनुष्याच्या जीवनरथाचे सारथ्य करायला तयार आहे, पण जगणाऱ्यालाच गरज नाही!हीच अज्ञान स्थिति आहे.

"भरोसा है खुदापर तो खुदा वही लिखेगा जो तकदीरमे है।पर भरोसा है खुदपर तो खुदा वही लिखेगा जो तुम चाहोगे।"

अंतरंगातील हरविणारे शत्रु vs उपाय

*व्यवहारात इच्छा असल्यामुळे कार्य करतो. पण कार्य न करता केवळ विषय चिंतन करणे यामुळे इच्छेचे "काम" मध्ये रुपांतर होते.

vs निष्काम कार्य

भगवतगीतेत "काम" हाच मुख्य शत्रु म्हटला आहे, जो क्रोध, भय, चिंता, इर्षा अशा विकाराला जन्म देतो. यामुळे संमोह व समोहामुळे स्मृतिभंश होतो.

ध्यायतो विषयान् पुंसाः ...

संगात संजायते कामः ...

... बुद्धिनाशात प्रणश्यति।(२-६२, ६३)

जही शत्रुं महाबाहो कामरुपम् दुरासदम् ।(३-४३)

* भय (भय मनोदुर्बलता असते)vs धैर्य, निर्भयता
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

या(कर्मयोग) धर्मात कार्याचा दृढनिश्चय असतो. योगस्थ वृत्तीने कर्म execute करतो.

* दुःखाने विचलित होणे ही मनोदुर्बलता असते.
 vs योग (दुःखान्त)
योगः कर्मसु कौशलम् ।

* द्वंद्व vs निर्द्वंद्व
प्रकृतित द्वंद्व असतात. चांगले-वाईट, योग्य-अयोग्य हे मार्गातील द्वंद्व असतात. ईश्वर एकत्व संदेश देतो. निर्द्वंद्व होण्यासाठी मार्गदर्शन करते. व सत मार्ग ठरतो. चांगलेपणा(सत) सक्षम करण्यासाठी हा संदेश उपयुक्त ठरतो.
कार्य संदर्भात दृढत्व,
श्रेष्ठ-कनिष्ट, सुख-दुःख, लाभ-हानी संदर्भात समत्व

*संशय vs विश्वास व विश्वासासाठी ज्ञान अर्थात

संशयात्मा विनश्यति vs ज्ञानसंच्छिन्न संशयम्

(४-४० vs ४-४१)

*प्रज्ञावादी(नकारात्मक) स्वतःचे अज्ञान लपविण्यासाठी बौद्धिक वापरुन आदर्श दर्शविण्याचा प्रयत्न

vs ज्ञानी, ज्ञान हा प्रकाश असतो व ज्ञानी विश्वासाने मार्ग चालतो.

* आळस vs कार्यरत (१८-२८ vs १८-२६)

*विषादी vs उत्साही (१८-३५ vs १८-३३)

* अहंकार आश्रय vs ईश्वर आश्रय

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे। (१८-५९)

vs तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।(१८-६२)

*मोह vs बुद्धियोग

जीवनाचे Destination न जाणणे, (कुठे जायचे आहे?काय करायचे आहे हा स्मृतिभ्रम) vs

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा .. (१८-७३)

**************

८-७ :

" माम अनुस्मर युध्य च "

(Life is crusade)

जगात महापुरुष होतात, क्रान्ति/बदल घडत असतात. हा बदल घडवुन आणणारा मनुष्यच असतो. जीवनात दुःख आहे म्हणुन जीवन आव्हान असते. हेच आव्हान स्विकारल्या जाते तेंव्हा जीवनात, जगात क्रान्ति घडते.

या जीवनात लढवय्याची भूमिका कां आवश्यक आहे ? अर्थात जीवनात दुःख आहे म्हणुन योद्धा ही भूमिका आवश्यक आहे. ही भूमिका कशी असते याचे निश्चित ज्ञान भगवतगीता देत आहे. सामान्य जीवन व श्रेष्ठ (लढवय्या-योद्धा) जीवन याची ओळख भगवतगीता करुन देते. यासाठी मानसिकता बदल याचे महत्व स्पष्ट होते.

*चांगले /श्रेष्ठ जीवन, चांगले भाष्य व ज्ञान

चांगले /श्रेष्ठ जीवन म्हणजे काय?या जीवनातील योद्धा ही भूमिका कशी असते?

याचा ज्ञानविज्ञानाशी असलेला संबंध भगवतगीतेत दर्शवलेला आहे.

१. चांगले भाष्य व ज्ञान दर्शन

*जगात नकारात्मक भाष्य करणारे असतात तसेच सकारात्मक भाष्य करणारेही असतात. Law of Attraction नुसार सकारात्मक भाष्य उपयुक्त(healer) तर नकारात्मक भाष्य अडथळा करणारे असते.

"A pessimist sees the difficulty in every opportunity; an optimist sees the opportunity in every difficulty. "

चांगले जीवन जगण्यासाठी शिक्षण आहे. चांगले जीवन या संदर्भात भौतिक विकासाला प्राथमिकता असते. जग व्यवहार जगत असते.

समाजात व्यवहारसिद्धिसाठी भाष्य (जाहिरात, मंथराभाष्य, राजकिय भाष्य, उपदेश) चालत असते. याचवेळी कुणी आदर्श म्हणून समर्थनासाठी असे भाष्य वापरतो व फसगत होते.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।(गीता १७-१५)

चांगले भाष्य वाङमय तप असतो. यामुळे भाष्य सकारात्मक असते. निरोगी संवाद साधल्या जातो. श्रेष्ठ जनात संवाद होतो. कुणीही कुणाचा अधिकार वापरत नाही.

रामायणात श्रीरामाने वनप्रयाण करावे, या कार्याचा प्रवास मंथरा ते कैकेयी ते दशरथ महाराज ते श्रीराम असा होतो. अर्थात Through proper Channel होतो.

*दासी असलेल्या मनथरेला राणी कैकेयीला सल्ला देण्याचा कोणताच अधिकार नव्हता. तिने भाष्यकला वापरली व कैकेयीने काय करावे, हा आपला हेतु साध्य केला.

*कैकेयीने श्रीरामाला कोणताच आदेश दिला नाही. दशरथ महाराजाचे कर्तव्य महाराजांना दर्शवुन दिले.

*दशरथ महाराज वचनात अडकले . व त्याची बांधिलकी म्हणून श्रीरामाने वनप्रयाण करणे आवश्यक ठरले.

* वनप्रयाण महान कार्याची संधी आहे हे श्रीरामांनी मातेला सांगितले.

"जहां सब भांति मोर बड काजू।"(रामायण)

*ज्ञान :

सॉक्रेटिसने स्वतःला ज्ञानी नव्हे तर ज्ञानमार्गाचा वाटसरु म्हटले. तत्कालीन ज्ञानी(सोफिस्ट ) भौतिक प्रगतिसाठी लोकांना ज्ञानामृत पाजत असत. सॉक्रेटिसची पद्धत वेगळी होती. तो युवकांना विचार करण्यास प्रवृत्त करायचा. याप्रमाणे ही पद्धत विज्ञानाचा शोध घेण्यास युरोपात प्रेरक ठरली.

भगवतगीतेत श्रीकृष्णाने अर्जुनाकडुन प्रश्न वदवुन घेतला. प्रथम अर्जुन म्हणतो, माझा कोणताच प्रश्न नाही. (मला कांहीच नको. हे युद्ध लोभापायी ठरलेले आहे म्हणुन मला पापकर्म

करावयाचे नाही. ) पण त्याला चुक ठरविल्यानंतर तो प्रश्न करतो. या प्रश्नाचे समाधान मिळविण्यासाठी त्यालाच विचार करण्यास प्रवृत्त केले. ज्या बुद्धिवर मनाचे नियंत्रण आले होते व निर्णय करण्यास सक्षम नव्हती, ती बुद्धि नियंत्रणातून मुक्त झाली. ( नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा)

वर्तमानात ज्ञानविज्ञान आहे. या ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग मनुष्याला महत्वाचा वाटतो. तरी मनुष्य अडकतो व ज्ञानाची गरज भासते. व्यवहारमार्गावर चालत असतांनाच अर्जुन अडकला. आपले अज्ञान कबुल न करता सरळ Judgement thinking वापरतो. वर्तमान व्यवस्थेत आपली आदर्श भुमिका आहे हे दर्शवतो. यांत वास्तव झाकल्या जाते . मुख्य विषयावरुन लक्ष्य घसरते. म्हणून ज्ञानाची गरज भासते.

ज्ञान म्हणजे काय?

ज्ञानसंच्छिन्न संशयम् ।अर्थात ज्ञान प्रकाशासमान कार्य करते.

ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।

ज्ञान सर्वश्रेष्ठ कां?

सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।

अर्थात जीवनयात्रा कर्माने चालते पण सर्व कर्माचे अंततः ज्ञानात विलयन होते. हेच जीवनाचे ध्येय ठरते . ज्ञानी हे सत्य जाणतो.

२. श्रेष्ठत्व / योद्धा

अर्जुनाला साधे(भौतिक, राज्याचा अभाव) दुःख झाले नाही तर त्याची आत्मा तळमळली होती. हे आत्मदुःख होते. म्हणुन आत्मसुख याची ओळख भगवतगीता करुन देते. याचसाठी लढवय्याची भूमिका घेणे आवश्यक होते. हा मानसिकताबदलचा विषय असतो. अर्जुनाला वरच्या पायरीवर जाण्याची हि संधी आहे हे श्रीकृष्णाने जाणले व तसेच भाष्य वापरले. तुझ्यासारख्या श्रेष्ठांना मानसिक दुर्बलता अशोभनिय आहे. व श्रेष्ठत्व म्हणजे काय याचीच ओळख दिली.

भिष्माचार्य, द्रोणाचार्य यांनी सत्तेला, त्याच्या निर्णयाला योग्य ठरविले . या सत्तेविरुद्धच पांडवांचा लढा होता. पण अर्जुन युद्धक्षेत्रावर युद्ध न करणे याची निवड करतो. सामान्य मनुष्य जसा विचार करतो, तसाच अर्जुनही विचार करतो. कुणाची बाजु धर्माची हे कळत नाही. अर्थात स्वतःला चुक ठरवितो, किंवा बरोबर असले तरी यांना मारुन विजय नको आहे ही आपली मानसिकता स्पष्ट करतो.

मानसिकता बदल व यासाठी योद्धा होणे ही भगवतगीतेची भूमिका आहे. अर्जुन ज्याला(युद्धाला) अयोग्य ठरवतो, त्यालाच श्रीकृष्ण (युद्ध) योग्य ठरवितात. हा मानसिकतेचा व Perception चा परिणाम असतो.

सार :

जीवनात दुःख आहे म्हणुन जीवन आव्हान आहे. हे आव्हान स्विकारण्यासाठी योध्याची भूमिका हा भगवतगीतेचा विषय आहे.

माम अनुस्मर युध्य च ।(८-७)

"Life is a crusade in the service of God. Whether we wished to or not, we set out as crusaders to free - not the Holy Sepulcher - but that God buried in matter and in our souls. "

-Nikos Kazantzakis

******

(८-९)

*************************

कविंपुराणम् अनुशासितारम् अणोःअणीयांसम् अनुस्मरेद् यः"।
सर्वस्य धातारं अचिंत्यरुपम् आदित्यवर्णं तमसः परस्तात् ॥

*************************

(८-९) :"कविंपुराणम् अनुशासितारम् अणोःअणीयांसम् अनुस्मरेद् यः"

भगवतगीतेत ७ व ८ या अध्यायातुन जीवनाचे ज्ञानविज्ञान हा विषय येतो. "मी कोण"? या संदर्भात ज्या ईश्वराशी नाते असते, व जे जीवनाचे अंतिम धाम आहे, त्याची ओळख येथे दिली आहे.

कविंपुराणम् अनुशासितारम् अणोःअणीयांसम् अनुस्मरेद् यः"।
सर्वस्य धातारं अचिंत्यरुपम् आदित्यवर्णं तमसः परस्तात् ॥(८-९)

या ज्ञानाला अध्यात्मज्ञान म्हणुन ओळख आहे. अर्थात हा जीवनाच्या ज्ञानविज्ञानाचाच भाग असतो, ज्यामुळे स्वतःच्या जीवनाची स्वतःला ओळख होते. या अध्यात्मज्ञानाचा व्यवहारात काय उपयोग आहे?हे भगवतगीतेत स्पष्ट होते.

व्यवहारात (पांडवांवर) अन्याय झाला म्हणुन धर्मयुद्धाचा निश्चय होतो. प्रत्यक्ष युद्ध करण्यापुर्वी अर्जुनाला सेना न्याहाळण्याचे निमित्त होते व तो दुःखी होतो. येथे त्याला युद्ध (निश्चित

कशासाठी?) कां करायचे? हा प्रश्न निर्माण होतो. अर्थात हा प्रश्न व्यावहारिकच असतो.

जीवनांत सुखी व्हावे या इच्छेने जीवनाचा प्रवास चालु असतो. या प्रवासात कार्य, निर्णय यांची महत्वाची भूमिका असते. जीवनात कार्यज्ञान, निर्णयप्रक्रिया याचे निश्चित ज्ञान नसल्यामुळे निष्क्रियतेचे समर्थन करणे, अज्ञानाला ज्ञान संबोधणे हा प्रकार समाजात सर्रास चालु असतो.

अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतांना अज्ञानाला ज्ञान संबोधतो !म्हणुन भगवतगीता संवाद सुरु होतो.

जीवनविकासात कर्माचे महत्व या संदर्भात स्वभावनियतकार्य - स्वधर्म, निर्णयअधिकार-दृढनिश्चयाचा कर्मयोग सांगीतला. तसेच शाश्वत सुखाचे ज्ञान सांगीतले. याच संदर्भात कर्म(अ. ३), ज्ञान(अ. ४), भक्ति (संन्यास अ. ५/योग अ. ६) यावर सविस्तर चर्चा होते.

शाश्वत सुख या संदर्भात वर्तमानात ईश्वराचा आश्रय होण्यासाठी बुद्धियुक्त शब्द वापरलेला आहे. ज्यामुळे निष्काम कर्म करतो.

जरामरणमोक्षाय माम् आश्रित्य यतन्ति ते।

ते ब्रह्म तद् विदुः कृत्स्नं अध्यात्मं कर्म च अखिलं ।।(८-२९)

व ईश्वराला अंतकाळी अधिभूत (अशाश्वत भाव), अधिदैव (ईश्वर-अध्यक्ष, संचलन करणारा, दैवकर्ता), अधियज्ञ (शरीरधारी कर्म करतात, त्या सर्वात श्रेष्ठ कर्ता) जाणतो.

वर्तमानात स्थिर, निर्भय(अविचल), शांत, सकारात्मक भाव, प्रसन्नता, एकाग्रता याची संवय करणे यासाठी योगाभ्यास उपयुक्त ठरतो. (Practice of happiness). अभ्यास म्हणजे Practice व ज्यामुळे (चांगली)संवय जडते तो संस्कार ; अर्थात वर्तमानात विचलित न होणे, प्रसन्न, सकारात्मक असणे हे अपेक्षित असते, यामुळे विश्वासाने जीवनविकासाचा मार्ग चालण्यास मदत होते.
Yes. जीवनांत व्यावहारिक ज्ञानच महत्वाचे आहे, वर्तमानात विज्ञानच महत्वाचे आहे, पण अध्यात्मज्ञानाशिवाय ते अपुरे आहे. याच कारणाने समाजात निष्क्रियतेचे समर्थन होते, अज्ञानाला ज्ञान संबोधुन समाजात भ्रम निर्माण करण्यात येतो. हेच सत्य भगवतगीता स्पष्ट करते.

**********

(८-१४)

*************************

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।

तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः॥

*************************

(८-१४):"अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः"

(High level of awareness)

नित्य ईश्वराचे स्मरण या संदर्भात स्वतःच्या जीवनमार्गात ईश्वराची भूमिका जाणुन घेतली तर ईश्वराचे स्मरण महत्वाची भूमिका बजावते. यातच अनन्यभक्तिचे (Exclusive) रहस्य आहे.

जीवनमार्गात कार्य सकाम असते. यामुळे भय, संशय, अशांति, Tension असते. अर्थात दुःखाच्या भयाने मार्ग निश्चित होत नाही. युद्ध करायचे कि न करायचे हा कार्यनिश्चय होत नसल्यामुळे अर्जुन दुःख टाळण्यासाठी युद्ध न करणे हीच निवड करतो. संभाव्य दुःख अर्जुनाला दुबळे करते. ही जीवनाची सामान्य Level असते.

जीवनमार्गातील दुःख vs दुःखान्त, संशय vs ज्ञान, चंचलत्व vs एकनिश्चय, भय vs साहस (निर्भयता), अशांति vs शांति; याप्रमाणे जीवनाच्या लढाईत ईश्वराचे स्मरण महत्वाचे असते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)
दुबळा झाला तरी दुर्बलता सामर्थ्य दिसेल असे भाष्य मनुष्य ज्ञानी समजुन करीत असतो. मनुष्याला दुबळे करणाऱ्या दुःखावर मात करण्यासाठी ईश्वरभक्तिचे प्रयोजन आहे. कार्याद्वारे भक्ति/Exercise होण्यासाठी मार्ग निश्चित असावा. कार्यनिश्चय असावा. यासाठी जीवनमुल्ये महत्वाची भूमिका बजावतात. भगवतगीता जीवनमुल्ये या संदर्भात स्वधर्म व कार्याचा एकनिश्चय होण्यासाठी निर्णयअधिकार व बुद्धियोग याचे महत्व सांगते.

भगवतगीता जीवनमार्गातील Weakness दर्शविते. या Weakness वर मात करण्यासाठीच ईश्वराचे नित्य स्मरण होण्यासाठी अनन्यभक्ति रहस्य सांगते. सामान्य level वर कार्याची सकाम मानसिकता असते. तर Higher levelवर निष्काम मानसिकता असते. सृष्टिचा अध्यक्ष या भूमिकेत ईश्वरकार्य असते. जीवनाचा राजमार्ग "अमृतत्वाय कल्पते" याच

ज्ञानाने बनतो. यात कार्याचे ईश्वराला समर्पण ही भक्तिची कला असते. अर्थात कार्याची निष्काम मानसिकता असते.

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः॥(८-१४)

Working together on solving something requires a high level of humility and a high level of self-awareness.
Paul Polman

व्यावहारिक बोध:
१. मनुष्याला मृत्यु आहे, जीवनात दुःख आहे म्हणुन ईश्वराचे नित्यस्मरण व्हावे असे समाजाला प्रबोधन असते.
जो सुखमे सुमिरण करे तो दुख काहे होय।

याच ईश्वराचे जीवनातील ज्ञान भगवतगीता देत आहे. या ईश्वरज्ञानाचा उपयोग करुन घेणे ही निवड स्वतःची असते कारण ईश्वरज्ञानाचे महत्व जाणले नाही तरी प्रकृति आपली भूमिका करीतच असते. या पार्श्वभूमिवर ईश्वराचे नित्यस्मरण याला तांत्रिक

बैठक भगवतगीतेने दिलेली आहे. व्यवहारातील कार्यात या ज्ञानाचा उपयोग होतो. व जीवनात निष्क्रियता vs कर्तृत्व याचे महत्व जाणतो.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

२. जीवनाची Level या संदर्भात श्रीमंत vs गरिब, श्रेष्ठ vs कनिष्ट, चांगला vs वाईट, दुबळा vs शुर अशी दृष्टि बनत असते. व ही दृष्टिच जर मार्गातील संशयाचे कारण बनत असेल तर जीवनाची निश्चित higher level या संदर्भात ज्ञान हवे असते. हेच ज्ञान भगवतगीता देत आहे. हे ज्ञान Higher level of Awareness असते.

***************

(८-१४) :

" तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः"

(Purpose & meaning of life)

युक्त : बुद्धिवरील संस्कार या संदर्भात भगवतगीतेला अभिप्रेत असलेला हा शब्द आहे. युक्त.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखम् ॥(२-६६)

युक्त म्हणजे ज्याचे मनावर नियंत्रण आहे (जितात्मनः, आत्मवश). तो निष्काम कार्यरत असतो.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकिम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते॥(५-१२)

जीवनाचे ध्येय :

युक्त स्थितित ध्येय निश्चित असते. येथे जीवनप्रवासाचे ध्येय (Destination) ईश्वर असते. सृष्टिचा अध्यक्ष (पुरुषोत्तम) अशी ईश्वराची ओळख भगवतगीता देते व याच ईश्वराचे मनुष्याशी असलेले नाते प्रकृति-पुरुष-पुरुषोत्तम याप्रमाणे स्पष्ट करते. मनुष्यजीवनात याच ज्ञानाचा उपयोग करुन ईश्वरभक्ति या संदर्भात जीवनविकासमार्ग चालण्याची कला भगवतगीता सांगते. याला अनन्यभक्ति(केवळ ईश्वर) संबोधले आहे. ही कला सांगणारा जगतगुरु साक्षात ईश्वर आहे, जो अर्जुनाला स्वतःची ओळख देतो.

ज्याला श्रीकृष्ण या नांवाने जग ओळखते. या
ईश्वराला/श्रीकृष्णाला अर्जुन म्हणतो,
पिताअसि लोकस्य चराचरस्य
त्वम् अस्य पुजश्च गुरुः गरियान् ।।(११-४३)

ईश्वर अंतिम Destination व जीवनयात्रेत ईश्वराचा आश्रय याद्वारे जीवनविकासाचा मार्ग "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) असा होतो.
व्यवहारात मार्ग सकाम असतो. यांत कार्य साधन असते. बुद्धियुक्त स्थितित अर्थात "अमृतंगमय " या मार्गावर कार्याचा एकनिश्चय असतो. या मार्गावर विचलित होत नाही, निष्काम असतो. हा मार्ग ज्यांचा निश्चित असतो, नित्य ईश्वराचे स्मरण करतो, निश्चित Destination ला पोहोचणे सुलभ होते.
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)
अर्थात त्याला जीवन सुलभ होते. याप्रमाणे सुखी जीवनाचा मार्ग ठरतो.

यः प्रयाति त्यजन् देहम् स याति परमां गतिं।(८-१३)
अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगीनः।।(८-१४)

सार :

भगवतगीतेच्या या Verse मध्ये ईश्वरप्राप्ति सुलभ आहे असा सरळ अर्थ असला तरी ईश्वरप्राप्ति हा विषयच सुखी जीवनाच्या संदर्भात स्पष्ट केला आहे, ज्यामुळे जीवनाचे Purpose & Meaning स्पष्ट होते.

प्रत्येक मनुष्य Unique असतो. त्याला स्वतंत्र जीवन लाभलेले असते . जीवन आहे म्हणुन जगत असतो याला Survival mode म्हणता येईल. येथे Purpose & meaning हा प्रश्न नसतोच. पांडवांनी वनवास, विजनवास भोगला. तरी न्याय मिळत नव्हता म्हणुन अखेर धर्मयुद्ध ठरले. याच धर्मयुद्धातील आपल्या नियतकार्यात अर्जुनाला दुःख जाणवले. व एकंदरीत जीवनच कठीण वाटले. याचे रहस्य कळेनासे झाले. अशा वेळी भगवतगीता जीवनावरच प्रकाश टाकते.

"We are each gifted in a unique and important way. It is our privilege and our adventure to discover our own special light. "

~Evelyn Dunbar

******

(८-१५)

*************************

माम् उपेत्य पुनर्जन्म दुःखालयम् अशाश्वतम् ।

न आप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः।।

*************************

८. १५:

"माम् उपेत्य पुनर्जन्म दुःखालयम् अशाश्वतम् "

समाजव्यवस्था व त्यातील मनुष्याची स्वतःची भूमिका या दोन बाबी परस्परपुरक असल्या तरी स्वतःची भूमिका मनुष्यासाठी Priority असते. जसे समाजव्यवस्थेने कार्यसंधी उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते, पण कार्यसंधि उपलब्ध झाली नाही तरी स्वतःच्या विकासाची जबाबदारी मनुष्याला स्विकारावी लागते. याच संदर्भात मनुष्याची भूमिका कशी असावी याचे ज्ञान जाणणे मनुष्याची गरज बनते. अर्थात स्वतःच्या जीवनाची Leadership स्वतःलाच करावी लागते.

महाभारतात पांडवांचा अधिकारच नाकारण्यात आला होता. याची परिणति धर्मयुद्धात झाली. याद्वारे अर्जुनाला कार्यसंधि मिळते. ही संधि त्याच्या स्वभावनुरुप धर्मकार्याची (स्वर्गसंधि )ठरते. पण या स्वर्गसंधिला तो पापकार्य ठरवितो. व या कार्यापेक्षा "जैसे थे" स्थिति त्याला योग्य वाटते. अर्थात धर्मयुद्ध ठरण्यापुर्वि ज्या स्थितीत होता, त्याच स्थितित जगणे योग्य ठरवितो. या युद्धाने अर्जुनासमोर जो प्रश्न उपस्थित होतो, तो Survival /भोगैश्वर्य प्राप्तिचा नसतो. तर सुखदुःखाचा असतो.

दुःखापासुन मनुष्याला मुक्ति हवी असते. पण दुःखाच्या भयानेच मनुष्य स्वतःमध्ये परिवर्तन करु इच्छित नाही व "जैसे थे" स्थितित असणे त्याला comfortable वाटते. या संदर्भात सॉक्रेटिस म्हणतो,

"If you don't get what you want, you suffer;
if you get what you don't want, you suffer;
even when you get exactly what you want, you still suffer because you can't hold on to it forever.

Your mind is your predicament. It wants to be free of change. Free of pain, free of the obligations of life and death.

But change is law and no amount of pretending will alter that reality. "
-Socrates

पांडवांच्या दुःखमुक्तिसाठीच महत् प्रयासाने धर्मयुद्ध ठरले असते. अर्जुन हर्षित होउन युद्धासाठी तयार होतो. प्रत्यक्ष शस्त्रास्त्र चालणार तेंव्हा सेना न्याहाळतो व त्याच क्षणी गर्भगळित होतो, त्याला त्याच्या कार्यात दुःखच आढळते. सुखी जीव दुःखात पडला अशी त्याची स्थिति बनते.

अर्जुनासाठी ही स्थिति न उलगडणारे कोडं बनते. जीवनातील हेच कोडे भगवतगीता सोडविते. दुःखालयातच मनुष्याचा जन्म आहे ही वस्तुस्थिति मनुष्याला स्विकारावी लागते. व या दुःखमुक्तिसाठी भगवतगीता स्वतःमधील क्रांतीचा संदेश देते. विचारक्रांतिसाठी ही आध्यात्मिक क्रांति ठरते. मानवी

जीवनातील ही संपुर्ण क्रांति असते, जी" मोक्ष" या शब्दाने व्यक्त केली आहे.

माम् उपेत्य पुनर्जन्म दुःखालयम् अशाश्वतम् ।
न आप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः।।(८-१५)

या मार्गावर बुद्धिची "युक्त "स्थिति धारण करतो. प्रश्न सोडविण्याचा Aproach बदलतो. अर्थात प्रश्न, अडचण यामुळे विचलित न होता ती विकाससंधि (Stepping stone) जाणतो. अर्थात वर्तमानात स्थिर (समदुःखसुखंधीरं) असतो.

"कर्मण्येव अधिकारः ते" याद्वारे भगवतगीता मनुष्याचा कर्म करण्यासाठी निर्णयअधिकार दर्शविते. ही अधिकाराची जागृति आहे. कार्याद्वारे फलप्राप्ति हा व्यावहारिक विचार असतो. हा व्यवहार कार्यसंधि देते पण याच मानसिकतेत कार्य करणे ही सकाम स्थिति(अयुक्त) असते.
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते।(५-१२)

यामुळेच अर्जुन दुःखी होतो. येथे विचारक्रांति हवी असते,
"(बुद्धिची) अयुक्त (स्थिति) ते युक्त (स्थिति)"
युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिं आप्नोति नैष्ठिकीम् (५-१२)

यासाठी बुद्धियोगनिष्ठा भगवतगीता स्पष्ट करते.
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

ज्यामुळे कार्यनिश्चय दृढ होतो व कार्याद्वारे योग(दुःखान्त) या शाश्वत विकासमार्गावर असतो.

“A ship in a harbor is safe, but that’s not what a ship is built for. ”

***********

(८-१५):

".. दुःखालयम् अशाश्वतम् न आप्नुवन्ति महात्मनः संसिद्धिं परमां गताः"

मनुष्याला जीवन लाभले म्हणुन जगत असतो. पण हे सिमित काळासाठी लाभलेले जीवन कधी कठीण वाटते!तेंव्हा....

मनुष्यजीवनात आव्हान असते, प्रश्न असतात. या विश्वातील प्रश्न मानवानेच सोडविले आहेत. तसेच स्वतःच्या जीवनातील प्रश्न सोडविणे हे मनुष्याचे स्वतःचे दायित्व ठरते. जेंव्हा हे प्रश्न सोडविण्यास मनुष्य असमर्थ ठरतो, तेंव्हा मनुष्याची भूमिका/त्याचे भाष्य कसे असते?याच भूमिकेचे दर्शन अर्जुनविषादयोगात आहे. व याचमुळे भगवदगीता जगासमोर आली. जीवनातील प्रश्न सोडविणे या संदर्भात या विश्वातील मनुष्याच्या जीवनाला "दुःखालयातील जीवन" असे भगवदगीता संबोधत आहे व ईश्वराच्या ज्ञानाचा आश्रय याचे महत्व स्पष्ट करीत आहे.

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयम् अशाश्वतम् ।
न आप्नुवन्ति महात्मनः संसिद्धिं परमां गताः।।(८-१५)

जीवन कशासाठी?याचा हेतु काय?Survival साठी? कि श्रेष्ठ होण्यासाठी?कि स्वजनहीतासाठी?कि परमार्थासाठी? असे विविध प्रश्न अर्जुनासमोर येतात. अर्जुनाला आपले नियतकार्य दुःखदायी जाणुन टाळायचे असते. त्याला जसे धर्मज्ञान असते त्याचा आधार घेवुन आपले नियतकार्य धर्मविरोधी ठरवितो.

जगातील धर्म परमार्थाविषयी भाष्य करतात. म्हणुन आपले नियतकार्य स्वार्थासाठी कि परमार्थासाठी? हा अर्जुनाला Tie येतो. समाजातील शोषणालाही धर्माचा बुरखा चढविण्यात येतो,

म्हणुन आधुनिक समाजात शोषणमुक्त समाज ही Priority ठरली आहे. तर शोषणमुक्त समाजाला पोषक धर्म असावा यासाठी "धर्मस्थापना" या शब्दाचे प्रयोजन भगवदगीता करीत आहे. व स्वतःचे जीवन व त्याचा धर्म या संदर्भात "स्वर्ग vs. मोक्ष" तसेच "धर्म vs मोक्ष" हा भेद स्पष्ट करीत आहे.

जीवनाचा हेतु स्वतःचा योगक्षेम असो कि, परमार्थ असो यासाठी कर्म साधन आहे. आपले नियतकार्य स्वार्थापोटी (लोभ) आहे या आधारावर अर्जुन आपल्या नियतकर्मालाच धर्मविरोधी ठरवितो. प्रत्यक्षात अर्जुनाच्या प्रश्नाचा आधार सुखदुःखाचा असतो. म्हणुन दुःखमुक्तिसाठी " धर्म vs मोक्ष" या संदर्भात मोक्ष ही priority ठरविली आहे.

स्वातंत्र्य, Detachment from pain, अशाश्वताचे detachment होण्यासाठी शाश्वताचे attachment याच संदर्भात "बंधन vs मोक्ष " हे logic स्पष्ट झाले आहे. याच आधारावर "सकाम कर्म vs. निष्काम कर्म" हे शास्त्र स्पष्ट केले आहे.

सार:

वर्तमानात ज्ञानविज्ञान आले व (कथित, कांही) विद्वान लोक धर्म, अध्यात्म, ईश्वर या संकल्पना कालबाह्य ठरवायला लागले. ज्ञानविज्ञानामुळे निःसंशय विश्वातील प्रश्न सुटले आहेत. पण ज्ञानविज्ञान असुनही मनुष्याला प्रश्न भेडसावतात. हे प्रश्न कां सुटत

नाही? याचा आढावा भगवदगीता घेत आहे. शोषणाला भगवदगीता अधर्म ठरवीत आहे. शोषणमुक्त समाजासाठी धर्मस्थापना व्हावी यासाठी ज्ञानाला महत्व देत आहे. धर्माला अधर्म व अधर्माला धर्म ठरविणे हे अज्ञान ठरते. याच आधारावर मनुष्याच्या ज्ञानी भूमिकेचे महत्व highlight करीत आहे.

याच पार्श्वभुमिवर भगवदगीता सांगत आहे, ज्ञान काय आहे? ज्ञानी कोण?जीवन काय आहे? हे नीट जाणुन घ्या!

उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मेव मे मतम् ।(७-१८)

"You must live in the present, launch yourself on every wave, find your eternity in each moment. Fools stand on their island of opportunities and look toward another land. There is no other land; there is no other life but this. "

-Henry David Thoreau

*******

(८-१६)

*************************

आब्रह्मभूवनान् लोकान् पुनः आवर्तिनो अर्जुन।

मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते।।

*************************

(८-१६): "मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते"

Yes. पुनर्जन्माचा उल्लेख भगवतगीतेत आलेला आहे. या जन्माची मनुष्याला नीट ओळख व्हावी हाच त्याचा उद्देश आहे. यामागिल पार्श्वभुमि जाणणे आवश्यक आहे.

मनुष्याला जीवनात सुख हवे. सुखाच्या हेतुने गरज असते, गरजपुर्तिसाठी कार्य करतो. दुःख आले असता, ते deal करण्याचे ज्ञान नसेल तर मनुष्य सुखाच्या हेतुने Shortcut वापरतो. दुःख आढळले असता अर्जुन म्हणतो, मला राज्याची गरज नाही, हे कार्य दुःखप्राप्तिसाठी होईल म्हणुन माझ्यासाठी ते अयोग्य आहे. तथापि हे कार्यच अधर्माचे आहे, असे सिद्ध करतो. अर्थात दुःख

आले असता स्वतःला Comfort करण्यासाठी कार्यच चुकीचे ठरवितो व निष्क्रियतेला धर्म ठरवितो.

जीवनात सुखाची इच्छा विकासाची प्रेरणा देते, तद्वतच दुःख विकासाला पुरक असते, दुःखाशी Deal करण्याचे हे ज्ञान नसल्यामुळे अर्जुन निष्क्रियतेला धर्म ठरवितो. श्रीकृष्ण अशा भाष्याला इतरांचा बुद्धिभेद करणारे भाष्य ठरवितात.
न बुद्धिभेदं जनयेद् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।(३-२६)

कार्याद्वारेच मनुष्य विकास करीत असतो. समुहाचा विकास होतो, सृष्टिचक्र प्रवर्तन नियमित होते. म्हणुन मनुष्याला स्वतःला कार्यरत करण्याचा संस्कार असणे आवश्यक असते. श्रेष्ठ पुरुषाने स्वतः कार्यरत राहुन कार्याचाच आदर्श सामान्यजनासमोर ठेवावा.
तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।(३-१९)

जीवनांत प्रश्न असतात. ते सोडविण्यासाठीच ज्ञान असते. अर्जुन या प्रश्नाची ओळख करुन न घेता "त्यागी" समजुन कार्यच टाळतो. मला कांही नको, अशा पातकी कार्यापेक्षा निःशस्त्र राहुन युद्धात मृत्यु येणे श्रेयस्कर आहे!ही त्याची भूमिका असते. अर्जुन

सुखदुःखाच्या आधारावर योग्य-अयोग्य, धर्म-अधर्म ठरवितो. व स्वतःला ज्ञानी समजतो.

समाजात मनुष्याला (Problem) दुःखाशी deal करण्याचे ज्ञान नसेल तर" मी योग्य"सिद्ध करण्यासाठी ज्ञानी समजुन मनुष्य भाष्य करीत असतो, व स्वतःला comfort करतो. याच प्रक्रियेत चिंताग्रस्त राहतो, Stress असते, नकारात्मक होतो, पर्यायाने परावलंबि होतो. यामुळे आपले प्रश्न इतरांनी सोडवावे अशी त्याची इच्छा असते.

भगवतगीता दुःखाशी deal करण्याचे ज्ञान सांगते. हे ज्ञान ऐकुन अर्जुन म्हणतो, मला जर हा "योग"साध्य करता आला नाही तर ढगफुटीप्रमाणेजीवन फुकट जाणार काय?याच प्रश्नावर श्रीकृष्ण उत्तर देतात,

चांगले कार्य फुकट जात नाही. तु अशा घरात जन्माला येशील, जेथे पुर्वाभ्यासाने जीवनविकासाच्या मुख्य मार्गावर (अमृतंगमय)आकर्षित होशील. याचाच अर्थ वर्तमानातील जन्म मागिल जन्माचे फलित असते. व या जन्मात त्याला विकासाची संधी मिळालेली असते. अर्जुनाला याच संधीचे अज्ञान असते,

श्रीकृष्ण याच संधीची ओळख करुन देतात. याच अनुषंगाने जीवनाची ओळख, विकासाचा महामार्ग याची ओळख होते.

(ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।,

... तद् धाम परमं मम् ।,

... माम् अनुस्मर युध्य च।

... अमृतत्वाय कल्पते।)

जीवनात अडथळा जाणवला तर तेथे प्रश्न असतो. अर्जुन वास्तव स्विकारतो, तेंव्हाच प्रश्नाची पारदर्शकता कळते. अर्जुनाला प्रश्न सोडविण्याचे ज्ञान मिळते. याप्रमाणे दुःख जीवनविकासासाठी Stepping stone आहे, हे सत्य भगवतगीता दर्शवुन देते.

"The golden opportunity you are seeking is in yourself. It is not in your environment; it is not in luck or chance, or the help of others; it is in yourself alone. "

Orison Swett Marden

अर्जुनाला जाणवलेले दुःख ( अज्ञानामुळे )त्याचा Weakness होवु पहात होता. तेच दुःख आता विकासाची संधि बनले, Strength बनले. म्हणुन पुनर्जन्म आहे किंवा नाही अशा निरर्थक वादात न पडता, जे अनमोल जीवन मनुष्याला मिळालेले आहे त्या जीवनाची, शक्तिची ओळख व्हावी, हाच भगवतगीतेचा संदेश आहे.

भगवंतानी जसे अर्जुनाला मुख्य महामार्गाची ओळख करुन दिली. तीच ओळख भगवतगीता अखिल मानवजन्माला करुन देत आहे, ज्या मार्गावर असतांना मनुष्य दुबळा(दुःखाने विचलित) होत नाही.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

****************

(८-२०)

************************

परः तस्मात् तु भावो अन्यः अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः।

यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति।।

************************

(८-२०)/१:

"परः तस्मात् तु भावः अन्यः अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः"

(Absolute)

*ज्ञानविज्ञान या संदर्भात ईश्वराची ओळख :

विश्व, विश्वातील मनुष्यजीवन, जीवनातील जड-चेतन, अशाश्वत-शाश्वत ज्ञान, प्रकृति-ईश्वर ज्ञान भगवदगीतेच्या ज्ञानविज्ञानयोग व अक्षरब्रह्मयोग यातुन आलेले आहे.

अष्टप्रकृति -

भूमिआपःअनलः वायुः खं मनः बुद्धि एव च।

अहंकार इतिइयं मे भिन्ना प्रकृतिः अष्टधा।।(७-४)

जड-चेतन(व्यक्त-अव्यक्त)

अपरा इयं इतः तु अन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्।

जीवभूतां महाबाहो यया इदं धार्यते जगत्।(७-५)

ब्रह्म-परब्रह्म

(पुनर्जन्म-मोक्ष)

आब्रह्मभुवनान् लोकाः पुनः आवर्तिनो अर्जुन।

मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते।।(८-१६)

(शाश्वत धाम, मोक्ष व अनन्यभक्ति)

परःतस्मात् तु भावो अन्यो अव्यक्तो अव्यक्तात् सनातनः।

यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति।।(८-२०)

अव्यक्तोअक्षर इतिउक्तः तम् आहुः परमां गतिम्।

यं प्राप्य न निवर्तन्ते तद् धाम परमं मम।।(८-२१)

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्य तु अनन्यया।

यस्य अन्तस्थानि भूतानि येन सर्वम् इदं ततम् ।।(८-२२)

अर्थात कार्याद्वारे अनन्यभक्ति(कार्यसमर्पण, फलत्याग)चे ज्ञान.

* विश्वाचे व्यवस्थापन/सृष्टिसंचलन या संदर्भात ईश्वराची भूमिका:

अध्यक्ष :

मयाअध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्।
हेतुनाअनेन कौन्तेय जगद् विपरिवर्तते॥(९-१०)

धर्मस्थापना :

अभ्युत्थानं अधर्मस्य तद आत्मानं सृजाम्यहम्।(४-७)

धर्मग्लानि म्हणजे शोषण(बाह्यविघ्न), चांगल्या मनुष्याला (दैवीगुणयुक्त) संभ्रम(आंतर्विघ्न) असतो. या स्थितित धर्मस्थापनेसाठी ईश्वराने (श्रीकृष्ण) अवतार धारण केलेला आहे हा गौप्यस्फोट केला असला तरी याच ईश्वराचे ज्ञान, व्यवस्थापनिय महत्व, भक्तिचे महत्व भगवदगीता सांगत आहे.

भक्त्या तु अनन्यया शक्य अहमेवं विधोर्जुन।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्वेन प्रवेष्टुं च परन्तप॥(११-५४)

*ईश्वर श्रद्धा व शास्त्र:

कार्याद्वारे (अनन्य, योग)भक्तिला शास्त्र संबोधले आहे. ज्यात निष्काम कार्य असते. या शास्त्राचा वापर करीत नाही पण ईश्वराची श्रद्धेने भक्ति करतो, त्याची निष्ठा सत, रज, तम अशी कोणती समजावी?असा अर्जुन प्रश्न करतो. हा प्रश्न शास्त्र vs. श्रद्धा असा असतो. यावर उत्तर सत-असत मार्ग याद्वारे दिलेले आहे.

१. शास्त्रविरहीत मार्गाला अ ासुर म्हटले आहे.
अशास्त्रविहीतं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः।....
मां चैवअन्तः शरीरस्थं तान् विद्धि आसुर निश्चयान्।(१७-६)

२. कर्माद्वारे भक्ति (यज्ञ, दान, तप यांचे श्रद्धेने आचरण) याला सतमार्ग म्हटलेले आहे. श्रद्धाविरहीत मार्ग असतमार्ग ठरतो, जो सुखदायी नसतो(न च तत्प्रेत्य नो इह).

*जीवनविकासात आत्मोन्नतिचे महत्व :
प्रकृतिचे सत, रज, तम गुण व गुणातीत ईश्वर या ज्ञानामुळे आत्मोन्नतिचे महत्व स्पष्ट होते. आत्मोन्नति या संदर्भात मनोवश vs आत्मवश या स्थितिचे (State of Consciousness) महत्व कळते. याच आधारावर "अमृतत्वाय कल्पते" हा Standard मार्ग ठरतो.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

********

(८-२०)/२ : "अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः "

वर्तमान ज्ञानविज्ञानाचा आहे. मनुष्याने बुद्धि वापरावी, Blind follower होवु नये, बुद्धिने मुळातुन विचार करावा असा बुद्धिप्रामाण्यवादींचा आग्रह असतो. युरोपात याला (१५वे शतक)Age of Reasoning /Enlightenment म्हटल्या गेले. येथे प्रश्न विचारण्याचा अधिकार मिळतो. प्रश्न असेल तर उत्तर असतेच व याचसाठी ज्ञानविज्ञानाचा उपयोग होतो.

"ज्ञानविज्ञानाचे Age " हा संदर्भ घेतला तर असे अनेक प्रश्न आहेत जे अनुत्तरित असतात. याचे कारण काय?याच प्रश्नाचे उत्तर भगवतगीता देते.

भगवतगीता मनुष्यजीवन, सृष्टि याच्या मुळातच गेली आहे. याच संदर्भात "अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः" असे भाष्य आले आहे. जड प्रकृतिची अव्यक्त Energy (ब्रह्म) व या अव्यक्तापेक्षा मुळ अव्यक्त जे सनातन सत्य आहे, हे सत्य ईश्वर, पुरुषोत्तम, परमात्मा, परब्रह्म इ. संबोधनाने ओळखल्या जाते. याच अनुषंगाने जीवनविकासासाठी आवश्यक विविध विषय आलेले आहे. त्यानुसार ईश्वराची ओळख दिलेली आहे.

*मनोवैज्ञानिक ज्ञान:

मनोवैज्ञानिक ज्ञानासाठी ईश्वराची ओळख Universal mind "क्षेत्रज्ञ " अशी भगवतगीतेतुन आली आहे. याद्वारे Lower consciousness(Senses mind) व Higher consciousness (connected with God)यातील भेद स्पष्ट होतो. भय, संशय Lower consciousness मुळे असते. मनुष्याचा चांगलेपणा हा Divine गुण असतो. या अर्थाने दैवी गुणासाठी तुझा जन्म आहे हे अर्जुनाला संबोधले .

" मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव।"

*जीवन विकास मार्ग -

जीवनविकासात कार्याचे महत्व (State of Art) जाणणे, कार्य निष्ठेने करणे यासाठी निष्काम कार्याचे Logic (असंगशस्त्रेण दृढेन छित्वा) स्पष्ट करण्यासाठी प्रकृति व पुरुष असे वर्गिकरण केले आहे. येथे "पुरुषोत्तम"ही ईश्वराची ओळख आहे.

प्रकृति स्वभावानुसार कार्य घडते.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि ।(३-३३)

* व्यवस्थापन

ईश्वराची अध्यक्ष ही ओळख व्यवस्थापनाचा संदेश देते.

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।

हेतुना अनेन कौंतेय जगत् विपरिवर्तते।।(९-१०)

सृष्टिचक्रप्रवर्तनात यज्ञाची भूमिका स्पष्ट केली.

अन्नामुळे मनुष्यप्राणि जगत असतात. पर्जन्यामुळे अन्न, यज्ञामुळे पर्जन्य, कर्माद्वारे यज्ञ, कर्म ब्रह्मामुळे exist होते. यज्ञभावाने कर्म करणे याद्वारा समर्पण (निष्ठा) स्पष्ट केली.

यज्ञार्थात् कर्मणो अन्यत्र लोको अयं कर्मबंधनः।।(३-९)

यज्ञात अग्नि, हवन असते. व भस्मिकरण होते. इच्छा इंद्रियाग्निमधे, इंद्रियकार्य संयमाग्निमधे भस्म होतात. याप्रमाणे ईश्वरज्ञानाने प्रदिप्त झालेल्या अग्नित सर्वकर्माचे भस्मिकरण होते. हे ज्ञानकर्मसंन्यास logic आहे.

सर्वाणि इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।
आत्मसंयम योगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते॥(४-२७)

सृष्टिमध्ये असे अनेक कर्मयज्ञ चालु असतात. व सर्व कर्माचे ज्ञानात विलीनिकरण होते.
एवं बहुविधा यज्ञाः वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे॥(४-३२)
सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

येथे ज्ञान "अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः " या अर्थाने संबोधले आहे.

परः तस्मात् तु भावो अन्यः अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः।
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति॥(८-२०)

अव्यक्तो अक्षर इति उक्तः तम् आहुः परमां गतिं।
यं प्राप्य न निवर्तन्ते तद् धाम् परमं मम् ॥(८-२१)

याप्रमाणे जीवनाचा विकासमार्ग, विकासमार्गातील कर्म, ज्ञान, भक्ति यांचे शास्त्रोक्त विवेचन भगवतगीतेत आलेले आहे.

तसेच "अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः " ही शाश्वत ईश्वराची ओळख वेगवेगळ्या भूमिकेत विषयाला अनुसरुन दिलेली आहे.

***********

(८-२१)

************************

अव्यक्तो अक्षर इति उक्तःतम् आहुः परमां गतिं।

यं प्राप्य न निवर्तन्ते तद् धाम परमं मम् ॥

*************************

८. २१/१:

"अव्यक्तो अक्षर इति उक्तः तम् आहुः परमां गतिम् "

(Philosophy of Religion & God)

धर्म" या शब्दाद्वारे समुहाचे Religion व व्यक्तिगत श्रद्धा असा संदेश मिळतो. हाच धर्म समुहाच्या विकासाला पोषक कि शोषक (अधर्म) असे प्रश्न समाजात उपस्थित होतात. तेंव्हा धर्म-अधर्म यांतील निश्चित भेद कळणे आवश्यक असते. हाच भेद भगवतगीतेत दैवी-असुरी संपत्तिविभाग द्वारा स्पष्ट केला आहे, याद्वारे चांगल्या व्यक्तिला स्पष्टपणे मार्गदर्शन केलेले आहे.

अर्जुन दुःखी झाल्यावर दुःख टाळण्यासाठी निष्क्रियता पसंद करतो व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्माचा दाखला देतो. अर्जुन स्वतःला योग्य ठरविण्यासाठी धर्मातील Rituals ज्ञानाचा उपयोग करतो. यामुळेच धर्म या संदर्भात Rituals vs. Philosophy असा भेद जाणण्याची गरज निर्माण होते.

"धर्म "या संदर्भात समाजात संभ्रम निर्माण होतो तेंव्हा महामानवांनी समाजाला मार्गदर्शन केले. Philosophy सांगितली. यांतील महामानव धर्मसंस्थापकही ठरलेत. ही Philosophy प्रस्थापिकांच्या हीताला बाधक ठरत आहे हे पाहुन कांहीचा छळही झाला. जीझसला क्रुसवर लटकविले.

धर्मातील Rituals vs. Philosophy यातील भेद जाणण्यासाठी व्यक्तिगत पातळीवर 'अंधविश्वास vs ज्ञान' जाणणे आवश्यक असते. हेच ज्ञान भगवतगीता देत आहे.

"चार माकड एका खोलीत बंद करतात. तेथे एका खिडकीत केळी असतात. खिडकीला शिडी असते. प्रथम एक माकड शिडीवरुन चढते व खिडकीपर्यंत पोहोचण्याचे आधीच गरम पाण्याचा फवारा त्याचे अंगावर येतो. ते माकड खाली येते. याप्रमाणे चारही माकड

गरम पाण्याचा अनुभव घेतात. परत शिडीकडे पहात नाही. नंतर एक माकड बदलविल्या जाते, नवीन माकड येते. तेही शिडीवर चढते, तेंव्हा इतर तीन त्याला "समज "देतात . पण तो एकत नाही व चढतोच. त्याला "अनुभव" होतो. याप्रमाणे एकएक करुन चारही माकड बदलविल्या जातात. आता फक्त एकच गोष्ट जाणतात, कि शिडीवर चढणे धोका आहे. कां? माहीत नाही! नंतर पुनः एक माकड बदलले कि ते शिडीवर चढण्याचा प्रयत्न करते पण इतर तीन त्याला बदडतात. कां बदडतात?माहीत नाही!"

ज्याला समाज अंधश्रद्धा म्हणतो, त्या अशाच वेगवेगळया प्रकारे पुढे सरकत असतात. कारण "विकास " या नांवाखाली समाजाची Belief System तयार होत असते. म्हणुन व्यक्तिगत विकास म्हणजे काय?याची निश्चित Philosophy भगवतगीतेने स्पष्ट केली आहे.

समुहात जगतांना स्वतःचा "स्वधर्म" द्वन्द्वमोहमुक्त करण्यासाठी (चंचलत्व दुर करण्यासाठी) उपयोगी होतो.

Commonwealth is defined as to surrender the Right of Self in the hands of a person or assembly of persons in order to avail the common facilities. याचप्रमाणे विश्वात जगतांना स्वधर्माचरण म्हणजे अहंकाराचा त्याग व ईश्वराचा आश्रय असतो. कारण ईश्वराने जगण्यासाठी हवा, पाणी इ. अनेक Facilities उपलब्ध करुन दिलेली असते.

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वाम् सर्वपापेभ्यः मोक्षयिष्यामि मा शुचः॥(१८-६६)

सर्व विश्वाचा आधार एकत्व आहे. एकत्व म्हणजेच ईश्वर आहे, विश्वाचा अध्यक्ष ईश्वर आहे. अर्थात विश्वाचे उगम व संचलन करणारे तत्व ईश्वर आहे. जड प्रकृति, अव्यक्त प्रकृति व अव्यक्त ईश्वर याद्वारे क्षर (नाशवंत-बदलणारे)व अक्षर(शाश्वत) याचे ज्ञान सविज्ञान भगवतगीता स्पष्ट करते.

अव्यक्तो अक्षर इति उक्तः तम् आहुः परमां गतिम् ।
यं प्राप्य न निवर्तन्ते तद् धाम परमं मम् ॥(८-२१)

१. व्यक्तिगत Consciousness (Lower & Higher- Sub, Super, Spirit etc) द्वारा याच ईश्वरज्ञानाचा उपयोग विकासासाठी होतो.

२. ईश्वरज्ञानाचा उपयोग Common/Lower Path(सकाम, द्वन्द्वमोहयुक्त) व Higher Path (निष्काम, द्वन्द्वमोहमुक्त) यांतील भेद स्पष्ट होण्यासाठी होतो.

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वन्द्वमोहेन् भारत।(७-२७)

ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।(७-२८)

३. सामान्य लोक श्रेष्ठांचे अनुसरण करतात. तर श्रेष्ठ स्वतःचा मार्ग जाणतात जे या (विकास) मार्गावर विचलित होत नाही.

यत् यत् आचरति श्रेष्ठः तत् तत् एव इतरो जनः।

स यत् प्रमाणं कुरुते लोकः तद् अनुवर्तते॥(३-२१)

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

*****

(८-२१)/२:"यं प्राप्य न निवर्तंते तद् धाम परमं मम"

I. (Origin & Destination)

समाजात "धर्म" या शब्दाचे विविध बोध होतात. मुख्य बोध "Religion"असतो. जीवनात योग्य-अयोग्य, चांगले-वाईट, पाप-पुण्य ठरविण्यासाठी याचा उपयोग होतो. पुण्यकार्याचे (मरणोत्तर)अंतिम धाम स्वर्ग व पापाचे नरक ही Belief system(ज्ञान) बनते. याच ज्ञानानुसार अर्जुन आपल्या निष्क्रियतेचे समर्थन करतो. धर्माचा दाखला देतो.

भगवतगीता जीवनाचे ज्ञान(शहाणपण)व अज्ञान(भ्रम) यावर प्रकाश टाकते. या ज्ञानानुसार योगक्षेमासाठी, भोगैश्वर्यासाठी कार्य करणे ही प्रकृति आहे. यावर Objection नाही. चांगला मनुष्य(दैवी) दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो. स्वतःला योग्य ठरविण्यासाठी ज्ञान वापरतो. जसे अर्जुन अज्ञानाला ज्ञान संबोधतो यावर objection आहे. हाच भ्रम

ठरतो. यामुळे विकासमार्गात(द्वंद्ववश झाल्यामुळे) barrier तयार होते. ज्ञानी मात्र विश्वासाने विकासमार्गावर असतो .

अर्जुनासाठी प्रस्थापित(त्याला उपलब्ध असलेले) ज्ञान अपुरे पडते, म्हणुन भगवतगीता प्रस्थापित धर्माचा आढावा घेते. व अंतिम धाम स्वर्ग-नरक नसुन ईश्वरधाम आहे, जी उगमाची मुळ प्रवृत्ति आहे. हाच ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. यांत प्रकृतिच्या ज्ञानविज्ञानासह ईश्वरज्ञान स्पष्ट होते.

अव्यक्तो अक्षर इति उक्तःतम् आहुः परमां गतिं।
यं प्राप्य न निवर्तन्ते तद् धाम परमं मम् ॥(८-२१)

या धामाला प्राप्त झाले तर जन्ममृत्युच्या फेऱ्यातुन मुक्ति अर्थात मोक्षप्राप्ति असते. या ज्ञानाने मनुष्याचा जीवनविकासाचा (शाश्वत) मार्ग(अमृतंगमय) निश्चित होतो. म्हणुन याला शाश्वतधर्म म्हटले.

शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्य एकांतिस्य च।(१४-२७)

या मार्गावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति (निष्काम कार्य)घडते.

तत् इति अनभिसंधाय फलं यज्ञतपः क्रियाः।
दानक्रियाश्च विविधः क्रियन्ते मोक्षकांङ्क्षिभिः।।(१७-२५)

१. या मार्गावर जीवनयात्रा करणारा दुःखाने विचलित होत नाही.
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं सो अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

ज्या अडचणीमुळे दुःख होते, त्या अडचणी विकासमार्गावरील संधि ठरतात. श्रेष्ठ लोकांच्या जीवनात अडचणी येतात पण त्याच अडचणी त्यांच्यासाठी Stepping stone ठरतात. तर सामान्य मनुष्य दुःख टाळण्यासाठी (वास्तव न स्विकारता )shortcut शोधतो. प्रसंगी निष्क्रियता आली तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो, अशांत मनाला समाधानी करण्याचा हा प्रयत्न असतो. अर्जुन हीच भूमिका घेतो.

२. जीवनात कार्य घडते, कर्म याच भागाला भगवतगीता प्राधान्य देत आहे. कर्म संदर्भात धर्म शब्द "धारणा" या अर्थाने आलेला आहे. योग्य संवय अभ्यासाने(Practice) बनते. संवयच स्वभाव(प्रकृति) बनते . याला कुणी muscle memory (स्वभावनियत संवय) म्हणुन ओळखतात(उदा. Driving).

स्वभावनियत कार्य सहजकार्य ठरते . हेच आवडीचे कार्य बनते. या कार्याचा व्यवहारातील नियतकार्यात उपयोग याला "स्वधर्म" म्हटले. या संदर्भात स्वधर्माचा विविध उपयोग असतो.

अ) Professional ओळख

ब) योग्य-अयोग्य या द्वंद्वाचा Tiebreaker

क) नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करुन स्वतःच्या मार्गाचे Awareness.

ड)स्वधर्माचरण म्हणजे कार्य ईश्वरसमर्पण(ईश्वरभक्ति) अर्थात निष्ठेने कार्य घडते.

कार्यनिष्ठेतील दुसरा महत्वाचा भाग निर्णयसंस्कार आहे. यांत बुद्धियोग निष्ठा असते. ईश्वराचा आश्रय करुन चंचलत्व दुर करणे व कार्याचा दृढनिश्चय करणे. येथे निर्णयअधिकार व निर्णयप्रक्रिया महत्वाची ठरते. परिणामभयाने चंचलत्व येते म्हणुन समत्वयोगाने कार्य करणे(फल ईश्वराला समर्पण, निष्काम कार्य). धर्म या संदर्भात म्हटले,

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

अर्थात वरप्रमाणे निर्णयसंस्काराची धारणा निर्भय बनविते.

भगवतगीतेत निर्णयसंस्काराचे विशेष महत्व आहे. श्रीकृष्णाने वास्तवाचे Scientific विश्लेषण अर्जुनापुढे स्पष्ट केले. ( जीवनाचे संपुर्ण ज्ञान विज्ञानासह सांगितल्यानंतर अर्थात योग्य-अयोग्य यांतील निश्चित भेद सांगितल्यानंतर) निर्णय तुला घ्यायचा आहे. याद्वारे मनुष्याच्या निर्णयअधिकाराचे महत्व स्पष्ट केले.

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।

*******

(८-२१)/३ : "तत् धाम परमं मम "

II. (Address of Life)

मनुष्य जीवनाचे रहस्य काय?अर्थ काय?हेतु किंवा साध्य काय?यावर सुख!साफल्य!भोगैश्वर्य!परमार्थ, !ईश्वरभक्ति!स्वर्ग ! कांहिही नाही, केवळ आनंद!अशी विविध मते व धारणा असतात. याच धारणेनुसार मनुष्याची Belief System बनते. ही System वैचारिक चक्र (Cycle) बनविते. याला कुणी TAF(Thought-Action-Feel)Cycle संबोधतात. हेच चक्र/System जीवनयात्रेत क्रियाशिल असते.

जीवन प्रवासात दुःख आले तर मनुष्य दुःखमुक्तिसाठी पर्याय स्विकारतो. जसा अर्जुनाने पर्याय स्विकारला. यांत निष्क्रियतेचे समर्थन ज्ञानी समजुन करतो. अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. येथे अर्जुन स्वर्गधामाची भाषा बोलतो. ज्या Systemने अर्जुन जगतो, ती Systemच चक्रव्युह बनवते. हाच चक्रव्युह भेदण्यासाठी योग्य System /ज्ञान हवे असते. याच संदर्भात "मनुष्याचे अंतिम धाम/ईश्वराचे धाम"हाच भगवतगीतेचा विषय आहे.

(अर्थात याद्वारे जीवनाचे शाश्वत मनोवैज्ञानिक ज्ञान स्पष्ट होते. )

ज्या ईश्वराचा अंश मनुष्याचे जीवन संचलित ठेवते, त्याच ईश्वराचे अंतिम धाम जाणले तर मनुष्याला स्वतःच्या जीवनाचे अंतिम धाम (Address) कळते. व वर्तमानात मनुष्य जीवनविकासाचा राजमार्ग जाणतो, विकसित करतो. अर्थात Belief System बनवितो. "तद् धाम परमं मम् "हे शब्द "शाश्वत" अर्थाने व "स्वयंप्रकाश" अर्थाने असे दोनदा आलेले आहे.

शाश्वत:

अव्यक्तो अक्षर इति उक्तः तम् आहुः परमां गतिं ।

यं प्राप्य न निवर्तन्ते तद् धाम परमं मम॥(८-२१)

प्रकाश:

न तद् भासयते सूर्यो न शशांको न पावकः।

यद् गत्वान निवर्तन्ते तद् धाम परमं मम॥(१५-६)

व्यवहारात मनुष्य(सुख अनुभवण्यासाठी, प्राप्तिसाठी) कर्म करतो. याच कर्माद्वारे ईश्वराची भक्ति होणे म्हणजेच जीवनविकासाच्या राजमार्गावर चालणे. या भक्तिसाठी ईश्वराला कर्माचे समर्पण/फल समर्पण ही प्रक्रिया सांगितली आहे. ईश्वराची अकर्ता भूमिका याचे वैज्ञानिक ज्ञान स्पष्ट केले.

स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।(१८-४६)

या प्रक्रियेत कर्म अकर्म जाणतो, कर्ता अकर्ता अनुभवतो, याचाच अर्थ ही विकसित System बनते. व मार्गावर सहज(नैसर्गिक) कार्यरत असतो. दुःख आले असता त्याने विचलित होत नाही, ते त्याचे प्रगतिचे Stepping stone बनते. जसे चढावावर गाडीचा गेयर सहज बदलतो. येथे Higher Consciousness क्रियाशील होते. हे सर्व नैसर्गिक घडत असते(जसे गाडी चालवितो). हेच ईश्वरभक्तिचे व जीवनाचे रहस्य भगवतगीतेने Technically स्पष्ट केले आहे.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

अर्थात जीवनविकासाच्या राजमार्गावर चालणारा विचलित होत नाही.

*************

(८-२२)

***********************

पुरुषः स पराः पार्थ भक्त्या लभ्य तु अनन्यया।

यस्य अंतःस्थानी भूतानि येन सर्वम् इदम् ततम् ।।

***********************

(८-२२):

" पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्य तु अनन्यया"

(ईश्वराची ज्ञान या संदर्भात ओळख)

*जीवनातील प्रश्नाचे विषयांतर :

मनुष्याच्या वाट्याला सुखाचा खजिना आला तरी दुःखाशी सामना करण्याची वेळ मनुष्यजीवनात नकळत डोकावत असते. यातुन श्रीराम, बुद्ध कुणीही सुटले नाहीत. व अर्जुनही सुटला नाही. या दुःखाशी deal करण्यास मनुष्य सक्षम, समर्थ असतो, होतो तेंव्हा ही सक्षमता त्याला महान बनवित असते. हा जगाचा इतिहास आहे. पण जेंव्हा असमर्थ होतो, ज्ञान नसते, तेंव्हा त्याची

भूमिका कशी असते, तो विषयांतर (मुख्य मुद्दा सोडुन दुसऱ्या मुद्यावर लक्ष divert करणे)कसे करतो?हे भगवतगीतेच्या अर्जुनविषादयोगात दर्शविले आहे.

व्यवहार जगत असतांनाच अर्जुन विषयांतर करतो. "धर्मयुद्ध" करणे हा मुख्य विषय असतो, यालाच त्याने पाप ठरविले असते. याचाच अर्थ श्रीकृष्णासह शहाण्यांनी शिष्टाई करुन शेवटी धर्मयुद्ध हा पर्याय सांगितला, या पर्यायालाच अर्जुनाने काळिमा फासला. याचे कारण अर्जुनाला झालेले दुःख असते, त्याचा Self interest असतो.

विषयांतर vs. मुख्य प्रश्न/विषय:

"ज्ञान" या संदर्भात लोक चांगले भाष्य करतात. समाजात अनेक प्रश्न असतात. पण विषयांतर करणे, जबाबदारीसाठी इतरांकडे बोट दर्शविणे, स्वतःवर जबाबदारी आली तरी ती टाळण्यासाठी निष्क्रियतेला आदर्श ठरविणे ही संवय "समाजातील Error" या संदर्भात आढळते. याच Error चे दर्शन अर्जुनाच्या भूमिकेत आढळते.

अर्जुन (समज दिल्यावर)अज्ञान कबुल करतो, तेंव्हा निश्चित प्रश्न समोर येतो. ज्ञानविज्ञानाच्या Platform वर प्रश्न define होणे महत्वाचे असते.

*ज्ञानाचे ईश्वराशी नाते व अनन्यभक्ति:

वर्तमान ज्ञानविज्ञानाचा आहे. या विश्वात मनुष्याचे जीवन नायक किंवा प्रेक्षक या भूमिकेत चालत असते.

ईश्वरश्रद्धा असली तरी ईश्वराची ज्ञानविज्ञान या संदर्भात मनुष्याला ओळख नसते व यामुळे प्रेक्षक भूमिकेत जगत असतो. याच मानसिकतेत बदलाव (Change of consciousness ) आवश्यक असतो. स्वतःशी ईश्वराचे नाते जाणुन घेतले तर ईश्वराशी जोडल्या जातो. योग या शब्दाची व्याख्या दुःखान्त असुन शब्दशः अर्थच जोडणे आहे.

भगवतगीता ईश्वराशी मनुष्याचे नाते (ज्ञानविज्ञानासह) स्पष्ट करते, जे मनुष्याचे मुळ स्वरुप आहे, जो अध्यक्ष या भूमिकेत विश्वाचे संचलन करीत आहे, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ज्याचा ज्ञानाशी संबंध अाहे.

अपरा इयम् इतः तु अन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्।
जीवभूतां महाबाहो ययाइदं धार्यते जगत् ।(७-५)

परः तस्माद् तु भावोअन्योअव्यक्तोअव्यक्तात् सनातनः।(८-२०)

(जड)प्रकृति-परा प्रकृति(Superior Energy) -पुरुष (Supreme power of God)-पुरुषोत्तम(The Supreme) याप्रमाणे ईश्वराची निश्चित ओळख (ज्ञानविज्ञानासह ) दिलेली आहे. याच ईश्वराचे ज्ञान जाणले तर Higher consciousness चे महत्व कळते.
Lower Self- Higher Self यांतील भेद कळतो.
जीवनविकासाचा मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. याच मार्गावर निष्काम कर्म(समत्वयोगाने कार्य) घडते. अर्थात ईश्वराची अनन्यभक्ति घडते.

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्य तु अनन्यया।
यस्य अन्तस्थानि भूतानि येन सर्वम् इतं ततम् ।(८-२२)

*******

(८-२२):

"यस्य अंतःस्थानी भूतानि येन सर्वम् इदम् ततम् "

(Destination)

*Change vs Transformation

अर्जुन ज्या मार्गावर असतो, त्या मार्गात दुःख आढळते. म्हणुन तो मार्गच बदलवतो. युद्ध करणे व न करणे या दोहोत "न करणे" ही निवड करतो. अर्जुनाला दुःखमुक्ति हवी असते.

Change is about using external influences to modify actions to achieve desired results.

Transformation is about modifying beliefs so that natural actions achieve the desired results.

भगवतगीता शाश्वत दुःखमुक्तिचे ज्ञान "स्थितप्रज्ञ" याद्वारा स्पष्ट करते. अर्जुनाला "Change" ची नव्हे Transformation ची गरज असते.

मनुष्य मरणोत्तर स्वर्गलोकाला (ब्रह्मलोक, देवलोक) प्राप्त होतो अशी धर्मश्रद्ध मनुष्याची श्रद्धा असते. याच आधारावर त्याची Belief system बनली असते. पण हे मनुष्याचे अंतिम Destination नाही हे स्पष्ट करुन भगवतगीता अंतिम Destination चे ज्ञान सांगते जे सर्व विश्वाचे मुळ आहे. याच ज्ञानाचा वर्तमानातील दुःखमुक्ति(अमृतत्वाय कल्पते) व शाश्वत दुःखमुक्तिसाठी (स्थितप्रज्ञ) उपयोग भगवतगीता स्पष्ट करते.

भगवतगीता व्यक्त(जड) प्रकृति-अव्यक्त प्रकृति-अव्यक्त पुरुष असे प्रकृति-पुरुष ज्ञान विश्वसंचलन या संदर्भात स्पष्ट करते. मनुष्याच्या Consciousness शी असलेला याच ज्ञानाचा संदर्भ "क्षेत्र-क्षेत्रज्ञ "ज्ञानाद्वारे स्पष्ट करते. तसेच मनुष्याचा बंधन-मोक्ष मार्ग या ज्ञानाने स्पष्ट होतो. अर्थात या ज्ञानामुळे Belief systemचेmodification होते. व या Belief system चा आधार ज्ञानविज्ञान असतो.

पुरुषः स पराः पार्थ भक्त्या लभ्य तु अनन्यया।
यस्य अंतःस्थानी भूतानि येन सर्वम् इदम् ततम् ।।(८-२२)

************

(८-२७)

**********************

नैते सृति पार्थ जानन योगी मुह्यति कश्चन।

तस्मात् सर्वेषु कालेषु 'योगयुक्तो' भवार्जुन।।

**********************

(८-२७) : "नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन् "

I. (What is knowledge to life?)

अर्जुन समाधानासाठी बाह्य(सृति)ज्ञानाचा उपयोग करतो. मनुष्य (बाह्यज्ञानाद्वारे) तुलना करुन स्वतःचे समाधान करुन घेतो. स्वतः योग्य असणे, विकासमार्गावर असणे, आत्मविश्वास अनुभवणे हा आंतरिक सुखाचा अनुभव असतो. तर समाधानासाठी
बाह्यज्ञानाचा
उपयोग करणे यातील भेद भगवतगीता दर्शवुन देते व जीवनात Priority बाह्यज्ञान नसुन विकासमार्गावर असणे या Priority ला Highlight करते.

ब्रह्म-परब्रह्म याद्वारे मनुष्य ईश्वराला जाणतो. यासंदर्भात म्हटले,

आब्रह्मभुवनान् लोकाः पुनः आवर्तिनो अर्जुन।
मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते।।(८-१६)

मोक्ष व पुनर्जन्म याच्या अनुक्रमे शुक्लपक्ष व कृष्णपक्ष अशा दोन गतिंचा उल्लेख आहे. पण हे सृति(श्रवण)ज्ञान आहे. या सृतिने योगी(विकासमार्गावर असलेला) मोह पावत नाही अर्थात शुक्लपक्षात मृत्यु आला पाहिजे ही त्याची Priority नसते, तर नित्य विकासमार्गावर असणे ही त्याची Priority असते. म्हणुन योगी (बाह्य) सृतिज्ञानाने मोह पावत(Free from infection) नाही.

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन् ।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।।(८-२७)

What is knowlege to the Life? याचे ज्ञानच भगवतगीता देते. ज्ञान विकासमार्गातील संशय मिटवते. (ज्ञानसंच्छिन्न संशयम्) ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. ईश्वराचा आश्रय ज्ञानाचा आश्रय ठरतो. याप्रमाणे स्वतः नित्य विकासमार्गावर असण्यासाठी जीवनात ज्ञानाचे, (ईश्वराचे ) महत्व आहे. अर्थात योगयुक्त असणे

म्हणजेच नित्य विकासमार्गावर असणे. कार्याद्वारे ईश्वरभक्ति घडण्यासाठी कार्यमार्ग दृढ असणे ही Priority ठरते. या विकासमार्गावर असलेला (बाह्यज्ञान) कोणत्याही ऐकावयाच्या भाष्यामुळे मोह पावत(Infection) नाही. हे त्याचे Mental Attitude असते.

"Happiness doesn't depend on any external conditions, it is governed by our mental attitude. "
Dale Carnegie

भाष्य Communicationचे साधन असते. ते समाजात असतेच. जो स्वतःची Priority जाणतो, तो स्वतःचा विकासमार्ग जाणतो, असा विकासमार्गावर असलेला उपयोगी भाष्य व निरुपयोगी भाष्य यांतील भेद तात्काळ जाणतो. भाष्यामुळे infect होत नाही.

याप्रमाणे नित्य विकासमार्गावर असणे ही मनुष्याची Priority असली पाहिजे. नित्य विकासमार्गावर असलेला सुखशांती अनुभवतो. या मार्गावर दुःखाने infect होत नाही.
समदुःखसुखंधीरं सः अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

विकासाचा दृढमार्ग या संदर्भात निर्णय अधिकार, Committed नियतकार्य अर्थात वचन महत्व, स्वधर्म (Self approval, Tiebreaker), ईश्वरज्ञान (Destination, अज्ञानाचा अंधार मिटविणारे ज्ञान, बुद्धियोग देणारे ज्ञान) याचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते.

"Happiness is not something you postpone for the future; it is something you design for the present. "

Jim Rohn"'---

*****

(८. २७)/२:

"तस्मात् सर्वेषु कालेषु 'योगयुक्तो' भवार्जुन"

II. (Universal message of "Growth Mindset")

"You’re in charge of your mind. You can help it grow by using it in the right way. Common sense

would suggest that having ability, like being smart, inspires confidence. It does, but only while the going is easy. The deciding factor in life is how you handle setbacks and challenges. People with a ' Growth mindset 'welcome setbacks with open arms. "

Travis Bradberry

पाश्चात्य राष्ट्रात मुल्यविषयक शिक्षणात अलिकडे "Growth mindset" या शब्दाला महत्व आलेले आहे. भगवतगीतेने याचसाठी "योगयुक्त" शब्दाचे प्रयोजन केले आहे.

नैते सृति पार्थ जानन योगी मुह्यति कश्चन।
तस्मात् सर्वेषु कालेषु 'योगयुक्तो' भवार्जुन।।(८-२७)

"योगयुक्त" शब्दामुळे(सृति) मोह पावत नाही(भ्रमित होत नाही). अर्थात येथे शब्दापेक्षा Growth mindsetची धारणा याला भगवतगीता महत्व देत आहे. (Verses महत्वाचे नाही, तर त्याला respond करणारा Receiver महत्वाचा आहे. )
शरीराला जरा(वृद्धत्व), मरण आहे पण आत्मा नित्य आहे, शाश्वत

ईश्वराचा अंश आहे. प्रकृतिगुणाद्वारे विकासासाठीच (आत्मोन्नति) त्याने शरीर धारण केले आहे. म्हणुन विकासाचे(शरीर सोडेस्तोवर) सातत्य असते. त्याला स्वतःची (शाश्वत)ओळख असते, अध्यात्म जाणतो, कार्याचे महत्व जाणतो.

जरामरण मोक्षाय माम आश्रित्य यतन्ति ये।
ते ब्रह्म तद् विदुः कृत्स्नं अध्यात्म कर्म च अखिलं॥(७-२९)
म्हणुन मनुष्याच्या सुखविषयक, विकासविषयक संकल्पना आत्मोन्नति(उद्धरेत आत्मना)शिवाय अपुर्ण असतात. याच "Growth mindset "संदर्भात म्हटले आहे,
बुद्धियोगं उपआश्रित्य मद् चित्तः सततं भव।(१८-५७)

विकासाला नित्य तत्पर व सुखी जीवनासाठी हा "योगयुक्त" Mindset कसा operate होतो, हेच ज्ञान भगवतगीता सांगते. वर्तमानात शांति अनुभवतो, निर्भय असतो, शब्दमोहमुक्त असतो, दुःख (अडचण )आले असता त्याचा सकारात्मक Response असतो, अर्थात विचलित होत नाही व अडचणी विकासातील Stepping stone जाणतो. "अमृतंगमय" या शाश्वत विकासमार्गावर याचा प्रवास असतो. या मार्गावर कार्याचा

दृढनिश्चय असतो यासाठी स्वधर्म, निर्णयअधिकार वापरतो. कार्य ईश्वराला समर्पित होते म्हणुन निष्ठेने कार्यरत असतो.

व्यावहारिक बोध:

अध्यात्म, ईश्वर या संकल्पना भौतिक विकासाला, वैज्ञानिक विकासातील अडथळा आहे असा समज असतो. समाजातील हा समज अज्ञानामुळे आहे याचे भगवतगीता स्पष्टिकरण देते. व अडथळा नसुन पुरक आहे हे ज्ञान स्पष्ट करते.

कार्याशिवाय भौतिक विकासही साध्य होत नाही म्हणुन कार्याचे महत्व व कार्यकौशल्य ज्ञान याला भगवतगीता highlight करते. अर्जुन जसा निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी स्वतःला ज्ञानी दर्शविण्याचा प्रयत्न करतो, तशीच संवय मनुष्याला जडली तर त्याच्या स्वतःच्या विकासात तोच अडथळा ठरत असतो, अर्थात त्याचा "Growth mindset"नसतो.

भगवतगीता संवादाची वेळ लक्षात घेतली तर भगवतगीता वर्तमानातील मनुष्याचा "Growth mindset" व त्याची धारणा यावर focus करीत आहे याची प्रचिति येते. याद्वारेच "स्वतःच्या

विकासात स्वतःच अडथळा ठरु नका, स्वतःचा बंधु बनुन स्वतःच्या विकासाला सहाय्यक व्हा" हा संदेश मनुष्याला मिळतो.

"Always say 'yes' to the present moment... Surrender to what is. Say 'yes' to life - and see how life starts suddenly to start working for you rather than against you. "

Eckhart Tolle---'-

*************

(८-२७)/३ : "योगयुक्तो भवार्जुन "

III. Situated in higher consciousness

*"For many, life has become more about what they can't do rather than what they can do. The truth, however, is that you are far greater than you think and have truly amazing potential. The key is to tap into your higher self and unleash your full capacity for success and happiness. "

T. Harv Eker

*मनुष्याच्या संस्कारानुसार, ज्ञानानुसार त्याची Belief system काम करीत असते. यात अपेक्षेप्रमाणे पुर्ति झाली नाही तर निराशा येते. वर्तमानात शांती नसेल तर तुलना, judgement thinking चा वापर करुन समाधान घेतो, समर्थन करतो, यासाठी ज्ञान वापरतो. (To protect ignorance, stupidity. )

*अर्जुन दुःखी होतो. अशांत होतो. पण शांतीसमाधानासाठी उपाय शोधतो. युद्ध न करणे हा उपाय वापरतो व समर्थनासाठी धर्मज्ञान बोलतो.

*येथे ज्ञानाचा वापर अज्ञान लपविण्यासाठी होतो. भगवतगीता सांगते, अज्ञानाला नष्ट करण्यासाठी ज्ञान आहे, अज्ञान लपविण्यासाठी नाही.

* स्वतःच्या Belief system प्रमाणे जगत असतांनाच अडथळा वाटतो, चुक - बरोबर ठरवितो. त्याला स्वतःचे नियतकार्य अयोग्य असल्याचा संशय येतो, व प्रश्नाची पारदर्शकता नष्ट होते. स्वतःला काय हवे हेच कळत नाही. जसे अर्जुन म्हणतो, मला कांही नको! म्हणुन प्रश्न/वास्तव/काय हवे? महत्वाचे असते.

* "If you don't design your own life plan, chances are you'll fall into someone else's plan". -Jim Rohn

भगवतगीता मनुष्याच्या स्वतःच्या विकासमार्गात पारदर्शकता आणते. यांत वर्तमानातील State of mind महत्वाचे असते. किंबुहना विकासातील हाच महत्वाचा बिंदु आहे. स्थितप्रज्ञ अवस्था व त्यासाठी विकासमार्गाचे Status कसे असावे, हाच भगवतगीतेचा मुख्य विषय आहे. याच संदर्भात "योगयुक्तो भवार्जुन" हा संदेश आहे.

*अर्जुन Senses मनाच्या पातळीवर विचार करतो व मोहामुळे बुद्धिभ्रम होतो. बुद्धिला मुक्त करण्यासाठी(स्मृति प्राप्ति) "योगयुक्तो भवार्जुन" (engaged in higher consciousness)हा संदेश आहे.

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन॥(८-२७)
****************

# भगवदगीता

# अध्याय ९

# अनन्यभक्तियोग

अध्याय ९

अनन्यभक्तियोग

मनुष्यासाठी अनन्यभक्तिद्वारा योगयुक्त होणे सुलभ आहे, असे अध्याय ८ मध्ये सांगतात, यासाठी ईश्वराची ओळख, ईश्वराचा आश्रय होण्यासाठी माझा भक्त हो असे या अध्यायात सांगतात.

मनुष्य एखाद्या व्यक्तिला त्याच्या अधिकाराने, ज्ञानाने, Abilityने ओळखतो किंवा हितचिंतक या नात्याने ओळखतो. रामायणात कैकेयीची खरी हितचिंतक म्हणुन मनथरेने कैकेयीला विश्वास दिला. याच मोहामुळे मनथरा ज्ञानी आहे, तिला दुरदृष्टि आहे, असा कैकेयीला विश्वास वाटला.

येथे अर्जुनासाठी श्रीकृष्ण हितचिंतक होते हा विश्वास अर्जुनाला होताच. तसेच असुराचा नाश करणारा (मधुसुदन) महापुरुष अशी ओळख होतीच. धर्माचे जाणकार, ज्ञानी आहे या विश्वासानेच "माझ्यासाठी काय योग्य" हे जाणुन घेण्यासाठी या संवादात सहभागी झाला. याच संवादातुन मीच ईश्वर आहे अशी ओळख देतात. याचेच सविस्तर विवरण अनन्ययोग आहे. हे गुह्यज्ञान

(secret) ज्ञानविज्ञानसह स्पष्ट केले. हे ज्ञान स्पष्ठ होण्यासाठी मुख्य दोन विभाग पुढिलप्रमाणे येतात.

९. १ ईश्वराची ओळख

९. २ भक्तितील विविधता व अनन्यभक्ति

९. १ ईश्वराची ओळख

सुखाची जीवनयात्रा अनुभवण्यासाठी हा राजयोग म्हटले आहे. ज्याला ईश्वराची (मुळपुरुष)ओळख नाही असा श्रद्धाहिन ईश्वरतत्वांत विलिन न होता पुनः या मर्त्यसंसारात जन्माला येतो.

अध्याय ७ व ८ मधुन प्रकृति व ईश्वर यांचे नाते जड प्रकृति-अव्यक्त प्रकृति-अव्यक्त पुरुष(ईश्वर) असे ज्ञानविज्ञानाद्वारा स्पष्ठ केले . अव्यक्त पुरुष-ईश्वर ही भूमिका सृष्टिचा(प्रकृति) अध्यक्ष या नात्याने स्पष्ठ केली आहे.

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।
हेतुना अनेन कौंतेय जगत् विपरिवर्तते।।(९-१०)

कंपनी व्यवस्थापनात एखादा उद्योगपति अध्यक्ष या भूमिकेतुन अनेक कंपन्यांचे संचलन करतो. प्रत्यक्षात कंपनीची कार्यवाही कार्यकारी व्यवस्थापक सिद्ध करीत असतात. राष्ट्रपति व पंतप्रधान यांची भूमिका देशाचे संचलनात आपण जाणतो. यांत अनुक्रमे अध्यक्ष व कार्यकारी जशी भूमिका असते, सृष्टि संचलनात अध्यक्ष व प्रकृति कार्यकारी अशी भूमिका असते. याद्वारे जगतसंचलनात ईश्वर व प्रकृति यांचे नाते स्पष्ठ होते.

ईश्वराचे अव्यक्त स्वरुप व भूमिका (जगाचा कर्ता व भर्ता)यांचे अज्ञान असल्यामुळे मनुष्य कायम प्रकृतिने बद्ध असतो(प्रकृतिवश). याच कारणामुळे असुर प्रवृत्ति निर्माण होतात. तर दैवी प्रकृति धारण असलेले ईश्वराला मुळ पुरुष, अध्यक्ष ही भूमिका जाणुन अनन्यभक्तिने भजत असतात.

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिम् आश्रिताः।
भजन्ति अनन्यमनसो ज्ञात्वा भूत आदिम् अव्ययम् ॥(९-१३)

## ९. २ भक्तितील विविधता व अनन्यभक्ति

वर्तमानात जगतहितासाठी व मानवकल्याणासाठी श्रीकृष्णाने कठीण गोष्ट सुलभ करुन सांगितली. लोक इंद्राची पुजा करायचे. श्रीकृष्णांनी व्यवहारातील सत्याची जाणिव करुन दिली, इंद्र तुम्ही पाहिला नाही पण गोवर्धन आपल्यासमोर आहे. वृक्ष लावण्याचे कर्म करा. हीच पुजा आहे. जगतहितासाठी, जीवनविकासासाठी कर्माचे महत्व सांगितले.

चांगला मनुष्य देखील प्रकृतिच्या द्वंद Barrier मध्ये सापडुन निष्क्रिय होतो. म्हणुन भगवतगीता जगासमोर आली. दुःखी मनाने जीवन जगण्याची पाळी अर्जुनावर आली होती. म्हणुन या जगाला" अनित्यं असुखं लोकं" असे संबोधुन "इमं प्राप्य भजस्व माम् " याच भक्तिसाठी राजयोगाचे रहस्य सांगितले. ईश्वराची ओळख व सृष्टिसंचलनात प्रकृति व ईश्वराचे नाते ज्ञानविज्ञानाद्वारे स्पष्ठ केले. प्रकृतिमध्ये कर्म ही Strength आहे, तर (रागद्वेष) द्वंद हा Weakness असतो. या Weakness वर मात करण्यासाठी योगयुक्त स्थिति, ईश्वरभक्ति असे प्रयोजन आहे.

कर्मयोग व भक्तियोग या दोहोंचा समन्वय असलेला राजयोग आहे. आचरण्यास सुलभ पण प्रत्यक्ष अनुभव करण्याचा हा योग आहे. कर्मयोगात फलत्याग/निष्काम कर्म आहे तर अनन्ययोगात कर्म समर्पण आहे. कर्मच केले नाही तर समर्पण (worship)कसे होणार!

स्वर्गप्राप्तिसाठी विशिष्ट कर्म(कर्मकांड), विविधप्रकारे भक्ति करणे, तसेच विविध देवतांची भक्ति या सर्वांत अनन्यभक्तिचे श्रेष्ठत्व या अध्यायात वर्णिलेले आहे. चराचरात ईश्वर व्यापलेला आहे. स्वर्ग कुणी पाहिला नाही, पण व्यवहारातील कार्य आपल्यासमोर असते. वर्तमान सत्य असतो. जसे पत्र, पुष्प, फल निष्ठेने ईश्वराला समर्पित करतो, तसेच जे कार्य करतो, जे ग्रहण करतो, जे देतो ते सर्व ईश्वराला समर्पित वृत्तिने करणे (तद् कुरुष्व मद् अर्पणं). याद्वारे शुभ-अशुभ फलातील द्वंदापासुन मुक्त असतो. स्वतंत्रता व शांति अनुभवतो.

गोरा कुंभार माठ घडविण्यात, कबिर कापड विणण्यात ईश्वर अनुभवतात. जीवन व ईश्वराचे रहस्यमय नाते सोप्या शब्दांत जगासमोर आपल्या दोह्याद्वारे स्पष्ट करुन सांगतात.

जगतसंचलनात कर्म महत्वाचे आहे. कर्म करणारा कोणताही मनुष्य अनन्यभक्तिद्वारा जीवनाची उच्च स्थिति प्राप्त करतो. म्हणुन जीवन जसे कांही आहे, त्याचा स्विकार करुन त्याला योग्य वळण देणे हा जीवनाचा आदर आहे.

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वत् शांतिं निगच्छति।
कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्ताः प्रणश्यति।।(९-३१)

"Your philosophy determines whether you will go for the disciplines or continue the errors. " - Jim Rohn

सार:

कर्मयोगात फलत्याग आहे, वृक्ष लावल्यावर फळ ताबडतोब येत नाही. समत्वयोगाद्वारे समत्वदृष्टि साधणे, यासाठी कर्माचे महत्व आहे. फलासक्ति असल्यामुळे परिणामभयाने कर्मच टाळतो. कर्म टाळण्यास आळस, संशय कारण असते. यामुळे द्वंद्ववश असतो. प्रकृतिवश असतो.

कर्म करणे प्रकृतिधर्म आहे(कर्मानुबंधिनि मनुष्यलोके). तर द्वंद्ववश होणे हा अडथळा असतो. हाच अडथळा पार करण्यासाठी ईश्वर(प्रकृतिचा मालक)भक्ति आहे. जसे एका दगडाने दोन पक्षांची

शिकार साधतो, ईश्वर आश्रयाने १. मार्गातील भय, संशय मिटतोच तर २. भक्ति(समर्पण)द्वारा भयमुक्ति, दुःखवियोगशक्ति, शाश्वत सुख, ईश्वरज्ञान अनुभुति साध्य होते.

कर्म टाळुन" दे रे हरी खाटल्यावरी" अशी वृत्ति भगवतगीतेला मान्य नाही. जे कर्म करावयाचे आहे, (नियतकार्य) ते सरळ ईश्वरभक्तिसाठी (ईश्वराने दिलेले कार्य जाणुन) ईश्वराला समर्पित होवुन करणे. यांत जसे पुजा करतांना भक्तिने पत्र फुल अर्पण करतो, तसेच भक्तिसाठी कर्माचे समर्पण साध्य करणे. (जसे पत्र, फुलाचे समर्पण या अर्थाने). समर्पण हे फलसमर्पण या अर्थाने आहे. याप्रमाणे कर्मयोगात फलत्याग व अनन्ययोगात फलसमर्पण आहे.

योगक्षेम चालविण्यासाठी कर्म करणे हा मनुष्यधर्म आहे तर कर्माद्वारे ईश्वराची अनन्यभक्ति साधणे हे कार्यकौशल्य आहे. (जसे जीवनविमा काढणे अर्थनियोजनकौशल्य आहे)

अनन्याः चिंतयन्तो माम् ये जनाः पर्युपासते।

तेषां नित्यअभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।(९-२२)

***********

अध्याय ९:मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

९. १/१:"इदं तु ते गुह्यतमं प्रवक्षामि अनसूयवे"

(९-१)/२: "ज्ञानविज्ञानसंहितं यद् ज्ञात्वा मोक्ष्यसे अशुभात् "

(Wisdom of Ignorance & Importance of Knowledge)

९. २/१ : "राजविद्या राजगुह्यं पवित्रम् इदं उत्तमम्"

९. २/२:"प्रत्यक्ष अवगमं धर्म्यं सुसुखं कर्तुं अव्ययम् "

(९-३)विषय ७३५ :

"अश्रद्धधानाः पुरुषा धर्मस्य अस्य परन्तप"

(स्वर्गनरक प्राप्तिचा धर्म vs. कार्यनिश्चय होण्यासाठी ईश्वरसमर्पण धर्म)

९-४:"मया ततम् इदं सर्वं जगत् अव्यक्त मुर्तिनां"

९. १०/१:" मया अध्यक्षेण प्रकृतिः "

(९-१०)/२:"हेतुना अनेन कौंतेय जगत् विपरिवर्तते"

(विश्वाचे संचलन)

९-११/१:"अवजानन्ति मां मुढा मानुषिं तनुं आश्रितः"

९. ११/२:"परम् भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम्"

९. १३/१:

"महात्मानः तु मां पार्थ दैवीं प्रकृतिम् आश्रिताः"

(९. १३)/२ :

"भजन्ति अनन्य मनसो ज्ञात्वा भूतआदिम् अव्ययम् "

९. १८/१:"गतिः भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्"

(९-१८)/२ :

" गतिःभर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्"

(गति या संदर्भातील ईश्वराची ओळख)

९. २२/१:"अनन्याः चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते"

९. २२/२: "योगक्षेमं वहाम्यहम् "

अर्थात

असामान्यत्वाचा शोध

(Discovering SELF)

९-२२/३:

"तेषां नित्य अभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् "

(श्रेष्ठ जीवन )

(९-२३):

"येअपि अन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धया अन्विताः"

(जीवनविकासमार्गात ज्ञान, कर्म व भक्ति यांचा समन्वय)

(९-२४)/१:

"अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुः एव च"

(जीवनाची उच्च पातळी)

(९-२४)/२ :

"न तु माम् अभिजानन्ति तत्त्वेन् अतः च्यवन्ति ते"

(जगण्याची आध्यात्मिक पातळी व त्याचे अज्ञान)

(९-२७):

"यत् तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मद् अर्पणम् "

(अनन्यभक्ति:Higher level of living)

(९-२८):

" शुभाशुभफलैः एवं मोक्ष्यसे कर्मबंधनै:"

(बंधन -मोक्ष)

९. २९/१ :

"समोअहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योअस्ति न प्रियः"

९. २९/२:

"ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु च अपि अहं"

९. २९/३:

"मयि ते तेषु च अपि अहं "

(Leadership lesson:ईश्वराचा प्रतिनिधी)

९. ३०/१:"अपि चेत्सु दुराचारो भजति माम् अन्यभाक्"

(९. ३०)/२:

"साधु एव स मन्तव्यः सम्यग् व्यवसिता हि सः"

(अनन्यभक्ति)

(९-३१)/१ :

"क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वत् शान्तिं निगच्छति"

(अनन्यभक्ति रहस्य)

(९-३१)/२:

"न मे भक्तः प्रणश्यति"

९. ३३/१: "अनित्यं असुखं लोकं "

(९-३३)/२:

"अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् "

(Dealing distress)

(९-३४) :

" मामेव एष्यसि युक्त्वा एवं आत्मानं मत्परायणः"

(OMG)

(९-१)

***********************

इदं तु ते गुह्यतमं प्रवक्षामि अनसूयवे।

ज्ञानविज्ञानसंहितं यत् ज्ञात्वा मोक्ष्यसे अशुभात् ॥

*************************

(९. १)/१ :"इदं तु ते गुह्यतमं प्रवक्षामि अनसूयवे"

भगवतगीतेत गुह्य (रहस्य) शब्दाचे प्रयोजन ईश्वरभक्तांसाठी अर्थात ज्यांची ईश्वरावर श्रद्धा आहे, त्यांच्यासाठी आलेले आहे. याच ईश्वराची सृष्टितील भूमिका जाणण्यासाठी या गुह्य ज्ञानाचे प्रयोजन आहे, याला ज्ञानविज्ञानाचा आधार आहे.

इदं तु ते गुह्यतमं प्रवक्षामि अनसूयवे।

ज्ञानविज्ञानसंहितं यत् ज्ञात्वा मोक्ष्यसे अशुभात् ॥(९-१)

येथे प्रकृतिचे संचलन व त्यांत ईश्वराची भूमिका(मया अध्यक्षेण प्रकृति सूयते सचराचरम् ) स्पष्ट झाली आहे. प्रकृतिद्वारा जीवनांत क्रिया घडतात. या क्रियाद्वारे ईश्वरभक्ति अनन्यभक्ति म्हटले आहे.

यत्करोषि यत् अश्नासि यत् जुहोषि ददासि यत् ।

यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मद् अर्पणम् ।।(९-२७)

अर्थात जीवनविकासाचा प्रवास अशाश्वताकडुन शाश्वताकडे (अमृतंगमय)या मार्गावर होतो. दुःखमुक्तिसाठी अर्थात शाश्वत सुखासाठी हा मार्ग असतो.
मन्मना भव मद् भक्तो मत् याजी माम् नमस्कुरु।
मामेव ऐष्यसि युक्त्वा एवं आत्मानं मत्परायणः।।(९-३४)

याप्रमाणे जीवनविकासातील पायाभूत ज्ञानाची सांगता होते. ज्यांत ज्ञान, सुख(/भक्ति), कर्म प्रधान आहेत. व योग्य-अयोग्य जाणुन परिवर्तनाचे ज्ञान होते.

*ज्ञान:अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो व मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो.
वास्तव- मनुष्य योग्य समजुनच जीवनयात्रा करीत असतो. मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरल्या जाते, तेंव्हा असे भाष्य "ज्ञान " नसुन प्रज्ञावाद असतो. संवाद नसतो . अर्जुन योग्य काय याचा निश्चय करु शकत नाही. म्हणुन निष्क्रियतेचे option स्विकारतो. व अशांत मनाला समाधान देण्यासाठी भाष्य बोलतो. अर्जुन वास्तव स्विकारतो. तेंव्हाच संवाद सुरु होतो.

बदल-जीवनविकासमार्गातील अंधार दुर करण्यासाठी ज्ञान प्रकाश असते. ज्ञानामुळे प्रश्न सुटतात, उपाय मिळतो. अर्थात कार्यासाठी ज्ञान असते.

*सुख: भौतिक सुख(श्री, किर्ति) मनुष्य जाणतो. म्हणुन प्राप्तिसाठी कार्य करतो. या सुखाचा अभाव दुःखी करतो, म्हणुन हे अशाश्वत स्वरुपाचे सुख असते.

बदल- सुखासाठी कार्य साधन असते. योग(दुःखान्त), स्थिरता(विचलित न होणे), निर्भयता, शांति इ. शाश्वत सुख असते. याच शाश्वत सुखासाठी "कार्याद्वारा ईश्वरभक्ति" या शास्त्राचे प्रयोजन आहे.

कर्म : यांत दोन भाग आहेत.

(अ) स्वभावनियतकार्य(State of Art)

(ब) निर्णय (अधिकार व दृढनिश्चय)

संपत्ति(पैसा) असेल तर कार्य करण्याची काय गरज? हा प्रश्न अज्ञानामुळे असतो. यामुळे एखादे चांगले कार्य केले तरी श्रेय मिळायला पाहिजे . किर्ति मिळावी अशी सकाम मानसिकता असते.

अर्जुन म्हणतो, मला कांही नको. मग हे कृत्य लोभापायी होत आहे असा अर्थ लावतो. सकाम मानसिकतेमुळे (दैवी प्रकृतिचा)चांगला मनुष्यही असा भ्रमात सापडतो. म्हणुनच समाजात चांगलेपणाविषयी (चांगलेपणा चालत नाही!चांगल्या मनुष्याला त्रास होतो!)गैरसमज असतो.

प्राप्तिसाठी कार्य हा कार्याचा एक भाग असतो, तर दुसरा भाग "शाश्वत सुखासाठी कार्य" हा असतो. म्हणुन भक्तिसाठी विकासमार्गात (अमृतंगमय) कार्याचे Transformation असते.

अ. (स्वभाव)नियतकार्य स्वधर्मात Transform करणे. येथे स्वधर्माचे शिक्कामोर्तब करुन स्वतःचा मार्ग बनतो. यांत (ईश्वराला)कार्यसमर्पण असते. याद्वारा नैष्कर्मसिद्धि लाभते.

ब. दृढनिश्चय कर्मयोगाचा पाया आहे. म्हणुन निर्णयप्रक्रिया महत्वाची असते. वचनाचे महत्व जाणतो. बुद्धियोगामुळे दृढनिश्चय होतो. निर्णय कर्मयोगात Transform होतो. योगासाठी फलत्याग अर्थात निष्काम कर्म असते. येथे परिणामभयाने विचलित होत नाही.

**********

(९-१)/२:

"ज्ञानविज्ञानसंहितं यद् ज्ञात्वा मोक्ष्यसे अशुभात् "

(Wisdom of Ignorance & Importance of Knowledge)

योग्य-अयोग्य व अज्ञान:(निदान)

भगवतगीतेत स्पष्ट शब्दात ज्ञानविज्ञानाचे महत्व स्पष्ट केले आहे. म्हणुन जगतकल्याण वा व्यक्तिगत कल्याणासाठी ज्ञानविज्ञानाची भूमिका जाणुन घेणे अपरिहार्य ठरते.

इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्यामि अनसूयवे।
ज्ञानविज्ञानसंहितं यद् ज्ञात्वा मोक्ष्यसे अशुभात् ।।(९-१)

योग्य मार्गावर असेल तर विश्वासाने मार्ग चालतो. अर्जुन निष्क्रियतेला योग्य ठरवुन योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो. त्याचा हा प्रज्ञावाद योग्य सिद्ध करण्यासाठी असतो. वास्तव स्विकारतो(युद्ध करणे योग्य कसे? हा संशय!)तेंव्हा अज्ञानाचा स्विकार करतो. प्रश्नाची पारदर्शकता येते. निश्चित विषय मिळतो. याच विषयावर चर्चा-संवाद होतो.

सामाजिक पातळीवर किंवा व्यक्तिगत पातळीवर चुका काढुन टिका करणे सोपे असते. पण अज्ञान कळले तर ज्ञानविज्ञानाचा उपयोग करता येतो. यशस्वी व्यवस्थापनात व्यवस्थापनाचा अभ्यास केला तर ज्ञान कळते. जसे ज्ञान कळते तसेच अयशस्वी व्यवस्थापनातील अज्ञान कळले तर ज्ञानाचा उपयोग करता येतो. कॅलिफोर्नियात संत्राप्रक्रिया उद्योगासाठी कच्चा माल या संदर्भात संत्रा नाशवंत व अल्पकाळासाठी उपलब्ध होणारा आहे. व अस्तित्वात असलेल्या सहकारी संस्थामधील व्यवस्थापन या उद्योगासाठी सक्षम नाही म्हणुन Exchange पद्धति अंमलात आणली. व "सनकिस्ट एक्स्चेंज" अस्तित्वात आले. याचाच अर्थ जसे ज्ञानाचे महत्व आहे, तसेच अज्ञानाचा स्विकार होणे तितकेच महत्वाचे ठरते.

निश्चित विषय:

जसे एखाद्या कार्यासाठी ध्येय ठरविले तर प्रवास निश्चित दिशेने होतो, तसेच चर्चेचा विषय ठरला तर संवादाची दिशा ठरते. सुखासाठी मनुष्य कार्यरत असतो. येथे(याच संदर्भात) "दुःखमुक्तिसाठी कार्याचे प्रयोजन" हा विषय चर्चेला येतो.

चांगलेपणामुळे विकाससंधी:

चांगलेपणामुळेच अर्जुनाला दुःख होते, मग चांगलेपणाच अर्जुनाच्या अज्ञानाचे कारण ठरला काय?

उत्तर:चांगलेपणामुळे निर्माण झालेल्या या अज्ञानातही महान(Divine) प्रेरणा सुप्त अवस्थेत स्थित असते. व तीच विकासाची संधी ठरते. अर्थात अर्जुनाचे दुःख त्याच्यासाठी विकासाची(आत्मोन्नति) संधी ठरते हा उलगडा होतो.

विकासमार्ग:

भगवतगीता जीवनविकासाचे ज्ञानविज्ञान सांगते व याद्वारे विकासमार्ग(अमृतत्वाय कल्पते, अमृतंगमय) कळतो. या मार्गावर प्रवास करणारा विचलित होत नाही. हा मार्ग (योग, दुःखान्तशक्ति) साधनेचा ठरतो. या मार्गावर साधनेसाठी होणारे कार्य "योगः कर्मसु कौशलम् " असे ओळखल्या जाते. याच संदर्भात मार्गातील संशयमुक्तिसाठी "ज्ञानसञ्च्छिन्न संशयम्" हा संदेश ज्ञानासाठी मिळतो. शाश्वत विकासमार्गासाठी संदेश मिळतो,

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

******

(९-२)

*************************

राजविद्या राजगुह्यं पवित्रम् इदं उत्तमम् ।

प्रत्यक्ष अवगमं धर्म्यं सुसुखं कर्तुं अव्ययम्।।

***************************

(९. २)/१ :

"राजविद्या राजगुह्यं पवित्रम् इदं उत्तमम्"

भगवतगीतेत गुह्य ज्ञान या संदर्भात गुह्यतम ज्ञान(९-१), राजगुह्यं(९-२), गुह्यं अध्यात्म(११-१)गुह्यतमं शास्त्र (१५-२०), गुह्यात् गुह्यतरं ज्ञान (१८-६३), सर्वगुह्यतमं (१८-६४) अर्थात Secret, Secret of secret, King of Secret असे शब्द आलेले आहेत.

*The Secret :

रहस्य जोपर्यंत स्वतःपर्यंत असते तोवर रहस्य असते. रहस्याची जाहीरात होत नाही. समोरचा व्यक्ति विश्वासु आहे, त्याला आपल्यावर विश्वास आहे, याची खात्री झाली व आवश्यक

असेल तरच रहस्य सांगण्यात येते. अन्यथा शब्दाचे अनर्थ होतात. श्रद्धा नसेल तर आपल्या सोयीने अर्थ काढतात, दोष काढतात. अर्जुनाला श्रीकृष्णावर व श्रीकृष्णाला अर्जुनावर विश्वास होता. म्हणुन येथे "प्रवक्ष्यामि अनसूयवे" या शब्दाचे प्रयोजन आहे.

गुह्य ते गुह्य असते. तो श्रद्धा व विश्वासाचा विषय असतो. त्यामुळे भगवतगीतेचा स्पष्ट निर्देश आहे,

इदं ते ना तपस्काय ना भक्ताय कदाचन ।
न च अशुश्रूषवे वाच्यं न च मां यो अभ्यसूयति।।(१८-६७)

* राजमार्ग:

संपूर्ण जगाच्या व्यवहारात ज्ञानविज्ञान आहे. याच ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत ईश्वर आहे. हे भगवतगीतेने सविज्ञान दर्शवुन दिले आहे. सृष्टिचा अध्यक्ष या भूमिकेत ईश्वर सृष्टिसंचलन करीत असतो.

ईश्वराचे ज्ञान या संदर्भात गुह्य शब्दाचे प्रयोजन आलेले आहे (श्रीकृष्णाची ही आत्मस्तुती नव्हती). विज्ञानात हे शब्द येत नाहीत, पण येथे "ज्ञानविज्ञान " या संदर्भात गुह्य शब्दाचे प्रयोजन आहे.

ज्ञानविज्ञानसंहितं यद् ज्ञात्वा मोक्षसे अशुभात् ।(९-१)

अर्थात ईश्वराची विश्वसंचालनातील भूमिका हा विषय Secret म्हणुन आलेला आहे.
मया ततम् इदं सर्वं जगत् अव्यक्तमुर्तिनां।
मत्स्थानी सर्वभूतानि न च अहं तेषु अवस्थितः।।(९-४)

या अर्थाने मनुष्याचा विकासमार्ग "अमृतत्वाय कल्पते" हा राजमार्ग ठरतो. या मार्गावर अनन्यभक्ति घडते. याचसाठी व्यवहारमार्ग राजमार्गात Transform करणे. अर्थात सकाम कार्य निष्काम कार्यात Transform होते.

*राजविद्या:

१. ईश्वर हा विषयच भगवतगीतेने "गुह्यज्ञान" संबोधुन स्पष्ट केला असला तरी ज्ञानविज्ञान या विषयाचाच तो भाग आहे. या अर्थाने जगातील ज्ञानविज्ञानाचा राजा, अर्थात मुळ स्त्रोत ईश्वरज्ञान आहे. या अर्थाने हे ज्ञान राजविद्या ठरते.

२. या ज्ञानाची प्रत्यक्षात मनुष्याला अनुभुति घ्यायची असते. अर्थात जे ज्ञान प्रत्यक्ष आचरणात आणायचे असते, या अर्थाने गुणात्मक ज्ञान (राजविद्या) ठरते. विद्या-संख्यात्मक ज्ञान तर राजविद्या गुणात्मक ज्ञान ठरते.

राजविद्या राजगुह्यं पवित्रम् इदं उत्तमम्।
प्रत्यक्ष अवगमं धर्म्यं सुसुखं कर्तुम् अव्ययम् ।।(९-२)

* Application :

मनुष्याच्या जीवनयात्रेत शरीराचा प्रवास सिमीत असतो तर आत्म्याचा प्रवास अखंड(नित्य) असतो. अर्थात जीवनयात्रा नित्य विकासमार्गावर असावी हे अभिप्रेत असते. जीवनयात्रेत येणारे दुःख अडथळा नसुन विकाससंधी होणे यासाठी अनन्यभक्ति उपयुक्त ठरते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

"The block of granite which was an obstacle in the pathway of the weak, became a stepping-stone in the pathway of the strong. "

Thomas Carlyle

*********

(९. २)/२ :

"प्रत्यक्ष अवगमं धर्म्यं सुसुखं कर्तुं अव्ययम् "

भगवतगीतेत सर्वात महत्वाचा म्हणुन मधोमध अग्रभागी आलेला "राजविद्या योग" ओळखल्या जातो. याचे रहस्य जाणणे प्रत्येक भगवतभक्तासाठी आवश्यक आहे म्हणुन या रहस्याला "राजगुह्य" संबोधले आहे. (The most confidential knowledge)

राजविद्या राजगुह्यं पवित्रम् इदं उत्तमम् ।
प्रत्यक्ष अवगमं धर्म्यं सुसुखं कर्तुं अव्ययम्।।(९-२)

एखाद्या महामानवाची मरणोपरांत स्तुती करतांना 'असा व्यक्ति आतापावेतो झाला नाही व यापुढेही होणे नाही' अशा शब्दांत त्याचे प्रती आदर व्यक्त केल्या जातो. पण सर्व व्यक्तिसंदर्भातही हेच सत्य असते, याचा विसर पडतो. (Everyone is Unique) . या सत्याचा स्विकार केला तर सॉक्रेटिसच्या "Know Thyself"चे रहस्य कळते.

"We are each gifted in a unique and important way. It is our privilege and our adventure to discover our own special light. "

~Evelyn Dunbar

रामायण, महाभारत किंवा तत्सम माध्यमातुन ज्ञानार्जन होत असते. मनुष्य थोर लोकांचे आत्मचरित्र वाचतो. त्यांच्या कर्तृत्वशक्तिचे, मुल्यांचे ज्ञान होते. यातुन स्वतःच्या विकासासाठी काय उपयोगाचे आहे, याचा विसर पडला तर त्याचे महत्व फक्त Informatory Knowledge म्हणुन मर्यादित असते.

कोणत्याही Informatory ज्ञानाचा उपयोग चांगले-वाईट, योग्य-अयोग्य अशा Judgement thinking साठी, तुलना, समर्थन-टिका यासाठी होतो, तेंव्हा सामान्य मानसिकतेचे(Herd Mentality-Follower, not Leader)दर्शन होते. यामुळेच

नकारात्मकता नष्ट होत नाही. (यामुळेच अलीकडे "लीडरके तौरपर क्यों नही उभर रहा है भारत?असे प्रश्न चर्चिले जातात. )

(Herd vs Hero/Leadersip ) मानसिकता बदल होण्यासाठी प्रत्यक्ष Transformation आवश्यक असते.
हाच "प्रत्यक्ष अवगमं धर्म्यं सुसुखं कर्तुं अव्ययम्"चा संदेश आहे.
"You don't lead by pointing and telling people some place to go. You lead by going to that place and making a case. "
- Ken Kesey
यासाठी ईश्वराची ओळख प्रकृतिचा अध्यक्ष अशी आहे.
मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।
हेतुना अनेन् कौंतेय जगत् विपरिवर्तते।।(९-१०)
"मी" या सृष्टिचा अध्यक्ष प्रत्येकाच्या हृदयात वास करीत असतो. जीवंत असणे हेच या सत्याचे प्रमाण आहे. दुःखाला वश होऊन दुबळे होणे ही जीवनाची शोकांतिका आहे . म्हणुन "अमृतंगमय" या महामार्गावर येण्यासाठी दुःख निमित्त ठरते. अनन्यभक्तिने या मार्गावर जीवनाचा प्रवास होतो.
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

ईश्वरावर श्रद्धा असणारे (भक्त )याच ईश्वराची भक्ति प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे करीत असतात.

एकत्वेन् पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ।(९-१५)

(अव्ययाचे)गुह्यज्ञान जाणुन कार्याद्वारे अनन्यभक्ति साधणे ही राजविद्या.

यत्करोषि यत् अश्नासि यत् जुह्वोषि ददासि यत् ।

यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मद् अर्पणम् ।।(९-२७)

जसे श्रद्धेने समर्पित केलेले पत्र, पुष्प, फल याचा "मी" स्विकार करतो, तसेच कार्य समर्पित केल्याने माझी भक्ति लाभते. अर्थात महामार्गावर प्रवास होतो.

"Worthless people live only to eat and drink; people of worth eat and drink only to live. "

Socrates

अनन्याः चिन्तयन्तो माम् ये जनाः पर्युपासते।

तेषां नित्य अभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम् ।।(९-२२)

******

(९-३)

*************************

अश्रद्धधानाः पुरुषा धर्मस्य अस्य परन्तप।

अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसार वर्त्मनि।।

*************************

(९-३) :

"अश्रद्धधानाः पुरुषा धर्मस्य अस्य परन्तप"

(स्वर्गनरक प्राप्तिचा धर्म vs. कार्यनिश्चय होण्यासाठी ईश्वरसमर्पण धर्म)

स्वर्गप्राप्ति vs मोक्ष

युद्ध न करणे यासाठी अर्जुन पापपुण्याची/स्वर्गनरकाची भाषा वापरतो. समाजातील समर्थन-टिका यासाठी काय योग्य-काय अयोग्य? यावर भाष्य होत असते. या भाष्यातच द्वन्द्व असते.

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां।...

व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।।(२-४४)

अर्जुनाच्या Belief system नुसार स्वर्गाच्या धर्मातील द्वन्द्व जाणुनच कार्यनिश्चय होण्यासाठी श्रीकृष्ण म्हणतात,
हतो वा प्राप्स्यसि स्वर्ग्यं जीत्वा वा भोक्ष्यसे महीम्(२-३७)

कर्तव्यपालन करतांना(स्वधर्माचरण) मृत्यु आला तर स्वर्ग निश्चित आहे. पण जिंकलास तर पृथ्वीचे राज्य भोगशील.

भगवदगीता १. पापपुण्याचा/स्वर्गनरकाचा धर्म (योग्य-अयोग्य) व २. मोक्षप्राप्ति यासाठी स्वतःचा स्वधर्म जाणुन स्वतःचे कर्तव्य या संदर्भात कार्याचा निश्चय करणे व कार्य समर्पण भावाने (ईश्वरभक्ति) करणे यांतील भेद सांगत आहे.

अश्रद्धधानाः पुरुषा धर्मस्य अस्य परन्तप।
अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसार वर्त्मनि।।(९-३)

बंधन -मोक्ष या संदर्भातच जीवनयात्रेतील द्वन्द्व-निर्द्वन्द्व हा भेद जाणणे महत्वाचे असते.
इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत।(७-२७)

एषां तु अंतगतं पापं जनाणां पुण्यकर्मणाम्।
ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रतः।।(७-२८)

धर्मगति:

रामायणात ( स्वतःची) धर्मगति व ईश्वरगति यांतील भेद स्पष्ट केला आहे. स्वतःची धर्मगति ईश्वरगतिचाच(ईश्वराचे महान कार्य, त्याचे Design) भाग ठरतो हे धर्मधुरीन जाणत असतो. यामुळे स्वतःचे कर्तव्य निश्चितपणे जाणतो. कार्यनिश्चय होतो.

धरम धुरिन धरम गति जानी।कहेउ मातु सन अति मृदु बानी।।
पिता दीन्ह मोहि कानन राजू।जहँ सब भा ॅं ंति मोर बड काजू।।(रामचरितमानस /अयोध्याकांड ५३)

जे धर्मगति जाणतात ते स्वतःचे कर्तव्य निश्चितपणे जाणतात. पित्याच्या "वचनपालनाचा धर्म "पालनासाठी आज्ञापालनाचा श्रीराम स्विकार करतात. ही धर्मगति जाणतात. श्रीराम ही धर्मगति महान कार्याची संधि जाणतात.

कार्यनिश्चय :

स्वधर्मंअपि चावेक्ष न विकम्पुतुम् अर्हसि॥(२-३१)

निष्काम कर्म/ईश्वरभक्ति यासाठी कार्यनिश्चय होणे, कार्यनिश्चय होण्यासाठी स्वतःचा स्वधर्म जीवनमुल्य/सिद्धान्त या अर्थाने जाणणे. यासाठी( ईश्वराची) अनन्यभक्तिचा धर्म जाणणे व या धर्मावर श्रद्धा असणारा धर्मगति जाणत असतो. ही धर्मगति जाणणारा स्वतःचे कर्तव्य निश्चितपणे जाणतो.

*********

(९-४)

************************

मया ततम् इदं सर्वं जगत् अव्यक्त मुर्तिनां।

मत्स्थानि सर्वभूतानि न च अहं तेषु अवस्थितः।।

**************************

(९-४):"मया ततम् इदं सर्वं जगत् अव्यक्त मुर्तिनां"

*ईश्वराचे अस्तित्व:

मया ततम् इदं सर्वं जगत् अव्यक्त मुर्तिनां।

मत्स्थानि सर्वभूतानि न च अहं तेषु अवस्थितः।।(९-४)

ईश्वराच्या अव्यक्तातुन सर्व जगाचा उदय आहे. ईश्वराच्या आश्रयाने सर्व जग जगत आहेत. जगाच्या आश्रयामुळे ईश्वराचे अस्तित्व नाही.

*ईश्वराच्या भक्तिचे प्रयोजन कशासाठी?

ईश्वराचे अस्तित्व आहे किंवा नाही हा मुद्दा निरर्थक वाद घालण्याचा नाही . कारण लोक देवताभक्ति ईश्वरभक्ति जाणुनच करतात तरी जीवनात दुःखी होतात!

मनुष्याला सुख प्रिय असते, व दुःख अप्रिय असले तरी त्याचा जीवनात सहभाग असतो. दुःखाशी deal करण्याचे कौशल्य असेल तर ती जीवनविकासाची संधि ठरते व नसेल तर मात्र दुःख Weakness ठरते. म्हणुन सुखी जीवनाचा मार्ग तत्ववेत्ते सांगत असतात, शोधत असतात. भगवतगीता याच सुखी जीवनासाठी ईश्वराची अनन्यभक्ति सांगत आहे.

प्रत्यक्ष अवगमं धर्म्यं सुसुखं कर्तुं अव्ययम् ।(९-२)

* दुःखाशी deal करण्याचे कौशल्य (सुखाचा मार्ग)

१. मानसिक शक्ति

दुःखाने मनुष्य विचलित होतो. अशांत होतो. म्हणुन मानसिक शांति समुद्रशांति (अविचल)द्वारा दर्शविली आहे. (आपुर्यमाणम् अचल प्रतिष्ठम्). अर्थात ही मानसिक शक्ति असते व या शक्तिला योग म्हणजे दुःखान्त असे दर्शविले आहे.

आत्मविश्वास, सकारात्मकता, निर्भयता, धैर्य, प्रसन्नता(अविचल) याद्वारा मानसिक शक्ति व्यक्त होत असते. याच शक्तिच्या साधनेसाठी ईश्वरभक्तिचे प्रयोजन आहे.
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

व्यवहारातील कार्याद्वारे भक्ति हा अनन्यभक्तिचाच भाग आहे. व्यवहारात फलसिद्धिसाठी कार्य मनुष्य जाणतो. देवताभक्ति ईश्वरभक्ति जाणुनच करतो. कार्यातील परिणामभय दुःखी करते, संशयी करते. म्हणुन अव्यय ईश्वराची ओळख व भूमिका जाणुन कार्याद्वारे अनन्यभक्ति साध्य करणारा मानसिक शक्ति प्राप्त करतो.

२. ज्ञान:Problem solving attitude

विचलित झाला असता मनुष्य मनसमाधानासाठी नकारात्मक भाष्य "ज्ञान"समजुन बोलतो. यामुळे वास्तव स्विकारीत नाही. वास्तव स्विकारले तरच प्रश्न define होतो. हीच भगवतगीतेची सुरुवात आहे.

ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. ज्ञानविज्ञानाचा कार्यात उपयोग होतो व कार्याचे ज्ञानात विलिनिकरण होते.

सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

या ज्ञानामुळे दुःखास कारण असणाऱ्या अडचणी विकासमार्गातील कार्यसंधि(Stepping stone) ठरतात. अर्थात सकारात्मक असतो.

३. (सत)जीवनमार्ग :

ईश्वर(शाश्वत)व प्रकृति(अशाश्वत) याद्वारा सृष्टिचे सृजन होते. जीवनात चेतन व जड, अव्यक्त व व्यक्त अशी शाश्वत व अशाश्वताची ओळख असते. ही ओळख क्षेत्रज्ञ व क्षेत्र याद्वारा होत असते. याच आधारावर जीवनाचा शाश्वत विकासमार्ग (अमृतंगमय, ज्योतिर्गमय, सतगमय) ठरत असतो. दुःखाचे कारण attachment of pain अर्थात अशाश्वताला आसक्त(attach) यामुळे असते. याच आधारावर अनासक्तिचे logic आधारलेले आहे. यामुळे सकाम कर्म व निष्काम कर्म यातील भेद कळतो. निष्काम कर्माचे शास्त्र जाणतो.

अनन्यभक्तिद्वारा याच शाश्वत विकासाच्या मार्गावर असतो. व कार्याद्वारा योग (मानसिक शक्ति) साध्य होते.

याच संदर्भात अर्जुन प्रश्न करतो, निष्काम कर्माचे शास्त्र न आचरता ईश्वरभक्ति करणाऱ्यांची निष्ठा कोणती?सत, रज का तम!(१७-१)

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत्।
असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह।।(१७-२८)

ईश्वरभक्तांची श्रद्धा निर्विवाद "सत "असते पण जीवनातील (यज्ञ, दान, तप) कर्म अश्रद्धेने आचरण करतात, तो मार्ग असत् ठरतो. म्हणुन सुखी जीवनाचा (शाश्वत विकासाचा) मार्ग याच आधारावर(सत -असत) ठरत असतो.

******

(९-१०)

*************************

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।

हेतुना अनेन कौंतेय जगत् विपरिवर्तते।।

***************************

(९. १०)/१ :" मया अध्यक्षेण प्रकृतिः "

जसे मनुष्य आपले नांव, विशेषणासह व्यावसायिक (Professional)ओळख देतो, तशीच ईश्वराची ओळख वेगवेगळ्या संदर्भातुन भगवतगीतेत आलेली आहे. जगतसंचलन यंत्रणेतील "अध्यक्ष" अशीच एक महत्वाची ओळख आहे.

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।

हेतुना अनेन कौंतेय जगत् विपरिवर्तते।।(९-१०)

कार्पोरेट कारखाने, संस्था, देश या सर्वांच्या व्यवस्थापन यंत्रणेत अध्यक्ष असतो. अनेक संस्थांचा समुह(Group) असतो. या

संदर्भात विश्व Group of Nations ठरते. यांत विश्वाची यंत्रणा कार्यरत असते.

"We all are sailing in same boat" या संदर्भात विश्वाच्या नावेत( या संस्थांच्या माध्यमातुन)सर्वांचा प्रवास असतो. या संस्थांच्या स्पर्धेत विश्वनावेला हानी पोहोचु नये याची दक्षता कॅप्टन घेत असतो. हीच दक्षता अध्यक्ष घेत असतो. या अध्यक्षाचे व मनुष्याचे चैतन्याच्या माध्यमातुन शाश्वत नाते असते. याच नात्याची ओळख करुन त्याचा उपयोग अध्यक्षाच्या कार्यात सहकार्य करणे ही मनुष्याची भूमिका असावी. ही भूमिका मनुष्याच्या विकासाला पोषक असते, ही भगवतगीतेची "आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च" भूमिका आहे.

उच्च विकासदृष्टि :

अवजानन्ति माम् मुढा मानुषीं तनुम् आश्रितम् ।
परं भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।।(९-११)

ईश्वर सृष्टिचा निर्माता कसा?या विषयावर वाद होतो. हा वाद वगळला तरी सृष्टित घटना घडतच असतात. या घटनांमागील

सत्य शोधुन काढण्याचा अभ्यास अविरत होत असतो, यातुनच ज्ञानविज्ञान उपलब्ध झाले व होत आहे.

व्यवहारात मनुष्य मात्र या घटनांवर स्वतःच्या दृष्टितुन, Judgement thinking द्वारा भाष्य करीत असतो. जगावर भाष्य करणे सोपे असते. पण स्वतःचा विकासाचा मार्ग स्वतःलाच चालावा लागतो. म्हणुन स्वतःला जीवनविकासाची दृष्टि आवश्यक असते .

कुरुक्षेत्रावर अर्जुनाच्या मनात निर्माण झालेला प्रश्न व्यावहारिक असता तर त्याला Motivate करण्यासाठी कुणीही इतर व्यक्तिने व्यावहारिक भाष्य (शत्रु दुर्जन कसे आहेत!त्यांना मारणे उचित कसे!)केले असते. पण भगवतगीता "सर्वभूतहिते रतः" अर्थात जगतकल्याणार्थ कार्य व्हावे, यासाठी ईश्वरभक्ति हे माध्यम सांगते.

सृष्टितील सर्व घटनांचा (अप्रत्यक्ष )आधारस्तंभ अध्यक्ष या नात्याने ईश्वर आहे, ज्याचा अंश मनुष्याचे हृदयी असलेली शाश्वत चेतना आहे, हे जाणले तर मनुष्याला जीवनविकासाची दृष्टि मिळते. अध्यक्ष हा शब्द व्यवस्थापनाचा संदेश देते. जसे विश्वसंस्थेच्या यंत्रणेत ईश्वर अध्यक्ष असतो, तसेच शरीरयंत्रणेतील शाश्वत तत्व( चेतना) अध्यक्ष जाणले तर स्वतःच्या मार्गाचे

व्यवस्थापन कळते. याच संदर्भात आत्मवश vs मनोवश ही जीवनमार्गातील मानसिकता असते.

याप्रमाणे ईश्वराची अध्यक्ष ओळख समुहव्यवस्थापन, स्वतःच्या मार्गाचे व्यवस्थापन हा संदेश देते. म्हणुन स्वतः Execute करावयाच्या मार्गाच्या व्यवस्थापनात स्वधर्म, कार्याचा दृढनिश्चय करुन योगस्थ वृत्ति सांगितली. याप्रमाणे मार्गव्यवस्थापनातील कर्म, ज्ञान व भक्ति या संदर्भात जीवनविकासाची( उच्च) दृष्टि देते.

अध्यक्ष ओळख - कर्माची दृष्टि, व्यवस्थापनदृष्टि
ज्ञान (प्रकाश, ज्योति) - ज्ञानविज्ञानाची दृष्टि
योगेश्वर - सुखाची योग दृष्टि

(उच्च)विकासदृष्टिमुळे अडचणी संधीमध्ये, नकारात्मकता सकारात्मकतेमध्ये, दुर्बलता शक्तिमध्ये बदलते. हेच रहस्य भगवतगीता स्पष्ट करते.

मत्त परतरं न अन्यत् किञ्चित अस्ति धनंजय।
मयि सर्वम् इदं प्रोतं सुत्रे मणिगणा इव।।(७-७)

"We live in succession, in division, in parts, in particles, " Emerson wrote in "Self-Reliance, "

"Meantime within man is the soul of the whole; the wise silence; the universal beauty, to which every part and particle is equally related; the eternal ONE. "

He exhorted readers to trust their instincts as their best and truest guide to what is right.

*****

(९-१०)/२
:"हेतुना अनेन कौंतेय जगत् विपरिवर्तते"
(विश्वाचे संचलन)

The goal of life is to make your heartbeat match the beat of the universe, to match your nature with Nature.

Joseph Campbell-----

विश्वाच्या पसाऱ्यात आपण स्वतः एक घटक असतो. विश्वाशी याचे नाते असते. व्यवहारात आपण जगत असतो, दुःखी होतो व याच नात्याचा विसर होतो. कारण, मृत्यु दुःखद आहे हे जाणतो, पण विश्वाशी असलेल्या नात्याचे सौंदर्य जाणत नाही. भगवतगीता याच नात्याची ओळख करुन देते. यामुळे मनुष्याला उच्च पातळीवर जगण्याचे ज्ञान व महत्व कळते. "व्यवहार मनुष्याला कार्यरत करते, नियतकार्य देते पण कार्य करतांना उच्च पातळी(अमृतत्वाय कल्पते) असावी " या एकाच मुद्यावर भगवतगीता Focus करीत आहे. याच ज्ञानामुळे "आत्मनो मोक्षार्थ जगत् हिताय च" या संदेशातील रहस्य कळते.

व्यवहारात अडचण निर्माण होते, प्रश्न येतात. हेच प्रश्न सोडविण्यासाठी ज्ञानाचा वापर होतो. यातुनच विज्ञानाने अनेक शोध लावलेत. अडचणी, प्रश्न पुढील विकासाला संधीच ठरतात.

व्यावहारिक /प्राकृतिक पातळीवर सकाम कार्य असल्यामुळे अर्जुन दुःखी होतो व निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान वापरतो. येथे स्वाभाविकपणे" ज्ञान" या संदर्भात प्रश्न उभा होतो,

"ज्ञान "संशयमुक्तिसाठी कि समर्थन करण्यासाठी?या एकाच प्रश्नात भगवतगीतेने मनुष्यजीवनातील अनेक प्रश्नाचे निराकरण केले आहे.

मनुष्य स्वतःला योग्य समजुनच कार्यरत असतो, समर्थन -भाष्य बोलतो. अर्जुन स्वतःला धार्मिक, उच्च पातळीवर जगणारा, ज्ञानी असे समजुनच स्वतःला योग्य सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. जीवनाची उच्च (श्रेष्ठ, ज्ञानी) पातळी याबद्दल हे अज्ञान असते. कारण उच्च पातळीवर जगण्याचे समर्थन होत नाही, ती प्रत्यक्षात जगावी लागते. हा भगवतगीतेचा संदेश आहे.

राजविद्या राजगुह्यं पवित्रम् इदं उत्तमम्।
प्रत्यक्ष अवगमं धर्म्यं सुसुखं कर्तुं अव्ययम् ।(९-२)

भगवतगीता जीवनाची उच्च पातळी यावर निश्चित भाष्य करते, जेथे मनुष्याचे विश्वाशी नाते स्पष्ट होते. उच्च पातळीवर जगणारे (पुरुषं पुरुषर्षभ)"अमृतत्वाय कल्पते"(२-१५) असे वर्णित केले आहे. याचसाठी ईश्वराची ओळख दिली.

अध्याय ७ (ज्ञानविज्ञान)मधुन ईश्वरभक्त व ज्ञानी भक्त यातील भेद दर्शविला. येथे देवता व अव्यक्त (अक्षरब्रह्म ) ईश्वर यातील भेद

स्पष्ट होतो. प्राकृतिक पातळी(द्वंद्वमोहेन) व उच्च पातळी (द्वंद्वमोहनिर्मुक्ता) हा भेद स्पष्ट होतो.

अध्याय ८(अक्षरब्रह्म) मधुन अव्यक्त प्रकृति व सनातन अव्यक्त (ईश्वर) यातील भेद स्पष्ट केला .

अव्यक्तो अव्यक्तात् सनातनः (८-२०)

या सनातन अव्यक्ताला जाणणे व उच्चपातळीसाठी अनन्यभक्ति मार्ग संबोधले. या मार्गावर योगयुक्त असतो. (दुःख, सृति यामुळे)विचलित होत नाही.

पुरुषः स परा पार्थ भक्त्या लभ्य तु अनन्यया।
यस्य अन्तः स्थानी भूतानि येन सर्वम् इदं ततम् ।।(८-२२)

अध्याय ९(अनन्यभक्ति/राजगुह्य) मधुन ईश्वराची विश्वातील भूमिका स्पष्ट केली आहे.

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।
हेतुना अनेन कौंतेय जगद् विपरिवर्तते।।(९-१०)

ईश्वर विश्वाचा अध्यक्ष या भूमिकेत विश्वाचे संचलन करतो.

याच आधारावर उच्च पातळीची निश्चित भूमिका(९-२) स्पष्ट होते. या मार्गाला "अमृतत्वाय कल्पते" असे भगवतगीता संबोधते.
१. हा स्वतःचा शाश्वत विकासाचा(आत्मोन्नति) मार्ग असतो.

२. ईश्वरभक्ति या संदर्भात अव्यक्त ईश्वराची भक्ति कार्याद्वारे घडत असते. म्हणुन समर्पण, फलत्याग या शब्दाचे प्रयोजन आहे.

३. प्राकृतिक पातळीवर सकाम कार्य असल्यामुळे दुःखाने (परिणाम) विचलित होतो. मानसिकता Strong करणे अर्थात निर्भयता, साहस, बुद्धिची स्थिरता साध्य करणे यासाठी भक्ति या संदर्भात "योगः कर्मसु कौशलम् " संबोधले आहे. याप्रमाणे आत्मोन्नति या संदर्भात मानसिकता विकास अभिप्रेत आहे.

४. प्राकृतिक पातळीवर सकाम असतो यामुळे संशय असतो, कार्याचा दृढनिश्चय होत नाही. उच्च पातळीवर निष्काम असतो. नियतकार्य स्वधर्मात(Tiebreaker) परिवर्तित होते. निर्णय अधिकाराचा वापर करुन कार्याचा दृढनिश्चय असतो. निष्ठेने कार्य करतो, विश्वासाने मार्ग चालतो. समुहात जगतांना "स्वधर्म" हे जीवनमुल्य असते तर व्यक्तिगत पातळीवर निर्णयअधिकार स्वतःची Strength असते.

५. मनुष्य विश्वाचा घटक असल्यामुळे जीवनात जे घडत असते, तेच ईश्वराला अभिप्रेत असते. अर्जुन दुःखी झाला व जीवनाची "ज्ञानी level" या संदर्भात समर्थन भाष्य करु लागला. अज्ञानाला ज्ञान संबोधले. व हाच भ्रम जगासमोर यावा म्हणुन भगवतगीता जगासमोर आली.

सामान्यतः मनुष्य "दैव" या संदर्भात भाग्य, नशिब यांचा उल्लेख करतो. दैव या संदर्भात ईश्वराला अधिदैव संबोधले आहे. यातुन मनुष्याचे दैव या संदर्भात Destiny ठरते. विश्वरुपातुन अर्जुनाला Destiny चा बोध होतो.

"Psychoanalysis - and any good therapy - is a method of increasing one's awareness of destiny in order to increase one's experience of freedom. "
-Rollo May

******

(९-११)

************************

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुं आश्रितम्।

परम् भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम्।।

**************************

(९. ११)/१:

"अवजानन्ति मां मुढा मानुषिं तनुं आश्रितः"

भगवतगीतेचा विषय ज्ञानविज्ञानाचा आहे. जगात धर्म वादाचा विषय बनु शकतो, पण ज्ञानविज्ञान हा कधीच वादाचा विषय नसतो. ज्ञानविज्ञानानेच जगातील प्रश्न सुटलेले आहेत. भगवतगीतेने ज्ञानालाच सर्वश्रेष्ठ म्हटलेले आहे.

ज्ञानी विश्वासाने मार्ग चालतो, स्वतःच्या मार्गाची जबाबदारी स्विकारतो. तर जबाबदारी न स्विकारताही स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी समर्थन करणे अज्ञान ठरते. अर्जुनाची हीच भूमिका असते. वास्तव स्विकारतो, तेंव्हा प्रश्नात पारदर्शकता येते.

प्रकृति सत, रज, तम या त्रिगुणाने युक्त असते. ईश्वर गुणातीत, अव्यय असुन सृष्टि निर्मिति व संचलनात अध्यक्ष ठरतो. हा प्रकृतिचा आश्रित नसतो. मनुष्याला (शरीरधारी असल्यामुळे) प्रकृतिचा आश्रय असतो. यांत दैवीप्रकृति(चांगला मनुष्य) व असुरप्रकृति असा भेद असतो. दैवी प्रकृतिचा मनुष्य ईश्वराला भजतो.

देवताभक्ति मनुष्याची ईश्वरश्रद्धा दर्शवित असते. जीवनात नित्य ज्ञानविज्ञानाची दृष्टि असावी म्हणुन जो ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे, त्या अव्यय ईश्वराची ओळख दिली. अव्यय ईश्वराला भजणारा ज्ञानी ठरतो, याला अनन्यभक्ति म्हटले.

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।(९-१०)
अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुं आश्रितम्।(९-११)
राक्षसीम् आसुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रीताः।(९-१२)
महात्मानः तु मां पार्थ दैवीं प्रकृतिं आश्रिताः।
भजन्ति अनन्यमनसो ज्ञात्वा भूतआदिं अव्ययम् (९-१३)

व्यावहारिक बोध:

जगात ज्ञानविज्ञान आले, तरी जगात ( अनुत्तरीत) प्रश्न असतात. प्रश्न सोडविण्यासाठी ज्ञानविज्ञानाचाच आश्रय हवा असतो. मनुष्यजीवनात ज्ञानाचा आश्रय व्हावा हेच भगवतगीतेला अभिप्रेत आहे. यासाठी वास्तव स्विकारणे व प्रश्नात पारदर्शकता आणणे हे प्रथम कर्तव्य असते. प्रश्न योग्य असेल तर उत्तर निश्चित मिळेल.

"There is answer (solution) to the right question, but there is no solution to illusion of knowledge. "

*******

(९. ११)/२:

"परम् भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम्"

या विश्वातील ईश्वराची भूमिका जाणुन जीवनातील ईश्वराची भूमिका जाणणे हा भगवतगीतेचा विषय आहे. जगातील बरेच लोक ईश्वराचे अस्तित्व मान्य करीत नाहीत पण ज्ञानविज्ञान मान्य

करतात. जीवनात ज्ञानविज्ञान मान्य केले तर "मनुष्याची अज्ञान भूमिका" यापासुन भगवतगीतेची सुरुवात होते. अर्जुन स्वतःला ज्ञानी ठरविण्यासाठी स्वतःच्या अज्ञान (निष्क्रिय) भूमिकेला धार्मिक ठरवितो. यामुळे जीवनात ज्ञानविज्ञान, धर्म, ईश्वर या तिन्हींची भूमिका स्पष्ट झालेली आहे.

सुखासाठी (भोगैश्वर्य)प्राप्ति व प्राप्तिसाठी कार्य हा व्यवहार लोक जाणत असतात. या ज्ञानानुसार अर्जुन "मला कांहीही नको"ही भूमिका घेतो व स्विकारलेल्या नियतकार्याला(Commited) "लोभामुळे स्वजनांची हत्या करणारी भूमिका" असे Interpretation करुन "पाप" ठरवितो.

जगात धर्म असतात, देवतापुजन असते. येथे धर्माची भूमिका म्हटली तर स्वतःच्या नियतकार्यावर "स्वधर्म" स्वतःचे शिक्कामोर्तब असते. यामुळे मार्ग पक्का होतो. अर्जुन निष्क्रियतेला धार्मिक भूमिका ठरवितो. याचे खंडण करतांना श्रीकृष्ण म्हणतात, व्यवहारसिद्धि(यश)झाली तर राज्य भोगशील व युद्धात मृत्यु आला तर स्वर्ग मिळेल.

सांख्यनिष्ठेनुसार स्पष्टिकरण दिल्यानंतर श्रीकृष्ण " ईश्वर"या विषयाकडे वळतात. याला बुद्धियोग/कर्मयोग निष्ठा म्हटले. व्यवहारसिद्धिसाठी लोक देवतापुजन करतात. देवता विशेष गुणशक्तिचे प्रतिनिधित्व करतात. यांत ईश्वरश्रद्धा महत्वाची असते. याच श्रद्धेचा उपयोग जीवनातील ज्ञानविज्ञान स्पष्ट होण्यासाठी ईश्वराची भूमिका ज्ञात होते.

व्यवहारात व्यक्ति "मी योग्य" म्हणुन कार्यरत असतो किंवा (निष्क्रियतेचे)समर्थन करतो. संपुर्ण विश्वात अशाच भूमिकेत मनुष्याचे भाष्य चालत असते. तसा अर्जुनही स्वतःला "योग्य" ठरवितो. "प्रकृति"संदर्भात मनुष्य स्वतःसाठी "योग्य" असतो. (Everyone is right). अर्जुन प्रकृति संदर्भात योग्य असतो, पण "ज्ञानविज्ञान" या संदर्भात "अयोग्य" अर्थात "अज्ञान" ठरतो. म्हणुन "ज्ञानविज्ञान" संदर्भात योग्य भूमिका कोणती? हा भगवतगीतेचा विषय ठरला.

अवजानन्ति मां मुढा मानुषीं तनुं आश्रितम्।
परम् भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम्।।(९-११)

(अशाश्वत) प्रकृति व( शाश्वत) पुरुष याद्वारे (जड ) प्रकृतिची निर्मिती आहे. जीवनात (जड)प्रकृति व जीवित तत्वातील शाश्वत ईश्वर (पुरुष) याद्वारे क्षेत्र(शरीर) व क्षेत्रज्ञ(जाणणारा) असे ज्ञान असते. विश्वाचा क्षेत्रज्ञ "पुरुषोत्तम" म्हणुन ओळखल्या जातो. या ज्ञानाद्वारे जीवनाचा शाश्वत विकासमार्ग (अमृतंगमय) जाणतो. या मार्गावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति घडते. कार्याद्वारे सुखअनुभुति, योग (निर्भयता-दुःखान्त) शक्ति अनुभवणे व achieve करणे हे ज्ञान होते. म्हणुन कार्यकौशल्य संस्कार (स्वधर्म as Tiebreaker, निर्णयअधिकार जाणुन कार्याचा दृढनिश्चय) महत्वाचा विषय ठरतो. याप्रमाणे "ज्ञानी"/श्रेष्ठत्व जीवनाची उच्च पातळी ठरते.

जो ज्ञानी आहे तो विश्वासाने, दृढनिश्चयाने, वर्तमानात शांत राहुन कार्यरत असतो. दुःखाने विचलित होत नाही. अडचणी (Barriers) जीवनविकासात कार्यसंधि ठरतात. अर्थात या ज्ञानामुळे प्रसन्नचित्ताने कार्यरत असतो. साक्षात ईश्वराला हे(व्यवहारातील) रहस्यज्ञान सांगण्यासाठी मनुष्यरुपात(श्रीकृष्ण) अवतार धारण करावा लागला. पण योग्य वेळ आली असताच "ज्ञान"सांगण्याची संधि मिळाली तेंव्हा प्रसन्नमनाने (प्रहसन्निव भारत) अर्जुनाला उत्तराद्वारे ज्ञान कथन करतात.
तम् उवाच हृषिकेशः प्रहसन्निव भारत।(२-१०)

व्यावहारिक बोध:जसे ईश्वराचे अस्तित्व मान्य करणे वा न करणे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे, तसेच ईश्वराला कोणत्या रुपात जाणणे हीसुद्धा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न असतो. पण मनुष्यजीवनाचे, मानवतेचे प्रश्न केवळ ज्ञानविज्ञान सोडविते हा विश्वास असला तरी मनुष्यजीवनात विज्ञानाची निश्चित भूमिका जाणणे आवश्यक ठरते. हाच भगवतगीतेचा
विद्वान/धार्मिक/चांगल्या मनुष्याला संदेश आहे.

******

(९-१३)

***********************

महात्मानः तु मां पार्थ दैवीं प्रकृतिम् आश्रिताः।

भजन्ति अनन्यमनसो ज्ञात्वा भूत आदिम् अव्ययम् ॥

*************************

(९. १३):

"महात्मानः तु मां पार्थ दैवीं प्रकृतिम् आश्रिताः"

व्यवहारात मनुष्य मी वाईट नाही म्हणुन चांगला आहो असा बुद्धिवाद वापरत असतो. हे केवळ मनसमाधान असते. यामुळेच जीवनात "चांगलेपणा"चे महत्व जाणत नाही. "विकास" या संदर्भात वर्तमानातील "शक्ति"ची स्पर्धा असलेल्या युगात चांगलेपणा दुर्बलता बनु नये, शक्ति व्हावी, व याच संदर्भात चांगलेपणाचे महत्व जाणुन त्याला "शक्ति" बनविणे हेच रहस्य भगवतगीता सांगत आहे.

भगवतगीतेत "चांगलेपणा" सत हा प्रकृतिच्या त्रीगुणातील सतगुण(सात्विक) दर्शवितो, तसेच दैवी-असुर या द्विविभागातील दैवीगुण संपत्ति दर्शवितो,

शकुंतलेची पात्रता दुष्यंतासाठी विवाहयोग्य आहे, हे स्पष्ट करतांना दुष्यंत म्हणतो,
मा सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणम् अंतःकरण प्रवृत्तिम् ।
मनुष्याचा चांगलेपणा स्वतःवर विश्वास दर्शवितो, अर्थात त्याची अंतःकरण प्रवृत्ति प्रमाण असते. तो आत्मविश्वास अनुभवतो, त्याला प्रशस्तिची गरज नसते.

अर्जुन चांगलेपणामुळेच दुःखी होतो. दुःख टाळण्यासाठी युद्ध न करणे योग्य जाणतो व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी निष्क्रियतेला "आदर्श "ठरवितो. व्यवहारातील ते केवळ मनसमाधान असते. येथे त्याचे व्यक्तिगत सुखदुःख त्याला guide करते. अशांत मनाला शांत करण्यासाठी केलेले हे भाष्य भगवतगीता "प्रज्ञावाद" ठरविते. हे ज्ञान नसुन Illusion of knowledge(अज्ञानाला ज्ञान ठरविणे) असते. (कारण ज्ञान प्रकाश असतो)

"There is solution to ignorance(of knowledge) but there is no solution to illusion of knowledge"

समाजातील निष्क्रियता, अज्ञानाला ज्ञान दर्शविणे (Illusion of knowledge) हे सामाजिक अज्ञान असते. भगवतगीता याच सामाजिक रोगावर उपाय सांगते.

अर्जुन वास्तव स्विकारतो(अज्ञानाचा स्विकार करतो), तेंव्हा ज्ञान सांगण्यात येते.

*चांगले-वाईट या संदर्भात सत म्हणजे चांगले.

*योग्य-अयोग्य या संदर्भात सत म्हणजे योग्य.

* प्रकृतिगुण संदर्भात सत म्हणजे सात्विक.

*शाश्वत(नित्य) व अशाश्वत(अनित्य, Perishable, transient) या संदर्भात सत म्हणजे शाश्वत व शाश्वत म्हणजे ईश्वर, जो संपुर्ण विश्वाचे मुळ आहे, ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. म्हणुन ईश्वराचा आश्रय अंधाराचा नाश करणारा अर्थात ज्ञानाचा आश्रय असतो.

अर्थात "ज्ञान" संदर्भात ईश्वराचा आश्रय मार्गातील संशय छेदुन कार्याचा दृढनिश्चय करते. व "भक्ति" संदर्भात निष्काम कार्य/ईश्वरसमर्पित कार्य घडविते.

याप्रमाणे "चांगलेपणा " महात्मा या अर्थाने चांगली आत्मा(Higher/Spirit consciousness) दर्शविते. हा दैवी प्रकृति आश्रित असलेला (अव्यय )ईश्वराला सृष्टिचे मुळ जाणुन जीवनात नित्य (अनन्य) भजत असतो. यामुळे व्यवहारातील कार्यमार्ग दृढ असतो. निष्काम कार्यरत असतो अर्थात कार्याद्वारे भक्ति करीत असतो .

महात्मानः तु मां पार्थ दैवीं प्रकृतिम् आश्रिताः।
भजन्ति अनन्यमनसो ज्ञात्वा भूत आदिम् अव्ययम् ।।(९-१३)
******

(९. १३)/२ :
"भजन्ति अनन्य मनसो ज्ञात्वा भूतआदिम् अव्ययम् "
(जीवनविकासाची वरची पायरी)

भगवतगीतेत ईश्वराची निश्चित ओळख ज्ञानविज्ञानासह दिलेली आहे. संपुर्ण विश्वाचे उगमस्थान, सृष्टिसंचलन करणारा सृष्टिचा अध्यक्ष, मनुष्याच्या जीविततत्वातील ईश्वराचे स्थान इ. विविधप्रकारे ज्ञान स्पष्ट केले व हाच संदर्भ घेवुन जीवनविकासाचा राजमार्ग (अमृतत्वाय कल्पते)बनतो.

अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।...

कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च।....

ददामि बुद्धियोगं तं येन माम उपयान्ति ते।(१०-१०)

जीवनविकासाच्या Stages असतात. यानुसारच मनुष्य कर्म करतो, ईश्वराला भजतो(आर्त, अर्थार्थि, जिज्ञासु, ज्ञानी). हाच संदर्भ घेवुन सामान्य व श्रेष्ठ, आसुरी व दैवी अशा दोन stages/विभागणी जाणणे आवश्यक आहे. खालच्या पायरीवरच मनुष्य जगत असला तर वरची पायरी अस्तित्वात आहे याचे त्याला अज्ञान असते. याच अज्ञानामुळे अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो. याच अज्ञानाची व वरच्या (Stage )पायरीची ओळख भगवतगीता करुन देत आहे.

१. आसुरी गुण व दैवी गुण संपत्तिचा आश्रय स्पष्ट केला आहे.

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः।

राक्षसीं आसुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः।।

महात्मानः तु मां पार्थ दैवीं प्रकृतिं आश्रिताः।

भजन्ति अनन्यमनसो ज्ञात्वा भूतआदिम् अव्ययम् ।।(९-१३)

"वासुदेवः सर्वम् इति" ही ईश्वराची ओळख जाणणारा दुराचारी असला तरी ज्याचा अनन्यभक्तिचा निश्चय एक झाला आहे, तो साधुच समजावा.

अपिचेत्सु दुराचारो भजते माम् अन्यभाक्।

साधुःएव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः।।(९-३०)

२. जीवनमार्गाच्या दोन Stages.

अव्यक्त ईश्वराची भक्ति अनन्ययोग मार्गाने कर्माद्वारे शक्य आहे. हे भगवतगीता स्पष्ट करते.

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः।

अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त उपासते।।(१२-६)

अर्थात ईश्वराचे ठायी चित्त स्थिर करणे, अभ्यासाने प्रयास करणे. हे न जमल्यास कर्माद्वारे भक्ति करणे. अर्थात निष्काम कर्म करणे.

(अ)जे कर्म करतो ते ईश्वराला समर्पण करणे.

अशक्य झाल्यास

(ब) कार्याचा एकनिश्चय करुन फलत्याग करणे.

याप्रमाणे सकाम कर्म vs. निष्काम कर्म, सामान्य व श्रेष्ठ अशा दोन Stages भगवतगीता स्पष्ट करते. याच दोन Stages विविधप्रकारे स्पष्ट होतात.

*द्वन्द्ववश vs. द्वन्द्वमुक्त

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वन्द्वमोहेन् भारत।.. (७-२७)

ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।(७-२८)

सामान्य मार्ग द्वन्द्ववश (बन्धन)असतो. तर श्रेष्ठ द्वन्द्वमुक्त (मोक्ष) असतो.

* अहंकाराचा आश्रय vs ईश्वराचा आश्रय

यत् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।(१८-५९)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।

भ्रामयन् सर्वभूतानि यन्त्रारुढानि मायया।।(१८-६१)

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत(१८-६२)

सार:अहंकाराचा आश्रय, द्वन्द्वमोहाला वश यामुळे मनुष्य खालच्या पायरीवरच जगत असतो. वरच्या पायरीचे ज्ञान होण्यासाठीच ईश्वराचा आश्रय आहे. अर्थात वरच्या पायरीवर येण्यासाठीच ईश्वर(भगवतगीतारुपाने) हात पुढे करीत आहे.

*******

(९-१८)

*************************

गतिः भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्।

प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजं अव्ययम् ।।

***************************

(९. १८):

"गतिः भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्"

उपरोक्त संदेश जीवनविकासमार्गात ईश्वराला जाणण्यासाठी आहे.

मनुष्य कार्य (Sensesसुख प्रेरित) प्राप्तिसाठी करतो.
कार्यसंस्कारित होतो. परंतु याच (Primary) सुखामुळे (अभाव) दुःख होते. अर्जुनाला मार्गावर असतांना दुःख झाले. व दुःख टाळण्यासाठी निष्क्रियता निवडतो व त्याचे समर्थनाला "ज्ञान" संबोधतो. तो म्हणतो, मला सुखासाठी कांहिही नको. म्हणुन हे (नियत)कार्य केवळ लोभापायी होईल.

मनुष्य पहिल्या वर्गातुन वरच्या वर्गात जातो. तशी ही स्थिति असते. येथे अर्जुनाचे सुखाचे ज्ञान फक्त Sensesप्रणित असते. वरच्या वर्गाचे ज्ञान नसते. म्हणुन केवळ Senses प्रणित सुखाचे ज्ञान केवळ अपुरेच नसते, तर दुःखाचे कारण ठरते. त्याचे "ज्ञानी"भाष्य स्वतःला Comfortable करण्यासाठी असते. यामुळे "ज्ञान" या संदर्भात Confusion असते. म्हणुन भगवतगीता जीवन या संदर्भात" ज्ञान" म्हणजे काय? याचे स्पष्टिकरण देते. अर्जुनाच्या समर्थन भाष्याला प्रज्ञावाद संबोधल्या जाते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम।(९-३३)

विश्व Energyचे manifestaion आहे. मनुष्याचे जीवित तत्व Energy असते, याचे साकार रुप जीवन असते. याच Energy चे ज्ञानविज्ञान ईश्वर(पुरुष) व प्रकृति(गुण) याद्वारा भगवतगीतेत स्पष्ठ केले. As Creator म्हणुन ईश्वराची प्रकृतिचा अध्यक्ष ही ओळख व अनन्यभक्ति (अध्याय ९), ईश्वराची Creativity, Creation विभूति(अध्याय १०), वर्तमानातील God'sWill ईश्वराची प्रवृत्ति(अध्याय ११) याप्रमाणे स्पष्टिकरण आलेले आहे.

जीवनविकासात ईश्वराचा आश्रय या संदर्भात ईश्वराची ओळख Goal, Sustainer, Creator, Dissolution, Supreme, Witness, Existence, Friend, Shelter, Seed, Imperishable अशी केलेली आहे.

गतिः भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्।
प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजं अव्ययम् ।।(९-१८)

या ज्ञानामुळे जीवनविकासाचा अमृतंगमय मार्ग बनतो. कार्याद्वारे ईश्वरभक्तिचे महत्व कळते. नित्य ईश्वराचा आश्रय करुन कार्याद्वारे ईश्वरभक्ति याला अनन्यभक्ति म्हटले.

याप्रमाणे "जीवनासाठी ज्ञान प्रकाश असतो". (जगाने ज्याची नोंद घ्यावी) असा महत्वाचा मुलभूत विषय भगवतगीतेने घेतलेला आहे. याचाच अर्थ "ज्ञान" या संदर्भातील confusion मनुष्याला प्रज्ञावादी (Excuses) बनविते. ही प्रवृत्ति conditioned होते. यामुळे कर्माचे महत्व कळत नाही. सुखाच्या वरच्या वर्गाचे(शाश्वत) दर्शन होत नाही. म्हणुन भक्तिचे महत्व कळत नाही.

भगवतगीतेतील ईश्वरज्ञान जीवनातील ज्ञानविज्ञानाची पुर्णता दर्शविते. अन्यथा विज्ञानाचा महापुर असला तरी जीवन या संदर्भातील ज्ञान अपुर्ण असते. या ज्ञानामुळे कर्माचे महत्व कळते. ईश्वरभक्तिसाठी मार्ग दृढ हवा. म्हणुन संशय ज्ञानाने छेदणे व कार्याद्वारे योग हे रहस्य सांगितले. अर्थात शाश्वत सुखासाठी(संन्यास, शांति, निर्भयता, धैर्य, योग-दुःखान्त) भक्तिचे रहस्य कळते

योगसंन्यस्त कर्माणं ज्ञानसञ्छिन्न संशयम् ।(४-४१)

******

(९-१८) :

" गतिःभर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्"

(गति या संदर्भातील ईश्वराची ओळख)

ज्या ईश्वराचा मनुष्यजीवनाशी संबंध आहे त्या ईश्वराची निश्चित ओळख भगवदगीता देत आहे.

मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चित यतति सिद्धये।

यतताम् अपि सिद्धानां कश्चित् मां वेत्ति तत्त्वतः।।(७-३)

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुं आश्रितम्।
परम् भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम्।(९-११)

"Que sera sera" या डोरीस डे ने गायिलेल्या गाण्यात एक मुलगी आपल्या आईला आपल्या भविष्याविषयी (सुंदर होणार!श्रीमंत होणार!) विचारणा करते. भविष्य आपल्या अधिकारात नसले तरी जे घडायचे आहे ते होणारच आहे.

समाजात लोक आपल्या भविष्याविषयी उत्सुक असतात. कांही लोक नशिब, दैवाशी ईश्वराचा संबंध जोडतात. 'नशिबात जसे लिहीले असेल तसे होईल, ईश्वर तशीच बुद्धि देईल'. लोक ईश्वराला इच्छित फल देणारा, कल्याण करणारा जाणतात.
कांक्षतः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवता।(४-१२)
निश्चितच ईश्वराची ओळख 'सुहृद'(हितचिंतक) अशी आहेच.
गतिःभर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्।
प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजम् अव्ययम्।।(९-१८)
ईश्वराची ओळख या संदर्भात "गति" हा महत्वाचा शब्द येथे आलेला आहे. गति म्हणजे जे साध्य करायचे आहे त्यासाठी

असलेली प्रवृत्ति. यामुळे बदल घडुन येतो. अर्जुन विश्वरुप पाहतांना याच प्रवृत्तिला जाणु इच्छितो.

विज्ञातुम् इच्छामि भवन्तम् आद्यं

न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम्।(११-३१)

अर्जुनाला जी घटना टाळायची होती, त्याच घटनेचे दर्शन त्याला होते. ही घटना अप्रिय असली तरी अर्जुनाच्या हातुन "जगतहीताय "कार्य घडण्याची अर्जुनाला ही संधि होती.

तस्माद् त्वं उत्तिष्ठयशो लभस्व।...

मयैवैते निहताः पूर्वमेव।

निमित्तमात्रं भव सव्यसाचिन।(११-३३)

रामायणात श्रीरामाच्या जीवनात घडलेली वनवासाची अप्रिय घटना असते. पण याविषयी याच ईश्वरगतिचा उल्लेख आलेला आहे.

कार्यसंधी या संदर्भात म्हटले,

जहां सब भांति मोर बड काजू।

औरु करै अपराधु कोउ और पाव फल भोगु।

अति बिचित्र भगवंत गति को जग जानै जोगु ।

अयोध्याकांड(७७)

मनुष्याला प्रिय घटना सुख देते व अप्रिय घटना दुःखी करते. ईश्वराची गति जाणल्यामुळे या घटनेतील दुःख विचलित करीत नाही.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

ईश्वराचा आश्रय म्हणजे निवास, निधान, Destination या संदर्भात "अमृतत्वाय कल्पते" असा जीवनयात्रेचा Standard मार्ग बनतो. या मार्गावर निष्कामकर्म(ईश्वराला फलसमर्पण/समत्वयोग) घडते.

सार:

जीवनात सुखसमाधान हवे, (मानसिक) शांति हवी. यामुळे बुद्धि स्थिर असते. याच आधारावर अर्जुन म्हणतो, (स्थिर) बुद्धि श्रेष्ठ तर कर्माचे प्रयोजन कशासाठी?

समाजात ईश्वर सर्वेसर्वा आहे असे ईश्वरश्रद्ध जाणतो. ईश्वरच घडविणारा आहे तर मनुष्याच्या कार्याचे प्रयोजन काय?याचे निश्चित उत्तर भगवदगीतेत आलेले आहे.

********

(९-२२)

**********************

अनन्यः चिंतयन्तो माम् ये जनाः पर्युपासते।

तेषां नित्य अभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।

********************

(९. २२)/१:

"अनन्याः चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते"

सृष्टिच्या उत्पत्तिचे मुळ ईश्वर(Energy form) आहे व याच ईश्वराचा अंश सर्वांचे हृदयस्थानी आहे, ज्यामुळे जीवन संचलित असते. याद्वारा एकत्वाचे ज्ञान सात्विक ज्ञान म्हटले आहे. मनुष्याच्या जीवनातील क्रियांशी याच ईश्वराचा संबंध आहे. हे ज्ञान जाणले तर "विकास" संदर्भात भगवतगीतेतील अनन्यभक्तिचे महत्व कळते.

व्यवहारात कर्माचा आर्थिक हीतसंबंध असतो. कौरव पांडव एकच कुटुंब असले तरी त्यांचे आर्थिक हीतसंबंध वेगळे असतात. या आर्थिक संबंधातुनच धर्मयुद्ध ठरले होते. प्रत्यक्ष कर्म करण्याची

वेळ आली असता अर्जुन दुःखी होतो. कर्म(युद्ध) ठरण्यापुर्वीही "स्वजन" होते. मग आताच (कृति करतांना) "स्वजन" कां आठवले!

स्वजन असले तरी जेथे आर्थिक हीतसंबंध असतात, ती Primary Intimacy असते. आर्थिक हीतसंबंध नाही, पण स्वजन आहे, ती Secondary Intimacy ठरते. याच Intimacy मुळे दुःखी होतो. कर्माचा केवळ आर्थिक संबंध आहे हे जाणुन स्वतःला लोभी ठरवितो व निष्क्रियतेला त्यागी ठरविण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

अलिकडील कौटुंबिक, सामाजिक विवादाच्या मुळाशी आर्थिक हीतसंबंध असतात. वास्तव न स्विकारता सोयीस्करपणे या प्रश्नावर आदर्शाचा पडदा टाकण्यात येतो. (लोभी किंवा त्यागी याच आधारावर चांगले, स्वार्थि असे लेबल लावण्यात येते. आर्थिक शोषणाला त्याग ठरविण्यात येतो. याच कारणामुळे कार्ल मार्क्सने धर्मालाच अफुची गोळी करुन टाकले. )

खरा प्रश्न लोभी किंवा त्यागी असा नसतो. अर्जुन निष्क्रियतेला आदर्श ठरवितो. हे भाष्य जबाबदारीला लोभ व शोषणाला त्याग ठरविल्यासारखे असते. यामुळे अज्ञानाला ज्ञानी ठरविण्यात येते.

यामुळे खऱ्या प्रश्नावरच पडदा पडतो. समाजाची वाटचाल अशाच भ्रमात चालत असली तर मुळ प्रश्न बाजुला पडुन व्यर्थ वाद निर्माण होतात. अर्जुनासारख्या जबाबदार व्यक्तिने अज्ञानाला ज्ञान ठरविणे समाजाला हितकारक नसते. म्हणुन "ज्ञान" व "अज्ञान" हा विषय येथे आला.

*ज्ञान

जीवनातील दुःख, अडचणी विकासमार्गातील कार्यसंधि असतात पण याच अडचणीमुळे मनुष्य दुःखी होतो. वास्तव न स्विकारता सरळ प्रज्ञावादी भाष्य बोलतो. याच प्रयत्नात अज्ञानाला ज्ञान ठरवितो. जीवनातील हेच वास्तव जाणण्यासाठी भगवतगीता जीवनाचे ज्ञानविज्ञान सांगते. याच अनुषंगाने ईश्वरज्ञान जाणतो जे ज्ञान ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे.

गतिर्भता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृद् ।
प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजं अव्ययम् ।।(९-१८)

या ज्ञानामुळे मनुष्य जीवनाचा शाश्वत विकासमार्ग जाणतो. याच ज्ञानामुळे जीवनातील दुःख, अडचणी विकासातील कार्यसंधि

जाणतो. ज्ञानाने कार्यमार्ग पक्का करतो व कार्याद्वारे ईश्वरभक्ति करतो.

*भक्ति

जसे पत्र, पुष्प निष्ठेने ईश्वराला समर्पित करतो, तसेच मनुष्य जी क्रिया करतो(यत् करोषि, अश्नासि, जुह्वोशि, ददासि यत् -९. २७)ती समर्पित भावाने करणे. हेच कार्याद्वारे अनन्यभक्तिचे रहस्य आहे. मनुष्य जगत असतांना योगक्षेम त्याला चालवावाच लागतो. कार्यातील परिणामभय त्याचा निश्चय दुबळा करते. ईश्वरज्ञानाचा वापर भयमुक्तिसाठी होतो. म्हणुन म्हटले,

अनन्याः चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्य अभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।(९-२२)

*************

(९-२२)/२ : "योगक्षेमं वहाम्यहम् "

अर्थात

असामान्यत्वाचा शोध

(Discovering SELF)

मुकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरीम् ।
यद् कृपा त्वम् अहं वंदे परमानंद माधवम् ।।

Every person born into this world represents something new, something that never existed before, something original and unique.

"God made me and broke the mold. "
Jean-Jacques Rousseau

मनुष्यातील असामान्यत्व जगात चांगले बदल घडवुन आणते. हे असामान्यत्व मनुष्याला Hero ठरवितात. हे असामान्यत्व प्रथम प्रेरणारुपाने अंतरंगात जन्म घेते. अर्जुन कुरुक्षेत्रावर दुःखी होतो.

इतर व अर्जुन यांत हा फरक असतो. येथेच अर्जुनाच्या असामान्यत्वाचा जन्म होतो. म्हणुन त्याचा विषादही विषादयोग ठरला. याच कारणाने भगवतगीता जगासमोर आली.

स्वतःच्या असामान्यत्वाचा शोध घेण्यासाठी भगवतगीता गुरुची भूमिका बजावते. अर्जुन श्रीकृष्णाला महत् गुरु संबोधतो.
पिता असि लोकस्य चराचरस्य।
त्वम् अस्य पुजश्च गुरुः गरियान् ।(११-४३)

शेक्सपीयर म्हणतो, सामान्य खाण्यासाठी जगतो, असामान्य जगण्यासाठी खातो. भगवतगीता जीवन जगण्याच्या या दोन पातळी(Survival व श्रेष्ठ) स्पष्ट करते, ज्यात कर्म हे साधन ठरते. Survival पातळीवर दुःख असते व परिणामभयाने अर्जुन दुःखी होतो. व द्वंद्वाच्या जाळयात अडकतो. असामान्यासाठी हेच दुःख Stepping stone ठरते. व हेच ज्ञान भगवतगीता देते.
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।

मृत्युनंतर देह पंचमहाभूतात विलिन होतो हे मनुष्य जाणतो. पण आत्मा(Live Energy) ईश्वर तत्वात विलिन होते, हेच तत्व ज्ञानविज्ञानाचा स्रोत आहे. याचे ज्ञान भगवतगीता स्पष्ठ करते.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।

माठ मातीचा शोध घेत नाही. मातीचे गुण त्यांत असतात. अंततः मातीत विलिन होते. तद्वत या जीवनाचे मुळ ईश्वरतत्व आहे, अंततः त्यात विलिन होते. म्हणुन जगण्याचा मार्ग अमृतंगमय ठरतो. व यामुळे Survival पातळीवरील दुःख त्याला हरवित नाही. त्या दुःखाचे Stepping stone करतो व उच्च दालनात प्रवेश करतो.

अनन्यः चिंतयन्तो माम् ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्य अभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।(९-२२)

Survival Level मध्ये योगक्षेम महत्वाचा असतो. हीच दृष्टि असते. तर उच्च पातळीवर दृष्टि बदलते. स्वतःचे असामान्यत्व अनुभवत असतो, सिद्ध करीत असतो.

Knowing others is wisdom, knowing yourself is Enlightenment.

Lao Tzu

*****

(९-२२) :
"तेषां नित्य अभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् "
(श्रेष्ठ जीवन )

"The meaning of life is not simply to exist, to survive, but to move ahead, to go up, to achieve, to conquer. "
-Arnold Schwarzenegger

कार्य हे मानवी विकासाचे मुख्य साधन आहे. हा भगवद्गीतेचा संदेश आहे . सुसंस्कृत मनुष्य आपली कार्यक्षमता, ज्ञान, आपला आनंद(सुखदुःख) आणि नीतिचे अनुसरण करुन स्वतःला कार्यरत ठेवतो.

अर्जुनाला आपले वचनबद्ध नियतकार्य स्वधर्माचरण या नात्याने करायचे होते. शस्त्र चालवण्याची वेळ आली होती. त्यावेळी अर्जुन म्हणतो, मला कोणत्या खुशमस्कऱ्यांशी लढायचे आहे?

एकदा मी निरीक्षण करतो. पण पाहिल्यावर दुसऱ्याच क्षणी दुःखी होतो. दुःख टाळण्यासाठी नियतकार्याला पाप सिद्ध करतो. अर्थात येथे प्रश्न उभा ठाकतो.

१. हा अर्जुनाचा चांगलेपणा आहे कि कमकुवतपणा?अर्थात श्रेष्ठत्व कि कनिष्ठता?

२. धर्म/नीतिच्या संदर्भात(Morality) योग्य कि अयोग्य?

३. ज्ञानाचे संदर्भात ज्ञानी कि अज्ञानी?

विकासासाठी कार्य, ज्ञान विज्ञानाची आवश्यकता असते. या संदर्भात, जसा अर्जुन धर्माच्या भूमिकेला अधर्म ठरवितो. तसेच समाजातील धर्माच्या भूमिकेस सतत आव्हान दिले जाते.

-मार्क्सने धर्माला अफुची गोळी म्हटले?

- धर्माच्या नावाखाली रक्तपात होतो?

- विकासासाठी कार्य हवे असते पण कर्म टाळून भोंदुबाबा लोकांच्या मागे धावतात?

वर्तमान ज्ञानविज्ञानाचा आहे. अज्ञानामुळे अंध विश्वास वाढतो?या संदर्भात भगवद् गीता काय म्हणते?हे पाहणे महत्वाचे ठरते.

भगवतगीता चांगलेपणा/श्रेष्ठ, धर्म/नीति, ज्ञान या सर्व मुद्यावर प्रकाश टाकते.

१. धर्म भूमिका:(योग्य-अयोग्य नीति)

विकास कार्याने होत असतो. कार्य टाळण्यासाठी अर्जुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्माचा आश्रय करतो.

अर्जुन म्हणतो, मला काहीही नको आहे आणि हे कार्य केल्याने मला नरक मिळेल.

भगवतगीता म्हणते, धर्मज्ञान मनुष्याला स्वधर्म देते. हा स्वधर्म (योग्य-अयोग्य यांतील)Tiebreaker असतो.

रामायणात याला धर्मगति म्हटले आहे. भरताला राज्य व श्रीरामाला वनवास असे दोन वर Execute करण्याची जबाबदारी दशरथ महाराजावर येते. श्रीरामाला हे कळताच पित्याची मुकसम्मति जाणुन वनवासाचा स्विकार होतो. याला धर्मगति म्हटले आहे.

धरम धुरिन धरमगति जानी। कहेउ मातुसन अति मृदु बानी।

पिता दीन्ह मोहे कानन राजू।जहां सब भांति मोर बडे काजू।।(अयोध्याकांड ५२/३)

अर्थात श्रीराम स्वतःचा स्वधर्म म्हणुन वनवास स्विकारतात. हा स्वधर्म श्रीरामासाठी Tibreaker ठरतो.

(इतर बंधु सोडुन मलाच राज्याभिषेक कां? हा श्रीरामासाठी Tie असतो. )

नव गयंदु रघुबीर मनु राजु अलान समान।

छूट जानि बन गवनु सुनि उर अनंदु अधिकान।।(अयोध्याकांड ५१)

अर्थात श्रीरामाचे मन पकडलेल्या हत्तीसारखे व राज्याभिषेक कांटेदार साखळीसारखे असते. वनगमन ऐकल्यावर बंधनातुन सुटुन मन आनंदीत होते.

जीवनात शंका निर्माण करणारे संघर्ष दूर करण्यासाठी स्वधर्म Tibreaker ठरतो. म्हणुन श्रीकृष्ण म्हणतात,

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्षसे महीम्।(२-३७)

२. ज्ञानाची भूमिका:

जीवनाच्या प्रवासाबद्दल शंका असताना, किंवा करायचे नसल्यास मनुष्य Excuses बोलतो. ही सामान्य संवय मानवांमध्ये आढळून येते . इतरांनी काय करावे हे मात्र उत्सुकतेने बोलत असतो पण जेव्हा स्वत:ची जबाबदारी असते तेव्हा निमित्त बोलले जाते. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी मात्र ज्ञानाचा वापर होतो. समाजात प्रज्ञावादाची संवय असते. व याचमुळे टिकाही होतात. यासंदर्भात "इतरांच्या डोळयातील कुसळ दिसते पण स्वतःच्या डोळयातील मुसळ दिसत नाही. "अशी प्रसिद्ध म्हण आहे.

म्हणुन भगवतगीता वर्तमानातील ज्ञान या संदर्भात प्रज्ञावाद vs ज्ञान हा भेद स्पष्ट करते. ज्ञान मार्गातील संशय मिटविण्यासाठी असते. ज्यामुळे कार्याचा एकनिश्चय होतो. याला भगवतगीता ज्ञान म्हणते. अर्जुनाच्या भाष्याला प्रज्ञावाद संबोधते.

योगसंन्यस्त कर्माणं ज्ञानसंच्छिन्न संशयम् ।(४-४१)

३. चांगलेपणा/श्रेष्ठ :

चांगलेपणा दुबळा ठरु नये हा भगवतगीतेचा संदेश आहे. अर्जुन प्रज्ञावादाद्वारे आपण सात्त्विक/आदर्श आहो असे दर्शवितो. ही दुर्बलता असते. याच अज्ञानातुन मुक्त होण्यासाठी अध्यात्मज्ञान सांगितले. प्रकृति(सत, रज, तम गुण) व पुरुष (-पुरुषोत्तम) याचे सविज्ञान ज्ञान सांगितले. याच संदर्भाने आत्मा-परमात्मा असे ईश्वराचे ज्ञान, आत्मोन्नतिचे ज्ञान आले. बंधन-मोक्ष शास्त्र सांगितले. चांगलेपणाचा संबंध दैवीगुण, प्रकृतीतील सतगुण यांचेशी दर्शविला आहे.

मनुष्याचे श्रेष्ठत्व या संदर्भात संदेश आहे,
मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)
ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)

श्रेष्ठांचा मार्ग पक्का (द्वन्द्वमोहमुक्त) असतो.

सामान्य लोक योगक्षेमासाठी(Survival)जगत असतात. तर श्रेष्ठांचा योगक्षेम ईश्वर चालवतो.
अनन्यः चिन्तयन्तो माम् ये जनाः पर्युपासते।

तेषां नित्य अभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।(९-२२)

सार :

"To live is to suffer, to survive is to find some meaning in the suffering. "

Friedrich Nietzsche

अपंग असूनही हेलन केलर नोबेलविजेता बनली. हा इतिहास आहे. माणसाची कार्यशक्ती, त्याचे जीवनमुल्य, सकारात्मक विचारसरणी ही त्याची संपत्ती आहे. ही संपत्ती दैवी गुणांनी युक्त असे भगवतगीतेत स्पष्ट केले आहे. ज्ञान सर्वश्रेष्ठ असते, अज्ञानामुळे अर्जुनाचा चांगलेपणा, विद्वत्ताही दुबळी ठरते तेंव्हा भगवतगीता मार्गदर्शन करते हे कथित चांगल्या लोकांनी व विद्वान लोकांनी लक्षात घेतले पाहीजे.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।(४-३८)

*******

(९-२३)

*************************

येअपि अन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धया अन्विताः।

तेअपि मामेव कौन्तेय यजन्ति अविधिपूर्वकम् ।।

*************************

(९-२३):

"येअपि अन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धया अन्विताः"

(जीवनविकासमार्गात ज्ञान, कर्म व भक्ति यांचा समन्वय)

* ईश्वर व ईश्वराची भक्ति :

मनुष्यजीवनात बंधन-मोक्ष या संदर्भात विश्वचालक ईश्वराची ओळख भगवदगीता देत आहे.

काङ्क्षतः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः।(४-१२)

येअपि अन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धया अन्विताः।

तेअपि मामेव कौन्तेय यजन्ति अविधिपूर्वकम् ।।(९-२३)

अवजानन्ति माम् मूढा मानुषीं तनुं आश्रितम् ।
परम् भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम्।(९-११)

देवता व ईश्वर यांतील भेद भगवदगीता स्पष्ट करते. समाजातील देवतांची भक्ति करणारे ईश्वरश्रद्ध असतात. देवतांना मनुष्यरुपात (ईश्वराला)जाणतात. तर अव्यय ईश्वराचे चिंतन करण्यासाठी ईश्वराच्या ठळक विभूतिंची ओळख भगवदगीता देते.

यत यत विभूति मत्सत्त्वं श्रीमतं उर्जितम् एव वा।(१०-४१)
या ईश्वराची भक्ति कर्माद्वारे अनन्ययोगाने होत असते.

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परः।
अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त उपासते।(१२-६)

व्यवहारात कर्म सकाम असते. तर ईश्वराच्या भक्तिसाठी निष्काम कर्म हवे. यांत (ईश्वर)ज्ञानामुळे कार्याचा एकनिश्चय होतो. कर्म/कर्मफल ईश्वराला समर्पित करणे हे भक्तिचे स्वरुप असते.

*कर्म :

भगवदगीतेने जीवनात ज्ञान व कर्म या दोन्ही संदर्भात पारदर्शकता आणली आहे. अर्जुन दुःखी झाल्यावर स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी आपल्या नियतकार्याला अधर्म ठरवितो. या कथित ज्ञानाला प्रज्ञावादी ज्ञान संबोधले आहे. प्रत्यक्षात ज्ञान प्रकाशासमान असते. अंधार दुर करते. संशयमुक्त करते. ज्ञानी असणे म्हणजे कार्याचा एकनिश्चय असतो. नित्य ज्ञानाचा आश्रय असतो. ज्ञान याच संदर्भात ईश्वराचा नित्य आश्रय, बुद्धियोग हा संदेश आहे. यामुळे जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. कार्याचा एकनिश्चय असतो, विचलित होत नाही. विश्वासाने मार्गक्रमण होते.

बुद्धियोगं उपआश्रित्य मद् चित्तः सततं भव।(१८-५७)

अर्थात ईश्वरश्रद्ध व्यक्ति ईश्वराची ओळख ज्ञान या संदर्भात जाणुन व्यवहारात ईश्वराची भक्ति साध्य करतो.

ईश्वराचा नित्य आश्रय व त्याची भक्ति यासाठी भक्ति, ज्ञान व कर्म यांचा जीवनविकासमार्गात समन्वय साध्य होतो. व्यवहारातील सकाम कार्य निष्काम कार्यात Transform होते.

*सार :

मनुष्याचे कर्तृत्वच जगात इतिहास घडविते. कर्तृत्व/कर्म या संदर्भात १. Devotion/Integrity (ईश्वर) भक्तिने साध्य होते. २. कार्यनिश्चय (ईश्वर)ज्ञानाने साध्य होतो. ३. विचलित न होणे ही शक्ति दुःखान्त शक्ति असते. समत्वयोगाने या शक्तिची साधना होणे हे निष्काम कर्माचे साध्य असते.

***********

(९-२४)

*************************

अहं हि सर्वयज्ञानां भोक्तां च प्रभुः एव च।

न तु माम् अभिजानन्ति तत्त्वेन् अतः च्यवन्ति ते।।

*************************

(९-२४) :

"अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुः एव च"

(जीवनाची उच्च पातळी)

जीवनाची उच्च पातळी:

जीवनाच्या सामान्य पातळीवर जाणवत असलेल्या अडथळयावर मात करण्यासाठी जीवनाची उच्च पातळी जाणणे आवश्यक असते. जे फक्त स्वतःच्या योगक्षेमासाठी जगतात, ते जीवनाची उच्च पातळी जाणत नाही. यामुळे अडचणीत सापडतात. याला भगवदगीता बंधन/द्वन्द्ववश अवस्था संबोधत आहे.

"Everyone is handed adversity in life. No one's journey is easy. It's how they handle it that makes people unique. "

-Kevin Conroy

जशी एखादी संस्था चालते, तसे या सृष्टिचे चक्र अव्याहत सुरु असते. (विश्वाचे संचलन सुरु असते. )मनुष्य आपल्या स्वभावनियत कर्माने या चक्रप्रवर्तनाला सहकार्य करीत असतो. याच कर्मप्रक्रियेला यज्ञ, ईश्वर(अध्यक्ष) या तत्वाशी भगवदगीतेने जोडलेले आहे, ज्यामुळे मनुष्य जीवनाच्या उच्च पातळीवर जगण्यास समर्थ होईल.

यज्ञ:

मनुष्याच्या स्वतःच्या मार्गाचे व्यवस्थापन, विविध समुहाचे व्यवस्थापन विश्वाच्या व्यवस्थापनातील सक्रिय भाग असतो. मनुष्याचे कार्य १. स्वतःचा योगक्षेम चालविणे २. समुहविकासप्रित्यर्थ कार्य ३. सृष्टिचक्रप्रवर्तनासाठी कार्य या सर्व कार्यांची पुर्तता व्हावी या हेतुने "यज्ञ" या शब्दाचे प्रयोजन आहे.

यज्ञार्थात कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधन:।

तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर।(३-९)

विश्वाच्या आरंभि यज्ञ कर्माचे प्रयोजन देवतापुजन यासाठी होते. निसर्गातील विविध देवता व लोक यांनी परस्पर सहकार्य साध्य करावे हा यज्ञाचा हेतु होता,

सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा पुरा उवाच प्रजापतिः।(३-१०)

...

परस्परं भावयन्तः श्रेयः परम् अवाप्स्यथ।(३-११)

यज्ञ कर्माने सृष्टिचक्रप्रवर्तन होते याचा अर्थ वर्तमानात यज्ञकर्म सृष्टिचक्रप्रवर्तनात सहकार्य साधणारे असते.

एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्तयतीह यः।

अघायु इंद्रियरामो मोघं पार्थ स जीवति।(३-१६)

भगवदगीतेने यज्ञातील अग्नि व हवन (समर्पण) या तत्वाचा उपयोग निष्काम कर्म/समर्पित कार्य यासाठी व्यवस्थापनात केलेला आहे.

देवता-ईश्वर

वर्तमानात ईश्वरश्रद्धा असलेले देवतापुजन करीत असतात. भगवदगीतेत ईश्वराची ओळख ज्ञानविज्ञानाचे आधारावर अव्यक्त, सृष्टिचा अध्यक्ष अशी दिलेली आहे. जसे एखाद्या संघटनेचा,

संस्थेचा अध्यक्ष असतो, स्वतः कांही करीत नाही तरी त्याच्या भूमिकेला सर्वोच्च अस्तित्व असते. जसे अध्यक्षासाठी संपुर्ण संघटना राबत असते, तसेच जणु विश्व ही संघटना ईश्वरासाठी राबत असते. या सृष्टित यज्ञरुपाने कर्म घडत असतात. या सर्व यज्ञाचा भोक्ता अध्यक्ष(ईश्वर) असतो.

अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुः एव च।
न तु माम् अभिजानन्ति तत्वेन् अतः च्यवन्ति ते।(९-२४)

देवतापुजनानिमित्त जे यज्ञ होतात त्याचा भोक्ता ईश्वरच असतो. जे ईश्वराला न जाणता अन्य देवतांना श्रद्धेने भजतात ते अप्रत्यक्षपणे ईश्वराचीच भक्ति करतात. पण शास्त्र जाणत नसल्यामुळे(अविधीपुर्वक) या (आत्मोन्नति, अमृतत्वाय कल्पते) मार्गावरुन घसरतात.

जे ईश्वराची अध्यक्ष ही अव्यय ओळख जाणुन ईश्वराचा आश्रय करुन (यज्ञकर्म, समर्पण, निष्काम कार्य) भक्ति करतात, याला अनन्यभक्ति म्हटले आहे. तो जीवनाच्या उच्च पातळीवर कार्यरत असतो.

अनन्याः चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते।

तेषां नित्य अभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।(९-२२)

********

(९-२४):

"न तु माम् अभिजानन्ति तत्त्वेन् अतः च्यवन्ति ते"

(जगण्याची आध्यात्मिक पातळी व त्याचे अज्ञान)

व्यवहार आणि अध्यात्म याचा मध्य धर्माने साधलेला असतो. पांडवांना न्याय मिळणे हा व्यवहार होता. हा व्यवहार कौरवांना मान्य नव्हता म्हणुन धर्मयुद्ध (External battle )ठरले. प्रत्यक्ष युद्धाचे वेळी हा व्यवहार अर्जुनाला मान्य झाला नाही. याचाच अर्थ व्यवहार, धर्म याद्वारे प्रश्न सुटला नाही तेंव्हा अध्यात्मिक युद्धाचा (Internal battle) विषय आला.

व्यवहारात बाह्य (External ) सहकार्य असते. पण Internal battle मध्ये एकटा असतो. It is your own response to situation. युद्धाचे वेळीच अर्जुनाला दुःख झाले. निष्क्रिय होणे हा त्याचा स्वतःचा Response होता.

Response

जीवन जगण्याच्या दोनच पातळी महत्वाच्या आहेत . १ व्यावहारिक पातळी २. आध्यात्मिक पातळी

कार्यात संशय आला तर स्वतः माघार घेतो. व्यवहारसिद्धि झाली नाही तर समर्थन करणे, दोषासाठी बाह्य स्थितीला कारण धरणे अर्थात दोषाचे खापर जगावर फोडणे, परिस्थितिवर फोडणे ही व्यवहारपातळीच असते. अर्थात जेथे इतरांना जबाबदार धरण्यात येते ती व्यवहारपातळी असते . अर्जुनाने स्वतःला लोभी ठरविले अर्थात जबाबदार स्वतःला धरले. याचाच अर्थ त्याला आध्यात्मिक पातळीची गरज भासली.

ईश्वरभक्त व जीवनाची आध्यात्मिक पातळी (Higher level):

आध्यात्मिक पातळी Self Help असते. भगवतगीता याला अनन्यभक्ति संबोधते. ईश्वरश्रद्ध देवतांना भजतात. पण ईश्वराची "विश्वाचा अध्यक्ष" ही ओळख जाणत नसल्यामुळे अनन्यभक्ति किंवा जीवनाची आध्यात्मिक पातळी जाणत नाही, ज्या पातळीवर कर्म ईश्वराला समर्पित होते. अर्थात निष्काम कर्माचे शास्त्र जाणतो.

अहं हि सर्वयज्ञानां भोक्तां च प्रभुः एव च।
न तु माम् अभिजानन्ति तत्त्वेन् अतः च्यवन्ति ते॥(९-२४)

ईश्वरच सर्व सृष्टीच्या प्रवर्तनचक्रातील यज्ञकर्माचा भोक्ता असतो. म्हणुन समर्पणतत्व महत्वाचे आहे. हेच समर्पण तत्व जाणले तर निष्काम कार्य घडते. पण याच समर्पणतत्वाच्या अज्ञानामुळे वरची पातळी गाठु शकत नाही. अर्थात ज्या पातळीवर आहे तेथेच राहतो.

सार :आध्यात्मिक पातळीवर जगणे (अमृतत्वाय कल्पते) हा प्रत्यक्षातील स्वतःचा अनुभव असतो. याच(वरच्या) पातळीवर येण्यासाठी भगवतगीता ज्ञान आहे. या पातळीवर योगयुक्त असतो. त्याला कोणतेही बाह्यज्ञान विचलित करीत नाही.

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन् ।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन॥(८-२७)

"Nothing else so destroys the power to stand alone as the habit of leaning upon others. If you lean, you will never be strong or original. Stand alone or bury your ambition to be somebody in the world. "
Orison Swett Marden

*******

(९-२७)

**********************

यत् करोषि यत् अश्नासि यद् जुह्वोषि ददासि यत् ।

यत् तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मद् अर्पणम् ॥

************************

(९-२७):

"यत् तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मद् अर्पणम् "

(अनन्यभक्ति:Higher level of living)

*जीवन व त्याचे ईश्वराशी नाते.

"No other planet in the solar system is a suitable home for human beings; it's this world or nothing. That's a very powerful perception. "

भगवतगीतेत मनुष्य व ईश्वर यांचे नाते ज्ञानविज्ञानासह स्पष्ट केले. ईश्वरासाठी सर्व सारखे आहेत पण जे ईश्वरभाव

जाणुन(सर्वभूतहितेरतः) ईश्वराला भजतात तेच या नात्याची दिव्यता जाणतात.

"प्रत्येक मनुष्याला विकासाची संधी या जगी मिळालेली असते. "हेच सत्य highlght करण्यासाठी दुराचारी किंवा पापयोनीमध्ये जन्माला आला असेल तरी (अनन्यमार्गावरील) ईश्वरभक्तिने पावन होतो, साधु, धर्मात्माच ठरतो. असा खास उल्लेख भगवतगीता करते.

अपिचेत्सु दुराचारो भजति माम् अन्यभाक्।(९-३०)

......

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वत् शांतिं निगच्छति।

कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति।।(९-३१)

मां हि पार्थ व्यपआश्रित्य ये अपि स्युः पापयोनयः।(९-३२)

.....

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

*जीवन कठीण कि विकाससंधि?:

(Shifting Perception)

या दुःखालयात मनुष्य जन्माला आलेला आहे म्हणुन ईश्वरप्राप्तिसाठी भजणे असा उल्लेख आलेला आहे. याद्वारे जीवन जगण्याची (प्राकृतिक व संस्कारीत -अनन्यभक्ति) पातळी स्पष्ट होते.

१. प्राकृतिक level व २. अनन्यभक्तिची level: "अमृतत्वाय कल्पते"

मनुष्य दुःखी, चिंताग्रस्त असतो कारण तो प्राकृतिक (प्रकृतिवश) पातळीवर जगत असतो. अर्जुन दुःखी होतो. व विकास थांबतो. जीवन कठीण वाटते. हेच Perception असते. " येथे जीवन कठीण कि विकाससंधी?"हा प्रश्न येतो. ज्ञानानेच Perception बदलते.

"नजरको बदलो नजारे बदल जायेंगे।"

"The difference between average people and achieving people is their perception of and response to failure. When we shift our perception, our experience changes. "

*विकास (Action) :

अनन्याः चिन्तयन्तो माम् ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्य अभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥(९-२२)

ईश्वरश्रद्धा असली तरी जीवनाची उच्च पातळी (Higher consciousness, अनन्यभक्ति) व देवताभक्ति यांतील भेद येथे स्पष्ट होते.

येअपि अन्य देवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः।(९-२३)
...
न तु माम् अभिजानन्ति तत्वेन अतः च्यवन्ति ते॥(९-२४)

"मोक्ष" या संदर्भात जीवनाची उच्च पातळी महत्वाची असते. जीवनाची प्राकृतिक पातळी व विकासासाठी अनन्यभक्तिची "अमृतत्वाय कल्पते" पातळी, या दोन्ही पातळीमध्ये कार्य साधन (Common) असते. कार्याचा एकनिश्चय असतो. समर्पण अर्थात निष्ठा असते.

यत् करोषि यत् अश्नासि यद् जुह्वोषि ददासि यत् ।

यत् तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मद् अर्पणम् ॥(९-२७)

व्यावहारिक बोध:

"Perception" is an important mediating cognitive process through which persons make interpretations of the stimulus or situation they are faced with. Four distinctive tools that can help to shift our perceptions in a positive way:

*Removing the Emotion:

*Consciously Searching for the Positives:

*Focus on Shifting the Perception & Overcoming the Problem:

*Action:

******

(९-२८)

***************************

शुभाशुभफलैः एवं मोक्ष्यसे कर्मबंधनैः।

संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो माम् उपैष्यसि।

**************************

(९-२८):

" शुभाशुभफलैः एवं मोक्ष्यसे कर्मबंधनै:"

(बंधन -मोक्ष)

कर्म जीवनविकासाचे साधन आहे व विकासाचा आधार बंधन-मोक्ष आहे. हा भगवदगीतेचा मुख्य संदेश आहे. म्हणुन कर्मबंधन हा शब्द आलेला आहे.

कर्मबंधन या शब्दात

१. कर्म योग्य कि अयोग्य हा द्वन्द्व असतो.

२. कर्मफल शुभ- अशुभ, यश-अपयश हा द्वन्द्व असतो.

हा द्वन्द्वच बंधन असते. अर्थात Attachment असते. याच कर्मबंधनातुन मुक्तिसाठी भगवदगीतेत विविध संदर्भ आलेले आहेत.

* यज्ञकर्म:

यज्ञार्थात् कर्मणोअन्यत्र लोकोअयं कर्मबन्धनः।(३-९)

अर्थात यज्ञाचे तत्व वापरुन (ईश्वराला)कर्मसमर्पित करणे.

*बुद्धियोग :

बुद्ध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)

(कर्मयोग )

*अनन्ययोग:

शुभाशुभफलैः एवं मोक्ष्यसे कर्मबंधनै:।

संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो माम् उपैष्यसि।(९-२८)

विश्वसंचलन करणाऱ्या ईश्वराचे मनुष्याशी जवळचे नाते असते. ज्ञानविज्ञान या संदर्भात सृष्टिचा अध्यक्ष ही ईश्वराची ओळख आहे. त्याचाच अंश Consciousness/Mind शी संबंधीत आहे.

मनःषष्ठानि इंद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति।(१५-७)

विश्वसंचलन करणारा हा ईश्वर सर्वांसाठी सारखा आहे. पण जो या ईश्वराला जाणतो, तो अनन्यभक्ति(नित्य ईश्वराशी जोडलेला) करतो. यांत समर्पण असते.

यत्करोषि यदअश्नासी यत् जुहोषि ददासि यत्।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदअर्पणम् ।(९-२७)

समोअहं सर्वभूतेषु ... मयि ते तेषु च अपिअहं।(९-२९)

जो या ईश्वराला भजतो, त्याच्याशी ईश्वरच नाते जोडतो, त्याच्या हृदयातील अज्ञान दुर करतो. त्याच्याप्रत पोहोचण्याचा मार्ग दर्शवितो. अज्ञान दुर करणाऱ्या या विशेष कृपेला बुद्धियोग संबोधले आहे. अज्ञानामुळे मनुष्य हे ज्ञान जाणत नाही म्हणुन मोह असतो. व बंधनाच्या जाळ्यात सापडतो.

सुखासाठी मनुष्य जगत असला तरी त्याची दुःखाशी गांठ पडते. याच दुःखी अवस्थेवर मात करण्याचे अज्ञान असल्यामुळे अर्जुन नियतकर्मच टाळतो. "ना रहे बांस ना बजे बांसुरी". पण स्वतःची प्रतिमा आदर्श दिसण्यासाठी आवर्जुन ज्ञान सांगतो.

एकीकडे अडचणीवर मात करण्याचे ज्ञान नसते, यामुळे स्वतः निर्णय घेवु शकत नाही तर दुसरीकडे ज्ञान सांगतो. ही जशी

अर्जुनाची भूमिका असते, तशीच समाजातील ही सामान्याची (Herd ) भुमिका असते.

अर्जुन मार्गात अडकतो पण आपण अडकलो नाही तर ज्ञानी आहो हे दर्शविण्यासाठी Judgement thinking वापरतो. वास्तव स्विकारीत नाही. वर्तमानातील वास्तव स्विकारणे याला तत्त्ववेत्यांनी Awakening म्हटले आहे.

“Awakening begins when a man realizes that he is going nowhere and does not know where to go. "

-G. I. Gurdjieff

मनुष्यजीवन केवळ Survival साठी नाही, तर या जीवनाची Master भूमिकेची ओळख भगवदगीता करुन देत आहे. व याचसाठी ईश्वराची(ज्याचे मनुष्याशी नाते आहे) ओळख करुन देत आहे. निर्णय मनुष्याला करायचा आहे.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।(९-३३)

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६६)

सार :

"ज्या शाश्वताशी मनुष्याचे नाते आहे(ज्यामुळे मनुष्य जीवंत असतो)त्या ईश्वराशी नाते जोडले, त्याचा अधिकार मान्य केला तर तोच मार्ग दाखवतो. कारण त्यालाच Address(तद् धाम परमं मम) माहीत असतो. "

हाच भगवदगीतेचा संदेश आहे.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

********

(९-२९)

************************

समोअहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योअस्ति न प्रियः।

ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु च अपि अहं।।

**************************

(९-२९) /१:

"समोअहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योअस्ति न प्रियः"

ईश्वराचे अस्तित्व जाणणे किंवा न जाणणे, हा मनुष्याचा प्रश्न आहे, ईश्वराचा नाही. तसेच ईश्वर Private property नाही, तो सर्वांच्या हृदयी स्थित आहे. ईश्वरासाठी सर्व समान आहेत. ईश्वराला सृष्टिचा अध्यक्ष जाणुन जो श्रद्धेने अव्यय ईश्वराशी नाते जोडतो त्याचेशी ईश्वराने नाते जोडलेले असते. येथे भगवतगीता क्रांतिकारक वक्तव्य करीत आहे.

समोअहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योअस्ति न प्रियः।

ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु च अपि अहं।।

अपिचेत् सुदुराचारो भजते माम् अन्यभाक् ।

साधुः एव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः।।(९-३०)

पतित असला तरी तो सुद्धा अनन्य भक्तिद्वारा पावन होतो, कारण त्याचा निश्चय असतो. (वाल्याचा वाल्मिकी) मग चांगल्या (दैवी) मनुष्याने या ज्ञानाला वंचित राहुन संशयी, दुःखी, नकारात्मक होणे उचित नाही. अर्थात राज- रहस्याला जाणुन युक्त व्हावे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

दुःखामुळे अर्जुनाची नकारात्मक दृष्टि होते व यामुळे नकारात्मक वक्तव्य(विपरित होणार!) करतो. व हे वक्तव्य योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान बोलतो. हा Senses( Lower, अशाश्वत)Self चा परिणाम असतो. येथे नकारात्मक दृष्टि बुद्धिला भ्रमित करते. व त्याला त्याच्या True( Higher, शाश्वत) Self ला कार्यरत होण्यापासुन वंचित ठेवते.

("Perceiver pollutes the perception through judgement thinking and pollutes mind which then does not allow Higher Self to operate")

जगात ज्ञान आले तरी त्याचा उपयोग याप्रमाणे(आपले नकारात्मक मत, interest सिद्ध करण्यासाठी वापर!) होत असल्यामुळे समाजात नकारात्मकता कायम राहते. त्याला मनुष्यातील सुप्त शक्तिची ओळख नसते. यालाच भगवतगीतेने अहंकाराचा आश्रय म्हटले आहे.
अहंकार विमुढात्मा कर्ताहम् इति मन्यते।

मनुष्याचे मन वाऱ्यासारखे पळत असले तरी त्याची दृष्टि मर्यादित असते. या मनाची मर्यादा जाणुन मनावर नियंत्रण अर्थात आत्मवश होण्याचे महत्व येथे स्पष्ट होते. बुद्धियोगाचे महत्व कळते. ही प्रक्रिया चेतना जागृति म्हणुनही ओळखल्या जाते.

भगवतगीता मनुष्याच्या सुप्त शक्तिला जाणण्याची व त्याला साकार करण्याची, अनुभव करण्याची प्रक्रिया सांगते. ईश्वरज्ञानाने संशय छेदुन दृढनिश्चयी होणे, कार्याद्वारे ईश्वरभक्ति करणे . या प्रक्रियेत True Self(शाश्वत) कार्यरत असतो. यामुळे जीवननाव निश्चित दिशेने, निश्चयाने वल्हवित असतो.

जगालाच नव्हे तर मनुष्याला स्वतःला सुखी, समृद्ध करण्यासाठी भगवतगीतेच्या या क्रांतिकारक रहस्याला जाणणे (राजगुह्य) आवश्यक आहे.

*********

(९. २९)/२:

"ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु च अपि अहं"

सुखी जीवनाचे व्यवस्थापनात ईश्वराची भूमिका जाणली तर स्वतःचा मार्ग Design करणे सुलभ होते. अर्थात स्वतःच्याच मार्गाचे स्वतःला (काय करीत आहो व कशासाठी करीत आहो?)Awareness असते. अर्जुनाला हाच Awareness हवा होता. हाच Awareness वर्तमानातील जागृति असते.

अर्जुन धर्म जाणत होता पण धर्माचे आचरण करण्यास असमर्थ ठरतो. पण या सत्याचेही अज्ञान असल्यामुळे स्वतःच्या आचरणालाच तो धर्म संबोधतो. याचे कारण त्याचे व्यक्तिगत सुखदुःख असते. म्हणुन " सुखाचा जीवनमार्ग " हा भगवतगीतेचा विषय ठरतो. व याच अनुषंगाने अर्जुनाला वर्तमानात

Awareness हवा होता, ज्यामुळे धर्माचरण तर होईल पण दुःख होणार नाही, समाधान होईल, अशा मार्गाचे ज्ञान अर्जुनाला हवे होते. याच ज्ञानाची पुर्तता भगवतगीता करते.

जीवनमार्ग चालतांना बुद्धिची स्थिरता साधण्यासाठी दुःखाने विचलित न होता मार्ग चालणे महत्वाचे असते. याच संदर्भात मानसिक शक्तिची साधना होण्यासाठी कार्याद्वारे ईश्वरभक्ति हा विषय येतो.

"कार्याद्वारे ईश्वरभक्ति" ही उच्च जीवन जगण्याची कला (Leaving for higher purpose)असते. अर्थात या जगण्यात समाधान (सुख/दुःखान्त)अनुभवत असतो.

ईश्वरामुळे संपुर्ण जगाचे अस्तित्व आहे पण जगामुळे ईश्वराचे अस्तित्व नाही. याप्रमाणे जग व ईश्वर यांचा संबंध स्पष्ट होतो. ईश्वर जगातील कुणाचीही खाजगी संपत्ति नाही. ही संपत्ति त्याच्याच उपयोगाची असते, ज्याला या संपत्तिची ओळख असते.

समोअहं सर्वभूतेषु न मे द्वेष्यो अस्ति न प्रियः।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु च अपि अहं॥(९-२९)

जो निष्ठेने ईश्वराची भक्ति करतो, त्याच्याशीच ईश्वराची मैत्री असते. म्हणुन मनुष्यजीवनात नित्य ईश्वराचा आश्रय होण्यासाठी व भक्ति घडण्यासाठी अनन्ययोग महत्वाचा आहे. जीवनाचा शाश्वत विकासाचा मार्ग(अमृतंगमय) जाणला तर त्या मार्गावर दैनंदिन जीवनात ज्या क्रिया घडतात, त्या संदर्भात हा अनन्ययोग (भक्तिसाठी ) ईश्वराला समर्पित कार्य असे संबोधित करतो.

यत् करोषि यत् अश्नासि यत् जुहोषि ददासि यत् ।
यत् तपस्यसि कौंतेय तत् कुरुष्व मद् अर्पणम् ।।(९-२७)

*व्यावहारिक बोध:

जीवनविकास संदर्भात मनुष्याच्या सुखदुःखाची महत्वाची भूमिका असते. दुःखामुळे विचलित होणे हा मनुष्यजीवनातील Weaknes ठरतो.

"दर्दको दर्दसे देखोगे तो दर्द बढेगा(विचलित), प्रेमसे देखोगे तो हमदर्द बनेगा(विकाससंधि)"

म्हणुन वर्तमानात State of mind अविचल (स्थिर) असणे व (जगण्यातुन) कार्याद्वारे मानसिक शक्तिची (योग-दुःखान्त) साधना करण्याची कला साध्य करणे हाच भगवतगीतेचा विषय आहे.
(योगः कर्मसु कौशलम्) याचसाठी:

१. नित्य ईश्वराचा आश्रय करणे याचे प्रावधान आहे. याद्वारा योगयुक्त असणे, ज्यामुळे (ऐकीव भाष्यानेसुद्धा) बुद्धि विचलित होत नाही. व नित्य (शाश्वत) विकासमार्गावर असतो.

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन॥(८-२७)

२. कार्यसंस्कारित (स्वधर्म, कार्याचा दृढनिश्चय) असणे, ज्यामुळे स्वतःच्या मार्गाचे Awareness असते व कार्य (ईश्वराला समर्पण)निष्ठेने करतो व कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य होते.

******

९. २९ :

"मयि ते तेषु च अपि अहं "

(Leadership lesson:ईश्वराचा प्रतिनिधी)

स्वतःची ओळख:

मनुष्य या सृष्टिनिर्मितीतील श्रेष्ठ अविष्कार आहे. त्याचे जीवन या अविष्काराचे Expression असते. "स्वतःला ओळखणे" हीच

या अविष्काराची प्रक्रिया असते. याच प्रक्रियेत "स्वभाव अध्यात्म उच्यते" असा बोध भगवद् गीतेत आलेला आहे.

"एका जोडे बनविणाऱ्या कारखान्याला तोटा आल्यामुळे कारखान्याला टाळे लावण्याचा निर्णय होतो. तेथील जाॅन्सन नांवाचा कामगार टाळेबंदीपुर्वी मला कारखाना चालविण्याची संधी द्या अशी विनवणि करतो. ती मान्य होते. जाॅन्सनच्या नेतृत्वात त्याच कामगारांकडुन कारखाना चालविण्यात येतो. सहा महिन्यात कारखाना नफ्यात येतो. मालक त्याला व्यवस्थापक पद Offer करतो. पण तो नाकारतो व राजीनामा देवुन स्वतःचा कारखाना सुरु करतो. स्वतःतील मालकाची ओळख जाॅन्सनला झालेली असते. "

मी कोण?याची ओळख जगाला होण्यासाठी मनुष्याची धडपड सुरु असते. पण त्याचा शोध बहिर्मुखी असतो. जगाच्या गर्दीत असतो. तुलना करतो, दुःखी होतो, अतृप्त असतो. भगवद् गीता या शोधाची दिशाच बदलविते. प्रेमाची परिभाषा बदलते.
पक्षाला पिंजऱ्यात बंद करुन गुलाम करणे याला प्रेम संबोधल्या जाते. पण पक्षी आपले उड्डान विसरतो, त्याचे पंख दुबळे होतात. "मी कोण" हेच विसरतो.

Born to win but conditioned to loose"

अर्जुन युद्धक्षेत्रावर दुःखी झाल्यावर स्वतःला लोभी म्हणवतो. पापाचरण करणारा ठरवितो. पण स्वतः निष्क्रिय झाला आहे, स्वधर्म टाळत आहे याचा विसर पडतो. नव्हे, यावर पांघरुण घालण्यासाठीच ही धडपड असते. अर्थात स्वतःला योग्य ठरविण्यासाठी ही धडपड असते. स्वतःला "योग्य" ठरविण्यासाठी नव्हे तर "योग्य" अनुभवण्यासाठी मनुष्याला विचाराची दिशा बदलवायची असते.

Know Thyself या प्रक्रियेत वास्तवाचा स्विकार केला तर प्रश्नाला पारदर्शकता येते. अर्जुन वास्तव स्विकार करतो व निश्चित प्रश्न पटलावर येतो. याच प्रश्नाचे श्रीकृष्ण हंसतमुखाने उत्तर देतात.
तमउवाच हृषिकेशो प्रहसन्निव भारत।(२-१०)
"No problem can be solved from the same level of consciousness that created it. "
Albert Einstein

व्यवहारात मार्ग सकामच असतो. याचमुळे अर्जुन दुःखी होतो. प्रत्यक्ष कृती करतांना (प्रश्न सोडवितांना) कोणत्या

Consciousness मध्ये कार्य करायचे आहे, हे भगवद् गीता सांगते. यामुळे विचाराची दिशा बदलते. यामध्ये १. स्वतःची ओळख होते.

सर्वस्य च अहं हृदि संनिविष्टो
मत्तः स्मृतिः ज्ञानं अपोहनं च।(१५-१५)

२. स्वतःच्या कृतीचा मार्ग बनवितो. (कार्यकौशल्य)
"समदुःखसुखं धीरं स अमृतत्वाय कल्पते"(२-१५)
या मार्गावर कार्याचा एकनिश्चय असतो.

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।(२-४१)
निष्काम कार्यरत असतो. अर्थात ईश्वराची भक्ति करतो.

तस्माद् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।(२-५०)
कार्यकौशल्य-कार्यातुन सुखाची, शक्तिची साधना.
३. श्रीकृष्ण ईश्वराची ओळख (यतः प्रवृत्ति भूतानां येन सर्वम् इदम् ततम् ) देतात. ईश्वर सर्वांसाठी सारखा असला तरी जो त्याला (अनन्यभावाने) भजतो, त्याचे ठायी तो असतो . तो जसा ईश्वराचे ठायी असतो, ईश्वर त्याचे ठायी असतो.

समोअहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योअस्ति न प्रियः।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चअपि अहं।।(९-२९)

४. ईश्वराचा प्रतिनिधी

अर्जुनाचे व ईश्वराचे नाते अर्जुनाच्या कार्यातुन स्पष्ट होते. येथे जणु अर्जुन ईश्वराचा प्रतिनिधी म्हणुनच आपली कार्याची भूमिका बजावतो.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव।।(११-५५)

सार:

अध्यात्म विचाराची दिशा बदलविते.

"Leadership is an intense journey into yourself. You can use your own style to get anything done. It's about being self-aware. "

Jeffrey R. Immelt

*********

(९-३०)

************************

अपिचेत् सुदुराचारो भजते माम् अनन्यभाक् ।

साधुः एव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः।।

**************************

(९. ३०)/१:"

अपिचेत् सुदुराचारो भजते माम् अनन्यभाक् ।"

भगवतगीता सृष्टिचा मुळपुरुष ईश्वर याची ओळख करुन देते.

यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदं ततम् ।(१८-४६)

प्रकृति व पुरुष या संदर्भात पुरुषोत्तम, योजक(किंवा कर्म) संदर्भात प्रकृतिचा अध्यक्ष, प्रकृतिसंदर्भात गुण (सत, रज, तम) व गुणातीत. दैव संदर्भात अधिदैव, ज्ञान संदर्भात ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत . याच ईश्वराच्या(श्रीमतं- उर्जितम् ) विभूतिची मनुष्याला ओळख करुन देते.

याप्रमाणे अशाश्वत जीवन व त्या जीवनाचे शाश्वत मुळ याची ओळख भगवतगीता करुन देते. ईश्वर शाश्वत आहे व कर्म काम्य आहे म्हणुन कुणी संन्यास पत्करुन साधना करतात. तर समाजात

राहणाऱ्यांना कार्याचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते व कार्याद्वारे ईश्वरभक्तिचा मार्ग सांगते.

हे जग वासुदेवमय आहे हे जाणुन याच ईश्वराच्या नित्य ठायी राहणे. असे जमत नसल्यास प्रयत्नाने ( अभ्यासाने , ध्यान) साध्य करणे. किंवा कार्याद्वारे (समर्पण) अनन्यभावाने भक्ति करणे.
ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परः।
अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त उपासते॥(१२-६)

व्यवहारात मनुष्य कार्यसंस्कारित असतो. यांत स्वभावनियत सहजकार्य(State of art) असते. याचा उपयोग व्यवहारात गरजापुर्तिसाठी करतो. कार्यसंस्कारित असणारे प्रगति साधतात. अर्जुन कार्यसंस्कारित असतो. पण याच व्यवहाराच्या मार्गात त्याला अडथळा जाणवते. व निष्क्रियतेचे समर्थन करतो. अर्थात Trapमध्ये सापडतो. याच Trapमधुन मुक्त होण्यासाठी भगवतगीता जगासमोर आली.

दुःख टाळण्यासाठी मनुष्य Shortcut वापरतो. व दुःखावर विजय मिळविण्यासाठी, Trapमधुन मुक्तिसाठी ईश्वरज्ञानाचे, भक्तिचे महत्व भगवतगीता सांगते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

अर्थात या मार्गाला "अमृतत्वाय कल्पते" (२-१५) संबोधले आहे. या मार्गावर कार्याचा दृढनिश्चय असतो म्हणुन निर्णयअधिकार जाणतो . स्वभावनियत कार्य स्वधर्मात transform करतो. द्वंद्व trap असतो, म्हणुन स्वधर्म, दृढनिश्चय यांची भूमिका Tiebreakerची असते.

तसेच कार्याद्वारे भक्ति याचा अर्थ निष्ठेने (Excellence) कार्य घडते. कार्याची दृढता, निष्काम कार्य, कार्याद्वारे भक्ति, कार्याद्वारे योग(दुःखान्त) हे सर्व परस्परपुरकता निर्देश करतात.

याप्रमाणे जीवनात दुःखमुक्त राहण्यासाठी, सकारात्मक राहण्यासाठी, विकासमार्गावर राहण्यासाठी १. नित्य ईश्वराचा आश्रय करुन योगयुक्त असणे २. कार्यसंस्कारित असणे व अनन्यभक्ति साधणे याचे रहस्य भगवतगीता स्पष्ट करते.

व्यावहारिक बोध: समाजात व्यवहार असतो. व्यवहारातच अर्जुनाला अडचण जाणवते. तो Trap होतो. येथे भगवतगीतेचे अध्यात्म सुरु होते, ते याच trapमधुन मुक्तिसाठी. याचाच अर्थ

भगवतगीता व्यवहारविरोधी नाही तर व्यवहाराला सहाय्यक आहे, ज्यामुळे मनुष्याला जीवनाची उच्च पातळी कळते. सुखाचा अनुभव होतो.

प्रत्येक मनुष्य या ज्ञानाचा अधिकारी आहे. ज्याला नित्य ईश्वराचे ठायी राहणे जमते, ईश्वराची नित्य भक्ति साध्य होते, किंवा अनन्यभावाने भक्ति करतो, तो साधुच समजावा.

अपिचेत् सुदुराचारो भजते माम् अनन्यभाक् ।
साधुः एव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः॥(९-३०)

"The man who has submitted his will and purposes entirely to God, carries God with him in all his works and in all circumstances. "
Meister Eckhart

*********

(९. ३०)/२:

"साधु एव स मन्तव्यः सम्यग् व्यवसिता हि सः"
(अनन्यभक्ति)

*पाप आणि निष्क्रियता :
"एका बाईला पापी ठरवुन लोक दगड मारतात. तेंव्हा जीझस म्हणतात, पहिला दगड त्याने उचलावा ज्याने कधीच पाप केले नाही! सर्व हात खाली येतात. "

जगात काय चुकीचे आहे यावर चर्चा होते पण काय करणे योग्य आहे यासाठी कार्य हवे असते. चुकांच्या भयाने ( किंवा परिणामभयाने) मनुष्य कार्यच टाळीत असतो. याच भयामुळे समाजात निष्क्रियतेची संवय जडते. समाजातील निष्क्रियतेची संवय समाजाला आळशी बनविते.
"Nature knows no pause in progress and development, and attaches her curse on all inaction. "
Johann Wolfgang von Goethe

भगवतगीता अर्जुनाच्या निष्क्रियतेला पाप ठरवित आहे.

अथ चेत् त्वं इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि।।(२-३३)

*Interpretation :

भगवतगीतेने जगातील निष्क्रियतेचा रोगच समाजासमोर प्रदर्शित केला आहे. निष्क्रियतेचे समर्थन करुन स्वतःला "आदर्श" दर्शविणे हा सामाजिक रोगच असतो. मी वाईट नाही म्हणुन चांगला आहे, मी चुक केली नाही म्हणुन योग्य आहे. अशा स्वरुपाचा हा मनुष्याचा प्रज्ञावाद असतो. अर्थात स्वतःच्या favor साठी घटनेचे Interpretation असते.

We are the only beings on the planet who lead such rich internal lives that it's not the events that matter most to us, but rather, it's how we interpret those events that will determine how we think about ourselves and how we will act in the future.

Tony Robbins

*Logic of Replacement :

The present system can be changed by Relacement of What is right.

अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो. व निष्क्रियतेला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. चुकांच्या भयामुळे कार्य टाळणे याचे Replacement निष्काम कर्माने भगवतगीता करते.

जगतहीतासाठी प्रत्यक्ष कार्य करणे, अर्थात ईश्वरभक्तिसाठी कार्य करणे हा संदेश भगवतगीता देते. याचसाठी जो मार्ग ईश्वराच्या राज्यात (तद् धाम परमं मम) जातो, त्याच मार्गावर (अमृतत्वाय कल्पते) जीवनयात्रा चालणे या मार्गाचे रहस्य भगवतगीता सांगते. या मार्गावर अनन्यभक्ति (ईश्वराला समर्पित कार्य)घडते.

जगात अनेक चांगल्या कार्याची गरज असते. जेंव्हा मनुष्य काय चुक आहे यावर भाष्य करतो, तेंव्हा त्याला काय योग्य आहे हे कळणे आवश्यक असते. कार्य करणेच मनुष्याच्या अधिकारात आहे. याच कार्याने Replacement करता येते. चांगले कार्य ईश्वरभक्तिसाठी करणे, हे स्वतःच्या संशयावर, अर्थात भयावर Replacement असते.

*Replacement of fear by faith,

निष्क्रियता vs. निष्काम

Action is a great restorer and builder of confidence. Inaction is not only the result, but the cause, of fear. Perhaps the action you take will be successful; perhaps different action or adjustments will have to follow. But any action is better than no action at all.

Norman Vincent Peale

अर्जुनाला स्वतःच्या कार्यात पापाचा संशय येतो आणि यामुळे भय वाटते. निष्क्रिय होतो. याच भयावर Replacement विश्वास असतो. निष्क्रियतेचे कारण ठरलेला संशय/द्वंद्व याला ईश्वरभक्तिने replace केले . याद्वारे निष्काम कर्माचे रहस्य highlight झाले.

अपिचेत् सुदुराचारो भजते माम् अनन्यभाक् ।
साधु एव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः॥(९-३०)

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वत् शांतिं निगच्छति।
कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति॥(९-३१)

******

(९-३१)

************************

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वत् शांतिं निगच्छति।

कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति।।

**************************

(९-३१)विषय ७६५ :

"क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वत् शान्तिं निगच्छति"

(अनन्यभक्ति रहस्य)

भगवदगीतेत ईश्वराची ओळख ज्ञानविज्ञानासह (जड प्रकृति - अक्षरब्रह्म(अव्यक्त)-शाश्वत ईश्वर) स्पष्ट केली आहे. यानुसार ईश्वरच या सृष्टिचे मुळ आहे. विश्वसंचलनात विश्वाचा अध्यक्ष आहे. या विश्वात ईश्वराचा सुप्त संचार आहे, अस्तित्व आहे. या विश्वरुप ईश्वराला जाणणारा अनन्य ठरतो. व त्याची भक्ति अनन्यभक्ति ठरते.

सो अनन्य जाकें असि मति न टरइ हनुमंत।

मैं सेवक सचराचर रुप स्वामि भगवंत
।।(रामचरितमानस/किष्किन्धाकाण्ड दो. ३)

हे चराचर विश्व माझ्या स्वामिचे( ईश्वराचे) रुप आहे व मी त्याचा सेवक आहे. या विचारावरुन ज्याची बुद्धि कधीच विचलित होत नाही तोच अनन्य (केवळ एक, अन्य नाही).

भगवदगीतेत अनन्यभक्ति राजविद्या राजगुह्ययोगाद्वारे (अनन्यभक्तियोग) स्पष्ट होते. कांही विशिष्ट ठिकाणी अनन्य शब्द आलेला आहे.
अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।(८-१४)
अनन्याः चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते।(९-२२)
अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त उपासते।(१२-६)
मयि च अनन्ययोगेन भक्तिः अव्यभिचारिणी।(१३-१०)

व्यवहारात मनुष्य कार्यरत असतो. योगक्षेमासाठी कार्यरत असणे हा व्यवहार (संसार)असतो. या कार्यातील (जीवनमार्गातील) योग्य-अयोग्य, व त्याच्या परिणामातील यश-अपयश याप्रमाणे जीवनमार्गात द्वन्द्व असतो. या द्वन्द्वाला वश असणे हे बंधन ठरते.

द्वन्द्वमुक्तिसाठी मोक्ष म्हटलेले आहे. व्यवहारकार्याला अनन्यभक्तिसाठी Transform करणे (Higher consciousness) हाच महत्वाचा मुद्दा भगवदगीतेने highlight केला आहे.

शुभाशुभफलैः एवं मोक्ष्यसे कर्मबंधनैः।
संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो माम् उपैष्यसि।।(९-२८)

अर्थात व्यवहारात मनुष्य कार्यरत असतो. ईश्वराची विश्वरुपात ओळख जाणुन अनन्यभक्ति करणारा कर्मातील योग्य-अयोग्य या द्वन्द्वापासुन (बन्धनातुन) मुक्त होतो. यासाठी धर्मात्मा (Rightous) शब्द वापरला आहे. व्यवहारात मनुष्य परिणामाला महत्व देतो. पण अनन्यभक्तिमुळे निष्काम असतो . यामुळे शाश्वत शान्ति अनुभवतो.

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वत् शान्तिं निगच्छति।
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति।।(९-३१)

**********

(९-३१):

"न मे भक्तः प्रणश्यति"

ईश्वराला मानणे, जाणणे, ओळखणे अथवा न मानणे, जाणणे वा ओळखणे हा व्यक्तिगत प्रश्न आहे. ईश्वरासाठी कुणीही प्रिय नाही वा ईश्वर कुणाचाही द्वेष्टा नाही. जो ईश्वराला सृष्टिचा अध्यक्ष म्हणुन ओळखतो, त्याचे सार्वभौमत्व( दिव्य जन्म, कर्म )जाणतो व ईश्वराची भक्ति करतो, तो ईश्वराच्या ठायी असतो, ईश्वर (शक्ति) त्याच्या ठायी असते.

समो अहं सर्वभूतेषु न मे द्वेष्यो न अस्ति प्रियः।

ये भजन्ति तु माम् भक्त्या मयि ते तेषु च अपि अहं।।(९-२९)

मनुष्य दुराचारी असला तरी विश्वाचा आधारस्तंभ असलेल्या ईश्वराला जाणतो तेंव्हा निश्चयाने भक्ति करतो, त्यालाही साधुत्व प्राप्त होते. अर्थात ईश्वराची सार्वभौमता जाणुन भक्ति करणारा शिघ्र धर्मात्मा होतो, त्याची भक्ति व्यर्थ जात नाही. या पार्श्वभुमिवर जो चांगला आहे, ज्याची समाजात श्रेष्ठ अशी ओळख आहे, त्याला या सार्वभौम ईश्वराची भक्ति उपयुक्तच ठरणार हे निश्चित आहे.

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वत् शांतिं निगच्छति।

कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति।।(९-३१)

"गहना कर्मणो गतिः"

दुःखामुळे चांगल्या मनुष्याचाही भ्रम होतो. अर्जुन दुःख टाळण्यासाठी नियतकार्याचा त्याग करतो व आपल्या या भूमिकेला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो . आपल्या अज्ञानाला ज्ञानी ठरवितो. या प्रक्रियेत दुःखाला, मार्गातील अडचणीला Deal करण्याचे अर्थात प्रश्न सोडविण्याचे ज्ञान नसते. याच पार्श्वभुमीवर ईश्वरभक्तिचे महत्व स्पष्ट होते.

हे जग दुःखालय आहे. दुःखमुक्तिसाठी, शांतिसाठी ईश्वराच्या भक्तिचे प्रयोजन अनन्यभक्तिद्वारा स्पष्ट केलेले आहे. यानुसार कार्य व्यवहारातील( योगक्षेमासाठी)साधन असले तरी जीवनाचा विकासमार्ग "अमृतंगमय" असतो. हाच जीवनाच्या उच्च साधनेचा मार्ग असतो. भगवतगीतेत या मार्गालाच "अमृतत्वाय कल्पते" (२-१५) असे संबोधले आहे. या मार्गावर (दुःखाने) विचलित होत नाही. कार्याचा एकनिश्चय असतो. कार्य ईश्वराला समर्पित होते. याद्वारा ईश्वराची भक्ति साध्य होते. अर्थात कार्यरत असतांनाही ईश्वराचे नित्य स्मरण असते.

अनन्यः चिंतयन्तो माम् ये जनाः पर्युपासते।

तेषां नित्यअभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।(९-२२)

अर्थात जीवनयात्रेत कार्य घडत असते. या मार्गावर सुखी जीवनासाठी, दुःखमुक्तिसाठी कार्यसंस्कारीत असणे आवश्यक असते. कार्याद्वारे ईश्वराची अनन्यभक्ति हा याच संस्काराचा वा कार्यकौशल्याचा भाग असतो. या संस्कारामुळे "योगक्षेम" हा चिंतेचा विषय नसतो, जणु ईश्वरच त्याची व्यवस्था करतो. याला(Art of Work) भगवतगीता "गहना कर्मणो गतिः" असे संबोधते, ज्यामुळे कर्म अकर्म होते, याचे ज्ञान होते.
अकर्मणश्च बोधव्यं गहना कर्मणो गतिः।(४-१७)

******

(९-३३)

***********************

किं पुनः ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयः विदुः।

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।

*************************

(९-३३) /१: "अनित्यं असुखं लोकं "

मनुष्यजीवन अनित्य आहे हे आपण जाणतोच. याच अनित्याशी सुखदुःखाचा संबंध आहे. म्हणुन श्रीकृष्ण म्हणतात,
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

सर्व जग स्वभावप्रकृतिनुसार जगत असते. सहज नैसर्गिक जगणे (मनाप्रमाणे)मनुष्याला आवडते. याच जगण्यात दुःख येतात, ते आवडत नाही. मनुष्याला जगणे कठिण वाटते. आपल्या याच Natural जगण्यानुसार तो बोलुन व्यक्त करतो, (कठिण आहे!) व स्वतःला comfort करतो. तर दुःख आले असता कुणाला ईश्वराची आठवण होते.

ज्यांना कार्यच कठिण वाटते, ते नुसती चिंता करीत असतात. संस्कारीत कार्यरत होतो व सुखी होतो. आनंदाने जगतो. संस्काराने(प्रकृति, Mindset) त्याची नैसर्गिक प्रकृति बनते. अर्जुन संस्कारित होता. तरी अडचणीत सापडला. अर्जुनासमोर प्रत्यक्ष दुःखाचा प्रसंग निर्माण झाला नव्हता. पण तो जे कार्य करणार होता, त्यामुळे दुःख निर्माण होईल म्हणुन भावी दुःखाने भयभित झाला. स्वतःला Comfort करण्यासाठी आपल्या निष्क्रियतेचे समर्थन करु लागला. येथे कार्यकौशल्य ज्ञान सांगितले. ज्यामुळे "इमं प्राप्य भजस्व माम् " अर्थात कार्याद्वारे भक्तिचे तत्व सांगितले.

निर्णयक्षमता (Decisiveness)

Decisiveness is defined as being “characterized by firmness and decision. ” Being decisive means that you have the ability to decide. Instead of being decisive, most people procrastinate. They don’t spend more time researching but simply avoid the decision entirely. Without a decision no progress can be made.

Decisiveness is both a skill you can build and an internal state you can summon when you need it. Leadership requires that you are able to make key decisions effectively. Decisiveness then simply means being the leader of your own life.

जीवनात निर्णयक्षमता फार महत्वाची आहे. तीच मनुष्याला श्रेष्ठ बनविते. परिणामाच्या भयाने मनुष्य निर्णय टाळतो. ज्यांना निर्णयक्षमता नसते, त्यांना त्यांचे निर्णय घेण्यासाठी इतरांची गरज पडते. अपयश आले तर इतरावर दोष ढकलुन मोकळा होतो. स्वतःचे अज्ञान स्विकारीत नाही. अर्थात बेजबाबदार ठरतो. मनुष्याचे भाष्यच त्याची (जबाबदार-बेजबाबदार, ज्ञानी-अज्ञानी) ओळख देते. जसे अर्जुनाने ओळख दिली. म्हणुन स्वतःच्या जीवनाची जबाबदारी घेणे हाच भगवतगीतेचा महत्वाचा संदेश आहे.

निर्णयक्षमता या संदर्भात परिणामभय हेच कार्य टाळण्याचे कारण असते. म्हणुन कार्याद्वारे भक्ति/"इमं प्राप्य भजस्व माम् " या

संदर्भात फलत्याग महत्व सांगीतले. अर्जुन संन्यास व त्याग(अ. १८चा प्रश्न) यांतील भेद विचारतो. उत्तर मिळते,

कुणी कर्म काम्य आहे म्हणुन कर्माचा त्याग याला संन्यास म्हणतात, पण कर्म करुन फलत्याग करणे याद्वारे भक्ति साध्य होते. शांती, शक्ति(योग) प्राप्त होते.

"त्यागात् शांतिः अनंतरम् "(१२-१२)

मनुष्यजीवनात दुःख आहे म्हणुनच मनुष्याला जीवनाच्या वरच्या पायरीवर चढता येते. विकासाचे महत्व कळते. भगवतगीता "अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् " याद्वारे जीवनविकासाचा संदेश देते. ज्यांत ज्ञान, कर्म, भक्ति यांचा मेळ असतो.

ज्ञान: ईश्वरस्मरण -वास्तवाचा स्विकार हे ज्ञानप्राप्तिचे द्वार. व तेच शाश्वत धाम. म्हणुन अमृतंगमय हा जीवनविकासाचा राजमार्ग होतो. (राजविद्या)

कर्म : कर्माद्वारा भक्ति होण्यासाठी कार्यकौशल्य ज्ञान(स्वधर्म-Self approval, Decesiveness)

भक्ति: फलत्याग (निष्काम कर्म) "इमं प्राप्य भजस्व माम्"

*************

(९-३३)/२:

"अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् "

(Dealing distress)

प्रत्येक मनुष्य Unique असतो. त्याची प्रतिभा, त्याचा चांगलेपणाही unique asset असते. समाजात चांगले-वाईट या विषयावर चर्चा होतात. मनुष्याने समाजात चांगले वागावे व समाज चांगला व्हावा यासाठी धर्मज्ञान, उपदेश चालुच असतात. चालुच राहणार. पण चांगलेपणा निष्क्रिय होणे समाजासाठी तर हीताचे नसतेच पण मनुष्याच्या व्यक्तिगत कल्याणाचे नसते. याच महत्वाच्या मुद्यावर भगवतगीतेने प्रकाश टाकला आहे.

सामान्य जीवन जगणे यात मनुष्याचा दोष नसतो पण जे अद्भुत जीवन मनुष्याला मिळाले आहे त्याची नीट ओळख करुन घेणे मनुष्याचे दायित्व ठरते.

जीवनात नकारात्मक असणे, (तुलना, Judgement thinking वापरुन )जगावर टिका करुन आपला चांगलेपणा दर्शविण्याचा प्रयत्न करणे, भयग्रस्त असणे, चिंतातुर असणे, हताश असणे दुर्बलतेचे, अज्ञानाचे लक्षण असते.

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदं एव च।
न विमुच्यञ्ति दुर्मेधा धृति सा पार्थ तामसी।(१८-३५)

जीवन आहे म्हणुन मनुष्य जगत असतो. जीवनात सुखी होणे या इच्छेने जीवनयात्रा चालत असते. नित्य सुखी असावे ही इच्छा असली तरी जीवनात दुःखी होणे ही नैसर्गिक (मानसिक)क्रिया आहे. याच सुखदुःखाचा संबंध मनुष्याच्या जगण्याशी असतो, त्याच्या मानसिक क्षमतेशी असतो, दुर्बल किंवा सक्षम व्यक्तिमत्वाशी असतो.

दुःखी झाल्यावर मनुष्य कधी आपले दुःख व्यक्त करतो. चर्चा करतो. कधी तो व्यावहारिक विषय असतो. पांडवावर अन्याय होणे हा व्यावहारिक विषय असल्यामुळेच अधिकाराचा विषय येतो व धर्मयुद्ध declare होते. पण प्रत्यक्ष कृति करण्याची वेळ आली असता ठरलेले कार्य चुकीचे आहे असे भाष्य अर्जुन करतो. येथे हा व्यक्तिगत विकासाचा(आत्मविकासाचा) प्रश्न बनतो.

जीवन सुखी व्हावे, जीवनात प्रगति साधावी, जीवन सफल व्हावे या हेतुने मनुष्य शिक्षण घेतो, संस्कारीत होतो. व्यवहारज्ञान, धर्मज्ञान घेतो. जीवन जगतांना हे सर्व उपयोगात आणतो. मनुष्याला इच्छेप्रमाणे Response मिळाला नाही, परिणाम मिळाला नाही तर निराश होतो, दुःखी होतो. दुःखावर उपाय करतो. तो जे प्रत्यक्षात जगतो, तोच त्याचा उपाय असतो. असाच अर्जुन जीवनयात्रेत दुःखी होतो. त्याची दुःखी झाल्यावरची प्रतिक्रिया विषादयोगात स्पष्ट झाली आहे. व्यवहारात चांगले Intention असुनही, चांगला मनुष्य दुःखी झाल्यावर त्याच्या जगण्यावर काय परिणाम होतो हे विषादयोगात स्पष्ट होते. अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करुन त्याला धर्म संबोधतो. हा अर्जुनाचा Comfort zone असतो.

"The comfort zone is the great enemy to creativity; moving beyond it necessitates intuition, which in turn configures new perspectives and conquers fears. "

Dan Stevens

चांगलेपणाची मानवकल्याणासाठी नेहमीच गरज असते. पण यासाठी चांगलेपणा दुबळा ठरायला नको म्हणुन चांगल्या मनुष्याला भ्रमातुन मुक्त करण्यासाठी भगवतगीता संदेश देत आहे,

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

प्रत्येक जीवनाचा, चांगला असला तरी, विद्वान असला तरी दुःखाशी सामना असतो, कारण मनुष्याचा जन्मच दुःखालयात झालेला आहे. याच पार्श्वभूमिवर ईश्वर श्रीकृष्णाच्या माध्यमातुन सांगत आहे,

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

अर्थात जीवनमार्गात ईश्वराची भूमिका "अमृतत्वाय कल्पते" या महामार्गाशी आहे. श्रेष्ठ मनुष्याची जीवनयात्रा याच महामार्गावर चालत असते. या मार्गावर तो व्यथीत होत नाही. व यामुळे दुबळा ठरत नाही. तर विकासमार्गावर असतो. त्याच्या कार्याची भूमिका "योगः कर्मसु कौशलम् " अशी असते.

********

(९-३४)

***********************

मन्मना भव मद् भक्तो मद् याजी मां नमस्कुरु।

मामेव एष्यसि युक्त्वा एवं आत्मानं मत्परायणः।।

***********************

(९-३४) :

" मामेव एष्यसि युक्त्वा एवं आत्मानं मत्परायणः"

(OMG)

संपुर्ण जगात OMG प्रसिद्ध आहे. मनुष्याला ईश्वर हवा असतो पण देणारा देव हवा असतो. तो(मनुष्य) जसा आहे तसा स्विकार करणारा देव हवा असतो. अर्जुनाला कांहीच हवे नव्हते तरी त्याला त्याची चुक दर्शवुन ज्ञान सांगणारा ईश्वर भेटतो.

मनुष्य आपले मन आपले सख्य असणाऱ्याजवळ मोकळे करतो. त्याच्या "हो" मध्ये हो मिळविणारा सखा त्याला प्रिय असतो. चुका काढणारा व ज्ञान सांगणारा नको असतो. सखा या नात्यानेच

अर्जुन श्रीकृष्णाजवळ आपले मन मोकळे करतो व ठरलेले युद्ध करणे पाप आहे म्हणुन मी युद्ध करणार नाही असे भाष्य करतो.

विश्वातील प्रश्न सोडविण्यासाठी श्रीरामाची भूमिका रामायणात आहे. व्यक्तिगत सुखदुःख या संदर्भात श्रीरामाला वनवास ही घटना सामान्यांना अनाकलनिय असते. यावर रामायणात भाष्य आहे. या घटनेला ईश्वरगति संबोधले आहे.

और करै अपराधु कोउ और पाव फल भोगु।

अति बिचित्र भगवंत गति को जग जानै जोगु।।(अयोध्याकांड दो. ७७)

ईश्वर विश्वाचा अध्यक्ष असतो. या नात्याने विश्वात जे घडते त्याचा मनुष्याशी असलेला संबंध ईश्वरगति ठरते. अर्जुन चांगला मनुष्य असतो. त्याला जे नियतकार्य लाभले असते त्याचा विश्वकल्याणाशी संबंध असतो. (विश्वरुपदर्शनात हे स्पष्ट होते). पण अर्जुन हे रहस्य जाणत नाही. तो व्यक्तिगत सुखदुःखाला महत्व देतो. म्हणुन श्रेष्ठ मनुष्याची भूमिका व त्याचा मार्ग या आधारावर सखा या नात्यानेच श्रीकृष्ण समज देतात.

तुझ्यासारख्या श्रेष्ठ मनुष्याला अशा कठिणप्रसंगी मनोदुर्बलता अशोभनिय आहे. अर्थात ठरल्याप्रमाणे युद्ध करणे योग्य आहे हेच श्रीकृष्णाला सांगायचे असते. अर्जुन आपल्या संशयाची कबुली देतो. पण या कार्याचे परिणाम दुःखद आहे, आपल्या सोयीचे नाही हे स्पष्टपणे सांगतो.

(मनुष्याला जगातील प्रश्नाचे(समस्येचे) ज्ञान असते पण त्याचे उत्तर त्याच्याजवळ नसते. एखाद्याजवळ उत्तर असले तरी ते परिणाम या संदर्भात त्याच्या सोयीचे नसते. म्हणुन ते इतरांनी सोडवावे अशी अपेक्षा करतो व स्वतः सरळ निष्क्रियता पत्करतो. "ना रहे बांस ना बजे बांसुरी")

समाजात स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी प्रज्ञावादाचा (Advocacy) वापर होतो. श्रीकृष्ण स्पष्टिकरण देतांना सर्वप्रथम याच प्रज्ञावादाचा समाचार घेतात. जी अर्जुनाची धर्माविषयी विचारसरणी(Belief system)असते व ज्या आधारावर नियतकार्याला पाप ठरविले असते, त्याच विचारसरणीचा/ ज्ञानाचा आधार घेवुन "निष्क्रियता म्हणजे स्वधर्म टाळणे" याला पाप संबोधुन अपकिर्तीचे कारण दर्शवितात.

यानंतर भगवतगीतेचे बंधन-मोक्ष या संदर्भात Exclusive ज्ञान सुरु होते. येथे प्रज्ञावादाला वाव नसतो. या ज्ञानाला बुद्धियोग संबोधले आहे.

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिः योगे तु इमां शृणु।
बुद् द्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि॥(२-३९)

हे ज्ञान Beyond Right-Wrong असते. म्हणुन "कर्मबंधं प्रहास्यसि", असे संबोधन केले आहे.

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥(२-५०)

१. संस्कार या संदर्भात युक्त-अयुक्त असा भेद केलेला आहे. युक्त निष्काम असतो. कर्माद्वारे समत्वयोग साध्य करतो. यांत कार्याचा एकनिश्चय असतो. याच संदर्भात समाधौ अचला बुद्धिः तदा योगम् अवाप्स्यसि।(२-५३)

असे संबोधन आहे. याच संदर्भात स्थितप्रज्ञ यावर भाष्य होते.

२. मनुष्याच्या हृदयी ईश्वराचा अंश आहे जो विश्वाचा अध्यक्ष आहे. हाच आधार Standard मार्गाचा (अमृतत्वाय कल्पते) आहे. ईश्वराचा आश्रय करुन बुद्धियुक्त असणे हे अभिप्रेत आहे. येथे बुद्धियोग Higher consciousness/आत्मवश अवस्था दर्शविते.

ज्या जगात मनुष्याचा जन्म झाला ते दुःखालय आहे. मनुष्य ज्या Consciousness वर सुखासाठी जगतो, त्याच पातळीवर दुःख येते. म्हणुन पातळीबदल हा भगवतगीतेचा संदेश आहे.

"The significant problems we face cannot be solved at the same level of thinking we were at when we created them. "

~ Albert Einstein

पातळीबदल याचसाठी ईश्वराचा आश्रय हा भगवतगीतेचा संदेश आहे.

अनित्य असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

मन्मना भव मद् भक्तो मद् याजी मां नमस्कुरु।
मामेव एष्यसि युक्त्वा एवं आत्मानं मत्परायणः।।(९-३४)

सार :मनुष्यजीवनातील जन्म-मृत्यु, सुख-दुःख, ईश्वरगति, अधर्माचा उदय व धर्मस्थापना यांतील मनुष्याची भूमिका याचे सविज्ञान स्पष्टिकरण भगवतगीतेने केलेले आहे. यासाठी "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च" हा धर्मस्थापनेचा संदेश भगवतगीता देते. याचसाठी सत्ता आणि शक्तिच्या स्पर्धेत असुरी शक्तिची विचारसरणी कशी असते हे भगवतगीता स्पष्ट करते.
असत्यं अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनीश्वरम् ।
अपरस्परसंभूतं किम् अन्यत् कामहैतुकम् ।(१६-८)

हे विश्व ईश्वराने जोडलेले आहे या सत्यावर विश्वास नसतो. व स्पर्धेत स्वतःला शक्तिमान ठरवितो.
ईश्वरोअहं अहं भोगी सिद्धोअहं बलवान सुखी।(१६-१४)

*******

# भगवदगीता

# अध्याय १०

# विभूतियोग

अध्याय १०

विभूतियोग

अनन्ययोग(राजयोग)व विभूतियोग हे दोन्ही(९व१०) अध्याय भगवतगीतेत मध्यभागी आलेले आहे. मानवविकास, जगतकल्याण या संदर्भात दोन्ही महत्वाचे ठरतात.

अध्याय ७ व ८ मधुन ईश्वराची" मुळ पुरुष "अशी वैज्ञानिक ओळख होते. ९ मधुन ईश्वराची सृष्टिचा अध्यक्ष या भूमिकेतुन ओळख होते. याच ईश्वराशी प्रत्यक्ष जोडण्याचे शास्त्र राजयोग आहे. मनुष्याची जीवनयात्रा राजमार्गावर (अमृतंगमय) असते. विभूतियोगात दिव्यगुणांचा धारक व प्रेरक (God the Motivator) या भूमिकेतुन ओळख होते.

याच संदर्भात हा अध्याय दोन भागात विभागला आहे.

१०. १ God, The Motivator

१०. २ God, The Creator

---

१०. १ God, The Motivator

स्का ॅटिश तत्वज्ञ था ॅमस कार्लाईल याचे विभूति या विषयावर "Heroes, Hero-Worship, and the Heroic in History, On, by Thomas Carlyle. हे पुस्तक प्रसिद्ध आहे. जगतकल्याणासाठी पुराणातिल तसेच इतिहासातील सहा प्रकारच्या नायकांच्या विविध गुणांची ओळख यातुन केलेली आहे.

The Hero as Divinity. (देवदेवता)

The Hero as Prophet. (धर्मसंस्थापक)

The Hero as Poet. (कवी, कलालेखक)

The Hero as Priest. (आचार्य, पुजारी)

The Hero as Man of Letters. (इतिहासकार, प्राचिन संपदा लेखनातुन व्यक्त करुन जगासमोर आणणारे)

The Hero as King. (शुर राजा)

या नायकांच्या गुणांची ओळख व्हावी व ती ओळख विकासासाठी, जगतकल्याणासाठी प्रेरक व्हावी ज्याद्वारे भावी

पिढि विकासाच्या योग्य दिशेने वाटचाल करण्यास समर्थ होईल. हा हेतु यामागिल आहे.

या सृष्टित जगतांना मनुष्यातील दिव्यभाव विकासाला प्रेरक व कारण ठरतात. ईश्वराच्या दिव्य भावाची श्रीकृष्ण ओळख करुन देतात यालाच विभूति म्हणतात. जगतकल्याण, निर्मिति व पोषण या भूमिकेतुन ईश्वराला जाणणारे ज्ञानीजन श्रद्धेने ईश्वराच्या( Creater )या भूमिकेवर श्रद्धेने परस्पर चर्चा करतात. या ज्ञानांत रमतात. अशा भक्तांना ईश्वर बुद्धियोग प्रदान करतो.

जीवनातील अज्ञान मिटुन त्याची जीवनयात्रा (अमृतंगमय) ईश्वरधामाच्या महामार्गावर गतिमान होत असते. अर्थात विकासमार्गावर असते. हेच ईश्वराचे Motivation ठरते.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

Motivation म्हटले कि रमणे हा विषय येतो. व रमण्यासाठी कलेचा वापर होतो. किर्तनकार, प्रवचनकार श्रोत्यांना ईश्वरनामांत रमवतात. तर येथे रमविण्याचा विषय God, the Creator जगाचा निर्माता, प्रवर्तक असा असतो.

१०. २ God, The Creator

ईश्वराचा नित्य आश्रय होण्यासाठी ईश्वर चिंतन कसे करायचे?या विश्वात ईश्वराची उपस्थिति कोणत्या विभूतिच्या माध्यमातुन जाणायची? असा अर्जुनाचा प्रश्न असतो.

१. सकारात्मक दृष्टि. ( Perception)

"विश्वातील सर्व चांगले विचार आमच्यापर्यंत पोहोचु दे" अशी ईश्वरप्रार्थना आहे. मनुष्यालाच हंसाप्रमाणे दिव्य गुणांचा शोध घ्यायचा आहे. ईश्वराचा आश्रय ही दृष्टि धारण करते. याच संदर्भात विभूतियोगाचे महत्व आहे.

"माझे ते चांगले व दुसऱ्याचे ते वाईट " या दुषित दृष्टिमुळे मनुष्याला टिका करण्याची संवय जडते. नकारात्मक होतो व ईश्वराच्या दिव्य गुणांपासुन वंचित राहतो. ईश्वराचा आश्रय म्हणजे दृष्टिबदल हा संदेश मिळतो.

२. कल्याण निश्चित. (सकारात्मक भाव)

जगतप्रवर्तक या संदर्भात विभूतिंचे वर्णन आहे. ईश्वरकार्याचा आढावा समुद्रमंथन व नंतर अवतारकार्य यातुन घेतला आहे. अवतारकार्यातील Hero ना विभूति दर्शविले. प्रह्लाद, राम व नंतर वर्तमानात कृष्ण असा उल्लेख आहे. वर्तमानातील अवतार Hero ची ओळख देतांना विभूति या संदर्भात श्रीकृष्णाने स्वतःची ओळख" वृष्णिनां वासुदेवो अस्मि", रामाची ओळख "रामः शस्त्रभृतां अहं"प्रह्लादाची ओळख "प्रह्लादश्च अस्मि दैत्यानां" अशी करुन दिली.

वर्तमानांत अर्जुनाची विभूति ओळख "पांडवानां धनंजय" अशी दिली.

जगत कल्याणासाठी ईश्वराचे कार्य नित्य सुरु आहे हा यातुन संदेश मिळतो.

३. आम्ही मानव आहोत.

कार्लायलने धर्मसंस्थापकांना Hero दर्शविले. पण त्यांच्या चमत्कारासाठी नव्हे तर त्यांना वीरत्व प्रदान करणाऱ्या दिव्य गुणांसाठी. आपल्यासोबत मनुष्यरुपांत कुणी साक्षात ईश्वर आहे, ही संकल्पना त्या विशिष्ट काळाची उपज आहे, असे जाणुन वर्तमानात आपण सर्व मानवसमुहात जगत आहोत, याची जाणिव

ठेवुन दिव्य गुणांची धारणा होण्यासाठी त्याचा आदर करणे महत्वाचे आहे. म्हणुनच श्रीकृष्णाने स्वतःची ओळख "वृष्णिनां वासुदेवो अस्मि" अशी दिली. व अर्जुनाचे सारथी बनले. श्रेष्ठांनी गरज नसली तरी कर्माचा आदर्श ठेवावा हे यामागिल कारण सांगितले.

४. Strength उर्जाशक्ति

विभूतिंची ओळख देतांना विश्वातील विविध समुहाचा उल्लेख केला व त्या समुहात श्रेष्ठ highlight केले. दिव्य विभूतिची व्याख्याच अशी केली,
"यत् यत् विभूति मत् सत्वं श्रीमतं उर्जितम् एव वा।"
अर्थात या विश्वात जे जे समृद्ध व उर्जायुक्त आहे, ते सर्व ईश्वराची दिव्यशक्तिरुपाने विभूति ठरते.

५. दिव्य(Divine) या संदर्भात कार्लायलने धर्म, देवता, मुर्तिपुजा यांचा आढावा घेतला. भूतकाळात जे घडुन गेले ते परत येणार नाही. बदलणे, नष्ट होणे व पुनर्निर्मिति हाच निसर्गाचा नियम आहे. मनुष्याचा वर्तमान उर्जायुक्त समृद्ध व्हावा, कल्याणदायी व्हावा याचसाठी Hero या संदर्भात वीरत्वाचे पूजन म्हटले. वीरत्व

जगात नेहमीच पुजनिय राहिल व वीरत्वाचे दर्शन वर्तमानात प्रेरक ठरते.

विभूतियोगात Masculine divine या संदर्भात विष्णु(आदित्य)), शंकर(रुद्र) असे देवतांचे तर Feminine devine या संदर्भात(किर्ति श्रीवाक् च नारिणां स्मृतिः मेधा धृतिः क्षमा)) लक्ष्मि(श्री)सरस्वती(वाक्) यांचा उल्लेख आलेला आहे. तसेच देवलोकांतील इंद्र(देवलोक), पावक(वसु), मरिचि (मरुत), चित्ररथ(गंधर्व) असा उल्लेख आहे.

६. कार्लायलने Hero the Poet या संदर्भात शेक्सपियरला Hero ठरविले, जो आपल्या नाटकांतुन विविध मानवी गुणांचे दर्शन घडवितो. मानवांच्या समुहात राजा श्रेष्ठ(नराणां च नराधिपम् ) यांत नेपोलियनला Hero ठरविले. याशिवाय इतिहासकार लेखक, आचार्य अशा समुहातील Hero चे दर्शन कार्लायलने घडविले तर भगवतगीतेत रुषि(भृगु), कवि(उशना), पुरोहित(बृहस्पति), लेखक(व्यास), सिद्ध मुनि(कपिल) अशा विविध समुहाचा उल्लेख आलेला आहे.

७. याव्यतिरिक्त भगवतगीतेत मनुष्य, प्राणि, वृक्ष, काळ, जड, चेतन अशा संपुर्ण विश्वात अस्तित्वात असलेल्या समुहाचा उल्लेख आलेला आहे. याशिवाय वर्तमानात जगत् संचलनातील (प्रशासकिय, व्यवस्थापनिय, कला) विविध गुणांचे दर्शन विभूतिरुपाने (तेज, जय, कार्याचा निश्चय, दण्ड, मौन, ज्ञान, इ. ) घडविले आहे.

याप्रमाणे सर्वव्यापी ईश्वराचे दर्शन विभूतियोगाद्वारे स्पष्ट केले. मनुष्यातील सुप्त गुणांची ओळख व्हावी, सकारात्मक गुण वृद्धिगत करावे व Goal च्या दिशेने वाटचाल व्हावी या हेतुने Motivators ची भूमिका असते. श्रीकृष्णांची हीच भूमिका येथे" ईश्वराची ओळख" या संदर्भात स्पष्ठ होते.

**********

अध्याय १०- मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

१०. ८/१:"अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते"

१०. ८/२ : "इति मत्वा भजन्ते माम् बुधा भाव समन्विताः"

(विश्वचालकाची ओळख करुन स्वतःची भूमिका जाणणे)

१०-९/१ :

"कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च "

(वासुदेवमय विश्व)

१०-९/२ :

"मत् चित्ता मद् गत प्राणा बोधयन्तः परस्परं।"

कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ।।

कर्ता(अहंकार) vs अकर्ता(बुद्धियोग)

(१०-१०)/१ :

"तेषां सततयुक्तानां भजतां प्रितिपूर्वकम्"

(बंधनमुक्ति Tiebreaker)

(१०-१०)/२:"ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते"

१०. १०/३ :" ददामि बुद्धियोगं तं "

( Change)

(१०-११)/१: "तेषामेव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजं तमः"

(१०-११)/२ :

"तेषामेव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजं तमः"

(अज्ञानाचा, अंधाराचा नाश)

१०-११/३:"नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता"

(Enlightenment)

(१०-११)/४:

"नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता"

(Everyone walks his own path)

१०. १७ : "कथं विद्यां अहं योगींस्त्वां सदा परिचिंतयन् ?

(Thinking God as creator for Self motivation)

(१०-२२) :

"इंद्रियाणां मनश्चअस्मि भूतानाम्अस्मि चेतना"

(मन Mind -चेतना Consciousness)

(१०. २७):"नराणां च नराधिपम् "

(Divine qualities of King/The Leader/The Orgoniser-योजक)

१०-३०/१ :

" प्रल्हादश्च अस्मि दैत्यानां"

(चांगलेपणा ईश्वराची दिव्य विभूति)

(१०-३०)/२ :

"कालः कलयताम् अहम्"

(The Time)

१०-३०/३:"मृगाणां च मृगेंद्रो अहं वैनतेयश्च पक्षिणाम् "

१०-३०/४:"मृगाणां च मृगेंद्रो अहं"

१०-३२/१:

"सर्गाणाम् आदिः अंतः च मध्यं चैव अहं अर्जुन"

(Creative world &Creatures)

१०. ३२/२:

"अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदताम् अहम्"

(१०-३२)/३ :

"वादः प्रवदताम् अहम्"

(भाष्य)

(१०-३३):

"अहमेव अक्षयः कालो धाता अहं विश्वतोमुखः"

(ईश्वरगति)

(१०-३६)/१ :

"तेजः तेजस्विनाम् अहम् "

(जीवनयात्रेतील दुर्बलता vs. सक्षमता)

(१०-३६)/२:

"जयोअस्मि व्यवसायोअस्मि सत्त्वम् सत्त्वमताम् अहं"

(The world of Winners)

(१०-३८)/१:"नीतिअस्मि जिगीषताम् "

(Morality of Winners)

(१०-३८)/२ :"नीतिःअस्मि जिगीषताम् "

(Art of success)

१०-३८/३ :"ज्ञानम् ज्ञानवताम् अहं"

(१०-४०) :

"न अन्तो अस्ति मम दिव्यानां विभूतिनां परंतप"

(God as Motivator)

१०. ४१/१: "श्रीमत् उर्जितमेव वा"

Think of Prosperity

१०. ४१/२:"मम तेजोअंश संभवम् "

(विश्वातील ऐश्वर्याचा प्रकाश)

******

(१०-८)

************************

अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।

इति मत्वा भजन्ते माम् बुधाभाव समन्विताः।।

**************************

(१०-८):"अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते"

भगवतगीतेत ईश्वराची निश्चित(अखिल सृष्टिचा प्रवर्तक)ओळख आलेली आहे. बहुतेक धर्मात ईश्वराचा उल्लेख आलेला आहे. जगात असे अनेक धर्म आलेत.

धर्मामुळे निश्चित संस्कार असतात व हेच अपेक्षित असते. धर्मगति जाणणारे (अडचणीतही विशेष संधी जाणुन) निश्चित मार्गावर असतात . धर्मासाठी वनवास या संदर्भात श्रीराम मातेला म्हणतात,

धरम धुरीन धरम गति जानी।कहेउ मातु सन अति मृदु बानी।पिता दीन्ह मोहे कानन राजू।जहॅ॑ सब भांति मोर बड काजू।(रामायण-अयोध्याकांड ५२-३)

(धर्मगति या संदर्भात)यांत दोन भाग येतात:

१. Morality संदर्भात काय योग्य व काय अयोग्य.

२. मार्गातील दृढता, निश्चितता .

भगवतगीता ठामपणे दुसऱ्या भागाचे(निश्चितता) महत्व स्पष्ट करते. धर्मज्ञान या संदर्भात "स्वधर्म"निश्चितता (कार्याचा निश्चय) देते. तरी निश्चितता ढळली तर?

याचे कारण भगवतगीता स्पष्ट करते. धर्मातील 'काय योग्य काय अयोग्य 'या संदर्भात स्वर्गप्राप्तिसाठी विशेष कार्याचा उल्लेख असतो.

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।

क्रिया विशेष बहुलां भोगैश्वर्य गतिंप्रतिः॥(२-४३)

भोगैश्वर्य प्रसक्तानां तया अपहृत चेतसाम् ।

व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते॥(२-४४)

हे सकाम ज्ञान असल्यामुळे निश्चय होत नाही. व यावर उपाय बुद्धियोगनिष्ठा सांगितली. यांत ईश्वराची ओळख आहे. हे ज्ञान जाणुन बुद्धियोगी होणे अपेक्षित असते.

अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।(१०-८)
ददामि बुद्धियोगं तं येन उपयान्ति ते।।(१०-१०)

ईश्वराच्या या ज्ञानासमोर (काय योग्य काय अयोग्य असे) धर्मज्ञान सर्वत्र जलमय झाले असता विहिरीसमान असते.
(यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके २-४६)

बुद्धियोगनिष्ठेमुळे कार्याचा दृढनिश्चय होतो.
व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।
बहुशाखा हि अनन्ताश्च बुद्धयोः अव्यवसायीनाम् ।।(२-४१)

बुद्धियोगनिष्ठेमुळे युक्त(निष्काम)होतो व चंचलतेवर मात होते.
चंचल करणारे धर्मातील( "योग्य-अयोग्य ")सकाम ज्ञान यावर मात होते व फक्त (योग)भक्तिसाठी कार्य घडते.

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

व्यावहारिक बोध :

धर्मामुळे Strong(निर्भय) होणे अपेक्षित असते. अर्जुन दुबळा झाला व अज्ञानाला ज्ञान संबोधु लागला. म्हणुन जगातील धर्मज्ञान या विषयावरच भगवतगीता भाष्य करते. व सक्षम होण्यासाठी जीवनमार्गातील "निश्चितता vs चंचलता" यांतील भेद व महत्व स्पष्ट केले आहे. यासाठी निर्णयअधिकार हे साधन आहे. म्हणुन ज्ञान सांगितल्यावर "निर्णय तुला घ्यायचा आहे" असे अर्जुनाला संबोधले. "काय योग्य" यावर भाष्य होवु शकते, पण निर्णय कर्त्याला घ्यावा लागतो हाच व्यावहारिक बोध येथे सिद्ध होतो.

******

१०.८ :

"इति मत्वा भजन्ते माम् बुधा भाव समन्विताः"

(विश्वचालकाची ओळख करुन स्वतःची भूमिका जाणणे)

विश्वाचे संचलन या संदर्भात ईश्वर विश्वाचा अध्यक्ष असतो. याच ईश्वराची निश्चित ओळख ज्ञानविज्ञान या संदर्भात भगवतगीतेत दिलेली आहे. तसेच Consciousness (क्षेत्रज्ञ) या संदर्भात मनुष्यजीवनाशी नाते स्पष्ट होते. भगवतगीतेत म्हटल्याप्रमाणे

मनुष्यजीवनाचा विकासमार्ग "अमृतत्वाय कल्पते" याच ज्ञानामुळे होतो.

अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।
इति मत्वा भजन्ते माम् बुधा भाव समन्विताः।।(१०-८)

ईश्वराच्या ज्ञानामुळे विश्वसंचलनात, मनुष्यजीवनात संदेश मिळत असतात. यामुळे स्वतःच्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन (Perception)बदलतो. मनुष्यजीवनात विकासाची(आत्मोन्नति) संधी मिळत असते, ज्यामुळे Higher consciousness वर कार्यरत असतो. निष्काम कार्यरत असतो. ईश्वराची भक्ति साध्य करतो. निर्भयता लाभते.

अर्जुनाला युद्धक्षेत्रावर दुःख झाले पण याच घटनेमुळे भगवतगीता जगासमोर आली. जे कार्य विश्वसंचलनात आवश्यक आहे त्याच कार्याची अर्जुनाला ईश्वराने संधी दिलेली असते. पण (ईश्वराच्या अज्ञानामुळे) त्याच कार्याला अर्जुन पापकार्य ठरवितो. प्रत्यक्षात हीच ईश्वरभक्तिची संधी असते. ईश्वराच्या ज्ञानामुळे सत्कृत्य(पुण्य)-दुष्कृत्य(पाप) या द्वन्द्वापासुन मुक्त होतो.

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

याचाच अर्थ जसे सृष्टिसंचलनात ईश्वराची भूमिका असते, तसेच मनुष्याच्या जीवनविकासात ईश्वराच्या भूमिकेचे महत्व असते. याच ज्ञानाच्या अभावी मनुष्य या जगात स्वतःला दुबळा समजुन बघ्याची भूमिका घेतो. मनुष्य या विश्वातील खेळाडु/नायक आहे हे जाणत नाही.

सार:

"Every moment is an organizing opportunity, every person a potential activist, every minute a chance to change the world. "

- Dolores Huerta

स्वतःच्या जीवनमार्गात अज्ञानामुळे मनुष्य धर्माला अधर्म व अधर्माला धर्म ठरवितो. अर्थात योग्यला अयोग्य व अयोग्यला योग्य ठरवितो. अर्जुन स्वतःच्या नियतकार्याला अधर्म(पापकर्म) ठरवितो. ईश्वरज्ञानामुळे Perception बदलते. हीच घटना विकासाची(आत्मोन्नति) संधी असते. धर्म-अधर्म ठरवितांना जो द्वन्द्व निर्माण होतो, त्या द्वन्द्वापासुन मुक्त होतो. कार्याचा एकनिश्चय होतो. व (शक्ति)साधनेसाठी कार्य हे कौशल्य साध्य होते.

*******

(१०-९)

************************

मत् चित्ता मद् गत् प्राणा बोधयन्तः परस्परं।

कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च।।

**************************

१०-९ :

"कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च "

(वासुदेवमय विश्व)

किर्तन, भजन यांत ईश्वराच्या ज्ञानात कथन करणारे व ऐकणारे दोघेही रमतात, आनंद घेतात. सृष्टिचे उगमस्थान, विश्वाचा संचालक अर्थात विश्वाचा अध्यक्ष अशी भगवतगीता ईश्वराची ओळख देते. या नात्याने ईश्वराला जाणणारे त्याचे परस्पर कथन करतात, भजतात त्यांना बुद्धियोग ही कृपा लाभते, ज्यामुळे अज्ञानाचा अंधार मिटतो. निश्चित मार्गावर त्यांचा जीवनप्रवास होतो.

अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।(१०-८)

कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ।(१०-९)
ददामि बुद्धियोगं तं येन् माम् उपयान्ति ते।(१०-१०)

या ईश्वराचे नित्य चिंतन कसे करायचे? हा अर्जुनाचा प्रश्न असतो.
कथं विद्याम् अहं योगीं त्वाम् सदा परिचिंतयन् ।
केषु केषु च भावोषु चिंत्योअसि भगवन् मया।।(१०-

विश्वाचे Existence व त्यातील विविध शक्ति, विश्वाच्या संचलनात अमृतमंथन, अवतारकार्य, वर्तमानातील व्यवस्थापनातील शक्ति (तेज, जय, कार्यप्रतिभा State of art, नीति, मौन इ. ) अर्थात हे जग वासुदेवमयच आहे. व या जगातील ज्या उर्जामय(श्रीमतं उर्जितम् ) ऐश्वर्यमय शक्ति आहे त्या ईश्वराच्या विभुति जाणणे. अर्थात ईश्वराच्या एका अंशापासुन सर्व शक्ति संचालित असतात.

विष्टभि अहं इदं कृत्स्नं एक अंशेन् स्थितो जगत् ।(१०-४२)

"God's designs may be frequent justification for our actions, but it is we, the self-made men, who take the credit".

Arthur Erickson

*

१०-९:

"मत् चित्ता मद् गत प्राणा बोधयन्तः परस्परं।"

कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ।।

कर्ता(अहंकार) vs अकर्ता(बुद्धियोग)

मन, बुद्धि, चित्त व अहंकार मनाच्या faculties आहे (Mind functioning faculties). मन व चित्त यातील भेद "मनः संयम्य मद् चित्तः" आत्मवश(मनाला संयमित करणे) होण्याच्या या विधानाद्वारा स्पष्ट होतो.

मनः संयम्य मद् चित्तः युक्त आसीत मत्परः।(६-१४)

अहंकार(Ego mind) हा प्रकृतिचा कर्ताभाव दर्शवितो.

(अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।)

याच अहंकाराचे Replacement बुद्धियोगाने होण्यासाठी ईश्वराचा आश्रय हा उपाय भगवदगीता सांगते. याच संदर्भात म्हटले आहे,

मत् चित्ता मद् गत प्राणा बोधयन्तः परस्परं।
कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ।।(१०-९)

१. भगवदगीता जगतप्रवर्तक/अध्यक्ष ईश्वराची ओळख देते. ही ओळख जीवनातील अज्ञान दुर करण्यासाठी "ज्ञान" या संदर्भात असते.

अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।(१०-८)

या ईश्वराचे ज्ञान जाणणारे परस्पर कथन करुन त्यांत संतुष्ट असतात, रमतात.

२. (मन) चित्त ईश्वराकडे लावणे, जीवनाचे ध्येयच ईश्वरधाम जाणुन "कर्ता" या नात्याने जीवनाच्या संपुर्ण क्रिया ईश्वरसमर्पित होणे म्हणजेच अहंकाराचे Replacement असते. याप्रमाणे नित्य भजणाऱ्यांना, त्यांचे अंतर्गत अज्ञान दुर करण्यासाठी बुद्धियोग प्रदान करतो. ही ईश्वराची अनुकंपा असते.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)
तेषां एव अनुकम्पार्थम् अहं अज्ञानजं तमः।
नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदिपेनभास्वता।।(१०-११)

***********

(१०-१०)

**********************

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम्।

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।।

************************

(१०-१०) :

"तेषां सततयुक्तानां भजतां प्रितिपूर्वकम्"

(बंधनमुक्ति Tiebreaker)

Check your path :

जीवनयात्रेत कार्य करीत असता शक्तिसाधना झाली व वर्तमानात कठिण प्रसंगातही विचलित झाला नाही तर मार्ग बरोबर आहे. अन्यथा तो Tie (बंधन) मध्ये सापडतो. अर्थात द्वन्द्ववश होतो. मार्गात Error असतो. याच Error चा स्विकार केला तर Correction करता येते. भगवतगीतेची हीच भूमिका आहे.

अर्जुन कठिण प्रसंग आला असता विचलित होतो. Tie मध्ये सापडतो. म्हणुन(Tie सोडविण्यासाठी) सरळ निष्क्रिय होतो. अध्यात्मज्ञान हाच Tie सोडविण्यासाठी आहे ज्याचे logic बंधन vs मोक्ष आहे.

व्यवहारात स्वभावनियत कार्य, निर्णयअधिकार याचा उपयोग योगक्षेमासाठी, इच्छापुर्तिसाठी करतो. या मार्गावर धर्माची भूमिका कार्याद्वारे ईश्वरभक्ति(Devotion समर्पण) असते, ज्यामुळे शक्तिसंचिति(सिद्धि) होते. यासाठी नियतकार्याला स्वधर्म ही स्वमंजुरी असते. स्वधर्म Tiebreaker ठरतो. पण प्रत्यक्षात अर्जुन Tie मध्ये सापडला असता आपल्या नियतकार्याला पाप ठरविण्यासाठी धर्माचा वापर करतो. व Tie सुटत नाही. भगवतगीता याला द्वन्द्ववश /Herd मानसिकता संबोधत आहे.

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेनभारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परन्तप।।(७-२७)

याप्रमाणे धर्म या संदर्भातच अर्जुनाला Tie उत्पन्न होतो. म्हणुन भगवतगीतेत अध्यात्मज्ञानाचा Tie सोडविण्यासाठी वापर केलेला आहे. यामुळे जीवनमार्ग"अमृतंगमय"(शाश्वताकडे)

असा होतो.

ईश्वर या सृष्टिचा उगम आहे, ईश्वरामुळेच विश्व संचलित असते. सृष्टिचक्रप्रवर्तन म्हणजेच विश्वात व्यवस्थापन असते व ईश्वर या विश्वसंघटनेचा अध्यक्ष असतो. या ईश्वराच्या(शाश्वत) ज्ञानाचा मनुष्याच्या आत्म्याशी (प्राणतत्वाशी) संबंध असतो व अध्यात्मविषय येतो. (स्वभाव अध्यात्म उच्यते).

ईश्वराची याप्रमाणे ओळख असणारा जाणकार (विद्वान) ठरतो. जाणकार या विषयावर परस्परामध्ये भाष्य करुन ईश्वराचीच भक्ति साध्य करीत असतात. याला व्यवहारात सत्संग म्हणुन ओळखले जाते. याच ईश्वराची नित्य भक्ति लाभावी यासाठी "युक्त" संस्कार भगवतगीता सांगत आहे. त्याला बुद्धियोग प्राप्त होतो. व मार्ग "अमृतंगमय" होतो. या मार्गावर निष्काम कार्यरत असतो. विचलित होत नाही.

जाणकार व सत्संग:

अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।

इति मत्वा भजन्ते मां बुधा भाव समन्विताः।।(१०-८)

मच्चित्ता मद् गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।

कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ।।(१०-९)

Correction (ईश्वरकृपा):

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतीपूर्वकम् ।

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।।(१०-१०)

तेषामेव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजं तमः।

नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता।।(१०-११)

सार :

मनुष्यजीवनात दुःख आले कि मनुष्याची मनोदुर्बलतेकडे वाटचाल सुरु होते. वास्तविक जीवनातील अडथळे, दुःख या विकासमार्गातील Stepping stone असतात. अज्ञान द्वन्द्ववश (बंधनात) जगतो . तर जाणकार या (Tie, Obstacle) बंधनाला ओळखतो. व अध्यात्मज्ञानाचा वापर करुन Tie सोडवितो. शक्तिसंचितीकडे त्याची वाटचाल सुरु होते.

"नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा"

"Obstacles are like wild animals. They are cowards but they will bluff you if they can. If they see you

are afraid of them... they are liable to spring upon you; but if you look them squarely in the eye, they will slink out of sight. "

-Orison Swett Marden

********

(१०-१०)/२:

"ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते"

"अंधारातुन प्रकाशाकडे" ही भगवतगीतेची स्पष्ट भूमिका आहे. जगात कर्तृत्वाने इतिहास घडतो. तर मनुष्याच्या जीवनयात्रेत सर्वात सोपी संवय म्हणजे स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी समर्थन करणे, इतरांवर टिका करणे, ज्ञानी समजुन उपदेश करणे असते. याच संवयीमुळे निष्क्रियतेचे अर्जुन समर्थन करतो. या स्थितीत मनुष्याला स्वतःचे अज्ञानही कळत नाही. आपले अज्ञानही न कळणे अशी स्थिति मनुष्यजीवनात आली तर अंधारकोठडीतुन त्याला कुणीही बाहेर काढु शकत नाही. कारण येथे अहंकाराचा आश्रय असतो. याच अंधारातुन त्याला

स्वतःलाच बाहेर यावे लागते. भगवतगीतेचे हे प्राथमिक ज्ञान Wisdom of Ignorance ठरते.

*चांगलेपणाची सकारात्मक व नकारात्मक बाजु
(निर्द्वंद्व vs द्वंद्ववश):
मनुष्यजीवनात चांगलेपणाचा संबंध अंतरात्म्याशी, ईश्वराशी असतो, यामुळे स्वतःवर विश्वास असतो.

सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणम् अन्तकरणप्रवृत्तय।(अभिज्ञान शाकुंतलम् )

अंतःकरण (Conscience )व्यक्तीच्या आत्म्याचे कार्यात्मक तत्त्व मानले जाऊ शकते, ज्यामुळे व्यक्ती द्वंद्वाच्या उपस्थितीत निर्णय घेते. (Tiebreaker-निर्द्वंद्व).
मनुष्यजीवनात ही चांगलेपणाची सकारात्मक बाजु असते.

भगवतगीतेत अर्जुनाला दैवीगुणी संबोधले आहे.
चांगलेपणामुळेच त्याला दुःख होते. तो निष्क्रियतेचे समर्थन करतो. अर्जुन यालाच ज्ञान समजतो, यामुळे अज्ञान कळतच नाही.

ही स्थिति द्वंद्ववश असते. यामुळे ही चांगलेपणाची नकारात्मक बाजु (अज्ञानामुळे) ठरते.

*मृगजळाला पाणी समजणे म्हणजेच अज्ञानाला ज्ञान समजणे. यामुळेच अज्ञान कळत नाही. यावर उपाय वर्तमानातील (Awareness)वास्तव असते.

*Wisdom of ignorance:
The first step toward change is awareness. The second step is acceptance.
Nathaniel Branden

अर्जुन वास्तव स्विकारतो, तेंव्हा नियतकार्याने दुःखमुक्ति कशी होईल हा त्याचा प्रश्न असतो. दुःखमुक्तिसाठी "योगः कर्मसु कौशलम् " हे या प्रश्नाचे उत्तर असते. योग म्हणजे दुःखान्त, "त्रायते महतो भयात् "अशी स्पष्ट परिभाषा भगवतगीता करते. याच संदर्भात "कर्मण्येवाधिकारस्ते" याद्वारा मनुष्याचा अधिकार स्पष्ट केला. या मार्गात कार्याचा एकनिश्चय असावा. चंचलत्वामुळे निश्चय होत नाही म्हणुन बुद्धियोग प्रयोजन आहे. याचसाठी

ईश्वराचे गुणातीत ज्ञान(ज्ञानविज्ञानाचा मुळस्त्रोत), विभूतिज्ञान स्पष्ट केले, मार्गात ईश्वराचा आश्रय स्पष्ट होतो.

यतः प्रवृत्ति भूतानां येन सर्वम् इदम् ततम् ।

तद् धाम परमं मम।

जीवनाचा महामार्ग /विकासमार्ग अशाश्वताकडुन शाश्वताकडे (अमृतत्वाय कल्पते) यामुळे ठरतो. व याचसाठी बुद्धियोग देतो.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

-------

(१०-१०)/३ :" ददामि बुद्धियोगं तं "

( Change)

ददामि बुद्धियोगं तं येन् माम् उपयान्ति ते ।(१०-१०)

अर्थात "जीवनविकासाचा महामार्ग मजप्रत येणारा (तद् धाम परमं मम)असतो. या मार्गावर जीवनप्रवास होण्यासाठी बुद्धियोग देतो. "

जगात प्रत्येक व्यक्ति स्वभावप्रकृतिनुसार (Natural) जगत असतो. याच स्वभावानुसार अर्जुन जगतो. नियतकार्यासाठी कुरुक्षेत्रावर येतो. दुःखी झाल्यामुळे युद्ध टाळण्याचा बेत करतो. आपली भूमिका योग्य आहे, हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान बोलतो. कर्म आणि भाष्य या संदर्भात व्यवहारात हेच अनुभवायला येते.

स्वभावप्रकृतिनुसार व्यक्ति कार्य करतो. कार्यमार्गात संशय वाटला तर निष्क्रिय होतो. पण आपली भूमिका योग्य आहे हे दर्शविण्यासाठी भाष्य बोलतो. यांत मनुष्य आपले सुख manage करण्यासाठी(मनोरंजनासाठी) भाष्य बोलतो. कुणी कार्य टाळुन आपले हीत साधण्यासाठी भाष्य बोलतो. दुःखामुळे अर्जुनाची मानसिकता अशांत असते. म्हणुन त्याचे भाष्य मनोरंजनासाठी असते.

व्यवहारात कर्माची सकाम अवस्था असते. याच अवस्थेत कार्य execute करण्यासाठी अर्जुन कुरुक्षेत्रावर (Warfield) येतो. कर्म

व भाष्य यांत गोंधळ उडतो. कर्म संदर्भात निष्क्रिय होतो, व निरर्थक भाष्य बोलतो. (जसा दुःखी, आळशी मनुष्य निरर्थक, नकारात्मक भाष्य बोलतो, येथे अर्जुनाची मानसिकता अशांत असते. ही अवस्था शरीरयंत्रातील काया, वाचा व मन यासंदर्भात Disturbance of Harmony ठरते. हीच Harmony साध्य होण्यासाठी बदल आवश्यक असतो.

शरीरयंत्रात काया, वाचा, मन यांचे functioning असते. यांतील Harmony साध्य करण्यासाठी भगवतगीता जीवनविकासातील अनुक्रमे कर्म, ज्ञान व भक्ति यांचे ज्ञान(संबंधाने functioning) स्पष्ठ करते. व "बदल "गरज (Why change) स्पष्ट होते.

*कर्म- काया-सकाम कर्म, निष्काम कर्म, निष्क्रियता

*ज्ञान-वाचा-भाष्य-समर्थन(प्रज्ञावाद)भाष्य, स्वहितासाठी भाष्य, ज्ञानाची बैठक(निश्चित प्रश्न, विषय), संवाद

*भक्ति-मन-मानसिकता(State of mind), मनोरंजनासाठी (Comfort)भाष्य किंवा सुखासाठी भक्ति(योग-शाश्वत सुख)

अर्जुन वास्तवाचा स्विकार न करता समर्थनासाठी प्रज्ञावाद बोलतो. यामुळे संवादच बंद होतो. पण श्रीकृष्ण अधिकाराने त्याला न दुखवता(तुझ्यासारख्या श्रेष्ठाला न शोभणारी भूमिका) समज देतात. तेंव्हा वास्तव(दुःखदायी युद्ध करणे योग्य कसे?)स्विकार करतो. व संवादासाठी द्वार उघडे होते.

व्यवहारात कार्य सकामच ठरते. यांत कार्याचे Purpose असते. पण प्रत्यक्ष कार्य execute करतांना कार्याद्वारे exercise साध्य होते. ही exercise शारिरीक व मानसिक दोन्ही असते. जीवनाचे Goal काय? यावर सकाम कार्य(भोगैश्वर्य), चांगले कार्य(पुण्य), निष्काम कार्य ही मानसिकता असते.

अर्जुन चांगले(पुण्य)कार्य या संदर्भातच (धर्म या संदर्भात) संशय व्यक्त करतो. अर्जुनाची मानसिकता disturb झालेली असते, व याला येथे Priority आहे. मानसिक Wellness चे ज्ञान "स्थितप्रज्ञ" द्वारा स्पष्ट होते. याच संदर्भात श्रीकृष्ण मनोवैज्ञानिक ज्ञान (Consciousness) स्पष्ट करतात.

मनुष्याचे जीवित तत्व व ईश्वर यांचे नाते स्पष्ट होते. व या संदर्भात जीवनविकासाचा महामार्ग "अमृतंगमय"होतो. या मार्गावर

योगासाठी कार्य(समर्पण, निष्काम)घडते. व कार्याद्वारे ईश्वरभक्तिचे logic स्पष्ट होते. याच संदर्भात ईश्वराची प्रकृतिचा अध्यक्ष/पुरुषोत्तम/क्षेत्रज्ञ ही ओळख करुन त्या ईश्वराला भजणारा बुद्धियोग प्राप्त करुन घेतो. ही ईश्वराची विशेष कृपा असते. ज्यामुळे हृदयातील अंधार मिटतो. व मनुष्य विकासाच्या महामार्गावर प्रवास करतो.

याप्रमाणे सकाम कार्याचे निष्काम कार्यात परिवर्तन होते. व हा बदल घडवुन आणणारा " बुद्धियोग "आहे. अर्थात बुद्धियोगाचे Purpose व पर्यायाने ईश्वरभक्तिचे Purpose कळते.

******

(१०-११)

************************

तेषामेव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजं तमः।

नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता।।

**************************

(१०-११)/१:

"तेषामेव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजं तमः"

जीवनातील अज्ञानाचा नाश ही ईश्वराची सर्वश्रेष्ठ कृपा असते. नैराश्य, बुद्धिभ्रम अज्ञान असते. म्हणुनच अर्जुन शेवटी म्हणतो, "नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा"

याच श्रेष्ठ कृपेमुळे "मुकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरीम् " हा चमत्कार होतो.

जीवनाचे ज्ञान या संदर्भात ज्ञान, ईश्वरश्रद्धा, चांगलेपणा जीवनातील Strength असते, Weakness नसतो. ईश्वरश्रद्धेचा उपयोग भगवतगीता ज्ञानासाठी करते. याच संदर्भात अध्यात्मज्ञान आलेले आहे. मनुष्य जीवनाचे ईश्वराशी असलेले नाते, ईश्वराची

विश्वातील भूमिका हे सर्व ज्ञान जाणुन जीवनविकासाचा राजमार्ग ठरतो. हाच भगवतगीतेचा विषय आहे.

अर्जुनाने विद्या संपादन केली असते. धनुर्विद्येत तो पारंगत असतो. जीवनज्ञान या संदर्भात त्याला जे ज्ञान असते त्याचा तो कसा उपयोग करतो याचे भगवतगीता (विषादयोग) दर्शन देते.

जीवनात सुख-दुःख आहे, हार-जीत म्हणुन ज्ञान-अज्ञान आहे. दुःख टाळण्यासाठी अर्जुन युद्ध न करण्याचा निर्णय करतो. अर्थात निष्क्रियता स्विकारतो व त्याचे समर्थन करतो. आपण योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी त्याला उपलब्ध असलेल्या (जीवन)ज्ञानाचा उपयोग करतो. हाच आधार घेवुन अर्जुन म्हणतो, मी युद्धात निःशस्त्र राहुन कौरवाकडुन मला मृत्यु मिळणे हेच माझ्यासाठी श्रेयस्कर आहे!असे त्याचे दीनवचन असते.

जीवनात निराश होणारे असेच दीनवचन बोलत असतात. जगण्याचे ज्ञान कळत नाही. जीवनात निराश होणे ही हार असते.
"मनके हारे हार है, मनकी जीत जीत"
म्हणुन हार-जीत या संदर्भात जीवनाला लढाई संबोधले आहे.
"माम् अनुस्मर युध्य च"

तसेच ज्ञान-अज्ञान या संदर्भात जीवनाचे ज्ञान जीवन जगण्यासाठी असते. अर्जुनाला योग्य-अयोग्य या संदर्भात संशय येतो, व जगण्यातच अज्ञान जाणवते. पण (अज्ञान) वास्तव न स्विकारता युद्ध करणे पाप आहे असे Judgemental वचन बोलतो. अर्थात योग्य-अयोग्य संदर्भात "आपण योग्य आहो " या आधारावर हे भाष्य असते.

ज्ञान-अज्ञान या संदर्भात जीवन असेच आव्हान देत असते. व वास्तव न स्विकारता मनुष्य निष्क्रिय झाला तरी स्वतःला योग्य समजुनच समर्थनभाष्य बोलत असतो. त्याला उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा उपयोग समर्थनासाठी करतो. अज्ञानालाच ज्ञान संबोधतो.

अर्जुन वास्तव स्विकारतो, तेंव्हाच जीवनात ज्ञानाचे प्रयोजन हा विषय चर्चेला येतो. याच संदर्भात ईश्वर आणि ज्ञान यांचे नाते विज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते. ज्ञान जगात सर्वश्रेष्ठ आहे. कार्यपुर्व अवस्थेत संशय मिटविण्यासाठी ज्ञान असते. "ज्ञानसञ्चिन्नसंशयम् ". तर सर्व कार्याचे ज्ञानातच अखेर विलिनिकरण होते.

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

याच ज्ञानाचा आश्रय जीवनात होण्यासाठी ईश्वराची भक्ति व त्याचे महत्व स्पष्ट केले आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

मनुष्य व्यवहारात जगतो. योगक्षेम(Survival) चालावा यासाठीच जीवन आहे असे कांही लोक जाणत असतात, तर कांही Survival(योगक्षेम) जीवनाचे साधन आहे हे जाणुन विकासाच्या राजमार्गावर जीवनयात्रा करीत असतात. याच राजमार्गावर ईश्वराची अनन्यभक्ति (कार्यसमर्पण) साधतो त्याला "युक्त" म्हटले आहे. त्याचा योगक्षेम(Survival) ईश्वर चालवतो. (Blessings of God)

तेषां नित्यअभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।(९-२२)

याच राजमार्गाचे ज्ञान(अमृतत्वाय कल्पते) भगवतगीतेचा विषय आहे. याच राजमार्गाच्या अज्ञानामुळे अर्जुनाचा विकासरथ (आत्मोन्नति) थांबतो.

जीवनविकासाचा हा राजमार्ग व व्यवहारातील मार्ग यांचा निकटचा संबंध आहे. दोन्ही मार्गात कार्य साधन असते. व्यवहारमार्गात गरजा, इच्छापुर्तिसाठी कार्य जाणतो तर राजमार्गावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति ही भूमिका असते.

याच राजमार्गावर प्रत्यक्षात यात्रा होण्यासाठीच ईश्वर बुद्धियोग प्रदान करतो व ही ईश्वराची सर्वश्रेष्ठ कृपा असते.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)
तेषामेव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजं तमः।
नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता।।(१०-११)

अर्थात ज्ञान (जीवनातील अंधाराचा नाश होण्यासाठी) हीच ईश्वराची सर्वश्रेष्ठ कृपा असते. बुद्धिभ्रम अंधार असतो. बुद्धियोग प्रकाश असतो. याप्रमाणे अर्जुनाला ईश्वराची कृपा लाभते. राजमार्ग कळतो म्हणुन शेवटी म्हणतो,

नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा त्वत् प्रसादात् मया अच्युत।
स्थितो अस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव।।(१८-७३)

"Knowledge is not power, it's the application of knowledge that is power"

"थोडा ज्ञान जो प्रयोग में लाया जाए वो बहुत सारा ज्ञान जो बेकार पड़ा है उससे कहीं अधिक मूल्यवान है।"

खलील जिब्रान

******

(१०-११)/२ :

"तेषामेव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजं तमः"

(अज्ञानाचा, अंधाराचा नाश)

जीवन जगत असतांना मनुष्याला दुःख, अडचणी यांचा सामना करावा लागतो. असाच प्रसंग अर्जुन अनुभवतो. पांडवावरील अन्याय दुर होण्यासाठी सर्वात शेवटचे अस्त्र म्हणुन धर्मयुद्ध ठरले असते. पण प्रत्यक्षात युद्धपुर्व प्रसंगात अर्जुन दुःखी झाला असता, हा उपाय अधर्माचा आहे असे अर्जुन सांगतो. स्वतःला कांहीही नको म्हणुन अशा अधर्म कर्माचे प्रयोजन व्यर्थ आहे ही भूमिका घेतो. याच पार्श्वभुमिवर जीवनातील ज्ञानअज्ञान हा विषय भगवदगीतेत आलेला आहे.

“Changing our decision sets up a bad habit. It reinforces decision-making as an expression of bewilderment and ignorance, instead of wisdom and freedom. ”
– Sakyong Mipham

अहंकारामुळे मनुष्य स्वतः कर्ता या नात्याने अज्ञानाचा स्विकार करीत नाही व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी मात्र "ज्ञानाचा" आश्रय करतो. (Advocacy प्रज्ञावाद). अर्थात अज्ञान स्विकारले तरच ज्ञानाचे महत्व व त्याचा जीवनात उपयोग कळतो.

अहंकार (ego mind) vs. ईश्वर

भगवदगीता ईश्वराची ओळख ज्ञान, प्रकाश या संदर्भात देत आहे. ज्याच्या कृपेमुळे अज्ञान, अंधार, तमगुणाचा नाश होतो.
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)
तेषामेव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजं तमः।(१०-११)

मनुष्य ज्या सृष्टीत जगत आहे, त्या सृष्टीचा अध्यक्ष ईश्वर आहे. याच ईश्वराचा अंश मनुष्याच्या हृदयस्थानी असतो, ज्यामुळे जीवित असतो. याच ज्ञानामुळे जीवनयात्रेचे अंतिम धाम (Destination) ईश्वर आहे हे जाणतो व मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. श्रेष्ठ जीवन जगण्याचा हा राजमार्ग ठरतो.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

या मार्गावर दुःख, अडचणीमुळे विचलित होत नाही. या मार्गावर जीवनयात्रेचा प्रवास घडणे ही ईश्वरकृपा असते. यामुळे व्यवहारातील कर्म ईश्वरभक्तिचे साधन बनते. कर्म (अर्जुनाचे युद्ध लढणे) हे व्यावहारिक नैमित्य असते.

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व।...
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ।(११-३३)

****************

(१०-११)/३ :

"नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता"

I. (Enlightenment)

ईश्वर जीवनाला प्रकाशित करतो. (अज्ञानरुपी अंधार मिटवतो) हा संदेश आहे. जीवनात Enlightenment या अर्थानेच बुद्धियोगाचे महत्व आलेले आहे.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।
तेषां एव अनुकम्पार्थम् अहं अज्ञानजम् तमः।
नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता।।(१०-११)

ईश्वर सृष्टिचा अध्यक्ष या नात्याने विश्वाचे संचलनकार्य (व्यवस्थापन) जाणुन स्वतःच्या विकासमार्गावर असतो. हा बुद्धियोग असतो. हृदयी ईश्वर(अंश), अंतिम धाम ईश्वर(तद् धाम परमं मम) याद्वारे शाश्वत जीवंत तत्वाचा प्रवास कळतो. या प्रवासाला कार्य सहकार्य करीत असते. चंचलत्व नष्ट होते.

कार्याचा एकनिश्चय(Determination) असतो. "I am right"ही शाश्वत सुखाची अनुभुति असते.

मनुष्य जीवनात एक शरीर व दुसरे जीवंत तत्व आहे. व्यक्त व अव्यक्ताचे, अशाश्वत(जड) व शाश्वताचे नाते भगवतगीता स्पष्ट करते. जड प्रकृति कार्य करते, शाश्वत(पुरुष)तत्व सुखदुःख अनुभवतो.

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतु उच्यते।।
पुरुषः प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान्।
कारण गुणसंगअस्य सत् असत् योनी जन्मसु।।(१३-२२)

अव्यक्त प्रकृतिने पुरुष बद्ध असतो. यामुळे सुख जीवात्म्याचा विषय बनतो. Senses (विषय)सुख, कार्यात सुख, स्वातंत्र्याचे(I am right) सुख, परमार्थ सुख, आत्मविश्वासाचे सुख, आत्मशांतीचे सुख असे विविध सुख मनुष्य अनुभवतो. शाश्वतसुख(आत्मसंयम सुख) व अशाश्वत सुख(ज्याचा अभाव झाला तर दुःख होते) याप्रमाणे सुखाला विभागले तर एकाचा

दिवस(अशाश्वत सुखाचे चिंतन)दुसऱ्याची(शाश्वत सुख/आत्मसंयमी) रात्र, व vice a versa असते.

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः॥(२-६९)

अर्जुनाची प्रज्ञावादी भूमिका(Socalled ज्ञानी, I am right) सुखदुःखामुळेच येते. दुःख टिळण्यासाठी व समाधानासाठी प्रज्ञावादी भूमिकि घेतो. जेंव्हा "I am right" चे ज्ञान मिळते, त्यांत तो सुख अनुभवतो. हे स्वातंत्र्याचे ज्ञान(मोक्ष) असते. याप्रमाणे वर्तमानात सुख अनुभवणे याचसाठी ज्ञान आहे. याचेच सविस्तर जीवंततत्व (क्षेत्रज्ञ, Consciousness) व शरीर(क्षेत्र) याचे नाते भगवतगीता स्पष्ट झाले आहे.

शरीर क्षेत्र म्हटले तर Consciousness (Knower of the field) क्षेत्रज्ञ असतो. Universal consciousness ईश्वराला संबोधले आहे. याद्वारे मनुष्य व ईश्वर यांचे नाते भगवतगीतेने स्पष्ट केले आहे. ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. म्हणुन चेतना जागृति(Active higher consciousness) Enlightenment असते.

न अहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः।
मुढोअयं न अभिजानाति लोको माम् अजम् अव्ययम् ॥(७-२५)

भौतिक मायेने आच्छादित असल्यामुळे जीवनात अंधार भासतो. यामुळे नकारात्मक होतो. (दुःखी होतो, भय असते, चिंता असते, क्रोध, ईर्षा असते अर्थात अशांत असतो, तरी स्वतःला ज्ञानी समजुन भाष्य करतो!).
त्याच्याच ठायी असलेले ईश्वराचे प्रकाशज्ञान जाणत नाही.

याप्रमाणे भगवतगीतेचे ज्ञान जीवनात प्रकाश करण्यासाठी ज्ञानदीप ठरते.

*******

(१०-११)/३:

"नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता"

II(Everyone walks his own path)

ज्ञानी समजुन जगावर टिका करणे, जगाने बदलावे ही इच्छा करणे सोपे आहे. टॉलस्टाय म्हणतो, लोक जगाने बदलावे ही इच्छा करतात पण यासाठी स्वतः बदलावे लागते याचे ज्ञान नसते. याच सत्यावर भगवतगीता प्रकाश टाकत आहे.

प्रत्येक मनुष्य स्वतःचा मार्ग चालत असतो हा मानवी जीवनातील महत्वाचा मुद्दा भगवतगीता highlight करीत आहे. याच अनुषंगाने निर्णयअधिकार, नियतकार्य (Committed task) स्वधर्म जाणणे, स्वतःच्या कार्याचा दृढनिश्चय याचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते.

*परावलंबन, पंगुत्व :

You are the only person on earth who can use your ability.

– Zig Ziglar

स्वतःचा मार्ग या संदर्भात "एकला चालोरे" हा संदेश प्रसिद्ध आहे. मानवी जीवनातील जगण्याचे (स्वतःचा मार्ग) सत्य जो जाणतो तो पंगु ठरत नाही. परावलंबन गुलामीचे, पंगुत्वाचे कारण

बनते म्हणुन महापुरुषांनी "स्वावलंबन" या प्रथम जीवनमुल्याचा पुरस्कार केला. Beggars are not choosers.

"मायकेल ॲन्डरसन अपघातात दोन्ही पाय गमावतो. तुला नेहमी सोबतीला सहाय्यक लागेल असा डॉक्टर त्याला सल्ला देतात, तेंव्हा तो चिडतो व म्हणतो, मी पायाने पंगु झालो, मानसिक पंगु नाही. ईश्वराने मला प्रयत्नाचे अधिकार (कर्मण्येवाधिकारस्ते)दिले आहे. तो पुढे विमानाचा पायलट होतो. "

बालवयात मुले परावलंबीत असतात. जसे चालायला शिकतात, तसेच जीवनात मनुष्य स्वतःचा मार्ग चालायला शिकतो. यांत स्वावलंबन प्रमुख जीवनमुल्य असते. मनुष्याला परावलंबनाची संवय जडली तर "Born to win but conditioned to loose " अशी अवस्था होते.

कोंबड्यांच्या कळपात एक गरुडपिलु वाढते. त्याला उडावेसे वाटते पण जेष्ट कोंबडी त्या पिलाला सल्ला देत असते, "आपले काम नोहे. "

You are not what you were born, but what you have within yourself to be.

Godfrey of Ibelin:

*योद्धा vs. प्रेक्षक

जगात व्यवहार असतो. काय योग्य? यावर भाष्य होते. उपदेश करणारे ज्ञानी समजुनच उपदेश करीत असतात. मनुष्याच्या भाष्यात व्यवहार(काय हवे?) व ज्ञान (धर्म, आदर्श) यांचा समावेश असतो. जगात ज्ञानविज्ञानात प्रतिदीन भर पडत असते. समाजात बदल घडतात. काय योग्य? यावर चर्चा होतच राहणार. पण मनुष्य स्वतःचा मार्ग चालत असतो. कार्य या मार्गाचा भाग असतो.

पांडवांना न्याय मिळावा या हेतुने अखेरचा पर्याय म्हणुन धर्मयुद्ध ठरले असते. येथे अर्जुनाचे नियतकार्य निश्चित होते. प्रत्यक्ष कार्य करण्याची वेळ आली असता तो युद्ध करणे पाप आहे असे सांगुन युद्ध न करणे (दुःख टाळण्यासाठी असलेले option)ही निवड करतो. ज्या धर्माचा, आदर्शाचा संपुर्ण विचार करुनच धर्मयुद्ध ठरले होते. तरी समर्थन भाष्यात धर्म, आदर्श वापरतो. स्वतःला ज्ञानी समजुन धर्म, आदर्श भाष्याचा उपयोग करतो.

समाजात योद्धा आणि प्रेक्षक अशा दोन वर्गात मनुष्यांची विभागणी केली तर कार्यक्षेत्रावर प्रत्यक्ष लढणारे योद्धा ठरतात, तर त्यांना judge करुन मत देणारे, उपदेश करणारे प्रेक्षक ठरतात. योद्धा स्वतःचा मार्ग चालतात. तर प्रेक्षक Excuses बोलुन

त्याला "ज्ञान" (धर्म/आदर्श) दर्शवितात. अर्थात अर्जुन "प्रेक्षक" भूमिकेत येतो. हाच भेद जाणुन भगवतगीता योद्धा होण्याचा मनुष्याला संदेश देत आहे.

व्यवहारकार्य सकाम असते यामुळे परिणामभयाने संभ्रम होतो. या भयापासुन मुक्तिसाठी "माम अनुस्मर युध्य च" हा संदेश आहे. या प्रक्रियेत मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. कार्याद्वारे योगसाधना (दुःखान्त)होते. निर्भयता लाभते. अर्थात मार्गातील संशयातील मुक्तिसाठी धर्म, ज्ञान याचा उपयोग भगवतगीता करीत आहे. हे येथे लक्षात घेण्यासारखे आहे. काय योग्य आहे? हा उपदेश करुन भगवतगीता मार्ग चालणाऱ्याला थांबवत नाही तर थांबलेला हताश मनुष्य अज्ञानाच्या अंधारात असतो. त्याच्या मार्गावर प्रकाश टाकत आहे. याला बुद्धियोग म्हटले आहे.

ददामि बुद्धियोगं तं येन माम उपयान्ति ते।
तेषां एव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजं तमः।
नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता॥(१०-११)
* व्यावहारिक बोध :

"We're born alone, we live alone, we die alone. Our grief path is ours " alone", and no one else can walk it, and no one else can understand it. "

-Orson Welles

"मनुष्य स्वतःचा मार्ग चालतो " या सत्याची जाण नसणे हेच मनुष्याचे अज्ञान ठरते. जीवन जगतांना दुर्बलता, नकारात्मकता, आळस(निष्क्रिय), अज्ञान असुनही स्वतःला ज्ञानी समजणे हा अहंकार असतो हे भगवतगीता स्पष्ट करीत आहे. या अहंकारावर विजय मिळविण्यासाठी ईश्वर ज्ञान सविज्ञान भगवतगीता स्पष्ट करीत आहे. याच अनुषंगाने भगवतगीतेत ईश्वर शब्द आलेला आहे पण तो ज्ञान या संदर्भात आहे.

"संशयात्मा विनश्यति"असा संदेश देवुन भगवतगीता मनुष्याला सावधान करीत आहे . स्वतःच्या मार्गाची जाण असलेला संशयाचे वास्तव स्विकारतो. (अर्जुन वास्तव स्विकारतो व प्रश्न पारदर्शक होतो. ) मार्गातील याच संशयमुक्तिसाठी ज्ञान(ज्ञानसञ्छिन्न संशयम् )आहे.

******

(१०-१७)

***********************

कथं विद्यां अहं योगींस्त्वां सदा परिचिंतयन् ।

केषु केषु च भावेषु चिंत्यो असि भगवन् मया।।

*************************

(१०-१७) :

"कथं विद्यां अहं योगींस्त्वां सदा परिचिंतयन् ?

(Thinking God as creator for Self motivation)

“Self-motivation is, the force that drives you to do things. It’s the drive you have to work towards your goals, put effort into self-development, and achieve personal fulfillment. "

Self-motivation is a key component of emotional intelligence.

Emotional intelligence is the measure of an individual’s ability to recognize and manage their emotions and the emotions of other people.

Self-motivation is generally driven by intrinsic motivation, It can also be driven by extrinsic motivation, although it’s clear that intrinsic motivation is usually a more effective and fulfilling drive.

भगवतगीता Self motivation चा विषय आहे हे वरील विवेचनावरुन स्पष्ट होते. दुःखी झाल्यामुळे अर्जुनाच्या जीवनविकासमार्गात Barrier तयार होतो. जीवनविकासाचे ज्ञान असणारा Self motivated असतो.

विक्रेते ग्राहकांना जाहिरातीद्वारे motivate करतात. व्यवहारात स्वतःचे हित साधण्यासाठी इतरांनी काय करावे यासाठी भाष्याद्वारा motivate करणे. हा extrinsic motivation चा प्रकार ठरतो. भगवतगीता intrinsic motivation चे ज्ञान आहे.

(A)

You have something you “have to do. ” You’re not excited or passionate about it, but you know you

need to get it done all the same, so you work hard to complete your task.

(B)

You have something you "get to do. " You're interested in your task—you may have even set this task for yourself rather than receiving it from someone else—and you are happy to put in the time and effort to complete it.

या दोन उदाहरणात (B) Intrinsic self motivation आहे. व सुखी जीवनाचे रहस्य आहे. भगवतगीता हेच ज्ञान सांगते.

जन्ममृत्यु जरा व्याधी दुःखदोष अनुदर्शनम् ।
अर्थात मनुष्यजीवनात दुःख आहे, पण हे दुःख जीवनविकासात Barrier होवु नये . म्हणुन जीवनविकासाचा राजमार्ग (अमृतंगमय) कळणे आवश्यक आहे. याच संदर्भात आत्मोन्नति आहे, कार्याद्वारे ईश्वरभक्ति आहे, नित्य ईश्वराचा आश्रय, योगयुक्त हा संदेश आहे. या राजमार्गावर चालण्यासाठी ईश्वराची ओळख करुन त्याच्या कृपेने बुद्धियोग मिळतो. (अर्थात Goal धाम कळले तर मार्ग कळेल)

हे ज्ञान जाणल्यावर अर्जुन म्हणतो, या सृष्टित तुला कोणत्या स्वरुपात पाहु?ज्यामुळे चिंतन करता येईल?

कथं विद्यां अहं योगींस्त्वां सदा परिचिंतयन् ।
केषु केषु च भावेषु चिंत्यो असि भगवन् मया।।(१०-१७)

दिव्यगुणांचा धारक व प्रेरक (God the Motivator) या भूमिकेतुन ईश्वराची ओळख होते.

---या सृष्टित जगतांना मनुष्यातील दिव्यभाव विकासाला प्रेरक व कारण ठरतात. ईश्वराच्या दिव्य भावाची श्रीकृष्ण ओळख करुन देतात यालाच विभूति म्हणतात. जगतकल्याण, निर्मिति व पोषण या भूमिकेतुन ईश्वराला जाणणारे ज्ञानीजन श्रद्धेने ईश्वराच्या( Creater )या भूमिकेवर श्रद्धेने परस्पर चर्चा करतात. या ज्ञानांत रमतात. अशा भक्तांना ईश्वर बुद्धियोग प्रदान करतो.

जीवनातील अज्ञान मिटुन त्याची जीवनयात्रा (अमृतंगमय) ईश्वरधामाच्या महामार्गावर गतिमान होत असते. अर्थात विकासमार्गावर असते. हेच ईश्वराचे Motivation ठरते.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

God, The Motivator

"विश्वातील सर्व चांगले विचार आमच्यापर्यंत पोहोचु दे" अशी ईश्वरप्रार्थना आहे. मनुष्यालाच हंसाप्रमाणे दिव्य गुणांचा शोध घ्यायचा आहे. ईश्वराचा आश्रय ही दृष्टि धारण करते. याच संदर्भात भगवतगीतेतील विभूतियोगाचे महत्व आहे. जगत कल्याणासाठी ईश्वराचे कार्य नित्य सुरु आहे हा यातुन संदेश मिळतो.

स्का ॅटिश तत्वज्ञ था ॅमस कार्लाईल याचे विभूति या विषयावर "Heroes, Hero-Worship, and the Heroic in History, On, by Thomas Carlyle. हे पुस्तक प्रसिद्ध आहे. जगतकल्याणासाठी पुराणातिल तसेच इतिहासातील सहा

प्रकारच्या नायकांच्या विविध गुणांची ओळख यातुन केलेली आहे.

The Hero as Divinity. (देवदेवता)

The Hero as Prophet. (धर्मसंस्थापक)

The Hero as Poet. (कवी, कलालेखक)

The Hero as Priest. (आचार्य, पुजारी)

The Hero as Man of Letters. (इतिहासकार, प्राचिन संपदा लेखनातुन व्यक्त करुन जगासमोर आणणारे)

The Hero as King. (शुर राजा)

या नायकांच्या गुणांची ओळख व्हावी व ती ओळख विकासासाठी, जगतकल्याणासाठी प्रेरक व्हावी ज्याद्वारे भावी पिढि विकासाच्या योग्य दिशेने वाटचाल करण्यास समर्थ होईल. हा हेतु यामागिल आहे.

जगतप्रवर्तक या संदर्भात विभूतियोगात विभूतिंचे वर्णन आहे. ईश्वरकार्याचा आढावा समुद्रमंथन व नंतर अवतारकार्य यातुन

घेतला आहे. अवतारकार्यातील, तसेच विविध क्षेत्रातील Hero ना विभूति दर्शविले.

Positive Habits या संदर्भात Think of Prosperity ही एक सकारात्मक संवय असते. विभूतियोगातील ईश्वरचिंतन हीच सकारात्मक संवय आहे.

यद् यद् विभूति मत् सत्वं श्रीमत उर्जितमेव वा*।
तद् तद् एवअवगच्छ त्वम् मम् तेजो अंश संभवम् ॥(१०-४१)

ईश्वराच्या विभूतिज्ञानामुळे सकारात्मक उर्जा प्राप्त होते, तसेच विकासाचा राजमार्ग कळतो. व याद्वारे ईश्वरचिंतन Self motivation साठी उपयुक्त ठरते.

******

(१०-२२)

*************************

वेदानां सामवेदोअस्मि देवानाम् अस्मि वासवः।

इंद्रियाणां मनश्चअस्मि भूतानाम्अस्मि चेतना॥

*************************

(१०-२२):

"इंद्रियाणां मनश्चअस्मि भूतानाम्अस्मि चेतना"

(मन Mind -चेतना Consciousness)

भगवदगीतेत आत्मा(Soul), मन(Mind), चेतना (Consciousness) यांना वेगवेगळ्या संदर्भात ईश्वराच्या विभूति म्हटलेले आहे.

अहं आत्मा गुडाकेश सर्व भूताशयस्थितः।(१०-२०)...

इंद्रियाणां मनश्चअस्मि भूतानाम्अस्मि चेतना॥(१०-२२)

सर्व जीवांच्या अंतर्यामी असणारा आत्मा, इंद्रियांमध्ये मन आणि जीवांमध्ये असणारी चेतना ईश्वराच्या दिव्य विभूति आहे. या विभूतिद्वारा मन, चेतना व आत्मा यांची ओळख दिलेली आहे.

चेतना(Consciousness):

चेतना अर्थात प्राणशक्ति/Consciousness हा विषय आधुनिक मानसशास्त्रात महत्वाचा ठरलेला आहे. भगवदगीतेत शरीर क्षेत्र (Field) व क्षेत्राला जाणणारा क्षेत्रज्ञ (Knower), विश्वातील सर्व क्षेत्राला जाणणारा क्षेत्रज्ञ(Universal consciousness) याप्रमाणे क्षेत्र-क्षेत्रज्ञ ज्ञान ईश्वराचे ज्ञान असते. आध्यात्मिक भाषेत चेतना जागृति, Enlightenment, मानसशास्त्रिय भाषेत Higher level of consciousness या संदर्भात या ज्ञानाला महत्व आहे.

आत्मा व चेतना यांचे नाते विद्युतनिर्मितिकेंद्रात निर्माण झालेली (Feeder)विद्युत व प्रत्यक्ष उपयोगात येणारा विद्युतप्रवाह याप्रमाणे असते. मनुष्य झोपला असला तरी त्याच्यामध्ये चेतना असते, तर मृत्यु झालेल्या शरीरात चेतना नसते. मनुष्य मृत्यु पावतो तेंव्हा अमुक "गेला" असे भाष्य होते. येथे आत्मा या अर्थाने आला-गेला असे निर्देश होते. अर्थात आत्मा शाश्वत तर शरीर अशाश्वत असते हाच अर्थ अभिप्रेत होतो. जसे सूर्यकिरण सूर्यापासुन निघते. तसे

चेतना आत्म्याचा Spark असतो.

मन :

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।
मनःषष्ठानि इंद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति॥(१५-७)

मनुष्याच्या शरीरात सनातन (शाश्वत) आत्मा ईश्वराच्या अंशरुपाने असतो. मन व पंचेंद्रियासह(श्रोत्र- ऐकणे, चक्षु-पाहणे, स्पर्श, रस-चव, गंध) प्रकृतिस्थानि आकर्षित होतो. या इंद्रियामध्ये मन श्रेष्ठ आहे. या संदर्भात मनाला ईश्वराची विभूति म्हटलेले आहे. मनाशिवाय इंद्रियविषयाचे ज्ञान होत नाही. चेतनेमुळे मन कार्यरत होते. चेतना आत्म्यामुळे क्रियाशिल असते.

जड प्रकृति(अशाश्वत) आणि आत्मतत्व यांतील भेद येथे स्पष्ट होतो. जड प्रकृतिच्या ठायी चेतना नसते किंवा जड तत्वे एकत्र करुन चेतना उत्पन्न होत नसते. म्हणुन चेतना श्रेष्ठ व शाश्वत आहे.

मनोवश-आत्मवश(जितात्मनः)

मनोवश व आत्मवश या संदर्भात इंद्रिय, मन, बुद्धि, आत्मा याप्रमाणे श्रेष्ठत्वाचा अनुक्रम असतो.

इंद्रियाणि पराणि आहुः इंद्रियेभ्यः परं मनः।
मनसः तु परां बुद्धिः योः बुद्धेः परताः तु सः॥(३-४२)

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यआत्मानम् आत्मना।(३-४३)

याप्रमाणे "मनोवश vs. आत्मवश" या लढाईत मनापेक्षा बुद्धि श्रेष्ठ व बुद्धिपेक्षा आत्मा श्रेष्ठ जाणुन बुद्धिद्वारा मनाला नियंत्रित करुन आत्मवश असणे.

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(८-७)

The key to growth is the introduction of higher dimensions of consciousness into our awareness. (Consciousness is defined as "the state of being aware. " )

Lao Tzu

*********

(१०. २७)

**************************

उच्चैःश्रवसम् अश्वानां विद्धि माम् अमृतोद् भवम् ।

ऐरावतं गजेंद्राणाम् नराणां च नराधिपम् ।।

*************************

(१०. २७):"नराणां च नराधिपम् "

(Divine qualities of King/The Leader/The Orgoniser-योजक)

अयोग्य पुरुषं नास्ति योजकः तत्र दुर्लभः।

According to The Opulence of the Absolute(विभूतियोग)Rightous king is considered to be the Representative of God. The God is maintainer of Universe. The King is maintainer of his kingdom.

नराणां च नराधिपम् ।(10-27)

*In the jungle which animal is the biggest ..... We heard, ..... elephant.

*In the jungle which animal is the tallest.... We heard ... Giraffe.

*In the jungle which animal is the wisest..... We heard ...... Tortoise

*In the jungle which animal is the fastest ..... We heard ..... Cheetahs.

* Among all these wonderful qualities mentioned.... Where is the Lion in the picture?

*Yet we say the Lion is the king of the jungle even without any of these qualities. Why?

* something fascinating about the Lion.

*_The Lion is Courageous_

*_The Lion is very bold_

*_The Lion is always ready to face any mountain, any challenges, any barrier that crosses his part, no matter how big they are. _

*_The Lion walks with confidence. _

*_The Lion dares anything and it's never afraid_

*_The Lion believes he is unstoppable. _

*_The Lion is a risk taker_

*_The Lion believes any animal is food for him_

*_The Lion believes any opportunity is worth giving a trial and never allows it slip from his hands. _

*_The Lion has charisma. _

*_What is it that we get to learn from here ...

• All we need is courage_*

_*• All we need is boldness_*

_*• All we need is the Will to try_*

_*• All we need is the faith to believe it is possible_*

_*• All we need is to believe in ourself that I can do it. _

These are the Energetic qualities of King/The Leader/The Orgonizer . These qualities are part of Divine (दैवी)qualities. ( positive personality )

अभयं सत्त्वसंशुध्दिः ज्ञानयोग व्यवस्थितिः।(१६-१)

......

तेजः क्षमा धृतिः शौचम् अद्रोहो न अति मानिता।(१६-३)

********

(१०-३०)

************************

प्रल्हादश्चअस्मि दैत्यानां कालः कलयताम् अहम् ।

मृगाणां च मृगेन्द्रो अहं वैनतेयश्च पक्षिणाम् ।।

**************************

विषय ७४९ :

" प्रल्हादश्च अस्मि दैत्यानां"

(चांगलेपणा ईश्वराची दिव्य विभूति)

चांगले व वाईट या संदर्भात दैवी व आसुरी प्रवृत्तिचा भगवदगीता उल्लेख करते. जगात वाईटपणा असला तरी चांगलेपणा असतोच. मनुष्यातील चांगलेपणा ईश्वराची Divine विभूति असते. याच अर्थाने म्हटले आहे, "प्रल्हादश्च अस्मि दैत्यानां"

प्रल्हादश्च अस्मि दैत्यानां कालः कलयताम् अहं।

मृगाणां च मृगेंद्रो अहं वैनतेयश्च पक्षिणाम् ।।(१०-३०)

जगात चांगले वाईट ही गणना असली तरी काळ (The Time) ईश्वराची विभूति असते. कोणत्याही प्रसंगी न खचता लढणारा सिंह, गरुडाला पाऊस व्यत्यय आणित नाही तर तो ढगाच्या वर उड्डान करतो. म्हणुन सर्व वन्य प्राण्यांमध्ये सिंह व पक्षांमध्ये गरुड ईश्वराच्या दिव्य विभूति म्हटले आहे.

चांगलेपणा दैवी संपत्ति असते पण मनुष्याचा चांगलेपणाबद्दल गैरसमज होतो !तेंव्हा चांगलेपणा दुबळा होतो. याच पार्श्वभुमिवर भगवदगीता संदेश देते, चांगल्या मनुष्याला दुर्बलता शोभत नाही .

मनुष्य या जगात आला, तो जगत असतोच. जेंव्हा चांगला मनुष्यही दुःखाने व्यथित होतो, तेंव्हा तो बंधनात अडकतो. त्याला मार्ग सापडत नाही व अज्ञानामुळे निष्क्रियतेचे समर्थन करतो. नाव समुद्रात वाऱ्याने वाहते तसे जीवन सुरु असते. ही मनोवश, द्वंद्ववश अवस्था असते. तर नावेवर ज्याची command असते, तो नाव वल्हवतो. अर्थात स्वतःचा मार्ग चालत असतो. याच मार्गाचे ज्ञान भगवदगीता देते.

नाव तुफानात सापडावी तसे दुःखामुळे मनुष्याची स्थिति होते. व याच दुःखाशी deal करण्यासाठी ईश्वरज्ञान, स्वतःचे

ज्ञान(आत्मज्ञान, अध्यात्मज्ञान) ज्ञानविज्ञानासह भगवदगीता स्पष्ट करते.

*मनुष्याचे अधिकारक्षेत्र (स्वतःची ओळख)

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।मा कर्मफलहेतुर्भुः मा ते संगो अस्तु अकर्मणि।।(२-४७)

*ईश्वराचे अधिकारक्षेत्र (ईश्वराची ओळख):

मया अध्यक्षेण प्रकृति सुयते सचराचरम् ।
हेतुना अनेन कौंतेय जगद् विपरिवर्तते।।(९-९)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

मनुष्य आपल्या अधिकारक्षेत्रात कर्म करतो. परिणाम ईश्वराचे अधिकारक्षेत्र आहे. परिणामाचे भय विचलित करीत नाही. याची

जाण असणारे कर्माद्वारे विकासमार्गावर असतात . अंतःकाळी ईश्वराच्या दिव्य धामात विलिन होतात(ईश्वरप्राप्ति).

जन्मकर्म च मे दिव्यं एवं योः वेत्ति तत्वतः।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सो अर्जुन।।(४-९)

**********

(१०-३०) :
"कालः कलयताम् अहम्"
(The Time)

वर्ष, महिना, दिवस, तास ही कालगणना असते. मनुष्याच्या आयुष्याचे मोजमाप याच कालगणनेनुसार होते. या कालगणनेत "काळ" ईश्वराची विभूति म्हटले आहे.
प्रल्हादश्चअस्मि दैत्यानां कालः कलयताम् अहं।(१०-३०)

"काळ" या संदर्भातच इतर दिव्य विभुतिची ओळख भगवदगीता देत आहे, ज्यांचा सरळ संबंध विश्वातील घडामोडीशी असतो.

*या विश्वातील संपूर्ण प्राणिमात्रांचा आरंभ, मध्य व अन्त-
अहम् आदिश्च मध्यं च भूतानाम् अन्त एव च।(१०-२०)

*सृष्टिचा आरंभ, मध्य व अन्त-
सर्गाणाम् आदिः अन्तश्च मध्यं चैव अहं अर्जुन।(१०-३२)

*(शाश्वत)महाकाळ, सर्वांचे धारणपोषण करणारा-
अहमेव अक्षय कालः धाताअहं विश्वतोमुखः।(१०-३३)

*महिन्यात मार्गशीर्ष व ऋतुमध्ये वसंत-
मासानां मार्गशीर्षोअहम् ऋतुनां कुसुमाकरः।(१०-३५)

*सर्वांचा नाश करणारा मृत्यु व भविष्याचा निर्माता-
मृत्युः सर्वहरश्च अहम् उद्भवश्च भविष्यताम्।(१०-३४)

काळ अनंत आहे पण मनुष्याचे जीवन सिमित आहे. पण या सिमित जीवनाचे याच अनंत काळाशी नाते आहे. याच संदर्भात ईश्वराच्या विभुतिची ओळख दिलेली आहे. याच संदर्भात अर्जुनाला विश्वरुपदर्शन दिलेले आहे. विश्वरुपदर्शन झाल्यावर अर्जुन त्याची वर्तमानातील प्रवृत्ति जाणण्याची इच्छा करतो. ईश्वर आपली ओळख देतो.

कालोअस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धः।(११-३२)
मया एवैते निहताः पूर्वमेव
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्।(११-३३)

येथे अर्जुनाला त्याची वर्तमानातील Destiny कळते.

सार:

काळ अनंत आहे पण मनुष्याजवळ वर्तमान आहे. मनुष्याला त्याचा वर्तमान जगण्यासाठी त्याचा जीवनचालक, सृष्टिचालक ईश्वर स्वतःची ओळख भगवदगीतेद्वारा करुन देत आहे.

"The art of life is to live in the present moment, and to make that moment as perfect as we can by the realization that we are the instruments and expression of God Himself. "

-Emmet Fox

*********

(१०-३०):"मृगाणां च मृगेंद्रो अहं वैनतेयश्च पक्षिणाम् "

जीवनांत श्रेष्ठ होणे, "मोठे" होणे जीवनाचे सुखासाठी ध्येय असेल तर हे श्रेष्ठत्व लाभण्यासाठी कोणते Attitude हवे?याचे रहस्य भगवतगीता सांगते.

धर्म जीवनाचे Manual आहे असे धर्मधुरिण सांगतात. चांगलेपणा धर्माचे मुळ आहे असे जाणतात. मनुष्य चांगलेपणा आचरण करतो. तरी दुःख, अडचणी त्याला जाणवतात. अर्जुन अशाच दुःखाच्या वादळात सापडतो. व दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो. व आपण योग्य आहोत हे सिद्ध करण्यासाठी धर्माचा दाखला देतो. स्वतःला ज्ञानी दर्शवितो.

अर्जुन वास्तव(नियतकार्य करणे योग्य कि अयोग्य?) स्विकार करीत नाही. दुःख टाळण्यासाठी निष्क्रियता पसंद करतो. व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी अहंकाराचा आश्रय करतो. याचीच परिणिति अज्ञानाला ज्ञान दर्शविण्यात होते. अर्थात हा अज्ञानाचा आश्रय बनतो. म्हणुन ज्ञानी मनुष्याचा मार्ग कोणता?हा प्रश्न उपस्थित होतो.

जीवनातील अडचणीशी, दुःखाशी सामना करण्याची शक्ति, ज्ञान प्राप्त होणे याच संदर्भात ईश्वराचा आश्रय म्हटले आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

ज्या ईश्वराचे चिंतन होत नाही अशा अव्यक्त(अव्यक्तोअयं अचिंत्योअयं) ईश्वराचे ज्ञान (प्रकृति)विज्ञानासह श्रीकृष्ण स्पष्ट करतात. पण याच ईश्वराच्या ज्ञानात रममाण होणाऱ्याला बुद्धियोग देतो. ज्याद्वारे जीवनाच्या विकासमार्गावर असतो. या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही, अडचणी विकाससंधि ठरते.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

हे भाष्य ऐकल्यानंतर अर्जुन प्रश्न करतो, या ईश्वराचे चिंतन या जगतात कसे करायचे?याच प्रश्नाच्या उत्तरात विभूतिचिंतन(अध्याय १०) आले आहे.

मृगाणां च मृगेंद्रो अहं वैनतेयश्च पक्षिणाम् ।( १०-३०)

सर्व प्राण्यांत सिंह श्रेष्ठ आहे, तर पक्षांत गरुडपक्षि श्रेष्ठ आहे. हे श्रेष्ठत्व ईश्वराची विभूति जाण.

उंची, शक्ति, भव्यता, चपळता, चातुर्य या संदर्भात तुलना केली तर जिराफ, हत्ती, चित्ता किंवा कोल्हा श्रेष्ठ ठरतो. तरी सिंह या सर्वांचा "राजा" ठरतो. कां?
सिंह निर्भय असतो. त्याला त्याच्या शक्तिवर विश्वास असतो (आत्मविश्वास). संघर्षाचे संदर्भात योद्धा असतो. निर्भयता, आत्मविश्वास(सिंहासारखे श्रेष्ठत्व) ज्याचे ठायी आहे तो दुःखाने विचलित होत नाही.

"All birds find shelter during rain. But eagle avoids rain by flying above the clouds"

सर्व पक्षी पावसापासुन बचाव करण्यासाठी आश्रय शोधतात, तर गरुड ढगाच्या वर उड्डान करतो.

व्यवहारात सकाम कर्म असते. पण याच मानसिकतेने प्रत्यक्ष कर्मक्षेत्रावर असले तर परिणामभयाने संशयी होतो. म्हणुन श्रेष्ठांचे Attititude धारण होण्यासाठी ईश्वराचा आश्रय करणे याचे महत्व भगवतगीता सांगते. या Attitude धारणेत निष्काम कर्म (योगः कर्मसु कौशलम्, भक्तिसाठी कार्य) घडते. व गरुडाचे वा सिंहाचे ठायी असलेल्या शक्तिची धारणा होते, ज्यामुळे दुःख विचलित करीत नाही.

यस्मिन स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते।(६-२२)

व्यावहारिक बोध:
मनुष्यजीवन अमुल्य आहे. या जीवनाचे महत्व जाणणे मनुष्याचे दायित्व आहे. याचसाठी ज्ञान मनुष्य घेत असतो. पण या ज्ञानाचा जीवनात वापर कसा करायचा याचे रहस्य भगवतगीता सांगते.

निष्क्रियतेचे, दुर्बलतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञानाचा वापर करणे हाच अहंकाराचा आश्रय ठरतो. याच अहंकारामुळे कोंबडी गरुडाला अक्कल शिकविते व गरुडाची कोंबडी बनते. (गरुडपिलु कोंबड्याच्या कळपात वाढते. गरुडाला उडावेसे वाटते, पण कोंबड्या त्याला ज्ञान देतात. "आपले काम नोहे". हीच मानसिकता मोठेपणी धारण होते.

"Born to win but conditioned to loose"

याच पार्श्वभुमिवर भगवतगीतेतील श्रेष्ठत्वाच्या Attitudeची धारणा महत्वाची ठरते. याच महत्वाच्या गुणामुळे स्वप्न साकार केले जातात,

Transforming dreams into action या संदर्भात म्हटले आहे,

"Dream is not the thing you see in sleep but is that thing that does not let you sleep. We do'nt just build on success, We also build on failures. Remember adversities always present opportunities. "

*******

(१०-३०)/२ :"मृगाणां च मृगेंद्रो अहं"

ईश्वराचे चिंतन या संदर्भात ईश्वराच्या वर्तमानातील, विश्वातील श्रेष्ठ विभूतिचे वर्णन करतांना

मृगाणां च मृगेंद्रो अहं।(१०-३०)

अर्थात वन्य प्राण्यांमध्ये सिंह श्रेष्ठ विभूति म्हटले आहे. सिंहाच्या श्रेष्ठत्वाची ओळख येथे करुन घ्यायची आहे.

सुखी व्हावे, असावे असे प्रत्येक जीवाला वाटत असते. सुखी जीवनासाठी त्याच्या जीवनाची वाटचाल सुरु असते. याचसाठी ज्ञान घेतो. पांडवावर अन्याय झाला म्हणुन त्यांची स्थिति अर्थातच सुखाची नव्हती. हा अन्याय दुर करण्यासाठी धर्मयुद्ध ठरते. प्रत्यक्षात युद्धक्षेत्रावर अर्जुन दुःखी होतो व सुखासाठी राज्य नको अशी भाषा बोलु लागतो. सुख मिळाले नाही तरी चालेल पण दुःख नको ही त्याची भूमिका असते म्हणुन युद्धाला नकार देतो.

येथे जे व्यवहारातील नियतकार्य होते ते योग्य कि अयोग्य याचा निश्चय करण्यास अर्जुन असमर्थ असतो हे वास्तव असते. तर त्याचा Interest दुःख टाळण्याचा अर्थात सुखाचाच असतो.

वास्तव hide करतो व आपली भूमिका धार्मिक आहे हे सिद्ध करण्यासाठी त्याला ज्ञात असलेले ज्ञान( धर्मज्ञान )बोलतो.

मनुष्याच्या सुखाच्या संकल्पना जशा असतात, जसे ज्ञान असते, तशी त्याची वाटचाल सुरु असते. श्रेष्ठतम(मोठे) या संदर्भात श्रीमंति, किर्ती(Fame), साधु(महात्मा) यांचेशी संबंध जोडल्या जातो. याच श्रेष्ठत्वाचा सुखाशी संबंध जोडलेला असतो.

अर्जुनाच्या भाष्यात वास्तव वेगळे असते व interest वेगळा असतो. आपला interest श्रेष्ठत्वाशी जोडतो. यामुळे वास्तव बाजुला पडुन श्रेष्ठत्व हाच प्रथम विषय बनतो. श्रेष्ठत्वाविषयीचा गैरसमज दुर होवुनच वास्तवाचा मुख्य विषय पुढे येतो.

श्रीकृष्ण प्रथम श्रेष्ठत्वाच्या संदर्भात भाष्य करतात. अर्जुनाची भूमिका श्रेष्ठत्वाला अशोभनिय व किर्ती किंवा स्वर्ग यापासुन वंचित करणारी ही भूमिका आहे असे दर्शवुन देतात.

"श्रेष्ठत्व"याच संदर्भात सिंहाची श्रेष्ठ भूमिका जाणणे आवश्यक आहे. उंची, शक्ति, भव्यता, चपळता, चातुर्य या संदर्भात तुलना केली तर जिराफ, हत्ती, चित्ता किंवा कोल्हा श्रेष्ठ ठरतो. तरी सिंह या सर्वांचा "राजा" ठरतो. कां?

सिंह निर्भय असतो. त्याला त्याच्या शक्तिवर विश्वास असतो (आत्मविश्वास). संघर्षाचे संदर्भात योद्धा असतो. निर्भयता,

आत्मविश्वास(सिंहासारखे श्रेष्ठत्व) ज्याचे ठायी आहे तो दुःखाने विचलित होत नाही. ही मानसिकता धारण होण्यासाठी भगवतगीता जीवनाचा Standard मार्ग सांगते,

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

या मानसिकतेची धारणा होण्यासाठी बुद्धिची स्थिर व चंचल अवस्था यांतील भेद सांगते. स्वतःवर command यातील रहस्य कळते.

हा भेद जाणुनच सुखी जीवनासाठी निवड स्वतःला करायची आहे.

इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः।(२-६०)

अर्थात जीवनरथातील (इंद्रियरुपी) घोडे सारथ्याला मार्गदर्शन करणार! (याच अवस्थेत नकारात्मकता असते)

कि,

सारथी घोड्यांना मार्ग दाखविणार?

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः।

वशे हि यस्य इंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।(२-६१)

******

(१०. ३२)

***********************

सर्गाणाम् आदिअंतश्च मध्यं चैव अहं अर्जुन।

अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदताम् अहम्

*************************

१०-३२ :

"सर्गाणाम् आदिः अंतः च मध्यं चैव अहं अर्जुन"

(Creative world &Creatures)

"दुखमे सुमिरन सब करें सुखमे करे ना कोय।

जो सुखमे सुमिरन करे तो दुख काहे होय।"

संत कबिरांचा हा प्रसिद्ध दोहा आहे. ईश्वराचे नित्य स्मरण होणे या संदर्भात अर्जुन प्रश्न करतो,

कथं विद्यां अहं योगींस्त्वां सदा परिचिंतयन् ?

केषु केषु च भावेषु चिंत्योअसि भगवन् मया।(१०-१७)

ईश्वर अव्यक्त(निराकार, Formless), निर्गुण आहे तर चिंतन कसे करणार?कोणकोणत्या भावात(विभूति) ईश्वराचे अस्तित्व

जाणावे?या प्रश्नाच्या उत्तरादाखल ईश्वराच्या विभूतिचे वर्णन आलेले आहे.

(वासुदेवमय )जगात संपन्न, उर्जायुक्त(श्रीमतम् उर्जितम् ) जे जे विश्वात (जंगम-स्थावर) आहे त्या सर्व ईश्वराच्या साक्षात विभूति आहे. या विभूति ईश्वराचे अस्तित्व दर्शवितात, त्याची आठवण करुन देतात. ईश्वराचे चिंतन होते.

यत् यत् विभूति मत्सत्त्वम् श्रीमत् उर्जितमेव वा।
तत् तदेव अवगच्छ त्वम् मम तेजोंअंश संभवम् ।(१०-४१)

*सृष्टिचा प्रवाह (सर्ग)अखंड सुरु असतो. या प्रवाहात दररोज मानवप्राणि जन्म घेतात व मृत्युही पावतात. "यह जिंदगीके मेले दुनियामे कम ना होंगे... "हा सृष्टिप्रवाह जेथुन सुरु होतो ते उगमस्थान, प्रवाहाचा अंत व मध्य यांचा विचार होतो, तेंव्हा ईश्वराचे स्मरण होते. कारण हा सृष्टिप्रवाह, त्याचा उगम, अंत, मध्य ईश्वराची विभूति आहे.

सर्गाणाम् आदिः अंतः च मध्यं चैव अहं अर्जुन।
अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदताम् अहम्।(१०-४१)

*जगात ज्ञान या संदर्भात जितक्या विद्या आहेत, त्या सर्वात श्रेष्ठ विद्या अध्यात्मज्ञान असते. कारण या विद्येचा संबंध सरळ स्वतःच्या जीवनाशी, जीवनविकासाशी असतो. अध्यात्मज्ञान ईश्वराची विभूति आहे. अर्थात अध्यात्मज्ञान म्हटले कि ईश्वराचे स्मरण होते.

*जगात भाष्य होते, चर्चा होतात. स्वतःला, स्वतःच्या पक्षाला योग्य सिद्ध करण्यासाठी होणारे भाष्य जल्पा असते तर इतरांना चुक ठरविणे, चुक सिद्ध करण्यासाठी भाष्य करणे, विरुद्ध पक्षाचे दोष काढणे हा वितंड असतो. तर निश्चित निर्णय होण्यासाठी (Conclusion) सांगोपांग चर्चा होते तो वाद-संवाद असतो. वाद-संवादामध्ये निश्चित प्रश्न असतो, निश्चित विषय(Agenda) असतो. असा मौलिक वाद-संवाद ईश्वराची विभूति असते.

***********

(१०. ३२)/१:

"अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदताम् अहम्"

समाजात मानसिकता बदल व सकारात्मक भाष्य यासंबंधी Motivational Workshop, प्रवचने होतात . या अनुषंगाने भगवतगीतेचे संदेश जाणणे महत्वाचे ठरते.

अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदताम् अहम्।(१०-३२)

समाजात "अध्यात्म" या शब्दाचा व्यावहारिक संदेश ईश्वरभक्ति, आत्मबोध असा होत असतो. तर "वाद" या शब्दाचा व्यावहारिक संदेश तंटा, विरोध असा असतो. पण भगवतगीता या शब्दाचे निश्चित (सकारात्मक व व्यावहारिक उपयोगिता)महत्व highlight करते.

भगवतगीता युद्धप्रसंगी सांगितली आहे. व या Conflict परिस्थितित अध्यात्म, शांति याचा भगवतगीता उल्लेख करीत आहे. कारण जीवनात मनुष्याला लाभलेली परिस्थिति व त्याची मनःस्थिति/आत्मस्थिति यांचा परस्पर संबंध असतो. प्रश्न असतो, परिस्थिति आत्मस्थितिला Dominate करीत आहे(वर्चस्व कुणाचे?) कि आत्मस्थिति परिस्थितिवर नियंत्रण करीत आहे? हाच भगवतगीतेचा महत्वाचा विषय अाहे.

जरामरणमोक्षाय माम् आश्रित्य यतन्ति ये।
ते ब्रह्म तद् विदुः कृत्स्नं अध्यात्मं कर्म च अखिलं॥(७-२९)

जीवनातील दुःख, वृद्धावस्था, मृत्यु या नकोशा अवस्था असल्या तरी जीवनाचे वास्तव आहे. या अवस्थेचा (परिस्थिति) मनुष्याच्या मानसिकतेवर विपरित परिणाम झाला तर नकारात्मक मानसिकता तयार होते. याच मानसिकतेचे दर्शन त्याच्या कार्यात व भाष्यात दिसते. अर्जुन दुःखी झाला असता आपल्या निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी धर्माचा पुरावा देतो. म्हणुन जीवनाचे ज्ञानविज्ञान सांगतांना प्रथम त्याच्या भाष्याला श्रीकृष्ण "प्रज्ञावाद"संबोधतात व मानसिकताबदल या संदर्भात अध्यात्म विषय येतो.

वादः प्रवदातम् अहम् -
मनुष्य भाष्य बोलतो. यांत संवाद होतो, चर्चा होते. या संदर्भात जलपा-वितंड व वाद-संवाद अशी मुख्य विभागणि असते. स्वतः योग्य आहे किंवा विरुद्ध बाजु अयोग्य आहे, हे सिद्ध करण्यासाठी पुरावा देणे हा प्रज्ञावाद असतो. स्वतःला योग्य ठरविण्यासाठी अर्जुन याच तंत्राचा वापर करतो.

एखाद्या प्रश्नावर विषय निश्चित करुन चर्चा घडवुन आणणे हा संवाद असतो. चर्चेतुन, मंथनातुन निष्कर्ष निघुन निर्णय ठरतो याला "वाद" म्हटले आहे. ही निरोगी चर्चा वाद-संवाद असते.

अध्यात्म-

मानसिकता बदल या संदर्भात तत्वज्ञ State of Consciousness चा उपयोग करतात. याच आधारावर कांही तत्वज्ञ Lower Self-Higher Self असा उपयोग करतात. भगवतगीता मनोवश व आत्मवश अवस्था यांतील भेद स्पष्ट करते व आत्मवश अवस्थेसाठी अध्यात्माची उपयोगिता सांगते.

अक्षरं परं ब्रह्म स्वभाव अध्यात्म उच्यते।(८-३)
मद् अनुग्रहाय परमं गुह्यं अध्यात्म संज्ञितम् ।(११-१)
अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञानार्थ दर्शनम् ।
एतद् ज्ञानं इति प्रोक्तं अज्ञानं यदतो अन्यथा॥(१३-१२)

स्वतःच्या जीवनाचे मुळ शाश्वत तत्व जाणणे याला अध्यात्म म्हटले आहे. हे ज्ञान जाणुन मोह(अशाश्वताला attached) नष्ट

झाला असे अर्जुन कबुल करतो. नित्य ज्या ज्ञानाचा आश्रय करणे आवश्यक ते अध्यात्मज्ञान व तत्वज्ञानाने या शाश्वताला जाणणे हे ज्ञान अन्यथा अज्ञान. अर्थात जीवनाचे मुळ शाश्वत तत्व जाणुन जीवनाचा विकासमार्ग ठरत असतो. यामुळे मानसिकता दुबळी होत नाही. व सक्षम मानसिकता विकासाचे मुळ उद्दिष्ट बनते(योग- दुःखान्त, त्रायते महतो भयात्)

******

(१०-३२)/२ :

"वादः प्रवदताम् अहम्"

(भाष्य)

"बहिर्मन व अंतर्मन यांत जेंव्हा संवाद होतो, तेंव्हा जीवनात सुखाचा सुकाळ होतो. परंतु या दोघांत जेंव्हा वितंडवाद होतो, तेंव्हा जीवनात सुखाचा दुष्काळ होतो. "

- वामनराव पै

समाजात भाष्य होते, परस्पर चर्चा होते. हे भाष्य बोलतांना किंवा ऐकतांना Awareness असावे यासाठी संवाद व वाद यातील भेद जाणणे आवश्यक असते. समाजात दोन किंवा अधिक व्यक्तित

होणारी चर्चा याला संवाद संबोधले जाते. तर वितंड या अर्थानेच फक्त वाद जाणत असतात. हा सिमित अर्थबोध असतो.

भगवदगीतेत ज्ञान या संदर्भात विद्या व भाष्य या संदर्भात वाद, संवाद हे शब्द आलेले आहेत. भगवदगीतेतील श्रीकृष्ण व अर्जुन यांच्यातील चर्चेसाठी "संवाद" शब्द वापरलेला आहे. तर"वादः प्रवदताम् अहं " अर्थात परस्परार्थ शास्त्रार्थ हेतुने भाष्य होते याला "वाद" संबोधले आहे. व हा वाद ईश्वराची विभूति म्हटलेले आहे.

अध्यात्मविद्या विद्यानाम् वादः प्रवदताम् अहं।(१०-३२)
अध्यष्यते च य इमं धर्म्यं संवादम् आवयोः।(१८-७०)

संवाद :

Dialogue vs. Monologue:

"Dialogue cannot exist without humility. "

-Paulo Freire

मनुष्य जे करतो, ते योग्य समजुनच करतो. समाजात विविध पक्षवादी, विविध धर्मवादी असतात. ज्यांच्या भाष्याची हवा कोणत्या दिशेने जाणार हे आधीच निश्चित होते, ते monologue असतात.

धर्मगति जाणुन धर्माचरण करणे यासाठी रामायणात "धरमधुरिन" हा शब्दप्रयोग आहे. (धरमधुरिन धरमगति जानी) अर्थात प्रत्यक्षात स्वधर्माचरण करणे व "वाद" करणे यांत भेद आहे. अर्जुन दुःखी झाला असता स्वतःच्या (निष्क्रिय)भूमिकेला योग्य सिद्ध करण्यासाठी शास्त्रार्थ करतो. याला "प्रज्ञावाद" संबोधले आहे.

अर्जुनाला युद्ध करण्यासाठी motivate केले असा चुकीचा संदेश समाजात जात असतो. पण भगवदगीतेतील motivation अर्जुनाला त्याचे वास्तवाचा स्विकार करण्यासाठी झालेले आहे.

अर्जुनाच्या भाष्यात Judgement thinking असते, वास्तवाचा स्विकार नसतो. श्रीकृष्ण हेच वास्तव दर्शविण्यास त्याला motivate करतात.
अनार्यजुष्टम् अस्वर्ग्यम् अकीर्तिकरम् अर्जुन।(२-२)

अर्जुनाचे भाष्य Dialogue (संवाद) नसुन Monologue असतो. अर्जुनाने सरळ युद्ध केले असते तर या दिव्य संवादाचे कांहीच प्रयोजन नव्हते. अर्जुन वास्तवाचा स्विकार करतो. व चर्चेला निश्चित विषय मिळतो. अर्जुन निश्चित प्रश्न करतो. माझ्यासाठी दुःखदायी असलेले युद्ध मी कां करावे?येथुनच संवादाला सुरुवात होते.

* "वादः प्रवदताम् अहं" (Arguments and Conclusion thereof)

वाद हा तीन प्रकारचा असतो. १. जल्प(अथवा जलपा) २. वितंड ३. वाद

जल्प: आपल्या पक्षाचे युक्ति-प्रयुक्तिने समर्थन व दुसऱ्या पक्षाचे खंडण करुन आपल्या पक्षाला विजय मिळवुन देणे व दुसऱ्या पक्षाची हार होण्यासाठी शास्त्रार्थ करणे.

वितंड: स्वतःचा पक्ष न मांडता दुसऱ्या पक्षाचे केवळ खंडणच करण्यासाठी जो शास्त्रार्थ होतो .

वाद : पक्षपात न करता केवळ तत्व-निर्णयासाठी परस्परात विचार-विनिमय होतो व (उपयुक्त) निष्कर्ष निघतो.

या तिन्ही वादामध्ये "वाद" श्रेष्ठ असतो. म्हणुन ईश्वराची विभूति म्हटलेले आहे.

०००००००

Dialogue - Argument & its Reality

"A conversation is a dialogue, not a monologue. That's why there are so few good conversations: due to scarcity, two intelligent talkers seldom meet. "

-Truman Capote (American Novelist)

"Never argue with stupid people, they will drag you down to their level and then beat you with experience. "

-Mark Twain

*********

(१०-३३)

***********************

अक्षराणाम् अकारोअस्मि द्वंद्वःसामासिकस्य च।

अहमेवअक्षयकालः धाताअहं विश्वतोमुखः।।

*************************

(१०-३३):

"अहमेव अक्षयः कालो धाता अहं विश्वतोमुखः"

(ईश्वरगति)

जीवनविकासमार्गावर स्वतः स्वतःचा बंधु असणे अर्थात आत्मवश असणे भगवतगीतेला अपेक्षित आहे. मनोवैज्ञानिक भाषेत हा संदर्भ Higher Self(/Consciousnes) क्रियाशील करणे असते. दुःखी असणे, चिंता करणे, विचलित होणे, नकारात्मक असणे हे सर्व (Stress ) Lower Self(/Consciousness, Senses mind) क्रियाशील असणे दर्शविते. अर्थात येथे स्वतःच स्वतःचा शत्रु ठरतो. हा Influencing Self असतो.

अनात्मनः तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत् ।(६-६)

याचसाठी "जीवनविकास" या संदर्भात ईश्वरगतिचे ज्ञान (काळ-Time, निर्माता-Creater, बदलाव करणारा, भविष्याचा निर्माता )जाणले तर मनुष्याला स्वतःची भूमिका जाणता येते.

अहमेव अक्षयः कालो धाता अहं विश्वतोमुखः।(१०-३३)
मृत्यु सर्वहरश्च अहं उद्भवश्च भविष्यताम् ।(१०-३४)

जीवनविकास या संदर्भात मनुष्य सुखी होणे/असणे, भोगैश्वर्यप्राप्ति, स्वतःचे अस्तित्व/श्रेष्ठत्व, स्वजनसुख इ. जाणत असतो व याचसाठी कार्याचे Purpose जाणतो(Default knowledge). याच मानसिकतेनुसार (दुःखी झाल्यामुळे) अर्जुन "मला कांही नको" म्हणुन नियतकार्य टाळतो. व्यवहारमार्गात मनुष्य सकाम कार्यरत असतो. यामुळेच अर्जुन दुःखी होतो. येथे Lower Self क्रियाशील असते. तेंव्हा येथेच Transformation चे ज्ञान अपेक्षित असते. "Allow Higher Self be active"हेच ज्ञान भगवतगीता सांगत आहे.

Transformation:

१. विकासमार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा असतो.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

२. नियतकार्य स्वधर्मात, निर्णय दृढनिश्चयातTransform करतो व स्वतःचा(स्वतंत्र) विकासमार्ग बनतो.

३. योगस्थ मानसिकता धारण करुन "योगः कर्मसु कौशलम्" अर्थात समत्वयोगाने कार्यरत असतो.

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।

तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन॥(८-२७)

अर्थात सृतिचा(hearsay)ही Influence होत नाही यामुळे विचलित होत नाही. आत्मविश्वासाने विकासमार्गावर असतो.

******

(१०-३६)

************************

द्युतं छलयताम् अस्मि तेजः तेजस्विनाम् अहम् ।

जयो अस्मि व्यवसायोअस्मि सत्त्वं सत्त्वमताम् अहं॥

**************************

(१०-३६) :

"तेजः तेजस्विनाम् अहम् "

(जीवनयात्रेतील दुर्बलता vs. सक्षमता)

धर्म, चांगलेपणाचा आदर्श यांचा दाखला देवुन मनुष्याच्या दुर्बलतेचा भगवदगीता पुरस्कार करीत नाही तर या विरोधात आक्षेप नोंदवते. हीच घटना भगवदगीता ज्ञानाची सुरुवात ठरते.

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ न एतद् त्वयि उपपद्यते।(२-३)

अर्जुनासारख्या श्रेष्ठ मनुष्याला क्लैब्य अशोभनिय आहे. ही भूमिका अपकीर्तिचे कारण ठरणारी आहे.

अकीर्ति च अपि भूतानि कथयिष्यन्ति ते अव्ययाम् ।

संभावितस्य च अकीर्तिः मरणात् अतिरिच्यते॥(२. ३४)

धर्माचा दाखला देवुन मनुष्याच्या शोषणाचा पुरस्कार करणाऱ्या धर्माचा कार्ल मार्क्सने निषेध केला व धर्मालाच अफुची गोळी ठरविले. जीवनात दुर्बलता नसावी, परावलंबन नसावे हे जीवनविकासात अभिप्रेत असते. वर्तमानात मनुष्य स्वतःला सक्षम करण्यासाठी ज्ञानाचा शोध घेत असतो. याच पार्श्वभुमिवर मनुष्याला सक्षम करणाऱ्या ज्ञानाचा, धर्माचा शोध वर्तमानात घेणे ही स्वाभाविक गरज ठरते. हीच पुर्तता भगवदगीता करीत आहे.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)
जगाला चांगलेपणाची गरज असते. जगातील चांगलेपणाला सक्षम करणाऱ्या धर्माचा भगवदगीता पुरस्कार करते. मनुष्याला "दुर्बलता vs. सक्षमता" यातील भेद भगवदगीता स्पष्ट करीत आहे. हाच भेद जाणण्यासाठी " दैवीगुणसंपत्ति Vs. असुरगुणसंपत्ति" हा भेद स्पष्ट केला आहे.

विश्वातील व्यवस्थेविषयी डार्विनने "Survival of the fittest " हे रहस्य उघड केले.

सिंह: शिशुरपि निपतति मदमलिनकपोलभित्तिषु गजेषु ।

प्रकृतिरियं सत्त्ववतां न खलु वयः तेजसो हेतु:॥

"सिंहाचा छावासुद्धा मदमस्त हत्तीवरही हल्ला करतो. असे म्हटले जाते की, शक्तिशाली प्राण्याचा हा स्वभाव असतो, येथे वयाचा तेजस्विताच्या भावनेचा काहीही संबंध नाही. "
याच पार्श्वभुमिवर ईश्वराचे चिंतन या संदर्भात सिंहाला (प्राण्यामधील) ईश्वराची विभूति म्हटले आहे.
मृगाणां च मृगेन्द्रो अहं ।(१०-३०)

यद् यद् विभूति मत्सत्त्वम् श्रीमत् उर्जितमेव वा।
तद् तद् एव अवगच्छ त्वम् मम तेजोअंश संभवम् ।।(१०-४१)
अर्थात ईश्वराचा आश्रय तेजाचा (शक्तिचा) आश्रय असतो.
याप्रमाणे तेजस्वि मनुष्यातील तेजस्विता ईश्वराची विभूति असते.
तेजः तेजस्विनाम् अहम् ।(१०-३६)

दैवी गुणात निर्भयता, धृति(साहस), तेज यांचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे. अर्थात मनुष्यातील चांगलेपणा निर्भयता, तेज, धैर्य या गुणाशिवाय अपुर्ण ठरतो.
अभयंसत्त्वसंशुद्धिः।(१६-१)

तेजः क्षमाःधृति: शौचम् अद्रोहो न अतिमानिता।
भवन्ति सम्पदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव॥(१६-३)

**********

(१०-३६):

"जयोअस्मि व्यवसायोअस्मि सत्त्वम् सत्त्वमताम् अहं"
(The world of Winners)

चांगल्या लोकांची निष्क्रियता:

"The penalty that good men pay for not being interested in politics is to be governed by men worse than themselves".

-Plato

दुष्कृत्य करणारे तर कोणत्याच अडचणीची पर्वा करीत नाही व कुणाच्या परवानगीची वाटही बघत नाही. पण चांगल्या लोकांनाच समाजात अडचणी जाणवतात!

व प्रसंगी निष्क्रियता आदर्श दिसेल असे समर्थन करतात.
 या प्रक्रियेत स्वतःला ज्ञानी समजुन भाष्य करतात. "समाजात स्वार्थ, भ्रष्टाचार आहे व चांगल्याचे जगणे कठीण आहे" असा भाष्याचा सूर कांही लोक लावित असतात.

समाजात दोष निर्माण झाला तरी लोकांनी जगणे सोडले नसते. कांही अफाट प्रगति साधतात व कांही सतत टिका करतात. केवळ टिका करुन दोष दुर होत नाही तर नकारात्मक संदेश जातात व वातावरण गढुळ होते. या पार्श्वभूमिवर समाजातील चांगल्या लोकांची निष्क्रियता हाच समाजातील अज्ञानाचा मुद्दा ठरतो. हाच विषय भगवतगीतेने घेतला आहे.

अर्जुन वास्तवाचा स्विकार न करता निष्क्रियतेचे समर्थन करतो. वास्तव स्विकारतो तेंव्हाच प्रश्न समोर येतो. अर्जुन म्हणतो, धर्मासाठी काय योग्य(युद्ध करणे वा न करणे) यांत संशय निर्माण झाला आहे हे वास्तव असले तरी युद्ध जिंकुन लाभणार असलेली प्राप्ति लक्षात घेतली तर पृथ्वीवरील किंवा देवाचे राज्य मिळाले तरी शोक कसा नष्ट होणार?हेच मला कळेनासे झाले आहे. हाच खरा प्रश्न असतो व उत्तर असते,

"धर्मकार्य म्हणजे कार्याद्वारे भक्ति. अर्थात (धर्म)कार्याने शोकमुक्ति, दुःखान्त, योग "
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।

भगवतगीतेत ईश्वराची ओळख ज्ञानविज्ञान संदर्भात आलेली आहे. याच ज्ञानाचा स्त्रोत ईश्वर आहे. सृष्टिचा अध्यक्ष(मया अध्यक्षेण) ही अव्यक्त ईश्वराची ओळख आहे. याच ईश्वराचे चिंतन करण्यासाठी वर्तमानात कोणत्या रुपात जाणावे?हा अर्जुनाचा प्रश्न असतो(कथं विद्याम् अहं योगी त्वां सदा परिचिंतयन) . याच प्रश्नाचे उत्तरात विभूतिवर्णन आहे.

हे जगच नित्य कार्यरत आहे. वर्तमानातील कार्याचे जग पुढीलप्रमाणे वर्णिले आहे.

१. The world of Winners

जयोअस्मि व्यवसायोअस्मि सत्त्वम् सत्त्वमताम् अहं।।(१०-३६)

जिंकणाऱ्याचा विजय, कार्याचा निश्चय, जिंकणाऱ्याची (सकारात्मक) शक्ति ईश्वराची विभूति जाण.

इतर दोन:

२. The world of State of Art

(वर्तमानातील कार्यप्रतिभा)

वृष्णिनां वासुदेवोअस्मि पांडवानां धनञ्जयः।
मुनिनाम् अपि अहं व्यासः कवीनाम् उशना कविः।।(१०-३७)

३. The world of Administration

(प्रशासन, व्यवस्थापन)

दण्डो दमयताम् अस्मि नीतिः अस्मि जिगीषताम् ।
मौनं चैव अपि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवताम् अहं।।(१०-३८)

******

(१०-३८)

************************

दण्डो दमयताम् अस्मि नीतिःअस्मि जिगीषताम् ।

मौनं चैवअस्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवताम् अहम् ।।

**************************

(१०-३८)/१:"नीतिअस्मि जिगीषताम् "

(Morality of Winners)

ईश्वर हेच विश्वाचे उगमस्थान, विश्वाचा आधारस्तंभ, सार्वभौमत्व आहे. या संदर्भातील ईश्वराच्या ज्ञानाचे व भूमिकेचे वर्णन कथा, किर्तन यातुन होत असते. ईश्वराचे सार्वभौमत्व याच संदर्भातील भूमिकेचे वर्णन भगवतगीतेत ज्ञानविज्ञानासह स्पष्ट केलेले आहे, ज्याचा अंश मनुष्याच्या जीवित तत्वाचा भाग आहे. हे ज्ञान कथन करणे, या ज्ञानात रमणे, संतुष्ट होणे. याद्वारा ईश्वराला भजत असतो, त्याला बुद्धियोग देतो.

मत् चित्ता मद् गतप्राणा बोधयन्तः परस्परम्।

कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्तिं च॥(१०-९)

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपुर्वकम्।
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते॥(१०-१०)

मनुष्याचा व्यवहारमार्ग (State of want-State of Art) सकाम असतो. (मनाच्या चंचलत्वामुळे) हा मार्ग कच्चा होण्याचे Chances असतात. मार्ग पक्का होण्यासाठी जीवनमुल्यांचे (स्वावलंबन, वचन, स्वधर्म.. ) महत्व आहे. मार्ग पक्का होण्यासाठीच "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) या मार्गाचे महत्व आहे. या मार्गात कर्माची निष्काम मानसिकता असते. याच मार्गात ईश्वरभक्ति घडते. (दुःखान्त, योग, नैष्कर्मसिद्धि)शक्तिची साधना होते.

ईश्वराचे सार्वभौमत्व याच संदर्भात अर्जुन प्रश्न करतो, Existed जगात ईश्वराच्या कोणत्या दिव्य विभूति जाणायच्या?ज्यामुळे चिंतन, रमणे शक्य होईल.
कथं विद्याम् अहं योगीं त्वां सदा परिचिंतयन् ।
केषु केषु च भावेषु चिंत्योअसि भगवन् मया॥(१०-१७)

या प्रश्नाचे उत्तरातील सार:

यत् यत् विभूति मत् सत्वं श्रीमतं उर्जितम् एव वा।

तत् तत् एव अवगच्छ त्वं मम तेजोअंश संभवम् ।।(१०-४१)

विजय मिळविण्यासाठी, व्यवस्थापन सुरळित चालण्यासाठी, धर्मरक्षणासाठी वा स्थापनेसाठी अर्थात जग सुखी होण्यासाठी ज्या शक्तिची, नीतिची गरज असते, त्या सर्व शक्ति ईश्वराच्याच दिव्य विभूति जाणाव्यात.

नीतिअस्मि जिगीषताम् ।(१०-३८)

*A winner is someone who recognizes his God-given talents, works his tail off to develop them into skills, and uses these skills to accomplish his goals.

Larry Bird

******

(१०-३८)/२:

"नीतिःअस्मि जिगीषताम् "

(Art of success)

मनुष्याला सुखी व्हायचे असते व सुखासाठी यशस्वि व्हायचे असते. या यशाचे चिंतन आसक्ति होवुन कार्य सकाम ठरते. पण याच यशाचे चिंतन ईश्वराचे चिंतन होण्याचे रहस्य भगवदगीता सांगत आहे, ज्यामुळे कार्याचा निश्चय ढळत नाही व निष्काम कर्म घडते .

स्वतःचे नियतकार्य ईश्वराच्या कार्याचे निमित्त जाणुन त्याद्वारे भक्ति साधणे हा विश्वरुपदर्शनयोगाचा संदेश आहे. हा संदेश यशाच्या विचारासह ("War is won in the mind first")आलेला आहे.

तस्माद् त्वं उत्तिष्ठ यशो लभस्व।(११-३३)

अव्यक्त(अव्यय) ईश्वराचे चिंतन होण्यासाठी ईश्वराच्या विभूतिचे दर्शन विभूतियोगात आहे. याच विभूतिचे वर्णन "यश" या संदर्भात आलेले आहे.

जयोअस्मि व्यवसायोअस्मि सत्त्वं सत्त्वमताम् अहम्।

...

दण्डो दमयताम् अस्मि नीतिःअस्मि जिगीषताम् ।(१०-३८)

यशस्वि होणाऱ्याची नीति(Art, Morality) ईश्वराची विभूति आहे. विजयी होणाऱ्याचा विजय, कार्याचा निश्चय, व सात्त्विक मनुष्याची सात्त्विक शक्तिही ईश्वराचीच विभूति आहे. यांत "व्यवसाय" हा शब्द कार्याचा निश्चय या संदर्भात आलेला आहे.

भगवदगीतेत कार्याचा निश्चय(Determination) हाच मुख्य विषय आहे. यशस्वि मनुष्याचे कर्तृत्व या संदर्भात कार्याचा निश्चय, निर्णय अधिकार व निर्णयक्षमता, वचन (commitment) महत्वाचे पैलु ठरतात. सामान्यतः मनुष्याचा कार्यनिश्चय ढळला, निर्णय घेवु शकला नाही तरी मनुष्य स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी भाष्य बोलतो.

अर्जुनाचा कार्यनिश्चय युद्धक्षेत्रावर ढळतो. व येथेच भगवदगीता सुरु होते. अर्जुनाचे हे भाष्य ज्ञान या संदर्भात असते. याच पार्श्वभुमिवर "ज्ञान" व त्याचे जीवनातील महत्व" हा विषय भगवदगीतेत आलेला आहे. ज्ञानाने अज्ञान मिटते, संशय मिटतो व कार्याचा एकनिश्चय होतो. "ज्ञान" या संदर्भातच (शाश्वत)ईश्वराचे ज्ञान प्रकृतिच्या विज्ञानासह आलेले आहे. ज्याचा आश्रय यशाचा विचार देते, ज्ञानामुळे कार्याचा निश्चय होतो, व निष्काम कर्माचे शास्त्र आचरण करण्यास मार्गदर्शन करते.

सार :

"A positive attitude causes a chain reaction of positive thoughts, events and outcomes. It is a catalyst and it sparks extraordinary results. "
-Wade Boggs

"यशस्वि होण्यासाठी आत्मविश्वास हवा व यासाठी सकारात्मक विचार हवा" या logic मध्ये दुमत नसते पण याच logic नुसार दुसऱ्या महायुद्धात हीटलरने "गोबेल्स तंत्र"(खोट्याला खरे

दर्शविणे, असत्याला सत्य दर्शविणे) वापरले व त्याची परिणाम जगाने पाहीले, अनुभवले. यशाची आसक्ति विकार झाला तर कार्य सकाम व द्वन्द्व(यश-अपयश)युक्त बनते. म्हणुन यशाचा विचार व तत्संबंधी नीति ईश्वराचा आश्रय व त्याचे चिंतन व्हावे. कारण मनुष्याचे कर्तृत्व व ईश्वर यांचा संयोग होतो तेंव्हा,

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।

तत्र श्री: विजयो भूतिः धृवा नीतिः मतिः मम ॥(१८-७८)

तेथे वैभव, विजय, शक्ति, व नीतिही निश्चित असते.

********

१०-३८ :

"ज्ञानम् ज्ञानवताम् अहं"

जगात ज्ञान आले, तरी प्रश्न आहेत. मनुष्य सुखासाठी जगत असतो तरी दुःखाशी सामना आहे!मनुष्याला झालेले दुःख प्रश्न निर्माण करते. प्रश्नाचे निदान केले तरच उत्तर सापडते. अन्यथा Stress निर्माण होतो. मनुष्याच्या Healthला harm करतो.

आपल्या दुःखासाठी केवळ परिस्थितिला, जगाला दोषी धरुन जेंव्हा प्रश्न सुटत नाही तेंव्हा तो प्रश्न केवळ स्वतःलाच सोडवायचा असतो. अर्जुनाला असाच प्रश्न पडला. हा प्रश्न त्याला स्वतःलाच सोडवायचा होता. याच पार्श्वभुमिवर "ज्ञान" हा विषय चर्चेला येतो.

"Knowing others is wisdom, knowing yourself is Enlightenment. "

- Lao Tzu

समाजात मनुष्य योग्य असला किंवा नसला तरी स्वतःला योग्य दर्शविण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो. अर्जुनाचा दुःखाशी सामना होतो व दुःखमुक्तिचा उपाय व्यवहारात शोधतो. अर्थात कर्म प्राप्तिसाठी केल्या जाते व मला कांही नको . या आधारावर स्वतःला योग्य दर्शविण्यासाठी जे भाष्य बोलतो ते "ज्ञान" या संदर्भातच असते.

याच पार्श्वभुमिवर "ज्ञान " या संदर्भातच भगवदगीता जगासमोर आलेली आहे. व ज्ञानाला सर्वश्रेष्ठ म्हटले आहे.

"ज्ञान" या संदर्भातच ईश्वराची ओळख दिलेली आहे. मनुष्याचा चांगलेपणा दैवीगुणसंपत्ति दर्शवितो. याच चांगलेपणाला ईश्वरज्ञानाशी जोडल्या जाते तेंव्हा "ज्ञानयोग व्यवस्थितिः" असा दैवीगुणसंपत्ति म्हणुन उल्लेख होतो. जीव, विश्व, ब्रह्म(ईश्वर) याप्रमाणे अशाश्वत (प्रकृति) व शाश्वत (ईश्वर) या संदर्भात ज्ञानयोगातील ज्ञान अभिप्रेत आहे.

याच ईश्वराचा जीवनात नित्य आश्रय कसा करायचा हा भगवदगीतेचा विषय आहे.
तस्माद् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(१६-७)

यानुसार नित्य चिंतन कसे करायचे?अर्जुन हा प्रश्न करतो.
केषु केषु च भावेषु चिंत्योअसि भगवन् मया।(१०-१७)
अर्थात या विश्वातील ईश्वराचे अस्तित्व कोणत्या भावात जाणायचे? याचे उत्तर असते.
यद् यद् विभूति मत्सत्त्वं श्रीमत् उर्जितम् एव वा।
तत् तत् एव अवगच्छ त्वम् मम तेजोअंश संभवम्।(१०-४१)

यानुसार ज्ञानी मनुष्याचे ज्ञान ही ईश्वरविभूति असते.

दण्डो दमयताम् अस्मि नीतिःअस्मि जिगीषताम्।
मौनं चैवअस्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवताम् अहं।(१०-३८)

ज्ञानी जीवनाचे ज्ञान जाणतो, व विचलित होत नाही. अशा ज्ञानी पुरुषाचे ज्ञान ईश्वराची विभूति असते.

सार:

समाजात "अंधश्रद्धा/अज्ञान vs. ज्ञान " हा विषय चालत असतो. या संदर्भात जगाने भगवदगीतेची भूमिका जाणणे आवश्यक ठरते. ज्ञानच सर्वश्रेष्ठ आहे ही भगवदगीतेची भूमिका आहे व ज्ञानी मनुष्याचे ज्ञान ईश्वरविभूति (भाव) आहे.
उदाराः सर्व एवैते ज्ञानी तु आत्मैव मे मतम् ।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेव अनुत्तमां गतिम्।(७. १८)

*********

(१०-४०)

************************

न अन्तो अस्ति मम दिव्यानां विभूतीनां परन्तप।

एष तु उद्देशतः प्रोक्तो विभूतेः विस्तरो मया।।

************************

(१०-४०) :

"न अन्तो अस्ति मम दिव्यानां विभूतिनां परंतप"

(God as Motivator)

श्रीकृष्णाने स्वतःच्या ईश्वर या भूमिकेची अर्जुनाला ओळख करुन दिली. स्वतःचे ऐश्वर्य सांगतांना अर्जुनाला "परंतप"(शत्रुंवर विजय मिळविणारा) या संबोधनाने त्याची ओळख जागविली.

न अन्तो अस्ति मम दिव्यानां विभूतीनां परन्तप।

एष तु उद्देशतः प्रोक्तो विभूतेः विस्तरो मया।।(१०-४०)

भगवदगीतेत याप्रमाणेच कांही विशेष प्रसंगी अर्जुनाला "परंतप" असे संबोधुन त्याचा सन्मान दुखावल्या जाणार नाही, आत्मविश्वास कमी होणार नाही याची दक्षता घेण्यात आली. सकारात्मक संवादाचे हे दर्शन आहे.

*क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप।(२-३)

तुझ्यासारख्या शत्रुचे दमन करणाऱ्या शुराला क्लैब्य अशोभनिय आहे, म्हणुन हृदयाच्या क्षुद्र दौर्बल्यावर विजय मिळव. युद्धासाठी तयार हो.

*स कालेन इह महता योगो नष्टः परंतप।(४-२)

जे विकासज्ञान फक्त राजर्षि जाणत होते ते काळातच लुप्त झाले. तुझ्यासारख्या शुराला हे राजर्षिचे ज्ञान (Master morality) जाणणे आवश्यक आहे.

*श्रेयान द्रव्यमयात् यज्ञ ज्ञानयज्ञः परंतप।
सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

श्रीमंति, ऐश्वर्य मिळविण्यासाठी द्रव्ययज्ञ असतो. पण ऐश्वर्यापलिकडे ज्ञान असते म्हणुन द्रव्ययज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे

हे श्रेष्ठांनी जाणुन घ्यावे. कारण शेवटी सर्व कर्माचे ज्ञानातच विलिनिकरण होते.

*सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप।(७-२७)

व्यवहारात सकाम कर्म असते. द्वन्द्वमोहवश असल्यामुळे सर्वलोक सामान्य अवस्थेमध्ये (Herd morality) जगतात. पण शत्रुचे दमन करणारा श्रेष्ठ पुरुष या नात्याने सामान्य व श्रेष्ठ यांतील भेद तु जाणणे आवश्यक आहे.

* ज्ञातुं द्रष्टुं च तत्वेन प्रवेष्टुं च परन्तप।(११-५४)

ईश्वराचे विश्वरुप दर्शन देवलोकांसाठीही दुर्लभ आहे. या इहलोकी तुझ्याशिवाय कुणीही पाहीले नाही. हेच रुप व त्याचा वर्तमानातील संदेश हे रहस्य ज्ञानाने जाणुन घेणे शक्य आहे. (हेच ज्ञान भगवदगीतेतुन स्पष्ट केले)

संदेश:

Motivation या संदर्भात श्रीकृष्णाने अर्जुनाला युद्ध करण्यासाठी motivate केले नाही, तर अर्जुनाला त्याची ओळख दर्शवुन दिली. मनुष्यजन्माचे रहस्य दर्शवुन दिले. त्याला विकासाचा निश्चित मार्ग दाखविला. व याच विकासासाठी motivate केले. जणु ईश्वर मनुष्याला वर उचलण्यासाठी प्रोत्साहित करीत आहे.

"God has blessed me with the capacity to meditate even while I am talking. "

-Sri Chinmoy

********

(१०-४१)

************************

यत् यत् विभूति मत् सत्वं श्रीमतं उर्जितम् एव वा।

तत तत् एव अवगच्छ त्वं मम तेजों अंश संभवम् ॥

**************************

(१०-४१)/१ : "श्रीमत् उर्जितमेव वा"

Think of Prosperity

भगवतगीतेतील एक शब्दच अनेक संस्थांची Philosophy बनली. (योगक्षेमं वहाम्यहम् -आयुर्विमा, यशो लभस्व- Defense). समुद्रमंथनातुन अमृत निघाले, तसे ईश्वराने श्रीकृष्ण अवतार घेवुन भगवतगीता रुपाने ज्ञान अमृतच जगाला बहाल केले. यांतील एक थेंब(एक शब्द) मनुष्याचे जीवन बदलवु शकतो. असाच एक शब्द आहे, "श्रीमत् उर्जितमेव वा"

मनुष्याला जीवन मिळाले . सुखी जीवन जगणे कि दुःखी जीवन जगणे ही मनुष्याची निवड असते. यानुसार जीवनयात्रा सुरु असते.

दुःखी जीवन नकारात्मक व सुखी जीवन सकारात्मक जाणले तर नकारात्मक जीवनात नकारात्मक विचाराचे चिंतन(चिंता, भय, भूतकाळातील वेदना) आपोआप सुरु असते. नकळत मनुष्य आपल्या जीवनाला नकारात्मक लेबल(दुर्दैवी, गरीब, अपयशी) चिकटवतो.

Labeling theory : is the theory of how your identity and behavior is influenced by the terms (labels) you use to describe or classify yourself.

Labels are self-prophetic. The labels we attach to ourselves can be a powerful motivator or detractor.

Samples of positive labels:

Achiever, Beautiful, Generous, Giving, Compassionate, Friendly, Capable, Intelligent, Smart, etc.

Samples of negative labels:

Ugly, Stupid, Weak, Fat, Loser, Hopeless, Selfish, Unworthy, Poor, etc.

Thinking: the talking of the soul with itself.

Plato

"A man is what he thinks about all day long. "

- Ralph Waldo Emerson

सकारात्मक जीवन जगण्यासाठी ईश्वरचिंतन (Replacement of negative thinking by positive) आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।

अहं सर्वस्य प्रभवो मत्त सर्वं प्रवर्तते।(१०-८)

संपुर्ण सृष्टिचे मुळ ईश्वर आहे व त्याची प्रवृत्तिच सृष्टि संचलित करते, त्या ईश्वराच्या ज्ञानात नित्य रमतो, त्याला ईश्वर बुद्धियोग देतो. हे भाष्य ऐकल्यावर(विभूतियोग) अर्जुन प्रश्न करतो, ईश्वर अचिंत्य, अव्यक्त आहे तर तो या सृष्टित कसा व कोणत्या दिव्य विभूतित व्यापलेला आहे, ज्याद्वारे मला चिंतन करता येईल?

कथं विद्याम् अहं योगीं त्वाम् सदा परिचिंतयन।

केषु केषु च भावेषु चिंत्यो असिभगवन् मया।।(१०-१७)
उत्तर असते,

सृष्टि संचलनातील ईश्वराचे कार्याचा इतिहास वर्णन (समुद्रमंथन, अवतारकार्य) करतात. सृष्टिसह विविध Planetमधील व्यक्त व अव्यक्त दिव्य विभूतिचे (समृद्ध, सुंदर, उर्जायुक्त) वर्णन करतात. व सार सांगतात,

यद् यद् विभूति मत् सत्वं श्रीमत उर्जितमेव वा*।
तद् तद् एवअवगच्छ त्वम् मम् तेजो अंश संभवम् ।।(१०-४१)

Positive Habits या संदर्भात Think of Prosperity ही एक सकारात्मक संवय असते. विभूतियोगातील ईश्वरचिंतन हीच सकारात्मक संवय आहे.

*****

(१०. ४१)/२:"मम तेजोअंश संभवम् "

(विश्वातील ऐश्वर्याचा प्रकाश)

या विश्वात जे (चांगले-वाईट) घडत असते, त्यांत प्रामुख्याने मनुष्याचीच भूमिका असते. मग ईश्वराची भूमिका कोणती?याच प्रश्नाचे उत्तर भगवतगीता देत आहे.

*कर्ता vs अकर्ता

ईश्वर कांहीच करीत नाही, पण तोच कर्ता आहे!
अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।(१०-८)
तस्य कर्तारम् अपि मां विद्धि अकर्तारम् अव्ययम् ।(४-१३)

कर्ता आहे पण कर्ता नाही या Contradictory भाष्याचा अर्थ काय?
विजेवरील यंत्र यंत्राप्रमाणेच कार्य करते, पण विजेशिवाय यंत्र चालु शकत नाही. तद्वतच प्राणतत्व शरीरात व्यापलेले आहे म्हणुन जीवन आहे. या प्राणतत्वातील(जीवात्मा) प्रकृतिगुण व ईश्वरअंश याचे पृथःकरण जाणुन घेण्यासाठी "कर्ता-अकर्ता " हा विषय भगवतगीतेत आलेला आहे.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

ईश्वर शाश्वत व प्रकृति अशाश्वत याप्रमाणे जाणुन शाश्वत- अशाश्वत या संदर्भात हे पृथःकरण आहे. शाश्वत-अशाश्वत हाच भगवतगीतेतील संपुर्ण तत्वज्ञानाचा पाया आहे.

*अनासक्ति-आसक्ति

शाश्वत-अशाश्वत या संदर्भात अनासक्ति-आसक्ति हा विषय आलेला आहे. आसक्ति म्हणजे Attachment. दुःखी होणे म्हणजे Attachment of pain. अर्थात दुःखाचे कारण आसक्ति (अशाश्वताला attach) असते. म्हणुन सुखी जीवनासाठी "आसक्ति-अनासक्ति" हा विषय आलेला आहे. ईश्वर शाश्वत व प्रकृति अशाश्वत हे तत्व जाणुन ईश्वराचा आश्रय म्हणजे शाश्वताचा आश्रय . हाच आधार जीवनविकासाच्य् महामार्गाचा ("अमृतत्वाय कल्पते" ) आहे.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)
न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः।(२-१६)

हाच आधार निष्काम कर्म यासाठी वापरलेला आहे.

*अंधार vs. प्रकाश(अज्ञान vs ज्ञान)

अ)अज्ञान अंधार आहे, तर ज्ञान प्रकाश आहे. ईश्वराचे अस्तित्व जाणणे म्हणजे अंतरात्म्यातील अंधार दुर करणे.

नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदिपेन भास्वता।(१०-११)

ईश्वराचे अस्तित्व विश्वातील ऐश्वर्याचे तेज(प्रकाश) या संदर्भात भगवतगीतेतील विभूतियोगात स्पष्ट केले आहे.

यत् यत् विभूति मत् सत्वं श्रीमतं उर्जितम् एव वा।
तत तत् एव अवगच्छ त्वं मम तेजों अंश संभवम् ।।(१०-४१)

ब)ईश्वराचे Design

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्।
हेतुना अनेन कौंतेय जगत् विपरिवर्तते॥(९-१०)

हे विश्व ईश्वराचे Design (नियोजन) आहे. जे घडते, त्याला ईश्वराचे Design जाणुन स्वतःची भूमिका (Destiny) जाणणे . अर्थात ईश्वराचे कार्य जाणुन त्याचेच कार्य (भक्तिसाठी) करणे. याचे दर्शन विश्वरुपदर्शनयोग आहे.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वेरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

"Give light, and the darkness will disappear of itself. "

********

# भगवदगीता

# अध्याय ११ विश्वरुपदर्शन

अध्याय ११ विश्वरुपदर्शन

ईश्वराचे विश्वरुपदर्शन(Full Universal form) या अध्यायात आहे. आतापावेतो अव्यक्त(Formless) ईश्वरावर चर्चा झाली. अध्याय ६ मध्ये शाश्वतआत्मा व त्याचा जन्मजन्माचा प्रवास हा प्रश्न चर्चिल्या गेला. याच अनुषंगाने अ. ७मध्ये (जड)प्रकृति व चेतन(अव्यक्त) याचे ज्ञानविज्ञान चर्चिल्या गेले. यातुन ईश्वराची ओळख हा विषय पुढे आला .

* ईश्वराची वैज्ञानिक ओळख(मुळ पुरुष, शाश्वत धाम)- अ. ८

*ईश्वराची( विश्वाचा) अध्यक्ष ही भूमिका (गति, भर्ता, प्रभु, साक्षी) - अ. ९

*ईश्वराला वर्तमानात जाणण्यासाठी दिव्य विभूति -अ. १०

मनुष्यजीवन, आत्मा व ईश्वर संपुर्ण अध्यात्म अर्जुनाला कळले. तो म्हणतो, माझा मोह नष्ट झाला. यामुळे युद्ध करणे वा न करणे हा प्रश्न राहिला नाही. तर निष्क्रिय राहुनही चांगला समजणे!हा प्रश्न होता.

सामान्यतः समाजात निषिद्ध कर्म टाळणारे स्वतःला चांगले समजत असतात. चांगलेपणा ईश्वराचे gift असते. याच चांगलेपणाला पुर्णत्व देणे हा संदेश विश्वरुप अध्यायाचा आहे.

राजा दुष्यंत आपल्याविवाहासंदर्भात चांगल्याची व्याख्या करतो, व शकुंतलेची पात्रता प्रमाणित करतो.

मा सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणम् अंतःकरण प्रवृत्तिम् ।
अर्थात चांगल्या व्यक्तिची अंतःप्रेरित प्रेरणा प्रमाण असते.
चांगल्या व्यक्तिला स्वतःवर विश्वास असतो. कार्याचा दृढनिश्चय असतो व विश्वासाने मार्गक्रमण करतो. तर चांगलेपणाच्या अर्धवट ज्ञानामुळे संशय असतो, निष्क्रिय होतो. याचा परिणाम स्वसमर्थन करणे, परटिका करणे अशा प्रज्ञावादाचा आश्रय करतो.

जीवनांत व्यवहार व त्यासंदर्भातील कार्य महत्वाचे असते, म्हणुन चांगलेपणाचा संबंध व्यवहाराशी जोडतो. व्यवहारात कोण व कसा यशस्वि होतो, यावरुन चांगल्याचे मुल्यमापन करतो. याचाच परिणाम "चांगले चालत नाही!असा सुर निघतो. यामुळे समाजात नकारात्मकतेचे अप्रत्यक्ष पोषण होते.

चांगलेपणाला पुर्णत्व देण्यासाठी अर्जुनाला ईश्वराने दिलेली ही संधि असते हा संदेश विश्वरुपदर्शनयोग देत आहे.

अर्जुनाने आतापावेतो ईश्वरासंबंधी बौद्धिक (Theory) ऐकले. व आता ईश्वराचे विश्वरुप पाहण्याची इच्छा व्यक्त करतो. साध्या दृष्टिने हे रुप पाहणे अशक्य असते म्हणुन श्रीकृष्ण दिव्यदृष्टि प्रदान करतात. जशी अर्जुनाला दिव्यदृष्टि प्रदान केली, हीच दृष्टि ज्ञानाने प्राप्त करता येते, हे रहस्य शेवटी सांगतात. याच ज्ञानासाठी जगाला भगवतगीता प्रदान केली.

Your eyes cannot see if your mind does not know.

या अध्यायाचे विवरण दोन भागात चर्चिले आहे.

११. १ ईश्वराचे विश्वरुप

११. २ ईश्वराची वर्तमानातील प्रवृत्ति(भूमिका )

----

११. १ ईश्वराचे विश्वरुप

विश्वरुप मुख्य तिन रुपांत आले आहे. (१)प्रथम दिव्य, प्रकाशमान, सर्वव्यापि, मोहक असे रुप पाहतो व प्रसन्न होतौ. (२) यानंतर उग्र, तेजोमय रुप दिसते, ज्यामुळे लोक अस्वस्थ होतात.

पश्यामि त्वाम् दीप्तहुताशवक्त्रम् ।

स्वतेजसा विश्वम् इदं तपंतम् ।(११-१९)

(३)यानंतर उग्र, घोर, भयावह रुप दिसते. कौरवपक्षातील योद्धे मृत्युसाठी ज्वालामय मुखात प्रवेश करीत आहेत. आता अर्जुन घाबरतो व या वर्तमान रुपाचे रहस्य विचारतो.

"आख्यायि मे को भवान् उग्ररुपो ।नमोअस्तु ते देववर प्रसीद।"(११-३१)

११. २ वर्तमानातील ईश्वराची भूमिका जाणणे.

*यशो लभस्व

* सत्य-सत्याचा स्विकार करुन प्रत्यक्षात भयाचा त्याग करणे.

* ज्ञान-ज्ञानाचे महत्व:(ईश्वर पहायचा नाही, त्याचे अस्तित्व ज्ञानाने जाणायचे आहे)

*यशो लभस्व

मी "काळ"(The TIME, वर्तमान) आहे, असे श्रीकृष्ण उत्तरतात. तु युद्ध करणार किंवा न करणार हा माझा प्रश्न नाही. तुझ्याविणाहि या कौरवपक्षांतील लोकांचा नाश होईल. तुला केवळ तुझ्या विकासाची संधि आहे, असे अर्जुनाला अप्रत्यक्ष सुचवतात.

तस्मात् त्वम उत्तिष्ठ "यशो लभस्व"(११-३३)
अर्थात युद्ध जिंकले हा विश्वास धारण करुन (निमित्त)युद्ध कर.
'War is won in the mind first, then on battlefield. '

सकारात्मक (उत्साही)विचार व नकारात्मक(निराश) विचार या मानसिकतेचा परिणाम मनुष्याच्या कृतीवर होतो. दुसऱ्या महायुद्धात हिटलर ने याच मानसिकतेचा वापर केला. याच कार्यासाठी गोबेल्सची नियुक्ति केली. तो निराशा किंवा भयग्रस्त विचार व्यक्त करणाऱ्या योध्याला गोळी घालायचा. चर्चिल निराश विचाराच्या योध्याला बाहेरची वाट दाखवायचा. या महायुद्धात हिटलर, चर्चिल, रुझवेल्ट यांची भूमिका याच सकारात्मकतेसाठी प्रसिद्ध आहे. रुझवेल्ट एका पायाने (पोलियोग्रस्त)अधु असुनही त्याचे व्यक्तिमत्व अतिशय आनंदी होते.

चर्चिल म्हणतो, मानवी जीवनाचा इतिहास व युद्ध यांत साम्य आहे म्हणुन सकारात्मक विचाराला मानवी विकासात महत्व असते. दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास आपल्यासमोर आहे. ज्याच्या कार्याने मानवतेला हानी पोहोचणार, ते सकारात्मक विचाराचे मोल जाणतात, तर जे चांगले आहेत असा दावा करतात, त्यांचा चांगलेपणा सकारात्मक विचाराविणा अधुरा असतो. हाच विश्वरुपदर्शनयोगाचा संदेश आहे.

*भयाचा त्याग, सत्याचा स्विकार

अर्जुन श्रीकृष्णाला केवळ विश्वाचा पिताच नव्हे तर परमगुरु संबोधतो. आपले घोर रुप मला व्यथित करित आहे. मी भयभित झालो आहे. जसे पिता पुत्राला, सखा सख्याला क्षमा करतो, तसे क्षमा मागुन पुर्ववत रुपांत येण्यासाठी आग्रह करतो. श्रीकृष्ण म्हणतात, तुझ्यावर प्रसन्न झाल्यामुळेच मी हे रुप दर्शविले, ते यापुर्वी कुणिही पाहिले नाही. म्हणुन व्यथित न होता, प्रेमपुर्वक, श्रद्धेने हेच रुप पुनः पहा. अर्थात वर्तमानातील सत्याचा स्विकार करुन भयाचा त्याग कर. (Accept Present).

*ज्ञानाचे महत्व

श्रीकृष्ण पुर्ववत अवस्थेत आल्यावर अर्जुन म्हणतो, प्रकृतिने मला व्यथित केले होते, आता भय मिटले. श्रीकृष्ण या रुपाचे रहस्य सांगतात. हे दुर्लभ रुप पाहण्यासाठी देवलोकही नेहमी उत्सुक असतात. पण जगातील कोणत्याही विधीने किंवा साधनेने हे रुप पाहणे केवळ अशक्य आहे. पण अनन्ययोगाने भक्ति साधुन ज्ञानचक्षुने ईश्वराला जाणणे शक्य असते. व असा भक्त माझेच कार्य जाणुन माझ्याप्रित्यर्थ कर्म करतो, त्याची जीवनयात्रा राजमार्गावर(अमृतंगमय) असते.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्ताः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव।।(११-५५)

याप्रमाणे प्रत्यक्ष ईश्वररुप पाहणे व ज्ञानाने जाणणे या दोन्हीमध्ये ज्ञानाने ईश्वराचे अस्तित्व जाणणे हे अधिकारात असते. जीवनांत सकारात्मक उर्जा धारण होण्यासाठी ज्ञानाचे महत्व भगवतगीता स्पष्ठ करते.

चांगल्या व्यक्तिलाही समाजात (व्यवहारात) अडचण जाणवते, दुःख जाणवते, निराश होतो, तेंव्हा या अडचणी ईश्वराने विकासासाठी दिलेली संधि आहे हे याच ज्ञानाने अनुभवता येते. अर्थात नकारात्मक विचार, भय यांचा त्याग करण्यासाठीच ईश्वराचे ज्ञान जाणुन त्याचा आश्रय जीवनांत महत्वाचा असतो.

ईश्वरनिर्मित जग चांगले आहे, (आपल्या) कल्याणासाठीच या जगात आपल्याला आणले आहे. असा विश्वास धारण होतो. मनुष्याला त्याच्या जीवनाचे रहस्य उलगडते. या ज्ञानाद्वारे भगवतगीता मनुष्याला त्याच्या जीवनाचा आदर करण्याचा संदेश देते.

********

अध्याय ११-मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

(११. १)/१:

"मद् अनुग्रहाय परमं गुह्यं अध्यात्म संज्ञितम्"

(अज्ञानाचा विनाश)

(११-१)/२:

" यत् त्वया उक्तं वचः तेन मोहो अयं विगतो मम "(Religion vs. Spirituality)

११-६ :

"बहुनि अदृष्टपुर्वाणि पश्य आश्चर्याणि भारत"

(Author of Universe)

(११-७):

"मम देहे गुडाकेश यत् च अन्यत् द्रष्टुम् इच्छसि"

(११. ८):

"दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगम् ऐश्वरम् "

(Change of Perception)

११. १८/१:

"त्वम् अव्ययः शाश्वतधर्मगोप्ता

सनातनः त्वं पुरुषो मतो मे"

(विश्वातील बदल व शाश्वत अस्तित्व)

(११-१८)/२ :

"त्वम् अव्ययः शाश्वतधर्मगोप्ता

सनातनः त्वं पुरुषो मतो मे"

(Maintainer of eternal religion of Universe)

११. २४ :"नभःस्पृश्य दीप्तम् अनेक वर्णं"

(११-२८): "यथा नदीनां बहवो अम्बुवेगा"

(NATURE )

(११-३१)/१:

"आख्यायिमे को भवान् उग्ररुपो।

नमो अस्तु ते देववर प्रसीद"

(Design of God/मनोधैर्याचे रहस्य)

११. ३१/२ :"विज्ञातुम् इच्छामि भवन्तम् आद्यं-न ही प्रजानामि तव प्रवृत्तिम् "

(God 's Will For Present)

११. ३२/१: "कालो अस्मि"

( I am the TIME)

११. ३२/२: "कालो अस्मि लोकक्षय प्रवृद्धः "

(वर्तमान)

(११-३२)/३ :

"ऋतेअपि त्वाम् न भविष्यन्ति सर्वे"

(आत्मोद्धार Mindpower ची संधी)

११. ३३/१:

"तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व

जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् "

११. ३३/२: " यशो लभस्व "

११-३३/३: "यशो लभस्व"

११. ३३/४ : "निमित्तमात्रं भव

११-३३/५ : "निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् "

(Spiritual Revolution)

(११-३३)/६ : "मया एवैते निहताः पूर्वमेव

निमित्तमात्रं भव स व्यसाचिन् "

(नियंता व नियति Designer-Destiny )

(११. ३४)/१:"मया हतान् त्वं जहिं मा व्यथिष्ठा"

(Internal battle of ego)

(११-३४)/२:"युध्यस्व जेताअसि रणे सपत्नान्"

(चांगल्याचा वाईटावर विजय)

(११-३७):" "अनंतदेवेश जगत् निवासं।

त्वम् अक्षरं सत् असत् तत्परं यत् "

(The Supreme Power)

११-३८ :

"वेत्ताअसि वेद्यं च परं च धाम

त्वया ततम् विश्वम् अनन्तरुपम्"

(विश्वाचे व्यवस्थापन)

(११-४३)/१:"पिताअसि लोकस्य चराचरस्य

त्वम् अस्य पुज्यश्च गुरुः गरियान"

११. ४३/२: "त्वम् अस्य पुज्यश्च गुरुःगरीयान् "

११. ५४/१:

"भक्त्या तु अनन्यया शक्यं अहं एवं विधःअर्जुन"

(११. ५४)/२ : "ज्ञातुम् द्रष्टुं च तत्त्वेन् प्रवेष्टुं च परंतप "

(Higher level of consciousness )

११. ५५/१ : "मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः"

११. ५५/२:"निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव"

******

(११-१)

************************

मद् अनुग्रहाय परमं गुह्यं अध्यात्म संज्ञितम्।

यत् त्वया उक्तं वचः तेन मोहोअयं विगतो मम।।

**************************

(११-१):

"मद् अनुग्रहाय परमं गुह्यं अध्यात्म संज्ञितम्"

(अज्ञानाचा विनाश)

*वर्तमान व ज्ञानविज्ञान

वर्तमानकाळात "व्यवसाय" या संदर्भात विज्ञानाने नवक्रांति केली. परिवर्तन घडुन आले व सातत्याने याचा अनुभव जग घेत आहे. विज्ञानाच्या काळाला युरोपने Age of Reasoning/ Age of Enlightenment असे संबोधले होते. याचमुळे फ्रांसमध्ये राज्यक्रांति घडुन आली. व यानंतर युरोपने जगावर आपल्या साम्राज्याची पकड मजबुत केली हा इतिहास आहे.

विज्ञानाने केलेल्या क्रांतिचे चांगले-वाईट परिणाम जग अनुभवत असते.

*कार्ल मार्क्सच्या साम्यवादी क्रांतिने समाजातील आर्थिक शोषणावर प्रकाश टाकला. जगातील कामगार आंदोलनांचा उदय झाला. समाजातील आर्थिक शोषणास समाजव्यवस्था कारण असते, हा सिद्धांत या क्रांतिने जगासमोर आणला.

*दुसऱ्या महायुद्धातील हिरोशिमा नागासाकी विनाशाने संपुर्ण जग हादरले.

याच पार्श्वभुमिवर अध्यात्माशिवाय विज्ञान अधुरे व विज्ञानाशिवाय अध्यात्म अधुरे आहे. असे अनेक समाजशास्त्रज्ञ, महानुभाव यांनी जगाला संदेश दिला. याचाच अर्थ अध्यात्माची मनुष्यजीवनात, समाजव्यवस्था निर्मिती यांत महत्वाची भूमिका असते. हे समजुन घेणे वर्तमानात आवश्यक आहे. भारतिय महानुभावांनी जीवनविकासासाठी, समाजविकासासाठी "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च" हा संदेश दिला. व याद्वारे अध्यात्मज्ञानाचे जीवनातील महत्व व ज्ञानविज्ञानाचे समाजविकासासाठी महत्व स्पष्ट केले.

ज्ञानविज्ञान—

मनुष्यजीवनात ज्ञानविज्ञान परिवर्तन घडवुन आणते. मनुष्याच्या व्यवसायाला ज्ञानविज्ञान आकार देते. तसेच समाजाचा विकास घडवुन आणते. याच मुख्य हेतुने शिक्षणाकडे पाहिल्या जाते.

विज्ञान ज्ञानविज्ञानाचाच भाग आहे. त्याचा वापर "ज्ञान" या संदर्भातच विश्वात होत राहणार. व समाज त्याचे चांगले-वाईट परिणाम अनुभवत राहणार. पण समाजाच्या दुषितीकरणाचे निश्चित कारण मात्र विज्ञानच दर्शवुन देते . व समाजाला निश्चित दिशेने वाटचाल करण्यासाठी मार्गदर्शन करते.

समाजातील प्रश्न असो वा मनुष्यजीवनातील असो, त्या प्रश्नाचे निश्चित निदान होणे, व यासाठी वास्तवाचा स्विकार करणे ही प्राथमिकता असते. तरच दोष दुर करण्यासाठी ज्ञानविज्ञान सहाय्यक होईल. ज्ञानविज्ञान या संदर्भातील याच प्राथमिक ज्ञानावर भगवतगीता प्रकाश टाकते. ज्ञानविज्ञान या संदर्भात हे Scientific thinking ठरते.

टॉलस्टाॅय म्हणतो, जग बदलावे असे ज्यांना वाटते, त्यांनी सर्वप्रथम स्वतःमध्ये बदल घडवुन आणावा. (Be the

Change)अर्जुनाला प्रश्न येतो, तेंव्हा तो म्हणतो काय योग्य आहे हे इतरांना कळत नाही, पण ज्यांना कळते ते आपण! आपण पापापासुन निवृत्त होणे, हेच कर्तव्य ठरते.

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहत चेतसा।(१-३७)

कथं न ज्ञेयं अस्माभिः पापात् अस्मान् निवर्तितुम् ।(१-३८)

मनुष्य स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा आश्रय करतो. व या प्रक्रियेत (Scientific thinking ऐवजी) Judgement thinking चा वापर करतो. अर्जुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी आपल्या निष्क्रियतेवर धर्माचे शिक्कामोर्तब करतो, यासाठी ज्ञानाचा आश्रय करतो.

उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः।

उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन।

नरके नियतं वासो भवति इति अनुशुश्रुम्।।(१- ४४)

*धर्म-अधर्म व स्वधर्म

अर्जुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानी समजुन धर्माचा वापर करतो म्हणुन ज्ञान व धर्म हे दोन्ही विषय भगवतगीतेत आले.

धर्म-अधर्म या संदर्भात समाजव्यवस्थेतील शोषण बाह्यविघ्न ठरते अर्थात अधर्म स्थिति दर्शविते. याच अधर्माला दुर करण्यासाठी, रंजल्या गांजल्यांचे दुःख दुर होण्यासाठी परमार्थ समाजात असतो. याच धर्म-अधर्माच्या जाळयात अर्जुन अडकतो. धर्माला अधर्म(स्वधर्माचे अज्ञान) व अधर्माला(स्वतःची निष्क्रियता) धर्म संबोधतो. यामुळे धर्म काय?अधर्म काय? स्वधर्म काय? याचे स्पष्टिकरण भगवतगीतेने केलेले आहे.

*स्वधर्म :

(समाजव्यवस्थेतील )मनुष्याच्या सहजकार्याला स्वधर्म संबोधले आहे. स्वतःच्या कार्यातील बाह्यविघ्न (शोषण, नुकसान) व आंतर्विघ्न (संशय, धर्मसंकट, कार्याचा निश्चय न होणे)दुर व्हावे यासाठी "निर्विघ्नं कुरुमे देव" ही प्रार्थना सर्वश्रुत आहे.

(जगातील )मनुष्याने स्वतःच्या नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब केले तर स्वधर्माला जीवनमुल्याचे महत्व प्राप्त होते. जीवनमुल्यांचा मनुष्य Determination साठी उपयोग करतो. धर्म-अधर्म यातील द्वंद्व मिटतो. अर्थात स्वधर्म Tiebreaker ठरतो.

याद्वारे धर्म, अधर्म, स्वधर्म याची Universal व्याख्या जगासमोर आली आहे.

सार:

समाजात प्रश्नाची सोडवणुक करण्यासाठी ज्ञानविज्ञानाचा वापर होतोच. पण समाजाच्या वाटचालीत प्रश्न पुनः निर्माणही होतात व समाजात विद्यापीठांची रेलचेल असली तरी प्रश्न अनुत्तरीत राहतात. हे अनुत्तरीत प्रश्न राजकारण निर्मित आहे असे शिक्कामोर्तब करुन राजकिय क्षेत्रात परस्पर आव्हाने होत असतात. हे समाज अनुभवत असतो.

महाभारतात पांडवावरील अन्याय दुर करण्यासाठीच अखेर धर्मयुद्ध हे Solution असते. या धर्मयुद्धात अर्जुनाचे Active participation असते.

पण प्रत्यक्ष कुरुक्षेत्रावर...

अर्जुनाला विद्या असुनही, त्याचा वापर करण्यास त्याची विद्या अपुर्ण ठरते. अर्थात विद्यापीठाचे शिक्षण(प्रत्यक्ष कुरुक्षेत्रावर) त्याच्या उपयोगी पडत नाही. हीच अपुर्णता भगवतगीता भरुन काढते. याचसाठी अध्यात्मज्ञानाचा वापर व त्याचे महत्व स्पष्ट

होते. ज्ञानविज्ञान योग(७) या अध्यायापासुन अध्यात्मज्ञान सुरु होते.

७. ज्ञानविज्ञानयोग- अव्यक्त परा प्रकृति

८. अक्षरब्रह्म-अशाश्वत व शाश्वत(सनातन) अव्यक्त

९. अनन्ययोग-जीवनविकासाचा राजमार्ग, (अमृतत्वाय कल्पते) हाच ईश्वरभक्तिचा अनन्यभक्ति मार्ग आहे. येथे ईश्वराची सृष्टिचा अध्यक्ष अशी ओळख होते.

१०-विभूतियोग: विश्वातील ईश्वराच्या व्यक्त अव्यक्त विभूति(श्रीमतम् उर्जितम् एव वा)

हे ज्ञान ऐकल्यावर अर्जुन म्हणतो, अज्ञानाचा नाश अध्यात्म ज्ञानामुळे झाला असे मनोगत व्यक्त करतो

मद् अनुग्रहाय परमं गुह्यं अध्यात्म संज्ञितम्।
यत् त्वया उक्तं वचः तेन मोहोअयं विगतो मम॥(११-१)

******

(११-१) :

" यत् त्वया उक्तं वचः तेन मोहो अयं विगतो मम "

(Religion vs. Spirituality)

सखा, मित्र या नात्याने जरी श्रीकृष्ण अर्जुनासोबत त्याचा सारथी बनुन सोबत करतात, श्रीकृष्ण आपली खरी(ईश्वर) ओळख देतात, ईश्वराचे ज्ञान विज्ञानासह सांगतात. याच ज्ञानाचे मनुष्याशी असलेले नाते स्पष्ट करतात. हे सर्व ज्ञान अध्यात्म म्हणुन ओळखल्या जाते. (स्वभाव अध्यात्म उच्यते). यांत ज्ञानविज्ञान (अ. ७), अक्षरब्रह्म (८), अनन्यभक्ति/राजविद्या/ईश्वराची अध्यक्ष ही ओळख(९), ईश्वराच्या विभूति(१०) यांचा समावेश असतो. हे ज्ञान ऐकुन अर्जुनाला स्वतःच्या जीवनाचे ज्ञान कळते व तो म्हणतो, माझा मोह दुर झाला.

मद अनुग्रहाय परमं गुह्यं अध्यात्म संज्ञितम्।
यत् त्वया उक्तं वचः तेन मोहो अयं विगतो मम।।(११-१)

व्यवहारात अर्जुनाने धर्म ऐकले असते. पण अध्यात्मज्ञान प्रथमच ऐकतो. वैद्यकशास्त्रात जसे शरीरशास्त्र असते तसेच जीवनविकासशास्त्राचे (Journey of life) हे ज्ञान असते.

धर्म आणि अध्यात्म यांतील भेद कांही तत्वज्ञांनी स्पष्ट केले आहे.

"Spiritual journey "

Each one of us have our own evolution of life. As certain things are common, while performing physical journey, we do learn things from each others (व्यवहार आणि अध्यात्म) experience.

Religion vs. Sprituality

1. Unity

a). Religion Separates from Other Religions – Spirituality unites them.

b). Religion tells us the Then Truth – Spirituality Lets us Discover It for present.

2. Freedom

a). Religion Makes us Dependent – Spirituality Makes us Independent

b). Religion Makes us to obey – Spirituality Sets us Free.

c) Religion makes us to follow other's Journey – Spirituality Lets us Create our Own path.

d) Religion applies Punishment(heaven –hell)cause fear-

Spirituality Applies work for regulating principles of freedom.

3. Empowerment

Religion Shows us Fear – Spirituality Shows us How to be empowered in order to break cycle of fear.

वरील भेद Unity, Freedom, Empowerment या संदर्भात भगवतगीतेत अनुक्रमे

१. एकत्व : द्वन्द्व vs निर्द्वन्द्व

२. स्वातंत्र्य : बंधन vs मोक्ष

३. योग(दुःखान्त) :

व्यावहारिक जीवनयात्रा vs आध्यात्मिक जीवनयात्रा(अमृतत्वाय कल्पते)

-विचलित होणे(चंचलता) vs स्थिरत्व

-सकाम vs. निष्काम(समत्वयोग)

-lower consciousness vs Higher consc.

-त्रायते महतो भयात्

याप्रमाणे स्पष्ट होते. श्रीकृष्ण म्हणतात,

ज्ञानी मला विश्वाचा अध्यक्ष म्हणुन जाणतात व नित्य स्मरण करतात, भजतात.

अहं सर्वस्य प्रभवः मत्तः सर्वं प्रवर्तते।

इति मत्वा भजन्ते माम् बुधा भाव समन्विताः॥(१०-८)

*******

११-६

**********************

पश्य आदित्यान् वसुन् रुद्रान् अश्विनै मरुतः तथा।

बहुनि अदृष्टपुर्वाणि पश्य आश्चर्याणि भारत॥

**********************

११-६ :

"बहुनि अदृष्टपुर्वाणि पश्य आश्चर्याणि भारत"

(Author of Universe)

संदर्भ : अर्जुनाला "भारत" या संबोधनातुन आलेला संदेश.

(विश्वरुपदर्शनयोग )

विश्वरुपदर्शनयोगात ईश्वराचे दर्शन आहे.

यांत ईश्वराचे आनंददायी रुप आहे .

बहुनि अदृष्टपुर्वाणि पश्य आश्चर्याणि भारत।(११-६)

पण सर्वात लक्षवेधी संदेश आहे, वर्तमानात काय घडत आहे, ईश्वराला काय घडवायचे आहे याचे दर्शन आहे. याला "काळ" The Time हे संबोधन आहे.

जे घडते ते ईश्वर घडवितो?कि मनुष्याचे दैव घडवते ?कि मनुष्य घडवितो?याच पार्श्वभुमिवर मनुष्याकडुन घडणाऱ्या कार्यासंदर्भात श्रीकृष्ण अर्जुनाला सांगत आहे:

प्रकृतिच्या प्रभावाखाली मनुष्य जगत असतो. ईश्वर यंत्रावर फिरविल्याप्रमाणे या प्रकृतिकडुन कार्य घडवीत असतो. अज्ञानामुळे मनुष्य स्वतःलाच कर्ता जाणतो.

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।
अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।।(३-२७)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

विश्वरुपदर्शनयोगातुन संदेश मिळतो,

निमित्तमात्रं भव सव्यसाचिन।(११-३३)

*चांगलेपणा व आत्मविश्वास

(द्वन्द्व vs. द्वन्द्वमुक्ति)

"God is not the author of all things, but of good only. "

PLATO,

व्यवहारात कर्म घडत असतात. व्यवहारात सकाम कार्य असते. यामुळे मनुष्य द्वन्द्ववश असतो. अर्जुन चांगला मनुष्य असतो. पण सुखदुःखाच्या प्रभावाखाली येतो. नियतकार्य टाळण्यासाठी त्या कार्याला पाप ठरवितो. स्वतःला लोभी ठरवितो. अर्थात येथे (चांगले-वाईट ) द्वन्द्ववश होतो.

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वंद्वमोहेन भारत।

सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परंतप ।।(७-२७)

समाजात चांगले कर्म ईश्वराचे कार्य, ईश्वरभक्तिसाठी कार्य असे जाणल्या जाते. याचमुळे द्वन्द्वमोहमुक्ति होते. हा भगवदगीतेचा संदेश आहे.

येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः॥(७-२८)

आत्मविश्वास (State of mind):
कर्म विकासाचे साधन असते. कार्याद्वारे ईश्वरभक्ति या संदर्भात कार्याद्वारे योग/सिद्धि साध्य करणे, याद्वारे स्थितप्रज्ञ होणे हे ज्ञान भगवदगीता स्पष्ट करते.

जीवनात दुःखामुळे, इच्छेच्या अतृप्तिमुळे मनुष्य विचलित होतो. याचमुळे Stress, Tension, Worries इ. मानसिक Weakness येतात. याचाच अर्थ सुख या संदर्भात State of mind/मानसिक स्थैर्य(विचलित न होणे) /आत्मविश्वास याचे जीवनात महत्व आहे. याच संदर्भात अर्जुनाला म्हटले,
तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व।(११-३३)

"भरोसा है खुदापर तो वही होता है जो खुदा लिखता है।पर..
भरोसा है खुदपर तो खुदा वही लिखेगा जो तुम्हारी चाह है।"

सार :

दैव, ईश्वर, धर्म यांचा दाखला देवुन मनुष्य निष्क्रिय होतो, त्याचा बुद्धिभेद होतो असा समाजात आक्षेप घेणारा वर्ग असतो. भगवदगीता ज्ञानाला जगात सर्वश्रेष्ठ स्थान देते. ज्ञान या संदर्भातच दैव, ईश्वर, धर्म यांची जीवनविकासातील निश्चित भूमिका भगवदगीतेतुन स्पष्ट होते. जीवनविकासाचा रथ अज्ञानामुळे थांबतो, पण थांबलेला अर्जुनाचा रथ ज्ञानामुळेच चालु होतो.

********

(११-७)

************************

इह एकस्थम् जगत् कृत्स्नं पश्य अद्य सचराचरम् ।

मम देहे गुडाकेश यत् च अन्यत् द्रष्टुम् इच्छसि॥

**************************

(११-७):

"मम देहे गुडाकेश यत् च अन्यत् द्रष्टुम् इच्छसि"

ईश्वरावर श्रद्धा असलेले ईश्वराला भजतात. ईश्वराचा आश्रय करतात. मनकामनापुर्ति करणाऱ्या (जागृत) मंदिरात गर्दी असते. ईश्वराची "देणारा" अशी ओळख मनुष्य जाणतो. अर्जुनाला मात्र कांहीच मागायचे नसते. म्हणुन अर्जुनाला "मागण्यासाठी" ईश्वराचे दर्शन घ्यायचे नव्हते, तर श्रीकृष्णांनी स्वतःची ईश्वर अशी ओळख दिली होती व वर्तमानात काय "योग्य" आहे हे सांगितले होते, ते ईश्वररुप पाहण्याची इच्छा होती. येथे जे प्रत्यक्षात योग्य आहे व तेच घडणार आहे हे दर्शन होणार होते. म्हणुन येथे स्पष्ट इच्छेचा उल्लेख आहे. (तुला जे पहायची इच्छा आहे)

इह एकस्थम् जगत् कृत्स्नं पश्य अद्य सचराचरम् ।
मम देहे गुडाकेश यत् च अन्यत् द्रष्टुम् इच्छसि॥(११-७)

जेंव्हा प्रत्यक्षात विश्वरुपदर्शन होते, तेंव्हा अर्जुन ईश्वराची वर्तमानातील प्रवृत्ति विचारतो, अर्थात ही ईश्वराची इच्छा असते.

पितामह भीष्म व द्रोणाचार्य यांचा मृत्यु आपल्या हातुन होवु नये ही अर्जुनाची इच्छा असते म्हणुन तो म्हणतो मला विजय नको, ऐश्वर्य नको. अर्जुनाची इच्छा कांहिही असली तरी विश्व त्याच्या इच्छेनुसार चालणार नव्हते. कारण जगतहिताय काय घडणार हा ईश्वराचा अधिकार असतो, कर्म करणे मनुष्याचा अधिकार असतो. अशा स्थितीत जगतहिताय ईश्वराचे कार्य जाणुन ईश्वरभक्तिसाठी करणे हाच उपाय असतो.

(Purpose)
मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।(११-५५)

तसेच उपलब्धि भगवतगीता दर्शविते.

तत्र श्री विजयो भूतिः धृवा नीतिः मतिः मम ।(१८-७८)
अर्थात श्री(ऐश्वर्य), विजय(यश), भूति (शक्ति, योग, निर्भयता, साहस), नीति(Rightous) अर्थात प्रत्यक्ष प्राप्ति
ही उपलब्धि असते. तसेच कार्य करतांना मानसिकता कशी असावी याचा बोध होतो.

अर्जुन म्हणतो श्री(ऐश्वर्य) नको, पण ते अर्जुनाच्या नियतकार्याचे फलित असते. तो म्हणतो विजय नको पण हेच फलित असते. म्हणुन ईश्वराचा आश्रय करुन कार्य करतांना "यशो लभस्व" हा आत्मविश्वास असणे अपेक्षित असते.

विश्वाच्या अनंतकाळात मनुष्यजीवन स्वल्प काळासाठी लाभले असले तरी त्या अनंताशी नाते असते, याच नात्याची ओळख भगवतगीता देत आहे. याद्वारे
१. मनुष्याला सकारात्मक उर्जा(यशो लभस्व) प्रदान होते. मानसिकता बदल होतो . मानसिकता बदल अर्थात दुर्बल मानसिकतेवर मात करण्यासाठी "योगः कर्मसु कौशलम्" स्पष्ट होते.

२. मनुष्य व्यवहारात कार्य करतो. हेच व्यवहारातील कार्य ईश्वराचे कार्य बनते, तेंव्हा स्वतःचे अधिकारक्षेत्र कळते व "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन" या verseचा, तसेच निष्काम कर्माचा बोध होतो.

३. या जीवनात सुखासाठी ऐश्वर्यभोग व ऐश्वर्यासाठी कार्य असते . हाच अर्जुनाचा कार्याविषयी समज असतो. व नरकप्राप्तिसाठी कार्य करण्यापेक्षा निष्क्रिय राहणेच योग्य ही अर्जुनाची भूमिका असते. कार्याविषयी हे अधुरे ज्ञान(अज्ञान) असते. याच अज्ञानामुळे मनुष्य आळशी होतो. मानसिक दुर्बल होतो. कार्याची महति व गति जाणत नाही. कार्य हेच विकासाचे साधन आहे "गहना कर्मणो गतिः" याद्वारे भगवतगीता जीवनविकासाचे रहस्य स्पष्ट करते.

"The great aim of education is not knowledge but action. "

Herbert Spencer

******

(११-८)

************************

न तु मां शक्यसे द्रष्टुं एनेनैव स्वचक्षुषा।
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगम् ऐश्वरम् ।।

**************************

(११. ८):

"दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगम् ऐश्वरम् "

(Change of Perception)

"We are all one Energy Stream, but what makes the separations or distinguishes the differences is perspective. You are a unique and individual perspective. "

Abraham-Hicks

सर्वभूतेषु एनैकं भावम् अव्ययम् ईक्षते।
अविभक्तं विभक्तैस्तु तद् ज्ञानं विद्धि सात्विकम् ।।(१८-२०)

या विश्वात ईश्वर(ज्ञान) एकत्वाची दृष्टि देते. तर व्यक्तिमधील भेद हा दृष्टिकोनाचा(Perspective) असतो. यामुळे व्यक्तिगत दृष्टि लाभलेली असते. ज्ञानामुळे जी दृष्टि लाभते त्याला ज्ञानचक्षु म्हटले आहे.

"Your eyes cannot see if your mind does not know.
"

अर्जुनाला जीवनविकासाचे ज्ञान सांगितले, जीवनाचे रहस्य ज्ञान विज्ञानासह सांगितले. या संदर्भातच अध्यात्मज्ञान सांगण्यात येते. यांत ईश्वर ही संकल्पना असते. अर्जुन अध्यात्माचा स्विकार करतो. पण ईश्वर या संकल्पनेविषयी कुतुहुल असते. तो म्हणतो, शक्य असेल तर पाहण्याची इच्छा आहे.

मन्यसे यदि तत् शक्यं मया द्रष्टुम् इति प्रभो।(११-४)

यावर उत्तर येते,

न तु मां शक्यसे द्रष्टुं एनेनैव स्वचक्षुषा।
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगम् ऐश्वरम् ।।(११-८)

अर्जुनाला दिव्यदृष्टि (Divine vision)दिली तर याद्वारे भगवतगीता(ईश्वरश्रद्ध भक्तांना)ज्ञानचक्षु (Perspective) प्रदान करते. याच ज्ञानचक्षुचा उल्लेख भगवतगीता करते.

"प्रत्यक्ष दर्शन vs. ज्ञानचक्षु "या संदर्भात भगवतगीतेचे येथे स्पष्टिकरण आहे. ईश्वराच्या विश्वरुपाला पाहण्यास देवलोकही नित्य उत्सुक असतात, ते रुप या लोकी प्रत्यक्षात पाहण्याची संधि फक्त अर्जुनालाच लाभलेली आहे. याच माध्यमातुन ज्ञानचक्षुचा लाभ होतो.

भक्त्या तु अनन्यया शक्यं अहं एवं विधोअर्जुन।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्वेन प्रवेष्टुं च परंतप।।(११-५४)

*शरीरातील ईश्वराचे अस्तित्व या संदर्भात:
उत्क्रामंतं स्थितं वा अपि भुञ्जानं वा गुणान्वितम्।
विमूढा न अनुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः।।(१५-१०)

*Consciousness व विकास या संदर्भात:
क्षेत्रक्षेत्रज्ञ योः एवं अंतरं ज्ञानचक्षुषा।
भूतप्रकृति मोक्षं च ते विदुः यान्ति मे परम्।।(१३-३५)

Once we begin to change our perception, our thinking, it's amazing how other things in our lives

start changing also. The domino effect* begins with the first step within ourselves. It's not esoteric; it's human energy. "

Kingsley Dennis

(*A domino effect or chain reaction is the cumulative effect produced when one event sets off a chain of similar events. )

******

(११-१८)

************************

त्वम् अक्षरं परमं वेदितव्यं

त्वम् अस्य विश्वस्य परं निधानम् ।

त्वम् अव्ययः शाश्वतधर्मगोप्ता

सनातनः त्वं पुरुषो मतो मे ॥

**************************

११. १८/१ :

"त्वम् अव्ययः शाश्वतधर्मगोप्ता

सनातनः त्वं पुरुषो मतो मे"

(विश्वातील बदल व शाश्वत अस्तित्व)

* भगवतगीता

या विश्वात ईश्वराचे अस्तित्व जाणण्याचे प्रयोजन काय?या प्रश्नाचे उत्तर भगवतगीता देत आहे. मनुष्याला जीवनात अडचणी जाणवतात व तो उत्तर शोधतो. उत्तर सापडले नाही तर Frustrated भाष्य करतो. अज्ञानाला ज्ञान दर्शविण्याचा प्रयत्न करतो. जीवन भार वाटायला लागते!

भगवतगीता जीवनाचे महत्व व प्रयोजन सांगते. याच संदर्भात शाश्वत व अशाश्वत(बदल) याचे ज्ञान स्पष्ट होते.

मनुष्याचे जीवन सिमीत आहे पण विश्वाचे अस्तित्व कायम राहणार हे आपण जाणत असतो. या विश्वाचा अधिपति ईश्वर शाश्वत आहे. अर्जुनाला याच ईश्वराची ओळख दिल्या जाते. त्याचा पुरावाच विश्वरुपदर्शन असते. अर्जुन आपले मत व्यक्त करतो. ईश्वर सनातन पुरुष आहे. धर्मस्थापनेसाठी शाश्वत धर्म(Eternal) जाणणारा व त्याच अनुषंगाने न्याय करणारा आहे.

त्वम् अक्षरं परमं वेदितव्यं
 त्वम् अस्य विश्वस्य परं निधानम् ।
त्वम् अव्ययः शाश्वतधर्मगोप्ता
 सनातनः त्वं पुरुषो मतो मे ॥(११-१८)

*Existence of God:
या विश्वातील ईश्वराचे अस्तित्व, त्याचे दिव्य जन्म, कर्म जाणणे हा ज्ञानाचाच भाग असतो. ज्ञान या संदर्भातच ईश्वराचे महत्व जाणुन त्याचा उपयोग व्यवहारात करणे अर्थात मनुष्याचा ईश्वराशी असलेला संबंध जाणणे व स्वतःच्या शाश्वत विकासाचा मार्ग जाणुन स्वतःचे व्यावहारिक (सकाम)कर्म निष्काम कर्मात Transform करणे. हे Transformation महत्वाचे असते.

* बदल (Change) - शाश्वत, विकासतत्व (Transformation)

"If you don't get what you want, you suffer;
if you get what you don't want, you suffer;
even when you get exactly what you want, you still suffer because you can't hold on to it forever.

Your mind is your predicament. It wants to be free of change. Free of pain, free of the obligations of life and death.

But change is law and no amount of pretending will alter that reality. "

-Socrates

जन्ममृत्युजराव्याधी दुःखदोषअनुदर्शनम् ।(१३-८)

नित्यं च समचित्त त्वं इष्ट-अनिष्ट उपपत्तिषु।(१३-९)

अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञानार्थदर्शनम् ।
एतद् ज्ञानं इति प्रोक्तं अज्ञानं यदतो अन्यथा।।(१३-११)

"ज्ञान" या संदर्भातच विश्वातील शाश्वत-अशाश्वत तत्व (जीवनातील बदलतत्व व नित्य) विकासतत्वाचा आधार आहे. शाश्वत विश्व (ईश्वर) व अशाश्वत जीवन(शरीर) याच आधारावर आत्मा व शरीर यांचे नाते Stable- Changable या संदर्भात

स्पष्ट होते. अशाश्वत म्हणजे changable बदल. जगात बदल होत असतो. विकासात हेच बदल Transformation ठरते.

******

(११-१८)/२:

"त्वम् अव्ययः शाश्वतधर्मगोप्ता

सनातनः त्वं पुरुषो मतो मे"

(Maintainer of eternal religion of Universe)

जगात अनेक धर्म अलिकडे स्थापित झाले असले तरी विश्वाचे संचलन या संदर्भात सनातन धर्माचा संचलन करणारा प्रत्यक्ष ईश्वर असतो, असेच मत विश्वरुप पाहुन अर्जुन व्यक्त करतो.

त्वम् अक्षरं परमं वेदितव्यं

त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।

त्वम् अव्ययः शाश्वतधर्मगोप्ता

सनातनः त्वं पुरुषो मतो मे।।(११-१८)

भगवदगीता याच धर्मासंदर्भात भाष्य करते. विश्वधर्माचे संचलन या संदर्भातच म्हटले आहे,

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिःभवति भारत।
अभ्युत्थानं अधर्मस्य तद् आत्मानं सृजाम्यहम् ।।(४-७)

सनातन धर्म/विश्वधर्म म्हटले कि, "सत्यमेव जयते", "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च", चांगलेपणाला प्रोत्साहन व दुष्कृत्याला Discourage करणे (परित्राणाय साधुनाम विनाशाय च दुष्कृताम् ) असे अभिप्रेत असते.

सत्याचा, चांगलेपणाचा विजय होतो, पाहणारा(साक्षी) व घडवणारा(गतिर्भर्ता) ईश्वरच आहे अशी ईश्वरभक्ताची श्रद्धा असते.

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्।
प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजम् अव्ययम् ।।(९-१८)

*एका पुण्यवानामुळे सर्व वाचतील!
"तीन जंगलाचे व्यापारी घरी परतत असतात. वाटेत वादळ व विजांचा कडकडाट होतो. एका मशिदीजवळ झोपडीवजा घर

असते. तेथे व्यापारी आश्रय घेतात. या मशिदीजवळ पाप्याच्या अंगावर विज पडते, तोवर विजा कडकडणार! अशी आख्यायिका असते. असे आपसात भाष्य करतात. घरात एक बाई व तीचे लहान मुल असते. व्यापारी म्हणतात, आपल्यापैकी कुणीतरी पापी आहे त्याने बाहेर जावुन मशिदीला हात लावुन यावे. म्हणजे इतर तरी वाचतील . घरमालकिण बाई म्हणते, घाबरु नका, एका चांगल्यामुळे(पुण्यवानामुळे)सर्व वाचतील. पण तीचे न ऐकता त्या बाईलाच प्रथम मशिदीला हात लावुन यायला सांगतात. एकापाठोपाठ सर्व हात लावुन येतात. मग पापी कोण?तर त्या बाईचे मुल तेथे असते. हेच मुल पापी आहे म्हणुन त्या मुलाला बाहेर फेकतात. बाई मुलाला घेण्यासाठी घराबाहेर पडते. विज झोपडीवर पडते व तिन्ही व्यापारी मृत्युमुखी पडतात. "

"एका पुण्यवानामुळे सर्व वाचतील हा त्या पुण्यवान बाईचा विश्वास असतो, तर भयग्रस्त व्यापारी हा शहाणपणा ऐकत नाही. "

चांगलेपणा आणि आत्मविश्वास याचे दृढ नाते असते. पण चांगलेपणा या संदर्भातच अर्जुनाचा भ्रम होतो. आपण लोभी आहोत अशी त्याची अपराधिक भावना बनते. व निष्क्रियतेला

धर्म दर्शवितो. या पार्श्वभुमिवर ईश्वराला अभिप्रेत(अर्थात विश्वधर्माला मान्य ) असणारी अर्जुनाची भूमिका काय असावी, याचे ज्ञान भगवदगीता स्पष्ट करते.

चांगल्या मनुष्याला निष्क्रियता, भय, दुर्बलता विश्वधर्माला मान्य नाही तर चांगल्या मनुष्याला स्वतःवर प्रगाढ विश्वास असावा, स्थिर असावे, त्याच्या कर्तृत्वाची जगाला गरज असते. या पार्श्वभुमिवर चांगल्या मनुष्याने कार्याद्वारेच अनन्यभक्तिद्वारा(ईश्वराने नियोजलेले कर्म जाणुन ईश्वराच्या भक्तिसाठी कर्म करणे) दुबळेपणावर (नकारात्मकता, भय, हृदयदौर्बल्य) मात करावी. अर्थात चांगल्या मनुष्याची सक्रियता ईश्वराचेच कार्य करीत असते. हेच सत्य व कार्यकौशल्य भगवदगीता सांगत आहे.

संशयामुळे, सकाम कार्यामुळे मनुष्य द्वन्द्ववश होतो. व बंधनात अडकतो. म्हणुन दुबळा ठरतो. भगवदगीता मोक्षाची भाषा बोलते. यासाठी निष्काम कर्माचा संदेश आहे,

निर्द्वन्द्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्।(२-४५)

सार :

पाप व पुण्य या संदर्भात अर्जुनाचा भ्रम होतो. चांगलेपणाला (दैवीगुणसंपत्ति) भय, दुर्बलता अशोभनिय आहे. चांगलेपणा समाजात सक्रिय असावा, म्हणुन सक्षम व्हावा यासाठीच भगवदगीता ज्ञान आहे.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

Goodness is the only investment that never fails.

- Henry David Thoreau

************

(११. २४)

***********************

नभःस्पृश्य दीप्तम् अनेक वर्णं

व्यात्तआननं दीप्तविशालनेत्रं।

दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथिता अंतरात्मा

धृतिं न विन्दामि शमं च विष्णो।।

*************************

(११. २४) :"नभःस्पृश्य दीप्तम् अनेक वर्णं"

The message of Diwali:

"Diwali night is considered to be darkest night of the year. Bursting of crackers and lighting the sky signifies our commitment to the world, to the Celestial and the Supreme Divine being that we will fight out the darkness surrounding us. We will light the lamp of inner knowledge. "

नभःस्पृश्य दीप्तम् अनेक वर्णं (भगवतगीता११-२४)

This is uttered by Arjuna in Bhagwatgeeta, While talking about the existed form of Supreme Divine.

Message of Bhagwatgeeta in the context of Diwali:

In Bhagwatgeeta, Darkness signifies ignorance and light signifies knowledge.

The motive of Shrikrishna was to guide Arjuna , through the right path in life and give salvation from not only the birth and death but from pains, sorrows and miseries of the world attracted out of ignorant livings.

"HAPPY DIWALI "

******

(११-२८)

***********************

यथा नदीनां बहवो अम्बुवेगाः।

समुद्रमेव अभिविद्रवन्ति।

तथा तवामि नरलोकवीरा।

विशन्ति वक्त्राणि अभिविज्वलन्ति।।

*************************

(११. २८): "यथा नदीनां बहवो अम्बुवेगा"

(NATURE )

We do what we are and we are what we do

-ABRAHAM MASLOW

मनुष्य स्वतःच्या जीवनाला काय समजतो, जीवनाचा हेतु काय?अर्थ काय?त्याच्या सुखाच्या संकल्पना काय?मनुष्याच्या या "समज" नुसारच भगवतगीता स्पष्टिकरण देते. म्हणुनच

शरीराला कधी वस्त्र(वासांसि जिर्णानि यथा विहाय), कधी नाव(नावाम् इव अम्भसि) ही उपमा दिली आहे.

मनुष्य या विश्वात आला, व त्याचा जगण्याचा प्रवास सुरु झाला. आजच्या विज्ञानयुगात ईश्वराचे अस्तित्व मान्य करणे वा न करणे हा महत्वाचा विषय वाटत नसला तरी स्वतःच्या जीवनाचा प्रवास जाणणे महत्वाचा विषय आहे. याच प्रवासाची ओळख भगवतगीता करुन देते.

जसे जमीनीवर पावसाचे पाणी पडले तर वाट मिळेल तसे स्वैर वाहते. तर याच विश्वात निसर्गाची सुनियोजित व्यवस्थाही पहायला मिळते. पहाडावरुन वाहणारे पाणी नाले बनते, नदी बनते, अखेर नदी समुद्राला मिळते. याच प्रसंगाचा वापर "प्रवास " या संदर्भात दोनदा आलेला आहे.

१. Nature:

जीवनाच्या प्रवासातील (मृत्यु)सत्य जे अर्जुन (विश्वरुपदर्शन) पहात असतो व वर्णन करतो,

यथा नदीनां बहवो अम्बुवेगाः।<br>
समुद्रमेव अभिविद्रवन्ति।<br>
तथा तवामि नरलोकवीरा।<br>
विशन्ति वक्त्राणि अभिविज्वलन्ति।।(११-२८)

२. Knowledge :

विचलित न होणे (स्थितप्रज्ञ). शांति

संस्कारीत कां व्हावे?कोणती (State of mind) स्थिति achieve करायची आहे?

आपुर्यमाणम् अचल प्रतिष्ठम् ।

समुद्रम् आपः प्रविश्यन्ति यद्वत् ।

तद्वत् कामायं प्रविश्यन्ति सर्वे।

स शांतिम् आप्नोति न कामकामी।।(२-७०)

"There are the fixed laws authored by Nature and the flexible laws authored by people which bring order and dignity to existence.

* Nature is the source of all true knowledge. She has her own logic, her own laws, she has no effect without cause nor invention without necessity. "

Leonardo da Vinci

स्वभावप्रकृतिनुसारच मनुष्य जगत असतो, कार्यरत असतो. संस्कारीत नसेल तर द्वंद्वमोहाच्या जाळ्यात अडकतो(यामुळेच Stress, बंधन, दुःख, आसक्ति) व संस्कारीत असेल तर

अडथळ्याचा Victim न होता स्वतःचा स्वधर्म जाणुन निश्चित दिशेने प्रवास करतो.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।(३-३३

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ॥(३-३४)

निर्विवाद !शरीराचा प्रवास मृत्युकडे आहे. पण मनुष्याचा स्वतःचा प्रवास ईश्वराप्रत आहे हे जाणले तर या प्रवासातील वाहन शरीर(देहरथ) आहे ही ओळख होते. शरीराची "वाहन" या अर्थाने ओळख झाली तर जीवनप्रवासातील विविध पैलु जाणुन घेण्यासाठी त्याचा (अर्थात विकासासाठी) उपयोग होतो. जसे "नाव" ही उपमा मिळते तेंव्हा " मनोवश vs आत्मवश" अवस्था अर्थात "स्वैर vs संस्कारीत "( Error vs. Discipline) अवस्था समजुन घेणे सोपे जाते.

इंद्रियाणां हि चरतां यत् मनो अनुविधीयते।

तदस्य हरति प्रज्ञा वायुः नावाम् इव अम्भसि॥(२-६७)

"Your philosophy determines whether you will go for the disciplines or continue the errors. " - Jim Rohn

******

(११-३१)

***********************

आख्यायिमे को भवान् उग्ररुपो

नमो अस्तु ते देववर प्रसीद।

विज्ञातुम् इच्छामि भवन्तम् आद्यं

न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ।।

*************************

(११-३१)/१:
"आख्यायिमे को भवान् उग्ररुपो।
नमो अस्तु ते देववर प्रसीद"
(Design of God/मनोधैर्याचे रहस्य)

समाजात लोक जगत असतात. निसर्ग कार्यरत असते व लोक भाष्य करीत असतात(Nature acts people argues).
विश्वातील हा नैसर्गिक प्रवाह असतो. याच प्रवाहात आपण स्वतः जगत असतो.

समाजात व्यवहार असतो. याच व्यवहारानुसार युद्ध(कार्य) ठरले असते. प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ असतांना अर्जुनाला हा व्यवहारसिद्धिचा मार्ग विपरित जाणवतो. व ठरलेले कार्य न करण्याचा बेत करतो.

व्यावहारिक प्रक्रियेत मार्ग सापडला नाही तर चांगला मनुष्यही निष्क्रियतेचे समर्थन करतो. या प्रक्रियेत निराश मनाने(नकारात्मक) जगण्याची निवड करतो. याउलट संस्कारीत असलेला आत्मविश्वासाने जगत असतो. हाच भेद मानसिक दुर्बलता, Purpose loyalty अर्थात सक्षमता दर्शवीत असते.

आत्मविश्वासाने जगण्याच्या संदर्भात स्वामी विवेकानंदांनी "Paradize lost"मधील सैतानाचे उदाहरण quote केले, जो आत्मविश्वासाने लढत असतो. जगात चांगले-वाईट, दैवी-असुर हा भेद असतो. पण चांगलेपण जेंव्हा दुर्बल ठरते, तेंव्हा चांगला मनुष्यही निराश मनाने जगत असतो. हीच मानसिक दुर्बलता, मानसिक गरिबी ठरत असते. अर्जुन गोंधळतो तेंव्हा याच मानसिकतेचे दर्शन होते.

मनुष्य गोंधळला कि ईश्वराचे स्मरण करतो, मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी धर्माची आदर्शाची भाषा बोलतो. असाच अर्जुन गोंधळतो, तेंव्हा धर्माची भाषा बोलतो.

धर्म या संदर्भात धर्माचरण करणारा चांगला/योग्य असे मनुष्य जाणतो. पण याच चांगलेपणामुळे अर्जुन दुःखी होतो. येथे धर्माचरणाचा दुसरा Chapter उघडतो. धर्माचरण म्हणजे स्वधर्माचरण, संशयमुक्त असणे. यात मार्ग दृढ असतो. याप्रमाणे मार्गाचे "ज्ञान" या संदर्भात आत्मविश्वासाने जगण्याचा मार्ग सांगतात. जेंव्हा ईश्वर म्हणुन श्रीकृष्ण ओळख दर्शवितात, तेंव्हा अर्जुन प्रश्न करतो, तु कोण आहे?तुझ्या मनात काय आहे?

आख्यायिमे को भवान् उग्ररुपो।नमो अस्तु ते देववर प्रसीद।
विज्ञातुम् इच्छामि भवन्तम् आद्यं।न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम्
॥(११-३१)

तेंव्हा ईश्वराचे Design कळते. व स्वतःची Destiny कळते. ईश्वराचा आश्रय म्हणजे काय? याचा उलगडा होतो. व "अमृतत्वाय कल्पते" या मार्गाचे महत्व कळते. या मार्गावर

विश्वासाने मार्गक्रमण होते, ईश्वरभक्ति होते, शक्तिची(योग) साधना होते.

ईश्वराचे Design या संदर्भात रामायणात सरस्वती मनथरेची नियुक्ति करते. ही मनथरा कैकयीचे मनोधैर्य दुबळे करण्यात यशस्वी होते. मनोधैर्य या संदर्भातच महाभारतात अर्जुनाचे मनोधैर्य दुबळे होते व या दुर्बलतेवर विजय मिळविण्याचे रहस्य भगवतगीता उलगडते.

व्यावहारिक बोध:मनुष्यजीवनात विकास या संदर्भात मनोधैर्याची महत्वाची भूमिका असते. याच संदर्भात "War is won in the mind first, then on battlefield" असे आपण ऐकतो. भगवतगीतेत "तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व" हा विश्वास अर्जुनाला मिळतो. याच संदर्भात ईश्वर, धर्म यांची भूमिका भगवतगीता स्पष्ट करीत आहे.

"God will not allow any person to keep you from your Destiny. They may be bigger, stronger, or more powerful, but God knows how to shift things

around and get you to where you're supposed to be.
"

*****

(११. ३१)/२ :

"विज्ञातुम् इच्छामि भवन्तम् आद्यं-न ही प्रजानामि तव प्रवृत्तिम् "

(God 's Will For Present)

अर्जुन ईश्वराचे विश्वरुप पाहतांना भयभित होतो व प्रश्न करतो.

आख्याहि मे को भवान् उग्ररुपो
नमोअस्तु ते देववरप्रसीद।
विज्ञातुम् इच्छामि भवन्तम् आद्यं
न ही प्रजानामि तव प्रवृत्तिम्।।(११-३१)

वर्तमानातील ईश्वराची प्रवृती जाणु इच्छितो. या प्रश्नाचे उत्तर God's Will या संदर्भात येते.

God's Will हा ईश्वर या संदर्भात Universal शब्द आहे. मनुष्य व्यवहारात स्वतःच्या जीवनातील घडामोडीशी (अर्थलाभ, कर्मसिद्धिलाभ, लग्न इ. ) ईश्वराची इच्छा(God'sWill) चा संबंध लावतो. मनुष्याला सुख, कर्मसिद्धिलाभ हवा असतो. याचा संबंध Endलाभाशी (कर्मफल) असतो. अर्थात ही Self Will असते, व हे स्वतःचे Lower Circle असते.

ईश्वराचे विश्व Universal Circle असते. या Circle मध्ये ईश्वराचे Creation असते. याच Creationचे व त्यातील विभूति(समृद्ध, उर्जा)चे दर्शन विभूतियोगात दिले आहे. ईश्वराचे Creation जाणले तर God'Will जाणता येते. यासाठी "बुद्धियोग" ईश्वराची कृपा असते.

मनुष्यजन्मात कर्माचे महत्व कळावे म्हणुन जगाला अर्जुनाच्या माध्यमातुन भगवतगीता ज्ञान सांगायचे होते. व्यक्तिगत संदर्भात अर्जुनाच्या कार्याशी God'Willचा संदर्भ येतो. म्हणुन अर्जुन अशा Environment मध्ये सापडतो, जेथे अर्जुन दुःखी होतो. स्वजनांना मारणे अयोग्य आहे, म्हणुन युद्ध करणार नाही ही अर्जुनाची Self Will बनते. तर याउलट भीष्म, द्रोण, कर्ण सर्व

युद्धात मारले गेले आहेत, ही God'Will असते. व असा विरोधाभास( Self Will vs God's Will ) निर्माण होतो.

चांगला मनुष्य असला तरी, मनुष्याला अशा Environment चा अनुभव येतो, जेथे विरोधाभास अनुभवत असतो. याला कधी धर्मसंकट संबोधतो. म्हणुन स्वतःचे Lower Circle vs ईश्वराचे Universal Circle, Self Will vs God's Will यांतील भेद भगवतगीता स्पष्ठ करते. व याच संदर्भात सकाम कर्म vs निष्काम कर्म याचे महत्व स्पष्ठ करते. अहंकार स्वतःचे Lower circle क्रियाशील करते. म्हणुन ईश्वराचा आश्रय अर्थात बुद्धियोग सांगितला.

बुद्धियोगं उपाश्रित्य मत् चित्तः सततं भव।(१८-५७)

"Since God’s will is lofty and eternal, man must come out of his own little circle and get into the larger circle of God. It is as he is brought into the great circle of God that he will see God’s eternal plan and his own part in it. "

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

******

(११-३२)

***********************

कालोअस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धो

लोकान् समाहर्तुम् इह प्रवृत्तः।

ऋतेअपि त्वां न भविष्यन्ति सर्वे

ये अवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः।।

*************************

(११-३२) : "कालो अस्मि"

( I am the TIME)

"God will not allow any person to keep you from your Destiny. They may be bigger, stronger, or more powerful, but God knows how to shift things around and get you to where you're supposed to be. "

Joel Osteen

मनुष्याची जगाकडे पाहण्याची दृष्टि (Perception) जशी असेल तसे जग दिसते, ही दृष्टिच स्वतःच्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन (Perception) बनवते. व याच दृष्टितुन जगाकडे पाहतो. असे हे चक्र चालु असते. यामुळे मनुष्य तेच पाहतो, ऐकतो, त्याला जे पहायचे असते किंवा ऐकायचे असते.

अर्जुनाने अशाच पुर्वग्रहदुषित नजरेतुन या ज्ञानाला ऐकले असते, तर युद्ध करणे कसे चुक आहे, हेच शोधले असते. व तसा तो प्रश्नही करतो(३-१), बुद्धि श्रेष्ठ तर कर्माचे प्रयोजन कशाला?

या प्रश्नाचे त्याला उत्तर मिळते. व आता युद्ध करणे कसे योग्य आहे हे जाणुन घ्यायचे होते. जीवनाचे संपुर्ण ज्ञान विज्ञानासह ऐकुन घेतो व अव्यक्त ईश्वराचे दृश्य रुप पाहण्याची इच्छा होते. श्रीकृष्ण त्याला दृष्टि (दिव्यदृष्टि) देतात. अर्जुन विश्वरुपाचे वर्णन करतो व उग्ररुप पाहुन भयभित होतो. व प्रश्न करतो,
तु कोण आहेस?वर्तमानात तुझी प्रवृत्ती मी जाणत नाही!भगवंताचे उत्तर असते,

"कालो अस्मि"

युद्ध करणे तु नाकारले तरी शत्रुपक्षातील योध्यांचा मृत्यु युद्धात निश्चित आहे. तुला केवळ संधी आहे . म्हणुन तुझ्या व्यावहारिक दृष्टिनुसार "यश निश्चित"हा विश्वास धारण करुन जिंकण्यासाठी युद्ध कर व राज्याचा उपभोग घे.

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ "यशो लभस्व"।
जित्वा शत्रुन् भुञ्गाक्ष्व राज्यं समृद्धम् ।
मया एवैते निहताः पुर्वमेव।
"निमित्तमात्र भव "सव्यसाचिन् ।।(११-३३)

येथे भगवंताच्या नजरेतुन स्वतःकडे, स्वतःच्या कार्याकडे पाहण्याची दृष्टि मिळते. व स्वतःच्या हृदयी ईश्वर (अंश) आहे, याची (Higher consciousness) जाण होते. व स्वतःला ईश्वराचा (प्रतिनिधी)भक्त जाणुन कार्यरत होतो.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्ता संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव।।(११-५५)

याप्रमाणे भगवंताच्या नजरेतुन स्वतःकडे, स्वतःच्या कार्याकडे पाहणे, हेच दिव्य दृष्टिचे रहस्य आहे. यासाठी भगवतगीतेने ज्ञान उपलब्ध करुन दिले आहे. व जगातील हे अद्भुत व महान रहस्य ठरते.

"वर्तमानात भगवंताच्या नजरेतुन स्वतःला पाहणे "हाच "कालो अस्मि" चा संदेश आहे.

या सृष्टिचा नियंता कोण?ईश्वराचे अस्तित्व आहे किंवा नाही ?कोणाचा ईश्वर श्रेष्ठ?अशा प्रकारचे वाद चालतच राहील पण काळ सत्य असतो. त्यानेच जीवनरुपाने मनुष्याला संधी दिली आहे. "नरजन्म दुर्लभम् "
या जीवनाचा आदर करण्यासाठी काळाचा आदर करणे ("कालाय तस्मै नमः") मात्र कर्तव्य ठरते.

"Lost wealth may be replaced by industry, lost knowledge by study, lost health by temperance or medicine, but lost time is gone forever. "
Samuel Smiles

******

११. ३२: "कालो अस्मि लोकक्षय प्रवृद्धः "

(वर्तमान)

मनुष्याचा वर्तमान त्याचे कर्तृत्व, त्याची विकासपातळी सिद्ध करीत असते. अर्जुनाने नियतकार्यातील युद्ध करणे चुकीचे ठरविले होते. पण ही अर्जुनाची गैरसमजुत आहे असे श्रीकृष्ण दर्शवुन देतात. तेंव्हा (अशा आणिबाणीप्रसंगी) वर्तमानातच अर्जुनाला निश्चित उत्तर हवे होते.

अर्जुनाला वर्तमानात दुःख झाले होते. दुसरीकडे नियतकार्य करणे आवश्यक होते. केवळ सहन कर हे शब्द पुरेसे नसते.

एखादी गोष्ट योग्य कि अयोग्य हा वादाचा प्रश्न होवु शकतो. अर्जुनाने विचार करुन स्वतःच्या युद्धकार्याला पापकर्म ठरविले होते. यामुळे हा निश्चित ज्ञानाचा व वर्तमानातील विश्वासाचा प्रश्न ठरतो.

श्रीकृष्ण जीवनविकास या संदर्भात अध्यात्मासह ज्ञानविज्ञान सांगतात व अर्जुन ते कबुल करतो.

मद अनुग्रहाय परमं गुह्यं अध्यात्म संज्ञितम् ।(११-१)

(The main “flaw” of spiritual and Ideal personal development methods in the past has been their tendency to lose the practical side of things. Despite they offer good directions and ideas, it has made it difficult to follow . The intellectual level allows you to think about it, but the physical level allows you to actually feel, experience and be it.

What this means is that this is power that you can use - power that can affect the real physical world in massive ways! )

याच ज्ञानाची Practical side पाहण्याची इच्छा अर्जुन व्यक्त करतो. वर्तमानाचे विश्वरुप अर्जुन पाहतो. (अर्जुनाची State of Art योद्ध्याची असते. याच अनुषंगाने विश्वरुपदर्शन आहे)

कालो अस्मि लोकक्षय प्रवृद्धः
लोकान् समाहर्तुम् इहप्रवृत्तः।
ऋतेअपि त्वाम् न भविष्यन्ति सर्वे
ये अवस्थिताः प्रत्यनिकेषु योधाः॥(११-३२)

अर्थात ईश्वरच या सृष्टिची मुळ शक्ति आहे. त्याचाच अंश प्राणतत्वात आहे. सृष्टिसंचलनात सर्वकार्याचे योगदान असते.
एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे॥(४-३२)

ईश्वराचेच कर्म जाणुन ईश्वराच्याच भक्तिसाठी(अर्थात निष्काम कर्म) करणे. सर्वांप्रति अद्वेष्टा असतो, तो "अमृतत्वाय कल्पते" या मार्गावर असतो.

Courage is one of the 24 character strengths identified by positive psychology founders Chris Peterson and Martin Seligman. Developing courage is a matter of learning how to manage fear so it

doesn’t prevent you from action, and of finding ways to motivate yourself to act.

Biswas-Diener found that courage is made up of two processes. The first part is the willingness to take action, and the second is the ability to control fear.

दुःखाने, भयाने विचलित होणे अर्थात भय मानसिक दुर्बलता ठरते. व अभय ही दैवी संपत्तित प्रथम quality आहे. म्हणुन विकास या संदर्भात भयावर विजय मिळविणे मनुष्याचे दायित्व ठरते. भगवतगीता चांगल्या मनुष्याच्या दैवी संपत्तित पुर्णत्व आणण्यासाठी मानसिक दुर्बलतेवर विजय मिळविण्याचा संदेश देते.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।(२-५०)
अनित्य असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

सार : जीवन म्हटले कि कार्य घडत असते. कार्य कशासाठी करतो हा ज्याचा त्याचा (त्याच्या मानसिकतेनुसार) व्यक्तिगत प्रश्न असतो. हाच प्रश्न अर्जुनाला पडला होता. कांहीच नको तर कार्य कशाला करायचे? व याच प्रश्नाने भगवतगीता ज्ञानाचे द्वार उघडते.

सर्व ईश्वरच घडवीत आहे अशी ईश्वरश्रद्ध व्यक्तिची श्रद्धा असते. स्वतःच्या बाबतीत जे घडते त्याला दैव म्हणतो. या संदर्भात ईश्वर अधिदैव असतो. भगवतगीता सप्रमाण, सविज्ञान हेच दर्शवितांना याचे निश्चित ज्ञान स्पष्ट करते.

आपले व्यवहारातील कार्य हे निमित्त आहे. मानसिक शक्ति (योग- दुःखान्त, निर्भय) साध्य करण्यासाठी कार्याद्वारे भक्ति आवश्यक आहे. हेच Transformation असते.

*******

(११-३२) :

"ऋतेअपि त्वाम् न भविष्यन्ति सर्वे"

(आत्मोद्धार Mindpower ची संधी)

"Never discount your capacity as an individual. One person can make a difference in the world. You can be that person. "

-Jack Canfield

मनुष्याला प्रेरणा मिळतात, मनुष्याची स्वप्ने असतात. या संदर्भात प्रत्येक मनुष्य Unique असतो. ही प्रेरणा किंवा स्वप्ने साकार करण्यासाठी कार्याची गरज असते. जेंव्हा ही प्रेरणा Unique असते, जगतहीताय असते, ती दिव्यप्रेरणा असते. जणु ईश्वराने या विशिष्ट कार्यासाठी त्याचीच नियुक्ति केलेली आहे. भगवतगीतेतील विश्वरुपदर्शनयोग हेच स्पष्ट करीत आहे.

विश्वाचे संचलन व्यवस्थापन या संदर्भात ईश्वराची भूमिका विश्वाचा अध्यक्ष ही असते. Survival या संदर्भात मनुष्य आपल्या सुखासाठी कार्यरत असतो. मनुष्य स्वतःला ऐश्वर्य लाभावे, किर्ती लाभावी फार तर स्वर्ग मिळावा यासाठी कार्यरत असतो. चांगल्या मनुष्याचे हेच कार्य जगतकल्याणात महत्वाची भूमिका बजावीत असते, पण याचे त्याला अज्ञान असते. याच मार्गात अर्जुन दुःखी झाला असता "मला कांही नको" ही भूमिका

घेवुन निष्क्रियतेचे समर्थन करतो. या भूमिकेद्वारे अर्जुन जीवनाच्या महान संधीला मुकणार असतो. मनुष्याच्या याच अज्ञानाला भगवतगीता प्रकाशात आणते.

एका विशिष्ट विचारसरणीने (भौतिक पातळी/सकाम मानसिकता) "मी कर्ता" या भुमिकेत अर्जुन बोलत असतो. श्रीकृष्ण स्वतःची ईश्वर या भूमिकेची ओळख देतात.

कालोअस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धः
लोकान् समाहर्तुम् इह प्रवृत्तः।
ऋतेअपि त्वाम् न भविष्यन्ति सर्वे
ये अवस्थीतः प्रत्यनीकेषु योधाः॥(११-३२)

तु असलास काय किंवा नसलास काय, जे वर्तमानात पहात आहे ते कार्य मात्र घडलेले आहे. हे ईश्वराचे कार्य आहे. तु केवळ निमित्तमात्र आहेस.

निमित्तमात्रं भव सव्यसाचिन ।(११-३३)

तुला तुझ्या विकासासाठी(आत्मोद्धार) ईश्वराने दिलेली संधी जाण. भगवतगीतेच्या भाषेत हीच आध्यात्मिक पातळी (Spiritual journey) ठरते. अर्थात नियतकार्य ईश्वराचे कार्य जाणुन केले तर अहंकारावर(कर्तापण) मात होते, मार्गातील संशयरुपी अडथळा दुर होतो. ईश्वराचे कार्य ईश्वरालाच समर्पित होते.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्ताः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

आध्यात्मिक पातळी :

सहसा भगवतगीतेला लोक निष्काम कर्माचे शास्त्र असे ओळखतात. या निष्काम कर्माचे रहस्यच ईश्वराचे कार्य आहे.

कुणी एखादा मोठ्या उद्योगसमुहाचा उद्योगपति अध्यक्ष या भूमिकेत घरी बसुनच समुहावर नियंत्रण करतो. जरी प्रत्यक्षात उद्योग मात्र CEO/MD/व्यवस्थापक चालवीत असतात, यंत्रे चालविणारे वेगळेच असतात. हा व्यवस्थापनाचा विषय असतो. येथे अध्यक्ष या भूमिकेत अध्यक्षाचे अस्तित्व व कार्यक्षमता लक्षात येत असते. जरी सर्व यंत्रणा मोबदल्यासाठी कार्यरत असते, ते अप्रत्यक्षपणे अध्यक्षाचेच कार्य असते. विश्वसंचलन या

संदर्भात ईश्वराच्या याच भूमिकेची ओळख विश्वाचा अध्यक्ष अशी होते, ज्याचा अंश मनुष्याच्या हृदयात विराजमान असते. (नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ) हाच आधार जीवनाच्या Higher (आध्यात्मिक) पातळीचा असतो.

सार :

मनुष्य, त्याचे कर्माशी नाते, ईश्वराशी असलेले नाते यांची ओळख भगवतगीता "ज्ञान" या संदर्भात करुन देत आहे.

कर्मानुबंधीनि मनुष्यलोके ... (१५-२)

सर्वस्य च अहं हृदि संनिविष्टो ... (१५-१५)

"You and your choices are the only things you have control over in this life. Complaining or lamenting over external circumstances and events is the greatest waste of energy on the planet. "

-Jack Canfield

"आपलं मन अतिशय शक्तिशाली असुन, आपल्याला जे हवं आहे ते मिळवुन देण्याची क्षमता आपल्याच मनात आहे. "असा

एक शक्तिशाली विचार आधुनिक जगाला देणारा जॅक कॅनफिल्ड. एक अमेरिकन लोकप्रिय वक्ता आणि लेखक आहे.

"Chickensoup for the SOUL"(Inspirational book series)

The Success Principles: How to Get From Where You Are to Where You Want to Be.

याद्वारे तो संदेश देत आहे... मनुष्याचे स्वप्न व त्याच्या स्वप्नपुर्तिमध्ये एकच अडथळा असतो, भय/संशय.

Don't worry about failures, worry about the chances you miss when you don't even try. ” .. Jack Canfield

भगवतगीता यावरच उपाय सांगते. "ज्ञानसञ्छिन्नसंशयम्"

******

(११-३३)

************************

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ "यशो लभस्व"।

जित्वा शत्रुन् भुञ्गक्ष्व राज्यं समृद्धम् ।

मया एवैते निहताः पुर्वमेव।

"निमित्तमात्र भव "सव्यसाचिन् ।।

**************************

(११. ३३)/१:

"तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व

जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् "

अहिंसा दैवी गुण आहे. यामुळे हिंसा करणे कोणत्याही धर्माची शिकवण नाही. हेच भगवतगीता स्पष्ट करते. पण त्याचबरोबर निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी धर्माचा वापर करणे यामुळे समाजात भ्रम निर्माण होतो. समाज आळशी बनतो. भगवतगीता हाच भ्रम दुर करुन समाजाला सक्रिय करण्याची प्रेरणा देते.

मनुष्याच्या ठायी असलेला चांगलेपणा, प्रेम यामुळे दिव्य(Divine) प्रेरणा मनुष्याला मिळतात. या चांगलेपणाचा

ईश्वराशी संबंध असतो. पण याचेच अज्ञान असल्यामुळे चांगला(दैवीगुणी) असलेला अर्जुन दुःखी होतो. व निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी धर्माचा वापर करतो. म्हणुन धर्माचे निश्चित Purpose काय?

ईश्वराच्या ज्ञानाचे जीवनात महत्व काय?

चांगलेपणाचा उपयोग काय?

हे प्रश्न उपस्थित होतात व या सर्व प्रश्नाचे भगवतगीतेने निराकरण करुन समाजाला सक्रिय होण्याचे ज्ञान दिले. मनुष्याला प्रेरणा दिली.

मनुष्याने विश्वासाने जीवनयात्रा करावी, सुख अनुभवावे हाच भगवतगीतेचा संदेश आहे. पण जीवनयात्रेत मनुष्य दुःखी झाला असता दुःख टाळण्यासाठी(विशेषतः चांगला मनुष्य) प्रसंगी निष्क्रिय होतो. व स्वतःला योग्य ठरविण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो. म्हणुन या दुःखाशी, अडचणीशी deal करण्यासाठी अध्यात्म सांगितले. हे जीवन आत्म्याच्या नित्य प्रवासाला मिळालेले साधन आहे. या ज्ञानाचा उपयोग अडचणीवर मात करण्यासाठी होतो, आत्मविश्वास येण्यासाठी होतो. याचेच प्रात्यक्षिक(अर्जुनाच्या आग्रहानुसार) विश्वरुपातुन दर्शविले आहे.

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व

जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् ।

मयैव एते निहताः पूर्वम् एव

निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥(११-३३)

भगवतगीतेत युद्धाचा प्रसंग आहे. धर्मासाठी युद्ध करणे अर्जुनाच्या सहजकार्याचा(State of art) भाग होता. युद्धाच्या प्रसंगी शांत असणे(बुद्धि स्थिर असणे), आत्मविश्वास असणे व उत्साहाने कार्यरत होणे हा संदेश अर्जुनाला दिला.

******

(११-३३)/२ : " यशो लभस्व "

“If you don’t see yourself as a winner, then you cannot perform as a winner”.

~ Zig Ziglar

जगण्यातील पारदर्शकता (Clear intentions) मनुष्याच्या जीवनविकासाचा पाया आहे. सुखासाठीच मनुष्य जगतो हे स्वाभाविक आहे. अर्जुनाचे निष्क्रिय राहणे यांत अर्जुनाचे Intention दुःखापासुन सुटका असते पण तो आपले Intention चांगले आहे, आदर्शवादी आहे असे दर्शवितो.

*When we don't live with clear intentions, many people can be pulled down a destructive path by circumstances.

जीवनविकासाचे ज्ञान मनुष्याला असेल तरच वर्तमानात त्याचे जगण्याचे Clear intention असते. व हे ज्ञान जाणुन घेणे मनुष्याचे दायित्व असते. एक चुक मनुष्याला खाली खेंचते. पण चुक टाळण्यासाठी निष्क्रिय राहणे व याला आदर्शवादाचा बुरखा घालणे हा जीवनविकासातील अडथळा ठरतो. अर्जुनाला हीच चुक कळल्यानंतर तो आपले अज्ञान (Confusion of Right or wrong)कबुल करतो.

वाघाचा बुरखा घालुन कोल्हा वाघ ठरत नाही. प्रत्यक्षातील भेद मानसिकतेचा असतो.

भगवतगीता मानसिकतेचेच महत्व सांगते. "यशो लभस्व" अर्थात सकारात्मक मानसिकता धारण होण्यासाठीच भगवतगीता नित्य योगयुक्त/योगस्थ मानसिकता याचे महत्व सांगते.
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ।(८-२७)

जशी मानसिकता असते, तसे विचार असतात (Law of attraction). Motivators, Counselers विचारबदल यावर कार्यप्रक्रिया सुचवितात.

* You can transform your thoughts from hate to love, looser to winner from fear to courage by consciously raising your vibrations.

दुर्बलता, भय, आत्मविश्वास अभाव, अशांती (विचलीत होणे) दुबळ्या मानसिकतेचे लक्षण ठरते. हीच मनुष्यजीवनातील गरिबी असते. यावरुनच चांगलेपणा दुबळी झाली तर हा जन्म व्यर्थ जाईल काय?असा अर्जुन प्रश्न करतो. चांगलेपणा व्यर्थ जात नाही

पण या जीवनात योगयुक्त मानसिकतेशिवाय चांगलेपणा अपुर्ण असतो. हे सत्य श्रीकृष्णाच्या उत्तरात स्पष्ठ होते.

म्हणुन भगवतगीता मनुष्यातील चांगलेपणाला सक्षम होण्याचा संदेश देते.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव ।(१६-५)

जीवनांत अहंकाराचा आश्रय असतो. याच अहंकारामुळे मनुष्याला त्यानेच निर्माण केलेल्या अडथळयाचे अज्ञान असते. ईश्वराचा आश्रय(बुद्धियोग) याच अहंकाराला Replace करते. व मनुष्यात सकारात्मक उर्जा निर्माण करते, ज्यामुळे विश्वासाने कार्य करतो. कार्याद्वारे योग (शक्ति)साध्य होण्याचे हेच रहस्य आहे. कार्य निमित्त आहे. सक्षम मानसिकता साध्य करायची आहे.

जीवनविकासाचे ज्ञान सांगुन श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात,

"तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व "..

. निमित्तमात्रं भव सव्यसाचिन ।(११-३३)

************

११-३३/३ :

"यशो लभस्व"

जगात धर्म आलेत. धर्माने मानसिकता बदलविली. मनुष्याला जीवन जगण्याचे मार्गदर्शन मिळाले. धर्म मनुष्याला जोडतो. धर्माने समुहात संघटनशक्ति साध्य केली. या धर्माचा अंतिम हेतु स्वर्गप्राप्ति असते म्हणुन पुण्यकार्य, सत्कार्य याचे महत्व असते. अर्जुनाने (दुःख झाल्यामुळे) याच धर्माचा दाखला देवुन आपल्या नियतकार्याला अधर्म ठरविले. तेंव्हा धर्माचे निश्चित प्रयोजन काय? हा विषय पटलावर आला.

१. जीवनयुद्ध लढण्यासाठी ईश्वराचा आश्रय :

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

मनुष्याला जीवनात यशस्वि व्हायची इच्छा असते. पण जीवनात दुःख आहे, अडचणी आहेत. हे दुःखच मनुष्याला जीवनात हरवते तेंव्हा मनुष्य मनोदुर्बल होतो. जगण्यात आनंद वाटत नाही. हीच मनःस्थिति अर्जुनाची होते. जीवनात हारणे किंवा जिंकणे याच संदर्भात जीवनाला लढाई संबोधले आहे. महाभारतातील युद्ध हे

निमित्त असुन याच निमित्ताने "जीवनाची लढाई " हा विषय धर्म या संदर्भात आलेला आहे.

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(८-७)
अर्थात ईश्वराचा आश्रय जीवनाची लढाई जिंकण्यासाठी आलेला आहे.

२. बंधन-मोक्ष

भगवदगीता ज्या धर्माचे ज्ञान सांगते त्याचा अंतिम हेतु "मोक्ष" आहे. पुण्यकार्य(सत्कृत्य-दुष्कृत्य) या संदर्भात निर्माण झालेल्या द्वन्द्वावर विजय मिळविण्यासाठी "बुद्धियोग", ईश्वराचा आश्रय याचे महत्व सांगितले.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।(१८-६६)

हा जीवनमार्ग ईश्वरप्राप्ति या संदर्भात "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. या मार्गावर विचलित होत नाही.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

३. "विजयी भव"

श्रीकृष्ण स्वतःची ओळख (शाश्वत) ईश्वर अशी देतात, या ईश्वराचे रुप प्रत्यक्षात पाहण्याची इच्छा अर्जुन व्यक्त करतो. हे विलोभनिय रुप पाहिल्यानंतर उग्र रुप पाहुन भयभित होतो व वर्तमानकाळातील ईश्वराची प्रवृत्ति जाणण्याची इच्छा व्यक्त करतो. तेंव्हा "कालो अस्मि" ही ओळख देवुन(जे कार्य घडणार आहे त्याच कार्याची संधि अर्जुनाला मिळाली असते) अर्जुनाला संदेश मिळतो.

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व।(११-३३)

**********

(११-३३)/४ : "निमित्तमात्रं भव "

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्ताःसंगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

ईश्वराचे विश्वरुपदर्शन झाल्यानंतर अर्जुनाला कळुन येते कि, त्याला ईश्वराचेच कार्य करायचे आहे. यापुर्वी त्याला व्यावहारिक कार्याची ओळख होती. पण हे कार्य निमित्तमात्र असते, ईश्वरच जणु कार्य करवुन घेतो, असे ज्ञान होते.

अहंकार विमुढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

शाश्वताचे ज्ञान (ईश्वर)नसल्यामुळे अहंकारमन (Egomind) स्वतःलाच कर्ता जाणुन जीवनयात्रेत दुःखी होतो. हेच अज्ञान असते.

व्यवहारातील सकाम कार्यामुळे परिणामभय संशयी करते. दुःखी होणे यात Pain attachment असते. हे अशाश्वताला attachment असते. म्हणुन Detachment साठी भगवतगीता शाश्वताला attach होण्यासाठी, निष्काम कर्मशास्त्र सांगते. अर्थात कार्याद्वारे शाश्वत ईश्वराची भक्ती सांगते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)
या मार्गात कार्यमार्ग दृढ असतो(कार्याचा एकनिश्चय). सकाम मानसिकते मुळे चंचल मन असते व निश्चय होण्यास बाधा येते. म्हणुन दृढत्वासाठी बुद्धियोग प्रावधान आहे.
जगातील तत्वज्ञांनी आसक्ति व यामुळे Painचे Mindवर Reaction हेच दुःखाचे मनोविज्ञान सांगितले. भगवतगीतेने याच Detachmentसाठी ईश्वरभक्तिद्वारा शाश्वताला attach होणे, निष्काम कार्यासाठी दृढत्वाचे कार्यकौशल्य सांगितले. हेच भगवतगीतेचे Technical logic आहे. याच ज्ञानामुळे अज्ञानाचा अंधार मिटतो.
न आदत्ते कस्यचित् पापं न चैव सुकृतं विभुः।
अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।।(५-१५)
ज्ञानेन तु तत् अज्ञानं एषां नाशितम् आत्मनः।
तेषां आदित्यवत् ज्ञानं प्रकाशयति तत् परम् ।।(५-१६)

अर्जुन( याच शाश्वताच्या) अज्ञानामुळे दुःखी होतो. व दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो (यासाठी ज्ञान वापरतो). या भाष्याला ज्ञान म्हणतो. हा प्रज्ञावाद (अहंकारामुळे) असतो. समाजात (याच)अज्ञानामुळे असेच प्रज्ञावादी भाष्य चालत असते.

(ज्ञान नसेल तर)याच भाष्याने मोह पावतात व भ्रम होतो. पण ज्ञानी मोह पावत नाही, ते निश्चयाने मार्ग चालत असतात.

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।।(८-२७)

जीवन आहे तर कार्य घडतच असते. प्रकृति कार्य करीत असते. हे प्रकृतिचे Automation आहे. ही प्रकृति मोहाद्वारे द्वंद्वाच्या जाळ्यात ओढुन मनुष्याला (प्रकृति)वश करते. म्हणुन केवळ प्रकृतिवश शरीरयंत्र कार्यरत आहे ही जाण संशयी, दुःखी करते. ही मनोवश अवस्था असते.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

अर्थात प्रत्यक्षात जीवित तत्वातील शाश्वत ईश्वर हे शरीरयंत्र संचलित ठेवते. म्हणुन ईश्वराचा आश्रय करुन मनोवश अवस्थेला आत्मवश अवस्थेनी Replace करणे व कार्याद्वारे भक्ति करणे. हा Transformation साठी सोपा संदेश भगवतगीता देते.

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तत् प्रसादात् परां शांतिम् स्थानम् प्राप्स्यसि शाश्वतम् ।।(१८-६२)

ईश्वर मनुष्याचे शाश्वत स्वरुप व अंतस्थान आहे. ज्ञानाचा मुळ स्रोत व विश्वास देणारे ज्ञान आहे. चराचरातील Prospority ( श्रीमतम् उर्जितम् )त्याच्याच दिव्य विभूति आहेत. या विभूतिचे चिंतन(Think of prospority) मनुष्याला सकारात्मक करते. बुद्धियोग प्रदान होतो.
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

युद्धमैदानावर कठिणप्रसंगी(अटितटीची वेळ)याच ज्ञानाने अर्जुनाला जीवनाचे रहस्य कळले. त्याचे दृष्टीत Instant बदल झाला. भगवतगीतेचे हे (आध्यात्मिक)मनोविज्ञान आहे. रोग्याला औषध कसे तयार झाले हे जाणण्यात रस नसतो, त्याला वापरायचे असते. तसेच हे आध्यात्मिक मनोविज्ञान आहे. ते Instantly वापरायचे आहे. कारण जो चांगला आहे, (दैवीगुणी), ईश्वरश्रद्ध आहे (सत भाव) त्याला भय, दुर्बलता अशोभनिय आहे. म्हणुन त्याला निर्भयतेने, विश्वासाने जगण्यासाठी(मार्ग चालण्यासाठी) भगवतगीता (मनुष्याला) त्याची खरी ओळख देत आहे.

कार्य मनुष्यालाच करायचे आहे. श्रीकृष्णाने अर्जुनाला त्याची ओळख दिली पण अर्जुनातर्फे प्रत्यक्षात लढाई केली नाही. म्हणुन मनुष्यरुपात जरी हा नरदेह लाभला आहे, तरी ईश्वराचेच कार्य

त्याला करायचे आहे. हेच रहस्य ज्ञानी जाणतो व ईश्वराचेच कार्य करीत असतो.

"निमित्तमात्रं भव"

******

११-३३/५:

"निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् "

(Spiritual Revolution)

"The world is starving for a new spiritual truth - a truth that works in sustaining life, not a truth that brings an end to life. "

Neale Donald Walsch

शतकानुशतके जगात चांगल्या आणि वाईटाचे युद्ध चालू आहे. यालाच आम्ही धर्मयुद्ध म्हणुनही ओळखतो. मनुष्यजीवनातील Internal battle या संदर्भात "रात्रंदिनि आम्हा युद्धाचा प्रसंग" हे संत तुकारामांचे वचन प्रसिद्ध आहे .

महाभारतात अर्जुनाला अंतर्गत आणि बाह्य(Internal & External) दोन्ही संघर्षांचा सामना करावा लागतो. हा समन्वय भगवतगीतेत साधलेला आहे. अर्जुनासाठी बाह्य घटना केवळ व्यावहारिक असते. पण सत्य असते. भलेही बाह्ययुद्ध राज्य-समृद्धिचे असते पण खरे युद्ध Internal असते( मानसिक समृद्धिसाठी).

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

लढाई लढण्यासाठी आत्मविश्वास, धैर्य, निर्भयता इ. सामर्थ्य हवे असते . हाच सामर्थ्याचा संदेश भगवद्गीतेचा कर्मयोग देतो. याचसाठी ज्ञान महत्वाचे आहे.
योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम् ।(४-४१)

*The great Epic
रामायण आणि महाभारत हे दोन्ही धर्मयुद्ध आहेत. केवळ घटना जगासमोर येतात. या घटनांचा आधार चांगला किंवा वाईट असा न्याय्य म्हणून दिला जातो. ही एक सामान्य संवय असते. पण दोन्ही ठिकाणी कला आणि ज्ञानाचा रहस्यमय खजिना आहे.

जगातील कोणताही प्रश्न असो, ज्ञानविज्ञानाने, महापुरुषांच्या कर्तृत्वाने ते सोडविले आहेत. हा विकासाचा इतिहास आहे. समुद्रातील भरती-ओहोटीप्रमाणे विश्वात जेंव्हा अधर्माची स्थिति (शोषण, चांगल्यांना अडथळे इ. )येते किंवा विश्व अडचण अनुभवत असते, तेंव्हा प्रत्यक्षात ज्ञानी प्रश्नावर उत्तर शोधत असतात. हे उत्तर सापडते, तेंव्हा समुद्राच्या लाटांवर स्वार झाल्यागत महापुरुष आनंदित होतो.

"श्रीरामाचा राज्याभिषेक न होता त्यांना वनवास मिळावा " हे महत्वाचे कार्य देवलोक सरस्वतीकडे सोपवितात. हा प्रसंग सरस्वतीसाठी धक्कादायी असतो. पण पुढील (धर्मयुद्ध) कार्याचा विचार करून ही कलेची देवता आनंदीत होते.

आगिल काजु बिचारि बहोरी।
करिहहिं चाह कुसल कवि मोरी।
हरषि हृदयँ दसरथ पुर आई।
जनु ग्रह दसा दुसह दुखदाई।।-रामायण(अयोध्याकांड ११-४)

जगतहीताच्या महत्कार्याची संधी जाणुन सरस्वतीचा हा आनंद असतो. श्रीकृष्णालासुद्धा असाच आनंद होतो, जेव्हा अर्जुनाला

आपल्या शंकांचे निरसन करण्यासाठी ज्ञान पाहिजे असते. बहुतेक वेळा लोक देवाला समृद्धी मागत असतात. ज्ञान नको असते!

(कांक्षतः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः।४- १२

परम् भावम् अजानन्तो ममभूतमहेश्वरम् ।१०-११)

परंतु श्रीकृष्ण (मानवी रूपातील देव) यांना ज्ञान सांगण्याची संधी मिळाली असते. मानवी संवयीला वेगळी कलाटणी मिळते.

तम उवाच हृषिकेशो प्रहसन्नीव भारत।

सेनयोः उभयोः मध्ये विषिदन्तमिदं वचः।।

(२-१०)

योग्य असो कि अयोग्य !मनुष्य स्वतःला योग्य समजुनच जगत असतो. योग्य नसला तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी त्याला उपलब्ध झालेल्या घटनेची Philosophy बनवितो. अर्जुन अशीच Philosophy बनवतो. वास्तव hide करण्यासाठी हा बुरखा ठरतो. अर्जुनाचा हा Monologue असतो. अशा भाष्याला भगवतगीता प्रज्ञावाद संबोधते. हीच संवय समाजात असते. या संवयीचा बोध करुन वास्तव स्विकार करणे अर्थात स्वतःचे अज्ञान स्विकार करणे हे ज्ञानवर्धनाचे प्रथम पाऊल असते.

"Realize deeply that the present moment is all you ever have. Make the Now the primary focus of your life. "

-Eckhart Tolle

श्रीकृष्णाने लक्ष्यापर्यंत पोहोचण्यासाठी संभाषणातून सकारात्मक मार्गाने संवाद साधला. यांत कोणताही विचार लादला नाही. हे भगवतगीतेचे सौंदर्य आहे. शेवटी म्हटले,

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)

सार :

Everyone thinks of changing the world, but no one thinks of changing himself.

Leo Tolstoy------

जगातील कोणताही प्रश्न असो, मनुष्य अशा भूमिकेत बोलतो कि जणु त्याचेचजवळ उत्तर आहे पण त्याचे भाष्य स्वतःची भूमिका

सोडुन असते. अर्जुन म्हणतो, हे युद्ध लोभामुळे ठरले आहे. मी जर "शहाणा" या नात्याने बाजुला झालो तर हे विपरित, अधर्म, विश्वासघात टळेल.

Transformation of Conflict into Conversation (Monologue into Dialogue)

The briliant talk of Arjuna was monologue, which stops further conversation. Shrikrishna asked him to accept reality. Later he accepts his inability to take rightous decesion and got ready to listen rightous, putting his view that any reward of kingdom can not end misery as he viewed. Here the dialogue starts. Thus Shrikrishna turned the conflict into a conversation aimed to resolve conflict.

अर्जुन मनातील संघर्षामुळे Monologue बोलतो. एखादा Monologue बोलतो, तेंव्हा दुसऱ्याला बोलण्याची संधीच नसते. श्रीकृष्ण केवळ भाष्यातीलच संघर्ष मिटवित नाही तर

जगातील संघर्ष मिटविण्यास अर्जुनाच्या भूमिकेचे महत्व त्याला दर्शवुन देतात.

विश्वसंचलनात मनुष्याची सक्रिय भूमिका असते पण याचेच त्याला अज्ञान असते. याच भूमिकेचे दर्शन श्रीकृष्ण अर्जुनाला घडवितात.

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व
जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् ।
मया एवैते निहताः पूर्वम् एव
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥(११-३३)

"Don't underestimate the power of your vision to change the world. Whether that world is your office, your community, an industry or a global movement, you need to have a core belief that what you contribute can fundamentally change the paradigm or way of thinking about problems. "

Leroy Hood

*******

(११-३३)/६:

"मया एवैते निहताः पूर्वमेव

निमित्तमात्रं भव स व्यसाचिन् "

(नियंता व नियति Designer-Destiny )

समाजात, मनुष्यजीवनात कधी अनाकलनिय प्रश्न निर्माण होतात. मनुष्य उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतो, पण जे ज्ञान तो जाणतो, ते ज्ञानच अपुरे पडते!भगवद् गीता याच संदर्भात गुह्यज्ञानाचे द्वार उघडत आहे.

१. जीवनरथ :

मनुष्यजीवन अशाश्वत आहे. मृत्यु या जीवनाचा अपरिहार्य भाग आहे. मग या जीवनाचा निश्चित हेतु काय?(हाच प्रश्न सिद्धार्थांना पडला होता!)

मनुष्यजीवनाला आवश्यक असा भगवदगीतेतील विषय कोणता?असा प्रश्न आला तर हा विषय "जीवनविकास या संदर्भात मनुष्याचा जीवनविकासरथ/मनुष्याची जीवनयात्रा" असतो. जीवनयात्रा या संदर्भात "आत्मोन्नति" जीवनविकासाचा पाया असतो.

उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत्।(६-५)

गुणान् एतान् अतीत्य त्रीन देही देह समुद्भवान् ।(१४-२०)

व्यवहारात जगत असतांना चांगल्या मनुष्याचाही विकासरथ नकळत थांबतो. त्याला याची चाहुलही लागत नाही(जसा झोपेत असतो!). अर्जुनाचा विकासरथ असाच थांबतो. याच विकासरथाचे ज्ञान नसल्यामुळे केवळ Survival साठी आपले जीवन आहे व राज्यासाठी या घोरयुद्धाला तयार झालो, या विचारसरणीमुळे तो म्हणतो, नको ते युद्ध, यापेक्षा भिक्षा मागुन उदरनिर्वाह करणे आम्ही पसंद करु!केवळ "Survival साठी जीवन" हेच मनुष्याचे ज्ञान असल्यामुळे ऐश्वर्य, कीर्ति याच विचारसरणीमुळे प्रसंगी चांगल्या मनुष्यालाही जीवन कठीण वाटते व तो सोपा मार्ग(निष्क्रियता) निवडतो!

श्रेयोः भोक्तुम् भैक्ष्यम् अपि इह लोके।(२-५)

भगवदगीता याच जीवनरथाचे ज्ञान(ज्ञानविज्ञान) सांगते.

दैवी हि एषां गुणमयी मम माया दुरत्यया।
मामेव ये प्रपद्यन्ते मायाम् एतान् तरन्ति ते।।(७-१४)
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।(९-३३)

ज्ञान ऐकुन जीवनरथ पूर्ववत सुरु होतो.
स्थितोअस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव।(१८-७३)

२. ईश्वराची ओळख :

सृष्टिची निर्मिति, विश्वाचे संचलन या संदर्भात सृष्टिचा अध्यक्ष अशी ईश्वराची ओळख भगवदगीता देत आहे. या संदर्भात ईश्वर-परमेश्वर, आत्मा-परमात्मा, पुरुष-पुरुषोत्तम, दैव-अधिदैव याद्वारे ईश्वराची ओळख स्पष्ट होते. गुणातीत/अव्यक्त/शाश्वत या अर्थाने ही ओळख आहे, मग कशाप्रकारे ईश्वर विश्वात influence करतो? त्याचे Role काय?याचेच उत्तर भगवदगीता देत आहे.
ईश्वर भक्ताच्या माध्यमातुनच कार्य करवुन घेतो.
मत्कर्मकृत् मत्परमा मद् भक्ताः संगवर्जितः।(११-५५)

सृष्टिसंचलनात "दैवीगुणसंपत्ति" असलेल्याची अर्थात चांगल्या मनुष्याची भूमिका महत्वाची असते. समाजात सुसंस्कृति,

चांगलेपणा असावा, सत्कृत्य व्हावे. दुष्कृत्य करणाऱ्यावर चांगलेपणाचा विजय व्हावा. हा धर्मस्थापनेचा हेतु आहे. या हेतुनेच ईश्वराचे Design असते. विश्वरुपदर्शनयोगात याच ईश्वराच्या Design चे दर्शन आहे.

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व
जित्वा शत्रुन् भुङक्ष्व राज्य समृद्धम्।
मया एवैते निहताः पूर्वमेव
निमित्तमात्रं भव स व्यसाचिन् ।।(११-३३)

ईश्वर येथे नियंता /अधिदैव ठरतो तर अर्जुनाला याच कार्याची संधी होती, हे त्याचे दैव(Destiny) ठरते.

"God's designs may be frequent justification for our actions, but it is we, the self-made men, who take the credit. "

-ArthurErickson(Canedian architect & Urban Planner )

********

(११-३४)

************************

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च

कर्णं तथा अन्यान् अपि योधवीरान्।

मया हतान त्वं जहिं मा व्यथिष्ठा।

युध्यस्व जेताअसि रणे सपत्नान् ।।

**************************

(११. ३४)/१:"मया हतान् त्वं जहिं मा व्यथिष्ठा"

(Internal battle of ego)

मनुष्याला भविष्याचे प्रचंड कुतुहुल असते. "एक निरागस मुलगी आपल्या भविष्याबद्दल आईला विचारते, मी भविष्यात काय होणार?श्रीमंत?सुंदर?तिची आई उत्तर देते, तु श्रीमंत होणार असशील, सुंदर होणार असशील तर झाल्याशिवाय राहणार नाही. आपल्याला त्या दिशेने प्रयत्न करण्याचा अधिकार आहे. आपण आपले कार्य करायचे व जे घडणार त्याचा स्विकार करायचा.

Que Sera Sera, Whatever will be will be हे डोरीस डे चे प्रसिद्ध गाणे आहे.

भविष्य आणि वर्तमान यांचे नाते, मनुष्याच्या मर्यादा, या संदर्भात त्याचे अधिकार भगवतगीता स्पष्ट करते. सृष्टिचे संचलनात ईश्वर भूमिकेचे ज्ञान विज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते. ईश्वराला जे मान्य असेल तेच भविष्यात घडणार. अशी ईश्वरश्रद्ध व्यक्तिची मान्यता असते, विश्वरुपदर्शनातुन ईश्वराच्या "काळ" या भूमिकेद्वारे भविष्य व वर्तमान याचे दर्शन अर्जुनाला होते.

मया हतान त्वं जहिं मा व्यथिष्ठा।
युध्यस्व जेताअसि रणे सपत्नान् ।।(११-३४)

पार्श्वभूमि:

अहंकारामुळे चुकीचे interpretation:

प्रत्येक मनुष्याची जीवनयात्रा स्वतःला मी योग्य आहे हे समजुनच चालत असते. अर्जुन त्याचे नियतकार्य पापकर्म ठरवितो. धर्माला अधर्म व अधर्माला धर्म ठरवितो. अशाच प्रकारचे चुकीचे Interpretation हा अहंकार करीत असतो. अर्थात कर्ता या

नात्याने स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी चुकीचे interpretation करुन ज्ञान वापरतो.

Knower (क्षेत्रज्ञ) या संदर्भात मन, बुद्धि, चित्त, अहंकार Faculties of Consciousness असतात. मनुष्य जन्माबरोबरच त्याचा अहंकार जन्म घेतो अर्थात त्याचा "मी" जन्म घेतो. याच अहंकाराला सोबत घेवुन जीवन जगत असतो. भगवतगीता या अहंकारावर भाष्य करते.

अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

Misleading Interpretation:

"Often humanbeing is confused while interpreting Self respect and Ego. The former push the life ahead, the later plays obstacle. "

मी कर्ता ऐसे म्हणसी।तेणे तू कष्टी होसी।
राम कर्ता म्हणता पावसी।यश कीर्ती प्रताप।।

न आदत्ते कस्य चित्पापं न चैव सुकृतं विभूः।
अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।।(५-१५)

अहंकाराच्या Replacement साठी ईश्वराचा आश्रय याचे महत्व भगवतगीता सांगते. वर्तमानातील युद्धकार्यात ईश्वर कर्ता आहे हे दर्शन अर्जुनाला विश्वरुपदर्शनयोगात होते.

मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि।
अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रोष्यसि विनङक्ष्यसि।।(१८-५८)

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।
मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिं स्त्वाम् नियक्ष्यति।।(१८-५९)

"Inside every human being, two opposing forces battle against one another: love and ego. Each has its own agenda, suggestions, and ideas, and they are almost always opposite. It’s up to us to choose which we will allow to govern our lives. "

********

(११-३४)/२:"युध्यस्व जेताअसि रणे सपत्नान्"
 (चांगल्याचा वाईटावर विजय)

भगवतगीता चांगलेपणाला दैवीगुण संबोधते. मानवता - कल्याणासाठी समाजात चांगलेपणाचा आग्रह होत असतो. जगातील धर्म चांगलेपणालाच प्रोत्साहीत करतात. समाजात चांगलेपणा जेंव्हा दुबळा ठरतो, तेंव्हा वाईटपणाचे साहस वाढत असते. समाजाचा Balance बिघडतो. समाजात शोषण असते. चांगले सज्जन संभ्रमात सापडतात. अशाच स्थितिला अधर्म संबोधल्या जाते. म्हणुन धर्मस्थापना या संदर्भात चांगल्याचा वाईटावर विजय होणे(आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च) या संदर्भातच भगवतगीता भाष्य करीत आहे.

समाजातील भाष्य:

समाजात व्यावहारिक भाष्य चालते. कुणी आपल्या हीतसिद्धिसाठी डावपेच लढवीत असतात, कुणी आपल्या

निष्क्रियतेला योग्य सिद्ध करण्यासाठी स्वमताचा दुराग्रह करतात. महाभारतात या दोन्ही भाष्याचे दर्शन होते.

प्रथम भाग:पांडवांना राज्यापासुन वंचित ठेवण्यासाठी अनेक डावपेच कौरव वापरतात. अटी पुर्ण करुनही पांडवांना न्याय मिळत नाही व अखेरचा पर्याय म्हणुन धर्मयुद्ध ठरते. याद्वारे अर्जुनाला नियतकार्य मिळते ही अर्जुनासाठी उपलब्धि असते.

दुसरा भाग:अर्जुनाला योग्य नियतकार्य मिळाले तरी तो युद्धक्षेत्रावर कार्य न करण्याचा आग्रह धरतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी भाष्य बोलतो. ज्याला स्वतःचा मार्ग माहित आहे तो विश्वासाने मार्ग चालतो. ज्याला स्वतःचा मार्ग माहित नसतो किंवा मार्गावर विश्वास नसतो, अशा स्थितित निष्क्रियता निवडतो पण ती लपवित असतो. "मी योग्य आहे" हे सिद्ध करण्यासाठी भाष्य बोलतो.

वर्तमान ज्ञानविज्ञानाचा आहे. या पार्श्वभुमीवर निरर्थक, भ्रम निर्माण करणारे भाष्य व प्रश्नाची पारदर्शकता यांतील भेद जाणणे आवश्यक असते. समाजात सर्वांना व्यावसायिक रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी बौद्धिक भाष्य होते. व्यावसायिक रोजगार

देणारी समाजव्यवस्था हा शाश्वत (शोषणविरहीत) समाजव्यवस्थेचे व्यवस्थापन या संदर्भात व्यवहाराचाच भाग असतो.

*निरर्थक वाद vs. प्रश्नाची पारदर्शकता

मनुष्याला इच्छा असतात. (अतृप्तिमुळे)अशांती आली कि तो भाष्यात (समर्थन, तुलना) शांति शोधत असतो. अशा भाष्यावर वाद करणे निरर्थक ठरते. व येथे "निरर्थक वाद vs. प्रश्नाची पारदर्शकता" हा विषय भगवतगीता प्रकाशात आणते.
अर्जुन वास्तव स्विकारतो व दुःखमुक्तिसाठी हा मार्ग योग्य कसा ? हा प्रश्न उपस्थित करतो.

* सामान्य पातळी vs. श्रेष्ठ पातळी

(Common vs Higher)

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

श्रेष्ठ विश्वासाने मार्ग चालतो, दुःखाने विचलित होत नाही. हा श्रेष्ठांचा Standard मार्ग भगवतगीता सांगते. यातुनच मानसिक दुर्बलता व Wellness हा प्रश्न उपस्थित होतो.

*मानसिक दुर्बलता vs. स्थितप्रज्ञ
(दुःख vs. दुःखान्त-योग)

सामान्य पातळीवर मनुष्य सुखासाठी कार्यरत असतो. जेंव्हा हे कार्य(सर्वांना) दुःखच देणार आहे तर या कार्याचे प्रयोजन कशासाठी?

अर्जुन चांगला असतो, म्हणुन त्याला दैवीगुणी संबोधले आहे. दैवीगुणी व्यक्तिला स्वतःवर विश्वास असतो. या पार्श्वभुमिवर चांगलेपणाचे (सत) ईश्वराशी (गुणातीत) असलेले नाते ज्ञानविज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते. ईश्वराचा आश्रय येथे ज्ञानाचा आश्रय असतो, यामुळे विश्वास येतो. जगतहीतायसाठी दैवी मनुष्याच्या सत्कार्याचे महत्व असते म्हणुन विश्वरुपातुन ईश्वराच्या भूमिकेतुन श्रीकृष्ण सांगतात,
मया हतान् त्वं जहि मा व्यथिष्ठा।
युध्यस्व जेताअसि रणे सपत्नान्॥(११-३४)

ईश्वराची ही भूमिका जगतहीताय असते, तर अर्जुनासाठी आत्मनो मोक्षार्थ(स्वविकास) असते. याच संदर्भात बुद्धियोगाचे महत्व भगवतगीतेत स्पष्ठ होते. व "अमृतत्वाय कल्पते" हा विकासमार्ग ठरतो. कार्यनिश्चय (द्वंद्वमुक्त) होतो व निष्ठेने कार्यरत होतो. (योगः कर्मसु कौशलम्). याप्रमाणे ईश्वाराचा आश्रय जीवनाच्या Higher Level साठी होतो, हे भगवतगीतेत स्पष्ठ होते.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

******

(११-३७)

***********************

कस्मात् च ते न नमेरन् महात्मन्

गरीयसे ब्रह्मणोअपि आदिकर्त्रे।

अनंतदेवेश जगत् निवासं

त्वम् अक्षरं सत् असत् तत्परं यत्।।

*************************

(११-३७):" "अनंतदेवेश जगत् निवासं।

त्वम् अक्षरं सत् असत् तत्परं यत् "

(The Supreme Power)

अर्जुनाला ईश्वराबद्दल जे जे सांगण्यात आले, अर्जुन तेच प्रत्यक्ष(विश्वरुपदर्शन) पहात होता व अनुभवत होता. अर्जुनाला ईश्वराची, त्याच्या कार्याची, विश्वातील भूमिकेची ओळख होते. जगातील शाश्वत तत्व, जगाचा आधारस्तंभ व आश्रय ईश्वर आहे. जगतहीतासाठी काय योग्य हे जाणुन न्याय करणारा( शाश्वत धर्मरक्षक) व सनातन पुरुष ईश्वर आहे असे मत व्यक्त करतो.

त्वम् अक्षरं परमं वेदितव्यं

त्वम् अस्य विश्वस्य परं निधानम् ।

त्वम् अव्ययः शाश्वतधर्मगोप्ता

सनातनः त्वं पुरुषो मतो मे।।(११-१८)

अर्जुनाला वर्तमानातील भूमिका जाणुन घ्यायची असते. तेंव्हा कळते, भीष्म, द्रोण, कर्ण या सर्व महारथींचा मृत्यु निश्चित झाला आहे. कारण व प्रभाव या संदर्भात ईश्वराच्या या भूमिकेला कांहीच Argument नसते. म्हणुन अर्जुन म्हणतो, Creator या संदर्भात ब्रह्माच्या आधी ईश्वराचे अस्तित्व आहे. तेच मुळ धाम आहे. सर्व देवांचा राजा अशी ईश्वराची ओळख आहे. "ईश्वर "हे शाश्वत तत्व उर्जारुपाने निसर्गाच्या कारण व प्रभाव या नियमा पलिकडे अस्तित्वात आहे.

(प्रकृतिसंचलन निसर्गनियमानुसार होत असते. यातील एक नियम कारण व प्रभावाचा आहे. "सत -असत "

Law of Cause and Effect - Nothing happens by chance or outside the Universal Laws.. Every Action(including thought) has a reaction or consequence "We reap what we sow")

कस्मात् च ते न नमेरन् महात्मन्

गरीयसे ब्रह्मणोअपि आदिकर्त्रे।
अनंतदेवेश जगत् निवासं
त्वम् अक्षरं सत् असत् तत्परं यत्।।(११-३७)

व्यावहारिक बोध:

निसर्गनियमानुसार प्रकृतिचे संचलन होते, तेंव्हा ईश्वराचे अस्तित्वच नाही अशी भूमिका कांही बुद्धिप्रामाण्यवादी घेत असतात. ईश्वराचे अस्तित्व मान्य करणे वा न करणे महत्वाचे नसले तरी मनुष्य विश्वाला व स्वतःला कसे ओळखतो हे महत्वाचे ठरते. ईश्वर" कारण व प्रभाव" यापलीकडील शाश्वत शक्ति आहे, विश्वाचा आधारस्तंभ आहे व मानवकल्याणासाठी न्याय करणारी शक्ति आहे. याप्रमाणे ईश्वराला जो ओळखतो त्यालाच ईश्वर ओळखत असतो. याचाच अर्थ मनुष्य स्वतःला व विश्वाला कसे ओळखतो हेच येथे महत्वाचे ठरते.

समोअहं सर्वभूतेषु न मे द्वेष्यो अस्ति न प्रियः।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु च अपि अहं।।(९-२९)

******

११-३८ :

"वेत्ताअसि वेद्यं च परं च धाम
त्वया ततम् विश्वम् अनन्तरुपम्"
(विश्वाचे व्यवस्थापन)

१. विश्वाचे व्यवस्थापन :

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्।
हेतुना अनेन कौंतेय जगत् विपरिवर्तते।(९-१०)

या विश्वात देशाचे संघटन, उद्योग, प्रशासन यांचे विविध संघटन चालु असते. यात व्यवस्थापन असते. याप्रमाणे संपुर्ण विश्वात व्यवस्थापन यंत्रणा सुरु असते. या विविध व्यवस्थापन यंत्रणेचा ईश्वर अध्यक्ष असतो.

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।(४-३२)

कर्माने घडणाऱ्या या व्यवस्थापन यंत्रणेला यज्ञ ही संज्ञा दिलेली आहे. या विश्वात द्रव्ययज्ञ, ज्ञानयज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ असे विविध यज्ञ होतात. आपापले कर्म यज्ञरुपाने करुन मनुष्य सृष्टिचक्रप्रवर्तनास सहकार्य करीत असतो.

*धर्म

मनुष्य आपल्या कुटुंबाचा, संस्था-समाजाचा, देशाचा तसेच विश्वाचा घटक असतो. अर्थात समुहव्यवस्थापनातील सदस्य असतो. मनुष्याला लाभलेल्या नियतकार्याचा या सर्व घटकांशी संबंध असतो. या सर्व घटकांशी Harmony साध्य होण्यासाठी धर्माचे प्रयोजन असते.

या सर्व घटकांबरोबर मनुष्य स्वतःच्या जीवनाचाही जबाबदार घटक असतो. अर्जुनाला नियतकार्यात दुःख जाणवते म्हणुन या कार्याला अधर्म ठरवितो. धर्म-अधर्म या संदर्भात त्याचा निर्णय होत नाही. धर्म या संदर्भात त्याचे नियतकार्य त्याच्यासाठी "स्वधर्म" ठरते. स्वधर्माचरण Tiebreaker ठरतो.

२. जीवनविकासमार्गातील व्यवस्थापन :

मनुष्याला इच्छा/गरजा असतात. या पुर्तिसाठी कर्म करतो. कार्याचे ध्येय निश्चित करुन कर्म घडत असते. या व्यवस्थापन प्रक्रियेत "यज्ञ तत्व" भगवतगीतेने वापरलेले आहे. याच यज्ञ तत्वाने कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य होते.

यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।(४-२३)

*ईश्वरभक्ति

अर्जुन विश्वसंचालन याचे Theoritical ज्ञान ऐकतो, अध्यात्म याच ज्ञानाचा भाग असतो. त्याच्या विनंतिवरुन विश्वसंचालकाचे रुप त्याला दाखविण्यात येते. अर्जुनाला वर्तमानकाळातील कर्म व त्याचे प्रयोजनाचा हेतु (ईश्वराचे Design) याचे दर्शन होते. ज्ञान या संदर्भात वर्तमान व भविष्य जाणणारा ईश्वर आहे. हीच ज्ञानशक्ति मनुष्याचे गन्तव्य धाम आहे. व याच शक्तिचे ज्ञान जाणण्यालायक (वेद्य) आहे. याचसाठी ईश्वराची भूमिका, त्याचे विश्वाशी व मनुष्याशी नाते जाणुन आपापल्या कर्माने त्याची भक्ति साध्य करायची आहे. अर्जुन म्हणतो,

त्वम् आदिदेवः पुरुषः पुराणः

त्वम् अस्य विश्वस्य परं निधानं।

वेत्ताअसि वेद्यं च परं च धाम

त्वया ततम् विश्वम् अनन्तरुपम्।। (११-३८)

भगवतगीतेचा (Song of God) अर्थात ईश्वराचा संदेश:

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

३. वर्तमानातील आव्हान :

जगात कर्तृत्वाचे महत्व, जीवनात कर्माचे महत्व निर्विवाद असते. ज्ञान जगी सर्वश्रेष्ठ आहे. ज्ञानामुळेच अशक्य गोष्टी शक्य झालेल्या आहेत. ज्ञानामुळेच मनुष्याची कार्यक्षमता वाढली आहे.

*ज्ञान

समाजात मात्र "ज्ञान" या संदर्भात विपरित चर्चा (उदा.. भ्रष्टाचाराने मनुष्य श्रीमंत होतो!राजकारण भ्रष्टाचाराने चालते!नशीबाने श्रीमंति मिळते!)होत असते व कर्म, कर्तृत्व यांचे निश्चित महत्व कळत नाही, ज्ञान होत नाही. मनुष्य योग्य समजुनच स्वतःला कार्यरत करतो. योग्य नसला तरी योग्य सिद्ध करण्यासाठी (वास्तव स्विकारीत नाही) ज्ञान वापरतो. समाजातील या संवयीमुळे जणु सर्व लोक ज्ञानीच असतात व आपल्या ज्ञानाचे दर्शन देत असतात

अशीच स्थिति असते. तरी समाजात ज्ञान या संदर्भातच विविध विषयावर चर्चा होत असते.

अशीच चर्चा भगवतगीतेत होत आहे. पण त्या चर्चेला निश्चित विषय आहे. अर्जुनाच्या कार्याची जगाला गरज असते. पण अर्जुन निष्क्रियतेला योग्य ठरविण्यासाठी ज्ञान वापरतो. याच घटनेने मनुष्याचे कर्तव्य व वर्तमानातील वास्तव या संदर्भात मनुष्याला भगवतगीतेने सावध केले आहे.

*श्रेष्ठ/योजक

"श्रेष्ठ" या संदर्भात सामान्यजन श्रेष्ठांचे अनुसरण करतात. सामान्यजनांचा विकास कर्मानेच होत असतो. म्हणुन श्रेष्ठांनी सामान्यजनांचा बुद्धिभ्रम करुन त्यांना आळशी, निष्क्रिय करु नये. जो चांगला आहे, त्याच्या कार्याची जगाला गरज असते. म्हणुन भगवतगीतेत श्रेष्ठांची भूमिका व त्यांचे कर्तव्य याचेच ज्ञान highlight केले आहे.

अमंत्रं अक्षरं नास्ति नास्ति अमुलम् औषधम्।
अयोग्यं पुरुषं नास्ति योजकः तत्र दुर्लभः।

अर्थात शब्दापासुन साहित्य बनते, वनस्पतिपासुन औषधी, संघटनेत मनुष्याचा उपयोग होतो. व्यर्थ कांहीहि नसते. म्हणुन व्यवस्थापन यंत्रणेत योजक (Orgoniser, Creative leadership)महत्वाचा असतो.

"Personal leadership is the process of keeping your vision and values before you and aligning your life to be congruent with them. "

-

Stephen Covey

**********

(११-४३)

***********************

पिताअसि लोकस्य चराचरस्य

त्वम् अस्य पूज्यश्च गुरुः गरीयान्

न त्वमसमःअस्ति अभ्यधिकः कुतो अन्यो

लोकत्रये अपि अप्रतिम् प्रभावः।।

*************************

(११-४३)/१:
"पिताअसि लोकस्य चराचरस्य

त्वम् अस्य पुज्यश्च गुरुः गरियान"

"It is not in the stars to hold our Destiny but in ourselves. "

-William Shakespeare

जगात अनेक तत्ववेत्ते झालेत, महापुरुष झालेत. ज्यांनी मानवजीवनाचे ज्ञान सांगितले व मानवकल्याणासाठी मोलाचे योगदान केले . (मानवकल्याण)याच संदर्भात मनुष्यजीवनाची

ओळख देणारी भगवतगीता एकमेव (Unique asset)आहे. भगवतगीतेत श्रीकृष्णाला अर्जुन महागुरु संबोधतो, ज्याची ओळख चराचराचा पिता (सृष्टि अध्यक्ष) अशी होते. याच संदर्भात आचार्य विनोबा भावेंनी भगवतगीतेला "आई" संबोधले होते. "पडता, रडता उचलुनी घेई।गीताई माऊली माझी।।"

पिताअसि लोकस्य चराचरस्य
त्वम् अस्य पूज्यश्च गुरुः गरीयान्
न त्वमसमःअस्ति अभ्यधिकः कुतो अन्यो
लोकत्रये अपि अप्रतिम् प्रभावः।।(११-४३)

मनुष्य शरीराचा भौतिक प्रवास जाणतो. या प्रवासात व्यवहार जाणतो. हा प्रवास सकाम (प्राप्ति) असल्यामुळे मनुष्य (परिणामभयामुळे) दुःखी होतो. मनुष्य आदर्श (Morality) धर्मज्ञान ऐकतो. याच ऐकलेल्या धर्माचा दाखला अर्जुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी देतो. प्रत्यक्षात अर्जुन दुःख टाळण्यासाठी युद्ध न करणे ही निवड करतो व या निवडीचा धर्माशी कांहीही संबंध नसतो.

अर्जुनाचे Intention चांगले असते. तो जाणतो, मनुष्य प्राप्तिसाठी, भोगैश्वर्यासाठी कार्य करतो व यामुळे "मला कांही नको " ही भूमिका घेतो. याशिवाय ही भूमिका लोभी ठरेल. "लोभामुळे स्वजनांची हत्त्या " अशी या कार्याचे स्वरुप दिसते, व यामुळे हे कार्य पापकर्म ठरते. अर्थात या प्रवासात सकाम मानसिकता असते. धर्म या संदर्भातील संशयामुळे श्रीकृष्ण धर्माची भूमिका स्पष्ट करतात. स्वर्गाची इच्छा असली तरी प्रवास सकाम असतो व यामुळे कार्यनिश्चय दृढ नसतो असे भगवतगीता स्पष्ट करते.
व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।(२-४४)

SELF AWARENESS या संदर्भात सॉक्रेटीसने "Know Thyself हा संदेश दिला होता. Self Awareness या संदर्भात "मनुष्य स्वतःचा मार्ग चालत असतो" हा संदेश भगवतगीता देत आहे. मार्गात अडथळा (Adversity, Barrier) जाणवले तर मनुष्यासमोर दोन Choice असतात. १. अडथळा टाळुन चालणे २. अडथळ्यावर उपाय करुन मार्ग clear करणे. याच Choice चे ज्ञान नसल्यामुळे अर्जुन अडथळा टाळण्यासाठी युद्धच टाळतो. पण वास्तव स्विकारल्यावर युद्ध करण्यामुळे दुःख नष्ट कसे होईल? हा प्रश्न उपस्थित करतो.

जोवर धर्माचा संबंध असतो, स्वतःचे नियतकार्य स्वधर्म करणे यामुळे स्वतःचा मार्ग बनतो व जाणतो. व कार्याद्वारे भक्ति घडते. धर्मज्ञान कार्याचा निश्चय करण्यासाठी वापरावे हे ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते. निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी धर्म, आदर्श, ज्ञान वापरणे ही पळवाट ठरते. कार्यनिश्चय न होण्याचे कारण मनाची चंचलता असते. याच चंचलतेवर मात करुन कार्यनिश्चय करणे यासाठी "मनोविज्ञान" या संदर्भात बुद्धियोग निष्ठेचे महत्व भगवतगीता सांगते.

मनोवैज्ञानिक मनाच्या Functionig faculties (Consciousness) सांगतात. भगवतगीता मनोविज्ञान या संदर्भातच मन, बुद्धि, चित्त, अहंकार या functioning faculties शिवाय आत्मज्ञान(अध्यात्म) सांगते. शाश्वत जीवित तत्व(चेतन, आत्मा)व अशाश्वत देह याचे ज्ञान विज्ञानासह(सत, रज, तम प्रकृति-पुरुष-पुरुषोत्तम) स्पष्ट करते. आत्मा-परमआत्मा, क्षेत्र-क्षेत्रज्ञ याद्वारे ईश्वर प्रकृतिचा अध्यक्ष व त्याचा हृदस्थानी वास याचे ज्ञान स्पष्ट होते. हे ज्ञान जाणल्यामुळे मनुष्याचा मुळ प्रवास (जीव)आत्म्याचा असुन त्याला शरीर हे साधन या इहलोकी मिळाले आहे, या पार्श्वभूमिवर हा प्रवास "मृत्योर्मा अमृतंगमय" असा असतो. या मार्गावर असलेला व्यथित होत नाही. नित्य विकासमार्गावर असतो.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

जीवनमार्गाच्या (दोन: स्वधर्म व बुद्धियोग- कार्याचा दृढनिश्चय)निष्ठा याप्रमाणे भगवतगीता स्पष्ट करते.
बुद्धियोगनिष्ठेमुळे मनुष्याचा जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा असतो. अहंकार मनाची एक Functioning faculty असल्यामुळे याच अहंकाराचा आश्रय मनुष्याला प्रकृतिवश करते. ईश्वराचा आश्रय अहंकाराला Replace करते व मार्ग अमृतंगमय होतो, . या मार्गात १. निर्णयअधिकार जाणतो, व कार्यनिश्चय करतो. २. समत्वयोगाने कार्यरत असणे ही (फलत्याग)भक्ति असते.

भगवतगीता सोप्या शब्दात प्रकृतिचे Automation, अडथळा व स्वतःचा मार्ग स्पष्ट करते.
*प्रकृति :
सदृशं चेष्टते स्वस्या प्रकृते ज्ञानवान अपि।(३-३३)

ज्ञानी असला तरी प्रत्येक मनुष्य स्वभावनियत जगतो. मनुष्याला जे जमते, तेच सहज कार्य तो करीत असतो. स्वतःचे

सहजकार्य/स्वभावनियतकार्य ही Strength असते, तर द्वंद्व मार्गातील अडथळा असतो. यामुळे प्रकृतिवश (मनोवश) असतो.

*अडथळा:

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

याच अडथळ्यावर उपाय म्हणजे Tiebreaker. स्वधर्म (Tiebreaker) स्वतःचा मार्ग अडथळाविरहीत करतो. याच अनुषंगाने स्वतःचा मार्ग व इतरांचा मार्ग यासंदर्भात भगवतगीता भाष्य करते:

*स्वतःचा मार्ग:

श्रेयान स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् ।

स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः॥(३-३५)

“I desire that there may be as many different persons in the world as possible; but I would have each one be very careful to find out and pursue his own way, and not his father’s or his mother’s or his neighbor’s instead. ” — Henry David Thoreau

**************

(११. ४३)/२:"त्वम् अस्य पुज्यश्च गुरुःगरीयान् "

मनुष्याची जीवनयात्रा त्याच्या (प्रकृति)स्वभावानुसार चालु असते. जगात तो खुप ज्ञान ऐकत असेल पण त्याला जे योग्य वाटते तेच तो ग्रहण करतो, आपले लक्ष्य ठरवितो व यात्रा चालु असते. अशीच यात्रा चालु असता अर्जुनाला साक्षात ईश्वर भेटतो. ज्याचा शिष्य म्हणुन अर्जुन योग्य काय? हे ज्ञान ऐकण्यास तयार होतो, तो साक्षात ईश्वर आहे म्हणुन ज्याला तो मित्र(सखा) समजतो, मित्र समजुनच अजाणतेने त्याचेशी झालेल्या वागणुकीत चुक झाली असेल तर क्षमायाचना करतो. व गुरुश्रेष्ठ (महानगुरु) जाणुन म्हणतो,

पितासि लोकस्य चराचरस्य
त्वम् अस्य पुज्यश्च गुरुःगरीयान् ।(११-४३)

गुरु फार तर जे साध्य करायचे आहे त्यासाठी मार्ग दाखवेल पण येथे कोठे जायचे ?(जीवनाचे लक्ष्य) व कां जायचे? याचेही ज्ञान मिळते, जे अर्जुन जाणत नव्हता, व तेथे कसे पोहोचायचे याचेही

ज्ञान मिळते. याप्रमाणे "गुरु" या संदर्भात श्रीकृष्णाची महान भूमिका अर्जुन अनुभवतो.

*The great Inspirer:

मनुष्याचे जीवन त्याच्या जीवित तत्वामुळे चालु असते. याच जीवित तत्वाचे ईश्वराशी नाते असते, जो ईश्वर या संपुर्ण सृष्टिचे सृजन करतो व प्रवर्तन करतो. याच ईश्वराप्रत त्याचा जीवनप्रवास असतो. हा प्रवास अनेक जन्मापासुन चालु असतो. या जन्मात मनुष्यशरीर त्याला प्रवासाचे साधन मिळालेले आहे. याच ज्ञानाचे अज्ञान असल्यामुळे अर्जुन दुःखी होतो.
जीवनात काय मिळवायचे आहे?पैसा!भोगैश्वर्य!किर्ति!पुण्य करुन स्वर्गगति!याच स्वतःच्या Belief system नुसार अर्जुन विचार करतो व मला कांही नको असे सांगुन, स्वतःला धर्मज्ञानी संबोधुन युद्धस्थळी शस्त्र खाली ठेवतो.
अर्जुनाचे धर्मभाष्य श्रीकृष्ण शांतपणे(अडथळा न करता) ऐकुन घेतात व त्याला पुनः दुःखी न करता त्याला त्याची खरी ओळख करुन देतात, अर्थात प्रथम Verse मधुनच Inspire करतात.
अनार्य जुष्ठम् अस्वर्ग्यम् अकिर्तिकरम् अर्जुन ।(२-२)

तुझ्यासारख्या श्रेष्ठाला अशा कठिण प्रसंगी मोह अशोभनिय आहे. ही भूमिका ना धर्मासाठी योग्य आहे ना इहलोकी किर्तिप्रद आहे.

अर्जुन आपले भावनात्मक विचार व्यक्त करतो. धर्मधुरिण गुरुंना मारुन मिळविलेले राज्य रक्ताने माखलेले राहील. शिवाय कोणाची बाजु धर्माची हेही कळत नाही. धर्मदृष्ट्या युद्ध करणे योग्य असले व ते जिंकले आणि देवाचे राज्यही मिळाले तरी माझा शोक कसा नष्ट होणार, हे मला अनाकलनिय आहे. म्हणुन युद्ध करणार नाही ही अर्जुनाची भूमिका असते.

अर्जुन याच प्रश्नात दोन प्रश्न उपस्थित करतो. योग्य काय?हा धर्माचा प्रश्न व व्यक्तिगत सुखदुःखाचा प्रश्न. व एकाच दगडाने दोन्ही पक्षी मारावे तसे एकच उत्तर श्रीकृष्ण देतात. (कर्माद्वारे योग-दुःखान्त)

अर्जुनाच्या Belief system नुसार जीवनातील सुखाच्या ज्या संकल्पना असतात, त्याप्रमाणे दुःखावर उपाय करु शकत नाही. अर्थात त्याचे जीवनविषयक ज्ञान अपुर्ण असते.

मनुष्याला सुख हवे असते, पण दुःख नको असतांनाही येते. दुःखावर उपाय करण्याचे ज्ञान नसेल तर जो (अर्जुनाप्रमाणे मनसमाधानासाठी प्रज्ञावाद) उपाय करतो, तेंव्हा "ज्ञानी" या आविर्भावातच प्रवास करीत असतो.

जीवनात कर्म घडते. कर्मानेच शरीरयात्रा चालते. कर्मानेच भोगैश्वर्य मिळवितो. कर्मानेच (जगतहीत साध्य करुन) पुण्य मिळवितो. पण कर्मानेच योग(दुःखान्त) साध्य होतो, हा विषय अर्जुनाला नवीन असतो.

मनुष्य व्यवहारात कर्म करतो, हे कर्म जीवनविकासाचे साधन असते. हे कर्म मनुष्य स्वतःच्या सुखासाठी करतो?समुहकल्याणासाठी करतो?कि जगतहीतासाठी करतो?याचाच मध्य भगवतगीतेने साधलेला आहे. अर्थात हे कर्म "अमृतंगमय " या मार्गावरील असते. या मार्गात बुद्धियोगाचा आश्रय असतो. या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही. याचसाठी ईश्वरज्ञान, अध्यात्मज्ञान भगवतगीतेत आलेले असले तरी " ज्ञान" निष्क्रियतेच्या समर्थनासाठी (संशयामुळे!) कि कार्याचा मार्ग निश्चित करुन विकासासाठी? असा उलटसवाल भगवतगीतेने (अर्जुनाच्या माध्यमातुन) जगाला केलेला आहे!

*संशयात्मा विनश्यति।

*ज्ञानसंच्छिन्नसंशयम् ।

*योगसंन्यस्त कर्माणं।

******

(११-५४)

***********************

भक्त्या तु अनन्यया शक्यं अहं एवं विधःअर्जुन।

ज्ञातुं द्रष्टुं च तत्वेन प्रवेष्टुं च परंतप॥

*************************

(११. ५४):

"भक्त्या तु अनन्यया शक्यं अहं एवं विधःअर्जुन"

जीवन जगत असतांना मनुष्याला कार्यात संशय आला व निष्क्रिय झाला तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी "ज्ञान"वापरतो, म्हणुन सर्वप्रथम "ज्ञान" हा विषय भगवतगीतेत आला.

ज्ञान:ज्ञानी(मार्गाचे ज्ञान असलेला) विश्वासाने (कार्यरत असतो) मार्ग चालतो. म्हणुन "ज्ञानाचा कार्याशी संबंध" हा विषय उपस्थित झाला.

कर्म :आर्थिक(भौक्तिक) विकास व कार्य यांचा संबंध मनुष्य जाणतो. सुखासाठी प्राप्ति हा विषय जाणतो. या आधारावर दुःख टाळण्यासाठी अर्जुन म्हणतो, मला कांही नको!या आधारावर

"कार्य व सुख यांचा संबंध " अर्थात "कार्याद्वारे सुख "हा विषय उपस्थित झाला.

भक्ति:शाश्वत सुख या संदर्भात दुःखाने विचलित न होणे अर्थात दुःखान्त शक्ति यासाठी योग हा विषय आला. म्हणुन कार्याद्वारे योग विषय आला. याचसाठी कार्याद्वारे भक्ति या अनुषंगाने ईश्वर, अध्यात्म हा विषय उपस्थित झाला.

अर्जुनाला श्रीकृष्णाने(ईश्वराचे) प्रत्यक्ष विश्वरुपदर्शन दिले. यांत वर्तमानातील ईश्वराची प्रवृत्ति(भूमिका) दर्शविली, व अर्जुनाला स्वतःची Destiny समजली. या रुपाबद्दल श्रीकृष्ण म्हणाले,
देवलोकसुद्धा जे (वर्तमान)विश्वरुप पाहण्यास सदा उत्सुक असतात, ते दर्शन दुर्लभ असले तरी मनुष्यलोकांत अनन्यभक्तिने हे रुप जाणणे शक्य आहे. ही भक्ति करण्याचे मनुष्यासाठी प्रयोजन काय? हाच भगवतगीतेचा विषय आहे.

भक्त्या तु अनन्यया शक्यं अहं एवं विधःअर्जुन।(११-५४)

अर्थात सुखाचा मार्ग यासाठी "कार्याद्वारे भक्ति" हे ज्ञान उपलब्ध झाले. याप्रमाणे सुखी जीवनाच्या मार्गात ज्ञान, कर्म व भक्ति यांची भूमिका भगवतगीतेने स्पष्ट केली आहे.

जीवनाच्या शाश्वत विकासाचा मार्ग :

विकासमार्गात कार्यातील संशय ज्ञानाने छेदल्या जाते. ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. म्हणुन शाश्वत विकासाचा मार्ग "मृत्योर्मां अमृतंगमय" (अशाश्वताकडुन शाश्वताकडे) असा होतो. या मार्गावर कार्याद्वारा ईश्वराची भक्ति घडते.

*चांगलेपणाचा पुढाकार:
अर्जुन दुःखाने विचलित झाला. त्याला "चांगलेपणा" यासंबंधी संशय आला व निष्क्रियता पत्करली. ही भूमिका "चांगलेपणा" संदर्भात अज्ञान ठरते. शाश्वत सुख(दुःखाने विचलित न होणे) व चांगलेपणा यांचा जीवनमार्गात संबंध दर्शवितांना ईश्वरभक्तिचे महत्व स्पष्ट केले.
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

ज्ञानी(श्रेष्ठ)दुःखाने मार्गात विचलित न होता चांगलेपणाचा पुढाकार (To lead) स्वतःचा स्वधर्म जाणुन घेतो. दृढनिश्चयी असतो.

*स्वधर्म: समर्पित भावाने कार्य करणे.

समुहातील नियतकार्य स्वतःचा स्वधर्म जाणुन स्विकारतो.

*निर्णय : निर्णय अधिकार जाणणे व कार्याद्वारे योगासाठी कार्याचा दृढनिश्चय करणे.

******

(११. ५४) :

"ज्ञातुम् द्रष्टुं च तत्त्वेन् प्रवेष्टुं च परंतप "

(Higher level of consciousness )

१. Level of consciousness

व्यवहारात मनुष्य स्वभाव प्रकृतिनुसार जगतच असतो. या पातळीवर सकाम मानसिकता असल्यामुळे दुःख, भय अनुभवतो.

"No problem can be solved from the same level of consciousness that created it. "

Albert Einstein

जगात विविध धर्म आहेत. आपापल्या धर्माप्रमाणे ईश्वर मानत असले तरी ते ईश्वरश्रद्ध म्हणुनच ओळखल्या जातात. चांगले असले तरी सर्वच लोक (चांंगले असोत, धार्मिक असो वा ईश्वरश्रद्ध असोत) व्यवहारात जगत असतात. ही सकाम मानसिकतेची level असते.

दुसरी महत्वाची level निष्काम कर्माची असते. हीच अध्यात्म level/Higher consciousness/श्रेष्ठत्वाची असते. यावरच भगवतगीतेने निश्चित भाष्य केले आहे.

निर्द्वन्द्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।(२-४५)

अर्थात वरची level म्हणजे ईश्वर मनुष्याच्या माध्यमातुन कार्य करुन घेतो ही स्वतःची प्रत्यक्ष अनुभुति असते. याचसाठी अनन्यभक्ति, बुद्धियोग, निष्काम कर्मशास्त्र इ. शब्दप्रयोजन आहे.

अर्थात भगवतगीता जीवन जगण्याच्या केवळ याच दोन Level वर भाष्य करते.

२. Herd vs. Master mentality :

"The human race is a herd. Here we are, unique, eternal aspects of consciousness with an infinity of potential, and we have allowed ourselves to become an unthinking, unquestioning blob of conformity and uniformity. A herd. Once we concede to the herd mentality, we can be controlled and directed by a tiny few. And we are. "

David Icke

(David Vaughan Icke is an English conspiracy theorist . Believes in

kundalini activating chakras-energy centres, triggering a higher level of consciousness. )

सृष्टिचा अध्यक्ष ही ईश्वराची ओळख आहे. त्याचाच अंश मनुष्याच्या हृदयात जीवित तत्वरुपाने वास करीत आहे. अतः

Higher level of consciousness activation ला भगवतगीता बुद्धियोग संबोधते.

अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।...

ददामि बुद्धियोगं तं येन माम उपयान्ति ते।।(१०-१०)

या पातळीवर "अमृतत्वाय कल्पते" हा जीवनविकासाचा मार्ग बनतो. या मार्गावर विचलित होत नाही. कार्याचा एकनिश्चय असतो. कार्याद्वारे ईश्वरभक्ति अर्थात अनन्यभक्ति घडते. किंवा ईश्वराचे कार्य ईश्वराला समर्पित करतो.

भक्त्या तु अनन्यया शक्यं अहं एवं विधोअर्जुन।

ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप।।

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।

निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव।।(११-५५)

सार :

व्यवहारात (जीवनयात्रा) कर्म घडते. अध्यात्मात (Spiritual journey) ईश्वरभक्ति घडते. Consciousness च्या या दोन पातळी ठरविल्या तर Lower consciousness वर व्यवहार

असतो. यांत सकाम कार्य/इच्छापुर्तिसाठी कार्य घडते. तर Higher consciousness च्या पातळीवर ईश्वर मनुष्याच्या माध्यमातुन कार्य करवुन घेतो हे भगवतगीता दर्शवित आहे.

मनुष्याला या अनित्य, दुःखमय(अनित्यं असुखं लोकं) जीवनाची ओळख देवुन जीवनविकासाचे निश्चित ज्ञान सांगण्यासाठी श्रीकृष्णरुपाने ईश्वराचे अवतारकार्य आहे. याचरुपाने ज्ञान जगासमोर आले.

("ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप")

**********

(११-५५)

***********************

मत्कर्मकृत् मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥

*************************

(११-५५)/१ : "मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः"

उपरोक्त संदेश मनुष्याची सकारात्मक भूमिका या संदर्भात आहे.

"नकारात्मक विचार सकारात्मक विचारात बदलवा " या संदेशाची मनुष्याला ओळख असते. विचाराचा परिणाम मनुष्याच्या कार्यविषयक भूमिकेवर असतो. जगण्यातुन विचार Conditioned झालेले असतात. म्हणुन याच विचारबदलासाठी प्रक्रिया आवश्यक असते. भगवतगीता याच भूमिकेची व प्रक्रियेची ओळख करुन देते.

अर्जुनाला नियतकार्यात संशय असतो. पण हे वास्तव hide करुन निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी धर्मज्ञान वापरतो. ही नकारात्मक

भूमिका आहे, हे भगवतगीता दर्शवुन देते. व याच भूमिकेचे सकारात्मक भूमिकेत Transformation करण्यासाठी भगवतगीतेने ज्ञान उपलब्ध करुन दिले.

कर्म या संदर्भात विचाराची नकारात्मक भूमिका व सकारात्मक भूमिका(Negative & Positive Personality) यांतिल भेद जाणणे आवश्यक असते. एकासाठी(नकारात्मक) कर्मात संशय असतो, भय असते, तर दुसऱ्यासाठी(सकारात्मक) कर्म Exercise(योगासाठी) असते. एकासाठी अडचण adversity असते, दुसऱ्यासाठी Opportunity असते.

कर्मात संशय असतो तेंव्हा मनुष्य (निष्क्रियतेला योग्य ठरविण्यासाठी) समर्थनभाष्य करतो, यासाठी तो विविध Polarity/Dualityचा (माझे-तुमचे, चांगले-वाईट, धर्म-अधर्म, योग्य-अयोग्य, पाप-पुण्य इ. ) उपयोग करतो. ही कर्म या संदर्भात नकारात्मक भूमिका ठरते. यालाच भगवतगीतेत प्रज्ञावाद म्हटले.

कर्म या संदर्भात विचाराची सकारात्मक भूमिका म्हणजे कार्याचा आत्मविश्वास, योग्य हा विश्वास, यशाचा विश्वास, कल्याणाचा

विश्वास असे संदर्भ येतात. व याच भूमिकेचे दर्शन विश्वरुपदर्शनयोगात आहे.

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व।(११-३३)

War is won in the mind.

सृष्टिचक्र कर्माने प्रवर्तित असते. या सृष्टित कर्म घडत आहे. मधमाशी फुलातुन पराग घेते. फुलाचे बीजात रुपांतर होते(निसर्गाला सहकार्य). मध निर्मितिप्रक्रियेत समुहात सहकार्य होते. याप्रमाणे मधमाशीचे कर्म स्वतःसाठी (स्वार्थ), समुहासाठी(परमार्थ), निसर्गासाठी- मानवासाठी (शाश्वत कल्याण) अर्थात मधमाशीचे कार्य ईश्वराचे कार्य ठरते. या प्रक्रियेत कार्य घडणे महत्वाचे असते. कोण कशासाठी करतो ही मनुष्याची व्यक्तिगत मानसिकता असते. विश्वरुपदर्शनयोगात याचेच दर्शन आहे. (रुतेअपि त्वाम् न भविष्यन्ति सर्वे।)तु केले काय किंवा न केले काय, कार्य घडणार!

मत्कर्मकृत् मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

"Worship is a way of seeing the world in the light of God. "

Abraham Joshua Hesche

**********

(११. ५५)/२:"निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव"

"The world is starving for a new spiritual truth - a truth that works in sustaining life, not a truth that brings an end to life. "

Neale Donald Walsch

व्यावहारिक स्पर्धेत उतरलेल्या जगाला शांतिची गरज असते. यासाठी अशा क्रांतिची गरज असते जी क्रांति परस्पर जीव घेण्यासाठी नाही तर " विश्वाचे जीवन" जगवण्यासाठी असेल. याच आशेने संपुर्ण जग भारताकडे पहात आहे जेथे विश्वकल्याणाचे, विश्वशांतिचे ज्ञान जन्माला आले. याच पार्श्वभूमिवर विश्वाचा सदस्य या नात्याने भगवतगीतेची महानता जाणुन घेणे आवश्यक झाले आहे.

"मजहब नही सिखाता आपसमे बैर रखना" धर्म संदर्भात असे घोषवाक्य आहे. भगवतगीता संदेश देतांना सांगते,

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव ॥(११-५५)

अधर्माचे निर्मुलन करण्यासाठी धर्माचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते. कोणत्याही धर्मस्थापनेचे मुळ ज्ञानच विज्ञानासह भगवतगीता सांगते. व ज्याला धर्म म्हणते, त्याचा उल्लेख शाश्वत धर्म(गुणातीत), अमृतधर्म (पुरुषोत्तमयोग), राजधर्म(अनन्ययोग) याप्रमाणे भगवतगीतेत आहे. याला ज्ञानविज्ञानाचा आधार आहे. म्हणुनच "सर्वधर्मान् परित्यज्य " असे भाष्य भगवतगीतेने केलेले आहे.

या (शाश्वत)धर्माचा चांगलेपणाशी संबंध आहेच, पण याच चांगलेपणामुळे अर्जुन युद्धस्थळावर दुःखी होतो. व त्याचेसमोर Tie निर्माण होतो. वर्तमानस्थितीतील त्याची मानसिकता हा Tie सोडवु शकत नाही.

"The significant problems we face cannot be solved at the same level of thinking we were at when we created them. "

~ Albert Einstein

वर्तमानातील त्याची मानसिकता व्यावहारिक(प्राप्तिसाठी कार्य) असते. याच मानसिकतेमुळे तो "मला निश्चित काय हवे?"याचा आढावा घेतो व कांहीच नको तर या युद्धकार्यासारखे घोरकर्म कशाला? असे conclude करतो. आपण योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी (तो जाणत असलेल्या)धर्मज्ञानाचा वापर करतो. व्यावहारिक मानसिकतेतील या भाष्याला प्रज्ञावाद संबोधले आहे. या मानसिकतेमुळे कितीही महान ज्ञान जगात असले तरी मनुष्य (समर्थनासाठी) आपल्या पातळीपर्यंत त्याला (खाली) खेचतो. कारण कोणत्या बाजुने आपले भाष्य बोलायचे आहे, हे आधीच ठरले असते. जगात जे श्रेष्ठ विश्वपुरुष झालेत, ज्यांनी जगातील अंधार दुर करण्यासाठी महान संदेश दिलेले असतात, पण त्यांनाही या (व्यावहारिक ) मानसिकतेने एखाद्या विशिष्ट समुहात बंदिस्त केले असते. व अप्रत्यक्षपणे हा त्या विश्वपुरुषाचा अवमानच ठरत असतो. व सत्य /ज्ञान मनुष्यापर्यंत पोहोचतच नाही. याच पार्श्वभुमिवर भगवतगीतेचा विषय महत्वाचा ठरतो.

"उच्च मानसिकतेची धारणा".

अर्जुनाला जी अडचण(कष्ट) जाणवते ती त्याला विकासाची (उच्च मानसिकता) संधि असते. याच रहस्याचे त्याला अज्ञान असते. उच्च मानसिकतेच्या धारणेसाठी श्रीकृष्ण म्हणतात,

अनित्य असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

उच्च मानसिकता "स्थितप्रज्ञ", दैवीगुण संपत्ति याद्वारे भगवतगीता स्पष्ट करते. जगातील श्रेष्ठ पुरुष याच मानसिकतेमुळे श्रेष्ठ ठरतात.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

अर्थात उच्च मानसिकता धारण होण्यासाठी "अमृतत्वाय कल्पते" हा जीवनमार्ग असतो. या मार्गावर जीवनयात्रा होण्यासाठी बुद्धियोग असतो. (ईश्वरकृपा)

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

******०००

# भगवदगीता

# अध्याय १२. भक्तियोग

## अध्याय १२. भक्तियोग

भक्तियोग हा बारावा अध्याय एका विशेष टप्प्यावर आलेला आहे. याला आतापावेतोच्या ज्ञानाचे सार म्हणता येईल. तर भक्तियोग हा पुढिल ज्ञानाचे प्रास्तविकही ठरते. याच संदर्भात शरीरयंत्र व जीवनाच्या विकासयात्रेतील मनोवैज्ञानिक ज्ञान पुढे सुरु होते ज्याद्वारे जीवनाचा राजमार्ग ठरविणे सुलभ होते.

जीवनांत यशस्वी व्हावे, जीवनप्रवास सुखाचा व्हावा यासाठी आपण सर्व जगत आहोत. प्रत्यक्षात जीवनमार्गात योग्य-अयोग्य हा प्रश्न निर्माण झाला तरी आपल्यासाठी जे योग्य आहे, त्याचीच आपण निवड करीत असतो. व आपला प्रवास सुरु ठेवतो. या प्रवासात कधी असे प्रश्न व भाष्य आपण बोलत असतो, जणु तेच आपल्या अशांतीचे कारण आहेत. व जे प्रत्यक्षात करीत असतो, त्याचे समर्थन करतो. अशाच भाष्यातुन विचारसरणी बनत असते. व्यक्तिमत्व बनत असते.

जसे प्रश्न आपल्या मनोविश्वात निर्माण होतात, तसाच प्रश्न अर्जुनाच्या मनात निर्माण झाला. व तो जे भाष्य बोलला, त्याला अनुसरुन त्याचेशी श्रीकृष्णांनी संवाद साधला. यातुन अर्जुनाला

प्रश्न सुचलेत . या प्रश्नाचा आदर करुन श्रीकृष्णांनी अर्जुनाचे समाधान होईल असे सविस्तर भाष्य केले. या सुसंगत संवादातुन भगवतगीतारुपी मानव व मानवता विकासाचे संपुर्ण ज्ञान जगासमोर आले.

अर्जुनाच्या प्रश्नाचे मुख्य लक्ष्य युद्ध करणे योग्य कि अयोग्य हे होते. ईश्वराचे विश्वरुप ज्ञान कळल्यावर युद्ध करणे ही आपली Destiny आहे. हे सत्य कळले. आता जे कार्य योग्य म्हणुन करायचे, त्यांत त्याला पुर्ण समाधान अनुभवायचे होते. यासाठीच त्याला जीवनप्रवासातुन भक्ति साधायची होती. आता त्याचे समोर दोन प्रकारचे ईश्वर होते . एक साक्षात ईश्वराचे मानवी स्वरुप श्रीकृष्ण(Form) तर दुसरे ज्ञानाने जाणायचा अव्यक्त (Formless)ईश्वर .

श्रीकृष्णच ज्ञानाचे अधिकारी, महत् गुरु आहेत, पुजनिय आहे याची त्याला खात्री झाली. व त्याला श्रीकृष्णाच्या भाष्याचा आदर करणे अशक्य नव्हते. पण तो ही मानव होता. त्याला संपुर्ण समाधान करुन घ्यायचे होते. म्हणुन प्रश्न करतो, कोणाची भक्ति(सगुण/निर्गुण) श्रेष्ठ होईल अर्थात याद्वारे कोण श्रेष्ठ भक्त ठरेल याची प्रत्यक्ष विचारणा करतो.

याप्रश्नाचे उत्तर पुढिल चार टप्प्यातुन येते.

१. कृष्णमय भक्ति(Krishna Consciousness)

२. अव्यक्ताची साधना(अव्यक्त आसक्त चेतसाम् )

३. कर्माद्वारे अनन्यभक्ति

४. प्रियभक्त व त्याची मानसिकता

अव्यक्त साधनेत स्थित असलेला समत्वदृष्टि व सर्वभूतहितेरताः हा जगत् कल्याणभाव धारण करतो.

स नियम्यइंद्रियग्रामं सर्वत्रसमबुद्धयः।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहितेरताः।।(१२-४)

अव्यक्ताची साधना देहधारी मनुष्याला कठिण प्रयासाने साध्य होते. परंतु हीच भक्ति कर्माद्वारे अनन्यभक्तिद्वारा सुलभतेने साध्य होते. याचे विवरण पुढिल टप्प्यांत केले.

१. "मयिएव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय"

ईश्वराचे ज्ञान जाणुन ईश्वराचे ठायी मन स्थिर करणे व बुद्धिला ईश्वरज्ञानाशी जोडुन(बुद्धियोग) जीवनप्रवास ईश्वरप्रित्यर्थ करणे.

२. "अभ्यासयोगेन ततो माम् इच्छा आप्तुं धनंजय।"

ईश्वराचे ठायी चित्त स्थिर झाले नाही तर, अभ्यासयोगाद्वारे ईश्वरप्राप्तिसाठी अभ्यास (Practice) करणे.

३. "मदर्थम् अपि कर्माणि कुर्वन् सिद्धिं अवाप्स्यसि।"

असा अभ्यास साधणे तुला शक्य झाला नाही तर जे तु कर्म करतो ते ईश्वरप्रित्यर्थ करुन ईश्वराला समर्पित करणे. (आपले नियतकार्य ईश्वराचे कार्य जाणुन, स्वतःला निमित्त समजुन ईश्वरसमर्पित करणे. )

४. "कर्तुम् मत् योगम् आश्रिताः"

असे समर्पण शक्य झाले नाही तर तुला कार्याचा निश्चय करण्याचा अधिकार (निर्णयअधिकार)आहे, या अधिकाराचा वापर करुन

कार्याचा निश्चय कर व योगस्थवृत्तिने कार्याद्वारे समत्वयोग साध्य होण्यासाठी फलत्याग कर. )(परिणामभयाने व्यथित न होता समत्वयोग साध्य झाल्यामुळे भयमुक्त होतो. )

या सर्व प्रक्रियामध्ये(फल)त्याग सर्वश्रेष्ठ ठरतो. यामुळे परम् शांतीचा लाभ होतो.

श्रेयो हि ज्ञानम् अभ्यासात् ज्ञानात् ध्यानम् विशिष्यते।
ध्यानात् कर्मफलत्यागः त्यागात् शांतिः अनन्तरम् ॥(१२-१२)

*प्रियभक्त

प्रेम, जगत् कल्याणभाव, विचलित न होणे यासाठी समत्वदृष्टि, सर्वभूतहितेरताः, समदुःखसुखंधीरं हे शब्द भक्तसंदर्भात वेळोवेळी आलेले आहे. याचेच सविस्तर विवरण प्रियभक्त संदर्भात केले.

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी॥(१२-१३)
************

अध्याय १२- मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

(१२-१):

"ये च अपि अक्षरं अव्यक्तं तेषां के योगवित्तमा?"

(१२-२) :

"श्रद्धया परया उपेताः ते मे युक्ततमा मताः"

(जीवनाचा सर्वश्रेष्ठ संस्कार)

(१२-४):

"ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहीतेरतः "

(ईश्वराशी जोडणे)

१२. ५ :"क्लेशो अधिकतर तेषां अव्यक्तासक्त चेतसाम् !

१२. ६/१ : "ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परः"

(१२-६)/२:

"अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त उपासते"

(How to get Higher Mind working for you)

१२. ७ :"तेषां अहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्"

१२. ८ :

" मय्येव मन आधस्त्वं मयि बुद्धिः निवेशय"

(नित्य ईश्वराचा आश्रय)

(१२-९):

" अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम्?"

(Alternatives.. to connect with God)

१२. १०/१:

"अभ्यासेअपि असमर्थोअसि मत्कर्म परमो भव"

१२-१०/२ :

"मदर्थम् अपि कर्माणि कुर्वन् सिद्धिम् अवाप्स्यसि"

(सिद्धि:शक्तिची साधना:सुखी जीवन)

(१२-११):

"अथ एतद् अपि अशक्तोअसि कर्तुं मद् योगंआश्रितः"

(सुखाची साधना)

१२. १२:"त्यागात् शांतिं अनंतरम् "

१२-१३/१:"अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च"

(१२-१३)/२:

"निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी"

( अशाश्वताशी Detachment)

(१२-१४)/१ :

" संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः"

(State of Growth mindset)

(१२-१४)/२ :

"यो मद् भक्तः स मे प्रियः"

(१२-१५) :

" यस्मात् न उद्विजते लोको लोकात् न उद्विजते च यः"

(Detached :मुक्त मनुष्य)

(१२-२०):

"ये तु धर्मं अमृतं इदं यथा उक्तं पर्युपासते"

(शाश्वत विकासाचा स्वतःचा मार्ग)

******

(१२-१)

*************************

एवं सतत युक्ता ये भक्ताः त्वां पर्युपासते।

ये च अपि अक्षरं अव्यक्तं तेषां के योगवित्तमा।।

*************************

(१२-१):

"ये च अपि अक्षरं अव्यक्तं तेषां के योगवित्तमा?"

भगवतगीतेत अर्जुनाचा प्रश्न वर्तमानात निश्चित निर्णय घेण्यासाठी(Determination) असतो. आपल्या नियतकार्यानुसार(Committed) युद्ध करणे योग्य कि अयोग्य याचा निश्चित निर्णय अर्जुन करु शकत नाही यामुळे सरळ दुःख टाळण्यासाठी युद्ध न करणे योग्य समजतो. पण जेंव्हा ही भूमिका अयोग्य आहे हे श्रीकृष्ण सांगतात, तेंव्हा दुःखदायी युद्ध करणे योग्य कसे?हा प्रश्न करतो. याच प्रश्नात भगवतगीतेचे उत्तर असते. दुःखावर मात करण्यासाठीच (कार्याद्वारे) ईश्वरभक्ति भगवतगीता सांगते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

निश्चितच भगवतगीतेत ईश्वराचा संदर्भ आलेला आहे.
सगुण(मनुष्यरुप) व निर्गुण(अव्यक्त ज्ञान) यातील भेदही भगवतगीता स्पष्ट करते. व जीवनविकासमार्गात अव्यक्त ईश्वराची भक्ति याचे महत्व स्पष्ट करते.

काङ्क्षतः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवता।(४-१२)

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुं आश्रितम्।
परम् भावम् अजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।।(९-११)

याच संदर्भात कोणती भक्ति(सगुण कि निर्गुण) श्रेष्ठ?हा प्रश्न अर्जुन करतो.

एवं सतत युक्ता ये भक्ताः त्वां पर्युपासते।
ये च अपि अक्षरं अव्यक्तं तेषां के योगवित्तमा।।(१२-१)

(देहवान)मनुष्याला अव्यक्ताला आसक्त असणे कठिण प्रयासाने शक्य असते. म्हणुन जीवनविकासात कार्याचे महत्व जाणुन कार्याद्वारे भक्ति(समर्पण, फलत्याग) याचे रहस्य भगवतगीता स्पष्ट करते. याचसाठी अव्यक्त ईश्वराचे ज्ञान विज्ञानासह(प्रकृति-पुरुष, क्षेत्र-क्षेत्रज्ञ) जाणुन जीवनविकासाचा मार्ग "अमृतत्वाय कल्पते"

होतो. याच मार्गावर स्वधर्माचरण(समर्पण), Determination (फलत्याग) याचे शास्त्र भगवतगीता स्पष्ट करते.

वर्तमानात जशी शांति हवी, स्थिरबुद्धि हवी हे मनुष्य जाणतो. तसेच Determination चे संस्कार हवे. याच संदर्भात स्थिरबुद्धिचे महत्व भगवतगीता सांगते व विचलित होणे व स्थिर असणे यातील भेद स्पष्ट होतो.

"त्यागात् शांतिं अनंतरम् "(१२-१२)

व्यावहारिक बोध:

निर्णयअधिकार मनुष्याचा( Bornfree)जन्मसिद्ध अधिकार आहे ही स्वातंत्र्याची जागृति भगवतगीता करते. जीवनात प्रश्न सोडविण्यासाठी, विकासासाठी मनुष्याला निर्णय घ्यावा लागतो. कार्याचा निर्णय घेतांना मनुष्याचा स्पष्ट हेतु (purpose, want) असतो. यामुळे परिणाम (Consequences) त्या कार्याचा अविभाज्य भाग असतो. यशाची इच्छा असते पण अपयशाचे, दुःखाचे भय असल्यामुळे कार्याचा एकनिश्चय(Determination) होत नाही. याच Determination साठी भगवतगीता निष्काम कर्माचे प्रयोजन सांगते.

कर्माच्या फलसिद्धिसाठी देवताभक्ति(सगुण) मनुष्य जाणत असतो. ईश्वराच्या सगुण भक्तिमध्ये ईश्वरश्रद्धा ही Strength असते. याच ईश्वरश्रद्धेचा उपयोग जीवनविकासात (निष्काम कार्य) होण्यासाठी भगवतगीता ईश्वराचे ज्ञान विज्ञानासह सांगत आहे. या ज्ञानामुळे व्यावहारिक मार्ग(सकाम कार्य) "अमृतत्वाय कल्पते" या विकासाच्या महामार्गावर Transform होतो व समत्वयोगाने कार्य करणे याचे (निर्भय, दुःखमुक्त) महत्व जाणतो.
स्वधर्माचरणाचे (समर्पण) महत्व जाणतो.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायतेमहतो भयात् ।(२-४०)

******

(१२-२)

***************************

मयिआवेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते।

श्रद्धया परया उपेताः ते मे युक्ततमा मताः।।

***************************

(१२-२) :

"श्रद्धया परया उपेताः ते मे युक्ततमा मताः"

(जीवनाचा सर्वश्रेष्ठ संस्कार)

युक्त-अयुक्त:

भगवदगीतेत संस्कार या अर्थाने युक्त व अयुक्त या शब्दाचे प्रयोजन आहे. संस्कारीत नसलेला(अयुक्त) अशांत असतो.

नास्ति बुद्धिर्युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

न च अभावयतः शान्तिः अशांतस्य कुतः सुखम् ।।(२-६६)

युक्त निष्काम कर्माचे संस्कार असलेला तर अयुक्त सकाम कार्यरत असतो.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम्।

युक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते।।(५-१२)

युक्त ही मानसिकताच बनते, तेंव्हा ही मानसिकता निष्काम कर्म करणारा अर्थात कार्याचा एकनिश्चय (Determination) असलेला होतो.

बुद्धियुक्त, योगयुक्त, बुद्धियोग :

ज्या बुद्धिने समत्व साधलेले(स्थिरत्व) आहे अशा बुद्धिला बुद्धियुक्त हे संबोधन आहे. याचमुळे कार्याचा एकनिश्चय होतो(द्वन्द्वमुक्त)

बुद्धियुक्तो जहातीह उभेसुकृतदुष्कृते।(२-५०)

जो कर्मातुन योग साध्य करतो त्याला योगयुक्त संबोधन आहे. येथे आत्मवश (जितात्मनः) असतो. सृतिने विचलित होत नाही.

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन् ।

तस्मात् सर्वेषु कालेषु 'योगयुक्तो' भवार्जुन।।(८-२७)

अव्यक्त ईश्वराचे(सृष्टिचा अध्यक्ष) ज्ञान जाणुन त्याची भक्ति घडण्यासाठी "अमृतत्वाय कल्पते" हा जीवनविकासाचा मार्ग बनतो, तो बुद्धियोग.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते। (१०-१०)

"युक्ततमा":

हा शब्द (अव्यक्त) ईश्वराच्या भक्तिसाठी आलेला आहे. युक्त असलेला श्रद्धेने ईश्वरभक्ति करतो.

१. योगीनाम् अपि सर्वेषां मद् गतेन अंतरात्मना।

श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमा मताः।(६-४७)

२. मयिआवेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते।

श्रद्धया परया उपेताः ते मे युक्ततमा मताः॥(१२-२)

युक्ततमा या संबोधनाने अभिप्रेत असलेली भक्ति अव्यक्त ईश्वराची असते. (देहधारी)मनुष्यासाठी ही भक्ति सहज साध्य नाही. पण कर्माद्वारे (अनन्यभक्ति) साध्य करणे सहज शक्य होते.

अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद् भिः अवाप्यते।(१२-५)

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः।

अनन्येन् एव योगेन मां ध्यायन्त उपासते॥(१२-६)

"युक्त " श्रद्धेने भक्ति करतो अर्थात जीवनमार्ग भगवदगीतेच्या २-१५ प्रमाणे "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. या मार्गात-

१. स्वधर्माचरणाद्वारे ईश्वराला कार्य समर्पित होते.

(मत्कर्म परमो भव)

किंवा

२. कर्माचा एकनिश्चय होतो. ईश्वराला फलसमर्पित करतो.

(कर्तुं मद् योगम् आश्रितः)

********

(१२-४)

**************************

सन्नियम्यइंद्रियग्रामं सर्वत्रसमबुद्धयः।

ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहीतेरताः ॥

**************************

(१२-४) :
"ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहीतेरतः "
(ईश्वराशी जोडणे)

"We are all living together on a single planet, which is threatened by our own actions. And if you don't have some kind of global cooperation, nationalism is just not on the right level to tackle the problems, whether it's climate change or whether it's technological disruption. "

- Yuval Noah(Writer Homo Deus: A Brief History of Tomorrow, Sapiens A Brief history of Humankind)

१. किम् आश्चर्यम्?हा प्रश्न यक्ष युधिष्ठिराला करतो.
इतक्या स्वल्प काळासाठी हे अनित्य जीवन मिळाले आहे . याचे औचित्य काय?हा प्रश्न कधीच पडत नाही.

मनुष्याचे भाष्य कधी वादळावर स्वार होण्याचे असते पण प्रत्यक्ष कार्यात मर्यादा अनुभवतो. प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर दुःखी झाल्यावर शुर अर्जुन म्हणतो, मी निःशस्त्र राहुन सशस्त्र कौरवांकडुन मृत्यु येणे माझेसाठी श्रेष्ठ आहे.
धार्तराष्ट्रा रणे हन्यु तन्मे क्षेमतरं भवेत् ।(१-४५)

मनुष्याला सुखी जीवन आवडते, तो भोगैश्वर्य यात जीवनाचे सुख(यश, सार)शोधतो. त्यात आसक्त होतो. दुःख नको असले तरी ते कोणत्या वाटेने येते कळतही नाही. व जीवन कठिण आहे मृत्यु बरा ही त्याची जीवनाची philosophy बनते. मृत्यु येणारच आहे. जेंव्हा मृत्यु येतो तेंव्हा आपण येथे नसतोच मग जीवनापेक्षा मृत्यु बरा यांत कोणता पराक्रम आहे?

जीवन दुःखामुळे असह्य होते. म्हणुनच भगवतगीता येथे सतर्क करते, व जीवन जगतांना "सर्वभूतहीतेरतः" असलेल्या ईश्वराशी

जोडण्याचे (योग)ज्ञान व कला सांगते. "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च" या सत्याचा हाच आधार आहे. अर्थात अशाश्वत देह या नात्याने(अनित्य) मृत्युशी मनुष्य जोडलेलाच आहे, पण शाश्वताशी जोडण्याचे व अनुभवण्याचे ज्ञान व शास्त्र भगवतगीता सांगत आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।(९-३३)

२. मानवी व्यवहारात मानसशास्त्राचा उपयोग होतांना आढळतो. फ्राईडने आंतर्विश्वाची System सांगीतली. ज्याचा उपयोग Mental wellness साठी केल्या जातो. भगवतगीता Internal System सांगते, ज्याचा उपयोग Mental wellness व मानवी विकास(भौतिक व शाश्वत) यासाठी होतो.

सन्नियम्यइंद्रियग्रामं सर्वत्रसमबुद्धयः।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहीतेरताः ॥(१२-४)

सृष्टिनियमानुसार (Laws of Universe)सृष्टिसंचलन होत असते. Rhythm नियम म्हणतो, जसा हिवाळा उन्हाळा सृष्टिचक्राचा

(Cycle) भाग आहे, तसेच मनुष्यजीवनातील सुखदुःख, जन्ममृत्यु जीवनचक्राचा भाग आहे.

"Rhythms-means that the pendulum swings in everything. Rhythms establish seasons, cycles, stages of development, and patterns. Each cycle reflects the regularity of God's Universe.

When you feel the Law start to draw you back do not become fearful or discouraged. Masters know how to rise above negative parts of a cycle by never getting to excited or allowing negative things to penetrate their consciousness. "

Mentalism law म्हणतो,

There is a single Universal Consciousness - the Universal Mind - from which all things manifest. Every mind is part of the Universal Mind . All energy and matter at all levels is created by and is subordinate to the Omnipresent Universal Mind.

Your Reality is a manifestation of your mind.

हेच सत्य भगवतगीतेच्या क्षेत्रक्षेत्रज्ञयोगात स्पष्ठ झाले आहे. ईश्वराची भूमिका अध्यक्षाची असते. मनुष्य याच सृष्टिचा भाग व ईश्वराचा अंश हृदयस्थानी आहे. याच तत्वावर भगवतगीतेचे ज्ञान आधारित आहे.

३. मनुष्य आपल्या निष्ठेनुसार स्वतःला व्यस्त करीत जीवन जगतो. ज्ञानावर निष्ठा असलेले ज्ञानाद्वारे ईश्वराशी जोडतात. व नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करुन ईश्वराला समर्पण या भावाने कार्य करतात. कर्मावर निष्ठा असलेले कर्माद्वारे ईश्वराशी जोडतात. यांत बुद्धियोगामुळे कर्माचा निश्चय दृढ होतो. व कार्यातुन समत्वयोग साध्य करतो. या मार्गासाठी "अमृतत्वाय कल्पते" असे संबोधन आहे.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

याप्रमाणे जीवन जगतांना ईश्वराशी जोडण्याची कला भगवतगीता सांगते. जे जीवनाचे मुळ अंतिम सत्य आहे.

यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम् ।

स्वकर्मणा तम अभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः॥(१८-४६)

*******

(१२. ५)

***********************

क्लेशो अधिकतर तेषां अव्यक्तासक्त चेतसाम् ।

अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवत् भिः अवाप्यते॥

*************************

(१२. ५) :"क्लेशो अधिकतर तेषां अव्यक्तासक्त चेतसाम् !

हा संदेश अव्यक्त ईश्वराची साधना या संदर्भात आहे.

कर्माद्वारे भक्तिचे संपुर्ण भाष्य अर्जुन ऐकतो व प्रात्यक्षिक पाहतो. (आता युद्धकार्य टाळण्याची कुठेच सुटका दिसत नाही, कर्माद्वारे भक्तिचे रहस्य अव्यक्ताची साधना आहे व सरळ साधनाही होवु शकते, हेही ऐकतो. म्हणुन याच संदर्भात तो महत्वाचा प्रश्न करतो) अव्यक्ताची सरळ साधना करणारा व कर्माद्वारे भक्ति करणारा यांत श्रेष्ठ कोण?

एखादा साधु गुहेत साधना करतांना मृत्यु पावला तर तेथे सकारात्मक तरंग(Vibrations) पसरले असतात, म्हणुनच एखादा देवतुल्य महात्मा समाधि घेतो, तेथे मंदिर उभे होते.

सन्नियम्य इंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहितेरतः।।(१२-४)

अव्यक्ताची साधना "सर्वभूतहितेरतः" "अद्वेष्टा सर्वभूतानां" अर्थात जगतहिताय तरंग निर्माण करते. देहवान मनुष्यासाठी ही कठिण साधना असते. महत् प्रयासानेच ती साध्य होते.

क्लेशो अधिकतर तेषां अव्यक्तासक्त चेतसाम्।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवत् भिः अवाप्यते।।(१२-५)

मनुष्यजीवनात साध्य करण्यास कठिण आहे, अशी गोष्ट भगवतगीता सोपे करुन सांगते. यासाठी व्यवहारात (संसारात) जगणाऱ्यासाठी कर्माद्वारे भक्तिचे महत्व याला भगवतगीता प्राधान्य देते.

"The battle of life is, in most cases, fought uphill; and to win it without a struggle were perhaps to win it without honor. If there were no difficulties there would be no success; if there were nothing to struggle for, there would be nothing to be achieved. "

Samuel Smiles

मनुष्यजीवनांत कर्म घडतच असतात. पण जीवनात कर्माचे महत्व न जाणणारे(अज्ञान असलेले) निष्क्रियतेचे समर्थन करतात व मनुष्यजन्मात कर्माचा अनादर करणे बुद्धिभेद ठरतो. म्हणुन महात्मा असला तरी समाजात आदर्शासाठी कर्म आवश्यक आहे.

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते।।(१२-६)

So, regulating principle of freedom(Free from distress/pain, Self approval) through work is what Bhagwatgeeta is.

मनुष्याचा अंत अमृतंगमय अर्थात ईश्वरमिलन आहे. हे जाणुन त्याच ईश्वराचा नित्य आश्रय करणे. हे शक्य न झाल्यास अनुक्रमे

१. अभ्यास (सर्वभूतहितेरतः)

२. कर्मसमर्पण (स्वधर्म)

३. फलत्याग (योगः कर्मसु कौशलम् )

असे टप्पे स्पष्ट केले आहेत. शांतीसाठी त्याग श्रेष्ठ अस्त्र आहे.

त्यागात् शांतिम् अनन्तरम् ।(१२-१२)

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।

मयि अर्पित मनः बुद्धिः योः मद् भक्तः स मे प्रियः।।(१२-१४)

******

(१२-६)

************************

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परः।

अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त उपासते॥

**************************

(१२-६)/१ :

"ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परः"

कर्माद्वारे ईश्वरभक्तिचा हा संदेश आहे. वर्तमानात कर्म घडत असतात. सुखप्राप्तिसाठी, दुःखमुक्तिसाठी कर्म केले जातात. प्रश्न असुनही कर्म टाळणाऱ्यांना समाज "दे रे हरी खाटल्यावरी"या वर्गात बसवतात.

समाजात प्रश्न असतात, यासाठी ज्ञानविज्ञानाचा वापर होत असतो. दुःख, प्रश्न जीवनाचा अंग आहे. ज्ञानी प्रश्न सोडविण्यास समर्थ होतात, पण प्रश्न, दुःख टाळण्यासाठी shortcut वापरणे, निष्क्रियतेचे समर्थन करणे. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान

वापरणे व त्यालाच ज्ञानी भूमिका संबोधणे. ही अर्जुनाची भूमिका असते. यांत अहंकारामुळे अज्ञानाचे, वास्तवाचे Acceptance नसते.

मनुष्य स्वतःला योग्य समजुन समर्थन करीत असला तरी वर्तमानातील त्याचे Attitude ज्ञानी (Wisdom)आहे कि अज्ञानी?याचे निदान भगवतगीता करते. व वर्तमानात ज्ञानाचा आश्रय हाच भगवतगीतेचा विषय बनतो.

"वक्तपर समझ नही, समझ आती है तब वक्त नही।खुशनसीब है वे, जिन्हे वक्तपर समझ होती है।"

या पार्श्वभुमीवर वर्तमानात ज्ञानाचा आश्रय महत्वाचा विषय ठरतो. केवळ याच Purpose साठी ईश्वराचा नित्य आश्रय हा भगवतगीतेचा संदेश आहे.
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत ईश्वर आहे. याच ईश्वराची ओळख भगवतगीततेने दिलेली आहे. "ज्ञान"या संदर्भात ईश्वराचा नित्य आश्रय बुद्धियोग असतो. यामुळे नित्य विकासमार्गावर असतो.

याच संदर्भात (Attitude)अज्ञानी असेल तर ज्ञानी (Attitude धारण-) होण्यासाठी संदेश देत आहे,

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परः।
अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त उपासते।।(१२-६)

वर्तमानात हीच अवस्था(Attitude) धारण होण्यासाठी पुढील टप्पे दिलेले आहेत.

१. नित्य ईश्वराचा आश्रय

मयि एव मन आधस्त्व मयि बुद्धिं निवेशय।(१२-८)

२. अभ्यास-Practice

अभ्यासयोगेन ततो माम् इच्छा आप्तुं धनञ्जय।(१२-९)

३. कर्म ईश्वराला समर्पण

अभ्यासे अपि असमर्थोअसि मत्कर्म परमो भव।(१२-१०)

४. फलत्याग

अथ एतद् अपि असमर्थोअसि कर्तुं मत् योगम् आश्रितः (१२-११)

"Nothing can stop the man with the right mental attitude from achieving his goal; nothing on earth can help the man with the wrong mental attitude. "
Thomas Jefferson

********

(१२-६)/२:

"अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त उपासते"

(How to get Higher Mind working for you)

व्यवहारात मनुष्याची प्रत्यक्षातील जीवनयात्रा त्याच्या जीवनाचे वास्तव असते. मनुष्य जो मार्ग चालत असतो, तो सकाम कार्याचा मार्ग असतो. याच मार्गावर अडचणी अनुभवतो. दुःखाने विचलित होतो.

दुःखाने विचलित झाल्यावर अर्जुन समाधान शोधतो. निष्क्रियतेला ज्ञान /धर्म संबोधतो. वास्तव न स्विकारता Judgement thinking करतो. याच स्थितिचे निदान भगवतगीतेत केले आहे. येथे Lower state of

Consciousness क्रियाशील असते. व Shifting to higher state of consciousness हा विषय चर्चेला येतो.

"Higher consciousness is the consciousness of a higher Self, transcendental reality, or God. It is "the part of the human being that is capable of transcending animal instincts".

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनव एव ते।
आद्यन्तवन्तः कौंतेय न तेषु रमते बुधः।।(५-२२)

Higher Consciousness (क्षेत्रज्ञ) याच संदर्भात भगवतगीता ज्या ईश्वराची ओळख देते तो ईश्वर अव्यक्त, शाश्वत व सृष्टिची मुळ प्रवृत्ति अाहे. याच ईश्वराचा अंश जीवित तत्वात स्थित असुन प्रकृतिगुणाने बद्ध आहे.

अव्यक्त ईश्वरावरील श्रद्धेने व त्याच्या ज्ञानाने व भक्तिने बुद्धियोग प्राप्त होतो. अर्थात यामुळे मनुष्य विकासाच्या राजमार्गावर "अमृतत्वाय कल्पते" असतो.

अहं सर्वस्य प्रभवो मत्त सर्वं प्रवर्तते।(१०-८)
तेषां सतत युक्तानां भजतां प्रितिपुर्वकम्।
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

याच संदर्भात अर्जुन विचारतो, या विश्वात ईश्वराचे चिंतन करण्यासाठी कोणत्या विभूति जाणायच्या?
याच प्रश्नाचे उत्तरात कळते, व्यक्त व अव्यक्त स्वरुपातील दिव्य शक्ति याच ईश्वराच्या विभूति आहेत. यात विष्णु, शंकर, राम, कृष्ण, सरस्वति, लक्ष्मी, गायत्री सर्वच देवीदेवतांचा शक्तिसंदर्भात उल्लेख होतो.

सकाम कर्मात आसक्त असणारे कर्मसिद्धिसाठी देवतांना भजतात.
काङक्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः।(४-१२)

यातील ईश्वरश्रद्धा ही Strength असते. अव्यक्त ईश्वरभक्ति या संदर्भात अव्यक्त ईश्वराला आसक्त असणे देहवान मनुष्याला कठिण असते. म्हणुन अव्यक्त ईश्वराची भक्ति या संदर्भात

अनन्यभक्ति, कार्याद्वारे भक्ति शक्य आहे. अर्थात "अमृतत्वाय कल्पते" या मार्गावर जीवनयात्रा करणे येथे अपेक्षित आहे.

"The end of life is to be like God, and the soul following God will be like Him. "

Socrates

क्लेशो अधिकतर तेषां अव्यक्त आसक्त चेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिः दुःखं देहवद् भिः अवाप्यते।।(१२-५)
अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त उपासते।।(१२-६)

या मार्गावर निष्काम कर्माद्वारे(समर्पण/फलत्याग) ईश्वरभक्ति घडते. येथे Higher Consciousness क्रियाशील असते.

अभ्यासेअपि असमर्थोअसि मत्कर्म परमो भव।
अथ एतद् अपि अशक्तोअसि कर्तुं मत् योगम् आश्रितः।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यत् आत्मवान् ।।(१२-११)

व्यावहारिक बोध:

व्यावहारिक जीवनयात्रेत अडचणी येतात. तेंव्हा गरज असते, Shifting to higher level!याचसाठी भगवतगीता ईश्वराची ओळख, ईश्वरश्रद्धा व त्याची Strength, ईश्वरभक्ति व भक्तिचे निश्चित Purpose स्पष्ट करते.

"No difficulty can discourage, no obstacle dismay, no trouble dishearten the man who has acquired the art of being alive. Difficulties are but dares of fate, obstacles but hurdles to try his skill, troubles but bitter tonics to give him strength; and he rises higher and looms greater after each encounter with adversity. "

Ella Wheeler Wilcox

******

(१२-७)

************************

तेषां अहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।

भवामि न चिरात् पार्थ मयि आवेशितचेतसाम् ।।

**************************

(१२. ७) :"तेषां अहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्"

जगात धर्म वेगवेगळे, अनेक देवदेवता असल्या तरी ईश्वर यासंबंधी एकवाक्यता आढळत नाही. जीवनविकासात कर्म व ज्ञान यांची निश्चित भूमिका स्पष्ट करतांना भगवतगीता याच ईश्वराची सविज्ञान ओळख करुन देते.

सुखासाठी प्राप्ति व प्राप्तिसाठी कर्म केल्या जाते, शिक्षणामुळे ज्ञान मिळते व ज्ञानामुळे Professional level प्राप्त होते. हीच कर्म, ज्ञान यासंबंधी सर्वसाधारण मानसिकता असते. प्रत्यक्ष व्यवहारात जगतांना तो जे करतो(किंवा करीत नाही) ते योग्य समजुनच करतो. अर्जुनाचा चांगलेपणा त्याला प्रत्यक्ष कार्यप्रसंगी दुःखी करते. दुःख टाळण्यासाठी युद्ध न करणे त्याला योग्य वाटते.

वास्तवाचा स्विकार(युद्ध करणे योग्य कि अयोग्य हा त्याला आलेला संशय)न करता सरळ Judgement thinking चा (युद्ध करणे पाप!)वापर करतो. हेच सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान वापरतो. वास्तवाचा स्विकार करतो, तेंव्हा काय योग्य हे ऐकायला तयार होतो.

येथे अर्जुन मला कांही नको, तर मग हे कार्य लोभासाठी करीत आहो असे भाष्य करतो. व युद्ध करणे योग्य असले तरी, जास्तीत जास्त देवाचे राज्यही मिळाले तरी माझा शोक यामुळे नष्ट कसा होईल?ही शंका व्यक्त करतो.

अशा प्रसंगी त्याला प्रत्यक्ष देव भेटला असता व" माग" म्हटले असते तर "युद्ध रद्द कर"हीच मागणी केली असती. कारण "देव देणारा" हीच संकल्पना असते.

श्रीकृष्ण अर्जुनाला देवाचाही देव विश्वाध्यक्ष ईश्वर आहे, त्याची ओळख व मनुष्यजीवनाशी असलेले नाते ज्ञानविज्ञानासह स्पष्ट करतात व याच ईश्वराचे विश्वरुपातुन दर्शन देतात. "मी वर्तमान आहे"व यावेळी काय घडणार याचे अर्जुनाला दर्शन होते.

(अर्जुनाला येथे स्वतःचे दैव- Destiny दिसते, प्राप्ति दिसत नाही, कर्तव्य दिसते. ) व जीवनाचा अमृतंगमय मार्ग जाणुन ईश्वर इच्छितो, ते कर्म करणे भक्ति असते याची खात्री होते.

या अव्यक्त ईश्वराची भक्ति देहवानाला क्लेशकारक ठरते पण अनन्यभक्तिद्वारा कर्माद्वारे भक्तिसाठी कौशल्य साध्य करणे शक्य होते. याद्वारे हा दुःखमय( संसाररुपी) भवसागर सहज पार करता येतो.

तेषां अहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।
भवामि न चिरात् पार्थ मयि आवेशितचेतसाम् ॥(१२-७)

सर्व लोक आपापल्या स्वभावप्रकृतिनुसार येथे कार्यरत असतात. सुखासाठी मनुष्य जगतो, प्राप्तिसाठी कर्म करतो, हेच कर्म जीवनविकासाचे साधन बनते. "प्राप्तिसाठी कर्म" याच मानसिकतेने प्रत्यक्ष कर्म करण्यास प्रवृत्त झाला असता परिणामभयाने संशयी होतो, म्हणुन द्वंद्वाच्या जाळ्यात सापडतो, तेंव्हा ही (वर्तमानातील) सकाम मानसिकता असते.

हेच वास्तव अर्जुनाच्या भूमिकेत घडले. म्हणुन प्रत्यक्ष कृति घडण्यासाठी वर्तमानात शांति, बुद्धिची स्थिर अवस्था व यासाठी

निष्काम कर्म(कार्याची दृढता) व यासाठी कार्याद्वारे भक्तिचे महत्व स्पष्ठ होते. ईश्वराचे ज्ञान जाणुन त्याच्या भक्तिने बुद्धियोग प्राप्त होतो, व विकासाच्या राजमार्गावर(अमृतंगमय) जीवनयात्रा होते. या मार्गावर कार्याद्वारा भक्ति घडते(towards goal).
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

*ज्ञानाचा आश्रय या संदर्भात ईश्वराचा आश्रय बुद्धियोग असतो. बुद्धियोग निष्ठा कार्याची सकाम मानसिकता निष्काम मानसिकतेत बदलण्यासाठी उपयुक्त ठरते. या Transformation मुळे कार्याच्या द्वंद्व अवस्थेतुन निर्द्वंद्व अवस्थेत(दृढता, एकनिश्चय) येतो.
"योगसंन्यस्त कर्माणं ज्ञानसंच्छिन्नसंशयम् "

*नियतकार्य स्वधर्मात Transform होते. स्वधर्माचरण म्हणजे कार्य ईश्वराला समर्पण वृत्तीने करणे.
*निर्णयअधिकार जाणुन कार्याचा एकनिश्चय होतो.
(चंचलतामुक्ति) व समत्वयोगाने कार्य करतो.
(योगः कर्मसु कौशलम् )
*योग म्हणजे दुःखान्त(तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योगसंज्ञितम् )

* अर्जुनाला झालेले दुःख त्याच्या पुढील (विकास) प्रवासात कार्यसंधिच ठरते. अर्थात चांगलेपणा या संदर्भात मार्गातील दुःख, अडचणी विकासाच्या कार्यसंधी असतात. हे सत्य अनुभवण्यासाठी ईश्वराचा आश्रय करुन जीवनविकासाच्या शाश्वत मार्गावर जीवनयात्रा करणे आवश्यक असते. भगवतगीता शेवटी हेच Option सांगते.

(अहंकाराचा आश्रय असेल तर प्रकृति आपले काम करणारच. अहंकाराचा आश्रय कि ईश्वरसमर्पित?)

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।

तत् प्रसादात् परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।।(१८-६२)

~~~ *******
~~~

(१२-८)

***********************

मयि एव मन आधस्त्व मयि बुद्धिं निवेशय।

निवसिष्यसि मय्येव अथ उर्ध्वं न संशयः।।

*************************

१२. ८:

" मय्येव मन आधस्त्वं मयि बुद्धिः निवेशय"

(नित्य ईश्वराचा आश्रय)

२०व्या शतकात संपुर्ण जग स्वातंत्र्य क्रांतिने गाजले. या शतकाने दोन जागतिक युद्ध पाहिले. अणुयुद्धाचा विध्वंसक परिणाम पाहिला. याच शतकात स्वातंत्र्य, शांति, अहिंसा यांचे बीज रोवल्या गेले.

मनुष्यजीवनात स्वातंत्र्य हाच प्रेरणास्त्रोत व स्वातंत्र्य हेच ध्येय असते या रहस्याचा उलगडा भगवतगीता करीत आहे व स्वातंत्र्याचे निश्चित ज्ञान सांगत आहे. याच अनुषंगाने निर्णयअधिकाराचे महत्व भगवतगीता सांगत आहे, ज्यामुळे

मनुष्य जबाबदारी स्विकारतो. स्वातंत्र्याचे ज्ञान नसेल तर मनुष्य स्वैर असतो, अज्ञानी असतो. मनुष्याच्या Lifejourney मध्ये विश्वास हवा. विश्वास नसेल तर Comfort zone मध्ये असतो. स्वतःचे अज्ञान hide करतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. स्वतःचे समर्थन करणे, इतरांवर टिका करणे, अनावश्यक उपदेश करणे . अशी ही Comfort zone ची भूमिका असते.

भगवतगीता अर्जुनाच्या याच भूमिकेवर आक्षेप घेते. अर्जुनाच्या भाष्याला प्रज्ञावाद संबोधते. जाॅर्ज ऑर्वेल व माओ त्सेतुंग यांनी अनावश्यक उपदेशावर आक्षेप घेतला. नवीन पिढी जुन्या पिढीच्या खांद्यावर वाढलेली असते. जे जुन्या पिढीला दिसत नाही ते नवीन पिढी पहात असते.

अज्ञानाची कारणे व उपाय भगवतगीता स्पष्ट करते.

* १ अहंकाराचा आश्रय

अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

उपाय: अहंकाराचा आश्रय vs. ईश्वराचा आश्रय

*२ जीवनमार्गात द्वंद्ववश असणे

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वन्द्वमोहेन् भारत।(७-

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

उपाय: द्वन्द्ववश vs. कार्याचा दृढनिश्चय

व्यवसायआत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।(२-४१)

*३ द्वंद्ववश असण्याचे कारण सकाम कर्म

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।

अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते।।(५-१२)

उपाय: सकाम कर्म vs. निष्काम कर्म

अर्थात जीवनमार्गात नित्य ईश्वराचा आश्रय हा भगवतगीतेचा संदेश आहे. यामुळे जीवनमार्गात विश्वास असतो. ईश्वरज्ञान Faith growth harmone ठरते.

मयि एव मन आधस्त्व मयि बुद्धिं निवेशय।

निवसिष्यसि मय्येव अथ उर्ध्वं न संशयः।।(१२-८)

नित्य ईश्वराचा आश्रय होण्यासाठी तीन Options भगवतगीता स्पष्ट करते.

१. अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम ।अभ्यासयोगेन ततो माम् इच्छा आप्तुं धनंजय ।।(१२-९)

अर्थात अभ्यासयोगाने (Practice) नित्य ईश्वराचा आश्रय साध्य करणे. (ईश्वरभक्ति)

२. अभ्यासेअपि असमर्थोअसि मत्कर्म परमो भव।मदर्थमअपि कर्माणि कुर्वन् सिद्धिं अवाप्स्यसि ।।(१२-१०)

अर्थात अभ्यासाने शक्य नसेल तर जे कर्म करतो, ते ईश्वराला समर्पित करणे.

३. अथ एतद् अपि अशक्तोअसि कर्तुं मतयोगं आश्रितः ।सर्वकर्मफलत्यागं ततः कुरू यत आत्मवान् ।।(१२-११)

अर्थात पुर्ण समर्पण शक्य नसेल तर कार्याचा एकनिश्चय करणे व समत्वयोगाने कार्य करणे अर्थात फल ईश्वराला समर्पित (फलत्याग) करणे.

सार: "Honor Yourself"

वर्तमानात स्वतःला सक्षम करणे हाच संदेश भगवतगीता देत आहे. सहसा मनुष्य समर्थन, टिका, उपदेश भाष्य पसंत करतो. पण जो आपल्या जीवनविकासाची जबाबदारी स्विकारतो, तो स्वतःच्या जीवनाचा सन्मान करतो.

उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत् ।
आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः॥(६-५)

***** *****

(१२-९)

***********************

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।

अभ्यासयोगेन ततो माम् इच्छा आप्तुम् धनंजय।।

***********************

(१२-९) :

" अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम्?"

(Alternatives.. to connect with God)

भगवतगीतेत ईश्वराचे ज्ञान विज्ञानासह स्पष्ट केले आहे. व्यवस्थापन हा संदर्भ घेतला तर ईश्वर विश्वाचा अध्यक्ष आहे. जीवनप्रवासाचे अंतिम ध्येय हा संदर्भ घेतला तर जे सृष्टिचे मुळ आहे, उगम आहे, ज्याचा अंश हृदयी स्थित आहे, त्याचा नित्य आश्रय असणे, यामुळे मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो.

मनुष्यजीवनात दुःख आहे . या दुःखाने मनुष्य विचलित होतो म्हणुन ईश्वराच्या नित्य ठायी असणे. हा संदेश आहे. ज्यामुळे मार्ग "अमृतत्वाय कल्पते" हा होतो.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

अव्यक्त ईश्वराचे ठायी असणे ही स्थिति खचितच देहधारी मनुष्याला कठिण आहे.
सन्नियम्य इंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः(१२-४)

म्हणुन निश्चित भाष्य करुन टप्पे सांगितले आहे.
अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ?(१२-९)

१. अभ्यासयोगेन ततो माम् इच्छा आप्तुम् धनंजय।(१२-९)
२. मदर्थम् अपि कर्माणि कुर्वन् सिद्धिम् अवाप्स्यसि।(१२-१०)
३. सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यत् आत्मवान् ।(१२-११)

अर्थात ईश्वराचे ठायी राहणे शक्य होत नसेल तर अभ्यासाद्वारे (Practice, ध्यान) प्रयत्न करणे. हेही शक्य होत नसेल तर जे कार्य करतो ते ईश्वरप्रित्यर्थ करणे. हेही अशक्य असेल तर कार्याचा एकनिश्चय करणे व फलत्याग अर्थात समत्वयोगाने कार्य करणे. याच संदर्भात कर्मयोग(फलत्याग) सर्वश्रेष्ठ ठरविला आहे.

श्रेयोहि ज्ञानम् अभ्यासात् ज्ञानात् ध्यानम् विशिष्यते।
ध्यानात् कर्मफलत्यागः त्यागात् शांतिः अनंतरम् ॥(१२-१२)

अर्थात अभ्यासापेक्षा(practice) ज्ञान श्रेष्ठ, ज्ञानापेक्षा ध्यान श्रेष्ठ, ध्यानापेक्षा कर्मफलत्याग श्रेष्ठ ठरतो. यामुळे अनंत शांतिचा लाभ होतो.

सार :
भगवतगीतेतील प्रसंग युद्धाचा आहे. अर्जुनाला स्वतःचे नियतकार्य (Committed)या नात्याने युद्ध करायचे असते. पण या युद्धाचा परिणाम दुःखद आहे हे जाणुन थबकतो.

व्यवहारात मनुष्य सुखासाठीच जगतो ही Survival स्थिति असते. म्हणुन दुःखाला, कष्टाला टाळुन जगण्याचा त्याचा प्रयत्न असतो. याच प्रयत्नात आपले नियतकार्य पाप ठरवुन थबकतो. कारण अर्जुनाला निर्णय करायचा असतो, युद्ध करायचे कि quit करायचे?

तेंव्हा श्रीकृष्ण जीवनाची सामान्य स्थिति व श्रेष्ठ स्थिति यातील भेद स्पष्ट करतात. याचसाठी

* Lower consciousness vs. Higher consciousness

*अज्ञानी vs. ज्ञानी

*सकामvs. निष्काम

* चंचलता vs. कार्याचा एकनिश्चय

*मनोवश vs. आत्मवश

अर्थात अयुक्त vs. युक्त (संस्कारीत) असा भेद भगवतगीता स्पष्ट करते. सुखी जीवनाचा मार्ग यासाठी हा भेद जाणणे आवश्यक ठरते.

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

*******

(१२-१०)

***********************

अभ्यासेअपि असमर्थोअसि मत्कर्म परमो भव।

मदर्थम् अपि कर्माणि कुर्वन् सिद्धिम् अवाप्स्यसि।।

*************************

(१२-१०):

"अभ्यासेअपि असमर्थोअसि मत्कर्म परमो भव"

भगवतगीतेतील ईश्वरज्ञान, अध्यात्मज्ञान समाजाला निष्क्रिय करण्यासाठी नाही तर निष्क्रिय समाजाला सक्रिय करण्यासाठी आहे. हाच संदेश भगवतगीता येथे देत आहे.

भगवतगीतेत जीवनविकास विषयावर मुद्देसुद भाष्य ज्ञानविज्ञानासह आलेले आहे. यानंतर विकासमार्गाचा किमान शब्दात बोध होण्यासाठी मुख्य दोन Steps आलेल्या आहेत.

१. (अ)नित्य ईश्वराचे ठायी मन, बुद्धि( चित्त) असणे, (ब) शक्य होत नसेल (चित्त स्थिर होत नसल्यास) तर अभ्यासाद्वारे (ध्यान, भक्ति)प्रयत्न कर.

हे शक्य नसल्यास

२. कर्माद्वारे भक्ति हा मार्ग आहे. यांत दोन भाग आहे.

(अ)स्वधर्म(समर्पण)

अभ्यासेअपि असमर्थोअसि मत्कर्म परमो भव।(१२-१०)

(ब)कार्याचा दृढनिश्चय( फलत्याग)

अथ एतद् अपि अशक्तो असि कर्तुं मत् योगम् आश्रितः।(१२-११)

मनुष्याच्या विकासविषयक, सुखविषयक जशा संकल्पना असतात, तशी जीवनयात्रा चालु असते. कार्य करुनच भौतिक विकास साधल्या जातो. या यात्रेत अडचणी जाणवणे, दुःख होणे यामुळे अशांत होणे हा जीवनयात्रेचाच भाग असतो. मार्ग कळला नाही तर Tie असतो. व हाच Tie सोडविण्यासाठी ज्ञान हवे असते(जे भगवतगीता सांगत आहे. ). परंतु मनुष्य मनाला शांत करण्यासाठी भाष्य बोलत असतो. जसे अर्जुन (वास्तवाचा स्विकार न करता) भाष्य बोलतो व धनुष्य खाली टाकतो. येथे अज्ञानाला ज्ञान दर्शवितो व अशा भाष्यामुळे संवाद होत नाही.

निष्क्रिय असलेले लोक जे ज्ञान समजुन भाष्य करतात, ते अज्ञानाला ज्ञान दर्शवीत असतात व भ्रम निर्माण करतात. अर्थात अहंकार किंवा स्वार्थ (स्वसमाधान)याचा आश्रय असल्यामुळे संवाद होत नाही. (प्रश्नाची पारदर्शकता नसते). हाच ज्ञानाचा विषय असतो. "ज्ञान" या संदर्भातच भगवतगीतेत ईश्वरज्ञान आलेले आहे. (भगवतगीतेत शेवटी दोनच Option दिले, ईश्वराचाचा आश्रय कि अहंकाराचा?)

समाजात (वास्तवाचा स्विकार करुन)निरोगी संवाद झाले तर मोठमोठे प्रश्न सुटु शकतात. जेंव्हा संवादाला भाष्य पोषक नसते, तेंव्हा argue करण्यात अर्थ नसतो. मार्क ट्वेन म्हणतो,

"Never argue with stupid. He will drag you to his level and beat with experience. "

श्रीकृष्ण अर्जुनाला न दुखवता वेगळ्या भाषेत अज्ञान दर्शवुन देतात. "तुझ्यासारख्या श्रेष्ठाला अशोभनिय!". अर्जुन वास्तव स्विकारतो. प्रश्नाला पारदर्शकता येते. संवाद सुरु होतो. ज्ञानाचे द्वार उघडे होते.

येथे अर्जुन जीवनाच्या सामान्य अवस्थेनुसार दुःखी होतो. दुःख टाळण्यासाठी, मनाला शांत करण्यासाठी समर्थनभाष्य बोलतो. यांत दोष नाही, पण येथेच जीवनाची सामान्य अवस्था vs श्रेष्ठ अवस्था या विषयावर भगवतगीता जाते. अर्थात हा विषय

" Attitude of Commons vs Leadership attitude"

असा होतो. येथे Leadership राजकिय संदर्भात नाही, जो आपल्या विकासासाठी स्वतः पुढाकार घेतो (परावलंबि नसतो), या संदर्भात आहे. समाजाला अशाच leadership ची गरज असते.

विकासमार्गात अडचणीच stepping stone असतात. या मार्गात Tie सोडविण्यासाठी ईश्वरज्ञान आले. यासाठी अमृतंगमय (अशाश्वताकडुन शाश्वताकडे) मार्ग व या अनुषंगाने शाश्वत धर्म सांगितला. या धर्मात कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य होते. यासाठी:

१. स्वधर्माचरण (कार्य समर्पण)

२. कार्याचा दृढनिश्चय व निष्काम कर्म (फलत्याग)

******

१२-१० :

"मदर्थम् अपि कर्माणि कुर्वन् सिद्धिम् अवाप्स्यसि"

(सिद्धि:शक्तिची साधना:सुखी जीवन)

"मृगाणां च मृगेंद्रो अहं" अशी सिंहाची ओळख ईश्वराची विभूति या अर्थाने भगवतगीतेत दिलेली आहे. सिंहाच्या श्रेष्ठत्वाचे विश्वात आकर्षण असते. सिंह सर्व प्राण्यांमध्ये ना मोठा असतो, ना उंच असतो, ना शहाणा असतो, ना चपळ असतो. यांत अनुक्रमे हत्ती, जिराफ, कासव, चित्ता यांचा नंबर लागतो. तरी सिंह वनाचा राजा ठरतो. कारण तो निर्भय, साहसी असतो. आनंदाने प्रसंगाला तोंड देतो. त्याचा आत्मविश्वास त्याला राजा बनवितो.

सिंहाचे कातडे पांघरलेला कोल्हा सिंह बनत नाही, कोल्हाच राहतो. तद्वत मनुष्य आपले अज्ञान, दुर्बलता झांकण्यासाठी स्वतःला ज्ञानी, आदर्श दर्शविण्याचा प्रयत्न करतो, तेंव्हा भगवतगीता सावधान करते, सिंहाचे कातडे पांघरुन तुम्ही सिंह बनणार नाही, तर सिंहच बना.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

अर्जुन दुःख टाळण्यासाठी निष्क्रियता पत्करतो. स्वतःला मात्र आदर्श, विद्वान, धर्मधुरीन दर्शवितो. ही मानवी संवय मनुष्याला मोठेपणा, चांगलेपणा, श्रेष्ठत्व याविषयी भ्रमात ठेवते. जीवनमार्गात श्रेष्ठ विचलित होत नाही. या शक्तिला सिद्ध होणे, योग, स्थितप्रज्ञ या विविध संदर्भात स्पष्ट केले आहे. याच शक्तिचे ज्ञान व त्याची साधना करण्यासाठी भगवतगीता अध्यात्म सांगते.

जीवनविकासमार्गातुन शक्तिसाधना अर्थात सिद्धि प्राप्ति हे विकासमार्गाचे रहस्य आहे. हा मार्गच सुखी जीवनाचा मार्ग ठरतो.

मयि एव मन आधत्स्वं मयि बुद्धि निवेशय।
अर्थात नित्य ईश्वराचे ठायी असणे.
शक्य झाले नाही तर... १/शक्य नसल्यास.. २/शक्य नसल्यास... ३ )

१. (योग)अभ्यास
अभ्यासयोगेन ततो माम् इच्छा आप्तुं धनंजय।(१२-९)
२. अभ्यासेअपि असमर्थोअसि मत्कर्म परमो भव।
मदर्थम् अपि कर्माणि कुर्वन् सिद्धिम् अवाप्स्यसि।।(१२-१०)

३अथ एतद् अशक्तोअसि कर्तुं मत् योगम् आश्रितः।(१२-११)

ईश्वरभक्तिद्वारा शक्तिची साधना हे शास्त्र भगवतगीता सांगते. कार्याद्वारा ईश्वरभक्ति यांत (२) स्वधर्माचरण (समर्पण) (३) Determination कार्याचा एकनिश्चय करुन समत्वयोगाने कार्यरत अर्थात फलत्याग हे महत्वाचे मुद्दे ठरतात.

सार :

भगवतगीता शक्तिसाधनेचे शास्त्र आहे. योग(दुःखान्त शक्ति), भूति(असाधारण शक्ति), सिद्धि(साधनेद्वारा साध्य होणारी) अशा विविध शब्दांनी या शक्तिचे वर्णन आहे. ईश्वरचिंतन यासाठी शक्तिचे(श्रीमतम्, उर्जितम्) विभूतिचिंतन सांगितले आहे.

मनुष्य स्वप्न पाहतो, पण कार्याशिवाय हे स्वप्न साकार होत नाही. जीवन जगतांना व्यवहारात सकाम कार्य असते हे आपण जाणतो. पण या(सकाम) मुळे कार्यनिश्चय एक होत नाही. परिणामभयाचा अडथळा जाणवतो. म्हणुन याच मार्गाला भगवतगीतेने निष्काम कर्म घडण्यासाठी Transform केले आहे. यामुळे जीवन जगतांनाच शक्तिची साधना होते. हा संस्कारीत व्यक्तिचा जीवनमार्ग असतो. याच मार्गाचे ज्ञान भगवतगीता करुन देत आहे.

अर्जुनाचा कार्यासंबंधी विचारबदल " मला कांही नको vs. शक्तिसाधना " याप्रमाणे असतो.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

"We don't develop courage by being happy every day. We develop it by surviving difficult times and challenging adversity. "

-Barbara De Angelis

****************

(१२-११)

***********************

अथ एतद् अपि अशक्तोअसि कर्तुं मद् योगंआश्रितः।

सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यत् आत्मवान् ॥

*************************

(१२-११):

"अथ एतद् अपि अशक्तोअसि कर्तुं मद् योगंआश्रितः"

(सुखाची साधना)

*भगवतगीतेची भूमिका:

१. भ्रम(संशय)मुक्ति

आधीच गोंधळलेल्या अर्जुनाला गोंधळातुन मुक्त करण्यासाठी जगामध्ये भगवतगीता अवतरली. याचाच अर्थ बौद्धिक सांगुन जगाला भ्रमात टाकणे ही भगवतगीतेची भूमिका नाही, तर भ्रमातुन मुक्त करणे, संशयमुक्ति ही भगवतगीतेची भूमिका आहे. योग्यला अयोग्य व अयोग्यला योग्य ठरविणे ही भ्रम या शब्दाची सरळ व्याख्या भगवतगीतेनेच दिलेली आहे.

अधर्मंम धर्मंम् इति या मन्यते तमसा आवृता।(१८-३२)

जगामध्ये काय योग्य आहे? एकाला जे योग्य वाटते, तेच दुसऱ्याला अयोग्य वाटते. तेंव्हा योग्य-अयोग्य या संदर्भात संशय, भ्रम निर्माण होत असतो. योग्य-अयोग्यच्या या गदारोळात आपण जगत असतो. या गदारोळातही स्वतःच्या मार्गाचे निश्चित ज्ञान असेल तर मनुष्य विश्वासाने मार्ग चालतो. भगवतगीता हेच निश्चित ज्ञान देत आहे.

२. स्वतःचा मार्ग:(जबाबदारी स्विकारणे)

मनुष्याला स्वतःच्या मार्गाचे अज्ञान असते तेंव्हा अडथळा आला असता ( स्वतःचे अज्ञान न स्विकारता )बाह्य परिस्थितिवर दोष ढकलतो. स्वतःचे अज्ञान स्विकारणे म्हणजे घटनेतील वास्तव स्विकारणे असते. स्वतः परिणामाची जबाबदारी स्विकारतो. रामायणकार महर्षि वाल्मिकिच्या पुर्वाश्रमीतील वाल्याला याच जबाबदारीची जाणीव झाली व प्रायश्चितासाठी उपाय मागितला. येथे पापाची जबाबदारी एकट्याची आहे हे वास्तव कळले तर अर्जुन स्वतःला योग्य ठरविण्यासाठी आपल्या नियतकार्याला पाप ठरवितो. स्वतःचे अज्ञान स्विकारीत नाही.

कार्य :

"The only correct actions are those that demand no explanation and no apology. "

Red Auerbach

मनुष्याला प्राप्तिसुख कळते. व याच आधारावर प्राप्तिसाठी कार्य हा व्यवहारमार्ग कळतो. हा मार्गच सकाम असतो. कार्याचा प्राप्तिशी संबंध असल्यामुळे स्वतःच्या व्यवहारमार्गात योग्य-अयोग्य हा issue येतो.

युद्धक्षेत्रावर अर्जुन दुःखी होतो. नियतकार्य त्याला दुःखदायी वाटते म्हणुन स्वतःला काय हवे?याचा आढावा घेतो. कांहीच नको असा निष्कर्ष निघतो, उलट या कार्यामागे लोभी प्रवृत्ति आहे असा त्याला शोध लागतो. आपल्या निष्क्रियतेचे Explanation देण्यासाठी येथे त्याला वाव मिळतो. घटनेतील वास्तव (नियतकार्य योग्य कि अयोग्य ? हा संशय) न स्विकारता सरळ आपली भूमिका योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी Explanation देतो.

"To rush into explanations is always a sign of weakness".

Agatha Christie,

जगण्यातुन सुख अनुभवणे, आनंद अनुभवणे ही मनुष्याची नैसर्गिक प्रवृत्ति आहे, याचसाठी कार्यरत असतो. कार्य सुखप्राप्तिचे साधनच असते हाच मुद्दा भगवतगीतेत highlight केलेला आहे. याच अनुषंगाने भगवतगीता येथे "कार्याद्वारे सुखाची साधना" हे जीवनविकास या संदर्भातील महत्वाचे दालन उघडे करते.

Senses mind द्वारा अनुभूत होणारे सुख अशाश्वत असले तरी तो जीवनाचा अपरिहार्य भाग असतो. ज्याचा अभाव आला असता दुःख होते, विचलित होतो, हेच अशाश्वत सुख ठरते. निर्भयता, साहस, आत्मविश्वास, विचलित न होणे अर्थात दैवीगुण संपत्तिचे सुख असते. कार्याद्वारे योग (दुःखान्त) ही साधना होण्यासाठी कार्याद्वारे ईश्वरभक्ति हा संदेश आहे. यात दोन टप्पे आहेत.

१. "मत्कर्म परमो भव"

मदर्थम् अपि कर्माणि कुर्वन् सिद्धिं अवाप्स्यसि।(१२-१०)

(स्वधर्म)कार्याचे समर्पण

२. अथ एतद् अपि अशक्तोअसि कर्तुं मद् योगंआश्रितः।

सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यत् आत्मवान् ।।(१२-११)

(कार्याचा एकनिश्चय) फलत्याग

"आत्मवान् "(Situated in the Self) हा शब्दच मनुष्य स्वतःचा मार्ग चालतो हा संदेश देतो. या मार्गातच सुखाची साधना असते. स्वतःचा मार्ग चालतांना आत्मवान् असणे, याच मार्गाचे महत्व (सुखाची साधना) व ज्ञान भगवतगीता सांगत आहे.

*या मार्गावर विचलित होत नाही.

*व्यवहारमार्गात सकाम प्रवृत्तिमुळे संशय असतो. प्राणतत्वातील शाश्वत तत्व व त्याचे मुळ ईश्वर याला जोडणारा मार्ग "अमृतत्वाय कल्पते" हा विकासाचा (साधनेचा) शाश्वत मार्ग असतो. या मार्गावर कार्य ईश्वर भक्तिसाठी घडते. व्यवहारमार्ग या शाश्वत विकासाच्या मार्गात transform होतो तेंव्हा, नियतकार्य स्वधर्मात, कार्याचा निर्णय एकनिश्चयात बदलतो.

******

(१२-१२)

***********************

श्रेयो हि ज्ञानम् अभ्यासात् ज्ञानात् ध्यानम् विशिष्यते।

ध्यानात् कर्मफलं त्यागः त्यागात् शांतिः अनंतरम् ॥

*************************

-

(१२-१२):"त्यागात् शांतिं अनंतरम् "

ज्ञानविज्ञानात दररोज भर पडत असते. तरी ज्ञान श्रेष्ठ कि कर्म श्रेष्ठ?हा समाजातील महत्वाचा विषय असतो.

"The great aim of education is not knowledge but action. "

Herbert Spencer

ज्ञान श्रेष्ठ कि कर्म श्रेष्ठ? या संदर्भात जीवनात ज्ञान, कर्म यांचे महत्व भगवतगीतेने वेगवेगळ्या Context मध्ये स्पष्ट केले आहे.

सुखी जीवन हा मनुष्याचा जिव्हाळ्याचा विषय आहे. भगवतगीता सुखासाठी शांतिचे महत्व सांगत आहे. "अशांतस्य कुतः सुखं?"

शांतिसाठी निष्काम कर्माचे (फलत्याग) महत्व सांगितले.

श्रेयो हि ज्ञानम् अभ्यासात् ज्ञानात् ध्यानम् विशिष्यते।
ध्यानात् कर्मफलं त्यागः त्यागात् शांतिः अनंतरम् ॥(१२-१२)

अभ्यासापेक्षा ज्ञान, ज्ञानापेक्षा ध्यान, ध्यानापेक्षा फलत्याग(निष्काम कर्म) श्रेष्ठ आहे, अर्थात येथे ज्ञानापेक्षा कर्माचे महत्व जीवनात अधिक आहे.

मनुष्याला निर्णयक्षमता नसेल (निर्णयात संशय असेल) तर तो जे करतो (किंवा करीत नाही)त्याचे समर्थन करतो. अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो व यासाठी ज्ञान वापरतो. अर्थात वास्तव न स्विकारता ज्ञानभाष्य बोलत असतो. अशांत मनाला शांत करण्याचा हा प्रयास असतो. अज्ञानाला ज्ञान दर्शविण्याचा हा प्रयास असतो. ज्ञान व कर्म या संदर्भात संभ्रम निर्माण करणारी ही मानसिक अवस्था असते. याच मुद्यावर भगवतगीतेची सुरुवात आहे.

भगवतगीतेत श्रीकृष्णाने जीवनाचे ज्ञान विज्ञानासह सांगितले. यांतुन जीवनासाठी योग्य काय? याचा बोध जाणुन निर्णय स्वतः करायचा असतो. या वाक्यावर समाप्ति होते. श्रीकृष्णाने

अर्जुनाच्या निर्णय अधिकारावर अतिक्रमण केले नाही, उलट स्वअधिकाराची जागृति केली. (कर्मण्येवाधिकारस्ते).

तसेच मनुष्याची ईश्वरावर श्रद्धा असली पाहिजे, हा आग्रह नाही. अर्थात ज्यांची श्रद्धा आहे, त्याचेसाठी भगवतगीता ज्ञान आहे. मनुष्याला जीवन मिळालेले आहे, हे जीवन जगण्याची जबाबदारी स्वतःची आहे. हे साधे तत्व भगवतगीतेतुन highlight झाले आहे. अर्थात स्वतःच्या निर्णयाचे महत्व जाणणे व इतरांचा निर्णयअधिकार मान्य करणे, हे स्वातंत्र्याचे मुलभूत तत्व भगवतगीतेतुन highlight झाले आहे.

समाजात भगवतगीतेतील "मोक्ष" या शब्दाची ओळख केवळ मरणोत्तर गति या अर्थाने आहे. प्रत्यक्षात भगवतगीतेतील (बंधन-मोक्ष) ज्ञान जीवनाच्या स्वातंत्र्याचे मुलभुत ज्ञान ठरते.

बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी।(१८-३०)

******

(१२-१३)

**********************

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।

निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी॥

************************

(१२-१३):"अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च"

जगतहीत, समाजहीत, मनुष्याचा व्यक्तिगत विकास याचा समन्वय मनुष्याचे कार्य साधत असते. (मधमाशीच्या मधनिर्मितीत फुलाचे फळात रुपांतर, समुहहीत, स्वहीत साध्य होते. कोठेही शोषण नाही. )

"The goal of life is to make your heartbeat match the beat of the universe, to match your nature with Nature. "

Joseph Campbell-----

जगतहीत, समाजहीत, स्वतःचा विकास हाच समन्वय साधण्यासाठी जगात धर्म आले. हाच समन्वय साधणारे साधन ईश्वर आहे ही भगवतगीतेची भूमिका आहे. भगवतगीता धर्म व

ईश्वर यांत ईश्वराचे महत्व Priority ठरविते. व कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य होण्यासाठी धर्म अशी निश्चित भूमिका घेते.

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।(१८-६६)

निर्विवाद भगवतगीतेने समाजहीत दुर्लक्षित केले नाही. समाजातील शोषणाला अधर्म ठरविले. म्हणुनच भगवतगीता जगासमोर आली. अर्जुन चांगला मनुष्य(दैवी) असतो. समाजात व्यवहार असतो. याच व्यवहारानुसार धर्मयुद्ध ठरले असते. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर दुःखी झाल्यामुळे अर्जुन आपल्या नियतकार्याला अधर्मकार्य ठरवितो. व निष्क्रियतेला धर्म ठरवितो. याच पार्श्वभूमिवर भगवतगीता प्रकृति व ईश्वर याचे ज्ञान विज्ञानासह स्पष्ट करते.

मनुष्यातील चांगलेपणानेच मानवकल्याणासाठी तत्वज्ञान, ज्ञानविज्ञान जगासमोर आणले. याच चांगलेपणाचा संबंध प्रकृतीतील सत गुण, कार्याद्वारे ईश्वरभक्ति (योग)याचेशी जोडलेला आहे. ज्यामुळे मनुष्याचा भाव "सर्वभूतहितेरतः " होतो.

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।(१२-१३)

"Many people absorbed a sense of guilt and/or shame from a very early age; their 'mind-set' is towards feeling worthless or in need of punishment. ("Born to win but conditioned to loose". )Just saying of Change your thoughts/mindset, it won't make it happen, nor will 'positive thinking'. We have to work at it every day and prove to ourselves that we are worthwhile. "

******

(१२-१३)

विषय ६६४ :

"निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी"

( अशाश्वताशी Detachment)

निर्ममो निरहंकारः

अशाश्वताच्या Detachment संदर्भात निर्मम व निरहंकार हे शब्द परस्परसोबत आलेले आहेत. ममता- अहंता या संदर्भात शरीर माझे आहे ही स्वामित्वाची भावना ममता असते, तर मी शरीर आहे ही कर्तेपणाची भावना अहंता असते.

भगवदगीतेनुसार अर्जुनाचे कर्म(नियतकार्य) ठरणे हा व्यवहाराचा भाग होता. तर ते कर्म करणे हा ईश्वरभक्तिचा(अध्यात्माचा) भाग बनला आहे. याला कर्मकौशल्य म्हटले. (योगः कर्मसु कौशलम्). अर्थात कर्म ठरविणे मनुष्याच्या अधिकारात आहे तर कर्मफल त्याच्या अधिकारात नाही.
कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन् ।(२-४७)

१. आत्मा शाश्वत, शरीर अशाश्वत आहे. शाश्वताशी attach झाले तर अशाश्वताशी detach होतो. याच Attachment-Detachment logic च्या आधारावर कर्माद्वारे ईश्वरभक्तिचे शास्त्र आहे. हाच आधार बंधन-मोक्षाचा आहे. (अव्यक्त) ईश्वराशी जोडणे याला बुद्धियोग म्हटले आहे. कर्माद्वारे ईश्वरभक्ति या संदर्भात Detachment म्हणजे ईश्वराला समर्पित कार्य/निष्काम कर्म(फलसमर्पण) अशी स्थिति असते. याच ईश्वरभक्तिद्वारा

स्थितप्रज्ञ स्थिति प्राप्त होते. याच स्थितिचे वर्णन करतांना "निर्ममो निरहंकारः" हे शब्द आले आहेत.

विहाय कामान् यः सर्वान् पुमांश्चरति निस्पृहः।

निर्ममो निरहंकारः स शान्तिम् अधिगच्छति।।(२-७१)

अर्थात(बंधन-मोक्ष Attachment-Detachment या शास्त्रामुळे) शान्ति प्राप्त होते.

२. ईश्वरभक्त :

अव्यक्त ईश्वराचा भक्त म्हणजे अव्यक्तासक्त(शाश्वताशी attach), सर्वभूतहीतेरतः, समत्वबुद्धि असे वर्णन आले आहे. याच आधारावर कर्माद्वारे (अनन्य)भक्ति करणारा ईश्वरभक्त कसा असतो, जो ईश्वराला प्रिय असतो, याचे वर्णन करतांना "निर्ममो निरहंकारः " हे शब्द आले आहेत.

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।

निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी।।(१२-१३)

अर्थात सुखदुःखामुळे विचलित होत नाही. क्षमाशील असतो.

********

(१२-१४)

*************************

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।

मयिअर्पित मनोबुद्धिः यो मद् भक्तः स मे प्रियः।

*************************

(१२-१४) :

" संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः"

(State of Growth mindset)

मनुष्याचे सुखदुःख त्याच्या जीवनाला आव्हान देत असते. दुःखी झाला असता वास्तव न स्विकारता मनुष्य तोकड्या समाधानाने स्वतःला दुःखमुक्त करण्याचा प्रयत्न करतो. पण यामुळे त्याचा विकासच थांबतो. तो दुबळा ठरतो. त्याची जगण्याची स्थिति Survival mode असते. अज्ञानामुळे लोक याच mode मध्ये जगत असतात. म्हणुनच जीवनाचे आव्हान स्विकारण्यासाठी सक्षम होणे याचे ज्ञान भगवदगीता करुन देत आहे.

मनुष्यजीवन नित्य विकासमार्गावर आहे याची जाणीव भगवदगीताच करुन देते. याचसाठी आत्मोन्नति(उद्धरेत् आत्मना आत्मानम् ) अर्थात Growth mindset चे ज्ञान आहे.
अनित्यं असुखं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

मनुष्यजीवनाला दुःखाचे आव्हान स्विकारावे लागते. म्हणुन ज्या ईश्वराचे मनुष्याशी नाते आहे त्या ईश्वराची ओळख भगवदगीता देत आहे. जीवनाचा मार्ग याच ईश्वरधामावर (अमृतत्वाय कल्पते) पोहोचतो. या मार्गावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति याचे शास्त्र भगवतगीता सांगते.

ईश्वर सर्वांसाठी सारखा आहे, त्याला कुणी प्रिय किंवा अप्रिय नाही पण जो त्याला भजतो तो ईश्वराचा प्रिय ठरतो.

समोअहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योअस्ति न प्रियः।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु च अपि अहं।(९-२९)

भगवदगीतेने जीवनविकासात कर्माचे महत्व सांगितले. कर्माद्वारे ईश्वरभक्ति यात १. कर्मसमर्पण २. फलत्याग याद्वारा Detachment चे शास्त्र सांगितले. याप्रमाणे ईश्वराची भक्ति करणारा भक्त नित्य योगयुक्त म्हणजे नित्य समाधानी(विचलित न होणारा), आत्मवश (मनावर नियंत्रण असलेला), बुद्धि व मन ईश्वरठायी असलेला, विकासमार्गावर कार्याचा एकनिश्चय(Determination) असलेला असतो.

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।
मयिअर्पित मनोबुद्धिः यो मद् भक्तः स मे प्रियः॥(१२-१४)

*********

(१२-१४) :
"यो मद् भक्तः स मे प्रियः"

ईश्वर व मनुष्याचे नाते:
ईश्वराचा अंश मनुष्याच्या प्राणतत्वात असतो म्हणुन तो जीवित असतो. अर्थात प्रत्येक मनुष्याचे ईश्वराशी अतुट नाते आहे.

ईश्वरासाठी सर्व समान आहे. त्याच्यासाठी कुणी प्रिय नाही किंवा तो कुणाचा द्वेष करीत नाही.

समोअहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योअस्ति न प्रियः।

ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु च अपि अहं।।(९-२९)

जो ईश्वराला भजतो तो ईश्वराच्या ठायी आहे व ईश्वर त्याच्या ठायी आहे. याचा अर्थ जे शाश्वत ईश्वराला जाणत नाही व प्रकृतिला वश असल्यामुळे प्रमादी, आळशी, विषादी असतात. ते अज्ञानी ठरतात. याचाच अर्थ मनुष्याचे शाश्वत ईश्वराशी असलेले नाते जो जाणतो, अनुभवतो, ईश्वराचे ज्ञान(अध्यात्म) जाणुन त्याचा भक्त बनुन जीवन जगतो. यासाठी योगी (Connected with God) शब्दाचे प्रयोजन आहे.

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।

निर्ममो निरअहंकारः समदुःखः सुखः क्षमि।।

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।

मयिअर्पित मनोबुद्धिः यो मद् भक्तः स मे प्रियः ।।(१२-१४)

ईश्वरभक्ताची लक्षणे या संदर्भात "अद्वेष्टा सर्वभूतानां ", निर्ममो निरहंकारः", संतुष्टः सततं योगी", "यतात्मा दृढनिश्चयः" यांचा विशेष उल्लेख केलेला आहे.

*"अद्वेष्टा सर्वभूतानां "

जगतहिताय( मानवता, सर्व प्राणिमात्रावर प्रेम) या संदर्भात "निर्वैरः सर्वभूतेषु यः "(११-५५), "सर्वभूतहितेरताः "(५-२५), (१२-४) हा संदेश भगवदगीता देत आहे.

*"निर्ममो निरहंकारः" vs ममता-अहंता

निर्मम म्हणजे (स्वामीत्वाचे, अशाश्वताचे)Detachment .

"Receive without pride, let go without attachment. "
-Marcus Aurelius (Roman emperor and a Stoic philosopher)

*"संतुष्टः सततं योगी"

योगी शाश्वत व अशाश्वत यातील भेद जाणतो. सुखदुःख अशाश्वत आहे हे जाणुन दुःखाने विचलित होत नाही. नित्य समाधानी (संतुष्ट) असतो.

*"यतात्मा दृढनिश्चयः"

मन चंचल असते. चंचलत्वामुळे कार्याचा निश्चय होत नाही. योगी आत्मवश असतो. कार्याचा एकनिश्चय होतो.

कर्मयोगात कार्याचा एकनिश्चय आवश्यक असतो. निष्काम कर्म म्हणजे फलत्याग. भोग आणि त्याग यातील भेद जाणला तर निष्काम कर्माचे, पर्यायाने कार्याच्या दृढनिश्चयाचे महत्व कळते.

भोग आणि त्याग यांचे ज्ञान बाज पक्षापासुन घेतले पाहिजे. एखाद्याने आपल्या हक्काचे मांस हिसकावुन घेतले तेव्हा त्याला मरणप्राय दुःख होते, परंतु जेव्हा तो आपल्या अधिकारातील हक्काचे मांस इतर पक्ष्यांसाठी आपल्या इच्छेनुसार सोडुन देतो, त्यागतो, जो त्याचा स्वभाव असतो. तेंव्हा तो सुख, आनंद अनुभवतो. म्हणजे संपूर्ण खेळ इच्छा, आसक्ती किंवा स्वतःच्या मनाचा असतो.

- सांख्य दर्शन

***********

(१२-१५)

************************

यस्मात् न उद्विजते लोको लोकात् न उद्विजते च यः।

हर्षअमर्ष भय उद्वेगैः मुक्तो यः स च मे प्रियः।

************************

(१२-१५) :

" यस्मात् न उद्विजते लोको लोकात् न उद्विजते च यः"

(Detached :मुक्त मनुष्य)

मनुष्याचा Mindset जसा बनतो त्यानुसार तो जगत असतो. त्याला आपल्या हीताचे ऐकायचे असते पण अहंकारामुळे स्वमतांध होतो. अर्थात स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. लोकांनी स्तुती केली, आपल्या favor चे भाष्य केले तर आनंदीत होतो, म्हणुन लोकांनी चांगले म्हणावे ही इच्छा सुखी होण्यासाठीच करतो. अर्थात त्याचे सुखदुःख बाह्य स्थितीवर(लोक) अवलंबुन असते.

अर्जुन दुःखी होतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी निष्क्रियतेला धर्म दर्शवितो. येथे त्याचे स्पष्टपणे अज्ञान असते. तसेच जबाबदारी टाळण्याची चुकही असते. या स्थितित अर्जुन स्वमतांध बनतो. या स्थितित मनुष्य कुणाचे ऐकुन घेण्याच्या मनःस्थितीत नसतो. पण त्याच्या कानावर शब्द येतातः

"ही भूमिका तुझ्यासारख्या श्रेष्ठ व्यक्तिला अशोभनिय आहे. " तेंव्हा तो स्वतःचे वास्तव प्रकाशात आणतो. व निश्चित प्रश्न पुढे येतो. निश्चित प्रश्न(काय हवे?) आल्यावर श्रीकृष्ण आनंदित(प्रहसन्निव भारत) होतात.

युद्ध न करणे ही निवड अर्जुनाने मोहवश(दुःख टाळण्यासाठी) केलेली असते. या अवस्थेत म्हणतो, मला कांही नको!पण वास्तव प्रकाशात येते व नियतकार्यानुसार युद्ध केले तर दुःखमुक्ति ही त्याची गरज स्पष्ट करतो. याच आधारावर युद्ध करणे हे स्वतःसाठी योग्य कसे? हे अर्जुनाला जाणुन घ्यायचे असते. कारण त्याला स्वतःला निर्णय करायचा असतो, युद्ध करायचे कि न करायचे?

प्रत्येक मनुष्य स्वतःचा मार्ग चालत असतो. तो जे करतो ते त्याचेच निर्णय असतात. ज्याला स्वतःच्या मार्गाचे ज्ञान आहे तो

विश्वासाने चालत असतो. स्वतःच्या निर्णयासाठी जागृत असतो. स्वतःला काय हवे हे निश्चितपणे कळते.

जागृति :

“Who looks outside, dreams. Who looks inside, awakens.

Carl Jung

मनुष्याला जीवन मिळाले आहे. खऱ्या अर्थाने ही जीवनयात्रा आत्मोद्धारासाठी सुरु असते, याच प्रवासासाठी जीवन साधन असते. या प्रवासाचे अंतिम धाम ईश्वर आहे. ज्या ईश्वराचा अंश त्याची जीवनयात्रा चालविते. याप्रमाणे भगवदगीता हेच ज्ञान सविज्ञान स्पष्ट करते. तसेच मनुष्याचा जीवनमार्ग, यातुन "जीवनविकासाचे शास्त्र" हा विषय विस्ताराने सविज्ञान भगवदगीता स्पष्ट करते. बंधन-मुक्ति हे आधारतत्व असते. या शास्त्रानुसार व्यवहारमार्गातील नियतकार्य हे आत्मोन्नतिचे साधन असते.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

या मार्गावर चालणारा ईश्वरभक्त ठरतो. ईश्वरासाठी सर्व समान असले तरी जो अनन्यभावाने भजतो तो ईश्वरासाठी प्रिय असतो,

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परः।
अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त उपासते।(१२-६)

याच ईश्वरभक्ताची Quality भगवदगीता स्पष्ट करते. यानुसार लोकांमुळे ज्याचा उद्वेग होत नाही व लोकांचा त्याच्यामुळे उद्वेग होत नाही, असा हर्ष-शोक यांच्या reaction पासुन मुक्त असलेला भक्त ईश्वराला प्रिय असतो.

यस्मात् न उद्विजते लोको लोकात् न उद्विजते च यः।
हर्षअमर्ष भय उद्वेगैः मुक्तो यः स च मे प्रियः।(१२-१५)

सार : (बाह्य) लोक आणि स्वतः या संदर्भात श्रीकृष्णाची भूमिका जरी मार्गदर्शकाची असली तरी अर्जुनाला स्वतःला निर्णय घ्यायचा असतो, स्वतःला चालायचे असते. यावरुन भगवदगीता स्पष्टपणे मनुष्याला त्याच्या स्वतःच्या जीवनमार्गाचे ज्ञान सांगत आहे हे स्पष्ट होते.

"The key to creating the mental space before responding is mindfulness. Mindfulness is a way of being present:

paying attention to and accepting what is happening in our lives. It helps us to be aware of and step away from our automatic and habitual reactions to our everyday experiences. "

-Elizabeth Thornton

********

(१२-२०)

************************

ये तु धर्मं अमृतं इदं यथा उक्तं पर्युपासते।
श्रद्दधाना मत्परमा भक्ताः ते अतीव मे प्रियाः॥

**************************

(१२-२०):"ये तु धर्मं अमृतं इदं यथा उक्तं पर्युपासते"
(शाश्वत विकासाचा स्वतःचा मार्ग)

धर्म या शब्दाचा बोध विविध Religion असा होतो. Religion हा समाजधर्म ठरतो. समाज किंवा समुहाच्या संचलनासाठी, कल्याणासाठी असलेले नियम याचा बोध समाजधर्म किंवा समुहधर्म हे शब्द देत असतात. याच नियमांचा आधार योग्य-अयोग्य ठरवितात. आपली निष्क्रियता योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी अर्जुन याच धर्माचा आधार घेतो. या पार्श्वभुमीवर समाजधर्म आणि स्वतःचा व्यक्तिगत धर्म हे दोन वेगळे विषय बनतात. अर्जुनाचे युद्धकार्य (Battle on battlefield) समाजधर्माचा भाग असतो, तर Internal battle व्यक्तिगत भाग

असतो. याच पार्श्वभुमीवर भगवतगीता स्वतःचा व्यक्तिगत धर्म यावर भाष्य करते.

समाजाचे कल्याण व्हावे, निरोगी संचलन व्हावे या हेतुने समाजात धर्म आलेत. तर व्यक्तिगत धर्म स्वतःला सक्षम करण्यासाठी, विकासमार्गावर चालण्यासाठी मार्गदर्शन करतो. समाजधर्म व व्यक्तिगत धर्म याचा मध्य भगवतगीतेने "स्वधर्म" या शब्दाने साधला आहे.

१. कार्य स्वयंविकासात साधन:

व्यवहारात कार्याद्वारेच विकास होतो. कार्य या संदर्भात स्वभावनियत (सहजकार्य) कार्य हा एक भाग असतो. याच संदर्भात स्वधर्म मनुष्याची ओळख देत असते. दुसरा भाग निर्णयअधिकार(कार्य करण्याचा अधिकार) असतो.

२. कार्याचा एकनिश्चय :

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्ती अविपश्चितः।(२-४२)

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां।(२-४३)

व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।(२-४४)

स्वतःचा व्यक्तिगत धर्म किंवा स्वतःचा विकासमार्ग याचे अज्ञान असेल तर चांगला मनुष्यही निष्क्रियतेचे समर्थन करतो व यासाठी धर्माचा दाखला देतो. या सत्याचे दर्शन अर्जुनविषादयोग आहे. याच आधारावर अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. याच पार्श्वभुमिवर स्वतःचा शाश्वत विकास होण्यासाठी (शाश्वत विकासाचा मार्ग)व्यक्तिगत धर्म स्पष्ट केला आहे. या धर्माचा हेतु सक्षम होण्यासाठी नित्य योगयुक्त असणे हा आहे, ज्यामुळे पुस्तकी किंवा ऐकलेल्या शब्दाने (मोह पावत नाही) विचलित होत नाही,

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन॥(८-२७)

३. शाश्वत विकासमार्ग

अर्जुन दुःख टाळण्यासाठी धर्माचा दाखला देतो. हा विषय Internal battleचा असतो. याच पार्श्वभुमिवर व्यक्तिगत धर्म हा मनोविज्ञानाचा, अध्यात्माचा विषय बनतो. हा शाश्वत विकासमार्ग असतो. या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही.
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

याचसाठी मनुष्याची मुळ ओळख अध्यात्मज्ञानाद्वारे स्पष्ट केली.
अक्षरं ब्रह्म परं स्वभाव अध्यात्म उच्यते।(८-३)
अविभक्तं च भूतेषु विभक्तं इव च स्थितम् ।(१३-१६)

यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धामपरमं मम।(१५-६)
अर्थात ईश्वराची ज्ञान या संदर्भात (प्रकृति-पुरुष) विज्ञानासह दिली, जे मनुष्याचे अंतिम धाम (Goal/Destination) ठरते. याच आधारावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति (कार्यसमर्पण, फलत्याग) हा शाश्वत विकासाचा मार्ग ठरतो.

ये तु धर्मं अमृतं इदं यथा उक्तं पर्युपासते।
श्रद्दधाना मत्परमा भक्ताः ते अतीव मे प्रियाः।।(१२-२०)

व्यवहारातील (विकासमार्गातील)कार्य सकाम असते. या कार्याला निष्काम कार्यात Transform करण्यासाठी शाश्वत धर्माचे(विकासमार्गाचे) प्रयोजन आहे. ज्यामुळे संशयमुक्त असतो व विश्वासाने मार्गक्रमण करतो. याचसाठी (Transformation) "स्वधर्म" महत्व व बुद्धियोग याचे ज्ञान भगवतगीता देत आहे.

अर्थात हाच सक्षम होण्याचा, शक्ति विकसित करण्याचा(विचलित न होणे) मार्ग ठरतो.

बुद्धियुक्तो जहातिह उभेसुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

# भगवदगीता

# अध्याय १३

## क्षेत्र क्षेत्रज्ञयोग

## (Nature & Consciousness)

**********************

अध्याय १३

क्षेत्र क्षेत्रज्ञयोग (Nature & Consciousness)

भक्तियोग(१२) कर्माद्वारे अनन्यभक्ती, फलत्याग याचे महत्व सांगते. तर याचेच मनोविज्ञान क्षेत्रक्षेत्रज्ञयोग या अध्याय १३ मध्ये सविस्तर आलेले आहे. या अध्यायात जड व चेतन या संदर्भात प्रकृति व पुरुष याचा उल्लेख आलेला आहे. प्रकृति या संदर्भात गुणज्ञान अध्याय १४ मध्ये, ईश्वर या संदर्भात पुरुषोत्तमज्ञान अध्याय १५ मध्ये, चांगलेपणाला पुर्णत्व साध्य करण्यासाठी फलत्याग शास्त्र अध्याय १६ मध्ये सविस्तर वर्णिलेले आहे.

मनोविज्ञानात मन Mind, Consciousness व त्याच्या Faculties, तर हेच सोप्या शब्दात Lower Self व Higher Self याद्वारे स्पष्ट केले आहे.

Humans have a soul which is their real higher self; a Divine, Mighty, Being.

Edward Bach

*Our Spirit is our individual spark of the Divine, and it fills us with the higher guiding intelligence of the Universe. Our Soul is the connection between our physical body and our Spirit, and provides communication between the two. It is our consciousness, and forever remains connected to the Creator, God,

For many, life has become more about what they can't do rather than what they can do. The truth, however, is that you are far greater than you think and have truly amazing potential. The key is to tap into your higher self and unleash your full capacity for success and happiness.

T. Harv Eker

*Battle of Selves

In our own existence we have two selves. One is the lower self and the other is the higher Self. As long as the lower self (consisting of the mind, senses and

body) rules over one's life, one is one's own enemy. But when the lower self is ruled by the higher Self, then one becomes one's own friend. Thus the battle between the Lower Self and the Higher Self has been in the consciousness of humanity for millennia.

१. क्षेत्रक्षेत्रज्ञ(१-६)

या अध्यायात क्षेत्र म्हणजे शरीरयंत्र व क्षेत्रज्ञ म्हणजे जाणणारा Consciousness . व ईश्वर म्हणजे सर्व क्षेत्रांना जाणणारा क्षेत्रज्ञ असा अर्थ दिला आहे. मनुष्य व जगत याचे नाते क्षेत्रज्ञ स्पष्ट करते, तर देह (अनित्य)व आत्मा (नित्य)याचे पृथःकरण क्षेत्रक्षेत्रज्ञ ज्ञानाने कळते.

२. क्षेत्रज्ञ ज्ञान(७-१८)

क्षेत्र, ज्ञान व ज्ञेय याद्वारे ब्रह्माचे शरीरात अस्तित्व जाणणे.

अर्थात जसे Activation of Higher Self चे ज्ञान मनोवैज्ञानिक सांगतात.

ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम् (१३-१७)

शरीर अनित्य आहे . व जन्ममृत्युजराव्याधि दुःखदोषकारण आहे म्हणुन समदुःखसुखंधीरं ही समत्वदृष्टि ज्ञानाने साध्य करणे.

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्वज्ञानार्थदर्शनम् ।
एतद् ज्ञानम् इति प्रोक्तम् अज्ञानम् यदतो अन्यथा॥(१३-११)

३. प्रकृति पुरुष ज्ञान (जड-चेतन, अशाश्वत-शाश्वत)(१९-२३)
कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते॥(१३-२०)

प्रकृति सत, रज, तम गुणयुक्त आहे. (Psychological domain of Nature). पुरुष शाश्वत ईश्वराचा (पुरुषोत्तम) अंश आहे. प्रकृति गुणाने वेढल्यामुळे जिवात्मा बनतो.

४. शाश्वत ईश्वरज्ञान व मुक्ति (२४-३४)

क्षेत्रक्षेत्रज्ञाच्या संयोगाने जडचेतनयुक्त जग अस्तित्वात आले आहे.

यावत् संजायते किंचित सत्वं स्थावर जंगमम् ।

क्षेत्रक्षेत्रज्ञ संयोगात तत्विद्धि भरतर्षभ ॥(१३-२६)

कार्य प्रकृति करते आत्मा सुखदुःख भोगतो, अर्थात प्रकृतिगुण सेवन करतो. यामुळे गुणबद्ध होतो. प्रत्यक्षात प्रकृति (कार्य)कर्ता व पुरुष अकर्ता जाणणे हे देह व आत्मा याचे पृथःकरण ज्ञान जाणणे, हेच क्षेत्रक्षेत्रज्ञ ज्ञानाचे रहस्य आहे. ध्यान, ज्ञान, कर्मयोगातील फलत्याग हे सर्व याच ज्ञानासाठी साधन ठरते. ज्यामुळे मुक्तिचे (मनुष्य -प्रकृति - स्वातंत्र्य) ज्ञान जाणतो. अर्थात मुक्ति अनुभवतो.

क्षेत्रक्षेत्रज्ञ योः एवम् अंतरं ज्ञानचक्षुषा।

भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुः यान्ति ते परम् (१३-३४)

**************************

(अध्याय १३)

१३. २/१: " क्षेत्रज्ञं च अपि माम् विद्धि"

( I am The Knower )

(१३-२)/२:

"क्षेत्रक्षेत्रज्ञयोः ज्ञानं यत् तद् ज्ञानं मतं मम"

(Know Thyself)

१३. ८:

"जन्ममृत्युजराव्याधि दुःखदोषअनुदर्शनम् "

१३-१०:

"मयि च अनन्ययोगेन भक्तिः अव्यभिचारिणी"

(Rightous )

१३. ११/१ :"अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञानार्थ दर्शनम् "

१३. ११/२:

" अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञानार्थ दर्शनम् "

Part II

(Philosophy of life:Progressive or Barrier!)

१३. ११/३:

"एतद् ज्ञानं इति प्रोक्तं अज्ञानं यदतो अन्यथा"

(जीवनविकासाचे ज्ञान कशाला म्हणायचे?)

१३. १६ :

"अविभक्तं च भूतेषु विभक्तं इव च स्थितम् "

(Universal mind and YOU)

१३. १८:

"मद् भक्त एतद् विज्ञाय मद् भावाय उपपद्यते"

(१३. १९):

"प्रकृतिं पुरुषं चैव विद्धि अनादि उभौअपि"

(Science of Nature and Progress)

१३. २०/१ :"कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते"

(१३-२०)/२विषय ५४० :

"पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते"

(Happiness & Spirituality connection )

१३. २१/१ :

"पुरुषं प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान् "

(Attitude affects Outcome of our lives)

(१३-३१)/२:

"अनादित्वात् निर्गुणत्वात् परमात्मा अयम् अव्ययः"

(Laws of Universe & its application)

(१३-३३)/१:

"यथा प्रकाशयति एकः कृत्स्नं लोकं इमं रविः"

(जीवन प्रकाशीत होणे Know Thyself)

(१३. ३३)/२:"क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत"

( Own light)

१३. ३४/१:

"क्षेत्रक्षेत्रज्ञयोः एवं अंतरं ज्ञानचक्षुषा"

१३-३४/२:

भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुः यान्ति ते परम् "

(स्वातंत्र्याचे संस्कार-Process of liberation)

(१३-२)

***********************

क्षेत्रज्ञं च अपि माम् विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।

क्षेत्रक्षेत्रज्ञ योः ज्ञानं यत् ज्ञानं मतं मम।।

*************************

(१३. २)/१: " क्षेत्रज्ञं च अपि माम् विद्धि"

( I am The Knower )

Mentalism law (Universal Law)म्हणतो,

There is a single Universal Consciousness - the Universal Mind - from which all things manifest. Every mind is part of the Universal Mind . All energy and matter at all levels is created by and is

subordinate to the Omnipresent Universal Mind. Your Reality is a manifestation of your mind.

क्षेत्र शरीर(Field of activity) व त्याला जाणणारा (Consciousness)क्षेत्रज्ञ असतो. याचप्रमाणे सर्व क्षेत्राला जाणणारा क्षेत्रज्ञच (Universal mind)ठरतो. अर्थात Mind हे Universal mind चा भाग आहे.

क्षेत्रज्ञं च अपि माम् विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
क्षेत्रक्षेत्रज्ञ योः ज्ञानं यत् ज्ञानं मतं मम।।(१३-२)

भगवतगीतेतील मनोवैज्ञानिक ज्ञानाचा हाच आधार आहे. याच आधारावर Law of devine Oneness ( Sublaw of Universe) म्हणतो,

"Everything is connected to everything else. What we think, say, do and believe will have a

corresponding effect on others and the universe around us. "

या आधारावर Law of Cause & Effect म्हणतो,

"Every cause has its effect; every effect has its cause. "

In accordance with this Law, every effect you see in your outside or physical world has a very specific cause which has its origin in your inner or mental world. This is the essence of thought power.

याचाच अर्थ जगातील घटना, मनुष्याचे कार्य, त्याची मानसिकता, त्याचे भाष्य याच्या मुळाशी निश्चित कारणे असतात. यातुनच विज्ञानाचा शोध होतो. यातुनच भगवतगीता मनोविज्ञान सांगत आहे.

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं च उक्तं समासतः।

मद् भक्त एतद् विज्ञाय मद् भावाय उपपद्यते।।(१३-१९)

*ज्ञेयं -Higher consciousness connected with universal mind, i. e. raising the vibrations of consciousness, Expiriencing true Self स्व भाव)

याच ज्ञानाचा अध्यात्मज्ञान भाग आहे.

अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञानार्थ दर्शनम्।

एतद् ज्ञानं इति प्रोक्तं अज्ञानं यदतो अन्यथा।।(१३-१२)

* निर्णयक्षमता क्षीण झाल्यामुळे जेंव्हा निर्णय टाळतो व निष्क्रियतेचे समर्थन करतो, यातुनच नकारात्मक भाष्य बोलल्या जाते, याच अज्ञानी मानसिकतेतुन भगवतगीतेने अर्जुनाला बाहेर काढले.

कार्याद्वारे विकास याचे शास्त्र प्रकृति व पुरुष याद्वारे स्पष्ट केले. हे अनुक्रमे अशाश्वत व शाश्वत ठरतात. प्रकृति सत, रज, तम गुणाने बद्ध असते. पुरुष गुणातीत (शाश्वत जीवित तत्व)असते. (ईश्वर पुरुषोत्तम )

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।(१३-२१)

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान्।(१३-२२)

उपद्रष्टा अनुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः।

परमात्मा इति च अपि उक्तः देहेस्मिन् पुरुषः परः॥(१३-२३)

येथे कार्यकारण व शाश्वत ईश्वराचे ज्ञानविज्ञान स्पष्ट होते. म्हणुन "ईश्वर" हे जीवनाचे अंतिम (शाश्वत)ध्येय ठरते हे स्पष्ट होते. व भक्ति म्हणजे निष्काम कार्य याचे तत्व कळते.

याप्रमाणे मानसिकतेचा संबंध बुद्धिशी असतो. क्रोध, चिंता, इर्षा आदि विकारामुळे बुद्धिभ्रंश होतो. म्हणुन समुद्रशांती (विचलित न होणे) ही संकल्पना आहे. अर्जुन यावरच प्रश्न करतो, बुद्धि श्रेष्ठ तर कार्य कशाला?यावरच भगवतगीतेचे उत्तर आहे,

कार्याद्वारेच हा विकास साधायचा आहे.

ध्यान, योग, ईश्वरभक्ति असे सर्व संदर्भ सामान्य मनुष्य अध्यात्म या संदर्भातच जाणत असतो. भगवतगीता ईश्वरभक्ति या संदर्भात भक्तांना कार्याद्वारे विकास याचा संदेश देते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।

दुःखमुक्तिसाठी मनुष्य ईश्वराला भजतो. याच दुःखमुक्तिसाठी कार्याद्वारे भक्ति साधणे. हे मनोवैज्ञानिक ज्ञानच भगवतगीता सांगत आहे.

ध्यानेन् आत्मनि पश्यन्ति केचित् आत्मानम् आत्मना।

अन्ये सांख्येन् योगेन कर्मयोगेन चापरे।(१३-२५)

मानसिकशांती, सकारात्मकता, उत्साह, निर्भयता, धैर्य, कार्याचा दृढनिश्चय हे सर्व मानसिक स्वास्थ म्हणुन आपण जाणतो. भय, क्रोध, Stress, चिंता, नैराश्य, नकारात्मकता मानसिक Disturbance (disorder) असते. मानसिक Wellness साठी जीवनविकासात ईश्वरभक्तीचे व कार्याचे महत्व मनोविज्ञानाद्वारे भगवतगीता स्पष्ट करते.

***********

(१३-२)/२:

"क्षेत्रक्षेत्रज्ञयोः ज्ञानं यत् तद् ज्ञानं मतं मम"

(Know Thyself)

सॉक्रेटिसने " KNOW THYSELF" हा मंत्र शिष्यांना दिला. Know Thyself अर्थातच " स्वतःला ओळखा" या विषयाचे विस्तृत वर्णन भगवतगीतेत अध्याय १३ (Knower) पासुन अध्याय १८ पर्यंत (अहंकार vs ईश्वर, बंधन vs. मुक्ति-स्वातंत्र्य) आलेले आहे.

क्षेत्रज्ञं च अपि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।

क्षेत्रक्षेत्रज्ञयोः ज्ञानं यत् तद् ज्ञानं मतं मम।।(१३-२)

जसा सूर्य विश्वाला प्रकाशित करतो, तद्वतच प्राणतत्व (Living entity) शरीराची(क्षेत्र) ओळख देते, पर्यायाने विश्वाचे अस्तित्व जाणत असतो, व या विश्वात स्वतःची भूमिका जाणत असतो, बनवीत असतो.

यथा प्रकाशयति एकः कृत्स्नं लोकं इमं रविः।

क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत।।(१३-३४)

अर्थात क्षेत्रज्ञ क्षेत्राला (शरीर) जाणणारा (Knower) असतो. हा क्षेत्रज्ञ व्यक्तिच्या संदर्भात स्वतःचा Knower असतो, तर ईश्वर

विश्वाचा क्षेत्रज्ञ (Knower ) असतो. येथुन हा स्वतःला जाणण्याचा (ज्ञान)प्रवास(अ. १३ ते अ. १८) सुरु होतो. या दरम्यान शंकानिरसनासाठी केवळ तीन प्रश्न अर्जुन करतो.

१. ईश्वर निर्गुण आहे या आधारावर गुणातीत ज्ञान आहे. हा गुणातीत होण्याचा प्रवास कसा होतो, कसा वागतो?(अ. १४)

२. ईश्वरश्रद्धा असणारे ईश्वराला भजतात पण निष्काम कार्याचे शास्त्र आचरत नाही. या निष्ठेला काय समजावे (सत, रज कि तम)?(अ. १७)

३. निष्काम कार्य या संदर्भात संन्यास व (फल)त्याग या तत्वाचे स्पष्टिकरण?

मनुष्य एखादी कादंबरी वाचतो, तेंव्हा मनोरंजन, माहिती होते. कादंबरीचा विषय कळतो. तर "ज्ञान" या हेतुने एखादे पुस्तक वाचतो, तेंव्हा मनुष्याची निश्चित दृष्टि (Perception) किंवा निश्चित हेतु(काय हवे?) असतो.

भगवतगीता एक Universal ग्रंथ म्हणुन जगतमान्य आहे. भगवतगीता या नांवातच Song of God ईश्वर हा शब्द आलेला

आहे. त्यामुळे मुलतः ईश्वरज्ञान व त्याची विश्वातील भूमिका हा भगवतगीतेचा विषय आहे.

*भगवतगीता यामुळेच पवित्र ग्रंथ ठरतो. विश्वअध्यक्ष असलेल्या(अहं सर्वस्य प्रभवः) ईश्वरज्ञानात, त्याच्या भक्तित रमणे, यामुळे "बुद्धियोग" ही ईश्वराची अनुकंपा होते. व अज्ञान(संशय) मिटते. (ददामि बुद्धियोगं तं )

* ज्या कारणास्तव भगवतगीता जगासमोर आली, त्या निश्चित कारणाचा बोध होतो. कार्याचा निश्चय (Determintion) या संदर्भात मनुष्याचा झालेला गोंधळ(कारण), व हा गोंधळ मिटविण्यासाठी "ज्ञान" या विषयाचा बोध होतो.

अ)"तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम्"

जीवनाचा निश्चित अर्थ काय?जीवनातुन काय साध्य करायचे आहे?(Meaning &Purpose of life) कळते. या संदर्भात आत्मोन्नति व योग ( "State of mind" या संदर्भात दुःखान्त म्हणजे विचलित न होणे)

हे Purpose कळते. याद्वारे भक्तिचे महत्व कळते.

ब)" गहना कर्मणो गतिः"

प्रकृतित कर्म घडत असते. जीवनात कर्माचे महत्व व त्याची भूमिका कळते. (गहना कर्मणो गतिः)

व्यवहारात इच्छापुर्तिसाठी (State of want- State of Art) कर्म असते. यातील सकाम मानसिकतेमुळे चंचलता असते. चंचलतेमुळे कार्यनिश्चयात अडथळा येतो. कार्य केवळ भोगैश्वर्य प्राप्तिसाठी आहे हे जाणुन एखाद्याजवळ संपत्ति आहे तर कार्य कशाला?असा त्याला प्रश्न पडतो. अर्जुन म्हणतो, मला राज्याची आकांक्षा नाही मग हे शोकदायी घोरकर्म कशाला?हा त्याचा मुख्य प्रश्न असतो.

असे शोकदायी कर्म टाळणेच योग्य!हे Statement सत्य ठरविण्यासाठी धर्मज्ञानाचा दाखला देतो.

मनुष्यजीवनात चिंता, अडचणी, भय, Tension- Stress हे दुःखरुपाने डोकावत असते. हे दुःख मनुष्याला विचलित करते. हा Mental weakness असतो. म्हणुन मानसिक शक्ति म्हणजे विचलित न होणे या शक्तिचा(योग) विकास, हे Purpose कळते. या शक्तिसाधनेचा प्रवास "चांगलेपणातुन" होतो. अर्जुन चांगला(दैवीगुण) असल्यामुळे दुःखी झाला. हा चांगलेपणाच मनुष्याच्या अंतरंगात सुप्तावस्थेत असतो. (याचमुळे एखादा सिनेमा पाहतांना भावुक होतो, रडणारेही आढळतात). याच चांगलेपणामुळे मनुष्य पापभिरु होतो, चांगलेपणा असला तरी विचलित होतो. हाच प्रकृतिचा Weakness असतो, ज्यामुळे मनुष्य द्वंद्वमोहाच्या जाळ्यात सापडतो अर्थात बंधनात अडकतो. याच आधारावर बंधन- स्वातंत्र्य (मुक्ति, मोक्ष) या ज्ञानावर प्रकाश टाकला आहे. व पर्यायाने "आत्मोन्नति" संदर्भात मोक्ष हेच जीवनाचे Purpose कळते.

बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी।(१८-३०)

याप्रमाणे शाश्वत-अशाश्वत, बंधन-मोक्ष, आसक्ति-अनासक्ति या संदर्भात ज्ञान होते.

क्षेत्रक्षेत्रज्ञं योः एवं अंतरं ज्ञानचक्षुषा।

भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुः यान्ति ते परम् ॥(१३-३५)

"All our knowledge begins with the senses, proceeds then to the understanding, and ends with reason. There is nothing higher than reason. "

-Immanuel Kant

*********

(१३-८)

***********************

इंद्रियार्थेषु वैराग्यम् अनअहंकार एव च।

जन्ममृत्युजराव्याधि दुःखदोषअनुदर्शनम्।।

*************************

(१३-८) : "जन्ममृत्युजराव्याधि दुःखदोषअनुदर्शनम् "

भगवतगीतेने जीवनज्ञान(जीवनाच्या विकासमार्गाचे ज्ञान) या संदर्भात जीवनाची Reality उपरोक्त संदेशातुन (१३-८) दर्शविली आहे. व जीवनात ज्ञानविज्ञानाचे महत्व स्पष्ट केले आहे.

जगात विकास आढळतो, पण अडचणीही असतात. ज्ञानविज्ञान शोधल्या गेले, व जगाला सुखी करण्यासाठी त्याचा वापर होत असतो. ज्ञानविज्ञान या संदर्भात विकासाला उपयुक्त ज्ञानविज्ञानाचे महत्व जग मान्य करीत असते. पृथ्वी गोल आहे हे

कळल्याबरोबर कोलंबस भारताच्या शोधार्थ निघाला व अमेरिकेत पोहोचला. अमेरिका वसली. याप्रमाणे जगाच्या विकासात ज्ञानविज्ञानाची भूमिका स्पष्ट आहे.

जीवनांत विकास असतो, अडचणी असतात. जीवनांत अडचणी असल्या तरी त्याच निवारण्यासाठी ज्ञान असते.

मनुष्यजीवन सिमित काळासाठी व्यक्तिला उपलब्ध असते. या जीवनाचे Motion नित्य सुरु असते. एक Right move जीवनाला वरच्या पायरीवर नेते, तर Wrong move खालच्या पायरीवर नेते. जीवनात Wrong होवु नये यासाठी कुणी चुकीच्या भयाने निष्क्रिय होतो. अर्जुन अशाच चुक होण्याच्या भयामुळे निष्क्रियता पसंत करतो.

मनुष्य Right असो वा Wrong वा निष्क्रिय असो, त्याची भूमिका मी योग्य आहे अशीच असते. अर्जुन मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो यांत धर्मज्ञान वापरतो. मनुष्याला जर या क्षणी ज्ञान मिळाले तर तो विश्वासाने मार्ग चालतो. सुख अनुभवतो. याचसाठी भगवतगीतेद्वारा जीवनात ज्ञानाची भूमिका या संदर्भात विविध विषय जगासमोर आले.

*जीवनात धर्माची भूमिका vs ज्ञानविज्ञानाची भूमिका.

अर्जुनाला धर्मज्ञान होते व याच धर्माचा वापर प्रज्ञावादासाठी करतो. व याद्वारे जीवनात प्रज्ञावादी भूमिका vs ज्ञानी भूमिका हा विषय चर्चेला येतो. या चर्चेत धर्म वा देवता यावर भगवतगीता आक्षेप घेत नाही तर जीवनात त्या ज्ञानाची अपुर्णता दर्शवुन पुर्णत्वासाठी ज्ञान सांगते.

जीवनात विकास करण्यासाठी शिक्षित झाले पाहिजे हे समाज जाणतो, तरी शिक्षित होवुनही बेरोजगार अशी उदाहरणे आढळतात. याचा अर्थ हे शिक्षणातील अपुर्णत्व असते.

धर्म आहे, ज्ञान आहे तरी अपुर्णता (अंधार)आहे! ही अपुर्णता भगवतगीता दर्शवुन देते व पुर्णत्वासाठी ज्ञानविज्ञान सांगते.

*What is Knowledge?

ज्ञान प्रकाश असतो. ज्ञानामुळे विश्वासाने मार्ग चालतो. पण संशय असेल तर निष्क्रिय होतो. मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी उपलब्ध ज्ञानाचा वापर करतो. ही प्रज्ञावादी भूमिका असते. म्हणुन जीवनात ज्ञानविज्ञानाची भूमिका श्रेष्ठ ठरते. जीवनात ईश्वराची भूमिका ज्ञानविज्ञानाचा भाग असतो, या ज्ञानाला अध्यात्म म्हटले आहे. म्हणुन म्हटले,

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।(४-३८)

या सृष्टिचा अधिपती ईश्वर आहे म्हणुन ईश्वराचा संबंध धर्माशी व धर्माचा चांगल्या कर्माशी समाजात आलेला असतो. चांगले कर्म याविषयी किर्ती प्राप्ति, स्वर्गप्राप्ति याचेशी संबंध जोडल्या जातो. चांगले कर्म चांगले भाग्य, किर्तिप्रद व मरणोत्तर स्वर्गप्राप्ति. याउलट वाईट कर्म मरणोत्तर नरकप्राप्ति, अपकिर्ति अशी भावना(Belief system) असते. अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतांना याच धर्माचा व प्राप्तिचा उल्लेख करतो. श्रीकृष्ण म्हणतात, तु जी भूमिका घेतली आहे यामुळे किर्ति व स्वर्ग या दोहोला मुकशील. याच कारणाने(अज्ञानाला ज्ञान समजणे)ज्ञान या संदर्भात जीवनातील

सर्वात मोठा रोग प्रज्ञावादी भाष्य असते, ज्याला स्वतःची "ज्ञानी" भूमिका समजत असतो.

ज्ञानामुळे स्वतःचा मार्ग पक्का होतो, विश्वासाने मार्ग चालतो व सुख अनुभवतो. भगवतगीतेत स्वतःच्या नियतमार्गावर शिक्कामोर्तब(स्वतःची मंजुरी) करणे यासाठी स्वधर्म वापर आहे. स्वधर्म जीवनमुल्य असते व Tiebreaker ची भूमिका करते. कार्य ईश्वराला समर्पण करतो याचा अर्थ निष्ठेने कार्य घडते.

धर्म या संदर्भात अपुर्णता जाणवली, संशय असला तर चंचलत्व दुर करण्यासाठी बुद्धियोग सांगितला. यांत ईश्वराचा आश्रय असतो. निर्णयअधिकार मनुष्याचे Bornfree आहे. कार्याचा निश्चय दृढ करुन निष्काम कार्य म्हणजे फल ईश्वरसमर्पण व योगासाठी कार्य घडते.

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।(१८-६६)

*********

(१३-१०)

***********************

मयि च अनन्ययोगेन भक्तिः अव्यभिचारिणी।

विविक्तदेशसेवित्वम् अरतिः जनसंसदि।

***********************

१३-१०(विषय ७६२) :

"मयि च अनन्ययोगेन भक्तिः अव्यभिचारिणी"

(Rightous )

मनुष्याची जशी मानसिकता(विचारसरणी) असते तसा मनुष्य घडत असतो. याच मानसिकतेचा धर्माशी संबंध असतो. धर्मानुसार Belief system असते. याच Belief system चा परिणाम मानसिकतेवर (State of mind) असतो.

अर्जुन "धर्म" या संदर्भात योग्य-अयोग्य मार्ग, चांगले-वाईट कर्म, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक अशा Belief system ला जाणत असतो. यानुसार आपल्या नियतकार्याला अयोग्य, अधर्मकार्य

ठरवितो. याच पार्श्वभुमिवर भगवदगीतेत अशाश्वत-शाश्वत, क्षर-अक्षर, अनित्य-नित्य, बंधन- मोक्ष या आधारावर असलेला धर्म सांगितला. याला राजधर्म, शाश्वत धर्म, अमृतधर्म असे भगवदगीतेने संबोधित केले आहे.

भगवदगीतेतील या धर्मात :

१. अव्यक्त ईश्वर शाश्वत आहे. सृष्टिसंचलनात त्याची भूमिका अध्यक्षाची असते. मनुष्याच्या कर्म घडण्याच्या पाच तत्वापैकी दैव एक तत्व (Factor) आहे.

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथक् विधम् ।

विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैव अत्र पंचमम्॥(१८-१४)

अर्जुनाला त्याच्या दैवाचे (Destiny) दर्शन विश्वरुपदर्शनातुन होते व ईश्वराची(अधिदैवाची) भूमिका कळते. याप्रमाणे विश्वसंचलनात ईश्वराची भूमिका स्पष्ट होते. याच ईश्वराची नित्य भक्ति, कर्माद्वारे भक्ति याला अनन्यभक्ति म्हटले आहे.

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परः।

अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त उपासते॥(१२-६)

२. कर्म :

व्यवहारात कर्म घडते. याच व्यवहारानुसार धर्मयुद्ध ठरते. पण प्रत्यक्ष कर्म execute करण्याची वेळ आली असता अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो. याच संदर्भात प्रश्न करतो. बुद्धिची स्थितप्रज्ञ अवस्था साध्य करणे हेच महत्वाचे असेल तर कर्माचे प्रयोजन कशासाठी?याच पार्श्वभुमिवर भगवदगीता जीवनात धर्म या संदर्भात कर्माचे महत्व स्पष्ट करते.

धर्म या संदर्भात कर्माच्या दोन निष्ठा असतात.

लोकेस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मया अनघ"।

ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम्॥ (३-३)

सांख्यनिष्ठेत "स्वधर्म" हे जीवनमुल्य असते. तर योगनिष्ठेत "बुद्धियोग" निष्ठा असते. या मुल्यांमुळे Rightous या अर्थाने कार्यमार्ग निश्चित होतो. अर्थात मार्गावर धर्माचे Rightous असे शिक्कामोर्तब होते.

*स्वधर्माचरण :

धर्म या संदर्भात स्वभावनियतकार्याला "स्वधर्म" संबोधले आहे. यानुसार मनुष्य आपली योग्यता जाणतो. त्यानुसार कार्यरत होतो. विपरित स्थिततिही धर्ममार्गापासुन विचलित होत नाही. तो Rightous असतो. येथे कार्य ईश्वराला समर्पित होते. (मत्कर्मपरमो भव)

आत्मज्ञानं समारम्भः तितिक्षा धर्मनित्यता। यमर्थान्नापकर्षन्ति स वै पण्डित उच्यते ॥(विदुरनीति)

(One who is fully aware of his capabilities and acts accordingly to help others, one who can bear the pain, one who is not distracted by adverse conditions, is known as a virtuous person)

*बुद्धियोग :

एषा ते अभिहिता सांख्ये बुद्धिः योगे तु इमां शृणु।
बुद् द्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)

बुद्धियोगामुळे जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

या मार्गावर कार्याचा एकनिश्चय असतो. स्वतःचा निर्णयअधिकार जाणतो. (सिद्धि-असिद्धि यांतील) समत्वयोगाने कार्यरत होतो.

याप्रमाणे भगवदगीता ईश्वराची (शाश्वत) ओळख व भूमिका स्पष्ट करते. या ईश्वराच्याअनन्यभक्तिसाठी कर्माचे महत्व व भूमिका स्पष्ट करते.

नित्यं च समचित्तत्वम् इष्टअनिष्ट उपपत्तिषु।(१३-९)
मयि च अनन्ययोगेन भक्तिः अव्यभिचारिणी।(१३-१०)

सार :

जगातील कोणताही धर्म योग्य-अयोग्य (Right-Wrong) या संदर्भात भाष्य करतो. अर्जुनही याच धर्माचा आश्रय करतो व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी त्याचा वापर करतो.

याउलट भगवदगीतेतील धर्म स्वतःचा मार्ग योग्य (Rightous) अनुभवण्यासाठी मार्गदर्शन करते, ज्ञान सांगते. यामुळे त्याला स्वतःला स्पष्टिकरण देण्याची गरज पडत नाही.

"When you're righteous, you don't have to tell people that you're righteous. "

-Shaquille O'Neal

**********

(१३-११)

************************

अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञानार्थ दर्शनम्।

एतद् ज्ञानं इति प्रोक्तम् अज्ञानं यदतो अन्यथा।।

**************************

(१३-११)/१ :"अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञानार्थ दर्शनम् "

Part I: Your Self

वर्तमानात ज्या ज्ञानाची मनुष्याला गरज असते, यासंबंधी भगवतगीता हा संदेश देते.

अध्यात्मज्ञान याचा बोध आत्मसंबंधी ज्ञान अर्थात स्वतःच्या स्वत्वाचे ज्ञान असा होतो.

स्वभाव अध्यात्म उच्यते।(८-३)

म्हणुनच तत्वज्ञांनी Know Thyself याद्वारे या ज्ञानाची गरज व्यक्त केली. या ज्ञानामुळे ज्या Self ची आपल्याला जाण आहे व

आपला (सुप्त) खरा True Self (जो शाश्वताशी संबंधित आहे) यातील भेद कळतो.

अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञानार्थ दर्शनम्।
एतद् ज्ञानं इति प्रोक्तम् अज्ञानं यदतो अन्यथा।।(१३-११)

दर्शनशास्त्र तत्वज्ञान(Philosophy) म्हणुन ओळखल्या जाते. जे शाश्वत सत्य आणि प्रकृतिचे (निसर्गाचे) सिद्धांत आणि त्याचे कारण शोधते. यामुळे जे प्रत्यक्ष घडत आहे (वर्तमानातील सत्य) जाणण्यास उपयुक्त होते. या स्थितित स्वतःची भूमिका काय असावी याचा बोध ज्या ज्ञानाने होतो, असे आवश्यक ज्ञान . हा संदर्भ येथे आलेला आहे.

मनुष्य जीवन जगतांना स्वभाव प्रकृतिनुसार जगत असतो. विकासाची, सुखाची इच्छा करतो. मनुष्यात प्रचंड सुप्तशक्ति आहे असे ऐकतो. या शक्तिचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करतो. जीवनात श्रेष्ठ (मोठे व्हावे!)व्हावे, विकास करावा यासाठी ज्ञान घेतो, त्यानुसार जगण्याचा प्रयत्न करतो. विविध ज्ञान घेवुन जगत असतो,

हे जाणुनही जगतांना अडकतो, जसे अर्जुन अडकला. म्हणुनच या प्रकृतिबंधनाला जटिल माया म्हटलेले आहे.

दैवी हि एषां गुणमयि मम् माया दुरत्यया।(७-१४)

अर्जुनाला दुःख झाले, तो दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो. यासाठी स्वतःला ज्ञानी दर्शवतो. जीवनातील दुःख, चिंता हे सर्व आपण स्वतः जाणतो. ही जाण Lower Self (मन)ची असते.

मनुष्याचे शाश्वत Self यासंबंधी ब्रह्म Self, Higher Self, Higher consciousness, True Self अशा विविध शब्दांद्वारे व्यक्त झालेले आहे. तर ईश्वराचा आश्रय, बुद्धियोग, योगयुक्त, आत्मवश हे सर्व शब्द True Self (ज्याचे शाश्वताशी नाते आहे) क्रियाशील होण्यासाठी वापरलेले आहे.

या दोन Self ला आपण जीवात्मा Conscious व परमात्मा Conscious म्हणुनही जाणले तरी ईश्वरभक्तिचे प्रयोजन कळते. (Activation of higher consciousness). या अवस्थेला भगवतगीता बुद्धियुक्त संबोधते. या अवस्थेत दोन्ही Self परस्पर

सहकार्य करतात. दुःखी होणे, चिंता करणे यामुळे बुद्धि भ्रम पावते. म्हणुन " बुद्धियुक्त " प्रयोजन आहे.

"बुद्धियुक्त" अवस्थेत स्वतःचा मार्ग विश्वासाने चालतो. अर्थात जीवननाव वल्हवित असतो(अन्यथा वाऱ्याने वहावी तशी नावेची अवस्था असते). या मार्गात कार्याचा दृढनिश्चय असतो. निष्ठेने कार्यरत असतो. शांति, सुख अनुभवतो.

कार्याद्वारे ईश्वरभक्ति या संदर्भात निष्काम कर्म, कार्यसमर्पण, योग याचा उल्लेख आहे. म्हणुन जीवनविकास या संदर्भात स्वधर्माचरण, फलत्यागासाठी कार्याचा दृढनिश्चय असतो. अर्थात (दुःखाने, संशयाने) विचलित होत नाही.

******

(१३. ११)/२:

" अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञानार्थ दर्शनम् "

Part II

(Philosophy of life:Progressive or Barrier!)

"Your philosophy determines whether you will go for the disciplines or continue the errors. "

- Jim Rohn

मनुष्य जगत असतो. या जगण्याबरोबर नकळत त्याची जीवनविषयक Philosophy बनत असते. ही Philosophy त्याच्या विकासाला पोषक आहे कि, अडथळा करणारी आहे?हाच प्रश्न महत्वाचा असतो.

या सृष्टित पशुही जगतात. तसे मानवही जगतात. चुकीच्या जगण्यामुळेच मात्र मानवाची Born to win but conditioned to loose अशी अवस्था होते. म्हणुन स्वतःचा वर्तमान निरोगी, स्वस्थ करणे मनुष्याचे प्राथमिक दायित्व ठरते. याच दायित्वाची जाण श्रीकृष्णाने अर्जुनाला वेळीच करुन दिली.

समाजात दोष निर्माण झाला तरी लोकांनी जगणे सोडले नसते. कांही अफाट प्रगति साधतात व कांही सतत टिका करतात. "समाजात स्वार्थ, भ्रष्टाचार आहे व चांगल्याचे जगणे कठीण आहे"

असा भाष्याचा सूर कांही लोक लावित असतात. केवळ टिका करुन दोष दुर होत नाही तर नकारात्मक संदेश जातात व वातावरण गढुळ होते.

"A bad mood is often the reason for blaming others; but very often blaming others causes bad feelings in us: the more we blame others, the worse we feel. ”

Leo Tolstoy

मनुष्याची सक्रिय, सकारात्मक, ज्ञानी भूमिकाच समाजातील दोष दुर करण्यास कारणीभूत होते. हाच भगवतगीतेचा स्पष्ट संदेश आहे.

युद्धक्षेत्रावर दुःखी झाल्यामुळे अर्जुनाचे विचारचक्र सुरु होते. चांगला असुनही अर्जुन अशा विचारचक्रात सापडतो कि, स्वतःलाच दोषी धरतो म्हणुन युद्ध न करणे श्रेयस्कर व धर्म समजतो . याचा आधार त्याची जगण्याची Philosophy असते.

स्वतःला अपराधी ठरवुन खिन्न दुःखी अवस्थेत जगत राहणे, निष्क्रिय राहणे, याचा परिणाम मनुष्य सतत स्वतःची सफाई देत, जगावर टिका करुन जगत असतो. शेवटी स्वतःच्या दैवाला किंवा जगालाच दोषी ठरवतो. या संवयीमुळे वर्तमानक्षण गमावतो. जणु नित्य भुतकाळात जगत असतो. हा मानसिक दोष ठरतो. या दोषाचे निदान जगण्याची ज्ञानी(दृढनिश्चयी, स्थिरबुद्धि) व अज्ञानी भूमिका(प्रज्ञावादी) जाणुन करता येते.

सर्वभूतेषु येनैकं भावम् अव्ययम् ईक्षते।
अविभक्तं विभक्तेषु तद्ज्ञानं विद्धि सात्विकम् ।।(१८-२०)

हे विश्व ईश्वर या एकाच धाग्यात मण्याप्रमाणे ओवलेले आहे. मनुष्याचे ठायी याच ईश्वरतत्वाचा वास असतो, ज्यामुळे मनुष्य जीवीत असतो. याच ईश्वराचे ज्ञान विज्ञानासह भगवतगीता सांगते. मनुष्य या ज्ञानाला अध्यात्म म्हणुन ओळखतो. हेच (नित्य-शाश्वत) ज्ञान जीवनविकासाच्या शास्त्राचा आधार आहे. अर्थात जीवनविकासाच्या Philosophy चा आधार आहे. याच आधारावर भगवतगीता वर्तमान जगण्याचे ज्ञान सांगत आहे.

याच(वर्तमान) काळाचे (कालो अस्मि) दर्शन श्रीकृष्णाने विश्वरुपात दिले.

अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञानार्थ दर्शनम् ।
एतद् ज्ञानं इति प्रोक्तं अज्ञानं यदतो अन्यथा।।(१३-११)

"It's always easy to blame others. Blaming others takes time and energy from improving yourself. You can spend your entire life blaming the world, but your success and failures are entirely your own responsibility. "

Paulo Coelho

*********

(१३. ११)/३ :

"एतद् ज्ञानं इति प्रोक्तं अज्ञानं यदतो अन्यथा"

(जीवनविकासाचे ज्ञान कशाला म्हणायचे?)

जीवनविकासात मुलांची शारिरीक तसेच मानसिक वाढ महत्वाची भूमिका बजावते हे डॉ. मारिया मा ॅन्टेसरीने जाणले.

"She used her observations of mistreatment of the children there to read all she could on intellectually disabled children, which led to the creation of her new form of education. "

१९०७ साली प्रथम शाळा डॉ मा ॅन्टेसरीने इटालीत सुरु केली. हीच सुधारीत पद्धती १९१२ मध्ये अमेरिकेत पोहोचली. तदनंतर याच शिक्षणपद्धतीचा जगभर प्रसार झाला.

भगवतगीतेतील अध्यात्माचा भाग मनुष्याची मानसिक शक्ति, आत्मविश्वास वाढविण्यासाठी आहे हा संदेश समाजात रुजला तरच भगवतगीतेतील "योगः कर्मसु कौशलम्" अर्थात कार्यकौशल्याचे महत्व कळते. कार्यकौशल्य साध्य करणे गुणात्मक ज्ञान आहे. हा गुणात्मक शिक्षणाचा भाग होवु शकतो.

मनुष्यातील चांगलेपणाला अध्यात्माची जोड देणे हा संदेश गुणात्मक ज्ञानासाठी भगवतगीता स्पष्ट करते. मनुष्यात चांगलेपणा असला तरी जीवनात दुःख आहे. म्हणुन भगवतगीता अध्यात्माची पर्यायाने मनुष्याला त्याची शाश्वत ओळख देते.

स्वभाव अध्यात्म उच्यते।(८-३)

अर्जुन दुःख टाळण्यासाठी (निष्क्रिय) Shortcut वापरतो. व ज्ञान कशाला म्हणायचे हा प्रश्न उपस्थित होतो.

अर्जुन आपली दुर्बलता सक्षम दिसावी यासाठी ज्ञान वापरतो. या प्रक्रियेत स्वतःचे अज्ञान hide होते जे वास्तव असते. हेच अज्ञान असते . यालाच Illusion (जे जसे आहे तसे न स्विकारणे) म्हटल्या जाते. यामुळे अर्जुनाची भूमिका अज्ञान ठरते. याचसाठी " गुणात्मक ज्ञान" हा भगवतगीतेचा विषय आलेला आहे.

अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्वज्ञार्थदर्शनम्।

एतद् ज्ञानं इति प्रोक्तं अज्ञानं यदतो अन्यथा।।(१३-११)

ज्ञान या संदर्भातच सुखी जीवनासाठी निश्चित संस्काराचे भाष्य भगवतगीतेने केलेले आहे.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

न च अभावयतः शांतिं अशांतस्य कुतः सुखम् ।।(२-६६)

१. निर्णय अधिकार

"कर्मण्येव अधिकारः ते "

स्वतःचा निर्णय अधिकार कळला तर स्वतःच्या मार्गाची दिशा ठरवितो, जबाबदारी स्विकारतो. निर्णयअधिकार स्वतःचे अस्तित्व असते, स्वातंत्र्य असते व तो मनुष्याने मिळविलाच पाहिजे.

Beggars are not choosers.

अर्थात याचसाठी स्वावलंबि होणे(भार न होणे, Asset होणे) आवश्यक असते.

२. स्वभावनियत कार्य (State of Art)

मनुष्य कार्यरत होवुनच स्वावलंबि होतो. स्वतःची ओळख बनवितो.

शरीरयात्रा अपि च तेन् प्रसिद्धेत् अकर्मणः।(३-८)

व्यवहारातील सकाम कार्य निष्काम कार्यात Transform करण्यासाठी "स्वधर्म" या जीवनमुल्याचा उपयोग होतो. स्वभावनियतकार्य याच स्वधर्म जीवनमुल्याचा महत्वाचा एक भाग (इतर Tiebreaker, Self approval) आहे. याला सहजकार्यही (सहजं कर्म कौंतेय) म्हटलेले आहे. स्वतःचे सहजकार्य विकसित करणे हे स्वतःचे दायित्व ठरते. पर्यायाने संस्कार, शिक्षण याचा महत्वाचा हेतु (सहजकार्य विकसित करणे)अभिप्रेत होतो.

"Dr. Montessori’s early research focused on educating young children, but in the 1920s she turned her attention to adolescence. She observed that at this stage of development, students need activities that help them to understand themselves, to find their place in the world, and to blossom into global citizens.

She proposed residential schools where young adolescents—whom she called Erdkinder, or “children of the earth”—could work and live in a trusting community, engaging in real-world activities such as farming or marketing their own handmade goods. By experiencing human interdependence, she believed, students would learn how society is organized and develop the skills needed to meet the world’s challenges in a positive way. "

********

(३. १६)

**********************

अविभक्तं च भूतेषु विभक्तं इव च स्थितम् ।

भूतभर्तृ च तत् ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च॥

************************

१३. १६ :

"अविभक्तं च भूतेषु विभक्तं इव च स्थितम् "

(Universal mind and YOU)

: We are what our thoughts have made us; so take care about what you think. Words are secondary. Thoughts live; they travel far.

Swami Vivekananda

Know that thought power comes from within. Accessing the source of All Power starts by looking inwards.

क्षेत्र म्हणजे शरीर व क्षेत्राला जाणणारा Knower क्षेत्रज्ञ असे शरीरयंत्राचे ज्ञान भगवतगीतेतील क्षेत्रक्षेत्रज्ञ या अध्यायात आलेले आहे. Universal mind सर्व क्षेत्राला जाणणारा क्षेत्रज्ञ असतो.

Your Thought Power is Limitless:

There is a single, intelligent Consciousness that pervades the entire Universe, which is all powerful, all knowing, all creative and present everywhere at the same time - the Universal Mind.

Your mind is part of this One Universal Mind and since your thoughts are a product of your mind, it follows that your thought power too is limitless.

अविभक्तं च भूतेषु विभक्तं इव च स्थितम् ।
भूतभर्तृ च तत् ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च॥(१३-१६)

Once you truly understand that your mind is one with the Single Source of All Power and that this power is within you, you will have found the only true source of infinite power for which nothing is impossible and impossible is nothing.

ज्योतिषाम् अपि तद् ज्योतिः तमसः परम् उच्यते।
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम् ॥(१३-१७)

अध्यात्म या विषयात ब्रह्म, Universal mind जाणण्याचे महत्व आहे, ज्याचा आपल्या विचाराशी सरळ संबंध असतो. Alchemist कार पावलो कोएलो (Paulo Coelho) म्हणतो, इतरांनी कसे जगावे याविषयी लोक निश्चयाने बोलत असतात. पण हाच निश्चय स्वतःच्या जीवनाविषयी नसतो. तो म्हणतो, एखादी गोष्ट करणे कसे अशक्य आहे हेच आम्ही लहानपणापासुन ऐकत आलो असतो. या विचारातच स्वतःचा Inner power लुप्त होतो. याच विचारामुळे मन भय, अपराधिक भावनेने ग्रसित होते.

*"There is only one thing that makes a dream impossible to achieve: the fear of failure. "

"Every blessing ignored becomes a curse. "

Paulo Coelho

*It is we who nourish the Soul of the World, and the world we live in with be either better or worse, depending on whether we become better or worse. And that’s where the power of love comes in. Because when we love, we always strive to become better than we are.

*Intuition is really a sudden immersion of the soul into the universal current of life, where the histories of all people are connected, and we are able to know everything, because it's all written there.

*When you want something(Your dream), all the universe conspires in helping you to achieve it.

Paulo Coelho

******

(१३-१८)

***********************

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं च उक्तं समासतः।

मद् भक्त एतद् विज्ञाय मद् भावाय उपपद्यते।।

*************************

(१३. १८):"मद् भक्त एतद् विज्ञाय मद् भावाय उपपद्यते"

भगवतगीतेच्या क्षेत्रक्षेत्रज्ञयोगात मानसशास्त्रिय भाग (Consciousness क्षेत्रज्ञ) आलेला आहे. मानसिक तज्ञ मानसिक रोगावर उपचार करतात. (सहसा )मानसिक रोगाचे (Stress, Depression) मुळ सुखदुःखात असते. भगवतगीतेचा विषय या सुखदुःखामुळेच उपस्थित झालेला आहे.

अर्जुन दुःखाने विचलित होतो. व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी निष्क्रियतेला धर्म संबोधतो. अर्थात चांगला मनुष्यही दुःखाने विचलित होतो तेंव्हा बुद्धि भ्रम पावते व उलट विचार (धर्माला अधर्म व अधर्माला धर्म) करतो, यामुळे नकारात्मक भाष्य करतो. याच संदर्भात जीवनाला लढाई संबोधले आहे.

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(८-७)

दुःखाने विचलित होणे ही मानसशास्त्रिय हार ठरते. व जिंकणे म्हणजे दुःखाने विचलित न होता अडचणीला जीवनविकासातील Stepping stone जाणणे. अर्थात अडचणी विकासातील संधी ठरतात. याच संदर्भात जीवनाचे ज्ञानविज्ञान(अशाश्वत-शाश्वत) सांगुन भगवतगीता जीवनाची श्रेष्ठ अवस्था व सामान्य अवस्था यांतील भेद स्पष्ठ करते.

ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः॥(९-२८)

अर्थात जीवनाची लढाई जिंकण्यासाठी ईश्वराचा आश्रय (ईश्वरभक्त)याचे ज्ञानविज्ञान व महत्व सांगते. हेच ज्ञान क्षेत्र(शरीर ) क्षेत्रज्ञ(जाणणारा) योगात स्पष्ठ केले. याच संदर्भात म्हटले आहे,

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं च उक्तं समासतः।

मद् भक्त एतद् विज्ञाय मद् भावाय उपपद्यते॥(१३-१८)

*********

(१३-१९)

************************

प्रकृतिं पुरुषं चैव विद्धि अनादी उभौअपि।

विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृति संभवान् ।।

**************************

(१३. १९)

:"प्रकृतिं पुरुषं चैव विद्धि अनादि उभौअपि"

(Science of Nature and Progress)

Science of NATURE:

*प्रकृति व पुरुष:

सृष्टिचे सृजन प्रकृति व पुरुष या दोन तत्वापासुन होते. अनादि काळापासुन हेच सत्य आहे.

प्रकृतिं पुरुषं चैव विद्धि अनादी उभौअपि।(१३-१९)

सत रज तम या तीनगुणांनी प्रकृति बनलेली आहे. हेच तीन गुण पुरुष या शाश्वत तत्वाला बद्ध करतात.

सत्वं रजः तम इति गुणाः प्रकृतिः संभवः।
निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनम् अव्ययम्।।(१४-५)

*पुरुष-पुरुषोत्तम:

ज्या मुळ तत्वाचा पुरुष अंश आहे तो पुरुषोत्तम, परमात्मा म्हणुन ओळखल्या जातो.

उपद्रष्टा अनुमंता च भर्ता भोक्ता महेश्वरः।
परमात्मा च अपि इति उक्तः देहेअस्मिन पुरुषः परः।(१३-२२)

स्वतःचे ठायी याच शाश्वत तत्वाचे अस्तित्व ध्यान किंवा कार्याद्वारे अनुभवतो. अनुभवणे, जाणणे या संदर्भात क्षेत्र-क्षेत्रज्ञ Consciousness या शब्दांचे प्रयोजन आहे.

ध्यानेन् आत्मनि पश्यन्ति केचित् आत्मानम् आत्मनः।
अन्ये सांख्येन् योगेन कर्मयोगेन् च अपरे।।(१३-२४)

"To be conscious of knowing God is to know about God and self. "

Meister Eckhart

PROGRESS:

१. विकासमार्ग:

सत् चित्तआत्मा, आत्मोन्नति, जितात्मनः, आत्मवश, बंधुःआत्मा हे सर्व शब्द जीवनविकास, आत्मविकास या संदर्भातच संदेश देत असतात. तर "अमृतत्वाय कल्पते" हा शाश्वत मार्ग (विकासाचा राजमार्ग) असतो. या मार्गावर अनन्यभक्ति घडते.

२. सुखदुःख -कार्य:

कार्यकारण ही प्रकृति असते तर सुखदुःखाचा, गुणाचा भोक्ता पुरुष असल्यामुळे शाश्वत तत्व गुणाने बद्ध असते . याच स्थितिमुळे जन्म घेत असतो.

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।

पुरुषं प्रकृतिस्थोही भुंक्ते प्रकृतिजान् गुणान्।

कारणं गुणसंगोअस्य सत् असत् योनि जन्मसु।।(१३-२१)

३. प्रकृतितील Strength व Weakness

कार्य ही विकासमार्गातील Strength असते. तर द्वंद्वाच्या जाळ्यात अडकणे हा विकासमार्गातील अडथळा असतो. (परिपन्थिनौ) म्हणुन स्वधर्म, कार्याचा दृढनिश्चय निर्द्वंद्व अवस्था दर्शवित असते.

४. जीवनातील Strength व Weakness:

विचलित होणे, भय, चिंता हे Weakness असतात. तर कार्याद्वारे योग(दुःखान्त) साध्य करणे हे विकासमार्गात कार्यकौशल्य असते. "योगः कर्मसु कौशलम्"

"You were put on this earth to achieve your greatest self, to live out your purpose, and to do it courageously. "

Steve Maraboli

*********

(१३-२०)

************************

कार्यकारण कर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।

पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते।।

**************************

(१३. २०) :"कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते"

निसर्ग कार्यरत असते, ही प्रकृतिची Strength असते. पक्षी उड्डान करतात, घरटे बांधतात. मधमाशी मधनिर्मिति करते. या प्राण्यांनी कोणतेही ज्ञान घेतले नसते. ती Born gift असते. "कार्य" मनुष्याची Born gift असते. (कर्मानुबंधिनी मनुष्यलोके). कार्याद्वारे विकास होतो, मनुष्याची ओळख बनते.

महाधनुर्धर अर्जुनाची ओळख होती. धर्मयुद्धासाठी (धनुर्धर)अर्जुन व सारथी भूमिकेत (ज्ञानी)श्रीकृष्ण युद्धमैदानावर येतात. प्रत्यक्ष कार्याचा क्षण येतो, तेंव्हा अर्जुन दुःखी होतो. युद्ध न

करणे योग्य जाणुन निष्क्रियतेचे समर्थन करतो, यासाठी "ज्ञान" वापरतो.

महाभारतातील या घटनेतुन भगवतगीता जगासमोर आली. जीवनातील दुर्बलता दृष्टिक्षेपात आली. व जीवनविकासाचा मार्ग स्पष्ट झाला.

१. कार्य:

कार्य जीवनविकासाचे साधन आहे. प्राप्तिसाठी कार्य, प्रश्न सोडविण्यासाठी कार्य आवश्यक असते.

२. सुखदुःख :

प्राप्तिसुख या संदर्भात भोगैश्वर्य(पैसा, फेम), किर्ति जाणतो, पण याचेच अभावाने, परिणामभयाने दुःखी होतो. म्हणुन निश्चित मार्गासाठी निष्काम कार्याचे प्रयोजन आहे.

सुखासाठी कार्यरत असतो पण दुःखामुळे दुबळ्या अवस्थेला प्राप्त होतो, नकारात्मक होतो. म्हणुन शाश्वत सुख, दुःखमुक्ति,

योग(दुःखान्त), शांति, स्थितप्रज्ञ हा विषय आला. "कार्याद्वारे योग(दुःखान्त, Strong) अर्थात Strong होणे "हा विषय बनला.

स्वतःला Strong करणे याचसाठी Motivation असते.

३. अशाश्वत - शाश्वत

"कार्याद्वारे Strong होणे"(अविचल, योग, निर्भय, धैर्य)या विषयाअंतर्गत जीवनाचे ज्ञानविज्ञान आले. ईश्वरज्ञान याच ज्ञानाच्या संदर्भात आहे.

अशाश्वत प्रकृति व शाश्वत ईश्वर(पुरुष तत्व) याद्वारा जीवन चालु असते. प्रकृति कार्य करते, पुरुष (ईश्वर) ज्ञान, सुखदुःख जाणिव देते.

कार्यकारण कर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते॥(१३-२१)

प्रकृतित कार्य Strength असते, तर कार्यातील इच्छाद्वेष द्वंद्व Weakness असतो. या द्वंद्वाच्या Trap मध्ये सापडल्यामुळे जीवंत

तत्वातील ज्ञान (प्रकाश)जाणत नाही. म्हणुन जीवनात ईश्वर Supreme नियंत्रक जाणुन त्याचा आश्रय करणे ज्ञानाचा आश्रय ठरतो. ज्ञानामुळे मार्ग पक्का होतो. योगासाठी कार्यरत होतो.

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंच्छिन्नसंशयम् ।(४-४१)

अर्थात ईश्वराचा आश्रय करुन मार्ग पक्का करणे व ईश्वरभक्तिसाठी कार्य करणे. हे तत्व कार्याद्वारे Strong होणे यासाठी वापरलेले आहे.

जसे भोगैश्वर्य(Sensesसुख)सुख देते, तसेच चांगले कार्य, चांगलेपणा आत्मिक सुख देते. चांगलेपणा ईश्वराचा दैवीगुण(Divine)आहे. पण याच चांगलेपणामुळे अर्जुन दुःखी होतो. म्हणुन ईश्वराच्या ठायी असलेले शाश्वतसुख (शांति, दुःखान्त)ज्ञान आहे. याच शाश्वत सुखासाठी अभ्यासयोग आहे.

शांतिनिर्वाणपरमां मत्संस्थाम् अधिगच्छति।(६-१५)

जीवनात कार्याचे महत्व ही भगवतगीतेची प्राथमिकता आहे, जे निसर्गाचे gift आहे, म्हणुन कार्याद्वारे योग साध्य करणे हे प्रयोजन आहे.

अभ्यासेअपि असमर्थोअसि मत्कर्म परमोभव।(१२-१०)

४. ज्ञान:

"प्राप्तिसाठी कार्य" या संदर्भात सुखासाठी भोगैश्वर्य प्राप्तिसुख (State of want)अशी धारणा असते. पण याच मार्गात संशयामुळे परिणामभय असते, व निष्क्रिय होतो. निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान वापरतो. अर्थात अज्ञानी अवस्थेला ज्ञानी दर्शविण्याचा हा प्रयत्न असतो. म्हणुन "ज्ञान"व ज्ञानाची विकासमार्गात भूमिका हा विषय समोर आला.

ज्ञान प्रकाश आहे. जीवनातील अंधार दुर करण्यासाठी ज्ञान असते. जगात ज्ञानविज्ञान आले. याचा उपयोग कार्यासाठी होतो. अखेर सर्व कार्याचे ज्ञानात (ईश्वर-ज्ञानस्त्रोत)विलिनीकरण होते. याप्रमाणे ज्ञानविज्ञान ते कार्य व कार्य ते ज्ञान असा ज्ञानाचा प्रवास असतो. या प्रवासात कार्य माध्यम ठरते.

शिक्षणात ज्ञानविज्ञान प्राप्त करतो. हे ज्ञान संख्यात्मक ठरते. या ज्ञानाचा कार्यासाठी उपयोग करणे गुणात्मक ज्ञान ठरते.

५. वर्तमानातील वास्तव (भाष्य व वास्तव समन्वय):

समाजात भाष्य चालते, निसर्गात घटना(कार्य)घडते.

जसे अर्जुन भाष्य(प्रज्ञावाद) बोलतो व अज्ञानी अवस्थेला ज्ञानी दर्शविण्याचा प्रयत्न करतो. यांत भाष्याचा हेतु स्वतःचे मनसमाधान(सुख) असते. यांत वर्तमानातील वास्तव hide होते. असेच समाजात कधी आपले हीत साधण्यासाठी (व्यवहार)भाष्य असते . तसेच "ज्ञान" म्हणुन किंवा "ज्ञानी"म्हणुनही भाष्य चालु असते. वर्तमानातील वास्तव जाणुन भाष्याचा कार्याशी समन्वय साधण्यासाठी संवाद आवश्यक असतो,

६. स्वधर्म :

समुहकार्यात निर्णय होतो. या निर्णयाद्वारे मनुष्याचे नियतकार्य निश्चित होते. नियतकार्याला स्वधर्म जाणला तर स्वतःचा मार्ग निश्चित होतो व निष्ठेने कार्यरत होतो.

७. निर्णय :

कार्याचा निश्चय स्वतःच्या निर्णयाने होतो. निर्णयज्ञान नसेल तर स्वतःच्या निर्णयासाठी परावलंबि असतो. स्वनिर्णयामुळे स्वतःच्या मार्गाचे awareness असते. जबाबदारी जाणतो, निर्णयक्षमतेचे महत्व कळते. यासाठी निर्णय अधिकाराचे/निर्णयक्षमतेचे महत्व आहे. Strong होण्यासाठी(त्रायते महतो भयात् )कर्मयोग आहे. कार्याचा दृढनिश्चय कर्मयोगाचा पाया आहे.

शेवटी श्रीकृष्ण म्हणतात,

कार्य घडणारच आहे. निर्णय तुझा आहे!

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)

****

(१३-२०)/२:

"पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते"

(Happiness & Spirituality connection )

अध्यात्म भारतीय संस्कृतिची ओळख आहे. जगतकल्याण असो, समुहकल्याण असो कि व्यक्तिगत (जीवन) विकास असो, यांत अध्यात्म Weakness नसुन Strength आहे हे स्वामी विवेकानंदांनी जगाला दर्शवुन दिले. भगवतगीता हेच सत्य ज्ञानविज्ञानासह स्पष्ट करते.

जीवनविकासात कार्य व सुखदुःख हे मुख्य पैलु असतात. कार्याद्वारेच विकास होतो. देवतांकडे इच्छापुर्तीची कामना करणे अशी दैववाद्यांची मानसिकता असते हा समाजात समज असतो. भगवतगीता यावर भाष्य करते.

कर्मैंद्रियैः कर्मयोगं असक्तः स विशिष्यते।(३-७)

काङ्क्षतः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः।(४-१२)

भगवतगीता ईश्वराची कर्म या संदर्भात विश्वाचा अध्यक्ष, दैव या संदर्भात अधिदैव अशी निश्चित ओळख देते.

कर्म, सुखदुःख व अध्यात्म

(Logic of Attachment/Detachment)

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते।।(१३-२०)

Soul is part of kingdom of God. Our soul experience happiness and misery. The cause of distress is attachment of painful thoughts. The negative emotions (Thoughts undergone physiological process forms emotion)cause stress.

Positive emotions helps empowerment of soul. Detachment is free from negative emotion, it is attachment of positive glorious vibrations of prosporous thoughts in kingdom of God. Purpose of spirituality thus is happiness.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

विश्वकल्याणाच्या भूमिकेसाठी ज्याची विश्वाचा अध्यक्ष अशी ओळख दिली, त्याच ईश्वराचे मनुष्याच्या आत्म्याशी नाते जीवनविकासासाठी स्पष्ट केले. व जीवनविकासाचा Standard (अमृतत्वाय कल्पते) मार्ग सांगितला, ज्या मार्गावर (दुःखाने)व्यथित(विचलीत) होत नाही व अखंड(नित्य) आत्मोन्नतिचा मार्ग बनवतो.

याप्रमाणे कार्याद्वारे ईश्वरभक्ति म्हणजेच निष्काम कर्म व यासाठी जीवनविकासमार्ग(अमृतत्वाय कल्पते) ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते.

*****

(१३-२१)

***********************

पुरुषं प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान् ।

कारणं गुणोअस्य सत् असत् योनि जन्मसु।।

*************************

१३. २१ :

"पुरुषं प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान् "

(Attitude affects Outcome of our lives)

मनुष्याच्या जगण्याचा परिणाम त्याच्या Internal प्रगतिवर होतो. ही Internal प्रगति म्हणजे आत्मोन्नति असते. गुण या संदर्भात प्रकृति व प्राणतत्व, ईश्वराचा अंश या संदर्भात पुरुष मनुष्यजीवन Constitute करते. जसे एखाद्या यंत्राला वीजपुरवठा होतो व यंत्राच्या स्वभावानुसार (Function) यंत्र चालते. तसेच प्रकृति स्वभावानुसार कार्यरत असते. या गुणाला पुरुष/आत्मा भोगत असतो. अर्थात सुखदुःख भोगत असतो. (म्हणुन प्रसन्नात्मा शब्दाचे प्रयोजन आलेले आहे)

कार्यकारण कर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते।।(१३-२०)
पुरुषं प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान् ।
कारणं गुणोअस्य सत् असत् योनि जन्मसु।।(१३-२१)

याचाच अर्थ प्रकृति कार्यरत असते, आत्मा सुखदुःख भोगत असतो. येथेच Attitude चे महत्व justify होते.

Our attitude has a great deal to do with the outcome of our lives. It also affects our happiness. A story of a shoe salesman who was sent to a remote part of the country.

When he arrived, he was dismayed because everyone went around barefooted. He wired the company back home: “No prospect for sales here. People don’t wear shoes. ” Later another salesman

went to the same territory. He too immediately sent word to the home office, but his telegram read, “Great potential! People don’t wear shoes here!” Heard the saying? One man’s disaster, another man’s opportunity.

"Having a positive mental attitude is asking how something can be done rather than saying it can't be done. "

Bo Bennett

*******

(१३-३१)

**************************

अनादित्वात् निर्गुणत्वात् परमात्मा अयम् अव्ययः।

शरीरस्थोअपि कौन्तेय न करोति न लिप्यते।।

**************************

(१३-३१)

:

"अनादित्वात् निर्गुणत्वात् परमात्मा अयम् अव्ययः"

(Laws of Universe & its application)

Law of gravity चा शोध लागला म्हणुन फळ झाडावरुन खाली पडत नाही. ती नैसर्गिक प्रक्रिया आहे व या प्रक्रियेतील Gravity हा नियम आहे. कोणताही धर्म आहे म्हणुन ईश्वर आहे असे होत नाही. ईश्वराचे अस्तित्व या सृष्टिसंचलनातील सत्य आहे. हे भगवतगीता सांगत आहे.

मया ततम् इदं सर्वं जगत् अव्यक्तमूर्तिना।

मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेषु अवस्थितः।।(९-४)

ईश्वरज्ञान जाणत नाही म्हणुन जीवनाचे जन्ममृत्युचक्र थांबत नाही किंवा जीवन जगणे थांबत नाही. जसे Gravity चा नियम विकासासाठी करण्यात येतो, तसेच ईश्वरतत्वाचा उपयोग जीवनविकासात, सृष्टिसंचलन Regulate करण्यासाठी होतो. या ईश्वरतत्वास सनातन (अनादि), अव्यक्त, अव्यय, गुणातीत तत्व म्हणुन ओळख आहे.

अनादित्वात् निर्गुणत्वात् परमात्मा अयम् अव्ययः।
शरीरस्थोअपि कौन्तेय न करोति न लिप्यते।।(१३-३१)

*अहंकार vs. बुद्धियोग(ईश्वराचा आश्रय)

जीवनयात्रेत मनुष्य दुःखी होतो. दुःखामुळे मानसिक दुबळा होतो. दुबळेपणामुळे अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. व याचे कारण अहंकार असतो. मनुष्याच्या या संवयीमुळे ज्ञानविज्ञान असुनही त्याचा उपयोग करण्यास असमर्थ ठरतो. हेच जीवनाचे सत्य भगवतगीतेने प्रकाशात आणले आहे.

ईश्वरतत्वच मनुष्याच्या हृदयात स्थित आहे व Mind functioning साठी सक्रिय भूमिका ठरते. अहंकार Mind functioning faculty आहे. ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी अहंकाराचे ईश्वरज्ञानाने Replacement भगवतगीता सांगत आहे. हेच अध्यात्मज्ञान म्हणुन ओळखल्या जाते.

अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।

मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वाम् नियोक्ष्यति।।(१८-५९)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।

भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

व्यवहारातील मार्ग सकाम असतो. यांत कार्य साधन असते. तर हेच कार्य "अमृतत्वाय कल्पते" या मार्गात स्वधर्म जाणत असतो. सकाम कार्याचे निष्काम कार्यात Transformation होण्यासाठी वरील अध्यात्मज्ञानाचा वापर करण्यात येतो.

********

(१३-३३)

************************

यथा प्रकाशयति एकः कृत्स्नं लोकं इमं रविः।

क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत॥

**************************

(१३-३३) :

"यथा प्रकाशयति एकः कृत्स्नं लोकं इमं रविः"

(जीवन प्रकाशीत होणे Know Thyself)

भगवद् गीतेचे ज्ञान Exclusively मनुष्याला सक्षम करण्यासाठी आहे. या जीवनात दुःखामुळे मनुष्य स्वतःला दुबळा जाणतो. हताश होतो. नकारात्मक होतो. अज्ञान असुनही स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान सांगतो. जगाने काय करावे यावरही भाष्य करतो. पण स्वतःला जाणत नाही!

"Life is not a problem to be solved, but a reality to be experienced. "

भगवद्-गीता स्वर्गात जाण्याचा मार्ग सांगत नाही, तर या जीवनात जीवन जगतांनाच स्वर्गाविषयी मनुष्याच्या ज्या संकल्पना असतात व त्यामुळे अर्जुनाच्या बुद्धित कसा गोंधळ निर्माण होतो, याचे प्रात्यक्षिक भगवद् गीतेत आढळते. या गोंधळाचे प्रत्यक्षातील कारण स्पष्ट होते .

या जीवनात मनुष्याला स्वर्गाचा आनंदच (experience of reality and happy life) अनुभवण्याची संधी आहे. यावर भगवद्-गीता प्रकाश टाकते. हा प्रकाश भगवद् गीतेचे ज्ञान आहे. याच प्रकाशासंदर्भात

"अंधार vs प्रकाश", "अज्ञान vs ज्ञान", "बंधन vs. मोक्ष ", क्षेत्र-क्षेत्रज्ञ" हाच भगवद्-गीतेचा विषय आहे.

धर्म या संदर्भात न्याय-अन्याय (योग्य-अयोग्य) यावर भाष्य होते. याचमुळे महाभारत हे धर्मयुद्ध ठरले असते. पण याच धर्माचा उपयोग अर्जुन स्वतःला (निष्क्रिय स्थिति) योग्य सिद्ध करण्यासाठी करतो. भगवद् गीता या संवयीला "अहंकार " हे कारण दर्शविते.

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।

मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृति स्त्वाम् नियोक्ष्यति।।(१८-५९)

येथे प्रकृतिच्या निर्देशानुसार जगत असतो. व स्वतःला कर्ता ठरवितो. अहंकारामुळेच "मी कर्ता" जाणुन मनुष्य स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी जगाने सुधारावे (मी नाही सुधारणार!) ही इच्छा करतो. व जगावर टिका करतो. पण ईश्वराने या जीवनाद्वारे मनुष्याला संधी दिली आहे. या संदर्भात कर्ता ईश्वर असतो. तो अंधार मिटविणारा प्रकाश आहे, अज्ञान दुर करणारे ज्ञान आहे.

अनादित्वात् निर्गुणत्वात् परमात्मा इति अव्ययः।
शरीरस्थोअपि कौन्तेय न करोति न लिप्यते॥(१३-३१)

यथा प्रकाशयति एकः कृत्स्नं लोकं इमं रविः।
क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत॥(१३-३३)

प्रकाशामुळेच डोळे पाहु शकतात. देहाचे ठायी असलेला परमात्मा (विश्वाचा क्षेत्रज्ञ) प्रकाश असतो. जसा सूर्य विश्वाला प्रकाशीत करतो. विश्वाचा क्षेत्रज्ञ प्रकाश असतो. क्षेत्रज्ञ या नात्याने परमात्मा मनुष्याशी जोडलेला असतो. यामुळेच (शरीराचा) क्षेत्रज्ञ (Consciousness) या देहाला जाणतो.

सार :

Honor your own life. Choice is yours !

आत्मैव हि आत्मनो बंधूः आत्मैव रिपूः आत्मनाः।।

*******

(१३-३३):"क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत"

( Own light)

"One may read, listen and learn everything. But after doing all this he has confusion. Kabir is at pains to explain that confusion is the root of sorrow. "

" पढ़ा सुना सीखा सभी, मिटी ना संशय शूल |
कहे कबीर कैसो कहू, यह सब दुःख का मूल ||

मनुष्य ज्ञानी असो कि अज्ञानी!श्रीमंत असो कि गरीब!चांगला असो कि वाईट! सर्वच या भूतलावर जगत असतात. ज्ञानी आहे, चांगला आहे तरीपण अर्जुनाची जगण्याची हतबल झालेली दशा व त्याचे दर्शन याची ओळख अर्जुनविषादयोगात भगवतगीता करुन देत आहे.

कांट म्हणतो,

"One who makes himself a worm cannot complain afterwards if people step on him. "

अर्जुन ज्ञानी असतो, पराक्रमी असतो, चांगला असतो यात शंका नाही पण चांगलेपणा, ज्ञान यांचे नांव पुढे करुन प्रत्यक्षात त्याची दुर्बल व निष्क्रिय अवस्था हे वास्तव असते. याला "क्लैब्य" संबोधण्यात आले.

या विश्वात कोणते सत्य जाणायचे आहे?यावर सॉक्रेटिसचे उत्तर असते, "Know Thyself" !याच संदर्भात वर्तमानात जीवन जसे आहे, त्याची दशा (वास्तव)

जाणुन घेणे. हे मनुष्याचे प्रथम दायित्व आहे.

"The acknowledgment of our weakness is the first step in repairing our loss. "

Thomas a Kempis

भगवतगीता जीवनयात्रेतील अज्ञान व ज्ञान या संदर्भात अंधार व प्रकाश यावर भाष्य करते. या पार्श्वभूमिवर

मनुष्याची जीवनयात्रा भयाने (अंधार) मार्गदर्शित होत आहे कि प्रकाशाने?हाच प्रश्न असतो.

अज्ञानेन् आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

भगवतगीता मनुष्याची जीवनयात्रा व या प्रवासातील अशाश्वत( क्षेत्र, प्रकृति)व शाश्वत (क्षेत्रज्ञ, पुरुष)तत्व याचे रहस्य व भूमिका सांगत आहे. प्रत्येक क्षणाला कार्य घडते, याचाच अर्थ जीवनयात्रा नित्य सुरु असते. या यात्रेतील प्रवास आत्म्याचा असतो. म्हणुन हा प्रवास "अमृतंगमय" व्हावा हे भगवतगीतेला

अपेक्षित आहे. याच मार्गावर मनुष्य व्यथित होत नाही . दुःखाने दुबळा व निष्क्रिय होत नाही.

Darkness vs Light

अज्ञानेन् आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।

Vs.

क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत।

"The present system cannot be changed unless it is replaced properly. "

अंधार प्रकाशानेच मिटतो. कबीर म्हणतात,

बुरा जो देखन मैं चला, बुरा न मिलिया कोय,

जो दिल खोजा आपना, मुझसे बुरा न कोय।

सूर्य सृष्टिला प्रकाशित करते पण मनुष्य सृष्टितील अंधार शोधत असतो. समाजातील दोष दर्शवुन टिका करणे ही समाजातील संवय असते. कारण काय योग्य आहे यापेक्षा काय अयोग्य काय आहे यावर चर्चा करणे सोपे असते. आणि काय योग्य आहे?व कोण

करेल? हा प्रश्न अनुत्तरीत असतो. याच पार्श्वभूमिवर स्वतःची भूमिका महत्वाची असते.

भगवतगीतेचे उत्तर आहे, "Personal Loyalty"

(स्वतःशी प्रामाणिकता)

आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपु आत्मनः"(६-५)

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव।(१६-५)

"We are each gifted in a unique and important way. It is our privilege and our adventure to discover our own special light. "

~Evelyn Dunbar

यथा प्रकाशयति एकः कृत्स्नं लोकं इमं रविः।

क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत।।(१३-३३)

*********

(१३-३४)

***********************

क्षेत्रक्षेत्रज्ञ योः एवं अंतरं ज्ञानचक्षुषा।

भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुः यान्ति ते परम् ।।

*************************

(१३. ३४):

"क्षेत्रक्षेत्रज्ञयोः एवं अंतरं ज्ञानचक्षुषा"

"To have the power and the courage to respond, you must see the need and feel the greatness of the times in which you live. ”

ईश्वरश्रद्धेचा जीवनात उपयोग "धर्म"संदर्भात असतो, इतकीच ओळख मनुष्याला असते. याच श्रद्धेचा मानसशास्त्रिय उपयोग भगवतगीतेने स्पष्ट केला आहे.

संपुर्ण विश्व भौतिक पातळीवरील प्रदुषणाविषयी जागृत होत आहे पण मानसिक प्रदुषणाविषयी जागृत नसतो. प्रत्येकाची

चेतना(क्षेत्रज्ञ, Consciousness) संपुर्ण मानवी चेतनेचाच(Universal mind) भाग असतो. यामुळे प्रत्येक व्यक्ति आपापल्या मानसशास्त्रिय पातळीवर जे जे काय करीत असतो, अनुभवत असतो, त्या सर्वांची तो समस्त मानवी चेतनेत भर टाकीत असतो.

अविभक्तं च भूतेषु विभक्तं इवच स्थितम् ।
भूतभर्तृ च तद् ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च॥(१३-१७)

मनुष्य जे जे काय करतो, ते योग्य समजुनच करतो. तो स्वतःचे सुख शोधत असतो, स्वतःच्या अस्तित्वाची दखल घेत असतो. या प्रयासात निष्क्रिय झाला तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानभाष्य बोलतो. अर्थात संस्कारीत नसला तरी स्वतःला ज्ञानी दर्शविण्याचा हा प्रयत्न असतो. या प्रयासातील नकारात्मक भाष्य अज्ञानाला ज्ञानी ठरविण्यासाठी केलेला प्रयत्न असतो. यामुळे अंधाराचीच भर पडत असते.

जीवनात जेंव्हा अटितटीचे प्रसंग येतात व या प्रसंगी कोणती चाल मनुष्य चालतो, हे जीवनविकासात महत्वाचे ठरते. Right

move उच्च स्तरावर नेते. Wrong move घसरण असते किंवा No move विकास थांबवते, याचे कारण( Right time) वेळेची ओळख नसते. याच वेळेची ओळख भगवतगीतेत "कालो अस्मि" द्वारा (Right Time) अर्जुनाला करुन दिली.

"Right move at Right time"

युद्धप्रसंगी अर्जुनामधील मानसिक Disorder दुर करण्यासाठी श्रीकृष्णाने याच वेळेला RightTime ठरविले. युद्धप्रसंगापुर्वी श्रीकृष्ण हे ज्ञान (महत्वाचे जर होते?)केंव्हाही सांगु शकले असते. पण गरज नसतांना या ज्ञानाचे प्रयोजन नव्हते. वर्तमानातील विज्ञानयुगात या ज्ञानाला कालबाह्य ठरविणारा वाद जगात चालत असतो.

चांगला, विद्वान असला तरी मनुष्याला जीवनात अडचणी येतात, तेंव्हा मनुष्य (कार्याची)Move टाळतो किंवा भ्रमामुळे चुकीचा निर्णय करतो. जीवनातील वेळेचे स्वतःचे महत्व असते, त्याची मनुष्याला ओळख व्हावी हाच भगवतगीतेचा प्रयास आहे. क्षेत्रक्षेत्रज्ञ ज्ञान जाणुन वेळेचे महत्व जाणणे, जेणेकरुन योग्य move करण्यास समर्थ होईल. ही Right move(मानसशास्त्रिय )उपाय

असतो. याच संदर्भात स्वधर्म(Self approval, Tiebreaker, समर्पण), निष्काम कर्म(दृढनिश्चय), बुद्धियोग(भ्रममुक्त) ज्ञान सांगितले. या ज्ञानात

* निर्णयप्रक्रियेचे महत्व कळते.

*समुहातील निर्णयावर स्वधर्माचे स्वतःचे शिक्कामोर्तब याचे महत्व कळते.

*बुद्धिभ्रम vs बुद्धियोग याचे महत्व कळते.

*अव्यय ईश्वराची ओळख जाणुन ईश्वरश्रद्धेचा ज्ञानासाठी उपयोग कळतो. हीच मानसिकता ज्ञानाचा जीवनात उपयोग करण्यास समर्थ करते.

क्षेत्रक्षेत्रज्ञयोः एवं अंतरं ज्ञानचक्षुषा।
भूतप्रकृति मोक्षं च ये विदुः यान्ति ते परम् ।।(१३-३४)

"जिंदगिमे जीतना या हारना जरुरी नही।जिंदगि खेल है, खेलना जरुरी है।"

******

(१३. ३४)/२ :

भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुः यान्ति ते परम् "

(स्वातंत्र्याचे संस्कार-Process of liberation)

"When you look in the mirror, what do you see?

Do you see the real you, or what you have been conditioned to believe is you?

The two are so, so different.

One is an infinite consciousness capable of being and creating whatever it chooses, the other is an illusion imprisoned by its own perceived and programmed limitations. "

-David Icke

"आफ्रिकेत एक वनअधिकारी सिंहिणचे पालन करतो. तीला एल्सा नांव देतो. कांही दिवसानंतर त्याला वाटते, एल्साने वनात मुक्तजीवन जगावे म्हणुन वनात सोडण्यासाठी नेतो. पण ती वनातील संघर्षाला तोंड देवु शकत नाही व परत मालकाकडे येते. दोनतीन प्रयत्न असेच निष्फळ ठरतात. शेवटचा प्रयत्न मात्र सफल होतो. एल्सा अशी हाक दिल्यावरही परत येत नाही. "

निर्भयता सिंहाचा जन्मसिद्ध स्वाभाविक गुण आहे. आत्मविश्वास जीवनाची उर्जा असते. पिंजऱ्यातील Conditioning मुळे सिंहिण स्वाभाविक गुण विसरते. "Born to win but conditioned to loose".

स्वातंत्र्य मनुष्याचा स्वाभाविक गुण व जन्मसिद्ध अधिकार आहे. म्हणुन मनुष्य स्वातंत्र्यप्रिय आहे पण स्वातंत्र्याचेही संस्कार असतात. मनुष्याचे संस्कारविहिन स्वातंत्र्य स्वैरता ठरु शकते. भगवतगीतेतील बंधन-मोक्ष ज्ञान हेच स्वातंत्र्याचे संस्कार व गुणात्मक ज्ञान ठरते.

Herd morality:

इच्छाद्वेष समुत्थेन द्वंदमोहेन भारत।सर्वभुतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप।।(१३-२७)

जगातील बहुसंख्य लोक सामान्यजीवन जगत असतात. नकारात्मक मानसिकता असली तरीही स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतात. यामुळे अज्ञान -ज्ञान यातील भेद जाणत नाही. येथे अहंकाराचा आश्रय असतो. हेच बंधनाचे जाळे असते. हीच Herd morality ठरते.

Master morality:

जीवनमार्गातील ज्ञान-अज्ञान याचे निश्चित ज्ञान असते. श्रेष्ठतेची निश्चित व्याख्या येथे स्पष्ट होते व "ज्ञानी" व अज्ञानी यांचा हाच आधार आहे.

१. एषा तू अंतगतं पापं जनाणाम् पूण्यकर्मणाम् ।ते द्वंदमोहनिर्मुक्ता भजन्ते माम दृढव्रताः।।(७-२८)

२. यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

Transformation of Herd morality into Master morality.

अर्थात आध्यात्मिक क्रांति.

ज्ञान-अज्ञान हाच Transformation चा आधार असतो.

क्षेत्रक्षेत्रज्ञ योः एवं अंतरं ज्ञानचक्षुषा।

भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुः यान्ति ते परम् ॥(१३-३४)

प्रकृतिने (गुण) शाश्वत तत्वाला बद्ध केले आहे. मनुष्याचे जीवित तत्व (Living entity) याचाच परिणाम असतो. क्षेत्र(शरीर) व शरीराला जाणणारा (Knower, ) यातील भेद जाणतो, याद्वारेच Consciousness व मार्ग यांचा (Higher consciousness- Higher Path) परस्पर संबंध जाणतो.

१. Right:अधिकार

कार्याचा निर्णय अधिकार स्वतंत्रतेचा पाया आहे.

यासाठी स्वावलंबन या मुल्याचा वापर करणे.

Beggars are not choosers.

२. Standard path of lifejourney:

जीवनयात्रेचे अंतिम धाम ईश्वर आहे. अर्थात जीवनविकासाचा Standard मार्ग "अमृतंगमय" ठरतो. या मार्गावर उच्च मानसिकता( Higher consciousness क्रियाशील असणे)असते.

३. कर्मयोग:

कार्याचा एकनिश्चय असणे. Determination यासाठी वचन Commitment या जीवनमुल्याचा वापर करणे. यांत फलत्याग असतो. अर्थात समत्वयोग साध्य करतो.

४. कर्मसंन्यास:

समुहातील निर्णयाला स्वतःचा करण्यासाठी "स्वधर्म " या जीवनमुल्याचा वापर करणे. कार्य ईश्वराला समर्पित होते. यामुळे नैष्कर्मसिद्धि लाभते.

सार:

"Without self knowledge, without understanding the working and functions of his machine, man cannot be free, he cannot govern himself and he will always remain a slave. "

George Gurdjieff

*******

# अध्याय १४

# गुणत्रयविभागयोग

# (Three modes of nature)

अध्याय १४

गुणत्रयविभागयोग(Three modes of nature)

अध्याय १३ पासुन मनोवैज्ञानिक ज्ञानास सुरुवात झाली. १३ मध्ये Consciousness ज्ञान व विकास या संदर्भात प्रकृति(गुण)-पुरुष (शाश्वत)याचा उल्लेख आला. ज्या प्रकृतिगुणामुळे पुरुष(शाश्वत)बद्ध असतो, त्या गुणांचे सविस्तर वर्णन व विकासज्ञान प्रस्तुत अध्यायात आलेले आहे. यांच गुणांचे संदर्भात समाजात कसे संदेश जातात व सात्विक कोण असा प्रश्न (पुढे १७मध्ये) अर्जुन करतो.

* सृष्टि उत्पत्तित प्रकृतिपुरुष ज्ञान (१-४)

*प्रकृतिगुणांचे मनोवैज्ञानिक ज्ञान (५-९)

*वर्तमानातील वागणुकीत गुणांचा प्रभाव व गति (१०-२०)

* अर्जुनाचा विकासमार्गासंबंधी प्रश्न (२१)

* विकासमार्ग - शाश्वत धर्म

-----

१. प्रकृतिपुरुषज्ञान

ईश्वराचा भाव मुळपुरुष व प्रकृतिगुण यांचे ज्ञान जाणुन विकासमार्गावर असतो, तो ईश्वराच्या भावास प्राप्त होतो. (ममसाधर्म्यम् आगताः). सृष्टिउत्पत्तित प्रकृति पुरुष यांची भूमिका ब्रह्म व मुळपुरुष(तासां ब्रह्म महत् योनिः अहं बीजप्रदाः पिता) अशी असते.

२. प्रकृतिगुणांचे मनोवैज्ञानिक ज्ञान

सत, रज व तम या तिन गुणाने प्रकृति व्यापलेली असते. व हेच गुण आपल्या विशिष्ट भावाने अव्यय आत्मा बद्ध करतात. जीवनविकासात तम खाली ओढतो, सत वर उचलतो.

विशेषता

सत: प्रकाश ,

रज: प्रवृत्ति, तृष्णा,

तम : अज्ञान, मोह

आवड /Strength

सत: सुख, ज्ञान

रज: Strength -कर्म, Weakness-तृष्णा, चंचलता

तम: आळस, प्रमाद, निद्रा

३. वर्तमानातील वागणुकीत गुणांचा प्रभाव व गति

सत - Mode of goodness

रज - Mode of Passion

तम - Mode of Ignorance

सत-चांगले कार्य सत गुणांची वृद्धि करतो. ज्ञानाची आवड उत्पन्न होते. उत्साह असतो. (प्रकाश)

रज- दुःखाचे कारण तृष्णा म्हणुन लोभ वृद्धिगत होतो, कर्म करतो पण अशांत असतो. हा रज गुणाचा प्रताप दर्शवितो

तम- अज्ञानामुळे प्रमाद, मोह, आळस वृद्धिगत होतो येथे तम दर्शन होते.

दोन गुणावर मात करुन एक गुण प्रभावी ठरतो. सत जीवनाला वर उचलतो तर तम खाली खेंचतो.

आळस जिंकण्यासाठी कर्म करणे, कर्मातील चंचलत्व मिटविण्यासाठी अर्थात कार्याचा दृढनिश्चय होण्यासाठी स्थिरत्व,

अहंकार जिंकण्यासाठी ईश्वरसमर्पण या सर्व प्रक्रिया स्वधर्म/कर्मयोग यांत साध्य होतात.

गुणांच्या प्रभावामुळे देह क्रियाशिल आहे असे जाणुन गुणातित असलेल्या ईश्वराला जाणतो. तो गुणातित होण्याची प्रक्रिया साधण्यासाठी विकासमार्गावर असतो.

तेंव्हा हा मार्ग कसा व कोणता आहे असा अर्जुन प्रश्न करतो. जीवनविकासमार्ग सगुण ते गुणातीत या तत्वावर आधारित असतो. याप्रमाणे गुणांचा प्रभाव जाणुन विचलित न होणे, सुखदुःख यांत समत्व साधुन धैर्य साधणे, समत्वदृष्टि, यातुन एकत्वदृष्टि असते . याचे संपुर्ण वर्णन गुणातीत या संदर्भात आहे. मार्ग या संदर्भात सविस्तर (१५) पुरुषोत्तमयोग-जीवनाचे लक्ष्य (ईश्वरधाम) (१६) चांगल्या मनुष्यासाठी कर्मातील फलत्याग शास्त्र (१७) सत-असत मार्ग याद्वारे पुढे स्पष्ठ होत आहे.

********** ****

अध्याय १४-मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

१४-१ : "ज्ञानानां ज्ञानम् उत्तमम्"

( वर्तमानातील जीवनातील सर्वश्रेष्ठ ज्ञान)

१४. २:"इदं ज्ञानम् उपाश्रित्य मम साधर्म्यम् आगताः"

(१४-३) :

"संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत"

(प्रकृति The Nature)

१४. ५/१ :"सत्वं रजः तम इति गुणाः प्रकृतिसम्भवा"

(१४-५)/२:"प्रकृति vs ईश्वर"

"निबध्नन्ति महाबाहो देहे देहीनम् अव्ययम् "

vs

"शरीरं यद् अवाप्नोति यत् च अपि उत्क्रामति ईश्वरः"

१४. ६:

"तत्र सत्वं निर्मलत्वात् प्रकाशम् अनामयम् "

(Enlightenment)

(१४-९) :

" सत्त्वं सुखे सञ्जयति, रजः कर्मणि भारत,

ज्ञानम् आवृत्य तु तमः"

(आत्मोन्नति मार्गाचा आधार-विकासाची दिशा)

१४. १०/१:"रजः तमश्च अभीभूय सत्वं भवति भारत"

(१४-१०)/२:

"रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा"

(गुणात्मक ज्ञानात प्रकृतिगुणाचा प्रभाव -Transformation चा आधार)

१४. ११:

"सर्वद्वारेषु देहेस्मिन् प्रकाश उपजायते "

(Be a Light )

(१४-१७):

"सत्वात् संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च-

प्रमाद मोहो तमसो भवतो अज्ञानं एव च"

( Wisdom-Passion-Ignorance)

१४. १९/१ :

" न अन्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टा अनुपश्यति"

(Logic of detachment)

(१४-१९)/२:

" गुणेभ्यश्च परम् वेत्ति मद् भावं सो अधिगच्छति "

(Connection with God)

१४. २०/१:

"गुणान् एतान् अतीत्य त्रीन् देही देहसमुद् भवान् "

(जीवनविकासाचे तत्व)

१४. २०/२:"जन्ममृत्युजरादुःखैः विमुक्तो अमृतं अश्नुते"

१४. २७:

"शाश्वतस्य धर्मस्य सुखस्य ऐकान्तिकस्य च"

**, ***

( १४-१)

*************************

परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानम् उत्तमम्।

यत् ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिं इतो गताः।।

*************************

१४-१: "ज्ञानानां ज्ञानम् उत्तमम्"

( वर्तमानातील जीवनातील सर्वश्रेष्ठ ज्ञान)

ज्ञानविज्ञानाने अकल्पितही प्रत्यक्षात साकार केले आहे. या ज्ञानात दररोज भर पडत असते. पण जीवनयात्रेतील ज्ञान मात्र "वर्तमानात जगण्याचे ज्ञान " या अर्थाने मनुष्याला ज्ञानाची आवश्यकता भासत असते. वर्तमानातच मनुष्याला ज्ञानाची गरज भासते. ज्ञान नसले (अज्ञान असले) तरी मनुष्य स्वतःला योग्य समजुनच कार्यरत असतो, जगत असतो. अर्जुन दुःखी झाला असता स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान सांगतो.

ज्ञान या संदर्भातच ईश्वराची ओळख "ज्ञानानाम् ज्ञानम् उत्तमम् "असे म्हटले आहे.

परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानम् उत्तमम्।

यत् ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिं इतो गताः।।(१४-१)

इदं ज्ञानम् उपाश्रित्य मम साधर्म्यम् आगताः।

सर्गेअपि न उपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च।।(१४-२)

ईश्वर व प्रकृति या दोहोमिळुन विश्वाची उत्पत्ति आहे. समाजात चांगले-वाईट, श्रीमंत-गरीब, साहसी(शुर) -दुबळे (पळपुट्या, क्लैब्य), ज्ञानी-अज्ञानी असे मनुष्याच्या वागणुकीनुसार लेबल लागत असते. प्रत्यक्षात जीवनात मनुष्य आपल्या प्रकृतिगुणानुसार कार्यरत असतो. ईश्वर म्हणजे गुणातीत. प्रकृतिगुण सत, रज, तम असे तीन प्रकारचे असतात. प्रकृतिगुण व ईश्वर(अंश) या दोहोमिळुन जीवात्मा असतो. हाच आधार वर्तमानात गुणातीत होण्याचा विकासमार्ग यासाठी आहे.

सत -ज्ञान, सुख; रज-कर्मप्रवृत्ति, लोभ; तम-अज्ञान, मोह याप्रमाणे प्रकृतिगुणाचा मनुष्याच्या वागणुकीत प्रभाव आढळतो. गुणातीत होण्याच्या प्रक्रियेसाठी चांगले (सात्त्विक) कर्म, निष्काम कर्माचे प्रयोजन आहे.

कर्मणः सुकृतस्य आहुः सात्त्विकं निर्मलं फलं।

रजसः तु फलं दुःखं अज्ञानं तमसः फलम्।(१४-१६)

तमगुण अज्ञान असते, म्हणुन मोह असतो. (मोहात् आरभ्यते कर्म). रज आसक्ति असते यामुळे सकाम कर्म असते तर सत निष्काम कर्म असते.

***********

(१४-२)

*************************

इदं ज्ञानम् उपाश्रित्य मम साधर्म्यम् आगताः।

सर्गेअपि न उपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च॥

*************************

(१४. २):"इदं ज्ञानम् उपाश्रित्य मम साधर्म्यम् आगताः"

मनुष्याला मृत्यु आहे हा संदेश नकारात्मक वाटतो, तर जीवनप्रवास ईश्वराप्रत आहे हा सकारात्मक संदेश वाटतो. जीवनात सकारात्मकता येणे व हे जीवन नित्य विकासमार्गावर असणे(आत्मोन्नति) हाच भगवतगीतेचा संदेश आहे. या ज्ञानामुळे जीवनविकासमार्ग निश्चित करतो. आळस, प्रमाद, द्वेष, लोभ, ईर्षा इ. Weakness जाणुन त्यावर मात करतो व नित्य विकासमार्गावर असतो.

इदं ज्ञानम् उपाश्रित्य मम साधर्म्यम् आगताः।(१४-२)

ईश्वराची ओळख:

ये यथा मां प्रपद्यन्ते तान् तथैव भजाम्यहम् ।
मम वर्त्म अनुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः।।(४-११)

ईश्वराला जसा ओळखतो तसा भजत असतो. जीवनविकासमार्ग ठरविण्यासाठी ईश्वराची गुणातीत ओळख होणे आवश्यक असते. प्रकृतित सत, रज, तम या तीन गुणांचा प्रभाव असतो. प्रकृति आणि ईश्वर यांच्या संयोगाने सृष्टिचे सृजन आहे, प्रवर्तन आहे. ईश्वराची भूमिका व प्रकृतिगुण जाणुन जीवनविकासाचा मुख्य मार्ग ठरतो. ज्ञानी याच मार्गावर जीवनाचा प्रवास सुरु ठेवतो.

मां च यो अव्यभिचारेण भक्तियोगेन् सेवते।
स गुणान् समतित्य एतान् ब्रह्मभूयाय कल्पते।।(१४-२६)

प्रकृतिगुण:
सत : सुख, ज्ञान, निष्काम कर्म, प्रकाश
रज: प्रवृत्ति, लोभ, (योग्य-अयोग्य)संशय, सकाम कार्य

तम:आळस, प्रमाद, अज्ञान, अंधार, अधर्माला धर्म ठरविणे.
(Details अ. १४ व १८)

जसे स्वभावानुसार मनुष्य जगतो, कार्यरत असतो. हा गुणांचा प्रभाव असतो. अर्जुनाला मोह उत्पन्न होतो. व अधर्माला धर्म ठरवितो. येथे "तम" प्रवृद्ध झालेला असतो.

जीवनविकासात तम गुण Weakness व सतगुण Strength असते.

निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्।(२-४५)

अर्थात आळसावर मात करुन तम जिंकणे. कार्यरत होणे.
कार्यातील द्वंद्वावर मात करुन रज जिंकणे. नित्य सत स्थितित राहुन निष्काम कार्याद्वारे ईश्वरभक्ति साधणे.

०००००००

(१४-३)

**************************

मम योनिः महत् ब्रह्म तस्मिन् गर्भं दधाम्यहम् ।

संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत।

**************************

(१४-३) :

"संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत"

(प्रकृति The Nature)

अर्जुनाला "भारत" या संबोधनाद्वारे गुणत्रयविभागयोगातुन जे विशेष संदेश आलेले आहेत ते चार संदेश पुढीलप्रमाणे आहेत. प्रकृति व प्रकृतिचा विश्वातील प्रभाव या संदेशातुन स्पष्ट होते.

१. सृष्टिची निर्मिति

संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत।(१४-३)

प्रकृति(महद् ब्रह्म) व पुरुष (परब्रह्म) याद्वारे प्रकृतिची निर्मिति होते.

२. प्रकृतिगुणाद्वारे आत्मा बंधनात असतो.

प्रमादआलस्यनिद्राभिः तत् निबध्नति भारत।(१४-८)

सुख व ज्ञानाद्वारे सतगुण;प्रवृत्ति-कर्म याद्वारे रजगुण, प्रमाद-आळस-निद्रा याद्वारे तमगुण आत्म्याला बद्ध करतो.

३. प्रकृतिगुणाचा प्रभाव

सत्त्वं सुखे सञ्जयति रजः कर्मणि भारत।(१४-९)

सत्त्वगुणाचा प्रभाव सुख, रजगुणाचा प्रभाव कर्म व तमगुणाचा प्रभाव अज्ञान असते.

४. विशिष्ट गुण प्रभावी असण्याचे कारण?

रजः तमश्च अभिभूय सत्त्वं भवति भारत।(४-१०)

तम व रजला पराभूत करुन सतगुण प्रभावी असतो, तम व सतगुणाला पराभूत करुन रजगुण प्रभावी ठरतो, तर रज व सतगुणाला पराभूत करुन तमगुण प्रभावी ठरतो.

जीवनविकासाचा आत्मोन्नति हा आधार असतो. यासाठी भगवदगीता संदेश देते, गुणातीत हो.

त्रैगुण्यविषयावेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन।

निर्द्वन्द्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्।।(२-४५)

गुणातीत हो( स्वतःला व्यवहाराच्या वर उचलणे), यासाठी द्वन्द्वमुक्त होणे, द्वन्द्वमुक्त होण्यासाठी निष्काम कर्म (Determination) हे प्रयोजन आहे, याचे वर्णन "नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् " असे केलेले आहे.

रजगुण कर्माने बद्ध करतो पण सतगुण निष्काम कर्म दर्शवितो.
नियतं संगरहितं अरागद्वेषतः कृतम्।
अफलप्रेप्सुना कर्म यत् तद् सात्त्विकं उच्यते।।(१८-२३)

********

(१४-५)

*************************

सत्वं रजः तम इति गुणाः प्रकृतिसम्भवा।

निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनम् अव्ययम् ।।

*************************

(१४. ५)/१ :

"सत्वं रजः तम इति गुणाः प्रकृतिसम्भवा"

प्रकृति सत, रज, तम या तीन गुणाने बद्ध असते (Constituents). गुणातित( पुरुष) ईश्वर या प्रमाणे प्रकृति व पुरुष याद्वारे Live प्रकृति असते. हे प्रकृतिचे ज्ञान विज्ञान आहे. सत, रज, तम या तीन गुणाने (Pure)आत्मा बद्ध असतो. यालाच आपण "जीवात्मा /जीव" असे ओळखतो.

सत्वं रजः तम इति गुणाः प्रकृतिसम्भवा।

निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनम् अव्ययम् ।।(१४-५)

मनुष्य प्रत्यक्ष जगत असतांना इतर दोन गुण डावलुन एक गुण active होतो. या तीन गुणाचा परिणाम मनुष्याची आवड, आचरण यावर होतो. या तीन गुणाची ओळख:

सत : Mode of Wisdom, Goodness

रज: Mode of Passion

तम: Mode of Ignorance

सत ज्ञान -Mode of wisdom (ईश्वराद्वारे एकत्व ज्ञान व प्रकृतिविज्ञान) याद्वारे ज्ञानविज्ञान मान्य करते. यांतील रज गुण प्रवृत्ति म्हणुन ओळखल्या जातो. भगवतगीतेचे ज्ञान जीवनविकासाचे कर्म साधन आहे, यावर आधारित आहे. म्हणुन "कर्म" या संदर्भात तीन गुण काय म्हणतात?

सत: निष्काम कर्म

रज: सकाम कर्म

तम: स्वैर कर्म (मोहात् आरभ्यते कर्म)

सत व तम यांतिल विरोधाभास लक्षात घेवुन जीवनविकासात कार्याच्या दृढनिश्चयासाठी, विकासमार्गासाठी सत गुण favorable असतो.

बुद्धि:

सत बुद्धि-विकासात बंधन व स्वातंत्र्य याचे ज्ञान असते. या आधारावर कार्याचा दृढनिश्चय होतो.

तमबुद्धि-(मोहामुळे)निश्चय होत नाही. अयोग्यला योग्य अशी समज असते.

धृति:

सत धृति- Determination

तमधृति-भय, शोक, विषाद, याचा आश्रय(न विमुच्यन्ति दुर्मेधा)

कर्ता :

सत कर्ता- धैर्यवान, उत्साही, यश-अपयश याच्या द्वंद्वापासुन मुक्त

तम कर्ता -आळशी, प्रमादी, शठ, Animal instict (प्राकृत)

याच गुणांचा परिणाम त्यागाचे निश्चित ज्ञानावर होतो.

निष्काम कर्मातील फलत्याग सतत्याग ठरतो. पण नियत, आवश्यक कर्माचा संन्यास(नियतस्य तु संन्यासः कर्मणो न उपपद्यते)हा मोहामुळे त्याग ठरतो.

सतगुण Mode of Goodness म्हणुन व्यवहारात ओळखल्या जातो. याच चांगलेपणामुळे अर्जुन दुःखी होतो. व नकळत तम modeमध्ये येतो. येथे निष्क्रियतेचे समर्थन करतो. कार्यातील चांगले-वाईट, लाभ-हानी, योग्य-अयोग्य हे Confusion असते. जीवनविकास मार्गात Last destination ईश्वर ज्ञान असते. याच ज्ञानाचा आश्रय संशय छेदतो. जीवनविकासातील ज्ञानविज्ञान या संदर्भात ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत ठरतो.

व्यवहारात योग्य-अयोग्य या आधारावर कार्यनिर्णय होतो. अर्जुनाला स्वतः योग्य कि अयोग्य हा संशय आला. पण हे वास्तव डावलुन निष्क्रिय राहणे निवडतो. व याचे समर्थन करुन संशयाला खतपाणि देतो.

समाजात "ज्ञान" या संदर्भात भाष्य चालते. जेंव्हा भाष्य मनुष्याच्या बुद्धित संशयाची पेरणी करते, तेंव्हा भाष्याद्वारे

संशयालाच खतपाणी घालते. तेंव्हा प्रश्न असतो, संशयाला खतपाणी देणे कि मार्ग दृढ करण्यासाठी ज्ञानाने संशयमुक्त होणे?

भगवतगीता हाच प्रश्न सोडविण्यासाठी संशयमुक्तिसाठी ज्ञान याची निवड करते. यांत वास्तवाचा स्विकार होतो. व्यवहारात वास्तवातील मुख्य मुद्याला डावलुन भाष्य होत असेल तर संशयाला खतपाणि देणे असा अर्थ होतो. यामुळे Misguidance, निष्क्रियता याला वाव मिळतो. अर्जुन संशय कबुल करतो. व प्रश्न करतो, दुःखदायी कर्म मी कां करावे? अर्थात या प्रश्नात Reasoning असते. व भाष्याला ज्ञानवैज्ञानिक स्वरुप येते.

सार: विकासाच्या दिशेने समाजाची वाटचाल असते. पण वर्तमानात ज्ञानविज्ञान असुनही अनेक प्रश्न अनुत्तरीत असतात. याचे उत्तर समाज भगवतगीतेने ओळख करुन दिलेल्या "प्रज्ञावादी"भूमिकेतच देत असतो. म्हणुन प्रश्न सोडविण्याची Will असेल तर भगवतगीतेतील ज्ञानविज्ञानाची दृष्टि जाणुन घेणे आवश्यक ठरते. कारण ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे. ज्ञानच जगातील अंधार मिटवतो.

न हि ज्ञानेनसदृशं पवित्रम् इह विद्यते.

************

(१४-५)/२:"प्रकृति vs ईश्वर"

"निबध्नन्ति महाबाहो देहे देहीनम् अव्ययम् "

vs

"शरीरं यद् अवाप्नोति यत् च अपि उत्क्रामति ईश्वरः"

मनोविज्ञान क्षेत्रात Consciousnessचे ज्ञान असते. हे ज्ञान Disorderly जीवन व Orderly जीवन याचा बोध करते. हेच ज्ञान भगवतगीता क्षेत्र(Field)-क्षेत्रज्ञ (Knower) ज्ञान यातुन स्पष्ट करते. या ज्ञानाचा आधार प्रकृति व ईश्वर आहे. या ज्ञानाद्वारे मनुष्य जीवनविकासाचा राजमार्ग(अमृतत्वाय कल्पते २-१५) जाणतो . सामान्य जीवन व उच्च जीवन यातील भेद स्पष्ट होतो.

जीवंत शरीरात ईश्वराच्या अंशाचा वास असतो म्हणुनच जीवन असते. प्रकृति(गुण)ईश्वराच्या अंशाला बद्ध करते.

सत्त्वं रजःतम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः।

निबध्नन्ति महाबाहो देहे देहीनम् अव्ययम् ।(१४-५)

जसा वायु फुलाचा गंध घेवुन जातो, तद्वत शरीर सोडतांना हाच ईश्वरी अंश प्रकृतिगुण घेवुन जातो.

शरीरं यद् अवाप्नोति यत् च अपि उत्क्रामति ईश्वरः।गृहीत्वा एतानि संयाति वायुः गन्धान् इव आशयात् ॥(१५-८)

मनुष्य या जगाच्या Field वर आलेला आहे. स्वतःच्या field चा Knower असतो. स्वतःच्या मार्गाचे awareness असेल तर स्वतःचा मार्ग चालतो, विकासमार्गावर असतो. पण स्वतःच्या मार्गात संशय असेल तर अशांत होतो. Comfortable होण्यासाठी आपले अज्ञान hide करुन स्वसमर्थन करतो, किंवा जगावर दोष ढकलतो. हा जगण्यातील Disorder ठरतो. भगवतगीता याच अज्ञानाला highlight करते.

मनुष्य आपल्या (संवयीनुसार)Lifestyleने जगण्यात Comfortable असतो. आपले अज्ञान स्विकारुन ते दुर न करता दुसऱ्यावर (जगावर) दोष ढकलण्याची संवय ही सामान्य जीवन जगण्याची संवय ठरते. पण अर्जुन जेंव्हा हीच भूमिका घेतो तेंव्हा अर्जुनाच्या संदर्भात(श्रेष्ठ, दैवी असल्यामुळे) हेच अज्ञान ठरते, चुक ठरते. याच मुद्यावर भगवतगीता ज्ञान जगासमोर आलेले आहे.

"Everyone is Unique ".

We are each gifted in a unique and important way. It is our privilege and our adventure to discover our own special light.

~Evelyn Dunbar

श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, सामान्याचे जीवन जगण्यासाठी तुझा जन्म नाही, तर श्रेष्ठ जीवन जगण्यासाठी आहे.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

सामान्य जीवन व श्रेष्ठ जीवन यांतील भेद जाणुन कोणते जीवन जगायचे ही निवड मनुष्याला करायची आहे.

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)

याप्रमाणे जीवनात ईश्वराचा आश्रय श्रेष्ठ जीवन जगण्यासाठी सहाय्यक ठरतो हा भगवतगीतेचा संदेश आहे.

ददामि बुद्धियोगं तं येन् मां उपयान्ति ते।(१०-१०)

*********

(१४-६)

*************************

तत्र सत्वं निर्मलत्वात् प्रकाशम् अनामयम् ।

सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन च अनघ॥

*************************

१४. ६:

"तत्र सत्वं निर्मलत्वात् प्रकाशम् अनामयम् "

(Enlightenment)

प्रकाश आणि अंधार यांचे नाते ज्ञान-अज्ञान, सत-तम (प्रकृतिगुण) यांचेशी आहे व सर्वात महत्वाचे नाते सुख-दुःख यांचेशी आहे. हाच भगवतगीतेतील तत्वज्ञानाचा आधार आहे. सत प्रकाश आहे तर तम अंधार आहे.

सत-तम:

चांगले वाईट या संदर्भात सत म्हणजे चांगलेपणा व तम म्हणजे प्रमाद, तर ज्ञान या संदर्भात तम म्हणजे अंधार असा अर्थबोध समाजात असतो.

तत्र सत्वं निर्मलत्वात् प्रकाशम् अनामयम् ।
सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन च अनघ॥(१४-६)

अर्थात प्रकृतितील सतगुण "प्रकाश" आहे. सत म्हणजे चांगलेपणा(निर्मल, पापमुक्त). "सत"याचाच सुख व ज्ञानाशी निकटचा संबंध आहे.

सुख:

"Happiness depends upon ourselves. "

Aristotle

"Searching happiness" हा मनुष्यजीवनाचा प्रवासच असतो. अर्जुनाला युद्धक्षेत्रावर दुःख झाले. याच अवस्थेत तो दुःखमुक्तिसाठी शोध घेवु लागला.

"The significant problems we face cannot be solved at the same level of thinking (Consciousness) we were at when we created them. "

~ Albert Einstein

जीवनात दुःख आले असता मनुष्य जी भूमिका घेतो, ती योग्य कि अयोग्य? हा विषय उपस्थित होतो. (अहंकाराचा आश्रय असल्यामुळे मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी) अर्जुन अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. यामुळे सर्वच संदर्भ बदलतात. याच पार्श्वभूमिवर ज्ञान-अज्ञान या विषयावर भगवतगीतेने प्रकाश टाकला.

ज्ञान-अज्ञान:

अ) ज्ञान-प्रकाश

यथा प्रकाशयति एकः कृत्स्नं लोकं इमं रविः।

क्षेत्रं क्षेत्रि तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत।।(१३-३४)

प्रकाशात विश्व पाहतो. येथे सूर्याची जी भूमिका असते, तीच भूमिका शरीरातील क्षेत्रज्ञाची ( क्षेत्राला जाणणारा) असते. अर्थात मनुष्यासाठी ज्ञानाची, ईश्वराची भूमिका असते.

ज्योतिष्याम् अपि तद् ज्योति तमसो परम् उच्यते।
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम् ।।(१३-१८)

(अंतरात्म्यातील) प्रकाशच ज्ञान आहे, तेच ज्ञेय(जाणणे) आहे, ज्ञानानेच जाणता येते. अज्ञानाकडुन ज्ञानाकडे, अर्थात अंधाराकडुन प्रकाशाकडे हा विकासमार्गाचा ज्ञान या संदर्भात आधार असतो.
"तमसो मा ज्योतिर्गमय"

ब)योगाग्नि / ज्ञानाग्नि

"योगः कर्मसु कौशलम् " या कार्यकौशल्यासाठी "यज्ञ" या तत्वाचा भगवतगीतेने व्यवस्थापनात वापर केला.
सर्वाणि इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।।(४-२७)

अर्थात योगः कर्मसु कौशलम् " या संदर्भात यज्ञातील ( ज्ञानदीपाने प्रज्वलित ) योगाग्नि संबोधले आहे.

ज्ञानाग्नि:

विकासमार्गात कर्मसमर्पण(भक्ति) या संदर्भात यज्ञातील "ज्ञानाग्नि " ही ज्ञानाची भूमिका असते.

ज्ञानाग्निः सर्वकर्माणं भस्मसात् कुरुते तथा।।(४-३७)

भगवतगीतेत ज्ञानाला सर्वश्रेष्ठ ठरविले आहे. विकासात कर्म हे साधन असले तरी अखेर कर्माचे ज्ञानातच विलिनिकरण होते.

श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञ ज्ञानयज्ञः परंतप।

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।।(४-३३)

अर्थात विकासमार्गात ज्ञानविज्ञानाचा वापर होतो. अखेर सर्व कर्म ज्ञानातच विलीन होतात.

"Better to light a candle than to curse the darkness. "

******

(१४-९)

*************************

सत्त्वं सुखे सञ्जयति, रजः कर्मणि भारत।

ज्ञानम् आवृत्य तु तमः प्रमादे सञ्जयत्युत।।

*************************

(१४-९) :

" सत्त्वं सुखे सञ्जयति, रजः कर्मणि भारत,

ज्ञानम् आवृत्य तु तमः"

(आत्मोन्नति मार्गाचा आधार-विकासाची दिशा)

प्रकृति व ईश्वर यांच्या ज्ञानामुळे जीवनविकासाचा मार्ग बनतो, तोच आत्मोन्नतिचा मार्ग असतो. प्रकृति व ईश्वर यांचे ज्ञान विज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते. प्रकृति सत, रज व तम या तीन गुणाने बद्ध असते. ईश्वर गुणातीत आहे. जीवात्मा(Energy) ईश्वराचा अंश प्रकृतिगुणाने बद्ध असतो, हाच जीवात्मा. याप्रमाणे विश्वातील प्राणिमात्राची धारणा होते.

जीवभूतां महाबाहो यया इदं धारयतेजगत् ।(७-५)

जो गुण active असतो, त्याचा प्रभाव मनुष्याच्या मनःस्थितिमध्ये असतो. ज्ञान व सुख सतगुणाचा प्रभाव, इच्छा व कर्म रजगुणाचा प्रभाव तर अज्ञान व मोह तम गुणाचा प्रभाव असतो.

सत्त्वं सुखे सञ्जयति, रजः कर्मणि भारत।
ज्ञानम् आवृत्य तु तमः प्रमादे सञ्जयत्युत।।(१४-९)
मनुष्य द्वन्द्वमोहवश असतो, नकारात्मक असतो हा तमगुणाचा प्रभाव असतो.
तमसः तु अज्ञानजम् विद्धि मोहनं सर्वदेहिनाम्।
प्रमादआलस्य निद्राभिः तत् निबध्नति भारत।।(१४-८)

इच्छा असते म्हणुन कार्यरत असतो, हा रजगुणाचा प्रभाव असतो.
रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसम् उद्भवम्।
तत् निबध्नति कौन्तेय कर्मसंगेन देहिनम् ।(१४-७)
समाधानी असतो, विचलित होत नाही, निष्काम कार्यरत असतो. हा सतगुणाचा प्रभाव असतो.

तत्र सत्त्वं निर्मलत्वात् प्रकाशकम् अनामयम्।

सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ।।(१४-६)

१. तम vs. सत

अर्थात अज्ञान vs ज्ञान, अंधार vs प्रकाश

२. तम vs रज

अर्थात आळस, निष्क्रियता vs. कर्म

३. रज vs सत

अर्थात सकाम कर्म vs. निष्काम कर्म, तृष्णा vs समाधान (सुख), चंचलता vs दृढता

आळस जिंकण्यासाठी कार्यरत रहा. चंचलतेमुळे कार्याचा एकनिश्चय होत नाही. सकाम कार्यरत असतो, विचलित होतो. म्हणुन आत्मोन्नतिसाठी संदेश आहे,

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन।
निर्द्वन्द्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्।।(२-४५)

"Hope is like the sun, which, as we journey toward it, casts the shadow of our burden behind us. "

-Samuel Smiles

********

(१४-१०)

**************************

रजः तमश्च अभीभूय सत्वं भवति भारत।

रजः सत्वं तमः चैव तमः सत्वं रजः तथा।।

**************************

(१४. १०):"रजः तमश्च अभीभूय सत्वं भवति भारत"

जीवनयात्रेत मनुष्य सुखदुःख दोन्ही अनुभवत असतो. जीवनविकास या संदर्भात हे 'जीवन' विकासाच्या पायऱ्या चढत असते. वर्तमानात दुःख जाणवले तर वरची पायरी चढणे आवश्यक असते. याच संदर्भात भगवतगीता Step-up करण्यासाठी सत-रज-तम गुणाचा प्रभाव सांगते.

जड व चेतन या संदर्भात व्यक्त-अव्यक्त आपण जाणतो. (शाश्वत)ईश्वर व(अशाश्वत) प्रकृति यांच्या संयोगाने सृष्टिचे सृजन व संचलन असते. सत, रज, तम हे तीन प्रकृतिगुण आहे तर गुणातीत ईश्वर असतो.

रजः तमश्च अभीभूय सत्वं भवति भारत।

रजः सत्वं तमः चैव तमः सत्वं रजः तथा॥(१४-१०)

अर्थात इतर दोन गुणांवर विजय मिळवुन तिसरा गुण प्रभावी असतो. जीवनाच्या शाश्वत विकासासाठी नित्य "सत" गुण प्रभावी करणे आवश्यक असते. कारण वर्तमानात 'आहे' त्याच गुणाच्या प्रभावाखाली रहावे कि "सत" गुण जाणुन Step-up करावे ही निवड स्वतःची असते.

ईश्वरभक्ति:

जीवनाच्या शाश्वत विकासासाठी(आत्मोन्नति) नित्य ईश्वराचा आश्रय व भक्ति हे Logic असते . शरीरयात्रेत कार्य घडत असते. व्यवहारात प्राप्तिसाठी कार्य साधन असते. म्हणुन विकासात कार्य साधन असते. भगवतगीता याच कार्याला शाश्वत विकासाचे साधन करते. याच अनुषंगाने भगवतगीता मार्गदर्शन करते.

शाश्वत विकासाचा हा जीवनप्रवास गुणातीत होण्याचाच प्रवास असल्यामुळे (गुणातीत)ईश्वराचा आश्रय निश्चित मार्ग (अमृतंगमय) ठरविण्यास प्रेरक ( motivation) ठरतो. यासाठी बुद्धियोग हा ज्ञानाचाच आश्रय (ज्ञानसंच्छिन्न संशयम् )ठरतो.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

या मार्गावर निर्द्वंद्व अर्थात कार्याचा दृढनिश्चय असतो व निष्काम कार्यरत होतो. आत्मवश असतो अर्थात स्वतःवर command असते. याचसाठी "नित्यसत्वस्थ " असावे.

निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्।(२-४५)

नित्यसत्वस्थ:

*जीवनविकासात ज्ञान, कर्म व भक्ति यांची भूमिका भगवतगीता स्पष्ट करते . भक्तिसाठी सात्विक त्याग सांगते. अर्जुन वर्तमानात दुःखी होतो व स्वतःला त्यागी दर्शवितो. प्रत्यक्षात येथे मोहामुळे तमगुण प्रभावी होतो. मोहामुळे निष्क्रिय राहणे हा तामस त्याग ठरतो, तर स्वतःला कार्यरत करणे, नियतकार्य अनासक्त राहुन करणे हा सात्विक त्याग ठरतो. अर्थात कार्याद्वारे भक्तिसाठी सात्विक त्याग आवश्यक असतो.

*जीवनयात्रेत ज्ञान(ज्ञान-ज्ञेयं-परिज्ञाता) व कर्म (करणं-कर्म-कर्ता) यांची भूमिका विकासाला motivate करीत असते(१८-१८).

याच संदर्भात १. ज्ञान-कर्म-कर्ता, २. बुद्धि-धृति, ३. सुख अशा तीन विभागात सत, रज व तम गुणाचा प्रभाव भगवतगीतेने स्पष्ट केलेला आहे.

१. ज्ञान- ईश्वराचा एकत्व भाव हा ज्ञानस्त्रोत जाणुन कार्यरत असतो.

कर्म-निष्काम कर्म

कर्ता-धैर्यवान, उत्साही (Confident)

२. बुद्धि - (बंधन व स्वातंत्र्य जाणुन) कार्यनिश्चय होणे

धृति - Determination प्रत्यक्ष(कृतिसाठी) धारणा

३. सुख - आत्मबुद्धिः प्रसादजम् (सत) vs(तम)मोहसुख ( प्रमाद, आळस)

यावरुन वर्तमानात कोणत्या गुणाचा प्रभाव आहे याचे स्वतःला निदान होते व Step-up करण्यासाठी(सत प्रभाव) मार्गदर्शन मिळते. मार्गातील अडचणी वरच्या पायरीवर चढण्यासाठी संधी ठरते.

*******

(१४-१०) :

"रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा"

(गुणात्मक ज्ञानात प्रकृतिगुणाचा प्रभाव -Transformation चा आधार)

"The object of education is to prepare the young to educate themselves throughout their lives. "

-Robert M. Hutchins(American educational philosopher)

शिक्षणाचे दोन विभाग ठरतात. १. संख्यात्मक(बौद्धिक) ज्ञान व २. गुणात्मक ज्ञान (Application)

(गुणात्मक ज्ञानाच्या अभावी) अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन ज्ञानाचा वापर करुन करतो . याचमुळे भगवदगीता जगासमोर आली. अर्थात भगवदगीतेतील ज्ञान शिक्षणातील दुसऱ्या भागाची(गुणात्मक) पुर्तता करते,

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम् ।(४-४१)

अर्थात ज्ञानाने संशयमुक्ति होते. कार्याचा एकनिश्चय होतो. व समत्वयोगाने कार्यरत होतो.

जीवनाचा विकास प्रवास हा आत्मोन्नतिचा प्रवास असतो. या प्रवासातील मार्गाचे वर्णन भगवदगीता करते.

१. पुस्तकी ज्ञान(Information) व आत्मोन्नतिचे ज्ञान या संदर्भात :

त्रैगुण्यविषयावेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।(२-४५)

आत्मोन्नति या संदर्भात निस्त्रैगुण्यो अर्थात प्रकृतिगुण या संदर्भात गुणातीत होण्याचा मार्ग. अर्थात आत्मोन्नतिच्या मार्गावर रहा.

२. प्रत्यक्ष मार्गात:

निर्द्वन्द्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।(२-४५)

याप्रमाणे जीवनमार्गात प्रकृतिगुण या संदर्भात निस्त्रैगुण्यो व नित्यसत्त्वस्थो या शब्दांचा वापर केलेला आहे. आत्मोन्नति मार्गावर नेहमी सतगुण mode मध्ये असणे असे अभिप्रेत आहे.

धर्मात योग्य-अयोग्य या आधारावर निर्णय होतो. जसे पांडवांना न्याय मिळण्यासाठी धर्मयुद्ध ठरले असते. रामायणात श्रीरामाने

वनवास स्विकारला. येथे श्रीरामाने धर्माचा दाखला दिला.
("धरमधुरिन धरमगति जानु ")

जीवनविकासमार्ग मात्र आत्मोन्नतिचा असतो. सत, रज, तम या प्रकृतिगुणाचा जीवनप्रवासात प्रभाव असतो. तम-रज गुणाला defeat करुन सतगुण प्रभावी होतो. तम-सत गुणाला defeat करुन रज प्रभावी असतो. तर रज-सत गुणाला defeat करुन तमगुण प्रभावी होतो.

रजः तमश्चअभिभूय सत्त्वं भवति भारत।
रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा॥(१४-१०)

व्यवहारात मनुष्य इच्छापुर्तिसाठी (State of want- State of Art) कार्यरत होतो. आळस, नकारात्मकता, (परिणामी)निष्क्रियतेचे समर्थन हा तमगुणाचा प्रभाव असतो. कर्मबंधन अर्थात सकाम कार्य रजगुणाचा प्रभाव असतो. हेच कर्म निष्काम कार्यात Transform होते, तेंव्हा सतगुण प्रभावी होतो.

नियतं संगरहितं अरागद्वेषतः कृतम् ।

अफलप्रेप्सुना कर्म यत् तत् सात्त्विकम् उच्यते।(१८-२३)

याप्रमाणे ज्ञान, कर्म, कर्ता, बुद्धि, धृति, सुख यांचे ज्ञान भगवदगीता "सत" या संदर्भात देते.

जीवनाची उच्च पातळी:निर्द्वन्द्व/Transformation

गुणात्मक ज्ञानातील हाच महत्वाचा भाग आहे. यामुळेच ज्ञानाचे, कर्माचे निश्चित महत्व कळते. व्यवहारातील इच्छापुर्तिसाठी कार्य ही जीवनाची सामान्य पातळीअसते तर उच्च पातळीवर (Higher consciousness) निर्द्वन्द्व अर्थात कार्याच्या एकनिश्चयाचे महत्व आहे. या उच्च पातळीवर बुद्धियोग निष्ठा असते. यामुळे जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा असतो.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।(२. ५०)

सार:

सर्वधर्माचा आधार व सर्व तत्वज्ञानाचे मुळ अशी भगवदगीतेची ख्याति आहे. शिक्षणाचा हेतु ज्ञानप्राप्ति असते याद्वारे १. जीवनातील प्रश्न सोडविण्यासाठी मनुष्याला समर्थ करणे. २. तसेच समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी समाज सक्षम व्हावा या हेतुने शिक्षणाकडे पाहिल्या जाते.

संपुर्ण विश्वात वरप्रमाणे ज्ञानप्राप्ति हा शिक्षणाचा हेतु असला तरी युवापिढीसाढी मुळ हेतु व्यवसायकार्य असते. प्रत्यक्षात केवळ नोकरीच्या हेतुने शिक्षण घेतलेले नोकरी मिळाली नाही तर बेरोजगार ठरतात. यामुळे "जीवनविकास" या संदर्भात शिक्षणाचा हेतु साध्य होत नाही. अर्थात शिक्षणातील ही त्रुटी ठरते. ही त्रुटी भरुन काढण्यासाठी ज्ञानाचा उपयोग कार्यात होणे (Application of knowledge into action) याचे ज्ञान आवश्यक आहे, ज्यामुळे मनुष्य स्वतःची सर्वांगिण उन्नति साध्य करु शकेल.

१. आत्मोन्नति म्हणजे प्रकृतिच्या lower गुणाला defeat करुन higher गुण प्रभावी करणे. द्वन्द्वाला वश न होणे म्हणजेच निर्द्वन्द्व असणे. जीवनविकासाचा मार्ग आत्मोन्नतिचा जाणुन व्यवहारमार्ग(सकाम कार्य) आत्मोन्नति मार्गात Transform करणे. याचसाठी बुद्धियोगाचे प्रयोजन आहे.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

२. सकारात्मक होणे, सुखी विचार, तणावमुक्त सुखी जीवन, साहसी होणे, स्वावलंबि होणे असे समाजात प्रबोधनाचे विषय असतात.

*जीवनात स्वावलंबि असले तर स्वतःचा निर्णयअधिकार वापरतो. "Beggars are not choosers"

*नकारात्मक विचार, आळस तमगुण असतो. म्हणुन सतगुणाचे महत्व आहे.

*साहसी होणे (निर्भय) यासाठी "योगः कर्मसु कौशलम्" हा कर्मयोगाचा संदेश आहे. यांत कार्याचा एकनिश्चय असतो म्हणुन निर्द्वन्द्व असणे याचे महत्व आहे.

********

(१४-११)

*************************

सर्वद्वारेषु देहेअस्मिन् प्रकाश उपजायते।

ज्ञानं यदा तदा विद्याद् विवृद्धं सत्वं इति उत्।।

*************************

१४. ११:

"सर्वद्वारेषु देहेस्मिन् प्रकाश उपजायते "

(Be a Light )

“As we work to create light for others, we naturally light our own way. ”

– Mary Anne Radmacher

जगात चांगलेपणाचे महत्व असते. सात्विकता चांगलेपणाची साक्ष असते असे समाज जाणतो. भगवतगीता याच चांगलेपणा,

सात्विकता याला निश्चित परिभाषित करते. चांगलेपणाचा संबंध ज्ञान(सत) व अज्ञान(तम), प्रकाश(सत) व अंधार(तम) याचेशी जोडला आहे.

जीवनविकासात आत्मोन्नति किंवा आत्मशुद्धि या संदर्भात प्रकृतिगुण (सत, रज, तम) व गुणातीत (ईश्वर) हे ज्ञान गुणत्रयविभागयोगात स्पष्ट केले आहे.

सत, रज, तम हे प्रकृतिगुण अनुक्रमे प्रकाश(Mode of goodness/Wisdom), प्रवृत्ति(Mode of passion), अंधार(Mode of darkness/Ignorance) represent करतात.

सर्वद्वारेषु देहेअस्मिन् प्रकाश उपजायते।
ज्ञानं यदा तदा विद्याद् विवृद्धं सत्वं इति उत्।।(१४-११)
(Experiencing the manifestations of the mode of goodness:The whole body-all gates illuminated by knowledge)

*Darkness :

मानवी जीवनात असे काही क्षण आहेत जेव्हा बाह्य ज्ञान हे मार्गदर्शन करण्यास सक्षम नसते, भगवतगीता अर्जुनाच्या याच क्षणाला प्रकाशात आणते. अर्जुन चांगला (दैवीगुणसंपत्तियुक्त) असतो, तरी नकळत तम (मोह) mode मध्ये येतो.

या युद्धातील कोणती निवड करणे किंवा न करणे धर्मास उपयुक्त आहे? अर्जुन हे समजून घेण्यात अयशस्वी ठरतो. हे वास्तव असते, परंतु दुःख त्याला स्वीकार्य नसते यामुळे या युद्धाचे परिणाम उद्या शोककळा पसरणेच आहे, म्हणून युद्ध न करणे योग्य आहे. या भूमिकेवर धर्माचे शिक्कामोर्तब करतो. जीवनाचा हेतु स्वर्गप्राप्ति आहे व प्रस्तुत कार्य नरकप्राप्ति दर्शविते! येथे अर्जुन श्रीकृष्णाला जीवनाचा हेतू समजावून सांगत आहे. हाच संवादाचा विषय (Purpose of life) बनतो.

*Wisdom of Ignorance :

अहंकाराचा आश्रय असल्यामुळे अज्ञान असले तरी वास्तव न स्विकारता मनुष्य स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी आदर्शाचा, ज्ञानाचा उपयोग करतो. याच प्रक्रियेत नकारात्मक विचार जन्म घेतो. स्वतःच स्वतःचा पथदर्शक बनण्यास समर्थ होण्यासाठी वास्तव स्विकारणे Wisdom of ignorance ठरते.

*पथदर्शक

There are two kinds of light - the glow that illumines, and the glare that obscures.
~James Thurber

१. Be a Light :
"Be a light unto yourself. "( अत्त दिपोभव ) हे बुद्धांचे वचन प्रसिद्ध आहे.

One of the best gifts you can give yourself is to discover the light within you. When you find the light inside you, you get to the core of who you are and discover that your ultimate purpose is just to be who you are.

“You have to find what sparks a light in you so that you in your own way can illuminate the world. ” — Oprah Winfrey

२. Purpose of Life :

No matter what you're going through, there's a light at the end of the tunnel and it may seem hard to get to it but you can do it and just keep working towards it and you'll find the positive side of things.
Demi Lovato

श्रीकृष्णाने जीवनाचा उद्देश समजावून सांगितला आहे, जेणेकरून तेच ज्ञान त्याचे मार्गदर्शक बनेल. बोगद्यातून मार्गक्रमण करताना, दिव्याचा प्रकाश मार्गांवर पुढील पाऊल टाकण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतो, पण बोगद्याच्या बाहेर प्रकाश दिसत असेल तर, एखादी व्यक्ती स्वतःचा मार्ग बनवू शकते. यामुळे मार्ग चालण्यात आत्मविश्वास असतो. Purpose of Life जाणण्यासाठी हा प्रकाश सहाय्यक ठरतो.

ददामि बुद्धियोगं तं येन् माम् उपयान्ति ते।।(१०-१०)
तेषां एव अनुकंपार्थम् अहं अज्ञानजं तमः।
नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता।।(१०-११)

अर्थात ईश्वराचा आश्रय स्वतःचे अज्ञान मिटविण्यासाठी असते.

*******

(१४-१७)

*************************

सत्वात् संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च।

प्रमाद मोहो तमसो भवतो अज्ञानं एव च।।

*************************

(१४-१७):

"सत्वात् संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च-

प्रमाद मोहो तमसो भवतो अज्ञानं एव च"

( Wisdom-Passion-Ignorance)

प्रकृति(Mode of Nature) सत-रज-तम या त्रिगुणात्मक आहे.

सत् रजः तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः।

निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनम् अव्ययम् ।।(१४-५)

या जीवनात शाश्वत प्राणतत्व त्रिगुणाने बद्ध असते. मनुष्य वर्तमानात कोणत्या Mode मध्ये(सत-रज कि तम!) जगत आहे याची ओळख भगवतगीता करुन देते. व्यवहारात सत-रज-तम गुण

(ज्ञान-प्रवृत्ति-अज्ञान ) अनुक्रमे संस्कृति-प्रवृत्ति-विकृति म्हणुन ओळखल्या जाते.

"सत्वात् संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च।
प्रमाद मोहो तमसो भवतो अज्ञानं एव च॥(१४-१७)
ज्ञान, लोभ, अज्ञान यांची निर्मितीच सत, रज, तम(Mode of goodness, passion, ignorance) या गुणांमुळे होते.

मनुष्याच्या जीवनयात्रेत कार्य घडत असते. कार्याद्वारे विकास होत असतो. हा विकास भौतिक आणि मानसिक असतो. याचसाठी कार्य सत mode मध्ये घडणे महत्वाचे आहे. हीच भूमिका ज्ञानी ठरते. या (ज्ञानी-अज्ञानी) आधारावर कार्याद्वारे केवळ भौतिक विकास जाणणे सकाम प्रवृत्ति अर्थात "रज"(Mode of passion) ठरते, व मानसिक विकासाचे अज्ञान असते.

मानसिक विकासाच्या अज्ञानामुळेच अर्जुन "मला कांही नको" असे भाष्य करतो . हा त्याचा अशांतिवर उपाय असतो. जीवनांत मनुष्याचा भाष्याद्वारे मानसिक शांति प्राप्त करण्याचा प्रयास असतो. या संदर्भात तुलना करणे, Judgement thinking चा वापर करुन स्वसमर्थन-परटिका करणे हा प्रयास असतो.

अर्जुन स्वतःचे समर्थन करतांना निष्क्रियतेला धर्म दर्शवितो. नकळत ही भूमिका "तम-अज्ञान" mode मध्ये transmit होते. म्हणुन भगवतगीता मानसिक विकासासाठी निष्काम कार्याचे शास्त्र स्पष्ट करते. याच संदर्भात "योगः कर्मसु कौशलम् " हा संदेश आहे.

मनुष्य स्वतःला योग्य समजुनच कार्यरत असतो, भाष्य बोलतो. अर्थात ज्ञानी समजुनच भाष्य बोलत असतो. अर्जुनाच्या समर्थनभाष्याला भगवतगीता प्रज्ञावाद संबोधते. "कार्य" या संदर्भात शहाणपणाचे भाष्य करतांना योग्य (ज्ञानी) भूमिका जाणणे येथे महत्वाचे ठरते.

न कर्मणाम् अनारंभान् नैष्कर्म्यं पुरुषं अश्नुते।
न च संन्यसनादेव सिद्धिं सम अधिगच्छति।।(३-४)

अर्थात नैष्कर्मसिद्धि कर्माशिवाय प्राप्त होत नाही.

*कार्याचा निश्चय

कार्याचा निश्चय करण्यासाठी व्यवहारात भाष्य(चर्चा) होत असते. महाभारतात याच व्यवहारातुन धर्मयुद्ध ठरते व कार्याचा निश्चय होतो.

*कार्याद्वारे साधना

भौतिक विकास(प्राप्ति) मनुष्य जाणत असतो. तसेच सुख या संदर्भात शांति, समाधान असे मानसिक सुख मनुष्य जाणत असतो. मानसिक विकास या संदर्भात निर्भयता, साहस, शांति (विचलित न होणे) दुःखान्त शक्ति ठरते. या शक्तिची साधना कार्याद्वारे होणे हेच कर्मयोगाचे रहस्य आहे.
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

******

(१४-१९)

*************************

न अन्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टा अनुपश्यति।

गुणेभ्यश्च परं वेत्ति मद् भावम् सोअधिगच्छति।।

*************************

१४-१९ :

" न अन्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टा अनुपश्यति"

(Logic of detachment)

प्रकृतिचे सत्, रज, तम गुण व गुणातीत(शाश्वत, ईश्वर) हे प्रकृतिचे विज्ञान भगवतगीतेने अध्यात्म या विषयाचे संदर्भात स्पष्ट केले आहे. अशाश्वताशी Detachment म्हणुन शाश्वताशी Attachment हे अनासक्ति (Detachment ) चे logic आहे. याच Detachment संदर्भात "कर्ता" कोण?हे निश्चित जाणणे हा विषय भगवतगीतेने स्पष्ट केला आहे.

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।

अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।।(३-२७)

गुणा गुणेषु वर्तन्ते इति मत्वा न सज्जते।(३-२८)

न अन्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टा अनुपश्यति।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद् भावम् सोअधिगच्छति॥(१४-१९)

येथे "द्रष्टा "हा शब्द महत्वाचा आहे. आपण झाड पाहतो. झाड दृश्य असते व मी "द्रष्टा "(Seer)असतो. याप्रमाणेच मी कर्ता नव्हे तर द्रष्टा असतो. गुणांचा खेळ(गुणा गुणेषु वर्तन्ते) कर्ता या संदर्भात संबोधले आहे. मी शरीर (अशाश्वत) vs मी आत्मा, शाश्वत, गुणातीत या संदर्भात शाश्वत तत्व द्रष्टा असते. दृश्य Changable आहे.

रजःतमश्च अभिभूय सत्वं भवति भारत।
रजःसत्वं तमश्चैव तमः सत्व रजस्तथा॥(१४- १०)
वर्तमानात दोनगुणांवर विजय मिळवुन एकगुण क्रियाशील होतो.

सत म्हणजे ज्ञान, रज म्हणजे प्रवृत्ति, तम म्हणजे अज्ञान याप्रमाणे गुणांचे ज्ञान जाणुन वर्तमानात सतगुण active असणे (Mode of goodness/ Wisdom) आवश्यक असते. तम गुण active

असला तर Delusion असते. (वास्तवाला जसे आहे तसे न पाहणे. अज्ञानाला ज्ञान संबोधणे). रजगुण active असेल तर कार्यरत असतो पण सकाम कर्म असते. अहंकार असतो. यामुळे संशय असतो. सत गुण activeकरणे, चांगले कर्म करुन वृद्धिगत करणे आवश्यक असते.

कर्मणा सुकृतस्य आहुः सात्विकं निर्मलं फलं।(१४-१६)

ज्ञान vs अज्ञान म्हणजेच सत vs तम गुण असते. कार्याद्वारे Detachment या संदर्भात निष्काम कर्म हा संदेश आहे. याचसाठी नित्य सत्वगुणात राहणे, (कार्याचा) एकनिश्चय असणे(निर्द्वंद्व) हा संदेश आहे.

त्रैगुण्यविषया वेदा निःत्रैगुण्यो भवार्जुन।
निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।।(२-४५)

******

(१४-१९) :

" गुणेभ्यश्च परम् वेत्ति मद् भावं सो अधिगच्छति "

(Connection with God)

*Are we aware of what circumstances drives our life?
सत, रज आणि तम या तीन गुणाद्वारे प्रकृतिचे Automation असते. याच संदर्भात automatic action व intentional action हा मानसशास्त्रिय अभ्यासाचा विषय आहे. (क्षेत्रक्षेत्रज्ञ योग)

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते।।(१३-२०)

जीवनविकासाचे संदर्भात
-Automatic(प्रकृतिचे Automation)vs (कार्याचे) Intention,
-Controllable(नियंत्रण होवु शकते)vs Uncontrollable(उदा. मृत्यु),
-Choice(उदा. कार्याचा अधिकार)vs No choice (उदा. कर्मफल result)

याप्रमाणे भगवतगीता Awareness देते.

* Intention

मनुष्यजीवनांत निर्णय घेणे व मार्ग चालणे यांतील निर्णय घेणे ही Intentional क्रिया असते. ही क्रिया घडली नाही तर जे घडते त्याचा स्विकार करावाच लागतो. व मनुष्य सुखदुःख अनुभवतो.

चिंता करणे, दुःखाने विचलित होणे हे प्रकृतिचे automation असते. अर्जुनाला कार्यात दुःख आढळते. तो कार्य टाळतो. व समर्थन करतो. ही (Behavior) वागणूक Automatic क्रिया असते. अर्जुनाचे समर्थन दुःखमुक्तिसाठी असते. ही क्रिया त्याचे Attitude दर्शवते. अर्जुन या प्रक्रियेत कार्याच्या Intention चा आढावा घेतो. मला सुखासाठी कांहिही नको. कांही नकोच तर अशा घोर कार्याचे प्रयोजन व्यर्थ आहे. उलट पाप होईल हे सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान सांगतो.

(युद्ध)कार्य टाळणे अर्जुनाचे automation असते. कार्याचा परिणाम शोक आहे म्हणुन तो कार्याच्या Intention मध्ये संशय

व्यक्त करतो. व यावर भाष्य करतो. आमचे Intention लोभ आहे!

मनुष्यस्वभावाचे हेच automation आहे. "What you sow, so reap. "मनुष्याच्या सुख, विकास याविषयाच्या संकल्पना जशा असतात, तसे हे automation बनत असते. याच Automationमुळे मनुष्य दुःख, चिंता करीत असतो, तरी जसा जगतो, हाच माझा विकासमार्ग आहे, असा त्याचा समज असतो.

राज्य(ऐश्वर्य, पैसा)नको म्हणुन कार्याची(विकास)गरज नाही अशी अर्जुनाची भूमिका असते. पण दुःखी अवस्था विकासाची गरज दर्शविते. याच विकासमार्गाचे अर्जुनाला अज्ञान असते, तरी(अहंकारामुळे) स्वतःला ज्ञानी ठरवितो.

*Acceptance of reality

Acceptance of reality हे विकासाचे प्रथम पाऊल आहे. अर्जुन दुःखाची मानसिक स्थिति, अज्ञान स्विकार करतो व विकासमार्गाचे ज्ञान ग्रहण करतो.

प्रत्यक्षात याक्षणी (त्याला करावयाच्या कार्याच्या) Intention मधील संशय कबुल केल्यावर शेवटी प्रश्न करतो, प्रस्तुत कार्याचा परिणाम देवाचे राज्यही असला तरी शोक नष्ट कसा होईल हा प्रश्न मला भेडसावत आहे. येथे शोकमुक्ति त्याची गरज ठरते. सुखासाठी मनुष्य कार्य करतो. योगक्षेम, भोगैश्वर्य, परमार्थ यासाठी कार्य अर्जुन जाणतो पण शोकमुक्तिसाठी कार्य जाणत नाही.

मनुष्यजीवनात कर्म घडणे हा अविभाज्य भाग आहे. (कर्मानुबंधिनि मनुष्यलोके). तसेच जगात ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे. विकासासाठी ज्ञान आवश्यक असते. ज्ञानाने Intentionमधील संशय नष्ट करणे व कार्याद्वारे शोकमुक्ति हा भगवतगीतेचा विषय ठरतो.

(ईश्वर)ज्ञानाने Intention मधील संशय नष्ट करणे व कार्याद्वारे ईश्वरभक्तिसाठी करणे, याद्वारे शोकमुक्ति(योगः कर्मसु कौशलम् )चे रहस्य सांगितले. याचसाठी ज्ञान व ईश्वर याचा संबंध भगवतगीतेत ज्ञानविज्ञानासह स्पष्ट केलेला आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

नकारात्मक विचाराचे कारण मनाची दुःखी, दुबळी अवस्था असते. म्हणुन सकारात्मक विचारासाठी नित्य ईश्वरचिंतन हे replacement असते व हेच विभूतियोगातुन स्पष्ट होते. (यांत सृष्टि संचालनातील समृद्ध, उर्जायुक्त विभूतिचे चिंतन आहे). व बुद्धिची Stable अवस्था प्राप्त होण्यासाठी कार्याद्वारे भक्ति कशी करायची याची कला व शास्त्र सांगतात.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

हृदयातील ईश्वर - परमेश्वर, महेश्वर
आत्मा - परम् आत्मा
पुरुष - पुरुषोत्तम्

म्हणुन शेवटी निवड दिली, Automation प्रमाणे जगत राहणे किंवा ईश्वराचा आश्रय करुन ईश्वरभक्तिसाठी ( Intentionaly)कार्य करणे.

सार :

दुखमे सुमिरन सब करे सुखमे करे न कोय।
जो सुखमे सुमिरन करे तो दुख काहे होय।

The life is automation of nature . And..

..

The basic intention of life is to connect with God.

न अन्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टा अनुपश्यति।
गुणेभ्यश्च परम् वेत्ति मद् भावं सो अधिगच्छति ।।(१४-१९)

*******

(१४-२०)

**************************

गुणान् एतान् अतीत्य त्रीन् देही देहसमुद् भवान् ।

जन्ममृत्युजरादुःखेः विमुक्तः अमृतम् अश्नुते॥

**************************

(१४. २०)/१:

"गुणान् एतान् अतीत्य त्रीन् देही देहसमुद् भवान् "

(जीवनविकासाचे तत्व)

या विश्वात निसर्ग आपण जाणतो, तसेच Material world प्रकृति (Material nature, प्रकृतिगुण) व पुरुष (गुणातीत) यांची निर्मिति असते. प्रकृति (अशाश्वत) व पुरुष(शाश्वत) याद्वारे जीवनाची निर्मिति आहे, जीवनयात्रेचे संचलन आहे.

पुरुष(जीवनातील शाश्वत तत्व) पुरुषोत्तम (Universal शाश्वत तत्व, ईश्वर) याच शाश्वत तत्वाचा भाग आहे. जीवनातील शाश्वत तत्व सत, रज, तम या तीन प्रकृतिगुणांनी बद्ध आहे. जोवर ही बद्धता आहे, जीवन येणारच(जन्ममृत्युफेरा). या फेऱ्यात सापडले

कि जीवनाचे आव्हान स्विकारणे मनुष्याचे दायित्व ठरते. कारण
"जन्ममृत्युजराव्याधी दुःखदोषअनुदर्शनम् ।"
या प्रकृतिगुणांच्या पलीकडे जाणे म्हणजे ईश्वरधामाकडे जाणे.

गुणान् एतान् अतीत्य त्रीन् देही देहसमुद् भवान् ।
जन्ममृत्युजरादुःखेः विमुक्तः अमृतम् अश्नुते।।(१४-२०)

भगवतगीता जीवनातील याच गुणाचा प्रभाव व ईश्वराची ओळख देते. यामुळे ईश्वरभावाचा आश्रय म्हणजे ईश्वरभावाशी संमिलन असते.
गुणेभ्यश्च परम् वेत्ति मद् भावं सो अधिगच्छति ।।(१४-१९)

हाच आधार जीवनविकासाच्या Logic चा आहे. त्रीगुणातील सतगुण म्हणजे प्रकाश, (शाश्वत) सुख व ज्ञानाची आवड दर्शविते. याच "सत" चा उपयोग आपण व्यवहारात चांगलेपणा या अर्थाने घेतो. ईश्वरश्रद्ध असलेल्याला सात्त्विक समजतो. भगवतगीता जीवनमार्ग या संदर्भात सत-असत (योग्य-अयोग्य) मार्ग याचे ज्ञान सांगते.
१. सत-असत म्हणजे शाश्वत -अशाश्वत या अर्थाने आलेले आहे.

न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः।
उभयो अपि दृष्टो अन्तः तु अनयोः अपि तत्वभिः।।(२-१६)

२. सत-असत मार्ग म्हणजे मुक्ति-बंधन(विकास-अडथळा) या अर्थाने आलेला आहे. यातील सत भाव म्हणजे चांगलेपणा, कल्याणभाव, चांगले कार्य तसेच वर्तमानातील सुखी(विचलित न होता कार्यरत) स्थिति या अर्थाने स्पष्ट होते.

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत् ।
असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह।।(१७-२८)

* अर्जुन चांगला असतो पण त्याला संभाव्य स्वकीयांच्या पीडेने ग्रस्त केले असते. युद्धक्षेत्रावर तो व्यथीत होतो. यामुळे नियतकार्य योग्य कि अयोग्य? या संभ्रमात (बंधनाचे जाळे) सापडतो.

* जगात चांगलेपणा दुबळा ठरला तर असुरशक्तिचा समाजात प्रभाव वाढतो. म्हणुन चांगलेपणा म्हणजे दुर्बलता नव्हे हा भगवतगीतेचा संदेश आहे.

अर्जुनाच्या स्वभावातील चांगलेपणाला " दैवीगुण" संबोधले आहे. दैवीगुणात "अभय" हा प्रथम गुण आहे. श्रेष्ठ मनुष्य (पुरुषं

पुरुषर्षभ) जीवनमार्गात विचलित होत नाही. म्हणुन चांगल्या मनुष्यासाठी संदेश आहे,

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

* दुःखी झाला असता अर्जुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी आपल्या भुमिकेचे समर्थन करतो. (भ्रम असुनही, अयोग्य असुनही) स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा उपयोग करणे हा प्रज्ञावाद असतो. येथे अहंकाराचा आश्रय असतो. म्हणुन भगवतगीता भ्रममुक्तिसाठी ज्ञानाचा आश्रय या संदर्भात ईश्वराचा आश्रय सांगत आहे. व याचसाठी बुद्धियोगाचे प्रयोजन (कार्यकौशल्यासाठी) आहे.

बुद्धियुक्तो जहातीह उभेसुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्।।(२-५०)

या मार्गात योग(दुःखान्त)साधना होत असते.
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

******

(१४. २०)/२:"जन्ममृत्युजरादुःखैः विमुक्तो अमृतं अश्नुते"
(Growing old vs Growing up)

जीवनाचा प्रवास म्हातारपणाकडे, मृत्युकडे होत आहे!अर्थात दुःखच या जीवनाचे अंतिम धाम आहे!या जीवनाच्या (Growing old) बाह्य वास्तवाने सिद्धार्थाची झोप उडवली. याच घटनेत बौध्द धर्माचे बीजारोपण झाले.

आपल्या नियतकार्याने दुःखच पदरी पडणार हे वास्तव जाणुन अर्जुनाचे गात्रच शिथील झाले. व दुःख टाळण्यासाठी निष्क्रियता पत्करतो .

असेच जीवनाचे वास्तव आढळल्यामुळे मनुष्य गोंधळतो व वर्तमानात त्याचे जे आचरण असते, त्याचे समर्थन करतो. यासाठी ज्ञानाचा वापर करतो, ज्याला स्वतःचाच मार्ग कळत नाही तो अर्जुन धर्मज्ञान सांगत आहे!म्हणुन जीवनाचे ज्ञान हा विषय चर्चेत येतो.

जीवन म्हणजे Growing old हे External वास्तव असते, तर Growing Up (विकास, आत्मोन्नति) हे Eternal वास्तव असते. याच विकासाचे ज्ञान भगवतगीता सांगते. याच शाश्वत विकासासाठी बाह्य( External) वास्तव व Eternal वास्तव यांचा समन्वय भगवतगीतेने कार्याद्वारे साधलेला आहे.

गुणान् एतान् अतित्य त्रीन् देही देहसमुद् भवान् ।
जन्ममृत्युजरादुःखैः विमुक्तो अमृतं अश्नुते।।(१४-२०)
जीवनात सत, रज, तम या त्रीगुणाच्या आश्रयाने प्रकृति क्रियाशिल असते. व अंतिम धाम गुणातीत (ईश्वर) असतो. याच ईश्वराच्या आश्रयाने आत्मोन्नति अर्थात शाश्वत विकासमार्ग (अमृतत्वाय कल्पते) बनतो.

मनुष्याला सुखासाठी (पैसा, भोगैश्वर्य) प्राप्ति व प्राप्तिसाठी कार्य हे वास्तव मनुष्य जाणतो म्हणुन व्यवहारात सकाम कार्य जाणतो. हे External वास्तव असते. तर आत्मोन्नति Eternal विकास असतो. म्हणुन कार्याद्वारे योग (यासाठी निष्काम कर्म) हा विकासाचा मध्य साधलेला आहे. व हा जीवनाचा शाश्वत विकासमार्ग(Grow up) ठरतो. या मार्गालाच "अमृतत्वाय

कल्पते" (२-१५)असा शब्दप्रयोग आहे. या मार्गावर(वर्तमानातील)मानसिकता कशी असावी? हे "यं हि न व्यथयन्तेते" व "समदुःखसुखंधीरं" या शब्दप्रयोगाने व्यक्त केली आहे.

आपले जीवन कोणत्या दिशेने प्रवास करीत आहे? "Growing Old"कि "Growing Up" ही ओळख स्वतःलाच करुन घ्यायची आहे!

"नजरको बदलो नजारे बदल जायेंगे।

सोचको बदलो सितारे बदल जायेंगे।

कश्ति बदलना जरुरी नही!

दिशाको बदलो किनारे बदल जायेंगे।"

******

(१४-२७)

*************************

ब्रह्मणो हि प्रतिष्ठा अहं अमृतस्य अव्ययस्य च।

शाश्वतस्य धर्मस्य सुखस्य ऐकान्तिकस्य च॥

*************************

(१४-२७)

:"शाश्वतस्य धर्मस्य सुखस्य ऐकान्तिकस्य च"

जगात वर्तमानात अस्तित्वात असलेले धर्म विशिष्ट समुहाचे निदर्शक म्हणुनच ओळखले जातात. या पार्श्वभूमिवर धर्मसंबंधाने भगवतगीतेचे ज्ञान जाणुन घेणे महत्वाचे ठरते.

मनुष्याचे Emotional world विविध Intimacy circle ने विभागलेले असते. तो स्वतः केंद्रस्थानी असतो. याभोवती "आपण(आपले)" या संदर्भात(आपला परिवार, आपले गांव, आपला देश, आपली संस्था, आपला धर्म इ. ) हे सर्व Circles असतात. आपला परिवार या संदर्भात आर्थिक परस्परावलंबि

असलेले स्वतःचे कुटुंब व आर्थिक अवलंबुन नसलेले (स्वजन)कुटुंब अनुक्रमे प्रथम व दुय्यम Circle असते. अर्जुनासाठी पांडव प्रथम circle तर धृतराष्ट्र(व पुत्र) स्वजन circle होते. यांत intimacy तीव्र असते. म्हणुन अर्जुन दुःखी झाला. त्याचा स्वतःचा मार्ग दुबळा झाला. स्वतःचा मार्ग सक्षम करणे स्वतःच्या अधिकारात असते.

प्रत्येक मनुष्य स्वतःच्या प्रकृतिस्वभावानुसार, आपल्या संस्कारानुसार जगत असतो. अर्जुन असाच जगत असता दुःखी झाला. दुःख टाळण्यासाठी निष्क्रिय होतो. व याला धर्माचा दाखला देतो. या भाष्यातअज्ञानाला ज्ञान दर्शवितो. अशा भाष्याला "खायचे दात वेगळे(वास्तव) व दाखवायचे वेगळे(भाष्य) " अशी ओळख आहे. युद्ध करणे अयोग्य आहे हे अर्जुनाचे व्यक्तिगत judgement असते. "शहाणा" संदर्भात मनुष्याला Judgement thinking ची संवय असते. "ज्ञान" संदर्भात वास्तव स्विकारणे आवश्यक असते. यामुळे प्रश्न define होतो. संवादाला निश्चित विषय मिळतो.

भाष्य संवादाचे माध्यम असते. वास्तवाचा स्विकार केला तर संवाद होतो, सार्थक भाष्य होते. अज्ञान दर्शविल्यानंतर धर्मदृष्ट्या

काय योग्य हे कळत नाही हे वास्तव कबुल करतो. व संवाद सुरु होतो. Intimacy circle मधील शेवटचे Circle विश्व circle असते. धर्मसंदर्भात विश्वधर्माचा आधार हेच circle असते("आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च"). हाच धर्म स्वतःचा मार्ग सक्षम करण्यासाठी अर्जुनाला सांगण्यात येतो. (सर्वभूतहितेरतः).

जगात स्वतःचा मार्ग सक्षम करण्यासाठी, समुहाचे निरोगी संचलनासाठी Cross cultural management चा उपयोग होतो. भगवतगीतेत याला धर्मस्थापना म्हटले. या धर्माचा आधारच ज्ञानविज्ञान आहे. शाश्वत (जीवित) तत्व ज्या ईश्वराचा अंश आहे, तो ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. या ईश्वराची ओळख विविध संदर्भात आलेली आहे.
विश्वधर्म, सृष्टिसंचलन संदर्भात सृष्टिचा अध्यक्ष, दैव संदर्भात अधिदैव, जीवित तत्व संदर्भात क्षेत्रज्ञ, मनुष्याचे अंतिम Goalसंदर्भात सनातन अव्यक्त- ईश्वरधाम, सृष्टिधारणेत प्रकृतिसंदर्भात पुरुष, प्रकृतिगुण (सत, रज, तम) संदर्भात गुणातीत.
शाश्वतस्य धर्मस्य सुखस्य ऐकान्तिकस्य च।(१४-२७)

या आधारावर स्वतःच्या विकासाचा शाश्वत मार्ग होण्यासाठी "बुद्धियोग" ही किल्ली ठरते. या मार्गावर कार्याद्वारा ईश्वरभक्ति घडते. स्वतःचा निश्चित मार्ग(स्वधर्म, कार्याचा दृढनिश्चय)बनतो. दुःखामुळे विचलित होत नाही. अडचण विकासाची संधि ठरते.
बुद्धियोगं उपआश्रित्य मद् चित्तः सततं भव।(१८-५७)

************

# भगवदगीता

# अध्याय १५ पुरुषोत्तमयोग

## अध्याय १५ पुरुषोत्तमयोग

"The secret to life is meaningless unless you discover it yourself. "

जीवन रहस्यमय आहे. अज्ञानामुळे जीवन मृत्युकडे प्रवास करीत आहे असे भासते. तर अध्यात्मज्ञानामुळे हे जीवन त्याच्या मुळ पदाकडे (अमृतत्वाय कल्पते)प्रवास करित आहे हे जाणतो. हाच दृष्टिबदल होण्यासाठी पुरुषोत्तमयोग शास्त्र ठरते. म्हणुन या अध्यायाला शास्त्र म्हटले आहे. याच शास्त्राचा वर्तमानात प्रत्यक्षात उपयोग होण्यासाठी निश्चित उद्देशअध्याय १६ मध्ये स्पष्ठ झाला आहे. दोन्हीमध्ये शास्त्र या शब्दाचा उल्लेख आलेला आहे.

"कर्मानुबंधिनि मनुष्यलोके" अर्थात मनुष्यजीवन कर्माने या सृष्टित बांधलेले आहे. "ततः पदं तत्परि मार्गितव्यं" अर्थात जीवनाचे मुळ पद जाणणे. व मार्गस्थ होणे. यासाठी " असंगशस्त्रेण दृढेन छित्वा" अर्थात अनासक्ति(फलत्याग) शास्त्र आहे . "ज्ञात्वा शास्त्रं विधान उक्तं कर्म कर्तुम् इह अर्हसि".

या सृष्टित नित्य बदल होत असतात. जशी जुनी पाने गळुन नवी पालवी येते व झाड पुनः टवटवित होते. तसेच ही सृष्टि नित्य टवटवित रुप धारण करीत असते. (यह जिंदगिके मेले दुनियामे कम न होंगे). ज्या सृष्टित मनुष्य जन्माला आला ती सृष्टि एका अवाढव्य वृक्षासमान आहे. या वृक्षाची पाने सृष्टितिल संगित(छंदासि यस्य पर्णानि) असते. ज्याचे मुळ वर आहे, व फांद्या खाली आलेल्या आहेत. या फांद्यांनी खाली मुळ धरलेले आहे. मनुष्य याचमुळे कर्माच्या बंधनात सापडलेला असतो. ज्या वृक्षाचे मुळ, अंत, पाया कांहीच सापडत नाही, असे हे अश्वत्थवृक्ष असंगशस्त्राने ( अनासक्ति, फलत्याग) छेदल्या जाते. या वृक्षाचे मुळ वर आहे, ज्यामुळे सृष्टिनिर्मिति झाली ते पद जाणतो व त्या पदाकडे मार्गस्थ होतो.

द्वंद्वैः विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैः।गच्छन्ति अमुढाः पदम् अव्ययम् तत् ।।(१५-५)

*ईश्वराचे धाम व जीवनांत अस्तित्व

सृष्टिच्या उत्पत्तिचे मुळ धाम स्वयं प्रकाशमान आहे. या धामाला सूर्य, चंद्र, अग्नि किंवा कोणतिही उर्जा प्रकाशित करीत नाही.

याच्याच अंशाने प्रकृतिस्थानी आकर्षित होवुन जीवलोकी मानवरुप धारण केले आहे. हे शाश्वत तत्व प्रकृतिगुणांनी वेढलेले आहे. हे तत्व शरीर सोडते तेंव्हा वारा फुलातील गंध वाहुन नेतो, तसे गुणांना वाहुन नेते. अर्थात हेच Consciousness जीवात्मा ठरते व दुसरे शरीर धारण करते.

*तेजोमय उर्जातत्व

सूर्य, चंद्र, अग्नि कोणतेही तेज मनुष्य जाणतो, ती ईश्वराची उर्जा आहे. हीच उर्जा वनस्पतिचे धारणपोषण करते. शरीरात हीच उर्जा प्राणअपान प्रक्रिया, अन्नपचन यांत (वैश्वानर भूमिकेत) कार्यरत असते. सर्वांच्या हृदस्थानी हे तत्व प्रतिष्ठित असते. ज्ञान, स्मृति, विस्मरण याच तत्वामुळे असते.

क्षर(नाशिवंत) व अक्षर(अविनाशी) हे दोन तत्व यालोकी असतात. या दोनतत्वांशिवाय श्रेष्ठ असलेले शाश्वत पुरुषतत्व परमात्मा म्हणुन तिन्ही लोकांत ओळखल्या जाते. संपुर्ण ब्रह्मांड चालविणारा हाच ईश्वर असतो. जीवसृष्टितील हेच मुळ तत्व ज्ञानीजन पुरुषोत्तम म्हणुन जाणतात व भजतात. अर्थात मनुष्य आपल्या उर्जायुक्त मुलतत्वाचे महत्व जीवनयापनात जाणतो, उपयोगात आणतो, व आपले(जीवनाचे) लक्ष्य (मुळपद) जाणुन नित्य मार्गस्थ(अमृतत्वाय कल्पते) असतो

अध्याय १५- मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

१५-१ :"उर्ध्वमुलम् अधः शाखम् "

१५. २:"कर्मानुबंधीनि मनुष्यलोके"

१५. ३: " असंगशस्त्रेण दृढेन छित्वा "

१५-४/१:"ततः पदं तत्परिमार्गितव्यं

यस्मिन गतः न निवर्तन्ति भूयः"

(I. Lifevalues :the strength of Life)

(१५-४)/२:"ततःपदं तत्परिमार्गितव्यं

यस्मिन् गता न निवर्तन्ति भूयः"

(II. Herd vs. Hero)

१५. ५/१:

" निःमानमोहा जितसंगदोषा

अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः "

(शाश्वत विकासमार्ग)

(१५-५)/२:"द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैः

-गच्छन्ति अमूढाः पदम् अव्ययं तत् "

(Universal Standard Path)

(१५-६) /१ :

"न तद् भासयते सूर्यो न शशांको न पावकः"

(स्वतःचा मार्ग)

(१५-६)/२:

"यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धाम परमं मम"

(प्रवास अजुन संपला नाही!)

१५. ७:

"ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः"

१५-८:

"शरीरं यद् अवाप्नोति यत् च अपि उत्क्रामति ईश्वर"

(जीवन व त्याचा प्रवास)

१५. १० :

"विमूढा न अनुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः"

(Trained eyes of knowledge)

१५-१५/१:

"सर्वस्य च अहं हृदि संनिविष्ठो"

(जीवनाचा राजमार्ग)

१५-१५/२ :

"मत्तः स्मृतिः ज्ञानं अपोहनं च"

१५. १६:/१:

"द्वौ इमौ पुरुषौ लोके क्षरः च अक्षर एव च"

(अखंड विकास म्हणजेच आत्मोन्नति)

(१५-१६)/२:

"क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थो अक्षर उच्यते"

(अशाश्वत vs. शाश्वत;अशांति vs विकास)

(१५-१७)/१:

"उत्तमः पुरुषः तु अन्यः परमात्मा इति उदाहृतः"

(आत्मा-परमात्मा/ God connection)

(१५-१७)/२:

"यो लोकत्रयम् आविश्य बिभर्ति अव्यय ईश्वरः"

(पुरुषोत्तम-परमात्मा-ईश्वर)

(१५-१८)/१:

"यस्मात् क्षरम् अतीतो अहं अक्षराद् अपि च उत्तमः"

(The Supreme-पुरुषोत्तम-ईश्वर-परमात्मा)

(१५-१८)/२:

"अतोअस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः"

(श्रीकृष्णाची पुरुषोत्तम ही ओळख)

(१५-१९)/१ :

" यो माम् एवम् असम्मूढो जानाति पुरुषोत्तमम् "

(Determination साठी ज्ञान या संदर्भात ईश्वराचे ज्ञान )

(१५-१९)/२ :

"स सर्वविद् भजति माम् सर्वभावेन भारत"

(ईश्वराचे पुरुषोत्तम ज्ञान)

१५. २०:

"इति गुह्यतमं शास्त्रं इदं उक्तं मया अनघ"

(ज्ञान, कर्म व भक्ति)

******

(१५-१)

*************************

उर्ध्वमुलम् अधः शाखम् अश्वत्थं प्राहुः अव्ययम् ।

छंदासि यस्य पर्णानि यः तं वेद स वेदविद् ॥

*************************

(१५-१) :"उर्ध्वमुलम् अधः शाखम् "

आपण ज्या जगात आलो आहोत, ते एक भव्य वृक्ष आहे. ज्याचे मुळ वर व शाखा वर-खाली पसरलेल्या आहेत. या शाखांनी खाली मुळ धरल्यासारखे भासते. यामुळे मनुष्य कर्मबंधनात असतो. हेच कर्म विकासाचे साधन असते.

शाश्वत विकास उर्ध्वगामी असतो. उर्ध्वगामी विकासात इच्छा-कर्म-आत्मसंयम(दृढता)-ज्ञान (आत्मा-ईश्वर) अशी उर्ध्वगामी कार्यप्रणालि कार्यरत असते. शरीरयंत्राच्या संरचनेत मन विषयकेंद्र (Centre of senses) आहे. मनापलीकडे बुद्धि, बुद्धिपलिकडे आत्म्याचे स्थान अशी श्रेष्ठता(sequence of superiority )असते.

या प्रवासात इच्छेमुळे निर्माण होणारा काम(संगात् संजायते कामं) शत्रु ठरतो, जो खाली ओढत असतो. अर्थात आत्मविकासरुपी पहाडावर चढतांना मन बुद्धिचे पाय ओढते. (मनातील नकारात्मक

विचार इच्छाद्वेष द्वंद्व तयार करते व मोहाद्वारे विचलित करते). बुद्धिचे वर (पलिकडे) आत्मा असतो. आत्माचे वर ईश्वर (परमआत्मा) असतो. आत्मा ईश्वराचा अंश असतो म्हणून वर(Step up) घेण्यासाठी ईश्वर बुद्धिला हात देत असतो. अर्थात बुद्धियोग देतो. बुद्धियोगामुळे दृष्टिबदल होतो. कार्याचा एकनिश्चय होतो. समत्वयोगाने कार्य (निष्काम) करतो. व याप्रमाणे हे अनाकलनिय वृक्ष असंगशस्त्राने छेदल्या जाते. या प्रक्रियेत जीवनात ईश्वराचे(पुरुषोत्तम) ज्ञान व महत्व कळते.

उर्ध्वमुलम् अधः शाखम् अश्वत्थं प्राहुः अव्ययम् ।(१५-१)

.....

असंगशस्त्रेण दृढेन छित्वा।(१५-३)

भगवतगीतेत योग्य-अयोग्य याचे ज्ञान सांगितले पण निर्णय स्वतः घ्यायचा असतो ही जबाबदारी असते. व्यवहारात जशी मनुष्याला जबाबदारी भार वाटते, तसे अर्जुनाला भार वाटु नये म्हणुन सर्वात शेवटी म्हटले, मला शरण राहशील तर मी तुझ्यासोबत आहे, ज्या जबाबदारीचे भय वाटते, त्याची जबाबदारी मी स्विकारतो. अन्यथा तुझ्या कर्माचा व फलाचा तुच जबाबदार राहशील .

अहं त्वां सर्व पापेभ्यो मोक्ष्ययिष्यामि मा शुचः।(१८-६६)

******

(१५-२)

*************************

अधःश्च उर्ध्वं प्रसृताःतस्य शाखा।

गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः।

अधःश्च मुलानि अनुसन्ततानि।

कर्मानुबंधीनि मनुष्यलोके।

*************************

(१५-२) :"कर्मानुबंधीनि मनुष्यलोके"

मनुष्यजीवनातील कर्म या संदर्भातील सत्य व त्याचे महत्व भगवतगीता सांगते. कार्यकौशल्य साध्य करण्यासाठी व विकासमार्ग जाणण्यासाठी ज्ञानविज्ञानासह विविध प्रकारे विश्वातील मनुष्याची भूमिका स्पष्ट केली आहे.

व्यावहारिक प्रश्न कर्माद्वारे सोडविल्या जातात. अर्थात कर्म साधन असते. याच कर्माला शाश्वत विकासाचे साधन करण्याचे कौशल्य भगवतगीतेने सांगितले. जीवनांत कर्माचे स्थान, महत्व व विकासासाठी कार्यकौशल्य साध्य व्हावे यासाठी निष्काम कर्माचे महत्व येथे दर्शविले आहे.

*सामान्य जीवनाचे वास्तव व अज्ञान:

मनुष्याचा जीवनरथ कार्यरत असतो. योग्य काय ?अयोग्य काय? हा मनुष्याचा प्रश्न असतो. योग्य मार्गावर रथ वळविता आला नाही तर योग्य व अयोग्य या द्वंद्वामध्ये मनुष्य सापडतो. प्रसंगी निष्क्रिय राहणे पसंत करतो. व नाव वाऱ्याने वहावी तशी जगण्याची अवस्था होते.

मनुष्य अज्ञानाचा स्विकार न करता स्वतःला ज्ञानी ठरविण्याचा प्रयत्न करतो. मी वाईट नाही म्हणुन चांगला आहे हा नियम मनुष्य स्वतःच्या सोयीसाठी बनवितो. कारण समाजात चांगले-वाईट याच आधारावर भाष्य होत असते. Universal Law मध्ये Law of Polarity एक नियम आहे. अंधार-उजेड, चांगला-वाईट, ज्ञान-अज्ञान इ. अशी Polarity आपण जाणतो. याचाच आधार घेवुन स्वतःला चांगला, ज्ञानी ठरविण्याचा प्रयत्न असतो.

नियतकार्य टाळणे, जबाबदारी टाळणे, हा पळपुटेपणा असतो. निष्क्रियता दुबळे बनविते. जसे आसुरी होणे वाईट, तसेच दुबळेपणा, निष्क्रियता मानसिक गरिबी ठरते. अज्ञान ठरते. निष्क्रियतेला शक्ति दर्शविण्याच्या प्रयत्नात अज्ञानाला ज्ञान ठरविणे, दुर्बलतेला शक्ति ठरविणे . आपली दुर्बलता, निष्क्रियता झांकण्यासाठी मनुष्याने अंगिकारलेली ही समाजातील बुरसटलेली संवय असते. यामुळे नकारात्मकता असते.

*"माम् अनुस्मर युध्य च"

जीवनात सुख हवे असते, पण दुःखही आहे व अडचणी त्याचे कारण असते. दुःख टाळण्यासाठी अर्जुन निष्क्रियता पसंत करतो. म्हणुन जीवनाला संघर्षाचे रुपक आहे.

(माम् अनुस्मर युध्य च). जीवनविकासासाठी हे युद्ध लढायचे असते.

*"असंगशस्त्रेण दृढेन छित्वा"

मनुष्य सुखासाठी जगत असतो. दुःख म्हणजे Attachment of pain असते. आसक्तिमुळे Attachment असते म्हणुन धर्मधुरिण आसक्ति दुःखाचे कारण दर्शवितात. जेंव्हा प्राण शरिरापासुन

detach होतो, तो मृत्यु म्हणुन आपण जाणतो. म्हणुन Detachmentचे शास्त्र भगवतगीता सांगते. यासाठी ध्यानधारणा, योग हा अभ्यास असतो.

भगवतगीता कर्मशास्त्राद्वारे Detachmentची Art सांगते. यासाठी या विश्वाला महावृक्षाची उपमा दिली तर त्याचे मुळ वर आहे. शाखा खाली पसरलेल्या आहेत. गुणयुक्त याच शाखा वर व खाली पसरलेल्या दिसतात. या वृक्षाने खाली मुळ धरलेले आहे व याच मुळामुळे मनुष्य कर्म करण्यास बाध्य होतो.

अधःश्च उर्ध्वं प्रसृताःतस्य शाखा।गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः।
अधःश्च मुलानि अनुसन्ततानि।कर्मानुबंधीनि मनुष्यलोके।(१५-२)

अर्थात या वृक्षाला छेदण्यासाठी कर्म साधन आहे, तर निष्काम कर्म शस्त्र आहे. हाच उर्ध्वगामि(जीवनाच्या मुळ, शाश्वत तत्वापर्यंत पोहोचण्याचा) जीवनविकासाचा मार्ग आहे. जीवनांत कर्माचे स्थान, महत्व व विकासासाठी कार्यकौशल्य साध्य व्हावे यासाठी निष्काम कर्माचे महत्व येथे दर्शविले आहे.

* विकासाचा शाश्वत मार्ग:

आपला स्वतःचा कार्यमार्ग पक्का व्हावा व विश्वासाने मार्ग चालुन निष्ठेने कार्य व्हावे . याच कार्याद्वारे Detachment साध्य व्हावे व स्वतःची खरी ओळख व्हावी हे कर्मशास्त्राचे रहस्य भगवतगीता सांगते. याच अनुषंगाने बुद्धिवर संस्कार(Quality education ) अभिप्रेत असते.

*धर्मश्रद्ध, चांगला असला तरी(अर्जुन)मनुष्य द्वंद्वात सापडतो व हा द्वंद्व break करण्यासाठी स्वधर्म Tiebreakerची भूमिका करते. स्वधर्म स्वतःच्या मार्गाला स्वतःची मंजुरी असते. म्हणुन स्वधर्म जीवनमुल्य ठरते. ईश्वरसमर्पित कार्य घडण्यासाठी स्वधर्माचरण अप्रिय वा प्रिय परिणामापासुन detach करते.

*ईश्वरभक्ति करणारे ईश्वरश्रद्ध असतात. याच श्रद्धेमुळे ईश्वराची ओळख करण्याचे ज्ञान भगवतगीता सांगते. व्यवहारात कर्म घडत असतात व द्वंद्वाच्या तुफानी हवेत जीवनाची नाव सापडते. म्हणुन ज्ञानाची गरज असते. (ज्ञानासाठी) हृदयातील ईश्वराची ओळख झाली तर जीवनाची ओळख होते. यासाठी भगवतगीता परम् ईश्वराची ओळख ("पुरुषोत्तम" ) करुन देते . या ज्ञानामुळे, श्रद्धेमुळे बुद्धियोग प्रदान होतो. व शाश्वत विकासमार्गावर स्वतःचा प्रवास

जाणतो. या मार्गावर कार्याचा निश्चय पक्का होतो. कर्माद्वारे योग साध्य करतो.

*दृढनिश्चयासाठी निर्णय अधिकाराची जागृति हवी. स्वावलंबन या जीवनमुल्याद्वारे निर्णय अधिकार मिळतो. Beggars are not choosers. या जगांत भार न बनता Asset व्हावे .
*वचन या जीवनमुल्याद्वारे कार्यनिश्चय पक्का होतो. मनुष्यावर विश्वास असतो.

*इच्छा Worries बनु नये. अडचणी दुःख बनु नये तर विकासातील कार्यसंधी जाणुन Goal/Aim निश्चित करणे व Deadline ठरविणे . यासाठीच भगवतगीतेतील कर्मशास्त्र कार्याचे आध्यात्मिक व्यवस्थापन ठरते.

******

(१५-३)

*************************

न रुपम् अस्य तथा उपलभ्यते।

न अन्तो न च आदिः च संप्रतिष्ठा।

अश्वत्थं एनं सुविरुढमुलं।

असंगशस्त्रेण दृढेन छित्वा।

*************************

(१५-३) : " असंगशस्त्रेण दृढेन छित्वा "

अश्वत्थं एनं सुविरुढमुलं।असंगशस्त्रेण दृढेन छित्वा।
ततः पदं तत्परिमार्गितव्यं।यस्मिन गतः न निवर्तन्ते भुयः।।(१५-३/४)

निष्काम कर्माचे तत्व स्पष्ट करण्यासाठी, हे विश्व एका विशाल वृक्षासारखे आहे. ज्याचे मुळ वर व फांद्या खाली आल्यात. अशी कल्पना पुरुषोत्तम योगात मांडलेली आहे. या वृक्षाचा मनुष्य असंगशस्त्राने छेद करुन (विश्वाच्या) मुळ पदाला जातो.

हे असंगशस्त्र निष्काम कर्म आहे. कर्माचा हा स्वतःचा दृढ मार्ग असतो. जीवनमुल्ये स्वतःचा मार्ग दृढ करण्यासाठी उपयोगी ठरतात.

१. "मत्कर्मपरमो भव " (१२-१०) )

यांत स्वधर्माचे नियतकार्यावर शिक्कामोर्तब असते व स्वतः मार्गाची जबाबदारी स्विकारतो. कार्य ईश्वराला (शाश्वत) समर्पित होते.

हे शक्य न झाल्यास

२. "कर्तुं मत् योगं आश्रितः।

सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यत् आत्मवान् "(१२-११)

यांत निर्णयअधिकार महत्वाचा आहे. निर्णयक्षमतेला येथे महत्व असते. तरच कार्याचा दृढनिश्चय असतो. दृढनिश्चय झाला तरच

फल ईश्वराला समर्पित होते. समत्वयोगाने कार्य execute होणे अपेक्षित असते.

याप्रमाणे असंगशस्त्राची धारणा होण्यासाठी स्वतःच्या मार्गाची दृढता, पारदर्शकता, जबाबदारी स्पष्ट होते. ईश्वराचा आश्रय, बुद्धियोग या शस्त्राला प्रभावी करते.

सार: प्रत्येक मनुष्य स्वतःचा मार्ग चालतो व तोच त्याचा जबाबदार असतो. या सत्याचा स्विकार केला तर समाजात, जीवनात पारदर्शकता असते. यामुळे मनुष्य स्वतःच्या जीवनाविषयी गंभिर असतो. ("वाल्याचा वाल्मिकी" या सत्याचा भक्कम पुरावा आहे. )हे सत्य जगातील कोणताही व्यक्ति अमान्य करणार नाही. विशिष्ट वयात मुलांची निर्णयक्षमता वाढविण्यासाठी विकसित राष्ट्रात प्रयत्न होत असतो. याच निर्णयक्षमतेमुळे अल्पवयात शिवाजी महाराजांनी "पन्हाळा" जिंकला.

******

(१५-४)

*************************

ततः पदं तत्परिमार्गितव्यं

 यस्मिन गतः न निवर्तन्ति भूयः।

तमेव च आद्यं पुरुषं प्रपद्ये

 यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी।।

*************************

(१५-४)/१:"ततः पदं तत्परिमार्गितव्यं

 यस्मिन गतः न निवर्तन्ति भूयः"

 ( Lifevalues :the strength of Life)

जीवनात जे महत्वाचे जाणतो, तेच मनुष्य करीत असतो. याच आधारावर जीवनमुल्यांचे महत्व मनुष्य जाणत असतो. अर्जुनाला( दुःख टाळण्यासाठी) युद्ध टाळणे (नियतकार्य) महत्वाचे वाटते. पण हाच मनुष्यजीवनातील Weakness असतो व या Weaknessला Strength दर्शवितो. अर्थात त्याला जीवनातील Weakness व Strength याची ओळख नसते.

भगवतगीता याच Weakness व Strengthची ओळख करुन देते. जीवनाचे वास्तव स्विकारले तरच विकासाचे महत्व कळते. Weakness वर मात करणे हे विकासाचे Purpose असते.

संपुर्ण प्रकृतिचे(सृष्टिचे) मुळच ईश्वरावर आधारलेले आहे. ईश्वरधाम हाच मनुष्याचा अंतिम Goal आहे. हाच शाश्वत विकासमार्गाचा(अशाश्वताकडुन शाश्वताकडे, अमृतंगमय) आधार आहे.

ततः पदं तत्परिमार्गितव्यं
यस्मिन गतः न निवर्तन्ति भूयः।
तमेव च आद्यं पुरुषं प्रपद्ये
यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी।।(१५-४)

या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही. या मार्गात "मोक्ष" ही संपुर्ण मुक्तिची संकल्पना असते, तर कर्म करण्याचा अधिकार अर्थात निर्णयअधिकार ही मुलभुत स्वातंत्र्याची जागृति भगवतगीता करुन देते.

"आपके जीवन में आज़ादी नहीं है तो आप उस शरीर की तरह है जिसमें से आत्मा गायब है।"

-खलील जिब्रान

अधिकाराच्या जागृतिमुळेच मनुष्य जबाबदारीने विकासमार्गावर असतो. म्हणुन स्वतःला अधिकार प्राप्त करुन देणे मनुष्याचे स्वतःप्रति दायित्व ठरते. याचसाठी स्वावलंबन जीवनमुल्य महत्वाचे आहे. "Beggars are not choosers"(अर्थात या जगी Liability व्हायचे कि Asset!)

जीवनाचा विकासमार्ग दृढ होण्यासाठी व निष्ठेने कर्म (निष्काम कर्म) घडण्यासाठी विकासाच्या शाश्वत मार्गाची व जीवनमुल्यांची (Strength)ओळख भगवतगीता करुन देते.

मार्गातील द्वंद्व, मनाचे चंचलत्व Weakness असतो. मार्गातील द्वंद्वावर मात करण्यासाठी स्वधर्म Tiebreaker असतो. मनाच्या चंचलत्वामुळे कार्याचा दृढनिश्चय होत नाही व दृढनिश्चयाशिवाय कर्मयोग घडत नाही. म्हणुन चंचलत्वावर मात करण्यासाठी

"बुद्धियोग" जीवनमुल्य ठरते, ज्यामुळे विकासाचा शाश्वतमार्ग ठरतो. व या मार्गावर निष्कामकर्म घडते.

*********

(१५-४)/२:"ततःपदं तत्परिमार्गितव्यं
यस्मिन् गता न निवर्तन्ति भूयः"
(II. Herd vs. Hero)

We are the most amazing creatures that this world has ever produced, but we seem to also have this herd mentality. Life is short. Don't do the same thing everyone else is doing - that's such a herd mentality. And don't do something that's two percent better than the other person. Do something that changes the world.

Oren Etzioni

जीवन जीवनयात्रा असते. प्रत्येक मनुष्याचे जीवन त्याच्या मार्गाचा प्रवास असतो. हा प्रवास अखंड सुरु असतो (कार्य घडते, विचार चालु असतात). हाच प्रवास आनंदाने होण्यासाठी मार्गाचे (मार्ग चालण्याचे)पायाभूत ज्ञान हवे असते. दुःखी असणे, विचलित होणे, Stress असणे, नकारात्मक असणे, निष्क्रियतेचे समर्थन करणे ही लक्षणे मानसिक दुर्बलता तसेच मार्ग चालण्याचे अज्ञान दर्शविते. परंतु मनुष्याला या अज्ञानाचेही अज्ञान असते. याचमुळे अर्जुन ज्ञानी समजुन "मी योग्य " या भूमिकेचे समर्थन करतो.

Excuse vs Exercise

जीवनात सुखी होणे, सुखी होण्यासाठी विकास करणे, कार्याद्वारे विकास करणे हे मनुष्य जाणतो. जीवनातील दुःखामुळे मनुष्य दुबळा होतो, पण ही दुर्बलता सक्षमता दर्शविण्याचा अर्जुनाचा प्रयत्न असतो. हेच अज्ञान ठरते, तर जीवनप्रवासात सक्षम असणे व सक्षम होणे यासाठी कार्याद्वारे योग(Exercise) हे ज्ञान भगवतगीता सांगते. जसे चालण्यातुन Exercise होते, तसेच कार्याद्वारे Exercise होणे या ज्ञानाचे रहस्य भगवतगीता सांगते.

मार्गस्थ vs अडथळा

याचाच अर्थ जीवन जगण्याचे Basic ज्ञान म्हणजे मार्ग चालण्याचे ज्ञान आहे. या मार्गात चालत आहे कि थांबला आहे?याचे Awareness हवे असते.

"A hero is someone who, in spite of weakness, doubt or not always knowing the answers, goes ahead and overcomes anyway. "

Christopher Reeve

मार्गातील अडथळा: (सकाम)द्वंद्व

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

चांगलेपणामुळे अर्जुन दुःखी होतो. म्हणुन exercise ज्ञान आले आहे. यासाठी "अमृतत्वाय कल्पते" हा महामार्ग आहे . म्हणुन ईश्वरज्ञान (मुळ व अंतीम धाम)स्पष्ट झाले. या मार्गावर निष्काम कर्म घडते.

(मुळ: यतः प्रवृत्ति भूतानां येन सर्वम् इदम् ततम् ।

धाम: तद् धाम परमं मम।)

ततःपदं तत्परिमार्गितव्यं

यस्मिन गतः न निवर्तन्ते भूयः।

तमेव च आद्यं पुरुषं प्रपद्ये

यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणि॥(१५-४)

याच Basic ज्ञानात

१निर्णय अधिकार

( यासाठी स्वावलंबन हे जीवनमुल्य असते. "Beggars are not choosers")

२. सहजकार्य (State of art)-स्वधर्म

मनुष्य व्यवहारसिद्धिसाठी सहजकार्याचाच वापर करतो. स्वतःचे नियतकार्य ठरवितो. स्वतःचा मार्ग चालण्यासाठी याच नियतकार्याला स्वधर्म करणे आवश्यक असते.

३. Exercise योग (दुःखान्त)

यासाठी कार्याचा एकनिश्चय हवा असतो. निष्ठेने कार्य घडण्यासाठी निष्काम कर्म, भक्ति असे प्रयोजन आहे.

चंचलतेमुळे निश्चय होत नाही. वचन, स्वधर्म ही जीवनमुल्ये यासाठी उपयुक्त ठरतात. बुद्धियोगामुळे "अमृतत्वाय कल्पते" या महामार्गावर यात्रा होते. याच महामार्गाचे ज्ञान भगवतगीता देत आहे. या मार्गावर विचलित होत नाही.

******

( १५. ५)

*************************

निःमानमोहा जितसंगदोषा

अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः।

द्वंद्वैःविमुक्ताः सुखदुःखसंज्ञैः

गच्छन्ति अमूढाः पदम् अव्ययम् तत् ॥

*************************

१५. ५/१:

" निःमानमोहा जितसंगदोषा

अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः "

(शाश्वत विकासमार्ग)

*मनुष्याची स्वाभाविक संवय:(Hiding facts)

मनुष्य चांगला असेल, ईश्वरश्रद्ध असेल, विद्वानही असेल पण कार्याचा एकनिश्चय नसणे, कार्यात निष्ठा नसणे (निष्काम कर्म नसेल तर), यामुळे भय असते अर्थात आत्मवश नसतो, स्वतःवर

command नसते. ही स्थिति मनोवश असते. या स्थितित समाधानासाठी Judgement thinkinking चा वापर करतो. ही मनुष्याची स्वाभाविक संवयच बनते. मनुष्याच्या याच संवयीमुळे वास्तवाचा स्विकार होत नाही . स्वतःला व विश्वाला accept करीत नाही. यामुळे प्रश्न सुटत नाही.

*Judgement thinking vs. love

'The more you judge, the less you love. ’

— Honor de Balzac

मनुष्याला स्वतःचे अस्तित्व प्रिय असते. याच पायावर त्याच्या विकासाची उभारणी होते. सुख अनुभवण्यासाठी, होण्यासाठी त्याची जीवनयात्रा चालु असते. या प्रवासात दुःख आले व उपाय कळला नाही तर समाधानी होण्यासाठी Judgement thinking/ Compare thinking चा वापर करतो. या प्रक्रियेत कुणी स्वतःला दोषी धरतो, तर कुणी इतरांना चुक ठरवुन टिका करतो. या प्रक्रियेत वास्तवाचा स्विकार करीत नाही.

*"वास्तवाचा स्विकार " :

जगात वास्तवाचा स्विकार झाला म्हणुनच विज्ञानाचे अविष्कार झालेत. वास्तवाचा स्विकार करणे हाच प्रथम पाठ भगवतगीता देते. अर्जुनाने वास्तव स्विकारले व प्रश्नात पारदर्शकता आली. दुःखावर उपाय काय?

*"स्वतःचे अस्तित्व"

"स्वतःचे अस्तित्व" हाच भगवतगीतेचा दुसरा पाठ आहे. वाघाचे कातडे पांघरुन कोल्हा वाघ ठरत नाही. पण स्वतः वाघच असतांना वाघ असल्याची ओळख नसेल तर

स्वतःला वाघ दर्शविण्याचा प्रयत्न करतो. यामुळे Judgement thinking चा वापर करुन वास्तवाचा अस्विकार होतो. भगवतगीता स्वतःच्या शाश्वत अस्तित्वाची ओळख करुन देते. हा अध्यात्मज्ञानाचा पाठ आहे. यामुळे जीवनाच्या शाश्वत विकासाचा मार्ग "अमृतत्वाय कल्पते" याची ओळख होते. या मार्गावर अंतिम धाम ईश्वर असते. व याच ईश्वराचा अंश मनुष्याचे हृदयस्थानी असते.

मनःषष्ठानि इंद्रियाणि प्रकृतिस्थानी कर्षति।(१५-७)

याच ज्ञानामुळे Consciousness चे ज्ञान जाणणे आवश्यक असते. भगवतगीता Lower consciousness मनोवश या अर्थाने व Higher) consciousness आत्मवश/ जितात्मनः असा उल्लेख करते.

निःमानमोहा जितसंगदोषा
अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः।
द्वंद्वैःविमुक्ताः सुखदुःखसंज्ञैः
गच्छन्ति अमूढाः पदम् अव्ययम् तत् ।।५।।

स्वतःचा मान व्हावा (अपमानीत होवु नये) म्हणुन Judgement thinking चा वापर होतो. म्हणुन स्वतःचे अस्तित्व जाणणे महत्वाचे असते. ज्यामुळे "अमृतत्वाय कल्पते" या मार्गाची ओळख होते. या मार्गावर ईश्वराची भक्ति असते. हा भगवतगीतेचा तिसरा पाठ आहे.

* "शाश्वत विकासमार्ग" :

या मार्गावर आत्मशुद्धि(आत्मोन्नति) होत असते. अर्थात मनुष्य सगुण जन्माला येतो व हा मार्ग गुणविकासाचा (प्रकृतियुक्त -सगुण ते गुणातीत- ईश्वरभाव) असतो. म्हणुन शरीर सोडतो तेंव्हा जसा वायु फुलाचा गंध घेवुन जातो, तसा आत्मा गुणासह (जी स्थिति असेल) शरीराला सोडतो.

शरीरं यद् अवाप्नोति यद् च अपि उत्क्रामति ईश्वर।
गृहित्वा एतानि संयाति वायुः गंधान् इव आशयात्॥(१५-८)

* "ईश्वराची भक्ति":

ईश्वराची भक्ति अर्थात कार्यसमर्पण किंवा कार्याचा एकनिश्चय(द्वंद्वमुक्त) करुन फलसमर्पण करणे. या मार्गावर सुखदुःखाने विचलित होत नाही. हाच मार्ग मोक्षाचा आहे. अर्थात इहलोकी(वर्तमानात) संपुर्ण स्वातंत्र्याचा आहे.

यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धाम परमं मम।(१५-६)

*****

(१५-५)/२ :"द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैः
-गच्छन्ति अमूढाः पदम् अव्ययं तत् "
(Universal Standard Path)

भगवतगीतेत ज्या मार्गाविषयी भाष्य आहे त्याचा आधार Duality vs. Nonduality ( द्वंद्व -निर्द्वंद्व) आहे. या मंथनातुन जो मार्ग बनतो तोच Universal Standard Path ठरतो.

जगात व्यवहार असतो व व्यवहारात Polarity (/Duality)असते. पण मनुष्य स्वतःचा मार्ग चालत असतो, किंवा चालायचा असतो म्हणुन "काय योग्य" हे जाणुन घेतो. जाणणे व जगणे जसे जमले तसे प्रत्यक्षात जगत असतो व आपला जीवनमार्ग "योग्य" समजुनच चालत असतो.

समाजात व्यवहारधर्म असतो. व्यवहारधर्मात योग्य-अयोग्य, यश-लाभ, सिद्धि-असिद्धि, चांगले-वाईट अशी Polarity असते. व्यवहारधर्मानुसार धर्मयुद्ध ठरते. पण अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन

करण्यासाठी याच Polarity चा आधार घेतो. अर्जुन ज्या धर्माचा दाखला देतो, जाणतो, त्या धर्मातही पाप-पुण्य, स्वर्ग-नरक ही Polarity असते.

प्रकृतिनुसार मनुष्य जगतो. यांत कार्यरत असणे मार्गातील strength असते, तर द्वंद्ववश(इच्छाद्वेष) होणे (परिपन्थिनौ) अडथळा असतो. प्रकृतित द्वंद्व असते, तर ईश्वर एकत्व (समत्व), हाच आधार मार्गातील दृढत्वाचा आहे, निष्काम कर्माचा आहे . ईश्वर ही मुळ प्रवृत्ति आहे व हाच आधार मार्ग व Destination असते.

असंगशत्रेण दृढेन छित्वा ।(१५-३)
ततः पदं तत्परिमार्गितव्यं...
यतः प्रवृत्ति प्रसृता पुराणी... (१५-४)
द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैः
गच्छन्ति अमूढा पदम् अव्ययम् तत् ।(१५-५)
Duality vs. Nonduality
धर्म vs स्वधर्म(स्वतःचा मार्ग)

धर्मात polarity (योग्य-अयोग्य)आहे. स्वधर्म Tiebreaker असतो. स्वतःचे approval असते.

धर्म vs. बुद्धियुक्त(State of mind)

बुद्धियुक्तो जहातीह उभेसुकृतदुष्कृतेः।
तस्माद् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कोशलम् ॥(२-५०)

अर्थात येथे कार्याचा एकनिश्चय असतो. व (सिद्धि-असिद्धि यांत समत्व)समत्वयोगाने कार्य करतो. कार्याद्वारे योग (दुःखान्त) ही साधना असते. येथे स्वतःचा निर्णय अधिकार असतो. (कर्मण्येवाधिकारस्ते)

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही. हाच Universal Standard Path ठरतो.

"If you first fortify yourself with the true knowledge of the Universal Self, and then live in the midst of wealth and worldliness, surely they will in no way affect you. "

-Ramakrishna

******

(१५-६)

*************************

न तद् भासयते सूर्यो न शशांको न पावकः।

यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धाम परमं मम॥

*************************

(१५-६) :
"न तद् भासयते सूर्यो न शशांको न पावकः"
(स्वतःचा मार्ग)

एखाद्या बोगद्यात मनुष्य शिरतो. सर्वत्र अंधार असतो. निश्चित मार्ग सापडत नाही. बोगद्याबाहेर पडण्याचे प्रयत्न सुरु असतात. अशा वेळी चालत असतांना प्रकाश दिसतो. हा प्रकाश बोगद्याबाहेरील असतो. या प्रकाशाच्या दिशेने मनुष्य चालायला लागतो, मार्ग बनत जातो.

मनुष्य जीवन जगत असतो. आनंदासाठी आनंदाने जगतो. पण कधी अशी स्थिति होते, मार्ग सापडत नाही. जणु अंधाऱ्या

बोगद्यात सापडतो. अर्जुन अशाच बोगद्यात सापडतो. पांडवांना न्याय मिळण्यासाठी "धर्मयुद्ध" हा पर्याय मिळाला असतो. धनुर्धर पारंगत अर्जुनासाठी ही संधि असते. पण शस्त्रपाडावाची प्रत्यक्ष वेळ आली असता हे कार्यच शोकदायी आहे असे त्याला जाणवते. तो Freeze होतो. जणु अंधाऱ्या बोगद्यात सापडतो व मार्ग सापडत नाही. आपल्या समाधानासाठी, दुःखमुक्तिसाठी "जैसे थे" ही स्थिति स्विकारतो. या युद्धात स्वतः निःशस्त्र राहुन शस्त्रधारी कौरवाकडुन मारल्या गेले तरी श्रेयस्कर आहे. युद्ध जिंकुन राज्य मिळाले तरी जेष्ठांच्या रक्ताने माखलेले राज्य भोगण्यापेक्षा भिक्षा मागुन उर्वरित आयुष्य जगणे श्रेयस्कर वाटते . याप्रमाणे व्यथा प्रगट करतो.

जीवनाविषयी नकारात्मक भाष्य ठामपणे मनुष्य जेंव्हा बोलतो, तेंव्हा जणु तो बोगद्यात सापडला आहे व आपल्यालाही घेवुन जात आहे असे वाटते.

"How would your life be different if…You stopped allowing other people to dilute or poison your day with their words or opinions?

Let today be the day…You stand strong in the truth of your beauty and journey through your day without attachment to the validation of others"

-Steve Maraboli,

जीवन आव्हान असले तरी निश्चित संस्कारामुळे, ज्ञानामुळे मनुष्य हे आव्हान सहज स्विकारतो. कधी बोगद्यात सापडला तरी त्यातुन स्वतःच बाहेर पडतो. हेच ज्ञान भगवदगीता सांगत आहे. एखादा दिवा दुसरे पाऊल उचलण्यासाठी मार्गदर्शक होवु शकतो, तर बोगद्याबाहेरील प्रकाश Destination धाम दर्शविते. संपुर्ण विश्वाचे मुळ, स्वतःच्या जीवनाचे मुळ, जगातील ज्ञानाचे मुळ जो ईश्वर आहे त्या ईश्वराचे, जीवनाच्या धामाचे (Destination) ज्ञान "प्रकाश" या संदर्भात सांगत आहे.

न तद् भासयते सूर्यो न शशांको न पावकः।
यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धाम परमं मम।।(१५-६)

प्रकाश सुर्याचा असो, चंद्राचा असो कि अग्निचा असो, त्या सर्वांचे मुळ ईश्वराचा प्रकाश आहे. अर्थात हाच प्रकाश जीवनाचे Destination जाणुन मार्गासाठी पथदर्शक असतो.

*अमृतत्वाय कल्पते।अर्थात या मार्गावर व्यथित होत नाही.
*या मार्गावर कार्याचा एकनिश्चय असतो.
*या मार्गावर समत्वयोगाने कार्यरत असतो. (समर्पण/फलत्याग)

सार :

"To be conscious of knowing God is to know about God and self. "

-Meister Eckhart

समुहात(समाज), व्यवहारात(संसार) मार्ग चालतांना मनुष्य स्वतःचा मार्ग चालत असतो. वाल्याचे महर्षि वाल्मिकीत Transformation, अर्जुनाचे Transformation हेच सत्य दर्शवित आहे.

Wisdom of Lifepath या संदर्भात निष्काम कर्माचे शास्त्र भगवदगीता सांगत आहे. सकाम कर्म vs निष्काम कर्म जाणुन घेण्यासाठी Choice, Decesion, Determination जाणणे महत्वाचे असते. म्हणुन Determination या संदर्भात इच्छा(

Desire), स्वधर्म आदि जीवनमुल्ये( Values), ध्येय(Destination, Purpose) यातील भेद जाणणे आवश्यक असते. हेच ज्ञान भगवदगीता स्पष्ट करते.

अहंकारामुळे मनुष्य वास्तवाचा स्विकार करीत नाही. व आपले अज्ञान आदर्श, ज्ञान, शक्ति दर्शविण्यासाठी जे भाष्य करतो, तेथेच नकारात्मक विचार जन्म घेतो. म्हणुन अर्जुनाचे वास्तव स्विकारणे"Wisdom of Ignorance" ठरते. स्वतः स्वतःचा पथदर्शक बनण्याचे ते प्रथम पाऊल ठरते.

********

(१५-६) :
"यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धाम परमं मम"
(प्रवास अजुन संपला नाही!)

मनुष्याचे जीवन त्याची जीवनयात्राच आहे. या यात्रेचे ज्ञान व प्रवासाचा मुख्य Track (मार्ग) याचे ज्ञान भगवदगीतेतुन स्पष्ट होते.

*"प्रवास अजुन संपला नाही"

मनुष्य जीवनात शिक्षण घेतो, शहाणपण शिकतो तरी मनुष्याला प्रश्न असतो!अर्जुनाने विद्या ग्रहण केली असते, तो सुसंस्कारीत होता तरी त्याला जीवनयात्रेत प्रश्न निर्माण झाला. जीवनयात्रा सुखदुःखानुसार चालु असते. अर्जुनाला नियतकार्यात दुःख जाणवले म्हणुन ते टाळणे योग्य समजतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान सांगतो. निहत्य राहुन शत्रुपक्षाकडुन मृत्यु येणे श्रेयस्कर आहे . ही त्याची भूमिका असते. या स्थितित त्याचा जीवनरथच थांबतो. भगवदगीता येथेच सावध करते, "प्रवास अजुन संपलेला नाही!"

*जीवनाचा मुख्य Track :

जीवनाच्या मुख्य Trackवर आत्मोन्नति साध्य होते. या Track वर मनुष्य ईश्वराशी नित्य जोडलेला असतो . या मार्गावर असतांना विचलित होत नाही. कार्याद्वारा यात्रा पुढेपुढे चालत असते. या मार्गात कार्याचा एकनिश्चय असतो. निष्काम कार्यरत असतो. जे मनुष्याचे अंतिम धाम आहे, त्या ईश्वराचे ज्ञान विज्ञानासह भगवदगीता स्पष्ट करते.

प्रकृति-पुरुष- पुरुषोत्तम

जड-अव्यक्त-Supreme अव्यक्त(शाश्वत)

ईश्वरधाम:

परः तस्मात् तु भावो अन्यः अव्यक्तः अव्यक्तात् सनातनः।

अव्यक्तो अक्षर इति उक्तः तम् आहुः परमां गतिम् ।

यं प्राप्य न निवर्तंते तद् धाम परमं मम।।(८-२०/२१)

अर्थात जे सर्व विश्वाचे मुळ शाश्वत तत्व आहे, परम गति आहे, ते ईश्वराचे परमधाम आहे.

न तद् भासयते सूर्यो न शशांको न पावकः।

यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धाम परमं मम।।(१५-६)

अर्थात ईश्वराचे परमधाम स्वयंप्रकाशीत आहे.

जीवनाचे व्यवहारात कर्म साधन असते. यात कार्याच्या परिणामाचा विचार केला तर यशाची इच्छा असते पण अपयश फलाचा भाग असतो. यामुळे सकाम अवस्थेत (परिणाम आसक्तिमुळे) विचलित होतो. बुद्धियोगी (ईश्वराशी जोडलेला) मात्र निश्चयाने मार्ग चालतो. या स्थितित सकारात्मक असतो.

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व।(११-३३)

“The increased desire to please God and seek HIS approval will decrease the desire to seek approval from man.

Yvonne Pierre,

व्यवहारात जगत असतांना लोकांनी स्तुति करावी अर्थात मंजुरीची इच्छा करतो. पण आत्मोन्नतिच्या मार्गावर (अमृतत्वाय कल्पते) ईश्वरभक्ति Priority असते. यामुळे निष्काम कार्यात Transformation होते. व्यवहारमार्गाला आत्मोन्नतिच्या मार्गात Transform करण्यासाठीच नित्य ईश्वराशी जोडणे व विश्वासाने मार्ग चालणे . हा भगवदगीतेचा संदेश आहे.

सार :

दुःख में सुमिरन सब करे, सुख में करै न कोय।
जो सुख में सुमिरन करे दुःख काहे को होय ॥

दुःखालयात मनुष्यजीवन आलेले आहे म्हणुन या विशेष Track चे महत्व असते. याच संदर्भात ईश्वराच्या भक्तिचे महत्व स्पष्ट होते.
अनित्य असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयम् अशाश्वतम्।
न आप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं पराम् गताः ।(८-१५)

जीवनात दुःख आहेत, प्रश्न आहेत. या प्रश्नाचे आव्हान न स्विकारणे म्हणजे जीवनाचेच आव्हान न स्विकारणे ठरते. नकारात्मक मानसिकता होते. जणु जीवनयात्राच थांबली आहे अशी स्थिति होते... पण
ईश्वराचा आश्रय मनुष्याला स्मरण करुन देते,
"प्रवास अजुन संपलेला नाही. " आणि..
नव्या उर्जेने जीवनयात्रा सुरु होते.

"What matters most is that you take the journey (of self awareness and transformation). "
-Diana Dentinger,

********

(१५-७)

*************************

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।

मनःषष्ठानिइंद्रियाणि प्रकृतिस्थानी कर्षति।।

*************************

(१५. ७):"ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः"

जीवन जीवंत तत्वाच्या अस्तित्वाची साक्ष आहे, तर जीवंत तत्व ईश्वराच्या (स्वतःला)अस्तित्वाची साक्ष देते.
ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।
मनःषष्ठानिइंद्रियाणि प्रकृतिस्थानी कर्षति।।(१५-७)

सर्व जीवित प्राणिमात्रांना मृत्यु आहे. मृत्यु होतो तेंव्हा आपण येथे नसतोच. म्हणुन जीवन व त्याचे जीवंत तत्व यांचा संबंध जाणुन घेणे हा अध्यात्मज्ञानाचा विषय आहे, कारण हा संबंध फक्त

मनुष्यच जाणु शकतो. याच ज्ञानाची भगवतगीता ओळख देते, व ईश्वर हा विषय येतो.

सर्वप्रथम ईश्वर हा विषय येथे येण्याचे कारण जाणणे महत्वाचे आहे. अर्जुनाला दुःख झाले. या दुःखाशी deal करण्याचे ज्ञान नसल्यामुळे सोयिस्कररित्या(दुःख टाळण्यासाठी) निष्क्रिय होतो व आपण योग्य आहो हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. अज्ञानाला ज्ञान संबोधतो. तेंव्हा दुःखाशी deal करण्याचे ज्ञान या संबंधाने ईश्वर हा विषय आला.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ॥(९-३३)

अर्थात हा जीवनविकासाचा राजमार्ग(मृत्योर्मां अमृतंगमय) असतो.

या अनुषंगाने मुख्य तीन मुद्दे येतात.

१. घटनेचे /मार्गाचे Awareness

२. जीवनविकासाचा राजमार्ग(Change)

३. ज्ञान(प्रश्नाची पारदर्शकता व ज्ञानाचे महत्व)

१. Awareness

कार्यसंस्कारित असलेला स्वतःचा मार्ग जाणतो, स्वनिर्णयाचे Awareness असते. कार्यसंस्कारित नसलेला तो जे करतो, ते योग्य समजुनच किंवा करीत नाही (निष्क्रिय) तेंव्हा समर्थनासाठी ज्ञान वापरतो.

अर्जुन कार्यसंस्कारित होता. तरी दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो व अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. अर्थात कार्यसंस्कारित असला तरी त्याचे ज्ञान अधुरे ठरते. श्रीकृष्णाने त्याच्या भूमिकेतील दुर्बलता दर्शविल्यानंतर वास्तवाचा(युद्ध करणे योग्य कि अयोग्य हा संशय) स्विकार करतो.

"The first step toward change is awareness. The second step is acceptance. "
Nathaniel Branden

२. विकासमार्ग:(Change)
गरजापुर्तिसाठी कार्य करणे हा व्यवहारमार्ग असतो. सकाम दृष्टिमुळे या मार्गात अडचणी जाणवतात. जसा अर्जुन म्हणतो, मला कांहीही नको. मग ज्यामुळे दुःख होईल ते कार्य कां करायचे?

येथे जीवनज्ञान संदर्भात अशाश्वत (शरीर, प्रकृति) व शाश्वत (ईश्वर, पुरुष) याचे ज्ञान सांगितले. या ज्ञानामुळे जीवन विकासाचा राजमार्ग (अमृतंगमय) ठरतो. या मार्गावर दुःखी न होता अडचणी विकासाच्या संधि ठरतात.

या मार्गात नियतकार्य(Committed) स्वतःचा स्वधर्म जाणतो. स्वतःचा निर्णयअधिकार जाणतो व निष्काम कार्यासाठी कार्याचा दृढनिश्चय करतो. हाच सुखाचा (योग-दुःखान्त) राजमार्ग असतो. कार्याद्वारे सुख, ज्ञान अनुभवतो.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

३. ज्ञान :

व्यवहारमार्गातील अडचण(दुःख) अर्जुनासाठी विकासाचे Stepping stone ठरते. (knowing and operatng higher consciosness).

असेच व्यवहारात प्रश्न असतात. ते प्रश्न कार्यानेच सुटु शकतात व या कार्यासाठी ज्ञानाचा वापर असतो.

स्वतःच्या मार्गाचे संस्कार असेल तर awareness असते. प्रश्नाची पारदर्शकता असते. प्रश्नावर चर्चा करता येते. संवाद होतो. संस्कार नसेल तर अज्ञानाला ज्ञान संबोधतो. यामुळे भ्रमाच्या अवस्थेत जगत असतो.

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्तिं परंतप।।(७-२७)

या अवस्थेत मनाला समाधान देण्यासाठी(सुखासाठी) स्वतःचे समर्थन करतो. इतरांच्या चुका दर्शवुन टिका करणे, पण स्वतःचे अज्ञान न दिसणे किंवा स्वतःचे वास्तव hide करणे यामुळेच ज्ञानाला ज्ञान दर्शवित असतो. हेच भ्रमात जगणे असते.

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

भगवतगीता या जगण्याला स्वतःचे अज्ञान संबोधते. ही स्थिति साचलेल्या डबक्यासारखी असते. ही स्थितिच द्वंद्ववश अवस्था असते.

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

जीवन गतिमान असते, यासाठी जीवनविकासाचा राजमार्ग जाणणे व त्याची धारणा करणे. याचे विकासासाठी महत्व आहे. या मार्गावर असणे हाच जीवनाचा आदर असतो.

व्यावहारिक बोध : मनुष्यजीवनात सुख दुःख दोन्हीचा अनुभव होतो. दुःख, अडचणी विकासमार्गातील संधी आहेत (stepping stone)याच जाणिवेसाठी भगवतगीता अध्यात्मज्ञान सांगते. म्हणुन जीवनाचा विकासमार्ग अध्यात्मज्ञानाशिवाय अपुर्ण ठरतो. ज्ञान अपुर्ण ठरते.

याच अध्यात्मज्ञानाचा समाजव्यवस्थेच्या धारणेत उपयोग होतो, तेंव्हा तो धर्म ठरतो. या धर्माला ग्लानि(बाह्यविघ्न-शोषण व आंतर्विघ्न-संभ्रम) येते, म्हणुन मनुष्याला मुळ ज्ञान(अध्यात्मज्ञान)जाणणे आवश्यक असते. हीच पुर्तता भगवतगीतेत केलेली आहे.

"The world is starving for a new spiritual truth - a truth that works in sustaining life, not a truth that brings an end to life. "

Neale Donald Walsch

******

१५-८:

"शरीरं यद् अवाप्नोति यत् च अपि उत्क्रामति ईश्वर"
(जीवन व त्याचा प्रवास)

जीवन या संदर्भात "ईश्वर" ही संकल्पना प्राणतत्वाशी निगडीत आहे. प्राणतत्व शरीरात व्याप्त असल्यामुळे मनुष्य जीवंत असतो.

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।
मनः षष्ठानि इंद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति।(१५-७)
ईश्वर गुणातीत आहे. याचाच अंश मन व पंचेद्रिये याला (प्रकृतिठायी) आकर्षित झालेला आहे.

शरीरं यद् अवाप्नोति यत् च अपि उत्क्रामति ईश्वरः।
गृहीत्वा एतानि संयाति वायुः गंधान् इव आशयात्।।१५-८

जसा वायु फुलापासुन जातो, तो फुलाचा सुगंध घेवुन जातो, तसेच प्राणतत्वातील ईश्वर (अंश)प्रकृतिगुणाला घेवुन जातो. "असतो मा सतगमय" अर्थात अशाश्वताकडुन शाश्वताकडे या आधारावर जीवनप्रवास "अमृतत्वाय कल्पते" असा असावा हे येथे अभिप्रेत आहे. याच प्रवासाचे ज्ञान व शास्त्र भगवदगीता स्पष्ट करीत आहे.

ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदी सर्वस्य विष्ठितम्।(१५-१७)

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं च उक्तं समासतः।

मद् भक्त एतद् विज्ञाय मद् भावाय उपपद्यते।।(१५-१८)

ईश्वरज्ञानाचे महत्व :

१. मनुष्याचा व्यक्तिगत जीवनविकास-

मनुष्यजीवनात सुख हवे असते. पण दुःखी होणेही याच सुखदुःखाचा भाग असतो. सुखी म्हणजे बुद्धिची स्थिरता व दुःखी होणे म्हणजे बुद्धिची अस्थिरता, मनाची चंचलता याच आधारावर Higher State of mind/Higher Consciousness/नित्यसत्वस्थो, श्रेष्ठ पुरुषांचा मार्ग भगवदगीता सांगत आहे.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

दुःखी होणे ही स्थिति अशाश्वताला attach असल्यामुळे असते. मनाची प्रसन्नता यामुळे नष्ट होते. याचमुळे Transformation चा संदेश आलेला आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।(९-३३)

शास्त्र :
स नियम्यइंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहीते रताः।(१२-४)
अव्यक्त ईश्वराला आसक्त असणे, देहधारी मनुष्याला क्लेशदायी व कठिण प्रयासाने साध्य होते. पण कर्माद्वारे ईश्वराची(अनन्य) भक्ति, कर्मयोग या शास्त्राद्वारे भक्ति साध्य होते.
ये तु सर्वाणि कर्माणि मयी संन्यस्य मत्पराः।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते॥(१२-६)

२. विश्वसंचलन :

"सर्वभूतहिते रतः " हा शब्द "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च " हा संदेश देतो. यानुसार :

अ. चांगलेपणाला, चांगल्या मनुष्याला(परित्राणाय साधुनाम्) संरक्षण, प्रोत्साहन दर्शवीत आहे. चांगलेपणा, स्वातंत्र्य, सुखशांती आत्म्याचा मूलभूत भाव आहे. स्वातंत्र्य मूलभूत प्रेरणा असे आपण ऐकतो. चांगलेपणा दुर्बलता झाली तर चांगलेपणा चालत नाही अर्थात survivalसाठी unfit असते असे आपण ऐकतो. वास्तवात चांगलेपणा शक्ति होणे यासाठी भगवतगीतेत धर्मस्थापना या संदर्भात "परित्राणाय साधुनाम् " असा हेतु स्पष्ट केला आहे.

ब. मनुष्याचे कार्य त्याचा योगक्षेम चालविते. याच कार्याद्वारे विविध समुहकल्याण तसेच सृष्टिचक्रप्रवर्तनास सहकार्य करणे व असा समन्वय साधणे या संदर्भात "धर्मस्थापना" या शब्दाचे प्रयोजन केले आहे.

सार :

सृष्टिचक्रप्रवर्तन या संदर्भात या विश्वात पराश्रित (Economy of parasite), व्यावहारिक (Economy of enterprise),

समुहहीतप्रधान (Economy of gregation) व जगतहीतप्रधान (Economy of permanance) अशा विविध व्यवस्था व त्यानुसार संस्कृति आढळते.

जगतहीतप्रधान समाजव्यवस्था शाश्वत समाजव्यवस्था ठरते. सृष्टीचक्र ईश्वराचे संचलन जाणले तर सृष्टीचक्राला सहाय्यक ठरणारी जगतहीतप्रधान व्यवस्था निर्माण करणे ही संकल्पना आहे. आपण योगक्षेमासाठी कार्य करतो, पण याच कार्याचा संबंध समुह विकास, समाजविकास, सृष्टिसंचलन याचेशी असतो. हाच समन्वय साधण्यासाठी "धर्मस्थापना" ही संकल्पना आलेली आहे. अर्थात याप्रमाणे ईश्वराची भूमिका justify होते.

"The goal of life is to make your heartbeat match the beat of the universe, to match your nature with Nature. "

Joseph Campbell-

********

(१५-१०)

**************************

उत्क्रामन्तं स्थितं वाअपि भुञ्जानं वा गुणान्वितम् ।
विमूढा न अनुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः॥

**************************

१५. १० :

"विमूढा न अनुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः"
(Trained eyes of knowledge)

मनुष्याचे जीवन त्याच्या आत्मोद्धाराचे साधन आहे हा भगवतगीतेचा महत्वाचा संदेश आहे. यासाठी आत्मोद्धाराचे तत्वज्ञान (Process of liberation बंधन-मोक्ष) भगवतगीता सांगत आहे.

"उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत् "

मनुष्यजीवनात व्यवहार असतो. यांत व्यवहारसिद्धिसाठी कर्म साधन असते. आत्मोद्धारासाठी याच कार्याला साधन केले आहे. अर्थात व्यवहारमार्ग(सकाम कर्म) आत्मोद्धारासाठी "अमृतत्वाय

कल्पते" (निष्काम कार्य) या Standard मार्गात Transform होतो.

आत्मोद्धार याच संदर्भात शरीरयंत्रातील शरीर व जीवंत तत्व(प्राणतत्व) या दोन भागाचे ज्ञानविज्ञान (प्रकृति-पुरुष) /मुक्तिचे तत्वज्ञान Process of Liberation (क्षेत्र-क्षेत्रज्ञ) भगवतगीता सांगते.

क्षेत्रक्षेत्रज्ञ योः एवं अंतरं ज्ञानचक्षुषा।
भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुः यान्तिं ते परम् ।।(१३-३५)

आत्मा या संदर्भातील ज्ञानाने शरीरातील प्राणतत्वाचे आवागमन (उत्क्रामन्तं), शरीरात असणे(स्थितं), प्रकृतिगुणाचा भोग (भुञ्जानं), प्रकृतिगुणाचे अधिपत्य (गुणान्वितम्) ज्ञानचक्षुने जाणत असतो.

ज्ञानाने दृष्टि मिळते. Perception बदलते. यासाठी ज्ञानचक्षु हा शब्द वापरलेला आहे.

Illusion is a physical phenomenon, delusion (False belief)pertains to the mental aspect.

या ज्ञानाने मनुष्याची जीवनाकडे पाहण्याची पर्यायाने विश्वाकडे पाहण्याची दृष्टि मिळते. कर्ता व अकर्ता याबाबत निश्चित ज्ञान होते.

यः पश्यति तथा आत्मानम् अकर्तारम् स पश्यति॥(१३-२९)
न अन्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टा अनुपश्यति।(१४-१९)

उत्क्रामन्तं स्थितं वा अपि भुञ्जानं वा गुणान्वितम् ।
विमूढा न अनुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः॥(१५-१०)

सार : अर्जुनाला ईश्वराचे दिव्य विश्वरुप पाहण्यासाठी दिव्यदृष्टि मिळाली. मनुष्याला वर्तमानातील सत्य स्थिति जाणुन घेण्यासाठी " ज्ञानचक्षु" भगवतगीतेने उपलब्ध करुन दिले.

******

(१५-१५)

*************************

सर्वस्य च अहं हृदि संन्निविष्टो

मत्तः स्मृतिः ज्ञानं अपोहनं च।

*************************

(१५-१५) :

"सर्वस्य च अहं हृदि संनिविष्ठो"

(जीवनाचा राजमार्ग)

धर्म :

धर्मक्षेत्रात "जे का रंजले त्यासी म्हणे जो आपुले अर्थात वैष्णव जन तो तेणेरे कहिये, जो पीड पराई जाणेरे" याप्रमाणे सत्कार्यासाठी Motivation समाजात आपण ऐकत असतो. व आप्तपीडेने व्यथित झालेला अर्जुन म्हणूनच कसा वागतो, हे भगवदगीतेची सुरुवात आहे.

दुःख होणार म्हणून युद्ध न करणे हा निर्णय असतो हे वास्तव असते. पण याला " स्वार्थ(लोभ) vs धर्माचरण" असा रंग देतो. समाजात अशा भाष्यांशी आपली चांगली ओळख असते.

मनातील भावविश्व आपण स्वतःच जाणत असतो. भावनांचे नैसर्गिक व्यवस्थापन सुखासाठी असते. दुःख झाले तर सुखासाठी मनुष्य alternate option घेतो. अर्जुनाने हेच केले. "युद्ध करणे हा स्वार्थ आहे व न करणे हे धर्माचरण आहे" हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान बोलतो.

“Light can only be understood with the wisdom of darkness.

अर्जुनाच्या भाष्यावर श्रीकृष्णाची प्रतिक्रिया होती,
-धर्माचरण करणाऱ्याला हे वर्तन अशोभनिय आहे. स्वर्ग व कीर्ति दोन्हीला मुकणार.

अनार्यजुष्टम् अस्वर्ग्यम् अकिर्तिकरम् अर्जुन।(२-२)

अर्जुन सत्य स्विकारतो. धर्माचरणाची तयारी दर्शवतो. पण ज्या कार्याचा परिणाम शोक आहे, ते कार्य मी करणार नाही असे म्हणून रथाखाली उतरतो. येथे एक प्रश्न असतो धर्माचरणाचा व दुसरा असतो शोकमुक्तिचा.

भगवदगीतेने दोन्ही प्रश्नाचे उत्तर साध्य केले आहे. व हे ज्ञान भावनांचे ज्ञानविज्ञानयुक्त व्यवस्थापन ठरते..
तसेच जग ज्या धर्माचा शोध घेत आहे "आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च"याचे उत्तर भगवदगीता आहे. जगातील युवापिढी ज्या नव्या क्रांतिच्या शोधात आहे, त्या "आध्यात्मिक क्रांति " ची ज्योत भगवदगीतेने तेवत ठेवली आहे.

तत्वज्ञ राॅबर्ट ग्रीन इंगरसॉल म्हणतो,
In our era, the road to holiness necessarily passes through the world of action.

सत्संग (Shrikrishna-As the best Motivator)

मनुष्याला विकासमार्गावर चालण्यास प्रवृत्त करणारे भाष्य अशी भगवदगीतेची एक ओळख ठरते.

श्रीकृष्णाला अर्जुनाचे अज्ञान आढळले. त्याचे अज्ञान दर्शवितांना अर्जुनाचा उद्वेग होईल असे भाष्य श्रीकृष्ण करीत नाही. "उच्च मनुष्याला अशोभनिय" ही भाषा वापरुन "तुझी पात्रता उच्च मनुष्याची आहे" हा संदेश अर्जुनाला मिळतो. विकासाला प्रेरक ठरणारे भाष्य सकारात्मक हवे. हीत करणारे सत्य पण उद्वेग होणार नाही असे भाष्य वांड्गमय तप असतो.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहीतं च यत् ।
स्वाध्याय अभ्यसनं च एव वांड्गमयं तप उच्यते॥(१७-१५)

चांगल्या मनुष्यालाही दुःखावर उपाय करणे जमले नाही तर त्याचे behavior नकारात्मक आपोआपच होते, म्हणुन भगवदगीता नकारघंटा वाजविणारे भाष्य (Negativity) करीत नाही. वरच्या पायरीवर नेणारेच भाष्य करते.

Negativity मुळेच मनुष्य निष्क्रिय होतो किंवा चुकीचे कार्य करतो. वरुन आपल्या भूमिकेचे ज्ञानी समजुन समर्थन करतो.

अर्थात अज्ञानी असुनही ज्ञानी समजतो. हा अहंकार असतो. भगवदगीता अज्ञानाला ज्ञानाने replace करण्याचे शास्त्र ठरते. "ज्ञानसंच्छिन्न संशयम् "

जो अहंकार मनुष्याला अज्ञानाच्या अंधारकोठडीत डांबुन ठेवतो, त्याच अहंकाराचे Replacement ईश्वर (ज्ञान) आहे याची फक्त जाणीव भगवदगीता करुन देते.

* अध्यात्म :

सर्वस्य च अहं हृदि संन्निविष्टो
मत्तः स्मृतिः ज्ञानं अपोहनं च।(१५-१५)
मनुष्यातील जीवित तत्व ज्या रहस्यमय शक्तिचा अंश आहे, त्या शक्तिची(ईश्वर, पुरुषोत्तम) ओळख भगवदगीता करुन देते. या जीवित तत्वाचा राजमार्ग त्याच ईश्वराचे धामात जातो. या राजमार्गाची (अमृतंगमय)ओळख होते. या राजमार्गावर जीवनप्रवास होणे म्हणजेच ईश्वराशी नाते जोडणे असते.
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

मनुष्यातील चांगलेपणा याच ईश्वराशी(भक्तिद्वारा)नाते जोडण्यास त्याला पात्र करते. यामुळे स्वतःवर, विश्वास असतो. स्वतःची सुप्त शक्ति जाणतो . यामुळे आत्मविश्वास असतो. त्याचा जीवनमार्ग (अमृतंगमय) राजमार्गावर चालू असतो. यामुळे विश्वासाने मार्गक्रमण होते. कार्याचा निश्चय दृढ असतो. कार्य समर्पण वृत्तिने घडते. (अर्थात या मार्गात भक्ति घडते. )

मनुष्याच्या जीवनयात्रेत दुःख आहे याची त्याला जाण असते. पण हे दुःख त्याला हारवत नाही. दुःखी मनामुळे जीवनाचा प्रवास (अमृतंगमय) राजमार्गावर होत नाही. दुःखाशी deal करण्याचे शास्त्र तो जाणतो. याच शास्त्राची ओळख भगवदगीता करुन देते. जीवनाचा रथ राजमार्गावर येण्यासाठीच या शास्त्राचा उपयोग होतो. व दुःख महान कार्याची संधि ठरते.

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।
तत्र श्री: विजयो भूतिः धृवाः नीतिः मतिर्मम॥(१८-७८)

मनुष्याला वैभव, यश, शक्ति मिळवून देणारा नीतिचा मार्ग केवळ हाच आहे.

**********

१५-१५) :

"मत्तः स्मृतिः ज्ञानं अपोहनं च"

मनुष्यजन्माला बुद्धिची महान देण प्राप्त आहे. स्वतःच्या बुद्धिचा वापर करुनच मनुष्य जीवनविकास साधत असतो. अर्थात बुद्धिचा वापर कसा करतो यावर त्याचा विकास अवलंबुन असतो. याच संदर्भात बुद्धिची चाचणी होण्यासाठी I. Q, E. Q, A. Q, S. Q (Intellegent, Emotional, Adverse, Spiritual quotients) अशा विविध मापाचा उल्लेख वर्तमानात होत आहे.

भगवदगीता बुद्धिभ्रम, बुद्धिनाश व त्याची कारणे, स्थिर बुद्धि यावर भाष्य करते. बुद्धिचा संबंध स्मृति, ज्ञान, कर्तृत्व (कर्म), सुख (स्थिरबुद्धि) याचेशी येतो. सुखी होणे म्हणजे स्थितप्रज्ञ असणे या संदर्भात "तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता" हा शब्दप्रयोग आहे.

अडचणीच्या वेळेसही विकाससंधि दार ठोठावते. पण अडचणीमुळे बुद्धिभ्रम झाला कि निर्णय घेण्याची क्षमता नष्ट होते. अशा वेळी ज्ञानाची गरज असते. अर्जुन युद्धक्षेत्रावर दुःखी झाला असता "भ्रमतीव च मे मनः " हा शब्दप्रयोग करतो. अर्थात येथे

स्मृति नष्ट होते, आपल्याच कार्यावर संशय उत्पन्न होतो. भगवदगीतेतील ज्ञान ऐकल्यावर शेवटी अर्जुन म्हणतो, स्मृतिर्लब्ध्वा, गतसंदेहः अर्थात गेलेली स्मृति प्राप्त झाली व संशय नष्ट झाला.

जसा सूर्य विश्वाला प्रकाशीत करतो व याच प्रकाशात वस्तु दिसते, डोळे पाहु शकतात. प्रकाश नसेल तर डोळे असुनही पाहु शकत नाही. याचप्रमाणे शरीरात हृदयस्थानी ईश्वर आहे. जो संपुर्ण शरीराला प्रकाशीत करतो. स्मृति, ज्ञान, ज्ञानाद्वारे संशयनिवारण होते.

यथा प्रकाशयति एकः कृत्स्नं लोकं इमं रविः।
क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत॥(१३. ३३)

सर्वस्य च अहं हृदि संनिविष्ठो
मत्तः स्मृतिः ज्ञानं अपोहनं च।(१५-१५)

या सर्वांचा सार हाच आहे कि, बुद्धिभ्रम झाला असता जशी डोळे असुनही अंधारात वस्तु दिसत नाही. तशी अवस्था होते. तर

जीवनात ईश्वराचा आश्रय प्रकाशाची भूमिका बजावते. याच संदर्भात स्वतःची बुद्धि वापरणे यासाठी ईश्वराचा आश्रय व त्याद्वारा आत्मवश अवस्था महत्वाची आहे.

तानि सर्वाणी संयम्य युक्त आसीत मत्परः।
वशे हि यस्य इंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥(२-६१)

याच अवस्थेसाठी "बुद्धियोगं उपआश्रित्य मच्चित्तः सततं भव " (१८-५७) हा भगवदगीतेचा संदेश आहे.

"As far as we can discern, the sole purpose of human existence is to kindle a light in the darkness of mere being. "

-Carl Jung

**********

(१५-१६)

*************************

द्वौ इमौ पुरुषौ लोके क्षरः च अक्षर एव च।

क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोअक्षर उच्यते।।

*************************

१५. १६/१:

"द्वौ इमौ पुरुषौ लोके क्षरः च अक्षर एव च"

(अखंड विकास म्हणजेच आत्मोन्नति)

आधुनिक युग विकासाचे आहे, विज्ञानाचे आहे. व ईश्वर, अध्यात्म या शब्दांचा संदेश या कथित भौतिक विकासात अडथळा करते हा कांही लोकांचा समज बनतो. Known ज्ञानविज्ञानात(अर्थात पाश्चात्य) अध्यात्म, ईश्वर बसत नाही असा हा वाद असतो. अध्यात्म, ईश्वर Known ज्ञानविज्ञानाचाच (प्रकृति-पुरुष)भाग आहे हे भगवतगीता स्पष्ट करते. व ज्ञान जगी सर्वश्रेष्ठ आहे, हा संदेश जगाला दिला आहे. व मनुष्याच्या योग्य-

अयोग्य या भूमिकेसंदर्भात ज्ञानी-अज्ञानी या विभागणीला महत्व दिले आहे.

समाजात ईश्वर या शब्दाची ओळख वेगवेगळी असते. भगवतगीतेत जीवित तत्व व विश्वतत्व यांचे connection ईश्वर या शब्दाने व्यक्त होते. अनित्य शरिराच्या प्रवासाला मर्यादा आहे, व जिवित तत्वातील (शाश्वत) आत्म्याचा प्रवास निरंतर असतो. जीवित तत्व( आत्मा) परमात्म्याशी मिलन करणारा प्रवासी आहे, हे रहस्य जीवनाचे ज्ञान या संदर्भात येथे स्पष्ट होते.

द्वौ इमौ पुरुषौ लोके क्षरः च अक्षर एव च।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोअक्षर उच्यते।।(१५-१६)

* प्रकृति (क्षर) vs ईश्वर (अक्षर)
जीवन कसे आहे?दुःखद कि सुखद् ?हा विचार मनुष्याला येतोच. ज्या क्षणी अर्जुनाला जीवन दुःखद वाटले, त्याने shortcut वापरला. आपल्या अज्ञानी भूमिकेला ज्ञानी संबोधतो!या बिंदुवरच भगवतगीता सुरु झाली. यात ईश्वर, अध्यात्म या शब्दांचा उल्लेख आहे.

शेवटी श्रीकृष्ण निवड करण्यासाठी Option देतात. अहंकाराचा आश्रय(प्रकृति, क्षर) कि ईश्वरशरण (पुरुष, अक्षर)?

यद् अहंकारम् आश्रित्य...

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।

मनुष्य दुःखी होतो, तेंव्हा अहंकाराचा आश्रय असल्यामुळे अज्ञानी भूमिकेला ज्ञानी समजतो. म्हणुन या प्रवासाचे रहस्य जाणुन प्रवासात ईश्वराचा आश्रय करणे व "अमृतं गमय"या राजमार्गावर प्रवास करणे. या प्रवासाचे रहस्य भगवतगीतेत स्पष्ट केले. ज्यामुळे जीवन सुखद(दुःखमुक्त) होईल. हा मार्ग स्वातंत्र्याचा असतो, ज्याला मोक्षाकांक्षि म्हटले.

जीवनमार्गाच्या याच तत्वाला भगवतगीतेने सर्वस्थळी, सर्वकाळी उपयोगात येईल असे व्यापक रुप दिले आहे.

* Automatic Thinking(Lower Consciousness) vs. Conscious thinking (Higher consciousness)

मनुष्याला जीवनात सुखी व्हायचे असते. व त्याचसाठी जीवनयात्रा Automaticसुरु असते. भौतिक विकास मनुष्याला हवा असतो, पण याच प्रवासात अपयश, दुःख, संशय येतो. व मनुष्य दुःख टाळण्यासाठी जी निवड करतो, त्याचे समर्थन करतो. हे सर्व automatic सुरु असते.

अर्जुन दुःख टाळण्यासाठी निष्क्रिय राहण्याची निवड करतो व या भूमिकेला ज्ञानी भूमिका सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. हे Conditioned mindsetद्वारा automatic thinking असते, Conscious thinking नसते.

भगवतगीता याच स्थितिचे दर्शन करुन देते व Automatic vs Conscious thinking चे ज्ञान करुन देते. Conscious thinking साठी ज्ञानाचा आश्रय आवश्यक असतो. जीवनमार्गात ज्ञानासाठी "ईश्वराचा आश्रय" या शब्दाचे प्रयोजन आहे. म्हणून Conscious thinking साठी ज्ञानाचा आश्रय करण्यासाठी ईश्वराचा आश्रय स्पष्ट होतो.

*जीवनयात्रेत शरीरयंत्रणा ईश्वर या शाश्वत तत्वाने संचालित असते.

ईश्वरः सर्वभूतानां ह्रद्देशे अर्जुन तिष्टति।
भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया॥(१८-६१)

जीवनविकासात शरीर आत्मविकासाला सहकार्य करते, किंवा आत्मतत्व भौतिक विकासासाठी सहकार्य करते. जेंव्हा जीवनरथ विकासमार्गावर असतो, तेंव्हा मनुष्य स्वतःचा मित्र असतो.

उद्धरेत् आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत् ।
आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः॥(६-५)

सार :

"ईश्वराचा आश्रय जीवनविकासासाठी आहे, विकास थांबविण्यासाठी नाही . याउलट थांबलेला विकासरथ सुरु करण्यासाठी आहे. याचाच अर्थ मनुष्याचा जीवनरथ विकासमार्गावर असावा हाच भगवतगीतेचा संदेश आहे

*****

(१५-१६)/२:

"क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थो अक्षर उच्यते"

(अशाश्वत vs. शाश्वत;अशांति vs विकास)

या विश्वात अशाश्वत(क्षर) व शाश्वत(अक्षर) हे विश्वाचे दोनच भाग महत्वाचे आहे. अशाश्वत ही प्रकृति व शाश्वत ईश्वर( पुरुष-पुरुषोत्तम) या अन्वये सृष्टिचे सृजन होते. हेच अशाश्वत व शाश्वत तत्व जीवनविकासाच्या तत्वज्ञानात भगवतगीतेने वापरले आहे.

द्वौ इमौ पुरुषौ लोके क्षरः च अक्षर एव च।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थो अक्षर उच्यते।।(१५-१६)

अशाश्वत शरीराचा प्रवास शाश्वताकडे आहे हे जीवनाचे रहस्य भगवतगीता सांगते. अशाश्वत म्हणजे तात्पुरते, बदलणारे. मनुष्याचे सुखदुःख, शरीर बदलणारी अवस्था आहे. प्रकृति अशाश्वत(क्षर) व ईश्वर शाश्वत(अक्षर) हाच आधार जीवनाचा शाश्वत विकासमार्ग यासाठी भगवतगीतेने वापरला आहे.

वर्तमानातील शांति:

मनुष्याच्या सुखाच्या संकल्पना अशाश्वत(भोगैश्वर्य) असल्यामुळे अभाव आला असता अशांत होतो, विचलित होतो. जसे पाणी स्थिर असते तेंव्हा स्वच्छ दिसते, खडा टाकला, गाळ असेल तर वर येणारच. तसेच मनुष्याची सुखदुःखाची स्थिति असते.

मनुष्याला सुख हवे, समाधान हवे. यानुसार त्याचा जीवनप्रवास असतो. दुःख आले, अशांति आली कि शांति शोधतो. अर्जुन नियतकार्य Execute करण्यासाठी सज्ज झाला असताच दुःखी होतो, अशांत होतो. "लोभामुळेच आपण कार्य करीत आहो" असा शिक्का आपल्या नियतकार्यावर लावतो. अर्थात हे घोरकार्य टाळले तर संभाव्य दुःखापासुन आपली सुटका होईल व शांति भंग होणार नाही . म्हणुन "दुःखी राहुन, पापी ठरुन जगण्यापेक्षा समाधानाने मृत्यु येणे श्रेयस्कर आहे. "असे त्याचे Judgement असते.

मनुष्य समाधानी असावा, चंचलता नसावी म्हणुन निष्क्रियता पसंत करणे हाच मार्ग अर्जुनाची पसंती असते. साधारणतः कार्यामुळे अपेक्षित यश मिळावे ही मनुष्याची इच्छा असते. तर कार्य टाळतांना अर्जुन म्हणतो, "न कांक्षे विजयं कृष्ण" अर्थात सुखासाठी या कार्यातुन यश मिळावे ही माझी इच्छा नाही.

भगवतगीता याच मुद्यावर निष्क्रियता vs विकास;संन्यास vs योग या विषयावर प्रकाश टाकते.

१. निष्क्रियता vs विकास

कार्य काम्य आहेत अर्थात व्यावहारिक कार्यात सकाम मानसिकता असते म्हणुन कार्याचा संन्यास घेणारे असतात. लोकांमध्ये "विकासासाठी कर्म" हा आदर्श रहावा, त्यांचा बुद्धिभेद होवु नये म्हणुन समाजात, समुहात ज्यांना श्रेष्ठ असे लेबल लागते अशा श्रेष्ठांनाही(अनासक्त) कर्म(आदर्शासाठी) आवश्यक आहे.

अ. कर्माद्वारे भोगैश्वर्यप्राप्ति, यश मिळणे ही व्यावहारिक भूमिका असते. तर कार्याद्वारे योग/ईश्वरभक्ति हा शाश्वत विकासमार्ग असतो. मनुष्य नित्य विकासमार्गावर असावा यासाठी शाश्वत विकासमार्गाचे जीवनात प्रयोजन आहे.

ब. व्यावहारिक मार्ग व शाश्वत विकासमार्ग यांत कार्य Common असते, साधन असते. शाश्वत विकासाच्या मार्गावर विचलित होत नाही. कार्याचा एकनिश्चय असतो.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

क. या मार्गात कार्याचा एकनिश्चय असतो. व्यावहारिक नियतकार्य स्वधर्मात Transform होते. व्यवहारातील निर्णयअधिकार कार्याचा निश्चय करण्यासाठी वापरतो. एकनिश्चयामुळे निष्काम कार्य घडते. चंचलत्वामुळे निश्चय होण्यास बाधा येते म्हणुन भगवतगीता बुद्धियोगाला highlight करते. ज्यामुळे जीवनयात्रा शाश्वत विकासमार्गावर असते. कार्याद्वारे योग हे कार्यकौशल्य साध्य होते.
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

ड. कार्याद्वारे नैष्कर्मसिद्धि म्हणजेच कर्मसंन्यास
नैष्कर्मसिद्धिं परमां संन्यासेन अधिगच्छति।(१८-४९)

२.. संन्यास कि योग ?यांत माझ्यासाठी काय श्रेयस्कर राहील?हा अर्जुनाचा प्रश्न असतो. (५-१)

अशांत असणे, (दुःखाने, भयाने )विचलित होणे ही मानसिक दुर्बलता असते. योग म्हणजे दुःखान्त अशी निश्चित व्याख्या भगवतगीता करते. जीवनविकास या संदर्भात मानसिक दुर्बलतेवर विजय मिळविणे अपेक्षित असते.

तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योगसंज्ञितम् ।(६-२३)

युञ्जनैव सदा आत्मानं योगी नियतमानसः।(६-१५)

युञ्जनैव सदा आत्मानं योगी विगतकल्मषः।

सुखेन ब्रह्मसंस्पर्शं अत्यंतं सुखं अश्नुते।।(६-२८)

"The search for something permanent is one of the deepest of the instincts leading men to philosophy. "

-Bertrand Russell,

******

(१५-१७)

*************************

उत्तमः पुरुषः तु अन्यः परमात्मा इति उदाहृतः।

यो लोकत्रयम् आविश्य बिभर्ति अव्यय ईश्वर।।

*************************

(१५-१७)/१:

"उत्तमः पुरुषः तु अन्यः परमात्मा इति उदाहृतः"

(आत्मा-परमात्मा/ God connection)

*ज्ञानी:

"ईश्वर "ही संकल्पना भगवतगीतेत बाहेरुन आयात झालेली नाही, प्रकृतितील गुण (सत, रज, तम) व पुरुष (क्षर व अक्षर), पुरुष-पुरुषोत्तम याप्रमाणे ज्ञानविज्ञानासह ईश्वर ही संकल्पना स्पष्ट होते.

सर्वस्य च अहं हृदी संनिविष्टो।(१५-१५)

क्षरः सर्वाणि भूतानि कुटस्थो अक्षर उच्यते।(१५-१६)

उत्तमः पुरुषः तु अन्यः परमात्मा इति उदाहृतः।

यो लोकत्रयम् आविश्य बिभर्ति अव्यय ईश्वर।।

(१५-१७)

ज्या ईश्वराचा अंश मनुष्याच्या जीवित तत्वात (आत्मा) विराजमान आहे, याच तत्वाची Energy तेज, प्रकाश, वैश्वानर अशी वर्णित केलेली आहे.
अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिणाम् देहम् आश्रितः।(१५-१४)

याप्रमाणे स्वतःचे जीवन, विश्व यांचे नाते ईश्वर या संदर्भात आत्मा-परमात्मा, पुरुष-पुरुषोत्तम याद्वारे स्पष्ट झालेली आहे. व त्याचा हेतु मनुष्यविकासाचा शाश्वत मार्ग (Standard path) जाणणे हाच आहे. याच आधारावर ज्ञान, कर्म, भक्ति या संदर्भात विकासाचा शाश्वत मार्ग "(अ-)सतो मा सतगमय";"(मृ-)त्योर्मा अमृतंगमय";(त-)मसो मा ज्योतिर्गमय" याद्वारे (हा अमृतमार्ग ) स्पष्ट होतो. या मार्गाला "अमृतत्वाय कल्पते" असे भगवतगीता संबोधते (२-१५).

"अमृतत्वाय कल्पते"हा मार्ग हा जगातील कोणत्याही व्यक्तिसाठी जीवनविकासाचा Standard मार्ग(Mode of progress, ज्ञानी, सत) ठरतो. या मार्गात कर्म हेच (विकासाचे) साधन असते. कर्मासाठी ज्ञान व कर्माचे ज्ञानात विलिनिकरण हा

विकासमार्गाचा "ज्ञानी" या संदर्भातील सिद्धांत आहे. येथे ईश्वर व ज्ञान यांचे नाते (ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत) स्पष्ट होते. अर्थात ईश्वराचा आश्रय(माम अनुस्मर) ज्ञानाचा आश्रय असतो हेच भगवतगीतेला अभिप्रेत आहे.

(योगसंन्यस्त कर्माणम् )ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम्।(४-४१)
सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

अर्थात मनुष्याने नित्य विकासमार्गावर असावे हे भगवतगीतेला अभिप्रेत आहे. या संदर्भात वर्तमानातील सकारात्मक Attitude जाणुन घेणे आवश्यक आहे.
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)

*सकारात्मक Attitude:

नित्य विकासमार्गावर असणारा "ज्ञानी" असतो, स्वतःचा बंधु असतो, विचलित होत नाही. तर विचलित झाला असता मनुष्य विकासमार्गावरुन घसरतो. स्वतःच स्वतःचा शत्रु ठरतो. अर्जुनाला याच विकासमार्गाचे अज्ञान असते. स्वतःला योग्य ठरविण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो व ज्ञान वापरतो. अर्थात प्रत्यक्षात

विकासमार्गावरुन घसरतो तरी "ज्ञानी" समजुनच भाष्य करतो. म्हणुन ज्ञानी कोण?हा प्रश्न येतो.

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(८-७)
जीवनात मृत्यु असतो, त्यासाठी प्रयत्न करावे(लढावे) लागत नाही. तसेच दुःख असते, अडचणी असतात, त्यासाठी वेगळे प्रयत्न (लढा)नसतात. प्रयत्न सकारात्मक जगण्यासाठी असतात. अर्थात हाच (दुःखी vs सुखी, नकारात्मक vs सकारात्मक)लढा असतो. दुःखी राहुन निराश मनाने जगणे कि उत्साहाने जगणे ?ही निवड जगण्यासाठी आपणच करीत असतो.

नित्य विकासाचे Attitude सकारात्मक असते. कर्म करण्यास किंवा करतांना उत्साह असतो. जगात अशक्य कांहीही नाही असे भाष्य करणे व त्यासाठी प्रत्यक्षात सकारात्मक Attitude बनविणे यांत भेद असतो. हाच भेद भगवतगीतेतुन स्पष्ट होतो.

भाष्य आणि संवाद:
अर्जुनविषादयोगात (निष्क्रियतेचे समर्थन)स्वतःच्या मनोरंजनासाठी केलेले Irrelevent भाष्य याचे दर्शन होते, ज्यामुळे संवाद होत नाही. स्वतःला योग्य व समर्थ सिद्ध

करण्यासाठी हे भाष्य असते. या भाष्याला प्रज्ञावाद संबोधले आहे. अर्जुन वास्तव स्विकारतो, (युद्ध करणे योग्य कसे?) तेंव्हा संवाद सुरु होतो.

समाजात मी योग्य समजुनच भाष्य बोलल्या जाते. समाजात व्यवहार असतो. व्यवहारसिद्धिसाठी किंवा स्वतःला योग्य, समर्थ सिद्ध करण्यासाठी भाष्य बोलल्या जाते. स्वतःच्या विकासमार्गाचे अज्ञान असलेला याच भाष्याने मोह पावतो. अज्ञानाला ज्ञान संबोधतो. स्वतःच्या विकासमार्गाचे ज्ञान असलेला आपल्या कार्याचा निश्चय होण्यासाठी ज्ञान घेतो, संवाद करतो.

सार:

ज्ञानी व सकारात्मक Attitude :

स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानी समजुन भाष्य करणे ही समाजातील संवय असते. तर "ज्ञानी म्हणजे विकासमार्गावर असलेला" हेच भगवतगीतेला अभिप्रेत आहे. याचसाठी सकारात्मक Attitude चे जीवनात महत्व आहे व सकारात्मक Attitude होण्यासाठी जीवनाचे ईश्वराशी असलेले(Scientific)नाते जाणुन घेणे हाच भगवतगीतेचा संदेश आहे.

"Your attitude, not your aptitude, will determine your altitude. "

Zig Ziglar

******

(१५-१७)/२:

"यो लोकत्रयम् आविश्य बिभर्ति अव्यय ईश्वरः"

(पुरुषोत्तम-परमात्मा-ईश्वर)

मनुष्यासाठी दररोजचे व्यावहारिक जीवनच (संसार) सत्य असते. कुरुक्षेत्रावर दु:खी होणे हे अर्जुनाचे सत्य आहे. दु:खापासून मुक्त होण्यासाठी त्याच्याकडे एकच पर्याय आहे, कार्यापासुन निवृत्ति/निष्क्रियता. अर्थात पळवाट, तो तीच निवडतो आणि स्वत: ला योग्य दर्शविण्यासाठी धर्मज्ञान सांगतो. ही Lower consciousness(मनोवश) ची Activity असते.

आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः।(६-५)

मनुष्य स्वतःच स्वतःचा शत्रु ठरतो (मनोवश-Lower consciousness) व स्वतःच स्वतःचा बंधु ठरतो.

जगात चांगले लोक आहेत, परंतु जेव्हा कार्य करण्याचा योग्य पर्याय त्याचेसमोर नसतो, तेव्हा निष्क्रियता पसंद करतो किंवा पळवाट शोधतो. आणि स्वत:ला योग्य दर्शविण्यासाठी ज्ञान वापरतो. येथे ज्ञानाचा चुकीचा वापर होतो.

"The greatest enemy of knowledge is not ignorance, it is the illusion of knowledge. "

-Stephen Hawking

ज्ञान या विश्वात सर्वश्रेष्ठ आहे हा भगवतगीतेचा संदेश आहे. ज्ञानामुळेच आत्मविश्वास असतो. भगवतगीता मानवी जीवनात ज्ञानाचे महत्त्व सांगते. या ज्ञानामुळे युद्धकार्य( स्वधर्म )योग्य कसे आहे याचे अर्जुनाला उत्तर मिळते. आणि निवड करण्यासाठी एक नवीन पर्याय मिळतो .

- ईश्वराची इच्छा / ईश्वराचे कार्य.

हेच ज्ञान जाणून घेण्यासाठी आपण भगवद्गीता ज्ञानाचा प्रवास करतो. या प्रवासामध्ये पुरुषोत्तमयोग(१५ वा अध्याय )ईश्वराचे ज्ञान व त्याचे मनुष्याशी असलेले नाते स्पष्ट करते.

ईश्वर:

उत्तमः पुरुषः तु अन्यः परमात्मा इति उदाहृतः।
यो लोकत्रयम् आविश्य बिभर्ति अव्यय ईश्वरः॥(१५-१७)

मनुष्य व ईश्वर:

मनुष्याचा ईश्वराशी संबंध आहे, त्याचे ज्ञान स्पष्ट केले आहे, ज्यास भगवद्गीता अध्यात्म म्हणते (स्वतःला ओळखणे).
सर्वस्य च अहं हृदि संनिविष्टो।(१५-१५)

जड प्रकृति, अव्यक्त प्रकृति, प्रकृति-पुरुष, सनातन अव्यक्त (पुरुषोत्तम) त्याचप्रमाणे जड व अव्यक्त, क्षर-अक्षर, सगुण-निर्गुण यांचे ज्ञान आले आहे. हे ज्ञान जाणून घेतले तर आपण कर्म करून आध्यात्मिक विकास (योग) करण्याचे ज्ञान जाणणे आपले लक्ष्य ठरते.

निष्काम कर्म :

ज्या विश्वात मनुष्य आलेला आहे ते अवाढव्य वृक्ष आहे. ज्याचे मुळ वर आहे, फांद्या वरखाली आहेत. त्यांनी (सकाम कर्मरुपाने) खालीही मुळ धरले आहे.

अधश्च मूलानि अनुसंततानि
कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके।(१५-२)

हे वृक्ष (कर्माच्या) असंगशस्त्राने छेदल्या जाते. व मनुष्याचा शाश्वत विकासाचा मार्ग मोकळा होतो. जे प्रकृतिचे मुळ आहे त्या शाश्वताकडे जाण्याचा हा मार्ग असतो. या मार्गावर कार्य करताना कार्याचा दृढनिश्चय Determination/स्वधर्म &Devotion भक्ती महत्त्वपूर्ण आहे. अर्थात निष्काम कर्म असते. येथे Higher consciousness (आत्मवश)क्रियाशील असते.

असंगशस्त्रेण दृढेन छित्वा।(१५-३)
ततः पदं तत्परिमार्गितव्यं
यस्मिन गतः न निवर्तन्ते भुयः।(१५-४)

विकासमार्ग:

अर्थातच Shifting of level of consciousness (Lower to Higher) यासाठी मनुष्याला त्याचे ईश्वराशी असलेले नाते जाणुन घेणे महत्वाचे ठरते. याच संदर्भात शरीरातील प्राणतत्व /आत्मा याचे प्रवास दर्शन याच अध्यायात आलेले आहे.

शरीरं यद् अवाप्नोति यत् च अपि उत्क्रामति ईश्वरः।
गृहित्वा एतानि संयाति वायुः गंधान् इव आशय।।(१५-८)

अर्थात वायु जसा फुलाचा सुगंध घेवुन जातो, तसे शरीर सोडतांना (आत्मा) गुणाला घेवुन जातो. म्हणुन या प्रवासाचे ज्ञान जाणुन गुणातीत होण्यासाठी ईश्वराचे धाम जाणुन विकासमार्गाचे नियोजन करणे आवश्यक ठरते.

यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धाम परमं मम।(१५-६)

यावरुन भगवतगीतेचे ज्ञान संपुर्ण वैज्ञानिक आहे याचा बोध होतो. म्हणुनच भगवतगीतेने ज्ञानालाच सर्वश्रेष्ठ ठरविले आहे. व जीवनात ज्ञानाचा योग्य वापर कसा करावा याचे मार्गदर्शन करते. अर्थात ज्ञानाचे Purpose (अज्ञान झांकण्यासाठी कि जीवनमार्गातील संशय मिटविण्यासाठी?) कळते.

"Knowledge rests not upon truth alone, but upon error also. "

Carl Jung

बोध: विश्वातील मोठा वर्ग ईश्वर, अध्यात्म हे विज्ञानविरोधी आहे असे समजतात. पण ज्ञानविज्ञान असुनही मानवी Survival चे साधे प्रश्न (बेरोजगारी, निष्क्रियता, )

सुटत नाही . या संदर्भात भगवतगीतेतील Wisdom of ignorance (Illusion) जाणुन घेणे आवश्यक आहे.

*******

(१५-१८)

*************************

यस्मात् क्षरम् अतीतो अहं अक्षराद् अपि च उत्तमः।

अतोअस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः।।

*************************

(१५-१८):

"यस्मात् क्षरम् अतीतो अहं अक्षराद् अपि च उत्तमः"

(The Supreme-पुरुषोत्तम-ईश्वर-परमात्मा)

*समाजातील वास्तव :

जे स्वतःचा मार्ग चालत असतात, काय हवे?याची त्यांना जाण असते. त्यांचे निश्चित ध्येय असते. पण मार्गाच्या अज्ञानामुळे समाजात चांगला मनुष्य योग्य असुनही स्वतःला चुकीचा समजुन निष्क्रिय होतो. अर्जुनाचा हाच गोंधळ होतो. अर्थात दैवीगुणसंपत्ति असलेला संशयाने ग्रासल्यामुळे निष्क्रिय होतो, तर

असुरगुणसंपत्ति असलेला निःसंशयपणे सक्रिय असतो. ही समाजातील शोकांतिका ठरते.

आशापाशशतैःबद्धा कामक्रोधपरायणाः।...
ईश्वरोअहं अहं भोगी सिद्धोअहं बलवान सुखी॥(१६-१४)

अर्जुनाची Prewar मनःस्थिति

स्वतःच्या मार्गाचे अज्ञान असते म्हणुनच अर्जुन आपले नियतकार्य Execute करतांना गोंधळतो. आपले कार्य शोकदायी आहे असे त्याला जाणवते. ते कार्य टाळण्यासाठी त्या कार्याला पापकर्म ठरवितो. अर्थातच आपल्या निष्क्रियतेला धर्म ठरवितो. हेच सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो.

लोभी vs त्यागी या सुत्रानुसार अर्जुन स्वतःला त्यागी समजतो. मला कांही नको म्हणुन कर्मच करायचे नाही या विचारचक्रात नियतकर्म/जबाबदारी टाळतो.

मनुष्याला मार्गात अडचणी दिसल्या, कष्ट जाणवले तर ते टाळण्यासाठी त्याचे विचारचक्र सुरु होते. व चांगलेपणा किती कठिण आहे याचे दाखले देतो व जग जणु भ्रष्टाचारावरच चालत

आहे असे स्पष्ट Judgement भाष्य करतो. याचा परिणाम आपल्या निष्क्रियतेलाच चांगलेपणाचा शिक्का मारतो.

या प्रसंगात अज्ञानाला ज्ञान ठरविण्यात येते. म्हणुन भगवदगीतेत जीवनमार्गातील "ज्ञान" हा विषय स्पष्ट केला आहे.

*भगवदगीतेने सुचविलेला उपाय :

"ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम् "

"ज्ञान "या संदर्भातच ईश्वराची ओळख प्रकृति-पुरुष - पुरुषोत्तम याप्रमाणे ज्ञानविज्ञानासह भगवदगीता स्पष्ट करीत आहे.

अहंकार मनुष्याचे निम्न (अशाश्वत)अस्तित्वच (Lower Self ) असते.
अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)
याच अहंकारामुळे मनुष्य जीवनमार्गातील ज्ञानअज्ञानाची उलटापालट करतो. म्हणुन "अशाश्वत vs. शाश्वत" या संदर्भात "अहंकार vs. ईश्वर" हा विषय आलेला आहे. या ज्ञानामुळे

दर्प(False ego of Self) vs. आत्मविश्वास(Self confidence) हा भेद कळतो.

ईश्वर :क्षर(अशाश्वत)व अक्षर(शाश्वत) या संदर्भात,

यस्मात् क्षरम् अतीतो अहं अक्षराद् अपि च उत्तमः।
अतोअस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः।।(१५-१८)

ईश्वर :आत्मा-परमात्मा या संदर्भात,

उत्तमः पुरुषः तु अन्यः परमात्मा इति उदाहृतः।
यो लोकत्रयम् आविश्य बिभर्ति अव्यय ईश्वरः।।(१५-१७)

ईश्वरधाम:
यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धाम परमं मम।(१५-६)

मनुष्याचे ईश्वराशी नाते येथे स्पष्ट होते. हाच आधार स्वतःच्या (जीवनविकास) मार्गाचा आहे. स्वतःचा मार्ग या संदर्भात नियतकार्याला "स्वधर्म" ठरविणे, निर्णयअधिकार जाणुन कार्याचा

एक(दृढ) निश्चय करणे. या मार्गात ईश्वराची भक्ति साध्य करणे अर्थात समत्वयोगाने कार्य करणे अभिप्रेत आहे.

सार :

मनुष्य चांगला असुनही योग्य-अयोग्य या संदर्भातील संशयमुक्तिसाठी भगवदगीता(१) "चांगला मनुष्य" या संदर्भात ईश्वराची अनन्यभक्ति स्पष्ट करते.

अपिचेत्सु दुराचारो भजति माम् अन्यभाक्।
साधुएव स मन्तव्यः सम्यग् व्यवसिता हि सः।।(९-३०)

(२)तर "कर्म "या संदर्भात बुद्धियुक्त याचे ज्ञान स्पष्ट करते.
बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

*********

(१५-१८):
"अतोअस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः"
(श्रीकृष्णाची पुरुषोत्तम ही ओळख)

श्रीकृष्ण स्वतःच ईश्वर आहे हे मान्य करुन अर्जुन श्रीकृष्णाला पुरुषोत्तम असे संबोधन करतो. या संबोधनाने अर्जुन तीन प्रश्न करतो, ज्याचे रहस्य ईश्वरच जाणतो.

१. ब्रह्म, अध्यात्म, कर्म याची निश्चित व्याख्या जाणण्याची इच्छा. अर्थात हा प्रश्न जड-चेतन, व्यक्त-अव्यक्त यासंबंधी ज्ञान या संदर्भात आहे.

किं तद् ब्रह्म किम् अध्यात्म किं कर्म पुरुषोत्तम।(८-१)

२. ईश्वराचे चिंतन करण्यासाठी विश्वातील ईश्वराच्या विभूति जाणण्याची इच्छा.

स्वयं एव आत्मनाआत्मानम् वेत्थ त्वं पुरुषोत्तम।(१०-१५)

३. परमेश्वराचे प्रत्यक्ष रुप पाहण्याची इच्छा.

द्रष्टुं इच्छामि ते रुपम् ऐश्वरं पुरुषोत्तम।(११-३)

याचाच अर्थ मनुष्य form मध्ये असलेल्या ईश्वराला पुरुषोत्तम संबोधले आहे. याच पुरुषोत्तमाचे परमात्मा/ईश्वर ज्ञान भगवदगीता पुरुषोत्तमयोगात स्पष्ट करते.

द्वौ इमौ पुरुषौलोके क्षरः च अक्षर एव च।(१५-१६)

या सृष्टित सर्वप्राणिमात्रात जड व चेतन (क्षर-अशाश्वत, अक्षर - शाश्वत) असे दोन विभाग येतात.

अपरा इयं इतः तु अन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।(७-५)

परः तस्मात् तु भावो अन्योअव्यक्तःअव्यक्तात् सनातनः।(८-२०)

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यः तु अनन्यया।(८-२२)

उदा. शरीर व जीवात्मा, जड विश्व(Universe) व अक्षरब्रह्म (Universal mind), याशिवाय अक्षर या संदर्भात श्रेष्ठ अव्यक्त "पुरुषोत्तम " जाण.

ईश्वर

उत्तमः पुरुषः तु अन्यः परमात्मा इति उदाहृतः।

यो लोकत्रयम् आविश्य बिभर्ति अव्यय ईश्वरः।(१५-१७)

क्षर-अक्षर-पुरुषोत्तम

यस्मात् क्षरम् अतीतो अहं अक्षरात् अपि च उत्तमः।

अतोअस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः।।(१५-१८)

सारः

"पुरुषोत्तम" हा शब्द भगवदगीतेत दोन अर्थाने आलेला आहे.

१. "प्रकृति-पुरुष-पुरुषोत्तम " ज्याद्वारे सृष्टिचे manifestation होते. यातील पुरुषोत्तम परमात्मा,

ईश्वर(अक्षरश्रेष्ठ) असतो.

शरीर(जड) नाशवंत आहे. जीवात्मा(चेतन) शाश्वत आहे. या शाश्वतामध्ये श्रेष्ठ शाश्वत(ज्याचा नाशच होत नाही) ईश्वराचा अंश प्रकृतिगुणामुळे जीवात्मा बनला. हाच ईश्वर सर्वांच्या हृदयस्थानी स्थित आहे. यामुळेच मनुष्याचे शरीरयंत्र क्रियाशील होते. स्मृति, ज्ञान यामुळेच असते.

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।(१५-७)

सर्वस्य च अहं हृदि संनिविष्ठो।मत्तः स्मृतिः ज्ञानम् अपोहनं च।(१५-१५)

२. स्वतः परमात्मा मनुष्य form मध्ये-

या लोकी पुरुषोत्तम या सन्मानाने श्रीकृष्णाला संबोधन आहे. (विश्वरुपात मात्र महात्मन्, जगतपते, जगतनिवास, विष्णु, विश्वमुर्ते असे संबोधन आहे. )

********

(१५-१९)

************************

यो माम् एवं सम्मूढो जानाति पुरुषोत्तमम्।

स सर्वविद् भजति माम् सर्वभावेन भारत।।

************************

(१५-१९) :

" यो माम् एवम् असम्मूढो जानाति पुरुषोत्तमम् "

(Determination साठी ज्ञान या संदर्भात ईश्वराचे ज्ञान )

जगात ज्ञानविज्ञान आले. या ज्ञानविज्ञानाने जगाला बदलविले. या ज्ञानविज्ञानात दररोज भर पडत असते. विश्वात बदल घडत असतात. या विश्वातील मनुष्याची भूमिका मात्र एकमेव असते. मनुष्याला आपल्या जीवनाचे आव्हान स्विकारावे लागते. या संदर्भातील प्रश्न स्वतःलाच सोडवावे लागतात.

आपले नियतकार्य दुःखदायी आहे ही जाणिव झाल्यामुळे युद्ध करणे योग्य कि अयोग्य? या संभ्रमात अर्जुन सापडतो. हा संभ्रम (Tie) अर्जुन सोडवु शकत नाही. जेंव्हा मनुष्याला स्वतःला प्रश्न

येतो, Tie येतो अर्थात Tie सोडविण्यासाठी स्वतःचे कर्तव्य या संदर्भातील ज्ञान नसल्यामुळे Tie सोडवु शकत नाही. (Flaw in determination ).

अतीव पीडेतुन बाहेर पडण्यासाठी अर्थात Comfortable होण्यासाठी युद्ध टाळणे अर्जुनाची गरज बनते. आपल्या निष्क्रिय भूमिकेला धर्माची भूमिका आहे असे दर्शवितो व स्वतःला ज्ञानी समजतो. या भूमिकेत अर्जुन धर्माला अधर्म व अधर्माला धर्म म्हणतो. अर्थात अज्ञानाला ज्ञानी दर्शवितो.

ज्ञान:

व्यावहारिक जीवन(संसार) व पारलौकिक जीवन याचा समन्वय धर्म साधत असतो. या संदर्भातच हाच समन्वय ईश्वर या संज्ञेने भगवदगीता साधत आहे. धर्मकार्य या संदर्भात सत्कार्य, पुण्यकार्य याचे महत्व मनुष्य जाणतो. चांगलेपणा या संदर्भात सत्कार्य, कार्याद्वारे ईश्वरभक्ति, दैवीगुणसंपत्ति याद्वारे Determination होणे व (योग, दुःखान्त) शक्तिची साधना होणे याचे ज्ञान भगवदगीता देत आहे.

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम्।

ईश्वराची "पुरुषोत्तम" ही संज्ञा ज्ञानविज्ञान (प्रकृति-पुरुष- पुरुषोत्तम) या संदर्भात आलेली आहे. मनुष्याला स्वतःच्या जीवनाची ओळख (Know Thyself) व्हावी याच हेतुने "प्रकृति-पुरुष-पुरुषोत्तम " हे ज्ञानविज्ञान आलेले आहे. याच ईश्वराचा अंश मनुष्याच्या प्राणतत्वात 'Energy' या संदर्भात असतो. यामुळेच जीवन संचालित असते.

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनाम् देहम् आश्रितः।
प्राणअपान समायुक्तः पचामि अन्नं चतुर्विधम्।।
सर्वस्य च अहं हृदि संनिविष्ठो
मत्तः स्मृतिज्ञानम् अपोहनंच। (१५-१५)

यो माम् एवम् असम्मूढो जानाति पुरुषोत्तमम्।
स सर्वविद् भजति मां सर्वभावेन भारत।।(१५-१९)

सार :

जगात ईश्वर या संकल्पनेला मानणारा वर्ग आहे तसेच न मानणाराही वर्ग आहे. ज्ञानविज्ञानाचे महत्व मात्र सर्व जगानेच मान्य केले आहे. स्वतःच्या जीवनाचे प्रश्न सोडविण्यास हे ज्ञानविज्ञान अपुरे पडते, तेंव्हा भगवदगीता ही पुर्तता करीत आहे. भगवदगीता "ज्ञानविज्ञान" या संदर्भात "ईश्वर" या संकल्पनेचे स्पष्टिकरण देत आहे, ज्याचा संबंध मनुष्यजीवनाशी, त्याच्या मानसिकतेशी, Determination शी असतो.

********

(१५-१९):

"स सर्वविद् भजति माम् सर्वभावेन भारत"

(ईश्वराचे पुरुषोत्तम ज्ञान)

भगवदगीतेत कांही महत्वाच्या ठिकाणी अर्जुनाला "भारत" हे संबोधन आलेले आहे. "Feel good " प्रमाणे मनुष्याला उत्साह देणारा हा शब्द आहे. भगवदगीतेचा मुख्य संदेश लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी मनुष्यालाच हे संबोधन आहे.

ईश्वराचे पुरुषोत्तम ज्ञान जाणुन ईश्वरभक्ति करणे हे रहस्यमय ज्ञान जाणणारा बुद्धिमान ठरतो व जीवनाचे सार्थक करणारा ठरतो. हा

संदेश पोहोचण्यासाठी पुरुषोत्तमयोगात सलग दोनदा भारत या शब्दाचा उल्लेख आलेला आहे.

यस्मात् क्षरम् अतीतो अहम् अक्षरात्अपि च उत्तमः।
अतोअस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः।।(१५-१८)
यो माम् एवं सम्मूढो जानाति पुरुषोत्तमम्।
स सर्वविद् भजति माम् सर्वभावेन भारत।।(१५-१९)
इति गुह्यतमं शास्त्रं इदं उक्तं मया अनघ।
एतद् बुद्ध्वा बुद्धिमान् स्यात् कृतकृतश्च भारत।।(१५-२०)

पुरुषोत्तम ज्ञानाचा सार(संदेश) :

सृष्टिचा पसारा भव्य वृक्षासमान आहे. ज्याचे मुळ प्रत्यक्षात वर आहे पण कर्मरुपी फांद्यांनी खाली मुळ धरलेले आहे. यामुळे याचा उगम व अंत कळेनासे होते. पण निष्काम कर्माच्या शस्त्राने या वृक्षाला छेदता येते. व मनुष्य मुळ धामाच्या मार्गावर असतो. जे धाम ईश्वराचे धाम आहे, ज्यामुळे सृष्टिची निर्मिति आहे.

जीवनाच्या याच मार्गाचे शास्त्र भगवदगीता सांगते. आत्मवश असणे, सुखदुःख या संदर्भात निर्द्वन्द्व असणे, अध्यात्मज्ञानाद्वारा निष्काम कर्म जाणणारा व आचरणारा या धामाला पोहोचतो.

प्रकाश, उर्जा यांचे मुळ तत्व ईश्वर आहे, ज्यामुळे वृक्ष, प्राणिमात्राचे पोषण होते. याच तत्वाचा अंश प्राणतत्वात आहे. ज्यामुळे क्षेत्राला जाणणारा क्षेत्रज्ञ (मत्तः स्मृति ज्ञानं अपोहनंच)ठरतो. क्षर-अक्षर या संदर्भात सर्व प्राणिमात्र अशाश्वत आहे तर ईश्वर शाश्वत तत्व आहे. प्रकृति-पुरुष, पुरुष-पुरुषोत्तम यांत पुरुषोत्तमाला सर्वलोक परमात्मा, ईश्वर म्हणुन ओळखतात.

********

(१५-२०)

************************

इति गुह्यतमं शास्त्रं इदं उक्तं मया अनघ।

एतद् बुद्ध्वा बुद्धिमान् स्यात् कृतकृतश्च भारत।।

************************

१५. २० :

"इति गुह्यतमं शास्त्रं इदं उक्तं मया अनघ"

(ज्ञान, कर्म व भक्ति)

जसा डॉक्टर रोगाचे निदान करुन उपाय करतो, तसेच मानवी जीवनातील दुःखाचे निदान आवश्यक असते. यामुळे निश्चित प्रश्न पुढे येतो व उपायावर कार्यवाही होते. जगात अडचणी असतात तसेच Resources ही असतात. अर्थात Strength व Weakness दोन्ही असते. जे जसे आहे तसे स्विकार केले तर Strength कळते व Weakness ही कळतो. Weakness ला Strength मध्ये बदलविणे हा मानवी प्रयास असतो. या सत्याचे ज्ञान नसेल तर मनुष्याला स्वतःच्या Strength चे दर्शनच होत नाही. यामुळे आत्मविश्वास नसतो.

धर्म:

जगातील दुःखावर धर्मांनी उपाय सुचविले. मनुष्य दुःखालयात जन्माला आला हीच मनुष्यजन्माची ओळख आहे. व धर्माचे मुळ आहे. "मानवी जीवनात दुःख आहे व दुःखाचे कारण आसक्ति आहे "असे बुद्धांनी म्हटले होते. याप्रमाणे दुःखाचे निदान करुन उपाय सुचविला. तोच बुद्ध धर्म म्हणुन ओळखल्या जातो. जन्ममृत्युच्या Cycle मध्ये बद्ध असलेल्या जीवाचा मुक्तिकडे प्रवास व्हावा यासाठी बंधन-मोक्ष याचे शास्त्र भगवतगीता सांगते. हे शास्त्र सर्व धर्माचे मुळ ठरते.

ईश्वर:

माम् उपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते।(८-१६)

मनुष्य दुःखालयात जन्माला आला म्हणुन त्याचा जीवनविकासमार्ग "अमृतंगमय" अर्थात ईश्वराप्रत असावा. या मार्गावर व्यथित होत नाही. दुःखाशी deal करण्याचे ज्ञान असते. याच मार्गाचे शास्त्र ज्ञानविज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते. यांत विकासमार्गातील ज्ञान, कर्म व भक्ति या तिन्ही factors चा समावेश आहे. यामुळेच

भगवतगीतेत ईश्वर, आत्मा हे शब्द आलेले आहेत, त्यांचा ज्ञानविज्ञानाशी संबंध आहे.

समाजात लोक ईश्वराची भक्ति करतात. यात ईश्वरश्रद्धा ही Strength असते. ईश्वर या संकल्पनेत व्यक्तिपरत्वे, धर्मपरत्वे मते वेगळी असली तरी समाजात जगतांना मनुष्याला व्यवहार जगावाच लागतो. यात कर्म असते.

कौन कहता है भगवान आते नही?मिरा जैसे बुलाते नही!
कौन कहता है भगवान खाते नही?शबरी जैसे खिलाते नही!

अर्थात कर्म निष्ठेने करणे हेच कर्माद्वारे भक्तिचे रहस्य आहे.

"Excellence is an art won by training and habituation. We do not act rightly because we have virtue or excellence, but we rather have those because we have acted rightly. We are what we repeatedly do. Excellence, then, is not an act but a habit. "

Aristotle

कर्माद्वारे भक्ति व्हावी यासाठी ईश्वराची "ज्ञान" या संदर्भात ओळख भगवतगीतेत दिलेली आहे.

सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

युरोपात विज्ञानक्रान्ति आली तेंव्हा त्या युगाला(शतकाला) Enlightenment Age म्हटले. हेच शतक Age of resoning म्हणुन ओळखल्या गेले. गौतम बुद्धांनी Enlightenment (बुद्ध) ला महत्व दिले. भगवतगीता Enlightenment चे महत्व "ज्ञानी" या संदर्भात स्पष्ट करते.

नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता।(१०-११)

याप्रमाणे भगवतगीता सर्वधर्माचे मुळ रहस्य ज्ञानविज्ञानासह [(प्रकृतिगुण-पुरुष (आत्मा)-पुरुषोत्तम (परमात्मा) ]सांगत आहे.

इति गुह्यतमं शास्त्रं इदं उक्तं मया अनघ।

एतद् बुद्ध्वा बुद्धिमान् स्यात् कृतकृतश्च भारत।।(१५-२०)

********

# भगवदगीता

## अध्याय १६ दैवी-असुर संपत्ति

अध्याय १६ दैवी-असुर संपत्ति

चांगला मनुष्य, धार्मिक मनुष्य अशा शब्दांची आपल्याला ओळख असते. चांगला मनुष्य पापभिरु असतो हे सुद्धा आपण ऐकतो. याच संदर्भात १६-१७ हे अध्याय आहेत.

अध्याय १२ पर्यंत ईश्वराची ओळख होते, भक्तिचे महत्व जाणतो. तर अ. १३ पासुन मनोवैज्ञानिक ज्ञान सुरु होते. अ. १५ मध्ये जीवनविषयक दृष्टि बदलते. व प्रत्यक्ष मानसिकतेत बदल होत जातो. अ. १६ मध्ये चांगलेपणाला पुर्णत्व देण्यासाठी (प्रत्यक्ष बदलाव) फलत्याग शास्राचे महत्व सांगितले.

हॅम्लेटसमोर प्रश्न आला, जगावे कि मरावे, तसाच मनुष्याला एक प्रश्न असतो. खाण्यासाठी जगायचे कि, जगण्यासाठी खायचे!
जगात जीवनविषयक, मानवताविषयक अनेक महानुभावांनी, तत्वज्ञांनी प्रकाश टाकलेत. प्रत्यक्ष व्यवहारातही आपण Philosophy ऐकत असतो. हे सर्व ज्ञान असुनही गोंधळ कुठे होतो!What's error! याचे उत्तर भगवतगीता देते. मनुष्य साधनाला साध्य करतो. व जे साध्य करायचे आहे, त्यावर दुर्लक्ष

करतो. याच गोंधळामुळे अर्जुन गोंधळतो व मला यश नको, राज्य नको असे बोलुन नियतकार्य टाळतो.

साधन व साध्य यांत गोंधळ झाल्यामुळे हे जीवन भोगऐश्वर्यासाठी आहे, ज्यामुळे जीवन सुखी होते. अशी ठाम मानसिकता बनते. अशा अज्ञानामुळेच "पैसाच सर्वकांही आहे", अशी Philosophy समाजात ऐकायला मिळते. साधनालाच साध्य करण्यात येते.

चिंताम् अपरिमेयां च प्रलयांताम् उप आश्रिताः।
कामउपभोगपरमा एतावत् इति निश्चिताः।।(१६-११)

कार्य टाळुन चिंता करतो, लोभामुळे क्रोध, ईर्षा असते. काम, क्रोध, लोभ हे तमोद्वार ठरते. यावर मात करण्यासाठी फलत्याग शास्त्र आहे.

ये शास्त्रविधिम् उत्सृज्य वर्तते कामकारतः।
न स सिद्धिं अवाप्नोति न सुखं न परां गतिं।।(१६-२३)

चांगलेपणा मनुष्याची दैवी संपत्ति असते. व त्याचा हाच गोंधळ भगवतगीता दुर करते.
मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

दैवी संपत्तित अभय, अहिंसा, तेज या तीन प्रमुख गुणांपासुन विस्तार केला आहे.

अभयं सत्वसंशुद्धिः ज्ञानयोग व्यवस्थितिः।(१६-१)
अहिंसा सत्यम् अक्रोधः त्यागः शांतिः अपैशुनम् ।(१६-२)
तेज क्षमा धृतिः शौचम् अद्रोहो न अतिमानिता। (१६-३)

ॲरिस्टोटल म्हणतो, धैर्य(तेज यांतील धृति) हा प्रमुख सद् गुण आहे. चांगले या संदर्भात कुणी अहिंसा हा प्रमुख सद् गुण आहे असे म्हणतात. तर भगवतगीता या तिन्हीगुणासह अभय(निर्भयता) हा सद् गुण प्रमुख ठरवते. (पापभिरु हा शब्द चांगल्या मनुष्याचे भय दर्शवते. या संदर्भात अर्जुनाचे भय स्पष्ठ होते. )
फलत्यागासाठी कर्मयोगाचा धर्म याच भयावर मात करते. (अ. २)

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

कर्मयोगात कार्याचा दृढनिश्चय असतो. म्हणुन
निर्णयअधिकारजागृति भगवतगीता करते. व साध्या शब्दात शास्त्र सांगते,
कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।(२-४७)

निर्णयअधिकार या शास्त्रातील साधन आहे. Beggars are not choosers. स्वावलंबन हे जीवनमुल्य निर्णयअधिकार देते, यामुळे पैसा साधन आहे याचे ज्ञान होते. वचन, स्वधर्म ही जीवनमुल्ये कार्याचा निश्चय दृढ करते. बुद्धियोग चंचलत्व दुर करते. याप्रमाणे फलत्याग शास्त्रात कर्म साधन ठरते.

तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्ये व्यवस्थितौ।
ज्ञात्वा शास्त्रं विधान उक्तं कर्म कर्तुम् इह अर्हसि।।(१६-२४)

अध्याय १६-मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

१६. १ : "अभयं सत्वसंशुद्धिः "

(१६-२):

"दयाभूतेषु अलोलुप्त्वं मार्दवं हीः अचापलम् "

(दैवीगुणसंपत्ति व धर्म)

१६. ३/१:"तेजः क्षमाः धृतिः शौचम् अद्रोहो न अतिमानिता"

१६. ३/२ :

" भवन्ति संपदम् दैवीम् अभिजातस्य भारत "

१६. ४ :

"दम्भो दर्पो अभिमानश्च क्रोधः पारुष्यम् एव च"

(Pride vs. Confidence)

१६. ५/१: " दैवी संपद् विमोक्षाय निबन्धाय आसुरी मता "

१६. ५/२:"दैवी संपद्विमोक्षाय निबंधाय आसुरी मता"

१६. ५/३ : "मा शुचः संपदम् दैवीम् "

(१६-५)/४ : "मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव"

(Know Thyself)

१६-६: "द्वौ भूतसर्गौ लोकेस्मिन दैव आसुर एव च"

(१६. ७)/१:

"प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुः आसुराः"

(जीवनयात्रा)

१६. ७/२:

"प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुः आसुराः"

(अज्ञान vs. स्वभाव)

१६. ८/१:

"असत्यं अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनिश्वरम्!"

(विभक्त vs एकत्व अर्थात Survival vs Spirituality)

१६. ८/२ :

"अपस्परसंभूतं किम् अन्यत् काम हैतुकम् "

(विश्वातील मनुष्याचे स्थान)

(१६-९):

"प्रभवन्ति उग्रकर्माणः क्षयाय जगतो अहिताः"

(जगाचे विनाशक vs जगतकल्याणकर्ते)

१६. १० : "कामम् आश्रित्य दुष्पुरं दम्भमानम् अदान्वितः"

(Unhealthy thought pattern & Change)

१६. ११/१:"चिंताम् अपरिमेयां च प्रलयान्ताम् उपआश्रिताः"

१६-११/२ :

"चिंताम् अपरिमेयां च प्रलयान्ताम् उपआश्रितः।
कामउपभोगपरमा एतावद् इति निश्चितः!"
(जीवनाचा हेतु कां जाणावा?
Purpose to know the Purpose of life)
१६. १२/१:
"आशापाशशतैः बद्धाः कामक्रोधपरायणाः"
( Devil's Workshop)
१६-१२:/२:
"इहन्ते कामभोगार्थम् अन्यायेन अर्थसंचयान"
(Social illness)
(१६-१३):
"इदम् अद्य मया लब्धं इमं प्राप्से मनोरथम् "
(मनुष्यजीवनाची सक्षमता)
१६. १४/१: "ईश्वरोअहं अहं भोगी सिद्धोअहं बलवान सुखी?"
(१६-१४)/२ :
"ईश्वरोअहं अहं भोगी सिद्धोअहं बलवान सुखी"
(श्रेष्ठत्व:Uniqueness कि असुरी!)
(१६-१८) :

"माम् आत्मपरदेहेषु प्रद्विष्यन्तो अभ्यसूयकाः"

(विश्वधर्म, विश्वअध्यक्ष, चांगलेपणा याची ओळख)

(१६-२१): "त्रिविधं नरकस्य इदं द्वारम् नाशनम् आत्मनः"

(The barrier & Replacement )

(१६-२२)/१ :

"एतैः विमुक्तः कौंतेय तमोद्वारैः त्रिभिः नरः "

(तम द्वारापासुन सावध असणे)

१६. २२/२:"आचरति आत्मनः श्रेयः"

(दैवी vs असुर)

(१६-२३)/१:" यः शास्त्रविधिम् उत्सृज्य वर्तते कामकारतः"

(सुखी जीवनाचे शास्त्र)

(१६-२३)/२:

"न स सिद्धिम् अवाप्नोति न सुखं न परां गतिम् "

( अर्जुनाची नकारात्मक भूमिका)

१६. २४/१ : "तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्य अकार्य व्यवस्थितौ"

१६. २४/२:"ज्ञात्वा शास्त्रं विधान उक्तं कर्म कर्तुम् इह अर्हसि"

(१६-१)

*************************

अभयं सत्वसंशुद्धिः ज्ञानयोग व्यवस्थितिः।

दानम् दमश्च यज्ञश्च स्वाध्याय तपः आर्जवम् ॥

*************************

( १६. १ ) : "अभयं सत्वसंशुद्धिः "

(Fearless, Existance, Purification.. )

जीवनविकासात चांगलेपणाला निर्भयतेची जोड असणे हा "अभयं सत्वसंशुद्धिः " चा संदेश आहे.

भगवतगीतेतील १६ व्या अध्यायात दैवी गुणांचे वर्णन पुढील तिन वर्गात वर्णिलेले आहे. हे वर्गिकरण पुरुष (Masculine), स्त्री (Feminine)आणि गुणांतील समत्व (Balanced Qualityत )दर्शविते.

The Universal Law of Gender tells us that "Gender is in everything; everything has its masculine and feminine principles". Regardless of your gender, you have inner masculine and feminine qualities. Inside every human being exists a complex feedback system within their soul and body which allows them to feel. When we fail to acknowledge our vast energetic system, we may feel chronically out of balance.

*अभयं सत्वसंशुद्धिः ज्ञानयोग व्यवस्थितिः।
दानम् दमश्च यज्ञश्च स्वाध्याय तपः आर्जवम् ।।(१६-१)
(Masculine qualities are energy, self reliance, logic and intellect. )

*अहिंसा सत्यम् अक्रोधः त्यागः शांति अपैशुनम्।
दया भूतेषु अलोलुप्त्वम् मार्दवम् हीः अचापलम्।। (१६-२)

(Feminine qualities are love, patience, intuition and gentleness )

*तेज क्षमाः धृतिः शौचम् अद्रोहो न अतिमानिता।(१६-३)

(Balanced -True expression of Wisdom -Healthy, Balanced Human with Integrity)

Courage is the ladder on which all the other virtues mount.
Clare Boothe Luce

Biswas-Diener found that courage is made up of two processes.
The first part is the willingness to take action, and the second is the ability to control fear.

"Developing courage is a matter of learning how to manage fear so it doesn’t prevent you from action,

and of finding ways to motivate yourself to act. If you are honest, you will realize your need for courage. Dishonesty is weakness. Courage is strength. ”

"धैर्य, निर्भयता या Born गुणामुळे सिंह जंगलाचा राजा म्हणुन ओळखल्या जातो. एका सिंहिणाला वनअधिकारी पिंजऱ्यात ठेवुन पाळतो. तीला खुप प्रेम देतो. काळजी घेतो. कांही काळानंतर वनात सोडतो. पण सिंहिण संघर्षाला घाबरते व परत मालकाकडे येते. परतपरत या प्रयोगानंतरच ती वनात राहण्यास सक्षम होते.

"Born to win but conditionined to loose"
मनुष्याचे प्रेम सिंहिणीचा Born Free गुण हिरावुन घेते. हाच या गोष्टीचा संदेश आहे.

संस्कार या संदर्भात चांगलेपणा विकसित होणे अभिप्रेत असते. हा फक्त दैवी गुणाचा केवळ एक भाग असतो. हेच भगवतगीता नजरेत आणुन देते. अर्जुनविषादयोगात चांगलेपणाची शक्ति( Feminine quality )दुःखात परिवर्तित होते व balance

बिघडतो. हा balance "स्थितप्रज्ञ" द्वारा वर्णिलेला आहे. या प्रक्रियेत मानसिक शक्तिचा विकास अभिप्रेत आहे.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

कर्मयोगाचा संदेश मानसिक शक्तिचा विकास आहे. हे भगवतगीता स्पष्ट करते. चांगलेपणा शक्तित परिवर्तित करणे, याचाच अर्थ जीवनविकासात धैर्य, निर्भयता महत्वाचा गुण असतो.

******

(१६-२)

************************

अहिंसा सत्यम् अक्रोधः त्यागः शान्तिः अपैशुनम्।

दयाभूतेषु अलोलुप्त्वं मार्दवं हीः अचापलम् ।

************************

(१६-२):

"दयाभूतेषु अलोलुप्त्वं मार्दवं हीः अचापलम् "

(दैवीगुणसंपत्ति व धर्म)

"धर्म" या शब्दाचा नीति, कर्मकांड(Rituals), सदगुण (Charecter) धारणा अशा विविध अर्थाने अर्थबोध होत असतो.

सदगुण या संदर्भात "दया धरमका मुल है" हा वाक्प्रचार समाजात प्रचलित आहे. मनुस्मृतिनुसार दहा सदगुणांना धर्मलक्षण संबोधले आहे.

धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ।

धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ।।

अर्थात—धृति (धैर्य, निर्भय, स्वावलंबन), क्षमा, दम (मनःसंयम), पावित्र्य, अस्तेय (न्यायपूर्ण जीवन), इन्द्रिय निग्रह (आत्मवश), धी (विवेक बुद्धि), विद्या (स्वाध्याय ), सत्य (मन, वचन, कर्म याद्वारे व्यक्तिचे पावित्र्य), अक्रोध (मानसिक समत्व)

भगवदगीतेनुसार वरील सदगुणांचा दैवीगुणसंपत्तिमध्ये समावेश आहे.

अभयं सत्वसंशुद्धिः ज्ञानयोग व्यवस्थितिः।(१६-१ )

..

दयाभूतेषु अलोलुप्त्वं मार्दवं हीः अचापलम् ... (१६-२)

...

भवन्ति संपदम् दैवीम् अभिजातस्य भारत ।(१६-३)

"निर्भयता, आत्मशुद्धि, ज्ञानयोग, दान, इंद्रियनिग्रह, यज्ञ(कर्म), स्वाध्याय, तप(संस्कारीत), सरळपणा, क्रोध न करणे, (फल)त्याग, शांति, अपैशुनम्(क्षुद्र दृष्टि नसणे), दया, लोलुपता नसणे, (दुष्कृत्याची)लज्जा, प्रभाव, क्षमा, साहस, पावित्र्य, अद्वेष्टा, नम्रता" याप्रमाणे निर्भयता प्रथम गुण तर अखेरचा गुण नम्रता अशी दैवीगुणसंपत्ति आहे.

सदगुण/चांगलेपणा या संदर्भात निर्भयता प्रथमगुण ठरतो. चांगलेपणा असला तरी अर्जुनाला मार्गात संशय निर्माण होतो. हा संशयच (विश्वासविरोधी)भय ठरत असतो. हे भय विकासमार्गात अडथळा निर्माण करते. भगवदगीतेतील धर्माचे प्रयोजन नीति या संदर्भात असले तरी निर्भयतेसाठी अर्थात योग(दुःखान्तशक्ति) साधनेसाठी हा धर्म महत्वाची भूमिका बजावते.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।(२-४०)

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

"Courage is never to let your actions be influenced by your fears. "

-Arthur Koestler

********

(१६. ३)

**************************

तेजः क्षमाः धृतिः शौचम् अद्रोहो न अतिमानिता।

भवन्ति सम्पदम् दैवीम् अभिजातस्य भारत।।

**************************

(१६. ३)/१ :"तेजः क्षमाः धृतिः शौचम् अद्रोहो न अतिमानिता"

सक्षम, चांगले व्यक्तिमत्व असलेल्या व्यक्तिचे गुण दर्शविणारा हा संदेश आहे.

जगात चांगले(दैवी) व वाईट(असुर) या दोन भूमिकेची जाण असते, पण एक तिसरी भूमिका आहे, ज्याची भगवतगीतेने दखल घेतली आहे. ती भूमिका निष्क्रियता असलेली प्रेक्षकाची (Audience) भूमिका असते.

पाण्यात पोहण्यासाठी उडी मारावी लागते. जीवनाचे मात्र वेगळे आहे, उडी पडलेली आहे. जीवन आहे ते जगावेच लागते. पोहणे

ज्यांना जमत नाही ते किनाऱ्यावर राहणे पसंत करतात. Audience बनतात, Comment करणे, सल्ला देणे यांतच समाधान मानतात. या भूमिकेची संवय झाली तर पोहण्याचा विचारही शिवत नाही. ही Conditioned अवस्था असते. याविषयी कुणी महापुरुष म्हणतो, मी लोकांना चंद्र दाखवतो पण लोक बोटाकडे पाहतात.

भगवतगीतेत कुरुक्षेत्रावर दुःखी झाल्यामुळे अर्जुन हीच भूमिका घेतो. त्याला दुःख होते व या स्थितित त्याला भय वाटते कि जगात आपण लोभी ठरु व लोभामुळे पापकृत्य केले अशी अपकिर्ति होईल. या भयाने त्याला ग्रासले असते. चांगले असुनही लोक अशाच भयाने नकळत ग्रासले असतात, तेंव्हा सरळ Audienceची भूमिका घेतात. अज्ञान असुनही स्वतःला नम्र, ज्ञानी दर्शवितात. येथेच भगवतगीता प्रकाश टाकते.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव(१६-५)

दैवी गुण या संदर्भात प्रथम शब्द "अभय", मधला अपशुत्व व शेवटचा" न अतिमानिता" अर्थात नम्रता आहे. "नम्रता" या

संदर्भातच चांगल्या मनुष्याला भ्रम असतो, निर्भयतेमुळेच नम्रता ठळकपणे शोभुन दिसते.

अभय सत्व संशुद्धिः ज्ञानयोगव्यवस्थितिः(१६-१)
प्रथम verse आहे. ज्यांत पुरुषार्थाने साध्य करायचे गुण(Masculine)दर्शविले आहे.

अहिंसा सत्यम् अक्रोधः त्यागः शांतिः अपैशुनम् ।(१६-२)
द्वितिय verse आहे, ज्यात अपशुत्व गुण(Feminine) दर्शविले आहेत.

तेजः क्षमाः धृतिः शौचम् अद्रोहो न अतिमानिता।(१६-३)
तृतिय verse आहे, ज्यांत दैवी गुणाने (शक्ति, क्षमा, धैर्य, ईर्षारहीत, नम्र) प्रत्यक्षात धारण झालेले व्यक्तिमत्व दर्शविले आहे. हेच व्यक्तिमत्व धारण होण्यासाठी निर्भयतेने जगणे आवश्यक असते. याचसाठी कर्मयोगाचे महत्व आहे.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

ज्या भवसागरात पोहायचे आहे, त्याचा अधिपति ईश्वर आहे, ज्याच्या उर्जेमुळे(अंश) जीवन मिळालेले असते. त्याचा आश्रय करुन हा भवसागर पार करायचा असतो.

मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि।(१८-५८)

ईश्वराचा हा आश्रय(भवसागर पार करण्यासाठी) बुद्धियोग असतो, ज्यामुळे मनाची चंचलता बुद्धिला भ्रमित करीत नाही अर्थात चंचलतेवर मात होते व कार्याचा दृढनिश्चय होतो. योगासाठी (दुःखान्त, निर्भयता) कार्य घडते व याद्वारे निष्काम कार्याचे कौशल्य साध्य करतो.

******

(१६. ३)/२:

" भवन्ति संपदम् दैवीम् अभिजातस्य भारत "

भगवतगीतेत दैवी गुणांचे वर्णन पुढील तीन श्लोकात वर्णिलेले आहे. हे वर्गिकरण Masculine(पुरुष), Feminine (स्त्री )आणि Balanced (समत्व) Qualityत दर्शविते. *

१. Masculine qualities : fearlessness, self reliance, logic and intellect. )

अभयं सत्वसंशुद्धिः ज्ञानयोग व्यवस्थितिः।

दानम् दमश्च यज्ञश्च स्वाध्याय तपः आर्जवम् ॥(१६-१)

२. Feminine qualities are love, Nonviolence, patience, intuition and gentleness )

अहिंसा सत्यम् अक्रोधः त्यागः शांति अपैशुनम्।

दया भूतेषु अलोलुप्त्वम् मार्दवम् हीः अचापलम्।। (१६-२)

३. Balanced -True expression of Wisdom -Healthy, Energy, Balanced Human with Integrity उर्जावान, साहसी)

तेजः क्षमा धृतिः शौचम् अद्रोहो न अतिमानिता।(१६-३)

भवन्ति संपदम् दैवीम् अभिजातस्य भारत॥(१६-३)

अर्जुनविषादयोगात चांगलेपणाची शक्ति( Feminine quality )दुःखात परिवर्तित होते व balance बिघडतो. हा balance "स्थितप्रज्ञ" द्वारा वर्णिलेला आहे. व balance येण्यासाठी "योगः कर्मसु कौशलम् " अर्थात Masculine शक्तिचा विकास हा संदेश आहे.

"One who makes himself a worm cannot complain afterwards if people step on him. "

-Immanuel Kant

[*Reference :The Universal Law of Gender tells us that "Gender is in everything; everything has its masculine and feminine principles".

Regardless of your gender, you have inner masculine and feminine qualities

Masculine = Your true expression of Power (Strength).

Feminine = Your true expression of Love (Caring).

Balanced = Your true expression of Wisdom (Healthy, Balanced Human with Integrity)

Inside every human being exists a complex feedback system within their soul and body which allows them to feel. When we fail to acknowledge our vast energetic system, we may feel chronically out of balance. Besides working on our physical health through conscious eating and fitness, it’s equally important to pay attention to our subtle energies if we desire to live a healthy life.

According to Yoga philosophy, the male energy is known as Shiva and the female energy is known as

Shakti. The male energy is symbolized by the sun and the feminine by the moon. These complementary channels on either side of the body are known as Nadis (the word meaning a stream) through which Prana (life force) circulates.

The feminine channel, known as Ida Nadi governs the left side of the body. The masculine channel known as Pingala Nadi governs the right side of the body. One of the goals of yoga is to bridge the gap between the masculine and feminine and reach the central channel which is called Shushumna Nadi that provides us a clear and joyful mind for meditation and self-realization.

-Shayna Hiller, C. H. C, R. Y. T. is a health coach, retreat leader, speaker, author and yoga instructor based in Los Angeles. ]

*******

(१६. ४)

*************************

दम्भो दर्पो अभिमानश्च क्रोधः पारुष्यम् एव च।

अज्ञानं च अभिजातस्य पार्थ संपदम् आसुरीम् ।।

*************************

१६. ४ :

"दम्भो दर्पो अभिमानश्च क्रोधः पारुष्यम् एव च"

(Pride vs. Confidence)

भगवतगीतेतील ज्ञानाचा आधार मुक्ति(मोक्ष, स्वातंत्र्य) व बंधन आहे. बंधन म्हणजे (इच्छाद्वेष, लाभहानी इ. ) द्वन्द्ववश जाळयात सापडणे, यामुळे जन्ममृत्युच्या फेऱ्यात(Cycle) बद्ध असणे. याच Cycle breaking साठी मुक्तिचे ज्ञान आहे. बंधन-मोक्ष याच अनुषंगाने दैवी व असुरी अशा दोन प्रकारच्या संपत्तिगुणाचे वर्णन भगवतगीतेत आलेले आहे.

दैवी संपद् विमोक्षाय निबंधाय आसुरी मता।(१६-५)

समाजात चांगले लोक-वाईट लोक असे सहज वर्गिकरण भाष्यातुन होते. तर भगवतगीता चांगले-वाईट संदर्भातच दैवी व

असुरी गुणसंपत्तिचे वर्णन करते. चांगला मनुष्य दैवीगुण संपत्तिसाठी जन्माला येतो. यामुळेच त्याचा गोंधळ उडतो. सर्वांना सुख लाभावे, आपल्यामुळे कुणी दुखवु नये ही त्याची भावना असते. अर्जुन याच चांगलेपणामुळे गोंधळतो. निष्क्रियतेचे समर्थन चांगले, आदर्श, सात्त्विक, धार्मिक या संदर्भात करतो. "तु दैवीगुणसंपत्तिसाठी जन्माला आलेला आहे म्हणुन हृदयदुर्बलता तुला शोभत नाही" असा अर्जुनाला संदेश असतो.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव।।(१६-५)

चांगलेपणा या संदर्भातच मनुष्याचा गोंधळ उडतो म्हणुन भगवतगीता जीवनाचे Purpose सांगते व पुर्णत्वाचे निश्चित ज्ञान देत आहे.

भवन्ति संपदम् दैवीम् अभिजातस्य भारत।।(१६-३)

असुरीसंपदा नकारात्मक गुण असते तर दैवीसंपदा सकारात्मक असते. नकारात्मक गुणाचे Replacement सकारात्मक गुणाने करणे आवश्यक असते.

चिंताम् अपरिमेयां च प्रलयान्ताम् उपआश्रिताः।
कामउपभोगपरमां एतावद् इति निश्चिताः।।(१६-११)

हे जीवन कामउपभोगासाठी (ऐश्वर्यभोग) मिळालेले आहे अशी जीवनाविषयी ऐहिकवादी विचारसरणी असल्यामुळे चिंताग्रस्त जीवन जगणे असुरी गुणसंपत्तिला जन्म देते.

दम्भो दर्पो अभिमानश्च क्रोधः पारुष्यम् एव च।

अज्ञानं च अभिजातस्य पार्थ संपदम् आसुरीम् ।।(१६-४)

दम्भ, दर्प, अभिमान एकाच जातीतील(Pride) असले तरी त्यांत भेद आहे. [जे नाही आहे ते दाखविण्याचा प्रयत्न दम्भ (Hypocrasy) असतो. जे आहे पण त्याचा आश्रय करुन इतरांना तुच्छ लेखणे हा दर्प असतो. जे आहे त्याचा अभिमान करणे. ]अहंकारामुळे दम्भ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोरता, अज्ञान ही असुरीसंपत्ति जन्म घेते.

Pride व Confidence यांत भेद आहे. अहंकारामुळे Pride असते, तर ईश्वरज्ञानामुळे आत्मविश्वास असतो. ईश्वराचा आश्रय अहंकाराला Replace करतो. जीवनाला कोण Drive करतो?

मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि।

अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रौष्यसि विनंक्ष्यसि।।(१८-५८)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।

भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

अहंकार फ्राईडच्या भाषेत Conscious mind व Unconscious mind यांना जोडणारे माध्यम असते.

The word "ego" originated with Sigmund Freud's theory of personality structure and is part of the mind that mediates between the conscious and unconscious and is responsible for reality testing and a sense of personality identity.

भगवतगीतेच्या भाषेत अहंकार Mind Faculty (मन, बुद्धि, चित्त, अहंकार) असते. Higher consciousness ईश्वरज्ञानाला connect करते. भगवतगीता याला क्षेत्रज्ञ (Mind-Universal mind) संबोधत आहे.

ईश्वरश्रद्ध, चांगलेपणा दैवीगुणसंपत्तिसाठी जन्माला येतो. निर्भयता, धृति (साहस, विचलित न होणे) ही शक्ति असते. याच शक्तिच्या साधनेसाठी "योगः कर्मसु कौशलम् "

हा भगवतगीतेचा संदेश आहे.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

*****

(१६-५)

*************************

दैवी संपद् विमोक्षाय निबन्धाय आसुरी मता।

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव।

*************************

(१६-५)/१:

" दैवी संपद् विमोक्षाय निबन्धाय आसुरी मता "

प्राचिन काळात देव-असुर असा उल्लेख आढळतो. मनुष्याच्या जीवनविषयक Belief system चा त्याच्या मानसिकतेवर, स्वभावावर परिणाम होतो. याच Belief System नुसार भगवतगीतेत (मानवी स्वभाव, त्याची मानसिकता या आधारावर) दैवी व असुरी असे वर्गिकरण केले.

कामउपभोगपरमा एतावत् इति निश्चितः।(१६-११)

हे जीवन ऐश्वर्य भोगण्यासाठी मिळाले आहे, अशी Belief system "असुरी " मानसिकतेचे कारण बनते.

अभाव असेल तर चिंताग्रस्त जीवन जगतो.
चिंताम् अपरिमेयां च प्रलयांताम् उपाश्रिताः।(१६-११)

किंवा "अन्यायेन अर्थ संचयान् "(१६-१२)

(केवळ प्राप्ति हीच मानसिकता असल्यामुळे)अलोट प्राप्तिमुळे दंभ, दर्प, अहंकाराचा आश्रय असतो.
ईश्वरो अहं अहं भोगी सिद्धो अहं बलवान सुखी।(१६-१४)

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः।(१६-१८)

मनुष्य सुखासाठी कार्य करतो. दुःखी झाल्यावर अर्जुन म्हणतो, मला कांही नको व स्वतःला लोभी ठरवितो. मी युद्ध करणार नाही ही भूमिका घेतो. अर्थात व्यावहारिक gain त्याला नको असते. म्हणुन हा प्रश्न व्यवहारक्षेत्राचा नसतो, तर मानसिक क्षेत्राचा असतो. अर्थात त्याची Belief system असुरविरोधी असते. म्हणुन दैवी संबोधले तरी निर्भयता हा प्रथम दैवीगुण असतो. (अभयंसत्व संशुद्धिः) म्हणुन म्हटले,

दैवी संपद् विमोक्षाय निबन्धाय आसुरी मता।
मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव।(१६-५)

मानवी जीवनातील प्रश्न व्यावहारिक व मानसिक अशा दोन स्वरुपाचे असतात, हे येथे स्पष्ट होते. व्यवहारात पांडवांना न्याय मिळत नाही म्हणुन शेवटचा पर्याय म्हणुन धर्मयुद्ध ठरते. निर्णय होतो. प्रत्यक्ष कार्य करण्याची वेळ आली असता अर्जुन दुःखी होतो. स्वतःला मानसिक Comfort करण्यासाठी युद्ध न करण्याची निवड करतो. ज्ञानी समजुन यालाच तो धर्म संबोधतो.

भाष्य Communicationचे माध्यमअसते. भाष्य व्यावहारिक संदर्भात असेल तर याच भाष्यात मनुष्याची मानसिकता स्पष्ट होते. एकतर स्वतःला comfort करण्यासाठी भाष्य बोलतो किंवा स्वतःचे हीत साध्य करण्यासाठी इतरांनी काय करावे यासाठी भाष्य बोलतो. येथे अर्जुनाला स्वतःचे हीत साध्य करायचे नव्हते तर त्याला Comfort करायचे होते. प्रत्यक्षात हे भाष्य "मी युद्ध करणार नाही"या भूमिकेवर शिक्कामोर्तब करण्यासाठी असते. याला धर्म संबोधतो.

अर्जुनाची ही भूमिका जाणुन व त्याचे ज्ञान ऐकुन श्रीकृष्ण म्हणतात, श्रेष्ठांना अशोभनिय तुझी भूमिका आहे!

तेंव्हा अर्जुन त्याची मानसिकता स्पष्ट करतो. व संभ्रम कबुल करतो. युद्ध करणे धर्मोचित असेल तर माझा शोक कसा नष्ट होईल हा खरा प्रश्न त्याच्यासमोर उभा ठाकतो.

याप्रमाणे

१. सर्वप्रथम वास्तवाचा स्विकार होतो. अर्जुनाचे भाष्य केवळ प्रज्ञावाद आहे, ज्ञान नव्हे हे श्रीकृष्ण दर्शवुन देतात. प्रश्नाची पारदर्शकता स्पष्ट होते.

२. वर्तमान स्थितीत काय आहे vs काय हवे. यातुन निश्चित बदल कळतो.

काय हवे?यावर श्रीकृष्ण म्हणतात, श्रेष्ठ विकासाच्या राजमार्गावर(अमृतंगमय) असतो. दुःखाने विचलित होत नाही.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ ।(२-१५)

*याप्रमाणे अर्जुनाचा प्रश्न(शोकाला कारण ठरणारे युद्ध कशासाठी?) व अपेक्षित बदल याचा संबंध कसा आहे याचे

सविस्तर ज्ञान भगवतगीता आहे. या ज्ञानाने जीवनमार्गाचे ज्ञान स्पष्ट होते. यासाठी मनुष्याचे Resources:

*मनुष्याच्या जीवंत तत्वाचे मुळ स्वरुप ईश्वर आहे, याचे ज्ञानविज्ञान स्पष्ट होते. "अमृतंगमय" राजमार्ग स्पष्ट होतो. या मार्गावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य होते.

मामेकं शरणं व्रज।(१८-६६)

ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. ईश्वराचा आश्रय करुन कार्याद्वारे भक्ति साधणे.

"ज्ञानसंच्छिन्न संशयम् "(४-४१)

"योगसंन्यस्त कर्माणं" (४-४१)

तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम् ।(६-२३)

"त्रायते महतो भयात् "(२-४०)

*स्वभावनियत कार्य

स्वकर्मणा तमभिः अर्च्य.. (१८-४६)

*स्वधर्म (Tiebreaker, Self approval)

*कार्य करण्यासाठी निर्णयाचा अधिकार
कर्मण्येव अधिकारः ते।(२-४७)

*मार्गाची निवड करण्याचा अधिकार .
(स्वाभाविकपणे जसा जगत आहे तसेच जगणे कि ईश्वराचा आश्रय करुण, शरण राहुन जगणे)
विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)

*******

(१६. ५)/२:
"दैवी संपद्विमोक्षाय निबंधाय आसुरी मता"

“THE ULTIMATE GOAL OF MAN SHOULD BE LIBERATION FROM ALL THE TRAPPINGS OF ONE'S LIFE. ”

but,

How can you be free, If you don't even know you're trap or lock inside?
Ann Marie Aguilar

व्यावहारिक सत्य:
We are driven by our desires, ambitions, likes and dislikes. Mostly emotions take control of our actions.

जगात लोक व्यवहारात स्वभावनियत प्रकृतिनुसार जगतात. व्यवहारमार्गात अडचण आल्यामुळे निष्क्रिय झाला तरी समर्थन करतात. हा Emotional trap असतो. अर्जुन याच Emotional trap मध्ये सापडतो. व्यवहारात युद्ध ठरते. प्रत्यक्ष प्रसंग आला

असता, कार्य टाळतो. व या निष्क्रियतेवर धर्माचे शिक्कामोर्तब करतो. अर्जुन trapमध्ये सापडतो हे वास्तवही त्याला कळत नाही.

प्रत्यक्ष व्यवहारातील हा प्रसंग आहे. व्यवहारात असे प्रसंग आजही मनुष्य अनुभवतो. निश्चय करतो, पण कृतीची वेळ आली असताच खरी परिक्षा असते. ही परिक्षा त्याच्या चांगलेपणाची असते, जीवनमुल्याची असते. पाण्यात खडा टाकला तर गाळ वर येतोच. श्रीकृष्णाने रथ भीष्माचार्यासमोर उभा करुन खडाच टाकला होता.

सर्वप्रथम या Trapची ओळख होणे आवश्यक असते. अर्जुन वास्तव स्विकारतो. तेंव्हा त्याला Trapची ओळख होते. धर्मासाठी युद्ध केले तरी दुःख येणारच!ते नष्ट कसे होईल हेच कळत नाही!भगवतगीता बंधन-मोक्ष याचे ज्ञान सांगते.

One must strive to liberate oneself out of such trappings and become a superior personality.

दैवी संपद्विमोक्षाय निबंधाय आसुरी मता।

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव॥(१६-५)

चांगला मनुष्य स्वातंत्र्यासाठी(मोक्ष) जन्माला आला असतो, म्हणुन दैवीगुण संपत्ति जाणुन जीवनात जीवनमुल्यांचा अंगिकार करावा. अर्थात trapमध्ये सापडत नाही. याच मुल्यांचे (स्वधर्म, बुद्धियोग, निष्काम कर्म) महत्व भगवतगीता सांगते.
जीवनमुल्यामुळे मार्ग पक्का असतो. निर्भय होतो.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

व्यावहारिक बोध:अर्जुन आपले व्यावहारिक कर्तव्य पार पाडण्यासाठी (युद्ध करण्यासाठी )कुरुक्षेत्रावर आला होता, धर्म ऐकण्यासाठी नव्हे!पण व्यवहारात जगत असतांनाच मनुष्य Trap होतो. त्याला या Trapची ओळखही नसते. याला भगवतगीता बंधन संबोधते. या बंधनाची (Trap) ओळख झाली तरच मनुष्याला "बंधन-मोक्ष" ज्ञान महत्वाचे व उपयुक्त वाटते. बदल या संदर्भात हेच (बंधन-मोक्ष)ज्ञान महत्वाचे आहे. अन्यथा (अहंकारामुळे) स्वसमर्थन भाष्य करीत मनुष्य जगतच असतो.

"We cannot change anything until we accept it. Condemnation does not liberate, it oppresses. "

Carl Jung

*********

(१६-५) /३: "मा शुचः संपदम् दैवीम् "

जगात ज्ञानविज्ञान आले, पण विज्ञान जगाची होळीही करु शकते हा विचार पुढे आला. अनेक विविध धर्म आलेत, तर धर्म अफुची गोळी आहे असे भाष्य करुन कार्ल मार्क्सने साम्यवादाची संकल्पना मांडली. कांही राष्ट्रांनी याचा अंमलही केला. मानवविकास, मानवता विकास या संदर्भात असे चांगले वाईट अनुभव घेत जगाची वाटचाल सुरु आहे. या वाटचालीत एक विषय कायम आढळतो, मानवाचे दुःख व विषमता अर्थात शोषण!हे मनुष्याचे अनुक्रमे आंतर्विघ्न व बाह्यविघ्न ठरतात.

बाह्यविघ्न हा सामाजिक प्रश्न असला तरी आंतर्विघ्न दुर करणे मनुष्याचे स्वतःचे दायित्व असते. व यातुनच बाह्यविघ्न दुर होण्यास मनुष्याचे योगदान होते, हा मोलाचा संदेश भगवतगीता

देते. मनुष्य दुःखी होतो तेंव्हा अज्ञानामुळे (आपल्या ज्ञानानुसार, दृष्टिनुसार) स्वतःच या जगी अदृश्य अशा जाळ्यात अडकतो. समाधानासाठी बौद्धिक भाष्य(प्रज्ञावाद) करतो. त्याचे भाष्य बाह्य जगताविषयी असते. व त्याची स्थिति "नाचता येईना अंगण वाकडे" अशी होते. याच मुद्यावर भगवतगीता संदेश देते,

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव।(१६-५)
चांगल्या मनुष्याला जाणवत असलेले आंतर्विघ्न त्याला जागविण्यासाठीच आलेले असते. म्हणुनच अर्जुनाला जागविण्यासाठी श्रीकृष्णाने वारंवार "उत्तिष्ठ" शब्दाचा प्रयोग केला.

The key to growth is the introduction of higher dimensions of consciousness into our awareness.
Lao Tzu
मनुष्यजीवनातील चांगलेपणा ईश्वराने दिलेली(Devine) प्रेरक शक्ति असते. हा चांगलेपणा शक्ति व्हावी, आत्मविश्वास व्हावा, म्हणुन स्वतःतील चांगलेपणा जाणणे व त्याला शक्ति बनविण्यासाठी भगवतगीता कार्याद्वारे ईश्वरभक्ति हा संदेश देते.

*शकुंतलेच्या संदर्भात लोक दुष्यंताला प्रश्न करतात. तेंव्हा त्याचे उत्तर असते: स्वतःचे ठायी असलेला चांगलेपणा दुष्यंत जाणतो व स्वतःची अंतःप्रेरणा प्रमाण आहे, हे विश्वासाने सांगतो.

"मा सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणम् अंतःकरण प्रवृतिम् ।"

*क्रौंच(मादी)पक्षाच्या विरहाचे दुःख महर्षि वाल्मिकीला विचलित करते व याच प्रेरणेतुन रामायणाची रचना होते.

"Emotions never lie"

मनुष्याचे भावविश्व स्वतःचे असते, जणु तो स्वतःशी बोलत असतो. दुःखी झाला असता Why me? असा प्रश्न करतो!

*एका रिक्षाचालकाला अपघात होतो. पायाने अधु होतो. तो स्वतःशी बोलतो, ईश्वराने एवढ्या मोठ्या अपघातातुन मला वाचविले, याचाच अर्थ त्याला माझ्याकडुन विशेष कार्य करुन घ्यायचे आहे. तो गॅरेज काढतो, कालांतराने कारखानदार होतो.

"Internal dialogue is the voice that applies your logic and reasoning to situations. "

*चांगलेपणा असुनही दुःख कां? हा अनेकांचा प्रश्न असतो. याचेच उत्तर भगवतगीता देते. -"निमित्तमात्रं भव"

दुःखात चांगलेपणा दुर्बलता (विषादयोग )ठरु नये. (स्वतःला चांगले/आदर्श दर्शविण्यासाठी नकारात्मक -Handicapped भाष्य करणे) तर वर्तमानात ईश्वराचा आंतील आवाज ऐकणे- उत्तिष्ठ! महत्वाचे असते.

भगवतगीता वर्तमानाची भाषा बोलते. ईश्वर बुद्धि देईल तेंव्हा मी कार्य करेल !असे भाष्य करणारेही आढळतात. पण ईश्वर मनोविज्ञानाचाच (शाश्वत) भाग आहे, हे जाणणाराच "उत्तिष्ठ" हा आवाज ऐकतो, त्याचे भाष्य कळते. भगवतगीता मनुष्याशी बोलायला लागते. वर्तमानात जीवनातील Order व Disorder जाणुन Mental wellness साध्य करणे, मनुष्याचे दायित्व असते. व यासाठीच "तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता " या शब्दाचे प्रयोजन भगवतगीता करते . भगवतगीता अशाच शब्दातुन आपल्याशी बोलत असते.

"तु पोट भरण्यासाठी (योगक्षेम) जन्माला आलेला नाही, ती चिंता मी वाहतो (योगक्षेमं वहाम्यहम् ). माझेच कार्य (निमित्त जाणुन) करण्यासाठी तुझा जन्म आहे. "

Worthless people live only to eat and drink; people of worth eat and drink only to live.

Socrates

******

(१६-५)/४ :

"मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव"

(Know Thyself)

जीवनाचा अर्थ काय? हेतु काय? या संदर्भात हे जीवन केवळ योगक्षेमासाठी/भोगैश्वर्यासाठी आहे, असा समज करुन जीवनाच्या अखेरपावेतो चिंताग्रस्त असणारे किंवा मोठेपणाचा दर्प असणारे व यासाठी अन्यायाने अर्थसंचयन करणारे लोक समाजात आढळतात. अज्ञानामुळे हे लोक बंधनात, दुःखात अडकलेले असतात. म्हणुन सुखी जीवनासाठी मनुष्याला जीवनाचा निश्चित अर्थ व हेतु जाणणे आवश्यक ठरते. या संदर्भात दैवी व असुरी असे दोन गुणसम्पत्तिविभाग भगवदगीता स्पष्ट करीत आहे.

समाजातील केवळ चांगले व वाईट हे वर्गिकरण या संदर्भात पुरेसे नाही ही वस्तुस्थिति भगवदगीता दर्शवुन देत आहे.

भगवदगीतेनुसार जगात दैवी व असुरी असे दोन प्रकारचे लोक असतात. दैवी स्वातंत्र्यासाठी(मोक्ष) जन्माला येतो, तर असुरी बंधनात(गुलामी) अडकलेला असतो.

द्वौ भूतसर्गो लोकेस्मिन् दैव आसुर एव च।(१६-६)
दैवी सम्पद्विमोक्षाय निबंधाय आसुरी मताः।(१६-५)

दैवी व असुरी यांचा संबंध समाजातील चांगले-वाईट, गुलामी व स्वातंत्र्य, अज्ञान-ज्ञान, भय-निर्भय यांचेशी असतो.

दैवी:

अभयं सत्त्वसंशुद्धिः ज्ञानयोग व्यवस्थितिः।(१६-१)

असुरी:

दम्भो दर्पो अभिमानश्च क्रोधः पारुष्यम् एव च।
अज्ञानं च अभिजातस्य पार्थ सम्पदम् आसुरीम् ।(१६-४)

*बंधन -मोक्ष (गुलामी व स्वातंत्र्य)

पशु असो वा मनुष्य गुलामी असा मानसिक आजार आहे कि, तो आपली मुळ शक्ति विसरतो.

लहानपणी पाळीव हत्तीला साखळदंडाने बांधल्या जाते. हत्ती मोठा झाल्यावर मात्र पायात दोरखंड टाकले तरी पुरेसे ठरते. कारण तो मानसिक गुलाम झालेला असतो.

"Born to win but conditioned to loose "

या प्रकृतित मनुष्य संवयीने असाच बंधनात अडकलेला असतो. यामुळे द्वन्द्ववश असतो.

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत।(७-२७)

हे बंधन अशाश्वताशी Attachment असते. बंधनमुक्तिसाठी Detachment चे शास्त्र भगवदगीता सांगत आहे. हे शास्त्र जाणणारी बुद्धि सात्त्विक म्हटले आहे.

बंधं मोक्षं च या वेत्ती बुद्धिः सा पार्थ सात्त्विकीः।(१८-३०)

दैवीगुणसम्पत्ति या संदर्भात "सात्त्विक" चा संबंध समाजातील चांगले-वाईट या वर्गिकरणाशी असतो. अर्जुन चांगला असतो पण दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेला चांगलेपणा दर्शवितो.

प्रत्यक्षात चांगले व वाईट या वर्गिकरणाशिवाय समाजात साहसी व भित्रे असे दोन प्रकारचे लोक आढळतात. चांगले असले तरी भित्रेपणामुळे वा अज्ञानामुळे चांगलेपणा आचरण्यासाठी घाबरतात पण चांगलेपणाचा बुरखा घालुन जगत असतात. तर

साहस असणारे चांगलेपणाही दुर्लक्षित करतात व साहसाने जगत असतात. स्वामी विवेकानंदांनी या संदर्भात " Paradise lost" या मिल्टनच्या कादंबरीतील सैतानाचे उदाहरण दिले, जो धैर्याने अखेरपर्यंत लढत असतो. याच आधारावर स्वामी विवेकानंदांनी निर्भयता, धैर्य याचे महत्व highlight केले.

या पार्श्वभुमिवर "स्वतःला ओळखा" या संदर्भात आत्मविश्वास महत्वाचा ठरतो. याच संदर्भात अर्जुनाला संदेश आहे,

मा शुचः सम्पदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

"Believe in yourself! Have faith in your abilities! Without a humble but reasonable confidence in your own powers you cannot be successful or happy. "

-Norman Vincent Peale

********

(१६-६)

*************************

द्वौ भूतसर्गौ लोकेस्मिन दैव आसुर एव च।

दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु।।

*************************

(१६-६):"द्वौ भूतसर्गौ लोकेस्मिन दैव आसुर एव च"

भगवतगीतेनुसार जगात मुख्यतः दोन प्रकारचे लोक असतात. एक दैवी अर्थात समाजात "चांगले" म्हणुन ओळखल्या जाणारे व दुसरे आसुर अर्थात जे स्वतःच्या भोगैश्वर्यासाठीच (शेक्सपियरच्या भाषेत 'खाण्यासाठी') जगत असतात व या हेतुने कोणत्याही मार्गाचा अवलंब करतात.

ईहन्ते कामभोगार्थम् अन्यायेन् अर्थसंचयान् ।(१६-१२)

भगवतगीतेला "आसुर" या Category शी कांहीही घेणेदेणे नाही. तर जे "चांगले" या Categoryत जन्माला येतात, जे पापभिरु म्हणुन ओळखल्या जातात, पण संशयामुळे निष्क्रिय होतात. याचा परिणाम त्यांचे समाजातील अस्तित्व दुबळे ठरते व ते बघ्याची

भूमिका स्विकारतात. अशाच लोकांचे Mindset बदलविण्यासाठी भगवतगीता ज्ञान जगात आले आहे. ज्यामुळे ते या सृष्टिच्या कुरुक्षेत्रावर प्रत्यक्षात लढणारे योद्धे ( खेळाडु) ठरतील.

प्रत्येक मनुष्याच्या हृदयात (जीवितत्व) ईश्वरअंश आहे. चांगलेपणा(Divine) हा ईश्वरीअंशाचा Born गुण असतो. पण अज्ञानामुळे मनुष्य त्याचे अस्तित्व जाणत नाही. यामुळे अहंकाराचा आश्रय क्रियाशिल असतो. अहंकार Mind functioning मधील (मन, बुद्धि, चित्त, अहंकार) एक घटक असतो. हाच अहंकार क्रियाशिल असल्यामुळे अज्ञानाला ज्ञान ठरविण्याच्या प्रयत्नात मनुष्य आपल्या सोयीने शब्दाला अर्थ देत असतो.

'अहंकार' हा शब्द समाजात दर्प(गर्विष्ट) या अर्थाने ओळखल्या जातो. प्रत्यक्षात मनुष्याला जगतांना आत्मविश्वास हवा असतो. अहंकार या शब्दाला चुकीचे interprete केल्यामुळे आत्मविश्वास व अहंकार यांतील भेद अस्पष्ट होतो. " अहंकारी नसावे" या हेतुने मनुष्य आत्मविश्वासही दुर्लक्षित करतो. आत्मविश्वास असलेलाच मनुष्य निर्भय असतो, विश्वासाने मार्ग चालतो, प्रसन्नचित्त असतो.

'Self'या संदर्भात अहंकार अशाश्वताचे प्रतिनिधित्व करते.
अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

अशाश्वत प्रकृति व (जीवित तत्वातील)शाश्वत ईश्वर याद्वारा जीवन संचलित असते. 'कार्य' प्रकृतिची Strength आहे तर इच्छाद्वेष द्वंद्व Weakness असतो. व हाच द्वंद्व barrier ठरतो. याप्रमाणे अशाश्वत barrier आहे व barrier breaker शाश्वत या आधारावर "अहंकार vs ईश्वर" यांचे option भगवतगीतेने शेवटी दिलेले आहे.
यद् अहंकारं आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।(१८-५९)
vs
बुद्धियोगं उपआश्रित्य मत् चित्तः सततं भव।(१८-५७)
याप्रमाणे शाश्वत या संदर्भात(बुद्धियोग) ईश्वराचा आश्रय असलेला 'Self'(Higher Consciousness, True Self) दैवीगुणाचा स्त्रोत असतो. म्हणुन चांगल्या मनुष्याला भगवतगीतेचा संदेश आहे :
मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

अर्थात चांगलेपणा म्हणजे "सत" व याचा संबंध ईश्वराशी जोडलेला असतो. भगवतगीता याच (अव्यय)ईश्वराचे ज्ञान सांगते, ज्यापासुन सृष्टिचे सृजन होते.

(यतः प्रवृत्ति भूतानां येन सर्वम् इदं ततम्).

हाच ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. याच ईश्वराचा सर्वच चांगल्या गुणांचा, ज्ञानाचा, क्रियांचा संबंध असतो. म्हणुन याच ईश्वराचे नित्य चिंतन करण्याची कला भगवतगीता सांगते. याला अनन्यभक्ति म्हटले आहे.

महात्मानः तु मां पार्थ दैवीं प्रकृतिं आश्रिताः।

भजन्ति अनन्यमनसो ज्ञात्वा भूतआदिम् अव्ययम् ।।(९-१३)

(याच अव्यय ईश्वराचे सृष्टित व जीवनात स्थान जाणुन)ही अनन्यकला साधली तर दुराचारीही साधु होण्यास पात्र होतो. (वाल्याचा वाल्मिकी)

अपिचेत्सु दुराचारो भजते माम् अन्यभाक् ।

साधुः एव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः।।(९-३०)

.... .... न मे भक्तः प्रणश्यति।।(९-३१)

******

(१६-७)

*************************

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुः आसुराः।

न शौचम् न अपि आचारो न सत्यं तेषु विद्यते।।

*************************

(१६. ७)/१:

"प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुः आसुराः"

(जीवनयात्रा)

जगातील अनेक तत्त्ववेत्ते सुखी जीवनावर, जगतहीतावर भाष्य करतात. याच संदर्भात जीवनाची ओळख करुन देतात. मानवी जीवन सुखी होण्यासाठी अनेक धर्म जगात आले. याच आधारावर लोक चांगले आणि वाईट हेच वर्गिकरण जाणुन भाष्य करीत असतात.

जगात सात्विक, दैवी, (चांगले )जगतहीताय भाव असणारे असतात. अर्जुन दैवी गुणसंपत्तिसाठी जन्माला आला तरी अपुर्णता, अज्ञान असते. याच अपुर्णतेची, अज्ञानाची भगवतगीता ओळख करुन देते.

*दैवीगुणसंपत्ति-अभयंसत्वसंशुद्धिः

मानवी जीवनातील श्रेष्ठत्व, चांगलेपणा दैवीगुण संपत्तिद्वारा भगवतगीता स्पष्ट करते. अर्जुनाला त्याचे नियतकार्य करणे आवश्यक होते. पण ते कार्य करण्यास भय वाटते. त्या कार्याला निंदनिय ठरवतो.

दया धर्माचे मुळ आहे असे म्हटले तर भय अधर्माचे मुळ ठरते. समाजात जे कार्य निंदनिय आहे, ते करण्यास भय वाटत नाही (Regret नसते. )व जे कार्य वंदनिय आहे, जगतहीताचे आहे, ते करण्यास मात्र भय वाटते!(येथे निष्क्रियतेचे Regret असते). हे कार्य अनुक्रमे असुर व दैवी संपत्तिगुणात वर्गिकृत केले तर अर्जुनाचे कार्य दैवीगुणातील ठरते. कारण अर्जुन दैवीगुणसंपत्तिसाठी जन्माला आलेला असतो. अर्थात अर्जुनाला भयावर मात करणे त्याचे दायित्व ठरते.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

*जीवनयात्रेची ओोळख:

जीवनाला नावेची उपमा दिली तर मनुष्याची जीवनाची (यात्रारुपी) नाव निश्चित किनाऱ्याच्या (Goal) दिशेने वल्हवली जाते (आत्मवश). परंतु नावेला न वल्हवता केवळ वाऱ्याने वहात

असते (परावलंबि) तेंव्हा वादळरुपी अडथळयावरच लक्ष केंद्रित असते(मनोवश).

इंद्रियाणां हि चरतां यत् मनोअनुविधीयते।(२-६७)

समुद्रात वादळे असतात तसे मनुष्यजन्म दुःखालयातच आलेला असतो. व निश्चित दिशेने नावेचा प्रवास होण्यासाठी " ईश्वराचे धाम" याची ओळख भगवतगीता देते, ज्याचा सरळ संबंध मनुष्याच्या प्राणतत्वाशी असतो, व अप्रत्यक्ष संबंध Consciousness शी असतो

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)
मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयम् अशाश्वतम् ।(८-१५)

"Hope is like the sun, which, as we journey toward it, casts the shadow of our burden behind us. "
Samuel Smiles

याप्रमाणे जीवनयात्रेची ओळख असणारे व ओळख नसणारे असे दोन वर्ग जगात जगत असतात. याच आधारावर ज्यांना ही ओळख नाही त्यांच्या मानसिकतेचे वर्णन भगवतगीता करते,

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुः आसुराः।
न शौचम् न अपि आचारो न सत्यं तेषु विद्यते।।(१६-७)
असत्यं अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनीश्वरम् ।
अपस्परसंभूतं किम् अन्यत् काम हैतुकम् ।।(१६-८)

जीवनात काय साध्य करायचे ?याविषयी व्यक्तिपरत्वे मतभिन्नता असते. कुणी म्हणतो भोगैश्वर्य प्राप्ति व भोग!कुणी म्हणतो दुःख आहे म्हणुन संन्यास!कांहीही मत व्यक्त केले तरी जीवनयात्रा थांबत नसते.

"We don’t receive wisdom; we must discover it for ourselves after a journey that no one can take for us or spare us. "

Marcel Proust

अर्थात सुखी जीवनासाठी जीवनयात्रेची ओळख करणे व या यात्रेत "बंधन vs स्वातंत्र्य(मोक्ष)" ही ओळख करणे आवश्यक ठरते ज्यामुळे संशयमुक्ति होते. कार्याचा निश्चय होतो,

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्य अकार्ये भय अभये।
बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी॥(१८-३०)

******

१६. ७/२ :

"प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुः आसुराः"

(अज्ञान vs. स्वभाव)

जसे मणि हारात ओवलेले असतात, तसेच सर्व विश्व एकाच हारात ओवलेले आहे.

मयि सर्वम् इदं प्रोक्तं सुत्रे मणिगणा इव।(७-७)

अर्थात सर्व विश्वाचा आधार ईश्वर आहे, या श्रद्धेने जगणारे "सुर" वादी व याविरुद्ध श्रद्धा (Belief system) असणारे "असुर" वादी असे दोन प्रकारचे लोक या भूतलावर असतात.

असत्यं अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनीश्वरम् ।
अपरस्परसंभूतं किं अन्यत् काम हैतुकम् ।।(१६-८)

जे "सुर" वादी आहेत ते दैवीगुणासाठी जन्म घेतात. ते आर्य म्हणुन ओळखल्या जातात. अर्जुन दुःखी झाल्यामुळे निष्क्रिय राहण्याचा बेत करतो. त्याच्या शोकग्रस्त, दुबळया, अनार्याला शोभेल अशा भूमिकेकडे पाहुन श्रीकृष्ण त्याला संबोधन करतात,
अनार्यजुष्ठम् अस्वर्ग्यम् अकीर्तिकरम् अर्जुन।(२-२)

अज्ञान vs. स्वभाव

दैवीगुणसंपत्ति व असुरगुणसंपत्ति यांत निश्चित भेद आहे. हा भेद न जाणल्यामुळे काय करणे योग्य(प्रवृत्ति) व काय अयोग्य (निवृत्ति) अर्जुनाला कळत नाही. दैवी गुणसंपत्ति या संदर्भात हे अज्ञान ठरते, तर असुरगुणसंपत्तिनुसार तो स्वभाव असतो.

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुः आसुराः।
न शौचम् न अपि च आचारो न सत्यं तेषु विद्यते।।(१६-७)

अर्जुन स्वतःला लोभी ठरवितो, पण "असुरगुण" हा त्याचा स्वभाव नसतो. म्हणुन अर्जुनाला म्हटले, तु दैवीगुणसंपत्तिसाठी जन्माला आलेला आहे, तुला शोक करणे उचित नाही.

अर्जुन आपले अज्ञान कबुल करतो. दैवी गुणसंपत्ति या संदर्भात असलेल्या २६ गुणात निर्भयता (अभय) हा प्रथम गुण आहे व अखेरचा गुण नम्रता(न अतिमानिता) असे स्पष्ट केले आहे. निर्भयता ही शक्ति असते. व याच शक्तिची साधना होण्यासाठी "योगः कर्मसु कौशलम् " हा संदेश आहे.

सार : समाजात चांगलेपणाला महत्व दिले जाते. पण चांगलेपणा चालत नाही!असे निरुत्साही भाष्यही समाजात चालत असते व पर्यायाने चांगलेपणाचे Demotivation होते. याचे कारण दैवीगुणाचे/चांगलेपणाचे अज्ञान असते. हेच अज्ञान भगवतगीता दर्शवीत आहे. व शक्तिची साधना होण्यासाठी कार्य हा संदेश देत आहे.

*****

(१६-८)

*************************

असत्यं अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनिश्वरम्।

अपरस्परं संभूतं किम् अन्यत् काम हैतुकम् ॥

*************************

(१६-८):

"असत्यं अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनिश्वरम्!"

(विभक्त vs एकत्व अर्थात Survival vs Spirituality)

भौतिक विकासाची स्पर्धा सर्व जग अनुभवत आहे. या विकासाच्या प्रवाहात आपले स्थानच मनुष्य नकळत बनवीत असतो. मनुष्याला स्वतःचे अस्तित्व प्रिय असते व या गर्दीत आपले अस्तित्व शोधतो, 'मी कोठे आहे?' तेंव्हा या भौतिक स्पर्धेत अध्यात्माचे निश्चित काय स्थान आहे? हा प्रश्न उपस्थित

होतो. व भगवतगीता याच Exlusive प्रश्नावर प्रकाश टाकीत आहे.

चांगलेपणा दुर्बल ठरणे, बदनाम होणे समाजासाठी हितावह नसते. म्हणुन भगवतगीतेने जगालाच सावध केले आहे. व याच संदर्भात "अध्यात्म" या विषयाचा ऐहिक विकासाशी कसा संबंध आहे हे भगवतगीता स्पष्ट करीत आहे.

असत्यं अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनिश्वरम्।
अपरस्परं संभूतं किम् अन्यत् काम हैतुकम् ।।(१६-८)

अर्थात ऐहिक विकासासाठी, सुख उपभोगण्यासाठी, हे मनुष्य जीवन आहे. अध्यात्म, (ईश्वर) ऐहिक विकासात अडथळा करते, समाजाची दिशाभुल करते. अशी ऐहिकवाद्यांची धारणा असते. म्हणुन ऐहिकवादी स्पर्धेला नकळत मान्यता देत असतात. "Survival of the fittest".

'दया धरमका मुल है' अर्थात धर्म या संदर्भात चांगलेपणाला महत्व असते. अर्जुन चांगला असल्यामुळेच (स्वजनांच्या दुःखामुळे) दुःखी झाला. मनुष्य दुःख टाळण्यासाठी, स्वतःला

समाधान देण्यासाठी जसे आचरण करतो, त्याचे समर्थन करतो. अर्जुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान बोलतो.

मनुष्याच्या जीवनयात्रेचा हा सहजप्रवास असतो. परंतु मानसिक दुर्बलतेला नम्रता, चांगलेपणा ठरविणे हा भ्रम असतो. तो Mental weakness(हृदयदौर्बल्य) ठरतो. हे भगवतगीता दर्शवुन देते. याच अनुषंगाने मानसिक दुर्बलता vs मानसिक सक्षमता(अभय, दैवी) हा विषय भगवतगीता स्पष्ट करते.

अनार्यजुष्ठम् अस्वर्ग्यं अकिर्तिकरं अर्जुन।(२-२)

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप।(२-३)

अर्जुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्या ज्ञानाचा उपयोग करतो, ते केवळ पुस्तकी(Informatory) ज्ञान असते, Wisdom नसते. म्हणुन 'ज्ञान' हा विषय ४५)भगवतगीतेत आला. जीवनाचे ज्ञानविज्ञान सांगतांना प्रकृतिचे सत, रज, तम गुण व गुणातीत असे पृथःकरण स्पष्ठ केले. यातील गुणातीत, ईश्वर, आत्मोन्नति हा अध्यात्माचा विषय असतो. याच ज्ञानाच्या आधारावर (विज्ञान व अध्यात्म) ऐहिक जीवन जगतांना भगवतगीता जीवनविकासमार्गाचे निश्चित ज्ञान देत आहे.

समाजात स्वतःचे अस्तित्व या संदर्भात किर्तिला मनुष्य महत्व देतो. पण चांगलेपणा व किर्तिविषयक संकल्पना कशा भ्रामक आहे हा पर्दाफाश भगवतगीता करीत आहे.

"कर्ता" या संदर्भात, तम(खिन्न, आळशी, विषादी, प्रमादी) vs. सत(उत्साही, ज्ञानी, धैर्यवान, निर्भय ) अशी गुणांची ओळख भगवतगीता देते. मनुष्याने नित्य सत्वगुणात असावे हा संदेश देते. चांगले कार्य सतगुण प्रवृद्ध करीत असते हे स्पष्ट करते.

कर्मणा सुकृतस्य आहुः सात्विकं निर्मलं फलं।(१४-१६)

निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।(२-४५)

"We are all living together on a single planet, which is threatened by our own actions. And if you don't have some kind of global cooperation, nationalism is just not on the right level to tackle the problems, whether it's climate change or whether it's technological disruption. "

Yuval Noah

******

१६. ८ :

"अपस्परसंभूतं किम् अन्यत् काम हैतुकम् "

(विश्वातील मनुष्याचे स्थान)

संपुर्ण जीवसृष्टि निसर्गाची स्वयंचलित प्रणालि (Automation) आहे. ईश्वर अध्यक्ष या भूमिकेत याच प्रणालिला कार्यरत करीत असतो. या संपुर्ण प्रणालिचे ज्ञानविज्ञान "प्रकृति-पुरुष " याद्वारा भगवतगीता स्पष्ट करते.

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।(९-१०)

जेंव्हा मनुष्य या ईश्वराला जाणतो, त्याचे अस्तित्व जाणतो, तेंव्हा तो या विश्वाचा जबाबदार घटक असतो. पण जाणत नाही तेंव्हा त्याची जीवनविषयक संकल्पना केवळ स्वतःच्या Survival ची असते.

असत्यं अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनीश्वरम्।

अपस्परसंभूतं किम् अन्यत् काम हैतुकम् ।।(१६-८)

मनुष्याच्या जीवनातील सुखाच्या संकल्पना याच Survival चा भाग असतो. अर्जुन म्हणतो, यांना(कौरव पक्ष) मारुन मी सुखी होणार नाही. म्हणुन मी प्रतिकार न करता शस्त्रहीन असता, शस्त्रधारी कौरवांनी मारले तरी माझ्यासाठी ते श्रेयस्कर आहे. अर्थात या विश्वाची स्वयंचलित प्रणाली(प्रकृति) व त्याचा चालक (ईश्वर) हे ज्ञान जाणले नाही तर चांगला मनुष्य देखील Survival mode मध्ये सापडतो व द्वन्द्ववश होतो. या स्थितित बंधन असते व संपुर्ण जग या बंधनात अडकलेले असते.

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वंद्वमोहेन भारत।
सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परंतप ।।(७-२७)

Survival mode मध्ये स्वतःच्या सुखदुःखाच्या संकल्पनेनुसार अर्जुन दुःखी होतो व दुःख टाळण्यासाठी निष्क्रिय होतो. अर्थात जबाबदारी ( एका महत्वाच्या समयीच) टाळतो. बेजबाबदार झाला तरी मनुष्य स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो व आपण या विश्वाचे घटक आहोत हेच विसरतो.

"You are honorable unit of Universe"

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव ।(१६-५)

चांगल्या कार्याची विश्वाला गरज असते. आसुरी व दैवी संपत्तिगुण यातील भेद स्पष्ट करुन चांगल्या मनुष्याला भगवतगीता त्याची ओळख करुन देते.

याप्रमाणे भगवतगीतेतील अध्यात्म हा विषय मनुष्याला त्याचीच ओळख करुन देण्यासाठी आहे. म्हणुन म्हटले,

"स्वभाव अध्यात्म उच्यते"

सार :

सृष्टिची स्वयंचलित प्रणालि(प्रकृति) व त्याचा चालक (पुरुष, ईश्वर) व या संपुर्ण प्रणालिचाच मनुष्य घटक याप्रमाणे मनुष्याला स्वतःची ओळख जाणुन घ्यायची आहे. हाच भगवतगीतेतील अध्यात्माचा विषय आहे.

येषां तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।

"ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः॥(७-२८)

अर्जुनाच्या कार्याने विश्वात फरक पडणार होता, त्याप्रमाणे चांगल्या कार्याची, चांगल्या विचाराची(जगतहीताय) विश्वाला नेहमी गरज असते. अज्ञानामुळे कठिणसमयी चांगला मनुष्यही हातपाय गाळुन बसतो. म्हणुन म्हटले, "उत्तिष्ठ". तुला दुर्बलता शोभत नाही.

******

(१६-९)

*************************

एतां दृष्टिम् अवष्टभ्य नष्टात्मानो अल्पबुद्धयः।

प्रभवन्ति उग्रकर्माणः क्षयाय जगतो अहीताः।।

*************************

(१६-९):

"प्रभवन्ति उग्रकर्माणः क्षयाय जगतो अहिताः"

(जगाचे विनाशक vs जगतकल्याणकर्ते)

जगात दैवी व असुरी असे दोन प्रकारचे लोक असतात. प्राचिन काळातील देव व राक्षस व वर्तमानातील चांगले व वाईट असे वर्गिकरण याच दैवी व असुर या संदर्भात होत असते. दैवीगुण जगतकल्याणाला पोषक असते तर असुर जगतविनाशाची पर्वा करीत नाही.

द्वौ भूतसर्गौ लोकेअस्मिन् दैव आसुर एव च।(१६-६)

*जगतकल्याणासाठी "निश्चितव्यवस्था"

व्यक्तिचे Survival, समुहाचे व्यवस्थापन, सृष्टिचे संचलन यांचा संबंध निश्चित व्यवस्थेशी जोडलेला असतो. या "निश्चित" व्यवस्थेसंदर्भातच समाजव्यवस्था (कार्लमार्क्सची साम्यवाद क्रान्ति), धर्म(अर्जुनाने समर्थनासाठी घेतलेला आश्रय), ईश्वर(भगवतगीता) यांचा उल्लेख होतो.

मधमाशीच्या शहदनिर्मिति प्रक्रियेत स्वतःचा योगक्षेम, समुहहीत, सृष्टिचे संचलन (फुलातुन Nector गोळा करणे, फुलाचे बीजात रुपांतर) याप्रमाणे एकाच कार्यात व्यक्ति, समुह, सृष्टि यांचे हीत साध्य होते. मनुष्याला स्वतःचा योगक्षेम चालवायचा आहे, समुहातील सर्वांच्या कल्याणासाठी शोषणविरहीत समुहव्यवस्था हवी, सर्व समुहाच्या कल्याणासाठी सृष्टिसंचलन जगतहिताय असावे. हेच "निश्चित व्यवस्थेचे" लक्ष असावे.

*दैवी vs. आसुर

जीवनाचे अस्तित्व" या संदर्भात हे जीवन भोगैश्वर्य उपभोगासाठी आहे व सुखासाठी स्वतःची इच्छापुर्ति हीच जेंव्हा एकमेव Philosophy बनते, याच दृष्टिमुळे इतरांच्या पीडेविषयी कांहीच गैर वाटत नाही, समाजात याच दृष्टिमुळे शोषण होते.

एतां दृष्टिम् अवष्टभ्य नष्टात्मानो अल्पबुद्धयः।
प्रभवन्ति उग्रकर्माणः क्षयाय जगतो अहीताः।।(१६-९)

मनुष्यजीवन, समुहजीवन व विश्व(सृष्टि) यांचा परस्पर संबंध अर्जुन "धर्म" या शब्दाने व्यक्त करतो. अर्जुन दुःखी होतो, तेंव्हा आपल्या नियतकार्याला धर्मविरोधी कार्य आहे हे सिद्ध करतो. येथे अर्जुन आपल्या (हृदयदौबल्य) दुर्बलतेला सामर्थ्य (परमार्थभाव, चांगली भावना) दर्शविण्याचा प्रयत्न करीत आहे, हे सत्य श्रीकृष्ण दर्शवुन देतात. याच अनुषंगाने दैवीगुण vs असुरगुण हा विषय आला.

असत्य अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनीश्वरम् ।
अपस्परं संभूतं किं अन्यत् कामहैतुकम् ।।(१६-८)

*एकत्व (God connection) vs अनासक्ति(Detachment)

"ईश्वर "याद्वारा सर्व विश्व जोडलेले आहे. ईश्वर हीच विश्वाची मुळ प्रवृत्ति, विश्वाचा आधार व अंतिमधाम आहे. याच ईश्वराचे ज्ञान भगवतगीता प्रकृतिच्या विज्ञानासह स्पष्ट करते. व या ज्ञानाचा उपयोग जीवनविकासासाठी (अमृतत्वाय कल्पते) भगवतगीता स्पष्ट करते. प्रकृति अशाश्वत आहे अर्थात सुखदुःख बदलते आहेत. तर ईश्वर शाश्वत आहे. म्हणुन शाश्वतसुखाची व्याख्या स्पष्ट केली. दुःखान्त (योग) व "कार्याद्वारे योग" हे शास्त्र भगवतगीता स्पष्ट करते.

*जीवनविकासाचा श्रेष्ठ Standard मार्ग :

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

या मार्गात ईश्वराची भक्ति (समर्पण, फलत्याग) घडते. अर्थात १. भक्तिद्वारा Detachment(अनासक्ति) असते. २. योग-दुःखान्तशक्ति, नैश्कर्मसिद्धि या (दिव्य) शक्तिची साधना होते. ३. "मनोविज्ञान" (Consciousness) या संदर्भात या ज्ञानाला "क्षेत्र-क्षेत्रज्ञ योग" याद्वारा स्पष्ट केले आहे.

क्षेत्रक्षेत्रज्ञ यो ज्ञानं एतद् ज्ञानं मतम् मम।(१३-२)

याचाच अर्थ व्यक्तिविकास, समुहव्यवस्थापन, सृष्टिसंचलन यांचा ज्या निश्चितव्यवस्थेशी संबंध आहे, त्यांत ईश्वर ही संकल्पना सर्वश्रेष्ठ ठरते. मार्ग तोच श्रेष्ठ ज्यांत कार्याद्वारा ईश्वराची भक्ति साध्य होते.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

याचाच अर्थ धर्माने योग्य-अयोग्य हा संशय निर्माण केला तरी (ईश्वरज्ञानाने)बुद्धियुक्त असणे श्रेष्ठ ठरते.

बुद्धियोगम् उपाश्रित्य मच्चित्तः सततं भव।(१८-५७)
सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।(१८-६६)

******

(१६. १०)

*************************

कामम् आश्रित्य दुष्पुरं दम्भमानम् अदान्विताः।

मोहात् गृहीत्वाअसत् ग्राहान् प्रवर्तन्ते अशुचिव्रताः।।

*************************

१६. १०:

"कामम् आश्रित्य दुष्पुरं दम्भमानम् अदान्विताः"

(Unhealthy thought pattern & Change)

मनुष्याच्या इच्छांना मर्यादा नसते. पण क्षमतेला मर्यादा असते. मनुष्य आपली क्षमता वाढवु शकतो पण क्षमतावृद्धिचे ज्ञान, विकासाचे ज्ञान कळले नाही तर इच्छा वाढतात व Unhealthy Thought Pattern तयार होतो.

"विचारबदल " या संदर्भात भर्तृहरि म्हणतात (संदर्भ:भर्तृहरि त्रिशतक), विद्वान जन ईर्ष्येने ग्रस्त आहे, धनिक जन गर्वाने दुषित

आहे, बाकी लोक अज्ञानात आकंठ बुडाले आहेत. म्हणुन संतवाणीचा जनमानसावर अपेक्षित परिणाम होत नाही.

या पार्श्वभुमिवर विचारबदल (Thought pattern) या संदर्भात भगवतगीता महत्वाचा संदेश देत आहे, हीच भगवतगीतेची Strength आहे, हे लक्षात घेतले पाहीजे.

Thought Pattern

The quality of your thinking pattern is responsible for the quality of all your individual, specific thoughts.

Thought patterns are created just like physical patterns — by forming habits. When you start thinking a certain way, let’s say negative, and you practice this negative mindset long enough, it becomes a pattern.

(Transformation of thought pattern (Unhealthy to Healthy/positive)

*Finding the roots of your thinking pattern:

(The first step toward gaining control over your thoughts is finding the roots of your thinking pattern. )

*Rebooting your thinking pattern

*Reaching a state of mindfulness)

दैवी व असुरी गुणसंपत्ति असलेले असे दोन प्रकारचे लोक जगात असतात असे भगवतगीतेत म्हटलेले आहे. असुरी या गुणसंपत्तिमध्ये Unhealthy thought pattern असतो.

कामम् आश्रित्य दुष्पुरं दम्भमानम् अदान्विताः।(१६-१०)

चिंताम् अपरिमेयां च प्रलयान्ताम् उपआश्रिताः।(१६-११)

अनेकचित्त विभ्रान्तां मोहजालसमावृताः।(१६-१६)

तर दैवीगुण संपत्तिविभागात अज्ञानामुळे negative thought pattern असतो. अर्जुन दैवीगुणसंपत्तिसाठी जन्माला आला पण नियतकार्य करणे योग्य कि अयोग्य? यात संशय आल्यामुळे Negative thinking होते. यामुळे विकासच थांबतो.

मनुष्य जीवनाचा विकास अखंड/शाश्वत स्वरुपाचा असतो. व यासाठी "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) हा मार्ग सांगितला. हा Positive thought pattern असतो. पण द्वन्द्ववश झाल्यामुळे अडथळा होतो, विकास थांबतो.

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

याप्रमाणे भगवतगीतेचा विषय "Transformation of negative thought pattern into positive" हा बनतो.

सार :

मनुष्य चांगला असुन देखील त्याचा Thought pattern नकारात्मक कां बनतो?याचे उत्तर भगवतगीता देत आहे. याचे Root cause "काम" असते. म्हणुन अर्जुनाला म्हटले,

जहि शत्रुं महाबाहो कामरुपम् दुरासदम् ।(३-४३)

*******

(१६-११)

*************************

चिंताम् अपरिमेयां च प्रलयान्ताम् उपआश्रिताः।

कामउपभोगपरमा एतावद् इति निश्चिताः।।

*************************

(१६. ११)/१:

"चिंताम् अपरिमेयां च प्रलयान्ताम् उपआश्रिताः"

चिंता मनुष्याला दुःखी करते, दुबळे करते हे आपण जाणत असतो. दैवीगुण संपत्तिचे अज्ञान असल्यामुळे चिंता असते असे भगवतगीता स्पष्ट करते.

चिंताम् अपरिमेयां च प्रलयान्ताम् उपआश्रिताः।

कामउपभोगपरमा एतावद् इति निश्चिताः।।(१६-११)

अर्थात हे जीवन केवळ भौतिकसुखासाठी (ऐश्वर्यभोगासाठी) आहे अशी मानसिकता बनल्यामुळे चिंता शेवटपर्यंत सुटत नाही.

दैवीगुणाची चांगलेपण अशी ओळख मनुष्य जाणतो. पण हाच चांगलेपणा अर्जुनाला दुःखी करतो. दुःख टाळण्यासाठी निष्क्रियता निवडतो व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. या एकाच घटनेतुन चांगलेपणा, ज्ञान या संदर्भातील विविध प्रश्न उपस्थित होतात.

*चांगलेपणा vs स्वार्थि यांतील भेद

*विकासात चांगलेपणाचे प्रयोजन काय?

चांगलेपणा आत्मविश्वास देतो कि दुःखी करतो?

* ज्ञानाचे प्रयोजन स्वतःचे अज्ञान दुर करण्यासाठी कि, स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी?

*चांगलेपणा vs स्वार्थि

एखादा व्यक्ति चांगला कि स्वार्थि? असा भेद करणारे भाष्य आपण व्यवहारात ऐकत असतो. समाजात चांगला म्हणजे निःस्वार्थ प्रेम करणारा व स्वार्थि म्हणजे स्वतःच्या हितासाठी इतरांचा उपयोग करुन घेणारा अशी भावना असते. याच आधारावर अर्जुन स्वतःला लोभी म्हणवतो व मला कांही नको ही भूमिका घेतो.

दुष्यंत शकुंतलेची निवड करतो तेंव्हा शकुंतलेच्या खानदानीविषयी लोक प्रश्न उपस्थित करतात. तेंव्हा दुष्यंत उत्तरतो,

मा सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणम् अंतःकरण प्रवृत्तिम् ।

दुष्यंत चांगला आहे हे दुष्यंत जाणतो. चांगल्याची प्रेरणाच प्रमाण असते. ज्याअर्थि दुष्यंताने शकुंतलेला पसंद केले, त्याअर्थि शकुंतलेची पात्रता एका क्षत्रिय राजाला वरण्यास योग्य आहे हे सिद्ध होते. याप्रमाणे शकुंतलेवरील निःस्वार्थ प्रेम स्पष्ट करतो. अर्थात चांगलेपणा स्वतःवरील विश्वास (आत्मविश्वास) दर्शवतो.

मनुष्याला स्वतःच्या मार्गाचे ज्ञान असेल, या मार्गात आनंद, आत्मविश्वास अनुभवत असेल तर त्याला स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी बाह्यज्ञानाची गरज भासत नाही. अर्जुनाला मात्र आत्मविश्वास नसल्यामुळे तो समाधानासाठी ( मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी) बाह्यज्ञानाचा उपयोग करतो. म्हणुन जीवनात ज्ञानाची भूमिका(योग्य सिद्ध करण्यासाठी कि अज्ञान मिटविण्यासाठी?), स्वतःचा विकासमार्ग या महत्वाच्या विषयावर भगवतगीता प्रकाश टाकते.

चांगलेपणा मनुष्याला विकासासाठी सकारात्मक करते. अडचणी विकासासाठी संधी जाणतो. याप्रमाणे दुःखाशी सामना करण्यासाठी चांगलेपणाचा उपयोग होतो. याचेच शास्त्र

भगवतगीता स्पष्ट करते. चांगलेपणाचे ईश्वराशी नाते याच शास्त्राचा भाग असतो. याच ज्ञानामुळे "अमृतत्वाय कल्पते" हा श्रेष्ठांच्या शाश्वत विकास मार्गाची ओळख होते. मनुष्य या संपुर्ण ब्रह्मांडाचाच भाग असतो पण हे ज्ञान न जाणल्यामुळेच दुःख, चिंता जीवनात असते.

असत्यं अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनीश्वरम् ।
अपरस्परं संभूतं किम् अन्यत् कामहैतुकम् ॥(१६-८)

व्यावहारिक बोध:

चांगलेपणा मनुष्यजीवनातील Divine गुण असतो. याच चांगलेपणाचे जीवनातील महत्व भगवतगीता स्पष्ट करते. म्हणुन चांगल्या मनुष्याला भगवतगीता संदेश देत आहे,

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

"The fragrance of flowers spreads only in the direction of the wind. But the goodness of a person spreads in all directions. "

Chanakya

******

१६-११/२ :

"चिंताम् अपरिमेयां च प्रलयान्ताम् उपआश्रितः।

कामउपभोगपरमा एतावद् इति निश्चितः!"

(जीवनाचा हेतु कां जाणावा?

Purpose to know the Purpose of life)

जीवन भोगऐश्वर्यासाठी आहे तर जीवनात पैसा, ऐश्वर्य असेल तर सुख ही विचारसरणी स्वाभाविक असते. याच विचारसरणीनुसार अर्जुन म्हणतो, मला कांहीही नको. पैसा, राज्य यांच्या लोभाने स्वजनांना मारणे पाप आहे, धर्मविरोधी आहे. नको मला असे अधर्माचे जिणे!अर्थात स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी याप्रमाणे ज्ञान सांगतो. व्यवहारात या भाष्याला Excuses, भगवदगीतेत प्रज्ञावाद असे म्हटले आहे.

मनुष्याचे सामान्य जीवन असेच चालु असते. अडथळा, अडचणीवर मात करणे जमले नाही तर तो स्वतःचे समाधान शोधत असतो व स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी समर्थनार्थ ज्ञान सांगत असतो. हा मनुष्याचा Comfort zone असतो. यामुळेच चिंता, अशांति (Stress) असते.

मनुष्याला जे आवडते, जे योग्य वाटते तेच करीत असतो. तरीपण अशांत, दुःखी कां? हा प्रश्न पडतो. याच पार्श्वभुमिवर भगवदगीतेचा संदेश येतो,

अनित्य असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।(९-३३)

या दुःखालयात मनुष्यजन्म आलेला असतो. म्हणुन दुःखाचे, अडचणीचे हे आव्हान स्विकारण्यासाठी भगवदगीतेचा हा संदेश आहे.

Transformation :

जीवनमार्गात कर्म घडत असते. जीवनविकासात कर्म (स्वभावनियत कार्य, निर्णयअधिकार) साधन आहे. व्यवहारात सकाम कर्म असते म्हणुन संशय असतो. कार्यनिश्चय होत नाही. ईश्वरज्ञानामुळे जीवनाचा हेतु "कामउपभोगपरमा" बदलुन मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. हा मार्ग आत्मोन्नतिचा बनतो. व कार्य समत्वयोगाने ( निष्काम) करतो.

***********

(१६-१२)

**************************

आशापाश शतैः बद्धाः कामक्रोधपरायणाः।

ईहन्ते कामभोगार्थम् अन्यायेन् अर्थसंचयान।।

**************************

१६-१२/१:

"आशापाशशतैः बद्धाः कामक्रोधपरायणाः"

( Devil's Workshop)

विश्वातील विकासाची चढाओढ प्रामुख्याने भौतिक विकासाची असते. या चढाओढीमुळे समाजातील शोषण दुर्लक्षित होते. जीवन जगतांना स्वाभाविकपणे मनुष्य श्रीमंत-गरीब असे भेद पहात असतो. श्रीमंतिचे, तत्सम शक्तिचे उन्मादही पहात असतो, तेंव्हा समाजात भ्रष्टाचार, असुर अशी टिकाही होत असते. याच स्पर्धेत मनुष्य नकळत स्वतःतील अज्ञानही दुर्लक्षित करीत असतो. "चांगलेपणा" या संदर्भात(संस्कारहीन, अज्ञान असला तरी) मनुष्य स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी समर्थन करतो.

याचाच परिणाम समाजातील भय, नकारात्मक विचार, शोषण इ. असते. हे सर्व समाजातील अज्ञान असते. या अज्ञानामुळेच चुकीच्या विचाराचा, नकारात्मक विचाराचा Virus समाजात वेगाने पसरत असतो. समाज भयरोगाने ग्रासल्या जातो. धुर्त, स्वार्थि लोक समाजातील याच भयाचा फायदा घेत असतात. यामुळे समाजाचे वैचारिक आरोग्य बिघडते.

आशापाशशतैः बद्धाः कामक्रोधपरायणाः।
इहन्ते कामभोगार्थम् अन्यायेन अर्थसञ्चयान्॥(१६-१२)

धर्म, ज्ञान व अध्यात्म :
निरोगी समाजनिर्मितीसाठीच जगात धर्म आलेत. अर्जुन दुःखी झाल्यामुळे धर्माला(स्वधर्माचरण) अधर्म व अधर्माला(निष्क्रियता) धर्म ठरवितो. या स्थितिला भगवतगीतेने बुद्धिची तामस अवस्था म्हटले आहे.
अधर्मम् धर्मम् इति या मन्यसे तमसा आवृताः।(१८-३२)

अर्थात हा विषय ज्ञानविज्ञानाचा असतो. यामुळे विकासातील Error/प्रश्न जाणता येतात. व त्यावर उपाय करता येतो.

धर्माचा निश्चित हेतु विश्वसंचालनास सहकार्य, निरोगी- शोषणमुक्त समाजनिर्मिति, चांगलेपणाला सक्षम करणे त्याला संरक्षण देणे याप्रमाणे भगवतगीतेत स्पष्ट होते.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

मनुष्याच्या व्यक्तिगत संस्कारात मनुष्य स्वतःच त्याच्या विकासासाठी जबाबदार असतो. म्हणुनच व्यक्तिगत संस्कारात अध्यात्मज्ञानाचे (आत्मोन्नति ) महत्व आहे.

तस्माद् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(८-७)

सार :

भगवतगीतेने धर्म, अध्यात्म व ज्ञानविज्ञान यांचा समन्वय साधलेला आहे. समाजातील भौतिक, आर्थिक, मानसिक, वैचारिक आरोग्य बिघडले तर त्याचा जबाबदार धर्म नसुन धर्माचे अज्ञान असते. अर्थात हा ज्ञानविज्ञानाचा प्रश्न/विषय असतो. हे लक्षात घेणे आवश्यक आहे. हाच संदेश भगवतगीता देत आहे.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।

********

(१६-१२)/२:

"इहन्ते कामभोगार्थम् अन्यायेन अर्थसंचयान"

(Social illness)

मनुष्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्याची विचारसरणी बनवते . ही विचारसरणी जीवनविकासाला पोषक(अविरुद्ध) असावी, विरुद्ध नसावी म्हणुन जीवनात काय साध्य करावयाचे आहे? जीवनातील कोणते Asset विकासाचे साधन आहे, साध्य आहे?ही साधनसंपत्ति दैवी व आसुर संपत्ति या दोनमध्ये भगवतगीतेने विभागली आहे. एक विकासात स्वातंत्र्यासाठी सहकारी ठरते, अर्थात स्वातंत्र्याच्या मार्गावर जीवनयात्रा असते. दुसरी बंधन घट्ट करते.

दैवी संपद् विमोक्षाय निबंधाय आसुरी मता।(१६-५)

संपत्ति या संदर्भात अर्थविषयक विचार महत्वाचा असतो.

मनुष्याची अर्थविषयक विचारसरणी दैवी संपत्तिला पोषक असावी.

समाजात पैसा(अर्थ) महत्वाचा विषय असतो.
सामान्यांना याच संपत्तिची ओळख असते. श्रीमंतिचे पैसा हेच "मानक" बनते. या मानकानुसारच गरिबी-श्रीमंति मापल्या जाते. पैसा असेल किंवा नको असेल तर नियतकर्म कशाला? असा सामान्यांना प्रश्न असतो.

अर्जुनाची अर्थविषयक विचारसरणी त्याला लोभी ठरविते. यामुळे संभ्रम होतो. अर्थात पैसा हवा कि नको हा विषय येथे गौण ठरतो. दैवी संपत्ति महत्वाची ठरते. या संदर्भात भय हा दैवी संपत्तितील weakness असतो. म्हणुन मानसिक शक्ति या संदर्भात "भय vs अभय" असा भेद जाणुन" योगाय आचरतः कर्म "यासाठी निश्चय करणे.
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

१. दैवी संपत्ति:
अभयं सत्वसंशुद्धिः ज्ञानयोग व्यवस्थितिः।(१६-१)

दैवी संपत्तित यज्ञ, दान, तप या मुलभूत त्रिकर्माचा उल्लेख आहे.
यज्ञ व दान यांचा "अर्थ" शी संबंध असतो.

दानम् दमश्च यज्ञश्च स्वाध्याय तपः आर्जवम् ।(१६-१)
*यज्ञ: सकाम कर्म vs समर्पित कर्म, निष्काम कर्म हा भेद
जाणण्यासाठी व विकासासाठी यज्ञकौशल्य.
यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलियते।
*दान: दाता vs याचक यामध्ये दाता व्हावे, याचक होवु नये.
अर्थात परावलंबन त्यागुन स्वावलंबि होणे.
(Beggars are not choosers)

२. आसुर संपत्ति, Social illness

Social illness शी संबंधित विषयावर भगवतगीता आसुर संपत्ति
द्वारा प्रकाश टाकते.

आशापाश शतैः बद्धाः कामक्रोधपरायणाः।
ईहन्ते कामभोगार्थम् अन्यायेन् अर्थसंचयान।।(१६-१२)

भोगैश्वर्य उपभोगण्यासाठी हे जीवन आहे. जीवनात सुखी होण्यासाठी याच विचारसरणीने मनुष्य जगतो. याच्या पुर्तिसाठी पैसा हवा म्हणुन सुखी जीवनासाठी "अर्थसंचयन" ही विचारसरणी बनते. अशी विचारसरणी बनते. यासाठी अन्यायाने अर्थसंचयन करतो.

समाजात श्रीमंति व गरिबी यातील आर्थिक दरीमुळे समाजव्यवस्थेत असमतोल निर्माण होतो. हा असमतोल शोषणास कारण ठरतो. वर्तमानात Social illness या संदर्भातच शोषण, भ्रष्टाचार, गरिबी हे अर्थविषयक विषय यावर भाष्य होते.

जसे विज्ञानाने क्रांति केली, औद्योगिकिकरण आले. व्यावसायिक रोजगाराच्या कक्षा वाढल्या. पण समतोल विकासासाठी समाजव्यवस्था महत्वाचा विषय ठरतो. हा अर्थविषयक Socioeconomics चा विषय असतो. अर्थविषयक Social illness वर मात करण्यासाठी शाश्वत, शोषणविरहित समाजव्यवस्था निर्मिति हे समाजाला आव्हान असते.
"एका राज्यात फुगे बनविणारा कारागिर राजाकडे त्याच्या राज्यात आश्रय मागतो. फुग्यांच्या खर्चाचा भार लोकांना जाणवु नये व

कारागिरालाही रोजगार मिळेल या हेतुने राजा "गुब्बारा एकादशी"(या एकादशीला फुगे खेळायचे) म्हणुन एक प्रथा सुरु करतो. "हा अर्थविषयक विचार शोषणविरहित व्यवस्थेला प्रोत्साहीत करते.

अर्थात येथे केवळ नवीन रोजगार निर्मिति झाली नाही तर लोकांच्या "भौतिक व आध्यात्मिक विकासाला पोषक समाजव्यवस्था " ही (अर्थात Socioeconomic vision) विकास या संदर्भातील सावधानता पाळण्यात आली.
भगवतगीतेने जगाला मानवविकासाचे मुलभूत ज्ञान दिले. धर्म-अधर्म हा शब्द आंतर्विघ्न (संशय) व बाह्यविघ्न (शोषण, अन्याय) या संदर्भात आलेला आहे.

वर्तमानातील विज्ञान व मानवविकासाचे मुलभूत ज्ञान या दोन्हीचा उपयोग करुन समाजव्यवस्थेची वाटचाल शाश्वत समाजव्यवस्थानिर्मितिकडे असावी, जगतहिताय असावी हे भगवतगीतेला अभिप्रेत आहे. म्हणुन अर्जुनाला म्हटले,

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

वर्तमानात समाजव्यवस्थेचा Socioeconomic संदर्भ:

समाजव्यवस्थेची भूमिका व्यावसायिक रोजगारसंधि उपलब्ध करुन देणे ही असते. सर्वांना संधि देतांना कुणाचेही नुकसान होणार नाही अशा शोषणविरहीत, समुहात (देशात) सर्वांना रोजगार देणारी, जगतहीताय असणारी व्यवस्था आध्यात्मिक /शाश्वत समाजव्यवस्था ठरत असते. याला Socioeconomic संदर्भ येतो. अर्थतज्ञ यावर भाष्य करतात. असेच भाष्य अर्थविषयक समाजशास्त्रज्ञ व ग्रामपुनर्निर्माणाचे भाष्यकार डॉ जे. सी. कुमारप्पा यांनी त्यांच्या Economy of Permanence यातुन केले. याला Erich W. Zimmermann चे World resources & Industries याचा संदर्भ आहे. ज्यात resources ची अशाश्वत(Violence-सिमित) व शाश्वत (Nonviolence-असिमित ) अशी स्पष्ट विभागणी आहे.

---

*जगात चार प्रकारच्या समाजव्यवस्था असतात.

१. (परजीवी, पराश्रित व्यवस्था )Economy of Parasite/Predator (स्वतः कांहीही न करता पराश्रित, ) या व्यवस्थेत शोषण असते. ही व्यवस्था सरळ हिंसेला जन्म देते.
२. (व्यावहारिक समाजव्यवस्था )Economy of Enterprise (या व्यवस्थेत स्पर्धा असते, आर्थिक दरी वाढत जाते. )

३. (समुहप्रधान समाजव्यवस्था) Economy of gregation (देशहीतासाठी स्वधर्म/कार्य अर्थात निःस्वार्थ असतो) देशहीत अर्थात निःस्वार्थ वृत्ति असली तरी यांत निसर्गाचे संतुलन, इतर देशांचे हीत दुर्लक्षित होते.

४. आध्यात्मिक/शाश्वत व्यवस्था Economy of Permanance. (जगाचे अहीत होणार नाही अर्थात जगतहीताय राहील अशी देशहितासाठी बनविलेली व्यवस्था. ) :
जगतहीताय/ईश्वरभक्तिसाठी कर्म/स्वधर्म असतो. यात अहिंसा भाव असतो. देशहीत ही priority असली तरी मानवतेचे हीत, विश्वहीत दुर्लक्षीत होत नाही.

विज्ञान व अध्यात्म (जगतहिताय)या दोहोमिळुन आध्यात्मिक समाजव्यवस्था* बनलेली असते. ज्यात सहजकार्य ईश्वराला समर्पित करणे. हा संदेश असतो.

The goal of life is to make your heartbeat match the beat of the universe, to match your nature with Nature.

-Joseph Campbell

******

(१६-१३)

*************************

इदम् अद्य मया लब्धं इमं प्राप्से मनोरथम् ।

इदम् अस्ति इदम् अपि मे भविष्यन्ति पुनर्धनम् ।

*************************

(१६-१३):

"इदम् अद्य मया लब्धं इमं प्राप्से मनोरथम् "

(मनुष्यजीवनाची सक्षमता)

तत्वज्ञानाच्या विश्वात जीवन (सुखदुःखाचा) प्रवास आहे, लढाई आहे असे भाष्य होत असते.

१. जीवन आहे तर ते जगलेच पाहीजे ही नैसर्गिक बाब म्हणजेच SURVIVAL असते.

२. जीवनविकास या संदर्भात भोगैश्वर्यासाठी हे जीवन मिळाले आहे म्हणुन ऐश्वर्य मिळविणे हेच ध्येय समजुन जगणारेही असतात.

३. मनुष्याची स्वतःची सक्षमता हा भगवदगीतेचा विषय आहे. "सक्षमता" या संदर्भातच दैवीगुणसम्पत्ति व असुरगुणसंपत्ति या

दोन विभागाद्वारे सक्षमतेची निश्चित ओळख भगवदगीता करुन देत आहे.

प्रत्येक मनुष्य स्वतः सक्षम असावा व इतरांनाही सक्षम करण्यासाठी सहकार्य करावे हा मनुष्यधर्म असतो. या पार्श्वभुमिवर सक्षमता या संदर्भात तुलना करणे, स्वतःचे समर्थन करणे, इतरांच्या चुका काढणे, इतरांना challange करणे हा व्यवहार असतो, प्रेम नसते.

इदम् अद्य मया लब्धं इमं प्राप्से मनोरथम् ।
इदम् अस्ति इदम् अपि मे भविष्यन्ति पुनर्धनम् ।।(१६-१३)

हे जीवन केवळ ऐश्वर्यासाठी आहे. मला आज इतके ऐश्वर्य प्राप्त झाले, भविष्यात सर्वेसर्वा होईल. या वृत्तिला असुरीगुणसम्पत्ति संबोधले आहे. तर मनुष्य चांगला असुनही दुबळा होणे, निष्क्रिय होणे हे जीवनाचे अज्ञान ठरते. अर्जुनाचे हेच अज्ञान प्रकाशात आणले आहे. व स्वतःला सक्षम करण्यासाठी संदेश दिला,
मा शुचः सम्पदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

सार :

जीवनविकास व जीवनाची सक्षमता याविषयी मनुष्याला निश्चित ज्ञान हवे असते.

Where is the Life we have lost in living?
Where is the wisdom we have lost in knowledge?
Where is the knowledge we have lost in information?
T. S. Eliot

विद्वान असुनही निष्क्रिय असणे, चांगला असुनही दुबळा (मनोदुर्बलता, भय) असणे निश्चितच अज्ञान ठरते. या अज्ञानाची ओळख करुन त्यावर मात करणे व याद्वारे स्वतःला सक्षम करणे आवश्यक असते. हाच भगवदगीतेचा संदेश आहे.

************

(१६-१४)

**************************

असौ मया हतः शत्रुः हनिष्ये च अपरान् अपि।

ईश्वरोअहं अहं भोगी सिद्धोअहं बलवान् सुखी।।

**************************

(१६-१४) :"ईश्वरोअहं अहं भोगी सिद्धोअहं बलवान सुखी?"

(श्रेष्ठत्व : असुरी vs. ईश्वरभाव)

दैवी व असुरी संपत्ति विभागात योग्य व अयोग्य गुण, प्रवृत्ति( attitude ) वर्णिलेले आहे. "ईश्वर" या शब्दाचा उल्लेख येथे आलेला आहे. वर्तमानात स्वविकासासाठी श्रेष्ठ(मोठे, किर्तिमान) होणे म्हणजे काय?ताडाचे झाड कि वडाचे झाड? या संदर्भात हा भेद जाणुन घेणे आवश्यक आहे.

ईश्वरोअहं अहं भोगी सिद्धोअहं बलवान् सुखी?(१६-१४)

आढ्यो अभिजनवान अस्मि कः अन्योः अस्ति सदृशो मया?(१६-१५)

अर्थात मीच सिद्ध, मीच ऐश्वर्यभोगण्याचा अधिकारी, (माझ्यासारखा श्रेष्ठ कुणीच नाही) म्हणुन स्वतःला ईश्वर संबोधणे असुरगुण संदर्भात म्हटले आहे.
तर आवश्यक गुण या संदर्भातही ईश्वर शब्द आलेला आहे.
शौर्यं तेजो धृतिः दाक्ष्यं युद्धे च अपि अपलायनम् ।
दानम् ईश्वरभावश्च क्षात्रकर्म स्वभावजम् ।।(१८-४३)

कोणत्याही कार्याला त्या कार्याची सहजप्रवृत्ति(Attitude) महत्वाची असते. यामुळे ते कार्य Burden जाणवत नाही तर ते करण्यात आनंद अनुभवतो. याच संदर्भात ईश्वरभाव Attitude अर्थाने(समाजातील Leader, Orgonizer) दर्शविले आहे.

प्राचिन काळातील राजर्षि (Master morality) या संदर्भात ईश्वरभाव( Attitude ) आवश्यक गुण आहे. हेच Attitude वर्तमानातील पुढारी(Leadership), योजक (Orgonizer) या संदर्भात आवश्यक गुण असतो.

Leadership म्हटले कि समाजात राजकिय क्षेत्रातील नेते अशी समाजात पुढारी या शब्दाची ओळख असते. पण कोणत्याही चांगल्या, विधायक कार्यासाठी स्वतः पुढाकार घेणारी पुढारी व्यक्ति आवश्यक असते.

योजक Orgonizer दुर्लभ (अर्थात महत्वाची क्षमता) असते. जगात त्याज्य (शब्द, वनस्पति, मनुष्य)कांहिही नाही, त्याला विधायक उपयोगात आणणारा योजक दुर्लभ असतो.
(अमंत्रं अक्षरं नास्ति नास्ति मुलम् औषधम् ।
अयोग्यं पुरुषं नास्ति योजकःतत्र दुर्लभः।)

नकारात्मक भाष्य करुन समाजाला निष्क्रिय, भ्रमित करणे म्हणजे "अंधार आहे" अशी ओरड करणे ठरते. अंधार आहे अशी ओरड करुन अंधार मिटत नाही. प्रकाशानेच अंधार मिटतो. समाजाला प्रकाशित करणाऱ्या व्यक्तिची जगाला नेहमीच गरज असते. अशा Leadership ला, Orgonizerला ईश्वरभाव संबोधले आहे. असा भाव असलेल्या व्यक्ति ईश्वराचेच कार्य करतात.

मत्कर्मकृत मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।

निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

व्यावहारिक बोधः ईश्वर जगाची मुळ प्रवृत्ति, तर ईश्वरभाव समाजहितासाठी Attitude ठरते.

******

(१६-१४) :
"ईश्वरोअहं अहं भोगी सिद्धोअहं बलवान सुखी"
(श्रेष्ठत्व:Uniqueness कि असुरी!)

मनुष्यजीवनात विकास या संदर्भात त्याचे Uniqueness व Survival हे दोन मुद्दे महत्वाचे आहेत.

*Uniqueness:

"Every person born in this world represents something new, something that never existed before, something original and unique.

Uniqueness is defined, not as individualism, but as the bearing of a particular gift that no one else can offer in quite the same way.

Every person's foremost task is the actualization of his unique, unprecedented and never-recurring potentialities, and not the repetition of something that another, be it even the greatest, has already achieved. "

*Survival mechanism :

१. Survival या संदर्भात गरजापुर्तिसाठी कार्य (योगक्षेम) असते.
२. चांगलेपणा या संदर्भात कीर्ति इच्छा, स्वर्ग इच्छा असते.
श्रेष्ठत्व या संदर्भात याच चांगलेपणाचा अर्जुन वापर करतो.

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां।

क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यं गतिंप्रति।।(२-४३)
भोगैश्वर्य प्रसक्तानां तया अपहृत् चेतसाम् ।(२-४४)

चांगलेपणाचे निश्चित ज्ञान नसल्यामुळे अर्जुनाचे Confusion होते. समाजात चांगलेपणा व त्या अनुषंगाने श्रेष्ठत्व या संदर्भातच Confusion असते. भगवतगीतेत याच Confusion ची ओळख करुन दिलेली आहे.

ईश्वरोअहं अहं भोगी सिद्धोअहं बलवान सुखी।(१६-१४)
आढ्यो अभिजनवान् अस्मि कः अन्यो अस्ति सदृशो मया।
यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इति अज्ञान विमोहिताः।।(१६-१५)

माझ्यासारखा सुखी, बलवान, दानशुर कुणीच नाही!ही अहंची प्रवृत्ति भगवतगीतेने असुरगुणसंपत्ति दर्शविली आहे.

अर्थात चांगलेपणा, श्रेष्ठत्व याचे निश्चित ज्ञान नसल्यामुळे चांगल्या मनुष्याचेही confusion होते. तो द्वन्द्ववश होतो. व हेच Confusion दुर करण्यासाठी द्वन्द्व vs निर्द्वन्द्व, मनोवश vs. आत्मवश अर्थात Senses mind (lower self) vs. Higher

Self याचे ज्ञान स्पष्ट करते. हेच स्पष्ट करतांना निर्द्वन्द्व (एकत्व) या संदर्भात ईश्वराची ओळख होते.

*Ego mind vs. Higher Self

It is actually our higher self that guides us, not our personality or ego. The higher self just means a more evolved version of ourself, the truest form of our being.

We chose the battles for ourselves to experience higher self vs lower self(ego mind), that guiding us along the path to why we are here: to experience the Higher Attributes and ultimately to experience oneness with God.

The significance of this vision of Oneness is understood only when we understand the conflicts and stresses that accompany a belief in the reality of duality.

*Oneness vs. Duality

We see duality or differences everywhere in creation. When one's activities are prompted by likes and dislikes, one's actions are often impulsive and this leads to conflict both within and without.

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत।(७-२७)

Duality is cause of illusion . The dualistic ego-mind is essentially a survival mechanism, on a par with the fangs, claws, stingers, scales, shells, and quills that other animals use to protect themselves.

Unless we develop beyond the defensive ego-mind, we remain subject to endless inner conflict, alienation, and suffering — the hallmark of what the our spiritual traditions call samsara.

* अशाश्वत (Change) vs शाश्वत

Every object in the universe is constantly changing, and subject to time. Yet the God exists in all objects as the one who is Imperishable, Changeless.

आगमा अपायिनो अनित्यः तान् तितिक्ष्यस्व भारत।(२-१४)

All our sorrow, grief, likes and dislikes are born of ignorance alone. That is why the Shrikrishna says that the ignorant person, even though seeing, does not see. Only the wise person really sees.

यः पश्यति तथा आत्मानं अकर्तारम् सः पश्यति।(१३-२९)

The God – who is non-dual, undivided – is real, and the world, which appears dual, is not. The wise person who perceives the God as the very essence of oneness everywhere, does not destroy himself by himself.

उद्धरेत आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत।(६-५)
अर्थात आत्मवश अवस्थेत स्वतःचा बंधु असतो. याप्रमाणे जीवनविकासाचे निश्चित ज्ञान भगवतगीता देत आहे.

******

(१६-१८)

*************************

अहंकारम् बलं दर्पम् कामम् क्रोधं च संश्रिताः।

माम् आत्मपरदेहेषु प्रद्विष्यन्तो अभ्यसूयकाः।।

*************************

(१६-१८):

"माम् आत्मपरदेहेषु प्रद्विष्यन्तो अभ्यसूयकाः"

(विश्वधर्म, विश्वअध्यक्ष, चांगलेपणा याची ओळख)

समाजव्यवस्थेत व्यवहार असतो. कार्य घडत असते. याद्वारा समाजाचे संचलन चालु असते. या संचलनात मनुष्याला त्याच्या विकासाची (भौतिक, आत्मोन्नति) संधि मिळते. याद्वारा सृष्टिसंचलनाला सहकार्य होते. व्यक्तिविकास, समुहकल्याण, जगत/सृष्टिसंचलन या परस्पर सहकार्यासाठी धर्म आलेत.

भगवदगीतेनुसार या व्यवस्थेत जर चांगलेपणा (दैवीगुणसंपत्ति) दुबळा ठरत असेल व वाईटपणा (असुर) हावी होत असेल तर ती धर्मग्लानिची अवस्था ठरते. या पार्श्वभुमिवर चांगल्याचे रक्षण करणे व वाईटाचे निर्दालन करणे यासाठी धर्मस्थापनेचे प्रयोजन आहे.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिःभवति भारत।
अभ्युत्थानं अधर्मस्य तद् आत्मानं सृजाम्यहम् ।(४-७)
परित्राणाय साधुनाम् विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।।(४-८)

अर्थात जगातील चांगलेपणाचे रक्षण करणे, त्याला प्रोत्साहीत करणे, ज्यामुळे वाईटावर विजय मिळेल (सत्यमेव जयते). हेच ईश्वराला अभिप्रेत आहे जो जगाचा अध्यक्ष असतो. याप्रमाणे भगवदगीता धर्म, ईश्वर यांची निश्चित व्याख्या व प्रयोजन स्पष्ट करते. हा धर्म चांगले-वाईट या आधारावर योग्य-अयोग्य मार्ग ठरवीत असतो. यातील चांगले-वाईट ही संकल्पना दैवीगुणसंपत्ति व असुरगुण संपत्ति याद्वारा स्पष्ट केली आहे.

असुर vs. श्रेष्ठ

समाजातील व्यवहारात (आर्थिक, राजकिय)योग्य-अयोग्य, चांगले-वाईट अशी विभागणि होत असते. तथापि आपल्या बाजुचे ते योग्य, चांगले व विरोधी बाजुचे अयोग्य, वाईट अशीही मानसिकता समाजात असते. अर्जुन चांगला (दैवीगुणसंपत्ति असलेला) असतो. पण याच चांगलेपणामुळे दुःखी होतो व स्वतःच्या निष्क्रियतेला धर्म ठरवितो. चांगलेपणाचे/योग्य मार्गाचे

निश्चित ज्ञान नसल्यामुळे मनुष्य आपल्या निष्क्रियतेलाच आदर्श दर्शविण्याचा प्रयत्न करतो. याच पार्श्वभुमिवर जगातील चांगलेपणा सक्षम व्हावा यासाठी श्रेष्ठ कोण?असुर कोण? व श्रेष्ठांची भूमिका कशी असावी हे भगवदगीता स्पष्ट करते.

असुरगुणसंपत्ति:

अहंकारम् बलं दर्पम् कामम् क्रोधं च संश्रिताः।
माम् आत्मपरदेहेषु प्रद्विष्यन्तो अभ्यसूयकाः॥(१६-१८)

अहंकार व दर्प याच्या आश्रयाने इतरांचा द्वेष करणारा यामुळे जगावर टिका करणारा चांगलेपणा जाणत नाही. कारण स्वतःच्या आत्मठायी असलेला किंवा इतरांच्या ठायी असलेला ईश्वर (अंशरुपाने प्राणतत्वात स्थित असलेला) जाणत नाही, अप्रत्यक्षपणे त्याचा(ईश्वराचा) द्वेष करतो.

श्रेष्ठ :

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

**********

(१६-२१)

*************************

त्रिविधं नरकस्य इदं द्वारम् नाशनम् आत्मनः।

कामः क्रोधः तथा लोभः तस्मात् एतद् त्रयं त्यज्येत् ॥

*************************

(१६-२१)

:

"त्रिविधं नरकस्य इदं द्वारम् नाशनम् आत्मनः"

(The barrier & Replacement )

Replacement :

The present system cannot be changed unless it is replaced properly.

आळस हा मनुष्याचा शत्रु आहे हे जाणुन मनुष्य स्वतःला कार्यरत करतो, busy ठेवतो. चुकीची संवय चांगल्या संवयीने Replace होते. "Replacement" याच logicवर "काईझेन"(चांगली संवय) या तत्वाचा जपानमध्ये वापर होतो.

"The Kaizen Philosophy assumes that our way of life - be it our working life, our social life, or our home life - deserves to be constantly improved. "

-Masaaki Imai

"एक चोर आपले कल्याण होईल असा(चोरी सोडुन इतर) उपदेश साधुला मागतो. "खरे बोल" हा उपदेश मिळतो. एका गावात चोरी करायला जातो. तेथील राजा वेशांतर करुन फेरफटका मारत असतो. चोर आपली ओळख देतो, तेंव्हा राजा म्हणतो, आपण भागीदारी करुन चोरी करु. राजा त्याला रस्ता दाखवतो. चोर आंत जावुन सोन्याच्या दोन विटा आणतो. दुसऱ्या दिवशी दरबारात चोराला हजर करण्यात येते. रखवालदार तीन वीटा चोरल्या हा आरोप करतो. तेंव्हा चोर म्हणतो, तेथे तीन वीटा होत्या. आम्ही दोन भागीदार होतो. योग्य वाटणी व्हावी म्हणुन मी एक वीट तेथेच सोडली. रखवालदाराने संधी साधुन एक वीट लांबवली असते. राजा रखवालदाराला बडतर्फ करतो व चोराला रखवालदार म्हणुन नियुक्त करतो. चोरासाठी "खरे बोलणे" हेच जीवनमुल्य बनते. त्याची शक्ति बनते. "

हे जीवन सहजपणे विकासमार्गावर असावे, यासाठी चांगल्या संवयी, संस्कार ( त्याज्य)अवगुणांवर मात करते.

विकासमार्गातील अडथळा कोणता?ज्याला मनुष्य ओळखत नाही. हा प्रश्न अर्जुन करतो.

अथ केन प्रयुक्तोअयं पापं चरति पूरुषः।(३-३६)
मनुष्याच्या विकासमार्गात अडथळा आणणारे षड्- रिपुपैकी काम, क्रोध, लोभ हे तीन नरकद्वार, तमोद्वार म्हटले आहे. व यावर मात करण्यासाठी निष्काम कर्माचे शास्त्र यावर भगवतगीता प्रकाश टाकते. अर्थात "संस्कार", गुणात्मक ज्ञान/शिक्षण या संदर्भात "निष्काम कार्य" हा संस्कार ठरतो.

त्रिविधं नरकस्य इदं द्वारम् नाशनम् आत्मनः(१६-२१)
एतैः विमुक्तः कौंतेय तमोद्वारैः त्रिभिः नरः ।(१६-२२)
ये शात्रविधिम् उत्सृज्य वर्तते कामकारतः(१६-२३)
तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्य व्यवस्थितौ।(१६-२४)

निष्काम कार्याचा संस्कार असेल तरच जीवनमुल्यांचे महत्व जाणतो.

रामायणात दशरथ महाराज कैकेयीला दोन वराचे वचन देतात. याच वचनाचा कैकेयी उपयोग करते. व दशरथ महाराजांना स्वतःचेच "वचन " आव्हान देते.

" निश्चयाचे बळ तुका म्हणे तेची फळ"

अर्थात "Determination" या संस्काराचे जीवनविकासात महत्व असते. यासाठी निर्णयअधिकाराची जाण, वचन, स्वधर्म या जीवनमुल्यांचे Determination साठी महत्व जाणणे. चंचलतामुक्ति, द्वंद्वमुक्ति यासाठी बुद्धियोग, समत्वयोग, "योगः कर्मसु कौशलम्" याचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते.

******

(१६-२२)

**************************

एतैः विमुक्तः कौंतेय तमोद्वारैः त्रिभिः नरः।

आचरति आत्मनः श्रेयः ततो याति परां गतिम् ॥

**************************

(१६-२२):

"एतैः विमुक्तः कौंतेय तमोद्वारैः त्रिभिः नरः "

(तम द्वारापासुन सावध असणे)

मानसशास्त्रात सातत्याने अभ्यास होतो. वर्तमानातील समाजबांधणीच्या महत्वाच्या क्षेत्रात या शास्त्राचा उपयोग प्राचीन काळापासुन होत आहे. Depression सारखे रोग दुःख, नकारात्मकता, भय यांच्या अतिरेकामुळे उद्भवत असतात. दुःखाचे कारण शोधुन उपचार होत असतो. भगवतगीता Mental wellnessचे ज्ञान सांगते. जीवनविकासात भगवतगीता कर्माचे महत्व highlight करते. व यातील कार्यकौशल्याचे शास्त्र (योगः

कर्मसु कौशलम् ) मानसिक सक्षमीकरण चे(Mental wellness )शास्त्र ठरते. निर्भयता मानसिक सक्षमीकरणाचाच भाग असतो.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

समाजाला चांगलेपणाचीच नेहमी गरज असते, पण समाजातील सर्वात मोठा भ्रम "चांगलेपणा" याच संदर्भात असतो. या भ्रमामुळे चांगलेपणा बदनाम होतो, दुबळा होतो, या भ्रमामुळे मानसिक दुर्बलता येते. याचा परिणाम आसुरी जगत क्रियाशील होत असते. म्हणुन चांगलेपणाविषयी असलेला भ्रम मनुष्याचे अज्ञान ठरते . याच अज्ञानाला भगवतगीतेने प्रकाशात आणले आहे.

१. चांगलेपणा : दैवी - असुर विभाग

*जसे दुर्बलता, भय याचा फायदा दुर्जन घेत असतात तसेच चांगलेपणाचाही फायदा घेत असतात.

"एक साधु घोड्यावर बसुन येत असतो. एक दरोडेखोर रोगी मनुष्याचे सोंग घेवुन मार्गात बसतो. साधु जसा खाली उतरतो, दरोडेखोर घोड्यावर बसतो. हा प्रकार साधुच्या लक्षात येतो. तो दरोडेखोराला म्हणतो, खुशाल घोडा ने पण कुणाला सांगु नको

कि, सोंग घेवुन घोडा मिळविला. अन्यथा कुणीही गरजुंची मदत करणार नाही. "

*मी वाईट नाही म्हणुन चांगला आहे असे दर्शविण्याची समाजात संवय असते. या संवयीमुळे निष्क्रियतेला चांगले दर्शविण्याचा प्रयत्न असतो.

अर्जुन म्हणतो, हे युद्ध केले तर आम्ही लोभी ठरु, लोभ हे पापाचे द्वार आहे, म्हणुन युद्ध न करणे हाच धर्म आहे असे भाष्य करतो.

* आपली समाजात स्तुती व्हावी या हेतुने लोकांनी चांगले म्हणावे या संवयीमुळे मनुष्य स्वतःची निर्णयक्षमताच (Power of Determination) क्षीण करतो. या संदर्भात एक गाढव व त्याला विकायला घेवुन जाणारे पितापुत्र यांची गोष्ट सर्वश्रुत आहे, ज्यांत पिता प्रत्येक वाटसरुच्या मताप्रमाणे वागुन आपले गाढव तर घालवतोच पण गाढवसदृश आपली फजिति करुन घेतो.

भगवतगीता चांगले-वाईट या संदर्भात दैवी व असुरीगुण असा भेद स्पष्ट करते. व चांगल्या मनुष्याला दुर्बलता शोभत नाही हा संदेश देते. चांगल्या मनुष्याला स्वतःवर, स्वतःच्या मार्गावर विश्वास

असतो. संशय अज्ञानामुळे असतो. म्हणुन मनुष्य चांगला असला तरी त्याला संशयमुक्तिसाठी ज्ञान हवे असते. हाच संदेश भगवतगीता देते.

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

२. चांगलेपणा : सत -असत

* सत vs तम (Activation of mode of goodness)

प्रकृतिच्या सत, रज व तम या तीन गुणांत सतगुण श्रेष्ठ आहे. म्हणुनच अर्जुनाला म्हटले, "नित्यसत्वस्थो". तम म्हणजे आळस व रज म्हणजे चंचलता या दोन्ही गुणावर मात करुन सत गुण प्रभावित(Active) होतो. याच आधारावर चांगलेपणाच्या नांवाखाली तमोगुणाने धुंद असलेल्या चांगल्या व्यक्तिला तम गुणापासुन सावध केले आहे. मनुष्याला इच्छा असतात. म्हणुनच मनुष्य कर्माने बद्ध(कर्मानुबंधिनि मनुष्यलोके) आहे. सुखी जीवनासाठी कार्यकौशल्य भगवतगीता सांगत आहे. कार्यकौशल्य साध्य न केले तर इच्छा तमगुणात ( काम, क्रोध, लोभ हे तमगुणाचे तीन द्वार आहेत) परिवर्तित होतात. याचाच अर्थ आत्मोन्नतिसाठी कार्यकौशल्य (योगः कर्मसु कौशलम् ) महत्वाची भूमिका बजावते.

एतैः विमुक्तः कौंतेय तमोद्वारैः त्रिभिः नरः।
आचरति आत्मनः श्रेयः ततो याति परां गतिम् ।।(१६-२२)

*जीवनमार्ग या संदर्भात

अ. सत मार्ग व असत मार्ग यांतील भेद भगवतगीता श्रद्धा या संदर्भात स्पष्ट करते.

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत् ।
असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह।।(१७-२८)

ब) सत म्हणजे शाश्वत व असत म्हणजे अशाश्वत या आधारावर मार्गाची निवड करतो. या मार्गावर विचलित होत नाही. हा मार्ग जीवनविकासाचा शाश्वत मार्ग ठरतो.

न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः।
उभयो अपि दृष्टो अंतः तु अनयोः अपि तत्वभिः।।(२-१६)

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

सार :

चांगलेपणा या संदर्भात निष्क्रियतेला चांगलेपणा संबोधणे हा कर्तृत्वाचा अपमान असतो. जगाचा इतिहास कर्तृत्वानेच लिहिल्या जातो. चांगलेपणा मनुष्याची Divine quality (दैवीगुणसंपत्ति) असते. हाच चांगलेपणा प्रत्यक्षात active होण्यासाठी भगवतगीता निष्काम कर्माचे शास्त्र सांगते. सकाम स्थितिमुळे अशांति असते.

यः शास्त्रविधिम् उत्सृज्य वर्तते कामकारतः।
न स सिद्धिम् अवाप्नोति न सुखं न परां गतिम् ।।(१६-२३)
तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्यअकार्य व्यवस्थितौ।
ज्ञात्वा शास्त्र विधान उक्तं कर्म कर्तुम् इह अर्हसि।।(१६-२४)

********

१६. २२:"आचरति आत्मनः श्रेयः"

(दैवी vs असुर)

चांगल्या गुणाची वृद्धि व्हावी हे व्यक्तिगत विकासासाठी अभिप्रेत असते. मनुष्याच्या ठायी असलेला चांगलेपणा त्याच्या विकासाला पोषक (आत्मना श्रेयः) असतो. तर याच चांगलेपणामुळे अर्जुन अडचणीत सापडतो. आपल्या भुमिकेला धर्माची भूमिका सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान वापरतो. अर्जुन वास्तव स्विकारतो. या स्थितिला समाजात धर्मसंकट संबोधले आहे. अर्जुन "धर्मसंमुढचेता" हा शब्द वापरतो.

अधर्माचे भय (नरकवास) व अपकिर्तिचे भय (स्वार्थी, लोभी!) या अर्थाने धर्म व किर्ति या संदर्भात अर्जुनाचा भ्रम असतो. व्यक्तिगत पातळीवर गुणविकास या संदर्भात चांगलेपणा, मोठेपणा या शब्दांचा वापर सामान्यतः लोक करीत असतात. समाज चांगला असावा ही सर्वांची इच्छा असते. चांगलेपणा या संदर्भात समाजात उपदेश असतात. व्यक्तिगत पातळीवर आपल्याला हितावह कि विरोधी यावरुन चांगले-वाईट असे लेबल लावण्यात येते. किर्ति-अपकिर्ति या संदर्भात चांगले म्हणावे, स्तुती करावी ही इच्छा बनते. धर्म व किर्ति या संदर्भात भगवतगीता याच चांगलेपणावर निश्चित भाष्य करते.

याच संदर्भात दैवीगुणसंपत्ति vs असुरगुणसंपत्ति हा विषय येतो. असुरगुणवृद्धि करणाऱ्या तमोद्वाराची ओळख भगवतगीता देते. या तमोद्वारापासुन(काम, क्रोध, लोभ) सावध राहण्याचा इशारा देते. व विकासाला पोषक दैवीगुणसंपत्तिची ओळख देते. व दैवीसंपत्तिवृद्धि होण्याचे शास्त्र (निष्काम कर्म) सांगते.

एतैः विमुक्तः कौंतेय तमोद्वारैः त्रिभिः नरः।
आचरति आत्मनः श्रेयः ततो याति परां गतिम् ॥(१६-२२)

*चांगलेपणा vs. निर्भयता

दैवीगुणसंपत्तित "अभय" हा प्रथम शब्द आलेला आहे. व शेवटचा शब्द "न अतिमानिता" अर्थात नम्रता आहे. इतरांसाठी नम्रता सर्वांनाच आवडते. पण स्वतःसाठी "अभय"( निर्भयता, साहस, आत्मविश्वास, विचलित न होणे) हा गुण दुर्लक्षित होतो, ज्याला भगवतगीतेने Priority दिली आहे. याच गुणाच्या वृद्धिसाठी योग(दुःखान्त), स्थितप्रज्ञ या शब्दांचे प्रयोजन आहे.

१. निर्भयता

(स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।२-४०)

कार्याचा एक निश्चय करुन समत्वयोग साध्य करणे यासाठी निष्काम कार्य.

२. विचलित न होणे

(स शांतिं आप्नोति नैष्ठिकीम्।५-१२)

आपुर्यमाणम् अचल प्रतिष्ठम्

समुद्रम् आपः प्रविश्यन्ति यद्वत् ।(२-७०)

अर्थात समुद्राला नद्या मिळतात पण समुद्र विचलित होत नाही.

तद्वत् कामायं प्रविश्यन्ति सर्वे स शांतिं आप्नोति नैष्ठिकिम् ।(२-७०)

याचप्रमाणे इच्छानिर्मित विकार विचलित करीत नाही.

विचलित न होणे याच शक्तिसाठी साधना, समत्वयोगाने कार्य असते.

यं लब्ध्वा च अपरं लाभं मन्यते न अधिक अंततः।

यस्मिन् स्थिता न दुःखेण गुरुणाअपि विचाल्यते॥(६-२२)

तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योगसंज्ञितम्।(६-२३)

३. आत्मवश अवस्था

(आत्मवश्यैः विधेयात्मा प्रसादम् अधिगच्छति।२-६४)

चिंता, भय मनोवश अवस्थेमध्ये असते. प्रसन्न मनाचे हरण होते. (हरन्ति प्रसभं मनः) . म्हणुन आत्मवश अवस्थेचे महत्व आहे. इंद्रियाणि इंद्रियार्थेभ्यः तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।(२-६८)

सार :

"सुखासाठी प्राप्ति व प्राप्तिसाठी कर्म " ही सुखाची, कर्माची ओळख मनुष्याला असते. पण मानसिक शक्ति (आत्मविश्वास, निर्भयता, साहस) दुर्लक्षित होते. याच संदर्भात स्वामी विवेकानंदांनी भय पापाचे मुळ आहे असे म्हटले होते. व साहस, निर्भयता, जीवनाचा लढा याची ओळख करुन देण्यासाठी मिल्टनच्या "Paradise Lost" मधील सैतानाचे उदाहरण दिले. कारण याच शक्तिच्या अभावी समाजात चांगलेपणा बदनाम होतो. निष्प्रभ होतो.

याचमुळे अर्जुन विचारतो, आमचा चांगलेपणा व्यर्थ जाईल काय?ज्याचे सविस्तर उत्तर भगवतगीता देते (अध्याय ६-४०ते४५)

न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात् गच्छति।(६-४०)

"We don't develop courage by being happy every day. We develop it by surviving difficult times and

challenging adversity. The eagle has no fear of adversity. We need to be like the eagle and have a fearless spirit of a conqueror!"

Barbara De Angelis

******

(१६-२३)

*************************

यः शास्त्रविधिम् उत्सृज्य वर्तते कामकारतः।

न स सिद्धिम् अवाप्नोति न सुखं न परां गतिम् ।

*************************

(१६-२३) :

" यः शास्त्रविधिम् उत्सृज्य वर्तते कामकारतः"

(सुखी जीवनाचे शास्त्र)

भगवतगीतेतील शास्त्राचा आधार Attachment vs. Detachment अर्थात शाश्वताशी attach असणे व अशाश्वताशी Detach होणे हा आहे. यामुळे जीवनयात्रा आत्मोन्नति (अमृतत्वाय कल्पते) या मार्गावर असते. आत्मोन्नति या संदर्भात प्रकृतिचे तम, रज, सत गुण व शाश्वत गुणातीत याप्रमाणे विकास अभिप्रेत असतो.

या शास्त्रात कर्म साधन आहे. नित्य सत्वगुणात असणे म्हणजे चंचलत्व मुक्ति(द्वन्द्वमुक्ति) अर्थात कार्याचा एकनिश्चय असणे व

निष्काम कर्म अर्थात निष्ठेने कार्यरत असणे. नित्य ईश्वराचा(शाश्वत) आश्रय म्हणजे ईश्वराशी जोडलेले असणे. बुद्धियोग . यामुळे जीवनयात्रा "अमृतत्वाय कल्पते" या मार्गावर असते.

आचरति आत्मनः श्रेयः ततो याति परां गतिम् ।
यः शास्त्रविधिम् उत्सृज्य वर्तते कामकारतः।
न स सिद्धिम् अवाप्नोति न सुखं न परां गतिम् ।(१६-२३)

व्यवहार व आत्मोन्नति यांचा समन्वय साधणारे जीवनविकासाचे मुळ शास्त्र जगातील धर्माचा आधार असतो. याळ मुळ शास्त्राचे ज्ञान भगवदगीतेचे ज्ञान आहे. व्यवहारात मनुष्य सुखासाठी परिणामातील यश-अपयश याला महत्व देतो. तर या लोकी कीर्ति( व चांगली गति ) साठी चांगलेपणा अर्थात चांगले-वाईट कार्य याला महत्व देतो. भगवदगीतेतील शास्त्र व्यवहारातील सुख, नैष्कर्मसिद्धि (शाश्वत सुख), चांगली गति(परां गति) हे तिन्ही साध्य करते.

या मार्गावर ईश्वरभक्ति संदर्भात,

१. मत्कर्म परमो भव

जे कार्य करतो ते ईश्वराला समर्पित करणे . यासाठी नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करुन निश्चय करणे . यामुळे नैष्कर्मसिद्धि प्राप्त होते.

२. योगः कर्मसु कौशलम्

जे साध्य करायचे त्याचे ध्येय ठरविणे. स्वतःचा निर्णयअधिकार जाणणे. कार्याचा एकनिश्चय करणे व फल ईश्वराला समर्पित करणे . (निष्काम कर्म). यामुळे समत्वयोग साध्य होतो.

सिद्धिअसिध्योः समौ भूत्वा समत्वंयोग उच्यते।(२-४८)

सार:

मनुष्याची जीवनयात्रा सुखासाठी असली तरी जीवनात संपुर्ण समाधानाचे साफल्य अनुभवणे महत्वाचे असते ज्यामुळे निश्चितपणे सुख अनुभवतो. प्रसन्न असतो. हेच साफल्य अनुभवण्यासाठी भगवदगीता निश्चित शास्त्र सांगत आहे. जीवनातील सुखाचा संबंध मानसिक आरोग्याशी, क्षमतेशी असतो. दुःखामुळे विचलित होतो, अशांति असते. म्हणुन शास्त्राला प्रमाण करुन कर्म करणे हा संदेश भगवदगीता देते. ज्ञात्वा शास्त्र विधान उक्तं कर्म कर्तुम् इह अर्हसि।(१६-२४)

"Happiness cannot be traveled to, owned, earned, worn or consumed. Happiness is the spiritual experience of living every minute with love, grace, and gratitude. "

Denis Waitley

********

(१६-२३) :

"न स सिद्धिम् अवाप्नोति न सुखं न परां गतिम् "

( अर्जुनाची नकारात्मक भूमिका)

युद्धक्षेत्रावर अर्जुन दुःखाने पिडित होतो. व युद्ध करणार नाही ही भूमिका घेतो. अर्जुनाची नकारात्मक भूमिका " न" Verses मधुन स्पष्ट होते.

१. (सुखदुःख परिणाम /State of mind)

न च शक्नोमि अवस्थातुं भ्रमतीव च मे मनः।(१. ३०)

मी नीट उभाही राहु शकत नाही. मला भ्रमिष्टासारखे जाणवत आहे.

२. (Right -Wrong /Cause of doubt)

न च श्रेयो अनुपश्यामि हत्वा स्वजनम् आहवे।(१-३१) स्वजनांना मारणे अयोग्य वाटते.

३. (Want, The need )

न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च।(१-३२)

आमची विजयाची कामना नाही किंंवा सुखासाठी राज्यही नको.

४. (धर्म)

न च एतद् विद्मः कतरत् नो गरियो

यद् वा जयेम् यदि वा नो जयेयुः।(२-६)

धर्मासाठी कुणाचे जिंकणे योग्य!हे कळेनासे झाले आहे.

५. (शोकमुक्ति Priority)

न हि प्रपश्यामि मम् अपनुद्यात्

यत् शोकं उच्छोषणम् इंद्रियाणाम् ।(२-८)

आमचे जिंकणे जर श्रेयस्कर असेल तर पृथ्विचे राज्यच काय तर देवाचे राज्य जरी मिळाले, तरी हे राज्य माझ्या सर्व इंद्रियांना घायाळ करीत असलेला शोक नष्ट कसा करणार?हे मला कळत नाही.

६. (अर्जुनाचा निर्णय)
न योत्स्य इति गोविंदम् उक्त्वा तूष्णीं बभूव ह।(२-९)
मी युद्ध करणार नाही. अर्थात अर्जुनाची Priority दुःखमुक्ति असते.

सुखदुःखानुसार मनुष्याची इच्छा असते. याच इच्छेला विस्ताराने स्पष्ट करतो. यात कार्याच्या परिणामाचा समावेश असतो. अर्थात कार्याची ही सकाम मानसिकता असते. कार्याच्या निश्चयावर (Determination) याचा परिणाम होतो. याच पार्श्वभुमिवर निष्काम कर्माचे महत्व (Detachment) भगवदगीता स्पष्ट करते.

*Self/स्वतःचे अस्तित्व (अशाश्वत vs. शाश्वत):

अहंकाराचा आश्रय :

मनुष्य स्वतःचे अस्तित्व दर्शविण्यासाठी (स्वतःला योग्य ठरविण्यासाठी) अहंकाराचा आश्रय करतो. हाच अहंकार नकळत मनुष्याच्या विकासाचा Barrier बनतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्याच्या दुराग्रहामुळे वास्तव स्विकारण्याच्या किंवा ऐकण्याच्या मनःस्थितित नसतो.

("अहंकारम् विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।" -पण येथे अर्जुनाला श्रीकृष्णाची सोबत होती. व श्रीकृष्ण त्याला वास्तव स्विकारण्यास भाग पाडतात. )

अर्जुन वास्तव स्विकारतो. निश्चित प्रश्न करतो. याच प्रश्नाच्या उत्तरात भगवदगीता सुरु होते.

"The ego is not master in its own house. "

-Sigmund Freud

अहंकाराचा आश्रय Vs. ईश्वराचा आश्रय:

ईश्वराचा आश्रय अहंकाराच्या आश्रयाला Replace करते. (अशाश्वताचे शाश्वताद्वारा Replacement). ईश्वराचा आश्रय

म्हणजे १. बुद्धियोग, २. कार्याचा एकनिश्चय ३. कार्याद्वारे भक्ति (फलसमर्पण ) म्हणजेच निष्काम कर्म . याला शास्त्र संबोधले आहे.

(यः शास्त्रविधिम् उत्सृज्य वर्तते कामकारतः।)

जे या शास्त्राचा अवलंब न करता सकाम कार्यरत असतात. अर्थात या शास्त्राचा अवलंब न करणे यामुळेच तणाव असतो. दुःखाचे कारण ठरते.

न स सिद्धिम् अवाप्नोति न सुखं न परां गतिम् ।(१६-२३)

**********

(१६-२४)

**************************

तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्य अकार्य व्यवस्थितौ।

ज्ञात्वा शास्त्रं विधान उक्तं कर्म कर्तुम् इह अर्हसि॥

**************************

(१६-२४)१ :

"तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्य अकार्य व्यवस्थितौ"

दैवीअसुर संपद् विभागयोग या अध्यायात शास्त्र, कार्य हे शब्द आले आहेत. शास्त्र निष्काम कर्म या संदर्भात, तर कार्य कर्तव्य या संदर्भात आलेला आहे.

तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्य अकार्य व्यवस्थितौ।

ज्ञात्वा शास्त्रं विधान उक्तं कर्म कर्तुम् इह अर्हसि॥(१६-२४)

कार्य-कर्तृत्व या संदर्भात श्रीकृष्ण म्हणतात,

तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर।(३-१९)

शहाण्याने स्वतः कर्म करुन सामान्यांसमोर कार्याचा आदर्श ठेवावा.

"न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।
जोशयेत् सर्वकर्माणि विद्वान युक्तः समाचरन्।।"(३-२६)

मला मिळविण्यालायक कांहिही नाही, तरी कर्म करतो.

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन।
न अनव्याप्तं अव्याप्तं वर्तैव च कर्मणि।।(३-२२)

ज्या कार्याची जगाला गरज आहे, मनुष्याला गरज आहे, ते कर्तव्य म्हणुन स्विकारणे.

संपत्ति(श्रीमंत)असेल तर कार्य करण्याची काय गरज असा समाजात(अज्ञानामुळे) समज असतो. चार्ली चाप्लिन म्हणतो, मी गरिब असतांना मला वाटायचे कि, श्रीमंतांना दुःख नसते. पण श्रीमंत झाल्यावर कळले कि श्रीमंतांनाही दुःख असतात. याचमुळे कार्याविषयी, सुखदुःखाविषयी चुकीचे Perception असते.

"गरिब खावे भुंगडा तो भुका मरो खावे, अमिर खावे तो शौकसु"

"Many persons have a wrong idea of what constitutes true happiness. It is not attained through self-gratification but through fidelity to a worthy purpose. "

Helen Keller

कार्यकारण कर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतु उच्यते।।(१३-२१)
प्रकृतिमुळे कार्य घडते, तर मनुष्य(त्याची अंतरात्मा) सुखदुःख अनुभव करतो.

दैवी-असुर संपत्ति यांतिल असुर गुण या संदर्भात संपत्ति म्हणजे कार्यातील उपलब्धि(फल) याला महत्व देतो. म्हणुन याचे कर्म सकाम असते. या कर्माची Reaction चिंता, काम, क्रोध, लोभ अशी असते. तर दैवी गुणाची संपत्ति या संदर्भात निर्भयता, चांगलेपणा, पावित्र्य, इ. Devine गुणाला महत्व असते. कर्माद्वारे निर्भय होणे यांत कर्मातील उपलब्धि योग असते. निष्काम कर्माचे हेच रहस्य आहे.

कार्य(Goodwork)-कर्तव्य, व कर्म-क्रिया यांतिल असा सुक्ष्म भेद जाणणे. सुखदुःख, कर्मातील उपलब्धि योग जाणुन निष्काम कर्माचे शास्त्र जाणणे. यासाठीच दैवी व असुर गुण याला(संपत्ति) संपद् विभागयोग म्हटले आहे. दैवी संपत्ति शाश्वत(Non-violent) आहे तर असुर संपत्ति अशाश्वत(Violent) आहे. दैवीचा मार्ग स्वातंत्र्याचा असतो, तर असुर मार्ग बंधनाचा. म्हणुन अर्जुनाला म्हटले, तुं Trap होण्यासाठी नव्हे तर स्वातंत्र्यासाठी(मोक्ष) जन्माला आलेला आहे. "निर्भय हो"

दैवी संपद् विमोक्षाय निबंधाय आसुरी मता।
मा शुचः संपदम् दैवीं अभिजातो असि पांडव।।(१६-५)

*******०

(१६-२४)/२:
"ज्ञात्वा शास्त्रं विधान उक्तं कर्म कर्तुम् इह अर्हसि"

भगवतगीतेत दैवी-असुर संपत्ति योगात कर्म संदर्भात "शास्त्र" शब्द आलेला आहे. दैवी संपत्तिसाठी निष्काम कर्माचे शास्त्र या अर्थाने हा शब्द आहे. मनुष्य पैसा मिळवितो, संचित करतो, ही संचित संपत्ति बनते. तसेच मनुष्याचा व्यक्तिमत्व गुणधर्म(Personality trait) या संदर्भात दैवी-असुर संपत्ति म्हटले आहे. जगण्यातुन ही संपत्ति संचित होते. दैवी संपत्ति संचितीसाठी कार्याद्वारा ईश्वरभक्ति व्हावी यासाठी निष्काम कार्य शास्त्र सांगितले आहे.

भगवतगीता कुरु(कार्य)क्षेत्रावर सांगण्यात आली म्हणुन कार्याचा ईश्वरभक्तिशी संबंध या विषयाला भगवतगीता highlight करते. व्यवहारात सुखासाठी प्राप्ति व प्राप्तिसाठी कर्म जाणतो. नियतकार्य प्रत्यक्ष करण्यापुर्वी विचलित झाला असता अर्जुन हीच भाषा(कार्य प्राप्तिसाठी) वापरतो. व निष्क्रियतेचे समर्थन करतो. दुःखाचे भय निष्क्रियतेचे कारण असते.

आपण कोणते चांगले कार्य करु शकतो या संदर्भात सहजकार्य, स्वभावनियत कार्य (जे आवडीचे कार्य बनते) आपण जाणतो. याचसाठी कार्याचे प्रशिक्षण हा विकासमार्गाचा एक भाग असतो, तर मनाचे प्रशिक्षण हा दुसरा महत्वाचा भाग असतो, यावर भगवतगीतेने प्रकाश टाकला आहे.

मनाचे प्रशिक्षण या अंतर्गत Feel-Emotion(भावना) - Trait(गुणधर्म) या संदर्भात सुखदुःख Feel असते, तर बुद्धिची स्थिरता(विचलित न होणे) Trait असतो. अशांति सुखाचा अभाव दर्शविते. अर्जुन अशांत झाला व शांति मिळावी म्हणुन निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी धर्मज्ञान हे साधन वापरतो, अर्थात शब्दानेच समाधान घेण्याचा प्रयत्न करतो. म्हणुन शांतीची व्याख्या "Trait"या संदर्भात समुद्राची उपमा (नद्या मिळाल्या तरी खवळत नाही)देऊन स्पष्ट केली आहे. म्हणुन वर्तमानात "शांति"साठी संस्कार या संदर्भात ईश्वरभक्ति घडण्यासाठी बुद्धियोग प्रावधान आहे, ज्यामुळे विचलित होत होत नाही व अमृतंगमय मार्गावर असतो.

दैवी-असुर संपत्तियोगात प्रथम व शेवटचे verse महत्वाचे आहे.
अभयं सत्वसंशुद्धिः ज्ञानयोगव्यवस्थितिः।(१६-१)
तर
ज्ञात्वा शास्त्रं विधान उक्तं कर्म कर्तुम् इह अर्हसि।(१६-२४)
या verseने समाप्ति होते. अर्थात निर्भयता हा महत्वाचा Personality Trait असतो.

अर्जुनासाठी दुःखाचे भय कार्याच्या परिणामातील भय असते. हा संशय मिटविण्यासाठी ज्ञानाची गरज या अनुषंगाने बुद्धियोग आश्रय सांगितला. कार्याचा दृढनिश्चय करुन योगार्थ कार्य अर्थात निष्काम कार्य करणे हाच कार्याद्वारे ईश्वरभक्तिचा संदेश आहे.
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

याप्रमाणे सक्षम Personality Trait धारण होण्यासाठी वर्तमानातील संस्कार, नित्य ईश्वराचा आश्रय व भक्ति यांचा समन्वय निष्काम कर्म या शास्त्राद्वारे भगवतगीतेने साध्य केलेला आहे.

# भगवदगीता

## अध्याय १७. श्रद्धात्रय विभागयोग

## अध्याय १७. श्रद्धात्रय विभागयोग

या सृष्टित जड व चेतन, क्षर व अक्षर, अशाश्वत व शाश्वत, असे दोन तत्व आहेत. या संदर्भात अध्याय १३ मध्ये क्षेत्र(Field of activity)-क्षेत्रज्ञ (Consciousness) हे (मनोवैज्ञानिक)ज्ञान स्पष्ट झाले. अध्याय १४ मध्ये प्रकृतिचे सत, रज, तम असे तीन गुण व त्यांची मनोवैज्ञानिक भूमिका स्पष्ठ झाली. गुणातीत होणे अंतिम साध्य आहे, हे साध्य करण्यासाठी ज्या धर्माचा उपयोग होतो, त्याला अमृताचा धर्म, शाश्वताचा धर्म म्हटले. हेच अंतिम साध्य सृष्टिचे मुळ पद, धाम आहे. ज्या मुळतत्वापासुन प्रकृति निर्माण झाली, त्याची पुरुषोत्तम अशी ओळख दिली. त्याचा अंश हृदी असतो. याचाच अर्थ मनुष्याची जीवनयात्रा मुळ पदाकडे प्रवाहीत होण्यासाठी मनुष्यजन्म आहे. हाच विकासशास्त्राचा पाया ठरतो. यामुळे दृष्टिबदल होतो. हा प्रत्यक्ष मानसिक बदलाव असतो.

चांगलेपणा मनुष्याची दैवी संपत्ति असते. अध्याय १६ मधुन चांगलेपणाला पुर्णत्व देण्यासाठी फलत्याग शास्त्र सांगितले. (अभय)निर्भयतेविणा चांगलेपण अपुर्ण असते. यात निवडीसाठी फलत्याग हे एकच Option असते. अन्यथा सकाम असतोच. यामुळेच भय असते. यानंतरच्या प्रश्नात उत्तरासाठी एकच

Option आलेले आहे. व त्यांत सत व असत यांत भेद स्पष्ट झाला आहे. हाच प्रश्न या अध्यायात आलेला आहे.

प्रश्न :

समाजात अनेक लोक धार्मिक असतात. ईश्वरभक्ति करतात. त्यांची ओळख सहसा सात्विक अशी केली जाते. फलत्याग/निष्काम या शास्राचे महत्व ऐकल्यानंतर अर्जुन प्रश्न करतो, निष्काम शास्राला विसरुन ईश्वराला श्रद्धेने भजणारे कोण समजावेत, सत, रज कि तम? या प्रश्नाचे उत्तर सत-असत असे आलेले आहे. याच अनुषंगाने हा विषय दोन भागात येथे विभागला.

१. श्रद्धा व शास्त्र

२. सत व असत

१७. १ श्रद्धा व शास्त्र

श्रद्धा: सत, रज, तम या प्रकृतिगुणानुसार श्रद्धा असतातच. यांत देवांवर श्रद्धा असणारे व भजणारे ही सत श्रद्धा असते. हीच श्रद्धा जीवनविकासासाठी Strength ठरते.

शास्र : स्वतः चांगले जगा व इतरांनाही चांगले जगु द्या (जगा आणि जगु द्या )यासाठी शास्र असते. पण ज्याचे जगणे

दुसऱ्याला(जन) त्रासदायी होते, स्वतःच्या शरीरमनालाही दुखवतो. तो दंभ, अहंकार, काम, आसक्ति, बल याच्या आश्रयाने आत्माही दुखवत असतो. म्हणुन अशी वागणुक शास्त्राविरुद्ध ठरते. पशुवत ठरते. अर्जुनाला आपल्या नियतकार्यामुळे (स्व)जनमानस दुःखी होईल, या विचाराने स्वतः दुःखी होतो. अशांत होतो. म्हणुन हा Tie सोडविण्यासाठी (फलत्याग)शास्त्र सांगितले.

१७. २. सत व असत

यांत दोन भाग आहेत.

अ)

शरीर, मन व त्याची activity यांत सतगुणवृद्धि व्हावी अर्थात निरोगी व प्रसन्न जीवनासाठी

आहार, यज्ञ(कर्म), दान, तप(शारिरिक, वाचा, मन )

अ◌ाहार

यज्ञ:कर्म या संदर्भात समर्पण भावाने केलेले कार्य यास यज्ञ संबोधले आहे.

तप(शीरिरिक, वाचिक व मानसिक)

दान

(ब)ॐतत् सत् यांतील सत हा जगतकल्याणभाव

(अ)

आहार -आयु, सत्व, बल, आरोग्य, सुख, प्रेम वृद्धिगत करणारे , मनाला प्रसन्नता देणारे स्निग्ध, पौष्टिक अन्न.

यज्ञ(कर्म)-कार्याची विधि(process) जाणुन विधिपुर्वक, यज्ञभावनेने(हवन-समर्पण) कर्म करुन फलत्याग करतो.

शारिरिक तप-चांगले आचरण या संदर्भात ईश्वरभक्ति, आचार्य, विद्वत् जन जे मानव, जगतकल्याणहेतु कार्यरत असतात ते पुजनिय जाणुन आदर करणे. पावित्र्य, अहिंसा(चांगलेपणाचे मुळ)

वाचिक तप (भाष्य)- इतरांच्या हितावह, उद्वेग न होता, प्रिय भाष्य, स्वविकासाचे ज्ञान अर्थात सकारात्मक, कल्याणार्थ सार्थ भाष्य

मानसिक तप -प्रसन्न व, शांत व समाधानी मन, संयमी, मौनव्रति, शुद्ध कल्याणभाव

दान-जगत, समाज, मानवकल्याणार्थ समाजाला मदत करणे हे कर्तव्य जाणुन तसेच स्थलकालपात्र जाणुन दान करणे.

ब)ॐतत् सत् यांतील सत हा जगतकल्याणभाव

ॐतत् सत् या तिन शब्दानुसार जगतकल्याणार्थ भाव (Positive Energy) व्यक्त होतो. ब्रह्मवादी ॐ शब्दाने आरंभ करुन यज्ञदानतप सातत्याने आचरतात. तर मोक्षाकांक्षि तत् या शब्दाद्वारा फलत्याग करुन यज्ञदानतप क्रियाप्रित्यर्थ कर्म करतात. कल्याणभाव, शुद्धभाव सत आहे तर त्यासाठी केलेले कर्म सत्कार्य(Goodwork)ठरते. वर्तमानातील यज्ञभावाने होत असलेले कर्म, (शरीर, भाष्य, मन)तप, दान यांतील वर्तमान स्थिति सत असते व त्याप्रित्यर्थ होत असलेले कर्म सत्कार्य(Goodwork)ठरते.

अर्जुनाचा प्रश्न श्रद्धा व शास्त्र या संदर्भात होता. कर्मे शास्त्रविरहीत किंवा श्रद्धाविरहीत दोन्ही असत अर्थात अर्थहिन ठरतात. म्हणुन सकारात्मक जीवनयात्रेसाठी शास्त्र व श्रद्धा यांचा समन्वय साधणे आवश्यक आहे. अर्थात संस्कार, गुणात्मक शिक्षण, सकारात्मक जीवन यासंदर्भात हा अध्याय महत्वाचा ठरतो. व याप्रमाणे मनुष्याच्या चांगलेपणाला पुर्णत्व प्राप्त होते. मनुष्य सत ठरतो.

अध्याय १७- मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

(१७. १)/१:

"ये शास्त्रविधिम् उत्सृज्य यजन्ते श्रद्धया अन्विताः"

१७. १/२:

"तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वं आहो रजःतमः"

(१७-३)/१ :

" सत्वअनुरुपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत"

(श्रद्धा vs शास्त्र)

(१७-३)/२ :

" सत्त्वअनुरुपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत "

(सत-सत्त्व-सात्त्विक)

१७. १५/१: "अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् "

(१७-१५)/२ :

"स्वाध्याय अभ्यसनं चैव वाङमयं तप उच्यते"

(वाणीचे संस्कार)

(१७-१६) :

"मनःप्रसादः सौम्यत्वं मौनम् आत्मविनिग्रहः"

(Training of mind मनाला संस्कारीत करणे )

(१७-१७)/१: "श्रद्धया परया तप्तं तपः तत् त्रिविधं नरैः"

(Harmony :काया-वाचा-मन)

१७-१७/२:

"अफलाकाङ्क्षिभिःयुक्ते सात्त्विकं परिचक्षते"

(तप, Art of living)

(१७-२०)/१:

"दातव्यम् इति यत् दानम् दीयते अनुपकारिणे"

(याचक Liability vs. Asset दाता)

(१७-२०)/२: "देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् "

(सत्कार्यासाठी दान)

(१७-२१) :

"दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम्"

(व्यवहार vs आदर्श पारदर्शकता)

१७. २३ :"ॐ तत् सत् "

(१७-२५)/१ :

"तत् इति अनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः"

(निष्काम कर्म)

(१७-२५)/२: "क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः"

(Path of freedom, स्वतःचा मार्ग)

(१७. २६)/१:

"सत् भावे साधुभावे च सत् इति एतद् प्रयुज्यते"

(१७-२६)/२ :

"प्रशस्ते कर्मणि तथा सत् शब्दः पार्थ युज्यते"

(चांगलेपणा आणि मानसिक शक्ति)

१७. २७:

"कर्म चैव तद् अर्थियं सत् इतिएव अभिधीयते"

(१७-२८)/१:

"अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत् "

( Importance of Devotion & bravery)

१७-२८/२:

"असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह"

(Lack of Purpose loyalty)

******

(१७-१)

*************************

ये शास्त्रविधिम् उत्सृज्य यजन्ते श्रद्धया अन्विताः।

तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वम् आहो रजःतम॥

*************************

(१७. १)/१:

"ये शास्त्रविधिम् उत्सृज्य यजन्ते श्रद्धया अन्विताः"

मनुष्य विकासमार्गावर (आवश्यक कार्यासाठी) निष्क्रिय झाला तरी स्वतःला योग्य समजुन समर्थन करतो. व जे कांही विकास संदर्भात ऐकले असते, त्या ऐकीव ज्ञानाचा समर्थनासाठी वापर करतो. ही मनुष्याची अशी संवय असते कि त्याला स्वतःलाच आपले अज्ञान कळत नाही. भगवतगीता याच संवयीला प्रकाशात आणते.

अर्जुन स्वतःच्या बुद्धिनुसार युद्ध न करणे योग्य समजतो. पण युद्ध करणे योग्य आहे असे श्रीकृष्ण सांगतात, तेंव्हा काय योग्य आहे व कां आहे याचे निश्चित ज्ञान अर्जुनाला जाणुन घ्यायचे असते. याच

मंथनात निष्काम कार्याचे शास्त्र ऐकतो, ईश्वरभक्तिचे महत्व ऐकतो. तेंव्हा अर्जुन एक प्रश्न करतो, श्रद्धेने ईश्वराची भक्ति करणारे जर निष्काम कार्याचे शास्त्र आचरत नसले तर त्यांची निष्ठा सत, रज किंवा तम काय समजायची?

ये शास्त्रविधिम् उत्सृज्य यजन्ते श्रद्धया अन्विताः।
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वम् आहो रजःतम।।(१७-१)

आपल्या जगण्याचे समुह-सृष्टि याला सहकार्य होणे वा अडथळा होणे या संदर्भात दैवी व असुर गुणसंपत्ति विभाग भगवतगीता स्पष्ट करते. समुहात एकदुसऱ्याला सहकार्य केले तर शक्ति बनते, याउलट चुका काढुन एकदुसऱ्याला challange केले तर अडथळा बनतो. म्हणुन समुहात असतांना स्वतःचा विकास व समुहाला सहकार्य, सृष्टिला सहकार्य यासाठी यज्ञ (समर्पित, निष्काम कार्य), दान(opposite of beggar), तप(मन, काया, वाचा यांचे सक्षम व निरोगी आचरण) या कर्माचे प्रयोजन भगवतगीता स्पष्ट करते. या कर्माद्वारे विकासमार्गावर असतो.

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत्।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम्।(१८-५)

"ॐतत् सत् " हा संदेश सृष्टि व त्यातील घटक विकासासाठी, कल्याणासाठी गतिमान आहेत हा संदेश देते. सत म्हणजे चांगले व विकासाची गतिमान स्थिती, त्याप्रित्यर्थ (यज्ञ, दान, तप) कर्म करणे असते. या कर्माद्वारा श्रद्धेने विकासमार्गावर असणे तो सतमार्ग. या कर्मात श्रद्धेचा अभाव असणे, तो असतमार्ग !

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत्।

असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह॥(१७-२८)

******

(१७. १)/२:

"तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वं आहो रजःतमः"

समाजात सात्विक, चांगले, स्वार्थि, लोभी, वाईट अशी अनेकप्रकारे लोक वर्गवारी करीत असतात. समाजात अशी वर्गवारी( Labeling) होत असली तरी मनुष्याला स्वतःला स्वतःच्या भूमिकेची पारदर्शकता आवश्यक असते. (किर्ति या संदर्भात) चांगला असलेल्या अर्जुनालाही संशयाने ग्रासले होते. यातुनच स्वतःसाठी (अर्जुनासाठी ) योग्य भूमिका कोणती ? हा प्रश्न निर्माण झाला. व या वर्गवारीचा निवाडा भगवतगीतेने

मनुष्याची जगण्याची सत किंवा असत निष्ठा याद्वारे स्पष्ठ केला आहे..

चांगलेपणा दैवी गुण दर्शवीत असतो. चांगल्या मनुष्याचा (संशयी न होता ) स्वतःवर विश्वास असणे आवश्यक असते. स्वतःवर विश्वास असेल तरच कार्याचा मार्ग दृढ असतो. निर्भयता, धैर्य, शांति या गुणाची वृद्धि निष्काम कर्मातुन होत असते म्हणुन निष्काम कर्म शास्त्र आचरण आवश्यक ठरविले आहे. यावर अर्जुन प्रश्न करतो,

समाजात ईश्वराची भक्ति करणारे सात्विक समजल्या जातात. जे श्रद्धेने ईश्वराची भक्ति करतात पण व्यवहारात कर्माचे निष्काम शास्त्र आचरण करीत नाही. त्यांची निष्ठा(सात्विक, राजस कि तामस) कोणती जाणावी?

ये शात्रविधिम् उत्सृज्य यजन्ते श्रद्धया अन्विताः

तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वं आहो रजःतमः।।(१७-१)

या प्रश्नाचे उत्तर सत-असत निष्ठा असे दिलेले आहे. अर्थात लोक काय म्हणतात? हा स्वतःमध्ये संशय निर्माण करणारा प्रश्न असतो. व स्वतःची जीवन जगण्याची सत निष्ठा हे त्याचे उत्तर असते. यामुळेच स्वतःवर प्रचंड विश्वास असतो.

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत् ।

असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह।।(१७-२८)

सृष्टित कर्म घडतात. सृष्टिचक्रप्रवर्तनात कर्म यज्ञकार्य असते. मनुष्याने (सृष्टिचक्रातील) यज्ञ, दान, तप (आचरण, भाष्य, मानसिकता) हे त्रिविध कार्य ईश्वरभक्ति या निष्ठेने आचरण केले असता निष्काम निष्ठेने करतो. ही सतनिष्ठा असते.

मनुष्य ईश्वरभक्ति करतो पण कर्माचे निष्काम शास्त्र आचरण करीत नाही अर्थात कर्म (यज्ञ, दान, तप) निष्ठापुर्वक करीत नाही यामुळे ही निष्ठा असत ठरते. म्हणुन भगवतगीता कार्याद्वारे ईश्वरभक्तिलाच महत्व देते.

तत इति अनभिसंधाय फलं यज्ञ तपः क्रियाः।

दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः।।(१७-२५)

अर्थात तत् (ईश्वरकार्य )जाणुन (मोक्षकाङक्षि ) कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य करतो. ज्यामुळे निष्काम कर्म शास्त्र साधल्या जाते.

******

(१७-३)

*************************

सत्वअनुरुपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत।

श्रद्धामयोअयं पुरुषो यो यत् श्रद्धः स एव सः।।

*************************

(१७-३):

" सत्वअनुरुपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत"

(श्रद्धा vs शास्त्र)

भगवतगीता ज्ञानविज्ञानाचा विषय आहे. भगवतगीतेच्या दैवीअसुरसंपत्तिविभागयोग या अध्यायात चांगलेपणाचा (दैवी) संबंध शास्त्राशी जोडलेला आहे. शास्त्राला Laws of Cause & Effect या संदर्भात Scientific आधार असतो. भगवतगीता निष्काम कर्माचे शास्त्र सांगत आहे. चांगल्या मनुष्याने कर्म करतांना याच शास्त्राचा उपयोग करावा. यामुळे चांगलेपणा म्हणजे दुर्बलता किंवा निष्क्रियता नव्हे याची प्रचिति येते.

यावर अर्जुन शास्त्र vs श्रद्धा असा प्रश्न करतो. जो श्रद्धेने ईश्वराला भजतो पण शास्त्राचा उपयोग कर्मासाठी करीत नाही त्याची निष्ठा( सत, रज, तम )कोणती समजावी?(१७-१)

शास्त्राचा आधार Scientific असतो. तर ज्याला Scientific आधार नाही त्याला अंधश्रद्धा म्हणुन समाजाने ओळख दिलेली असते. अर्थात Blind faith या अर्थाने अंधश्रद्धा हा शब्द वापरल्या जातो. भगवतगीतेत अंधश्रद्धा हा शब्द नाही तर अश्रद्धा हा शब्द आलेला आहे.

सत श्रद्धा vs. तम श्रद्धा:
सत्वअनुरुपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत।
श्रद्धामयोअयं पुरुषो यो यत् श्रद्धः स एव सः।।(१७-३)

प्रत्येक मनुष्य श्रद्धावानच असतो. पण या श्रद्धा सत, रज व तम या तीन विभागात मोडतात. यापैकी तामस श्रद्धेलाच अश्रद्ध/श्रद्धाविरहीत असे संबोधन केलेले आहे.
यज्ञ, तप व दान या त्रिविधकर्म संदर्भात अनुक्रमे भाष्य आहे:
श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते।(१७-१३)

परस्य उत्सादनार्थं वा तत्तामसम् उदाहृतम् ।(१७-१९)
असत् कृतम् अवज्ञातं तत्तामसम् उदाहृतम्।(१७-२२)

अर्थात तामस श्रद्धेला शास्त्रिय आधार नसतो. यामुळे असुरसंपत्तिविभागातच जाणावे.
अशास्त्रविहितंघोरं तप्यन्ते ये तपो जनाः।
दम्भअहंकार संयुक्ताः कामरागबलान्विताः।। (१७-५)
कर्षयन्तः शरीरस्थं भूतग्रामं अचेतसः।
मां चैवअन्तः शरीरस्थं तान् विद्धि असुर निश्चयान् ।।(१७-६)

याउलट सात्विक श्रद्धेला शास्त्रिय आधार असतो . "ॐतत् सत् " अर्थात "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च" हा शास्त्रिय आधार सतकर्माला असतो. यांत श्रद्धा व शास्त्र यांचा समन्वय साधलेला आहे. विश्व व मनुष्य यांचा संबंध येथे स्पष्ट होतो. ज्याची या संबंधावर श्रद्धा नाही ते असुरसंपत्तिविभाग या प्रकारात येतात.

असत्यं अप्रतिष्ठम् ते जगत् आहुः अनीश्वरम्।
अपरस्पर संभूतं किम् अन्यत् कामहैतुकम् ।।(१६-८)

याच पार्श्वभूमिवर अश्रद्धेने आचरलेले कर्म असत अर्थात अशांतिचे कारण म्हटलेले आहे.

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत्।
असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह।।(१७-२८)

सार : मनुष्याच्या चांगलेपणाचा संबंध त्याचे विश्वाशी असलेले नाते याचेशी स्पष्ट होतो. याला शास्त्रिय आधार आहे. समाजात श्रद्धा या संदर्भात वाद असतो पण ज्या श्रद्धेला शास्त्राची जोड आहे त्या सात्विक निष्ठेचे (Purpose loyalty) ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते.

"The nightmare of materialism, which has turned the life of the universe into an evil, useless game, is not yet past; it holds the awakening soul still in its grip. "

“The awakening is finally realizing that you are a part of God, like a single cell that finally sees it is a part of you "

-L. J. Vanier

******

(१७-३)/२:

" सत्त्वअनुरुपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत "

(सत-सत्त्व-सात्त्विक)

भगवदगीतेत "सत" हा शब्द प्रकृतिगुण या संदर्भात येतो तेंव्हा सात्त्विक गुण हा अर्थ अभिप्रेत असतो.

"सत्त्व " हा शब्द जीवित प्राणी (Existence, Existed वस्तु) या अर्थाने आलेला आहे. जीवित प्राणी सत, रज, तम या प्रकृतिगुणाने बद्ध असतात.

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः।

सत्त्वं प्रकृतिःजैर्मुक्तं यत्एभिः स्यात् त्रिभिः गुणैः।(१८-४०)

*सत-असत

समाजात सत हा शब्द चांगलेपणा या अर्थाने वापरण्यात येतो.
भगवदगीतेत सत-असत याचे संदर्भ

१. योग्य-अयोग्य

२. शाश्वत(नित्य) - अशाश्वत(अनित्य),

३. जगताचे कार्यकारण(Cause & effect of material world )या संदर्भात सत(cause कारण)-असत (effect कार्य) या अर्थाने आलेले आहेत. सत-असत मार्गाचा हा आधार ठरतो.

न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः।
उभयोःअपि दृष्टो अंतःतु अनयोः तत्त्वदर्शिभिः।।(२-१६)

* सत-असत मार्ग

जे ईश्वरभक्ति श्रद्धेने करतात पण निष्काम कर्माचे शास्त्र आचरण करीत नाही त्यांची निष्ठा सात्त्विक, राजस कि तामस समजावी? हा अर्जुन प्रश्न करतो व या प्रश्नाचे उत्तर सत-असत मार्ग याप्रमाणे देण्यात येते.

जीवित प्राणी ज्या प्रकृतिगुणाच्या Mode मध्ये असतात त्याप्रमाणे त्यांची श्रद्धा असते.

सत्वअनुरुपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत।(१७-३)

जीवनविकासासाठी यज्ञ, दान, तप ही आवश्यक कार्ये आहेत. सृष्टिचक्रप्रवर्तनात स्वभावनियतकार्याने सहकार्य घडण्यासाठी यज्ञ या संज्ञेचे प्रयोजन आहे. समर्पण, त्याग (निष्काम कर्म) हा त्याचा बोध आहे.

शरीरयात्रेसाठी कार्य आवश्यकच असते, पण हेच कार्य यज्ञासाठी आचरण करण्याचा संदेश (निष्काम कर्मासाठी) आहे.

शरीरयात्राअपि च ते न प्रसिद्धेत् अकर्मणः।(३-८)

यज्ञार्थात् कर्मणोअन्यत्र लोकोअयं कर्मबन्धनः।(३-९)

यज्ञ, दान, (काया, वाचा, मन)तप ही त्रिविध कार्ये श्रद्धेने करणे हा सत मार्ग व अश्रद्धेने करणे हा असत मार्ग ठरतो.

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत् ।

असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह।(१७-२८)

सार :

अर्जुनाला व्यवहारातील कार्य करतांनाच "काय योग्य?" याचा निर्णय करण्यास अडथळा जाणवतो. यामुळे दुःख टाळण्यासाठी सरळ कार्य न करणे श्रेयस्कर समजतो. स्वतःला योग्य, चांगला ठरविण्यासाठी धर्माचा दाखला देतो. याच घटनेतुन भगवदगीता ज्ञान जगासमोर आले.

समाजात ईश्वरश्रद्ध लोक श्रद्धेने देवतांच्या माध्यमातुन ईश्वराची भक्ति करीत असतात. व्यवहारात निष्काम कर्माचे शास्त्र आचरण करण्यासाठी (अव्यक्त) ईश्वराचे ज्ञान जाणुन जीवनविकासाचा मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा करणे ही गरज भगवदगीता स्पष्ट करीत आहे. यामुळेच जीवनात ईश्वराचा नित्य आश्रय असतो.
तस्मात सर्वेषु कालेषु माम अनुस्मर युध्य च।(८-७)

********

(१७-१५)

*************************

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।

स्वाध्याय अभ्यसनं चैव वांग्मयं तप उच्यते॥

*************************

(१७. १५):"अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् "

भाष्य communicationचे साधन असते. यामुळे सं ंवाद होतो. इतरांचा उद्वेग न होणारे, सत्य व कल्याणदायी असे सकारात्मक भाष्य "वांग्मय तप "अर्थात उपयुक्त भाष्य असते. संवादात, Motivation साठी अशा भाष्याचे विशेष महत्व असते.

भगवतगीतेत यज्ञ(समर्पण), दान, तप (शारिरीक, वाचिक, मानसिक) कार्य जीवनविकासात आवश्यक समजले आहे. वांग्मय तप यापैकी एक कार्यच असते.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।

स्वाध्याय अभ्यसनं चैव वांग्मयं तप उच्यते॥(१७-१५)

उद्वेगजनक भाष्य, वास्तव Hide करण्यासाठी, स्वार्थसिद्धिसाठी वापरलेले भाष्य, इतरांचे अहित करणारे (नकारात्मक)भाष्य तामस वांग्मय तप ठरतो. असे भाष्य Monologue (जलपा, वितंड)असते, संवाद(Dialogue) नसतो.

"Everything begins with dialogue. Dialogue is the initial step in the creation of value. Dialogue is the starting point and unifying force in all human relationships. "

Daisaku Ikeda

भाष्य मनुष्याची ओळख देते. मनुष्य आपल्या अशांतीला भाष्याद्वारे वाट करुन देतो. म्हणुन समर्थन-टिका भाष्य वापरतो. अर्जुनाचे विषाद अवस्थेतील भाष्य समर्थनासाठी असते, पण या भाष्याला "ज्ञान" दर्शवतो. म्हणुन ज्ञान म्हणजे काय ?हाच विषय प्रथम पटलावर येतो. ज्ञान, ज्ञानी अवस्था याचा परिचय भगवतगीता देते व जीवनांत भाष्य व ज्ञान यांचा संबंध कळतो.

संवादात Responding असते, Monologue मध्ये Reaction असते. संवादात Reasoning असते . प्रश्न विचारण्याचा अधिकार असतो. अर्जुनाचा Monologue (जलपा) संवादात परिवर्तित करणे हे श्रीकृष्णासमोर आव्हानच होते. जेंव्हा अर्जुन वास्तव स्विकारतो व ऐकण्यास तयार होतो, तेंव्हा म्हणुनच श्रीकृष्ण प्रसन्न होतात.

तम उवाच हृषिकेशो प्रहसन्निव भारत।

******

१७-१५ :

"स्वाध्याय अभ्यसनं चैव वाङमयं तप उच्यते"

(वाणीचे संस्कार)

वाणी Communication चे साधन आहे हे आपण जाणतो. वाणीमुळे ऐकणारा प्रसन्नही होतो तसेच दुखवल्याही जातो. इतरांचा विश्वासही बसतो (वचन) किंवा भ्रमही(मन्थरा) होतो.

चांगल्या वाणीचे रहस्य सत्य, प्रसन्न करणारे पण हितावह असे असते. यासाठी संवाद असतो. लोक इतरांच्या बाबत (कसे वागावे, काय करावे व करु नये?) सहज ज्ञानी समजुन भाष्य करतात. पण स्वतःवर कृतीची वेळ आली असता गोंधळतात.

गोंधळात सापडला तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानी समजुनच भाष्य करतो . हेच सत्य अर्जुनाच्या विषादी भूमिकेचे असते.

अर्जुन स्वतःच्या अज्ञानावर पडदा टाकण्यासाठी स्वतःला चांगले, ज्ञानी, धार्मिक दर्शवितो व त्याप्रमाणे भाष्य वापरतो. श्रीकृष्ण अधिकारी व्यक्ति असुनही अर्जुनाचा उद्वेग होणार नाही व तो गांभिर्याने वास्तवावर विचार करेल असे भाष्य बोलतात.

अनार्यजुष्टम् अस्वर्ग्यम् अकीर्तिकरम् अर्जुन।

क्लैब्यं मास्म गमः पार्थ न एतद् त्वयि उपपद्यते।(२-३)

अर्थात तुझ्यासारख्या श्रेष्ठाला अशा कठिण समयी मनोदुर्बलता अशोभनिय आहे. यामुळे मनुष्याच्या श्रेष्ठ जीवनाच्या संकल्पनेनुसार (इहलोकी )कीर्ति व(मरणोत्तर) स्वर्गप्राप्ति यापासुन मनुष्य वंचीत असतो.

स्वाध्याय म्हणजे स्वतः कसे जगावे याचे ज्ञान व तत्संबंधी अभ्यास(Practice), जे भगवतगीता सांगत आहे.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।

स्वाध्याय अभ्यसनं चैव वाङमयं तप उच्यते।।(१७-१५)

अर्जुन वास्तव स्विकारतो व प्रश्नाला पारदर्शकता येते.
नियतकार्यानुसार युद्ध करणे योग्य असेल तर यापासुन जी

दुःखप्राप्ति होणार आहे, त्यावर उपाय कोणता?येथे मुद्देसुद संवाद सुरु होतो.

१. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी समर्थन करणे ही सामान्य मनुष्याची संवयच असते. याप्रित्यर्थ केलेले भाष्य पुस्तकी ज्ञान(बौद्धिक)असले तरी याला प्रज्ञावाद संबोधले आहे.
२. इतरांना चुक ठरविणे सोपे असते. कायद्याच्या आधारावर एखाद्याला गुन्हेगार ठरविण्यात येते तसेच येथे चुकाचा आधार जीवनाचा Standard मार्ग असतो.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)
अर्थात श्रेष्ठ(विकास) मार्गावर विचलित होत नाही. याच मार्गाचे ज्ञान भगवतगीता ज्ञानविज्ञानासह स्पष्ट करते.
याचाच अर्थ Scientific भाष्य तेच असते जेंव्हा अडचणीला Scientific आधार मिळतो व प्रश्न Define होतो. यामुळे संवादाला, चर्चेला निश्चित "विषय Subject, Agenda" मिळतो.
याप्रमाणे भगवतगीतेत निश्चित विषयावर भाष्य होते. अर्जुन प्रश्न विचारुन शंकानिरसन करुन घेतो. संपुर्ण शंका निरसन झाल्यावर श्रीकृष्ण म्हणतात, जीवनाचे जे रहस्यमय ज्ञान आहे (Meaning

&purpose of life) ते सर्व तुला सांगितले. यावर विचार करुन निर्णय तुलाच घ्यायचा आहे. तो तुझा अधिकार आहे.

इति ते ज्ञानं आख्यातं गुह्यात् गुह्यतरं मया।
विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।।(१८-६३)

सार :

"No matter what people tell you, words and ideas can change the world. "

-Robin Williams

Motivation speech मध्ये चांगल्या भाष्याची(वाङमय तप) गरज असते. याच Motivation भाष्यातुन अर्जुनाला विकासाचा पुढील टप्पा गवसला. अन्यथा जेथे होता तेथेच थांबला असता.

*******

(१७-१६)

*************************

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनम् आत्मविनिग्रहः।

भावसंशुद्धिः इति एतद् तपो मानसम् उच्यते।।

*************************

(१७-१६) :

"मनःप्रसादः सौम्यत्वं मौनम् आत्मविनिग्रहः"

(Training of mind मनाला संस्कारीत करणे )

यज्ञ(सृष्टिचक्रप्रवर्तनासाठी स्वतःच्या स्वभावनियतकार्याचे योगदान, समर्पित कार्य), दान (चांगल्या कार्यात स्वतःचे योगदान), तप(शरीर, वाचा, मन यांना संस्कारीत करणे) हे त्रिविध कर्मे जीवनविकासात आवश्यक आहे. मनसमाधान, शांतपणा, मौन(नियंत्रण, रहस्य), आत्मवश (निग्रह), शुद्ध सकारात्मक भाव हे मनाचे संस्कार आहेत.

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनम् आत्मविनिग्रहः।

भावसंशुद्धिः इति एतद् तपो मानसम् उच्यते।।(१७-१६)

आत्मविनिग्रह :

चंचलता मनाचा स्वभाव आहे. ते भटकत असते. जसे शेतात बी पेरले नाही तर तेथे गवत जंगल उगवते. या मनाला ताब्यात केले नाही तर ते बुद्धिमध्ये संशय, भ्रम निर्माण करते. बुद्धि स्थिर नसते. यामुळेच कार्याचा एकनिश्चय (Determination) नसतो, ध्येयहीन असतो. जो जीवनविकासात आवश्यक आहे. अभ्यासाने (योग) हे शक्य होते.

शनैः शनैः उपरमेद् बुद्ध्या धृतिगृहीतया।
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किञ्चित् अपि चिंतयेत्॥(६-२५)
यतो यतो निश्चलति मनः चञ्चलम् अस्थिरम्।
ततः ततो नियम्य एतद् आत्मन्येव वशं नयेत् ॥(६-२६)

मनोवश vs आत्मवश

"People tend to dwell more on negative things than on good things. So the mind then becomes obsessed with negative things, with judgments, guilt and anxiety produced by thoughts about the future and so on. "

-Eckhart Tolle

पाण्यावरील नाव वाऱ्याने वहावी तशी मनोवश अवस्थेत स्थिति असते. या अवस्थेत बुद्धिचेच हरण होते. यामुळे अशांति असते. म्हणुन संस्कार आवश्यक त्याला युक्त संबोधले आहे. या अवस्थेत निष्काम कार्यरत असतो.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखम् ।(२-६६)

इंद्रियाणां हि चरतां यत्मनो अनुविधीयते।

तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावाम् इव अम्भसि।।(२-६७)

ध्येय निश्चित असेल, कार्याचा एकनिश्चय असेल (Determination) तर निश्चित मार्गावर जीवनयात्रा चालु असते. हाच सुखी जीवनाचा मार्ग ठरतो.

"A man without a goal is like a ship without a rudder. "

-Thomas Carlyle

******

(१७-१७)

*************************

श्रद्धया परया तप्तं तपः तत् त्रिविधं नरैः।

अफलाकांक्षिभिः युक्तेः सात्विकं परिचक्षते।।

*************************

(१७-१७):

"श्रद्धया परया तप्तं तपः तत् त्रिविधं नरैः"

(Harmony :काया-वाचा-मन)

He who lives in harmony with himself lives in harmony with the universe...

जीवनविकासाचा राजमार्ग ज्ञान, कर्म, भक्ति यांचे समन्वयाने बनतो हा भगवतगीतेतील शाश्वत विकासमार्गाचे शास्त्राचा आधार आहे. ज्ञान, कर्म व भक्ति याच संदर्भात अनुक्रमे वाङमय तप, शारिरिक तप व मानसिक तप याचा उल्लेख भगवतगीतेत दर्शविला आहे. मनुष्याची वागणुक त्याची संस्कृति, संस्कार यानुसार असते हे व्यवहारात मनुष्य जाणत असतो. व्यवहारात

अनुक्रमे उक्ति(भाष्य), कृति(कार्य), व मति (बुद्धिची अविचल अवस्था, मानसिकता) याचे दर्शन होते.

*ज्ञान - कर्म -भक्ति

*वाङमय तप -शारिरिक तप-मानस तप

*उक्ति (भाष्य)- कृति(कार्य) -मति(बुद्धिची अविचल अवस्था, मानसिकता)

समाजात भाष्य बोलल्या जाते. या भाष्याचा निश्चित विषय असेल तर संवाद होतो. चर्चा होते. पण स्वतःला ज्ञानी, श्रेष्ठ, योग्य सिद्ध करण्यासाठी भाष्य असेल तर Dialogue होत नाही, तो Monologue असतो.

अर्जुन प्रत्यक्ष कार्यापुर्वी दुःखी होतो. ही विचलित मानसिकता असते. अशांत होतो म्हणुन शांतिसाठी कार्य न करणे उचित समजतो अर्थात निष्क्रियतेला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. हा त्याचा Monologue असतो. येथेच ज्ञान व कर्म या संदर्भात तसेच मानसिकता या संदर्भात Error तयार होतो.

दुःखामुळे विचलित होतो म्हणुन"भक्ति" आणि मानसिकता या संदर्भात भगवतगीतेचा संदेश आहे,

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

ज्ञान:अर्जुनाला संशय आला असता युद्ध न करणे योग्य समजतो, व योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. प्रत्यक्षात संशय हेच अज्ञान दर्शविते. "संशयात्मा विनश्यति". अज्ञान स्विकारले तर ज्ञान मिळते. भगवतगीता ज्ञान या संदर्भात ईश्वराची ओळख देते. व "ज्ञानसंच्छिन्न संशयम् " हा संदेश देते. याच आधारावर नित्य विकासाचा राजमार्ग(अमृतत्वाय कल्पते) बनतो. या मार्गावर विचलित होत नाही अर्थात हाच कार्याद्वारे भक्तिचा मार्ग बनतो.

कर्म :जन्माला आला तर हर क्षणी कर्म घडणारच आहे.

न हि कश्चित् क्षणम् अपि जातु तिष्ठति अकर्मकृत् ।(३-५)

कर्माला कष्ट, दुःख समजुन नियतकार्य, आवश्यक कार्य टाळणे यातुन कर्माबद्दल ज्ञान व मानसिकतेचे दर्शन होते.

मोहातस्य परित्यागः तामसः परिकीर्तितः।(१८-७)

एकीकडे कर्म घडत असते व दुसरीकडे कर्मात दुःख जाणत असल्यामुळे निष्क्रिय राहतो, तरी ज्ञानी समजतो. याचाच अर्थ कर्माचे अज्ञान असते. भगवतगीता कर्माचे ज्ञान व महत्व स्पष्ट करते. "गहना कर्मणो गतिः" ज्यामुळे सहज कर्म घडत असते. याच कर्माद्वारे भक्ति अर्थात साधना घडते. उच्च मानसिकता(दुःखान्त, योग) लाभते.

अर्जुन निष्क्रियतेला ज्ञान संबोधतो याच पार्श्वभूमिवर "गहना कर्मणो गतिः"हाच भगवतगीतेचा महत्वाचा संदेश आहे. कर्म या संदर्भात यज्ञ (निष्काम कर्म), दान(परमार्थ या संदर्भात सतकार्य), तप या तिन्ही कार्याचा भगवतगीता उल्लेख करते.

यज्ञ दान तपः कर्म न त्याज्य कार्यं एव तत्।
यज्ञो दान तपः चैव पावनानि मनीषिणाम् ।।(१८-५)

"तप" कार्य या संदर्भातच "श्रद्धा"(मनुष्याची निष्ठा, विश्वास) या शब्दाचा उल्लेख आलेला आहे. म्हणुन यज्ञ, दान, तप या कर्मांचे "श्रद्धात्रयविभागयोग" या अध्यायात स्पष्टिकरण केले आहे.

"Faith is a knowledge within the heart, beyond the reach of proof. "

Khalil Gibran

शारिरीक तप: "श्रद्धावान् लभते ज्ञानम् " म्हणुन देवद्विजगुरुआचार्य यांचा सन्मान हा श्रद्धेचाच विषय असतो. ईश्वर व ज्ञान यांचा समन्वय भगवतगीतेने साधलेला आहे. या संदर्भात ईश्वरश्रद्धा, व्रत, पावित्र्य शारिरिक तप म्हटले आहे.

वाङमय तप : कल्याणकारी पण सत्य (Motivational ), उद्वेगरहित भाष्य, स्वतःच्या शाश्वत विकासाचे (Self motivational )ज्ञान, अभ्यास.

मानस तप: सकारात्मक, कल्याणकारी शुद्ध भाव, मनाची प्रसन्नता, मौन, शांति. ही मानसिकता धारण करणे.

श्रद्धया परया तप्तं तपः तत् त्रिविधं नरैः।
अफलाकांक्षिभिः युक्तेः सात्विकं परिचक्षते।।(१७-१७)

******

१७-१७ :

"अफलाकाङ्क्षिभिःयुक्ते सात्त्विकं परिचक्षते"

(तप, Art of living)

"Culture is the process by which a person becomes all that they were created capable of being. "

Thomas Carlyle

यज्ञ(सृष्टिचक्रप्रवर्तनास सहकार्य करणारे स्वभावनियत कार्य), दान व तप(काया, वाचा, मन) ही त्रिविध कर्मे जीवनविकासाला आवश्यक आहे. यापैकी तप हे काया, वाचा, मन या संदर्भातील (Culture/वर्तणुक) कर्म आहे.

काया:जे(देव, द्विज, गुरु, प्राज्ञ) पुजनिय आहेत, आदरणिय आहे त्यांचेशी असलेली वर्तणुक, पावित्र्य, अहिंसा असे आचरण(शारिरीक तप)

वाचा:सत्यच पण इतरांचा उद्वेग होणार नाही, (त्याच्या विकासाला कल्याणकारी)हीतावह होईल असे सकारात्मक वचन, जीवनविकासाचे ज्ञान व त्याचा अभ्यास(वाङमय तप)

मन:प्रसन्न मन, शांति, मौन, आत्मवश असणे(Higher consciousness), शुद्ध व कल्याणकारी भाव. (मानस तप)

भगवतगीता अनासक्तिचे(Detachment) शास्त्र आहे. जीवनाच्या Survival mode मध्ये मनुष्य सुखासाठी सकाम कार्यरत असतो. पण हेच कार्य जीवनविकासाचे साधन करुन निष्काम कार्यासाठी उपयोगात आणणे हे (योग)कौशल्य भगवतगीतेने साधले आहे. हीच जगण्याची Spiritual mode(Higher consciousness) असते.

यज्ञ, दान व तप या त्रिविध कर्मसंदर्भात सात्त्विक, राजस व तामस असे तीन प्रकार येतात. तप हा शब्द तपणे, चांगल्या संवयी लावणे ज्यामुळे स्वतःला विकासमार्गावर राहता येईल, अशा अर्थाने येतो. चांगल्या संवयी संस्कार म्हणुनही ओळखल्या जातात. "Art of living" चा तप एक महत्वाचा भाग असतो.

*जो तप राजस किंवा तामस नाही तो सात्त्विक तप(Right behavior) ठरतो.

श्रद्धया परया तप्तं तपः तत् त्रिविधं नरैः।

अफलाकाङ्क्षिभिःयुक्ते सात्त्विकं परिचक्षते।।(१७-१७)

*सात्विक vs राजस तप याचे स्वरुप निष्काम vs. सकाम असे असते. स्वतःचा सत्कार, मान व्हावा या इच्छेने काया, वाचा, मन या तपाचे आचरण असते. या तपाचे फल अशाश्वत (अनिश्चित)असते.

सत्कारमानपुजार्थम् तपो दम्भेन चैव यत्।
क्रियते तद् इह प्रोक्तं राजसं चलम् अधृवम् ।।(१७-१८)

*सात्त्विक vs. तामस तपाचे स्वरुप कल्याणार्थ vs. पीडादायी(स्वतःला व इतरांना) अर्थात सकारात्मक vs. नकारात्मक असे असते. आदरणिय, पुजनिय लोकांशी अपमानास्पद वर्तणुक करणे, इतरांचा उद्वेग होईल अशी व नकारात्मक वाणी, इतरांचे अकल्याण होईल अशी स्वतःला व इतरांना पीडादायी वर्तणुक.

मूढग्राहेण आत्मनो यत् पीडया क्रियते तपः।
परस्य उत्सादनार्थं वा तत्तामसम् उदाहृतम् ।।(१७-१९)

*******

(१७-२०)

*************************

दातव्यम् इति यत् दानम् दीयते अनुपकारिणे।
देशे काले च पात्रे च तद् दानम् सात्विकं स्मृतम् ।।
*************************

(१७-२०):
"दातव्यम् इति यत् दानम् दीयते अनुपकारिणे"
(याचक Liability vs. Asset दाता)

यज्ञ, दान व तप या तीन प्रकारचे कार्य करुन मनुष्य विकास साधत असतो.
यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यम् एव तत् ।
यज्ञः दानं तपः चैव पावनानि मनीषिणाम्।(१८-५)

*यज्ञ:
व्यवहारातील कर्म (स्वभावनियत- State of art) यज्ञकर्म जाणुन केले तर निष्कामकर्म घडते.

यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।(४-२३)

इच्छा(Wants) इंद्रियाग्नित(कृति), इंद्रियकर्मे संयमाग्नित (दृढनिश्चय) भस्मिकरण होते. याप्रमाणे(ईश्वर)ज्ञानाने प्रदिप्त झालेल्या संयमअग्नित सर्व कर्मे भस्म होतात.

सर्वाणी इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।

आत्मसंयम योगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।(४-२७)

*तप:

शरीर(आचरण), वाचा(वाणी), मन(विचार) याद्वारा संस्कार तयार होतो. मनात वारंवार जो विचार करतो(सकारात्मक -नकारात्मक), जे भाष्य( हीतावह कि उद्वेगजन्य) वारंवार करतो, प्रत्यक्ष वागणुक(Behavior) याद्वारा संस्कार बनतो. चांगल्या संस्कारासाठी चांगली संवय लावणे येथे अभिप्रेत आहे. याच संदर्भात तप कर्म महत्वाचे आहे. ज्या आचरणाने प्रसन्नता लाभते, वागणुक स्वतःला व जगाला हीतावह होईल. असे आचरण शारिरीक तप(१७-१४), वाङमय तप(१७-१५), मानस तप(१७- १६)याद्वारा भगवतगीता स्पष्ट करते

*दान:

कुणी जगाकडुन सुखाची अपेक्षा करतो, तर कुणी जगाला सुखी करतो या दोन मानसिकतेमध्ये याचक (Liability) vs दाता (Asset) असा स्पष्ट भेद आढळतो. ज्यांच्याजवळ जगाला देण्यालायक आहे, ते जगाला देत असतात, जगाला सुखी करतात. ज्यांच्याजवळ देण्यालायकच नाही ते दान कसे करणार?दानच केले तर त्यांचे दान व्यावहारिक(Give & Take) असते. देतांना कष्ट होते. या पार्श्वभुमिवर दानकर्म याचक(Liability) vs दाता(Asset) अशी मानसिकता दर्शवित असते. जे Asset असतात त्यांना आत्मविश्वास असतो.

दातव्यम् इति यत् दानम् दीयते अनुपकारिणे।
देशे काले च पात्रे च तद् दानम् सात्विकं स्मृतम् ।।(१७-२०)

व्यावहारिक बोध :

जगापासुन सतत अपेक्षा करणारे व जगाला देणारे असे दोन प्रकारचे व्यक्तिमत्व समाजात आढळत असते. समाजात यांची नकारात्मक व सकारात्मक व्यक्तिमत्व अशी ओळख बनते.

"For we must be one thing or the other, an asset or a liability, the sinew in your wing to help you soar, or the chain to bind you to earth. "

-Countee Cullen

(Author-High Soul's My Song)

या विश्वात "भार" बनु नका अशी कांही धर्माची शिकवणच असते. याचमुळे गुणात्मक शिक्षणात "स्वावलंबन" या जीवनमुल्याचे महत्व स्पष्ट होते.

"Beggars are not Choosers"

******

(१७-२०):

"देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् "

(सत्कार्यासाठी दान)

यज्ञ(सृष्टिसंचलनास सहकार्य करणारे स्वभावनियतकार्याचे योगदान), तप(शारिरीक, वाणी व मानसिक वर्तणुक) व

दान(जगतहीताय, मानवकल्याणार्थ दान) असे तीन प्रकारचे कार्य जीवनविकासास आवश्यक असतात.

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यं एव तत् ।
यज्ञो दानं तपैश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥(१८-५)

हे त्रिविध कार्य सात्त्विक, राजस व तामस अशा तीन प्रकारात विभागल्या जातात. जे राजस किंवा तामस नाही ते अर्थातच सात्त्विक ठरतात.

सात्त्विक दान या संदर्भात (१) फलाची इच्छा न करता अर्थात दान करणे उपकार नसुन कर्तव्य जाणुन करणे. (२) स्थळ, काळ व पात्र यांचा विचार करुन दान करणे हे दोन मुख्य मुद्दे येतात.

दातव्यम् इति यत् दानम् दीयते अनुपकारिणे।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ॥(१७-२०)

(१) सात्त्विक vs. राजस दान
(अर्थात कर्तव्य vs. उपकार)

चांगल्या कार्यासाठी, जनकल्याणासाठी फलाची अपेक्षा न ठेवता कर्तव्य जाणुन दान करणे सात्त्विक दान असते. जे दान परतफेडीच्या इच्छेने केले जाते व असे दान करतांना कष्ट होतात ते राजस दान असते.

यत्तु प्रतिउपकारार्थम् फलम् उद्दिश्य वा पुनः।
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ।।(१७-२१)

(२) सात्त्विक vs. तामस दान

(स्थळ-काळ-पात्र)

स्थळ, काळ, पात्राचा विचार न करता लोकांना जुगार, व्यसन, आळस करण्यास प्रोत्साहीत करेल असे अविचाराने केलेले दान तामस ठरते. याउलट चांगल्या कार्याला, जनकल्याणाला प्रोत्साहीत करणारे दान सात्त्विक ठरते.

अदेशकाले यत् दानं अपात्रेभ्यश्च दीयते।
असत् कृतम् अवज्ञातं तत्तामसं उदाहृतम् ।।(१७-२२)

सार :

अन्नदान, शिक्षादान, रक्तदान, नेत्रदान असे शब्द दान या संदर्भात समाजात रुढ असले तरी मुख्यत्वेकरुन "अर्थविषयक" हा दान

शब्द वापरल्या जातो. जीवनात अर्थनितीचे ज्ञान स्वावलंबन, दान या संदर्भात आवश्यक असते. या ज्ञानावरच गुलामी, शोषण, स्वातंत्र्य याची जागृति असते.

दान देतांना त्याचे स्वरुप व हेतु (कर्तव्य vs परतफेडीची इच्छा, स्थळकाळपात्र) निश्चित असावा. उदाहरणार्थ जनहीतार्थ कार्य करणाऱ्या NGO मध्ये आर्थिक source दान(Donation) असते. तर सहकारी संस्था Share भागभांडवल व कर्ज यावर उभ्या असतात. Share मध्ये परतावा Divident व सेवा असते. म्हणुनच Donation, Share व Loan यांतील भेद स्पष्ट असावा.

"The value of life is not in its duration, but in its donation. You are not important because of how long you live, you are important because of how effective you live. "

Myles Munroe

********

(१७-२१)

*************************

यत्तु प्रतिउपकारार्थम् फलम् उद्दिश्य वा पुनः।

दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम्॥

*************************

(१७-२१)विषय ७६४ :

"दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम्"

(व्यवहार vs आदर्श पारदर्शकता)

*आदर्श vs. व्यवहार :

मनुष्यजीवनात "उपकार( आदर्श) vs. व्यवहार " याची पारदर्शकता हवी . तरच आदर्श, दान याचे महत्व कळते. अपेक्षाभंगाचे दुःख होत नाही. याच संदर्भात रामायणातील श्रीरामाचा सुग्रीवाशी मैत्रीव्यवहार बोलका आहे.

श्रीरामाचा सुग्रीवाशी मैत्रीव्यवहार :

(सुग्रीवाने गुप्तदुत पाठविलेला) हनुमान श्रीरामाला म्हणतो,

तेही सन नाथ मयत्री कीजे।दीन जानि तेहि अभय करीजे।

सो सीता कर खोज कराइहि।जहँ तहँ मरकट कोटि पठाइहि।।
राज्य हरण झाल्यामुळे दीन झालेल्या सुग्रिवाला अभय द्या,
त्याचेशी मैत्री करा. कोटी वानर पाठवुन तो सीतेचा शोध घेईल.

देत लेत मन संक न धराई।बल अनुमान सदा हित करई।
बिपति काल कर सतगुन नेहा।श्रुति कह संत मित्र गुन एहा।
व्यवहारात संशय करीत नाही, आपल्या शक्तिनुसार नेहमी
कल्याण करतो, संकटकाळी शतपट स्नेह करतो. हे श्रेष्ठ मित्राचे
लक्षण आहे.
पण ठरल्याप्रमाणे सुग्रीव वर्षाृृऋततुनंतर हजर झाला नाही,
तेंव्हा श्रीराम लक्ष्मणाजवळ बोलतात,
सुग्रीवही सुधि मोरि बिसारी।पावा राज कोस पुर नारी।।
भोगैश्वर्यात रत असलेला सुग्रीव माझे कार्य विसरला.
लक्ष्मणाचा क्रोध पाहुन हनुमानाचे विचारचक्र सुरु होते,
इहाॅं पवनसुत हृदय बिचारा।राम काजु सुग्रीवँ बिसारा।।
हनुमान सुग्रीवाला जागे करतो. विषयामुळे मी हरीचे कर्तव्य
विसरलो हे कबुल करतो. व बोलल्याप्रमाणे वानरसेना युद्धासाठी
तयार करतो.

वर्तमान व भगवदगीता :

अर्वाचिन इतिहास सांगतो, जगात ज्या शोषणाविरुद्ध क्रान्त्या झाल्यात ते शोषण मुख्यतः आर्थिक संदर्भात होते. (ज्या मिळकतिसाठी(योगक्षेम) कर्म करतो, त्याची पुर्तता न होणे). अशाच शोषणामुळे कर्जबाजारी होवुन वेठबिगार झालेले गुलामासारखे जगत होते. "आदर्श" या संदर्भात मालक मजुरावर उपकार करतो हा विचार कार्ल मार्क्सने फेटाळुन लावला व मजुर मालकावर उपकार करतो या विचाराला समाजात रुजवुन शोषणाविरुद्ध क्रान्तिची ज्योत पेटविली. याचाच अर्थ "आदर्श(उपकार) vs. व्यवहार" यांत पारदर्शकता हवी हे अर्वाचिन इतिहास सांगतो.

भगवदगीतेनुसार यज्ञ(समर्पित कार्य), दान, तप (शरीर, वाचा, मन संस्कार) अशी तीन प्रकारची कर्मे जीवनविकासात आवश्यक म्हटलेली आहे. कर्म या संदर्भातच त्याग, दान याची निश्चित व्याख्या भगवदगीता स्पष्ट करते.

सकाम vs निष्काम

व्यवहारात (Business) सकाम कार्य असते. ज्याला जीवनविकासात कर्माचे महत्व कळते त्याला निष्काम कार्याचे महत्व कळणे आवश्यक असते. याचप्रमाणे दानाचे महत्व कळण्यासाठी स्वतःच्या अधिकारातील मिळकतीचे, संपत्तिचे

महत्व कळणे आवश्यक असते. ही पारदर्शकता भगवदगीतेत स्पष्ट होते.

कर्मामुळे अर्थप्राप्ति होते. फलत्यागामुळे कार्याचा एकनिश्चय होतो. निष्ठेने, समत्वयोगाने कार्य घडते. ज्याला निष्काम कार्याचे महत्व कळत नाही तेंव्हा कार्य सकाम असते. अर्थात हा व्यवहार (Business) असतो. "आदर्श" (दान, त्याग, धर्मकार्य)या संदर्भात भाष्य भलाईचे असणे व अपेक्षा मात्र प्रतिउपकाराची असणे हाही अप्रत्यक्षपणे व्यवहार असतो. यामुळे असा आदर्शच राजस म्हटले आहे.

यत्तु प्रतिउपकारार्थम् फलम् उद्दिश्य वा पुनः।
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम्॥(१७-२१)

**********

(१७-२३)

*************************

ॐ तत् सत् इति निर्देशो ब्रह्मणः त्रिविधः स्मृतः।

ब्राह्मणास्तेन् वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा॥

*************************

(१७-२३) :"ॐ तत् सत् "

भारतिय संस्कृतित "ॐ तत् सत् " हा सर्वाधिक प्रचलित संदेश आहे. हा विकासाचा सकारात्मक (कल्याण) संदेश आहे. विश्वाचे व जीवनाचे मुळ रहस्यच यातुन प्रगट होते.
ॐ तत् सत् इति निर्देशो ब्रह्मणः त्रिविधः स्मृतः।(१७-२३)

आयुष्य प्रतिक्षण पुढे पुढे वाटचाल करीत असते किंवा प्रतिक्षण संपत असते . एक जीवनाची सकारात्मक Reality असते, तर दुसरी नकारात्मक!Energetic Life जगतांना जीवनात आनंद असतो, हे वास्तव असते. शारिरीक दुःख दृश्य असते पण मानसिक दुःख फक्त स्वतःच जाणतो. या दुःखावर स्वतःलाच

उपाय शोधावा लागतो, अन्यथा जीवनांत निरसता येते . याच मुद्याला भगवतगीतेत highlight केले आहे.

“A person’s energy can tell you more about them than their own word. ”

दुःखी अवस्था आली असता अर्जुन निष्क्रियतेला आदर्श दर्शविण्याचा प्रयत्न करतो. हा प्रयत्न श्रीकृष्ण हाणुन पाडतात. अर्जुन वास्तव स्विकार करतो. भगवतगीतेत जीवनाचा Standard मार्ग दर्शविला, ज्याद्वारे मनुष्याचा जीवनमार्ग Energetic होतो. मानसिकता योगस्थ होते.

दुःखामुळे जीवनात नैराश्य येते. म्हणुन जीवनांत सकारात्मक भाव (उत्तरोत्तर कल्याण) धारण होण्यास "ॐ तत् सत् " हा संदेश भगवतगीता देत आहे. यातुनच सतमार्ग धारण होतो.

“If you’re not positive energy, you’re negative energy. ” Mark Cuban

सकारात्मक उर्जायुक्त जीवन प्रकाशासमान असते. सुर्याने कधी अंधार पाहिलेला नसतो. त्याच्या प्रकाशाने सृष्टि प्रकाशित होते. तसेच सकारात्मक मनुष्याचे जीवन जगातील अंधार मिटवीत असतो.

NASAने सुर्याच्या प्रकाशातील Compressed ( vibration )sound "ॐ " आहे हे सिद्ध केले. विश्वातील ती (Magnetic)

शांती (Positive Energy)आहे. हाच ब्रह्मांडातील मुळ शब्द आहे.

ॐ इति एकाक्षरं ब्रह्म व्याहरन् माम् अनुस्मरन् ।(८-१३)

ब्रह्मवादी याच शब्दाने कार्यारंभ करतात. तर मोक्षाकांक्षि "तत् " या शब्दाने अनासक्ति भाव धारण करुन कार्य करतात.

तत् इति अनभिसंधाय फलं यज्ञतपः क्रियाः।
दानक्रियाश्च विविधः क्रियन्ते मोक्षकांक्षिभिः।।(१७-२५)

चांगले, कल्याणार्थ कार्य व कार्यातील सातत्य (वर्तमान) या अर्थाने "सत" शब्दाचे प्रयोजन आहे.

सत् भावे साधु भावेच.. (कल्याण, चांगले)
.. स्थितिः सत इति च उच्यते (वर्तमान)
कर्मं चैव तद् अर्थियं सत इति एव अभिधीयते।।(१७-२६/२७)

******

(१७-२५)

*************************

तत् इति अनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः।

दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः।।

*************************

(१७-२५) :

"तत् इति अनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः"

(निष्काम कर्म)

अर्जुन दुःखी झाल्यावर आपल्या नियतकार्याला पापकर्म ठरवितो. यामुळे पुण्यकर्म-पापकर्म असा द्वन्द्व तयार होतो. अर्जुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्माचा आधार घेतो.
धार्मिक/आध्यात्मिक/ईश्वरश्रद्ध या संदर्भात भगवतगीतेत स्वर्गवादी व मोक्षकांक्षि यातील भेद अनुक्रमे सकाम कार्य व निष्काम कार्य असा दर्शविला आहे.

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां।

क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यं गतिंप्रति।।

भोगैश्वर्यप्रसक्तानां तया अपहृत् चेतसाम् ।
व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।।(२-४४)

अर्थात स्वर्गप्राप्तिसाठी कर्म म्हणुन पुण्यकर्म, विशेषकर्म करणे. पण ही सकाम स्थिति असल्यामुळे कार्याचा एकनिश्चय नसतो.

"The difference between the impossible and the possible lies in a man's determination. "
-Tommy Lasorda

बुद्धियुक्त या द्वन्दापासुन मुक्त असतो. कार्याद्वारे योगसिद्ध होणे हे कार्यकौशल्य असते. या मार्गात कार्याचा एकनिश्चय असतो.
बुद्धियुक्तो जहातिह उभेसुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

अर्थात चांगले कर्म-वाईटकर्म (सुकृतदुष्कृत) या संदर्भात स्वर्गवादी भूमिका असते. तर स्वातंत्र्य(मुक्ति), शक्तिसाधना (दुःखान्त-योग) साठी ईश्वरभक्ति या संदर्भात मोक्षकाङ्क्षि भूमिका असते.

"ॐतत् सत् "यातील ॐ ईश्वर, तत ईश्वराचे कार्य, सत कल्याण या अर्थाने जगतकल्याणासाठी ईश्वर विश्वसंचलन करीत आहे हा संदेश मिळतो. मोक्षकांक्षि ईश्वराचे कार्य या अर्थाने "तत्" या शब्दाद्वारे निष्काम कार्य करतो.

तत् इति अनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः।
दानक्रियाश्च विविधः क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः।।(१७-२५)

*****

(१७-२५):
"क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः"
(Path of freedom, स्वतःचा मार्ग)

*अडथळा vs. शहाणपण(अज्ञान vs ज्ञान)
जगात धर्म आलेत, तत्वज्ञान आलेत, ज्ञानविज्ञान आले. पण ज्ञानविज्ञान मार्गदर्शनासाठी कि अडथळयासाठी? हा प्रश्न नकळत

मनुष्य स्वतःच उभा करतो. अर्जुनाला युद्धक्षेत्रावर दुःख होते. या स्थितित त्याला युद्ध करणे वा टाळणे यातुन एक निवड करायचा प्रसंग त्याचेसमोर उद्भवतो. तो युद्ध टाळणे स्विकारतो. अज्ञानामुळे मनुष्य अडथळ्यालाच शहाणपण सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. "अडथळा vs शहाणपण(ज्ञान) " यातील भेद कळत नाही.

मनुष्याच्या जीवनयात्रेत कर्म महत्वाचे असते. कर्म करण्याचा अधिकार (निर्णय अधिकार) मनुष्याचे अधिकारक्षेत्र आहे. मनुष्याला भाष्य करण्याची संवय असते. जो आपल्या मार्गात योग्य असतो, त्याला स्वतःला योग्य सिद्ध करण्याची गरज भासत नाही. पण अर्जुन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी भाष्य बोलतो. आपल्या जीवनयात्रेतील अडथळा, अडथळा नसुन शहाणपण आहे हे सिद्ध करण्यासाठी अर्जुन धर्मज्ञान बोलतो. भगवतगीता अडथळा vs आदर्श vs ज्ञान हा भेद स्पष्ट करते.

*स्वतःचा मार्ग:

जन्म व मृत्यु या दरम्यान जीवन असते. जीवनाची जीवनयात्रा ज्या मार्गावर चालते तो मार्ग मनुष्याने स्वतःच निवडलेला असतो. इतिहासाचे अवलोकन केले तर, जगातील श्रेष्ठ, थोर लोकांचे आत्मचरित्र हेच सत्य सांगते. याच संदर्भात भगवतगीतेची

"मार्गदर्शन" ही भूमिका आहे. (जीवनमार्गाचे )ज्ञान अडथळा करीत नाही तर मार्गदर्शन करते. म्हणुन मार्गातील अडथळा स्विकारणे अर्थात अज्ञान स्विकारणे प्रथम कर्तव्य असते.

"ज्ञान सर्वश्रेष्ठ शक्ति आहे" या वाक्याचा जनक सर फ्रान्सिस बेकन( १५९७ )याला विज्ञानजगत मानते. पण "ज्ञान" या संदर्भात भगवतगीता जनक ठरते.

Yuval Noav Harari या इश्राईली लेखकाने

A brief History of Humankind या पुस्तकाद्वारे ज्ञान व आदर्श संकल्पना यांतील भेद स्पष्ठ केला आहे. या पुस्तकातील महत्वाचे मुद्दे :

["Sir Francis Bacon was the first person attributed to the phrase 'Knowledge is Power'. ( 1597). The real test of ‘knowledge’is not whether it is true, but whether it empowers us. The real test is utility.

Until the Scientific Revolution most human cultures did not believe in progress. They thought the golden age was in the past, and that the world was stagnant, if not deteriorating.

Many cultures have viewed poverty as an inescapable part of this imperfect world.

Throughout history, societies have suffered from two kinds of poverty:social poverty, which withholds from some people the opportunities available to others; and

biological poverty, which puts the very lives of individuals at risk due to lack of food and shelter]

भगवतगीतेचा विषय ज्ञानविज्ञानाचा आहे म्हणुन Reasoning चा अधिकार आहे. उपदेश, आदेश यांत Reasoning नसते. Only to obey. जे कार्य दुःखच देणार असे कार्य मी कां करावे? हा अर्जुनाचा प्रश्न असतो. याच प्रश्नाचे उत्तर भगवतगीता देते. शेवटी निवड करण्याचे स्वातंत्र्य हा अर्जुनाचाच अधिकार असतो.

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)

ज्या दुःखामुळे युद्ध करणे टाळतो, त्याच दुःखमुक्तिसाठी "अमृतत्वाय कल्पते" या मार्गाचे ज्ञान मिळते. या मार्गाचा आधार "बंधन vs मोक्ष(स्वातंत्र्य)" असतो.

तत् इति अनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः।

दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः।।(१७-२५)

******

(१७-२६)

*************************

सत् भावे साधुभावे च सत् इति एतद् प्रयुज्यते।

प्रशस्ते कर्मणि तथा सत् शब्दः पार्थ युज्यते।।

*************************

(१७. २६):

"सत् भावे साधुभावे च सत् इति एतद् प्रयुज्यते"

"The fragrance of flowers spreads only in the direction of the wind. But the goodness of a person spreads in all directions. "

Chanakya

चांगलेपणाला समाजजीवनात वा मनुष्याच्या व्यक्तिगत जीवनात आदराने पाहिल्या जाते. चांगलेपणा या संदर्भातच लोकांनी चांगले म्हणावे, किर्ति या मनुष्याच्या इच्छा बनतात. तसेच याच चांगलेपणाच्या संदर्भात "चांगलेपणा चालत नाही, चांगल्या मनुष्याला त्रास होतो "अशी मोठ्या प्रमाणात समाजात

(गैर)समजुत असते. प्रत्यक्षात चांगलेपणाचेच समाजात अज्ञान असते. याच चांगलेपणाचे ज्ञान भगवतगीता विस्ताराने सांगत आहे.

*चांगलेपणा या संदर्भातच अर्जुनाला युद्धक्षेत्रावर दुःख झाले. आपल्याला चांगलेपणा कळतो म्हणुन ठरलेले युद्ध करणे पाप आहे असे स्वतःच certify करतो.
*अर्जुनाचे intention चांगले होते. पण धर्मासाठी योग्य काय? हे कोडे न सुटल्यामुळे युद्ध टाळणे पसंत करतो. यामागे केवळ त्याचे स्वतःचे सुखदुःख असते. धर्म नसतो.
*धर्म, जीवनमुल्ये यामुळे मनुष्याचा विकासमार्ग निश्चित होतो. स्वतः विकासमार्गावर असणे हाच भगवतगीता संदेश देते.

सत् भावे साधुभावे च सत् इति एतद् प्रयुज्यते।
प्रशस्ते कर्मणि तथा सत् शब्दः पार्थ युज्यते।।(१७-२६)

येथे चांगलेपणाचा संबंध ईश्वराशी जोडलेला आहे. प्रकृति(सत, रज, तम गुण) व पुरुष(गुणातीत ईश्वर) याद्वारे सृष्टिचे सृजन होते. सत ही चांगलेपणाची श्रद्धा असते. धर्मपालन करणारा वा जीवनमुल्य आचरण करणारा यांचा मार्ग निश्चित असतो. धर्माचा,

जीवनमुल्यांचा उपयोग करुन स्वतःचे स्वधर्माचरण ही "धर्मगति "असते.

धर्मगति -ईश्वरगति (कालगति)

"धरमधुरिन धरमगति जानु "

रामायणात श्रीरामाने आचरलेल्या धर्मगतिनुसार श्रीरामाला वनाचे राज्य मिळते. या (वर्तमान)स्थितिला ईश्वरगति संबोधले आहे.

"अतिबिचित्र भगवनगतिं जो जग जाने जोगु"

ही ईश्वरगति म्हणजे ईश्वराची "कालगति" जाणली तर मार्गात येणाऱ्या अडचणी विकासाच्या (महान कार्याच्या) संधि असतात. (जहां सब भांति मोर बड काजु). याच ईश्वरगतिचे दर्शन भगवतगीतेतील विश्वरुपदर्शनयोगात आले आहे. ही ईश्वराची (वर्तमानातील) कालगति असते. "कालो अस्मि"

"अमृतत्वाय कल्पते" जीवनविकासाच्या या राजमार्गावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति निष्काम कर्म असते.

निष्काम कर्म न करता ईश्वरभक्ति कोणती निष्ठा ठरेल (सत, रज, तम)? या अर्जुनाच्या प्रश्नावर चांगलेपणाचे हे संपुर्ण ज्ञान

भगवतगीता स्पष्ट करते. हे ज्ञान जाणुनच ज्ञानी सतमार्ग चालत असतो.

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत्।
असत् इति उच्यते पार्थ न च तप्रेत्य नो इह।।(१७-२८)

********

(१७-२६) :

"प्रशस्ते कर्मणि तथा सत् शब्दः पार्थ युज्यते"

(चांगलेपणा आणि मानसिक शक्ति)

निष्क्रियतेला चांगलेपणा दर्शविणे, दुर्बलतेला शक्ति दर्शविणे, अज्ञानाला ज्ञान दर्शविणे ही समाजातील संवय असते. या संवयीचे मुळ काय?व उपाय कोणता?हाच भगवतगीतेचा विषय आहे. हा विषय बंधन - मोक्ष (स्वातंत्र्य) या शास्त्राद्वारे स्पष्ट केला आहे.

*Courage धैर्य हा Mental power असतो. Physical exercise ने भौतिक शक्ति वाढते, तसेच Mental power साठी

Mental exercise असते. हे रहस्य "भक्ति " या संदर्भात भगवतगीतेत स्पष्ट केले आहे.

*मनुष्य सामान्य म्हणुनच जगतो. जीवनात विकास करावा यासाठी मोठे, उच्च झाले पाहिजे ही इच्छा असते पण उच्च पातळीवर जगणे कळले तर मोठे होणेही शक्य होईल. भगवतगीतेने हा अधिकार सर्वांना दिलेला आहे.

अपिचेत्सु दुराचारो भजति माम् अन्यभाक् ।
साधु एव स मन्तव्यः सम्यग् व्यवसिताः ही सः।।(९-३०)

* सुख आणि मानसिक शक्ति :

अर्जुनाला युद्धाचा परिणाम दुःख दिसते. तेंव्हा युद्ध करणे योग्य कि अयोग्य याचा निश्चय करण्यास तो असमर्थ ठरतो व Indecesive राहतो. निर्णयक्षमता या संदर्भात हा महत्वाचा factor आहे. मनुष्य जेंव्हा Indecesive होतो, तेंव्हा स्वतःच्या सोयीचे तिसरे द्वार उघडतो व स्वतःचा guilt लपविण्यासाठी दुर्बलता शक्ति दिसावी हा प्रयत्न असतो. दुःखामुळेच मनुष्याचा Thought pattern नकारात्मक होतो. व नकारात्मक विचारातच comfortable राहण्याची संवय जडते. ही Mental poverty

(illness)ठरते. याला दुर्दैवाने रोग म्हणुन ओळखल्या जात नाही. कारण शक्तिची ओळख नसते.

*चांगलेपणा व ज्ञान:

चांगलेपणाविषयी मनुष्याचे जीवनात संभ्रम असला तरी मनुष्य जी निवड करतो, ती योग्य समजुनच करतो. चांगलेपणामुळेच अर्जुन गर्भगळित होतो. चांगलेपणाविषयी जी Belief system त्याचे Mind मध्ये programmed असते, त्याचा उपयोग स्वतःला योग्य दर्शविण्यासाठी करतो. यामुळे अज्ञानाला ज्ञान बनवितो. निष्क्रियतेला चांगलेपणा दर्शविणे हा दुबळेपणाला शक्ति दर्शविण्याचा प्रयत्न ठरतो.

चांगलेपणामुळे स्वतःवर विश्वास यावा यासाठी चांगलेपणा ईश्वराशी जोडण्याचे(एकत्व) साधन असते. ज्यामुळे सतकार्य घडते, सत मार्ग असतो.

सत् भावे साधुभावे च सत् इति एतद् प्रयुज्यते।
प्रशस्ते कर्मणि तथा सत् शब्दः पार्थ युज्यते।।(१७-२६)

कार्य योग्य कि अयोग्य हा संशय अर्जुनाला येतो. हे Rightous कार्याचे अज्ञान असते. याच अज्ञानाचा अर्जुन स्विकार करतो.

अज्ञान मिटविण्यासाठी ज्ञान असते. कार्यातील संशय मिटुन कार्यनिश्चय पक्का होण्यासाठी बुद्धियोगाचा आश्रय करणे, याचसाठी ईश्वरज्ञान पुरुष (पुरुषोत्तम) व प्रकृति(गुण) याचे ज्ञानविज्ञानातुन भगवतगीतेत स्पष्ठ केले आहे.

या ज्ञानामुळे मनुष्याचा जीवनविकासाचा मुख्य track "मृत्योर्मां अमृतं गमय " बनतो (अमृतत्वाय कल्पते). कार्याद्वारे योग साध्य करण्यासाठी योगस्थ वृत्तिने कार्यरत होतो. याप्रमाणे कार्याची गति बदलते. कार्याच्या गतिचे transformation होते. हा कर्मयोग असतो.

योगः कर्मसु कौशलम् ।

सार :

श्रीमंती-गरिबी मनुष्याला चटकन समजते. पण सुख-दुःख, दुर्बलता-शक्ति याची निश्चित ओळखच भगवतगीतेने करुन दिली. कितिही प्रचंड दुःख आले तरी विचलीत होत नाही. त्या शक्तिला योग म्हटले आहे. शाश्वत सुखाची ओळख व रहस्य कळते.

यस्मिन स्थिताः न दुःखेन गुरुणा अपि विचाल्यते।
तं विद्याद् दुःखसंयोगंवियोग योग संज्ञितम् ।।(६-२३)

सामान्य असो कि श्रीमंत पैशासाठी कार्य कळते. पण "योगः कर्मसु कौशलम्" याची ओळख होत नाही. अर्थात मनुष्याला पैसा, luxury need, fame, पुण्यप्राप्ति यासाठी कार्य कळते. पण ज्या शक्तिची व्याख्या भगवतगीता करते, त्या शक्तिसाठी कार्य याची जाण नसते.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

या धर्मात कार्याचा दृढनिश्चय असतो. व यासाठी निर्णय अधिकार व निर्णयक्षमतेची ओळख व्हावी.

व्यवसाय आत्मिका बुद्धिः एकेह कुरुनंदन।(२-४१)

वर्तमानात मनुष्यजीवनांत निर्णयक्षमता, व वर सांगितल्याप्रमाणे (निर्भय)शक्तिचे महत्व जाणणे आवश्यक आहे. तरच जीवनातील स्वातंत्र्याचे महत्व कळते.

*****

(१७-२७)

*************************

यज्ञे तपसि दाने च स्थितीः सत् इति च उच्यते।

कर्मं चैव तद् अर्थियं सत् इति एव अभिधीयते।।

*************************

(१७. २७) : "कर्म चैव तद् अर्थियं सत् इतिएव अभिधीयते"

सत मार्ग(विकास) या संदर्भात हा संदेश आहे. व्यवहारात चांगलेपणा, चांगले गुण, चांगला भाव, (ईश्वरावरील )श्रद्धा, निष्ठा असे अनेक शब्द आपण ऐकत असतो. भगवतगीतेत अध्याय १६(दैवीअसुर)व१७(श्रद्धा) यातुन चांगले (सत) गुण व कर्माची निष्ठा याद्वारे (सत)भाव व निष्ठा यांचा समन्वय साधलेला आहे. याद्वारे सत मार्ग अर्थात विकासमार्ग स्पष्ठ केलेला आहे.

मनात भावना असतात. चांगली भावना विकासाची संधी देते. या चांगल्या भावनेला कर्माद्वारे साकार करणे यासाठी कार्यसंस्कार हवे असतात. हे कार्य निष्ठेने होते तेंव्हा सत मार्ग(विकासमार्ग)

ठरतो. या मार्गावर सुख अनुभवतो. भगवतगीता याच विकासमार्गाचे ज्ञान देते.

मन मानेल तसे जगणे या स्थितीची स्वैरता म्हणुन ओळख असते. चांगली भावना असली तरी अर्जुन(मोहामुळे) द्वंद्वाच्या जाळयात सापडतो व "ज्ञान" या संदर्भात प्रज्ञावादी भाष्य करतो. प्रत्यक्षात येथे अर्जुनाची हतबलता असते. चांगल्या भावनेला निष्ठेची जोड मिळत नाही म्हणुन ही स्थिती अज्ञान ठरते. याच उणिवेची भगवतगीता पुर्तता करते.
मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातो असि पांडव।(१६-५)

समाजात चांगले भाव व्यक्त होत असतात. पण निष्ठेविणा ते प्रत्यक्षात साकार होत नाही. मनुष्य आपली हतबलता भाष्याद्वारे व्यक्त करीत असतो. असे भाष्य भगवतगीतेच्या भाषेत प्रज्ञावाद ठरते.

वर्तमानात ज्ञानविज्ञान उपलब्ध झाले तरी समाजात हतबलता जाणवत असते. या हतबलतेलाच "ज्ञान" म्हणुन दर्शविण्यात येते. भगवतगीता याला सरळ प्रज्ञावाद संबोधुन भाष्यकाराचे अज्ञान दर्शविते.

ईश्वरावरील श्रद्धा सात्विक भाव म्हणुन आपण ओळखत असतो. म्हणुन "श्रद्धा" हा शब्द भाव संदर्भात येतो, तर "निष्ठा" हा शब्द कर्म या संदर्भात येतो. निष्ठेने कार्य करणे या संदर्भात निष्काम कर्म शास्त्र म्हटले. यावर अर्जुन प्रश्न करतो, ईश्वरावर श्रद्धा आहे पण निष्काम कार्य नसेल तर ती निष्ठा (सत/रज/तम)कोणती?

ये शास्त्र विधीम् उत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः।
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वमाहो रजःतमः।।(१७-१)

चांगला भाव Divine Inspiration असते. विकासाची संधी देते. याला साकार करण्यासाठी ज्ञान हवे असते. म्हणुन " सत"ला ईश्वराशी जोडले आहे.

"ॐ तत् सत् " यांतील तत् हा शब्द विकासमार्गात(मोक्ष) वापरला. याद्वारे ईश्वरभक्ति व निष्काम कर्म यांचा संबंध साधलेला आहे.

तत् इति अनभिसंधाय फलं यज्ञ तपः क्रियाः।
दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकांक्षिभिः।।(१७-२५)

विकास मार्गावरील कार्यकौशल्यासाठी यज्ञ (Professional) कार्य, दान, तप (शारिरीक, वाचीक, मानसिक) अशा तिन्ही कार्यांचा उल्लेख आहे. वर्तमानातील या कार्यांची स्थिती या संदर्भात विकासमार्गाचा संदेश आलेला आहे. अर्थात सत मार्ग स्पष्ठ होतो.

यज्ञे तपसि दाने च स्थितीः सत् इति च उच्यते।

कर्मं चैव तद् अर्थियं सत् इति एव अभिधीयते॥(१७-२७)

निष्ठेअभावी मार्ग असत् ठरतो. अर्थात हतबलतेचे कारण (अशांती) स्पष्ठ होते.

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत्।

असत् इति उच्यते पार्थ न च तप्रेत्य नो इह॥(१७-२८)

"Once you start a working on something, don't be afraid of failure and don't abandon it. People who work sincerely are the happiest. "

Chanakya

******

(१७-२८)

*************************

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत् ।

असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह।।

*************************

(१७-२८)/१:

"अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत् "

( Importance of Devotion & bravery)

"Loyalty and devotion lead to bravery. Bravery leads to the spirit of self-sacrifice. The spirit of self-sacrifice creates trust in the power of love. "

Morihei Ueshiba

समाजात मनुष्याला श्रद्धावान, सात्विक, चांगले, धार्मिक असे lable लावलेले आपण ऐकत असतो. कोणतेही lable लावले तरी भगवतगीता जीवनविकासात कर्माला Priority देते व कर्माचे

महत्व, कार्यकौशल्य, निष्काम कर्माचे शास्त्र, कर्माची निष्ठा याचे महत्व स्पष्ठ करते.

*निष्काम कर्म समत्वयोगसाधना:

भगवतगीता निष्काम कर्मासाठी प्रसिद्ध आहे पण निर्भयता, साहस या गुणाची साधना निष्काम कर्माद्वारे होते, हे जाणुन घेतले तर निष्काम कर्माचे महत्व कळते.

जगात निर्भयता, साहस या गुणाला प्रथम स्थान आहे.

दैवीगुणसंपत्तिमध्ये "निर्भयता" हा प्रथम गुण आहे.

("अभयंसत्वसंशुद्धिः... ")

"You will never do anything in this world without courage. It is the greatest quality of the mind next to honor. "

Aristotle

"चांगले" या lable संदर्भात अर्जुनाला म्हटले, तु दैवीगुण संपत्तिसाठी जन्माला आलेला आहे, म्हणुन मार्गात विचलित होणे

हेच अज्ञान ठरते. "योगः कर्मसु कौशलम् " अर्थात कार्याद्वारे योग (दुःखान्त) साधनेसाठी निष्काम कर्माचे शास्त्र सांगते.
मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

सात्विक कर्ता व कार्य :
अमुक मनुष्य सात्विक, राजस कि तामसि असे आपण वर्गिकरण ऐकतो, तेंव्हा ते "कर्ता" या संदर्भात असते.

भगवतगीतेत (समत्वयोग) साधना शक्य झाली नाही तर हा जन्म व्यर्थ समजावा काय? असा भगवतगीतेत प्रश्न येतो. तेंव्हा चांगले कार्य (पुण्यकार्य) व्यर्थ जात नाही. असे स्पष्टिकरण आले आहे.
(न हि कल्याणकृत कश्चित् दुर्गतिं तात् गच्छति।६-४०)
अर्थात चांगलेपणा, चांगल्या कार्याचे जीवनविकासातील महत्व निर्विवाद असले तरी भगवतगीता "सात्विक कर्ता" याची निश्चित व्याख्या करते.

सात्विक कर्ता उत्साहाने, धैर्याने, (निष्काम) कार्य करणारा असतो (१८-२६)तर आळशी, शठ, नकारात्मक तामसी कर्ता ठरतो. (१८-२८)

*ईश्वरश्रद्धा, सत निष्ठा व सतमार्ग:

"सात्विक" या lable संदर्भात अर्जुन प्रश्न करतो, जगात ईश्वरश्रद्धा असलेले पण निष्काम कर्मशास्त्र आचरत नाही ते सात्विक, राजस कि तामस समजावे?
येथे अर्जुनाचा प्रश्न निष्ठेसंदर्भात असतो. या प्रश्नाचे उत्तर निष्ठा या संदर्भातच सत व असत मार्ग असे दिले आहे.
अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत् ।
असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह।।(१७-२८)

ज्या कार्यात(यज्ञ, दान, तप) निष्ठा नसते ते "असत" अर्थात(या जीवनात व मरणोत्तर दोन्हि) निरुपयोगी ठरते.
या पार्श्वभुमिवर कार्य निष्ठेने करणे हे" भक्ति" संदर्भात अभिप्रेत आहे. याचाच अर्थ श्रद्धापुर्वक निष्काम कर्मामुळे कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य होते.

*ईश्वरभक्ति व Transformation

सत मार्ग :"ॐ तत् सत्"

भगवतगीता ज्या ईश्वराची ओळख (मया अध्यक्षेण, यतः प्रवृत्ति भूताना... , अहं सर्वस्य प्रभवः .. )करुन देते, त्याच ईश्वराचा संबंध मनुष्याच्या Consciousness शी आहे. हे "क्षेत्रज्ञ" (Knower of field, Universal mind) या शब्दातुन स्पष्ट होते. याच ईश्वरभक्तितुन बुद्धियोग मिळतो. बुद्धियोगामुळे "अमृतत्वाय कल्पते" या राजमार्गावर असतो. या मार्गावर (निष्काम कर्म) साधना घडते. दुःखाने विचलित होत नाही.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

सतमार्ग या संदर्भात "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) याच मार्गाचे स्पष्टिकरण "ॐ तत् सत् " या विश्वातील ईश्वरगतितुन( अर्जुनाच्या निष्ठा या संदर्भातील प्रश्नसंदर्भात) केले आहे.

भगवतगीता यज्ञ(समर्पित कार्य-हवन), दान(परमार्थ), तप (काया, वाचा, मन) या तीन कर्मातील सतनिष्ठा व अनासक्ति स्पष्ठ करते. या कार्याला "ॐ तत् सत् "(ईश्वरगति)यांतील "तत् " संबोधले आहे.

तत् इति अनभिसंधाय फलं यज्ञ तपः क्रियाः।

दानक्रियाश्च विविधः क्रियन्ते मोक्षकांक्षिभिः।।(१७-२५)

कल्याणभाव, चांगला भाव, नित्यविकास व त्याप्रित्यर्थ यज्ञ, दान, तप कार्य याला सत कार्य संबोधले. अर्थात येथे कार्य श्रद्धापुर्वक/निष्ठेने केले जाते. या कार्यातुन साधना होते. हा सत मार्ग(निष्ठेने कार्यरत) ठरतो.

सतभावे साधुभावे च सत इति एतत् प्रयुज्यते।(१७-२६)
कर्म चैव तद् अर्थियं सत् इति एव अभिधीयते।(१७-२७)

अर्थात ईश्वरभक्तितुन सकारात्मक Transformation होते हे भगवतगीता स्पष्ट करते.

"The time you spend alone with God will transform your character and increase your devotion. Then your integrity and godly behavior in an unbelieving world will make others long to know the Lord. "
Charles Stanley

**********

(१७-२८)/२:

"असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह"

(Lack of Purpose loyalty)

समाजात प्रश्न असतात, योजना बनते. तसेच मनुष्य जीवनात नियोजन करतो. Commitment करतो. पण lack of purpose loyalty असेल तर निष्क्रियतेचेच दर्शन होते. चांगल्या मनुष्याची निष्क्रियता समाजाला पंगु बनवीत असते. हाच भगवतगीतेचा विषय आहे.

"The only thing necessary for the triumph of evil is for good men to do nothing. "

Edmund Burke

युद्धक्षेत्रावर अर्जुनाला दुःखाने घेरले असते. त्याची बुद्धि काम करेनाशी होते अर्थात भ्रम होतो. नियोजित कार्य (Committed) दुःखच देणार आहे मग केवळ राज्य मिळावे यासाठी हे दुःख पदरात पाडुन घेणे आहे. "आ बैल मुझे मार" सारखी ही स्थिति आहे. मग नियोजित कार्य योग्य कसे हे त्याला कळेनासे होते. या

वास्तवाची तो कबुली देतो. पण दुःखमुक्ति त्याची prime गरज बनते.

येथे प्रसंग निर्णय घेण्याचा असतो. दुःखी झाल्यावर अर्जुनासमोर दोन options असतात, १. ठरल्याप्रमाणे युद्ध करणे किंवा २. Quit करणे.

मनुष्य शिक्षणातुन, प्राप्त संस्कारातुन लाभलेला आपला व्यवहारमार्ग चालत असतो. मार्ग चालत असतांना जीवनात लहानसहान दिसणारे वळणे येतात. या वळणावर बुद्धिभ्रम झाल्यामुळे निश्चित निर्णय करण्यास मनुष्य असमर्थ ठरतो. म्हणुन भगवतगीता "बुद्धियुक्त" असणे याचे महत्व सांगते. शेवटी अर्जुन म्हणतो, "नष्टो मोहः स्मृतिः लब्ध्वा"

हे निमित्त साधुन भगवतगीतेने मनुष्याच्या जीवनविकासाचा Universal Standard मार्ग सांगितला आहे, ज्यामुळे भगवतगीता जगत् मान्य होण्यास पात्र ठरली आहे. याच Standard मार्गाचे Details (ज्ञान, कर्म व भक्ति ) भगवतगीता सांगत आहे.

समाजात ईश्वरश्रद्ध लोक असतात, ईश्वराची भक्ति करतात. भगवतगीता बुद्धियुक्त या संदर्भात ईश्वरभक्ति व ईश्वरभक्ति या संदर्भात निष्काम कर्माचा उल्लेख करते. याच पार्श्वभूमिवर अर्जुन विचारतो, जे ईश्वरभक्त आहे पण निष्काम कर्माचे शास्त्र आचरण करीत नाही, त्यांची कोणती निष्ठा(सत, रज, तम) समजावी?

ये शास्त्रविधिम् उत्सृज्य यजन्ते श्रद्धया अन्विताः।
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वं आहो रजः तमः।।(१७-१)

सत, रज, तम हे प्रकृतिगुण श्रद्धा बनवीत असते. व प्रत्येक मनुष्याची कोणती तरी(सत, रज वा तम) श्रद्धा असतेच. सात्विक ईश्वराला भजतो. पण निष्ठा (Purpose loyalty) मार्ग संदर्भात असते. म्हणुन याचे उत्तर भगवतगीता सत-असत मार्ग असे वर्गिकरण करुन देते.

"ॐ तत् सत् " याद्वारा सत् मार्ग(Goodwork) याचे वर्णन भगवतगीता करते. या मार्गात "आत्मनो मोक्षार्थ जगत् हिताय च" ही निष्ठा असते.

तत् इति अनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः।

दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः।।(१७-२५)
यज्ञे तपसि दाने च स्थितिः सत् इति च उच्यते।
कर्मं चैव तद् अर्थीयं सत् इति एव अभिधीयते।।(१७- २७)

जे लोक केवळ यांत्रिकरित्या (दर्शनी) (यज्ञ, दान, तप या कार्यात) कार्यरत असतात. लोकांमध्ये सन्मान व्हावा, वरच्या श्रेणीत पण( " आत्मनो मोक्षार्थ जगत् हिताय च/ ॐ तत् सत् ) श्रद्धेचा अभाव असतो. यामुळे मार्ग "सत" ठरत नाही . कारण मार्गात निष्ठेचा अभाव असतो. यामुळे जीवनात किंवा मरणोत्तर इच्छित सुखापासुन वंचित असतो.

अश्रद्धया हुतं दत्तं तपः तप्तं कृतं च यत् ।
असत् इति उच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह।।(१७-२८)

"There are no good and bad peoples; there are only leaderships that behave responsibly or insanely. "

Yossi Sarid

*********

# भगवदगीता

# अध्याय १८ मोक्षसंन्यासयोग

अध्याय १८ मोक्षसंन्यासयोग

अर्जुनाला सत होण्यासाठी फलत्यागाचे महत्व कळते. सर्व भोगैश्वर्याचा त्याग करुन कुणी संन्यास घेतो व येथे अर्जुन कर्म करुन संन्यास, फलत्याग हे शब्द ऐकतो. आता जर प्रत्यक्ष कर्म करायचे आहे तर संन्यास व त्याग यांतील निश्चित भेद काय आहेत हे जाणुन घेण्यासाठी प्रश्न करतो.

या सृष्टित जीवनप्रवाह यंत्रवत सुरु असतात. यांत कर्म घडतात. सृष्टिचक्राला सहकार्य करण्यासाठी या कर्माला यज्ञ संबोधले आहे. जीवनप्रवाह मनुष्यासाठी त्याचा जीवनविकास असतो. या विकासप्रक्रियेत कर्मप्रक्रिया प्रधान असते. या प्रक्रियेचे ज्ञान भगवतगीता स्पष्ठ करते. या ज्ञानामुळे कुणी कर्मात सुख अनुभवतो तर ज्ञानाच्या अभावामुळेच दुःख अनुभवतो.

कर्मप्रक्रियेतील कर्मसाधनांची ओळख

१. सहजकार्य(कर्माचा तांत्रिक/Expertise प्रकार (State of Art). उदा. अर्जुन धनुर्धारी. हा प्रकृतिचा भाग.

२. स्वधर्म, कार्याचा निश्चय निर्णय अधिकार दर्शविते. विकासाचे हे साधन असते.

३. कर्माची गति विकास दर्शविते.

या ज्ञानाची ओळख करुन स्वतः काय करायचे याची निवड मनुष्याला करायची असते. व हाच प्रश्न श्रीकृष्ण शेवटी अर्जुनाला करतात. याच संदर्भात या अध्यायात पुढिलप्रमाणे वर्णन आलेले आहे.

१. त्याग व संन्यास याविषयी असलेले लोकमत व श्रीकृष्णाचे मत

२. जीवनविषयक दृष्टि, कर्म व विकास

२. १प्रकृतिगुणानुसार दृष्टि

२. २ सहजकार्य(State of Art)

२. ३ स्वधर्म व नैष्कर्म्यसिद्धि

३. ईश्वराचा आश्रय

३. १ अहंकार आश्रय(प्रकृतिवश)कि ईश्वर(ज्ञान) आश्रय

३. २ ईश्वरश्रद्धा महिमा

३. ३ संजयमत

## १८. १ संन्यास व त्याग

संसारातील सर्व कर्म काम्य आहेत म्हणुन कर्माचा संन्यास योग्य असे कुणी विद्वत् जन(कवि) म्हणतात. तर अनुभवि विव्दत् जन म्हणतात फलत्याग साधुन कर्म करणे श्रेष्ठ. मनोविज्ञान जाणणारे तत्वज्ञ यांचेही दोन मत आहेत. दुःखदोषास कारण सकाम कर्म त्याज्य आहे. तर यज्ञ, दान, तप या कर्माचा त्याग करु नये असे दुसरे म्हणतात. या पार्श्वभूमिवर श्रीकृष्ण स्वतःचे निश्चित मत सांगतात. यज्ञ, दान, तप तिन्ही कर्मे आचरण्यास कर्तव्य जाणुन करणे श्रेयस्कर आहे. याद्वारे विद्वान, तत्वज्ञ यांनीही पावन (पुर्णता साध्य करावी)व्हावे. हे कर्म फलत्याग साध्य करण्यासाठी कर्तव्य जाणुन करणे हे निश्चित मत आहे.

त्यागाचे तिन प्रकार:

नियतकार्य फलत्याग साधुन करणे सात्विक त्याग,

दुःखाचे भयाने कर्माला कष्टदायी जाणुन नियतकार्याचा त्याग करणे राजस त्याग, तर जबाबदारी पार पाडण्यासाठी नियतकार्याची गरज असतांना (मला कांही नको म्हणुन )कर्म टाळणे . ही वृत्ति मोहामुळे (काय हवे हेच कळत नाही) असते. हा नियतकार्याचा संन्यास तमस त्याग ठरतो.

कर्माचा श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद न करता बुद्धिमान विश्वासाने(संशयरहित) कार्यरत असतो. देहवानाला कर्मत्याग अशक्य आहे, तर फलत्यागी श्रेष्ठ ठरतो.

चांगले, वाईट, मिश्र असे कर्मफल सकाम व्यक्तिला बद्ध करते. पण फलत्याग साधलेला संन्यासी वृत्तिने कार्यरत असतो, त्याला कर्मफल बद्ध (Reaction)करीत नाही.

या सृष्टित(स्थल, कर्ता, कर्मसाधनsenses, कर्मेंद्रियाच्या हालचाली activities, दैव)पाच कारणाने कर्म घडते. शरीर, वाचा, मन याद्वारे(योग्य वा अयोग्य) कर्म घडण्यास हेच पांच तत्व कारण असते.

"दैव" या संदर्भात कुणी भाग्य म्हणतात, कुणी नियति ( Destiny), कुणी ईश्वराने योजिलेले कर्म जाणुन दुःखी होत नाही. कर्म भक्तिसाठी करतो, यांत फल बद्ध करीत नाही . याप्रमाणे फलत्याग शास्त्र बद्ध करीत नाही. ज्या (बद्ध) कारणाने संन्यासी कर्मत्याग करतो, तर कर्म करुनही संन्यासस्थिति अनुभवणे फलत्याग शास्त्राचे वैशिष्ठ ठरते.

१८. २ जीवनविषयक दृष्टि, कर्म व विकास

२. १प्रकृतिगुणानुसार दृष्टि व प्रवृत्ति

आधुनिक ज्ञान कर्म घडण्यासाठी इच्छा, गरज (State of wants)व कर्म (State of Art) अशी विभागणि करते. भगवतगीतेत कर्माचे ज्ञान (Motivater) व कर्म(Activity) असे विभाग येतात. ज्ञान संदर्भात(Motivaters) ज्ञान, ज्ञाता व ज्ञेय(Purpose) कर्मप्रवृत्तिस कारण ठरते. व प्रत्यक्ष कर्म घडण्यास कर्म, कर्ता व इंद्रिय(साधन instrument) हे कर्मसंग्रह ठरतात. ज्ञान व कर्म संदर्भात सत, रज, तम गुण दृष्टि व प्रवृत्तिचे Behavioral pattern ठरते.

ज्ञान, कर्म, कर्ता समुह,

बुद्धि, धृति(धैर्य धारणा)

सुख

सात्विक ज्ञान- एकत्व दृष्टि

सात्विक कर्म- निष्कामभावाने केलेले नियतकार्य

सात्विक कर्ता-स्वतंत्र(आसक्तिबंधनात नसलेला), धैर्यवान, उत्साही, फलातील यशापयश यात निर्विकार

धृति-यांत आळशी, भय व दुःखाने पिडित, विषादी तामस धृति ठरते तर याविरुद्ध (योगयुक्त)सात्विक धृति ठरते.

सात्विक बुद्धि-योग्य अयोग्य, बंधन मुक्ति(स्वातंत्र्य) याचे ज्ञान जाणणारी बुद्धि.

सुख-

तमसुख -निद्रा आळस मोहसुख

रजसुख- विषयइंद्रियसुख

सतसुख-आत्मबुद्धि प्रसन्न करणारे शाश्वत सुख

या प्रवृत्ति मनुष्याचे behavioral pattern ठरविते.

२. २ सहजकार्य(State of Art)

या Pattern नुसार निसर्गात चार प्रवृत्ति आढळतात.

१. पशु(Animal instinct): इच्छापुर्तिसाठी इतरांवर अवलंबुन असणे.

२. मनुष्य(Human instinct):इच्छापुर्तिसाठी कार्य करणे

३. समुह कल्याणार्थ कार्यरत:

४. जगत(मानव)कल्याणार्थ कार्यरत

याच प्रवृत्तिच्या आधारावर समाजव्यवस्था विकसित होत असते. सहजकार्याचे प्रयोजन करण्यासाठी प्राचिन व्यवस्था याच आधारावर होती.

१. जगत(मानव)कल्याणार्थ ज्ञानविज्ञान कार्य - ब्रह्मकार्य

२. समुहकल्याणार्थ (प्रशासन, सुरक्षा)- क्षात्रकार्य

३. अर्थ, समृद्धि कार्य(कृषि, उद्योग ) -वैश्य कार्य

४. सेवाकार्य

या व्यवस्थेत कार्याच्या Expertise नुसार जाती निर्माण झाल्यात. यांत परंपरागत कार्य सहजकार्य ठरायचे. आधुनिक व्यवस्थेत ज्ञानविज्ञानाने पारंपरिक कार्याला नविन आयाम दिला. अर्थ, संसाधन समृद्धिचे कार्य रोजगारनिर्मितिचे, समृद्धिचे प्रमुख साधन असते. या कार्याला नविन आयाम मिळाला. संघटित उद्योगधंदे आलेत, यामुळे पारंपरिक व्यवसाय आर्थिकदृष्ट्या क्षीण झालेत. म्हणुन योग्य समाजव्यवस्थेसाठी कृषि व उद्योग या व्यवसायांना बदलत्या व्यवस्थेत नविन आयाम देणे आवश्यक असते. जसे प्राचिन व्यवस्थेत सहजकार्य उद्दिष्ट होते, तसेच हेच उद्दिष्ट(Professional work) साध्य करणे नवव्यवस्थेला आव्हान असते.

जगतहिताय(ब्रह्म-ज्ञानविज्ञान) व समुहहिताय(क्षात्र-ईश्वरभाव Leadership) कार्याला भगवतगीतेने विशेष गुणांची आवश्यकता प्रतिपादन केली.

२. ३ स्वधर्म व नैष्कर्म्यसिद्धि

स्वधर्म जीवनमुल्य आहे जे स्वतःचा मार्ग(Self approval) बनवते. स्वतंत्रता अनुभवतो.
स्वधर्म द्वंदमुक्तिसाठी Tiebreaker ठरते.

योगक्षेमासाठी सहजकार्य आवश्यक असते. याच कार्याचे स्वधर्मात transformation करुन विकासासाठी स्वतःचा मार्ग बनतो. ज्या मुळ प्रवृत्तितुन सृष्टि उदयास आली त्या प्रवृत्तिचे पुजन स्वधर्माने होते. व नैष्कर्मसिद्धि प्राप्त होते. (अकर्ता, संन्यास)

१८. ३

## ३. ईश्वराचा आश्रय व भक्ति

### ३. १) शाश्वताचा प्रवास

प्रकृतिच्या सत, रज, तम या त्रिगुणानुसार प्रकृति कार्यरत असते. सहजकार्याद्वारे नैष्कर्मसिद्धि प्राप्त करणे यासाठी सहजकार्याचे स्वधर्मात Transformation करणे व मुळ प्रवृत्ति-ईश्वराला समर्पित कार्य करणे. नैष्कर्मसिद्ध झाले असता भक्तिद्वारा ब्रह्मभूत होतो. समत्वदृष्टि, प्रसन्नता प्राप्त होते. ईश्वराच्या राज्यात प्रवेश होतो. म्हणुन ईश्वराचा आश्रय करुन ईश्वरधाममार्गावर(अमृतंगमय) जीवनयात्रेचा प्रवास साध्य करणे(कार्य ईश्वरभक्तिसाठी करणे)यामुळे शाश्वतपद प्राप्त होते.

### ३. २ अहंकार आश्रय(प्रकृतिवश)कि ईश्वर(ज्ञान) आश्रय

भगवतगीतेत विश्वास व संशय, स्वातंत्र्य व बंधन यातील भेद स्पष्ट झाला आहे. संशय असला तर मनुष्य कार्य टाळतो. पण जे स्वतः करतो ते योग्यच आहे असे समजुन करतो व याला स्वातंत्र्य समजतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानभाष्य बोलतो व याला ज्ञान समजतो. हाच अहंकाराचा आश्रय असतो.

जीवनप्रवासात अहंकाराचा आश्रय असल्यामुळे मनुष्याचा प्रवास प्रकृतिवश होतो. यामुळे द्वंदात सापडतो. निष्क्रिय झाला तरी(मनाने)कार्य सुरुच असते.

जीवनात ज्ञानामुळे विश्वास असतो. ज्ञान व स्वातंत्र्य (गुणातीत) अनुभवण्यासाठीच ईश्वराचा आश्रय असतो. ईश्वर मुळ प्रवृत्ति आहे. ज्ञान व स्वातंत्र्याचे मुळ आहे. ईश्वर हृदयस्थानी राहुन शरीरयंत्र ईश्वरामुळेच कार्यरत असते. हे ज्ञान जाणुन बुद्धियोगाचा आश्रय करणे. यामुळे शाश्वत स्थानाकडे जीवनयात्रा प्रवाहीत होते. भक्ति म्हणजे कार्य समर्पितभावाने करणे किंवा फलत्याग साधुन कर्म करणे याद्वारा चित्ताची शुद्धि साधल्या जाते अर्थात चित्त मुख्य मार्गावर स्थिरावते. म्हणुन जीवनप्रवासात 'कर्ता' हे श्रेय कुणाला द्यायचे?अधिकार कुणाला द्यायचा? प्रकृतिला कि ईश्वराला !हे स्वतः ठरवायचे आहे.

याप्रमाणे जीवनयात्रेच्या संपुर्ण ज्ञानाचा समारोप येथे होतो. व श्रीकृष्ण अर्जुनाला त्याच्या निवडअधिकाराची जाणीव देतात. विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।

३. ३ भगवतगीतेचे वैशिष्ट

अर्जुनाला जे धर्मविषयक ज्ञान होते, त्यांत पापाचे भय होते. अमुक केले तर नरक मिळेल, युद्ध केले तर नरक मिळेल याच भयाने अर्जुनाला ग्रासले होते.

मनुष्याला अशा भयानेच ग्रासल्यामुळे तो द्वंदवश होतो. भगवतगीता कोणतेही भय दर्शवित नाही, तर भयमुक्त करण्यासाठी ज्ञान आहे. हेच भगवतगीतेचे वैशिष्ट आहे.

साक्षात श्रीकृष्ण अर्जुनाच्या सोबत होते, तर भगवतगीता या ज्ञानरुपाने प्रत्येक मनुष्याला ही सोबत प्रदान केली आहे. भय नष्ट करण्यासाठी शेवटचा उपाय म्हणुन श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, माझे व तुझे नाते दृढ आहे व तुझे कल्याणच मी इच्छितो. म्हणुन मला शरण ये. कोणत्याही भयाला थारा देवु नको. अर्थात (भय दर्शविणाऱ्या) धर्माचा त्याग करुन फक्त मला शरण ये.

३. ४ ईश्वरश्रद्धा महिमा

अर्जुनाला जीवनाचे हे रहस्यज्ञान श्रीकृष्ण केंव्हाही सांगु शकले असते. पण गरज नसतांना मनुष्य कांहिही ऐकण्याच्या मनःस्थितित नसतो. व्यवहारात मनुष्य आपल्या कार्यात मग्न

असतो. सुखासाठी आपल्या व्यवहारज्ञानसंबंधित बाबीत रस घेतो. फक्त जाहिरात माध्यमातुन आपले विचार लोकांच्या गळी उतरविल्या जाते. पण श्रीकृष्णाला विचार लादायचे नव्हते. आधीच बंधनात सापडलेल्या जीवाला पुन्हा बंधनात अडकवायचे नव्हते.

बंधनातुन मुक्त करण्यासाठी ज्ञान आहे, ज्या ज्ञानाची मनुष्याला गरजच वाटत नाही. बंधनात अडकलो आहे हे सुद्धा कळत नाही. अशा आणिबाणिच्या प्रसंगी श्रीकृष्ण अर्जुनाला सत्य स्विकारण्यास भाग पाडतात व अर्जुन ऐकायला तयार होतो. व याद्वारे श्रीकृष्णाला हे रहस्यज्ञान सांगण्याची संधि मिळाली, तेंव्हा ते हर्षित झाले.

ईश्वर व मनुष्याचे दृढ नाते आहे. याच नात्याचे ज्ञान भगवतगीता करुन देते. व याचसाठी श्रीकृष्ण अवताराचे प्रयोजन होते. व जगासमोर हे शाश्वताचे ज्ञान आले.

ईश्वराप्रति श्रद्धा नसेल तर या ज्ञानावर भाष्य करणे निरर्थक ठरते. पण ज्याची श्रद्धा आहे, ज्ञान जाणण्यास उत्सुक आहे, त्यांनाच या ज्ञानाचे रहस्य सांगणे उचित असते व ही भक्ति ठरते. या ज्ञानाच्या

अभ्यासात रमणे, चर्चेत रमणे यांत ज्ञानयोगरुपाने भक्ति लाभ होतो. जे श्रोते श्रद्धेने ऐकतात त्यांनाही भक्तिलाभ होतो.

*पुर्वी सांगितल्याप्रमाणे जे ईश्वराला जगाचा कर्ता, भर्ता, अध्यक्ष जाणुन त्या ज्ञानात रमतात, या ईश्वराची भक्ति करतात, त्यांना बुद्धियोग ही कृपा प्रदान होते. यामुळे हृदयातील अज्ञानाचा नाश होतो. व जीवनयात्रा अमृतंगमय या मुख्य मार्गावर(Spiritual journey) प्रवाहित होते.

* याप्रमाणे श्रद्धाज्ञान सांगुन श्रीकृष्ण अर्जुनाला प्रश्न करतात. व अर्जुन म्हणतो, आपल्या कृपेने मोह नष्ट झाला. संशय मिटुन स्मृति पुर्ववत स्थिर झाली.

I AM READY

३. ५ संजयमत

साक्षात ईश्वराने अर्जुनाशी साधलेला, व्यासांनी शब्दबद्ध केलेला हा संवाद आपणापर्यंत पोहोचला. या संवादाने प्रसन्नता लाभतेव पुनःपुनः ऐकावयासा वाटतो, हे बोलुन संजय म्हणतो, अद्भुत

ईश्वराचे विश्वरुप आठवुन विस्मय वाटतो, प्रसन्नता लाभते, व आपले निश्चित मत धृतराष्ट्राजवळ व्यक्त करतो,

जेथे श्रीकृष्ण (ईश्वर) व धनुर्धारी अर्जुन आहे तेथे श्री(वैभव), विजय(यश), भूति(अद्भुत शक्ति) निश्चित आहे व हीच बाजु नीतिची (धर्मश्रेष्ठ) आहे.

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।

तत्र श्रीः विजयो भूतिः धृवा नीतिः मतिर्मम॥(१८-७४)

*********** **** ********

अध्याय १८- मुख्य विषयावर दृष्टिक्षेप

(१८-१) :

"संन्यासस्य महाबाहो तत्वम् इच्छामि वेदीतुम् "

(The last doubt)

१८. २/१ :

" काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः"

(कार्यकौशल्य -गुणात्मक ज्ञान)

(१८-२)/२:

"सर्वकर्मफलत्यागं प्राहुः त्यागं विचक्षणः "

(कर्मकौशल्य, निर्भयतेची साधना)

(१८-४)/१:

"निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम् "

१८. ४/२:

"त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः"

१८. ५/१:

"यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यं एव तत् "

(१८-५)/२:

"यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम्"

(जीवनविकासात कर्म साधन)

(१८-७) :

"नियतस्य तु संन्यासः कर्मणो न उपपद्यते"

(नियतकर्माचा त्याग vs फलत्याग)

(१८-९) :

"संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः"

(जीवनमार्गातील त्यागाचे तत्व व ध्येयपुर्तिचे रहस्य)

१८-१०:

"त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः"

(चांगल्या मनुष्याचे Determination)

(१८-११)/१:

" न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माणि अशेषतः"

(त्यागाची निश्चित व्याख्या)

(१८. ११)/२:

"य: तु कर्मफलत्यागी स त्यागी अभिधीयते"

(Sacrifice :The source of Peace)

(१८-११)/३ :

न हि देहभृतां शक्यं ... vs. न विमुच्यन्ति दुर्मेधा ...

(जीवनाचे वास्तव व Wisdom vs. Stupidity)

(१८-१२) :

"अनिष्टं इष्टं मिश्रं च त्रिविध कर्मणा फलम् "

(Breaking Karmic Trap)

(१८-१३):

"पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे"

(दैवाची निश्चित व्याख्या)

(१८-१४):

"विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैव अत्र पंचमम्"

१८. १५ :

"न्याय्यं विपरितं वा पञ्चैते तस्य हेतवः"

(दैव vs. अधिकार)

(१८-१६) :

"पश्यति अकृतबुद्धित्वान् न स पश्यति दुर्मति।
यस्य न अहंकृतो भावो बुद्धिःयस्य न लिप्यते"

(बुद्धिनाश vs. स्थितप्रज्ञ )

(१८-१७)/१:

"यस्य न अहंकृतो भावो बुद्धिः यस्य न लिप्यते"

(अहंकार Vs ज्ञान)

(१८-१७)/२ :

"हत्वापि स इमान् लोकान् न हन्ति न निबध्यते"

(Right Interpretation)

१८-१८/१ :

"ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधः कर्मचोदना "

(Motivation : कर्माची प्रेरणा)

(१८-१८)/२:

"करणं कर्म कर्ता इति त्रिविधः कर्मसंग्रहः"

(भगवतगीतेचे गुणात्मक ज्ञान)

(१८-१९) :"ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः"

(मनुष्यजीवनातील विकासाचे ज्ञान )

१८. २० :

"अविभक्तं विभक्तेषु तद् ज्ञानं विद्धी सात्विकम्"

(१८-२३)/१:

"अफलप्रेप्सुना कर्म यत् तत् सात्त्विकम् उच्यते"

(१८-२३)/२:

"नियतं संगरहितं अरागद्वेषतः कृतम् "

(Art of Detachment )

(१८-२४) :

"यत्तु कामेप्सुना कर्म सअहंकारेण वा पुनः"

(व्यवहारातील सकाम कर्माची मानसिकता)

(१८-२६)/१:

" मुक्तसंगो अनहंवादी धृति उत्साहसमन्वितः"

(सात्त्विक कर्ता/श्रेष्ठ व्यक्तिमत्व)

(१८-२६)/२ :

"सिद्धि असिद्ध्योः निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते"

(व्यक्तिमत्व)

(१८-२७) :

"हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः"

(सकाम vs निष्काम, चांगले उत्साही व्यक्तिमत्व)

(१८-२८) :

"अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कतिको आलसः ।

विषादी दीर्घसुत्री च ... "

(क्रियाशिल-Active vs. निष्क्रिय- Idle)

१८. ३०/१:

"प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्य अकार्ये भय अभये"

(The Choice & Determination)

(१८. ३०)/२:

"बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी"

(Age of Science & Wisdom)

१८. ३०/३: बंधं मोक्षं च या वेत्ति "

(Trap vs Freedom)

(१८. ३१)/१ :

"यया धर्मं अधर्मं च कार्य च अकार्यं एव च..

अयथावत प्रजानाति.. "

(स्वतःचा स्वधर्म)

१८. ३१/२ :

"अयथावत् प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसि"

(Strength vs. Weakness)

१८. ३२/१:

"अधर्मं धर्मं इति या मन्यते तमसा आवृता"

(Mode of Wisdom vs. Mode of Ignorance)

(१८. ३२)/२ :

"सर्वार्थान् विपरितांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी"

(Transperency of Strength & Weakness)

१८-३३/१ :

"धृत्या यया धारयते मनःप्राणइंद्रियक्रियाः"

(१८-३३)/२:

"धृत्या यया धारयते मनःप्राण इंद्रियक्रियाः"

Part II (Determination in the mode of goodness)

(१८-३४):

"यया तु धर्मकामार्थान् धृत्या धारयते अर्जुन।

प्रसंगेन फलाकांक्षी.. "

(Flaw in determination)

१८. ३५/१:

"यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदं एव च...

.. न विमुच्यन्ति दुर्मेधा "

(Frustrated life vs. Happy life)

(१८-३५)/२ :

" न विमुञ्चति दुर्मेधा "

(दुर्गुण न सोडणे vs. बदल घडवुन आणणे)

(१८-३६) :

"अभ्यासात् रमते यत्र दुःखान्त च निगच्छति"

(Happiness)

(१८-३७) :

"तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तं आत्मबुद्धिः प्रसादजम् "

(सुख व सुखी जीवनाचा मार्ग/Happy life/Change of mode of living)

(१८-३८):

"विषयइंद्रियसंयोगात् यद् तद् अग्रे अमृतोपमम् ..

परिणामेविषम् इव "

(Desire vs. Drive force of life)

(१८-४३) :

"शौर्यं तेजो धृतिः दाक्ष्यं युद्धे च अपि अपलायनम्"

(१८-४४) :

"कृषि गोरक्ष्य वाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् "

(१८-४५)/१ :

"स्वे स्वे कर्मणि अभिरतः संसिद्धिं लभते नरः"

(विश्वसंचलनात स्वभावनियत कार्याची भूमिका)

१८-४५/२:

"स्वे स्वे कर्मणि अभिरतः "

(Rising above the worldly troubles)

(१८-४५)/३:

"स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तत् शृणु"

(कर्तृत्व, श्रेष्ठत्व व जीवनमुल्ये)

(१८-४६)/१:

"यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम् "

(The Source)

१८. ४६/२:

"स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः"

१८. ४७/१:

"श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् "

(Searching own Destiny)

१८-४७/२:

"स्वभावनियतं कर्म कुर्वन्न आप्नोति किल्बिषम्"

१८. ४८/१:

"सहजं कर्म कौंतेय सदोषम् अपि न त्यज्येत् "

(State of Art)

(१८-४८)/२:

" सर्वारम्भा हि दोषेण धूमेन अग्निः इवआवृताः"

(Importance of courage)

(१८-४८)/३:

"सर्वारम्भा हि दोषेण धूमेन अग्निः इवआवृताः"

(स्वधर्म Tiebreaker)

(१८-४९) :

"नैष्कर्मसिद्धिं परमां संन्यासेन् अधिगच्छति"

(Attitude of Growth Mindset:

निष्क्रियता vs. नैष्कर्मसिद्धि)

१८. ५६/१ :

"सर्वकर्माणि सदा कुर्वाणो मद् व्यपाश्रयः"

(१८-५६)/२ :

"सर्वकर्माणि सदा कुर्वाणो मद् व्यपाश्रयः।

मद्प्रसादात् अवाप्नोति शाश्वतं पदम् अव्ययम्।।"

(Activation of higher consciousness चेतना जागृति)

(१८. ५७)/१:

"चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः"

(Right mental attitude)

१८-५७/२:

"बुद्धियोगं उपाश्रित्य मत् चित्तः सततं भव"

(१८-५७/३)विषय ६४७ :

"बुद्धियोगं उपाश्रित्य मत् चित्तः सततं भव"

(II. Spiritual Wisdom)

(१८-५८/१:

"मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि"

(ईश्वर vs. अहंकार )

१८. ५८/२:

"अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रोष्यसि विनङक्ष्यसि"

(अहंकार vs. ज्ञान)

१८. ५९/१ :

"यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे" (The Third Option)

१८. ५९/२ :

"मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वाम् नियोक्ष्यति"

(Men argue and Nature acts)

(१८-५८)/३ :

"मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि।

अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रोष्यसि विनङक्ष्यसि"

(ईश्वरज्ञानाश्रय)

१८-६०/१:

"स्वभावजेन कौंतेय निबध्दः स्वेन कर्मणा"

१८. ६०/२:

"कर्तुं न इच्छसि यत् मोहात् करिष्यसि अवशोअपि तत् "

(१८-६१)/१ :

" ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति"

( I-God The Barrier breaker)

१८-६१/२:

"ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति"

( II-Survival life vs. Higher life)

१८-६१/३:

"भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया"

१८. ६२/१ :

"तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत"

(१८-६२)/२:

"तत् प्रसादात् परां शांतिम् स्थानम् प्राप्स्यसि शाश्वतम् "

(परिस्थितिला शरण कि परमात्म्याला शरण?)

१८-६३/१:

"इति ते ज्ञानं आख्यातं गुह्यात् गुह्यतरं मया"

१८. ६३/२ : "यथा इच्छसि तथा कुरु"

१८-६३/३:

"विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु"

(१८-६३) /४:

"कर्मण्येवाधिकारस्ते -(ते)-यथा इच्छसि तथा कुरु"

(Right to Choice)

(१८-६४)/१ :

" सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः"

(जीवनविकासाचे रहस्य)

१८-६४/२:

"इष्टोअसि मे दृढम् इति ततो वक्षामि ते हितम्"(I)

१८. ६४/३:

"इष्टोअसि मे दृढम् इति ततो वक्ष्यामि ते हितम् "

(II-Knowledge Trap vs Wisdom:

बंधन vs मोक्ष)

१८. ६६/१ :

"सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज"

१८. ६६/२:

" स्वधर्मे निधनं श्रेयः"vs"सर्वधर्मान् परित्यज्य"

(१८-६६)/३ :

" सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज"

(आत्मोन्नति-Self empowerment)

(१८-६६)/४:"अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः"

(Importance of Determination & Freedom)

१८. ६७/१:

"इदं ते ना तपस्काय ना भक्ताय कदाचन "

(१८-६७)/२:

"न च अशुश्रूषवे वाच्यं न च मां यो अभ्यसूयति"

(सावधान)

१८. ६८/१:

"य इदं परमं गुह्यं मद् भक्तेषु अभिधास्यति"

(Speaker -listner of Bhagwatgeeta)

(१८-६८)/२:

"भक्ति मयि परां कृत्वा मामैव ऐष्यति असंशयः"

(भगवदगीतेचे महात्म्य:Spiritual Revolution)

(१८-६९) :

"न च तस्मात् मनुष्येषु कश्चित् मे प्रियकृतमः"

(भगवदगीता रहस्य)

१८-७०/१:

"अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादम् आवयोः"

(१८-७०)/२: " धर्म्यं संवादम् आवयोः"

(ज्ञानयज्ञ)

(१८-७०)/३:

"ज्ञानयज्ञेन तेन अहम् इष्टः स्याम् इति मे मतिः"

(भगवतगीतेचा ज्ञानयज्ञ)

१८. ७१ : "श्रद्धावान अनसूयश्च शृणुयात् अपि यो नरः"

(१८-७२)/१:

"कश्चित् एतद् श्रुतं पार्थ त्वया एकाग्रेण चेतसा"

(Right vs Rightous)

१८-७२/२: "कश्चित् अज्ञान संमोहः प्रनष्टः ते धनंजय?"

१८. ७३/१: " नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा "

(End of darkness)

(१८-७३)/२:

"नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा त्वत् प्रसादात् मया अच्युत"

(बुद्धिनाश vs. बुद्धियोग)

(१८-७३)/३:

"स्थितोअस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव"

(Psychodrama of Arjuna)

(१८-७३)/४ : "करिष्ये वचनं तव"

(Governing Self)

१८-७६:

"केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुःमुहुः"

(आनंद, भक्ति व वर्तमान ज्ञान)

(१८-७८)/१ :

" यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः "

(जेंव्हा चांगलेपणा सक्षम होतो.. )

१८. ७८/२ : "तत्र श्री: विजयो भूतिः धृवा नीतिः मतिः मम "

(१८-१)

*******************

संन्यासस्य महाबाहो तत्वम् इच्छामि वेदीतुम् ।

त्यागस्य च हृषीकेशो पृथक् केशिनिषूदन॥

*******************

(१८-१) :

"संन्यासस्य महाबाहो तत्वम् इच्छामि वेदीतुम् "

(The last doubt)

जगी ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे हा भगवतगीतेचा संदेश आहे. मनुष्याचे सिमित ज्ञान हे भगवतगीतेच्या ज्ञानाचे द्वार आहे.

अर्जुनाला नियतमार्गात(Journey) दुःख झाले. त्याला ठरल्याप्रमाणे युद्ध करणे वा न करणे यातुन एक निवड करायची असते. यासाठी analysis करतो.

शोकदायी नियतकार्य योग्य कसे हे कळत नाही. या कार्याच्या योग्य-अयोग्य यापेक्षा त्याला दुःख असह्य होते. दुःख टाळण्याच्या

हेतुनेच नियत युद्धकार्य पाप आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान सांगतो. अर्जुनाच्या सिमित ज्ञानाचा हा परिणाम असतो.

"True knowledge exists in knowing that you know nothing. "

-Socrates

प्रत्येक मनुष्याचे ज्ञान सिमित असते. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी याच सिमित ज्ञानाचा वापर करुन मनुष्य Judgement thinking करीत असतो.

मनुष्याने विश्वासाने मार्गक्रमण करावे. त्याचा मार्ग पक्का (Determination) अर्थात निश्चित असावा. याद्वारे निष्काम कर्म(Detachment)/ईश्वरभक्ति साध्य करीत असतो. (अमृतत्वाय कल्पते) . हा जीवनाचा Standard मार्ग असतो. याच आधारावर अर्जुनाच्या भूमिकेला अज्ञान संबोधण्यात आले. व योग्य काय? यासाठी "ज्ञान" हा विषय सुरु होतो.

१. अज्ञानाचा स्विकार करणे. (Acceptance)

२. निश्चित प्रश्न/चर्चेचा विषय ठरणे. (Agenda)

३. योग्य काय हे ज्ञान कळणे. (ज्ञान)

४. जे योग्य त्याची संवय करणे. (अभ्यास)

"ज्ञानार्जन" या संदर्भातील वरील चारही मुद्याचा समावेश चर्चेत असतो. अर्जुन आपल्या शंकेचे निरसन करुन घेतो. अर्जुनाला Standard मार्गाचे संपुर्ण ज्ञान मिळते. या मार्गाला शेवटी (१७-२८) सतमार्ग संबोधले आहे. यानंतरही एक शंका विचारतोच.

शंका, संशय वाटेत पहाडच उभा करतो. म्हणुन ज्ञानार्जन या संदर्भात संशय दुर होणे राक्षसाला ठार मारण्यासारखे असते. अर्जुनाचा हा शेवटचा प्रश्न याच शंकानिरसन संदर्भात आहे. त्याग व संन्यास या दोन्ही Technical शब्दांचा उल्लेख होतो. व्यवहारात मात्र या दोन्ही शब्दांमध्ये साम्य वाटते. पण भगवतगीता त्यागाला श्रेष्ठ ठरविते.

श्रेयोही ज्ञानम् अभ्यासात् ....

..... त्यागात् शांतिः अनंतरम् ।(१२-१२)

अर्जुन या संदर्भात निश्चित प्रश्न करतो.

संन्यासस्य महाबाहो तत्वम् इच्छामि वेदीतुम् ।
त्यागस्य च हृषिकेशो पृथक् केशिनिषूदन।।(१८-१)

कर्म काम्य आहे हे जाणुन कर्माचा त्याग करणे याला कुणी संन्यास म्हणतात. पण नियतकर्म करुन फलत्याग करणे अर्थात निष्काम कर्म करणे कुणी श्रेष्ठ समजतात, व भगवतगीतेचा निश्चित संदेश हाच ठरतो.

कर्तव्यान् इति मे पार्थ निश्चितं मतम् उत्तमम् ।(१८-६)
कार्यम् इत्येव यत् कर्म नियतं क्रियते अर्जुन।
संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः।।(१८-९)

******

(१८-२)

*************************

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः।

सर्वकर्मफलत्यागं प्राहुः त्यागं विचक्षणाः।।

*************************

१८. २ :

" काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः"

(कार्यकौशल्य -गुणात्मक ज्ञान)

संन्यास, त्याग हे समाजातील आदर्श या संदर्भात प्रचलित शब्द आहेत. अर्जुन निष्क्रियतेला आदर्श दर्शवितो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी निष्क्रियतेला आदर्श दर्शविण्याचाच समाजात प्रयत्न होतो. संन्यास, त्याग, दान असे शब्द वापरुन जेंव्हा आपल्या निष्क्रियतेचे समर्थन केल्या जाते, श्रेष्ठत्व, आदर्श या संदर्भात समाजाला घातक ठरत असते. कारण समाजात राहतांना जे श्रेष्ठ असतात त्यांचेच अनुसरण सामान्यजन करतात.

उत्सिदेयुः इमे लोका न कुर्याम् कर्म चेत् अहम् ।
संकरस्य कर्ता स्याम् उपहन्याम् इमाः प्रजा॥(३-२४)

भगवतगीता आदर्श या संदर्भात संन्यास, त्याग यासाठी कर्माची आवश्यकता स्पष्ट करते. एकीकडे कर्माची आवश्यकता सांगणे व दुसरीकडे संन्यास, त्याग याच शब्दाचा भगवतगीतेत वारंवार उल्लेख होतो. या पार्श्वभूमिवर अर्जुन आदर्श या संदर्भात संन्यास, त्याग याचा निश्चित अर्थ व तत्व जाणुन घेण्याची इच्छा करतो व हाच त्याचा शेवटचा प्रश्न असतो.

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुः त्यागं विचक्षणाः॥(१८-२)

कर्म काम्य आहेत, संसारात बद्ध करतात म्हणुन कांही विद्वान (जाणकार) कर्माचाच संन्यास पसंत करतात. तर अनुभवी जाणकार निष्काम कर्माला(फलत्याग) त्याग संबोधतात.

व्यवहारात कर्म सकामच असते. कर्माचा हेतु असतो. कर्माने प्राप्ति होते. प्राप्ति झाली तरच दान करेल म्हणुन प्रत्यक्षात कर्म करणारेच दानकर्म करतात. मला कांही नको म्हणुन कर्म टाळणारे त्यागी ठरत नाही. तर निष्काम कर्म करणारे अर्थात फलत्याग(फल ईश्वराला समर्पण) करणारे त्यागी ठरतात.

"Labour may be a burden and a chastisement, but it is also an honour and a glory. Without it, nothing can be accomplished. "
Samuel Smiles

कर्मकौशल्य ज्ञान नसेल तर कर्म कष्ट वाटतात. यामुळे जीवन भार(Burden) वाटते. जे कर्म सहज करतो, त्या कर्मात मनुष्याची आवड असते. त्या कर्माला स्वतःचे बनवितो. कर्माला स्वतःचे बनविणे हेच सुखी जीवनाचे रहस्य आहे. कर्मातच स्वातंत्र्य अनुभवण्यासाठी निर्णय अधिकार जाणणे, कर्माला स्वतःचे बनविण्यासाठी स्वधर्म मुल्याचा उपयोग करणे, संन्यास अनुभवण्यासाठी ( ईश्वराचेच )कार्य ईश्वराला समर्पण करणे, त्याग अनुभवण्यासाठी कार्याचा निश्चय करुन निष्काम कर्म(ईश्वराला

फल समर्पण) करणे. म्हणुन भगवतगीतेत कर्मकौशल्याचे महत्व आहे . यालाच "योगः कर्मसु कौशलम् " संबोधले आहे.

यज्ञभावाने कर्म करणे, ईश्वरभक्तिसाठी कर्म करणे हा कर्मकौशल्याचाच भाग आहे. याप्रमाणे भगवतगीताज्ञान कर्माला अकर्म अनुभवणे, संन्यास, त्याग इ. आदर्श अनुभवण्यासाठी कर्म करणे, स्वातंत्र्य(बंधनमुक्ति) अनुभवणे यासाठीच कर्मकौशल्य शास्त्र आहे.

"संख्यात्मक ज्ञान vs. गुणात्मक ज्ञान" Knowledge vs. Wisdom जाणले तर सुखी जीवनासाठी भगवतगीतेतील कर्मकौशल्य शास्त्र हेच गुणात्मक ज्ञान (Wisdom) ठरते.

तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।(२-५०)

"A true teacher would never tell you what to do. But he would give you the knowledge with which you could decide what would be best for you to do. "

*******

(१८-२):

"सर्वकर्मफलत्यागं प्राहुः त्यागं विचक्षणः "

(कर्मकौशल्य, निर्भयतेची साधना)

केवळ योगक्षेम इच्छापुर्ति, भोगैश्वर्य इच्छापुर्ति साठीच नव्हे तर मानसिक आरोग्यासाठी, सक्षमतेसाठी, विकासासाठी कर्माचे महत्व भगवतगीता दर्शवुन देत आहे.

व्यवहारात संन्यास व त्याग हे दोन्ही शब्द आपण ऐकत असतो. भगवतगीता कर्माद्वारे संन्यास व योग(योगासाठी फलत्याग) सांगत आहे. कर्मयोग फलत्यागावर आधारीत आहे. कर्म या संदर्भातील संन्यास व त्याग यांचे निश्चित तत्व काय?हे अर्जुनाला जाणायचे असते.

कर्म काम्य आहे म्हणुन कर्माचा संन्यास करणे असे कांही लोक समजत असतात. तर निष्काम कर्मातील फलत्याग याला जाणकार त्याग समजतात. व भगवतगीतेला हीच व्याख्या अभिप्रेत आहे.

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः।

सर्वकर्मफलत्यागं प्राहुः त्यागं विचक्षणः।।(१८-२)

निष्क्रियतेचे समर्थन हा मानवी Weakness आहे. निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी कर्माविषयी गैरसमज समाजात पसरत असतो. पण त्याचे दुरगामी परिणाम आळस, भय, दुर्बलतेत आढळते. याउलट स्वयंप्रेरणेने, आनंदाने कर्म करणे कार्यसंस्काराचा परिणाम असतो. भगवतगीता याच कार्यसंस्काराचे ज्ञान (बुद्धियुक्त/गहना कर्मणो गतिः) स्पष्ट करीत आहे.

*भय vs. पुढाकार

निष्काम कर्माचा अर्थ निर्भयता, कार्याचा एकनिश्चय, कार्य निष्ठेने (समत्वयोगाने)करणे, इ. अभिप्रेत होतो.

"If one has fear, there can be no initiative in the creative sense of the word. To have initiative in this sense is to do something original - to do it spontaneously, naturally, without being guided, forced, controlled. It is to do something which you love to do. "

-Jiddu Krishnamurti

आपल्या नियतकार्याला, स्वभावनियतकार्याला (आवडणारे कार्य) स्वधर्म जाणुन कार्य केले तर विकास असतो. आणि कार्यरत राहुन मृत्यु जरी आला तरी धर्माला अपेक्षित असणारी स्वर्गप्राप्ति असते. म्हणुन कर्माला पर्याय नाही. या कर्माची गति जाणुन घेणे म्हणुन आवश्यक व महत्वाचे आहे. याच ज्ञानाच्या अभावाने निष्क्रियतेचे समर्थन होत असते. व त्याग या संदर्भातच निष्क्रियतेला रंग चढवित असतो.

"मानसिक विकासासाठी कर्म" या संदर्भात "योगः कर्मसु कौशलम् " हा संदेश आहे

सार :

प्रत्येक मनुष्य Unique असतो. एखादे चांगले कार्य दृष्टिक्षेपात दिसुनही भयामुळे पुढाकार घेत नाही व निष्क्रियता निवडतो. निष्क्रियता म्हणजे त्याग नव्हे, तर ते अज्ञान असते. अर्थात चांगलेपणा नसतो. कर्म करणाऱ्याचा फलत्याग (समत्व, परिणामभयापासुन मुक्त) म्हणजे त्याग ही भगवतगीतेची त्यागाची व्याख्या आहे. या कौशल्यामुळेच कार्याचा एकनिश्चय असतो. निष्ठेने कार्यरत असतो. निर्भयता अर्थात मानसिक सक्षमता साध्य करण्याची कर्मयोग ही साधना असते. (त्रायते महतो भयात्)

********

(१८-४)

*************************

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम् ।

त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः॥

*************************

.

(१८-४)/१:

"निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम् "

आपली भूमिका योग्य आहे हे दर्शविण्यासाठी समर्थन करणे व सिद्ध करण्यासाठी ज्ञान सांगणे, ही समाजातील एक संवय असते. समर्थन मात्र दोन्ही बाजुंनी होवु शकते. समर्थनच करायचे असेल तर मनुष्य निष्क्रियतेचेही समर्थन करु शकतो. याच घटनेने भगवतगीतेने ज्ञानाचे द्वार उघडले. मनुष्याला निर्णय घ्यायचा असतो, पण द्वंद्वाच्या जाळयात सापडतो म्हणुन त्याला निश्चित मत हवे असते.

"अर्जुनाला दुःखामुळे युद्ध करायचे नसते. युद्ध करणे चुकीचे आहे यासाठी प्रथम समर्थन करतो. व पाप आहे हे सिद्ध करण्यासाठी

धर्माचा आधार घेतो. पण निष्क्रियतेची भूमिका अयोग्य आहे असे श्रीकृष्ण दर्शवुन देतात, तेंव्हा युद्ध न करण्याचे निश्चित कारण सांगतो. वंद्य जेष्ठांना मारणेच अकल्पनिय आहे. कोण योग्य हे कळत नसले तरी आपली बाजु धर्माची जाणली तरी स्वजनांना मारुन होणारा शोक मिटणे अशक्य वाटते. "

अर्जुनाने निष्क्रियतेचे केलेले समर्थन त्याच्या चांगलेपणाची साक्ष असते. पण जीवनविकास या संदर्भात ही अज्ञान भूमिका ठरते. व त्याला निश्चित उत्तर/मत हवे असते. हेच निश्चित मत ऐकुन घेण्यास अर्जुन तयार होतो. व निश्चित मताचा आग्रह धरतो.

१. तदेकं वद निश्चित्य येन श्रेयो अहं आप्नुयाम् ।(३-२)

जीवनविकासमार्गावर श्रेष्ठ दुःखाने विचलित होत नाही. याच संदर्भात स्थितप्रज्ञ ज्ञान ऐकतो व प्रश्न करतो. बुद्धिची स्थिरता (ज्ञान) श्रेष्ठ आहे तर (अप्रिय) कर्माचे प्रयोजन कशाला?कर्म कि ज्ञान(बुद्धि) यांत श्रेयस्कर काय?

२. यत् श्रेयं स्यात् निश्चितम् ब्रुहि तन्मे।(५-१)

कर्मकौशल्य या संदर्भात एकदा कर्माचा संन्यास (अकर्म) ऐकले व पुनः योग ऐकले. यांत माझ्यासाठी योग्य काय?

याप्रमाणे निष्काम कर्म या संदर्भात फलत्यागातुन योग, बुद्धिची स्थिरता(विचलित न होणे) हे ज्ञान ऐकतो. कर्म आवश्यक हे जाणतो व कर्मकौशल्य या संदर्भात शेवटी संन्यासाचे तत्व व त्यागाची निश्चित व्याख्या जाणुन घेण्याची इच्छा करतो. याच संदर्भात भगवतगीतेचे निश्चित उत्तर आहे.

३. निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम् ।
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः।।(१८-४)

कर्म या संदर्भात कांही विद्वान कर्म काम्य आहे म्हणुन संन्यास घेणे योग्य आहे ही भूमिका घेतात, तर जाणकार निष्काम कर्म (फलत्याग) आवश्यक जाणतात. कर्माचा त्याग करणे दोष ठरतो असे जाणुन यज्ञ(समर्पण), दान, तप (काया वाचा मन-आचरण) प्रित्यर्थ कर्मे आवश्यक जाणतात. याप्रमाणे असे दोन मतप्रवाह समाजातील विद्वांनामध्ये आढळतात. या पार्श्वभूमिवर श्रीकृष्ण निश्चित मत देतात.

कर्तृत्ववान, श्रेष्ठ मनुष्य (यज्ञ-समर्पण, दान, तप-काया, वाचा, मन-आचरण) कर्म करुनच पावन होतात. नियतकार्याचा त्याग हा तम त्याग तर कष्टाच्या, दुःखाच्या भयाने नियतकार्याचा त्याग रज त्याग ठरतो. नियतकार्य करतांना फलत्याग(परिणामभयमुक्त) अर्थात निष्किम कर्म सत त्याग ठरतो. यामुळे भयमुक्त असतो. म्हणुन त्यागी निर्द्वंद्व असतो यामुळे कार्याचा दृढनिश्चय असतो. याच ज्ञानामुळे जीवनविकासमार्गात निष्क्रिय असण्यापेक्षा निष्काम कर्म श्रेष्ठ ठरते.

कार्यम् इत्येव यत्कर्म नियतं क्रियते अर्जुन।
संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्विको मतः॥(१८-९)

"It is by acts and not by ideas that people live. "
Anatole France

*******

(१८. ४)/२:
"त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः"

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम् ।
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः सम्प्रकीर्तितः॥(१८-४)

मनुष्याला, स्वतःला जे जीवन मिळाले आहे ते Unique आहे. ते सिमित काळासाठी असले तरी त्याला स्वतःच्या जीवनाचे महत्व कळावे हेच भगवतगीतेला अभिप्रेत आहे. "पुरुषव्याघ्र" या शब्दाचे प्रयोजन मानवात श्रेष्ठ (पुरुषातील वाघ) या अर्थाने भगवतगीतेत आलेला आहे, जो निश्चितपणे आपला मार्ग जाणतो. व विश्वासाने मार्ग चालतो.

व्यवहारात श्रेष्ठ, ज्ञानी, Leadership Personality या अर्थाने "पुरुषव्याघ्र" (शेळी व वाघ, Herd व Master)ही ओळख असते. शेळयांबरोबर तुलना करुन जगणे, निष्क्रियतेचे समर्थन करणे ही herd मानसिकता असते. म्हणुन स्वतःचा मार्ग निश्चित करण्यासाठी मनुष्याची भूमिका "पुरुषव्याघ्र" असावी हे भगवतगीतेला अभिप्रेत आहे.

जगात अनेक ज्ञानी, विद्वान झालेत, वर्तमानात आहेत व पुढेही होतील. जगात व्यवहार असतो. याच अनुषंगाने कर्म केल्या जाते, भाष्य बोलल्या जाते. यामुळे विविध मते ऐकत असतो. आणि जगाचे रहाटगाडगे चालत असते.

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुः त्यागं विचक्षणाः॥(१८-२)

कर्म काम्य आहेत असे जाणुन कांही विद्वान कर्माचा त्याग करुन संन्यास घेणे योग्य आहे याचा पुरस्कार करतात . तर कांही जाणकार तत्ववेत्ते "कर्मफलत्याग" logic वापरणे योग्य समजतात. याच "फलत्याग" logicचा वापर करुन कर्म करण्याचे महत्व जाणणे भगवतगीतेचा संदेश आहे.

जीवनात शारिरीक, वाचिक, मानसिक कर्म घडतात. या कर्माची विभागणि यज्ञ, दान, तप(शारिरीक आचरण, भाष्य, मानसिक स्थिति) याद्वारे भगवतगीतेने केलेली आहे. यज्ञ, दान, तप याची विभागणि सत, रज, तम या प्रकृतिगुणानुसार(Mode of nature) केलेली आहे. यानुसार योग्य व अयोग्य हा भेद सात्विक व तामस याद्वारे जाणतो, तर निष्काम व सकाम हा भेद सात्विक व राजस याद्वारे जाणतो. म्हणुन भगवतगीतेला अभिप्रेत असलेले योग्य व निष्काम कर्म सात्विक (यज्ञ, दान व तप) कर्म याद्वारा दर्शविलेले आहे.

*यज्ञ भावाने समर्पित कर्म घडते.

यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।(४-२३)

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।(४-३२)

*मानवता कल्याणासाठी परमार्थ साधण्यासाठी(दान)
*समाजात जगतांना सदाचरण(शारिरीक तप)
*हीतकारक (सकारात्मक) भाष्य(वाङमय तप)
अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहीतं च यत् ।(१७-१५)

*निरोगी, प्रसन्न मानसिकता(मानसिक तप)
मनःप्रसादः सौम्य त्वं मौनम् आत्मविनिग्रहं ।(१७-१६)
******

(१८-५)

**************************

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यं एव तत्।

यज्ञो दानं तपः चैव पावनानि मनीषिणाम् ॥

**************************

(१८. ५):"यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यं एव तत् "

समाजातील निष्क्रियता, दौर्बल्य घालविण्यासाठी संत, तत्ववेत्ते मार्गदर्शन करतात. मनुष्य(अज्ञानामुळे) निष्क्रियतेला "चांगलेपणा"ठरवितो! समाजातील ही भ्रमिष्ट संवय असते. (मी वाईट नाही म्हणुन चांगला!).

हा मुद्दाच स्वामी विवेकानंदांच्या प्रबोधनाचा पाया होता. याच महत्वाच्या मुद्यावर भगवतगीता ज्ञान आलेले आहे.

मनुष्य जे करतो ते (स्वतःसाठी) योग्य समजुनच करतो व निष्क्रिय असला तरी स्वतःची भूमिका योग्य आहे असे भाष्य करीत असतो. अर्थात स्वतःसाठी तो "योग्य"असतो. नियतकार्य आचरण करण्याची वेळ आली असता अर्जुन दुःखी होतो व त्याला युद्ध करणे टाळायचे असते. म्हणुन "आपण लोभामुळे पाप

करायला निघालो आहोत "असे स्वतःच Judgement देतो. कर्मज्ञान नसणे किंवा कर्म करायची इच्छा नसणे यामुळे निष्क्रियतेला चांगलेपणा ठरविण्यासाठी मनुष्य याच प्रकारची भूमिका घेत असतो. समाजहीत संदर्भात अशी भूमिका नकारात्मक व भ्रम निर्माण करणारी ठरते.

"चांगलेपणा "मनुष्यातील ईश्वरी अंशाचाच अविष्कार असतो. याचे निश्चित ज्ञान असलेला Confident असतो. स्वतःवर विश्वास असतो व विश्वासाने मार्ग चालतो. "चांगलेपणा " संदर्भातच त्याग व संन्यास यातील भेद जाणण्यासाठी अर्जुन शेवटचा प्रश्न(१८-१) करतो. याचे उत्तर देतांना "निष्क्रियता vs कर्म " हा मुद्दा स्पष्ट करण्यात येतो.

कर्म सकाम आहेत म्हणुन कुणी (कर्माचा) संन्यास योग्य समजतात, तर कुणी निष्काम कर्म (फलत्याग) करणे योग्य समजतात. या पार्श्वभुमिवर भगवतगीता आपले निश्चित मत सांगते, यज्ञ(निष्काम/समर्पित कार्य), दान, तप(शारिरीक चांगले आचरण, सकारात्मक भाष्य, मानसिक-शांति, आत्मवश) हे तीन कर्म जीवनविकासात आवश्यक आहेत.

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यं एव तत्।
यज्ञ दानं तपः चैव पावनानि मनीषिणाम् ॥(१८-५)

व्यावहारिक बोध:
विज्ञानाने जग बदलविले. हा इतिहास आहे. याच विज्ञानाचा वापर होवुन समाजाची वाटचाल विकासमार्गावर होत आहे. या वाटचालीत समाजात नविन प्रश्न निर्माण होतात. समाजविकासाच्या वाटचालीत जीवनात या प्रश्नाची चाहुल लागते. यामुळे प्रत्येक मनुष्यासाठी जीवनविकास हा स्वतंत्र व आवश्यक विषय ठरतो.

वर्तमानात ज्ञानविज्ञान आले, तरी प्रश्न अनुत्तरीत असतात याचे कारण वास्तवाचा स्विकार होत नाही . वास्तव hide करण्यासाठीच समाजात भ्रम अनवधानाने निर्माण होतो किंवा जाणिवपुर्वक निर्माण करण्यात येतो. यामुळे प्रश्न नीट Define होत नाही.

निष्क्रियतेला चांगलेपणा, दुर्बलतेला शक्ति किंवा अज्ञानाला ज्ञान दर्शविणे यामुळेच जीवनात, समाजात भ्रम असतो. तांत्रिक भाषेत हा भ्रम Delusion(False belief), Illusion (Misleading

perception, Mis- interpretation) असा ओळखल्या जातो.
भ्रमातुन मुक्तिसाठीच ज्ञान असते.
अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

या पार्श्वभूमिवर भगवतगीता ज्ञानाला सर्वश्रेष्ठ ठरविते. ज्ञानविज्ञानाची भाषा सरळ असते, पण सकारात्मक असते. हेच दर्शन भगवतगीता देत आहे. व याद्वारा जीवनात, समाजात ज्ञानविज्ञानाचा वापर करण्याची कला अवगत करते.

* ******

(१८-५):
"यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम्"
(जीवनविकासात कर्म साधन)

भगवदगीतेत समाजातील कर्माचे वास्तव व महत्व स्पष्ट केले. याच अनुषंगाने मनुष्यजीवनात कर्म या संदर्भात भगवदगीतेत संन्यास व त्याग हे दोन शब्द आलेत. अर्जुन याच शब्दांचे निश्चित logic जाणण्यासाठी शेवटचा प्रश्न करतो. या प्रश्नाचे उत्तर देतांना

संन्यास व त्याग या शब्दांना कर्म या संदर्भात विद्वतजनांनी कोणता अर्थ दिला हे स्पष्ट केले.

प्रत्येक शब्द आपल्याला संदेश देत असतो. जनमानसात प्रचलीत असलेला संदेश त्या शब्दाची निश्चित व्याख्या आहे असे म्हणता येणार नाही तर ती सापेक्ष असते. कर्म काम्य आहेत म्हणुन अशा काम्य कर्माचा संन्यास याला कुणी संन्यास म्हणतात, तर कुणी फलत्यागाला त्याग म्हणतात. कुणी दोषवत कर्माचा त्याग करणे आवश्यक समजतात, तर कुणी यज्ञ, दान, तप ही कर्मे आवश्यक समजतात.

समाजातील विद्वतजनांच्या अशा विविध मतांना विरोध न करता श्रीकृष्ण आपले निश्चित मत सांगतात. यज्ञ दान तप या तीन कर्माद्वारेच जीवनविकास साध्य होतो.

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यं एव तत् ।

यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम्॥(१८-५)

जीवनयात्रेतील कर्म यज्ञ, दान व तप या तीन विभागात विभागले आहे. हे तीन्ही Technical term आहेत. वर्तमानात या शब्दांना निश्चित अर्थ दिलेले आहे.

यज्ञ: (सकाम vs निष्काम कर्म)

तस्माद् सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम्।

एवं प्रवर्तितं च न अनुवर्तयतीय यः।

अघायु इंद्रियरामः मोघं पार्थ स जीवति।।(३-१६)

सृष्टिचक्र प्रवर्तनातील कार्य या अर्थाने "यज्ञ" शब्द वापरला आहे. यज्ञ म्हणजे समर्पित कार्य. अर्जुनाचे नियतकार्य "यज्ञ" या विभागात येते. आपापल्या स्वभावनियत कार्याद्वारा ईश्वरभक्ति साधणे .

यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।(३-२३)

दान:(Beggar vs. Donor)

*दातव्यम् इति यत् दानं दीयते अनुपकारिणे।(१७-२०)

व्यवहारातील नियतकार्य यज्ञकार्य म्हटलेले आहे. दान सत्कार्यासाठी केलेले दान या अर्थाने आहे. हे दान प्रतिउपकारार्थ असेल तर ते राजस दान ठरते. अर्थात तो व्यवहार ठरतो.

*दान स्वतःच्या अधिकारात (संपत्ति इ. ) दिल्या जाते. स्वतःचा अधिकार येथे महत्वाचा ठरतो. या पार्श्वभुमिवर स्वावलंबि असणे व स्वतःचा अधिकार जाणणे महत्वाचे ठरते. तरच स्वतःचा निर्णयअधिकार वापरता येतो.

Beggars are not choosers.

*तप : (Disorderly vs. Orderly)

मनुष्याची काया, वाचा व मन या संदर्भातील वागणुक (शारिरीक आचरण, वाणी, मानसिकता) त्याची संस्कृति, संस्कार यानुसार असते हे व्यवहारात मनुष्य जाणत असतो. काया, वाचा, मन या संदर्भात स्वतःला संस्कारीत करणे. हा अनुक्रमे शारिरीक, वाचिक व मानसिक तप ठरतो.

"श्रद्धावान् लभते ज्ञानम् " ईश्वर व ज्ञान यांचा समन्वय भगवतगीतेने साधलेला आहे. या संदर्भात ज्ञानीजन( देवद्विजगुरुआचार्य) यांचा सन्मान, ईश्वरश्रद्धा, व्रत, पावित्र्य शारिरिक तप म्हटले आहे. कल्याणकारी पण सत्य (Motivational), उद्वेगरहित भाष्य, स्वतःच्या शाश्वत विकासाचे (Self motivational )ज्ञान, अभ्यास. हा वाङमय तप म्हटले आहे. सकारात्मक, कल्याणकारी शुद्ध भाव, मनाची प्रसन्नता, मौन, शांति. ही मानसिकता धारण करणे. हा मानसिक तप म्हटले आहे.

********

(१८-७)

*************************

नियतस्य तु संन्यासः कर्मणो न उपपद्यते।

मोहात् तस्य परित्यागः तामसः परिकीर्तितः।।

*************************

(१८-७) :

"नियतस्य तु संन्यासः कर्मणो न उपपद्यते"

(नियतकर्माचा त्याग vs फलत्याग)

*जीवनमुल्यांचा अपभ्रंश :

१. जीवनातील चांगलेपणा, आदर्श या संदर्भात चांगला मनुष्य, त्यागी मनुष्य अशी सकारात्मक अर्थाने विशेषणे लागतात. तर "अहंकारी मनुष्य" इ. नकारात्मक अर्थाने विशेषणे लागतात. यांचा सकारात्मक किंवा नकारात्मक संदेश जातो.

२. आपली प्रतिमा समाजात चांगली असावी यासाठी सकारात्मक अर्थानेच मनुष्य आपली प्रतिमा उभी करतो. याचा संबंध त्याच्या अस्तित्वाशी, सुखाशी, आनंदाशी, स्वाभिमानाशी असतो.

३. वरील दोन कारणामुळे प्रत्यक्षात समाजात जगत असतांना चांगलेपणा, त्याग, अहंकार, धर्म-अधर्म इ. शब्दांचा गोंधळ होत असतो.

(उदा. अहंकार या संदर्भात दर्प या अर्थाने संदेश जातो, यामुळे अहंकाररहित असणे याला चांगलेपणा जाणतो. व चांगलेपणा या संदर्भातच False ego vs. Self esteem हा भेद जाणणे आवश्यक असते. )

असाच गोंधळ युद्धक्षेत्रावर अर्जुन करतो. आपले नियतकार्य पाप ठरवुन त्याचा त्याग करतो. लोभी vs. त्यागी असा संदर्भ देवुन स्वतःला त्यागी समजतो. याप्रमाणे "त्याग" या शब्दाचा अपभ्रंश होतो. याला तामस त्याग अर्थात अज्ञानामुळे झालेली उलटापालट असे म्हटले आहे.

नियतस्य तु संन्यासः कर्मणो न उपपद्यते।
मोहात् तस्य परित्यागः तामसः परिकीर्तितः।।(१८-७)

* त्यागाचे निश्चित तत्व :

भगवदगीता जीवनात कर्माचे महत्व सांगते, कारण जीवन आहे म्हणुन कर्म हरक्षणी घडत असतात. व कर्माचे महत्व "गहना कर्मणो गतिः" याद्वारा स्पष्ट करते.

कर्माद्वारेच विकास होतो. विकासाचे साधन असलेल्या कर्माचेही मनुष्याला अज्ञान असते. "कर्माद्वारे विकास " या संदर्भात पैसा, ऐश्वर्य, कीर्ति, सुख अशा संकल्पना असतात. मग पैसा असेल तर कर्म करण्याची गरज काय?

कर्माद्वारे सुख मिळते, मग मनसमाधान असेल तर कर्म करण्याची गरज काय?असे प्रश्न मनुष्य उभे करतो. अर्जुनही असाच प्रश्न उपस्थित करतो. मला कांही नको मग कर्माची गरजच काय?

सुख या संदर्भात "विचलित होणे(हृदयदौर्बल्य)vs. दुःखान्त (योग) " हा विषयच भगवदगीता ज्ञानाचे द्वार उघडे करते. दुःखामुळे अर्जुन विचलित होतो . याच शक्तिची (योग) साधना करण्यासाठी कर्माचे प्रयोजन सांगितले आहे, ज्याला येथे कर्मयोग म्हटले आहे.

तामस:

नियतस्य तु संन्यासः कर्मणो न उपपद्यते।(१८-७)

राजस:

दुःखम् इति एव यत्कर्म कायक्लेष भयात् त्यज्येत् ।(१८-८)

सात्त्विक:

कार्यम् इतिएव यत्कर्म नियतं क्रियतेअर्जुन।(१८-९)

अज्ञानामुळे "संन्यास "समजुन नियतकर्माचा त्याग करतो, तेंव्हा हा तामस त्याग ठरतो. तर Senses सुखाची आसक्ति असल्यामुळे कष्टाच्या भयाने कर्माचा त्याग करणे हा राजस त्याग ठरतो. कर्मयोगात कार्याचा एकनिश्चय असतो, यामुळे चंचलतेपासुन मुक्त असतो. या कर्मयोगात निष्काम कर्म अर्थात फलत्याग असते याला "त्याग" संबोधले आहे. हाच सात्त्विक त्याग असतो.

सार :

समाजात व्यवहार असतो. आपले ईप्सित साध्य व्हावे यासाठीही भाष्य होत असते.. आपली प्रतिमा चांगली, योग्य दिसावी यासाठी भाष्य होत असते. या भाष्यात कधी स्वतःच्या अज्ञानालाही शहाणपणा व इतरांच्या शहाणपणालाही मुढता दर्शविण्याचा प्रयत्न होतो. शब्दांचा हा गोंधळ समाज करीत असतो. मनुष्याला या गोंधळातुन मुक्त असावे लागते. यासाठी जीवनमुल्यांचा निश्चित अर्थबोध होणे व त्याची जीवनविकासातील उपयुक्तता जाणणे आवश्यक असते.

जीवनात यशस्वि होणे, श्रेष्ठ होणे, सुखी होणे या सर्वांचा संबंध जीवनविकासाशी आहे. जीवनविकासात योग्य-अयोग्य याचा आधार धर्म होतो तेंव्हा त्याग, चांगलेपणा, स्वधर्म, ज्ञान इ. यांची निश्चित भूमिका भगवदगीता स्पष्ट करते. जेंव्हा स्वतःची प्रतिमा चांगली दिसावी यासाठी उलटापालट(धर्माला अधर्म, निष्क्रियतेला त्याग) करतो तेंव्हा तामस बुद्धिचा हा अविष्कार ठरतो. अर्थात अज्ञान ठरतो. हेच अज्ञान दुर करण्यासाठी भगवदगीतेने ज्ञान, सुख, त्याग, चांगलेपणा इ. ची निश्चित व्याख्या केली आहे व याची विकासातील भूमिका स्पष्ट केली आहे.

********

(१८-९)

*************************

कार्यम् इतिएव यत् कर्म नियतं क्रियते अर्जुन।

संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः।।

*************************

(१८-९) :

"संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः"

(जीवनमार्गातील त्यागाचे तत्व व ध्येयपुर्तिचे रहस्य)

*Mindset

अर्जुन निष्क्रियतेला आदर्श ठरवितो. म्हणुन Mindset बदलाव हा भगवतगीतेचा विषय ठरला आहे. जीवनात कर्मच घडत असतात. हे कर्म घडत असतांना आत्मोन्नति होणे म्हणजे विकासमार्गावर असणे याचे रहस्य भगवतगीता सांगते. सांख्य व योग या कर्माच्या निष्ठाद्वारा अनुक्रमे कर्मसंन्यास आणि कर्मयोग साध्य होत असते. त्याग म्हणजे फलत्याग हा विषय कर्मयोगात येतो.

*पुरुषव्याघ्र:
"त्याग" या संदर्भात निश्चित मत देतांना अर्जुनाला पुरुषव्याघ्र संबोधले.

"The lion is a symbol of personal strength,
and courage and leadership. Whenever we see these awesome creatures, we are reminded of the raw power and limitless potential that we all share. As a result, many role models can be considered ‘lions’ due to their influence, accomplishments. "

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम् ।
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः।।(१८-४)

सामान्यातील सिंह असा पुरुषव्याघ्रचा संदर्भ आहे. समाजात जसा श्रीमंत-गरीब, चांगले-वाईट असा भेद होतो, तसाच श्रेष्ठ-सामान्य या संदर्भात वाघ-बकरी, सिंह-शेळी या शब्दांचा उल्लेख होतो. "श्रेष्ठांना कठिणसमयी मनोदुर्बलता अशोभनिय आहे "असे श्रीकृष्णाने अर्जुनाचे अज्ञान दर्शवितांना म्हटले होते. (२-२)

अर्थात श्रेष्ठ व सामान्य यांच्या Mindset मधील भेद यामुळे स्पष्ट होतो. याचाच अर्थ अर्जुनाने सामान्यांचा Mindset बदलवुन श्रेष्ठांचा Mindset धारण करावा हे अपेक्षित असते.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

*त्याग:

कार्यम् इतिएव यत् कर्म नियतं क्रियते अर्जुन।

संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः।।(१८-९)

त्यागाचा निश्चित बोध होण्यासाठी सात्त्विक, राजस व तामस असे भेद दर्शविले आहे.

तामस vs सात्त्विक अर्थात निष्क्रियता vs निष्काम कर्म

नियतस्य तु संन्यासः कर्मणो न उपपद्यते।

मोहात् तस्य परित्यागः तामसः परिकीर्तितः।।(१८-७)

राजस vs सात्त्विक अर्थात सकाम कर्म vs निष्काम कर्म.

कार्याच्या सकाम मानसिकतेमुळे कार्य कष्टमय जाणवतात.

दुःखम् इतिएव यत् कर्म कायक्लेश भयात् त्यज्येत् ।
स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ।।(१८-८)

अर्थात निष्काम कर्मासाठी त्यागाची मानसिकता असते. याचमुळे कार्याचा एकनिश्चय होतो. ध्येय निश्चित असते. कार्य निष्ठेने घडते अर्थात सुखाची साधना होते.

सार :

"Lack of seeking implies that one does not cherish one's purpose with determination "

-Wang Yangming

मनुष्याला सुखी व्हायचे आहे, सुखाने जगायचे आहे पण सुखासाठी जगण्याच्या मार्गातच दुःख येते!ही स्थिति आली असता जणु दुःखालयात जन्म झाला असे वाटते.
हेच सत्य भगवतगीता सांगत आहे,
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३२)

या दुःखाचे कारण आसक्ति(Attachment) असते. आसक्ति फलअपेक्षा, परावलंबन अशा स्वरुपाची असते. म्हणुन निष्काम कर्माचे अर्थात फलत्यागाचे शास्त्र भगवतगीता सांगते. याबरोबरच कर्माद्वारे सुखाची (समत्वयोग) साधना याचे ज्ञान सांगते. (योगः कर्मसु कौशलम्). याच ज्ञानामुळे जीवनाचे Purpose कळते, जीवनयात्रेत Determination असते.

*******

(१८-१०)

*************************

न द्वेष्टि अकुशलं कर्म कुशले न अनुषज्जते।

त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः।।

***********************

(१८-१०) :

"त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः"

(चांगल्या मनुष्याचे Determination)

जीवनात सुखदुःखाचा विचार निश्चितच होतो, पण मानसिक आरोग्याचा(दुर्बलता-सक्षमता) विचार दुर्लक्षित होतो. भगवतगीतेत "हृदयदौर्बल्य" (Mental weakness) हा शब्द आलेला आहे. जीवनात स्वतःला express करण्यासाठी वास्तव स्विकारावे लागते. अर्जुन दुःख टाळण्यासाठी वास्तव न स्विकारता(युद्ध करणे योग्य कसे? हा प्रश्न पडतो) Judgement thinking वापरुन(युद्ध करणे पाप आहे!) निष्क्रियता स्विकारतो. दुःखावर हा उपाय नसतो, तर दुःखान्त हा उपाय असतो, जी योग या नांवाने ओळखली जाणारी एक शक्ति आहे व याच शक्तिची साधना जीवनातुन शक्य आहे. अर्थात मनोदुर्बलतेविरुद्ध हे युद्धच(Internal battle) असते.

*जगात दैवी व आसुरी अशा दोन प्रकारचे लोक असतात. दैवी(चांगलेपणा) मनुष्याचा जन्मच बंधनमुक्तिसाठी झालेला असतो. व हाच बंधनमुक्तिचा मार्ग अर्जुनाला सांगण्यात येतो.
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)
या मार्गात Priority जीवनमार्गातील दृढत्व(एकनिश्चय), विचलित न होणे(Determination) अशी असते. या मार्गात (विकासात )चांगलेपणा हे साधन असते.

समाजात जगत असतांना स्वतःच्या जीवनात चांगलेपणाला महत्व असते. जीवनविकासातील महत्वाचे साधन असते, पण याच चांगलेपणामुळे अर्जुन गोंधळतो. आपल्या हातुन चुक होत आहे असे guilty feel त्याला उत्पन्न होते. भगवदगीता येथेच संदेश देत आहे,
मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

या पार्श्वभूमिवर बंधनमुक्तिचा मार्ग जाणणे आवश्यक असते. म्हणुनच या(Determined) मार्गात चांगलेपणा या संदर्भात "सत्त्वसमाविष्टो" हा शब्द वापरलेला आहे.

कार्यम् इत्येव यत् कर्म नियतं क्रियते अर्जुन।
संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः।(१८-९)
न द्वेष्टि अकुशलं कर्म कुशले न अनुषज्जते।
त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः।।(१८-१०)

*Determination :

या मार्गात नियतकर्म ईश्वराला समर्पण या अर्थाने स्वधर्म ठरतो. स्वधर्म Tiebreaker(छिन्नद्वैधा) ठरतो. तर कार्याचा एकनिश्चय या संदर्भात "छिन्नसंशयः" म्हटले आहे. कर्म कुशल-अकुशल( लहान-मोठे किंवा चांगले-वाईट) हा संशय मिटतो.

*निष्काम कर्म म्हणजे कर्मफलत्याग असते. याच संदर्भात "त्यागी" हा शब्द वापरलेला आहे.

सार :सामान्यतः जीवन जगत असतांना मानसिक आरोग्य हा विषय दुर्लक्षित होतो. जीवनातील नैराश्य हा मानसिक आरोग्याचाच प्रश्न असतो. याच विषयावर भगवदगीता प्रकाश टाकत आहे.

********

(१८-११)

**************************

न हि देहभृतां शक्यं त्यक्तुं कर्माणि अशेषतः।

यः तु कर्मफलत्यागी स त्यागी अभिधीयते॥

**************************

(१८-११):

" न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माणि अशेषतः"

(त्यागाची निश्चित व्याख्या)

मनुष्यजीवनात कर्माची भूमिका प्रमुख असते. शरीर, वाचा, मन याद्वारे कर्म घडत असतात.

"कर्मानुबंधिनी मनुष्यलोके"

व्यवहारात (कुरुक्षेत्र) कर्म करतांना अर्जुनाला अडथळा जाणवतो व निष्क्रियतेला धर्म/आदर्श/त्याग समजतो. राज्याच्या लोभामुळे कुलक्षय होईल व हे पाप आम्हाला स्पष्टपणे दिसत आहे. ही पार्श्वभुमि तयार करुन "लोभी vs. त्यागी" असा द्वन्द्व निर्माण करतो व स्वतः त्यागी ही भूमिका निवडतो.

या पार्श्वभुमिवर जीवनविकासात कर्माचे महत्व व कर्माद्वारे (अव्यक्त) ईश्वराची भक्ति हे महत्वाचे विषय येतात.
(अव्यक्त) ईश्वराची भक्ति या संदर्भात शरीरधारी मनुष्याला अव्यक्तआसक्त असणे कठिण असते, पण कर्माद्वारे भक्ति शक्य आहे. असे स्पष्ट होते.

क्लेशो अधिकतर तेषां अव्यक्तासक्त चेतसाम् !। अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिः . अवाप्यते।(१२-६)
ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परः।
अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त उपासते।(१२-७)

याच(अनन्य)भक्तिसंदर्भात "त्यागी" या शब्दाची व्याख्या भगवदगीता स्पष्ट करते. भगवदगीतेत निष्काम कर्म या संदर्भात फलत्यागाचे शास्त्र स्पष्ट केले. कार्याचा एकनिश्चय (Determination) याचे महत्व येथे महत्व स्पष्ट होते.
(शरीरधारी) मनुष्याला कर्माचा संपुर्णपणे त्याग करणे केवळ अशक्य असते. पण फलत्यागाचे शास्त्र आचरण करुन कर्म करणारा त्यागी ठरतो.

त्यागी सत्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः।(१८-१०)
न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माणि अशेषतः।
यः तु कर्मफलं त्यागी स त्यागी अभिधीयते॥(१८-११)

अर्थात वर्तमानात कार्याचा एकनिश्चय महत्वाचा ठरतो. ज्यामुळे विश्वासाने मार्ग चालतो, निष्ठेने कार्य करतो. या मार्गात समत्वयोगाने कार्य करणे हे कार्यकौशल्य असते.

सार :

नीति(Moral) या संदर्भात व्यवहारात शाब्दिक भ्रम होत असतो. निष्क्रियतेला त्यागी ठरविणे म्हणजे भिकाऱ्याला संन्यासी ठरविण्यासारखे आहे. भगवदगीतेत नीति (Morality) या संदर्भात ज्या शब्दांचा वापर केला त्याची जीवनविकासातील साधन या संदर्भात निश्चितपणे उपयुक्तता स्पष्ट केली आहे. भगवदगीता याप्रमाणे भ्रम दुर करीत आहे.

******

(१८. ११):"य: तु कर्मफलत्यागी स त्यागी अभिधीयते"

(Sacrifice :The source of Peace)

भगवतगीता सुखी जीवनासाठी स्थितप्रज्ञ, योग(दुःखान्त) व विकासासाठी कर्माचे महत्व highlight करते. कर्म कष्ट न वाटता ते सहज घडावे या अनुषंगाने कर्माचे अकर्मात परिवर्तन होण्यासाठी "ज्ञानकर्मसंन्यासयोग" यातुन ज्ञानाद्वारे कर्मसंन्यास हे प्रबोधन आहे.

एकीकडे कर्माचे महत्व व दुसरीकडे (सुखासाठी ) स्थितप्रज्ञ अवस्था साध्य करणे या प्रक्रियेत (कर्म) संन्यास, त्याग, अनासक्त हे शब्द आलेले आहेत. या शब्दांची संदर्भासह निश्चित व्याख्याही भगवतगीतेने केलेली आहे. याद्वारा विकासप्रक्रियेतील "कर्म हे साधन" या संदर्भात संन्यास vs अनासक्ति, संन्यास vs त्याग यांतील Confusion दुर केलेले आहे.

*कर्म काम्य आहेत म्हणुन कर्माचा त्याग करणे याला कांही संन्यास संबोधतात.

* संन्यास vs अनासक्त

जीवनातील अडचणी, प्रश्न सोडविण्यासाठी कर्म आवश्यक असते. कर्म टाळले तरी इच्छा असल्यामुळे चिंता, भय विचलित करते. यामुळे कर्म टाळणे मिथ्याचार ठरतो. म्हणुन मनावर(इच्छा इ. ) नियंत्रण करुन (आत्मवश) कर्माद्वारे विकास साधणे हे कार्यकौशल्य असते. श्रेष्ठ मनुष्य(आत्मतृप्त असलेलाही) आदर्शासाठी कर्म करतो ती असक्त अवस्था असते.

कर्मेंद्रियैः कर्मयोगं असक्तः स विशिष्यते।(३-७)
तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर।(३-१९)

*संन्यास vs त्याग

जीवनविकासात कर्म आवश्यक आहे. कर्मातील फलत्याग याला भगवतगीतेने "त्याग" संबोधले आहे. फलत्याग या शब्दाद्वारे निष्काम कर्माचा बोध होतो.

न हि देहभृतां शक्यं त्यक्तुं कर्माणि अशेषतः।
य: तु कर्मफलत्यागी स त्यागी अभिधीयते।।(१८-११)

ज्ञान, ध्यान या सर्वात फलत्याग श्रेष्ठ आहे. याद्वारा अनंत शांतिचा लाभ होतो.

श्रेयो हि ज्ञानम् अभ्यासात् ज्ञानात् ध्यानम् विशिष्यते।
ध्यानात् कर्मफलत्यागः त्यागात् शांतिं अनंतरम् ॥(१२-१२)

व्यावहारिक बोध: जीवन आहे तर कर्म घडणारच. दुःखही येणार!जीवनातील प्रश्न सोडविण्यासाठीच कर्म आवश्यक असते. कार्यरत राहुनही(कर्म करुनही) अकर्म जाणणे, सुख अनुभवणे याचे समग्र शास्त्र म्हणजेच भगवतगीता.

* ******

(१८-११)विषय ७६३ :

न हि देहभृतां शक्यं ... vs. न विमुच्यन्ति दुर्मेधा ...

(जीवनाचे वास्तव व Wisdom vs. Stupidity)

जीवनात कर्म घडणे हे स्वाभाविक आहे तर दुःखी होणे ही भावना स्वाभाविक असली तरी यातील शहाणपणा व मुर्खपणा (Wisdom & Stupidity) भगवदगीता स्पष्ट करीत आहे. याच

आधारावर श्रीकृष्णाने अर्जुनाला त्याच्या जीवनाचे वास्तव स्विकारण्यास भाग पाडले.

जीवनाचे (स्वाभाविक) वास्तव :

मनुष्याला सुख हवे, दुःख नको असते. हे स्वाभाविक आहे. युद्धक्षेत्रावर दुःखी झालेला अर्जुन आपले दुःख टाळण्यासाठी युद्ध न करण्याचा निर्णय घेतो. आपली भूमिका धर्माची आहे असे Judgemental भाष्य करतो. याप्रमाणे शोकमग्न असलेल्या व निष्क्रियतेला धर्म संबोधणाऱ्या अर्जुनाच्या भूमिकेवर श्रीकृष्ण प्रतिक्रिया व्यक्त करतात:

"ज्या मनुष्याची गणना श्रेष्ठ, शहाण्या लोकांत होते, त्याला असे क्लैब्य अशोभनिय आहे. "

यावर अर्जुन स्वतःचे वास्तव स्विकार करतो, स्वतःला प्रामाणिकपणाने व्यक्त करतो.

ज्यांची हाराने पुजा करावी अशा जेष्ठ, श्रेष्ठांना मारुन राज्य मिळविणे म्हणजे रक्ताने माखलेले सिंहासन मिळविणे होईल. यापेक्षा भिक्षा मागुन उदरनिर्वाह करणे श्रेयस्कर ठरेल.

१. या स्थितित कोणत्या पक्षाचा विजय होणे श्रेयस्कर आहे हेच कळत नाही. असे असले तरी ज्यांना मारुन विजय मिळवायचा नाही तेच आमच्यासमोर उभे ठाकले आहेत.

२. या विचाराने माझी बुद्धि भ्रमात सापडलेली आहे. अशा स्थितित युद्ध करणे माझ्यासाठी श्रेयस्कर कसे हे आपण सांगावे. कारण हे युद्ध जिंकुन देवाचे राज्यही मिळाले तरी माझा शोक कसा नष्ट होईल हे कळेनासे झाले आहे.

शहाणपण व मुर्खता :

देहधारीला (मनुष्याला) कर्म पुर्णपणे सोडणे अशक्य असते. कर्म मनुष्यजीवनाचा अपरिहार्य भाग आहे. निष्काम कर्माचे कौशल्य साध्य करणारा (फलत्याग करणारा) शहाणा ठरतो. त्यालाच त्यागी म्हटले आहे.

न हि देहभृतां शक्यं त्यक्तुं कर्माणि अशेषतः।
यः तु कर्मफलत्यागी स त्यागी अभिधीयते॥(१८-११)

"कर्म" हे प्रकृतिकार्य आहे. ते अपरिहार्य असले तरी निष्काम कर्म शहाणपण असते. दुसरीकडे जे आळस (निष्क्रियता), भय, दुःख(विषाद), चिंता, दर्प सोडत नाही, त्यांना भगवदगीता मुर्ख (दुर्मेधा) ठरविते.

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदं एव च।
न विमुच्यन्ति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी।।(१८-३५)

अर्जुन दुःखमुक्तिसाठी Judgemental thinking चा वापर करतो. हा जीवनाचा Comfort zone ठरतो. याच जगण्याची संवय केली तर मनुष्य आपल्याच जीवनाचे वास्तव स्विकारीत नाही व जीवनाच्या विकासापासुन वंचित राहतो. मनुष्याला याच Comfort zone मधुन बाहेर निघण्याचा संदेश भगवदगीता देते.

"The comfort zone is the great enemy to creativity; moving beyond it necessitates intuition, which in turn configures new perspectives and conquers fears. "

-Dan Stevens

**********

(१८-१२)

*******************

अनिष्टं इष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणा फलम् ।

भवति अत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ।

*******************

(१८-१२) :

"अनिष्टं इष्टं मिश्रं च त्रिविध कर्मणा फलम् "

(Breaking Karmic Trap)

भगवदगीतेत "त्याग" हा शब्द Detachment शास्त्रातील कर्मफलत्याग या अर्थाने वापरलेला आहे. Attached (सकाम) म्हणजे अत्यागी व Detached म्हणजे त्यागी अशी बंधन-मोक्ष शास्त्रातील परिभाषा आहे.

अत्यागी म्हणजे सकाम कार्यरत असलेला याला कर्मफल बंधनात टाकतात. हे कर्मफल अनुकुल(इष्ट), प्रतिकुल (अनिष्ट) व मिश्र असे तीन प्रकारचे असते. अनुकुल फलाची आसक्ति(राग) असते

तर प्रतिकुल फलाचा द्वेष असतो. याप्रमाणे रागद्वेषाद्वारे कर्मफल बंधनात टाकतात. हाच कार्मिक Trap असतो.

अनिष्टं इष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणा फलम् ।
भवति अत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ।(१८-१२)

कर्मसंन्यास साध्य केलेल्याला (त्यागी) कर्मफल बद्ध करीत नाही. हेच ज्ञान कार्मिक trap मधुन मुक्तिसाठी उपयुक्त ठरते. याउलट सकाम कार्यरत असलेला स्वतःच Trap तयार करतो.

"Man is the only kind of varmint sets his own trap, baits it, then steps in it. "

-John Steinbeck(Noble prize winner)

********

(१८-१३)

*******************

पञ्चैतिनि महाबाहो कारणानि निबोध मे।

सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम्।।

*******************

(१८-१३):

"पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे"

(दैवाची निश्चित व्याख्या)

या सृष्टित कर्म घडत असतात. मनुष्य जे कर्म करतो, त्याची पाच कारणे असतात. १. स्थळ २. कर्ता ३. कर्माची(विविध इंद्रिय) साधने. ४. घडणाऱ्या विविध क्रिया(चेष्टा) व ५. दैव म्हटले आहे.

पञ्चैतिनि महाबाहो कारणानि निबोध मे।

सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम्।।

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथक् विधम् ।

विविधाश्च पृथक् चेष्टा दैव चैव अत्र पञ्चमम् ।।(१८-१४)

यातील दैवाचा संबंध ईश्वराशी आहे.

समाजात मनुष्याचे नशीब, Destiny या अर्थाने दैव या शब्दाची ओळख मनुष्य जाणतो. तर येथे कर्माचे कारण अशी ओळख दिलेली आहे. याच संदर्भात ईश्वराला अधिदैव म्हटले आहे(पुरुषश्च अधिदैवतम् ). याच ईश्वराचा अंश हृदयी असतो. या अर्थाने मनुष्याच्या संदर्भात "दैव"(Supreme) म्हटले आहे. अर्थात "ईश्वराने नियोजित केलेले मनुष्यासाठी कार्य " या अर्थाने "दैव" याची व्याख्या मनुष्याची Destiny या संदर्भात स्पष्ट होते.

समाजात दैव या संदर्भात जे ईश्वराला मान्य ते घडते असेही म्हटल्या जाते. भगवदगीतेतील ईश्वराच्या विश्वरुप दर्शनात याच दैवाची ओळख अर्जुनाला श्रीकृष्ण करुन देत आहे. ईश्वराचे (अध्यक्ष या भूमिकेतील) विश्वासाठी नियोजिलेले Design व मनुष्याची Destiny या संदर्भात म्हटले आहे,

मया एवैते निहताः पूर्वमेव
निमित्तमात्रं भवसव्यसाचिन् ।(११-३३)

अर्थात तुझ्या हातुन जे घडायचे आहे ते मी आधीच केलेले आहे. तु निमित्तमात्र हो.

रामायणात या स्थितिला ईश्वरगति संबोधले आहे. या ईश्वरगतिनुसार श्रीरामाला वनवास होतो पण समाजात "फल" या संदर्भात दैवाची ओळख जाणतात. पण ईश्वराने नियोजिलेले विशेष कर्म या संदर्भात ही ईश्वरगति असते.

और करै अपराधु कोउ और पाव फल भोगु।
अति बिचित्र भगवंत गति को जग जानै जोगु।।(अयोध्याकांड ७०)

शुभ-अशुभ कर्मानुसार ईश्वर हृदयी विचार करुन फळ देतो. जसे कर्म करतो तसे फळ पावतो. अशी समाजातील नीति मनुष्य जाणतो. पण येथे या विपरित स्थिति आहे. अपराधी दुसराच, फळ पावणारा दुसराच!ही ईश्वराची गति(लीला) विचित्र आहे. जी सामान्य मनुष्य जाणत नाही. ही गति श्रेष्ठ मनुष्य जाणतो. म्हणुन वनवासाच्या घटनेला श्रीराम स्वतःची धर्मगति (स्वधर्म)जाणुन ईश्वरगति या संदर्भात स्वतःला "महान कार्याची संधि"(जहां सब भांति मोर बड काजू) संबोधतात.

धरम धुरीन धरम गति जानि।
कहेउ मातु सन अति मृदु बानी।पितां दीन्ह मोहे कानन राजू।
जहां सब भांति मोर बड काजू।

याचाच अर्थ "दैव "शब्दाचे समाजात विविध संदेश जात असले तरी ईश्वरावर श्रद्धा असणारे आपले नियतकार्य ईश्वराने नियोजित केलेले कार्य जाणुन त्यालाच (भक्तिद्वारा) समर्पित करतात.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव॥(११-५५)

"The man who has submitted his will and purposes entirely to God, carries God with him in all his works and in all circumstances. "
Meister Eckhart

********

(१८-१४)

*************************

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग् विधम् ।

विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैव अत्र पंचमम्।।

*************************

(१८-१४):

"विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैव अत्र पंचमम्"

भगवतगीता अर्जुनाच्या वर्तमानाविषयी बोलत आहे. व जीवनात वर्तमान महत्वाचा असतो हा बोध होतो. मनुष्याला जे जीवन मिळाले आहे, त्याची संपुर्ण ओळख भगवतगीता देत आहे. याच संदर्भात मनुष्याचे शरीरयंत्र व त्यातील मनोविज्ञान, वर्तमानातील अस्तित्व, जीवनमार्ग यांचा परिचय देत आहे. व या जीवनाचा बंधु व्हा, शत्रु बनु नका हा संदेश देत आहे. आत्मवश अवस्थेत मित्र, बंधु असतो, तर मनोवश अवस्थेत स्वतःचाच शत्रु ठरतो.

आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः।(६-५)

प्रत्येक व्यक्ति प्रकृतिनुसार(स्वभावनियत) कार्यरत असतो. याच प्रकृतिनुसार जगत असतांना अर्जुन दुःखी होतो. तो द्वंद्ववश होतो. ही मनोवश अवस्था ठरते म्हणुन भगवतगीता येथेच सावध करते.

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

जीवनात कर्म घडते. (द्वंद्ववश अस ल्यामुळे)कुणी कष्टत जगत असतो व नकारात्मक मानसिकतेने (Depressive realism) जगतो, कुणी उत्साहाने उर्जायुक्त (Energetic) व सकारात्मक मानसिकतेने(Going ahead) जगतो.

"What’s shocking is that when asked to make predictions, depressed people are more accurate than optimists. It’s called “depressive realism. ” The world can be a harsh place. Optimists lie to themselves. But if we all stop believing anything can change, nothing ever will. We need a bit of fantasy to keep us going. "

Eric Barker,

दैवबोध (सकारात्मक व नकारात्मक):

कर्म घडण्यास पंचकारणापैकी "दैव" हे एक कारण असते.

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग् विधम् ।
विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैव अत्र पंचमम्॥(१८-१४)

सामान्यतः लोक "दैव " या शब्दाचा नशीब या अर्थाने बोध करतात. जसा बोध असतो, तशी कर्म करण्याची मानसिकता बनते. "देरे हरि खाटल्यावरी" असा बोध केला तर त्याला दैववादी, अंधश्रद्धाळु संबोधण्यात येते. दैव या संदर्भात ही नकारात्मक भूमिका ठरते. (Depressive realism).
भगवतगीतेत "दैव" या शब्दाचा संबंध "अधिदैव"(पुरुषश्च अधिदैवतम् /८-४)(Supreme) या भूमिकेतील अव्यक्त, शाश्वत ईश्वराशी असतो. या अर्थाने दैव Destiny ठरते. अर्जुनाच्या Destiny चे दर्शन विश्वरुपदर्शनातुन होते. येथे मनुष्य सकारात्मक असतो.
"तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व"
याच Destiny संदर्भात पुढे म्हटले,
मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।

निर्वैरः स भुतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

निवड:

प्रकृतिला वश राहुन मनुष्य जगतच असतो. कार्यरत असला किंवा नसला तरी अशांति, कष्ट (अहंकाराचा आश्रय असल्यामुळे)याच प्रकृतिवश अवस्थेमुळे अनुभवत असतो. म्हणुन जगत् चालक ईश्वराला शरण राहुन जगणे, शाश्वत महामार्गावर जगणे व शांति अनुभवणे ही निवड स्वतःची असते.

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।
मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृति स्त्वाम् नियोक्ष्यति॥(१८-५९)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया॥(१८-६१)

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन् भारत् ।
तत् प्रसादात् परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥(१८-६२)

* *******

(१८-१५)

*************************

शरीर वाक् मनोभिः यत् कर्म प्रारभते नरः।

न्याय्यं विपरितं वा पञ्चैते तस्य हेतवः॥

*************************

१८. १५ :

"न्याय्यं विपरितं वा पञ्चैते तस्य हेतवः"

(दैव vs. अधिकार)

"We live in a fantasy world, a world of illusion. The great task in life is to find reality. "

Iris Murdoch

संपुर्ण विश्व कार्यरत असते. कार्य चांगले असो कि वाईट, ते घडण्यास पांच तत्व कारण असते.

अधिष्ठान तथा कर्ता करणं च पृथक् विधम् ।

विविधाश्च पृथक् चेष्टा दैव च एव अत्र पञ्चमम् ॥(१८-१४)

शरीर वा मनोभिः यत् कर्म प्रारभते नरः।

न्याय्यं विपरितं वा पञ्चैते तस्य हेतवः॥(१८-१५)

स्थळ, कर्ता, विविध इंद्रिय(Instrument), करावयाचे कार्य, दैव अशा पांच तत्वाचा उल्लेख आहे. यात "दैव" शब्द आलेला आहे.

व्यवहारात दैव शब्द नशिब, Luck, Fortune, Destiny या अर्थाने ओळखत असतो. अर्थात मनुष्याची मर्यादा दर्शवित असते. भगवतगीता मनुष्याला जागृत करते, त्याची ओळख देते, त्याचे अधिकार दर्शविते.

भगवतगीतेत अधिदैव हा शब्द ईश्वर (पुरुषश्च अधिदैवतम् ) या अर्थाने आलेला आहे. याच संदर्भात दैव या शब्दाचे प्रयोजन आहे. दैव म्हणजे दैवत व अधिदैव म्हणजे देवतांचा प्रमुख ठरतो. दैवाला नशिब म्हटले तर अधिदैव नशिब लिहिणारा Designer असा अर्थ होतो.

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन् ।(२-४७)

यांत कर्म करणे हा मनुष्याचा अधिकार (प्रयत्नअधिकार) तर फलप्राप्ति ईश्वराचे(Designer) क्षेत्र जाणले तर स्वतःच्या कर्माचे प्रयोजन ही Destiny (What God want me to do) ठरते. अर्जुनाच्या याच Destiny चे दर्शन विश्वरुपातुन दिले.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः सङ्गवर्जितः।
निर्वेरः सर्वभूतेषु यः स माम एति पांडव॥(११-५५)

अर्थात स्वतःचे व्यवहारकार्य आध्यात्मिकिकरणामुळे ईश्वराचे कार्य जाणतो. याप्रमाणे भगवतगीतेत आध्यात्मिकिकरण हा विषय आलेला आहे.

Spiritualization

* निष्क्रियतेचे सक्रियतेत Transformation होते.

*चांगलेपणाचे आध्यात्मिकिकरण म्हणजे चांगल्याचे सक्षमीकरण आहे.

*मनोदुर्बलतेला स्थितप्रज्ञ अवस्थेत transform करण्यासाठी साधनेचे ज्ञान.

*दुःखी अवस्थेचे सुखी(दुःखान्त) अवस्थेत Transformation.

*मनोवश स्थितिचे आध्यात्मिकिकरण म्हणजे आत्मवश असणे.

*जीवनमार्गाचे आध्यात्मिकिकरण:

अध्यात्म हा शब्दच स्वतःची जागृति, स्वतः काय करावे याची जागृति आहे.

अध्यात्म म्हणजे आत्मशुद्धि अर्थात गुणातीतकडे प्रवास, (आत्मवश असणे). मनुष्याचा आत्मा व परम आत्मा जोडणारा हा महामार्ग(अमृतत्वाय कल्पते) हा महामार्ग ठरतो. या मार्गावर प्रवास होणे ही Spiritual journey.

*व्यवहारकार्याचे आध्यात्मिकिकरण म्हणजे सकाम कार्य निष्काम कार्यात बदलविणे, द्वंद्वाला निर्द्वंद्वात(कार्याचा एकनिश्चय) बदलविणे.

* धर्माचे आध्यात्मिकिकरण:

१. धर्म-अधर्म हा tie सोडविण्यासाठी "स्वधर्म"

२. सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।

अहं त्वां सर्वपापेभ्यः मोक्ष्ययिष्यामि मा शुचः।।(१८-६६)

अर्थात धर्मात पापपुण्य ही संकल्पना आहे. चांगलेकार्य पुण्यकर्म असते. चांगलेपणाचे आध्यात्मिकिकरण या संदर्भात मोक्ष अर्थात

वर्तमानात स्वातंत्र्य (बंधनमुक्ति) ही संकल्पना द्वंद्वमुक्ति, अडथळामुक्ति या संदर्भात आहे.
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परितन्थिनौ।(३-३४)

सार :

ज्ञानप्राप्ति, Motivation मनुष्याच्या सक्षमीकरणासाठी असते. तर समाज सुव्यवस्थित संचलित व्हावा म्हणुन जगात धर्म आलेत.

दुर्बलता, दुःख, अडथळे मनुष्याच्या अज्ञानामुळे असते. या अज्ञानाची ओळख भगवतगीता देत आहे. धर्म-अधर्मातील गोंधळ दुर करण्यासाठी आध्यात्मिकिकरण हा भगवतगीतेचा विषय आहे. भगवतगीतेतील आध्यात्मिकिकरण सक्षमीकरणासाठी आहे, अज्ञानमुक्तिसाठी आहे, दुःखमुक्तिसाठी आहे.
*ज्ञान
ज्ञानसञ्छिन्नसंशयम्

*सक्षमीकरणासाठी कर्म

योगः कर्मसु कौशलम्

तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगंयोग संज्ञितम् ।(६-२३)

Never lose an opportunity of seeing anything beautiful, for beauty is God's handwriting.

Ralph Waldo Emerson

भरोसा है खुदापर तो खुदा वही लिखेगा जो नसिबमे है।

भरोसा है खुदपर तो खुदा वही लिखेगा जो तुम चाहते हो।

********

(१८-१६)

**********************

तत्रैवं सति कर्तारं आत्मानं केवलं तु यः।

पश्यति अकृतबुद्धित्वान् न स पश्यति दुर्मति।।

**********************

(१८-१६) :

"पश्यति अकृतबुद्धित्वान् न स पश्यति दुर्मति।

यस्य न अहंकृतो भावो बुद्धिःयस्य न लिप्यते"

(बुद्धिनाश vs. स्थितप्रज्ञ )

व्यवहारात कर्म घडत असतात. मनुष्याला इच्छा असतात व इच्छापुर्तिसाठी मनुष्य कर्म करतो. कर्म घडण्याचे हे सामान्य logic असते.

कर्माचा निश्चय होणे, ध्येय ठरणे यामुळे निश्चितपणे कर्म घडत असतात. चंचलतेमुळे निश्चय होत नाही. केवळ इच्छाचिंतनामुळे आसक्ति व आसक्तिमुळे काम उत्पन्न होतो. यामुळे चिंता, क्रोध व यामुळे बुद्धिनाश होतो.

जीवनाचे सुखदुःख या संदर्भात बुद्धिची भूमिका जाणणे हा भगवतगीतेचा विषय आहे. कर्म घडण्याच्या प्रक्रियेत जसे

feeding होते तसे output असते. Tension, Stress याचे कारण कर्म घडण्याच्या प्रक्रियेतील बुद्धिच्या भूमिकेला(स्थिर, युक्त, योगस्थ अवस्था, ) न जाणणे.

दुरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगात् धनञ्जय।
बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।।(२-४९)

जसे कर्म करतो, तसे कर्मबंधन असते. अर्थात कर्मफलाने बद्ध होतो. पण भगवदगीता या कर्मबंधनातुन मुक्तिचे शास्त्र सांगते. बंधन-मोक्ष हे भगवदगीतेचे शास्त्र आहे. या संदर्भात कर्मबंधन व बंधनमुक्ति याचे महत्व आहे. याचसाठी बुद्धिची भूमिका जाणणे महत्वाचे ठरते.

मानसशास्त्राचा आधार Functioning of mind faculties असते. मन, बुद्धि, चित्त व अहंकार mind faculties आहेत. बुद्धिची स्थिर अवस्था यासाठी आत्मवश अवस्था/Higher consciousness याचे महत्व भगवदगीता स्पष्ट करते. शरीरयंत्रात इंद्रियापलिकडे मन, मनापलिकडे बुद्धि, बुद्धिपलिकडे आत्मा व आत्मा पलिकडे परम आत्मा असतो. अशी जेष्ठता जाणुन इच्छोमुळे निर्माण होणारा काम शत्रु जाणणे.

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्य आत्मानम् आत्मनः।

जहि शत्रु महाबाहो कामरुपम् दुरासदम् ।(३-४३)

केवळ इच्छाचिंतन बुद्धिनाशाचे कारण ठरते. यांत बुद्धि विचलित होते. म्हणुन आत्मवश अवस्था/Higher consciousness या संदर्भात कर्म घडण्याच्या प्रक्रियेतील बुद्धिची स्थिर अवस्था जाणुन घेणे व बुद्धिवरील संस्कार या संदर्भात "युक्त" होणे महत्वाचे असते.

कर्म घडण्याच्या प्रक्रियेत अज्ञानामुळे कर्मबंधन असते व ज्ञानामुळे बंधनमुक्त होतो. बुद्धिवरील संस्कार या संदर्भात "अकृत् बुद्धि व अहंकृत भावरहित बुद्धि " या शब्दाचा उल्लेख येथे आलेला आहे.

तत्रैव सति कर्तारं आत्मानं केवलं तु यः।
पश्यति अकृतबुद्धित्वान् न स पश्यति दुर्मति।।(१८-१६)
यस्य न अहंकृतो भावो बुद्धिःयस्य न लिप्यते।
हत्वापि स इमां लोकान् न हन्ति न निबध्यते।।(१८-१७)

********

(१८-१७)

*************************

यस्य न अहंकृतो भावो बुद्धिः यस्य न लिप्यते।

हत्वापि स इमान् लोकान् न हन्ति न निबध्यते।।

*************************

(१८-१७)/१ :

"यस्य न अहंकृतो भावो बुद्धिः यस्य न लिप्यते"

(अहंकार Vs ज्ञान)

समाजात अहंकार या शब्दाविषयी बराच समज-गैरसमज असतो. अहंकार हा मानसशास्त्राचा विषय असला तरी
हा गैरसमज भगवतगीतेने सोप्या भाषेत(अहंकार vs ज्ञान) दुर केला आहे.

मानसशास्त्रात सातत्याने अभ्यास होत असतो. वर्तमानातील समाजबांधणीच्या महत्वाच्या क्षेत्रात या शास्त्राचा उपयोग प्राचीन काळापासुन होत आहे. Depression सारखे रोग दुःख,

नकारात्मकता, भय यांच्या अतिरेकामुळे उद्भवत असतात. दुःखाचे कारण शोधुन उपचार होत असतो.

भगवतगीता Mental wellnessचे ज्ञान सांगते. अहंकार Mind faculty आहे. (मन, बुद्धि, चित्त, अहंकार Conscious faculties आहेत. )अहंकार Defensive mechanism चे functioning करते. हे सर्व automatic होते.

जोवर मनुष्यजीवन असते, तोवर अहंकार याचेशी गांठ असते. हा अहंकार मनुष्याला स्वार्थी करतो, दुःखी करतो, व या अहंकारामुळेच मनुष्य स्वतःच्या अज्ञानाला ज्ञान दर्शवतो. जेंव्हा अर्जुन अज्ञानाला ज्ञान दर्शवतो, भगवतगीता सांगते, What is knowledge to life?(ज्ञानसञ्छिन्नसंशयम्)ज्ञानामुळे आत्मविश्वास असतो.

अल्बर्ट आईंन्स्टाईन केवळ शास्त्रज्ञ नव्हते, तर दार्शनिक तत्वज्ञ पण होते. एक भागिला शुन्य बरोबर अनंत या गणिती सुत्राच्या आधारावर एक भागिला ज्ञान बरोबर अहंकार या सुत्राची ओळख आईंन्स्टाईनने दिली. या सुत्रानुसार जितके ज्ञान कमी तितका अहंकार जास्त हे गणिती सुत्र बनते. यातील ज्ञान हा शब्द

गुणात्मक आहे. शाळा, कॉलेजमधील ज्ञान संख्यात्मक (Informatory knowledge) असते. तर मनुष्य या जगात कसा interact करतो, याचा संबंध ज्या ज्ञानाशी येतो, ते गुणात्मक ज्ञान असते.

समाजात व्यवहार असतो. चांगले-वाईट, योग्य-अयोग्य असे भेद आपण ऐकत असतो. भगवतगीतेत ज्ञानी-अज्ञानी हा भेद वापरलेला आहे. अज्ञानामुळे मनुष्य आपला दोष, अज्ञान कबुल न करता, मी योग्य आहे असे समजुन, आपली भूमिका योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी (संख्यात्मक)ज्ञान वापरतो. याच कारणामुळे अर्जुनाचे अज्ञान उघड झाले.

अर्जुनाला आपल्या मार्गात संशय आला, पण याची कबुली न देता तो जी भूमिका घेतो, ती आदर्श भूमिका आहे, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. समाजात असेच भाष्य चालत असते. म्हणुन असे भाष्य Argumentचा मुद्दा नसतो. म्हणुन त्या भाष्यामागील भूमिकेचे (Intention) खरे स्वरुप श्रीकृष्णाने उघड केले. या भुमिकेचे कारण अहंकार असतो.

Knowledge is not a domain of ego.

Knowledge is domain of calm devotional Soul.
(सत्वात् संजायते ज्ञानं)

Your ego is the mask you wear, the false image you have of yourself and your labels and position in society. Your Soul is the true you, the you behind the mask and labels, your spirit and essence.

जसा एखादा मनुष्य जन्माने आंधळा असतो, यात त्याचा दोष नसतो, तसेच अहंकाराचा आश्रय अज्ञानाचे कारण असते. म्हणुन याच अज्ञानाची भगवतगीता ओळख करुन देते व जीवनांत ज्ञानाचा आश्रय यावर भाष्य होते. ईश्वर ज्ञानविज्ञानाचा मुळ स्त्रोत आहे हे ज्ञानविज्ञानासह स्पष्ठ होते. अहंकार फक्त Selfशी संबंधीत आहे, तर ईश्वर जगातील एकत्व याचेशी संबंधित आहे. हाच आधार विकासाचा मार्ग(अमृतत्वाय कल्पते) ठरवीत असते.

यस्य न अहंकृतो भावो बुद्धिः यस्य न लिप्यते।
हत्वापि स इमान् लोकान् न हन्ति न निबध्यते।।(१८-१७)

अहंकारामुळेच काळजी, भय, दुःख असते(Negative emotions) अर्थात Pain attachment(Negative emotions) असते. तर आत्मविश्वास (स्वतः स्वतःचा बंधु )Self respect (Positive emotion) असतो. ज्ञानामुळे आत्मविश्वास येतो. ज्ञानामुळे द्वन्द्वमुक्त होतो.

"The ego is the problem; that's why you cannot know yourself. The ego gives you certain false images of yourself, and if you carry those images for a long time, you become afraid. God is not hidden, only your eyes are closed. Open your eyes! The moment you put the ego aside, the curtain disappears. "

मनुष्याला जीवनयात्रेत विकास करण्यासाठी कर्म साधन मिळालेले आहे. कर्म हा त्याचा अधिकार आहे. कर्माचे ज्ञानात विलिनिकरण हा जीवनविकासाचा(तमसो मा ज्योतिर्गमय) हेतु मनुष्याची ज्ञानी भूमिका होण्यास मार्गदर्शन करते. याचसाठी शेवटी ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी ईश्वराचा आश्रय कि( default) अहंकाराचा आश्रय असे Option सांगितले.

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(९-३३)

******

(१८-१७)/२ :

"हत्वापि स इमान् लोकान् न हन्ति न निबध्यते"

(Right Interpretation)

शब्दांतील गोंधळ मनुष्याला संभ्रमात टाकते. अहंकार व आत्मविश्वास यामध्ये असाच गोंधळ होतो. आत्मविश्वास विकासाला पोषक असतो. अर्जुनाला युद्धक्षेत्रावर संशय निर्माण होतो. त्याला मार्गावर आत्मविश्वास नसतो. स्वतःच्या intention ला स्वार्थी, लोभी असे lable लावतो (लोभामुळे स्वजनांना मारणे) व त्याला guilty feel होते. हा गोंधळ अहंकारामुळे होतो. यामुळे स्वतः योग्य असुनही स्वतःला अयोग्य ठरवितो.

Selfish व Self interest या शब्दातील गोंधळ मिटविण्यासाठी सॅम्युअल स्माईल या स्का ॅटिश तत्वज्ञाने Self help हा शब्द योजिला. भगवतगीतेने स्वतः स्वतःचा बंधु व्हा, शत्रु बनु नका हा

संदेश दिला. अर्थात Self help साठी "आत्मवश vs मनोवश" ही स्थिति जाणणे महत्वाचे ठरते.

मनुष्यजीवनांत दुःखाशी सामना करण्याचे क्षण येतात. पण सुखाच्या अपेक्षेने दुःख टाळत प्रवास करण्याचा मनुष्याचा प्रयत्न असतो. हाच अर्जुनाचा प्रयत्न होता. म्हणुन युद्ध न करण्याची निवड करतो . अहंकाराचा आश्रय असल्यामुळे या भूमिकेला ज्ञानी भूमिका दर्शवतो. अज्ञानी भूमिकेला ज्ञानी ठरवितो. नेमकी ही चुक केल्यामुळे "ज्ञान" (What is Knowlege!)challange होते.

मनुष्य स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी जे शब्द वापरतो, त्या शब्दाला स्वतःच अर्थ देतो. हे त्याचे स्वतःचे Interpretation असते. "Wisdom" या संदर्भात ज्ञानाची ओळख न झाल्यामुळे Informatory ज्ञानालाच अर्जुन ज्ञान समजतो. ज्ञान या संदर्भातील हाच भेद भगवतगीता स्पष्ट करते.

अर्जुनाच्या या भाष्याला प्रज्ञावाद संबोधले. हा ज्ञानाचा आश्रय नसुन अहंकाराचा आश्रय असतो.

यस्य न अहंकृतो भावो बुद्धिः यस्य न लिप्यते।
हत्वापि स इमान् लोकान् न हन्ति न निबध्यते।।(१८-१७)

अर्थात संशयामुळे, अहंकारामुळे guilty feel होते. विश्वासासाठी ज्ञान हवे असते. म्हणुन ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी ईश्वराचा आश्रय करण्याचे शास्त्र सांगितले. दुःखावर मात करण्यासाठी हे शास्त्र असते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)
सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

याप्रमाणे भगवतगीता Wisdom या संदर्भातील ज्ञान व Informatory ज्ञान यांतील भेद स्पष्ट करते.

सुखाच्या अपेक्षेने दुःखावर मात करण्यासाठी Shortcut वापरणे . अज्ञानाचा स्विकार न करता अज्ञानाला ज्ञान दर्शविणे, या प्रक्रियेत स्वतःचा भ्रम होतोच पण इतरांचाही बुद्धिभेद होत असतो. याच प्रवृत्तिमुळे स्वतःला Mental Wellness चा अभाव(अशांती) असतो व समाजात नकारात्मकता पसरते. म्हणुन विद्वान असला तरी निष्क्रियतेचे समर्थन करुन बुद्धिभेद करु नये हा संदेश भगवतगीता देते.

न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम्।
जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान युक्ताः समाचरन् ।।(३-२६)

याद्वारे भगवतगीता ज्ञानाचे सर्वश्रेष्ठ असे महत्व सांगुन ज्ञान या संदर्भातील गोंधळ मिटवते . कर्माचे समाजातील महत्व स्पष्ट करते.

********

(१८-१८)

*************************

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्म चोदना।

करणं कर्म कर्ता इति त्रिविधः कर्मसंग्रहः।।

*************************

१८-१८ :

"ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधः कर्मचोदना "

(Motivation : कर्माची प्रेरणा)

मनुष्यजीवनात बौद्धिक क्षमता व मानसिक क्षमता यांचा परस्परसंबंध भगवदगीतेने स्पष्ट केला आहे. हाच संबंध वर्तमानातील Emotional quotient, Adverse quotient या Terminology द्वारा स्पष्ट होतो.

बौद्धिक क्षमता या संदर्भात ज्ञान शब्द आलेला आहे. तर हृदयदौर्बल्य (विचलित होणे)चंचलता, मनोवश अवस्था हे शब्द मानसिक संदर्भात आलेले आहे.

१. बौद्धिक व मानसिक क्षमता या दोहोंचा संबंध आत्मविश्वासाशी असतो. म्हणुन या दोहोंचा समन्वय साधण्यासाठी "अमृतत्वाय कल्पते" या मार्गाचे प्रयोजन आहे.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

यामुळे निष्काम कर्माचे प्रयोजन व त्याचे महत्व कळते. अर्थात बौद्धिक क्षमता व मानसिक क्षमता या दोहोंचा संबंध कर्माशी असतो.

२. Who drives the life ?

जीवनात कर्म घडत असते. याच कर्मानुसार मनुष्याचा विकास होत असतो. त्याची ओळख बनते. कर्म गरजेनुसार घडते ही समाजात कर्माची ओळख असते. Desire, need याचा संदर्भ घेवुनच अर्जुन म्हणतो, मला कांही नको!

*जीवनाचे ध्येय :

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधः कर्मचोदना ।
करणं कर्म कर्ता इति त्रिविधः कर्मसंग्रहः।।(१८-१८)

ज्ञेय म्हणजे ध्येय, जाणण्याचे Purpose, object; व परिज्ञाता म्हणजे जाणणारा. याप्रमाणे भगवदगीता जीवनाचे ध्येय (ज्ञेय, Purpose &Meaning ) सांगते. याच अंतर्गत ज्ञान, कर्म, कर्ता, बुद्धि, धृति, सुख याची निश्चित व्याख्या(सत mode) सांगते.

३. सुखदुःख, भय मानसिक संदर्भात येतात. अर्जुन दुःखामुळे विचलित होतो. या अवस्थेत युद्ध न करण्याचा निर्णय घेतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान सांगतो. येथे अहंकाराचा आश्रय असतो व ही भूमिका अज्ञानी ठरते.
अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

* अहंकाराचा आश्रय vs. ईश्वराचा आश्रय
ज्ञानविज्ञान या संदर्भात ईश्वराची ओळख भगवदगीता देत आहे. याच आधारावर ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी ईश्वराचा आश्रय, बुद्धियोगाचा आश्रय हा संदेश आहे.

अर्जुन अशांत, मनोवश अवस्थेत (युद्ध न करण्याचा) निर्णय करतो. या निर्णयावर त्यालाच समाधान नसते. अर्थात संशय मिटत नाही. हीच मानसिक दुर्बलता अज्ञानाचे (बौद्धिक) कारण ठरते. तर आत्मवश अवस्था म्हणजे स्वतःवर विश्वास असणे.

बुद्धियुक्त अवस्थेत आत्मवश असतो. या अवस्थेत निर्णय योग्य होतो. यामुळे कार्याचा एकनिश्चय असतो.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥(२-५०)

याप्रमाणे मानसिक व बौद्धिक गुलामीचे कारण मनोवश अवस्था ठरते. या अवस्थेत अहंकाराचा आश्रय असतो, यामुळे प्रकृतिवश असतो. योग्य निर्णय होण्यास ही अवस्था योग्य ठरत नाही. तर बुद्धियुक्त अवस्थेत ईश्वराचा आश्रय असतो. यामुळे निष्काम कर्म घडते. निर्णय योग्य ठरतो. अर्जुनाला हेच ज्ञान सांगितले तेंव्हा तो म्हणतो,

नष्टो मोहः स्मृतिः लब्ध्वा तत् प्रसादात् मया अच्युत।
अर्थात भ्रम पावलेली बुद्धि पुर्ववत् झाली(जागेवर आली).

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।
मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वाम् नियोक्ष्यति॥(१८-५९)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया॥(१८-६१)

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।(१८-६२)

सार :

इतिहासात गुलामि, पारतंत्र्य याचे कारण शोधतांना विविध सत्य समोर आले. यातील परावलंबन व मानसिक गुलामि हे प्रमुख आहेत.

मानसिक गुलामी :

"जशी गुलामाला गुलामीच्या पलिकडे जगण्याची जाणीवच नसते तशीच मानसिक अवस्था बौद्धिक खच्चिकरण झालेल्यांची असते. मानसिक आणि बौद्धिक खच्चिकरण झालेल्या जनतेवर राज्य करणं कोणत्याही सत्तेस सहज शक्य असतं. बुद्धी गहाण ठेवत मनाचा ताबा दिला की आपण आपले रहात नाही. एखाद्या कठपुतली बाहुलीसारखे नाचत आपण हुकुमाचे ताबेदार होतो. "

या पार्श्वभुमिवर भगवदगीता स्वातंत्र्याचे (मोक्ष) ज्ञान देत आहे. यानुसार जीवनाचा आदर करणे किंवा जीवनाचा शत्रुवत अनादर करणे ही मनुष्याचीच निवड असते.

**********

(१८-१८):
"करणं कर्म कर्ता इति त्रिविधः कर्मसंग्रहः"
(भगवतगीतेचे गुणात्मक ज्ञान)

वर्तमानात मनुष्य शिक्षण घेतो. व्यवसायासाठी या शिक्षणातील ज्ञानाचा उपयोग होतो. व्यवसायासाठी स्वयंरोजगार किंवा नोकरी हे दोन पर्याय असतात. नोकरीसाठी प्रयत्नशील असणाऱ्यांना नोकरी मिळाली नाही तर बेरोजगार ठरतो. शिक्षण व व्यवसाय यांचा संबंध म्हणजे ज्ञान व कर्म यांचा संबंध असतो. ज्ञान व कर्म यांचा संबंधच भगवतगीता स्पष्ट करीत आहे.

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना।
करणं कर्म कर्ता इति त्रिविधः कर्मसंग्रहः।।(१८-१८)
ज्ञान या संदर्भात Knower(परिज्ञाता) असतो. व कर्म या संदर्भात कर्ता असतो.

कार्याद्वारे प्राप्ति होते. विकास होतो. व्यक्तिगत पातळीवर कार्यरत असणे/स्वावलंबि असणे(आपल्या पायावर उभे असणे) हा सामान्य संस्कार असतो. कार्यरत असणे यांत १. प्राप्तिसाठी कार्य व २. कार्यसंस्कार/कार्यकौशल्य असे दोन भाग येतात.

१. प्राप्तिसाठी कार्य :

मनुष्याची जीवनयात्रेत "मी योग्य" ही भूमिका असते. योग्य नसला तरी मनुष्याला सुख अनुभवायचे असते, म्हणुन अतृप्ति, अज्ञान hide करण्यासाठी समर्थन करतो व आदर्शवादी भाष्य वापरतो. किंवा स्वतःचे (प्राप्ति)हित साध्य करण्यासाठी भाष्य बोलतो, व यांतही आदर्शवादी भाष्य वापरतो. या प्रक्रियेत "स्वतःला काय हवे"हे सत्य hide केल्या जाते.

अर्जुन आपल्या भूमिकेचे analysis करतो. मला कांहिही नको, मग आप्तांना मारणे केवळ लोभ दर्शवते, म्हणुन आपल्या नियतकार्याला पापाचे द्वार सिद्ध करतो. हा सर्व प्रयास दुःख टाळण्यासाठी असतो व ही भूमिका ज्ञानी दर्शविण्याचा प्रयत्न करतो. "ज्ञानी" भूमिकेच्या संदर्भातच ही भूमिका अज्ञानी ठरते. येथे विषय प्राप्तिचा नसतो, Consciousnessचा असतो.

अर्जुनाचे intention चांगले असते, पण आपल्या emotion ला लोभाचे labling करतो व विषय प्राप्तिचा बनवतो.

Acceptance of "what I want" and/or Ignorance यामुळे पारदर्शकता येते. व ज्ञान आपली भूमिका बजावु शकते. अर्जुन अज्ञान कबुल करतो. व भगवतगीतेच्या ज्ञानाचे द्वार उघडते.

२. कार्यकौशल्य(गहना कर्मणो गतिः)

व्यवहारात व्यवस्थापनकौशल्य असते, धर्माचे ethics, जीवनमुल्य याद्वारे मनुष्याला नियतकार्य मिळते, निर्णय मिळतो. पण जोवर त्या मार्गाची जबाबदारी स्विकारीत नाही, तोवर तो मार्गच पक्का नसतो. कार्यात निष्ठा नसते. यामुळेच मनुष्याचा मार्ग द्वंद्ववश असतो, व मनुष्य जबाबदारी स्विकारित नाही. अर्जुनाला नियतकार्य मिळते, पण द्वंद्ववश होतो. हा मार्गातील अडथळा ठरतो.

मनुष्याला निर्णयक्षमता असो वा नसो, कार्याच्या गतिचे ज्ञान असो वा नसो, प्रत्यक्षात प्रत्येक क्षणात कार्य घडत असते, त्याचा निर्णय होत असतो. मनुष्याला निर्णयक्षमता नसेल तर त्याला

निर्णयासाठी इतरांवर अवलंबुन रहावे लागते. यामुळे समाजात सहसा दुसऱ्याने काय करावे व करु नये यावर मनुष्य अधिक focus होत असतो.

जीवनमार्गात कार्याच्या गतिचे ज्ञान(व निर्णयअधिकार) हाच भगवतगीतेचा विषय आहे. म्हणुन स्वतःचा मार्ग पक्का करण्यासाठी नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करणे किंवा निर्णय पक्का होण्यासाठी बुद्धियोगाचा आश्रय करणे, ज्याद्वारे कार्यात निष्ठा असते.

भगवतगीता सांगते, मृत्यु शरीराला आहे, जे जिवित तत्व शरीरयंत्राला संचालित ठेवते, त्या तत्वाला मृत्यु नाही. याच जिवित तत्वाची ओळख, त्याचे विश्वाशी असलेले नाते, याची संपुर्ण ओळख भगवतगीता करुन देते. यालाच अध्यात्मज्ञान(स्वभाव अध्यात्म उच्यते) म्हटले आहे. या ज्ञानामुळेच जीवनविकासाचा सामान्य मार्ग (सकाम) व शाश्वत मार्ग (अमृतत्वाय कल्पते) यांतील भेद कळतो. व कार्यकौशल्याचे महत्व कळते. जीवनविकासाच्या प्रवासात आध्यात्मिक प्रगतीमुळे बुद्धिची स्थितप्रज्ञ अवस्था प्राप्त होते.

सार :

*Small is beautiful चा लेखक इ. एफ. शुमेकर म्हणतो, पुस्तकी शिक्षण संख्यात्मक ज्ञान देते. या ज्ञानाचा उपयोग विकासासाठी होतो, तेंव्हा ते गुणात्मक ज्ञान ठरते.

* अर्जुनाचा प्रश्न व्यावहारिक असतो. व त्याचे लक्ष व्यावहारिक कार्य(प्राप्तिसाठी कार्य) टाळण्याकडे असते. त्याला कार्यापासुन सुटका हवी होती. म्हणुन प्रश्न करतो, बुद्धिची स्थितप्रज्ञ अवस्था श्रेष्ठ तर घोर कर्माचे प्रयोजन कां?याच प्रश्नाचे उत्तरात मनुष्यजीवनांत कार्याचे महत्व सांगितल्या जाते. याचाच अर्थ, अर्जुनाला व्यावहारिक कार्यातच (प्राप्तिसाठी कार्य) संशय येतो, व हा संशय मिटविण्यासाठी ज्ञान असते. जे ज्ञान भगवतगीता सांगते. (ज्ञानसंच्छिन्न संशयम्) . याप्रमाणे ज्ञान हाच भगवतगीतेचा विषय बनतो. अर्थात हे गुणात्मक ज्ञान ठरते.

*****

(१८-१९)

**************************

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः।

प्रोच्यते गुणसंख्याने यथावत् शृणु तानि अपि॥

**************************

(१८-१९) :,
"ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः"
(मनुष्यजीवनातील विकासाचे ज्ञान )

व्यक्ति व त्याचे कार्य या संदर्भात श्रेष्ठ-कनिष्ट, चांगले - वाईट, योग्य-अयोग्य अशी वर्गवारी सामान्यतः भाष्यातुन होत असते. याच संदर्भात भगवतगीतेने दैवी व असुर संपत्ति विभाग अशी वर्गवारी स्पष्ट केली आहे. याच संदर्भात निट्झी या तत्वज्ञाने Master व Herd morality अशी वर्गवारी केली आहे.

अर्जुन दैवी संपत्तियुक्त(चांगला) असला तरी अज्ञान ठरतो. परंतु अज्ञानाला hide करुन स्वतःला ज्ञानी समजुन भाष्य करतो. म्हणुन ज्ञान हा भगवतगीतेचा विषय आलेला आहे. अर्थात

व्यक्ति(कर्ता), त्याचे कर्म व त्याचे ज्ञान कार्य घडण्यास कारण ठरतात.

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्म चोदना।
करणं कर्म कर्ता इति त्रिविधः कर्मसंग्रहः।।(१८-१८)

परिज्ञाता जाणणारा, ज्ञेय जाणण्याचा हेतु असतो व ज्ञानाने motivation होत असते. कर्ता, कर्म व ज्ञान यातील भेद प्रकृतिच्या सत, रज, तम या गुणानुसार भगवतगीता स्पष्ट करते. व मनुष्यजीवनात "ज्ञान" म्हणजे सत ज्ञान हे स्पष्ट होते.

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः।
प्रोच्यते गुणसंख्याने यथावत् शृणु तानि अपि।।(१८-१९)

ज्ञान या संदर्भात

(१)निश्चित तत्व/हेतु असणारे व त्यानुसार कार्यरत असणारे व (२) तत्वहीन/हेतुहीन कार्यरत असणारे, भाष्य करणारे असे दोन भाग पडतात.

निश्चित तत्व/हेतु यानुसार कार्यरत असणारे यांत
(१. १) सर्व मानव एकाच (ईश्वर) शाश्वत तत्वात ओवलेले आहे, अर्थात ईश्वरज्ञान जाणणारे (सत ज्ञान)
सर्वभुतेषु एनैकं भावम् अव्ययम् ईक्षते।(१८-२०)

व (१. २). सर्व मानव विभक्त आहे. अर्थात मनुष्याचा विश्वाशी संबंध नाही अर्थात भोगवादी(रज ज्ञान)
पृथक्त्वेन तु यद् ज्ञानं नानाभावान् पृथःग् विधान् ।(१८-२१)

याप्रमाणे( १. १), (१. २), (२) अनुक्रमे सत, रज व तम ज्ञान ठरते.

कर्म:
कर्म या संदर्भात १. चांगले कर्म व २. वाईट कर्म असे दोन विभाग केले तर चांगले कर्म या संदर्भात (१. १) निष्काम कर्म व (१. २ )सकाम कर्म असे दोन भाग येतात. याप्रमाणे (१. १), (१. २), (२) अनुक्रमे सत, रज व तम कर्म ठरते.

नियतं संगरहितं अरागद्वेषतः कृतम् ।
अफलप्रेप्सुना कर्म यत् तद् सात्विकं उच्यते।।(१८-२३)

कर्ता:

कर्ता या संदर्भात १. Master (श्रेष्ठ) व २. Herd अशी विभागणी केली असता Master या संदर्भात सत कर्ता जाणले तर Herd या संदर्भात (२. १)समाजात स्वार्थि(केवळ स्वतःच्या हीतावर लक्ष केंद्रित असलेला) म्हणुन ओळख असलेला रज कर्ता व (२. २) तम कर्ता(विषादी, खिन्न, नकारात्मक, प्रमादी) अशी विभागणि होते.

१. Master morality असलेला सत कर्ता:

मुक्तसंगो अनहंवादी धृतिउत्साह समन्वितः।
सिद्धिअसिद् ध्योः निर्विकारः कर्ता सात्विक उच्यते।।(१८-२६)

याप्रमाणे श्रेष्ठ व्यक्तिची निश्चित व्याख्या भगवतगीता देत आहे. व त्याच अनुषंगाने अज्ञान व ज्ञान यातील भेद स्पष्ट करीत आहे.

*******

(१८-२०)

*************************

सर्वभूतेषु येनैकं भावम् अव्ययम् ईक्षते।

अविभक्तं विभक्तेषु तद् ज्ञानं विद्धी सात्विकम्।।

*************************

(१८-२०):"अविभक्तं विभक्तेषु तद् ज्ञानं विद्धी सात्विकम्"

जीवनात दुःखमुक्तिसाठी, विश्वास येण्यासाठीच लोक देवतांची भक्ति करतात. यांत ईश्वरश्रद्धा ही Strength असते. भगवतगीता ज्ञानविज्ञान संदर्भात(अव्यय) ईश्वराची ओळख सांगते.

या सृष्टित सर्व अविभक्त आढळत असले तरी सर्वांभूति एकच शाश्वत तत्व विराजमान आहे. याच तत्वाला ईश्वर हे संबोधन आहे. भगवतगीतेत याच ईश्वराची ओळख विविध संदर्भात आलेली आहे.

सर्वभूतेषु येनैकं भावम् अव्ययम् ईक्षते।

अविभक्तं विभक्तेषु तद् ज्ञानं विद्धी सात्विकम्।।(१८-२०)

"ज्ञान" या संदर्भात ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत अशी ओळख येथे आलेली आहे. याच ईश्वरज्ञानाचा आश्रय ज्ञानाचा आश्रय ठरतो.

याला बुद्धियोग संबोधले आहे. याच ज्ञानामुळे जीवनविकासाचा निश्चित मार्ग कळतो (अमृतंगमय). जीवनमार्गातील संशय अज्ञानामुळे असतो. (ज्ञानसंच्छिन्नसंशयम्)ज्ञानामुळे विश्वास असतो.

जीवनात दुःख, अशांती अज्ञानामुळे असते. जगात अज्ञान आहे म्हणुन ज्ञानाचे महत्व सिद्ध झाले आहे. अंधार आहे म्हणुन प्रकाशाचे महत्व असते.

जीवनविकासमार्गात कार्याद्वारे ईश्वरभक्ति हे शास्त्र भगवतगीता स्पष्ट करते. ईश्वरभक्ति घडण्यासाठी कार्य यज्ञभावाने आचरले तर ज्ञानात विलिनीकरण होते.

यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।(४-२३)

कार्यामुळे विकास होतो. कार्यात ज्ञानविज्ञानाचा उपयोग होतो व कार्याचे अखेर ज्ञानात विलिनीकरण होते. याद्वारे जीवन विकास संदर्भात ज्ञान व कर्म यांचे नाते भगवतगीतेने स्पष्ट केले आहे. कार्याद्वारे ईश्वरभक्ति यामुळे नैष्कर्मसिद्धि लाभते व अकर्ता जाणतो.

यथा एधांसि समिद्धोअग्निः भस्मसात् कुरुते अर्जुन।

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा।।(४-३७)

चांगलेपणा म्हणजे सत् हे आपण जाणतो. या सतचा संबंध ईश्वराभक्तिशी जोडलेला आहे. विकासमार्ग सतमार्ग असतो. यासाठी सत व असत मार्ग यातील भेद स्पष्ट केला आहे. (अ.

१७). चांगल्या मनुष्याने ईश्वराचा आश्रय करुन स्वतःचे जीवनातील अज्ञान दुर करावे हे अपेक्षित आहे.

ज्ञानेन तु तत् अज्ञानं येषां नाशितम् आत्मनः।

तेषां आदित्यवत् ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ।।(५-१६)

दुःख टाळण्यासाठी अर्जुन निष्क्रियता स्विकारतो. स्वतःला योग्य ठरविण्यासाठी ज्ञान वापरतो. हेच अज्ञानाला ज्ञानी ठरविणे ठरते. यांत" ज्ञान" या संदर्भातच भ्रम असतो व स्वतःची फसवणुक करतो. म्हणुनच जीवनात "ज्ञान" व त्याची भूमिका भगवतगीता स्पष्ट करते.

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

याप्रमाणे भगवतगीतेने "ज्ञान" रहस्य उलगडले आहे. ज्ञान(विद्या) जगात सर्वांना उपलब्ध आहे. या ज्ञानाचे रहस्य जाणुन जो योग्य उपयोग करतो, तो देश, ते जीवन विकास करणारच.

* ******

(१८-२३)

*************************

नियतं संगरहितंम् अरागद्वेषतः कृतम् ।

अफलप्रेप्सुना कर्म यत् तत् सात्त्विकम् उच्यते।।

*************************

(१८-२३):

"नियतं संगरहितं अरागद्वेषतः कृतम् "

(Art of Detachment )

मनुष्यजीवनातील कर्म या संदर्भातील सत्य भगवतगीता सांगते. जगातील लोक चार विविध स्तरावर कार्यरत

(१. परावलंबि, अनुसरण करणारे, २. अर्थार्थि, प्राप्तिसाठी कार्य करणारे ३. प्रतिभावान, दैवीगुणसंपत्तियुक्त, ४. ज्ञानी, महामानवांचा स्तर) असतात. अर्जुन प्रतिभावान, दैवी स्तरात असुनही त्याचा विकासरथ थांबतो. येथे वरच्या स्तराचे द्वार उघडते.

१. निष्क्रियता:

मनुष्याचा जीवनरथ कार्यरत असतो. योग्य काय ?अयोग्य काय? हा मनुष्याचा प्रश्न असतो. योग्य मार्गावर रथ वळविता आला नाही तर योग्य व अयोग्य या द्वंद्वात मनुष्य सापडतो. प्रसंगी निष्क्रिय राहणे पसंत करतो. व नाव वाऱ्याने वहावी तशी जगण्याची अवस्था होते.

नियतकार्य टाळणे, जबाबदारी टाळणे, हा पळपुटेपणा असतो. निष्क्रियता दुबळे बनविते. जसे आसुरी होणे वाईट, तसेच दुबळेपणा, निष्क्रियता मानसिक गरिबी ठरते. अज्ञान ठरते.

मनुष्य अज्ञानाचा स्विकार न करता स्वतःला ज्ञानी ठरविण्याचा प्रयत्न करतो. मी वाईट नाही म्हणुन चांगला आहे हा नियम मनुष्य स्वतःच्या सोयीसाठी बनवितो. कारण समाजात चांगले-वाईट याच आधारावर भाष्य होत असते.

Universal Law मध्ये Law of Polarity एक नियम आहे. अंधार-उजेड, चांगला-वाईट, ज्ञान-अज्ञान इ. अशी Polarity आपण जाणतो. याचाच आधार घेवुन स्वतःला चांगला, ज्ञानी ठरविण्याचा प्रयत्न असतो. निष्क्रियतेला शक्ति दर्शविण्याच्या प्रयत्नात अज्ञानाला ज्ञान ठरविणे, दुर्बलतेला शक्ति ठरविणे .

आपली दुर्बलता, निष्क्रियता झांकण्यासाठी मनुष्याने अंगिकारलेली ही समाजातील बुरसटलेली संवय असते. म्हणुन स्वामी विवेकानंदांनी भगवतगीतेला अग्रक्रम दिला.

२. कर्माद्वारे जीवनविकासशास्त्र

नियतं संगरहितम् अरागद्वेषतः कृतम् ।
अफलप्रेप्सुना कर्म यत् तत् सात्विकम् उच्यते॥(१८-२४)

*Attachment vs. detachment

मनुष्य सुखासाठी जगत असतो. दुःख म्हणजे Attachment of pain असते. आसक्तिमुळे Attachment असते म्हणुन धर्मधुरिण आसक्ति दुःखाचे कारण दर्शवितात.

Detachmentसाठी ध्यानधारणा, योग हा अभ्यास असतो. तसेच भगवतगीता कर्मयोगशास्त्राद्वारे Detachmentची Art सांगते. आपला स्वतःचा कार्यमार्ग पक्का व्हावा व विश्वासाने मार्ग चालुन निष्ठेने कार्य व्हावे . याच कार्याद्वारे Detachment साध्य व्हावे व

स्वतःची खरी ओळख व्हावी हे कर्मयोगशास्त्राचे रहस्य भगवतगीता सांगते. याच अनुषंगाने बुद्धिवर संस्कार(Quality education ) अभिप्रेत असते.

* Tiebreaker

धर्मश्रद्ध, चांगला असला तरी(अर्जुन)मनुष्य द्वंन्द्वात सापडतो व हा द्वंद्व break करण्यासाठी स्वधर्म Tiebreakerची भूमिका करते. स्वधर्म स्वतःच्या मार्गाला स्वतःची मंजुरी असते. म्हणुन स्वधर्म जीवनमुल्य ठरते. ईश्वरसमर्पित कार्य घडण्यासाठी स्वधर्माचरण अप्रिय वा प्रिय परिणामापासुन detach करते.

*स्वधर्मकला

मनुष्य समुहात जगतो. समुहात असुनही स्वतःला स्वधर्म देण्याची कला साध्य करणे.

मनुष्याला जे कार्य प्रत्यक्षात जमते(सहजकार्य)तेच नियतकार्य करतो. या कार्याला स्वधर्मात transform केले तर कर्म समर्पित निष्ठेने केले जाते.

स्वधर्म समुहातील common causeसाठी स्विकारलेल्या नियतकार्याला स्वमंजुरी असते. समुहात commonप्रश्न सोडविण्यासाठी विषय ठरतो. मनुष्याला नियतकार्य मिळते. स्वधर्माची जाण असेल तर या विषयाला व त्या संदर्भातील भाष्याला गांभिर्य प्राप्त होते. अन्यथा मनुष्याचा egoself (स्वार्थ) त्या विषयालाच चुकीचे ठरवितो. जसे अर्जुनाने युद्धकार्यालाच (मुळ विषय)चुकीचे ठरविले.

समर्पण म्हणजे surrender of governing self for common cause of team. खेळाडु Team(समुह)चे नियम पाळतो. व कार्य teamला समर्पित होवुन करतो. खेळाडु बदलतात पण team कायम असते. बदलते ते असत् व बदलत नाही ते सत(शाश्वत) या तत्वावर कर्म शाश्वताला समर्पित होते. निःसंशयपणे समर्पित कार्य घडण्यासाठी अशाश्वत व शाश्वत यांतील भेद भगवतगीता स्पष्ठ करते.

*बुद्धियोग कला(दृढनिश्चय)

ईश्वरभक्ति करणारे ईश्वरश्रद्ध असतात. याच श्रद्धेमुळे ईश्वराची ओळख करण्याचे ज्ञान भगवतगीता सांगते. व्यवहारात कर्म घडत असतात व द्वंद्वाच्या तुफानी हवेत जीवनाची नाव सापडते. म्हणुन

ज्ञानाची गरज असते. ज्ञानासाठी हृदयातील ईश्वराची ओळख झाली तर परम् ईश्वराची ओळख होते . बुद्धियोग प्रदान होतो. कार्याचा निश्चय पक्का होतो. कर्माद्वारे योग साध्य करतो.

कार्याच्या परिणामातील अपयशाचा, दुःखाचा संशय कार्यनिश्चय होण्यास अडथळा करतो. म्हणुन कार्यनिश्चय दृढ होण्यासाठी बुद्धियोग म्हणजे ईश्वर ज्ञानाने संशय मिटविणे व योगस्थ वृत्तीने (निष्काम) कार्य योगासाठी करणे.
योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंच्छिन्न संशयम् ।(४-४१)

सार :
*दृढनिश्चयासाठी निर्णय अधिकाराची जागृति हवी. स्वावलंबन या जीवनमुल्याद्वारे निर्णय अधिकार मिळतो. Beggars are not choosers. या जगांत भार न बनता Asset व्हावे .
*वचन या जीवनमुल्याद्वारे कार्यनिश्चय पक्का होतो. मनुष्यावर विश्वास असतो.
*इच्छा Worries बनु नये. म्हणुन Goal/Aim निश्चित करणे व Deadline ठरविणे हे कार्य व्यवस्थापनात आवश्यक असते.

याप्रमाणे भगवतगीतेतील कर्मयोगशास्त्र कार्याचे आध्यात्मिक व्यवस्थापन ठरते.

********

(१८-२३):

"अफलप्रेप्सुना कर्म यत् तत् सात्त्विकम् उच्यते"

"You were put on this earth to achieve your greatest self, to live out your purpose, and to do it courageously. "

Steve Maraboli,

Survival हेच पशुच्या जगण्याचे Purpose असते. मनुष्य Survival या संदर्भातच श्रेष्ठत्व, चांगले जगणे म्हणजे भोगैश्वर्य भोगणे व सुखी होणे असा समज करुन जीवनाचे Purpose ठरवीत असतो. या प्रवासात दुःख आले असता उपायाची गरज भासते. (उदा. शांती) व जीवनाचे संदर्भ(Purpose, meaning)बदलत असतात. याच प्रवासात अर्जुन दुःखी होतो. अशांत होतो. व अशांतीवर उपाय म्हणुन युद्ध न करणे ही निवड

करतो. शांती अनुभवण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो. येथे हीच जीवनाची परिक्षा ठरते.

अर्जुनाने जे नियतकार्य स्विकारले असते, ते योग्य जाणुनच. पण दुःख झाल्यामुळे ते अयोग्य आहे, असे धर्माचा आधार देवुन स्पष्ट करतो. अर्जुनाला धर्मातील स्वर्ग-नरक याची जाण असते, पण "चेतना"(Live entity)याचे ज्ञान नसते. याच चेतनेचे (मनोवैज्ञानिक ) ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते. व याचद्वारा जीवनाचे निश्चित Purpose & meaning भगवतगीता स्पष्ट करते.

जीवनात दुःखी होणे, निराश होणे, निष्क्रियतेचे समर्थन करणे ही नैसर्गिक क्रिया(Default system of life) आहे व ती मनोवश अवस्था असते. (येथेच परिवर्तन हवे असते. )ही जीवनाची हरलेली मानसिकता असते म्हणुन जीवनाला युद्ध म्हटले. मनोवैज्ञानिक जगतात हा लढा Internal battle म्हणुन ओळखला जातो.

Self Consciousness System

मानसशास्त्रज्ञाचे भाष्य

फ्राईड म्हणतो,

The self-consciousness system is directly related to mental health, that reflects on one’s thoughts, feelings and actions and inhibits or legitimizes them to one’s self and to others.

भगवतगीतेचे भाष्यः

वर्तमानात मनुष्य वर्तन करतो म्हणजेच तो आपले शरीरयंत्र operate करीत असतो, तेंव्हा तो Operator असतो. हे यंत्र पंचमहाभुते, मन, बुद्धि, अहंकार यासह अष्टप्रकृति (८), दशइंद्रिये(१०), (५)विषय(इंद्रियगोचर)व (१) चेतना याप्रमाणे २४ भागाचे संघटित क्षेत्र आहे. या "क्षेत्रा"चा Operator कोण असावा?

अर्जुन निष्क्रिय स्थितीला योग्य ठरवितो, हा अहंकाराचा आश्रय असतो. यामुळे मन बुद्धिचा ताबा घेते. म्हणुन(In order to change of mode) बुद्धियोगाचा आश्रय कर असे भाष्य केले आहे.

इंद्रिय, मन, बुद्धि, (अंतरात्मा Superconscious, परम आत्मा Spirit conscious)आत्मा असा Consciousness functioning मधील क्रम आहे.

इंद्रियाणि पराणि आहुः इंद्रियेभ्यः परं मनः।
मनसः तु परा बुद्धिः योः बुद्धेः परतः तु सः॥(३-४२)

. मन कनिष्ट(दास) तर आत्मा श्रेष्ठ(मालक) ठरतो. यावरुन Operator कोण याची स्वतःला जाणिव असते. जेंव्हा मन (Lower Self)operator असते, ती मनोवश अवस्था असते, जेंव्हा आत्मा (Higher Self) Operator असतो, ती आत्मवश अवस्था असते.

नाव वाऱ्याने वहात रहावी तशी जीवनाची मनोवश अवस्था असते, यात कार्याची सकाम अवस्था असते. हा कार्याचा "रज"Mode असतो. तर आत्मवश अवस्थेत नाव वल्हवीत असतो. या अवस्थेत कार्याची निष्काम अवस्था असते. स्वतःवर command असते. हा कार्याचा "सत" Mode असतो.
नियतं संगरहितंम् अरागद्वेषतः कृतम् ।
अफलप्रेप्सुना कर्म यत् तत् सात्त्विकम् उच्यते॥(१८-२३)
********

(१८-२४)

*******************

यत्तु कामेप्सुना कर्म सअहंकारेण वा पुनः।

क्रियते बहुलायासं तद् राजसम् उदाहृतम्।

*******************

(१८-२४):

"यत्तु कामेप्सुना कर्म सअहंकारेण वा पुनः"

(व्यवहारातील सकाम कर्माची मानसिकता)

अर्जुनाची जगण्याची भूमिका कशी होती व कसे जगणे योग्य होते?हाच भेद भगवदगीतेतुन जाणायचा आहे.

आपण प्रत्यक्षात कसे जगत आहोत व कसे जगायला हवे?यावर मनुष्य विचार करीत नाही कारण स्वतःला योग्य समजुनच मनुष्य जगत असतो किंवा तसे समर्थन करीत असतो.

"When the intensity of emotional conviction subsides, a man who is in the habit of reasoning will

search for logical grounds in favour of the belief which he finds in himself. "

Bertrand Russell

"युद्ध करणे" या संदर्भात विचार केला तर युद्ध करणे हा व्यवहाराचा विषय होता व ते अर्जुनाचे कर्तव्य होते. युद्ध करण्यासाठीच अर्जुन युद्धक्षेत्रावर उत्साहाने हजर होतो. त्याच उत्साहाने म्हणतो, युद्धासाठी जमलेले दुर्बुद्ध दुर्योधनाचे खुशमस्करे कोण ?त्यांचे चेहरे मला न्याहाळायचे आहेत. पण दुसऱ्याच क्षणी (स्वजनांच्या हत्येचे)दुःख पाहुन युद्ध करणे पाप आहे असे declare करतो!सर्व योध्यांना आपापल्या कर्तव्याचे ज्ञान होते, मग अर्जुनालाच एक साधी गोष्ट कशी समजली नाही!पण ज्ञान ऐकल्यावर शेवटी तयार होतोच!

जसे पाणी उतार सापडेल तिकडे वहात असते तसे मनुष्यजीवन प्रकृतिस्वभावानुसार कार्यरत असते. या संदर्भात श्रीकृष्ण म्हणतात,

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।
मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वां नियोक्ष्यति।(१८-५९)

भगवदगीता कार्याविषयी बोलत नाही तर कार्य करतांनाच्या मानसिकतेविषयी बोलत आहे.

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।(२-४९)

१. सकाम कर्म vs. निष्काम कर्म

मनुष्य प्रकृतिच्या प्रभावाखाली जगत असतो. हा प्रभाव सत, रज किंवा तम गुणाचा असतो. "नियतकर्म" या संदर्भात निष्काम कर्म हा सत प्रभाव असतो व मोहामुळे चांगला मनुष्यही निष्क्रिय होतो तेंव्हा हा तम प्रभाव ठरतो.

इच्छा(State of want) व कर्म(State of art) हे कर्म घडण्याचे साधे व्यावहारिक logic आहे. यामुळे व्यवहारात सकाम कार्य मनुष्य जाणत असतो.

यत्तु कामेप्सुना कर्म सअहंकारेण वा पुनः।

क्रियते बहुलायासं तद् राजसम् उदाहृतम्।(१८-२४)

युद्धक्षेत्रावर दुःखी झाल्यावर अर्जुन या logic च्या आधारावरच भाष्य करतो. मला सुखासाठी राज्याची इच्छा नाही म्हणुन या कर्माचे प्रयोजन माझ्यासाठी व्यर्थ आहे. याउलट हे लोभापायी केलेले कार्य पापकर्मच ठरेल!असा शिक्का मारतो. (मनुष्य जेंव्हा जबाबदारीपासुन पलायन करतो तेंव्हा स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी समर्थन करतो. )

या पार्श्वभुमिवर निष्काम कर्म हा भगवदगीतेचा संदेश आहे. यांत सतगुणाचा प्रभाव असतो. परिणामाचे भय विचलित करीत नाही, अर्थात मानसिकता stable (योगयुक्त) असते. सकाम कर्म व निष्काम कर्म यांत हाच मानसिकतेचा भेद असतो.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते।(५-१२)

२. योगयुक्त(Higher) मानसिकता

शब्द आदीन् विषयान् अन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति।(४-२६)
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।(४-२७)

"इच्छा-कार्य-कार्याचा एकनिश्चय(ध्येय)/स्वधर्म (आत्मसंयम)-योगयुक्त/योगस्थ-ज्ञानी" याप्रमाणे

कार्य घडण्याच्या प्रक्रियेचे व्यवस्थापन "यज्ञ" या तत्त्वाने स्पष्ट केले आहे.

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४- ३३)

या पार्श्वभुमिवर कर्म करतांना योगयुक्त मानसिकता असणे, हा संदेश भगवदगीता देत आहे. या स्थितित कुणी स्वतःचा स्वधर्म जाणतात, कुणी कर्तव्य जाणतात. पण हे कार्य या संदर्भात Conviction असते.

तस्माद् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)

"There can be no great courage where there is no confidence or assurance, and half the battle is in the conviction that we can do what we undertake. "

-Orison Swett Marden

********

(१८-२६)

*******************

मुक्तसंगो अनहंवादी धृति उत्साहसमन्वितः।

सिद्धि असिद्ध्योः निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते।।

*******************

(१८-२६):

" मुक्तसंगो अनहंवादी धृति उत्साहसमन्वितः"

(सात्त्विक कर्ता/श्रेष्ठ व्यक्तिमत्व)

"व्यक्तिमत्व विकास" या विषयावर Motivational workshops समाजात चालत असतात. जीवन प्रगतिपथावर असावे यासाठी सकारात्मक मानसिकता धारण व्हावी या उदात्त हेतुने या कार्यशाळा चालत असतात. भगवतगीता तीन प्रकारचे व्यक्तिमत्व सात्त्विक, राजस, तामस कर्ता याद्वारे स्पष्ट करीत आहे. सात्त्विक व्यक्तिमत्व समाजहीतासाठी चांगलेपणाचा पुढाकार घेण्यासाठी (Leadership, Orgonizer- योजक)उपयुक्त ठरते.

अर्जुन चांगला, प्रतिभाशाली असतो. पण नियतकार्य करण्याचे वेळी शोकग्रस्त होवुन मनोदुर्बलतेला आश्रय देतो. या स्थितित त्याचे उच्च व्यक्तिमत्व ठरत नाही. अर्थात भगवतगीतेच्या भाषेत तो सात्त्विक कर्ता ठरत नाही. म्हणुन म्हटले,
अनार्यजुष्ठम् अस्वर्ग्यम् अकिर्तिकरम् अर्जुन।(२-२)

“Sometimes you don’t realize your own strength until you come face to face with your greatest weakness. ”– Susan Gale

तु दैवीगुणसंपत्तिसाठी जन्माला आलेला आहे म्हणुन मनोदुर्बलतेला आश्रय देवु नको असे त्याला संबोधन होते.

*प्रज्ञावादी संवय vs. ज्ञान-अज्ञान मापदंड चांगले म्हणावे यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करणे ही समाजात संवय असते. चांगले-वाईट या आधारावर वाईट नाही म्हणुन चांगला आहो असे दर्शविण्याची प्रज्ञावादी संवय असते. या संवयीमुळे जो वाईट नाही तो चांगला अशी चांगलेपणाची व्याख्याच केलेली असते. तसेच वाईट म्हणु नये, अहंकारी म्हणु नये म्हणुन Fear based विचारप्रणालीचा "संस्कार" या नांवाखाली वापर होत असतो.

अर्जुनाची नेमकी हीच मानसिकता बनते. आपण लोभी ठरु नये म्हणुन निष्क्रियता योग्य ठरवितो. अप्रत्यक्षपणे दुर्बलतेला सक्षम दर्शविण्याचा हा प्रयत्न असतो. यामुळे स्वतःच्या अज्ञानाचा स्विकार होत नाही. या चुकीच्या मानसिकतेलाच भगवतगीतेने "ज्ञान-अज्ञान" या मापदंडावर प्रकाशात आणले आहे. व श्रेष्ठ कर्ता (सात्त्विक) याची निश्चित व्याख्या केली आहे.

तीन प्रकारचे व्यक्तिमत्व :

१. रोगी/तामसी
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते।(१८-२८)

अर्थात रोगी मानसिकता असलेला तामस कर्ता (नेहमी दुःखी, नकारात्मक असणारा, आळशी, खिन्न) ठरतो.

२. सामान्य /राजस
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः।(१८-२७)

सामान्य व्यक्तिमत्त्व असलेला राजस ठरतो.

"रागी कर्मफलप्रेप्सुः" अर्थात भोगैश्वर्य या संदर्भात समाजात श्रीमंत व्हावे, किर्तिमान व्हावे अशी सामान्यांची इच्छा असते. पण यासाठी कर्तृत्व हवे असते.

३. श्रेष्ठ/सात्त्विक

मुक्तसंगो अनहंवादी धृति उत्साहसमन्वितः।
सिद्धि असिद्ध्योः निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते॥(१८-२६)

श्रेष्ठ, प्रगतिसाठी अपेक्षित व्यक्तिमत्व सात्त्विक कर्ता याद्वारे स्पष्ट होते. यांत कार्याचा एकनिश्चय (Determination) असतो. अर्थात चंचल नसतो(Free from attachment of pain). अहंकारविरहीत पण आत्मविश्वास असलेला, उत्साही असतो.

******

(१८-२६) :

"सिद्धि असिद्ध्योः निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते"

(व्यक्तिमत्व)

## १. विकास (Evolution):

"What religion a man holds, to what race he belongs, these things are not important; the really important thing is this knowledge: the knowledge of God's plan for men. For God has a plan, and that plan is evolution. "

-Jiddu Krishnamurti

मानवी जन्मामध्ये एखाद्या गुणविशेषाची कल्पना अवतरली असते, अन्यथा पशुपक्षीही जगत असतात.

सुर्य आपल्याच जागेवर असते, त्याच्याभोवती पृथ्वी फिरते. आम्ही म्हणतो सुर्य उगवला. घड्याळाचे काटे पुढे सरकतात, आम्ही म्हणतो वेळ निघून गेली आहे. अगदी याचप्रमाणे जीवन पुढे सरकत असते. आत्मोन्नतिचे हेच रहस्य आहे.

काय आमचे जीवन पुढे सरकत आहे ? अर्थात प्रगतिपथावर आहे ?अर्थात जीवनाला आमचे सहकार्य आहे?नसेल तर आमची वागणुक स्वतःशी शत्रुवत आहे.
अनात्मनः तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत् ।(६-६)

स्वतःचा बंधु की शत्रू? ही आपलीच निवड असते. हाच व्यक्तिमत्व या संदर्भात भगवद् गीतेचा प्रथम पाठ आहे.

२. व्यक्तिमत्व :

या संदर्भात भगवतगीता सात्त्विक मनुष्याची निश्चित ओळख देत आहे. स्वतःचा पक्का (निश्चित) मार्ग चालणे, विचलित न होणे यासाठी निष्काम कर्म करणे. हा जीवनयात्रेतील Standard मार्ग आहे. सात्त्विक मनुष्याचा हाच मार्ग असतो.

मुक्तसंगो अनहंवादी धृति उत्साहसमन्वितः।
सिद्धि असिद्ध्योः निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते।।
(१८-२६)

अर्जुन विचलित होतो. शोकग्रस्त होतो, म्हणुन नियतकार्य (युद्ध ) टाळणे हा मुद्दा करतो. मुख्य मुद्याला डावलण्यासाठी विषयांतर करणे ही मनःस्थिति बनते. ज्याला मार्ग चालायचा नसतो, तो निष्क्रियतेचे समर्थन करतो. यांत

१. विचलित होणे

२. आळशी असणे व नकारात्मक असणे हे दोन महत्वाचे मुद्दे असतात.

१. विचलित होणे vs. निर्विकार

( राजस vs. सात्त्विक )

रागी कर्मफलप्रेप्सुः लुब्धो हिंसात्मको अशुचिः।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः।।(१८-२७)

कार्याची ही सकाम मानसिकता असते. म्हणुन "राजस vs. सात्त्विक "या संदर्भात सकाम कर्म vs. निष्काम कर्म हाच मुख्य मुद्दा बनतो.

* निष्क्रियता, नकारात्मक vs उत्साही, सकारात्मक

(तामस vs. सात्त्विक)

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिको आलसः।
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते।।(१८-२८)

"It is the working man who is the happy man. It is the idle man who is the miserable man. "

Benjamin Franklin

*******

(१८-२७)

**************************

रागी कर्मफलप्रेप्सु लुब्धो हिंसात्मको अशुचिः।

हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः।।

**************************

(१८-२७) :

"हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः"

(सकाम vs निष्काम, चांगले उत्साही व्यक्तिमत्व)

"चांगले व्यक्तिमत्व" या संदर्भात सात्त्विक कर्ता याद्वारे भगवदगीतेने परिभाषित केले आहे. या परिभाषेला तुलनात्मक स्पष्टिकरण दिले आहे.

मुक्तसंगो अनहंवादी धृतिउत्साहसमन्वितः ।

सिद्धिअसिद्ध्योः निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते।।(१८-२६)

समाजात लोक सक्रिय असतात व विकास साध्य करीत असतात. तर कुणी अज्ञानामुळे निष्क्रिय, आळशीही होतात. म्हणुन व्यक्तिमत्व या संदर्भात त्याज्य काय?हे तामस कर्ता याद्वारे स्पष्ट केले आहे.

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिको आलसः।

विषादी दीर्घसुत्रि च कर्ता तामस उच्यते।।(१८-२८)

निष्क्रिय, आळशी, खिन्न, विषादी, शठ(कपटी), संस्कारहीन मनुष्य तामस ठरतो. याप्रमाणे

निष्क्रियता vs. सक्रियता,

नकारात्मकता vs सकारात्मकता,

विषादी, भित्रा vs साहसी, उत्साही (धृतिउत्साहसमन्वितः)

असा तुलनात्मक व्यक्तिमत्वदोष स्पष्ट होतो.

मनाला वश करुन आत्मवश होणे हे मनुष्याला साध्य करायचे असते. हे साध्य न झाल्यास ज्याला वशीभूत करायचे त्यालाच वशीभूत(प्राकृतः) होतो.

समाजात जे सक्रिय असतात त्यांच्यावरच जी टिका होत असते, ती मुख्यत्वेकरुन चांगले vs वाईट याच स्वरुपाची असते. याच पार्श्वभुमिवर सक्रिय असणाऱ्यांमधे " असुरी vs. दैवीगुणसंपत्ति" याचा बोध राजस कर्ता याद्वारे होतो.

रागी कर्मफलप्रेप्सु लुब्धो हिंसात्मको अशुचिः।

हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः॥(१८-२७)

*सकाम vs निष्काम कर्म

रागी कर्मफलप्रेप्सु vs मुक्तसंगो अनहंवादी

हर्षशोकान्वितः कर्ता vs. सिद्धिअसिद्ध्योः निर्विकारः कर्ता

*असुर vs दैवी हा भेद स्पष्ट होण्यासाठी "लुब्धो हिंसात्मको अशुचिः " या शब्दाचा राजस कर्ता या संदर्भात शब्दप्रयोग आहे.

सार :

"Man's main task in life is to give birth to himself, to become what he potentially is. The most important product of his effort is his own personality. "

-Erich Fromm

व्यक्तिमत्व घडविण्यास समाजातील शिक्षणव्यवस्थेचे सहकार्य होत असते. "व्यक्तिमत्व विकास" या विषयाचा मुख्य हेतु जीवनविकास करण्यास मनुष्य सक्षम व्हावा, चांगला नागरिक व्हावा, Excellence असावे, सकारात्मक असावे, उत्साही असावे ज्यामुळे जीवनाचे आव्हान स्विकारण्यास सक्षम होईल, असा प्रामुख्याने असतो. या ज्ञानाला गुणात्मक ज्ञान संबोधले आहे. हेच ज्ञान भगवदगीतेने "कर्ता" या संदर्भात स्पष्ट केले आहे.

************

(१८-२८)

*************************

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठोनैष्कतिको आलसः ।

विषादी दीर्घसुत्री च कर्ता तामस उच्यते।

*************************

(१८-२८) :

"अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कतिको आलसः ।

विषादी दीर्घसुत्री च ... "

(क्रियाशिल-Active vs. निष्क्रिय- Idle)

जीवन आहे म्हणुन जगावेच लागते. जीवनात विकास व्हावा यासाठी ज्ञानार्जन(विद्या ग्रहण )करतो. आपापल्या ज्ञानानुसार, स्वभावप्रकृतिनुसार मनुष्य जगत असतो.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृते ज्ञानवानअपि।

१. समाजात चांगले-वाईट, गरीब-श्रीमंत असे भेद होत असतात. चांगले-वाईट या संदर्भात अर्जुनाचा भ्रम होतो. समाजात अन्यायाने (भ्रष्टाचार करुन) धनसंचय करुन श्रीमंत होणारेही असतात. याच संदर्भात भगवदगीता दैवी-असुर गुणसंपत्तिद्वारा भेद स्पष्ट करीत आहे.

२. समाजात योग्य-अयोग्य या संदर्भात आढावा घेतला असता समाजातील गुलामि, शोषण, मानवी दुर्बलता, निष्क्रियता अयोग्य ठरते. समाजाला सक्षम करण्यासाठी महामानवांनी वेळोवेळी संदेश दिले. चांगलेपणा, धर्म, आदर्श यांच्या नांवाखाली दुर्बलतेचे पोषण करणे यासारखे अज्ञान जगात नसते. स्वामि विवेकानंदांनी या दुर्बलतेचा निषेध करतांना याच अज्ञानाला स्पष्ट करण्यासाठी मिल्टनकृत "Paradise lost" या कादंबरीतील सैतानाचे उदाहरण दिले जो जीवनात न हारता लढत लढत मरतो.

दुर्बलतेचे पोषण करणारे हेच अज्ञान भगवदगीतेने अर्जुनाच्या विषादयोगातुन दर्शवुन दिले. अर्जुन आपल्या निष्क्रियतेला धर्म व दुर्बलतेला आदर्श दर्शविण्याचा प्रयत्न करतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी येथे अहंकाराचा आश्रय असतो.

अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

अहंकार नसलेला सात्त्विक कर्ता असतो.

मुक्तसंगो अनहंवादी धृति उत्साह समन्वितः।(१८-२६)

अहंकारावर विजय मिळविण्यासाठी ईश्वराचा आश्रय कर हा संदेश आहे.

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्या इति मन्यसे।(१८-५९)

भगवदगीतेत सात्त्विक vs तामस कर्ता यातुन हा भेद स्पष्ट होतो. कर्मानेच विकास होतो. सक्रिय vs निष्क्रिय, सकाम कर्म vs. निष्काम कर्म याप्रमाणे सात्त्विक vs तामस, सात्त्विक vs. राजस याप्रमाणे सात्त्विक, राजस व तामस कर्ता यातील भेद स्पष्ट होतो. यानुसार नित्य विकासमार्गावर असलेला असलेला शहाणा व विकासमार्गावरुन घसरलेला मूढ असा एकच भेद केला तर सात्त्विक कर्ता vs तामस कर्ता असा भेद करता येईल. निष्क्रियता, आळस, विषाद, संस्कारहीन अर्थात मनोवश अवस्था(प्राकृत) तामस कर्त्याचे लक्षण असते.

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कतिको आलसः ।
विषादी दीर्घसुत्री च कर्ता तामस उच्यते।(१८-२८)

सार :

जीवनात यशस्वि होण्यासाठी Motivation असते. मनुष्य ज्ञानार्जन करतो. भगवदगीता व्यवहार व अध्यात्म या दोहोंचा समन्वय साधते. व्यावहारिक motivation ला अध्यात्माची जोड मिळते. व याद्वारा ईश्वरभक्तिचा लाभ होतो. असा दुहेरीलाभ होतो. ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

***********

(१८-३०)

*************************

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्य अकार्ये भय अभये।

बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी।।

*************************

१८. ३०/१:

"प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्य अकार्ये भय अभये"

(The Choice & Determination)

चांगले-वाईट या संदर्भात सत्कृत्य-दुष्कृत्य हा संदर्भ असतो. समाजातील समर्थन-टिका भाष्याचा चांगले-वाईट हाच आधार असतो, अर्थात व्यक्तिचे ते Judgement thinking असते. अर्जुन आपल्या नियतकार्याला दुष्कृत्य ठरवितो. यामुळे संशय निर्माण होतो. संशयामुळे द्वंद्व निर्माण होते. हे द्वंद्वच बुद्धिवरील, मनावरील(Conscious system) ओझे ठरते.

भगवतगीता द्वंद्व vs निर्द्वंद्व हे शास्त्र सांगते. यासाठी "व्यवसायआत्मिका बुद्धि" या संदर्भात निर्णयक्षमता /Determination याला महत्व देते. Determination या

संदर्भात मनुष्यासमोर निवड करण्याचा प्रसंग येतो. कार्याचे संदर्भात एकाची निवड करावी लागते. मनुष्याचा निर्णयअधिकार त्याला निवड करण्याचे स्वातंत्र्य देते. हाच स्वातंत्र्याचा अधिकार असतो. हा अधिकार वापरुन द्वंद्वाचे ओझे उतरविणे, स्वातंत्र्य अनुभवणे, निर्भय असणे हा भगवतगीतेचा संदेश आहे. याचसाठी निष्काम कर्माचे शास्त्र सांगितले आहे.

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्य अकार्ये भय अभये।
बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी॥(१८-३०)

अर्थात कार्याची निवड करतांना Determination चे निश्चित ज्ञान असते.

*करण्यास योग्य vs. करण्यास अयोग्य

*सत्कृत्य vs. दुष्कृत्य

*चांगल्या/आवश्यक कार्यासाठी निर्भय असणे(साहस) vs. परिणामाचे भय

*स्वातंत्र्य(ओझे उतरणे) vs. बंधन(ओझ्याखाली दबणे)

*निर्द्वंद्व vs. द्वंद्व

*शाश्वत vs. अशाश्वत

* निष्काम vs. सकाम

*धर्म vs. अधर्म

बोध:

इच्छाद्वेषसमुत्थेन् द्वंद्वमोहेन् भारत।

सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप।।(७-२७)

जीवन जगतांना नकळत(अज्ञानामुळे) मनुष्य द्वंद्वाच्या ओझ्याखाली जगत असतो व यामुळेच Stress असतो. मानसिक दुर्बलता असते. यालाच भगवतगीतेने "बंधन " संबोधले आहे. हाच विकास मार्गातील अडथळा ठरतो.

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

"Determination gives you the resolve to keep going in spite of the roadblocks that lay before you. "

Denis Waitley

******

(१८. ३०)/२:

"बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी"

(Age of Science & Wisdom)

*भगवतगीतेची ज्ञानविज्ञान भूमिका:

विज्ञाननिष्ठ विचारांचे महत्व सांगुन तत्वज्ञानाची सांगड माणसाच्या दैनंदिन व्यवहाराशी घालुन देणारा सत्यशोधन जगतातील प्रथम विचारवंत म्हणुन सॉक्रेटिसची जगाला ओळख आहे. श्रीकृष्णाने ज्ञान सर्वश्रेष्ठ हे निक्षुन सांगीतले.

जगाचा इतिहास कर्तृत्वाचा आहे. कर्तृत्वानेच विकास होत असतो. याच संदर्भात ज्ञानविज्ञानाला आज प्राधान्य मिळाले आहे. ज्ञानविज्ञानामुळे प्रश्नाचे निदान होते. याच संदर्भात प्रश्न विचारण्याचा अधिकार असतो. ज्ञानविज्ञानाचे युग म्हणुन युरोपात

१८वे शतक "Age of Reasoning " संबोधल्या गेले. या शतकाला "Century of Philosophy" संबोधल्या गेले.

भगवतगीतेत अर्जुनाच्या प्रश्नाचा आधारच ज्ञान (Confidence vs. Excuse) आहे. दुःखी झाल्यावर त्वरीत Judgemental thinking चा वापर करतो. व युद्ध करणे धर्मविरोधी आहे असे भाष्य करतो. वास्तव स्विकारतो, तेंव्हा हा प्रश्न ज्ञानविज्ञानाच्या मंचावर येतो. या मंचावर " शोकदायी कार्य मी कां करावे?"हा त्याचा प्रश्न असतो.

*वर्तमान :

मनुष्य आपल्या जीवनाला जसे ओळखतो (कठिण, चांगले, सोपे) तसे त्याचे जीवन घडते. आज ज्ञानविज्ञान आहे. ज्ञानी या संदर्भात जो योग्य जाणतो, त्याचा मार्ग पक्का असतो, त्याला समर्थनाची गरज पडत नाही, तो आनंद अनुभवतो. जो जीवनात दुःख अनुभव करतो, त्याचे जीवन त्याला असह्य वाटते. मार्गात योग्य-अयोग्यचा निर्णय करण्यास असमर्थ असला तरी जी निवड करतो, त्याचे समर्थन करतो.

व्यवहारात गरजापुर्तिसाठी कार्य(State of Want- State of Art) असे सरळ समिकरण असते. म्हणुन विकासमार्ग या संदर्भात निर्णयक्षमता, कार्यकौशल्य याद्वारे संस्कारित असणे आवश्यक असते. कार्य व जीवनमुल्ये (चांगलेपणा, Rightousness)याद्वारे विकासमार्ग बनतो.

"The human mind naturally finds pleasure in the principles of righteousness, just as the eyes take pleasure in color and the ears in sound. "
Wang Yangming

*भगवतगीता :(Wisdom)
कार्यसंस्कार या संदर्भात अर्जुन महाधनुर्धारी असतो. व प्रत्यक्ष नियतकार्य आचरण करण्यासाठी " चांगलेपणा" या संदर्भात त्याचे Intention चांगले असले तरी योग्य-अयोग्यचा निश्चय करु शकत नाही, परिणामी निष्क्रियतेचे समर्थन करतो. अर्जुन या समर्थनासाठी धर्मज्ञान वापरतो. याच पार्श्वभुमिवर भगवतगीतेने धर्म, अध्यात्म, ईश्वर यांची सांगड मनुष्याच्या दैनंदिन व्यवहाराशी ज्ञानाच्या माध्यमातुन घालुन दिली .

भगवतगीता" विषादयोग" पासुन सुरु होते, मोक्ष (संन्यास) वर समाप्ति होते. विषादामुळे(दुःख)बंधन अनुभव करतो. व सुखासाठी मुक्ति हवी असते. बंधन-मोक्ष(स्वातंत्र्य)हे ज्ञान जाणणारा जीवनाला ओळखतो. ज्ञानाचे मुळ व अंत ईश्वर आहे . ज्याचा अंश मनुष्याचे हृदयी विराजमान आहे. जीवनाची ही शाश्वत ओळख नसल्यामुळे मनुष्य बंधनात अडकतो.

अर्जुन (योग्य-अयोग्य) बंधनात अडकतो. तेंव्हा युद्ध करणे अयोग्य दर्शविण्यासाठी स्वर्ग-नरक याचा दाखला देतो. अर्जुनाचा प्रश्न व्यवहाराचा नसतो, तर धर्माचरणाचा असतो. श्रीकृष्णाने अर्जुनाच्या धर्मज्ञानाला (Informatory knowledge)आव्हान दिले नाही, तर ज्ञानाला आव्हान दिले.

श्रीकृष्णाने बंधन-मोक्ष जाणणारे ज्ञान श्रेष्ठ ठरविले आहे. यासाठी ईश्वराची ओळख सृष्टिचा अध्यक्ष अशी दिली. विकासमार्ग "अमृतंगमय" ठरतो. याच संदर्भात स्वधर्माचरण म्हणजे कर्मसंन्यास(कार्य ईश्वराला समर्पण )
अर्थात येथे Detachment चे रहस्य स्पष्ट होते.

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये।
बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी।।(१८-३०)
यया धर्मं अधर्मं च कार्य च अकार्यं एव च।
अयथावत प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी।।(१८-३१)

(१८-३०) /३: बंधं मोक्षं च या वेत्ति "
(Trap vs Freedom)

मन, बुद्धि, चित्त, अहंकार Mind functioningचे चार अंग आहेत. कार्याची योग्य-अयोग्य(चांगले वाईट, धर्म अधर्म) ही निवड बुद्धिचे functioning असते. यांत बंधन(Trap) vs मोक्ष (Freedom अर्थात स्वातंत्र्य) ही निवड सर्वात महत्वाची ठरते.

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्य-अकार्ये भय-अभये।
बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी।।(१८-३०)

Law of polarity(Universal law) प्रकृतिचा नियम आहे. ज्या गोष्टीमुळे सुख वाटते, त्याचा अभाव दुःख देते. याप्रमाणे प्रकृतिमध्ये द्वंद्वाचा Trap असतो. याच Trap मधुन मुक्तिचे साधन "कर्म" आहे. पण कर्मातही योग्य- अयोग्य, चांगले -वाईट हा द्वंद्व (Trap)असतो. यामुळे भय असते.

जीवन जगतांनाच मनुष्याला या Trap चा सामना करावा लागतो. हा सामना कसा असतो व मनुष्याला या Trapचे अज्ञान कां असते?याचे दर्शन अर्जुनाच्या दुःखी भूमिकेत दिसते. तो Shortcut वापरतो व निष्क्रियतेचे समर्थन करतो. वास्तवाचा स्विकार न करणे यांत अज्ञान ठरते.

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्तिं परंतप।। (७-२७)

सामान्य जीवन असेच चालत असते. सुखाच्या ज्या संकल्पना करतो, त्याच Trap मध्ये सापडत असतो. म्हणुनच मनुष्य आपल्या जीवनाची जबाबदारी न जाणता स्वतःचे समर्थन करीत, इतरांवर दोषाचा ठपका ठेवत जगत असतात. याप्रमाणे

जीवनातील नैराश्य, मानसिक पंगुत्व(हताशा) व्यक्त करीत जगत असतात.

जीवनाची वरची पायरी गाठणे ही ईश्वराची कृपा असते. अर्जुनावर ही कृपा झाली व त्याला वरच्या पायरीवर चढण्याचे ज्ञान मिळाले. अर्थात जीवनविकासाचा महामार्ग(अमृतंगमय) कळला. मार्ग मोकळा झाला.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।।(१०-१०)

मनुष्यजीवन कार्याद्वारे पुढेपुढे वाटचाल करीत असते. याच कार्यातुन स्वातंत्र्य अनुभवणे, निर्भय होणे, सुखी होणे अर्थात ईश्वरभक्ति साधणे हेच महामार्गावरील जीवनप्रवासाचे रहस्य आहे. तो कोणत्याच द्वंद्वाच्या Trap मध्ये सापडत नाही.
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

बुद्धियोगामुळे कर्माच्या (योग्य अयोग्य) Trap पासुनही मुक्त असतो.
(कर्मबंधं प्रहास्यसि -Right or wrong Only Freedom)

म्हणुन व्यथीत होत नाही.
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।।(२-१५)

कार्य प्रत्येक क्षणात घडते, याच कार्यातुन विकास साधणे अर्थात जीवनप्रवास विकासमार्ग होण्यासाठी "बंधं मोक्षं च या वेत्ति" हा संदेश Transformation साठी प्रेरीत करते. भगवतगीतेद्वारा श्रीकृष्णाने हे ज्ञान उपलब्ध करुन दिले असले तरी कोणते जीवन जगायचे ? सामान्य (द्वंद्ववश)कि उच्च(स्वतंत्र)!ही निवड स्वतःची असते.

******

(१८. ३१)

************************

यया धर्मं अधर्मं च कार्यं च अकार्य एव च।

अयथावत् प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसि॥

************************

(१८. ३१) :

"यया धर्मं अधर्मं च कार्य च अकार्यं एव च..

अयथावत प्रजानाति.. "

(स्वतःचा स्वधर्म)

विज्ञानाने ज्ञानविज्ञान युग आणले. ज्ञानविज्ञानाच्या युगाला युरोपात Enlightenment age संबोधले होते. ज्ञानविज्ञानाच्या युगात समाजातील शोषण, दरिद्रि, भांडणे, अज्ञान याला धर्मच जबाबदार आहे, व धर्म समाजाला अज्ञानात लोळवित असतो, असा धर्माविषयी (गैर)समज झाल्यामुळे धर्म बदनाम होतो. यामुळे जगात "धर्म vs ज्ञान ( बुद्धिप्रामाण्यवाद)" असा वाद निर्माण होतो.

ज्ञानविज्ञानाच्या युगातही धर्म अधर्म यांत पारदर्शकता असणे महत्वाचे असते. धर्माला अधर्म, अधर्माला धर्म म्हणणे हे अज्ञान असते ही वास्तविकता भगवदगीता दर्शवून देते. तर धर्म काय? अधर्म काय?यानुसार कोणते कार्य योग्य? कोणते अयोग्य ?याचा मनुष्याचा स्वतःचा निश्चय होत नाही. अर्जुनाने स्वतःच्या या अवस्थेला "धर्मसम्मूढचेताः" संबोधले आहे.

स्वतःचे कर्तव्य या नात्याने भूमिका पार पाडतांना अर्जुन जेंव्हा संशयाच्या भोवऱ्यात सापडतो, तेंव्हा गोंधळतो. भगवदगीतेतील अर्जुनविषादयोगात याच गोंधळलेल्या भूमिकेचे दर्शन आहे. अर्जुनाने आपल्या नियतकार्य टाळण्याला धर्म म्हटले नाही तर दुःखमुक्तिसाठी कोणताही उपाय त्याला दिसला नाही म्हणुन युद्धाचा परिणाम अधर्म दिसतो असे भाष्य करतो.

यया धर्मं अधर्मं च कार्य च अकार्यं एव च।
अयथावत प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसि।।(१८-३१)

ज्ञान या संदर्भात धर्माचे प्रयोजन काय व कशासाठी ?या ज्ञानाचा उलगडा भगवदगीता करते. ज्ञानविज्ञानाच्या युगात प्रश्न विचारण्याचा अधिकार (Why?) मिळाला. अर्थात स्वतःच्या

निर्णयअधिकाराची जागृति झाली. स्वतःचे कर्तव्य काय? याची पारदर्शकता असते. स्वतःच्या कर्तव्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करतो. येथे स्वधर्म (योग्य-अयोग्य यांतील)Tiebreaker, Self approval व Surrender समर्पण अशी तिहेरी भूमिका बजावते.
(To surrender the right of governing self in the hands of assembly/Community/God)

समुहातील कर्तव्य या नात्याने हा स्वधर्म असतो. मनुष्य कुटुंब, कार्यसंस्था, देश अशा विविध समुहाचा सदस्य असतो. जबाबदार सदस्य या नात्याने त्याला समुहात आपली भूमिका पार पाडावी लागते. व केवळ मर्यादित समुहाला जोडणारा नव्हे तर संपुर्ण विश्वाला जोडणारा धर्म कोणता याचे रहस्य भगवदगीता सांगते.

"The goal of life is to make your heartbeat match the beat of the universe, to match your nature with Nature. "
-Joseph Campbell

प्रत्येक मनुष्य अशा ज्ञानाच्या शोधात आहे, जे त्याला सुखाने जगण्यासाठी, त्याच्या विकासाला पोषक होईल, त्याच्या

जीवनाला अर्थ देण्यासाठी मार्गदर्शन करेल. व त्याचे जीवन आनंद व उत्साहाच्या उर्जेने न्हाऊन निघेल. म्हणुन संपुर्ण जग अशा धर्माकडे (Spiritual truth) आशेने पहात आहे, जो विश्वात Harmony (मानवता धर्म) प्रस्थापीत करेल. अर्थात मनुष्य समुहाचा सदस्य असतांना याचवेळी तो विश्वाचाही सदस्य असतो. व त्याच्या कार्याने त्याला विश्वाशी Harmony साध्य करायची असते. ही Harmony साध्य होते, तेंव्हा तो (Universal mind या नात्याने)ईश्वराशी जोडल्या जातो. (vice a versa)

"The world is starving for a new spiritual truth - a truth that works in sustaining life, not a truth that brings an end to life. "
-Neale Donald Walsch

हा धर्म केवळ एकच होऊ शकतो,
"आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च"

आत्मनो मोक्षार्थ-
प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये।

बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी॥(१८-३०)

जगतहिताय-

मत्कर्मकृत मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।

निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

*********

(१८. ३१):

"अयथावत् प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसि"

(Strength vs. Weakness)

* विकासाची निश्चित दिशा

मनुष्यजीवनातील Strength व Weakness या संदर्भात भगवतगीता दैवीगुणसंपत्ति व असुरगुण संपत्ति अशी विभागणी करते. व्यवहारात चांगलेपणा, आत्मविश्वास, निर्भयता, साहस, नम्रता इ. गुणांचा Strength या संदर्भात उल्लेख होतो. तर भय, संशय, चिंता, अहंकार इ. Weakness या संदर्भात उल्लेख होतो.

चांगलेपणा असला तरी अर्जुनाला आपल्या नियतकार्यात दोष आढळतो. योग्य-अयोग्य याची निवड करु शकत नाही. परिणामी निष्क्रिय राहणे पसंत करतो. स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. अर्थात आपली भूमिका सक्षम दिसावी हा प्रयत्न असतो व या प्रयत्नात दुर्बलतेलाच सक्षम ठरवितो. याच प्रकारामुळे समाजात सक्षमता-दुर्बलता याचा निश्चित बोध होत नाही. व याचमुळे विकासाची निश्चित दिशा ठरत नाही.

यया धर्मं अधर्मं च कार्यं च अकार्य एव च।
अयथावत् प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसि।।(१८-६१)

मनुष्यजीवनातील "सक्षमता vs. दुर्बलता "याचे निश्चित ज्ञान असेल तरच विकासाची निश्चित दिशा ठरविता येते. अन्यथा दुर्बलतेला सक्षम दर्शविण्याच्या प्रयत्नात विकास खुंटतो. स्वतः भ्रमात असतो.

** Strength vs. Weakness चे ज्ञान

मनुष्यजीवनातील" Strength vs. Weakness" जाणुन घेण्यासाठी भगवतगीता "ज्ञान vs अज्ञान" स्पष्ट करते. याच संदर्भात विविध भेद भगवतगीतेत स्पष्ट होते.

*Ego

"यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे"(१८. ५९) vs.

"बुद्धियोगं उपआश्रित्य मद् चित्तः सततं भव"(१८-५७)

अहंकार vs. आत्मविश्वास

अहंकार आश्रय vs ईश्वर आश्रय

*Faith

"संशयात्मा विनश्यति"(४-४०) vs.

"ज्ञानसञ्छिन्नसंशयम् "(४-४१)

संशय vs विश्वास

संशय vs ज्ञान

भय vs विश्वास

"Optimism is the faith that leads to achievement. Nothing can be done without hope and confidence. "

-Helen Keller

*Duality

"तयोः न वशम् आगच्छेत्" (३-३४) vs.

" ते द्वंद्वमोह निर्मुक्ता"(७. २८)

द्वंद्व vs निर्द्वंद्व

धर्म-अधर्म द्वंद्व vs. स्वतःचा स्वधर्म

चंचल vs. कार्याचा एकनिश्चय

*Mindset

"क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप " (२-३)vs.

"यस्मिन् स्थितः न दुःखेन् गुरुणाअपि विचाल्यते"(६-२२)

"यत् मनो अनुविधीयते"(२-६७) vs.

"आत्मवश्यै विधेयात्मा"(२-६४)

मनोवश vs आत्मवश

Lower consciousness vs. Higher consciousness

विचलित होणे vs. स्थितप्रज्ञ

"Our ambition should be to rule ourselves, the true kingdom for each one of us; and true progress is to know more, and be more, and to do more. "

Oscar Wilde

*****

(१८-३२)

*************************

अधर्मं धर्मं इति या मन्यसे तमसा आवृता।

सर्वार्थान् विपरिताश्च बुद्धिः सा पार्थ तामसि।।

*************************

१८. ३२:

"अधर्मं धर्मं इति या मन्यते तमसा आवृता"

(Mode of Wisdom vs. Mode of Ignorance)

जगात ज्ञानविज्ञान आले. पण या ज्ञानविज्ञानाचा उपयोग मनुष्य कसा करतो?हा समाजात, जीवनात महत्वाचा प्रश्न असतो. जीवनांत Purpose Loyalty (अर्थात निश्चित हेतु, goal) असेल तरच ज्ञानाचा उपयोग होतो, अन्यथा ज्ञान फक्त पुस्तकी स्वरुपात (Informatory knowledge) असते असे अनेक शिक्षणतज्ञ मत व्यक्त करतात. या पार्श्वभुमिवर वर्तमानातील शिक्षणात दोष नसतो, उणीव असते. हीच उणीव भगवतगीता भरुन काढते.

"It is a strange trade that of advocacy. Your intellect, your highest heavenly gift is hung up in the shop window like a loaded pistol for sale. "
Thomas Carlyle

भगवतगीता "जीवनाची Purpose loyalty " यावर भाष्य करते. याच संदर्भात निश्चयात्मक बुद्धि, चंचल बुद्धि, उलट(योग्यला अयोग्य व अयोग्यला योग्य ठरविणे) बुद्धि याचे संदर्भ स्पष्ट करते.

सत, रज, तम हे प्रकृतिचे तीन गुण आहेत. वर्तमानात एक गुण प्रभावी असतो. या गुणाचा परिणाम बुद्धिवरही आढळतो.

सत-Mode of wisdom निश्चयात्मक बुद्धि

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्य अकार्ये भयअभये।
बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी।(१८-३०)

रज-Mode of passion (शंका, भय) चंचलत्व

यया धर्मं अधर्मं च कार्यं च अकार्यं एव च।
अयथावत् प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसि।।(१८-३१)

तम-Mode of Ignorance उलट बुद्धि, अज्ञानाला ज्ञान, अधर्माला धर्म दर्शविणे

अधर्मं धर्मं इति या मन्यसे तमसा आवृता।
सर्वार्थान् विपरिताश्च बुद्धिः सा पार्थ तामसि।।(१८-३२)

येथे धर्म -अधर्म या विषयाचा हेतु बंधन -मोक्ष आहे अर्थात विकासासाठी करण्यास योग्य व अयोग्य असा आहे. भगवतगीतेतील विकासमार्गाचा आधारच बंधन-मोक्ष आहे. योग्य-अयोग्य ठरविण्यासाठी धर्म-अधर्म या शब्दांचा वापर केला. अर्जुन (मोहामुळे) दुःखी झाला असता स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी निष्क्रियतेला धर्म दर्शवितो. अर्थात ही स्थिति धर्माला अधर्म व अधर्माला धर्म असे निर्देशन असते. व हे बुद्धिचे Mode of Ignorance असते.

मनुष्य सद् बुद्धि दे अशी ईश्वराला प्रार्थना करतो . याचाच अर्थ बुद्धिचे Mode of Wisdom यासाठी ही प्रार्थना असते. भगवतगीता बुद्धिनाश, बुद्धियोग, स्थितप्रज्ञ यावर भाष्य करते. व बुद्धियोगाचा आश्रय, "नित्यसत्वस्थो" यासाठी ईश्वराचा आश्रय याचे महत्व highlight करते.

बुद्धियोगं उपआश्रित्य मद् चित्तः सततं भव।(१८-५७)
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्तिं ते।(१०-१०)

अर्जुनही शेवटी (अज्ञानाला कारण ठरलेला)मोह नष्ट झाला, स्मृति पुर्ववत झाली, संशय नष्ट झाला हे सांगतो.

नष्टो मोहः स्मृतिर्लब्द्ध्वा तत् प्रसादात् मया अच्युत।
स्थितोअस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव।।(१८-७३)

* ******

(१८. ३२)/२:

"सर्वार्थान् विपरितांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी"

(Transperency of Strength & Weakness)

*Know Thyself "

मनुष्याला स्वतःला जीवन अनुभवायचे असते. जीवनातील Strength-Weakness त्याला कळावा व स्वतःला Strong करावे, हे जीवनविकासाचे शास्त्र जाणण्यासाठी जीवनातील ज्ञान-अज्ञान यांतील भेद भगवतगीतेने स्पष्ट केला आहे.

अर्थात भगवतगीता मनुष्याच्या Weakness व Strengthची निश्चित ओळख करुन देत आहे व हा विषय जीवनातील ज्ञान-अज्ञान या संदर्भात घेतलेला आहे. ज्ञान-अज्ञान हाच संदर्भ जीवनविकासमार्गासाठी (बंधन-मोक्ष) घेतलेला आहे. मनुष्यजीवनातील या महत्वाच्या पैलुवर भगवतगीतेने प्रकाश टाकला आहे.

बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी।(१८-३०)
सर्वार्थान् विपरितांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी।(१८-३२)

*Strength - Weakness
जीवनातील अज्ञान कळले नाही तर मनुष्य जीवनातील Weakness ला Strength दर्शवितो व स्वतःच्या Strengthची ओळख होत नाही. यामुळे मनुष्य स्वतःच्या Weaknessला challange न करता इतरांनाच challange करतो, स्वतःला ज्ञानी समजुन समर्थन करतो. यामुळे Negativity येते व ही प्रवृत्ति Mental illnessचे कारण ठरते.

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहत चेतसः।

कुलक्षयं कृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ।।
कथं न ज्ञेयं अस्माभिः पापाद् अस्मान निवर्तितुम् ।
कुलक्षयं कृतं दोषं प्रपश्यत् भिः जनार्दन।(१:३७-३८)

लोभामुळे "त्यांना" पातक कळत नाही पण आपण शहाणे आहोत ना!येथे अर्जुन शत्रुपक्षाच्या अज्ञानाला Challange करतो, व स्वतःला ज्ञानी ठरवितो. स्वतःचे अज्ञान hide करतो. अर्थात स्वतःच्या Weakness ला Strength दर्शवितो. यामुळे स्वतःची Strength दिसत नाही. यावर भगवतगीता प्रकाश टाकते.

Weakness :

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परतप।(२-३)

Strength:

मा शुचः संपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

*Transperency :

"Clear thinking requires courage rather than intelligence. "

मनुष्यजीवनात Courage महत्वाचा गुण आहे. कर्मयोगातील" योग"दुःखमुक्तिचे रहस्य आहे. यामुळेच courage वृद्धी होते. यांत

कार्याचा दृढनिश्चय हवा असतो. दृढनिश्चयासाठी विश्वास हवा, विश्वास ज्ञानाने येतो.

*ज्ञान

निरोगी प्रकृतिसाठी आहाराचे ज्ञान असते. पण निरोगी मानसिकतेसाठी योग्य ज्ञानाचे feeding यावर दुर्लक्ष झाले तर Mental illness येवु शकतो, Negativity याचेच लक्षण असते. हेच ज्ञान भगवतगीता सांगते.

*विकासमार्ग /राजमार्ग:

इच्छापुर्तिसाठी कार्य करणे हेच जीवनाचे purpose मनुष्य जाणतो. किर्तिसाठी चांगले कार्य, स्वर्गासाठी पुण्यकार्य हा इच्छापुर्तिचाच भाग असतो. या इच्छेमुळे द्वंद्व (कार्यातील इच्छाद्वेष)निर्माण होतो. यामुळे संशय असतो. व द्वन्द्व अडथळयाचे कारण ठरतो.

अर्थात Traditional जीवनमार्ग(इच्छापुर्तिसाठी कार्य)संशय निर्माण करतो. या संशयावर मात करुन विश्वासाने मार्गक्रमण करणे हा प्रश्न असतो.

मनुष्य विकासाचा Traditional मार्ग जाणतो पण राजमार्ग जाणत नाही. भगवतगीता विकासाचा राजमार्ग सांगते. याला राजविद्या, राजयोग म्हटले. व विकासासाठी अनन्ययोग(कार्य समर्पण) म्हटले.

अनन्यः चिन्तयन्तो माम् ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्यअभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।(९-२२)

मनुष्याचे जीवित तत्व व त्या तत्वाचे अंतिम धाम याला जोडणारा राजमार्ग असतो. कार्य घडविणारे शरिरयंत्र प्रकृतिचे automation असते व हे यंत्र ईश्वर चालवितो हे राजमार्ग जाणणारा ज्ञानी जाणतो. म्हणुन या राजमार्गावर चालणारा दुःखाने विचलित होत नाही.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं सोअमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

******

(१८-३३)

*************************

धृत्या यया धारयते मनःप्राणइंद्रियक्रियाः ।

योगेन अव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्विकी॥

*************************

(१८-३३)/१ :"धृत्या यया धारयते मनःप्राणइंद्रियक्रियाः"

I. Determination

प्रत्यक्ष कार्य घडण्यास "धृति(Determination)" कारण असते. मनुष्याला जीवनमार्गात संशय आला असता "रज" गुण प्रभावी होतो. यामुळे निश्चय होत नाही. "कळते पण वळत नाही"! हे वाक्य आपण ऐकत असतो. ज्ञान आहे पण कार्य नाही!भाष्य बोलल्या जाते, योजना बनतात पण त्याप्रमाणे प्रत्यक्ष कार्य घडत नाही! ही अवस्था Lack of Personal loyalty म्हणुनच विश्वात ओळखल्या जाते.

मनुष्याला स्तुति आवडते. मनुष्य स्वतःला "योग्य"जाणुनच कार्यरत असतो वा "योग्य आहे" हे सिद्ध करण्यासाठी भाष्य

बोलतो, यासाठी ज्ञान वापरतो. याच प्रवृत्तिमुळे निष्क्रियतेचे समर्थन करणे, दोषांचे इतरांना Target करणे, टिका करणे असा प्रकार समाजात चालत असतो.

प्रत्यक्ष कार्य घडण्यासाठी ज्ञान आणि कर्म यांचा समन्वय तीन विभागात (१ ज्ञान-कर्म-कर्ता, २ बुद्धि-धृति, ३ सुख) केलेला आहे. कार्य घडण्यास अज्ञानाचे(मोह) कारण "तम"व संशयामुळे अनिश्चितीचे कारण "रज" गुणप्रभाव असतो. म्हणुन Step-up करण्यासाठी "सत" गुण आवश्यक असतो. म्हणुन "सत"mode मधील Determination या संदर्भात सत धृति स्पष्ट केली आहे.

धृत्या यया धारयते मनःप्राणइंद्रियक्रियाः ।
योगेन अव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्विकी।। (१८-३३)

अर्थात योगस्थ होवुन मन, प्राण(जीवित तत्व, आत्मा), इंद्रिय यांचा समन्वय साधुन क्रिया(Action)साधणे. जीवनविकास मार्गात Continuity साधणे या अर्थाने 'अव्यभिचारिण्या' हा शब्दप्रयोग आहे. यामुळे वर्तमानातील गुणप्रभाव जाणतो व Step-up करण्यासाठी "सत" mode मधील बुद्धि-धृति ज्ञानाचा उपयोग करतो. याच आधारावर श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात:

निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्।(२-४५)

*****

(१८-३३)/२:

"धृत्या यया धारयते मनःप्राण इंद्रियक्रियाः"

Part II (Determination in the mode of goodness)

"Think about what there is to learn from your heritage, good and bad, and about what you want to cultivate and not cultivate. "

Sheri L. Dew

मनुष्य स्वतःसाठी "योग्य" ही भूमिका समजुनच जगत असतो. कुणी "योग्य" या आत्मविश्वासाने जगतो, तर कुणी "योग्य " सिद्ध करण्यासाठी समर्थन करीत जगत असतो. अर्जुनाने दुःखी अवस्थेत याच "योग्य(Right)" समर्थनार्थ भाष्याचा उपयोग केला. तो म्हणतो, या युद्धास "आमचा लोभ" कारण आहे, म्हणुन

या युद्धामुळे नरकच मिळेल. अर्थात अर्जुनासाठी येथे युद्ध करणे अयोग्य ठरवितो, श्रीकृष्ण याउलट मत देतात. श्रीकृष्ण म्हणतात, तु युद्ध न केले तर पाप होईल!स्वर्ग व किर्ति यापासुन वंचित होशील.

ततः स्वधर्म किर्तिं च हीत्वा पापम् अवाप्स्यसि।(२-३३)

याचाच अर्थ अर्जुन "योग्य"ला अयोग्य ठरवितो व "अयोग्य" ला योग्य ठरवितो. बुद्धिची ही तम अवस्था (Mode of darkness) असे भगवतगीता स्पष्ट करते. या पार्श्वभूमिवर चर्चेचा हा विषय "Mode of darkness vs. Mode of goodness" असा होतो.

Mode of Darkness :

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदं एव च।

न विमुच्यन्ति दुर्मेधा धृति सा पार्थ तामसी॥(१८-३१)

Mode of goodness

धृत्या यया धारयते मनःप्राण इंद्रियक्रियाः।

योगेन अव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकी॥(१८-३३)

मनुष्यजीवन सुख इच्छित असते, पण दुःख हा जीवनाचाच भाग असतो. दुःख जेंव्हा मनुष्याला दुबळे करते, जीवनात अडथळा ठरते तेंव्हा जीवनाच्या विकासमार्गात हे अडथळेच जणु परिक्षा घेत असतात. या अडथळ्याची ओळख झाली नाही तर दुःख टाळण्यासाठी जसा जगतो, त्या भूमिकेचे समर्थन करीत जीवनयापन करतो.

जीवनविकासाचा मार्ग असतो म्हणुन अडथळा असतो. जीवनाचे ध्येय(Destination)असते म्हणुन मार्ग असतो. अर्जुन ज्या धर्माचा दाखला (समर्थनासाठी) देतो, त्याचे अंतिम Destination स्वर्ग(-नरक) असते. याच धर्माचा दाखला देवुन श्रीकृष्ण स्वधर्माचरणाचे (स्वधर्म-The tiebreaker, Self approval) ज्ञान सांगतात. (या मार्गात कार्याद्वारे ईश्वरभक्ति (समर्पण)साध्य होते. )

मनुष्य दुःखी झाला असता(अशांति) त्याचा मुळातील प्रश्न वेगळाच असतो. पण "योग्य" या संदर्भात समर्थन करण्यासाठी आदर्श, धर्म, ज्ञान याचा आश्रय करतो व स्वतःच्या अशांत मनाला समाधान देतो. अर्थात "वर्तमानातील शांति" हा मुळातील प्रश्न असतो.

व्यवहारात यश, लाभ, चांगलेपणा(Right thing, goodness) या आधारावर मार्ग(निर्णय)संदर्भात चर्चा होतात. स्वतःला जे श्रेयस्कर आहे पण फायद्याचे आहे अर्थात सुखी करणारे आहे हे व्यवहारज्ञान मनुष्याला आवडते. अर्जुन ज्या स्वर्ग-नरक प्राप्तिच्या धर्माचा उल्लेख करतो, तो धर्म-अधर्म हा त्याचा मुळातच प्रश्न नसतो. दुःख हा त्याचा मुळ प्रश्न असतो. वास्तव कबुल करतो, तेंव्हा या (कथित धर्म)कार्याने दुःखावर मात कशी होईल?हाच प्रश्न उपस्थित करतो, ज्या प्रश्नाचे समाधान भगवतगीता देत आहे.

भगवतगीता "मनुष्यजीवनातील दुःख/अशांती"याच मुळ प्रश्नाची ओळख करुन देते. जीवनाची ज्ञानविज्ञानासह (सत, रज, तम प्रकृति-पुरुष-पुरुषोत्तम) ओळख करुन देते. जीवनातील Adversity ला Surrender होणे व Adversity वर उपाय(Dealing with obstacle) हे दोन Option मनुष्याजवळ असतात व त्यासाठी Choice असते. या निवडअधिकाराची भगवतगीता ओळख करुन देते. या एकमेव कारणासाठी ईश्वराची "ज्ञान" या संदर्भात ओळख करुन देते, ज्यामुळे जीवनविकासाचा मार्ग "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) असा होतो. याच ज्ञानासाठी म्हटले आहे,

ददामि बुद्धियोगं तं येन उपयान्ति ते ।(१०-१०)

कर्मयोगाचे महान रहस्य भगवतगीता येथे प्रकट करते. या मार्गात कार्याचा एकनिश्चय (Determination) असतो. अर्थात योग्य - अयोग्य या द्वंद्वापासुन कर्म मुक्त होते व" योगः कर्मसु कौशलम्" ( समत्वयोग) कौशल्य साध्य करतो. "मी योग्य आहे" या आत्मविश्वासाने कार्यरत असतो.

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौललम् ।।(२-५०)

*******

(१८-३४)
***************************
यया तु धर्मकामार्थान् धृत्या धारयते अर्जुन।
 प्रसंगेन फलाकांक्षी धृतिः सा पार्थ राजसी।।
***************************

(१८-३४) :
"यया तु धर्मकामार्थान् धृत्या धारयते अर्जुन।
 प्रसंगेन फलाकांक्षी.. "
(Flaw in determination)

धृति या शब्दाचा धारणाशक्ति, धैर्य(साहस), Determination असा अर्थबोध होतो. कार्याचा निश्चय बुद्धि करीत असते, तर प्रत्यक्ष कार्याचे Execution "धृति" द्वारा होत असते.
यया तु धर्मकामार्थान् धृत्या धारयते अर्जुन।
 प्रसंगेन फलाकांक्षी धृतिः सा पार्थ राजसी।।(१८-३४)

धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थामधील मोक्षच्या ऐवजी "प्रसंगेन फलाकांक्षि " या शब्दाचा उल्लेख राजस धृति मध्ये होत

आहे. अर्थात मनुष्य आपल्या इच्छापुर्तिसाठी धर्म अनुष्ठान(क्रियाविशेष), भौतिक (आर्थिक) विकास करतोव भोगऐश्वर्याचा उपभोग घेतो.

१. भगवदगीतेत धर्म या संदर्भात स्वर्ग vs. मोक्ष ( स्वातंत्र्य) हा भेद याला highlight केलेला आहे. व धर्म vs मोक्ष या संदर्भात मोक्षाला Priority दिलेली आहे.

Flaw in determination :

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां।
क्रियाविशेषबहुला भोगैश्वर्यं गतिं प्रति।...
व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधियते।।(२-४४)

धर्म vs मोक्ष

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्ष्ययिष्यामि मा शुचः।।(१८-६६)
अर्थात पापापासुन detachment यासाठी शाश्वताचा आश्रय .

२. मनुष्याला सुख या संदर्भात स्वातंत्र्य आवडते. मनुष्यजीवनातील दुःख ( अशाश्वताच्या) attachment मुळे (आसक्ति) असते. हे Attachment बंधन असते व detachment मोक्ष असते, यासाठी शाश्वताचा आश्रय या आधारावर बंधन-मोक्ष logic आहे.

३. मनुष्यजीवन दुःखालयात आलेले आहे. अर्थात येथे प्रश्न असतात, आव्हान असते. हे आव्हान स्विकारण्यासाठी "माम् अनुस्मर युध्य च" याप्रमाणे अंतर्गत लढाई लढण्याचे ज्ञान भगवदगीता सांगत आहे.

४. Determination या संदर्भात कार्याचा एकनिश्चय व निष्काम कर्म याप्रमाणे कर्मयोगाचे शास्त्र आलेले आहे. जेथे समत्वयोगाने कार्य(योगेन अव्यभिचारिण्या) केल्या जाते. याप्रमाणे "निष्काम vs सकाम कार्य " असा सात्त्विक धृति vs राजस धृति असा भेद स्पष्ट होतो.

सार :

प्रत्यक्ष नियतकार्य execute करतांना अर्जुनाच्या Determination मध्ये flaw(दोष) येतो. याचे निराकरण "धृति" या संदर्भात स्पष्ट होते.

"Nothing in this world can take the place of persistence.

Talent will not: nothing is more common than unsuccessful men with talent.

Genius will not; unrewarded genius is almost a proverb.

Education will not: the world is full of educated derelicts. Persistence and determination alone are omnipotent. "

-Calvin Coolidge

********

(१८-३५)

**************************

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदं एव च।

न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी।

**************************

१८. ३५:

"यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदं एव च...

.. न विमुच्यन्ति दुर्मेधा "

(Frustrated life vs. Happy life)

*Frustrated life:

जीवनात आनंदी असावे, सुखी असावे ही मनुष्याची स्वाभाविक इच्छा असते. दुःखी असणे, विषादी, खिन्न, नकारात्मक असणे Frustration दर्शविते. हेच Frustration " तामसि धृति" यांत दर्शविले आहे.

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदं एव च।

न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी।(१८-३५)

* Goodness/ सत

भगवतगीतेत सुखी जीवनाचा मार्ग हा चांगलेपणातुन जातो. आनंदी होण्यासाठी परपीडेत आनंद घेणे, इतरांचा आनंद हिसकावुन स्वतः आनंदी असणे या वृत्तीला भगवतगीता Mode of ignorance दर्शविते.

मुढग्राहेण आत्मनो यत् पीडयाह्ि्रयते तपः।

परस्य उत्सादनार्थ वा तत् तामसं उदाहृतम्।।(१७-१९)

मनुष्यजीवनात चांगलेपणाला निश्चित महत्व आहे. चांगल्या कार्याने सतगुण प्रवृद्ध होतो. अर्जुनाचा जीवनप्रवास चांगलेपणाचा असतो.

चांगल्या मनुष्याला परपिडा अस्वस्थ करते. अर्जुन परपीडेने अस्वस्थ झाला. आपल्या सुखासाठी आपण पापकर्म करीत आहो हे त्याचे Judgemental Statement असते. यांत अर्जुनाच्या चांगलेपणाचे दर्शन होते पण याबरोबरच मानसिक दुर्बलतेचेही अर्थात अज्ञानाचे दर्शन होते. याच अज्ञानाची ओळख भगवतगीता

करुन देते. व सुखी जीवनासाठी ज्ञानाचा मार्ग अर्थात "अमृतत्वाय कल्पते" या मार्गाचे ज्ञान सांगते.
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

* Happy Life:

Courage is the ladder on which all the other virtues mount.
Clare Boothe Luce

सुखी जीवनासाठी सात्विक धृति व यासाठी काया, वाचा, मन, आत्मा(प्राण) यांची Harmony आवश्यक असते. अर्थात स्वतःच्या आत्म्याशी Loyalty असते.

धृत्या यया धारयते मनःप्राणइंद्रियक्रियाः।
योगेन अव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्विकी।।(१८-३३)

याचसाठी व्यवहारातील सकाम कर्माचे निष्काम कर्मात Transformation आहे. हेच कार्यकौशल्य ठरते. कर्मयोग,

यज्ञकार्य याद्वारा या कार्यकौशल्याला भगवतगीतेने highlight केले आहे.

१. "योगः कर्मसु कौशलम् "
२. यज्ञाय आचरतः कर्म समग्रं प्रविलियते।

कार्यकौशल्याचे अज्ञान असेल तर कर्म कष्ट वाटते. हेच प्रामुख्याने अर्जुनाच्या अज्ञानाचे कारण ठरते. समाजात कर्म टाळण्याची प्रवृत्ति याच अज्ञानामुळे होते. म्हणुन "निष्काम कर्म" हा कार्यकौशल्याचा परिणाम आहे हे जाणुन कार्यकौशल्य गुणात्मक ज्ञान (Quality knowledge) याची दखल समाजाने घेणे आवश्यक आहे.

बोध: भगवतगीता द्वेष, हिंसा याचा पुरस्कार करीत नाही. तर अहिंसा, "सर्वभूतहितेरतः"याचा निर्देश करुन "जगतहिताय " संदेश देते. व चांगलेपणाच्या प्रवासात (आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च) दैवी गुणाचे सविस्तर वर्णन करते.

अहिंसा सत्यम् अक्रोधः त्यागः शांतिः अपैशुनम्।

दया भुतेषु अलोलुप्त्वं मार्दवं हीः अचापलम् ॥(१६-२)

* ******

(१८-३५):
" न विमुञ्चति दुर्मेधा "
(दुर्गुण न सोडणे vs. बदल घडवुन आणणे)

मनुष्य आपल्या जीवनयात्रेत जे करतो किंवा करीत नाही ते योग्य समजुनच करीत असतो. यामुळेच समाजात 'नकारात्मक vs. सकारात्मक', 'चांगले vs. वाईट' या आधारावर भाष्य बोलल्या जाते.

अर्जुनाला आपले नियतकार्य (युद्ध ) दुःखदायी असल्यामुळे टाळायचे असते. हे युद्ध धर्मविरोधी आहे असे भाष्य करतो. व स्वतः निःशस्त्र होतो.

मनुष्य "ज्ञानी" / योग्य या संदर्भात स्वतःचे समर्थन करु शकतो. पण जेंव्हा स्वतः आळशी, निष्क्रिय राहुनही स्वतःची भूमिका

योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञानी समजुन भाष्य बोलतो तेंव्हा चांगला मनुष्यही आपले अज्ञान नकळत लपवित असतो. यामुळे विषादी, भयग्रस्त, दुःखी, निष्क्रियता या दुर्गुणांनी युक्त असलेली धारणा कायम होत असते. जी धारणा त्याज्य आहे त्यांत बदलाव न करणे या संदर्भात "न विमुञ्चति दुर्मेधा" हा शब्दप्रयोग आहे.

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदं एवच।
न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी॥(१८-३५)

धृति हा शब्द धैर्य/धारणा/Determination या संदर्भात भगवदगीतेत आलेला आहे.

KAIZEN हा जपानी शब्द "जे योग्य आहे त्याचे ज्ञान होणे, त्याची संवय करणे, ही संवय धारणा/स्वभाव बनते. " या प्रक्रियेसंदर्भात आलेला आहे. बदल हा प्रकृतिचा नियम आहे. जे बदलते ते अशाश्वत व जे बदलत नाही ते शाश्वत या आधारावर प्रकृति-ईश्वर याचे ज्ञान भगवदगीतेत आलेले आहे.

जीवनात विकास होण्यासाठीच अर्थात अपेक्षित बदल घडवुन आणण्यासाठीच प्रकृतिच्या सत, रज व तम गुण(Mode) याचे ज्ञान भगवदगीतेत स्पष्ट केले आहे. या ज्ञानाद्वारे:

उत्साही मनुष्य vs. विषादी मनुष्य

सकारात्मक vs नकारात्मक

याप्रमाणे भेद स्पष्ट होतो. सात्त्विक धृतिचे महत्व स्पष्ट होते.

मनुष्य शिक्षण घेतो, तज्ञांचा सल्ला घेतो. याचा अर्थ तो अज्ञान आहे, दुर्बुद्ध आहे असा होत नाही. एखाद्या विषयात पारंगत असलेला सर्वच क्षेत्रात पारंगत असायला हवा असे होत नाही. अर्जुन धनुर्विद्येत पारंगत असतो. तरी त्याला "जीवनविद्या" या क्षेत्रात ज्ञानाची गरज पडते. म्हणुन भगवदगीता ज्ञान सांगण्यात आले. यांत मनुष्याची ज्ञानी /योग्य भूमिका स्पष्ट होते. या ज्ञानाद्वारे अर्जुनामध्ये जो बदलाव (Transformation) घडुन येतो याची प्रक्रिया जाणुन घेणे आवश्यक अािहे.

१. येथे सर्वप्रथम अर्जुनाने स्वतःच्या मार्गातील अज्ञान कबुल केले. समाजात "आपल्या भाग्याचे शिल्पकार आपण स्वतःच" यासारखे Motivation होत असते. स्वतःमध्ये बदलाव घडवुन

आणण्यासाठी "स्वतःची गरज" या संदर्भात स्वतःचे अज्ञान स्विकारणे आवश्यक असते.

"Acceptance looks like a passive state, but in reality it brings something entirely new into this world. "
-Eckhart Tolle
स्वतःला ओळखा या संदर्भातील हे "Awareness" असते.
"The first step toward change is awareness. The second step is acceptance. "
-Nathaniel Branden

२. बुद्धियोग:

मनुष्य Inspirational, उत्साहवर्धक भाष्यात रमतो. जरी भगवदगीतेत अज्ञान, मूढ हे शब्द आलेले आहेत. तरी ते केवळ Awareness, Acceptance या संदर्भात आहे.

न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।(३-२६)
अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

अवजानन्ति मां मूढा मानुषिं तनुं आश्रितम् ।(९-११)

भगवदगीता(Song of God) ज्ञानात रमणे, यामुळे जीवनविकासाची प्रेरणा मिळते. हा बुद्धियोग असतो.
कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च।(१०-९)
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

"Acceptance doesn’t mean resignation; it means understanding that something is what it is and that there’s got to be a way through it. "
-Michael J. Fox

३. भगवदगीतेत"ईश्वराचा आश्रय " ही संकल्पना आलेली आहे. ईश्वरश्रद्ध असलेला, दैवीगुणसंपत्तियुक्त असलेला अर्जुन अव्यक्त, अव्यय ईश्वराचे ज्ञान जाणतो. ज्याचा मनुष्याशी Consciousness या संदर्भात सरळ संबंध (क्षेत्र-क्षेत्रज्ञ) असतो. या ज्ञानामुळे :
*अशाश्वत vs. शाश्वत या भेदाचे रहस्य जाणतो .

*जीवनाचे Destination जाणुन "अमृतत्वाय कल्पते" या मार्गाचे महत्व जाणतो.

* मनोवश अवस्था vs. आत्मवश अवस्था

बुद्धिची अयुक्त स्थिति vs युक्त स्थिति

सकाम कर्म vs. निष्काम कर्म

कार्याचा एक निश्चय असलेला vs. चंचल, विचलित होणे

याप्रमाणे भेद जाणतो.

********

(१८-३६)

********************

सुखं तु इदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ।

अभ्यासात् रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति।

********************

(१८-३६):

"अभ्यासात् रमते यत्र दुःखान्त च निगच्छति"

(Happiness)

नर तन सम नहिं कवनिउ देही।जीव चराचर जाचत तेही।।

(- रामायण-उत्तरकांड १२०/५, )

*जीवनातील आव्हान व बदल:

मानवदेह या विश्वात सर्वश्रेष्ठ आहे. सर्व चराचर या देहाची कामना करतात. हे सत्य असले तरी दुःखाशी या देहाची गाठ पडते. व दुःखापासुन मुक्तिसाठी, सुखासाठी या देहाची धडपड सुरु असते.

जन्ममृत्यु जराव्याधी दुःखदोषअनुदर्शनम्।(१३-८)

सुखी जीवन हा विश्वातील सर्व प्राणिमात्रांचाच (Universal) प्रश्न असतो. मनुष्याची जीवनयात्रा या संदर्भात सुख या विषयावर अनेक तत्वज्ञान उभे झालेत. सुखाची ओळख झाली नसली तरी दुःखाची ओळख मात्र होते. Stress, Tension याची ओळख असते. मार्गात चढाव आला तर गाडीचा गेयर बदलविला नाही तर गाडी बंदही पडु शकते. यासाठीच Change of Mode of living/Higher consciousness हा विषय येतो.

"The significant problems we face cannot be solved at the same level of thinking we were at when we created them. "
~ Albert Einstein

* अशाश्वत-शाश्वत:

सुखदुःख अशाश्वत(बदलते) असते. देहही अशाश्वत असतो. या विश्वात ईश्वर शाश्वत आहे, विश्वाचे संचलन या संदर्भात ज्याची भूमिका अध्यक्षाची आहे.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया॥(१८-६१)

हे शाश्वत तत्व गुणातीत आहे व त्रिगुणात्मक प्रकृति (सत, रज, तम) अशाश्वत आहे. म्हणुन भगवदगीता अशाश्वत-शाश्वत या आधारावर Attachment- Detachment, बंधन-मोक्ष याचे शास्त्र सांगत आहे. या शास्त्रानुसार अव्यक्त ईश्वराला आसक्त असणे हे देहवानाला साध्य होणे क्लेशदायी असते म्हणुन कठिण प्रयासाने साध्य होते. पण मनुष्याजवळ कर्म हे महत्वाचे साधन आहे. कर्म नित्य घडतच असते, या साधनाचा व्यवहारात उपयोग होत असतो. या कर्माद्वारेच अनन्यभक्तिने अव्यक्त ईश्वराची भक्ति साध्य करणे सुलभ असते.

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।

तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगीनः॥(८-१४)

याचसाठी Detachment(Attachment with pain)-निष्काम कर्म हे शास्त्र सांगितले आहे.

* निष्काम कर्म व सुख :

जीवनविकासाच्या "कर्माद्वारे विकास " या शास्त्रानुसार कर्म घडण्याची प्रक्रिया या संदर्भात ही प्रक्रिया तीन Set मध्ये विभागली आहे.

१. Motivation(प्रेरणा) : या संदर्भात ज्ञान, कर्म व कर्ता.

२. Execution(धारणा) : या संदर्भात बुद्धि व धृति(धैर्य)

३. Happiness (सुख)

सुखं तु इदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ।
अभ्यासात् रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति।(१८-३६)

अर्थात Repeatedly(अभ्यास) रममाण होणे, जेथे दुःखाचा अन्त होतो. प्रकृतिगुणानुसार सुख सत (शाश्वत-आत्मबुद्धिप्रसादजम्), रज(Senses इंद्रियसुख) व तम (मोह, निद्रा, आळस) असे तीन प्रकारात सुख भगवद्-गीतेने विभागले आहे.

तं विद्याद् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम्।
स निश्चयेन योक्तव्यो योगोअनिर्विण्णचेतसा।।(६-२४)

अर्थात ज्या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही. तो जीवनविकासाचा Standard मार्ग ठरतो.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

या मार्गावर जगण्याच्या Mode मध्ये बदल झाल्यामुळे
योग(दुःखान्त)अर्थात शाश्वत सुखाची (आत्मबुद्धिप्रसादजम्)
साधना होते.

यत् तद् अग्रे विषम् इव परिणामे अमृतोपमम् ।
तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तं आत्मबुद्धि प्रसादजम्।।(१८-३७)

********

(१८-३७)

************************

यत् तद् अग्रे विषम् इव परिणामे अमृतोपमम् ।

तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तं आत्मबुद्धि प्रसादजम्॥

*************************

(१८-३७):

"तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तं आत्मबुद्धिः प्रसादजम् "

(सुख व सुखी जीवनाचा मार्ग/Happy life/Change of mode of living)

अर्जुनाने ठरल्याप्रमाणे सरळ युद्ध केले असते तर कोणताही प्रश्नच नव्हता, व भगवदगीता हा विषय जगासमोर आलाच नसता. भगवदगीता ज्ञान सांगितल्यावर शेवटी युद्ध मात्र केलेच.

अर्जुनाची गोंधळलेली मानसिकता व बुद्धितील गोंधळ शांत करण्यासाठी सांगितलेले ज्ञान यांतच भगवद् गीतेचे रहस्य दडलेले आहे.

अर्जुन प्रत्यक्ष युद्धाचे वेळी दुःखी झाला व दुःख टाळण्यासाठी युद्ध न करण्याची भाषा बोलतो. वरुन स्वतःला योग्य ठरविण्यासाठी धर्माचा आश्रय करतो.

सुखासाठी मनुष्य कार्यरत असतो, जगत असतो. ही जगण्याची Survival mode असते. प्रकृतिगुणानुसार सुख सत(शाश्वत-आत्मबुद्धिप्रसादजम्), रज(Senses इंद्रियसुख) व तम (मोह, निद्रा, आळस) असे तीन प्रकारात भगवद्-गीतेने विभागले आहे.

जीवनयात्रेत दुःख आले व त्यावर मात करण्याचे ज्ञान/क्षमता नसेल, मार्ग कठिण वाटत असेल तर (जसे मुख्य मार्ग सोडुन गल्लीबोळातुन (Shortcut) मार्ग काढणे) तो Shortcut वापरत असतो. अडचणीला Deal न करता मनुष्याला अशीच Shortcut ने जगण्याची संवय जडली तर त्याचा परिणाम मानसिक Stress, Tension यांत होतो. अज्ञानामुळे मानवी जीवन याच मानसिक दुर्बलतेने ग्रस्त असते.

भगवदगीतेने मनुष्याच्या याच Shortcut संवयीला प्रकाशात आणले आहे. चांगलेपणाची जगाला गरज असते. अर्जुनाच्या कार्याची जगाला गरज होती. पण अर्जुन वास्तवाचा स्विकार न

करता दुःख टाळण्यासाठी Shortcut वापरतो. Survival mode मध्येच जगत असतो, व (निष्क्रियता) मार्ग काढतो.

*Change of Mode /Higher consciousness

.

Survival mode मध्ये मनुष्य योग्य नसला तरी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो, नकारात्मक भाष्य बोलतो. अर्जुनाला मानसिक दुर्बलता त्यागुन युद्ध कर असे श्रीकृष्ण सांगतात तेंव्हा तो वास्तव स्विकारतो. युद्ध जिंकुन पृथ्वीच काय पण देवाचे राज्यही मिळाले तरी माझे दुःख कसे मिटणार?असा प्रश्न करतो.

मनुष्याचे शरीरयंत्र जर योग्य कार्य करीत आहे अर्थात मनुष्य योग्य मार्गावर आहे तर प्रश्नच नसतो . हे शरीरयंत्र योग्यच मार्गावर असावे हे भगवद् गीतेला अभिप्रेत आहे, पण योग्य नसुनही योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान सांगणे याचे कारण अहंकार असतो हे भगवद् गीता स्पष्ट करते. Survival modeचे हे सत्य असते. अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

भगवद् गीता Detachment चे शास्त्र सांगते. व याच संदर्भात कर्ता कोण? हा महत्वाचा प्रश्न असतो. हे जाणल्यावर मनुष्याची जगण्याची mode बदलते. (Survival to Spiritual). मार्ग अमृतंगमय होतो.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही.

समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

या मार्गावर जगण्याच्या Mode मध्ये बदल झाल्यामुळे शाश्वत सुखाची ( आत्मबुद्धिप्रसादजम्)साधना होते.

यत् तद् अग्रे विषम् इव परिणामे अमृतोपमम् ।
तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तं आत्मबुद्धि प्रसादजम्।।(१८-३७)

तं विद्याद् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम्।
स निश्चयेन योक्तव्यो योगोअनिर्विण्णचेतसा।।(६-२४)

सार :

"Happiness is not something you postpone for the future; it is something you design for the present. "

-Jim Rohn"

सुखी जीवन हा विश्वाचाच (Universal) प्रश्न असतो. व जीवनयात्रा या संदर्भात सुख या विषयावर अनेक तत्वज्ञान उभे झालेत. सुखाची ओळख झाली नसली तरी दुःखाची ओळख मात्र होते. Stress, Tension याची ओळख असते. मार्गात चढाव आला तर गाडीचा गेयर बदलविला नाही तर गाडी बंदही पडु शकते. जशी दुःखाची ओळख होते, तशीच श्रेष्ठ होणे याचीही ओळख होणे आवश्यक असते. यासाठीच Change of Mode of living/Higher consciousness हा विषय येतो. यासाठी भगवदगीता सकाम कर्म ते निष्काम कर्म असे Transformation चे शास्त्र सांगते.

********

(१८-३८)

**************************

विषयइंद्रियसंयोगात् यद् तद् अग्रे अमृतोपमम् ।

परिणामे विषम् इव तत्सुखं राजसं स्मृतम्॥

**************************

(१८-३८) :

"विषयइंद्रियसंयोगात् यद् तद् अग्रे अमृतोपमम् ..

परिणामेविषम् इव "

(Desire vs. Drive force of life)

*Desire vs Driving Force

जीवनात मनुष्य स्वतःचे Potential व्यक्त करतो. स्वतःची ओळख बनवितो. मनुष्याची "Need " या संदर्भात अब्राहम मास्लोने Self actalization म्हटले आहे. तर या Term चा जनक गोल्डस्टिन याने जीवनाचा Driving force म्हटले आहे.

"The term " Self Actualization" was originally introduced by the organismic theorist Kurt Goldstein for the motive to realize one's full potential. According to him Self Actualizaion is

Driving Force and not desire. Whereas Abraham Maslow considerd it as Desire(Need), as mostly people are engaged in fulfilment of desire till end of life and deprived of own potential. "

जीवनात आव्हान असते, प्रश्न असतात. हेच आव्हान भय, द्वन्द्व आदि विकार निर्माण करते कि जीवनयात्रेतील Driving force होतो हे महत्वाचे असते.
अर्जुनासमोर युद्ध करणे वा न करणे हे आव्हान उभे होते. हे आव्हान त्याच्या जीवनयात्रेत अडथळा निर्माण करते. सुखासाठी इच्छा असतात, इच्छा आसक्ति-द्वेष हा द्वन्द्व निर्माण करते. याच द्वन्द्वाला वश होवुन जगणे जीवनविकासमार्गात अडथळा निर्माण करते.
सुखासाठी मनुष्य जगत असतो यांत दुमत नसते, आक्षेप नसतो. सुख अडथळा बनु नये Drive force व्हावा यासाठी सुखाची सत, रज व तम ही तुलनात्मक स्थिति भगवदगीता स्पष्ट करीत आहे. "रज" स्थितित कार्याचा Motive force " Desire" असते. "तम " स्थिति " सत" च्या विरुद्ध अर्थात अज्ञान, मोह दर्शविते. यामुळे सुख या संदर्भात निद्रा, आळस, प्रमाद दर्शविते.
विषयइंद्रियसंयोगात् यद् तद् अग्रे अमृतोपमम् ।

परिणामे विषम् इव तत्सुखं राजसं स्मृतम्॥(१८-३८)

याच पार्श्वभुमिवर

१. "सकाम कर्म vs. निष्काम कर्म "/Desire vs. Driving force या शास्त्राचा उगम होतो. यांत (अ) सहजकार्य/स्वभावनियतकार्य स्वधर्म असते. (ब) कार्याचा एकनिश्चय असतो. समत्वयोगाने कार्य करतो.

२. मनुष्याच्या प्राणतत्वातील अंशरुपात ईश्वर मनुष्याचा Driving force असतो. याच ज्ञानाला जाणले तर बुद्धियोग प्राप्त होतो. व मनुष्याचा जीवनमार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो.

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

अर्थात हा बुद्धियोग Driving force बनतो.

याप्रमाणे जीवनात ईश्वराचा आश्रय Desire निर्मित दोष दुर करुन Driving force व्हावा यासाठी बुद्धियोगाचे प्रावधान आहे.

बुद्धौ शरणं अन्विच्छ कृपणः फलहेतवः।(२-४९)

*********

(१८-४३)

*************************

शौर्यं तेजो धृतिः दाक्ष्य युद्धे च अपि अपलायनम् ।

दानम् ईश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥

*************************

(१८-४३) :

" शौर्यं तेजो धृतिः दाक्ष्यं युद्धे च अपि अपलायनम् "

(Leadership is not a position – it's a mindset. )

भगवदगीता विश्वपातळीवर मनुष्यस्वभावाच्या Mindset चे वर्णन करते. वर्तमानातील व्यवसाय (Position/Occupation) व Mindset यातील भेद मानसशास्त्रतज्ञांनी स्पष्ट केला आहे.

'Entrepreneurship is not an occupation - it's a mindset. "

"Leadership is not a position – it's a mindset. "

We tend to think of ‘leaders’ as being part of the workforce, or part of the political sphere. However, there are leaders everywhere, woven into every fiber that makes up the fabric of our society.

Mindset of Creative Leadership:

"एका गांवात पहाडावरुन लोक पाणी आणतात. एकजण विचार मांडतो, पहाडावरुन नहर खोदुन पाणी खाली आणता येईल. कुणी त्याला मुर्खात काढतात, कुणी विचाराला दुजोरा देतात. पण बघ्याची भूमिका घेतात. नहर खोदण्याची वेळ आली असता एकटाच नहर खोदत आणतो. नहर पुर्ण होतो. "

ज्यांनी जगात मानवकल्याणार्थ प्रथम पाऊल उचलले ते महापुरुष ठरलेत. विश्वात विविध कार्याचे Mindset असतात. उदा. उद्योगपति, पुढारी, शास्त्रज्ञ-गुरु(मार्गदर्शक) हे अनुक्रमे अर्थसमृद्धि, समुहकल्याण, मानवता (विश्व) कल्याण या कार्यात कार्यरत असतात, तेंव्हा स्वभावनियत कार्याचा Mindset दर्शवित असतो. अर्थात विश्वातच जे कार्य करायचे त्या Mindset ची धारणा आवश्यक असते.

अर्जुनाच्या Mindset नुसार त्याला युद्धाचे धर्मकार्य मिळाले.
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धम् इदृशम् ।(२-३२)

"एक सिंहिण आपल्या पिलाबरोबर कोल्ह्याच्या पिलाचे पालनपोषण करते. पिले मोठी झाल्यावर Mindset चा भेद स्पष्ट होतो. बाहेर फिरत असता हत्ती दिसतो. सिंहपिले आनंदीत होतात, कोल्हा पळतो. सिंहिण म्हणते तुला विद्या सारखी दिली पण तु ज्या कुळात जन्माला आला तेथे हत्ती मारत नाही. "

अर्जुनाचे युद्धकर्म क्षात्र Mindset चे कर्म असते. याच Mindset चे वर्णन भगवदगीता करीत आहे. साहस, तेज, शौर्य या गुणाने युक्त असलेला पुढाकार घेणारा पण जबाबदारी न टाळणारा, दानी, ईश्वर(पुढारी)भाव असा Mindset क्षात्रांचा असतो.

शौर्यं तेजो धृतिः दाक्ष्य युद्धे च अपि अपलायनम् ।
दानम् ईश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ।।(१८-४३)

बोध:

भारतात समाजव्यवस्था निर्मितीत वर्णाश्रमाचा महत्वाचा सहभाग होता. या व्यवस्थेत व्यवसायदर्शक जाती निर्माण झाल्यात. वर्तमानात व्यवसायसंधी उपलब्धि ही शिक्षणनीति व उत्पादन व्यवस्था यावर अवलंबुन असते. रोजगार या संदर्भात कुणी Employment Creator असतो, कुणी Seeker असतो. याच व्यवसाय उपलब्धिसंदर्भात Mindset व Occupation यातील भेद जाणणे आवश्यक असते. अर्थात जे कार्य करायचे त्याचा Mindset धारण करणे हे महत्वाचे ठरते.

*******

(१८-४४)

*************************

कृषि गोरक्ष्य वाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम्।

परिचर्यात्मकं कर्म शुद्रस्यअपि स्वभावजम् ।।

*************************

(१८-४४) :

"कृषि गोरक्ष्य वाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् "

समाजव्यवस्थेच्या संरचनेतील मानवसंसाधन घटक या संदर्भात संपत्तिनिर्मिती व व्यापार या अर्थाने
" कृषि गोरक्ष्य वाणिज्यं"(१८-४४)
या घटकाचा उल्लेख आहे. समाजव्यवस्था, अर्थकारण प्रभावित करणारा हा घटक आहे.

कोणत्याही कार्यात Efficiency, Excellency या संदर्भात कार्याची आवड महत्वाची असते तर आवड संदर्भात स्वभावनियत कार्य महत्वाचे ठरते. मानवसंसाधन संदर्भात प्राचिन

समाजव्यवस्थेत जाति Specialized Skill दर्शवित होत्या. ही विकेंद्रित व्यवस्था होती.

आधुनिक व्यवस्थेत संपत्ति निर्मिति संदर्भात उत्पादन व व्यापाराचे कार्पोरेट व्यवस्थेद्वारा संघटित केंद्रिकरण झाले. याचा प्रभाव संपुर्ण व्यवस्थेवर झाला.

आधुनिक अर्थव्यवस्थेतील मानवसंसाधनाचा Resource Pattern :

१. कृषि, पशुपालन, खनिज घटक

२. मुल्यवर्धन करणारा उद्योग घटक व

३. सेवा घटक ; याप्रमाणे घटक टक्केवारी अनुक्रमे प्राथमिक, दुय्यम व तृतिय गटात ठरतात. याच आधारावर "विकास" या संदर्भात मुल्यवर्धन करणाऱ्या उद्योग या घटकाची टक्केवारी वाढवुन प्राथमिक घटकाची टक्केवारी कमी करणे आवश्यक ठरते.

आधुनिक विकासात प्रश्न असतो, मुल्यवर्धन करणारा उद्योग घटक केंद्रित असावा कि विकेंद्रित!या प्रश्नाचा सरळ संबंध रोजगार व समाजव्यवस्थेशी असतो. भारतातील हाच प्रश्न सोडविण्यासाठी अर्थतज्ञ डॉ. जे. सी. कुमारप्पा यांनी Economy

of Permanence या पुस्तकाद्वारा शाश्वत/आध्यात्मिक समाजव्यवस्थेची (Permanent cycle of developement) संकल्पना मांडली. या संकल्पनेद्वारा कृषिसंबंधीत उद्योग ग्रामिण क्षेत्रातच असावेत व याद्वारा कृषिक्षेत्र आधुनिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणावे ही संकल्पना मांडली, ज्यामुळे शांतिची अर्थव्यवस्था निर्माण होण्यास गति प्राप्त होईल.

(ग्रामिण व्यवस्थेला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जपानने या संकल्पनेला कृषि व उद्योग यांचे लग्न असे संबोधले. जपानमध्ये १९४८ मध्ये प्राथमिक क्षेत्रातील टक्केवारी ५० होती. ती वर्तमानात ३ टक्क्यावर खाली आली. )

भगवतगीता ज्ञान कालातीत आहे. श्रीकृष्णाने प्राचीन व्यवस्थेतील कर्म संदर्भातील "यज्ञ" ही संकल्पना (तत्कालीन) वर्तमानात समर्पित कार्यासाठी (व्यवस्थापन) वापरली. व मनुष्याला शाश्वत विकासाची दृष्टि दिली. यासाठी अध्यात्म विषयाला विकासाचे(व्यक्ति व समाज दोन्हीसाठी) अविभाज्य अंग ठरविले आहे. मनुष्य व समाज या संदर्भात "आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च "शाश्वत विकासाची दृष्टि ठरते. हीच दृष्टि "ॐ तत् सत् " याद्वारे भगवतगीता स्पष्ट करते.

स्वतःच्या विकासात Creativity या संदर्भात वर्तमानात आवडीचा विषय, आवडीचे कार्य व्यावसायिक उपयोगात, समाजोपयोगी कार्यात करण्यासाठी स्वतःला कार्यरत करावेच लागते. हेच सहजकार्य शाश्वत विकासाचे (अमृतंगमय) साधन ठरते.

याप्रमाणे प्राचीन व्यवस्थेतील Strength (स्वभावनियत कार्य / आवडीचे कार्य) लक्षात घेवुन रोजगारनिर्मितीसाठी वर्तमानात आर्थिक सक्षम असणारा (Economicaly viable) व्यवसाय निर्माण करणाऱ्या व्यवस्थेला चालना देणे अशी "विकासाची योग्य दृष्टि" वर्तमानात समाजविकासासाठी प्राप्त होते.

********

(१८-४५)

***********************

स्वे स्वे कर्मणि अभिरतः संसिद्धिं लभते नरः।

स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तत् शृणु।

***********************

(१८-४५):

"स्वे स्वे कर्मणि अभिरतः संसिद्धिं लभते नरः"

(विश्वसंचलनात स्वभावनियत कार्याची भूमिका)

"Make your education valuable. Apply what you learnt. Refuse to take the back seat and watch things happen. Join the change and be part of the change. "

- Israelmore Ayivor,

अर्जुन शुर असतो, धनुर्विद्येत पारंगत असतो, चांगला मनुष्य असतो. पण जेंव्हा त्याच्या गुणाची, कार्याची समाजाला गरज असते तेंव्हा तो हातपाय गाळुन बसतो.

समाजात बरेच लोक विद्वान असतात, चांगले असतात पण आपल्या गुणाचा उपयोग कार्यात करुन ते समाजापर्यंत पोहोचवु शकत नाही. किंवा पोहोचत नाही. समाजविकासातील ही त्रुटी असते. भगवतगीता हीच त्रुटी भरुन काढते. ईश्वर या सृष्टिचा अध्यक्ष असतो, त्याला जग चालवायचे असते. याचसाठी ईश्वराने श्रीकृष्ण या मनुष्यरुपी अवतारात येवुन भगवतगीता ज्ञान जगाला उपलब्ध करुन दिले.

Transformation

विश्वसंचलनासाठी(सृष्टिचक्रप्रवर्तनासाठी) सहकार्य करणे या संदर्भात स्वतःच्या स्वभावनियत कार्याचे महत्व भगवतगीतेने "यज्ञ" या शब्दाद्वारे स्पष्ट केले आहे.

यज्ञार्थात् कर्मणो अन्यत्र लोकोअयं कर्मबंधनः।
तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसंगः समाचर॥(३-९)

एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्तयतीह यः।
अघायु इंद्रियरामः मोघं पार्थ स जीवति॥(३-१६)

याचाच अर्थ Informatory ज्ञानप्राप्ति जोवर कार्यात Transform होत नाही, तोवर ते समाजोपयोगी बनत नाही. ज्ञान जगात सर्वश्रेष्ठ आहे याची जाणिव देवुन भगवतगीता ज्ञान ते कार्य व कार्य ते ज्ञान असे Transformation चे शास्त्र सांगत आहे. यामुळेच Knowledge vs Wisdom, संख्यात्मक vs गुणात्मक ज्ञान यांतील भेद स्पष्ट होतो.

सर्वकर्म अखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

विश्वसंचलनास स्वकार्याचे सहकार्य अर्थात कर्माद्वारे ईश्वरभक्ति या संदर्भातच कर्माचे ज्ञानात विलिनिकरण अभिप्रेत आहे. याच मार्गाचे ज्ञान भगवतगीता देत आहे. याच आधारावर अर्जुनाचे अज्ञान दर्शवुन दिले.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

या मार्गावर स्वतःच्या कार्याचा एकनिश्चय असतो. Informatory knowledge ला (संख्यात्मक ज्ञान) समाजोपयोगी कार्यात बदलविणे आवश्यक असते. हे स्वभावनियत कार्य असते.

स्वे स्वे कर्मणि अभिरतः संसिद्धिं लभते नरः।
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तत् शृणु।(१८-४५)
यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम्।
स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।(१८-४६)

सार :

ज्ञान (विद्वत्ता) आहे पण समाजोपयोगी कार्यात Transform करता न येणे हीच वर्तमानातील सर्वात मोठी त्रुटी असते. यामुळेच बेरोजगारीसारखे प्रश्न समाजात उपस्थित होतात. म्हणुन समाजाने याच विषयाकडे गांभिर्याने पाहणे आवश्यक असते. ज्यामुळे ही त्रुटी भरुन काढण्यासाठी शिक्षणप्रणालित योग्य सुधारणा करता येईल.

*******

१८-४५/२ :
"स्वे स्वे कर्मणि अभिरतः "
(Rising above the worldly troubles)

"The new generation of researchers must be given the skills and values - not just scientific ideals, but also awareness of human weaknesses - that will enable it to correct its forebears' mistakes. "

-Heinrich Rohrer

According to Buddhist philosophy, the world is transient (anicca) and constantly changing. Within this transient world, sorrow (dukkha) is intrinsic to human existence. It is by following the path of moderation between severe penance and self-indulgence that human beings can rise above these worldly troubles.

*कर्म जीवनविकासात साधन : भगवदगीता

व्यवहारात (State of want - State of art) कार्य सकाम असते. इच्छापुर्तिसाठी कार्य साधन आहे हा व्यवहार असतो.

अर्जुनाला दुःख झाले तेंव्हा आपल्या नियतकार्यामार्गे असलेल्या हेतुचा आढावा घेतला. यांत स्वतःला कांही नको म्हणुन निष्क्रिय राहणे ही भूमिका दुःखमुक्तिसाठी घेतो.

भगवदगीता आसक्ति(Attachment) vs. अनासक्ति (Detachment) याचे logic सकाम कर्म vs. निष्काम कर्म या संदर्भात स्पष्ट करते. याद्वारे जीवनविकासात कर्म हे साधन आहे. यावर शिक्कामोर्तब करते.

*Rising above the worldly troubles :

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

अशाश्वताचे attachment द्वन्द्व/बंधन याचे कारण ठरते. तर बंधनमुक्तिसाठी शाश्वताचा आश्रय या संदर्भात ईश्वराचा आश्रय हे logic स्पष्ट केले. ज्ञानविज्ञान या संदर्भात शाश्वत ईश्वराची ओळख दिली. ही ओळख शाश्वत, अव्यक्त- गुणातीत, विश्वाचे मुळ या अर्थाने आहे.

"ज्ञानसञ्छिन्न संशयम् " अर्थात ईश्वराचा आश्रय जीवनमार्गात करणे, यामुळे मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा होतो. संशय मिटुन कार्याचा निश्चय होतो. स्वधर्माचरणात कार्य ईश्वराला समर्पित करणे, निर्णय अधिकार वापरुन कार्याचा निश्चय करणे व फल ईश्वराला समर्पित करणे . अर्थात कार्याद्वारे ईश्वरभक्ति करणे. या संदर्भात "अभिरतः " हा शब्द निष्ठेने कार्य करणे "Excellence " या अर्थाने आलेला आहे.

स्वे स्वे कर्मणि अभिरतः संसिद्धिं लभते नराः।(१८-४५)

यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम्।
स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।।(१८-४६)

सार :

१. ज्ञान :

ज्ञानविज्ञानामुळे जगातील प्रश्न सोडविणे शक्य झाले. तर जीवनविकासात अध्यात्माशिवाय ज्ञानविज्ञान अपुर्ण ठरते हे सत्य भगवदगीता स्पष्ट करीत आहे.

२. कर्म:

केवळ गरजापुर्तिसाठी नव्हे तर सर्वांगिण विकास, दुःखमुक्ति यासाठी जीवनविकासात कर्माचे महत्व भगवदगीता सांगत आहे. कार्यकौशल्याचा संस्कार या संदर्भात सहजकार्य (स्वभावनियत कार्य, स्वे स्वे कर्मणि अभिरतः, स्वधर्म, )निर्णय अधिकार, कार्याचा एकनिश्चय, निष्काम कर्म ही धारणा अभिप्रेत आहे.

**********

(१८-४५) /३:

"स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तत् शृणु"

(कर्तृत्व, श्रेष्ठत्व व जीवनमुल्ये)

समाजात "मनुष्याचे श्रेष्ठत्व" याविषयी कुतुहुल असते, आकर्षण असते. पण समाजातील श्रेष्ठ होणे या संदर्भात मनुष्याच्या संकल्पना भौतिक असतात. सामान्य व श्रेष्ठ मनुष्य यांतील निश्चित भेद भगवदगीता स्पष्ट करते.

मनुष्याचे कर्तृत्वच जगाचा इतिहास लिहीत असते. जगातील श्रेष्ठ लोकांनी मुल्य जपले असते व परिणामाला तोंड देण्याची शक्ति

त्यांच्यात असते यातुन महान कार्यही घडत असते म्हणुन ते श्रेष्ठ ठरतात.

१. "श्रीरामाने स्वधर्म(पित्याच्या वचनपुर्तिसाठी पितृआज्ञा) मुल्य जपतांना वनवास स्विकारला. "जहां सब भांति मोर बड काजू" या शब्दात (मातेला) वनवासाचे फलित सांगतात. पुढे लंकायुद्ध होते. असुरशक्ति पराभुत होतात. "

२. "आपल्या मुलाला जास्त मार्क्स द्यावे ही हेडमास्तरची इच्छा मॅगासेसे धुडकावुन लावतो व शिक्षकाचा राजिनामा देतो. उदरनिर्वाहासाठी दगड फोडतो. १२ वर्षाचा रॅमन पित्याला सहकार्य करतो. हाच रॅमन पुढे फिलिपाईनचा पंतप्रधान होतो. "

भगवदगीतेत मनुष्याच्या स्वाभाविक कर्माला(State of art) स्वधर्म या मुल्याची जोड मिळते. धर्म या संदर्भात अर्जुन आपल्या नियतकार्याला धर्मविरोधी ठरवितो. तर या नियतकार्याला स्वभावनियतकार्य या संदर्भात स्वधर्म ठरविले आहे.

श्रेष्ठ जीवनमुल्यांचा आदर करतात. जीवनयात्रेत विचलित होत नाही. याच पार्श्वभुमिवर अर्जुनाला म्हटले,

अनार्यजुष्टम् अस्वर्ग्यम् अकीर्तिकरम् अर्जुन।(२-२)

धर्म या संदर्भात आपल्या स्वभावनियत कार्याद्वारा ईश्वरभक्ति करणे यासाठी स्वधर्म या मुल्याचे महत्व आहे.

स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तत् शृणु।(१८-४५)
यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम् ।
स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।।(१८-४६)
श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात्।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्न आप्नोति किल्बिषम्।।(१८-४७)

सार :

धर्मात योग्य-अयोग्य असे द्वन्द्व असते. अर्जुन योग्य काय?याचा निर्णय घेवु शकत नाही परिणामी द्वन्द्ववश होतो.
धर्माला(नियतकार्याला) अधर्म व अधर्माला(निष्क्रियता) धर्म ठरवितो. भगवदगीता सामान्य व श्रेष्ठ या संदर्भात द्वन्द्ववश असणे vs. निर्द्वन्द्व असणे हा भेद स्पष्ट करते. अर्थात यावेळी Tiebreakerची गरज असते. व स्वधर्म हे जीवनमुल्य याच Tiebreaker ची पुर्तता करते. याप्रमाणे नीति व जीवनमुल्ये या संदर्भात धर्म व स्वधर्म यातील भेद स्पष्ट होतो. (जगातील)मनुष्य कोणत्याही धर्मात असला तरी स्वधर्म मनुष्याची गरज असते.

********

(१८-४६)

***********************

यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम्।

स्वकर्मणा तमभिः अर्च सिद्धिं विन्दति मानवः।।

***********************

(१८-४६)/१

"यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम् "

(The Source)

भगवतगीतेचे Logic

१. ज्या मुळ तत्वापासुन विश्वनिर्मिति आहे, त्याच मुळ तत्वाकडे जीवनाचा प्रवास आहे. याच मुळ तत्वाचे (ईश्वर) व मार्गाचे ज्ञान भगवतगीता देते. या मार्गावर कर्माद्वारे ईश्वराची भक्ति घडते. हा मार्ग "आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च "/'अमृतत्वाय कल्पते 'असा असतो. हा जीवनविकासाचा राजमार्ग असतो.

यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम्।

स्वकर्मणा तमभिः अर्च सिद्धिं विन्दति मानवः।।(१८-४६)

God as President ही ओळख होते, या ज्ञानात रमतो तेंव्हा बुद्धियोग देतो. यामुळे जीवनयात्रा विकासाच्या राजमार्गावर असते.

अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते। (१०-८)

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।।(१०-१०)

अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो. (दुःखी असतांनाही) स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. जीवनमार्गात (योग्य-अयोग्य असा)संशय आला असता निष्क्रिय होणे व योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरणे ही स्थिति अज्ञानाला ज्ञान ठरविणे असते.

याच पार्श्वभुमिवर प्रश्न येतो, ज्ञानाचे purpose काय? कर्माचे महत्व काय?(याच अनुषंगाने ज्ञान, कर्म, भक्ति हे विषय आले. )

विकासाचा राजमार्ग:

*योगसंन्यस्त कर्माणं ज्ञानसंच्छिन्न संशयम् ।(४-४१)

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

अर्थात ज्ञान संशयमुक्तिसाठी आहे, यामुळे कार्याचा एकनिश्चय होतो. कार्याद्वारे योग(दुःखान्त) ही भक्ति असते. सर्व कर्माचे अखेर ज्ञानात विलिनिकरण होते. हेच कार्यकौशल्य असते.

*यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

या मार्गावर व्यथित होत नाही. Survival योगक्षेमासाठी कर्म हे साधन असते. हेच कर्म राजमार्गावर साधन बनते. "गहना कर्मणो गतिः " कर्माच्या या ज्ञानामुळे
विकासाच्या राजमार्गावर येण्यासाठी कर्म या संदर्भात Transformation होते. हाच लढा ठरतो.
"माम् अनुस्मर युध्य च "

*Survival मार्ग vs. अमृतत्वाय कल्पते

*इच्छापुर्तिसाठी कार्य vs. योगः कर्मसु कौशलम्

* सकाम कर्म vs. निष्काम कर्म

*मनोवश(Lower Consciousness) vs.
Higher Consciousness

बोध:भगवतगीता महान आहे. सर्व धर्माचे मुळ आहे. जीवन लढाई आहे हे सर्व आपण ऐकत असतो. म्हणुनच याचे मुळ Logic जाणुन घेणे आपले दायित्व ठरते.

********

(१८. ४६)/२:

"स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः"

*कार्याद्वारे गरजापुर्ति होते, प्रश्न सुटतात. या व्यावहारिक जाणिवेतुन कार्याचे महत्व मनुष्य जाणत असतो.

*जगात दुःख आहे, प्रश्न असतात, यातुनच ज्ञानाची गरज भासली, विज्ञानाचे शोध लागले.

*जीवनात दुःख आहे, म्हणुन भगवतगीता म्हणते,

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

याप्रमाणे जीवनात कार्य, ज्ञान, विज्ञान, अध्यात्म यांची भूमिका असते. हीच भूमिका भगवतगीता स्पष्ट करते.

"गहना कर्मणो गतिः"या संदेशाद्वारे भगवतगीता जीवनात विकासासाठी "कार्याचे महत्व " याला Priority देत आहे.

"The great aim of education is not knowledge but action. "

Herbert Spencer

जीवनमार्गात अर्जुनाला नियतकार्यात दुःख जाणवले म्हणुन दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेला"ज्ञान" संबोधतो.

"There is solution to ignorance (of knowledge ) but there is no solution to illusion of knowledge"

अर्जुनाला नियतकार्यात(योग्य कि अयोग्य) संशय उत्पन्न झाला हे वास्तव होते. तो अज्ञानाला ज्ञान संबोधतो म्हणुन "ज्ञान" हा विषय आला. व जीवनमार्गातील ज्ञान या संदर्भात "अध्यात्म" हा विषय आला.

जीवनमार्गात ज्ञानाद्वारे कार्यातील संशय छेदणे व कार्यमार्ग दृढ करणे(एकनिश्चय) . याचसाठी स्वधर्माचरण/बुद्धियोग आश्रय याचे प्रयोजन आहे. याद्वारा कार्याद्वारा ईश्वरभक्ति साधणे हा संदेश आहे.

यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदं ततम्।
स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।।(१८-४६)

* ******

(१८-४७)

*************************

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात्।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्न आप्नोति किल्बिषम् ॥

*************************

(१८. ४७)/१:
"श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् "
(Searching own Destiny)

“It is better to live your own destiny imperfectly than to live an imitation of somebody else's life with perfection"

"एक साधुमहाराज पाण्यात डुबणाऱ्या विंचवाला वाचवतात. विंचु चावा घेतो व परत पाण्याकडे जातो. महाराज पुनः वाचवतात. क्रिया repeat होते, तेंव्हा शिष्य कुतुहुलाने यातील रहस्य विचारतात. उत्तर मिळते, चावणे विंचवाचा धर्म आहे, वाचवणे माझा धर्म आहे. आम्ही दोघेही आपआपल्या धर्माचे पालन

करीत आहो. "येथे धर्म स्वतःचा स्वभावनियत गुण, नियतकार्य दर्शवितो.

"धर्म" या शब्दाला मनुष्यजीवनात विशेष आणि गहन अर्थ असतो. पण समाजात लोक "धर्म" या शब्दाला केवळ Religion या अर्थाने जाणतात. पाप-पुण्य या आधारावरच योग्य-अयोग्य ठरविल्या जाते. युद्धकार्य करणे अर्जुनाचा स्वभावनियत धर्म होता. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर त्याचे नियतकार्य त्याचा स्वधर्म ठरला होता. पण अर्जुन दुःखी झाला असता स्वतःसाठी काय योग्य आहे याचा शोध सुरु होतो(Thinking). तो म्हणतो, पापकर्म न करणे हा माझा धर्म आहे, म्हणुन मी युद्ध करणार नाही.

या विश्वात अज्ञानामुळेच मनुष्य द्वंद्वाच्या जाळयात(बंधन) सापडतो. याच पार्श्वभूमिवर (बंधन vs मुक्ति) "Searching your own destiny " हा भगवतगीतेचा विषय बनतो.

"Psychoanalysis - and any good therapy - is a method of increasing one's awareness of destiny in order to increase one's experience of freedom. "

Rollo May

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात्।(३-३५)

स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।।(३-३५)

स्वभावनियतं कर्म कुर्वन्न आप्नोति किल्बिषम् ।। (१८-४७)

१. As Tiebreaker (Lifevalue)

स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।।(३-३५)

प्रत्येक मनुष्य स्वभावनियत जगत असतो. अज्ञानामुळे द्वंद्वाच्या जाळ्यात सापडतो. याच पार्श्वभुमिवर "स्वधर्म" येथे Tiebreaker या अर्थाने जीवनमुल्य दर्शविते.

२. As prescribed duty

स्वभावनियतं कर्म कुर्वन्न आप्नोति किल्बिषम् ।।(१८-४७)

येथे स्वधर्म आवडीचे कार्य, स्वभावनियत कार्य दर्शविते.

मनुष्याने या विश्वात पदार्पण केले आहे. He is World पण तो समाजातील गर्दीत स्वतःला शोधतो, "मी कोठे आहे?"हा डबक्यातील शोध असतो.

विश्व ईश्वराचे संघटन आहे. मनुष्य त्याचे ईश्वराशी असलेले नाते जाणतो, तेंव्हा तो (ईश्वराच्या)विश्वसंघटनेत स्वतःची Destiny (जीवनाचे निश्चित प्रयोजन) शोधतो. अर्जुनाला त्याचे ईश्वराशी असलेले नाते(अध्यात्म) कळते व विश्वरुपयोगातुन स्वतःच्या Destiny चा शोध लागतो.

मद् अनुग्रहाय परमं गुह्यम् अध्यात्म संज्ञितम् । (११-१)
अर्थात अध्यात्म जाणले.
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ।(११-३३)
अर्थात तु निमित्तमात्र हो.
मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।(११-५५)
अर्थात ईश्वराचेच कार्य जाणुन ईश्वरासाठी (भक्ति) करणे.

"The chief condition on which, life, health and vigor depend on, is action. It is by action that an organism develops its faculties, increases its energy, and attains the fulfillment of its destiny. "
- Colin Powell

**********

(१८-४७)/२:
"स्वभावनियतं कर्म कुर्वन्न आप्नोति किल्बिषम्"

"The meaning of life is not simply to exist, to survive, but to move ahead, to go up, to achieve, to conquer. "
Arnold Schwarzenegger

जीवन म्हणजे केवळ जीवंत असणे किंवा जीवंत राहण्यासाठी धडपडणे नव्हे तर सतत या प्रवासाचा शोध घेणे, दुःखावर दुर्बलतेवर विजय मिळवुन उत्साहाने (Destination कडे)प्रवास करणे.

जेंव्हा अर्जुन जीवन प्रवासात निराश होतो, आपला प्रवासच थांबवतो, तेंव्हा याच प्रवासात अर्जुनाची गांठ श्रीकृष्णाच्या रुपात

साक्षात ईश्वराशी होते. याच घटनेतुन भगवतगीता जगासमोर आली.

जगात मनुष्य (स्वभावनियत)प्रकृतिनुसार जगत असतो. यांत व्यवसायाचा संबंध स्वधर्माशी येतो, तेंव्हा सहजकार्य, स्वभावनियतकार्य State of Art असते. व्यवसायकार्यात State of Art व State of Want हे विभाग असतात. मनुष्याच्या इच्छा असतात. कांही आवश्यक गरजा (Livelihood) असतात, तर कांही Luxury(ऐश्वर्य) इच्छा असतात. याशिवाय किर्ति असते. यांत Social Status असते. याप्रमाणे कर्तृत्वाद्वारे ओळख बनत असते. याप्रमाणे गरज या संदर्भात योगक्षेम(Livelihood)/व्यवसाय (Profession)/सामाजिक स्थान(Social position)/ओळख(Social status)मनुष्य आपल्या व्यवसाकार्याकडे पहात असतो, यांत Priority गरजापुर्ति असते.

समाजातील ओळख या संदर्भात चांगले-वाईट, श्रीमंत-गरिब, श्रेष्ठ-कनिष्ठ अशी विभागणि लोक करीत असतात. मनुष्याची ओळख समाजातील असो वा स्वतःसाठी असो, ओळख प्रामुख्याने कर्तृत्वाद्वारे बनते. याच कर्तृत्वाचा संबंध मनुष्याच्या

गरजांशी असतो. म्हणुन कार्य कशासाठी? हा प्रश्न अर्जुनासमोर उभा ठाकतो.

इच्छा vs जीवनमुल्ये

जीवनांत निर्भय होण्यासाठी जीवनमुल्यांचा(Values) उपयोग होतो. Values driven Life निर्भय, Couageous जीवन असते, तर जीवनात मानसिक handicapped होणारेexcuses चा वापर करतात. निष्क्रियतेला आदर्श, दुर्बलतेला शक्ति दर्शविण्याचा प्रयत्न करतात.

भगवतगीतेची सुरुवातच "धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे " अशी झालेली आहे. कर्माचा धर्माशी संबंध सर्व लोकांनी(धृतराष्ट्रासह) मान्य केलेला असतो. पण अर्जुन याच धर्माचा दाखला देवुन निष्क्रियतेचे समर्थन करतो. श्रीकृष्ण अर्जुनाचे सामाजिक स्थान(समाजातील ओळख) या संदर्भात "श्रेष्ठांना दुर्बलता शोभत नाही" असे भाष्य करतात.

स्वधर्म हे जीवनमुल्य आहे ज्याद्वारे मनुष्य आपल्या मार्गावर स्वतःच्या मंजुरीचे शिक्कामोर्तब करतो. रामायणात "वचन" या मुल्याला highlight केले आहे. वचनपालन या संदर्भात दशरथ

महाराज व श्रीराम यांना आव्हान आलेले असते. व यानुसार श्रीरामाला वनवास ठरलेला असतो. तेंव्हा श्रीराम आपला स्वधर्म निश्चितपणे जाणतात. "धरमधुरीन धरमगति जानु"
याला रामायणात धर्मगति म्हटले आहे.

याच स्वधर्म संदर्भात भगवतगीतेत स्वतःच्या कार्याशी संबंध जोडलेला आहे. कार्य इच्छापुर्तिसाठी होते. इच्छा(अतृप्ति, संशय यामुळे) द्वंद्व निर्माण करते. म्हणुन निर्द्वंद्व(Tiebreaker) होण्यासाठी स्वधर्माचे प्रयोजन आहे. याच अनुषंगाने म्हटले आहे:

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात्।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्न आप्नोति किल्बिषम्।(१८-४७)
सहजं कर्म कौंतेय सदोषम् अपि न त्यज्येत् ।(१८-४८)

भगवतगीता निर्भय जीवन जगण्याचा संदेश देते. व याचसाठी कार्याद्वारे योग /भक्ति/निष्काम कर्म म्हटले आहे. या मार्गात दृढनिश्चय असतो.
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।(२-४०)
तं विद्यात् दुःखसंयोगंवियोगं योग संज्ञितम् ।(६-२३)

स्वधर्म प्रयोजन दृढत्वासाठी उपयुक्त आहे. अर्थात स्वधर्माचा संबंध सहजकार्याशी येतो, तेंव्हा द्वंद्व vs स्वधर्म यांत स्वधर्म Priority असावी. म्हणुन सहजकार्य संदर्भात स्वतःचा स्वधर्म " मुल्य "या संदर्भात जाणणे स्वतःचे दायित्व ठरते. वर्तमानातील ज्ञानविज्ञानयुगात स्वतःला जो विषय आवडतो, त्या विषयाचा उपयोग होणारे कार्य सहजकार्य बनविले तर आत्मविश्वासाने कार्य करतो. हेच सहजकार्य व्यवसायकार्य बनविले(ज्या कार्यामुळे योगक्षेम साध्य होतो) तर जीवनप्रवासात स्वधर्म मुल्याचे महत्व कळते.

* ******

(१८-४८)

*************************

सहजं कर्म कौंतेय सदोषम् अपि न त्यज्येत् "

सर्वारम्भाहि दोषेण धुमेन् अग्निः इव आवृताः।।

*************************

१८. ४८/१::

"सहजं कर्म कौंतेय सदोषम् अपि न त्यज्येत् "

(State of Art)

*सत्य स्वीकारणे. Acceptance

वर्तमानातील सत्य स्वीकारणे म्हणजे ज्ञान किंवा विकासाची पहिली पायरी आहे.

कुणी महामानव म्हणतो, मी लोकांना चंद्र दाखवितो, परंतु लोक माझ्या बोटावर लक्ष केंद्रित करतात. चंद्र पाहण्याचा आनंद घेण्याचे लक्ष्य आहे यावर दुर्लक्ष होते. जीवनाचे सत्य न स्वीकारल्यामुळे माणूस शब्दांत अडकतो आणि इतरांना गोंधळात टाकतो.

जीवनविकासात जीवनाचे सत्य स्वीकारणे आवश्यक आहे. अर्जुन जीवनाचे सत्य लपवतो आणि स्वत: ला शब्दांमध्ये अडकवतो . पण "ज्ञान" या संदर्भात अर्जुनाचा श्रीकृष्णाशी सामना असतो. तेंव्हा तो सत्य स्वीकारतो. प्रश्नाची पारदर्शकता येते.

* जीवनाची ओळख :Know thyself

"You are Hero of your story "

एखाद्या महान व्यक्तिबद्दल आपण म्हणतो, "त्याच्यासारखा कोणी झाला नाही आणि कोणीही होणार नाही . " खरं आहे, परंतु आम्ही विसरतो, आपल्यासारखा किंवा आपल्यासारखा कोणी नसतो आणि होणारही नसतो. कारण प्रत्येक माणूस Unique आहे.

"We are each gifted in a unique and important way. It is our privilege and our adventure to discover our own special light. "

~Evelyn Dunbar

जीवनाची ओळख नसल्यामुळे, एखाद्या व्यक्तीला दु:खाचा त्रास होतो. ज्यामुळे माणूस चिंता, भीती, क्रोधाचा बळी पडतो, ही द्वंद्वावस्था असते. नकारात्मकता, चिंता किंवा तणावात व्यस्त राहण्याचे हेच कारण आहे. जीवनाच्या प्रवासातील हाच अडथळा असतो. हा अडथळा दूर करण्यासाठी श्रीकृष्णाने भगवतगीतेत जीवनाची शास्त्रोक्त(सत, रज, तम प्रकृतिगुण, पुरुष-आत्मा, पुरुषोत्तम-परमात्मा) ओळख दिली. व "अमृतत्वाय कल्पते" हा विकासाचा Standard मार्ग सांगितला.

*Standard मार्ग (अमृतत्वाय कल्पते)

जीवनाच्या उपरोक्त ज्ञानानुसार जर मनुष्याने जीवनाचा शोध घेतला, सत्य स्विकारले तर तो ईश्वरापर्यंत पोहोचणारच. कारण तेच प्रत्येक मनुष्याचे अंतिम परम निवासस्थान आहे.

जिज्ञासुः अपि योगस्य शब्दब्रह्म अतिवर्तते।(६-४४)

याचाच अर्थ मनुष्याचे जीवन एक प्रवास आहे ज्याचे लक्ष्य ईश्वरधाम असते. अर्थात हा मार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा असतो.

योअंतः सुखः अंतआरामः तथा अंतःज्योतिः एव यः।(५-२४)

या मार्गाचा पाया व्यावहारिक मार्गातील
१स्वभावनियत /नियतकार्य व
२. निर्णय (Determination) असते. हे कार्य Standard मार्गावर अनुक्रमे स्वधर्म व कर्मयोगासाठी दृढनिश्चयी कार्य बनते. या मार्गावर भक्ति घडते.

** भगवतगीता व शिक्षणप्रणालिचे दायित्व:

भगवतगीतेत जीवनविकास या संदर्भात व्यावहारिक सकाम कार्य व निष्काम कार्य (Determination) असे दोन भाग पडतात. निष्काम कर्म या संदर्भात "अमृतंगमय" हा विकासमार्ग असतो. या मार्गाचा पाया व्यावहारिक कर्मच असते. "अमृतंगमय" या मार्गावर स्वधर्म व कर्मयोगासाठी कार्याचा दृढनिश्चय असतो. या कर्माच्या दोन निष्ठा असतात.
१. स्वभावनियत कार्य (State of art) व २. निर्णय अधिकार

**स्वभावनियत/सहजकार्य /State of Art, समाजव्यवस्था व शिक्षणप्रणालि

था ॅमस कार्लायल म्हणतो, ज्याला आवडीचे कार्य व्यवसायकार्य म्हणुन मिळाले आहे त्याला देवापासुन कांहीही मागण्याची गरज पडत नाही. तर भगवतगीता म्हणते, ज्याच्या सहजकार्याला धर्मकार्यासाठी संधी मिळते त्याला स्वर्गाचे द्वारच उघडे असते.

सहजं कर्म कौंतेय सदोषम् अपि न त्यज्येत् "
सर्वारम्भाहि दोषेण धुमेन् अग्निः इव आवृताः॥(१८-४८)
जसा अग्नि धुराने वेढलेला असतो, तसेच सर्वच कार्यात दोष आढळतोच. अर्थात यात महत्वाचे Priority सहजकार्य(आवडीचे कार्य) असते. त्या कार्याला नियतकार्याची संधी मिळाली तर स्वधर्म (Self- approval, Tiebreaker) करणे, ज्यामुळे विचलित होत नाही, एकनिश्चय असतो.

प्राचिन समाजव्यवस्थेत जगतहिताय कार्य, समुहहिताय कार्य, अर्थप्राप्ति साठी अर्थविषयक कार्य, सेवाकार्य यासाठी अनुक्रमे ज्ञानविज्ञानाचे कार्य, Leadership (ईश्वरभाव) कार्य, कृषिउद्योग उत्पादन व्यवसाय, सेवा अशी विभागणी HRD संदर्भात होती.

याचा उद्देश स्वतःचे स्वभावनियत कार्य/सहजकार्य विकसित करणे हा होता.

"The direction in which education starts a man will determine his future in life".

-Plato

*लॉर्ड मकॉलेने "सभ्यता मिशन" च्या नावाने भारतासाठी शैक्षणिक प्रणाली तयार केली. हे शिक्षण घेवुन भारतीयांनी आपल्या उर्वरित लोकांना सांगावे की ब्रिटीश भारतीयांचे कल्याण करण्यासाठी आले आहेत. त्यांचे ज्ञान हे वैज्ञानिक ज्ञान आहे जे आपल्या विकासासाठी पोषक आहे. ब्रिटीशांची भाषा आणि संस्कृती उच्च दर्जाची आहे. आपल्याकडे कोणतीही भाषा आणि संस्कृती असली तरी ती विकास करण्यास पोषक ठरत नाही. अर्थात आमच्यात अशी कोणतीही क्षमता नाही ज्यामुळे इंग्रजांनी जी विकासाची वाट दाखविली आहे, ती अमान्य ठरवेल. भारतात हीनतेची भावना याच मानसिकतेत रोवली गेली होती.

"All of us have been trained by education and environment to seek personal gain and security and to fight for ourselves. Though we cover it over with

pleasant phrases, we have been educated for various professions within a system which is based on exploitation and acquisitive fear. "

Jiddu Krishnamurti

उच्चशिक्षित होवुनही बेरोजगारी! हा दोष कशामुळे निर्माण होतो? स्वातंत्र्योत्तर काळात बऱ्याच शिक्षणतज्ञांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. यासाठी मेकॉलेवर दोष ढकलुन सुटका केली जाते. पण प्रश्न तसाच कायम राहतो.

"Small is beautiful" कार ई. एफ . शुमेकरने गुणात्मक शिक्षणाची गरज प्रतिपादन केली. स्वावलंबनामुळे निर्णय-अधिकार मिळतो. गुणात्मक शिक्षणात स्वावलंबनासाठी Appropriate कार्य (शुमेकर याचा अर्थ जेवढा पाय तेवढा जोडा या तत्वावर सहजकार्य) ची संकल्पना स्पष्ट केली.

याचाच अर्थ समाजात सर्वांना व्यावसायिक स्वभावनियत कार्य उपलब्ध होईल अशी व्यवस्था निर्माण करणे व त्याच व्यवस्थानिर्मितिसाठी योग्य शिक्षणपद्धति (संख्यात्मक व गुणात्मक)निर्माण करणे हे समाजाचे दायित्व असते.

********

(१८-४८)/२:

" सर्वारम्भा हि दोषेण धूमेन अग्निः इवआवृताः"

(Importance of courage)

जे कार्य आवश्यक आहे, योग्य आहे, ते केलेच पाहिजे. हे कार्य आनंदाने करतात ते शहाणे ठरतात. तर अमुक कार्य योग्य आहे हे जाणतो पण आचरण करण्याचे धैर्य नसते. कारण मोह, भय, सकामवृत्ति आडवी येते . व आवश्यक कार्य टाळण्यासाठी निमित्तच मिळते. निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी स्वतःचे तत्वज्ञान तयार करतात . असेच अर्जुनाचे नियतकार्य व निष्क्रियतेचे समर्थन असते.

अर्जुन योद्धा होता. युद्धात लोक मृत्युमुखी पडतात हे त्याला माहिती होते. तरी निष्क्रियता सक्षम दिसावी यासाठी धर्माचे तत्वज्ञान वापरतो. येथे स्वजनांचा मोह आडवा येतो. हे कार्य योग्य असले तरी दुःख होईल ही त्याची भूमिका असते, म्हणुन कार्याद्वारे दुःखमुक्ति कशी होईल? हा त्याचा अप्रत्यक्षपणे प्रश्न असतो.

समाजात चांगले चालत नाही, चांगल्याला त्रास होतो, असे भाष्य जेंव्हा ऐकतो, याचाच अर्थ त्या व्यक्तिला योग्य काय हे कळले पण आचरण करण्याचे धैर्य नसते. याच शक्तिसाठी भगवतगीता मार्गदर्शन करते. अर्जुन योग्य काय? याची शहानिशा ज्ञानविज्ञानासह (अध्यात्म), प्रात्यक्षिकासह (विश्वरुप) करुन घेतो. हे कार्य घडणारच आहे याची खात्री विश्वरुपातुन होते. आता फक्त Courage हवे असते. सकाम मानसिकतेमुळे भय असते, चंचलता असते उदा. किर्तिइच्छा, लोकांनी चांगले म्हणावे ही सकाम मनोवृत्ति असते, यामुळेच लोक काय म्हणतील या भयाची निर्मिति होते. व योग्य-अयोग्य असा भ्रम होतो. म्हणुन निष्काम कर्माचे प्रयोजन आहे. हा मार्ग म्हणजे दुःखमुक्तिसाठी कार्याद्वारे योगसाधना ठरते.

"We were born into this world and formed in the likeness and similitude of The Creator. This simply means that we have infinite and unlimited abilities to conquer any challenge we put our minds to. "

All men's souls are immortal, but the souls of the righteous are immortal and divine.

Socratese

योग्य कार्य केले तरी त्यातील चुका काढुन त्याला highlight करणे ही राजकिय क्षेत्रातील प्रवृत्ति आपण अनुभवत असतो. कारण जसा धुरावाचुन अग्नि नाही, तसेच योग्य कार्यातही चुका शोधण्याची मनोवृत्ति असली तर चुकाही सापडते. याचेच दर्शन राजकिय क्षेत्रात होत असते.

सहजं कर्म कौंतेय सदोषम् अपि न त्यज्येत्।

सर्वारम्भा हि दोषेण धूमेन अग्नि इव आवृताः॥(१८-४८)

समाजात चोराला चोरी करण्यात अडथळा वाटत नाही, अर्थात दुष्कृत्य करणाऱ्याला भय वाटत नाही. पण मनुष्याला योग्य कार्य करण्याचे भय वाटते. ही समाजातील शोकांतिका असते. म्हणुन योग्य कार्यासाठी धैर्य महत्वाचे असते.

Clear thinking requires courage rather than intelligence.
Thomas Szasz

* ******

(१८-४८)/३:
"सर्वारम्भा हि दोषेण धूमेन अग्निः इवआवृताः"
(स्वधर्म Tiebreaker)

जीवन समर्थपणे जगणे हेच यशस्वि जीवनाचे रहस्य आहे. हेच ज्ञान भगवदगीता सांगत आहे. यश, स्तुती यामुळे मनुष्य सुख अनुभवतो. अपयश, निंदा यामुळे दुःख जाणवते. यशस्वि जीवनाचे रहस्य न जाणल्यामुळे जीवनात यश-अपयश, मान-अपमान हे द्वन्द्व कार्यात संशय निर्माण करतात. याच संशयाचा नाश करण्यासाठी भगवदगीतेने ज्ञानाचे महत्व सांगितले. या ज्ञानामुळे कार्याचा निश्चय होतो. विश्वासाने जीवनयात्रा चालते.

"Everyone is hero of his own story. "

प्रत्येक मनुष्य विश्वाच्या रंगपटावरील एक नायकच असतो, पण अज्ञानामुळेच प्रेक्षक राहतो. या अज्ञानाचेही अज्ञान असते हेच या विश्वातील वास्तव असल्यामुळे नायक-प्रेक्षक अशी भूमिका कायम राहते. जीवनातील वास्तव न स्विकारता प्रेक्षकी भूमिका स्विकारल्या जाते. हेच दर्शन अर्जुनविषादयोगात होते. मनुष्याच्या भूमिकेत हाच नायक-प्रेक्षक भेद असल्यामुळे स्वामी विवेकानंदानी म्हटले होते, जग ही व्यायामशाळा आहे. येथे शक्ति संचित करण्यासाठी मनुष्यजीवन लाभले आहे. याच शक्तिची ओळख भगवदगीता करुन देते.

जगात काय वाईट आहे?जगातील(इतर मनुष्यांच्या) चुका कोणत्या? अमुकाने असे करावे, असे कां करीत नाही? असे Judgement thinking वापरुन सहजपणे मनुष्य भाष्य करीत असतो. हीच Judgement thinking ची संवय स्वतःसाठी वापरतो तेंव्हा मात्र स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी भाष्य बोलतो.

अर्जुन चांगला मनुष्य असला तरी जेंव्हा युद्धक्षेत्रावर दुःखी होतो. तेंव्हा स्वतःला लोभी दर्शवुन या लोभापायी नियतकार्य केले तर पापीच ठरणार असे शिक्कामोर्तब करतो. व निष्क्रिय राहणे पसंद

करतो. याच कारणास्तव वास्तव न स्विकारता प्रेक्षकी भूमिका स्विकारतो.

मनोदुर्बलता सोडुन युद्ध कर या श्रीकृष्णाच्या भाष्याने अर्जुनाला त्याचे वास्तव स्विकारण्यास भाग पाडले. येथे स्वतःचे नियतकार्य योग्य कसे?हा त्याचा मुख्य प्रश्न असतो व या कार्यातुन दुःखमुक्ति कशी होईल?ही त्याची Priority असते. यानुसार समाधानकारक उत्तर मिळणे यावरच अर्जुनाचा युद्ध करण्याचा निर्णय अवलंबुन होता.

निष्क्रियता असुनही स्वतःला योग्य दर्शविण्यासाठी ज्या ज्ञानाचा उपयोग करतो, त्यासंदर्भात धर्म, ज्ञान, सुखदुःख, स्वभावनियतकार्य असे विविध विषय येतात. या सर्व विषयावर संवादातुन चर्चा होते.

स्वधर्म :

जगातील लोक स्वभावनियत कार्यानुसार कार्यरत असतात. पण कार्य काम्य आहेत म्हणुन काम्य कर्माचा त्याग करुन संन्यास घेणारे संन्याशी म्हणुन ओळखले जातात. पण येथे अर्जुन नियतकार्याचा त्याग "लोभी vs. त्यागी " या आधारावर करतो. समोरचा धर्म पाळत नाही म्हणुन आपण धर्म कां पाळु नये? हे त्याचे logic असते. "धर्म " या संदर्भातच स्वभावनियत कार्याला स्वधर्म संबोधले आहे.

अर्जुनाचे सहजकार्य (State of art स्वभावनियत कार्य) योद्धा (Warrior) असते. यानुसार शत्रुपक्षाविरुद्ध लढणे हा त्याचा स्वधर्म असतो. पण या कार्यातच त्याला दोष आढळतो. जसा अग्नि धुराने वेढल्या जातो, तसेच सर्व कार्यात दोष आढळत असतो. स्वधर्माचरण आचरुनच ईश्वरभक्ति घडत असते. नैष्कर्मसिद्धि प्राप्त होत असते.

सहजं कर्म कौंतेय सदोषम् अपि न त्यज्येत्।
सर्वारम्भा हि दोषेण धूमेन अग्निः इवआवृताः।।
असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः।
नैष्कर्मसिद्धिं परमां संन्यासेन् अधिगच्छति।।(१८-४९)

"We are each gifted in a unique and important way. It is our privilege and our adventure to discover our own special light. "

~Evelyn Dunbar

********

(१८-४९)

********************

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः।

नैष्कर्मसिद्धिं परमां संन्यासेन् अधिगच्छति।।

********************

(१८-४९):

"नैष्कर्मसिद्धिं परमां संन्यासेन् अधिगच्छति"

(Attitude of Growth Mindset:

निष्क्रियता vs. नैष्कर्मसिद्धि)

मनुष्यजीवनात व्यावसायिक कार्य महत्वाची भूमिका बजावते. याला सहजकार्य, स्वभावनियतकार्य संबोधले आहे. विश्वात मनुष्याला जे सहज जमते तेच कार्य करतो. ही सहजता मनुष्य मिळवित(कमावीत) असतो. संवय सहजतेत बदलते. या सहजकार्याचा उपयोग नियतकार्यात करतो, तेंव्हा तो स्वधर्म ठरतो.

अर्जुनाचे सहजकार्य योद्धा(Warrior) हे होते. धर्मयुद्धातील नियतकार्य त्याचा स्वधर्म ठरते. या स्वधर्माद्वाराच मनुष्य कार्यरत

असतो. याप्रमाणे स्वधर्म Professional/Occupational Identity ठरते. हा स्वधर्म जीवनविकासातील Mindsetचा महत्वाचा भाग बनतो. हा स्वधर्म सक्रियता अर्थात Growth mindset दर्शविते.

"Mindset: The New Psychology of Success, " (Carol Dweck)

यानुसार जीवनयात्रेत Fixed mindset व Growth mindset असे दोन प्रकारचे Mindset कार्यरत असतात.

1. Fixed mindset:

You believe your abilities and intelligence are static, so you need to prove yourself over and over. You tend to avoid challenges, give up easily, and ignore useful, constructive feedback.

2. Growth mindset:

You believe you have the ability to learn and grow through effort and practice because you embrace challenges, stay persistent in the face of setbacks, and welcome constructive feedback.

जीवनयात्रेत अर्जुनाची भूमिका Fixed mindset ची बनते. यामुळेच तो आपल्या निष्क्रियतेला धर्माची मंजुरी सांगतो. (Need of approval). हा त्याचा Comfort zone असतो. व्यक्तिगत संदर्भात हा विषय जबाबदारी टाळण्याचा असला तरी (१) व्यक्तिगत सुखदुःख (२) मानसिक स्वास्थ व विकास (दुर्बलता- सक्षमता) असा होतो. याच पार्श्वभूमिवर Growth mindset चे ज्ञान भगवतदगीता देत आहे.

*निष्क्रियता vs नैष्कर्मसिद्धि

Attitude of Fixed mindset vs. Growth mindset

जसे एखादे व्रत आरंभुन निराहार असले तरी विषयाची गोडी सुटत नसेल तर मन विचलित होते. तसे Fixed Mindset मुळे विद्वान मनुष्यही विचलित होतो.

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहीनः।.. (२-५९)
इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः।।(२-६०)
याचाच अर्थ निष्क्रियता म्हणजे समाधान, शांति नव्हे.

या पार्श्वभूमिवर जीवनयात्रेतील Growth Mindset जाणणे आवश्यक ठरते. Growth mindset म्हणजे अशांति नव्हे.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते॥(२-१५)

"Adopting a growth mindset can be challenging because it pushes you out of your comfort zone, but that comfort zone is a dead end. By taking a new attitude towards your personal growth, you open yourself up to greater possibilities. "

Growth mindsetया संदर्भात आत्मोन्नति हा महत्वाचा भाग आहे. याच संदर्भात ईश्वरधाम, ईश्वराची नियतकार्याद्वारा (स्वधर्माचरण) भक्ति हा विषय आलेला आहे.

स्वे स्वे कर्मणि अभिरतः संसिद्धिं लभते नरः।(१८-४५)
...
असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः।

नैष्कर्मसिद्धिं परमां संन्यासेन् अधिगच्छति॥(१८-४९)

नैष्कर्मसिद्धि या संदर्भात अकर्म, स्थितप्रज्ञ(विचलित न होणे), द्वन्द्वमुक्ति, मनःशांति या विविधशक्तिंचा समावेश होतो.

सार :

"Change your attitude" हा Carrier विकासातही महत्वाचा विषय असतो. याच संदर्भात भगवदगीतेतील Fixed mindset vs. Growth mindset यातील भेद जाणुन घेणे उपयुक्त ठरते.

********

(१८-५६)

*************************

सर्वकर्माणि सदा कुर्वाणो मद् व्यपाश्रयः।

मद् प्रसादात् अवाप्नोति शाश्वतं पदम् अव्ययम् ॥

*************************

(१८. ५६)/१ :

"सर्वकर्माणि सदा कुर्वाणो मद् व्यपाश्रयः"

कार्याच्या संदर्भात जीवनात प्रत्येक क्षणात कार्य घडते. या जीवलोकात मनुष्य स्वभावप्रकृतिनुसारच कार्यरत असतो. ईश्वराचा अंश प्रत्येकाच्या हृदयी स्थित आहे. यामुळे ईश्वर सर्वांसाठी Common असतो. याच आधारावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति घडणे Common प्रक्रिया ठरते. व्यक्तिमत्व विकास या संदर्भात "कार्याद्वारे भक्ति"या Stanardard मार्गाचे रहस्य काय?

सर्वकर्माणि सदा कुर्वाणो मद् व्यपाश्रयः।

मद् प्रसादात् अवाप्नोति शाश्वतं पदम् अव्ययम् ॥(१८-५६)

*सुखासाठी मनुष्य कार्यरत असतो. दुःख आले कि अडचण जाणवते. चिंता, भय असते. दुःखाशी deal करण्याचे ज्ञान नसेल तर व्यक्तिमत्व Disorder होते. निष्क्रियतेचे समर्थन करतो यासाठी ज्ञान वापरतो. म्हणुन कार्य व ज्ञान यांचा संबंध स्पष्ट केला आहे.

"ज्ञान" या संदर्भात निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान? कि कार्याचा दृढनिश्चय होण्यासाठी ज्ञान? हा प्रश्न उपस्थित होतो.

*व्यवहारात कार्य घडत असते. इच्छापुर्तिसाठी, प्रश्न सोडविण्यासाठी कार्य करतो. व्यवहारातील कार्य व कार्याद्वारे ईश्वरभक्ति यात कार्य common आहे. व्यवहारकार्य सकाम असते तर निष्काम कार्यासाठी कार्याद्वारे ईश्वरभक्ति असते. (सकाम कार्य ते निष्काम कार्य)

*ज्ञान व ईश्वर यांचा संबंध:

मनुष्याच्या जीवित तत्वातील (Self) शाश्वत तत्व ईश्वराचा अंश असतो व त्याचे अंतिम धाम ईश्वर असते म्हणुन शाश्वत विकासाचा मार्ग "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) म्हटलेले आहे. ईश्वर प्रकृतिचा अध्यक्ष, ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. याच ईश्वराचा

आश्रय करुन बुद्धियोग धारण होतो. कार्याचा दृढनिश्चय होतो. कार्य ईश्वराला समर्पण ही ईश्वरभक्ति असते. यालाच भगवतगीता राजधर्म(९-२) अमृतधर्म(१२-२०), शाश्वत धर्म(१४-२७) संबोधते.

या मार्गावर दुःखाने विचलित होत नाही. अडचण विकासासाठी कार्यसंधी(Stepping stone) असते. या संदर्भात ईश्वर "अधिदैव" असतो(मनुष्य व ईश्वर यांचा संबंध दैव-अधिदैव). याप्रमाणे दुःखाशी deal करण्यासाठी ज्ञान या संदर्भात ईश्वरज्ञानाचा उपयोग होतो.

चिंता आली तर मनुष्य दुबळा होतो, Nervous असतो. तर अडचणीशी लढण्यास तयार झाला तर आत्मविश्वास असतो, निर्भय होतो. म्हणुन "कार्याद्वारे योग" याचे रहस्य सांगितले.

स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।(२-४०)

व्यक्तिमत्व विकास या संदर्भात नित्य आत्मविश्वास असणे, विकासाची मानसिकता असणे आवश्यक असते. हाच Growth Mindset असतो. व याचसाठी भगवतगीता Disorderly mindset(अशांती, अस्थिरता) व Orderly mindset(शांत, स्थिर) यांतील भेद स्पष्ट करते.

व्यावहारिक बोध: समाजातील नकारात्मक भाष्य सामाजिक Disorder चा परिणाम असतो. व्यवहारात जगत असतांना आपले मत शिरोधार्य मानावे ही इतरांची इच्छा असु शकते. पण स्वतः कसे जगावे ही आपली स्वतःची Choice असते. आपला निर्णय, कार्य स्वधर्म जाणुन आचरण करतो, तेंव्हा आपली भूमिका लढवय्याची असते. हीच भूमिका होण्यासाठी भगवतगीता संदेश देत आहे,

तस्मात् सर्वेषु कालेषु माम अनुस्मर युध्य च ।(८-७)

*******

(१८-५६)/२:

"मद्प्रसादात् अवाप्नोति शाश्वतं पदम् अव्ययम्"

(Survival mode of life vs Progresive mode)

आधुनिक युग विकासाचे आहे, विज्ञानाचे आहे. जगातील धर्माची भूमिका जीवन सुखी व्हावे, समाज सुखी व्हावा यासाठी झालेली

असते. तर धर्म, ईश्वर, अध्यात्म या शब्दांचा संदेश या कथित आधुनिक विकासात अडथळा करते हा कांही लोकांचा समज बनतो.

समाजातील प्रस्थापित System मध्ये मनुष्य जगत असतो. मनुष्याच्या जगण्याच्या संकल्पना त्याच्या सुखाच्या आधारावर बनलेल्या असतात. अर्जुन असाच Systemमध्ये जगत असतांना त्याला अडथळा जाणवतो. (स्वकीयांमुळे)दुःखी होतो व यामुळे निष्क्रियता पसंद करतो. हे जगणे Survival mode मधील असते.

जगात चांगले-वाईट, कर्तृत्ववान-आळशी, गरीब-श्रीमंत, ज्ञानी-अज्ञानी, स्वकीय-परकीय असे विविध लोक जगत आहेत याप्रमाणे मनुष्य जगाला ओळखत असतो. याच आधारावर अर्जुन स्वतःचे समर्थन करुन स्वतःला ज्ञानी दर्शवितो. या भूमिकेला भगवतगीता प्रज्ञावादी संबोधते. अर्थात चांगला असुनही अर्जुन Survival mode मध्ये जगत असतो.

"Our own life is driven by our own Internal Guidance System. IGS. Our IGS is a largely

untapped resource that we can now easily learn to understand and use. It is there to help us experience our highest purpose and at the same time to live a great life. "

हे मनुष्यजीवन एकदाच मनुष्याला मिळाले आहे. या जीवनाची निश्चित ओळख होण्यासाठी भगवतगीता मार्गदर्शन करते. याद्वारे Progressive mode ची ओळख करुन देते. जीवनविकासातील पुढील टप्पा Progressive mode of life हा असतो. हा टप्पा "अमृतत्वाय कल्पते", आत्मोद्धार अशा शब्दाद्वारे भगवतगीता व्यक्त करीत आहे.

सर्वकर्माणि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः।
मद्प्रसादात् अवाप्नोति शाश्वतं पदम् अव्ययम्।।(१८-५६)

या Verse मधुन मरणोत्तर शाश्वतपद मिळणे यासाठी भगवतगीता मार्ग सांगत आहे!असे Interprete केले तर भगवतगीतेतील Progressive modeचे रहस्यच कळणार नाही.

*It is not how we interprete Bhagwatgeeta but how we respond to it for betterment of our own life i. e. transforming our life in survival mode into Progressive mode.

अनित्य असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)
जीवनविकासाची Progressive mode स्पष्ट करतांना ईश्वराचा आश्रय जीवनविकासासाठी आहे, विकास थांबविण्यासाठी नाही. हा भगवतगीतेचा संदेश देत आहे.
समाजात ईश्वर या शब्दाची ओळख वेगवेगळी असते. मनुष्य Survival mode(योगक्षेम) जगतो. याच mode मध्ये ईश्वरश्रद्धा असली तरी फलसिद्धिसाठी देवतांना भजतात.
ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।(४-११)
काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवता।(४-१२)

याच ईश्वरश्रद्धेचा उपयोग जीवनविकासाच्या ज्ञानासाठी (Progressive mode of life) भगवतगीतेने केलेला आहे. (Higher State of Mind). जीवनांत ईश्वराचा नित्य आश्रय म्हणजे Survival mode मधील व्यवहारमार्गाला Progressive mode मध्ये transform करणे. हा मनुष्याचा Response

असतो. ही ईश्वराची कृपाच असते, ज्यामुळे त्याची जीवनयात्रा (Towards शाश्वत पद) "अमृतत्वाय कल्पते"या महामार्गावर असते. या मार्गावर व्यथित(विचलित) होत नाही.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

"The meaning of life is not simply to exist, to survive, but to move ahead, to go up, to achieve, to conquer. ”
– Arnold Schwarzenegger

******
(१८-५६):
"सर्वकर्माणि सदा कुर्वाणो मद् व्यपाश्रयः।
मद्प्रसादात् अवाप्नोति शाश्वतं पदम् अव्ययम्।।"
(Activation of higher consciousness चेतना जागृति)

व्यवहारात कर्म विकासाचे(गरजापुर्ति) साधन असते. यश मिळावे, सुख लाभावे, प्रश्न सुटावेत या हेतुने मनुष्य कार्यरत असतो. या

मार्गात कर्म कष्टप्रद, दुःखदायी वाटते म्हणुन अर्जुन त्याचे नियतकर्म धर्मविरोधी आहे असे जाहीर करतो . त्याचा हेतु कर्म टाळण्याचा असतो. याच पार्श्वभुमिवर भगवदगीता ईश्वराची ओळख करुन देत आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।(९-३३)

मनुष्याचे ज्या ईश्वराशी अतुट नाते आहे त्या ईश्वराची ओळख भगवदगीता करुन देत आहे ज्यामुळे मनुष्याला स्वतःची ओळख करता यावी. अध्यात्मज्ञान अशी या ज्ञानाची ओळख आहे.

"स्वभाव अध्यात्म उच्यते"

शाश्वत ईश्वराचा नित्य आश्रय होण्यासाठी भगवदगीता कर्माद्वारे ईश्वरभक्तिचा संदेश देते. याची प्रक्रिया (कर्मसमर्पण, फलत्याग) सांगते. याच संदर्भात शेवटी नित्य ईश्वराचा करुन कर्म कर ज्यामुळे ईश्वराची भक्ति लाभते व जीवनमार्ग शाश्वत पदाला पोहोचतो.

सर्वकर्माणि सदा कुर्वाणो मद् व्यपाश्रयः।

मद्प्रसादात् अवाप्नोति शाश्वतं पदम् अव्ययम्।।(१८-५६)

याची प्रक्रिया Mind functioning या संदर्भात (१८-५७ ते १८-६२) स्पष्ट केली आहे.

*Higher Consciousness :

अल्बर्ट आईन्स्टाइन म्हणतो,

"The significant problems we face cannot be solved at the same level of thinking we were at when we created them. "

मन, बुद्धि, चित्त, अहंकार या Mind faculties आहेत. मन Senses mind, चित्त Memory mind, अहंकार Ego mind व बुद्धि Intellegence असते. मनाला Lower consciousness व चित्ताला Higher consciousness असेही ओळखल्या जाते.

मनसः तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतः तु सः।(३-४२)

Higher consciousness या संदर्भात नित्य ईश्वराचा आश्रय होण्यासाठी ईश्वराचे स्थान जाणणे व त्याला शरण जाणे आवश्यक असते. याची प्रक्रिया पुढिलप्रमाणे स्पष्ट केलेली आहे.

*चित्त, बुद्धि व अहंकार :
चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः।
बुद्धियोगं उपाश्रित्य मत् चित्तः सततं भव।।(१८-५७)

मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि।
अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रोष्यसि विनङक्ष्यसि।।(१८-५८)

अहंकार येथे अडथळा ठरतो. याला Lower Self (कर्ता भाव) म्हणता येईल.
अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)

*अहंकार व प्रकृति:

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।
मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वाम् नियोक्ष्यति।।(१८-५९)

स्वभावजेन कौंतेय निबध्दः स्वेन कर्मणा।
कर्तुं न इच्छसि यत् मोहात् करिष्यसि अवशोअपि तत् ।।(१८-६०)

*प्रकृति व ईश्वर :(Replacement of ego)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया॥(१८-६१)

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तत् प्रसादात् परां शांतिम् स्थानम् प्राप्स्यसि शाश्वतम् ॥(१८-६२)

***********

(१८-५७)

*************************

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः।

बुद्धियोगं उपाश्रित्य मत् चित्तः सततं भव।।

*************************

(१८. ५७)/१:

"चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः"

(Right mental attitude)

Nothing can stop the man with the right mental attitude from achieving his goal; nothing on earth can help the man with the wrong mental attitude.

"Wrong mental attitude vs. Right Mental Attitude" is major subject dealt in Bhagwatgeeta .

Facts of people & mental attitude

1. The people of this world have long had a tendency to judge most everything in terms of

light vs. darkness,

good vs. evil,

us vs. them

Our lives are filled with these and many other dualities. These dualities can easily lead to a polarization of beliefs and lifestyles.

When we don't live with clear purpose and intentions, many people can be pulled down a destructive path by circumstances, become victim of dualistic paradigm behaviors. By developing clear purpose and intentions and following these to the best of our ability, we can shift from dualistic old paradigm behaviors to develop healthier, more harmonious ways of living with each other.

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।

तयोः न वशम् आच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

2. Nobody thinks that they're evil or bad, they think that they're doing the right thing. So many people in the world would rather stay in a situation that's painful but familiar because they're comfortable with it. Not a lot of people have the strength or heart to realize when something's not good for them and to turn around and be alone.

इच्छाद्वेष समुत्थेन द्वंद्वमोहेन भारत
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप।(७-२७)

3. Right mental attitude :
येषा तु अंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः।।(७-२८)

अर्थात
निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्।(२-४४)

4. Advise

Determination in mode of goodness

a. Right mental attitude

निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान।(२-४५)

b. Right of decesion/ Devotion

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।(२-४७)

सिद्धि असिद् द्धोः समो भूत्वा समत्व योग उच्यते।(२-४८)

c.. Masterpath -"अमृतत्वाय कल्पते"(२-१५)

तस्मात सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।(८-७)

Battle(युद्ध) :Wrong mental atttude vs. Right mental attitude

अर्थात

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः।

बुद्धियोगं उपाश्रित्य मत् चित्तः सततं भव।।(१८-५७)

******

(१८-५७)/२ :

बुद्धियोगं उपाश्रित्य मत् चित्तः सततं भव।

(I. Raising Consciousness/Krishna Consciousness)

*Change your Attitudes towards Problem

"The significant problems we face cannot be solved at the same level of thinking we were at when we created them. "

~ Albert Einstein

The word "Problem "sounds negativity, that triggers feelings of fear and anxiety,

Change the word "problem" to the positive word "Situation" or "Challange" or Opportunity.

"Situation" is neutral.

"Challenge" is a positive word. When you think of a challenge, you think of something that you rise to, something that brings out the best in you and others.

Your job is to find the benefit, and this way of approaching a problem is determined by your attitude.

"Every problem or difficulty you face contains the seed of an equal or greater advantage or benefit. "
-Napoleon Hill

दुःख, अडचणी, प्रश्न जीवनाचा अविभाज्य भाग आहे. पण यामुळे मनुष्य कोणती भूमिका घेतो व कोणती भूमिका घ्यायला हवी हेच भगवतगीतेत अर्जुनाच्या भूमिकेतुन स्पष्ट होते. अर्जुनासाठी Stepping stone संधि असते. पण त्याचा Lower Self (Self

I)निष्क्रियतेचे समर्थन करण्यास भाग पाडतो. हा Lower self प्रश्नाची वास्तविकता न स्विकारता प्रज्ञावादी(Always complaining) भूमिका घेतो. Higher Consciousness विषयी तो अनभिज्ञ असतो. स्वतःची त्याला पुर्ण ओळख नसते. स्वतःची पुर्ण ओळख होण्यासाठीच त्याला ही संधी मिळालेली असते.

Lower Self :(अयुक्त) सकाम कार्य,
प्रज्ञावादी(Complaintant) भूमिका, अपुर्ण, अहंकार आश्रय
Higher Self : (युक्त)निष्काम कार्य

"Know Thyself " स्वतःची ओळख

Consciousness(Awareness), Self(मी)&Soul (आत्मा)

There are two main aspects to our consciousness that are directly relevant and necessary to understand.

The first is our conscious mind. The conscious mind is the aspect of our awareness (and our thoughts) which we are aware of at ordinary levels of consciousness. We try to use our conscious minds to plan our entire lives and to predict using logic and reason alone where we are going to end up and what actions we need to take in order to get there.

It is this use of our minds which ends up getting in the way of the actualization of our true potential and who we really are.
The reason being is that we have another aspect to ourselves called the higher self.

Self I is incomplete self, Lower Self, Immature Self.
Self II is complete Self, Creative Self, Higher Self.

The higher self(Self II. Creative) is a higher and more evolved aspect of our own consciousness which organizes our journey of evolution

throughout our life. Your Higher Self is, in simple terms, the highest aspect of you that can be attained and held in the physical body.

Your Soul, on the other hand, had an enormous role in deciding upon and designing what you experience in this lifetime. Your Soul wanted to experience a certain set of experiences so it put in place a plan and process where it could - through you.

Higher consciousness is spiritual or energetic awareness that transcends the mind’s normal preoccupation with the past and the future. As you raise your consciousness, you awaken to the eternal, unlimited nature of your being.

Higher consciousness म्हणुन ओळखल्या जाणारे स्वतःमधील God consciousness असते. यालाच Krishna Consciousness म्हणुन ओळखल्या जाते.
याच संदर्भात म्हटले,

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः।
बुद्धियोगं उपाश्रित्य मत् चित्तः सततं भव॥(१८-५७)

******

(१८-५७/३):
"बुद्धियोगं उपाश्रित्य मत् चित्तः सततं भव"
(II. Spiritual Wisdom)

महाभारतात धर्मयुद्धासाठी अर्जुनाने श्रीकृष्णाला मागितले तर दुर्योधनाने श्रीकृष्णाचे सैन्य मागितले. बायबलमध्ये याच प्रकारची गोष्ट आहे.

"सुलेमान या युवकाला देव प्रसन्न होतो, देव म्हणतो, तुझ्या हृदयाला जे वाटेल ते माग. सुलेमान शहाणपणा मागतो. देव म्हणतो, ऐश्वर्य, कीर्ति, शत्रुचा पाडाव, दिर्घायुष्य यापैकी तु कांहीही न मागता तु तुझ्यासाठी शहाणपण मागितले. राज्य चालविण्यासाठी तुला ते हवे आहे ते मी प्रदान करीत आहे. "

या गोष्टीतील शहाणपणाचे स्पष्टिकरणच Spiritual Wisdomचे स्पष्टिकरण आहे .

"The fact that Solomon asked for (not just knowledge) but insight on how to apply the knowledge effectively, he was granted things like riches, wealth and honor. Why? -Because once you know what to do with what you have, the universe can entrust you with more. "

भगवतगीतेने याच शहाणपणाला आध्यात्मिक शहाणपण (बुद्धियोग) संबोधले आहे. ही ईश्वराची कृपा असते.

ददामि बुद्धियोगं तं येन मामउपयान्ति ते।
तेषां एव अनुकम्पार्थम् अहं अज्ञानजं तमः ।
नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेनभास्वता।।(१०-११)

प्रत्यक्ष युद्धाचे वेळी अर्जुन दुःखी होतो व धर्मयुद्धालाच पापकर्म ठरवितो. यासाठी अनुभवातुन ऐकलेले ज्ञान वापरतो. जे ज्ञान त्याची वर्तमानातील जबाबदारी पार पाडण्यास सक्षम नसते.

“We are made wise not by the recollection of our past, but by the responsibility for our future. ”

-George Bernard Shaw

भगवतगीतेने वर्तमानातील, भविष्यातील जबाबदारी पार पाडण्यास ज्ञान सांगितले. हे सर्व ज्ञान ऐकल्यानंतर याचा सार श्रीकृष्ण सांगतात, एकच संदेश देतात,

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः।
बुद्धियोगं उपाश्रित्य मत् चित्तः सततं भव।(१८-५७)

सार :

Spiritual wisdom, is not just about knowing what's good for you, but applying that knowledge into your everyday life. When you do that, this is when you know that you are truly wise.

*******

(१८-५८)

*************************

मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि।

अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रोष्यसि विनङक्ष्यसि।।

*************************

(१८-५८)/१:

"मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि"

(ईश्वर vs. अहंकार )

"Check your ego at the door. The ego can be the great success inhibitor. It can kill opportunities, and it can kill success. "

-Dwayne Johnson

*हे विश्व भवसागर जाणले तर जसे पाण्यात पडल्यानंतर पोहणे जमले तर तरतो, अन्यथा डुबतो. जसे डुबु नये यासाठी Lifejacket असते, तसे मनुष्य ईश्वराचा आश्रय करीत आलेला आहे. या जीवनात "तरणे " या संदर्भात वर्तमानातील Stability (State of mind) महत्वाची आहे, हा संदेश भगवतगीता देते. व

भवसागर पार करण्यासाठी याच ईश्वराची विकासमार्गातील (पोहण्यासाठी) भूमिका स्पष्ट करते.

मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि।
अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रोष्यसि विनङक्ष्यसि।।(१८-५८)

* अहंकार:

मनुष्याचे या विश्वात Strength व weakness या दोन्हीसह पदार्पण होते. Weakness वर मात करुन वर्तमानात Stability(विचलित न होणे) असणे महत्वाचे असते. १. प्रसन्नतेमुळे बुद्धि Stable असते, तर दुःखामुळे विचलित होतो. तसेच २. विकासमार्गावर प्रवास करीत असतांना विचलित होत नाही.

प्रसन्नचेतसो हि आशु बुद्धिः पर्यवतिष्ठते।(२-६५)
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ। (२-१५)

जीवन आहे तर प्रवास चालुच राहणार. येथे आलेला पशुही जगत असतोच. मनुष्य सुखी होण्यासाठी Survival of the fittest या

न्यायाने जगत असतो. जीवनात अडचणी येतात व याच अडचणीवर मात करण्यासाठी शोध होतो.

स्वतःच्या जीवनविकासमार्गाचे ज्ञान नसेल तर मनुष्य स्वतःचे तत्वज्ञान बनवतो. जीवनात अर्जुनाला अडचण जाणवली, विचलित झाला व युद्ध करणार नाही या भूमिकेला योग्य ठरविण्यासाठी स्वतःचे तत्वज्ञान बनवतो. अज्ञान असले तरी मीच बरोबर हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. येथे अहंकाराचा आश्रय असतो.

* ईश्वर:

ईश्वर कर्ता आहे हे जाणले व मान्य केले तर अहंकार सुटतो. हा भगवतगीतेचा संदेश आहे. याचेच स्पष्टिकरण भगवतगीता ज्ञानविज्ञानासह देते. संघटन, व्यवस्थापन या संदर्भात ईश्वर विश्वाचा अध्यक्ष असतो . विश्वात विविध समुह कार्यरत असतात. या विश्वातील Strength व Weakness यांचा शोध घेतांनाच ज्ञानविज्ञान जगासमोर आले.

विकासमार्गात (अमृतत्वाय कल्पते)आपले (व्यावहारिक) कार्य ईश्वराचेच कार्य जाणुन ईश्वराला समर्पित करतो, अर्थात ईश्वरभक्ति करतो.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः स भूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

सार:

विज्ञानाने जगात क्रांति केली हे सत्य संपुर्ण विश्व जाणते. ज्ञानविज्ञानाचा महासागर असतांना कोणत्याही प्रश्नावर उपाय करणे आता कठिण नसावे. मग अडचण कोठे आहे?

याचेच उत्तर भगवतगीता देते.

ज्ञानविज्ञानाचा संबंध मनुष्यजीवनात "ईश्वर vs. अहंकार" या विषयाशी आहे, याची जाणीव केवळ भगवतगीता देते . जगाने "ज्ञानविज्ञान" या संदर्भात याची दखल घेणे आवश्यक आहे.

"We are the only beings on the planet who lead such rich internal lives that it's not the events that matter

most to us, but rather, it's how we interpret those events that will determine how we think about ourselves and how we will act in the future. "

-Tony Robbins(American author, philanthropist, and life coach. )

*

******

१८. ५८/२:

"अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रोष्यसि विनङक्ष्यसि"

(अहंकार vs. ज्ञान)

अल्बर्ट आईंन्स्टाईन केवळ शास्त्रज्ञ नव्हते, तर दार्शनिक तत्वज्ञ पण होते. एक भागिला शुन्य बरोबर अनंत या गणिती सुत्राच्या आधारावर एक भागिला ज्ञान बरोबर अहंकार या सुत्राची ओळख आईंन्स्टाईनने दिली.

या सुत्रानुसार जितके ज्ञान कमी तितका अहंकार जास्त हे गणिती सुत्र बनते. यातील ज्ञान हा शब्द गुणात्मक आहे.
शिक्षणातील(शाळा, कॉलेजमधिल) ज्ञान संख्यात्मक असते. तर मनुष्य या जगात कसा interact करतो, याचा संबंध ज्या ज्ञानाशी येतो, ते गुणात्मक ज्ञान असते. जीवनमुल्ये वापरुन मनुष्य स्वतःची उंंची वाढवितो व अहंकारावर विजय मिळवितो. याच ज्ञानाची ओळख भगवतगीता करुन देते.

समाजात व्यवहार असतो. चांगले-वाईट, योग्य-अयोग्य असे भेद आपण ऐकत असतो. भगवतगीतेत ज्ञानी-अज्ञानी हा भेद वापरलेला आहे. अर्जुनाला आपल्या मार्गात संशय आला, पण याची कबुली न देता तो जी भूमिका घेतो, ती आदर्श भूमिका आहे, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. अज्ञानामुळे मनुष्य आपला दोष, अज्ञान कबुल न करता, मी योग्य आहे असे समजुन, आपली भूमिका योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी (संख्यात्मक) ज्ञान वापरतो. समाजात असेच भाष्य चालत असते. म्हणुन असे भाष्य Argumentचा मुद्दा नसतो. म्हणुन त्या भाष्यामागील भूमिकेचे (Intention) खरे स्वरुप श्रीकृष्णाने उघड केले.

मनुष्यजीवनांत दुःखाशी सामना करण्याचे क्षण

येतात. पण सुखाच्या अपेक्षेने दुःख टाळत प्रवास करण्याचा मनुष्याचा प्रयत्न असतो. हाच अर्जुनाचा प्रयत्न होता. म्हणुन युद्ध न करण्याची निवड करतो . अहंकाराचा आश्रय असल्यामुळे या भूमिकेला ज्ञानी भूमिका दर्शवतो. अर्थात अज्ञानी भूमिकेला ज्ञानी ठरवितो. नेमकी ही चुक केल्यामुळे "ज्ञान"challange होते. (What is wisdom?)

या भाष्याला प्रज्ञावाद संबोधले. हा ज्ञानाचा आश्रय नसुन अहंकाराचा आश्रय असतो. विश्वासासाठी ज्ञान हवे असते. म्हणुन ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी ईश्वराचा आश्रय

करण्याचे शास्त्र सांगितले. दुःखावर मात करण्यासाठी हे शास्त्र असते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

जसा एखादा मनुष्य जन्माने आंधळा असतो, यात त्याचा दोष नसतो, तसेच अहंकाराचा आश्रय अज्ञानाचे कारण असते. म्हणुन याच अज्ञानाची भगवतगीता ओळख करुन देते व जीवनांत ज्ञानाचा आश्रय यावर भाष्य होते.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।(४-३८)

ईश्वर ज्ञानविज्ञानाचा मुळ स्त्रोतआहे हे ज्ञानविज्ञानासह स्पष्ठ होते. मनुष्याचे जिवित तत्व शाश्वत ईश्वराचा अंश आहे. व शेवटी ज्ञानात अर्थात अनंतात विलीन होते (तमसो मा ज्योतिर्गमय). हेच शास्त्र भगवतगीतेचा आधार आहे.

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

मनुष्याला जीवनयात्रेत विकास करण्यासाठी कर्म साधन मिळालेले आहे. कर्म हा त्याचा अधिकार आहे. कर्माचे ज्ञानात विलिनिकरण हा जीवनविकासाचा हेतु मनुष्याची ज्ञानी भूमिका होण्यास मार्गदर्शन करते. याचसाठी शेवटी ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी ईश्वराचा आश्रय कि (default) अहंकाराचा आश्रय असे Option सांगितले.

मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि।

अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रोष्यसि विनङक्ष्यसि।।(१८-५८)

सार :

शब्दांतील गोंधळ मनुष्याला संभ्रमात टाकते. अहंकार, गर्व व आत्मविश्वास यामध्ये असाच गोंधळ होतो. गर्विष्ट व्यक्तिला अहंकारी संबोधण्यात येते. आत्मविश्वास नसेल तरी त्या व्यक्तिला निरअहंकारी संबोधण्यात येते. यामुळे खरा गोंधळ अहंकार व आत्मविश्वास यातच असतो. याच गोंधळामुळेअर्जुन स्वतःच्या intention ला स्वार्थी, लोभी असे lable लावतो व त्याला guilty feel होते. यामुळे निष्क्रियतेचे समर्थन करतो.

Selfish व Self interest या शब्दातील गोंधळ मिटविण्यासाठी सॅम्युअल स्माईल या स्का ॅटिश तत्वज्ञाने Self help हा शब्द योजिला. भगवतगीतेने स्वतः स्वतःचा बंधु व्हा, शत्रु बनु नका हा संदेश दिला. व याचसाठी "आत्मोन्नति "चे महत्व स्पष्ट झाले.

सुखाच्या अपेक्षेने दुःखावर मात करण्यासाठी Shortcut वापरणे . अज्ञानाचा स्विकार न करता अज्ञानाला ज्ञान दर्शविणे, या प्रक्रियेत स्वतःचा भ्रम होतोच पण इतरांचाही बुद्धिभेद होत असतो. याच प्रवृत्तिमुळे स्वतःला Mental Wellness चा अभाव(अशांती) असतो व समाजात नकारात्मकता पसरते. म्हणुन विद्वान असला तरी निष्क्रियतेचे समर्थन करुन समाजात बुद्धिभेद करु नये हा संदेश भगवतगीता देते.

न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम्।
जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान युक्ताः समाचरन् ।।(३-२६)
****

(१८-५८)/३ :
"मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि।
अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रोष्यसि विनङक्ष्यसि"
(ईश्वरज्ञानाश्रय)

१. ईश्वरज्ञान :
विश्वाचा अध्यक्ष अशी ईश्वराची ओळख भगवदगीतेने दिलेली आहे. स्वाभाविकच ईश्वराची शक्ति, त्याचे दिव्य कार्य(Design) जाणुन घेण्याची (भक्त, ईश्वरश्रद्ध) मनुष्याला उत्सुकता असते. विश्वाचे संचलन या संदर्भात ईश्वराची भूमिका स्पष्ट करतांना ज्ञानविज्ञानाची Theory भगवदगीता स्पष्ट करते. तरी ईश्वराचे दिव्यकार्य (Design), व मनुष्याचे कार्य हे रामायणातुन विविध प्रकारे स्पष्ट होते. हे ज्ञान (अनित्य- देहधारी)मनुष्याच्या अहंकाराचे हरण करते. आत्मविश्वास जागवते. मनुष्याला कार्यरत करते व हे कार्य ईश्वराचे जाणुन (निष्ठेने) करतो.

जन्मकर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ति तत्वतः।
त्यक्त्वा देह पुनर्जन्म नैति मामेतिसो अर्जुन ।(४-९)

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव।।(११-५५)

२. अहंकाराचे हरण :
भगवदगीता -

मत् चित्तः सर्वदुर्गाणि मत् प्रसादात् तरिष्यसि।
अथ चेत् त्वम् अहंकारात् न श्रोष्यसि विनङक्ष्यसि।(१८-५८)

रामायण-

सीतेचा शोध घेण्यासाठी वानरसेना निघते. तेंव्हा सम्पाति (गिद्ध) भेटतो. वानरसेनेला भयभित करतो. अंगद म्हणतो, जटायु सारखा धन्य नाही ज्याने ईश्वराचे(राम) कार्य करतांना प्राण त्यागले व परमधामाला पोचला. तेंव्हा सम्पाति अभय देतो व जटायुची

माहिती घेतो. जटायुचे कार्य ऐकुन सम्पाति म्हणतो, तुम्ही मला(जटायुला तिलांजलि देण्यासाठी) समुद्रापर्यंत घेवुन चला. बदल्यात तुमच्या सीताशोध कार्यात सहाय्य करेल .

"यावेळी सम्पाति म्हणतो, मी देहसंबंधी अहंकारामुळे सुर्याजवळ पोहोचलो. तेजामुळे पंख जळाले व कोसळलो. माझ्या अहंकाराचे एका मुनिने हरण केले.

"बहु प्रकार तेहिं ग्यान सुनावा।देह जनित अभिमान छडावा।"

श्रीरामाचे कार्य तुझ्या हातुन घडेल व पंख पुर्ववत होतील . हे वचन आज सत्य होत आहे. ( गिद्ध लांबचे पाहु शकतो. )सीतेचे लंकेतील निश्चित स्थान सांगतो. "

२. व्यवस्थापन :

रामायण :

याप्रमाणे समुद्राजवळ सर्व वानरसेना येते. पण समुद्र पार करण्यासाठी जरतरची भाषा(संशय) सुरु होते. (पार जाइ कर संसय राखा). तेंव्हा अंगद तयारी दर्शवितो. पण जांबुवन्त म्हणतो, तुझ्या योग्यतेबद्दल संशय नाही. पण तु सेनानायक आहे, तुला पाठविणे योग्य नाही.

रामायणातील Motivation

जांबुवन्त हनुमानाला त्याच्या शक्तिची आठवण करुन देतो.
(सूर्याजवळ जाण्याच्या घटनेमुळे स्वशक्तिचा विसर पडतो)

कहइ रीछपति सुनु हनुमाना।काचुप साधि रहेउ बलवाना ।।
पवन तनय बल पवन समाना।बुधि बिबेक बिग्यान निधाना।।(किष्किन्धाकाण्ड)

जगात असे कोणतेच कठिण कार्य नाही जे हनुमान करु शकत नाही. देहधारी असला तरी पवनसमान शक्ति आहे. बुद्धि, विवेक, विज्ञानाची खाण आहे. याप्रमाणे जाम्बुवन्त Motivation करतो.

तेंव्हा हनुमानाची शक्ति पुर्ववत जागृत होते व दुत म्हणुन निश्चित काय करायचे या संदर्भात जांबुवन्त म्हणतो, तु फक्त सीतेला पाहुन बातमी दे.

यानंतर श्रीराम सर्व वानरसेना सोबत घेवुन राक्षसाचा संहार करतील. व सीतेला स्वतः सोबत घेवुन येतील. याप्रमाणे

जाम्बुवन्त स्वतः श्रीराम, नायक, दुत यांच्या कार्याची निश्चित भूमिका स्पष्ट करतो.

भगवदगीता :(ईश्वराचेकार्य व भक्ति )

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिःभवति भारत।(४-७) धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।(४-८)

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व
जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् ।
मया एवैते निहताः पूर्वमेव
निमित्तमात्रं भव स व्यसाचिन् ।।(११-३३)

***********

(१८-५९)

*************************

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।

मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वां नियोक्ष्यति।।

*************************

(१८-५९) /१ :

"यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे"

(The Third Option)

अर्जुनासमोर असा विचित्र प्रसंग उभा होतो, कार्य केले तर शोक व न केले तर अपराधिक भावना!अर्थात येथे दोन Option असतात,

१. ठरल्याप्रमाणे (नियत)कार्य करणे किंवा

२. निष्क्रिय राहणे.

म्हणुन या स्थितितील Tie सोडविण्यासाठी अर्जुन निष्क्रिय राहण्याचे Option स्विकारतो. याच प्रश्नावर भगवतगीता ज्ञानाचे द्वार उघडते.

"The significant problems we face cannot be solved at the same level of thinking we were at when we created them. "
~ Albert Einstein

न हि कश्चित् क्षणम् अपि जातु तिष्ठति अकर्मकृत् ।
कार्यते हि अवशः कर्म सर्वः प्रकृतिः जैर्गुणे।।(३-५)

कार्य घडणे ही प्रकृतिची क्रिया आहे. अहंकाराचा आश्रय असल्यामुळे या जगी कार्य करण्याचे तु ठरविले काय किंवा न ठरविले काय, कार्य घडणारच आहे.

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।
मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वां नियोक्ष्यति।।(१८-५९)

समाजात इतरांनी काय करावे वा करु नये याविषयी सहज भाष्य होते. पण स्वतः काय काय करावे याविषयी संभ्रम आला तर ते स्वतःचेच अज्ञान ठरते. म्हणुन हा Tie सोडविण्यासाठी भगवतगीता तिसरे Option देते.

Professional कार्य, स्वधर्म व कर्मयोग:

योगक्षेमासाठी मनुष्य Professional कार्य करतो, हे व्यक्तिचे दायित्व असते.

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो हि अकर्मणः।
शरीरयात्रा अपि च तेन प्रसिद्धयेत् अकर्मणः॥(३-८)

आधुनिक ज्ञानविज्ञानाचे शिक्षण, उद्योगप्रधान व्यवस्था यामुळे समाजव्यवस्थेत बदल घडुन आलेत व Employment शब्दाला महत्व आले. HRD संदर्भात Employment शासकिय नीतिचे दायित्व ठरले. थाॅमस कार्लायल म्हणतो, प्रस्थापित व्यवस्थेत ज्याला आवडीचे कार्य (स्वभावनियत) करण्याची संधी "Professional कार्यात" मिळाली त्याला ईश्वराकडुन कांहिही मागण्याची गरज उरत नाही. तर स्वधर्म या संदर्भात श्रीकृष्ण म्हणतात, आवडीचे (सहजकार्य) कार्य धर्मकार्य करण्याची संधी मिळणे, हे स्वर्गद्वार आहे.

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारम् अपावृतम् ।(२-३२)

याप्रमाणे स्वतःला कार्यरत करण्याचे दायित्व स्वतःचे असते.

कार्याचे "तिसरे Option" या संदर्भात कर्माची बुद्धियोगनिष्ठा महत्वाची आहे.

यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदं ततम् ।
स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः॥(१८-४६)

सृष्टिची मुळ प्रवृत्ति व (त्याचा कर्ता पुरुष व अंतिम धाम)ईश्वर याचे ज्ञान जाणुन जीवनविकासाचा महामार्ग (अमृतंगमय) जाणणे. या मार्गावर कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य करणे. या प्रक्रियेत

-ईश्वराचा आश्रय अहंकाराला replace करते.

-कार्य निष्ठेने घडते, म्हणुन कार्याचा पक्का निश्चय असतो.

कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य करणे हेच जाणण्यालायक "कार्यकौशल्य" ज्ञान(योगः कर्मसु कौशलम् ) आहे. हाच गुणात्मक ज्ञानाचा महत्वाचा भाग आहे.

अर्जुनासमोर आता तीन Options येतात.

१. निष्क्रिय राहणे.

२. ठरल्याप्रमाणे राज्यप्राप्ति हेतुने कार्य करणे.

वरील दोन्ही Option सकाम स्थितित असतात. म्हणुन प्रकृतिवश अवस्था बनते. या अवस्थेतच त्याला Tie येतो. केले तरी शोक, न केले तर चुक!म्हणुन तिसरे Option:

३. ईश्वरभक्तिसाठी कार्य करणे. ईश्वराने सोपविलेले कार्य निष्ठेने (निष्काम)करणे. (आत्मनो मोक्षार्थ जगत् हिताय च)

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्ताः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेतिपांडव॥(११-५५)

********

(१८. ५९)/२:

"मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वाम् नियोक्ष्यति"

(Men argue and Nature acts)

आज जगात ज्ञानविज्ञान आले. याचा आश्रय करुन ज्ञान बोलल्या जाते. पण जे प्रत्यक्षात घडते, तेच वास्तव असते.

जगातील मानव विकासाच्या इतिहासात "धर्म, ज्ञानविज्ञान यांचे योगदान " या संदर्भात संस्कृतित दोन महत्वाचे पैलु आढळतात,
१. आज्ञा संस्कृति(Obey) व
२. निर्णय संस्कृति(Reasoning)

वरील दोन संस्कृतिचे संदर्भात तत्वज्ञ निट्झिने Herd morality व Master morality असे वर्गिकरण केले. धर्म या संदर्भात "आज्ञा "संस्कृतिचे प्राबल्य (To obey the order of God) याचा प्रभाव highlight होतो. युरोपमध्ये ज्ञानविज्ञानामुळे १५वे शतक Age of reasoning म्हणुन घोषीत केले.

मानवी संस्कृतित या दोहोंचा समन्वय साधलेला असतो. यामुळे परस्पर सहकार्य, व्यक्तिगत विकास साध्य होतो. याचा आदर करुनच भगवतगीता जीवनविकास या संदर्भात स्वतःच्या मार्गाला व याद्वारा निर्णय संस्कृतिला highlight करते.

जगात घटना घडतात. कुणी काय करायला नको होते व काय हवे होते?यावर वर्तमानात सहज भाष्य होते. "रामायणात मायावी हरिणासाठी सीतेचा आग्रह असतो. तीच्या समाधानासाठी श्रीराम हरिणाचा पाठलाग करतात व सीतेचे हरण होते. "या घटनेत स्त्रीहट्ट जाणुन श्रीरामाने जायला नको होते, !अशा स्वरुपाचे भाष्य आपण ऐकत असतो.

मनुष्य भाष्य(Argument)करतो व निसर्गात घटना घडत असतात. "Man argue Nature acts. "

भूतकाळात जी चुक जाणवते, वर्तमानात सुधारायला हवी हे अपेक्षित असते. अर्थात वर्तमानात ज्ञान उपलब्ध असते. तरी निष्क्रियतेचे समर्थनभाष्य "ज्ञानी" या भूमिकेत चालत असते. मानवी जीवनातील याच मुद्याला भगवतगीता प्रकाशात आणते, व निर्णयसंस्कृति highlight करते. यासाठी मानवी जीवनाचे ज्ञानविज्ञान highlight झाले आहे. यात प्रकृतिची(निसर्ग) भूमिका, ईश्वराची भूमिका, मनुष्याची भूमिका स्पष्ट होते.

आपल्या जीवनातील घटनांवर नियंत्रण कुणाचे?हे जाणुनच मनुष्य स्वतःचा निर्णय करीत असतो. मनुष्य स्वभावप्रकृतिने बद्ध आहे.

या प्रकृतिला वश राहुनच कार्य घडत असते. युद्धात नियतकार्य स्विकारले तरी स्विकारलेले कार्य शोकप्रद आहे हे जाणुन अर्जुन " मी युद्ध करणार नाही अशी भूमिका घेतो. निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी ज्ञान वापरतो. या अवस्थेत अहंकाराचा आश्रय असतो.

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।

अहंकार विमुढात्मा कर्ता अहम् इति मन्यते॥(३-२७)

जसे यंत्र उर्जेवर चालते. तसे या निसर्गाच्या कारखान्यात मनुष्याच्या हृदयी असलेले ईश्वरतत्व जीवनाला चालवित असते.

भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।(१८-६३)

अर्थात नियंत्रक प्रकृति(निसर्ग)नसुन ईश्वर(Supreme controler) असतो. अधिदैव या अर्थानेही ईश्वराची ओळख भगवतगीता देते(पुरुषश्च अधिदैवतम्). मनुष्याच्या जीवनात जे (प्रिय, अप्रिय) घडते, त्याला व्यवहारात दैव म्हणुन जाणतो. म्हणुन अधिदैव, दैवाचा Supreme नियंत्रक ईश्वर ठरतो.

दैवाचा संदर्भ घेतला तरी (अधिदैव) ईश्वर Supreme, ज्ञानविज्ञान संदर्भ घेतला तरी (ज्ञाने परिसमाप्यते)ईश्वर ज्ञान(स्त्रोत), धर्म संदर्भ घेतला तरी ईश्वर (तद् धाम परमं मम् ) अंतिम लक्ष्य. याप्रमाणे कोणताही संदर्भ घेतला तरी विश्वाचा Supreme शाश्वत ईश्वर ठरतो. हेच सत्य भगवतगीतेने स्पष्ट केले.

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।

तत् प्रसादात् परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।।(१८-६२)

अर्थात जीवनमार्गात ईश्वराची भूमिका जाणुन कार्याचा निश्चय, कार्याद्वारे भक्ति, निष्काम कर्म याचे महत्व जाणुन विकासमार्गावर असणे व शांति अनुभवणे .

प्रकृतिवश कार्यरत असणे(Operated by senses mind/Lower Self) व आत्मवश कार्यरत असणे (Operated by True/Higher Self) यांतील भेद जाणुन निर्णय करायचा असतो. अर्थात जीवननाव वाऱ्याने वाहणे व नावेवर command घेवुन वल्हवणे यांतील भेद कळतो. हेच ज्ञान भगवतगीता याप्रमाणे highlight करते.

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)

******

(१८-६०)

*************************

स्वभावजेन कौंतेय निबध्दः स्वेन कर्मणा।

कर्तुं न इच्छसि यत् मोहात् करिष्यसि अवशोअपि तत् ।।

*************************

(१८-६०)/१:

"स्वभावजेन कौंतेय निबध्दः स्वेन कर्मणा"

(प्रकृति vs ज्ञान)

भगवतगीतेत जन्म-मृत्यु या संदर्भात अशाश्वत vs शाश्वत हा विषय आलेला आहे. "अशाश्वत vs शाश्वत" याच विषयाच्या अनुषंगाने प्रकृति vs ज्ञान;अहंकार vs ज्ञान;अहंकार vs ईश्वर या विषयावर प्रकाश टाकलेला आहे. अहंकार vs ज्ञान या विषयातुन अहंकार vs आत्मविश्वास;अहंकार vs अधिकार यांतील भेद स्पष्ट झाला आहे.

प्रत्येक मनुष्य स्वभावप्रकृतिनुसार जगत असतो. कार्यरत असतो.

स्वभावजेन कौंतेय निबध्दः स्वेन कर्मणा।(१८-६०)

प्रकृति याच संदर्भात म्हटले आहे, विद्वान असो कि चांगला, तोही स्वभावप्रकृतिनुसार जगत असतो व जीवनमार्ग चालतो.
सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृते ज्ञानवानअपि।(३-३३)
...
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

याच मार्गात प्रकृति द्वंद्वाचे जाळे हा Barrier तयार करते. व मार्गावरुन घसरतो. हीच अर्जुनाची अवस्था दर्शविली आहे. दुःख टाळण्यासाठी वास्तव न स्विकारता नियतकार्य टाळतो.
निष्क्रियतेचे समर्थन करण्यासाठी "ज्ञान" वापरतो व अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. हाच अहंकार ठरतो. याच अहंकारामुळे चुकीचे विचारही conditioned झालेले असतात.

ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे हा भगवतगीतेचा संदेश आहे. ज्ञानानेच प्रश्न सुटतात. मार्गातील संशय दुर होतो. म्हणुन जीवनात अज्ञान व ज्ञान यातील भेद जाणणे आवश्यक असते.

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

मनुष्यजीवनात अहंकाराचा आश्रय असतो. यामुळेच अज्ञानाला ज्ञान समजतो व मोह पावतो. याद्वारा ज्ञानी अवस्था vs अज्ञानी अवस्था यांतील भेद स्पष्ट होतो. ज्ञानी अवस्थेत दुःखाने विचलित होत नाही, अडचणी विकासाच्या संधि जाणतो. म्हणुन जीवनात ज्ञानाचा आश्रय होण्यासाठी भगवतगीता जीवनाचा विकासमार्ग सांगते.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

या मार्गात ईश्वराचे जीवनाशी असलेले नाते भगवतगीता सविज्ञान स्पष्ट करते. हे नाते जाणुन मार्ग "अमृतंगमय" होतो. याचसाठी बुद्धिभ्रम vs बुद्धियोग स्पष्ट होतो. या मार्गावर नियतकार्य "स्वधर्म" जाणतो. निर्णयअधिकार जाणतो. हाच अधिकार वापरुन कार्याचा दृढनिश्चय करतो. याद्वारे कार्य ईश्वरभक्ति(Towards Goal) साठी (समर्पण, योगासाठी- निष्काम कर्म)होते. यामुळे निर्भय होतो व आत्मविश्वासाने मार्ग चालतो.

"Great thoughts speak only to the thoughtful mind, but great actions speak to all mankind. "

Theodore Roosevelt

*******

(१८. ६०)/२:

"कर्तुं न इच्छसि यत् मोहात् करिष्यसि अवशोअपि तत् "

"जीवनविकास या संदर्भातील Empowerment"

Que Sera sera! Whatever will be, will be!डॉरिस डे या अमेरिकन गायिकेचे हे प्रसिद्ध गाणे किंवा "ठेवीले अनंते तैसेची रहावे, चित्ती असु द्यावे समाधान" हे संदेश वर्तमानातील सुखशांती संदर्भात आहेत. याच संदर्भात भगवतगीतेतील हा महत्वाचा संदेश जाणुन घ्यायचा आहे.

मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वाम् नियोक्ष्यति।(१८-५९)
कर्तुं न इच्छसि यत् मोहात् करिष्यसि अवशोअपि तत् (१८-६०)
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।(१८-६१)

या सृष्टिचे संचलन प्रकृतिचा खेळ व ईश्वराची शक्ति( उर्जा) याद्वारा होत असते. प्रकृतिच्या या कारखान्यातील सर्व यंत्रांना ईश्वराची उर्जा चालवित असते. हेच प्रकृति व ईश्वर यांचे ज्ञान विज्ञानासह भगवतगीता स्पष्ट करते. जीवनप्रवासातील विकास या संदर्भात आत्मोन्नति, Empowerment याचे रहस्य स्पष्ट होते.

जे घडले ते घडणारच होते व जे घडणार ते घडणारच!हे सर्व घडत असतांना आपले attitude जसे असते, तेच आपले व्यक्तिमत्व (State of Mind) घडवीत असते! वर्तमानातील सुखशांतिसाठी हेच महत्वाचे कारण ठरते.

जीवनात सुखदुःख असते. सुखामुळे शक्ति अनुभवतो पण दुःखामुळे दुर्बलता अनुभवतो. याच दुर्बलतेवर मात करण्यासाठी अर्जुन स्वतःला Empower करण्याचा प्रयास करतो:

*युद्ध टाळले तर दुःख होणार नाही म्हणुन युद्ध न करणे ही निवड करतो.

*मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी युद्ध करणे चुकीचे आहे हा Stand घेतो.

*समर्थनासाठी उपलब्ध ज्ञानाचा वापर करतो.

स्वतःला Empower करण्यासाठी हा सर्व प्रयास असतो. पण या दुर्बलतेला सक्षम दर्शविण्याचा हा प्रयास ठरतो. या प्रयासात अज्ञानाला ज्ञान संबोधतो. "ज्ञान" या संदर्भात ही उलट प्रक्रिया आल्यामुळे "ज्ञान" हाच विषय भगवतगीता स्पष्ट करते व चांगलेपणा दुर्बलता नसुन शक्ति असते. हा महत्वाचा संदेश देते.

संशयात्मा विनश्यति।

ज्ञानसंच्छिन्न संशयम।

याद्वारा ज्ञानाचे महत्व सांगते व याच अनुषंगाने मनुष्यजीवनाचे संपुर्ण ज्ञान विज्ञानासह स्पष्ट करते. यात ज्ञानासह प्रकृतितील कर्माची भूमिका स्पष्ट करते.

योगसंन्यस्त कर्माणं। (कर्माद्वारे Empowerment)

*कर्म या संदर्भात युद्ध करणे योग्य कि अयोग्य या संशयाचे वास्तव अर्जुन कबुल करतो. कर्म भोगऐश्वर्याचे सुख प्राप्तिसाठी आहे. मला कांही नको ही अर्जुनाची भूमिका असते. अहंकारामुळे

स्वतःला Empower करण्यासाठी दुर्बलतेला सामर्थ्य घोषीत करतो. म्हणुन "अहंकार आश्रय vs ईश्वरज्ञान" यातील भेद स्पष्ठ केला आहे.

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।(१८-५९)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।(१८-६१)

ईश्वराचा आश्रय असल्यामुळे बुद्धियोग प्राप्त होतो. "बुद्धियोग vs. बुद्धिभ्रम "यातील भेद स्पष्ट होतो. तसेच अमृतंगमय हा शाश्वत विकासाचा(आत्मोन्नति) मार्ग जाणतो. या मार्गावर विश्वासाने कार्यरत होतो.

*स्वधर्म Tiebreaker असतो. नियतकार्यावर स्वतःचे approval असते. अर्थात स्वतंत्रता असते. स्वधर्माचरण म्हणजे ईश्वराला कर्मसमर्पण . ज्ञानकर्मसंन्यास अर्थात कर्म अकर्म होणे.

*निर्णयअधिकार मनुष्याचे Bornfree resource आहे. स्वातंत्र्याची हीच मुलभूत प्रेरणा ठरते. (Beggars are not choosers). याचमुळे कार्याचा दृढनिश्चय होतो. चंचलत्वामुळे दृढता नसते. जीवनमुल्यामुळे (स्वावलंबन, वचन, स्वधर्म,

बुद्धियोग इ. ) दृढता असते. "योगः कर्मसु कौशलम् "
(Empowerment)याद्वारा निष्काम कार्याचे महत्व कळते.

याप्रमाणे जीवनात सुखशांति अनुभवण्यासाठी बुद्धिवरील संस्कार व कार्यसंस्काराचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते.

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतः शांतिः अशांतस्य कुतः सुखं॥(२-६६)

अर्थात सुखशांतिसाठीच जीवनविकास या संदर्भातील Empowerment चे निश्चित ज्ञान भगवतगीता स्पष्ट करते.

******

(१८-६१)

*************************

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।

भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया॥

*************************

(१८-६१) /१:

" ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति"

(Part I- God, The Barrier breaker)

जीवनात विकासाला महत्व असते. या अर्थाने जीवन विकासमार्गच असते, मग हा विकास ऐश्वर्याचा असो, Creativityचा असो, Innovator व्यक्तिमत्वासाठी असो. या मार्गात Barriers(Weakness) कोणते?Motives(Strength) जाणले तरच खऱ्या अर्थाने विकासमार्गावर जीवनयात्रा घडते.

प्रकृति(जड) व पुरुष(चेतन, शाश्वत Energy) या दोहो मिळुन जीवित सृष्टि बनलेली आहे. जीवनात जग कळते, जीवन कळते, जीवंत तत्वही कळते पण मनुष्य जीवंत तत्वाला विसरतो व प्रकृतित लिप्त होतो. मृत्यु कळतो पण अमृत कळत नाही.

प्रकृति यंत्राप्रमाणे कार्यरत असते. पण जसे यंत्र Power शिवाय संचालित होत नाही तसेच जीवनात जीवंत तत्वाची Powerची भूमिका असते.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया ॥(१८-६१)

प्रकृतित इच्छा(State of want)-कार्य(State of Art) असते. कार्याद्वारे शरीरयात्रा चालते, इच्छापुर्ति होते. जीवनात काय साध्य करावयाचे, केले या आधारावर त्याचे विकासमार्गाचे ज्ञान असते. याच ज्ञानानुसार अर्जुन भावी दुःखामुळे गोंधळतो. निष्क्रियतेचे समर्थन करुन त्यालाच विकासमार्ग ठरवितो.

येथे इच्छा "काम" मध्ये, कार्यातील द्वंद्वात परिवर्तित होते. व निष्क्रियतेचे समर्थन करतो. इच्छेची अतृप्ति दुःख, चिंता, भय निर्माण करते हे आपण जाणतो. म्हणुन जीवनाच्या विकासमार्गात Barrier तयार होतो.

मनोविज्ञान विकासमार्गातील " State of want - कार्य" या संदर्भात Desire, want, need, interest, motives अशा विविध पातळीवर अभ्यासाअंति कार्यातील

Barrierकोणते?Trap कोणता? व त्यावर उपाय( Barrier breakers)सांगते.

भगवतगीतेने म्हणुनच इच्छानिर्मित "काम" ला barrier म्हटले ("जहि शत्रु महाबाहो कामरुपम् दुरासदम् "अर्थात Desires have no limitations)
व कार्यातील द्वंद्वाला Trap म्हटले.
(तयो न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ")

या आधारावर "मृत्योर्मा अमृतंगमय" हा शाश्वत विकासमार्ग सांगते व कार्याद्वारे ईश्वरभक्ति याचे रहस्य सांगते. याद्वारा जीवंत तत्वाची विकासात भूमिका स्पष्ट करते. या संदर्भात शरीर कार्य(क्षेत्र )व क्षेत्राला जाणणारा क्षेत्रज्ञ म्हटले. जीवनाचा क्षेत्रज्ञ मनुष्य स्वतः असतो. व सर्व (जग)क्षेत्राला जाणणारा क्षेत्रज्ञ ईश्वर असतो. याप्रमाणे मनुष्याचे ईश्वराशी नाते स्पष्ट होते. व (मोक्षाचा)विकासमार्ग जाणतो. हा मार्गच Barrier breaker ठरतो.

क्षेत्रक्षेत्रज्ञ योः एवं अंतरं ज्ञानचक्षुषा।

भूत- प्रकृति- मोक्षं च ते विदुः यान्तिः ते परम् ॥(१३-३५)

Life isn’t about finding yourself. Life is about creating yourself. ”

~G. B. Shaw

***********

(१८-६१)/२ :

"ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति"

( Part II-Survival life vs. Higher life)

एखादा कारखाना चालतो, तसे हे जग कारखान्याप्रमाणे सुरु असते. कारखान्यातील यंत्रे उर्जेवर चालत असते, तसेच मनुष्यजीवन जीवित तत्वातील ईश्वर या उर्जेवर चालत असते.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।

भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया॥(१८-६१)

येथे यंत्र प्रकृति व उर्जा ईश्वर म्हटले आहे. उर्जेमुळेच स्मृति असते अर्थात ज्ञान असते. शाश्वत उर्जा ज्ञानाचा स्त्रोत ठरते.

(जीवंतपणामुळेच जाणिव असते) . मग जीवन कोण चालविते प्रकृति(यंत्र) कि( ईश्वर )जाण असलेली उर्जा?

प्रकृति यंत्रवत कार्यरत असते. मधमाशी मधनिर्मिति करते, यासाठी कोणतेही ज्ञान( Training) घेतले नसते. प्रकृतिची ती देण असते. या सृष्टित सर्व लोक आपापल्या प्रकृतिनुसार, स्वभावगुणानुसार जगत असतात.

सदृशं चेष्टते स्वस्या प्रकृतेः ज्ञानवान अपि।(३-३३)

श्रेष्ठत्व किंवा विकास या संदर्भात जीवनातील चांगलेपण असो, ज्ञान असो, जशी Belief system असते तसा जगतो. अर्जुन असेच जीवन जगत असतांना युद्धक्षेत्रावर दुःखी होतो. दुःख टाळण्यासाठी निष्क्रियतेचे समर्थन करतो. समर्थनासाठी आपल्या श्रेष्ठत्वाच्या Belief system नुसार ज्ञान वापरतो. याचाच अर्थ जीवनविकासात पुढचे पाउल कळत नाही. येथे द्वंद्वाच्या जाळ्यात अडकतो. म्हणुनच हे Survival life ठरते (Higher life ठरत नाही). म्हणुनच जगात लोकांनी ज्यांना श्रेष्ठ ठरविले असते, ते पण हताश झालेले( अशी अनेक उदाहरणे) आढळतात.

विकासमार्गात कार्य प्रकृतिची strength आहे, तर द्वंद्व weakness ठरतो.
तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

*श्रेष्ठ जीवन (Higher life) काय आहे, यावर श्रीकृष्ण भाष्य करतात.
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

अर्थात जीवनात शाश्वत व अशाश्वत ही दोन तत्वे जाणुन विकासमार्ग अशाश्वताकडुन शाश्वताकडे(मृत्योर्मां अमृतंगमय) ठरतो.

जीवन आणि मृत्यु या संदर्भात ही दोन तत्वेच (अशाश्वत-शाश्वत) विकासमार्ग ठरविण्याचे Logic भगवतगीता स्पष्ट करते. ज्याचा नाश होत नाही ते सत व जे नाशिवंत(अल्पकाळ) ते असत्. या तत्वावर सत-असत या दोहोतुन सत जाणुन ज्ञानी विकासमार्गावर कार्यरत असतो. या तत्वावर निष्काम कर्म शास्त्र आहे(अशाश्वताचे non attachment)

न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः।
उभयोः अपि दृष्टो अन्तः तु अनयोः तत्वदर्शिभिः (२-१६)

विकासमार्गात (शाश्वत)ईश्वराचा आश्रय जाणला नाही तर अहंकाराचा आश्रय असतोच. ही प्रकृतिवश अवस्था असते. यामुळे यंत्र(प्रकृति) स्वतःला कर्ता समजते. दुःख टाळण्यासाठी जे समर्थनभाष्य बोलतो त्याला ज्ञान दर्शवितो (स्वमतांध). पण हे Survival life चे ज्ञान असते.

अज्ञान तमस(अंधार) ठरते तर ज्ञान प्रकाश असतो. म्हणुन ज्ञानाचे संदर्भात हे जीवन अंधाराकडुन प्रकाशाकडे (तमसो मा ज्योतिर्गमय) असा प्रवास करीत असते. म्हणुन जीवनात मार्गाला प्रकाशित करणाऱ्या ज्ञानाचा आश्रय आवश्यक असतो.

याप्रमाणे जीवनविकासमार्गात ईश्वराचा आश्रय जाणणे, अनुभवणे म्हणजेच शाश्वताचा आश्रय, ज्ञानाचा आश्रय, कल्याणाचा(सत) आश्रय असतो. या मार्गात शांति अनुभवतो. (अशाश्वताचे attachment कारण असलेल्या)दुःखाने विचलित होत नाही. (समुद्रशांति)

आपुर्यमाणम् अचल प्रतिष्ठम् समुद्रम् आपः प्रविश्यन्ति यद्वत् ।(२-७०)

********

(१८-६१)/३:"भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया"

व्यवहार vs स्वतःचा विकास(SELFHELP):

समाजात व्यवहार असतो, तसेच स्वतःचा विकास असतो. काय हवे?काय करावे?या संदर्भात जेंव्हा इतरांना Challange करणारे भाष्य होते तेंव्हा तो व्यवहार असतो.

व्यवहारानुसार महाभारतात धर्मयुद्ध ठरते. पण प्रत्यक्ष कृती करतांना युद्ध करणे योग्य वा अयोग्य या प्रश्नाने अर्जुन संभ्रमित होतो व सरळ युद्ध न करणे ही निवड करतो.

चांगलेपणाची निष्क्रियता व स्वमतांधतेचे भाष्य या संदर्भात स्वामी विवेकानंदांनी Paradize lost मधील सैतानाचे उदाहरण दिले. सैतान आत्मविश्वासाने लढत असतो व लढतच मृत्यु पत्करतो. याउलट समाजातील कथित चांगल्या मनुष्याची(संशय, भयामुळे) निष्क्रियता समाजातील शोकांतिका ठरते.

भाष्य Communicationचे साधन असते. जसे पाणी उताराकडे वहाते, तसा जीवनप्रवाह असतो, या प्रवाहात मनुष्य योग्य समजुनच कार्यरत असतो. पण कार्यात संशय आला, निष्क्रिय झाला तरी अर्जुन योग्य आहे हे समजुनच समर्थन करतो. येथे वास्तव न स्विकारता सरळ निष्क्रिय होतो, अज्ञान न स्विकारता सरळ उपलब्ध ज्ञानाचा आधार घेवुन स्वतःला ज्ञानी समजतो. यामुळे स्वतःच्या विकासाला खिळ बसते. येथेच भगवतगीता पारदर्शकता आणते.

अर्थात स्वतःचे वास्तव न स्विकारता निष्क्रियतेचे समर्थन करणे ही स्थिति स्वतःच्या विकासाला challnge असते. म्हणुन भाष्यात वास्तवाची पारदर्शकता येणे आवश्यक असते.

स्वतःचा विकास(SELFHELP)

"The spirit of self-help is the root of all genuine growth in the individual. "

Samuel Smiles

मनुष्याला सुखशांति हवी यासाठीच कार्यरत असतो, ईश्वराला भजतो. सुखशांति या संदर्भात व्यावहारिक सुख व

(शाश्वत)आत्मिक सुख असे दोन भाग जाणले तर भगवतगीता या दोहोंचा समन्वय साधते ज्यात कार्य साधन असते. व्यावहारिक सुखात प्राप्तिसाठी कार्य अर्थात गरजा, इच्छा हा हेतु असतो म्हणुन कार्यरत असतो. तर आत्मिक सुख(योग, दुःखान्त) कार्याद्वारे योग अर्थात exercise ठरते.

भगवतगीतेनुसारच कार्य ठरणे हा व्यवहार होता तर प्रत्यक्ष कृती करतांना कार्याद्वारे योग ही exercise साध्य करणे हा आत्मिक विकासाचा(आत्मोन्नति) भाग असतो. याचसाठी Transformation आहे.

Transformation

"The perennial wisdom of the Bhagavad Gita can teach us how to transform our character, conduct and consciousness to meet the challenges of everyday life. "

-C Leonard Perlmutter

विश्व हा ईश्वराचा कारखाना जाणला तर ईश्वर प्रकृतिचा अध्यक्ष असतो. यंत्रावर फिरविल्याप्रमाणे जगाला संचलित ठेवतो. याच ईश्वराचा वास हृदयी असतो व त्यामुळे जीवन संचलित असते.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।(१८-६१)

अहंकार vs ईश्वर

अज्ञानामुळे अहंकाराचा आश्रय असतो.
अहंकार विमुढात्मा कर्ताहम् इति मन्यते।

आत्मिक सुखासाठी ईश्वराचा आश्रय म्हटले तर हा आश्रय ज्ञानाचा असतो. ज्ञान या संदर्भात ईश्वराची ओळख झाली तर अज्ञानाचा स्विकार होतो(वास्तव स्विकारतो) . विकासमार्ग (अमृतत्वाय कल्पते) जाणतो. या मार्गावर नियतकार्य स्वधर्मात transform होते. निर्णयाचा अधिकार जाणतो. कार्याचा दृढनिश्चय होतो. कार्य विश्वासाने व निष्ठेने करतो. अर्थात जीवनयात्रेत ईश्वराचा आश्रय (व्यावहारिक सकाम कार्य निष्काम कार्यात )transformation करते.

******

(१८-६२)

*************************

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।

तत् प्रसादात् परां शांतिम् स्थानम् प्राप्स्यसि शाश्वतम् ।।

*************************

(१८-६२)/१

: "तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत"

प्रकृति(सृष्टि, जगत) व पुरुष(शाश्वत तत्व-Energy, प्राणतत्व)या दोहोद्वारे सृष्टिचक्र प्रवर्तित असते. मनुष्याचे जीवन संचलित असते.

भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।(१८-६१)

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।(१८-६२)

म्हणुन नित्य ईश्वराला शरण असणे अर्थात जीवनाचे व्यवस्थापनातील भूमिका जाणुन व्यवस्थापनाला ईश्वराशी जोडणे.

* "ज्ञान" या संदर्भात

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

अर्थात अज्ञानामुळे मोहित होतो म्हणुन ज्ञानाने संशय छेदणे व विकासासाठी(भक्तिसाठी)मार्ग दृढ करणे.

ज्ञानसंच्छिन्न संशयम् ।(४-४१)

सर्वकर्माचे अखेर ज्ञानातच विलिनीकरण होते.

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

*"कर्म" संदर्भात

एवं प्रवर्तितं चक्रं न अनुवर्ततीय यः।

अघायु इंद्रियरामः मोघं पार्थ स जीवति।।(३-१६)

सृष्टिचक्राचे रहस्य जाणुन भक्त माझेच कार्य मला समर्पित करण्यासाठी करतो.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्ताः संगवर्जितः।(११-५५)

सृष्टित घटना घडतात. कार्य घडते. या घटनांना "मी" जोडतो, तेंव्हा मर्यादा जाणवते. नकारात्मक होतो. पण ईश्वराशी जोडतो, तेंव्हा स्वतः निमित्त(Instrument) जाणतो. अनासक्त असतो. म्हणुन

"माम अनुस्मर युध्य च "(८-७)

अर्थात Lower conscious(Senses मन) व Higher conscious(Spirit मन) यांतील Internal Battle जाणणे. व ईश्वराला स्मरुन जेता होणे.

* "भक्ति" या संदर्भात

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-

अर्थात दुःखमुक्तिसाठी भक्ति व याद्वारे निर्भय होणे.

योगसंन्यस्त कर्माणं (४-४१)

(अ)मार्ग

Destination: तद् धाम परमं मम् (८-२१)

म्हणुन अमृतंगमय मार्ग असतो. सुखदुःख जीवनाचाच भाग असतो. दुःख Upstepping साठी संधि असते. म्हणुन या (अमृतंगमय)मार्गावर दुःखामुळे भ्रम होत नाही.

समदुःखसुखंधीरं सो अमृतत्वाय कल्पते।(२-१५)

(ब) Shifting/Transformation

अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो व यालाच ज्ञान संबोधतो. येथेच त्याच्या अज्ञानाचे निदान होते. जीवनविकास ज्ञान जाणतो. म्हणुन त्याची दुःखी अवस्था Upstepping चा इशारा असतो. अर्थात

हे Upstepping अर्जुनासाठी Shift of consciousness असते.
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।(८-२७)

********

(१८-६२)/२

"तत् प्रसादात् परां शांतिम् स्थानम् प्राप्स्यसि शाश्वतम् "

(परिस्थितिला शरण कि परमात्म्याला शरण?)

"We must learn to see that life's trials are nothing but passing circumstances and that something can be done to overcome them. "

Kevin Johnson,

परिस्थितिला शरण जाणे व परिस्थितिवर मात करण्यासाठी स्वतः(मार्ग/निर्णय) ठरविणे (याचसाठी ईश्वराला शरण जाणे )हा भेदच भगवतगीता स्पष्ट करते. याच दोन Choiceचे ज्ञान अर्जुनाला मिळते.

*No Choice No Decesion

पांडवांनी वनवास, विजनवास भोगल्यानंतर शेवटी धर्मयुद्धाची संधि मिळते. युद्धाचा निश्चय होतो. अर्जुन उत्साहीत होवुन युद्धक्षेत्रावर येतो. उत्साहीत होवुन प्रसन्न मनाने कार्य करण्यात मनुष्य आनंद, सुख अनुभवतो. हा आनंदाचाच प्रवास असतो.

दुःखाचा, कष्टाचा प्रवास मनुष्य टाळत असतो. अर्जुन जेंव्हा दुःखी होतो, तेंव्हा त्याला नियोजित प्रवास दुःखाचा वाटतो. पण धर्मयुद्ध करणे आवश्यक असते, यांत choice नसते. परिस्थिति मात्र दुःखी करते. "ना रहे बांस ना बजे बांसुरी" या न्यायानुसार अर्जुन युद्ध करणेच टाळतो, यालाच धर्माची भूमिका सिद्ध करतो. येथे अर्जुन परिस्थितिला शरण जातो कारण ही स्थिति निश्चय करण्यास अनुकुल नसते.

"Analysis paralysis or paralysis by analysis is the state of over-analyzing (or over-thinking) a situation so that a decision or action is never taken, in effect paralyzing the outcome. "

*निश्चय करण्यासाठी Choice चे ज्ञान:

अर्जुन वास्तव स्विकारतो. युद्ध करणे योग्य असेल तर या कार्याने दुःखमुक्ति कशी होणार? हा त्याचा प्रश्न असतो. ज्ञान, कर्म, भक्ति या तिन्ही संदर्भात भगवतगीता अर्जुनाच्या प्रश्नाचे निराकरण करते.

ज्ञान- ज्ञानी विश्वासाने मार्ग चालतो. विचलित होत नाही. अज्ञानी संशयामुळे निष्क्रियतेचे समर्थन करतो. स्वतःला योग्य ठरविण्यासाठी ज्ञान वापरतो.

योगसंन्यस्त कर्माणं ज्ञानसंञ्च्छिन्न संशयम् ।(४- ४१)

कर्म-१. कर्म टाळुन इच्छा करणे व चिंता करणे, दुःखी होणे. ही अज्ञानी स्थिति असते. तर मनावर नियंत्रण करुन कार्यरत असणे ही संस्कारीत स्थिति असते.

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

न च अभावयतः शांतिं अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

भक्ति-सकाम कर्म व निष्काम कर्म यातील भेद व महत्व भक्तिमुळे स्पष्ट होते.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।

अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते।।(५-१२)

*Your Choice of Action

अर्जुनासमोर आता दोन Option येतात. परिस्थितिचा गुलाम होवुन जगणे वा परिस्थितिवर विजय मिळविणे!

यद् अहंकारम् आश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।

मिथ्या एष व्यवसायः ते प्रकृतिः त्वाम् नियोक्ष्यति।।(१८-५९)

अहंकाराचा आश्रय असल्यामुळे प्रकृतिवश असतो व यामुळे परिस्थितिला शरण असतो. परिस्थितिवर विजय मिळविण्यासाठी ईश्वराला शरण जाणे ही Choice असते.

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।

तत् प्रसादात् परां शांतिम् स्थानम् प्राप्स्यसि शाश्वतम् ।।(१८-६२)

याप्रमाणे १. परिस्थितिला शरण राहुन दुःखी, कष्टी जीवन जगणे कि २. शांतिचा, सुखाचा प्रवास विश्वासाने करणे.

हे दोन Choice भगवतगीता ज्ञानामुळे अर्जुनासमोर येतात.

"The self is not something ready-made, but something in continuous formation through choice of action. "

-John Dewey

******

(१८-६३)

*************************

इति ते ज्ञानं आख्यातं गुह्यात् गुह्यतरं मया।

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।।

*************************

******

(१८-६३)/१:

"इति ते ज्ञानं आख्यातं गुह्यात् गुह्यतरं मया"

जन्मापासुन मृत्युपर्यंत जीवनप्रवास सुरु असतो. सुखी जीवन मनुष्याला आवडते. पण दुःख आले कि जीवन एक कोडेच(रहस्य) ठरते. हेच रहस्य भगवतगीता उलगडते. म्हणुन या ज्ञानाला गुह्यात गुह्यज्ञान(Secret amongst secret) या शब्दाचे प्रयोजन केले आहे.

इति ते ज्ञानं आख्यातं गुह्यात् गुह्यतरं मया।
विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।।(१८-६३)

येथे योग्य काय? हे जाणुन निर्णय स्वतःला घ्यायचा आहे. निर्णय घेतांना (Conditioned)मरणोत्तर पाप-पुण्याचा संशय असलाच तर पुनः गुह्य सांगितले. हे विशेष गुह्य केवळ (दृढनिष्ठ)भक्तांसाठी आहे.

सर्वगुह्यतमं भुयः शृणु मे परमं वचः।
इष्टो असि मे दृढम् इति ततो वक्षामि ते हीतम् ।।(१८-६४)

आणि हे रहस्य आहे,

(१)सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वाम् सर्वपापेभ्यः मोक्ष्ययिष्यामि मा शुचः।।(१८-६६)
सर्वधर्मात जगतचालक ईश्वराची भक्ति श्रेष्ठ आहे. हीच भक्ति अनन्यभावाने साध्य होते.

(२)य इदं परमं गुह्यं मद् भक्तेषु अभिधास्यति।
भक्तिं मयि परां कृत्वा मामैव एष्यति असंशयः।।(१८-६८)
अर्थात "भगवतगीता ज्ञानाची महति " या संदर्भात हे गुह्य आहे.

*समाजाने व्यावहारिक सत्य स्विकारले असते. वर्तमानातील ज्ञानविज्ञानाच्या पार्श्वभूमिवर अध्यात्म, ईश्वर याचा व्यावहारिक उपयोग काय?या प्रश्नाचे निश्चित उत्तर केवळ भगवतगीतेने दिलेले आहे. यासाठीच ईश्वराने श्रीकृष्णरुपात अवतार धारण केला. युद्ध जिंकण्यासाठी अर्जुनाला श्रीकृष्णावरच विश्वास होता. म्हणुन सेना कि श्रीकृष्ण ?यांत श्रीकृष्णाची निवड केली होती. ज्ञानाचा अधिपति साक्षात ईश्वर अर्जुनासोबत होता.

ईश्वराने गुह्यज्ञान योग्यवेळीच अर्जुनाला सांगितले. ज्ञानाची गरज निर्माण झाली तरच मनुष्य(Listner ) ऐकण्याच्या मनःस्थितीत असतो. अन्यथा भाषणाऐवजी प्रत्यक्ष सहकार्य हवे असते. यापुर्वी अर्जुन अनेक अडचणीत सापडला होता, त्यावेळी इतर बंधु त्याच्याबरोबर होते. पण जेंव्हा स्वतः(निर्णय करण्यासाठी)एकटा असतो, अडचणीला दुर करण्याऐवजी (दुःखाशी deal करणे) ज्ञानी समजुन निष्क्रियतेचे समर्थन करतो, याद्वारा नकारात्मक भावनेचे व विचाराचेच प्रदर्शन होते. "अज्ञानाला ज्ञान "दर्शवुन समाजाला भ्रमित करण्यात येते.

तेंव्हा ज्ञान म्हणजे काय? ज्ञानी कोण?हाच प्रश्न उपस्थित होतो. व याचे उत्तर भगवतगीता देते.

*मनुष्य व्यावहारिक सत्य जाणतो व त्याप्रमाणे विचार करतो( Judgement thinking). याच व्यावहारिक सिद्धिसाठी देवताभक्ति करतात. पण ईश्वराची ओळख नसते. हीच ओळख देण्यासाठी "गुह्य" हाच शब्द विशिष्ट संबोधनासाठी वापरण्यात आला आहे.

१. इदं तु ते गुह्यतमं प्रवक्षामि अनसुयवे।
ज्ञानविज्ञानसंहीतं यद् ज्ञात्वा मोक्षसे अशुभात् ।।(९-१)

समुहात व्यवस्थापन असते. या संदर्भात ईश्वर सृष्टिचा अध्यक्ष असतो. मनुष्याचे कार्य याच व्यवस्थापनाचा भाग असतो. आपली भूमिका करतांना याच ईश्वराची अनन्यभावाने भक्ति साधणारा योग्यच असतो. अर्थात अंतिम साध्य ईश्वर(धाम) असते. या मार्गावर दुःखामुळे विचलित होत नाही.

२. इति गुह्यतमं शास्त्रं इदं उक्तं मया अनघ।(१५-२०)

क्षर-अक्षर या संदर्भात "प्रकृति-पुरुष",

अक्षरश्रेष्ठ (अक्षरात् अपि च उत्तमः) या संदर्भात

"पुरुष-पुरुषोत्तम" याप्रमाणे ईश्वराची( परमात्मा ) पुरुषोत्तम ओळख आहे. याद्वारा (सगुण)जीवात्मा व निर्गुण परमात्मा याची ओळख दिली. ईश्वरामुळेच उर्जा असते, प्रकाश असतो. सृष्टित उर्जा पोषण करते. ईश्वर हृदयठायी वसलेला असुन उर्जारुपानेच शरीरातील (पचन)क्रियेस सहाय्य करतो. (अहं वैश्वानरो भूत्वा). ही संपुर्ण सृष्टि महावृक्षासारखी असेल तर याच ईश्वराच्या भक्तिसाठी निष्काम कर्म "असंगशस्त्र" म्हटले आहे.

व्यावहारिक बोध:

वर्तमान ज्ञानविज्ञानाचा आहे. प्रश्नाचे निदान झाले तर उपाय मिळणारच. पण असे होत नाही!स्वतःच्या दुःखाला, अडचणीला deal करण्याऐवजी (स्वतःचे समर्थन करण्यासाठी) इतरांवर टिका करणे हा मार्ग आकर्षक वाटतो. यामुळे समाजात प्रश्नांना राजकिय रंग देण्यात येतो. समाजातील हे कटुसत्य जाणुन स्वतःच्या जीवनाचे महत्व जाणावे. याच संदर्भात भगवतगीतेचे महत्व आहे.

वर्तमानात सुखी जीवनाचे रहस्य हाच भगवतगीतेचा विषय आहे. भगवतगीता जीवनाची ओळख देते. स्वतःच्या जीवनाचा सन्मान करण्याचा संदेश देते. दुःखाच्या भयाने निष्क्रिय न होता दुःखाशी सामना(dealing) करण्याचे ज्ञान सांगते.

हेच सत्य जगातील महान तत्ववेत्ता सॉक्रेटिस याने "KNOW THYSELF" याद्वारा सांगितले.

****

(१८-६३)/२ : "यथा इच्छसि तथा कुरु"

"Self-directed "informs you that a self-directed person is “under one’s own control, ” and “showing initiative and the ability to organize oneself. ”

मनुष्य स्वतःच्या स्वभावप्रकृतिनुसार, दृष्टिनुसार स्वतः निवड करतो, निर्णय करतो. निर्णय योग्य आहे कि अयोग्य हा Tie आला

तर व हा Tie सुटु शकत नाही अशी धारणा झाली असता, निष्क्रिय होणे व त्याचे समर्थन ज्ञानी समजुन करणे ही मनुष्याची Escape अवस्था असते.

अर्जुनाने हीच Escape भूमिका घेतली. सुखदुःख अनुभव असतो. शब्दाने मनोरंजन होते. नकारात्मक भाष्य करुन मनुष्य मनोरंजन करुन घेतो. मनुष्य जरी आपल्या अज्ञानी अवस्थेला ज्ञानी दर्शवितो, तरी त्याला Wrong म्हटले तर त्याचा Ego दुखावतो. ही प्रकृति असते. प्रकृति अशीच कार्यरत असते व स्वमतांधतेमुळे संवाद होत नाही.

अज्ञानाच्या गटारातुन मनुष्य कां निघत नाही याचा बोध येथे होतो. सॉक्रेटिस म्हणतो, "मला कांहीच माहीत नाही हे माझे ज्ञान आहे. "अज्ञान कबुल झाले तर ज्ञानाचे द्वार उघडे होते.

"If you think you can win, You can हे उत्तर असते. तर If you think you can't याचे उत्तर You are right असते. "अशा स्थितीत उद्वेग होणार नाही अशा भाष्यात Motivator/गुरु ला अज्ञान दर्शवावे लागते. श्रीकृष्ण म्हणतात, "तुझ्यासारख्या श्रेष्ठांना" मनोदुर्बलता अशोभनिय आहे.

अर्जुन अज्ञान कबुल करतो. व प्रश्न करतो, ज्या कार्यात माझा कांहीच लाभ नाही, ज्यात धर्म कि अधर्म बोध होत नाही, असे दुःखदायी कार्य मी कां करावे?

सुखदुःख वर्तमानातील अनुभव आहे. अर्जुनाचे भाष्य शाब्दिक मनोरंजन असते. (हा प्रकृतितील अहंकाराचा आश्रय असतो. )समाधानाचा, शांतीचा, सुखाचा अनुभव नसतो. हाच सुखाचा अनुभव होण्यासाठी वर्तमानात ज्ञानाचा आश्रय करणे व उपासना करुन दुःखान्त(योग) स्थिति अनुभवणे याचे भगवतगीता ज्ञान देते. कार्याद्वारे नैष्कर्मसिद्धि, योग अनुभवणे, याचे शास्त्र सांगते.

न कर्मणाम् अनारंभान् नैष्कर्म्यं पुरुषो अश्नुते।(३-४)

अर्थात कर्म टाळल्याने नैष्कर्मसिद्धिचा अनुभव होत नाही.

स्वधर्माचरण यांत नियतकार्याला स्वधर्माचे शिक्कामोर्तब करुन स्वतःचा मार्ग बनविणे व (शाश्वत ईश्वराला)समर्पण वृत्तिने कार्य करणे अभिप्रेत आहे. किंवा

बुद्धियोग (ईश्वर) आश्रय करुन कार्याचा दृढनिश्चय करणे व योगासाठी (निष्काम) कार्य करणे .

याद्वारे वर्तमानात कार्याद्वारे उपासनेचे शास्त्र भगवतगीता स्पष्ट करते.

ज्ञान सांगितल्यावर श्रीकृष्ण म्हणतात, तुला जे योग्य वाटते, ते करण्यास तु स्वतंत्र आहे.

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)

भगवतगीता स्वातंत्र्याचे ज्ञान देते. येथे दुराग्रह नाही. निर्णयक्षमतेचे ज्ञान आहे. हेच भगवतगीतेचे सौंदर्य आहे.

“We are the creative force of our life, and through our own decisions rather than our conditions, if we carefully learn to do certain things, we can accomplish those goals. ”

—Stephen Covey

******

(१८-६३)/३:

"विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु"

जीवनाच्या लढाईतुन 'मी युद्ध करणार नाही' ही भूमिका घेवुन अर्जुन withdraw होतो. विश्वातील स्वार्थ-परमार्थ, धर्म-अधर्म, चांगले-वाईट या संदर्भात अर्जुनाला आपण सर्व स्वार्थि, लोभी आहोत ही शंका येते. समोर उभे ठाकलेल्यांना यातील अधर्म, पाप दिसत नाही. पण आपण शहाणे आहोत ना!आपण या पापापासुन निवृत्त व्हावे यातच शहाणपण आहे.

कथं न ज्ञेयं अस्माभिः पापाद् अस्मान् निवर्तितुम् ।(१-३८)

चांगलेपणा जर या विश्वाच्या पटलावरुन निवृत्त (Withdraw) झाला तर ते जगतहिताय तर नसतेच पण स्वहिताय नसते. जगात परमार्थ, चांगलेपणा, धर्म या संदर्भात "स्वार्थ vs स्वविकास "यांतच मनुष्याचा गोंधळ होतो.

१९ व्या शतकात सॅम्युअल स्माईल या स्का ॅटिश लेखकाचे "SELFHELP" हे पुस्तक जगभर गाजले. युरोपात बायबलनंतर याच पुस्तकाला महत्वाचे स्थान मिळाले. जपानने स्वभाषेत भाषांतरीत करुन याचा व्यवस्थापनात उपयोग करुन घेतला. (Kaizen म्हणजे चांगली संवय करणे). हे पुस्तक स्वहितासाठी, जगतहितासाठी चांगल्या संवयीविषयी भाष्य करते.

जीवनविकासात व्यवहार व स्वविकास हे दोन भाग असतात. व्यवहारात कर्तव्य असते, तर स्वविकास स्वतःप्रति दायित्व असते. भगवतगीता या स्वविकासाविषयीच भाष्य करीत आहे. धर्मयुद्ध ठरणे हा व्यवहाराचा भाग होता. पण प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ आली असता अर्जुन withdraw होतो, स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी अज्ञानाला ज्ञान संबोधतो. येथेच व्यवहार(काय मिळेल?)vs स्वविकास(दायित्व) यावर भाष्य होते.

One reason why it has become harder to promote the beneficial side of emotions such as anger is that the moral vocabulary of good and bad has been replaced by the self-help lexicon of positive and negative thinking.

Julian Baggini

अर्जुन ज्या धर्माचा आधार घेवुन योग्य-अयोग्य ठरवितों, त्याच धर्माची मर्यादा भगवतगीता दर्शवुन देते. व धर्म-अधर्म हा Tie सोडविण्यासाठी स्वधर्माचरण हा पर्याय(Tiebreaker) सांगते. अर्थात द्वंद्वावर मात करते .

व्यवहारात सकाम कार्य असते, म्हणुन संशय, द्वंद्व असतो तर स्वविकासात आत्मविश्वास असतो. अर्थात स्वधर्माचरण कार्याद्वारे ईश्वरभक्ति असते. यामुळे कार्य निष्ठेने घडते.

It is not eminent talent that is required to ensure success in any pursuit, so much as purpose - not merely the power to achieve, but the will to labour energetically and perseveringly.

Samuel Smile

समाजात यशस्वी लोकांबद्दल बोलतांना पैसा(पैसा आहे म्हणुन यश मिळाले!), Talent किंवा परस्पर सहकार्याचे पाठबळ अशा factorचा उल्लेख होतो. पण स्वविकासासाठी जीवनमुल्यांचे महत्व जाणणे, त्याची संवय करणे हेच स्वविकासाला अपेक्षित

असते. भगवतगीता स्वविकास या संदर्भातच जीवनमार्गातील मनोवश(स्वतःचा शत्रु) कि आत्मवश( स्वतःचा बंधु) ! अवस्था यांतील भेद स्पष्ट करते.

*वचन पाळणाऱ्यावर जग विश्वास ठेवते.
*स्वावलंबनामुळे निर्णयअधिकार मिळतो (Beggars are not choosers)
म्हणुनच "प्रयत्न करणाऱ्यांची हार होत नाही" असे आपण ऐकत असतो.

जगात फुकट सल्ला देणारे बहु मिळतील, पण "स्वविकास" संदर्भात मनुष्याला निर्णयअधिकार असतो. स्वातंत्र्याचे ते साधन आहे. भगवतगीता मनुष्याच्या याच अधिकाराचा सन्मान करीत आहे. (कर्मण्येव अधिकारः ते)याचमुळे जीवनमार्गात कार्याचा निश्चय होतो.

चांगला मनुष्यही निष्क्रिय झाला तरी मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो व अज्ञानाला ज्ञान संबोधतो. हेच Delusion असते. हा knwledge trap असतो. स्वविकास या संदर्भात ज्ञान संशयमुक्तिसाठी असते, ज्यामुळे कार्यनिश्चय होतो.

अर्जुनाला जीवन व मार्गाचे महत्व सांगितले. जीवनमार्गात आत्मोन्नती(स्वविकास) याचे महत्व सांगितले. "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) हा विकासाचा राजमार्ग असतो, या मार्गावर निष्काम कार्य(फल ईश्वरसमर्पण) साध्य होते. स्वभावनियतकार्य जगतहिताच्या महत्वाच्या कार्यासाठी उपयोगात यावे यासाठी अर्जुनाला ही संधि चालुन आलेली असते. अर्थात स्वविकासाची ही संधि असते. (आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च). याप्रमाणे स्वविकासाचे ज्ञान सांगुन शेवटी म्हटले,

इति ते ज्ञानं आख्यातं गुह्यात् गुह्यतरं मया।
विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसे तथा कुरु।।(१८-६३)

******

(१८-६३)/४ :

"कर्मण्येवाधिकारस्ते -(ते)-यथा इच्छसि तथा कुरु"

(Right to Choice)

निवड व निर्णय हे दोन वेगळे शब्द आहेत. जेंव्हा अनेक पर्याय उपलब्ध असतात, तेंव्हा योग्य निवड करण्याची जबाबदारी येते. ही जबाबदारी योग्य रितीने पार पडावी यासाठी Choice Architecture या शब्दाची योजना नोबेलविजेता प्रां रिचर्ड थॅलर यांनी केली. अर्थशास्त्राला मानसशास्त्राची जोड देणे आवश्यक आहे, हे त्यांनी "Improving Decesions about Health, Wealth &Happiness या पुस्तकातुन व्यक्त केले.

मनुष्याला ग्राहक या भूमिकेतुन निवड करायची असते, तर विक्रेता, संस्था यांना आपले उद्दिष्ट साध्य करतांना ग्राहकाचे निवडस्वातंत्र्य लक्षात घेवुन ग्राहकाचे व समाजाचे हीत साध्य व्हावे ही पार्श्वभूमि Choice Architecture यामागे आहे.

मनुष्याचा आध्यात्मिक विकास मानसिक शक्तिशी संबंधित आहे. जीवनविकास या संदर्भात मनुष्य मानसिक शक्तिविषयी बेफिकिर असतो. यामुळे अनभिज्ञ असतो. याचाच परिणाम क्रोध, भय, चिंता या नकारात्मक भावनेला (Negative emotion) आश्रय मिळतो. व बुद्धिचे हरण होते. याच रोगाविषयी भगवतगीता सावध करते.

क्रोधात् भवति संमोहः संमोहात् स्मृति विभ्रमः।

स्मृतिभंशात् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति॥(२-६३)

सुखदुःख मानसिक शक्तिच्या विकासात महत्वाचा दुवा साधते या संदर्भात ते साधन ठरते. मार्गात दुःख आले असता काय स्थिति होते हे कुरुक्षेत्रावरील अर्जुनाची मानसिकता व त्याचा प्रज्ञावाद(समर्थनार्थ भाष्य) याचे दर्शन होते.

अर्जुनाचे स्वातंत्र्य (निर्णयअधिकार, निवडअधिकार) अबाधित ठेवुन त्याचा स्वतःचा मानसिक( आध्यात्मिक) विकास साध्य व्हावा, जगतहीत साध्य व्हावे यासाठी धर्माचे प्रयोजन ही संकल्पना भगवतगीता समजावुन देते. सृष्टि अध्यक्ष या नात्याने श्रीकृष्ण Choice Architect ठरतात. ज्यांनी अर्जुनाला योग्य निवड करण्यासाठी निवडशास्त्र (Choice Architecture ) समजावुन सांगितले.

आपला युद्धाचा निर्णय आपल्या कुटुंब परिजनांसाठी दुःखदायी आहे हा विचार अर्जुनाला दुःखी करतो.

यामुळे युद्ध करावे कि टाळावे यांत निवड करण्याची त्याचेवर जबाबदारी येते. ही जबाबदारी टाळुन युद्ध करणे त्याचेसाठी अधर्म आहे असे घोषीत करतो.

मनुष्य कार्य करतो. स्वतःचे हीत साध्य करतांना त्याचे कार्य समुहहीत(-कुटुंबहीत, समाजहीत, देशहीत, जगतहीत) यांना

प्रभावित करीत असते. प्रत्येक टप्प्याशी मनुष्याचा स्वतःचा विकास (भौतिक, मानसिक)निगडित असतो. म्हणुन निर्णयअधिकार असतो, निवडस्वातंत्र्य असते. समुहात जगतहीत शेवटचा टप्पा असतो. या टप्प्याशी ईश्वर(सृष्टिचा अध्यक्ष) याचे नाते मान्य केले तर धर्म व मनुष्याचा मानसिक (आध्यात्मिक) विकास याच टप्प्याशी संबंधित असतो. म्हणुन जीवनविकासात धर्म या संदर्भात "स्वधर्म" या जीवनमुल्याचे महत्व Tiebreaker(द्वंद्वमुक्त) या अर्थाने स्पष्ट करते.

याच पार्श्वभुमिवर भगवतगीता (कार्याचा)निर्णयअधिकार व निवडअधिकार या संदर्भात स्पष्ट आपले मत देत आहे.

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।(२-४७)

व शेवटी म्हटले,

"यथा इच्छसि तथा कुरु"(१८-६३)

"The Hebrew word, timshel—'Thou mayest'— that gives a choice. It might be the most important word in the world. That says the way is open. "

******

(१८-६४)

************************

सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परं वचः ।

इष्टोअसि मे दृढम् इति ततो वक्षामि ते हितम्।

**************************

(१८-६४)१ :

" सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः"

(जीवनविकासाचे रहस्य)

जीवनविकासाचे संदर्भात

*Automatic(प्रकृतिचे Automation)vs (कार्याचे) Intention,

*Controllable(नियंत्रण होवु शकते) vs Uncontrollable(उदा. मृत्यु),

*Choice(उदा. कार्याचा अधिकार)vs No choice (उदा. कर्मफल result)

याप्रमाणे भगवदगीता Awareness देते.

*Automatic(प्रकृतिचे Automation) vs. (कार्याचे) Intention,

प्रकृतिचे Automation:(automatic action व intentional action) हा मानसशास्त्रिय अभ्यासाचा विषय आहे.

मनुष्यजीवनांत निर्णय घेणे व मार्ग चालणे यांतील निर्णय घेणे ही Intentional क्रिया असते. ही क्रिया घडली नाही तर जे घडते त्याचा स्विकार करावाच लागतो. व मनुष्य सुखदुःख अनुभवतो.

अर्जुनाला कार्यात दुःख आढळते. तो कार्य टाळतो. व समर्थन करतो. ही (Behavior)वागणूक Automatic क्रिया असते. अर्जुनाचे समर्थन दुःखमुक्तिसाठी असते. ही क्रिया त्याचे Attitude दर्शवते. यांत कार्याच्या Intention चा आढावा घेतो.

मला सुखासाठी कांहिही नको. राज्य(ऐश्वर्य, पैसा)नको म्हणुन कार्याची(विकास)गरज नाही अशी अर्जुनाची भूमिका असते. पण दुःखी अवस्था विकासाची गरज दर्शविते. याच मार्गाचे अर्जुनाला अज्ञान असते, तरी (अहंकारामुळे) स्वतःला ज्ञानी ठरवितो. कांही

नकोच तर अशा घोर कार्याचे प्रयोजन व्यर्थ आहे. उलट पाप होईल हे सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान सांगतो.

जीवनात सुखासाठी मनुष्य कार्यरत असतो, पण या प्रवासात दुःखी झाला असता प्रज्ञावाद(आपली भूमिका ज्ञानी आहे असा अट्टहास) बोलत असतो. त्याचे वागणुकीत तुलना, टिका, नकारात्मकता, द्वेष, मत्सर याचा समावेश असतो. ज्ञानाच्या अभावामुळे सामान्यतः असेच मनुष्याचे Automation होते. याच ज्ञानाच्या अभावामुळे महाभारतात कुरुक्षेत्रावर अर्जुन कार्य टाळतो.

(युद्ध)कार्य टाळणे अर्जुनाचे automation असते. कार्याचा परिणाम शोक आहे म्हणुन तो कार्याच्या Intention मध्ये संशय व्यक्त करतो. व यावर भाष्य करतो. आमचे Intention लोभ आहे!

मनुष्यस्वभावाचे हेच automation आहे. मनुष्याच्या सुख, विकास याविषयाच्या संकल्पना जशा असतात, तसे हे automation बनत असते. याच Automationमुळे मनुष्य दुःख,

चिंता करीत असतो, तरी जसा जगतो, हाच माझा विकासमार्ग आहे, असा त्याचा समज असतो.

प्रत्यक्षात याक्षणी (त्याला करावयाच्या कार्याच्या) Intention मधील संशय कबुल केल्यावर अर्जुन शेवटी प्रश्न करतो, प्रस्तुत कार्याचा परिणाम देवाचे राज्यही असला तरी शोक नष्ट कसा होईल हा प्रश्न मला भेडसावत आहे. येथे शोकमुक्ति त्याची गरज ठरते.

जीवनप्रवासातुन मनुष्य सुखदुःख अनुभवतो. सुखाच्या दिशेनेच आपला प्रवास वळवीत असतो. आपला प्रवास दुःखमुक्तिच्या दिशेने वळविण्याच्या हेतुनेच अर्जुनाने युद्ध न करण्याचे ठरविले. आपली भूमिका ज्ञानी आहे असे दर्शवतो. ज्ञानाविषयी होणारा असा गैरसमज दुर करण्यासाठी भगवदगीता जगासमोर आली.

सुखासाठी मनुष्य कार्य करतो. योगक्षेम, भोगैश्वर्य, परमार्थ यासाठी कार्य अर्जुन जाणतो पण शोकमुक्तिसाठी कार्य जाणत नाही. Acceptance of reality हे विकासाचे प्रथम पाऊल आहे. अर्जुन दुःखाची मानसिक स्थिति, अज्ञान स्विकार करतो व विकासमार्गाचे ज्ञान ग्रहण करतो.

*Controllable(नियंत्रण होवु शकते) vs
Uncontrollable(उदा. मृत्यु),
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे अर्जुन तिष्ठति।
भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।

हृदयातील ईश्वर - परमेश्वर, महेश्वर
आत्मा - परम् आत्मा
पुरुष - पुरुषोत्तम्

नकारात्मक विचाराचे कारण मनाची दुःखी, दुबळी अवस्था असते. म्हणुन सकारात्मक विचारासाठी नित्य ईश्वरचिंतन हे replacement असते व हेच विभूतियोगातुन स्पष्ट होते. (यांत सृष्टि संचालनातील समृद्ध, उर्जायुक्त विभूतिचे चिंतन आहे).

बुद्धिची Stable अवस्था प्राप्त होण्यासाठी कार्याद्वारे भक्ति कशी करायची याची कला व शास्त्र सांगतात.

*Choice(उदा. कार्याचा अधिकार)vs No choice (उदा. कर्मफल result)

कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।(२-४७)
तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।(२-५०)

अर्थात कार्य करण्यासाठी स्वतःचा निर्णय अधिकार जाणणे. व कार्याद्वारे योग(दुःखान्त) हेच कौशल्य साध्य करणे.

The basic intention of life is to connect with God. या रहस्याचा उलगडा होतो. (ईश्वर)ज्ञानाने Intention मधील संशय नष्ट करणे व कार्याद्वारे ईश्वरभक्ति करणे, याद्वारे शोकमुक्ति(योगः कर्मसु कौशलम् )चे रहस्य सांगितले. याचसाठी ज्ञान व ईश्वर याचा संबंध भगवदगीतेत ज्ञानविज्ञानासह स्पष्ट केलेला आहे. म्हणुन शेवटी निवड दिली, Automation प्रमाणे जगत राहणे किंवा ईश्वराचा आश्रय करुन ईश्वरभक्तिसाठी ( Intentionaly)कार्य करणे.

सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः।(१८-६४)
मन्मना भव मद् याजी मां नमस्कुरु।(१८-६५)
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।(१८-६६)

**********

(१८-६४)/२:
"इष्टोअसि मे दृढम् इति ततो वक्षामि ते हितम्"

भाष्य Communicationचे महत्वाचे माध्यम असते. कुणी सकारात्मक भाष्य बोलुन Motivate करतात तर कुणी नकारात्मक भाष्य बोलुन Demotivate करतात, जे पाय ओढणे या संदर्भात ओळखले जाते. या पार्श्वभुमिवर भगवतगीतेतील संवादकौशल्य जाणुन घेणे महत्वाचे आहे.

'मी तुझ्या भल्यासाठी सांगत आहे', असे भाष्य समाजात ऐकत असतो. लोकाचे भले होईल असे भाष्य विद्वान बोलत असतात तर लोक ऐकतच नाही अशी व्यथाही विद्वान बोलुन दाखवतात. भाष्यकाराला जो उपाय सांगायचा असतो, तो ग्रहण करण्याची श्रोत्याची मानसिकता हवी. 'मी तुझ्या भल्यासाठी सांगतो', याच

संदर्भात प्रथम रामायणातील मनथरा-कैकयी संवाद जाणुन घेणे महत्वाचे आहे. कैकयीने दोन वर Cash करावे व महाराणीपद स्वतःकडे घ्यावे हा मनथरेसमोरील Task होता.

या Task मध्ये कैकयीला श्रोता करणे हे प्रथम पाउल होते. राज्याभिषेकाच्या आनंदाचे क्षणी मनथरा कष्टि चेहरा करुन फाटके वस्त्र घालुन कैकयीचे लक्ष स्वतःकडे वेधते. कैकयी तिच्या दुःखाचे कारण विचारते. माझ्या दुःखाने नव्हे तर तुझ्या दुःखाने मी दुःखी झाले अशी स्पष्टता मनथरा देते. या संवादातुन 'तुझ्या विरोधातील महाराजाचे कारस्थान ' असे ऐकल्यावर कैकयीचा राग अनावर होतो.

यामुळे दुसरे पाउल असते, कैकयीची मानसिकता दुबळी(भयभित) करणे. मनथरा क्षमा मागते. व आपला कोणताही स्वार्थ नाही हे स्पष्ट करुन स्वतःच्या दुर्दैवी जीवनाचे वास्तव सांगते. मनथरेला फक्त कैकयीची चिंता आहे असा कैकयीला विश्वास होतो. तेंव्हा तुझ्या मनात हा विचार कसा आला अशी विचारणा करते. तेंव्हा श्रीरामाचा राज्याभिषेक असतांना भरताला मामाकडे पाठविणे या कटाची सुत्रधार कौशल्या आहे . सावत्र संबंधातील कटुत्व सिद्ध करण्यासाठी शेकडो कहान्या सांगते. कैकयीचे हृदय बंद पडणार या भयाने कहान्या बंद करते. अर्थात मानसिकता बदल या संदर्भात कैकयीचा बुद्धिभ्रम पुर्णपणे झालेला असतो.

आता शेवटचे पाउल असते कैकयीने काय करावे हे निमुटपणे मान्य करणे. मनथरा म्हणते, चिंता करु नको, ज्योतिष्य म्हणतात तुच महाराणी राहणार!उपाय आहे, ऐकला तरच सांगुन उपयोग आहे. यावर कैकयी म्हणते, तु विहिरीत उडी मार म्हणशिल तरी मी मारेल कारण तुझ्याशिवाय मला कुणावरही विश्वास नाही. ज्या मानसिकतेची, क्षणाची मनथरा वाट पहात होती. ती वेळ आली. अर्थात बीजपेरणी याच मानसिकतेत होते. येथे बुद्धिभ्रम करुन बीजपेरणी होते.

भगवतगीतेतील विषय कोणत्याच बीजपेरणीचा नाही, तर बुद्धिभ्रम झालेल्या अर्जुनाला बुद्धियुक्त (Higher consciousness) अवस्थेत आणणे(Lower मानसिकता Higher मध्ये बदलविणे) हा श्रीकृष्णाच्या समोरील Task असतो. मनथरेने सुखी कैकेयीला दुःखी केले, तर श्रीकृष्णाने दुःखी अर्जुनाला दुःखाचा सामना करण्याचे ज्ञान सांगितले. "प्रेम" या संदर्भात दुःखी करणे व Motivate करणे यांत फरक आहे.

If you judge people, you have no time to love them. 'The more you judge, the less you love. '

— Honor de Balzac

वास्तव vs Judgement

अर्जुनाला दुःख टाळण्यासाठी युद्ध टाळायचे होते. व युद्ध करणे पाप आहे असे Judgement करतो. या Judgementचा आधार धर्म आहे असे स्पष्ट करतो. श्रीकृष्णाने आधीच दुःखी असलेल्या दुःखी केले नाही तर तुझ्यासारख्या श्रेष्ठाला अशा प्रसंगी मोह, दुर्बलता अशोभनिय आहे असे भाष्य करतात . " श्रेष्ठ" चे निश्चित Standardअसते. अर्थात श्रीकृष्णाच्या Judgementचा आधार श्रेष्ठांची मानसिकता असते. ज्ञान vs अज्ञान हा विषय चर्चेला येतो.

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

अर्जुन वास्तव (अज्ञान)स्विकारतो व त्याच्याच प्रश्नानुसार उत्तराद्वारे ज्ञान सांगण्यात येते. ज्ञान सांगितल्यानंतर निर्णय तुला घ्यायचा आहे . येथे अर्जुनाचे स्वातंत्र्य अबाधित आहे.

विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)

मनुष्य अशाश्वताशी जोडलेला असतो. पण याच अशाश्वताच्या माध्यमातुन शाश्वत ईश्वराशी जोडण्याची कला भगवतगीता सांगते. येथे Theory संपते. व अगदी शेवटच्या टप्प्यात भगवतगीता येते. (What others to do) जो श्रीकृष्णाचा महत्वाचा Task होता. शाश्वत ईश्वराशी जोडणे ज्यामुळे (बुद्धिभ्रमास कारण ठरलेली)

मानसिकता बदल निश्चित होईल (Higher consciousness) .
व कोणत्याही संदेहाला जागा मिळणार नाही. (गतसंदेहः)

कुणी धर्माचा आधार घेवुन आपले विचार लादतात. भगवतगीता विचार लादत नाही. उलट धर्मातील एखाद्या विचाराने बुद्धित निर्माण झालेला संशय मिटविण्यासाठी गुह्य ज्ञान सांगते.

इष्टोअसि मे दृढम् इति ततो वक्षामि ते हितम्।(१८-६४)

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्वपापेभ्यः मोक्ष्ययिष्यामि मा शुचः।।(१८-६६)

अर्जुनाचे श्रीकृष्णाशी दृढ नाते असले तरी याच माध्यमातुन शाश्वताला जोडण्याची त्याला संधि होती. म्हणुन म्हटले, मी तुझ्या भल्यासाठी सत्य सांगतो. समर्पणभाव धारण होण्यासाठी हा महत्वाचा संदेश होता. अर्थात ईश्वरावर श्रद्धा असणाऱ्यासाठीच हा संदेश आहे. ज्याद्वारे जीवनात शाश्वत ईश्वराची भूमिका व त्याचे (मानसिकता बदल होण्यासाठी) महत्व कळते.

"Practicing psychiatry without faith in God is like meeting a hungry man and giving him a toothpick.
"-Unknown

****

(१८-६४)/२:

"इष्टोअसि मे दृढम् इति ततो वक्ष्यामि ते हितम् "

Part II

(Knowledge Trap vs Wisdom:

बंधन vs मोक्ष)

आपण आदर्श जाणतो असे समजुन लोक इतरांच्या आदर्शाला, Valuesला Challange करतात, टिका करतात. अर्थात कुणी काय करावे व करु नये असे भाष्य समाजात चालत असते.

जीवनाच्या मार्गावर चालत असतांना तु चुकीच्या मार्गाने जात आहे, असे कैकयीच्या मनात संशय पेरला व मनथरेने जो मार्ग सांगितला तो मार्ग कैकयीने मुकाट्याने स्विकारला. याच संदर्भात रामायणात "मी तुझ्या हिताचे सांगत आहे"असे भाष्य मनथरेने कैकयीसाठी केले.

"मी तुझ्या भल्यासाठी सांगत आहे" हेच भाष्य श्रीकृष्ण अर्जुनासाठी विविध verses मधुन करतात.

यत्तेअहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया।(१०-१)

इष्टोअसि मे दृढम् इति ततो वक्ष्यामि ते हितम् ।(१८-६४)

जीवन म्हणजे जीवनयात्रा आहे. यात स्वतःचा मार्ग चालत असतो. स्वतःच्या मार्गातील कार्य या संदर्भात (समुहात) स्वधर्म, व्यक्तिगत निर्णयअधिकार ही साधने असतात.

जीवनाच्या याच मार्गावर चालत असतांना अर्जुन म्हणतो, युद्ध न करणे हा माझा स्वधर्म आहे. हा आदर्शाचा Trap असतो. व योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. हा Knowledge trap असतो.

"Man is the only kind of varmint sets his own trap, baits it, then steps in it. "

John Steinbeck

चांगल्या मनुष्याला जीवनमार्गात संशय येतो, तेंव्हा तो आदर्शाच्या Trap मध्ये सापडतो.

सदृशं चेष्टते स्वस्या: प्रकृते ज्ञानवानअपि।(३-३३)

तयोः न वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।(३-३४)

मनुष्य जीवनयात्रेत trap मध्ये सापडतो, तेंव्हा हा trap मार्गातील Barrier ठरतो. या Trap मधुन मनुष्याला स्वतःच बाहेर पडावे लागते. अर्थात स्वतंत्र (Trapfree) स्वतःच व्हावे लागते. हेच ज्ञान भगवतगीता देते.

*स्वधर्म barrier नसुन Tiebreaker असतो.

*चांगलेपणा मनुष्याची शक्ति असते. पण याच चांगलेपणामुळे अर्जुन थबकतो, (चांगलेपणाच्या) trapमध्ये सापडतो. या trap मधुन मुक्तिसाठी ईश्वरज्ञान सहाय्यक ठरते. चांगलेपणा(सत) व ईश्वरज्ञान यांचे नाते भगवतगीता स्पष्ट करते. व ईश्वर मनुष्याचा हीतचिंतक आहे. तो साहस वाढवतो. शक्ति वाढवतो. हे स्पष्ट होते.

समोअहं सर्वभुतेषु न मे द्वेष्यो न अस्ति न प्रियः।

ये भजन्ति तु माम् भक्त्या मयि ते तेषु च अपि अहं।।(९-३०)

*आदर्शाच्या Trap मध्ये सापडल्यामुळे चांगला मनुष्य मार्गात संशयी होतो, व निष्क्रियता स्विकारतो. तेंव्हा त्याला आत्मविश्वासाची गरज असते. हाच आत्मविश्वास श्रीकृष्ण देतात. आदर्श, goodness या संदर्भात पुर्ण विश्वास देतात.

अहं त्वां सर्वपापेभ्यः मोक्ष्ययिष्यामि मा शुचः।(१८-६६)

"The greatest trap in our life is not success, popularity or power, but self-rejection. "

Henri Nouwen

******

(१८-६६)

***********************

सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।

अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।।

*************************

(१८. ६६)/१ :

"सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज"

(Belief system vs Self confidence)

वर्तमान मनुष्याचे जीवन घडवित असते. वर्तमानात मनुष्याची सजगता(State of mind) कशी आहे ही परिक्षा केवळ अटितटीच्या प्रसंगी होत असते. पाणी वरुन स्वच्छ दिसले तरी खडा टाकल्यास गाळ असेल तर वर येतोच.

अर्जुन अटितटीच्या प्रसंगी(युद्धाचा प्रसंग!) गोंधळतो, अशांत होतो. त्याचे गात्र शिथिल होतात. येथे प्रत्यक्षात क्रिया घडलेली नसते, घडायची असते व घडविणारा आपण स्वतः आहे हे समजुनच अर्जुन (परिणामभयाने) दुःखी होतो. व निष्क्रियता

स्विकारतो. अशांत मनाला शांत करण्यासाठी (धर्मातील) ज्ञानाचा (Belief system) वापर करतो.

येथे प्रश्न उपस्थित होतो, हा गोंधळ धर्मामुळे(प्रस्थापित ज्ञान)निर्माण झाला कि अर्जुनाच्या व्यक्तिगत सुखदुःखामुळे?(misunderstanding!)

प्रत्यक्षात अर्जुनाच्या बुद्धितील गोंधळ व्यक्तिगत सुखदुःखामुळे असतो. व प्रस्थापित ज्ञान हा गोंधळ दुर करु शकत नाही. या ज्ञानाचा उपयोग मात्र अशांत मनाला शांत करण्यासाठी करतो, हे Thinking स्पष्ट होते. यामुळेच वास्तवातील प्रश्न, कार्यनिश्चय हा विषय दुर्लक्षित होतो.

समाजात अशाच thinking व भाष्याचा अनुभव होतो. तुलना करुन समाधान घेणे, स्वसमर्थन व परटिका भाष्याचा सर्रास उपयोग होतो, अर्थात हे (वास्तव न स्विकारता )Judgement thinking असते. वर्तमानात अशांत मनाला शांत करण्यासाठी, मनोरंजनासाठी अशा thinking चा उपयोग होतो. यामुळे नकारात्मकता असते.

"नरकातही सौंदर्य असते, पण मुर्ख तेथे गेले असता याच सत्याचे त्यांना अज्ञान असते. ईश्वराने हीच शिक्षा त्यांना केलेली असते. "

निष्क्रिय होण्याचे कारण कार्याचा निश्चय न होणे असते, याचे कारण अशांत मन असते. म्हणुन हा प्रश्न
"अशांत मनाला शांत करण्यासाठी प्रज्ञावादी भाष्य(यांत प्रस्थापित उपलब्ध ज्ञानाचा उपयोग करणे) vs कार्यनिश्चय होण्यासाठी ज्ञान" असा असतो. "

या प्रश्नाचे श्रीकृष्ण प्रथम निराकरण (प्रज्ञावादांश्च भाषसे) करतात व जीवनात विकासासाठी ज्ञानाची भूमिका स्पष्ट करतात. ज्ञान सांगितल्यानंतर शेवटी मुख्य दोन प्रश्नाने सांगता होते.
१. विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु।(१८-६३)
अर्थात निर्णय तुला घ्यायचा आहे.

२. कश्चित् अज्ञान संमोहः प्रनष्टः ते धनंजय।(१८-७२)
अर्थात वर्तमानातील सजगता(- "Are you ready?)

Talent alone won't make you a success. Neither will being in the right place at the right time,
unless you are ready. The most important question is: 'Are your ready?'

(Johnny Carson)

प्रकृति जीवनात कर्म घडविते. प्रकृतिची मुळ प्रवृत्ति(उगम)ईश्वर आहे, तोच ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. "ज्ञान"या संदर्भात ईश्वराचा आश्रय संशयमुक्त करते.

"भरोसा है खुदापर, तो वही होता है जो खुदा लिखता है।खुदपर भरोसा है तो खुदा वही लिखेगा जो तुम चाहोगे।"

स्वतःवर विश्वास असेल तरच कार्याचा निश्चय होतो. स्वतःवर विश्वास येण्यासाठी ईश्वरशरणता(ज्ञानाचा आश्रय)आहे. म्हणुन श्रद्धा ईश्वरावर पण विश्वास स्वतःवर असा येथे बोध आहे.

ईश्वराची ओळख कर्म संदर्भात अधियज्ञ (देहधाऱ्यांचे कर्म व त्याचा अधिपति) आलेली आहे. कुणी कार्य करण्यासाठी दैव शब्द वापरतात(दैवात जसे असेल तसे होईल!). दैव संदर्भात हीच ओळख "अधिदैव "आलेली आहे. याप्रमाणे निष्काम कर्मासाठी ईश्वराचा आश्रय ज्ञानाचा आश्रय असतो. म्हणुन स्वतःवर संपुर्ण विश्वास येण्यासाठी ज्ञान आहे व यासाठी म्हटले,

सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।

अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥(१८-६६)

********

(१८-६६)/२ : " स्वधर्मे निधनं श्रेयः"

vs

"सर्वधर्मान् परित्यज्य"

नीति आणि जीवनमुल्य यातील भेद भगवतगीता स्पष्ट करते. धर्माचा बोध नीति होतो तर स्वधर्म जीवनमुल्य असते. जीवनमुल्य स्वतःच्या मार्गाचे मुल्य(महत्व) विकसित करते. मार्गातील संशय मिटवते.

नीति नियम, Ethics या संदर्भात असते. विषादयोग या प्रथम अध्यायात "धर्म" या संदर्भात भाष्य आहे. पांडवांना न्याय मिळण्यासाठी अखेरचे शस्त्र धर्मयुद्ध असते. म्हणुन Warfield ला धर्मक्षेत्र संबोधले. अर्जुन दुःखी होतो व स्वतःचे समर्थन करतांना युद्ध करणे त्याचेसाठी पाप आहे म्हणुन आपली भूमिका धर्मविरोधी आहे असे स्पष्टिकरण देतो. शेवटी याच धर्माचा "नीति" या संदर्भात संजय उल्लेख करतो.
धृवा नीतिः मतिः मम् (१८-७२)

श्रीकृष्ण अर्जुनाच्या भाष्याला प्रज्ञावाद संबोधतात. व अर्जुनाच्या Belief system नुसार असलेल्या धर्माची दुसरी बाजु स्पष्ट करतात. अर्जुन समर्थन भाष्यात किर्ति, स्वर्गप्राप्ति याचा उल्लेख करतो. श्रीकृष्ण म्हणतात, धर्मासाठी स्वधर्माचरण केले नाही तर किर्ति, स्वर्ग दोहोपासुन वंचित होशील.

अथ चेत् त्वम् इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापम् अवाप्स्यसि।।(२-३३)

याप्रमाणे नीतिचे दोन्ही बाजुने(निष्क्रियता व सक्रियता) समर्थन होते. पण मनुष्याला विकासासाठी त्याचा मार्ग चालणे महत्वाचा असतो. नीतितील संशयामुळे निष्क्रिय होतो. म्हणुन शेवटी ईश्वरज्ञानाने मार्गातील संशय मिटवणे यासाठी
"सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज "(१८-६६)

असा उल्लेख आलेला आहे. अर्थात कार्याद्वारे ईश्वरभक्ति याला प्राधान्य दिले.

*"स्वतःचा मार्ग" या संदर्भात धर्माचा(कार्याद्वारे भक्ति) हेतु स्पष्ट होतो.
-निर्भय होणे, दुःखान्त(योग) यासाठी कर्मयोग धर्म :
"स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् "(२-४०)

-अनन्ययोग या संदर्भात(शाश्वत) सुखासाठी आचरण्याचा (राज)धर्म:

"प्रत्यक्ष अवगमं धर्म्यं सुसुखं कर्तुं अव्ययम् ।"(९-२)

-गुणातित होण्याचा शाश्वत धर्म:
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्य एकान्तिस्य च।(१४-२७)

*"स्वधर्म" हा शब्द जीवनमुल्य या अर्थाने स्वतःची ओळख बनविते व स्वतःचा मार्ग दृढ करण्यासाठी Tiebreaker ची भूमिका करते.

स्वतःची ओळख:
"स्वतःची ओळख" या संदर्भात स्वधर्माचे जीवनमुल्य या अर्थाने महत्व जाणणे महत्वाचे आहे. समाजात स्वभावनियत कार्यच मनुष्य करीत असतो. या संदर्भात "स्वधर्म" मुळ भाव असतो (Unique). कार्य मनुष्याची Professional ओळख असते. शुर धनुर्धारी(पारंगत) अशी अर्जुनाची ओळख असते. धर्मयुद्ध त्याच्या कार्याला मिळालेली धर्माची संधी म्हणुन स्वधर्माचे महत्व असते. (Application of State of Art for Goodwork).

जे कार्य आपण सहज करु शकतो, त्याला विकसित करणे व त्याचा विकासासाठी मार्गात उपयोग करणे आवश्यक असते. जे करु शकत नाही, ते दुसऱ्याचे कार्य परधर्म म्हटले, म्हणुन कठीण वाटते. या अर्थाने भाष्य आहे:
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।।(३-३५)

* Tiebreaker

कार्याव्यतिरिक्त समाजात श्रेष्ठ -कनिष्ट, श्रीमंत-गरीब, चांगला-वाईट अशीही ओळख बनत असते. याच अनुषंगाने समर्थन-टिका चालत असते. अर्जुन चांगला असतो(दैवी). श्रीकृष्ण "श्रेष्ठ" या संदर्भात म्हणतात, श्रेष्ठ मार्गात दुःखाने विचलित होत नाही. म्हणुन चांगल्या मनुष्याने जीवनविकासाच्या महामार्गावर असणे आवश्यक आहे.
यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखंधीरं स अमृतत्वाय कल्पते।।(२-१५)

याच मार्गासाठी स्वधर्माचे Tiebreaker या अर्थाने महत्व स्पष्ट केले. कारण संशय, भय मार्गात द्वंद्व निर्माण करतात. म्हणुन स्वधर्म स्वतःच्या मार्गावरील नियतकार्यावर शिक्कामोर्तब असते.

कार्याचा मार्ग दृढ न होण्याचे कारणच चंचलता असते. स्वधर्माचरणात मार्ग दृढ होतो व कार्य ईश्वराला समर्पित केल्याने नैष्कर्मसिद्धि लाभते.

(ईश्वर)ज्ञानाने संशय मिटतो. भक्तिसाठी मार्ग दृढ होतो. निष्ठेने कार्य execute होते. हा भगवतगीतेचा महत्वाचा संदेश आहे. म्हणुन सकाम vs निष्काम शास्त्र सांगितले.

************

(१८-६६) /३:
" सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज"
(आत्मोन्नति-Self empowerment)

या विश्वात धर्म आलेत, महामानव आलेत. याविषयी स्वामी विवेकानंदांचे भाष्य महत्वाचे ठरते. समुद्राला भरती-ओहोटी असते तसे या विश्वात समाजातील पतन-उत्थान चालु असते. जेंव्हा पतन होते, तेंव्हा सर्व शक्ति संपल्यासारखी वाटते. पण या पतनाचे कारण शोधत असतांनाच कुठेतरी शक्ति संचयन होत

असते. लाटावर आरुढ होउन महामानव मार्गदर्शक बनतो. अर्वाचिन धर्माचे सर्व धर्माचे संस्थापक हेच महामानव होते.

धर्माची मुळ संकल्पना ज्या धर्मात आहे, त्याला भगवदगीता शाश्वताचा, अमृताचा धर्म संबोधत आहे.
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्य ऐकान्तिकस्य च।(१४-२७)

जगातील कोणत्याही धर्माचा हेतु १. सामाजिक संचलन व नियंत्रण( Social control) व २. सामाजिक सामंजस्य (Social cohesion) असते. याशिवाय भगवदगीतेनुसार तिसरा हेतु स्वतःचे सक्षमीकरण अथवा आत्मोन्नति आहे. यावरच भगवदगीता प्रकाश टाकत आहे.

१. अर्जुन जो धर्म जाणतो त्या धर्माच्या संकल्पनेत पाप-पुण्य, स्वर्ग-नरक या संकल्पना असतात. युद्धक्षेत्रावर दुःखी झाल्यावर आपले नियतकार्य निषिद्ध ठरविण्यासाठी याच धर्माचा आश्रय करतो. या भूमिकेला अयोग्य ठरवुन याच धर्मानुसार स्वधर्माचरण हे स्वतःचे कर्तव्य आहे. हा संदेश भगवदगीता देते.
* स्वभावनियतकार्य धर्मकार्यासाठी वापरणे हे स्वर्गद्वारच ठरते.

*स्वधर्माचरण टाळले तर स्वकिय व शत्रु दोघेही अपकीर्ति गातील. म्हणुन स्वधर्माचरण आचरतांना जिंकला तर राज्य भोगशील व मृत्यु आला तर स्वर्ग मिळेल.
*स्वतःच्या सक्षमीकरणासाठी(आत्मोन्नति) स्वधर्म स्वतःच्या मार्गातील Tiebreaker (निर्द्वन्द्व) ठरते.

२. धर्म या संदर्भात भगवदगीता दुसरा महत्वाचा मार्ग/ज्ञान सांगते. स्वर्ग-नरकाचा धर्म vs. बुद्धियोगाचा मोक्षधर्म

बुद्ध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि।(२-३९)

प्रस्थापित धर्म या संकल्पनेत सकाम कर्म असल्यामुळे कार्याचा एकनिश्चय होत नाही. याला "व्यवसायआत्मिका बुद्धि" संबोधले आहे.
कामात्मनाः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां।(२-४३)
व्यवसायआत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।(२-४४)

या पार्श्वभुमिवर भगवदगीता द्वन्द्वमुक्तिसाठी बुद्धियोगनिष्ठा, ईश्वराचा आश्रय याला जीवनमार्गात Priority देते.

यावानर्थ उदपाने सर्वतः सम्प्लुतोदके।
तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः।(२-४६)

सर्व जलमय झाले असता जशी विहीरीची किंमत तशीच
ईश्वरज्ञानासमोर (सृति)धर्माची किंमत असते.
नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।(८-२७)

याच ज्ञानासंदर्भात भगवदगीतेने धर्म vs ईश्वरज्ञान यातील Prority
स्पष्ट केली. अर्थात कोणत्याही धर्माने द्वन्द्व निर्माण झाला तर
बुद्धियोगाचा आश्रय कर. मला(ईश्वराला) शरण ये.
मन्मना भव मद् भक्तो मद् याजी मां नमस्कुरु।(१८-६५)
सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।(१८-६६)

ईश्वराचा आश्रय असलेला हा धर्म कोणता आहे?हाच
भगवदगीतेचा मुख्य विषय आहे.
स्वल्पम् अपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।(२-४०)

*यांत ईश्वराची ओळख ज्ञानविज्ञानासह दिली.

मया अध्यक्षेण प्रकृतिः सुयते सचराचरम्।(९-१०)
अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।(१०-८)
ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

या ज्ञानामुळे मनुष्याचा जीवनविकासमार्ग "अमृतत्वाय कल्पते" असा बनतो. व्यवहारातील सकाम कार्य याच मार्गात Transform केल्याने निष्काम कार्य करतो.

*कर्म करण्याचा अधिकार आहे, फलाचा नाही. म्हणुन फलत्याग करणे अर्थात सिद्धि-असिद्धि यांत समत्वयोगाने कार्यरत असणे अभिप्रेत आहे.
कर्मण्येव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।(२-४७)
योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय।(२-४८)

* या धर्मात कार्याचा एकनिश्चय (Determination) असतो.
बुद्धियोगामुळे चंचलत्वावर, द्वन्द्वावर मात होते.
बुद्धियुक्तो जहातीह उभेसुकृतदुष्कृते।(२-५०)

*सर्व धर्मांचे मुळ असलेल्या, ज्याला ज्ञानविज्ञानाचा आधार आहे अशा आत्मोन्नतिच्या या धर्माला शाश्वताचा धर्म, अमृताचा धर्म असे संबोधन आहे.

*या धर्माचे logic बंधन vs मोक्ष, अशाश्वत vs शाश्वत, Attachment vs Detachment, द्वन्द्व vs निर्द्वन्द्व, सकाम कर्म vs निष्काम कर्म असे आहे. याच logic नुसार ईश्वराचा आश्रय शाश्वताचा आश्रय ठरतो.

"Religion is the everlasting dialogue between humanity and God. Art is its soliloquy. "
-Franz Werfel

********

(१८-६६)/४:
"अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः"
(Importance of Determination & Freedom)

एखादा महत्वाचा निर्णय होतो, हा निर्णय समुहातील असतो किंवा स्वतः ठरवितो, हा निर्णय execute करण्याचा प्रसंग आला तर अडचण जाणवते. असे आपण अनुभवत असतो. रामायणात दशरथ महाराजांनी कैकेयीला "वर"(Promise) तर मोठ्या उदार मनाने दिले, पण Implimentation ची वेळ आली असता हाच निर्णय महाराजासाठी जीवघेणा ठरतो. श्रीराम मात्र महाराजांना काय योग्य आहे? असे बोधामृत न पाजता स्वतःची "धर्मगति"जाणुन(धरमधुरिन धरमगति जानु) वनप्रयाणाचा निर्णय घेतात. हा प्रश्न दशरथ महाराजांसाठी "निर्णय"क्षमतेचा असला तरी यांत "वचन"हे जीवनमुल्य Highlight झाले आहे. याच मुल्यांना श्रीराम धरमगति संबोधततात.

महाभारतात सर्व योध्ये ठरल्याप्रमाणे युद्धक्षेत्रावर आले. कुणालाही अडचण जाणवली नाही. फक्त अपवाद ठरला अर्जुन!युद्ध करण्यासाठी रथावर आरुढ झालेला व युद्धासाठी उत्साहीत असलेला अर्जुन दुसऱ्याच क्षणी म्हणतो "मी युद्ध करणार नाही".

स्वतःच्या मार्गाचे ज्ञान, स्वतःची जबाबदारी कळली नसली तरी अर्जुन मात्र स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी (धर्म) ज्ञान वापरतो.

अज्ञानाला ज्ञान संबोधतो. या संदर्भात दोरीला साप समजणे ही उपमा देण्यात येते. या अज्ञानाचे कारण अध्यात्माचे अज्ञान सांगण्यात येते. अर्थात हा मनोविज्ञानाचाच विषय असतो.

"निर्णयक्षमता" या संदर्भात "कर्मण्येवाधिकारस्ते" याद्वारा " मनुष्याचा निर्णयअधिकार" जागृत करते. १. स्वतःचा निर्णयअधिकार जाणला तरच कार्याचा दृढनिश्चय करु शकतो. २. मनाच्या चंचलतेमुळे निश्चय होत नाही म्हणुन मनाची चंचलता व त्यावर उपाय या संदर्भात मनोवश व आत्मवश State of mind भगवतगीता स्पष्ट करते व मनोविज्ञान याच संदर्भात जीवनविकासाचे ज्ञान व स्वतःच्या मार्गाचे (अमृतत्वाय कल्पते) ज्ञान व महत्व भगवतगीता स्पष्ट करते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।(९-३३)

"Your grief path is yours alone, and no one else can walk it, and no one else can understand it. "

- Terri Irwin

दुःख बंधनाचे कारण ठरते म्हणुन मोक्ष/स्वातंत्र्यासाठी ईश्वराच्या ज्ञानाचे महत्व स्पष्ट होते. परिणामभयापासुन मुक्तिसाठी व स्वातंत्र्याचा आनंद अनुभवण्यासाठी हा मार्ग मनुष्याचे

मुळ(शाश्वत) जीवित तत्व व अंतिम धाम याला जोडणारा मार्ग असतो(२-१५). याच संदर्भात प्रकृति - पुरुष व ईश्वराचे (पुरुषोत्तम) ज्ञानविज्ञानासह (सत, रज, तम, गुणातीत) भगवतगीता स्पष्ट करते. याचसाठी बुद्धियोग, ईश्वराचा नित्य आश्रय करुन योगयुक्त असणे याचा उल्लेख भगवतगीतेत आलेला आहे. चंचलत्व, संशय निर्माण करणाऱ्या धर्मापेक्षा ईश्वरज्ञानाला Priority दिलेली आहे.

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥(१८-६६)

संस्कृति या संदर्भात व्यावहारिक बोध:

Morality या संदर्भात स्वतःचा निर्णय अधिकार व क्षमता Master morality असते, तर मत लादण्याची व लादुन घेण्याची प्रवृत्ति Herd/Slave Morality असे तत्वज्ञ निट्झी स्पष्ट करतो.

भारतिय संस्कृतित कथाकहान्यातुनही निर्णयक्षमता (Determination) हा विषय highlight झाला आहे. अर्थात लोक Master Morality असलेल्या कथा ऐकतात. यांत सावित्रीची कथा Determintion ची शक्ति highlight करते.

सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्ष आहे, हे कळुनसुद्धा सावित्रीचा निर्णय बदलत नाही. Consequencesला सामोरे जाण्याची शक्ति आपल्यात आहे हा विश्वास सावित्रीला असतो.

या जगात एकच गोष्ट स्वस्त आहे, फुकट सल्ला!कथीत शहाणे "ज्ञानी" समजुन सल्ले देत असतात. आदेश, उपदेश करणे त्याला आवडते, पण स्वतःचा किंवा इतरांचा निर्णयअधिकार दुर्लक्षित होतो. एखाद्या व्यक्तिला निर्णय घेतांना अडचण आली तर त्याने तोच निर्णय घ्यावा यासाठी "शहाणपणाचे बोल सांगणारे" म्हणतात, "मी म्हटले" म्हणुन तो तयार झाला. व हे कथीत शहाणे स्वतःच्या पाठीवर थाप मारुन घेतात. भगवतगीता असा कथीत शहाणपणाचा विषय नाही, तर हा स्वतःच्याच निर्णयक्षमतेचा विषय आहे.

याच पार्श्वभुमिवर भगवतगीतेतील "ईश्वर " हा विषय अंधश्रद्धेचा नाही, तर Determination, स्वातंत्र्य याची शक्ती अनुभवण्यासाठी ज्ञानाचा विषय आहे हे भगवतगीतेतुन स्पष्ट होते.

*********

(१८-६७)

************************

इदं ते ना तपस्काय ना भक्ताय कदाचन।

न च अशुश्रूषवे वाच्यं न च मां यो अभ्यसूयति।।

**********************

(१८-६७)/१:

: "इदं ते ना तपस्काय ना भक्ताय कदाचन "

"इदं ते ना तपस्काय ना भक्ताय कदाचन " हा संदेश भगवतगीतेचे वाचन-श्रवण या संदर्भात निर्बंध दर्शवितो. वर्तमानातील ज्ञानविज्ञानाचे युगात त्याचे कारण जाणुन घेणे महत्वाचे आहे.

१. व्यवहारात कार्याद्वारे कर्मसिद्धि होत असते. व कार्याद्वारेच ईश्वरभक्ति साध्य करणे हे रहस्यज्ञान भगवतगीता सांगते.

ईश्वरावर श्रद्धा असणारे ईश्वराचे अस्तित्व मान्य करतात.

ईश्वराचे अस्तित्व ज्ञानविज्ञान आधारावर जाणुन कार्याद्वारे ईश्वरभक्ति साध्य करण्याचे कौशल्य भगवतगीता स्पष्ट करते. व सर्व संशयापासुन ( पाप-पुण्य, स्वर्ग-नरक) मुक्त करते.

अहं त्वाम् सर्वपापेभ्यो मोक्ष्ययिष्यामि मा शुचः।(१८-६६)

२. प्रत्येक मनुष्य "मी योग्य" जाणुन जगत असतो. योग्य नसला तरी "मी योग्य कसा?" हे सिद्ध करण्यासाठी बाह्यज्ञानाचा उपयोग करतो. पण वास्तवाचा, अज्ञानाचा स्विकार करीत नाही. हे मानवी जीवनाचे वास्तव आहे.

बुद्धिप्रामाण्यवादी केवळ उपलब्ध ज्ञानविज्ञानावर Believe करतात. उपलब्ध ज्ञान प्रमाण जाणुन समाजातील कोणताही प्रश्न असो, त्याला Judgement thinking ने सोडविण्याचा प्रयत्न केला तर प्रश्न सुटत नाही. अर्जुनाला प्रश्न पडतो(युद्ध योग्य कि अयोग्य) व याच Judgement thinking चा वापर करुन प्रश्नाला निकालात काढतो. ही Belief system श्रद्धाच असते. अशा प्रयत्नाला भगवतगीता प्रज्ञावाद संबोधते. व प्रश्न सोडविण्यासाठी ज्ञानविज्ञानाचा वापर कसा होतो, याचे ज्ञान स्पष्ट करते.

ज्ञानविज्ञानात Reasoning असते. यासाठी प्रश्नाची पारदर्शकता महत्वाची ठरते. अर्जुन वास्तव स्विकारतो व. प्रश्नाची पारदर्शकता येते . याप्रमाणे ऐकण्यास तयार होतो. तेंव्हाच रहस्यज्ञान सांगण्यात आले.

३. सुखदुःख जीवनांत महत्वाची भूमिका बजावते. सुखाच्या हेतुने दुःख टाळुन जगण्याच्या प्रयत्नात मनुष्य निष्क्रियतेचे समर्थन करतो व यालाच ज्ञान म्हणुन सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. हा मानसशास्त्राचा भाग असतो म्हणुन मानसशास्त्राच्या भाषेतच मनोदुर्बलता दुर करण्यासाठी निर्भय, दुःखमुक्त(योग) होण्याचे शास्त्र (योगासाठी कार्य) भगवतगीता सांगते. व यासाठी ईश्वरभक्तिचे महत्व स्पष्ट करते.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

प्रत्येक क्षणात कार्य घडते. कार्याद्वारे ईश्वरभक्ति साधते, त्यावेळी Higher consciousness क्रियाशिल असते. म्हणुन भगवतगीतेत मनोविज्ञानज्ञान आले. Consciousness ला क्षेत्रज्ञ संबोधले. प्रकृति(जड) व पुरुष(चेतन) यांचे ज्ञानविज्ञानाद्वारे देवता(मानुषिं तनुम् आश्रिता:) व ईश्वर(अव्यय) यांतील भेद स्पष्ट होतो.

## ४. श्रद्धा व ज्ञानविज्ञान

श्रीकृष्णाच्या भूमिकेतुन कथित अंधश्रद्धा निर्मुलन कार्याचे दर्शन होते. पाऊस पडण्यासाठी इंद्रपुजा vs गोवर्धन(-वृक्षारोपण) हे उदाहरण बोलके आहे.

श्रद्धेविणा या जगात कुणिही नाही.
सत्व अनुरुपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत।(१७-३)

ईश्वरश्रद्ध मनुष्य कर्मसिद्धिसाठी देवता भजतात.
कांक्षतः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः।(९-१२)

"देवता"भजन या संदर्भात प्राचिन संदर्भ भगवतगीतेत दिला.
सहयज्ञाः प्रजा सृट्वा पुरा उवाच प्रजापति।..
परस्परं भावयन्तः श्रेयः परम् अवाप्स्यथ।।(३-११)
यज्ञाद्वारे देवताभजन करुन परस्पर सहकार्य साधणे.

वर्तमानात कार्याद्वारे ईश्वरभक्तिसाठी "यज्ञ" तत्वाचा वापर भगवतगीतेने व्यवस्थापन कौशल्य या संदर्भात केला. म्हणुन व्यवहारकार्याला "यज्ञ"कार्य संबोधले.

वर्तमानात मनुष्य देवतांची भक्ति करीत असला तरी ईश्वरश्रद्धा ही Strength असते. व्यवहारात जगण्यासाठी ईश्वराचा आश्रय या संदर्भात भगवतगीता बुद्धियोगाचे महत्व स्पष्ट करते. ईश्वरभक्तिसाठी शाश्वत (अमृतंगमय) मार्गाचे महत्व कळते. याप्रमाणे श्रद्धा आणि ज्ञानविज्ञान यांचा संबंध भगवतगीतेने स्पष्ट केला आहे.

५. "If you think you can win. Yes you can. "
"If you think you ca'nt win You are right. "

येथे दोन्ही Statement बरोबर असतात. जीवनात दुःख हे वास्तव असते पण यामुळे नकारात्मक होणे वा सकारात्मक होणे, ही मनुष्याची Choice असते. Difficulty ला Opportunity बनविणे ही सकारात्मकता असते.

येथे प्रश्न Belief system चा, श्रद्धेचा असतो. श्रद्धा असेल तर Listner होईल व ज्ञान जाणुन घेण्याची जिज्ञासा होईल.

भगवतगीता जाणुन घेण्याचा विषय आहे. वादाचा विषय नाही. या संदर्भात ज्ञानाचे आदानप्रदान भक्तिच ठरते. ज्ञानाच्या आदानप्रदानात प्रश्नोत्तर असते. तर याला वादाचा विषय बनविला तर प्रतिक्रिया असते, Arguments असतात. या संदर्भात मार्क ट्वेन म्हणतो,

"Never argue with stupid. He will drag you to his level and beat with experience"

याचपार्श्वभुमीवर श्रीकृष्ण येथे निर्बंध जाहिर करतात.

"इदं ते ना तपस्काय ना भक्ताय कदाचन।
न च अशुश्रूषवे वाच्यं न च मां यो अभ्यसूयति।।(१८-६७)

*******

(१८-६७)/२:

"न च अशुश्रूषवे वाच्यं न च मां यो अभ्यसूयति"

(सावधान)

मनुष्यजीवनात आणुन ईश्वराने आपल्याला विकासाची संधी दिलेली आहे म्हणुन आपल्या जीवनाची स्वतःच जबाबदारी स्विकारुन स्वतःच्या निर्णयअधिकाराचे महत्व जाणणे आवश्यक आहे. ही अत्यंत महत्वाची जागृति भगवतगीतेने "कर्मण्येवाधिकारस्ते" याद्वारा केलेली आहे.

मनुष्याला निर्णयक्षमता (Determination)असो वा नसो, त्याच्या जीवनाचा (अर्थात जीवनमार्गाचा) तोच जबाबदार असतो. रामायणकार महर्षि वाल्मिकीचा पुर्वाश्रमीचा वाल्या हेच सत्य जाणतो. व स्वतःत बदल घडवुन आणतो.

विश्वात जे घडते, तो प्रकृतिचा खेळ(व्यवस्था) आहे. मनुष्य याच विश्वाचा, प्रकृतिचा घटक आहे. ईश्वरावर श्रद्धा असणारे, भजणारे असे मानतात व जाणतात, स्वतःच्या जीवनात जे घडत आहे ईश्वरच घडवीत आहे. हा त्यांच्या श्रद्धेचा प्रश्न असतो. तर ज्यांची ईश्वरावर श्रद्धाच नाही, त्यांचा हा प्रश्नच नसतो. श्रीकृष्णावर श्रद्धा असल्यामुळे युद्धासाठी "श्रीकृष्ण कि सेना "यांत अर्जुनाने श्रीकृष्णाची निवड केली.

एखादा व्यक्ति म्हणतो, जगाचे कठीण आहे!"जगाचा प्रवास प्रलयाकडे होत आहे असे ठामपणे भाष्य करणारेही असतात. हाॅलिवुडने यावर सिनेमा बनवुन करोडोचा गल्ला मिळविला. अशा नकारात्मक Statement वर argument करणे केवळ डोकेदुखी असते.

एतां दृष्टिम् अवष्टभ्य नष्टात्मानो अल्पबुद्धयः।

प्रभवन्ति उग्रकर्माणः क्षयाय जगतोअहिताः।।(१६-९)

म्हणुन मार्क ट्वेन म्हणतो,

"Never argue with stupid people, they will drag you down to their level and then beat you with experience. "

-Mark Twain

याच संदर्भात भगवतगीता "सावध" करते,

इदं ते ना तपस्काय ना भक्ताय कदाचन।

न च अशुश्रूषवे वाच्यं न च मां यो अभ्यसूयति।।(१८-६७)

अर्थात ईश्वरावर श्रद्धा असणारे मानतात, जाणतात कि या सृष्टिच्या प्रवासात(व्यवस्थापनात)ईश्वराची "अध्यक्ष" या भूमिकेत महत्वाची भूमिका असते. हेच सत्य भगवतगीता सांगत आहे.

मया अध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।(९-१०)

याच सत्यावर आधारीत प्रकृतिचा(विश्वाचा) प्रवास "जगतहिताय" असावा हीच ईश्वराची इच्छा आहे. याच सृष्टिचा घटक असल्यामुळे जगतहीताय भावना होण्यासाठी जीवनात चांगलेपणाचे, सकारात्मक भाष्याचे महत्व माझा(ईश्वराचा)भक्त जाणत असतो.

विश्वाच्या शांतिसाठी World Peace Advocate म्हणुन ख्याती प्राप्त असलेला ना ॅर्मन "Quality of Life या संदर्भात म्हणतो,

Quality of life:

#1. Realize that each human being has a built-in capacity for recuperation and repair.

#2. Recognize that the quality of life is all-important.

#3. Assume responsibility for the quality of your own life.

#4. Nurture the regenerative and restorative forces within you.

#5. Utilize laughter to create a mood in which the other positive emotions can be put to work for yourself and those around you.

#6. Develop confidence and ability to feel love, hope and faith, and acquire a strong will to live.

Norman Cousins

******

(१८-६८)

***********************

य इदं परमं गुह्यं मद् भक्तेषु अभिधास्यति।

भक्ति मयि परां कृत्वा मामेव एष्यति असंशयः।।

*************************

१८. ६८:

"य इदं परमं गुह्यं मद् भक्तेषु अभिधास्यति"

(Speaker -listner of Bhagwatgeeta)

जगातील ( Religion) धर्म व भगवतगीतेतील(अध्यात्म) धर्म यातील ईश्वराची भूमिका कोणती हा भेद जाणणे महत्वाचे ठरते. बहुतेक (नीति-Religion)धर्मात ईश्वराचे अस्तित्व मान्य केले आहे व यांतील धर्मसंस्थापक विविधरुपाने ईश्वराचे प्रतिनिधित्व करीत आहे. भगवतगीतेत साक्षात ईश्वराचा अवतार आहे, प्रतिनिधी नाही. व यांत धर्माचे मुलभूत तत्व (अध्यात्म व नीति)अस्पष्ट केले आहे. अध्यात्म Self-Help या संदर्भात आहे, तर नीति Team-culture या संदर्भात आहे.

समुहात नीतिचे महत्व असते. धर्म-अधर्म ही स्थिति योग्य-अयोग्य ठरवीत असते. व पर्यायाने धर्म या संदर्भातील पाप-पुण्य ठरवीत असते. यामुळेच अर्जुनाला आपल्या कार्यात पापाचे भय वाटते. व धर्माला अधर्म व अधर्माला धर्म(योग्यला अयोग्य व अयोग्यला योग्य) ठरवितो. हे चुकीचे Perception मोहामुळे अर्थात Mode of darkness/ Ignorance (तम) यामुळे होते. म्हणुन State of mind या संदर्भात बुद्धियुक्त असणे, ज्ञान या संदर्भात Mode of wisdom (सत), व समुहातील धर्म-अधर्म या संदर्भात "स्वधर्म" या जीवनमुल्याचे महत्व आहे.

Self help या संदर्भात "स्वधर्म" जीवनमुल्य ठरते. यामुळे कार्याचा निश्चित निर्णय होतो. द्वंद्वमुक्ति होते. तसेच Self approval (स्वातंत्र्य) असते. स्वधर्माचरण म्हणजे कार्य ईश्वराला समर्पण ही भक्ति असते.

ज्ञान या संदर्भात भगवतगीतेत ईश्वराची ओळख दर्शविली. जे तत्व जीवनयात्रेत मनुष्याला जीवित ठेवते, तोच ईश्वर जीवनयात्रेत अंतिमधाम असते. या आधारावर मनुष्याचा शाश्वत विकासाचा मार्ग(अमृतत्वाय कल्पते) ठरतो. या मार्गावर विचलित होत नाही. विचलित न होणे याच संदर्भात मनोवश(Senses mind) व

आत्मवश (Higher mind) हा भेद स्पष्ट होतो. हेच Selhelp चे ज्ञान ठरते. हेच अध्यात्मज्ञान भगवतगीतेतील धर्माचा आधार आहे. म्हणुन "नीति" या संदर्भातील द्वंद्वमुक्ति जीवनमार्गात Selfhelp साठी ईश्वराचा आश्रय भगवतगीता highlight करीत आहे.

वर्तमानात ज्ञानविज्ञान आले. जीवनातील वास्तव स्विकारले तर प्रश्न कळतो. काय हवे? कळते. ज्ञानविज्ञान या संदर्भात प्रश्नाचे निदान होणे ही प्रथम पायरी असते. काय साध्य करायचे आहे?हा विषय ठरतो.

अर्जुन वास्तव(योग्य-अयोग्य हा संशय) hide करतो. मी योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. म्हणुन ज्ञान कशासाठी? स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी कि अडचणी सोडविण्यासाठी?संशयमुक्तिसाठी?हा प्रश्न उपस्थित होतो.

याचाच अर्थ ज्ञानविज्ञान हाच भगवतगीतेचा विषय आहे. यातच जीवनातील अध्यात्मज्ञानाचा समावेश आहे.

ज्ञानं ते अहं सविज्ञानम् इदं वक्षामि अशेषतः।

यद् ज्ञात्वा न भूयो अन्यत् ज्ञातव्यम् अवशिष्यते।।(७-२)

याप्रमाणे Teamculture(नीति) साठी Self help भगवतगीतेचा विषय आहे. व Selfhelp या संदर्भात "स्वधर्म" महत्वाचे आहे. व धर्मज्ञान या संदर्भात कार्याद्वारे ईश्वरभक्ति(भगवतगीताज्ञान) महत्वाची आहे.

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्वपापेभ्यः मोक्षयिष्यामि मा शुचः।।(१८-६६)

सार:

जीवनात मनुष्य सुखाच्या इच्छेनेच जगत असतो, पण अडचणी जाणवतात, दुःख येते. हे जीवनाचे वास्तव असते. पण जीवनांत अडचण जाणवत असतांनाही वास्तव न स्विकारता जेंव्हा मनुष्य स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञानाचा वापर करतो, तेंव्हा संवाद होत नाही. मनुष्य Listner नसतो. समाजातील याच संवयीमुळे ज्ञानविज्ञान असुनही प्रश्न सुटत नाही. म्हणुन ईश्वरज्ञानाचा आश्रय करणे याचे प्रयोजन आहे. व याचसाठी भगवतगीतेचे प्रयोजन आहे.

अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम् ।(९-३३)

जे ईश्वरश्रद्ध आहेत, ईश्वरभक्त आहेत व ज्ञानविज्ञान या संदर्भात(विश्वाचे, जीवनमार्गाचे ज्ञानविज्ञान जाणण्यास) जिज्ञासु आहेत, त्यांना भगवतगीता ज्ञान सांगणे. तसेच जो श्रद्धेने ऐकतो त्यांना ईश्वराची भक्ति घडत असते.

य इदं परमं गुह्यं मद् भक्तेषु अभिधास्यति।
भक्ति मयि परां कृत्वा मामेव एष्यति असंशयः॥(१८-६८)

श्रद्धावान् अनसूयश्च शृणुयात् अपि यो नरः।
सोअपि मुक्तः शुभान् लोकान् प्राप्नुयात् पुण्यकर्मणाम् ॥(१८-७१)

"जीवनमे क्या पाया?क्या खोया?
जो पाया है वह रबकी मेहरबानी हे।जो खोया वह मेरी नादानी है।
बडा खुबसुरत रिश्ता है मेरा रबसे, मै जादा मांगता नही, वह कम देता नही।"

"ईश्वरकी शरणमे जीयो और डरको भगाओ।क्यों डरते हो आगे क्या होगा?कुछ नही होगा तो तजुर्बा तो होगा!"

******

(१८-६८) :

"भक्ति मयि परां कृत्वा मामैव ऐष्यति असंशयः"

(भगवदगीतेचे महात्म्य:Spiritual Revolution)

क्रान्ति म्हणजे बदल. जगातील स्वातंत्र्यक्रान्त्यांनी जगाला बदलविले आहे. मनुष्यजीवनातही प्रसंगी क्रान्तिची गरज असते. भगवदगीता हीच क्रान्ति(Internal battle, Spiritual Revolution) सांगत आहे. भगवदगीतेतील या ज्ञानाद्वारे (ईश्वर)भक्तांमध्ये याच क्रान्तिची ज्योत पेटविल्या जाते.

य इदं परमं गुह्यं मद् भक्तेषु अभिधास्यति।
भक्ति मयि परां कृत्वा मामैव ऐष्यति असंशयः।।(१८-६८)

*भगवदगीता ज्ञानाची पार्श्वभुमि:

जगात व्यवहार असतो. व्यवहारातील अन्याय दुर करण्यासाठी महाभारतात धर्मयुद्ध ठरले. अर्जुनाचा कार्यनिश्चय होतो. जीवनमार्गात कार्याचा निश्चय एक असेल तर निष्ठेने कार्यरत होतो. Purpose loyalty असते.

अर्जुन मार्गावर आला असता त्याला अडथळा जाणवतो व निष्क्रियतेचे समर्थन करतो. व्यवहार या संदर्भात Commitment प्रमाणे शब्द न पाळणे हा व्यावहारिक दोष असतोच पण मला राज्य नको असे सांगुन आपल्या निष्क्रियतेला धर्म, आदर्श, ज्ञान याचा बुरखा चढवितो. वाघाचे कातडे पांघरुन कोल्हा वाघ बनत नाही. हा स्वतःचा भ्रम असतो. तसेच अर्जुन स्वतःच्या समाधानासाठी भ्रमात सापडतो.

कर्म केल्यानंतर योग्य मोबदला मिळत नाही व या शोषणावर धर्माचा बुरखा चढविल्या जातो. या व्यावहारिक दोषाचे निर्मुलन करण्यासाठी कार्ल मार्क्सने अशा धर्मालाच अफुची गोळी ठरविले. याच व्यावहारिक दोषाचे निर्मुलन करण्यासाठी भगवदगीता "धर्मस्थापना" हा शब्द वापरते व धर्म, आदर्श, ज्ञान या सर्वांवर प्रकाश टाकते.

*धर्मस्थापना(Spiritual Revolution)

"कुण्या व्यक्तिकडे पाळीव पोपट असतो. वनातील मुक्तपणे बागडत असलेले पोपट पाहुन आपल्या पोपटाला मुक्त करण्याची त्याला इच्छा होते. व पोपटाला मुक्त करुन म्हणतो, तु आता स्वतंत्र आहे, मुक्तपणे संचार कर. स्वतंत्र झाल्यावर कांही वेळाने पोपट परत पिंजऱ्यात येतो. हेच माझे स्वातंत्र्य आहे असे मालकाला सांगतो व नीट व्यवस्था करण्यास सांगतो. (त्याची नैसर्गिक Born-free पंखशक्ति क्षीण झालेली असते). मालक नेहमीप्रमाणे व्यवस्था करतो. पण पोपट मेव्याची मागणी करतो, मागण्या दिवसेंदिवस वाढत जातात. पोपट क्रान्तिची धमकी देतो व एकदिवस त्रागा करुन मरुन पडतो. "

जगातील सर्व प्राणिमात्रांना त्याच्या Survival साठी निसर्गाने नैसर्गिक gift (Born-free) दिलेले असते. तसेच मनुष्याला स्वतंत्र बुद्धि व कर्माचे gift दिलेले आहे. "धर्मस्थापना" एकप्रकारे Revolution असते. समाजातील स्वैरतेवर मात करण्यासाठी मोझेसने "Ten Commandments द्वारा धर्म सांगितला.

याच पार्श्वभुमिवर "स्वैरता vs. स्वातंत्र्य" समजुन घेणे आवश्यक आहे. भगवदगीतेप्रमाणे स्वैरता बुद्धिनाशाचे कारण ठरते. म्हणुन बुद्धियोगाचे महत्व सांगितले.

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषु उपजायते।

..... बुद्धिनाशात् प्रणश्यति ॥(२-६३)

नास्ति बुद्धिःयुक्तस्य न च अयुक्तस्य भावना।

.......... अशांतस्य कुतः सुखं॥(२-६६)

याप्रमाणे स्वैरता vs स्वातंत्र्य या संदर्भात बुद्धिनाश vs. बुद्धियोग, बंधन vs. मोक्ष धर्मस्थापना अर्थात भगवदगीतेतील ही क्रान्ति(Spiritual Revolution) आहे.

*Internal battle/Spiritual Revolution

जगात सुख-दुःख, दिवस-रात्र, शित-उष्ण, चांगले-वाईट, ज्ञान-अज्ञान, धर्म-अधर्म अशी Polarity असते. जीवनातील स्वातंत्र्यक्रान्तिचे अर्थात जीवनविकासाच्या मार्गाचे ज्ञान होण्यासाठी(Internal battle या संदर्भात) खालीलप्रमाणे Polarity चा उपयोग होतो.

*वाईट vs चांगले

द्वन्द्व vs. निर्द्वन्द्व

निर्द्वन्द्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्।(२-४५)

बुद्धियुक्तो जहातीह उभेसुकृतदुष्कृते।(२-५०)

*असुरी vsदैवी

भित्रा vs निर्भय

अभयं सत्त्वसंशुद्धिः।(१६-१)

मा शुचःसंपदम् दैवीम् अभिजातोअसि पांडव।(१६-५)

* मनोवश vs आत्मवश

आत्मवश्यै विधेयात्मा प्रसादम् अधिगच्छति।(२-६४)

इंद्रियाणां हि चरतां यत् मनो अनुविधीयते।(२-६७)

*अनार्य vs आर्य

अनार्यजुष्टम् अस्वर्ग्यम् अकीर्तिकरम् अर्जुन।(२-२)

*सामान्य vs. श्रेष्ठ

मनोदुर्बलता vs. योग(दुःखान्त)

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप।(२-३)

यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ।(२-१५)

सार :

Youth of the World looking for new revolution . It is "Spiritual Revolution".

*The world is starving for a new spiritual truth - a truth that works in sustaining life, not a truth that brings an end to life.

-Neale Donald Walsch

*Illuminate the wonderful light within you.

-Lailah Gifty Akita,

*The greatest challenge of the day is: how to bring about a revolution of the heart, a revolution which has to start with each one of us?

-Dorothy Day

********

(१८-६९)

*************************

न च तस्मात् मनुष्येषु कश्चित् मे प्रियकृतमः।

भविता न च मे तस्मात् अन्यः प्रियतरो भुवि।।

*************************

(१८-६९):
"न च तस्मात् मनुष्येषु कश्चित् मे प्रियकृतमः"
(भगवदगीता रहस्य)

*गुह्य ज्ञान :

भगवदगीतेत असे कोणते गुह्यज्ञान(रहस्य) जाणुन घेण्यालायक आहे कि, त्याच्या (ईश्वराच्या) भक्ताला हे ज्ञान कळावे ही श्रीकृष्णाची इच्छा आहे?
न च तस्मात् मनुष्येषु कश्चित् मे प्रियकृतमः।
भविता न च मे तस्मात् अन्यः प्रियतरो भुवि।।(१८-६९)

श्रद्धेशिवाय, गरजेशिवाय कुणीही ऐकत नसतो. ज्ञान सांगण्याचा प्रसंग आला तेंव्हाच श्रीकृष्णांनी अर्जुनाला हे रहस्य(गुह्यज्ञान) सांगितले, जेणेकरुन अर्जुन स्वतःचा कार्यनिश्चय करण्यासाठी सक्षम व्हावा.

जीवनयात्रेत मनुष्य कार्यरत असतो. स्वतःचे कार्य ठरणे हा व्यवहार असतो. (State of want-State of Art). व्यवहारात याचमुळे सकाम कार्याची मानसिकता असते. अपेक्षित यश न मिळणे, परिणामाचे भय असणे यामुळे जीवनात Frustration येते. काय करावे, कसे जगावे याचा निश्चय होत नाही. पण या मनःस्थितित जसा विचार करतो, तोच योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. अर्थात नकारात्मक विचार असुनही "मीच योग्य" ही स्थिति अहंकाराचा आश्रय असतो. हा अशाश्वताचा आश्रय असतो.

*Transformation:

जन्ममृत्यु हे जीवनचक्र असते. या जीवनचक्रातील "अशाश्वताचा आश्रय vs शाश्वताचा आश्रय" याचे शास्त्र जाणुन घेण्यासाठी

भगवदगीता (Frustration to Self confidence असा मानसिक बदल: Transformation) ज्ञान सांगत आहे.
याला "बंधन vs. मोक्ष" असे संबोधन केलेले आहे.
अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्।(९-३३)

अर्थात जीवनयात्रेतील मार्ग "अमृतत्वाय कल्पते"(२-१५) असा होतो. (अव्यक्त)ईश्वर ही शाश्वत संकल्पना(अमृत) आहे, ज्याचे ज्ञानविज्ञान भगवदगीता सांगत आहे. याचा मनुष्याशी असलेला संबंध "अध्यात्मज्ञान" या संदर्भात भगवदगीता स्पष्ट करीत आहे.

"अशाश्वताचा आश्रय vs. शाश्वताचा आश्रय" या संदर्भातील शास्त्र :
*अहंकार vs. ईश्वर
अहंकार विमुढात्मा कर्ताहम् इति मन्यते।(३-२७)
समाजात अहंकार vs. आत्मविश्वास यांत गैरसमजुत असते.
जीवनात आत्मविश्वास आवश्यक असतो, यामुळेच कार्याचा एकनिश्चय होतो. तर नकारात्मक असला तरी स्वतःला " मी योग्य " सिद्ध करण्याचा दुराग्रह असणे हा अहंकार असतो.

*सकाम कर्म vs. निष्काम कर्म

परिणामभयामुळेच चंचलत्व असते. कार्यनिश्चय होत नाही. व कर्मयोगात कार्याचा दृढनिश्चय हे साधन असते. या मार्गात निर्णय स्वतःचा असतो. पण निर्णय दृढ होण्यासाठी निष्काम कर्म हे प्रयोजन आहे. निष्काम कर्म या संदर्भात ईश्वराला फलसमर्पण, (सिद्धि-असिद्धि यांत)समत्वयोगाने कार्यरत असणे असे शब्दप्रयोग आहेत.

*द्वन्द्व vs. निर्द्वन्द्व

इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।

तयोःन वशम् आगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ।।(३-३४)

अर्थात कार्यात योग्य-अयोग्य, यश-अपयश हे द्वन्द्व असतात. या द्वन्द्वाला वश असणे बंधन असते. कार्याचा एकनिश्चय निर्द्वन्द्व अवस्था दर्शविते. व हेच "मोक्ष" या संदर्भात साधन आहे.

********

(१८-७०)

************************

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादम् आवयोः।

ज्ञानयज्ञेन तेन अहं इष्टः स्याम् इति मे मतिः॥

**************************

(१८-७०):"अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादम् आवयोः"

जगात कालानुरुप परिवर्तन होत असते. वर्तमानातील विज्ञानयुगात लोक धर्म, ईश्वर याला Outdated ही ठरवितात. भगवतगीतेत धर्म व ईश्वर या दोहोंचाही उल्लेख आहे. निर्विवाद भगवतगीता "धर्म-अधर्म "या संदर्भातील संवादरुपाने जगासमोर आली असली तरी "ज्ञान" जगात नेहमीच पुजनिय राहील हा भगवतगीतेचा संदेश आहे. व या संवादरुपी ज्ञानाच्या अध्ययनाला "ज्ञानयज्ञ" संबोधले आहे.

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादम् आवयोः।

ज्ञानयज्ञेन तेन अहं इष्टः स्याम् इति मे मतिः॥(१८-७०)

"ज्ञान" या दृष्टितुनच जगाचा, जगातील तत्वज्ञान, धर्म यांचाही अभ्यास होत असतो. जगाचा इतिहास वास्तवावर लिहिल्या जातो. इतिहासकाराने Judgemental thinking वापरले तर वास्तव hide होते. योग्य-अयोग्य, चांगले-वाईट हे Judgemental thinking असते. "ज्ञान" या संदर्भात मात्र वास्तव महत्वाचे असते.

मनुष्यजीवनातील वास्तव ही त्याची Reality असते. मनुष्याला स्तुती आवडते. निष्क्रिय झाला तर समर्थन करतो. अर्जुन निष्क्रियतेचे समर्थन करतो. हे Judgemental thinking असते. यामुळे वास्तव hide होते. हीच मानसिकता भगवतगीता प्रकाशात आणते. व Self approval स्वतःच्या सक्रियतेवर(याच संदर्भात नियतकार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब Self approval असते. ) कि निष्क्रियतेवर? हा प्रश्न highlight होतो.

हा एकच प्रश्न अनेक विषयाला जन्म देतो. व त्याचे स्पष्टिकरण भगवतगीता देते.

*ज्ञान काय आहे?(प्रकाश)

*अधर्म काय? (शोषण बाह्यविघ्न, बुद्धिभ्रम आंतर्विघ्न)

*जीवनात कार्याची भूमिका कोणती?

*सुखी होणे म्हणजे काय?

*मनुष्य आपल्या जीवनाला कसे ओळखतो व याचे प्रयोजन काय?

*जीवनात चांगलेपणाचे महत्व काय?

*ईश्वराची या विश्वातील अस्तित्व व भूमिका काय?

"परित्राणाय साधुनाम् "यासाठी ईश्वराची धर्मस्थापना भूमिका व "मा शुचः संपदम् दैवीम् " असे अर्जुनाला संबोधन, याद्वारा जीवनात चांगलेपणाचे महत्व स्पष्ट होते. चांगल्या मनुष्याने कोणती भूमिका घ्यावी? याची स्पष्टता कळते. जीवनात चांगलेपणा चालत नाही अशी व्यथा मनुष्य बोलुन दाखवतो, तेंव्हा चांगलेपणाची ही हार असते. चांगलेपणा दुबळी होणे समाजहीतासाठी अयोग्य असते. चांगल्या मनुष्याचे हे आंतर्विघ्न ठरते. चांगलेपणा शक्ति व्हावी यासाठी ईश्वर(ज्ञानाचा) आश्रय प्रयोजन आहे. (Free from Doubt).

बुद्धियुक्तो जहातिह उभे सुकृतदुष्कृते।

तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।(२-५०)

******

(१८-७०) :

" धर्म्यं संवादम् आवयोः"

(ज्ञानयज्ञ)

अर्जुनाला जीवनात कोणताच समाधानकारक मार्ग दिसत नाही. मला कांहीच नको तर निष्कारण दुःख कां ओढवुन घ्यायचे म्हणुन युद्धक्षेत्रावर निष्क्रिय राहणे हा पर्याय निवडतो. हा शहाणपणाचा निर्णय आहे असे अर्जुन Declare करतो. आपले म्हणणे शहाणपणाचे आहे हे

सिद्ध करण्यासाठी धर्माचा दाखला देतो. अर्जुन श्रीकृष्णाला हे धर्माचे शहाणपण सांगत होता.

तं तथा कृपयाविष्टम् अश्रुपुर्णा कुलेक्षणम्।(२-१)

प्रत्यक्षात मात्र अर्जुन आंतुन अशांत आहे, दुःखी आहे आणि तो समाधानासाठी शहाणपणाचा बुरखा ओढत आहे हे श्रीकृष्णांनी जाणले. तुझ्यासारख्या श्रेष्ठ पुरुषाला अशी दुबळी भूमिका अशोभनिय आहे . ज्या धर्माचा अर्जुन दाखला देत आहे त्यानुसार स्वर्गापासुन, कीर्तिपासुन वंचित करणारी ही भूमिका आहे. अशी समज देतात. यातुनच श्रीकृष्ण व अर्जुन यांचा संवाद सुरु होतो.

ज्ञान या संदर्भात श्रीकृष्णाचा अधिकार जाणुन अर्जुन आपली मानसिक स्थिति व्यक्त करतो. या स्थितिला "धर्मसम्मूढचेता" असे संबोधित करतो. अर्थात धर्मदृष्ट्या माझे कर्तव्य कोणते हे कळेनासे झाले आहे. (कारण धर्मदृष्ट्या युद्ध करणे योग्य असले तरी त्रिलोक्याचे राज्यही मिळाले तरी यामुळे माझे दुःख नष्ट कसे होणार?)

पांडवावरील अन्याय दुर करण्यासाठी अखेरचा पर्याय हे धर्मयुद्ध होते. हा मानवी व्यवहार होता. याच व्यवहारात ऐन कृतिची वेळ आली असता अर्जुनाला हा पर्याय अधर्मयुद्ध वाटतो. अर्जुनाच्या भूमिकेतुन धर्माला, शहाणपणाला, ज्ञानाला हे आव्हान होते. हे युद्ध करणे धर्म आहे असे नुसते शहाणपण त्याला ऐकायचे नव्हते. तर त्याच्या जीवनात अशी अनाकलनिय स्थिति किं आली?(मीच कां?) याचे समाधानकारक उत्तर त्याला सापडले नाही म्हणुन सरळ निष्क्रियता त्याने स्विकारली असते.

याच संवादातुन महान गुरु अशी श्रीकृष्णाची ओळख होते.
त्वम् अस्य पुज्यश्च गुरुः गरीयान्।(११-४३)

गुरुश्रेष्ठ केवळ काय योग्य आहे?असा शहाणपणा सांगत नाही तर ते ज्ञान जाणण्याची जिज्ञासा निर्माण करतो. (ज्या गावाला जायचेच नाही ती केवळ माहिती असते. तर त्या गावाला जाण्याचे महत्व काय? हे जाणले तर त्या माहितीची जिज्ञासा असते. )अर्थात जीवनाचे रहस्य जाणण्याची (ध्येय, Purpose &meaning of life) जिज्ञासा निर्माण होणे हा महत्वाचा भाग ठरतो.

१. कार्य योगक्षेमासाठी, ऐश्वर्यप्राप्तिसाठी? तर धर्म दुष्कृत्य टाळण्यासाठी व सत्कृत्य करण्यासाठी? असे जीवनयात्रा संदर्भात अर्जुनाचे सिमित ज्ञान असते. या सिमित ज्ञानामुळेच अर्जुन अडचणीत सापडतो. पण आपण अडचणीत नाही असे Declaration देतो. अर्जुन या Declaration मध्ये धर्माचा(स्वर्ग) उल्लेख करतो. म्हणुन भगवदगीतेत धर्म हा विषय येतो. स्वर्गाचे धर्मज्ञान हे सिमित ज्ञान आहे हे स्पष्ट होते. व विश्वधर्माची ओळख होते. श्रीकृष्ण व अर्जुन यांच्यातील या संवादाला "धर्मसंवाद" असे संबोधन होते.

इहलोकी ऐश्वर्य व परलोकी(मरणोत्तर) ही अर्जुनाची जीवनविषयक संकल्पना असते. यांत कार्य साधन असते. पण स्वर्गप्राप्ति या

संदर्भात आपले नियतकार्य निषिद्ध ठरवितो. त्याच्या धर्माला मर्यादा येते.

भगवदगीतेनुसार योग्य कार्य व अयोग्य कार्य ठरविणारी निश्चित बुद्धि सात्त्विक म्हटलेली आहे. याचा आधार "बंधन-मोक्ष " अर्थात बंधन vs स्वातंत्र्य हे ज्ञान असते.

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्य अकार्ये भय अभये।
बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी।।(१८-३०)

मोक्ष(स्वातंत्र्य) हेच जीवनाचे ध्येय जाणणारा धर्म भगवदगीता सांगत आहे. याच आधारावर ( अ). कार्याचे योग्य-अयोग्य निश्चय होणे( ब). कार्यनिश्चय न होणे. (क). विपरित(अधर्माला धर्म व धर्माला अधर्म) निश्चय होणे. हा बुद्धिचा अनुक्रमे सात्त्विक, राजस व तम Mode असा परिणाम असतो. सत, रज व तम हे प्रकृतिगुण असतात. प्रकृति व ईश्वर याद्वारे विश्वाचे Manifestation होते.

२. या संवादातुनच श्रीकृष्णाने स्वतःची ईश्वर ही ओळख दर्शविली आहे. भगवदगीता या शब्दातच "ईश्वराचे गीत" हा अर्थ अभिप्रेत आहे. या ज्ञानाद्वारे ईश्वराची ओळख जाणणे असा संदेश मिळतो.

ईश्वर हे शाश्वत तत्व आहे, ज्याचा अंश मनुष्याच्या प्राणतत्वात स्थित आहे. जे विनाशी आहे ते अशाश्वत (शरीर) तत्व आहे. अशाश्वत ते शाश्वत हा जीवनयात्रेतील प्रवास "आत्मोन्नति" असते. म्हणुन या प्रवासाला भगवदगीता "अमृतत्वाय कल्पते" असे संबोधित करते (२-१५).

३. स्वभाव:

मनुष्यजीवनाचे" रहस्य" अध्यात्मज्ञानाद्वारे भगवदगीता सांगत आहे. याची व्याख्या "स्वभाव अध्यात्म उच्यते" अशी केली आहे.

शाश्वत (मुळ भाव) या संदर्भात स्वभावाला अक्षरब्रह्म/ईश्वर म्हटले आहे.

तर प्रकृति(अशाश्वत) या संदर्भात स्वभावनियतकार्य अर्थात सहजकार्य हे जीवनविकासाचे साधन आहे याला स्वधर्म म्हटले आहे. याच स्वधर्माद्वारे ईश्वरभक्ति हा प्रवास असतो.

४. याप्रमाणे विश्वधर्माचे वैशिष्ट:

अ) योग्य-अयोग्य कार्याचा बंधन -मोक्ष हा आधार

ब) Higher consciousness वर जगणे म्हणजेच निष्काम कर्म (विचलित न होणे) असा होतो.

क)ज्ञान या संदर्भातील या धर्मसंवादाचे अध्ययन हा ज्ञानयज्ञ ठरतो. या यज्ञाद्वारे ईश्वरभक्तिच साध्य करतो.

अध्यष्यते च य इमं धर्म्यं संवादम् आवयोः।
ज्ञानयज्ञेन तेन अहं इष्टः स्याम् इति मे मतिः॥(१८-७०)

*********

(१८-७०):

"ज्ञानयज्ञेन तेन अहम् इष्टः स्याम् इति मे मतिः"

(भगवतगीतेचा ज्ञानयज्ञ)

१. भगवतगीतेनुसार ज्ञान जगात सर्वश्रेष्ठ आहे. ज्ञानाचा आदर करा हा भगवतगीतेचा संदेश आहे. ज्ञान जीवनप्रवासात अंधाराचा नाश

करणाऱ्या प्रकाशाची भूमिका बजावते. विज्ञान ज्ञानाचाच भाग आहे. विज्ञान सत्य शोधते, याचा संबंध समाज भौतिकवादाशी जोडतो, तर तत्वज्ञान मनुष्यजीवनातील सत्य शोधत असते, याचा संबंध समाज आदर्शवादाशी जोडतो. आदर्शवाद सत्य hide करु शकते, हे वास्तव भगवतगीता दर्शवते.

जीवनात मनुष्याची मार्ग चालतांना "मी योग्य" ही भूमिका असते. योग्य नसला तरी मनुष्याला सुख अनुभवायचे असते, म्हणुन अतृप्ति, अज्ञान hide करण्यासाठी समर्थन करतो व आदर्शवादी भाष्य वापरतो. किंवा स्वतःचे हित साध्य करण्यासाठी भाष्य बोलतो, व यांतही आदर्शवादी भाष्य वापरतो. या प्रक्रियेत "स्वतःला काय हवे"हे सत्य hide केल्या जाते.

अर्जुन आपल्या भूमिकेचे analysis करतो. मला कांहिही नको, मग आप्तांना मारणे केवळ लोभ दर्शवते, म्हणुन आपल्या नियतकार्याला पापाचे द्वार सिद्ध करतो. हा सर्व प्रयास दुःख टाळण्यासाठी असतो व ही भूमिका ज्ञानी दर्शविण्याचा प्रयत्न करतो. "ज्ञानी" भूमिकेच्या संदर्भातच ही भूमिका अज्ञानी ठरते. अर्थात अज्ञानाला ज्ञान ठरवीत असतो. जसे दोरीला साप समजणे हे delusion आहे. या भूमिकेचे कारण जे जसे आहे, ते स्विकार

न करणे व Judgement thinking वापरुन योग्य-अयोग्य, श्रेष्ठ-कनिष्ट, चांगले-वाईट असे लेबल लावणे.

२. सत्य, पारदर्शिकता, वास्तवाचा स्विकार, ज्ञान यांचे महत्व समाजात किंवा मनुष्यजीवनात वादातीत असते.
प्रस्थापित संकल्पना चुक ठरविल्याने अंधाराचा नाश होत नाही. वीज पडणे देवतेचा प्रकोप आहे ही संकल्पना बेंझामिन फ्रॅन्कलिनने वीजेतील Electrical energy शोधुन संपुष्टात आणली. श्रीकृष्णाने पाऊस पडण्यासाठी (गोवर्धन)पर्वताचे महत्व, वृक्षारोपण महत्व सांगितले व इंद्रदेवतेला disarm केले. प्रस्थापित संकल्पनेला अज्ञान ठरविले तर केवळ टिका करुन अंधाराचा नाश होत नाही. अज्ञानाचा स्विकार केला तरच ज्ञानाचे द्वार उघडते.
Acceptance of "what I want" and/or Ignorance यामुळे पारदर्शकता येते. व ज्ञान आपली भूमिका बजावु शकते.

३. शोषण करणारी व्यवस्था(बाह्यविघ्न) असेल तर चांगल्या व्यक्तिला जगतांना संशय उत्पन्न होतो. ते आंतर्विघ्न असते. व ही अधर्म स्थिति ठरते. चांगल्या व्यक्तिला संशयमुक्त होण्यासाठी ज्ञानाची गरज असते. मरणोत्तर गति चांगली मिळावी ही प्रस्थापित

धर्माची संकल्पना असते. भगवतगीता वर्तमान जीवन चांगले जगावे याचे शास्त्र सांगते. स्वातंत्र्याचे ज्ञान बंधन-मुक्ति याद्वारा स्पष्ट करते.

४. "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च" यांत जीवनविकास व विश्वकल्याण अभिप्रेत आहे. मनुष्य कर्म करतो. या कर्माद्वारे जगतकल्याण साध्य होत आहे ही भावना भगवतगीता ईश्वरभक्ति याद्वारा स्पष्ट करीत आहे.

भगवतगीता ईश्वराची ओळख विश्वाचा अध्यक्ष अशी देते. ईश्वराला(अध्यक्ष या नात्याने) विश्वकल्याण अभिप्रेत आहे. हा व्यवस्थापनाचा विषय असतो. व्यवस्थापन ज्ञानाचाच भाग आहे.

मत्कर्मकृत् मत्परमो मद् भक्तः संगवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स माम् इति पांडव॥(११-५५)

५जगाची रहाटी अखंड चालु राहणार पण आपण नसणार?भगवतगीता सांगते, मृत्यु शरीराला आहे, जे जीवित तत्व

शरीरयंत्राला संचालित ठेवते, त्या तत्वाला मृत्यु नाही. याच जीवित तत्वाची ओळख, त्याचे विश्वाशी असलेले नाते, याची संपुर्ण ओळख भगवतगीता करुन देते. यालाच अध्यात्मज्ञान(स्वभाव अध्यात्म उच्यते) म्हटले आहे. जीवनविकासाच्या प्रवासात आध्यात्मिक प्रगतीमुळे बुद्धिची स्थितप्रज्ञ अवस्था प्राप्त होते.

* अर्जुनाचा प्रश्न व्यावहारिक असतो. व त्याचे लक्ष व्यावहारिक कार्य टाळण्याकडे असते. त्याला कार्यापासुन सुटका हवी होती. म्हणुन प्रश्न करतो, बुद्धिची स्थितप्रज्ञ अवस्था श्रेष्ठ तर घोर कर्माचे प्रयोजन कां?याच प्रश्नाचे उत्तरात मनुष्यजीवनांत कार्याचे महत्व सांगितल्या जाते.

६. मनुष्यजीवनात अहंकारामुळे (स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी )अज्ञानाला ज्ञान दर्शवितो. म्हणुन अहंकाराला replace करण्यासाठी बुद्धियोग आश्रय/ईश्वराचा अ ाश्रय स्पष्ट होतो. ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. सर्व कर्माचे ज्ञानात रुपांतर होते. म्हणुन भगवतगीतेतील ईश्वर संकल्पनाच ज्ञानाशी निगडित आहे.

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(४-३३)

*याचाच अर्थ, अर्जुनाला व्यावहारिक कार्यातच संशय येतो, व हा संशय मिटविण्यासाठी ज्ञान असते. जे ज्ञान भगवतगीता सांगते. (ज्ञानसंच्छिन्न संशयम्) . याप्रमाणे ज्ञान हाच भगवतगीतेचा विषय बनतो. अर्थात हे गुणात्मक ज्ञान ठरते. "

७.

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादं आवयोः।
ज्ञानयज्ञेन तेन अहं इष्टः स्याम् इति मे मतिः।।(१८-७०)

या विश्वाचे संचलन होण्यात ईश्वराची महत्वाची भूमिका असते. यावर श्रद्धा असणारे असतात, तसेच नसणारेही असतात. ज्यांची श्रद्धा आहे, तेच या संवादरुपी ज्ञानाचे महत्व जाणतात. त्यांचेसाठी हा ज्ञानयज्ञ असतो.

सार:

*जगात दुःख आहे, अडचणी आहेत म्हणुन प्रश्न आहेत. प्रश्न आहे म्हणुन ज्ञान आहे. ज्ञानाचा आदर करा .

*वास्तव स्विकार न करता स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी ज्ञान सांगणे या संवयीचे कारण अहंकार असतो. या संवयीमुळे अज्ञानाला ज्ञान दर्शवितो.

*"व्यवस्थापन" या संदर्भात "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च" याद्वारे "सृष्टिचा अध्यक्ष या भुमिकेत सृष्टिसंचलन सुरु असते. " हा संदेश मिळतो.

*"ज्ञानविज्ञान" या संदर्भात ईश्वर ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे. म्हणुन जीवनमार्गात ईश्वराचा आश्रय ज्ञानाचा आश्रय ठरतो. यामुळे अहंकाराचे Replacement होते. व " योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्चिन्नसंशयम्" हा जीवनविकासाचा संदेश मिळतो.

*Small is beautiful चा लेखक इ. एफ. शुमेकर म्हणतो, पुस्तकी शिक्षण संख्यात्मक ज्ञान देते. या ज्ञानाचा उपयोग विकासासाठी होतो, तेंव्हा ते गुणात्मक ज्ञान ठरते. गुणात्मक ज्ञान या अर्थाने भगवतगीतेची ओळख झाली तर शिक्षणक्षेत्र व युवापिढी भगवतगीतेचे महत्व जाणु शकते.

**********

(१८-७१)

***********************

श्रद्धावान अनससूयश्च शृणुयात् अपि यो नरः।

सोअपि मुक्तः शुभान् लोकान् प्राप्नुयात् पुण्यकर्मणाम् ।।
**************************

(१८-७१) :"श्रद्धावान अनसूयश्च शृणुयात् अपि यो नरः"

धार्मिक क्षेत्रात देवतापुजन हा एक श्रद्धेचा भाग असतो, तद्वत पवित्र ग्रंथवाचन, प्रवचन श्रवण हा एक भाग असतो. यांत श्रोता रमतो व भक्ति लाभते. तसेच भगवतगीता संवादाविषयी म्हटलेले आहे. श्रद्धेने या संवादग्रंथात रमणारे पुण्य प्राप्त करुन घेतात.

श्रद्धावान अनससूयश्च शृणुयात् अपि यो नरः।
सोअपि मुक्तः शुभान् लोकान् प्राप्नुयात् पुण्यकर्मणाम् ।।(१८-७१)

ईश्वरावर श्रद्धा असणारे वाचन-श्रवण करुन त्यांत रमतात. चांगलेपणाची प्रवृत्ति निर्माण होते. चांगल्या लोकांसाठी(पुण्यवान, दैवी) प्रत्यक्ष भगवतगीतेची Philosophy पुढचे पाऊल आहे.

भगवतगीतेप्रमाणे ईश्वराला प्रकृतिचा (कर्ता, भर्ता, साक्षी) अध्यक्ष जाणुन या ज्ञानात रमतात, त्यांना बुद्धियोग देतो. यामुळे "मृत्योर्मा अमृतंगमय" या जीवनविकासाच्या राजमार्गावर येतो.

अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।...

ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।(१०-१०)

भगवतगीतेने जीवनविकासात कर्म-कर्तृत्वाचे महत्व स्पष्ट केले आहे. वर्तमान कर्तृत्वाचा आहे. (कर्तृत्वानेच इतिहास घडतो. ) यांत स्वभावनियत सहजकार्य(State of Art) हा एक भाग तर दुसरा निर्णयक्षमता असते.

मनुष्याला निर्णय अधिकार असतो. भगवतगीतेत "कर्मण्येवाधिकारस्ते"याद्वारा हे सत्य highlight होते. जो परावलंबि असतो, तो निर्णयासाठी इतरांवर अवलंबुन असतो. "सकाम" अवस्थेत निर्णय दृढ नसतो. परिणामभयाचे कारण संशय असते. यामुळे विचलित होतो. म्हणुन वर्तमानात निर्णयअधिकार, निर्णयक्षमता व यासाठी निर्णयप्रक्रिया जाणुन घेणे महत्वाचे असते. याच अनुषंगाने अर्जुनाला ज्ञात केलेली भगवतगीतेची सविस्तर भूमिका जाणुन घेणे आवश्यक आहे.

व्यवहारात नियतकार्याचा निर्णय ठरतो. ही व्यवहारातील प्रक्रिया असते. यामुळे नियतकार्य ठरते. निर्णय ठरतो. पण कर्तृत्व संदर्भातील दुसरा महत्वाचा Chapter सुरु होतो, तो निर्णय/कार्य execute करण्याचा असतो. प्रत्यक्ष निर्णय execute करतांना अर्जुनाला दुःख होते. अडचण जाणवते. म्हणुन ठरलेले कार्यच

टाळतो व निष्क्रियतेचे समर्थन करतो व याचसाठी स्वतःला ज्ञानी ठरवितो.

समाजात असेच निष्क्रियतेचे समर्थन असते व असे समर्थन "ज्ञान" या संदर्भात बोलले जाते, अशी स्थिति आली तर प्रत्यक्षात मात्र दुःखाशी, अडचणीशी deal करण्याचे ज्ञान नसते ही वस्तुस्थिति असते.

(उदा. व्यक्ति किंवा एखादा समुदाय आर्थिक विवंचनेत सापडला तर आत्मपरिक्षण करुन कारणमिमांसा न करता इतर-
व्यक्ति/समुदाय अडचणीसाठी कारण आहेत, असा आभास निर्माण करण्यात येतो. वास्तव न स्विकारता टिका करणे सोपे असते. लोकांना अशा आभासात गुंतवुन ठेवणे ही राजकारणी खेळी जगात आढळते! )

लोक अशा भाष्याने, आभासाने मात्र मोह पावतात.

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।(५-१५)

भगवतगीता याच दुःखावर मात करण्यासाठी जीवनज्ञान व विकासमार्ग सांगते. अडचणी विकासमार्गात Stepping stone ठरतात. जसे अर्जुनाला Senses conscious(मन) व Higher conscious या संदर्भात मनोवश vs आत्मवश ज्ञान स्पष्ट केले.

या ज्ञानामुळेच" श्रेष्ठ" विचलित होत नाही व निष्ठेने विकासमार्गावर असतात. निष्काम कर्माचे हेच रहस्य आहे.

"यं हि न व्यथयन्तेते पुरुषं पुरुषर्षभ"(२-१५)
बन्धुः आत्मा आत्मनः तस्य येन आत्मैव आत्मना जितः।(६-६)

इंद्रियाणां हि चरतां यत् मनो अनुविधियते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इह अम्भसि।।(२-६७)

******

(१८-७२)

************************

कश्चित् एतद् श्रुतं पार्थ त्वया एकाग्रेण चेतसा।

कश्चित् अज्ञान संमोहः प्रनष्टः ते धनंजय॥

**************************

(१८-७२)/१:

"कश्चित् एतद् श्रुतं पार्थ त्वया एकाग्रेण चेतसा"

(Right vs Rightous)

(Right)"योग्य काय?"यावरच समाजात भाष्य चालते. असे भाष्य होत राहणार. पण मनुष्याचे प्रत्यक्षातील जगणे हेच त्याचे जीवन असते. मनुष्य त्याचा वर्तमान प्रत्यक्षात कसा जगतो यावर त्याच्या विकासाची दिशा ठरत असते. "What you sow, so reap" .

"कबीरांकडे एक शिष्य प्रश्न घेवुन आलेला असतो. वेळ दिवसाची असते. कबीर पत्निला कंदील लावुन आणण्यास सांगतात. पत्नि कबीरांना विचारणा न करता, कबीरांची गरज ओळखुन कंदील

आणण्यात येतो. कबीरांच्या पतिपत्निच्या प्रेमाचे रहस्य हा प्रश्न शिष्य घेवुन येतो. उत्तर मिळते. "

"योग्य काय " हे मनुष्याला सतत ऐकायला मिळते. यातुनच समर्थन-टिका असते. मनुष्य जे कांही (योग्य-अयोग्य) करतो ते स्वतःसाठी योग्य समजुनच करतो. व योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी ज्ञान वापरतो. स्वतःला योग्य ठरविण्यासाठी समर्थन करणे व इतरांना चुक ठरविण्यासाठी टिका करणे असे भाष्यही समाजात चालत असते. मनुष्य श्रेष्ठ/ज्ञानी व्यक्तिचीही चुक काढतो पण स्वतःसाठी आचरण्यास "योग्य" काय?(Rightous) याचेच अज्ञान असते तेंव्हा मनुष्य कसा वागतो हेच वास्तव अर्जुनविषादयोगातुन स्पष्ट होते.

युद्ध करणे हे" नियतकार्य" या संदर्भात योग्य आहे, हे अर्जुन जाणत होता पण प्रत्यक्ष कार्याची वेळ आली असता दुःखी होतो. युद्ध न करणे हे योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान बोलतो.

"When you're righteous, you don't have to tell people that you're righteous. "

Shaquille O'Neal

जीवन ही अशी प्रयोगशाळा आहे, जेथे प्रथम जगतो नंतर धडा मिळतो. "अमुक करायला हवे होते व अमुक करायला नको होते, किंवा अमुक केले असते तर योग्य झाले असते. "असे भाष्य करणे याचा अर्थ "करण्यास योग्य (Rightous) " याचे अज्ञान होते असे दर्शविते.

नियतकार्य या संदर्भात युद्ध टाळणे अर्जुनासाठी अयोग्य आहे हे श्रीकृष्ण समज देतात. तेंव्हा या कार्याने जे दुःख मिळणार ते नाहिसे कसे होईल हे कळत नाही . अर्थात जे कार्य केल्यानंतर पश्चातापच होणार आहे ते कार्य कां करायचे?म्हणुन युद्ध करणार नाही ही अर्जुनाची भूमिका असते.

यत् श्रेयः स्यात् निश्चितम् ब्रूहि तन्मे।(२- ७)
अर्जुनासाठी युद्ध न करणे "प्रेयस" असते तर ते कार्य "श्रेयस "कसे? हा प्रश्न करतो. भगवतगीतेतील हा प्रश्न Right vs Rightous असा असतो. अर्जुनाला "Rightous ऐकायचे होते.

समाजातील योग्य-अयोग्य(Right-Wrong) या संदर्भातील भाष्य व स्वतःसाठी आचरण्यास योग्य (Rightous) यातील भेद

भगवतगीता स्पष्ट करते. "योग्य " या संदर्भातील पुस्तकी भाष्य, सृति या संदर्भात म्हटले,

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्ति अविपश्चितः।
वेदवादरताः पार्थ न अन्यत् अस्ति इति वादिनः॥(२-४२)

नैते सृति पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन।
तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन॥(८-२७)

*श्रीकृष्णांनी उत्तर दिल्यानंतर दिलेले वा केलेले प्रश्न: (Ball in the court of Arjuna)

१. Right(योग्य काय?) या संदर्भात विज्ञानासह ज्ञान(प्रकृति-पुरुष) सांगण्यात येते व अर्जुनाला Choice दिलेली असते.

इति ते ज्ञानं आख्यातं गुह्यात् गुह्यतरं मया।
विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरु॥(१८-६३)

२. Rightous(करण्यास योग्य) या संदर्भात म्हटले,

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्वपापेभ्यः मोक्षयाष्यामि मा शुचः॥(१८-६६)

जगात जे घडत आहे ते ईश्वराच्या इच्छेने घडत आहे असे म्हटले तर ईश्वराला Surrender होणे हे मनुष्याचे दायित्व ठरते. (भगवतगीतेप्रमाणे)याचाच अर्थ मनुष्य "अमृतत्वाय कल्पते" या मार्गावर जीवनयात्रा करतो. मार्ग निश्चितपणे, विश्वासाने चालत असतो. याच मार्गासाठी बुद्धियोगाचे महत्व व मोह, अज्ञान नष्ट होण्यासाठी बुद्धियोगाची भूमिका भगवतगीता स्पष्ट करते.

३. श्रीकृष्ण शेवटी एकच प्रश्न करतात,
कश्चित् एतद् श्रुतं पार्थ त्वया एकाग्रेण चेतसा।
कश्चित् अज्ञान संमोहः प्रनष्टः ते धनंजय॥(१८-७२)

सार:

विज्ञान, जगातील तत्वज्ञान जेथे अपुर्ण ठरते, ती उणीव भगवतगीता भरुन काढते. वेद, विज्ञान वा कोणताही धर्म याचे मुल्य भगवतगीता कमी करीत नाही. तर त्यातील अपुर्णता दर्शवुन

पुर्णत्वाचे ज्ञान सांगते. भगवतगीतेला Song of God अशी ओळख आहे. जीवनविकासासाठी Motivational भाष्य या दृष्टितुन या ज्ञानाची ओळख झाली तर या ज्ञानात मनुष्य रमतो. या रमण्यातुन ईश्वराची कृपा लाभते.
कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च।(१०-९)

"We are accountable for our actions as we exercise our moral agency. If we understand this principle and make righteous choices, our lives will be blessed. "

L. Lionel Kendrick

******

(१८-७२)/२ :

"कश्चित् अज्ञान संमोहः प्रनष्टः ते धनंजय?"

संपुर्ण जग जगत असते, पण आपण स्वतः विश्वासाने जगत आहो काय?हा स्वतःसाठी कधी प्रश्न उपस्थित होतो. जगावे कि मरावे!हा प्रश्न हॅम्लेटला पडला होता. तर युद्धप्रसंगी युद्ध करुन राज्य मिळवावे कि निष्क्रिय राहुन प्रतिकार न करता मृत्यु पत्करणे श्रेयस्कर! हा प्रश्न अर्जुनासमोर उभा ठाकला.

सामान्यतः लोक येथे युद्ध जिंकलो तर सुखी होईल व हरलो तर दुःखी होईल याप्रमाणे परिणामभयाने कधी अशांत होतात. ही कार्याची सकाम मानसिकता असते. याच मानसिकतेमुळे अर्जुनाला वाटते, युद्ध जिंकले तरी दुःख होईल, यामुळे अशांत होतो. व या अशांत अवस्थेत तो काय योग्य याची निवड करु शकत नाही. व मनाला शांत करण्यासाठी सोपा उपाय म्हणुन युद्ध न करण्याची निवड करतो, व या भूमिकेचे समर्थन केवळ मनाला शांत करण्यासाठी करतो.

जीवन भविष्याकडे वाटचाल करीत असले तरी वर्तमानच जीवन असते. वर्तमानातील शांती महत्वाची असते. अशांती, दुःख याचे कारण अज्ञान असते. हेच अज्ञान दुर करण्यासाठी ज्ञान हवे असते, ज्यामुळे विश्वासाने, दृढतेने, निष्ठेने कार्यरत होतो. हाच

भगवतगीतेचा विषय बनला. अर्थात वर्तमानातील शांती म्हणजे युद्ध टाळणे नव्हे. हा विषय येथे आला आहे.

"Peace is not absence of conflict, it is the ability to handle conflict by peaceful means. "

जगात स्वर्ग नांदेल इतके ज्ञान वर्तमानात उपलब्ध आहे. पण कोण करेल?कसे होईल ?हा प्रश्न महत्वाचा असतो. यावर चर्चा झाली तरी शेवटी इतरांनी कुणीतरी करावे असा निष्कर्ष निघाला तर आपण जेथे होतो, तेथेच येवुन पोहोचतो.

कुणी काय करावे याचा विचार समाजात होतोच व तसे भाष्यही बोलल्या जाते. पण स्वतः काय करावे यावर केवळ भगवतगीता भाष्य करीत आहे. वर्तमानात सुखी जीवनाचे तत्वज्ञान यावर ज्ञान सातत्याने उपलब्ध होत असते. तरी स्वतःसमोर कधी प्रश्न उपस्थित होतो. अर्जुनाला काय करावे हे (मोहामुळे) कळत नाही म्हणुन जीवनविकासाचे ज्ञान सांगितल्यानंतर श्रीकृष्ण विचारतात, मोहामुळे निर्माण झालेले अज्ञान नष्ट झाले काय?

कश्चित् अज्ञान संमोहः प्रनष्टः ते धनंजय।(१८-७२)

विषयचिंतनात असल्यामुळे मोह होतो. मोहामुळे विभ्रम(संशय) व यामुळे स्मृतिभ्रम होतो.
ध्यायतो विषयान् पुंसाः संगः तेषु उपजायते।...
स्मृतिभंशात् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।।(२-६३)

अशाश्वताला आसक्त attach झाल्यामुळे मोह असतो. मोहामुळे infection होते. अशांत होतो. अज्ञान असते. म्हणुन जीवनमार्गात निष्काम(Nonattachment) कर्म शास्त्र सांगितले. जीवनमार्गात ईश्वराचा आश्रय शाश्वताशी attach असतो. हेच शास्त्र भगवतगीता विस्ताराने सांगते.

भगवतगीता म्हटले कि कुणी कर्मयोगी यावर focus करतो, कुणी ईश्वर consciousness यावर focus करतो, कुणी शांती Peace of Mind यावर focus करतो. कुणी निर्भयता, योग(दुःखान्त) यावर focus करतो. पण हा विषय संपुर्ण जीवनाचे ज्ञान व याच अनुषंगाने वर्तमानातील शांतीचे महत्व दर्शविते. व शांती ढळण्याचे कारण अज्ञान असते हे भगवतगीता स्पष्ट करते. म्हणुनच ईश्वर भक्तिने शांती मिळते असे भाष्य आपण ऐकत असतो, अनुभवत असतो.

शांति निर्वाणपरमां मत्संस्थां अधिगच्छति।(६-१५)

सुखी जीवनासाठी शांति व शांतिसाठी संस्कार(बुद्धियुक्त) आवश्यक असते.

नास्ति बुद्धिः युक्तस्य न च अयुक्तस्य भावना।
न च अभावयतःशांतिः अशांतस्य कुतः सुखं।।(२-६६)

याप्रमाणे जीवनातील अज्ञान दुर करण्यासाठी ज्ञान हाच भगवतगीतेचा विषय ठरतो.

******

(१८-७३)

***********************

नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा त्वत् प्रसादात् मया अच्युत।

स्थितो अस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव।।

*************************

(१८-७३)/१ : " नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा "

(End of darkness)

यदा ते मोहकलिलं बुद्धिः व्यतितरिष्यति।

तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च।।(२-५२)

अर्थात मोहामुळे भ्रमित झालेली बुद्धि स्थीर होते व बाह्यज्ञानापासुन मुक्त असते. हा "नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा" याचा संदेश आहे. हा शब्दप्रयोग अर्जुनाने शेवटी केला, व भगवतगीताज्ञानाचे Purpose स्पष्ट होते.

The significant problems we face cannot be solved at the same level of thinking we were at when we created them. "

~ Albert Einstein

मन(Sensation) Sensitive असते. यामुळे अर्जुन (दैवी, चांगला) दुःखी होतो. अर्थात या Conscious (Level of thinking) मध्ये प्रश्न निर्माण होतो. या level वर निर्माण झालेला मोह बुद्धिला भ्रमित करतो. योग्य सिध्द करण्यासाठी बाह्यज्ञानाचा उपयोग करतो.

ध्यायतो विषयान् पुंसः संगःतेषु उपजायते..
.. संमोहात् स्मृति विभ्रमः।स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशो।.. (२-६२/६३)

Sensation मनामुळे भ्रमित झालेल्या बुद्धिला मुक्त करण्यासाठी मनोवश अवस्था vs आत्मवश अवस्था यांतील भेद स्पष्ट भगवतगीता स्पष्ट करते.

मनसः तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतः तु सः।(३-४२)

इंद्रिय, मन, बुद्धि, आत्मा यांतील श्रेष्ठत्वाचा क्रम जाणुन आत्मवश अवस्थेचे महत्व कळते. याच आत्मवश अवस्थेसाठी योगयुक्त/ईश्वराचा आश्रय/बुद्धियोग असे शब्दप्रयोग आहे. तसेच ही स्थिति कायम होण्यासाठी आत्मोन्नति व यासाठी कार्याचा दृढनिश्चय करुन "योगः कर्मसु"असा शब्दप्रयोग आहे.

Higher(शाश्वत) Consciousness क्रियाशील होण्यासाठी शास्त्र :

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन।
निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥(२-४५)

गुणातीत होण्यासाठी ईश्वराचा आश्रय, निर्द्वंद्व होण्यासाठी कार्याचा दृढनिश्चय, समर्पण/फलत्यागासाठी निर्योगक्षेम, मोह तमगुण आहे म्हणुन सत गुण क्रियाशील होण्यासाठी" नित्यसत्वस्थो" असे शब्दप्रयोग आहेत.

जीवनांत प्रश्न आहेत, म्हणुन विकासाचे महत्व आहे. अर्जुन दुःखी झाल्यावर म्हणतो, मला कांही नको. माझा कोणताच Problem नाही. म्हणुन मला युद्ध करायचे नाही!

Beware when you have no problems. Then you've really got a problem. Problems are like landmarks of progress. "

~ Scott Alexander

जीवनात दुःख आहे . मनाच्या खालच्या पातळीवर यामुळे भ्रमित होतो. पण हेच दुःख विकासात Stepping stoneअसते. Higher conscious वर पोहोचण्याची ही संधी असते. ज्याद्वारे प्रवास शाश्वताकडे(अमृतंगमय) होतो.

नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा त्वत् प्रसादात् मया अच्युत।
स्थितो अस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव।।(१८-७३)

********

(१८-७३):

"नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा त्वत् प्रसादात् मया अच्युत"

(बुद्धिनाश vs. बुद्धियोग)

भगवदगीतेत आत्मोन्नति या संदर्भात आध्यात्मिक भाष्य असले तरी त्याचा प्रमुख हेतु प्रत्यक्ष व्यवहारात अर्जुनासमोर जे आव्हान उभे झाले त्याला सामोरे जाण्याचे ज्ञान या संदर्भात आहे.

मनुष्यजीवनात प्रत्यक्ष व्यवहारातच आव्हान उभे होत असते. मार्गावर असतांना विचलित झाले तर बुद्धि नीट काम करेनाशी नाही. यामुळे कार्याचा निश्चय होत नाही. कर्तृत्व क्षीण होते, ज्याची जीवनविकासात Prime भूमिका असते.

व्यवहारात विषयाला सोडुन भाष्यकाराने मुद्दा सोडला तर विषयाची जाणीव भाष्यकाराला करुन देण्यात येते. भगवदगीतेत सर्वच भाष्य अर्जुनाच्या मुख्य प्रश्नासंदर्भातच आहे. हा विषय कार्यकर्तृत्व या संदर्भातच असतो. अर्जुन युद्ध करायला युद्धक्षेत्रावर आलेला असतो. त्या संदर्भातील त्याचे नियतकार्य चुकीचे आहे कि योग्य आहे? हा त्याचा मुख्य विषय असतो.

भगवदगीतेत जीवनाचे भौतिक व मानसिक ज्ञानविज्ञान स्पष्ट केले. तसेच जीवनविकास/जीवनयात्रा या संदर्भात ज्ञान, भक्ति, कर्ममार्ग व त्याचा समन्वय साधणारा अनन्यभक्तिमार्ग असे विविध मार्ग/Philosophy सांगितली.

अर्जुनाला दुःख झाल्यामुळे आपले नियतकार्य चुकीचे आहे असे समजुन निष्क्रिय राहण्याची निवड करतो. सर्वप्रथम त्याची ही निवड चुकीची आहे हे दर्शवुन देण्यात येते. व ही चुक होण्याचे कारण मोह आहे. मोह तमगुणाला प्रभावीत करतो. यामुळे बुद्धिभ्रम(बुद्धिनाश, स्मृतिनाश) होतो. हे भगवदगीता स्पष्ट करते.

अर्जुन आपली भूमिका योग्य आहे हे सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान वापरतो. या मार्गातील अर्जुनाचे Excuses भाष्य प्रज्ञावाद असतो. भगवदगीता "ज्ञान" या विषयावर भाष्य करते. ज्ञान मार्गातील संशय दुर करते व कार्याचा निश्चय दृढ होतो. (Determination). हेच ज्ञान अर्जुन श्रीकृष्णाकडुन ऐकतो. मोह नष्ट होतो. स्मृति जागृत होते. संशयमुक्त होतो. स्थिर होतो. अर्थात या ज्ञानामुळे कार्याचा निश्चय होतो.

नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा त्वत् प्रसादात् मया अच्युत।
स्थितोअस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ।।(१८-७३)

नष्टो मोहः - मोह (अंधार, तम) vs. ज्ञान(प्रकाश, सत)
स्मृतिर्लब्ध्वा- बुद्धिनाश vs. बुद्धियोग

त्वत् प्रसादात् - ईश्वरकृपा

(ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते।)

स्थितोअस्मि -

विचलित(अस्थिर) अवस्था vs. स्थिर(Stable)

गतसंदेहः - संशय(भ्रम) vs. ज्ञान, कार्याचा एकनिश्चय

करिष्ये वचनं तव - भगवतगीतेतील ज्ञानाचा स्विकार करणे.

"Knowing your own darkness is the best method for dealing with the darknesses of other people. "

Carl Jung

********

(१८-७३)/३:

"स्थितोअस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव"

(Psychodrama of Arjuna)

महाभारतात युद्धाचे प्रसंगी युद्ध करण्यासाठी केवळ अर्जुनाशिवाय कुणीही आढेवेढे घेतले नाही. पण शेवटी अर्जुनाने युद्ध केलेच!ही घटना कांही प्रश्न उपस्थित करते,

१. अर्जुनाने जो Drama केला, ते त्याचे अज्ञान होते काय?सर्व शहाणे व केवळ अर्जुनच दुबळा ठरला काय?

२. ईश्वराची भूमिका जगाचे कल्याण करण्यासाठी आहे असे आपण ऐकत असतो. नरसंहार करुन जगाचे अहित करणारे असे युद्ध मी करणार नाही, ही अर्जुनाची भूमिका असते. श्रीकृष्ण तर साक्षात ईश्वर होते, ते सहज युद्धातील नरसंहार थांबवु शकले असते. तसे न करता त्यांनी अर्जुनाला युद्ध करण्यासाठी motivate केले काय?

*अर्जुनाने जे आढेवेढे घेतले तो Psychodrama असतो. मनुष्यजीवन कसे आहे?कशासाठी आहे? या प्रश्नाचा विचार न करता मनुष्य जगत असतो. जीवनात अडचणी येतात, दुःख जाणवते, तेंव्हा Psychodrama सुरु होतो. याच Psychodramaचे दर्शन अर्जुनाच्या भूमिकेतुन होते.

चांगलेपणामुळेच अर्जुनाला दुःख होते. त्याला आपल्या नियतकार्यात संशय उत्पन्न होतो. निष्क्रियतेचे समर्थन करतो व त्याला धर्म म्हणतो. जगात कर्तृत्वाचा सन्मान होतो, निष्क्रियतेमुळे समाजात आळस वाढतो. समाजात निष्क्रियतेचे समर्थन करुन आपण योग्य आहो हे सिद्ध करण्यासाठी केलेले भाष्य ज्ञान आहे, आदर्श किंवा धर्म आहे असे भासविल्या जाते. एखाद्याच्या गरिबीचे कारण केवळ त्याचा त्याग आहे.. चांगलेपणा, प्रामाणिकपणा आहे असे दर्शविल्या जाते अर्थात गरिबीवर आदर्शाचे आच्छादन केल्या जाते. याच संवयीमुळे समाजात आदर्श, चांगलेपणा, धर्म, अध्यात्म यांचे चुकीचे संदेश जातात. याच पार्श्वभूमिवर मनुष्यातील चांगलेपणाचा हा जीवनविकासातील महत्वाचा टप्पा असतो. व या Psychodramaची ओळख होणे आवश्यक असते. हीच ओळख भगवतगीता करुन देते.

(चांगल्या मनुष्यालाही)व्यवहारमार्गात आलेले दुःख, अडचणी विकाससंधि असते. या अडचणीवर उपाय करुन मार्ग ठरवायचा असतो. हेच ज्ञान (वास्तव स्विकारणे, प्रश्नाचे निदान करणे, उपाय)भगवतगीता सांगत आहे.

ईश्वर या संपुर्ण सृष्टिचा अध्यक्ष आहे व त्याचाच अंश मनुष्याच्या हृदस्थानी विराजमान असते. (सर्वस्य च अहं हृदि संनिविष्टो). या ज्ञानामुळे त्याचा प्रवास अमृतंगमय (अमृतत्वाय कल्पते) होतो. हा विकासाचा राजमार्ग असतो. या मार्गात अनन्यभक्ति (कार्याद्वारे भक्ति) साध्य होते. ही विद्या राजविद्या ठरते.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेः ज्ञानवान अपि।
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किम् करिष्यति।।(३-३३)
या जगात प्रत्येक मनुष्य आपल्या स्वभावनुरुप जगतो.
(एक महात्मा बुडत्या विंचवाला वाचविण्याचा प्रयत्न करतात. विंचु चावण्याचा आपला स्वभाव सोडत नाही व महात्मा वाचविण्याचा आपला स्वभाव सोडत नाही).

व्यवहारमार्गात (फलासक्त असल्यामुळे)विचलित होणे नैसर्गिक (Automation) असते. यामुळे द्वंद्वाच्या जाळ्यात अडकतो. कार्यनिश्चय दृढ नसतो. म्हणुन विचलित न होण्याची शक्ति(दुःखान्त-योग) साध्य करणे विकासमार्गात अपेक्षित असते. व्यवहारमार्गातील कार्य निमित्त असले तरी याच शक्तिच्या साधनेसाठी साधन ठरते. अर्थात याच कार्याद्वारे शक्तिची साधना (योगः कर्मसु कौशलम् ) होते.

जसे दुःख टाळण्यासाठी अर्जुन युद्ध न करणे ही निवड करतो, जीवन व विकासाचे ज्ञान ऐकल्यावर निर्णय त्यालाच घ्यायचा असतो. भगवतगीतेत "मोक्ष" ही आध्यात्मिक संकल्पना असली तरी ही संकल्पना वर्तमानात स्वातंत्र्याचा संदेश देत आहे. व याच अनुषंगाने निर्णयअधिकार महत्वाचा आहे. या अधिकाराची जाण असणारे जबाबदारी जाणुन जीवन जगत असतात. अर्जुनाचे अज्ञान मिटते. स्वविकासाची (आत्मविकास) जबाबदारी जाणतो.

नष्टो मोहः स्मृतिः लब्ध्वा तत् प्रसादात मया अच्युत।

स्थितो अस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव।।(१८-७३)

******

(१८-७३) :

"करिष्ये वचनं तव"

(Governing Self)

मनुष्याच्या आयुष्यात(अ)वय १५पर्यंत बालवय, (ब)१५ते२१ पर्यंत युवा पुर्वावस्था, (क)२१नंतर जबाबदार व्यक्ति अशी विभागणि केली तर-

(अ)Governed by Parents.

(ब)Learning to govern Self.

(क) Governing Self.

अर्थात जो स्वतःला govern करतो, तेच जबाबदार व्यक्तिमत्व ठरते. येथे तो स्वतःच्या जीवनासाठी Leadershipची भूमिका बजावतो.

अर्थात मनुष्याला स्वतःच्या जीवनयापनासाठी Leadershipची भूमिका बजावावी लागते. भगवतगीतेत जबाबदार व्यक्तिमत्वाला आत्मवश (आत्मवश्यै विधेयात्मा)व बेजबाबदार व्यक्तिमत्वाला मनोवश (मनोअनुविधियते) संबोधले आहे.

इंद्रियाणां हि चरतां यत् मनोअनुविधीयते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुः नावाम् इव अम्भसि॥(२-६७)

अर्थात ज्याची शरिररुपी नाव वाऱ्याने वाहते ते बेजबाबदार व्यक्तिमत्व व जो नाव योग्य दिशेने वल्हवतो ते जबाबदार व्यक्तिमत्व दर्शविले आहे.

आत्मवश व मनोवश याच संदर्भात युक्त(निष्काम कर्म) व अयुक्त(सकाम कर्म) या शब्दांचे प्रयोजन आहे.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते॥(५-१२)

व्यवहाराचा भाग म्हणुन महाभारतात धर्मयुद्ध ठरते. अर्जुनाचे नियतकार्य ठरते व कुरुक्षेत्रावर येतो. (चांगलेपणामुळे) दुःखी होतो व योग्य काय याची निवड करण्यास असमर्थ होतो. या अवस्थेत भावविवश होऊन युद्ध न करण्याची निवड होते व समर्थन करतो. समर्थनाची Philosophy बनवितो.

प्रत्यक्षात अर्जुन दुःखी असतो. व स्वतःला govern करण्यास असमर्थ ठरतो. अंधाराचे शहाणपण कळले तर उजेडाचे महत्व कळते अर्थात अज्ञानाचा स्विकार केला तर ज्ञानाची गरज पडते. अर्जुन अज्ञानाचा स्विकार करतो, तो प्रश्न करतो. तेंव्हाच श्रीकृष्ण ज्ञानाचा पाठ सुरु करतात.

"No problem can be solved from the same level of consciousness that created it. "

-Albert Einstein

व्यवहारात सकाम कर्म असते म्हणुन द्वन्द्व असतो. या Consciousness level वर अर्जुनाचा प्रश्न तयार होतो. येथेच Change of level आहे.

*मनोवश ते आत्मवश

*अयुक्त ते युक्त

*द्वन्द्व ते निर्द्वन्द्व

अर्जुनाला स्वतःच्या जीवनाची ओळख होते, चेतना जागृति होते(स्मृतिर्लब्ध्वा) व माझ्या माध्यमातुन ईश्वरकार्य घडणार आहे या सत्यावर विश्वास येतो. म्हणुन म्हणतो, "करिष्ये वचनं तव।"

नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा त्वत् प्रसादात् मया अच्युत।
स्थितोअस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव।।(१८-७३)

"The man who has submitted his will and purposes entirely to God, carries God with him in all his works and in all circumstances. "

-Meister Eckhart

**********

(१८-७६)

***********************

राजन् संस्मृत्य संस्मृत्य संवादम् इमं अदभूतं।

केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुःमुहुः।।

*************************

१८-७६ :

"केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुःमुहुः"

(आनंद, भक्ति व वर्तमान ज्ञान)

वर्तमानात मनुष्याला आनंदाने जगायचे असते. याचा अर्थ १. जी क्रिया करतो त्यांत आनंद अनुभवायचा असतो. २. नित्य विकासमार्गावर असावे लागते. हाच समन्वय साधणारे भगवदगीता ज्ञान आहे.

संजय श्रीकृष्ण व अर्जुन यांचा संवाद ऐकतो व धृतराष्ट्राजवळ आपली प्रतिक्रिया व स्वतःचे मत व्यक्त करतो.

राजन् संस्मृत्य संस्मृत्य संवादम् इमं अदभूतं।

केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुःमुहुः॥(१८-७६)
अदभूत, रोमांचित करणारे, कल्याणकारी दिव्य संवाद पुनः पुनः आठवुन मी हर्षित होत आहे.

यानंतर म्हणतो, ईश्वराचे विश्वरुप पुनः पुनः आठवुन चित्ताला विस्मयाने हर्षित करीत आहे. (यांत वर्तमानाचे दर्शन घडविले आहे. ). ज्या बाजुने योगेश्वर श्रीकृष्ण व कर्तृत्ववान अर्जुन आहे, तेथे ऐश्वर्य, विजय, शक्ति आहे. तीच बाजु नीतिची आहे असे माझे निश्चित मत आहे.

भगवदगीता मनुष्यासाठी तिहेरी भूमिकेत उपयुक्त ठरते.

१. आनंद मिळतो.

भगवदगीता Song of God म्हणुन प्रसिद्ध आहे. गीत मनुष्याला रमविते.

२. ईश्वराच्या भक्तिचा लाभ होतो.

या विश्वाचे मुळ, प्रवर्तक, अध्यक्ष अशी ज्ञानविज्ञान या संदर्भात ईश्वराची ओळख जाणुन त्या ज्ञानात रमणे यामुळे ईश्वराच्या कृपाप्रसादाने बुद्धियोग लाभतो.

अहं सर्वस्य प्रभवः मत्त सर्वं प्रवर्तते।

ददामि बुद्धियोगं तं येन माम उपयान्ति ते।

३. वर्तमानात स्वतःच्या जीवनविकासमार्गाचे ज्ञान मिळते.
यामुळे निर्णय घेतांना, execute करतांना "जागृत" असतो. (जो निर्णय होतो तो firm असला तरच निष्ठेने, आनंदाने कार्यरत असतो) .
यतः प्रवृत्तिः भूतानां येन सर्वम् इदम् ततम्।
स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।।(१८-४६)

याप्रमाणे आनंदाने जीवन जगत असतांना नित्य विकासमार्गावर असण्याचा संदेश भगवदगीता देते .

*********

(१८-७८)

************************

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।

तत्र श्री: विजयो भूतिः धृवा नीतिः मतिः मम ।।

**************************

(१८-७८) :

" यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः "

(जेंव्हा चांगलेपणा सक्षम होतो.. )

ऐहिक सुख कर्तृत्वाने मिळते. ईश्वर, अध्यात्म हे विषय ऐहिक सुखासाठी उपयुक्त नसतात असा समाजात समज असतो. जीवनांत ईश्वराचा आश्रय कशासाठी?या प्रश्नाचे उत्तरच संजयाने भगवतगीतेतील शेवटच्या Verse मध्ये स्पष्ट केले.

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।

तत्र श्रीः विजयो भूतिः धृवा नीतिः मतिः मम।।(१८-७८)

अर्थात जेथे अर्जुनासारखा कर्तृत्ववान सत्पुरुष आहे, त्याला सोबत (शक्तिवर्धन करणारा, साहस वाढविणारा) योगेश्वर

कृष्णाच्या रुपात ईश्वर आहे, तेथे वैभव, यश, शक्ति, धर्मदृष्ट्या नीति निश्चित आहे.

१. ईश्वर हा अंशरुपाने मनुष्याच्या प्राणतत्वातच स्थित आहे. याच ईश्वराची ओळख नसते. म्हणुन सकाम अवस्थेत (अयुक्त, Lower consciousness) मध्ये जगत असतो.
अवजानन्ति माम् मुढा मानुषीं तनुम् आश्रितम्।
परम् भावम् अजानन्तो ममभूतमहेश्वरम् ॥(९-११)

याच ईश्वराची (विश्वाचा अध्यक्ष) ओळख प्रकृतिचे ज्ञानविज्ञान व त्या प्रकृतिचा अध्यक्ष याप्रमाणे ज्ञानविज्ञानासह भगवतगीतेत केलेली आहे. याच आधारावर "आत्मनो मोक्षार्थ" हे विकासमार्गाचे रहस्य आहे. यासाठी मनुष्याने स्वतःचा बंधु व्हावे, स्वतःशी शत्रुवत आचरण करु नये अर्थात आत्मवश असावे व नित्य आत्मोन्नतिच्या मार्गावर (अमृतत्वाय कल्पते) असावे हा संदेश आहे. या मार्गावर शक्तिसंचय(योग-दुःखान्त) होतो व (विचलित न करणारी) शांति लाभते. हीच(शाश्वत) सुखाची साधना असते. या अलौकिक शक्तिला भूति असे संबोधन आहे.

२. कार्यकौशल्य :

मनुष्यजीवन कर्माने बद्ध आहे. योगक्षेम चालविण्यासाठी कर्म करतो म्हणजे स्वावलंबि असतो. निष्क्रियतेमुळे परावलंबि होतो. पांडवांना याच स्वावलंबनाच्या अधिकारापासुन कौरवांनी वंचित केले होते. यामुळे धर्मयुद्ध ठरते. समाजातील शोषण मनुष्याला स्वावलंबनाच्या अधिकारापासुन वंचीत करते. याच संदर्भात कर्म करण्याचा अधिकार (निर्णयअधिकार) हा भगवतगीतेतील महत्वाचा संदेश आहे.

Beggars are not choosers.

अर्थात जीवनात स्वावलंबि असणे महत्वाचे असते. दान त्रिविध(यज्ञदानतप)कर्मातील एक कर्म आहे. स्वावलंबि असलेलाच दान करु शकतो.

निष्क्रियता, परावलंबन ऐश्वर्यापासुन वंचीत करते. अर्जुन चांगला सत्पुरुष असतो. याचमुळे युद्धक्षेत्रावर दुःखी होतो व युद्ध करणे हा अनीतिचा मार्ग आहे. असे संबोधन करतो. मला कांही नको म्हणुन निष्क्रियता श्रेयस्कर समजतो, नीति समजतो. याच पार्श्वभूमिवर भगवतगीता सुरु होते.

प्रत्यक्षात चांगलेपणा येथे दुबळी ठरते. निष्क्रिय ठरते. या विश्वातील सर्वात मोठा अडथळा हाच आहे. भोगैश्वर्याच्या स्पर्धेत असणारे सृष्टिसंचलनात अडथळे निर्माण करतात व ईश्वराच्या(विश्वाचा अध्यक्ष) कार्यातीलच हा अडथळा असतो. हे अडथळे दुर करण्यासाठीच चांगलेपणा सक्षम व्हावा लागतो व याचसाठी ईश्वराची सोबत(आश्रय) महत्वाची असते.

योग्य-अयोग्य या संदर्भात चांगले-वाईट असे वाद समाजात असतात. चांगल्या मनुष्याला भगवतगीता या वादाच्या(द्वन्द्व) पलीकडे घेवुन जाते. या स्थितिला बुद्धियुक्त संबोधले आहे. या स्थितित निष्काम कर्म असते.
युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।(५-१२)

संस्कार या संदर्भात "युक्त" निष्काम कर्म, कार्याचा एकनिश्चय, "योगः कर्मसु कौशलम् " अर्थात हा शक्तिसाधनेचा मार्ग असतो.

व्यवहारात मनुष्य सकाम स्थितित असतो. म्हणुन कार्याचा एकनिश्चय होत नाही. जीवनमुल्ये (स्वावलंबन, वचन, स्वधर्म) मार्ग निश्चित करतात. निष्काम कर्मासाठी Higher

consciousness /पातळीबदल आवश्यक असतो. याचसाठी युक्त स्थितिचे(आत्मवश) प्रयोजन असते.

३. यश(विजय)

ईश्वर विश्वाचा अध्यक्ष या नात्याने चांगल्या मनुष्याच्या जीवनाची स्थिति ईश्वरगतिचा परिणाम असतो. चांगल्या मनुष्याची लढाई त्याच्या मनोदुर्बलतेविरुद्ध असते. नियतकार्य ईश्वराचे कार्य जाणुन त्याला समर्पित करणे हा भगवतगीतेचा संदेश आहे. जगतहीताय हे ईश्वराचेच कार्य असते. म्हणुन प्रबळ आत्मविश्वास हवा. ज्या बाजुला ईश्वर आहे ती बाजु जिंकणार कारण हे कार्य जगतहीताय/सर्वभूतहीतेरतः होत असते.

तस्मात् त्वम् उत्तिष्ठ यशो लभस्व ।(११-३३)

War is won in the mind first.

४. अहंकारामुळे संशय/नकारात्मक

अहंकाराचा(Egomind) असल्यामुळे चांगला मनुष्यही संशयामुळे नकारात्मक होतो. संशयमुक्ति, आत्मविश्वासधारणा यासाठी ईश्वराचा आश्रय महत्वाचा ठरतो.

ज्ञानसञ्च्छिन्नसंशयम् ।(४-४१)

नाशयामि आत्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता।(१०-११)

सार : चंचल मनामुळे चांगला मनुष्यही निष्क्रिय होतो. अज्ञानाला ज्ञान संबोधतो. जगाचा इतिहास कर्तृत्वाने लिहिल्या जातो. कर्तृत्व या संदर्भातील मानवी error दुर करण्यासाठी विश्वसंचालक असलेल्या ईश्वराशी जोडणे याचे महत्व भगवतगीता स्पष्ट करते.

*********

(१८-७८)

: "तत्र श्री: विजयो भूतिः धृवा नीतिः मतिः मम "

एकीकडे अर्जुन(दुःखी अवस्थेत) म्हणतो, मला श्री(राज्य)नको, विजय नको.

न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च।(१-३१)

तर स्मृति(ज्ञान) प्राप्त झाल्यावर अर्जुन युद्धास तयार झालेला पाहुन संजय म्हणतो, ज्या बाजुने अर्जुन आहे, योगेश्वर श्रीकृष्ण आहे, त्यांचा विजय निश्चित, त्याला अर्थलाभ, त्याच बाजुने नीति आहे.

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।
तत्र श्री: विजयो भूतिः धृवा नीतिः मतिः मम ॥(१८-७८)

या दोन भाष्याचा(Pre knowledge & Post knowledge) तुलनात्मक विचार केला तर भगवतगीतेचा संदेश कळतो.

१. कार्य ठरविणे(Decesion, Determination) व प्रत्यक्ष कार्य करणे (Execution) असे दोन भाग कार्याचे असतात. व्यवहारात कार्य ठरविण्यासाठी योग्य अयोग्यचा विचार होतो. पण प्रत्यक्ष कार्य Execute करतांना कार्यातील योग्य-अयोग्य हा विचार(जे चंचलतेचे कारण ठरते) मागे पडुन दृढनिष्ठा असेल तरच निष्ठेने कार्य घडते.

२. व्यवहारातील "योग्य-अयोग्य "याच आधारावर धर्मयुद्ध ठरले होते. पण अर्जुनासाठी हाच योग्य अयोग्यचा विचार डोके वर काढतो. व युद्ध करणे धर्मविरोधी अर्थात अनीति आहे असे भाष्य

करतो. जणु राज्य, विजयाची इच्छा हेच अनीतिचे कारण आहे असा अर्जुन विचार करतो व दुःख टाळण्यासाठी राज्य, विजय याचा त्याग करण्यास तयार असतो.

कोणतेही कार्य प्राप्तिसाठी केल्या जाते या विचारसरणीनुसार राज्य, विजय हा कार्यातील फलविषयक (परिणाम) विचार असतो. याच(परिणाम) विचाराने अर्जुन आपल्या नियतकार्याला अनीतिचे कार्य ठरवितो. व निष्क्रियतेचे समर्थन करतो.

३. संजय म्हणतो, राज्य, विजय प्राप्ति निश्चित व हीच नीतिची बाजु आहे. याचाच अर्थ ज्या कार्याला अर्जुन अनीति ठरवितो, त्याच कार्याला संजय नीति ठरवितो.
ज्या बाजुने श्रीकृष्ण ती बाजु नीतिची.
ईश्वरासाठी सर्व सारखे आहेत, पण कार्य करतांना जो कार्याद्वारे भजतो त्याचे बाजुने तो असतो. प्रत्यक्ष कार्य Execute होतांना निष्ठेने कार्य घडते.

समो अहं सर्वभूतेषु न मे द्वेष्यो अस्ति न प्रियः।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु च अपि अहं।।(९-२९)

४. चुकीचे असले तरी ते कार्य करण्याचे भय वाटत नाही! पण चांगल्या व आवश्यक कार्यासाठी भय, Excuses! असे समाजात दर्शन होते. म्हणुन चांगल्या कार्यासाठी, मनुष्यासाठी निर्भयता महत्वाची असते. व याचसाठी कार्याद्वारे भक्तिचे शास्त्र भगवतगीता सांगते. (त्रायते महतो भयात् ).

५. याप्रमाणे कार्य ठरवितांना योग्य अयोग्यचा विचार होतो. पण कार्य प्रत्यक्षात घडण्यासाठी फलत्याग/निष्काम/समर्पण होण्यासाठी कार्याद्वारे भक्ति महत्वाची असते. व ही संवय होण्यासाठी नेहमी योगयुक्त असणे अर्थात ईश्वराचा आश्रय महत्वाचा असतो. या ज्ञानाने संशय मिटतो. मार्ग दृढ होतो.

योगसंन्यस्त कर्माणं (कार्याद्वारे भक्ति)

ज्ञानसंच्छिन्न संशयम् (निश्चय)

"God always gives His best to those who leave the choice with him. "

Jim Elliot

******

"भगवद्गीता परिवर्तनाचे व्यवस्थापन  " पुस्तकावरील
मान्यवरांच्या प्रतिक्रिया

*वा!

देणाऱ्याने देत जावे  घेणाऱ्याने

घेत जावे !

काका आम्ही सतत घेत गेलो !

तुम्ही सतत देत गेलात !

आम्हाला ज्ञानसमृद्ध करत राहीलात !

कशाचीही अपेक्षा नाही !

व्यवस्थापन शास्त्र व भगवत् गीता यांचा असा परस्परमेळ

आजवर कोणीही घातलेला नाही !

आपण हे शिवधनुष्य उचलले नी बघता बघता पूर्णत्वास नेले !

या सगळ्या प्रवासाचा मी साक्षीदार आहे हे माझे महत् भाग्य !

आठवणीने इ~बुक पाठवले अन् माझी प्रतिक्रिया सामील केलीत आपले खूप खूप आभार

-डॉ.लक्ष्मिकांत कोर्टिकर(M.D.Ayurved) अहमदनगर

***

भगवदगीता ......

पुस्तक रूपात आल्याने सगळयांनाच याचा आनंद मिळेल. श्री भगवत गीता ही केवळ अध्यात्मिक दृष्ट्या न बघता, ती रोजचे जीवन जगताना, अनेक निर्णय घेताना, सुख दुःख अनुभवताना , आपली मार्गदर्शक ठरू शकते ... हा दृष्टिकोन या पुस्तकातून मिळतो. आजच्या तरुण पिढीसाठी हे पुस्तक खूपच महत्वाचे मार्गदर्शक आणि हितचिंतक ठरेल .

प्रा.सौ.मेघनाताई ढेरे पुणे

**मित्रहो, पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?**

हो! आम्ही म्हणतो वाचनाने माणूस शहाणं होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. प्रत्यक्ष अनुभवासारखा शिक्षक नाहीच. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.  एक एक पुस्तक म्हणजे व्हिटामिनची एक एक गोळी असते असं समजा. शहाणं करून सोडणारं व्हिटामिन. आणि जसे इतरांचे अनुभव तुम्हाला

शहाणं करतात तसे तुमचे अनुभव इतरांना सांगून त्यांना शहाणं करायचं काम तुम्ही करू शकता. तुम्ही तुमचे अनुभव लिहून ई साहित्यकडे पाठवा. बाकी सर्व आम्ही बघू.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

www.esahity.com

www.esahity.in